डॉ. अरुणचंद्र शं. पाठक
कार्यकारी संपादक व सचिव
दर्शनिका विभाग

श्री. आनंद कुलकर्णी, (भा.प्र.से.)
प्रधान सचिव
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग

# निवेदन

नांदेड जिल्हा दर्शनिका (गॅझेटिअर) दोन भागात या विभागाने तयार केले असून त्याची ई-बूक आवृत्तीसुध्दा उपलब्ध करुन देताना आनंद होत आहे. या मालिकेतील हे नववे पुष्प आहे. जिल्ह्याची सर्वांगिण माहिती विविध छायाचित्रे व नकाशांसह उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

परिवर्तित होणाऱ्या व गतीने पुढे जाणाऱ्या विश्वाबरोबर शासनाचा हा विभागसुध्दा वाटचाल करीत असल्याचे या ई-बूक विषयक कामामुळे स्पष्ट होईल.

जिल्ह्याची भौगोलिक व भूशास्त्रीय वैशिष्टये, ऐतिहासिक पार्श्वभूमी, मुक्ती आंदोलनातील योगदान तसेच जिल्ह्यातील लोक, त्यांच्या परंपरा व समाजजीवन, कृषी व जलसिंचन या क्षेत्रातील वाटचाल, शंकर सागर जलाशयाचे वैशिष्टय, राज्य पातळीवर उद्योगक्षेत्रात असलेले या विभागाचे स्थान स्पष्ट करणारे अनेक तपशील या ई-बूकमध्ये दिले आहेत. बँक व्यवसाय, वाणिज्य व व्यापार आर्थिक विकास, सेवाक्षेत्रातील कामे, जिल्ह्याची सांस्कृतिक परंपरा, साहित्य तसेच जिल्ह्यातील विविध प्रेक्षणीय स्थळे यांचे तपशील नोंदविणारी ही दर्शनिका सर्व अभ्यासक, संशोधक व विशेषत्वाने विद्यार्थी यांच्यासाठी उपयुक्त ठरेल असा विश्वास वाटतो. या ई-बूक निर्मितीसाठी सातत्याने प्रोत्साहन दिल्याबद्दल मी मा. ना. श्री संजय देवतळे (मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य), मा. ना. श्रीमती फौजिया खान (राज्यमंत्री, सांस्कृतिक कार्य व अन्य विभाग), श्री. आनंद कुलकर्णी (प्रधान सचिव, सांस्कृतिक कार्य) व अन्य सहकाऱ्यांचे ऋण व्यक्त करतो.

अरुणचंद्र शं. पाठक
कार्यकारी संपादक व सचिव

महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर

# नांदेड जिल्हा

## गॅझेटिअर

[भाग १]

दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई

नांदेड जिल्हा

[भाग १]

महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर

दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन

# नांदेड जिल्हा
# गॅझेटिअर
## (भाग-१)

महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर

महाराष्ट्र शासन

# नांदेड जिल्हा

(भाग - १)

संपादक

**अरुणचंद्र शं. पाठक**

एम. ए., एम. फिल., पीएच. डी.

**दर्शनिका विभाग**

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग

महाराष्ट्र शासन, मुंबई.

२०११

# महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर
# नांदेड जिल्हा

प्रथम आवृत्ती ( इंग्रजी ) : १९७१
प्रथम आवृत्ती ( मराठी ) : २०११
जिल्हा दर्शनिका खंड-नऊ

**प्रकाशक :**
श्री. आनंद कुलकर्णी
अध्यक्ष, संपादक मंडळ, दर्शनिका
प्रधान सचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,
महाराष्ट्र शासन, मुंबई.

( सर्व हक्क प्रकाशकांचे स्वाधीन. )

**मुद्रक :**
व्यवस्थापक
शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय
मुंबई.

**कार्यालय :**
दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन,
२७, बरजोरजी भरुचा मार्ग, फोर्ट,
मुंबई ४०० ०२३.

**संकेत स्थळ :** www.maharashtra.gov.in
**ई-मेल :** stategazetteers_maharashtra@yahoo.co.in

**ग्रंथ मिळण्याची ठिकाणे :**
(१) शासकीय ग्रंथ भांडार, नेताजी सुभाष रोड,
मुंबई ४०० ००४.
(२) शासकीय मुद्रणालय व ग्रंथ भांडार, सिव्हिल लाईन्स,
नागपूर ४४० ००१,
(३) शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथ भांडार,
पुणे ४११ ००१.
(४) शासकीय मुद्रणालय व ग्रंथ भांडार,
औरंगाबाद ४३१ ००१.
(५) शासकीय मुद्रणालय व लेखन सामग्री भांडार,
ताराबाई पार्क, कोल्हापूर ४१६ ००३.

**किंमत रु.**

**टीप : ( सर्व पूर्वप्रकाशित ग्रंथांच्या ई-बुक आवृत्ती कार्यालयात उपलब्ध. )**

---

**या गॅझेटिअरमधील नोंदी तज्ज्ञ सहयोगकर्ते लेखक तसेच कार्यालयातील संदर्भ साहित्य, शासकीय, निमशासकीय कार्यालयांनी पुरविलेल्या माहितीआधारे केल्या असून त्या संपादक मंडळ सदस्यांनी तपासल्या आहेत.**

## आभार

नांदेड जिल्हा दर्शनिकेची निर्मिती होत असताना कार्यरत असणाऱ्या संपादक मंडळाचा मी आभारी आहे. याशिवाय या जिल्हा दर्शनिकेशी संबंधित असलेल्या या पूर्वीच्या संपादक मंडळातील ज्येष्ठ सदस्य डॉ. म. के. ढवळीकर, कै. डॉ. भा. ल. भोळे, डॉ. नागोराव कुंभार, डॉ. श्रीनिवास ओमनवार, डॉ. जयकुमार मगर, डॉ. शेषराव मोरे यांच्या सहकार्यासाठी मी ऋणी आहे.

डॉ. गो. बं. देगलूरकर

डॉ. रा. श्री. मोरवंचीकर

श्री. स. दि. महाजन

डॉ. के. बी. पाटील

डॉ. एस. जी. देवगांवकर

डॉ. भागवतराव डेंगळे

डॉ. डी. व्ही. जहागिरदार

डॉ. श्रीनंद बापट

डॉ. सुनिल पुरी

डॉ. श्रद्धा कुंभोजकर

डॉ. प्रभाकर देव (जिल्हा स्वीकृत सदस्य, नांदेड)

श्री. मदन धनकर (जिल्हा स्वीकृत सदस्य, चंद्रपूर)

Maharashtra State Gazetteers

## अनुक्रमणिका

**प्रस्तावना**

**ऋणनिर्देश**

**प्रकरण १ : भूगोल** **१**

भौगोलिक स्थिती, प्रशासकीय रचना ३; प्राकृतिक पर्यावरण ९; भूप्राकृतिक स्थिती १५; भूशास्त्र २१; भूजल २५; हवामान २८; वनक्षेत्र ३०; वनसंपदा ३४; प्रमुख वनसंपदेची यादी ५२; वनीकरण योजना ८७; प्राणीसृष्टी ८९; वन्यप्राणी ९२; सरपटणारे प्राणी ९५; मत्स्यव्यवसाय ९८; तक्ते १०५.

**प्रकरण २ : इतिहास** **१११**

**प्राचीन काळ :** प्रागैतिहासिक काळ ११२; हवामान ११४; प्राचीन राजवंश ११५; वाकाटक कालखंड ११९; राष्ट्रकूट कालखंड १२१; कल्याणी चालुक्य १२४; कलचुरी कालखंड १२७; यादव कालखंड १२८; परिसरातील काही मांडलिक घराणी १३०; प्रशासकीय विभाग १३२; विद्याकेंद्र १३४.

**मध्ययुगीन कालखंड :** मुस्लिम सलतनतीचे स्वरूप १४१; संस्कृती समन्वयाचा प्रारंभ १४३; वतनदारीचा प्रारंभ १४४; गोंड राजांनी बहमनी सत्तेला केलेला विरोध १४७; बहमनीचे राजकारण १४८; महमंद गवानचे लष्करी ठाणे १५०; नांदेड परिसर मुघलांकडे १५३; सुभे तेलंगणाची सुभेदारी नांदेडला १५४; १८ व्या शतकातील संघर्ष १५७; श्रीगुरु गोविंदसिंगजींचे नांदेड वास्तव्य १५९; मुघल दरबारातील राजकारण १६३; नांदेड निजामी राज्यात आले १६४; मराठे-इंग्रज-निजाम संबंध १६८.

**आधुनिक काळ (१८१८ ते १९४९) :** हटकरांचा स्वराज्य रक्षणार्थ झालेला संघर्ष १७०; भिल्ल, कोळी, रामोशींचे पराक्रम १७३; हैद्राबादच्या निजामी राजवटीतील प्रशासकीय सुधारणा १७६; समाजजागृतीची चाहूल १८०; राज्यातील दुष्काळ १८१; सामाजिक परिषद १८३; आर्यसमाजाचा प्रभाव १८४; साहित्यसंस्था व राजकीय परिषदा १८६; सामाजिक सुधारणांचा प्रयत्न १८८; हैद्राबाद स्टेट काँग्रेस स्थापना व बंदी १९१; नांदेडचे सत्याग्रही १९४; वंदे मातरम् आंदोलन, १९५; १९४२ च्या आंदोलनाचे पडसाद १९८; गोविंदराव पानसरेंचे हौतात्म्य २०१; झेंडा प्रकरण २०४; डोर्लीचा गोळीबार २०६; उमरी बँक ॲक्शन २०८; इस्लापूर ॲक्शन २१०; निजामी सत्ता झुगारणारी गावे २१२.

**परिशिष्ट (१)** जिल्ह्यातील वतनदार २१५

**परिशिष्ट (२)** हुतात्मा स्मारक २१८

**प्रकरण ३ : लोक** **२२३**

लोकसंख्या २२३; राहणीमान २५१; हिंदू समाजजीवन २५५; सण व उत्सव २५७; प्रमुख जाती व जमाती २६२.

**प्रकरण ४ : कृषि व जलसिंचन** **३०१**

कृषक लोकसंख्या ३०१; पर्जन्य ३०२; मृदा ३०४; सहकारी शेती ३११; पीके ३१२; कडधान्य ३१८; तेलबिया ३२१; फलोत्पादन ३३०; खते ३३२; जलसिंचन ३३३; पशुसंवर्धन ३५१; दुग्धव्यवसाय ३६०; कुळ वहिवाट व भूधारणा ३६३; कृषि शिक्षण व संशोधन ३६९; नैसर्गिक आपत्ती ३७५; तक्ते ३८०.

Maharashtra State Gazetteers

(सहा)

**प्रकरण ५ : उद्योगधंदे** **३८९**

औद्योगिकीकरणाचा इतिहास ३८९; वीज निर्मिती व वितरण ३९५; खाद्यपदार्थांचे उत्पादन ४०१; वस्त्रोद्योग ४३८; लोकर व रेशीम उद्योग ४५१; कागद, कागदाच्या वस्तू, मुद्रण, प्रकाशने व संबंधित उद्योग ४५३; रसायने व रासायनिक पदार्थ ४५८, खाणकाम आणि दगड खाणकाम ४६१; रबर व प्लास्टिक उत्पादने ४६३; मूलभूत व मिश्र धातू ४६४; धातूच्या वस्तू व सुटे भाग ४६५; परिवहन सामग्री, यंत्रसामग्री व सुटे भाग ४६८; इलेक्ट्रिक, इलेक्ट्रॉनिक यंत्रसामग्री, साधने, उपकरणे व सुटे भाग ४६९; अधातू खनिज उत्पादने ४७०; लाकडाच्या वस्तू आणि फर्निचर ४७२; भांडवली वस्तू व यंत्रसामग्री दुरुस्ती ४७३; ग्रामोद्योग व कुटीरोद्योग ४७५; औद्योगिक वसाहती ४९५, कामगार चळवळ ५००; तक्ते ५०७.

**प्रकरण ६ : बँक व्यवसाय, व्यापार व वाणिज्य** **५५५**

प्रास्ताविक ५५५; सावकारी व्यवसाय ५५७; सहकारी चळवळ ५६३; उद्योगांना आर्थिक सहाय्य ५८२; कृषि अर्थ सहाय्य ५९३; विविध बँका ५९४; बँक पत योजना ५९६; राष्ट्रीय बचत योजना ६०१; व्यापार व वाणिज्य ६०२; कृषि उत्पन्न बाजार समिती ६०६; सहकारी विपणन ६२३; किरकोळ व्यापार ६२५; आठवडे बाजार ६२७; यात्रा ६२८; तक्ते ६३१.

**प्रकरण ७ : वाहतूक व दळणवळण** **६४७**

प्राचीन रस्ते आणि दळणवळणाची साधने ६४७; रस्ते विकास ६५२; राष्ट्रीय महामार्ग ६५३; राज्यमार्ग ६५७; प्रमुख जिल्हा मार्ग ६६९; रेल्वेमार्ग ६७१; महाराष्ट्र राज्य परिवहन ६७५; पर्यटकांसाठी सुविधा ६७८; डाक, तार आणि दूरध्वनी सेवा ६८१; तक्ते ६८५.

**प्रकरण ८ : आर्थिक विकास** **७३५**

उपलब्ध साधनसामग्री ७३५; कृषि अर्थव्यवस्था ७३७; जलसिंचन ७४६; जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार (सेवायोजन) ७५३; ग्रामीण विकासाचा कार्यक्रम ७५९; आर्थिक नियोजन ७७४; किमती व भावपातळी ७८७; मानव विकास निर्देशांक ७९९; तक्ते ८०२.

**प्रकरण ९ : प्रशासन** **८१५**

प्रशासकीय व्यवस्था ८१५; जमीन महसूल ८३४; भूमी अभिलेख विभाग ८४२; पोलीस ८४५; कारागृह प्रशासन ८४७; नगरसेना ८४८; न्यायालये ८५०; स्थानिक स्वराज्य संस्था ८५५; पंचायत राज ८५७; जिल्हा परिषद ८५८; ग्रामपंचायती ८६७; नगरपालिका ८७१; तक्ते ८८२; परिशिष्ट ८८८.

**संदर्भसूची** **८९९**

**सूची**

**छायाचित्रे**

Maharashtra State Gazetteers

## नांदेड जिल्हा गॅझेटिअर

### भाग १ नकाशे

(१) नांदेड जिल्हा - भारतातील स्थान

(२) नांदेड जिल्हा - प्राकृतिक

(३) नांदेड जिल्हा - प्राकृतिक

(४) नांदेड जिल्ह्यातील वनक्षेत्र

(५) नांदेड जिल्ह्यातील प्रमुख नद्या व जलसिंचन प्रकल्प

(६) नांदेड जिल्ह्यातील लोहमार्ग, राज्य महामार्ग व जिल्हा मार्ग

### आलेख

(१) जिल्ह्यातील साक्षरतेचे प्रमाण, (२) जिल्ह्यातील स्त्री-पुरुष प्रमाण

(३) जिल्ह्यातील अनुसूचीत जाती/जमातीच्या लोकसंख्येची तहसीलनिहाय टक्केवारी.

### भाग-१ छायाचित्रे

(१) **फलक-१**—महामहीम राष्ट्रपती यांच्या हस्ते शंकरराव चव्हाण यांच्या टपाल तिकीटाचे विमोचन.

(२) **फलक-२**—(अ) गुरुद्वारा रोषणाई, (ब) नवीन पूल व गोदावरीचे पात्र.

(३) **फलक-३**—(अ) माथुरी स्त्रीया नृत्य करताना, (ब) लोहा येथील बीबा उद्योग, (क) माथुरी स्त्रीया - पायातील अलंकार.

(४) **फलक-४**—(अ) नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका रुग्णालय, (ब) जिल्हा परिषद, नांदेड, (क) श्री. गुरु गोविंदसिंघजी अभियांत्रिकी महाविद्यालय.

(५) **फलक-५**—(अ) उड्डाण पूल, (ब) गोदावरी घाट

(६) **फलक-६**—(अ) किनवट येथील आदिवासी नृत्य, (ब) महिला बचत गट, (क) कपाशीचे शेत.

(७) **फलक-७**—(अ) शंकर सागर जलराय (विष्णुपुरी धरण), (ब) लाल कंधारी वळू, (क) साखर कारखान्याकडे ऊस वाहून नेणाऱ्या बैलगाड्या.

(८) **फलक-८**—रेणुकादेवी, माहूर.

(९) **फलक-९**—(अ) स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, (ब) विमानतळ प्रवेशद्वार, नांदेड, (क) गुरूद्वारा, नगीना घाट.

Maharashtra State Gazetteers

(१०) **फलक-१०**—(अ) शासकीय विश्रामगृह, नांदेड, (ब) मुख्य गुरुद्वारा, नांदेड, (क) डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड

(११) **फलक-११**—(अ) रेल्वे स्थानकासमोरील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भव्य स्मारक, (ब) रेल्वे स्थानक, नांदेड, (क) नांदेड येथील विमानतळ.

(१२) **फलक-१२**—हुतात्मे -(अ) दत्तात्रय देवीदास उत्तरवार, (ब) दत्तगिरी महाराज, (क) माधव एकलारे, (ड) गोविंद पाणसरे.

Maharashtra State Gazetteers

## प्रस्तावना

नांदेड जिल्हा गॅझेटिअर प्रकाशित करीत असताना मनस्वी आनंद होत आहे. या विभागाने केलेल्या सामूहिक परिश्रमाची ही फलश्रुती आहे. हा ग्रंथ ऐतिहासिक संदर्भसाहित्यात मोलाची भर घालील असा विश्वास वाटतो. तसेच जिल्ह्याच्या विकासविषयक भावी वाटचालींसाठी पायाभूत संदर्भ पुरविणारा ग्रंथ म्हणून उपयुक्त ठरेल. वास्तविक पाहता गॅझेटिअरनिर्मिती ही एक स्वतंत्र ज्ञानशाखा बनली आहे. गॅझेटिअरच्या संकल्पनेत होणारे परिवर्तन स्वाभाविक आहे. गॅझेटिअर म्हणजे प्राकृतिक भूस्वरूप, नद्या, वनसंपदा, स्थळांची भौगोलिक माहिती, लोकांच्या चालीरिती, इतिहास, अर्थव्यवस्था, महसूल, प्रशासन आणि पुरावशेषाचा तपशील पुरविणारा कोश ही मूळ संकल्पना प्रमाण मानून गॅझेटिअरची मर्यादा संकुचित करून चालत नाही. नवनवीन संशोधनातून विविध विषयांचे, पैलूंचे ऐतिहासिक दृष्टिकोनातून विवेचन करणे आवश्यक असते. नवीन साधनसामग्रीच्या आधारे राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक इतिहासावर नवा प्रकाश टाकणे अपरिहार्य ठरते. विद्यमान ग्रंथ या दृष्टिकोनातूनच लिहिण्याचा प्रयत्न केलेला असून मराठी जिल्हा गॅझेटिअर मालिकेतील हा नववा खंड आहे. गॅझेटिअर किंवा विश्वकोश हे अत्यंत उपयुक्त ठरणारे असे ग्रंथ असून त्याची विशिष्ट कालावधीनंतर पुनरावृत्ती होणे सर्वार्थाने उपयुक्त ठरते व त्या दृष्टिकोनातून नांदेड जिल्हा गॅझेटिअरची ही मराठी आवृत्ती उपलब्ध करून देण्यात येत आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात बॉम्बे प्रेसिडेन्सीमधील जिल्ह्यांसाठी गॅझेटिअर ग्रंथनिर्मिती झाली. पण निझाम डोमिनिअन्समधील मराठवाड्याच्या प्रत्येक जिल्ह्यासाठी असे स्वतंत्र गॅझेटिअर निर्माण करण्यात आले नाही. केवळ औरंगाबाद जिल्हा गॅझेटिअर फक्त सन १८९४ मध्ये प्रकाशित झाले ते पुनर्मुद्रित स्वरूपात या विभागाने उपलब्ध करून दिले आहे. इम्पिरिअल गॅझेटिअर ऑफ इंडिया, प्रोव्हिन्शिअल सिरिज, हैद्राबाद स्टेट या मालिकेत अत्यंत त्रोटक स्वरूपात मराठवाड्यातील तत्कालीन जिल्ह्यांविषयीच्या नोंदी करण्यात आल्या. स्वातंत्र्योत्तर काळात भारत सरकारने निश्चित केलेल्या आकृतिबंधाप्रमाणे नांदेड जिल्ह्यासाठी सन १९७१ मध्ये गॅझेटिअरची इंग्रजी आवृत्ती प्रकाशित करण्यात आली. याचे संपादन डॉ.भ.ग.कुंटे यांनी केले होते. तथापि, या आकृतिबंधाच्या स्वतःच्या काही मर्यादा होत्या. नांदेड जिल्हा दर्शनिका या मराठी आवृत्तीचे संपादन करताना विविध क्षेत्रात झालेल्या मूलगामी स्वरूपाच्या संशोधनाची व विकासविषयक वाटचालींची नोंद घेण्याचा प्रयत्न केला आहे.

नांदेड जिल्ह्याला स्वतःचे असे व्यक्तिमत्त्व लाभले आहे. मूळात महाराष्ट्र व आंध्राला संपन्न करणाऱ्या गोदावरीच्या नाभिस्थानावर वसलेला हा जिल्हा गोदावरीच्याच प्रवाहामुळे उत्तर व दक्षिण अशा दोन भागांत विभागला आहे. भौगोलिकदृष्ट्या मराठवाड्याच्या पूर्वेस असून त्याच्या पूर्व सरहद्दीवर आंध्रप्रदेशातील निजामाबाद व अदिलाबाद जिल्हे येतात. जिल्ह्याच्या दक्षिण बाजूला कर्नाटकातील बिदर जिल्हा आहे तर सर्वसाधारणपणे पश्चिमेला परभणी, हिंगोली व लातूर हे मराठवाड्यातील जिल्हे येतात. उत्तरेला विदर्भातील यवतमाळ जिल्ह्याची सरहद्द आहे. एकूण नांदेड जिल्ह्याचे भौगोलिक स्थान हे महाराष्ट्रातील मराठवाडा, विदर्भ आणि आंध्र, कर्नाटक यांच्या सीमारेषेवर असल्याचे जाणवते. परिणामतः सांस्कृतिक व भाषिक वाटचाल पाहता इथल्या राहणीमानावर सभोवतालच्या प्रदेशाचा परिणाम जाणवतो.

Maharashtra State Gazetteers

(दहा)

मूळात गोदावरीच्या काठावर वसले म्हणून नांदिकट - नांदिकड आणि नांदितट या संस्कृत शब्दापासून नांदेडची उत्पत्ती होते. उत्तर भारतातील नंद घराण्यानंतर मौर्य राजवंशाच्या सत्तेचा संबंध या भागाशी आला. तसेच शुंगांनीही विदर्भालगत असलेल्या या प्रदेशावर सत्ता प्रस्थापित केली असावी. गोदावरीच्या दोन्ही तीरावर वसलेले म्हणून नांदिकट अशी स्थलउत्पत्ती असलेल्या जिल्ह्याला संपन्न असा पौराणिक वारसा लाभला आहे. स्थानिक दंतकथांप्रमाणे नवनंदडेरा यापासून नांदेड झाले. त्यानुसार नांदेड हा नंदवंशाच्या साम्राज्याचा एक भाग असावा. बौद्ध साहित्याप्रमाणे बुद्धाच्या काळात असलेला बावरी हा साधक या भागातील होता. रामायण आणि महाभारताचादेखील जिल्ह्यातील नांदेड व कंधार या स्थानांशी लोकस्मृतीतून संबंध दर्शविला जातो. उनकदेव येथील शिलालेखात प्रभू रामचंद्राने येथील गरम पाण्याचा झरा त्रेतायुगात निर्माण केल्याची नोंद आहे. युगानयुगाचा संबंध या उष्णोदकाच्या झऱ्यांशी व माहूर येथील दत्तात्रय व रेणुका या स्थानांशी अवगुंठीत आहे. प्रागैतिहासिक काळातदेखील या जिल्ह्याचे अस्तित्व जाणवते. मध्याश्मयुगीन कालखंडामध्ये मानवाचा वावर या परिसरात होता. नांदेड जिल्ह्यातील गोदावरी, मांजरा, मण्याड या नद्यांच्या किनारी मध्यपुराश्मयुगीन मानवाच्या वसाहती होत्या. किवळा, शंखतीर्थ राहेगाव, वारंगा इत्यादी ठिकाणी मध्यपुराश्मयुगीन तसेच भोकर या गावी टेकडीच्या पायथ्याशी चर्ट जातीच्या दगडात बनविलेली उत्तरपुराश्मयुगीन हत्यारे सापडली. ही हत्यारे २० ते ३० हजार वर्षांपूर्वीची आहेत. अशी हत्यारनिर्मिती केंद्रेच या ठिकाणी असल्याचे पुरातत्त्वज्ञ मानतात.

सात-आठ लक्ष वर्षांपूर्वी भूगर्भजन्य हालचालींमुळे मूळ भीमेची उपनदी असलेली मांजरा नदी गोदावरीकडे आकर्षित झाली असे भूरिपिकी शास्त्राच्या आधारे तज्ज्ञांनी नोंदवले आहे. शंखतीर्थाच्या परिसरात आढळणारे अश्मीभूत स्वरूपातील उजव्या सोंडीचे शंख हे अशाच भूगर्भीय हालचालींची साक्ष देतात. असे असले तरी ताम्रपाषाणकालीन वसाहतींचे पुरावे मात्र उपलब्ध होत नाही. सन १९७१ चे गॅझेटिअर प्रकाशित करताना प्रागैतिहासिक कालखंडावरील कुठलेही संशोधन प्रकाशित नसल्यामुळे याबाबतची नोंद त्यात करण्यात आली नव्हती. ती यावेळी जाणीवपूर्वक घेतली आहे.

नांदेड जिल्ह्याने कै. शंकरराव चव्हाणांच्या रूपाने या राज्याला कार्यक्षम मुख्यमंत्री तसेच कर्तबगार केंद्रीय मंत्री विशेषतः गृहमंत्री लाभले. तर अशोकराव चव्हाण यांच्या रूपाने निर्मितीक्षम कार्याची दृष्टी असलेले मुख्यमंत्री लाभले होते. हे वर्तमानातले सत्य इतिहासकाळातसुद्धा वेगवेगळ्या राजवंशाच्या रूपात अधोरेखित झाले आहे. नांदेड जिल्ह्याचा अखिल भारतीय संपर्क सांचीच्या स्तूपावरील दानलेखातील नोंदीवरून स्पष्ट होतो. लुडर्स यादीत नांदेड येथील एकूण २३ दात्यांची नोंद सांची स्तूपावर उपलब्ध आहे. यावरून येथे बौद्धधर्म केंद्र असावे. नांदेड जिल्ह्याची नोंद अश्मक व पुढे कुंतल या जनपदाचा एक भाग म्हणून मिळते. उत्तर भारतातील नंद घराण्यानंतर मौर्य राजवंशाच्या सत्तेचा संबंध या भागाशी आला. ऐतिहासिकदृष्ट्या इ. स. चौथ्या शतकातील नांदेड जिल्ह्यातील कंधारची नोंद उपलब्ध आहे. पुरातत्त्वीय अवशेषांचा विचार करता नांदेड परिसरात सातवाहनकालीन पुरातत्त्वीय अवशेष मिळाले. विशेषतः असरजंग या ठिकाणी सातवाहन राजवंशाचे नाणे उपलब्ध झाले आहे. काळाच्या ओघात सातवाहन व क्षत्रप यांची सत्ता येथे राहिली. अमरावतीहून विदिशाकडे जाणाऱ्या राजमार्गावरील एक प्रमुख नगर म्हणून याचे महत्त्व होते.

नांदेड जिल्ह्याचा विकास गोदावरीच्या दोन्ही काठांवर झाला आहे. सातवाहन राजा हाल याने संपादित केलेल्या गाथासप्तशतीमध्ये या परिसरातील तत्कालीन लोकजीवनाचे प्रतिबिंब उमटल्याचे जाणवते.

वाकाटक राजांपैकी वाशीम शाखेच्या (वत्सगुल्म) राजा विंध्यशक्ती दुसरा याच्या ताम्रपटात नांदेड व परिसरातील गावांच्या दानांविषयीचा उल्लेख आहे. विंध्यशक्तीच्या कारकिर्दीत ३७ व्या वर्षी ताकालख्खोप्पक या गावाजवळील आकासपद्द या खेड्याचे दान दिले. ताम्रपटात नोंदवलेले हे गाव नांदिकडच्या उत्तर मार्गावर होते. या नोंदीप्रमाणे ताम्रपटात नांदेड परिसराचा उल्लेख चौथ्या शतकातील आहे. या परिसरातील विद्वानांना त्यांच्या विद्वत्तेसाठी म्हणून अग्रहाराचे दान मिळत असे हे विशेष. बदामीच्या चालुक्य कालखंडात पुलकेशीची सत्ता महाराष्ट्रावर व त्या अनुषंगाने या जिल्ह्यावरही होती. नांदेडचा नंद्याल असा उल्लेख या काळात मिळतो. या घराण्यातील विजयादित्याने गोदावरीकाठी नंद्याल येथे आपला लष्करी तळ उभारला होता. याच काळात देगलूर तालुक्यातील होट्टलचा उल्लेख पोट्टलिकनगर असा येतो. राष्ट्रकूट कालखंड हा नांदेडच्या इतिहासात अभिमानाने नोंदवावा असा काळ होता. वेरूळचे कैलास लेणे निर्माण करणाऱ्या या राजवंशाचे सत्ताकेंद्र कंधार येथे होते. या घराण्यातील कृष्ण तिसरा (इ.स.९३९ ते ९६७) हा राष्ट्रकूट राजा स्वतःला कंधारपूरवराधीश्वर असे म्हणवून घेत असे. या काळात एक राजधानीचे शहर म्हणून कंधारचा विकास झाला व दहाव्या शतकातील आदर्शनगररचनेचा मापदंड लावता येईल अशा प्रकारे शहराची उभारणी करण्यात आली. याविषयीचे तपशील येथील शिलालेखांत उपलब्ध आहेत. त्यांनी निर्माण केलेला जगतुंगसमुद्र हा जलाशय आजही कंधार येथे उपलब्ध असून महाराष्ट्राच्या जलव्यवस्थापनाच्या इतिहासात ही एक उल्लेखनीय बाब आहे. याच काळात महाराष्ट्रातील एकमेव कामदेवाचे मंदिर त्याने उभारले. शिवाय सर्व लोकाश्रय मंडप तसेच मध्य आशियातील सर्वांत मोठे असे क्षेत्रपालाचे मंदिर उभारले. सन १९८४ मध्ये करण्यात आलेल्या उत्खननातून २२ मी. लांब व १५ मी. रुंदीचे क्षेत्रपाल मूर्ती अवशेष उपलब्ध झाले. या सर्वांचे तपशील प्रथमच या गॅझेटिअर ग्रंथात एकत्रितपणे देण्याचा प्रयत्न झाला आहे.

कल्याणीच्या चालूक्य कालखंडामध्ये दहाव्या, अकराव्या व बाराव्या शतकात या जिल्ह्यात प्रामुख्याने देगलूर व बिलोली तालुक्यात संस्कृत भाषा व कन्नड लिपीतील जवळपास ३६ शिलालेख उपलब्ध झाले आहेत. या लेखांतून साधारणतः इ. स. १०७९ ते ११४८ पर्यंत चालुक्यांच्या विविध राजांची सत्ता येथे होती हे स्पष्ट होते. यामध्ये सोमेश्वर पहिला, दुसरा व तिसरा तसेच जगदेकमल्ल विक्रमादित्य सहावा या राजांच्या काळात विविध निर्मितीक्षम कामे अदमपूर, एकलारा, करडखेड, जुन्नी, तडखेळ, देवापूर, नरखेड, बिम्रा, होट्टल, येरगी, एताळा, सगरोळी, संगम या स्थानांवर करण्यात आली. नांदेड जिल्ह्याचा दक्षिण भाग हा प्रामुख्याने चालुक्यांच्या अधिपत्याखाली असल्याचे स्पष्ट होते व यातूनच कन्नड भाषिक प्रभाव तसेच सांस्कृतिक वैशिष्ट्ये या जिल्ह्यात सर्वदूरपर्यंत जाणवतात. चालुक्यांच्या काळात सोमलदेवी आणि बिज्जलदेवी या होट्टलच्या निवासी होत्या. याविषयीची अभिलेखीय नोंद उपलब्ध आहे. होट्टल या स्थानाचे महत्त्व बदामीच्या चालुक्यांपासून कल्याणीच्या चालूक्यांपर्यंत सातत्याने राहिल्याचे दिसते. सोमेश्वर पहिला, दुसरा, तिसरा, चौथा आणि सहावा विक्रमादित्य यांच्या लेखांतून या क्षेत्रातील त्यांचा प्रभाव स्पष्ट होतो. तर सोमेश्वर चौथा (सन ११८३

ते ११९०) चालुक्यांची दुसरी मांडलिक घराणी वन्हीकूल व वाजीकूल ही नांदेड परिसरातच नांदत होती. करडखेड येथे वन्हीकूल तथा पावककूल ही राजधानी होती. तर कलचुरी घराण्याचा एकमेव महत्त्वाचा अभिलेख जुन्नी येथे मिळाला असून बाराव्या शतकातील मराठवाड्याशी संबंधित या घराण्याची सत्ता या अभिलेखामुळे स्पष्ट होते.

यादव राजवंशाशी संबंधित अभिलेख अर्धापूर, उनकदेव, कंधार, मरळक, भोकर, माहूर या परिसरातील सत्ता स्पष्ट करतात. सिंघण यादवापासून रामचंद्र यादवांपर्यत या भागात यादवांची असलेली सत्ता प्रामुख्याने गोदावरी नदीच्या उत्तर भागात होती. महाराष्ट्रातील आंध्र-कर्नाटक असा सांस्कृतिक संपर्क असलेला व इतका मोठ्या प्रमाणात अभिलेखीय नोंद उपलब्ध होणारा असा हा जिल्हा आहे. यादवकाळामधील रट्टबल्लाळ हे मूळ अमरदकपूर म्हणजे औंढ्याचे घराणे. तेथे त्यांची राजधानी होती तर उप राजधानी अराध्यपूर (अर्धापूर) येथे होती. बल्लाळाचा सेनापती चाऊंड हा अर्धापूरचा निवासी होता. यादव राजा मल्लबी यास बल्लाळाने संकट काळात साहाय्य केले. अर्धापूर शिलालेखात बल्लाळाचा उल्लेख यादवराज्यस्थैराचार्य असा आला आहे. तर यादवकाळात कंधार हे देश या प्रशासकीय विभागाचे प्रमुख केंद्र होते. प्राचीन काळात राष्ट्रकूट राजा तिसरा याची कंधार ही राजधानी होती. तर होट्टल येथे काही काळ कल्याणीच्या चालुक्यांची राजधानी होती. रट्टबल्लाळाची अर्धापूर ही उपराजधानी होती तर चालुक्य काळात करडखेड (करडीकल्ल) येथे वन्हीकुळाची तथा पावककुळाची राजधानी होती. तसेच हे एक सहस्र मंडलाचे प्रशासकीय केंद्र होते. अशा प्रकारे पराक्रमी राजवंशाचे निवासस्थान म्हणून नांदेड जिल्ह्याचा उल्लेख करावा लागतो. या जिल्ह्यात बौद्ध व जैन संप्रदायाचे अस्तित्वदेखील येथील अभिलेखीय पुरावे स्पष्ट करतात. विशेषतः कंधार व करडखेड ही स्थाने. या काळातील दुसरे वैशिष्ट्य म्हणजे कंधार, होट्टल, सगरोळी, तडखेल, करडखेड येथील घटीकास्थान (पाठशाळा) व महाघटीकास्थानातून धर्मशास्त्रासारख्या विषयातील पारंगत तज्ज्ञ अभ्यासक व विद्यार्थी असल्याचे स्पष्ट होते. मठांची परंपरा ही कोलंबी येथील तांत्रिक मठ तसेच लिंगायतांच्या मठापर्यंत कायम राहिल्याचे दिसते.

मध्ययुगीन कालखंडातील या जिल्ह्याचे वेगळे वैशिष्ट्य स्पष्ट होते ते येथे विकसित झालेल्या माहूर आणि कंधार या किल्ल्यांमुळे. गोंडांनी बहमनीविरुध्द मोहीम उघडून संपूर्ण वऱ्हाड बहमनीपासून जिंकून घेतले. यावेळी माहूर परिसरात गोंडांची सत्ता विकसित झाली होती. पुढे बहमनींनी सन १४२६ मध्ये माहूर किल्ला परिसर ताब्यात घेतला. अहमदशहा खिलजी याने आपल्या सैन्यानिशी माहूरवर चढाई करून १४५६ पर्यंत माहूर परिसरात तळ दिला होता. याचप्रमाणे बहमनी सलतनतीचा वजीर महमूद गवान याने बहमनी राज्याची प्रशासकीय पुनर्रचना केली व आपले लष्करी ठाणे नांदेड शहरात ठेवले. त्यांनी बहमनी राज्याचे आठ सुभ्यांत विभाजन केले. यावेळी आजचा नांदेड जिल्हा माहूर या सुभ्याचा एक भाग बनला. नांदेड जिल्ह्याची उभारणी माहूर व तेलंगणा तरफेतूनच झाल्याची दिसते. पुढे कासिम बरीद याने बरीदशाहीची स्थापना करताना कंधार किल्ल्याचा आश्रय घेऊन तेथे सत्ताकेंद्र निर्माण केले असे दिसते. एकूण या जिल्ह्यातील मध्ययुगीन अभिलेखाचा विचार केला तर तुघलक, बहमनी व बहमनीच्या शाह्या, निजामशाही, आदिलशाही, इमादशाही यांचा सत्तासंघर्ष या परिसरात झाल्याचे दिसते. मोगलांनी निजामशाहीकडून सन १५७४ मध्ये संपूर्ण वऱ्हाड सुभा आपल्या नियंत्रणाखाली आणला

त्यावेळी नांदेड जिल्ह्यातील माहूर परिसर निजामशाहीचा एक भाग झाला. पुढे सन १६२२ मध्ये जहांगीरचा मुलगा राजपुत्र खूर्रम (शहाजहान) याने वडीलांविरुध्द बंड केले तेव्हा तो माहूर येथे आश्रयाला आला. माहूरचे किल्लेदार उदयराम आणि यादवराम यांनी त्याला आश्रय दिला. निजामशाहीचे मोठे केंद्र कंधार येथे होते. मोगलांनी निकराचा संघर्ष करून १७ मे १७३१ रोजी कंधार ताब्यात घेतले. तेलंगणा सुभ्याचे मुख्य केंद्र म्हणून नांदेड येथून कारभार होऊ लागला. आज मराठवाड्यातील दुसरे विभागीय केंद्र म्हणून नांदेडला असलेले महत्त्व या पार्श्वभूमीवर अधिक स्पष्ट होते. छत्रपती शिवरायांच्या सत्तासंघर्षात त्यांच्या पदस्पर्शाने ही भूमी पावन झाली असावी (१६७० च्या सुमारास वऱ्हाडवरील चढाईच्या वेळी) असे मत सेतुमाधवराव पगडी यांनी नोंदवले आहे. नांदेड परिसरातील मोगली हालचालींच्या नोंदी भीमसेन सक्सेना यांच्या 'तारीख-ए-दिलकुशा' या ग्रंथात मिळतात. मोगल काळात सन १७६० नंतर आजचा नांदेड जिल्हा नांदेड व माहूर अशा दोन सत्ताकेंद्रात विभागला होता. माहूरचा समावेश वऱ्हाडच्या सुभ्यात झाला तर नांदेडचा बिदर सुभ्यात. गुरू गोविंद सिंग हे शिखांचे दहावे गुरू १९ जुलै १७०८ रोजी नांदेड येथे आले. येथील वास्तव्यात हा परिसर त्यांच्या पदस्पर्शाने पावन झाला. १८ ऑगस्ट १७०८ या दिवशी त्यांच्यावर प्राणघातक हल्ला झाला व ७ ऑक्टोबर १७०८ रोजी ते पंचतत्त्वात लीन झाले. गुरू गोविंदसिंग यांनी गुरुग्रंथसाहेब हेच यापुढे शिखांचे गुरू व मार्गदर्शक असतील हे नांदेड येथे घोषित केल्यामुळे नांदेडला अनन्यसाधारण असे महत्त्व प्राप्त झाले. या गोष्टीला तीनशे वर्षे पूर्ण झाली असून त्रिशताब्दी महोत्सव साजरा करीत असताना दूरदर्शी नेतृत्वामुळे नांदेड परिसराचा विकास झाला आहे. विशेषतः गुरुद्वारा, गोदावरीचा घाट, विमानतळ परिसर विकसित झाल्याचे आपल्याला दिसते.

नांदेड व परिसराची नोंद युरोपियन प्रवासी ट्रॅव्हरनीअर याच्या प्रवासवर्णनातून मिळते. तो सन १६४५ मध्ये गोदावरी नदी पार करून नांदेड गावी आला. यावेळी मोगल सुभेदाराची परवानगी त्याला घ्यावी लागली. नदीकाठी असलेल्या किल्ल्यावर माणसांचा वावर होता व या तटबंदीच्या लगत गाव वसले होते असे तो नोंदवतो. त्यानंतर कॅप्टन फिट्झेराल्ड या इंग्रज अधिकाऱ्याने गुरु गोविंदसिंगांच्या गुरुद्वाराला इ. स. १८४० मध्ये भेट दिली. तो म्हणतो, शीखबाग आणि बाभुळबन यांच्या मधोमध हा गुरुद्वारा असून घनदाट जंगलातून पाऊलवाट आहे. निजाम संस्थानच्या ताब्यात हा जिल्हा होता. सन १७२४ मध्ये आजचा नांदेड जिल्हा हा नांदेड सरकार या नावाने ओळखला जाई. त्यात ४१ महल व परगण्यांचा समावेश होता. यामध्ये आंध्रातील अदिलाबाद व निजामाबाद जिल्ह्याचे काही क्षेत्रसुद्धा नांदेड सरकारचा भाग होता. कंधार येथे यावेळी गोपाळसिंग गौड घराण्याची सत्ता होती. निजाम-उल-मुल्क याला या गोपाळसिंग व दलबतसिंग याने मदत केली. निजाम मराठा संघर्षाच्या काळात नांदेडचे सुभा म्हणून असलेले महत्त्व कायम होते. नांदेड सुभ्यावर जमिलबेग खान हा सुभेदार होता. निजाम काळामध्ये ज्या प्रशासकीय सुधारणा हाती घेण्यात आल्या त्याचा भाग म्हणून नांदेड हा आठ तालुक्यांचा एक जिल्हा बनविण्यात आला. १८८१ मध्ये मूळ नांदेड सुभा नांदेड जिल्हा म्हणून औरंगाबाद सुभ्याचा एक भाग बनला. निजाम राजवटीबरोबर जो संघर्ष नांदेड जिल्ह्यात झाला तो अत्यंत रोमहर्षक असाच आहे.

(चौदा)

सन १८१८ नंतर साधारणपणे महाराष्ट्राच्या आधुनिक काळाची सुरुवात मानली जाते. या काळात निजामी हुकूमशाहीविरुद्ध भिल्ल, रामोशी, हाटकर यांनी केलेला उठाव उल्लेखनीय होता. सन १८०० मध्ये इंग्रज, मराठे, निजाम यांचा सत्तासंघर्ष सुरूच होता. सन १८१८ मध्ये नांदेड जिल्ह्यातील नोहा या ठिकाणी इंग्रज फौजांनी मेजर पिटमनच्या नेतृत्वाखाली हाटकरांचा उठाव मोडून काढण्यासाठी हल्ला केला. ८ जानेवारी १८१९ रोजी ब्रिटिश फौजांनी नोहा येथील नौसाजी नाईक याच्या किल्ल्याला वेढा घातला. ८ जानेवारी ते ३१ जानेवारीपर्यंत ब्रिटिशांच्या विरुद्ध नाईक याने दिलेला लढा हा उल्लेखनीय आहे. हौसाजी नाईक व त्याची पत्नी गंगाबाई यांची आहुती यात पडली. १८२२ मध्येसुद्धा माहूर गडावर एतद्देशीयांशी ब्रिटिशांचा संघर्ष झाला. कॅप्टन सर जॉन गार्डन याने हा किल्ला ताब्यात घेऊन निजामाकडे परत केला. सन १८४७ मध्ये कंधार किल्ल्यावरील राजा हणमंतसिंग गौड याने निजामी वर्चस्व झुगारून दिले. या सर्व पार्श्वभूमीवर सन १८५३ मध्ये इंग्रज आणि निजाम यांच्यात एक करार झाला. १८५७ च्या उठावाचे पडसाद नांदेड जिल्ह्यातही उमटले. नानासाहेब पेशव्यांकडून रंगराव नावाचा माणूस देगलूर येथे आला. त्याने स्वतःचे सैन्यउभारणीचा प्रयत्न केला. हा उठाव मोडून काढण्यात आला. सन १८६७ मध्ये हैद्राबाद राज्याचे पाच सुभे आणि १७ जिल्ह्यांत प्रशासनाच्या दृष्टीने पुन्हा विभाजन करण्यात आले. हैद्राबाद-मनमाड हा रेल्वेमार्ग सन १९०० मध्ये पूर्ण होऊन नांदेड येथे रेल्वे आली. याबरोबरच भारतीय स्वातंत्र्याच्या आंदोलनाचे पडसाद नांदेड जिल्ह्यात उठू लागले.

स्वातंत्र्य संग्रामाशी संबंधित असलेल्या सामाजिक परिषदेचे अधिवेशन नांदेड जिल्ह्यात कवाना येथे सन १८१८ मध्ये झाले. त्यावेळी जिल्ह्यातील रामराव मांजरकर, केशवराव गोळेगावकर, केशवराव कोरटकर, श्रीधर वामन नाईक, दे. ल. महाजन यासारख्यांनी या परिसरात सामाजिक परिषदेचे काम उभे केले. आर्य समाजाची चळवळ १९२०-३० या दशकात वाढताना दिसते. निजामी जुलूमशाहीविरुद्ध आर्यसमाजाच्या चळवळीत शंकरराव टेळकीकर, गुरुराव देशपांडे, रामदास कोळनूरकर यांच्यावर राजद्रोहाचा खटला झाला. यावेळी सन १९२१ मध्ये निजामाने गस्ती निशाण ५२, गस्ती निशाण ५३ अशा फर्मानांद्वारे स्थानिक जनतेला दडपून टाकण्याचा प्रयत्न केला. ५ मे १९३९ रोजी नांदेड येथे सत्याग्रह झाला. दुसरा सत्याग्रह १४ मे १९३९ रोजी झाला. या आर्यसमाजाच्या चळवळीची नोंद नांदेडच्या आधुनिक इतिहासाच्या दृष्टीने महत्त्वाची ठरते. जिल्ह्यातील उमरी, धर्माबाद, कंधार, देगलूर ही आर्य समाजाची सक्रिय केंद्रे होती. नांदेड जिल्ह्यात सप्टेंबर १९४३ मध्ये निजाम प्रांतीय मराठी साहित्य परिषदेचे दुसरे संमेलन झाले. यावेळी शंकरराव मोरे, वि. अ. कानोले हे प्रमुख होते. १९१७-१८ च्या दरम्यान 'नागरिक' हे पहिले वर्तमानपत्र नांदेडमधून निघाले तर सन १९४७ च्या दरम्यान ग. ना. आंबेकर यांनी 'प्रतोद' सुरू केले. दासगणूंच्या कीर्तनातून तसेच दे. ल. महाजनांच्या प्रवचनांतून जिल्ह्यांतील प्रबोधनाची चळवळ सुरू होती. स्वातंत्र्य आंदोलनातील वंदे मातरम ही चळवळ, १९४२ चे आंदोलन, आझाद हैद्राबादची चळवळ, याचबरोबर अर्जापूरजवळ गोविंदराव पानसरे यांच्यावर २१ ऑक्टोबर १९४६ मध्ये झालेला प्राणघातक हल्ला हे सर्व स्वातंत्र्य चळवळीला नवी दिशा देणारे ठरले. अशाच प्रकारे दत्ता उत्तरवार यांच्यावरील उमरी येथील बेधुंद गोळीबार, या गोष्टी निजामी सत्तेचे क्रौर्य स्पष्ट करणाऱ्या होत्या. नांदेड येथे १५ ऑगस्ट १९४७ रोजी रेल्वे स्टेशनवर

Marathwada Mitra Mandal's Publishers

तिरंगा फडकविण्यात आला. हदगाव तालुक्यातील डोरली या गावी लोकांनी झेंडा सत्याग्रह व जंगल सत्याग्रहाचा कार्यक्रम केला असताना त्यांच्यावर गोळीबार करण्यात आला. सन १९४८ च्या मार्च-एप्रिल मध्ये उमरखेडजवळ विड़ुळला नांदेड जिल्ह्यात आणखी एक कॅम्प सुरू करण्यात आला. अशाच चळवळी नांदेड, कंधार परिसरातदेखील होत होत्या. ३० जानेवारी १९४८ रोजी उमरी बँकवर केलेला हल्ला ही निजामी संघर्षाविरुद्धची एक यशस्वी लढाई होती.

निजामी सत्तेविरुद्ध स्वातंत्र्य पुकारून कयाधू आणि पैनगंगा नदीच्या खोऱ्यातील हदगाव तालुक्यांतील ३२ गावांनी १५ ऑगस्ट १९४८ रोजी आपले स्वातंत्र्य घोषित केले. शेवटी १७ सप्टेंबर १९४८ रोजी निजामाच्या शरणागतीने हा संघर्ष संपला.

नांदेड जिल्ह्याला लाभलेल्या वैशिष्ट्यपूर्ण भौगोलिक पार्श्वभूमीबरोबरच जिल्ह्याच्या किनवट व माहूर तालुक्यात बंजारा तसेच मथुरा बंजारा, गौंड, परधान, आंध हे आदिवासी प्रामुख्याने आढळतात. अल्पप्रमाणात भिल्लही आढळतात. निजामी राजवटीमुळे आलेल्या मागासलेपणाची जाणीव स्वातंत्र्योत्तर काळातील सर्व क्षेत्रात जाणवत राहते. असे असले तरी स्थानिक नेतृत्वातून विविध क्षेत्रांत नांदेड जिल्ह्याचा विकास झाला आहे. यातून रेल्वेचे विभागीय कार्यालय म्हणून नांदेड स्थानकाचे महत्त्व असून मुदखेड या स्थानकाचे जंक्शन म्हणून असलेले स्वरूप महत्त्वाचे ठरते. मराठवाडा जनता विकास परिषद, मराठवाडा रेल्वे संघर्ष समिती, जिल्हा रेल्वे संघर्ष समिती यामध्ये सक्रिय कार्यकर्ते म्हणून सुधाकरराव डोईफोडे व त्यांच्या सहकाऱ्यांचे योगदान उल्लेखनीय आहे. नांदेड जिल्ह्यात एकूण २२६.२१ कि.मी.लांबीचा रेल्वे मार्ग आहे.

नांदेड जिल्ह्याला जलव्यवस्थापनाची प्राचीन परंपरा लाभली असून राष्ट्रकूट काळात इ.स.च्या दहाव्या शतकात जगतुंगसमुद्र हा जलाशय कंधार येथे निर्माण करण्यात आला. चालुक्य व यादव राजवंशांनी या क्षेत्रात काम केले. यातून सगरोळी, अर्धापूर, माहूर या ठिकाणी जलाशय तर होट्टल, येरगी, येवती या ठिकाणी पुष्करणी व बारवांची निर्मिती झाली. यांपैकी बहुतांश वास्तू आजही अस्तित्वात आहेत. स्वातंत्र्योत्तर काळातील काही दशकांत झालेल्या सुनियोजित प्रयत्नांचा परिणाम म्हणून जिल्ह्यात विष्णपुरी हे उपसा सिंचन प्रकल्प मन्याड या प्रमुख प्रकल्पाबरोबर पूर्णा, उर्ध्वपैनगंगा, लेंडी हे आंतरराज्य प्रकल्प आहेत. तर मध्यम प्रकल्पांमध्ये अन्य प्रकल्पांबरोबर बाभळी प्रकल्पाचे काम सुरू आहे. एकूण जिल्ह्यातील प्रकल्पीय सिंचनक्षेत्र ४,३४,९९८ हेक्टर असून प्रकल्पीय सिंचनक्षेत्र लागवडीलायक क्षेत्राच्या ५० टक्के आहे हे विशेष. यातून विकसित होणारे कृषी क्षेत्र व उभारण्यात आलेली उस्मानशाही मिल व विविध साखर कारखाने हे नांदेड जिल्ह्याच्या विकासाच्या वाटचालीवरील विविध टप्पे आहेत. तर बचत गटाच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण व स्थानिक रोजगार या दृष्टीने जिल्ह्यात झालेले काम निश्चितच उल्लेखनीय आहे.

या जिल्ह्यात दासगणू महाराज, विष्णुकवी ही संतपरंपरा वरदानंदांपर्यंत येते. त्यांचे साहित्यक्षेत्रातील काम उल्लेखनीय आहे. तर कीर्तन परंपरेमध्ये धुंडामहाराज देगलूरकर, शंकरमहाराज खंदारकर (साधुमहाराज) यांचीही नोंद घ्यावी लागते. जिल्ह्यातील निर्मितीक्षम काम करणाऱ्यांच्या मालिकेत शामराव बोधनकर, दिगंबरराव बिंदू, पद्मश्री श्यामराव कदम तसेच भगवानराव गांजवे,

कॉ. व्ही. डी. देशपांडे यांची जाणीवपूर्वक नोंद केली आहे. साहित्य परंपरेमध्ये स. रा. गाडगीळ, नरहर कुरुंदकरांमुळे नांदेड जिल्ह्याला महाराष्ट्राच्या साहित्य विश्वामध्ये वेगळी प्रतिष्ठा निर्माण झाली. या सर्वांची नोंद करण्याचा प्रयत्न संस्कृती या प्रकरणामध्ये केला आाहे. शिक्षणविषयक वाटचालीमध्ये नांदेड येथील प्रतिभा निकेतन महाविद्यालय, पिपल्स कॉलेज, यशवंत महाविद्यालय तसेच देगलूर व कंधार येथील महाविद्यालयांचे कार्य उल्लेखनीय आहे. नांदेड येथे स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ हे विविध ज्ञानशाखेंचे मुख्य प्रेरणास्रोत ठरत आहे.

एकूणच जिल्ह्याची भौगोलिक वैशिष्ट्ये, इतिहास, संस्कृती, परंपरा, लोकजीवन, कृषी व जलसिंचन यांत असलेले जिल्ह्याचे योगदान, उद्योगधंदे, बँकव्यवसाय व व्यापार, वाणिज्य, वाहतूक व दळणवळण, रेल्वेचा झालेला विकास, आर्थिक क्षेत्रात झालेली प्रगती, प्रशासन, सामाजिक सेवा, संपूर्ण जिल्ह्याचा सांस्कृतिक वारसा, यांमध्ये संत साहित्य, साहित्य, क्रीडाक्षेत्र, इत्यादींचा सर्वंकष वेध घेण्याचा प्रयत्न झालेला आहे. प्रेक्षणीय स्थळांसंबंधी जिल्ह्यातील सर्व प्रेक्षणीय स्थळे विशेषतः पर्यटनाची संधी म्हणून ज्याकडे पाहता येईल अशा नांदेड, माहूर व कंधार या स्थानांची तपशिलात नोंद दिली आहे.

मूलतः गॅझेटिअरची सातत्याने होणारी वाटचाल आणि पुनरावृत्ती ही निरंतर सुरू असणाऱ्या संशोधन प्रक्रियेचा एक भाग ठरते. विभाग प्रमुखांसह कार्यालयातील सहकाऱ्यांनी प्रत्यक्ष केलेले सर्व्हेक्षण, विविध शासकीय, निमशासकीय पातळीवरून, संस्था व व्यक्तींकडून मिळालेली माहिती यांचे संकलन व संपादन करताना संपादक मंडळ सदस्यांकडून लाभलेले मार्गदर्शन यांतून हा ग्रंथ साकार झाला आहे. नांदेड जिल्हा गॅझेटिअर प्रकाशित करताना जाणीवपूर्वक विविध क्षेत्रांतील विकासविषयक माहिती येथे अधोरेखित करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. या गॅझेटिअरचे वैशिष्ट्य म्हणून ज्याची नोंद करता येईल त्यात ग्रामनिर्देशिकेचा उल्लेख करावा लागतो. या ग्रामनिर्देशिकेसह भारतीय जनगणना कार्यालयाने प्रकाशित केलेल्या ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ॲटलासमधील नांदेड जिल्ह्यातील तालुकाशः नकाशे व त्यात दर्शविलेले प्रत्येक गावाचे स्थान याचे मराठी रूपांतर प्रथमच प्रकाशित करण्यात येत आहे. शिवाय उपग्रहीय छायाचित्रे व नकाशे हे याचे वैशिष्ट्य म्हणून नोंदवता येईल. आजपर्यंत उपलब्ध झालेल्या एकूण अभिलेखांविषयीचा सारांशाने दिलेला तपशील जिल्ह्याच्या सांस्कृतिक वैभवाचे साक्ष देणारा व भावी अभ्यासकांना नवी दिशा देणारा ठरावा. एकूण माहितीच्या दृष्टीने वाढती पृष्ठसंख्या विचारात घेऊन ग्रंथ हाताळण्याच्या दृष्टीने ही दर्शनिका दोन भागांत प्रकाशित करण्यात येत आहे. ज्यात प्रथम भागामध्ये प्रकरण १ ते ९ यांचा समावेश असून दुसऱ्या भागामध्ये प्रकरण १० ते १२ आणि ग्रामनिर्देशिकेचा अंतर्भाव करण्यात आला आहे. या विभागाच्या वतीने पूर्वप्रकाशित सर्व राज्य गॅझेटिअर, जिल्हा गॅझेटिअर तसेच ब्रिटिशकालीन जिल्हा गॅझेटिअर हे ई-बुक आवृत्तीच्या स्वरूपात उपलब्ध असून महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर (www.maharashtra.gov.in) उपलब्ध करून देण्यात आले आहेत. या विभागाने केलेले काम निश्चितच उल्लेखनीय असून मराठी राज्य गॅझेटिअर ग्रंथांची दुसरी आवृत्तीदेखील प्रकाशित करण्यात आली आहे. 'महाराष्ट्र : लॅण्ड ॲण्ड इटस पीपल' हे राज्य गॅझेटिअर राज्याच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त प्रकाशित करण्यात आले आहे. विभागात जिल्हा गॅझेटिअर मालिकेमध्ये बुलडाणा व चंद्रपूर गॅझेटिअरचे काम सुरू आहे.

विविध विषयांची माहिती संकलित करताना प्रकाशनास थोडा विलंब होत असल्याने मंदन अवधी (Timelag) गेला आहे. यातील उणिवांची जाणीव ठेवून एका मर्यादेत ही दर्शनिका प्रकाशित करत आहे. मूळात गॅझेटिअर हा एक भौगोलिक कोश या प्रारंभिक संकल्पनेपासून ब्रिटिशकाळातील प्रशासनाच्या सोयीसाठी माहिती पुरविणारा ग्रंथ असे याचे असलेले स्वरूप बदलून शासनाचा समाजाभिमुख दृष्टिकोन विचारात घेऊन विविध क्षेत्रांत होणारा विकासविषयक संकल्पनेचा आराखडा मांडताना साहाय्यभूत होणारा ग्रंथ या दृष्टीने या दर्शनिकेची निर्मिती करण्यात आली आहे. तेव्हा नांदेड गॅझेटिअरमध्ये केलेला हा प्रयत्न अभ्यासू संशोधक, सामान्य नागरिक आणि प्रशासक यांना उपयुक्त ठरेल अशी आशा व्यक्त करतो.

मुंबई,
स्वातंत्र्यदिन,
१५ ऑगस्ट २०११.
(श्रावण कृ. २, शके १९३३)

**डॉ. अरुणचंद्र शं. पाठक**
कार्यकारी संपादक व सचिव.

Maharashtra State Gazetteers

## ऋणनिर्देश

भारतामध्ये गॅझेटिअर निर्मिती करताना ब्रिटिश शासनाने बॉम्बे प्रेसिडेन्सी आणि सेन्ट्रल प्रोव्हिन्सेस या दोन स्वतंत्र प्रशासकीय केंद्रांतून काम केले. त्यातून गॅझेटिअर निर्मितीच्या दोन स्वतंत्र परंपरा निर्माण झाल्या. असे असले तरी निजामी अंमलाखाली असलेल्या मराठवाड्यासाठी मात्र जिल्हानिहाय विस्तृत असे गॅझेटिअर लिहिले गेले नाही. केवळ औरंगाबाद जिल्ह्यासाठी निजाम डोमिनियन्सच्या वतीने औरंगाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर विस्तृतपणे सन १८९४ ला प्रकाशित झाले, व याचे पुनर्मुद्रण सन २००६ मध्ये केले आहे. स्वातंत्र्योत्तर काळात तत्कालीन मराठवाड्याच्या पाच जिल्ह्यांसाठी भारत सरकारने निश्चित केलेल्या आकृतिबंधाप्रमाणे 'गॅझेटिअर ऑफ इंडिया' या मालिकेतून सन १९७१ मध्ये नांदेड जिल्हा गॅझेटिअर प्रकाशित करण्यात आले.

मराठीमध्ये जिल्हा दर्शनिका (गॅझेटिअर) प्रकाशित करावयाच्या निर्णयाप्रमाणे सर्वप्रथम परभणी जिल्हा गॅझेटिअर प्रकाशित करण्यात आले. तर संयुक्त महाराष्ट्र निर्मिती नंतरच्या कालखंडात नव्याने निर्माण झालेल्या जिल्ह्यांपैकी प्रादेशिक भाषांतून सर्वप्रथम गॅझेटिअर निर्मितीचा मान सन २००८ मध्ये लातूर जिल्ह्याला मिळाला. नांदेड जिल्हा गॅझेटिअरचे मराठी सुधारित आवृत्ती विषयक काम कार्यालयात गेले काही वर्ष सुरू असले तरी प्रत्येक विषयाची माहिती संकलित होत असताना प्रकाशनास होत जाणारा विलंब यामुळे अपरिहार्यपणे मंदन अवधी (Time lag) गेलेला आहे हे मी नम्रपणे नमूद करतो. वस्तुतः ग्रंथ प्रकाशित होईपर्यंतच्या प्रक्रियेत विविध पातळ्यांवर अनेकांचे सहकार्य लाभले आहे. प्रामुख्याने जिल्हाधिकारी कार्यालय व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालय व अनुक्रमे डॉ. श्रीकर परदेशी, जिल्हाधिकारी व श्री. श्रावण हर्डिकर, मुख्य कार्यकारी अधिकारी यांची व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांची मी नोंद करायला हवी. अन्य शासकीय कार्यालय, निमशासकीय कार्यालय, संस्था तसेच मान्यवर अभ्यासक व जाणकार मार्गदर्शक, संपादक मंडळ सदस्य यांच्या मदत, मार्गदर्शन व सक्रिय सहभागाशिवाय ग्रंथ पूर्ण होणे शक्य नव्हते. सर्व पातळीवर हा सहभाग लाभला. या गॅझेटिअर ग्रंथाचे काही पैलू ठळकपणे अधोरेखित करता येतील जसे जिल्ह्यातील ग्रामांविषयीचे संपूर्ण तपशील पुरवणारी ग्रामनिर्देशिका (Directory of village and town) दिली आहे. यासाठी प्रामुख्याने जिल्ह्यातील सर्व गटविकास अधिकारी व ग्रामसेवकांचे सहकार्य मोलाचे ठरले आहे. नांदेड जिल्ह्याचे वैशिष्ट्य म्हणून जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात उपलब्ध होणारे कन्नड, देवनागरी, फार्शी भाषेतील शिलालेख यांची स्वतंत्र तालिका उपलब्ध करून दिली आहे.

नांदेड जिल्हा गॅझेटिअर ग्रंथनिर्मिती होत असताना संकल्प व कार्यसिद्धी दरम्यान दोन संपादक मंडळांचे मार्गदर्शन लाभले. त्यामध्ये डॉ. के. बी. पाटील, कुलगुरू, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांच्यासह ज्येष्ठ सदस्य म्हणून डॉ. म. के. ढवळीकर, डॉ. भा. ल. भोळे, डॉ. रा. श्री. मोरवंचीकर, डॉ. नागोराव कुंभार, डॉ. जयकुमार मगर, प्रा. स. दि. महाजन, डॉ. भागवतराव डेंगळे, डॉ. श्रीनिवास ओमनवार, डॉ. एस. जी. देवगावकर, डॉ. शेषराव मोरे यांचे सहकार्य लाभले. संपादक मंडळाची

नव्याने रचना होत असताना नांदेड जिल्ह्याशी संबंधित तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून प्रा. स. दि. महाजन, डॉ. भागवतराव डेंगळे यांच्याबरोबरच डॉ. प्रभाकर देव हे ज्येष्ठ अभ्यासक व कार्यप्रवण मार्गदर्शक म्हणून विभागास लाभले. तसेच नवीन संपादक मंडळामध्ये सर्वश्री डॉ. गो. बं. देगलूरकर, अध्यक्ष, डेक्कन कॉलेज, पुणे, डॉ. डी. व्ही. जहागिरदार या ज्येष्ठ अभ्यासकांबरोबर डॉ. सुनिल पुरी, डॉ. श्रद्धा कुंभोजकर, डॉ. श्रीनंद बापट या तरुण अभ्यासकांचे संपादक मंडळ सदस्य या नात्याने सहकार्य लाभले. या सर्वांनी केलेल्या सहकार्यासाठी मी ऋणी आहे.

विद्यमान ग्रंथामध्ये सहयोगकर्ते लेखक म्हणून पुढील मान्यवरांचे योगदान लाभले आहे. भूगोल या प्रकरणात जिल्ह्याची भौगोलिक वैशिष्ट्ये व भूशास्त्र या भागाचे लेखन नांदेड विद्यापीठाचे निवृत्त कुलगुरू डॉ. धनंजय येडेकर व त्यांचे सहकारी डॉ. कपले यांनी केले. जिल्ह्यातील वनसंपदेचे तपशील डॉ. वा. ना. नाईक यांनी नोंदवले आहेत, तर श्री. पांडे यांनी वन्यजीवांविषयी काही नोंदी केल्या. इतिहास प्रकरणात प्राचीन काळाचे लेखन डॉ. गो. बं. देगलूरकर यांनी केले. यासाठी त्यांनी केलेल्या विशेष अभ्यासातून व डॉ. हरिहर ठोसर यांनी लिहिलेल्या ग्रंथामुळे होट्टल ही काही काळ चालुक्यांची राजधानी राहिली होती हे प्रथमच नोंदविण्यात आले. जिल्ह्याच्या मध्ययुगीन व आधुनिक इतिहासाचे लेखन, शिलालेख सूची डॉ. प्रभाकर देव यांनी केले आहे. जिल्ह्यातील मध्ययुगीन शिलालेखांची तालिका डॉ. दिलीप बलसेकर, सहसंपादक यांनी केली आहे. जिल्ह्यातील मठ या विषयावर डॉ. सुनिल पुरी यांनी नोंद केली असून बहुतांश सर्वेक्षण डॉ. अ. शं. पाठक यांनी स्वतः केले आहे. उद्योगधंद्याविषयीचे लेखन जसे कार्यालयात झाले तसेच श्री. र. पु. कुरूलकर व डॉ. जयंत जोशी यांनीही आपले योगदान दिले आहे. संस्कृती प्रकरणामध्ये साहित्यावरील नोंद प्रा. स. दि. महाजन यांनी केली असून क्रीडाविषयक नोंद प्रा. नंदकुमार मेगदे यांनी केली आहे.

याशिवाय गॅझेटिअर ग्रंथनिर्मितीच्या प्रक्रियेत अनेकांचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहभाग राहिला आहे. प्रातिनिधिक स्वरूपात श्री. सुधाकर डोईफोडे, प्रा. यू. डी. कुलकर्णी, प्रा. प्रकाश मेदककर, श्री. अरुण किनगावकर, श्री. राम कोंडे तसेच डॉ. अनिल कठारे, डॉ. उत्तम सावंत, श्री. समुद्रगुप्त पाटिल यांचे सहकार्य लाभले असून श्री. सुरेश जोंधळे, डॉ. मोघे, जिल्हा प्रसिद्धी अधिकारी, छायाचित्रकार श्री. महेश होकर्ण, श्री. गिरीष ठक्कर, श्री. लक्ष्मीकांत तांबोळी, श्री. रवींद्र रसाळ, श्री. अतुल डोईफोडे, प्रा. जीवन कुलकर्णी ही व अशी अनेक नावे नोंदवता येतील. याशिवाय एक उल्लेखनीय नोंद म्हणजे महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन यांनी उपग्रहीय नकाशे उपलब्ध करून दिले. तर ग्रामनिर्देशिकेमध्ये या गॅझेअिरमध्ये प्रथमच जिल्ह्यातील प्रत्येक गावाचे स्थान दर्शविणारे तालुकाशः नकाशे आवश्यक तपशिलांसह दिले आहेत. 'भारतीय जनगणना कार्यालयाचे ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ॲटलास २००१' याचा वापर केला असून त्यासाठी भारत सरकारच्या जनगणना कार्यालयाच्या सौजन्यासाठी ऋणी आहे. संचालक, राज्य पुरातत्त्वीय विभाग यांनी जिल्ह्यातील संरक्षित स्मारकांचे नकाशे दिले आहेत.

विद्यमान ग्रंथाच्या संकलन व प्रकाशन प्रक्रियेमध्ये मला साहाय्य करणारे सर्वश्री डॉ. दि. प्र. बलसेकर, सहसंपादक, सौ. सा. प्र. पिंपळे, उपसंपादक, त्रि. मा. केंद्रे (प्रकरण १ + सहयोगकर्ते लेखक), प्र. रा. गवळी (प्रकरण ३), सु. श्री. गायकवाड (प्रकरण ६ व ७), डॉ. वै. ह. भागवत (प्रकरण २ + सहयोगकर्ते लेखक व प्रकरण १२) सर्व संशोधन अधिकारी तसेच शा. का. मोरे (प्रकरण ८ व १०), अं. रा. पवार (प्रकरण ९), दि. वि. भगत, सौ. चा. बा. चंदनशिवे (प्रकरण ५), रा. र. वळवी (ग्रामनिर्देशिका), श्री. श. दराडे (प्रकरण ४), सौ. स्व. शै. फडके (प्रकरण ११ + सहयोगकर्ते लेखक) या सर्व सहायक संशोधन अधिकाऱ्यांबरोबरच कार्यालयातील लघुलेखक, सहायक तसेच विविध स्तरांवरील कर्मचारी यांनी केलेल्या सहकार्याचा उल्लेख करणे मला आवश्यक वाटते.

या ग्रंथाची उत्कृष्ट छपाई करून दिल्याबद्दल श्री. प. ज. गोसावी, संचालक, शासकीय मुद्रण व लेखन सामग्री, मुंबई तसेच व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, मुंबई व या मुद्रणालयातील सर्व सहकारी कर्मचाऱ्यांचे मी ऋण व्यक्त करतो.

हे गॅझेटिअर विस्तृत नोंदींमुळे दोन खंडांत प्रकाशित करण्यात येत असून याच्या ग्रंथनिर्मितीसाठी जाणीवपूर्वक प्रेरणा देणारे मा. ना. श्री. पृथ्वीराज चव्हाण (मुख्यमंत्री), श्री. अजित पवार (उप मुख्यमंत्री), श्री. संजय देवतळे (मंत्री, पर्यावरण व सांस्कृतिक कार्य), श्रीमती फौजिया खान (राज्यमंत्री, सांस्कृतिक कार्य, सामान्य प्रशासन व अन्य विभाग) यांचे मी आभार व्यक्त करतो. माजी मुख्यमंत्री श्री. अशोक चव्हाण यांनी या ग्रंथनिर्मितीच्या कामात व्यक्तिशः लक्ष देऊन सातत्याने प्रोत्साहन दिले तर श्री. आनंद कुलकर्णी, प्रधान सचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांनी केलेल्या मार्गदर्शनासाठी मी ऋणी आहे.

Maharashtra State Gazetteers

मुंबई
स्वातंत्र्यदिन,
१५ ऑगस्ट २०११.
(श्रावण कृ. २, शके १९३३)

**डॉ. अरुणचंद्र शं. पाठक,**
कार्यकारी संपादक व सचिव.

# नांदेड जिल्हा गॅझेटिअर

## प्रकरण-१

## भूगोल

Maharashtra State Gazetteers

प्रकरण-१

# भूगोल

## भौगोलिक स्थिती*

नांदेड जिल्हा उत्तर अक्षांश १८° १६' ते १९° ५५' व पूर्व रेखांश ७६° ५६' ते ७८° १९' या दरम्यान पसरलेला आहे. तो भौगोलिकदृष्ट्या खंडांतर्गत स्थितीनुसार महाराष्ट्र राज्याच्या मध्यपूर्व भागात, अरबी सागर व बंगालच्या खाडीपासून दूर व भारत भूखंडाच्या मध्य अंतर्गत भागात वसलेला आहे.

**जिल्हा नामाची व्युत्पत्ती :** जिल्ह्याचे मुख्यालय असलेल्या नांदेड शहराच्या नावाच्या व्युत्पत्तीमागे अनेक कथा आहेत. स्कंध पुराणात गोदावरी नदीच्या काठांवर वसलेल्या पवित्र तीर्थस्थानांच्या महत्तेचे वर्णन केलेले आहे. या पुराणांमध्ये गोदावरीच्या अष्टांगाचे वर्णन केलेले आहे. त्यानुसार ब्रह्मगिरी हे गोदावरीचे शिर्षस्थान, नांदेड जवळील शंकतीर्थ हे नाभीस्थान मानले जाते.

या पौराणिक नोंदीखेरीज जनमनात काही आख्यायिका रूजलेल्या असतात. नांदेड हे गोदावरीच्या नाभीस्थानावरील महत्त्वाचे स्थान/शहर असल्यामुळे ' नंदीतट क्षेत्रविजय ' आणि ' गोदामहात्म्य ' या स्थान महात्म्यात नांदेड नामाच्या व्युत्पत्तीचा इतिहास सांगितला आहे. नंदी या शिव वाहनाचे तपश्चर्या स्थान म्हणून नंद/नंदीतट असे म्हणत.

ऐतिहासिकदृष्ट्या असे पुरावे मिळतात की, ' मगध ' राज्याच्या काळात नऊ ' नंद ' नावाच्या राजाच्या राज्याची सीमा या भागाला भीडलेली होती म्हणून या शहराला ' नांदेड ' असे नाव पडले. सांची स्तूपावरील लेखात जो नंदीनगरचा उल्लेख आलेला आहे, तो नांदेडचा असावा असे अभ्यासकाचे मत आहे.[१] परिसरातील अवशेषांवरून नांदेडचे प्राचीनत्व सातवाहन काळापर्यंत सिद्ध होते.

Maharashtra State Gazetteers

नंदीनगर, नंदीकड, नंदीतट, नंद्याल आणि नंदीकट अशी या स्थळनामाची विविध रुपे ऐतिहासिक साधनात आढळतात.[२] त्यावरून नंदी हे यातील पूर्वपद असून विविध काळात त्यास वेगवेगळी उपपदे

---

* डॉ. धनंजय येडेकर, निवृत्त कुलगुरू, आणि डॉ. आर. डी. कपले, संचालक, स्कूल ऑफ अर्थ सायन्सेस, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांनी या भागाचे लेखन केले आहे. त्यात आवश्यक तेथे अन्य स्रोतांपासून प्राप्त माहितीचा समावेश करण्यात आलेला आहेत.

१. ठोसर, हरिहर, **स्टडीज इन दि हिस्टॉरिकल ॲण्ड कल्चरल जिओग्राफी ॲण्ड इथनोग्राफी ऑफ मराठवाडा** (अप्रकाशित प्रबंध), डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, पृ. २००.

२. कित्ता.

जोडली गेली असे दिसते. नंदी शिवाच्या गणाचे नाव असून या स्थळ नामाची व्युत्पत्ती त्यापासून झाली असे दिसते.

**जिल्हा निर्मितीचा इतिहास :** सध्याचा नांदेड जिल्हा प्राचीन काळात कल्याणी, चालुक्य आणि यादव राजवटीतील एक भाग होता. नांदेड येथे पूर्वी काकतीयांच्या काळात नंदगिरी किल्ला होता. तो चौदाव्या शतकाच्या सुरुवातीस अल्लाउद्दीन खिलजी याने जिंकला होता. त्यानंतर हा बहमनी राज्याचा भाग बनला आणि पुढे तो कुतुबशाही राज्याचा भाग बनला. पुढे औरंगजेबाने दख्खन जिंकल्यानंतर मुघल राजवटीस तो जोडण्यात आला. अकराव्या शतकाच्या सुरुवातीस हैद्राबाद राज्याच्या स्थापनेमुळे तो या राज्यास जोडला गेला.[३]

सन १८५३ च्या इंग्रज व निजाम यांच्या ऐतिहासिक करारानंतर काही महिन्यांनी म्हणजे १८५४ मध्ये वऱ्हाडमधून हदगाव, किनवट व माहूर हे तालुके काढून त्यांचा नांदेड जिल्हा निर्माण करण्यात आला. सन १९०५ मध्ये निजामाबाद जिल्ह्यातील मुधोळ व भैसा हे तालुके काढून ते नांदेड जिल्ह्यात समाविष्ट करण्यात आले. तसेच निजामाबाद जिल्ह्यातील आओला नरसापूर तालुका रद्द करण्यात आला आणि त्याऐवजी किनवट येथे मुख्यालय असलेला मुधोळ एक नवीन तालुका निर्माण करण्यात आला. उस्माननगर (लाठी) येथे मुख्यालय असलेला दुसरा तालुकासुद्धा रद्द करण्यात आला आणि त्यातील खेड्यांची बिलोली आणि कंधार तालुक्यात वाटणी करण्यात आली. नांदेड तालुक्यातील उत्तरेकडील काही खेडी परभणी जिल्ह्यातील कळमनुरी तालुक्यात समाविष्ट करण्यात आली आणि इतर भाग हा हदगाव व मुधोळ तालुक्यात समाविष्ट करण्यात आला. कंधार तालुक्याचे मुख्यालय बरीच वर्षे मुखेड येथे होते. त्यानंतर १९४८ पर्यंत जिल्ह्याच्या किंवा तालुक्याच्या सीमांमध्ये मोठे बदल झाले नाहीत.

या जिल्ह्यात काही खाजगी मालकीचा सर्फ-इ-खास (निजामाची स्वतःची मालमत्ता ही सर्फ-इ-खास म्हणून संबोधली जायची) भाग होता. सन १९४९ मध्ये संस्थाने व जहागिरी नष्ट करण्यात आल्या व त्यानंतर जिल्ह्यासह जहागिरी व सर्फ-इ-खासचा भाग त्यावेळच्या हैद्राबाद या राज्यात विलीन करण्यात आला. त्यानंतर १९५० मध्ये सर्व तालुक्याच्या सीमा पुन्हा ठरविण्यात आल्या. सन १९५० मध्ये जिल्ह्यात मुखेड व भोकर हे दोन नवीन महाल निर्माण करण्यात आले. सन १९५६ च्या राज्यपूनर्रचनेपूर्वी जिल्ह्यात नांदेड, कंधार, हदगाव, मुधोळ (किनवट येथे मुख्यालय), देगलूर, बिलोली हे ६ तालुके आणि मुखेड व भोकर हे दोन महाल यांचा समावेश होता. सन १९५६ मध्ये राज्य पुनर्रचना करण्यात आल्यावर ह्या जिल्ह्याचा समावेश हैद्राबाद राज्यातून त्यावेळच्या मुंबई राज्यात करण्यात आला. याच वेळी देगलूर तालुक्यातील बिचकुंदा आणि जुक्कल सर्कल आणि मुधोळ तालुका, त्यातील धर्माबाद सर्कल वगळून नांदेड जिल्ह्यातून निजामाबाद (आंध्रप्रदेश) जिल्ह्यामध्ये समाविष्ट करण्यात आले आणि आदिलाबाद (आंध्रप्रदेश) जिल्ह्यातून किनवट व राजुरा हे दोन तालुके तसेच बोथ तालुक्यातील एक महसूल मंडळ इस्लापूर यांचा सुद्धा नांदेड जिल्ह्यात समावेश करण्यात आला. मुधोळ तालुक्यातील धर्माबाद सर्कल बिलोली तालुक्यात तर इस्लापूर सर्कल हे किनवट

३. **द इम्पिरिअल गॅझेटिअर ऑफ इंडिया,** हैद्राबाद स्टेट, व्हॉ XVIII, ऑक्सफर्ड, १९०८, पृ. ३५०.

तालुक्यात वर्ग करण्यात आले. सन १९५९ मध्ये नांदेड जिल्ह्यातील राजुरा तालुका जिल्हा मुख्यालयापासून ३०० मैल दूर असल्यामुळे तो चांदा (चंद्रपूर) जिल्ह्यात समाविष्ट करण्यात आला आणि दिनांक १ मे १९६० पासून नांदेड हा जिल्हा नवनिर्मित संयुक्त महाराष्ट्र राज्याचा अविभाज्य भाग बनला.[४]

**सीमा :** नांदेड जिल्ह्याच्या उत्तरेस यवतमाळ जिल्हा आहे. या जिल्ह्याची उत्तरेकडील सीमा जी या जिल्ह्यास यवतमाळ जिल्ह्यापासून वेगळी करते ती संपूर्णतः पैनगंगा नदीलगत आहे किंवा पैनगंगा नदी हीच या जिल्ह्याची उत्तरेकडील सीमा आहे. उत्तर-पश्चिमेकडे (वायव्येकडे)नव्याने निर्माण झालेला हिंगोली जिल्हा आहे. या सीमेचा काही (अल्प) भाग टेकड्यांचा बनलेला आहे. सध्या या टेकड्यांची रांग मुदखेड टेकड्या या नावाने ओळखली जाते. जिल्ह्याच्या पश्चिमेस परभणी जिल्हा आहे. (नैऋत्येस) दक्षिण-पश्चिमेस लातूर जिल्हा आहे. या सीमेचा बहुतांश भाग हा डोंगराचा असून तो बालाघाट डोंगररांगेचा बनलेला आहे. जिल्ह्याच्या दक्षिणेस कर्नाटक राज्याची (बिदर जिल्हा) सीमा आहे. तर पूर्वेस व (आग्नेयेकडे) दक्षिण-पूर्वेकडे आंध्रप्रदेश राज्याची, आदिलाबाद व निझामाबाद जिल्ह्याची सीमा आहे. जिल्ह्याच्या पूर्वेकडील सीमेपासून आणखी दक्षिणेकडे गेल्यास १३ कि.मी. पर्यंत गोदावरी नदी आणि त्यापुढे क्रमाने गोदावरी नदीस मिळणारी उपनदी लेंडी नदी यांनी (आग्नेयेकडील) दक्षिण-पूर्वेकडील सीमेचा काही भाग रेखांकित झालेला आहे.[५]

## प्रशासकीय रचना

सन १९०८ मध्ये प्रशासकीयदृष्ट्या या जिल्ह्यात तीन उपविभाग अस्तित्वात होते. एका उपविभागात नांदेड आणि कंधार यांचा समावेश होता. दुसऱ्या उपविभागात देगलूर आणि बिलोली यांचा, तर तिसऱ्या उपविभागात तेव्हाचा मुधोळ आणि हदगाव या तालुक्यांचा समावेश होता.[६] नांदेड जिल्हा संयुक्त महाराष्ट्रात सामील झाला त्यावेळेस जिल्ह्यात एकूण ६ तालुके व २ महाल होते. सध्या नांदेड, देगलूर व किनवट या तीन उपविभागात मिळून एकूण १६ तालुक्यांचा समावेश आहे.

महाराष्ट्रातील प्रशासकीय विभागानुसार औरंगाबाद विभागात मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांचा समावेश आहे. त्यापैकी एक नांदेड जिल्हा आहे.

सन १९९१ व २००१ च्या जनगणना अहवालानुसार जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ १०,५२८ चौ.कि.मी. दर्शविले आहे.

सन २००१ च्या जनगणना अहवालानुसार दर्शविलेले जिल्ह्याचे उपरोक्त १०,५२८ चौ.कि.मी. क्षेत्रफळ हे राज्याच्या क्षेत्रफळाच्या ३.४१ टक्के आहे. राज्यात क्षेत्रफळानुसार जिल्ह्याचा सध्या ११ वा क्रमांक लागतो. १०,५२८ चौ.कि.मी. क्षेत्रफळापैकी १९८.९ चौ.कि.मी. क्षेत्रफळ हे शहरी वसाहतीचे

---

४. **भारतीय जनगणना १९६१, जिल्हा जनगणना निर्देश ग्रंथ, नांदेड,** पृ. २ आणि **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, १९७१, पृ. १, तसेच जिल्हाधिकारी नांदेड यांनी पाठविलेल्या माहितीवर आधारित.

५. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९७१, पृ. ३.

६. **द इम्पिरिअल गॅझेटिअर ऑफ इंडिया,** पूर्वोक्त, पृ. ३५३-३५४.

Maharashtra State Gazetteers

आहे. तर १०,३२९.१० चौ.कि.मी. क्षेत्रफळ हे ग्रामीण वसाहतीचे आहे. शहरी भाग हा जिल्ह्याच्या एकूण क्षेत्रफळाच्या १.८९ टक्के आहे. तर उर्वरित भाग ग्रामीण वसाहतीचा आहे.[७]

जिल्ह्यात १९९२ पूर्वी नांदेड, हदगाव, किनवट, भोकर, बिलोली, देगलूर, मुखेड व कंधार असे आठ तालुके होते. त्यानंतर सन १९९९ अखेरपर्यंत तीन टप्प्यात पंचायत समित्यांना तालुक्याचा दर्जा देऊन नवीन ८ तालुके निर्माण करण्यात आले. असे जिल्ह्यात एकूण १६ तालुके अस्तित्वात आले.

दिनांक १५ ऑगस्ट १९९२ पासून विद्यमान नांदेड उपविभागाच्या कार्यक्षेत्रातील कंधार तालुक्याची पुनर्रचना करून लोहा हा एक अतिरिक्त नवीन तालुका पहिल्या टप्प्यात निर्माण करण्यात आला.[८] दुसऱ्या टप्प्यात दिनांक २६ जून १९९९ पासून जिल्ह्यातील विद्यमान किनवट या उपविभागाच्या कार्यक्षेत्रातील हदगाव तालुक्याची पुनर्रचना करून हिमायतनगर हा एक अतिरिक्त नवीन तालुका निर्माण करण्यात आला आणि विद्यमान नांदेड उपविभागाच्या कार्यक्षेत्रातील नांदेड तालुक्याची पुनर्रचना करून मुदखेड हा एक अतिरिक्त नवीन तालुका निर्माण करण्यात आला. तसेच विद्यमान किनवट उपविभागाच्या कार्यक्षेत्रातील किनवट या तालुक्याची पूनर्रचना करून माहूर हा एक अतिरिक्त नवीन तालुका निर्माण करण्यात आला. त्याचप्रमाणे विद्यमान देगलूर या उपविभागाच्या कार्यक्षेत्रातील बिलोली या तालुक्याची पुनर्रचना करून धर्माबाद हा एक अतिरिक्त नवीन तालुका निर्माण करण्यात आला. तर नांदेड या उपविभागाच्या कार्यक्षेत्रातील भोकर या तालुक्याची पुनर्रचना करून उमरी हा एक अतिरिक्त नवीन तालुका निर्माण करण्यात आला.[९] त्यानंतर तिसऱ्या टप्प्यात ३० डिसेंबर १९९९ पासून विद्यमान नांदेड या उपविभागाच्या कार्यक्षेत्रातील नांदेड आणि मुदखेड या तालुक्यांची पुनर्रचना करून अर्धापूर हा एक अतिरिक्त नवीन तालुका निर्माण करण्यात आला. तसेच विद्यमान देगलूर या उपविभागाच्या कार्यक्षेत्रातील बिलोली या तालुक्याची पुनर्रचना करून नायगाव हा एक अतिरिक्त नवीन तालुका निर्माण करण्यात आला.[१०] अशाप्रकारे जिल्ह्यात सध्या १६ तालुके अस्तित्वात आले आहेत.

---

७. महाराष्ट्र राज्य सांख्यिकी गोषवारा, १९८८-८९, पृ. ४४, सन १९८९-९० आणि १९९०-९१ पृ. २६, सन २०००-२००१ पृ. २२ आणि **सेन्सस् ऑफ इंडिया २००१ सिरिज २८, महाराष्ट्र डिस्ट्रिक्टस् सेन्सस् हँडबुक नांदेड जिल्हा** पृ. XX, XXIV.

८. दिनांक १४ ऑगस्ट १९९२ चे महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारणमध्ये प्रसिद्ध झालेली महसूल आणि वन विभागाची अधिसूचना क्र. आरईएन ४३९२/सीआर १३१/एम-१० अनुसार नांदेड जिल्ह्यात दिनांक १५ ऑगस्ट १९९२ पासून लोहा तालुक्याची निर्मिती करण्यात आली.

९. दिनांक २३ जून १९९९ चे महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारणमध्ये प्रसिद्ध झालेल्या महसूल आणि वन विभागाच्या अधिसूचना क्र. ४२९९/प्र.क्र. ६४ ते ६८/म-१० अनुसार दिनांक २६ जून १९९९ पासून नांदेड जिल्ह्यात अनुक्रमे हिमायतनगर, मुदखेड, माहूर, धर्माबाद, उमरी या अतिरिक्त नवीन पाच तालुक्यांची निर्मिती करण्यात आली.

१०. दिनांक २९ डिसेंबर १९९९ चे महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारणमध्ये प्रसिद्ध झालेल्या महसूल आणि वन विभागाच्या अधिसूचना क्र. ४२००/प्र.क्र. १२६ (अ), १२६ (ब)/म-१० अनुसार दिनांक ३० डिसेंबर १९९९ पासून अनुक्रमे अर्धापूर व नायगाव (खैरगाव) या अतिरिक्त नवीन दोन तालुक्यांची निर्मिती करण्यात आली.

प्रशासकीयदृष्ट्या नांदेड जिल्हा हा तीन महसूल उपविभागात विभागला गेला आहे. नांदेड, देगलूर आणि किनवट हे तीन महसूल उपविभाग आहेत. या तीन उपविभागात मिळून एकूण १६ तालुक्यांचा समावेश आहे. खालील विवरणपत्रात[११] जिल्ह्यातील महसूल उपविभाग, त्याअंतर्गतची तालुके, क्षेत्रफळ, सन २००१ च्या जनगणनेनुसार तालुकानिहाय गावांची संख्या आणि एकूण लोकसंख्या दिलेली आहे.

| उपविभाग | तालुका | क्षेत्रफळ (चौ.कि.मी.) | गावांची संख्या | | | एकूण लोकसंख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | निवासी खेडी | ओसाड खेडी | शहरे | |
| नांदेड उपविभाग | १. नांदेड | ४१२.७ | ८५ | ५ | २ | ५,९८,९६९ |
| | २. कंधार | ८७६.१ | १२४ | ३ | १ | २,११,३४७ |
| | ३. भोकर | ६८८.० | ८१ | २ | - | १,१९,२२९ |
| | ४. मुदखेड | ३३५.२ | ५१ | २ | १ | ९७,२८६ |
| | ५. अर्धापूर | ३२५.० | ५३ | ३ | - | ९८,७५५ |
| | ६. लोहा | ९०१.० | १२३ | २ | १ | २,०७,३०६ |
| | ७. उमरी | ४२३.५ | ६५ | १ | १ | ८६,२०६ |
| देगलूर उपविभाग | ८. देगलूर | ६८६.४ | १०६ | ९ | १ | २,००,६२७ |
| | ९. बिलोली | ५५३.९ | ८१ | ८ | २ | १,५५,३१८ |
| | १० नायगाव (खैरगाव) | ५४७.० | ८६ | ४ | - | १,६१,१३४ |
| | ११. मुखेड | १,०६७.१ | १५१ | - | १ | २,४३,०३० |
| | १२. धर्माबाद | ३०५.८ | ५२ | २ | १ | ८६,३६२ |
| किनवट उपविभाग | १३. किनवट | १,५६६.८ | १८२ | ८ | १ | २,१०,६३० |
| | १४. माहूर | ५२०.० | ८९ | ४ | - | ८६,७८२ |
| | १५. हदगाव | १,१४९.६ | १४८ | ६ | १ | २,२४,३५४ |
| | १६. हिमायतनगर | ६११.० | ६९ | ४ | - | ८८,९२४ |
| | **एकूण** | १०,९६९.१ | १,५४६ | ६३ | १३ | २८,७६,२५९ |

जिल्ह्यात २००१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्याची एकूण लोकसंख्या २८,७६,२५९ आहे. त्यापैकी पुरूषांची संख्या १४,८१,३५८ व स्त्रियांची संख्या १३,९४,९०१ इतकी आहे. अनुसूचित जातीची

११. **सेन्सस ऑफ इंडिया, २००१ सिरिज २८, महाराष्ट्र डिस्ट्रिक्टस् सेन्सस् हँडबुक, नांदेड जिल्हा,** पृ. XX, XXI, XXIV व ५९२ आणि जिल्हाधिकारी, नांदेड यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.

Maharashtra State Gazetteers

लोकसंख्या ४,९८,१९६ इतकी आहे. महाराष्ट्राशी तुलना करता जिल्ह्यातील अनुसूचित जातीचे प्रमाण अधिक आहे. सदर जनगणनेनुसार जिल्ह्यात अनुसूचित जमातीची लोकसंख्या २,५३,५९६ इतकी आहे. जिल्ह्यात सर्वात जास्त म्हणजे किनवट तहसिलमध्ये अनुसूचित जमातीची लोकसंख्या ५८,५२७ इतकी आहे. एकूण किनवट तहसिलच्या लोकसंख्येशी त्याचे प्रमाण २७.७९ टक्के येते. नांदेड जिल्ह्यात विविध जाती-जमाती आढळतात. त्यापैकी आदिवासी जमातीत आंध, परधान, कोळंब (कोलाम) या उपजमातीचे प्राधान्य आढळून येते. कोलाम या जमातीला केंद्र सरकारने अतिमागास म्हणून घोषित केले आहे.

जिल्ह्यामध्ये विविध धर्माचे लोक राहतात. सन २००१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यात एकूण लोकसंख्येपैकी सर्वाधिक संख्या हिंदुंची म्हणजे ७५.२ टक्के आहे. मुस्लिम धर्मातील लोकसंख्या १३.४ टक्के, बौध्द धर्मातील लोकसंख्या १०.५ टक्के, शिख धर्मातील लोकसंख्या ०.४ टक्के, ख्रिश्चन धर्मातील लोकसंख्या ०.१ टक्के आहे.

जिल्ह्यात विविध भाषा बोलल्या जातात. सन २००१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्याच्या एकूण लोकसंख्येत प्रमुख भाषांमध्ये मराठी भाषा बोलणाऱ्यांची संख्या सर्वाधिक म्हणजे ७४.९ टक्के आहे. त्या खालोखाल उर्दू भाषा बोलणाऱ्यांची संख्या १० टक्के आहे. बंजारी भाषा बोलणाऱ्यांची संख्या ४.८ टक्के आहे. हिंदी भाषिकांची संख्या ४.२ टक्के, तेलुगु भाषिकांची संख्या २.९ टक्के, गोंडी भाषिकांची संख्या ०.८ टक्के, मारवाडी भाषिकांची संख्या ०.५ टक्के, कानडी भाषिकांची संख्या ०.५ टक्के, लमानी किंवा लम्बाडी भाषा बोलणाऱ्यांची संख्या ०.३ टक्के आहे. या खेरीज इंग्रजी, पंजाबी व पर्शियन भाषादेखील जिल्ह्यात बोलल्या जातात. जिल्ह्यातील विविध भागातील जाती-जमातीचे आणि जिल्ह्यातील लोकसंख्या रचनेची विविध वैशिष्ट्यांनुसार माहितीचे सविस्तर विवेचन या गॅझेटिअरमधील लोक या प्रकरणामध्ये करण्यात आलेले आहे.

जिल्ह्यात सन २००१ च्या जनगणनेनुसार १,५४६ निवासी खेडी असून ओसाड खेडी ६३ आहेत. जिल्ह्यात एकूण १,३१३ ग्रामपंचायती आहेत. सदर जनगणनेनुसार जिल्ह्यात १३ नागरी क्षेत्रे म्हणून संबोधले गेले असून या नागरी क्षेत्रांची एकूण लोकसंख्या ६,८९,०६४ इतकी आहे. नागरी लोकसंख्या जिल्ह्याच्या एकूण लोकसंख्येच्या सुमारे २३.९५ (२४) टक्के आहे. उर्वरित ७६.०५ टक्के लोकसंख्या ग्रामीण क्षेत्राची आहे. जिल्ह्यात १६ पंचायत समित्या, १ महानगरपालिका व ११ ' क ' वर्ग नगरपालिका आहेत. जिल्ह्यात महसूल प्रशासनाच्या सोयीसाठी महसूल मंडळांची संख्या ५९ आहे व ४५७ तलाठी सज्जे आहेत. जिल्ह्यात १४ कृषी उत्पादक समिती आहेत.[१२]

**नांदेड शहर :** नांदेड हे शहर गोदावरीच्या काठावर वसलेले आहे. शिखांचे दहावे गुरू श्री गुरू गोविंदसिंगजी यांच्या पदस्पर्शाने ही भूमी पुनीत झालेली असल्याने नांदेड शहरास पवित्र तीर्थक्षेत्राचे महत्त्व प्राप्त झालेले आहे. तसेच हे शहर जिल्ह्याचे व तालुक्याचे ठिकाण असून

१२. **सेन्सस ऑफ इंडिया, २००१,** पूर्वोक्त पृ. XX, VII, १०, ३४, ६१६-१७, ६२२, १,०५४, १,०७८ आणि **जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, नांदेड जिल्हा २००४-०५,** पृ. ३ तसेच डॉ. प्रभाकर देव, **हेरिटेज नांदेड** २००८, पृ. २.

महाराष्ट्रातील ऐतिहासिक व प्राचीन शहरांपैकी एक आहे. भारतीय उपखंड हे जगातील समृद्ध असा ऐतिहासिक वारसा असलेले उपखंड असून येथे त्याच्या प्रागैतिहासिक काळापासून ते २१ व्या शतकापर्यंतच्या ऐतिहासिक घडामोडीच्या व ऐतिहासिक विकासाच्या पाऊलखुणा उमटलेल्या आहेत. या भागातील नद्या ह्या पवित्र मानल्या गेल्या असून प्राचीन काळापासून त्यांचे

" गंगेच् यमुनेच् गोदावरी सरस्वती।
नर्मदा सिंधु कावेरी जलेस्मिन सन्निधी करूम्! "

या श्लोकान्वये महत्त्व प्रतिपादन केले जाते, जे मानवाला पाण्याच्या सान्निध्यात विकसित होण्याची प्रेरणा देते. या प्रेरणेतूनच भारतीय उपखंडातील महाराष्ट्र आणि त्याच्या दक्षिण पठारी भागातील सांस्कृतिक विकास हा प्रामुख्याने गोदावरी नदीच्या खोऱ्यामध्ये झाल्याचे दिसून येते. प्राचीन काळापासून हे शहर गोदावरी नदीच्या नाभीस्थानी वसलेले असल्यामुळे या शहराच्या विकासाला सांस्कृतिक व ऐतिहासिक पार्श्वभूमी असून या शहरास पवित्र तीर्थक्षेत्राचे महत्त्व प्राप्त झालेले आहे.

प्रागैतिहासिक काळाबाबत येथे अद्याप संशोधन झालेले नसले तरी नदीकाठच्या काही भागात आढळलेले अवशेष किंवा वस्तू नवाश्मयुगाच्या (इ.स.पू. ७०० वर्षापर्यंतचा काळ) काळावर प्रकाश टाकतात आणि या वस्तू नांदेड शहराला नवाश्मयुगाशी जोडतात.[१३] मूळ नांदेड गोदावरीच्या उत्तर काठावर वसलेले शहर होते. या भागाचा ऐतिहासिक काळात सम्राट अशोकाच्या राज्यामध्ये समावेश होई. पुढे इ.स.पू. १८४ मध्ये संस्थापित शुंग राजवटीमध्ये या शहराचा समावेश होता. शुंगानंतर इ. स. च्या तिसऱ्या शतकाच्या पूर्वार्धापर्यंत या भागावर (दख्खनवर) सातवाहनानी राज्य केले. सातवाहन काळात भारतातील मोठ्या बाजारपेठांपैकी एक नांदेडची बाजारपेठ होती. सातवाहनांच्या ऱ्हासानंतर वाकाटकांचा इ.स. ५५० पर्यंत या भागात अंमल होता. तद्नंतर कलचुरी घराण्याकडे अधिसत्ता आली. इ.स. ६२० मध्ये या भागावर राष्ट्रकुटांची सत्ता आली. राष्ट्रकुटानंतर कल्याणीच्या चालुक्यानी येथील सत्ता काबीज केली. त्यानंतर काकतीयांची सत्ता आली. बाराव्या शतकाच्या उत्तरार्धात (अंतिम चतुर्थांशामध्ये) हिंदू राजा देवगिरीच्या यादवांची राजवट प्रबळ झाली. त्यानंतर इ.स. १३१८ मध्ये यादवांचा पाडाव करून दिल्लीचा सुलतान अल्लाउद्दीन खिलजी याने देवगिरीचे साम्राज्य काबीज केले. तेव्हापासून नांदेड जिल्ह्यावर पर्यायाने नांदेड शहरावर बहमनी, बरीदशाही, इमादशाही, आदिलशाही व अहमदनगरचे निजाम इत्यादी राजघराण्यांचे अधिपत्य होते. बहमनींनी त्यांच्या अधिसत्तेखालील दक्षिण भागाची चार भागात किंवा सुभ्यात विभागणी केली. त्यावेळी नांदेडचा समावेश तेलंगणा सुभ्यामध्ये होता. नंतर बहमनींचा वजीर महमंद गवान याने बहमनीच्या राज्याची आठ सुभ्यात विभागणी केली. माहूर-बालाघाट सुभ्यामध्ये नांदेडचा समावेश करण्यात आला. ह्या वजीराने नांदेड येथे काही काळ वास्तव्य केले होते आणि नांदेड शहरातील (सध्याच्या जिल्हाधिकारी मुख्यालयालगतचा भाग) वजीराबाद नावाच्या भागाची स्थापना त्यानेच केली. पुढे सन १५९६ च्या तहानुसार वऱ्हाड हा प्रांत अकबर बादशहाच्या अधिपत्याखाली आला. त्यानंतरच्या 'शाहजाननामा' मधील उल्लेखानुसार औरंगजेबास दक्षिणेचा सुभेदार करण्यात आले त्यावेळी नांदेड शहर हे तेलंगना

१३. डॉ. प्रभाकर देव, **'हेरिटेज नांदेड'**, पृ. १, ३ आणि **जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, जिल्हा नांदेड** २००४-०५, पृ. १.

जिल्ह्याच्या मुख्यालयाचे शहर होते. पुढे मोगल बादशहा औरंगजेबाने बिदर हे सुभ्याच्या मुख्यालयाचे ठिकाण केले. बिदर सुभ्याची सहा सरकार आणि ७६ महालांमध्ये विभागणी करण्यात आली आणि नांदेड हे बिदर सुभ्यामधील एक सरकार होते. औरंगजेबानंतर सन १७१३ मध्ये दिल्लीच्या मोगल बादशहांनी असफजहा या सेनापतीला, त्याने मोगल साम्राज्यासाठी जी उत्कृष्ट कामगिरी बजावली त्याप्रित्यर्थ दख्खनचा सुभेदार केले. तसेच असफजहा याला निजाम-उल-मुल्क असा किताब बहाल केला. त्या कालावधीपासून हा किताब वंशपरंपरागत त्याच्याच घराण्याकडे राहिला. अशाप्रकारे हैद्राबादचे निजामशाही घराणे उदयास येऊन सत्ताधीश झाले. नांदेड हे जेव्हा निजामाने १७२५ पासून दक्षिणेकडील सुभेदारी ग्रहण केली तेव्हापासून हैद्राबाद राज्याचा एक भाग बनला व तो पुढे भारतीय स्वातंत्र्यानंतरही सप्टेंबर १९४८ पर्यंत मराठवाड्यासह हैद्राबाद राज्याचा एक भाग तथा जिल्हा राहिला.

दरम्यान १८५४ मध्ये नांदेड हा जिल्हा स्थापन करण्यात आला व तेव्हापासून नांदेड शहर हे जिल्ह्याचे मुख्यालयाचे ठिकाण बनले.[१४]

सन १८५८ मध्ये सालारजंग या निजामाच्या प्रधानमंत्र्याने बऱ्याच प्रशासकीय सुधारणा घडवून आणल्या. कालांतराने ब्रिटिश अंमलाखालील हिंदुस्थानात ज्या प्रशासनिक प्रथा व कायदेकानून होते त्यांचा हैद्राबाद राज्यात सुद्धा बऱ्याच अंशी अंगिकार करण्यात आला. उपरोक्त ऐतिहासिक पार्श्वभूमीवर नांदेड जिल्ह्याच्या किंबहुना नांदेड शहराच्या प्रशासनाचे एक नवे पर्व सुरू झाले.

**नगरपालिका व महानगरपालिका :** नांदेड शहराच्या प्रशासनासाठी तसेच लोककल्याणप्रवण शासकीय कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी सन १९३५ मध्ये नांदेड नगरपरिषदेची स्थापना करण्यात आली. नांदेड नगरपालिकेअंतर्गत येणारे त्यावेळचे क्षेत्रफळ हे १६.४८ चौ.कि.मी. इतके होते. तेव्हाची शहरी लोकसंख्या ५४,७०८ होती. सन १९६५ पर्यंत नगरपालिकेचे कामकाज हैद्राबाद जिल्हा नगरपालिका कायद्यानुसार चालत असे.[१५]

सन १९९१ च्या जनगणनेनुसार प्रथमतःच वाघाळाला नगराचा दर्जा देण्यात आला आणि वाघाळाच्या जवळ असलेली कवठा, रहिमपूर (बळीरामपूर), फत्तेजंगपुरी, असर्जन, असदवन ही गावे वाघाळा नगरपालिकेमध्ये समाविष्ट करण्यात आली. दिनांक २६ मार्च १९९७ रोजी नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिकेची स्थापना करण्यात आली. या महानगरपालिकेचे क्षेत्रफळ ४९ चौ. कि. मी. आहे. सध्या नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिकेत एकूण २४ प्रभाग आहेत.[१६]

**शहराचा पाणीपुरवठा :** महानगरपालिकेमार्फत पार पाडण्यात येणाऱ्या विविध जबाबदाऱ्यांमध्ये शहराला स्वच्छ व पुरेसा नियमित पाणीपुरवठा करणे ही एक अत्यंत महत्त्वाची जबाबदारी आहे. नांदेड शहरासाठी सुरक्षित व स्वच्छ पाणी पुरवठ्याची योजना प्रथम १९३६ मध्ये त्यावेळी रु. ५,५२,०००/- खर्च करून पूर्ण करण्यात आली होती. त्या योजनेचे उद्दिष्ट दरदिवशी दरडोई ६८.१९

---

१४. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर १९७१,** पूर्वोक्त, पृ. २८, ५५, ८२, ५७५-७६.

१५. कित्ता, पृ. १०७, ५७६-७७.

१६. उपायुक्त, नांदेड-वाघाळा महानगरपालिका यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.

लिटर (१५ गॅलन) दराने सुमारे ३५,००० लोकसंख्येला पाणी पुरवठ्याचे होते. त्यानंतर शहराच्या वाढत्या लोकसंख्येची पाण्याची गरज पूर्ण करण्यासाठी विस्तार योजनेत मूळ योजनेअंतर्गत शहरातील पाणी पुरवठ्यापासून वंचित असलेल्या भागास पाणीपुरवठा करण्यास सुरुवात केली. यासाठी मूळ योजनेअंतर्गत टाकण्यात आलेल्या पाईपलाईन्स ह्या सन १९६१ पर्यंत कार्यरत होत्या, त्याठिकाणी नवीन व जास्त क्षमतेच्या पाईपलाईन्स टाकण्याचे काम सन १९६२ मध्ये पूर्ण झाले.[१७]

सन १९९७ पासून विष्णूपुरी पंपहाऊसमधून शहरास पाणीपुरवठा होऊ लागला. या काळात ९० दशलक्ष लिटर पाणीपुरवठा शहरास करण्यात येत होता. जवाहरलाल नेहरू नागरी पुनरूत्थान योजनेअंतर्गत नांदेड शहराचा समावेश करण्यात आला असून यामधून नांदेड शहर व परिसराचा विकास करण्यासाठी रु. १,००० कोटी निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यापैकी रु. ५९ कोटी ९१ लाख खर्च करून पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करण्यात येणार आहे. सध्याचा ९० दशलक्ष लिटरहून १२५ दशलक्ष लिटर पाणीपुरवठा शहरास होणार आहे. या पाणीपुरवठा योजनेमुळे शहरवासियांना दरडोई १३५ लिटर पाणी प्रतिदिन मिळणार आहे. या योजनेअंतर्गत शहरात सध्या २१ कि.मी. अंतराच्या जलवाहिन्या टाकण्याचे काम पूर्ण झाले आहे.

पाणीपुरवठा कामाव्यतिरिक्त महानगरपालिकेने शासनाचा निधी व स्वतःच्या सहभागातून शहरातील अनेक विकासाची कामे केली आहेत. त्यात रस्ते, नाल्या, ड्रेनेजलाईन्स, मुख्य रस्त्यांचे डांबरीकरण, पाण्याचा निचरा होण्यासाठी नाल्या व छोट्या पुलांचे बांधकाम इत्यादी कामे हाती घेऊन पूर्ण करण्यात आलेली आहेत. तसेच महानगरपालिका अस्तित्वात आल्यानंतर नव्याने समावेश झालेल्या अविकसित भागात मुलभूत सोयीसुविधा रोड, नाल्या, विद्युत व्यवस्था, मोकळ्या जागा विकसित करणे इत्यादी सोयी पुरविण्यात आलेल्या आहेत.[१८]

## प्राकृतिक पर्यावरण

**नांदेड शहर व परिसरातील प्राकृतिक पर्यावरण :** नांदेड हे गोदावरीच्या नाभीस्थानी वसलेले शहर आहे. नदीच्या खोऱ्याचा भाग हा सपाट मैदानाचा आहे. गोदावरी नदीच्या खोऱ्यात असलेली बहुतेक जमीन काळी सुपीक व ठिसूळ आहे.

नांदेड शहर परीसरातील भूस्वरूपाची विभागणी १) टेकड्या, २) सपाट पठाराचा भूभाग, ३) नदीकाठचा तटीय प्रदेश या प्रकारात झालेली आढळून येते. केवळ शहर परिसरच नसून एकंदर जिल्ह्यामध्ये एकूण क्षेत्रफळाच्या तुलनेत टेकड्यांचे क्षेत्रफळाची टक्केवारी १.५६ टक्के तर सपाट पठाराच्या भूभागाच्या क्षेत्रफळाची टक्केवारी ७७.६० इतकी आहे आणि पूर मैदान/नदी काठच्या तटीय प्रदेशाच्या क्षेत्रफळाची टक्केवारी २०.८३ इतकी आहे. यावरून नांदेड परिसरातही टेकड्यांचे प्रमाण अत्यल्प आहे. तर बहुतांश भूभाग हा सपाट पठाराने व्यापलेला आहे. त्याखालोखाल प्रमाण नदीकाठच्या तटीय प्रदेशातील काळ्या व सुपीक मातीच्या भूभागाचे आहे.

---

१७. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर १९७१**, पूर्वोक्त, पृ. ५७७-७८.

१८. उपायुक्त, नांदेड-वाघाळा महानगरपालिका यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.

नांदेड परिसरातील हवामानाच्या दृष्टीने ३ ऋतुत विभागणी होते. जून ते सप्टेंबर महिन्यात येथे नैऋत्य मोसमी वाऱ्यापासून पाऊस पडतो. या काळात हवामान साधारणतः उष्ण असले तरीही पावसाळी वातावरणामुळे त्यात गारवा येऊ लागतो. ऑक्टोबर ते फेब्रुवारी या महिन्यात हवा कोरडी व थंड असते. नोव्हेंबर ते जानेवारी या महिन्यात अधूनमधून काही दिवस थंडीची लाट येते. मार्च ते मे या महिन्यात हवामान उष्ण व कोरडे असते. एप्रिल महिन्याच्या दुसऱ्या पंधरवड्यापासून तापमानात वाढ होते. काही वेळा उन्हाळा जूनपर्यंत खेचला जातो. थोडक्यात नांदेड हे शहर समुद्रसपाटीपासून अधिक अंतरावर असल्यामुळे येथील हवामान उन्हाळ्यात अधिक उष्ण व हिवाळ्यात जास्त थंड असते. अर्थात सरासरीने वर्षभरात उष्ण कोरडे असते. (जिल्ह्याचे वार्षिक सरासरी पर्जन्यमान ९४२ मि.मी. आहे) येथील सरासरी वार्षिक पर्जन्यमान ९०१.१ मि.मी. इतके आहे.[१९]

**शहरातील पाणथळी :** पावसाळ्यात शहरातील अनेक खोलगट भागात पाणी साचतं. पण त्या व्यतिरिक्त कायमस्वरूपी पाणथळे काही भागात आढळून येतात.

**भूस्वरूपीय स्वरूपात बदल घडवून आणणारा मानव एक घटक :** नांदेड परिसरातील भूरुपाचे प्रकार लक्षात घेता येथे मानवाने त्याच्या उपयोगासाठी भूरुपामध्ये खाली नमूद केलेले बदल घडवून आणले आहेत.

१) गिट्टी खदान, २) मुरूम खदान, ३) वाळूचा उपसा.

**गिट्टी खदान :** नांदेड परिसरात बाभूळगाव, वाघाळा, खुपसरवाडी, झरी आणि ढाकणी येथे गिट्टीच्या छोट्या खदानी आहेत. यापैकी ढाकणी येथील खदान सर्वात मोठी आहे. नांदेड शहराच्या दक्षिण-पश्चिम भागात गिट्टीच्या खदानी ह्या ३८० मी. ते ४८० मी. च्या समोच्य रेषेदरम्यानच्या भूरुपात वसलेल्या आहेत. बाभुळगाव येथे ०.१३९ चौ.कि.मी., वाघाळा येथे ०.०५७ चौ.कि.मी., खुपसरवाडी येथे ०.१३ चौ.कि.मी., झरी येथे ०.११ चौ.कि.मी. आणि ढाकणी येथे ०.२७ चौ.कि.मी. गिट्टीचे खनन झालेले आहे.

**मुरूम :** वसरणी, आसदवन, झरी, नेरली, बोंधर, चिमेगाव, चिखली, पुयनी व मारकल येथे मुरूमाच्या खदानी आहेत. त्यापैकी चिमेगाव येथून सर्वात जास्त मुरूमाचा उपसा केला जातो.

नांदेड (टोपोशीट ५६ इ/८) च्या उत्तर-पश्चिम भागातून सर्वात जास्त मुरूम काढला जातो. वसरणी येथे ०.०४३ चौ.कि.मी., आसदवन ०.०४१ चौ.कि.मी., झरी ०.०९८ चौ.कि.मी., नेरली ०.००७ चौ.कि.मी., बोंधर ०.०२९ चौ.कि.मी., चिमेगाव ०.११८ चौ.कि.मी., चिखली ०.०३३ चौ.कि.मी., पुयनी येथे ०.०३७ चौ.कि.मी., मारकल येथे ०.०३ चौ.कि.मी. मुरूमाचे खनन झालेले आहे.

**वाळूचा उपसा :** नांदेड परिसरातील गोदावरी पात्रातून वाळूचा उपसा नागापूर येथून ०.०९३७५ चौ.कि.मी., इंजेगाव येथून ०.०२२५ चौ.कि.मी., पिंपळगाव येथून ०.००२५ चौ.कि.मी.व असर्जन येथून

१९. **जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, जिल्हा नांदेड,** २००४-०५, पृ. २.

०.००९ चौ.कि.मी. वाळूचा उपसा झाला आहे. वरील आकडेवारी लक्षात घेता नागापूर येथून सर्वात जास्त तर पिंपळगाव येथून सर्वात कमी वाळूचा उपसा होतो. नांदेड परिसरातून १,३६,७५० चौ.मी. एवढ्या रेतीचा उपसा होतो.[२०]

**हवेचे प्रदूषण :** नांदेड शहरात जुना मोंढा, बसस्थानक जवळचा भाग हा सर्वात जास्त हवेचा प्रदुषित भाग आहे. या भागातील हवेत धुळीचे कण सर्वात जास्त आहेत. या भागात हवेतील धुळीचे कण हे साधारणपणे २६० मायक्रो ग्रॅम/घ.मी. प्रती दिवस इतके आहेत.

जागतिक स्वास्थ संस्था (WHO) ने हवेतील धुळींच्या कणांची मर्यादा ही २०० मायक्रोग्रॅम/घ.मी. प्रती दिवस इतकी ठरवली आहे. वर्षातून एका दिवसापेक्षा जास्त जर हा आकडा २६० मायक्रो ग्रॅम/घ.मी. प्रती दिवस गेला तर तो घातक ठरतो. शहरातील जुना मोंढा परिसरात २,६४२.१०९ मायक्रोग्रॅम प्रती घ.मी. प्रती दिवस इतक्या कमाल तरंगत्या अन्य घटक कणांची नोंद करण्यात आली आहे. जी सर्वसाधारण प्रमाणापेक्षा दहा पटीने अधिक आहे. ह्याच भागात किमान तरंगत्या अन्य घटक कणांची नोंद ४९२.४४१ मायक्रोग्रॅम प्रती घ.मी. प्रती दिवस इतकी करण्यात आली आहे, जी सुरक्षित मर्यादेपेक्षा दुप्पट आहे.

तरंगते घटककणांचे सर्वात कमी प्रमाण (११७.३४६ मायक्रो ग्रॅम/घ.मी. प्रती दिवस) हे स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ परिसरात आढळून आले आहे. कारण हा भाग शहरातील वर्दळीच्या भागापासून जवळपास १२ कि.मी. दूर आहे. शहरातील विविध भागातील धुळीचे प्रमाण खालील तक्त्यात दिले आहे :—

| अ.क्र. | ठिकाण | श्वसनाद्वारे प्रवेश करणारे घटक (मायक्रो ग्रॅ./घन मी.) | श्वसनाद्वारे प्रवेश न करणारे घटक (मायक्रो ग्रॅ./घन मी.) | हवेतील तरंगते घटक कण (एकूण) |
|---|---|---|---|---|
| १ | शिवाजीनगरचा दादरा | १५४.३७८ | ३८३.३६० | ५३७.७३८ |
| २ | एस.पी. ऑफीस | १०९.१७३ | ३८३.२६८ | ४९२.४४१ |
| ३ | रेल्वे स्टेशन | २२५.४९४ | ७६२.५०७ | ९८८.००१ |
| ४ | वैद्यकीय महाविद्यालय | १२५.८१६ | ४१५.५०९ | ५४१.३२५ |
| ५ | जुना मोंढा | ७११.५३५ | १,९३०.५७४ | २,६४२.१०९ |

**ध्वनी प्रदूषण :** मानवी कान हा २० हर्टज्ञ पेक्षा कमी वारंवारीतेचा ध्वनी ऐकण्यास समर्थ असतो. त्याचप्रमाणे २००० हर्टज्ञ या वारंवारीतेच्या वरचा ध्वनी आपण ऐकू शकत नाही. या दोन्ही वारंवारीते दरम्यानचा आवाज ऐकता येतो. नांदेड शहरात ध्वनीचा स्तर सकाळी १०.३० ते १२.३० दरम्यान अधिक असतो तर संध्याकाळी ५ ते ९ च्या दरम्यान तुलनेने कमी असतो.

२०. श्री. मोहिते २००६, यांचा स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडकडे सादर केलेला (अप्रकाशित प्रबंध). वर्ष २००६ मध्ये केलेल्या सर्वेक्षणाची स्थिती यामध्ये दाखविली आहे.



Maharashtra State Gazetteers

**भूजल प्रदूषण :** शहरातील वजिराबाद, जुना मोंढा भागातील भूजलाचे विश्लेषण हे दर्शविते की, ह्या भागातील भूजल अजून प्रदूषणरहित आहे. पाण्याचे जडत्वाचे प्रमाण आय.एस.आय. (ISI) मर्यादेच्या आत आहे. तसेच कॅल्शिअम (Ca), मॅग्नेशिअम (Mg) व इतर घटकांचे प्रमाण अत्यल्प आहे.

**नांदेड येथील उथळ व खोल भूजलाच्या दर्जाचे प्रमाण**

(आय.एस. १०५००:२००३)

| घटक | किमान (मि.ग्रॅ./लिटर) | कमाल (मि.ग्रॅ./लिटर) | उथळ भूजल | खोल भूजल |
|---|---|---|---|---|
| हैड्रोजन कॉन्सन्ट्रेशन (pH) | ६.५-८.०० | सूट नाही | ७.५९-७.९४ | ७.९०-७.९८ |
| एकूण विरघळलेले घटक (TDS) | ५०० | २,००० | ६५३-१,६४२ | ४५९-१,३२९ |
| एकूण जडत्व (TH) | ३०० | ६०० | ३००-४७५ | ३२०-७४० |
| कॅल्शिअम (Ca++) | ७५ | २०० | ३०-६२ | २०-१८० |
| मॅग्नेशिअम (Mg++) | ३० | १०० | ५०-८६ | २१-१२५ |
| क्लोराईड (Cl) | २५० | १,००० | ३५-१५२ | ९६-४६८ |
| सल्फेट ($SO_4$) | २०० | ४०० | ७६-७०० | १९-२१४ |
| नायट्रेट ($NO_3$) | ४५ | सूट नाही | २६-१११ | २०-२३६ |
| फ्लोरीन (F) | १.० | १.५ | ०.४८-१.२० | ०.५४-१.१७ |

वरील तक्त्यावरून असे आढळून येते की, पाण्याचे जडत्व कूपनलिकेत अधिक आहे व गोकुळनगर व खडकपुरा भागात पाण्याचे जडत्व हे ६०० मि.ग्रॅ./लीटर पेक्षा जास्त आहे व मॅग्नेशिअमचे प्रमाण १२५ मि.ग्रॅ./लीटर होते. असे पाणी वापरण्यायोग्य नसते.

सल्फेटचे ($SO_4$) प्रमाण कवठा भागात (१,७०० मि.ग्रॅ./लीटर) अधिक आहे. कारण या भागात रासायनिक खते वापरली जातात.

नायट्रेटचे ($NO_3$) प्रमाण वसरणी (१११ मि.ग्रॅ./लीटर) व खुदबाई (२३६ मि.ग्रॅ./लीटर) येथे अधिक आहे.

पाण्याच्या विश्लेषणावरून असे लक्षात येते की, शहरातील मध्य भागातील, वजिराबाद, नवीन मोंढा, गोकुळनगर, नंदिग्राम सोसायटी, खडकपुरा, मदिनानगर आणि खुदबाईनगर परिसरातील पाण्यात क्लोराईड (Cl) आणि नायट्रेटचे प्रमाण अधिक आहे. कवठा परिसरात फ्लोरीनचे (F) प्रमाण (१.२० मि.ग्रॅ./लीटर) हे अधिक आहे. नांदेड शहरातील औद्योगिक वसाहतीत सर्वात अधिक प्रदूषण आहे.

Maharashtra State Gazetteers

एकूण विरघळलेले घटक (TDS) प्रदूषित प्रदेश हा सन १९९७ साली ७.९२ चौ.कि.मी. होता, तो सन १९९९ मध्ये ३८.२५ चौ.कि.मी. पर्यंत वाढत गेला. सन २००५ साली तो पुन्हा खाली येऊन १.७७५ चौ.कि.मी. पर्यंत स्थिरावला आहे. क्लोराईड (Cl) प्रदूषित क्षेत्र सन १९९७ साली १.५९ चौ.कि.मी. होते ते सन १९९९ पर्यंत ८.३७ चौ.कि.मी. पर्यंत वाढत गेले. तर सन २००५ साली ते फक्त ०.१ चौ.कि.मी. इतके आहे.

एकूण जडत्वाचे (TH) प्रदूषित क्षेत्र १९९७ साली ७.०५ चौ.कि.मी. होते ते सन १९९९ पर्यंत ३२.३ चौ.कि.मी. पर्यंत वाढत गेले. सन २००५ साली ते ०२.९२५ चौ.कि.मी. पर्यंत स्थिरावले होते.

या औद्योगिक क्षेत्रात कूपनलिकेतील प्रदूषण विहिरीपेक्षा जास्त आहे. कारण औद्योगिक वसाहतीतील प्रदूषित पाणी जमिनीत कूपनलिकेद्वारे सोडण्याची प्रथा होती.

**शैक्षणिक विकास :** नांदेडमध्ये सन १९५० साली स्वामी रामानंदतीर्थ यांनी पिपल्स कॉलेजची स्थापना केली व नांदेड जिल्ह्यातच नव्हे तर मराठवाड्यात उच्च शिक्षणाची मुहुर्तमेढ रोवली गेली. महाराष्ट्र निर्मितीनंतर तर शैक्षणिक विकास अधिक गतीमान झाला. आयुर्वेद, इंजिनिअरिंग, शिक्षण, कायदा इत्यादी विद्याशाखेच्या शिक्षणाच्या सोयीही येथे उपलब्ध झाल्या. पुढे सन १९७५ मध्ये तत्त्कालीन मराठवाडा विद्यापीठाने नांदेड येथे विद्यापीठ उपकेंद्राची स्थापना केली. पुढे त्याचे रुपांतर दिनांक १७ सप्टेंबर १९९४ रोजी स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ स्थापनेमध्ये झाले.[२१] अशा प्रकारे नांदेड येथील शैक्षणिक क्षेत्रदेखील सतत व्यापक व सक्षम होत आहे. नांदेडच्या शैक्षणिक वाटचालीसंबंधीची अधिक सविस्तर माहिती या गॅझेटिअरमधील ' सामाजिक सेवा ' या प्रकरणात देण्यात आलेली आहे.

**नांदेड परिसरातील प्रेक्षणीय स्थळे :** शिखांचे दहावे गुरू श्री गुरू गोविंदसिंगजी या लढवय्यांच्या पदस्पर्शाने ही भूमी पुनीत झालेली असून त्यांच्या पवित्र समाधीस्थळी त्यांच्या स्मरणार्थ बांधलेला गुरूद्वारा हे धार्मिक महत्त्वाच्या दृष्टीने भारतात अमृतसरच्या गुरूद्वारानंतर दुसऱ्या क्रमांकावर येतो. त्यामुळे नांदेड शहर हे धार्मिक क्षेत्रही आहे.[२२]

'नंदीतट क्षेत्रविजय' या ग्रंथात पवित्र नदीकाठावर नांदेड येथे आठ तीर्थे असल्याचे वर्णन आहे. त्यानुसार उपनदी उर्वशीसंगम ते आसना-गोदासंगम या दरम्यान आठ तीर्थे आहेत. या सर्व ठिकाणी घाट असून येथे आजदेखील महत्त्वाच्या धार्मिक पर्वामध्ये अनेक लोक भेट देतात. ही तीर्थे पुढीलप्रमाणे - १) इंद्रतीर्थ, २) गणेशतीर्थ, ३) नृसिंहतीर्थ, ४) चक्रतीर्थ, ५) लक्ष्मीतीर्थ, ६) ऋणमोचनतीर्थ, ७) तारातीर्थ, ८) भावतीर्थ.

**सचखंड गुरूद्वारा :** हा गुरूद्वारा सामान्यतः ' गुरूद्वारा सचखंड श्री हुजूर अबचलनगर साहिब ' या नावाने ओळखला जातो. हा गुरूद्वारा शिखांच्या एकूण पाच महत्त्वपूर्ण तख्तांपैकी एक महत्त्वाचे तख्त आहे. नांदेड येथील हा मुख्य गुरूद्वारा आहे. श्री गुरू गोविंदसिंगजी यांचे महापरिनिर्वाणस्थान व तख्त सचखंड गुरूद्वारा महाराजा रणजितसिंग यांनी बांधला. त्यावेळी त्याच्या बांधकामाचा खर्च सुमारे रु. ३ लाख होता.

---

२१. महाराष्ट्र राज्य रौप्य महोत्सवी प्रकाशन १९८५-८६, नांदेड जिल्हा संदर्भ ग्रंथ समिती, पृ. १२४-२५.

२२. **सामाजिक व आर्थिक समालोचन, जिल्हा नांदेड,** १९८६-८७, पृ. २३ व सन २००४-०५, पृ. १ व १२.

उपरोक्त मुख्य गुरूद्वाराशिवाय नांदेड येथे अन्य सात गुरूद्वारे गोदावरीच्या काठावर आहेत. ते पुढीलप्रमाणे - १) नगीना घाट, २) बंदा घाट, ३) संगतसाहिब, ४) मालटेकडी, ५) हिरा घाट, ६) शिकार घाट, ७) मातासाहेब देवाजी हे गुरूद्वारा होत. या सर्व वास्तुंच्या रुपाने मध्ययुगीन वास्तू परंपरा आणि आधुनिक वास्तू परंपरांचा मनोहारी संयोग घडतो आहे. त्यामुळे शिखांचे हे पवित्र स्थान म्हणून त्याची ख्याती शिखांची काशी म्हणून झालेली आहे.

श्री गुरू गोविंदसिंगजी यांच्या परलोकगमनाला तसेच 'गुरूग्रंथसाहिब' या धर्मग्रंथाच्या प्रतिष्ठापनेला ऑक्टोबर २००८ साली (सन १७०८ ते २००८) ३०० वर्षे पूर्ण झाली. हा त्रिशताब्दी महोत्सव नांदेडमध्ये 'गुरू-ता-गद्दी' महोत्सव म्हणून साजरा केला गेला. या सोहळ्यासाठी केवळ भारतातूनच नव्हे तर परदेशातूनही शिख बांधव मोठ्या प्रमाणावर नांदेड येथे आले होते. या महोत्सवानिमित्त नांदेड शहर विकास कामासाठी केंद्र व राज्य शासनाकडून रु. ८१७ कोटीचा निधीही मंजूर केला गेला. त्याअंतर्गत शहरात विविध विकासाची कामे करण्यात आली.[२३]

**औद्योगिकरण :** कृषिच्या दृष्टीकोनातून नांदेड जिल्हा समृद्ध जरी असला आणि मनुष्यबळ पुरेसे उपलब्ध असले तरीही पूर्वी पुरेशी दळणवळणाची साधने नसल्यामुळे १९६१ पर्यंत औद्योगिकदृष्ट्या हा प्रदेश अतिशय मागासलेला होता. तथापि, सन १९६१ मध्ये देखील या शहरात काही छोटे व काही मोठे उद्योग कार्यरत होते. छोट्या उद्योगांमध्ये पिठाच्या किंवा भाताच्या गिरण्या होत्या. नांदेड येथे फर्निचर तयार करणारा एक सहकारी कारखाना स्थापन करण्यात आला होता. शहरात तेलाच्या घाण्या, लाकूड कापण्याच्या गिरण्या, हातमागावरील कापड विणकाम उद्योग, रंगकाम, धातू कामाचे उद्योग इत्यादी छोटे उद्योग कार्यरत होते. तर मोठ्या उद्योगांमध्ये नांदेड येथे उस्मानशाही नावाची कापड गिरणी आहे. ती पूर्वीच्या हैद्राबाद राज्य सरकारच्या प्रयत्नांमुळे सन १९२३ मध्ये स्थापन झाली. या गिरणीतून तयार होणाऱ्या मसलीन कापडासाठी नांदेड शहर प्रसिद्ध होते.

नांदेड येथे १९६८-६९ साली औद्योगिक क्षेत्र विकसित करण्यात आले आहे. त्यांचे एकूण क्षेत्र २७१.८९ हेक्टर असून त्यात ६१३ भूखंड तयार करण्यात आले आहेत.[२४] सन १९९५ नंतर शहरात तसेच जिल्ह्यात औद्योगिकरणाला गती प्राप्त झाली.

**दळणवळण :** मनमाड-काचीगुडा लोहमार्ग नांदेड शहरातून जातो. आता या मार्गाला मुंबईशी जोडण्यात आलेले आहे. हा मार्ग पूर्वी गोदावरी रेल्वेलाईन या नावाने ओळखला जात असे. या मार्गाची सुरुवात १८१९ मध्ये झाली होती. आता नांदेड हे रेल्वेद्वारे नागपूर, मुंबई, पुणे, पटना, अमृतसर, बेंगलोर, हैद्राबाद, तिरुपती इत्यादी मोठ्या शहरांशी जोडले गेले आहे. सध्या दक्षिण-मध्य रेल्वे विभागाचे कार्यालय नांदेड शहराच्या उत्तरेला सुरू झाले आहे. शिवाय नांदेड येथे गुरू-ता-गद्दी कार्यक्रमाच्या निमित्ताने विमातळाच्या विस्ताराचे नवीन धावपट्टीचे कामपूर्ण होऊन हवाई वाहतूक सुरू झाली आहे.[२५]

---

२३. उपायुक्त, नांदेड-वाघाळा महानगरपालिका यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.

२४. उप अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, उपविभाग क्र. ३, नांदेड यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.

२५. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, नांदेड यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.

## भूप्राकृतिक स्थिती

विविध भूरुपीय प्रक्रियांचा प्रदेशाच्या ठेवणीवर परिणाम होतो. या प्रदेशाच्या ठेवणीलाच भूप्राकृतिक स्थिती असे म्हणतात.

नांदेड जिल्हा दख्खनच्या पठारावर वसलेला आहे. येथील प्रदेश हा जवळपास सपाट मैदानी प्रदेशांतर्गत जरी मोडत असला तरीही डोंगराळ भागसुद्धा या प्रदेशात आढळून येतो. प्राकृतिकरित्या जिल्हा हा तीन प्राकृतिक घटकात विभागला जातो. १. उत्तरेकडील डोंगराळ प्रदेश, २. मध्यभागातील गोदावरी खोऱ्याचा प्रदेश आणि ३. दक्षिणेकडील डोंगराळ प्रदेश.

१. उत्तरेकडील डोंगराळ प्रदेश :– सातमाळा व निर्मल या डोंगराच्या रांगा या भागात येतात. उत्तरेकडील भोकर, हिमायतनगर, हदगाव, माहूर व किनवट तालुक्यांचा बहुतांश भाग या विभागात येतो.

२. मध्यभागातील गोदावरी खोऱ्याचा भाग :– दक्षिणेकडील गंगा म्हणून प्रसिद्ध असलेली गोदावरी नदी ही उत्तरेकडील व दक्षिणेकडील डोंगराळ भागाच्या मधल्या भागातून वाहते. नांदेड, धर्माबाद, लोहा, नायगाव, बिलोली आणि देगलूर हा प्रदेश गोदावरी नदीमुळे कृषिसमृद्ध झाला आहे व येथील जमीन सुपीक आहे.

३. दक्षिणेकडील डोंगराळ प्रदेश :– दक्षिणेकडील मुखेड व कंधार तालुका हे प्रामुख्याने या विभागात येतात. याशिवाय देगलूर तालुक्याचा दक्षिणेकडील भागाचाही समावेश या विभागात होतो.

जिल्ह्यात आढळून येणाऱ्या डोंगराच्या रांगा ह्या प्रामुख्याने उत्तर-पश्चिम (वायव्य), दक्षिण-पूर्व (आग्नेय) ह्या दिशेला एकमेकांना समांतर अशा पसरल्या आहेत. काही ठिकाणी ह्या उत्तर-पश्चिम (वायव्य) रांगा दक्षिण-पूर्व (आग्नेय) डोंगराच्या रांगांना छोट्या डोंगराच्या रांगेत काटकोनात छेदत जातात.

सह्याद्रीतील सप्तशृंगी (१,४१६ मी.) पासून पूर्वेकडे सातमाळा अजिंठ्याचे डोंगर पसरत गेले आहेत. पैनगंगेचे खोरे ओलांडल्यानंतर सातमाळा ह्या डोंगराच्या रांगेचा प्रवेश जिल्ह्यात होतो. तीन वेगवेगळ्या उंचीचे डोंगर ह्या रांगेत आढळतात. समुद्रसपाटीपासून १) ३५० ते ५७० मी., २) ५७० ते ६०० मी., ३) ६०० मी. पेक्षा जास्त उंचीचे आहेत. पूर्वेकडे या डोंगराची उंची कमी होत जाते. या डोंगरांना पूर्वेकडे औरंगाबाद जिल्ह्यात, अजिंठ्याचे डोंगर म्हणतात. अजिंठा डोंगराचा उत्तरेकडील उतार तीव्र तर दक्षिणेकडील उतार मंद स्वरूपाचा आहे. या कमी उंचीच्या डोंगरांना दक्षिणेस नांदेड जिल्ह्यात निर्मलच्या डोंगर रांगा म्हणतात.

शिवनेरीच्या उत्तरेकडील हरिश्चंद्रगडापासून (१,४२४ मी.) हरिश्चंद्र बालाघाटचे डोंगर पूर्वेकडे पसरले आहेत व पूर्वेकडे ह्याची उंची कमी-कमी होत जाते. ह्या डोंगररांगाच्या पश्चिमेकडील भागाला हरिश्चंद्र, तर पूर्वेकडील भागाला बालाघाटचे डोंगर म्हणतात. नांदेड जिल्ह्यातील दक्षिण बाजुला ह्याच बालाघाट डोंगराच्या रांगा आहेत.

सातमाळा डोंगररांगाच्या दक्षिणेकडील भागात निर्मलच्या डोंगररांगा ह्या सातमाळा डोंगररांगांना समांतर आहेत आणि पैनगंगेच्या पूर्वेकडील भागात या दोन्ही, सातमाळा आणि निर्मल डोंगररांगा एकमेकांना छोट्या डोंगरांनी जोडल्या गेल्या आहेत. हे छोटे डोंगर नदीच्या प्रवाहाला समांतर आहेत आणि ह्या छोट्या डोंगर रांगाच जिल्ह्याची सीमा ठरवितात.

साधारणपणे गोदावरीच्या उत्तरेकडील व दक्षिणेकडील लागून असणाऱ्या भागातील डोंगररांगांची उंची ही कमी आहे. या डोंगररांगांना भोकर आणि हदगाव तालुक्यात ' वाखड ' म्हणतात. तर कंधार आणि मुखेडमध्ये उंचीने छोट्या असणाऱ्या डोंगर रांगाना ' बालाघाटचा डोंगराळ प्रदेश ' म्हणतात.

पैनगंगा आणि गोदावरी नद्यांना विभागत जाणाऱ्या सावरगाव पठारावरील डोंगराच्या रांगा अखंडपणे १३ कि.मी. पर्यंत पसरलेल्या आहेत. ह्या डोंगर सीमा जल विभाजक (Water divide) म्हणून ओळखल्या जातात. पुढे ह्या डोंगर रांगा तीन रांगात विभागल्या जातात. एक रांग पूर्वेकडे पसरत जाते. दुसरी रांग दक्षिण-पूर्वेकडे (आग्नेय) तर तिसरी रांग दक्षिणेकडे पसरत जाते.

**एकाकी टेकड्या :** तीव्र विदारण व खननामुळे अनाच्छादित झालेल्या ह्या टेकड्या असतात. नांदेड शहराच्या दक्षिण-पश्चिम (नैऋत्य) भागात ह्या टेकड्या आढळून येतात. अशा प्रकारच्या टेकड्यांनी जिल्ह्यातील कमी क्षेत्र व्यापलेले आहे.

**भूपृष्ठाचा उतार :** जिल्ह्यातील बहुतांश भाग मंद उताराचा आहे. नांदेड शहर हे गोदावरी काठी वसले असल्याने व उत्तरेकडे सातमाळा आणि निर्मल डोंगराच्या रांगा व दक्षिणेकडे बालाघाटचा डोंगराळ प्रदेश असल्याने स्वाभाविकपणे उत्तर व दक्षिणेकडून मंद उतार हा नांदेड शहराकडे येतो. गोदावरीच्या दक्षिणेकडील भागात, जिल्ह्यातील भूरुपात प्रादेशिक विविधता आढळून येते. गोदावरीकडील दक्षिणेच्या भागाचे चार उपविभागात विभागणी होते. १) पश्चिमेकडील भूरुपे, २) केंद्रिय (मध्य) भूरुपे, ३) पूर्वेकडील भूरुपे आणि ४) गोदावरीचे खोरे.

**(१) पश्चिम उप विभाग :** ह्या उपविभागात कंधार तालुका व मुखेडच्या पश्चिमेकडील भागाचा समावेश होतो. या परिसरात टेकड्यावरील हिरवळीचे प्रमाण कमी आहे. येथील मृदा बहुतांशपणे काळी जरी असली तरी ती खडकाळ आणि कमी जाडीची आहे. यामुळे या भागात फक्त खरीप पिकेच घेतली जातात. ज्वारी, कापूस, तूर, अंबाडी व्यतिरिक्त सिंचनाचा वापर करून ऊसाचेसुद्धा उत्पादन या भागात घेतले जाते. या भागात सिंचन प्रकल्पांची संख्या फार कमी असल्यामुळे या भागात विहिरींचे प्रमाण जिल्ह्यात सर्वात जास्त आहे.

कंधार शहराजवळ असलेल्या मानसपुरी तलावातील पाण्याचा वापर सिंचनासाठी केला जातो. या भागात ज्वारी, तूर, तंबाखू, तांदुळ, हरबऱ्याचे पीक घेतले जाते.

गोदावरीच्या उत्तरेकडील डोंगरावर जास्त हिरवळ आढळून येते. लॅटेराईट प्रकारची मृदा मुखेडजवळ आढळून येते आणि या भागात भूईमुग, तीळ, बाजरी, कापूस आणि ज्वारीचे पीक घेतले जाते.

**(२) मध्य उप विभाग :** पूर्व मुखेड, पश्चिम देगलूर आणि पश्चिम बिलोली भागात मृदेची जाडी वाढत जाते. येथील मृदा अधिक सुपीक आहे. त्यामुळे या भागात खरीप नंतर रब्बीचे पीक पण घेतले जाते. अति उच्च दर्जाचे ज्वारी, कापूस, तूर, अंबाडी, मिरची, ऊस, गहू आणि तीळ या पिकांचे उत्पादन येथे घेतले जाते.

**(३) पूर्व उप विभाग :** पूर्वेकडील बिलोलीचा भाग आणि देगलूर तालुक्याचा हा भाग नायसिक (Gneissic) खडकाचा बनलेला आहे. या भागात तलावांचे प्रमाण (बिलोली तालुक्यातील नोंदविलेली मालगुजारी तलावांची संख्या २८ आहे.) जास्त आहे व येथे तांदळाची शेती जास्त केली जाते. बिलोलीच्या अगदी अगोदर नरसी बिलोलीच्या रस्त्याच्या दोन्ही बाजुला बेसाल्ट खडकांच्या दोन टेकड्या आहेत. रस्त्याच्या उत्तरेकडील टेकडीवर टाळकी ज्वारीचे पीक घेतले जाते. तर दक्षिणेकडील टेकडी ही विराण आहे. बिलोली गावाजवळ तांदळाची शेती मोठ्या प्रमाणावर आहे.

**(४) गोदावरीचे खोरे :** गोदावरी खोऱ्याचा हा उप विभाग सुपीक काळ्या जमिनीचा आहे. ह्या भागात केळी, ऊस आणि भाजीपाल्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर घेतले जाते. ह्या विभागात सिंचनासाठी नदी, विहीर व विंधन विहिरीच्या पाण्याचा वापर केला जातो.

गोदावरी नदीच्या दोन्ही तटावर सुपीक माती आहे व तिथे तांदुळ, मिरची, कापूस आणि ज्वारीचे पीक घेतले जाते. नांदेड शहराच्या आजूबाजूच्या परिसरात भाजीपाल्याचे पीक मोठ्या प्रमाणावर घेतले जाते. नांदेड शहर हे जिल्ह्यातील सर्वात मोठे कापूस केंद्र आहे.

गोदावरीच्या उत्तरेकडील भागाची दोन उप गटात विभागणी होते.

**(१) पश्चिम उप विभाग :** या विभागातील हदगाव तालुक्यातील काळी माती पैनगंगेजवळ खोल आहे. गव्हाचे उत्पादन या भागात सर्वात जास्त आहे. ऊस, कापूस आणि ज्वारीचे पण उत्पादन घेतले जाते. हदगावजवळ पैनगंगेच्या पुराचे पाणी दक्षिणेकडे जवळपास एक किलोमीटरपर्यंत पसरते. जर मध्यम स्वरूपाचा पाऊस झाला तर कापूस आणि ज्वारीचे पीक चांगले येते. खूप पाऊस झाला आणि पिकाची नासाडी झाली तरी येणाऱ्या गव्हाचे पीक खूप चांगले येते आणि म्हणूनच या भागाला दुष्काळाचा फटका बसत नाही.

**(२) पूर्व उप विभाग :** या उपविभागातील किनवट आणि भोकरचा भाग डोंगराळ आहे. या भागातील माती उथळ आहे. जंगलाचे प्रमाण जास्त आहे. उच्च प्रतिचे सागाचे लाकूड (टीक वूड) या भागात मिळते. सालई, धावडा, टेंभुर्णी, खैर, मोथना या प्रकारच्या लाकडाच्या जाती येथे सापडतात. या भागातील साधारण पीक हे ज्वारी, कापूस, तूर आणि ऊस आहे. या भागात उनकेश्वर जवळ गरम पाण्याचे झरे आहेत. भोकर भागात तांदळाची शेती जास्त आहे. तसेच ऊस आणि ज्वारीचे सुद्धा पीक या भागात घेतले जाते.

**भूरुपांची विभागणी :** नांदेड जिल्ह्यात पुढीलप्रमाणे भूरुपांची विभागणी झालेली आढळून येते.

| अ.क्र. | भूरुपाचे प्रकार | क्षेत्रफळ (कि.मी.) | टक्केवारी (क्षेत्रफळ) |
|---|---|---|---|
| १ | टेकड्या | ३.७५ | १.५६ |
| २ | सपाट पठाराचा भूभाग | १८६.२५ | ७७.६० |
| ३ | पूर मैदान/नदी काठचा तटीय प्रदेश | ५०.०० | २०.८३ |
| | **एकूण** | | ९९.९९ |

वरील तक्ता पाहिल्यास लक्षात येते की, नांदेड जिल्ह्यात टेकड्यांचे प्रमाण अत्यल्प आहे. तर बहुतांश भूभाग हा सपाट पठाराने व्यापलेला आहे. नांदेड शहर गोदावरी काठी वसले असल्याने २० टक्के भूभाग हा नदी काठच्या तटीय प्रदेशाने व्यापला आहे. जिल्ह्यातील सर्वात उंचीचे ठिकाण हे माहूर आहे. ज्याची समुद्रसपाटीपासूनची उंची ६०६ मीटर आहे. तर सर्वात कमी उंचीचे ठिकाण हे पैनगंगा नदीच्या पात्रात आहे. त्याची समुद्रसपाटीपासूनची उंची २६० मीटर आहे.

**जलखोरे :** जिल्ह्यात भूरुपीय गुणधर्माच्या आणि भूरुपांच्या आधारावरती ४९ जलखोऱ्यांची विभागणी करण्यात आली आहे.

भूरुपीय निर्देशांकाच्या आधारावरती या जलखोऱ्यांची ३ उप विभागात पुढीलप्रमाणे विभागणी केली आहे.

| | भूरुपीय निर्देशांक | नदीचे खोरे | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | गोदावरी | पैनगंगा | मांजरा | जलखोऱ्यांची संख्या | समुद्रसपाटी-पासून उंची |
| १. | पाणी वाहून जाणारे क्षेत्र | ४ | १२ | १ | १७ | ४६० मी. |
| २. | पूनर्भरण क्षेत्र | ७ | — | ११ | १८ | ३८० मी. ते ४६०मी. |
| ३. | साठवणीचे/वाहून नेण्याचे क्षेत्र (Storage/Discharge Zone) | ७ | ४ | ३ | १४ | — |
| | एकूण | १८ | १६ | १५ | ४९ | |

जिल्ह्यातील या ४९ जलखोऱ्यात प्रामुख्याने बेसाल्ट हा खडक आढळून येतो. मात्र बिलोलीच्या काही भागात व देगलूर आणि मुखेडच्या भागात ग्रॅनाईट हा खडक आढळून येतो.

**नद्या व प्रवाह पद्धती :** गोदावरी, पैनगंगा, मांजरा आणि मनार (मन्याड) ह्या नांदेड जिल्ह्यातून वाहणाऱ्या महत्त्वाच्या व प्रमुख नद्या आहेत.

Maharashtra State Gazetteers

**गोदावरी खोरे :** जिल्ह्यातील सर्वात महत्त्वाची नदी ही गोदावरी नदी आहे. गोदावरी नदी नांदेड जिल्ह्यात पश्चिमेकडून प्रवेश करते व मध्यभागातील नांदेड जवळून म्हणजेच जिल्ह्याच्या मध्यभागातून पूर्वेकडे वाहते व आंध्रप्रदेशातील निजामाबाद जिल्ह्यात प्रवेश करते. जिल्ह्यातील गोदावरी नदीचा प्रवाह हा १४० कि.मी. लांबीचा आहे.

उत्तरेकडे सातमाळाचे डोंगर व दक्षिणेकडे बालाघाटच्या डोंगररांगा दरम्यान गोदावरी नदीचे खोरे वसले आहे. बालाघाटच्या डोंगररांगांमुळे गोदावरीचे खोरे भीमा खोऱ्यापासून वेगळे झाले आहे. गोदावरीच्या काठावर गाळाचे अरूंद मैदान आहे. नाशिकपासून नांदेडपर्यंत बेसाल्ट खडक आहे. यामुळे या भागात नदीचे खनन कार्य अतिशय कमी आहे. गोदावरी नदी सामान्यतः मुगटपर्यंत उत्तर-पूर्व (ईशान्य) या दिशेस वाहते. त्यानंतर पुढे नागमोडी वळण घेत गोदावरीचा संगम मांजरा नदीशी होतो.

आसना, सीता आणि सिद्धा या नद्याही गोदावरीच्या उपनद्या आहेत. तर मांजरा ही गोदावरी नदीची सर्वात मोठी उपनदी आहे.

गोदावरीची एक प्रमुख उपनदी आसना परभणी जिल्ह्यात उगम पावणारी नदी आहे. ही नदी गोदावरीच्या उत्तर बाजूने डोंगररांगांच्या उताराने जिल्ह्यात सुमारे ५० कि.मी. अंतर वाहत येऊन नांदेडपासून १ कि.मी. अंतरावर गोदावरीच्या डाव्या किनाऱ्यावर गोदावरी नदीला मिळते. सीता ही गोदावरीची आणखी एक प्रमुख उपनदी आहे. या नदीचा जिल्ह्यातील प्रवाह सुमारे ३० कि.मी. लांबीचा आहे. ती आसना नदीच्या पूर्वेस त्याच उताराने प्रवाहीत होऊन ती पुढे गोदावरीस डाव्या किनाऱ्यावर मिळते. त्यापुढे उताराच्या जमिनीवर गोदावरी नदीच्या डाव्या किनाऱ्यावर सिध्दा ही आणखी एक उपनदी गोदावरीस मिळते.[२६]

नांदेड शहराजवळ विष्णुपुरी येथे विष्णुपुरी प्रकल्प उपसा जलसिंचन योजना राबविण्यात आली आहे. त्या अंतर्गत गोदावरी नदीवर ३३९ मी. लांबीचा दगडी बंधारा बांधलेला आहे. बंधाऱ्याची पायापासून उंची ९ मीटर आहे. येथील वार्षिक पाण्याचा वापर ११.४ टी.एम.सी. इतका करण्यात येतो. हा प्रकल्प आशिया खंडातील अशाप्रकारचा सर्वात मोठा प्रकल्प मानण्यात येतो. या प्रकल्पातील जलाशयाला अलीकडे शंकरसागर असे नाव देण्यात आले आहे.[२७]

**मांजरा नदी :** मांजरा नदी ही गोदावरीची जिल्ह्यातील सर्वात मोठी उपनदी आहे. ही नदी गोदावरी नदीला कुंडलवाडीच्या ५ कि.मी. अंतरावर उजव्या (दक्षिण) किनाऱ्यावर येऊन मिळणारी एक अत्यंत महत्त्वाची उपनदी आहे. ही नदी दक्षिणेकडून उत्तरेकडे वाहून जिल्ह्याची व आंध्रप्रदेशाची सुमारे ४० कि.मी. पर्यंत नैसर्गिक सीमा तयार झालेली आहे. मनार आणि लेंडी या दोन नद्या ह्या मांजरा नदीच्या प्रमुख उपनद्या आहेत.

---

२६. **भारतीय जनगणना १९६१, जिल्हा जनगणना निर्देश ग्रंथ, नांदेड**, पृ. १ आणि **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर १९७१**, पूर्वोक्त पृ. ५, तसेच **सामाजिक व आर्थिक समालोचन जिल्हा नांदेड** १९८६-८७, पृ. ४ आणि २००४-०५, पृ. २.

२७. अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.

Maharashtra State Gazetteers

बीड जिल्ह्यातील धरमपूरपासून उगम झालेली मनार नदी जिल्ह्याच्या दक्षिण-पश्चिम (नैऋत्य) दिशेने प्रवाहीत होऊन कंधारच्या दक्षिणेकडून व माळेगावच्या जवळपास ३ कि.मी. अंतरावर नांदेड जिल्ह्यात प्रवेश करते. कंधारच्या दक्षिणेस वळसा घेऊन नंतर आग्नेय दिशेने वाहत जाऊन मांजरा नदीला मिळते. कंधारपासून सुमारे १५ कि.मी. वर वरवंट गावाजवळ मनार नदीवर मातीच्या भरावाचा मध्यम स्वरूपाचा सिंचन तलाव बांधलेला आहे याची लांबी ९५४ मीटर व उंची ३१ मीटर आहे. या प्रकल्पाच्या डाव्या कालव्याची लांबी ६२ कि.मी. तर उजव्या कालव्याची लांबी २० कि.मी. आहे. यातील जलसंचयापासून ६,००० हेक्टर क्षेत्र ओलिताखाली आणण्याचे उद्दिष्ट होते.

लेंडी नदी ही तिची उपनदी तीरू या नदीसह जिल्ह्याच्या दक्षिणेकडील भागात मुखेड तालुक्यातून पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहते. ती काही अंतर दक्षिण सीमेवरून वाहत जाऊन देगलूर तालुक्यातून उत्तरेकडे वळते व या तालुक्यातून वाहत जात मांजरा नदीला मिळते. या नदीवर महाराष्ट्र व आंध्रप्रदेश या राज्यांचा संयुक्त सिंचन प्रकल्प आहे. हा प्रकल्प जिल्ह्यातील मुखेड तालुक्यातील गोणेगावजवळ आहे. येथे मातीच्या धरणाचे बांधकाम आहे. त्याची एकूण लांबी १,६५१.४० मी. व उंची २७.८३ मी. आहे. या प्रकल्पाच्या साहाय्याने जिल्ह्यातील मुखेड व देगलूर तालुक्यातील अनुक्रमे १४,२१० हेक्टर आणि १,५०० हेक्टर असे एकूण १५,७१० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणण्याचे उद्दिष्ट होते.[२८]

**पैनगंगा :** पैनगंगा नदी ही जिल्ह्याची उत्तर सीमा आहे. या नदीचा प्रवाह प्रदीर्घ वळणाचा आहे. या नदीचे पात्र लांब आणि नागमोडी वळणाचे आहे. या नदीचा प्रवाह प्रदीर्घ वळणामुळे इंग्रजी ' S ' या अक्षराच्या स्वरूपात प्रवाहीत झालेला आहे. ही नदी पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहते. किनवट तालुक्यातील इस्लामपूर गावाजवळ १०-१२ मी. उंचीचा सहस्रकुंड येथील नदीच्या पात्रातील धबधबा आता एक प्रेक्षणीय स्थळ म्हणून विकसित होत आहे.

कयाधू आणि तामसा या पैनगंगा नदीच्या दोन छोट्या उपनद्या आहेत. कयाधू नदी ही उत्तर-पश्चिम (वायव्य) दिशेने जिल्ह्यात प्रवेश करताना उजवे वळण घेऊन पैनगंगेच्या दिशेने पैनगंगेसारखेच वळण घेत पैनगंगेला मिळते. कयाधू नदीवरील परभणी जिल्ह्यातील कळमनुरी तालुक्यातील सपली गावातील साठवण तलावातील पाण्यापासून सुमारे ५५,००० एकर शेतीला होणाऱ्या पाणी पुरवठ्यातील मोठा हिस्सा हदगाव तालुक्यास प्राप्त होतो. पैनगंगेची आणखी एक उपनदी तामसा ही छोटी नदी असल्यामुळे यास तामसा नाला असेही म्हणतात. तामसा नाला यावर पिम्पळी या गावानजीक एक केदारनाथ नामक प्रकल्प तयार करण्यात आला आहे. त्यापासून सुमारे ३,५०० एकर जमिनीस सिंचनाची सुविधा उपलब्ध झाली आहे. तामसा नदी पैनगंगेच्या खोऱ्यात वाहत येऊन पैनगंगेला मिळते. या उपनद्यांसह पैनगंगा पूर्वेकडे वाहत जाऊन यवतमाळ जिल्ह्यात वर्धा नदीला मिळते. जिल्ह्यातील बारमाही वाहणाऱ्या गोदावरी, मांजरा, मनार (मन्याड) व पैनगंगा ह्या नद्या आहेत.[२९]

---

२८. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर १९७१**, पूर्वोक्त, पृ. ५ आणि अधिक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.

२९. कित्ता, पृ. ५-६ आणि **सामाजिक व आर्थिक समालोचन, जिल्हा नांदेड,** १९८६-८७, पृ. ४.

## भूशास्त्र

भूवैज्ञानिक रचना म्हणजे जमिनीखालील खडकांच्या थरांची रचना असते. सर्वात वरती मातीचा थर असतो. त्या मातीच्या थराखाली खडकांचे वेगवेगळे थर असतात.

महाराष्ट्राचा बहुतांश भाग हा विस्तृत पठाराचा भाग आहे. ह्या पठाराचा पूर्वेकडील उतार मंद स्वरूपाचा आहे. तर पश्चिमेकडील उतार तीव्र स्वरूपाचा आहे. सह्याद्रीच्या पर्वत रांगांनी महाराष्ट्राचे भौगोलिकदृष्ट्या दोन भाग केलेले आहेत. पश्चिमेकडील कोकण व पूर्वेकडील महाराष्ट्र. नांदेड जिल्हा हा पूर्वेकडील पठारामध्ये येतो. ह्या पठाराची (पूर्व आणि पश्चिम) लांबी ७५० कि.मी. आहे. ह्या पठाराची पश्चिम बाजू जास्त उंच (६०० मीटर) आहे व पूर्वेकडे उंची कमी आहे. नांदेडची समुद्रसपाटीपासूनची उंची ३६० मी. आहे. नागपूरजवळ ह्या पठाराची उंची सर्वात कमी (२५० मी.) आहे. पठाराचा सर्वसाधारण उतार पूर्वेकडे व आग्नेय दिशेकडे आहे.

महाराष्ट्र पठारावर सह्याद्रीपासून पूर्वेकडे व आग्नेय दिशेकडे अनेक डोंगररांगा पसरत गेल्या आहेत. जसजसे पूर्वेकडे जावे तशा ह्या डोंगराच्या मधल्या दऱ्या रूंद होत जातात. नांदेड जिल्ह्यात सुद्धा निर्मल व बालाघाट दरम्यान असलेल्या गोदावरी खोऱ्याची रूंदी अधिक (सुमारे ५०० मी.) आहे.

महाराष्ट्राचा बहुतांश भाग बेसाल्ट नावाच्या खडकांनी व्यापलेला आहे. हा भाग अतिशय स्थिर मजबूत अशा भूकवचाचा बनलेला आहे. भूशास्त्रीयदृष्ट्या अनेक तड्यातून (फटीतून) लाव्हारस बाहेर निघून लाव्हारसाचे थरावर थर साचून हा पठाराचा भाग तयार झालेला आहे. बेसाल्ट खडक हा लाव्हारसापासून बनला आहे. या खडकांची रचना जमिनीला समांतर आडवी अशी आहे. हा खडक काळा, कठीण, अतिशय कणखर व मजबूत स्वरूपाचा आहे. या भूभागास दख्खनचे पठार असे म्हणतात. नांदेड जिल्ह्यातसुद्धा ह्याच बेसाल्ट खडकांनी व्यापलेला दख्खनच्या पठाराचा भूभाग आहे.

ह्या दख्खनच्या पठाराचा मूळ पायाभूत खडक हा ' आर्कियन ' आहे. या आर्कियन खडकात नाईस, ग्रॅनाईट व शिस्ट हे अतिप्राचीन खडक आढळून येतात. नांदेड जिल्ह्यातसुद्धा सर्वात खालच्या स्तरावरती हे आर्कियन खडक आढळून येतात. जिल्ह्यात पेनीन्सुलर ग्रेनाईट कॉम्प्लेक्स, धारवाड आणि डेक्कन ट्रॅप हे खडक प्रामुख्याने आढळून येतात. नांदेड जिल्ह्यातील भूखडकांची सर्वसाधारण भूशास्त्रीय रचना खालीलप्रमाणे आहे :—

| भूशास्त्रीय काळ | भूशास्त्रीय एकक/ स्ट्रॅटीग्रॅफीक घटक | खडकांचे घटक/प्रकार |
|---|---|---|
| रिसेन्ट ते सब रिसेन्ट | ॲल्युव्हियल | क्ले, सिल्ट आणि ग्रॅव्हल (माती व लहान खताचे मिश्रण). |
| इओसिन ते अप्पर क्रिटेशियस | डेक्कन ट्रॅप (दख्खनचे बेसाल्ट) | कठीण बेसाल्ट, व्हेसीक्यूलर बेसाल्ट, ॲम्गडुलायडल बेसाल्ट आणि इंटर ट्रॅपियन (कठीण पाषाण, मांजऱ्या व मुरूम). |
| प्री कॅम्ब्रियनस | विंध्यानस | सँडस्टोन्स आणि लाईम स्टोन्स (वाळू दगड आणि चुनखडक). |
| आर्कियनस् | आर्कियन कॉम्प्लेक्स (आर्कियन संयुक्त खडक) | पेनिन्सुलर ग्रॅनाईट-नाईस कॉम्प्लेक्स, पिंक आणि ग्रे ग्रॅनाईट, डोलेराईटस् आणि क्वार्टझ्व्हेनस्-बॅन्डेड हेमाटाईट क्वार्टझाईटस्, धारवार सिस्टीम. |

Maharashtra State Gazetteers

**आर्कियनस् :** धारवाड खडकांअंतर्गत ग्रॅनाईट, ग्रॅनेटिक नाईस आणि असंख्य छोटे छोटे बँडेड हेमाटाईट क्वार्टझाईट आढळून येतात. या खडकांवर खनन कार्याचा परिणाम फार कमी होतो. त्यामुळे या खडकांचे १५ ते ३० मी. उंचीचे डोंगर तयार होतात.

ग्रॅनाईट हे खडक जिल्ह्यातील दक्षिण-पूर्वेकडील (आग्नेय) भागात आंध्रप्रदेशच्या सीमेलगत आढळून येतात. उत्तर पूर्वेकडे (ईशान्य) सुद्धा किनवटजवळ थोड्या प्रमाणात हे खडक आढळून येतात.

ग्रॅनाईट खडकामध्ये दोन्हीकडे निमुळता होत जाणारा नाईस खडक आढळून येतो. ॲम्फीबोलाईट, डोलेराईट, डाईक, पिग्म्याटाईट आणि क्वार्टझ् व्हेनस्चे खडकसुद्धा जिल्ह्यात दक्षिण-पूर्वेकडील (आग्नेय) भागात आढळतात. पिंक आणि ग्रे ग्रॅनाईट हे दोन ग्रॅनाईटचे प्रकार जिल्ह्यात आढळतात. दोन्ही प्रकारचे ग्रॅनाईट पिग्म्याटाईट या खडकासोबत आढळून येतात. ग्रॅनाईट या खडकांचा रंग या खडकात आढळून येणाऱ्या फेल्डस्पारवरती अवलंबून असतो. ग्रॅनाईट खडकांत आढळून येणाऱ्या खडकांच्या कणाचा आकार हा लहान ते मध्यम असतो. पॉरफिरेटिक टेक्श्चर सुद्धा ग्रॅनाईटमध्ये आढळून येते.

**प्री-कॅम्ब्रीयनस् :** विंध्यान ग्रुपमध्ये सापडणारा लाईमस्टोन (चुनखडक) हा किनवट तालुक्यातील पारडी गावाजवळ थोड्याफार प्रमाणात विखुरलेला आढळून येतो. किनवटपासून पश्चिमेकडे २० कि.मी. अंतरावर पातळ थराचे लाईमस्टोन (चुनखडक) आणि वाळूचे खडक (Sand Stone) डेक्कन ट्रॅपच्या खाली आढळून येतात.

**इओसिन ते अप्पर क्रिटेशियस (दख्खनचे बेसाल्ट) :** एकूण भूप्रदेशाच्या २/३ भाग हा बेसाल्ट खडकाने व्यापलेला आहे. स्तरीय रचना असलेला हा खडक कठीण व अभेद्य असतो. सर्वसाधारणपणे बेसाल्ट खडक हा काही ठिकाणी काळ्या मातीने व काही ठिकाणी मुरूमाने व्यापलेला दिसतो.

बेसाल्ट खडकात दोन प्रकार आढळतात. एक ' आआ ' खडक व दुसरा पाहुईहुई खडक. ' आआ ' खडकाचा खालचा भाग जास्त जाडीचा व कठीण असतो आणि प्रस्तर भेगा व गाळयुक्त झीज हे प्रमुख लक्षण असते. पाहुईहुई प्रकारात सच्छिद्र स्तर हा जास्त असतो व कठीण स्तर हा कमी प्रमाणात असतो.[३०]

डेक्कन ट्रॅप (दख्खनचे बेसाल्ट) मध्ये आढळणाऱ्या बेसाल्टचा फ्लो (स्तर) चा समावेश सह्याद्री गटात ' केला जातो. सह्याद्री गटाची चार उप गटात विभागणी झाली आहे. अजिंठा, चिखली, बुलडाणा आणि कारंजा हे ते उप गट आहेत. अजिंठा उप गटाची जाडी १५४ मी. आहे. ज्यात १५ बेसाल्टिक फ्लो (स्तर) चा समावेश आहे. अजिंठ्याच्या वरती असणाऱ्या चिखली उप गटाची जाडी ९० मी. आहे. यामध्ये १ ते ४ ' आआ ' प्रकारचे फ्लो (स्तर) आढळतात.

बुलडाणा उप गट चिखली उप गटाच्या वरती आहे आणि हे जमिनीवरती टेकड्यांच्या रुपात उत्तर-पूर्व (ईशान्य) आणि दक्षिण-पश्चिम (नैऋत्य) भागात दिसून येतात. यामध्ये सुद्धा ' आआ '

३०. वरीष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, नांदेड यांची माहिती पुस्तिका, ' भूजल जनजागृती अभियान ', २००६-०७, पृ. २ व ३.

Maharashtra State Gazetteers

प्रकारचे बेसाल्ट आहेत. ज्याची जाडी ५० मी. इतकी आहे. कारंजा उप गट सर्वात वरती असून वयाने सर्वात लहान आहे. यामध्ये २ ते ३ ' आआ ' प्रकारचे बेसाल्ट फ्लो आहेत. ह्याची जाडी ५० मी. इतकी आहे. कारंजा उप गट हा जिल्ह्यात दक्षिण-पश्चिम (नैऋत्य) भागात आढळून येतो.

डेक्कन ट्रॅपमध्ये आढळणारा बेसाल्ट हा खडक कडक आहे. यातील खडकांचे कण अतिशय सुक्ष्म असतात. ज्याचा प्रकार उघड्या डोळ्यांनी ओळखणे कठीण असते. या खडकांचा रंग प्रामुख्याने काळा असतो पण कधी कधी गडद निळा राखाडी किंवा तांबड्या रंगाच्या छटापण या खडकात आढळून येतात. लॅब्राडोराईट हा फेल्डस्पाइन फक्त मोठ्या आकाराचा असतो. जो की, पॉरफिरेटीक बेसाल्ट या खडकात आढळतो.

जिल्ह्यातील दक्षिण-पश्चिम (नैऋत्य) दिशेला बेटमोगरा ह्या गावाजवळ बेसाल्ट हा ग्रॅनाईटच्या लगत ३५० मी. उंचीवर आढळून येतो. सगरोळीजवळ बेसाल्ट ग्रॅनाईटचा संपर्क ३९६ मी. उंचीवर झालेला दिसतो. व्हेसीक्युलर बेसाल्टमध्ये आढळून येणाऱ्या व्हेसीकलस् (उघड्या पोकळ्या) चा आकार हा ठराविक नसतो. बेसाल्ट थराच्या (फ्लो) सर्वात खाली पाईप अॅम्माडुल्स आणि ' रोपी स्ट्रक्चर ' आढळून येते. व्हेसीकलस्मध्ये ' क्लोराईट, कॅलसाईट, झिओलाईट आणि डिव्हिट्रीफाईड ग्लास ' आढळून येतात.

' आआ ' बेसाल्ट प्रकारात मॅसीव्ह बेसाल्ट प्रामुख्याने आढळतो. ह्या मॅसीव्ह बेसाल्ट प्रकारात कॉलमनर जॉईन्टस (मोठ्या षटकोनी आकाराचे उभे स्तंभ) आढळून येतात. कापलेल्या कांद्याच्या सालीप्रमाणे वर्तुळाकार खनन कार्य (Spheroidal Weathering) सुद्धा या खडकात आढळून येते. या प्रकारचा बेसाल्ट बिलोली तालुक्यातील नरसी गावाजवळ आढळून येतो. कॉलमनर बेसाल्ट हे नांदेड विद्यापीठाजवळसुद्धा आढळतात. मॅसीव्ह बेसाल्टच्या वरच्या भागात पण व्हेसीकल्स् आढळून येतात.

किनवटजवळील एका घाटात १२ पाहुईहुई (Paheoehoe) प्रकारचे बेसाल्ट आढळून आले आहेत. इतर बेसाल्ट हे ' आआ ' प्रकारचे आहेत. ' आआ ' प्रकारचे बेसाल्ट हे जिल्ह्यातील उत्तरेकडील भागात जास्त आहेत. मध्य भागात संयुक्त/कम्पाऊंड पाहुईहुई (Compound Paheoehoe) प्रकारचे बेसाल्ट आहेत.

बेसाल्टच्या प्रत्येक थराची सरासरी जाडी ही २० मी. इतकी आहे. किनवट भागात कॉम्पॅक्ट व व्हेसीक्युलर बेसाल्ट व ग्रॅनाईट आढळतो. हदगाव तालुक्यात व्हेसीक्युलर आणि कॉम्पॅक्ट बेसाल्ट आढळतो. भोकर तालुक्यात कॉम्पॅक्ट आणि अॅम्माडुलायडल बेसाल्ट आढळतो. बिलोली तालुक्यात ग्रॅनाईट आढळतो. देगलूरच्या उत्तरेकडे कॉम्पॅक्ट बेसाल्ट व ग्रॅनाईट आढळतो. तर दक्षिणेकडे फक्त ग्रॅनाईट खडक आढळतो. मुखेडमध्ये कॉम्पॅक्ट बेसाल्ट आणि खनन झालेला व्हेसीक्युलर बेसाल्ट आढळतो. कंधारमध्ये कॉम्पॅक्ट व व्हेसीक्युलर बेसाल्ट आढळतो. नांदेड तालुक्यात व्हेसीक्युलर व कॉम्पॅक्ट बेसाल्ट आढळतो.

प्राचीन काळी सखल भागात तलाव तयार झाले व या भागात गाळ जमा होऊन दोन बेसाल्ट थरांच्यामध्ये गाळाच्या खडकांची निर्मिती झाली. ज्यात प्रामुख्याने वाळूचे खडक, लाईमस्टोन (चुनखडक) चे थर जमा झाले. या गाळाच्या खडकात गॅस्ट्रोडा, लॅमिनीब्रँची आणि पानांचे जिवाश्म

(Fossils) सापडले आहेत. या थरांना ' इंटर-ट्रेपीयन ' असे म्हणतात. हे १ ते १.५ मी. जाडीचे इंटर ट्रेपीयन थर किनवट, मातुल, रावणगाव, पिंपलाधु आणि झरीजवळ आढळून येतात. ह्या खडकातील काही नमुन्यात ८० ते ९२ टक्के $CaCo_3$ (कॅल्शिअम कार्बोनेट/चुनखडक) आढळून येतो. लाईमस्टोन हे पारडी, वडेपुरी, झरी आणि पांगरीजवळ आढळून येतात. पारडीजवळ २.२५ दशलक्ष टन इतका लाईमस्टोन (चुनखडक) साठा अपेक्षित आहे. तर पांगरीजवळ ०.७८ दशलक्ष टन इतका साठा उपलब्ध असावा असा अंदाज केला आहे. या लाईमस्टोनपासून सिमेंटची निर्मिती होवू शकते. क्ले आणि फ्लॅगस्टोन ह्या खडकांचे नमुनेपण इंटरट्रॅपियनमध्ये आढळून आले आहेत.

**रिसेन्ट ते सब रिसेन्ट :** गोदावरी, पैनगंगा, मांजरा, आसना, लेंडी आणि मनार (मन्याड) या उप नद्यांच्या खोऱ्यात अल्युव्हियल (जलोढ) ची जाडी १२ ते ३० मी. पर्यंत आढळून येते. यात बेसाल्ट, चर्ट, क्ले (माती), सिल्ट आणि क्वार्टझ्चे तुकडे आढळून येतात. ज्या ॲल्युव्हियलमध्ये (गाळयुक्त मातीमध्ये) वाळुचे प्रमाण जास्त आहे त्याला या भागात ' येसगी सगरोळी ' असे संबोधतात आणि या थरात उदंड भूजल आहे पण गोदावरी अल्युव्हियलमध्ये क्ले (माती) चे प्रमाण जास्त असल्याने त्यात भूजलाचे प्रमाण कमी आहे.

**प्रस्तर भ्रंश/लिनियामेन्ट/स्ट्रक्चरल फिचर्स :** किनवट तालुक्यातील बोधडी गावाजवळून जाणारा कदम फॉल्ट उत्तर-पश्चिम ते दक्षिण-पूर्व पसरला आहे. उ. २०° पूर्व. - दक्षिण २०° प., उ. ३०° पू. - द. ३०° प. आणि उ. ४७° प. - द. ४७° पू. या तीन दिशेला प्रस्तरभ्रंश प्रामुख्याने पसरलेले आढळून येतात.

प्रस्तरभ्रंश हे प्रामुख्याने कमकुवत क्षेत्र म्हणून संबोधले जातात. त्यामुळे या भागातील छोट्या छोट्या नदी-नाल्यांचे जाळे हे या प्रस्तरभ्रंशातून वाहतात. किंबहुना ह्या जलप्रणालीवर (ड्रेनेज पॅटर्न) प्रस्तरभ्रंशाचा प्रभाव आढळून येतो. ' Sub-Parallel drainage Pattern ' हे त्याचेच द्योतक आहे. या प्रस्तरभ्रंशाजवळ भूजलाचे प्रमाण जास्त आहे.

**आर्थिकदृष्ट्या महत्त्वाचे खनिजे :** या जिल्ह्याच्या भूगर्भात महत्त्वाचे उल्लेखनीय असे खनिज पदार्थ आढळत नाहीत. तथापि, स्थानिक उपयोगात येणारे काही खनिजे पुढीलप्रमाणे आहेत.

**चुनखडी :** चुनखडी प्रामुख्याने व्यापारीकरणाच्या दृष्टीने वापरली जाऊ शकते. १ ते १.५ मीटर जाडीचे चुनखडक (लाईमस्टोन) जिल्ह्यात आढळून येतात. किनवट तालुक्यात काही भागात कांळवथरी दगडांच्या स्तरांमध्ये चुनखडीचे साठे सापडतात. मेहदाजवळ ०.७ मेट्रीक टन, धानोऱ्याजवळ ०.०१७ मेट्रीक टन, बेलमंडजवळ ०.०४ मेट्रीक टन आणि खारकाजवळ ०.२४ मेट्रीक टन चुनखडी आढळून आली आहे. जिल्ह्यात सापडणारी चुनखडी एकाच दर्जाची नसून काही ठिकाणी चुनखडीमध्ये बरीच रेती सापडते. जिल्ह्यातील चुनखडीचा एकंदरीत साठा सुमारे एक कोटी टनाचा असावा असा अंदाज आहे.[३१] मेहदा, धानोरा, बेलमंड व खारका येथील चुनखडीची खंडता आणि त्यावर असलेल्या बेसाल्टमुळे या खडकांचे रुपांतर फायदेशीर खाणीत सध्यातरी होऊ शकले नाही.

---

३१. **भारतीय जनगणना १९६१, जिल्हा जनगणना निर्देशग्रंथ, नांदेड,** पृ. २ आणि **जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, जिल्हा नांदेड,** २००४-०५, पृ. १.

**ग्रॅनाईटस् :** जिल्ह्यात आढळणाऱ्या वेगवेगळ्या रंगछटा असणाऱ्या ग्रॅनाईटस्चा वापर इमारतीचा दगड म्हणून केला जाऊ शकतो.

**बेसाल्ट :** हा खडक कडक, कणखर आणि जास्त घन असल्यामुळे बेसाल्टचा वापर इमारतीचा दगड आणि या खडकाची खडी रस्त्यासाठी तसेच सिमेंट काँक्रीटमध्ये वापरली जाते.

**मृदा/जमीन :** जिल्ह्यात जमीन सर्वसाधारणपणे काळी, सुपीक व कसदार अशा स्वरूपाची आहे. जिल्ह्याच्या सर्व तालुक्यात काळीची जमीन आहे. या जमिनीत कॅल्शियम, मॅग्नेशियम व कार्बोनेटस्चे प्रमाण अधिक आहे. परंतु नायट्रोजन, पोटॅश, फॉस्फेटस् व ह्युमसचे प्रमाण फार कमी आहे. या जमिनीत ओलावा व आर्द्रता टिकवून ठेवण्याची फार मोठी क्षमता असल्यामुळे जिल्ह्यातील कमी पावसाच्या भागात अशी जमीन उपयुक्त ठरते. उत्तम प्रतीची काळीची जमीन गोदावरी नदी व तिच्या उपनद्यांच्या काठाकाठाने अरूंद पट्ट्यात आढळते. चांगल्या प्रतीची काळीची जमीन मांजरा व मन्याड नदीच्या काठाकाठाने बिलोली तालुक्यात आढळते. तर बिलोली तालुक्याला इतरत्र ती हलक्या प्रतीची व मोकळ्या दगडाने झाकलेली अशा प्रकारची आहे. नांदेड तालुक्यातील जमीन मुख्यतः भारी काळीची व गाळ साचलेली अशी आहे. टेकड्यांच्या पायथ्याशी लागून असलेल्या भागात मात्र फार हलक्या प्रतीची जमीन आढळते. देगलूर तहसिल जिल्ह्यातील सर्वात लहान तहसिल असले तरी उत्तम प्रतीची काळीची जमीन त्या तालुक्याला लाभलेली आहे. तालुक्याच्या पश्चिमेकडील थोड्याशा भागाव्यतिरिक्त तालुक्यातील सर्व जमीन उच्च प्रतीची व रब्बी पिकांसाठी योग्य अशी आहे. कंधार व लोहाचा काही भाग काळीची जमीन असलेला आहे. तेथे रब्बी पिके घेतली जातात. या तालुक्याच्या उर्वरित भागात हलकी जमीन आहे. तेथे खरीप पिके घेतली जातात. हदगाव तालुक्यातील जवळपास ३/४ जमीन विशेषतः पैनगंगेच्या काठाजवळची जमीन सुपीक आहे. तालुक्याच्या दक्षिणेकडील टेकडीजवळच्या जमिनी थोड्या क्षारयुक्त असल्याचे आढळते. बाकीच्या भोकर व किनवट या दोन तालुक्यात टेकड्या व माळरानाचा भाग वगळून इतर सर्व जमीन काळीची व भारीची आहे.[३२]

## भूजल

भूजल उपलब्धीच्या दृष्टीकोनातून जिल्ह्यातील भूस्तरीय रचना महत्त्वाची ठरते. जिल्ह्यातील भूस्तरीय रचनेचे स्थूलमानाने तीन विभाग करता येतील. (१) आर्कीयन - ग्रेनाईट, (२) क्रिटेशिअस ते इओसिन - बेसाल्ट आणि इंटर ट्रेपियन बैडस्, (३) रिसेंट - अल्युव्हियल. यापैकी पहिल्या विभागातील ग्रेनाईट हा खडक नांदेड जिल्ह्याच्या बिलोली आणि देगलूर तालुक्याच्या दक्षिण आणि पूर्व भागामध्ये तसेच किनवट शहराच्या उत्तर व दक्षिणेस पैनगंगा नदीच्या किनाऱ्यावर पसरलेला आहे. ग्रेनाईट ह्या खडकामध्ये जास्त विघटन झालेल्या स्तरांमध्ये पाणी आढळून येते. ह्या खडकामध्ये व्हेदरींग १४ ते ३० मीटरपर्यंत आहे. ग्रेनाईट असल्यामुळे पाणी लागत नाही आणि आवेधनाचे काम होऊ शकत नाही. या भागातील विंधन विहिरीची क्षमता ४,००० लिटर्स ते १५,००० लिटर्स प्रती तास आढळून येते. पाण्याची स्थिर पातळी ५ मीटरपासून १५ मीटरपर्यंत आहे. विंधन विहिरीचे यशस्वीतेचे प्रमाण ८५ ते ९०% आहे.

---

३२. **जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन,** पूर्वोक्त, पृ. ५.

दुसऱ्या प्रकारच्या भूस्तरीय रचनेनुसार जिल्ह्याच्या उर्वरित भागामध्ये बेसाल्ट हा खडक पसरलेला आहे. ह्या खडकामध्ये काही भागात इंटरट्रेपियन व इन्फ्रोट्रेपियन हे खडक आढळतात. बेसाल्टमध्ये पाणी साठवून ठेवण्याची क्षमता फक्त अतिविघटीत, जॉईन्टस्, फ्रॅक्चरमध्येच आढळून येते. या खडकात विंधन विहिरीची खोली ६० मीटरपर्यंत करावी लागते. या भागातील विंधनविहिरीची क्षमता ५,००० ते १५,००० लिटर्स प्रती तास आहे आणि पाण्याची स्थिर पातळी १० ते ३० मीटरपर्यंत आहे.

नांदेड जिल्ह्यातील बागायती सिंचन विहिरींची खोली साधारणतः ७ ते २० मीटरपर्यंत आहे. पाण्याची स्थिर पातळी हिवाळ्यात ४ ते ६ मीटरपर्यंत व उन्हाळ्यात १० ते १५ मीटर असते. विहिरींची क्षमता हिवाळ्यात ५४ किलोलिटर पासून ते १८० किलोलिटर पर्यंत आणि उन्हाळ्यात १८ कि.लीटरपासून ते ५४ कि.लीटरपर्यंत असते.

तिसऱ्या विभागातील ॲल्युव्हियलच्या भागात जिल्ह्यामध्ये मुख्य गोदावरी, मांजरा, पैनगंगा आणि लेंडी नद्या आहेत. या नद्यांच्या दोन्ही बाजूंच्या परिसरामध्ये गाळांचा प्रदेश आढळून येतो. त्याची खोली १२ ते २० मीटरपर्यंत आहे. ॲल्युव्हियलमध्ये रेती, ग्रॅव्हल्स आणि बोल्डर्स आढळतात. हा ॲल्युव्हियम बिलोली, देगलूर, नांदेड, हदगाव आणि किनवट तालुक्यात आढळतो. बिलोली आणि देगलूर तालुक्यात मांजरा नदीच्या काठी ८०० मी. रूंद आणि ५० कि.मी. लांबीच्या परिसरामधील १५ गावांमध्ये ॲल्युव्हियलचा पट्टा आहे. सदर ॲल्युव्हियलची खोली १५ ते २० मीटर असून केसींग पाईपची खोली १० ते १५ मीटरपर्यंत आहे. या उथळ कूपनलिकांची क्षमता ५,००० ते ७,००० लिटर्स प्रती तास आहे आणि या ट्युबवेल २४ तास चालतात.[३३]

नांदेड परिसरातही भूजल हे प्रामुख्याने ॲल्युव्हियल बेसाल्टमधील तडे (Joints) आणि विघटन क्षेत्रात आढळून येते. या भागात विहिरीत भूजल सर्वसाधारणपणे जमिनीपासून ६.८५ मी. ते २३.८५ मी. च्या खोलीवर आढळून येते. या भागात सर्वात खोल विहीर गुरूद्वारा परिसरात (२३.८५ मी.) आहे. कूपनलिकेची खोली ३० मी. ते ९० मी. पर्यंत आहे.

नांदेड वाघाळा परिसरात पाण्याची मागणी दिवसाला ४९.९ एम.एल.ओ. (Million liters per day) आहे. तथापि फक्त ४०.६१ एम.एल.ओ. पाणी पुरवठा ५,५६३ कूप नलिकेतून केला जातो.

**भूजल सर्वेक्षण**[३४] **:** जिल्ह्यात भूजल आणि विकास यंत्रणेचे कार्यालय नांदेड येथे १९७३-७४ मध्ये सुरू झाले. लघुपाणलोट आणि खेडे/गाव हा घटक धरून संबंधित खेड्याचे/गावाचे सखोल भूजल सर्वेक्षण करण्यात येते. या सर्वेक्षणांतर्गत खेड्यातील प्रातिनिधीक विहिरींची भूजलविषयक माहिती गोळा करून नकाशा तयार केला जातो. या नकाशावरून विहिरींसाठी योग्य/अयोग्य स्थळांची माहिती प्राप्त होते.

---

३३. वरीष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्व्हेक्षण आणि विकास यंत्रणा, नांदेड यांचेकडून २००९ मध्ये प्राप्त माहितीवर आधारित.

३४. कित्ता.

Maharashtra State Gazetteers

नांदेड जिल्ह्यात ४९ पाणलोट क्षेत्र असून यापैकी सन २००८-०९ पर्यंत १६ पाणलोट क्षेत्र पूर्णतः हाताळलेले आहेत. या पाणलोट क्षेत्रातील ६१० गावांचे सखोल भूजल सर्व्हेक्षण करण्यात आलेले असून ६०८ अहवाल तयार करण्यात आलेले आहेत. वरील ४९ पाणलोट क्षेत्रांपैकी १३ पाणलोट क्षेत्र अंशतः हाताळलेले असून यामध्ये ८८ गावांचे सखोल भूजल सर्वेक्षण करण्यात आलेले असून ८६ अहवाल पूर्ण तयार करण्यात आलेले आहेत.

या अहवालाचा उपयोग प्रत्येक खेड्यातून विहिरी खोदण्याच्या कार्यक्रमासाठी अपारंपरिक व जलसंधारण योजनाकरीता करण्यात येतो. तसेच शेतकऱ्यांना त्यांच्या विहिरी खोदण्यासाठी वैयक्तिक सल्ला देण्यात येतो.

जिल्ह्यातील निरीक्षण विहिरीतील तालुकानिहाय भूजल पातळीची माहिती खालील विवरणपत्रात दिली आहे.

**निरीक्षण विहिरीतील तालुकानिहाय भूजल पातळी (२००६)**

| अ. क्र. | तालुक्याचे नाव | एकूण निरीक्षण विहिरींची संख्या | सरासरी भूजल पातळी (मीटरमध्ये) | मागील ५ वर्षाच्या ऑक्टोबर महिन्यातील भूजल पातळीतील घट (-), वाढ (+) झालेल्या निरीक्षण विहिरींची संख्या | | भूजल पातळीत घट (-), वाढ (+) मीटरमध्ये | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | घट (-) | वाढ (+) | घट (-) | वाढ (+) |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| १ | नांदेड | ५ | ४.९२ | ४ | १ | ... | ०.३१ |
| २ | मुदखेड | २ | ३.७० | २ | ... | १.६१ | ... |
| ३ | अर्धापूर | २ | ३.६६ | २ | ... | ०.६४ | ... |
| ४ | भोकर | ७ | ३.३२ | २ | ५ | ... | ०.२१ |
| ५ | उमरी | ६ | ३.४९ | ३ | ३ | ०.६९ | ... |
| ६ | हदगाव | १७ | ४.३६ | ७ | १० | ... | ०.३२ |
| ७ | हिमायतनगर | ५ | ४.१९ | ३ | २ | ०.१५ | ... |
| ८ | किनवट | १५ | ३.११ | ८ | ७ | ... | ०.०३ |
| ९ | माहूर | ३ | ३.२८ | १ | २ | ... | १.२८ |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १० | धर्माबाद | २ | ४.८२ | १ | १ | ... | ०.३२ |
| ११ | बिलोली | ७ | ५.२६ | ५ | २ | ३.५३ | ... |
| १२ | नायगाव | ४ | ४.६० | २ | २ | ... | ०.१९ |
| १३ | मुखेड | १० | २.५० | २ | ८ | ... | ०.३७ |
| १४ | देगलूर | १० | ६.३५ | ५ | ५ | ०.१३ | ... |
| १५ | कंधार | १२ | २.९० | ... | १२ | ... | १.३३ |
| १६ | लोहा | ८ | २.४२ | ५ | ३ | ०.११ | ... |

अनुसूचित जाती/जमाती वगळून इतर जातींच्या अल्पभूधारक शेतकऱ्यांना जवाहर विहीर योजने अंतर्गत राज्य शासनाद्वारे विहिरी बांधून दिल्या जातात. जिल्ह्यात सन १९८८-८९ ते सन २००७-०८ पर्यंत एकूण ८,७०९ जवाहर विहिरींचा लक्षांक ठरवून देण्यात आला होता. त्यापैकी ६,६६४ विहिरींना मंजुरी देण्यात आली होती. मंजूर जवाहर विहिरींपैकी ५,१५२ विहिरी पूर्ण झाल्या होत्या, तर ६६३ विहिरी अपूर्ण होत्या आणि ५३ विहिरी निष्फळ ठरल्या होत्या. ७०६ विहिरी रद्द करण्यात आल्या तर काम सुरू न झालेल्या विहिरींची संख्या ९० इतकी होती. या योजनेतील लाभार्थींची निवड आणि विहिरीचे खोदकाम आणि बांधणी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत केली जाते.

## हवामान[३५]

नैऋत्य मान्सूनमुळे पडणारा पावसाळ्याचा ऋतू वगळता या जिल्ह्याचे हवामान सर्वसाधारणपणे कोरडेच असते. येथे एका वर्षात चार ऋतू असतात. त्यात हिवाळा हा नोव्हेंबर ते फेब्रुवारी अखेरपर्यंत असतो. त्यानंतर येणारा उन्हाळा मात्र जूनच्या पहिल्या आठवड्यापर्यंत खेचला जातो. नैऋत्य मान्सूनचा पाऊस त्याच्या पाठोपाठ येतो आणि ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यापर्यंत टिकतो. शेष ऑक्टोबर आणि नोव्हेंबरचा पूर्वार्ध हा मान्सूनोत्तर गर्मीचा काळ असतो.

**पर्जन्यमान :** या जिल्ह्यात नऊ पर्जन्यमापक केंद्रे असून दहा वर्षापासून ते अठ्ठेचाळीस वर्षापर्यंतची पर्जन्यविषयक आकडेवारी येथे उपलब्ध आहे. तक्ता क्र. १ व २ मध्ये जिल्ह्यातील या केंद्रामध्ये पडणारा पाऊस आणि संपूर्ण जिल्ह्यातील पर्जन्याची आकडेवारी दर्शविली आहे. तसेच तक्ता क्र. ३ मध्ये सन २००५-०६ मधील तालुकानिहाय पर्जन्य दिवसांची संख्या व एकूण पर्जन्याची आकडेवारी दर्शविली आहे. जिल्ह्यातील सरासरी वार्षिक पर्जन्यमान हे ९९१.५ मि.मी. (जनगणना अहवाल २००१ नुसार ही सरासरी ८९७.८ मि.मी. दर्शविली) आहे. त्यातील नैऋत्य मोसमी

३५. कालेकर बी. पी., निवृत्त निदेशक, हवामानशास्त्र विभाग, पुणे यांनी **इंडिया मेटिऑरालॉजिकल डिपार्टमेंट, गव्हर्नमेंट ऑफ इंडिया,** पुणे तसेच श्री. कपले आर. डी., संचालक, एस.आर.टी.एम. युनिव्हर्सिटी, नांदेड यांचेकडून प्राप्त माहिती आधारे ही नोंद केली आहे.

Maharashtra State Gazetteers

वाऱ्यापासून पडणाऱ्या पावसाचे प्रमाण हे एकूण वार्षिक पर्जन्याच्या ८६ टक्के आहे. जुलै आणि ऑगस्ट हे वर्षातील सर्वाधिक पर्जन्याचे महिने आहेत. या जिल्ह्यातील पर्जन्याचा सर्वसाधारण आलेख पाहिला तर असे दिसून येते की, जिल्ह्यात पश्चिमेकडून पूर्वेकडे पावसाचे प्रमाण वाढत जाते. जिल्ह्यात दरवर्षी पडणाऱ्या एकूण पावसाच्या आकड्यांत बरीच तफावत दिसून येते. सन १९४१ ते १९९० या पन्नास वर्षाच्या कालावधीत जिल्ह्यात सर्वाधिक वार्षिक पर्जन्य १९८३ साली झाले. ते प्रसामान्याच्या १९४ टक्के होते. तर सर्वात कमी वार्षिक पर्जन्य १९७२ साली झाले. ते प्रसामान्याच्या ४१ टक्के इतके होते. या पन्नास वर्षाच्या काळात प्रसामान्य पर्जन्याच्या ८० टक्केपेक्षा कमी वार्षिक पर्जन्य दहा वर्षात झाले त्यात सलग दोन आणि तीन वर्षे प्रत्येकी एकेकदा ८० टक्केपेक्षा कमी वार्षिक पर्जन्य झाले. तक्ता क्र. २ वरून असे दिसून येते की, पन्नास वर्षांपैकी ३४ वर्षांमध्ये जिल्ह्यात ७०१ मि.मी. ते १२०० मि.मी. दरम्यान पावसाची नोंद झाली आहे. एका वर्षात सर्वसाधारणपणे ४९ पर्जन्य दिवस (२.५ मि.मी. पेक्षा जास्त पर्जन्य झालेले दिवस) आहेत. पर्जन्य दिनाच्या संख्येत बदल झालेला आढळतो. जसे बासरला ३५ तर किनवटला ५५ पर्जन्य दिन. जिल्ह्यात २४ तासात सर्वाधिक पाऊस ३९० मि.मी. इतका किनवट येथे दिनांक २८ जून १९८९ रोजी झालेला आहे.

तक्ता क्र. ३ मधील सन २००५-०६ या वर्षातील पर्जन्याच्या आकडेवारीनुसार हिमायतनगर भागात सर्वात जास्त पाऊस झाला तर सर्वात कमी पर्जन्याची नोंद नांदेड येथे झाली. कमी पर्जन्याची स्थिती नांदेड आणि देगलूर तालुक्यात अनुभवाला आली. जिल्ह्यातील मध्य आणि उत्तरेकडील भाग दुष्काळ प्रवण क्षेत्र म्हणून संबोधला जातो.

**तापमान :** जिल्ह्यात हवामान विषयक निरीक्षणे घेणारी वेधशाळा फक्त नांदेड या ठिकाणीच आहे. या वेधशाळेतील हवामान विषयक आकडेवारीच्या आधारे पुढील माहिती दिलेली आहे. ऋतुनुसार जिल्ह्यातील तापमानामध्ये खूप बदल होतो. जेव्हा तापमानात घट होऊ लागते, तेव्हा नोव्हेंबरच्या शेवटी हिवाळ्याची चाहूल लागते. डिसेंबर सर्वाधिक थंडीचा महिना. या महिन्यातील सरासरी किमान (न्यूनत्तम) तापमान १३.१° सेल्सिअस आणि सरासरी कमाल (उच्चत्तम) तापमान ३०.२° सेल्सिअस असते. थंडीच्या मोसमात जिल्ह्याला थंडीच्या लाटेचा फटका बसण्याची काही वेळा शक्यता असते. उत्तर भारतात पश्चिमेकडून पूर्वेकडे जाणारे पश्चिमी वारे यामुळे या थंडीच्या लाटा येतात. अशावेळी किमान तापमान ५° सेल्सिअस पर्यंत घसरते. मार्च ते मे या कालावधीत दिवसाचे आणि रात्रीचे तापमान सतत वाढत जाते. मे हा वर्षातील सर्वाधिक तापमान असणारा महिना. या महिन्यात दैनंदिन सरासरी कमाल तापमान ४२° सेल्सिअस इतके असते तथापि दैनंदिन सरासरी किमान तापमान हे २६° सेल्सिअस असते. कधी कधी या कालावधीत तापमान ४७° सेल्सिअस पर्यंत पोहचते. जिल्ह्यातील नैऋत्य मान्सून पावसाच्या प्रगतीबरोबरच साधारण जूनच्या मध्यावधीस तापमानात अमुलाग्र घट जाणवू लागते आणि संपूर्ण मोसमी ऋतुमध्ये हवामान आल्हाददायी असते. ऑक्टोबरच्या सुरूवातीस जिल्ह्यात मान्सूनच्या परतीच्या प्रवासास सुरूवात होते आणि दिवसाचे तापमान हळू हळू वाढू लागते. ऑक्टोबरमध्ये द्वितीय कमाल तापमानाची नोंद होते. त्यानंतर दिवसा आणि रात्रीच्या दोन्ही तापमानात घट होते. जिल्ह्यात नांदेड येथे कमाल तापमान ४६.७° सेल्सिअस इतके दिनांक ४ जून १९९५ रोजी, तर सर्वात कमी (किमान) तापमान ३.६° सेल्सिअस इतके दिनांक २८ डिसेंबर १९८३ रोजी नोंदविले गेले आहे.

**आर्द्रता :** नैऋत्य मोसमी पावसाच्या काळात जिल्ह्यातील सापेक्ष आर्द्रता ही सर्वाधिक असते, ती साधारणपणे ६० ते ८० टक्केच्या दरम्यान असते. नैऋत्य मोसमी पावसाच्या परतीच्या प्रवासाबरोबरच आर्द्रता ही हळू हळू कमी होऊ लागते. थंडीच्या आणि उन्हाळ्याच्या काळात हवा सर्वसाधारणपणे कोरडी असते. उन्हाळा हा वर्षातील सर्वात कोरडा काळ असून भरदुपारच्या वेळी सुद्धा सापेक्ष आर्द्रता ही ३० टक्के पेक्षा कमी असते. तक्ता क्र. ४ मध्ये जिल्ह्यातील सरासरी तापमान, सापेक्ष आर्द्रता आणि सरासरी वाऱ्याचा वेग यांची आकडेवारी दिलेली आहे.

**मेघमयता (अभ्राच्छादन) :** नैऋत्य मान्सूनच्या काळात आकाश पूर्णपणे मेघांनी आच्छादलेले असते. मान्सूनोत्तर काळात ढगांचे प्रमाण झपाट्याने कमी होऊ लागते. हिवाळ्यात आकाश निरभ्र किंवा हलकेसे ढगाळ असते.

**वारे :** ऑक्टोबर ते मार्च दरम्यान वाऱ्याचा वेग मंद असतो. उन्हाळ्याच्या पूर्वार्धात आणि नैऋत्य मोसमी पावसाच्या काळात वाऱ्याचा वेग थोडासा वाढल्याचे जाणवते. नैऋत्य मोसमात वारे प्रामुख्याने प्रश्चिमेकडून किंवा नैऋत्येकडून वाहतात. मान्सूनोत्तर काळात आणि हिवाळ्यात सकाळच्या वेळी मंद गतीने आणि विभिन्न दिशेने वारे वाहतात. दुपारनंतर वारे शांत असतात किंवा ईशान्येकडून वाहू लागतात. उन्हाळ्याच्या सुरुवातीस प्रामुख्याने ते नैऋत्य आणि वायव्येकडून साधारणपणे मे महिन्यापर्यंत वाहतात आणि नैऋत्य मान्सूनची सुरुवात होईपर्यंत ते तसेच वाहत राहतात.

**विशेष हवामानाच्या घटना :** उन्हाळ्यात आणि मान्सूनमध्ये झंझावात उद्‌भवतात. मेघगर्जना आणि विजेच्या कडकडाटासह पर्जन्यवृष्टी होते. त्याची वारंवारीता उन्हाळ्यात अधिक असते. उन्हाळ्यात धुळीची छोटी छोटी वादळे आढळून येतात. हिवाळ्यात काहीवेळा धुके पडते. अरबी समुद्र आणि बंगालच्या उपसागरात होणाऱ्या कमी दाबाच्या क्षेत्रामुळे आणि वादळामुळे जिल्हा क्वचित प्रभावित होतो.

## वनक्षेत्र

जिल्ह्यातील वनक्षेत्र हे उपवनसंरक्षक यांच्या नियंत्रणाखाली आहे. वनक्षेत्राच्या संरक्षणासाठी आणि संवर्धनासाठी नांदेड येथे वन अधिकाऱ्याचे विभागीय कार्यालय कार्यरत आहे.

जिल्ह्यात सन १९७१ मध्ये १,२३३.७७ चौ.कि.मी. वनक्षेत्र होते. ते सध्या १,२९९.१० चौ.कि.मी. असून त्यापैकी वन विकास महामंडळ किनवट यांना १७३.६३ चौ.कि.मी. वनक्षेत्र हस्तांतरीत करण्यात आल्याने नांदेड वन विभागाकडे सद्यस्थितीत १,१२५.४७ चौ.कि.मी. वनक्षेत्र शिल्लक आहे. त्यापैकी राखीव वनक्षेत्र १,०८६.५४ चौ.कि.मी. आहे. संरक्षित वनक्षेत्र १५.१० चौ.कि.मी. आहे. अवर्गीकृत वनक्षेत्र ४७.३८ चौ.कि.मी. आहे. तर पर्यायी वनीकरण क्षेत्र १९.३३ चौ.कि.मी. आहे. जिल्ह्यात नांदेड वन विभागाच्या आणि वनविकास महामंडळाच्या अधिपत्याखालील क्षेत्र वगळता इतर महसूल विभागाकडे अधिघोषित वनक्षेत्र नाही. महसूल विभागाकडे असलेले गायरान वनेत्तर क्षेत्र हे मागील १९९२ ते २००८ पर्यंत ३,२८४ हेक्टर वनक्षेत्र वन विभागाने ताब्यात घेऊन ते संरक्षित वन जाहीर केले आहे. जिल्ह्यात एकूण भौगोलिक क्षेत्राशी वनक्षेत्राची टक्केवारी १२.२२ इतकी आहे. पर्यावरणाचा समतोल राखण्याच्या दृष्टीने जंगलव्याप्त क्षेत्र जवळ जवळ ३३ टक्के असणे आवश्यक असून जंगलाखालील क्षेत्र वाढविणे आवश्यक आहे. हे जंगलव्याप्त क्षेत्र वाढविण्याच्या दृष्टीने वने व

सामाजिक वनीकरण खाते प्रयत्न करीत आहेत. त्या अंतर्गत वन विभागाच्या सन २००१-०२ ते २०१०-११ या कालावधीच्या सुधारित कार्य आयोजनेस केंद्रशासनाने दिनांक ६ डिसेंबर २००१ मध्ये मंजुरी दिलेली असून सदर मंजूर सुधारित कार्यआयोजनेत एकूण ७ कार्यवर्तुळे आहेत. त्यापैकी ४ कार्यवर्तुळात नांदेड वन विभागाचे संपूर्ण क्षेत्र समाविष्ट असून इतर ३ अतिव्याप्ती कार्यवर्तुळे आहेत. वनक्षेत्रात करावयाच्या कार्यासाठी निर्धारित कार्यवर्तुळात १) आरक्षणयुक्त स्थूणवन (फुटोरा वृक्ष) कार्यवर्तुळ, २) सुधार प्रबंधन कार्यवर्तुळ, ३) वनीकरण कार्यवर्तुळ, ४) कुरण विकास कार्यवर्तुळ अशी आहेत व अतिव्याप्ती कार्यवर्तुळामध्ये १) गैर इमारती (वनउपज) अतिव्याप्ती कार्यवर्तुळ, २) वन्यप्राणी (अतिव्याप्ती) कार्यवर्तुळ, ३) संकीर्ण अतिव्याप्ती कार्यवर्तुळ ही कार्यवर्तुळे आहेत. सन २००२-०३ पासून कार्यआयोजनेची अंमलबजावणी सुरू आहे.

नांदेड वन विभाग व वनविकास महामंडळाअंतर्गतच्या वनक्षेत्रात पूर्ण नांदेड जिल्ह्याच्या भौगोलिक भागाचा समावेश आहे. नांदेड जिल्ह्याच्या दक्षिण भागात अत्यंत विरळ झाडोरा व पडीत वनक्षेत्राची व्याप्ती जास्त आहे. नांदेड वन विभागात एकूण १,१२,५४७.०९० हेक्टर वनक्षेत्र असून त्याच्या प्रशासकीय व्यवस्थापनासाठी ते एकूण १२ वनपरिक्षेत्रात विभागण्यात आलेले आहे. त्यात माहूर, किनवट, मांडवी, बोधडी, इस्लापूर, अप्पाराव पेठ , भोकर, हदगाव, हिमायतनगर, नांदेड, मुखेड व देगलूर ही वनपरिक्षेत्रे आहेत.

जिल्ह्यात किनवट तालुक्यात सर्वाधिक वनक्षेत्र असून त्याखालोखाल भोकर तालुक्याचा क्रमांक लागतो. पुढील विवरणपत्रात जिल्ह्यातील वनक्षेत्राची परिक्षेत्रनिहाय व वर्गिकरणनिहाय माहिती दिलेली आहे.

**जिल्ह्यातील परीक्षेत्रनिहाय व वर्गिकरणनिहाय वनक्षेत्र**

(क्षेत्र/हेक्टर)

| अ. क्र. | वन परिक्षेत्र | राखीव वन | प्रस्तावित राखीव वन | संरक्षित वन | अवर्गीकृत वन | पर्यायी वनीकरण | एकूण | वनविकास महा-मंडळास हस्तांतरीत क्षेत्र | वन विभागाकडे शिल्लक क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| १ | माहूर | ९,९८५.१३ | ० | २९९.२० | ३,०९४.९७ | ९५.०० | १३,४७४.३० | ० | १३,४७४.३० |
| २ | किनवट | १४,१७७.३० | ३,२१५.९२ | २००.२६ | ० | ९५.०० | १७,६८८.४८ | ६,०६६.०४ | ११,६२२.४४ |
| ३ | मांडवी | १०,७३२.९३ | १,४५६.४८ | १००.०० | ० | ६९.०० | १२,३५८.४१ | १,१९४.९८ | ११,१६३.४३ |
| ४ | बोधडी | ८,४२०.१३ | २,३१२.९२ | २०.०० | ० | १४०.०० | १०,८९३.०५ | १,६८३.४७ | ९,२०९.५८ |
| ५ | इस्लापूर | १०,११६.१७ | ० | ० | ० | ० | १०,११६.१७ | १,४०९.२८ | ८,७०६.८९ |
| ६ | अप्पाराव पेठ | ११,५९५.४६ | ० | ० | ० | ० | ११,५९५.४६ | ७,००९.६७ | ४,५८५.७९ |
| ७ | भोकर | ११,८१३.०५ | १,८२७.७० | ८५.०० | १७३.३९ | १४७.०० | १४,०४६.१४ | ० | १४,०४६.१४ |
| ८ | हदगाव | १०,६०९.५९ | ५०५.८६ | १९५.०० | ० | ४८५.०८ | ११,७९५.५३ | ० | ११,७९५.५३ |

Maharashtra State Gazetteers

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | हिमायतनगर | ४,६१३.९३ | ० | ० | ४०१.१० | १४५.०० | ५,१६०.०३ | ० | ५,१६०.०३ |
| १० | नांदेड | ७,१८१.३१ | १,७१७.४८ | २५२.०० | २६२.२३ | २५०.०० | ९,६६३.०३ | ० | ९,६६३.०३ |
| ११ | मुखेड | ६,७७०.६३ | १,०००.४४ | ८४.२६ | ० | २४२.०० | ८,०९७.३३ | ० | ८,०९७.३३ |
| १२ | देगलूर | २,६३८.६५ | १,०३७.३९ | २७५.०० | ८०६.३७ | २६५.१९ | ५,०२२.६० | ० | ५,०२२.६० |
| | **एकूण** | १,०८,६५४.२८ | १३,०७४.१९ | १,५१०.७२ | ४,७३८.०६ | १,९३३.२७ | १,२९,९१०.५३ | १७,३६३.४४ | १,१२,५४७.०९ |

खालील विवरणपत्रात तालुकानिहाय वनक्षेत्राची माहिती दिलेली आहे.

**तालुकानिहाय वनक्षेत्र**

| अ.क्र. | तालुका | एकूण वनक्षेत्र (हेक्टर) | वनविकास* महामंडळास हस्तांतरीत क्षेत्र (हेक्टर) | वन विभागाकडे शिल्लक क्षेत्र (हेक्टर) |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | माहूर | १३,४७४.३०३ | ० | १३,४७४.३०३ |
| २ | किनवट | ६२,६५१.५६१ | १७,३६३.४४२ | ४५,२८८.११९ |
| ३ | हदगाव | ११,७९५.५३० | ० | ११,७९५.५३० |
| ४ | हिमायतनगर | ५,१६०.०३४ | ० | ५,१६०.०३४ |
| ५ | भोकर | १४,५०१.१३३ | ० | १४,५०१.१३३ |
| ६ | धर्माबाद | १४८.८५२ | ० | १४८.८५२ |
| ७ | उमरी | ३,०४६.४६८ | ० | ३,०४६.४६८ |
| ८ | अर्धापूर | १,८०५.३११ | ० | १,८०५.३११ |
| ९ | कंधार | २,३४४.१८१ | ० | २,३४४.१८१ |
| १० | लोहा | ३,११४.९३० | ० | ३,११४.९३० |
| ११ | मुदखेड | १,६२७.००० | ० | १,६२७.००० |
| १२ | मुखेड | ५,२१८.६२६ | ० | ५,२१८.६२६ |
| १३ | बिलोली | २,९८०.९१७ | ० | २,९८०.९१७ |
| १४ | देगलूर | ९३५.२३६ | ० | ९३५.२३६ |
| १५ | नायगाव | १,१०६.४५० | ० | १,१०६.४५० |
| १६ | नांदेड | ०.००० | ० | ०.००० |
| | **एकूण** | १,२९,९१०.५३२ | १७,३६३.४४२ | १,१२,५४७.०९० |

* वन विकास महामंडळाच्या नांदेड जिल्ह्यातील विभागाची सन १९७५ ला स्थापना करण्यात आली.

Maharashtra State Gazetteers

नांदेड जिल्हा दक्षिण पठाराच्या भागात असल्यामुळे महाराष्ट्राच्या सपाट भूभागाच्या जिल्ह्यांपैकी एक जिल्हा आहे. येथील जंगले शुष्क - मिश्र - पानझडीच्या जातीची आहेत. किनवट, नांदेड आणि भोकर येथील जंगले शुष्क सागाच्या जातीची आहेत. मिश्र - संकीर्ण जातीची जंगलेही साधारणपणे शुष्क जंगल प्रकारच्या जंगलासारखीच असून फरक फक्त इतकाच की, या प्रदेशात सागाचे प्रमाण कमी आहे. जिल्ह्यात टेकड्यांच्या उतारावरील धूप झालेल्या प्रदेशात काटेरी झुडुपांची जंगले आहेत. तर देगलूर येथील जंगलाच्या प्रदेशातील बऱ्याच भागात उथळ जमिनीमुळे आणि गुरांच्या प्रमाणाबाहेर चरण्यामुळे गवताळ प्रदेश तयार झाला आहे.

जिल्ह्यात प्रमुख जंगलात धावडा, हिंगण, आपटा, कांटेसावर, सालई, कटक, चारोळी, पळस, पाचुंदा, कुंभा, बहावा, भोकर, शीसम, तेंदू, मेदशिंगी, वईनिवडूंग, कवठ, आवळा, मोह, करंज, बिवला, रिठा, जांभूळ, सागवान, अर्जुन, बेहडा, बोर इत्यादी मोठे वृक्ष आढळतात. लहान वृक्ष आणि झुडुपे वनस्पतीमध्ये खैर, हिवर, बाभूळ, सीताफळ, रूई, वाघाटी, करवंद, गेळफळ, रानकेळी, मुरडशेंग, मोगली एरंड, निवडूंग, निर्मली इत्यादी प्रमुख लहान वृक्ष आढळतात. जंगलातून इमारती बांधकामास उपयुक्त अशी ऐन, धावडा, कळम इत्यादी झाडे आढळतात. सरपणास उपयोगी पडणाऱ्या लाकडाची बरीच झाडे आढळतात. विड्यांचे उद्योगात उपयुक्त अशी टेंभुर्णीची पाने हे या जंगलातील एक महत्त्वाचे असे दुय्यम उत्पादन आहे. त्याचप्रमाणे धावडा आणि बाभूळ यापासून मिळणारा गोंद हे दुसरे महत्त्वाचे दुय्यम उत्पादन आहे. तसेच मध, शिकेकाई यासारखी वन उत्पादनेही येथे प्रामुख्याने घेतली जातात. गवत हे देखील येथील जंगलापासून मिळणारे उत्पादन आहे. जिल्ह्यातील जंगलापासून २००४-०५ या वर्षात वन उत्पादनाच्या विक्रीपासून १ कोटी ७६ लक्ष ८ हजार रुपयांचे उत्पन्न प्राप्त झाले. त्यापैकी मुख्य उत्पादन म्हणजे जळाऊ लाकडाच्या व इतर लाकडाच्या विक्रीपासून रु. १ कोटी ६३ लक्ष ७४ हजार व गौण वन उत्पादने बांबू, गवत, विडीची पाने आणि इतर विक्रीपासून रु. १२ लाख ३४ हजाराचे उत्पन्न मिळाले.

जिल्ह्यातील किनवट तालुक्याचा उत्तर-पूर्व भाग डोंगराळ व शेतीसाठी अयोग्य असल्यामुळे या तालुक्याच्या भौगोलिक क्षेत्रात ३२.८० टक्के एवढे उच्च प्रतीचे वनक्षेत्र आहे. किनवट तालुक्यात साग, मिश्रवर्णीय पानझड प्रकारचे वन असून अतिशय मौल्यवान वनराई व वनचरांनी व्यापलेला तालुका आहे. तसेच हदगाव व भोकर तालुक्यात थोड्याफार प्रमाणात दाट वनक्षेत्राची नैसर्गिक देणगी लाभलेली आहे.[३६]

नांदेड जिल्हा आणि परिसरच नसून एकूण मराठवाड्याची वनश्री सन १९६३ पर्यंत जवळजवळ अज्ञात होती किंवा त्यावर पुरेसे लिखाण झालेले नव्हते. तथापि, तत्पूर्वी काही मोजक्याच लेखकांनी मराठवाड्यातील वनसंपदेविषयी काही लिखाण केले. त्यात डब्ल्यु.एच.ब्रेडले (१८८४), ए.सी.कॅम्पबेल (१८९८), डी.डी.प्रेन (१९०९), इ.ए.पॅट्रीज (१९११), एम.सैदुद्दीन (१९३५-३६, १९४०), एम.आर.सक्सेना (१९४७), शरफूद्दीन खान (१९५३) यांनी लिखाण केले आहे. या परिसरातील वनसंपदेवर १९६३ नंतरच्या काळात प्रसिद्ध झालेल्या साहित्याची माहिती सन २००६ मध्ये प्रकाशित झालेल्या महाराष्ट्र

३६. उपवनसंरक्षक, नांदेड वन विभाग, नांदेड यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित तसेच **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर, १९७१,** पृ. १८, **भारतीय जनगणना १९६१, नांदेड जिल्हा जनगणना निर्देश ग्रंथ,** पृ. ३९ आणि **जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, जिल्हा नांदेड,** २००४-०५, पृ. ४.

Maharashtra State Gazetteers

शासनाच्या ' महाराष्ट्रातील वनस्पतीशास्त्र आणि वनसंपदा ' या राज्य गॅझेटिअरमध्ये दिलेली आहे. तसेच नांदेडसह मराठवाड्यातील वनसंपदेविषयी काही माहिती सदर गॅझेटिअरमध्ये देण्यात आलेली आहे. त्यानुसार पहिल्या प्रकारात या परिसरात उष्ण कटिबंधीय शुष्क पानझडी जंगले आहेत. ही जंगले नांदेड जिल्ह्यातील किनवट, भोकर आणि हदगाव तालुक्यातील सातमाळा रांगा ह्या भागात आढळतात. यामध्ये उंच वृक्षांच्या सोबतीला कमी उंचीचे वृक्ष आढळतात. तसेच दुसऱ्या प्रकारात उघडी झुडपांची राने आढळतात. अशा जंगलावर हवामान, पाऊस, जमिनीची झीज आणि मानवी उपद्रव यांचा भीषण परिणाम होऊन वृक्ष जवळ जवळ नाहीसे होतात आणि काही तुरळक काटेरी झुडुपे शिल्लक राहतात. तसेच तिसऱ्या प्रकारानुसार गवताळ राने आढळतात. त्यात पानझडी जंगले, झुडुपांची राने आणि शेतजमीन वगळता इतर सर्व जमीन गवताळ रानांनी व्यापलेली आहे. ही गवताळ राने नैसर्गिक नसून प्रतिकूल हवामान, ओसाड जमीन, कमी पर्जन्यमान आणि मानवी उपद्रव या कारणांमुळे प्रभावित झालेली आणि सर्व दुष्परीणामांना तोंड देत ' खंडीत वाढ ' होणारी आहेत. त्यामुळे ती दुय्यम प्रतीची गणली जातात. या प्रकारात गवतांच्या प्रजाती, इतर क्षुद्र वनस्पती यामध्ये इतस्ततः विखुरलेले काही वृक्ष व झुडुपे आढळतात.[३७]

नांदेड जिल्ह्यातील वनसंपदांच्या दृष्टीने विविध स्वाभाविक विभागांमध्ये आढळणाऱ्या विविध वनस्पती, त्यांची नावे, त्यांचे प्रकार, वर्गीकरण, त्यांच्या प्रजाती, येथील वनस्पती व त्यांचे उपयोग इत्यादी बाबतची शास्त्रीय पद्धतीने सविस्तर माहिती तथा येथील वनस्पतीशास्त्राची माहिती पुढील भागात दिलेली आहे.

## वनसंपदा[३८]

संपूर्ण मराठवाडा विभागामध्ये आठ जिल्ह्यांपैकी नांदेड हा अत्यंत समृद्ध अशा वनसंपदेचा जिल्हा आहे. इतर सात जिल्ह्यांत मिळून जेवढी नैसर्गिक संपत्तीची विविधता आहे तेवढी विविधता एकट्या नांदेड जिल्ह्यात आढळून येते. वनसंपदेच्या दृष्टिकोनातून ही गोष्ट तंतोतंत खरी आहे.

वनसंपदा आणि वनश्रीच्या दृष्टीने नांदेड जिल्ह्याचे तीन स्वाभाविक विभाग पडतात. ते असे :

१. उत्तरेकडील किनवट - माहूरच्या जंगलांच्या रांगा.

२. उत्तर-पूर्वे (ईशान्य) कडील भोकर-हदगाव जंगलांच्या रांगा आणि

३. दक्षिणेकडील गोदावरीचे खोरे.

संपूर्ण नांदेड जिल्ह्यात चँपिअन आणि सेठ (१९६८) यांच्या जंगलांच्या वर्गीकरणानुसार " दक्षिणेकडील दमट पानझडी वृक्षांचे जंगल " असे वर्गीकरण करता येईल. काहीसे दमट हवामान, बऱ्यापैकी पर्जन्यमान आणि सुपीक काळी जमीन या तीनही घटकांचा सुयोग्य परिणाम या जिल्ह्याच्या समृद्ध वनसंपदेस कारणीभूत आहे.

---

३७. राज्य गॅझेटिअर, **महाराष्ट्रातील वनस्पतीशास्त्र आणि वनसंपदा २००६,** पृ. ६९, ७१ व ७२.

३८. डॉ. वा. ना. नाईक, निवृत्तप्रपाठक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद. सहयोगकर्ते लेखक यांनी या भागाचे लेखन केले आहे. [पृ. ५२ पर्यंत]

Maharashtra State Gazetteers

नांदेड जिल्ह्यात प्रामुख्याने सागवानाची जंगले दिसून येतात. यात इतर अनेकविध वृक्षांचा समावेश होतो. मुख्यत्त्वे Anogeissus latifolia (धावडा) Balanites aegyptiaca (हिंगण) Barringtonia acutangula, Bauhinia racemosa (आपटा), Bombax ceiba (कांटे सावर), Boswellia serrata (सालई), Bridelia airy-shawii (कटक), Buchanania lanzan (चारोळी), Butea monosperma (पळस), B. Superba (पळसवेल), Capparis grandis (पाचुंदा), Careya arborea (कुंभा), Casearia elliptica (यस्सी), Cassia fistula (बहावा), Chloroxylon Swietenia, Cleistanthus collinus, Cochlospermum religiosum (गणेर), Cordia dichotoma (भोकर), Dalbergia lanceolaria, D.latifolia (शिशम), Diospyros Melanoxylon (तेंदू), Dolichandrone falcata (मेदशिंगी), Erythrina suberosa (पांगारा), Euphorbia nivulia (वई निवडुंग), Flacourtia indica, Garuga pinnata (काकड), Gimelina arborea (शिवण), Grewia tiliifolia (धामण), Haldina cordifolia (हळद), Holoptelea integrifolia (चिरबिल्व), Kydia calycina, Lagerstroemia parviflora (लेंडी), Lannea coromandelica (मोई), Limonia acidissima (कवठ), Madhuca indica (मोह), Mallotus philippensis (कपिला), Mitragyna parvifolia (कलम), Ougeinia oojenensis (तिवस), Phoenix sylvestris (शिंदी), Phyllanthus emblica (आवळा), Pongamia pinnata (करंज), Pterocarpus marsupium (बिवला), Sapindus emarginatus (रिठा), S. laurifolius (रिठा), Schleichera oleosa (कुसुंभ), Soymida febrifuga (रोहण), Stereospermum chelenoides (पाडळ), S.Colais (पाळड), Syzygiun cumini (जांभूळ), Tectona grandis (सागवान), Terminalia alata, T. arjuna (अर्जुन), T. bellirica (बेहाडा), T. crenulata, Toona serrata (तूण), Wrightia tinctoria (काळा कुडा) आणि Ziziphus mauritiana (बोर) वगैरे वृक्ष आढळून येतात.

या मोठ्या वृक्षांच्या संगतीने अनेक लहान वृक्ष आणि झुडुपे देखील मोठ्या प्रमाणात आढळतात. मुख्यत्त्वे Acacia catechu (खैर), A. chundra (लाल खैर), A. leucophloea (हिवर), A. nilotica subsp. Indica (बाभूळ), A. pennata, A. Torta, Albizia amara, annona squamosa (सीताफळ), Bregnia refusa, Bridelia montana, Calotropis gigantea (रुई), C. procera (रुई), Capparis sepiaria (काकादनी), C. zeylanica (वाघाटी), Carissa congesta (करवंद), C. opaca (करवंद), Cassine albens (भूतपळ), Catunaregam spinosa (मदनफळ), Ceriscoides turgida, Cissus pallida, Clerodendrum serratum (भारंगी), Cordia sinensis, Crotalaria spectabilis, Dichrostachg S Cinerea, Diospyros chloroxylon, Ensete superbum (रानकेळी), Euphorbia antiquorum, E. caducifolia, E. neriifolia, Gardenia latifolia, Grewia flavescens, G. Polygama, G. rothii, G. subinaequalis, G. tenax, G. villosa, Helicteresisora (मुरडशेंग), Holarrthena pubescens (पांढरा कुडा), Indigofera pulchella, Ipomoea carnea subspfistulosa (बेशरम), Ikora pavetta, Jatropha curcas (मोगली एरंड), Kleinia grandiflora,

Lantana camara var. Aculeata (घाणेरी), Leea asiatica, L. Crispa, L. Indica, L. Macrophylla (दिंडा), Maerua oblongifolia, Maytenus emarginata (हेंकळ), Mimosa hamata, Morinda citrifolia, M. tomentosa (बारतोंडी), Nyctanthes arbor-tristis (पारिजातक), Opuntia elatior (निवडुंग), Phyllanthus reticulatus (कांगुणी), Rhus sinuata (आपटी), Spermadictyon suaveolens (जीतसाया), Sterculia urens (कांडोळ), Strychnos potatorum (निर्मली), Thespesia lampas, Trema politoria, Woodfordia fruticosa (धायटी), Ziziphus caracutta and Z. rotandifolia.

या लहान वृक्षांवर तसेच झुडुपांवर अनेक प्रकारच्या वेली, झाळकट वेली आणि त्यांच्या सहाय्याने वाढणारी झुडुपे मोठ्या प्रमाणात आढळतात. त्यापैकी प्रमुख म्हणजे Abrus precatorius (गुंज), Acacia pennata, A. Torta, Ampelocissus latifolia, Argyreia cymosa, A. Strigosa, Asparagus racemosus var. javanicus (शतावरी), Aspidopterys cordata, Cadaba fruticosa (हबब), Caesalpinia bonduc (सागरगोटा), C. decapetala (चिलार), Cajanus platycarpus, C. Scarabaeoides, Canavalia cathartica, Cayratia auriculata, C. Trifolia, Celastrus paniculata (माल कांगुणी), Cessampelos pareira var. hirsuta (पहाडवेल), Clematis heynei (रानजाई), Clitoria ternatea (गोकर्ण), Cocculus hirsutus (वासन वेल), Combretum albolum, Corallocarpus epigaeus, Cryptolepis buchanani (पांढरी कावळी), Cryptostegia grandiflora, Ctenolepis gareihii, Cuscuta chinensis, C. reflexa (अमरवेल), Dioscorea bulbifera, D. oppositifolia, D. Pentaphylla, D.tomentosa, Diplocyclos palmatus (शिवलिंगी), Dregea volubilis, Gloriosa superba (कळलावी), Glycine wightii, Hemidesmus indicus (उपळसरी), Ipomoea spp. Jasminum auriculatum (जुई), Leptadenia reticulata (जीवंती), Merremia aegyptia, Mucuna pruriens (खाज कुइरी), Olax psittacorum, Operculina tulrpethum (निशोत्तर), Pentatrepis spiralis, Pergularia daemia (उतरण), Pueraria tuberosa (विदारी कंद), Rhynehosia aurea, Rivea hypocrateriformis (फांद), Telosma cordata, Thunbergia laevis, Tinospora glabra (गुळवेल), Trichosanthes cucumerina (रान पडवळ), T. tricuspidafa (कौंडळ), Ventilago denticulata and Ziziphus oenoplia आहेत.

या जंगलांमधून जमिनीलगतची वनसंपदा विपुल प्रमाणात आणि विविधतेने नटलेली असते. यात प्रामुख्याने लहान रोपटी, गवत आणि पसरणा-या वेली आढळतात. पावसाळ्याच्या अखेरीस या वनस्पतींची अगदी रेलचेल असते आणि हिवाळ्यानंतर त्या एक-एक सुकत जातात आणि उन्हाळ्यात तर सर्व जमीन उघडी पडते. जमिनीलगतच्या वनसंपदेतील लहान रोपटी म्हणजे Abelmoschus crinitus, A. ficulneus (रान भेंडी), A. manihot, Abutilon indicum (पेटारी), A. pannosum, Acalypha ciliata, A indica (खोकली), A. lanceolata, A. Malabarica, Acanthospermum hispidum, Achyranthes aspera, Aerva lanata, Aechynomene indica, Ageratum conyzoides (ओसाडी), Alhagi pseadalhagi, Alteranthesa spp.,

Maharashtra State Volunteers

Alysicarpus Spp, Amaranthus spp., Amorphophallus sylvaticus, Andrographis paniculata (काळमेघ), Anisomeles indica, Argemone mexicana, Baliospermum solaniifolium (दंती), Barleria spp., Bidens biternata, Blainvillea acmella, Biophytum sensitivum (लाजरी), Blepharis Maderaspatensis, B. repens (हडसन), Blumea spp., Boerhavia repens, B. repens var. diffusa (पुनर्नवा), Brassica spp. Buchnera hispida, Caesulia axillaris Cajanus platycarpus, canscora decurrens, Caralluma adscendens var. attenuata, cardiospermum helicacabum (कपाळ फोडी), Cassia spp., Catnaranthas pusillus, Celoslia argentea (कुरुडू), Centranthera nepalensis, Ceropegia bulbosa, C. hirsuta, Chlorophytum bharuchae, C. taxum, C. tuberosum, Cleome spp., Commelina spp. Commicarpus chinensis, Crotalaria spp., Cureculigo orchioides, Curcuma spp. , Cyanotis spp., Cyathocline purpurea, Cynoglossum, Zeylanicum, Datura inoxia, D. Ferox, D. Metel, Desmodium dichotomum, D. gangeticum, D. Velutinum, Dicliptera verticillata, Dicoma tomentosa, Dipteracanthus patulus, D. prostratus, Drimia indica, Drosera indica, Ecboellium viride, Elephantopus scaber, Emilia sonchifolia, Enicostema axillare, Eriocaulon spp. Euphorbia spp., Evolvulus alsinoides, Girardinia diversifolia, Glossocardia bosvallea, Gynura bicolor, Habenaria spp. Haplanthodes verticillata, Hedyotis Spp., Hemigraphis latebrosa, Hibiscus lobatus, H. ovalifolius, H. trionum, Hybanthus enneaspermus Hygrophila schulli, Hyptis suaveolens, Indigofera spp. Iphigenia indica, I. Pallida, Ipomoea eriocarpa Justicia spp., Lagascea Mollis, Lavandula bipinnata, Leonotis nepetifolia (मातीसूळ), Lepidagathis spp., Leucas spp. Lindenbergia Muraria, Linum Mysorense, Malvastrum coromandelianum, Martynia annua, Mitreola petiolata, Mollugo pentaphylla, Murdannia spp., Ocimum spp., Orthosiphon pallidus, Polygala arvensis, P. erioptera, Pulicaria angustifolia, P. foliolosa, P. wightiana Pupalia lappacea, Rhynehosia Minima, Rostellularia Spp., Rungia Spp., Scilla hyacinthina, Scleria Spp. Sida Spp., Solanum Spp. Spermacoce Spp., striga spp., Tephrosia Spp., Termnus labialis, Theriophonum indicum Tonningia axillaris, Trianthema portulacastrum, Tribulus terrestris, Trichodesma Spp., Tricholepis glaberrima, Tridak procumbens, Wraria arboreum, W. picta, W. rufescens, Utricularia Spp., Verbascum Chinense, Vernonia Cinerea, Vicoa indica, Vigna spp., Waltheria indica, Withania somnifera, Xanthium strumarium, and Zornia diphylla आहेत.

गवताचे तर इतके प्रकार आहेत की सुमारे २०० हून अधिक प्रजाती या जंगलामधून विखुरल्या आहेत. त्यापैकी प्रमुख प्रजाती खालील प्रमाणे आहेत. Acrachne racemosa, Alloteropsis Cimicina, Andropogon pamilus, Apluda Mutica, Apocopis Vaginata, Aristida Spp., Arthraxon spp. Arundinella spp., Arundo donax, Brachiaria spp., Chionachne Koenigii, Chloris spp., Chrysopogon fulvus, C. serrulatus Coix gigantea (कसई), Cymbopogon Martinii (रोशा गवत), Cynodon dactylon (दुर्वा),

Dactyloctenium aegyptium, Dendrocalamus strictus (बांबू), Dichanthium spp., Digitaria spp.. Dinebra retroflexa, Echinochloa spp., Eleusine indica, Elytrophorus spicatus, Eragrostis spp., Eremopogon foveolatus, Eriochloa falmensis, E. procera, Eulalia trispicata, Heteropogon contortus, Imperata cylindrica, Isachne Meeboldii. Ischaemum spp., Iseilema spp., Leptochloa Chinensis, Lophopogon tridentatus, Melanocenchris jacquemontii, Mnesithea granukeris, Ophiuros exaltatus, Oplismenus burmannii, Oropetium spp., oxyza rufipogon, Panicum spp., Paspalidium flavidum, P. geminatum, Paspalum spp., Pennisetum spp. Polypogon monspeliensis, Pseudoraphis spinenscens Pseudosorghum fasciculare, Saccharam Spontaneam, Sacciolepis spp. Schizachyrium spp., Sehima spp., Setaria spp., Sorghum spp., Sporobolus spp., Thelepogon elegans, Themeda spp., Tragus roxburghii, Tripogon spp. Urochloa panicoides, Vetiveria lawsonii and V. Zizanioides.

### १. उत्तरेकडील किनवट-माहूर जंगलांच्या रांगा

या रांगा सर्वात जास्त समृद्धीने नटलेल्या असून या भागात वृक्षाची चांगली वाढ होते. येथील सागवानाचे वृक्ष उंच आणि सरळ वाढत असल्याने त्यांच्यापासून उत्तम इमारतीचे तसेच घरगुती सामानाचे लाकूड उपलब्ध होते. सागवानाबरोबर इतर अनेक वृक्ष येथे आढळतात. प्रामुख्याने Anogeissus latifolia (धावडा), Barringtonia acutangula, Bridelia airy-shawii (कटक), Buchanania lanzan (चारोळी), Butea Monosperma (पळस), B. superba (पळसवेल), Careya arborea (कुंभा), Chloroxylon swietenia, Cleistanthus collinus, Cochlospermum religiosum (गणेर), Dalbergia lanceolaria, Euphorbia nivulia (वई निवडुंग), Haldina cordifolia (हळद), Holoptelea integrifolia (चिर बिल्व), Madhuca indica (मोह), Mallotus Philippensis (कपीला), Ougeinia oogeinensis (तिवस), Pterocarpus Marsupium (निवळा), Schleichera oleosa (कुसुंभ), Stereospermum chelenoides (पाडळ) आणि Terminalia spp. या वृक्षांचा समावेश होतो.

तसेच अनेक प्रकारची झुडुपे, लहान वृक्ष यांची देखील येथे रेलचेल आहे. मराठवाड्यात इतरत्र कोठेही उपलब्ध नसलेल्या Orchidaceae कुलातील वनस्पती येथे आढळतात. Vanda tessellata ही अशीच एक वनस्पती वृक्षांच्या आधाराने वाढते. Tacca leontopetaloides या वनस्पतींची रोपटी केवळ याच जंगलात आढळतात. Ixora pavelta, Leea Macrophylla, Strychnos potatorum (निर्मळी) यासारखी इतरत्र दुर्मिळ असणारी झुडुपे येथे विपुल प्रमाणात आढळतात. जमिनीलगत वाढणाऱ्या वनसंपदेपैकी Cajanus Platycarpus, Operculina turpethum, Trichosanthes Tricuspidata वगैरे वनस्पती येथे खास करून आढळतात. शिवाय गवत प्रकारांपैकी Chrysopogon serrulatus, Coix gigantea, Eriochloa fatmensis, Leptochloa Chinensis, Oryza rufipogon, Pseudoraphis spinescens, Vetiveria zizanioides इत्यादी प्रजाती येथे उपलब्ध आहेत.

Maharashtra State Gazetteers

## २. उत्तर-पूर्वेकडील भोकर-हादगांव जंगलांच्या रांगा

या रांगा उतरेकडील रांगांच्या तुलनेत शुष्क आणि निकृष्ट दर्जाच्या आहेत. येथे देखील सागवानाची जंगले आहेत परंतु लाकडाचा दर्जा दुय्यम प्रतीचा आहे. सागवानाबरोबर Bauchinia racemosa (आपटा), Bombax ceiba (कांटे सावर), Boswellia serrata (सालई), Cassia fistula (बहावा), Cordia dichotoma (भोकर), Diospyros Melanoxylon (टेंभुर्णी), Erythrinia suberosa (पांगरा), Kydia calycina, Lagerstroemia parviflora (लेंडी), Lannea coromandelica (मोई), Phyllanthus emblica (आवळा) इत्यादी शुष्क वातावरणातले वृक्ष आढळतात.

झुडुप प्रकारांमध्ये देखील काटेरी, लहान पानांची, कमी उंचीची झुडुपे अधिक प्रमाणात आढळतात. Acacia spp., Albizia amara, Bridelia Montana, Calotropis gigantea, C. procera, Capparis spp., Catunavegam spinosa इत्यादी झुडुपे प्रामुख्याने आढळतात. Ensete superbum हा जंगली केळाचा प्रकार तसेच रान हळदीचे प्रकार, शतावरी या सारख्या वनस्पतींचा देखील येथे सुकाळ आहे. औषधी वनस्पतींच्या प्रजाती येथे तुलनेने अधिक सापडतात. गवतांचे प्रकार देखील तुलनेने अधिक आहेत.

## ३. दक्षिणेकडील गोदावरीचे खोरे

हा भाग जवळ जवळ जंगलरहित असून जमिनीचा बराच भाग शेतीने व्यापलेला आहे. Acacia Chundra, A. leucophloea A. nilotica subsp. Indica, Albizia Procera, Arnona reticulata, A. Squamosa, Capparis zeylanica, Cordia dichotoma, C. Sinensis, Dalbergia sissoo, Erythrina suberosa Lannea coromandelica, Ficus spp., Limonia acidissima, Phoenix sylvestris, Pongamia pinnata, Mangifera indica, Sapindus emarginatus, Syzygium cumini, Tamarindus indica इत्यादी वृक्ष तुरळक आणि विखुरलेले आढळतात. त्यांच्या सोबत Lantana Camara var. aculeata, ची झुडुपे, Combretum albidum आणि Tinospora glabra सारख्या वेली आणि Andropogon pumilus, Apluda Mutica, Chloris spp., Chrysopogon fulvas, Dichanthium caricosum, D. pertusum, Digitaria ciliaris, Dinebra retroflexa, Eragrostis spp., Heteropogon contortus, Ischaemum pilosum, Iseilema laxum, Thelepogon elegans Themeda quadrivalvis आणि Tragus roxburghii या सारख्या गवताच्या प्रजाती आढळतात.

लहान लहान तलाव, तळी, ओली भात शेते या भागात विपुल प्रमाणात आढळतात आणि त्यातील वैशिष्ट्यपूर्ण वनस्पती हे या भागाचे वैशिष्ट्य आहे. येथे सापडणा-या वनस्पतींची यादी तळी-तलावांभोवती वाढणा-या वनसंपदेमध्ये समाविष्ट केली आहे.

या तीन प्रमुख प्रकारांखेरीज येथील वनसंपदेचे इतर उपप्रकार नांदेड जिल्ह्यात आढळतात. ते खालीलप्रमाणे आहेत :—

## ४. उघडी झुडुपांची जंगले

लहान लहान टेकड्या, त्यावरील पठारे अशा भागात झुडुपांची जंगले आढळतात. ही झुडुपे सहसा लहान पानांची आणि काटेरी असतात. यात प्रामुख्याने Acacia chundra, A. pennata, A. torta, Carissa Congesta, C. opaca, Cissus repanda, Dichrostachys cinerea, Euphorbia caducifolia, E. neriifolia, Flacourtia indica, Grewia spp. Mayteonus emarginata, Opuntia elatior, Securinega leucopyrus, Ziziphus oenoplia इत्यादी प्रजाती आढळतात. या झुडुपांवर अनेक प्रकारच्या वेली वाढतात. त्यात Clematis heynei, Dregea volubilis, Cocculus hirsutus, Cissampelos pareira, Jasminum auriculatum, Rivea hypocrateriformis इत्यादी प्रमुख आहेत. झुडुपांच्या भोवती Apluda Mutica, Heteropogon contortus, Sehima sulcatum हे गवत प्रकार आणि Blepharis maderaspatensis, Cassia pumila, C. obtusifolia, C. tora या सारखी इतर रोपटी वाढताना आढळतात.

## ५. गवताळ राने

अनेक ठिकाणी उघड्या जमिनीवर शेती करणे शक्य व्हावे म्हणून प्रचंड प्रमाणात वृक्ष तोड करण्यात आली आहे. परंतु सर्वच जमीन शेतीसाठी वापरणे शक्य न झाल्याने त्या ठिकाणी विस्तीर्ण गवताळ राने निर्माण झाली आहेत. व्हाईट (१९५७) यांनी दाखवून दिल्याप्रमाणे ही गवताळ राने नैसर्गिक नसून मानव निर्मित आहेत आणि त्यांची वाढ नैसर्गिक हवामान आणि जैविक घटकांच्या हालचाली यामुळे सीमित झालेली आहे. जैविक घटकांच्या हालचालींमध्ये चरणे, लाकूड तोड, रान पेटवणे, शेती करणे, रस्ते-इमारती-कारखाने उभे करणे, औषधी वनस्पतींची तोड इत्यादिंचा समावेश होतो. या सर्व जैविक हालचालींना तोंड देत ही गवताळ राने वाढत आहेत. त्यामुळे याना हवामान-प्रभावी-कमाल (Climatic climax) गवताळ राने न म्हणता कुचमलेली (Disclimax) गवताळ राने म्हणणे योग्य होईल.

गवताळ रानांतील प्रजातींच्या आधारे या रानांना दबडघाव (१९९०) यांच्या मताप्रमाणे Dichanthium—Sehima type असे नांव देता येईल. परंतु या नांवाप्रमाणे सर्वच ठिकाणी या प्रजातींचे प्राधान्य नसून अति चरण्यामुळे चरण्या योग्य गवतांच्या प्रजातींचा संपूर्ण नाश होऊन त्या ठिकाणी चरण्यास अयोग्य अशा प्रजाती फोफावल्या आहेत. म्हणून ब-याच ठिकाणी गवताळ रानांच्या वरील प्रकाराऐवजी Aristida—Heteropogon अशा कुसळी गवतांचे प्रभुत्व आढळून येते. गवतांच्या प्रजातींची ही कमाल अधोगती आहे असे शास्त्रज्ञांचे मत आहे.

## ६. नदी-नाले यांच्या काठची वनश्री

मराठवाड्यातील नदी-नाले पावसाळ्यातच दुथडी भरून वाहताना दिसतात. इतर वेळी त्यांची पात्रे पूर्णतः किंवा ब-याच अंशी कोरडीच असतात. या नदी-नाल्यांच्या काठी वाढणा-या वृक्षांमध्ये Acacia nilotica subsp. Indica (बाभूळ), Balalnites aegyptiaca (हिंगण), Barringtonia

acutangula, Bombax ceiba (कांटे सावर), Careya arborea (कुंभा), Casearia elliptica (यसी), Cordia dichotoma (भोकर), Erythrina suberosa (पांगारा), Mitragyna parvifolia (कळम), Phoenix sylvestris (शिंदी), Strychnos potatoram (निर्मली), Syzygium Cumini (जांभूळ), Terminalia arjuna (अर्जुन), Trema politoria इत्यादी प्रमुख वृक्ष आढळतात. या वृक्षांच्या सोबत कांही झुडुपे आणि वेली देखील वाढतात. त्यात Acacia torta, Clerodendrum Multiflorum (टाकळी), C. Serratum (भारंगी), Ehretia aspera (दात्रुंग), Grewia spp., Helicteres isora (मुरडशेंग), Homonoia retusa, Indigofera pulchella, I. tinetoria (तीळ), Ixora pavetta, Lantana Camara var. aculeata (घाणेरी), Leea crispa, L. Macrophylla (दिंडा), Mallotus philippensis (कपिला), Olax psittacorum, Phyllanthus spp., Rotula aquatica, Vitex negundo (निर्गुडी), Woodfordia fruticosa (धायटी), Tamilnadia uliginosa, इत्यादी प्रमुख आहेत. Homonoia retusa आणि Rotula aquatica या दोन प्रजाती नदीच्या खडकाळ पात्रात आढळतात.

शुष्क आणि रेताड नदीची पात्रे तसेच त्यांचे काठ असंख्य रोपट्यांनी गजबजलेले असतात. त्यात Alternanthera sessilis, Alysicarpus spp., Ammannia baccifera (मारजांभूळ), Aanisochilus carnosus (कापूर्ली), Bacopa monnieri (ब्राह्मी), Bergia ammannioides, B. capensis, Canscora decurrens Centranthera nepalensis, Cleome Monophylla, C. Chelidonii, Commelina spp. Dentella repens, Eclipta prostrata (माका), Grangea Maderaspatana (माचीपत्र), Hygrophila schulli (कोळसुंदा),Hyptis suaveolens, Pancratium Longiflorum, Phyllanthus amarus (भुईआवळी), Polygonam plebeium, Rotala serpyllifolia, Salvia plebeia, Sesbania bispinosa, Seseli diffusum, Sapubia delphinifolia, Stemodia Viscosa, Sutera dissecta, Typha domingensis (पानकणीस) आणि Cyperaceae व Poaceae या कुलातील अनेक प्रजाती यांचा प्रामुख्याने समावेश होतो.

## ७. तलाव-तळी-डबकी यातील वनश्री

कमी पर्जन्यमान आणि दीर्घ काळचे शुष्क हवामान यामुळे कायम स्वरूपाचे तलाव-तळी नांदेड जिल्ह्यात क्वचितच आढळतात. परंतु पावसाळ्याच्या अल्पावधीत असंख्य डबकी साठतात. त्यात फार तर ३ ते ४ महिने पाणी टिकते. यामुळे त्यात अल्पजीवी वनस्पतींचे प्रकार पहाण्यास मिळतात. अशी तळी-डबकी दक्षिणेकडील गोदावरीच्या खो-यात विपुल प्रमाणात पहाण्यास मिळतात. देगलूर जवळच्या अशाच एका तळ्यात पाण वनस्पतींची विविधता नोंद करण्यासारखी आहे. पावसाळ्यात या तळ्यात केवळ पाण वनस्पतीच दिसतात परंतु पावसाळ्यानंतर पाण वनस्पतींची जागा ओल्या चिखलात वाढणा-या वनस्पती आणि नंतर कोरड्या चिखलातील वनस्पती घेतात. पावसाळ्यात दिसणा-या वनस्पतींमध्ये Aeschynomene aspera, A. indica, Cleome chelidonii, Coix gigantea, Cryptocoryne refrospiralis, Cyperus spp., Eleocharis atropurpura, Echinochloa colonum, Hemarthria Compressa, Limnophila indica, Najas graminea,

Panicum paludosum, Pseudoraphis spinescens, Sesbania bispinosa इत्यादी प्रजाती आढळतात. पाण्यात बुडालेल्या प्रजाती मध्ये Hydrilla verticillata, Najas spp., Ottelia alismoides, Potamogeton nodosus, P. pectinatus, P. perfoliatus आणि Vallisneria natans यांचा समावेश होतो. Lemna perpusilla, Nymphoides cristatum, N. indicum, Utricularia stellaris या पाण्याच्या पृष्ठभागावर तरंगणाऱ्या प्रजाती असून माहूरच्या तळ्यात कमलांचे प्रकार आढळतात.

तळ्यांचे काठ असंख्य क्षुद्र वनस्पतींनी नटलेले असतात. त्यात Ammannia spp., Anagallis pumila, canscora decurrens, Dentella repens, Exacum pedunculatum, Glossostigma diandrum, Gnaphalium polycaulon, Hygrophila polysperma, Lipocarpha sphacelata, Oryza rufipogon, Polygonum barbatum, Sutera dissecta, Scirpus maritious, Typha domingensis इत्यादी प्रजाती प्रामुख्याने आढळतात.

ही तळी-डबकी हिवाळ्यानंतर पूर्णपणे वाळून जातात आणि वरील पाण वनस्पतींची जागा कोरड्या जमिनीवर वाढणाऱ्या अगदी वेगळ्याच वनस्पतींनी व्यापलेली दिसते. त्यात प्रामुख्याने Dopatrium Junceum, Eleocharis atroparpurea, Lindernia spp., Polygonism plebeium आणि कांही काठावरील प्रजाती आढळतात. कोरड्या चिखलावर आक्रमण करणा-या प्रजातीमध्ये Blumea spp., Chrozophora prostrata, Cyathocline purpurea, Glinus lotoides, G. Oppositifolius, Gomphrena serrata, Grangea Maderaspatana, Heliotropium spp. Sphaeranthus senegalensis, Stemodia viscosa, Verbascum chinense आणि काही इतर प्रजातींचा समावेश होतो.

काही रस्त्यालगतच्या डबक्यांमध्ये तसेच ओल्या भात शेतात विशिष्ट प्रजाती वाढताना दिसतात. त्यात मुख्यत्त्वे Drosera indica, Lobelia alsinoides, Ludwigia perennis, Rotala Mexicana, R. rotundifolia, Scleria caricina, Smithia conferta, Tenagocharis latifolia, Vahlia digyna आणि Xyris pauciflora. हे मात्र नांदेड जिल्ह्याचे खास वैशिष्ट्य आहे. यातील प्रजाती मराठवाड्यात इतरत्र क्वचितच आढळतात.

Maharashtra State Gazetteers

## ८. पडित जमिनींची वनसंपदा

ज्या जमिनी शेती किंवा बागा करण्यास निरुपयोगी असतात. त्याना पडित जमिनी (Waste lands), असे येथे म्हटले आहे. या जमिनी दुर्लक्षित असतात. त्यात कच-याचे ढीग, पडित जमिनी, रस्त्याकडेच्या जमिनी यांचा समावेश करता येईल. अशा जमिनींमध्ये Calcium आणि Magnesium या क्षारांची विपुलता असून नत्राचे प्रमाण अत्यल्प असते. नांदेड जिल्ह्यात अशा जमिनीवर आढळणा-या वनस्पतींमध्ये Abutilon hirtum, Acalypha spp. Acanthospermum hispidum, Agremone Mexicana, Blumea spp., Calotropis gigantea, C. procera, Cassia occidentalis, C. Sophera, C. tora, Cleome gynandra, C. Viscosa, Croton bonplandianum, Datura inoxia, Echinops echinatus, Euphorbia spp., Flaveria

trinervia, Kickxia ramosissima, Lactuca runcinata, Lagascea Mollis, Leucas urticifolia, Martynia annua, Opuntia elatior Parthenium hysterophorus, Pupalia lappacea, Sida spp., Solanum nigrum, S. virginianum, Tribulus terrestris, Tridax procumbens, Vesbascum Chinense, Vernonia Cinerea, Withania Somnifera आणि Aristida spp., Arthraxon hispidus, Chloris virgata, Eragrostis spp., Eragrostiella brachyphylla, Melanocenchris Jacquemontii, Setaria verticillata, Tripogon jacquemontii इत्यादी गवतांच्या प्रजाती या प्रामुख्याने आढळतात.

## ९. खडकाळ जमिनीवरील वनसंपदा

वनस्पतींच्या कांही प्रजाती अतिशय कमी पाण्यावर उदरनिर्वाह करतात. त्यांना तशी सवयच लागलेली असते. म्हणून त्या खडकांच्या कपारीत, खडकाळ जमिनीवरील खाच खळग्यात राहणे पसंत करतात. उघड्या खडकांवर वाढणा-या प्रजातींना Lithophytes आणि खडकांच्या कपारीत वाढणाऱ्या प्रजातींना Chasmophytes असे शास्त्रीय नांव आहे. अशा वनस्पतींची मुळे वरवरच पसरतात सामान्य Lithophytes मध्ये Aerva lanata, Allmania nodiflora, Andrographis echioides, Boerhavia diffusa, Glossocardia bosvallea, Justicia glauca, Lepidagathis trinervis, Oropetium roxburghianum, O. villosulum, Trichuriella Monsoniae, Woodfordia fruticosa इत्यादी प्रजातींचा समावेश होतो.

सामान्य Chasmophytes मध्ये Anisochilus carnosus, Caralluma adscendens, Cyanotis cristata, Drimia Indica, Eragrostiella Brachyphylla, Euphorbia spp., Justicia Spp., Kickxia ramosissima, Petalidium barlerioides, Polycarpaea corymbosa, Trema politoria Tripogon Jacquemontii आणि इतर अनेक प्रजातींचा समावेश होतो.

## १०. शेतातील तण

पाण्याकाठच्या तसेच सिंचन क्षेत्राखाली असणा-या जमिनीमध्ये शेतमाला बरोबरच असंख्य तण प्रजाती उगवतात आणि कोरड्या जमिनींवर दुष्काळावर मात करणा-या प्रजाती आढळून येतात.

शेतातील तणांचे खरीप आणि रबी पिकातील तण असे दोन प्रकार सामान्यपणे दिसतात. पण काही प्रजाती कोणत्याही पिकांमध्ये आढळतात. खरीप पिकांतील तण प्रजाती खरीप पिकांबरोबरच उगवतात आणि त्यांच्या बरोबरच नाहीशा होतात आणि रबी पिकातील तण प्रजाती पावसाळ्या अखेर पासून हिवाळा संपेपर्यंत दृष्टीस पडतात.

खरीप पिकांमध्ये सामान्यपणे Acalypha indica, Alternanthera sessilis, Alysicarpus Spp., Amaranthus Spp., Ammannia Multiflora, Aristida Spp., Biophytum reinwardtii Blainvillea acmella, Brachiaria eruciformis, Caesulia axillaris, Cardiospermum helicacabum, Cassia Mimosoides, Celosia argentea, Cleome viscosa, Commelina Spp., Corchorus olitorius, Cyperus Spp., Datura ferox,

Digera muricata, Digitaria ciliaris, Dinebra retroflexa, Echinochloa Colonum, Eleusine indica, Emilia sonchifolia, Eragrostis Spp., Goniogyna hirta, Hedyotis Spp., Indigofera Spp., Justicia Spp., Leucas Spp., Neanotis Montholoni, Ophiuros exaltatus, Oxalia Corniculata, Panicum Spp. Phyllanthus Spp., Polygala arvensis, Portulaca oleracea, Rhynchosia minima, Setaria Spp., Sida Spp., Striga angustifolia, Tonningia axillaris, Urochloa panicoides, Vernonia Cinerea, Xarthium strumarium आणि इतर अनेक प्रजातींचा समावेश होतो.

रबी पिकांमध्ये तुलनेने कमी प्रजाती तणासारख्या वाढतात. यातील सामान्य प्रजाती म्हणजे Ageratum conyzoides, Alternanthera betzickiana, A. pungens, Asphodelus tenuifolius, Bergia ammannioides, Canscora decurrens, Centaurium Centaurioides, Chrozophora rottleri, Cyathocline purpurea, Euphorbia Spp., Exacum pedunculatum, Flaveria trinervia, Goniocaulon indicum, Gnaphalium polycaulon, Gantelbua urens, Heliotropium Spp., Ischaemum pilosum, Spilanthes paniculata, Stemodia viscosa, Sutera dissecta, Themeda quadrivalvis (बांधांवर), Tricholepis glaberrima, Vicia peregrina, Vicoa indica आणि इतर काही.

## ११. भिंतीवरील वनसंपदा

नांदेड जिल्ह्यात अनेक पडक्या इमारती, जुने वाडे वगैरे खेडेगावांमधून दिसतात. तसेच बऱ्याच घरांवर पत्रे असून त्यावर भिंती-कठडे बांधलेले असतात आणि त्यावर माती, चुना किंवा शेणाचा गिलावा केलेला असतो. या भिंतींमध्ये चुना भरपूर प्रमाणात असल्यामुळे चुन्यावर वाढणा-या अनेक प्रजाती त्यावर आढळतात. सामान्यपणे Aerva lanata, Aristida depressa, Arthraxon lanceolatus, Bidens biternata, Chloris virgata, Cleome gynandra, Eragrostiella bifaria, Eragrosis pilosa E. Minor, Euphorbia Spp. Lagascea Mollis, Leucas urticifolias, Melanocenchris Jacquemontii, Peristrophe paniculata, Setaria pumila, S. Verticillata, Tribulus terrestris Vernonia Cinerea इत्यादी प्रजाती प्रामुख्याने आढळतात. तसेच काही प्रजाती सर्वत्र आढळतात. तशा त्या भिंतीवर देखील आढळतात. त्यात Aristida funiculata, Dactyloctenium aegyptium, Lophopogon tridentatus, Portulaca oleracea Setaria intermedia, Tridax procumbens इत्यादींचा समावेश होतो.

या उलट काही प्रजाती केवळ भिंतीवरच आढळतात. त्यापैकी ficus bengalensis, F. religiosa, Oropetium Spp., Tetrapogon tenellus, Tripogon jacquemontii इत्यादी प्रामुख्याने आढळतात.

## १२. आर्थिक दृष्ट्या महत्त्वाच्या प्रजाती

सामान्यपणे प्रत्येक वनस्पती प्रजातीचा कांही ना काही उपयोग असतोच. या सर्वांची विस्तृत यादी पुढे दिलेली आहेच. परंतु सामान्यपणे आर्थिक दृष्ट्या महत्त्वाच्या अशा काही प्रजातींचा येथे उल्लेख केला आहे.

**अ) परदेशातून आणलेल्या आणि येथे रुजलेल्या प्रजाती :** बऱ्याच पूर्वीपासून बाहेरून काही वनस्पती आणून येथे लावण्याची प्रथा आहे. त्यापैकी काही येथेच रुजल्या असून त्यांची उत्पत्ती सुद्धा नैसर्गिक रीतीने होताना दिसते. अशा सुमारे ५८ प्रजाती नांदेड जिल्ह्यात आढळतात. त्यांच्या मुळच्या ठिकाणाच्या उल्लेखासह त्यांची यादी खालीलप्रमाणे आहे :—

| अ.क्र. | प्रजातीचे लॅटीन नाव | मूळ ठिकाण |
|---|---|---|
| १. | Argemone mexicana L. | मेक्सिको |
| २. | Malachra capitata L. | द. अमेरिका |
| ३. | Oxalis richardiana Babu | मेक्सिको |
| ४. | Stylosanthes fruticosa (Retz.) Alston | आफ्रिका |
| ५. | Caesalpinia pulcherrima (L.) SW. | आफ्रिका |
| ६. | Desmanthus virgatus (L), Willd. | आफ्रिका |
| ७. | Prosepis cineraria (L.) Druce | द. अमेरिका |
| ८. | Prosopis juliflora (SW) DC. | द. अमेरिका |
| ९. | Eriocereus bonplandii Ricc. | द. अमेरिका |
| १०. | Nopaka cochenillifera (L.) Solms | मेक्सिको |
| ११. | Opuntia elatior Mill | द. अमेरिका |
| ३९१. | *Iphigenia pallida Baker* | — | आंबाडी | कंदापासून कोल्चिसीन मिळते. |
| ३९२. | *Scilla hyacinthina (Roth) Mcbride* | रानकांदा | आंबाडी | औषधोपयोगी |
| | **Commelinaceae** | | | |
| ३९३. | *Commelina benghalensis* L. | केना | सीताखंडी | पानांची भाजी करतात. |
| ३९४. | *Commelina paludosa* Bl. (Syn. *C. obliqua* Buch Ham. ex D. Don.) | — | माहूर | पाने सर्पदंशावर वापरतात. |
| | **Arecaceae** | | | |
| ३९५. | *Phoenix sylvestris* (L.) Roxb. | शिंदी | माहूर | खोडापासून नीरा काढतात. |

Maharashtra State Gazetteers

| अनु. | प्रजातीचे लॅटीन नाव | स्थानिक नाव | कोठे उपलब्ध | उपयोग |
|---|---|---|---|---|
| | **Pandanaceae** | | | |
| ३९६. | *Pandanus fascicularis* Lamk. (Syn. *P. odoratissimus* L.F.) | केवडा | किनवट | सुवासिक कणसे |
| | **Typhaceae** | | | |
| ३९७. | *Typha domingensis* Pers. (Syn. *T. angustata* Bory et chaub.) | पान कणीस, रामबाण | किनवट | कणसे औषधोपयोगी. |
| | **Araceae** | | | |
| ३९८. | *Amorphophallus sylvaticus* (Roxb.) Kunth | जंगली सुरण | आंबाडी सीताखंडी गट्टा | औषधोपयोगी |
| ३९९. | *Cryptocoryne retrospiralis* (Roxb.) Kunth | — | पेनगंगा नदी काठ | तण |
| ४००. | *Theriophonum indicum* (Dalz.) Engl. | — | किनवट | तण |
| | **Cyperaceae** | | | |
| ४०१. | *Cyperus alopecuroides* Rottb. (Syn. *Juncellus alopecuroides* (Rottb.) Clarke. | लव्हाळा | भोकर | कागद बनविण्यासाठी उपयोगी |
| ४०२. | *Cyperus rotundus* L. | लव्हाळा, नागरमाथा | सर्वत्र | औषधोपयोगी सुगंधी द्रव्य. |
| ४०३. | *Kyllinga bulbosa* Beauv. | निर्विषी | धर्माबाद | औषधोपयोगी सुगंधी द्रव्य. |
| | **Poaceae** | | | |
| ४०४ | *Andropogon pumilus* Roxb. | लाल गवत | सर्वत्र | चारा |
| ४०५. | *Apluda mutica* L. | — | सर्वत्र | चारा |
| ४०६. | *Arthraxon lanceolatus* (Roxb.) Hochst. | — | कैलास | चारा |
| ४०७. | Brachiaria eruciformis (J.E.Sm.) Griseb. | शिंपी | सर्वत्र शेतात | तण, चारा |

Maharashtra State Gazetteers

| अनु. | प्रजातीचे लॅटीन नाव | स्थानिक नाव | कोठे उपलब्ध | उपयोग |
|---|---|---|---|---|
| ४०८. | *Brachiaria mutica* (Forssk.) Stapf. | पॅरा गवत | किनवट | उत्तम चारा |
| ४०९. | *Cenchrus ciliaris* L. | — | किनवट | उत्तम चारा |
| ४१०. | *Chloris inflata* Link (Syn. *C. barbata* Sw.) | गोंडाळ गवत | सर्वत्र | तण |
| ४११. | *Chrysopogon fulvus* (Spreng.) Choiv. | सोनेरी गवत | आंबाडी | चारा, जमिनीची धूप थांबवण्यासाठी. |
| ४१२. | *Coix gigantea* Roxb. | कसई गवत | आंबाडी | औषधोपयोगी |
| ४१३. | *Cymbopogon Martinii* (Roxb.) wats. | तिखाडी रोशा | आंबाडी | पानांपासून सुगंधी तेल काढतात. |
| ४१४. | *Cynodon dactylon* (L.) Pers. | दूर्वा, हरळी | सर्वत्र | औषधोपयोगी |
| ४१५. | *Dendrocalamus strictus* Nees | वेळू | किनवट | इमारती लाकूड कागद कारखान्यासाठी. |
| ४१६. | *Dichanthium caricosum* (L.) A. Camus | मारवेल | किनवट | उत्तम चारा |
| ४१७. | *Dichanthium pertusum* (L.) Clayton | — | किनवट | चारा, जमिनीची धूप थांबविण्यास. |
| ४१८. | *Digitaria ciliaris* (Retz.) Koeler | — | सर्वत्र | चारा |
| ४१९. | *Dinabra retroflexa* (Vahl) Panz. | लोणी गवत | सर्वत्र शेतात | चारा, तण |
| ४२०. | *Echinochloa colonum* (L.) Link | पानकुंड | सर्वत्र | चारा, तण |
| ४२१. | *Eragrostis aspera* (Jacq.) Nees | — | फुगडी गुट्टा | चारा |
| ४२२. | *Eragrostis namaquensis* Schrad. Var. *diplachnoides* (Steud.) Clayton | — | आंबाडी, माहूर | चारा |

Maharashtra State Gazetteers

| अनु. | प्रजातीचे लॅटीन नाव | स्थानिक नाव | कोठे उपलब्ध | उपयोग |
|---|---|---|---|---|
| ४२३. | *Eragrostis unioloides* (Retz.) Nees ex Steud. | — | सर्वत्र | तण, चारा |
| ४२४. | *Eremopogon faveoiatus* (Del.) Stapf. | कडू मारवेल | आंबाडी | चारा |
| ४२५. | *Heteropogon contortus* (L.) P. Beauv. ex Roem & Schulb. | कुसळ | सर्वत्र | चारा, तण |
| ४२६. | *Ischaemum pilosum (Klein ex Willd.) Wt.* | कुंदा गवत | शेतात | चारा |
| ४२७. | *Iscilema anthephoroides* Hack | तांबड गोटा | सर्वत्र | चारा |
| ४२८. | *Oplismenus burmannii* . (Retz.) P. Beauv | — | आंबाडी | चारा |
| ४२९. | *Panicum phoiniclados* Naik & Patunkar | — | मिर्झापूर | चारा |
| ४३०. | *Paspalidium geminatum* (Forssk.) Stapf. | — | किनवट | चारा |
| ४३१. | *Pennisetum pedicellatum* Trin | — | किनवट | चारा |
| ४३२. | *Pseudanthistiria hispida* Hook. F. | — | सर्वत्र | चारा |
| ४३३. | *Sehima nervosum* (Rottl.) Stapf. | पवना | सीताखंडी | चारा |
| ४३४. | *Sehima sulcatum* (Hack.) A. Camus | — | किनवट | उत्तम चारा |
| ४३५. | *Setaria pumila* (Poir) Roem & schult. | — | किनवट | तण |
| ४३६. | *Sorghum controversum* (Steud.) Snowden. | बोरु | किनवट | चारा, लेखणी |
| ४३७. | *Sorghuin deccanense* Stapf ex Bor | कोकळा | किनवट | चारा, तण |

Maharashtra State Gazetteers

| अनु. | प्रजातीचे लॅटीन नाव | स्थानिक नाव | कोठे उपलब्ध | उपयोग |
|---|---|---|---|---|
| ४३८. | *Sporobolus indicus (L.) R. Br. Var.* diander (Retz.) Jou. and God. | — | किनवट | चारा, तण |
| ४३९. | *Tetrapogon tenellus* (Roxb.) Choiu. | — | माहूर | तण |
| ४४०. | *Themeda quadrivalvis* (L.) O. Ktze | गोंडाळ | आंबाडी | चारा |
| ४४१. | *Urochloa panicoides* P. Beau | — | किनवट | चारा |
| ४४२. | *Vetiveria lawsonii* (Hook F.) Blatt. & Mccann. | — | किनवट | चारा |
| ४४३. | *Vetiveria zizanioides* (L.) Nash | वाळा, खस | किनवट | मुळे सुगंधी, औषधोपयोगी. |

या खेरीज लव्हाळा आणि गवतांच्या अनेक प्रजाती नांदेड जिल्ह्याच्या समृद्ध वनसंपदेत समाविष्ट झाल्या आहेत.

Maharashtra State Gazetteers

**अभयारण्य :** सन १९७१ मध्ये शासनाने पैनगंगा अभयारण्य घोषित करण्याचा निर्णय घेऊन यवतमाळ जिल्ह्यातील ६ आणि नांदेड जिल्ह्यातील २१ असे एकूण २७ गावांचा समावेश पैनगंगा अभयारण्याचे कक्षेत करण्यात आला होता. त्यानुसार नांदेड जिल्ह्यातील २१ गावातील सर्व जनसामान्यांचे हक्क व सवलतीबाबत वनजीव (संरक्षण) अधिनियम १९७२ अन्वये चौकशी करण्यासाठी शासनाने १९९२ मध्ये उपविभागीय अधिकारी किनवट यांना नियुक्त करण्यात आले होते. त्याप्रमाणे सदर बाबतची चौकशी करून १९९८ मध्ये सदर चौकशी अहवाल शासनास सादर करण्यात आला. त्यानुसार नांदेड जिल्ह्यातील वनक्षेत्र हे तुटक स्वरूपाचे असल्याने सदर क्षेत्र हे अभयारण्य क्षेत्रातून निर्वणीकरण करण्याचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला. त्यामुळे नांदेड वन विभागातील कोणतेही क्षेत्र सद्यस्थितीत पैनगंगा अभयारण्याचे कक्षेत कार्यान्वित नाही.

**रोपवाटिका :** जिल्ह्यात सद्यस्थितीत वन विभागाच्या ८ रोपवाटिका आहेत. त्यामध्ये नांदेड वनक्षेत्रातील अर्धापूर रोपवाटिका (क्षेत्र ३.०० एकर), भोकर वनक्षेत्रातील भोकर रोपवाटिका (क्षेत्र २.८८ एकर), बोधडी वनक्षेत्रातील सावरी रोपवाटिका (क्षेत्र २.०० एकर), हदगाव वनक्षेत्रातील निवघा रोपवाटिका (क्षेत्र २.०० एकर) ह्या चार रोपवाटिका मध्यवर्ती रोपवाटिका आहेत. इतर रोपवाटिकामध्ये मांडवी वनक्षेत्रातील टिटवी रोपवाटिका (क्षेत्र १.०० एकर), इस्लापूर वनक्षेत्रातील सहस्त्रकुंड रोपवाटिका (क्षेत्र ३.०० एकर), देगलूर वनक्षेत्रातील खैरगाव रोपवाटिका (क्षेत्र १.५० एकर), देगलूर वनक्षेत्रातील बडूर रोपवाटिका (क्षेत्र १.५० एकर) ह्या आहेत. या सर्व रोपवाटिकांमधून विविध प्रजातींच्या रोपांची निर्मिती केली जाते. त्यामध्ये प्रामुख्याने शिसू (शिसव), खैर, बांबू, आवळा, करंज, सीताफळ, शिवन, नीम, बेहडा, बहावा, बोर, शिरस इत्यादी वृक्षांच्या रोपांची निर्मिती केली जाते.

## वनीकरण योजना

**वनीकरण योजना :** नांदेड वन विभागामार्फत नवीन क्षेत्रात वनीकरण करण्यासाठी विविध योजनांखाली वनीकरण करण्यात आलेले आहे. त्यामध्ये संयुक्त वनव्यवस्थापन योजनेखाली सन २००५ मध्ये ३० हेक्टर व २००७ मध्ये २१० हेक्टर तर बिगर आदिवासी उपयोजन क्षेत्रात सन २००७ मध्ये ४० हेक्टर क्षेत्रात नवीन वनीकरण केले आहे. कृत्रिम पुनर्निर्मिती योजनेखाली सन २००५ मध्ये २० हेक्टर आणि २००६ मध्ये ६१२ हेक्टर क्षेत्रात वनीकरण करण्यात आले. निकृष्ट वनाचे पुनर्वनीकरण योजनेखाली सन २००६ मध्ये ६४ हेक्टर आणि २००७ मध्ये ४० हेक्टर क्षेत्रात आणि याच योजनेखाली सन २००७ मध्ये बिगर आदिवासी उपयोजनेखाली १० हेक्टर क्षेत्रात वनीकरण करण्यात आले. औद्योगिक व व्यापारी वृक्ष लागवड बांबू योजनेखाली सन २००६ मध्ये ४७ हेक्टर क्षेत्रात वनीकरण करण्यात आले. मृदसंधारणार्थ वनीकरण कार्यक्रमांतर्गत सन २००६ मध्ये ५७ हेक्टर क्षेत्रात वनीकरण करण्यात आले. किरकोळ जंगल उत्पन्नाचा विकास घायपात, खैर योजनेखाली सन २००७ मध्ये ८० हेक्टर क्षेत्रात लागवड करण्यात आली. आदिवासी उपयोजन क्षेत्रात लागवड कार्यक्रमाखाली सन २००७ मध्ये ५ हेक्टर आणि बिगर आदिवासी उपयोजनेखाली याच वर्षात १८ हेक्टर क्षेत्रात वनीकरण करण्यात आले. कार्यआयोजनांतर्गत सन २००७ मध्ये ६२५ हेक्टर क्षेत्रात वनीकरण करण्यात आले. उपरोक्त योजनांखेरीज जिल्ह्यात रोजगार हमी योजनेंतर्गत वन विभागातर्फे सन २००५ मध्ये एकूण ५० हेक्टर क्षेत्रात रोपांची लागवड करण्यात आली. त्यात लावण्यात आलेल्या

रोपांची संख्या ६४ हजार इतकी होती व त्यावर या योजनेंतर्गत रु. ६ लाख ९७ हजार खर्च करण्यात आले. सन २००६ मध्ये राष्ट्रीय कार्यक्रम अंतर्गत एकूण ८५५ हेक्टर क्षेत्रात ८ लाख ६५ हजार ८०० रोपांची लागवड करण्यात आली. त्यावर १७ लाख ८ हजार रुपये खर्च झाले. महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेखाली सन २००७ मध्ये १२५ हेक्टर क्षेत्रात २ लाख ९४ हजार ४०० रोपांची लागवड केली. सन २००८ मध्ये १७५ हेक्टर क्षेत्रात ३ लाख ६४ हजार ३०० रोपांची लागवड करण्यात आली आणि सन २००९ मध्ये १५५ हेक्टर क्षेत्रात २ लाख १९ हजार ४०० रोपांची लागवड करण्यात आली. या योजनेखाली वरील कार्यासाठी सन २००७ ते २००९ या तीन वर्षाच्या कालावधीत अनुक्रमे रु. ७ लाख २८ हजार, रु. ३ लाख ७१ हजार आणि रु. १५ लाख ७७ हजार इतके खर्च झाले. वन विभागामार्फत उपरोक्त विविध योजनाखाली सर्वसाधारण वृक्षजातीची लागवड करण्यात आली त्यात नीम, शिसू, खैर, बोर, करंज, आवळा, शिरस, बांबू इत्यादी वृक्ष जातीचा समावेश होता.[३९]

**सामाजिक वनीकरण :** वाढत्या लोकसंख्येबरोबर इंधनाची गरज वाढली. गेल्या अनेक वर्षात कोणताही विचार न करता एकीकडे अव्याहतपणे वृक्ष तोड होत असताना दुसरीकडे नवीन वृक्ष लावण्याचे फारसे प्रयत्न झाले नाहीत. सर्व परिस्थितीचा गांभीर्याने विचार करून शासनाने सामाजिक वनीकरण योजना सुरू केली व उघड्या बोडक्या, उजाड माळरानावर, रस्त्याच्या दुतर्फा, कार्यालयाच्या आवारात, कालव्यांच्या बाजूने वृक्षरोपणाची मोहीम हाती घेतली.[४०]

नांदेडला दिनांक ११ नोव्हेंबर १९८१ ला सामाजिक वनीकरण विभाग कार्यालयाची स्थापना झाली. या विभागाद्वारे वनीकरणाच्या अनेक योजना राबविण्यात आल्या आहेत.

जिल्ह्यात सामाजिक वनीकरणाअंतर्गत विविध योजनांखाली पुढील वृक्ष जातींची लागवड करण्यात आली.

गुलमोहर (Delonix regia), काशीद (Cassia Siamea), रेन ट्री (Samania Saman), शिवण (Gmelina arborea), करंज (Pongamia Pinnata), शिरस (Albizzia lebbek), सागवान (Tectona grandis), निंब (कडुनिंब-Azadirachta indica), शिसू (Dalbergia Sisoo), पेल्टाफोरम (Peltoforum ferrugenium), खैर (Acacia Catechu), पार्किन सोनिया (Parkinsonia aculetta), जॅटोफा, शेमल या वृक्षांची रोपे तयार करण्यासाठी बिलोली तालुक्यातील मौ. जारीकोट आणि मौ. अर्जापूर येथे, नांदेड शहरात पॉलिटेक्नीक कॉलेज येथे आणि भोकर तालुक्यातील मौ. भोसी येथे मध्यवर्ती रोपवाटिका आहेत.

**किसान रोपवाटिका योजना :** राष्ट्रीय पडीक जमीन विकास महामंडळाने पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली नवी दिल्ली येथे दिनांक ६ फेब्रुवारी १९८६ रोजी झालेल्या बैठकीत सामाजिक वनीकरणाच्या कार्यक्रमात जनतेचा सहभाग मोठ्या प्रमाणात होण्यावर भर देण्यात यावा व त्यादृष्टीने रोपवाटिकांची उभारणी करण्यात यावी. अशा रोपवाटिका सर्वदूर उभारल्या जाव्यात व साधारणतः

३९. उपवनसंरक्षक, नांदेड वन विभाग, नांदेड यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.

४०. महाराष्ट्रातील जिल्हे : नांदेड, १९८९, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातर्फे प्रकाशित, पृ. ३६.

प्रत्येक १० कि.मी. अंतरावर अशा तऱ्हेच्या रोपवाटिका उपलब्ध असाव्यात असा निर्णय घेतला. त्यानुसार सन १९८६-८७ पासून महाराष्ट्र राज्यामध्ये किसान रोपवाटिका योजना केंद्र शासनाच्या आर्थिक सहाय्यातून राबविण्यात आली. वृक्ष निर्मिती तंत्रज्ञान, वृक्ष लागवड कार्यक्रमाचा आधार, स्वयंरोजगार निर्मितीचे साधन या दृष्टीने जनतेने राबविलेल्या किसान रोपवाटिकांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

उपरोक्त विविध प्रकारच्या वनसंपदामध्ये जिल्ह्यामध्ये एक वनोद्यानही आहे. हे वनोद्यान कंधारजवळ शांतीघाट बहादुरपुरा येथे असून ते पंडित नेहरू वनोद्यान या नावाने ओळखले जाते.[४१]

श्री. दिलीप गोगटे यांनी अलिकडील काळात रामानंदनगर परिसरात मत्स्यपुराण व गर्गसंहितेतील नोंदी आधारे नक्षत्र व राशी विषयी असणारी वृक्ष व औषधी वनस्पती यांची सुमारे ४०० पेक्षा जास्त रोपांची लागवड अर्ध्या एकर क्षेत्रात केली आहे.

## प्राणीसृष्टी

नांदेड वन विभागांतर्गत किनवट भागातून पैनगंगा नदी वाहत जाते. तेथे साग, सालई, हळदु, मोई, ऐन, तेंदु, दुधी, पळस, धावडा, खैर इत्यादी वृक्ष दाटीने दिसून येतात. तसेच भोकर आणि हदगाव येथीलही अशा प्रकारच्या दाट जंगलामुळे या भागात म्हणजेच किनवट, माहूर, मांडळी, बोधडी, इस्लापूर व हदगाव या वनपरिक्षेत्रात अनेक वन्य प्राण्यांचा संचार मोठ्या प्रमाणात आढळून येतो. या वनक्षेत्रामध्ये वाघ, बिबट्या, सांबर, चितळ, भेकर, काळविट, चौसिंगा, निलगाय, रानडुक्कर, तरस, अस्वल, सायाळ, लांडगा, कोल्हा, वानर इत्यादी प्राणी आढळतात. नांदेड जिल्ह्यातील वन्य प्राण्यामध्ये काही मांसभक्षक व काही शाकतृजीवी (वनस्पती) खावून राहणारे आहेत. काही सरपटणारे तर काही उभयचरही आहेत. तसेच जिल्ह्यात गोदावरी नदीच्या खोऱ्यात, तलावांच्या किंवा जलसंचयाच्या परिसरात व जंगलातही विविध पक्षीदेखील आढळतात. अशा काही पक्षांची आणि प्राण्यांची वर्णनात्मक माहिती खाली दिलेली आहे.

### नांदेड जिल्ह्यात आढळणारे पक्षी

**१) मोर** (Common Peafowl/Pavo Cristatus) : हा पक्षी मोर किंवा मयुर या नावाने ओळखतात. हा राष्ट्रीय पक्षी असून याच्या मस्तकावर तुरा असतो. त्याची मान व डोळे निळसर असतात. त्या निळावंतीवर मध्ये-मध्ये हिरवी-पिवळी छटा दिसते. त्याचे पोट हिरवट काळसर रंगाचे असते व पृष्ठभागी लांबलचक पिसारा असतो. त्यातील पिसे साधारणपणे वीस किंवा त्यापेक्षा अधिक असतात. याची शेपटी लांब पिसांची असते. ही पिसे किंवा पिसारा प्रत्येक वर्षी गळतो आणि वसंत ऋतुत त्या ठिकाणी नवीन पिसे येऊ लागतात. एकंदरीत मोराचा रंग निळा, सोनेरी, तपकिरी काळा, जांभळा असा असतो. या सर्व रंगाची जणू त्याच्यावर उधळणच झाल्याचे भासते. शेपटीच्या पिसांच्या टोकाकडील भाग अत्यंत मुलायम व हाताच्या पंजासारखा पसरलेला व शेवटी निमुळता झालेला

४१. उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग, नांदेड यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.

असतो आणि त्यावर विविध व आकर्षक रंग छटा असतात आणि त्यावर डोळ्यासारखी आकर्षक आकृती असते. या पक्षाच्या मादीला लांडोर म्हणतात. तिला मोरासारखा तुरा नसतो तसेच पिसाराही नसतो. ती साधारणतः तपकिरी रंगाची असून गळ्याच्या खालच्या भागाचा रंग हिरवा असतो. ह्या पक्षाचे खाद्य धान्य, किटक, पाली, भाजीपाला इत्यादी असते. हा पक्षी पाणथळीचे जंगल तसेच डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या जंगलात किंवा पतझड जंगलात थव्या थव्याने किंवा कळपात वावरतो. सामान्यतः हा पक्षी जिल्ह्यातील जंगलाच्या सर्व परिक्षेत्रात आढळतो. मोराचे घरटे जमिनीवर गवताचे केलेले असते. मादी ६ ते १५ अंडी घालते. हा पक्षी म्याव-म्याव असा आवाज काढीत असतो. या पक्षाची वयोमर्यादा ८ ते १० वर्षाची असते.

**२) तीतर** (Grey Partridge/Francolinus Pondicerianus) : हा जमिनीला चिकटून बसणारा, शेपूट नसलेला गोंडस पक्षी असून त्याचा रंग बदामी, तपकिरी, फिकट पांढरे ठिपके, वरच्या भागात लाल तपकिरी आणि काळ्या रंगाचे असतात. मादीला गळ्यावर काळे पट्टे नसतात. प्रत्येक पायावर टोकदार आरी असते. शेताच्या व गावाच्या आसपास असलेल्या गवताच्या माळरानात किंवा काटेरी झुडुपाच्या भागात हा पक्षी आढळतो.

**३) जांभळी पानकोंबडी** (Purple Moorhen/Porphyrio) : गावठी कोंबडीच्या आकाराच्या या पक्षाचा रंग निळा जांभळट असतो व पाय लांब उघडे असतात. तांबड्या रंगाचे कपाळ व त्याच्या भागात लहान जाड व तांबडी चोंच आणि चालताना स्पष्ट दिसणारा उभारलेल्या शेपटीखालचा पांढरा डाग. वेताच्या वनामधील पानथळ प्रदेशात ह्या पक्षांचे थवे आढळतात.

**४) घार** (Pariah/Haliastur) : या पक्षाचा रंग काळा तपकिरी असतो. याची शेपटी दुभंगलेली असते. तो उडत असताना त्याच्या शेपटीचा आकार स्पष्ट दिसतो. हा पक्षी खाटीक खाने, मासोळी बाजार, कचऱ्याचे मोठे साठे, बंदरे यांच्या आसपास मिळणारे मांसाचे तुकडे गोळा करताना हे बहुसंख्येने आढळतात. यांच्या खाद्यामध्ये साप, सरडे, उंदीर, मासे, छोटे पक्षी इत्यादींचा समावेश असतो. हा पक्षी पर्णझडीत उंच झाडावर, शेती, उजाड माळरान इत्यादी ठिकाणी वास्तव्य करून राहतो. हा पक्षी चीर चीर असा आवाज करीत असतो. याची वयोमर्यादा ७ ते ८ वर्षे असते.

**५) जांभळा बगळा** (Purple Heron/Aredea Purpurea) : हा इतर बगळ्यासारखाच पण आकाराने लहान असतो. ह्या पक्षाचे वरचे अंग निळसर किंवा जांभळट राखाडी रंगाचे असते. याची मान व डोके तांबूस असते. तर पोटाखाली काळी व तांबूस पिंगट पिसे असतात. इतर पांढरे बगळे देखील जिल्ह्यात आढळतात. ते देखील या पक्षाप्रमाणे पाणथळ जागेत आढळतात.

**६) उघड्या चोचीचा करकोचा** (Open-billed Stock/Anastomus oscitans) : हा अडीच फूट उंचीचा पक्षी असतो. याचा रंग राखट किंवा पांढरा असतो. पंख काळे असतात. तांबूस काळ्या रंगाच्या चोचीचे दोन्ही भाग वाकलेले असल्यामुळे त्यांच्यात नेहमी फट राहते म्हणून उघड्या चोचीचा करकोचा असे नाव पडले असावे.

Maharashtra State Gazetteers

**७) सुतार हुप्पो** (लाकूडतोड्या/Hoopoe/Woodpecker) : हा आकर्षक पिंगट व उदीरंगाचा पक्षी. याच्या अंगावर पिवळसर तपकिरी ठिपके असतात. याच्या डोक्यावर तुरा असतो. हा तुरा त्याला मिटता किंवा उघडता येतो. काळे पांढरे पंख असलेला व कमानदार चोच असलेला हा पक्षी झाडाची खोडेही चोचीने पोखरतो. याच्या खाद्यामध्ये किडे, अळ्या यांचा समावेश असतो. हे पक्षी साधारणपणे जोडीने किंवा टोळक्याने आढळतात.

**८) कुरल चिलखा** (Stone Curlew/Burhinus oedicnemus) : याचा तितरासारखा आकार, तपकिरी पट्टे असलेला जमिनीवरील पक्षी. याचे डोके जाडसर असते. पाय पिवळसर असतात व पिवळसर मोठे डोळे असतात. याच्या गडद पंखावर दोन अरूंद पांढरे पट्टे असतात. हे जोडीने किंवा थव्यासह मोकळ्या खडकाळ प्रदेशात दिसतात. किडे, जंतू व लहान सरडे हे याचे भक्ष्य असते. हा फेब्रुवारी ते ऑगस्टमध्ये घरटे करतो.

**९) सुगरण किंवा विणकर** (Weaver Bird or Baya/Ploceus Philippinus) : हा चिमणी गटातील पक्षी घरटे विणण्याकरीता सुप्रसिद्ध आहे. चिमणीसारख्या दिसणाऱ्या या पक्षाची चोच जाड व शेपूट लहान असते. विणीच्या हंगामात नर जास्त पिवळसर दिसतो. माळरानात व शेताच्या आसपास प्रचंड थव्याने दिसतात. प्रत्येक विणीच्या हंगामात एकेक नर ७-७ घरटी बांधतो.

**१०) लालबुडी भिंगरी** (लालगुड्या भांडीक/Straited or Redrumped Swallow/ Hirundo daurica) : या पाकोळीच्या पोटाकडील पांढरट भागावर तांबड्या रंगाच्या रेषा असतात. मान आणि शेपटीजवळ पाठीवर चॉकलेटी रंग असतो.

**११) चिरक** (Indian Robin/Saxicoloides fulicata) : याचा आकार चिमणीपेक्षा थोडा मोठा असून १५-१६ सें.मी. लांब असतो. नराचा रंग काळा, शेपटाखाली तांबट रंग, त्याच्या खांद्यावरील पंखावर पांढरा आडवा पट्टा, चोच काळी, मादी मातकट रंगाची, राखट तपकिरी असते. हा झुडुपी खडकाळ माळरानात दिसतो. जमिनीवर उड्या मारीत असतो. शेपटी सारखी वर करतो. एप्रिल-जूनमध्ये त्याचा विणीचा हंगाम असतो. मादी पिवळसर पांढरी अंडी घालते. त्यावर तपकिरी ठिपके असतात. मादी एकटी अंडी उबविते. पिल्लांना भरविण्यात नर मादीला मदत करतो.

**१२) पोपट** (Parrot/Psittacula Kosnoor) : हा हिरव्या रंगाचा पक्षी, याची चोच लाल असते. हा पक्षी फळे खातो. हा झाडांच्या ढोलीत तसेच झाडावर वास्तव्यास असतो. हा मिठू-मिठू किंवा चिव्-चिव् असा आवाज करतो. हा जोडीने किंवा कळपाने राहतो. याची वयोमर्यादा ८ ते १० वर्षे असते.

**१३) टिटवी** (Redwattled Lapwing/Vanellus indicus) : हा पक्षी वरून तपकिरी, खालून पांढरा रंग, छाती, डोके व मान काळी, डोक्याजवळ पुढे किरमिजी रंगाची मांसल गाठण असते. पाय बरेच लांब असतात. तळी, नदीकाठी, वाळूच्या आसपास दिसते. याची वयोमर्यादा ५ ते ६ वर्षे असते.

एचएफ ४२१०—८अ

Maharashtra State Gazetteers

**१४) कोकीळ** (Koel/Eudynamys Scolopacea) : हा पक्षी कावळ्याच्या आकाराचा परंतु थोडा निमुळता असतो. नर पक्षी कावळ्यासारखा गडद काळा पण मादी मातकट रंगाची असते. मादीच्या पाठीवर पांढऱ्या रेषा व ठिपके असतात. याच्या खाद्यामध्ये फळे व किटकांचा समावेश असतो. हा कुहू-कुहू असा आवाज काढतो. फक्त नरालाच गाता येते. हा पक्षी बगीचा, मोठेमोठे झाडे असलेल्या ठिकाणी आढळतो. याची वयोमर्यादा ७ ते ८ वर्षे असते.

**१५) घुबड** (Indian Great Hernedo Owl/Bubo bubo) : हा पक्षी पिवळट तपकिरी रंगाचा असतो. प्रामुख्याने हा निशाचर पक्षी मानला जातो. साळुंकीच्या आकाराच्या या पक्षाचा बांधा मजबूत असून शरीराची वरची बाजू राखाडी रंगाची व त्यावर पांढरे ठिपके असतात. डोके मोठे व वाटोळे पण पुढे झुकलेले असते. डोळे वटारलेले असतात. याच्या खाद्यामध्ये छोटे पक्षी, मासे, उंदीर इत्यादींचा समावेश असतो. हा झुडुपी खडकाळ क्षेत्र, घनदाट जंगल इत्यादी ठिकाणी आढळतो. हा घु-घु असा आवाज काढत असतो. याची वयोमर्यादा १० ते १२ वर्षे असते.

**१६) लाव्हरी** (जंगली दुर्लाव/Jungle Bush Quail/Perdicula asiatica) : हा तीतराच्या निम्म्या आकाराचा पक्षी. हा वरून तपकिरी, लालसर आणि लाकडी रंगाचा असतो. नर वरून तपकिरी रंगाचा असून त्यावर काळ्या आणि पिवळट रंगाच्या रेषा व ठिपके असतात. नर व मादीच्या अंगावर कपाळापासून मानेपर्यंत फिकट रंगाच्या भुवईची पट्टी स्पष्ट दिसते. हा झुडुपी जंगल, शुष्क दगडी गवती प्रदेशात आढळतो. हा जमिनीवर राहतो. गवतामध्ये किंवा झुडुपांच्या बुडाशी घरटे करतो. मादा अशा घरट्यात अंडी घालते. या पक्ष्याच्या खाद्यात किडे, गवती बी, धान्य इत्यादीचा समावेश असतो. हा कुंक-कुंक असा आवाज करीत असतो. याची वयोमर्यादा ३ ते ४ वर्षे असते.

जिल्ह्यात आढळणाऱ्या वरील पक्षांखेरीज किनवट भागात हिवाळ्यात सैबेरिया इत्यादी देशातून विविध स्थलांतरित पक्षी येतात.

नांदेड जिल्ह्यात खालील वन्यप्राणी आहेत.

## वन्यप्राणी

**१) बिबळ्या वाघ** (Panther/Leopard/Panthera pardus) : याच्या अंगावर काळेपिवळे ठिपके व गुलखुना रिंगन असते. हे दाट व साधारण जंगलात आढळून येतात. नांदेड परिक्षेत्रात ऊसाची मोठी लागवड असल्यामुळे व अस्तित्वात असलेल्या वनात बिबट वाघाचा वावर आढळून येतो. त्याचप्रमाणे ईस्लापूर, बोधडी व किनवट या परिक्षेत्रात बिबट या प्राण्याचा वावर मोठ्या प्रमाणात आढळून येतो. हरणे, माकडे, गाई, गुरे व लहान प्राणी हे याचे भक्ष्य आहे. याची वयोमर्यादा ३० वर्षे असते. दिनांक १८ एप्रिल २००५ ते दिनांक २३ मे २००५ च्या कालावधीतील वन्यप्राण्यांच्या प्रगणनेनुसार जिल्ह्यात २ बिबटे आढळून आले.

**२) पट्टेदार वाघ** (Tiger/Panthera tigris) : याच्या अंगावर काळे पिवळे पट्टे असतात. पोटाखालील भाग फिकट पिवळसर असतो, गालावर काळेपांढरे पट्टे असतात. हा प्राणी दाट तसेच

साधारण जंगलात आढळतो. हरणे, गाई, गुरे व लहान प्राणी हे याचे भक्ष्य आहे. सन १९९७ मध्ये माहूर वनपरिक्षेत्रात एक पट्टेदार वाघ व वाघीण त्यावेळच्या प्रगणनेत आढळून आले होते. परंतु सन २००५ च्या प्रगणनेमध्ये मात्र या वाघाचे अस्तित्व असूनही त्याची प्रगणना शक्य झाली नाही.

**३) अस्वल** (Sloth Bear/Malursus Ursinus) : याचा गडद मातकट रंग असतो. याचे पाय मळकट पांढरे असतात. याच्या खाद्यात झाडपाला, गवत, मोहाफुले, फळे, किटक, मुंग्या, वाळवी, शेतपिके, मधमाशांचे पोळे इत्यादीचा समावेश असतो. हा गुरगुर असा आवाज काढतो. या प्राण्याचे गंधज्ञान तीव्र असते. याला पाण्यात पोहता येते. किनवट, माहूर, बोधडी परिक्षेत्रात याचे वास्तव्य आढळते. याची वयोमर्यादा ४० वर्षे असते. सन २००५ प्रगणनेनुसार यांची संख्या २४ होती.

**४) लांडगा** (Wolf/Canis lupus) : हा कुत्र्यासारख्या आकाराचा प्राणी जंगलाच्या घनदाट भागात आढळतो. याचा रंग वाळुसारखा गडद व काळसर असतो. हरीण, सांबर, गाई, गुरे इत्यादी याचे भक्ष्य असते. याची वयोमर्यादा १२ ते १५ वर्षे असते. २००५ च्या प्रगणनेनुसार यांची संख्या ५८ होती.

**५) कोल्हा** (Jackel/Lanis Qureus) : हा उदी अथवा तपकिरी रंगाचा प्राणी कुठल्याही प्रकारच्या वनात आढळतो. याच्या खाद्यात मृत जनावराचे मांस, फळे, ऊस, कोंबड्या, तितर, सरडे, शेळ्या-मेंढ्या इत्यादीचा समावेश असतो. हा क्रूर व भारदस्त दिसतो. याची वयोमर्यादा १२ वर्षे असते. सन २००५ च्या प्रगणनेनुसार यांची संख्या १९० आहे.

**६) तरस** (Striped Hyaena/Hyaena-hyaena) : या प्राण्याचा रंग मळकट पांढरा-उदी व राखी असतो व अंगावर आडवे पट्टे असतात. याच्या खाद्यामध्ये सडकी, कुजकी प्रेते, शेळी, मेंढी, पाळीव कुत्रे यांचा समावेश असतो. हा प्राणी प्रामुख्याने मांडवी वनपरिक्षेत्रात आढळतो. हा प्राणी रडल्यासारखा व हसण्यासारखा आवाज काढतो. याची वयोमर्यादा १६ वर्षे असते. सन २००५ च्या प्रगणनेनुसार याची संख्या ३ आढळून आली आहे.

**७) मसण्या उद** (Common Pop Civet/Paradoxurus hermaphorditus) : हा प्राणी राखी व मातकट काळसर रंगाचा असतो. हा जंगलात किंवा आंब्याच्या झाडावर वास्तव्य करून राहतो. हा बोधडी वनपरिक्षेत्रात विशेष करून आढळून येतो. याच्या खाद्यामध्ये सरपटणारे प्राणी, उंदीर, घुशी, कोंबड्या इत्यादींचा समावेश असतो. हा फिसकारत असतो. सन २००५ च्या प्रगणनेनुसार याची संख्या ४ आढळून आली आहे.

**८) मुंगूस** (Common Mangoose/Herpeste edwardsi) : याच्या अंगावर काळ्या पांढऱ्या रंगाचे पट्टे असतात. हे शेतात, दाट जंगलात तसेच मनुष्य वस्तीतही आढळतात. याच्या खाद्यामध्ये साप, उंदीर, कोंबड्या, लहान पक्षी, सरपटणारे प्राणी, बेडूक, खेकडे, किटक इत्यादींचा समावेश असतो. याची वयोमर्यादा ७ ते ८ वर्षे असते. एप्रिल ते मे २००५ या कालावधीतील प्रगणनेत या प्रकारच्या मुंगूसाची संख्या ३ आढळून आली आहे.

**९) रानमांजर/बोका/बोगा** (Jungle Cat/Felis Chaus) : याचा रंग पिवळसर, राखाडी वाळुसारखा असतो. हे सुक्या उघड्या माळरानावर, जुन्या पडीत घरात किंवा देवळात आढळतात. याच्या खाद्यामध्ये सायाळ, उंदीर, छोटे सस्तन प्राणी, कोंबड्या इत्यादींचा समावेश असतो. हा गुरगुरत असतो.

**१०) जंगली डुक्कर/रानडुक्कर** (Wild bear/Susscrofa) : याचा रंग मातकट, राखाडी असतो. अंगावर काळसर केस असतात. याच्या खाद्यामध्ये झाडाझुडपांची मुळे, कंदमुळे, फळे, पिके, किडे, सरडे, कुजके मांस इत्यादीचा समावेश असतो. हे झुडुपाच्या किंवा कोणत्याही जंगलात कळपाने आढळतात. याचे गंध ज्ञान तीव्र असते. याची वयोमर्यादा २० ते २५ वर्षे असते. सन २००५ च्या प्रगणनेप्रमाणे यांची संख्या ८५० एवढी आढळून आली आहे.

**११) निलगाय** (Bluebull/Nilgai/Boselaphus tragocamelus) : निलगायचा रंग उदी अथवा राखाडी असतो. गालावर दोन दोन पांढरे ठिपके असतात. मानेवर काळ्या रंगाची केसाची खुरटी आयाळ असते. शिंग काळे असतात. हे गवताळ, खुरट्या झुडुपानी भरलेल्या जंगलात कळपाने राहतात. यांच्या खाद्यामध्ये झाडाझुडुपांचा पाला, फळे, बोर, मोहफुले इत्यादीचा समावेश होतो. निलगायची साधारण वयोमर्यादा २० ते २५ वर्षे असते. निलगाय पळण्यात अतिशय चपळ असते. किनवटच्या जंगलात यांचा वावर दिसून येतो. सन २००५ च्या प्रगणनेप्रमाणे निलगायींची संख्या ४१६ आढळून आली आहे.

**१२) भेकर** (Muntjack or Barking deer/muntiacus muntjack) : याचा रंग गडद तांबडा असतो. याच्या खाद्यात गवत, झाडपाला, रानटी फळे इत्यादींचा समावेश असतो. याचा आवाज काहीसा कुत्र्याच्या भुंकण्यासारखा असतो. त्यामुळे यास बार्किंग डिअर असेही म्हणतात. हे दाट झुडुपे व जंगलामध्ये आढळतात. सन २००५ च्या प्रगणनेप्रमाणे यांची संख्या ३६ एवढी आढळून आली आहे.

**१३) काळविट** (Black buck/Indian Antilop) : या हरणाच्या पाठीच्या वरच्या भागात गडद पिवळा पट्टा, त्याच्याखाली फिकट पिवळसर पांढरा पट्टा आणि त्याखाली काळ्या रंगाचा पट्टा आणि पोटाचा भाग पांढरसर असतो. मागच्या पायावर वरील बाजूस काळा पट्टा असतो. याला दोन शिंग असतात. याच्या खाद्यामध्ये गवत व निरनिराळी पिके यांचा समावेश असतो. याची दृष्टी तीक्ष्ण असून हा चपळ प्राणी आहे. हा खुरटी झुडुपांची वने व सपाट गवताळ भागातही कळपाने वास्तव्यास असतो. सन २००५ च्या प्रगणनेप्रमाणे काळविटांची संख्या २७ एवढी आढळून आलेली आहे.

हरीण या प्रकारात जिल्ह्यात चितळ, चौशिंगे व चिंकारा प्रकारचे हरीण देखील आढळतात. एप्रिल ते मे २००५ च्या प्रगणनेमध्ये ३ चितळ आणि १ चिंकारा हरीण आढळून आले आहे.

**१४) लाल तोंडाचे माकड** (Bonet Monkey/Macaca radiata) : याचे तोंड लाल, अंग भुरकट असते. हे अतिशय खोडकर असतात. याच्या खाद्यामध्ये झाडाची फुले, पाने, फळे, मुळे, किटक इत्यादींचा समावेश असतो. हे झाडावर कळपाने किंवा गटाने राहतात. हे ची ची असा आवाज करत असतात. याची वयोमर्यादा १२ ते १५ वर्षे असते.

**१५) काळतोंड्या वानर** (Common Langoor/Presbytis entetlus) : याचे तोंड, हातपायाचे पंजे काळे, अंग गडद भुरकट असते. हे हुप हुप असा आवाज करीत असतात. याच्या खाद्यामध्ये झाडांची फुले, पाने, फळे, मुळे, किटक याचा समावेश असतो. याची वयोमर्यादा १२ ते १५ वर्षे असते. हे कळपाने किंवा गटाने झाडावर राहतात.

**१६) ससा** (Indian Hare/Lepus nigricollis) : हा भुरकट, तांबडा, मातकट, काळसर पांढऱ्या रंगाचा प्राणी असतो. हा हिरवे गवत खात असतो. झुडुपाचे जंगलात याचे वास्तव्य असते. हा भित्रा प्राणी आहे. सन २००५ च्या प्रगणनेमध्ये यांची संख्या ६३ एवढी आढळून आली आहे.

**१७) सायाळ** (Indian Procupine/Hystrix indica) : याच्या अंगावर काटेरी टोकदार केस असतात. हा अशा काटेरी राठ केसाचा पिसारा फुलवून दुश्मनापासून स्वतःचे संरक्षण करण्याचा प्रयत्न करतो. हा सशापेक्षा थोड्या मोठ्या आकाराचा भासतो. याच्या काटेरी राठ केसांचा रंग काळा व पांढरट असतो किंवा केसावर पांढरे ठिपके असतात. यालाच साळसूद किंवा साळींदर असेही म्हणतात. सन २००५ च्या प्रगणनेमध्ये यांची संख्या ३ एवढी आढळून आली आहे.

## सरपटणारे प्राणी

**१) घोरपड** (Common Indian Monitor/Varanus bengalensis) : हा सरपटणारा प्राणी काळ्या करड्या आणि तपकिरी रंगाचा असतो. हा किडे, शेवाळ, जलवनस्पती खात असतो. याचे वास्तव्य खडकात किंवा कपारीमध्ये आढळते.

**२) कासव** (Tortoise/Melanochelys triluga) : हा प्राणी काळ्या करड्या व तपकिरी रंगाचा असतो. याच्या पाठीवर कठीण कवच असते. अन्य प्राण्याच्या हल्ल्यापासून स्वतःच्या संरक्षणार्थ चारही पाय आणि मान हा कवचाच्या आत ओढून घेतो. हा किडे, शेवाळ व जलवनस्पती खात असतो. हा नदी, विहीर, तलाव, समुद्र या ठिकाणी वास्तव्यास असतो.

**३) सरडा** (Common garden Lizard/Calotes Versicolor) : हा काळा, करडा, तपकिरी रंगाचा असतो. हा लहान किडे खात असतो. याचे वास्तव्य कुंपण, झुडुपे व झाडावर आढळते.

**४) साप** (Snake) : जिल्ह्यात सापामध्ये बिनविषारी आणि विषारी अशा दोन्ही प्रकारचे साप आढळतात. बिनविषारी आणि विषारी सापात सामान्यतः तपकिरी, काळा, लाल, हिरवा, पिवळसर ठिपके, अंगावर खवले असलेले इत्यादी रंग असलेले साप आढळतात.

**बिनविषारी साप :**

i) आंधळा साप (Typhlops sp.) : हा डोंगराळ भागात जेथे कुजलेला पानांचा ढिगारा असतो अशा ठिकाणी आढळतो. हा भुरकट रंगाचा असतो. याच्या कातडीवरील खवलांची रचना ही कौलाच्या रचनेसारखी असते. अनेकवेळा हा छद्मपाद प्राणी आहे असा समज होतो. या निरूपद्रवी सापाची लांबी साधारणपणे ८ इंचापर्यंत असते. हा कुजलेले पदार्थ तसेच कुजलेला पानांतील किटक भक्षण करीत असतो.

Maharashtra State Gazetteers

ii) अजगर (Indian Python/Python molurus) : हा प्रामुख्याने किनवटच्या जंगल भागात जास्त प्रमाणात आढळतो. त्याची लांबी साधारणतः १५ फूटांपर्यंत वाढते. त्याच्या अंगावर तांबडे-पांढरे फिकट ठिपके असतात. हा डोंगराळ भाग, हिरवी झुडुपे आणि काही जलसंचयाच्या ठिकाणी वास्तव्यास असतो. हा आपले भक्ष स्वतःच्या शरीराचा संकोच करून भक्षण करतो किंवा स्वतःचे शरीर भक्षाच्या भोवती आवळून भक्षण करतो.

iii) धामण (Common rat Snake or Dhaman/Ptyas mucosus) : हा उंदीरभक्षी प्राणी केवळ जिल्ह्यातच नाही तर संबंध महाराष्ट्रात आढळतो. याची लांबी १० फुटांपर्यंत वाढू शकते. याचा रंग फिकट पिवळा व त्यावर गडद भुरकट ठिपके असतात आणि शेपटीकडील भाग काळसर असतो.

iv) धीवर (Diwad/Natrix puscator) : हा उभे-आडवे पट्टे किंवा रेषा असणारा साप जिल्ह्यात सर्वत्र घाण डबके आणि नदीच्या ठिकाणी आढळतो. त्यांची लांबी साधारणतः ४ फुटांपर्यंत वाढू शकते. त्याची कातडी राखाडी रंगाची असते आणि त्यावर काळे चौकोनी व आडव्या उभ्या रेषा असतात. हा प्रामुख्याने बेडूक खात असतो. तो वेगाने चावा घेतो.

v) कवड्या साप (Kavdya/Lycodon qulicus) : हा साप सामान्यतः पावसाळ्यानंतर आढळतो. हा तीन फुटांपेक्षा अधिक वाढू शकत नाही. हा निरूपद्रवी साप भुरकट रंगाचा आणि त्यावर पांढरट फुल्यांसारख्या रेषा असलेला असतो. त्यामुळे स्थानिक भागात कवड्या साप म्हणतात.

**विषारी साप :**

i) नाग (Indian Cobra/Naja naja) : हा साप केवळ याच जिल्ह्यात नाही तर, राज्यात सर्वत्र आढळतो. हा शेती किंवा जंगलामध्ये आढळतो. हा विषारी साप असल्यामुळे लोक याची धास्ती बाळगतात. याची विशिष्ट सणाच्या (नागपंचमीच्या) दिवशी पूजाही केली जाते. या प्रकारच्या सापाच्या फण्यावर किंवा डोक्यावरील भागात दोन डोळ्यासारखी नक्षी किंवा प्रतीमा असते. याचा दंश झाल्यास या विषामुळे तत्काळ मज्जासंस्थेच्या कार्यावर परिणाम होऊ लागतो.

ii) मण्यार (Common Indian Krait/Bungarus caeruleus) : हा निळवट पोलादी आणि त्यावर पांढऱ्या फुल्यायुक्त रेषा असलेला साप हा उघड्या कोरड्या भागात क्वचित आढळतो. याचे विष देखील तत्काळ मज्जासंस्थेवर परिणाम करणारे असते.

iii) फुरसे (Saw-Scaled Viper/Echis Carinatus) : हा साप साधारणतः दगड किंवा खडकाळ भागात आढळतो. स्थानिक भागात याला 'कंद्या साप' म्हणतात. हा नेहमी इंग्रजी आठच्या आकड्याच्या आकाराप्रमाणे शरीर करून बसत असतो आणि खवले घासून आवाज करीत असतो. याची लांबी १० इंचापर्यंत वाढू शकते. हा अत्यंत विषारी साप आहे.

उपरोक्त बिनविषारी व विषारी साप हे सामान्यतः किडे, उंदीर, बेडूक, लहान मासे इत्यादी भक्षण करतात. अजगर मात्र मोठे प्राणीदेखील भक्षण करतो. सापांना कान नसतात, ते ध्वनी लहरी शोषून घेतात. निसत काळात हे कात टाकतात.

सरपटणाऱ्या वन्य प्राण्यात जिल्ह्यात मगर (Mugger or Marsh Crocodile/Crocodylus Palustris) हा प्राणीदेखील आढळतो.

जिल्ह्यात दि. १८ एप्रिल २००५ ते २३ मे २००५ या कालावधीत वन्यप्राण्यांच्या झालेल्या गणनेनुसार निलगाय-४१६, चितळ-३, भेकर-३६, माकड आणि वानर यांची एकूण संख्या १,२३४, जंगली डुक्कर-८५०, तरस-३, अस्वल-२४, बिबट-२, सायाळ-३, रानमांजर-६२, ससे-६३, कोल्हा-१९०, मसण्या उद-४, मुंगूस-३, मोर-६५४, रानकोंबडी-६, लांडगा-५८, काळविट-२७, चिंकारा हरीण-१, सर्प गरूड-६ आढळून आले.

वन्य प्राण्यांच्या मृत्यूच्या घटनांमध्ये सन २००६-०७ मध्ये बिबट्याच्या मृत्यूची एकूण ४ प्रकरणे घडली. त्यापैकी ३ मृत्यू नैसर्गिक होते व १ मृत्यू अपघाताने झालेला होता. सन २००७-०८ मध्ये १ हरीणाचा नैसर्गिक मृत्यू आणि काळविटाचा अपघाती मृत्यू झाल्याची नोंद करण्यात आली आहे. सन २००८-०९ मध्ये वन्य प्राण्यांच्या मृत्यूच्या एकूण ७ घटनांची नोंद झाली आहे. त्यापैकी १ भेकराचा नैसर्गिक मृत्यू, १ काळविटाचा अपघाती मृत्यू व १ हरीण व १ भेकराची शिकार झाल्याची नोंद आहे. तर १ निलगायीचा नैसर्गिक मृत्यू, १ कोल्ह्याचा अपघाती मृत्यू झाला व १ मोराची शिकार झाल्याची नोंद आहे. सन २००९-१० मध्ये १ बिबट्याचा अपघाती मृत्यू झाल्याची नोंद आहे.

**वन्य प्राण्यांच्या संरक्षणासाठी उपाययोजना**

वन्य प्राण्यांकडून पाळीव जनावरांवर तसेच माणसांवर हल्ले होऊन त्यात पाळीव जनावरे व माणसांना इजा पोहचते किंवा त्यात प्राण गमवावा लागतो. तसेच शेत पिकांचे नुकसान वन्य प्राण्यांकडून केले जाते किंवा होते. अशा घटनांमुळे हल्ला करणाऱ्या वन्य प्राण्यांना विष देणे, त्यास इजा पोहचविणे, कुंपण तारांमध्ये वीज प्रवाह सोडून प्राण्यांना मारणे इत्यादींमुळे वन्य प्राण्यांचा मृत्यू होतो. हे होऊ नये म्हणून असे प्रसंग उद्‌भवल्यास वन्य प्राण्यांना इजा न पोहचविता झालेल्या वित्त हानीच्या मोबदल्यात आर्थिक अनुदान शासनाकडून संबंधितांना देण्यात येते. सन २००६-०७ ते २००८-०९ या कालावधीत वन्य प्राण्यांच्या हल्ल्यांमध्ये एकूण ५ व्यक्तींचा मृत्यू झाला. त्यांच्या कुटुंबियांना एकूण ८ लक्ष रुपयांची मदत देण्यात आली. या कालावधीत एकूण १२४ व्यक्ती प्राण्यांकडून जखमी झाल्या त्यांना एकूण ९,१७,१३२ रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली. याच तीन वर्षांच्या कालावधीत एकूण २२४ पाळीव प्राणी मृत प्रकरणे झाली. त्यांच्या मालकांना एकूण रु. १२,२१,१२२ ची आर्थिक मदत देण्यात आली. या कालावधीत शेत पीक नुकसानीचे १ प्रकरण उद्‌भवले. त्याबाबत संबंधितास १,९६० रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली. अशा घटनांसाठी देण्यात येणाऱ्या आर्थिक मदतीमुळे जनतेमध्ये वन्य प्राण्यांबद्दल आस्था निर्माण होऊन वन्य प्राण्यांची हत्या किंवा अवैध शिकारींना आळा बसण्यास मदत झाली आहे.

याशिवाय नांदेड वन विभागातील वन्यजीव संपत्ती संरक्षणासाठी वन विभागाने विविध स्तरावर उपाययोजना केलेल्या आहेत. त्यामध्ये सन २००६-०७ ते २००८-०९ या तीन वर्षांच्या कालावधीत मृद व जलसंधारण अंतर्गत महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेखाली ७७ माती नाला बांध घेण्यात आले आहेत. तसेच ग्रामीण व वन कर्मचाऱ्यांच्या श्रमदानातून सन २००८-०९ मध्ये २६ वनराई बंधारे

देखील घेण्यात आले. त्याचप्रमाणे किनवट वनपरिक्षेत्रात लोणी, मोरेगाव, आंजी, पानदरा, अंबाडी, राजगड येथील नैसर्गिक खोलगट भागातील पाणवठ्यांचा गाळ काढून व खोदून नैसर्गिक पाणवठे व कृत्रिम पाणवठे तयार करण्यात आले. त्यामुळे पाण्याचा स्रोत वाढून त्याचा फायदा वन्य प्राण्यांना पिण्याच्या पाण्यासाठी झाला आहे. ज्यामुळे उन्हाळ्यात दीर्घकाळ पाण्याचे साठे टिकून राहतात व उन्हाळ्याच्या शेवटी पाण्याच्या अभावी वन्य प्राण्यांचे होणारे मृत्यू टळतात. तसेच मिठाचे चारण ठेवण्यात येते, ज्यामुळे जंगलातील वन्य प्राणी शक्यतो वस्तीकडे धाव घेऊ नयेत हा त्यामागील उद्देश असतो.

वन्य प्राण्यांची हत्या होऊ नये यासाठी विभागीय स्तरावर क्षेत्रीय तसेच फिरते पथकातील अधिकारी व कर्मचारी नियमित गस्त घालीत असतात. त्यासाठी त्यांना वाहनांचा, शस्त्रांचा पुरवठा करण्यात आला आहे. अवैध वृक्षतोड/वन्यजीव शिकार यावर प्रतिबंधात्मक तातडीची कार्यवाही व्हावी म्हणून या वन विभागाने ३९ भ्रमणध्वनी (मोबाईल फोन) अतिसंवेदनशील व संवेदनशील भागातील क्षेत्रीय वन कर्मचाऱ्यांस वाटप केलेले आहेत. या तत्पर मोबाईल सेवेमुळे वनसंपदा व वन्यजीव संरक्षणास महत्त्वपूर्ण मदत होत आहे. तसेच वन्य प्राण्यांचे व वन संरक्षणाचे महत्त्व कळावे म्हणून याबाबतीत ग्रामस्थांमध्ये संबंधित कायद्यांची माहिती देखील देऊन जनजागृती करण्यात येते. वन्यजीव सप्ताह अंतर्गत जिल्ह्यामध्ये विविध शाळा व महाविद्यालयात आणि गावोगावी जंगलाच्या महत्त्वाबरोबरच वन्य प्राण्यांचे महत्त्वसुद्धा पटवून दिले जाते. वन्यजीव संरक्षणासाठी शासनाने स्थापन केलेल्या व्याघ्रकक्ष समितीची जिल्हास्तरीय व महसूल विभागस्तरीय समितीच्या बैठकांमध्ये वन्य प्राण्यांविषयी होणाऱ्या गुन्ह्यांची चर्चा केली जाते. तसेच वन्यजीव व वन संरक्षणासाठी गावनिहाय गठित केलेल्या वन संरक्षण समितीची मदत घेतली जाते.

या सर्व उपाययोजनांमुळे किनवट, माहूर, मांडवी व भोकर वनक्षेत्रात मागील ३ वर्षांत वन्य प्राण्यांच्या अवैध शिकारीच्या घटना घडल्या नाहीत. केंद्र पुरस्कृत योजना २००९-१० करिता वन्यजीव अधिवास नांदेड वन विभागाच्या विकास कामाबाबतचा वार्षिक प्रवर्तन अहवालाचा प्रस्ताव या वन विभागाद्वारे मान्यतेसाठी सादर केला आहे. त्यानुसार निरीक्षण मनोरे १५, सिमेंट बांध ११, माती नालाबांध ५, डोहातील गाळ काढण्याची कामे ८, रोपवने २२० हेक्टर, कृत्रिम मीठवडे २५ व जनजागृती २५ ठिकाणी आदी कामे प्रस्तावित केली असून त्यासाठी रु. १५२.२६ लाखाची मागणी करण्यात आली आहे.[४२]

## मत्स्यव्यवसाय

प्राणीजन्य प्रथीनयुक्त सकस आहार पुरविण्यात मासळीचा महत्त्वाचा वाटा आहे. देशात तसेच राज्यामध्ये सागरी व भूजलीय मच्छिमार व्यवसाय चालतो. समुद्र किनाऱ्यावर व अंतर्भागात राहणाऱ्या

४२. उप वनसंरक्षक, वन विभाग, नांदेड यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित. तसेच **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर १९७१,** पृ. २०, २२ ते २४. **नागपूर जिल्हा गॅझेटिअर, २००५,** पृ. ६२ ते ८५ आणि दर्शनिका विभागाने सन २००९ मध्ये केलेल्या सर्वेक्षणावर आधारित.

कोळी, भोई, ढीवर इत्यादी मागासलेल्या जातीचा मासळी पकडणे हा पारंपरिक व्यवसाय आहे. संवर्धन करणे व मासळीच्या उत्पादनात वाढ तसेच मच्छिमारांची सामाजिक व आर्थिक उन्नती करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाचा मत्स्यव्यवसाय विभाग कार्यरत आहे. या विभागाकडून उपलब्ध जलसंपत्तीतून अधिकाधिक मत्स्योत्पादन काढण्यास प्रोत्साहन देणे, मच्छिमार वर्ग सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागासलेला असल्यामुळे या वर्गाची आर्थिक व सामाजिक सुधारणा घडवून आणण्यास मदत करणे, मच्छिमारांना व्यावसायिक शिक्षण देऊन त्यांची कार्यक्षमता विकसित करणे इत्यादी उद्दिष्टाने मत्स्यव्यवसाय विभागाचे कामकाज चालते.

जिल्ह्याच्या भौगोलिक रचनेमुळे या जिल्ह्यातील मत्स्यव्यवसाय हा गोड्यापाण्यातील व अंतर्गत जलाशयांपुरता मर्यादित आहे. त्यामुळे नद्या-नाले, तलाव, लहान तळी यामध्येच फक्त मासेमारीस वाव राहतो. यामुळे जिल्ह्यात हा व्यवसाय अर्धवेळ चालणारा व्यवसाय मानला जातो. महाराष्ट्रात गोड्या पाण्यातील लहान तळी, तलाव, जलाशय या प्रकारचे सुमारे ३,१६,९९८ हेक्टर जलक्षेत्र मत्स्यव्यवसायासाठी उपलब्ध आहे. नांदेड जिल्ह्यात भूजल मत्स्यव्यवसायासाठी १) नद्या व नाले यांच्या वाहत्या पाण्यातील मत्स्यव्यवसाय आणि २) तलाव, लघु, मध्यम व मोठे सिंचन प्रकल्पातील जलाशये यातील मत्स्यव्यवसाय असे दोन प्रकार आहेत. जिल्ह्यात गोदावरी, पैनगंगा, मांजरा, मनार (मन्याड), लेंडी, आसना अशा एकूण सहा नद्या असून त्यापैकी गोदावरी, पैनगंगा, मनार, मांजरा या प्रमुख व बारमाही नद्या आहेत. सर्व नद्यांची जिल्ह्यातील एकूण लांबी ७०० कि.मी. आहे. मत्स्यव्यवसायासाठी जिल्ह्यात पाटबंधारे विभागाचे ९४ तलावाचे ६,१६९ हेक्टर, जिल्हा परिषदेच्या मालकीचे ३०५ तलावाचे १,५२५ हेक्टर, लघुपाटबंधारे १५ तलावाचे १२५ हेक्टर व ग्रामपंचायत मालकीच्या ४८ तलावाचे १२८ हेक्टर असे एकूण ४६२ तलावांचे ७,९४७ हेक्टर जलक्षेत्र नद्यांच्या क्षेत्राशिवाय सध्या मत्स्यव्यवसायासाठी उपलब्ध आहे. हेच क्षेत्र सन १९६१ मध्ये २,२४० एकर, सन १९८६-८७ मध्ये ५,२८९ हेक्टर आणि सन २००४ मध्ये ४५४ तलावांचे ७,४२८ हेक्टर जलक्षेत्र उपलब्ध होते. सन २००४ नंतर २००८-०९ पर्यंत या क्षेत्रात ५१९ हेक्टर जलक्षेत्राची वाढ दिसून येते. उपरोक्त नद्यांच्या ७०० कि.मी. जलक्षेत्रापैकी नांदेड तालुक्यात ७० कि.मी., हदगाव तालुक्यात ५८ कि.मी., माहूर तालुक्यात ९६ कि.मी., किनवट तालुक्यात ७५ कि.मी., हिमायतनगर तालुक्यात ३९ कि.मी., बिलोली तालुक्यात ७४ कि.मी., देगलूर तालुक्यात ५० कि.मी., मुखेड तालुक्यात ३० कि.मी. आणि कंधार तालुक्यात ३८ कि.मी., मुदखेड तालुक्यात १५ कि.मी., उमरी तालुक्यात ३२ कि.मी., धर्माबाद तालुक्यात ६१ कि.मी., नायगाव तालुक्यात ३२ कि.मी., लोहा तालुक्यात ३० कि.मी. अशी या जलक्षेत्राची विभागणी आहे.

सन १९६० पूर्वी जिल्ह्यामध्ये नद्या-नाले व मालगुजारी तलावात परंपरागत पद्धतीने मासेमारी केली जात होती व जिल्ह्यात प्रामुख्याने मरळ, शिंगाडा, बळो, तंबू, बांब, कटरना, गुगाळी यासारख्या माशांच्या नैसर्गिक जाती आढळत होत्या. त्यांचा मांसभक्षक गुणधर्म, त्यांचा लहान आकार व संथ वाढीमुळे त्यांच्या संवर्धनास योग्य मासे म्हणून फारसे उपयोगी ठरत नव्हते. त्यामुळे येथील मत्स्योत्पादन अत्यंत मर्यादित होते. त्यामुळे १९६० नंतर जलदगतीने वाढणारे कार्प माशाचे मत्स्यबीज काही प्रमाणात कोलकत्ता येथून आयात करून ते जिल्ह्यातील तलावात सोडण्याचे प्रयोग शासनामार्फत

सुरू केले व त्याचा मत्स्यबीज वाढीवर अनुकूल परिणाम दिसून आल्यामुळे सन १९७० मध्ये नवीन निर्माण झालेले तलाव व जलदगतीने वाढणाऱ्या मत्स्यबीजाचे संचयन यामुळे मत्स्यव्यवसाय उत्पादनात लक्षणीय वाढ होण्यास सुरुवात झाली. परिणामतः सन १९८० नंतर प्रमुख कार्प मत्स्यबीजाची मागणी वाढली त्यामुळे मत्स्यव्यवसाय विभागाकडून कोलकत्ता येथून प्रमुख कार्प मत्स्यबीजांची आयात करून मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांना शासकीय दराने पुरवठा करण्यात येत होता. सन १९९० नंतर कोलकत्ता येथील मत्स्यबीजाची आयात बंद करून जिल्ह्यातच प्रमुख कार्प मत्स्यबीज निर्मिती करण्याचे दृष्टीने करडखेड, ता. देगलूर येथील शासकीय मत्स्यबीज निर्मिती केंद्रात चायनीज हॅचरीची स्थापना करण्यात आली व मत्स्यबीज निर्मितीची सुरुवात करण्यात आली.

जिल्ह्यात करडखेड येथील मत्स्यबीज निर्मिती केंद्राशिवाय दोन मत्स्यबीज संवर्धन केंद्रे आहेत. ते अनुक्रमे मनार (बारूळ), ता. कंधार आणि लोणी, ता. किनवट येथे कार्यरत आहेत. सर्वांची मिळून एकूण मत्स्यबीज क्षमता २२५ लाख आहे. यांच्याद्वारे मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था व खाजगी मत्स्य कास्तकारांना त्यांच्या मागणीप्रमाणे मत्स्यबीज पुरवठा केला जातो. करडखेड येथील मत्स्यबीज निर्मिती केंद्रावर सन २००४-०५ मध्ये १३५ लाख मत्स्यजीरे व ९.०६ लाख मत्स्यबीज निर्मिती करण्यात आली. यासाठी या केंद्रावर सदर वर्षी रु. १०.४२ लाख खर्च करण्यात आले तर रु. १.९९ लाख उत्पन्न झाले. सदरवर्षी मनार येथे ७.८७ लाख मत्स्यबीज संवर्धन करण्यात आले व या केंद्रावर रु. ५.३१ लाख खर्च झाले तर उत्पन्न केवळ ८५ हजार रुपयांचे झाले. सदरवर्षी जिल्ह्यात एकूण ५६.०५ लाख मत्स्यबीजांचे संचयन करण्यात आले. सन २००७-०८ मध्ये करडखेड येथील मत्स्यबीज निर्मिती केंद्रावर १११.५० लाख मत्स्यजीरे निर्मिती करण्यात आली. यावर्षी या केंद्रावर रु. ३.८३ लाख खर्च झाले तर रु. १.३६ लाख उत्पन्न मिळाले. सदर वर्षी मनार येथील केंद्रात २.७२ लाख मत्स्यबीज निर्मिती करण्यात आली. यावर्षी मनार केंद्रावर रु. २.६४ लाख खर्च झाले तर रु. ०.२३ लाख उत्पन्न मिळाले आणि याचवर्षी लोणी येथील केंद्रावर ७ लाख मत्स्यबीजांची निर्मिती करण्यात आली. यावर्षी या केंद्रावर रु. १.९४ लाख खर्च झाले तर रु. ०.५६ लाख उत्पन्न मिळाले. सन २००७-०८ मध्ये जिल्ह्यात एकूण १०८ लाख मत्स्यबीजांचे संचयन करण्यात आले. सन २००८-०९ मध्ये करडखेड येथील मत्स्यबीज निर्मिती केंद्रातील हॅचरीची दुरूस्ती कामे, फिल्टर चेंबर, पाणीपुरवठा वाहिनी, कूपनलिका इत्यादीच्या प्रस्तावित कामासाठी महाराष्ट्र शासनाने ८.७० लाख रुपयांची तरतूद केली होती, तर मनार येथील मत्स्यबीज संवर्धन केंद्रातील पाणीपुरवठा वाहिनीच्या प्रस्तावित कामासाठी रु. ४.३५ लाखाची तरतूद केली होती.

सन २००९-१० या वर्षासाठी महाराष्ट्र शासनाने नांदेड जिल्ह्यातील अवरूध्द पाण्यात मत्स्यसंवर्धनासाठी एकूण रु. ३.०० लाखांची तरतूद, मत्स्यबीज केंद्रातील बांधकामे यासाठी रु. १.५० लाख, मत्स्यसंवर्धन विकास अभिकरणासाठी रु. ०.५० लाख, मच्छिमार साधने यासाठी रु. ०.७० लाख इतकी तरतूद करण्यात आलेली आहे.

जिल्ह्यातील ईष्टतम मत्स्यबीज संचयन क्षमता ४५० लाख मत्स्यबीज आहे. जिल्ह्यात विविध तलाव व जलाशयात सन १९८६-८७ यावर्षी ४१.१९ लाख मत्स्यबीजाची साठवणूक करण्यात येऊन

भूजल मत्स्योत्पादन ९५० मे.टन घेण्यात आले. पकडण्यात आलेल्या माशांची उत्पादकांना रु. ९५ लाख किंमत प्राप्त झाली. सन १९९० या वर्षी जिल्ह्यात करडखेड येथील मत्स्यबीज केंद्रातून २६.८० लाख मत्स्यबीजांचा पुरवठा करण्यात येऊन जिल्ह्यात १,८०० मे.टन भूजल मत्स्योत्पादन झाले व पकडलेल्या माशांची उत्पादकांना रु. २७० लाख किंमत प्राप्त झाली. सन २००० यावर्षी ३,७०० मे.टन भूजल मत्स्योत्पादन झाले त्याची किंमत रु. ९२५ लाख होती. सन २००४-०५ यावर्षी ६३.३० लाख मत्स्यबीज वापरण्यात येऊन भूजल मत्स्योत्पादन ४,९२० मे.टन झाले व पकडलेल्या माशांची किंमत रु. १,०३७.८० लाख होती. सन २००७ मध्ये जिल्ह्यात ५,४८३ मे.टन भूजल मत्स्योत्पादन झाले, त्याची किंमत रु. १,६४५.५० लाख होती.

जिल्ह्यात नदी-नाले, तलावात विविध प्रकारचे मासे आढळतात. त्यापैकी जलदगतीने वाढणारे मासे म्हणजे भारतीय प्रमुख कार्प उदा. कटला, रोहू, मृगळ इत्यादी बरोबरच काही प्रमाणात विदेशी मासे म्हणून ओळखले जाणारे गवत्या, चंदेरा, सिप्रनस हे मासे चांगले वाढत असल्यामुळे व ते मांस भक्षक नसल्यामुळे खाद्यासाठी एकमेकांचे समर्थक नसल्यामुळे त्यांचे उत्पादन अधिक मिळते. शिवाय बाजारपेठेत त्यांना चांगली मागणी असल्यामुळे जिल्ह्यातील मत्स्योत्पादनात या माशांचा ७०% पेक्षा जास्त वाटा आहे. जिल्ह्यात गोड्यापाण्यातील झिंग्यापैकी वेगाने वाढणारे कोळंबी (मायक्रो बॉक्रीयम रोझनबर्गी/घोडा झिंगा) यांच्यात प्रथिनाचे प्रमाण भरपूर असल्यामुळे बाजारात त्यांना चांगली किंमत मिळत आहे. समाधानकारक दरामुळे मच्छिमार त्याचे संवर्धन करीत आहेत व आर्थिक उन्नती साधत आहेत.

जिल्ह्यात विविध जातीचे लोक मच्छिमार व्यवसाय करतात. त्यामध्ये झिंगा भोई, निलावार भोई, प्रनिकवार भोई, कोळी, भोई मुसलमान, भटाणधनगर, परदेशी भोई, मच्छिंदर भोई, बौध्द, मातंग, हटकर, आंध आदिवासी, बंजारा, कलाल व इतर जातींचा समावेश होतो. जिल्ह्यातील मच्छिमारांची संख्या सन १९९०, २००० आणि २००७ या वर्षात अनुक्रमे ९,०००, १०,५०० आणि १५,००० होती. या मच्छिमारांकडून जिल्ह्यात मासे पकडण्यासाठी विविध प्रकारचे जाळे किंवा गुंतवे तसेच गळ पिंजरे वापरले जातात. त्याची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

**मच्छिमारीसाठी वापरली जाणारी जाळी व अन्य साधने :**

(१) गोल जाळे : या प्रकारात माशाच्या आकारानुसार त्या आसाचे जाळे तयार करून त्याचा वापर केला जातो. हे जाळे नायलॉन धाग्यांचे व विविध आसाच्या आकाराचे (उदा. दोन बोटीपासून सोळा बोटी आसाचे) असतात. या जाळ्यात मासा कल्ल्यात अडकला जातो म्हणून याला गील जाळे म्हणतात. यामध्ये मोनो फिलामेंट विविध रंगाचे व आसाचे मोठ्या प्रमाणात वापरले जातात. याला स्थानिक मच्छिमार डिस्को जाळेसुद्धा म्हणतात.

(२) औढप जाळे : हे जाळे समतल पृष्ठभाग असलेल्या तलावात ठराविक जलक्षेत्र घेऊन सामुहीक पद्धतीने तलावाच्या कडेला आणून मासे पकडले जातात.

(३) फेकजाळे : हे जाळे एका माणसानी वापरले जाणारे जाळे आहे व शंक्वाकृती आहे. माशांचा अंदाज घेऊन त्या ठिकाणी जाळे गोलाकार फेकून मासे पकडले जातात.

(४) झोरली : लहान प्रकारची मासे पकडण्यासाठी झोरली जाळी वापरली जातात.

(५) गळ : हे गळ धातुपासून बनविलेले आकडे असतात. त्याच्या तीक्ष्ण टोकाला आमिष लावून मांसाहारी माशांची मासेमारी केली जाते.

(६) पिंजरा : बांबुच्या काठ्यांपासून विशिष्ट रचना करून मासेमारीसाठी पिंजरा तयार केला जातो. आमिषाच्याद्वारे मासे पिंजऱ्यामध्ये अडकले जातात.

मच्छिमार समाज सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागासलेला असल्यामुळे त्या समाजातील तरुणांना व्यावसायिक प्रशिक्षण देऊन त्यांचे व्यावसायिक कौशल्य वाढविण्यात येते, जेणेकरून उपलब्ध जलक्षेत्राचा पुरेपूर वापर करण्यात येऊन मत्स्योत्पादन वाढ होऊन त्यांची आर्थिक उन्नती करण्यासाठी महाराष्ट्र शासनातर्फे अल्प व मध्यम मुदतीचे प्रशिक्षण मच्छिमार तरुणांना दिले जाते. जिल्ह्यात जिल्हा मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी, नांदेड आणि मत्स्यसंवर्धक विकास यंत्रणा यांचेमार्फत मत्स्यव्यवसायासंबंधी प्रशिक्षण देण्यात येते. सन १९९० मध्ये जिल्ह्यात ५९ लाभार्थींना प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणावर रु. १५,००० खर्च करण्यात आले. सन २००० मध्ये ७२ लाभार्थींना प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणावर रु. २८,७०० खर्च झाले, तर २००७ या वर्षी मत्स्यवर्धक विकास यंत्रणेमार्फत ७७ लाभार्थींना प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणावर ५१,४०० रुपये खर्च झाले. मत्स्यसंवर्धक विकास यंत्रणा कार्यालयामार्फत मत्स्यकास्तकार व यंत्रणेचे निवडलेले लाभार्थी यांना १० दिवसांचे आधुनिक मत्स्यव्यवसायाबाबत प्रशिक्षण दिले जाते. त्यासाठी विद्यावेतन व प्रवास खर्च नियमानुसार दिला जातो. लहान तळ्यात मत्स्यशेतीचा विकास करण्याचे दृष्टीने निवडक जिल्ह्यात मत्स्यसंवर्धक यंत्रणा स्थापन करण्यात आल्या आहेत. त्यात या जिल्ह्याचा समावेश आहे. या यंत्रणे अंतर्गत जिल्ह्यात सन २००० या वर्षी मत्स्य व्यवसायासाठी पळसा येथील एका वैयक्तिक लाभार्थीस रु. १७,८५६ इतके अनुदान देण्यात आले, तर जिल्ह्यातील अन्य ९७ लाभधारकांस एकूण २,०३,००० रुपयांचे अनुदान देण्यात आले. तर सन २००७ यावर्षी ९४ लाभधारकांस एकूण २,५७,००० रुपयांचे अनुदान देण्यात आले.

मासे विक्रीसाठी पणन सुविधांचे बळकटीकरण या योजनेंतर्गत बाजारपेठ वाहतुकीसाठी सायकल, शीतपेट्या, डिपफ्रिजर, मत्स्यसंकलन केंद्र विविध संस्थांना पुरविण्यात आले. त्यापैकी सन १९९२ मध्ये लोणी येथील लक्ष्मी मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थेस ६ सायकल व शीतपेटी संच यासाठी रु. १२,९३८ इतके अनुदान देण्यात आले. सन २००१ मध्ये लोहा येथील जय अंबिका मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था आणि वाल्मिकी मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था यापैकी पहिल्या संस्थेस मत्स्यविक्री केंद्र संचासाठी १५,००० रुपयांचे तर दुसऱ्या संस्थेस तीनचाकी वाहनासाठी १,१६,००० रुपयांचे अनुदान देण्यात आले.

मच्छिमार आपली आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी एकत्र येऊन सहकारी संस्था स्थापन करतात. सन १९६० मध्ये मच्छिमारीसाठी नांदेडला गंगापुत्र मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था ही पहिली मच्छिमार सहकारी संस्था स्थापन झाली. अशा मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांना मच्छिमार सहकारी संस्थांचा विकास या योजनेतून विकासासाठी शासनाकडून शासकीय भागभांडवल व व्यवस्थापकीय अनुदानाच्या स्वरूपात अर्थसहाय्य देण्यात येते. त्यापैकी भागभांडवल हे संस्थेच्या भाग भांडवलाच्या तीनपट किंवा

दहा हजार रुपयांच्या मर्यादेपर्यंत आणि व्यवस्थापकीय अनुदान २००० रुपये पाच वर्षांपर्यंत विभागून देण्यात येते. जिल्ह्यात सन २००२-०३ मध्ये सर्वसाधारण मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांची संख्या ९३ होती. त्यांची त्यावर्षी सभासद संख्या ३,४३३ होती. सध्या जिल्ह्यात ९३ सर्वसाधारण मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था, ७ विशेष घटक मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था आणि ६ आदिवासी मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था मिळून एकूण १०६ मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था कार्यरत आहेत. त्यांची एकूण सभासद संख्या ५,५३२ इतकी आहे. जिल्ह्यात सन १९९० मध्ये २ मत्स्य सहकारी संस्थांना एकूण ५,००० रुपये शासकीय भाग भांडवल व १.३३ लाख रुपयांचे अनुदान देण्यात आले. सन २००० मध्ये ३ मत्स्य सहकारी संस्थांना एकूण ३०,००० रुपये शासकीय भाग भांडवल व ३०,००० रुपयांचे अनुदान देण्यात आले. तर सन २००७ मध्ये १४ मत्स्य सहकारी संस्थांना एकूण रु. ५.३४ लाख शासकीय भाग भांडवल व २.६३ लाख रुपयांचे शासकीय अनुदान देण्यात आले. मत्स्य सहकारी संस्थांना व्यावसायिक अनुदानासाठी सन २००९-१० मध्ये रु. ३.२० लाखाची तरतूद करण्यात आली आहे.

जिल्ह्यात माशांच्या खालील जाती आहेत :

**(१) कटला :** जलदगतीने वाढणारा, पाण्याच्या वरच्या थरात वावरणारा व प्लवंगावर उप-जीविका करणारा, मोठे डोळे, जाड ओठ, मध्यभाग फुगीर, करड्या रंगाचा असा हा मासा आहे.

**(२) रोहू :** हा मासा पाण्याच्या मधल्या थरात वावरतो, जलवनस्पती, कुजके पाने, प्लवंगावर उपजीविका करतो. दातेरी कडा असलेले ओठ, तांबूस रंगाचे खवले व शरीर लांबट असते.

**(३) मृगळ :** हा पाण्याच्या तळाशी राहणारा व तळाशी असलेले लहान प्लवंग व कुजलेले वनस्पती, पदार्थांवर उपजीविका करणारा लहान तोंड, लांबट आकाराचा मासा आहे.

**(४) चंदेरा :** या माशाच्या अंगावरील चांदीसारख्या चमकणाऱ्या खवल्यामुळे याला सिल्व्हर कार्प म्हणतात. याचे शरीर लांब, डोके लहान, डोके व पाठीवरील पर लहान असतात. हा वनस्पती प्लवंगावर उपजीविका करणारा व पाण्याच्या वरच्या थरात राहणारा मासा आहे. याचे मूळ वसतीस्थान युरोप खंडातील नद्यांमधील आहे.

**(५) गवत्या :** पाण्यातील वनस्पतीवर उपजीविका करणारा, लहान तोंड, हिरवट रंगाचे खवले, लांबट आकाराचा व पाठीवरील पर लहान असणारा हा मासा आहे.

**(६) सायप्रिनस :** पाण्याच्या तळाशी राहणारा, शरीर आखुड. या माशांमध्ये तीन प्रकारच्या प्रजाती आढळतात. हा मिश्र आहारी आहे. मिशांच्या दोन जोड्या असतात. याचे मागेपुढे होणारे गोलाकार तोंड असते.

**(७) मरळ :** हा स्थानिक मोठा मासा आहे. हा मांसभक्षी आहे. अंगावर कमी व लहान खवले, पाठीवरील पर शेपटीपर्यंत गेलेले, अंगावर आडवे पट्टे असलेला, शरीरात काट्याचे प्रमाण कमी असते.

Maharashtra State Gazetteers

**(८) बांब :** हा स्थानिक मोठा मासा, चोचदार तोंड, सापासारखा लांबट आकार, काट्याचे प्रमाण अतिशय कमी, नाल्यात तळाशी वावरणारा, मांसभक्षी मासा आहे.

**(९) सवडा (बळव) :** हा स्थानिक मोठा मासा, मांसभक्षक, मोठे तोंड, मागील आकार निमुळता, याला गोड्या पाण्यातील शार्क असे सुद्धा म्हणतात. यात काट्याचे प्रमाण कमी असते व अंगावर खवले नसतात.

**(१०) तंबू (अहेर) :** स्थानिक मोठा मासा, मांसभक्षक, तळाशी वावरणारा, सापासारखा दिसणारा, वळवळणारी हालचाल करणारा मासा आहे. यात काट्याचे प्रमाण कमी आहे व औषधोपयोगी गुणधर्म असल्याचा लोकांचा समज असल्यामुळे मागणी व दर जास्त असतो.

**(११) शिंगाडा :** हा स्थानिक मोठा व मांसभक्षक मासा आहे. याला लांब मिशांची जोडी असते, तोंड चपटे, पाठीवर दोन पंख असतात. यात काटे व वरून खवले नसतात.

**(१२) मांगूर :** हा स्थानिक मासा चपटे तोंड, मिशांच्या चार जोड्या, पाठीवरील पर लांब असणारा, कुशीजवळ तीक्ष्ण काटा असलेला, चवदार पाण्याच्या बाहेर जास्त काळ जिवंत राहणारा, तसेच यात काट्याचे प्रमाण कमी असणारा मासा आहे.

या व्यतिरिक्त स्थानिकरीत्या आढळणारे मासे व शास्त्रीय नावे पुढीलप्रमाणे आहेत :

(१) वाळ ढोकडा (Giossogobius gilrius)
(२) कटारणा (Mystus caracius)
(३) काळोशी (Punctius Kolus)
(४) तांबे (Labeo fimbriatus)
(५) मळगे (Punctius terdon)
(६) सांडकोळ (Thyneas sandkal)
(७) चांभरी, पातोळी (Notopterus notopterus)
(८) छाळ (hella chella)
(९) मुटी (Botia striuto)
(१०) कनेरी (Rasbora clanioonirus)
(११) टपेरी (Borba Stieto)
(१२) लहान झिंगा (Acetus)
(१३) घोडा झिंगा (Macrobracium rosenbergil)
(14) झिंगा (Malconsoni)[43]

४३. (i) जिल्हा मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी, नांदेड यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित. (ii) **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर, १९७१**, पृ. २०-२१, (iii) नागपूर जिल्हा गॅझेटिअर २००५, पृ. ८५-८६, (iv) **भारतीय जनगणना १९६१, जिल्हा जनगणना निर्देश ग्रंथ, नांदेड**, पृ. ४०, (v) कार्यक्रम अंदाजपत्रक, मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र शासन, २००८-०९, पृ. ५, ८, २३, ७९, (vi) वार्षिक योजना २००९-१०, जिल्हा योजना भाग ४, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, पृ. १४४-४५, १५१, १५४, १६०, (vii) **जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन,** जिल्हा नांदेड, सन १९८६-८७, पृ. १६ व ७८, सन २००४-०५, पृ. ८, ७४, 75.

Maharashtra State Gazetteers

## तक्ता क्र. १

### नांदेड जिल्ह्यातील सामान्य आणि अतिविषम पर्जन्य*

| केंद्र | आकडे-वारीच्या वर्षाची संख्या | | जाने. | फेब्रु. | मार्च | एप्रिल | मे | जून | जुलै | ऑगस्ट | सप्टें. | ऑक्टो. | नोव्हें | डिसें. | वार्षिक | सामान्य वार्षिक पर्जन्याची % आणि वर्ष | | २४ तासातील सर्वाधिक पर्जन्य | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | | | | | कमाल | किमान | आकडे-वारी | दिनांक |
| बासर | १० | अ | ५.३ | १४.५ | ४.२ | ३.९ | ६.१ | ९५.१ | २१५.४ | १५९.९ | २१५.२ | १९.७ | १८.३ | ०.० | ७५७.६ | ११७ | ५९ | १५८.७ | २४सप्टें. |
| | | ब | ०.२ | ०.८ | ०.४ | ०.२ | ०.३ | ५.५ | ११.५ | ६.८ | ७.१ | १.५ | १.१ | ०.० | ३५.४ | (१९४७) | (१९४१) | | १९३१ |
| भोकर | १७ | अ | १२.३ | ८.० | ९.६ | ४.५ | २१.७ | १९८.१ | २६७.८ | ३१२.६ | २०२.३ | ७०.१ | २४.३ | ५.२ | ११३६.५ | २०३ | ५८ | २१८.० | २९ जून |
| | | ब | ०.५ | ०.४ | ०.४ | ०.५ | १.४ | ८.४ | १२.६ | १३.३ | ८.७ | ३.१ | १.४ | ०.३ | ५१.० | (१९८८) | (१९७४) | | १९८९ |
| बिलोली | ३९ | अ | ५.५ | ६.२ | ६.७ | ९.६ | २०.२ | १६२.१ | २९४.४ | २९०.२ | १८२.० | ८०.१ | १९.८ | ४.७ | १०८१.५ | २६० | ५० | २७५.६ | ११ऑगस्ट |
| | | ब | ०.३ | ०.४ | ०.३ | ०.८ | १.२ | ८.४ | १४.१ | १२.८ | ८.१ | ३.५ | १.० | ०.३ | ५१.२ | (१९८३) | (१९७२) | | १९८३ |
| देगलूर | ३८ | अ | ३.६ | ४.८ | ९.६ | १३.० | २३.० | १५७.८ | २४५.१ | २४६.३ | १७८.० | ८६.४ | २०.२ | ३.१ | ९९०.९ | १५५ | ४० | १६०.० | १८ सप्टें. |
| | | ब | ०.३ | ०.४ | ०.५ | १.० | १.७ | ८.८ | १२.९ | १२.४ | ९.२ | ३.९ | १.१ | ०.३ | ५२.५ | (१९५५) | (१९७२) | | १९६२ |
| कंधार | ३७ | अ | ४.३ | ४.० | ८.३ | ५.१ | १७.४ | १४५.१ | २२७.४ | २०९.९ | १६९.५ | ६५.६ | १४.३ | ३.० | ८७३.९ | १९३ | ५४ | २६४.४ | ६ऑक्टो. |
| | | ब | ०.३ | ०.४ | ०.५ | ०.५ | १.० | ८.९ | ११.८ | १०.८ | ८.९ | ३.३ | ०.९ | ०.४ | ४७.७ | (१९८३) | (१९५२) | | १९८३ |
| किनवट | २० | अ | ७.० | ४.३ | २.२ | २.६ | १०.४ | २०४.८ | ३३६.१ | ३३३.३ | २०३.० | ८४.० | ७.६ | ४.७ | १२००.० | १७५ | ५६ | ३९०.० | २८ जून |
| | | ब | ०.६ | ०.३ | ०.३ | ०.४ | ०.८ | ८.४ | १४.२ | १५.१ | ९.८ | ३.८ | ०.६ | ०.२ | ५४.५ | (१९५५) | (१९८४) | | १९८९ |
| मुखेड | १० | अ | ६.२ | ०.८ | १०.० | ५.७ | १७.३ | १३७.४ | २२१.८ | २२४.८ | १८७.६ | ९८.७ | १९.० | ४.७ | ९३४.० | १६६ | ५७ | १७०.४ | ६ऑक्टो. |
| | | ब | ०.४ | ०.१ | ०.६ | ०.४ | १.२ | ८.५ | ११.६ | १०.९ | १०.१ | ४.१ | १.२ | ०.५ | ४९.६ | (१९८३) | (१९८६) | | १९८३ |
| नांदेड | ४८ | अ | ७.६ | ९.३ | ९.२ | ९.४ | १७.५ | १५२.४ | २५२.५ | २४८.६ | २०९.१ | ६३.१ | १६.५ | ७.३ | १००२.५ | १९३ | ३६ | २५४.० | २०ऑगस्ट |
| (स्टेशन) | | ब | ०.६ | ०.७ | ०.७ | ०.६ | १.४ | ८.३ | १३.३ | १२.० | ९.४ | ३.५ | १.१ | ०.४ | ५२.२ | (१९८८) | (१९७२) | | १९०३ |
| नांदेड (Obsy) | ३० | अ | ७.१ | ४.९ | १०.८ | ११.७ | १६.६ | १४७.५ | २४४.४ | २३८.९ | १९१.५ | ५२.१ | १३.५ | ८.१ | ९४७.१ | १६१ | ३४ | २५२.६ | १२ऑगस्ट |
| | | ब | ०.५ | ०.४ | ०.८ | ०.९ | १.७ | ८.३ | १२.७ | १२.४ | ९.५ | ३.१ | १.१ | ०.४ | ५१.८ | (१९८३) | (१९७२) | | १९८३ |
| नांदेड (जिल्हा) | — | अ | ६.५ | ६.३ | ७.८ | ७.३ | १६.७ | १५५.६ | २५६.१ | २५१.६ | १९३.१ | ६८.९ | १७.१ | ४.५ | ९९१.५ | १९४ | ४१ | — | — |
| | | ब | ०.४ | ०.४ | ०.५ | ०.६ | १.२ | ८.२ | १२.७ | ११.८ | ९.० | ३.३ | १.१ | ०.३ | ४९.५ | (१९८३) | (१९७२) | | |

अ = सरासरी पर्जन्यमान (मिली मीटरमध्ये), ब = सरासरी पर्जन्यमान दिनाची संख्या (२.५ मिली मीटरपेक्षा जास्त पर्जन्य झालेले दिवस).
कंसातील आकडे घटना वर्ष दर्शवितात.

* तक्ता क्र. १, २, ४ आणि ५ ची आकडेवारी कालेकर बी.बी., निवृत्त निदेशक, हवामानशास्त्र विभाग, पुणे यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.

**तक्ता क्र. २**

**नांदेड जिल्ह्यातील वार्षिक पर्जन्यमानाची वारंवारता (१९४१ ते १९९०)***

| कक्षा मि.मी. | वर्षांची संख्या | कक्षा मि.मी. | वर्षांची संख्या |
|---|---|---|---|
| ४०१-५०० | १ | १२०१-१३०० | ३ |
| ५०१-६०० | १ | १३०१-१४०० | ४ |
| ६०१-७०० | ४ | १४०१-१५०० | १ |
| ७०१-८०० | ८ | १५०१-१६०० | ० |
| ८०१-९०० | १० | १६०१-१७०० | १ |
| ९०१-१००० | ६ | १७०१-१८०० | ० |
| १००१-११०० | ५ | १८०१-१९०० | ० |
| ११०१-१२०० | ५ | १९०१-२००० | १ |

* फक्त ५० वर्षांची आकडेवारी उपलब्ध आहे.

Maharashtra State Gazetteers

## तक्ता क्र. ३

## जिल्ह्यातील तालुकानिहाय पर्जन्य दिवसांची संख्या व एकूण पर्जन्य*

(२००५-०६)

| तालुका | सरासरी पर्जन्य (मि.मी.) | पर्जन्य दिवसांची संख्या | पर्जन्य (मि.मी.) | सरासरीच्या तुलनेत वर्षातील पर्जन्याची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| माहूर | १,२४० | ३३ | १,३८१ | ११७.३७ |
| किनवट | १,२४० | ४३ | १,२९० | १०४.०३ |
| हिमायतनगर | ९७७ | ४१ | २,०८१ | २१३.०० |
| हदगाव | ९७७ | ३५ | १,२५६ | १२८.५६ |
| अर्धापूर | ८६९ | ३९ | १,७४४ | २००.६९ |
| नांदेड | ८६९ | ३१ | ७९४ | ९१.३७ |
| मुदखेड | ८६९ | ३६ | १,५५१ | २७८.४५ |
| भोकर | ९९६ | ३७ | १,२३७ | १२४.२० |
| उमरी | ९९६ | ३६ | १,१७९ | ११८.३७ |
| धर्माबाद | ९१५ | ३९ | १,३९७ | १५२.३५ |
| बिलोली | ९१५ | ३० | ९०९ | ९९.३४ |
| नायगाव | ९१५ | ३५ | १,४३० | १५६.२८ |
| लोहा | ८३३ | ३० | ९६४ | ११५.७३ |
| कंधार | ८३३ | ३२ | १,०२५ | १२३.०५ |
| मुखेड | ८६९ | २६ | ९५६ | ११०.०१ |
| देगलूर | ९४१ | ३६ | ८८९ | १०५.१० |

* कपले, आर.डी. संचालक, एस.आ.टी.एम. युनिव्हर्सिटी, नांदेड यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित.

Maharashtra State Gazetteers

## तक्ता क्र. ४

## नांदेड जिल्ह्यातील तापमान, आर्द्रता व वाऱ्याची गती

### हवेचे तापमान

| महिना | सरासरी दैनिक कमाल तापमान (°से.) | सरासरी दैनिक किमान तापमान (°से.) | हवेचे तापमान अति विषम | | | | सापेक्ष आर्द्रता (शेकडा प्रमाण) | | सरासरी वाऱ्याची गती (दर तासी कि.मी.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | उच्चतम (°से.) | दिनांक आणि वर्ष | न्यूनतम (°से.) | दिनांक आणि वर्ष | ०८.३० (भा.प्र.वे.) | १७.३० (भा.प्र.वे.) | |
| जानेवारी | ३०.७ | १३.४ | ३६.० | १३ जानेवारी १९७३ | ४.९ | ०३ जानेवारी १९८३ | ६२ | ३६ | ४.० |
| फेब्रुवारी | ३३.९ | १५.७ | ३८.८ | २६ फेब्रुवारी १९७३ | ६.८ | ११ फेब्रुवारी १९८१ | ५० | २८ | ४.१ |
| मार्च | ३७.७ | १९.१ | ४२.० | ३० मार्च १९७२ | १०.४ | १० मार्च १९७९ | ४१ | २४ | ४.५ |
| एप्रिल | ४०.७ | २३.० | ४५.५ | ३० एप्रिल १९६४ | १३.४ | ०१ एप्रिल १९६८ | ३७ | २५ | ५.१ |
| मे | ४१.८ | २५.६ | ४६.६ | ०२ मे १९६४ | १९.० | ०७ मे १९६८ | ४३ | २६ | ७.० |
| जून | ३७.१ | २३.८ | ४६.७ | ०४ जून १९९५ | १७.४ | २६ जून १९८३ | ६८ | ४७ | ९.९ |
| जुलै | ३२.५ | २२.५ | ३९.५ | १७ जुलै १९८५ | १५.२ | २१ जुलै १९७० | ७९ | ६५ | ८.४ |
| ऑगस्ट | ३१.२ | २१.९ | ३९.० | १३ ऑगस्ट १९७७ | १३.६ | १४ ऑगस्ट १९७० | ८१ | ६९ | ७.६ |
| सप्टेंबर | ३१.९ | २१.८ | ३८.२ | २२ सप्टेंबर १९८२ | १४.२ | २५ सप्टेंबर १९७२ | ७९ | ६४ | ५.७ |
| ऑक्टोबर | ३३.१ | १९.४ | ३८.८ | ०८ ऑक्टोबर १९७१ | ११.२ | २३ ऑक्टोबर १९८३ | ६९ | ४९ | ३.९ |
| नोव्हेंबर | ३१.१ | १५.० | ३६.० | ११ नोव्हेंबर १९६९ | ५.० | २४ नोव्हेंबर १९८३ | ६४ | ४२ | ४.१ |
| डिसेंबर | ३०.० | १२.५ | ३४.८ | ०६ डिसेंबर १९७६ | ३.० | २८ डिसेंबर १९८३ | ६५ | ४१ | ३.४ |
| **एकूण वार्षिक सरासरी** | **३४.३** | **१९.५** | - | - | - | - | **६२** | **४३** | **५.६** |

Maharashtra State Gazetteers

## तक्ता क्र. ५

## नांदेड जिल्ह्यातील विशेष हवामानाच्या घटना

| महिना | घटनांच्या सरासरी दिवसांची संख्या | | | |
|---|---|---|---|---|
| | झंझावात | गारा | धुळीचे वादळ | धुके |
| जानेवारी | ०.० | ०.० | ०.० | ०.० |
| फेब्रुवारी | ०.० | ०.० | ०.० | ०.०३ |
| मार्च | ०.३ | ०.० | ०.० | ०.०२ |
| एप्रिल | ०.६ | ०.० | ०.० | ०.० |
| मे | ०.६ | ०.० | ०.० | ०.० |
| जून | ०.८ | ०.० | ०.० | ०.० |
| जुलै | ०.२ | ०.० | ०.० | ०.० |
| ऑगस्ट | ०.२ | ०.० | ०.० | ०.० |
| सप्टेंबर | ०.१ | ०.० | ०.० | ०.० |
| ऑक्टोबर | ०.० | ०.० | ०.० | ०.० |
| नोव्हेंबर | ०.० | ०.० | ०.० | ०.० |
| डिसेंबर | ०.० | ०.० | ०.० | १.१ |
| **वार्षिक** | **२.८** | **०.०** | **०.०** | **१.६** |

Maharashtra State Gazetteers

# नांदेड जिल्हा गॅझेटिअर

## प्रकरण-२

## इतिहास

Maharashtra State Gazetteers

प्रकरण-२

# इतिहास

## प्राचीन काळ*

**नां**देड हे मराठवाड्यातील दुसऱ्या क्रमांकाचे शहर आहे. औरंगाबाद नंतर याचा क्रमांक लागतो. पुण्यसलीला गोदावरीचे काठी हे वसलेले आहे. प्राचीन काळी नांदेड परिसर राजकीयदृष्ट्या फार महत्त्वाचा व भाग्यशाली परिसर होता. येथे काही राजधान्या आणि काही उपराजधान्या होत्या. कंधार ही त्याकाळच्या मातब्बर अशा राष्ट्रकूट घराण्याची तर होट्टल (ता.देगलूर) ही काही काळ कल्याणी चालुक्याची राजधानी होती. एवढेच नव्हे तर कल्याणी हे स्थान नांदेड-बिदर पासून फार दूर नव्हते. तसेच अमर्दकपूर म्हणजे औंढानागनाथ येथे रट्टवंशीय बल्लाळाची राजधानी होती. अराध्यपूर (अर्धापूर) येथे रट्टांची उपराजधानी व कराडखेड येथे वन्हीकुलाची उपराजधानी होती. ही मांडलिक घराणी होते.

मानवी वसतीच्या खुणा या परिसरात सुमारे ४० हजार वर्तमान पूर्व काळापासूनच्या आढळत असल्या तरी अभिलेखांतून नांदेडचे उल्लेख इसवीसनाच्या चौथ्या शतकापासूनच उपलब्ध आहेत. गोदावरीच्या काठी वसलेल्या या शहराला आणि तिच्याच उपनद्यांच्या पाण्यावर पोसलेल्या या जिल्ह्याला समृध्द इतिहास आहे. मात्र तो धुंडाळावा लागतो. त्याचे कारण या परिसरातील मंडळींनी किंवा या भागात प्राचीन काळी रहाणाऱ्यांनी इतिहास घडवला असला तरी तो लिहून ठेवला नाही.

भौगोलिकदृष्ट्या पाहिले तर नांदेड जिल्हा मराठवाड्याच्या पूर्वेस असून त्याच्या पूर्वेकडील हद्दीस आंध्र प्रदेशातील निजामाबाद, मेदक आणि आदिलाबाद हे जिल्हे आहेत आणि कर्नाटकाचा बिदर जिल्हा त्याच्या दक्षिणेला आहे, तर पश्चिमेस परभणी, लातूर हे मराठवाड्यातील जिल्हे आणि उत्तरेकडे विदर्भाचा यवतमाळ जिल्हा येतो. संगतीचा व सततच्या सहवासाचा माणसावर जसा परिणाम होत असतो तसाच तो प्रदेशावर, तेथील राहणीवर एवढेच नव्हे तर तेथील रहिवाशांच्या वागणुकीवरही होत असतो, असे आढळून येते. नांदेड जिल्ह्यातील काही लोकांच्या भाषेवर व वागणुकीवर आंध्र, कर्नाटक व विदर्भाचा प्रभाव पडलेला जाणवतो.

एखाद्या प्रदेशाला नाव प्राप्त झाले म्हणजे त्या प्रदेशातील हवामान, जलस्त्रोत, जनजीवन, शेती आणि मुख्य म्हणजे इतिहास या सर्वांमुळे त्या प्रदेशाचे व्यक्तिमत्त्व आजमावता येते हे खरे पण असे होण्यापूर्वीही वरील सर्व वा बऱ्याचशा बाबी प्रादेशिक नामकरणाच्या आधीही अस्तित्वात असतातच.

---

* प्राचीन काळ या भागाचे लेखन डॉ. गो. बं. देगलूरकर, संपादक मंडळ सदस्य तथा निवृत्त प्राध्यापक, डेक्कन कॉलेज, पुणे यांनी केले आहे.

सुमारे २५-३० वर्षांपूर्वी नांदेड परिसराला प्रागैतिहास असावा असे ठामपणे सांगता येण्यासारखी परिस्थिती नव्हती. याचे महत्त्वाचे एक कारण म्हणजे अशा स्वरूपाची या प्रदेशाची पाहणीच झालेली नव्हती. आधी निजामाचे राज्यात म्हणजे १९४८ पर्यंत सर्वच क्षेत्रात अनास्थाच होती. शिवाय त्यावेळी अशा प्रकारची पाहणी करण्याचे ज्ञान व तंत्र उपलब्ध नव्हते आणि मुख्य म्हणजे त्याचे भानही नव्हते. या क्षेत्रातील तज्ज्ञांचे इकडे लक्ष जाण्यास विसाव्या शतकाचे सातवे-आठवे दशक उजाडावे लागले. साहजिकच, १९७१ साली प्रसिद्ध झालेल्या नांदेड जिल्ह्याच्या गॅझेटिअर मध्ये नांदेड परिसराच्या प्रागैतिहासासंबंधी काहीही माहिती येऊ शकली नाही.

## प्रागैतिहास काळ

ऐतिहासिक काळ तर प्रागैतिहासिक काळाच्या मानाने फारच थोडा आहे. अगदी सिंधू-सरस्वतीकाठच्या संस्कृतीच्या उषःकालापासून तो मोजला तरी ५ हजार वर्षांचा - थोडा कमी अधिक - तो मानला गेला आहे. पुरातत्त्वीयदृष्ट्या मानव सुमारे वीस लक्ष वर्षांपासूनचा आहे. म्हणजे या प्रदीर्घ काळात ज्या घडामोडी त्याच्या कडून झाल्या त्याची माहिती काय ? याचाच अर्थ असा की ऐतिहासिक कालखंडापेक्षा प्रागैतिहासिक कालखंड प्रचंड मोठा असतो आणि या लांबच लांब लक्षावधी वर्षांत मोडल्या जाणाऱ्या काळातील घटनांची माहिती मात्र अगदी तुटपुंज्या स्वरुपाची असते आणि त्यांचे विवरण बऱ्याच वेळा अनुमानावरच आधारित असते.

आपण माहिती घेतो आहोत त्या प्रदेशाला नांदेड - हे नाव मिळायला किती तरी वर्षे लागणार होती. पारिभाषिक रुपात सांगायचे तर पुराश्मयुग, मध्याश्मयुग, नवाश्मयुग, ताम्रपाषाणयुग आणि त्या नंतरच्या ऐतिहासिक काळापर्यंत येण्यास 'युगे' लोटावी लागणार होती. असे असले तरी या परिसरात त्या प्राचीन काळी निदान मध्याश्मयुगांत मानवी वसती होती हे आता पुराव्यानिशी सांगता येते. आणखी थोडे खुलासेवार सांगायचे तर अश्मयुगाचे चार खंड कल्पिले गेले आहेत. ते असे पुराश्मयुग : इसवीसन पूर्व सुमारे तीन लाख ते इसवीसन पूर्व सत्तर हजार, मध्याश्मयुग : इसवीसन पूर्व सत्तर हजार ते इसवीसन पूर्व पंचवीस हजार, उत्तर पुराश्मयुग : इसवीसन पूर्व तीस हजार ते दहा हजार, मध्याश्मयुग : इसवीसन पूर्व दहा हजार ते तीन हजार आणि नवाश्मयुग (यात ताम्रपाषाण युगाचाही अंतर्भाव केला जातो) : इसवीसन पूर्व दोन हजार पाचशे ते एक हजार. पैकी नांदेड जिल्ह्यात सध्या जो भूभाग आहे त्याची पुरातत्त्वीय पहाणी करता असे आढळून आले की तेथे मध्यपुराश्मयुगीन वसतीच्या खुणा उमटलेल्या आहेत. महाराष्ट्रात इतर ठिकाणी आढळली तशी क्वार्टसाईट या प्रकारच्या दगडाची हातकुऱ्हाड (हॅण्ड एक्स) आणि फरशी अशा सारखी पूर्वपुराश्मयुगीन ॲबेव्हिलियन वा ॲश्युलियन हत्यारे व अवजारे नांदेडच्या परिसरात आतापर्यंत तरी उपलब्ध झाली नाहीत. अशा प्रकारच्या साधनांनी वन्य प्राण्यांची हत्या करायची आणि कंदमुळे, फळे कापायची तीही दगडी अवजारानेच. ही हत्यारे वा अवजारे नांदेड परिसरात मिळाली नाहीत हे खरे असले तरी पुरापुराश्मयुगात या भागात मानवाची वसती नसावी असे अनुमान काढणे तर्कशुद्ध असले तरी वस्तुस्थिती निदर्शक ते ठरेल असे ठामपणे म्हणता येणार नाही. त्याचे एक कारण म्हणजे प्रत्यक्ष नांदेड परिसरात त्या काळासंबंधीचे म्हणावे असे संशोधन झाले नाही, हे आहे. तरी पण महाराष्ट्र

व शेजारच्या प्रदेशातील या काळासंबंधीची उपलब्ध माहिती विचारात घेऊन येथील मानवी जीवनाचा आढावा घेता येतो. त्याचे कारण असे की सगळ्या अश्मयुगीन (पुरा-मध्य-नवाश्म) काळातील मानवी जीवन, शे दोनशे कि.मी. परिसरात तरी एकाच तोंडवळ्याचे असणार, त्या त्या काळातील एखादे हत्यार वा अवजार नांदेडला मिळाले काय की लातूरला मिळाले काय, त्याचा उपयोग व तंत्र साधारणतः सारखेच असणार!

पुराश्मयुगात काय किंवा नंतरच्या कालखंडात काय मानवाने वसतीसाठी नदीची संगत स्विकारली, खरे तर ती त्याचेसाठी अपरिहार्यच होती. नांदेड जिल्ह्यातही मध्यपुराश्मयुगीन वसती अशीच गोदावरी, मांजरा, मन्याड, लेंडी इत्यादी नद्यांच्या किनारी झाल्याचे आढळते. गोदावरी ही केवळ नांदेड परिसरातीलच नव्हे तर मराठवाड्यातीलच सगळ्यात मोठी नदी, तिचे काठी किवळा, शंखतीर्थ, राहेगांव, वांरगा इत्यादी ठिकाणी मध्यपुराश्म तसेच भोकर गावाजवळील टेकडीच्या पायथ्याशी चर्ट जातीच्या दगडात भूऱ्या रंगाची उत्तरपुराश्मयुगीन हत्यारे आढळली, ही हत्यारे २० ते ३० हजार वर्षांपूर्वीची आहेत. एवढेच नव्हे तर अशी हत्यारे निर्माण करण्याची ही केन्द्रेच होती असे जाणकार सांगतात. या ठिकाणी राहणाऱ्या आद्यमानवाने आपल्या अस्तित्वासाठी गारगोटीची (चर्ट या जातीच्या दगडाची) हत्यारे अवजारे घडविली. याचा आणखी एक अर्थ असा की आवश्यकतेप्रमाणे योग्य दगड निवडण्याचे ज्ञान या काळापावेतो त्याने संपादन केले होते. ही हत्यारे आकाराने पूर्वाश्मयुगीन हत्यारापेक्षा लहान आणि खूप धारदार, अणकुचीदार असत. ती तयार करण्याच्या तंत्रातही एव्हाना सुधारणा झाली होती. दगडी गोट्यांच्या लहान चिपा काढून त्यांच्या कडांचे बारीक तुकडे उडविले की हत्यार धारदार बने. वेगळ्या-वेगळ्या प्रकारच्या तासण्या (स्क्रेपर्स) आणि छिन्नी सारखी बारीक हत्यारे (बुरीन) अशा प्रकारची त्यावेळची हत्यारे मिळतात. अशी हत्यारे सर्वात आधी नेवासे (जि. नगर) येथे मिळाली. त्यानंतर भारतात ती अन्यत्रही आढळली. गोदाकाठी नांदेड परिसरात ती इ. स. १९७७ च्या सुमारास सापडली.

गोदावरीचे खालोखाल मांजरा ही या भागातील मोठी व महत्त्वाची नदी. हिलाच पुराणात वांजरा, वंजुला अशा नावाने संबोधिले आहे. वांजरा, वंजुला यांच्या जोडीनेच अंजरिक या नदीची नांवे लातूर जिल्ह्याशी संबंधीत कोरीव लेखात आढळतात. बीड जवळील बालघाटातील मांजरसुंबा येथे तिचे उगमस्थान असल्याचे मानतात. मंजर हे बालाघाटाच्या, येथील रांगेचे प्राचीन नाव असून या नदीच्या नावाची व्युत्पत्ती त्यातून झालेली असावी. ही नदी बीड, लातूर, उसमानाबाद या मराठवाड्यातील जिल्ह्यांतून आणि कर्नाटकाच्या बिदर जिल्ह्यातून सुमारे २५० कि.मी. चा प्रवास करून पुढे ही नांदेड जिल्ह्यात प्रवेश करते. तेथेही सुमारे १०० कि.मी. प्रवास करून निजामाबाद जिल्ह्याच्या सीमेवर कंदकुर्ती या गावी गोदावरीस मिळते. भूरिपिकी (Geomorphology) शास्त्राच्या आधारे तज्ज्ञांनी असे दाखवून दिले आहे की ७-८ लाख वर्षापूर्वी मांजरा नदी भीमानदीची उपनदी होती. पुढे भूगर्भजनक हालचालीमुळे ही नदी गोदावरीच्या दिशेने वाहू लागली. मांजरा खोऱ्यात मध्याश्मयुगीन वसतीच्या खुणा अनेक ठिकाणी सापडल्या आहेत. या भागातील हवामान सर्वसाधारणपणे अर्धशुष्क मोसमी स्वरूपाचे आहे. कमी आणि अनिश्चित स्वरूपाचा पाऊस, खडकाळ पठारी प्रदेश आणि बारमाही वाहणाऱ्या नद्यांची उणीव व कमतरता यामुळे हा भाग भरपूर पाणी असलेल्या गोदावरीसारख्या बारमाही

वाहणाऱ्या नद्यांच्याकाठच्या तुलनेने मागासलेला, अविकसित राहिला. येथे कदाचित त्यामुळेच यादव, चालुक्य, राष्ट्रकूट, वाकाटक आणि सातवाहन या घराण्याच्या कारकीर्दीच्या खुणा तुलनेने विरळ आहेत. येथे शेतीप्रधान ताम्रपाषाणयुगीन वसतीचा एकही धागा अद्यापपावेतो हाती आलेला नाही.

अश्मयुगीन (तेथील संदर्भात मध्यपुराश्मयुगीन) मानवाच्या भटक्या आणि शिकारी जीवनाचा मागोवा घेता येतो. या मांजरा नदीच्या खोऱ्यात चर्ट जातीचा दगड मोठ्या प्रमाणात उपलब्ध होतो. त्यामुळे या भागात मध्यपुराश्मयुगाच्या संस्कृतीचे अवशेष मोठ्या प्रमाणात उपलब्ध होतात. त्यामुळे या भागात मध्यपुराश्मयुगाच्या संस्कृतीचे अवशेष मोठ्या प्रमाणात आढळतात. लेंडी ही मांजरेची एक उपनदी, अशा उपनद्यांच्या पात्रांत व परिसरातही असे अवशेष आढळून येतात. शंखतीर्थ, नांदेड, वांरगा विशेषतः नांदेडच्या दक्षिणेस किवळा येथे मध्य पुराश्मयुगीन हत्यारे (Middle Palaeolithic) बनविण्याचे केंद्र होते.[१] मुगांव, देगलूर इत्यादी ठिकाणी मध्यपुराश्मयुगात वावरणाऱ्या मानवाने उपयोगात आणलेली हत्यारे उपलब्ध झाली आहेत. तासण्या, तीराग्रे, धारदार काठ असलेली पाती, अणकुचीदार टोचा, छिलके (फ्लेक्स) आणि ज्या गोट्यापासून छिलके काढले जात त्या गोट्यांचे गाभे (कोअर) इत्यादी हत्यारांचे प्रकार येथे आढळून आले. यापैकी काही हत्यारे गुळगुळीत, झिजलेली तर काही अगदी न वापरलेली पाहता ती येथेच तयार केली जात हे जसे लक्षात येते, तसेच आदिमानवाने येथेच मुख्यतः वसती केली होती हे ही ध्यानात येते. देगलूरजवळ तांबड्या व पिवळसर चर्टचे पट्टे खडकातून आढळतात. मध्यपुराश्मयुगीन मानवाला अत्यंत सोयीचा असा हा दगड आहे. याच्या सहाय्यानेच हा शिकारी करी व संकटातून सहीसलामत सुटे. मात्र येथील हत्याराबरोबर कुठल्याही प्रकारच्या अश्मास्थी (फॉसिल्स) किंवा किरणोत्सर्गी कालमापनास उपयुक्त ठरतील अशा वस्तू न मिळाल्यामुळे येथील मध्याश्मयुगीन वसतीचा काळ ठरवण्यासाठी प्रत्यक्ष पुरावा काही मिळाला नाही. पुरातत्त्वशास्त्रात सापेक्ष कालमापनालाही (रिलेटिव्ह डेटिंग) महत्त्व आहे. त्याआधारे येथील वसतीच्या काळाचा अंदाज घेता येतो. उदाहरण शोधण्यास फार दूर जायची आवश्यकता नाही. गोदावरीची आणखी एक उपनदी मन्याड, तिचे काठावरील मुगांव येथे मध्य आणि उत्तरपुराश्मयुगातील हत्याराबरोबरच काही प्राण्यांची अश्मीभूत हाडे मिळाली. त्यांच्या अभ्यासावरून असे ध्यानी आले की, नांदेड परिसरातील देगलूर काय किंवा शेजारच्या निजामाबाद (प्राचीन इंदूर) जिल्ह्यातील सीमेवरील सालुरा काय, या दोन्ही गावी सापडलेल्या हत्यारांपेक्षा मुगांव येथील हत्यारे नंतरची आहेत. म्हणजेच असे की, मुगांव येथील वसतीचा काळ आधीच्या दोनही ठिकाणच्या वसतीपेक्षा तुलनेने नंतरचा आहे.

**हवामान :** नांदेडच्या परिसरातील हवामान प्रस्तुत कालखंडात कशा प्रकारचे होते याचा मागोवा तज्ज्ञांनी घेतलेला आहे. अर्थात असे हवामान केवळ नांदेड जिल्ह्यापुरतेच मर्यादित नव्हते/नसणार. किंबहुना संपूर्ण महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, कर्नाटक या प्रदेशातील हवामान जसे असेल तसेच हवामान थोड्याफार प्रमाणात या भागातलेही असणार. विशेष एवढेच की ते कसे होते ते येथील परिसराच्या निरीक्षणाधारेच तज्ज्ञांना कळले आहे. मांजरा व तिच्या उपनद्या ह्यांची पात्रे मध्यपुराश्मयुगापासूनच अत्यंत उथळ होती. पात्रातून गोटे वाहून नेणे एवढेच त्यांचे महत्त्वाचे कार्य होते. यांच्या खोऱ्यात आढळणारी न्यूनाधिक उताराची भूमी, त्यावरील चुनखडीयुक्त काळी माती आणि दगडा-गोट्यांनी

१. पाठक, अ.शं., **गोदावरी एक पुरातत्त्वीय अभ्यास**, एम्. फील. अप्रकाशित प्रबंध, औरंगाबाद विद्यापीठ १९८२, पृ. ४८.

Maharashtra State Gazetteers

भरलेली उथळ पात्रे अर्धशुष्क हवामानाचे (सेमिअरिड) निदर्शन करतात. याचाच अर्थ असा की, आदिमानव या भागात आल्यानंतर म्हणजेच सुमारे ४०-५० हजार वर्षात येथील हवामानात आजतागायत फारसे बदल झालेले नाहीत. आजही या प्रदेशातील हवामान अर्धशुष्क मोसमीच आहे.

या मध्यपुराश्मयुगाच्या काळासंबंधी आणखी एक महत्त्वाची बाब सांगायला हवी. त्यावेळी या भागात, विशेषतः मुगांव, तडोळा, वडोळा या ठिकाणी प्राण्यांच्या अश्मास्थी सापडत. त्यावरून दिसते ते असे की येथे हत्ती (एलेफस मॅक्झिमस), बैल (बॉस-नमॉडिकस), हरिण (कर्व्हस), घोडा, म्हैस इत्यादी प्राणी त्याकाळी होते आणि चोंच देणारा चाऱ्याची सोय करीत असतो म्हणतात, त्यानुसार उंच गवत आणि खुरट्या पानझडी वृक्षांचे पुंजकेही या भागात त्याकाळी असावेत असे तज्ज्ञ मानतात.

या नंतर आले मध्याश्मयुग (मेसॉलिथिक). यालाच लघुपाषाणयुग (मायक्रोलिथिक) काळ असेही म्हणतात. या काळातील बरीचशी हत्यारे आकाराने अगदी लहान असल्यामुळे यांना क्षुद्रास्त्रे म्हणतात. अशी अनेक हत्यारे एखाद्या लाकडाच्या खाचेत बसवून त्यांचा उपयोग केला जात असे. ही बहुतेक तर गारगोटीची असतात. हा मध्याश्मयुगाचा काळ इसवी पूर्व ३००० ते २५०० वर्षापर्यंतचा मानतात. या नंतर येते ते ताम्रपाषाणयुग. या काळातील वसतीचे पुरावे अद्याप तरी नांदेड जिल्ह्यात मिळालेले नाहीत.

वेदवाङ्मयातून ज्याला दक्षिणापथ असे म्हटले आहे त्या विस्तीर्ण दक्षिण प्रदेशात आताच्या नांदेड जिल्ह्याच्या परिसराचा समावेश होत असे. पुढे रामायण-महाभारताच्या काळात ज्याला दण्डकारण्य म्हटले जाई त्या मध्येही या प्रदेशाचा समावेश होत असे. याचे कारण असे की, दक्षिणापथ आणि दण्डकारण्य या दोन्हीतही संपूर्ण महाराष्ट्राचा स्थूलमानाने अंतर्भाव होई. याचा अर्थ असा की हा प्रदेश वेगवेगळ्या नावाने ओळखला जात असला तरी या भागाला इतिहास होता आणि आहेही.

## प्राचीन राजवंश

**ऐतिहासिक काळाचा प्रारंभ :** कालांतराने म्हणजे इसवीसन पूर्व सहाव्या शतकाच्या सुमारास महाराष्ट्रातील विविध प्रदेश अश्मक, कुंतल, मूलक, अपरांत, ऋषिक अशा नावाने संबोधिले जाऊ लागले. यापैकी पहिल्या तीन प्रदेशांचा मराठवाड्याच्या इतिहासाशी संबंध आहे. नांदेड भोवतीच्या प्रदेशाचा समावेश त्याकाळी विदर्भात होत असे. या भागाची दक्षिण सीमा गोदावरी नदीपर्यंत होती. नांदेड हे नावच मुळी गोदावरीशी निगडीत आहे. नदीच्या (म्हणजे गोदावरीच्या) काठावर वसलेले म्हणून नांदीकट, नंदिकड,[२] आणि नांदीकट या संस्कृत शब्दापासून नांदेडची व्युत्पत्ती होते. गोदावरीच्या दोन्ही तीरावर वसलेले म्हणून नंदीकट.[३] नदीकांठच्या गावांची अशी नांवे पडल्याची आणखीही काही उदाहरणे सांगता येतील. वरदाकट (वऱ्हाड), करहाकट (कऱ्हाड).[४] प्रारंभी काही संशोधकांचे [५]

२. मिराशी, वा.वि., **कॉर्पस् इन्सिक्रिप्शनम् इंडिकेरम,** खंड ५, क्र. २३.

३. मिराशी, वा.वि., **वाकाटक नृपति आणि त्यांचा काळ,** नागपूर विद्यापीठ, नागपूर, १९५६, पृ. ६७.

४. कल्याणी चालुक्याच्या शिलालेखात नदितर असा उल्लेख, पहा : कोलते वि.भि., **महाराष्ट्रातील कांही ताम्रपट व शिलालेख,** महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, १९८७, पृ. १५१ व पुढे.

५. रायचौधरी, एच.सी., **पोलिटिकल हिस्ट्री ऑफ एन्शंट इंडिया,** युनिव्हर्सिटी ऑफ कलकत्ता, कलकत्ता, १९५३, पृ. १५६.

म्हणणे होते की नांदेडचा उत्तरेकडील नंदवंशाच्या कारकीर्दीशी संबंध असावा, ' नवनंदडेरा ' यापासून नांदेड झाले असावे. गोदावरीच्या दक्षिण काठावरील प्रदेशाला प्राचीन काळी अश्मक म्हणत. खानदेशापासून गोदावरीनदीपर्यंतचे नाशिक, नगर हे सध्याचे जिल्हे तसेच वऱ्हाड आणि मराठवाड्याचा काही भाग मिळून होणाऱ्या प्रदेशाला अश्मक हे नाव मिळाले. गौतमी बलश्री या सातवाहन घराण्यातील राजाच्या नाशिक शिलालेखात याला असक तर बौद्धवाङ्मयात याला अस्सक म्हटले आहे.[६] आंध्र प्रदेशातील निजामाबाद जिल्ह्यातील बोधन[७] ही याची राजधानी मानतात. पुढे या प्रदेशाचा समावेश कुंतल या प्रदेशात झाला. सध्याचे सातारा, कोल्हापूर, सांगली, नगर, बीड आणि उस्मानाबाद या जिल्ह्यांचाही समावेश कुंतलात होऊ लागला. सातवाहन, चालुक्य आणि राष्ट्रकूट घराण्यातील राजांना कुंतलेश्वर असे संबोधिले जाऊ लागले असे शिलालेखांच्या आधारे म्हणता येते.

उत्तर भारतात नंद घराण्यानंतर मौर्य घराण्याचे राज्य आले. या घराण्याची सत्ता बऱ्याच मोठ्या प्रदेशावर होती, त्यात महाराष्ट्राचाही समावेश होता असे दिसते. अशोकाचे लेख सोपारा (जिल्हा ठाणे) आणि देवटेक (जिल्हा चंद्रपूर) येथे सापडल्यामुळे या समजाला पुष्टी मिळते. शिवाय पुरातत्त्वीय काही पुरावे उदा. एन.बी.पी. (नॉर्थ ब्लॅक कॉटन पॉटरी) प्रकारची खापरे पवनी (जि. भंडारा) येथे व नुकत्याच झालेल्या अमरावती जवळच्या ऋध्दिपूर येथील उत्खननातही मिळाली. त्यावरून उत्तरेशी दळणवळण होते असे दिसते. असे असले तरी या मौर्यांच्या राज्यात नांदेड परिसराचा अंतर्भाव होता या संबंधीचा ठोस पुरावा उपलब्ध नाही.

मौर्यांच्या पश्चात उत्तरेत शुंग घराण्याचे राज्य प्रस्थापित झाले, त्यावेळी विदर्भ प्रदेशावर राज्य होते यज्ञसेन राजाचे. त्याचा भाऊ माधवसेन, दोघामध्ये कमालीचे वितुष्ट होते. इतिहास सांगतो की माधवसेनाचे सहाय्यास शुंगाचा राजपुत्र अग्निमित्र धाऊन गेला. यज्ञसेनाचा पराभव झाला. नंतर या दोन भावात विदर्भाची वाटणी झाली. सहाजिकच यापैकी एकाच्या ताब्यात नांदेडचा भाग आला असावा. त्या संबंधीचा ठोस पुरावा मात्र हाती आलेला नाही.

**सातवाहन घराणे :** भारताच्या मानचित्रावर महाराष्ट्राला मानाचे स्थान मिळवून दिले ते पैठणच्या सातवाहन राजांनी. इसवीसनपूर्व तिसरे ते इसवीसनाच्या तिसऱ्या शतकाच्या मध्यापर्यंत या घराण्यातील राजांनी दक्षिण भारतातील मोठ्या प्रदेशावर अव्याहतपणे राज्य केले. या घराण्यातील सुमारे तीस राजांची महाराष्ट्रावर सत्ता होती. सांची (मध्य प्रदेश) येथील दान-लेखात नांदेड येथील २३ दानशूरांची नांवे आली आहेत. सातवाहन काळात नांदेड येथे बौध्द धर्माचे केंद्र असावे, असे अनुमान यावरुन करता येते.[८] यापैकी गौतमीपुत्र सातकर्णी, वाशिष्टीपुत्र पुलुमावी सारखे काही श्रेष्ठ पराक्रमी होते, हाल सारखे काही साहित्य-कला प्रेमी होते तर यज्ञश्री सारखे काही साम्राज्य समृध्द व संपन्न करणारे होते. मात्र शक्यता ही की अगदी प्रारंभीच्या काळात कदाचित नांदेडचा सगळा परिसर

६. **मराठी विश्वकोश,** खंड १, पृ. ६३०.

७. प्राचीन पौडण्य - मजुमदार आर.सी. व पुसाळकर ए.डी. (संपा.), **हिस्ट्री ॲण्ड कल्चर ऑफ इंडियन पीपल,** खंड २, भारतीय विद्याभवन, बॉम्बे, १९५४, २ री आवृत्ती, पृ. २०१.

८. ठोसर एच.एस., **हिस्टॉरिकल जॉग्रॉफी ऑफ महाराष्ट्र अँड गोवा,** एपिग्राफीकल सोसायटी ऑफ इंडीया, म्हैसुर, २००२, पृ. ५४०.

यांच्या राज्यात समाविष्ट नसेल. ही राजे मंडळी अजून पुरेशी प्रबळ व्हावयाची होती, किंवा राज्य विस्ताराची प्रक्रिया तेथे पावेतो पोचली नसावी. आधी उल्लेखिलेल्या माधवसेनाचे राज्य यावेळपर्यंत चालू असावे. या अनुमानाला बळकटी देणारी घटना अभिलेखात नोंदवली गेली आहे. खारवेल राजाच्या उदयगिरी (भुवनेश्वरजवळ) येथील हाथीगुंफा अभिलेखात म्हटले आहे की सातकर्णीचे अस्तित्त्व न जुमानता खारवेलाने पश्चिम प्रदेशाकडे सैन्य रवाना केले. याचा अर्थ असा की सातकर्णी हा सातवाहन राजा प्रबळ होता. मोठा होता मात्र पश्चिम प्रदेश त्याच्या ताब्यात नव्हता. पण पुढे दिसते ते असे की सातकर्णीचा प्रभाव व प्राबल्य खूप वाढले. त्यामुळेच त्याला राजसूय आणि अश्वमेध इत्यादी प्रकारचे यज्ञ करता आले आणि हे फक्त सम्राटच करू शकत असे. त्याचाच अर्थ असा की पुढे त्याच्या राज्यात नांदेड परिसर समाविष्टित होता. ऐतिहासिक घटनांचा अर्थ लावू शकणाऱ्या कुणाही संशोधकाला हे मान्य होण्यासारखे आाहे.

सातकर्णीचा मुलगा वेदिश्री हा दक्षिणाधिपती होता असा उल्लेख लक्षात घेता त्याचे नांदेड भागावर राज्य होते हे वेगळे सांगण्याचे कारण राहत नाही. सातकर्णी नंतर राज्यावर आलेल्या इतर सातवाहन राजांचे अधिपत्य नांदेड व भोवतालच्या प्रदेशावर असणारच. यांच्या पैकी गौतमीपुत्र सातकर्णी सारख्या सम्राटाचे राज्य तर सगळ्या दक्षिण प्रदेशावर होते हे त्याच्या बिरूदावरूनही कळते. इसवीसनाच्या पहिल्या शतकात होऊन गेलेला सातवाहनांचा हाल नामक राजा एका वेगळ्या अर्थाने महत्त्वाचा ठरतो. मोठ्या रसिकतेने याने लोकजीवनावर आधारीत ७०० गाथा निवडल्या. गाथासत्तसई[९] वा सप्तशती असे या संग्रहाचे नाव. सातवाहनांची नाणी गोदावरीच्या पात्रात व परिसरात उपलब्ध झाली, त्यावरून आणि शिलालेखावरून तत्कालीन लोकजीवनाची पुरेशी माहिती अर्थातच मिळत नाही. त्यादृष्टीने पहाता हालाने 'संपादित' केलेल्या सप्तशतीचे खूपच महत्त्व आहे. नांदेड ज्या गोदावरीचे काठावर वसले आहे त्या नदीच्या काठचे, त्याकाळचे जीवन यापैकी किती तरी गाथातून शब्दबद्ध झालेले आहे. यात त्या काळचा समाज, नागरी व ग्रामीण जीवन, चालीरीती, सण-वार, उत्सव-महोत्सव, अलंकार, वस्त्रप्रावरणे या जीवन-पैलूंची माहिती जशी मिळते तशीच नगरांची रचना, रस्ते, घरांची बांधणी, देवळे, देव-देवता, धार्मिक समजुती या संबंधीचीही मिळते. त्याकाळी नांदेडच्या परिसरातील जीवन यापेक्षा वेगळ्या प्रकारचे असेल असे वाटत नाही. प्रत्यक्ष पुरावे मात्र अजून मिळालेले नाहीत. पण राजधानीच्या (पैठण) परिसरातल्या जीवनाचा प्रभाव इतरत्र पडत असावा असे अनुमान करता येते.

गाथासप्तशतीतून आलेल्या आर्थिक जीवनासंबंधीच्या माहितीवरून कळते की त्याकाळी महाराष्ट्रात सुबत्ता होती. व्यापार उदीमही मोठ्या प्रमाणात चाले. भोवती परकोट असलेली ३० नगरे सातवाहनांच्या राज्यात होती असे प्लिनीसारख्या परदेशी प्रवाशाने लिहून ठेवले आहे. प्रतिष्ठान (पैठण), तेर, सोपारा, कऱ्हाड, जुन्नर, वैजयंती, अडम वगैरे नगरे त्यापैकीच असावीत. अजिंठ्याच्या घाटाने जाणारा व्यापारीमार्ग भोकरदन (जि. औरंगाबाद), पैठण, या मार्गाने उज्जैनीशी जोडलेला होता. तेर (जि. लातूर) येथून भडोच पर्यंतही असा एक मार्ग होता. सोपारा, कल्याण, चौल ही बंदरे भरभराटीला आलेली होती. परिणामी भारताच्या पश्चिमेकडील देशांशी व्यापार मोठ्या प्रमाणात चालत

९. जोगळेकर, स.आ. (संपा.), **राजा हालाची गाथा सप्तशती**, प्रसाद प्रकाशन, पुणे, पृ. ७

Maharashtra State Gazetteers

असे. रोमशी व्यापार चाले याचा पुरावा उत्खननातून मिळतो. रोमची मातीची भांडी, मद्यकुंभ मराठवाड्यात उपलब्ध झाले आहेत. भोकरदन येथील उत्खननात १९७२ साली मिळालेल्या[१०] आरशाच्या स्त्री-आकृतीच्या मुठीसारखीच हस्तिदंती स्त्री प्रतिमा इटलीतील पॉम्पे या ठिकाणी इसवीसनाच्या पहिल्या शतकात पोचली होती हे पाहाता दोन्ही देशातील दळणवळणाची कल्पना येऊ शकते. अशा व्यापारामुळे आलेल्या समृध्दीचे लोण भोकरदन, विशेषतः तेर पासून दूर नसलेल्या नांदेड पर्यंत गेले असल्याचे अनुमान चुकीचे ठरू नये. शिवाय नांदेड परिसरात असरजंग येथे या काळचे पुरातत्त्व गृणक्षेत्र आढळून आले असून सातवाहन राजाची नाणी मिळाली आहेत. व्यापारी आणि कारागीर यांचा श्रेणीबद्दल शिलालेखातून माहिती मिळते. शिवाय ओदयंत्रिक (पाणचक्क्या चालवणारे) कटिचक्र (गवंडी), कुलरिक (कुंभार), कीलिक (विणकर), चम्मकार (चांभार), तिलपिशक (तेली), धम्मिक (धान्याचे व्यापारी), मणिकर (मोत्याचे व्यापारी), वढकी (सुतार), लोहवणिय (लोहार) इत्यादींचे उल्लेखही येतात.[११] ही माहिती थोड्याशा विस्ताराने दिली आहे, उद्देश हा की महाराष्ट्रभर पसरलेल्या त्या काळच्या समाजाची ओळख व्हावी आणि नांदेड परिसरातील त्या काळच्या समाजाचा परिचय व्हावा.

सातवाहनांच्या राजवटीत गुण्यागोविंदाने, स्वास्थ्यपूर्ण संपन्न जीवन जगणाऱ्या समाजाला हाल राजाच्या कारकिर्दीनंतर थोड्याच वर्षात एका महाभयंकर संकटाला तोंड द्यावे लागले. त्या संकटाचा आवाका एवढा मोठा होता की त्यात साऱ्या महाराष्ट्राचे स्वातंत्र्य, अस्मिता आणि धर्म हे सारेच होरपळून जाणार, अशी स्थिती निर्माण झाली होती. भारताच्या वायव्येकडील खैबरखिंडीतून शक भारतात शिरले होते. ही टोळधाडच होती. साऱ्या महाराष्ट्राला गिळंकृत करायला ही शक मंडळी उत्सुक होती. नहपान नामक त्यांच्या पुढाऱ्याने सगळा महाराष्ट्र ताब्यात घेतला होता अणि तिकडे रूपिअम्म नामक दुसऱ्या एका शक राजाने विदर्भ गिळंकृत केला होता. परिणामतः नांदेड परिसरावरही हे परवशतेचे सावट पसरले होते.

शकांचे सावट महाराष्ट्रातून पर्यायाने नांदेडच्या परिसरातून नाहीसे करणारा नरपुंगव गौतमीपुत्र सातकर्णीच्या रूपाने अवतीर्ण झाला. त्याच्या २४ वर्षाच्या राजवटीत सातवाहन साम्राज्याचा चोहोदिशेस विस्तार झाला. त्यात ऋषिक (खानदेश), अश्मक (पश्चिम माळवा), सौराष्ट्र आणि अपरान्त (कोकण) या प्रदेशांचा अंतर्भाव तर होत होता शिवाय दक्षिणेकडील सेतागिरी (नागार्जुनकोंड्याजवळ), श्रीस्तन (कर्नुल) आणि महेन्द्र (गोदावरी व कृष्णा या मधील प्रदेश) यांचाही समावेश होता. साम्राज्याच्या या व्याप्ती व विस्तारावरून असे दिसते की या राजांचा अंमल दक्षिणेकडील कृष्णा व उत्तरेकडील माळवा आणि काठेवाड आणि पूर्वेकडील विदर्भ व पश्चिमेकडील कोंकण एवढ्या प्रदेशावर होता.[१२]

राजकीयदृष्ट्या सुमारे ४०० पेक्षा अधिक वर्षांपर्यंत नांदेडचा परिसर सातवाहनांच्या साम्राज्यात होता हे जरी खरे असले तरी सांस्कृतिक जीवन येथे कशा स्वरूपाचे होते हे सांगण्यास फारसे पुरावे

१०. देव, शां.भा., व गुप्ते, र.शं., **एक्सकेव्हेशन ॲट भोकरदन,** १९७२.

११. यझदानी, गुलाम (संपा.) **अर्ली हिस्टरी ऑफ दि डेक्कन,** खंड १, ऑक्सफर्ड, १९६०, पृ. १३७.

१२. पाहा **एपिग्राफिया इंडिका**, भाग ८, पृ. ७३, नाशिक लेणी लेख.

अद्यापि तरी हाती आलेले नाहीत. नाही म्हणायला येथे या काळात बौध्द धर्माचे केंद्र होते असे दिसते. ल्युडर्सच्या यादीत नांदेड येथील २३ जणांची नावे सांची स्तूपाला दान देणारे म्हणून आली आहेत.[१३] या काळातील लेणीही नांदेड जिल्ह्याच्या वाट्याला आलेल्या नाहीत. निदान त्यावरून तरी स्थापत्य, शिल्प, देवता, कला, वस्त्रे, अलंकार इत्यादी संबंधी काही सांगता आले असते. आता पैठण, तेर, भोकरदन, नेवासे, नाशिक येथील उत्खननातून प्राप्त झालेल्या माहितीवरून त्यासंबंधी अनुमानच करावे लागते. एकाच घराण्याच्या अधिपत्याखाली असलेल्या जवळ जवळच्या प्रदेशात सांस्कृतिक जीवनात, चालीरीतीत आणि धार्मिक समजुतीत फार फरक असण्याचे कारणही नाही. नांदेड जिल्ह्यात पुरातत्वीय उत्खनने होतील तेव्हा या संबंधी ठोस असे काही सांगता येईल. तो पर्यंत वाट पहाणे क्रमप्राप्त आहे.

**वाकाटक कालखंड (इ. स. २५० ते ५५०) :** सातवाहनानंतर इ. स.२५० चे सुमारास वाकाटकांनी राज्य केले. या घराण्यातील विन्ध्यशक्ति याने विदर्भात राज्य स्थापिले. उत्तरेत गुप्त सम्राट आणि दक्षिणेत वाकाटक राजे हे समकालीन होत. यांच्यात वैवाहिक संबंधही होते. द्वितीय रुद्रसेन या वाकाटक राजाची अग्रमहिषी प्रभावती गुप्त ही द्वितीय चंद्रगुप्ताची कन्या होती. तिच्या राजपुत्रांना शिकवण्यासाठी चंद्रगुप्ताने कविकुलगुरू कालिदासाची रवानगी दक्षिणेत केली होती असे मानले जाते. प्रथम प्रवरसेन हा या घराण्याचा सर्वश्रेष्ठ राजा. तो पराक्रमी होता, साहित्यिक आणि प्रजाहितदक्ष होता. याने ६० वर्षे राज्य केले आणि खूप विस्तृत अशा राज्याची विभागणी आपल्या चार मुलांमध्ये केली असा पुराणांचा दाखला आहे. प्रवरसेनाने चार अश्वमेध केले होते आणि दख्खनच्या फार मोठ्या भागावर याचे अधिपत्य होते हे पहाता नांदेडचा परिसर त्यात समाविष्ट असणे सहाजिकच ठरते.

येथे प्रवरसेनाच्या राजवटीतील आणखी एका घटनेचा उल्लेख केला पाहिजे. त्याचा देव नामक सचिव, कर्तबगार, विद्वान, नितिनिपुण व धार्मिक वृत्तीचा होता. याचे सविस्तर वर्णन घटोत्कच लेणीत (अजिंठ्याच्या लेणीपासून समारे १५ कि.मी.) आलेले आहे. ह्या वंशातील व्यक्तीकडेच सचिवपद दिले जाई. आधी रवी नामक सचिव सर्वसेनाच्या (वत्सगुल्मशाखा) राज्यकाळात होता. पुढे वत्सगुल्म शाखेच्या देवसेन राजाचा हस्तिभोज हा सचिव झाला आणि नंतर पुत्र वराहदेव हा सचिव झाला. राजवंश आणि सचिवाचा वंश अव्याहतपणे कार्यरत असल्याचे असे उदाहरण दुर्मिळच म्हणावे लागेल. विशेष म्हणजे राजघराण्याच्या मुख्य शाखेत सचिवपद भूषविलेल्याच्या वंशजाकडेच ते पद वत्सगुल्मशाखेतल्या राजांनीही चालू ठेवले होते.[१४]

वाकाटकांच्या साम्राज्याची वाटणी चार भागात झाल्याचा उल्लेख वर आलेला आहे. पण हे चार भाग कोणते ह्याचा उलगडा मात्र अजून झालेला नाही. पुराणातील अशा माहितीवर इतिहासकारांनी १९३९ पर्यंत विश्वास ठेवला नव्हता. १९३९ मध्ये वाशीम (जि.अकोला, आता जि.वाशीम) येथे मिळालेल्या ताम्रपत्रावरून कळले की वत्सगुल्म (वाशीम) ही वाकाटकांच्या राज्याच्या धाकट्या शाखेची राजधानी होती व तिचा पहिला राजा होता सर्वसेन. अजिंठा लेणीतील शिलालेख आणि प्रस्तुतचे ताम्रपत्र या दोन साधनांद्वारे या धाकट्या पातीचा इतिहास उभा करता आला. या ताम्रपत्रातून कळले

१३. हरीहर ठोसर, पूर्वोक्त.

१४. मिराशी, वा. वि., **वाकाटक नृपति आणि त्यांचा काळ,** पूर्वोक्त, पृ.५९.

Maharashtra State Gazetteers

की नांदेडशी विन्ध्यशक्ती (दुसरा) याचा संबंध होता. म्हणजे इसवीसनाच्या चौथ्या शतकात नांदेडचा पहिला स्पष्ट उल्लेख येतो. आपल्या कारकीर्दीच्या ३७ व्या वर्षी त्याने ताकालख्खोप्पक या गावाजवळील आकासपद्द या खेड्याचे दान दिल्याचा या ताम्रपत्रात उल्लेख आहे. हे गाव नांदीकड (नांदेड) च्या उत्तरमार्गात म्हणजे उपविभागात होते. वरील दोन्ही गावे नक्की कोठली हे निर्णायकपणे सांगता येत नसले तरी नांदेडच्या उत्तरेला सुमारे ६० कि.मी. वर असलेले टाकळीगोहान आणि आसुंद ही तीच गावे असावीत असे अनुमान करता येते. विन्ध्यशक्तीच्या राज्यात असलेले उस्मानाबाद (कुंतल देशाचा काही भाग), नांदेड, परभणी आणि औरंगाबाद परिसरातील जनजीवनाच्या काही पैलूंवर थोडाफार प्रकाश टाकणारे हे ताम्रपत्र आहे. विशेषतः प्राचीन नांदेडच्या संदर्भात ते महत्त्वाचे आहे. खरे तर येथल्या लोकजीवनासंबंधी स्पष्टपणे काही सांगणारा सर्वात प्राचीन पुरावा म्हणून ते अनन्य साधारण महत्त्वाचे ठरते. या लेखातून असे कळते की वाकाटकांनी राज्यभर दौरे काढून तपासणी करण्यासाठी काही अधिकाऱ्यांची नेमणूक केली होती. त्यांच्या रहाण्याची व्यवस्था मात्र ग्रामस्थांनी करायची असे. या राज्यातील लोकांना पहिले वासरू, कोळसा, कातडे, पाण्याचे घडे (कुंभारांनी तयार केलेला पहिला घडा), इत्यादी वस्तू प्रथम सरकारात जमा कराव्या लागत. नांदेड परिसरातील व्यक्तींनाही हे चुकले नसणार. येथे एक बाब लक्षात घ्यायला हवी. वाकाटक राजाने नांदेड जवळच्या विद्वान ब्राह्मणांना एक गाव दान दिले होते. अशा गावांना अग्रहार म्हणत. अग्रहारातील रहिवासी ब्राह्मणांना सर्व प्रकारच्या करापासून सूट दिली जात असे. या वरून असे कळते की वाकाटक राजे विद्वत्तेची बूज राखणारे होते आणि याहून आपल्यासाठी प्रस्तुत विशेष म्हणजे नांदेड परिसरातील विद्वत्ता त्यावेळी ख्यातकीर्त झाली होती, येथे राजांचेही लक्ष वेधून घेणारी विद्वान मंडळी होती.

या घराण्याच्या राज्यात नांदेड परिसराचा समावेश होता हे त्यांच्या विस्तृत राज्याच्या चोहोकडे झालेल्या वाढीवरून अंदाजता येते. या वाकाटक शाखेचा शेवटचा राजा हरिषेण हा पराक्रमी आणि कलेचा भोक्ता होता. विशेष म्हणजे मुख्य घराण्याचे राज्यही याचेकडेच आले होते. म्हणजेच उत्तरेस नर्मदेपासून दक्षिणेस गोदावरीपर्यंत आणि पश्चिमेस ऋषिकाच्या (खानदेशाच्या) पूर्वसीमेपासून पूर्वेस दक्षिण कोसलाच्या (छत्तीसगडाच्या) पश्चिम सीमेपर्यंतचा सर्व प्रदेश याच्या अमलाखाली आलेला होता. यांच्या कारकीर्दीतच अजंठ्याच्या काही लेण्यातून चित्रकाम झालेले (विशेषतः लेणी क्र.१,२,१६ व १७) असल्यामुळे त्यातून दिसणारी वस्त्रे, अलंकार आणि इतर वस्तू यावर येथील रहाणीमानाचा प्रभाव पडला असावा असे वाटते.

**बदामीचे चालुक्य-कालखंड :** वाकाटकांनंतर दक्षिण भारताच्या काही भागांवर राज्य करणारे घराणे 'बदामीचे चालुक्य' म्हणून संबोधिले जाते. यांची राजधानी कर्नाटकाच्या विजापूर जिल्ह्यातील वातापी (बदामी) येथे होती म्हणून याला 'बदामीचे चालुक्य घराणे' असे म्हणतात. या घराण्याने सुमारे दोनशे वर्षे राज्य केले. या काळातील दक्षिणेच्या सांस्कृतिक जीवनावर मोठा प्रभाव या घराण्याचा होता. बदामी येथील लेणी यांचे कारकीर्दीत झाली. नृत्य-गायनाला या काळात प्रोत्साहन मिळाले. राजस्त्रियाही सार्वजनिक नृत्यकार्यक्रमात भाग घेत. या राजकुलातील राजे आणि राण्या यांनी पट्टदकल, ऐहोळे, बदामी येथे मंदिरे उभारल्याचे उल्लेख अनेक शिलालेखांतून आले आहेत. या मंदिरशैलीचा प्रभाव कर्नाटकाच्या सीमेवरील महाराष्ट्राच्या काही भागावर दाखवता येईल. द्वितीय पुलकेशिनसारखा

Maharashtra State Gazetteers

पराक्रमी राजा तर उत्तरेकडील हर्षवर्धनाला शौर्यात पुरून उरलेला दिसतो. याचे राज्य कितीकाळ महाराष्ट्रावर म्हणजेच पर्यायाने नांदेड परिसरावर होते हे नक्की सांगता येत नसले तरी याचे राज्य संपूर्ण महाराष्ट्रावर होते. त्याला कमीतकमी दोन पुरावे देता येतील. (१) याचे साम्राज्य उत्तरेस नर्मदेपासून ते दक्षिणेस कांची पर्यंत पसरले होते. (२) याच्या ऐहोळे येथील मेगुती मंदिरावरील शिलालेखात हा तीन महाराष्ट्रकांचा स्वामी होता असे नोंदवलेले आहे. यातील एका भागात मराठवाड्याचा पर्यायाने नांदेडचा अंतर्भाव होत असावा. या काळी चिनी यात्रेकरू युआन च्वांग महाराष्ट्रात आलेला होता. त्यानेही पुलकेशीचा उल्लेख 'महाराष्ट्राचा राजा' असा केला आहे. त्याने महाराष्ट्रीयांच्या स्वभावाचे जे वर्णन केले आहे ते थोड्याफार प्रमाणात नांदेडच्या रहिवाशांना त्याकाळी लागू पडत असावे. या घराण्याच्या लेखात नांदेडचा नंधाल असा उल्लेख आढळतो. या घराण्यातील विजयादित्याचा गोदावरी काठच्या नंधाल येथे लष्करी तळ असल्याचा उल्लेख मिळतो. एवढेच नव्हे तर या राज्याच्या लेखात देगलूर तालुक्यातील होट्टलचा उल्लेख पोट्टलिकनगर असा आला आहे.[१५]

**राष्ट्रकूट कालखंड (इ.स. ७४४) :** नांदेडचे व त्याच्या परिसराचे भाग्य राष्ट्रकूटांचे काळी उजळले होते तेवढे व तसे भाग्य आजतागायत त्याच्या नशिबी आले नाही, असे वाटते. बदामीच्या चालुक्यानंतर 'लत्तलूरपुरवराधिश्वर' असे स्वतःला म्हणवून घेणाऱ्या राष्ट्रकूटांचे राज्य आले. ते सुमारे २०० वर्षे टिकले. हे लातूर गांव नांदेड पासून १२० कि.मी. अंतरावर आहे. या घराण्याचा पहिला नांव घेण्यासारखा राजा म्हणजे दंतीदुर्ग. याने कर्नाटक, महाराष्ट्र आणि गुजरात जिंकलेला होता हे, व राष्ट्रकूटांची पुढील कारकीर्द लक्षात घेता या घराण्याचे राज्य नांदेड भागावर अखंडपणे चालू होते असे समजण्यास प्रत्यवाय नसावा. दक्षिणेवर राज्य करणाऱ्या घराण्यांपैकी हे एक मातब्बर घराणे होते. पराक्रम, प्रज्ञा आणि ललितकला प्रेम हे या राजकुलातील अनेक राजांचे वैशिष्ट्य होते. दक्षिणेवर अधिराज्य प्रस्थापित करून थेट गंगा-यमुनेच्या दुआबापर्यंत धडक देण्याचा पराक्रम या घराण्याच्या नावे इतिहासाने नोंदवला आहे, तर वेरुळ येथील अप्रतिम, अद्वितीय कैलास लेणे निर्माण करून यांनी कला जगताला थक्क केले आहे. साहित्य, शिल्प, मूर्तिशास्त्र आणि धार्मिकता यांचा अभूतपूर्व एकोपा कैलासात प्रगट झाला आहे. हेन्री कझेन्स[१६] आणि आळतेकर[१७] यांच्या म्हणण्याप्रमाणे कैलासच्या जवळपासच राष्ट्रकूटांची त्यावेळची राजधानी असावी. यावरून राष्ट्रकूटांचे राज्य नांदेडवर असणे अपरिहार्य होते हे स्पष्ट होईल. कारण लातूर किंवा वेरूळ नांदेड पासून शंभर-दोनशे कि.मी. परिघातच आहेत.

वर 'नांदेडचे भाग्य उजळणारे' असे या घराण्याला म्हटले त्याचे कारण म्हणजे या काळात कंधारला[१८] (नांदेड जिल्ह्यातील एक मोठा तालुका) लाभलेले राजधानीचे महत्त्व हे होय. तृतीय कृष्णाच्या काळापासून राष्ट्रकूट स्वतःला कंधारपुरवराधीश्वर असेही म्हणवून घेऊ लागले. याचाच

१५. ठोसर, हरिहर, पूर्वोक्त, पृ. ५४१.

१६. कझेन्स हेन्री, **आर्किटेक्चरल ॲन्टिक्विटीज ऑफ वेस्टर्न इंडीया**, लंडन इंडिया सोसायटी, १९२६, पृ. १.

१७. आळतेकर, ए. एस., **दि राष्ट्रकूटाज ॲण्ड देअर टाईम्स्**, ओरिएन्टल बुक एजन्सी, पुणे, १९३४, पृ. ४८.

१८. **एपिग्राफिया इंडिका**, खंड १५, पृ. १०५-११४.

अर्थ राष्ट्रकूटांनी नांदेड परिसराला राजधानीच्या परिसराचा मान मिळवून दिला, असा होतो. येथे एक नोंद करणे अप्रस्तुत ठरू नये. राष्ट्रकूट घराण्याचा समग्र इतिहास पहिल्यांदाच पुढे आणणारे डॉ. अ. स. आळतेकर काय की फ्लीट काय, या दोघांनाही कंधारपुराचे अस्तित्व माहिती नव्हते. कंधार हे ग्रामनाम काल्पनिक असावे असे आळतेकर मानतात.[१९] फ्लीटलाही कंधारचे अस्तित्व अज्ञातच होते.[२०]

सुमारे ८५ वर्षापूर्वी कंधार येथे एक शिलालेख सापडला. याचा काही भाग उपलब्ध न झाल्यामुळे अक्षरवटिकेवर विसंबून तज्ज्ञांनी याचा काळ म्हणजे तृतीय कृष्णाचा काळ होय असे ठरवले (९३९ ते ९६७) सौंदत्तीच्या रट्टांच्या एका लेखातही तृतीय कृष्णाचा उल्लेख 'कंधारपुरवराधीश्वर' असा आला आहे.[२१] याला कृष्णकंधार असेही म्हणत. या कृष्णराजाने दक्षिणेकडील रामेश्वरापर्यंत धडक दिली होती. पांड्य, केरल यांचा पराभव केला होता. या विजयामुळेच त्याला 'सकलदक्षिणदिग् अधिपती' अशी उपाधी होती. हा जसा पराक्रमी होता तसाच धार्मिकही होता. पराक्रमाबद्दलचा उल्लेख वर आलाच आहे. स्वारीवर गेला असता याने रामेश्वर येथेही कृष्णेश्वर, गण्डमार्तण्ड अशा नावाने देवळे उभारली आणि कंधार या राजाधानीच्या ठिकाणी तर अनेक मंदिरे बांधली. प्रस्तुत कंधार लेखात तेथील राजधानीचा उल्लेख येतो. राष्ट्रकूटांच्या अनेक ठिकाणच्या राजधान्यांचा उल्लेख अनेक अभिलेखातून आढळतो हे खरे पण राजधानीचे प्रत्यक्ष वर्णन मात्र नांदेड परिसरातील कंधार येथील शिलालेखात मिळते. तेव्हा त्यासंबंधी थोड्या विस्ताराने लिहिले पाहिजे.

कृष्ण तिसरा स्वतः येथे वास्तव्याला असल्यामुळे येथे राजवाडा असणे ओघाने आलेच. राजवाड्याच्या प्रवेशद्वाराला मकर आणि यक्ष तोरणांनी सुशोभित केलेले होते. राजधानीत सत्रशाला, विद्यास्थान, राजाच्या मुख्य गणिकांचे वाडे आणि त्यांचे सान्निध्यात कामदेवाचे[२२] मंदिर (हे अखिल महाराष्ट्रात बहुधा एकमेव असावे.) शिवाय इतर देवतांची मंदिरे, पाणी पुरवठ्याची व्यवस्था इत्यादी रचनांचा विचार करता राजधानीची योजना व्यवस्थितपणे केली होती असे दिसते. सहाजिकच राजाच्या वास्तव्याचे अनुमान करता येते. येथे असलेल्या भाट लोकांची उपस्थिती आणि विशेष म्हणजे प्रधान-राजविलासिनींचे वास्तव्य यावरून राजा संबंधीच्या वरील विधानाला बळकटी येते. तो राजा प्रजाहितदक्ष होता असे म्हणता येईल एवढ्या बाबींचा उल्लेख या लेखात आहे. त्याने 'सर्वलोकाश्रय' या सार्थ नावाचा सभामंडप येथे बांधला होता. तो जनसामान्यांच्या अडीअडचणीच्या वेळच्या निवाऱ्यासाठीच बहुधा असावा. एवढेच नव्हे तर आश्रयाला आलेल्यांची अंथरुण-पांघरुणांचीही (प्रवावरण व आस्तरण) सोय केली होती. शिवाय जगतुंगसमुद्र (तलाव) निर्माण केला होता. (अद्यापही तो वापरात आहे).[२३] एवढेच नव्हे तर विद्याभ्यासकाच्या रहाण्या-जेवण्याची, तसेच

१९. कित्ता, पृ.२२, तळटीप ५०.

२०. एस. एम. एडवर्डस् (संपा.), **गॅझेटिअर ऑफ बॉम्बे ॲण्ड सिटी ॲण्ड आयलंड**, भाग-१, १९७७, (मूळ प्रकाशन वर्ष १९०९), पृ. ४१९.

२१. कित्ता.

२२. हा गणिकांचा उपास्य देव असल्याचे हेमाद्री सांगतो, पहा. जोशी महादेव शास्त्री (संपा.), **भारतीय संस्कृती कोश**, खंड २, संस्कृती कोश मंडळ, पुणे, १९७०, पृ. २५६-५७.

२३. पाठक अ. शं., **जगत्तुंग समुद्र-अे क्रिएशन ऑफ द राष्ट्रकुटाज**, बुलेट ऑन वॉटर मॅनेजमेंट इन राष्ट्रकुट पिरियड, २००४, पृ.२०-२३.

वस्त्रप्रावरणाची सोयही केलेली होती. मंदिरे उभारली ती धार्मिक जीवन सुव्यवस्थीत चालावे म्हणून. कालप्रिय (असे एक मंदिर कविकुलगुरु कालिदासाचे वेळी उज्जैनीस होते), कामदेव, मंडलासिद्धी विनायक, बंकेश्वर, सगरेश्वर, वीरनारायण आणि श्रीकृष्णेश्वर अशी ती मंदिरे होती. या शिवाय या परिसरातील म्हणजेच नांदेड सभोवतालच्या सामान्य प्रजाजनांची राजा किती काळजी घेत असे हे पहाणेही उचित होईल.

उन्हाळ्याच्या दिवसात काही शहरातून वाटसरू, पादचारी यांचेसाठी ठिकठिकाणी पाणपोया घातलेल्या आज जशा दिसतात तशा त्या राष्ट्रकूटांचे काळीही होत्या असे कंधारचा लेख सांगतो. पाणपोईला प्रपा म्हणत. त्या पुढील ठिकाणी होत्या : (१) राजवाड्याच्या प्रवेशदाराच्या मकरतोरणाजवळ, राजकाजासाठी येणाऱ्या जाणाऱ्यांची तहान भागावी म्हणून ही योजना होती. (२) प्रधान राजविलासिनींच्या पेठेतील कामदेवाच्या देवळाजवळ, (३) मंडलसिद्धीविनायकाच्या मंदिराच्या यक्ष तोरणयुक्त प्रवेशदाराजवळ, (४) कालप्रियाच्या मंदिराचे प्रांगणात, (लोक श्रध्देने मंदिरात दर्शनाला, पूजेला, श्रवण-कीर्तनाला येतात, तेव्हां येथे प्रपा असणे उचितच होय), (५) शिवाय सर्वलोकाश्रय मंडपाजवळही एका प्रपाची व्यवस्था केलेली होती. अर्वाचीन काळात लोकहितार्थ न करण्यात आलेली आणि सामान्यजनास अवगत नसणारी एक आवश्यक अशी व्यवस्था येथे त्याकाळी केलेली होती, ती होती अग्निष्टिकांची म्हणजेच शेकोटीची. असे दिसते की या संबंधीचा लेखी पुरावा निदान महाराष्ट्रात तरी फक्त नांदेड जिल्ह्यातच उपलब्ध झाला आहे.[२४] तसेच नेवूरगाव शिलालेखातही अशा प्रकारची नोंद उपलब्ध आहे, त्याचप्रमाणे स्थानपोथीतही महाराष्ट्रात असलेल्या विविध अग्निष्टिकांची नोंद आहे.[२५] या अग्निष्टिकांची योजना कंधार या राजधानीच्या ठिकाणी पुढील जागी केली होती. (१) 'सर्वलोकाश्रय' सभामंडपाच्या प्रांगणात, (२) मंगलसिद्धी विनायकाच्या अंगणात, (३) कालप्रियाच्या मंदिराच्या आवारात दोन जागी (दर्शनेच्छूंची बरीच गर्दी येथे होत असणार), (४) जगत्तुंगसमुद्राच्या काठी बांधलेल्या सागरेश्वर मंदिरासमोर आणि (५) नगराच्या उत्तरेला असलेल्या बंकेश्वर मंदिराच्या परिसरात. वर उल्लेखिलेल्या क्षेत्रपाल मंदिराची काही वैशिष्ट्ये तेथे १९८४ मध्ये झालेल्या उत्खननातून उजेडात आली. या मंदिराचे आवार सुमारे २२ मीटर लांबीचे आणि १५ मीटर रुंदीचे होते. त्यातील वास्तुपुरुषाच्या आकारात बांधलेले १८.४० मीटर लांबीचे मंदिर होते. अशा प्रकारचे मंदिर इतरत्र क्वचितच आढळेल. अशा अनोख्या आणि मोठ्या, भव्य आकाराच्या मंदिरात जमणाऱ्या भक्तांची संख्याही मोठीच असणार. सहाजिकच त्या आवारात दोन ठिकाणी अग्निष्टिकांची सोय करावी लागली असणार. अशा रीतीने प्रपा आणि अग्निष्टिका यांची जनहितासाठी सोय करून भागेल असे तत्कालीन शासनाला वाटले नसणार. कारण तेथे लोकांसाठीच केवळ नव्हे तर प्राण्यांसाठीही क्षुधाशांतीची सोयही केलेली होती. भुकेजलेल्यासाठी अन्नछत्र आणि बाजाराला आलेल्या बैल, घोडे इत्यादीसाठी चाऱ्याची सोय केलेली होती. थोडक्यात असे की नांदेड परिसराला प्रजाहितदक्ष, ज्ञानार्जनाची चाड असलेले आणि नागरी सुविधांसाठी तत्पर असलेले शासन लाभले होते.

---

२४. पाठक, अ.शं., **गोदावरी खोरे : एक सांस्कृतिक अभ्यास** (महानुभाव स्थानपोथीच्या विशेष संदर्भात), पी.एचडी. अप्रकाशित प्रबंध, औरंगाबाद विद्यापीठ, १९८५.

२५. कित्ता ; कोलते, वि. भि. (संपा.), **स्थानपोथी**, अरुण प्रकाशन, मलकापूर, दुसरी आवृत्ती, १९७६.

कंधार तालुक्यातील कपिथक म्हणजे कवठा हे गोदावरीकाठचे एक गांव. याला ऐतिहासिक महत्त्व प्राप्त होण्याचे कारण म्हणजे चतुर्थ गोविंद या राष्ट्रकूट राजाचा येथे झालेला पट्टबंधोत्सव. म्हणजे राष्ट्रकूटांचे दृष्टीने या काळापर्यंत नांदेड परिसराचे महत्त्व होते.[२६]

राष्ट्रकूटांची लहानमोठी अशी अनेक घराणी होती, उदाहरणार्थ सातारा जिल्ह्यातील माण येथील घराणे. आपल्या दृष्टीने महत्त्वाचे ठरते ते औंढा (प्राचीन अमर्दकपूर) जि. परभणी येथील रट्ट घराणे. या अमर्दकपुराचा उल्लेख गुजरात, राजस्थान आणि मध्य प्रदेशातील शिलालेखांतून आढळतात. दक्षिणदेशाचे महत्त्वाचे नगर म्हणून पुराणात याचा उल्लेख येतो. देवपाल, पुत्र विक्रम व नातू बल्लाळ अशी या रट्ट राजाची वंशावळ शिलालेखावरून कळते.

या रट्टांची उपराजधानी अर्धापूर (प्राचीन अराध्यपूर) जि. नांदेड येथे होती. अर्धापूर येथील लेखात ही माहिती येते. येथे राजवाडे व देवळे उभारलेली होती. एक मोठा कर्दलय नावाचा तलावही खोदला होता. बल्लाळ राजाचा सेनापती चाऊंड याचे येथे मुख्य कार्यालय होते.

**कल्याणी चालुक्य :** राष्ट्रकूटांनंतर या भागावर राज्य केले ते कल्याणीच्या चालुक्य वंशीय राजांनी. महाराष्ट्राच्या अन्य कुठल्याही प्रदेशापेक्षा नांदेड आणि उस्मानाबाद या जिल्ह्याशी या घराण्याचा निकटचा संबंध होता. आणि आतापर्यंतच्या कोणत्याही राजकुलापेक्षा या राजकुलाच्या कारकीर्दीसंबंधी येथील शिलालेखातून मोठ्या प्रमाणात माहिती मिळते. एकट्या नांदेड जिल्ह्यातच त्यांच्या काळातील चाळीसच्या वर शिलालेख उपलब्ध झाले आहेत.[२७] वन्हीकुल, वाजीकुल अशा त्यांच्या मांडलिकांची घराणी व प्रमुख केन्द्रे या भागात असल्याचे त्यावरुन कळते. त्यांचे पराक्रम कळतात. त्यांनी, त्यांच्या मांडलिकांनी आणि अधिकाऱ्यांनी उभारलेली मंदिरे, खोदलेले तलाव आणि स्थापन केलेल्या पाठशाळा ह्यांची माहिती मिळते आणि नांदेड परिसरातील सांस्कृतिक स्थितीवर प्रकाश पडतो. याच्या पैकी सोमेश्वर पहिला (इ. स. १०६८ ते १०७६) हा पराक्रमाचा चाहाता होता आणि त्याचा सरसेनापती विलक्षण पराक्रमी होता, हे ही कळते. देगलूरजवळच्या तडखेल या गावी एक मोठा शिलालेख आहे. त्यात म्हटले आहे की वाजी कुलोत्पन्न नागवर्मा सेनापती याने गाजवलेला पराक्रम राजाला फार महत्त्वाचा वाटला. राजाने षोडशमहादान समारंभ प्रसंगी या नागवर्म्याला बोलावून घेऊन त्याचा विवाह साजरा केला आणि तत्प्रीत्यर्थ तडखेल हे गांव त्याला भेट दिले.

या कल्याणीच्या चालुक्यांची राजवट नांदेड परिसराच्या दृष्टीने हितकर ठरली असे इतिहासाचा मागोवा घेता म्हणता येते. या काळात या परिसरात कितीतरी मंदिरे उभारली गेली. पैकी होट्टल, मुखेड, खानापूर, बाऱ्हाळी, सुगाव, एकलारे, येरगी, सगरोळी, संगम करडखेड, तडखेल इत्यादी ठिकाणच्या मंदिरांची माहिती मिळते. तर पहिल्या चार-पाच ठिकाणांची देवळे आजही तग धरून आहेत. वास्तवात स्थानिकांनी, वा शासनाने यासाठी कांही केले असे दिसत नाही. यादव काळातनंतर तर येथे मुस्लिम सत्ताधारीच होते.

---

२६. ठोसर, हरिहर, पूर्वोक्त, पृ. ५१०.

२७. रित्ती, श्रीनिवास व शेळके,जी.सी., **इन्स्क्रिप्शन्स फ्रॉम नांदेड डिस्ट्रिक्ट**, यशवंत महाविद्यालय, नांदेड, १९६८, पृ. २१.

Maharashtra State Gazetteers

या मंदिरांच्यामुळे केवळ धार्मिक परिस्थितीच कळून येते असे मानणे म्हणजे भारतीय जीवनातील मंदिरांचे प्रयोजन कळले नाही असा अर्थ होतो. मंदिर म्हणजे सामाजिक संस्था या दृष्टीने त्याचेकडे पहायला हवे. ही मंदिरे उभारण्यासाठी सूत्रधार, स्थपती, शिल्पी, कलाकार, जाणकार मूर्तिशास्त्रज्ञ, कारागीर, कामगार यांची आवश्यकता असते. राजांनी वा अधिकाऱ्यांनी मंदिरे उभारल्याची नोंद जेव्हां अभिलेखातून कळते तेव्हां त्यांनी फक्त खर्चाची बाजू सांभाळलेली असते. 'अगा नगर रायें केलें | या म्हणण्या साचपण कीर आले | परि निरूते पाहतां काय शिणले | रायाचे हात (ज्ञानेश्वरी, ९ ओवी ११०). श्रीज्ञानेश्वर म्हणतात ते खरेच आहे. राजाने नगर उभारले असे म्हणणे रूढ झाले असले तरी खरे पाहू जाता राजाच्या हाताला काहीच कष्ट झालेले नसतात. मंदिरांच्या बाबतीतही हेच खरे होय. मूर्ती कशा प्रकारे घडवायच्या हे ठरवण्यास तज्ज्ञ मूर्तिशास्त्रज्ञ, कलाकुसर कोणती, कोठे करायची या साठी जाणकार कलाकारांची आवश्यकता, सुतार, गवंडी, पाथरवट ही मंडळी उपलब्ध असावी लागतात आणि ही नांदेड परिसराच्या बाहेरून आयात केली होती असा कोणत्याही लेखात उल्लेख नाही. शिवाय येथे मंदिरात पाठशाळा चालविल्या जात. त्या निवासी पद्धतीच्या असत. ज्ञानेश्वर पंडितासारखे विद्वान अध्यापन करीत असत. या विद्यार्थ्यांना भोजन तर मिळेच पण त्यांच्या कपड्यालत्त्याचीही सोय केली जात असे. कंधार, होट्टल, सगरोळी, तडखेल, करडखेड येथील घटिकास्थान (पाठशाळा) व महाघटिकास्थानातून धर्मशास्त्र, खगोल, भूमिती इत्यादी विषयात पारंगत झालेले विद्यार्थी, आणि वडिलोपार्जित परंपरेने चालत आलेले कलांच्या संबंधीचे ज्ञान आणि सराव असलेले कुशल कलावंत-कारागीर यांनी मिळून नांदेड परिसर ज्ञानसमृद्ध व कलासंपन्न केल्यामुळे त्याला देखणेपण लाभले. पुष्करण्या निर्माण केल्या, तलाव खणले, जनतेच्या व शेतीच्या पाण्याची सोय केली.

मूर्तिशास्त्राच्या दृष्टीने या काळात महत्त्वपूर्ण भर घातली गेली. नृत्यगणेश, नटराज, अकरा रूद्र, सप्तमातृका, गजलक्ष्मी, सरस्वती, चामुंडा, महिषासुरमर्दिनी, ज्येष्ठा इत्यादी देवदेवता येथे कोरल्या गेल्या तर शत्रूमर्दिनी, नूपुरपादिका, मर्दला, केतकीभरणा, पुत्रवल्लभा, रती, कर्पूरमंजरी या देखण्या सुरसुंदरींनी मंदिरांचे बाह्यभाग शोभिवंत केले.

कंधारपुरला राजधानी स्थापणारे राष्ट्रकूट पुढे कल्याणी चालुक्यांचे मांडलिक म्हणून अकराव्या शतकात राहात होते.[२८] कंधारच्या किल्ल्यात मिळालेल्या सहावा विक्रमादित्य याच्या काळातील लेखात धल्लदेव (महादंडनायक) व त्याचा सेनापती पुत्र भीमनाथ हे तेथे अधिकारपदावर होते.[२९] चालुक्यांची दुसरी दोन मांडलिक घराणी वन्हीकुल व वाजीकुल नांदेड परिसरातच नांदत होती. करडखेड (ता. देगलूर) येथील या घराण्याची वंशावळ पुढे एके ठिकाणी दिली आहे. बदामी चालुक्यांच्या काळात नांदेडला 'नंद्याल' म्हणत तर कल्याणी चालुक्यांचे काळात हे 'नंदीतट' म्हणून ओळखले जाई. देगलूरच्या पंचक्रोशीत असलेल्या होट्टल (प्राचीन पोट्टल) येथे कल्याणी चालुक्यांचे तीन शिलालेख उपलब्ध झाले. विशेष म्हणजे द्वितीय जयसिंह जगदेकमल्ल याची होट्टल ही राजधानी होती. तेथे त्याच्या

---

२८. ठोसर, हरिहर, पूर्वोक्त, पृ. ५०५.

२९. **बुलेटिन ऑफ दि डेक्कन कॉलेज रिसर्च इन्स्टिट्यूट**, खंड ५०, पुणे, पृ. २७७-२०८.

सोमलदेवी आणि बिज्जलदेवी यांचा निवास होता (रायचूर जिल्ह्यातील सन १०२९ व ३१ चे लेख)[३०] म्हणजे या चालुक्य राजवटीत नांदेड परिसराला केवढे महत्त्वाचे स्थान लाभले होते हे कळते आणि हे महत्त्व बदामी चालुक्यांच्या काळापासून होते.[३१] नांदेड जिल्ह्यात मिळालेल्या द्वितीय, तृतीय व चतुर्थ सोमेश्वर आणि षष्ठ विक्रमादित्य यांच्या अनेक लेखावरून कल्याणी चालुक्यांचे दृष्टीने या परिसराला बरेच महत्त्व होते असे दिसते. कल्याणी चालुक्यांच्या राजांची माहिती नांदेड परिसरात उपलब्ध झालेल्या शिलालेखातून पहाणे उपयुक्त ठरेल.

**विक्रमादित्य सहावा :** चालुक्यांच्या इतिहासातील समृध्द कालखंडाचा हा निर्माता होय. याची पन्नास वर्षांची प्रदीर्घ कारकीर्द होती. हा नित्यशः (प्रतिदिनी) भूमिदान करीत असे असा उल्लेख आढळतो. असे म्हणतात दख्खन आणि कर्नाटकात कल्याणी चालुक्यांचे सर्वाधिक अभिलेख उपलब्ध झालेत आणि त्यात सगळ्यात अधिक आहेत ते सहाव्या विक्रमादित्याचे. विशेष म्हणजे नांदेड परिसरातच त्याचे एकोणीस लेख सापडले आहेत.[३२] इतरत्र सापडलेल्या शिलालेखातून कळते त्यापेक्षा येथील लेखातून त्याच्या काही मुख्याधिकाऱ्यांची आणि राज्यांची माहिती नव्याने पुढे आली आहे.

**काही नवे अधिकारी :** येरगी लेखात (क्र.९) दण्डनायक चट्टपय्य याची ओळख होते. ह्याच्याकडे माणिकभाण्डारिग अशीही जबाबदारी होती. महामण्डलेश्वर सामंत ठाकूर याचीही नव्यानेच माहिती मिळते. तसेच पसायित योकपय्या किंवा ओक्करस हा सावरवल्ली (सगरोळी) येथील सोमेश्वराच्या मंदिराला भूमिदान करणारा अधिकारीही नव्यानेच ज्ञात होतो. (क्र.१४ व १८), 'तैलप देवन चित्तसंतोष' असा याचा उल्लेख केलेला आहे. म्हणजेच हा विक्रमादित्याच्या तैलपदेव नामक पुत्राचा आवडता होता असे दिसते. तर करडखेड लेखातून (क्र.१५) आणखी एका अधिकाऱ्याचे नाव पुढे येते. ते आहे महामंडलेश्वर मदनकर्णरस. एवढ्यावर ही यादी संपत नाही. तृतीय सोमेश्वर चालुक्याच्या अनेक लेखात उल्लेखलेला बिम्रा (बिमरा) येथील रेवणेश्वर देवालयांला दान देणारा येरम्मरस हा आणखी एक अधिकारी.

अधिकाऱ्यांची नव्याने माहिती इकडील लेखातून जशी उपलब्ध होते तशीच ती विक्रमादित्याच्या राण्या आणि पुत्र यांच्या बाबतीत मिळते. मल्लणीदेवी आणि सुग्गलदेवी, मलयमतिदेवी या ह्या राण्या. पैकी तिसऱ्या राणीची माहिती परिसराबाहेरच्या लेखातून कळते. वाजी कुलाचा नागराज हा मल्लणीदेवीच्या राजवाड्यातील कोषागाराचा प्रमुख होता, या माहितीवरून ही राणी महत्त्वाचा अधिकार बाळगून होती असे अनुमान करता येते. तर नागराजाच्या वडिलांनी उभारलेल्या रेवणेश्वराच्या देवालयाला दान देणारी म्हणून सुग्गलदेवीचा उल्लेख येतो.

विक्रमादित्याच्या मल्लिकार्जुन आणि तैलपरस या राजपुत्रांची नावेही येथील लेख देतात. संगम (क्र. २० व २१) आणि सगरोळी (क्र.१४) या लेखातून ही माहिती पुढे येते. विक्रमादित्याच्या एका लेखात तर मल्लिकार्जुनाचा उल्लेख 'युवराज' असाच केलेला आहे. तर मल्लिकार्जुनाचा अमात्य

---

३०. या घराण्याची सविस्तर माहिती याच प्रकरणाच्या पुढील भागात दिली आहे.

३१. ठोसर हरिहर, **स्टडीज इन इंडियन प्लेस नेम्स**, म्हैसूर, १९८९, खंड ११, पृ. ११-१८.

३२. येथे कंसात दिलेले अभिलेख क्रमांक हे **इन्स्क्रिप्शन्स फ्रॉम नांदेड डिस्ट्रिक्ट** या ग्रंथातील आहेत.

म्हणून ब्रह्मशर्मा आणि सेवेत असलेला त्याचा धाकटा भाऊ यांच्यामुळे मल्लिकार्जुनाकडे नांदेड परिसरातील कोणत्यातरी प्रदेशाच्या राज्यकारभाराची जबाबदारी असावी असे वाटते. तर विक्रमादित्याचा कनिष्ठ पुत्र तैलपदेव हा सगरोळीच्या भोवतालच्या प्रदेशाचे प्रशासन पहात असावा असे दिसते.

बिम्रा (ता. देगलूर) या उपरोल्लेखित दीर्घ लेखातून कांही विशेष माहिती या चालुक्य घराण्यासंबंधात पुढे आलेली आहे. (१) यातील वंशावळीत आधी बदामीच्या चालुक्य नृपांची नावे येतात आणि या घराण्याच्या अधोगतीला द्वितीय कीर्तिवर्म्याचे नाकर्तेपण कारणीभूत होते; (२) कार्तिकेयाने कृपावंत होऊन या घराण्याला मयूरध्वज दिला, महिषासुरमर्दिनीने सहा शुभ्र छत्रे दिली आणि अच्युत (विष्णू) याने वराहमुद्रा दिली, (३) दुर्गा ही या घराण्याची कुलस्वामिनी होती.

**तृतीय सोमेश्वर :** या परिसरात प्रामुख्याने देगलूर तालुक्यात मिळालेल्या पाच शिलालेखांतून[३३] याच्या राजवटीतील अधिकाऱ्यांच्या हालचालीची माहिती प्राप्त होते. महामंडलेश्वर येरम्मरस हा एरड-इरच्छासिर-बाड या दोन हजार गावे समाविष्ट असलेल्या विभागावर अधिकारी होता. रूद्रदंडाधिप (म्हणजे कोषागार आणि सैन्य यांचा प्रमुख) आणि महाप्रधान या दोन मोठ्या हुद्देदारांची माहिती मिळते. श्रीधर या महाप्रधानाकडेच राणीवशातील मनेवेरगड्डे हे पद आणि अवरवाडी ७०० या प्रदेशाचा करभार होता.

**द्वितीय जगदेकमल्ल :** याचे दोनच शिलालेख या भागातून प्राप्त झाले आहेत. मात्र त्यातून एरिगे अग्रहार (सध्याचे येरगी गांव) आणि महामंडलेश्वर येरम्मरस याचे उल्लेख आढळतात.[३४]

उपरनिर्दिष्ट सहावा विक्रमादित्य, तिसरा सोमेश्वर आणि दुसरा जगदेकमल्ल यांच्य अधिपत्याखालील प्रदेश, त्यांचे मंत्री, सेनापती, राज्यपाल, कोष प्रमुख, इत्यादींची जी माहिती मिळते त्यावरून, शिवाय या काळात उभारलेल्या मंदिरांवरून कल्याणी-चालुक्यांच्या काळात नांदेड परिसराला प्राप्त झालेल्या महत्त्वाचे, वैभवाचे आकलन होते.

**कलचुरी कालखंड**[३५]**:** इतिहासात अगदी थोड्या वर्षांचा कालखंड या घराण्याच्या नशिबी आला होता; अवघ्या २२-२४ वर्षांचा तो कालखंड होता.

कल्याणीच्या चालुक्यांचे राज्य चालू असता त्यांत मध्येच खंड पडला तो या घराण्याच्या राज्यकालामुळे. प्रस्तुत घराण्याला मराठवाड्याचे कलचुरी असे म्हणता येईल. यांचा असा उल्लेख इतरत्र आढळत नाही. भारताच्या फार मोठ्या प्रदेशावर आणि तेही हजार-बाराशे वर्षे राज्य करणाऱ्या प्रख्यात कलचुरी घराण्याशी तसा यांचा संबंध नव्हता. श्री. वा. वि. मिराशी यांच्या 'कलचुरी नृपति आणि त्यांचा काळ' या ग्रंथातही यांचा उल्लेख आलेला नाही. विशेष म्हणजे कल्याणी चालुक्यांचा इतिहास लिहिणाऱ्या सगळ्यांना या कल्याणी-कलचुरींवर लिहावे लागलेच आहे.

---

३३. रित्ती व शेळके (संपा.), पूर्वोक्त, क्र. २८ ते ३२ चे शिलालेख.

३४. कित्ता, क्र. ३४ व ३५ चे शिलालेख.

३५. देगलूरकर गो. बं., 'मराठवाड्याचे कलचुरी', **विदर्भ संशोधन मंडळ वार्षिक**, नागपूर, १९६८.

चालुक्य सहावा विक्रमादित्य याचा सासरा होता जोगमरस कलचुरी हा महामंडलेश्वरही होता. पेर्माडिदेव (हेमाडी) हा जोगमरसचा मुलगा. हा तृतीय सोमेश्वर याचा मांडलिक (सन ११२९) होता. पित्याप्रमाणे हाही सध्याच्या उस्मानाबाद-सोलापूर प्रदेशावर ताबा ठेऊन होता. याचा मुलगा बिज्जल हा तृतीय तैल चालुक्याचा आधी महामंडलेश्वर होता. तैल राजा निष्प्रभ होता. त्यामुळे बिज्जलाने साम्राज्याची सर्व सूत्रे आपल्या हाती घेतली. स्थिरस्थावर झाल्यावर सन ११६२ मध्ये ' समस्तभुवनाश्रय श्रीपृथिवीवल्लभ महाराजाधिराज परमेश्वर परम भट्टारक ' ही बिरुदे घेतली आणि सम्राट म्हणून हा कारभार करु लागला. बिज्जलाचा बसवेश्वर नामक खजिनदार होता. त्याने बंड केले. त्यात बिज्जल मारला गेला. वीरशैव पंथाचा प्रणेता म्हणून पुढे हा बसवेश्वर प्रसिद्ध झाला.

इकडे, बसवेश्वराच्या बंडाचा बिमोड करण्यात बिज्जल गुंतला असता यादव राजा मल्लुगी याने गजदलप्रमुख दद्द याच्या मदतीने कलचुरी-सैन्याचा पाडाव केला. बिज्जलानंतर सोमेश्वरापासून सिंघणापर्यंत कलचूरी गादीचे सर्वच वारस निष्प्रभ ठरल्यामुळे सन ११८३ नंतर कलचुरी घराणे नामशेष झाले[३६] आणि पुन्हा कल्याणीचे चालुक्य सत्तेवर आले.

जुन्नीचा (ता. बिलोली, जि. नांदेड) उल्लेख कलचुरी-लेखात आहे. विषय या प्रशासकीय विभागाचे हे मुख्य केन्द्र होते. कलचुरींनी येथील मंदिरांना आणि ब्राह्मणांना दाने दिल्याच्या नोंदी त्यात आहेत.[३७]

बिज्जलाला चार मुलगे होते. विशेष म्हणजे बिज्जलानंतर त्यांनी क्रमाने कल्याणीहून राज्यकारभार चालवला होता. पैकी पहिला पुत्र सोमेश्वर याने ११६५ पासूनच राज्यकारभारात लक्ष घातले होते. तो कुंतलभूपति म्हणून संबंधिला जाई.[३८] याने रायमुरारी अशी पदवी धारण केली होती. सोमेश्वरानंतर त्याच्या संकम व आहवमल्ल या भावांनी क्रमाने राज्य केले. सिंघण हा बिज्जलाचा चौथा पुत्र हा या घराण्याचा शेवटचा राजा. याच्या महाप्रधानाने अंबाजोगाई येथे भोगादित्याचे मंदिर बांधल्याचा उल्लेख तेथील लेखात आहे. (तेथे सध्या मशीद आहे). सिंघण फक्त केवळ एक वर्षच राज्य करू शकला. नंतर या घराण्याचे राज्य लयाला गेले.

या कलचुरींनी सुरू केलेला संवत अत्यंत अल्पजिवी ठरला.

**यादव कालखंड :** महाराष्ट्रभर केवळ नव्हे तर त्या बाहेरच्या विस्तृत प्रदेशावर राज्य करणारे हे यादवांचे घराणे. महाराष्ट्र महोदयाच्या इतिहासाच्या उषःकाली सातवाहनांचे साम्राज्य जेवढ्या महत्त्वाचे होते तेवढेच प्राचीन काळाच्या शेवटी या यादव घराण्याचे महत्त्व होते. सहाजिकच संपूर्ण नांदेड परिसर त्यांच्या अधिपत्याखाली होता.

हे यादव राजे इसवीसनाच्या बाराव्या शतकाच्या शेवटच्या चतुर्थकात महत्त्वाला चढले, या घराण्यातील आधीचे राजे खानदेशात (सेऊणदेश) चालुक्यांचे मांडलिक म्हणून रहात होते. पांचव्या भिल्लमाने देवगिरी हे नगर वसविले आणि तेथे आपली राजधानी हलविली. तेव्हां पासून मराठवाडा महत्त्वाचा ठरला. कृष्णेच्या उत्तरेकडील सारे राज्य याच्या ताब्यात होते.

---

३६. पानसे मु. ग., **यादवकालीन महाराष्ट्र**, मुंबई ग्रंथ संग्रहालय, मुंबई, १९६३. पृ. २७.

३७. रित्ती व शेळके, पूर्वोक्त, क्र. ३९.

३८. मुजुमदार, आर. सी., व पुसाळकर, ए. डी. (संपा.), **हिस्टरी अँड कल्चर ऑफ दि इंडियन पीपल**, भाग ५, भारतीय विद्याभवन, मुंबई, १९५४. पृ. १८१.

Maharashtra State Gazetteers

रट्ट घराण्याच्या बल्लाळाची अमर्दकपूर (औंढा, जि.परभणी) येथे राजधानी होती आणि उपराजधानी होती अराध्यपूर (अर्धापूर, जि. नांदेड) येथे.[३९] या ठिकाणी बल्लाळाचा सेनापती चाऊंड याचा निवास असे. नांदेड परिसराशी यादवांचा संपर्क आल्याची नोंद अर्धापूर शिलालेखात आली आहे. यादव मल्लुगी यास बल्लाळाने संकटमुक्त होण्यास सहाय्य केले. सेनापतीद्वारे, पर्णिखेट (परभणी) येथील हेमाद्रीदेवाशी झालेल्या लढाईच्या वेळचा हा प्रसंग असावा. वरील अर्धापूर लेखात बल्लाळाला 'यादवराज्य स्थैर्याचार्य' असे संबोधिलेले आहे ते बहुधा यामुळेच होय. पुढे मल्लुगीचा राज्यकारभार परभणीहूनच होऊ लागला. येथेच नारसिंही देवीच्या कृपेने त्याला पुत्र प्राप्त झाला, तोंच द्वितीय सिंघण होय. रट्ट बल्लाळ निपुत्रिक होता. त्याच्या मृत्यूनंतर या सिंघणाने अर्धापूरचा ताबा घेतला आणि त्याचा कारभार सर्वाधिकारीपदावरील लखण (लक्ष्मण) पंडित याच्याकडे सोपवला. ही घटना असावी इ. स. १२१० नंतरची. इ. स. या आधी पंचम भिल्लम यादवांचा राजा झाला. मल्लुगी नंतर भिल्लम (सन ११८४ ते ११९१)[४०] राज्यावर आला. याने यादवांच्या राज्याची हद्द कृष्णानदीपर्यंत नेऊन पोचवली. ओघानेच येते की नांदेड परिसर याचे ताब्यात असणार. हाच यादवांची देवगिरी येथे राजधानी करणारा पहिला यादव सम्राट. याने कल्याणी चालुक्य आणि मराठवाड्याचे कलचुरी या घराण्यांचा शेवट केला. या नंतर जैत्रपाल हा यादवांचा राजा झाला. याने काकतीयांच्या गणपतीला देवगिरीच्या दुर्गात कारावासात ठेवले होते. पुढे त्याला मुक्त केले व काकतीय गादीवर बसविले.

जैत्रपालाचा (इ.स. ११९१-१२१०) राज्यविस्तार पाहता नांदेड परिसर त्याच्या राज्यात मोडत होता हे स्पष्ट होते. पुढील राजा सिंघण (इ.स. १२१०-१२४७) याने रट्ट बल्लाळाचे राज्य ताब्यात घेतले होते असा उल्लेख वर आलेलाच आहे. यादव राजांच्या काही लेखातून कंधारचा खंदार[४१] असा उल्लेख आढळतो. त्यांच्या राज्यात हा 'देश' विभाग होता व खंदार हे त्याचे मुख्य ठाणे होते. गोपालदेव हा याचा प्रशासक होता. ही माहिती कान्हरदेव (कृष्ण) यादवाच्या कान्हेगाव लेखावरून उपलब्ध होते.[४२]

रामदेवाला दिल्लीच्या सुलतानांच्या आक्रमणामुळे राज्य गमवावे लागले (सन १३०९) आणि शंकरदेव, हरपालदेव यांच्यानंतर सन १३१८ मध्ये यादवांचे राज्य कायमचे बुडले. महाराष्ट्रावर मुसलमानी सत्तेचा अंमल सुरू झाला, नांदेड परिसर त्याला अपवाद नव्हता. यादवांच्या नंतर येथील जीवन विस्कळीत झाले. सांस्कृतिक जीवनाची तर वाताहत झाली.

यादवांच्या कारकिर्दीतही मंदिरे उभारण्याचा चालुक्यांचा वारसा पुढे चालू राहिला. यादवकाळी जी मंदिरे उभारली गेली त्याला लोकभाषेत हेमाडपंती मंदिरे म्हणतात तर शास्त्रीय भाषेत ती भूमिज म्हणून ओळखली जातात. अर्धापूरात द्विदल म्हणजे दोन गर्भगृह व एकच सामायिक मंडप असलेले मंदिर याच काळात उभारले गेले. जुन्नी, उन्हकदेव व राहेर येथेही अशी मंदिरे उभारली गेली. तुलनेने येथली सर्व मंदिरे लहान आणि साधी आहेत.

---

३९. ठोसर, हरिहर, पूर्वोक्त, पृ. ४३९.

४०. पानसे, मु.ग., पूर्वोक्त, पृ. २७.

४१. तुळपुळे शं. गो., **प्राचीन मराठी कोरीव लेख,** पुणे युनिव्हर्सिटी, पुणे, १९६३, अभिलेख क्र. ३१.

४२. ठोसर, हरिहर, पूर्वोक्त, पृ. क्र. ५०६.

Maharashtra State Gazetteers

## परिसरातील काही मांडलिक घराणी[४३]

कल्याणी चालुक्यांच्या राजवटीत या परिसरात काही मांडलिकांची घराणी उदयास आली होती, त्यांची नोंद घेणे आवश्यक ठरते. पैकी पहिले घराणे अमर्दकपूरचे रट्ट घराणे होय. याची उपराजधानी नांदेड जवळील अर्धापूर येथे होती. अमर्दकपूर (सध्याचे औंढा नागनाथ) येथून रट्ट राजा बल्लाळ राज्य करीत होता. इतरत्र त्याची माहिती आपण घेतली आहेच. त्याची वंशावळ अशी :—

देवपाल
।
विक्रमार्क
।
बल्लाळ = पोम्मलदेवी

बल्लाळ याचे एक बिरूद होते कपिध्वजालब्ध वरप्रसाद. कपिध्वजा ही देवी कोणती हे मात्र अजून कळले नाही. अर्धापूर लेखात त्याने अर्धापूर, बारसग्राम आणि करकरीग्राम येथे भूमिदान दिल्याचे उल्लेख आहेत. तसेच जुन्नी विभागातील प्रत्येक गावातून निधी गोळा करण्याची व्यवस्था केली होती असे म्हटले आहे. याचा अर्थ नांदेड परिसराच्या काही भागावर याचा अधिकार होता असा होतो.

येथील दुसरे घराणे वाजी नामक होते. दक्षिणेत अनेक ठिकाणी यांचे शिलालेख उपलब्ध झाले आहेत. कदाचित या नावाची अनेक घराणी असावीत, कारण त्यांचे पारस्परिक संबंध दाखवणे अशक्य झाले आहे. खुद्द नांदेड परिसरात या नावाची दोन घराणी एकमेकांशी संबंध नसलेली नोंदवलेली आहेत.

चालुक्य प्रथम सोमेश्वर याच्या काळच्या कौण्डिण्य गोत्राच्या एका वाजी कुलाचा लेख तडखेल (ता. देगलूर) येथे आढळला. त्यात या कुलाची वंशावळ येते ती अशी :—

आदित्य
।
प्रथम नागादित्य
।
गोविंद
।
द्वितीय नागादित्य

| | | |
|---|---|---|
| । | । | । |
| कालिदास | प्रथम नारायण | आयचा पार्य |
| | = सायिकब्बे (पत्नी) | |
| । | । | । |
| नागवर्मा | मादिराज तथा माधव | कन्या |
| = पत्नी अक्षाम्बिके | | |
| । | | |
| द्वितीय नारायण | | |

४३. या सर्व मांडलिक घराण्यांची माहिती ठोसर, हरिहर, पूर्वोक्त आणि रित्ती व शेळके, पूर्वोक्त यातून मिळालेली आहे.

Maharashtra State Gazetteers

यांचेपैकी नागवर्मा आणि मादिराज (माधव) हे सोमेश्वराच्या सैन्यात मोठ्या पदावर कार्यरत होते. नागवर्मा फार पराक्रमी होता. सोमेश्वराचा जणू उजवा हातच होता. लवकरच तो सरसेनापती झाला. तो पुढे दुसरा सोमेश्वर याच्या काळातही याच पदावर राहिला.

दुसऱ्या वाजी कुलाची माहिती बिम्रा लेखातून आलेली आहे. हे मांधाता गोत्राचे कुल होते. सहाव्या विक्रमादित्याचे काळात हे होते. कलुंबरक (कलंबर) गावाचे हे होते. कुंतलदेशाच्या सायिरबाड १००० गावांच्या प्रदेशातील अवरवाडी ७०० विभागात हा गाव होता. या कुळाची वंशावळ होती ती अशी :—

गोपालक्रमित
।
प्रथम रेवणय्य
।
मधुसूदन = गोविंदकब्बे (पत्नी)
।
रेवणय्य (दुसरा) = नालिकब्बे (पत्नी)
। । । । ।
देवपार्थ मधुसूदन नागराज रामदेव गोविंद

दुसऱ्या रेवणय्याने रेवणेश्वराचे मंदिर उभारले, नागराजाने त्याचा जीर्णोध्दार केला आणि सहाव्या विक्रमादित्याच्या सुग्गलदेवी या राणीला या मंदिराला जमीन देण्याला प्रवृत्त केले.

**वन्ही वा पावक कुल :**

नांदेड परिसरातील अनेक शिलालेखात या कुटुंबांचा उल्लेख येतो. करडखेड येथील लेखात प्रथमच या कुलाची माहिती येते. द्वितीय सोमेश्वराच्या राजवटीत होट्टल येथे या कुलाची वसती होती. विक्रमादित्याच्या कारकिर्दीतील करडखेड येथील लेखात म्हटले आहे की, अगस्त्य ऋषींच्या अग्निकुंडातून हे वन्ही कुल उद्‌भूत झाले. त्यातून वर आला तो मानसिद्धी किंवा मुनीमनासिद्धी (होट्टल लेख क्र. ३३), तर करडखेड लेखात (क्र. २४) नाव येते ते धोरा असे. होट्टल लेखाप्रमाणे हा चालुक्यांच्या दुसरा तैलचा आणि परमार मुंजाचा समकालीन होता. दुसरा तैल हा याचा अधिपती असल्यामुळे मुंजाच्या विरुद्धच्या लढाईत याने त्याची बाजू घेतली. या कुलातील कर्क (अर्ग) हा नावाजलेला होता. होट्टल लेखानुसार तो २००० गावांच्या प्रदेशाचा मुख्य होता. वस्तुतः हजार हजार गावांचे हे दोन विभाग होते. याने सोमनाथ, ढोरेश्वर, कलिचोरेश्वर आणि प्रसन्न भैरव ही मंदिरे उभारली व सन १०७९ मध्ये त्या मंदिरांना देणग्या दिल्या. द्वितीय कलिचोर हा त्याचा भाऊ. त्याची पत्नी रेब्बलदेवी फार कर्तबगार होती असे आदमपूर लेखावरून कळते. या लेखात तिला (सन १११६) महामंडलेश्वरी असे संबोधिले आहे. म्हणजेच मांडलिक वा राज्यपाल असे तिला म्हटले आहे. निदान तसा दर्जा तिला देण्यात आला असावा. अशा अधिकाराचे पद दिले गेलेल्या स्त्रीचे हे पहिलेच उदाहरण. हा मान

नांदेड परिसराला मिळाला ही ऐतिहासिक महत्त्वाची घटना मानावी लागते. या कुलाची वंशावळ अशी :—

धोर

।

उत्तम

।

प्रथम कलिचोर = रेब्बलदेवी (१०७९)

।

द्वितीय कलिचोर = रेब्बलदेवी कर्क वा अर्ग
(लेख सन ११०८, १११३, १११६, ११२२)[४४]

।

तृतीय कलिचोर

## प्रशासकीय विभाग

**प्रशासन विभाग आणि प्रशासन-अधिकारी**[४५].—राज्याचे प्रशासन व्यवस्थित चालायचे तर शासन यंत्रणा सुचारू रितीने कार्यान्वित करण्यासाठी त्याची लहानमोठ्या प्रदेशात विभागणी करणे आवश्यक ठरते. त्यानंतर त्या त्या विभागाची व्याप्ती, महत्त्व आणि आवश्यकतेनुसार अधिकारपरत्वे योग्य त्या दर्जाच्या माणसाची नेमणूक करावयाची ही प्राचीन काळापासूनची परंपरा. महाराष्ट्रावर राज्य करणाऱ्या सगळ्याच राजवंशांनी ही परंपरा पाळलेली आढळते. प्रस्तुत विषयाच्या संदर्भात या परिसरात आढळणाऱ्या शिलालेखातून मिळणाऱ्या माहितीवरून या संबंधी हे विवेचन केले आहे.

**राजधानी :** कंधार (जि. नांदेड) येथील लेखातून राष्ट्रकूट तृतीय कृष्णाची कंधार ही राजधानी होती हे कळते. हिची रचना कशी होती, प्रजाहिताची दक्षता कशी घेतली गेली होती, तिला कोणत्या सोयीसुविधा पुरवल्या गेल्या होत्या इत्यादी संबंधीचे सविस्तर वर्णन अन्यत्र आलेलेच आहे. याच काळात औंढा (नागनाथ) येथे रट्टवंशीय बल्लाळाची राजधानी होती. तर कल्याणी ही चालुक्यांची राजधानी राहिलेले स्थान भाषावार प्रांतरचनेपूर्वी (सन १९५६) महाराष्ट्रात पक्षी मराठवाड्यातच होते हे या आधी पाहिलेच आहे. होट्टल येथे काहीकाळ कल्याणी चालुक्यांची राजधानी होते हे हरिहर ठोसर यांनी सिद्ध केले आहे.[४६] कल्याणी चालुक्याच्या वन्ही कुलाच्या मांडलिकांची राजधानी होट्टल (ता. देगलूर) येथे असल्याचे शिलालेखात नमूद आहे.

---

४४. येथे सर्वत्र कंसात दिलेले लेख सन, **इन्स्क्रिप्शन्स फ्रॉम नांदेड डिस्ट्रिक्ट** या ग्रंथातील आहेत.

४५. या भागातील माहितीचे आधार ग्रंथ : (१) मिराशी, वा. वि., **वाकाटक नृपती आणि त्यांचा काळ,** (२) यज्ञदानी, पूर्वोक्त, (३) रित्ती व शेळके (संपा), पूर्वोक्त, (४) ठोसर, हरिहर, पूर्वोक्त, (५) पानसे मु. ग., पूर्वोक्त, १९६३, मुंबई.

४६. ठोसर, हरिहर, **स्टडीज इन इंडियन प्लेस नेम्स**, पूर्वोक्त, पृ. ११ ते १८.

**उपराजधानी :** राज्याच्या विस्तारानुसार उपराजधानीची निर्मिती विकेंद्रीकरणासाठी आवश्यक ठरते. रट्ट बल्लाळाची उपराजधानी अर्धापूर (प्राचीन अराध्यपूर) जि. नांदेड येथे तर चालुक्य काळात अवरवाडी ७०० येथे एक उपराजधानी होती. करडखेड येथे वन्ही कुलाची राजधानी होती.

**देश, विषय इत्यादी :** देश हा प्रशासनाच्या दृष्टीने सर्वात मोठा विभाग ठरतो. यादवांच्या काळी खंदार (कंधार) हा देश विभाग होता. गोपाळदेव हा तेथे प्रशासनाधिकारी होता. तर वाकाटकांचे काळी नांदेड हा विषय विभाग होता.[४७] जुन्नी ता. बिलोली हाही एक विषय होता. विषयविभाग विस्तृत असेल तर दिशानुसार विभाग पाडलेले असत. उदाहरणार्थ नांदेड विषयाच्या उत्तरेकडील पोट विभागास उत्तरमार्ग म्हणत. मार्ग हा विभाग साहजिकच लहान असणार. चालुक्य काळात काही गावांचा मिळून एखादा शासन विभाग असे आणि तो केंद्रस्थानी मानलेल्या ग्रामनामापुढे त्या अंतर्गतच्या गावांच्या संख्येद्वारे दर्शविला जाई. नांदेड परिसरात एरगी ४०, करडखेड १०००, अवरवाडी ७०० असे विभाग होते. या शिवाय करवसुलीत आणि अन्य सवलती दिले गेलेले अग्रहारही होते.

**प्रशासनाधिकारी :** राजसत्ताक पद्धतीत सर्वेसर्वा राजाच असे, नंतर युवराज. संगम (ता. बिलोली) लेखात सहाव्या विक्रमादित्याचा पुत्र मल्लिकार्जुन हा युवराज असल्याचे म्हटले आहे. यादव काळातल्या अर्धापूर लेखात सर्वाधिकारी म्हणून लखण (लक्ष्मण) पंडिताची नेमणूक केल्याची माहिती आली आहे. गणेशवाडी लेखात भीमनाथाचे वडील धल्लदेव हे राज्यपाल होते असा उल्लेख येतो तर धल्लदेव हे सांधिविग्रहिक या पदावर होते असे सहाव्या विक्रमाचे एका लेखात उल्लेखिले आहे. हे पद फार महत्त्वाचे मानले जाई. या काळात राजकारण आणि युद्ध यांची एकरूपता होती आणि अशा परिस्थितीत परसत्तेशी संबंध ठेवून युद्ध वा तह घडवून आणणाऱ्या सांधिविग्रहिक नामक मंत्र्यावर फार मोठी जबाबदारी असे. आपल्या शत्रूच्या राज्यातल्या राजकीय घडामोडीकडे त्याने लक्ष ठेवले पाहिजे असे. त्याला परसत्तेची आणि एकंदर इतिहासाची चोख माहिती असणे आवश्यक असे. राजाच्या दानपत्रांची रचना करण्याचे काम त्यालाच करावे लागे.

या पदाइतकेच किंबहुना थोडे अधिकच महत्त्वाचे पद असे ते महादंडनायकाचे. चालुक्य काळात धल्लदेव हा महादंडनायक असल्याचा उल्लेख मिळतो. दंडनायकाचा वारंवार उल्लेख येतो. कालिदासय्य हा सन १०४९ मध्ये दंडनायकपदावर होता (लेख क्र. ४). हा जसा प्रथम सोमेश्वराच्या राजवटीत दंडनायक होता तसाच चटपय्या हाही दंडनायक त्याचवेळी होता. ही माहिती खानापूर (क्र. ७) आणि येरगी लेखात (क्र. ९) येते. माणिक दंडनायक अशा पदाचा उल्लेख सन १०७८ च्या येरगी लेखात (क्र. ९) आणि सन १११६ च्या आदमपूर लेखात आढळतो (क्र. १९).

अमात्य म्हणजे मंत्री हा अधिकार सहाव्या विक्रमादित्याच्या मल्लिकार्जुन नामक मुलाच्या राजवटीत ब्रम्हशर्मा याच्याकडे होता (संगमलेख क्र. २०). याहून मोठे पद महाप्रधानाचे असे. आदमपूरच्या सन १११६ च्या लेखात तृतीय सोमेश्वराचा श्रीधर नामक कर्तबगार अधिकारी महाप्रधानपदावर असल्याचे म्हटले आहे. तर हेमाद्री पंडिताचा महाप्रधान म्हणून उल्लेख येतो तो सन १२८० च्या उनकेश्वर (ता. माहूर) लेखात (क्र. ४२).

---

४७. मिराशी, वा. वि., **वाकाटक नृपती आणि त्यांचा काळ**, क्र. २२ ओळ ५.

महामंडलेश्वर या पदावरच्या अनेक कर्तबगार अधिकाऱ्यांची नावे उपलब्ध झाली आहेत. एरम्मरस (सन ११३० चा करडखेड लेख), सन १११३ च्या करडखेड लेखातील मदनकर्णरस, सामंत ठाकूर, सन १०७९ च्या लेखातील अपरादित्यदेव ही त्यापैकी काही नावे. विशेष म्हणजे रेब्बलदेवीचा महामंडलेश्वरी असा झालेला उल्लेख (क्र. १९).

**मांडलिक :** साम्राज्याच्या कक्षेत जितकी अंकित राज्ये अधिक तितकी सम्राटाची प्रतिष्ठा अधिक. मांडलिकांचे अधिकार त्यांचे ताब्यातील प्रदेशावर एखाद्या राजाच्या अधिकाराएवढेच असत. त्यामुळे प्रत्येक अंकित राज्याची शासन यंत्रणा स्वतंत्र असेल अशी व्यवस्था असे. मांडलिक हे त्यांच्या अधिकारकक्षेतील प्रदेशाचे राजेच असत, त्यामुळे त्यांच्याजवळ आवश्यक ती कारभाराची योजना (मंत्री, सेनापती, कोषाध्यक्ष इत्यादी) असायचीच. कालांतराने सामर्थ्यवान होणाऱ्या आणि स्वाभिमानी मांडलिकांना सम्राटाच्या अंकित राहणे न रूचणे स्वाभाविकच म्हणावे लागते. त्यामुळे मुत्सद्दीपणाने डावपेच करून अधिसत्ता कमकुवत झाल्यावर किंवा ती मोठ्या लढाईत गुंतल्यावर अनूकुल संधी मिळताच स्वतंत्र होण्याची मांडलिकांची धडपड असे. मांडलिक असलेले राष्ट्रकूट पुढे साम्राज्य स्थापन करते झाले. त्यांचे मांडलिक असलेल्या कल्याणीच्या चालुक्यांनीही साम्राज्य स्थापन केले. यादवांचा इतिहासही यापेक्षा वेगळा नाही. नांदेड परिसरात वाजीकुलाचे आणि वन्ही कुलाचे राजे मांडलिकच होते हे आपण पाहिलेच आहे. या शिवाय महासामंत आणि सामंत ही अधिकारपदे (एकलारा ता. मुखेड, लेख क्र. ६ व करडखेड लेख क्र. ३०), तसेच पेरगडे (खानापूर लेख क्र. ७), बाणसवेर्गडे, मनेवेर्गडे, तंत्रअधिष्टायक, आनेसाहणि (करडखेड लेख क्र. २९), पसायित (सगरोळी लेख क्र. १८), हाथिसहाणि (क्र. ४२) ही अधिकारपदे उपभोगणारी मंडळी त्या काळी नांदेड परिसरात कार्यरत होती अशा नोंदी लेखातून आढळतात.

## विद्याकेंद्र

**विद्याकेंद्र आणि स्थापत्य कला**[४८]**.—**विद्यार्जनासाठी दिलेली दाने, वसविलेले अग्रहार आणि उभारलेली मंदिरे यांच्या सहाय्याने व आश्रयाने नांदेड परिसरात पाठशाळा चालविल्या जात असत. त्याकाळी ब्राह्मणांच्या वसतीच्या ठिकाणी त्यांच्या अध्यापनशीलतेमुळे ज्ञान प्रसार होणे सुलभ झाले होते. विद्यार्जनाच्या अशा व्यवस्थेवरून आणि विद्वत्तेची अशी जाणीव ठेवणाऱ्या राजांच्या सहभागावरून हे कल्याणकारी राज्य होते असे म्हणता येईल. राजे लोकांनी व त्यांच्या मांडलिकांनी केलेल्या भूमिदानामुळे व निर्माण केलेल्या अग्रहारामुळे विद्यार्जन सोपे व सोयीचे झाले. याचा लाभ स्थानिकांना तसाच परप्रांतातून आलेल्यांना होत असे. पाठशाळातून गुरूशिष्यांच्या भोजनाची आणि निवासाची सोय होई. देवळामध्येच राहण्या जेवण्याची सोय झाल्यामुळे विद्याविनिमय सुरळीतपणे चालत असे. काही ठिकाणी अन्नछत्रेही असत तर राष्ट्रकूटकालीन कंधारसारख्या ठिकाणी विद्यार्थ्यांच्या कपड्यालत्यांची गरज भागवली जात असे.

नांदेड परिसरातल्या पाठशाळातून शिकविल्या जाणाऱ्या विषयांची कल्पना शिलालेखावरून येत नसली तरी वेदांत, व्याकरण, ज्योतिष, आयुर्वेद इत्यादींचे शिक्षण दिले जात असावे. नांदेड परिसरातल्या अग्रहाराची माहिती येरगी आणि होट्टल येथील लेखातून कळते. येरगीचा सन ११३४ चा लेख (क्र. ३१) आणि होट्टलचा सन ११०१ चा (क्र. १२) चा लेख येरगी येथील अग्रहाराविषयी

४८. येथे दिलेले कंसातील क्रमांक हे **'इन्स्क्रिप्शन्स फ्रॉम नांदेड डिस्ट्रिक्ट'** या ग्रंथातील शिलालेखांचे क्रमांक आहेत.

सांगतात. येथील घटिकास्थानाचा (पाठशाळा) उल्लेख आढळतो. त्याचा कारभार स्थानिक महाजनांनी चालविलेला होता. नांदेड येथील पाठशाळेचा उल्लेख गणेशवाडी येथील चालुक्यकालीन लेखात येतो. तसेच भीमनाथ ह्या सहाव्या विक्रमादित्याच्या सेनापतीने ती पाठशाळा उघडल्याची माहिती दिलेली आहे. तर करडखेड येथील पाठशाळेचे चालकत्व आचार्य ज्ञानेश्वर पंडित, योगीश्वर आणि चंद्रशेखरमुनी पंडित या विद्वानाकडे असल्याचे तेथील लेखावरून ज्ञात होते. हे तिघेही कालमुखपंथाचे अनुयायी होते. विशेष म्हणजे वारकरीपंथाच्या आणि भावार्थदीपिका ही गीतेवरील टीका रचणाऱ्या संत ज्ञानेश्वरांच्या आधीही ज्ञानेश्वर हे नाव प्रचारात होते असे दिसते. सावरवल्ली (सगरोळी) येथील पाठशाळेंचे आचार्य होते ब्रम्हर्षी पंडित. सरस्वती मंडप तडखेल येथे होता. बागेश्वर पंडित हा कालमुखपंथाचा अनुयायी या पाठशाळेचा आचार्य होता. बिलोली तालुक्यातील जुन्नी विषयामध्येही पाठशाळा होती असा (क्र. ३९) उल्लेख आहे.

ठिकठिकाणी पाठशाळा आणि अग्रहाराच्या निर्मितीमुळे तत्कालीन ज्ञानार्जनाच्या केल्या गेलेल्या सोयीमुळे हा परिसर विद्यासंपन्न झाल्याचे जसे दिसते, तसेच अनेक ठिकाणी मंदिरे उभारली गेल्याचे अभिलेखातून आलेल्या उल्लेखातून कळते. स्थापत्य-शिल्प आणि मूर्तिशास्त्रादी वरून त्याकाळची आणि समाज जीवनाची कल्पना येते. सुदैवाने येथे उभारल्या गेलेल्या अनेक मंदिरांचे उल्लेख अभिलेखातून आढळतात. त्यात सध्या अस्तित्वात असलेली मंदिरे पाहता स्थापत्याची आणि मूर्तिकलेची ओळख पटते.

होट्टल, खानापूर, मुखेड, राहेर येथील मंदिरे म्हणजे कलेचे आगरच. सिद्धेश्वर, रेबेश्वर ही होट्टलची मंदिरे आणि खानापूर आणि मुखेड येथील महादेव मंदिरे, राहेर येथील नृसिंह मंदिर देखणी आणि शिल्पसमृद्ध आहेत.

नांदेड परिसरातून उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे या भागात सुमारे ३०-४० मंदिरे उभारली गेली होती असे म्हणता येईल. अर्धापूर, होट्टल, करडखेड, कंधार या ठिकाणी तर अनेक मंदिरे होती. यापैकी काही राजाकडून तर काही अधिकाऱ्यांकडून उभारलेली होती. काही स्थानिक महाजनांनी बांधली होती. यात शिवाची मंदिरे संख्येने अधिक होती. मल्लेश्वर, सोमेश्वर, सिद्धेश्वर, सर्वेश्वर, प्रसन्नभैरव, रेवणेश्वर इत्यादी तर काही विष्णूची-येरगी येथील केशवदेव, शुभनारायण नरसिंह (अर्धापूर) इत्यादी. याशिवाय विनायक, चंडिकादेवी (दोन्ही अर्धापूर, ता. नांदेड) ह्यांची देवळे होती. विशेष म्हणजे तृतीय कृष्ण या राष्ट्रकूट नृपतीचे कंधार येथील राजधानीत कामदेवाचे मंदिर उभारले गेले होते. हे मराठवाड्यातच केवळ नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातले कामदेवाचे एकमेव मंदिर होय. येथे उल्लेखिलेल्या पैकी फार थोडी मंदिरे आज उपलब्ध आहेत. येथील लेखातून मंदिरे, त्यांची उभारणी, त्यांचे व्यवस्थापन या संबंधीची मिळणारी माहिती विशेष महत्त्वाची ठरेल असे वाटते.

प्राचीन मातापूर म्हणजे सध्याचे माहूर येथील सरणुनायकाचा पुत्र मेघदेव याने मंदिर बांधण्यास घेतले आणि ते बांधून पूर्ण केले (क्र. ४२) तर वन्ही कुलातील कालिचोर रस याने उभारलेल्या देवळावर कलश स्थापन (कळस आरोहण) केल्याची माहिती करडखेड येथील सन १०८८ च्या लेखातून (क्र. ११) आलेली आहे. पडझड झालेल्या मंदिरांचा जीर्णोध्दार, डागडुजी करण्यासाठी व्यवस्था केली जाई हे अनेक लेख सांगतात. विशेष म्हणजे येरगीच्या ११३४ चा लेख सांगतो की केवळ देखभालच नव्हे तर मंदिराची रंगरंगोटी करण्यासाठीही तरतूद केलेली होती.

मंदिरांच्या ' योगक्षेमासाठी ' काही रक्कम करापोटी गोळा केली जाई, काही अधिकाऱ्यांनी अनेक खेड्यातून त्यासाठी कर गोळा करण्यासाठी तरतूद केलेली होती (क्र. १९, ३२), नंदादीप सतत तेवत राहावा म्हणून गावातील प्रमुखाने त्याची व्यवस्था केली होती (सन १११३ चा सगरोळी लेख, क्र. १७ व बिम्रा लेख सन ११२२ क्र. २३), अर्धापूरच्या सन ११९२ च्या लेखात या संबंधी आणखी माहिती येते. तेथील मल्लिकार्जुनाच्या मंदिरासाठी जमीन आणि निधीची योजना होती. अराध्यपूर, बरसग्राम, पोहरग्राम व करकरीग्राम येथील भूमी दान केलेली होती. त्यातून प्रतिदिनी फुलांची व्यवस्था करणाऱ्याची सोय, पोफळीच्या (सुपाऱ्या) खरेदी-विक्रीतून येणारे व तेलघाणीतून मिळणारे उत्पन्न मंदिरातील दिव्यासाठी लावून दिलेले होते. याशिवाय मंदिरातील सिद्धेश्वरदेवाला अर्पण केलेल्या वस्तू गावोगावाहून आणण्यासाठी दहा बैलगाड्यांची व्यवस्था केलेली होती. उनकेश्वर लेखात तेथील देवासाठी बोयी, सांगवी येथील फुलबागांची सोय केली होती असे सांगितले आहे. सन ११३४ च्या येरगी लेखातून कळते की तेथील केशवदेव मंदिरासाठी गावच्या प्रभू, पाठशाळेचे व्यवस्थापन मंडळ, ब्रम्हपुरीचे महाजन, त्याचप्रमाणे येरगी, तडगूर, सिरिमलिगे आणि बवरगाव येथील प्रभूमंडळी आणि समस्त ग्रामस्थ यांनी जमिनीचे दान केले होते. त्यातून मंदिराची देखभाल एवढेच नव्हे तर पुजाऱ्याचा योगक्षेम चालविला जावा ही इच्छा (क्र. ३१).

वर एके ठिकाणी उद्धृत केल्याप्रमाणे मंदिर म्हणजे एक सामाजिक संस्था असे. मंदिर म्हटले की, गाभाऱ्यातील देवता आणि मंदिर सुशोभित करणाऱ्या प्रतिमा, कलाकुसर, एकूणच मंदिराची रचना, त्यांची शैली यांचा विचार करावा लागतो.

नांदेड परिसरातील काही मंदिरे[४९] विष्णूची-शुभनारायण, केशवदेव, नरसिंह आदि तर बरीचशी मंदिरे शिवाची असल्याचे शिलालेखातून येणाऱ्या त्यांच्या नावावरूनही कळते. मात्र त्यापैकी अगदी बोटावर मोजण्याइतकीच आज उभी आहेत. त्यापैकी राहेर, ता. बिलोली येथील देव नरसिंहाची दोन मंदिरे यादव काळातील आहेत. अन्य कल्याणी चालुक्यांच्या काळातील होत.

राहेर येथे योग नरसिंह, भोग नरसिंह अशी मंदिरे. पैकी योग नरसिंहाचे मंदिर अजूनही बऱ्या अवस्थेत आहे. ते काहींचे कुलदैवत आहे. गाभारा, अंतराळ, सभामंडप (उघडा) आणि मुखमंडप अशा पदविन्यासाचे हे मंदिर. गाभाऱ्यात चतुर्भुज नरसिंह पद्मासनात नि ध्यान मुद्रेत बसलेला आहे. सभामंडप उघडा, भोवताली वामनभिंत (ड्वार्फ वॉल) असलेला असा आहे. येथे महानुभावाचे चक्रधर स्वामी येऊन गेल्याचा स्थानपोथीत उल्लेख आहे.

होट्टल, मुखेड, खानापूर, अर्धापूर येथील चालुक्यकालीन मंदिरे शिवाची होत. विशेष म्हणजे होट्टल आणि अर्धापूर या देवळांचे उल्लेख तेथील शिलालेखात आलेले आहेत. होट्टल येथे आजमितीला तीन देवळे आहेत. पडझड झालेल्या अवस्थेत ती आहेत. पैकी सर्व सपाट छतांची आहेत. यातील एक त्रिदल प्रकारचे आहे. म्हणजे एका गाभाऱ्यात विष्णू-प्रतिमा असावी. इतर दोन मंदिरांच्या बाह्यभिंतीवर (मंडोवर) काही देवता प्रतिमा उदा. नृत्यगणेश, याशिवाय शत्रूमर्दिनी (दुर्मिळ), रती, पुत्रवल्लभा, रती इत्यादी सुरसुंदरीच्या सुंदर प्रतिमा मंडोवरावर आहेत. विशेष म्हणजे गर्भगृहाच्या

४९. देगलूरकर, गो. बं., **टेंपल आर्किटेक्चर अँड कल्चर ऑफ महाराष्ट्र**, नागपूर, १९७४ आणि महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, महाराष्ट्र : इतिहास-प्राचीन काळ, खंड १, भाग २, **स्थापत्य व कला**, मुंबई २००२ मध्ये काही स्थानांचे तपशील आले आहेत तर, या सर्व मंदिरांचे तपशील प्रेक्षणीय स्थळे प्रकरण १२ मध्ये दिलेले आहेत.

Maharashtra State Gazetteers

चौकटीच्या शाखांवर पुत्तलिका (कार्याटिड) कोरलेल्या आहेत. या स्त्री प्रतिमा खरोखरच दर्शनीय आहेत.

मुखेड येथील महादेव मंदिराची बाहेरून बरीच डागडुजी केलेली आहे. गाभारा, अंतराळ व सभामंडप असा तलविन्यास आहे. सभामंडपाच्या दारावर गजलक्ष्मीचे ललाटबिंब आहे. गाभाऱ्यातील शिवलिंग उंच अशा पद्मपीठावरील शाळुंकेत स्थित आहे. मंदिराची बाह्यभिंत स्तंभांची रचना आहे. प्रत्येक दोन स्तंभात सप्तमातृकांपैकी एकेक मातेची नृत्यावस्थेतील प्रतिमा आहे. चालुक्यांच्या घराण्याच्या या संरक्षक माता मानल्या गेल्या आहेत. त्या आसन, स्थानक वा नृत्यरत असतात. पण मंदिरावर अशा तऱ्हेचे त्यांचे शिल्पांकन अगदी दुर्मिळ. शिवाय या अप्रतिम देखण्या आहेत. प्रत्येकीच्या पायाखाली तिचे वाहन आहे. येथेच एका टोकास लक्ष्मीची थोरली बहीण ज्येष्ठा हिची प्रतिमा आहे. तिचे वाहन गाढव तेथे आहे. या चतुर्भुज देवीच्या हाती कट्यार, केरसुणी, सूप आणि कपालपत्र इत्यादी असून काकध्वजही आहे. मूर्तिशास्त्रावरील ग्रंथातील जितेंद्रनाथ बॅनर्जी, नी. पु. जोशी यांनी दिलेल्या वर्णनानुसार हिचे शिल्पांकन झाले आहे.

मंदिरे, तलाव, वाव, प्रपा (पाणपोई), पाठशाळा, धर्मशाळा या सर्वांची सांगड स्मृतिकारांनी इष्टापूर्तीच्या पुण्यसंपादनाशी घातली आहे (यमस्मृती, १, ६९-७०).[५०] त्यामुळे अशा सामाजिक कार्यामध्ये रावापासून रंकापर्यंत ज्यांना शक्य होते त्यांनी धर्मभावनेने लक्ष घातल्याचे दिसते. कंधार येथील जगत्तुंगसमुद्र, गणेशवाडी येथील भीमनाथाने बांधलेला कलंबर (ता. कंधार) येथील बांध, मुखेड येथील कुंड (विहीर), अनेक ठिकाणच्या पाठशाळा, सत्रशाळा ही इष्टापूर्त धर्माचीच उदाहरणे होत.

**बौध्द व जैनधर्म :** यासंबंधी सातवाहन काळातील नांदेड येथील अनेकांची सांची येथील स्तुपासंदर्भात दाने दिल्याचा उल्लेख आणि कंधार येथे राष्ट्रकूट पूर्व काळातील बुध्द व पद्मपाणी यांच्या प्रतिमा एवढाच पुरावा मिळाला आहे. येथे जैन मंदिर असावे. तर करडखेड येथील एका लेखात जैन मंदिराचा उल्लेख एवढाच त्या संबंधीचा पुरावा हाती लागला आहे.

**प्राचीन नगरे :**[५१] नांदेड जिल्ह्याचा परिसर ऐतिहासिक काळाच्या उषःकाळापार ज्ञात असला तरी दोन चार गावे वगळता या जिल्ह्यातील पुढे भरभराटीस आलेल्या, सांस्कृतिक दृष्ट्या महत्त्वाच्या ठरणाऱ्या गावांची संख्या प्रारंभी अल्पच होती असे दिसते. मात्र या जिल्ह्याचे प्राचीन काळातील वैभव सांगणारी नगरे इसवीसनाच्या ९ व्या-१० व्या शतकापासून नावाजली गेली. या जिल्ह्यात दोन राजधान्या (कंधार आणि होट्टल) आणि दोन उपराजधान्या (अर्धापूर आणि अवरवाडी) होत्या हे सांगितले तरी पुरे. अभिलेख, क्वचित वाङ्मयीन साधने आणि स्थलमाहात्म्य यांच्या आधारे काही नगरांची माहिती उपलब्ध झाली आहे. हरिहर ठोसर यांनी ही माहिती पुढे आणण्यास अपार परिश्रम केले आहेत.[५२] याबाबतचे तपशील याच गॅझेटिअरमध्ये आले आहेत.[५३]

---

५०. पानसे मु. ग., पूर्वोक्त, पृ. १५.

५१. प्राचीन नगरे या विषयीची माहिती रित्ती व शेळके यांच्या **इन्स्क्रिप्शन्स फ्रॉम नांदेड डिस्ट्रिक्ट** या ग्रंथा आधारे दिली आहे.

५२. ठोसर, हरिहर यांचा **हिस्टॉरिकल जॉग्रॉफी ऑफ महाराष्ट्र ॲण्ड गोवा** हा ग्रंथ अधिक माहितीसाठी पहा.

५३. या विषयीची अधिक नोंद या ग्रंथाच्या प्रकरण १२, प्रेक्षणीय स्थळे या प्रकरणात विस्ताराने दिली आहे.

## मध्ययुगीन कालखंड*

इसवी सन १२९६ पर्यंत नांदेड परिसरावर देवगिरीच्या यादवांचा प्रभाव होता. यादवांच्या सत्तेचे एक प्रमुख ठाणे नांदेड नजीकच्या अर्धापूरात होते. हे अर्धापूर म्हणजे यादवकालीन आराध्यपूर. तेथील यादवकालीन शिलालेख आणि असंख्य शिल्प स्थापत्य अवशेष यादवकालीन इतिहासाच्या आठवणी जागवीत आहेत. यादवपूर्व काळातील नांदेडचा इतिहास दख्खन पठारावरील इतिहासाचाच भाग होता. सातवाहन, वाकाटक, पूर्व चालुक्य, राष्ट्रकूट, उत्तर चालुक्य आणि यादव या राजघराण्यांच्या स्थिर आणि संपन्न कालखंडात राजकीय संघर्ष होताच पण अजिंठा, वेरूळ, पितळखोरा, कार्ले, भाजा, घारापुरी यासारख्या प्रचंड कला अविष्कार घडविता येण्याजोगे सामाजिक, राजकीय स्थैर्य आणि कलाकारांना उदार हस्ते मदत करण्याचे औदार्यही होते. हजार दिड हजार वर्षांच्या या वाटचालीत मराठवाड्यात, महाराष्ट्रात आणि एकूणच दख्खनच्या पठारावर मोठमोठ्या बाजारपेठा विकसित झाल्या. व्यापारी मार्ग तयार झाले होते. या व्यापारी मार्गांवर लेण्यांच्या रुपात असंख्य कलाकेंद्रे आणि धार्मिक स्थळे उभी राहिली होती. गावाच्या शिवारात अप्रतिम कला अविष्कार घडला होता. नांदेडातही अशा कला अविष्काराच्या खाणाखूणा पावलोपावली विखरुन पडलेल्या आहेत. या कला अविष्कारामागची अनामिकांची कलासक्ती समजून घेण्याचे औदार्य दाखवणे अगत्याचे आहे.

मध्ययुगाच्या प्रारंभी आणि प्राचीन कालखंडाच्या शेवटी दख्खन पठारावर यादवांचे संपन्न साम्राज्य अस्तित्वात होते. १३ व्या शतकात अस्तित्वात असलेल्या या साम्राज्याविषयी ग.ह.खरे म्हणतात, " देवगिरी हे लक्ष्मी आणि सरस्वतीचे माहेरघर होते. यादवांच्या राज्याच्या सीमा दूरवर पसरलेल्या होत्या. त्यांच्या सैन्यबळामुळे सर्वत्र शांतता नांदत होती. व्यापार-उदीमाची राज्यात भरभराट होती. गोवा, दाभोळ, चौल आणि कोकणातील इतर छोट्या मोठ्या बंदरांतून परदेशाशी व्यापार चालू होता. प्रामुख्याने पैठण, देवगिरी सारख्या ठिकाणांहून कापड परदेशी पाठवले जात होते आणि त्याबदल्यात सोने आयात होत होते."[५४]

तात्पर्य तेराव्या शतकातील त्या शेवटच्या दशकात देवगिरीचे राज्य अत्युच्च शिखरावर पोहचले होते.[५५] इ.स. १२९४ साली दिल्लीच्या तुर्की सुलतानाने देवगिरीवर स्वारी केली. सुलतान जलालुद्दीनचा पुतण्या अल्लाऊद्दीन खिलजी आपले सैन्य घेऊन दख्खन पठारावर उतरला आणि त्याने देवगिरीवर हल्ला केला. प्रचंड धुमश्चक्री झाली. २२ वर्षांच्या संघर्षानंतर इ.स. १३१८ साली देवगिरीचे यादव राज्य नष्ट झाले. १४ व्या शतकाच्या प्रारंभी घडलेल्या या राजकीय स्थित्यंतराचे दूरगामी परिणाम महाराष्ट्राच्या आणि दख्खनच्या इतिहासावर झाले. पश्चिम महाराष्ट्राच्या संदर्भात तर पुढील साडेतीनशे वर्षाचा काळ म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांच्या उदयापर्यंतचा काळ निरनिराळ्या मुस्लिम सलतनतींच्या राजकीय संघर्षानेच व्यापला. स्थानिक मराठी रयत दिन अवस्थेत हतबलतेने ही राजकीय

---

* डॉ. प्रभाकर देव, निवृत्त विभागप्रमुख, इतिहास विभाग, यशवंत महाविद्यालय, नांदेड यांनी नांदेड जिल्हा मध्ययुगीन काळ आणि आधुनिक काळ या भागाचे लेखन केले आहे.

५४. खरे, ग. ह., **महाराष्ट्राचा इतिहास - मध्ययुगीन कालखंड**, भाग-१, मुंबई, २००१, प्रस्तावना, पृ. २.

५५. शेरवानी, एच. के., जोशी, पी. एस., **हिस्टरी ऑफ मिडीव्हल डेक्कन**, व्हॉ. १, हैद्राबाद, १९७३, पृ. ३६.

धुमश्चक्री पाहत होती. मराठवाड्यात आणि नांदेड जिल्ह्यात तर ही परिस्थिती थेट १९४८ पर्यंत कायम होती. इ.स. १३१८ साली यादवांचे राज्य दिल्लीच्या सलतनतीचा एक भाग बनले आणि नांदेड परिसरही मुस्लिम सत्तासंघर्षाच्या प्रभावाखाली आला. या सत्ता संघर्षात कधी या सुलतानाची सरशी तर कधी त्या सुलतानाचा पराजय. सतत लढाया आणि लढाया! दरम्यान मुघलांचा प्रभाव मराठवाड्यात स्थिरावला. औरंगाबादची मुघल सुभेदारी अस्तित्वात आली. पुढे या सुभ्याचेच रुपांतर स्वतंत्र अशा निजामी राज्यात झाले.

**जिल्ह्याची मध्ययुगीन आणि आधुनिक कालखंडातील वाटचाल :**—नांदेड जिल्ह्यातली ही सातशे वर्षाची वाटचाल म्हणजे मध्ययुगीन आणि आधुनिक कालखंडाचा इतिहास होय. हा इतिहास समजून घ्यावयाचा तो एकूण मध्ययुगीन सलतनतींच्या राजकारणाच्या पार्श्वभूमीवर. ती पार्श्वभूमी समजल्याशिवाय नांदेड जिल्ह्यातील राजकीय घडामोडींचा अन्वयार्थ लावता येणार नाही. माहूर, कंधार आणि कौलास सारख्या किल्ल्यांच्या परिसरात घडलेल्या घटनांचे तपशील स्पष्ट होणार नाहीत. नांदेड जिल्ह्याचा मध्ययुगीन इतिहास खरे तर संपूर्ण दख्खन राजकीय संघर्षाचेच प्रतिरुप होते.

अल्लाऊद्दीन खिलजीच्या आक्रमणाने राजकीय संघर्षाचे एक नवे पर्व दख्खन पठारावर सुरु झाले. हे पर्व अंतर्गत सत्तासंघर्षाचे पर्व होते. या संघर्षात तुर्की, अफगाण, मुघल अशा निरनिराळ्या सत्ताधिशांनी धुमाकूळ घातला होता. या सुलतानी राज्यकर्त्यांमध्ये दख्खन पठारावरील वर्चस्वासाठी सतत लढाया होत राहिल्या. स्थानिक रयत या संघर्षात हतबल होत गेली. या अस्मानी सुलतानी संघर्षात स्थानिक रयतेची भूमिका नगण्य होती. स्थानिक वतनदार, मांडलिक लोक या सुलतानी संघर्षाला विरोध करण्याच्या मनःस्थितीत नव्हते. या सुलतानी फौजांचा आपापसात संघर्ष व्हायचा, स्थानिक रयतेची लूट व्हायची. त्यांना विरोध करण्याचे सामर्थ्यच शिल्लक राहिले नव्हते. सारी रयत आपले स्वत्वच हरवून बसली होती. दख्खन पठारच नव्हे तर उत्तर भारतातही अशीच परिस्थिती होती.

स्थानिक सत्ताधिश राजघराणी, मांडलीक सरदार आणि सामान्य रयत अशी हीनदिन का झाली होती ? त्यांच्यावर अनन्वीत अत्याचार होत होते तरी ही रयत विरोध करून का नाही उठली ? आपले स्वतःचे स्थानिक राज्य पुनर्प्रस्थापित करण्याचा कुणीच का प्रयत्न केला नाही ? या सारख्या प्रश्नांची उत्तरे शोधून त्याची कारणमिमांसा करणे अगत्याचे आहे.

**शेजारच्या आंध्र-कर्नाटक परिसरातील परिस्थिती :**—ही मिमांसा करण्यापूर्वी इसवी सनाच्या १४ व्या शतकातील आंध्र-कर्नाटकातली परिस्थिती लक्षात घेतली पाहिजे. आंध्र-कर्नाटक आणि दक्षिणी राज्यातील रयतेने या सुलतानी आक्रमणांना विरोध केला. एवढेच नव्हे तर खिलजी, तुघलक यांची सत्ता नाकारून स्वतःची स्वतंत्र राज्ये निर्मिली. अलाऊद्दीन खिलजीच्या अधिपत्याखाली आक्रमण झाल्यानंतर अवघ्या तीस वर्षांच्या अवधीत काकतीयांचे स्वतंत्र होण्याचे प्रयत्न सुरू झाले. इ.स. १३२५ मध्ये तटवर्ती आंध्र तुघलकांच्या जोखडातून स्वतंत्र झाले. इ.स. १३२७ च्या दरम्यान पश्चिम आंध्र स्वतंत्र झाला. इ.स. १३३३-३४ मध्ये मदुराई राज्य तुघलक साम्राज्यातून स्वतंत्र झाले. इ.स. १३३६ मध्ये धर्मांतरित हरिहर आणि बुक्क पुनश्च हिंदू झाले व त्यांनी एका स्वतंत्र राज्याची

स्थापना केली. हेच राज्य इतिहासात विजयनगरचे साम्राज्य म्हणून प्रसिध्दिस आले.[५६] तात्पर्य दक्षिणेतील स्थानिक रयत आक्रमक सत्तांना विरोध करून स्वतःचे स्वत्व जपत होती. महाराष्ट्रात मात्र अशी परिस्थिती नव्हती हे लक्षात घेतले पाहिजे. याच अनुषंगाने प्रश्न पडतो तो असा, की असे काय घडले की ज्याच्या प्रभावामुळे १४ व्या शतकापासून सतराव्या शतकापर्यंतच्या साडेतीनशे वर्षाच्या काळात दख्खन पठारावर आणि विशेषतः महाराष्ट्रात या आक्रमक सुलतानी राज्यकर्त्यांना संघटित विरोध होऊ शकला नाही. या मध्ययुगीन धर्माधिष्ठीत सलतनतींना विरोध करण्याचे भान तर मराठवाड्यातील रयतेला २० व्या शतकापर्यंत आले नव्हते.

**दख्खन पठारावरील संघर्ष :**—दख्खन पठारावरील रयत अशी का वागली. या प्रश्नाचा शोध घेतल्यास असे लक्षात येते की या तुर्की सुलतानी सत्तेस सुरुवातीस स्थानिक रयतेचा विरोध बोथट का झाला याचे उत्तर या मुस्लिम राज्यकर्त्यांच्या धोरणातही काही प्रमाणात सामावले आहे. या राज्यकर्त्यांनी आपली सत्ता टिकवून ठेवण्यासाठी राज्यातील परंपरेने चालत आलेले हिंदू अधिकारी (विशेषतः खेड्यातील) यांना कधीही हात लावला नाही. त्यांची स्थानिक सत्ता आणि महत्त्व हे अबाधित ठेवले. त्यामुळे परंपरागत अधिकारी, लहान मोठे सरदार, दरकदार यांनी विरोध करण्याऐवजी मुस्लिम सत्ताधिशांची मनोभावे सेवा केली.[५७]

आणखी एक लक्षणीय गोष्ट अशी की मध्ययुगीन सत्ता संघर्षात गुंतलेले सर्वच राज्यकर्ते मुसलमान असले तरी त्यांनी धार्मिक ऐक्याच्या मुद्यावर परस्पर सलोखा किंवा सामंजस्य कधीच दाखविले नाही. ग. ह. खरेंनी या परिस्थतीचे विश्लेषण करताना अगदी रास्तपणे म्हटले आहे, " निरनिराळ्या शाह्यांच्यामध्ये असलेली बेबंदशाही आणि अंदाधुंद असलेली परिस्थिती याच्याच जोडीला हे मुस्लिम राज्यकर्ते अथवा सुलतान दुसऱ्या सुलतानाशी भांडण काढून आक्रमणाच्या पवित्र्यात असत. या आपापसातील द्वंद्वात अनेक वेळा कुठला तरी एक पक्ष शेजारच्या विजयनगरच्या हिंदू राजाकडे मदतीची याचना करी आणि विजयनगराचे राजेही सैनिकी सहाय्य करीत."[५८] अर्थात असे सामर्थ्यशाली स्थानिक राज्य तत्कालीन महाराष्ट्रात अस्तित्वात नव्हते हे लक्षात घेतले पाहिजे. स्थानिक वतनदार पाटील, देशमुख मात्र होते. त्यांनी या नव्या सत्ताधिशांचा स्विकार केला. आपले मानलेल्या परकीय सत्ताधिशाचे राज्य टिकविण्यासाठी मराठी रयतेने शर्थीची झूंज दिली. परंतु हे स्थानिक सरदार सत्तेच्या राजकारणापासून दूरच होते. फारतर काही जहागिरी आणि वतनाचे ते दावेदार बनले इतकेच. पहिल्या बहमन हसन शहाच्या कारकिर्दीत मुधोळचे घोरपडे, फलटणचे निंबाळकर, म्हसवडचे माने, माळवाडीचे घाटगे अशी काही स्थानिक घराणी उदयाला आली.

स्थानिक रयतेने फारसा विरोध केला नाही, नव्या परकीय सत्तेला स्विकारले याचे एक कारण भारतीय सामाजिक मानसिकतेत दडलेले आहे. स्विकाराची मानसिकता पराकोटीचा अत्याचार, अन्याय होईपर्यंत कायम आहे. सुलतानी राज्यसत्तांनी आपल्याभोवती इराणी मनसबदारांचे कडे उभे केले होते.

५६. कित्ता, पृ. ५४.

५७. खरे, ग. ह., पूर्वोक्त, पृ. ७.

५८. कित्ता, पृ. ९.

महत्त्वाच्या जबाबदाऱ्या या इराणी मनसबदारांच्या हाती सोपवलेल्या असत. त्यांच्या जोडीला दख्खनी मुसलमान होते. स्थानिक रयत या सत्ता संघर्षापासून अलिप्त असे. लष्करी हल्ल्यात आणि झालेल्या लूटमारीत हाल अपेष्टा सहन करणे आणि ठेविले अनंते तैसेची राहणे ही वृत्ती धारण करून जगणे सामान्य रयतेच्या नशीबी होते.

विरोध न होण्याचे आणखी एक कारण दिले जाते ते असे की या सुलतानी राजसत्तांनी स्थानिक रयतेशी प्रत्यक्ष संघर्षात्मक पवित्रा घेण्याचे टाळले. राज्य आणि सत्ता टिकवण्यासाठी काही प्रमाणात स्थानिक हिंदू रयतेला राज्य कारभारात समाविष्ट करून घेतले. बहुसंख्य हिंदू रयतेला त्यांच्या धर्माप्रमाणे आचरण करण्यात बाधा आणली नाही. स्थानिक प्रशासनात ग्रामस्वराज्यात, पंचायती व्यवस्थेत, जातपंचायतीत, पंचायतींच्या न्याय व्यवस्थेत त्यांनी हस्तक्षेप केला नाही. शरियतचे कायदे त्यांना लागू केले नाहीत. पंचायतीच्या न्यायनिवाड्यात हस्तक्षेप करण्याचा अधिकार मुल्ला मौलवींना नव्हता. सुलतानी राज्यकर्ते आपल्या सत्तासंघर्षातील उद्दीष्टांबाबत अधिक दक्ष होते, त्यामुळे शरियतचे कायदे आणि मुल्ला मौलवी आणि काझींचे सल्ले त्यांनी कधीच तंतोतंत पाळले नाहीत. अल्लाउद्दीन खिलजी स्वतः शरियतच्या कायद्यांपेक्षा वेगळा वागला आणि त्याच्या कृतीचे समर्थन देतांना समकालीन तवारिखकार झियाऊद्दीन बरनी लिहितो, "सुलतानास शरियतच्या कायद्यास अनुसरून राज्यकारभार करणे शक्य नव्हते, कारण राज्यकारभार विषयक जे कायदे आहेत त्याविषयी शरियत गप्पच आहे आणि जेव्हा राज्याचा कायदा हा शरियतच्या विरुद्ध असतो तेव्हा शरियत ऐवजी राज्याचा कायदा हाच वरचा अथवा श्रेष्ठ ठरवला जाई."[५९]

**मुस्लिम सलतनतीचे स्वरूप :**—तात्पर्य दख्खन पठारावरील सुलतानी राज्यातले बहुसंख्य प्रजाजन हे बिगर मुस्लिम असल्यामुळे, राज्यकर्ते एका बाजूला असे वागत की बहुसंख्यांचे त्यांना सहकार्य मिळावे आणि दुसऱ्या बाजूला मुल्ला मौलवींचा रोषही ओढवू नये. राज्यकर्त्यांनी आपला मतलब कधीच दृष्टीआड होऊ दिला नाही आणि ते इसलामी शरियतच्या व मुल्ला मौलवींच्या आहारी गेले नाहीत. म्हणूनच सातशे वर्षे त्यांची सत्ता टिकून राहिली आणि फारसा विरोध झालाच नाही. विरोध होता तो आक्रमण करून आलेल्या इतर सलतनतीकडूनच. "सहिष्णूता हाच सर्वात शहाणपणाचा मार्ग आणि सुलतानांनी त्याचा स्विकार केला. दक्षिणेतील आणि विशेषतः महाराष्ट्रातील अल्पसंख्यांक सुलतान अनेक शतके येथील हिंदू प्रजेवर राज्य करू शकले, त्याचे हे मुख्य कारण होय. मौलवी आणि उलेमांच्या सल्ल्यानुसार ते वागते तर या देशात त्यांचा कदापि टिकाव लागला नसता, याची त्यांना पूर्ण जाणीव होती. त्यांच्या या धोरणामुळेच मध्ययुगीन महाराष्ट्रात हिंदूंचा कडवा विरोध अथवा रक्तपात घडविणारे फारसे प्रसंग निर्माण झाले नसावेत".[६०]

मध्ययुगीन कालखंडाचा अभ्यास करतांना हे स्पष्टपणे जाणवते की तुर्की, खिलजी सलतनतींनी आणि मुघल सुभेदारांनी, काही प्रमाणात का होईना येथील संस्कृती, चालीरिती, सामाजिक धार्मिक

---

५९. हबील व खान (इंग्रजी अनु.) **पॉलिटिकल थिअरी ऑफ देल्ही सलतनत**, मुळ लेखक बरनी झियाऊद्दीन, फतवा-इ-जहांगीरी, पृष्ठ ३९, ४०.

६०. खरे, ग. ह., पूर्वोक्त, पृष्ठ १३.

रूढी आणि परंपराचा स्विकार केला. त्यामुळेच की काय स्थानिक रयतेकडून होणाऱ्या विरोधाची धार बोथट झाली. ही धार बोथट व्हायला भिन्न प्रवाह सामावून घेण्याची भारतीय मानसिकता आणि भारतीयत्व टिकविण्याची भारतीय समाजाची क्षमताही कारणीभूत होती.

मध्ययुगीन सलतनतींबद्दल आणखी एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. " सलतनत " हा राज्य प्रकारच तसे पाहिले असता इस्लामी राजकारणात नवीन प्रकार होय. खलीक अहमद निजामी यांच्या मते, "सलतनत ही संकल्पना शरियतच्या मर्यादेबाहेरची होती. धर्मगुरूची मान्यता आणि राजाश्रयामुळे ती टिकून राहिली."[६१] तशी सलतनत ही संकल्पना मुळात इराणात होती व तेथून पुढे तिचा प्रचार झाला. सुलतान या शब्दाला मध्ययुगात राजा म्हणून जी मान्यता होती ती इस्लामच्या सुरुवातीच्या काळात नव्हती. या सलतनतीने तर मध्ययुगात राज्य करण्यासाठी खलीफाची मान्यता घेण्याची प्रथाही मोडीत काढली. खुद्द अल्लाऊद्दीन खिलजीनेच हे केले. त्याला तर असेही वाटत होते की शरीयतच्या कायद्यानुसार हिंदुस्थानातील बहुसंख्य हिंदू प्रजेवर राज्य करणे शक्य नाही. तेव्हा त्याने या कायद्यास संमत नसलेल्या अनेक नवीन प्रथांची सुरुवात केली.[६२] खिलजी, तुघलक, बहमनी सुलतानांनी राज्य टिकविण्यासाठी हिंदूंचा सहभाग आवश्यक आहे हे तत्त्व ओळखले होते. त्यामुळे मध्ययुगीन मुस्लिम सलतनतींची वाटचाल काही अंशी भारतीय संस्कृती आणि परंपराकडे झुकत चाललेली दिसते तरीही राज्याचा चेहरामोहरा निश्चितपणे इस्लामी राखला गेला हेही विसरता येत नाही.

तात्पर्य वर उल्लेखिलेल्या अनेकविध कारणांमुळे स्थानिक रयतेची मानसिकता, या नव्या आक्रमक सलतनतींच्या राज्याला स्विकारण्याचीच राहीली. हा स्विकार कधी दहशतींचा, अत्याचारी जुलमांचा परिपाकही होता. या विषयीचे अत्यंत विश्लेषणात्मक विवेचन ग. ह. खरेंनी " महाराष्ट्र महोदयाचा पूर्वरंग " या प्रकरणात केले आहे.[६३] धर्माने, संस्कृतीने, भाषेने, विचाराने, तत्त्वज्ञानाने आणि इतर अनेक प्रकारे भिन्न असल्यामुळे आक्रमक सुलतानी राजसत्तेचे येथील समाजावर अनेक प्रकारचे परिणाम झाले. मूर्तीपुजेला त्यांनी सतत विरोध केला एवढेच नव्हे तर स्थानिक रयतेची श्रद्धास्थान असलेल्या मूर्ती आणि देवळं त्यांनी उद्ध्वस्त केली. गावांची नावे बदलली. इतर अनेक प्रकारचे अत्याचार केले. परिणामी स्थानिक रयत आपले स्वत्व गमावून बसली. विरोध करण्याचे रयतेचे सामर्थ्यच नष्ट झाले. असे असले तरी या सुलतानी अत्याचाराविरुद्ध प्रतिक्रिया उमटत राहिल्या. संत नामदेवांच्या अभंगातून, महानुभावांच्या रचनांमधून या प्रतिक्रिया दिसतात. या प्रतिक्रिया सामाजिक मानसिकतेतील उद्वीग्नता दर्शवितात.

एका बाजूला ही उद्वीग्नता दिसते तर दुसऱ्या बाजूला मुस्लिम शास्ते आणि बहुसंख्य हिंदू शासित यांच्यात सामाजिक राजकीय आणि आर्थिक हितसंबंध गुंतलेले दिसतात. " सुलतानाच्या राजकीय विकासाच्या स्पर्धेत हळुहळु वरच्या दर्जाची साधने येथील बहुजन समाजातील कर्तबगार लोकांना मिळू

६१. निझामी, के. ए., **स्टेट ॲण्ड कल्चर ऑफ मिडीव्हल इंडिया**, न्यू दिल्ली, १९८५, पृ. ११.

६२. खरे, ग. ह., पूर्वोक्त, पृ. १४.

६३. कित्ता, पृ. १८.

लागली. त्यात कोणकोणत्या जमाती पुढे आल्या हे पाहिले तर ब्राम्हण, मराठे, धनगर या तीन जमातींची नावे डोळ्यापुढे येतात. ते सर्व पुकासेदार किंवा जहागीरदार असलेले दिसतात.[६४] मुस्लिम सलतनती आणि त्यांचे सरदार दरकदार नव्याने जिंकलेल्या प्रदेशात अत्याचार करीत असले तरी वतनदार व जहागीरदार यांची मने दुखविणारी कृत्ये जाणून बुजून सहसा करीत नसत. या वरुन एक शक्यता नाकारता येत नाही की जहागीरदारांच्या प्रभावाखाली राहत असलेली प्रजा धार्मिक आणि सामाजिक अत्याचारापासून मुक्त असावी.[६५]

**संस्कृती समन्वयाचा प्रारंभ :**—महाराष्ट्रामध्ये १५ व्या शतकानंतर परिस्थिती बदलू लागली. दोन भिन्न धर्मीय गट काही प्रमाणात समन्वय साधू लागले. चालीरिती, रुढी, परंपरा, पोषाख पद्धती याबाबतीत आदानप्रदान होऊ लागले. लोकजीवनावर परिणाम होऊ लागला. याच काळात नवीन लोकभाषेची जडणघडण झाली. सुलतानी शासकांनी तुर्की, अरबी आणि फार्सी भाषांचा वापर सुरू केला. परिणामी या भाषा आणि स्थानिक रयतेची मायबोली मराठी यांच्या मिश्रणातून खडी बोली नावाची लोकभाषा विकसित झाली. लष्करी आणि राज्यकारभारविषयक शब्द त्यात रूढ झाले. ती भाषा रूळली आणि दख्खनी हिंदी किंवा दख्खनी उर्दू म्हणून ओळखली जाऊ लागली. ही भाषा मुख्यतः अरबी, फार्सी, तुर्की आणि मराठीचे मिश्रण होते. सुलतानांच्या दरबारातील अधिकृत भाषा फार्सी होती. परंतु दरबारातील फर्माने फार्सी-मराठी, फार्सी-कानडीतून निघत.

या सलतनती राज्यातल्या काहींनी तरी निश्चितपणे संस्कृत आणि मराठी भाषेचे ज्ञान अवगत केले होते. हिंदू धर्म व तत्त्वज्ञान समजून घेतले होते. काही मुस्लिम लेखकांनी मराठीतून अप्रतिम ग्रंथ रचना त्या काळात केली होती. " कल्पसमुह " या नावाची सैद महमदांची रचना याचे एक अप्रतिम उदाहरण होय. यादवोत्तर कालखंडातील या ग्रंथाचा कर्ता मुस्लिम असूनही ग्रंथाची भाषा शुद्ध मराठी आहे. त्यावर अरबी फार्सीचा कुठलाही परिणाम झालेला नाही.[६६] अशीच एक दख्खनी उर्दूतील रचना उल्लेखनीय ठरावी. पंधराव्या शतकाच्या सुरुवातीस लिहिला गेलेला " मनसबी कदमराव पदमराव " हा ग्रंथ हिंदू-मुस्लिम संस्कृतीचा समन्वय कसा घडला याचे प्रत्यंतर देणारी रचना होय. ग्रंथाचा विषय आहे नाथपंथाचे तत्त्वज्ञान. त्या विषयाला अनुसरून मराठी संस्कृतीची, भाषेची ओळख लेखकाने करून दिली आहे. फकरूद्दीन निजामी यांची ही रचना डॉ.जमील ह्यांनी संपादीत केली आहे.[६७]

दख्खन पठारावरील तुघलक सुलतानांची सत्ता संपुष्टात येऊन बहमनी राज्याची स्थापना झाली आणि संस्कृती संयोगाची प्रक्रिया आणखी थोडी गतीमान झाली. हिंदूंचे नष्टचर्य संपले नाही. स्थानिक मुस्लिम राज्यकर्ते आता प्रादेशिक अभिमान बाळगू लागले आणि मुस्लिमांच्या मध्येच संघर्ष अधिक तीव्र बनत गेला. इराणी आणि तुर्की मुस्लिमांशी त्यांचे खटके उडू लागले. दख्खनी राज्यामध्ये हिंदूंचा

६४. कुलकर्णी, अ. रा., आणि खरे, ग. ह. (संपा.), **मराठ्यांचा इतिहास**, खंड १, पृ. ५०,५१.

६५. कित्ता, पृ. ५२.

६६. सैद महंमद, **कल्पसमूह**, (संपादन, डॉ. मुंडी), पुणे, १९८८, पृ. ४.

६७. निजामी फकरुद्दीन, **मनसवी कुदमराव पदमराव**, (संपादन, डॉ. जमील), नवी दिल्ली १९७९, पृ. १०.

प्रभाव वाढू लागला त्यांच्या कारभारात देवनागरी लिपीला आणि स्थानिक भाषेला महत्त्व येऊ लागले. मराठी भाषा आणि हिंदू संस्कृतीचा प्रभाव दख्खनी उर्दूवर जाणवू लागला. पुढील काही शतकात हा प्रभाव वाढतच गेला. सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धातील विजापूरचा सुलतान इब्राहिम आदिलशहा तर स्वतः सरस्वतीचा आणि गणेशाचा भक्त होता. त्याने रचिलेला " नवरसनामा " ग्रंथ प्रसिद्ध आहे. त्याच्या राजदरबाराच्या पत्रव्यवहारातही सरस्वतीला मानाचे स्थान दिले होते. त्याच्या पत्राच्या शिर्षभागी " अजपुजा सरसती " असे लिहिले जात असे.[६८]

अशा प्रकारे सांस्कृतिक देवाणघेवाण सुरू झाली. मुस्लिम सुलतान आणि हिंदू प्रजा जवळ येत गेली. काही ठिकाणी संघर्षही होत राहिले. तरीही पोषाखपद्धती, आचार आणि इतर चालीरीती संदर्भात आदानप्रदान होत राहिले. हिंदू रयतेच्या जीवन पद्धतीत, चालीरितीत बदल घडत गेले. अनेकांनी मुस्लिम सलतनतीची चाकरी स्विकारली. त्यात कुठेही धर्माचा आपपरभाव दिसत नाही. या राजसत्ता परकीय आहेत ही भावना देखील हळू हळू लोप पावत गेली. फार्सी भाषेतील असंख्य शब्द मराठीत रूळले. अनेक मराठी सरदार राजदरबारातून वावरत. साहजिकच राजदरबारातील फार्सी भाषेतील शब्दांचा वापर हे प्रतिष्ठितपणाचे लक्षण ठरले, आणि फार्सी शब्द मराठीत आले. नवे प्रवाह आत्मसात करण्याची भारतीयांची मानसिकताही याला कारणीभूत होतीच. अनेक जुनी आडनावे कायम राहीली नवी आडनावे प्रचारात आली. अमलदार, इनामदार, चोपदार, जामदार, मनसबदार, शिलेदार, सिकंदार अशी अनेक नवी नावे मराठीने स्विकारली. कारखानीस, पारसनीस, हजरनवीस, सबनीस ही सगळी नावे सलतनतीच्याच काळात शासकीय पदनामे म्हणून प्रचारात आली होती.

**वतनदारीचा प्रारंभ :**—स्थानिक रयतेचा विरोध न होण्याचे आणखी एक कारण म्हणजे या सलतनतींनी सुरु केलेली वतन पद्धत होय. " वतन हा मूळचा अरबी भाषेतला शब्द. गावकीची कामे व त्यासाठीचे अधिकार व तेथील जमीन हा वतन या शब्दाचा मूळ अर्थ आहे."[६९] सुलतानी पादशहांनी या वतनदारी पद्धतीचा अवलंब करून स्थानिक रयतेला आपलेसे करून घेतले. या वतनात श्रेष्ठ वतन होते देशमुखीचे, त्या खालोखाल पाटीलकी, त्यानंतर कुलकर्णी, देशपांडे हे दुय्यम दर्जाचे वतनदार. ही वतने धारण करणारी मंडळी स्थानिक प्रशासनात प्रत्यक्ष राजेच असत. स्वतःच्या नावाचे नाणे ही गोष्ट सोडली तर प्रतिष्ठा, प्रांत, सत्ता, फौज, हाताखालचे अधिकारी व रयत ही सर्व राजलक्षणे देशमुखी वतनात सामावलेली होती. या वतनदारीने स्थानिक रयतेपैकी काहीजण इतके आकर्षित झाले होते की त्यांच्या सर्व निष्ठा वतनापायी कायमस्वरूपी पातशाहीकडेच गहाण राहिल्या. असल्या लोकांकडून विरोध तो काय होणार ? तात्पर्य पश्चिम महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य प्रस्थापनेच्या कालखंडापर्यंत कमी अधिक प्रमाणात संघर्ष सतत चालू राहिला. मराठवाड्यात नांदेड परिसरात तर हा संघर्ष २० व्या शतकाच्या मध्यापर्यंत आढळतो. या पार्श्वभूमिवर आपण मध्ययुगीन नांदेडचा मागोवा घेणार आहोत.

**नांदेड परिसरातील पडसाद :**—आजच्या नांदेड जिल्ह्याचा मध्ययुगीन इतिहास एकूण दख्खन पठारावरील राजकीय घडामोडींशी प्रत्यक्ष संबंध ठेवून होता. मराठवाडा, विदर्भ आणि खानदेश या

६८. इथापे, उषा (संपा.), **नवरसमाला**, कोल्हापूर, पृ. ५.

६९. जोशी, शं. ना., **मराठेकालीन समाजदर्शन**, पुणे, १९६०, पृ. २२२.

भूप्रदेशात घडणाऱ्या संघर्षाचे पडसाद नांदेड जिल्ह्याच्या परिसरातही उमटले. हे पडसाद समजून घेण्याअगोदर दख्खन पठारावरील राजकीय स्थित्यंतरे समजून घेणे अगत्याचे आहे. इसवी सनाच्या तेराव्या शतकापर्यंत मराठवाड्याचा परिसर म्हणजेच महाराष्ट्रातील गोदा खोरे, संपन्न अशा राजसत्तांचे माहेरघर होते. इसवीसन पूर्व ५ व्या शतकातील अश्मक आणि मूलक ही दोन्ही महाजनपदे याच परिसरातील. त्यानंतर अनुक्रमे सातवाहन, वाकाटक, पूर्वचालुक्य, राष्ट्रकूट, उत्तर चालुक्य, यादव, शिलाहार, कलचुरी या राजसत्तांच्या कालखंडात या परिसराने आर्थिक संपन्नता, राजकीय स्थैर्य, प्रचंड व्यापार उदीम उपभोगली. मोठ मोठी व्यापारी शहरे इथे उदयाला आली. अप्रतिम कलाविष्कार घडला. हजार वर्षांच्या या वाटचालीत अनामिक कलाकारांचे संघ आपल्या छिन्नी हातोड्यांनी येथील दऱ्याखोऱ्यातून सह्याद्रीच्या कड्याकपारीतून अप्रतिम कला अविष्कार घडवित होते. या कला अविष्काराला उदार हस्ते मदत करणारे संपन्न व्यापारी इथे होते. राजघराण्याच्या कोषागारात अमाप संपत्ती होती. इथल्या संपन्नतेच्या कथा अरब व्यापाऱ्यांमार्फत सर्वदूर पसरल्या होत्या.

मध्यप्रदेशातील कडा प्रांताचा सुभेदार अल्लाऊद्दीन खिलजी यानेही देवगिरी परिसरातील संपन्नतेच्या गोष्टी ऐकल्या होत्या. खिलजी राजसत्तेने आपले हेर पाठवून एकूण परिस्थितीचा अंदाज बांधला होता. प्रचंड धन देवगिरी परिसरात म्हणजेच आजच्या मराठवाड्यात उपलब्ध होईल याची त्या राजसत्तेला खात्री झाली. म्हणूनच की काय अल्लाउद्दीन खिलजीने दिल्लीचा तख्त काबीज करण्यासाठी लागणारे धन मिळविण्यासाठी देवगिरीवर स्वारी करावयाचे ठरवले.[७०] देवगिरीच्या संपन्नतेची कल्पना, येथील व्यापाराचे स्वरूप येथील कापडउद्योग याचे अप्रतिम वर्णन 'इसामी' या समकालीन इतिहासकाराने करून ठेवले आहे. तो लिहितो, प्रत्येक घरातून हिरे माणकांच्या राशी होत्या. सोने आणि चांदीने ही घरे तुडंब भरली होती. रेशमी कापडाचे ठाण बाजारात सर्वत्र दिसत तर सर्व प्रकारच्या उंची अत्तराचा घमघमाट अनेक ठिकाणी पसरलेला जाणवत होता. सर्वत्र निरनिराळ्या प्रकारचे कापडांचे ढिग दिसून येत.'[७१]

या संपन्नतेचा आणखी एक पुरावा फेरिश्ता या समकालीन इतिहासकाराच्या लिखाणातूनही मिळतो. तो लिहितो की अल्लाउद्दीनच्या सैन्याने मुक्तपणे दवेगिरीची लूट केली. या लुटीचे टिपण लिहायला लेखकाला शंभर वर्षांचा अवधी लागेल.[७२] यातला अतिशयोक्तिचा भाग सोडून दिला तरीही मराठवाड्याच्या आणि विशेषतः देवगिरीच्या यादव साम्राज्याच्या संपन्नतेची कल्पना यावी. या काळातही संघर्ष होताच. प्रादेशिक लढाया होत. परंतु एकूण राजकीय परिस्थिती बरीच स्थिर होती. याची पावती एक हजार वर्षाच्या कालखंडातील अप्रतिम कलावैभवातून मिळते. हे कलावैभव आर्थिक संपन्नतेची, राजकीय स्वास्थ्याची साक्ष देते. १३ व्या शतकात हे सारे बदलू लागले. पराकोटीचा सत्तासंघर्ष सुरू झाला. त्याची झळ नांदेड जिल्ह्यालाही बसली. या संघर्षाबरोबरच प्रशासन व्यवस्थेतही बदल घडला.

---

७०. कुलकर्णी, खरे, पूर्वोक्त, पृ. २.

७१. इसामी, **फतुह सलातीन**, (संपादन, एम्. उषा) मद्रास, १९४८, पृ. १६५, २३४.

७२. कुंटे, भ. ग., (अनु.) फरिश्ता लिखित **गुलशने इब्राहिमी**, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, पुणे, १९८२.

नवी सुभेदारी व्यवस्था उदयाला आली. इ.स. १३४६ साली दिल्लीच्या सलतनतीने दख्खन पठारावर चार सुभे निर्मिले. नांदेडचा समावेश या सलतनती सुभ्यामध्ये झाला. याच दरम्यान मुहंमद तुघलक याने आपली राजधानी दिल्लीहून देवगिरीला आणण्याचा प्रयत्न केला. इ.स. १३४७ साली झफरखान उर्फ हसन गंगु बहमनी याने दिल्ली सलतनतीविरुद्ध बंड केले आणि स्वतःचे एक सत्ताकेंद्र गुलबर्ग्यात निर्माण केले. अल्लाउद्दीन बहमनशाह म्हणून तो सत्तेवर आला आणि दख्खन पठारावर बहमनी सत्तेचा उदय झाला.[७३] इ.स. १४२९ साली बहमनी सत्तेचे केंद्र गुलबर्ग्याहून बिदरला स्थलांतरीत झाले. नांदेड जिल्ह्याचा इतिहास पुढील १५० वर्षे बहमनी सत्तेशी निगडीत राहिला.[७४] बहमनी राजसत्तेने आपले राज्य चार तरफांमध्ये विभागले होते. प्रत्येक तरफ वर तरफदार नेमलेला असे. नांदेड जिल्ह्याचा समावेश वऱ्हाड आणि बिदर तरफेत झालेला होता. आजच्या नांदेड जिल्ह्यातील गोदावरीचा उत्तर काठ आणि पैनगंगेचा दक्षिण काठचा प्रदेश हा वऱ्हाड तरफेचा भाग होता.[७५] सफदरखान सिस्तानी हा वऱ्हाड तरफेचा तरफदार होता. प्रत्यक्ष नांदेड तसेच कंधार, कौलास, कोटगीर आणि मेदक (सध्या आंध्र प्रदेशातल्या निजामाबाद जिल्ह्यात समाविष्ट आहे) या सर्व प्रदेशाचा समावेश बिदर तरफेत झालेला होता. अझम-इ-हुमायुन हा या तरफेचा तरफदार होता. बहमनी सलतनतीच्या विरुद्ध तुघलक सुलतानांच्या कारवाया सुरूच होत्या. यातूनच प्रखर सत्तासंघर्ष होई. लढाया होत. अशा काही लढाया नांदेड परिसरातही झाल्या. कंधारचा भूईकोट किल्ला या परिसरातले प्रमुख सत्ताकेंद्र होते. राष्ट्रकूट नृपतींनी त्यांच्या उपराजधानीत बांधलेला कंधारचा हा किल्ला मध्ययुगीन राजकरणातही महत्त्वपूर्ण भूमिका बजावित राहिला. तुघलकांच्या सैन्याची एक तुकडी कंधारच्या किल्ल्यात तैनात होती. दख्खनच्या राजकारणात सत्तापालट झाला. बहमनींचा प्रभाव वाढला. तुघलकांचे वर्चस्व कमी होऊ लागली. कंधारच्या किल्ल्यातले तुघलकांचे सैन्य बहमनींकडे झुकले. बहमनी सैन्याचा अधिकारी गुरसप कंधारच्या किल्ल्यावर आला आणि त्याने किल्ला ताब्यात घेतला. बहमनी सैन्याने त्याला सलामी दिली व त्याचे नेतृत्व स्विकारले.[७६] कंधारचा किल्ला हे बहमनींचे लष्करी ठाणे बनले. कोटगीरचा किल्ला हे नांदेड जिल्ह्यातले बहमनींचे आणखी एक लष्करी ठाणे, ही दोन्ही लष्करी ठाणी तुघलक सलतनतीच्या कारकिर्दीतच उदयाला आली होती. त्यामुळेच तुघलक-बहमनी संघर्षाचे चटके नांदेड जिल्ह्यालाही बसले.

हा सत्तासंघर्ष चालू असतांना लढाया, स्वाऱ्या होत असतांनाही काही सत्पुरुष ईश्वरावरची श्रद्धा दृढ करून, सामान्य रयतेचा आत्मविश्वास वाढवीत संचार करीत होते. अकोल्याजवळच्या कारंजा या गावी जन्मलेले नृसिंह सरस्वती याच काळात भारतभर संचार करून नांदेड परिसरात गोदाकाठी बासरला स्थिरावले होते. त्यांनी कलीकाळालाही न भिण्याचा संदेश दिला आणि ईश्वरावर

---

७३. नटराजन् आणि प्रेमा रामकृष्णन, **पॉलीटीकल ॲण्ड कल्चरल हिस्ट्री ऑफ इंडिया**, व्हॉल्युम १, सिकंदराबाद १९८३, पृ. ४२२.

७४. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, १९७१, पृ. ४८.

७५. कित्ता.

७६. कित्ता, पृ. ४९.

श्रद्धा ठेवण्याचा उपदेश केला.[७७] याच काळात सुफी संतांपैकी काहींचा वावरही नांदेड परिसरात राहिला. सुफी सुलतान सांगडे मुश्कीले आसान यांनी कंधारला सुफी संप्रदायाचे एक केंद्र विकसित केले ते ही साधारणतः याच काळात.[७८]

सत्तासंघर्षाचे नांदेड परिसरातील आणखी एक केंद्र होते माहूर. येथला डोंगरी किल्ला अनेक लढायांचा साक्षीदार आहे. या किल्ल्याच्या परिसरात खरे तर गोंडाचे राज्य होते. गोंड हे दख्खनच्या पठारावरील वनक्षेत्राचे खरे राजे. तुघलक आणि बहमनी सत्तांच्या विस्ताराला गोंडानी सतत विरोध केला.[७९]

**गोंड राजांनी बहमनी सत्तेला केलेला विरोध :**—बहमनींनी गोंडाचा विरोध मोडून काढीत वऱ्हाड तरफेत आपला जम बसवला खरा पण गोंडराजांनी आपले सारे सामर्थ्य किनवटच्या जंगलात आणि माहूर परिसरात केंद्रित केले. बहमनी सत्तेला शह देण्याचा प्रयत्न तेथून ते सतत करीत राहिले. इ.स.१३९८ साली सुलतानांनी विजयनगरच्या हरिहर दुसरा या राजाविरुद्ध मोहिम उघडली. प्रचंड सैन्याची जमवाजमव केली.[८०] ठिकठिकाणांहून सैन्य बोलावले. विदर्भ तरफेतल्या तरफदाराकडेही खलिता आला. त्याचे सैन्य विजयनगरकडे कूच करून निघाले आणि या संधीचा फायदा घेऊन गोंडांनी बहमनी विरुद्ध मोहिम उघडली. १३९८-९९ साली संपूर्ण वऱ्हाड गोंडांनी बहमनींकडून जिंकून घेतला आणि माहूरच्या किल्ल्यावर गोंडांच्या सत्तेचे केंद्र विकसित झाले. गोंड राज्याची राजधानीच माहुरला राहिली. ते सतत बहमनी सत्तेशी झगडत राहिले. हा संघर्ष नांदेड जिल्ह्याच्या इतिहासाचा एक भाग होता हे लक्षात ठेवले पाहिजे. गोंडांचा उठाव म्हणून जरी हा संघर्ष संबोधला जात असला तरी प्रत्यक्षात गोंडाच्या राज्य रक्षणाचा तो प्रयत्न होता. आदिवासींच्या अस्तित्वाचा तो झगडा होता. हा झगडा चालू असतांना दख्खन पठारावर दुर्गादेवीचा दुष्काळ पडला. या दुष्काळाचे दूरगामी परिणाम नांदेड जिल्ह्यावरही झाले. इ.स. १३९६ पासून दहा अकरा वर्षां पर्यंत नांदेड-किनवट कंधार परिसरातील रयत या दुष्काळाने होरपळत राहिली. तशातच बहमनी-तुघलकी सैन्याचा सत्तासंघर्षही चालूच होता. गोंड जमात आपल्या वनवासी बांधवांसाठी लढतच राहिली. इ.स. १४२६ पर्यंत त्यांनी माहूर आपल्या ताब्यात ठेवले. बहमनींनी त्यावर्षी माहूरच्या किल्ल्याला वेढा दिला. एक प्रचंड संघर्ष या किल्ल्याच्या परिसरात घडला.

दरम्यान बहमनी सलतनतीतला अंतर्गत सत्तासंघर्ष पराकोटीला पोहचला. फिरोजशहा बहमन विरुद्ध उठाव झाला. त्याचा भाऊ अहमदशहा बहमन हा नवा सत्ताधीश बनला. त्यानेच बहमनी राज्यावरील आपली पकड पक्की करण्याचे प्रयत्न सुरू केले. माहूरवर हल्ला केला. गोंडांच्या

---

७७. पगडी, सेतूमाधवराव, "मध्ययुगीन नांदेड", **स्थानिक इतिहास आणि साहित्य, एक शोध**, संपादक देव, गाडगीळ, १९८५, पृ. ७४.

७८. पगडी, सेतूमाधवराव, **सुफी संप्रदाय आणि तत्त्वज्ञान**.

७९. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, पूर्वोक्त, पृ. ४९.

८०. मुजुमदार, आर. सी (संपा.), **दि देल्ही सलतनत**, हिस्ट्री ॲण्ड कल्चर ऑफ इंडियन पिपल, व्हॉल्युम ६, मुंबई, १९६७, पृ. २८१.

Maharashtra State Gazetteers

ताब्यातले वऱ्हाड जिंकायचा प्रयत्न केला.[८१] त्याने एलीचपूर पर्यंत मजल मारली आणि इ.स. १४२८ तो गुलबर्ग्यात परतला. गुलबर्गा ही बहमनीची सुरुवातीची राजधानी होती. इ.स. १४२६ साली माहूरच्या किल्ल्यावर गोंडांनी लढा दिला. शेवटी बहमनींच्या सामर्थ्यापुढे गोंडांची सत्ता अपुरी पडली. बहमनींनी माहूर जिंकले. नांदेड जिल्ह्यातला बहमनी सलतनतीला होणारा विरोध कोलमडून पडला. बहमनींची सत्ता स्थिरावली.

नांदेड जिल्ह्यातील खेरलाचा गोंड राजा नरसिंगदेव हा देखील अनेक वर्षे बहमनींशी लढत राहिला. माळव्यातून होशंगशाहचे देखील त्याच्यावर हल्ले सुरु होते. त्यांच्याशीही त्याने सामना दिला. १४२८ मध्ये बहमन सुलतान अहमदशाहने आपले सैन्य नरसिंगदेवाच्या मदतीला पाठवले आणि माळव्याच्या होशंगशाहला पळवून लावले. गोंड राजा आणि बहमनी यांच्यात सलोख्याचे संबंध प्रस्थापित झाले. मध्यंतरीच्या धामधुमीच्या काळात संपूर्ण दख्खन पठार बेचिराख झाले होते. जमिनीची मशागत करणे अशक्य झाले होते. आता परिस्थिती थोडीशी स्थिरस्थावर झाली आणि बहमनी सुलतानाने मलीक-उज् जफर या अधिकाऱ्याला संपूर्ण दख्खनची पाहणी करण्यास पाठवले. त्याने राज्याची पुनर्रचना केली. जमिनीची मशागत व्हावी म्हणून जमिनी शेतकऱ्यांना दिल्या. शेतसाऱ्याची व्यवस्था केली.

**बहमनींचे राजकारण :—** इ.स.१४३६ साली अहमदशाह बहमनचा मृत्यु झाला. त्याच्यानंतर त्याचा मोठा मुलगा अल्लाउद्दीन अहमद दुसरा हा राज्यावर आला. अंतर्गत बंडाळीला ऊत आला. इ.स.१४५५ मध्ये तेलंगण तरफेत जलालखानाने बंड केले आणि तो स्वतंत्र झाला.[८२] तेलंगणचा सुलतान म्हणून त्याने स्वत:ला घोषीत केले, ही बंडाळी नांदेड जिल्ह्यातही येऊन पोचली. जलालखानाने सिकंदरखानाला फौज देऊन माहूर किल्ल्यावर पाठवले. माहूरच्या किल्ल्यावरील लष्करी ठाण्यात बंड व्हावे व किल्ला आपल्या ताब्यात यावा असा प्रयत्न सिकंदरखानाने सुरू केला.[८३] तर इकडे माहूरवर ताबा मिळविण्यात सिकंदरखान यशस्वी होताच त्याच्याही मनात बंडखोरी आली. त्याने मावळ्याचा सुलतान महंमदशाह खिलजी याला निरोप पाठवला की बहमनी सुलतानाचा मृत्यु झाला असून वऱ्हाड आणि तेलंगणा परिसर ताब्यात घेण्याची ही सुसंधी आहे. परिणामी माळव्यातून सुलतान महंमदशाह खिलजी आपल्या सैन्यानिशी माहूरवर चालुन आला. इ.स. १४५६ साली त्याने माहूर परिसरात तळ दिला.

बहमनी राज्यातली ही बंडाळी मोडून काढण्याचा प्रयत्न सुलतान अल्लाउद्दीन अहमदशाह दुसरा याने केला. बंडाळी बरोबर माळवा आणि खानदेशाच्या सुलतानांच्या आक्रमणाचाही धोका होताच. हे सुलतानही वऱ्हाडवर डोळा ठेवून होतेच. तेव्हा अलाऊद्दीन अहमदशाह दुसरा या बहमनी सुलतानाने या परिस्थितीला खंबीरपणे तोंड दिले. खानदेशच्या सुलतानाविरुद्ध त्याने वऱ्हाडची फौज तयार ठेवली. या फौजेने वऱ्हाडचा सुलतान आदिलखान याचा मार्ग रोखला. त्याला तेलंगणात पाठवले. महंमद

८१. कित्ता, पृ. २६१.

८२. कित्ता, पृ. २५९.

८३. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, पूर्वोक्त, पृ. ५०-५१.

Maharashtra State Gazetteers

गवानची प्रचंड फौज तेलंगणातील जलालखानाचे बंड मोडून काढण्यासाठी कूच करून निघाली. दौलताबादचा सफसिकनखान यास त्याने माहूरकडे येण्यास सांगितले. त्याची फौज माहूरकडे निघाली. बहमनी सुलतान स्वतः विजापूरातले सैन्य घेऊन माहूरकडे निघाला. नांदेड जिल्ह्यातील माहूर किल्ल्याच्या परिसराला युद्धभूमीचे स्वरूप आले. माळव्याच्या सुलतानाला परिस्थितीची जाणीव झाली. आपण बहमनी सैन्याला तोंड देऊ शकणार नाही याची कल्पना येताच माळव्याच्या महंमद खिलजीने आपली फौज मागे घ्यायला सुरुवात केली व तो माहूरला परतला.[८४] संघर्ष टळला. माहूर तरफ पुन्हा तरफदार फक्र उल् मुल्कच्या ताब्यात देण्यात आला आणि बहमनींचा प्रभाव नांदेड जिल्ह्यात कायम राहिला.

दरम्यान बहमनी राज्याची राजधानी इ.स. १४२९ साली गुलबर्ग्याहून बिदरला आणली गेली. सुलतान अहमदशाह पहिल्याने हे राजधानीचे स्थलांतर केले आणि बिदर शहराचा विकास घडवून आणला. मुस्लिम सलतनतींमधला अंतर्गत संघर्ष चालू राहिला. खानदेशचा सुलतान व माळव्याचा सुलतान संधीची वाट पाहात होते. इ.स.१४६१ मध्ये बहमनी राज्यावर निझामशाह नावाचा अल्पवयीन मुलगा सत्तेवर आला. या संधीचा फायदा घेऊन माळव्याच्या सुलतानाने आपली फौज पश्चिम वऱ्हाडातून बहमनी राज्यात घुसवली.[८५] हे सैन्य थेट नांदेड जिल्ह्यातल्या कंधारपर्यंत येऊन धडकले. बहमनींच्या फौजाही वऱ्हाडातून, दौलताबादेहून, आणि विजापूरातून निघाल्या. सगळ्या बाजूंनी धुळवडा उडवत घोडे दौडु लागले. सारी सामान्य रयत भयभीत झाली. दोन्ही फौजा समोरासमोर आल्या आणि नांदेड जिल्ह्यात कंधार परिसरात एक मोठी घनघोर लढाई झाली.[८६] सुरुवातीला बहमनींची पिछेहाट झाली. माळव्याच्या फौजा बिदरपर्यंत जाऊन धडकल्या. बहमनी राजधानी तात्पुरती गुलबर्ग्याजवळ फिरोजाबादला स्थलांतरीत करण्यात आली. महंमद गावानने गुजरातच्या सुलतानाकडे मदत मागितली. गुजरातच्या सुलतानाची ८० हजारांची फौज नांदेडकडे निघाली व माळव्याच्या सीमेवर येऊन धडकली. त्यांनी माळव्याच्या सुलतानाची झोप उडवली. इकडे महमद गवानने माळव्याच्या फौजेची नाकेबंदी केली. शेवटी माळव्याच्या सुलतानाला कंधार परिसरात हार पत्कारावी लागली. कंधारहून त्याचे सैन्य माळव्याकडे परत फिरले. नांदेड जिल्ह्यातला एक मोठा संघर्ष संपला. सामान्य रयतेने सुटकेचा निश्वास टाकला.

या संघर्षातून बाहेर पडतो न पडतो तोच नांदेड जिल्ह्यातील मोठा दुष्काळ पडला. इ.स. १४७३-७४ हे वर्ष साऱ्या दख्खन पठारावर नापिकीचे (संकटाचे) वर्ष ठरले.[८७] पावसाचे प्रमाण अत्यल्प राहिले. दुसऱ्या वर्षीही अशीच परिस्थिती राहिली. या दोन वर्षांच्या दुष्काळात रयतेचे प्रचंड हाल झाले. उपासमारीने अनेकांचे मृत्यु ओढवले. रयतेने गुजरात-माळव्याकडे स्थलांतर करायला सुरुवात केली. लोकांचे लोंढेच्या लोंढे स्थलांतर करताना दिसू लागले. चार पाच वर्षे तरी परिस्थितीत फारसा बदल झाला नाही. पुढे हळु हळु परिस्थिती सुधारली.

---

८४. नटराजन् आणि प्रेमा रामकृष्णन्, पूर्वोक्त, पृ. ४२६-२७.

८५. कित्ता, पृ. ४२८.

८६. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, पृ. ५३.

८७. मुजुमदार आर. सी., खंड ६, पूर्वोक्त, पृ. २६५.

**महंमद गवानचे लष्करी ठाणे :—** बहमनी सलतनतीचा वजीर महंमद गवान याने बहमनी राज्याची प्रशासकीय पुनर्रचना करण्याचे काम हाती घेतले. या महंमद गवानचे लष्करी ठाणे नांदेड शहराच्या परिसरातच होते. त्याची आठवण म्हणून आजही नांदेडमध्ये वजीराबाद नावाची वस्ती आहे.[८८] या वजीर महंमद गवानने केलेल्या प्रशासकीय सुधारणेत बहमनी राज्याचे चार तरफ रद्द करण्यात येऊन आठ नवे सुभे निर्माण करण्यात आले. या पुनर्रचनेनुसार आजचा नांदेड जिल्हा माहूर सुभ्याचा भाग बनला.[८९] नांदेड जिल्हा आकाराला यायला लागला तो येथपासून. यापूर्वी नांदेडची विभागणी माहूर व तेलंगणा तरफेत झालेली होती. ते आता बदलले. विदर्भात गावील येथे आणखी एक सुभा निर्माण करण्यात आला. माहुरच्या सुभेदारीत सुभेदार म्हणून फत्तेउल्लाह-इमाद-उल्-मुल्क रूजु झाला. नांदेड-कंधार परिसरात खुद्द वजीर महंमद गवानचे लष्करी ठाणे उभे राहिले. त्याने बहमनी राज्यातले किल्ले संरक्षित केले. तेथे स्वतंत्र किल्लेदार नेमून त्यांच्यावर फौजेची जबाबदारी टाकली. राज्यातल्या सुभेदारांचे ठाणे सुभ्यातल्या प्रमुख किल्ल्यावर त्याने निश्चित केले. इ.स. १४८० च्या दरम्यान सुलतान महमूद तिसऱ्याच्या काळात या साऱ्या सुधारणा झाल्या.

महंमद गवानच्या विरुद्ध राजदरबारात मात्र बरेच राजकारण घडले. इ.स. १४८१ साली या राजकीय कट कारस्थानाचा परिणाम वजीर महंमद गवानच्या मृत्युत झाला.[९०] त्याला देहदंड देण्यापर्यंत सलतनतीतले कटकारस्थान पोहोचले. पराकोटीचा सत्तासंघर्ष सगळीकडे चालू होता. प्रत्येकालाच सुलतान बनण्याची इर्ष्या होती. दुसऱ्या सलतनतीवर, सुभ्यावर, तरफेवर हल्ला करून ते काबीज करणे, रयतेवर लूटमार करून जरब बसवणे हे नित्याचे होते. इ.स. १४८२ साली सुलतान महमंदशाह तिसरा बहमनी मृत्यु पावला व त्याचा १२ वर्षांचा मुलगा महमुदशाह अल्पवयीन राजा म्हणून सत्तेवर आला. सलतनतीतील सारी सत्ता कासीम बरीदने आपल्या हाती घेतली व पालनकर्ता राजा म्हणून तो कारभार पाहू लागला. सलतनतीतल्या अनेकांना हे आवडले नाही. राज्यातल्या बंडाळीला जोर चढला. अहमदनगरचा सुभेदार अहमद निजाम स्वतंत्र झाला. त्याने आपले निजामशाही राज्य अस्तित्वात आणण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू केले. गावील सुभ्याचा सुभेदार इमाद-उल्-मुल्क यानेही आपल्या सुभेदारीचे रुपांतर स्वतंत्र राज्यात करण्याचा प्रयत्न सुरू केला. माहुर सुभ्याचा सुभेदार खुदाबंद खान बहमनी सुलतानाशी इमान राखून होता. कासीम बरीदचे सलतनतीतले महत्त्व वाढत गेले. तो सर्वसत्ताधीश बनला.[९१]

**कासीम बरीदचे लष्करी ठाणे :—**नांदेड जिल्ह्यातील कंधारचा किल्ला हा कासीम बरीदचे प्रमुख लष्करी ठाणे बनला. कंधार आणि औसा या दोन जहागिरी त्याने मिळविल्या. संपूर्ण बहमनी राज्यात सुरू झालेला सत्तासंघर्ष पाहून त्याच्याही महत्त्वाकांक्षा प्रबळ झाल्या. आपलेही स्वतंत्र राज्य असावे असे त्यालाही वाटू लागले. कंधार आणि औसा ही दोन प्रमुख ठाणी जहागिरी म्हणून मिळून

---

८८. पगडी, सेतूमाधवराव, "मध्ययूगीन नांदेड", **स्थानिक इतिहास आणि साहित्य**, पूर्वोक्त, पृ. ७६.

८९. नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर, पृ. ५१.

९०. पगडी, सेतूमाधवराव, "मध्ययुगीन नांदेड", पूर्वोक्त, पृ. ७५.

९१. खरे, ग. ह., पूर्वोक्त, पृ. ११९.

Maharashtra State Gazetteers

देखील त्याचे समाधान नव्हते. मराठवाड्यातले इतर काही किल्ले जिंकायचा त्याने प्रयत्न केला. त्याच्या फौजा माहुरवर धडकल्या. बीड आणि शिवनगावचा परिसर ताब्यात घेण्याचाही त्याने प्रयत्न केला. शेवटी बीडला बहमनी सुलतानामध्ये आणि कासीम बरीद मध्ये एक समझोता झाला. तणाव थोडा निवळला. सुलतानाने कंधार, औसा, उदगीर आणि कल्याणी हा सारा परिसर कासीम बरीदला जहागीर म्हणून बहाल केला. तरीही कासीम बरीदची बंडाळी सुरुच राहिली. पंधराव्या शतकाचे शेवटचे दशक हे बहमनी सलतनीच्या अस्ताची नांदी घेऊनच आले. कासीम बरीदने बहमनी सलतनतीचे लचके तोडणे सुरूच ठेवले.[९२] याची परिणिती इ.स.१४९० च्या सुमारास बिदर परिसरात कासीम बरीदची ' बरीदशाही ' या नावाची स्वतंत्र सलतनत अस्तित्वात येण्यात झाली, असे काही इतिहासकार नोंदवतात. प्रत्यक्षात नामधारी का असेना बहमनी सुलतान सत्तेवर होता हे लक्षात घेतले पाहिजे. या नामधारी सुलतानाची सर्व सत्ता कासीम बरीदच्या हाती एकवटली होती हे मात्र खरे. नामधारी का होईना बहमनी सत्ता आणखी काही वर्षे तग धरून राहिली.

याच काळात आणखी तीन सलतनती मात्र निश्चित अस्तित्त्वात आल्या आणि बहमनी सलतनतीचे विघटन सुरू झाले. इ.स.१४९० साली विजापूरचा युसुफ आदिलशाह स्वतंत्र झाला आणि त्याने विजापूरच्या ' आदिलशाही ' सलतनतीची स्थापना केली. तिकडे पश्चिम महाराष्ट्राच्या परिसरात अहमदनगर येथे अहमद निजाम हा बहमनी सुभेदारही स्वतंत्र झाला आणि त्याने ' निजामशाहीच्या ' स्थापनेची घोषणा केली. नांदेड जिल्ह्याला लागून असलेल्या विदर्भात गावीलगड सुभ्यातही बंडाळी माजली. गावीलगडचा इमाद उल्-मुल्क हाही बहमनी सलतनतीविरुद्ध बंड करून उठला आणि त्यानेही ' इमादशाही ' ची घोषणा केली. गोवळकोंड्यातही बहमनी सलतनतीविरुद्ध बगावत झाली आणि ' कुतुबशाही ' अस्तित्वात आली.[९३] पुढील काही वर्षात या पाच सुलतानशाह्या स्थिरावल्या परंतु रयतेवर अत्याचार सुरूच राहिले. १६ व्या शतकात या सुलतानशाह्यांमधला सत्तासंघर्ष पराकोटीला पोहोचला.

**मुघल सत्ताही दख्खनच्या संघर्षात :**—तशातच इसवीसन १५२६ साली तिकडे दिल्लीत जहिरूद्दीन मुहंमद बाबरने मुघल सत्तेची स्थापना केली.[९४] ही मुघलसत्ताही दख्खनच्या सत्तासंघर्षात येऊन उतरली. दख्खनचे राजकारण, बरीदशाही, कुतुबशाही, इमादशाही, आदिलशाही, निजामशाही या पाच सलतनती आणि मुघल सत्ता यांच्यातल्या लढायांची, आणि तीव्र संघर्षाचीच कथा आहे. स्थानिक मुस्लिम, मुस्लिमेतर सामान्य रयतेचे जगणे अगदी कठीण झाले होते. नांदेड जिल्ह्यातील परिस्थितीही या पेक्षा वेगळी नव्हती. हा संघर्ष कधी परभणी जिल्ह्यातील पाथरी हे ठाणे ताब्यात मिळविण्यासाठी असे तर कधी नांदेड जिल्ह्यातील कंधार कौलासाचे किल्ले नियंत्रणात आणण्यासाठी असे. नांदेड जिल्ह्यातील माहूर हे आणखी एक संघर्ष केंद्र. १६ व्या शतकभर या सर्व ठिकाणी संघर्ष होत राहिला. लढाया लढल्या गेल्या. परिणामी शेती उद्ध्वस्त झाली. गावं ओसाड पडली. भरीसभर म्हणून गुजरात आणि माळव्याचे सुलतान, खानदेशचे फारुकी हे ही दख्खन पठारावर मुलुखगिरी करायला यायचे ते वेगळेच.

---

९२. कित्ता, पृ. ११५, ११६.

९३. नटराजन आणि प्रेमा रामकृष्णन, पूर्वोक्त, पृ. ४३१-३२.

९४. मुजुमदार, आर. सी. (संपा.), **मुघल एम्पायर**, हिस्ट्री ॲण्ड कल्चर ऑफ इंडियन पिपल, व्हॉल्युम सात, मुंबई, १९६७, पृ. २५.

वऱ्हाडच्या इमादशाहीत आणि अहमदनगरच्या निजामशाहीत पाथरी वरुन जो मोठा संघर्ष इ.स. १५२७ साली झाला त्याचे पडसाद नांदेड जिल्ह्यातही उमटले.[९५] वऱ्हाडच्या इमादशाही सुलतानाने पाथरीवर हल्ला केला पाथरी जिंकली आणि त्याच्या फौजा माहूरवर चालून गेल्या. बहमनी सुलतानाच्या पडत्या काळात, सर्वच किल्लेदार, तरफदार, सुभेदार बंड करून उठले होते. अनेकांनी स्वतंत्र राज्ये निर्मिली. या सगळ्या धामधुमीत माहूरचा किल्लेदार/तरफदार खुदाबंदखान अजूनही बहमनींशी एकनिष्ठ होता. इमादशाही सुलतानाने माहूरवर ताबा मिळविला. उर्वरित विदर्भही ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला एवढेच नव्हे तर गुजरातच्या सुलतानाची मदत घेऊन आगेकूच चालू ठेवली. परंतु गुजरातच्या सुलतान बहादूरशाहाचा प्रयत्न संपूर्ण विदर्भ जिंकण्याचा असल्याचे व विदर्भ गुजरातला जोडण्याची धडपड तो करीत असल्याचे कळताच इमादशाहने थोडेसे पडते घेतले व अहमदनगरच्या निजामशाहीशी जुळवून घेतले. गुजरातचे सैन्य परत फिरले.

**सलतनतीतील संघर्ष :**—नव्या सलतनतीतही फंदफीतुरी, दंगलबाजी, बंडखोरी चालुच होती. सत्तांतर होत होती सत्तास्पर्धेला ऊत आलेला होता. इ.स. १५६५ मध्ये मुर्तुजा निजामशाह तिकडे अहमदनगरच्या निजामशाहीत सत्तेवर आला. स्थिरस्थावर होताच त्याने आपल्या फौजा माहूरकडे पाठवल्या व त्या नांदेड जिल्ह्यात येऊन धडकल्या. इकडे विदर्भात इमादशाही सलतनतीत बुऱ्हान इमादशाह सत्तेवर आला खरा पण या सुलतानाला त्याच्याच वजीराने तुफालखानाने तुरुंगात डांबले आणि स्वतः सर्वसत्तधीशी बनला. अहमदनगरच्या निजामशाही फौजा, मुर्तुजा इमादशाहच्या मदतीसाठी आल्याचा बहाणा करीत असल्या तरी त्यांचा डोळा विदर्भावर होता. तुफालखानाने निजामशाही फौजांशी लढण्याच्या दृष्टीने आपले सैन्यही माहूरकडे पाठवले. नांदेड जिल्ह्यात माहूर जवळ सन १५७२ च्या दरम्यान निजामशाही आणि इमादशाहीत घनघोर लढाई झाली.[९६] इमादशाहीतील बंडखोर वजीर तुफालखान हा खरे तर लढत होता. निजामशाही फौजांनी पाथरी जिंकले आणि त्या फौजा माहूरच्या दिशेने निघणार एवढ्यात बातमी येऊन धडकली की तुफालखानाच्या फौजा कंधारच्या दिशेने निघाल्या. निजामशाही फौजाही कंधारकडे वळल्या. निजामशाही फौजांनी तुफालखानास जेरीस आणले आणि त्याला कंधार सोडून माहूरच्या दिशेने फौजांना दौडवावे लागले. पाठोपाठ निजामशाही फौजाही माहूरच्या दिशेने धावू लागल्या. माहुर परिसरात दोन्ही सैन्यात घनघोर लढाई झाली. अहमदनगरच्या निजामशाही फौजांनी सारा वऱ्हाड जिंकला. तुफालखानाला पळता भुई थोडी झाली. परंतु त्याच दरम्यान गोवळकोंड्याच्या कुतुबशाही फौजा अहमदनगरच्या राज्यावर येऊन धडकल्या. कंधारला लागून असलेल्या प्रदेशात त्या घुसल्या. त्यांनी तेथे तैनात असलेल्या निजामशाही फौजांना पराभूत केले. माहुर परिसरात असलेल्या निजामशाही फौजा कंधार परिसराकडे वळल्या व त्यांनी कुतुबशाही फौजांवर हल्ला चढवला. इब्राहिम कुतुबशाहला त्यांनी तेथेचे थोपवून धरले. कंधारच्या लष्करी ठाण्यात असलेली फौज वाढविण्यात आली. कंधारवर अशी नाकेबंदी झाल्यावर इब्राहिम कुतुबशाहच्या फौजा कौलासकडे वळल्या. कौलास परिसरात लढाई झाली. अहमदनगरच्या निजामशाही फौजांची कंधार येथील लष्करी तुकडीही कौलासकडे रवाना झाली. कुतुबशाही फौजा परतल्या. निजामशाही फौजांनी

---

९५. खरे,ग. ह., पूर्वोक्त, पृ. १३१.

९६. पगडी सेतू माधवराव, "मध्ययुगीन नांदेड", **स्थानिक इतिहास आणि साहित्य एक शोध**, पूर्वोक्त, क्र. ७४-७५.

आपली जरब बसवली. तिकडे नर्नाळा किल्ला परिसरातही निजामशाही फौजा यशस्वी झाल्या. तुफालखानाला कैद करण्यात आले. नर्नाळा किल्ला निजामशाहीच्या हाती आला. इ.स.१५७४ च्या दरम्यान दोनचार वर्षांच्या संघर्षानंतर सारा वऱ्हाड सुभा निजामशाहीत समाविष्ट झाला. नांदेड जिल्ह्यातील माहूरही निजामशाहीत दाखल झाले.

**नांदेड परिसर मुघलांकडे :**—अहमदनगरच्या निजामशाहीत समाविष्ट असलेला वऱ्हाड सुभा आणि त्यातला नांदेड जिल्हा इ.स. १५९६ मध्ये मुघलांच्या राज्यात समाविष्ट झाला.[९७] अहमदनगरच्या चांदबीबीने वऱ्हाड मुघलांना बहाल केला. गेली तीनशे साडेतीनशे वर्षे चाललेला स्थानिक मुस्लिम सलतनतीचा संघर्ष संपला आणि नांदेड जिल्हा पुन्हा दिल्लीपतींच्या अधिपत्याखाली आला. मुघलांनी दख्खन पठारावर विशेषतः मराठवाडा, तेलंगण, विदर्भ, कर्नाटकावर प्रशासकीय पकड बसवली. बहमनींचीच प्रशासकीय व्यवस्था अधिक बळकट केली. वऱ्हाड प्रांतात १६ सरकारे आणि १४२ परगणे होते. नांदेड जिल्हा या वऱ्हाड प्रांताचा भाग होता. मराठवाड्यातील पाथरी हे त्याकाळी सरकार होते. या सरकारात एकूण १२ परगणे होते. त्यात नांदेड जिल्ह्यातील, नांदेड, मुदखेड, लोहगाव, अर्धापूर या परगण्यांचा समावेश होत होता. नांदेड जिल्ह्यातील माहूर हे सरकार होते व त्यात विदर्भातील परगण्यांचा समावेश होत होता.

१७ व्या शतकातील नांदेड जिल्ह्याचा इतिहास म्हणजे अहमदनगरची निजामशाही आणि मुघल सत्ता यांच्यातल्या संघर्षाची गाथा होय. दोन अडीच दशके हा संघर्ष चालला. दरम्यान दिल्लीच्या मुघलदरबारी अनेक घटना घडल्या. इसवीसन १६०५ साली सम्राट अकबराचा मृत्यु झाला. राजपुत्र सलीम सत्तेवर आला आणि सम्राट जहांगीर म्हणून त्याने मुघल साम्राज्यावर राज्य केले. दक्षिणेतील मुघलांचे सरदार व निजामशाही फौजा यांच्यात लढाया होत राहिल्या. इ.स.१६१० साली तर जहांगीराचा मुलगा परवेझ यानेच अहमदनगर वर हल्ला केला. इ.स. १६१२ मध्ये मुघलांनी मलिक अंबरशी संघर्ष केला. दख्खनी लोकांनी विदर्भ आपल्या ताब्यात ठेवण्यात यश मिळविले. या सत्तासंघर्षात दख्खनी मुस्लिम आणि इतर असा एक जागृत राजकीय पैलू प्रथम स्पष्ट झाला. स्थानिक दख्खनी अस्मिता जागृत झाली. १६१७ साली राजपुत्र खुर्रम म्हणजेच शहाजहान याची वऱ्हाडच्या सुभेदारपदी नेमणूक झाली व त्याने दख्खनींचा प्रभाव कमी केला.

मुघल दरबारातील राजकारणही फारसे वेगळे नव्हते. तेथेही अंतर्गत सत्तासंघर्षाला ऊत आलेला होता. राजपुत्रच बादशहा विरुद्ध बंड करून उठत. १६२२ साली राजपुत्र खुर्रम म्हणजेच शहाजहानने आपल्या वडीलांविरुद्ध बंड केले. हे बंड त्याचा भाऊ राजपुत्र परवेझने मोडून काढले. राजपुत्र खुर्रमने बुऱ्हाणपुरात आश्रय घेतला. तेथून तो माहूरला आला. नांदेड जिल्ह्यातील माहूरच्या किल्ल्याचा किल्लेदार अधिकार उदयराम आणि यादवराम यांनी त्याला काही काळ आश्रय दिला. खुर्रमने आपला हत्ती व काही सामान माहूरला ठेवले व तो स्वतः गोवळकोंड्याकडे रवाना झाला. नांदेड जिल्हा सुभे वऱ्हाड आणि सुभे तेलंगणात समाविष्ट होता. नांदेड-कंधार आणि विशेषतः मांजरा नदीपर्यंत दौलताबाद सुभ्याच्या सीमा येऊन भिडलेल्या होत्या.

---

९७. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, पूर्वोक्त, पृ. ५५.

अहमदनगरच्या निजामशाहीत मात्र प्रशासकीय विभाग म्हणून सरकार, प्रांत, परगणे, तालुके आणि महाल अस्तित्वात होते. मलिक अंबरने शेतसारा वसुलीची आणि प्रशासनाची आदर्श व्यवस्था निर्माण केली होती. मुघलांची तोडरमल शेतसारा व्यवस्था अमलात येईपर्यंत निजामशाहीत मलीक अंबरची शेतसारा वसुली व्यवस्थाच रूढ होती. इ.स. १६२६ साली मलीक अंबरचा त्याच्या वयाच्या ८० व्या वर्षी मृत्यु झाला. त्याच्या मृत्युने अहमदनगरच्या निजामशाहीचा प्रमुख आधार नष्ट झाला. त्याचा मुलगा फत्तेहखान त्याच्या जागी रूजु झाला हे खरे असले तरी मलिक अंबरची तो बरोबरी करू शकत नव्हता. १६२७ साली मुघल सम्राट जहांगीरचा मृत्यु झाला. मुघल साम्राज्यात आणि विशेषतः दख्खनी राजकारणात प्रचंड अनागोंदी माजली. निजामशाहीत खानजहान या मुघल सुभेदाराने गोंधळ माजवला होता. त्याने अहमदनगर आणि सारा बालाघाट हमीदखानाच्या हवाली करून टाकला. मुर्तुजा निजामशाहीचा प्रतिनिधी म्हणून त्याने हा प्रदेश ताब्यात घेतला. दख्खनी विरुद्ध बिगरदख्खनी असा संघर्ष तीव्र बनला. मुघलदरबारात शहाजहान सत्तारूढ झाला. त्याने सत्तेवर येताच दख्खनी कारभारात लक्ष घातले. बालाघाटातून निजामशाही फौजा हटवण्याच्या त्याने आज्ञा दिल्या. बंडखोर मुघल सरदार खान जहान याला वठणीवर आणण्याचा त्याने प्रयत्न केला. शेवटी बादशहा स्वतः प्रचंड सैन्यासह दक्षिण पठारावर विशेषतः वऱ्हाडात उतरला. पश्चिम वऱ्हाडातून मुघल सैन्य अहमदनगरकडे वळले. निजामशाहीतील प्रमुख ठाणे कंधार किल्ल्यावर होते. नासीरखानाच्या नेतृत्वात मुघल सैन्याची एक तुकडी कंधारकडे रवाना झाली. नांदेड जिल्ह्यात निजामशाही विरुद्ध मुघल संघर्ष पेटला. कंधारच्या किल्ल्यावर असलेल्या सरफराज खानाने किल्ला लढवला. मुकर्रबखान, बहलोलखान, आणि रणदुल्लाखान, त्याच्या मदतीस आले. विजापूरातूनही फौजा दाखल झाल्या. प्रचंड युद्ध झाले. वऱ्हाडचा अझमखानही मुघलांना येऊन मिळाला शेवटी १९ दिवसांच्या वेढ्यानंतर कंधारचा किल्ला ७ मे १६३१ रोजी मुघलांनी जिंकला.[९८] नांदेड परिसरात सलतनतीची सुलतानशाही संपून मुघलाई अवतरली.

आपापसातल्या सत्तासंघर्षात गुंतलेल्या सरदार दरकदार, सुभेदार, तरफदार अधिकाऱ्यांना आणि सुलतानांना सामान्य रयतेशी काही देणं घेणं नव्हते. १६२९ पासून प्रचंड दुष्काळ होता. नांदेड जिल्ह्यातही त्याचे प्रत्यंतर येत होते. सलग दोन वर्ष पाऊसच पडला नाही. पेरण्याच झाल्या नाहीत. गावंच्या गावं ओस पडली. लोक स्थलांतरीत होऊ लागली. तशातच या सुलतानी मुघलांच्या फौजा धुमाकूळ घालीत. लूटालूट करीत.

**सुभे तेलंगणाची सुभेदारी नांदेडला :**—शेवटी १६३२ साली दौलताबादही मुघलांच्या ताब्यात आले. निजामशाहीतील कंधार आणि दौलताबाद सारखी प्रमुख लष्करी ठाणी पडल्यामुळे मुघलांचा प्रभाव वाढला. संघर्षाची तीव्रता कमी झाली. निजामशाही मोडकळीस येऊ लागली. दख्खन पठारावर चार सुभे निर्मिले. सुभे दौलताबाद, सुभे तेलंगणा, सुभे खानदेश आणि सुभे वऱ्हाड. सुभे तेलंगणाची सुभेदारी नांदेडला आली. नांदेड हे सुभ्याचे प्रमुख ठिकाण झाले. नांदेडच्या किल्ल्यातून

९८. खरे, ग. ह., पूर्वोक्त, पृ. १७१.

सुभ्याचा कारभार होऊ लागला.[९९] राजकीय संघर्ष चालूच होता. निजामशाही अजूनही तग धरून होती. विजापूरची आदिलशाही देखील सत्तासंघर्षात सक्रिय होती. तेव्हा हा संघर्ष मुघल, निजामशाही आणि आदिलशाही असा होता. मोहीमा निघत. लढाया होत. नांदेड जिल्ह्यातील १७ वे शतकही अशाच संघर्षाचे शतक होते.

१७ व्या शतकाच्या पूर्वार्धात सुभ्याचे ठिकाण म्हणून नांदेडला महत्त्व आले. गुलबर्गा परिसरही नांदेड सुभ्यात समाविष्ट झाला. निजामाबादही नांदेड सुभ्यात होते. बीदर, हुमनाबाद, मलखेड, यादगीर हा कानडी भाषिक भाग, निझामाबाद परिसरातला तेलगू भाषिक प्रदेश आणि प्रत्यक्ष नांदेडचा मराठी भाषिक भाग असा त्रिभाषिक भाग नांदेड सुभ्यात एकत्र आला होता. समर्थ रामदास स्वामींनी या नांदेड सुभ्यात निजामाबाद जवळील सारंगपूरला मारुती स्थापिला. तेथील कागदपत्रावरून ही घटना १६५४ सालची असल्याचे स्पष्ट होते. रामदासांच्या शिष्यांनी पुढे निजामाबादलाही रामदासी मठ स्थापिला. नांदेड जिल्ह्यातही रामदासी संप्रदायाचा प्रभाव या काळात होता. बिलोली तालुक्यातील कोडलवाडीतही रामदासी मठ याच वेळी अस्तित्वात आला. रामदास स्वामींचा संबंध अशा प्रकारे नांदेड जिल्ह्याशी या काळात आलेला होता.[१००]

**छत्रपती शिवाजी महाराज व नांदेड :—** याच शतकातील दख्खन पठारावरील संघर्षाला एक दैदिप्यमान पैलू जोडला गेला. सत्तापिपासू सलतनतीच्या राज्य संघर्षात रयतेच्या कल्याणाचा विचार करणारा, सामान्य रयतेची काळजी घेणारा लोकराजा छत्रपती शिवाजी महाराजांच्या रुपाने याच काळात उदयाला आला. मराठी स्वराज्याचा संघर्ष उभा राहिला आणि छत्रपती शिवरायांनी सामान्य रयतेचा विश्वास जागवला. त्यांना लढण्याचे सामर्थ्य दिले. सत्तेचा उपयोग स्वतःच्या स्वार्थासाठी करण्याच्या या मध्ययुगीन कालखंडात काळाची चौकट भेदून लोककल्याणाचा विचार करणारे मराठी स्वराज्य छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्मिले. मुघल-मराठा संघर्षातली लक्षणीय अशी लढाई नांदेड जिल्ह्यात झाली नसली तरी उभय पक्षाच्या फौजांनी नांदेड परिसरात घोडदौड मारली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने नांदेडची भूमी शहारली. १६७० साली वऱ्हाडवरील चढाईच्या वेळी शिवाजी महाराज नांदेडला आले होते.[१०१]

मराठ्यांच्या फौजा या परिसरात असतांना १६७१ साली बहादूरखानाने त्यांचा पाठलाग करीत कंधार गाठले होते. बीड, पाथरी येथेही या बहादूरखानाचा सैनिकी तळ होता. मराठ्यांच्या फौजा तेलंगणात रामगीर परिसरात होत्या. बहादूरखान आपले सैन्य घेऊन तिकडे गेला खरा परंतु मराठ्यांच्या फौजा त्या अगोदरच तिथून निघाल्या आणि बहादूरखान हात हलवीत अहमदनगरला परतला.

**खडकीचे औरंगाबाद झाले :—**याच सुमारास मुघलांचे एक प्रमुख ठाणे मराठवाड्यात उदयाला आले. इ.स. १६५३ साली औरंगजेब दख्खनचा सुभेदार म्हणून खडकीला आला. दौलताबाद

---

९९. पगडी, सेतूमाधवराव, "मध्ययुगीन नांदेड", **स्थानिक इतिहास आणि साहित्य एक शोध**, पूर्वोक्त, पृ. ७६.

१००. कित्ता.

१०१. कित्ता, पृ. ७७.

परिसरात सहा सात कोसावर खडकीला एक सैनिकी तळ होता. हा तळच औरंगजेबाचेही लष्करी ठाणे बनला आणि खडकीचे औरंगाबाद झाले. या लष्करी ठाण्याजवळ वस्ती झाली आणि ही वस्ती औरंगजेबाने आबाद केली म्हणून ती औरंग आबाद बनली. इ.स. १६५८ साली औरंगजेब मुघल सम्राट बनला आणि त्याने खडकी सोडले. मुघल-मराठा संघर्षाने सारे दख्खन पठार ढवळून निघाले. या संघर्षाची झळ नांदेड जिल्ह्यालाही पोहचली.

इ.स. १६८३ साली औरंगजेबाचे मुघल सैन्य राजपुत्र मोईजुद्दीनच्या नेतृत्त्वाखाली या परिसरात पाठवले. औरंगाबादेहून या फौजा नांदेडकडे आल्या. राजपुत्र मोईजुद्दीनने आपला सैनिकी तळ नांदेडला उभारला. नांदेडहूनच मुघल फौजा बिदरकडे गेल्या. नांदेडला त्या काळात रशिदखान हा फौजदार होता. मुघल फौजा या परिसरात असतानाच मराठा फौजांनी पाथरीवर हल्ला केला. मुघल फौजेची वाताहत झाली. बिदरकडे असलेल्या मुघल फौजा बहादूरखानाच्या नेतृत्वात पाथरीकडे वळल्या. पाथरीजवळ मुघल-मराठा संघर्ष झाला.

**परिसरातील हालचाली :**—नांदेड परिसरातील लष्करी हालचालींचे आणि नांदेडच्या लष्करी तळाचे वर्णन भिमसेन सक्सेना या समकालीन लेखकाने " तारीख-ए-दिलकुशा " या ग्रंथात करून ठेवले आहे. लष्करी मोहीमेविषयी तो लिहितो की ही मोहिम मुघलांसाठी मोठ्या त्रासाची ठरली. नांदेडच्या लष्करी तळावर तंबूचीही कमतरता होती. अन्नाचा तुटवडा जाणवला होता. कर्नाटक मोहिम आटोपून मुघल सैन्य नांदेडच्या लष्करी तळावर थकून भागून परतले, तर इथेही अनेक अडचणी त्यांचेसमोर होत्या. तिकडे मराठ्यांचा मात्र जोर वाढत चालला. त्यांनी विदर्भात आणि खानदेशात मुसंडी मारली.[१०२]

कालांतराने परिस्थिती बदलली. इ.स. १६८६ साली मुघलांनी विजापूर जिंकले. त्यांच्या आदिलशाही विरुद्धच्या बहुतेक मोहिमा यशस्वी झाल्या. तेलंगणा आणि वऱ्हाडात मात्र मराठा फौजांनी मुघल सैन्याला हैराण केले. विजापूरची आदिलशाही आणि गोवळकोंड्याची कुतुबशाही या दोन सलतनतींच्या पाडावानंतर औरंगजेबाने मराठ्यांवर सगळे लक्ष केंद्रित केले. कंधारचा आपला लष्करी तळही मजबूत केला. हमिदुद्दीनखान या किल्लेदाराने याच काळात कंधारच्या किल्ल्यावर आपला तळ ठोकला, मुघल-मराठा संघर्ष तीव्रतर बनत चालला. दरम्यान छत्रपती शिवाजी महाराजांनंतर संभाजी राजे गादीवर आले होते. छत्रपती संभाजी राजांनी पराक्रमाची शर्थ केली. प्रचंड मुघल फौजांना तोंड देणे सोपे नव्हते, तरीही मराठमोळा गनिमी सैनिक डगमगला नाही. चिवटपणे लढत राहिला.

हा संघर्ष चालू असतांना नांदेड परिसरातील सामान्य रयतेचे जीवन अत्यंत हालाखीचे झाले होते. अनेक लोक स्थलांतरीत होऊ लागले. याच काळात नांदेड मधील कांही घराणी काशी प्रयाग अशा तिर्थक्षेत्री स्थलांतरीत झालेली दिसतात. दक्षिण पठारावरील या संघर्षातही काही सलतनतींनी विद्वान मंडळींना आश्रय दिलेला होता. आदिलशाही दरबार याबाबतीत लक्ष देत होता. आदिलशाहच्या पदरी नांदेडच्या वामन पंडीतांचे शेष घराणेही होते. त्यांना आदिलशाही सुलतानाचा राजाश्रय होता. परंतु आदिलशाहीच्या पतनानंतर हे घराणे काशी प्रयागला स्थलांतरीत झाले.[१०३]

---

१०२. याविषयी भिमसेन सक्सेना, तारीख-ए-दिलकुशा या सारख्या साधनां मधून नोंद उपलब्ध होते.

१०३. कानोले, वि. अं., **वामन पंडीत**, गोदातीर इतिहास संशोधन मंडळ, नांदेड, १९६८.

दिल्लीपती मुघल बादशाह औरंगजेब मराठ्यांच्यापुढे हतबल बनत चालला होता. अचानक परिस्थिती पालटली आणि महाराजांना अटक करण्यात मुघलांना यश आले. मराठी स्वराज्याची राजधानी रायगड मुघलांच्या ताब्यात आली.[१०४] राजपुत्र शाहु आणि महाराणी येसूबाई आणि इतर राज दरबारी व्यक्तींना अटक करण्यात आली. औरंगजेबाला वाटले की आता मराठे संपले परंतु सह्याद्रीच्या कडेकपारी राहणारा काटक मराठा सैनिक असा हतबल होणारा नव्हता. फिनिक्स पक्षासारखी त्यांनी राखेतून पुन्हा भरारी घेतली आणि दख्खन पठारावरील मराठी रयतेचे स्वातंत्र्य युद्ध सुरू झाले.[१०५] रायगडच्या पाडावानंतर राजाराम राजे कर्नाटकात जींजीला गेले. मराठी राजकारणाचे आणि संघर्षाचे केंद्र आता जींजीला उभे राहिले. मुघलांच्या फौजा जींजीच्या दिशेने दौडु लागल्या. औरंगजेबाने गाझीऊद्दीन फिरोज जंग यास दख्खनच्या कामगिरीवर पाठवले. त्याने मराठी फौजांना पायबंद घालावा अशा आज्ञा होत्या. झुल्फीकारखान यास मुघल फौज देऊन जींजीकडे रवाना केले. इ.स.१६९८ साली जींजी मुघलांच्या ताब्यात आली.[१०६] राजाराम राजे जींजीहून निसटले आणि स्वराज्यात दाखल झाले. वऱ्हाड सुभ्यातील मुघल सैनिकी ठाण्यावर त्याच्या फौजांनी हल्ले करायला सुरुवात केली. गनीमी युद्धतंत्राने मराठी सैनिकांनी मुघलांना जेरीस आणले. सूलतानाबादला मुघल सम्राट औरंगजेबाला चिरनिद्रीस्त करूनच हा संघर्ष संपला. या संघर्षाच्या कालखंडातील काही घोडदौडी, काही पाठलाग, काही लढाया नांदेड जिल्ह्यातही झाल्या.

**१८ व्या शतकातील संघर्ष :**—१८ व्या शतकातील संघर्षही मुख्यतः मुघल आणि मराठे यांच्यातला सत्तासंघर्ष होता. मुघल फौजा आता नामोहरम होत आल्या होत्या. मराठी सैन्याच्या गनिमी युद्धतंत्राने मुघलांची लष्करी ठाणी उद्ध्वस्त होत होती. मुघल सैन्य मराठ्यांचा पाठलाग करीत घोडदौड करीत. झुल्फीकारखानाची दमछाक होत होती. मराठवाड्यातल्या आष्टी, परांडा, औसा, उदगीर, नळदूर्ग आणि किल्ल्याच्या परिसरात चकमकी झाल्या. नांदेड परिसरातही मुघल-मराठा संघर्ष झाला. सुभे हैद्राबादच्या सीमेपर्यंत मराठ्यांच्या गनिमी फौजा आणि त्यांचा पाठलाग करणाऱ्या मुघल फौजा यांचा पाठशिवणीचा खेळ चालूच होता. इ.स. १७०२ मध्ये जेव्हा औरंगजेब स्वतः विशाळगड घेण्याच्या प्रयत्नात होता तेव्हा झुल्फीकार खानाच्या नेतृत्वात मुघल फौजेच्या काही तुकड्या मराठ्यांच्या गनिमी सैन्याचा पाठलाग करत परांडा आणि चारठाण्यापर्यंत आल्या. तिथून त्या वऱ्हाडात घुसल्या. मराठ्यांचे गनिमी सैन्य साऱ्या विदर्भात आणि खानदेशात विखुरले होते. मराठी सैन्याच्या गनीमी युद्धाची एक प्रकारची दहशतच मुघल अधिकाऱ्यांवर आणि सैनिकांवर होती. नांदेडचा फौजदार म्हणून शाईस्तेखानाचा मुलगा खुदाबंदाखान त्यावेळी नांदेडला होता. मराठ्यांच्या हालचालींनी तो इतका घाबरला होता की झुल्फीकारखानाच्या मदतीला जाण्याचे त्याने टाळले. झुल्फीकारखानावर मराठ्यांचे ६ हजार सैनिक तुटुन पडले. तो कसा तरी निसटला आणि नांदेडात येऊन पोहोचला. नांदेड जिल्ह्यात

---

१०४. देव, प्रभाकर, **मराठ्यांचा इतिहास**, विद्या प्रकाशन, नागपूर १९९०, पृ. १३९.

१०५. कित्ता, पृ. १४०.

१०६. आठवले, सदाशीव, **मराठी सत्तेचा विकास आणि ऱ्हास**, विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, नागपूर, १९८२, पृ. १६, १७.

बिलोली परिसरात मराठ्यांच्या गनिमी तुकड्या असल्याचे त्याला कळले. आपली अडीच हजार सैनिकांची फौज घेऊन तो चालून गेला. चार दिवस मुघल-मराठा संघर्ष चालला. मराठ्यांच्या घोडदळाने मुघल सैन्याला सळो की पळो करून सोडले. शेवटी झुल्फीकारखान कौलासच्या किल्ल्यावर पोहोचला. त्यावेळी कौलास नांदेडमध्ये होते. आता ते आंध्रप्रदेशातील निजामाबाद जिल्ह्यात आहे. झुल्फीकारखानाने किल्ल्याच्या परिसरात तळ देऊन मराठ्यांच्या मागावर सैन्य धाडले. मुघल-मराठ्यात एक लढाई झाली. मराठ्यांनी मुघलांना जेरीस आणले. मुघलांचा दारूगोळा संपला. झुल्फीकारखानाने बिदरहून लष्करी मदत मागवली. लढाई निर्णायक झाली नसली तरी मुघल फौजांना हैराण करण्यात मराठे सैनिक यशस्वी ठरले. तेलंगण सुभ्यातही मराठ्यांच्या गनिमी सैन्याने मुघलांच्या फौजांना यशस्वीरितीने तोंड दिले. बिदरहून फौज आल्यानंतर झुल्फीकारखान बिलोलीला परतला. त्या परिसरात मुघलांची लष्करी छावणी असल्याचे भीमसेन सक्सेना लिहितो.[१०७] मुघल मराठा संघर्षात तेलंगण सुभ्याची कशी आर्थिक दुरावस्था झाली हेही तो नोंदवतो.

खरे तर गेली अनेक शतके चालू असलेल्या सत्तास्पर्धेने दख्खन पठारावरील सामान्य रयतेचे जगणे दुरापास्त झालेले होते. मराठ्यांनी सामान्य रयतेला लढण्याचे सामर्थ्य दिले आणि मुघल साम्राज्यासारख्या बलाढ्य सत्तेलाही शेवटी जेरीस आणले. तेव्हा तेलंगण सुभ्याची काय किंवा औरंगाबाद विदर्भ सुभ्याची काय आर्थिक दुरावस्था गेली अनेक शतके अशीच होती.

**परिसरातील मुधोळचा संघर्ष :**—कौलासचा संघर्ष संपतो न संपतो तोच मराठ्यांच्या गनीमी फौजा तत्कालीन नांदेड जिल्ह्यातील बाणगंगेच्या काठी मुधोळला एकत्र आल्याची बातमी येऊन धडकली.* झुल्फीकारखान याने मुघलसैन्य घेऊन मुधोळ गाठले. बिलोलीहून त्याने तात्पुरते सैन्य हलवले बाकी लष्करी ठाणे कायम होते. मुधोळजवळ मुघल मराठा संघर्षातील एक लक्षणीय लढाई झाली. मुघल सैन्याची प्रचंड हानी झाली. निर्णायक असा विजय मराठ्यांना मिळाला नसला तरी झुल्फीकारखानाला बिलोलीला परतावे लागले. बिलोली लष्करी ठाण्यावर आल्यानंतरही त्याला मराठ्यांच्या गनिमी हल्ल्याची सतत धास्ती वाटे. कारण मराठ्यांनी त्याच्या सैन्याचा मुधोळ पासून गोदावरीच्या काठापर्यंत सतत पाठलाग केला होता. गोदावरीच्या काठावरून मराठे परत फिरले. काही दिवस असेच गेले आणि बिलोलीत बातमी येऊन धडकली की मराठ्यांच्या गनिमी फौजा नांदेडकडे येत आहेत. इ.स. १७०३-०४ चा सुमार असेल. झुल्फीकारखानने बिलोलीहून नांदेडकडे आपला मोर्चा वळवला. मराठ्यांच्या हल्ल्याला तोंड देण्याची त्याने तयारी केली. मुघल प्रशासनानेही काही बदल केले. विदर्भ सुभेदारीवर सुभेदार म्हणून गाझीऊद्दीन फिरोज जंगची नेमणूक झाली. तेलंगण आणि विदर्भ दोन्हीला जवळ पडेल अशा कंधार किल्ल्यात गाझीऊद्दीन फिरोज जंगने आपला तळ ठोकला. अझीझुल्लाह कुरबेगी हा नव्यानेच कंधारचा किल्लेदार म्हणून रूजू झाला.[१०८] यामुळे मराठ्यांच्या हालचालीवर काहीही परिणाम झाला नाही. मराठ्यांच्या गनिमी फौजा विदर्भात धुमाकूळ घालत

१०७. कित्ता, पृ. ३६.

* आज हे मुधोळ आंध्रप्रदेशात आहे.

१०८. **नांदेड जिल्हा गॅझेटिअर**, पृ. ५६, ५७.

राहिल्या. रूस्तुमखान विजापूर नायब सुभेदार आपल्या ७००० सैनिकांसह मराठ्यांच्या मागावर निघाला परंतु त्यालाही पराभूत होऊन शेवटी मराठ्यांच्या कैदेत जावे लागले. ही बातमी कळताच गाझीउद्दीन फिरोज जंग स्वतः कंधारहून मुघल सैन्यासह मराठ्यांच्या बंदोबस्तासाठी निघाला. परंतु प्रत्यक्ष मराठ्यांच्या गनीमी फौजांशी त्याची समोरासमोर लढाई झालीच नाही. मराठी फौजा नर्मदा ओलांडून पार गेल्या आणि फिरोज जंग नांदेडकडे परत फिरला. इ.स.१७०४ च्या दरम्यान नांदेडला सुभेदारी कायम झाल्याचे दिसते. नांदेडचा सुभेदार खुदाबंदखान याची विजापूरला बदली झाल्याची नोंद आढळते.[१०९]

**नांदेड बीदर सुभ्यात गेले :**—इ.स.१७०४ च्या नंतर मुघल-मराठा संघर्ष अशा वळणावर येऊन पोहोचला की मुघलांचा पराजय स्पष्टपणे जाणवावा. मराठ्यांनी दख्खन पठारावरील आपली सारी ठाणी परत मिळवली, मुघलांना अनेक ठिकाणी नामोहरम केले एवढेच नव्हे तर मराठ्यांच्या गनीमी फौजा गुजरात आणि माळव्यातही मुलुखगिरीत यशस्वी होत राहिल्या. सरतेशेवटी २० फेब्रुवारी १७०७ रोजी औरंगजेबाचा मृत्यु झाला आणि मुघल मराठा संघर्षाचा एक अंक संपला. तरीही नांदेड परिसर मुघलांच्याच अधिपत्याखाली राहिला.

मुघल साम्राज्याने दख्खन पठारावर एकूण सहा सुभे निर्माण केले होते. खानदेश, वऱ्हाड, औरंगाबाद, बिदर, विजापूर आणि हैद्राबाद असे ते सहा सुभे होते. सुभ्याची विभागणी सरकारमध्ये (जिल्हा) व परगण्यामध्ये (तालुका) झालेली होती. आजचा नांदेड जिल्हा त्याकाळातल्या नांदेड आणि माहूर जिल्ह्यात विभागलेला होता. त्यातले माहूर हे वऱ्हाड सुभ्यात समाविष्ट होते तर नांदेडचा समावेश बिदर सुभ्यात झालेला होता. नांदेडची विभागणी ३० परगण्यात आणि ९४९ गावात झालेली होती तर माहूर जिल्ह्यात २० तालुके/परगणे आणि ११४१ गावं होती. हा सगळा तपशील मुनीमखान औरंगाबादीने लिहिलेल्या, ' सवांचे दख्खन ' (पृ. ३१.) या ग्रंथात आलेला आहे. तात्पर्य आजचा नांदेड जिल्हा त्याकाळात ५० तालुक्यात विभागलेला होता. शेतसारा वसुलीचे काम तेवढे व्यवस्थित होत होते.[११०]

औरंगजेबाच्या मृत्युनंतर मुघल दरबारात वारसा युद्ध सुरू झाले. मुअज्जम, अझम आणि कामबक्ष हे तिघेही राजपुत्र सत्ताकांक्षी होते. त्यांच्यात संघर्ष पेटला. अझमचा खून झाला आणि मुअज्जम, ' बहादूरशाह ' या नावाने मुघल बादशहा बनला. कामबक्ष दक्षिणेत दाखल झाला आणि आपले स्वतंत्र राज्य निर्मिण्याच्या प्रयत्नात गुंतला. त्याचा हा प्रयत्न हाणून पाडण्यासाठी बहादूरशाह प्रचंड मुघल सैन्य घेऊन दिल्लीहून इकडे दख्खनमध्ये आला. त्याने कामबक्ष विरुद्ध मोहिम उघडली. त्याच्या सैन्याचा एक तळ नांदेड जवळ दिला गेला. मुघलांचा हा सत्तासंघर्ष चालूच राहिला. त्याचे पडसाद नांदेड परिसरातही उमटत गेले.

**श्रीगुरू गोविंदसिंघजींचे नांदेड वास्तव्य :**—राजकीय सत्तासंघर्षाच्या या धामधुमीत नांदेड शहराला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त करून देणारी एक लक्षणीय घटना घडली. या घटनेचे महत्त्व

१०९. कित्ता. पृ. ६१.

११०. कित्ता.

स्थानिक नांदेड पुरते मर्यादित न राहता भारतीय इतिहासात नांदेडला एक आगळे स्थान प्राप्त करून देणारी ही घटना आहे. एका नव्या युगाचा प्रारंभ झाल्याची साक्ष नांदेड परिसर देत होता. आज पासून तीनशे वर्षापूर्वीची गुरूगोविंद सिंघजींची नांदेड भेट ही घटना केवळ त्यांच्या अंतकाळापुरती मर्यादित राहात नाही तर गुरु ग्रंथसाहिबच्या रुपात झालेल्या तत्त्वचिंतनाची ती मुहुर्तमेढ ठरते. गुरुगोविंदसिंघजींच्या पदस्पर्शाने पवित्र झालेला नांदेडचा परिसर कसा होता ? त्या काळात नेमके काय घडले ? या प्रश्नांचे उत्तर देणारे काही ऐतिहासिक पुरावे आज उपलब्ध झाले आहेत. त्या पुराव्यांच्या आधारे त्यांच्या नांदेडमधील वास्तव्यातील तपशील कांही प्रमाणात धुंडाळता येतो.

गुरूगोविंदसिंघजींचे दरबारी कवी सेनापती यांनी लिहिलेला ' गुरुशोभा ' हा ग्रंथ, गुरुगोविंदसिंघजींच्या नांदेड वास्तव्यातील शेवटच्या दिवसांची माहिती देणारा एकमेव प्रत्यक्षदर्शी पुरावा आहे. हा कवीश्रेष्ठ गुरु गोविंदसिंघजींच्या सोबत नांदेडला आला. त्यांचे चरित्राला काव्यबध्द करण्याच्या उद्देशानेच तो त्यांचे सोबत होता.[१११] गुरुमुखी आणि देवनागरी लिपीत शब्दबध्द झालेले ' गुरुशोभा ' हे हस्तलिखित अमृतसर येथील शीख संदर्भ ग्रंथालयात (हस्तलिखित क्र.१९९-३९१५) उपलब्ध आहे. या ग्रंथाच्या १८व्या प्रकरणात गुरुगोविंदसिंघजींच्या नांदेड वास्तव्याविषयीचे वर्णन आढळते.[११२] या शिवाय ११ नोव्हेंबर १७०८ रोजीचे ' अखबारात-ए-दरबार-ए-मुल्ला ' हे हस्तलिखितही समकालीन पुरावा म्हणून महत्त्वाचे साधन आहे. यातूनच ही गोष्ट स्पष्ट होते की मुघलसम्राट बहादूरशाहसह गुरुगोविंदसिंघजी उत्तरेतून नांदेड जवळील हिंगोली पर्यंत एकत्र आले. मुघलसम्राटाने हिंगोलीत तळ ठोकला. पुढे गुरुगोवींदसिंघजी नांदेडला आले. उत्तरेतल्या राजकारणात सरहिंदचा सुभेदार वजीरखान हा प्रचंड गोंधळ घालून होता. त्याची कृष्णकृत्ये गुरुगोविंदसिंघजींमुळे उघडकीस येण्याचा धोका होता. त्यातून त्यानेच दोन पठाण मारेकरी गुरुगोविंदसिंघजींसोबत धाडले. त्यातल्या एकाचे नाव गुलखान होते आणि तो गुरुगोविंदसिंघजींचा भक्त म्हणून त्यांच्या सान्निध्यात वावरत होता.[११३] हा सर्व तपशील सदर ' अखबारात ' मध्ये नोंदवलेला आढळतो. वरील पुराव्याशिवाय आणखी कांही समकालीन पुरावे उपलब्ध आहेत. काफीखानने लिहिलेला मुन्तखीब-उल्-लुबाब या ग्रंथात असा उल्लेख आढळतो की दक्षिणेकडे कूच करतांना गुरुगोविंदसिंघांबरोबर दोनशे सवार होते. मुघल बादशहाचे सैन्यही होते.[११४] गुरुगोविंदसिंघजींचा परम शिष्य बंदा बहादूर माधवदास यांच्याबद्दल १७८९ साली लिहिल्या गेलेल्या ' सियार-उल्-मुन्तखैरीन ' या ग्रंथात बरीच माहिती आढळते. इ.स. १६७० साली राजौरी येथे जन्मलेले बंदा बहाद्दूर माधवदास हे माधवदास या नावाने बैरागी बनले आणि सतराव्या शतकाच्या अखेरच्या दशकात ते नांदेड मुक्कामी पोहचले. गुरु गोवींदसिंघजी नांदेड मुक्कामी येण्याअगोदर १५ वर्षापासून बंदा बहाद्दूर नांदेडला वास्तव्य करून होते.[११५]

---

१११. चौधरी भारतभूषण, **गुरु गोविंदसिंघजींचे दरबारी कवि**, दिल्ली, १९७९, पृ. १०५.

११२. राजन, अमिताभ, "गुरु गोविंदसिंघजी आणि नांदेड", **स्थानिक इतिहास आणि साहित्य एक शोध**, पूर्वोक्त, पृ. ९५.

११३. सिंघ, के. जे., **गुरु गोविंदसिंघ ए स्टडी**, मुंबई, १९६७, पृ. १९८.

११४. लेफ्टनंट अँडरसन् (संपा.), **मुन्तखीब**, इंग्रजी भाषांतर, पृ. १३८.

११५. गुलाम हुसेन खान (संपा.), **सियार-उल्-मुन्तखैरिन**, इंग्रजी अनुवाद ब्रिग्ज, कलकत्ता, १८३६, पृ. ७२-७३.

या ऐतिहासिक पुराव्यांशिवाय गुरुगोविंदसिंघजी, बंदा बहादूर, माता साहिब कौर आणि मातासुंदरी यांचे हुकूमनामे यातही अत्यंत विश्वसनीय माहिती उपलब्ध आहे.[११६] त्याशिवाय शिखधर्माच्या मौखिक परंपरांनाही अनन्यसाधारण महत्त्व आहे. या मौखिक परंपरा, धार्मिक श्रद्धा, आणि काही उत्तरकालीन रचनांतूनही बरीच माहिती नोंदवलेली आढळते. गुरु तेगबहादूर आणि गुरुगोविंदसिंघजी यांच्या प्रवासाचे वर्णन करणारा ' साखी ' हा ग्रंथ[११७] सुखासिंघजींचे ' गुरुविलास पादशाही दसवीं ', संतोखसिंगाचे ' श्रीगुरुप्रताप सुरज ' थलमल यांचा ' खालासनामा ' या सारख्या रचनातूनही गुरुगोविंदसिंघजींच्या नांदेड वास्तव्याच्या स्मृती मोठ्या श्रद्धेने जोपासल्या आहेत.

उपलब्ध पुरावे असे दर्शवितात की, गुरुगोविंदसिंघजी १९ जुलै १७०८ या दिवशी नांदेडला पोहचले. पुढचे अडीच तीन महिने त्यांचे वास्तव्य नांदेडला होते. त्यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या ठिकाणी उभारलेले गुरुद्वारे त्यांच्या सुखद वास्तव्याच्या स्मृती आजही जागवीत आहेत. १८ ऑगस्ट १७०८ या दिवशी त्यांच्यावर प्राणघातक हल्ला झाला. त्यांच्यावर हल्ला करणारा पठाण, गुरुगोविंदसिंघजींचा भक्त म्हणूनच काही दिवस त्यांच्या सान्निध्यात होता. अशाप्रकारे या पठाणाने डाव साधला आणि गुरुगोविंदसिंघजींवर प्राणघातक हल्ला केला. ' गुरुशोभा ' या ग्रंथातील उल्लेखानुसार चार दिवसातच त्यांची प्रकृती सुधारली. जखमा भरत आल्या परंतु एका मोठ्या धनुष्याची प्रत्यंचा चढवित असताना पुन्हा जखमा चिघळल्या. ७ ऑक्टोबर १७०८ या दिवशी मध्यरात्रीनंतरच्या चौथ्या प्रहरी त्यांचे परलोकगमन झाले.[११८] त्यांचा नांदेडमधील वास्तव्याचा काळ शिखधर्माच्या दृष्टीने युगप्रवर्तक ठरला म्हणूनच नांदेडला आधुनिक काळातही एक आगळे असे स्थान प्राप्त झाले. नांदेडच्या गुरुद्वाऱ्यामुळे या शहराला एक वेगळी ओळख मिळाली. येथील सामाजिक धार्मिक जीवनाला एक नवा आयाम मिळाला.

सुखासिंगाच्या ' गुरुविलास ' या ग्रंथातील उल्लेखानुसार गुरुगोविंदसिंघांच्यावरील प्राणघातक हल्ल्याची माहिती मुघल बादशहाला कळताच, त्याने राजदरबारी हकीम तातडीने नांदेडला रवाना केले. नांदेडमधील सातशे पठाणांना अटक करून हल्लेखोर पठाणाचा शोध घेण्याचा प्रयत्नही केला. गुरु गोविंदसिंघजींना जेव्हा हे कळले तेव्हा त्यांनी पठाणांना निष्कारण शिक्षा करू नये असे बाहदशहास सुचविले आणि संतत्वाची प्रचिती दिली. तथापि, अभ्यासकांच्या मते गुलखान पठाण नावाच्या हल्लेखोराला गुरु जी नी स्वतः आपल्या तलवारीने मारले आणि दुसऱ्या अत्ताउल्ला खानला त्याच वेळी शीखांनी मारून टाकले.

**नांदेड मुक्कामाहून निघालेले हुकूमनामे :—** शिखधर्मासंबंधीचे कांही महत्त्वपूर्ण हुकूमनामे नांदेड मुक्कामाहून निघाले आहेत. त्यामुळे नांदेडला एक आगळे महत्त्व आहे. ऑक्टोबर १७०७चा गुरुगोविंदसिंघजींचा हुकूमनामा लक्षणीय आहे. हा हुकूमनामा धौलच्या संगतला उद्देशून लिहिलेला आहे. शिखांचे संघटन आणि शस्त्रसज्जता हे गुरुंचे प्रमुख प्रेषण कार्य असल्याचा उल्लेख सदरील हुकूमनाम्यात आहे. या काळात मुघल बादशहा बहादूरशाह सोबत बोलणी चालू होती असे दिसते. ही बोलणी जर असफल झाली तर गुरु परत पंजाबला येतील व जुलुमाविरुद्धचा संघर्ष चालू राहिल

११६. गंडासिंग (संपा.), **हुकुमनामा** पतियाळा १९६७.

११७. अत्तारसिंग (संपा.), **साखी**, इंग्रजी भाषांतर, पतियाळा, १८७३.

११८. राजन, अमिताभ, "गुरु गोविंदसिंघजी आणि नांदेड", पूर्वोक्त, पृ. ९३.

Maharashtra State Gazetteers

असाही उल्लेख धौलच्या संगतला उद्देशून काढलेल्या या हुकूमनाम्यात आहे. १७०८ या वर्षी माता साहेब कौर यांचे वास्तव्यही नांदेडला होते. त्यांच्या पवित्र स्मृतींची आठवण येथील गुरुद्वारा जोपासून आहे.

गुरुगोविंदसिंघजींच्या परलोक गमनानंतर मातासुंदरींनी शिखपंथात पुरेसा प्रभाव निर्माण केला होता. बंदाबहादूर माधवदासांचेही वास्तव्य नांदेडला होते. तेही निरनिराळ्या संगतला उद्देशून हुकूमनामे काढीत. १२ डिसेंबर १७१० या दिवशी त्यांनी जौधपूरच्या संगतला उद्देशून एक हुकूमनामा काढला. एक श्रद्धाशील शिष्य म्हणून बंदाबहादूर नांदेड मुक्कामी काही काळ वास्तव्याला राहिले. नांदेडच्या गोदातटावरील बंदा घाट त्यांच्या वास्तव्याच्या स्मृती उराशी बाळगून आहे.

**नांदेडला मिळालेले अनन्यसाधारण महत्त्व :**—तात्पर्य शिखांचे दहावे गुरु गोविंदसिंघजींनी जिथे अखेरचा श्वास घेतला अशी भूमी म्हणून नांदेड ख्यातकिर्त झाले ते याच काळात. गुरुगोविंदसिंघजींचे नांदेडमधील वास्तव्य म्हणजे अत्यंत निर्णायक असा कालखंड. मुघल साम्राज्याशी चाललेल्या वाटाघाटातील निरर्थकता जाणवली ती याच ठिकाणी. इथेच गुरुगोविंदसिंघजींच्या जीवनाचा एक टप्पा संपला आणि प्रतिकाराचे तत्त्वज्ञान विशिष्ट आकार घेऊन साकारले तेही इथेच. गुरुगोविंदसिंघजींचे शब्द, त्यांचे विचार आणि गुरुग्रंथसाहिब हेच यापुढील काळात खरे मार्गदर्शक ठरणार हा संदेश याच नांदेड परिसरातून सर्वत्र दुमदुमला. या घटनेला पाहता पाहता तीनशे वर्षे होऊन गेली. त्याचा त्रिशकोत्सवी महोत्सव नांदेडमध्ये साजरा करण्यात आला आहे.

**१७ व्या आणि १८ व्या शतकातले नांदेड :**—१७ व्या आणि १८ व्या शतकात हा नांदेडचा परिसर कसा होता याचे कुतूहलापोटी कागदपत्रांचा धांडोळा घेता काही प्रत्यक्षदर्शी पुरावे हाती येतात. मुघलसाम्राज्य आणि मुस्लिम सलतनतींच्या संघर्षाचे काळात नांदेडचा किल्ला तसेच कंधार, माहूर, कौलास येथील किल्ल्याचे अनेक संदर्भ येतात. पण प्रत्यक्ष नांदेडची वस्ती कशी होती ? यासारख्या प्रश्नांचे उत्तर काही युरोपीयन प्रवाश्यांच्या प्रवासवर्णनातून मिळते. ट्रॅव्हरनीअर या नावाचा एक युरोपीयन इ.स. १६४५ साली गोदावरीगंगा पार करून नांदेड गावी आला होता. तो असे लिहितो की, नदी पार करण्यासाठी त्याला मुघल सुभेदाराची परवानगी घ्यावी लागली.[११९] त्यानिमित्त काही करही जमा करावा लागला. नदीच्या काठी असलेल्या किल्ल्यावर माणसांचा वावर जाणवत होता. तटबंदीच्या आजूबाजूला गोदाकाठी गाव वसलेले होते. आजूबाजूला प्रचंड जंगल होते. त्यानंतर साधारणतः २०० वर्षांची कॅप्टन फिटझराल्ड या इंग्रज सेनाधिकाऱ्यांचे नांदेड पाहिले. इ.स. १८४० साली त्याने गुरुगोविंदसिंघजींच्या गुरुद्वाऱ्याला भेट दिली.[१२०] त्याच्या प्रवासवर्णनात तो लिहितो की, नांदेड गावाजवळ प्रचंड बाभुळबन होते व तो भाग शिखबाग म्हणून ओळखला जात होता. १७८१ बीघा जमिनीवर शिखबाग होता. या शिखबागेच्या आणि बाभूळबनाच्या मधोमध गुरूद्वारा बांधला गेला होता. त्याकाळातल्या नांदेड गावातून या गुरुद्वाराकडे यायला घनदाट अशा बाभूळबनातून काही

११९. वॉल कोडेन, **ट्रॅव्हर्नीअर ट्रॅव्हल अकाऊंट इंग्लीश ट्रान्सलेशन**, लंडन, १८८९, पृ. ११९.

१२०. राजन, अमिताभ, 'गुरु गोविंदसिंघजी आणि नांदेड' पूर्वोक्त, पृ. ९३.

पाऊलवाटा होत्या. किर्र जंगलातल्या या पाऊलवाटांनी यायला भिती वाटायची. अशा या वाटेने कॅप्टन फिटझराल्ड त्याकाळी गुरुद्वारात येऊन गेला आहे. एकोणिसाव्या शतकाच्या मध्यावर नांदेडची ही अवस्था होती. पुढच्या पन्नास वर्षांत अनेक स्थित्यंतरे घडली. नांदेडला रेल्वे आली. मूळ गावापासून पाच सात मैलावर रेल्वे स्टेशन उभे राहिले. हळुहळु सारे बदलत गेले. गुरुद्वारा परिसराचाही अमुलाग्र असा कायापालट झाला.

दोन तीनशे वर्षांच्या वाटचालीत हे सारे घडत असतांना राजकीय क्षेत्रातही खूप बदल झाले. संघर्ष चालू राहिला. मुघल साम्राज्याचा ऱ्हास झाला. मुघल सुभेदार स्वतंत्र झाले. मराठवाडा परिसरात आणि विशेषतः औरंगाबाद सुभ्यात स्वतंत्र राज्य अस्तित्वात आले. या साऱ्या घडामोडींचे अपरिहार्य असे पडसाद नांदेडमध्येही उमटले, म्हणूनच हा सारा तपशील विस्ताराने नोंदवणे आवश्यक ठरते.

**मुघल दरबारातील राजकारण :**—बहादुरशाह हा मुघल बादशहा १७०८ साली काही काळ हिंगोलीला तळ देऊन होता याचा उल्लेख यापूर्वी झालेला आहे. कामबक्षचा बंदोबस्त करून तो दिल्लीला परतला. सुभेदारीवर झुल्फीकारखान होता. हे दोघेही तसे महत्त्वाकांक्षी होते. मुघल सत्ता खिळखिळी झाल्यापासून तर प्रत्येक सुभेदाराला स्वतंत्र राज्य निर्माण करण्याची इर्षा निर्माण झाली. दिल्लीतल्या सत्तांतराचा परिणाम दख्खनी राजकारणावरही झाला. मुघल बादशाह बहादूरशाहच्या मृत्युनंतर जहांदरशाह आणि फारूकसियार सत्तेवर आले. त्यांनी सुभेदारीवरून दाऊदखानाला हटवले आणि चिन कुलीखान यास सुभेदारी दिली. इ.स. १७१३ सालातली ही घटना.

चिन कुलीखानाने दख्खनची सत्ता हाती घेताच मुघल-मराठा संबंधात थोडासा फरक पडला. दरम्यान आपण हे लक्षात घेतले पाहिजे की, मुघलांच्या नजरकैदेत असलेल्या संभाजीपुत्र छत्रपती शाहूंची मुक्तता झाली. शाहू-ताराबाई संघर्षानंतर छत्रपती शाहूचा राज्याभिषेक झाला. राणी ताराबाईंनी देखील आपले स्वतंत्र राज्य निर्मिले. कोल्हापूर हे महाराणी ताराबाईच्या राज्याची नवी राजधानी बनली.[१२१] या राजकीय घडामोडींचा परिणाम म्हणून छत्रपती शाहूंनी परसोजी भोसले यांना नांदेड परिसरातील माहूर आणि कळंब, नरनाळा, गावील आदी भागात चौथ आणि सरदेशमुखीचे अधिकार बहाल केले, दख्खनच्या मुघल सुभेदारानेदेखील चौथ आणि सरदेशमुखी वसुलीचे मराठ्यांचे हे अधिकार मान्य केले पण मुघल अधिकारी स्वतः वसुल करून हा महसूल परसोजी भोसल्यांच्या हवाली करणार होते.

दख्खनचा नवा मुघल सुभेदार चिन कुलीखान छत्रपती शाहूंच्या विरोधात आणि महाराणी ताराबाईंच्या बाजूचे राजकारण करू लागला. दाऊदखानाने केलेले करारमदार त्याने दुर्लक्षित केले. तिकडे दिल्लीत मुघल दरबारात सय्यद बंधूचे वर्चस्व वाढले. नवा सत्तासंघर्ष सुरू झाला. परिणामी चिन कुलीखान निजाम उल्-मुल्कची रवानगी दख्खनमधून माळव्याचा सुभेदार म्हणून झाली. सय्यद बंधूंनी मराठ्यांच्या मदतीने विशेषतः छत्रपती शाहूंच्या मदतीने मुघल बादशाह फरुखसिय्यर याला पदच्युत केले. छत्रपती शाहूंना दख्खनचे चौथ आणि सरदेशमुखीचे अधिकारही दिले आणि मराठी

१२१. पहा पवार, आप्पासाहेब, **ताराबाईकालीन पत्रव्यवहार**, शिवाजी विद्यापीठ ऐतिहासिक ग्रंथमाला, कोल्हापूर, १९६९.

Maharashtra State Gazetteers

राज्याचे स्वराज्यही मान्य केले. सय्यद हुसेन अलीखान हा दख्खनचा सुभेदार म्हणून चिन कुलीखानच्या जागी रुजू झाला होता. इ.स. १७१५ सालापासून दख्खनचा कारभार या सय्यद बंधूंकडे होता.

**हैद्राबादच्या निजामी राजवटीच्या स्थापनेची पार्श्वभूमी :**—फारुखसियर या मुघल बादशाहच्या जागी सत्तेवर आलेल्या बादशाह मुहंमदशाह यालाही सय्यदबंधूंचे दिल्लीतील राजकारण डोईजड होऊ लागले. बादशाहने सय्यद बंधूंचा बंदोबस्त करावयाचे ठरवले. दरम्यान चिन कुलीखान निजाम उल् मुल्क याने माळव्याची सुभेदारी सोडली आणि तो दख्खनला आला. इथला सय्यदबंधूचा प्रभाव कमी करून त्याने दख्खनचा कारभार ताब्यात घेतला. नर्मदेपासून ते पूर्ण दख्खन पठारावरील मुघल प्रदेशावर निजामाने आपला प्रभाव प्रस्थापिला. दरम्यान १७२२ साली मुघल दरबारात वजीरपदी त्याची नेमणूक झाली. निजाम उल् मुल्क इ.स. १७२२ ते १७२४ अशी दोन वर्षे मुघल दरबारात वजीरपदी होता. इ.स.१७२४ साली निजाम उल् मुल्क चिन कुलीखान दिल्लीतले वजीरपद सोडून दख्खनमध्ये आला. दख्खनच्या सुभेदारीवर हैद्राबादला मुबारीकखान होता. दिल्ली दरबारातून मुबारीकखानाला सूचना होत्या की, त्याने निजामाला विरोध करावा. दिल्ली दरबाराच्या इच्छेविरुद्ध निजाम खरेतर दख्खनकडे निघाला होता. परिणामी १७२४ च्या ऑक्टोबर महिन्यात मुघल आणि निजामी सैन्यात साखरखंडी येथे मोठी लढाई झाली.[१२२] या लढाईत मुबारीकखान मारला गेला. दख्खनचे सहा मुघल सुभे निजामाच्या ताब्यात आले. मुघल साम्राज्याचा सुभेदार म्हणून निजामाने दख्खनचे सुभे ताब्यात घेतले असले तरी प्रत्यक्षात साखरखंडी येथील लढाईतील विजयामुळे मुघलांना पराभूत करून चिन कुलीखान निजाम-उल्-मुल्कने आपले स्वतंत्र राज्यच अस्तित्वात आणले होते. या स्वतंत्र राज्याचा कारभार औरंगाबादेतून पाहिला जाऊ लागला.

**नांदेड निजामी राज्यात आले :**—नांदेड जिल्हा आता मुघलांच्या वर्चस्वातून बाहेर पडला आणि स्वतंत्र निजामी राज्याचा भाग बनला. कालांतराने निजामी राज्याची राजधानी, हैद्राबादला स्थलांतरीत झाली. १९४८ च्या २० सप्टेंबर पर्यंत म्हणजे ऑपरेशन पोळणे या नावाने ओळखल्या जाणाऱ्या पोलीस ॲक्शन पर्यंत मराठवाडा आणि विशेषतः नांदेड जिल्हा याच हैद्राबादच्या निजामी राज्यात समाविष्ट राहिला. १७२४ पासून १९४८ पर्यंत म्हणजे जवळपास सव्वादोनशे वर्षे मध्ययुगीन राजसत्तेतल्या सरंजामी सलतनतीतच हा नांदेड जिल्हा खितपत पडला होता. याची जाणीव होणे महत्त्वाचे आहे. आजच्या मागासलेपणाची पाळंमुळं या गतकालीन वाटचालीत शोधावी लागतात.

निजाम-उल्-मुल्क ने स्वतंत्र राज्याची निर्मिती केली त्यावेळी नांदेड परिसरात अमीनखान दख्खनीचा अंमल होता. त्याच्या कारभाराचे वर्णन शाह नवाज खानाने "मासीर-उल्-उमरा" या समकालीन ग्रंथात केले आहे. इ.स. १७२४ मधला नांदेड जिल्हा म्हणजे नांदेड सरकार खूप विस्तृत होते. त्यात ४१ महाल आणि परगण्यांचा समावेश होता. आजचा नांदेड जिल्हा, आदिलाबाद आणि निजामाबाद जिल्हा हा सारा परिसर मिळून हे नांदेड सरकार बनले होते. नांदेड सरकारात परगणे कंधारला तिथल्या किल्ल्यामुळे विशेष महत्त्व होते. हा परगणे कंधार याच सुमारास गोपालसिंग गौड याची जहागीर बनली. हा गोपालसिंग तिकडे दिल्लीत मुघल दरबारी होता.[१२३] निजाम-उल्-मुल्कने

१२२. धारूरकर, वि. ल., **मुक्तिसंग्राम**, १९३६-१९४८, मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद, १९९८, पृ. १७.

१२३. **नांदेड जिल्हा गॅझेटिअर**, पूर्वोक्त.

Maharashtra State Gazetteers

दख्खनकडे कूच करावयाचे ठरवले तेव्हा गोपालसिंग आणि दलपतसिंगांनी त्याला मदत केली ते दोघेही इकडे दख्खन सुभेदारीत दाखल झाले. साखरखंडी लढाईत ते निजामासोबत मुघलांविरुद्ध लढले. निजामाने आपले राज्य स्थापन करताच गोपासिंगाला कंधार परगण्याची जहागीर बहाल केली. कंधारच्या किल्ल्यावर इब्राहिमखानाला किल्लेदार म्हणून नेमले. मुळात हे गौड घराणे अलाहाबाद परिसरातील इंद्रुखी या गावचे जमीनदार. ओच्छा राज्यातल्या राजदरबारी गौडांचे पूर्वज दरबारी कारभारी म्हणून राहिले. औरंगजेबाच्या काळात गोपाळसिंगाचे आजोबा बिहारसिंग यांचा अंतर्गत संघर्षात खून झाला. बिहारीसिंगाचा मुलगा भागवतसिंगाच्याही नशीबी असाच मृत्यु आला. मूलचंदाशी झालेल्या संघर्षात भागवतसिंग मारला गेला. या सगळ्या संघर्षात गौड घराण्याची जमीनदारी गेली. भागवतसिंगाचा मुलगा गोपाळसिंगाने आपले गाव सोडले आणि तो बुंदेलखंडात आला. तेथे स्वकर्तृत्वावर त्याला सेनेत शिरकाव मिळाला. तीनशे सैनिकांचे नेतृत्व त्याला मिळाले. मुहंमदशाह बादशाहच्या काळात त्याला राजा हा किताब बहाल करण्यात आला. दिल्ली दरबारातला एक वजनदार दरबारी म्हणून तो वावरु लागला. निजाम उल्-मुल्कने दख्खनकडे कूच करतांना गोपालसिंग आणि त्याचा मुलगा दलपतसिंग यांना आपल्या बरोबर घेतले. या दोघांनी निजामाला दख्खनच्या संघर्षात खूप मदत केली. निजामाने म्हणूनच परगणे कंधारची जहागीर गोपालसिंगाला बहाल केली. कंधारचा इतिहास या गोपालसिंगाशी जोडला गेला. गोपालसिंगाचा उल्लेख गोपालसिंग कंधारवाले म्हणूनच केला जाऊ लागला. इथे एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे, परगणे कंधार गोपालसिंगच्या जहागिरीचा भाग असला तरी कंधारच्या किल्ल्यावर मात्र किल्लेदाराची नेमणूक निजामाकडून होत असे. इ.स.१७४८ साली अजयचंद गौड याने निजाम दरबारातून किल्लेदारपद मिळवले. १७४८ नंतर परगणे कंधारवर आणि कंधारच्या किल्ल्यावर गौड घराण्याचे वर्चस्व राहिले. ' राजा अजयचंद गौड बहादूर गोपालसिंग सवाई ' ही उपाधी धारण करून अजयचंद परगणे कंधारवर राज्य करू लागला.

हैद्राबादच्या निजामाने आपले स्वतंत्र राज्य निर्मिले असले तरी दख्खन पठारावरील संघर्ष चालूच होता. मुघल मराठा संघर्षाबरोबर आता निजाम मराठा संघर्ष उभा राहिला. या सर्व संघर्षात नांदेड परिसरातील अजयचंद गौड आणि त्याचे सैन्य सतत निजामाबरोबर होते. राक्षसभुवनच्या लढाईत निजामाच्या सैन्याबरोबर हा राजा अजयचंद गौड होता व तो त्या लढाईत मारला गेला. राजा अजयचंदाच्या मृत्युनंतर कबीरसिंग हा ' तिसरा गोपालसिंग ' ही उपाधी घेऊन कंधारची जहागीर सांभाळू लागला. तो ' हिंदुपत महेंद्र बहादूर ' या नावाने देखील ओळखला जात होता. अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात कान्हरखेड, कौलास आणि माहूर या ठिकाणच्या किल्ल्यांवरही या गौंड घराण्याचा ताबा होता. गौड घराण्याचा तेजसिंग हा कान्हरखेडचा जहागीरदार बनला. कौलासची जहागीर पद्मसिंगाकडे होती तर माहूरची जहागीर आणि विशेषतः माहूरचा किल्ला नरपतसिंग गौडाकडे होता. या काळात नांदेड परीसरावर गौड घराण्याचे प्रचंड वर्चस्व होते.

**मुघल-निजाम-मराठा संबंध :**—निजाम मराठा संघर्ष जसा चालू होता तसाच काही वेळा त्याच्यांत सलोखाही होता. टिपू सुलतानाविरुद्ध निजाम-मराठे एकत्र आले आणि १७८४ साली मोठा संघर्ष झाला. या संघर्षात नांदेडचे गौड राजे आपल्या सैन्यासह निजाम-मराठा सैन्यात हजर होते. कंधारचा जहागीरदार कबीरसिंग उर्फ तिसरा गोपालसिंग याच्या मृत्युनंतर मात्र या घराण्याचे महत्त्व

हळू हळू कमी होऊ लागले. असे असले तरी तेजसिंग गौड, जयसिंग गौड या गौड जहागिरदारांनी कंधारची जहागीर सांभाळली. एकोणीसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत कंधारच्या किल्ल्यावर गौडांचे वास्तव्य होते. इ.स. १८५० मध्ये हिरासिंग हा शेवटचा गौड मृत्यु पावला आणि हे कंधारवाले गौड घराणे इतिहासजमा झाले.

चिन कुलीखानाने दख्खनच्या मुघल सुभ्यात आपले स्वतंत्र राज्य निर्मिले असले तरी चौथ आणि सरदेशमुखीचे अधिकार मराठ्यांकडेच राहिले. छत्रपती शाहु महाराजांनी रघुजी भोसलेला सेना साहिब सुभा या पदावर नेमले आणि दख्खनपठारावरील चौथ आणि सरदेशमुखांच्या वसुलीची व्यवस्था केली. तात्पर्य चिन कुलीखान निजाम-उल्-मुल्कचे स्वतंत्र राज्यात चौथ आणि सरदेशमुखी वसुलीच्या निमित्ताने मराठा अधिकारी स्वैरपणे हिंडत. चौथ आणि सरदेशमुखीच्या अधिकारावरुन तंटेही होत. निजामाला मराठ्यांचा हा चौथ सरदेशमुखीचा अधिकार मान्य नव्हता. परंतु तो हक्क मान्य करण्याशिवाय गत्यंतर नसल्यामुळे निजामाच्या हद्दीत मराठी अधिकारी वसुली करीत. चौथ सरदेशमुखीच्या प्रश्नावर मराठे आणि निजाम या दोन सत्तांच्या मध्ये संघर्ष होत राहिला. इ.स. १७२८ साली पालखेडच्या मैदानावर त्याच्यांत लढाई झाली आणि निजामाला हार पत्करावी लागली. तर बाजीराव पेशव्याने निजामाच्या सैन्याला इ.स.१७३७ मध्ये भोपाळजवळच्या लढाईत पराभूत केले.

याच काळात विदर्भात कान्होजी भोसलेने निजामाच्याविरुद्ध मोर्चे बांधणी सुरू केली. देवगडचा राजाही निजामाच्या विरोधात लढण्याची तयारी करून लागला. निजाम-उल्-मुल्कचा दरबारी मुहंमद कासीम याने त्याकाळात लिहिलेल्या अहवाल-ए-खवाकिन मध्ये या संघर्षाविषयी विस्ताराने लिहिले आहे. वऱ्हाडातून आणि देवगडहून प्रचंड खंडणी वसूल करून निजाम औरंगाबादी परतल्याचे तो नोंदवतो. इ.स.१७३२ सालातल्या पावसाळ्यात निजामाचा मुक्काम औरंगाबादीच असल्याचे सांगून मुहमंद कासीम पुढे लिहितो की, निजामाने कर्नाटकात मोहिम काढली. बिदर जवळच्या वाकीनखेड्याचा जहागीरदार प्रबळ बनत चालला होता. त्याचा बंदोबस्त करून निजाम-उल्-मुल्क गुलबर्ग्यात आला. पावसाळा तेथे काढून त्याने आपला तळ हैद्राबादला हलवला. दरम्यान निजाम-उल्-मुल्कचा मुलगा नासिरजंग याच्या बेताल वागण्याचा मनस्ताप बापाला सोसावा लागला. निजाम औरंगाबादला परतला खरा पण स्वतंत्र राज्याला निवांतपणा नव्हता. विदर्भात भास्कर भोसले आणि रघुजी भोसले अजूनही प्रबळ होते. नर्मदेच्या तीरावरही निजामाचा शत्रू प्रबळ होता. तेथील जमीनदार मोहनसिंग यानेही चांगलेच सामर्थ्य एकवटले होते व तो निजामच्या वर्चस्वाला आव्हान देऊ लागला होता.

**निजामी राजवटीतील नांदेड सुभा :**—नांदेड सुभ्यावर जमीलबेग खान हा सुभेदार होता. विदर्भातून मराठ्यांच्या हालचाली चालूच होत्या. नांदेडवरही मराठ्यांच्या स्वारीचा धोका होताच. इरादारखान यासही सुभेदार जमीलबेग खानास मदत करण्यासाठी म्हणून नांदेड सुभ्यावर ठेवण्यात आले. छत्रपती शाहू महाराजांचे सेनापती भास्कर आणि रघुजी भोसले आपल्या सैन्यासह याच दरम्यान नांदेड सुभ्यात शिरले. त्यांनी इंदूरच्या बाजारपेठेवर (म्हणजे आजचे आंध्रप्रदेशातील निजामाबाद) हल्ला केला. मानवतची बाजारपेठही प्रसिद्ध होती. ३० हजाराचे सैन्य उभे करून मराठ्यांनी निजामासमोर मोठे आव्हान उभे केले. नांदेड सुभ्यात निजामाचे सैन्य दाखल झाले. मेदकचा सुभेदारही आपल्या सैन्यासह

नांदेड परिसरात दाखल झाला. गनीमी पद्धतीची प्रचंड धामधुम करून मराठ्यांची फौज साताऱ्याकडे रवाना झाली. नशीबाने निजामाचे सैन्य मराठ्यांच्या प्रत्यक्ष हल्ल्यापासून बचावले. निजाम-उल्-मुल्क स्वतः विदर्भात उतरला. देऊळघाटातून त्याचे संपूर्ण सैन्य कान्होजी भोसलेवर चालून गेले. कान्होजी भोसलेने संपूर्ण विदर्भ आपल्या ताब्यात आणला होता. त्याने निजामाला जेरीस आणले होतेच पण तो छत्रपती शाहू महाराजांचेही ऐकेनासा झाला. त्यांच्याही आज्ञांचे तो उल्लंघन करी. तो स्वतःला विदर्भाचा राजा म्हणून घेऊ लागला. या कान्होजीवर निजामाने हल्ला केला आणि बऱ्याच संघर्षानंतर त्याचे विदर्भातले वर्चस्व संपुष्टात आले. पूर्ण माहूर सुभा पुन्हा निजामाच्या ताब्यात आला. निजाम विदर्भ सोडून हैद्राबादकडे रवाना होण्याच्या बेतात असतानांच नांदेडजवळ गोदावरीच्या काठावरच त्याला बातमी कळली की, साताऱ्याला रघुजी भोसल्याच्या नेतृत्वात मराठा फौजा विदर्भाकडे यायला निघाल्या आहेत. नांदेड सुभ्याला आणि मेदकला या फौजांचा धोका होता. निजामाने मुहंमद सईदखान, जमील बेगखान या सुभेदारांना आणि बीडच्या सुलतानजी निंबाळकरांना खलीते पाठवून रघुजी भोसल्याच्या हल्ल्याविरुद्ध सैन्य तयार ठेवण्यास सांगितले.

रघुजी भोसलेने विदर्भात मुलुखगीरी करून विदर्भ सोडला. त्यानंतर निजाम-उल्-मुल्कने बुऱ्हाणपुराकडे कूच केले. रघुजी भोसलेला अटक करण्यात निजामाला अपयश आले. बुऱ्हाणपुरातल्या मुक्कामानंतर निजाम औरंगाबादला परतला. या सगळ्या घडामोडी आणि संघर्ष चालू असतानांच निजाम-उल्-मुल्कच्या मुलाने नासिरजंग याने बंड केले. याचा उल्लेख यापूर्वी आला आहेच. त्याचे बंड मोडून त्याला अटक करून कंधारच्या किल्ल्यात नजरकैदेत ठेवण्यात आले ते याच काळात. रघुजी भोसलेला पकडण्यात निजामाला अपयश आले असले तरी विदर्भ त्याच्या ताब्यात आला होता. अशा रितीने इ.स.१७४८ पर्यंत निजामाचे स्वतंत्र राज्य चांगलेच आकाराला आले होते. निजाम-उल्-मुल्कचा इ.स.१७४८ साली मृत्यु झाला आणि त्याच्या वारसदारांमध्ये सत्तासंघर्ष पेटला. निजामाचा मुलगा नासिरजंग आणि मुलीचा मुलगा मुजफरजंग यांच्यात हा सत्तासंघर्ष होता.

**इंग्रज-फ्रेंचाचा शिरकाव :**—या काळात इंग्रज आणि फ्रेंच व्यापारी आपल्या फौजांसह दख्खनच्या राजकारणात उतरले होते. त्यांच्या व्यापारी वखारी स्थापन झाल्या होत्या. स्थानिक सत्तांच्या अंतर्गत संघर्षात मदत करून इंग्रज आणि फ्रेंच आपला प्रभाव वाढवू इच्छित होते. निजामी राज्यातल्या सत्ता संघर्षातही त्यांचे लक्ष होतेच. इंग्रजांनी नासिरजंगाची बाजू घेऊन निजामी सत्तासंघर्षात उडी घेतली. मुज्जफरजंगाने फ्रेंचांची मदत घेतली आणि सत्तासंघर्ष तीव्र झाला. शेवटी नासिरजंग मारला गेला आणि मुज्जफरजंग निजामपदी आरुढ झाला. फ्रेंचांचा प्रभाव तात्पुरता का होईना वाढला. फ्रेंच गव्हर्नर डुप्लेक्सने निजामी राजकारणात लक्ष द्यायला सुरुवात केली. त्याच्या सल्ल्यानेच निजामी राज्याचा कारभार होऊ लागला. कालांतराने मुज्जफरजंगाचाही खून झाला. फ्रेंचांनी सलाबतजंग या राजपुत्राला निजामत दिली. गाझीउद्दीन याने निजामी सत्तेवर हक्क सांगितला आणि मराठ्यांच्या मदतीने त्याने निजामी राज्यात सत्ता मिळविण्याचा प्रयत्न सुरू केला. पहिल्या बाजीराव पेशव्यांनी हैद्राबादच्या सत्तासंघर्षात गाझीऊद्दीनची बाजू घ्यावयाचे ठरवले. मराठ्यांच्या या लष्करी मदतीचा मोबदला म्हणून गाझीउद्दीनाने वऱ्हाडातील शेतसारा वसुलीचे सारे अधिकार मराठ्यांना बहाल केले. परंतु इ.स. १७५२ च्या ऑक्टोबर महिन्यात परिस्थिती बदलली. गाझीउद्दीनचा औरंगाबाद येथे मृत्यु झाला. हैद्राबाद

राज्यातला सत्तासंघर्ष अचानक थांबला. निजामी राज्यावर असलेल्या निजाम सलाबत जंगाने मराठ्यांचे शेतसारा वसुलीचे चौथ सरदेशमुखीचे अधिकार मान्य केले. त्यामुळे नुसता विदर्भ नव्हे तर दख्खन पठारावरील उत्तरेकडील सर्व सरकार-परगण्यातील वसुलीचे अधिकार मराठ्यांना मिळाले.

दरम्यान दख्खन पठारावरील वर्चस्वासाठी चालू असलेला इंग्रज-फ्रेंच संघर्ष अंतीम टप्प्यात आला. कर्नाटक युद्धाने इंग्रजांचे वर्चस्व सिद्ध केले आणि फ्रेंचांचा प्रभाव कमी झाला. त्याचे पडसाद हैद्राबाद राज्यातही उमटले. फ्रेंचांनी सलाबत जंगाची साथ सोडली. शेवटी इ.स. १७५९ साली सलाबत जंगाला पदभ्रष्ट करून निजामपद मिळविण्याचा निजाम अली खानाने प्रयत्न सुरू केला. इ.स. १७६२ साली सलाबतजंगाला अटक करून निजाम अली खानने तुरुंगात डांबले आणि निजामपद मिळवले. निजाम-मराठा संघर्ष चालूच होता. या संघर्षातली एक महत्त्वपूर्ण लढाई राक्षसभुवनला झाली. इ.स. १७६३ च्या ऑगस्ट महिन्यात झालेल्या या लढाईत मराठ्यांनी निजामाचा पराभव केला. इ.स. १७६६ साली निजामाने इंग्रजांशी करार केला आणि तैनाती फौजेची योजना स्वीकारली. निजामावर युद्धाची वेळ आल्यास इंग्रजांची तैनाती फौज त्याच्या मदतीला पाठवावी आणि ही योजना स्वीकारल्या निमित्त निजामाने त्याच्या राज्यातले उत्तरेकडील काही भाग इंग्रजांच्या हवाली करावेत अशी तरतूद असलेला तह इंग्रज आणि निजाम यांच्यात झाला. इ.स. १७६८ साली देखील आणखी एक करार निजामाने कर्नाटकच्या नबाबाशी आणि इंग्रजांशी केला. हैद्राबाद राज्यातला इंग्रजांचा प्रभाव वाढत चालला. निजामाने आवश्यकता पडल्यास इंग्रजाच्याही मदतीला आपले सैन्य पाठवावे अशी तरतूद या तहांमध्ये होती.

**मराठे-इंग्रज-निजाम संबंध :**—इ.स. १७९० च्या सुमारास इंग्रज आणि टिपू सुलतान यांच्यात संघर्ष पेटला. मराठे, इंग्रज आणि निजाम यांच्यात टिपू विरुद्ध आघाडी करण्याचा करार झाला आणि प्रचंड फौजफाटा उभा राहिला. टिपू सुलतानच्या म्हैसूरवर लष्करी चढाईची तयारी झाली. परंतु लष्करी संघर्षाआधीच टिपू सुलतानने समझोता केला आणि त्याच्या म्हैसूर राज्याचा बराचसा भाग मराठे, इंग्रज आणि निजामाच्या हवाली केला. निजामाच्या ताब्यात म्हैसूर प्रांताचा काही भाग आला आणि त्याचे राज्य विस्तारले. इ.स. १७९८ मध्ये निजामाने इंग्रजांशी आणखी एक तह केला. या तहानुसार इंग्रजांकडून निजामाला ६००० चे खडे सैन्य आणि तेवढीच शस्त्रास्त्रे मिळणार होती व त्या मोबदल्यात निजामाने २४ लाख रुपये इंग्रजांना द्यावयाचे होते. तैनाती फौजेच्या योजनेचाच हा भाग होता. पुढे १७९९ साली टिपू सुलतानाचा मृत्यु झाला आणि श्रीरंगापट्टणम्‌चा पाडाव झाला. म्हैसूरच्या तहानुसार म्हैसूरचा बराचसा प्रदेश निजामाच्या वर्चस्वाखाली आला. मराठ्यांनी म्हैसूरच्या तहातून अंग काढून घेतल्यामुळे निजामाला आणखी फायदा झाला.

निजामाचे राज्य आता चांगलेच स्थिरावले. इ.स. १८०० मध्ये इंग्रजांशी आणखी एक तह निजामाने केला. तैनाती फौजेचा हैद्राबाद राज्यात आणखी विस्तार झाला. पायदळाच्या दोन बटालियन्स आणि एक घोडदळाची रेजीमेंट दाखल झाल्या. या सैन्याच्या तैनातीपोटी निजामाने मद्रास प्रांतातले त्याच्या ताब्यातले सिडेट डिस्ट्रीक्ट इंग्रजाच्या ताब्यात दिले. तात्पर्य १८व्या शतकाच्या अखेरीस आणि एकोणिसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर इंग्रजांच्या फौजांची हालचाल हैद्राबादेत वाढली. त्यांचे लष्करी ठाणे ' कॅन्टॉनमेन्ट ' स्थापन झाले.

निजाम-मराठा संघर्ष चालूच होता. इ.स.१८०३ साली निजाम अली खानची प्रकृती खालावली. या संधीचा फायदा घेऊन शिंदे आणि भोसल्यांनी आपल्या फौजा निजामच्या राज्यात घुसवल्या. निजामाचे सैन्य, इंग्रजाची तैनाती फौज हा सारा फौज-फाटा परांड्याच्या किल्ल्याच्या परिसरात तैनात झाला. होळकरांचेही सैन्य हैद्राबाद राज्यात घुसतेय ही बातमी कळताच जनरल वेलस्ली आपल्या सैन्यासह निघाला. जनरल स्टीव्हनसनच्या सैन्याची तुकडीही हैद्राबाद राज्यात शिरली. जालन्याजवळ हे सारे इंग्रज सैन्य एकत्र आले. असई आणि आडगाव या दोन ठिकाणी इंग्रज आणि मराठ्यांमध्ये लढाया झाल्या. शिंदे आणि भोसले आपल्या मराठा सैन्यासह या लढायांमध्ये पराभूत झाले. त्यानंतर झालेल्या तहातून निजामाचे राज्य सुरक्षित झाले. इ.स. १८०३ मध्ये निजाम अली खान मृत्यु पावला. सिकंदरजहाँ निजामपदी सत्तारूढ झाला. त्याच्या कारकिर्दीत इंग्रजांच्या तैनाती फौजेची संख्या वाढली. या सैन्याचा हस्तक्षेपही वाढला. इंग्रज फौजांच्या उपस्थितीमुळे निजाम सिंकदरजहाँ निर्धास्त बनला. याचा अर्थ संघर्ष संपला आणि सगळे स्थिरस्थावर झाले असा मात्र नव्हे. निजामाच्या विरुद्ध संघर्ष चालूच होता. १९ व्या शतकातले सगळ्यात मोठे आव्हान नांदेड परिसरातील हटकरांनी उभे केले होते. २० वर्षे हटकरांनी निजामाविरुद्ध संघर्ष केला. शेवटी इंग्रज सैन्याच्या मदतीने हा संघर्ष दडपला गेला व तो ही मोठ्या शर्थीच्या प्रयत्नानंतर ही गोष्ट लक्षणीय आहे. हटकरांच्या उठावाचा तपशील अभ्यासल्या नंतरच या संघर्षाचे महत्त्व लक्षात यावे.

१८०३ साली सिंकदरजहाँ निजामपदी रुढ झाला. निजाम-मराठा संघर्ष तात्पुरता संपला असला आणि निजामाचे राज्य सुरक्षित झाले असले तरी तो एक आभास होता. निजामी सलतनतीला विरोध करणाऱ्या आणि आपले स्वातंत्र्य अबाधित राखू इच्छिणाऱ्या अनेक राजवटी अजूनही मराठवाड्यात आणि इतरत्रही प्रभावी होत्या. त्यांचा विरोध चालूच होता. नांदेड जिल्ह्यात हटकरांची अशीच एक प्रभावी राजवट आपले स्वतंत्र अस्तित्व टिकवून होती. निजामाच्या सुलतानशाहीला आणि वाढत्या जुलमाला विरोध करून हटकर नाईकांनी नांदेड, परभणी यवतमाळ परिसरात आपले वर्चस्व प्रथापित केले होते.

## आधुनिक काळ (१८१८ ते १९४९)*

महाराष्ट्राच्या संदर्भामध्ये सन १८१८ पासून आधुनिक काळाची सुरुवात मानावी लागते. यावेळी एतद्देशीय सत्तेचा अस्त होऊन पेशवाई संपुष्टात आली व ब्रिटीश राज्य स्थिरावले. यातून पुढे १८५७ चा उठाव झाला. मराठवाड्याच्या संदर्भात खऱ्या अर्थाने आधुनिक काळाचा प्रारंभ निजामी सत्तेच्या अस्तानंतर म्हणजे स्वातंत्र्यानंतर सुरू झाला. तथापि एकूण भारतीय इतिहासाच्या संदर्भात व विशेषतः महाराष्ट्राच्या संदर्भात विचार करता निजामी सत्तेविरुद्ध स्थानिक पातळीवर उत्स्फुर्त उठाव होऊ लागला. ही घटना एका अर्थाने आधुनिक काळाचा प्रारंभ म्हणून मानली आहे.

---

* डॉ. प्रभाकर देव, निवृत्त विभागप्रमुख, इतिहास विभाग, यशवंत महाविद्यालय, नांदेड यांनी या भागाचे लेखन केले आहे.

**निजामी हुकूमतीला भिल्ल, रामोशी, हटकरांचा विरोध :**—निजामाची हुकूमत मराठवाडा, आंध्र, कर्नाटकातील लोकांनी निमुटपणे सहन केली व पराभूत मनोवृत्तीने त्यांनी ती स्विकारली असा एक गैरसमज इतिहास लेखनातून पसरला आहे. परंतु भिल्ल, कोळी, रामोशी, हटकर, बेरड, ठाकूर यांचा संघर्ष पाहिला की हा गैरसमज दूर होतो. या जातींची आणि आदिवासी वनवासींची बरीच वस्ती हैद्राबाद राज्यात होती.[१२४] या समाजाने सलतनती जुलुमशाहीला त्यांच्या अत्याचाराला विरोध करीत सामान्यांच्या जीवीताचे रक्षण केले. स्वतःचे स्वातंत्र्य अबाधित राखण्यासाठी लढा दिला. दुर्दैवाने या लढ्याला इंग्रजांनी आणि निजामी सलतनतीने बंड ठरविले. तसा हा त्यांचा स्वातंत्र्य रक्षणाचा संघर्ष होता. त्याच दृष्टीने त्यांचे लष्करी उठाव अभ्यासले पाहिजे.

असा एक लक्षणीय संघर्ष नांदेड जिल्ह्याच्या परिसरात एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी झाला. हा स्वातंत्र्य रक्षणाचा संघर्ष ' हटकरांचे बंड ' म्हणून इंग्रज इतिहासकारांकडून नोंदवला गेला. हैद्राबादच्या निजामी हुकूमतीला आणि त्यांचे संरक्षण करणाऱ्या इंग्रजाना हटकरांचा संघर्ष हा त्यांच्या हुकूमतीला दिलेले आव्हान वाटत होते, बंड वाटत होते. प्रत्यक्षात ते आव्हान होते स्वतःच्या अस्तित्वाच्या रक्षणासाठी. असे अनेक गट आपले अस्तित्व टिकविण्यासाठी निजामी सलतनतीला विरोध करीत होते. त्यातला सगळ्यात लक्षणीय संघर्ष नांदेड परिसरात ' नोवा ' या ठिकाणी घडला. त्या हटकरांच्या संर्घषाचा इतिहास विस्ताराने अभ्यासला पाहिजे.

**हटकरांचा स्वराज्य रक्षणार्थ झालेला संघर्ष :**—साधारणतः अठराव्या शतकाचे शेवटचे दशक असावे. पेनगंगेच्या खोऱ्यात, नांदेड, परभणी, यवतमाळ परिसरात हटकर धनगरांनी आपले अधिपत्य निर्माण केले. इंग्रज-निजाम-मराठे यांच्यातला सत्तासंघर्ष शिगेला पोहचला होता. अशा परिस्थितीत हटकर धनगरांनी नांदेड-उमरखेड परिसरातील रयतेचे रक्षण करीत स्वतःचे अधिपत्य टिकवण्याचा प्रयत्न सुरु केला. नौसाजी आणि हौसाजी या हटकर बंधूनी नोवा या ठिकाणच्या किल्ल्याप्रमाणे गढीवर आपले सत्ताकेंद्र प्रस्थापिले. या गढीला किल्ल्याचेच रुप प्राप्त झाले होते. किल्ल्याभोवती १२.१९ मी रुंदीचा आणि ७.६२ मी. खोल असा खंदक खोदण्यात आला होता. या किल्ल्याबाबत अशी अख्यायिका प्रचलित होती की ही गढी मुळात एका कासाराने बांधली व गढीच्या किल्लेवजा तटबंदीत प्रचंड धन साठवून ठेवले आहे. कालांतराने हा किल्ला हटकर बंधूंच्या ताब्यात आला. हटकरांनी नोवा गावाची जहागीर मिळविली आणि जहागिरीचे रुपांतर हळूहळू स्वतंत्र राज्यात होऊ लागले आणि त्याचबरोबर विस्तारही घडून येऊ लागला.

हे दोघेही हटकर बंधू दिसायला उमदे, प्रभावी व्यक्तिमत्वाचे धाडसी व पराक्रमी वीर होते. नांदेड जिल्ह्यातील हदगाव तालुक्यांतले नोवा हे या पराक्रमी वीरांचे सत्ताकेंद्र बनले. १९ व्या शतकाच्या प्रारंभी हे सत्ताकेंद्र विकसित होत गेले आणि जवळपास वीस-बावीस वर्षे हे सत्ताकेंद्र प्रभावी राहिले. निजामी हुकूमतीला आणि इंग्रजी फौजेला आव्हान देत राहिले. नोव्याबरोबरच त्यांनी उमरखेड येथील किल्लाही आपल्या ताब्यात घेतला होता.[१२५] तेथेही हटकरांचे सैन्य तैनात होते. उमरखेडच्या किल्ल्यात

---

१२४. सय्यद सिराज उल् हसन, **कास्ट ॲण्ड ट्राईब्स ऑफ एच.इ.एच.दि निजाम्स डोमिनीअन**, दि टाईम्स प्रेस, बॉम्बे, १९२०.

१२५. ढेंगळे भागवतराव, भागवतराव, **हैद्राबाद फ्रिडम स्ट्रगल,** कल्पना प्रकाशन, नांदेड, १९९८, पृ. २१.

हौसाजी नाईक तळ देऊन होता. नोवा गावाजवळ हटकरांचा घोड्यांचा मोठा पागा होता. तामश्या पासून चार किलोमीटर अंतरावर नोवा परिसरात दोनशे वर्षापूर्वीचे असंख्य अवशेष आजही पहायला मिळतात. हौसाजी आणि नौसाजी नाईकांच्या पराक्रमाच्या गाथा आजही त्या परिसरातील लोकमानसाच्या मनात ताज्या आहेत. हैद्राबादच्या निजामशाही हुकूमतीला विरोध करणारा पराक्रमी लढा हटकर नाईकांनी साधारणतः इ.स. १८०० च्या दरम्यान सुरू केला. पुढे सतत वीस वर्षे हटकरांचा प्रभाव राहिला. हैद्राबादच्या सलतनतीची त्यांनी झोप उडवली होती. हैद्राबादच्या निजामी राज्याला हटकर नाईकांनी सुरूंग लावला होता.

१९ व्या शतकाच्या सुरुवातीला म्हणजेच इ.स. १८०० च्या सुमारास इंग्रज-मराठे-निजाम यांच्यातल्या लढाया चालूच होत्या. त्याच दरम्यान इंग्रज आणि निजाम यांच्यात एक तहनामा झाला. इंग्रजांच्या फौजा हैद्राबाद राज्यात तैनात झाल्या. औरंगाबाद, जालना, मोमीनाबाद म्हणजे आजचे अंबेजोगाई, वरंगळ अशा अनेक ठिकाणी इंग्रजी फौजांच्या छावण्या उभारण्यात आल्या. सिकंदराबादेत तर इंग्रजांची कायम छावणी स्थापिण्यात आली. बोलाराम येथेही इंग्रजी लष्कराचा तळ होता. अशा रितीने हैद्राबादच्या निजामाने इंग्रजांच्या मदतीने आपली सत्ता स्थिरस्थावर करण्याचा प्रयत्न सुरू केला. तरीही स्थानिक रयतेचा, हटकर, भिल्ल, रामोशी, ठाकूर, नाईक यांचा आणि लहान मोठ्या जहागीरदार किल्लेदारांचा विरोध सुरूच होता. एकोणीसाव्या शतकातील पंचवीस-तीस वर्षे हा विरोधी संघर्ष चालू राहिला. तसेच पाहिले तर १९ वे शतक हे स्थानिक रयतेच्या स्वराज्य रक्षण संघर्षाचेच शतक होते. बीड जिल्ह्यात धर्माजी प्रतापराव यांनी असाच स्वराज्य रक्षणार्थ संघर्ष केला तो याच काळात. मोराळा परिसरातले राजे गर्जे यांनी वंजारी लोकांना संघटित करून मोठा लढा दिला होता तोही याच काळात. या लढ्याची साक्षीदार असलेली प्रचंड गढी पराक्रमाच्या आठवणी उराशी बाळगून आहे. औरंगाबाद परिसरातील भिल्लांचा लढाही याच काळातला. भिल्लांच्या संघर्षाने अजिंठ्याच्या डोंगररांगा उजळून निघाल्या होत्या. वैजापूर, खंडाळा, नागपूर, अंबड या भागात भिल्लांनी स्वदेश रक्षणार्थ लढे दिले. इंग्रजानी या लढ्याला बंड संबोधून ते लढे दडपण्याचा प्रयत्न केला. संघर्षाचे हेच स्फुल्लिंग पुढे १८५७ साली देखील पुन्हा प्रज्वलीत झाले. हैद्राबादच्या सलतनतीला मदत करणारे इंग्रज सैनिक म्हणून कंपनी सरकारच्या फौजावर हैद्राबाद सलतनतीतही हल्ले झाले. स्वराज्य रक्षणाचा पुनः प्रयत्न झाला.

१९ व्या शतकातील या संघर्षाची तीव्रता लोकमानसाने टिपलेल्या पराक्रमांच्या कथांमधून जशी जाणवते तशीच ती कंपनी सरकारच्या कागपत्रांतूनही नोंदवलेली आढळते. नांदेड परिसरातील हटकरांचा संघर्ष किती तीव्र होता याची कल्पना मेजर बर्टनच्या लिखाणातून येते. मेजर आर.जी.बर्टन याने हैद्राबाद कॉन्टीन्जेन्टचा इतिहास रेखाटला असून कंपनी सरकारच्या फौजेने दिलेला सगळ्यात कठीण लढा म्हणजे हटकरांचा संघर्ष होता असे म्हटले आहे.

**हटकरांविरुद्ध इंग्रजांच्या मोहिमा :**—इ.स. १८१८ च्या अखेरीस इंग्रजी फौजा हटकरांच्या विरोधात संघटित होऊ लागल्या. उमरखेडजवळ हे सैन्य एकत्रित आले. मेजर पिटमनच्या नेतृत्वात इंग्रजी फौजा नोव्हा ॲक्शनसाठी तयारीत खड्या झाल्या. जानेवारी १८१९ मध्ये प्रत्यक्ष लढा होणार होता. या लढ्यासाठी खालील प्रमाणे फौजा तैनात होत्या.

- रसेल ब्रिगेडचे १७८० सैनिक १७१ तोफा,
- बेरार इन्फन्टरीची पहिली बटालियन, तिसरी बटालियन आणि आर्टीलरी
- घोडदळ ३ रिसाल, २००० सैनिक कॅप्टन इव्हॉन डेव्हीसच्या नेतृत्वात.

इंग्रजी सैन्यातली गुप्त हेरांची माहिती अशी होती की, नौसाजी नाईकाने नोवा आणि उमरखेडच्या किल्ल्यावर प्रचंड फौजफाटा जमा केला आहे. अरबही प्रचंड संख्येने हटकरांच्या मदतीला हजर आहेत. नोवाच्या अभेद्य किल्ल्याच्या बुरुजांवर बंदुका तोफा लावल्या आहेत. किल्ल्याच्या भोवती प्रचंड खंदक आहे आणि किल्ल्यावर हल्ला करणे केवळ अशक्य आहे. अशा परिस्थितीत इंग्रजांनी प्रचंड फौजफाट्यासह नोवावर हल्ला करण्याचे ठरवले.[१२६]

८ जानेवारी १८१९ या दिवशी इंग्रजी फौजांनी किल्ल्याभोवती मोर्चा बांधला. १० दिवस वेढा कायम होता. हटकर नाईकांनी किल्ला शर्थीने लढवला. एवढेच नाही तर १९ जानेवारीच्या रात्री हौसाजी नाईकाने आपल्या घोडदळासह इंग्रज सैन्याच्या पिछाडीवर प्रचंड हल्ला केला. हौसाजी नाईकाचा हा हल्ला एवढा प्रचंड होता की काही काळ वेढा विस्कळीत झाला. परंतु इंग्रजांनी पुन्हा वेढा सावरला आणि हौसाजी नाईक यशस्वीपणे हल्ला करून परतला.

नोवाच्या किल्ल्यावरून बंदुकांचा आणि तोफांचा सतत मारा होत होता. इंग्रजांनीही १८ पौंडी गोळे फेकणाऱ्या तोफांचा मारा केला. ११ जानेवारीचा संघर्ष लक्षणीय ठरला होता. १४ जानेवारीला इंग्रजानी १८ पौंडी तोफांचा भडीमार केला. पण हटकरांचे सैन्य किल्ल्यात सुरक्षित होते. दमदारपणे हटकर आपला किल्ला लढवित होते. हटकरांचा पराभव करण्याचे मोठे आव्हान इंग्रज सैन्यापुढे होते. सैन्य हळूहळू किल्ल्याच्या तटबंदीजवळ सरकू लागले. २५ जानेवारीला सैन्य किल्ल्या नजीक पोहचले.[१२७]

**हटकरांचा दैदिप्यमान पराक्रम :**—हटकरांनी प्राणाच्या शर्थीने किल्ला लढवला. ८ जानेवारी पासून ३१ जानेवारी १८१९ पर्यंत नौसाजी नाईक किल्लावर प्रबळपणे, दमदारपणे मुक्काम ठोकून होता. शेवटी इंग्रजांनी किल्ल्याच्या तटबंदीजवळ सुरूंग पेरले. ३१ जानेवारीस दुपारी सुरुंगांचा स्फोट झाला आणि तटबंदीला खिंडार पडले. इंग्रज सैन्य किल्ल्यात घुसले आणि प्रचंड धुमश्चक्री सुरू झाली. इंग्रजांच्या नोंदींनुसार ४३९ हटकर सैनिक मारले गेले. ८० लोक जबर जखमी झाले. १०० लोक पकडले गेले. हटकरांच्या शौर्याने इंग्रज अधिकारी देखील आश्चर्यचकित झाले होते. त्यांच्या शौर्याच्या कथा आजही हदगाव परिसरात सांगितल्या जातात.

हौसाजी नाईक हा या लढाईत कामी आला. त्याने वीरमरण स्विकारले. त्याच्या पत्नीने गंगाबाईने हौसाजीचे शीर घेऊन खंदकात उडी घेतली. नौसाजी नाईक या धुमश्चक्रीतून सही सलामत सटकला. पुढे तो पेंढाऱ्यास जाऊन मिळाला अशी एक वदंता होती. कालांतराने हैद्राबादच्या निजामी सैनिकांनी त्याला पकडले आणि कैदेत टाकले. शेवटी तुरुंगातच त्याचा अंत झाला. हटकर नाईकांचा स्वदेश संग्राम संपला. परंतु जुलमी राजसत्तेला विरोध करण्याची प्रेरणा आणि स्वदेश रक्षणाची जिद्द कायम राहिली.

---

१२६. **नांदेड जिल्हा गॅझेटिअर**, पूर्वोक्त.

१२७. कित्ता.

नांदेड परिसरात जसा संघर्ष झाला तसाच संघर्ष आजूबाजूच्या परिसरातही चालू होता. माहूरच्या किल्ल्यावर, सावरगांवच्या किल्ल्यावर तसेच कंधारच्या किल्ल्यावर स्थानिक रयतेला घेऊन किल्लेदार संघटित होत. आपले राज्य सुरक्षित ठेवण्यासाठी निजामी फौजांशी आणि त्यांना मदत करणाऱ्या इंग्रजी सैन्याशी त्यांना सतत लढाया कराव्या लागत. इ. स. १८२२ साली माहुरगडावर असा संघर्ष झाला. कॅप्टन सरजॉन गार्डनच्या तुकडीने या किल्ल्यावर हल्ला केला आणि निजामाला किल्ला परत मिळवून दिला. सावरगावच्या किल्लेदाराने १८४२ दरम्यान आपले स्वतंत्र अस्तित्व जाहिर केले. हिंगोलीतल्या इंग्रजी छावणीतून ब्रिगेडीयर ऑनस्लोच्या तुकड्या सावरगावकडे रवाना झाल्या. सावरगाव पुन्हा निजामाच्या जाब्यात आले. १८४७ साली कंधारचा राजा हनुमंतसिंग गौड याने निजामाचे वर्चस्व झुगारून देण्याचा प्रयत्न केला.[१२८] निजामी फौजा इंग्रजाच्या तोफखान्यासह कंधारवर धडकल्या. कंधारचा किल्ला पुन्हा निजामाच्या वर्चस्वाखाली आला. १८५२ साली वल्ले या गावच्या किल्लेदाराने नरसिंगरावाने आपले स्वतंत्र अस्तित्व दाखवायला सुरुवात केली. निजामाच्या मदतीला मोमीनाबाद छावणीतून कॅप्टन मॅकिनटायर, हिंगोलीतून कॅप्टन ॲबट, आणि गुलबर्ग्याहून कॅप्टन क्लॉजेट धावले. वल्लें गावचा किल्ला त्यांनी ताब्यात घेतला.

**भिल्ल, कोळी, रामोशींचे पराक्रम :**—औरंगाबाद परिसरातही भिल्ल, कोळी आणि रामोशी यांनी देखील असाच स्वअस्तित्वाचा संघर्ष उभा करून निजामी राज्याला शह देण्याचा प्रयत्न केला. निजामी सरकारने आणि इंग्रजी फौजांनी त्याला बंड संबोधून तो विरोध शस्त्राच्या जोरावर दडपून टाकला. अजिंठा, भोकरदन, सिल्लोड या भागात भिल्लांचा प्रभाव होता. सामान्य रयतेच्या संरक्षणाचा विडा घेऊन हे भिल्ल उभे होते. त्यांचे स्वतःचे सैन्य होते. निजामी फौजांच्या अत्याचारापासून ते रयतेचे संरक्षण करीत. त्यांना शह देत. निजामी फौजांना त्यांचा बंदोबस्त करणे अवघड होते. त्यांनी इंग्रजी सैन्याची मदत घेतली. १८२२ साली कॅप्टन क्लार्कच्या रिसाल्याने कानम, देशपूर, नांदूरा, अजिंठा परिसरात भिल्लांवर हल्ला केला. १८२३ च्या उन्हाळ्यात औरंगाबाद छावणीच्या इन्फन्टरी बटालियनने वैजापूर, खंडाळा, नागपूर परिसरात भिल्लांवर चढाई केली. १८३४ साली अंबड परिसरातील भिल्लांचा पाठलाग करीत इंग्रजी फौजांनी धुमाकूळ घातला.

त्याकाळात संपूर्ण मराठवाड्यात भिल्लांचा लक्षणीय प्रभाव होता. त्यांनी हैद्राबादच्या निजामी राजवटीला सतत विरोध केला. 'भिल्लांचे बंड' म्हणून निजामी कागदपत्रातून आणि इंग्रजी रेकॉर्डमधून संबोधला गेलेला हा लढा खरं तर स्वसंरक्षणाचा संघर्ष होता. भिल्लांचे सैन्यही अगदी सुसंघटित होते. अजिंठा, वगमाळ, डोंगरी परिसरात भिल्लांच्या ३२ तुकड्या होत्या. प्रत्येक तुकडीचा प्रमुख नाईक होता. सरनाईक हा सर्वाधिकारी असायचा. अजिंठा परिसरातील लोकस्मृतीने चिलनाईक नावाच्या सरनाईकाच्या पराक्रमाच्या गाथा जागवल्या आहेत. चिलनाईक नावाच्या भिल्लांचे नेतृत्व जाकिरा नाईक व जांधुळा नाईक यांच्याकडे आले. गवताळ परिसरात त्यांचा प्रचंड प्रभाव होता. हिऱ्या नाईकानेही निजामी फौजांना आणि इंग्रजी लष्करी तुकड्यांना जेरीस आणले होते.

---

१२८. कित्ता.

लष्करी बळावर भिल्लांना नमवणे कठीण वाटल्याने १८२५ च्या दरम्यान डोंगरी भागातील त्यांच्या राज्याला मान्यता देण्याचाही विचार करण्यात आला. त्यांच्याशी सामोपचाराचा प्रयत्न झाला. दहावीस वर्षे हा संघर्ष चालूच होता. हा संघर्ष, नव्या जुलमी राज्यसत्तेविरुद्धचा भिल्लांचा स्वातंत्र्य लढाच होता. त्यांनी अनेक नव्या गढ्या उभारल्या होत्या. किल्ले बांधले होते. डोंगर कपारीतले सगळे रस्ते त्यांना माहिती होते. तेथे अनेक चोरवाटा होत्या. निजामी फौजेला या साऱ्या परिस्थितीला तोंड देणे अवघड होते. इंग्रजी सैन्यातल्या अधिकाऱ्यांनी कन्नड परिसरातल्या डोंगरातून, घाटातून रस्ता वहीवाटीला आणला तो याच काळात. या घाटातून चाळीसगावाकडे जाता येते.

असेच संघर्ष परभणी उस्मानाबाद परिसरातही झाले. उदगीरच्या किल्ल्याच्या आश्रयाने स्थानिक रयतेने आपले राज्य टिकवण्याचा प्रयत्न केला. शिवलिंगप्पा देशमुख याचा उदगीर संघर्ष असाच लक्षणीय ठरावा. अनेक स्थानिक जहागीरदार वतनदार देशमुख पाटील देशपांडेही आपले स्वतंत्र अस्तित्व टिकविण्याच्या प्रयत्नात संघर्ष करीत. हे सगळे पाहिल्यानंतर ही गोष्ट स्पष्ट होते की हैद्राबाद राज्यातल्या निजामी सलतनतीच्या निर्मितीला स्थानिक रयतेने सतत विरोध केला. १९ व्या शतकांतील हटकर, भिल्ल, नाईक, धनगर, वंजारी यांचे संघर्ष याच स्वरूपातले होते ते आवर्जुन लक्षात घेतले पाहिजे.

हे संघर्ष चालू असताना हैद्राबादच्या निजामी राज्यात इंग्रजांचा अप्रत्यक्ष प्रभाव वाढत चालला. त्यांच्यातला सलोखा वाढत चालला. इ.स. १८१८ साली पेशवाईराज्य संपुष्टात आले. त्या राज्यावर इंग्रजांनी आपला प्रभाव प्रस्थापिला. पेशव्यांचे सारे अधिकार इंग्रजांनी स्वतःकडे घेतले. हैद्राबाद राज्यात पेशव्यांकडून वसुल होणारी चौथ आणि सरदेशमुखी आता इंग्रज वसूल करू लागले. चारपाच वर्षे इंग्रजांनी हा वसुल संकलित केला. इ.स. १९२२ साली इंग्रजांनी निजामाशी करार करून चौथ आणि सरदेशमुखीतून निजामाला सूट दिली असे असले तरी निजामाकडे तैनात असलेल्या इंग्रजी फौजेपोटी होणारा खर्च निजामाने द्यावा हे तैनाती फौजेच्या योजने अंतर्गत झालेल्या करारातच ठरलेले होते. परंतु गेली अनेक वर्षे हा पैसाही निजामाने इंग्रजांना दिलेला नव्हता. परिणामी तैनाती फौजेचा पगार थकला होता.

**एकोणिसाव्या शतकातले नांदेड :**—या पार्श्वभूमिवर इ.स.१८५३ साली इंग्रज आणि निजाम यांच्यात एक नवा करार झाला. या करारान्वये हैद्राबादच्या निजामाने आपल्या राज्यातला पन्नास लाख शेतसारा वसुल करता येण्याजोगा भूप्रदेश इंग्रजांच्या ताब्यात द्यायचे कबूल केले. त्या अन्वये सारा विदर्भ सरकार हा विभाग इंग्रजांच्या ताब्यात गेला. विदर्भ सरकारातील जाफराबाद, उस्मानाबाद, रायचूर, परभणी जिल्ह्याचा बराचसा भाग आणि नांदेड परिसरातील हदगाव, माहूर, किनवट हा भाग मात्र हैद्राबाद राज्यातच राहिला. अशा प्रकारे हदगाव, माहूर, किनवट हे भाग विदर्भ सरकारातून नांदेड सरकारात दाखल झाले. नांदेड जिल्ह्याच्या दृष्टीने हा बदल लक्षणीय आहे.

याच काळात इ.स. १८२९ साली हैद्राबादचा निजाम सिकंदरजहाँचा मृत्यु झाला आणि नासिरूद्दौला निजामपदी आरूढ झाला. इ.स. १८५७ साली त्याचा मृत्यु झाला आणि अफझलद्दौला

सत्तेवर आला. त्याच दशकात नबाब सालारजंग हा हैद्राबादच्या निजामात हुकूमतीत पंतप्रधानपदी नेमला गेला. सालारजंगची नेमणूक महत्त्वपूर्ण ठरते कारण की त्याच्या प्रेरणेनेच मध्ययुगीन निजामी राज्यात आधुनिकतेची चाहुल लागली ती एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात. प्रत्यक्ष आधुनिक युग अवतरायला २० व्या शतकाचा उत्तरार्ध यावा लागला. या मध्ययुगीन सरंजामी सलतनतीत सुधारणा त्याही प्रशासकीय स्वरूपाच्या आणण्याचा प्रयत्न सालारजंगाने केला. त्या सुधारणांमुळे मध्ययुगीन सरंजामी व्यवस्थेत मात्र काही फरक पडला नाही.

नांदेड परिसरातील हालचालींचा शोध घेतांना १८५७ चा सहस्त्रकुंड परिसरातील रोहिल्यांचा तळ, आणि कौलास किल्ल्यावरील हालचाली आपले लक्ष वेधून घेतात.[१२९] १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्ध समयी हैद्राबाद राज्यातही इंग्रजांच्या फौजांच्या छावण्या होत्या. या छावण्यांतून असंतोष धुमसला. रोहिल्यांच्या टोळ्यांनी गंगाखेड परिसरात काही काळ तळ दिला. त्यानंतर त्या टोळ्या पैनगंगेच्या काठावर स्थिरावल्या. सहस्त्रकुंड भागात त्यांचा मोठा तळ उभारला गेला. अनेक स्थानिक जहागीरदारांनी या रोहिल्यांना मदत केली. नांदेड जवळील कौलास किल्ल्यावरचा राजा दिपसिंग हा देखील इंग्रजांविरुद्ध आणि पर्यायाने हैद्राबादच्या निजामाविरुद्ध सामर्थ्य संघटित करू लागला. नानासाहेब पेशव्यांकडून रंगराव नावाचा एक माणूस कौलासच्या राजाकडे येऊन भेटून गेला आणि १८५७ च्या संघर्षाचे पडसाद नांदेड भागातही उमटू लागले. हाच रंगराव पुढे देगलूरला गेला तेथे त्याने स्वतःचे सैन्य उभारण्याचा प्रयत्न केला. रंगराव, राजदिपसिंग आणि इतरांना नंतर शिक्षा झाल्या. १८६० च्या दरम्यान हा संघर्ष संपला.

१९ व्या शतकात नांदेड परिसरात आणि एकूण हैद्राबाद राज्यात हैद्राबादच्या निजामी हुकूमती विरुद्धच्या कारवाया जशा चालू होत्या तसेच निजामी हुकूमतीला स्थैर्य देण्याच्या दृष्टीने काही प्रशासकीय पावलेही टाकली गेली. प्रशासकीय बदल झाले. शेतसारा प्रशासनात सुधारणा करण्यात आल्या. १८६७ साली हैद्राबाद राज्यात ५ सुभे आणि १७ जिल्हे निर्मिण्यात आले. सुभा, जिल्हा, तालुका या स्तरावर भौगोलिक विभागणी झाली. सालारजंगाने उर्वरित भारतातल्या इंग्रजी प्रशासनाच्या धर्तीवर हैद्राबादेतही न्याय, बांधकाम, वैद्यकीय, पोलीस, पोस्ट अशी विविध खाती निर्माण केली. त्यांच्यामध्ये सुसुत्रता आणली. १८७५ साली शेतसारा वसुलीत सुसुत्रता आणण्यासाठी लँड रेव्हेन्यू अँड सेटलमेंट डिपार्टमेन्ट काढण्यात आले.

या प्रकारचे प्रशासकीय बदल घडून येत असतांना इ.स. १८६९ साली निजाम अफझलुद्दौला मरण पावला आणि मीर महबूब अली हा ९ वर्षाचा अल्पवयीन मुलगा हैद्राबादचा निजाम बनला. नबाब सालारजंग आणि अमीर कबीर बहादूर यांची रीजन्ट म्हणून नेमणूक झाली आणि प्रत्यक्षात सालारजंगाचा कारभार सुरू झाला. मध्ययुगीन सलतनतीतला कारभार सुधारण्यासाठी सालारजंगाने इंग्रजांच्या प्रभावाखालील बॉम्बे, कलकत्ता, मद्रास प्रेसिडेन्सीमधून तज्ज्ञ प्रशासकांना हैद्राबादच्या सेवेत सामावून घ्यायला सुरुवात केली. डॉ. सय्यदअली बिलग्रामी, मुश्ताक हुसेन अब्दुल कय्युम ही त्यातलीच काही अधिकारी मंडळी ख्यातकिर्त ठरली.

---

१२९. एस. चांद, **केंब्रिज इकॉनॉमिक हिस्टरी ऑफ इंडिया,** व्हॉल्यूम-१, दिल्ली, १९६२ पृ. ४८८.

Maharashtra State Gazetteers

**हैद्राबादच्या निजामी राजवटीतील प्रशासकीय सुधारणा :**—एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात हैद्राबाद राज्यात काही लक्षणीय बदल घडून आले. राज्यातील शेतसारा वसुलीत सुसुत्रता आणण्याचा प्रयत्न सालारजंगाने केला. या पूर्वी सामान्यतः तहहद्द पद्धतीने शेतसारा वसुल होई. ही एक प्रकारची गुत्तेदारी पद्धत होती. शेतसारा वसुलीचा गुत्ता एखाद्या नबाबाला दिला जाई तो तहहुद्देदार बने. तालुकदार, नायब, छोटा नायब यांच्या मार्फत हा तहहुद्देदार शेतसारा वसुल करी. त्याशिवाय काही भागात अमनीपद्धत, इजारा कौल पद्धतही रूढ होती. अमनीपद्धतीत शासनाच्या वतीनेच तालुकदार नियुक्त केले जात. त्यांच्याकडे पोलीसी व्यवस्थेचीही जबाबदारी असे. शेतजमिनीच्या नोंदी, सरपट्टी, डौल आणि जमाबंदीच्या स्वरूपात ठेवले जाई. गावपातळीवरील नोंदीला सरपट्टी, परगणा पातळीवरील नोंदीला डौल तर तालुका पातळीवरील नोंदीला जमाबंदी म्हणत. ओसाड पडलेले गाव पुनर्वसीत करून एखादा वतनदार त्या गावाचा इजारा कौल हद्द हवेलीदार म्हणून मिळवी. तेथील शेतसारा वसुलीचे सारे अधिकार त्या हवेलीदाराकडे असत. तहहद्ददारपद्धतीतील गुत्तेदारीने प्रचंड गोंधळ माजवला होता. शेतसाऱ्याशिवाय धनगरपट्टी, देरपट्टी, कलालपट्टी, जुलाह पट्टी, बुटसब्जी, बन्सफरोशी असे निरनिराळे व्यवसाय करही वसुल केले जात. त्याशिवाय शादीपट्टी म्हणजे लग्नावरही कर द्यावा लागे. हटबझारी, धारापट्टी, रहदारीपट्टी, गनिमबाब असे आणखी काही कर असत. हे सारे कर गुत्तेदारी पद्धतीनेच वसुल केले जात असल्याने आणि या वसुली विरुद्ध कुठेही दादफिर्याद नसल्याने रयतेची प्रचंड पिळवणूक होई. नांदेडमध्येही असे हजारदार, तहहुद्देदार होते.[१३०]

नबाब सालारजंगने ही गुत्तेदारी पद्धत आणि शेतसारा वसुलीच्या इतर पद्धती बंद करून एक नवी शेतसारा पद्धत, जिल्हाबंदीपद्धती अंमलात आणली. या शेतसारा वसुली पद्धतीत शेतकऱ्याची शेतजमीन हा घटक ग्राह्य धरून शेतसारा निश्चित करण्यात आला. रेव्हेन्यू सर्वे अँड सेटलमेंट डिपार्टमेंट स्थापन करण्यात आले. शेतसारा वसुलीसाठी शासकीय महसूल यंत्रणा निर्माण करण्यात आली. शेतसारा वसुली अधिकारी म्हणून राज्यात तालुकदारांची ६१ पदे निर्माण करण्यात आली. राज्याची विभागणी ६ सुभ्यात, सुभ्यांची विभागणी सरकारात, सरकारांची परगण्यात, परगण्यांची, पट्यात आणि पट्यांची महालात करण्यात आली. सुरुवातीला मुघलपरंपरेतील सुभेदारपद काही काळ काढून टाकण्यात आले व सुभ्याचा मुख्य अधिकारी म्हणून सदर तालुकदारपद निर्माण झाले. सरकारांची जागा जिल्ह्यांनी घेतली. परगणे तालुके झाले. मराठवाड्यात याच काळात जिल्ह्यांना नेमका आकार आला. औरंगाबाद जिल्हा, बीड आणि परभणी जिल्हा व नळदुर्ग जिल्हा निर्माण झाला.[१३१] शेतसारा वसुलीच्या प्रमाणावर जिल्ह्यांचे ग्रेडींग करून १२ लाख वसुली असणारे, १० लाखाची वसुली असणारे आणि ८ लाख वसुली असणारे असे तीन ग्रेड लक्षात घेतले गेले.

**सुभेदारी संपून जिल्हा बनला :**—याच काळात म्हणजे १८८१ च्या दरम्यान आठ तालुक्यांचा नांदेड जिल्हा आकाराला आला आणि औरंगाबाद सुभ्याचा भाग बनला. औरंगाबाद सुभ्यात नांदेडसह औरंगाबाद, बीड आणि परभणी हे जिल्हे समाविष्ट होते. नळदुर्ग जिल्हा मात्र गुलबर्ग्याच्या सुभ्यात समाविष्ट होता. साधारणतः १९०५ पर्यंत हीच व्यवस्था होती. १९०५ ते १९१४ च्या दरम्यान नळदुर्गचे

१३०. आर. जयरामन, **अॅडमिनिस्ट्रेटीव्ह सिस्टीम अंडर निजाम,** अल्ट्रा पब्लिकेशन, बंगलोर, १९९८, पृ. ३३.
१३१. कित्ता, पृ. ४९.

रुपांतर उस्मानाबाद जिल्ह्यात झाले. याच काळात मुळातले धाराशीव उस्मानाबाद बनले तर अंबेजोगाईचे नामांतर मोमीनाबादेत झाले.

१८८५ साली सुभेदारपद पुन्हा निर्माण झाले आणि ते १९४९ पर्यंत कायम होते. पोलीस ॲक्शन पर्यंत हैद्राबाद राज्यात चार सुभे अस्तित्वात होते. आजच्या प्रशासन यंत्रणेतल्या आयुक्ताच्या योग्यतेचा हा अधिकारी असे. जिल्हा प्रशासनाचा प्रमुख म्हणून तालुकदारपद निर्माण झाले ते १९४९ पर्यंत कायम होते. तालुकापातळीवर तहसीलदार पद होते. जिल्हा प्रशासनात नायब तालुकदार, पेशकार, शिरस्तेदार अशी काही पदेही होती.[१३२]

सालारजंगाने पोलीस प्रशासनाची निर्मिती करून हैद्राबाद प्रशासन व्यवस्थेत मोलाची भर टाकली. पूर्वी निजामराज्यात गावचा पाटील हा पोलीसी काम करावयाचा. संरक्षणाचे काम जहागीदार, वतनदार मंडळी, त्यांच्या पदरी असलेल्या सैन्याकडून करून घेत. रामोशी जागळे हेच स्थानिक पातळीवरचे पोलीस शिपाई असत. १८६६ साली सालारजंगाने प्रायोगिक स्वरूपात हैद्राबाद शहर आणि उपनगरांसाठी पोलीस खाते निर्मिले. सदर-उल्-मिहाम हा पोलीस मिनिस्टर खात्यावर नियंत्रण ठेवी. १८८४ साली राज्यातल्या बहुतेक जिल्ह्यात पोलीसी प्रशासन अस्तित्वात आले. सदर मोहतमीम हा जिल्ह्यातला प्रमुख पोलीस अधिकारी होता. त्याच्या हाताखाली नायब मोहतमीम, तालुक्यात अमीन, पोलीस ठाण्यात फमादार तर पोलीस चौकीत दफेदार अशी सारी पोलीसी व्यवस्था होती. पोलिसांच्या दिमतीला घोडदळ असे. त्यांना घोडा भत्ता दिला जात असे. या अधिकाऱ्याचेही निरनिराळे ग्रेड असत.[१३३] याच काळात नांदेडला थर्ड क्लास मोहतमीमचे पद निर्माण झाले व पोलीसी व्यवस्था अस्तित्वात आली.

हैद्राबाद शहरात १८५५ साली स्टेट बँक काढण्यात आली. आधुनिक बँकींग व्यवस्था सुरू झाली. कालांतराने निजामी राज्यातल्या काही गावांत स्टेट बँकेच्या शाखा निघाल्या. नांदेड जिल्ह्यातील उमरी या बाजारपेठेत अशीच एक शाखा उघडली गेली. ही घटना १९ व्या शतकाच्या अखेरीस घडली. १८६९ साली निजामी सलतनतीत पोस्ट खात्याची स्थापना झाली.[१३४] नांदेडला प्रत्यक्ष पोस्ट ऑफीस सुरू व्हायला काही काळ जावा लागला.

हैद्राबाद राज्याची राजभाषा फार्सी होती. फार्सी शिक्षण देणारे मदरसे काही ठिकाणी होते. १८६८ साली नांदेडलाही एक फारसी मदरसा निघाला.[१३५] काही खाजगी शाळाही होत्या. व्यावहारिक शिक्षण या गावठी शाळातून मिळे. १९ व्या शतकाच्या अखेरपर्यंत शिक्षणाची अशी अनौपचारीक पद्धतच राज्यात रूढ होती. सालारजंगाच्या काळात औपचारीक शिक्षणाला थोडीफार सुरुवात झाली. इ.स. १८८४ मध्ये फार्सी ऐवजी उर्दुला राजभाषेचा मान मिळाला. शिक्षणाचे माध्यम उर्दु झाले. हैद्राबाद

१३२. कित्ता, पृ. ६३, ७२.

१३३. कित्ता, पृ. ११९.

१३४. धारूरकर, पूर्वोक्त, पृ. २५.

१३५. अंबेकर, ग. ना., "नांदेडचे सांस्कृतिक जीवन", **स्थानिक इतिहास साहित्य एक शोध**, पूर्वोक्त, ११३-१२४.

Maharashtra State Gazetteers

शहरात इस्लामी धर्माचे शिक्षण देणारे मदरसे निजामीया निघाले. १८७० मध्ये इंजीनीअरींग स्कूल आणि मेडीकल स्कूल तर १८७८ मध्ये हैद्राबाद कॉलेज निघाले. या सगळ्या सोयी हैद्राबाद शहरात झाल्या. उर्वरित सोळा जिल्ह्यात आणि ४ सुभ्यात शिक्षणाची सुविधा नव्हती. औरंगाबाद सुभ्यात १८७४ च्या सुमारास फक्त औरंगाबाद शहरात मदरसे फोकानिया सुरू झाले. १९२० सालापर्यंत औरंगाबाद सुभ्यात म्हणजे मराठवाड्यात फक्त ६ हायस्कूल्स म्हणजे मदरसे फोकानिया होत्या. हैद्राबादमध्ये सन १८८७ साली राजघराण्यातील मुलांसाठी तसेच नबाबाच्या, जहागीरदारांच्या मुलांसाठी निजाम कॉलेज निघाले. श्रीमंत वतनदारांसाठी काही प्रमाणात शिक्षणाची सोय अशा प्रकारे झाली. बाकी सारी रयत अज्ञानाच्या अंधःकारात चाचपडत होती. हैद्राबाद संस्थानातील शिक्षणाची स्थिती यावरून लक्षात यावी. नांदेड जिल्ह्यातील परिस्थितीही अशीच होती.

तात्पर्य १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात हैद्राबादची निजामी हुकूमत आधुनिक वसाहतवादी सत्तेच्या संपर्कात आली. इंग्रजांचा प्रभाव वाढत चालला. तैनाती फौजांच्या रूपाने इंग्रजी सैन्याचे तळ हैद्राबाद राज्यात उभे राहिले. इंग्रजांचा रेसिडेन्ट राजधानीत नेमला गेला. इंग्रजांच्या प्रभावातून काही नव्या गोष्टी घडत गेल्या. औपचारीक शिक्षणाला सुरुवात झाली. टपालसेवा सुरू झाली. शेतसारा वसुलीच्या यंत्रणेची पुनर्रचना झाली. आधुनिकतेची बारीकशी तिरीप या मध्ययुगीन संरजामी राज्यात दिसू लागली. असे असले तरी विसाव्या शतकाच्या चौथ्या दशकापर्यंत या राज्याने आपली मध्ययुगीन सरंजामी चौकट कायम राखली होती. आपल्या साऱ्या कालबाह्य वैशिष्ट्यांसह हे राज्य विसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर आले.

**रेल्वे आली :**—इंग्रजांच्या प्रभावातून दळणवळणाची साधने वाढली. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात गुलबर्गा, वाडी यासारखी काही गावं मुंबई-मद्रास रेल्वे लाईनवर आली. हैद्राबाद ते वाडी पर्यंत रेल्वे सुरू झाली. इ.स. १९०० साली नांदेड या गावात रेल्वे आली. हैद्राबाद-मनमाड असा मिटर गेज रेल्वे मार्ग पूर्ण झाला[१३६] आणि या रेल्वेमार्गावरील एक रेल्वे स्टेशन नांदेड गावाजवळ उभारले गेले. एन.एस.आर म्हणजे निजाम स्टेट रेल्वे या स्थानकावर थांबू लागली. तात्पर्य एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आणि विशेषतः सालारजंगाच्या प्रशासकीय कारकिर्दीत आधुनिकतेच्या उंबरठ्यावर पाऊल ठेवण्याचा अल्पसा प्रयत्न हैद्राबाद संस्थानात झाला. मध्ययुगीन सरंजामी चौकट मात्र फारशी बदलली नाहीच. नांदेड गावाजवळून जाणाऱ्या रेल्वेची शिट्टी दिवसातून कधी तरी एकदा ऐकू यायची. हा एवढाच बदल घडला. बाकी रयतेच्या अवस्थेत काहीही बदल घडला नाही.

या पार्श्वभूमिवर पश्चिम महाराष्ट्रातील आणि उर्वरित ब्रिटिश इंडियातील परिस्थितीत प्रचंड स्थित्यंतरे घडून येऊ लागली होती. १८५७ च्या स्वातंत्र्य युद्धामुळे ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीचा कारभार संपुष्टात आला व इंग्रज सरकारचा प्रत्यक्ष अंमल सुरू झाला. इंग्रज सरकारचे धोरण बदलले. पाश्चात्य पद्धतीच्या औपचारिक शिक्षणाची सुरुवात झाली. मुंबई विद्यापीठाची स्थापना झाली. पाश्चात्य शिक्षणाचा प्रभाव जाणवू लागला. इंग्रजी शिक्षणामुळे पाश्चात्य ज्ञानाची कवाडं उघडली गेली. ज्ञानाच्या

---

१३६. **नांदेड जिल्हा गॅझेटिअर**, पूर्वोक्त.

कक्षा रूंदावल्या. प्रबोधन घडून आले. आत्मपरिक्षण करण्याची प्रवृत्ती वाढली. त्यातूनच ब्राह्मोसमाज, प्रार्थना समाज, आर्यसमाज, थिआसॉफीकल सोसायटी यासारख्या संघटना उदयाला आल्या. स्वत्वाची जाणीव निर्माण झाली आणि या सर्वांची परिणिती इ.स.१८८५ साली भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेत झाली.

**लक्षणीय स्थित्यंतरे आणि प्रशासकीय साधने :**—या साऱ्या घटनांचे पडसाद हैद्राबाद राज्यातही उमटले. हैद्राबाद शहरात मौलीम-ए-शफीक, हजर दास्ताँ, यासारखी काही वर्तमानपत्रे निघाली. अलीगढ विद्यापीठातील वैचारीक प्रभावाने भारलेली काही अधिकारी मंडळी, इमाद उल् मुल्क बिलग्रामी, विकार-उल्-मुल्क आणि मेहदी हसन नवाज जंग याच सुमारास हैद्राबाद प्रशासनात दाखल झाली होती. हे सारे लोक काँग्रेसच्या विचारांसंदर्भात अधिक शासंक होते. उर्दु वृत्तपत्रातून इंग्रजांच्या धोरणावर टिका होऊ लागली. ही टीका विशेषतः इंग्रजांच्या मध्यपूर्व आशियाई देशांच्या धोरणासंदर्भात आणि त्या अनुषंगाने भारतासंदर्भात असे. मोहसीन-उल्-मुल्क आणि इतर अधिकारी काँग्रेसच्या विरुद्धच होते. सर सय्यद अहमद यांच्या कार्याबद्दल या साऱ्यांच्या मनात एक प्रकारची आस्थाही होती हे लक्षात घेतले पाहिजे. असे असले तरी राज्यातली बहुसंख्य जनता आणि मुल्ला अब्दुल कय्युम, डॉ. अघोरनाथ चटोपाध्याय सारखी मंडळी काँग्रेसच्या विचारांविषयी आस्था बाळगून होती. तात्पर्य एकोणिसाव्या शतकाच्या अखेरच्या दशकात राज्यातले लोकमानस अशा द्विधा मनस्थितीत होते.

मध्ययुगीन शासनाने याच काळात राज्यातल्या वृत्तपत्रांवर निर्बंध लादले. निजाम सरकारवर, त्यांच्या धोरणावर टीका करणारा मजकूर छापू नये असा हुकूमच जारी झाला. काही वृत्तपत्रे दडपली गेली. वृत्तपत्र स्वातंत्र्याची कल्पना इथे असून रुजलीच नव्हती. १९ व्या शतकाच्या शेवटच्या दशकात हैद्राबाद राज्यात आर्यसमाजाची स्थापना झाली. १८९२ साली गिरानंद सरस्वतीची हैद्राबाद शहरात काही व्याख्याने झाली. त्यांच्या प्रयत्नानेच शहरात आर्यसमाजाची शाखा स्थापन झाली. त्याच दरम्यान लोकमान्य टिळकांच्या प्रभावातून हैद्राबाद शहरात गणेशोत्सव साजरा झाला. त्यानिमित्त भजन, किर्तन आणि व्याख्यानांचे आयोजन झाले. कालांतराने गणेश मेळेही संघटित झाले. शालीबंड्यावर आणि चादरघाटावर झालेला गणेशोत्सव खूप लक्षणीय होता. आर्यसमाज चळवळीतूनच हैद्राबादेतील सामाजिक सांस्कृतिक चळवळीचे नेतृत्व उदयाला आले. केशवराव कोरटकर, डॉ. अघोरनाथ चटोपाध्याय, पंडीत श्रीपाद दामोधर सातवळेकरांच्या रूपाने हैद्राबादमध्ये सामाजिक प्रबोधन करणारे नेतृत्त्व लाभले ते याच काळात. मुल्ला अब्दूल कय्यूम खान यांनी दारूल-उल् मौरीफ नावाची शैक्षणिक संशोधन संस्था काढली. एवढेच नव्हे तर[१३७] हैद्राबाद मधल्या स्टेट सेन्ट्रल लायब्ररीची सुरुवातही त्यांनीच केली.

एकोणीसावे शतक संपता संपता निजामाने काही प्रशासकीय बदल घडवून आणले. राजाला सहाय्यभूत ठरावीत अशी कॅबिनेट कौन्सील आणि लेजिस्लेटीव्ह कौन्सील या दोन कौन्सिल्स निर्माण करून कायदे बनवणे आणि त्याची अंमलबजावणी करणे या कामाची एक प्रकारे विभागणीच संस्थानी कारभारात झाली. पंतप्रधान, पेशकार, इतर काही मंत्री सभासद असलेली कॅबिनेट कौन्सील हे

१३७. कित्ता, पृ. ८६.

प्रत्यक्षात केवळ सल्लागार मंडळ होतं. मध्ययुगीन सरंजामी व्यवस्थेसारखी निजामाची इच्छा हीच शेवटी कायद्याचे रुप घेऊन प्रत्यक्षात यायची. लेजिस्लेटीव्ह कौन्सीलमध्ये चीफ जस्टीस, इन्स्पेक्टर जनरल पोलीस आणि रेव्ह्यून्यू व इतर काही विभागांचे सेक्रेटरी यांचा समावेश होता. कायदा मंत्र्याच्या अध्यक्षतेखाली वर्षातून तीन वेळा लेजिस्लेटीव्ह कौन्सीलची सभा व्हावी अशी तरतूद होती. या प्रशासकीय बदलांमध्ये सामान्य रयतेच्या प्रतिनिधीत्वाला कुठेही स्थान नव्हते. साहजिकच या विषयीचा असंतोष लोकांच्या मनात राहिला.

**हैद्राबाद राज्याच्या सीमांवर कडक नियंत्रण :**—हैद्राबाद संस्थानाच्या सीमांवर कडक नियंत्रण असे. करोडगिरी नाके असत. तपासणी होई. असे असले तरी लपून छपून ब्रिटीश इंडियातून म्हणजे पश्चिम महाराष्ट्र, विदर्भातून, मद्रासमधून (चेन्नई) तसेच बंगलोरमधून (बंगरूळ) लोक येतच. इंग्रजांचा ससेमिरा टाळण्यासाठीही लोक हैद्राबाद राज्याचा आश्रय घेत. अशीच एक महत्त्वाची घटना १८९७ साली घडली. रॅण्डचा खून करणारे स्वातंत्र्य सैनिक बाळकृष्ण हरी चाफेकर हे हैद्राबाद राज्यातील रायचूर जिल्ह्यात भूमिगत अवस्थेत वावरत होते. कोपाल आणि गंगावती दरम्यानच्या डोंगर-राईत सहा महिने त्यांचे वास्तव्य होते. १८९८ साली त्यांना इंग्रजांच्या हवाली केले.

**समाजजागृतीची चाहूल :**—गणेशोत्सवातील व्याख्यानांमुळे, प्रवचन किर्तनांमुळे हैद्राबाद शहरातील मराठी भाषिक एकत्रित येऊ लागले होते. संवाद सुसंवाद घडू लागला होता. मराठी भाषेतून शिक्षणाची गरज तीव्रतेने जाणवू लागली होती. परिणामी १९०१ साली राज्यातली पहिली मराठी शाळा हैद्राबादेत रेसिडेन्सी बाजारात निघाली. श्री. डींगरे आणि करमरकर या उभयतांनी यात पुढाकार घेतला होता. इ.स. १८८३ सालापासून हैद्राबाद सरकारने वकीलीची परिक्षा सुरू केली. दर्जे अव्वल, दर्जे दुव्वम अशा दोन प्रकारच्या या वकीलीच्या परिक्षा असत. मिडलपास व मॅट्रीक पास झालेल्या विद्यार्थ्यांनी खाजगी वकील क्लासमध्ये अभ्यास करावयाचा व वकीलीच्या परिक्षेला बसायचे असा प्रकार होता. यातून एक वकीलवर्ग उदयाला आला. पुढच्या पाच पंचवीस वर्षात असे काही वकील नांदेड जिल्ह्यातही दिसू लागले. मुंबई-मद्रास अलीगढ मधून शिकून आलेलेही काही वकील हैद्राबादेत होते. त्यातूनच नगण्य का होईना असा एक मध्यमवर्ग संस्थानी राज्यात दिसू लागला होता. त्यामुळेच सामाजिक संस्था, वाचनालये, राज्यात कार्यरत होऊ लागली. वर्तमान पत्रे निघाली. या साऱ्या चळवळी मूर्तरूपात येण्याबरोबरच त्यांच्यावर शासनाने निर्बंध घातले. वृत्तपत्र स्वातंत्र्यावर बंधन आले.

**२० व्या शतकाच्या उंबरठ्यावर :**—एकोणीसाव्या शतकाच्या स्मृती आणि किरकोळ चळवळींचा वारसा घेऊन हैद्राबाद राज्यातली रयत २० व्या शतकात दाखल झाली. शतकाचे परिवर्तन वर्ष म्हणजे १८९९-१९०० राज्यातल्या रयतेला मोठे क्लेषदायक ठरले. प्रचंड मोठा दुष्काळ यावर्षी पडला. तसा दुष्काळ आणि नापिकी राज्यातल्या रयतेच्या पाचवीलाच पुजलेली. इ.स. १६३० च्या दुष्काळाच्या स्मृती अजूनही ताज्या होत्या. इ.स. १७४९ आणि १७८७ सालातले दुष्काळ तर हैद्राबाद सलतनतीच्या काळातले. एकोणिसाव्या शतकातही दुष्काळाने रयत होरपळली होती. १८०४ साली मराठवाड्यातल्या रयतेचे दुष्काळाने प्रचंड हाल झाले. नांदेड परिसरही त्यातून सुटला नव्हता.[१३८]

१३८. आर., जयराम, पूर्वोक्त, पृ. २२७, २२८.

१८५४-५५ वर्षामध्ये दुष्काळाचे प्रत्यक्ष वर्णन मेडोज टेलर या युरोपीय प्रवाश्याने केले आहे. रयतेच्या हालअपेष्टांचे वर्णन अंगावर काटा आणणारे आहे. १८७१ साली औरंगाबाद जिल्ह्यात दुष्काळ अधिक तीव्र होता तर १८७६-७७ साली बीड उस्मानाबाद दुष्काळाने होरपळला. या काळात नांदेडवरही दुष्काळाची छाया होतीच. इ.स.१८९९ च्या दुष्काळाने मात्र कहर केला. दोनशे वर्षातला सगळ्यात भीषण दुष्काळ म्हणून या दुष्काळाचा उल्लेख केला जातो. या दुष्काळाचा नांदेड परिसरावर खूप परिणाम झाला. दुष्काळापाठोपाठ कॉलरा, आणि इतर साथींचाही प्रादुर्भाव झाला. रयत हैराण झाली. हा दुष्काळ २१०७८ चौरस मैलभर पसरला होता आणि मराठवाड्यातले ३१ लाख ८० हजार ७८३ लोक या दुष्काळाने पिडीत होते.[१३९] निजाम सरकारने इंग्रजांच्या धर्तीवर दुष्काळ निवारण्यासाठी काही प्रयत्न केले. शेतकऱ्यांना आर्थिक मदत दिली. नांदेड जिल्ह्यात ६७,१०२ रुपये मदत म्हणून वाटण्यात आले.[१४०] शिवाय शेतसारा वसुलीतही काही सूट देण्यात आली. नांदेड जिल्ह्यात ही सूट ७% होती तर उस्मानाबाद जिल्ह्यात हीच सूट ४२% टक्के होती.[१४१]

**राज्यातील दुष्काळ :**—राज्यात मदत छावण्याही उभारल्या गेल्या होत्या. बॉम्बे फेमीन कोड लक्षात घेऊन हैद्राबादच्या रेसिडेन्टने दुष्काळ निवारण्याचे सारे प्रयत्न केले होते. फेमिन कमीशनची निर्मिती करण्यात आली होती. त्याशिवाय दुष्काळ निवारण्यासाठी प्राईम मिनिस्टरच्या अध्यक्षतेखाली फेमिन कमिटी कार्यरत होती. याकाळात नांदेड जिल्ह्यात चार मदत छावण्या कार्यरत होत्या. नांदेड-उस्माननगर हा रस्ता दुष्काळी काम म्हणून बांधायला सुरुवात झाली. दुष्काळी कामावर नांदेड जिल्ह्यात त्याकाळी एकूण २,२९,२९५ रूपयांचे काम झाल्याची नोंद आढळते.[१४२] याशिवाय गरीबांसाठी अनाथालयेही (पुअर हाउस) चालवली गेली असल्याची नोंद आहे. नांदेड जिल्ह्यात अशी सहा अनाथालये होती. साधारणतः २९६ दिवस ही अनाथालये कार्यरत राहिली.[१४३]

दुष्काळी परिस्थितीतून सुटका व्हावी म्हणून राज्यातून अनेक लोकांनी स्थलांतरही केले. राज्य पुराभिलेखागारातील कागदपत्रांतून त्याचा तपशील आढळतो. बहुतेक लोक वऱ्हाडात आणि मुंबई प्रदेशात स्थलांतरीत झाले. सर्वात जास्त स्थलांतर उस्मानाबाद जिल्ह्यातून झाल्याची नोंद आहे. त्यामानाने नांदेड जिल्ह्यातून झालेले स्थलांतर अगदी किरकोळ होते.[१४४] ब्रिटीश इंडियातील मुंबई, पुणे, सोलापूर, खानदेश, अहमदनगर, नागपूर या शहरात जेव्हा ही स्थलांतरीत मंडळी पोहचू लागली तेव्हा त्या भागातल्या जिल्हाधिकाऱ्यांवर या स्थलांतरीतांना रोजगार देण्याचा प्रश्न आला. त्यांनी हैद्राबादच्या रेसिडेन्टकडे आणि निजामाकडे या अनधिकृत घुसखोराविषयी तक्रारी केल्या. या लोकांना हैद्राबादच्या सरकारने परत बोलवावे असा तगादा लावला.

---

१३९. डॉडवेल एच. एच., **केंब्रीज हिस्टरी ऑफ इंडिया**, व्हॉल्यूम ६, दिल्ली, १९९५, पृ. ३०७.

१४०. **फेमिन रिपोर्ट**, रिपोर्ट ऑन दि फेमिन रिलीफ ऑपरेशन्स, व्हॉल्यूम १ (१८९९-१९००), टेबल, पृ. ११.

१४१. कित्ता, पृ. १६.

१४२. जयराम, पूर्वोक्त, पृ. २५६.

१४३. **फेमिन ऑर्डर्स**, फेमिन रिलीफ ऑर्डर्स अॅण्ड इन्स्टिट्यूशन्स, नं. ३, दिनांक ३१ मार्च १९००, पृ. १७६.

१४४. **फेमिन रिलीफ ऑपरेशन्स**, रिपोर्ट ऑन फेमिन रिलीफ ऑपरेशन्स (१८९९-१९००) व्हॉल्यूम नं. १, पृ. २७, अॅपेन्डिक्स XIII.

**दुष्काळाने होरपळलेला जिल्हा :**—नांदेड जिल्ह्यातल्या हदगांव तालुक्यात कुठलेच दुष्काळी काम सुरू नव्हते तेव्हा आठशे माणसे विदर्भात स्थलांतरीत झाली. काही दिवसातच हदगाव रस्त्याचे काम दुष्काळी काम म्हणून सुरू झाले.[१४५] तात्पर्य नांदेड जिल्ह्यातील प्रशासकीय यंत्रणेने दुष्काळाच्या काळात रयतेला मदत करण्याचे कार्य केले. परंतु मराठवाड्यात आणि विशेषतः नांदेड, जिल्ह्यातही रस्त्यांची सोय नव्हती त्यामुळे मदत पोहचवणे कठीण होते. दुष्काळी कामासाठी लागणाऱ्या अवजारांचाही राज्यात तुटवडा होता. साऱ्या देशभर दुष्काळ असल्याने सगळीकडे अवजारांची मागणी होती. पाण्याचे दुर्भिक्ष तर होतेच. शेतीला पाणी पुरवठा करणाऱ्या कोणत्याच योजना मराठवाड्यात कार्यान्वीत नव्हत्या.[१४६] साहजिकच दुष्काळ निवारण्यासाठी ठेवलेली आर्थिक तरतूदही पूर्णपणे वापरली गेली नाही ही वस्तुस्थिती पुराभिलेखीय साधनांतून स्पष्ट होते आहे.[१४७]

या दुष्काळी कामासंदर्भात एक लक्षणीय गोष्ट म्हणजे जालना-खामगाव रेल्वे मार्ग टाकण्यासाठी म्हणून भरावयाचे काम हाती घेतले गेले होते. त्यावर १,४८,६४२ रुपये खर्च झाल्याची नोंदही आहे.[१४८] तसाच जालना-बीड असा ६४ मैल लांबीचा मार्गही दुष्काळी काम म्हणून हाती घेण्यात आला होता.[१४९] तसेच या मार्गाचेही पुढेमागे रेल्वेमार्गात रूपांतर करावे असा विचार वरील कागदपत्रातूनच मांडलेला दिसतो.

तात्पर्य या दुष्काळातून सावरायला काही वर्षे लागली. हळु हळु परिस्थिती पूर्वपदावर आली. इ.स.१९०२ साली लॉर्ड कर्झनने हैद्राबादला भेट दिली. निजामाने वऱ्हाड सुभा इंग्रजांच्या हवाली केला आणि तैनाती फौजेची थकबाकी देण्यातून सुटका करून घेतली. हैद्राबादच्या निजामी राज्यातून वऱ्हाड बाहेर पडले आणि इंग्रजांच्या पारतंत्र्यात गेले. इ.स.१९११ साली निजाम महबूब अली मरण पावला आणि मीर उस्मान अली खान निजामपदी आरूढ झाला. हाच हैद्राबादचा शेवटचा निजाम. याच्या कारकीर्दीत प्रशासनात काही किरकोळ बदल झाले. मदर-उल-महामच्या जागी कार्यकारी मंडळ आले. कार्यकारी मंडळ आणि न्यायालयीन विभागाची कार्यक्षेत्रे वेगळी करण्यात आली. या बदलामुळे प्रत्यक्षात रयतेच्या परिस्थितीत काहीच फरक पडला नाही. १९१८ नंतर परिस्थिती थोडीशी बदलली. हैद्राबाद शहरात उस्मानिया विद्यापीठाची स्थापना झाली. पुढच्या दहापंधरा वर्षात काही इंटरमिजीएट महाविद्यालये निघाली. श्रीमंत घरातली आणि नबाबजाद्यांची मुलं शिकू लागली. मराठी भाषिक रयतही आपल्या मुलांना शिक्षणासाठी नागपूर, मुंबई, पुण्याला पाठवू लागली. अर्थात हे प्रमाण अगदी थोडे होते. पण काही प्रमाणात सामाजिक व शैक्षणिक जागृती निश्चितच झाली. नांदेड जिल्ह्यातही अशी जागृती झाल्याची नोंद १९१८ च्या दरम्यान झालेल्या सामाजिक परिषदांमधून दिसते.

---

१४५. **पुराभिलेखीय कागदपत्रे** (दुष्काळी कामे आणि स्थलांतर), इन्स्टॉलमेंट-१३, लिस्ट-१, सिरीअल क्र. ४४८.

१४६. **फेमिन रिपोर्ट**, पूर्वोक्त, पृ. २१ आणि १०८.

१४७. कित्ता, ॲपेन्डेक्स XVII.

१४८. कित्ता, पृ. ७९, पत्र क्र. २९९९.

१४९. कित्ता, पृ. ८०, ८५.

**सामाजिक परिषद :**—साधारणतः १९१६ सालाच्या दरम्यान मराठवाड्यात सामाजिक शैक्षणिक जागृतीची चाहूल लागली. औरंगाबाद आणि हैद्राबाद या ठिकाणी शैक्षणिक परिषदा घेण्यात आल्या.[१५०] याच काळात सोशल सर्व्हीस लिग नावाची एक संघटना उदयाला आली. केशवराव कोरटकरांनी या संघटन कार्यात पुढाकार घेतला होता. नांदेड जिल्ह्यातील रामराव मांजरमकर, केशवराव गोळेगांवकर हे कोरटकरांच्या संपर्कात होतेच. या संघटनेच्या वतीने नांदेड जिल्ह्यात सामाजिक परिषदा घेण्याचे ठरले.[१५१] त्यानुसार सामाजिक परिषदेचे पहिले अधिवेशन नांदेड जिल्ह्यातील कवाना या गावी घेण्याचे ठरले. १९१८ साली ही सामाजिक परिषद दादासाहेब कवनेकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. केशवराव कोरटकर आणि श्रीधर वामन नाईक यांचीही भाषणं झाली.[१५२] या पहिल्याच परिषदेला चांगला प्रतिसाद मिळाला. दुसरी सामाजिक परिषदही नांदेड जिल्ह्यातच झाली. १९१९ साली हदगावलाही परिषद झाली आणि अहिताग्नी राजवाडेंनी या परिषदेला संबोधित केले. पुढच्या दोन परिषदा नांदेडलाच झाल्या. या परिषदांनी नांदेड शहरात सामाजिक सुधारणांचे वातावरण निर्माण झाले.

अस्पृश्योध्दार, विधवाविवाह, स्त्रीशिक्षण यासारख्या सुधारणांचा पुरस्कार करणारी आणखी एक संघटना नांदेडमध्ये कार्यरत झाली. दे.ल.महाजनांच्या घरी एक बैठक होऊन ऐक्यवर्धक समाज स्थापन करण्यात आला. दत्तोपंत ढासाळकर, रेणूकादासराव, गणपतराव गोळेगावकर, हरिभाऊ कुलकर्णी आदी प्रागतिक विचाराच्या मंडळींनी या कार्यात पुढाकार घेतला. किर्तन प्रवचनाद्वारे सामाजिक जागृती करण्याच्या उद्देशाने ही संघटना कार्यरत राहिली. दिवेकरशास्त्री, डॉ. कुर्तकोटी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री यांची व्याख्याने आयोजिली गेली. दे. ल. महाजनांनी विधवा विवाहाचा पुरस्कार करणारी भूमिका घेतल्यामुळे त्यांच्यावर बहिष्कारही टाकण्यात आला होता.[१५३]

**नांदेडमधील गणेशोत्सव :**—ऐक्यवर्धक समाजाने गणेशोत्सवाला सार्वजनिक स्वरूप देऊन मोठे कार्य केले. गुरूद्वारा कमिटीने व्याख्यानांसाठी वजिराबाद कोपऱ्यावर जागा उपलब्ध करून दिली. शारदाश्रम पटांगण असे या जागेचे नाव ठेवण्यात आले व तेथे सार्वजनिक कार्यक्रम होऊ लागले. या शारदाश्रमात गीतावाचस्पती भिडेशास्त्रींची प्रवचने गाजली. नगरेश्वर मंदिरातही गणेशोत्सव धुमधडाक्यात साजरा होई. त्याठिकाणी सनातन परंपरावाद्यांची व्याख्याने होत.[१५४] नांदेड मधील व्याख्याने प्रवचने ऐकून, सुधारणावादी विचार ऐकून जिल्ह्यात इतरत्रही हळु हळु असे कार्यक्रम घेतले जाऊ लागले.

---

१५०. आंध्रप्रदेश फ्रिडम स्ट्रगल कमिटी हैद्राबाद, **फ्रिडम स्ट्रगल इन हैद्राबाद**, ए कनेक्टेड अकाऊंट व्हॉल्यूम ३, १९५६, पृ. २३२.

१५१. रांजणीकर, रघुनाथ, **नांदेड जिल्ह्यातील स्वातंत्र्य लढा**, ऑगस्ट क्रांती सुवर्ण महोत्सव समिती, मुंबई, २००२, पृ. ३४.

१५२. ढेंगळे भागवत, पूर्वोक्त, पृ. ३४.

१५३. रांजणीकर रघुनाथ, पूर्वोक्त, पृ. २२.

१५४. कित्ता.

**खादीभांडाराची सुरुवात :**—फैजपूरच्या काँग्रेस अधिवेशनासाठी मराठवाड्यातून बरीच मंडळी गेली होती. नांदेडहून शामराव बोधनकर, भगवानराव गांजवे, गोपाळशास्त्री देव, विनायकराव डोईफोडे आणि इतर काही कार्यकर्ते फैजपूर अधिवेशनाला उपस्थित होते. या अधिवेशनाने प्रभावित होऊन अनेकांनी खादी वापरण्याचे व्रत घेतले. केशवजी कल्याणजी यांनी नांदेडमध्ये खादीभांडार काढले. हरिजन सेवक संघाचे कार्यही नांदेडात सुरू झाले. हरिजनांसाठी शाळा काढण्यात आली. अस्पृश्योध्दाराचे कार्य हाती घेण्यात आले.[१५५]

**आर्यसमाजाचा प्रभाव :**—१९ व्या शतकाच्या दशकात आर्यसमाज चळवळीची चाहुल मराठवाड्यातल्या उस्मानाबाद जिल्ह्यातल्या धारुरला लागली. तेथे आर्यसमाजाची पहिली शाखा १८९१ साली सुरू झाली.[१५६] १९२० च्या दरम्यान आर्यसमाज चळवळीचा प्रभाव वाढत राहिला. संस्थानातील मुस्लिम धर्मांतर चळवळीची आणि वाढत्या मुस्लिम अत्याचारांची ती प्रतिक्रिया होती. मुस्लिम धर्मांतराची तीव्रता जसजशी वाढत गेली तसतशी आर्यसमाज चळवळही प्रखर बनत गेली. या चळवळीनेच सामान्य मुस्लिमेतर रयतेला लढण्याचे सामर्थ्य दिले. तिचा आत्मविश्वास पुन्हा मिळवून दिला. गावोगाव आर्यसमाजाच्या शाखा निघाल्या. १९३० च्या दशकात हैद्राबाद[१५७] राज्यात २५० च्या वर आर्यसमाज शाखा कार्यरत झाल्या.

याच काळात नांदेड जिल्ह्यात हिंदू तरुणांचे काही गट कार्यरत झाले. पुढच्या दशकात आर्यसमाजी नेत्यांची व्याख्याने आयोजित होऊ लागली. पंडित नरेंद्रजींची व्याख्याने नांदेडच्या हनुमान टेकडीवर झाली[१५८] आर्यसमाजाने जाती निर्मुलन, व्यायामशाळा उभ्या करणे, मुस्लिम धर्मात गेलेल्यांचे धर्मांतर करून त्यांना पुन्हा हिंदू धर्मात घेणे, हवनकुंड निर्मिणे या सारख्या कामावर भर दिला. नांदेड जिल्ह्यात उमरी, कंधार, हदगाव वगैरे भागात आर्यसमाजाच्या चळवळी अधिक होत्या. महत्त्वाची केंद्र म्हणून ही ठिकाणे ख्यातकिर्त झाली. यातूनच पुढे हैद्राबाद मुक्ति संग्रामाच्या अंतिम पर्वातील सशस्त्र लढ्याला बळ लाभले. उमरखेड कॅम्पवर अनेक आर्यसमाजी कार्यकर्ते सक्रिय होते.[१५९]

**नांदेडमधला पहिला राजद्रोहाचा खटला :**—आर्यसमाजाच्या समाजोध्दाराच्या कार्यक्रमांची सुरुवात करण्यात, विशेषतः नांदेड परसरातील कार्याची सुरुवात करण्यात रामदासराव कोळणूरकर, शंकरराव ढेळकीकर, केशवराव उमरेकर आदि मंडळींचा पुढाकार होता. त्यांनी हवन केंद्र स्थापन केले. आर्य समाजाच्या शाखा काढल्या. बन्सीलाल आर्य, शामलाल राठोड या आर्यसमाजी नेत्यांची व्याख्याने आयोजिली. अहमदपूरचे माधवराव घोन्सीकर, प्रल्हाद मामडे, उध्दव सावकार, हरिभाऊ सराफ वगैरे कार्यकर्ते आर्यसमाजी चळवळीमध्ये नांदेडमध्ये सक्रिय होते. शंकरराव टेळकीकर,

---

१५५. कित्ता, पृ. २३.

१५६. धारूरकर, पूर्वोक्त, पृ. १६७.

१५७. भालेराव अनंत, **हैद्राबादचा स्वातंत्र्य संग्राम आणि मराठवाडा**, पृ. १४३.

१५८. देव, प्रभाकर (संपा.), ॲड. माधवराव नांदेडकर यांची प्रत्यक्ष मुलाखत, हैद्राबाद मुक्तिसंग्राम स्वातंत्र्य सैनिकांच्या मौखिक नोंदी, स्वामी रामानंदतिर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, २००२, पृ. १७४.

१५९. प्रेमराज यादव यांची प्रत्यक्ष मुलाखत, कित्ता, पृ. २४६.

गुरूराव देशपांडे, रामदासराव कोळनूरकर या वकील मंडळींवर राजद्रोहाचा खटला भरला गेला. नांदेडमधला हा पहिला राजद्रोहाचा खटला चालविण्यासाठी आर्यसमाजाने पेशावरहून ॲडव्होकेट खन्ना यांना बोलावले होते.[१६०] निजामी सत्तेच्या जुलुमी राजवटीविरुद्ध हळुहळु लोकमत जागृत होऊ लागले. नांदेड परिसरातही ही जागृती जाणवू लागली. राष्ट्रीय चळवळीच्या मुख्य प्रवाहात आपणही सामील व्हावे अशी प्रेरणा येथील तरुणांच्या मनात जागी झाली.

पुण्याजवळच्या तळेगाव येथील भाऊसाहेब रानडे यांच्या राष्ट्रीय शाळेतील विद्यार्थ्यांचा आणि शिक्षकांचा नांदेडशी संपर्क होता. नांदेडमधील काही मुले पुण्यातल्या या राष्ट्रीय शाळेत होती. शामराव बोधनकरांचे दोघे भाऊ शिक्षणानिमित्त पुण्यात होते.[१६१] १९३० च्या दशकात मराठवाड्यातले तरुण संस्थानाबाहेर ब्रिटीश इंडियात जाऊन चळवळीत सहभागी होत. अर्थात हा सहभाग अगदी मोजक्या तरुणांचा असे. या तरुणांमध्ये एक रॉयवादी आणि मार्क्सवादी विचारांनी भारावलेला तरुण गोविंदभाई श्रॉफ हे होते तर दुसरा तरुण गांधीवादी विचारांनी भारावलेले अच्यूतभाई देशपांडे हे होते. आ.कृ.वाघमारे हे प्रखर राष्ट्रवादी विचाराचे, लोकमान्य टिळकांचा वैचारिक प्रभाव असलेले परंतु आचरणात पूर्णपणे गांधीवाद भिनलेला अशा व्यक्तिमत्वाचे होते. हैद्राबाद राज्यातील विविध वैचारीक प्रवाहांना एकत्र आणण्याचे अवघड काम कालांतराने या लढाऊ वृत्तीच्या आ. कृ. वाघमारे या पत्रकारानेच केले हे मात्र निश्चित.[१६२]

हे सारे घडत असतानाच १९२० च्या दशकापासून राज्यातल्या बहुसंख्य रयतेवर चौफेर सांस्कृतिक आक्रमण सुरू झाले होते. उस्मानिया विद्यापीठाच्या रूपाने राज्यात मुस्लिम विद्यापीठ अस्तित्वात आले होते. या विद्यापीठाने देशात प्रथमच देशी भाषेचा माध्यम म्हणून स्विकार केल्याचा टेंभा मिरवला जात असे. व त्यात काही प्रमाणात तथ्यही होते. परंतु उर्दु ही देशीभाषा हैद्राबाद राज्यातल्या केवळ १५% रयतेची मातृभाषा होती. ही अल्पसंख्याकांची भाषा बहुसंख्य रयतेच्या माथी मारली जात होती हे वास्तव होते. तात्पर्य उस्मानिया विद्यापीठापासून ते प्राथमिक शाळेपर्यंतच्या शिक्षणाचे स्वरूप असे धार्मिक प्रभुत्वाचे होते. या धार्मिकते बरोबरच राजसत्तेविषयीच्या निष्ठा अंगी बाणाव्यात म्हणून राजाला यावच्चंद्रदिवाकरौ अभय असावे अशी दुवा अल्लातालाहकडे मागितली जाई.

निजामुलमुल्क उस्मानअली खाँ असिके साबे
सिराजे दिने इस्लामी अमीरे मोमीना तू हो.

अर्थ : हे बादशहा निजामा, इस्लाम धर्माचा तूच सूर्य आहेस व तमाम मुसलमानांचा अमीरे मोमीन तूच आहेस. तूझा विजय असो.

ही प्रार्थना प्रत्येक शाळेत म्हटली जाई प्रार्थनेच्या पुढील भागात हा उद्घोष असे की " तुझ्या सलतनतीमुळे मुसलमानांचे नाव बाकी आहे. आजतागायतचे बाकी सर्व सुलतान इतिहास जमा झाले. तूच आमची आशा आहेस."

१६०. रांजणीकर रघुनाथ, पूर्वोक्त, पृ. २४.

१६१. कित्ता, पृ. २५.

१६२. कित्ता.

**सांस्कृतिक अतिक्रमणाच्या प्रतिक्रिया :**—इ.स.१९२१ साली खास फर्मानाद्वारे राज्यातल्या रयतेवर अनेक निर्बंध लादले गेले. गस्ती निशाण ५२ आणि गस्ती निशाण ५३ अशी ही फर्माने होत. या फर्मानांनी भाषण, संघटन, अभिव्यक्तिवर बंधने आली. धार्मिक स्वतंत्र्य नव्हतेच. इस्लामेतरांवर असंख्य बंधने होती. निजामाने पराकोटीचा जमातवादी पवित्रा घेतला होता. या साऱ्यांची प्रतिक्रिया उमटणे स्वाभाविक होते. सामान्य रयतेच्या मनात असंतोष धुमसत राहिला. प्रतिकार-शक्ति सुप्तपणे संघटित होऊ लागली. राष्ट्रीय वृत्तीच्या शाळा निघू लागल्या. वाचनालये निघाली. १९२२ साली हैद्राबाद शहरात मराठी ग्रंथसंग्रहालय निघाले. त्याच सुमारास औरंगाबादेत बलवंत वाचनालय निघाले. नांदेड शहरात अशी वाचनालय चळवळ फारशी रूजली नाही तरी परिसरात काही वाचनालये निघाली. कंधारचे शारदा वाचनालय १९४१ साली निघाले.

वाचनालयाबरोबरच व्यायामशाळा व आखाडेही स्थापन झाले. गणेशोत्सवाच्या माध्यमातून जनजागृतीचे कार्य होत राहिले. नांदेड परिसरात प्रल्हाद कृष्णाजी गरूड यांनी व्यायामशाळा संघटित केल्या. व्यायाम परिषदाही घेतल्या. गरूड गुरूजींचा संचार परभणी जिल्ह्यातही होता. सेलू, मानवतच्या व्यायामशाळाही त्यांनीच काढल्या होत्या. मराठी शाळांनी देखील जनआंदोलनाला बळ देण्याचे मोठे कार्य केले. उर्दु खेरीज इतर भाषिक शाळांना परवानगीच द्यावयाची नाही धोरण सरकारने स्विकारल्यामुळे खाजगी शाळांची स्थापना व त्या चालू ठेवणे या गोष्टी राज्यद्रोहाच्या स्वरूपाच्या मानल्या गेल्या. पूर्वीच्या परंपरागत चालू असलेल्या गावठी शाळा हैद्राबादच्या निजामी सलतनतीने बंद केल्या. राष्ट्रीय शाळांच्या स्वरूपात शासनाचे निर्बंध झुगारून शाळा काढण्याचे प्रयत्न सुरू झाले. १९३५ पर्यंत मराठवाड्यात अशा चार-पाच शाळा निघाल्या. हैद्राबदच्या विवेकवर्धिनीनंतर आणि गुलबर्ग्याच्या नूतन विद्यालयानंतर १९१६ साली परभणीत नूतन प्राथमिक विद्यालय निघाले. त्याचवर्षी औरंगाबादेतही सरस्वतीभूवन निघाले.[१६३] पुढच्याच वर्षी मुलींसाठी शारदामंदिर निघाले. याच काळात मराठवाड्याच्या शिक्षणक्षेत्रातली एक लक्षणीय घटना घडली. १९२१ या वर्षीच्या विजयादशमीस उस्मानाबाद जिल्ह्यातील हिप्परगा या लहानश्या गावी निवासी राष्ट्रीय शाळा निघाली. इतर शाळांप्रमाणे ही शाळा नव्हती. ही शाळा राष्ट्रभक्तांचे, क्रांतीकारकाचे आश्रयस्थान, प्रेरणास्थान होती. या शाळेने हैद्राबाद मुक्ति अंदोलनातील निधड्या छातीच्या देशभक्तांची एक पिढी तयार केली. स्वामी रामानंद तीर्थांनी याच शाळेत प्रारंभी अध्यापन केले. त्यांच्या प्रेरणेतूनच ध्येयवादी तरुणांचा गट या शाळेभोवती निर्माण झाला.

नांदेड परिसरात खाजगी मराठी शाळा सुरू व्हायला मात्र १९४० चे दशक उजाडावे लागले. उमरीचे नूतन विद्यालय याच काळातले. १९४५ च्या दरम्यान नांदेडला प्रतिभानिकेतन आणि शारदाभवन निघाले.

**साहित्यसंस्था व राजकीय परिषदा :**—हैद्राबाद संस्थानात आणि पर्यायाने नांदेड परिसरात सामान्य रयत आणि जुलमी सरंजामी शासन यंत्रणा यांच्या दरम्यान एक प्रकारचा संघर्ष सुरू झाला. विसाव्या शतकाच्या दुसऱ्या तिसऱ्या दशकापासून या संघर्षाची तीव्रता वाढली. मुस्लिमेतर रयतेच्या

१६३. भालेराव अनंत, पूर्वोक्त, पृ. ५७.

Maharashtra State Gazetteers

या संघर्षाने भाषिक अस्मितेचे स्वरूप धारण केले. इ.स.१९१४ साली दक्षिण साहित्य संघ नावाची संस्था हैद्राबादेत अस्तित्वात आली. मराठी, तेलुगु, कन्नड या भाषांच्या रूपाने रयतेला संघटित करण्याचा प्रयत्न सुरू झाला. या कामी केशवराव कोरटकर आणि वामनराव नाईकांचा पुढाकार होता. निजामी शासनाने या साहित्य संघाच्या कार्यावर अनेक निर्बंध लादले होते. इ.स. १९३७ साली हैद्राबादेत मराठी भाषिकांची निजाम प्रांतीय मराठी साहित्य परिषद अस्तित्वात आली. या साहित्य परिषदेचे पहिले अधिवेशन १९३७ च्या ऑक्टोबर मध्ये हैद्राबादेत झाले.

**नांदेडचे निजामप्रांतीय मराठी संमेलन :**—निजाम प्रांतीय मराठी साहित्य परिषदेचे दुसरे संमेलन नांदेड येथे २८, २९ आणि ३० सप्टेंबर रोजी १९४३ साली संपन्न झाले. नांदेडच्या सदानंद थिएटरात झालेल्या या संमेलनाचे अध्यक्ष म. म. दत्तो वामन पोतदार होते. स्वागताध्यक्षपदी शंकरराव मोरे होते. वि. अ. कानोले यांनी निजामप्रांतीय मराठी साहित्य परिषदेच्या अधिवेशनाच्या आयोजनात विशेष पुढाकार घेतला होता. या संमेलनातच परिषदेची घटना तयार झाली. पुढच्या अधिवेशनानंतर ही परिषद मराठवाडा साहित्य परिषद म्हणून ओळखली जाऊ लागली. १९४४ च्या औरंगाबाद अधिवेशनात हा बदल झाला एवढेच नव्हे तर संयुक्त महाराष्ट्राच्या कल्पनेचा स्पष्ट निर्देश ग. त्र्यं. माडखोलकरांच्या अध्यक्षीय भाषणात करण्यात आला.

नांदेडच्या निजामप्रांतीय मराठी संमेलनाच्या अधिवेशनात संमत झालेले ठराव हैद्राबादच्या पुराभिलेखागारात उपलब्ध आहेत. या ठरावामध्ये शुद्ध लेखनाच्या नियमाविषयीचा ठराव, मराठी माध्यमाचा आग्रह धरणारा ठराव आणि वृत्तपत्रावरील बंधने उठविण्याविषयी आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा आग्रह धरणारा ठराव असे काही ठराव लक्षणीय होते. तालुक्यातून परिषदेने वाचनालये काढण्याचेही याच अधिवेशनात ठरवले आणि त्याप्रमाणे काही वाचनालये निघाली. परिषदेचे कार्यालय हैद्राबाद ऐवजी नांदेडला स्थलांतरीत झाले. ग. ना. आंबेकर हे परिषदेचे चिटणीस बनले तर एस. आर. देशपांडे यांनी संयुक्त चिटणीपदाची धुरा सांभाळली. १९४४ ला तिसरे अधिवेशन झाले आणि पुढे राजकीय परिस्थितीच अशी धकाधकीची झाली की परिषदेचे कार्य तात्पुरते ठप्प झाले.

**पहिले मराठी साप्ताहिक :**—हैद्राबाद राज्यातल्या मराठी भाषिकांच्या चळवळीला १९२० साली एक वेगळा आयाम मिळाला. लक्ष्मणराव फाटक यांनी " निजामविजय " हे साप्ताहिक सुरू केले. हैद्राबाद राज्यातले हे पहिले मराठी नियतकालिक. नांदेड जिल्ह्यातल्या भोकरचे दिगंबरराव बिंदू वकीली करण्याच्या निमित्ताने याच काळात हैद्राबाद शहरात स्थिरावले आणि निजामविजयशी त्यांचाही संपर्क आला. निजामविजयचे सातत्य कायम राहिले. राजकीय जागृतीचे कार्य नेटाने या वृत्तपत्राच्या माध्यमातून केले गेले.

**नियतकालिके :**—याच सुमारास नांदेडमध्येही मराठी नियतकालिके प्रकाशित करण्याचे प्रयत्न झाले. १९१७-१८ च्या दरम्यान " नागरिक " या नावाचे पहिले वृत्तपत्र नांदेड मधून प्रकाशित झाले.[१६४] फार काळ ते चालू शकले नाही. असे असले तरी अनेक नियतकालिके निघत राहिली. अशा नियतकालिकांमध्ये अग्रपुजेचा मान " आख्यानरत्नमाला " या नियतकालिकाकडे जातो. दे. ल. महाजन

१६४. नांदेडकर, शं. गो., **वृत्तपत्रांची वाटचाल**, स्थानिक इतिहास आणि साहित्य एक शोध, पूर्वोक्त, पृ. १५९.

या नियतकालिकाचे संपादन करीत. याच काळात शारदाश्रम या संस्थेचे मंदारमाला मासिक प्रकाशित होऊ लागले. विहंगमालाही याच काळातले. श्री. के. गोळेगांवकरांनी या दोन्ही मासिकांचे संपादन केलेले दिसते. साधारणतः १९२८ च्या दरम्यान ही मासिके प्रकाशित झाली असावीत. त्यांचे १९३५ पर्यंतचे अंक उपलब्ध आहेत. १९३७ च्या सुमारास नांदेड मधून ' अमरज्योत ' नावाचे साप्ताहिकही निघू लागले. गोळेगांवकरच याचे संपादक होते.[१६५] या साप्ताहिकावर बंदी आली. पुढे दोन-तीन वर्षे वेगवेगळ्या नावाने हे साप्ताहिक निघत राहिले. याच दरम्यान प्रख्यात विधिज्ञ माधवराव नांदेडकरांनी ' सारथी ' या नावाचे साप्ताहिक सुरू करण्याचा प्रयत्न केला.[१६६] या प्रयत्नाला यश आले नाही ही गोष्ट वेगळी. हैद्राबाद मुक्ति संग्रामाच्या शेवटच्या पर्वात १९४७ च्या दरम्यान ग.ना.अंबेकरांचे ' प्रतोद ' सुरू झाले.[१६७] प्रतोदने आपले सातत्य आजपर्यंत कायम राखले आहे. पोलीस ॲक्शनच्या धामधुमीत हे साप्ताहिक बंद पडले होते. १९५५ च्या सुमारास पुनःश्च हरिओम करून स्वातंत्र्योत्तर कालखंडातील नांदेडचे पहिले नियतकालिक म्हणून आजही ते चालू आहे.

**सामाजिक अभिसरणाच्या चळवळी :**—२० व्या शतकाच्या पहिल्या दोन दशकात हैद्राबाद राज्यात सामाजिक सांस्कृतिक जागरण सुरू झाले. समतेचा विचार आला. हिंदु धर्मातील अनेक अनिष्ट रूढीं विषयी चीड व्यक्त होऊ लागली. शिक्षणाचे महत्त्व जाणवू लागले. आत्मपरिक्षण करून आपल्या समाजातील दोष दूर करण्याचे प्रयत्न सुरू झाले. अस्पृश्योध्दाराचे प्रयत्न झाले. इ.स. १९१३ साली मानवतावादी लीगची स्थापना झाली. इ.स.१९१५ साली हैद्राबादेतच सोशल सर्व्हीस लीग अस्तित्वात आली. रॉय बाल मुकुंद, केशवराव कोरटकर, वामनराव नाईक यांचा या कामी पुढाकार राहिला.

**सामाजिक सुधारणांचा प्रयत्न :**—नांदेड परिसरात होणाऱ्या सामाजिक परिषदांमुळे नांदेड गावातील परिस्थितीतही बदल जाणवू लागला. नांदेड मधील सामाजिक परिषदेच्या अधिवेशनातून दे.ल.महाजनांनी विधवा विवाहाचे समर्थन करणारे भाषण केले. सनातन्यांच्यामधून तीव्र प्रतिक्रिया उमटल्या. राजेश्वरपंत यांनी विधवाविवाहाला विरोध केला.[१६८] एकोणीसाव्या शतकाच्या अंतिम दशकातच संतकवी दासगणू महाराजांनी किर्तनातून अमंगल भेदाभेदावर प्रहार केला. हाच विचार दे.ल.महाजनांनी प्रभावीपणे पुढे नेला. अस्पृश्यता नष्ट व्हावी या ध्येयवादाने प्रेरित होऊन त्यांनी ' मोत्याची मागणी ' हा काव्यग्रंथ लिहिला. त्यांच्या अस्पृश्यता निवारण कार्यामुळे आणि विधवाविवाहाच्या समर्थनामुळे नांदेडमधल्या सनातनवाद्यांनी त्यांना समाजबहिष्कृत केले होते. धर्मसभेच्या या बहिष्कार निर्णयाला भगवानराव गांजवे सारख्या पुरोगाम्यांनी विरोध केला होता.[१६९]

---

१६५. कित्ता, पृ. १६०.

१६६. कित्ता, पृ. १६१.

१६७. कित्ता, पृ. १६२.

१६८. अंबेकर, ग. ना., **आत्मचरित्र,** अप्रकाशित हस्तलिखित.

१६९. गायकवाड, नरेंद्र, **सामाजिक सुधारणेची चळवळ**, 'स्थानिक इतिहास आणि साहित्य एक शोध', पूर्वोक्त, पृ. १४४.

याच काळात अस्पृश्य समाजातील किर्तनकारांनीदेखील महत्त्वाची भूमिका बजावली. पिंपळगावचे हिरामणबुवा आपल्या दिंडीसमवेत अनेक अस्पृश्यांना पंढरपूरला नेत. तळणीचे बालबुवा, मरळकचे भुजाबुवा, होडीचे श्रावणबुवा अशा संतमहंतांनी तळागाळातील समाजाला तुळशीमाळ देऊन आपले शिष्य बनवले. या वारकरी सांप्रदायाने पोतराज आणि मुरळ्या बनण्यापासून लोकांना परावृत्त केले.[१७०]

तात्पर्य या काळात नांदेड परिसरातही सामाजिक प्रबोधनाला प्रारंभ झाला. सामाजिक संघटन, राजकीय हक्कांविषयी जागृती, लोकशिक्षणाचा आग्रह या गोष्टी हळुहळु का होईना घडून येऊ लागल्या. अर्थात सामाजिक परिवर्तनाची ही गती अत्यंत संथ होती. सामाजिक परिवर्तनाला गतीमान करणारा आणखी एक प्रयत्न याच कालखंडात हैद्राबाद राज्यात सुरू झाला. तसे १९२० पासून लहान मोठे प्रयत्न सुरूच होते. सामाजिक परिषदा, शिक्षण परिषदा, राजकीय परिषदा असे वळण घेत हैद्राबाद संस्थानातील तेलुगु, कन्नड आणि मराठी भाषिकांनी आपले भाषिक व्यासपीठ निर्माण करण्याचा प्रयत्न केला. १९२१ साली प्रथमतः तेलंगणात आंध्र जनसंघम ही आंध्रातल्या तेलगु भाषिकांची एक संघटना अस्तित्वात आली. याच आंध्रजनसंघमची आंध्रपरिषद आणि पुढे आंध्र महासभा झाली. याच काळात हैद्राबादेत राजकीय हालचाली करता याव्यात म्हणून हैद्राबाद राज्याबाहेर सीमावर्तीभागात राजकीय परिषदा घेण्यात आल्या, याचा उल्लेख पूर्वी आलेला आहेच. अकोल्याच्या चौथ्या राजकीय परिषदात प्रथमच हैद्राबाद राज्यातही जबाबदार राज्यपद्धती यावी अशी स्पष्ट मागणी करण्यात आली. राज्यात अशी मागणी करणे केवळ अशक्यच होते. म्हणूनच राज्याबाहेरच्या परिषदांतून असे ठराव झाले. १९३७-३८ च्या काळात राज्यात सभा घेऊन ही मागणी करण्याचे धैर्य रयतेमध्ये एकवटले. राज्यातली आंध्र महासभा हे भाषिक व्यासपीठ मूलतः सामाजिक, सांस्कृतिक व्यासपीठ होते. या व्यासपीठावरून १९३७ च्या निजामाबाद अधिवेशनात जबाबदार राज्यपद्धतीची मागणी करणारा ठराव करण्यात आला.

**महाराष्ट्र परिषदेचा उदय :**—राज्यातील बहुसंख्या रयत अशी सामाजिक सांस्कृतिक संघटनांच्या रूपात एकत्र येऊ लागली. आंध्र महासभेचे पाचवे अधिवेशन १९३६ साली शादनगर येथे झाले. या अधिवेशनात मराठी आणि कन्नड भाषिक लोकही मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. याच अधिवेशनात आंध्र महासभेप्रमाणे कर्नाटक आणि महाराष्ट्र परिषद स्थापन करण्यासंबंधीचा निर्णय झाला.[१७१] त्याप्रमाणे १९३७ च्या फेब्रुवारी महिन्यात कर्नाटक परिषदेची स्थापना होऊन तिचे पहिले अधिवेशनही झाले. दरम्यान महाराष्ट्र परिषदेचे अधिवेशन घेण्यासाठी परवानगी मिळविण्याचे प्रयत्न झाले. परंतु मराठवाड्यात कुठेही परवानगी मिळण्याची शक्यता दिसेना. मराठवाड्यातील परतूर परिसर हा महाराजा किसन प्रसाद यांच्या वैयक्तिक जहागिरीचा भाग. परतूर हे जहागिरीचे मुख्य ठाणे. या जहागिरीचे मोंहतेमद गुंडेराव नावाचे गृहस्थ होते. ते हैद्राबादलाच राहत. शादनगर अधिवेशनाला तेही उपस्थित होते व महाराष्ट्र परिषदेची कल्पना त्यांनीही उचलून धरली. तसे ते वजनदार असामी होते आणि राज्यात त्यांना मान होता. त्यांनी त्यांच्या अखत्यारीतल्या परतूर जहागिरीत महाराष्ट्र परिषदेचे

---

१७०. कित्ता, पृ. १४७.

१७१. भालेराव अनंत, पूर्वोक्त, पृ. ७५.

अधिवेशन घ्यायचे ठरवले. महाराजा किसनप्रसादांची परवानगी मिळवली. महाराजा किसन प्रसाद हे निजामाचे पंतप्रधान होते. त्यामुळेच त्यांचे दरबारी वजन होते. त्यांनी आपल्या जहागिरीत परतूर या गावी महाराष्ट्र परिषदेचे अधिवेशन घेण्याची परवानगी दिली आणि मराठी भाषिकांचे एक सामाजिक व्यासपीठ उदयाला आले.

१ जून १९३७ ला हे अधिवेशन संपन्न झाले. मराठवाड्यातून अनेक प्रतिनिधी परतूरच्या या महाराष्ट्र परिषद अधिवेशनाला उपस्थित होते. हैद्राबादची बडी प्रतिष्ठीत मंडळी तर होतीच. स्वामी रामानंद तीर्थ व बाबासाहेब परांजपे हे ही आपल्या शिक्षक सहकाऱ्यांसह मोमीनाबादहून आले होते. या परिषदेच्या अध्यक्षपदी परभणीचे वकील गोविंदराव नानल यांची एकमताने निवड झाली. या परिषदेच्या आयोजनात केंधळीचे गोविंदराव घारे यांचा मोलाचा वाटा होता. स्वागत समितीचे ते अध्यक्ष होते. त्यांच्या रूपाने सामान्य शेतकऱ्यांचा सहभाग लक्षणीय ठरला. श्यामराव पाटलांनी या परिषदेत शेतकऱ्यांच्या व्यथांना नेमकेपणाने शब्दबद्ध केले. त्यांचे भाषण खूप अभ्यासपूर्ण झाले. पायगा आणि जहागिरीतील प्रश्नासाठी पाटील सतत संघर्ष करीत राहिले.

महाराष्ट्र परिषदेने मराठी भाषिकांसाठी सामाजिक सुधारणांचे एक व्यासपीठ उपलब्ध करून दिले. हे व्यासपीठ पुरोगामी विचारांचे प्रेरणास्थान आणि जहाल संघर्षाचे केंद्र बनले. परतूरच्या पाठोपाठ महाराष्ट्र परिषदेची अधिवेशने अनुक्रमे उमरी, लातूर, औरंगाबाद, सेलू, लातूर, बीड अशा ठिकाणी होत गेली.

**महाराष्ट्र परिषदेचे उमरी अधिवेशन :**—नांदेड मधील वातावरणातही बरेच बदल दिसू लागले होते. सामाजिक परिषदांच्या अधिवेशनाने लोकसंघटन होऊ लागले होते. १९२५ पर्यंत सामाजिक अभिसरणाची प्रक्रिया सुरू झाली होती, असे असले तरी मध्यंतरीचा १०-१५ वर्षांचा काळ नांदेड परिसरात तसा सुस्तीतच गेला. नाही म्हणायला आंदोलने झाली. वंदेमातरम् चळवळ झाली. सत्याग्रह झाले. मराठवाड्याच्या पातळीवरचे असे अधिवेशन मात्र महाराष्ट्र परिषदेच्या रूपाने उमरी येथे भरले होते. परिषदेचे हे तिसरे अधिवेशन १९४१ साली भरले. त्या काळातील उमरी ही मुधोळ तालुक्यातील एक महत्त्वाची बाजारपेठ. दुसऱ्या महायुद्धाची छाया या बाजारपेठेवरही पडली होती. सरकारकडून सक्तिची वसुली होती. शेतकरीही हैराण होता. हैद्राबादच्या निजामी सलतनतीने इंग्रजांना युद्धात मदत करण्याचे धोरण अवलंबिले होते. युद्ध प्रयत्नात विरोध करणाऱ्यांना सरकारने तुरुंगात डांबले त्यात गोविंदभाई श्रॉफ आणि आ. कृ. वाघमारेंचा समावेश होता. गोविंदभाई कम्युनिस्ट विचारांचे असल्याचा संशय होता आणि कम्युनिस्ट हे युद्धात इंग्रजांच्या विरोधी भूमिका घेणारे म्हणून गोविंदभाईना अटक झाली. आ. कृ. वाघमारेही विरोधी भूमिका घेणारे सक्रिय कार्यकर्ते. तेही तुरुंगात बंदिस्त झाले. दरम्यानच्या काळात राज्यात वैयक्तिक सत्याग्रह झाला. त्यात स्वामी रामानंद तीर्थांना अटक झाली.[१७२]

उमरीच्या महाराष्ट्र परिषद अधिवेशनाच्या आयोजनात मुख्यतः पुढाकार होता तो धनजीभाई पुरोहित आणि गोविंदराव बर्डे यांचा. आर्यसमाजाचेही अनेक कार्यकर्ते या अधिवेशनासाठी सक्रीय होते.

१७२. रांजणीकर रघुनाथ, पूर्वोक्त, पृ. ७५.

नांदेड धर्माबादची मंडळीही होतीच. नांदेडचे प्रसिद्ध वकील देवीदासराव लव्हेकर हे तर स्वागताध्यक्षच होते. गोपाळशास्त्री देवांचा आणि भगवानराव गांजण्यांचा मोठ्या प्रमाणात सहभाग होता.[१७३] देगलूर, बिलोली, कंधार, नायगाव, भोकर येथून असंख्य प्रतिनिधी अधिवेशनास उपस्थित होते. काँग्रेसचा सत्याग्रह स्थगित झाल्यानंतर आता विधायक प्रश्न म्हणून शेतकऱ्यांचे प्रश्न हाती घेतले गेले. कंधारचे नागनाथ मामडे, आनंदराव मोरे, टेळकीकर, देगलूरचे दत्तात्रय संघवई, गोपाळराव मुजळगेकर यांचा अधिवेशनातला सहभाग लक्षणीय होता. नायगावचे गंगाराम बेळणे, उद्धव सावकार, कासराळीकर परिषदेस आवर्जुन उपस्थित होते. बारडचे विठ्ठलराव देशमुख आपल्या असंख्य सहकाऱ्यांसह उपस्थित होते.[१७४] बारडच्या या स्वयंसेवक चमूने अधिवेशनाच्या सभामंडपाच्या संरक्षणाचे काम केले. अशारितीने नांदेड परिसर चळवळीच्या प्रवाहात सक्रिय झाला.

१९३७ पासून ते १९४६ अशा नऊ वर्षांच्या काळात महाराष्ट्र परिषद हे व्यासपीठ कार्यरत राहिले. उमरी अधिवेशनानंतर औरंगाबाद, सेलू आणि लातूर येथे महाराष्ट्र परिषदेची पुढची अधिवेशने झाली. पुराभिलेखीय संग्रहालयात महाराष्ट्र परिषदेच्या एकूण सहा अधिवेशनांचा तपशील आढळतो. सेलू येथे झालेल्या पाचव्या अधिवेशनाचे अध्यक्षपद नांदेड जिल्ह्यातील दिगंबरराव बिंदू यांनी भूषविले होते. त्यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नाला वाचा फोडली. अरबाच्या सावकारी पाशाविरुद्ध सरकार काही करीत नाही ही व्यथा व्यक्त केली. महाराष्ट्र परिषदेच्या व्यासपीठावरून सातत्याने जुलमी शासनाच्या अन्यायाविरुद्ध आवाज उठवला गेला. शेतसाऱ्याच्या फेरआकारणीची मागणी केली गेली. बेछूट करांचा बोजा कमी करण्याचा आग्रह धरला गेला. जहागिरींचे शासन प्रशासनाने आपल्या नियंत्रणात घ्यावे असे ठराव झाले. काँग्रेसवरील बंदी उठवावी या अर्थाचा ठराव तर प्रत्येक अधिवेशनात झालेला आहे.

**हैद्राबाद स्टेट काँग्रेस स्थापना व बंदी :**—महाराष्ट्र परिषदेची स्थापना झाली त्यानंतर बरोबर एक वर्षाने हैद्राबादेत हैद्राबाद स्टेट काँग्रेसची स्थापना करण्याचा प्रयत्न झाला. साधारणतः १९३८ च्या उत्तरार्धाचा हा काळ आहे. १९३५ चा कायदा ब्रिटीश इंडियात करण्यात येऊन ब्रिटीशांच्या पारतंत्र्यात असलेल्या प्रांतांना प्रांतिक स्वायत्तता मिळाली होती. मर्यादित स्वायत्तता व अधिकार असूनही हा नवा प्रयोग लक्षणीय ठरला. अनेक प्रांतात काँग्रेस मर्यादित अर्थाने सत्तेवर आली. पारतंत्र्यातली ही स्वदेशी सत्ता होती. या पार्श्वभूमिवर हैद्राबादच्या निजामी राजवटीत परिस्थिती भयानक होती. राजाचा एकछत्री अंमल होता. त्याला विरोध होऊ लागला. समान व्यासपीठ निर्माण करण्याचे प्रयत्न झाले. हैद्राबाद रिफॉर्म कमिटी, निजाम सब्जेक्टस लिग, हिंदू स्डँडींग कमिटी यांच्या प्रयत्नांनंतर लोकसंघटन वाढत चालले. १२ नोव्हेंबर १९३७ ला हैद्राबाद शहरात हैद्राबाद पिपल्स कन्व्हेन्शन बोलावण्यात येऊन जबाबदार राज्यपद्धतीची मागणी करण्यात आली. याच दरम्यान हैद्राबाद शहरात अखिल भारतीय काँग्रेसची एक जिल्हा शाखा कार्यरत झाली. या शाखेमार्फत मर्यादित कार्य झाले. काँग्रेस अधिवेशनास उपस्थित राहण्यास कार्यकर्त्यांना प्रेरित करणे वगैरे गोष्टी या जिल्हा शाखेने केल्या. काँग्रेसच्या झेंड्याखाली राज्यातली चळवळ अधिकृतरित्या चालविण्याचा विचार राज्यातल्या अनेक

---

१७३. कित्ता.

१७४. बारडकर साहेबराव यांची प्रत्यक्ष मुलाखत, 'हैद्राबाद मुक्तिसंग्राम स्वातंत्र्य सैनिकांच्या मुलाखती', पूर्वोक्त.

कार्यकर्त्यांच्या मनात होता. परंतु हरिपूरा काँग्रेस अधिवेशनात या बाबतीत मोठा भ्रमनिरास झाला. १९३८ चे हे अधिवेशन. देशातल्या ५६२ राज्यांमधल्या चळवळींसंदर्भात, त्या राज्यातल्या रयतेच्या भविष्यासंदर्भात या अधिवेशनात स्पष्टपणे भूमिका घेतली गेली, ती अशी की, राज्याराज्यातल्या रयतेच्या संघर्षात काँग्रेसने लक्ष घालू नये. संस्थानी जनतेच्या प्रश्नामध्ये काँग्रेसने हस्तक्षेप करू नये असा स्पष्ट ठरावच या अधिवेशनात करण्यात आला.[१७५] तेथील चळवळ स्वाभाविकपणे स्थानिक रयतेच्या प्रेरणेने उभी राहावी असा विचार या ठरावामागे होता.

हैद्राबाद राज्यातली रयत संघटित होऊ लागली होती. आंध्र महासभा कर्नाटक परिषद आणि महाराष्ट्र परिषदेच्या रूपाने व्यासपीठे कार्यरत झाली होती. दरम्यान या व्यासपीठांच्या चळवळींना जातीय ठरवण्याचा प्रयत्न शासनाकडून झाला. महाराष्ट्र परिषदेला जातीय संस्था म्हणून, शासनाने त्यावर निर्बंध लादले. शासनाने एक फर्मान काढून ब्रिटीश इंडियातल्या, मुंबई, पुण्यातल्या वृत्तपत्रांवर राज्यात बंदी घातली गेली. एकूण २१ वृत्तपत्रांवर हैद्राबाद राज्यात बंदी होती. बंदी असली तरी लपून छपून केसरी, मराठा सारखी वृत्तपत्रे नांदेडमध्येही यायची. याच काळात आ.कृ.वाघमारे यांनी पुण्यातून ' मराठवाडा ' या नावाचे वृत्तपत्र सुरू केले. १० फेब्रुवारी १९३८ ला मराठवाडा साप्ताहिकाचा पहिला अंक निघाला. या साप्ताहिकावरही बंदी आली. तरीही हे साप्ताहिक पुढे नागरीक, संग्राम, रणदुदुंभी, समरभूमी, हैद्राबाद स्वराज्य, मुघलाई, कायदेभंग कायाकल्प आणि संजीवनी अशा विविध नावांनी प्रकाशित होत राहिले. हैद्राबादच्या शासनाने रयतेची दमछाक करणारे अंतर्गत निर्बंध लादले, वातावरण तापत चालले.

हैद्राबादेतील काही नेत्यांनी स्टेट काँग्रेसच्या स्थापनेचा प्रयत्न याच दरम्यान सुरू केला. २९ जून १९३८ ला एक अनौपचारीक बैठक बोलाविण्यात आली.[१७६] या बैठकीतच हैद्राबाद स्टेट काँग्रेसची स्थापना करण्याचा निर्णय झाला. रामकिशन धूत यांच्या नेतृत्वात एक अस्थायी समिती नेमण्यात आली. राज्यभरात सभासद नोंदणी सुरू झाली. नांदेडमधूनही काही सभासद नोंदवले गेले. ९ सप्टेंबर १९३८ ला आमसभा घेऊन कार्यकारी मंडळाची रितसर निवड करावी असे ठरले त्याप्रमाणे आमसभेचे आयोजनही झाले. अस्थायी समितीने एक निवेदन प्रकाशित केले होते. त्यात हिंदू-मुस्लिम साऱ्यांनीच काँग्रेसमध्ये सामील व्हावे यासाठी प्रयत्न सुरू झाले. सरकारच्याही धोका लक्षात आला. हे लोक आंदोलनाशेवटी जबाबदार राज्यपद्धतीची मागणी करणार आणि ही मागणी म्हणजे अल्पसंख्य मुस्लिमांच्या विशेष सत्ताधिकारावर गदा येणार हे लक्षात घेऊन मुस्लिम जमातवादी नेतेही पुढे सरसावले. इत्तेहादूल-मुसलमीन या संघटनेने नव्याने स्थापन होऊ पाहणाऱ्या हैद्राबाद स्टेट काँग्रेसमध्ये सामील होण्यापासून मुस्लिमांना परावृत्त केले. मुस्लिमांच्या भावना भडकवण्याचे काम सुरू झाले. मुघलांच्या वारसदाराचे हे एकमेव मुस्लिम राज्य टिकविण्यासाठी साऱ्या मुस्लिमांनी जागे व्हावे असा प्रयत्न सुरू झाला. याही परिस्थितीत काही नेमस्त मवाळ नेत्यांना खात्री होती की निजामी हुकूमत काँग्रेसच्या स्थापनेस मान्यता देईल. पण त्यांचा भ्रमनिरास झाला.[१७७] ८ सप्टेंबर १९३८ ला काँग्रेसवर

१७५. ढेंगळे भागवतराव, पूर्वोक्त.

१७६. कित्ता.

१७७. कित्ता.

बंदी जारी करणारे फर्मान निघाले. ९ सप्टेंबरला आमसभेत काँग्रेसची कार्यकारीणी रीतसर निवडली जाऊन हैद्राबाद स्टेट काँग्रेस अस्तित्वात येणार होती. त्याचे एक दिवस अगोदर म्हणजे जन्माला येण्याअगोदरच हैद्राबाद स्टेट काँग्रेस बेकायदा ठरविण्यात आली. परकीय देशातल्या संघटना आणि बाहेरच्या लोकांचा हस्तक्षेप आम्ही सहन करणार नाही अशी भूमिका हैद्राबादच्या निजामी हुकूमतीने घेतली. त्यांनी अखिल भारतीय काँग्रेसला परकीय संघटना ठरवले. मुंबई पुण्यातले नेते, शंकरराव देव आदी लोकांचा हस्तक्षेप निजामी शासन सहन करणार नाही असा इशारा सरकारने दिला.

**१९३८ चे सत्याग्रह आंदोलन :**—हैद्राबाद स्टेट काँग्रेसवर बंदी आली त्याच दरम्यान निजामी राज्यात आर्यसमाजाने अखिल भारतीय स्वरूपाचा लढा सुरू केला. त्याच सुमारास हिंदूमहासभेने निःशस्त्र प्रतिकार आंदोलन उभे करून निजामी राज्यातल्या जुलमी कायद्याविरुद्ध कायदेभंग चळवळीच्या स्वरूपात सत्याग्रह आंदोलन सुरू केले. नेमके त्याचवेळी हैद्राबाद स्टेट काँग्रेसवर बंदी आल्यामुळे संघटना स्वातंत्र्याच्या नागरी हक्कासाठी काँग्रेसचे सत्याग्रह आंदोलन सुरू झाले. या एकूण आंदोलनाच्या आणि सत्याग्रह चळवळीच्या दृष्टीने ऑक्टोबर १९३८ हा महिना आणि विशेषतः ऑक्टोबर महिन्यातल्या तिसरा आठवडा लक्षणीय ठरला.

२१ ऑक्टोबर १९३८ रोजी वा.डी.जोशी यांच्या नेतृत्वाखाली पाच जणांची तुकडी नागरी प्रतिकाराच्या नावावर सत्याग्रह करून तुरुंगात गेली आणि हिंदूमहासभेचे सत्याग्रह आंदोलन सुरू झाले, ते हिंदू नागरी स्वातंत्र्यसंघाच्या नावाने.[१७८] पहिल्या तुकडीला दोन वर्षांच्या तुरुंगवासाची जबर शिक्षा ठोठावण्यात आली. त्यानंतरही पाच तुकड्यांनी सत्याग्रह केला व साऱ्यांना अशाच शिक्षा ठोठावण्यात आल्या. एकूण १५९० सत्याग्रहींनी सत्याग्रह केल्याची नोंद पुराभिलेखागारात आढळते.

ऑक्टोबरच्या शेवटच्या आठवड्यात आर्यसमाजाचा सत्याग्रह सुरू झाला. २४ ऑक्टोबर १९३८ ला आर्यसमाजाच्या सत्याग्रहाचा प्रारंभ झाला. ही चळवळ सलग १० महिने चालू राहिली. ७ ऑगस्ट १९३९ ला ही सत्याग्रह चळवळ मागे घेण्यात आली. अक्षरशः हजारो सत्याग्रहींनी या सत्याग्रहात भाग घेतला. पुराभिलेखागारातील कागदपत्रातून अधिकृत नोंदीची दखल घेऊन लिहावयाचे म्हटले तरी ७५९४ सत्याग्रहींनी यात भाग घेतला असे ठामपणे प्रतिपादन करता येईल. सर अकबर हैदरींच्या एका पत्रात सत्याग्रहींची ही संख्या १२ हजार असल्याचा उल्लेख आहे.[१७९] आर्यसमाजाच्या सत्याग्रह आंदोलनाने हैद्राबादेतील रयतेच्या व्यथा वेशीवर टांगल्या हे मात्र खरे.

आर्यसमाजाचे हे सत्याग्रह नांदेडमध्येही झाले. अगदी तालुक्यापर्यंत हे लोण पोहचले होते. पं. वेदवृत्त यांनी ५१३ जणांसह ५ मे १९३९ रोजी नांदेडला सत्याग्रह केला. दुसरा सत्याग्रह १४ मे १९३९ ला झाला. या सत्याग्रही तुकडीचे नेतृत्व पुसदच्या स्वामी सूंदरानंदानी केले होते. ४६ जणांची त्यांची ही सत्याग्रही तुकडी पुसदहून आली होती.[१८०] तात्पर्य आर्यसमाजाने धार्मिक व सांस्कृतिक स्वातंत्र्यासाठी हे आंदोलन सुरू केले होते व महात्मा गांधीच्या सत्याग्रही तत्त्वावर आणि सविनय कायदेभंगाच्या भूमिकेवर ते आधारलेले होते ही गोष्ट निर्विवाद ठरावी.[१८१]

---

१७८. दाते सुनिल, भागानगर सत्याग्रह, पुणे पृ. २.

१७९. पुराभिलेखीय संग्रह, **अकबर हैदरी पेपर्स**, राज्य पुराभिलेखागार हैद्राबाद.

१८०. भालेराव अनंत पूर्वोक्त, पृ. १४७-४८.

१८१. जोशी र. मु., फाईल्स, स्वामी रामानंदतीर्थ संशोधन संस्था, औरंगाबाद (अप्रकाशित).

ही आंदोलने सुरू होत असतांनाच हैद्राबाद स्टेट काँग्रेसची स्थापना व त्यावर बंदी या घटना घडल्या. ज्या नेमस्त मंडळींनी स्टेट काँग्रेसची स्थापना केली व स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ, दिगंबरराव बिंदू, आ. कृ. वाघमारे आणि कर्नाटकातील काही मंडळींना जहाल मानून बाजूला सारले होते,[१८२] त्यांच्यावर बंदीमुळे मोठ्या नामुष्कीची वेळ आली होती. सरकारचा रोष ओढवून बंदी विरुद्ध चळवळ उभी करावयाची होती. साहजिकच नांदेडचे दिगंबरराव बिंदू आणि स्वामी रामानंद तीर्थ सारखे जहाल तरुणच पुढे आले. काँग्रेसच्या नेमस्त पुढाऱ्यांनी आम्हाला सत्याग्रह आंदोलन तूर्तास नको असे म्हणून हात झटकले. अशा वेळी स्वामीजींनी पुढाकार घेतला. स्वामीजी, दिगंबरराव बिंदू, आ. कृ. वाघमारे, ही मंडळी हैद्राबादेत परभणीच्या गोविंदराव नानल यांना भेटली. नानल हे हैद्राबादेतले एक प्रतिष्ठीत वकील, महाराष्ट्र परिषदेच्या परतूर अधिवेशनाचे अध्यक्ष. गोविंदराव नानल यांना बंदी घातल्या गेलेल्या काँग्रेसचे अध्यक्षपद स्वीकारावे अशी विनंती करण्यात आली. त्यांनी विनंती मान्य केली व बंदी असलेल्या या संघटनेचे अध्यक्षपद स्वीकारले. त्यांनी सरकारची नाराजी घेणारे हे पद स्विकारु नये म्हणून हैद्राबादमधील तथाकथित बड्या नेत्यांनी दडपणही आणून पाहीले.[१८३] नानल त्याला बधले नाहीत.

हैद्राबाद स्टेट काँग्रेसची अस्थायी समिती विसर्जीत करण्यात आली आणि नवी कार्यकारणी व कृतीसमिती नियुक्त केली गेली. गोविंदराव नानल यांच्या अध्यक्षतेखाली असलेली एकूण ५ जणांची कृतीसमितीच सत्याग्रहाची पहिली तुकडी होती. २४ ऑक्टोबर १९३८ रोजी गोविंदराव नानल आणि त्यांच्या चार सहकाऱ्यांनी सत्याग्रह केला आणि काँग्रेसचे सत्याग्रह आंदोलन सुरू झाले. पाठोपाठ स्वामी रामानंद तीर्थांच्या नेतृत्वात सत्याग्रहींची दुसरी तुकडी तयार होती. २७ ऑक्टोबर १९३८ ला स्वामीजींनी सत्याग्रह केला. या सर्व सत्याग्रहीनां जबर शिक्षा झाल्या. तरीही सत्याग्रह आंदोलन चालूच राहिले. हैद्राबाद-सिकंदराबाद शहरातून एकूण १८ तुकड्यांनी सत्याग्रह केले.[१८४] २४ ऑक्टोबर ते २४ डिसेंबर १९३८ अशा दोन महिन्यांच्या काळात हे आंदोलन तीव्र बनले. काशीनाथराव वैद्यांच्या नेतृत्वात शेवटचा सत्याग्रह झाला आणि गांधीजींच्या आदेशावरून सत्याग्रह मोहीम स्थगित करण्यात आली. एकूण ५३५ सत्याग्रही तुरुंगात डांबले गेले.

**नांदेडचे सत्याग्रही :**—या सत्याग्रहात नांदेडमधील सत्याग्रहींचाही सहभाग लक्षणीय होता. ११ व्या तुकडीचे नेतृत्व करणारे दिगंबरराव बिंदू नांदेड जिल्ह्यातील भोरचे. त्याशिवाय अनंत जयवंतराव देशमुख, रामसिंह पुरूषोत्तमसिंह, दिगंबर शंकरराव, लक्ष्मण आप्पाजी वंजारी, मोतीलाल, गोपाळरावशास्त्री देव यांनीही सत्याग्रह केले. हैद्राबादेतल्या या सत्याग्रह सहभागाबरोबरच नांदेड जिल्ह्यातही सत्याग्रह आंदोलन झाले. नांदेडमध्ये आर्यसमाजाचा लक्षणीय प्रभाव होता. उमरी, धर्माबाद, कंधार, देगलूर आदि आर्यसमाजाची केंद्र सक्रिय होती. त्यांच्या कार्यकर्त्यांचा गट संघटित होता. त्याचप्रमाणे श्यामराव

---

१८२. भालेराव अनंत, पूर्वोक्त, पृ. ११५-११६.

१८३. स्वामी रामानंद तीर्थ, **हैद्राबाद स्वातंत्र्य संग्रामाच्या आठवणी**, वि. मा. देऊळगावकर (मराठी अनु.), पृ. ८६-८७.

१८४. बन्सीधर विद्यालंकार, **पंडित विनायकराव अभिनंदन ग्रंथ** (हिंदी), पृ. १२७-१३४.

बोधनकर, भगवानराव गांजवे आणि गोपाळशास्त्री ही मंडळीही सक्रिय होती. त्यांनी सत्याग्रह मोहीम जिल्ह्यात राबवली. कंधारच्या सत्याग्रहात तर राजद्रोहाचा खटला नोंदवला गेला. नांदेड परिसरातील रंगनाथराव मामडे, प्रल्हाद गणपती अनावडे, उद्धव श्रीनिवास, अंबादास गंगाराम संगेवार, बंडोपत झट्ट, केशवराव उमरीकर अशा अनेकांनी औरंगाबादेत सत्याग्रह केला. याशिवाय नांदेडचे वासुदेवराव आडगावकर हेही औरंगाबादच्या सत्याग्रहात सहभागी होते. कंधारचे शंकरराव टेळकीकर सातव्या तुकडीचे नेते होते. रामराव पंढरीनाथ शिराढोणकरांनी नांदेडलाच सत्याग्रह केला.

तात्पर्य नांदेड जिल्हा महाराष्ट्र परिषद व स्टेट काँग्रेसच्या चळवळीचे तसेच आर्यसमाज आणि हिंदूमहासभा सत्याग्रहाचेही केंद्र राहिले. हुतात्म्यांची एक ज्वलंत परंपराच नांदेडने निर्माण केली हे मुद्दाम नोंदवले पाहिजे. या सत्याग्रह आंदोलनाच्या पार्श्वभूमिवर निजाम सरकारने १७ जुलै १९३९ ला काही सुधारणा जाहीर केल्या आणि आर्यसमाजाचेही सत्याग्रह आंदोलन मागे घेण्यात आले. ७ ऑगस्ट १९३९ ला आंदोलन मागे घेण्यात आले आणि तुरुंगात डांबलेल्या हजारो सत्याग्रहींना सोडण्यात आले.[१८५] या सत्याग्रही आंदोलनात दिसलेले हिंदूत्ववादी आर्यसमाजी आणि काँग्रेस हे वैचारिक गट पुढील वाटचालीत मुक्ती आंदोलनाच्या मुख्य प्रवाहात मिसळून गेले. सत्याग्रह आंदोलनाने निजामी सलतनतीत एक जन आंदोलन उभे केले. भूमिगत चळवळ सुरू केली. बंदी असलेल्या मराठवाड्याचे अंक चोरून लपून वितरित होत. त्यात सत्याग्रहाचा सर्व तपशील असे. चळवळीला सुसूत्रता आणण्यासाठी आवश्यक ती पत्रके चक्रमुद्रित करून गुप्तपणे घरोघर पोहचवली जात. गुप्त बैठकांविषयीची माहिती दिली जाई. सत्याग्रहींची नोंदणीही अशीच गुप्तपणे करावी लागे. हैद्राबाद मुक्ती आंदोलनाला गतीमान करण्यात या सत्याग्रह मोहिमेचा वाटा लक्षणीय होता.

**वंदे मातरम् आंदोलन :**—हैद्राबादच्या मीरउस्मानअली या सातव्या निजामाने १९१८ साली विद्यापीठाची स्थापना केली हे पूर्वी नोंदविले आहे. उर्दु भाषा आणि इस्लामी संस्कृतीचा प्रभाव विस्तारण्याचा आवर्जून प्रयत्न सुरू झाला. विद्यापीठातल्या विद्यार्थ्यांसाठी असलेला पोषाख हा खास इस्लामी पेहराव होता. जांभळी किंवा निळी शेरवानी आणि पायजमा हा पोषाख सक्तीचा होता. विद्यार्थ्यांसाठी असलेल्या वसतिगृहात हिंदू आणि मुस्लिम विद्यार्थ्यांसाठी वेगळी भोजनगृह होती. एवढेच नव्हे तर मुस्लिम विद्यार्थ्यांसाठी प्रार्थनागृह म्हणजे मशीदही होती.

जेवतानांही शेरवानी पायजमा घालूनच हिंदू विद्यार्थीही बसले पाहिजे असा हुकूम निघाला आणि संघर्षाची ठिणगी पडली. विद्यार्थ्यांनी उपवस्त्र काढून पाटावर जेवण्याच्या हिंदू पद्धती पासून सोवळं नेसून जेवण्याच्या प्रघातापर्यंत सगळ्या गोष्टीची चर्चा करून हिंदूंनाही त्यांच्या रिवाजाप्रमाणे जेवण्याची परवानगी मागितली. ती मागणी फेटाळली गेली. नांदेड जिल्ह्यातले मुदखेडचे डी. एम. देशमुख आणि जालन्याचे ॲड. द. ग. देशपांडे हे त्यावेळी विद्यार्थी होते. त्यांनी विद्यार्थ्यांना संघटित केले.[१८६] शेवटी हा नियम रद्द करण्यात आला व शेरवानी घालूनच जेवले पाहिजे ही अट रद्द झाली.

---

१८५. ढेंगळे, पूर्वोक्त, पृ. ६८-६९.

१८६. ॲड. द. ग. देशपांडे यांची प्रत्यक्ष मुलाखत, 'हैद्राबाद मुक्तिसंग्राम स्वातंत्र्य सैनिकांच्या मौखिक नोंदी', पूर्वोक्त; रांजणीकर रघुनाथ, पूर्वोक्त, पृ. २८.

Maharashtra State Gazetteers

दरम्यान मद्रास प्रेसिडेन्सीमधील प्रांतिय विधानसभेत वंदेमातरम् म्हणण्यावर एका मुस्लिमाने आक्षेप घेतल्याच्या बातम्या हैद्राबादेत येऊन धडकल्या. या गीतामध्ये मूर्तीपुजेचा उल्लेख असल्यामुळे हा विरोध असल्याचे कळले. हैद्राबादेतील उर्दु वर्तमानपत्रांनी ही बातमी उचलून धरली. मध्यंतरीच्या काळात विद्यापीठातल्या हॉस्टेलमध्ये हिंदू विद्यार्थी जेवणाच्या अगोदर काही श्लोकांबरोबर वंदेमातरम्ही म्हणू लागले होते. या हॉस्टेलचे सुपरीटेंडेंट कादरी यांनी मुस्लिम विद्यार्थ्यांना चिथवून, वंदेमातरम् मुळे आमच्या धार्मिक भावना दुखावल्या जातात अशी लेखी तक्रार करावयास लावली. ऑक्टोबर, १९३९ च्या दरम्यान हा आक्षेप घेण्यात आला.[१८७] वंदेमातरम् म्हणण्यावर हॉस्टेलमध्ये बंदी घालण्यात आली. ही बंदी ए हॉस्टेल पुरती मर्यादित होती. परंतु बी हॉस्टेलमध्येही बंदी येणार अशी बातमी होती. बंदी असूनही विद्यार्थी वंदेमातरम् म्हणत राहीले. तणाव वाढत राहिला. वंदेमातरम् नाही तर शिक्षण नाही ही भूमिका घेऊन विद्यार्थी बाहेर पडले. वंदेमातरम् चळवळ आकार घेऊ लागली. नरेंद्रदत्त हा विद्यार्थी नेता औरंगाबादला आला. गोविंदभाई श्रॉफ आणि नरेंद्रदत्त यांनी विद्यार्थ्यांची बैठक घेतली. हैद्राबादेतील ए हॉस्टेल मधील प्रकार औरंगाबादेतल्या विद्यार्थ्यांना कळला. तिथल्या चळवळीचे स्वरूप ध्यानात आले. औरंगाबादच्या कॉलेज हॉस्टेलमध्येही हैद्राबादच्या उस्मानअलीचे राज्य कायम राहो अशा अर्थाची प्रार्थना म्हणावी लागे यावच्चंद्रादिवाकरौउस्मानअली तुझे राज्य राहो या अर्थाने अल्लाची करूणा भाकावी लागे. याबरोबरच मुस्लिमेतर विद्यार्थ्यांनी जेवणाच्या अगोदर इथेही वंदेमातरम् म्हणायला सुरुवात केली.[१८८] हॉस्टेल सुपरिन्टेडंटने आक्षेप घेतला. प्राचार्यांनी हस्तक्षेप केला. विद्यार्थ्यांनी एक दिवस लाक्षणिक संप केला. पाठींबा देण्यासाठी हॉस्टेलबाहेरच्या विद्यार्थांनी संप पुकारला. त्या अगोदर ९ नोव्हेंबर १९३८ ला गोविंदभाई श्रॉफ आणि कर्वे गुरूजी या दोघांना कॉलेजातून काढून टाकले. ते उभयता विद्यार्थ्यांप्रिय शिक्षक होते. त्यांना संघटित करून त्यांच्यावर वैचारीक संस्कार करण्याचेही काम ते करीत. विद्यार्थ्यांनी १५ नोव्हेंबर पासून अन्न सत्याग्रह सुरू केला. प्राचार्य मोइन्नोद्दीन यांनी विद्यार्थ्यांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. हैद्राबादमध्ये हे गीत म्हणू दिले जात असेल तर इथेही म्हणू दिले जाईल असे प्राचार्यांनी आश्वासन दिले.[१८९] पण प्रश्न चिघळत गेला. मुले ठाम राहिली. शासनाने दडपशाही सुरू केली. वंदेमातरम्वर सार्वत्रिक बंदी टाकण्यात आली. संस्थानातील सर्व विद्यार्थी प्रतिकाराचा पवित्रा घेऊन मैदानात उतरले. ३० नोव्हेंबर १९३८ पासून हैद्राबाद मधील विद्यार्थ्यांनी संप सुरू केला.[१९०] वंदेमातरम् आंदोलन राज्यभर पसरले. नांदेड मधील हायस्कूलातील विद्यार्थ्यीही आंदोलनात सक्रिय होते.

उस्मानिया विद्यापीठाने वंदेमातरम् आंदोलनात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना रस्टीकेट केले. या विद्यार्थ्यांना राज्याबाहेर ब्रिटीश इंडियातील विद्यापीठात प्रवेश मिळवून देण्याचा प्रयत्न झाला. बनारस,

१८७. कित्ता, पृ. २९.

१८८. विजयेंद्र काबरा यांची प्रत्यक्ष मुलाखत, हैद्राबाद मुक्तिसंग्राम स्वातंत्र्य सैनिकांच्या मौखिक नोंदी, पूर्वोक्त, पृ. २३.

१८९. पुराभिलेख संग्रह, फाईल क्र. ९३/४८, पार्ट २ पृ. १ ते ५, राज्य पुराभिलेखागार हैद्राबाद, हैद्राबादच्या मंत्रालयातून औरंगाबाद तालुकदाराला आलेली तार.

१९०. भालेराव अनंत पूर्वोक्त, पृ. १५७.

अन्नमलाई, मद्रास या विद्यापीठांनी विद्यार्थ्यांना प्रवेश नाकारला. नागपूर विद्यापीठाच्या व्हाईस चॅन्सेलर केदार यांनी स्वतःच्या अधिकारात या विद्यार्थ्यांना प्रवेश दिला.[१९१] नागपूरला अशा प्रकारे शिक्षणासाठी गेलेल्या विद्यार्थ्यांत प्रत्यक्ष नांदेडमधील विद्यार्थी नव्हते कारण त्याकाळात नांदेडला कॉलेज नव्हते. औरंगाबाद आणि हैद्राबादमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांत नांदेडच्या काहींचा समावेश असण्याची शक्यता नाकारता येत नाही. या चळवळीने तरुण विद्यार्थ्यांत एक प्रकारची जागृती निर्माण झाली. या चळवळीतूनच अनेक कार्यकर्ते निर्माण झाले. मुक्ति आंदोलनातील कार्यकर्त्यांची एक भक्कम फळी नांदेड जिल्ह्यातही तयार झाली.

**संघटनात्मक कार्य :**—नांदेड जिल्ह्यातील संघटन कार्याचा प्रारंभ तसा नांदेड शहरातून झालेला दिसतो. नांदेड शहरात अर्थात त्या काळातल्या गावात उस्मानाशाही मिल ही कापडगिरणी होती. असंख्य मजूर या गिरणीत कामावर होते. या कामागारांना संघटित करण्याचे काम कम्युनिस्ट कार्यकर्ते कॉम्रेड व्ही. डी. देशपांडे करू लागले. त्यांच्या प्रयत्नांतून कामगार संघटित होऊ लागला. याच काळात येथे उस्मानशाही मिल कामगारांचा संप झाला. त्यांच्यावर खटले भरले गेले. मजुरांचे मोर्चे निघाले. घोडेस्वार पोलिसांनी मोर्चावर लाठीमार केला. धरपकड झाली. येथील मिलमध्ये कम्युनिस्ट प्रभाव वाढला. काही मुस्लिम नेतेही उदयाला आले. नांदेडमध्ये कम्युनिस्ट पक्षाची रितसर स्थापना याच काळात कॉम्रेड व्ही. डी. देशपांडे यांनी केली.[१९२] त्याचबरोबर ते महाराष्ट्र परिषदेचेही कार्य करीत असत. महाराष्ट्र परिषदेचे पहिले कार्यकर्ते म्हणून लातूरचे राघवेंद्र दिवाण नांदेड जिल्ह्यात हिंडले. त्यांनी सुरुवातीला नांदेड जिल्ह्यात महाराष्ट्र परिषदेचे चांगले संघटन केले. त्यानंतर ते लातूरला परतले व नांदेड परिसरात कॉम्रेड देशपांडेनी परिषदेच्या कार्याची धुरा सांभाळली. धर्माबाद, उमरी, मुधोळ परिसरात उस्मानाबादचे व्यंकटेश बापूजी जोशी हे महाराष्ट्र परिषदेचे कार्य करीत असत. परिषदेचे उमरी अधिवेशन हे अशा कार्यकर्त्यांच्या संघटित प्रयत्नांचे फलित होते हे लक्षात ठेवले पाहिजे. १९३९-४० चा हा काळ म्हणजे दुसऱ्या महायुद्धाच्या सुरुवातीचा काळ होय. निजामशासनाची दडपशाही सुरूच होती. युद्ध प्रयत्नाचा भाग म्हणून सक्तीची लेव्ही वसुली सुरू होती. असंतोष खदखदत होता. महाराष्ट्र परिषदेचे कार्यकर्ते पुजाप्पा जंगम यांनी हदगाव तालुक्यात तामसा, उमरा, धानोरा, वाढोणां या विभागात लोकांना संघटित करायला सुरुवात केली होती. अन्नधान्याचा तुटवडा भासू लागला. लोकांना खायला अन्न नाही आणि तामसा गोदामात मात्र सक्तिने वसूल केलेले धान्य साठवलेले. लोकांचा असंतोष अनावर झाला आणि तामसा गोदाम लुटण्याचा प्रयत्न झाला.[१९३] दुसऱ्या महायुद्धाच्या धामधुमीच्या काळात नांदेड परिसरात घडलेली ही लक्षणीय घटना. तामसा येथील अनेक लोकांवर खटले भरले गेले. गोपाळराव लाटकरांनी लोकांच्या बाजूने वकीली करून केसेस लढवल्या.

अशा रितीने नांदेड परिसरात संघटनात्मक कार्य सुरू झाले खरे पण त्याला आवश्यक ते बळ मिळाले नाही. संघटनात्मक कार्याला गती देणारा मध्यम वर्गच या परिसरात अजून निर्माण झालेला

---

१९१. पुराभिलेख संग्रह, फाईल क्र. ६६४/व्हॉल्यूम II, राज्य पुराभिलेखागार, हैद्राबाद, पूर्वोक्त, पृ. ३८.

१९२. रांजणीकर रघुनाथ, पूर्वोक्त, पृ. ३८.

१९३. कित्ता, पृ. ३८-३९.

नव्हता. एकूण हैद्राबाद राज्याचीच अशी परिस्थिती होती. राजकीयदृष्ट्या जागरूक असे काही लोक होते. काँग्रेसच्या विचारसरणीचा प्रभाव होता. आर्यसमाजाचे कार्य सुरू होते. हिंदुमहासभेचे काही कार्यकर्ते होते. पण हे सारे अगदी नाममात्र स्वरूपात असल्याने या काळात तरी संघटनात्मक कार्याला आवश्यक ती गती आली नाही. तरीही संघर्ष उभा राहिला. वैयक्तिक सत्याग्रह झाला. महात्मा गांधींनी वैयक्तिक सत्याग्रहांसाठी २१ पैकी पाच सत्याग्रहींची निवड केली. त्यामध्ये बीडचे मोतीलाल मंत्री, हिरालाल कोटेचा, उस्मानाबादचे देवरामजी चव्हाण औरंगाबादचे अच्युतभाई देशपांडे यांचा समावेश होता. या काळात अनेक कार्यकर्त्यांच्या झडत्या होऊन त्यांना अटक केली जाई. याच काळात रा. भी. हेमाद्री, डी. एच. देसाई, रेड्डी, हनुमंतय्या आणि चारठाणकर यांनाही अशी अटक करण्यात आली होती.[१९४]

**१९४२ च्या आंदोलनाचे पडसाद :**—हैद्राबाद राज्याच्या भोवतीचा पोलादी पडदा कितीही भक्कम असला तरी ब्रिटीश इंडियातील आंदोलनाचे वारे राज्यात येत होतेच. १९४२ च्या चलेजाव आंदोलनाचेही असेच पडसाद राज्यात उमटले. स्वामी रामानंद तीर्थांनी या आंदोलनाच्या दृष्टीने संघटन कार्य सुरू केले. राज्यातल्या जनतेने निष्ठेने या आंदोलनात भाग घ्यावा. असा त्यांचा आग्रह होता. १६ ऑगस्ट १९४२ ला स्वामीजींना नामपल्ली स्टेशनवर अटक करण्यात आली. अन्य ३० नेतेही पकडण्यात आले.[१९५] चलेजाव चळवळीचा प्रभाव नांदेड परिसरातही जाणवला. उमरी येथून मोहन शर्मा, मल्लीकार्जुन बर्डे आणि बारूआ यांनी सत्याग्रह केला. खुद्द नांदेड गावात सिताराम पप्पु, अच्युतराव खोडवे, चिंतामणी महाराज यांनी आंदोलन केले. संपतराय आणि त्यांचे भाऊ गणपतराय, रघुपतीराय हे सक्रिय होते. नांदेडला पोस्ट ऑफीस होते ते इंग्रजांच्या देखरेखीतले. त्याच्यावर हल्ला करायचे ठरले. पोस्ट ऑफीस जाळण्याचा प्रयत्न झाला. पोस्टाच्या पेट्या जाळल्या. हा १९४२ च्या आंदोलनाचा भाग होता.[१९६] प्रत्यक्षात छोडो भारत प्रमाणेच हैद्राबादेत छोडो हैद्राबादच्या घोषणा देण्यात आल्या. याचा अर्थ ब्रिटीशांनी भारत सोडावा व भारताला स्वातंत्र्य द्यावे त्याचप्रमाणे हैद्राबाद सोडावे व निजामाच्या या राज्यालाही स्वातंत्र्य द्यावे म्हणजेच हैद्राबाद आझाद करावे अशी ही भूमिका होती. त्या भूमिकेतून काही मंडळींनी छोडो हैद्राबादचा नारा दिला.[१९७]

**आझाद हैद्राबादचा प्रयत्न आणि प्रतिक्रिया :**—हैद्राबादच्या राजकारणाची पावले आझाद हैद्राबादच्या दिशेने पडू लागली होती. हैद्राबादचा निजाम " हिज् एक्झाल्टेड हायनेस " अशा किताबाने सन्मानित होता आणि इंग्रजांचा मोस्ट फेथफूल ॲली म्हणून ओळखला जात होता. राज्यातली इत्तेहादूल मुसलमीन ही संघटना निजामाची पाठराखण करीत होती. बहादूरयार जंग यांनी इत्तेहादूलचे अध्यक्ष या नात्याने संघटनेचा विस्तार केला. मुघल परंपरेचा वारसा सांगत हैद्राबादचे स्वतंत्र अस्तित्त्व टिकविण्याचा उद्योग सुरू केला. कासीम रझवीच्या अध्यक्षपदाच्या काळात इत्तेहादूल मुसलमीन ही संघटना अधिकच कडवी बनली. रझाकार नावाची निमलष्करी संघटना कासीम रझवीने उभी केली

---

१९४. एन्. रमेशन्, **दि फ्रीडम स्ट्रगल इन् हैद्राबाद**, हैद्राबाद स्टेट कमिटी, हैद्राबाद, पृ. १८५.

१९५. कित्ता, पृ. १८८.

१९६. सिताराम पप्पू यांची प्रत्यक्ष मुलाखत, हैद्राबाद मुक्तिसंग्राम, पूर्वोक्त, पृ. १९४.

१९७. रांजणीकर रघुनाथ, पूर्वोक्त, पृ. ४२.

आणि राज्यात दहशत निर्माण करायला प्रारंभ झाला. रझाकारांचे अतिरेकी गट कार्यरत राहिले. रझाकारांच्या सशस्त्र हल्ल्यांपासून संरक्षण करण्यासाठी हैद्राबाद राज्यातील सामान्य रयतही आता अधिकाधिक लढाऊ बनत चालली होती. १९४२ नंतर मुक्ति आंदोलन हळु हळु व्यापक बनत गेले. त्याला कारणही तसेच होते. १५ नोव्हेंबर १९४५ ला प्रांतिक परीषदांच्या कार्यकारी मंडळाचे संमेलन आयोजिले गेले. आंध्र महासभा, कर्नाटक परिषद आणि महाराष्ट्र परिषद या प्रांतिक परिषदांनी संघटितरित्या काम करावयाचे ठरवले. हैद्राबाद पिपल्स कॉन्फरनसचे बळ वाढले. त्या संघटनेच्या घटनेचा मसुदा मान्य झाला. हैद्राबादमुक्ती आंदोलन अधिक संघटितपणे उभे राहिले. प्रांतिक परिषदांचे सामर्थ्य वाढले होते ते आता सारे सामर्थ्य एकवटू लागले. महाराष्ट्र परिषदेच्या सदस्यांची संख्या १५००० च्या वर गेली. १९४५ च्या अखेरीस नांदेड जिल्ह्यातील परिषदेच्या सदस्यांची संख्या ३११० होती तर जिल्ह्यात २८ स्थानिक समित्या कार्यरत होत्या.[१९८] तसे पाहिले तर १९४३ पासूनच महाराष्ट्र परिषदेत जहाल गट प्रभावी बनत चालला होता. नांदेडमध्ये शामराव बोधनकर, गोपाळशास्त्री देव व भगवानराव गांजवे हे त्रिकूट आघाडीवर होते.[१९९]

३ जुलै १९४६ ला हैद्राबाद स्टेट काँग्रेसवरील बंदी उठविण्यात आली.[२००] ही बंदी उठवण्यास भारतातील एकूण राजकीय परिस्थिती कारणीभूत होती हे लक्षात घेतले पाहिजे. क्रिप्स मिशन प्लॅन येऊन गेला होता. भारतातील ५६३ राज्यांमध्ये जबाबदार शासन यंत्रणा उभारण्यावर भर दिला जाऊ लागला होता. उदयपूर अधिवेशनात अखिल भारतीय काँग्रेसने हैद्राबाद संस्थानातील परिस्थितीची दखल घेतली. लोकमताचा रेटा वाढत गेला. १५ सप्टेंबर १९४५ ला राज्यातील सर्वच संघटनांवरील बंदी उठविण्यात आली. १९४६ ते १९४८ या काळात हैद्राबादचा लढा अधिक तीव्र होत गेला व त्यातून एक प्रकारचा निर्णायक रोमहर्षक लढा दृष्टीपथात येत होता.[२०१]

इत्तेहादूल मुसलमीन आणि त्याची रझाकार संघटना तर निजामाचे इश्वरदत्त राज्य हक्क संरक्षीत ठेवण्यास वचनबद्ध होती. इत्तेहादूल मुसलमीनचे अध्यक्ष बहादूर यार जंग तर स्वतःच राज्यकर्ते असल्याच्या भ्रमात वावरत होते. मुघल सत्तेच्या हैद्राबाद राज्यातला वारसा टिकवायचा म्हणजे आझाद हैद्राबादचे स्वप्न वास्तवात आणावयाचे या भूमिकेतूनच इत्तेहादूल आणि रझाकार चळवळीची वाटचाल चालू होती. हैद्राबादच्या निजामाची भूमिकाही या वाटचालीला पूरक होती. त्याने आपली भूमिका पुढील शब्दात स्पष्ट केली, तो म्हणतो, "हिंदू मुस्लिम हे माझे दोन डोळे आहेत. त्यांचे संरक्षण करणे, हित पाहणे माझे कर्तव्य आहे. मी पाकिस्तानात जाणे हिंदूंना आवडणार नाही तर हिंदूस्थानात विलीन होणे मुस्लिमांना मानवणार नाही म्हणून माझाही आग्रह आझाद हैद्राबादसाठी राहिल."[२०२] हा इरादा निजामाने ११ जून च्या फर्मान-ए-मुबारक मधून जाहीर केला होता.[२०३]

---

१९८. रमेशन् एन्, पूर्वोक्त, पृ. २७७.

१९९. धारूरकर, पूर्वोक्त, पृ. ६०.

२००. फ्रिडम स्ट्रगल कमिटी, फ्रिडम स्ट्रगल इन् हैद्राबाद व्हॉल्यूम ४, पृ. २०६.

२०१. धारूरकर, पूर्वोक्त, पृ. ६१-६२.

२०२. रांजणीकर रघुनाथ, पूर्वोक्त, पृ. ५५.

२०३. रमेशन् एन्, पूर्वोक्त, पृ. २०८.

आझाद हैद्राबादच्या वाटचालीच्या अनुषंगाने निजामाने मीर नबाब जंग यांना आपला एजंट जनरल म्हणून लंडनला पाठवले. ब्रिटीश राज्यकर्तेही आझाद हैद्राबादच्या संकल्पनेला साथ देऊ लागले. दरम्यान मुस्लिम लिगने हैद्राबाद राज्यात डायरेक्ट ॲक्शनचा कार्यक्रम जारी करून राज्याच्या आझादीचे संरक्षण करण्यासंबंधीची पत्रक वाटली.[२०४] या पार्श्वभूमिवर हैद्राबाद राज्यातील सामान्य रयतेचा संघर्ष उभा राहिला. कासीम रझवीच्या रझाकार संघटनेचे अत्याचार दिवसेंदिवस वाढत चालले. त्याने जारी केलेला ३२ कलमी कार्यक्रम अत्यंत भयावह होता.

**संघर्षाचे अंतिम पर्व :**—या पार्श्वभूमिवर १६ ऑगस्ट १९४६ रोजी स्टेट काँग्रेसची बैठक हैद्राबादला संपन्न झाली. काँग्रेसमधला जहाल गट प्रभावीपणे सक्रिय झाला. रझाकारांच्या आक्रमक पवित्र्यामुळे आता जीवनमरणाचा अंतिम संघर्ष पुढे दिसत होता. १९४६ च्या अखेरीस महाराष्ट्र परिषदेचे हैद्राबाद स्टेट काँग्रेसमध्ये विलीनीकरणे झाले.[२०५] हैद्राबाद स्टेट काँग्रेसचे पहिले अधिवेशन मुझीराबाद येथे १६ ते १८ जून या काळात संपन्न झाले. स्वामी रामानंद तीर्थांची स्टेट काँग्रेसचे पहिले अध्यक्ष म्हणून निवड झाली.[२०६] त्यांनी या अधिवेशनातच निजामाच्या आझाद हैद्राबाद विरुद्धच्या आणि प्रस्तावित स्वतंत्र भारतातल्या हैद्राबादच्या विलीनीकरणाच्या अंतिम लढ्याचे रणशिंग फुंकले. १९४६ ते १९४८ लढा तीव्र झाला. स्टेट काँग्रेसच्या कृतीसमितीने लढ्याचे नियंत्रण केले. मुक्ति आंदोलनाचा अंतिम लढा सुरू होताच शासनाने लढा दडपून टाकण्याचा प्रयत्न केला. शेकडो कार्यकर्ते तुरुंगात डांबले गेले पण शेकडो कार्यकर्ते भूमिगत झाले आणि लढा सुरू राहिला.

या अंतिम पर्वात अनेक रोमहर्षक संघर्ष झाले. परिषदांची अधिवेशने झाली. शेतकऱ्यांचे, विणकरांचे प्रश्न हाती घेतले गेले. किसान आणि विद्यार्थी मेळावे घेतले गेले. अहिंसेवर नितांत श्रद्धा असणाऱ्या कार्यकर्त्यांनीही शेवटी शस्त्र हाती घेतले आणि " बंदुका ठासून भरल्या तर भयाची गरज नाही " हा विश्वास जागवला.[२०७] बॉर्डर कॅम्प उभे राहिले. सशस्त्र लढ्याचे रणशिंग फुंकले गेले. सशस्त्र लढ्याबरोबरच अहिंसक सत्याग्रही आंदोलनही सुरू राहिले. १५ आणि १६ मे १९४६ रोजी लातूरला महाराष्ट्र परिषदेचे सहावे आणि शेवटचे अधिवेशन झाले. अध्यक्षपदी विराजमान असलेल्या झुंझार पत्रकार, आ. कृ. वाघमारेंनी अत्यंत आक्रमकपणे आझाद हैद्राबाद या संकल्पनेवर हल्ला चढवला. राज्यातली ८५ टक्के रयत आझाद हैद्राबादच्या विरुद्ध आहे व संकल्पित स्वतंत्र भारतात विलीन होण्यास उत्सुक आहे ही बाब ठोसपणे मांडण्यात आली. हैद्राबाद मुक्ती आंदोलनाचे हे विलिनीकरण लढ्याचे स्वरूप अधिकाधिक स्पष्ट होत गेले ते दोन वर्षातल्या घडामोडीतून. मुक्ति आंदोलनातून, आर्य समाजापासून ते साम्यवादी कम्युनिस्ट वैचारिकते पर्यंतचे सारे वैचारीक प्रवाह मुक्ती आंदोलनाच्या मुख्य प्रवाहात विरून गेले. निदान तसा आभास तरी काही काळ निर्माण झाला.

---

२०४. रांजणीकर रघुनाथ, पूर्वोक्त, पृ. ५७.

२०५. पुराभिलेखीय संग्रह, एस.आर.टी. पेपर्स, स्वामी रामानंद तीर्थ संशोधन संस्था, औरंगाबाद, पृ. २४२.

२०६. धारूरकर, पूर्वोक्त, पृ. ६४.

२०७. कुरूंदकर,नरहर, साहित्य परिषदा-एक अवलोकन, वासंतिक पाक्षिक पुणे, १९७३, पृ. ८४

**परिसरातील घडामोडी :**—दुसऱ्या महायुद्धामुळे सर्वत्र टंचाई भासत होती. त्यातच सरकारने सक्तीची लेव्ही वसुली सुरू केली. या सक्तीच्या धान्य वसुलीमुळे शेतकरी हवालदिल झाले होते. नांदेड जिल्ह्यातल्या मुदखेड जवळ मेंडक्याला शेतकऱ्यांच्या असंतोषाचा उद्रेक झाला. मुदखेड सर्कलमधील इजळी या सुखवस्तु गावात कर तहसिलदाराने जेव्हा ज्वारी जप्त करण्यासाठी शेतकऱ्यांच्या घराच्या झडत्या घेतल्या तेव्हा तर प्रचंड असंतोष पेटला. तहसिलदाराचा दौरा चिकाळ्याकडे निघाला असतांना शेतकऱ्यांनी त्याच्यावर प्राणघातक हल्ला केला.[२०८] या प्रकरणात वीस बावीस जणांना अटक होऊन चार जणांना फाशीची शिक्षा तर आठ जणांना जन्मठेपेची सजा ठोठावण्यात आली. बाकीच्यांना दहा वर्षाचा तुरूंगवास झाला.

**गोविंदराव पानसरेंचे हौतात्म्य :**—गोविंदराव पानसरे हे एक निष्ठावंत गांधीवादी कार्यकर्ते. नांदेड जिल्ह्यातील मुधोळ आणि बिलोली तालुके हे त्यांचे मुख्य कार्यक्षेत्र. महाराष्ट्र परिषदेचे ते सक्रिय कार्यकर्ते. शासनाच्या अत्याचाराविरुद्ध लोकांना संघटित करणे भ्रष्टाचाराची प्रकरणे उघडकीस आणून त्याचा पाठपुरावा करणे अशाप्रकारचे कार्य गोविंदराव करीत.[२०९] त्याकाळातली निजामी राजसत्ता रझाकारांमार्फत अशा कार्यकर्त्यांवर दहशत प्रस्थापित करी. गोविंदराव मात्र अशा दहशतीला भीक घालीत नसत. निधड्या छातीने ते प्रकरणाच्या मुळाशी जात. त्यांना संपवण्याचा कटच रझाकारांनी रचला असावा. अर्जापूर जवळ त्यांची बैलगाडी अडवण्यात आली व त्यांच्यावर प्राणघातक हल्ला झाला. २१ ऑक्टोबर १९४६ ची ही पहिली आहुती पडली. या हौतात्म्याचे खूप दूरवर पडसाद उमटले. संघर्ष पेटत गेला.

**दत्ता उत्तरवारांचे बलीदान :**—गोविंदराव पानसरे या निष्ठावंत गांधीवादी कार्यकर्त्याच्या खुनाचे पडसाद विरतात न विरतात तोच उमरी येथील एका आर्यसमाजी कार्यकर्त्याचे बलीदान झाले. हैद्राबाद स्टेट बँकेच्या उमरी शाखेतील पहारेकरी असलेल्या एका अरबाने २२ डिसेंबर १९४६ च्या सायंकाळी दत्ता उत्तरवारांवर प्राणघातक हल्ला केला. उमरी बाजारपेठेत रझाकार गुंडांचा धुमाकूळ चालु असे. दत्ता उत्तरवार, शंकर शर्मा सारखे आर्यसमाजी कार्यकर्ते वेळप्रसंगी सामान्य रयतेच्या मदतीला धाऊन येत. अशाच एका प्रसंगी किरकोळ कारणावरून रझाकारांनी शंकर मंगळाजी यांच्या दुकानावर भांडण उकरून काढले आणि प्रकरण चिघळले. दत्ता उत्तरवार धावून आले. रस्त्यातच अरबाने त्यांचेवर बंदूक झाडली. आणि त्यांची प्राणज्योत मालवली. या प्रकरणानंतर पोलिसांनी रझाकारांवर कोणतीही कृती न करता गावातल्या सक्रिय आर्यसमाजी कार्यकर्त्यांना तुरुंगात डांबले. काँग्रेस कार्यकर्तेही पकडले गेले. धनजीभाई पुरोहीत हे मुधोळ तालुका काँग्रेसचे अध्यक्ष. त्यांच्यासह इतर अनेकांच्या घराच्या झडत्या घेतल्या गेल्या. भूमिगत कार्यकर्त्यांच्या ताब्यातली शस्त्रास्त्रे जप्त केली.

**अर्जापूरचा बेधूंद गोळीबार :**—६ जानेवारी १९४७ रोजी अर्जापूरला एक जाहीर सभा आयोजिली गेली. गोविंदराव पानसरेंवर प्राणघातक हल्ला करणाऱ्यांना शासन व्हावे या मागणीसाठी

---

२०८. रांजणीकर रघुनाथ, पूर्वोक्त, पृ. ४६.

२०९. विठ्ठलराव रत्नाळीकर यांची प्रत्यक्ष मुलाखत, हैद्राबाद मुक्ति संग्राम, पूर्वोक्त, पृ. ३४२.

आणि रझाकारांच्या वाढत्या अत्याचाराचा निषेध म्हणून ही सभा घेण्यात आली. सभेला यात्रेचे स्वरूप आले होते. नांदेडमधल्या कार्यकर्त्यांनी विशेषतः नायगावच्या गंगाराम बेळगे, नांदेड-धर्माबादच्या रांजणीकर रत्नाळीकरांनी, अनंत भालेरावांनी गावोगाव हिंडून या सभेसाठी वातावरण निर्मिती केली होती. ज्या ठिकाणी पानसरेंवर प्राणाघातक हल्ला झाला होता त्याच ठिकाणी भव्य व्यासपीठ उभारले होते. हजारो लोक सभास्थानी जमले. सरकारने ऐनवेळी सभेच्या ठिकाणी जमावबंदी जारी केल्याचे फर्मान काढले. लोकांना हुसकावण्याचा प्रयत्न झाला. वातावरण तापले. पोलिसांनी निःशस्त्र जमावावर बेछूट गोळीबार केला. शेकडो माणसे जखमी झाली. काही मृत्युमुखी पडले तर काही कायम अपंग झाले.[२१०] या गोळीबाराचे तीव्र पडसाद नांदेड परिसरात उमटले.

**किरंगुळ शेतकऱ्यांचा लेव्ही विरुद्धचा लढा :**—नांदेड जिल्ह्यातल्या बासरजवळचे किरंगुळ हे सधन गाव. दोनशे उंबरठ्याची वस्ती. गोदाकाठची सुपीक जमीन. येथे शासनाच्यावतीने सक्तीची लेव्ही वसुली सुरू होती. काँग्रेस कार्यकर्त्यांनी शेतकऱ्यांची बैठक घेऊन त्यांना संघटित केले. पोलिसांच्या आणि लेव्ही वसुली पथकाच्या कचाट्यातून सुटण्याचे संघटित प्रयत्न केले. धान्य लपवून ठेवले. पुरूष मंडळींनी शेताचा आसरा घेतला. गावावर पोलिसांनी छापे घातले. गाडगे मडके धुंडाळले. हाती काहीच लागले नाही. चार दिवसाच्या छाप्यानंतर पंधरा वीस पोती लेव्ही वसूल झाली. पोलिसांनी मिळेल त्याला अटक केली. अत्याचाराची परिसिमा गाठली गेली. सरकारी कामात अडथळे आणले म्हणून अनेकांना अटक झाली. हैद्राबादहून व्ही.बी.राजू यांनी या भागाला भेट दिली. लोकांना धीर दिला. स्वामी रामानंद तीर्थांनी शेतकऱ्यांच्या या आंदोलनाला सामर्थ्य दिले. लेव्ही वसुल करणे सरकारला कठीण जाऊ लागले. हैद्राबाद शासनाविरुद्ध सर्व प्रकारचा असहकार सुरू झाला.

**भारतीय स्वातंत्र्य दृष्टीपथात :**—जून १९४७ मध्ये हैद्राबाद स्टेट काँग्रेसचे पहिले अधिवेशन संपन्न झाले. त्याच महिनाअखेर सोलापूर येथे स्टेट काँग्रेसची बैठक झाली. अंतिम संघर्षाची रूपरेषा ठरली. कृतीसमिती नेमण्यात आली. दरम्यान भारतीय स्वातंत्र्य दृष्टीपथात आले. हैद्राबादच्या निजामाने तात्पुरता जैसे थे चा करार केला. स्वतंत्र भारतात विलीन न होता ज्या पद्धतीने हैद्राबाद राज्याचे इंग्रजांशी संबंध होते तसेच स्वतंत्र भारत सरकारशीही राहतील अशा स्वरूपाचा हा जैसे थे चा करार होता. स्वामी रामानंद तीर्थांनी १ ऑगस्ट १९४७ च्या परिपत्रकात स्पष्टच म्हटले की "संघराज्यात सामील होण्यासाठी सर्वांनी एकदिलाने प्रयत्न करावे लागणार आहेत."[२११] वाटते तितके हे सोपे नव्हते.

१५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र होणार या पार्श्वभूमिवर हैद्राबादच्या निजामाने राज्यातल्या रयतेवर अनेक निर्बंध लादले. सभा बंदी, भाषण बंदी, हिंदी संघराज्याच्या म्हणजेच तिरंगा झेंड्यावर बंदी अशा अनेक प्रकारच्या बंदी लादणारे फर्मान काढले गेले. स्वतंत्र होऊ घातलेल्या भारताचा तिरंगा ध्वज हा हैद्राबाद राज्यात परकीय ध्वज ठरवला जाऊन तो ध्वज फडकवणाऱ्यास राजद्रोही मानले गेले. अशा अवस्थेत स्वतंत्र भारतात विलीन होऊ इच्छिणारी राज्यातली ८५% जनता अधिकाधिक अस्वस्थ होत गेली. असंतोष भडकत गेला. विलिनीकरणाच्या मागणीने उग्र अशा आंदोलनाचे रूप

---

२१०. पुराभिलेखीय संग्रह, कमिटी रिपोर्ट, एस.आर.टी. पेपर्स, पूर्वोक्त.

२११. स्वामी रामानंद तीर्थ, पूर्वोक्त, पृ. १०८.

Maharashtra State Gazetteers

धारण केले. काँग्रेसने एक व्यापक असा कार्यक्रम जाहिर केला. भाषण बंदी सभाबंदी मोडणे, आझाद हैद्राबाद विरोधी ठराव करणे. भारतीय संघराज्यात सामिलीकरणाचा ठराव करणे, तत्संबंधीच्या तारा केंद्र सरकारला करून बहुसंख्य रयतेचे लोकमानस स्पष्ट करणे. बंदी हुकूम मोडून तिरंगाध्वज फडकवणे अशा अनेक गोष्टींचा समावेश या कार्यक्रमात होता. त्याचबरोबर रझाकारांच्या अत्याचाराचा प्रतिकार करण्यासाठी म्हणून सशस्त्र संघर्षही सुरू होता. हैद्राबादचे मध्ययुगीन सरंजामी बेजबाबदार प्रशासन अधिकाधिक खिळखिळे करण्यासाठी करोडगिरी नाके उद्ध्वस्त करणे, राज्याच्या उत्पन्नाचे साधन असलेल्या शिंदीची झाडे तोडणे व त्याअनुषंगाने जंगल सत्याग्रह करणे अशाही चळवळी सुरूच होत्या.

**हैद्राबादची रयत मात्र पारतंत्र्यातच राहणार :**—इंग्रजांनी भारत सोडून जायचे ठरवले व त्यांच्या ताब्यात असलेल्या भारताला स्वातंत्र्य मिळणार ही गोष्ट स्पष्ट झाली. त्याचबरोबर भारतातल्या ५६५ राजांनाही इंग्रजांनी स्वातंत्र्य द्यावयाचे ठरवले. याचा अर्थ हैद्राबादच्या निजाम उस्मान अलीला स्वातंत्र्य मिळणार होते परंतु हैद्राबाद राज्यात राहणारी सामान्य रयत बेजबाबदार सरंजामी अशा मध्ययुगीन राजेशाहीच्या पारतंत्र्यातच राहणार होती. साहजिकच जेव्हा १५ ऑगस्ट १९४७ ला भारताला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा या स्वातंत्र्य प्राप्तीचा निखळ आनंद नांदेड परिसरातील लोकांना उपभोगता आला नाही. साऱ्या हैद्राबाद राज्यातच पोलिसांचा, रझाकारांचा ससेमिरा चुकवत तिरंगा फडकवण्याचे प्रयत्न झाले. तिरंगा फडकवणाऱ्या कार्यकर्त्यांना राज्यद्रोही ठरवून तुरुंगात डांबण्यात आले. विलिनीकरण दिन म्हणून हा दिवस साजरा झाला. या दिवशी ३६२१ लोकांना अटक झाली.[२१२] रझाकारांनी हा दिवस आझाद हैद्राबाद दिन म्हणून साजरा केला.

हैद्राबाद शहरात स्वामी रामानंद तीर्थ, डॉ. मेलकोटे आणि कृष्णाचारी यांनी तिरंगा ध्वज फडकवून सभा घेतली तेव्हा त्यांना अटक करून चंचलगुडा जेलमध्ये ठेवण्यात आले. विद्यार्थ्यांची एक प्रचंड मिरवणूक सुलतान बाजारातून निघाली. उस्मानिया विद्यापीठावर तिरंगा फडकवण्याचा प्रयत्न झाला. त्यानिमित्त पोलिसांची धावपळ, लाठीमार, पकडापकडी झाली. अनेक कार्यकर्ते पकडले गेले. राज्यभर हिच परिस्थिती होती. स्वातंत्र्य दिनानंतर हैद्राबाद शहरात असलेल्या ब्रिटीश रेसिडेन्टला निरोप देण्यात आला. हैद्राबाद राज्यातला इंग्रजांचा अप्रत्यक्ष प्रभाव संपला. निजामाने जैसे थे चा करार केल्यामुळे इंग्रज रेसिडेन्टच्या ऐवजी आता स्वतंत्र भारताचा प्रतिनिधी हैद्राबादेत नेमला जाणार होता. काही दिवसातच एजंट जनरल म्हणून के.एम.मुन्शी हैद्राबादेत रूजू झाले ते भारतचे प्रतिनिधी म्हणूनच. राजकीय पातळीवर हैद्राबादचा निजाम आणि स्वतंत्र भारत सरकार यांच्यामध्ये वाटाघाटीचे गुऱ्हाळ सुरू राहिले. सामान्य रयत पारतंत्र्यातच खितपत पडली. अत्याचाराने परिसिमा गाठली. सशस्त्र लढ्याने सामान्य रयतेचा आत्मविश्वास काही प्रमाणात जागवला. नागपूर, मुंबई, मद्रास, विजयवाडा, सोलापूर, गदग, वाशीम, उमरखेड आदी ठिकाणी हैद्राबाद मुक्ती आंदोलनाची कार्यालये सुरू झाली. हजारो माणसे निर्वासित म्हणून हैद्राबाद राज्यातून बाहेर पडु लागली. असंख्य कार्यकर्ते भूमिगत झाले. बॉर्डर कॅम्प मधून सशस्त्र लढ्याचे संयोजन होऊ लागले.

---

२१२. पुराभिलेखीय कागद, **हैद्राबाद स्टेट काँग्रेस पुस्तीका**, पृ. ३१७, एस.आर.टी. पेपर्स, पूर्वोक्त.

**झेंडा प्रकरण :**—१५ ऑगस्ट १९४७ रोजी नांदेडच्या रेल्वे स्टेशनवर तिरंगा फडकवण्यात आला. रझाकार पुढाऱ्यांनी याबद्दलचा तंटा उपस्थित केला. रेल्वे ही निजाम स्टेट रेल्वे होती. रेल्वेची उभारणी हैद्राबाद राज्याने केली होती अशी त्यांची भूमिका. रेल्वे ही केंद्र सरकारच्या अखत्यारीतली बाब, या रेल्वेला राज्याबाहेर येण्यास बंदी लादल्यास दळणवळण खुंटेल याची जाणीव झाल्यावर तणाव कमी झाला. पोस्ट ऑफीस हे इंग्रजाच्या अखत्यारीतले. इंग्रज गेले तेव्हा ते पोस्ट ऑफीस आता स्वतंत्र भारताच्या ताब्यात आले. तेथे तिरंगा लावला गेला तेव्हाही रझाकारांनी दंडेली केलीच. त्या तिरंगा शेजारी हैद्राबादचा असफीया झेंडाही लावला गेला. तात्पर्य केंद्रीय कार्यालयावर तिरंगा झेंडा लावला गेला इतरत्र मात्र या झेंड्यावर बंदी आली. काँग्रेस कार्यालयावरही झेंडा फडकत राहिला.

लढ्याचा अंतिम टप्पा आता सुरू झाला होता. स्वामी रामानंद तीर्थांनी काँग्रेस कार्यकारिणीच्या जागी पाच जणांची एक कृतिसमिती नेमली. दिगंबरराव बिंदू, गोविंददास श्रॉफ, जे प्राणाचार्य, डॉ. जी. एस. मेलकोटे व जमलापूर केशवराव हे त्या कृतीसमितीचे सदस्य होते. या कृतीसमितीने आता लढ्याचे मार्गदर्शन करावयाचे होते. भगवानराव गांजवे हे नांदेड जिल्ह्याचे जिल्हा प्रमुख म्हणून काम पाहू लागले. भूमिगत कार्यकत्यांचे एक जाळे नांदेड जिल्ह्यात कार्यरत होते. भूमिगतांची अनेक केंद्र होती. बारड, लहान, नागेली, येथले राजारामजी देशमुख, चिमणाजी पाटील, नाना पाटील, साहेबराव देशमुख बारडकर, आबासाहेब लहानकर हे सारेच सक्रिय होते. हदगाव तालुक्यातले वायपना पाथरी, आष्टी, वाळकी, कोष्टी वायपनाचे जयवंतराव यादवराव मास्तर, चांदबा पाटील अशी अनेक कार्यकर्ती मंडळी या अंतिम संघर्षाचे नेतृत्व करायला सरसावली. लोहा, कापसी, कंधार, देगलूर, बेटमोगरा या भागातही संघर्ष तीव्र बनत गेला.

अंतिम टप्प्यात साधारणतः जुलै, ऑगस्ट १९४७ पासूनच नांदेड परिसरातलेही वातावरण तापत गेले. विलिनीकरणाची मागणी जोर धरू लागली. त्याला विरोध म्हणून आझाद हैद्राबादची मागणी आणि तिरंगा ध्वजाला विरोधही मुस्लिम जमातवाद्यांकडून होऊ लागला. ९ ऑगस्ट १९४७ रोजी नांदेडमध्ये फार मोठी घटना घडून आली.[२१३] ही घटना नांदेडचे झेंडा प्रकरण म्हणून ख्यातकिर्त आहे. झाले असे की ईद निमित्त नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे ९ ऑगस्ट १९४७ या दिवशी १५ ते २० हजार लोकांची ईदची मिरवणूक निघाली. जुन्या नांदेडच्या इतवारा-सराफा भागातली ही घटना आहे. सराफ्यात त्याकाळी काँग्रेसचे कार्यालय श्यामराव बोधनकरांच्या दुमजली इमारतीत होते. या कार्यालयावर तिरंगा फडकत होता.

स्वतंत्र भारतात हैद्राबाद राज्याचे विलिनीकरण व्हावे यासाठी म्हणून ९ ऑगस्ट १९४७ हा दिवस संघराज्य समावेश दिन म्हणून साजरा करण्याचे ठरले होते. विलिनीकरणाला मुस्लिम जमातवाद्यांचा विरोध होता आणि त्यांचे आझाद हैद्राबादचे स्वप्न होते. या पार्श्वभूमिवर नांदेड शहरात तिरंगा झेंडा फडकत राहणे मग तो काँग्रेस कार्यालयावर का होईना हे मुस्लिम जमातवाद्यांना मान्य नव्हते. तेव्हा सराफ्यातील काँग्रेस कार्यालयावरील तिरंगा झेंडा उतरवला जावा त्याची सावली देखील इदच्या

२१३. कित्ता, फाईल क्र. ८६/PA-५६ फसली.

मिरवणुकीवर पडु नये असा आग्रह धरला गेला. वातावरण तापत गेले. साऱ्या गावभर तणाव पसरला. विलिनीकरणवादी आम जनता आणि आझाद हैद्राबादवादी मुस्लिम जमातवादी संघटना या उभयतांनी हा प्रश्न गांभिर्याने घेतला. दोन्ही बाजूने संघर्षाची तयारी ठेवली गेली. सराफ्यात बोधनकरांच्या गच्चीपासून आजूबाजूच्या सर्व गच्च्यांवर रायफल्सधारी कार्यकर्ते प्रतिकारार्थ तयार होते. कुठल्याही परिस्थितीत तिरंग्याचा अपमान सहन केला जाणार नाही या इर्षेने सारे प्रेरीत झाले होते. इदची मिरवणूक सराफ्यात शिरली आणि तिरंगा ध्वज खाली उतरवण्याचा आग्रह वाढत चालला. तणाव शिगेला पोहचला. तालुकदाराचे प्रयत्नही निष्फळ ठरले. शेवटी इत्तेहादूल मुसलमीनचे अखलाख हुसेन, यांनी परिस्थितीचे गांभीर्य ओळखले. झेंड्याभोवती भगवानराव गांजवे होते. अखलख हुसेन वर गच्चीवर आले त्यांनी आपली शेरवानी झेंड्यासमोर धरली आणि मिरवणुकीतील लोकांना पुढे सरकण्याचा संकेत दिला. हळुहळु तणाव निवळला. एक प्रचंड संघर्ष टळला. पोलिसांनी नंतर बळवंतराव बोधनकर, गणपतराव सरसर, श्यामराव बोधनकर, विनायकराव डोईफोडे यांच्यावर पकड वॉरंट काढले. श्यामराव बोधनकर यांना धाड घालून पकडण्याचा प्रयत्न झाला तो अयशस्वी ठरला. विनायकराव डोईफोडे यांना मात्र अटक झाली. ते पोलीस ॲक्शननंतरच सुटले.[२१४]

**जंगल सत्याग्रह :**—संघर्षाचे अंतिम पर्व सुरू झाले. सविनय कायदेभंग म्हणून जंगल सत्याग्रह झाले. नांदेड परिसरातील जंगल सत्याग्रहाने वातावरण चांगलेच तापवले. टेळकी, डोर्ली, कांडली, बारड, पाटणूर येथील जंगलसत्याग्रहांनी जनआंदोलनाचे नवे मानदंड प्रस्थापित केले. शेकडो स्त्रियांचा सहभाग लक्षणीय होता. पाटणूरच्या जंगल सत्याग्रहाची नोंद एक महत्त्वपूर्ण ऐतिहासिक आंदोलन म्हणूनच करावी लागेल. जंगल सत्याग्रह आंदोलनाचा आढावा घेण्याअगोदर जंगल सत्याग्रहामागची भूमिका समजून घ्यावी लागेल. हैद्राबाद राज्यात शिंदी आणि ताडाच्या झाडापासून तयार होणाऱ्या मद्यातून सरकारला खूप मोठा महसूल मिळे. त्यामुळेच संपूर्ण राज्यात ही झाडे तोडण्यास मनाई होती. अगदी खाजगी शेतीतील शिंदीची झाडे देखील तोडता येत नसत. काही ठिकाणी तर खास राखीव शिंदीबन असे. असेच एक मोठे शिंदीबन राखीव स्वरूपात पाटणूर परिसरात होते. कायदा मोडण्याचा सविनय कायदेभंगाचा हा प्रतिकात्मक सत्याग्रह होता. जनआंदोलनाने मात्र एवढे रौद्र रूप धारण केले की या राखीव जंगलातील हजारो झाडे तोडली गेली. मुदखेड सर्कल मधली हजार बाराशे मंडळी, बहुतांश शेतकरी, शेतमजूर आपल्या कुऱ्हाडी, फरश्या घेऊन पाटणूरच्या जंगलात जमली. जंगल सत्याग्रह होणार याची कुणकुण पोलिसांना होतीच. अमीन आपला पोलीस फौज फाटा घेऊन हजर झाला. पाटणूरचे जंगल स्टेट काँग्रेस झिंदाबादच्या नाऱ्याने दुमदुमून गेले. एक्क्या प्रचंड जनसमुदायासमोर पोलीस हतबल झाले. त्यांच्या साक्षीने हा जंगल सत्याग्रह झाला. पुढे पोलिसी सोपस्कार झाले. एफ.आय.आर. नोंदवला गेला. त्यात गुन्हेगार म्हणून वीस माणसांची नावे आणि इतर १२०० अशी नोंद आहे.[२१५] खरे सत्याग्रही भूमिगत झाले होते. पाटणूर परिसर हा भूमिगत कार्यकर्त्यांचा बालेकिल्ला बनला. पाटणूर, चिदगीर, आमठाणे भागातील जंगलात हे भूमिगत कार्यकर्ते आश्रयाला असत. चिदगीरच्या चंदू नायकाच्या तांड्यावरून त्यांना मदत मिळे.

---

२१४. रांजणीकर रघुनाथ, पूर्वोक्त, पृ. ६०.

२१५. कित्ता.

**डोर्लीचा गोळीबार :**—हदगाव तालुक्यात डोर्ली या गावी आजूबाजूच्या खेड्यातील असंख्य लोकांनी झेंडावंदनाचा आणि जंगल सत्याग्रहाचा कार्यक्रम ठरवला. जहागीर उमरी, पाथ्रड, सोनारी या गावातून लोकांचे लोंढेच्या लोंढे डोर्लीकडे निघाले. सप्टेंबरचा दुसरा आठवडा होता. ब्रिटीशांच्या पारतंत्र्यातून उर्वरित भारत स्वतंत्र होऊन तिकडे तिरंगा डौलाने फडकत होता. नांदेड जिल्ह्यात मात्र तिरंगा फडकवणे हा कायद्याने गुन्हा होता. तो गुन्हा सविनय करण्यासाठी लोक जमले होते. जमाव शांत होता. आक्रमकता कुठेही नव्हती. तामसा पोलीस ठाण्याचा अमीन आपल्या हत्यारबंद पोलिसांसह डोर्लीला आला. त्याने लोकांना धमकावून झेंडा उभारण्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. लोक ऐकण्याच्या मनःस्थितीत नव्हते. झेंडा फडकवला गेला.

पोलीसपार्टी आणि अमिन जवळच्या पांदीकडे गेले, आणि बेसावध जमावावर त्यांनी अचानकपणे गोळीबार सुरू केला. लोकांची पांगापांग झाली. गोळीबारात चौघांना हौतात्म्य आले. गणपत अमृते, संभाजी कांबळे, ईश्वर शिंदे आणि एक अल्पवयीन मुलगा हरी तुकाराम यांना वर्मी गोळ्या लागल्या आणि ते मृत्युमुखी पडले.[२१६] केवळ तिरंगाध्वज शांतपणे फडकवणे आणि सविनय कायदेभंग करणे हाच त्यांचा गुन्हा. जालीयनवाला बाग हत्याकांडासारखेच हे हत्याकांड हैद्राबादच्या पोलिसांनी केले तेही भारत स्वतंत्र झाल्यावर. इतर अनेक लोक या गोळीबारात जखमी झाले होते. उमरीच्या झुबा पाटलाच्या पोटात गोळी घुसली होती. नारायणराव अमृतेंनी डोर्लीहून त्यांना खांद्यावर घेऊन उमरखेडला दवाखान्यात दाखल केले. पावसाळ्यामुळे काळ्यारानात सगळीकडे चिखल होता त्यामुळे छकडा गाडी वापरता आली नव्हती. त्यामुळे जखमींना वेळेवर उपचार मिळणेही दूरापास्त होते. शांत आणि सत्याग्रही अशा जमावावर बेसावधपणे गोळीबार करून माणसे मारणाऱ्या या डोर्लीच्या घटनेचे तीव्र पडसाद सर्वत्र उमटले. लोकही ईषेला पेटले. कायदेभंग करून लोकांनी अटक करून घ्यायला सुरुवात केली.

दरम्यान सामान्य रयतेच्या जनआंदोलनाने रझाकारांच्या वाढत्या अत्याचाराला प्रतिकार म्हणून सशस्त्र लढा सुरू केला. बॉर्डर्सवर कॅम्प उभे राहिले. अनेक ठिकाणी कार्यालये उघडली. या कॅम्पवर स्वातंत्र्य सैनिकांना सशस्त्र संघर्षाचे प्रशिक्षण दिले जाऊ लागले. हैद्राबादची शासन यंत्रणा खिळखिळी करण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू झाले. रस्ते, पूल उखडणे, करोडगीरी नाके उध्वस्त करणे, सरकारशी संपूर्ण असहकार करणे. पाटील पटवारी आणि इतर सरकारी कर्मचाऱ्यांनी राजीनामा देणे अशा अनेक गोष्टी राज्यभर सुरू झाल्या. त्याचा प्रभाव नांदेड परिसरातही जाणवला.

**आंदोलनाचे व्यापक स्वरूप :**—१५ सप्टेंबर १९४७ पर्यंत राज्यभरात आंदोलनाने व्यापक स्वरूप धारण केले होते. हैद्राबाद राज्य पुराभिलेखागारातील उपलब्ध कागदपत्रातून तुरुंगात डांबलेल्या स्वातंत्र्य सैनिकांची प्रदेशवार संख्या उपलब्ध आहे. त्यानुसार मराठवाड्यातून १५१७, तेलंगणातून १३३८ तर कर्नाटकातून ५१६ सत्याग्रहींना अटक झालेली दिसते. हैद्राबाद स्टेट काँग्रेसच्या कृतीसमितीने देखील ही आकडेवारी प्रसिद्ध केली आहे. त्याकाळात नांदेड जिल्ह्यातून २०९ सत्याग्रही पकडले गेल्याची नोंद आहे.

---

२१६. कित्ता, पृ. ६१.

सप्टेंबर अखेरपर्यंत मुक्ती आंदोलनाची एक अवस्था संपून दुसऱ्या आणि अंतिम पर्वाला सुरुवात झाली. हे पर्व अधिक तीव्रतर आंदोलन पर्व होते. हैद्राबाद स्टेट काँग्रेसच्या कृतीसमितीने विजयवाडा बैठकीत आंदोलनाचा सविस्तर कार्यक्रम निश्चित केला. या लढ्याने आता सत्याग्रही आंदोलनाबरोबर आवश्यक तेथे सशस्त्र संघर्षही करण्याची तयारी ठेवली. हैद्राबाद राज्याची प्रशासन यंत्रणा खिळखिळी करून, राज्याच्या सिमांवरची बंधने झुगारून निजामाला विलिनीकरण करण्यास भाग पाडणे हा या जनआंदोलनाचा मुख्य उद्देश होता. सामान्य रयतेच्या या इच्छेविरुद्ध आझाद हैद्राबाद राखू इच्छिणारा मुस्लीम जमातवादी गट अधिकाधिक आक्रमक बनत गेला आणि परिणामी जनआंदोलनाने सशस्त्र संघर्षाचे रूप धारण केले. हैद्राबाद राज्यातले सामान्य रयतेचे हे जन आंदोलन एकाच वेळी तीन आघाड्यांवर लढत होते. एका बाजूला हैद्राबादचे निजामी प्रशासन व निजामाची स्वतंत्र राज्य टिकविण्याची लालसा तर दुसऱ्या बाजूला इत्तेहादूल मुसलमीनचे जमातवादी राजकारण आणि तिसऱ्या बाजूला रझाकार संघटनेचे आक्रमक अत्याचारी हल्ले अशी ही लढत होती.

**परिसरातला सशस्त्र लढा :**—या लढतीचे प्रतिसाद नांदेड परिसरातही उमटत राहिले. किंबहुना या परिसरात हा लढा तीव्रतर राहिला. या लढ्याचे स्वरूप समजून घेण्याअगोदर हैद्राबाद स्टेट काँग्रेसच्या कृतीसमितीने मध्यवर्तीची दोन आणि प्रांतिकची तीन कार्यालये सुरू केली होती हे लक्षात घेतले पाहिजे. या कार्यालयापाठोपाठ प्रत्येक जिल्ह्याची केंद्रे सरहद्दीबाहेर उघडण्यात आली होती. जुलै, १९४७ मध्येच उस्मानाबाद जिल्ह्याचे कार्यालय सोलापूरात सुरू झाले होते. त्यानंतर औरंगाबाद जिल्हा कार्यालय मनमाडला, बीड जिल्ह्याचे नगरला, परभणी जिल्ह्याचे वाशीमला तर नांदेड जिल्ह्याचे उमरखेडला अशी जिल्हा कार्यालये हैद्राबाद राज्याच्या सीमांलगत निघाली. नांदेड जिल्ह्यातल्या आंदोलनाची रूपरेषा, सशस्त्र लढ्याची आखणी ही या उमरखेड कॅम्प मधून होत होती. नांदेडचे गोपाळशास्त्री देव आणि हदगावचे बन्सीलाल तोष्णीवाल यांनी मुळात हे कार्यालय सुरू केले. ऑक्टोबर, १९४७ मध्ये कृतीसमितीने या कार्यालयाला रितसर मान्यता दिली आणि भगवानराव गांजवे यांना कार्यालय प्रमुख/जिल्हा प्रमुख म्हणून कार्य पाहण्यास सांगितले.[२१७] कालांतराने शामराव बोधनकर हे उमरखेड केंद्राचे प्रमुख होते असा उल्लेख पुराभिलेखागारातील कागदपत्रातून आढळतो. याच कॅम्पवर शंकरराव चव्हाणही सक्रिय असल्याचे संदर्भ आहे.[२१८] पुसदचे गोदाजीराव मुखरे आणि उमरखेडचे जेठमलजी माहेश्वरी निघवेकर यांचे फार मोलाचे सहकार्य उमरखेड कॅम्पला आणि नांदेड जिल्ह्यातील चळवळीला होते. १९४८ च्या मार्च-एप्रिल मध्ये उमरखेड जवळ विडुळला नांदेड जिल्ह्याचा आणखी एक कॅम्प सुरू झाला. तात्पर्य या अंतिम टप्प्यात हैद्राबाद राज्याच्या सीमांवर असे जवळपास शंभरवर बॉर्डर कॅम्पस् कार्यरत होते. या कॅम्पवरून सारा सशस्त्र संघर्ष लढला गेला. असंख्य कार्यकर्ते भूमिगत राहून या जनआंदोलनात सक्रिय राहिले. करोडगिरी नाक्यावर त्यांनी हल्ले केले. रझाकारांची प्रमुख केंद्र नष्ट करण्याचा प्रयत्न झाला. बॉर्डर परिसरातल्या पंधरावीस मैलांच्या परिसरात हैद्राबाद शासनाचा प्रभाव संपूर्णपणे नष्ट करण्यात या स्वातंत्र्य सैनिकांना यश आले.

---

२१७. भालेराव अनंत, पूर्वोक्त, पृ. ३३७.

२१८. ना. शंकरराव चव्हाण प्रत्यक्ष मुलाखत, **हैद्राबादमुक्ति संग्राम**, पूर्वोक्त.

**नाक्यावरील हल्ले :**—नांदेड जिल्ह्याला लागून असलेल्या वऱ्हाडाच्या बाजूने पैनगंगेला लागून हैद्राबाद राज्याची सरहद्द होती. या सरहद्दीवर काही करोडगीरी नाके होते. दिघी, रिधडी, गुरुफळी, हरडफ, नानादेव, कव्हाणा या ठिकाणचे नाके नोव्हेंबर-डिसेंबर १९४७ च्या दरम्यानच नष्ट करण्यात आले. करोडगिरी नाक्यावरील ॲक्शन म्हणजे मुक्ती आंदोलनातील एक एक स्वतंत्र गाथाच ठरावी. हे करोडगिरी नाके म्हणजे परदेशातून येणाऱ्या लोकांची तपासणी करणारे कस्टम नाकेच होते. येथे सारे सामान तपासले जायचे व परकीय चलन जप्त व्हायचे. परकीय चलन म्हणजे स्वतंत्र भारतातले ब्रिटीश चलन. कारण हैद्राबाद राज्यातले चलन वेगळे होते. तात्पर्य हे करोडगिरी नाके म्हणजे हैद्राबादच्या आझादीचीच निशाणी होती. ती पुसून टाकून सरहद्द मोकळी करणे म्हणजे स्वतंत्र भारतात विलिनीकरणाची प्रक्रिया गतीमान करणे होते. त्यामुळे या करोडगिरी नाक्यावरील हल्ल्याला एक वेगळे महत्त्व होते. त्याच बरोबर हे करोडगिरी नाका म्हणजे आयात निर्यात कर वसूल करणारी ठाणीच होती. या स्वरूपात मोठा महसूल हैद्राबाद सरकारला मिळे. हे नाके उद्ध्वस्त करून हैद्राबादची अर्थव्यवस्था विस्कळीत करण्याचाही हेतू साध्य होणार होता.

हदगाव जवळच्या नानादेव नाक्यावर तर दोनदा हल्ला झाला होता. या भागातली बहुतेक करोडगिरी नाके हल्ले करून उद्ध्वस्त करण्यात आले होते. दिघी, कामारी, हरडफ, गुरफ, करोडी, तळणीचे करोडगिरी नाके उद्ध्वस्त होऊन बंदच पडले होते.[२१९]

नांदेड जिल्ह्यातल्या हदगाव, मनोला, इस्लापूर, पाथरड उमरी या गावांच्या पोलीस ठाण्यांवर स्वातंत्र्य सैनिकांनी हल्ले करून तेथली शस्त्रास्त्रे पळविण्याचा प्रयत्न केला होता. रझाकार केंद्रावरही हल्ले झाले. जंगल सत्याग्रहाचा उल्लेख काही ठिकाणच्या सत्याग्रहाच्या अनुषंगाने यापूर्वी आला आहे. त्याशिवाय दाभड, सोनारी, डोर्ली, कोळी, डिघूळ, भोकर येथील जंगल सत्याग्रहही लक्षणीय होते. बिलोली आणि कंधार तालुक्यातही जंगल सत्याग्रह झाले.

**कंधार परिसरातील चळवळी :**—नांदेड जिल्ह्यातील कंधार हे राज्यातला पहिला राजद्रोहाचा खटला भरला जाण्यामुळे इतिहासात पहिल्यांदा नोंदवले गेले. प्राचीन काळापासून ऐतिहासिक घटनांचा साक्षीदार असलेले कंधार हैद्राबाद मुक्ती संग्रामातल्या जन आंदोलनातही सातत्याने सक्रिय होते. कंधार परिसरातल्या एकोणसाठ हुतात्म्यांनी या जन आंदोलनात आपले बलीदान दिले. कल्लाळीच्या संघर्षातच पस्तीस हुतात्म्यांनी लढता लढता प्राण ठेवले. वडगाव, वडगाव तांडा, बारूळ, कैठाळे, बामनीपट्टी, कापसी, येळी, मरशिवणी, कळका आणि नंदशिवणी अशा अनेक ठिकाणच्या स्वातंत्र्यवीरांनी या संघर्षात आपले प्राण वेचले.[२२०] या संदर्भात तपशीलवार नोंद केशवराव धोंडगे यांनी आपले ग्रंथात केली आहे.

**उमरी बँक ॲक्शन :**—उर्वरित भारत स्वतंत्र झाला पण हैद्राबादच्या सामान्य रयतेच्या नशीबी मात्र मध्ययुगीन सरंजामी सलतनतीचे पारतंत्र्यच लिहिले होते. स्वतंत्र भारतात विलीन होण्यासाठी

२१९. भालेराव अनंत, पूर्वोक्त, पृ. ५८२.

२२०. धोंडगे केशवराव, **हैद्राबाद मुक्ति लढ्यातील मन्याड खोरी विजयी कारगील, शौर्य गाथा**, या ग्रंथात कंधार परिसरातील स्वातंत्र्य सैनिकांच्या प्रत्यक्ष मुलाखती समाविष्ट केल्या आहेत. तो ग्रंथ मुळातून वाचावा.

उत्सुक झालेली राज्यातली बहुसंख्य रयत जनआंदोलनाच्या स्वरूपात पुढे सरसावली होती. हैद्राबाद प्रशासन खिळखिळे करण्यासाठी अनेक ॲक्शन्स या जन आंदोलनाने घेतल्या. त्यातली नांदेड परिसरातील उमरी बँक ॲक्शन ही खरोखरच सर्वात लक्षणीय अशी मोहीम होती. हैद्राबादची अर्थव्यवस्था विस्कळीत करण्याचे इतर प्रयत्न जसे सुरू होते त्यातलाच हा एक प्रयत्न. शासनाच्या अस्तित्वालाच आव्हान देणारा. दिवसा ढवळ्या अत्यंत गजबजलेल्या अशा मोंढ्यामध्ये उमरी बाजारपेठेत वाजत गाजत बँक लुटली जाते व पैसा मिरवणुकीने स्वातंत्र्याचा उद्घोष करीत गावाबाहेर नेला जातो ही लक्षणीय गोष्ट होय. जनअंदोलनातील लढ्याचीच ती एक अत्यंत पूर्वनियोजित अशी योजना होती. ब्रिटीश इंडियातील भारतीय स्वातंत्र्य संग्रामात अशा खजिना लुटीच्या घटना घडल्या आहेत. विदर्भातल्या रामटेकच्या तहसिलमधील खजिना स्वातंत्र्य सैनिकांनी लुटला होता. साडेतीन लाखाचा ऐवज त्यांना मिळाला होता. १९४२ च्या चळवळीतल्या या काही घटना आहेत.[२२१] कोल्हापूर संस्थानातील भूदरगडच्या तालुका कचेरीतील खजिना लुटण्याचाही अयशस्वी प्रयत्न झाला होता.[२२२] तात्पर्य सरकारी खजिना लुटण्याचे अनेक प्रसंग भारतीय स्वातंत्र्य चळवळीतही घडले.

सकृत दर्शनी उमरी बँक ॲक्शन वर उल्लेखिलेल्या इतर घटनांसारखी भासत असली तरी या बँकलुटीचे स्वरूप पूर्णतया भिन्न आहे. इतर सर्व घटनांच्या तुलनेत हा हल्ला अनेक अर्थाने धाडसाचा होता. ब्रिटीश इंडियातील प्रशासनाच्या तुलनेत हैद्राबाद राज्यातले प्रशासन अत्यंत सरंजामी जुलमी होते, अशा प्रशासनाला आव्हान देणे दिसते तितके सोपे नव्हते. प्रशासन यंत्रणा, राज्यातली अर्थव्यवस्था खिळखिळी करण्याच्या उद्देशाने बँकेवर झालेला हा हल्ला होता. केवळ पैशाची लूट एवढे एकमेव उद्दीष्ट या ॲक्शनमागे नव्हते. भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील इतर बँक खजिना लुटीच्या तुलनेत कितीतरी पटीने अधिक रक्कम या ॲक्शन मध्ये लुटली गेली. या पैशाचा पैन् पै चा हिशेब ऑडीट होऊन नेत्यांना सादर झाला आणि हैद्राबाद मुक्ती आंदोलनातील स्वातंत्र्य सैनिकांच्या प्रामाणिकतेचा, सचोटीचा आणि निःस्वार्थ सेवेचा एक नवा आदर्श प्रस्थापित झाला.

उमरी बँक ॲक्शन एक सुनियोजित कृती होती व यात लष्करी मोहिमांचा अनुभव असणाऱ्या रघुनाथ रांजणीकरांचा प्रमुख सहभाग होता. १४ डिसेंबर १९४७ ला या कृतीची रंगीत तालीम झाली होती. उमरखेड कँम्पात सर्व शस्त्रास्त्रांची जमवाजमव झाली.[२२३] तीस चाळीस जणांची एक तुकडी २८ जानेवारीला पैनगंगेच्या काठावर देवसरीला येऊन पोहचली. देवसरी ते उमरी हे अंतर २५ मैल आहे. उमरी बँकेवर हल्ला करतांना खूप सावधगिरी बाळगली गेली. २९ जानेवारीला आणखी काही कार्यकर्ते येऊन मिळाले. स्टेट बँक ऑफ हैद्राबादच्या उमरी शाखेवर हल्ला करण्यापूर्वी उमरी गावाचा संपर्क इतर भागापासून तोडणे आवश्यक होते. उमरी-नांदेड, उमरी-धर्माबाद, उमरी-भोकर हे तीन रेल्वे मार्ग तोडणे अगत्याचे होते. रेल्वे रूळाबरोबरच हुलकावणी देण्यासाठी इतरत्र एखादी कृती करणे आवश्यक होते. शिवाय उमरीतले पोलीस ठाणे निष्क्रीय होईल याची तरतूद करावी लागणार होती.

---

२२१. भालेराव अनंत, पूर्वोक्त, पृ. ३८३.

२२२. केळकर, श्रीपाद, छोडो भारत १९४२, पृ. २३४-३५.

२२३. रांजणीकर रघुनाथ, पूर्वोक्त, पृ. ७९.

या कामासाठी चार वेगवेगळे गट तयार करण्यात आले. राजारामजी देशमुख यांची एक तुकडी मुगुट व मुद्‌खेडच्या दरम्यान रेल्वेलाईन उद्‌ध्वस्त करण्याच्या कामगिरीवर रवाना झाली.[२२४] या तुकडीत बारडचे रामा तेली, रामा भुपडे, आणि रामा भिमेवार असे तिघे, मारूती सोनार, शिवा पहेलवान, मलगेवार, रायसिंग व इतर चार पाच जण अशी अकरा माणसे होती.[२२५] निवघा, नागेली, लहानची पण आणखी आठ दहा माणसे त्यांना मिळाली.

मुख्य तुकडी बन्सीलाल यांच्या नेतृत्वाखाली रात्री नऊच्या सुमारास निघाली. यात सर्व कार्यकर्ते उमरीतलेच होते. शर्मा बंधू, उत्तरवार, जगदिश आर्य, मल्लीकार्जुन, साहेबराव बारडकर, आबासाहेब लहानकर, नागनाथ परांजपे, अनंत भालेराव, किशोर शहाणे यांची टोळी बँकेवर डायरेक्ट ॲक्शन करणाऱ्यांची टोळी होती. ती चौथी आणि मुख्य होय. या टोळीत एकूण १३ लोक होते पण प्रत्यक्ष बँकेवरच्या ॲक्शनमध्ये ५ लोक आले. दिगंबर उत्तरवार बँकेच्या गेटवर थांबले. ॲक्शनच्या अगोदर किशोर शहाणे आणि साहेबराव बारडकर एका हॉटेलमध्ये बसले. अनंत भालेराव आणि आबासाहेब लहानकर दुसरीकडे बसले.[२२६] निरनिराळ्या तुकड्यांकडे कामे वाटून दिली होती. ३० जानेवारीचा दिवस. बरोबर दुपारी ४-३० वाजता काशीनाथ शेट्टीने रेल्वे स्टेशनवर हल्ला केल्याची बातमी दिली. निवडक पाच सहा जण बँकेकडे धावले. बँकेवर हल्ला झाला. बँकेत आणि मोंढ्यात मिळून पाच सहा अरब, एक चपराशी, एक कॅशियर आणि पाच सहा रझाकार या हल्ल्यात मारले गेले.[२२७] उमरी बँकेतून २० लाख ६३ हजार ७१९ रुपये १५ आणे एवढी निजामी शिक्क्यातली (चलनातील) रक्कम लुटली गेली. ती रक्कम पोत्यात भरून बैलगाड्यांतून हैद्राबाद राज्याबाहेर म्हणजे वऱ्हाड आणि मध्यप्रदेश प्रांतात नेण्यात आली.[२२८] या रकमेचे तत्कालीन ब्रिटीश चलनामध्ये रुपांतर १७ लाख ६८ हजार ९०२ रुपये तेरा आणे करण्यात आले. हैद्राबाद राज्यातल्या चलनाला हाली चलन म्हणून संबोधिले जाई तर ब्रिटीश इंडियातल्या चलनाला कलदार चलन म्हणत. ही सारी रक्कम सोलापूर येथील स्टेट काँग्रेस ऑफीसला जमा करण्यात आली[२२९] व फर्स्ट क्लास मॅजिस्ट्रेटच्या कानावर ही गोष्ट घालण्यात आली.

**इस्लापूर ॲक्शन :**—नांदेड परिसरातील उमरी बँक ऑपरेशनच्या इतकीच महत्त्वाची ॲक्शन किनवट तालुक्यातील इस्लापूर येथे घेण्यात आली. उमरी बँक ॲक्शनवरून शासनाच्या अर्थव्यवस्थेला आव्हान दिले गेले. प्रशासकीय यंत्रणेचा ढिसाळपणा प्रकाशात आला. सरकारच अस्तित्वात नसल्याचे जाणवले. हैद्राबादच्या पोलिसांनी आणि रझाकारांनी अनन्वित अत्याचार करायला सुरुवात केली होती. सुरक्षित ठिकाणी असलेली पोलीस ठाणी त्यांची प्रमुख सत्ताकेंद्रे होती. किनवट तालुक्यातील इस्लापूर

---

२२४. शोभा कोरान्ने, उमरी बँक ऑपरेशन, औरंगाबाद.

२२५. रांजणीकर रघुनाथ, पूर्वोक्त, पृ. ८०.

२२६. बारडकर, साहेबराव, पूर्वोक्त, पृ. २१६.

२२७. भालेराव अनंत, पूर्वोक्त, पृ. २८८.

२२८. कित्ता.

२२९. किशोर शहाणे यांची प्रत्यक्ष मुलाखत ग्रंथ, हैद्राबाद मुक्तिसंग्राम, पूर्वोक्त, पृ. ४१३.

पोलीस ठाणे असेच एक सुरक्षित ठाणे. तेथे रझाकारांचे वर्चस्व होते. तीन-चारशे सशस्त्र रझाकार तेथे तळ ठोकून होते. त्यांच्या अत्याचारांच्या बातम्या उमरखेड कॅम्पवर येऊन धडकत. उमरी बँक ॲक्शन नंतर उमरखेड कँप काही काळ बंद करण्यात आला होता.[२३०] कार्यकर्त्यांनी भूमिगत राहून आंदोलनावर लक्ष ठेवले होते. इस्लापूरच्या रझाकारांच्या आणि पोलिसी अत्याचाराच्या बातम्या येत. सामान्य रयत हवालदिल झालेली असल्याच्या बातम्या असत. तरुण कार्यकर्त्यांचे रक्त सळसळून उठे. तशात बातमी अशी झाली की इस्लापूर वर हल्ला करावयाचे ठरले. एक व्यापक मोहिम हाती घेण्यात आली. जवळपास १७५ लोकांचा सहभाग या मोहिमेत होता.[२३१] उमरखेडचे सगळेच कार्यकर्ते या मोहिमेत सामील झाले. उमरी बँक ॲक्शनचे सुत्रधार धनजीभाई पुरोहितही या ॲक्शनमध्ये सहभागी होते.

३० जून १९४८ ला ॲक्शन करण्याचे निश्चित झाले. उमरखेड वरून जथ्या जथ्याने लोक निसटले. २८ तारखेला काही माणूस पेणगंगेच्या काठावर मुरली तांड्यावर मुक्कामाला आली. तेथून बिटरगाव जवळच होते. रात्री पैनगंगेच्या काठावरून पाण्याचा उतार शोधायचा प्रयत्न झाला. १५ ते २० जणांच्या ६ तुकड्या करण्यात आल्या. रात्रीच्या गर्द अंधारात नदी पार करून पलीकडच्या काठावर असलेल्या इस्लापूर पोलीस ठाण्यावर हल्ला करावयाचे ठरले. साहेबराव, आबासाहेब, मोहन शर्मा, जगदिश आर्य, नामदेवराव, दिगंबर उत्तरवार, जयवंतराव वायपेनकर, अमृतराव थेरवनकर हे धडाडीचे कार्यकर्ते आणि नेते पुढाकार घेऊन सरसावले. निष्ठावान गांधीवादी विठ्ठलराव रत्नाळीकर ही त्यात होते.[२३२] बरोबर आठ स्टेनगन, दोन विंचेस्टर बोअर, एक टॉमीगन, दोन तीन ट्वेल्ह बोअर, दोनतीन बंदुका, चार पाच रिव्हॉल्व्हर काही रायफली असा शस्त्रसाठा घेऊन ही मंडळी पैनगंगेच्या काठावर आली. रात्रीच्या अंधारात या सैनिकांनी नदी ओलांडली. सगळ्या तुकड्या ठरल्याप्रमाणे आपआपल्या जागी पोहोचल्या. पण तो पर्यंत सकाळचे पाच वाजले. नियोजनात थोडा विस्कळीतपणा आला. साहेबराव बारडकर आणि किशोर शहाणे हे दोघे गावच्या पांदीतून पोलीस ठाण्यात शिरले आणि किचनमध्ये लपून बसले. बन्सीलाल आणि रघुनाथ रांजणीकरही पोहोचले. बारडकरांनी पोलीस ठाण्याच्या अंगणात झोपलेल्या पोलीस अधिकाऱ्यावर बॉम्ब फेकला. पण तो फुटलाच नाही. नंतर गोळीबार केला. त्याची हालचाल दिसली नाही म्हणून सर्व एकदम चालून आले. जयवंतराव वायपनकर तर पोलीस ठाण्यातल्या खिडकीजवळ जाऊन उभे राहिले.[२३३] सर्वच जीवावर उदार झालेले स्वातंत्र्य सैनिक. पोलीस सावध झाले. पोलीस ठाण्यात शिरले आणि ठाण्यातून त्यांनी उघड्या मैदानावर असलेल्या स्वातंत्र्य सैनिकांवर बेछूट गोळीबार केला. पूर्व आणि पश्चिमेकडून तुकड्या पुढे सरकल्या. आता हातघाईची लढाई सुरू होती. पोलिसांनी केलेल्या गोळीबारात स्वातंत्र्य सैनीक जयवंतराव पाटील वायपनकर आणि लखासिंग लमाणी हे जबर जखमी झाले. जानकीलाल आणि तुकाराम चेनेवार हेही जखमी झाले होते. जयवंतराव पाटील यांना झालेल्या जखमा प्राणघातक ठरल्या. त्यांचे शव उचलून

२३०. भालेराव अनंत, पूर्वोक्त, पृ. ३८२.

२३१. कित्ता.

२३२. रांजणीकर रघुनाथ, पूर्वोक्त, पृ. ९८.

२३३. बारडकर, साहेबराव, पूर्वोक्त, पृ. २२५.

आणण्याच्या प्रयत्नात आणखी दोघे स्वातंत्र्यसैनिक जखमी झाले.[२३४] शेवटी स्वातंत्र्य सैनिकांनी माघार घेतली. पोलीस ठाण्यात अनपेक्षितपणे रात्री जादा कुमक आली आणि मोठा प्रतिकार झाला. तरीही सात आठ रझाकार मारले गेलेच. हैद्राबाद मुक्ती आंदोलनातील जयवंतराव वायपनकर, जानकीलाल गुलाबचंद राठी, तुकाराम कंजारकर आणि लखासिंग लमाणी असे चौघांनी इस्लापूर ॲक्शनमध्ये हौतात्म्य पत्करले. जयवंतराव आणि जानकीलाल यांचे मृतदेहही स्वातंत्र्य सैनिकांना बरोबर आणता आले नाहीत. याचे दुःख साऱ्यांच्याच वर्मी लागून राहिले. या ॲक्शननंतर या परिसरातला रझाकारांचा अत्याचारी धुमाकुळ थांबला. सामान्य रयतेने काही प्रमाणात सूटकेचा श्वास सोडला. पुढचे तीन चार महिने साऱ्या हैद्राबाद राज्यात संघर्षाचे अंतिम पर्व साकारणार होते. साऱ्या रयतेसाठी जीवन मरणाचा प्रसंग रात्रंदिन समोर होता.

**निजामी सत्ता झुगारणारी गावे :**—हैद्राबाद स्टेट काँग्रेस कृतीसमितीने मुक्तीसंग्रामाच्या अंतिम टप्प्यावर रयतेच्या जीवीत आणि वित्तसंरक्षणार्थ जसा सशस्त्र लढा सुरू केला तसेच गावे स्वतंत्र करावीत, जनराज्ये स्थापावीत, गावाचा कारभार चालविण्यासाठी आणि संरक्षणासाठी किसान दले उभारावीत असे आवाहन केले होते. औरंगाबाद जिल्ह्यात अहमदनगरला लागून असलेल्या हैद्राबाद राज्याच्या सीमेवर गोवर्धन सारोळ्यांचे समाजवादी जनराज्य अस्तित्वात आले. गोदावरी काठावर गोवर्धन परिसरातील आठ खेडी या जनराज्यात समाविष्ट होती व त्यांनी हे स्वातंत्र्य पोलीस ॲक्शन पर्यंत कायम टिकवले होते.[२३५] निजामी प्रशासनाला या जनराज्यात शिरण्याची हिंमत झाली नाही. विजयेंद्र कावरा यांच्या नेतृत्वात तरुण मुलांचा गटच खऱ्या अर्थाने या जनराज्यात कार्यरत होता. त्यात नांदेड जिल्ह्यातले काही युवक होते. अमृत गडकरी, केशवराव कुलकर्णी, गंगाधर येरावार, मदन सावंत, गुणवंतराव करडखेडकर यांचा त्यात समावेश होता. या जनराज्यातल्या प्रत्येक गावी तिरंगा फडकत राहिला. स्थानिक स्वराज्य संस्था स्थापन झाल्या. संरक्षणासाठी प्रचंड शस्त्र साठा जमवला गेला.[२३६] प्राणपणाने तिरंगाध्वजाचे रक्षण केले गेले. निजामी शासनाने या जनराज्यावर एक दोन वेळा हल्लेही केले परंतु ते यशस्वीरित्या परतवण्यात आले. या संघर्षात नांदेडचे गंगाधर येरावार, वैजापूरचे जगन्नाथ भालेराव आणि आझाद हिंद सेनेचे सैनिक गुजरातचे जगजीवन यांना हौतात्म्य प्राप्त झाले.[२३७]

आंदोलनाच्या या अंतिम पर्वात स्वतंत्र भारताचे प्रशासन आणि हैद्राबादचा निजाम यांच्यात वाटाघाटीचे गुऱ्हाळ चालू होते. एकीकडे वाटाघाटी करीत हैद्राबादचा निजाम आझाद हैद्राबादच्या दिशेने वाटचाल करीत होता. पाकिस्तानातून शस्त्रास्त्रांची मदत मिळविण्याच्या प्रयत्नात होता. रझाकारांचे अत्याचार वाढले होते. राज्यातून सामान्य रयतेचे लोंढे निर्वासित म्हणून स्वतंत्र भारताच्या हद्दीत जावू लागले होते. तशातच काही गावच्या गाव स्वतंत्र होऊ पाहात होती.

---

२३४. रांजणीकर रघुनाथ, पूर्वोक्त, पृ. १००.

२३५. काबरा, विजयेंद्र, गोवर्धन सारोळा जनराज्य विषयक हस्तलिखिते व छायाचित्रे, औरंगाबाद (अप्रकाशित)

२३६. गडकरी, अमृत, गोवर्धन सारोळा जनराज्य, नांदेड १९९९.

२३७. भालेराव अनंत, पूर्वोक्त, पृ. ४०२.

नांदेड जिल्ह्यातही कयाथू आणि पैनगंगेच्या दरम्यान हदगाव तालुक्यातली ३२ गावांनी १५ ऑगस्ट १९४८ रोजी आपले स्वातंत्र्य घोषीत केले. त्यांनी तिरंगा ध्वज प्रत्येक गावात फडकवला. प्राणपणाने या ध्वजाचे रक्षण करण्याची शपथ घेतली.[२३८] मध्यप्रदेश आणि वऱ्हाड प्रांतातून या गावांनी शस्त्रास्त्रे मिळवून आपले संरक्षण दल उभारले. उमरखेड कॅम्पवरचे कार्यकर्तेही संरक्षणार्थ इथे सज्ज होते. स्थानिक रयतेच्या मनात आत्मविश्वास जागवला गेला. अत्याचाराला तोंड देण्याचे मनोधैर्य आले. अशा प्रकारची मुक्त खेडी राज्यातल्या इतर जिल्ह्यातही अस्तित्वात आली. राज्यातल्या सामान्य रयतेच्या मनातले स्वातंत्र्याचे स्फुल्लिंग एवढे प्रज्वलीत होते की स्वतःच्या सामर्थ्यावर या गावांनी आपले स्वातंत्र्य उद्घोषित केले आणि पोलीस ॲक्शन होईपर्यंत प्राणपणाने टिकवले. अशी स्वतंत्र होणारी खेडी मराठवाड्यातल्या जवळपास प्रत्येक जिल्ह्यात होती. परभणीत अशी १०० खेडी स्वतंत्र झाली होती. औरंगाबाद जिल्ह्यात गोदावरी काठी पैठण परिसरातली १४ खेडी स्वतंत्र झाली होती.[२३९]

**परिस्थिती चिघळत गेली :**—१९४८ च्या ऑगस्ट सप्टेंबर महिन्यात हैद्राबाद राज्यातली परिस्थिती दिवसेन् दिवस तणावपूर्ण बनत गेली. रझाकारांचे अत्याचार वाढत गेले. शासनाचे परिस्थितीवर नियंत्रणच उरले नव्हते. स्वतंत्र झालेल्या खेड्यांनी, गावांनी स्वसंरक्षणार्थ किसान दले उभारली होती. या किसानदलांनी रात्रंदिवस पहारा करून संरक्षण केले. तिकडे राजकीय आघाडीवर वाटाघाटी चालू होत्या. विलिनीकरणाची मागणी सामान्य रयतेची होती पण तिकडे जैसे थे करार झालेला होता आणि राज्यात किमान जबाबदार राज्यपद्धती तरी यावी याचा आग्रह धरला जात होता. जबाबदार राज्यपध्दती येणार असेल तर हिंदू-मुस्लीम रयतेला पन्नास टक्के प्रतिनिधीत्व देण्यापर्यंत बोलणी आली आणि रझाकारांच्या हेकेखोरपणामुळे तीही फिस्कटली. सुदैवाने म्हणा दुर्दैवाने म्हणा ही योजना फेटाळली गेली आणि पोलीस ॲक्शन अपरिहार्य ठरले.

**ऑपरेशन पोलो :**—१३ सप्टेंबर १९४८ या रोजी स्वतंत्र भारताच्या फौजा हैद्राबाद राज्यात शिरल्या आणि " ऑपरेशन पोलो " सुरू झाले. चार दिवसात हैद्राबादच्या सैन्याने शरणागती पत्करली. १७ सप्टेंबरला हैद्राबादच्या निजामाने पांढरा झेंडा फडकवला आणि असफजाही घराण्याचा झेंडा खाली उतरवला गेला. हैद्राबाद सैन्याचा सेनापती अल् इद्रुसने शरणागती पत्करली आणि हैद्राबादेत तिरंगा फडकला. नांदेडच्या अव्वल तालुकदार कार्यालयावरही तिरंगा फडकला. हळुहळु स्थित्यंतर घडु लागले. अव्वल तालुकदाराच्या जागी नांदेडलाही कलेक्टर आला. मध्ययुगीन निजामी सलतनतीच्या कारभाराचे रूपांतर आधुनिक प्रजासत्ताकीय यंत्रणेत होऊ लागले. हैद्राबाद राज्य स्वतंत्र भारताचा अविभाज्य भाग बनला. पण काही काळ राज्यात लष्करी प्रशासकाचा अंमल राहिला. औरंगाबाद, सिंकदराबादच्या लष्करी छावण्यांवर भारतीय कमांडर्स नेमले गेले. मेजर जनरल जे. एन्. चौधरी यांनी लष्करी प्रशासक म्हणून हैद्राबाद राज्य ताब्यात घेतले. प्रत्येक जिल्ह्यासाठी नागरी प्रशासक, जिल्हा पोलीस प्रमुख नेमला गेला. लष्करी प्रशासनाचा काळ संपल्यानंतर नागरी प्रशासकाच्या जागी कलेक्टर नेमले गेले. नांदेडलाही नागरी प्रशासक आला. अव्वल तालुकदाराचा अंमल संपला.

---

२३८. कित्ता, पृ. ४०५.

२३९. कित्ता.

**राज्य पुनर्रचना आणि हैद्राबादचे विभाजन :**—मेजर जनरल चौधरींच्या लष्करी प्रशासनानंतर वेलोदी याचे नागरी प्रशासन हैद्राबाद राज्यात आले. त्यानंतर रितसर निवडणूका होऊन निर्वाचित लोकशाही प्रशासन सत्तारूढ झाले. हैद्राबाद राज्य आता स्वतंत्र भारताचा अविभाज्य भाग बनला. आझाद हैद्राबादचे स्वप्न विरले. आता राज्य पूनर्रचनेचा विचार होऊ लागला. १९२० साली अखिल भारतीय काँग्रेसने घटनेच्या पहिल्या मसुद्यातच भाषावार प्रांत रचनेचा विचार समाविष्ट केला होता.[२४०] हैद्राबाद मुक्ती संग्रामातही महाराष्ट्र परिषद, कर्नाटक परिषद आणि आंध्र महासभा या भाषिक व्यासपीठांनी भाषिक राज्यांचे स्वप्न उराशी बाळगले होते. परंतु खऱ्या अर्थाने भाषिक प्रांतरचनेला गती आली ती रामलूंच्या बलिदानाने. १९५५ साली फाजलअली अहवाल सादर झाला. द्वैभाषिक मुंबई राज्य अस्तित्वात आले. हैद्राबाद राज्याचे विभाजन झाले. मराठवाडा मुंबई राज्यात समाविष्ट झाला. तेलंगणाचा समावेश आंध्रप्रदेशात झाला तर हैद्राबाद राज्यातील कानडी भाषिक जिल्हे कर्नाटकात गेले. नांदेड जिल्हा आता हैद्राबाद राज्यातून मुंबई राज्यात समाविष्ट झाला. भाषावर प्रांतरचना झाली खरी परंतु महाराष्ट्र-गुजरातचा अपवाद वगळून ही भाषावार प्रांतरचना झाली. परिणामी संयुक्त महाराष्ट्र आंदोलन झाले. १०९ हुतात्म्यांनी आपले बलिदान दिले आणि १ मे १९६० रोजी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र अस्तित्वात आला. मुंबई प्रांताचे विभाजन होऊन गुजरात आणि महाराष्ट्र ही दोन राज्ये निर्मिली गेली.

**महाराष्ट्र राज्य निर्मिती :**—आता नांदेड जिल्हा महाराष्ट्र राज्याचा भाग बनला. अत्यंत संथ गतीने वाटचाल करणारे मध्ययुगीन सलतनतीतले नांदेड आता झपाट्याने बदलू लागले. नंदीतटांचे नांदेड आता लहान गावठाण राहिले नाही, शहर बनले. पाहता पाहता शहराचा विस्तार घडत गेला आणि नांदेड-वाघाला महानगरपालिका अस्तित्वात आली. संपूर्ण जिल्ह्यात मिळून एक हायस्कूल असलेल्या नांदेडात स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ स्थापन झाले. अनेक महाविद्यालये निघाली. मेडीकल, इंजीनिअरींग, लॉ, फार्मसी अशा विविध विद्याशाखांचे शिक्षण देणारी महाविद्यालये अस्तित्वात आली. नांदेड जिल्ह्याने मध्ययुगीन मागसलेपणाची कात टाकून २१ व्या शतकाकडे वाटचाल सुरू केली आहे. १९५० पर्यंत मध्ययुगीन सरंजामी व्यवस्थेत गुरफटलेला नांदेड जिल्हा झपाट्याने बदलत गेला. परिवर्तनाची गती वाढली. शहरीकरणाची प्रक्रिया गतीमान झाली. सारेच काही इतके अमुलाग्रपणे बदलले की गतकाळाच्या चांगल्या वाईट सगळ्या पाऊलखूणाच पुसल्या जाव्यात.

Maharashtra State Gazetteers

---

२४०. गडकरी, माधव, जय महाराष्ट्र, संयुक्त महाराष्ट्र, मराठवाडा काल आणि आज, संपादक भगवान काळे, पृ. ४-५.

## परिशिष्ट-१

# जिल्ह्यातील वतनदार

प्राचीन कालखंडातील चालुक्य-यादव प्रशासन काळात विषयपती, देशकपती अशी स्थानिक वतनदार मंडळी आपल्या जिल्ह्यातही असल्याचे संदर्भ शिलालेखातून मिळतात. पुढे कालांतराने देशकपतीचा देशमुख झाला. देशमाने झाला. हे स्थित्यंतर नेमके केव्हा घडले हे नेमकेपणाने नोंदवणे कठीण आहे. स्थानिक प्रशासनातले हे अधिकारपद अगदी आरंभापासून अस्तित्वात असावे पण त्याची पदनामे भिन्न असावीत. " देश " हा प्रशासकीय विभाग नांदेड परिसरातही होता. या देशाचा कारभार पाहणारी देशकपती, मंडलेश्वर वगैरे पदनामे मागे पडून यादवोत्तर काळात देशपांडे, देशकुलकर्णी, देशमाने, देशक अशी पदनामे रूढ झाली.

मध्ययुगाच्या आरंभी आपल्या परिसरातही देशकपतीचा देशमुख झाला असावा. चालुक्यांच्या उत्तर कालखंडात देसाई दिसतो. नाडगोंडा हा वतनदारही अस्तित्वात आला होता. तिकडे मराठी स्वराज्यात आणि आपल्या नांदेड जिल्ह्यातील मुस्लिम राजवटीत देशमुखी पद महत्त्वाचे बनले. या देशमुखी वतनाला प्रतिष्ठा प्राप्त झाली. मोठ्या राजसत्ता सतत संघर्षात गुंतलेल्या असल्याने प्रत्यक्षात अंमल असायचा तो वतनदार देशमुखांचा. वसाहत करणे, त्या वसाहतीची देखभाल करणे, शेतकऱ्यांना बी बीयाणे देणे ही कामे सामान्यतः देशक, देशमुखांची असत.[१] देशमुखाकडे विशिष्ट परगणा मोकासा म्हणून दिलेला असे. या वतनमोकास्यातील शेतसारा वसुली, जमीन लागवड, गोतसभा या साऱ्या कामात देशमुखाचा सहभाग महत्त्वाचा असे.

देशमुखी ही या जिल्ह्यातील महत्त्वाची वतनदारी. तसा वतन हा मूळ अरबी शब्द इस्लामी राजवटीत आपल्याकडेही रूढ झाला. प्रत्यक्षात एखाद्या ग्रामाधिकाऱ्याला मिळालेली जमीन हक्क म्हणजे वतन.[२] हे वतन लहान मोठ्या स्वरूपात उपजिविकेचे शाश्वत साधन असे. हे साधन बाळगणारा तो वतनदार म्हणवला जाई. त्याला या वतनाबरोबर काही हक्क, अधिकार मानमरातबही वंशपरंपरागत प्राप्त होत. इतिहासाचार्य वि.का.राजवाडेंच्या मते नवीन गावे वसवून त्याचे पाट्टकीलपण आणि ग्रामणीपद भूषविणारे वतनदार मध्ययुगात पाटील व देशमुख म्हणून संबोधले जाऊ लागले.[३]

हैद्राबादच्या निजामी राजवटीत देशमुखी वतनदारी चालु राहिली. त्यांच्या आधारेच निजामाचा कारभार पाहिला जाई. त्या मोबदल्यात त्यांना रुसूम, माश, वजीफा, जहागिरी मिळत. निजामकालीन मराठवाडयात गोपालसिंग गौड, विठ्ठलसूंदर, सुलतानजी निंबाळकर हे ख्यातकिर्त वतनदार होते. नांदेड जिल्ह्यातही काही मातब्बर देशमुख वतनदार घराणी उदयाला आलेली होती. ही देशमुखी वतने निरनिराळ्या जातीच्या लोकांमध्ये विभागलेली दिसतात. कुठल्याही जातीची कर्तबगार घराणी या देशमुखी वतनाला पात्र असत. तत्कालीन जातीप्रथेचा विचार करता असे दिसते की तमलूरची देशमुखी

---

१. जोशी, शं. ना., **अर्वाचीन महाराष्ट्रेतीहासातील राज्यकारभाराचा अभ्यास**, पृ. १७८.

२. कुलकर्णी, अ. रा., **शिवकालीन महाराष्ट्र**, राजहंस, पुणे, १९७७, पृ. २४.

३. राजवाडे, वि. का.

ही हटकर समाजातल्या कर्तबगार घराण्याकडे होती. पाटणूरची देशमुखी लिंगायत वाणी समाजातल्या मातब्बर घराण्याकडे होती. कुंडलवाडी आणि देगलूरची देशमुखी मुस्लिम घराण्याकडे तर सगरोळी, माहूर, हिप्परगा, होट्टल आणि मुदखेड येथील देशमुखी ब्राम्हण समाजातील व्यक्तिकडे होती. मराठा समाजातील वतनदार देशमुखांची संख्या नांदेड जिल्ह्यात सर्वात जास्त असल्याने दिसून येते.[४] निजामी राजवटीतल्या तत्कालीन नांदेड जिल्ह्यातील ही परिस्थिती लक्षणीय आहे.

वतन-परगण्यातील सर्व जातीधर्माच्या लोकांशी वतनदार देशमुखांचे सलोख्याचे संबंध असत. संकुचित जातीधर्मवादी वृत्तीने ही वतनदार मंडळी कधीच वागली नाहीत. मोहरमचे ताजे असोत की यात्रा महोत्सवातील दिंडी असो देशमुख वतनदाराला विशेष मान असे. दसरा दिवाळीतले मानपानही मुस्लिम देशमुखानांही दिले जात. तेही आनंदाने हिंदु सणात सहभागी होत. नांदेड जिल्ह्यातील काही देशमुखी गढ्यांवर निरनिराळ्या धार्मिक उत्सवाची परंपरा आजही आहे.[५] हिंदु देशमुखांच्या गढीवरही उरूस साजरे होत. मुस्लिम वतनदार देशमुखही हिंदुंच्या श्रद्धेचा मान राखीत. हिंदु-मुस्लिम ऐक्याची अशी अनेक उदाहरणे वतनदार देशमुखी घराण्याच्या परंपरेत आढळतात.

वतनदार देशमुखी घराण्यातल्या स्त्रिया सामान्यतः पडदानशीन असत. पडद्याच्या छकडयातूनच त्यांचा प्रवास होई. असे असले तरी नांदेड जिल्ह्यातील वतनदार देशमुखांच्या घराण्यातील शूर रणरागिणी स्त्रियांनी प्रसंगी हाती शस्त्रही घेतले आहे. माहुरच्या राजे उदाराम देशमुखाच्या घराण्यातील सरस्वती रायबागनचा उल्लेख सर्वज्ञात आहे. त्याशिवाय उमरीची दर्याबाई, हनेगावची गंगुबाई, हदगावची सिताबाई, शिळवणीची मालनबाई या वतनदार देशमुखी घराण्यातल्या स्त्रियांचे पराक्रमही लक्षणीय आहेत.

हैद्राबादच्या मुक्ति आंदोलनातला वतनदार देशमुखांचा सहभागही उल्लेखनीय आहे. हैद्राबादच्या निजामी प्रशासनातला एक महत्त्वपूर्ण घटक म्हणून देशमुखांची वतने चळवळीची आश्रयस्थाने होती. सामाजिक चळवळीतही त्यांचा पुढाकार होता. कवान्याच्या देशमुखांच्या सहकार्यानेच तेथली सामाजिक परिषद भरली होती. झरीचे देशमुख जंगल सत्याग्रहाशी संबंधित होते. कुंटुरच्या देशमुखांचा कल आर्यसमाजी चळवळीकडे होता. काही वतनदार देशमुख निजामी राजवटीशी इमान राखून असले तरी आंदोलनाबाबत तेही सहानुभूति बाळगून होते.

नांदेड जिल्ह्यातील वतनदारी देशमुख परगणे आताच्या अनेक तालुक्यात विखुरलेले होते. माहूर तालुक्यात माहूरच्या उदारामजी राजे यांची देशमुखी होती. किनवट तालुक्यात शिवणीची देशमुखी होती. हिमायतनगरमध्ये सरसम आणि कांडली अशी दोन देशमुखी वतने होती. हदगाव तालुक्यात तर देशमुखी वतनाची पाच घराणी होती. चाभरा, कवाना, उमरी, वाळकी आणि हदगावची देशमुखी वतने अशी ही पाच घराणी. त्या पेक्षाही जास्त देशमुखी वतने देगलूर तालुक्यात होती. हानेगाव, शिळवणी, दरेगाव, तमलूर, होट्टल, करडखेड, आणि देगलूर अशी सात देशमुखी वतने देगलूर तालुक्यात होती.

४. देशमुख, कल्पना, **नांदेड जिल्ह्यातील वतनदार देशमुख**, पी.एच.डी. अप्रकाशित शोध प्रबंध. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, पृ. ३८०.

५. कित्ता, पृ. ३८४.

Maharashtra State Gazetteers

इतर तालुक्यांचा विचार करता असे ध्यानात येते की, नायगाव तालुक्यात बडबडा आणि कुंटुर येथे देशमुखी होती. बिलोली तालुक्यातही कुंडलवाडी आणि सगरोळी या दोन ठिकाणी देशमुखी होती तर भोकर तालुक्यात पळशी, उमरी तालुक्यात गोरठा आणि तळेगाव, मुदखेड तालुक्यात शेंबोळी आणि मुदखेड तर अर्धापूर तालुक्यात लहान आणि पाटणूर या ठिकाणी देशमुखी वतनदारी होती. नांदेड तालुक्यातही फक्त झरी या एकाच गावी देशमुखी वतन होते. हे वतन तसे प्रत्यक्ष नांदेडचे देशमुखी वतन असल्यासारखे होते. नांदेड शहरातील गोदाकाठची विष्णूपूरी, कल्लोळ, असरजन, गुंडेगाव ढाकणी ही गावे या झरीच्या देशमुखी वतनात येत असत. कंधार, लोहा आणि मुखेड तालुक्यात प्रत्येकी तीन देशमुखी वतने होती. कंधार तालुक्यातली पेठवडज, कल्लाळी, बारूळ इथली वतनदारी मराठा नाईक देशमुखाकडे होती. लोहा तालुक्यातल्या रिसनगाव, सोनखेड आणि बोरगाव या गावी देशमुखी होती तर मुखेड तालुक्यात बाऱ्हाळी, हिप्परगा आणि मुरूमाबाद या गावी ही देशमुखी वतने होती. यापैकी हिप्परगाची देशमुखी ब्राह्मण कुटुंबाकडे तर मुक्रमाबादची देशमुखी लिंगायत घराण्याकडे होती.

नांदेड जिल्ह्यातील देशमुखी वतनाबद्दल एक लक्षणीय गोष्ट ध्यानात येते ती ही की इथली देशमुखी वतने हटकर, वाणी लिंगायत, ब्राह्मण, मराठा आणि मुस्लिम अशा भिन्न समाजगटांकडे होती. गावगाडयातील पाटील देशमुखाच्या खालोखाल असलेल्या इतर वतनदार बलुते-आलुते दाराविषयीची माहिती नांदेड जिल्ह्याच्या संदर्भात उपलब्ध होत नाही. चौगुला हा वतनदार मात्र नांदेड जिल्ह्यात नव्हता. महार वतनाचे पुरावे मात्र नांदेड जिल्ह्यातही सापडतात. गावगाड्यातील कामातला एक महत्त्वपूर्ण घटक म्हणजे हा महार वतनदार. नांदेड नगरीतील महारकीचे वतन जोंधळे कुटुंबीयाकडे होते.[६] जुन्या नांदेड मधील पाच वेशींवर या वतनादारांचा वचक असे. या वेशींच्या स्मृती लोकमानसात आजही घर करून आहेत आणि वतनदारीच्या आठवणी कागदपत्रात शब्दबद्ध होऊन उरल्या आहेत हे मात्र खरे.

Maharashtra State Gazetteers

६. सुरेश जोंधळे याच्याकडे असलेल्या वतनाच्या कागदपत्रांमध्ये सदर माहिती मिळाली.

## परिशिष्ट-२

हुतात्मा स्मारक[१]

नांदेड जिल्ह्यातील हुतात्मा स्मारकांवर नोंदविण्यात आलेल्या हुतात्म्यांची माहिती

### हुतात्मा स्मारक नांदेड, तालुका नांदेड, जिल्हा नांदेड.

| अ.क्र. | हुतात्म्याचे नाव | जन्म दिनांक | मृत्यु दिनांक | गाव | तालुका |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | किसनसिंग छेदासिंग बैस | ३०.८.१९२० | २.९.१९४० | नांदेड | नांदेड |
| २ | लक्ष्मीबाई बालाजी भायेकर | १९१३ | २०.९.१९४० | नांदेड | नांदेड |
| ३ | गंगाधर कवठेकर | जानेवारी १९२७ | | कवठा | नांदेड |
| ४ | रामचंद्र धंदेकर | १९२० | | कवठा | नांदेड |

### हुतात्मा स्मारक पाटनूर, ता. अर्धापूर, जि. नांदेड.

| अ.क्र. | हुतात्म्याचे नाव | जन्म दिनांक | मृत्यु दिनांक | गाव | तालुका |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | संभाजी अप्पा नखाते | | १९४७ | पाटनूर | अर्धापूर |

### हुतात्मा स्मारक निवघा, ता. मुदखेड, जि. नांदेड.

| अ.क्र. | हुतात्म्याचे नाव | जन्म दिनांक | मृत्यु दिनांक | गाव | तालुका |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | हिरामण चाँदबा पवार | | जून १९४७ | निवघा | मुदखेड |
| २ | दाजीबा संभाजी पवार | | जून १९४७ | निवघा | मुदखेड |
| ३ | नरबा गंगाराम पवार | | जून १९४७ | निवघा | मुदखेड |
| ४ | मोतीराम गोपाळ पवार | | जून १९४७ | निवघा | मुदखेड |
| ५ | महादेव बापुजी पवार | | जून १९४७ | निवघा | मुदखेड |
| ६ | संभा पुरवा एडके | | जून १९४७ | निवघा | मुदखेड |
| ७ | मारोती सभाजी पवार | | जून १९४७ | निवघा | मुदखेड |
| ८ | पुंजाजी भवानजी खुपसे | | जून १९४७ | तिरकसवाडी | मुदखेड |
| ९ | भिमराव निवघेकर | | | | |
| १० | गणोजी राघोजी खुपसे | | | तिरकसवाडी | मुदखेड |

१. **सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय यांनी तयार केलेली यादी नव्याने जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांचेकडून पडताळून घेण्यात आलेली आहे.**

Maharashtra State Gazetteers

**हुतात्मा स्मारक मुदखेड, ता. मुदखेड, जि. नांदेड.**

| अ.क्र. | हुतात्म्याचे नाव | जन्म दिनांक | मृत्यु दिनांक | गाव | तालुका |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | प्रभुराव नारायण केसरी | | | | |
| २ | चांदु केवळा नाईक | | | चिदगरी | भोकर |
| ३ | लालसिंग लेमा | | | | |
| ४ | लखमा नाईक | | | | |
| ५ | आनंद मंचा | | | | |
| ६ | नागोराव बाजीराव चौधरी | | | | |

**हुतात्मा स्मारक किनी, ता. भोकर, जि. नांदेड.**

| अ.क्र. | हुतात्म्याचे नाव | जन्म दिनांक | मृत्यु दिनांक | गाव | तालुका |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | चिन्नु व्यंकन्ना एटलेवार | ९.६.१९२५ | ११.५.१९४८ | किनी | भोकर |
| २ | पौसानीबाई राजलिंगु गोलेवार | २.७.१९०१ | १२.९.१९४८ | किनी | भोकर |
| ३ | पोशेट्टी भोजन्ना चनेवार | ८.५.१९२८ | १५.५.१९४८ | किनी | भोकर |
| ४ | भुमन्ना नरसय्या नोमुलवार | १५.७.१९०३ | ११.५.१९४८ | किनी | भोकर |
| ५ | बुतन्ना भोजन्ना नरसापुरे | १५.५.१९२७ | १५.५.१९४८ | किनी | भोकर |
| ६ | विमल भालू भुमन्ना | | | | |
| ७ | बाबा भोजी | | | लामकाणी | भोकर |

**हुतात्मा स्मारक उमरी, ता. उमरी, जि. नांदेड.**

| अ.क्र. | हुतात्म्याचे नाव | जन्म दिनांक | मृत्यु दिनांक | गाव | तालुका |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | गणपती उमाजी अमृते | १९१२ | सप्टेंबर १९४७ | डोरली | भोकर |
| २ | विखारा वामन शिंदे | १९३१ | सप्टेंबर १९४७ | | |
| ३ | दत्तात्रय देविदास उत्तरवार | १९२५ | १९४८ | मुदखेड | मुदखेड |

**हुतात्मा स्मारक धर्माबाद, ता. धर्माबाद, जि. नांदेड.**

| अ.क्र. | हुतात्म्याचे नाव | जन्म दिनांक | मृत्यु दिनांक | गाव | तालुका |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | गोविंदराव विनायक पानसरे. | १५.५.१९१३ | १.१०.१९४६ | धर्माबाद | धर्माबाद |
| २ | संताजी रूखमाजी | | | कांगठी | बिलोली |

एचएफ ४२१०—१६अ

**हुतात्मा स्मारक इस्लापूर, ता. किनवट, जि. नांदेड**

| अ.क्र. | हुतात्म्याचे नाव | जन्म दिनांक | मृत्यु दिनांक | गाव | तालुका |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | जयवंतराव विक्रम वायपनेकर | १९१८ | १९४८ | इस्लापूर | किनवट |
| २ | तुकाराम किसनराव चन्नेवार | १९१८ | १४.८.१९४८ | इस्लापूर | किनवट |
| ३ | जानकीलाल मोहनलाल राठी | १९२२ | ३०.६.१९४८ | हदगाव | हदगाव |
| ४ | लखासिंग मेघासिंग लमाणी | १९२२ | १९४८ | मालगुंडा | किनवट |
| ५ | गणपतराव कवानकर | १९०८ | १८.४.१९४८ | कवाना | हदगाव |

**हुतात्मा स्मारक अर्जापूर, ता. बिलोली, जि. नांदेड**

| अ.क्र. | हुतात्म्याचे नाव | जन्म दिनांक | मृत्यु दिनांक | गाव | तालुका |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | गोविंदराव विनायक पानसरे | | | अर्जापूर | बिलोली |
| २ | संताजी रखमाजी | | | कांगठी | बिलोली |
**अन्न :** नांदेड जिल्ह्यात सर्व लोकांचा मुख्य आहार म्हणजे ज्वारीची भाकरी, गहू व तांदूळ पण त्यांच्या आहारात आहेत परंतु त्यास दुय्यम स्थान आहे. कडधान्यात प्रामुख्याने तूर, हरभरा, लाख, मठ (मटकी), मूग, उडीद आणि वाल इत्यादी आहारात किंवा वापरात आहेत. तर करडई, भुईमुग व जवस यांचे तेल वापरतात. हिरव्या पालेभाज्यांमध्ये अळू, अंबाडी, चाकवत, चुका, चूर्ड, घोळ आणि मेथी आदिंचा समावेश असतो तर फळ भाज्यामध्ये देवडांगर, भुईकोला, वाळूक आणि दूधी भोपळा इत्यादींचा वापर करतात. त्यात प्रामुख्याने मिरची, मिरी, कोथिंबीर व लसूण वापरतात. ब्राह्मण, जैन, लिंगायत व काही व्रतधारी मराठे परंपरेने शाकाहारी आहेत. आर्थिक परिस्थितीनुसार अन्नाचा दर्जा ठरत असतो. सामाजिक प्रतिष्ठेप्रमाणे व ऐपतीप्रमाणे मेजवान्याप्रसंगी खास पक्वाने बनविली जातात. त्यामध्ये पुरणपोळी, लाडू, बासुंदी, शिरा, पुरी, साखरभात, श्रीखंड आदी पक्वाने विशेष प्रसंगी पाहुण्यांचे आतिथ्य करण्यासाठी बनविली जातात व त्यासंबंधी भरपूर मेहनत घेतली जाते.

हिंदू दिवसातून दोन वेळा जेवण करतात. सकाळी दहा बारा पर्यंत पहिले जेवण व रात्री आठ ते दहा वाजेपर्यंत दुसरे जेवण करतात. सकाळी चहा किंवा नास्ता घेतात. सकाळच्या जेवणात ज्वारीची भाकरी असते. भाकरी बरोबर, भाजी, चटणी, लोणी, दही, वरण, भात इत्यादी पदार्थांचा बहुतेक समावेश असतो. शेतकरी, कारागीर व श्रमिक वर्गाच्या आहारात लसूण, मिरची व मीठ एकत्र वाटून तयार केलेली चटणी असते. श्रमाचे काम असल्यामुळे हे दिवसातून तीन वेळा जेवण करतात. सकाळी न्याहारी करतात. त्यावेळेस भाकरी बरोबर चटणी खातात. दुपारी भाकरीबरोबर एखादी भाजी तर संध्याकाळी भाकरी, भात, भाजी, दूध, दही इत्यादी आहार असतो. कधी-कधी अंडे, मटण, कोंबडीचे मटण आणि मासे यांचाही समावेश असतो.

Maharashtra State Gazetteers

जिल्ह्यातील मुस्लीमांना दररोज मांसाहार चालतो. परंतु दररोज मांसाहार त्यांना परवडत नाही. श्रीमंत मुस्लीम दिवसातून तीन वेळा जेवण करतात. सकाळी नास्ताबरोबर चहा, कॉफी, सरबत इत्यादी आहार घेतात. संध्याकाळी ज्वारीची भाकरी, भात, खिचडी, मटण पुलाव आणि मटण कढी आदि पदार्थांचा समावेश असतो. मध्यमवर्गीय मुसलमानात सकाळी नास्ताबरोबर चहा बिस्कीट तर दुपारी ज्वारीची भाकरी, पोळी, मटण, भाजी, मलई इत्यादी. संध्याकाळच्या जेवणात ज्वारीची भाकरी, मटण, भाजी कढी, डाळ, भात, डाळकढी व पुलाव इत्यादी आहार असतो. मुस्लीमात गरीब वा श्रीमंत लोक जेवण म्हणून " बिर्याणी ", " जर्दा ", " पुलाव ", बिस्मिला आणि " अकिका " चा आहार असतो.

**पोषाख :** जिल्ह्यातील हिंदू स्त्रियांचा पोषाख पारंपारिक पध्दतीचा दिसून येतो. त्या प्रामुख्याने आठवारी व नऊवारी साड्या नेसतात. अंगात चोळी आणि झंपर घालतात. ग्रामीण भागातील स्त्रिया जाडीभरडी लुगडी नेसतात. त्या लुगड्याच्या पदराला जरी आणि सिल्कचे भरतकाम केलेले असते तोच पदर त्या डोक्यावरून घेतात. सध्या खणांच्या चौळी ऐवजी गळ्याच्या व आखुड बाह्यांच्या चोळ्या अधिक प्रचारात आहेत. शहरी भागातील मुली ह्या साडी, परकर, पोलका, झंपर व अंगात घट्ट चौळी घालतात. शहरातील सुशिक्षित मुली पंजाबी ड्रेस, जीन्स पॅन्ट, सलवार कमीज यासारखे नवनवीन भूषा प्रकार वापरतांना दिसतात.

ग्रामीण व शहरी भागातील प्रौढ पुरुषांच्या पेहरावात मुख्यत्वे धोतर वापरतात. उच्चभ्रू वर्गातील ब्राह्मण व मराठी बोलणारे लोक धोतर दुमडून निटनिटकेपणाने नेसतात. पुरुषांच्या पेहरावात पुर्वी साधारणपणे लंगोटी, लेंगा, चड्डी व पंचा धोतर, चोळ्या, तुमान, सुरवार हे नेसण्याचे कपडे व उपरणे, शेला, सदरा, पैरण, बाराबंदी, बंडी, कुडते, कोपरी, कवजा, अंगरखा, डगला, अचकन व शेरवानी हे अंगात घालण्याचे कपडे असत. डोक्याला टोपी, पागोटे, पगडी, मुंडासे, रुमाल पटका किंवा साफा घालीत असत. यातील पुष्कळ वस्त्राचा अथवा शिरस्त्राणचा आता लोप झालेला आहे. सध्या सर्वसाधारणपणे टोपी व फेटा प्रचलित आहे. पायजमा, सदरा, बुशकोट व पँट हाच पुरुषांचा पोषाख आढळतो. शेतकरी आणि मजूर वर्गीयांचे कपडे जाडे भरडे असतात. सुस्थितीतील लोक अधिक तलम सुताचे, रेशमी पॉलीस्टर व कृत्रिम धाग्यांचे कपडे वापरतात. अलीकडील काळात शहरी भागात पोषाखात बराच बदल झालेला आढळतो. त्या बदलात कोट, नेक टॉय, बुट, पायमोजे इत्यादी बदल दिसून येतो.

मुसलमानांत प्रत्येक जमातींच्या पोषाखात वेगळेपण दिसून येते. प्रौढ मुसलमान सामान्यतः फेटा वापरतो. प्रतिष्ठित सैय्यद प्रायः नास्तालिक म्हणून ओळखला जाणारा पसरट सफेद फेटा वापरतात. जमीनदार, सरकारी नोकर, अत्तार, गंधी, सुतार हे डोक्याला साधा रुमाल गुंडाळतात. पण त्याचा रंग साधारणपणे लाल असतो. मेमण लोक रेशमी व जरीकाठी फेटे बांधतात. काही सुती अथवा गर्भरेशमी फेटे घालतात. काही मुसलमान घट्ट पायजमे घालतात. शहरातील लोकात शेरवानी आणि पायजमा हा सामान्य पोषाख आहे. पंजाबी व उत्तर हिंदुस्थानी मुसलमानांच्या अनुकरणाने चुडीदार

पायजमा व शेरवानी वापरणारे पुष्कळ मुसलमान आहेत. जमीनदार आणि श्रीमंत लोक मलमलीचा मुसलमानी कुडता वापरतात तो खाली गुडघ्यापर्यंत पोचणारा असतो. त्यावर एक घट्ट जाकीट व अंगरखा घालतात. अथवा मुघली बटनांचा कोट चढवितात. परंतु आता मुसलमानांच्या तरुण पिढीत पँट व बुटशर्टचा प्रसार पावत आहे. श्रीमंत मुसलमानांच्या स्त्रिया ओढणी, कुडता, अंगिया व घट्ट पायजमा असा पोषाख करतात. त्यावर कलाकुसरीचे कशिद्याचे काम केलेले असते. फक्त विधवा स्त्रिया सफेद कपड्यात राहतात. तर बाकी स्त्रिया लाल, पिवळा, हिरवा, किरमिजी आणि इतर चकचकीत रंग वापरतात. बाहेर जाताना बुरखा घेण्याची पद्धत (वहिवाट) आहे. बहुतेक दक्षिणी मुसलमानांच्या स्त्रिया साड्याचोळ्याच वापरतात. पोषाखविषयक परंपरा काही अंशी बदलून आर्थिक स्थितीनुसार सुटसुटीत कपडे घालण्याची पद्धत रूढ होत आहे.

**दागदागिने (अलंकार) :** अलंकरणाच्या पद्धती प्रत्येक समाजात वेगवेगळ्या आहेत. महिला, पुरुष आणि मुलं यांचे अलंकार वेगवेगळ्या प्रकारचे आढळतात. हे दागदागिने (अलंकार) गळा, कान, नाक, बाहू, मनगट, अंगुली, कमर, पाय, डोळे आणि पायाचे बोटं इत्यादी शरीराच्या विविध भागांवर घातले जातात. काही जण दररोज दागिने घालतात. तर काही समारंभाच्या वेळी विविध प्रकारचे दागिने (अलंकार) वापरतात. आधुनिक विज्ञान युगात विविध यंत्र व तंत्रज्ञानाचा शोध लागल्याने असे दिसून येते की प्राचीन समाजात ज्या प्रकारचे दागिने (अलंकार) वापरात होते त्यात आणि आज बराचसा बदल झालेला आहे. त्यामुळे पुरुषांमध्ये दागिने वापरण्याचे प्रमाण फार कमी झाल्याचे दिसते. तथापि परंपरावादी सुखवस्तु लोक अद्यापि भिकबाळी, अंगुठी, कंठी, गोफ वारतांना आढळतात. ग्रामीण भागातील सुखवस्तु कुटुंबातील स्त्रिया सोन्याचे विविध प्रकारचे दागिने घालतात. तर गरीब कुटुंबातील स्त्रिया चांदी, तांबे, पितळ व शक्य झाल्यास सोन्याचे इत्यादींचे दागिने व काचेचे मणी वापरतात. हल्ली सगळीकडे नकली दागिने मोठ्या प्रमाणात सर्रास वापरतात. स्त्रिया आपल्या आर्थिक परिस्थितीनुसार दागिने वापरतात. मारवाडी समाजातील स्त्रिया किंमती व नक्षीदार दागिने वापरतात. सर्वसाधारणपणे जिल्ह्यातील स्त्रियांच्या वापरात येणारे दागदागिने (अलंकार) पायात वाळे, सांखळी, बोरमाळ, पुतळ्यांची माळ, मोहरांची माळ, सरी आणि गळेसार, नाकात नथ, कानात कर्णफुल (कुड्या) व बोटात अंगठी घालतात. जुने झालेले दागिने सोनाराकडे नेऊन त्याचा आकार बदलून किंवा त्याबदल्यात नवीन दागिने बनवून घेतात.

गेल्या पन्नास वर्षात भूषाप्रकारात अमुलाग्र बदल झाले आहेत. त्यामुळे स्त्रियांच्या अलंकाराच्या वापरातही बदल झाला आहे. त्यात केसांमध्ये लावावयाचे अलंकार, रत्नखचित साडीपीन, फूले, मूद, अग्रफूल, बिंदी-बिजोर, नागगोंडे इत्यादी अलंकार वापरतात. स्त्रियांचा महत्त्वाचा दागिना (अलंकार) म्हणजे मंगळसूत्र होय. मंगळसूत्राबरोबर काळे मणीही वापरतात. स्त्रियांच्या गळ्यातील दागिन्यात प्रामुख्याने सोन्याची चैन, चंद्रहार, एकदानी, चपलाहार, बकुळीहार, बोरमाळ, गलासरी, मोहनमाळ, इत्यादी अलंकार सोन्याचे, चांदीचे वापरतात. याशिवाय गोठ, पाटल्या बांगड्या, बाजुबंद इत्यादी जड अलंकारही स्त्रिया वापरतात.[३]

---

३. **नांदेड डिस्टिक्ट गॅझेटिअर,** १९७१, पृ. १५५-१५६.

Maharashtra State Gazetteers

## हिंदू समाजजीवन

जिल्ह्यात १९६१ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्येच्या ८१.१६ लोक हिंदू होते. त्यांचे ग्रामीण व शहरी अनुक्रमे ८४.७५ आणि ५९.८७ असे प्रमाण होते. एकूण लोकसंख्या हिंदूची ८,७६,२९९ इतकी होती. त्यापैकी ७,८२,९७६ लोक ग्रामीण भागात राहत होते. तर ९३,३२३ लोक शहरी भागात होते.[४] तर २००१ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्येच्या ७५.३८ लोक हिंदू होते. त्यांचे ग्रामीण व शहरी अनुक्रमे ८२.६२ आणि १७.३८ असे प्रमाण होते. एकूण लोकसंख्या हिंदूची २१,६२,१८५ इतकी होती. त्यापैकी १७,८६,३५४ लोक ग्रामीण भागात राहत होते तर ३,७५,८३१ लोक शहरी भागात होते.[५]

एकूण हिंदूची तुलना करता शहरी भागात त्यांच्या लोकसंख्येचे प्रमाण कमी दिसून येते. बहुतेक हिंदूचा व्यवसाय शेती असल्याचे दिसून येते किंवा त्यामध्ये ते गुंतून गेले आहेत.

आधुनिक काळात एकत्र व अविभक्त कुटुंबपद्धती, आधुनिक संस्कृती, नवीन शिक्षणपद्धती, वाढते औद्योगिकरण, शहरातील वाढत्या लोकसंख्येचे प्रमाण या सर्वामुळे मोडून पडत आहे. नांदेड शहरातील जरी औद्योगिकरण झाले असले तरी ग्रामीण भागात अजुनही एकत्र कुटुंबपद्धती स्थिर आहे. कुटुंबातील वडीलधारी मंडळी (कर्ता पुरुष) कुटुंब प्रमुख आहे. त्यानंतर त्याचा वारसा मुलास मिळतो. आजोबांच्या प्रामुख्याखाली अनेक भाऊ व त्यांची मुले एकत्र नांदतांना दिसतात. शेती हा त्यांचा मुख्य व्यवसाय असून त्यामध्ये मिळणारे उत्पन्न ते वाटून घेतात. उत्पन्न कमी झाल्यामुळे काही कुटुंबे शहरात जाऊन कारखाने, ऑफीस व आदि ठिकाणी काम करतात. शेती व्यवसाय, कुटीरोद्योग व्यक्तिस्वातंत्र्यविषयक विचार, आधुनिक शिक्षणपद्धती यामुळे अनेक तरुणांचा ओघ शहरांकडे होऊ लागल्याने पर्यायाने त्याचा परिणाम कुटुंबपद्धतीवर झाला, त्याचे रुपांतर लहान कुटुंबात झाले.

### धार्मिक प्रथा

हिंदू धर्माप्रमाणे विवाह हा अत्यंत महत्त्वाचा व अत्यावश्यक संस्कार आहे. त्यामुळे त्याचा विच्छेद होऊ शकत नाही. पर्यायी असे म्हणता येईल की विवाह हा स्त्री-पुरुष यांच्यात घालून दिलेले अपरिहार्य व पवित्र बंधन आहे. विवाहामध्ये गोत्रप्रवर अथवा कुळी देवकाचा विचार महत्त्वाचा मानला जात असे. पूर्वी आंतरजातीय विवाह होत नव्हते. तथापि आता जातीभेदाची तीव्रता कमी झाल्यामुळे आंतरजातीय विवाह होऊ लागले आहेत. शहरी भागात हा फरक अधिक प्रमाणात जाणवतो. त्यामुळे गोत्रप्रवर वगैरे पाहण्याच्या कल्पना नाहीशा होऊन सगोत्र विवाह देखील रूढ होऊ लागले आहेत. नोंदणी पद्धतीने विवाह करणे सोयीचे व खर्चातही बचत करणारे असल्यामुळे तसे विवाह अल्प प्रमाणात आढळून येतात. पावसाळ्याचे चार महिने सोडून उर्वरित महिन्यांत तीथी बघून विवाह ठरवितात.

---

४. **सेंसस ऑफ इंडिया, १९६१,** डिस्ट्रिक्ट, सेंसस हॅण्डबुक, आणि **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९७१, पृ. ११९.

५. **सेंसस ऑफ इंडिया, २००१,** रिलिजन डाटा ऑन रिलीजन (पूर्वोक्त) (सी.डी. वरून)

ग्रामीण भागातील रूढी व परंपरा हिंदूंच्या विवाहपध्दतीशी संबंधीत असून नांदेड जिल्ह्यात विवाह अजुनही दोन ते तीन दिवस प्रसंगी चार दिवस चालतात. हिंदूधर्मशास्त्रानुसार लग्नविधी जवळ आल्यावर श्रीगणेशाच्या साक्षीने पत्रिकापूजन होते किंवा करून घेतात. त्यावेळेस पुरोहित वधू व वराचे नाव एका कागदावर लिहून बंधन जोडतो. त्यानंतर सगेसोयरे व इष्टमित्रांना निमंत्रण देऊन ' अक्षत ' या समारंभाला बोलावतात. लग्नाच्या आदल्या दिवशी ' घाणा ' नावाचा विधी करतात. त्यात प्रामुख्याने विवाहीत स्त्रियांचाच सहभाग असतो. हळद, गहू व सुपारी या वस्तू घेऊन त्यांच्या दोन राशी करतात. नंतर गणेश व सरस्वती या देवतांची पुजा करतात. विवाहीत स्त्रिया सामुहिक रितीने मिळून एका बांबूच्या टोपलीत हळद, गहू, सुपारी, तांदूळ, रूई इत्यादी वस्तू कापडात गुंडाळून घेऊन मुसळाने कांडतात. पुढे विवाहीत जोडप्याने आयुष्यभर हे धर्माचरण करायचे असते त्याचे प्रतिक म्हणजेच घाणा नावाचा विधी असतो. विवाहाचा धार्मिक विधीशी काही संबंध नसलेला दुसरा कार्यक्रम म्हणजे हळद व तेलवण समारंभ. काही सुवासिनी स्त्रिया वाजतगाजत आपल्याबरोबर आणलेली ओली हळद, सुवासिक तेल लावून साडी चोळी नेसवितात व उरलेली हळद वराच्या घरी आणून त्याच्या अंगाला चोळून त्याला स्नान घालतात. वधुपिता वरास नवे कपडे देतो आणि नंतर तो वाजतगाजत मिरवणुकीने वधूगृही विवाह समारंभासाठी जातो.

विवाहस्थळी गेल्यावर लग्नसमयी इतर धार्मिक विधीबरोबर विवाहास मंडळप्रतिष्ठा, देवकप्रतिष्ठा, गणेशपुजन, पुण्याहवाचन, नदीश्राध्द आणि गृहमुख इत्यादी विधी होतात. गोमुत्राने सर्वत्र सडासंमार्जन व रांगोळी घालण्यात येते. देवक प्रतिष्ठेकरिता दोन्ही घरी आवश्यक उपचार केले जातात. त्या प्रसंगी वंशवृद्धीसाठी व देवपितरांचे ऋण फेडण्याकरिता प्रस्तुत विवाह योजिलेला आहे अशी प्रतिज्ञा घेण्यात येते. विवाहसमारंभ निर्विघ्न पार पडावा म्हणून गणपती, मुलदेवता आणि नवग्रह यांची प्रार्थना करण्यात येते. नातेवाईक व इष्टमित्र वधू-वरांना विवाहापूर्वी मेजवान्या देतात. त्यांना ' गडगणेर ' अथवा ' केळवण ' म्हणतात. विवाह ठरला हे औपचारिकपणे जाहीर करण्याचा ' वाङनिश्चय ' असे म्हणतात. वधूवरपिते उभयपक्षांच्या नावाचा व गोत्रप्रवरांचा उच्चार करून तसे जाहीरपणे बोलतात. वधूस नवीन वस्त्रालंकार घालून सर्वांच्या समोर तिच्या पित्याजवळ व नंतर वराच्या पित्याजवळ बसवितात. वधूस एक नारळ व विड्याचे पान देऊन तीन वेळा जाहीर करतात की, माझ्या मुलास मुलगी देण्यास अनुमती घेतात. त्यानंतर पानसुपारी वाटल्यावर हा वाङनिश्चय विधी संपतो. विवाहापूर्वी वराला मिरवणुकीने वाजतगाजत मुंडावळ्या बांधून वधूगृही आणण्यापूर्वी वधूपिता स्वागतासाठी इष्टमित्रांसह सीमेवर तयार राहतो. सीमेवर करावयाचा विधी म्हणून सीमांतपूजन असे म्हणतात. मंडपाच्या द्वाराशी वधूची आई व इतर स्त्रिया वराच्या पायावर पाणी व हळद घालून त्याला समारंभपूर्वक बोहल्यापाशी घेऊन जातात. विवाह मुहूर्त जवळ आलेला असतो व उपाध्याय घटिकापात्राकडे नजर लावून बसलेले असतात. वधु गौरीहराची पुजा करून पतीला दिर्घायुष्य द्यावे म्हणून प्रार्थना करीत असते.

लग्नाच्या मुहूर्ताला थोडा अवधी असतांना वधुवरांना स्वास्तिकचिन्ह काढून तांदळाच्या राशी केलेल्या पाटावर उभे करण्यात येते व त्यादोघांमध्ये अंतरपाट धरला जातो. स्वास्तिकवाचक मंगलाष्टकांचे पठण उपाध्याय व इतर मंडळी सुरू करतात. वधूवरांस अक्षता टाकून त्यांचे

अभिष्टचिंतन करण्यात येते. मुहूर्त धरून घटिका पाण्यात बुडताच अंतरपाट काढून घेऊन उपाध्याय टाळी वाजवितात व मंगलवाद्यांचा गजर सुरू होतो. वधू-वर एकमेकास पुष्पमाला घालतात व लग्न लागले असे मानतात. लग्न लागल्यानंतर केले जाणारे विधी म्हणजे मधुपर्क, कन्यादान, सप्तपदी, कंकणबंधन हे विधी पाठोपाठ करतात. विवाह झाल्यावर वर वधूस आपल्या स्वगृही घेऊन गेल्यानंतर केला जाणारा विधी म्हणजे वरात होय. समवयस्क स्त्रिया नवीन सुनेच्या तोंडात साखर घालून तीचे तोंड बघतात. वरातीनंतर वधूचे म्हणजे नव्या सुनबाईचे स्वागत सासूबाई तिच्या अंगावर नवे अलंकार व वस्त्रप्रावरणे घालून करते. विवाह संस्कारातील शेवटचा विधी म्हणजे देवकोत्थापन, त्यावेळेस ब्राह्मणांना दक्षिणा व उपस्थितांना जेवण देतात. एकंदरित असे म्हणता येईल की पूर्वी बरेच दिवस रेंगाळणारे विवाहविधी आता बहुधा एका दिवसात संक्षिप्तपणे संपविण्यात येतात. सोळा संस्कारापैकी विवाह हाच आता ठळकपणे पाळण्यात येतो. की अन्य सर्वांचा, उपनयनाचा देखील संक्षेप झाला आहे. त्यांचे महत्त्व फारसे कोणी मानीत नाही.

हिंदूमध्ये प्रेत दहन करण्याचीच मुख्यतः वहिवाट आहे. परंतु आठ वर्षाखालील मृतांचे मात्र दफन होते. मरणकाळ समीप आल्यावर त्याचे डोके त्याचा मुलगा अथवा त्याची पत्नी आपल्या मांडीवर घेते. गंगाजल व तुलसीजल मुखात घालण्यात येते. सुवर्ण मुखात घालण्याचा प्रघात आहे. त्यानंतर प्रेताला स्नान घालून ते तिरडीला घट्ट बांधतात व पांढरा कपडा सर्व अंग झाकेल असा टाकतात. फक्त तोंड उघडे ठेवतात. मृताचा मुलगा अथवा जवळचा आप्त प्रेतयात्रेच्या अग्रभागी हातात विस्तवाचे मडके धरून चालतो. स्मशानात पोहचल्यावर चिता रचण्यात येऊन त्यावर प्रेत ठेवण्यात येते. त्यानंतर प्रेतास अग्नी देण्यात येतो. चितेभोवती तीन प्रदक्षिणा घालून मुलगा चितेच्या उत्तर टोकासी उभा राहतो. सर्वजन प्रेताची कवटी फुटून तसा आवाज होईपर्यंत बसून राहतात. त्यानंतर सर्व लोक घरी परत येतात. सायंकाळी मृत व्यक्ति ज्या जागेवर मरण पावली तेथे एक दिवा लावून ठेवतात. तिसऱ्या दिवशी मुलगा व इष्टमित्र स्मशानात जाऊन रक्षा व अस्थि गोळा करून आणतात व पवित्र नदीत किंवा पवित्र स्थळी विसर्जित करतात. दहाव्या दिवशी मुलगा क्षौर करून पिंडदान करतात. तेराव्या दिवशी उत्तरक्रिया होते. तेव्हा सर्व नातलग व इष्टमित्रांना भोजनासाठी निमंत्रित करण्यात येते. पुढे दरवर्षी श्राद्ध करण्याची प्रथा आहे.

## सण व उत्सव

हिंदूमध्ये सण व उत्सव आणि उपवास हे प्रतिवर्षी येणारे असून त्यात काळानुसार परिवर्तन होत आहे.

**गुढीपाडवा :** नववर्षाच्या सुरुवातीस शालिवाहन शक पाळणाऱ्या हिंदूच्या दृष्टीने गुढीपाडवा हीच वर्षे प्रतिपदा होय. चैत्र महिन्याच्या शुक्ल पक्षातील हा पहिला दिवस. प्रत्येक घरी ' गुढी ' म्हणजे सजवलेली एक काठी उभारली जाते आणि तिची पूजा करून तिला बहुधा पुरणपोळीचा अथवा इतर पक्वानांचा नैवेद्य दाखविला जातो. काठीच्या टोकाला एखादे रेशमी अथवा जरीचे वस्त्र बांधून त्यावर भांडे (लोटा किंवा तांब्या) ठेवतात. त्यास गुढी उभारणे असे म्हणतात. चैत्र शुध्द प्रतिपदा या शालिवाहन शकाच्या नववर्षे दिनी रामाने चौदा वर्षे वनवास आणि लंका विजयानंतर याच दिवशी

Maharashtra State Gazetteers

आयोध्येत प्रवेश केला अशी कथा रूढ आहे. याच दिवशी ब्रह्मदेवाने जग निर्मिती केली अशीही समजूत आहे. या शुभदिवशी नवीन कामाचा आरंभ करतात.

**रामनवमी :** चैत्र शुध्द नवमीला दुपारी १२ वाजता राममंदिरात रामजन्मोत्सव साजरा करतात. या दिवशी कित्येक लोक उपवास करतात. त्यावेळी रामाला पाळण्यात घालून कीर्तनकार आईची भूमिका बजावून त्याला झोके देतो. रात्रंदिवस भजन-कीर्तन चालते. प्रतिपदेपासून ते सुरू झालेले असते.

**हनुमान जयंती :** चैत्र शुध्द पौर्णिमेला सुर्योदयाबरोबर हनुमानजयंती साजरी करतात.

**बसव जयंती :** वैशाख शुध्द द्वितीयेस लिंगायत लोक बसव जयंती साजरी करतात.

**अक्षयतृतीया :** अक्षयतृतीया ही वैशाख शुध्द तृतीयेस येत असून साडेतीन शुभ मुहूर्तापैकी यास अर्धा मुहुर्त समजतात. या दिवशी देवपूजन व पितृपूजन करण्यात येते. शेतकरी शेतीच्या कामाचा शुभारंभ या दिवशी करतात.

**वटपौर्णिमा :** जेष्ठ शुध्द पौर्णिमेस वटपोर्णिमा म्हणतात. हिंदू स्त्रिया या दिवशी उपवास करून वडाची पूजा करतात व पतीला दिर्घायुरारोग्य (दिर्यायुष्य) मिळावे म्हणून प्रार्थना करतात. सावित्रीने हे व्रत करून आपल्या पतीचे (सत्यवानाचे) प्राण यमाकडून परत मिळविले म्हणून तिच्या स्मरणार्थ हे व्रत करण्यात येते.

**आषाढी एकादशी :** आषाढ शुध्द एकादशीला वारकरी पंथाचे लोक उपवास करतात. या दिवशी चातुर्मासाला प्रारंभ होतो व कार्तिक शुध्द द्वादशीला तो संपतो. कीर्तनाचे कार्यक्रम होतात. ज्ञानदेव, नामदेव, तुकाराम इत्यादी संतांचे अभंग गातात. वारकरी पंथाचे विठोबाचे उपासक या दिवशी पंढरपुरी प्रस्थान ठेवतात. जिल्ह्यातून वारकऱ्यांची मोठी पालखी पंढरपुरास जाते.

**नागपंचमी :** श्रावण शुध्द पंचमीला नागपंचमी येते. या दिवशी नागाची आकृती पाटावर किंवा (अलीकडील प्रिंटींग घेऊन) काढून तिची पूजा करतात. खेडेगावात स्त्रिया मुंग्याच्या वारूळासी जाऊन तिथे नागपुजा करतात. वारूळाशी दूध व साखर नागाला पिण्यासाठी ठेवण्यात येते. नांगरणे, खणणे, खोदणे वगैरे कामे या दिवशी बंद ठेवतात. थोडक्यात ज्येष्ठ आषाढात शेतकरी शेतीच्या पेरणीत आणि मशागतीत गुंतलेला असतो. त्यातून थोडी उसंत मिळाली की हा सण येतो. नागपंचमी हा श्रावणातला सण सुफलीकरणाशी जोडला गेला आहे. नाग हा पौरुषत्वाचे प्रतीक मानला जातो आणि त्याला क्षेत्ररक्षक मानले जाते. भूमी ही स्त्री मानून वारूळ हे भूमीचे सर्जनाचे प्रतीक मानले जाते. हा कल्पनाबंध भारतीय मनात रुजलेला आहे. शेतात वारूळ असणे हे शुभलक्षण समजले जाते. स्त्रिया नागाला बंधू मानतात. शेतकऱ्यांना नागाचे भय वाटत असले तरी उंदराच्या त्रासापासून वाचविणारा नाग, हा मित्रच वाटत असतो. नागाची वाटणारी भिती दूर करण्याची ही एक सांस्कृतिक रीत आहे. या सणात माहेरवाशिणींना माहेरी बोलावण्यात येते, आधीच माहेरची ओढ असलेल्या विवाहित तरुणींना नागपंचमीनिमित्त माहेरला येण्याचे अप्रूप असते. आई-वडील, भाऊ-बहीण यांच्या संगतीतले

माहेरपण, मैत्रिणींची गाठ पडण्याची शक्यता आणि सासुरवासातून थोडा मोकळा श्वास घेण्याची संधी यामुळे नागपंचमीची वाट आतुरतेने बघितली जाते आणि आलेल्या लेकी-बहिणी चार दिवस आपल्या मैत्रिणींसोबत खेळतात, गातात आणि आपले मन मोकळे करतात. खणखणणाऱ्या काचेच्या बांगड्या घालून, झाडाला बांधलेले झोके...स्वप्नांचेही, आभाळाला भिडवताना तिने मनातील चिरंतन व्यथा आभाळात गोंदविली. आज काळासोबत आपल्या सासर-माहेर आणि सणवार यांच्या संकल्पनाही बदलत आहेत.

**नारळी पौर्णिमा (राखी पौर्णिमा) :** श्रावण शुध्द पौर्णिमा ही नारळी पौर्णिमा अथवा राखी पौर्णिमा म्हणून ओळखली जाते. या दिवशी ब्राह्मण व इतर लोक श्रावणी करतात व नवीन यज्ञोपविते धारण करतात. पुरोहित आपल्या यजमानांच्या मनगटात राखी बांधतात.

**गोकुळाष्टमी :** श्रावण वद्य अष्टमी ही गोकुळाष्टमी अथवा जन्माष्टमी म्हणून ओळखली जाते. या दिवशी श्रीकृष्णाची पूजा विशेष प्रकारे होते. बरेच लोक उपवास करतात. जन्मोत्सव मध्यरात्री होतो. यावेळी कृष्णस्तुतीपर भजने, गौळणी व अभंग म्हणतात. रात्री बारा वाजता लहानशा सजविलेल्या पाळण्यात कुंचीत नारळ घालून पाळणा गीत म्हणतात. दुसऱ्या दिवशी दहीहंडी (दहीकाला) होते.

**पोळा :** श्रावण अमावस्येला पोळा हा सण साजरा करतात. शेतकरी लोकांत याचे महत्त्व फार आहे. या दिवशी बैलांना पूर्ण विश्रांती मिळते. त्यांच्या शिंगांना रंग लावून त्यावर बेगड आणि रंगीबेरंगी फिती लावून सजवितात. पुरणपोळी खाऊ घालून त्यांची पूजा करतात.

**गणेशचतुर्थी :** भाद्रपद शुध्द चतुर्थी ही गणेश चतुर्थी म्हणून ओळखली जाते. गणपतीची मातीची मुर्ती समारंभपूर्वक प्राणप्रतिष्ठा करून बसविली जाते व तिची पूजा करण्यात येऊन मोदकांचा नैवद्य दाखविला जातो. कुलाचाराप्रमाणे दीड दिवस, पाच दिवस, सात दिवस अथवा दहा दिवस मुर्ती ठेवून तिची सांजसकाळ पूजा होते. अलीकडच्या काळात शहरातील लोक एकत्र येऊन वर्गणी गोळा करून सार्वजनिक ठिकाणी आकर्षक देखावे तयार करून गणपतीची स्थापना करतात व संयुक्तपणे उत्सव साजरा करतात. नंतर विसर्जन करतात.

**दसरा :** नवरात्र म्हणजे दसरा आश्विन महिन्याच्या शुक्ल पक्षातील पहिले दहा दिवस दुर्गा देवीचा हा उत्सव असतो. पहिले नऊ दिवस नवरात्रचे समजले जातात. पहिल्या दिवशी घटस्थापना करतात व देवीच्या नावे घट बसवितात. त्यानंतर दरदिवशी नित्यनेमाने पूजा करतात. साडेतीन शुभ मुहूर्तांपैकी दसरा हा एक पूर्ण मुहूर्त असल्यामुळे दसऱ्याचा मुहूर्त बघून कोणत्याही शुभ कार्याची सुरुवात या दिवशी करण्याची पध्दत आहे. आपट्याची पाने सोने म्हणून एकमेकांना देऊन भेटतात.

**दिवाळी :** दिवाळी अथवा दिपावली म्हणजेच दिव्यांचा उत्सव. आश्विन वद्य त्रयोदशीला प्रारंभ होऊन भाऊबीज म्हणजे कार्तिक शुध्द द्वितीयेपर्यंत त्याची मुदत असते. विष्णूने नरकासुराचा वध केला म्हणून हा दिपोत्सव प्रथम करण्यात आला. पण चार पाच उत्सवांचा संगम दिवाळीत होतो. धनत्रयोदशीला धनाची पूजा करतात. नरक चतुर्दशीच्या दिवशी सर्व लोक अभ्यंगस्नान करतात. अमावस्येला लक्ष्मीपूजन होते. व्यापारी वर्गात या दिवसात सर्वात जास्त महत्त्व असते. नवे हिशेब

व व्यवहार या दिवशी सुरू होतात. बलिप्रतिपदा म्हणजे विक्रम संवताचा पहिला दिवस. भाऊबीज हा बहिणीने भावास ओवाळण्याचा बंधूभगिनींना एकमेकास शुभचिंतन करण्याचा व बहिणीस सप्रेम भेट देण्याचा दिवस. दिपावलीच्या पाच दिवसात घरोघरी आकाश कंदील व मातीच्या पणत्या लावतात. लाडू, करंज्या, चकल्या, चिवडा इत्यादी फराळाचे पदार्थ तयार करतात.

**महालक्ष्म्या :** भाद्रपद शुल्क अष्टमीला महालक्ष्मींचे पूजन केले जाते. हा उत्सव तीन दिवस चालतो. आवाहन, पूजन आणि विसर्जन-उत्थापन असा तीन दिवसांचा कार्यक्रम असतो. यालाच लोकभाषेत लक्ष्म्या येणे, जेवणे व जाणे असे म्हणतात. या सणाला घरातील सर्व मंडळी हजर असतात. सणाकरिता आपल्या नोकरीच्या गावावरूनही चाकरमाने अवश्यमेव येतात. कोकणातला माणूस जसा गणपतीला आपल्या गावी जातो, तसाच मराठवाड्यातील विशेषतः नांदेड परिसरातील माणूस लक्ष्माला गावाकडे येतो. या सणाचा विशेष असा की हा सण गावातील सर्व जातीचे लोक पाळतात. उच्च-नीचतेला थारा न देता लक्ष्मीपूजनाचा उत्सव तीन दिवस साजरा केला जातो. तिसऱ्या दिवशी लक्ष्मीपूजनाचे दोरे बांधून घरातील मंडळींना आपापल्या कामधंद्याकरिता जाता येते. या दोऱ्याच्या निमित्ताने कौटुंबिक धागे घट्ट विणले जातात आणि कितीही दूर गेलेला माणूस कुटुंबाशी जोडला जातो. 'ज्येष्ठा' आणि 'कनिष्ठा' अशा दोन गौरींचे पूजन केले जाते. त्या मूर्तींचे मुखवटे तयार केलेले पूजेकरिता मांडले जातात. त्यांना उभ्या लक्ष्म्या म्हणतात. ज्यावेळी मुखवटा नसतो त्यावेळी बिनमुखवट्याच्या बसलेल्या किंवा खड्याच्या लक्ष्म्या म्हणतात.

**तुळशीचे लग्न :** कार्तिक शुध्द एकादशी म्हणजे कार्तिकी एकादशी या दिवशी चातुर्मास समाप्ती होते. या नंतरच्या दिवशी तुळशीविवाह होतो. तुळशीच्या लग्नानंतर लग्नकार्याचा प्रारंभ होतो.

**वेळामावस्या :** जिल्ह्यात मार्गशीर्ष अमावस्या ही वेळ अमावस्या म्हणून साजरी केली जाते. शेतात देवतांची पूजा करून सोने पिकविणाऱ्या काळ्या आईची ओटी भरून कृतज्ञता व्यक्त करणारा हा सण आहे. त्यामुळेच शेतकरी आणि शेतीवर अवलंबून असणारे नागरिक दरवर्षी हा सण उत्साहाने साजरा करतात. या निमित्ताने कुटुंबीय, आपले नातेवाईक आणि मित्रपरिवारासह वनभोजन केले जाते. विशेष म्हणजे हा सण सर्व जाती धर्मातले लोक मनापासून साजरा करतात.

हा सण मार्गशीर्ष महिन्यात येत असल्याने शेतात रब्बीची पिके जोमदार आलेली असतात. तसेच ऊसाचे पीक काढण्याच्या स्थितीत असते. काही भागात जांबाच्या बागा, वाटाण्याच्या शेंगा, हरभऱ्याचे ढाळे बहरलेले असतात. या नैसर्गिक वातावरणाचा आनंद आपल्या कुटुंबियांसोबत आणि मित्रमंडळीसोबत घेता यावा म्हणून आमंत्रणे दिली जातात. शेतकऱ्याच्या घरी सणाची तयारी महिन्यापासून केली जाते. या सणाच्या आदल्या रात्री शेतकरी ज्वारी-बाजरीच्या भाकरी, पोळ्या, दशम्या, धपाटे, अंबिल, उंडे, भज्जी (Mixed vegetable), गव्हाची खीर असा शुद्ध शाकाहारी बेत शिजवला जातो. शिजवलेला स्वयंपाक सजवलेल्या गाडीतून शेतात नेण्यात येतो किंवा हा स्वयंपाक शेतावरच शिजवला जातो. खेड्यातील रावापासून रंकापर्यंत सर्व शेतकरी मग तो २०० एकराचा मळा असलेला जमीनदार असो की एक-दीड एकर असलेला माळरानाचा मालक असो हा सण साजरा करतात.

'वेळ' हा शब्द 'ईला' या शब्दाचा अपभ्रंश आहे. 'ईला' म्हणजे भूमी. भूमीच्या सर्जनतेबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी शेतात देवतांची पूजा केली जाते. शेतात कडब्याचा, तणसाचा, तुराट्याचा खोपा केला जातो. या खोपात पाच दगडांना चुना लावून त्यांचे पांडव करतात खोपीच्या बाहेर असेच चुन्याचे दगड द्रौपदी आणि कुंतीच्या नावाने ठेवले जातात खोपीसमोर चुना आणि काव लावलेल्या सुपाऱ्या, हळकुंड, खारका खोबऱ्याचे तुकडे घातलेली आणि नागवेलीच्या पानांनी सजवलेली गाडगी ठेवली जातात खोपीसमोर नैवेद्य उकडलेले मुटके आणि ज्वारी-बाजरीचा खिचडा ठेवला जातो या दिवशी मांग समाजातल्या पतिपत्नीला बोलावून जेवू घालण्याचा रिवाज होता असे केले तर भूमीत भरपूर धान्य येते असा समज आहे.

**मकरसंक्रांत :** मकर राशीत सुर्य प्रवेश करतो तो दिवस मकरसंक्रांत म्हणून पाळतात. मिष्टान्न भोजन होते व सायंकाळी स्त्री-पुरुष सणाचा पोषाख करून मित्रांना व नातेवाईकांना भेटतात व तिळगूळ देतात.

**महाशिवरात्र :** माघ वद्य त्रयोदशी अथवा चतुर्दशीला महाशिवरात्री असते. त्या दिवशी उपवास व शिवार्चन करतात.

**होळी :** फाल्गुन पौर्णिमेला होळी साजरी करतात. होळी हा सण मोठ्या उत्साहात साजरा करतात. पुरणपोळी हे होळीचे विशेष मिष्टान्न मानले जाते. दुसऱ्या दिवशी धुलीवंदनाचा सण असतो. त्यावेळेस एकमेकांवर रंग उधळून त्याचा आनंद घेतात.

**यात्रा :** बहुतांश यात्रा स्थानिक साधुसंताच्या किंवा धार्मिक उत्सवानिमित्त भरतात. जिल्ह्यात भरणाऱ्या यात्रेसंबंधी थोडक्यात माहिती खालीलप्रमाणे देता येईल. नांदेड पासून १५ कि. मी. अंतरावर विष्णूपुरी येथे फेब्रुवारी महिन्यात दरवर्षी नित्यनेमाणे 'महाशिवरात्री' काळेश्वर महादेव मंदिर यात्रा भरते. या यात्रेस अंदाजे पंचवीस ते पस्तीस हजार यात्रेकरुंची संख्या असते. त्याठिकाणी भाविक मोठ्या श्रद्धेने येऊन दर्शन घेऊन जातात. १९ फेब्रुवारी रोजी जिल्ह्यात सर्व ठिकाणी शिवजयंती मिरवणुकीबरोबर इतरही कार्यक्रम साजरे करतात. तर मार्च महिन्यात जिल्ह्यातील वजीराबाद येथील होळी या ठिकाणी गुरू गोविंद सिंघजी (शिखांचे दहावे गुरू) यांची समाधी आहे. त्यानिमित्ताने शिख भाविक लोक एकत्र येतात. त्याठिकाणी 'हल्लाबोल मिरवणूक' व कार्यक्रम होतो. या कार्यक्रमात अंदाजे चाळीस ते पन्नास हजार शिख भाविक एकत्र येऊन मनोभावे भक्ती व पूजा करतात. एप्रिल व ऑक्टोबर महिन्यात वजीराबाद येथेच हल्लाबोल मिरवणुक बैसाखी येथही वरीलप्रमाणेच लोक जमा होऊन मिरवणूक जिल्ह्यात सर्वत्र साजरी करतात. ऑगस्टमध्ये पंचक्रोशी यात्रा माहूर येथे दत्तशिखर दत्तात्रय यांचे नावे यात्रा भरते. त्यावेळेस पंधरा ते वीस हजार भाविक यात्रेस सहभागी होतात. तर याच महिन्यात हाजीसया दर्गा कंधार येथे श्री. हाजीराय सरवरे मगदुम उरुस भरतो. त्यावेळेस जिल्ह्यातील व तालुक्यातील अंदाजे दहा ते बारा हजार यात्रकरू हजेरी लावतात. जिल्ह्यात ऑगस्टमध्येच शाहीर अण्णाभाऊ साठे जयंती साजरी करतात. तसेच बौद्ध धर्मीयांचे वार्षिक सम्मेलन बावरीनगर अर्धापूर येथे मोठ्या संख्येने लोक हजर राहून वार्षिक सम्मेलन करतात.

जिल्ह्यात डिसेंबर महिन्यात सर्वात मोठ्या दोन यात्रा भरतात, पहिली श्री खंडोबा यात्रा माळेगाव (खंडोबा मंदिर माळेगाव), तर दुसरी माहूर येथील दत्तशिखर यात्रा (दत्त मंदिर माहूर) श्री दत्तशिखर

यात्रा दत्तमंदिर येथे जिल्ह्यातून व तालुक्यातून सुमारे एक लाख ते सव्वा लाख भाविक या शिखरावर दत्ताच्या दर्शनासाठी गर्दी करतात.* लोहा तालुक्यात भरणारी माळेगावची यात्रा (श्रीक्षेत्र खंडोबा देवस्थान) ही महाराष्ट्राच्या आर्थिक, सांस्कृतिक आणि धार्मिक जीवनात फार मोठे स्थान पटकावून आहे. कालानुरुप बदलत चाललेल्या या यात्रेचे स्वरूपही मोठे प्रेक्षणीय आहे. या यात्रेत जनावरांचा बाजार भरतो त्यात उंट, घोडे, गाढवे, गाई म्हशी, वळू आणि श्वान इत्यादींचा समावेश असतो. तसेच उंट, गाढवे, घोडे व बैल यांच्या धावण्याच्या शर्यतीचे आयोजन केले जाते. शंकरपट हा बैलजोडीचा रिंगीसह धावण्याचा कार्यक्रम महत्त्वपूर्ण आहे. संपूर्ण यात्रेच्या नियोजनासाठी तसेच पशुसंवर्धन विभागाच्या स्पर्धा, प्रदर्शन, कुस्तीस्पर्धा, शंकरपट इत्यादी उपक्रमांसाठी नांदेड जिल्हा परिषद आपल्या अर्थसंकल्पात विशेष तरतूद करते. भटक्या समाजाच्या जीवन प्रणालीचा महत्त्वाचा घटक म्हणजे जातपंचायत, ही जातपंचायत म्हणजे पिढ्यानपिढ्या चालत आलेली न्यायव्यवस्था जातीतील भांडण, तंटे, गुन्हे, काही कौटुंबिक भानगडी, देवाण-घेवाण, सोयरिक आदि आपले प्रश्नावर चर्चा करण्यासाठी नांदेड जिल्ह्यातील लोहा तालुक्यातील माळेगावच्या यात्रेत विशेषतः वैदू समाज, मसणजोगी समाज, घिसाडी समाज यांच्या विशेष तसेच गारुडी, नंदीवाले, पांगुळ, वासुदेव, डोंबारी, भटक्यातील जोशी डमरुवाले, जोशी कुडमुडे यांच्यात असलेले अंतर्गत वाद व तंटे येथे निकाली काढले जातात. एकंदरित असे म्हणता येईल माळेगावच्या यात्रेमध्ये सर्वच बाबींची लोककरण महोत्सव, पथ कला आदि गोष्टींनाही यात्रा व त्यानिमित्ताने करमणूक ह्या बाबी महत्त्वाच्या आहेत.

### करमणूक

जिल्ह्याच्या संदर्भात व त्या योगाने येणाऱ्या प्रतिवर्षी सण व उत्सावामध्ये प्रामुख्याने देवालयामध्ये कीर्तने, प्रवचने व भजने करतात. देवादिकांच्या व साधु संताच्या जयंत्या साजऱ्या करण्यासाठी कीर्तने करतात. श्रावण महिन्यात अशा कार्यक्रमांत भजनी मंडळी आढळते. सणांच्या दिवशीं आणि एकादशीला भजनी मंडळीचे मंदिरात किंवा सार्वजनिक ठिकाणी कार्यक्रम होतात. त्यावेळेस भाविक आवर्जून उपस्थित राहतात. भजन कीर्तनाप्रमाणेच गोंधळी लोक देवी माहूर व अंबाबाईच्या नावाने गोंधळ घालतात. त्याच्याबरोबर तीनचार मदतनीस असतात. एक संबळ, दुसरा तुणतुणे, तिसरा झांज वाजवितो आणि चवथा दिवटी धरतो रात्रभर चालणाऱ्या या गोंधळात सर्व अबालवृध्द हजेरी लावतात. जिल्ह्यात लग्न मुंजीसाठी कार्यक्रम पार पडल्यावर गोंधळ्यांना बोलवून गोंधळ घालण्याची प्रथा अनेक हिंदू कुटुंबात आहे. याशिवाय जिल्ह्यात उपलब्ध असलेली सिनेमागृहे, दूरदर्शन केंद्रामधून प्रसारित होणारे कार्यक्रम करमणूक म्हणून बघितले जातात.

## प्रमुख जाती व जमाती

**आंध (अंध) :** जिल्ह्यात आढळणारी एक जमात. आर. व्ही. रसेल यांच्या मते आंध लोक आंध्र किंवा तामीळ भागातील द्रविड लोकांपैकीच असावेत. आंध ही आंध्रपासुनची उत्पत्ती असावी.[६] स्थानिक लोकांकडून दौऱ्याअंती कळाले की आंध्रातून स्थलांतर केल्यावर हे नाव त्यांना प्राप्त झाले

* पोलीस अधीक्षक नांदेड यांनी ऑक्टोबर, २००६ मध्ये पाठविलेल्या माहितीवर आधारित.

६. **महाराष्ट्र भूमि व लोक,** राज्य गॅझेटिअर, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९९६, पृ. २९.

असावे. यांची संख्या जिल्ह्यात डोंगराळ भागात आढळते. सन १९६१ च्या जनगणनेनुसार आंध जमातीची जिल्ह्यातील एकूण लोकसंख्या २१,५५९ इतकी होती. त्यात पुरुष १०,७३८ व स्त्रिया १०,८२० होत्या. हे लोक उंचीने ठेंगणे, वर्णाने सावळे, जाड ओठ, मध्यम कपालिक, पसरट नाक आणि रुंद चेहरेपट्टी ही या जमातीत दिसणारी शारीरिक लक्षणे आहेत.

या जमातीची पूर्वी व आजही जातपंचायत आहे. त्यास मोहतारीया असे म्हणतात. लग्न जमवितांना समान आडनावात विवाह करण्यास प्रतिबंध आहे. घटस्फोट व पुनर्विवाह यास मान्यता आहे. जर विवाहपूर्वी एखाद्या मुलीस लग्नाअगोदर दिवस गेल्यास संबधीत पुरुषाबरोबर तिचा विवाह करण्याचा निर्णय जातपंचायत घेते. हे हिंदुच्या सर्व देवतांना भजतात, व प्रामुख्याने मारुतीची सर्व आंध उपासना करतात. आखाडी (आषाढी), गुढीपाडवा, नागपंचमी, पोळा, महाशिवरात्री, दसरा, होळी आदि सण साजरे करतात. शेती हा यांचा प्रमुख परंपरागत व्यवसाय असून प्रामुख्याने डोंगराळ भागात असल्याने शिकार व वनस्पती गोळा करणे हा त्यांचा दुय्यम व्यवसाय आहे. पर्यायी हे लोक बहुतेक मांसाहारी आहेत. आता आधुनिकीकरणामुळे व विविध कल्याणकारी योजनांमुळे आंध जमातीच्या राहणीमान, शैक्षणिक व आर्थिक सुधारणा होत आहे. या जमातीने काही प्रमाणात आपली परंपरागत पोषाखपद्धती, भाषा, रितीरिवाज कायम राखले असले तरी बऱ्याच अंशी आधुनिकीकरणाचा साज त्यांच्या समाजजीवनावर चढला आहे. इतर ग्रामीण समाजाशी तो बराच एकरूप झाला आहे.[७]

**उपरा (बेलदार) :** ही एक भटकी जात होय. ओड सोनकर, राज, लरिया, कारिगर, मत्कूड, चुनकर, मुनुरवार, थापटकरी, वडार, पाथरट (पाथरवट), टक्कारी इत्यादी पोटप्रकार आढळतात.[८] यांच्यामध्ये गोंधळे, कुदळे, चव्हाण, काटे, नवले, बोरडे, भसाटी, निवते, तुरे, हराडे ही आडनावे आढळतात. १९३१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यात उपरा (बेलदारांची) लोकसंख्या १,२६६ इतकी होती. त्यात पुरुष ६४६ तर स्त्रिया ६२० होत्या.[९] बेल या फारसी शब्दाचा अर्थ कुदळ असा आहे. त्यावरून या जातीला हे नाव पडले. बेलाच्या झाडावरून हे नाव पडले असावे.[१०] माती खणणे, विहरी खणणे, दगडकाम करणे, विटा दगड वाहून नेणे, बांधकामाकरिता लागणारी कामे करणे तसेच पाटे, वरवंटे, जाते, उखळ, चौरंग इत्यादी वस्तुही विकतात व त्यावर आपली उपजिविका करतात. बायका पुरुष दोघेही जात्यांना टाके लावतात. ते भीक कधीही मागत नाहीत. हे लोक खुप कष्टाळू आहेत. उघाडीच्या दिवसात (पावसाळा वगळता) गाढवावर सामान लादून ते काम शोधण्यासाठी भटकत राहतात.

बेलदारांची दहा-पाच बिऱ्हाडे (कुटुंबे) एखाद्या गावाच्या सीमेजवळ पाले उभारून राहतात व त्यांच्याजवळ गाढवे, शेळ्या, कोंबड्या असतात. यांच्या प्रमुख कुलदैवतामध्ये तुळजाभवानी,

---

७. **इतिहास आणि साहित्य : एक शोध, नांदेड,** म.रा.रो.म. वर्षे, १९८५-८६ नांदेड जिल्हा संदर्भ ग्रंथ समिती, १ मे १९८६ पृ. १३०.

८. रसेल, आर. व्ही., ॲण्ड हिरालाल रॉय बहादूर, **द ट्राईब्स ॲण्ड कास्टस् ऑफ दि सेंट्रल प्रोव्हिन्सेस ऑफ इंडिया,** लंडन, १९१६, पृ. २१६.

९. **सेंसस ऑफ इंडिया, १९३१,** खंड २३, एच इ एच दि. निजाम डेमिनिअन्स, हैद्राबाद राज्य पार्ट २ टेबल, पृ. २५४ ते २५०.

१०. जोशी, महादेव शास्त्री पं., **भारतीय संस्कृती कोश,** खंड ६ वा, पुणे, १९७०, पृ. २२७.

Maharashtra State Gazetteers

कानिफनाथ आणि खंडोबा या देवदेवतांचा समावेश आहे. जेजुरीच्या खंडोबाला व मढी येथील कानिफनाथाला हे लोक मनोभावे भजतात. रंगपंचमीस मढी येथे कानिफनाथाच्या यात्रेत मोठ्या प्रमाणावर लोक या जातीतील सहभागी होतात त्याठिकाणी नवस करणे, जागरण, गोंधळ घालणे, बकरे-कोंबडी कापणे, अंगात येणे आदि अंधश्रध्देचे प्रकार पहावयास मिळतात, तर महाराष्ट्रातील वेगवेगळ्या ठिकाणी या समाजातील विखुरलेले लोक एकत्र येतात. येथे लग्न जमविणे, ठरविणे, काडीमोड करणे, भांडणतंट्यातील संदर्भात विचार करणे व जातपंचायत बसवून जाती अंतर्गत प्रकरणांचा निकाल देण्याचे काम केले जाते.[११]

बेलदारांत गाढव या प्राण्याला उपयुक्त समजले जाते त्याची पुजाही करतात. बहुतेक कुटुंबाकडे चार पाच गाढवे असतातच. हे लोक मृताला पुरतात. दहा दिवस सूतक पाळतात व बाराव्या दिवशी ज्ञातिभोजन देतात. जातीतील बहुतेक लोक मोलमजुरी करून जगणारे असल्याने अजुनही त्यांची आर्थिक परिस्थिती व जीवन सुधारलेले दिसत नाही.

**कलाल :** एक जात. संस्कृत कल्यपाल, कलवार, कलार, कलान अशी नावे आढळतात. जिल्ह्यात यांची १९३१ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्या ४,००० इतकी होती. त्यात २,२७५ पुरुष व १,७२५ स्त्रिया होत्या.[१२] यांच्यात अनेक पोटजाती आहेत. कलाल हे उत्तर प्रदेशातून इकडे आले असावे. पूर्वी हे लोक दारू गाळण्याचा धंदा करीत. हे लोक लग्न जमवितांना बहुतेक जातिभोजनातच ठरवितात व लग्न ब्राह्मण पुरोहिताकडून लावून घेतात. मुलीची (वधू पक्षाकडील) आर्थिक परिस्थिती कमकुवत असेल तर वर पक्ष त्यास मदत करतो. विधवाविवाहास मान्यता आहे. जात प्रमुख हा जातीतील लोकांच्या विचाराने तंटे मिटवितो. त्यांचे राहणीमान साधे असते. धोतर, जाकीट व मराठी धाटणीचे पागोटे असा त्यांचा पेहराव असतो. हिंदूच्या सर्व देवदेवतांची पूजा करतात. विशेषतः खंडोबा, भैरोबा व देवी ही त्यांची उपास्य दैवते आहेत. हे लोक मृतास पुरतात.

**कसाब (कसाई) :** जिल्ह्यात आढळणारी एक जात. १९३१ च्या जनगणनेनुसार त्यांची एकूण लोकसंख्या जिल्ह्यात ९०० एवढी होती. पैकी ५०० पुरुष व ४०० स्त्रिया होत्या.[१३] गायकसाई व बकरकसाई असे यांच्यात दोन वर्ग आहेत. यांनाच खाटीक असेही म्हणतात. किंवा ज्या हिंदू लोकांनी हा धंदा उचलला आहे त्यास खाटिक म्हणतात. मुसलमान कसायांचीही एक जात बनली आहे. मुसलमान कसाई पशुंवर घाव घालण्यापूर्वी कुराणातले काही मंत्र म्हणतात. पशु मरण्यापूर्वी त्याचे थोडे रक्त जमिनीवर वाहू देतात. या कृतीला जिहद किंवा हलाल असे नाव आहे. कसाई मृतांना पुरतात.

**कापू :** कापू शब्दाचा अर्थ पहारेकरी असा असून त्यास रेड्डी असेही नाव आहे. शेतकऱ्यांची जात होय. त्यांच्या मालकीच्या जमिनी आहेत. त्यामुळे त्यांना मोठा मान आहे. भूमची, देसूर, गंदी,

११. चव्हाण रामनाथ, **जाती आणि जमाती,** पुणे, १९८९, पृ. ९६.

१२. **सेंसस ऑफ इंडिया,** १९३१, खंड २३, एच.इ.एच.दि., निजाम डोमिनियन्स, हैद्राबाद स्टेट, पार्ट-२, टेबल पृ. २५४ ते २५७.

१३. **कित्ता.**

कोट्टई, गाझल, कम्मपुरी, मोरस, येरलम इत्यादी पोटजाती आहेत. हे लोक अयोध्येतून इकडे आले. येथील कापूंना कापेवार म्हणतात. जातीत स्त्रियांना मान सन्मान देतात. या लोकांत मुलीचे लग्न दहा वर्षाच्या आत न केल्यास आईबाबांना वाळीत टाकतात. पण प्रायश्चित घेऊन त्यांना पुन्हा जातीत घेतले जाते. लग्न हे वरपक्षाकडे होते. मृतास जाळतात. अस्थीविसर्जन गंगेत किंवा जवळच्या अन्य नदीत करतात.

**कासार :** तांब्यापितळेची भांडी बनविणे, विकणे व बांगड्या विकणे, हा धंदा करणारी एक जात. कांस्यकार या संस्कृत शब्दापासून कासार हा शब्द बनला आहे. यांना त्वष्टा कासार, कासार, किंवा तांबट या नावानेही ओळखले जातात. हजारे, दांडेकर, गोडांबे, आर्ते, लोंबर, कडू, पिंपळे, येडेकर, त्रिभुवने, शेटे, तांबडे, समेळ, मुळे, करडे, कवळे, पारंगे, तांबट, पाटील, पुसलेकर, मांडके, लांजेकर, बोधे इत्यादी आडनावे यांच्यात आढळतात. १९३१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यात कासारांची एकूण लोकसंख्या २,८०२ इतकी होती. त्यात पुरुष १,४९६ तर स्त्रिया १,३०६ इतक्या होत्या. पूर्वी कोशांचे काम करणारा एखादा वर्ग असावा, तो भांडी व बांगड्या करीत असावा व पुढे बांगडी करणारे आणि भांडी करणारे, निराळे झाले असावेत आणि त्यानंतर काशांची भांडी जाऊन पितळाची आली असावीत व काशांच्या बांगड्या जाऊन काचेच्या आल्या असाव्यात.[१४] त्वष्टाकासार हे आपली उत्पत्ती विश्वकर्मापासून झाली आहे असे मानतात. कासारात कुळे व देवके आहेत. एकच देवक असणाऱ्या घराण्यात परस्पर लग्नसंबंध होत नाहीत. आतेबहीण व मामेबहीण भावंडांचा विवाह करण्याची प्रथा आहे. तसेच विधवा विवाह व घटस्फोटास मान्यता आहे. कासारांची महाकाली ही मुख्य देवता असून बहिरी, एकवीरा, महालक्ष्मी, खंडोबा या देवतांनाही ते भजतात.

**कुणबी :** कुणबी ही एक शेती करणारी जात आहे. या शब्दाची व्युत्पत्ती कृषिवल अथवा कुटुंबिन या संस्कृत शब्दापासून झाली असावी. एकाच ठिकाणी घर करून राहून शेतीचा व्यवसाय व पशुपालन करणाऱ्या सामाजिक गटाला उद्देशुन हा शब्द वापरला जातो. व्यापक अर्थाने कुणबी हा परंपरेने शेतीचा व्यवसाय करणाऱ्या विविध जाती गटांना उद्देशून वापरला जात असलेला शब्द आहे. जिल्ह्यात १९३१ च्या जनगणनेनुसार यांची लोकसंख्या ७,४९५ इतकी होती. त्यात ४,००१ पुरुष तर ३,४९४ स्त्रिया होत्या.[१५] मराठा व कुणबी यांच्यात फारसा फरक नाही. या जातीतील पुरुष व स्त्रिया शरीराने धडधाकट असतात. पोषाख हा शेतीसाठी साधा तर बाहेर फिरण्यासाठी चांगला असतो. कुणबी जातीत मराठा, कोकणी, खानदेशी व गुजर असे प्रमुख प्रादेशिक गट आहेत.

कुणबी जातीत देवक पद्धती आहे. एकाच कुळात व देवकवाल्यात सोयरीक होत नाही. मामेबहिणीशी लग्न करता येते. विधवा विवाह व घटस्फोटास मान्यता आहे. विवाहात धोबी व न्हावी यांना फार महत्त्व आहे. यांच्यातील पोटजाती ह्या आपआपसात लग्न करीत नाहीत. शंकर, पार्वती, खंडोबा, रोकडोबा आणि भैरव या महत्त्वाच्या देवता आहेत. सर्व सण साजरे करतात, मात्र पोळा सणाला अधिक महत्त्व देतात. मृतास जाळतात, १३ व्या दिवशी पुरोहितास बोलावून सर्व विधी करून कावळ्याला भात घालतात.

---

१४. केतकर, श्रीधर व्यंकटेश, **महाराष्ट्रीय ज्ञानकोश,** खंड अकरावा, पुणे, १९२४, पृ. ४७३.

१५. **सेंसस ऑफ इंडिया, १९३१,** खंड २३, पृ. २५४ ते २५७.

**कुरमा :** कुरमा यांना धनगरांचेच भाईबंद म्हणून ओळखतात. ते जिल्ह्यात चांदा जिल्ह्यातून मेंढपाळीसाठी आले असावेत. हे आपणास जुन्या पल्लव घराण्याचे वंशज समजतात. १९३१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यात यांची संख्या एकूण २,४७४ इतकी होती. त्यात १,१४४ पुरुष तर १,३३० स्त्रिया होत्या.[१६] त्यांची भाषा कानडीचे एक स्वरूप आहे. यांच्यात वधूची निवड करतांना तिच्या डोक्यावरील केसातील भोवरे पाहून करतात. लग्न हे कांबळे विणण्याच्या धोट्यावर बसून करतात. एका लहान बाहुलीला झोंका देऊन ती वधूजवळ देतात. वधू ती नवऱ्याला देते. नंतर ती म्हणते की हिला सांभाळ मी स्वयंपाक करते. नवरा कधी कधी ती परत तिला देतो व म्हणतो की मी कांबळे विनतो तूच सांभाळ.

**कुंभार :** मातीची भांडी घडविणारी एक जात. कुंभकार या संस्कृत शब्दावरून कुंभार हा शब्द बनलेला आहे. यांच्यात एकूण २३ कुळ्या असून या सर्व कुळ्या मराठा, कोकणी, गुजराती व परदेशी या चार प्रकारात समाविष्ट होतात. कुंभार हा बारा बलुत्यांपैकी एक आहे. १९३१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यात यांची संख्या एकूण ८,८०२ इतकी होती. त्यात ३,८३२ पुरुष तर ४,९७० स्त्रिया होत्या.[१७] जिल्ह्यातील कुंभार घागरी, दुधाणे, ताकाचा डेरा, सुगडे, वेळण्या, पंथ्या, चिटकी (कोरड्यासाची), रांजण, कोथळी आदि जिनसा करून विकतात.[१८] पूर्वी कुंभार ह्या वस्तू बलुत्याला देई किंवा पुरवी व त्याबदल्यात त्याला वर्षाकाठी धान्य मिळे. आता ही प्रक्रिया हळूवार कमी होत चालली आहे. अढाव, भालेराव, चौगुले, दिवटे, जाधव, जगदळे, जोंधळे, जोखेकर, काळे, कापडे, लोणकर, माणमोडे, सोनवणे, वागचौरे, वाघमारे इत्यादी आडनावे यांच्यात आढळतात.

हे लोक आपापल्या वर्गातच लग्न करतात. घटस्फोट व पुनर्विवाहास मान्यता आहे. देवी, महादेव, भैरोबा व खंडोबा ही कुलदैवते आहेत. मृतास जाळतात. अस्थी विसर्जन धार्मिक स्थळी करतात. कुंभार समाजात गाढवाला महत्त्वाचे स्थान आहे. श्री खंडोबा यात्रा माळेगाव, जि. नांदेड येथे १९ डिसेंबर ते २३ डिसेंबर या पाच दिवसांच्या कालावधीत यात्रा भरते. त्यावेळेस सर्व जाती, जमातीचे लोक एकत्र येतात. त्यावेळेस कुंभार समाजाचेही लोक एकत्र येतात व याच यात्रेत गाढवांचा बाजार भरतो. गाढवांची किंमत १,००० ते १,५०० पर्यंत असते. खंडोबाच्या यात्रेच्या वेळी कुंभार आपल्या घरी गाढवांची पूजा करतात. मातीची मडकी रोख तसेच धान्याच्या मोबदल्यात विकतात. शहरात स्थलांतरित झालेले कुंभार स्वतःच्या व्यवसायाबरोबर इतरही व्यवसाय करतांना दिसतात. खेडेगावात माती आणि इतर साहित्य वेळेवर मिळत नसल्यामुळे हा व्यवसाय अडचणीत असल्याचे त्यांच्या मुलाखतीवरून आढळून आले. कुंभारांची बायका-मुले याच कामी मदत करतात.

**कैकाडी :** जिल्ह्यात आढळणारी एक विमुक्त जमात. आपले मूळ ठिकाण तेलंग होय असे ते सांगतात. ते तेथून इकडे स्थलांतरीत झाले असावे. यांच्यात धनताळे, कामाठी, काईजी, लमाण, कुंचेकरी (माकडवाले), उरुकैकाडी, वाइबसे (वायबसे), बोरीवाले, व भामटे अशा नऊ पोटजाती

---

१६. सेंसस ऑफ इंडिया, पूर्वोक्त, पृ. २५४ ते २७०.

१७. कित्ता.

१८. अत्रे, त्रिंबक नारायण, **गांवगाडा,** वरदा सेनापती बापट मार्ग, पुणे, १९८९, पृ. १११.

आहेत.[१९] यांची मातृभाषा तेलगू सांगितली जात असली तरी, तामिळी आणि कानडी या भाषेचे शब्द एकत्र करून एक वेगळीच भाषा हे लोक बोलतात त्याला ग्रामीण भागात कैकाडी भाषा असे नावे आहे.[२०]

कैकाडी हे ज्या ठिकाणी जातील तेथे गावाबाहेर उघड्या पटांगणात झाडाच्या सावलीला उतरतात. त्यांची चार पाच किंवा अधिक बिऱ्हाडे (कुटुंब) असतात. प्रत्येक बिऱ्हाडास दोन किंवा तीन गाढवे, शेळ्या, कोबड्या व कुत्री असतात ते पिटकुल, करंजी, तरवड, वगैरेचे फोंक काढून त्यांच्या पाट्या कणगी, कोंबड्यांचे ढाले किंवा झांप करतात आणि विकतात.[२१] गावकैकाडी निरनिराळ्या झाडांच्या फोकापासून शेतकऱ्यांना धान्य साठविण्यासाठी कणगी, खताडे, डाले, डुरकुले, पाटण ताटी (सितर फडका), पेटारे (सालद) इत्यादी वस्तू तयार करतात. पाटणा तयार करण्यासाठी कैकाडी लोक शिंदी, गावरान पळाटी, निरगुडी, पारिजात, बाभूळ, चिंच, रबलीचे वेल, कन्हेर, कारंजी इत्यादी झाडांच्या फोकांचा वापर करतात.[२२]

यांच्यात पूर्वी जातपंचायत होती. आताही काही ठिकाणी अस्तित्वात आहे. जातीतील लोक स्वतःच्या उपजातीत लग्नविधी करतात. एकाच कुळातील मुला मुलींची लग्ने होत नाहीत. घटस्फोट, पुनर्विवाह व विधवाविवाहास मान्यता आहे. स्त्री प्रस्तुत झाल्यावर पाचवीपुजन ऐपतीनुसार करतात. हे लोक बहिरोबा, भवानी, मरीआई, फिरंगाई, तुकाई, यमाई, मारुती, खंडोबा आदि देवतांना भजतात. किंवा पूजा करतात. गांवदेवी, फिरस्तीदेवी आणि कुलदेवीची पूजा करतात. फिरस्तीदेवीचा कौल घेतल्याशिवाय कैकाडी आपला मुक्काम हलवीत नाहीत. यांच्यात सातदेवी ह्या प्रमुख मानतात. या समाजात स्त्रियांना गोंदून घेण्याची फार आवड आहे. स्त्रिया हातावर तसेच कपाळावर तर पुरुष हातावर गोंदून घेतात.

हे लोक मृतांना जाळतात किंवा पुरतात. मग ज्ञातीभोजन घालतात. श्राद्ध करीत नाहीत. मृताचा टाक करून ठेवतात व त्यांची पूजा करतात.

**कोमटी :** जिल्ह्यात आढळणारी एक व्यापारी जात. कोमटी हे नाव कोमति, गो-मति, कु-मति अशा प्रकारच्या उपपत्या पुढे येऊन गोमतीचे तेलगूंत कोमटी असे अपभ्रष्ट रूप झाले असावे. गोदावरीच्या तीरावर कोमटी लोकांची पुष्कळ वस्ती आहे. १९३१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यात यांची लोकसंख्या १७,०३० इतकी होती. त्यात ९,९५९ पुरुष तर ७,०७१ स्त्रिया होत्या.[२३] या लोकांची मुख्य भाषा म्हणजे तेलगू होय. ज्या ठिकाणी ते राहतात त्या ठिकाणची भाषा शिकून घेतात. कोमटी लोकांची व्यापाराची एक निराळी सांकेतिक भाषा असते.

---

१९. केतकर, श्रीधर व्यंकटेश, खंड अकरावा, पृ. ६९६.

२०. चव्हाण, रामनाथ, पूर्वोक्त पृ. ३४.

२१. अत्रे, त्रिंबक नारायण, **गांवगाडा,** वरदा सेनापती बापट मार्ग, पुणे, १९८९, पृ. ११८.

२२. मांडे, प्रभाकर, **गावगाड्याबाहेर,** औरंगाबाद, १९८३, पृ. १२१-१२२.

२३. **सेंसस ऑफ इंडिया, १९३१,** पूर्वोक्त, पृ. २५४-२५७.

गवर कोमट्यात अनेक पोटभेद असून त्यापैकी काही शैव, काही वैष्णव तर काही माध्वपंथी आहेत. धंद्यावरून यांच्यात अनेक पोटजाती निर्माण झाल्या आहेत. गवर व कलिंग यांच्यात परस्पर लग्नसंबंध होत नाहीत. धंद्यावरून पडलेल्या जातीत रोटीबेटी व्यवहार होत नाहीत. यांची देवके प्राणी व वनस्पती असतात. जिल्ह्यातील कोमटी हे कोमटीकन्यका ' परमेश्वरी ' या कुमारी देवतेला भजतात. किंवा पूजा करतात. याशिवाय ते बालाजी व हिंदू देवतांचीही पूजा करतात. मृतास दहन करतात व अस्थी गोळा करून पवित्र स्थानी त्यांचे विसर्जन करतात. कोमटी लोक व्यापारी, वाणी आणि सावकार म्हणून प्रसिध्द आहेत. हे लोक हुशार मेहनती, मितव्ययी व श्रीमंत असून दानधर्माकडेही त्यांची प्रवृत्ती आहे. ते सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक क्षेत्रात मदत करतात.[२४]

**कोलम (कोलाम) :** ही एक आदिवासी जमात. महाराष्ट्र शासनाने कोलाम ही अतिमागास जमात (Primitive) म्हणून घोषित केली आहे.[२५] नांदेड जिल्ह्यात डोंगर भागात यांची वस्ती आढळून येते. कोलामांना 'मेटलाकु' किंवा 'मुगलायकुल' असेही म्हणतात. कोलाम हे द्रविडीय वंशाचे लोक असून गोंडाशी त्यांचे पुष्कळ साम्य आहे. जिल्ह्यात यांच्यात टेकाम, आतराम, चिराम, नाइताम इत्यादी आडनावे आढळतात. यांची वस्ती दुर्गम डोंगरात असल्याने त्यांचा व्यवसाय शेती हा होय. डोंगराच्या उतारावर नुसत्या कुदळीने जमीन खणून तीथे हे धान्य पेरतात. त्यांच्या या शेतीला पोद्दू असे नाव आहे. कोलाम लोक गावच्या मूळ वस्तीपासून थोडे दूर राहणे पसंत करतात. यांच्या वस्तीला 'कोलाम पौड' असे म्हणतात. कोलाम पौडात पंचायतीची निवडणूक होते. 'नाईक' हा पंचायतीचा अध्यक्ष असतो. गोंडाप्रमाणेच कोलमांची कुल आणि गोत्र रचना आढळून येते ती खालीलप्रमाणे देता येईल.[२६]

| देवगट | गोत्र | कुलनाम | कुलचिन्ह |
|---|---|---|---|
| अडीच किंवा तीन देव | कोवे | आतराम | कोवी-मातीची येरणी |
| चार देव | टेकाम | टेकाम | सागवान-झाड |
| पाच देव | भिकून | भिकून | बिब्बा-भिलाना झाड |
| सहा देव | झारीकूल | झोडे | मुसक्याची जाळी |
| सात देव | केरगामा | मसराम | केळीचे झाड |

कोलाम हे काळ्या रंगाचे असून मध्यम उंचीचे असतात. धोतर, शर्ट, शेला (पंचा), डोक्याला मुंडासा किंवा टोपी हा पुरुषांचा तर स्त्रिया लुगडा किंवा दिडकी हा परंपरागत पोषाख आहे. सुधारलेली

२४. जोशी, महादेवशास्त्री पं., **' भारतीय संस्कृती कोश ',** खंड दुसरा, पुणे १९६४, पृ. ५६७-६८

२५. देवगावकर, शैलजा, **' महाराष्ट्रातील आदिवासींचे लोकसाहित्य '** श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००७, पृ. १०२.

२६. देवगावकर, श. गो. आणि देवगावकर, शैलजा, **आदिवासी विश्व** आनंद प्रकाशन, नागपूर, २००१, पृ. २९-३०.

Maharashtra State Gazetteers

तरुण पिढी पॅन्ट आणि शर्ट घालतात, तर नवीन मुली साडी, पोलके तसेच सलवार सूटही घालतांना दिसतात. स्त्रिया मुकरा, साखळी, सरी, पाटल्या, जोडवे इत्यादी दागिने वापरतांना दिसून येतात. पुरुष फक्त चांदीचे कडे आणि करदोडा वापरतांना दिसतात. स्त्रियांमध्ये गोंदवून घेण्याची प्रथा आहे.

यांच्यात एका गोत्रात विवाह होत नाहीत. पूर्वी विवाह हे मुलाच्या घरी होत असत आता दोन्ही पक्षाकडे (वधू, वर) विवाह होतात. पूर्वी बुधवार व शनिवारी सांयकाळीच लग्ने लावत आता तसे आढळत नाहीत. तसेच पौष महिन्यातही विवाह करीत नाहीत. वधूमुल्याची (देज) प्रथा आहे. लग्नात सालईच्या झाडाचा मुंड आवश्यक असतो. हळद लावणे, देवदेवतांची पूजा करणे, तीन वेळा नवऱ्याच्या डोक्यावर पाणी ओतणे व मुलीच्या डोक्यावर दोन वेळा पाणी ओतणे असे विधी होऊन विवाह होतो. एखादा मुलगा वधू मूल्य देऊ न शकल्यास सासऱ्याच्या घरी 'इटलाम' (घरजावई) म्हणून राहतो. घटस्फोट व पुनर्विवाहाची प्रथा आहे.*

हे लोक आई, देवी, करामी, मुराई, भोवानी (भवानी), रेणुका, माहुरता देवी, चंडाका, भिमायक (भिमसेन), जंगोबाई, मानको, जैतूर, जलायाक, संसुरवाल, पेटतादियाम, मारोती, म्हसोबा या देवतांची पूजा करतात. कोलाम बडा देवाचीपण पूजा करतात. कोलामांचे वैशिष्ट्यपूर्ण सण म्हणजे गावबांधणी, दसरा, फूलझाडणी (भाद्रपद), भुरी किंवा मोहडोम्बरी हे असून या सणाबरोबर नागपंचमी, पोळा, दिवाळी, होळी, गणेश आणि दुर्जापूजा हे उत्सवपण साजरे करतात.

हे लोक मृतास पुरतात. दोन ते तीन दिवस सुतक पाळतात. तिसऱ्या दिवशी तेरवी साजरी करतात. भात, ज्वारीच्या कण्या व मृत व्यक्ति स्त्री असेल तर कोंबड्याचा बळी देऊन जेवण देतात. त्यांचा पुनर्जन्मावर विश्वास आहे. मृत व्यक्तीच्या आत्म्याला शांती मिळावी म्हणून तीन वर्षांच्या आत गोंधळ करतात. शेतीबरोबर, दगड फोडणे, शिकार करणे, कंदमुळे गोळा करणे, डींक गोळा करणे, टोपल्या विणने हे ते व्यवसाय करतात. कोलामांचे आधुनिक जगाशी संपर्क आल्यामुळे यांच्यात शिक्षणाचे प्रमाण वाढत असूनही नोकऱ्या मिळत नाहीत.

**कोया (राजकोया) :** एक डोंगरभागात राहणारी डोंगरी जात. यांनाच कोयी असेही म्हणतात. हे पण लोक गोंड वंशाचे आहेत असे म्हणतात. हे लोक एकाच ठिकाणी स्थिर राहत नसून ते एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी राहावयास जातात. एका ठिकाणचे रान जाळून त्यात बी पेरुन शेती करतात व ती जमीन नापीक झाल्यावर दुसरीकडे जातात. यांच्यात वराची आर्थिक स्थिती चांगली असेल तर तडजोड करून विवाह करतात. मात्र साधारणतः वराकडील मंडळी वधूला जबरदस्तीने पळवून नेतात व लग्नाच्या वेळी मात्र तिच्या दुःखित आईबापास निमंत्रण पाठवितात. वधूवरांना एकत्र स्नान घालून लग्न लावतात व त्यांच्यासह ज्ञातीभोजन देतात. भोजनसमारंभ उरकण्यात आला की लग्न झाले असे समजतात. नंतर गाणे बजावणे व नाच वगैरे समारंभ करण्यात येतात. ह्या जातीचा

* टेकाम, रामबाई, माजी पंचायत समिती सदस्य, मांडवी, यांच्या मुलाखतीवर आधारित (कार्यालयाने केलेल्या जानेवारी, २००९ च्या सर्वेक्षणावर आधारित).

आवडता विषय म्हणजे नाच होय. यांच्या कोमालम्मा, काटुरुडू, आडारदाराझु अशा त्यांच्या देवता आहेत. हे लोक मृतास लहान असेल तर पुरतात मोठ्या व्यक्तिस जाळतात.[२७]

**गुरव :** जिल्ह्यात आढळणारी एक जात. शंकराच्या मंदिरातील पुजारी म्हणून त्यांची ओळख आहे. दधिची ऋषीपासून गुरवांची उत्पत्ती झाल्याचे शिवपुराणात सांगितले आहे. पुजेसाठी नेमून दिलेल्या शेतावर व दक्षिणादी उत्पन्नावर त्यांना उपजीविका करावी लागते. गुरव देवपूजा, देवळाची झाडलोट व दिवाबत्ती करतो[२८] तर काही गुरव बाशिंग आणि मुकुट बनविण्याचा व्यवसाय करतात.

यांच्यात अनेक पोटभेद आहेत. लिंगायत, जानवे घालणारे आणि लिंग व जानवे दोन्ही धारण करणारे असे हे धर्मपरत्वे भेद आहेत. याशिवाय यांच्यात जैन गुरवही आहेत. गुरव जातीत गोत्र अथवा बहिर्विवाही समूह नाहीत. तरी पण एकच आडनाव असलेल्यांशी विवाह करीत नाहीत. यांच्यामध्ये लोखंडे, फुलझरे, सोनटक्के, गायकवाड इत्यादी आडनावे आहेत. या जातीत मामेबहिणीशी विवाह करण्याची पद्धती आहे. तसेच विधवा पुनर्विवाह व घटस्फोटास मान्यता आहे. हे मृत व्यक्तिचे दहन करतात.

**गोसावी :** जिल्ह्यात आढळणारी एक भटकी जमात होय. गोसावी, गोसाई, गुसाई, गोस्वामी ही सर्व नावे गोस्मामिन् या संस्कृत शब्दावरून निघाली आहेत.[२९] नांदेड जिल्ह्यात १९३१ च्या जनगणनेनुसार गोसावी जमातीची एकूण लोकसंख्या ५,२४९ इतकी होती. त्यापैकी ३,०१५ पुरुष व २,२३४ स्त्रिया होत्या.[३०] यांच्यात बावा, बैरागी, भारती, गिरी गोसावी, भारती गोसावी, सरस्वती पर्वत, सागर, बान किंवा वान तीर्थ आश्रम, रण्य धरभारी, संन्याशी, नागपंथी गोसावी अशा पोटजाती आहेत. गोसाव्यांची जात पंचायत आहे. यांच्यात शैव व वैष्णव असे दोन भेद आहेत. थोड्या फार फरकाने साडेबारा पंथ आढळतात. जिल्ह्यातील गोसावी हे आपले मूळ स्थान गुजरात राज्यात असल्याचे सांगतात. त्यामुळे त्यांची भाषाही गुजराती व मारवाडी मिक्स अशीच आहे.

इतर भटक्या विमुक्तातील गोसावी समाजातही जात पंचायत आहे. त्यांच्या प्रमुखास ' मुखिया ' म्हणतात. यांची प्रमुख दैवते म्हणजे धारदेवी, राजामोगल देवी, सातदेवी, अंबिका, लक्ष्मी, सितला देवी, मरिआई, खंडोबा, लक्ष्मी आई, काळा भैरवनाथ इत्यादी आहेत. नवरात्र महोत्सव मोठ्या प्रमाणात साजरा करतात. विवाहाची पध्दत हिंदू पध्दतीनुसारच आहे. होमहवन, मंगलाष्टके, सप्तपदी आदी सर्व प्रकार केले जातात. मृतास दहन करण्याऐवजी त्याचे दफन करण्याची प्रथा पूर्वीपासून आहे.

शिक्षणाच्या प्रसारामुळे गोसावी समाज, आता पूर्णपणे गृहस्थी बनलेला आहे. दाढी, केस, रुद्राक्षाच्या माळा आणि भगव्या कफन्या यांचा जवळजवळ त्या लोकांनी त्याग केलेला आहे. जे काम मिळेल ते करायचं आणि पोट भरायच हाच त्यांचा दिनक्रम ठरलेला आहे. या समाजातील काही

---

२७. केतकर, श्रीधर व्यंकटेश, (खंड ११) पूर्वोक्त पृ. ७७२.

२८. अत्रे, त्रिंबक नारायण, पूर्वोक्त, पृ. ११२.

२९. जोशी, महादेवशास्त्री पं., **भारतीय संस्कृती कोश,** खंड तिसरा, पुणे, १९६५, पृ. १९२.

३०. **सेंसस ऑफ इंडिया, १९३१,** पूर्वोक्त, पृ. २५४ ते २५७.

लोक आता एका ठिकाणी स्थिर होत आहे. ते निरनिराळे व्यवसाय करू लागलेत. पोटासाठी वणवण भटकंती सोडून एका ठिकाणी मिळेल तो घासतुकडा इज्जतीने मिळावा ही त्यांची इच्छा आहे.[३१]

**गोंड* :** जिल्ह्यात आढळणारी एक जमात. प्रामुख्याने किनवट व माहुर परिसरात यांची अधिक संख्या आहे. गोंड या शब्दाचा अर्थ 'जंगलात राहणारा' असा होतो. 'गो' म्हणजे जंगल आणि अड म्हणजे मूळ निर्मितीची जागा म्हणजे जंगलात राहणारे लोक असा 'गोंड' या शब्दाचा अर्थ होतो.[३२] गोंड हे दक्षिणेकडून मध्य प्रांतातून गोदावरी ओलांडून ते चंद्रपूर भागात व पुढे नांदेड भागात आले असावेत. मध्य प्रदेशात विंध्य व गोदावरी यांच्या मधल्या भागाला गोंडवन असे नाव आहे. साधारणपणे जंगलाच्या आसपास आणि पैनगंगा, गोदावरी, इंद्रावती अशा नद्यांच्या जवळ प्रामुख्याने यांची वस्ती आढळून येते. गोंडाच्या उत्पत्तीबाबत अनेक आख्यायिका आहेत.

गोंड जमातीत अनेक पोटजमाती आहेत. यात गोंड किंवा राजगोंड, आरख, अराख, अगारिया, असूर, बडोमारिया इत्यादी पोटजाती आढळतात. जिल्ह्यात यांच्यात चार देवगट आहेत. व त्यानुसार त्यांची आडनावे आहेत.

| देवगट | आडनावे |
|---|---|
| १. ४ देवे | — सिडाम, सेडमाकी, परचाकी, कोवा. |
| २. ५ देवे | — आडे (अडूर), घोडाम, किनाके, अरका, कुंमरा. |
| ३. ६ देवे | — आत्राम, गेडाम, तोडासाम, वुलके (उलके), कोडापा, मंडाळी. |
| ४. ७ देवे | — मडावी, मरसकोल्हे, पुरके, पंधरे, वेडमा, मेसराम, मडपची. |

यांच्यात एका कुलात अनेक कुळी असतात. या कुळींचे आपापसात विवाह होत नाहीत. ६ देवे व ५ देवे, ५ देवे व ४ देवे, यांच्यात सोयरेसंबंध जुळते. ५ देवे व ७ देवेची सोयरीक होऊ शकत नाही. लग्न जमवितांना गावातील प्रमुख व कुठलाही निर्णय घेण्यासाठी **महाजन, घट्या, देवारी** आणि **कारभारी** ह्या प्रमुख व्यक्ती आहेत किंवा त्यांना महत्त्वाचे स्थान आहे. गोंड समाजात जात पंचायत आहे, त्याच्या प्रमुखास महाजन असे म्हणतात. त्याच्या सहायकास गठ्याळ म्हणतात. गोंडामध्ये परंपरागत अर्थाने बालविवाह होत नाहीत. मुलाशी/मुलीशी वयात आल्यानंतरच विवाह होतात. मुलगी/मुलगा आपल्या पंसतीच्या मुलाशी/मुलीशी विवाह करू शकतात. मात्र त्यातही वरीलप्रमाणे देवगटाचे बंधन पाळले जाते. पूर्वी यांच्यात सोयरीक जमवतांना मुलाकडील मंडळी गावातील १५ ते २० बायका व पुरुष मिळून ज्या गावी सोयरीक असेल (मुलगी) त्या गावी जाऊन

३१. चव्हाण, रामनाथ, पूर्वोक्त, पृ. १५-१६.

* गोंड जमाती संबंधी माहिती कार्यालयाने जानेवारी, २००९ मध्ये केलेल्या सर्वेक्षणाद्वारे, ॲड. माधवराव मरसकोले, पं. स. स. जावरला, श्री. इश्रू मडावी (निवृत्त शिक्षक), उमरी बाजार, सौ. रामबाई टेकाम, पं. स. स. मांडवी यांच्या मुलाखतीवर आधारित.

३२. देवगावकर, श. गो. आणि देवगांवकर, शैलजा, पूर्वोक्त, पृ. ९.

Maharashtra State Gazetteers

प्रथम महाजनाच्या घरी जायचे. तेथे गेल्यावर महाजन देवारीला बोलावून सर्व वृत्तांत सांगून गावातील पंचाना बोलावयास पाठवितो. मग रितसर विवाहविषयक बोलणी होऊन विवाह ठरतो. त्यानंतर दोघे व्याही (वधू-वराकडील) एकत्र येऊन लग्नासंबंधी तारीख ठरवतात. यांची लग्ने शक्यतो होळी पंचमीला जास्त होतात. लग्नाची तारीख पक्की झाल्यावर नवरदेवाचे वडील आपल्या घरी आल्यावर देवारीला निरोप पाठवून लग्नासंबंधी माहिती देतात व त्यानुसार लग्नाच्या तयारीला लागतात.

लग्नाच्या १ दिवस अगोदर नवरदेवाकडून दोन माणसे नवरीकडे पाठवितात त्यांना 'सुरवर्ते' असे म्हणतात. पूर्वी हे 'सुरवर्ते' बैलगाडीने वधू पक्षाकडे जात. आता मोटर सायकल, बस या साधनांनी जातात. जातांना नवरदेवाचे वडील त्यांच्याकडे २०० रुपये देतात. तसेच बर्डी सुपारी २० नेतात. वधूच्या गावी गेल्यावर ह्या सुरवर्तेना फार मान असतो. त्यांचा पाहुणचार झाल्यावर नंतर तेथील देवारीकडून ढोल, सनई वाजवत हनुमानाच्या मंदिरात प्रथम जातात. तेथे पूजा करून सुपारी व ५ रुपये याप्रमाणे गावातील इतर जेवढ्या स्थानिक देवता असतील तेथे सुरवर्ते हे ३ रु. २ रु. याप्रमाणे ठेवत जातात. भिमदेवास, (मोहाच्या झाडाखाली), मरई व इतर देवतांना ढोल वाजवीत फिरवले जाते, व नंतर देवपूजा झाल्यावर सर्वजण नवरीच्या घरी येतात. घरी आल्यावर बाया ५ तांबे गोळा करतात. उपस्थित गोन्या टाकून (किंवा परिस्थितीनुसार जे उपलब्ध होईल ते) बसतात. ५ तांबे चौकोनी मांडून त्यास दोरा बांधून मध्ये पाट मांडता. नंतर वधूस बोलावतात ती उपस्थितांना नमस्कार करून पाटावर उजवा पाय प्रथम ठेवून नंतर बसते. बसल्यानंतर दोन वेळा स्नान करून दोन वेळा अंगाला हळद लावतात. त्यानंतर ओल्या कपड्यावर घरात नेऊन नवीन कपडे घालतात.

दुसऱ्या दिवशी नवरीकडील वऱ्हाडी मंडळी व सुरवर्तेसह मुलाकडे (नवरदेवाकडे) वाजतगाजत येतात. गावात आल्यावर प्रथम हनुमान मंदिरात थांबतात. त्यावेळेस नवरदेवाकडील ही मंडळी वाजतगाजत हनुमान मंदिरात जातात. तेथे पोहचल्यावर नवरदेवाकडील महिला नवरीचे पाय धुतात. उपस्थितांना बीडी-पान वाटतात. त्यानंतर नवरदेवाकडील मंडळी पाहुणे मंडळींना एक एक कांदा (हिरव्या पात्यासह) व त्याबरोबर पाणात आंबील खावयास देतात त्यास 'उलींग जावा' म्हणतात. त्यानंतर नवरी ज्या देवेत येते त्या आडनावाच्या घरीच वऱ्हाड मुक्कामास ठेवले जाते व त्यांची जेवनाखानाची व्यवस्था नवरदेवाचा बाप (वरपिता) करतो. ज्या ठिकाणी वऱ्हाड ठेवले जाते त्या घराला 'जानोसारोन' म्हणतात.

तिसऱ्या दिवशी लग्नविधीच्या वेळी नवरी व नवरदेवास स्वतंत्र अशी एक मार्गदर्शन करणारी महिला असते तिला 'तंगे' म्हणतात. पूर्वी गावाच्या बाहेर गाईच्या गोठ्यात व मारुतीच्या समोर पहिल्या अक्षदा टाकत असत. त्या जागेस 'गौरदार गोठाम' असे म्हणत. त्या ठिकाणी दोन्हीकडील महिला एकाच वेळी गाणी म्हणतात. तेथून नवरदेवाच्या घरी वरात वाजत गाजत नेतात. मांडवाच्या बाहेर नवरा नवरीचे पाय धुतले जातात व दोघांनाही स्नान घातले जाते. बहुल्यावर ५ कुंभाराची गाडगी असतात त्याला सूत गुंडाळून गाडग्यात पाणी, १:२५ रुपया, हळद, कुंकू लावून गाडग्याखाली ज्वारी ठेवतात व गाडग्यांवर पणत्या लावतात. अशा बहुल्यावर (सालई झाडाचे बहुले करतात) वधू-वरास उभे करून, नवऱ्याचा मेहुणा, नवरीचा मेहुणा दोघांना काखेस घेतात व बहुल्याच्या भोवती

Maharashtra State Gazetteers

वाजत गाजत व नाचत उजवीकडून फिरतात व एक दोन चक्कर मारून नवरदेवाच्या हातात गुलाल देतात व तो नवरीच्या अंगावर उधळतो. तर नवरी नवऱ्याच्या अंगावर गुलाल उधळते पूर्वी मंगलाष्टके म्हणत नसत त्यास 'साबोदान' म्हणत. आता मंगलाष्टके म्हणून लग्न लावले जाते. मात्र ब्राह्मणास बोलवित नाहीत. गावचे पंच पारंपारिक विधीनुसार लग्न लावतात.*

विवाहित स्त्रिला घटस्फोट मागण्याचा हक्क आहे. जमातीच्या गावपंचायतीसमोर ती आपले म्हणणे मांडू शकते. पुनर्विवाहाची पध्दत आहे. विधवा विवाहसुध्दा प्रचलित आहे. मुलाच्या जन्मानंतर ५ दिवस सुहेर पाळतात. संपूर्ण गावच्या बाया जमा करून पाचवी करतात व त्यामध्ये सर्व बायकांना तिळगूळ, १ किंवा २ रुपये तसेच ज्वारीच्या कण्या व कढीचे जेवण देतात. गोंडाच्या मोठा देव (फेरसापेन), भिमदेव, जंगूर रायताड (जंगो देवी) यांना श्रेष्ठ देवता मानतात. शिवाय महाकाली, भिमालपेन, श्री रेणुकादेवी, श्री कामाख्यादेवी, श्री पोहरादेवी इत्यादींना भजतात. वृक्षांची पुजाही करतात. पोळा, शिमगा, दिवाळी, गुढीपाडवा हे महत्त्वाचे सण साजरे करतात. दिवाळी १० दिवस साजरी करतात त्यावेळी 'दंडार' काढतात त्यास 'येत मसार' असे म्हणतात. गोंडांचे 'ढेमसा' नृत्य आनंदाच्या प्रसंगी किंवा देव बसविण्याच्या प्रसंगी करतात. स्त्री-पुरुष मिळून प्रचंड ढोलाच्या तालावर हे नृत्य करतात. झेंडा लावलेली काठी मोरपिसे सल्ले आदिंनी सजवून तिला रंगीत वस्त्रे बांधतात त्यालाच फेरसापेन देव म्हणतात. एका व्यक्तिच्या गळ्यात मोठा ढोल अडकवितात दुसरे दोघेजण तो ढोल वाजवितात. एका काडीने, हाताने आणि दोन काड्यांनी ढोल वाजवितात व नृत्य करतात. ढोल, पुंगी व घुंगराच्या तालावर नाचले जाणारे 'गोंडी' नृत्य हे एक दणकेबाज नृत्य आहे. शिट्या वाजवून, मधून-मधून आरोळ्यायुक्त हुंकार देऊन हातात टॉवेल किंवा रुमाल घेऊन वादकाच्या सभोवती हसतमुख मुद्रेने नृत्य करतात. विविध सणांच्या प्रसंगीही नृत्ये करतात.[३३]

मृत व्यक्तिला पुरण्याची प्रथा आहे. त्याजवळ आवश्यक असलेल्या वस्तू ठेवतात. ६ महिने, १ वर्षे, २ वर्षे, किंवा १० वर्षांपर्यंत केव्हाही श्राद्ध करतात. शेती, शिकार, जंगलात मजुरी व शेतमजुरी हे निर्वाहाचे त्यांची साधने आहेत. जंगलातील उत्पादने हिरडा, बेहडा, डिंक, मोहाची फुले, तेंदुपत्ता, मध इत्यादी गोळा करणे हेही उदरनिर्वाहाचे साधन आहे. बांबू व लाकडापासून नित्य उपयोगाच्या वस्तू चट्या (चटया), टोपल्या व हस्तकौशल्याच्या अनेक कोरीव वस्तू ते तयार करतात. गोंड पुरुष व स्त्रिया कष्टाळू असून घरगुती कामाबरोबरच शेतीची कामे लाकूडफाटा तोडून आणणे यासारखी कामे देखील करतात.

**चांभार :** चांभार किंवा चर्मकार या नावाने ओळखणारी जिल्ह्यात आढळणारी एक जात. चांभार हा जातिवाचक शब्द 'चर्मकार' या संस्कृत शब्दापासून आला आहे. या लोकांना मोची, चमार, चमगार व समगार अशीही नावे आहेत. यांच्यात भोईर, गायकवाड, साळवी, महाडिक, चांदोरकर, रोहेकर, कदम, चव्हाण, आडवीलकर, चिखलकर, गिरडकर, हांडे, विजयकर ही आडनावे आहेत.

---

* विवाहविषयक माहिती श्री. इश्रु मडावी (निवृत्त शिक्षक), उमरी बाजार यांच्या मुलाखतीवर आधारित आहे. (कार्यालयाने केलेल्या जानेवारी, २००९ च्या सर्वेक्षणाआधारे).

३३. देवगावकर शैलजा, पूर्वोक्त, पृ. ८.

पूर्वी चांभार मोट शिवणे, तिला ठिगळ लावणे, गोफनीला टबळे लावणे, जुना जोडा, आसूड सांधणे, सारांश गोठभर वाधी लागेल इतके कुणब्याचे व आलुत्याबलुत्याचे काम करणे, नवीन जोडा, आसूड, मोट वगैरेबद्दल रोख पैसे पडतात. चांभाराला कुणबी दोन शेर बी व शेकडा सव्वा दोन बलुते देतात. अशी पध्दत होती.[३४] आता ही पध्दत नामशेष होत चालली आहे.

यांच्यात समान आडनावात विवाह होत नाही. आतेबहिणीशी व मावसबहिणीशी विवाह करता येत नाही. मामेबहिणीशी विवाह करण्यास मान्यता आहे. विधवा पुनर्विवाह व घटस्फोटास मान्यता आहे. विवाह हे सर्वसाधारण हिंदू पध्दतीने केले जातात. मात्र वेगवेगळ्या प्रादेशिक पोटजातीमध्ये थोडाफार फरक आढळतो. चांभार सर्व हिंदू देवतांना भजतात. योगीराज 'देवजी बाबा' हे या समाजातील दैवत मानले जाते. या समाजातील वेगवेगळ्या कुटुंबातील कुलदैवते मानली गेली आहेत. त्यामध्ये पालीचा खंडोबा, जेजुरीचा खंडोबा, जावळीचे दैवत, मरीआई आणि काळूबाई, माहुरची देवी, भैरोबा यांचा समावेश आहे. यांच्यात मृताचे दहन करण्याची तसेच श्राद्ध करण्याची प्रथा आहे.

दुकानदारीशिवाय रस्त्याच्या कडेला बसून चप्पल बूट दुरुस्तीचे किरकोळ काम करणाऱ्यांची संख्या पुष्कळ आहे. त्यांना 'गटई' कामगार म्हणूनही ओळखले जाते. या कामासाठी वापरल्या जाणाऱ्या प्रमुख हत्यारांना रापी, आरी, हास्ति, इंगा, फरांडी, पलास्नी आणि आंबूर अशी नावे आहेत. सध्या या समाजातील शैक्षणिक प्रमाण वाढत आहे. सरकारी, निमसरकारी आणि केंद्र सरकारी कार्यालयात लोक नोकऱ्या करीत आहेत.

**जैन (धर्म) :** जैन धर्म हा हिंदू संस्कृतीचाच एक प्रवाह असणाऱ्या या धर्माची १९६१ च्या जनगणनेनुसार नांदेड जिल्ह्यात यांची एकूण १,७५१ एवढी लोकसंख्या होती. १९९१ मध्ये त्यात वाढ होऊन ती ३,४९७ झाली. त्यापुढील दशकात सन २००१ मध्ये परत त्यात वृद्धी होऊन ५,००३ एवढी लोकसंख्या जिल्ह्यात आढळते [३५] किंवा होती. ऋषभदेव किंवा आदिनाथ हा या धर्माचा पहिला तीर्थंकर अथवा धर्म प्रकट करणारा व वर्धमान महावीर हा चोवीसावा तीर्थंकर होय. तीर्थंकरांनाच पूज्य मानले जाते. वर्धमान महावीराला धर्माचा प्रवर्तक मानतात. अहिंसापालन आणि शुद्ध नैतिक आचरण यांना मध्यवर्ती स्थान आहे. क्षमा, मार्दव, आर्जव, शुचिता, सत्य, संयम, तप, अकिंचन्य अथवा आसक्तीचा अभाव, ब्रह्मचर्य यांचे उत्तम प्रकारे पालन करणे याला धार्मिक जीवनात महत्त्वाचे स्थान आहे. सन्यास मार्गाला महत्त्व दिले आहे व ही दीक्षा पुरुष आणि स्त्री या दोघांनाही घेता येते. पुरुष संन्यासी साधू, श्रमण किंवा मुनी, या नावांनी ओळखला जातो, तर संन्यासी साध्वी अथवा श्रमणी या नावाने ओळखली जाते. जे लोक गृहस्थाश्रमी जीवन जगतात व संन्यासी वर्गाला पोसतात त्यांना उपासक म्हणतात. वर्षातील पावसाळ्याचे चार महिने सोडून बाकीचा काळ जैन साधू व साध्वी एका ठिकाणी न राहता भ्रमंती करीत असतात. जैन धर्मात श्वेतांबर व दिगंबर हे दोन पंथ आहेत.[३६]

दिगंबर आणि श्वेतांबर यांच्या मूर्तीत आणि मूर्तिपूजेत काहीसा भेद आहे. दिगंबर हे मूर्तींना भूषवीत नाहीत पण श्वेतांबर मात्र मूर्तींना वस्त्राभरणांनी सुशोभित करतात. जैनांच्या तीन प्रकारच्या

३४. अत्रे, त्रिंबक नारायण, पूर्वोक्त, पृ. १११.

३५. **सेंसस ऑफ इंडिया, २००१,** पूर्वोक्त (सी.डी. वरून)

३६. '**महाराष्ट्र भूमि व लोक**', पूर्वोक्त, पृ. २९०.

देवता आहेत. (१) प्रासाद देवता (२) संप्रदाय देवता आणि (३) कुलदेवता, अंबा, सरस्वती, त्रिपुरा, तारा या संप्रदाय देवता असून चंडी, चामुंडा, कष्टेश्वरी या कुलदेवता आहेत. मूर्तिपूजा करणाऱ्या जैनांना मंदिर मार्गी म्हणतात. तर मूर्तिपूजा न करता आत्मशुद्धीसाठी व्रतस्थ राहणाऱ्यांना साधुमार्गी म्हणतात. जैन पूजाविधी हा अष्टविध असतो. जैन समाजात उपवासांचे महत्त्व फार आहे. पण उपवास करण्याच्या कालनिर्णयात आणि स्वरूपात पुष्कळ वैविध्य आढळते. जैन लोक अनेक धार्मिक उत्सव करतात. जैनांचे बरेचसे उत्सव किंवा पर्वे ही तीर्थंकरांच्या जन्म निर्वाणांच्या तिथींना धरून निर्माण केलेली आहेत. पर्युषण, श्रुतपंचमी, दिवाळी, अक्षयतृतीया व महावीर जयंती हे जैनांचे प्रमुख उत्सव होत. होळी, पाडवा, गणेश चतुर्थी, रक्षाबंधन, मकरसंक्रांत, शीतलासप्तमी, दुर्गाष्टमी, नवरात्र, दसरा, पोंगळ, कथिकई, युगादी, गौरीपूजा इत्यादी हिंदू सण व व्रते बहुसंख्य जैन मंडळी रीतरिवाजानुसार पाळतात. दिगंबरांचे ५३ संस्कार व श्वेतांबरांचे १६ संस्कार सांगितले आहेत.

यांच्यात मृत व्यक्तिस स्नान व कपडे घालून मग मिरवणुकीने प्रेत स्मशानात नेतात. प्रेताचे पूर्णपणे दहन होईपर्यंत कोणीही स्मशानातून हलत नाहीत. तिसऱ्या दिवशी राख गोळा करून नदीत टाकतात. दहा दिवस आशौच पाळतात. पण क्रियाक्रमानंतर काही करीत नाहीत. दानधर्म मात्र करतात.

**डक्कल :** जिल्ह्यात आढळणारी एक भटकी जात. महाराष्ट्रात निरनिराळ्या जातीचे मागते आहेत. या मागत्यांना कोणतेही उत्पादक काम न करता विशिष्ट जातीकडून भिक्षा मागून खाण्याचा हक्क असतो. भिक्षेच्या मोबदल्यात परंपरेने चालत आलेली गीते किंवा पुराणे गाऊन ते लोकांची करमणूक करतात. कधी कधी निरनिराळी सोंगे आणून लोकांची मने रिझवतात. त्यापैकीच डक्कलवार हे मागत्यांचे मागते आहेत. म्हणजेच मागांचे मागते डक्कलवार आहेत. 'डक्क' म्हणजे पाठीचा कणा व त्यावरून डक्कल हा शब्द पुढे आला आहे. डक्कल हे एके ठिकाणी घर न करता फिरत्यांचे जीवन कंठतात. डक्कलवारांचे उत्पतीसंबंधी अनेक कथा आहेत. मात्र त्यास पुष्टीकारक पुरावे उपलब्ध नाहीत. डक्कलवारांची आडनावे मांगांच्या आडनावावरून पडली आहेत असे सांगण्यात आले. गायकवाड, कांबळे, बोराडे, वीर, मोरे, लोखंडे, गवळे, वाघमारे, फुले, अनगळे ही यांच्यातील प्रमुख आडनावे आहेत.

डक्कलवार कोणताही व्यवसाय करीत नाहीत. प्रत्येक डक्कलवार कुटुंबाला भिक्षा मागण्यासाठी काही विभाग तोडून दिलेला असतो. सर्वसाधारण २०० गावांचा एक विभाग केलेला असतो. ज्या गावात भिक्षा मागायची त्या गावात मांगवाड्याशेजारी असलेल्या खुल्या जागेत ते आपली पाले ठोकतात. दोन कुत्री, एखादा बैल, कोंबडी, एक दोन खाटा, आवश्यक कपडे हे त्यांचे साहित्य असते. त्यांच्या घरात चूल नसते. घरी स्वयंपाक करून खात नाहीत. त्यांचा उदरनिर्वाह मांगांनी घातलेल्या भिक्षेवर होतो. एवढेच नाही तर दाराशी डक्कलवार भिक्षा मागण्यास आला असता कोणत्याही स्थितीत त्याला भिक्षा घातलीच पाहिजे असा मांग जातीत दंडक असतो. डक्कलवार मांगांना पुराणकथा, बसवपुराण ते किंगरीच्या साथीने एकसुरात सांगतात.

यांच्यात एकाच आडनावात विवाह करीत नाही डक्कलवारात मुलाकडील लोक मुलीला मागणी घालतात. मुलीच्या आईवडिलांना वधुमूल्य द्यावे लागते. आतेबहीण व मामेबहिणीशी विवाह करता

येतो. डक्कलवारात लग्नेही सायंकाळी लावली जातात त्यावेळेस जंगम पुरोहित असतो. डक्कलवार लग्नात बहुले घालत नाहीत. मुला मुलीला बसवून त्यांच्याभोवती पाच गाडगे ठेवून सूत गुंडाळतात व त्या गाडग्यातील पाणी पाच सवाष्ण बाया मुला मुलीच्या अंगावर टाकून न्हाऊ घालतात. अंतरपाट धरून मंगलाष्टके म्हणून लग्न लावल्यावर नवरा नवरीच्या हातात हात देतात. डक्कलवारांमध्ये पुनर्विवाह करण्याची पद्धत आहे. त्याला गंधर्व लावणे असेही म्हणतात.

माळेगाव हे नांदेड जिल्ह्यात असल्याने येथे खंडोबाचे मंदिर आहे. चंपाषष्ठीच्या वेळी येथे मोठी यात्रा भरते. (१९ डिसेंबर ते २३ डिसेंबर) ह्या यात्रेत मराठवाड्यातील जवळ जवळ सर्व फिरस्ते एकत्र जमतात. सर्व डक्कलवार जमातीतील लोक देखील येथे जमतात. पाचवी, बारसे आणि जावळ काढणे ह्या विधीशिवाय लग्न, दिवस करणे इत्यादी सर्व विधी माळेगावच्या यात्रेतच करण्यात येतात. लग्न केव्हाही असले तरी ते यात्रेत करावे असेच ठरवतात. डक्कलवार जमातीतील व्यक्ती केव्हाही मयत झाली तरी दिवस मात्र माळेगावच्या यात्रेतच करावा असा नियम आहे. तोपर्यंत सूतक पाळण्यात येते.[३७]

डक्कलवारांमध्ये प्रेताला पुरण्याची प्रथा आहे. मयत झाल्यावर प्रेताला मांडी घालून बसवतात. अंघोळ घालून प्रेताच्या कपाळाला रुपया लावतात. जंगमाकडून विधी करून मृतास खड्ड्यात सोडतात व माती लोटतात. डक्कलवारात दिवस करण्याची प्रथा आहे. मात्र हा दिवस माळेगावच्या यात्रेत करतात.

**ढेर (माला, महार माला दासरी) :** जिल्ह्यात आढळणारी एक जात. हे लोक मूळचे मध्यप्रदेशातील होत. ते तेथून इकडे आले असावेत. हे लोक तेलुंगू विनकर आहेत. यांच्यात पशु, वनस्पती व इतर वनस्पती यांच्या नावाची देवके आहेत. सूर्य देवकाचे लोक सूर्यग्रहणाच्या वेळी काही खात नाहीत. एकाच देवकांत लग्न संबंध होत नाहीत. यांच्यात शक्यतो मामाच्या मुलीशीच लग्न करण्याचा प्रघात आहे. मुलगी वयात येण्यापूर्वी तिचे लग्न करतात.

**ढोर :** जिल्ह्यात आढळणारी एक अनुसूचित जात. डोहोर शब्दाचा अपभ्रंश होऊन ढोर हे नाव कायम झाले असावे. आजही ते साक्षात शंकराचे पुत्र म्हणून स्वतःला डोहार म्हणवून घेतांना आढळतात. कातडी कमावणे हा ढोर जातीचा परंपरागत व्यवसाय होय. ढोर ह्याचा अर्थ गुरे असून व्यवसायावरून त्यांना ढोर हे नाव पडले असावे. ढोर समाजात होऊन गेलेल्या कक्कया महापुरुषास धर्मगुरू मानणारे ढोर स्वतःला शैव करुय्या म्हणवितात. यांच्यात बुधेलकरी, बुंदेलखंडी, हिंदुस्तानी, कंक्कय्या, कर्नाटकी, खेत्रफडी (खेतरफडी) इत्यादी पोटजाती आहेत. जिल्ह्यात कोकणे, साबणे, दरवेशी, इंगळे इत्यादी आडनावे आढळतात.

ढोर लोकांची गावाशेजारी थोड्या अंतरावर नदीच्या किंवा ओढ्याच्या काठी या समाजाची वस्ती अस्तित्वात होती. त्या ठिकाणी पारंपारिक पद्धतीने ते लोक कातडी कमवीत असत, आणि त्यापासून मोट, सोंड, बैलाच्या सापत्या, म्होरक्या, चाळाचे पट्टे, चामड्याची वादी, विणलेले चाबूक या वस्तू

---

३७. मांडे, प्रभाकर, पूर्वोक्त, पृ. ४१.

तयार करीत. व उरलेले कातडे चप्पल व तत्सम वस्तू तयार करण्यासाठी ते चर्मकाराला देत मात्र हल्लीच्या काळी खेड्यापाड्यातील जातीच्या पारंपारिक धंद्यांना उतरती कळा लागली आले. उंबर, जांभूळ, मर्यादवेल, परशा इत्यादी देवके असून एकच देवक असणाऱ्या गटातील व्यक्तींचा परस्पराशी विवाह होत नाही. आतेबहीण व मामेबहिणीशी विवाह करता येतो. घटस्फोट आणि विधवा पुनर्विवाह रूढीसंमत आहे. लग्नानंतर वधूवरांनी कुलदैवताला जाण्याची प्रथा आहे. धार्मिक विधी ब्राह्मण किंवा जंगम करतो. भवानी, जनाई, खंडोबा, महादेव, विठोबा ही यांची दैवते आहेत. ढोर जातीत मृताला बसलेल्या स्थितीत पुरतात. दहा दिवस सुतक पाळतात. वर्षेश्राद्ध करीत नाहीत, परंतु भाद्रपद कृष्ण पक्षात मृताच्या तिथीला महालय करतात.

**तेली :** तैल किंवा तैलिक या संस्कृत शब्दावरून तेली हे नाव पडले आहे. या शब्दाची तीळीपासून व्युत्पत्ती झाली असावी. हे आपली उत्पत्ती शनीपासून झाली असे सांगतात. तेल गाळणे व विकणे हा व्यवसाय करतात. तेली शेंगदाणा, तीळ, जवस, खोबरे, करडी इत्यादी तेलबियांपासून तेल काढण्याचा व्यवसाय परंपरेने करतात. यांच्यात पंचम किंवा लिंगायत, कानडे, लाड, गुजर, आयर, कडू, कांडी, शनिवारे, शुक्रवारे, राठोड, परदेशी व तिळवण, सोमवारे किंवा मराठा तेली आणि गांधी ही अर्धी पोट जात या साडेबारा पोटजाती आढळतात. १९३१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यात तेली लोकांची एकूण लोकसंख्या ५,४०१ एवढी होती. पैकी २,९६२ पुरुष तर २,४३९ स्त्रिया इतक्या होत्या.[३८] यांच्यात लोखंडे, राऊत, बेंद्रे, भिसे, भोज, चव्हाण, दळवे, देशमाने, दिवकर, डोळसे, झगडे इत्यादी आडनावे आहेत. वरील सर्व पोटजाती अंतर्विवाही गट आहेत. विवाह हे ज्या त्या पोटजातीतच होतात. एकाच कुळातील व्यक्तिंचा विवाह होत नाही. कुलानामाचा वापर आडनावासाठी केला जातो. प्रत्येक कुलाचे देवक असते व समान देवक असणाऱ्या व्यक्तींचा विवाह होत नाही. तेल्यांमध्ये पहार, घाणा, उंबर, आपटा, पाच पालवी इत्यादी देवके आहेत. आतेबहीण व मामेबहिणीशी विवाह करता येतो. पुनर्विवाह व घटस्फोटाची प्रथा आहे.

यांच्यात पहिले बाळंतपण बहूतेक माहेरीच होते. आवश्यकता असेल तरच बाळंतपण प्रसुतिगृहात करतात. खेड्यातील महिला अगदी बाळंतपणापर्यंत घरगुती व शेतीची कामे करतात. बाराव्या दिवशी किंवा सव्वा महिन्यानंतर नामकरण करतात. सर्व हिंदू सण व उत्सव ते साजरे करतात. तेली हे शुद्ध शाकाहारी आहेत त्यामुळे बहुतांश तेली गव्हाळ वर्णाचे, मध्यम बांधा व उंचीचे असून त्यांची राहणी, वेशभूषा कुणब्यांप्रमाणे दिसून येते. शिक्षणाचा प्रसार झाल्यामुळे या समाजातील लोक नोकरी, धंद्यात आहेत. तेली समाजात अग्निसंस्कार तसेच मृतदेह पुरण्याची प्रथा आहे.

**दर्जी :** जिल्ह्यात आढळणारी एक जात दर्जी किंवा शिंपी, चिपी, सुजी असेही म्हणतात. दर्ज या फारसी शब्दाचा अर्थ शिवणे असा आहे. त्यावरून दर्जी हे नाव पडले आहे. यांना मेराई पिपावासी, सई, सुई, सुतार आणि थालावाडी अशा नावानेही ओळखले जातात. १९३१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यात दर्जी लोकांची एकूण लोकसंख्या ३,८०८ एवढी होती. त्यात १,९२१ पुरुष तर १,८८७ स्त्रिया

३८. **सेंसस ऑफ इंडिया, १९३१,** पूर्वोक्त, पृ. २५४ ते २५०.

होत्या.[३९] हे लोक राजपूत हे आमचे पूर्वज आहेत असे सांगतात. यांचा मुख्य व्यवसाय कपडे शिवण्याचा आहे. यांच्यात राजदर्जी, कैथीय व श्रीवास्तव हे पोटभेद आहेत. यांची पूर्वी व आजही जात पंचायत आहे. जातीतील प्रश्नांचे निवाडे जातीतीलच लोक करतात. गुन्हानुसार संबधित व्यक्तिस दंडाचा आकार लावला जातो व संबंधित रकमेचा वापर हा ज्ञातीभोजनासाठी खर्ची करतात. लग्न समारंभ ब्राह्मण पौरोहित्याकडून करून घेतात. यांच्या हिंगलाज व पीठळदेवी या कुलदेवता आहेत. हे लोक मद्य व मांस खात नाहीत.

**धोबी (परीट) :** धोबी व परीट या नावाने ओळखली जाणारी जिल्ह्यात आढळणारी एक जात. धोबी हे नाव या लोकांना त्यांच्या कपडे धुण्याच्या धंद्यावरून मिळाले आहे. धव म्हणजे धुणे या संस्कृत शब्दापासून धोबी हे नाव पडलेले असावे. यांना वरठी, चकला, रजक, परीट धोबी इत्यादी अन्य नावेही आहेत.[४०] यांच्यात देशी परीट, कोकणी परीट, परदेशी व कामाठी या पोटजाती आहेत. १९३१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यात धोबी लोकांची एकूण लोकसंख्या ४,७२५ इतकी होती. त्यात २,४२८ पुरुष तर २,२९७ स्त्रिया होत्या.[४१]

यांच्यात वधू-वर वयात आल्यावर लग्न करतात. लग्न ब्राह्मण पुरोहित लावतो. एकच देवक असणाऱ्या मुला-मुलींचे लग्न होत नाहीत. आतेबहीण, मामेबहिणीशी विवाह करण्याची पद्धत आहे. घटस्फोट व विधवा पुनर्विवाहास परवानगी आहे. यांचे धार्मिक आचार, पोषाख आणि जेवनाची पद्धती कुणबी जातीप्रमाणेच आहे. घटोइया हा त्यांचा मुख्य देव होय. याचे स्थान धोबी घाटावर असते. आषाढ मासात त्याला नैवेद्य दाखवतात. धोबी जातीत मृत व्यक्तिस पुरतात किंवा जाळतात. लहान बालके किंवा एका वर्षातील आतील वय असणाऱ्या मुलांस पुरतात. त्यापुढील वय असणाऱ्यांना जाळतात. कुटुंबातील पुरुष नवव्या दिवशी मुंडन करतात. अकराव्या किंवा बाराव्या दिवशी जातीला जेवण घालतात. पिंडदान व अस्थिविसर्जन करण्याचीही चाल यांच्यात आहे. हे लोक मासिक किंवा वार्षिक श्राद्ध करीत नाहीत.

**परधान :** परधान नाव प्रधान या शब्दापासून आले असून पूर्वी परधान हे गोंडाचे पुरोहित व भाट होते. (Minstrels of the Gonds) रसेल आणि हिरालाल ह्यांनी गोंडाचे भाट किंवा पुजारी म्हणून काम करणारी गोंड जमातीची ही एक कनिष्ठ शाखा असावी असे म्हटले आहे. परधानांना पन, पठारी, देसाई, मोकासी किंवा भाऊ अशीही नावे आहेत. परधानात राज परधान, गांडा परधान, थोटी परधान या पोटजाती आहेत. त्यांची आडनावे देवांवरून पडली असून ती पुढीलप्रमाणे आहेत. सातदेवे, सहादेवे, पाचदेवे, चारदेवे, ही देवके असून त्यांची कुलनामेही (आडनावे) गोंडाशी जुळणारी आहेत. उदा. अत्राम, मसराम, नेताम, सुरपाम, मडावी, टेकाम, कुरसंगे, येरमे इत्यादी आहेत.[४२] यांच्यात मुले-मुली वयात आल्यानंतर विवाह होतात. एका कुलगट किंवा देवगटा-अंतर्गत

---

३९. **सेंसस ऑफ इंडिया, १९३१,** पूर्वोक्त, पृ. २४५-५०.

४०. रसेल, आर. व्ही. ॲण्ड हिरालाल, पूर्वोक्त, पृ. ५१९.

४१. **सेंसस ऑफ इंडिया, १९३१,** पूर्वोक्त, पृ. २४५-५०.

४२. जानेवारी, २००९ मध्ये कार्यालयाने केलेल्या सर्वेक्षण व मुलाखतीवर आधारित.

(Phratery) तसेच एका गोत्राअंतर्गत विवाह होत नाहीत. मुला-मुलींची पसंती झाल्यावर मुलाचे वडील पुढाकार घेऊन मागणी करतात. वधू मुल्य (देज) देण्याची प्रथा आहे. विवाह शक्यतो चैत्र, वैशाख किंवा फाल्गुन महिन्यात होतात.[४३] पूर्वी पाच दिवस विवाह विधी चालत आता मात्र एक किंवा दोन दिवसात लग्न आटोपतात.

यांच्यात आतेबहीण व मामेबहिणीशी विवाह होऊ शकतो. विधवा विवाहाची पद्धती आहे. यालाच ' पाट ' किंवा ' मोहतूर ' म्हणतात. केवळ पाटावर बसवून कृष्ण पक्षातील रात्री हा विवाह लावण्यात येतो. घटस्फोटाची पद्धत आहे. परधान लोक सर्व सण व उत्सव विशेषतापूर्वक साजरे करतात. आषाढी एकादशी, जीवती, पोवती, नागपंचमी, दिवाळी, महाशिवरात्री आणि फाग (शिमगा) हे सण साजरे करतात. तर नवा उत्सव, एकोती (एकती) उत्सव व हरेली उत्सव साजरे करतात. त्यावेळेस ते किंगरी व बना या त्यांच्या प्रमुख वाद्यांवर ताल धरून नाच करतात. भीम ही परधानांची ज्येष्ठ देवता आहेच शिवाय बडा पेन आणि भगवान ह्याही प्रमुख देवता आहेत. ते चेतनावादी व प्राणिपूजक आहेत. प्रेत पुरण्याची किंवा जाळण्याची पद्धत आहे. त्यानंतर तीन दिवस सुतक पाळतात. नंतर पेरसापेनची पूजा करतात व मृताबद्दल आदर व्यक्त करतात. गोमुत्राने घर सारवून स्वच्छ करतात.

**पांचाळ :** जिल्ह्यात आढळणारी एक जात पंच आळ म्हणजे पाच हुन्नर यावरून हा शब्द आला आहे. सोनार, सुतार, कासार, लोहार व शिल्पकार (पाथरवट) असे यांचे पाच भेद आहेत. याच कारागीर वर्गांना मिळून पांचाळ हे नाव मिळाले आहे. या पाच कारागीरांचे पाच वर्ग भिन्न आहेत. पांचाळ लोक स्वतःला ब्राह्मण मानतात, जानवे घालतात व ब्राह्मणांप्रमाणे सगळे संस्कार करतात.[४४] १९३१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यात पांचाळांची एकूण लोकसंख्या ८,२१० इतकी होती. त्यात ४,५६३ पुरुष तर ३,६४७ इतक्या स्त्रिया होत्या.[४५] वर्णाश्रमव्यवस्था कडक झाल्यानंतर जे ब्राह्मण वरील कामे करीत राहिले आणि ज्यांना सनातनी बाह्मण आपल्या श्रेणीचे मानीनासे झाले ते हे लोक होत. पण कारागिरी व सधनता यांमुळे त्यांची समाजातील प्रतिष्ठा मात्र कमी झाली नाही.

पांचाळात वरील पाच वर्गात परस्पर विवाहसंबंध होतात. त्यांची पाच गोत्रे आहेत. सुपर्ण, दैवज्ञ, अवभुवन, त्वष्ट, प्रस्थन शिल्पी, सनगमनू व संतनमय अशी त्यांची नावे आहेत. समान गोत्रात विवाह करीत नाहीत. लग्नसंबंध ठरवितांना आईवडीलांचा पुढाकार असतो. आतेबहीण व मामेबहीणीशी विवाह करता येतो. बहुतेक लग्न ही ब्राह्मणांसारखीच करतात. पांचाळांची कालिका ही कुलदेवता असून गणपती, सूर्य, खंडोबा, बहिरोबा या देवतांनाही भजतात. पांचाळ हे कारागीर असल्याने ते आपल्या हत्यारांची पूजा करतात. हे लोक सामान्यपणे प्रेतांचे दहन करतात. दहा, बारा दिवस सुतक पाळतात. अंत्यसंस्कार ब्राह्मणांप्रमाणेच करतात.

---

४३. देवगांवकर, शैलजा आणि देवगांवकर, श. गो., पूर्वोक्त, पृ. २४-२५.

४४ जोशी, महादेवशास्त्री, पं., ' **भारतीय संस्कृती कोश** ', खंड पाचवा, पुणे, १९६८, पूर्वोक्त, पृ. ४८१.

४५. **सेंसस ऑफ इंडिया, १९३१,** पूर्वोक्त पृष्ठ २४५-२५०.

**ब्राह्मण :** वैदिक काळातील हा अग्रगण्य वर्ग असा ब्रह्म या शब्दाचा अर्थ मंत्र किंवा स्तोत्र असा आहे.[४६] मंत्र किंवा स्तोत्र रचणारे व म्हणणारे ते ब्राह्मण होत. १९३१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यात ब्राह्मणांची एकूण लोकसंख्या १८,३२३ इतकी होती. त्यात पुरुषांची संख्या १०,१९० होती तर स्त्रियांची संख्या ८,१३३ एवढी होती. ब्राह्मणांच्या एकूण १४ पोटजाती असल्याचे १९११ च्या जनगणना अहवालामध्ये नमूद केले आहे. त्या पोटजाती पुढीलप्रमाणे आहेत. चित्पावन, देशस्थ किंवा कण्व, कऱ्हाडे, सामवेदी. नांदेड जिल्ह्यात देशस्थ, कोकणस्थ, कऱ्हाडे या ब्राह्मण शाखा आढळतात.

**देशस्थ :** देशावर राहणारे म्हणून त्यांना देशस्थ ब्राह्मण हे नाव प्राप्त झाले असावे. देशस्थांमध्ये ऋग्वेदी, यजुर्वेदी, त्रिगुळ व कण्व या मुख्य शाखा आढळतात. ऋग्वेदींना अश्वलायन आणि यजुर्वेदींना माध्यंदिन असेही म्हणतात. यजुर्वेदींमध्ये शुक्ल व कृष्ण अशा दोन पोटशाखा आढळतात. देशस्थ ब्राह्मणांत मामेबहिणीशी विवाह करण्याची पद्धत हे परंपरेला धरून असल्याचे मानण्यात येते. यांच्यामध्ये वैदिक ऋषींच्या नावाने ओळखली जाणारी गोत्रे असून स्मार्त आणि वैष्णव असे दोन सांप्रदायिक भेद आहेत. अंबाबाई, माहुरची रेणुका, योगेश्वरी आणि खंडोबा ही बहुतेकांची कुलदैवते आहेत.

शुक्ल यजुर्वेदी ब्राह्मणात विशिष्ट वैदिक ऋषींची परंपरा मानणाऱ्या बऱ्याच अंतर्विवाही पोटजाती आहेत. त्यापैकी कण्व व माध्यंदिन या दोन शाखा प्रामुख्याने जिल्ह्यात आढळतात. कण्वांमध्ये मामेबहिणीशी विवाह करण्याची प्रथा आहे. मात्र माध्यंदिन ब्राह्मणात मामेबहिणीशी विवाह करण्याची प्रथा नाही.[४७]

**कऱ्हाडे :** मूळचे कराडचे म्हणून त्यांना कऱ्हाडे असेही म्हणतात. यांच्यात ऋग्वेदी शाकल ही एकच वेदशाखा आढळते. यांच्यात एकूण २४ गोत्रे आढळतात. एकच गोत्र व प्रवर असलेल्या कुटुंबात विवाह निषिद्ध आहे. मामेबहिणीशी विवाह करण्यास मान्यता आहे. कोल्हापूरची महालक्ष्मी ही बहुतेक कऱ्हाडे ब्राह्मणांची कुलदेवता आहे. तसेच अंबाबाई, दुर्गा, म्हाळसा भवानी इत्यादींना भजतात. मूंज, लग्न, अंत्यविधी, क्षौर (मुंडण विधी), सण इत्यादी विधी थोड्याफार फरकाने इतर ब्राह्मणांप्रमाणेच पार पाडले जातात.

**कोकणस्थ :** कोकणातून आलेल्या ब्राह्मणांना कोकणस्थ किंवा चित्पावन ब्राह्मण असे म्हणतात. कोकणास्थामध्ये पोटजाती नाहीत. मात्र ऋग्वेदीय व हिरण्यकेशीय असे दोन प्रकार आहेत. फडके, कुंटे, टिळक, बर्वे, केळकर, काणे इत्यादी घराणी ऋग्वेदीय, आश्वलायन सूत्र शाकल शाखीय होत. तर लिमये, बोडस, नेने, ओक, साठे, खरे, बापट, लेले इत्यादी घराणी कोकणस्थच परंतु यजुर्वेदीय हिरण्यकेशी तैतरीय शाखीय होत. या दोन्ही शाखांचे बेटीव्यवहार होतात. त्यांचे समान संस्कार असले तरी प्रयोग निराळे असतात. ऋग्वेदी ब्राह्मणांत मौजीबंधन संस्कार मुंज लागल्यावर करतात तर हिरण्यकेशी ब्राह्मणात मुंजीचे अगोदर संस्कार व मग मुंज लावतात. बटुला मुंजीच्या वेळी द्यावयाचे आशीर्वादपर मंत्र निरनिराळे आहेत.[४८] बहुसंख्य कोकणस्थ नोकरी व व्यवसायासाठी आलेले

४६. '**महाराष्ट्र भूमि व लोक**', पूर्वोक्त, पृ. २९०.

४७. कर्वे, इरावती, '**हिंदू समाज एक अन्वयार्थ**' पुणे, १९७५, पृ. ११६.

४८. '**महाराष्ट्र भूमि व लोक**', पूर्वोक्त, पृ. ७०.

आढळतात. कोकणस्थांची कुलस्वामिनी आंबाजोगाईची योगेश्वरी आहे. काहींची माहूर येथील रेणूकादेवी आहे. ह्या कोकणस्थांच्या कुलस्वामिनी देवी आहेत, मग ती कोणतीही असो, त्यांच्याकडे कोणत्याही शुभकार्यात बोडण घालण्याचा कार्यक्रम केला जातो. बहुसंख्य कोकणस्थ गौरवर्णीय व घाऱ्या डोळ्यांचे असतात. प्रामुख्याने शासकीय सेवा, वैद्यकी, वकिली, अध्यापन इत्यादी व्यवसायामध्ये त्यांचा भरणा अधिक आहे.

चित्पावनांची चौदा गोत्रे आहेत. चित्पावन मध्यम उंचीचे, घाऱ्या डोळ्यांचे, गौरवर्णीय व सर्वसाधारणपणे सुखवस्तू आहेत. तथापि आता नविन विचारप्रवाहाप्रमाणे मुलतः वंशावळी सिद्धांतच कालबाह्य ठरला आहे. चित्पावनात आते मामे भावंडाचा विवाह होत नाही. हिंदूंच्या बहुतेक सर्व देवांची पूजा जरी त्यांच्यात होत असली तरी त्यांचा मुख्य देव शिव असून मूळ गावातील शिवाचे रूप व स्थान (व्याडेश्वर, वेळणेश्वर, हरिहरेश्वर, व्याघ्रेश्वर, कोळेश्वर, सोमेश्वर) त्यांचे प्रमुख दैवत असते. त्याचप्रमाणे 'देवी' हेही उपास्य दैवत शिवाच्या बरोबरीने असते. महाकाली, महालक्ष्मी, जोगेश्वरी, रेणूकादेवी यांचा समावेश असतो.[४९]

**चरक ब्राह्मण :** हे कृष्ण यजुर्वेदाच्या तैत्रिरीय शाखेचे आहेत. ते कोठून आले याबद्दल सांगता येत नाही. मात्र ते प्राचीन असावे. यांच्यात मुख्यत्वे मामेबहिणीशी विवाह करतात आणि तो पसंतही केला जातो. त्यांची कृष्ण, बालाजी, दत्त, खंडोबा, गणपती, नरसिंह, शंकर, तुळजादेवी (तुळजापुरची) ही कुलदैवते आहेत. सारस्वत किंवा गौड सारस्वत ही पण एक उपजात आढळते.

जिल्ह्यात मूंज, लग्न, अंत्यविधी, क्षौर, इत्यादी विधी महाराष्ट्रातील इतर ब्राह्मणांप्रमाणेच पार पाडले जातात. सणही इतर महाराष्ट्रीय ब्राह्मणांप्रमाणेच साजरे केले जातात. नोकरी व व्यवसायांसाठी खेड्यातील अधिकाधिक ब्राह्मण शहरांकडे येतात व शहरातच स्थायी होतात. त्यामुळे खेड्यातील ब्राह्मणांची संख्या घटू लागली आहे.

**बुरुड :** जिल्ह्यात आढळणारी एक अनुसूचित जात. बांबूच्या पट्ट्यांपासून सूपे, टोपल्या, दुरड्या, करंडी, चटया या वस्तू विणण्याचे तसेच वेताच्या खुर्च्या, शिड्या यासारख्या विविध वस्तू करण्याचे काम परंपरेने बुरुड जातीचे लोक करतात. १९३१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यात बुरुडांची एकूण लोकसंख्या ३,८४१ इतकी होती. त्यात १,९६६ पुरुष तर १,८७५ स्त्रिया होत्या.[५०] हे सर्व मराठी भाषिक आहेत. बुरुड जातीची विभागणी अनेक बहिर्विवाही कुळांमध्ये झालेली आहे. ही कुळे आडनावांनी ओळखली जातात. प्रत्येक कुळाचे विशिष्ट देवक असते. मोरपंख, कोंबडा, डुक्कर, तरवड, रूई खैर इत्यादी देवक असून विवाहाच्या वेळी देवक पाहिले जाते. त्यामुळे समान देवक असणाऱ्यांमध्ये विवाह होत नाही. मात्र मामेबहिणीशी विवाह करण्याची पद्धत आहे. यांच्यात मुलाचा बाप मुलीला मागणी घालतो. दोन्ही पक्षांची आर्थिक स्थिती चांगली असेल तर मुलीचा बाप मुलाला अधिक मदत (हुंडा) देतो. लग्नाचा मुहूर्त ब्राह्मण काढून देतो व लग्नात पौरोहित्य तोच करतो. लग्नात कन्यादान कंकणबंधन व विवाहहोम हे विधी होतात.[५१]

---

४९ कर्वे, इरावती, पूर्वोक्त, पृ. ११५.

५०. **सेंसस ऑफ इंडिया, १९३१,** पूर्वोक्त, पृ. ११५.

५१. जोशी, महादेवशास्त्री, पं., खंड सहावा, पूर्वोक्त, पृ. २०७.

यांच्यात विधवा पुनर्विवाह आणि घटस्फोट मान्य आहे. विधवा विवाहास पाट लावणे असेही म्हणतात. बुरुड लोक खंडोबा, जोतिबा, बहिरोबा, भवानी, राम, मारुती, विठोबा या देव देवतांना भजतात. यांच्यात मृत व्यक्तिस पुरतात किंवा जाळतात. अत्यंविधीचे पौराहित्य जंगम करतो. सूतक दहा दिवस पाळतात. बाराव्या किंवा तेराव्या दिवशी ज्ञातिभोजन घालतात. वार्षिक श्राध्दही करतात.

**बेडर :** जिल्ह्यात आढळणारी एक शिकारी जात. हे लोक आंध्र प्रदेशातून इकडे आले असावेत. हे स्वतःला वाल्मीकीचे वंश म्हणतात. १९३१ च्या जनगणनेनुसार बेडरांची जिल्ह्यातील एकूण लोकसंख्या ३२३ इतकी होती. त्यात १७१ पुरुष तर १५२ स्त्रिया होत्या.[५२] यांच्यापैकी काहीजण सुतार, लोहार, पहारेकरी म्हणून काम करतात तर बहुतेक लोक शेतकरी असून ते स्वतःच्या जमिनी कसतात. आंध्रातून आल्यामुळे त्यांची भाषा तेलगू आहे. यांच्यात उरू व म्यास असे दोन भेद असून त्यांचे पुन्हा अनेक पोटभेद आहेत. येम्मलवारू, मंडलवारू, पुलवरू आणि मीनलवारू हे पोटभेद असून उरू व म्यास यांच्यात परस्पर विवाह होत नाही. लग्न जमिवितांना मुलाचे आईवडील लग्न ठरवितात. उरू व म्यास ह्या दोन्ही पोटभेदांचे विवाह विषयक संस्कार व विधी वेगवेगळे आहेत. मात्र विवाह हा ब्राह्मण पुरोहिताकडून लावला जातो.

बेडर लोकांचा पोषाख हा साधा असून हे लोक कांबळे पांघरतात. तर काही लोक छातीवर एक कपडा बांधतात. हे लोक शिकारी असल्याने पूर्वी बंदूक, भाला व जाळी घेऊन शिकारीला जात व डुक्कर व हरणांची शिकार करीत. आता शिकारीस निर्बंध लावल्याने व प्राणीही नसल्याने हे लोक शेती व्यवसाय करतात. मरिअम्म, हुलिगम्म, कनिमिरय, कनकरयन, पोलेरम्म इत्यादी देवतांना ते भजतात. तिरुपती वेंकटरमण हा त्यांचा मुख्य देव आहे. यांच्यात मृत व्यक्तिस पुरतात. मृतास तिरडीवरून स्मशानात नेतात व नंतर खड्ड्यात विधीसह पुरतात.[५३] त्यानंतर नवव्या किंवा दहाव्या दिवशी मृत्यात्मासंदर्भात दिवस विधी करतात.

**भाट :** संस्कृत भट्ट या शब्दावरून भाट हा शब्द बनलेला आहे. यांच्या मते आमची उत्पत्ती कवी नामक एका ऋषीपासून झाली आहे असे सांगतात. यांच्यात बरेच पोटभेद आहेत. ब्रह्मभाट, वाटी, चंद्रीसा, बूना, शासनी, बोरवा, तुरी व केदारी, इत्यादी पोटभेद आहेत. नांदेड जिल्ह्यात १९३१ च्या जनगणनेनुसार भाट लोकांची एकूण लोकसंख्या ३२३ इतकी होती. त्यात पुरुषांची संख्या १७१ तर स्त्रियांची संख्या १५२ होती. हे लोक मूळचे राजस्थानमधले असल्याने ते जिल्ह्यात स्थलांतर करून आलेले असावेत. यांच्या उत्पत्तीविषयी लोककथा आहेत पण त्यास पुष्टीकारक पुरावे उपलब्ध नाहीत. धन्याच्या वंशावळी ठेवणे व त्याची स्तुती करणे हा भाटांचा प्रधान व्यवसाय तो पिढीजात चालतो. स्पष्टवक्तेपणा हा त्यांचा मोठा गुण असल्यामुळे मातबर राजेरजवाडेही त्यांना वचकून वागत. हातात उंच दांड्याचा भाला अथवा तलवार, कमरेला कट्यार, छातीवर रुळणारी दाढी, मिशांचे कल्ले, अंगात लांब अंगरखा व डोक्याला फेटा असा भाटांचा वेष असतो. कुठेही आणि केव्हाही आत्मत्याग करण्याची त्यांची तयारी असते. ते दिवसभर गावात हिंडतात, गाणी म्हणतात, गोष्टी सांगतात आणि आपला निर्वाह चालवतात.

---

५२. **सेंसस ऑफ इंडिया, १९३१,** पृ. २४५-५०.

५३. **जोशी, महादेवशास्त्री, पं., पूर्वोक्त,** पृ. २१८-२२१.

**भिल्ल :** जिल्ह्यात आढळणारी प्रामुख्याने किनवट परिसरात भिल्लांची वस्ती आहे. द्रविड भाषेत बिल्लू म्हणजे धनुष्य आणि धनुष्य हेच भिल्लांचे प्रमुख शस्त्र असल्याने त्यावरूनच त्यांना भिल्ल हे नाव पडले असावे. मानववंश शास्त्रज्ञांच्या मते प्राचीन काळी मध्यपूर्वेतून आलेल्या प्रोटो-ऑस्ट्रलॉईड लोकांचे भिल्ल हे वंशज होत. प्राचीन वाङ्मय व कथांमध्ये या जमातीचे पुष्कळ उल्लेख सापडतात. १९३१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यात भिल्ल लोकांची एकूण लोकसंख्या १,६९१ इतकी होती. त्यात पुरुष ८५६ तर स्त्रिया ८३५ इतक्या होत्या. यांच्यात भिल्ल गरासिआ, ढोली भिल्ल, डुंगरी भिल्ल, डुंगरी गरासिया, मेवासी भिल्ल, रायल भिल्ल, तडवी भिल्ल, भगालिया, भिलाला, पावरा, वसावा, वसावे, धनका हे भिल्लांचे पोटभेद आहेत. जिल्ह्यात यांची संख्या ही डोंगराळ भागात दिसून येते. भिल्लांना गोत्र नसते. विवाहाच्या वेळी कुळ व देवकाला महत्त्व देतात. मुलगी वयात आल्यावर अलीकडे लग्नासंबंधी बोलणी करतात. बोलणीनंतर विवाह ठरल्यावर साखरपुडा होतो. भिल्ल लोकांची लग्ने साधारणपणे उन्हाळी पीके हाती आल्यावर होतात. म्हणजेच ते शेतीकामापासून मोकळे झाल्यावर लग्नासाठी तयारी करतात. लग्नासाठी वरातीचे लोक वधूगृही जातांना वाटेत मारुतीचे (हनुमान) दर्शन घेतात व तिथे घड्यातील पाणी पितात. वऱ्हाड गावात लग्नमंडपात पोहचल्यावर सात सवाष्णी पाण्याचे घडे घेऊन व आरती घेऊन वराचे स्वागत करतात. प्रत्येक पाण्याच्या घड्यात (वर) प्रथम नाणे टाकतो व नंतर ब्राम्हण पुरोहित त्याच्याभोवती सूतवेष्टन करून अंतरपाट धरतो व वधूवरांचे एकमेकांचे हातात हात देतात व लग्न लागले असे समजतात. यांच्यात घटस्फोट आणि विधवा पुनर्विवाह मान्य आहे. बहुपत्नीत्वाची चाल आहे.

भिल्लांचा मुख्य देव महादेव (शंकर) आहे. डुंगऱ्यादेव (डोंगरदेव), शिवऱ्यादेव (सीमादेव), वाघदेव, नागदेव, म्हसोबा, खंडोबा, बहिरोबा, मरी, आसरा इत्यादी देवतांची पूजा करतात किंवा भजतात. राजा पंड्या हा सर्वात बलाढ्य देव मानतात. होळीचा सण विशेष साजरा करतात. दसरा व दिवाळी हे सणही ते साजरे करतात. या सणांव्यतिरिक्त इतर सणही साजरे करतात. हे मृत व्यक्तिस जाळतात. दहाव्या व तेराव्या दिवशी ज्ञातीभोजन देऊन श्राध्द करतात.

सर्वसाधारण भिल्ल हे डोंगर रांगात राहत असल्याने शेती व जंगलावर आधारित उद्योग करतात. शेती ही एकाच ठिकाणी राहून करतात, तर जंगप्रदेशात राहणारे भिल्ल कोळसा पाडणे, कात तयार करणे, मोहची फुले वेचने, लाकडे तोडणे, गवत, डिंक व मध गोळा करून विकणे आदि व्यवसाय करतात. त्यांची अलिकडे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आदि क्षेत्रात प्रगती होत चालली आहे.

**भोई :** जिल्ह्यात आढळणारी एक जात. मेणे व पालख्या वाहणे हा यांचा पूर्वी धंदा होता. त्यामुळे हा व्यवसाय करणाऱ्या जातीच्या लोकांना हे नाव मिळाले आहे. यांच्यात झिंगा भोई, परदेशी भोई, राजभोई, भोई, कहार, गोडिया कहार, धुरिया कहार, किरात, मछुआ, गांझी, जातिया, केवट, ढीवर, धीवर, धीमर, पालेमार, मछेंद्र, नावाडी, मल्हाव, मल्हार, बोई, गाढव भोई, खाडी भोई, खारे भोई, ढेवरा इत्यादी पोटभेद आहेत. १९३१ च्या जनगणनेनुसार भोईंची जिल्ह्यात एकूण २५,७४३ एवढी लोकसंख्या होती. त्यापैकी १३,५६६ पुरुष तर १२,१७७ स्त्रिया होत्या. यांची राहणी मराठा कुणब्यांसारखीच आहे. समान आडनावात विवाह होत नाही. भोईंमध्ये मुलाचे वडील मुलीला मागणी घालतात व त्यानंतर साखरपुडा करतात. त्यावेळेस वधूस ऐपतीनुसार साडीचोळी देतात. त्यानंतर लग्नाची तारीख पक्की झाल्यावर आदल्या दिवशी हळद लावतात. दुसऱ्या दिवशी नवरा मुलगा

आप्तेष्टांसह वधूच्या गावी जातात. त्याठिकाणी प्रथम नवरा मुलगा मारूतीच्या मंदिरात थांबतो. त्यानंतर वधूच्याकडील मंडळी नवरा मुलास कपडे, मानपान करून व बाशिंग बांधून नवरीच्या मंडपाकडे वाजत गाजत जातात. त्याठिकाणी मंगलाष्टके, कन्यादान आदि विधी होतात. उपस्थित आप्तेष्टांना जेवण देऊन लग्नसमारंभ आटोपून वरपक्षाकडील मंडळी वधूसह नवरा मुलाच्या घरी जातात.

हे लोक रेणुका, एकवीरा, मोरसाई, चावडमाता, महादेव, मारुती, विठोबा, खंडोबा, भवानी, बहिरोबा, म्हसोबा आदि देवतांना भजतात. हिंदूचे सर्व सण साजरे करतात. मृतास जाळतात. दहाव्या किंवा तेराव्या दिवशी अस्थिविसर्जन करून ज्ञातीभोजन देऊन श्राध्द करतात.

**मराठा :** प्राचीन काळी महाराष्ट्राला प्राकृतात महारट्ठ असे नाव होते. सातवाहनांच्या काळी म्हणजेच इसवीसन २ ऱ्या शतकातील शिलालेखात प्रामुख्याने नाणेघाट, भाजे, कार्ले, बेडसे, कान्हेरी येथील लेखात महारठि हा लोकवाचक शब्द वापरलेला आढळतो. मोगलीपुत्र तिरस यांनी इसवीसन पूर्व ३ ऱ्या शतकात बनवासी, अपरांतक, महारट्ठ इत्यादी प्रदेशात धर्मोपदेशक पाठविले होते. यावरून त्या काळापासून महारट्ठ इत्यादी प्रदेशात धर्मोपदेशक पाठविले होते. यावरून त्या काळापासून महाराठ्ठ हे नाव रूढ असले पाहिजे असे श्री. पां. वा. काणे यांचे मत आहे. सम्राट अशोकाच्या काळी दक्षिण भारतात रट्ठ नामक लोक होते. तेच कालांतराने आपल्याला महारट्ठ म्हणवू लागले त्याचेच रूपांतर होऊन पुढे मराठा हे नाव रूढ झाले.[५४] मराठा शब्दाच्या उत्पत्तीसंबंधी व नावासंबंधी अनेक विचारवंत, तज्ज्ञ, अभ्यासक यांनी आपआपल्या उपलब्ध साधनांचा पुरावा देऊन मते मांडली आहेत त्या सर्वांचा इथे परमार्श देणे शक्य नसल्याने बाकी इतर बाबींची नोंद खालीलप्रमाणे देता येईल.

नांदेड जिल्ह्यात १९३१ च्या जनगणनेनुसार मराठ्यांची एकूण लोकसंख्या १,८३,४५६ इतकी होती. त्यात स्त्रिया ९६,४४२ तर पुरुष ८७,०१४ होते. या जातीचे अस्सल मराठा, कुणबी व इतर असे तीन वर्ग आहेत. अस्सल मराठे स्वतःला क्षत्रिय मानतात. राजे, सरदार, जमीनदार व लढवय्ये लोक यांचा या वर्गात समावेश होतो. कुणबी म्हणजे शेतकरी मराठे यांनाच कुळवाडी असे म्हणतात. तिसऱ्या वर्गात गवंडी, भंडारी, कुंभार, लोहार, माळी, चित्रकथी, न्हावी, परीट, सुतार, तेली इत्यादी पोटजातींचा अंतर्भाव होतो. अस्सल मराठे राजपूत वंशाचे असून त्यांच्या सूर्य, सोम, ब्रह्म व शेष अशा चार शाखा आहेत व त्यांच्यात ९६ कुळे आहेत. जिल्ह्यात चव्हाण, जाधव, भोसले, दळवी, गायकवाड, जगताप, काळे, क्षीरसागर, मोहिते, माने, निंबाळकर, थोरात, शिंदे, पवार, देशमुख, मंगनाळे, पाटील, धूमाळ, वडजे, केशवे, बोकारे, कऱ्हाळे, गोमासे, घोरपडे, जोगदंड, धुंजारे, कदम, आनकाडे, कोकाटे इत्यादी कुळे आढळतात. मराठ्यांची कुळे हीच त्यांची आडनावे आहेत.

मराठ्यांची पुष्कळ देवके आहेत. त्यात झाडे, पशू, पक्षी, आणि विविध वस्तू यांचा समावेश होतो. विवाहाच्या प्रसंगी या देवकांची पूजा केली जाते. समान देवक व आडनाव असलेल्या कुळात लग्न करीत नाहीत. ब्राह्मणांप्रमाणे मराठे कुळांचीही गोत्रे आहेत. पण पुष्कळ कुळांना स्वतःचे गोत्र माहित नसते. मामेबहिणीशी लग्न करतात, पण आते किंवा मावस बहिणीशी लग्न करीत नाहीत. आई-बाप आपल्या मुलामुलींची लग्न ठरवतात. मुलीचा बाप मुलाला मागणी घालतो. पत्रिका पाहण्याची प्रथा आहे, पण ती जमलीच पाहिजे असे नाही. देवाण घेवाणीचे जमले की लग्नाची तारीख पक्की करतात. त्याअगोदर साखरपुडा हा कार्यक्रम (विधी) करतात. वराकडील मंडळी आपल्या

५४. जोशी, पंडित महोदवशास्त्री, पं., पूर्वोक्त, पृ. ७५२.

आप्तेष्टांसह ठरलेल्या दिवशी वधूगृही जातात. तिथे विधीपूर्वक वराचा पिता वधूला कुंकू लावून वस्त्रालंकार देतो व तिच्या तोंडात साखर घालतो. आलेल्या व सर्व उपस्थित मंढळींना पानसुपारी, पेढे व त्यानंतर ऐपतीप्रमाणे जेवण देतात व विधी पार पाडतात. त्यानंतर पत्रिकापूजन, अक्षत, घाणा, तेलवण, देवक बसवणे, वाग्दान, सीमांतपूजन, गौरीहरपूजन हे विधी विवाहपूर्वी केले जातात. हळदी समारंभासाठी मुहूर्त ठरवलेला असतो. त्या दिवशी सर्व कार्यक्रम विधीपूर्वक करून वधूस स्नान घालून, पिवळी साडी चोळी नेसवतात व दागीने घालतात व त्यानंतर हळद लावतात व उपस्थितांना मेजवानी देतात.

मुख्य विवाह समारंभ वधूच्या घरी (पूर्वी) उभारलेल्या मंडपात होतो. हल्ली मंगल कार्यालयात होतात. वधू वरांना समोरासमोर उभे करून त्यांच्यामध्ये अंतरपाट धरतात व त्यांच्या (वधूवरांच्या) दोन्ही पक्षाकडील मामा उभे राहतात. ब्राह्मण पुरोहित मंगलाष्टके म्हणून वधूवरांवर अक्षता टाकतात. अंतरपाट दूर झाल्यावर वधू-वर एकमेकांच्या (प्रथम वधू) गळ्यात हार घालतात. लग्न लागले असे समजतात व उपस्थितांना मेजवानी देतात.

विवाहनंतर मधुपर्क, कन्यादान, विवाहहोम व सप्तपदी हे विधी होतात. त्यानंतर कंकणबंधन, लक्ष्मीपूजन, देवकोत्थान इत्यादी कार्यक्रम करून लग्न समारंभ पूर्ण करतात. लग्नानंतर मुलीला दिवस गेल्यावर गर्भाधान विधी करतात. मुलीस वस्त्रालंकार करून मुलीची ओटी भरतात. स्त्रीचे पहिले बाळंतपण तिच्या माहेरी होते. पाचव्या किंवा सहाव्या दिवशी पाचवीची व सटवाईची पूजा करतात. त्यावेळेस आप्तेष्टांना भोजनही घालतात. अकरा दिवस सुहेर पाळतात व बाराव्या दिवशी बारसे करतात. मराठा लोक शिवाचे व देवीचे उपासक आहेत. खंडोबा, भैरव, रोकडोबा, रवळोबा इत्यादी रुपात ते शिवाची पूजा करतात. अंबा, भवानी, दुर्गा, शितळा, लक्ष्मी, जोगाई, बोलाई इत्यादी रुपात देवीची पूजा करतात. राम, मारुती (हनुमान), विठोबा, गणपती यांचीही पूजा करतात. दसरा, दिवाळी, होळी, संक्रांत, नागपंचमी, गणेशचतुर्थी इत्यादी सर्व सण साजरे करतात. मृतास हे लोक जाळतात. दहाव्या दिवशी पिंडदान करतात. तेराव्या दिवशी श्राद्ध करून आप्तेष्टांना भोजन घालतात.

**मांग (मातंग) :** जिल्ह्यात आढळणारी एक अनुसूचित जात होय. ग्रामीण भागात मांग हा एक बलुतेदार गणला जातो. याचा परंपरागत प्रमुख व्यवसाय म्हणजे वाखापासून दोर बनविणे होय. ते आपली उत्पत्ती जंब ऋषीपासून झाली आहे असे समजतात. ते जनावरांना बांधण्यासाठी लागणारे दोर, कासरा, मोटेसाठी लागणारे नाडे, चाबूक, शिंदीच्या केरसुण्या, बांबुच्या टोपल्या, पडवे इत्यादी वस्तू तयार करतात. याशिवाय विवाह व धार्मिक उत्सवाच्या प्रसंगी वाजंत्री (संबळ, पिपानी, सूराटा) वाजविण्याचे काम मांग करतात. जिल्ह्यात १९३१ च्या जनगणनेनुसार ५०,२०५ इतकी लोकसंख्या होती. त्यापैकी पुरुष २७,३३९ होते. तर २२,८६६ स्त्रिया होत्या.

मांगामध्ये अस्सल किंवा मराठा मांग, बाळे, बुरुड, चपलसुंडे, दाबकर, देसूर, ढकलकर किंवा वाजंत्री मांग, ढोर, घडशी, होलगे किंवा होलार, जिनगर, जिराइत, काकर, कोकलवार, मानभाव, मांग गारुडी, ताडे, मोर्चा, परीट, पेंड, शिवटे, तेलंगी, ढोकर कोडे आणि झरे इत्यादी असे चोवीस अंतर्विवाही गट आढळतात. यांच्यात परस्परात रोटीबेटी व्यवहार होत नाही. मांग जातीत मामेबहिणीशी विवाह करण्याची प्रथा आहे. परंतु आतेबहीण किंवा मामेबहिणीशी विवाह करता येत नाही.[५५] विधवाविवाह व घटस्फोटाची प्रथा आढळते. यांचे विवाह हे हिंदू विवाह पद्धतीनुसार होतात. मरीआई व यल्लमा या देवतांखेरीज मांग बहिरोबा, खंडोबा, म्हसोबा, काळूबाई, आंबाबाई, विठोबा, महादेव

५५. **महाराष्ट्र 'भूमी व लोक'** पूर्वोक्त, पृ. ८५.

या देवतांनाही भजतात. मृत व्यक्तिस पुरण्याची प्रथा होती. अलीकडे काही मांग लोक मृतास पुरतात व जाळतातही. तेराव्या दिवशी आप्तेष्टांना जेवण देतात. मांग जातीत श्राद्ध करण्याची प्रथा नाही.

**मारवाडी :** मारवाडातील लोकांना मारवाडी असे म्हणतात. व्यापार हा त्यांचा मुख्य व्यवसाय असल्याने सर्व भागात पसरलेले आहेत. त्यामुळे त्यांना वाणी म्हणूनही ओळखले जाते. मारवाड हा शब्द मरूवार या मरूस्थलवाचक शब्दाचा अपभ्रंश आहे. यांच्यात अग्रवाल, ओसवाल, खंडेलवाल पोरवार, मेश्री, माहेश्वरी, सरावगी, पुनपाळे, सोमाणी, भूतडा, मालपाणी, सोनी अशा अनेक पोटजाती आहेत. आपली प्राचीन सहा ऋषीपासून उत्पत्ती झाली असे ते मानतात. दध्यवसन, गूजरगौड, खंडेवाल, खंडेलवाल, पारीख, शिरवळ व सारस्वत अशी आहेत. यांच्यात लग्नसंबंध होत नाही. १९३१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यात मारवाडी लोकांची संख्या एकूण ३,५८४ इतकी होती. त्यात पुरुष २,३८६ तर स्त्रिया १,१९८ इतक्या होत्या.

मारवाडी लोक मेहनती, शांत व मितव्ययी आहेत. ते व्यापाराबरोबरच सावकारी व दलाली करून बरेच श्रीमंत झाले आहेत. त्यांची भाषा मारवाडी ही आहे. हे लोक बहुतेक शाकाहारी असून डाळरोटी व तूप हे त्यांचे मुख्य अन्न आहे.

**माळी :** जिल्ह्यात आढळणारा व बागकाम करणारा एक वर्ग माळी हा शब्द संस्कृतमधील मालाकार म्हणजे फुलांचा हार करणारा याचे संक्षेप रूप आहे. मराठीत माळ या शब्दावरून माळी हे नाव आले आहे. यांच्यात फुलमाळी, अधप्रभू, अधरोटी, बावने, हळदे (किंवा बनकर), जिरे, काच, कडू, क्षीरसागर, लिंगायत, पदे, रांत व उंडे असे तेरा पोटभेद आहेत. नांदेड जिल्ह्यात १९३१ च्या जनगणनेनुसार माळी लोकांची एकूण लोकसंख्या ५,५४५ इतकी होती. त्यात पुरुषांची संख्या २,६६५ इतकी होती. तर स्त्रियांची संख्या २,८८० इतकी होती.

यांच्यात समान कुळ व देवक असलेल्यांमध्ये लग्नसंबंध होत नाही. आतेबहीण व मामेबहिणीशी लग्न करण्याची प्रथा आहे. त्याचप्रमाणे विधवा पुनर्विवाह व घटस्फोट या प्रथा माळी जातीत आहेत. विवाह विधी मराठ्यांप्रमाणेच करतात. हे लोक भवानी, अंबा, खंडोबा जनाई, तुकाई, भैरोबा, नृसिंह व सप्तशृंगी आदि देवतांची पूजा करतात किंवा भजतात. हे लोक प्रामुख्याने शेती करतात त्याच्याबरोबर फुले, फळे, भाज्या पिकवतात व शेतमजुरी करून उदरनिर्वाह करतात. त्यांच्या बायका व मुले शेतीच्या कामात फुले, फळे आणि भाजीपाला विकण्यास मदत करतात. माळी जातीत संत सावतामाळी व महात्मा फुले यांना भूषण मानतात. मृत व्यक्तिस अग्निसंस्कार करतात.

Maharashtra State Gazetteers

## मुसलमान (धर्म)

इस्लामच्या अनुयायांना मुसलमान किंवा मुस्लिम म्हणतात.[५६] नांदेड जिल्ह्यात मुसलमानांची लोकसंख्या स्थुलमानाने दोन गटात विभागणी करता येईल. सय्यद, शेख, मुघल आणि पठाण यांचा एक प्रमुख गट असून पारंपारिक व्यवसायावरून नावे धारण केलेल्यांचा दुसरा गट.

हजरत महंमद पैगंबराची कन्या फातिमा व जावई अली यांचे आपण वंशज आहोत असा सय्यद म्हणविणारांचा दावा आहे. हा भेद ते आपल्या नावाच्या आधी सय्यद, मीर अथवा शाह असे उपपद लावून दाखवितात. स्त्रिया आपल्या नावापूर्वी बेगम ही उपाधी लावतात.[५७] महंमद पैगंबराच्या अनुयायांत

५६. जोशी, महादेवशास्त्री, **'भारतीय संस्कृतीकोश'** खंड सातवा, पुणे, १९७२, पृ. ४३९.

५७. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. १४०-१४१.

विविध कारणांमुळे मतभेद होऊन शिया, सुन्नी, मोटाझली, सैफेसियन, खारेजायी इत्यादी पंथ उत्पन्न झाले आणि त्यांचे पुन्हा शेकडो उपपंथ झाले आहेत.[५८] काही शियापंथी मुसलमान आहेत. पण बहुसंख्य सुन्नी आहेत. मुघल हे प्रायः हुसेनी सय्यद आणि शिया आहेत. ते गौरवर्णाचे असतात व दक्षिणी मुसलमानांसारखा पोषाख करतात, काही आपल्या नावापुर्वी मिर्झा व नंतर बेग हे उपपद लावतात. त्यांच्या स्त्रिया आपल्या नावापुर्वी खातम हे उपपद लावतात.

पठाणांचे पूर्वज अफगाण असल्याने ते आपल्या नावापुढे खान ही पदवी लावतात व स्त्रिया खातून अथवा खातू ही पदवी लावतात. येथे येऊन स्थायिक झालेल्या विदेशी मुसलमानांचा स्थानिक लोकांशी संकर होऊन प्रजोत्पती झाली. त्यामुळे पूर्वजांचे प्रत्येक खास वैशिष्ट्य त्यांच्यामध्ये दिसून येत नाही. मराठवाड्यातील बहुतेक मुसलमान हे नियाझी कुलातील महादवी किंवा मंदोझोई वंशाचे सुन्नी मुसलमान आहेत.

जिल्ह्यातील इतर मुसलमान विविध प्रकारचे व्यवसाय करतात. व्यापारी, कारागीर, शेतमालक व शेतकरी आणि सरकारी व खाजगी क्षेत्रातील कर्मचारी अशी त्यांची वर्गवारी करता येण्यासारखी आहे.[५९] त्यांच्या नावावरूनच असे स्पष्ट होते की, काही परदेशी वंशाचे व काही धर्मांतर केलेले मूळचे हिंदू आहेत. बोहरा हे मुख्यत्वे व्यापारी पेशाचे आहेत. तेही मूळचे हिंदूच असावेत. सुन्नी, आलिया, दाऊदी व सुलेमानी असे त्यांचे चार पोटभेद आहेत. अत्तार, कुंभार, कसाई, मोमण, जारस, कदियास, नालबंद, शिक्लगार, तांबटगार, लोहार, मणियार, सुतार, कागशी, व दर्जी अशा त्यांच्या आणखी शाखा आहेत.

अत्तार म्हणजे सुगंधी फुलांपासून अत्तरे, दंतमंजन, सुरमा, केसवर्धक तेले वगैरे तयार करणारे. भोनेकार किंवा मुसलमान कुंभार मातीची मडकी, कुंड्या वगैरे जिन्नस तयार करतात. यातले काही उत्तर हिंदुस्तानी आहेत. पण बहुतेक धर्मांतर झालेले मूळचे हिंदू आहेत. जरा किंवा धुलधोया हे सोनारांच्या दुकानात झाडलोट करून सोन्याचे व चांदीचे बारीक कण जमा करणारी अशी एक मिश्र शाखा आहे. उत्तर हिंदूस्थानी व दक्षिणी गायकसाई ही एक जमात आहे. त्यांचा बेटीव्यवहार होतो. विणकरांचा व शेतीचा व्यवसायही ते करतात. खाटीक म्हणजे बकरे कापणारे. परंपरेनुसार हे गायकसायांबरोबर रोटीव्यवहार अथवा बेटीव्यवहार करीत नाहीत. खाटीक मटन विकतात पण गोमांस विकत नाहीत. शेती धान्याचा म्हणजे भुसारी मालाचा व्यापार ते करतात. मोमिन अथवा जुलाहा हे धोतरे, साड्या, पागोटी, चादरी व असेच भरड कापड विणतात. हिंदूमधील अनेक जातींमधून मुसलमान झालेले हे शियापंथी आहेत. काही मुसलमान दर्जी म्हणजे शिंपी आहेत. पण बहुतेक शिवणकाम करणारे हिंदूच आहेच. थोडक्यात सांगावयाचे झाल्यास जिल्ह्यातील मुसलमानांची परंपरागत व्यवसाय काहीसे नष्टप्राय झाल्याने ते आता इतर व्यवसाय करण्यात व व्यवसायात मिसळून गेले आहेत.

यांच्यात विवाह संदर्भात असे म्हणता येईल की सामाजिक जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी करण्याचा एक करार म्हणजे विवाह असे मुसलमान मानतात. पूर्वी यांच्यात लहान वयात लग्न करीत

५८. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. १४०-१४१.

५९. **कित्ता**, पृ. १४२-१४३.

असत पण अलीकडे लग्नाचे वय वाढले आहे.[६०] विवाह करण्यासंदर्भात हे ओळख किंवा प्रेम या बाबी लक्षात घेत नाहीत. हिंदूच्या काही चालीरीति व जातिनिर्बंध खेड्यापाड्यापासून पाळण्यात येतात. तसेच मागील तीस वर्षांत विवाहविधी फारच साधा व जुन्या रूढीपेक्षा जरा भिन्न झाला आहे. वराकडील मंडळी वधूगृही जाऊन वधूला मागणी घालतात. तेंव्हाच मेहेर रूपाने द्यावयाची रक्कम ठरते. बऱ्या स्थितीतील लोक वर्षे सहा महिने अगोदर वाङनिश्चय करून ठेवतात. माँझा नावाच्या प्रकाराने विवाह समारंभाला सुरुवात होते. माँझा म्हणजे औपचारिकपणे वधूला बैठकीवर बसवून घरातील स्त्रियांनी रज्जक म्हणजे तीन दिवस-रात्री अल्लाच्या प्रशंसापर गाणी म्हणत बसणे. ढोलकीच्या तालावर ती म्हणतात व त्यात ईश्वराची स्तुती असते. नंतर हळद लावण्याचा समारंभ करतात व त्यानंतर बीयापारी म्हणून ओळखली जाणारी मेजवानी होते. त्यावेळी अल्लाच्या नावाने ऊद जाळण्यात येतो. यानंतर मेंदीची पाने वधूला नजर करण्यात येतात. त्याचवेळी तिला लग्नाचा अहेर करण्यात येतो व मेंदीची पाने वाटून तिच्या हातापायांना लावण्यात येतात.

विवाहमधील मुख्य भाग म्हणजे निक्का. हा अरबी शब्द आहे व त्याचा अर्थ ऐक्य अथवा संगम असा आहे. करार असा त्याचा अर्थ करण्यात येतो. निक्का अथवा लग्न विधीला दोन पुरुष साक्षीदार असावे लागतात. ते सरळ वधूकडे जातात व तिला वराचे नाव आणि वय सांगून त्याला पती म्हणून पत्करण्याला तिची तयारी आहे किंवा नाही असे विचारतात. तिचा जबाब ऐकूण त्याप्रमाणे काजीला व जमलेल्या इतर लोकांना सांगतात. मग काजी मुलीच्या बापाला व वराला समोरासमोर बसायला सांगतो आणि खास विवाह नोंदणीपुस्तकात लग्नाची नोंद करतो. मुलीला जो मेहेर देण्याचे ठरले असेल त्याची ही नोंद तो करतो आणि सर्वांसमक्ष वर जाहीर करतो की, 'सदरहू रक्कम देऊन वधूला मी निवडली आहेच पत्नी म्हणून मी तिचा स्वीकार करतो'. हे झाल्यावर सासरे, जावई एकमेकास अलिंगण देतात.[६१] हजर किंवा उपस्थितांना मिठाई व सरबत वाटण्यात येते. श्रीमंत घराण्यात त्याप्रसंगी गायनाची मेहफिल होते. प्रातःकाळी वधूचा भाऊ वराला अंतःपुरात बोलावून घेतो आणि तेथे जलवा नावाची विधी करण्यात येतो. याप्रसंगी वधुवरांचा एकमेकांसी परिचय करून देण्याचा हेतू असतो. एकमेकांचे चेहरे आरशात पाहण्याला त्यांना सांगण्यात येते आणि दोघांनाही लिहितावाचता येत असेल तर ती दोघे मिळून कुराणातील शांती या विषयावरील अध्याय वाचतात. अखेरचा विधी म्हणजे निरोप घेण्याचा. तो घेऊन वधू पतिगृही जाते. परंपरेनुसार पहिल्या चार शुक्रवारी (चार जुमानी) लग्नानंतर वधुवरांना वधूच्या माहेरी मेजवानीला बोलविण्यात येत असे.

मुसलमानांमध्ये चार बायका करण्याला परवानगी आहे. परंतु प्रत्यक्ष व्यवहारात तसे होत नाही. जवळच्या नातेवाईकांत लग्न होत नाही. पण चुलतभावंडे, मावसभावंडे व आतेमामेभावंडे यात विवाहाला हरकत नसते. एखाद्याला आपल्या दाईबरोबर अथवा दाईच्या मुलीबरोबर लग्न करता येत नाही. पण एकाच दाईने पाजलेल्या मुला मुलीत जर बऱ्याच वर्षाचे अंतर पडले असेल, तर हरकत मानीत नाहीत. बहिणीची मुलगी म्हणजे भाची विवाहार्ह नसते. बहिणीशी तिच्या हयातीत लग्न करता

---

६०. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. १४२-१४३.

६१. **कित्ता**.

येत नाही पण तिला घटस्फोट दिलेला असेल तर हरकत नसते. अनेक देव मानणाऱ्या मुलीबरोबर मुसलमानाला विवाह करता येत नाही.

गरोदरपणा, जन्म, वाङनिश्चय, विवाह आणि मृत्यू याबद्दलचे मुसलमानी विधी व संस्कार पुढे दिले आहेत. हिंदूप्रमाणेच विनाअपत्य मृत्यू येणे हे मुसलमान देखील मोठे दुर्भाग्य समजतात. म्हणून लग्नानंतर दोन तीन वर्षात स्वाभाविकपणे संतान झाले नाही तर मुसलमान स्त्रिया त्याबद्दलचे दुसरे उपाय म्हणजे गंडे, दोरे, ताईत औषधे यांचा उपचार करतात. त्यासाठी मृत अथवा जिवंत साधूची करुणा भाकण्यात येते. मांगिक लोक कागदाच्या तुकड्यावर देवाचे नाव लिहून ते गुलाबपाण्यात बुडवून ते पाणी पिण्याला देतात. अनेक बंधने व शर्ती गर्भिणीने पाळाव्या लागतात. प्रसुती सुलभ व्हावी म्हणून काही अशुभ घटना अथवा पीडा होऊ नये म्हणून काळजी घेण्यात येते. बीजेला चंद्र प्रथम दिसतो तेंव्हा आणि गुरुवारी गर्भिणीने घराबाहेर पडण्याला बंधन असते. तसेच सुर्यास्ताकाळी केव्हाच बाहेर पडू नये आणि वृक्षरायी व नदीकिनाऱ्यावर फिरु नये.[६२] गरोदरपणात गर्भिणीने वेणीफणी, प्रसाधन, अलंकार घालणे वगैरे वर्ज्य करावेत. सातवा महिना आला म्हणजे खेडेगावात दंपतीला जवळ बसवून स्त्रिया गाणी म्हणतात व मौजमजा करतात.

पहिल्या बाळंतपणासाठी गर्भिणी माहेरी जाते. मुलगा असो मुलगी जन्मतःच त्याला सुपात ठेवण्यात येते आणि आईकडे अगोदर लक्ष पुरविण्यात येते. जन्मदात्या ईश्वराचे नाव जन्मताच त्याच्या कानावर पडावे म्हणून अर्भकाचा बाप किंवा इतर आप्तेष्ट आझान प्रार्थना म्हणतो. 'अल्लाहो अकबर' असे त्या प्रार्थनेच्या सुरुवातीचे शब्द आहेत. मुलाच्या कानांना आवाजाची सवय व्हावी म्हणून तांब्याची किंवा पितळेची थाळी त्याच्या कानाजवळ वाजविण्यात येते. तकबीर किंवा प्रार्थनेची हाक बापाने देण्यापूर्वी हे करण्यात येते. त्याचप्रमाणे त्याला काटक व सोशिक बनविण्यासाठी स्नानापूर्वी त्याच्या अंगावर थंड पाणी शिंपडण्यात येते. पहिले स्नान झाल्याबरोबर मुलाच्या मनगटावर व पायावर काळे दोरे जरा आवळून बांधण्यात येतात. उद्देश एकच असतो तो म्हणजे कोणाची नजर लागू नये. दररोज व संध्याकाळी ऊद, राई-इसाद व मोहरी जाळून सात-आठ वेळा आईच्या व बाळाच्या अंगावरून ओवाळण्यात येते. सखाईची पूजा खेडेगावात विशेषतः पाचव्या व सहाव्या दिवशी करतात. ती देवी बाळाचे भवितव्य ठरविते अशी समजूत आहे. सहाव्या दिवशी बाळ व बाळंतीण यांना पूर्ण स्नान घालून नवीन कपडे घालतात. ईश्वर कृपेसाठी सर्वांना भोजन देतात व भिक्षा वाटतात. साधारणतः पहिल्या किंवा सहाव्या दिवशीच मुलाचे नामकरण होते. बाप, आजा आणि नातेवाईक मिळून कुराणाचे कोणतेही पान उघडतात. त्यावरील तिसऱ्या ओळीतील पहिल्या शब्दाचे जे पहिले अक्षर असेल त्याने मुलाचा नावाचा प्रारंभ झाला पाहिजे असा संकेत आहे. ज्याची मुले जगत नाहीत ते आपल्या मुलांना काहीतरी वेडीवाकडी अथवा शुद्र अर्थाची नावे ठेवतात. अकिका या नावाचा केवळ मुसलमानी समारंभ सातव्या, चौदाव्या किंवा एकविसाव्या दिवशी करतात. एकाच वेळी दोन क्रिया घडवून आणण्याचा हा विधी आहे. न्हाव्याने मुलाच्या डोक्यावर वस्तरा फिरवताच, बापाने अथवा दुसऱ्या कोणी बकऱ्याच्या गळ्यावर सुरी फिरविणे म्हणजे अकिका.

---

६२. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. १४२, १४३.

घटस्फोट देणे हे नवऱ्याच्या मर्जीवर अवलंबून असते. परंतु सभ्य समाजात असे क्वचित घडते, कारण ते उभयपक्षी कमीपणाचे समजले जाते. पण आपल्या मर्जीनुरूप नवऱ्याला बायकोशी काडीमोड घेता येते आणि कुराणशरीफ त्याबद्दल कोणत्याही समर्थनाची मागणी करीत नाही. पण काडीमोड देतांना तिच्याबद्दल घेतलेला मेहेर मात्र परत करावा लागतो. वाईट वागणूक, अन्नवस्त्राबाबत होणारे हाल आणि पतीचे नपुंसकत्व ही कारणे देऊन पत्नीला देखील घटस्फोटाची मागणी करता येते. मुसलमानी कायद्या अनेक प्रकारच्या घटस्फोटाची मागणी करता येते. मुसलमानी कायदा अनेक प्रकारच्या घटस्फोटांना मान्यता देतो. अशा तलाकापैकी तलाक-इ-अहसान आणि तलाक-ई-रजाई हे दोन प्रत्यावर्ती रद्द होण्यासारखे असतात. तलाक-इ-हुस्न या प्रकारात नवरा तीन निरनिराळ्या वाक्यात तीन वेळा काडीमोडीचा उच्चार करतो आणि तो मात्र मग रद्द होण्यासारखा नसतो. काडीमोडीनंतर तीन महिणे पुरे होईपर्यंत पत्नीला दुसरा घरोबा करता येत नाही व हा इद्दत कालावधी पूर्ण होईपर्यंत नवऱ्याला तिला अन्नवस्त्र द्यावे लागते.

घटस्फोटाची मागणी स्त्री करीत नाही. तिला काजीकडे जाऊन लग्नमोडीचा अर्ज करावा लागतो. अशा मागणीला खाला म्हणतात. मुसलमानी कायद्याप्रमाणे त्याचा अर्थ तिने स्वखुशीने नवऱ्याशी संबंध तोडण्याची मागणी केली आहे असा होतो. त्यामुळे मेहेरवर तिचा हक्क राहत नाही. कनिष्ठ समाजात घटस्फोटित स्त्रीकडे अगर पुरुषाकडे कोणी निंदास्पद दृष्टीने पाहात नाही आणि उभयतांना नवीन घरोबा करण्याला अडचण पडत नाही. विधवाविवाह अगदी अनिर्बंधपणे होतात आणि तरुण विधवा बहुधा पुनः लग्न करतातच. प्रथमच लग्न करणारा पुरुष बहुधा विधवेशी लग्न करीत नाही. तथापि त्याला कोणतीही हरकत मात्र नाही. तसेच प्रथमच विवाह करणाऱ्या मुलीने देखील विधुराशी लग्न करण्याला हरकत नाही.[६३]

यांच्यात मृत व्यक्तिस कुराणातील सुरा-ए-यासिम हा अध्याय मंद आवाजात ऐकविला जातो. या अध्यायात मृत्यू व मृत्यूनंतर मुसलमानाला प्राप्त होणारी गती यांचे विवेचन आहे. कलमा म्हणजे 'ला-इलाह-इल-लल्लाह, महंमद उर रसुल-उल-लाह' ही प्रार्थना सतत ऐकवली जाते. क्षमा केली जावी याबद्दलची प्रार्थना व ब्रीदवाक्य वारंवार ऐकवली जातात आणि मरणोन्मुख व्यक्तिच्या मुखात मधाचे काही थेंब सोडण्यात येतात. प्रार्थना ऐकत असता त्यानेही ती मनात म्हणावी अशी अपेक्षा असते. देहावसान झाल्यानंतर डोळे व तोंड बंद करण्यात येते आणि अंत्यसंस्काराची व्यवस्था विलंब न लावता करण्यात येते. एका लाकडी तक्त्यावर मृतदेह ठेवण्यात येतो. ठेवण्यापूर्वी मृतदेहास स्नान घालून सुवासिक द्रव्ये चोपडण्यात येतात नंतर त्यावर पांढऱ्या कापडाचे आच्छादन घालण्यात येते. पुरुषाचा देह पुरुषच धुतात तर स्त्रीचा देह स्त्रिया स्वच्छ करतात. पुरुषाचा देह कफनात गुंडाळतात स्त्रीच्या बाबतीत कफनाशिवाय आणखी ओढणी ठेवण्यात येते. मृत्यू जर रात्री झाला असेल तर सकाळपर्यंत मृतदेह हलविण्यात येत नाही. एरवी त्यावर आच्छादन घातल्याबरोबर आणि इष्टमित्रांनी अखेरचे दर्शन घेतल्याबरोबर देह जनाजावर ठेवण्यात येतो. जनाजावर ठेवल्यानंतर इतर लोकांपैकी चौघे तो उचलून खांद्यावर घेतात. दफन भूमीवर पोहचेपर्यंत प्रेतयात्रेतील सगळे लोक खांदेपालट करीत राहतात. आणि तोंडाने 'ला-इलाह-इल-लल्लाह' म्हणत असतात. उत्थापनापूर्वी आई व जरूर तर

६३. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. १४३.

मृताची पत्नी देखील आमचा आता काही हक्क राहिला नाही असा उच्चार करतात. मृत व्यक्ति पुरुष असेल तर शवपेटीवर हिरवी अथवा गडद रंगाची चादर टाकण्यात येते व स्त्री असेल तर शवपेटीवर लाल चादर टाकण्यात येते. मशिदीजवळ शवपेटी उतरून ठेवतात. व सर्वजन ओळीने उभे राहून ' अल्ला हो अकबर ' ही प्रार्थना म्हणतात. मग कबरीजवळ ती नेऊन अखेरची प्रार्थना होते आणि कबरीच्या खड्ड्यात शीर उत्तरेकडे करून व उजव्या बाजूला झूकवून प्रेत ठेवण्यात येते.[६४] म्हणजे चेहरा मक्केकडे होतो. वर पवित्र मातीची ढेकळे ठेवतात व सगळे जण त्यावर माती लोटतात. कबर पुर्णपणे भरल्यावर हजर असलेल्यांतील विव्दान किंवा पेश इमाम कुराणातील काही मंत्राचे पठण करतात व सर्वजण मृताच्या आत्म्याला शांती मिळावी म्हणून प्रार्थना करतात. नंतर सर्वजण मृताच्या घरी परत येतात आणि दरवाजापाशी त्याच्या आत्म्याला शांती मिळावी म्हणून प्रार्थना करतात. वर्षाकाठी एका ठराविक दिवशी प्रार्थना करणे, खैरात वाटणे, अनाथ मुलांना भोजन देणे अशी कृत्ये मृताच्या स्मरनार्थ करण्यात येतात. त्या दिवशी कबरींचे दर्शन घेण्याचीही प्रथा आहे.

नांदेड जिल्ह्यात मुसलमानामध्ये शिया व सुन्नी असे दोन पंथ आहेत. सुन्नी बहुसंख्य असून शिया हे अल्पसंख आहेत. इस्लामची पाच मुख्य तत्त्वे आहेत. (१) ईश्वर एकच आहे व मुहंमद हा त्याचा प्रेषित आहे. (२) दया व औदार्य, (३) मक्केची यात्रा, (४) रमझानचे उपवास व (५) प्रार्थना. अशा प्रकारे विश्वास व व्यवहार असे मुसलमानी धर्माचे दोन भाग आहेत. ईश्वरावर, त्याच्या दूतावर, प्रेषितावर व कुराणावर विश्वास, मृतांचे पुनरुत्थान, सर्वांच्या कयामताचा दिवस येतो व ईश्वराच्या निरपवाद आज्ञा हा धर्मश्रध्देचा भाग आहे. तर प्रार्थना, दया, रमझानचे उपवास व मक्केची यात्रा यावर विश्वास म्हणजे मुसलमानी धर्मोपचार आहे. दिवसाकाठी करण्याच्या पाचही प्रार्थनांचे नमुने निरनिराळे आहेत. शुक्रवारी, रमझान व बकरी-ईद यावेळी प्रार्थना, वाचनाबरोबर प्रवचनेही होतात. अत्यंसंस्काराची प्रार्थना म्हणजे 'अल्ला हो अकबर' हेच शब्द सतत म्हणत राहणे. इद उल-फितरच्या उपवास समाप्ती समारंभाच्या वेळी देखील हेच शब्द वारंवार उच्चारतात. सामान्यतः मुसलमान लोक आपल्या धर्माज्ञा पाळण्यात तत्पर असतात.

नांदेड जिल्ह्यात नांदेड आणि कंधार येथे मशिदी आहेत. पण त्या बहुतेक जुन्या पुराण्या आहेत. त्याठिकाणी ते दर शुक्रवारी व वेळ मिळेल तेंव्हा नित्यनेमाने नमाज पडतात. किंवा प्रार्थना करतात.[६५] मुसलमानी वर्षे मोहरम महिण्यापासून सुरू होते. करबला येथे झालेल्या हुसेनच्या मृत्यूचा वर्षेदिन म्हणून मोहरम पाळला जातो. पुष्कळ लोक ताजिया अथवा ताबूत तयार करतात. पुष्कळ दिवस हे घरी ठेवून नवव्या दिवशी रात्री त्याची गावातील मोठ्या रस्त्यातून मिरवणूक काढतात. दहाव्या दिवशी मोठ्या समारंभाने या ताबूतचे नदीत अथवा तलावात विसर्जन होते. महमंद पैगंबराच्या मृत्यूच्या दिवसाला वफ्त असे म्हणतात. रबिउल-अव्वाल महिण्याच्या बाराव्या दिवशी ईद-ए-मिलाद म्हणून हा दिवस पाळण्यात येतो. ही ईद सुनी मुसलमानात फार मोठ्या प्रमाणावर साजरी होते. पैगंबराचा जन्मदिवस याच महिन्याच्या सतराव्या दिवशी साजरा करण्यात येतो. त्याला मौलाद असे म्हणतात. शाबान महिण्याच्या चौदाव्या दिवशी सायंकाळी शब-ए-बारात किंवा सर्व आत्म्यांचा दिवस असतो.

६४. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. १४६.

६५. **कित्ता**, पृ. १४७-१४८.

या रात्री जन्माला येणाऱ्या आत्म्याची नोंद स्वर्गात होते असे म्हणतात. वर्षाचा नववा महिना रमझान आहे. या महिन्यात मुसलमान लोक दररोज उपवास करतात. महिना अखेर म्हणजे शब्बालच्या पहिल्या दिवशी ईद-उल्ल-फितर येते. या दिवशी मोठ्या समारंभाने उपवास संपविला जातो. मुसलमानांच्या फार मोठ्या उत्सवापैकी रमझान-ईद हा एक आहे. दुसरा मोठा उत्सव म्हणजे ईद-उल-जुहा कुर्बान ऊर्फ बकरी ईद हा एक आहे. हा झिलहिज्जा महिन्याच्या दहाव्या तारखेला येतो.[६६]

## लिंगायत (पंथ)

एक जात व संप्रदाय. या जातीचे व संप्रदायाचे लोक शरीरावर लिंग धारण करीत असल्यामुळे त्यांना लिंगायत, लिंगणी व लिंगवत, वीरशैव, लिंगधारी, लिंग, बळीजा, बंजीगारु, वाणी, गरू, हस्तूल, महाजन, देवधरू अशी नावे मिळाली आहेत. हे लोक कट्टर शिवोपासक असल्यामुळे त्यांना वीरशैव व शिवशरण असेही म्हणतात. लिंगायत संप्रदायाचा पुरस्कर्ता बसवेश्वर हा जातिभेदांच्या विरुद्ध होता. लिंगधारक तेवढा समान दर्जाचा, अशी त्याची शिकवण होती. नांदेड जिल्ह्यात १९३१ च्या जनगणनेनुसार लिंगायत लोकांची एकूण लोकसंख्या ५२,३६० इतकी होती. त्यात २६,७४० पुरुष होते तर स्त्रियांची संख्या २५,६२० इतकी होती.[६७]

लिंगायतांमध्ये मुख्य ३ वर्ग आहेत. तदसंबंधीची माहिती खालीलप्रमाणे देता येईल. (१) पंचमसाळी (२) पंचमसाळ्यांच्या बाहेरचे (३) धोबी, चांभार, कोळी इत्यादी.

(१) पंचमसाळी - लिंगायतात या वर्गाला महत्त्वाचे स्थान असून अष्टावरणांचा अधिकार आहे. अय्या अथवा जंगम या नावांनी ओळखल्या जाणाऱ्या उपाध्यांचा यात समावेश होतो. पंचमसाळ्यांमध्ये वरीलप्रमाणे उपाध्ये, जंगम, आणि व्यापारी बंजिंग यांचा समावेश होतो. नांदेड जिल्ह्यात जंगमांचा भरणा आहे. नंदी, भृंगी, वृष, वीर व स्कंद अशी या वर्गाची पाच गोत्रे आहेत. या सर्व पोटभेदात रोटीव्यवहार चालतो पण लग्नसंबंधावर मात्र काही निर्बंध आहेत. या वर्गाला शुद्ध लिंगायत असे म्हटलेले आहे. हे लोक स्वतःच जंगम असल्याने लग्नविषयक सर्व विधी व कार्य करतात. जंगम लोक सकाळी स्नान करून कपाळावर दररोज विभूती लावतात. पूर्वी जंगम लोक भगवे कपडे वापरीत परंतु आता इतरांसारखेच कपडे वापरतात. सर्वांच्या गळ्यात लिंग असते.

(२) पंचमसाळ्यांच्या बाहेरचे कोष्टी, तेली, गवंडी, धनगर व शेतकरी इत्यादी व्यावसायिक लोक या वर्गात येतात. यांच्यात पोटभेद निर्माण झाले असून यांच्यात रोटीबेटीव्यवहार होत नाही. जिल्ह्यात लिंगायत तेली, लिंगायत कोष्टी हे व्यावसायिक लोक आहेत. यांच्यात उद्योगतेली, तीरमल तेली, परदेशी या पोटजाती आहेत. लिंगायत कोष्ट्यांचा व्यवसाय हातमागावर कपडे विणणे हा होय. यांच्यात पटनावळ ही एक पोटजात आढळते. पटनावळ म्हणजे कपडा विणणे. विवाहविषयक सर्व विधी जंगमाप्रमाणेच करतात.

(३) धोबी, चांभार, कोळी, कुंभार इत्यादी लोकांचा या वर्गात समावेश होतो. यांना अष्टावरणाचा अधिकार नाही. लिंगायत धोबी हे कपडे धुणे व इस्त्री करणे हा व्यवसाय करतात.

---

६६. **परभणी जिल्हा गॅझेटिअर,** महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८८, पृ. १३८-१३९.

६७. **सेंसस ऑफ इंडिया १९३१,** पूर्वोक्त, पृ.२५४ ते २५७.

लग्नाच्या वेळी श्रीमंत लोक त्यांना कपडे भेट देतात. चांभार, कोळी, कुंभार हे बलुत्याची कामे अजुनही करतात. कुंभार हे एखादी व्यक्ती मृत पावली असेल तर त्यावेळेस हे जंगमांना विधीच्या वेळेस मदत करतात किंवा जंगमांचे करम करतात. मुलांच्या वाढदिवसासाठी त्यांना आमंत्रित करतात.

लिंगायतांत सामान्य, विशेष व निराभारी असे आणखी तीन भेद आहेत. याशिवाय भक्त व माहेश्वर असेही आणखी दोन भेद आहेत. भक्त हा शिष्यवर्ग असून, माहेश्वर हा गुरुवर्ग आहे. यांच्यातले सगळे स्त्री-पुरुष अंगावर शिवलिंग बाळगतात. लिंग हे पाषाणाचे असते व ते चांदीच्या डबीत ठेवून रेशमी दोऱ्याने गळ्यात बांधतात. सकाळी उठून भस्मधारण व लिंगस्पर्श केल्यावर मगच हे अन्न घेतात. लिंगायत लोक शिव हा प्रमुख देव आणि परम आराध्य मानतात. तोच निर्माता, कर्ता, धर्ता, संहर्ता असे समजतात. त्याचे प्रतीक म्हणून लिंगाची व त्याचे वाहन म्हणून नंदीची पूजा करतात. हनुमान, गणपती, व यल्लमा या देवतांनाही ते भजतात.[६८]

लिंगायतांना 'अष्टावरण' हा एक महत्त्वाचा आवश्यक असा धार्मिक संस्कार आहे. जीव हा मूलतः शिवरूप आहे. पण अज्ञानरूपी आवरणाखाली तो झाकलेला किंवा बद्ध राहतो. जीवाला शिवैक्य प्राप्त करण्यासाठी अंगाच्या गुणांपासून मुक्त होऊन लिंगत्व प्राप्त करावे लागते. त्यासाठी जी साधना करावी लागते तिला साहाय्यक अशा आठ गोष्टी मानलेल्या आहेत त्यांना 'अष्टावरण'असे म्हणतात. त्या अशा (१) गुरू (२) लिंग (३) जंगम (४) पादोदक (५) प्रसाद (६) विभूती (७) रुद्राक्ष आणि (८) मंत्र, ह्या होत. या आठ गोष्टीवरून अष्टावरण किंवा अष्टवर्ण ही संज्ञा पडली आहे. लिंगायतात अष्टवर्णाइतकेच पंचाचारालाही महत्त्व आहे. सदाचार, गणाचार, नित्याचार, शिवाचार व लिंगाचार असे हे पंचाचार आहेत. लिंगायतांच्या वस्तीत त्यांचे मठ असतात. हे मठ पंचाचार्यांपैकी एखाद्या आचार्याच्या परंपरेतले असतात व त्या त्या आचार्यांचे अनुयायी त्या मठांशी सलग्न असतात. त्यांच्यात दोन धार्मिक मिरवणुका वैशिष्ट्यपूर्ण आहेत. (१) नंदीकोडू म्हणजे नंदीशृंग व दुसरीचे नाव व्यासंतोल म्हणजे व्यासहस्त.

विवाहप्रथा - लिंगायतांमध्ये विवाहविषयक पूर्वी बाल व प्रौढ अशा दोन्ही विवाहपद्धती अस्तित्वात होत्या. मात्र कालमानाला अनुसरून प्रौढ विवाहपद्धतीच आता अस्तित्वात आहे. समान आडनावात विवाह करीत नाहीत. मावसबहीण किंवा मोठ्या बहिणीची मुलगी यांच्याशी लग्न करता येते. वरपिता वधूपित्याकडे जाऊन मुलीला मागणी घालतो. तो संबंध उभयपक्षी संमत ठरल्यास ज्ञातीबांधवासमक्ष सोयरीक पक्की करतात. मग वधूवरास पोषाख देतात. उभयपक्षी विडे दिले जातात. यांना साक्षीविडे म्हणतात. लग्नाच्या आधी वधूपिता वरपक्षाला मेजवाणी व पोषाख देतो. त्यास बाशनगी म्हणतात. लग्नाआधी गुग्गुळविधी असतो. त्यानंतर अरशन, देवकार्य, गुरूची पाद्यपूजा इत्यादी कृत्ये होतात. साखरपुड्यासाठी जंगमाला घेऊन वधूच्या घरी जातात. त्यावेळी साडीचोळी, दोन नारळ, पाच हळकुंडे, पाच निंबे आणि पाच विडे एवढे साहित्य बरोबर घेतात. वधूसाठी कांबळे आंथरतात. त्यावर तांदूळ घालतात. वधू फुलांचा मुकूट घालून त्या कांबळ्यावर बसते. मग आणलेल्या वस्तूंनी तिची ओटी भरतात. सुवासिनी घोंगडीवरचे तांदूळ घेऊन ते वधूचे गुडघे, खांदे व मस्तक यांच्यावर तीन

६८. जोशी, महादेवशास्त्री, पं., **भारतीय संस्कृतीकोश,** खंड आठवा, भारतीय संस्कृतीकोश, मंडळ, पुणे, १९७४, पृ. ३६९.

वेळा टाकतात. मग साखर व विडे वाटतात. वधूकडचा एखादा मोठा माणूस नियोजित वराला वधू दिल्याची घोषणा करतो. त्यावर वरपक्षाकडून स्वीकाराची घोषणा होते. लग्नसमारंभ सामान्यतः चार दिवस चालतो. पहिल्या दिवशी पितरांची पूजा होते. दुसऱ्या दिवशी तेल व तांदूळ मठाकडे पाठवितात व नातेवाईकांनाही देतात. तिसरा दिवस सर्वांत महत्त्वाचा असतो. त्या दिवशी पाच मुख्य आचार्यांची प्रतीके म्हणून पाच कलश देवघरात स्थापतात. चार कोपऱ्यांना चार व मध्ये एक अशी त्यांची मांडणी होते. त्यावर नारळ, खजूर, विडा आणि रुमालात बांधून एक पैसा ठेवतात. या पाचांच्या साक्षीनेच लग्नविधी व्हायचा असतो. लग्नासाठी बोहले घालतात. त्याच्या चारही बाजूना सूत्रवेष्टित असे चार कलश मांडतात. वराला बोहल्यावर बसवून पाच सुवासिनी त्याला तेलहळद लावतात. मग कुटुंबातली प्रौढ स्त्री आदल्या दिवशी पितरांच्या नावाने काढून ठेवलेली वस्त्रे वधू वरांला नेसायला देते. वधूवरांना सजवले जाते. वर बैलावर बसून देवदर्शनाला जातो. तिथे देवळात त्याला बाशिंग बांधतात. त्यांच्या लग्नात अंतरपाट नसतो. वर गुरूच्या पुढे बसतो. वधू-वराच्या डाव्या बाजुला बसते. गुरु त्या दोघांचे हात दर्भानी बांधतो आणि त्यावर पाणी घालून फुले व बिल्वपत्रे वाहतो. मग त्या दोघांच्या मनगटात तो सूत्रबंधन करतो व सुमुहूर्त सावधान म्हणतो. उपस्थित असलेले स्त्री-पुरुष वधूला स्पर्श करून उभयतांना आशीर्वाद देतात. वराने वधूच्या गळ्यात मंगळसूत्र बांधल्यावर सर्व मंडळी वधू-वरांवर अक्षता टाकतात. वधू-वर एकमेकांच्या कपाळी जिरे व गूळ लावतात. वधू वरांच्या वस्त्राची गाठ मारतात. वधू वराच्या पाया पडते. वर तिच्या डोक्यावर अक्षता टाकतो. नंतर विवाहासाठी उपस्थित इष्टमित्रांना भोजन देतात. चौथ्या दिवशी बैलावरून वरात काढतात. लिंगायतात घटस्फोट व पुनर्विवाह यांना मान्यता आहे.

माणूस मरण पावला, की त्याचे प्रेत आसनावर बसवतात. जंगम आपला डावा हात प्रेताच्या उजव्या मांडीवर ठेवतो. मृताला सुंगधलेपन करून वस्त्रालंकार घालतात. उपस्थित लोक प्रेताला नमस्कार करतात. प्रेताला स्मशानात नेल्यावर सहा हात लांबीचा खड्डा खणतात. खड्ड्यात मृताला उत्तराभिमुख बसवतात. त्यावेळेस जंगम म्हणतो, " हे शिवा, तू आपल्या भक्ताला कैलासात स्थान दे " अशा मजकुराची चिठ्ठी मृताच्या गळ्यात बांधतो. डाव्या हाती लिंग मृतास नारिंगी वस्त्राने गुंडाळतात. प्रेत बसलेल्या स्थितीतच पुरतात. लिंगायत लोक प्रेताचे क्रियाकर्मांतर करीत नाहीत.

**लोहार :** धंद्यावरून बनलेली एक जात. लोहार-गाडा (गाडी लोहार), दोडी, खतवली, पांचाळ, पंचाल, घिसाडी, इत्यादी नावांनी ओळखले जातात. लोह म्हणजे लोखंड आणि त्याचे काम करणारे ते लोहार होत. हे शेतीसाठी लागणारे नांगराचे फाळ, कुळ्याची पास, गाडीच्या धावा, कणे, लोखंडी मोटा, कुदळी, टिकाव, पहारी, खुरपी, विळे, वेळ्या, घमेली, जात्याच्या खुंट्या इत्यादी वस्तू तयार करतात व दुरुस्तीही करतात. हे लोक आपली उत्पत्ती विश्वकर्मापासून झाली असे सांगातात. विवाह विषयक सर्व व्यवहार बहुधा जातीतल्या जातीतच होतात. यांच्यात मामेबहिणीशी विवाह करता येतो. विवाहविषयक सर्व चालीरिती बहुधा मराठ्यांप्रमाणेच आहेत. सांडस, चिमटा, हातोडा व पंचपल्लव ही त्यांची देवके होत. खंडोबा, भवानी, गणपती, भैरोबा, महादेव ही त्यांची दैवते होत. हे लोक मृताला जाळतात किंवा पुरतात. माणूस मरायला लागला असे दिसल्यावर किंवा समजल्यावर त्याला भिंतीला टेकून घोंगड्यावर बसवितात आणि त्याच्या कानात रामनाम उच्चारतात. १९३१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यात ३,३०८ इतकी लोहारांची लोकसंख्या होती. पैकी १,८७६ पुरुष, तर १,४३२ स्त्रिया होत्या.

**वडार :** जिल्ह्यात आढळणारी एक भटकी जात. या लोकांना आडे, ओड्डे, वोड्डे, वड्ड, बेलदार, वड्डर व ओर्ह अशीही नावे आहेत. यांच्यात गाडी वड्डर, जाती वड्डर, माती वड्डर, पाथरवट, संगतराश/ दगडफोड्डू, वड्डर अशी तत्सम जाती आहेत. माती आणि दगड खणणे हा वडार लोकांचा वंशपरंपरागत व्यवसाय आहे. शिवाय दगड फोडण्याचे व ते वाहून नेण्याचे काम फार कष्टाचे असते. नांदेड जिल्ह्यात १९३१ च्या जनगणनेनुसार वडार लोकांची एकूण लोकसंख्या ६,०७१ इतकी होती. त्यात ३,२१२ पुरुष तर २,८५९ स्त्रिया होत्या. वडार समाज हा मूळचा आंधप्रदेशातला तेलगू भाषा बोलणारा परंतु पोट भरण्यासाठी हे लोक महाराष्ट्रात आले आहेत. हे लोक कामानिमित्त बरेचसे फिरत असतात. त्यांच्याबरोबर स्त्रियाही कष्टाची कामे करतात. वडार समाजात उपरोक्त तत्सम पोट जातीमध्ये अनेक कुळे (आडनावे) आहेत. एकाच आडनावात लग्न होत नाहीत. यांच्यात हुंडापद्धत अस्तित्वात नाही. विवाहप्रसंगी मुलाच्या वडीलाने ऐपतीप्रमाणे मुलीच्या वडिलांना लग्नखर्चासाठी म्हणून देण्याची पारंपरिक रीत मात्र या समाजात आहे. आतेबहीण व मामेबहिणीशी लग्न करता येते. मुलीला मागणी प्रथम मुलाचा बाप घालतो. पूर्वी यांच्यात लग्न लावण्याचे काम हे त्याच जातीतील कुळातीलच लोक करीत असत. परंतु अलीकडे कामाच्या निमित्ताने स्थायिक झालेले या समाजातील लोक लग्नविधीसाठी ब्राह्मण बोलवतात.

यांची कुलदैवते लक्ष्मीआई, नाथसाहेब, म्हसोबा, कान्होबा, खंडोबा, व्यकटेश्वर, सकलादीबाबा, सैलानी बाबा इत्यादींना ते मानतात. हे लोक पंढरपूर, तुळजापूर, तिरुपती इत्यादी ठिकाणची यात्रा करतात. हे लोक मृतास पुरतात अगर जाळतात. तिसऱ्या दिवशी मृताला अन्न अर्पण करतात. मृताशौच बारा दिवस पाळतात व तिसऱ्या दिवसानंतर पंधराव्या दिवसापर्यंत केव्हाही ज्ञातिभोजन देतात.

अलीकडील काळात वडार समाज हा जरी भटकणारा असला तरी त्यांच्यात थोडाफार बदल झाल्याचे दिसते. आपल्या पारंपरिक व्यवसायाबरोबर ते इतरही व्यवसाय करीत असून मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष देत आहेत. पर्यायी त्यांच्या वेषभूषेत व राहणीत फरक पडला आहे. त्याच समाजातील काही वडार लोक समाजाच्या उन्नतीसाठी प्रयत्न करीत असल्याचे दिसते.

**वंजारी :** जिल्ह्यात आढळणारी एक जात. यांना वंजारी, बंजारा, ब्रिजारी, लमाण, लंबाडी अशी निरनिराळ्या प्रदेशात त्यांना निरनिराळी नावे आहेत. जिल्ह्यात बंजारा व मथुरा लभाणी बंजरा हे दोन घटक आढळतात. मथुरा बंजारा हे प्रामुख्याने शीखपंथास मानतात. पूर्वी यांचा मुख्य धंदा बैलावरून माल वाहून नेण्याचा होता. पण आता ते स्थायिक झाले असून शेती, पशुपालन, लाकडे व गवत यांचा व्यापार, सावकारी इत्यादी उद्योग करू लागले आहेत. नांदेड जिल्ह्यात १९३१ च्या जनगणनेनुसार वंजारी (बंजारी) लोकांची एकूण लोकसंख्या १३,२५० इतकी होती. त्यात पुरुष ६,६०० तर स्त्रियांची संख्या ६,६५० एवढी होती.[६९] यांच्यात जातपंचायत पूर्वीही नव्हती व आजही नाही. विवाह हा समान आडनावात करीत नाही. मामाच्या मुलीशी विवाह करतात. मात्र आत्याच्या मुलीशी, भाचीशी व मावसबहिणीशी लग्न करीत नाहीत. लग्नासाठी प्रथम मुलीचा बाप पुढाकार घेतो. मुलाच्या घरी जाऊन लग्नासंबंधी बोलणी करतात. लग्नासंबंधी बोलणी दोन्ही पक्षाकडील पक्की झाल्यावर प्रथम कुंकू लावणे हा विधी होतो व नंतर लग्नाची तिथी ठरवितात. त्यानंतर वरवधूला पहिल्या दिवशी

६९. **सेंसस ऑफ इंडिया, १९३१** पूर्वोक्त, पृष्ठ २५४-२५७

आपआपल्या घरी हळद लावतात. लग्नात टिकाव (टिकोरा) टिकोऱ्याला आंब्याच्या फांद्या, समदड, बांधून आणतात त्यालाच ते देवक समजतात. दुसऱ्या दिवशी ब्राह्मण पुरोहिताद्वारे सर्व विधीसह लग्न लावतात. लग्नानंतर वधू-वर स्थानिक किंवा ऐपतीनुसार देवधर्मास जातात. पहिल्या बाळंतपणी सातव्या महिन्यात डोहाळे जेवण करतात. मुल जन्मल्यानंतर पाचव्या दिवशी पाचवीपुजन व तेरा दिवस सुहेर पाळतात. ते सुहेर किंवा विटाळ घालविण्यासाठी घुगऱ्या घालून, योग्य त्या विधीसह गाणे म्हणून विटाळ काढतात. वंजारी लोकांचे खंडोबा हे कुलदैवत असून ते बहिरोबा, भवानी व मारुती आदि देवतांनाही भजतात. मृत व्यक्ती झाल्यास त्यास अंघोळ, नवीन कपडे घालून ताटीवर स्मशानात नेतात व मृतास अग्नीडाग देतात. तेराव्या दिवशी तेरवी करतात त्यावेळेस पुरुषांचे डोक्यावरील केस काढतात व उपस्थितांना गोड जेवण देतात. बंजारा व मथुरा बंजारा ह्या भटक्या विमूक्त जाती असून तांडा संस्कृती हे बंजारा जातीची विशेषता आहे. तांडा नायकास नाईक म्हणतात. बंजारा लोकांची स्वतःची बोलीभाषा व त्यांचा पोषाख विशेष पद्धतीचा असतो. महिला लेंगा, चोळी घालतात व वर ओढणी घेतात. लेंग्यास फेटिया किंवा घागरा म्हणतात. त्यावर विणकाम करून कवड्या गुंफलेल्या असतात. ओढणीस छटा किंवा टुकरी म्हणतात. महिलांना दागिण्यांची मोठी हौस आहे. दोन्ही हातात कोपरापर्यंत व लग्नानंतर दंडावर देखील हस्तिदंती बांगड्या घालतात. पतीच्या नावाने 'घुगरी' नावाचा दागिना घालतात. प्रामुख्याने माहुर व किनवट तालुक्यात हे आढळतात.

**वासुदेव :** भटक्या जमातीपैकी एक भिक्षेकरी जात. त्यांना धुकोट असेही एक नाव आहे. हे लोक आपली उत्पत्ती एका ब्राह्मण ज्योतिषाला कुणबी स्त्रीपासून झालेल्या सहदेव नावाच्या मुलापासून झाली असल्याचे सांगतात. यांच्यात पोटजाती नाहीत. मात्र जातपंचायत आहे. जिल्ह्यातील मुखेडला यात्रा भरते त्यावेळी जातीतील लोक एकत्र येवून लग्न जमवितात व भांडणतंटे मिटवितात. गावोगाव हिंडून भिक्षा मागून हे आपला उदरनिर्वाह करतात. हे लोक देवधर्माची व राष्ट्रीय गाणी म्हणून भिक्षा मागतात. डोक्यावर मोरपिसांची उंच निमुळती होत गेलेली मुकुटाकार टोपी, अंगात घोळदार अंगरखा, गळ्यातून पुढे दोन्ही बाजूंना सोडलेला शेला, काखेत झोळी, सुरवार व कमरेला खोचलेला पावा, पायात चाळ व हातात चिपळ्या आणि टाळ असा वासुदेवाचा पोषाख असतो.

यांच्यात समान कुळात किंवा आडनावात विवाह होत नाही, मावसबहिण व भाची यांच्याशी विवाह होत नाही. मात्र आतेबहिणीशी विवाह होऊ शकतो. प्रथम मुलीचा बाप नवऱ्या मुलास बघतो. मुलगा पसंत पडल्यास लग्न नातेवाईकांसमक्ष पक्के करतात. यांच्यात हुंडा पध्दती आहे. मुलीच्या बापाकडून मुलास भिक्षेसाठी काही गावे हुंडा म्हणून देतात. त्याच गावात त्याने भिक्षा मागायची असते. त्याचप्रमाणे ऐपतीप्रमाणे पैसे व दागदागिने देतात. कुंकू लावणे, साखरपुडा हे कार्यक्रम होतात. लग्न हे मुलाच्या घरी होते व लग्नाचा खर्च मुलाचे वडील करतात कारण मुलीच्या वडीलांनी आधीच लग्नाचा खर्च दिलेला असतो. लग्न हे ब्राह्मण पुरोहित लावतो. विधवा व विधूर विवाहास मान्यता आहे. लग्न झाल्यावर वधू-वर देवदर्शनाला जातात व देवदर्शनाहून घरी आल्यावर खंडोब्याच्या नावाने गोंधळ घालतात किंवा सत्य नारायणाची पूजा करतात. हे लोक मरीआई, खंडोबा, ज्योतीबा, तुळजाबाई, रेणूकाबाई इत्यादी देवतांची उपासना करतात. मृत व्यक्तीस काही पुरतात तर काही जाळतात. मृताची तेराव्या दिवशी तेरवी करतात.

Maharashtra State Competitive Examinations

**वैदू :** जिल्ह्यात आढळणारी औषध विकत फिरणाऱ्या लोकांची जात होय. औषधाबरोबर ते वस्तूविक्रीही करतात. वैदूमध्ये भोई, धनगर, कोळी, माळी, फुलमाळी इत्यादी निरनिराळ्या जातींचे लोक दाखल झाले आहेत असे एन्थोवीन आर.इ. यांनी म्हटले आहे.[७०] हे लोक मूळचे आंध्र प्रदेशातील होत ते पोट भरण्यासाठी किंवा त्यानिमित्ताने भटकत आल्याचे सांगण्यात येते. यांच्यात दोन प्रमुख पोटजाती असून झोळीवाले, चंचीवाले अशी त्यांची नावे आहेत. त्यांच्यातही आणखी काही पोटभेद आहेत. यांच्यात परस्पर रोटीव्यवहार असला तरी बेटी व्यवहार होत नाही. पिढ्यानपिढ्या झाडपाल्याचे औषध विकणारे म्हणजेच वैद्यकीय व्यवसाय करणारे म्हणून ते वैद्य किंवा ग्रामीण भाषेत वैदू समाजातील होत.

या लोकांचा प्रमुख व्यवसाय औषधविक्रीचा असला तरी त्याशिवाय डबे, चाळण्या करणे, दुरुस्ती करणे, मणी, पोत, दाभण, बिब्बे, वाळे, मनगटी अशा छोट्या छोट्या गृहोपयोगी वस्तू घरोघर जाऊन विकणे आणि त्या बदल्यात मिळेल ते शिळेपाके अन्न, जुने कपडे किंवा पैसे स्वीकारणे. यांच्यात लग्नासाठी वराचा बाप मुलीला मागणी घालतो व तिच्यासाठी त्याला देज द्यावे लागते. लग्नाचा सर्व खर्च मुलीकडील मंडळी करते. लग्न हे जातीप्रमुखाकडून किंवा गावजोशीकडून लावतात. लग्नविधी चालू असतांना निरनिराळी सोंगे आणून नाचण्याची प्रथा आहे. उद्देश एकच जमलेल्या जातीबांधवांचे मनोरंजन करणे. लग्नाच्या वेळी टिळा लावण्याला कोहिनूर कापअसे म्हणतात. कोहिनूर काप ला जातपंचायतीस ११ रुपायांपासून पुढे पैसे द्यावे लागतात. महत्त्वाचे म्हणजे जातपंचायतीस मानपानाला फार महत्त्व आहे. यांच्यात अशा प्रकारचे एकूण १७ मानपान आहेत. यांच्यात पुनर्विवाह करण्यास मान्यता आहे. घटस्पोट व विधवा पुनर्विवाहासही मान्यता किंवा रूढ आहे.

हे लोक वेंकोबा, मरिअम्म, मारुती, शंकर, म्हसोबा, खंडोबा, कानिफनाथ, यल्लमा इत्यादी देवतांना भजातात. दसरा व शिमगा हे सण साजरे करतात हे लोक मांसाहारी असून त्यांच्याजवळ गाढवे, शेळ्या, कोंबड्या व बरेच शिकारी कुत्रे असतात त्यामुळे ते रानात जाऊन ससे, घोरपडी, रानमांजरे, कालिंदरे, रानपक्षी यांची शिकार करतात. डुक्करही भाजून खातात. हे लोक मृतास जाळतात किंवा पुरतात. प्रेत दहन केले असेल तर तिसऱ्या दिवशी राख जवळच्या नदीत नेऊन टाकतात. अकराव्या दिवशी दिवस पाळतात. हे लोक मात्र श्राद्ध करीत नाहीत. हल्ली काही लोक वारकरी पंथाचे अनुकरण करतात.

**सुतार :** सुतारकाम करणारी एक जात. स्थानपरत्वे यांना सुत्रधार, सुतार, बाडिग, थवी, बढई अशी नावे आहेत. सुतार स्वतःला पांचाळ म्हणवून घेतात व शिल्पशास्त्राचा जनक त्वष्टा नामक देवतेपासून आपल्या जातीची निर्मिती झाली आहे असे मानतात. १९३१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यात सुतार लोकांची एकूण लोकसंख्या १,०७९ इतकी होती. त्यात पुरुष ६०१ तर स्त्रिया ४७८ इतक्या होत्या. यांच्यात देशी, कोकणी, पांचाळ, आर्यक्षत्री आणि विदूर अथवा वाडू या पाच अंतर्विवाही पोटजाती आहेत. या पोटजातींची विभागणी अनेक कुलांत झालेली आहे. एकाच किंवा समान आडनावात विवाह होत नाहीत. आते, मामे भावंडांचा विवाह होतो. घटस्फोट व विधवापुनर्विवाहाची प्रथा आहे.

---

७०. **मांडे,** पूर्वोक्त, पृ. १३९.

सुतारांचा व्यवसाय हा वंशपरंपरागत असून खेडेगावात ते बलुतेदार होते. सुतार हे बैलगाड्या, नांगर, शेतीची अवजारे तयार करणे व ती दुरुस्त करणे. त्या मोबदल्यात त्यांना धान्य किंवा पैसे मिळतात. त्याचप्रमाणे विविध प्रकारची सजावटीची कामे, घरे, दुकाने इत्यादी कामेही ते करतात. भवानी, खंडोबा, विठोबा व काळम्म या त्यांच्या देवता आहेत. सुतार जातीतील सामाजिक प्रथा या मराठा जातीतील प्रथासारख्याच आहेत.

**सोनार :** जिल्ह्यात आढळणारी एक जात सोन्या-चांदीचे दागिने व भांडी घडवणाऱ्या लोकांना सोनार असे म्हणतात. नांदेड जिल्ह्यात १९३१ च्या जनगणनेनुसार सोनारांची एकूण लोकसंख्या ५,६३६ इतकी होती. त्यात पुरुष २,९१७ तर स्त्रिया २,७१९ इतक्या होत्या. हे लोक आपली उत्पत्ती विश्वकर्मपासून झाली असे मानतात. यांच्यात अहीर किंवा खानदेशी, अझरा, देवांगण, दैवज्ञ ब्राह्मण किंवा पांचाळ, देशी किंवा मराठा, सोनार, कडू, कातडे, कोकणी किंवा दैवज्ञ, लाड, माळवी, परदेशी, साद, शिलवंत, वैश्य किंवा जैन सोनार इत्यादी पोटजाती आहेत. या पोटजातींमध्ये परंपरेने रोटी-बेटी व्यवहार होत नाही. यांच्यात मामेबहिणीशी विवाह करण्यास मान्यता आहे किंवा करता येते. बरेच सोनार आपण ब्राह्मण आहोत असे मानतात. त्यामुळे विवाह संस्कार ब्राह्मणांच्या विवाह संस्कारासारखाच असतो. सोनार हे वंशपरंपरागत सोन्या-चांदीचे अलंकार व भांडी घडविणे हा व्यवसाय करतात पण त्यांच्या पैकी काही शेती व नोकरीही करतात.

## शीख (पंथ)

जिल्ह्यात मोठ्या संख्येने आढळणारी एक पंथ होय. पंजाबमधून आलेला प्रथम भक्तीमार्ग पण पुढच्या काळात क्षात्रधर्मी बनलेला एक पंथ. शीख याचा अर्थ शिष्य असा आहे. गुरू नानकांचे जे शिष्य त्यांना शीख म्हटले जाते. शीख पंथ हा गुरूमत पंथ आहे. गुरू नानकांच्या पासून तो गुरू गोविंदसिंगापर्यंत जे दहा गुरू त्या पंथात झाले, त्यांच्या उपदेशाप्रमाणे आचारण करणारा जो पंथ तो शीख पंथ. शीख पंथात एकूण दहा गुरू होऊन गेले त्यांची नावे अनुक्रमे गुरू नानक, गुरू अंगद, गुरू अमरदास, गुरू रामदास, गुरू अर्जुनदेव, गुरू हरगोविंद, गुरू हरिराय, गुरू हरिकिशन, गुरू तेगबादुर, गुरू गोविंदसिंग अशी आहेत. वरील दहा गुरूनंतर शीख पंथात आणखी कोणी गुरू झाला नाही. गोविंदसिंगानीच तशी घोषणा केली यापुढे गुरू होणार नाही. शिखांनी यापुढे गुरूग्रंथालाच शरण जावे आणि त्यातल्या उपदेशाप्रमाणे वागावे. गुरुग्रंथामध्ये आजवरच्या सर्व गुरूंची आत्मज्योत प्रकाशत आहे, हे लक्षात ठेवावे. थोडक्यात सांगायचे झाल्यास शीख पंथाचे आद्य गुरू नानक किंवा बाब नानक व त्यानंतर झालेले नऊ गुरू यांनी केलेली कामगिरी भारताच्या राजनैतिक इतिहासात मोलाची व महत्त्वाची ठरली आहे. नांदेड ही शिखांचे पवित्र असे श्रद्धास्थान आहे. गुरूगोविंदसिंगजींच्या वास्तव्य व गुरूतागद्दी मुळे त्यांना विषेश महत्त्व आहे.

विवाहप्रथा: विवाहविधी (लग्नविधी) सामान्यपणे हिंदूच्याच सारखा असतो. फरक एवढाच, की विवाहविधीत वैदिक किंवा पौराणिक मंत्राऐवजी ते गुरूग्रंथातील आनंद नामक मंत्र म्हणतात. ते विवाहालाही आनंदकारज असे म्हणतात. लग्न पक्के झाल्यावर तिलक लावण्याचा समारंभ होतो. गुरुद्वारातील धर्मोपदेशक प्रथम जपजीसाहेबमधील पाच मंत्र म्हणतो. मुलाला मुलीच्या बापाकडून

आलेली खारीक चाखायला लावतो आणि त्याच्या कपाळी केशराचा टिळा लावून त्याच्यावर अक्षता चिकटवतो. त्यानंतर त्याच्या कपड्यांवर केशरी पाणी शिंपडतो. मग वरपिता वधूसाठी न्हाव्यामार्फत साखर, नारळ, तांदूळ, खारका, पैसे, दागिणे कपडे इत्यादी वस्तू पाठवितो. त्यानंतर एखाद्या शुभ दिवशी मुलीच्या घरी सारखपुडा होतो. त्यावेळी न्हाव्याची पत्नी वधूला वर पित्याकडून आलेली साखर व खारीक खायला देतो. त्यानंतर मिठाई वाटून लग्नाचे निमंत्रण देतात. लग्नाच्या आधी काही दिवस आसपासच्या स्त्रिया संध्याकाळी वधूगृही येऊन विवाहगीते गातात. लग्नाच्या आदल्या दिवशी वधू-वरांच्या हातांना मेंदी लावतात. लग्नाच्या दिवशी नवरामुलगा आप्तेष्टांसह वाजत गाजत घोड्यावर बसून वधूगृही जातो. तिथे सर्वांचे स्वागत होते त्याला मिलनी असे म्हणतात. मग भोजन समारंभ होतो. त्यानंतर नवऱ्या मुलाला घरात नेतात. मोठ्या माणसांनी जमविलेल्या लग्नात अनेकदा वधूवर याच वेळी परस्परांना प्रथम पाहतात. लग्नाचा मुहूर्त सुर्योदयापूर्वी असतो. पहाटेच्या वेळी रागी म्हणजे गायक प्रभातकालीन उपासनेच्या वेळी म्हणावयाची स्त्रोत्रे गातात. त्यानंतर वधूवरांना गुरूग्रंथासमोर बसवितात. मग पुरोहित त्यांना वैवाहिक जीवनातील कर्तव्ये सांगतो आणि नंतर गुरूग्रंथातील विवाहविषयक मंत्र म्हणतो. मग रागी ते मंत्र तालासुरात गातात. नंतर वधूवर गुरूग्रंथाभोवती चार प्रदक्षिणा घालतात. या विधीने लग्न पक्के होते. शेवटी वधू समारंभाने गृहप्रवेश करते.

मुल जन्माला आल्यानंतर नामकरण संस्कार करतात. त्यावेळी गुरूग्रंथाचे कुठलेही एक पान उघडतात आणि त्यावरच्या पहिल्या अक्षराने सुरू होणारे नाव मुलाला ठेवतात. त्यानंतर केसांची पहिली गाठ बांधणे, दीक्षा असे संस्कार करतात. दीक्षा झाल्यावर पाच क-सार शरीरावर धारण करायला देतात. ते अनुक्रमे पुढीलप्रमाणे केश, कंगा-लहान फणी, कच्छ-तोकडी विजार, कड-लोखंडाचे लहान कडे व कृपाण-लहान तलवारीसारखे शस्त्र, दीक्षेनंतर प्रत्येक शिखाला पंथाच्या तत्वाप्रमाणे वागावे लागते. यांच्यात गुरूगंथ याला आदिग्रंथ किंवा ग्रंथासाहेब असे म्हणतात. गुरूग्रंथ हा शीखांचा पवित्र ग्रंथ आहे. शीख लोक गुरूग्रंथाला सगळ्या गुरूंचा ज्योति स्वरूप मानतात. शिखांचे नीतिनिर्धारण या ग्रंथाच्या आधारेच होते. म्हणूनच शिखांनी मूर्तीपूजा निषिध्द ठरवली आहे. मात्र गुरूग्रंथालाच ते भजतात.

शीख लोक स्त्री-पुरुष उंचेपुरे व धीप्पाड असतात. पुरुष शूर व मेहनती आहेत. ते मोठ्या प्रमाणात सैन्यात, क्रीडा क्षेत्रात तसेच परदेशात वास्तव करून तिथेही उद्योगधंदे करीत आहे. शीख लोक दाढी व केस वाढवतात व डोक्याला फेटा बांधतात. लहान मुलांची काही वर्षे वेणी घालतात. मुलगा मोठा झाल्यावर तो डोक्यावर मध्यभागी केसांची गाठ मारतो आणि त्याभोवती फेटा गुंडाळतो.

माणूस मरण पावला की त्याच्या जवळ बसून गुरू ग्रंथातले काही मंत्र म्हणतात. यांच्यात मृतासाठी रडणे किंवा शोक करणे याला मनाई आहे. मृताला स्नान घालून मग चितेवर ठेवतात. त्यानंतर मृताचा मुलगा किंवा उत्तराधिकारी चिता पेटवतो. मृताची रक्षा पवित्र ठिकाणी नदीत विसर्जित करतात. मृताचे श्राद्धही करीत नाहीत किंवा मृताचे स्मारकही उभारत नाहीत.

# नांदेड जिल्हा गॅझेटिअर

## प्रकरण-४

## कृषि व जलसिंचन

Maharashtra State Gazetteers

प्रकरण-४

# कृषि व जलसिंचन

**कृषक लोकसंख्या :** नांदेड जिल्हा हा मराठवाडा विभागातील सुपीक जिल्ह्यांपैकी एक असून शेती हा लोकांचा प्रमुख व्यवसाय आहे. जिल्ह्याच्या अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने शेतीला प्राथमिक महत्त्व दिले जाते. सन १९६१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यातील लोकसंख्येपैकी जवळजवळ ७६% लोकसंख्या ही प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे उदरनिर्वाहासाठी शेतजमिनीवरच अवलंबून होती.

जुन्या हैद्राबाद राज्याच्या गॅझेटिअरमधील सन १९०९ सालच्या आकडेवारीनुसार नांदेड जिल्ह्यात प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष शेतीवर ज्यांचे जीवन अवलंबून होते असे १,७१,६०० इतके लोक असून त्यांचे एकूण लोकसंख्येशी असलेले प्रमाण ३४% इतके होते.[१] त्यानंतर मात्र हे प्रमाण वाढत गेल्याचे खालील तक्त्यावरून लक्षात येते.

| वर्ष | एकूण लोकसंख्या | शेतकरी | शेतमजूर | एकूण कृषक लोकसंख्या |
|---|---|---|---|---|
| १९५१ | ८,८३,५३१ | १,२७,२२५ | १,४०,००१ | २,६७,२२६ |
| १९६१ | १०,७९,६५४ | २,४८,०६५ | २,०२,४१७ | ४,५०,४८२ |
| १९७१ | १३,९७,७६२ | १,९४,९९९ | २,०१,११९ | ३,९६,११८ |
| १९८१ | १७,४९,३३४ | २,८५,०२९ | २,६२,२४५ | ५,४७,२७४ |
| १९९१ | २३,३०,३७४ | ३,४०,७०९ | ३,८३,२०५ | ७,२३,९१४ |
| २००१ | २८,७६,२५९ | ३,३९,६०६ | ३,४९,८७६ | ६,८९,४८२[२] |

सन १९७१ च्या जनगणनेनुसार नांदेड जिल्ह्याची १३,९७,७६२ इतकी लोकसंख्या असून त्यापैकी ४,९७,५५३ इतके एकूण काम करणारे तर ९,००,२०९ इतके लोक काम न करणारे होते. म्हणजेच एकूण लोकसंख्येपैकी ३५.६०% लोकसंख्या काम करणारी होती, तर ६४.४०% काम न करणारी होती. त्याचवर्षी एकूण काम करणाऱ्या लोकसंख्येशी कृषक लोकसंख्येचे प्रमाण ७१.६१% इतके होते.

१. गॅझेटिअर ऑफ इंडिया, महाराष्ट्र स्टेट, **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र, बॉम्बे, १९७१, पृ. १६७.

२. **स्टॅटिस्टिकल अॅबस्ट्रॅक्ट ऑफ महाराष्ट्र, १९७२-७३,** डायरेक्टोरेट ऑफ इकॉनॉमिक्स अॅण्ड स्टॅटिस्टिक, गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र, बॉम्बे-१९७६, पृ. ५०, ५१, स्टॅटिस्टिकल, अॅबस्ट्रॅक्ट (१९८९-९० आणि ९०-९१), पृ. ५६, स्टॅटिस्टिकल अॅबस्ट्रॅक्ट (१९९९-२०००), पृ. ५३.

Maharashtra State Gazetteers

सन १९८१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यात एकूण लोकसंख्या १७,४९,३३४ इतकी असून ७,१०,१७४ इतके लोक काम करणारे होते. त्यांचे एकूण लोकसंख्येशी प्रमाण ४०.५९% इतके होते. तर १०,३९,१६० इतके लोक काम न करणारे होते. त्यांचे एकूण लोकसंख्येशी प्रमाण ५९.४१% इतके होते. तर एकूण काम करणाऱ्यांशी कृषक लोकसंख्येचे प्रमाण ७७.०६% इतके होते.

जनगणना १९९१ नुसार जिल्ह्यात एकूण ९.२७ लक्ष कामकरी होते. म्हणजेच एकूण लोकसंख्येशी कामकऱ्यांची टक्केवारी ३८.७६% येते. सिमांत कामकरी ह्या गणनेप्रमाणे १.१६ लक्ष म्हणजेच ४.९७% होते. तर एकूण कृषक लोकसंख्या ७,२३,९१४ इतकी असून मुख्यतः काम करणाऱ्यांशी त्यांचे प्रमाण ७८.१२% इतके होते. यावरून असे लक्षात येते की जिल्ह्यात शेतकरी व शेतमजूर यांचे प्रमाण जास्त होते. नांदेड शहरात थोड्या फार प्रमाणात लघु व कुटीरोद्योग आहेत. जिल्ह्यातील एकूण मुख्य ग्रामीण काम करणाऱ्यांची टक्केवारी ४३.३२% तसेच नागरी विभागातील मुख्य कामगारांची ही टक्केवारी २६.९५% इतकी होती. सिमांत कामकरी १.१६ लक्ष म्हणजेच ४.९७% होती. एकूण काम न करणारे १२.०० लक्ष म्हणजेच ५५.२७% आहेत. महाराष्ट्रात मुख्यतः कामकऱ्यांची व सिमांत कामकऱ्यांची टक्केवारी १९९१ च्या जनगणनेप्रमाणे अनुक्रमे ३९.३% व ३.७% अशी आहे. राज्याच्या तुलनेत जिल्ह्यातील मुख्यतः कामकरी व सिमांत कामकरी यांची टक्केवारी जास्त आहे.[३]

## पर्जन्य

नांदेड जिल्हा हा शाश्वत पर्जन्यमानाचा जिल्हा आहे. जिल्ह्यात जून ते ऑक्टोबर या कालावधीचे पर्जन्यमान सरासरी ९५४.०० मि.मी. आहे. तर जून ते सप्टेंबर या चार महिन्यात ८८% पाऊस पडतो. नांदेड जिल्ह्यातील पिकांचा प्रकार निश्चित करण्यात आणि शेतकी हंगामाबाबत पर्जन्याची भूमिका महत्त्वाची ठरते. जिल्ह्यातील जवळजवळ ८०% शेतजमिन ही मान्सूनवर अवलंबून आहे. जिल्ह्यात नैऋत्य मान्सून वाऱ्यांपासून पाऊस पडतो. जे मुख्यत्वे जून महिन्याच्या सुरुवातीपासून वाहण्यास सुरुवात होऊन सप्टेंबर महिना संपेपर्यंत वाहतात. मधून मधून ईशान्य मान्सून वाऱ्यांपासून ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये पावसाच्या सरी पडतात. त्याचप्रमाणे कधी कधी मे महिन्यात गैरमोसमी पावसाच्या सरीदेखील पडतात. जानेवारी-फेब्रुवारीच्या हिवाळ्यात मान्सूनचा (ज्याला गर्जणारे चाळीस म्हणतात) पाऊस रबी पिकासाठी उत्तम असतो. जिल्ह्यातील पर्जन्याच्या वितरणात असमानता आहे. देगलूर तालुक्यात सर्वाधिक पर्जन्य पडते तर मुखेड तालुक्यात सर्वात कमी पर्जन्य पडते. एकूण पर्जन्यापैकी ४५% पर्जन्य ऑगस्ट महिन्यात पडतो.[४]

नांदेड जिल्ह्यातील हवामान नैऋत्य मान्सून हवामानाखेरीज इतर वेळी कोरडे असते. वर्षाची चार ऋतुत विभागणी होते. हिवाळा नोव्हेंबर ते फेब्रुवारी अखेरपर्यंत असतो. नंतरचा उन्हाळा हा जूनच्या पहिल्या आठवड्यापर्यंत असतो. त्यानंतर नैऋत्य मान्सूनला सुरुवात होऊन तो ऑक्टोबरच्या

---

३. **जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, नांदेड जिल्हा** २००४-०५, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, पृ. ३.

४. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर** पूर्वोक्त, पृ. १६७.

पहिल्या आठवड्यापर्यंत असतो. उर्वरित ऑक्टोबर व नोव्हेंबरचा पूर्वार्ध हा मान्सूनोत्तर ऋतुचा काळ म्हणून ओळखला जातो.

जिल्ह्यात पर्जन्य विषयक नोंदी ह्या ९ केंद्रावर उपलब्ध असून जिल्ह्यातील पर्जन्य विषयक केंद्रावरील नोंदी तक्ता क्र. २ मध्ये दिल्या आहेत. जिल्ह्याचे सरासरी वार्षिक पर्जन्याचे प्रमाण ९६१.५ मि.मी. आहे. एकूण पर्जन्यापैकी ८६% वार्षिक पर्जन्य हे नैऋत्य मान्सून ऋतुच्या कालावधीत होते. जुलै व ऑगस्ट हे वर्षातील सर्वाधिक पर्जन्याचे महिने आहेत. जिल्ह्यातील पर्जन्य वितरणाचा विचार करता पावसाचे प्रमाण पश्चिमेकडून पूर्वेकडे वाढत असल्याचे दिसते. जिल्ह्यातील पर्जन्यात वर्षानुसार मोठी विविधता आहे. सन १९४१ ते १९९० या पन्नास वर्षाच्या कालावधीत सर्वाधिक वार्षिक पर्जन्य १९८३ साली नोंदला गेला असून तो सरासरी पर्जन्याच्या १९४% होता आणि सर्वात कमी वार्षिक पर्जन्य १९७२ साली नोंदले असून ते सरासरी पर्जन्याच्या ४१% होते. १९४१ ते १९९० या ५० वर्षातील १० वर्ष पर्जन्याचे प्रमाण सरासरी वार्षिक पर्जन्याच्या ८०% पेक्षा कमी होते.

तक्ता क्र. २ वरून असे दिसते की ५० पैकी ३४ वर्षे जिल्ह्यातील पर्जन्य हे ७०१ आणि १२०० मि.मि.च्या दरम्यान होते. जिल्ह्यात वार्षिक सरासरी ४९ दिवस पावसाचे आहेत (किमान २.५ मि.मी. किंवा त्यापेक्षा जास्त पावसाचे दिवस). त्यात बसर येथे कमीत कमी ३५ दिवस व किनवट येथे ५५ दिवस पावसाचे आहेत. जिल्ह्यातील २४ तासात सर्वाधिक पावसाची नोंद किनवट येथे दि. २८ जून १९८९ रोजी ३९०.० मि.मी. इतकी नोंदली गेली आहे.[५]

नांदेड येथील केंद्रात पर्जन्यमापक यंत्र बसविले असून वर्ष २००५ या कालावधीत हिमायतनगर तहसिल येथे सर्वात जास्त २०८१ मिमी पर्जन्याची नोंद झाली आहे व सर्वात कमी नांदेड तहसिलमध्ये ७९४ मि.मी. पर्जन्यमानाची नोंद झाली आहे.[६]

**कृषि हंगाम :** शेती हा हंगामी व्यवसाय असून शेतीवर अवलंबून असणाऱ्यांना त्यापासून पूर्णवेळ रोजगार मिळत नाही. जिल्ह्यातील शेतीच्या हंगामी स्वरूपाचा संबंध शेतीची पावसावरील विसंबना आणि अपुऱ्या जलसिंचनाच्या सुविधा यांच्याशी आहे. जिल्ह्यातील कृषि हंगाम पुढीलप्रमाणे

(१) **खरीप हंगाम :** पावसाळ्यात घेतल्या जाणाऱ्या पिकांना खरीप पिके म्हणतात. खरीप हंगाम जून-जुलैमध्ये सुरू होऊन सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये पिकाची कापणी केली जाते. खरीप हंगामात पिवळी आणि बेरार ज्वारी, गहू, मका, तूर, हरभरा (चणा), भात, शेंगदाणा इत्यादी अन्नधान्य पिके घेतली जातात. नांदेड जिल्ह्याचे खरीप हंगामातील सरासरी क्षेत्र ६,७४,३०० हेक्टर आहे व त्याचे सरासरी उत्पादन १३,९८,५६४ मे. टन आहे.

---

५. **क्लायमेंट ऑफ महाराष्ट्र,** गव्हर्नमेंट ऑफ इंडिया, मेटॉरॉलॉजिकल डिपार्टमेंट, पुणे, २००५, पृ. १९२.

६. **जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन,** पूर्वोक्त, पृ. २.

Maharashtra State Gazetteers

(२) **रबी हंगाम :** पावसाळ्यानंतर घेतल्या जाणाऱ्या पिकांना रबी पिके म्हणतात. रबी पिके सामान्यपणे नोव्हेंबरमध्ये पेरतात आणि मार्चमध्ये त्यांची कापणी केली जाते. या हंगामात ज्वारी, हरभरा (चणा), गहू, तेलबिया इत्यादी. रबी पिकांची वाढ ही जलसिंचनाच्या आणि कधी कधी नोव्हेंबरमध्ये येणाऱ्या वृष्टीच्या मदतीने होते.[७] रबी हंगामाचे जिल्ह्यातील सरासरी क्षेत्र १,१४,००० हेक्टर आहे व त्याचे एकूण उत्पादन ९२,७०३ मे.टन आहे.[८]

## मृदा

जिल्ह्यातील भूभाग हा दख्खनच्या पठाराने आच्छादलेला आहे. त्यामुळे मृदेच्या विकासात भौगोलिक रचनेचा प्रभाव सर्वाधिक आहे. मृदेचा पृष्ठभाग हा फिक्कट करड्या तपकिरी रंगाचा असून पोत हा चिकणमातीचा आणि समान बांधणीचा (Blocky) आहे. मृदेच्या रासायनिक बदलाबाबत विद्राव्य क्षाराचे प्रमाण बदलणारे असून ते ०.२६ आणि ०.९४% च्या दरम्यान आहे. या मृदेत कॅल्शियम कार्बोनेटचे प्रमाण उच्च असून ते ५.२० ते १९.६०% च्या दरम्यान बदलणारे आहे. सेंद्रिय घटकांचे प्रमाण ०.५ पासून १.५८ पर्यंत असते. जिल्ह्यातील जवळजवळ सर्व मृदा चिकणमातीयुक्त असून चिकणमातीचे घटक प्रमाण ४५.५०% पासून ६९.५०% पर्यंत आहे. मृदेच्या उच्च अदलाबदलीच्या क्षमतेवरून लक्षात येते की ती मुळचीच कसदार (सुपीक) आहे. मृदेतील पोषक घटकांचे प्रमाण चांगले असून त्यात नायट्रोजन ०.०३ पासून ०.०६% पर्यंत आहे. तर उपलब्ध फॉस्फेटच्या कसदारपणामुळे जिल्ह्यातील पिकांचे उत्पादन वाढले आहे.[९]

जिल्ह्यातील जमीन सर्वसाधारण काळी सुपीक व कसदार अशा स्वरूपाची आहे. जिल्ह्यातील सर्व तहसिलमध्ये काळी जमीन आहे. या जमिनीत कॅल्शियम, मॅग्नेशियम व कार्बोनेट्सचे प्रमाण अधिक आहे. तर नायट्रोजन, पोटॅश, फॉस्फेट व ह्युमसचे प्रमाण कमी आहे. या जमिनीत ओलावा व आर्द्रता टिकवून ठेवण्याची फार मोठी क्षमता असल्यामुळे जिल्ह्यातील कमी पावसाच्या क्षेत्रात अशी जमीन उपयुक्त ठरते. उत्तम प्रतीची काळीची जमीन गोदावरी व तिच्या उपनद्यांच्या काठाकाठाने अरूंद पट्ट्यात आढळते. चांगल्या प्रतीची काळीची जमीन मांजरा व मन्याड नदीच्या काठाकाठाने बिलोली तहसिलमध्ये आढळते. टेकड्यांच्या पायथ्याशी लागून असलेल्या भागात मात्र काळीची जमीन दुर्मिळ असून फारच हलक्या प्रतीची आढळते. जिल्ह्यातील देगलूर तहसिल सर्वात लहान तहसिल असले तरी उत्तम प्रतीची काळीची जमीन त्या तहसिलला लाभलेली आहे. तहसिलच्या पश्चिमेकडील थोड्याशा भागाव्यतिरिक्त सर्व जमीन उच्च प्रतीची व रबी पिकांसाठी योग्य अशी आहे. कंधार व लोहाचे अर्धे तहसिल काळीची व भारीची जमीन असलेला आहे. हदगाव तहसिलमधील जवळपास ३/४ जमीन विशेषतः पैनगंगेच्या काठाजवळची जमीन सुपीक आहे. तहसिलच्या दक्षिणेकडील टेकडीजवळच्या जमिनीत थोडा क्षारयुक्त

---

७. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. १७०.

८. राष्ट्रीय कृषि विकास परिषदेच्या ५३व्या ठरावानुसार, नांदेड जिल्ह्यातील कृषि व फलोत्पादन आराखडा एक दृष्टिक्षेप, पृ. ४.

९. कित्ता, पृ. १७०.

पदार्थ मिसळला असल्याचे आढळून येते. बाकीच्या भोकर व किनवट या दोन तहसिलमध्ये टेकड्या व माळरानाचा भाग वगळून इतर जमीन काळीची व भारीची आहे. मागील काही वर्षात पर्जन्यमान कमी झाल्याने भूगर्भातील पाण्याची पातळी खाली जात आहे. जिल्ह्यात जमिनीखालील पाण्याचा थर वेगवेगळ्या अंतरावर म्हणजेच जमिनीपासून सर्वसाधारणपणे १८ फुटापासून २०० फुटापर्यंत आहे.[१०]

सर्वसाधारणपणे नांदेड जिल्ह्यामध्ये तीन प्रमुख प्रकारच्या मृदा आढळतात. त्यामध्ये प्रामुख्याने ' एंटीसोल ' प्रकारातील (नवीन तयार होणाऱ्या मृदा) मृदा जास्त क्षेत्रावर आढळतात. त्याखालोखाल ' इनसेप्टीसोल ' या मृदा आढळतात आणि गोदावरी, मन्याड, पूर्णा नद्यांच्या खोऱ्यामध्ये ' व्हर्टीसोल ' मृदा आढळतात. व्हर्टीसोल या मृदा काळ्या व खोल असतात. तर इनसेप्टीसोल या मृदा नवीन तयार झालेल्या असून त्यांची खोली ६० सें.मी. पर्यंत आढळते. नांदेड जिल्ह्यातील जमिनी ज्वालामुखीच्या लाव्हारसापासून तयार झालेल्या बेसाल्ट या खडकापासून बनलेल्या आहेत.

जिल्ह्यातील मृदेची प्रामुख्याने खालील तीन प्रकार आढळतात.

(१) एंटीसोल (उथळ आणि हलक्या जमिनी २० सें.मी. पेक्षा कमी खोल)

(२) इनसेप्टीसोल (मध्यम काळ्या जमिनी २० ते ९० सें.मी.)

(३) व्हर्टीसोल (खोल काळ्या जमिनी ९० सें.मी. पेक्षा अधिक)

**जमिनीचे गुणधर्म :** जमीन बेसाल्ट या अग्नीजन्य खडकापासून निर्मिती झालेली असून प्राथमिक खनिजामध्ये लोह आणि मॅग्नेशियमच्या अधिक प्रभावामुळे लोह, मॅग्नेशियम, चुना, जस्त, तांबे आणि मँग्नीज पुरेशा प्रमाणात आढळतात.

दुय्यम खनिजांपैकी खोल काळ्या आणि मध्यम जमिनीत मॉन्टमोरी लोनाईटचे प्रभुत्व असून केओलीनाईट साधारण तर इलाईट हे सुक्ष्म प्रमाणात आढळतात.

**भौतिक गुणधर्म :**

(१) रंग : गर्द पिवळसर तपकिरीपासून काळसर तपकिरीपर्यंत.

(२) चिकणमातीचे प्रमाण : १२ ते ७७.०० टक्क्यापर्यंत.

(३) जमिनीचा पोत : अ) हलक्या उथळ जमिनी पोयटामुक्त वाळूपासून चिकण मातीपर्यंत.
ब) खोल व मध्यम काळ्या जमिनी चिकणमातीयुक्त पोयटा, चिकणमाती पोयटायुक्त वालुकामय.

(४) जमिनीची घनता : १.०३ ते १.५८ प्रतिघन सें.मी.

(५) पोकळीचे प्रमाण : ४०.३८ ते ६४.९९ टक्के.

(६) उपलब्ध जल : ११.३४ ते २५.४२/१०० सें.मी. खोल.

(७) जलवाहकता : अ) हलक्या वालुकामय : ५० ते ६२.५ मि.मी. प्रति तास.
ब) खोल आणि मध्यम काळ्या : १२.५ ते ५० मि.मी. प्रति तास.

---

१०. **जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन,** पूर्वोक्त, पृ. ५.

**रासायनिक गुणधर्म :**

(१) जमिनीचा सामु : ७.० ते ८.५

(२) विद्युत वाहकता : ०.१ ते ०.३५ डे.सी. प्रति मीटर

(३) सेंद्रिय कर्ब : ०.३० ते ०.८० टक्के

(४) मुक्त चुनखडी : ०.०० ते २२.०० टक्के

(५) उपलब्ध नत्र : कमी ते मध्यम

(६) उपलब्ध स्फुरद : कमी ते मध्यम

(७) उपलब्ध पालाश : मध्यम ते अधिक

(८) उपलब्ध जस्त : ०.१ ते ३.०६ पीपीएम (प्रति दशलक्ष भाग)

(९) उपलब्ध लोह : ०.६ ते १६.० पीपीएम (प्रति दशलक्ष भाग)

(१०) उपलब्ध मँगनीज : १.२० ते २७.२० पीपीएम (प्रति दशलक्ष भाग)

(११) उपलब्ध तांबे : ०.७८ ते ४.३० पीपीएम (प्रति दशलक्ष भाग)[११]

**मृद संधारण :** राज्यात मृद संधारण कामाची सुरुवात १९४३ पासून झाली असून मृद संधारणाची कामे १९८३ पर्यंत एकेरी उपचार पद्धतीने विखुरलेल्या स्वरूपात राबविण्यात येत होती. राज्यातील कोरडवाहू क्षेत्राचा सर्वांगीण विकास करण्याकरीता मृद व जलसंधारण कार्यक्रम राबविण्याची आवश्यकता लक्षात घेऊन राज्य शासनाने १९८३ पासून सर्वंकष पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम राबविण्यास सुरुवात केली. पाणलोट क्षेत्र आधारित मृद व जलसंधारणाची कामे राबविण्याचा निर्णय घेणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे.

कृषि विकासाच्या कार्यक्रमात पाणलोट क्षेत्र व्यवस्थापनाला विशेष महत्त्व प्राप्त झालेले आहे. त्यादृष्टीने १९८३-८४ पासून कृषि खात्याच्या मृद संधारण विभागामार्फत प्रामुख्याने हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. मृद संधारण व पाणलोट व्यवस्थापनाचे काम करण्यासाठी दिनांक १ जुलै १९९८ पासून कृषि विभागाची पुनर्रचना झाल्यामुळे मृद व जलसंधारणासाठी स्वतंत्र यंत्रणा आता अस्तित्त्वात नाही. परंतु कृषि व फलोत्पादन व मृद संधारण विभाग एकत्रित केल्यामुळे नवीन रचनेनुसार जादा कर्मचारी क्षेत्रीय कामासाठी यापुढे उपलब्ध होत आहेत. कृषि विभागाच्या एकत्रिकरणामुळे या नवीन अस्तित्त्वात असलेल्या यंत्रणेमार्फत मृद संधारणाची पुढील कामे केली जातात.

**(१) समतल सलग चर :** राज्यातील पडीक जमीन विकास कार्यक्रमांतर्गत बिगर शेतीखालच्या जमिनीत मातीसारख्या अमुल्य अशा विकास माध्यमाचे संरक्षण करणे मृद व जलसंधारण करणे तसेच

---

११. विभाग प्रमुख, मृद विज्ञान आणि कृषि रसायन शास्त्र विभाग, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांनी पाठविलेल्या माहितीवर आधारीत.

वृक्ष व चारा यांचे माध्यमातून स्थानिक लोकांच्या गरजा भागविणे व पर्यावरण संतुलन करणे हा सर्वसाधारण हेतू आहे. कमीत कमी सर्वात मृद व जलसंधारण करण्यासाठी सलग समपातळी चर घेऊन वृक्ष लागवड करावयाची आहे. या कामासाठी जमिनीचा उतार व पर्जन्यमान विचारात घेऊन राज्यात पडीक जमीन विकासासाठी निरनिराळे आठ नमुने तयार करण्यात येत आहे. सन १९९० ते २००० मध्ये एकूण १०,२७४ कामे तर २००० ते २००८ मध्ये एकूण ८,९५६ इतकी कामे करण्यात आली.[१२]

**(२) जैविक बांधासह समपातळी/ढाळीची बांधबंदिस्ती :** मृद संधारणाच्या ज्या अभियांत्रिकी उपाययोजना आहेत त्या अत्यंत खर्चिक असून त्यांचे परिणामही कालांतराने दिसून येतात. यासाठी कमी खर्चिक व लवकर परिणाम देणारी उपाययोजना म्हणून जैविक बांधाचे तंत्रज्ञान विकसित करण्यात आले आहे. जैविक बांध म्हणजेच मातीच्या किंवा दगडाच्या बांधाएवढी समपातळी रेषेवर गवत किंवा घायपात यासारख्या वनस्पतींची घट्ट लागवड करून भूपृष्ठावरून वाहणाऱ्या पाण्यास अडथळा निर्माण करणे की जेणेकरून पाण्याबरोबर येणाऱ्या मातीचे कण या ठिकाणी अडतील व स्वच्छ पाणी त्या बांधातून संथपणे वाहून जाईल. पाणी या वनस्पतींच्या जाळ्यातून वाहून जाऊ शकत असल्यामुळे या बांधास विशिष्ट प्रकारच्या सांडव्याची किंवा बांधास ढाळ देण्याची आवश्यकता राहत नाही. मातीच्या बांधाप्रमाणे हे बांध वाहून जाण्याची किंवा फुटण्याची शक्यता नसल्याने ते कोणत्याही प्रकारच्या तीव्र उताराच्या जमिनीवरदेखील घालता येतात. मृद संधारणाचा हा एक कमी खर्चिक व प्रभावी उपाय आहे. जिल्ह्यात सन १९८० ते १९९० मध्ये ७५,०१२ हेक्टर तर १९९० ते २००० मध्ये ३२,५०५ हेक्टर व सन २००० ते २००८ मध्ये १४,१९२ हेक्टर इतकी कामे करण्यात आली.[१३]

**(३) मातीचे नाला बंडिग :** उताराच्या जमिनीला मातीचे नाले बांधून त्या ठिकाणी पाणी अडवून ठेवले जाते. त्यामुळे जमिनीची धूप थांबते तसेच नाला बंडिगच्या खालील भागात ज्या विहिरी असतात त्यांना त्या बंडिगमधून साठलेले पाणी झिरपून विहिरीमध्ये जमा होते व त्याचा उपयोग पिकांसाठी होतो. जिल्ह्यात सन १९९० ते २००० मध्ये २,१४८ तर सन २००० ते २००८ मध्ये १,०८९ इतकी नाला बंडिग करण्यात आले.

**(४) सिमेंट नाला बांध :** ज्या ठिकाणी मातीचे नाला बांध घेण्यासाठी तांत्रिकदृष्ट्या योग्य जागा उपलब्ध नाही अशा ठिकाणी सिमेंटचे नाला बांध बांधून पाणीसाठा केला जातो. यामुळे भूपृष्ठामध्ये पाण्याच्या पातळीत वाढ होण्यास मदत होते. ही कामे सन १९८९ पासून शास्त्रोक्त पद्धतीने सुरू करण्यात आली. जिल्ह्यात सन १९९० ते २००० या कालावधीत एकूण १,५५७ तर सन २००० ते २००८ या कालावधीत एकूण ५९४ इतके सिमेंट नाला बांध बांधण्यात आले.[१४]

**(५) अनघड दगडाचे बांध (एल बी एस-Loose Boulder Structure) :** ओघळीचे रूपांतर लहान नाल्यात झाल्यानंतर त्यातून वाहणाऱ्या पाण्याचा वेग व परिणाम जास्त होतो अशा

---

१२. जिल्हा अधीक्षक, कृषि अधिकारी यांनी पाठविलेल्या माहितीवर आधारीत.

१३. कित्ता.

१४. कित्ता.

ठिकाणी शेतातील दगड गोळा करून त्याच्या नाल्याच्या रूंदीएवढा बांध घालण्यात येतो. या बांधासाठी नाल्याच्या पात्रात पाया खोदावा लागतो. यामुळे दगडांना बळकटी येते. दगड रचतांना ते पडू नयेत यासाठी बांधाला दोन्ही बाजूंनी उतार देण्यात येतो. अशा दगडाच्या बांधाची संख्या ओघळीची लांबी, उतार व शेत परिस्थितीप्रमाणे ठरविण्यात येते. जिल्ह्यात सन १९९० ते २००० या कालावधीत ५३,९४२ इतके तर सन २००० ते २००८ या कालावधीत ५१,०५६ इतके बांध घालण्याची कामे करण्यात आली.[१५]

**(६) भूमिगत बंधारा :** पाणलोट क्षेत्रामध्ये जर एखाद्या नाल्यामध्ये वाळूचा थर १ मी. पेक्षा जास्त असेल तर त्याठिकाणी वाळू उकरून जमिनीच्या पक्क्या खडकापर्यंत खोदाई करण्यात येते. खोदलेल्या भागात काळी माती भरून त्यावर पाणी मारून ठराविक घनता येण्यासाठी धुमस करून दबाई केली जाते. नाल्याच्या तळ्याच्या उंचीपर्यंत ही माती भरण्यात येते. त्यामुळे नाल्याचे शेजारचे क्षेत्रात पाणी मुरले जाते व त्याचा कायमस्वरूपी फायदा सभोवतालच्या विहिरींना होतो. ही कामे १९९१ मध्ये सुरू करण्यात आली. जिल्ह्यात सन १९९० ते २००० या कालावधीत ८१ भूमिगत बंधारे बांधण्यात आले. तर सन २००० ते २००८ या कालावधीत एकूण १५४ बंधाऱ्याचे काम पूर्ण करण्यात आले.[१६]

**(७) गॅबीयन बंधारा :** गॅबियन स्ट्रक्चर म्हणजे अनघट दगडाच्या जाळीच्या गुंडाळ्यात नाला पात्रात घातलेला आडवा बांध होय. दिवसेंदिवस भूगर्भातील पाण्याचा साठा कमी होत चालला आहे. पाणलोटात पडलेले पावसाचे पाणी हे जे अपधावेच्या स्वरूपात वाहून जाते. ते योग्य उपचाराद्वारे जागोजागी अडविणे व जिरवणे महत्त्वाचे आहे. परंतु काही भागात सांडव्यासाठी योग्य जागा मिळत नसल्यामुळे मातीचे बांध घालणे शक्य होत नाही. तर पक्का पाया मिळत नाही म्हणून सिमेंट बांध बांधता येत नाही. अशा भागासाठी गॅबीयन स्ट्रक्चरचे बांधकाम सोपे व कमी खर्चाचे आहे. यामुळे अपधावेचा वेग कमी होऊन जमिनीची धूप थांबविण्यास, भूगर्भात पाणी मुरण्यास मदत होते. ही कामे १९९२ मध्ये राष्ट्रीय पाणलोट क्षेत्र कार्यक्रमांतर्गत सुरू करण्यात आली. परंतु सदर कामाची उपयुक्तता विचारात घेऊन सदरची कामे इतर पाणलोट उपचाराप्रमाणे तांत्रिकदृष्ट्या योग्य जागेची निवड करून जलसंधारणाचा एक नियमित उपचार म्हणून राबविण्यास शासनाने आता मान्यता दिली आहे. जिल्ह्यात सन १९९० ते २००० या काळात एकूण २५५ तर सन २००० ते २००८ या कालावधीत ६५७ इतके गॅबियन स्ट्रक्चर बांधण्यात आले.

त्याचप्रमाणे जिल्ह्यात सन २००० ते २००८ या कालावधीत १,४९० इतकी शेततळे निर्माण करण्यात आली आहेत. तसेच सन २००० ते २००८ या काळात ६३,६४० इतकी अदर्न स्ट्रक्चर बांधण्यात आली आहे. पुढील तक्त्यात वर्षनिहाय केलेल्या मृद संधारण कामाचा तपशील दिला आहे.[१७]

---

१५. पूर्वोक्त, कित्ता.

१६. कित्ता.

१७. कित्ता.

Maharashtra State Gazetteers

**जलसंधारण कार्यक्रमांतर्गत कृषि अधिकारी, नांदेड अंतर्गत सन २००० ते २००८ अखेर करण्यात आलेल्या मृदसंधारण कामाचा अहवाल.**[१८]

| अ.क्र. | वर्ष | ढाळीचे बांध (हेक्टर) | सलग समतल चर | सी एन बी संख्या | मा ना बा संख्या | एल बी एस संख्या | अर्दन स्ट्र. संख्या | गॅबियन स्ट्रक्चर संख्या | भूमिगत बंधारे | शेततळे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २०००-०१ | ०० | ५,५०७ | २१५ | २५५ | ८,३८३ | २,१९६ | ०० | ०५ | ७३ |
| २ | २००१-०२ | ०० | ३५८ | ११६ | १३५ | ६,२८९ | २,५८४ | १७ | ०० | १६० |
| ३ | २००२-०३ | ०० | ३६३ | १८० | २१२ | ४,२६८ | ४५१ | १४ | ०० | ३१४ |
| ४ | २००३-०४ | ०० | ६७ | २४ | १८९ | ६,३८१ | १,६६५ | ०० | ०० | ११६ |
| ५ | २००४-०५ | ०० | १७७ | ०५ | १०६ | ४,६८४ | ३,६७६ | ३४० | ०० | ३०० |
| ६ | २००५-०६ | ०० | १,३११ | ०० | ०० | ८,१७७ | २१,२१६ | २८६ | १४९ | ४२२ |
| ७ | २००६-०७ | ९,१०२ | ८५१ | ०३ | ३२ | १०,११३ | २७,०७८ | ०० | ०० | ७० |
| ८ | २००७-०८ | ५,०९० | ३२२ | ५१ | १६० | २,७६१ | ४,७७४ | ०० | ०० | ३५ |
| | **एकूण** | १४,१९२ | ८,९५६ | ५९४ | १,०८९ | ५१,०५६ | ६३,६४० | ६५७ | १५४ | १,४९० |

१८. जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांनी पाठविलेल्या माहितीवर आधारीत.

**जमिनीचे उपयोजन :** नांदेड जिल्ह्यातील जमिनीच्या भूस्तराच्या उंचसखल भागावरून तीन विभाग पडतात.

(अ) उत्तरेकडील डोंगराळ प्रदेश : या प्रदेशात किनवट, माहूर, भोकर, हिमायतनगर व हदगाव तालुक्याचा काही भाग येतो. किनवट, माहूर, हिमायतनगर व भोकर तालुक्यांत जमिनी मध्यम, हलक्या प्रतीच्या असून डोंगर उतारावर आहेत.

(ब) गोदावरी नदीच्या खोऱ्याचा प्रदेश : या प्रदेशात नांदेड, बिलोली, लोहा तालुक्याचा समावेश होतो. गोदावरी नदीकाठचा प्रदेश उत्तम काळ्या मातीचा असून तो प्रदेश सुपीक व कसदार आहे. उर्वरित काही भाग मध्यम जमिनीचा आहे.

(क) बालाघाट डोंगराचा प्रदेश : या प्रदेशात प्रामुख्याने कंधार, लोहा, मुखेड व देगलूर तालुक्याचा दक्षिणेकडील भाग येतो. या भागातील मन्याड, लेंडी, मांजरा नदी काठच्या जमिनी मध्यम भारी असून सुपीक आहेत. उर्वरित भाग हलका व उजाड माळरानाचा आहे.

नांदेड जिल्ह्याचे एकूण क्षेत्र १०,३३,१०० हेक्टर असून त्याची उपयोगिता पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | जमीन | क्षेत्र (हेक्टरमध्ये) | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | वन क्षेत्र | ९२,७०० | ८.९७% |
| २ | उजाड क्षेत्र | २५,२०० | २.४४% |
| ३ | बिगर कृषि क्षेत्र | ३१,९०० | ३.०९% |
| ४ | वहितीखालील पड | ३२,६०० | ३.१६% |
| ५ | गायरान | ३६,३०० | ३.५१% |
| ६ | नदी, नाले, रस्ते या खालील पडीत क्षेत्र | ७,८०० | ०.७६% |
| ७ | चालू पडीत क्षेत्र | ६२,३०० | ६.०३% |
| ८ | इतर पडीत क्षेत्र | ३३,३०० | ३.२२% |
| ९ | पिकाखालील वहिती क्षेत्र | ७,११,००० | ६८.८२% |
| | **एकूण . .** | **१०,३३,१००** | **१००%** |
| १० | दुबार पिकाखालील क्षेत्र | १,००,१०० | ९.६९% |
| | **एकूण पिकाखालील क्षेत्र ९+१० . .** | **८,११,१००** | **७८.५१%** |

वरील तक्त्यावरून असे लक्षात येते की शेती आणि वनक्षेत्र हे जिल्ह्यातील जमीन उपयोजनाचे दोन मुख्य घटक आहेत. पैकी जिल्ह्यातील ८.९७% जमिनीचे क्षेत्र वनांनी व्यापलेले आहेत. तर ६८.८२% क्षेत्र हे शेतीखाली आहे. तर दुबार पिकाखाली क्षेत्राचे प्रमाण ९.६९% इतके आहे.[१९]

१९. राष्ट्रीय कृषि विकास परिषदेच्या ५३ व्या ठरावानुसार, नांदेड जिल्ह्यातील कृषि व फलोत्पादन आराखडा एक दृष्टीक्षेप पृ. ३ वर आधारीत.

Maharashtra State Gazetteers

## सहकारी शेती

जिल्ह्यामध्ये शेती उत्पादनात वाढ करण्यास वाव असून त्यासाठी सहकारी शेतीचा अवलंब करण्यात येतो. सहकारी शेती पद्धतीत प्रत्येक शेतकऱ्याचा जमिनीवरील मालकी हक्क कायम राहतो, परंतु शेती प्रक्रिया एकत्रितपणे केली जाते.

**सहकारी शेतीची वैशिष्ट्यपूर्ण लक्षणे पुढीलप्रमाणे.**

(१) सहकारी शेतीत जमिनीच्या स्वरूपानुसार तिचे घटक तयार केले जातात.

(२) सहकारी शेती संस्थेचे मालकी हक्क हे सहकारी शेती संस्थांच्या संस्थापक सदस्याकडेच असतात.

(३) सहकारी शेती संस्थांचे व्यवस्थापन हे संयुक्तरित्या चालवले जाते.

(४) सर्व सदस्यांना त्यांच्या कामाचा मोबदला दिला जातो.

(५) सहकारी शेतीतून आलेल्या उत्पन्नातून खर्च वजा करून तसेच काही रक्कम सुरक्षित ठेव म्हणून बाजुला काढली जाते व उर्वरित नफा हा सभासदांमध्ये वाटला जातो.[२०]

**नांदेड जिल्ह्यातील सहकारी शेती :** जिल्ह्यातील पहिली सहकारी शेती संस्था कलेक्टिव्ह फार्मिंग सोसायटी म., वर्ताळा या नावाने मुखेड तालुक्यात स्थापन झाली होती. तिची सुरुवातीची सभासद संख्या १० तर भागभांडवल १,००० रुपये होते. त्यानंतर जिल्ह्यात एकूण २२ सहकारी शेती संस्थांची नोंदणी करण्यात आली. त्यापैकी नांदेड तालुक्यात २ संस्था, हदगाव तालुक्यात २, देगलूर तालुक्यात ११, मुखेड तालुक्यात ४, कंधार तालुक्यात १ तर बिलोली तालुक्यात २ अशा एकूण २२ सहकारी शेती संस्थांची नोंदणी करण्यात आली होती. ह्या संस्था स्वतंत्र गटात प्रायोगिक तत्त्वावर स्थापन करण्यात आल्या होत्या. ह्या संस्था त्यांच्या बाल्यावस्थेत असताना दुसऱ्या व तिसऱ्या पंचवार्षिक योजनांच्या काळात संघटीत करण्यात आल्या. यातील काही संस्था ह्या को-ऑपरेटिव्ह कलेक्टिव्ह शेती संस्था आणि उर्वरित को-ऑपरेटिव्ह जॉईंट फार्मिंग सोसायटिज् आहेत.

या संस्थांना मिळणारे शासकीय सहाय्य हे तांत्रिक व भांडवली स्वरूपाचे होते. संस्थांना मिळणाऱ्या तांत्रिक सहाय्याचा विचार करता ते त्यांना पंचायत समितीतील विस्तार अधिकारी, पशुसंवर्धन, ग्रामीण अभियांत्रिकी आणि सहकार यांच्याकडून योजना तयार करणे, विविध प्रगतिपथावरील कामाचे अंदाजपत्रक तयार करणे आणि शेती उत्पादन वाढीसाठी योजना तयार करणे याशिवाय क्षेत्राप्रमाणे निवडक संस्थांना जमीन विकास कर्ज, विहीर व विद्युत पंपासाठी कर्ज व अनुदान देण्यात आले. संस्थांच्या उत्पादन आराखड्यानुसार मध्यवर्ती वित्त संस्थांकडून पीक कर्ज देण्यात येते. तसेच कृषि विभागाकडून ट्रॅक्टरद्वारे नांगरणी करून देण्यात येते.

या सहकारी शेती संस्था चांगल्या प्रकारे चालाव्यात यासाठी शासनाने या संस्थांना एकूण १,८७,६९० रुपये इतके कर्ज उपलब्ध करून देण्यात आले होते. तर भागभांडवल रुपये २०,५५० इतके मदत रूपात देण्यात आले होते.

---

२०. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. १९३.

सद्यस्थितीत या सर्व संस्था डबघाईला आल्यामुळे सर्व २२ संस्था अवसायनात काढण्यात येऊन संस्थांची नोंदणी रद्द करण्यात आली असून सध्या एकही शेती सहकारी संस्था कार्यरत नाही. संस्था स्थापन झाल्यानंतर नोंदणी रद्द होईपर्यंत संस्थांच्या सभासद संख्येत वाढ अथवा घट झालेली नाही.[२१]

## पीके

जिल्ह्यातील जमीन सर्वसाधारणपणे काळी, सुपीक व कसदार (रेगूर मृदा) अशा स्वरूपाची आहे. जिल्ह्यात खरीप आणि रब्बी या दोन्हीही हंगामात पिके घेतली जातात. खरीप हंगामात संकरित ज्वारी, बाजरी, तूर, मूग, उडीद, कापूस तसेच भुईमूग ही पिके प्रामुख्याने घेतली जातात. बारमाही पिकामध्ये ऊस आणि केळी ही मुख्य पिके असून जेथे ओलिताची सोय आहे अशा क्षेत्रात उन्हाळी भुईमूग, गहू, सुर्यफूल ही पिके घेतली जातात. भाजीपाला आणि फळे ही पिके पाण्याची सोय आहे अशा ठिकाणी सर्वसाधारणपणे वर्षभर घेतली जातात.[२२]

सन १९०१ मध्ये जिल्ह्यातील खालसा जमिनीचे एकूण प्रमाण २५४४ चौ.मै. होते. त्यापैकी १९६७ चौ.मै. इतके क्षेत्र लागवडीखाली तर २०२ चौ.मै. पडीत क्षेत्र होते. वनाखाली एकूण ३१० चौ.मै. इतके क्षेत्र तर ६५ चौ.मै. क्षेत्र लागवडीयोग्य नव्हते. ज्वारी हे जिल्ह्यातील मुख्य अन्नधान्य पीक असून एकूण लागवडीपैकी ५२% क्षेत्रात ज्वारीची लागवड केली होती. जिल्ह्यातील दुसरे महत्त्वाचे पीक म्हणजे कापूस. त्याखाली ४४९ चौ.मै. इतके क्षेत्र लागवडीखाली होते. इतर अन्नधान्य पिकात बाजरी, तूर आणि कडधान्य याखाली एकूण १९० चौ.मै. इतके क्षेत्र, तेलबियाखाली ९९ चौ.मै. क्षेत्र आणि गव्हाच्या लागवडीखाली ८२ चौ.मै. इतके क्षेत्र होते.[२३]

**ज्वारी :** जिल्ह्यात तृणधान्य पिकांत ज्वारीचा प्रथम क्रमांक असून ज्वारी हे जिल्ह्यातील मुख्य खाद्यपीक आहे. सन १९०१ मध्ये एकूण लागवडीपैकी ५२% क्षेत्र हे ज्वारीच्या पिकाखाली होते. तर सन १९६१-६२ मध्ये हेच प्रमाण ५८% पर्यंत वाढले होते. ज्वारीचे पीक हे खरीप तसेच रब्बी या दोन्ही हंगामात घेतले जाते. पण खरीप ज्वारी ही रब्बी ज्वारीच्या तुलनेत जास्त प्रसिद्ध आहे. त्याचे प्रमाण खरीप व रब्बी हंगामात अनुक्रमे ८०:२० इतके आहे.

ऐतिहासिक दृष्ट्या पाहिल्यास ज्वारी हे पीक मुळचे भारतीय नाही. ज्वारीचा प्रसार भारतामध्ये आफ्रिकेमधून झाला असावा असे विश्वकोशकारांनी म्हटले आहे. ज्वारीच्या पिकाला खोल व भारी प्रतिची मृदा आवश्यक असते. तसेच ६३५ ते १०१६ मि.मी. (२५ ते ४० इंच) इतक्या पर्जन्यात हे पीक उत्तम येते. ज्वारीचे पीक मुख्यत्वे पावसावरच अवलंबून आहे. प्राचीन काळापासून ह्या पिकाला जलसिंचनाचा लाभ झाल्याचा कोठेही पुरावा आढळत नाही. परंतु मागील काही वर्षांत पाटबंधाऱ्याच्या सोयी अधिकाधिक प्रमाणात उपलब्ध होत असल्यामुळे ज्वारीचे पीक आणि विशेषतः रब्बी ज्वारी सिंचनाच्या आधारे घेतली जाते.

---

२१. जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, नांदेड यांनी पाठविलेल्या माहितीवर आधारीत.

२२. **जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन,** पूर्वोक्त, पृ. ६.

२३. **इम्पिरियल गॅझेटिअर ऑफ इंडिया,** प्रोव्हिन्शिअल सिरिज, हैद्राबाद स्टेट, सन १९०९, पृ. २२६.

ज्वारीच्या पिकास अगदी सुरुवातीचा ५०.८ ते ७६.२ मि.मी. (२ ते ३ इंच) पर्यंतचा पहिला पाऊस खूप उपयोगी असतो. तसेच पिकाला फुलोऱ्याच्या काळात आणि बियांच्या रचना काळात पडलेला पाऊस पिकास नुकसानकारक ठरू शकतो. सप्टेंबर-आक्टोबरमधील पाऊस रब्बी ज्वारीसाठी उत्तम असतो. सर्वसाधारणपणे एप्रिल-मे महिन्यामध्ये शेतीची नांगरणी करून मशागत करतात. खरीप ज्वारीची पेरणी नैऋत्य मान्सून पाऊस सुरू झाल्यावर जून किंवा जुलैमध्ये केली जाते. ज्वारीच्या पिकात कडधान्य किंवा तेलबिया ही मिश्र पिके घेण्याची प्रथा आहे. पारंपारिक पद्धतीने दर एकरी ४.५३६ ते ५.२२३ कि.ग्रॅ. (१० ते १२ पौंड) इतके बियाणे वापरले जाते. पेरणीनंतर मधून मधून कोळपणी करावी लागते. पिकाची उंची १५२.४ मि.मी. (६ इंच) पर्यंत झाल्यानंतर पिकामध्ये तणाचा प्रादूर्भाव होतो. त्यासाठी दर १५ दिवसांच्या अंतराने निंदणी करावी लागते. निंदणीकडे दुर्लक्ष केल्यास त्याचा उत्पादनक्षमतेवर विपरीत परिणाम होतो. खरीप पीक साधारणपणे नोव्हेंबर महिन्यात कापणीस योग्य होते. रब्बी ज्वारीची पेरणी सप्टेंबर किंवा ऑक्टोबर महिन्यामध्ये होऊन ती फेब्रुवारी-मार्च महिन्यापर्यंत कापणीस योग्य होते. ज्वारीचे उत्तम पीक हे मृदेची स्थिती, पर्जन्य आणि पिकास पुरविलेली खते यावर अवलंबून असतात. ज्वारीच्या पिकास प्रति एकर ३१७.५१५ कि.ग्रॅ. (७०० पौंड) ते ४९८.९५१ कि.ग्रॅ. (१,१०० पौंड) इतका खत पुरवठा केला जातो.

जिल्ह्यात पारंपरिक पिवळी ज्वारी आणि वऱ्हाडी जातीचे पीक घेतले जाते. सध्या स्थानिक ज्वारीच्या जातीबरोबर सुधारित जातीची पी.जे.-४-के आणि ८-के ह्या खरीप हंगामात आणि एन-३५-१ रब्बी हंगामात पेरल्या जातात. महाराष्ट्रात १९६५-६६ पासून संकरित ज्वारीचा प्रसार झाला. संकरित ज्वारीचा फायदा म्हणजे त्या ज्वारीची ताटे कमी उंचीची असल्यामुळे त्यांची हेक्टरी संख्या जास्त ठेवता येते. वारा किंवा वादळापासून ताटांना फारसा उपद्रव होत नाही. पीक लवकर परिपक्व होते. संकरित ज्वारी रासायनिक खतांना भरपूर प्रमाणात प्रतिसाद देते. आणखी महत्त्वाचे म्हणजे ज्वारीच्या ताटांची पाने शेवटपर्यंत हिरवी राहत असल्यामुळे कर्बग्रहणशक्ती (फोटोसिन्थेसिस) टिकून राहते. या सर्वांचा परिणाम असा होतो की ज्वारीचे दर हेक्टरी उत्पादन पारंपरिक प्रकारापेक्षा अदमासे चौपट असते.

**खरीप ज्वारी उत्पादनवाढीची सुत्रे :**

- मध्यम ते भारी जमिनीवर पेरणी करणे.
- उताराला आडवी पेरणी करून ६ ओळीनंतर मृत सऱ्या काढणे.
- सेंद्रिय/शेणखत व रासायनिक खतांचा शिफारशीप्रमाणे वापर करणे.
- हेक्टरी बियाणे व रोपांची संख्या योग्य ठेवणे. (१.८ लाख)
- ज्वारी : तुर आंतरपिकाचा ३:३, ४:२ याप्रमाणे घेणे.
- पी.एस.बी., ॲझोटोबॅक्टर, गंधकाची बीज प्रक्रिया करणे.
- सुधारित सरळ वाणाचा वापर वाढविणे.

एचएफ ४२१०—२२

सन २००८-०९ च्या पेरणी अहवाल जिल्हा गोषवारानुसार जिल्ह्यात खरीप ज्वारीचे सरासरी १,७८,३०० हेक्टर क्षेत्र असून त्यापैकी १,०८,४०० हेक्टर क्षेत्रावर प्रत्यक्ष पेरणी करण्यात आली.[२४] जिल्ह्यातील खरीप ज्वारी खालील क्षेत्र, उत्पादन व दर हेक्टरी उत्पन्न पुढीलप्रमाणे.

**खरीप ज्वारी[25]**

| वर्ष | क्षेत्र ('००' हेक्टरमध्ये) | उत्पादन ('००' मे.टनामध्ये) | दर हेक्टरी उत्पादन (कि.ग्रॅ./हेक्टर) |
|---|---|---|---|
| १९८०-८१ | २,५५६ | १,८७९ | ६९९ |
| १९९०-९१ | २,३२२ | २,८४४ | १,२२५ |
| १९९५-९६ | २,१६० | २,०४६ | ९४७ |
| २०००-०१ | २,०९० | २,५६६ | १,२२८ |
| २००४-०५ | १,६५३ | २,१२७ | १,२८७ |

खरीप ज्वारीच्या तुलनेत रब्बी ज्वारी जिल्ह्यात कमी प्रमाणात घेतली जाते. रब्बी हंगाम २००८-०९ पेरणी अहवाल जिल्हा गोषवारानुसार जिल्ह्यात रब्बी ज्वारीचे सरासरी ३१,१०० हेक्टर क्षेत्र असून त्यापैकी प्रत्यक्षात २८,२०० हेक्टर क्षेत्रावर पेरणी करण्यात आली.[२६] जिल्ह्यातील रब्बी ज्वारीचे क्षेत्र, उत्पादन व दर हेक्टरी उत्पन्न पुढीलप्रमाणे :—

**रब्बी ज्वारी[२७]**

| वर्ष | क्षेत्र ('००' हेक्टरमध्ये) | उत्पादन ('००' मे.टनामध्ये) | दर हेक्टरी उत्पादन (कि.ग्रॅ./हेक्टर) |
|---|---|---|---|
| १९८०-८१ | ४५३ | २१३ | ४७० |
| १९९०-९१ | ३७८ | २५१ | ६६४ |
| १९९५-९६ | ३१६ | २७८ | ८७९ |
| २०००-०१ | ३०१ | २१५ | ७१३ |
| २००४-०५ | ३२६ | २७८ | ८५३ |

ज्वारीचे पीक हे अतिशय संवेदनशील असून ज्वारीच्या पिकाला मुख्यत्वेकरून खोड माशी, खोड किडा, मावा व तुडतुडे, लाल कोळी, लष्करी अळी, कणसातील अळी व मीज माशी यापासून

२४. जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, नांदेड यांनी पाठविलेल्या माहितीवर आधारीत.

२५. कृषि सांख्यिकी विषयक माहिती, महाराष्ट्र राज्य, २००६, भाग-२, मुख्य सांख्यिकी कृषि आयुक्तालय, पुणे-१, पृ. ७८, १००, १२२.

२६. कित्ता.

२७. कृषि सांख्यिकी विषयक माहिती, महाराष्ट्र राज्य, २००६, भाग-२, पृ. ७९, १०१, १२३.

Maharashtra State Gazetteers

मोठ्या प्रमाणात उपद्रव होतो. त्यामुळे उत्पादन घटण्याची शक्यता असते. किडीमुळे पोंगे मरतात व रोपास बुंध्यापासून नवीन तुरे येतात. त्यामुळे कणीस भरत नाही आणि पीक परिपक्व होण्यास वेळ लागतो. खोड माशीच्या प्रतिबंधासाठी पेरणीच्या वेळी दर हेक्टरी बियाण्याचे प्रमाण अधिक असते. उपद्रव झालेली रोपे नष्ट करावी लागतात आणि प्रतिबंधक उपाय म्हणून पेरणीच्या वेळी एक किलो बियाण्यास १०० ग्रॅम पाण्यात कार्बोफ्युरॉन हे औषध चांगले चोळावे लागते. त्यानंतर जर किडीचा उपद्रव झाला तर प्रभावी जंतुनाशकाचा उपयोग करतात. खोडकिडीचा उपद्रव रोप २५ ते ३० दिवसांचे झाल्यापासून ते तयार होईपर्यंत होऊ शकतो. या किडीमुळे पीक लहान असतांना पोंगे मरतात व ताटे खुंटतात. त्यामुळे कणासामध्ये दाणा भरत नाही. या किडींच्या बंदोबस्तासाठी एंडोसल्फान व इतर प्रभावी जंतुनाशकाची मधूनमधून फवारणी करतात.मावा व तुडतुडे यामुळे पानांवर चिकटा पसरलेला दिसतो. त्यामुळे वाढ खुंटते. काही वेळा कणसे निसवण्यास अडथळा येतो. पाने अकाली वाळतात व उत्पादनामध्ये फार मोठी घट दिसून येते. रब्बी हंगामामध्ये थंडी जास्त काळ टिकून राहिल्यास चिकटा रोगाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात होतो.लाल कोळी (माईटस्) यांचा उपद्रव मुख्यतः पीक ३० ते ४० दिवसांचे झाल्यानंतर दिसून येतो. त्यामुळे पिकाच्या खालील बाजूस भुरकट जाळी दिसून येतात व पाने तांबडी पडतात. ही कीड पानातील रस शोषून घेते. त्यामुळे ताटांच्या वाढीवर व दाणे भरण्यावर अनिष्ट परिणाम होतो. हा उपद्रव फार वेगाने पसरण्याची शक्यता असते. लष्करी अळ्या रात्री पाने कुरतडून खातात व दिवसा पोंग्यामध्ये लपून बसतात. मोठ्या प्रमाणावर कीड पडल्यास कीड पान पूर्ण खाते व पानांच्या फक्त शिराच शिल्लक राहतात. रोग नियंत्रणासाठी कार्बारिल व इतर प्रभावी जंतुनाशकांचा अवलंब करावा लागतो. कणसातील अळ्या कणसामध्ये जाळी तयार करतात व कणसातील दाणे खातात. संकरीत ज्वारीच्या पिकावर हा रोग फार मोठ्या प्रमाणावर होऊ शकतो व त्याच्यावर वेळीच उपाय न योजल्यास पीक नष्ट होण्याची शक्यता असते. संकरीत ज्वारी घेण्यास सुरुवात झाल्यापासून कणसावरील मीज माशी या किडीचा उपद्रव वाढता आहे. पोटरीतून कणसे बाहेर पडल्यावर फुलोऱ्यास सुरुवात होताच या किडीचा उपद्रव होतो. ही माशी दिसण्यास डासासारखी पण डासापेक्षा लहान असते. माशी खोडात एक अंडे घालते. त्यातून एक दोन दिवसात अळी बाहेर पडते व ती बीजांड कोषावर उपजिविका करते. यामुळे बीजांड कोष मरतो आणि त्याचे दाण्यात रूपांतर होत नाही. रोगट ज्वारीत दाणे भरत नाहीत. वरील किडीशिवाय कणसांच्या काणी व दाणे काणी ह्या रोगांपासून ज्वारीला फार मोठा उपद्रव होत असतो. या रोगामुळे कणसात काणी निर्माण होते व सबंध कणसाचे रूपांतर काणीमध्ये होते. या रोगावर फारसे उपाय उपलब्ध नाहीत.

**गहू :** गहू हे जिल्ह्यातील महत्त्वाचे तृणधान्य पीक आहे. सन १९०१ मध्ये एकूण १९६७ चौ.मै. लागवडीखालील क्षेत्रापैकी ८२ चौ.मै. इतके क्षेत्र गव्हाच्या लागवडीखाली होते.[२८] तर सन १९६१-६२ मध्ये एकूण लागवडीपैकी २८६६९.९०० हेक्टर (७०.८४५ एकर) इतके क्षेत्र गव्हाच्या लागवडीखाली होते. गव्हाचे पीक खरीप व रब्बी या दोन्ही हंगामात घेतले जाते. खरीप हंगामात हे पीक काळ्या कसदार व पाणीधारण क्षमता असलेल्या मृदेत घेतले जाते. तर रब्बी हंगामात गव्हाचे

२८. **इम्पिरियल गॅझेटिअर ऑफ इंडिया,** पूर्वोक्त, पृ. २२६.

पीक सिंचनाच्या सहाय्याने घेतले जाते. गव्हाच्या पिकाबरोबर कधी कधी करडई किंवा हरभरा हे मिश्र पीक घेतले जाते. तसेच रब्बी गहू हा कापूस, ज्वारी, भुईमूग इत्यादी सोबत आलटून पालटून घेतला जातो.

गव्हाच्या पिकाला साधारण ६३५.० ते १०१६.० मि.मी. (२५ ते ४० इंच) पर्यंत चांगला वितरीत पर्जन्य आणि सप्टेंबर, ऑक्टोबर मधील जोरदार पाऊस तसेच थंड व कोरडे हवामान पोषक असते. गव्हाच्या स्थानिक जातींची पेरणी सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये तर सुधारीत व अधिक उत्पादन देणाऱ्या जातींची पेरणी नोव्हेंबरमध्ये करण्यात येते. नोव्हेंबरमध्ये पेरणी केलेल्या गव्हास जलसिंचनाची आवश्यकता असते. लागवडीसाठी तयार केलेल्या जमिनीस पेरणीपूर्व सिंचन करण्यात येते. नंतर जमिनीत २० ते २२ सें.मी. खोलीवर पेरणी करतात. मात्र जलसिंचनाची सोय नसलेल्या ठिकाणी बियाणे जास्त खोल पेरण्यात येते. पेरणी करतांना दोन ओळीतील अंतर अदमासे ४० से.मी. ठेवण्यात येते. साधारणपणे १५ ते २५ दिवसांचे अंतराने पीक तयार होईपर्यंत ४ ते ७ वेळा पाणी देण्यात येते. या पिकास कंपोस्ट खत, शेंगदाण्याची पेंड तसेच रासायनिक खतेही देण्यात येतात. गव्हाची कापणी व मळणी फेब्रुवारी-मार्च महिन्यात करण्यात येते. खळ्यात बैलांच्या पायाखाली मळणी करून लोंब्यातून दाणे काढले जातात. उपनेरच्या सहाय्याने दाणे भुस्कटापासून वेगळे केले जातात.

जिल्ह्यात एन-५९, एन-आय-१४६ (सिंचित) आणि बांसी यासारख्या विविध जातीच्या गव्हाची लागवड केली जाते. जिल्ह्यातील गव्हाच्या पिकाखालील क्षेत्र, उत्पादन व दर हेक्टरी उत्पादन पुढीलप्रमाणे.

| वर्ष | क्षेत्र ('००' हेक्टरमध्ये) | उत्पादन ('००' मे. टनामध्ये) | दर हेक्टरी उत्पादन (कि.ग्रॅ./हेक्टर) |
|---|---|---|---|
| १९८०-८१ | ४०९ | २७५ | ६७२ |
| १९९०-९१ | २४९ | २१५ | ८६३ |
| १९९५-९६ | २३० | २३९ | १,०३८ |
| २०००-०१ | २६१ | २८२ | १,०८० |
| २००४-०५ | ३१६ | ३८५ | १,२१८[२९] |

गव्हाच्या पिकावर कीड व रोगांपासून संरक्षणासाठी किटकनाशक औषधे आवश्यकतेनुसार फवारतात. या पिकावर प्रामुख्याने तांबेरा, करपा, मर, काणी व काजळी ह्या रोगांचा आणि खोडकिडा, वाळवी (हूमणी) इत्यादी किडींचा प्रादुर्भाव होतो. उंदरापासूनही पिकास मोठ्या प्रमाणात उपद्रव पोहचतो. देठावरील काळा तांबेरा व पानावरील नारंगी तांबेरा असे तांबेरा या रोगाचे दोन प्रकार आहेत. डिसेंबर-जानेवारीमध्ये नारंगी तांबेऱ्याचा पिकावर प्रादुर्भाव होतो. पुढे काही दिवसांनी काळ्या

२९. कृषि सांख्यिकी विषयक माहिती, महाराष्ट्र राज्य, २००६, भाग-२, पूर्वोक्त, पृ. ७७, ९९, १२१.

Maharashtra State Gazetteers

तांबेऱ्याचा प्रादुर्भाव होतो. पीक पोटरीत आल्यापासून दाणे भरेपर्यंत केव्हाही रोगप्रसार होतो. काळ्या तांबेऱ्यामुळे लांबट गोलाकार लालसर किंवा विटकरी रंगाचे कोड पानावर येतात. पुढे हे कोड खोडावर व ओंब्यांवर पसरतात. यामुळे रोपे खुरटी राहून ओंब्या (लोंब्या) लहान पडतात व दाणे भरत नाहीत. नारंगी तांबेऱ्याचे कोड सुरुवातीस पानाच्या वरील बाजूस दिसतात. पुढे ते संपूर्ण पानावर विखुरलेले दिसतात. सुरुवातीलाच नारंगी तांबेऱ्याचा प्रादुर्भाव होत असल्यामुळे त्यापासून ६० ते ७५% नुकसान होण्याची शक्यता असते. त्यासाठी प्रतिबंधक उपाय म्हणून गव्हाचे पीक पोटरीत असताना दर हेक्टरी आयनेब (डायथेन झेड-७८) १८७५ ग्रॅम ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारण्यात येते. अशाच प्रकारची दुसरी फवारणी १५ दिवसांनी पुन्हा करण्यात येते. तसेच शासनातर्फे किटकनाशक फवारणी मोहीम राबविण्यात येते.

काजळी किंवा काणी हा बुरशीजन्य रोग असून त्यामुळे दाणे भरण्याऐवजी दाण्याच्या भोवती काळ्या बुरशीच्या गाठी तयार होतात. गाठीमध्ये असंख्य बिजाणू असतात. वाऱ्याबरोबर बिजाणूचा प्रसार होतो. त्यामुळे रोपांची वाढ खुंटते. त्यावर उपाय म्हणून पेरणीसाठी रोगमुक्त बियाणे वापरण्यात येते. बियाण्यांवर प्रतिकिलो २०५ ग्रॅम व्हॅटाबॅकस या बुरशीनाशकाची बीजप्रक्रिया करण्यात येते.

मर ह्या रोगाचा प्रादुर्भावही जमिनीतील बुरशीमुळे होतो. पीक फुलोऱ्यात असताना रोगाची लक्षणे दिसतात. प्रथम रोपाची पाने निस्तेज होऊन हळूहळू रोप वाळू लागते. रोगापासून संरक्षणासाठी रोगप्रतिबंधक जातीची लागवड करण्यात येते. पेरणीपूर्वी बियाण्यास बुरशीनाशक औषध लावण्यात येते. चक्री पीक पद्धतीने रोगाचा संभव कमी करता येतो.

खोडकिडा ह्या किडीचा प्रादुर्भाव झाल्यास रोपे उपटून जाळून टाकतात. त्याचप्रमाणे पीक निघण्यापूर्वी १५ दिवस अगोदर प्रति हेक्टरी २० टक्के द्रवरूप एंड्रिन (१२५० मि.ली.) ५०० लिटर पाण्यात मिसळून पिकावर फवारतात. उपद्रव वाढल्यास १५ दिवसांनी दुसरी फवारणी करतात. एंड्रिनऐवजी कार्बारिल किंवा बी.एच.सी.चा वापरही करण्यात येतो. वाळवी (हुमणी) ही कीड गव्हाच्या रोपाची मुळे खाऊन नष्ट करते. त्यामुळे रोपे वाळतात. पूर्वप्रतिबंधक उपाययोजना म्हणून क्लोरडेन किंवा हेप्टॅक्लोर ५ टक्के ही भुकटी दर हेक्टरी ६५ किलो किंवा १०० टक्के बी.एच.सी. भुकटी १२५ किलो या प्रमाणात शेतात पसरून जमिनीत चांगल्या प्रकारे मिसळण्यात येते.

**तांदूळ :** तांदूळ हे पावसाळी पीक असून पूर्ण जिल्ह्यात तांदळाचे उत्पादन घेतले जाते. तांदळाच्या उत्तम पिकासाठी दमट व उबदार हवामान, भरपूर पर्जन्यमान आणि उत्तम मृदेची आवश्यकता असते. चोपणी प्रकारच्या मृदेतही तांदळाचे पीक घेण्यात येते. हे प्रामुख्याने खरीप पीक आहे. जून-जुलैत पावसाळा सुरू झाल्यानंतर भाताची पेरणी केली जाते. पेरणीसाठी दर एकरी १३.५९ ते १८.१२ किलोग्रॅम बियाणे वापरण्यात येते. जुलैमध्ये जेव्हा भाताची रोपे २५४.० मि.मी. ते ३०४.८ मि.मी. (१० ते १२ इंच) उंच होतात तेव्हा रोपांची लावणी केली जाते आणि ऑक्टोबर ते डिसेंबरमध्ये रोपांची कापणी व मळणी केली जाते. तसेच वेळोवेळी खत घालणे, मशागत करणे आणि निंदणी ही कामेदेखील केली जातात. काही प्रगतीशील शेतकरी भात शेतीत जपानी पद्धतीचा वापर करतात. ज्यात शेतास मोठ्या प्रमाणात खतपाणी दिले जाते. भाताची लावणी एका रांगेत करताना जवळजवळ ४ ते ६ रोपे एका ठिकाणी लावली जातात. रांगेतील रोपांच्या मध्ये ३०४.८ × ३०४.८ मि.मी. (१२ × १२ इंच) २२८.६ × २२८.६ मि.मी. (९ × ९ इंच), १०१.६ × १०१.६ मिमी (४ × ४ इंच)

आणि १०१.६ x २२८.६ मि.मी. (४ x ९ इंच) इतके अंतर असते. जिल्ह्यात एच.आर.१९ आणि एच.आर.३५ ह्या भाताच्या सुधारित जातींचा वापर केला जातो. सन १९६१-६२ मध्ये भात पिकाखाली २३,७५०.२१२ हेक्टर क्षेत्र होते. त्यापासून १५,४६२ टन इतके उत्पादन काढण्यात आले.[३०]

सन २००८-०९ मध्ये जिल्ह्यातील भात पिकाखाली सरासरी २२,९०० हेक्टर क्षेत्र असून त्यापैकी ७,९०० हेक्टर क्षेत्रावर प्रत्यक्ष पेरणी करण्यात आली. जिल्ह्यातील भात पिकाखालील हेक्टरी क्षेत्र, उत्पादन व दर हेक्टरी उत्पादन पुढीलप्रमाणे.

| वर्ष | क्षेत्र ('०० हेक्टरमध्ये) | उत्पादन ('०० मे.टनामध्ये) | दर हेक्टरी उत्पादन (कि.ग्रॅ./हेक्टर) |
|---|---|---|---|
| १९८०-८१ | ३३७ | ४३१ | १,२७९ |
| १९९०-९१ | २९९ | २९३ | ९८१ |
| १९९५-९६ | २९० | १६७ | ५७६ |
| २०००-०१ | २६७ | २०१ | ७५३ |
| २००४-०५ | १६४ | ८२ | ५००[३१] |

भात पिकावर जिल्ह्यात टिक्या नावाच्या रोगाचा प्रादुर्भाव होतो. त्यापासून संरक्षणासाठी पेरणीपूर्वी बियाण्यावर रोग प्रतिबंधक औषधाची प्रक्रिया करण्यात येते. पीक फुलोऱ्यावर येईपर्यंत एक-दोन वेळा बोर्डेक्स मिक्स्चर ३:३:५० या प्रमाणात फवारतात. रोग प्रतिकारक जातींची लागवड करण्याकडे अलीकडे कल दिसतो.

जिल्ह्यात बाजरी व मका या धान्य पिकांचेही काही प्रमाणात उत्पादन घेतले जाते. परंतु त्याचे प्रमाण अत्यल्प आहे.

## कडधान्य

तृणधान्यानंतर खाद्य पिकांमध्ये कडधान्याचा क्रमांक लागतो. जिल्ह्यात तूर, मूग, उडीद, हरभरा ही महत्त्वाची कडधान्य पिके घेतली जातात. सन १९६१-६२ मध्ये जिल्ह्यात कडधान्य पिकाखाली ९९,२३०.६२६ हेक्टर (२,४५,२०४ एकर) इतके क्षेत्र होते. तर सन २००८-०९ मध्ये कडधान्य पिकाखाली प्रत्यक्ष पेरणी झालेले क्षेत्र १,७३,००० हेक्टर इतके होते.[३२] जिल्ह्यातील प्रमुख कडधान्य पिके पुढीलप्रमाणे.

**तूर :** जिल्ह्यात सन १९६१-६२ मध्ये तुरीच्या लागवडीखाली ३३,४६२.७० हेक्टर (८२,६९१ एकर) इतके क्षेत्र होते. हे पीक बऱ्याच प्रमाणात कापूस किंवा भुईमूगाच्या पिकामध्ये मिश्र पीक

---

३०. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. १९६.

३१. कृषि सांख्यिकी विषयक माहिती, महाराष्ट्र राज्य, २००६, भाग-२, पूर्वोक्त, पृ. ७६, ९८, १२०.

३२. खरीप हंगाम, २००८-०९ पेरणी अहवाल जिल्हा गोषवारा, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांनी पाठविलेल्या माहितीवर आधारीत.

म्हणून घेण्यात येत असल्यामुळे कापूस किंवा भुईमूगाच्या पेरणीबरोबरच जून-जुलैमध्ये तुरीची पेरणी करतात. तुरीची पेरणी जुलैच्या पहिल्या आठवड्यात करण्याची कृषितज्ज्ञांनी अलीकडे शिफारस केली आहे. त्यासाठी मुख्य पिकाच्या ३० ओळीनंतर एक ओळ याप्रमाणे तुरीची पेरणी करण्यात येते. हे मिश्र पीक असल्याने तुरीच्या रोपांची वाढ मुख्य पीक तयार होईपर्यंत मंदगतीने हिवाळ्यापर्यंत होत असते. मुख्य पिकाच्या कापणीनंतर या पिकाची वाढ अत्यंत जोमदारपणे होते. रोपांना अदमासे दोन महिन्यांनी फुले येतात व नंतर शेंगा लागतात. शेंगा परिपक्व होऊन कोरड्या झाल्यावर जानेवारी-फेब्रुवारीमध्ये पिकाची कापणी (सोंगणी) करण्यात येते. काही वेळा रोपे कापण्यापूर्वी त्याच्या पिकलेल्या शेंगा तोडल्या जातात. रोपांची कापणी केल्यानंतर ती एकत्र बांधून खळ्यावर काठीच्या सहाय्याने त्याची झोडपणी तसेच मळणी केली जाते.

जिल्ह्यात सामान्यतः लाल किंवा फिक्कट तपकिरी रंगाच्या तुरीचे उत्पन्न घेतले जाते. तर पिवळ्या रंगाच्या तुरीची वाटून लापशी बनविण्यात येते. तुरीच्या हिरव्या शेंगातील बिया उकडून खाल्ल्या जातात. तुरीची साल, टरफल हे दुभत्या जनावरांचे उत्तम खाद्यान्य आहे.[३३] सन २००८-०९ मध्ये जिल्ह्यात तुरीच्या पिकाखाली पेरणी झालेले क्षेत्र ५७,५०० हेक्टर इतके होते. जिल्ह्यातील तूर पिकाखालील क्षेत्र, उत्पादन, दर हेक्टरी उत्पन्न खालीलप्रमाणे.

| वर्ष | क्षेत्र ('००' हेक्टरमध्ये) | उत्पादन ('००' मे.टनामध्ये) | दर हेक्टरी उत्पादन (कि.ग्रॅ./हेक्टर) |
|---|---|---|---|
| १९८०-८१ | ३७२ | १२५ | ३३६ |
| १९९०-९१ | ४३३ | १२२ | २८२ |
| १९९५-९६ | ४९६ | १२८ | २५७ |
| २०००-०१ | ५३२ | २५४ | ४७८ |
| २००४-०५ | ५२८ | ४७८ | ९०५[३४] |

तुरीच्या पिकावर मर नावाच्या रोगाचा प्रादुर्भाव होतो. त्यापासून संरक्षणासाठी रसायने फवारतात. तसेच रोगप्रतिकारक सी-११, सी-२, सी-३६ या जातींच्या बियाण्यांची लागवड करतात.

**हरभरा :** हरभरा जिल्ह्यातील महत्त्वाचे कडधान्य पीक आहे. सन १९६१-६२ मध्ये जिल्ह्यात २४,५३९.७५४ हेक्टर (६०,६३९ एकर) इतके क्षेत्र हरभरा पिकाखाली होते. हरभरा हे मुख्यतः रब्बी हंगामातील पीक असून उत्तम प्रतीच्या मृदेत या पिकापासून चांगले उत्पादन मिळते. ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये पेरणीयंत्राद्वारे (तिफण) पेरणी केली जाते. रोपांची चांगली वाढ होण्यासाठी रोपाला फुलोरा येण्याआधी रोपांची शेंडे खुडून टाकतात. ज्यामुळे रोप मजबूत व दाट होतात आणि हरभऱ्याच्या

३३. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. २०१, २०२.

३४. कृषि सांख्यिकी विषयक माहिती, महाराष्ट्र राज्य, २००६, भाग-२, पूर्वोक्त, पृ. ८३, १०५, १२७.

दाण्याचा आकारही वाढतो. साधारणपणे फेब्रुवारीमध्ये पीक तयार होते. तेव्हा रोपे मुळापासून उपटून खळ्यावर नेतात. तेथे बैलाच्या पायाखाली तुडवून अथवा काठीने झोडपून मळणी करतात. सिंचनाची सुविधा उपलब्ध असल्यास बऱ्याच वेळा सिंचनाच्या बळावर हे पीक घेतले जाते. बऱ्याच ठिकाणी हरभऱ्याचे पीक मिश्र पीक म्हणून न घेता एकच पीक घेतले जाते. तर काही ठिकाणी रब्बी ज्वारी व गहू या पिकांमध्ये मिश्र पीक म्हणून हरभरा पेरतात. हरभऱ्याचे दाणे कच्चे, उकडून किंवा भाजूनदेखील खाल्ले जातात.[३५]

सन २००८-०९ मध्ये हरभरा पिकाखाली पेरणी झालेले क्षेत्र ४४,८०० हेक्टर इतके आहे. जिल्ह्यातील हरभरा पिकाखालील क्षेत्र, उत्पादन व दर हेक्टरी उत्पन्न पुढीलप्रमाणे.

| वर्ष | क्षेत्र ('००' हेक्टरमध्ये) | उत्पादन ('००' मे. टनामध्ये) | दर हेक्टरी उत्पादन (कि.ग्रॅ./हेक्टर) |
|---|---|---|---|
| १९८०-८१ | १४१ | ५२ | ३६१ |
| १९९०-९१ | १५१ | ६२ | ४१० |
| १९९५-९६ | २६० | ८९ | ३४३ |
| २०००-०१ | २१८ | ७५ | ३४४ |
| २००४-०५ | ४०७ | २०४ | ५०१[३६] |

हरभऱ्यावर दोन प्रकारच्या बुरशीमुळे मर नावाचा रोग येतो. त्यामुळे पेरणी केल्यावर रोपे वाळतात. रोगाचा प्रादुर्भाव पीक फुलात असतानासुद्धा दिसून येतो. रोगावर उपाय म्हणून एक टक्का पारायुक्त बुरशीनाशक रसायन एक किलो बियाण्यास २.५ ग्रॅम या प्रमाणात चोळून लावतात.

**मूग :** मूग हे जिल्ह्यातील दुसऱ्या क्रमांकाचे महत्त्वाचे कडधान्य पीक आहे. सन १९६१-६२ मध्ये या पिकाखाली सुमारे २१,०६३.५०२ हेक्टर (५२,०४९ एकर) इतके क्षेत्र होते. सामान्यतः खरीप हंगामात मिश्र पीक म्हणून मुगाची लागवड केली जाते. हे पीक चांगल्या प्रतीच्या मृदेत किंवा मुख्यत्वे काळ्या कसदार जमिनीत साधारण ७६२.०० मि.मी. (३० इंच) इतक्या पर्जन्यमानात घेतल्यास अधिक उत्पादन घेता येते. ह्याशिवाय उन्हाळ्यात वैशाखी मुगाचे पीक जलसिंचन सुविधा उपलब्ध असलेल्या ठिकाणी घेतात. मुगाच्या लागवडीसाठी दोन वेळा नांगरणी करतात. नंतर वखराच्या साहाय्याने ढेकळे फोडून जमीन तयार करतात. जिल्ह्यात मुगाच्या लवकर तयार होणाऱ्या जातीचा वापर मोठ्या प्रमाणावर करतात. कारण हे पीक काढून झाल्यावर या जमिनीत रब्बी ज्वारी किंवा गव्हाचे पीक घेतात. जून महिन्यात अरगड्याच्या सहाय्याने पेरणी करतात. पेरणीसाठी दर हेक्टरी १६ किलोग्रॅम

३५. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. २०२.

३६. कृषि सांख्यिकी विषयक माहिती, महाराष्ट्र राज्य, २००६, भाग-२, पूर्वोक्त, पृ. ८४, १०६, १२८.

बियाणे वापरण्यात येते. पेरणीनंतर एका आठवड्याने पिकाची रोपटी दिसू लागल्यानंतर निंदणी व डवरणी (कोळपणी) अदमासे वीस दिवसांच्या अंतराने करतात. सप्टेंबरमध्ये पीक तयार होते. प्रत्येक रोप समूळ उपटून काढतात व नंतर ते खळ्यावर काही दिवस वाळवतात. त्यानंतर बैलाच्या पायाने तुडवून अथवा काठीने झोडपून मळणी करण्यात येते. मुगाच्या मुळावर नायट्रोजनच्या ग्रंथी तयार होत असल्याने नंतर घेतलेल्या पिकास चांगला उपयोग होतो. रोपाच्या पाने व चिपाडापासून उत्तम प्रकारचे खत मिळते.[३७]

सन २०००-०१ मध्ये मुगाचे जिल्ह्यातील दर हेक्टरी उत्पादन ३८८ कि.ग्रॅ. तर २००४-०५ मध्ये ४८३ कि.ग्रॅ. होते. सन २००८-०९ मध्ये मुगाच्या पिकाखाली पेरणी झालेले प्रत्यक्ष क्षेत्र २८,८०० हेक्टर इतके होते.[३८] मुगाच्या पिकावर मर व भुरी ह्या रोगांचा प्रादुर्भाव होतो. मर रोग जमिनीत असणाऱ्या बुरशीपासून होतो. त्यामुळे पीक फुलात असताना रोपे एकदम कोमेजतात व पाने कोरडी होतात. यासाठी उपाययोजना म्हणून मर प्रतिबंधक जातींच्या बियाण्यांची लागवड करण्यात येते. पेरणीपूर्वी बियाण्यास एक टक्का पारायुक्त बुरशीनाशक रसायन एक किलो बियाण्यास ३ ग्रॅम या प्रमाणात चोळतात. भुरी रोगामध्ये पानावर पांढरट बुरशी दिसते. रोगाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात झाल्यास पाने गळून पडतात. हा रोग असलेली रोपे लांबूनसुद्धा ओळखता येतात. त्यावर उपाय म्हणून ३०० मेश गंधक २० किलो प्रति हेक्टर फवारतात किंवा ८०% पाण्यात मिसळणारे गंधक १२५० ग्रॅम ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारतात.

जिल्ह्यात उडिदाचे पिकही मुख्यत्वे खरीप हंगामात घेतले जाते. सन १९६१-६२ मध्ये उडिदाच्या पिकाखाली सुमारे १३,८५६.४४९ हेक्टर (३४,२४० एकर) इतके क्षेत्र लागवडीखाली होते. उडिदाचे पीक हे काळ्या आणि लाल चिकणमातीयुक्त जमिनीत ज्वारी तसेच काही प्रमाणात बाजरी बरोबर मिश्र पीक म्हणून घेतले जाते. जून-जुलैमध्ये पहिल्या पावसानंतर बी पेरले जाते. तर सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये पीक परिपक्व झाल्यानंतर मळणी करतात. उडिदाच्या हिरव्या शेंगा भाजीपाला म्हणून तर पक्व कडधान्यापासून उडिदाची डाळ तयार केली जाते. उडिदाच्या डाळीपासून बनविलेले पापड चविष्ट असतात. त्याचा पाला तसेच चिपाडापासून उत्तम वैरण मिळते. जिल्ह्यात सन २०००-०१ मध्ये उडिदाचे दर हेक्टरी उत्पादन ४३२ कि.ग्रॅ. तर २००४-०५ मध्ये ते ५१८ कि.ग्रॅ. इतके होते. सन २००८-०९ मध्ये उडिदाच्या पिकाखाली पेरणी झालेली प्रत्यक्ष क्षेत्र ४०,२०० हेक्टर आहे. उडिदाच्या पिकावर मुगाप्रमाणेच मर व भुरी हे रोग येतात.

## तेलबिया

जिल्ह्यात घेतल्या जाणाऱ्या तेलबियांपैकी सोयाबीन, भुईमूग, तीळ आणि करडई ही अत्यंत महत्त्वाची नगदी पिके आहेत. सन १९६१-६२ मध्ये भुईमूगाच्या लागवडीखाली २९,९१७.६२६ हेक्टर

---

३७. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. २०२.

३८. कृषि सांख्यिकी विषयक माहिती, महाराष्ट्र राज्य, २००६, भाग-१, पूर्वोक्त, पृ. ९६, ९७.

(७३,९२८ एकर) क्षेत्र तर तीळ आणि करडईच्या लागवडीखाली अनुक्रमे ३,५१३.४८४ हेक्टर (८,६८२ एकर) आणि २,८९१.०७७ हेक्टर (७,१४४ एकर) इतके क्षेत्र होते.[३९] गेल्या काही वर्षापासून जिल्ह्यात सोयाबीन लागवडीत प्रचंड प्रमाणात वाढ झाली असून जिल्ह्यात सोयाबीन हे प्रथम क्रमांकाचे तेलबिया पीक झाले आहे. जिल्ह्यात सन १९८०-८१, १९९०-९१, २०००-०१ व २००४-०५ मध्ये एकूण तेलबियाखालील क्षेत्र अनुक्रमे ४०,५०० हेक्टर, ८९,९०० हेक्टर, ५३,७०० हेक्टर व १,५५,८०० हेक्टर इतके होते. सदर वर्षी अनुक्रमे १३,९०० मे.टन, ४९,८०० मे.टन, २४,६०० मे.टन व १,८५,१०० मे.टन इतके तेलबियांचे उत्पादन झाले.[४०] जिल्ह्यातील प्रमुख तेलबियांची माहिती खालीलप्रमाणे.

**सोयाबीन :** सोयाबीनमधील २०% तेल आणि ४०% प्रथिने या गुणधर्मामुळे त्यास औद्योगिक क्षेत्रामध्ये बरीच मागणी आहे. सोयाबीनचा उपयोग रंग, वार्निश लिबोलियम, छपाईची शाई, फटाके व वंगणाचे तेल यासाठी होतो. तेल काढल्यानंतर उरलेल्या पदार्थाचा उपयोग पशु आहार, औषधे वगैरे बनविण्यासाठी होतो. यापासून अनेक पौष्टिक व रूचकर पदार्थ तयार करतात. सोयाबीन हे डाळवर्गीय पिकात मोडत असले तर त्यातील तेलाच्या गुणधर्मामुळे त्याची तेलबियाखालीच माहिती दिली आहे.हे प्रामुख्याने खरीप हंगामातील पीक असून हल्ली या पिकाचा सर्वत्र प्रसार झाला आहे. साधारणपणे १९९० च्या नंतर जिल्ह्यात सोयाबीनच्या लागवडीस सुरुवात झाली असून सध्या जिल्ह्यातील तेलबिया पिकांमध्ये सोयाबीनचा प्रथम क्रमांक लागतो. सोयाबीनचे पीक मध्यम, खोल व पाण्याचा चांगला निचरा असलेल्या जमिनीत उत्पादन चांगले येते. सोयाबीन पांढऱ्या व काळ्या अशा दोन रंगाचे असते. उन्हाळ्यात पेरणीपूर्वी जमीन नांगरून वखराच्या पाळ्या देऊन भुसभुशीत करतात. हेक्टरी १२ ते १५ गाड्या शेणखत टाकतात. तिफणीने ३० ते ४५ सें.मी. अंतरावर आणि दोन रोपातील अंतर ५ ते ७ सें.मी. ठेऊन अडीच ते तीन सें.मी. खोल पेरतात. दर हेक्टरी ७५ कि.ग्रॅ. बियाणे वापरतात. उगवणीनंतर दोन ते तीन वेळा कोळपणी व एक ते दोन वेळा निंदणी करतात. सोयाबीनचे खरीप पीक घेतल्यानंतर त्या शेतात रब्बी हंगामात गहू, करडई, सुर्यफुल व हरभरा ही पिके घेतात. कपाशी व तुरीच्या पिकासोबत मिश्र पीक म्हणून सोयाबीनच्या दोन ओळी पेरतात. पानाचा रंग पिवळा होऊन ती गळू लागल्यानंतर आणि शेंगाचा रंग काळसर पिवळा झाल्यानंतर पिकाची कापणी करतात.सन १९९५-९६ मध्ये जिल्ह्यात एकूण तेलबियाखाली ६०,४०० हेक्टर इतके क्षेत्र असून त्यात १,५०० हेक्टर क्षेत्र सोयाबीनच्या लागवडीखाली होते. तर २००४-०५ मध्ये एकूण तेलबियाखाली १,५५,८०० हेक्टर क्षेत्रापैकी १,१०,३०० हेक्टर क्षेत्र सोयाबीनच्या लागवडीखाली होते.[४१]

---

३९. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. २०८.

४०. कृषि सांख्यिकी विषयक माहिती, महाराष्ट्र राज्य, २००६, भाग-२, पूर्वोक्त, पृ. ९६, ११९.

४१. कित्ता, पृ. ९५, ११८.

याचाच अर्थ गेल्या काही वर्षापासून सोयाबीन जिल्ह्यातील प्रमुख तेलबिया पीक बनले आहे. जिल्ह्यातील सोयाबीनचे क्षेत्र, उत्पादन, दर हेक्टरी उत्पादन पुढीलप्रमाणे.

| वर्ष | क्षेत्र ('००' हेक्टरमध्ये) | उत्पादन ('००' मे. टनामध्ये) | दर हेक्टरी उत्पादन (कि.ग्रॅ./हेक्टर) |
|---|---|---|---|
| १९९५-९६ | १५ | १९ | १,२९५ |
| १९९८-९९ | ६१ | ५८ | ९५१ |
| २०००-०१ | १०१ | ९१ | ९०२ |
| २००२-०३ | ३९७ | ५४७ | १,३७७ |
| २००४-०५ | १,१०३ | १,०३५ | ९३८ |

सोयाबीनवर तुडतुडे, फुलकिडे, मावा, पाने पोखरणारी अळी, घाटे अळी, हिरवी उंट अळी, पानावरील ठिपके, पानावरील मोसेल या रोगांचा प्रादुर्भाव होतो.

**भुईमूग :** जिल्ह्यात पूर्वापारपासून भुईमूगाचे पीक घेतले जाते. बहुत करून भुईमूगाचे उत्पादन जिराईती पीक म्हणून घेतले जाते. जमिनीची सुपिकता वाढविण्यासाठी कपाशी किंवा ज्वारीच्या पिकानंतर चक्री पीक म्हणून भुईमूग पेरतात. पाण्याचा उत्तम निचरा होणाऱ्या जमिनीतच हे पीक घेणे लाभकारक असते. हलकी वाळूमिश्रित मृदा आणि चिकण मातीयुक्त उत्तम प्रतिची गाळाची मृदा भुईमूगाच्या पिकाला अनुकूल असते. हे पीक मध्यम काळ्या आणि दाट मृदेत देखील घेता येते. लागवडीसाठी जमीन तयार करताना प्रथम नांगरणी व नंतर वखरणी करतात. त्यामुळे जमीन भुसभुशीत होते. जून-जुलैमध्ये भुईमूगाची पेरणी मोगड्याच्या सहाय्याने करतात. बियाण्याच्या भरमसाठ किमतीमुळे टोकण पद्धतीने पेरणी करतात. त्यामुळे बियाण्यांची बचत होते.जूनच्या मध्यात शेत २ ते ३ वेळा नांगरून त्याची वखरणी केली जाते. बी पेरल्यानंतर जमीन समांतर केली जाते. पुष्कळसे प्रगतीशील शेतकरी भुईमूगाच्या पिकासाठी खतांचा वापर करतात. जिल्ह्यात भुईमूगाची सुधारित जात K-4-11 वापरण्यात येते. तसेच पंजाब-१, एस.जी.-३८६ या जातीही प्रचलित आहेत. भुईमूगाच्या आंतर मशागतीमध्ये डवरणी व निंदणी दोन-तीन वेळा करण्यात येते. किड किंवा रोगाची लक्षणे दिसू लागल्यास पिकावर पिकसंरक्षक औषधे फवारण्यात येतात. भुईमूगाचा हंगाम ऑक्टोबर महिन्याच्या शेवटी सुरू होतो. जलसिंचनाच्या सोयीमुळे हल्ली बऱ्याच ठिकाणी उन्हाळ्यातही भुईमूगाचे पीक घेण्यात येते.भुईमूगाच्या तेलाचा वापर मोठ्या प्रमाणात घरगुती आहारात केला जातो. तसेच साबण, तूप (घी) तयार करण्यासाठी भुईमूगाचा वापर होतो. भुईमूगाचे तेल काढल्यानंतर उरलेली पेंड ही दुभत्या जनावरासाठी उत्तम खुराक असते.[४२] जिल्ह्यात भुईमूगाच्या पिकाचे क्षेत्र, उत्पादन, दर हेक्टरी उत्पन्न पुढीलप्रमाणे.

---

४२. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. २०८.

| वर्ष | क्षेत्र ('००' हेक्टरमध्ये) | उत्पादन ('००' मे. टनामध्ये) | दर हेक्टरी उत्पादन (कि.ग्रॅ./हेक्टर) |
|---|---|---|---|
| १९८०-८१ | १७५ | ८६ | १,७३२ |
| १९९०-९१ | २४५ | १९० | १,२०९ |
| १९९५-९६ | ४९ | ५७ | १,६४० |
| २०००-०१ | ७३ | ४३ | १,०४९ |
| २००४-०५ | ५० | ५५ | १,८१०[४३] |

**करडई :** रब्बी हंगामात पावसाच्या पाण्यावर किंवा सिंचनाच्या सहाय्याने हे पीक गाळाच्या काळ्या कसदार मृदेत घेतले जाते. सामान्यतः करडईचे पीक हे गहू, हरभरा, ज्वारी इत्यादी मुख्य पिकांबरोबर मिश्र पीक म्हणून घेतले जाते. रब्बी ज्वारीच्या शेताभोवती कुंपण म्हणूनही हे पीक घेतात. करडईचे बी ऑक्टोबर मध्ये पेरले जाते आणि फेब्रुवारी महिन्यात त्याची कापणी केली जाते. पीक काढल्यानंतर काही दिवस त्याची गंजी तयार करून ठेवतात. रोपे वाळल्यानंतर काठीच्या सहाय्याने त्याची झोडपणी केली जाते. संशोधन केंद्राकडून 'शारदा' या वाणाची रब्बी हंगामासाठी शिफारस करण्यात आली आहे. या वाणाचे कोरडवाहू क्षेत्रात १० ते १२ क्विंटल प्रति हेक्टर उत्पादन क्षमता असून पाण्याखाली वाणाचे १८ क्विंटल दर हेक्टरी उत्पादन झालेले आहे.करडईच्या पानापासून करडईची भाजी तयार करतात. करडईचे तेल मोठ्या प्रमाणात स्वयंपाकासाठी वापरले जाते. तेल काढल्यानंतर उरलेला चोथा (पेंड) दुभत्या जनावरांचे पोषक खाद्य म्हणून वापरतात. तसेच करडईचा वापर साबण आणि रंग उद्योगातही केला जातो. जिल्ह्यातील करडई पिकाखालील क्षेत्र, उत्पादन, दर हेक्टरी उत्पादन पुढीलप्रमाणे.

| वर्ष | क्षेत्र ('००' हेक्टरमध्ये) | उत्पादन ('००' मे. टनामध्ये) | दर हेक्टरी उत्पादन (कि.ग्रॅ./हेक्टर) |
|---|---|---|---|
| १९८०-८१ | २८ | ०५ | १८५ |
| १९९०-९१ | १०२ | ४३ | ४२१ |
| १९९५-९६ | ११६ | ६१ | ५२४ |
| २०००-०१ | ७५ | २६ | ३४८ |
| २००४-०५ | ९४ | ४४ | ४६४[४४] |

या पिकावर पानावरील ठिपके हा रोग होऊ शकतो. अल्टेरनेरिया या बुरशीमुळे पानावर गोलाकृती ठिपके दिसतात. रोगाचा प्रादुर्भाव जास्त असेल तर पाने गळून पडतात व रोपांची वाढ खुंटते. पीक संरक्षणासाठी ताम्रयुक्त बुरशीनाशक फवारतात. 'शारदा' या वाणास रोगाचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव होत नाही.

**सुर्यफुल :** खरीप व रब्बी या दोन्ही हंगामात हे पीक घेतले जात असून त्यात तेलाचे प्रमाण ४५%, प्रथिनांचे प्रमाण १८ ते २०%, खनिजे ३ ते ३.५%, पिष्टमय पदार्थ २२ ते २३% आणि

४३. कृषि सांख्यिकी विषयक माहिती, पूर्वोक्त, पृ. ९०, ९४, ११२, ११७, १३४, १३८.

४४. कित्ता, पृ. ९१, ११४, १३५.

Maharashtra State Gazetteers

लोह ९.१०% असून त्यात कॅल्शियम व व्हिटॅमिन असतात. चांगला निचरा असलेल्या मध्यम ते साधारण प्रतिच्या जमिनीत हे पीक घेण्यात येते. पिकासाठी जमीन तयार करताना प्रथम नांगरणी करून नंतर दोन वेळा वखरणी करतात. दर हेक्टरी १० ते १२ कि.ग्रॅ. बियाणे पेरणीसाठी वापरतात. खरीपात जुलैच्या पहिल्या पंधरवाड्यात, रब्बीमध्ये ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात आणि उन्हाळी हंगामात फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात पाभरीने अथवा टोकन पद्धतीने पेरणी करतात. पेरणी करताना जमिनीच्या मगदुरानुसार दोन ओळीत ४५ ते ६० सें.मी. अंतर ठेवतात. या पिकास दोन ते तीन वेळा कोळपणी करतात. शेवटची कोळपणी झाडास फुले येण्यापूर्वी देतात. रासायनिक खतांचा उपयोग लाभदायक ठरतो. जलसिंचनाची सोय आहे त्या ठिकाणी शेतकरी गरजेनुसार दोन-तीन वेळा पाणी देण्यात येते. त्यामुळे उत्पादन अधिक येते. पीक संरक्षक औषधांची फवारणी करतात. पीक साधारणपणे साडेतीन ते साडेचार महिन्यात तयार होते. पीक तयार झाले म्हणजे फुलांची कापणी करतात. नंतर ही फुले वाळवतात व काठीने झोडपून बी वेगळे करण्यात येते. सुर्यफुलांच्या तेलबियांचे उत्पादन जमिनीच्या प्रतवारीप्रमाणे दर हेक्टरी ८ ते १२ क्विंटल येते. त्यापासून शेतकऱ्यास घरगुती वापरासाठी तेल तसेच बिया विकून रोख रक्कम मिळते.

जिल्ह्यात सन २००८-०९ मध्ये सुर्यफुलाखाली पेरणी झालेले क्षेत्र १०,२०० हेक्टर इतके होते. जिल्ह्यातील सुर्यफुलाखालील क्षेत्र, उत्पादन पुढीलप्रमाणे.

| वर्ष | क्षेत्र ('००' हेक्टरमध्ये) | उत्पादन ('००' मे. टनामध्ये) |
|---|---|---|
| १९८०-८१ | ०९ | ०४ |
| १९९०-९१ | ३४४ | २१९ |
| २०००-०१ | १३८ | ६० |
| २००२-०३ | १६७ | १२२ |
| २००३-०४ | १७४ | १३१ |
| २००४-०५ | २१८ | १००[४५] |

सुर्यफुलाच्या पिकास केसाळ अळी, मावा, तुडतुडे, पांढरी माशी, फुलकिडे आणि फुलांवरील अळ्यांपासून नुकसान होते.

**तीळ :** तीळ हे पावसाळी पीक असून खरीप हंगामात घेतले जाते. खरीपातील तिळाची जून-जुलैमध्ये पेरणी करतात. पेरणीनंतर पीक कापणीस येण्यास ४ महिन्यांचा कालावधी लागतो. पिकाची सामान्यतः नोव्हेंबर महिन्यात कापणी केली जाते. दर हेक्टरी ४ ते ६ क्विंटल उत्पन्न मिळते. विविध प्रकारच्या मृदेत तिळाचे उत्पादन घेतले जाते. त्यातही हलकी व वाळूमिश्रित चिकण मातीयुक्त मृदेत हे पीक चांगले येते. पिकाची कापणी जमिनीपासून केली जाते. नंतर ते एकत्र गोळा करून वाळवतात. त्यामुळे तिळाच्या बियांच्या बोंडांना भेगा पडतात आणि मळणीच्या खळ्यावर रोपांना झोडपून दाणे मिळवले जातात.तिळाचे तेल हलक्या पिवळसर रंगाचे, रूचकर चवीचे आणि अल्पशा वासाचे

४५. कृषि सांख्यिकी विषयक माहिती, पूर्वोक्त, पृ. ९२, ९३, ११६, ११७.

Maharashtra State Gazetteers

असते. तिळाचे तेल स्वयंपाकात वापरले जाते. तिळाचे तेल काढल्यानंतर उरलेली पेंड ही दुभत्या जनावरांचा पोषक आहार म्हणून वापरले जाते. सन १९९७-९८ मध्ये जिल्ह्यात तिळाच्या पिकाखाली ७,१०० हेक्टर क्षेत्र असून त्यापासून दर हेक्टरी २२५ किलोग्रॅम इतके तिळाचे उत्पादन होते.[४६] तर सन २०००-०१ मध्ये तिळाच्या लागवडीखाली ८,७०० हेक्टर क्षेत्रातून दर हेक्टरी १९५ कि.ग्रॅ. उत्पादन तर एकूण उत्पादन १,७०० टन इतके होते.[४७]

**मसाल्याची पिके :** जिल्ह्यात मिरची, हळद, धने, लसूण ही महत्त्वाची मसाल्याची पिके घेतात. एकूण मसाल्याच्या पिकाखालील क्षेत्रापैकी सर्वाधिक क्षेत्र हे मिरचीचे पिकाने व्यापलेले आहे. सन १९६१-६२ मध्ये मिरचीच्या लागवडीखाली २४,५२५.५९० हेक्टर इतके क्षेत्र होते. जिल्ह्यातील महत्त्वाची मसाला पिके पुढीलप्रमाणे.

**मिरची :** मिरचीचे पीक हे मोठ्या प्रमाणात हवामानाची स्थिती आणि मृदा यावर अवलंबून असते. तथापि काळ्या चिकणमातीयुक्त गाळाच्या मृदेत मिरचीचे पीक चांगले येते. हे पीक बहुदा ओलिताचे पीक म्हणून घेण्यात येते. सामान्यतः स्वतंत्रपणे मिरचीचे बी वाफ्यात पेरले जाते आणि नंतर जेव्हा रोपे साधारणपणे १५२.४ ते २०३.२ मि.मी. (६ ते ८ इंच) वाढतात. तेव्हा ती रोपे वाफ्यातून काढून मशागत व खतपाणी केलेल्या शेतात ठराविक अंतरावर लावतात. नंतर २ ते ३ वेळा निंदणी केली जाते. तसेच थोड्याफार प्रमाणात खत किंवा राख पिकाला देतात आणि जमिनीलगत पिकाच्या खोडाभोवती माती भरली जाते. लागवडीपासून साधारणतः २ महिन्यानंतर पीक फुल धरण्यास प्रारंभ करते. तिसऱ्या-चौथ्या महिन्यापर्यंत मिरच्या खुडल्या जातात. सिंचनाद्वारे घेतलेले मिरचीचे पीक दिर्घकाळ आणि पावसावर घेतलेल्या मिरची पिकापेक्षा अधिक उत्पादन देते. मिरचीचा उपयोग लोणचे, चटणी आणि गरम मसाले तयार करण्यासाठी केला जातो. रोजच्या अन्नात त्याचा नेहमीच वापर होतो. जिल्ह्यात लवंगी, लांब, आखुड, निमुळती अशा विविध प्रकारच्या मिरच्याचे उत्पादन घेतले जाते. मिरचीवर फुलकिडे, कोळी, मावा, खोड कुडतडणाऱ्या अळीचा उपसर्ग व करपा भूरी मिरच्या कुजणे, पानावर काळे ठिपके पडणे आणि शेंडे वाळणे या रोगांपासून नुकसान होते.

**हळद :** सन १९६१-६२ मध्ये जिल्ह्यात सुमारे ३४७.२२० हेक्टर (८५८ एकर) क्षेत्रात हळदीची लागवड करण्यात आली होती. हळदीच्या पिकास वाळूमिश्रित किंवा चिकणमातीयुक्त मृदा आवश्यक असते. जमिनीस खतपाणी द्यावे लागते. जून महिन्यात लागवड केली जाते. नंतर तीन ते चार वेळा निंदणी केली जाते. तसेच हळदीच्या पिकाला गरजेनुसार सिंचनाचे पाणी पुरवावे लागते. नोव्हेंबरपासून पुढे हळकुंड घट्ट होण्यास सुरुवात होते आणि जानेवारीत विळ्याच्या सहाय्याने ते खणून बाहेर काढले जाते. बाहेर काढलेले हळकुंड उकळून नंतर जवळजवळ आठ दिवस सुकविले जातात.

---

४६. सांख्यिकीय गोषवारा, महाराष्ट्र राज्य, १९९७-९८ व १९९८-९९, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, पृ. ४१९.

४७. सांख्यिकीय गोषवारा, महाराष्ट्र राज्य, २०००-०१, कित्ता, पृ. २९७.

Maharashtra State Gazetteers

**ऊस :** सन १९६१-६२ मध्ये जिल्ह्यात एकूण लागवडीपैकी २,५१४.१९ हेक्टर (६,२१४ एकर) इतके क्षेत्र ऊसाच्या लागवडीखाली होते. ऊसाची लागवड कंधार, नांदेड, हदगाव, भोकर आणि मुखेड तहसिल (तालुका) इत्यादी तालुक्यात मोठ्या प्रमाणात केली जाते. ऊसाचे पीक उच्च प्रतिच्या काळ्या कसदार जमिनीत तसेच मोठ्या प्रमाणात मशागत केलेल्या चिबड जमिनीत घेण्यात येते. चिबड जमिनीत दुसऱ्या कुठल्याही पिकापेक्षा ऊसाचे पीक चांगले येते. पीक घेतल्यावर त्या जमिनीत पुन्हा तीन वर्षे तेच पीक घेत नाहीत. या मधल्या कालावधीत त्या जमिनीत इतर कोरडवाहू पिके घेतली जातात. ऊसाच्या पिकासाठी ट्रॅक्टरच्या किंवा लोखंडी नांगराने जमीन सखोल नांगरतात. पीक लावण्याच्या १५ दिवस आधी जमिनीत पुन्हा पुन्हा दंताळे फिरवून २२८.६-२५४.० मि.मी. (९ ते १० इंच) खोलीचे खाचे पाडले जातात. पहिल्या नांगरणी नंतर प्रति एकर ३० ते ४० बैलगाड्या कंपोस्ट किंवा शेणखत देऊन त्याचे जमिनीत योग्य प्रकारे मिश्रण होण्यासाठी पुन्हा नांगरणी करतात. त्यामुळे खत चांगल्याप्रकारे मिसळले जाते व शेतातील ढेकळे फुटतात. त्यानंतर वखरणी करून ऊसाच्या लागवडीसाठी चऱ्या पाडतात. चऱ्यांमध्ये पाणी सोडून त्यात ऊसाचे बेणे ठराविक अंतरावर लावतात. लावणीनंतर तिसऱ्या दिवशी पिकास पहिले पाणी देण्यात येते. सातवे दिवशी पुन्हा पाणी देण्यात येते. त्यानंतर दर आठ दिवसांनी पाणी देण्यात येते. पावसाळ्यात पाणी देण्याची आवश्यकता नसते. पेरणीनंतर एक महिन्याने कोळपणी करण्यात येते. या पिकास मोठ्या प्रमाणात रासायनिक खते तसेच शेंगदाण्याची पेंड आवश्यक असते. किड व रोगापासून संरक्षणासाठी कृषि तज्ञांचे मार्गदर्शन मिळते. शासन व कृषि विद्यापीठ यांनी त्याबाबत बरेच उपयुक्त काम केले आहे.

**ऊस उत्पादन वाढीची सुत्रे**[४८]

(१) पट्टा पद्धतीने ऊसाची लागवड करणे.

(२) उष्ण पाणी बेने प्रक्रिया करणे.

(३) बीज प्रक्रिया करणे.

(४) कंपोस्ट, शेणखताचा व हिरवळीच्या खताचा वापर वाढविणे.

(५) शिफारसीनुसार खताची मात्रा वेळेवर देणे.

(६) माती परिक्षणानुसार एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन.

(७) एकात्मिक किड व्यवस्थापनाचा अवलंब.

(८) सुक्ष्म सिंचनाचा (ठिबक सिंचन) अवलंब करणे.

(९) खोडवा व्यवस्थापन करणे.

(१०) दोन डोळे पद्धतीने लागवड करणे.

(११) सुधारीत जातीच्या वाणाचा वापर वाढविणे.

---

४८. जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, नांदेड, यांनी पाठविलेल्या नांदेड जिल्ह्यातील कृषि विभाग, एक दृष्टीक्षेप यावर आधारीत.

Maharashtra State Gazetteers

ऊसाचे पीक साधारणतः एक वर्षानंतर कापणीसाठी तयार होते. ऊसाची पाने पिवळी झाल्यावर किंवा ताटे हाताने मोडल्यास काडकाड असा आवाज झाल्यास ऊस कापणीसाठी तयार झाला असे समजण्यात येते. जिल्ह्यात सन २००८-०९ मध्ये ऊसाखाली पेरणी झालेले प्रत्यक्ष क्षेत्र ५,४०० हेक्टर इतके आहे. जिल्ह्यातील ऊसाखालील क्षेत्र, उत्पादन व दर हेक्टरी उत्पादन पुढीलप्रमाणे.

| वर्ष | क्षेत्र ('००' हेक्टरमध्ये) | उत्पादन ('००' मे. टनामध्ये) | दर हेक्टरी उत्पन्न (कि.ग्रॅ./हेक्टर) |
|---|---|---|---|
| १९८०-८१ | ४५ | ३,५२४ | ७८,३११ |
| १९९०-९१ | १३० | ९,६२३ | ७४,०२३ |
| १९९५-९६ | १५० | ९,००९ | ६०,०६० |
| २०००-०१ | १४७ | ९,५३६ | ६४,८७१ |
| २००४-०५ | ९६ | ४,७१७ | ४,९००[४९] |

**कापूस :** सन १९०१ मध्ये एकूण लागवडीपैकी २७.२% क्षेत्र कापसाच्या पिकाखाली असून त्यांचे प्रमाण १,१६२.९१ चौ.कि.मी (४४९ चौ.मैल) इतके होते. तर सन १९६१-६२ मध्ये कापसाच्या पिकाखाली १,८७,८१८.८१९ हेक्टर (४,६४,१०० एकर) इतके क्षेत्र होते.

कापसाचे पीक मुख्यतः खरीप हंगामात घेतले जाते. भुईमूग नंतर कापुस पेरणे लाभदायक ठरते. त्यासाठी जमीन लागवडीयोग्य करण्यासाठी मगदुरानुसार नांगरणी व वखरणी करून दर हेक्टरी ३५ ते ४० बैलगाड्या शेणखत किंवा कंपोस्ट खत जमिनीत मिसळण्यात येते. काही ठिकाणी पेरणीपूर्वी जमिनीत भुईमूगाची पेंड मिसळतात. कापसाचे पीक काळ्या कसदार मृदेत साधारण ५०८.० मि.मी. आणि ७६२.० मि.मी. (२० आणि ३० इंच) इतके पर्जन्यमान असलेल्या भागात कापसाचे पीक उत्तम येते. जूनच्या शेवटच्या आठवड्यात किंवा जुलैच्या पहिल्या आठवड्यात तिफणीने पेरणी करण्यात येते. प्रति हेक्टर जवळजवळ १६ ते १८ कि.ग्रॅ बियाणे पेरले जाते. बी ४५७.२ मि.मी. खोल पेरले जाते. किड व रोगापासून संरक्षणासाठी बियाण्यास पेरणीपूर्वी शेण, माती व काही रसायणे लावतात. रासायनिक खते पेरणीनंतर देण्यात येतात. पेरणीनंतर अदमासे चार आठवड्यानंतर विरळणी करून रोपांमध्ये २५ सें.मी. अंतर ठेवण्यात येते. त्यानंतर आवश्यकतेप्रमाणे दोन-तीन वेळा कोळपणी व निंदणी करतात. कापसाची वेचणी ऑक्टोबरच्या शेवटच्या आठवड्यापासून सुरू होऊन डिसेंबरपर्यंत चालू असते.

जिल्ह्यात गावरानी पीक मोठ्या प्रमाणावर घेतले जात होते. नंतरच्या काळात जी-६, जी-४६, बुरी, बी-१४७, १७०-को-२ यासारख्या सुधारित जातीदेखील वापरण्यास सुरुवात झाली आहे. कापूस संशोधन केंद्र नांदेड येथे गावरानी - ४६ या जातीपासून अधिक उत्पन्न तसेच कापसाची लांबी वाढविणे

४९. कृषि सांख्यिकी विषयक माहिती, पूर्वोक्त, पृ. ८८, ११०, १३२.

याबाबत प्रयत्न केले जात आहे. अधिक माहितीसाठी याच प्रकरणातील कापूस संशोधन केंद्र, नांदेड पहावे.

**कापूस उत्पादन वाढीची सुत्रे**[५०]

(१) वेळेवर पेरणी करणे.

(२) शिफारशीप्रमाणे बीटी लांब धाग्याच्या वाणाची लागवड.

(३) शिफारशीप्रमाणे दोन रोपातील अंतर.

(४) जिवाणू संवर्धनाची बिज प्रक्रिया.

(५) पेरणीच्या वेळी रासायनिक खताचा वापर.

(६) माती परीक्षणानुसार एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन

(७) एकात्मिक किड व्यवस्थापनाचा अवलंब.

(८) सुक्ष्म सिंचनाचा अवलंब व एकसरी आड पद्धतीने पाणी देणे.

(९) हलक्या जमिनीवरील क्षेत्र कमी करणे.

(१०) सेंद्रिय शेतीचा प्रचार करणे.

जिल्ह्यात सन २००८-०९ मध्ये कापसाच्या पिकाखाली प्रत्यक्ष पेरणी झालेले क्षेत्र २,६६,९०० हेक्टर इतके आहे. जिल्ह्यातील कापसाचे क्षेत्र, उत्पादन व दर हेक्टरी उत्पादन पुढीलप्रमाणे.

| वर्ष | क्षेत्र ('००' हेक्टरमध्ये) | उत्पादन ('००' गाठीमध्ये) | दर हेक्टरी उत्पादन (कि.ग्रॅ./हेक्टर) |
|---|---|---|---|
| १९८०-८१ | २,०४२ | ९५१ | ७९ |
| १९९०-९१ | २,३४९ | १,२३९ | ९० |
| १९९५-९६ | २,७४७ | १,८३९ | ११४ |
| २०००-०१ | २,७०० | ८३४ | ५३ |
| २००४-०५ | २,३३२ | १,९४९ | १४२[५१] |

[टीप— कपाशीचे उत्पादन '००' गाठीत असून एक गाठ १७० किलोची आहे.]

जिल्ह्यात कापसाचे पिकावर करपा, कवडी, पानावरील ठिपके व मूळ कुजव्या हे रोग पडतात. त्यांची माहिती खाली दिली आहे.

---

५०. जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, नांदेड यांनी पाठविलेल्या नांदेड जिल्ह्यातील कृषि विभाग, एक दृष्टीक्षेप यावर आधारीत.

५१. कृषि सांख्यिकीविषयक माहिती, पूर्वोक्त, पृ. ८९, १११, १३३.

**करपा किंवा भुज्या काळ्या पडणे :** हा रोग स्थानिक व सुधारित बियाण्यांच्या पिकावर पडू शकतो. रोग उद्‌भवल्यास पानाच्या खालच्या बाजूस शिरांशेजारी हिरवे ठिपके पडतात. नंतर हे ठिपके तांबूस होऊन काळसर होतात. रोपांचे खोड, फांद्या व शिरांवर सुरुवातीस तेलकट ठिपके पडतात. पुढे ते काळसर होतात. रोगप्रसार मुख्यत्वे रोगट बियाणे, शेतीतील रोगट रोपांचे अवशेष यामुळे होतो. उपाययोजना म्हणून पेरणीपूर्वी बियाण्यास एक टक्का पारायुक्त रसायन चोळतात. रोग प्रकट होताच कॉपर ऑक्सीक्लोराईड हे बुरशीनाशक पाण्यात मिसळून फवारतात.

**कवडी :** हा रोगदेखील करपा रोगाप्रमाणे स्थानिक व संकरीत प्रकारच्या कापसावर पडतो. प्रारंभी रोपावर गोलाकार तांबूस ठिपके पडतात. तसेच कोवळ्या देठावर व्रण अथवा चट्टे पडतात. त्यामुळे रोपे वाळून नष्ट होऊ शकते. दुसऱ्या अवस्थेत हा रोग कपाशीच्या बोंडावर दिसून येतो. बोंडावर व पानावर तेलकट तपकिरी रंगाचे चट्टे पडतात. त्यामुळे बोंडातील कापसाच्या कवड्या बनतात व बोंड फुलत नाही. प्रतिबंधक उपाय म्हणून गतसालच्या पिकाचा पालापाचोळा नष्ट करणे आवश्यक असते. पेरणीपूर्वी एक किलोग्रॅम बियाण्यास सात ग्रॅम या प्रमाणात २ टक्के पारायुक्त औषध चोळतात. रोगांची लक्षणे दिसताच पिकावर किटकनाशक रसायनांची फवारणी करतात.

**पानावरील ठिपके :** हा रोग बुरशीजन्य असून त्याचा प्रादुर्भाव प्रामुख्याने सुधारित अमेरिकन जातीच्या कापसावर होतो. प्रारंभी पानावर तपकिरी रंगाचे गोल ठिपके पडतात. नंतर पाने वाळून गळून पडतात. रोगपिडीत रोपांना नवीन पाने व बोंडे फुटत नाहीत. बोंड आल्यावर रोगाच्या प्रादुर्भाव झाल्यास कापसाचा दर्जा खालावतो. यावर उपाय म्हणून रोग दिसताच प्रभावी बुरशीनाशक रसायने दर हेक्टरी ५०० लिटर पाण्यात १२०० ग्रॅम या प्रमाणात मिसळून फवारतात.

**मूळ कुजव्या :** हा रोग जमिनीतील बुरशीमुळे होतो. हा भयंकर पीक संहारक रोग असून सर्व प्रकारच्या कापसाच्या जाती ह्यास बळी पडतात. त्यामुळे रोपांची मुळे कुजतात व साल चटकन निघते. मुळांचा व खोडाचा भाग तपकिरी किंवा काळा होतो व त्यावर जंतूच्या बारीक गाठी दिसतात. यामुळे रोप कोरडे होण्याची प्रक्रिया सुरू होते. प्रतिबंधक उपाय म्हणून पेरणीपूर्वी बियाण्यास एक टक्का पारायुक्त बुरशीनाशक औषध चोळतात. पिकास योग्य वेळी पाणी देतात व पाण्याचा योग्य निचरा करतात. यामुळे रोगाचा प्रादुर्भाव कमी होतो. रोगप्रसाराची चिन्हे दिसताच ५० टक्के कॉपर ऑक्सीक्लोराईड पाण्यात मिसळून त्याचे द्रावण रोगट रोपांच्या खोडाजवळ टाकतात.

Maharashtra State Gazetteers

## फलोत्पादन

जिल्ह्याचे एकूण क्षेत्र १०.३३ लाख हेक्टर असून फळबागा खालील क्षेत्र ६३,१९६ हेक्टर आहे. यामध्ये प्रामुख्याने केळी, मोसंबी, संत्रा, चिकू, पेरू इत्यादी फळपिकांचा समावेश आहे. केळी हे द्विवार्षिक पीक असून त्याखालील क्षेत्र १२,१२० हेक्टर असून प्रामुख्याने नांदेड, अर्धापूर, मुदखेड या तालुक्यात दिसून येते. इतर तालुक्यात नव्याने लागवडीस सुरुवात होत आहे.

परंपरागत फळात आंबा पिकांचा समावेश असून जिल्ह्यात सर्वदूर दिसून येते. पूर्वी झाडाची लागवड बांधावरच दिसून येत असे परंतु आता रोजगार हमी योजना फळबाग अंतर्गत बागाच्या स्वरूपात लागवड होत आहे. यात प्रामुख्याने केशर आंबा लागवड असून यासोबत मल्लिका व इतर जातीची लागवड होत आहे. बागायती फळ पिकांमध्ये मोसंबी, संत्रा, चिकू, पेरू , लिंबू इत्यादी

तर कोरडवाहू चिंच, आवळा, जांभुळ इत्यादी पिकांची लागवड होत आहे. फळबाग लागवड ही जवळपास सर्व गावात होताना दिसून येते.

रोजगार हमी योजना लागवडी खालील वर्ष निहाय व पिकनिहाय सर्व पिकांचे क्षेत्र ६३,१९६ हेक्टर आहे. सद्यस्थितीत जिल्ह्यात शासकीय ४ व खाजगी ६५ रोपवाटिका आहेत. रोपे/कलमा अनुदानाव्यतिरिक्त नगदीने शेतकरी लागवड करताना दिसून येतात.

अपारंपरिक फळपिकांमध्ये औषधी वनस्पतीचे प्रकल्प आधारित लागवड करण्यासाठी पुढे येत आहेत. पुष्पविकास, उती संबंधित केळी, मसाला पिके इत्यादीची लागवड शेतकरी करीत आहेत. जिल्ह्यात पुष्पोत्पादनात चांगली वाढ होत आहे. जिल्ह्यात पुष्पोत्पादन पिकाखालील सरासरी क्षेत्र ५५२ हेक्टर व त्यापासून १,७१० मे.टन उत्पादन मिळत आहे.

जिल्ह्यात भाजीपालाही मोठ्या प्रमाणात पिकविला जात असून त्याखाली सरासरी ११,६२३ हेक्टर क्षेत्र असून त्यापासून ७८,२९८ मे.टन उत्पादन मिळत आहे. मोसंबी, आंबा (विशेषतः केशर), केळी या फळांची देशांतर्गत मोठ्या प्रमाणात निर्यात होते. तर जरबेरा, मोगरा, गुलाब, मोठ्या प्रमाणात उत्पादन होत असले तरी जरबेरा हा नांदेड, अर्धापूर, मुखेड तालुक्यात मोठ्या प्रमाणात होतो.

**राष्ट्रीय फलोत्पादन अभियान :** राष्ट्रीय फलोत्पादन अभियान ही योजना नांदेड जिल्ह्यामध्ये सन २००५-०६ पासून राबविण्यात येत आहे. सन २००५-०६ मध्ये जिल्ह्यात ४१९.९९ लाखाचा कार्यक्रम राबविण्यात आला होता. सन २००६-०७ साली ७३३.७३ लक्ष रकमेचा कार्यक्रम मंजूर करण्यात आला आहे. या अंतर्गत आदर्श रोपवाटिका, पॅकहाऊस, हरीतगृह, शेडनेट व शेडनेट हाऊस, प्रक्रिया उद्योग शीतगृह इत्यादी बाबींची अंमलबजावणी होत आहे. जिल्ह्यात २००८-०९ वर्षापासून हरीतगृह उभारण्यास सुरुवात झाली असून २५ हरीतगृहाची उभारणी झाली असून त्यात प्रामुख्याने जरबेरा फुलांचे उत्पादन घेतले जात आहे व फुले मुंबई, दिल्ली, नागपूर व हैद्राबाद येथे पाठविली जात आहे.

जिल्ह्यातील सन २००६-०७ मधील फळे व भाजीपाला पिके पुढीलप्रमाणे[५२].

| अ.क्र. | पीक | क्षेत्र | उत्पादन | दर हेक्टरी उत्पादन |
|---|---|---|---|---|
| १ | आंबा | ७,८१२ | ३९,०६० | ५ मे.टन/हे. |
| २ | मोसंबी | १०,४५२ | १,२५,४२४ | १२ मे.टन/हे. |
| ३ | पेरू | ५५३ | २,३७,५०० | २५ मे.टन/हे. |
| ४ | केळी | ९,५०० | ११,२२० | ६ मे.टन/हे. |
| | **भाजीपाला** | | | |
| १ | टोमॅटो | २,२५५ | १६,९१३ | ७.५ मे.टन/हे. |
| २ | वांगी | २,००५ | १६,०४० | ८ मे.टन/हे. |
| ३ | फुलकोबी | १,१०२ | ५,८५० | ४.५ मे.टन/हे. |
| ४ | कोबी | ८७० | ७,०४७ | ८.५ मे.टन/हे. |

५२. जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, नांदेड यांनी पाठविलेल्या नांदेड जिल्ह्यातील कृषि विभाग, एक दृष्टीक्षेप यावर आधारीत.

## खते

खतांचे प्रामुख्याने दोन प्रकार पाडता येतील (१) सेंद्रिय खते, (२) रासायनिक खते. आपल्या देशातील शेतकऱ्यांना फार प्राचीन काळापासून सेंद्रिय खताच्या वापराचे ज्ञान अवगत होते. रासायनिक खते वापरण्याची पद्धत प्रामुख्याने स्वातंत्र्यानंतरच प्रचलित झाली. सेंद्रिय खतांना नैसर्गिक खते किंवा भरखते असेही म्हणतात. सेंद्रिय खतामध्ये प्रामुख्याने गवत पालापाचोळ्यापासून तयार केलेले कंपोस्ट खत, शेणखत, सोनखत, हिरवळीपासून तयार केलेले खत यांचा समावेश होतो. पारंपारिक पद्धतीने तयार केलेल्या शेणखतात अर्धा टक्के नत्र असते. जनावरांचे मलमुत्र व शेतातील पालापाचोळ्यापासून सुधारित पद्धतीने कंपोस्ट खत तयार केल्यास त्यापासून एक टक्का नत्र, एक टक्का स्फूरद व १.०५ टक्के पालाश आणि झाडांच्या वाढीस सुक्ष्म प्रमाणात आवश्यक असलेली बहुतेक सर्व पोषक द्रव्ये मिळू शकतात.परंपरेने शेणखत हेच मुख्य सेंद्रिय खत होय. त्यात सुपिकता वाढविणाऱ्या द्रव्यांचे सर्वाधिक प्रमाण असते. सेंद्रिय खतांमध्ये खालीलप्रमाणे घटकद्रव्ये असतात.

| अ.क्र. | खतप्रकार | कोरड्या हवेतील शेकडा प्रमाण | | |
|---|---|---|---|---|
| | | नत्र | स्फुरद | पालाश |
| १ | जनावरांचे शेण | १.०६-१.९७ | ०.४०-१.२६ | १.२३-१.८७ |
| २ | मेंढ्यांच्या लेंड्या | १.१५-१.३६ | ०.४४-१.२९ | ०.५८-१.०१ |
| ३ | घोड्याची लीद | ०.७३-१.४६ | ०.७४-०.८४ | ०.५८-१.९९ |
| ४ | जनावरांचे मूत्र | १.००-१.१४ | किंचित | ०.१८-०.२४ |
| ५ | मेंढ्यांचे मूत्र | ०.६९-१.६७ | किंचित | ०.२९-१.०३ |
| ६ | तळ्यातील गाळ | ०.६७ | ७.३१ | — |
| ७ | मासळी खत | ५.९५ | ५.२० | १.३६ |
| ८ | हाडांचे खत | ३.८८ | २१.५६ | — |

सेंद्रिय खतामधील पीक उत्पादनाचे गुणधर्म सुमारे चार वर्षांपर्यंत टिकून राहतात. एका जनावरापासून प्रतिवर्षी अंदाजे पावणे दोन ते दोन टन शेणखत मिळू शकते.

नांदेड जिल्ह्यात पशुगणना २००३ च्या पशुगणनेनुसार जिल्ह्यात ९,७३,२२५ इतके पशुधन असून त्यापासून मोठ्या प्रमाणात शेणखत उपलब्ध होऊ शकते. परंतु बऱ्याचशा शेणाचा वापर इंधनासाठी केला जात असल्यामुळे बरेच शेणखत वाया जाते. यावर उपाय म्हणून शासनाने निरनिराळ्या योजना आखल्या आहेत.

**राष्ट्रीय बायोगॅस व खत व्यवस्थापन कार्यक्रम :** पारंपारिक उर्जा साधने जसे पेट्रोल, केरोसीन, कोळसा, नैसर्गिक वायू व लाकडी इंधन ही काळाच्या ओघात संपणारी उर्जा साधने आहेत. त्यांच्या वापरावरील भार कमी करण्यासाठी, ग्रामीण भागातील स्त्रियांचे जीवनमान सुधारण्यासाठी,

सर्वसाधारण स्वच्छता तसेच पर्यावरण संतुलनासाठी सन १९८२-८३ पासून शासनाने राष्ट्रीय बायोगॅस विकास कार्यक्रम ही योजना कार्यान्वित केली आहे.

ही योजना १००% केंद्र पुरस्कृत असून ती राज्य सरकारमार्फत तसेच खादी व ग्रामोद्योग आयोगामार्फत राबविली जाते. नांदेड जिल्ह्यात सन २००३-०४ मध्ये बायोगॅस विकासाद्वारे लक्ष २५० होते ते त्याच वर्षी पूर्ण करण्यात आले.[५३]

**रासायनिक खते :** जिल्ह्यात वर्ष २००४-०५ या वर्षी जिल्हा परिषद व स्थानिक संस्थामार्फत एकूण खतवाटप २,४१,७९८ मे.टन करण्यात आले आहे. संकरीत व सुधारित बियाण्यांच्या वापराबरोबरच सेंद्रिय व रासायनिक खतांच्या वापरांच्या प्रमाणात वाढ होताना दिसते. खरीप व रब्बी हंगामासाठी लागणाऱ्या निरनिराळ्या खतांचा पुरवठा महाराष्ट्र कृषि औद्योगिक विकास महामंडळ जिल्हा पणन महासंघ यांच्यामार्फत केला जातो. त्याचे वितरण जिल्हा तालुका खरेदी विक्री संघ व निवडक सहकारी संस्थामार्फत करण्यात येतो. सन २००६-०७ च्या खरीप हंगामात वाटप करण्यात आलेल्या खतांचा तपशील तक्ता क्र. ३ मध्ये देण्यात आला आहे.

## जलसिंचन

**प्रास्ताविक :** भारतासारख्या मोसमी पावसावर अवलंबून असलेल्या कृषि प्रधान देशात सिंचनाला अत्यंत महत्त्व आहे. शेतीला पाणी पुरवठ्याची सोय करणाऱ्या विविध योजना अगदी प्राचीन काळापासून कार्यान्वित असल्याचे दिसून येते. प्राचीन काळात मेघातिथी पाराशर यांनी लिहिलेला ग्रंथ ' कृषि पाराशर ' या नावाने प्रसिद्ध आहे. त्यात सिंचनव्यवस्थेसंबंधी विशेष चर्चा आलेली आहे. त्यांनीच रहाटगाडग्याची कल्पना मांडली आहे. रहाटगाडग्याची आणि विहिरींची कल्पना ही मुळची भारतीय असून अनादी कालापासून महाराष्ट्रात देखील अशा रहाटगाडग्याचा वापर केला जात आहे. धरणासाठी पालीबंधन हा शब्द प्रयोग त्यांनीच रूढ केला. ' विष्णूधर्मोत्तर ' पुराणामध्ये धरण व नदीप्रवाह म्हणजे पाट याचाही विचार केला आहे. धरण हे अनियमित पाटप्रवाहापेक्षा अधिक उपयुक्त असल्याचे प्रतिपादन केले आहे. याचाच आधार घेऊन हेमाद्रि पंडिताने सिंचनाचा विशेष तपशील आपल्या ' दानखंड ' या उपग्रंथामध्ये दिला आहे. एकंदरीत प्राचीन कालखंडामध्ये लहरी पावसावर अवलंबून राहण्यापेक्षा खात्रीच्या अशा सिंचनाच्या प्रयोजनाने राज्य समृद्ध होते हे तत्त्व स्वीकारल्याचे दिसते.

मध्ययुगीन कालखंडात ' कंधार वराधीश्वर ' या बिरूदाने ओळखल्या जाणाऱ्या राष्ट्रकूट घराण्यातील तिसरा कृष्णराज याच्या काळातील कालमेघ नावाच्या अधिकाऱ्याने कोरलेल्या एका शिलालेखात कंधार नगरातील ' जगतुंग ' नावाचे सरोवर आणि या नगरातील जलसिंचन व्यवस्थेचे विस्तृत वर्णन आले आहे. त्यामध्ये परिसरात एकूण पाच प्रपा (जलकेंद्राची) निर्मिती केल्याचा उल्लेख

---

५३. कार्यक्रम अंदाजपत्रक २००६-०७, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, पृ. ५५, ५७.

आहे. सोळा शतकानंतरसुद्धा ' जगतुंग सरोवर ' कंधार या सध्याच्या तालुक्याच्या गावाजवळ पिण्याचे पाणी व सिंचनाचें पाणी उपलब्ध करून देत आहे. मातीचा भराव व प्राचीन काळातील तीन कोरीव दगडी विमोचके तेथे अजून भक्कमपणाने उभी आहेत. त्यामुळे कंधार शहराला सिंचनासाठी पाण्याचा तुटवडा जाणवत नाही. उपयोगासाठी प्राचीन काळी निर्माण केलेल्या व्यवस्थेचे ते एक प्रतीक ठरले आहे.

राज्यात सन १८६७ नंतर इंग्रज सरकारने स्वतंत्र पाटबंधारे विभाग स्थापन करून बांधकाम संघटना तयार केली. १८६९ मध्ये १० वर्षासाठी सर्वकष सिंचन विकास नियोजन तयार केले. त्यात १५० दशलक्ष डॉलर्स खर्चाची योजना तयार करण्यात आली. पुढील १० वर्षात या योजनेवर ५२.८५ दशलक्ष डॉलर्स खर्च करण्यात आला. या नवीन पद्धतीत शासनाने हाती घेतलेली प्रकल्पाची कामे व त्यातील भांडवली गुंतवणूक ही समाधानकारक व उपयुक्त वाटल्याने त्यापुढील सिंचनाचे प्रकल्प शासकीय खर्चाने राबविण्यात आले. सध्याच्या शासकीय यंत्रणेचा व कार्यपद्धतीचा उगम येथून झाला असे म्हणावे लागेल.[५४]

ब्रिटिश आमदनीत २० व्या शतकाच्या १ ल्या दशकात नांदेड जिल्ह्यात विहिरी ह्या जलसिंचनाच्या मुख्य स्त्रोत असून त्यांची संख्या ५,७६४ इतकी, तर लहान मोठी अशी एकूण १६९ तळी होती. तसेच कालवे व ओढे यासारखे १६३ स्त्रोत जलसिंचनासाठी वापरात होते. त्याखाली एकूण ४६ चौ. मैल इतके सिंचित क्षेत्र होते.[५५]

जिल्ह्यातील शेती ही पावसावर अवलंबून असली तरी जिल्ह्यात काही जुने तलाव व विहिरी ही जलसिंचनाची साधने होती. एकूण पाटबंधाऱ्याखालील निव्वळ क्षेत्रापैकी विहिरीच्या पाण्याने भिजणारे क्षेत्र १९५९-६० मध्ये ८९.८९ टक्के व उरलेल्या १०.११ क्षेत्रास तलावाच्या पाण्याचा पुरवठा होत होता. १९५९-६० साली जिल्ह्यातील पाटबंधाऱ्याखालील क्षेत्राचे प्रमाण (१.३० टक्के) होते. राज्याच्या सरासरी पेक्षा (६.२३ टक्के) बरेच कमी होते. १९५९-६० मधील पाटबंधाऱ्याखालील निव्वळ क्षेत्र १९५०-५१ मधील पाटबंधाऱ्याखालील भिजणाऱ्या क्षेत्रापेक्षा ४,२०० एकरांनी अधिक होते. पाटबंधाऱ्याखालील एकूण क्षेत्राचे पिकाखालील एकूण क्षेत्राशी प्रमाण १९५९-६० साली नांदेड आणि बिलोली तालुक्यात (प्रत्येकी २.४६ टक्के) सर्वात जास्त होते. कंधार तालुक्यात (१.९८ टक्के) आणि भोकर महालात (०.६५ टक्के) पाटबंधाऱ्याखालील क्षेत्राचे प्रमाण काही अंशी उल्लेखनीय होते. इतर सर्व तालुक्यामध्ये पाटबंधाऱ्याखाली भिजणाऱ्या क्षेत्राचे प्रमाण अतिशय कमी होते. यावरून जिल्ह्यात पावसाळ्या व्यतिरिक्त जलसिंचनासाठी विहिरी व तलाव हे जलसिंचनाचे मुख्य स्त्रोत होते. शासनाकडून ह्या विहिरी व तलावांची वेळोवेळी दुरूस्ती करण्यात आली होती. दुसऱ्या पंचवार्षिक योजनाकाळात २८ तलावाचे काम पूर्ण करण्यात आले. तिसऱ्या पंचवार्षिक योजनाकाळात २२ तलावांच्या दुरूस्तीचे काम प्रगतीपथावर सुरू होते. या कामी एकूण रु. १,१३,९२६ इतका खर्च

---

५४. **महाराष्ट्र जल व सिंचन आयोग अहवाल, खंड १,** महाराष्ट्र शासन, जून-१९९९, पृ. २१, २२, ३० ते ३४.

५५. **इम्पिरियल गॅझेटिअर ऑफ इंडिया, प्रोव्हिन्शियल सिरीज, हैद्राबाद स्टेट,** कलकत्ता, १९०९, पृ. २२६.

करण्यात आला. ह्या ५० तलावांच्या क्षेत्रात १४११.५४५ हेक्टर (३,४८८ एकर) इतकी जमीन असून एकूण सिंचित क्षेत्र ५७८.७०१ हेक्टर (१,४३० एकर) इतके होते.[५६]

सन १९५८ साली स्वतंत्र पाटबंधारे विभागाची निर्मिती करण्यात आली. इ.स. १९६० मध्ये महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यानंतर तात्कालिन पाटबंधारे खात्याचे मंत्री व अर्थतज्ज्ञ स. गो. बर्वे यांच्या अध्यक्षतेखाली भविष्यकालीन सिंचनाची दिशा व धोरण आखण्यासाठी महाराष्ट्र सिंचन आयोग नेमण्यात आला. या आयोगाच्या निर्मितीनंतर राज्यातील सिंचन प्रकल्प निर्मितीला चांगली गती आली.[५७]

**नांदेड पाटबंधारे मंडळ :** नांदेड पाटबंधारे मंडळांतर्गत नांदेड जिल्ह्यात पूर्ण झालेले एकूण प्रकल्प ८५ आहेत. त्यात १ मोठा, ८ मध्यम आणि ७६ लघु प्रकल्पांचा समावेश आहे. उर्ध्व पैनगंगा, विष्णुपूरी प्रकल्प, लेंडी प्रधान प्रकल्प असे ३ मोठे तर उर्ध्व मानार, बाभळी उपसा सिंचन योजना तसेच २२ लघुपाटबंधारे प्रकल्पाची कामे प्रगतीपथावर आहेत. ऑक्टोबर ९८ पासून पाटबंधारे प्रकल्पाची कामे गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांचेकडे वर्ग करण्यात आली आहेत. पाटबंधारे प्रकल्पाचे बांधकामाबरोबर पूर्ण झालेल्या प्रकल्पाचे व्यवस्थापन, नवीन पाटबंधारे योजनांचे सर्व्हेक्षण इत्यादी कामे करण्यात येत आहेत. महामंडळाच्या धोरणानुसार सर्वसाधारणपणे मोठे प्रकल्प ७ वर्षात, मध्यम प्रकल्प ५ वर्षात तर लघु प्रकल्प ३ वर्षात पूर्ण करण्याचे नियोजन आहे. गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ यांच्या माध्यमातून नियोजन केल्याप्रमाणे प्रकल्पाची कामे निधीच्या उपलब्धतेनुसार पूर्ण करण्याबाबत यंत्रणा प्रयत्नशील आहे.

मंडळांतर्गत एकूण २२ योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत. त्यापैकी ८ योजनांचे प्रत्यक्ष बांधकाम पूर्ण पण अतिरिक्त कामे शिल्लक आहेत. लघु पाटबंधारे योजना करीता नाबार्ड मध्ये अनुदान उपलब्ध होत आहे.[५८]

**नांदेड जिल्ह्याच्या सिंचनाचा बृहत आराखडा**

| अ.क्र. | प्रकल्प | संख्या | प्रकल्पिय सिंचन क्षेत्र (हेक्टर) | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | मोठे | ०५ | १,५९,६७६ | प्रकल्पिय सिंचन क्षेत्र |
| २ | मध्यम | १० | २५,९१९ | लागवडी लायक क्षेत्राच्या |
| ३ | लघुपाटबंधारे (राज्यस्तर) | ३२८ | १,९६,९१० | ५० टक्के आहे. |
| ४ | लघुपाटबंधारे (स्थानिकस्तर) | ५८० | ३७,२८५ | |
| ५ | को. प. बंधारे (राज्यस्तर) | १४ | ५,१०८ | |
| ६ | को. प. बंधारे (स्थानिकस्तर) | २५१ | १४,५०० | |
| | एकूण | १,१८८ | ४,३४,९९८ | |

५६. **जिल्हा जनगणना निर्देश ग्रंथ, १९६१ नांदेड जिल्हा** पृ. ३३.

५७. **महाराष्ट्र जल व सिंचन आयोग अहवाल, खंड-१,** पूर्वोक्त, पृ. ३४.

५८. अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड यांनी पाठविलेल्या माहितीवर आधारीत.

Maharashtra State Gazetteers

**केदारनाथ तलाव :** हदगांव तालुक्यातील पिंगली गावी तामसा नदीचा उपप्रवाह असलेल्या नाल्यावर केदारनाथ नावाचे मातीचे धरण बांधण्यात आले. या धरणामुळे हदगांव तालुक्यातील ११ गावांना जलसिंचनाच्या सुविधा उपलब्ध झाल्या. या प्रकल्पाचा सुधारित अंदाजे खर्च रु. २५.५२ लाख पर्यंत होता. प्रकल्पाचे मुख्य काम १९६१ पर्यंत पूर्ण करण्यात आले. तर जलसिंचन वाहिन्यांचे काम १९६३ पर्यंत पूर्ण झाले. या तलाव सिंचनाखाली एकूण २,२९३.३५६ हेक्टर (५,६६७ एकर) क्षेत्र होते. तर निर्धारीत सिंचन क्षेत्र १,८०८.९४६ हेक्टर (४,४७० एकर) इतके होते. ह्या धरणाची लांबी १,०५०.०३६ मीटर (३,४४५ फूट) इतकी तर धरणाच्या उर्ध्व भागाची रूंदी ३.०४८ मीटर (१० फूट) तसेच त्याची उंची १७.०६९ मीटर (५६ फूट) आहे. धरणाच्या भिंतीची (बंधारा) एफ. ओ. एफ. लांबी १८८.९७६ मीटर (६२० फूट) तर भिंतीच्या उर्ध्व भागाची रूंदी ०.९१४ मीटर (३ फूट), मुख्य पाझर १.६७६ मीटर (५.५ फूट) इतका आहे, कालव्याची एकूण लांबी ११.२६५ कि.मी. (७ मैल) असून जलसाठ्याची क्षमता २६०.७३ (m.cft) दशलक्ष घनफूट इतकी आहे. या प्रकल्पाखाली खरीप पिकाचे ५१३.९५१ हेक्टर (१,२७० एकर) तर रब्बी पिकाखाली १,२९४.९९५ हेक्टर (३,२०० एकर) सिंचित क्षेत्र होते.

**किनी तलाव :** भोकर तालुक्यात किनी गावाजवळ मातीचे धरण बांधून हा प्रकल्प उभारण्यात आला असून भोकर तालुक्यातील १) किनी २) दिवशी ३) महेगांव ४) म्हाळसापूर ५) पलज या ५ गावांना या प्रकल्पापासून जलसिंचनाच्या सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. प्रकल्पाचा एकूण अंदाजित खर्च रु. १२.१२ लाख होता. प्रकल्पाचे मुख्य काम १९६४ पर्यंत पूर्ण करण्यात आले. या प्रकल्पाचे निर्धारीत सिंचित क्षेत्र ६८७.९६६ हेक्टर (१७०० एकर) होते. धरणाची एकूण लांबी ८४४.२९६ मीटर (२,७७० फूट) तर धरणाच्या उर्ध्व भागाची रूंदी ३.६५८ मीटर (१२ फूट), धरणाची उंची ७१.२७८ मीटर, धरणाच्या भिंतीची (बंधारा) लांबी ११५.८२४ मीटर (३८० फूट), भिंतीची रूंदी १.२१९ मीटर (४ फूट) असून धरणाच्या कालव्याची लांबी ८.०४७ कि.मी. (५ मैल) तर मुख्य पाझर १.२१९ मीटर (४ फूट) आहे. धरणाच्या जलसाठ्याची क्षमता ७०.५४ (m.cft) दशलक्ष घनफूट इतकी आहे. किनी प्रकल्पाखाली खरीप पिकाचे ३३३.८६६ हेक्टर (८२५ एकर), तर रब्बी पिकाखाली ३५४.१०० हेक्टर (८७५ एकर) इतके सिंचित क्षेत्र होते.

**गोरटा तलाव :** भोकर तालुक्यात गोरटा गावाच्या विरूद्ध दिशेला ३.२१९ कि.मी. (२ मैल) अंतरावर गोरटा नावाचे मातीचे धरण बांधण्यात आले. या प्रकल्पाचे मुख्य काम नोव्हेंबर १९६२ मध्ये करून १९६४ अखेरपर्यंत पूर्ण करण्यात आले. प्रकल्पाचा एकूण अंदाजित खर्च रुपये ९.०९ लाख होता. या प्रकल्पाखाली खरीप पिकाचे २६३.०४६ हेक्टर (६५० एकर) आणि रब्बी पिकाखाली तेवढेच म्हणजे २६३.०४६ हेक्टर (६५० एकर) इतके सिंचित क्षेत्र होते.

गोरटा तलावाच्या धरणाची लांबी ५०८.१०२ मीटर (१६६७ फूट) धरणाच्या उर्ध्व भागाची रूंदी ३.६५८ मीटर (१२ फूट) व उंची १२.८०२ मीटर (४२ फूट) धरणाची भिंत (बंधारा) ही विभागीय पुंडी प्रकारची असून ती १२१.९२० मी (४०० फूट) लांब आहे. धरणाच्या कालव्याची लांबी ११.२६५ कि.मी. (७ मैल) आणि धरणाच्या जलसाठ्याची क्षमता ५२.३५ दशलक्ष घनफूट, तसेच धरणाच्या

भिंतीवर १.२१९ मीटर (४ फूट) पूरनियंत्रक उद्वाहक जलद्वार (flood lift) बसविण्यात आले आहे. या तीन तलावाव्यतिरिक्त सेंबोली, मुखेड आणि आमठाणा या तलावांचे काम तिसऱ्या पंचवार्षिक योजना काळात घेण्यात आले होते.[५९]

**मोठे प्रकल्प**

**मानार प्रकल्प :** दहा हजार हेक्टरपेक्षा जास्त लाभक्षेत्र असलेल्या प्रकल्पांना मोठे प्रकल्प म्हणतात. दुसऱ्या पंचवार्षिक योजना काळात नांदेडपासून ५१.४९९ कि.मी. (३२ मैल) वर कंधार तालुक्यात वरवंट गावाजवळ मानार प्रकल्प या नावाच्या मातीच्या धरणाचे काम सुरू करण्यात आले होते. त्यासाठी नांदेड-लातूर रस्त्यावर सोनखेड गावापासून वरवंट गावापर्यंत येण्याचा २५.७५० कि.मी. (१६ मैल) लांबीचा रस्ता तयार करण्यात आला होता. ह्या प्रकल्पाचे एकूण लाभक्षेत्र १,५८४.९८ चौ.कि.मी. (६१२ चौ. मैल) इतके तर धरणाची उंची २६,२८८ मीटर व लांबी १,८५९.२८० मीटर इतकी आहे. हा प्रकल्प दोन टप्प्यात पूर्ण करण्यात आला.

धरणाच्या डाव्या कालव्याची एकूण लांबी ७२.४२० कि.मी. (४५ मैल) असून धरणाच्या जलसाठ्याची क्षमता ५५० क्युसेक होती. धरणाच्या उजव्या कालव्याची एकूण लांबी १९.३१२ कि.मी. (१२ मैल) असून त्याच्या जलसाठ्याची क्षमता ४२ क्युसेक होती. उजव्या काठावर धरणाची भिंत (बंधारा) असून त्याची लांबी ७३१.५२० मीटर, तर या प्रकल्पातील अतिरिक्त जलसाठा हा धरणाच्या डाव्या कालव्यातून गोदावरीच्या पात्रात वळविला जातो व त्याद्वारे बिलोली तहसिलमधील १६,५९२.१२६ हेक्टर (४,१०० एकर) एवढे क्षेत्र ओलिताखाली आणले जाते. ह्या प्रकल्पाची गोदावरीच्या पात्रातील लांबी जवळ-जवळ ११२.६५४ कि.मी. (७० मैल) इतकी आहे. ह्या प्रकल्पांतर्गत जलसिंचन क्षेत्र त्याच्या दुसऱ्या टप्प्यात २६,७०९.२७६ हेक्टर (६६,००० एकर) जमिनीचे क्षेत्र वाढवून त्यात साखर, तांदूळ, कापूस आणि खरीप, रब्बी तसेच उष्ण हवामानातील पिके यांना जलसिंचन सुविधा पुरविण्यात आल्या.

धरणाच्या बांधकामाला १९६० मध्ये सुरुवात झाली व तिसऱ्या पंचवार्षिक योजना काळात १९६८ मध्ये ते पूर्ण करण्यात आले. या प्रकल्पासाठी एकूण खर्च रुपये ५,२६,६९,४०० इतका होता. त्यात प्रत्यक्षात १ करोड रुपयेपर्यंत वाढ झाली.[६०]

**पूर्णा प्रकल्प :** वस्तूतः पूर्णा प्रकल्प हा परभणी जिल्ह्यात असला तरी या प्रकल्पाचे लाभक्षेत्र नांदेड जिल्ह्यातील अनुक्रमे अर्धापूर व नांदेड तालुक्यापर्यंत विस्तारलेले आहे.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस पूर्णा नदीवर येलदरी येथे धरण बांधण्यासाठी ५,८१,००,००० रुपयांचा एक प्रचंड मोठा प्रकल्प आराखडा तत्कालीन हैद्राबाद राज्य शासनाकडे सादर झाला होता. अशा प्रकारचा हा मराठवाड्यातील पहिलाच प्रकल्प होता. ऑक्टोबर १९५६ मध्ये हैद्राबाद शासन या आराखड्यावर विचार करीत असतांनाच राज्य पुनर्रचना होऊन ही योजना मुंबई राज्य

५९. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. २३४.

६०. **कित्ता**, पृ. २३३.

Maharashtra State Gazetteers

शासनाकडे आली. दिनांक २८ जानेवारी १९५७ रोजी मुंबई शासनाने ५,५५,००,००० रुपये खर्चाच्या या योजनेस मंजुरी दिली व सुधारित प्रकल्प आराखडा व योजना तयार करतांना जलसिंचनाबरोबरच जलविद्युत निर्मिती योजनेचाही त्यात अंतर्भाव करण्यात आला. स्वाभाविकच योजनेचा खर्च बराच वाढून संकल्पित खर्च १९,६१,००,००० रुपये इतका निर्धारित करण्यात आला. ह्या प्रकल्पाचे काम १९६८ मध्ये पूर्ण झाले. १९८६-८७ साली येथे ९३४ दशलक्ष घनफूट जलसंचय करणारा आणि १५८ किलोवॅट विद्युतनिर्मिती करणारा येलदरी प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला. येलदरी धरणाची उंची ५१.३६ मीटर असून विद्युत निर्मितीनंतर बाहेर पडणारे पाणी पुढे सिध्देश्वर धरण बांधून जलसिंचनासाठी वापरण्यात येते.

सिध्देश्वर धरण येलदरीपासून ६४ कि.मी. अंतरावर आहे. सिध्देश्वर धरणापासून १९२ कि.मी. लांबीचा जलसिंचन कालवा खोदलेला आहे. सन १९८६-८७ साली सदरहू धरणापासून परभणी जिल्ह्यातील ३९ हजार हेक्टर जमीन व नांदेड जिल्ह्यातील अदमासे २२,५१२ हेक्टर जमीन सिंचनाखाली होती.[६१]

सद्यस्थितीत जिल्ह्यात अर्धापूर तालुक्यात १०,०६७ हेक्टर तर नांदेड तालुक्यात ९,१२१ हेक्टर इतके क्षेत्र सिंचनाखाली होते.[६२]

**उर्ध्व पैनगंगा प्रकल्प :** पूर्णा प्रकल्पाप्रमाणेच उर्ध्व पैनगंगा प्रकल्पस्थळ नांदेड जिल्ह्यात नसले तरी जिल्ह्यातील अर्धापूर, मुदखेड, हदगांव, उमरी आणि भोकर या तालुक्यापर्यंत या प्रकल्पाचे लाभक्षेत्र विस्तारलेले आहे.

हा प्रकल्प यवतमाळ जिल्ह्यातील पुसद तालुक्यात ईसापूर येथे पैनगंगा नदीवर बांधण्यात येत आहे. त्यातून अदमासे ८५ कि.मी. लांबीचा डावा कालवा व १७७ कि.मी. लांबीचा उजवा कालवा बांधण्याची योजना आहे.[६३]

या प्रकल्पापासून सन २००५ पर्यंत नांदेड जिल्ह्यातील हदगांव तालुक्यात २३,३४७ हेक्टर, हिमायतनगर ३,०४४ हेक्टर, भोकर १,२११ हेक्टर, अर्धापूर १२,१७९ हेक्टर, उमरी १८,५६३ हेक्टर, मुदखेड १८,६२५ हेक्टर तर धर्माबाद २०,७४४ हेक्टर इतकी सिंचनक्षमता निर्माण झाली आहे.[६४]

हा प्रकल्प म्हणजे आंतर खोरे पाणी स्थलांतराचा उत्तम नमूना आहे.

**लेंडी प्रधान प्रकल्प :** लेंडी प्रधान प्रकल्प हा महाराष्ट्र व आंध्रप्रदेश या राज्यांचा संयुक्त प्रकल्प आहे. दिनांक ८ फेब्रुवारी १९८७ रोजी नांदेड जिल्ह्यातील मुखेड तालुक्यात 'गोणेगांव' जवळ 'लेंडी नदीवर' मातीचे धरण बांधण्यास सुरुवात झाली.

प्रकल्पाच्या माती धरणाची महत्तम उंची २७.८३ मीटर असून माती धरणाची व दगडी सांडव्याची लांबी अनुक्रमे १६५१.६० मीटर व ३२८.६० मीटर आहे. दगडी सांडवा (OGEE) ओगी उत्पल मार्ग आकाराचा असून त्यास १४ वक्रीय द्वारे (आकार १२ मीटर × ८ मीटर) बसविण्याचे

---

६१. **परभणी जिल्हा गॅझेटिअर,** सन १९८८, पृ. १८०, १८१, १८३.

६२. लघु पाटबंधारे विभाग, जिल्हा नांदेड, पाटबंधारे विषयक माहिती २००५, पृ. ४१, ४२.

६३. कित्ता.

६४. कित्ता.

काम प्रगतीपथावर आहे. धरणाच्या डाव्या बाजुला मुख्य कालवा काढला असून धरणापासून निघणाऱ्या संयुक्त मुख्य कालव्याची लांबी २०.४६ कि.मी. तर तेथून निघणाऱ्या महाराष्ट्र राज्यासाठीच्या डाव्या मुख्य कालव्याची लांबी ३०.८४ कि.मी. आहे. ह्या कालव्याच्या सहाय्याने नांदेड जिल्ह्यातील मुखेड व देगलूर तालुक्यातील अनुक्रमे १४,२१० हेक्टर आणि १,५०० हेक्टर असे एकूण १५,७१० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आहे.

प्रकल्पाचे पाणलोट क्षेत्र १,५९४ चौ.कि.मी. असून प्रकल्पस्थळी होणारा पाणीसाठा ८.६५ टी.एम.सी. आहे. प्रकल्पाचा एकूण पाणी वापर हा ६.३६ अब्ज घनफूट (१७८.९८ दशलक्ष घन मीटर) असून त्यापैकी महाराष्ट्र व आंध्रप्रदेश राज्याचा एकूण पाणीवापर (बाष्पीभवनासह) अनुक्रमे ३.९३ टी.एम.सी. (१११.५८ दशलक्ष घन मीटर) व २.४३ टी.एम.सी. (६७.४० दशलक्ष घन मीटर) आहे.

**लेंडी प्रधान प्रकल्पांतर्गत सिंचन क्षेत्र**

| अ.क्र. | सिंचन क्षेत्र | लाभक्षेत्र | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | महाराष्ट्र | आंध्रप्रदेश | |
| १. | एकूण लाभक्षेत्र (जी.सी.ए.) | १९,०५० हेक्टर | १३,३६० हेक्टर | ३२,४१० हेक्टर |
| २. | लागवडीयोग्य क्षेत्र (सी.सी.ए.) | १६,९५० हेक्टर | ११,३३६ हेक्टर | २८,२८६ हेक्टर |
| ३. | सिंचित लाभक्षेत्र (आय.सी.ए.) | १५,७१० हेक्टर | ११,२१४ हेक्टर | २६,९२४ हेक्टर |

प्रकल्पाच्या जलाशयाखाली पूर्णतः बुडणारी १० आणि अंशतः बुडणारी २ अशी एकूण १२ गावे आहेत. या गावाच्या पुनर्वसनाचे काम पूर्ण होत आले असून या पुनर्वसित गावठाणामध्ये नागरी सुखसोईची कामे प्रगतीपथावर आहेत.

प्रकल्पाची एकूण अंदाजित किंमत रुपये २७५.८३ कोटी (दरसूची १९९९-२००० प्रमाणे) असून त्यात महाराष्ट्र राज्याच्या कामाची किंमत रुपये २२५.९९ कोटी व आंध्रप्रदेश राज्याच्या कामाची रुपये ४९.८४ कोटी आहे. शासन निर्णय क्र. लेंडी प्रकल्प/२००१/२६७४/(६७४/२००१) मोप्र-२ दिनांक २१ डिसेंबर २००१ अन्वये प्रकल्पाच्या रुपये २२५.९९ कोटी किंमतीच्या प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.

**प्रकल्पाचा बाबीनिहाय अंदाजित खर्च (रुपये कोटी)**[६५]

| अ.क्र. | कार्य | अंदाजित खर्च | शेरा |
|---|---|---|---|
| १. | शिर्ष काम | १५६.२८ | महाराष्ट्र राज्य खर्च किंमत |
| २. | संयुक्त कालवा | १७.३५ | २२५.४९ कोटी रुपये. |
| ३. | कालवे व वितरिका | ५२.३६ | |
| ४. | आंध्रप्रदेश अंतर्गत कालवा | ४९.८४ | |
| | एकूण खर्च | २७५.८३ | |

६५. अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड यांनी पाठविलेल्या माहितीवर आधारीत.

Maharashtra State Gazetteers

**शंकररावजी चव्हाण विष्णूपुरी प्रकल्प :** नांदेड शहराच्या वरच्या बाजूस ८ कि.मी. अंतरावरील असरजन गावाजवळ (ता., जि. नांदेड) सन १९७८-७९ च्या रु. ३,२२४ लक्ष च्या मूळ प्रशासकीय मान्यतेनुसार निम्न (लोअर) गोदावरी विष्णूपुरी प्रकल्प ही उपसा जलसिंचन योजना कार्यान्वित आहे. विष्णूपुरी प्रकल्पांतर्गत गोदावरी नदीवर ३३९ मीटर लांबीचा दगडी बंधारा बांधण्यात आला आहे. बंधाऱ्यावर १८ दरवाजे बसविले आहेत. बंधाऱ्यालगत नदीच्या उजव्या तिरावर १३० × १७.० × ३९.२० मीटर उंचीचे आर.सी.सी. पंपगृह बांधण्यात आले असून त्याची एकूण क्षमता २३,८०० एच.पी. असेल. प्रकल्पस्थळी १३२/६.६ के.व्ही. दाबाचे उपकेंद्र उभारून १,६०० व्यासाच्या प्रत्येकी ३.८६ कि.मी. लांबीच्या स्पायरली वेल्डेड पाईपच्या ६ उध्दरण नलिकेच्या शेवटी तलांक +३९० मीटरवर वितरण कुंभ बांधणे व तेथून ६८ कि.मी. लांबीचा उजवा अस्तरांकीत मुख्य कालवा व त्या अंतर्गत उपकालवे बांधण्याचे काम सुरू आहे.

या कालव्यावर शासनाने नोव्हेंबर १९९१ मध्ये मंजूर केलेल्या डेरला, किवळा आणि गोळेगांव (शिरढोण) उपसा सिंचन योजना, त्याचबरोबर फेब्रुवारी १९९६ मध्ये मुख्य कि.मी. ६५ मध्ये कोलंबी उपसा सिंचन योजना या दोन्ही योजनेस शासनाची मंजुरी प्रदान करण्यात आली असून मुख्य कालव्याच्या ७ कि.मी. पर्यंत प्रस्तावित असलेल्या पांगरा शाखा कालवा, ढाकणी कालवा, उपकालवे व वितरकांची कामे पूर्ण करण्यात आली आहेत व त्यापासून १५,६३० हेक्टर सिंचनक्षमता निर्माण झाली. मुख्य कालव्याची ८ कि.मी. ते २३ कि.मी. व २४ कि.मी. ते ३३ कि.मी. पर्यंतची कामे पूर्ण झाली आहेत. तर मुख्य कालव्याच्या ३४ कि.मी. ते ६५ कि.मी. चे सर्व्हेक्षण पूर्ण होऊन काम प्रगतीपथावर आहे.

विष्णूपुरी प्रकल्पापासून एकूण ११.४० टी.एम.सी. पाणी वापर असून त्यातील ११.०० टी.एम.सी. सिंचनाकरीता व ०.४० टी.एम.सी. बिगर सिंचनाकरीता प्रस्तावित आहे. या प्रकल्पामुळे एकूण २८,३४० हेक्टर सिंचनक्षेत्र निर्माण करण्याचे प्रस्तावित आहे. या प्रकल्पामुळे निर्मित जलाशयास 'शंकरसागर' असे नाव देण्यात आले.

**विष्णूपुरी प्रकल्पांतर्गत असलेले कालवे व वितरीका**

| अ.क्र. | कालवा/वितरीकेचे नांव | एकूण कि.मी. | कामपूर्ण कि.मी. | प्रगत कि.मी. |
|---|---|---|---|---|
| १ | विष्णूपुरी मुख्य कालवा | ६८.०० | ३३.०० | १६.०० |
| २ | गुडेगांव शाखा कालवा | ०४.१३ | ०४.१३ | ——— |
| ३ | तुप्पा वितरीका | ०५.७२ | ०५.७२ | ——— |
| ४ | धनेगांव वितरीका | १०.७० | १०.७० | ——— |
| ५ | पांगरा शाखा कालवा | १६.५० | १६.५० | ——— |
| ६ | ढाकणी वितरीका | १६.०० | १६.०० | ——— |
| ७ | लोंढे सांगवी | १३.०० | १३.०० | ——— |

या प्रकल्पांतर्गत एकूण ४१,९८५ हेक्टर भौगोलिक क्षेत्र येत असून पैकी ३७,७८५ हेक्टर क्षेत्र लागवडीयोग्य आहे. तर २८,३४० हेक्टर पायनीय क्षेत्र आहे. तालुकानिहाय क्षेत्रानुसार नांदेड (ता.)[६६] ४,८५१ हेक्टर कंधार/लोहा १७,६४६ हेक्टर तर बिलोली ५,८१३ हेक्टर इतके क्षेत्र आहे.

६६. पूर्वोक्त.

## मध्यम प्रकल्प

दोन हजार ते दहा हजार हेक्टरपर्यंत लाभक्षेत्र असलेल्या प्रकल्पास मध्यम प्रकल्प म्हणतात. जिल्ह्यात दुसऱ्या पंचवार्षिक (१९५६-६१) योजनेपासून जलसिंचन प्रकल्पांना सुरुवात झाली. त्यात तीन वार्षिक योजनांपैकी १९६६-६७ मध्ये कुदाळा हा मध्यम प्रकल्प हाती घेतला व त्याद्वारे १,५६८ हेक्टर सिंचित क्षेत्र निर्माण करण्यात आले. त्यानंतर चौथ्या पंचवार्षिक योजनाकाळात (१९६९-७४) कुंद्राळा, करडखेड, पेठवडज व महालिंगी ह्या चार मध्यम प्रकल्पाचे काम पूर्ण झाले व त्यापासून कुंद्राळा येथे ५३७ हेक्टर, करडखेड येथे २,६३५ हेक्टर, पेठवडज येथे २,०७० हेक्टर व महालिंगी येथे ७९० हेक्टर असे एकूण ४ प्रकल्पांतर्गत एकूण ६,०३२ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणण्यात आले.

पाचव्या पंचवार्षिक योजनाकाळात (१९७४-७८) ३ मध्यम प्रकल्प अनुक्रमे नागझरी, लोणी, डोंगरगांव येथे उभारण्यात आले. त्यापासून नागझरी येथे १,२६० हेक्टर, लोणी येथे १,७९० हेक्टर व डोंगरगांव येथे १,२५० हेक्टर असे एकूण ४,३०० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणण्यात आले.

सध्या जिल्ह्यात एकूण ८ मध्यम प्रकल्पाचे काम पूर्ण झालेले असून सहाव्या पंचवार्षिक योजना काळात (१९८०-८५) उर्ध्व मानार प्रकल्प हाती घेण्यात आला तर नवव्या पंचवार्षिक योजनाकाळात (१९९७-२०००) बाभळी उच्च पातळी बंधारा हा प्रकल्प हाती घेण्यात आला असून या दोन प्रकल्पांचे बांधकाम प्रगतीपथावर आहे.[६७]

**उर्ध्व मानार प्रकल्प :** नांदेड जिल्ह्यातील लोहा तालुक्यात मौजे लिंबोटी गावाजवळ उर्ध्व मानार प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे. या प्रकल्पामुळे नांदेड व लातूर जिल्ह्यातील अनुक्रमे लोहा, कंधार ६,००० हेक्टर्स व अहमदपूर ३,००० हेक्टर्स क्षेत्र ओलिताखाली येणार आहेत. या प्रकल्पास दरसूची १९८२-८३ अन्वये रु. २,३०६ लक्षच्या अंदाजित खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. तदनंतर मूळ प्रकल्पाच्या नियोजनात बदल करून त्याची व्याप्ती वाढवून प्रकल्पग्रस्त व अवर्षणप्रवण क्षेत्रास सिंचनाचा लाभ देण्यासाठी प्रकल्पांतर्गत नियोजनात उपसा सिंचन योजनेचा नव्याने समावेश करण्यात आला व दरसूची १९९४-९५ अन्वये दिनांक २० डिसेंबर १९९६ रोजी रु. १०,८६५ लक्ष रूपयांच्या अंदाजित खर्चास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

प्रकल्पाची अद्ययावत् अंदाजित किंमत (दरसूची वर्ष २०००-०१) रु. १५,५२० लक्ष असून त्यांची विगतवारी खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | बांधकाम | किंमत |
|---|---|---|
| १ | मुख्य धरण | ९,६७८ लक्ष रुपये |
| २ | कालवा | ३,३८८ लक्ष रुपये |
| ३ | अहमदपूर उपसा सिंचन योजना | २,४५४ लक्ष रुपये |
| | **एकूण** | १५,५२० लक्ष रुपये |

६७. लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा नांदेड, पाटबंधारे विषयक माहिती २००५, पृ. १७ ते २०.

सदरहू प्रकल्पावर मार्च २००३ अखेर एकूण रू. ४,९२३ लक्ष (धरण ३,६३५ व उपसा सिंचन योजना १,२८८ लक्ष रुपये) इतका खर्च झाला आहे. प्रकल्पांतर्गत मानार नदीवर ९५३.७५ मीटर लांब ३१ मीटर उंच मातीचे धरण बांधण्यात येणार असून २९८.२५ मीटर लांबीच्या सांडव्यावर १२ मीटर × ६.५ मीटर आकाराचे १५ वक्राकार दरवाजे उभारणे व इतर संलग्न कामे प्रगतीपथावर आहेत. हा सांडवा ओमी टाईप प्रकारचा आहे. धरणाचे पाणलोट क्षेत्र ९८७.६ चौ.कि.मी. (३८१ चौ.मै.) आहे. या प्रकल्पाचे जलग्रहणक्षेत्र १,००० हेक्टर तर या प्रकल्पापासून ६२ कि.मी. लांबीच्या डाव्या कालव्याद्वारे कंधार/लोहा तालुक्यातील ६,००० हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार आहे. तसेच या प्रकल्पातून १५ कि.मी. लांबीची बारूळ वितरीका व २० कि.मी. लांबीची लोहा वितरीका काढण्याचे काम सुरू आहे. या प्रकल्पाखालील भिजणारे कृषिक्षेत्र पुढीलप्रमाणे.

**प्रकल्पाखाली भिजणारे कृषिक्षेत्र.**[६८]

| अ.क्र. | क्षेत्र | कालव्याद्वारे | उपसासिंचन | एकूण |
|---|---|---|---|---|
| अ | एकूण लाभक्षेत्र (जी.सी.ए.) | ८,३२५ हेक्टर | ४,३०० हेक्टर | १२,६२५ हेक्टर |
| ब | लागवडीयोग्य क्षेत्र (सी.सी.ए.) | ६,६६० हेक्टर | ३,८०० हेक्टर | १०,४६० हेक्टर |
| क | ओलिताखाली येणारे क्षेत्र (आय.सी.ए.) | ६,००० हेक्टर | ३,००० हेक्टर | ९,००० हेक्टर |

**बाभळी बंधारा प्रकल्प :** महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, कर्नाटक, ओरिसा आणि मध्य प्रदेश या पाच राज्यांसाठी गोदावरी खोऱ्यातील पाणीवाटप करण्यासाठी १९७५ साली बच्छावत आयोगाची स्थापना करण्यात आली. या लवादाने गोदावरी खोऱ्यातील पोचमपाड धरणाच्या वरच्या बाजूला ६० टी.एम.सी. पाणी महाराष्ट्राला अडविण्याची मुभा दिली. हे पाणी गोदावरी खोऱ्यात अडविण्यासाठी औरंगाबाद जिल्ह्यातील जायकवाडी धरणाखाली मोठे प्रकल्प बांधण्यासाठी साईट उपलब्ध नसल्याने गोदावरी नदीवर ११ बंधारे बांधण्याचा निर्णय या लवादाचा अधीन राहूनच घेण्यात आला होता यातील धर्माबाद तालुक्यातील बाभळीचा हा शेवटचा बंधारा असून गोदावरी नदीवर बाभळी, ता. धर्माबाद, जि. नांदेड येथे बाभळी बंधारा प्रकल्पक्षेत्र आहे. राज्य शासनाने १३ मार्च १९९५ रोजी या प्रकल्पाला मान्यता दिली असून ३१ कोटी ३७ लाख रुपये इतकी प्रशासकीय मान्यता देण्यात आली. त्यानंतर १४ फेब्रुवारी २००३ रोजी सुधारीत प्रशासकीय स्तरावर या प्रकल्पाला ९२ कोटी ६० लाख रूपयांची मान्यता देण्यात आली.

तथापि सन २००० नंतर प्रकल्पाच्या कामाला गती आली. मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ या महाराष्ट्र शासनाच्या अंगीकृत व्यवसायांतर्गत नांदेड पाटबंधारे विभागामार्फत निविदा काढून खाजगी कंत्राटदारामार्फत त्याचे काम सुरू आहे. केंद्रिय जल आयोगानेही या प्रकल्पाला मान्यता दिली आहे. प्रकल्पाचे एकूण पाणलोट क्षेत्र ३,२०० चौ.कि.मी. आहे. बाष्पीभवनासह एकूण पाणीवापर ७६.२२ दशलक्ष घनमीटर एवढा आहे.

६८. कार्यकारी अभियंता, मध्यम प्रकल्प विभाग, नांदेड यांनी पाठविलेल्या माहितीवर अधारीत.

प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर नदीच्या पात्रामध्ये धरण स्थळापासून मागे ५८.५० कि.मी. लांबीमध्ये पाणी साठणार असून मुख्य बंधाऱ्याची लांबी २३७ मीटर प्रस्तावित आहे. तर उंबरा पातळीच्या वर ११ मीटर उंचीपर्यंत पाणी साठणार आहे. बंधाऱ्यास १५ मीटर × ११ मीटर आकाराचे १३ उभे दरवाजे प्रस्तावित आहे. बंधाऱ्याच्या डाव्या व उजव्या बाजूस विभाजक भिंती राहतील. सध्या बंधाऱ्याच्या उजव्या भागाचे काम सुरू आहे. बाभळी प्रकल्पामुळे नांदेड जिल्ह्यातील ७,९९५ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा फायदा मिळेल, तसेच महत्त्वाचे म्हणजे नांदेड, मुदखेड, बिलोली, धर्माबाद, नायगांव, उमरी, लोहा येथील ५८ गावांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सुटणार आहे. या प्रकल्पामुळे निर्मित जलाशयाची पातळी २,३४८ मीटर एवढी असेल.[६९] बाभळी बंधाऱ्यात केवळ २.७४ टी.एम.सी. पाणी अडणार असून पोचमपाड धरणाच्या साठवणूक क्षमतेपेक्षा हे प्रमाण अत्यंत नगण्य आहे. विशेष म्हणजे पोचमपाड धरणाच्या एकूण क्षमतेचा विचार केला, तर बाभळीत केवळ ०.५४ टक्के (अर्धा टक्का) पाणी अडणार आहे.

**लघु पाटबंधारे प्रकल्प :** जिल्ह्यात लघुपाटबंधारे प्रकल्पामुळे सिंचन क्षेत्र वाढण्यास मदत झाली आहे. महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ मधील कलम १०० अन्वये २५० एकरापर्यंत जलसिंचन क्षमता असणाऱ्या लघुसिंचन योजना व पाझर तलावांची कामे जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित करण्यात आली.[७०] तर २५० हेक्टरपेक्षा अधिक सिंचनक्षमता असलेले प्रकल्प हे राज्य स्तरावर तयार केले जातात. त्यानुसार २००५ सालापर्यंत राज्यस्तरावरील (२५० हेक्टरपेक्षा जास्त) एकूण ४९ प्रकल्प पूर्ण झालेले असून त्यापासून २२,१४६ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. तर स्थानिक स्तरावर १०१ ते २५० हेक्टर सिंचन क्षमता असलेले २० प्रकल्प पूर्ण झाले असून त्यापासून ३,७८९ हेक्टर सिंचन क्षमता व ० ते १०० हेक्टर सिंचन क्षमता असलेले ३०७ प्रकल्प पूर्ण झाले असून त्यापासून १३,५८६ हेक्टर इतकी सिंचन क्षमता निर्माण झाली आहे.

**जिल्ह्यातील सन २००५ मधील तालुकानिहाय लघुपाटबंधारे प्रकल्पांची माहिती खालीलप्रमाणे.**[७१]

| अ.क्र. | तालुका | पूर्ण झालेले लघु पाटबंधारे प्रकल्प व सिंचन क्षमता | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | राज्यस्तर (२५० हेक्टरपेक्षा जास्त) | सिंचनक्षमता (हेक्टरमध्ये) | स्थानिकस्तर (० ते २५० हेक्टर) | सिंचनक्षमता (हेक्टरमध्ये) |
| १ | कंधार | ०२ | ५६१ | ४३ | २,१८७ |
| २ | लोहा | ०५ | २,५७३ | २५ | १,५०९ |
| ३ | अर्धापुर | - | - | ०४ | १९२ |
| ४ | नांदेड | - | - | ०१ | ६५ |
| ५ | मुदखेड | ०१ | २८७ | ०८ | ५५४ |

६९. दै. सकाळ वृत्तपत्र, दिनांक ८ मार्च २००६, बुधवार, श्री. नागनाथ देशमुख यांच्या लेखावर आधारीत.

७०. **परभणी जिल्हा गॅझेटिअर,** पूर्वोक्त पृ. १८६.

७१. लघुपाटबंधारे विभाग, नांदेड, जिल्हा पुस्तिका, पाटबंधारे विषयक माहिती २००५, पृ. ५ व ६.

| अ.क्र. | तालुका | पूर्ण झालेले लघु पाटबंधारे प्रकल्प व सिंचन क्षमता | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | राज्यस्तर (२५० हेक्टरपेक्षा जास्त) | सिंचनक्षमता (हेक्टरमध्ये) | स्थानिकस्तर (० ते २५० हेक्टर) | सिंचनक्षमता (हेक्टरमध्ये) |
| ६ | मुखेड | ०४ | १,४९३ | ६२ | ३,५७५ |
| ७ | नायगांव | - | - | २१ | ६८१ |
| ८ | देगलूर | ०३ | १,२३५ | ३० | १,३११ |
| ९ | हदगांव | १२ | ६,३४० | ३० | १,७३१, |
| १० | उमरी | ०३ | १,४८५ | १३ | ६५२ |
| ११ | भोकर | ०६ | २,७९७ | २९ | १,५७४ |
| १२ | धर्माबाद | - | - | ०२ | ७२ |
| १३ | बिलोली | - | - | २१ | १,०८१ |
| १४ | माहूर | ०२ | ७१२ | ०९ | ४७७ |
| १५ | किनवट | ११ | ४,६६३ | २१ | १,३९६ |
| १६ | हिमायतनगर | - | - | ०८ | ३१८ |
| | **एकूण** | ४९ | २२,१४६ | ३२७ | १७,३७५ |

**मालगुजारी तलाव**[७२] **:** इंग्रजांच्या काळात तलावांची मालगुजारी वसुली करण्याची मालकी त्या काळातील काही प्रतिष्ठित नागरीकांकडे देण्यात आली व त्यांना मालगुजार असे संबोधले गेले. हे मालगुजार लाभधारकांकडून वसूल केलेल्या रकमेतून ठराविक रक्कम सरकारकडे जमा करीत असत. सारा वसूली करण्याच्या सोयीसाठी म्हणून त्या काळात या तलावांची मालकी मालगुजारांकडे गेली म्हणून त्यांना मालगुजारी तलाव असे संबोधण्यात येते. तसेच त्याची नोंद एक्स मालगुजारी टँक अशीही केली जाते.नांदेड जिल्ह्यात कंधार व माहूर येथील किल्ले प्रसिद्ध आहेत. राष्ट्रकुटकालीन जलतुंग सागर कंधार आणि मालवाकालीन मातृतिर्थ माहूर येथे आजही चांगल्या स्थितित आहेत. या दोन्ही तलावांची नोंद पुरातत्त्व विभागाकडे आहे. याशिवाय अर्धापूर तलाव, सगरोळी तलाव, ता. बिलोली, मानसपुरी तलाव, ता. कंधार आणि मुखेडची बारव तसेच तळणी, ता. हदगांव येथील बारव, यवती, ता. बिलोलीची बारव, होट्टल, ता. देगलूरची बारव यांची पुरातत्त्व खात्याकडे नोंदी आहेत. ज्यांची नोंद पुरातत्त्व विभागांनी घेतलेली नाही अशा अनेक बारवा व तळी नांदेड जिल्ह्यात अस्तित्त्वात आहेत. ती तळी व बारवा निरनिराळ्या राजवटीत बांधल्या गेल्या असाव्यात त्या पुढीलप्रमाणे :

**राजवटी :** (१) कल्याणीचे चालुक्य, (२) कंधार राजधानी असलेले राष्ट्रकूट, (३) माहूर राजधानी असलेले मालवा, (४) मराठ्यांची राजवट, (५) सातवाहनकाळ, (६) वाकाटका, (७) देवगिरीचे यादव (यांच्याच काळात हेमाडपंत नावाचे प्रसिद्ध वास्तूशास्त्रज्ञ होऊन गेले. त्यांनी निर्माण केलेल्या देऊळरूपी अस्तित्त्वात असलेल्या वास्तू व त्या शेजारी बांधलेल्या बारवा त्यांच्या वास्तू कलेची साक्ष देतात.) (८) बहमनी राजवट- मोहंमद गवान नांदेड व कंधारमध्ये अनेक दिवस

७२. इंजि. द. मा. रेड्डी, सचिव सिंचन सहयोग, नांदेड यांनी पाठविलेल्या माहितीवर आधारीत.

वास्तव्यास होते. नांदेडचे वजिराबाद मोहंमद गवान यांनीच स्थापन केले होते. (९) निजामशाही, (१०) मोगल, (११) हैद्राबादचे निजाम.

नांदेड जिल्हा हैद्राबाद संस्थानच्या अधिपत्याखाली १९४८ सालापर्यंत राहिला. त्यांच्या काळात अबी (खरीप), रब्बी (रबी), तांबी (उन्हाळी) या तीन पीक पद्धती होत्या. त्या काळात मालगुजारी तलावाद्वारे तीन वेळा भाताचे पीक काढले जायचे. आता देखील बिलोली, धर्माबाद इत्यादी तालुक्यांच्या भागात मोठ्या प्रमाणात मालगुजारी तलावाखाली भातशेती केली जाते. अशा मालगुजारी तलावांची तालुकावार संख्या सध्याच्या सिंचन क्षमतेसह खाली दिली आहे. यापैकी काही तळ्यातील गाळ महात्मा फुले अभियानांतर्गत काढून साठवण क्षमता वाढविली जात आहे.

**नांदेड जिल्ह्यातील तालुकानिहाय मालगुजारी तलाव**

| अ.क्र. | तालुका | मालगुजारी तळ्यांची संख्या | साठवण क्षमता (दशलक्ष घनमीटर) | सिंचन क्षमता (हेक्टरमध्ये) | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १ | नांदेड | निरंक | — | — | — |
| २ | मुखेड | ०१ | २.९६ | ४० | — |
| ३ | अर्धापूर | निरंक | — | — | — |
| ४ | भोकर | ०१ | — | ०१ | साठवण क्षमता उपलब्ध नाही. |
| ५ | उमरी | ०२ | — | ३२ | साठवण क्षमता उपलब्ध नाही. |
| ६ | हदगांव | ०२ | २२.६१ | ९८ | — |
| ७ | हिमायतनगर | निरंक | — | — | — |
| ८ | किनवट | ०४ | २०.५ | ६१ | — |
| ९ | माहूर | निरंक | — | — | — |
| १० | कंधार | ०२ | ४०.० | ५९ | — |
| ११ | लोहा | ०२ | १४.० | १२ | एका तलावातील गाळ काढणे चालू आहे. दुसऱ्याची साठवण क्षमता उपलब्ध नाही. |
| १२ | बिलोली | २८ | १७४.० | ४०१ | — |
| १३ | धर्माबाद | ३९ | ५५.४६ | ४८९ | २८ तलावांची साठवण क्षमता उपलब्ध नाही. |
| १४ | नायगांव | निरंक | — | — | — |
| १५ | देगलूर | २४ | — | ७२ | साठवण क्षमता उपलब्ध नाही. ८ तलावाखाली सिंचन होत नाही. |
| | एकूण | ८५ | ३२९.५३ | १,२६५ | |

**कोल्हापुरी पद्धतीचे बंधारे :** महाराष्ट्रात कोल्हापूर पद्धतीचा बंधारा हा एक वैशिष्ट्यपूर्ण सिंचन बंधाऱ्याचा प्रकार कालौघात विकसित झाला आहे. कोल्हापूर भागातील शेतकरी पूर्वीपासून सिंचनासाठी नदीतून पाणी उपसण्यासाठी मोटेचा वापर करीत असत. नदीत पावसाळ्यानंतर पाण्याचा प्रवाह वाहत असल्याने पाणी साठवून रहावे म्हणून दरवर्षी पावसाळ्या अखेरीस नदी पात्रात कच्चे बांध घातले जात होते. या बंधाऱ्यांना शाश्वत पाणीपुरवठा व्हावा म्हणून छत्रपती शाहू महाराजांनी राधानगरी येथे १९०७ ते १९१८ या दरम्यान १२ मीटर उंचीचे दगडी धरण बांधले. या जलाशयातून पाणी सोडून खालच्या बाजूला शेतकऱ्यांनी बांधलेल्या कच्च्या बंधाऱ्यांना पाणीपुरवठ्याची व्यवस्था झाली. सिंचन प्रणालीला स्थिरता प्राप्त झाली. परंतु कच्चे मातीचे बंधारे वारंवार धुवून जाणे, त्यात जास्त पाणी गळती वाढणे यामुळे शेतकऱ्यांना सतत कष्ट पडत असत. यावर उपाय म्हणून १९३८ साली छत्रपती राजाराम महाराजांनी कोल्हापूरजवळ बावडा येथे पहिला दगडी बंधारा बांधला. आजच्या कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्याचे हे प्राथमिक रूप मानले जाते.[७३]

जिल्ह्यात सन २००५ पर्यंत एकूण १३२ कोल्हापुरी पद्धतीचे बंधाऱ्याचे बांधकाम पूर्ण झालेले असून याद्वारे ६,३९० हेक्टर इतकी सिंचनक्षमता निर्माण झाली आहे. त्यात २५० हेक्टर पेक्षा जास्त सिंचनक्षमता (राज्यस्तर) असलेले २ बंधारे होते, त्यापासून ५४३ हेक्टर क्षेत्र तर स्थानिक स्तरावरील २५० हेक्टरपेक्षा कमी सिंचनक्षमता असलेले एकूण १३० बंधारे पूर्ण झाले होते. त्यापासून ५,८४७ हेक्टर इतकी सिंचनक्षमता होती.[७४]

सन २००८ मध्ये एकूण २६५ कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्याचे बांधकाम पूर्ण असून त्याद्वारे १९,६०८ हेक्टर इतकी सिंचनक्षमता निर्माण झाली. त्यात २५० हेक्टरपेक्षा जास्त (राज्यस्तर) सिंचनक्षमता असलेले १४ प्रकल्प तर २५० हेक्टरपेक्षा कमी (स्थानिकस्तर) सिंचनक्षमता असलेले २५१ प्रकल्प असून त्याद्वारे अनुक्रमे ५,१०८ हेक्टर व १४,५०० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली होते.[७५]

**ठिबक व तुषार सिंचन :** परंपरागत सिंचन पद्धतीमुळे होणारा पाण्याचा अपव्यय टाळून जास्तीत जास्त क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळवून देण्यासाठी ठिबक व तुषार ह्या आधुनिक सिंचन पद्धती अस्तित्त्वात आल्या आहेत. पिकाला दिवसभरात लागणारे पाणी ५-६ तासांमध्ये त्याचे मुळाशी थेंबाथेंबाने देऊन मुळा भोवतालचा ओलावा किमान आवश्यक तितकाच ठेवण्याची व्यवस्था म्हणजे

---

७३. **महाराष्ट्र जल व सिंचन आयोग, अहवाल खंड-१,** पृ. ८८२ ते ८८५.

७४. लघु पाटबंधारे विभाग, पूर्वोक्त, पृ. ५ व ६.

७५. अमृतयोग लोकनेते बापूराव पाटील आष्टीकर गौरवग्रंथ, अमृत महोत्सव समिती, हदगांव, जि. नांदेड, यातील इजि. द. मा. रेड्डी यांच्या ' नांदेड जिल्ह्यातील सिंचनाची सद्यस्थिती ' लेखावर आधारीत, मे-२००८, पृ. ३२०, ३२१.

ठिबक सिंचन, ठिबक प्रमाणेच पी. व्ही. सी. नलिकांमधून थोड्या जास्ती दाबाने शेतापर्यंत पोहोचविलेले पाणी पॉलीएथीन नळ्यांना लावलेल्या तुषार तोट्यांमधून कारंज्यासारखे उडून शेतावर पडते त्यास तुषार सिंचन म्हणतात. राज्य शासनाने सन १९८६-८७ पासून ठिबक सिंचनाच्या राज्य पुरस्कृत ठिबक योजना व सन १९९१-९२ पासून केंद्र पुरस्कृत ठिबक योजना राबविण्यास सुरुवात केली.[७६]

सन २००६-०७ मध्ये नांदेड जिल्ह्यात सूक्ष्म जलसिंचन अंतर्गत ठिबक जलसिंचनाखाली ५,२१८ हेक्टर व तुषार सिंचनाखाली ७,०२४ हेक्टर क्षेत्र आले आहे. जिल्ह्यातील ओलिताखालील क्षेत्र १,२०,००० हेक्टर आहे व जिल्ह्यामध्ये नवीन सिंचन प्रकल्प राबविण्यास मर्यादा असल्याने ओलिताखालील क्षेत्रात वाढ करण्यासाठी उपलब्ध जलसाठ्यातून सुक्ष्म जलसिंचनाच्या द्वारे जास्तीत जास्त क्षेत्र सिंचनाखाली आणणे आवश्यक आहे.[७७]

**पाणी वाटप सहकारी संस्था :** स्वातंत्र्यानंतर सिंचन व्यवस्थापनात शेतीचे नियोजन करताना दुष्काळात पिकांना पाणी देऊन पिक जगवणे एवढाच उद्देश नसून जास्तीत जास्त क्षेत्र ओलिताखाली यावे, पीक उत्पादनात भर पडावी याकडे मुख्य लक्ष ठेवण्यात आले. सिंचन व्यवस्थापनात शेतकऱ्याचा सहभाग महत्त्वाचा आहे. त्यामुळे सन १९८० नंतर पाणीवाटप संस्था स्थापन करून कमी पाण्यात जास्त क्षेत्र ओलिताखाली आणून जास्तीत जास्त उत्पादन काढणे, जमिनीची धुप थांबविणे व जमिनीची योग्य निगा राखणे इ. उद्दिष्टांकडे लक्ष केंद्रित करण्यात आले. त्यापूर्वी सिंचन प्रकल्पासाठी कालवा समिती असे, पाणी वाटप संस्थामुळे प्रत्यक्ष पाणी वाटपाचे काम व वसुलीचे काम शेतकऱ्यांच्या संस्थांकडे देण्यात आले त्याचा परिणामही चांगला झाला आहे.

नांदेड जिल्ह्यात विष्णुपूरी, उर्ध्व पैनगंगा, मनार, पूर्णा प्रकल्प व लघुसिंचन प्रकल्पाअंतर्गत ११९ पाणी वाटप संस्था नोंदणीकृत आहेत. त्यात कृष्णा कालवा पाणी वाटप सहकारी संस्था, मालेगाव, ता. अर्धापूर ही चांगले काम करणारी संस्था असून महाराष्ट्र राज्य पातळीवर विविध स्तरावर विविध संस्था मार्फत पुरस्कार देवून या संस्थेचा गौरव करण्यात आला आहे. या संस्थेची नोंदणी २५ मे १९८९ ची असून त्याची एकूण सभासद संख्या ४०७ इतकी आहे. या संस्थेअंतर्गत भिजू शकणारे क्षेत्र ६५८.३२ हेक्टर तर लागवडी योग्य क्षेत्र १,०३६.१० हेक्टर इतके आहे. या संस्थेच्या कार्यक्षेत्रात मालेगाव, डौर, देगाव, कामठा (बु.) इ. गावे येतात.*

---

७६. कित्ता, पृ. ४७०.

७७. जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, नांदेड यांनी पाठविलेल्या माहितीवरून.

*. कृष्णा कालवा पाणी वाटप सहकारी संस्था, अठरावा वार्षिक अहवाल, २००८-०९ पृ. ३ व ४.

## २५० हेक्टर्सपेक्षा जास्त सिंचनक्षमता असलेल्या लघुपाटबंधारे तलावांची तालुकानिहाय माहिती, सन २००४-०५.[७८]

| अ.क्र. | प्रकल्पाचे नांव | एकूण अंदाजे किंमत (कोटी रु.) दर सूची २००४-०५ | एकूण सिंचन क्षमता (हे.) पिका-खालील क्षेत्र | एकूण पाणी साठा (द.ल.घ.मी.) | एकूण उपयुक्त साठा (द.ल.घ.मी.) | एकूण उपयुक्त पाणीसाठा वापर तपशील (द.ल.घ.मी.) | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | सिंचनासाठी | पिण्यासाठी |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| | **हदगांव तालुका** | | | | | | |
| १ | निमगांव | ०.१२३ | २९५ | १.३०६ | १.२३७ | १.२३७ | ० |
| २ | रावणगांव | ०.१३० | ३२९ | १.३८४ | १.२८० | १.२८० | ० |
| ३ | पिंप्राळा | ०.१४७ | ६७२ | २.६३२ | २.४२९ | २.४२९ | ० |
| ४ | केदारनाथ | ०.२१७ | १,८०९ | ७.८१० | ७.००६ | ५.९५६ | १.०५ |
| ५ | धोगरी | ०.१३५ | २६५ | १.३५५ | १.२६७ | १.२६७ | ० |
| ६ | पोटा | ०.१५७ | ४३२ | १.७५४ | १.६६७ | १.६६७ | ० |
| ७ | दुधड | ०.२५२ | ६१८ | २.४१९ | २.२८१ | २.२८१ | ० |
| ८ | सायलवाडी | ०.१७० | ३८० | २.३३७ | २.१८४ | २.१८४ | ० |
| ९ | चाबरा | ०.३९९ | ३७६ | १.८२३ | १.६९६ | १.६९६ | ० |
| १० | पवना | ०.४८६ | ४२७ | २.१५६ | २.०३३ | २.०३३ | ० |
| ११ | लोहामांडवा | २.४४४ | २७७ | १.४३४ | १.३१७ | १.३१७ | ० |
| १२ | धनिकवाडी | १.५४० | ४६० | २.१७० | २.०५३ | २.०५३ | ० |
| | **हदगांव एकूण (१२)** | **६.२००** | **६,३४०** | **३५.५८** | **३४.४५** | **३४.४०** | **१.०५** |
| | **लोहा तालुका** | | | | | | |
| १ | टाकळगांव | ०.१२७ | ३०९ | १.४४५ | १.३१० | ०.७० | ०.२१ |
| २ | सुनेगांव | ०.१९७ | ५१६ | २.१०२ | १.७८५ | ०.९२ | ०.३३ |
| ३ | लाडका | ०.१२८ | ५२२ | २.५०८ | २.३०४ | १.१५ | ० |
| ४ | सुगांव | ०.१९७ | ८५० | ३.४८९ | ३.१९२ | ०.८२ | ० |
| ५ | सोनखेड | ०.११६ | ३७६ | १.५०८ | १.६४२ | ० | ० |
| | **लोहा एकूण (५)** | **०.७६५** | **२,५७३** | **११.०५२** | **१०.२३३** | **३.५९** | **०.५४** |
| | **कंधार तालुका** | | | | | | |
| १ | पानशेवडी | ०.१९९ | २६३ | १.७७५ | १.५७५ | १.५७५ | ० |
| २ | घागरधरा | २.३८० | २९८ | २.८१२ | २.३९७ | २.१४७ | ०.२५० |
| | **कंधार एकूण (२)** | **२.५७९** | **५६१** | **४.५८७** | **३.९७२** | **३.७२२** | **०.२५०** |

७८. लघुपाटबंधारे विभाग, नांदेड, जिल्हा पुस्तिका, पाटबंधारे विषयक माहिती-२००५, पृ. ४५ ते ७७ वरून घेतली आहे.

Maharashtra State Gazetteers

×

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **उमरी तालुका** | | | | | | |
| १ | कारला | ०.१३२ | ५१० | १.८०३ | १.९४७ | १.१८ | ० |
| २ | गोरठा | ०.१०६ | ५२६ | १.४८२ | १.३५८ | ०.९१ | ०.१४ |
| ३ | बेद्राळी | ०.१२६ | ४४९ | १.९४ | १.८०४ | १.१५ | ० |
| | **उमरी एकूण (३)** | **०.३६४** | **१,४८५** | **५.२२५** | **५.१०९** | **३.२४** | **०.१४** |
| | **मुदखेड तालुका** | | | | | | |
| १ | कोल्हा | ०.१२३ | २८७ | १.१८७ | १.१४४ | ०.६१ | ० |
| | **मुदखेड एकूण (१)** | **०.१२३** | **२८७** | **१.१८७** | **१.१४४** | **०.६१** | **०** |
| | **माहूर तालुका** | | | | | | |
| १ | शालंबी | ०.४०१ | ३२० | १.५२३ | १.४८६ | १.४८६ | ० |
| २ | माहूर | १.१६९ | ३९२ | १.७०७ | १.६६१ | १.६६१ | ० |
| | **माहूर एकूण (२)** | **१.५७०** | **७१२** | **३.२३०** | **३.१४७** | **३.१४७** | **०** |
| | **भोकर तालुका** | | | | | | |
| १ | धानोरा | ०.१६५ | ६२७ | २.८१९ | २.५९३ | ०.५१ | १.४१ |
| २ | किनी | ०.१०५ | ६८८ | २.१८७ | १.९९३ | १.१३ | ० |
| ३ | कांडला | ०.१५७ | ३०० | १.२५६ | १.१६५ | ०.२७ | ० |
| ४ | अमठाणा | ०.०६५ | ३४४ | १.२३ | १.१६ | ०.६३ | ० |
| ५ | येळेगांव | ०.३२६ | ३१६ | १.६४७ | १.५५२ | ०.९५ | ० |
| ६ | लामकानी | ०.४७० | ५२२ | २.९४६ | २.६९२ | १.७१ | ० |
| | **भोकर एकूण (६)** | **१.२८८** | **२,७९७** | **१२.०८५** | **११.१५५** | **५.२०** | **१.४१** |
| | **देगलूर तालुका** | | | | | | |
| १ | भूतानी हिप्परगा | ०.१५४ | ४८१ | २.२७६ | २.०५५ | ० | ० |
| २ | हनेगांव-१ | ०.१८४ | २५९ | १.२६२ | १.१५६ | ०.५८९ | ०.५६७ |
| ३ | अंबुलगा | ०.१३४ | ४९५ | १.५९१ | १.४४६ | १.१८६ | ०.२६० |
| | **देगलूर एकूण (३)** | **०.४६८** | **१,२३५** | **५.१२९** | **४.६५७** | **१.७७५** | **०.८२७** |
| | **किनवट तालुका** | | | | | | |
| १ | मुळझरा | ०.१४३ | ६६४ | १.९५१ | १.८१४ | १.८१४ | ० |
| २ | निचपूर | ०.१७८ | ४६६ | २.३१३ | २.२०१ | १.८७४ | ०.३२७ |
| ३ | सिंदगी | ०.२५४ | ३०० | १.६६५ | १.५९० | १.५९० | ० |
| ४ | जलधारा | ०.१८८ | ४५७ | १.९७० | १.८६७ | १.८६७ | ० |
| ५ | हुडी | ०.२२९ | ३५२ | १.८०५ | १.७०९ | १.७०९ | ० |
| ६ | पिंपळगांव | ०.२९२ | ४०५ | २.२५५ | २.१६७ | २.१६७ | ० |
| ७ | कुपटी | ०.२५९ | २७६ | १.३४५ | १.२९७ | १.२९७ | ० |
| ८ | नंदगांव | ०.४३२ | ३२४ | १.५४१ | १.४९६ | १.४९६ | ० |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | वरसांगवी | ०.९३५ | ५०६ | २.९२१ | २.६८८ | २.६८८ | ० |
| १० | पिंपळगांव (भि.) | १.१६८ | ४८६ | २.३५३ | २.२८२ | २.२८२ | ० |
| ११ | शिरपूर | ७.२१० | ४२७ | ६.०५४ | ३.८० | ३.८० | ० |
| | **किनवट एकूण (११)** | **११.२८८** | **४,६६३** | **२६.१७३** | **२२.९१२** | **२२.६८५** | **०.३२७** |
| | **मुखेड तालुका** | | | | | | |
| १ | मुखेड | ०.०८६ | ४३७ | १.४०६ | १.२९९ | १.२९९ | ० |
| २ | अखरगा | ०.१५२ | ३७८ | १.७७५ | १.६१७ | १.६१७ | ० |
| ३ | सोनपेठवाडी | ०.१४६ | ३३२ | १.६०५ | १.४४८ | १.४४८ | ० |
| ४ | शिरूर | ०.२०० | ३४६ | १.७८० | १.६१५ | १.३७८ | ०.२३७ |
| | **मुखेड एकूण (४)** | **०.५८४** | **१,४९३** | **६.५६६** | **५.९७९** | **५.७४२** | **०.२३७** |
| १ | अर्धापूर | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| २ | नांदेड | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| ३ | नायगांव | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| ४ | धर्माबाद | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| ५ | बिलोली | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| ६ | हिमायतनगर | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |

## नांदेड जिल्ह्यातील सिंचनाचा संक्षिप्त गोषवारा

(१) जून २००७ पर्यंत पूर्ण प्रकल्प ५५९ ज्यावर १,०६,०७९ हेक्टर (निर्मित सिंचन क्षेत्र आहे.) बांधकाम चालू असलेले प्रकल्प २११ ज्यावर १,५०,३१७ हेक्टर (नियोजित सिंचन क्षमता आहे.)

(२) जून २००७ पर्यंत निर्मित एकूण सिंचन क्षमता १,८३,७०० हेक्टर (पूर्ण प्रकल्प व बांधकाम चालू प्रकल्प मिळून)

(३) जून २००७ पर्यंत निर्मित सिंचन क्षमता ७७,७९१ हेक्टर (बांधकाम चालू असलेल्या प्रकल्पावर)

(४) सिंचन क्षमतेचा वापर (२००६-०७) ८२,०८५ हेक्टर (निर्मित सिंचन क्षेत्राच्या ४५%)

(५) वर्ष २००७-०८ मध्ये बांधकाम चालू असलेल्या प्रकल्पाची किंमत रु. ३,०२४ कोटी (२००६-०७ च्या दरसूची प्रमाणे)

(६) उर्वरीत कामाची किंमत ०१/०४/२००७ रोजी रु. २,९१२ कोटी. (२००६-०७ च्या दर सूचीप्रमाणे)

(७) वर्ष २००७-०८ मधील आर्थिक तरतूद रु. १७८ कोटी (इ.टी.पी. सह)

(८) प्रशासकीय मान्यता मिळालेल्या प्रकल्पांची किंमत रु. १७.४३ कोटी व सिंचनक्षेत्र १,९४७ हेक्टर.

Maharashtra State Gazetteers

**काम चालु असलेल्या मोठ्या व मध्यम प्रकल्पाची सद्यस्थिती**[७९]

| अ.क्र. | प्रकल्प नांव | अद्ययावत किंमत (कोटी रु.) | ३१/०३/०७ पर्यंत खर्च (कोटी रु.) | उर्वरीत किंमत (कोटी रु.) | सकल्पित सिंचन क्षेत्र (हेक्टर) | सिंचन क्षेत्र निर्मित हेक्टर |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | उर्ध्व पैनगंगा | १९७६.० | ८१४.० | ११६२.० | १,२५,४९५ | ७५,२२५ |
| २ | विष्णूपुरी प्रकल्प | ३६३.५ | १९३.० | १७०.५ | २९,६५० | २४,०७६ |
| ३ | लेंडी प्रधान प्रकल्प | ४१९.२ | १२९.५ | २८९.७ | १५,७१० | — |
| ४ | उर्ध्व मानार प्रकल्प | ३३५.८ | १२२.८ | २१३.० | ६,००० | — |
| ५ | बाभळी बंधारा | १४९.८ | १९.२ | १३०.२ | ७,९९५ | — |
| | **एकूण** | **३२४४.३** | **१,२७८.५** | **१,९६५.४** | **१,८४,८५०** | **९९,३०१** |

## पशुसंवर्धन

प्राचीन काळापासून पशुपालन हा शेतीला पूरक व्यवसाय म्हणून केला जातो. जिल्ह्याच्या कृषि अर्थव्यवस्थेत पशुपालन व्यवसायाचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. कृषि क्षेत्रातील नांगरणी, वखरणी, पेरणी इत्यादी त्याचप्रमाणे जलसिंचन व पशुउत्पादनासाठी जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात पशुपालन केले जाते. सामान्यपणे उपयुक्त पशुंपैकी गोजातीय गटातील गायी, म्हशी ह्या मुख्यत्वे दूध, व प्रजननासाठी तर बैल व रेडे हे शेतीकाम व प्रजोत्पादनासाठी पाळले जातात. मेषजातीय गटातील शेळ्या, मेंढ्या ह्या दूध, मांस, लोकर व खतासाठी पाळल्या जातात. जिल्ह्यात कुक्कुटपालनही केले जात असून कोंबड्या व बदके अंडी व मांस उत्पादनासाठी पाळल्या जातात.

सन १९६१ च्या पशुगणनेनुसार जिल्ह्यात गोजातीय (गायी, म्हशी, बैल व रेडे) पशुसंख्या ८,५३,९१८ इतकी तर शेळ्यांची संख्या १,५६,५२१ व मेंढ्यांची संख्या ५०,२५३ होती. जिल्ह्यातील काही भागात देवणी प्रजाती मोठ्या प्रमाणात असून लाल कंधारी प्रजाती हे तर नांदेड जिल्ह्याचे भूषण ठरले आहे. लाल कंधारी गाय कंधार तालुक्यात मोठ्या प्रमाणात आढळते. सन १९६० च्या दशकात जिल्ह्यात ३ पूरक पशुपैदास केंद्रात १५ गावे अंतर्भुत होती. त्याठिकाणी १५ देवणी जातीचे बैल आणि १५० देवणी जातीच्या गायी पाळल्या होत्या. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेखाली सर्व ८१ बैल जिल्हा वळू नियोजन योजना यात अंतर्भुत करण्यात आले. त्यापैकी ५८ बैल हे अर्ध किंमत अनुदान तत्त्वावर तर २३ बैल निर्वाहासाठी अनुदान तत्त्वावर होते. जिल्ह्यातील प्रत्येक पंचायत समितीच्या मुख्यालयात कृत्रिम रेतन उप केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र नांदेड याठिकाणी

७९. **अमृतयोग लोकनेते बापूराव पाटील आष्टीकर गौरवग्रंथ,** अमृत महोत्सव समिती, संपादक-भगवंत क्षीरसागर, हदगांव, जि. नांदेड यातील इंजि. द. मा. रेड्डी यांच्या ' नांदेड जिल्ह्यातील सिंचनाची सद्यस्थिती ' या लेखावर आधारीत मे-२००८, पृ. ३२०, ३२१.

उभारण्यात आले आहे. पशुंच्या प्रजननासाठी याठिकाणी वळू पुरवठा केला जातो. या कार्यालयात ९४ बैल आणि ५० गायींचा पुरवठा हा निव्वळ प्रजननासाठी करणात आला होता. त्याद्वारे गुरांची गुणवत्ता वाढविण्याचा प्रयत्न केला. ह्या प्रयत्नाबरोबरच नांदेड जिल्ह्यात सन १९७० साली एक पशुवैद्यकीय चिकित्सालय तर कंधार, किनवट, देगलूर, बिलोली, भोकर, हदगांव, मुखेड, कळंबर आणि धर्माबाद इत्यादी ९ ठिकाणी पशुवैद्यकीय दवाखाने आहेत. तसेच जिल्ह्यात ३३ पशुवैद्यकीय प्रथमोपचार केंद्र होती. त्याद्वारे गुरांच्या गुणवत्तेत वाढ करण्यासाठी कमजोर जनावरांना औषधोपचार करणे, साथीच्या रोगांना आवर घालणे आणि जनावरांना बडवणे (नपुंसक करणे) सारखी कामे केली जात होती.

पाळीव पक्ष्यात कोंबड्या व बदके यांचा समावेश होतो. सन १९६१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यातील एकूण पशुधन २ लाखांपर्यंत होते. जिल्ह्यात पंचायत समितीमार्फत कुक्कुटपालन करण्यास प्रोत्साहन देण्याच्या हेतूने प्रत्येक उत्सुक व्यक्तीला ५०० रुपये पर्यंत कर्ज दिले जाते. तसेच जो कुक्कुटपालन करेल, त्यांची निपज करेल त्यांना कोबड्या, बदके खरेदी करणे, साहित्य आणणे, कुक्कुटपालन केंद्र (घर) उभारणे यासाठी भारत सरकारद्वारे दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अंतिम टप्प्यात नांदेड येथे एक कुक्कुटपालन प्रात्यक्षिक केंद्र स्थापण्यात आले होते. त्याचप्रमाणे राज्यस्तरावरील आकृतीबंधाप्रमाणे अस्तित्त्वात असलेले कुक्कुटपालन प्रात्याक्षिक केंद्र देगलूर येथे सुरू ठेवण्यात आले. ह्या केंद्राद्वारे सुधारित प्रजातीच्या कोंबड्या, बदके निर्मितीचे काम केले जाते. तसेच ह्या केंद्राद्वारे निव्वळ प्रजनन करणारे आणि अंडी उबवणाऱ्या पक्ष्यांची मागणी देखील पूर्ण केली जाते. जिल्ह्यात विस्तार अधिकारी, पशुसंवर्धन अधिकारी, भांडारपाल (संग्रहक) आणि ग्रामसेवक हे जिल्ह्यात कुक्कुटपालनाचा प्रचार व प्रसार करण्याचे काम करतात.[८०]

पशुपालनास कृषि अर्थव्यवस्थमध्ये फार महत्त्वाचे स्थान आहे. जिल्ह्यातील बहुसंख्य शेतकरी शेतातील कामासाठी बैल तसेच दुधदुभत्यांसाठी गाई, म्हशी इत्यादी जनावरांचे संगोपन करतात. भूमीहिन मजूर देखील उपजिविकेचे साधन म्हणून पशुपालन करतात. महाराष्ट्र शासनाने दुग्धविकास आणि पशुपालन यांचा विकास होण्याच्या दृष्टीने ऑपरेशन फ्लड (दुधाचा महापूर) ही योजना कार्यान्वित करून ह्या व्यवसायास उर्जितावस्था देण्यासाठी निरनिराळे कार्यक्रम आखले. पशुपालनाद्वारे ग्रामीण अर्थव्यवस्था आणि गरीब शेतकऱ्यांचे उत्पन्न तसेच राहणीमान सुधारण्याच्या दृष्टीने योजनाबध्द प्रयत्न करावेत हे ह्या कार्यक्रमाचे उद्दिष्ट आहे. ह्या कार्यक्रमाला शासनाने ' धवलक्रांती ' हे यथार्थ नाव देऊन आर्थिक सुधारणांच्या प्रयत्नामध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण केले आहे.

**पशुसंवर्धन विभाग :** निजामी राज्यातील या नांदेड जिल्ह्यात पशुसंवर्धन विभागाची स्थापना १८९२ मध्ये झाली. त्यावेळी विभागापुढे घोड्याची पैदास व जनावरांचे आरोग्य ही प्रमुख उद्दिष्टे होती. आता पशुधनाची अनुवांशिक सुधारणा करणे, जास्त दूध, अंडी, मांस व लोकर उत्पादन मिळवणे तसेच राज्यातील देशी शुद्ध जातीच्या जनावरांचे जतन, संवर्धन व या अनुषंगाने पशुसंगोपन, पशुपैदास व पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध करून देणे अशी उद्दिष्टे विभागाने निर्धारित केली आहेत. पशुसंवर्धन

८०. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. २२७, २२८.

व्यवसायाचे ग्रामीण अर्थव्यवस्थेत अनन्यसाधारण महत्त्व आहे. यातून निर्माण होणारी राष्ट्रीय संपत्ती तसेच निर्माण होणारा रोजगार याद्वारे ग्रामीण जनता/पशुपालकांचे आर्थिकस्तर उंचावणे हीदेखील उद्दिष्टे आहेत. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर सदर उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विविध योजना व कार्यान्वित झालेल्या संस्था/कार्यालये यांची सद्यस्थितीत उपयुक्तता, लोकाभिमुखता तपासून त्यांच्या उद्दिष्टनिहाय साध्यपूर्तीचे पुनर्विलोकन होऊन पशुसंवर्धन विभागाची पुनर्रचना सन १९८४ मध्ये करण्यात आली.

**जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, नांदेड :** जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, नांदेड या संस्थेची स्थापना सन १९६१ साली जिल्हा परिषदेच्या अधिपत्याखाली करण्यात आली असून सन १९६४ पासून शासनाच्या पशुसंवर्धन खात्याच्या अखत्यारित आली. संस्थेकडून द्रवनत्र उत्पादन करण्यासाठी फेब्रुवारी १९८७ पासून एक द्रवनत्र संयंत्र बसविण्यात आलेले आहे. खात्याच्या भावबंद करारानुसार द्रवनत्र खरेदी करण्यात येतो. तसेच नांदेड व हिंगोली जिल्ह्यातील केंद्रांना द्रवनत्र पुरवठा हा भावबंदीत वाहनाद्वारेच केला जातो. खात्याच्या प्रजननविषयक धोरणानुसार एच एफ व जर्सी या विदेशी वळूचा भिन्न भिन्न रक्तगटाच्या गोठित रेतमात्रा पुरवठा केल्या जातात व दोन्ही जिल्ह्यातील संस्थांना द्रवनत्राचा पुरवठा केला जातो.

जिल्ह्यातील पशुवैद्यकीय दवाखान्यांना कृत्रिम रेतनाद्वारे पैदास करण्याकरिता जर्सी व एच एफ या वळूच्या विदेशी, संकरित, देशी शुद्ध लाल कंधारी व म्हैसवर्गीय सुरती व मुऱ्हा जातीच्या अतिशीत वीर्यमात्रा व द्रवनत्राचा पुरवठा करण्यात येतो. जिल्ह्यातील द्रवनत्र उत्पादन व केंद्र संख्या पुढीलप्रमाणे.

**जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, नांदेड द्रवनत्र उत्पादन तक्ता व केंद्र संख्या**

| अ.क्र. | तपशील | १९९५-९६ | १९९८-९९ | २०००-०१ | २००२-०३ | २००३-०४ | २००४-०५ | २००५-०६ | २००६-०७ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | केंद्र संख्या | १६० | १६५ | १७० | १७५ | १७५ | १८० | १८३ | १८३ |
| २ | द्रवनत्र उत्पादन | २८,५२१ | १९,९९७ | ९,९७४ | ० | १,४०८ | १,८९५ | ० | ० |
| ३ | खरेदी | ० | १५,५८६ | ३८,०७४ | ६२,३६८ | ५५,४०६ | ५०,१८७ | ४४,४२८ | ५१,३०१ |
| | **एकूण** | **२८,५२१** | **३५,५८३** | **४८,०४८** | **६२,३६८** | **५६,८१४** | **५२,०८२** | **४४,४२८** | **५१,३०१** |

**(टीप.—**एकूण आकडेवारीत केंद्र संख्या विचारात घेऊ नये.)

**जिल्हा पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालय :** पशुवैद्यकीय आरोग्य सेवा व सुविधेकरिता नांदेड जिल्हा मुख्यालयी पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय कार्यान्वित आहे. तसेच जिल्हा स्तरावरील रोग नमुने तपासणी प्रयोगशाळा कार्यान्वित आहे. त्याचप्रमाणे क्ष-किरण सुविधा उपलब्ध करण्यात आलेली आहे.

**फिरते पशुवैद्यकीय दवाखाना :** जेथे पशुवैद्यकीय सुविधा उपलब्ध नाही अशा भागाकरिता किनवट तालुक्यातील आदिवासी भागासाठी एक फिरते पशुवैद्यकीय दवाखाना कार्यान्वित आहे.

**लाल कंधारी जनावरांचे संवर्धन केंद्र :** नांदेड जिल्ह्यातील लालकंधारी ही देशी शुद्ध गायवर्गीय जात अखिल भारतीय पातळीवर मान्यताप्राप्त झालेली आहे. या गोवंशाच्या प्रसारासाठीचे

उद्देशाने लालकंधारी जातीचे संवर्धन केंद्र गवूळ, ता. कंधार येथे ऑक्टोबर १९८७ पासून कार्यान्वित असून सद्यस्थितीत जिल्हा परिषदेकडे हस्तांतरीत करण्यात आलेले आहे.

**तालुकास्तर लघुपशुचिकित्सालय :** आधुनिक तंत्रज्ञान व सुविधा पशुपालकांना तालुक्याचे ठिकाणी मिळण्याचे उद्देशाने तालुक्याचे ठिकाणी टप्प्याटप्प्याने स्थापना करण्यात येत आहेत. राज्यात एकूण १७२ तालुका लघुपशुवैद्यकीय सर्वचिकित्सालये स्थापन करण्यात आलेली असून यापैकी नांदेड जिल्ह्यात २००५-०६ पासून अर्धापूर, कंधार, देगलूर, नायगाव, धर्माबाद या पाच ठिकाणी लघुपशुवैद्यकीय सर्वचिकित्सालयाची निर्मिती करण्यात आली आहे.

**सधन कुक्कुट विकास गट :** जिल्ह्यात अर्धापूर येथे सधन कुक्कुट विकास प्रकल्प कार्यान्वित असून कुक्कुटपालनासाठी सुधारित जातीचे पक्षी, अंडी लाभधारकांना उपलब्ध केली जातात. तसेच कुक्कुटपालन प्रशिक्षण देण्यात येते. सद्यस्थितीत ही योजना जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित करण्यात आलेली आहे.

**पशुउत्पादन (पैदास) :** कोणत्याही गुरांच्या संगोपनात त्यांच्या पैदासीचे महत्त्व अनन्यसाधारण असते. लालकंधारी जातीच्या गुरांच्या पैदासीकरिता बऱ्याच पशुधारकांकडे आपापल्या आवडीनुरूप उत्कृष्ट वळू जोपासलेले आहेत. वळूधारक आपल्या वळूची जोपासना वळू लहान असल्यापासूनच चांगल्या प्रकारे आणि शास्त्रीय पद्धतीने करतात. वळूधारक या जातीची पूर्ण तंतोतंत गुणवैशिष्ट्ये संपन्न आणि पूर्व वंशावळ उत्तम असलेल्या नरवासराची निवड करून त्याची उत्तम प्रकारे निगराणी ठेवून संगोपन करतात. यामध्ये वळूचा आहार आणि आरोग्य या बाबींवर वळूधारक काटेकोरपणे देखरेख ठेवतात. वळू जोपासण्यामागे वळू संगोपनाचे निरनिराळे उद्देश असतात. यामध्ये लालकंधारी जातीच्या आकर्षक गुरांची पैदास करणे, जोडधंदा म्हणून करणे, अर्थार्जन म्हणून करणे, तसेच विविध स्थानिक पातळीपासून अखिल भारतीय पातळीपर्यंतच्या पशुप्रदर्शनात सहभागी होणे याशिवाय बरेच वळूधारक छंद म्हणून वळूची जोपासना करतात.

**पशु उत्पादन सांख्यिकी तपशील**

| अ.क्र. | गुणधर्म | सांख्यिकी तपशील |
|---|---|---|
| १ | जन्मतः वासराचे वजन | २०.८८ कि.ग्रॅ. |
| २ | माजाचे वेळी वजन | २३५ कि.ग्रॅ. |
| ३ | पहिल्या वेताच्या वेळी वजन | २६४ कि.ग्रॅ. |
| ४ | दूध उत्पादन दररोज | ३.५० कि.ग्रॅ. |
| ५ | दूध उत्पादन | ४२१ कि.ग्रॅ. |
| ६ | दुधाचा काळ | २५० दिवस |
| ७ | भाकड काळ | १७१ दिवस |
| ८ | माजावर येण्याचे वय | ७७५ दिवस |
| ९ | पहिल्या वेताचे वय | १,११४ दिवस |
| १० | दुधातील स्निग्धांक | ४.४० |

Maharashtra State Gazetteers

**लालकंधारी गुरांची वैशिष्ट्ये :** लालकंधारी गुरांचे प्रमुख वैशिष्ट्ये म्हणजे ही गुरे लहान ते मध्यम आकाराची आणि मजबूत हाडापेराची असतात. डौलदार, आकर्षक, देखणी ठेवण, नर अतिशय हुशार, तेजस्वी, चपळ देखणा व सालस असतो.

(१) त्यांचा रंग लाल गडद, फिक्कट लाल, नरामध्ये गाईपेक्षा गडद रंग असतो. शरीरावर इतर कोणत्याही रंगाचे ठिपके नसतात.

(२) कपाळ—फुगीर असून विशिष्ट गोलाकाराची असतात.

(३) डोळे—मध्यम आकाराचे तसेच पाणीदार असून डोळ्याभोवती काजळ लावल्यासारखे वर्तुळ असते. त्यामुळे ही जनावरे फारच देखणी दिसतात.

(४) कान—लांब आणि खालच्या बाजूस झुकलेले असतात. टोकाला निमुळते, कानाच्या कडेला काळी झाक असते.

(५) मान—लांबीने थोडी कमी आणि मजबूत असते. पोळी आखूड कमी घड्या असणारी असते.

(६) बैलाचे वशिंड—पिळदार आणि मोठी असते. मजबूत, ताठ, मध्यम आकाराचे असते.

(७) खुरे—नीट जुळती खुरे, काळ्या रंगाची असून मजबूत असतात. खुरांवर काळे गोलाकार केस असतात.

(८) शेपटी—रेखीव, शरीराला धरून खुराकडे निमुळती, लांब असून शेपूट गोंडा काळा असून खुरापर्यंत लांब असतो.

(९) कास—शरीराला चिकटून, सड समांतर अंतरावर, दुधाची शिर अस्पष्ट असते.

दुधाच्या उत्पादनामध्ये ही जात जरी कमी असली तरी ह्या जातीपासून मिळणारी नर वासरे त्यापासून शेतीकरिता उपयोगी बैल शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. बैलजोडी अत्यंत काटक, कामसू, शेतीपयोगी ठरल्यामुळे जनावरांच्या बाजारामधील बैलजोड्याच्या किमती वाढलेल्या दिसून येतात.

Maharashtra State Gazetteers

८१. जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, नांदेड यांनी पाठविलेल्या माहितीवर आधारीत.

## नांदेड जिल्ह्यात लालकंधारी वळूचे रेतमात्रा वापरून केलेल्या कृत्रिम रेतन व त्यापासून जन्मलेल्या वासरांची वर्षनिहाय माहिती[८१]

| अ.क्र. | वर्ष | कृत्रिम रेतन केलेली जनावरे | जन्मलेली वासरांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | १९८८-१९८९ | १९६ | — |
| २ | १९९०-१९९१ | १,१३५ | — |
| ३ | १९९२-१९९३ | २,५४३ | १८६ |
| ४ | १९९५-१९९६ | ३,८२८ | ८८० |
| ५ | १९९६-१९९७ | ५,१७३ | १,३७६ |
| ६ | १९९७-१९९८ | ५,९१३ | १,६९८ |
| ७ | १९९८-१९९९ | ४,०८४ | १,८९१ |
| ८ | १९९९-२००० | ७,६१९ | १,४३३ |
| ९ | २०००-२००१ | ७,८५७ | २,२३० |
| १० | २००१-२००२ | ९,४९६ | २,७८० |
| ११ | २००२-२००३ | १०,०३५ | ३,०२९ |
| १२ | २००३-२००४ | ११,०१९ | ३,२९६ |
| १३ | २००४-२००५ | ११,७३३ | ४,२२५ |
| १४ | २००५-२००६ | ९,८४६ | ४,६६१ |
| १५ | २००६-२००७ | ९,३५४ | ४,१४९ |

**नांदेड जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागाचे कार्य :** नांदेड जिल्हा परिषद अंतर्गत ७६ पशुवैद्यकीय दवाखाने श्रेणी-१ व १०४ पशुवैद्यकीय दवाखाने श्रेणी-२ कार्यान्वित आहेत तसेच आदिवासी विभागांतर्गत किनवट येथे फिरता पशुवैद्यकीय दवाखाना आदिवासी उपयोजना अंतर्गत कार्यान्वित आहे. सदरील संस्थेत ५१ पशुधन विकास अधिकारी व १०२ पशुधन पर्यवेक्षक काम करतात. जिल्ह्यात २००३ च्या पशुगणनेनुसार एकूण पशुधन संख्या ९,७३,२२५ व ५,६३,७६४ पक्षी आहेत.

Maharashtra State Gazetteers

### सन २००६-०७ वर्षातील ठळक कामे[82]

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | एकूण गुरांना औषधोपचार | : | ३,३९,७३७ |
| (२) | शस्त्रक्रिया मोठी | : | ७१० |
| (३) | शस्त्रक्रिया लहान | : | ३०,५५२ |
| (४) | वळूचे खच्चीकरण | : | २७,७६० |
| (५) | एकूण लसीकरण | : | १०,८७,१२४ |
| (६) | एकूण कृत्रिम गर्भधारणा | : | ३१,४७० |
| (७) | कृत्रिम रेतनापासून वासरांचा जन्म | | |
| | गोऱ्हे | : | ५,९९१ |
| | कालवडी | : | ५,५३३ |
| | एकूण | : | ११,५२४ |
| (८) | एकूण श्रम शिबिरे | : | ३५४ |
| (९) | एकूण संकरित वासरांचे मेळावे | : | २४ |
| (१०) | एकूण पशुप्रदर्शन | : | २२ |

**पशु उपचार सोयी :** जिल्ह्यात पशु उपचार सोयी जिल्हा परिषदेमार्फत पुरविण्यात येतात. नांदेड येथे पशुवैद्यकीय शल्य चिकित्सालय आहे. याखेरीज राज्य शासनातर्फे ग्रामीण उपचार केंद्रही चालविले जातात व या केंद्रातून संकरित गाई निर्माण करण्याकरिता कृत्रिम गर्भधारणेचे काम केले जाते. तसेच वैद्यकीय सेवापण उपलब्ध केली जाते. तसेच मुखेड तालुक्यामध्ये एक शेती पैदास क्षेत्र आहे.जिल्ह्यात विकास कार्यक्रमांतर्गत वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्याकरीता संकरित गाई पैदाशीचा कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर घेतला जात आहे. गोठलेल्या विर्याचा पुरवठा पुणे येथून होतो. याखेरीज गोकुळ ग्रामीण योजना, ग्रामीण विकास यंत्रणा यांचे मार्फत गाई व म्हशींचा पुरवठा होतो. त्याचप्रमाणे वैरण विकास कार्यक्रमही जिल्ह्यात राबविला जातो. दुधसंकलनाकरीता जिल्ह्यात दुध संकलन मार्ग वाढविले जात आहेत. याखेरीज शासकीय दुध डेअरी योजनेमार्फत नांदेड व नरसी येथे दुध नासू नये म्हणून शितकेंद्रेपण आहेत. नांदेड येथे मेष विकास संस्थेमार्फत सुधारित मेंढ्या उत्पादनाचा कार्यक्रम घेण्यात येतो. लोकरीला योग्य भाव मिळावा म्हणून लोकर खरेदीपण केली जाते. खरेदी केलेली लोकर वस्तू निर्मिती करिता पुरविली जाते.[८३]

जिल्ह्यामध्ये जनावरांसाठी खाद्य म्हणून ज्वारीचा कडबा, बाजरी, भूईमुंग, भात याचा पाला, ऊसाचे वाढे, कडधान्ये याचा भूसा वगैरे खरीप व रब्बी मिळून खाद्य स्थानिकरित्या होते. ओलिताच्या ठिकाणी कडवळ, लुसर्न, बरसीम वगैरे चाऱ्याची पिके घेतली जातात.

---

८२. वार्षिक प्रशासन अहवाल, सन २००६-०७, जिल्हा परिषद, नांदेड, पृ. ९.

८३. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, पूर्वोक्त, पृ. ८.

**पशुप्रदर्शन (माळेगाव यात्रा) :** श्री क्षेत्र माळेगाव येथे श्री खंडोबा यात्रेनिमित्त जनावरांचा बाजार भरतो आणि पशुप्रदर्शनाचे आयोजन केले जाते. या बाजारात प्रतिवर्षी साधारणपणे मोठे घोडे एक हजार, लहान घोडे (तट्टद्न) पाच हजार, उंट तीन हजार ते पाच हजार व गाढवे पाच हजार ते सहा हजारपर्यंत विक्रीसाठी येतात. सर्व महाराष्ट्रात जनावरांसाठी येथील बाजार मोठा असून वैशिष्ट्यपूर्ण आहे. येथून जातिवंत घोडे बड्या असामी आजही मोठ्या प्रमाणावर विकत घेतात व त्यांची किंमत ५० हजार रुपयापासून तीन लाखांपर्यंत असते. गंगथडीचे तट्टून हैद्राबाद व मद्रासपर्यंत टांग्यासाठी खरेदी केली जातात. या बाजारात गंगथडीचे तट्टू रु. ५ हजारापासून २५ हजार पर्यंत, उंट रु. ५ हजार पासून १५ हजारपर्यंत व गाढवे रु. ३ हजार पासून १० हजारपर्यंत विकली जातात. महाराष्ट्रात जिल्हा परिषदांची स्थापना इ.स. १९६२ मध्ये झाल्यापासून जिल्हा परिषदेने जाणीवपूर्वक प्रयत्न करून या यात्रेनिमित्ताने भव्य पशुप्रदर्शनाचे आयोजन करण्यास सुरुवात केली. या पशुप्रदर्शनात देवणी, लालकंधारी, जर्सी, होलस्टीन क्रिजीयनसारख्या जातीच्या ३०० ते ८०० जनावरांचा सहभाग असतो. प्रत्येक जातीमधून एक सर्वोत्कृष्ट जनावर निवडले जाते व त्याच्या मालकास चांदीचे कडे व नगदी बक्षीस दिले जाते.जिल्हा परिषद नांदेडतर्फे शासनाकडून मिळालेल्या अनुदानातून या प्रदर्शनावर तसेच दुग्धस्पर्धा व जनावरांच्या धावण्याच्या शर्यतीवर तीन लाखापेक्षा जास्त खर्च केला जातो.

'घोडे माळेगाव' म्हणून प्रसिद्ध असलेल्या माळेगावचे प्रमुख आकर्षण म्हणजे घोड्यांचा बाजार. या बाजारात कोट्यावधी रुपयांची उलाढाल होत असते. घोड्यांच्या वैशिष्ट्यात अबलख, सब्जा, सफेद मुस्की, काली मुस्की व काठेवाडी घोड्यांना मागणी आहे. तसेच माळेगाव यात्रेत पाच हजारावर गाढवांची उलाढाल होते. 'कारवान', 'काठेवाडी' गाढवांना येथे चांगली मागणी आहे.

तसेच नायगाव, लोहा आणि कुंडलवाडी या ठिकाणी गुरांचा बाजार भरतो व तेथे बाजाराच्या दिवशी सरासरी ५०० ते ६०० गुरांची विक्री केली जाते.[८४]

जिल्ह्यातील पशुधन अनेक प्रकारच्या रोगराईंना बळी पडते. त्यामुळे शेतकऱ्यांची फार मोठी आर्थिक हानी होते. जिल्ह्यात प्रचलित असलेल्या रोगाबाबत माहिती खालीलप्रमाणे.

**(१) घटसर्प :** हा रोग विशिष्ट प्रकारच्या जिवाणू पासूनच होतो. या रोगाची लागण झाल्यास व वेळीच उपचार न झाल्यास जनावरे तात्काळ मृत्यूमुखी पडतात. यामध्ये १०४ ते १०६ डिग्री पर्यंत ताप असतो. जनावर खाणे पिणे बंद करते, श्वास घेण्यास त्रास होतो, घशास सूज येते, तोंडावाटे लाळ गळते, सूजेवर हात ठवल्यास ती जागा गरम लागून जनावरास वेदना होतात व काही तासातच जनावर औषधोपचार होऊनसुद्धा मरण्याची शक्यता असते. यावर प्रतिबंधक लस टोचून घेणे सर्वात चांगले.

**(२) फऱ्या :** हा रोग जिवाणूपासून होतो. विशेषतः म्हैस व गाय वर्गातील लहान जनावरामध्ये या रोगाचे प्रमाण जास्त असते. या रोगामध्ये १०४ ते १०६ डिग्री पर्यंत ताप असतो. मागील पायाच्या

८४. श्री क्षेत्र माळेगावची आनंद यात्रा, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, पृ. ९, १०, २३.

किंवा पुढील पायांच्या फऱ्यावर सूज येते. सूजेवर हात ठेवल्यास करकर असा आवाज येतो. जनावर खाणे पिणे बंद करते. त्यावर तात्काळ उपचार न झाल्यास जनावर मृत्यूमुखी पडते. या रोगाचा प्रादुर्भाव झाला तरच उपचार केले जातात. या रोगावर पेनीसीलीनची इंजेक्शने ६ तासांच्या अंतराने दिल्यास रोग बरा होऊ शकतो. यामध्ये प्रतिबंधक लस टोचून घेणे सर्वात उत्तम उपाय आहे.

**(३) लाळ खुरकत :** हा रोग विषाणू पासून होतो व एका जनावरापासून इतरास होतो. त्यामुळे संसर्गजन्य रोगात मोडतो. या रोगात जनावरांना १०४ ते १०५ डिग्री पर्यंत ताप असतो. तोंडात जिभेवर व जबड्यास पुरळ येऊन फुटतात. त्यामुळे जनावरास खातापिता येत नाही. जनावर लाळ गाळते, लंगडते, खुरी नसतात, दुधाळ जनावरे असल्यास आटतात, गाभण जनावरे गाभ टाकतात, कामाच्या बैलांची उत्पादन क्षमता कमी होते. या रोगावर औषधोपचाराकरीता रोग प्रतिबंधक लसीकरण वर्षातून दोन वेळा करणे अत्यंत आवश्यक आहे. या रोगाची लागण झालेल्या जनावरावर एंटीबायोटिक्सची इंजेक्शने देवून पुढील संभाव्य धोका टाळला जातो. तसेच पोटॅशियमच्या पाण्याने तोंड, खुरी धुवून त्यावर बोरॅक्स व ग्लिसरीन लावल्यास बऱ्याच प्रमाणात लागण आटोक्यात आणता येते.
त्याबरोबर जिल्ह्यात तोंड व पायखुरी, को. देवी, ई.टि.व्ही., लासोआ, ॲन्टीरेबीज यासारख्या रोगांचाही प्रादुर्भाव आढळून येतो. या व वरील रोगावर जनावरांना टोचण्यात आलेल्या रोगप्रतिबंधक लसीचे विवरण तक्ता क्र. ७ मध्ये दिले आहे.

**पशुगणना :** पशुगणना १९१६ पासून सुरू झाली तर सन १९६२ नंतर पशुसंवर्धनाच्या योजना राज्यशासन, जिल्हा परिषद व पंचायत समित्यांमार्फत राबविणे सुरू झाले. सन १९१६ पासून दर पाच वर्षांनी पशुगणना केली जाते. सन २००३ च्या पशुगणनेनुसार जिल्ह्यातील पशुधन पुढीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| (१) | पशुधन संख्या | : ९,७३,२२५ |
| (२) | संकरीत | : २४,८१८ |
| (३) | गायवर्ग | : ६,९०,६९४ |
| (४) | लालकंधारी जनावरे | : ४५,३६८ |
| (५) | म्हैसवर्ग | : २,५७,७१३ |
| (६) | शेळ्या | : ३,५७,६६५ |
| (७) | मेंढ्या | : ५४,५३७ |
| (८) | उंट/घोडे/गाढवे/खेचरे इ. ची संख्या | : ११,६०२ |
| (९) | डुकरे | : २०,३३३ |
| (१०) | कोंबड्या | : ५,६३,७६४ |
| (११) | संकरीत | : १०,२६५ |
| (१२) | देशी | : १,९०,९५१ |
| (१३) | म्हशी | : १,३१,६३९[८५] |

८५. जिल्हा अधीक्षक, कृषि अधिकारी, नांदेड यांनी पाठविलेल्या माहितीवर आधारीत.

Maharashtra State Gazetteers

## दुग्धव्यवसाय

जिल्ह्यातील नदीकाठची जमीन गाळाची असून तेथे उत्तम कुरणे आणि जलसिंचन सुविधा असल्याकारणाने दुभत्या जनावरांसाठी पोषक वातावरण आहे. त्यामुळे या परिसरात दुग्धव्यवसायास हा उद्योग अधिक फायदेशीर ठरला आहे.

सन १९६१ च्या पशुगणनेनुसार जिल्ह्यात जवळजवळ ७,३७,८४७ गुरे होती. त्यापैकी २ लाख गायी प्रजननक्षम होत्या. त्यात दुभत्या गायींची संख्या ८२ हजार तर उर्वरित दुध न देणाऱ्या होत्या. जिल्ह्यातील म्हैसवर्गाबाबत एकूण ६५,००० म्हशींपैकी ३२,००० म्हशी दुभत्या तर उर्वरित ३३,००० म्हशी दुध न देणाऱ्या होत्या. जिल्ह्यातील गायीपासून मिळणारे एका दिवसाचे दुधाचे अंदाजित उत्पन्न ३५० शेर तर म्हशींपासून १,००० शेर होते. नांदेड तालुक्यात दुभत्या जनावरात जवळजवळ १,२०० म्हशी आणि ९०० गायी होत्या. त्यापासून साधारणपणे ६० मण दुध दरदिवशी काढले जात होते. सन १९६१ च्या दुग्धव्यवसाय विकास विभागाने घेतलेल्या दुध सर्व्हेक्षणानुसार नांदेड तालुक्यात एकूण दुधाचा वापर २१० मण इतका असून त्यातील १५० मण दुध हे आजुबाजूच्या गाव परिसरात मिळवले होते. त्या सर्व्हेक्षणाच्या आधारावर असे म्हणता येईल की दुधाचे प्रमाण प्रति कुटुंब जवळजवळ ४ पौंड इतके होते.

कंधार तहसिलमध्ये लालकंधारी प्रजातीची गुरे मोठ्या प्रमाणात आढळतात. असे म्हटले जाते की ४ थ्या शतकातील राजा सोमदेवराय यांच्या कारकिर्दीपासून ही प्रजाती आढळून येते अशी मान्यता आहे. सध्या जिल्ह्यात लालकंधारी जनावरे ही शेतीसाठी उत्तम मानली जातात. परंतू या जनावरांपासून मिळणारे दुग्धोत्पादन अत्यंत कमी जवळजवळ १ ते २ शेर प्रति दिन. प्रजनन काळ ६ ते ७ महिन्यांपर्यंत असतो. देगलूर, बिलोली, आणि मुखेड तालुक्यात प्रामुख्याने देवणी जातीची गुरे आढळतात. लालकंधारी प्रजातीच्या गुरांच्या तुलनेत देवणी जातीची गुरे ही उमदी, बळकट व मजबूत बांध्याची आणि चांगल्या प्रतिची दुग्धोत्पादक असतात. देवणी प्रजातीची गायी दिवसाला सरासरी ३ ते ४ शेर दुध देतात. तर हदगांव, नांदेड आणि मुखेड तालुक्यात गावठी (गावरानी) जनावरे सांभाळली जातात.

Maharashtra State Gazetteers

इतर तालुक्यांच्या तुलनेत कंधार, हदगांव, नांदेड आणि बिलोली तालुक्यात म्हशी मोठ्या प्रमाणात आढळतात. तर कंधार तालुक्यात वाढलेल्या दुधाच्या जास्त मागणीमुळे हळूहळू म्हशींची संख्या वाढत आहे. म्हशींच्या सुधारीत जातींपैकी मुऱ्हा जात ग्रामीण भागात आढळत नाही. शेतकऱ्यांकडून मराठवाडा प्रजातीच्या म्हशींना प्राधान्य दिले जाते. तरीही बाहेरून आलेल्या मुऱ्हा जमातीपेक्षा त्याचे प्रमाण कमी आहे. स्थानिक गुरांपासून मिळणारे दुग्धोत्पादन साधारणपणे ४ शेर पर्यंत असून याची किंमत ३५० ते ४०० रू. पर्यंत होते. तर मुऱ्हा प्रजातीपासून साधारणपणे ८ ते ९ शेर दुध प्रतिदिन मिळत असून त्याची किंमत ७०० ते ८०० रूपयांपर्यंत आहे.

जिल्ह्यात सहकार तत्त्वावर दुग्धवितरण व्यवस्था सुरू करून त्यांच्या सदस्यांना जास्तीत जास्त फायदा तसेच ग्राहकांना ताजे व सकस दुध मिळावे या हेतूने नांदेड येथे स्थानिक नागरीकांनी नंदीग्राम सहकारी दुध संघ स्थापन केला. या संघास १६ इतर दुग्ध सहकारी संस्था जोडण्यात आल्या असून त्यातील ८ सहकारी दुग्धव्यवसाय संस्था तर उर्वरित ८ ह्या सहकारी सेवा संस्था आहेत. सहकारी संघ डिसेंबर १९६० पासून कार्यरत झाले. ग्रामीण भागात प्राथमिक दुध संस्थांच्या प्रतिनिधींमार्फत दिवसातून एकदा दुध एकत्र जमा केले जाते. जुलै १९६२ पासून ही स्थिती बदलली. संघ हा सुद्धा दुध संघाच्या वाहनांद्वारे दुधाची वाहतूक करतो.[८६]

नांदेड जिल्ह्यामध्ये सहकारी तत्त्वावर दुग्धव्यवसाय १९६९ मध्ये नांदेड जिल्हा सहकारी दुधउत्पादक व पुरवठा संघ लिमिटेड, नांदेड मार्फत सुरू झाला. सुरुवातीला जिल्ह्यात दुधाचे संकलन करून शहरामध्ये दुध वितरणाचे काम जिल्हा संघामार्फत केले गेले. संघाच्या दुध संकलनात वाढ झाली व स्थानिक वितरण कमी झाले. त्यामुळे संघाकडे संकलित झालेले जास्तीचे दुध शासनामार्फत स्विकृत करण्याची व्यवस्था नसल्याने संघास औरंगाबाद, सोलापूर इत्यादी ठिकाणी दुध पोहच करावे लागले. त्यामुळे संघ डबघाईस आला.शासनाच्या धोरणानुसार सर्व जिल्ह्याच्या ठिकाणी स्वयंपूर्ण शासकीय दुग्धशाळा उभारण्यात आल्या, त्यानुसार नांदेड येथे सन १९७८-७९ मध्ये १ लाख लिटर क्षमतेची परिपूर्ण दुग्धशाळा कार्यान्वित झाली. त्याचवर्षी म्हणजे १९७८ मध्ये जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी यांचे कार्यालय सुरू करण्यात आले. या कार्यालयामार्फत १९७८-७९ पासून भाकड, गाभण म्हशींचा पुरवठा, एक वर्ष वयाच्या पारड्याचा पुरवठा, शेतकरी प्रशिक्षण, हिरवी वैरण विकास कार्यक्रम अशा योजना मागासवर्गीय, आदिवासी यांच्यासाठी राबविण्यात आलेल्या आहेत.

**जिल्हा दुध उत्पादक सहकारी संघाची स्थापना :** नांदेड जिल्हा दुध उत्पादक सहकारी संघ मर्यादित, नांदेड याची स्थापना सन १९६९ मध्ये करण्यात आली. जिल्ह्यामध्ये संघामार्फत सन १९६९ ते १९७८-७९ पर्यंत जिल्हा संघामार्फत दुध संकलन व वितरणाचे काम करण्यात आले. तदनंतर संघास दुध वाहतुकीत आलेल्या तोट्यामुळे संघ डबघाईला आला. त्यामुळे १९७८-७९ पासून शासकीय दुध योजना नांदेडमार्फत दुध संकलनाचे काम सुरू झाले. १९६९ पासूनच्या दुध संकलनाचा तपशील पुढीलप्रमाणे.

Maharashtra State Gazetteers

८६. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. २३१, ३२३.

| अ.क्र. | दुध संकलन यंत्रणा | वर्ष | कार्यान्वित दुध संस्था | सरासरी दुध संकलन (लिटर प्रति दिवस) |
|---|---|---|---|---|
| १ | **जिल्हा सहकारी दुध** | १९६९-७० | १२ | ३६८ |
| | **उत्पादक व पुरवठा संघ** | १९७०-७१ | १३ | ६३३ |
| | **मर्यादित, नांदेड, जि. नांदेड** | १९७२-७३ | २७ | ९८४ |
| | | १९७५-७६ | ४२ | २,५७३ |
| | | १९७७-७८ | ५२ | ३,१७५ |
| | | १९७८-७९ | ६० | ३,९२५ |
| २ | **शासकीय दुध योजना,** | १९७९-८० | — | १,४०० |
| | **नांदेड** | १९८१-८२ | १२० | ८,८०० |
| | | १९८३-८४ | १९९ | १३,९५२ |
| | | १९८६-८७ | २१५ | १६,६११ |
| | | १९८९-९० | ३६२ | ३०,९७४ |
| | | १९९२-९३ | ३८९ | ३५,०४८ |
| | | १९९४-९५ | ४७१ | ५१,८९० |
| | | १९९७-९८ | ३४२ | २७,३८६ |
| | | १९९९-२००० | ३३९ | २३,७४२ |
| | | २०००-०१ | २७६ | २०,७४५ |
| | | २००१-०२ | ३१७ | २८,५७९ |
| | | २००२-०३ | ३२० | २५,१३१ |
| | | २००३-०४ | २३० | १७,२६४ |
| | | २००४-०५ | २०४ | १५,३४५ |

**दुधसंकलन :** नांदेड जिल्ह्यात सद्यस्थितीत गाई, म्हशी व इतर जनावरांकडून दररोज ८,००० लिटर दुधाचे संकलन होते. एकूण नांदेड जिल्ह्यात ६७३ सहकारी सोसायटीच्या माध्यमातून संकलन केंद्र असून त्यापैकी १७० दुध संकलन केंद्र कार्यान्वित आहेत. दुध संकलन केंद्रावरील दुध तसेच शेतकऱ्यांकडे जमा झालेले दुध स्थानिक पातळीवर वाटप करून दुध संकलन केंद्रात जमा होते. त्यावर प्रक्रिया होऊन ' आरे ' दुध या नावाने मुंबई व इतर बाजारपेठेत वितरीत केले जाते. शेतकऱ्यांना प्रति लिटर ९.८० पैसे हा योग्य भाव मिळतो.

**जिल्ह्यातील संकलन केंद्र**

(१) नांदेड - ४,००० लिटर

(२) लोहा - १,००० लिटर

(३) भोकर - ५०० लिटर

(४) किनवट - ३०० लिटर

(५) हदगांव - ५०० लिटर

(६) नायगांव/नरसी - १,५०० लिटर.

**एक वर्ष वयाच्या पारड्याचा पुरवठा योजना :** ग्रामीण भागात दुग्ध व्यवसायाला चालना मिळण्यासाठी तसेच उच्च प्रतिच्या म्हशींची निर्मिती होण्यासाठी मुऱ्हा-म्हैसाणा या सारख्या उच्च प्रतिच्या एक वर्ष वयाच्या पारड्याचे वाटप या योजने अंतर्गत ग्रामीण भागात केलेले आहे. सदर पारडे अनुसूचित जाती/जमातीच्या लाभधारकांना रू. १००/- एवढ्या नाममात्र किमतीत देण्यात आलेले आहेत. पारडे मिळाल्यानंतर या पारड्याचे पालनपोषण व संगोपन योग्य रितीने व्हावे म्हणून लाभधारकांना पारडे दिल्यापासून ९०० दिवस किंवा पारड्याच्या पहिल्या वेतापर्यंत यातील जो जवळचा कालावधी असेल त्यासाठी दररोज रू. १.५० प्रमाणे खावटी अनुदानाच्या खाद्य स्वरूपात पुरवठा केलेला आहे.

**भाकड गाभण म्हशींचा पुरवठा :** ग्रामीण भागातील दुग्धव्यवसायाला चालना देऊन अनुसूचित जाती/जमातीच्या लाभार्थ्यांचे आर्थिक जीवनमान उंचावण्याच्या दृष्टीने मुंबईच्या तबेल्यातील उच्च प्रतिच्या मुऱ्हा-म्हैसाणा ह्या जातीवंत भाकड गाभण म्हशींचा अनुदान तत्त्वावर पुरवठा करण्यात आलेला आहे.

यामध्ये भाकड गाभण म्हशीच्या एकूण किमतीच्या ५० टक्के किंवा जास्तीत जास्त रू. १,५०० इतके अनुदान देण्यात आलेले असून म्हशीच्या खावटी करीता रू. ३०० पशुखाद्य स्वरूपात व रू. २०० वाहतूक अनुदान म्हणून देण्यात आलेले आहे.

**शेतकरी कुटुंबांना प्रशिक्षण :** शेतकरी कुटुंबाना दुग्धव्यवसायाची जाणीव व्हावी, त्याची आवड निर्माण व्हावी आणि दुग्धव्यवसायाबाबत आत्मविश्वास निर्माण व्हावा या हेतूने अनुसूचित जाती/जमातीच्या लाभधारकांना (प्राधान्याने जोडप्यांना) सात दिवसापर्यंतचे दुग्धव्यवसायाचे प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. यात दुग्धव्यवसायासाठी मुलभूत आवश्यकतेबद्दल जसे की दुभत्या जनावराची निवड, संगोपन, हिरव्या वैरणीचे उत्पादन व महत्त्व, आहार, रोगनियंत्रण, जनावरांची तथा गोठ्याची स्वच्छता आणि दुधाची भांडी हाताळण्यामध्ये घ्यावयाची काळजी आदि बाबींचे प्रशिक्षण दिलेले आहे.

प्रशिक्षणासाठी लाभधारकाच्या गावापासून ते प्रशिक्षणापर्यंतच्या ठिकाणापर्यंत येण्याजाण्याचा खर्च शासनातर्फे करण्यात आलेला आहे.

**हिरवी वैरण विकास कार्यक्रम :** दुग्ध उत्पादकांकडील दुधाळ जनावरांना सकस हिरवी वैरण उपलब्ध व्हावी या दृष्टीने निवडक दुध सहकारी संस्थेच्या ज्याच्याकडे हिरवी वैरण लागवडीसाठी जमीन उपलब्ध आहे अशा दुध उत्पादक शेतकऱ्यांना संस्थेमार्फत बी-बियाणे मोफत पुरविण्यात आलेले आहे.[८७]

## कुळ वहिवाट व भूधारणा

नांदेड जिल्हा अस्तित्त्वात येण्यापूर्वी जमिनीवरील मिळकत आणि महसूल यांची आकारणी पैसा किंवा इतर स्वरूपात करण्यात येत होती. सतराव्या शतकाच्या सुरुवातीपासून जिल्ह्यात मलिक अंबरने नियोजित केलेली जमीन महसूल पद्धती रूढ होती. मलिक अंबरची पद्धती राजा तोडरमलच्या मूळ पद्धतीची सुधारित आवृत्ती होती. मलिक अंबरने जमिनीची सुपिकता व स्थान यावरून महसुलाचे दर ठरविले. इ.स. १८६६ मध्ये जिल्हा प्रशासनाचा प्रारंभ झाल्यावर पैशाच्या रुपात कर आकारणीला सुरुवात झाली आणि रयतवारी पद्धती अस्तित्त्वात आली. दक्षिणेत अकबराच्या राजवटीत राजा

८७. जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी, नांदेड यांचेकडील माहितीवर आधारीत.

तोडरमलने सर्व जमिनीची मोजणी करून व त्या जमिनीची प्रतवारी ठरवून सारा निश्चितीसाठी ' असल-इ-जमा-इ ' नामक पद्धती सुरू केली होती. अशा तऱ्हेने वसूल केल्या जाणाऱ्या साऱ्यास ' तनख्याह ' म्हणत.[८८]

सन १८८० मध्ये जिल्ह्यात सर्व्हेक्षण करण्यात आले. त्यानंतर १८८९ पासून जिल्ह्यातील कर आकारणी १५ वर्षासाठी औरंगाबाद, बीड आणि बेरार (वऱ्हाड) प्रांताप्रमाणे निश्चित करण्यात आली. या निश्चित कर आकारणीमुळे महसुलात ३९.७% इतकी वाढ घडून आली. या सर्व्हेक्षणावरून असे लक्षात येते की जमीन महसूल वास्तविकतेपेक्षा ४६% ने कमी दाखविला आहे. कोरड्या जमिनीवरील सरासरी कर आकारणी रु. १.८४ (जास्तीत जास्त ३ रुपये कमीत कमी ०.१९ रुपये) आणि सिंचित जमिनीवर रु. ९ (जास्तीत जास्त १० रुपये, कमीत कमी ६ रुपये) होती. दुबार पीक घेतल्या जाणाऱ्या जमिनीवर दुसऱ्या पिकावरील कर आकारणी ही पहिल्या पिकावरील कर आकारणीच्या निम्मी होती. वरील आद्र जमिनीवर आकारला जाणारा कर अबी (abi) पिकांसाठी तर तबी (tabi) पिकावर जास्तीत जासत रु. २० व कमीत कमी रु. १५ कर आकारला जात असे.[८९]

जमीन धारणाधिकाराच्या इतर पद्धतीत जहागिर, इनाम किंवा सरबस्ता, पेशकश आणि इजारा इ. होत्या. युध्दात अथवा प्रशासनात राजसत्तेस सहाय्य करणाऱ्यांना जहागिरी दिल्या जात. जहागिरदारीमध्ये सर्फ-इ-खास ही खुद्द निजामांचीच जहागीर असून त्याचे उत्पन्न निजामाच्या खर्चासाठी असे व त्यापासून निजामाला वार्षिक एक कोटी रुपये मिळत होते. सर्फ-इ-खास मध्ये जमिनी फार सुपीक असत. राज्याच्या एकूण क्षेत्रापैकी १०% क्षेत्रफळ सर्फ-इ-खासची जहागीर होती. मराठवाड्यातील सर्फेखासमध्ये खुलताबाद, सिल्लोड (जि. जालना), पालम (परभणी), पाटोदा (बीड), उस्मानाबाद, कळंब आणि परांडा यांचा समावेश होता. पायगा, ' पायगाह ' या शब्दाचा अर्थ ' रक्षक ' असा होतो. निजामाने त्यांच्याकडे आपल्या संरक्षणाची जबाबदारी सोपविली होती. हैद्राबाद संस्थानाचा ५% भाग हा पायगा जहागिरीने व्यापलेला होता. या जहागिरीचा मोठा भाग कर्नाटकात तर फार थोडा भाग मराठवाड्यात होता.

मराठवाड्यातील जहागिरदारीचे विश्लेषण व खेड्यांची संख्या खालीलप्रमाणे होती :—

| अ.क्र. | जिल्हा | दिवाणी | सर्फ-इ-खास | विविध सवलती असलेल्या जहागिरी | विविध सवलती नसलेल्या जहागिरी | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | औरंगाबाद, जालना | १,४४९ | ९२ | ८२ | ४०३ | २०२६ |
| २ | परभणी, हिंगोली | १,२६५ | १५० | १२३ | १०० | १८३८ |
| ३ | नांदेड | १,१४३ | ११ | ११३ | १५८ | १४२५ |
| ४ | उस्मानाबाद व लातूर | २४३ | ३७७ | २६० | २१ | ९०१ |
| | **एकूण** | ४,८९२ | ७१३ | ६२६ | ८०९ | ७०४० |

८८. **इम्पीरियल गॅझेटिअर ऑफ इंडिया**, प्रोव्हिन्शिअल सिरिज, हैद्राबाद स्टेट, सन १९०९, पृ. ६०.

८९. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** पूर्वोक्त, बॉम्बे-१९७१, पृ. २४४.

Maharashtra State Gazetteers

मराठवाड्यातील जहागिरदारीचे विश्लेषण केल्यास हे स्पष्ट होते की, मराठवाड्यात ७,०४० खेडी होती, त्यापैकी दिवणी भागात ४,८९२ खेडी तर सर्फ-इ-खास ही निजामाची खाजगी मालमत्ता होती. त्यामुळे हा प्रदेश विकासापासून वंचित राहिला. नांदेड जिल्ह्यात केवळ ११ खेडी सर्फ-इ-खास खाली होती. तर १,१४३ खेडी दिवाणी खाली होती. सर्फ-इ-खासमधील उत्पन्नाचा विनियोग हैद्राबाद शहराचा विकास करण्यासाठी केला. त्यामुळे मराठवाड्यातील सर्फ-इ-खासमधील जनतेची उन्नती होऊ शकली नाही.[९०] तत्कालीन नांदेड जिल्ह्यात हैद्राबाद राज्याचे जमीन महसुलाबाबतचे नियम व कायदे लागू होते. ते मुंबई राज्यातील मुंबई जमीन महसूल अधिनियमावर आधारित होते. याच नियमांना त्यावेळी दस्तूर-अल्-अमल म्हटले जात होते. इ.स. १९०७ पूर्वी प्रशासकीय जमीन महसूल पद्धती कायदेशीरपणे अमलात आलेली नव्हती. इ.स. १९०७ मध्ये हैद्राबाद लँड रेव्हेन्यू ॲक्ट, VII, (१३१७ फसली) हा जमीन महसुलासंबंधीचा कायदा लागू करण्यात आला. हा कायदा मुंबई जमीन महसूल संहिता,१८७९ वर आधारित होता. या कायद्यानुसार जमिनीची दोन गटात विभागणी करण्यात आली होती. (१) दिवाणी किंवा खालसा जमीन - या जमिनीचे व्यवस्थापन सरकारकडे असल्याने महसूल सरकारजमा होत असे. आणि (२) विशिष्ट कारणासाठी या जमिनीवर पूर्ण किंवा कमी दराने महसूल आकारण्यात येत असे अशी जमीन. या दुसऱ्या गटातील जमिनीचे दोन प्रकार होते. पहिल्या प्रकारात जमिनी सर्फ-इ-खास ही निजामाची जमीन व दुसऱ्या प्रकारात जागीर व इनाम जमीन होती.

इनामे ही व्यक्ती किंवा संस्थांनी केलेल्या कार्यासाठी आमदनी किंवा मोबदला म्हणून किंवा धर्मदाय दाननिधी म्हणून मानली गेली. तेव्हाच्या हैद्राबाद संस्थानामध्ये इनामे आणि जागिरी अभिहस्तांकित केल्या होत्या. इनाम व जागिरीची चौकशी करण्यासाठी एक समिती स्थापन करण्यात आली होती. परिणामतः त्यांच्या चौकशीतून १८६५ ते १९०३ च्या दरम्यान जी इनामे विधीग्राह्य सिध्द झाली ती पुढे चालू ठेवण्यात आली आणि इतर सरकारी मार्गदर्शनाप्रमाणे न्यायप्रविष्ट करण्यात आली. इनामे रद्द करण्याच्या दृष्टीकोनातून इनाम अंमलबजावणी कायदा, १९५२ तयार करण्यात आला. या कायद्यांतर्गत जी इनामे सेवेखातर दिली जात नव्हती अशी रयतवारीमध्ये बदलून पूर्ण कर लावण्यात आला. हा कायदा हैद्राबाद अबॉलिशन ऑफ इनामस् ॲक्ट, १९५४ नुसार रद्द करण्यात येऊन या कायद्यानुसार धार्मिक किंवा धर्मदाय कार्य तसेच विशिष्ट शासकीय सेवेसाठी दिलेली इनामे सोडून सर्व इनामे रद्द करण्यात आली व त्या सर्व जमिनीवर सारा आकारण्यात आला. संस्थानांच्या ३०% पेक्षा जास्त भागामध्ये सहा प्रकारच्या जागिरी होत्या. हैद्राबाद अबॉलिशन ऑफ जागीर रेग्युलेशन ॲक्ट, १९४९ अन्वये जागिरी परत घेण्यात आल्या. इनामे आणि जागिरी अबॉलिशन ॲक्टचा परिणाम म्हणून मराठवाडा विभागातील देवस्थान आणि धार्मिक देणगी सोडून कोणाच्याही नावावर जमिनी नव्हत्या. जिल्ह्यात खालील इनाम अबॉलिशन कायदे लागू करण्यात आले होते.

(१) दि हैद्राबाद अबॉलिशन ऑफ कॅश ॲक्ट, १९५२.

(२) दि हैद्राबाद अबॉलिशन ऑफ इनाम्स ॲण्ड कॅश ग्रँटस् ॲक्ट, १९५४.

(३) दि बॉम्बे इन्फेरिअर व्हिलेज वतन अबॉलिशन ॲक्ट, १९५८.

(४) दि महाराष्ट्र रेव्हेन्यू पाटील्स ॲक्ट, १९६२.

---

९०. काटे, पी. व्ही. **मराठवाड्याचा इतिहास,** १९९९, पृ. १०९-११२.

**शेतसारा आकारणी :** १९६६ पूर्वी दरवर्षी जिल्ह्यातील सारा वसुलीचे काम मक्त्याने देण्यात येत असे व महसूल गोळा करणाऱ्या ठेकेदारांना काही टक्के अडत मिळत असे. १८६६ मध्ये या ठेकेदारांच्या जागी जिल्ह्यातून आणि तालुक्यातून कायम अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली.

मूळ जमाबंदीच्या वेळी प्रत्येक प्रकारच्या जमिनीची वर्गवारी वेगवेगळी लक्षात घेऊन त्याप्रमाणे जमिनीचा सारा ठरविण्यात आला होता. मात्र साऱ्याची सर्वसाधारण पातळी ठरविताना प्रत्येक भागातील पावसाचे प्रमाण, पिकांचे प्रकार, सरासरी उत्पादन, किंमती, खंडाचे प्रमाण, बाजारापासूनचे अंतर, दळणवळणाच्या सोयी आणि इतर तत्सम गोष्टी विचारात घेण्यात आल्या. जमाबंदीच्या दुसऱ्या फेरपाहणीच्या वेळी वेगवेगळ्या जमिनीची प्रथमतः केलेली वर्गवारी बदलण्यात आली नाही आणि जमाबंदीच्या मुदतीत जमीन मालकांनी जमिनीमध्ये केलेल्या सुधारणांचा फायदा कोणताही कर न आकारता सर्वसाधारणपणे त्यांना घेऊ देण्यात आला. यामुळे जमिनीच्या प्रत्येक तुकड्यामागे साऱ्याचे तुलनात्मक प्रमाण जमाबंदीच्या पहिल्या फेरपाहणीच्या वेळी होते तेवढेच साधारणपणे राहील आणि प्रत्येक जमाबंदीच्या वेळी करण्यात आलेली वाढ सर्व विभागात सारखीच लागू करण्यात आली. या जिल्ह्यातील सारा आकारणीची पद्धती स्थुलमानाने महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यांप्रमाणेच आहे. विहिरी, तलाव आणि छोटे पाटबंधारे यांच्यामुळे भिजणाऱ्या जमिनींच्या बाबतीत पुरवठा केलेल्या पाण्याच्या आकाराचाही जमीन महसुलात समावेश करण्यात येतो.

जिल्ह्यातील निरनिराळ्या तालुक्यातील (किनवट तालुका सोडून) मूळ पाहणी व जमाबंदी १८८५ ते १८९२ या दरम्यान पूर्ण करण्यात आली. पहिली फेरपाहणी १९०४ ते १९१८ या दरम्यान आणि दुसरी फेरपाहणी १९२४ ते १९२७ या दरम्यान पूर्ण करण्यात आली. किनवट तालुक्यात मूळ पाहणी १९०८ मध्ये आणि पहिली फेरपाहणी १९१८ मध्ये करण्यात आली. जमाबंदीच्या फेरपाहणीची मुदत संपली असूनसुद्धा साऱ्याच्या दरांची फेरपाहणी करण्यात आलेली नाही.

१९५२ च्या हैद्राबाद जमीन (खास सारा) अधिनियमानुसार जिल्ह्यातील सर्व कोरडवाहू जमिनीवर एक रुपयामागे दोन आणे म्हणजे जमीन महसुलाच्या १२.५ टक्क्याइतका आणि सर्व बागायती जमिनीवर एक रुपयाप्रमाणे एक आणा म्हणजे जमीन महसुलाच्या ६.२५ टक्क्याइतका खास सारा आकारण्यात येत असे. जहागिरीखालील काही खेड्यांची शासनाच्या पाहणी व जमाबंदी विभागाकडून पाहणी व जमाबंदी करण्यात आली आहे आणि काही खेड्यांची जहागिरदारांच्या स्वतःच्या कारभार यंत्रणेमार्फत अशी पाहणी व जमाबंदी करण्यात आलेली आहे. जहागिरीखालील साऱ्याचे दर सर्वसाधारणपणे जवळपासच्या सरकारी खेड्यातील दरापेक्षा जास्त होते. १९४९ मध्ये जहागिऱ्या नष्ट झाल्यानंतर शासनाने अशा बऱ्याचशा खेड्यातील दरासंबंधी चौकशी करून पूर्वीच्या जहागिरीखाली असलेल्या खेड्यातील साऱ्याचे दर कमी करून ते आसपासच्या सरकारी खेड्यातील दराच्या पातळीवर आणले आहेत.

प्रत्येक जमाबंदीच्या वेळी जिल्ह्याच्या प्रत्येक तालुक्याचे क्षेत्रफळ आणि त्यातील खेड्यांची संख्या यात बदल झालेला आहे. मुळ जमाबंदीच्या वेळी किंवा नंतरच्या फेरपाहणीच्या वेळी जहागिरीखालील खेडी त्यातून वगळण्यात आली होती. १९४६ मध्ये प्रथम जहागिरीखालील खेड्यांमध्ये नजीकच्या सरकारी खेड्यांप्रमाणेच साऱ्याचे दर ठरवायचे असे सर्वसाधारणपणे धोरण होते. ज्या

खेड्यातून जास्त दर होते तेथे जहागिऱ्या नष्ट झाल्यानंतर वर सांगितल्याप्रमाणे कमी करून नजीकच्या सरकारी खेड्यातील साऱ्याच्या दरांच्या पातळीवर आणण्यात आले.१९५० साली काही तालुक्यातील खेडी एकत्र करून भोकर व मुखेड हे दोन नवीन महाल निर्माण करण्यात आले होते. अशाप्रकारे काही खेड्यांची अलिकडे जमाबंदी झाल्यामुळे, तसेच तालुक्यांच्या सरहद्दीत वेळोवेळी बदल झाल्यामुळे पूर्वीच्या जमाबंदी अहवालात अवलंबिलेल्या सारा आकारणीच्या पद्धतीपेक्षा वेगळी पद्धत हल्ली बऱ्याचशा तालुक्यात आढळते. तरीपण प्रत्येक जमाबंदीच्या वेळा किंवा तिच्या फेरपाहणीच्या वेळी जे साऱ्याचे एकरी कमाल किंवा सरासरी दर ठरविण्यात आले त्यावरून सुद्धा जिल्ह्याच्या निरनिराळ्या जमाबंदीच्या वेळी जमीन महसुलाचा आकार किती होता याची वास्तव कल्पना येऊ शकते.[९१]

**कुळ संरक्षण :** ज्या पद्धतीखाली वहिवाटदार जमीन धारणा करतात त्याला वहिवाटदारी जमीनधारणा पद्धत म्हणतात. या पद्धतीत अप्रतिबंधीत व प्रतिबंधीत असे दोन प्रकार आहेत. पैकी पहिल्या प्रकारात जमीन दुसऱ्याकडे हस्तांतरीत करण्यास, विकण्यास किंवा गहाण ठेवण्यास प्रतिबंध नाहीत. तर दुसऱ्या प्रकारात अशी बाब फक्त जिल्हाधिकाऱ्याच्या परवानगीनेच होऊ शकते. सन १९६० पूर्वी मराठवाडा विभागात प्रतिबंधीत वहिवाटदारी नव्हती. महाराष्ट्रात इनामदार, मालगुजार आणि खोत यांच्याकडे जमीन मालकी व शेतसाराविषयक अनेक प्रकारचे हक्क होते. मराठवाड्यात रयतवारी पद्धतीचे प्राबल्य असले तरी इजाय, कौल, इनाम व जागीर सारखी वहिवाटदारीही होती. अप्रतिबंधीत वहिवाटदारीमध्ये वर उल्लेखिल्याप्रमाणे जमीन इतरांना हस्तांतरित करता येत असल्यामुळे व अशा जमिनी इनामदार, खोत जमिनदार वगैरे संपन्न वर्गाकडे असल्यामुळे स्वतः जमीन न कसता कुळांकडून जमीन कसणाऱ्यांना एक वर्ग १९ व्या शतकाच्या अखेरीस निर्माण झाला. हा वर्ग जमिनीचा वापर शेतीऐवजी व्यापारी गुंतवणूक म्हणून करू लागल्याने तो व प्रत्यक्ष जमीन कसणारी कुळे यांच्यातील असंघटितपणा वाढत जाऊन वहिवाटदारी पद्धती निर्माण झाली. यातून जमीन मालकांकडून भाडेतत्त्वावर जमीन घेऊन कसण्याची स्पर्धा निर्माण झाल्याने पर्यायाने शेती उत्पन्न कमी होऊन महसुली उत्पन्न कमी होऊ लागले. यातून मार्ग काढण्यासाठी नियोजन मंडळाने कुळांना जमीन मालक बनविण्यासाठी काही तरतुदी सुचविल्या. त्यानुसार सरकारने सरकार व कुळांमधील मध्यस्थ नष्ट करण्यासाठी असलेल्या असामी शिक्मी ॲक्ट, १३५४ फसली (१९४५) च्या जागी अधिक परिणामकारक असा हैद्राबाद टेनन्सी ॲण्ड ॲग्रिकल्चरल लॅण्डस् ॲक्ट, १९५० हा कायदा गठीत केला. त्यातूनही अपेक्षित फलनिष्पत्ती न झाल्याने १९५४, १९५७ व १९५९ चे सुधारणा (अमेंडमेंडस्) कायदे करण्यात आले. त्यानुसार जमीन मालकांकडून जमीन मालकी व शेतसाऱ्याचे हक्क काढून घेऊन प्रत्यक्ष जमीन कसणाऱ्यास (कुळ) ते माफक रक्कम भरपाई म्हणून भरल्यावर बहाल करण्यात आले. या कायद्यांमुळे कसेल त्याची जमीन हे तत्त्व लागू केल्याने बऱ्याच जमिनी कुळांच्या मालकीच्या झाल्या. शिवाय जमीन मालकांची जमीन धारणाही या कुळ कायद्यांमुळे मर्यादित झाली. परिणामी कृषि विकास सुलभ झाला.

---

९१. **जिल्हा जनगणना निर्देश ग्रंथ,** पूर्वोक्त, पृ. ३.

कुळाने द्यावयाच्या खंडाची कमाल मर्यादा निश्चित करणे आणि कुळांना त्यांच्या वहिवाटी संबंधात सुरक्षितता प्राप्त करून देणे हा कुळविषयक कायदे करण्याचा मुख्य उद्देश होता. मुदत संपल्यावरही कुळवहिवाट रद्द होत नसे, तसेच कायद्याने ठरवून दिलेल्या मर्यादेपेक्षा कुळाने द्यावयाचा खंड शेतसाऱ्याच्या तीन ते पाच पटीपेक्षा जास्त असू नये असे बंधनही घालण्यात आले. पुढे सन १९६० मध्ये सरकारने भूमिहिनांनाही जमीन देण्याचे धोरण अवलंबिले. त्यानुसार काही तरतुदी सुचवून व त्यात सुधारणा करून त्या १९६० च्या कायद्यात रुपांतरीत केल्या. या सुधारणांमुळे मराठवाड्यातील वहिवाटदारी पद्धती ही पश्चिम महाराष्ट्रातील वहिवाटदारी पद्धतीसारखी झाली.

**कुळांना मालकी हक्क :** कुळ वहिवाटीचे हक्क जून १९५० पासून अंमलात आलेल्या हैद्राबाद कुळवहिवाट व शेतजमिनी अधिनियमानुसार विनियमित होतात. या अधिनियमामुळे कुळांना वहिवाटीची शाश्वती आणि वाजवी खंडाची हमी प्राप्त झाली आहे.

'कसेल त्याची जमीन' या धोरणानुसार या अधिनियमात रद्द जानेवारी १९५६ पासून कुळांकडील जमिनीचे मालकी हक्क सक्तीने कुळांना हस्तांतरीत करण्याबाबत तरतूद करण्यात आली आहे. गैरहजर जमीन मालकी पद्धती नष्ट करण्याच्या दिशेने टाकलेले हे एक महत्त्वाचे पाऊल होते. ३१ मार्च १९६३ पर्यंत जिल्ह्यातील ८,०७८ कुळांना ८२,९०८.७८ एकर जमिनीचे मालकी हक्क देण्यात आले होते. त्यापैकी ६,८५० प्रकरणात जमीन मालक आणि कुळ ह्यांनी परस्परांच्या विचारविनिमयाने जमिनीच्या किंमती ठरविल्या.[९२]

**शेतजमीन धारणेची कमाल मर्यादा :** महाराष्ट्र शेतजमीन धारणा (कमाल मर्यादा) अधिनियम २६ जानेवारी १९६२ पासून अंमलात आला. जिल्ह्यातील किनवट, नांदेड, मुखेड या तीन प्रदेशातील कोरडवाहू पिकाच्या जमिनीची कमाल मर्यादा अनुक्रमे ११४, ९६ आणि १०८ एकर ठरवून दिली आहे. जलसिंचित प्रदेशाची कमाल मर्यादा तीनही प्रदेशांसाठी एकच आहे, ती म्हणजे बारमाही जलसिंचित प्रदेशासाठी १८ एकर, दोन हंगामात जलसिंचन होणाऱ्या प्रदेशासाठी २७ एकर आणि एकाच हंगामात जलसिंचन होणाऱ्या प्रदेशासाठी ४८ एकर आहे. ज्यांच्या ताब्यात कमाल क्षेत्राहून अधिक जमीन आहे अशा जमिनधारकांवर काही बंधने घालण्यात आली आहेत. मर्यादेहून अधिक असलेली जमीन अधिनियमानुसार निश्चित केली जाईपर्यंत ती दुसऱ्याच्या नावावर करून देण्याची त्यांना मुभा नाही किंवा तिची वाटणीही करता येत नाही. त्यांना त्यांच्या ताब्यातील जमिनीची आवश्यक माहिती जिल्हाधिकाऱ्यांना सादर करावी लागते. जिल्हाधिकाऱ्यांनी जादा जमिनी निश्चित करण्यासाठी चौकशी करून त्या आपल्या ताब्यात घ्यावयाच्या असतात आणि नंतर त्या जमिनी राज्य सरकारच्या स्वाधीन करावयाच्या असतात. जमिनधारकांना काही ठराविक दराने नुकसानभरपाई देण्यासंबंधीची आणि जास्तीच्या जमिनीची भूमिहिनांना किंवा इतरांना अग्रक्रमानुसार वाटणी करून देण्याची सुद्धा या अधिनियमात तरतूद आहे.[९३]

---

९२. **जिल्हा जनगणना निर्देश ग्रंथ,** १९६१, नांदेड जिल्हा, १९६७, पृ. ५.

९३. कित्ता, पृ. ३६.

# कृषि शिक्षण व संशोधन

**मराठवाडा कृषि विद्यापीठ :** मराठवाडा कृषि विभागातील शेतकऱ्यांच्या शेतीविषयक गरजा भागविण्यासाठी आणि त्यांच्या शेतीविषयक आकांक्षा फलद्रूप करण्यासाठी तसेच शेतकरी व शेतकऱ्यांच्या मुलांना कृषि विषयाचे तांत्रिक शिक्षण देऊन त्यांचा आत्मविश्वास वाढविणे, जेणेकरून कृषि विषयाचे शिक्षण घेणारे विद्यार्थी स्वतःची शेती करण्यास प्रवृत्त होतील आणि सुधारीत तंत्रज्ञानाच्या वापरामुळे शेती उत्पादन वाढेल पर्यायाने शेतकऱ्यांचा सामाजिक व आर्थिक स्तर उंचावण्यास मदत होईल. विद्यार्थ्यांच्या ज्ञानाचा उपयोग त्यांची स्वतःची शेती सुधारण्याबरोबरच त्यांच्या गावातील व भागातील शेतकऱ्यांना त्यांचे मार्गदर्शन मिळेल. कृषि विद्यापीठामध्ये नवीन संशोधन, तंत्रज्ञान आणि पिकांच्या उन्नत वाणाची निर्मिती व्हावी. संशोधनातून शेतीला नवीन पूरक उद्योगाची निर्मिती होऊन रोजगार उपलब्ध होईल. एकंदरीत कृषिविषयांचे ज्ञान आणि शिक्षण या भागातील जनतेला उपलब्ध होतील, नवीन संशोधन आणि तंत्रज्ञान विकसित होऊन त्यांचा विस्तार तळागाळातल्या आपल्या शेतकरी बांधवांपर्यंत व्हावा या उद्देशाने मराठवाडा कृषि विद्यापीठाची स्थापना दिनांक १८ मे १९७२ रोजी परभणी येथे करण्यात आली.

मराठवाडा कृषि विद्यापीठाचे प्रमुख कार्य कृषि व संलग्न विषयांच्या शिक्षणाची उत्तम सोय उपलब्ध करणे, या शास्त्रातील संशोधन गतिमान करणे, कृषि विकास कार्याला चालना देणे आणि कृषि विस्तार प्रशिक्षणाचे कार्यक्रम राबविणे आहे. त्याचप्रमाणे परिस्थितीनुरूप शैक्षणिक पद्धतीत आधुनिकता व गती निर्माण करणे हे मराठवाडा कृषि विद्यापीठाचे ध्येय आहे.

मराठवाडा कृषि विद्यापीठांतर्गत परभणी, लातूर, नांदेड, हिंगोली, औरंगाबाद, बीड इत्यादी जिल्ह्यांचा समावेश होतो. नांदेड जिल्ह्यात मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या आधीपासून सन १९४१ पासून ता. देगलूर येथे कापूस संशोधन केंद्र तर १९६२ पासून पावडेवाडी नाका येथे कृषि विद्यालये सुरू आहेत. सध्या ती मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या अधिकार कक्षेत येतात. तर विद्यापीठाची मान्यता असलेले परंतू विना अनुदानित खाजगी संस्थेचे ता. नायगांव येथे कृषि महाविद्यालय तर जिल्ह्यात इतरत्र एकूण ८ कृषि विद्यालये आहेत. ती पुढीलप्रमाणे.

**कृषि विद्यालये**

(१) कृषि विद्यालय, बनचिंचोली, ता. हदगांव.
(२) कृषि विद्यालय, बोरगांव, ता. भोकर.
(३) कृषि विद्यालय, किनवट, ता. किनवट.
(४) कृषि विद्यालय, नेहरूनगर नागलगांव, ता. कंधार.
(५) कृषि विद्यालय, पांगरी, ता. लोहा.
(६) कृषि विद्यालय, पाचपिंपळी, ता. बिलोली.
(७) कृषि विद्यालय, सुगांव, ता. मुखेड.
(८) कृषि विद्यालय, वळग, ता. देगलूर.

Maharashtra State Gazetteers

वरीलप्रमाणे नांदेड जिल्ह्यात मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या अधिकारक्षेत्रात १ संशोधनकेंद्र (त्याची माहिती पुढे कापूस संशोधन केंद्र या घटकात दिली आहे.) व १ कृषि विद्यालय तर खाजगी संस्थेचे १ कृषि महाविद्यालय व ८ कृषि विद्यालये आहेत. या कृषि महाविद्यालय/विद्यालय यातील पदवी कालावधी व विद्यार्थी संख्या पुढीलप्रमाणे.

| अ.क्र. | शैक्षणिक संस्था | पदवी/पदविका | कालावधी | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | कृषि महाविद्यालय | पदवी (बी.एस.सी. कृषि) | ४ वर्ष | ९६ प्रत्येकी |
| २ | कृषि विद्यालय | कृषि पदविका प्रमाणपत्र अभ्यासक्रम | २ वर्ष | ६० प्रत्येकी |

तसेच सन १९७२ मध्ये नांदेड जिल्ह्यात मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या नियंत्रणाखाली एक विद्यार्थी वसतीगृह, कृषि विद्यालय, नांदेड येथे स्थापन करण्यात आले असून तेथे प्रतिवर्षी ८० विद्यार्थी असतात.

मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या कार्यकक्षेत येणाऱ्या जिल्ह्यांमध्ये नांदेड जिल्ह्याचा समावेश होतो. विद्यापीठाने केलेले समस्याभिमुख संशोधन शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत पोहचविण्याचे कार्य विस्तार शिक्षण संचालनालयामार्फत विविध कार्यक्रमातून केले जाते. हे नवीन कृषि तंत्रज्ञान शेतकऱ्यांनी अवलंबावे असे अपेक्षित असते. हे कृषि तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याचे काम प्रशिक्षण व भेट योजना, विभागीय कृषि विस्तार केंद्र, कृषि विज्ञान केंद्र व कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र या योजनांच्या माध्यमातून केले जाते. मराठवाड्यातील नांदेड, परभणी, व हिंगोली या जिल्ह्यांसाठी स्वतंत्र विभागीय कृषि विस्तार शिक्षण केंद्र स्थापन करण्यात आले आहे. प्रशिक्षण व भेट योजनांतर्गत जिल्हा मासिक चर्चासत्रात कृषि खात्याव्यतिरिक्त जिल्हा परिषद, बियाणे महामंडळ, पाटबंधारे विभाग, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभाग इत्यादी विभागाचे अधिकारी भाग घेतात. जिल्हा मासिक चर्चासत्रात एक दिवस शास्त्रज्ञ आणि अधिकारी प्रक्षेत्र भेटीवर जावून शेतकऱ्यांच्या शेतावर भेटी देतात. या भेटीत पीक प्रात्याक्षिक, प्रक्षेत्र चाचणी प्रयोग आणि शेतकऱ्यांनी अवलंबिलेल्या तंत्रज्ञानाची पाहणी करण्यात येते, तसेच शेतकऱ्यांच्या समस्याचे निरसन करण्यात येते.

विस्तार शिक्षण संचालनालय व विभागीय कृषि विस्तार शिक्षण केंद्रामार्फत वेगवेगळ्या केंद्रांमार्फत वेगवेगळ्या कार्यक्रमातून जसे प्रक्षेत्र भेटी, निदान चमू भेटी, प्रशिक्षण कार्यक्रम, शेतकरी मेळावे, शेतकऱ्यांना सल्ला देणे, शेतीदिन, पीक परिसंवाद, गटचर्चा इत्यादी नवीन तंत्रज्ञान नांदेड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत पोहोचविले जाते.

शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी शेतकऱ्यांच्या शेतावर शास्त्रज्ञ आणि विस्तार कार्यकर्ते यांच्या संयुक्त भेटी तसेच निदान चमूच्या भेटी आयोजित केल्या जातात. प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या शेतावर पीक पाहणी करून शेतकऱ्यांच्या समस्येचे निराकरण केले जाते. शेती उत्पादनामध्ये जे प्रश्न निर्माण होतात, त्याची उकल करण्यासाठी प्रशिक्षणाची गरज असते. म्हणून शेतकरी, ग्रामीण युवक, महिला शेतकरी, सुशिक्षित बेरोजगार यांना शेती व शेतीवर आधारित इतर पूरक व्यवसायावर विद्यापीठात तसेच विद्यापीठा परिसराबाहेर प्रशिक्षण वर्ग आयोजित केले जातात. विद्यापीठात विभागीय कृषि विस्तार शिक्षण केंद्राच्या ठिकाणी तसेच खेडेगावात शेतकरी मेळाव्याचे आयोजन केले जाते. अशा शेतकरी मेळाव्यातून विद्यापीठातील शास्त्रज्ञ व विषयतज्ज्ञ शेतकऱ्यांना विविध विषयावर मार्गदर्शन करतात. तसेच शेतकऱ्यांच्या शेतावर पीक परिसंवाद, शेतीदिन, गटचर्चा आयोजित केल्या जातात.

Maharashtra State Gazetteers

शेतकऱ्यांना हवी ती माहिती एकाच छत्राखाली उपलब्ध व्हावी यासाठी मराठवाडा कृषि विद्यापीठाने परभणी येथे कृषितंत्रज्ञान माहिती केंद्र उभारले आहे. या कार्यालयातून शेतकऱ्यांची सेवा, माहिती पुरविणे, माती तपासणी, पशु आरोग्य तपासणी, पिकावरील किड व रोग निदान, बियाण्यांची माहिती, विक्री, कृषि सल्ला, कृषि चिकित्सा इत्यादी माध्यमांद्वारे करण्यात येत आहे. तसेच रोपे, कलमे, उती संवर्धित रोपे, विद्यापीठाची प्रकाशने, शेती उपयोगी अवजारे इत्यादींची विक्री करण्यात येते.

शेतकऱ्यांना माहिती पुरविण्याचा एक भाग म्हणून या केंद्रातर्फे दर शुक्रवारी सकाळी ९ ते ११ या वेळेत कृषि माहिती वाहिनी या उपक्रमांतर्गत शेतकऱ्यांच्या प्रश्नांना फोनवरच उत्तरे दिली जातात. यासाठी शेतकऱ्यांनी दर शुक्रवारी निर्धारित वेळेत आपले प्रश्न २२९००० या दूरध्वनी क्रमांकावर विचारणा करावी व लगेचच आपल्या प्रश्नांचे शंका समाधान करून घ्यावे.

दिनांक २१ जानेवारी २००४ पासून ' किसान कॉल सेंटर ' या उपक्रमांतर्गत शेतकऱ्यांसाठी मोफत कॉल सेवा योजना देशपातळीवरून सुरू करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत शेतकऱ्यांना किसान कॉल सेंटरवरून माहिती देण्यात येते. शेतकऱ्यांना विनामुल्य सेवा (Toll Free) १५५१ या दूरध्वनी क्रमांकावर उपलब्ध आहे. ज्या प्रश्नांना प्राथमिक स्तरावर उत्तरे देता येत नाहीत त्यासाठी दुसऱ्या स्तरावर कृषि विद्यापीठातील विषय तज्ज्ञांकडून माहिती देण्यात येते.

या व्यतिरिक्त कृषि तंत्रज्ञानाचा प्रसार करण्यासाठी विविध प्रकाशने, शेतीभाती मासिक, शेतकऱ्यांसाठी आकाशवाणी/दूरदर्शनवरून मार्गदर्शन करणे, विविध वृत्तपत्रातून लेख लिहिणे अशा पद्धतीचाही वापर केला जातो.[९४]

**कृषि विद्यालय, नांदेड :** कृषि विद्यालय नांदेडची स्थापना १९६३ साली करण्यात आली. हे कृषि विद्यालय त्यावेळेस महाराष्ट्र कृषि विभागामार्फत कार्यरत होते. त्यानंतर १९६७ साली जिल्हा परिषद नांदेडकडे वर्ग करण्यात आले. तर १ एप्रिल १९७४ पासून नांदेड कृषि विद्यालय मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांचेकडे सुपूर्द करण्यात आले. या विद्यालयाद्वारे कृषि पदविका अभ्यासक्रम शिकविला जातो. यात एकूण ६० विद्यार्थ्यांना दरवर्षी प्रवेश दिला जातो.

कृषि विद्यालयाच्या स्थापनेपासून एप्रिल, २००५ पर्यंत पदविका शिक्षण पूर्ण करण्याऱ्या विद्यार्थ्यांची संख्या १,६२२ इतकी आहे. कृषि विद्यालयामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या आणि शेतमजुरांच्या मुलांना नवीन शेती तंत्रज्ञानाची माहिती देऊन त्याचा आत्मविश्वास वाढवून आधुनिक पद्धतीने शेती करण्याविषयी उत्तेजन मिळाले. शेतकऱ्यांची मुले आधुनिक पद्धतीने शेती करू लागली व आसपासचे शेतकरी त्यांचे अनुकरण करू लागले. प्रत्येक गावात चार ते पाच पदविकाधारक विद्यार्थी आहेत. जिल्हा परिषद, कृषि विद्यापीठ आणि शेतावर आधारित खाजगी कंपन्यामध्ये तांत्रिक माहिती असलेले कृषि पदविकाधारक कार्यरत आहेत.

नांदेड कृषि विद्यालयाकडे एकूण ५२.९० हेक्टर क्षेत्र आहे. तसेच कृषि विद्यालयात विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह व वाचनालयाची सोय उपलब्ध आहे.[९५]

---

९४. कुलसचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांनी पाठविलेल्या माहितीवर आधारीत.

९५. अधीक्षक, कृषि विद्यालय, नांदेड यांनी पाठविलेल्या माहितीवर आधारीत आहे.

**कापूस संशोधन केंद्र, नांदेड :** मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या स्थापनेपूर्वीपासून नांदेड जिल्ह्यात देगलूर येथे सन १९४१ साली कापूस संशोधन केंद्राची स्थापना करण्यात आली. कापूस संशोधन केंद्राखाली एकूण ६६.८९ हेक्टर क्षेत्रापैकी जुने क्षेत्र २७.८४ हेक्टर तर नवीन क्षेत्रात १६.० हेक्टर व धनेगांव प्रक्षेत्राखाली २३.०५ हेक्टर क्षेत्र असून लागवडीखाली असलेले एकूण क्षेत्र ३८.२० हेक्टर आहे. त्यात कापूस संशोधन केंद्र, नांदेड येथे २१.० हेक्टर क्षेत्र तर धनेगांव प्रक्षेत्र येथे १७.२० हेक्टर क्षेत्र लागवडीखाली आहे. त्याचप्रमाणे या संशोधन केंद्रात संशोधकाची एकूण संख्या १२ असून त्यापैकी ६ शास्त्रज्ञ तर ३ वरिष्ठ संशोधन सहायक व ३ कनिष्ठ संशोधन सहायक आहेत.

**कार्य :** कापूस संशोधन केंद्र, नांदेड येथे मराठवाडा विभागातील हवामान व जमिनीस प्रतिसाद देणाऱ्या कपाशीच्या सुधारित जाती विकसित करण्याचे संशोधन कार्य चालू असून १९७२ पासून प्रसारित केलेल्या कपाशीच्या वाणाची माहिती तक्त्यात दिली आहे. कपाशीचे सुधारित वाण विकसित करणे हा संशोधनाचा प्रमुख उद्देश असला तरी कपाशीवरील विविध किडी व रोगांच्या सविस्तर अभ्यास करून वेळोवेळी योग्य औषधीची शिफारस करण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे सुधारित वाणांसाठी लागणारे लागवड तंत्र विकसित करून शिफारसी करण्यात आल्या आहेत.

**नांदेड जिल्ह्यात पूर्वी प्रचलित असलेल्या कपाशीच्या जातींची नावे पुढीलप्रमाणे.**

एच-४, एलआरए-५१६६, एम.सी.यु.-५, डिसीएच-३२, बुरी-१४७, जी-२, जी-४६, जेकेएचवाय-१, पीकेवीएच-२, गावरान (देशी) वाय-१, पीए-३२ (एकनाथ), पीए-१४१, पीए-१८३, सी.जे. ७३.

**कापूस संशोधन केंद्र, नांदेडद्वारा विकसित कपाशीच्या सुधारित वाणाची माहिती**

| अ.क्र. (१) | कपाशीच्या वाणाचे नाव (२) | प्रसारीत वर्ष (३) | वंश/जात (४) | वाणाची वैशिष्ट्ये (५) |
|---|---|---|---|---|
| १ | एस आर टी-१ | १९७८ | अमेरिकन कपाशी (सरळवाण) | एल-१४७ पेक्षा २५ टक्के अधिक उत्पादन व सरस रूईचा उतारा (३७%) रसशोषण करणाऱ्या किडींना प्रतिकारक कालावधी कमी (१६०-१७० दिवस). |
| २ | एक एच एच-१ (गोदावरी) | १९८० | अमेरिकन कपाशी (संकरवाण) | एच-४ पेक्षा १५ टक्के अधिक उत्पादनक्षमता, रसशोषण करणाऱ्या किडीस प्रतिकारक्षम, धाग्याची प्रत सरस. |
| ३ | एन एच-४८ (रोहिणी) | १९८४ | देशी कपाशीचे (सरळवाण) | अधिक उत्पादन देणारा व धाग्याची प्रत सरस असलेला देशी कपाशीचा वाण. |
| ४ | एन एच-२३९ (पुर्णिमा) | १९८४ | अमेरिकन सरळवाण | एस आर टी-१ पेक्षा अधिक उत्पादन व रूईचा उतारा सरस (३९-४० टक्के). |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| ५ | एन एच एच-४४ | १९८५ | अमेरिकन कपाशीचे संकरवाण | एच-४ पेक्षा १५-२० टक्के अधिक उत्पादन, रसशोषण करणाऱ्या किडींना प्रतिकारक, विविध हवामानात उत्पादनात स्थिरता, महाराष्ट्राशिवाय कर्नाटक, गुजरात, आंध्रप्रदेश, तामिळनाडू इत्यादी राज्यात लागवड १९८५-९० च्या दरम्यान भारतात संकरीत वाणाखाली सर्वात मोठे असलेले संकरवाण. |
| ६ | एन एच एच-३०२ | — | — | — |
| ७ | एन एच बी-१२ | १९९० | अमेरिकन कपाशी × इजिप्शियन (संकरवाण) | डी सी एच-३२ पेक्षा अधिक उत्पादन क्षमता धाग्याची प्रत सरस (सुताचा काऊंट ८० पर्यंत). |
| ८ | एन एच-४५२ | १९९५ | अमेरिकन कपाशीचा (सरळवाण) | एन एच-२३९ पेक्षा अधिक उत्पादन, रसशोषण करणाऱ्या किडींना प्रतिकार करण्याची अधिक क्षमता, उत्पादन क्षमता १२-१५ क्वि./हे., पाण्याचा ताण सहन करण्याची क्षमता, रूईचा उतारा ४० टक्के. |
| ९ | एन एच-५४५ | २००१ | अमेरिकन कपाशी (सरळवाण) | एन एच-४५२ (रेणूका) पेक्षा अधिक उत्पादन, रसशोषण करणाऱ्या किडीस प्रतिकारक्षम, पाण्याचा ताण सहन करण्याची क्षमता, विविध हवामानात उत्पादनात स्थिरता, झाडाची वाढ ऊभट, उत्पादन १५-२० क्वि./हे., रूईचा उतारा ३९ टक्के. |
| १० | पी एच-३४८ | २००३ | अमेरीकन कपाशी (सरळवाण) | एन एच-४५२ (रेणूका) व एन एच-५४५ पेक्षा अनुक्रमे २४ व १६ टक्के अधिक उत्पादन दिले, धाग्याची लांबी २७.४ मि.मी. तर रूईचा उतारा ३८.८ टक्के दिसून आला. या वाणाची मराठवाडा विभागात कोरडवाहू लागवडीसाठी शिफारस करण्यात येत आहे.[९६] |

९६. कृषि दैनंदिनी, २००४, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी, पृ. १.

Maharashtra State Gazetteers

तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे नांदेड येथील कापूस संशोधन केंद्रातून कपाशीचे नवीन सुधारित वाण विकसित केले गेले असून त्यापैकी कापसाच्या काही जातीचे दर हेक्टरी उत्पादन पुढीलप्रमाणे.

(१) एन एच-४५२/एन एच-५४५ - १० ते १५ क्विं./हे. (कोरडवाहू)

(२) एन एच एच-४४ - १२ ते १५ क्विं/हे. (कोरडवाहू) आणि १५ ते २० क्विं./हे. (बागायती)

(३) पी. ए. २५५ (तुराबा) - १५ ते २० क्विं./हे.

पी. ए. १८३ (सावता) - १५ ते २० क्विं./हे.

पी. ए. ४०२ (विनायका) - १५ ते २० क्विं./हे.

या केंद्राद्वारे संशोधित झालेले एन एच-४५२/एन एच-५४५ हा सुधारित वाण विदर्भातील अकोला, नागपूर, यवतमाळ या जिल्ह्यातील शेतकरी तर मराठवाड्यात नांदेड, परभणी, बीड, जालना, औरंगाबाद या जिल्ह्यातील शेतकरी वापरतात. संशोधित कपाशीच्या जातीमुळे नांदेड जिल्ह्यात कपाशीच्या क्षेत्रात २० टक्के वाढ झाली असून नांदेड जिल्ह्यातील हदगांव, बिलोली, कंधार, लोहा, माहूर, किनवट, देगलूर तालुक्यात कपाशीच्या देशी, अमेरिकन कपाशीच्या सुधारित व संकरीत जातींची लागवड केली जाते. देशी कपाशीच्या सुधारित वाणांची लागवड तिफणीने पेरून केली जाते. तसेच ४५x२२.५ सें.मी. अंतरावर लागवड केली जाते. अमेरिकन सुधारित वाणाची लागवड टोकण पद्धतीने ६०x३० सें.मी. अंतरावर केली जाते. तर अमेरिकन संकरीत वाणाची लागवड टोकण पद्धतीने ९०x६० सें.मी. अंतर, ९०x९० सें.मी. अंतरावर केली जाते.

तसेच जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी संकरीत वाणातः- १) एन एच एच - ४४, २) एन एच एच-३०२, सुधारित वाणः- १) एन एच - ४५२ (रेणूका), २) एन एच - ५४५, देशी वाणः- १) पी ए - २५५, २) पी ए - ४०२ इत्यादी जातींना/वाणांना चांगला प्रतिसाद दिला. अशा वाणांमुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या उत्पन्नात २० ते २५ टक्के वाढ झाल्याची दिसते.

**कापूस उत्पादनासाठी लागवड तंत्रज्ञानाबाबतच्या शिफारसी.**

(१) पेरणीच्या वेळीच रासायनिक खतांची मुळमात्रा (बेसल डोस) पिकास देणे फायदेशीर ठरते. रासायनिक खतांची मुळमात्रा देण्यास उशीर झाला तर उत्पादनात घट येते.

(२) कपाशीमध्ये उडीद पिकाचे आंतरपीक घेतल्यास अधिक फायदा मिळतो असे आढळून आले आहे.

(३) बॅसालिन या तण नाशकांची हेक्टरी १.२५ लिटर १,००० लीटर पाण्यात मिसळून कपाशीच्या पेरणीपूर्वी ओल्या जमिनीवर फवारणी केल्यास तणाचे नियंत्रण होते.

(४) विविध पीक पद्धतीच्या अभ्यासात कपाशीनंतर उन्हाळी भुईमूंग घेतल्यास जास्त फायदा होतो असे दिसून आले आहे.

Maharashtra State Gazetteers

**कापूस संशोधन केंद्राची गौरवास्पद कामगिरी :** कापूस जगतात सातत्याने २० वर्ष टिकून राहिलेला एन एच एच - ४४ (नांदेड-४४) हा वाण विकसित केला. या वाणांनी जिल्हा विभाग, राज्य आणि देशाच्या सीमा पार केलेल्या आहेत. तसेच " आष्टा पथ दर्शक प्रकल्पाद्वारे " एकात्मिक कीड नियंत्रणातून " कापूस विना फवारणीचा येऊ शकतो " हा आत्मविश्वास कापूस उत्पादन करणाऱ्या शेतकरी बांधवांमध्ये निर्माण केला व ' बोंडासाठी कापूस पिकवायचा, पराटीसाठी नव्हे ' या पुस्तकाच्या ७५ हजार प्रतिंची विक्री झाली.[९७]

## नैसर्गिक आपत्ती

दैनंदिन जीवनामध्ये आपणास दुष्काळ, पूर, अतिवृष्टी, वादळ, साथीचे रोग, आकस्मित आगीच्या घटना तसेच भूकंपासारख्या नैसर्गिक आपत्तींना मानवाला वेळोवेळी तोंड द्यावे लागते. त्याचप्रमाणे रस्ते अपघात, औद्योगिक अपघात, कधी दंगली सारख्या मानवनिर्मित आपत्तीनांही तोंड द्यावे लागते. गेल्या २० वर्षात आपत्तीमुळे ३० लाख लोक मृत्यूमुखी पडले. नांदेड जिल्हाही त्याला अपवाद नाही.

**दुष्काळ :** प्राचीन साहित्यात येणाऱ्या वर्णनावरून भारतात इ.स.पूर्व ६००-१००० या काळात पुष्कळ वेळा दुष्काळ पडले असावेत असे वाटते. वायुपुराणात काशी उजाड झाली, याचे वर्णन आहे आणि वामनपुराणात नद्यांच्या प्रवाहात वाळूच्या आटल्यामुळे त्यांच्या काठी असलेल्या पवित्र स्थळांचे महत्त्व कसे कमी होऊ लागले हे सांगितले आहे. इथिओपियात पाऊस पडतो तो मान्सूनमुळेच. आपल्याकडील नैऋत्य मान्सून तिकडे जातो आणि त्यामुळे तेथे पाऊस पडतो. तेव्हा नाईलला चांगला पूर म्हणजे आपल्याकडेही चांगला पाऊस. तसेच नाईलची पातळी खाली गेली म्हणजे आपल्याकडे दुष्काळ हे शास्त्रज्ञांनी सिद्ध करून दाखविले आहे. ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ फँक सुलमान याच्या मते ज्यावेळी युरोपात कडक थंडी असते, त्यावेळी भारतासारख्या विषववृत्तीय प्रदेशाला दुष्काळ पडतात. विल्यम मोरलँड या ब्रिटिश इतिहासकाराने मोगल साम्राज्याचा आर्थिक इतिहास लिहिला आहे. त्यामध्ये ते म्हणतात मध्ययुगात भारताची आर्थिक स्थिती कधी नव्हे इतकी खालावली होती. संस्कृत साहित्यात गुप्तोत्तर काळातील दुष्काळाचे वर्णन येते. भयानक दुष्काळ वारंवार पडत अशा एका दिर्घकाळ बारा वर्षे टिकणाऱ्या दुष्काळाचे वर्णन दडिनच्या दंशकुमार चरितात आहे. त्याचे पुर्वज विदर्भातले पण ते दक्षिणेत पल्लवांच्या राज्यात जाऊन राहिले. परमेश्वर वर्मन पहिला (इ.स. ६७०-७००) आणि दुसरा नरसिंहवर्मन राजसिंह (इ.स. ७००-७२८) याच्या दरबारी होता. त्याने शतकुमार चरित्र इ.स.पू. ७०० च्या आसपास लिहिले असावे. त्यातील एका कथेत त्याने दुष्काळाचे अत्यंत हृदयद्रावक वर्णन केले आहे. ते इतके भयानक आहे की, त्याने तो दुष्काळ प्रत्यक्ष पाहिलेला असावा असे वाटते. परकीय प्रवाशांपैकी ह्यूएन त्संग (इ.स.पू. ६२९-४१) व फाहियान (इ.स.पू. ३९३-४१४) हे भारतात आले होते व त्यांनी केलेल्या वर्णनामध्ये पूर्वी होत्या त्याठिकाणी जंगल माजले होते. वस्ती फारच विरळ होती. त्यामानाने वाटमारी करणाऱ्यांच्या टोळ्याच अधिक होत्या.[९८]

---

९७. कापूस विषेतज्ञ, कापूस संशोधन केंद्र, नांदेड यांनी पाठविलेल्या माहितीवर आधारीत आहे.

९८. ढवळीकर, मधुकर केशव; **पर्यावरण आणि संस्कृती**, पुणे, २००४, पृ. १३०-१३१, १३३, १३६, १६३.

भारतातील बऱ्याच भागात इ.स. ९४१, १,०२२ व १,०३३ या वर्षामध्ये दुष्काळ पडला होता. यात असंख्य लोक मृत्यूमुखी पडून मानव कलेवर भक्षणापर्यंत पाळी आली होती. सन ११४८ ते ११५९ या कालावधीत भारतातील काही भागात सतत ११ वर्षे दुष्काळ पडला होता. यावेळी राजघराण्यांनादेखील अन्न सामग्री मिळविणे कठीण झाले होते. असंख्य लोक मृत्यूमुखी पडले होते.[९९]

पर्जन्यमानाच्या दृष्टीने नांदेड जिल्ह्याची तुलना फारशी चांगली नाही. अनिश्चित पावसामुळे किंवा जिल्ह्याच्या काही भागात कमी पाऊस पडल्यामुळे दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण होते. नांदेड जिल्हा हा दक्षिण महाराष्ट्राच्या पठारावर वसलेला आहे. या पर्वत रांगा जिल्ह्यात उत्तर-पश्चिम ते दक्षिण-पूर्व भागात गेल्या आहेत. जिल्ह्यात २००५ मध्ये हिमायतनगर तहसिल येथे सर्वात जास्त २,०८१ मि.मी. पर्जन्यमानाची नोंद झाली आहे व सर्वात कमी नांदेड तहसिलमध्ये ७९४ मि.मी. पर्जन्यमानाची नोंद झाली आहे. नांदेड जिल्ह्यात प्रामुख्याने मान्सूनचा पाऊस पडतो. हा पाऊस कधी जास्त होतो तर कधी कमी पडतो. त्यामुळे जिल्ह्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण होते.

नांदेड जिल्ह्यातील दुष्काळविषयी नांदेड जिल्हा गॅझेटिअर (१९७१) मध्ये पुढीलप्रमाणे माहिती दिलेली आहे.[१००]

सन १३९६ पासून जिल्ह्यात पाऊस कमी पडल्यामुळे सतत १२ वर्षे दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण झाली, त्याला दुर्गादेवीचा दुष्काळ असे म्हटले जाते. तसेच सन १४६० मध्येही दुष्काळ पडला, त्याला दामाजीपंत दुष्काळ म्हणून संबोधिले गेले. या दुष्काळामुळे जिल्ह्याच्या आर्थिक स्थितीवर परिणाम झाला. तसेच या कालावधीत दख्खनमध्ये सतत होणाऱ्या लढाईमुळेही अन्नधान्याचे तसेच पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले.

सतराव्या शतकामध्ये सन १६२९, १६३१, १६५०, १६५९, १६८२-८३, व १६८५ मध्येही जिल्ह्यात दुष्काळ पडले होते. शहाजहानच्या कारकिर्दीच्या अखेरच्या वर्षामध्ये या भागातील परिस्थिती कमी पर्जन्यामुळे बिकट झाली होती व ही बरेच दिवस टिकून होती. या वेळी हजारो लोकांनी देशाच्या वायव्य प्रांताकडे स्थलांतर केले होते. हा दुष्काळ संपूर्ण दख्खनमध्ये पडला होता. सन १६३१, १६५०, १६८२, आणि १६८३ चे दुष्काळ हे सैनिक हालचालीमुळे पिकांचे नुकसान झाल्यामुळे पडले होते. अठराव्या शतकामध्ये सन १७०२ मध्ये अतिवृष्टीमुळे खरीप तसेच रबी पिकांचे नुकसान झाले. सन १७१३, १७४० व १७८७ मध्ये पाऊस कमी पडल्यामुळे दुष्काळ पडले. या दुष्काळानंतर सन १७९२ मध्येही जिल्ह्यात दुष्काळ पडला. त्याला ' डोईबारा ' किंवा (Skull Famine) दडी मारून बसणारा दुष्काळ असे म्हटले जाते. याही दुष्काळाचा जिल्ह्यातील जनजीवनावर परिणाम झाला.

१९ व्या शतकामध्ये हैद्राबाद राज्यामध्ये प्रमुख १२ दुष्काळ पडले. त्याचाही जिल्ह्याच्या आर्थिक राहणीमानावर परिणाम झाला. सन १८०४ मध्ये पडलेल्या दुष्काळामुळे खरीप पिकांचे अतोनात नुकसान झाले. त्यामुळे अन्नधान्याच्या किंमतीमध्ये काहीशी वाढ झाली. जीवनावश्यक वस्तूंच्या शोधार्थ

---

९९. केतकर, व्य. श्री., **महाराष्ट्रीयन ज्ञानकोश,** पुणे, खंड १५ वा, १९२५, पृ. १३४.

१००. नांदेड जिल्हा गॅझेटिअर, पूर्वोक्त, पृ. २५१-२५२.

लोकांनी सीमेलगतच्या जिल्ह्यामध्ये स्थलांतर केले. सन १८१९ मध्येही अवर्षण पडले. सन १८९९-१९०० मध्येही मोठा दुष्काळ पडला. सर्व विहिरी आणि नद्या कोरड्या पडल्या. सन १८९९ मध्ये फक्त ३८१ मि.मी. (१५ इंच) पाऊस झाला. तो सरासरीपेक्षा निम्मा इतका झाला. त्यामुळे खरीप हंगाम हा दरवर्षापेक्षा १/४ ने कमी तर रबी हंगाम १/१६ पटीने नेहमीपेक्षा कमी होता. खर्चात २ १/४ लाखांनी वाढ झाली. सन १९०१ च्या जनगणना अहवालानुसार यावेळी १,२८,८४५ लोक व २२% जनावरे कमी झाली.

सन १८८१ ते १८९१ मध्ये जिल्ह्यात पटकी व इतर साथीच्या रोगाने थैमान घातले. सन १८९० मध्येही पिकांच्या उत्पन्नामध्ये घट झाली. सन १८९७-९८ मध्येही अवर्षण पडले. सन १८९९ मध्ये फक्त १६ इंच पाऊस पडला. त्यानंतर १९०० मध्येही मोठा दुष्काळ पडला. त्याचाही लोकांच्या राहणीमानावर परिणाम झाला. त्यातच यावेळी जिल्ह्यात हिवताप, देवी, मलेरिया यासारख्या रोगांचा फैलाव झाला.

सन १९०१ ते १९११ या दशकामध्ये शेतीचे उत्पन्न चांगले झाले. परंतु सन १९१०-११ मध्ये अतिवृष्टीमुळे कापसाच्या पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. सन १९१६-१७ मध्येही अवेळी पावसामुळे खरीप व रबी पिकांचे नुकसान झाले. त्यामुळे अन्नधान्याच्या किंमतीमध्ये वाढ झाली. सन १९१७-१८ मध्येही अवेळी पाऊस पडल्यामुळे पिकांचे नुकसान झाले. सन १९२१-३१ या दशकात पिकांचे उत्पन्न चांगले झाले.

सन १९३१ ते १९५१ या कालावधीत शेतीचे उत्पन्न चांगले झाले. परंतु ६ ऑक्टोबर १९४० ते ३१ मार्च १९५१ या कालावधीत साथीच्या रोगाने जिल्ह्यात ४,४३४ लोक मृत्यूमुखी पडले.

सन १९६०, १९७२, १९८३, २००३ मध्ये अतिवृष्टीमुळे जिल्ह्यात जनजीवन विस्कळीत झाले. सन जुलै २००५ मध्येही अतिवृष्टीमुळे गोदावरी नदीने नांदेड शहराला जोराचा तडाखा बसला. गोदावरी दुथडी भरून शेजारच्या अनेक गावात आणि नांदेड शहरात पाणी शिरले. यावेळी जिल्ह्यातील २५,००० लोकांना सुरक्षित स्थळी हलविण्यात आले. सन २००४-२००५ मध्ये ९५ गावे व ९७ वस्त्यांना १३८ टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत होता. जुलै २००६ मध्ये जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे २०२ गावे बाधीत झाली. त्यामुळे वरील बाधीत गावातील ४०,२५१ कुटुंबांना पुरामुळे झळ पोहोचली. त्यांना अनुक्रमे ४,०२५ क्विंटल ज्वारी, ४,०२५ क्विंटल तांदुळ व ४०,२५१ लिटर केरोसीन वाटप करण्यात आले.

**नांदेड जिल्ह्यातील पुरामुळे बाधीत गावांचे पुनर्वसन :** नांदेड जिल्ह्यामध्ये गोदावरी, आसना, मन्याड, मांजरा, कयाधू, पैनगंगा या मुख्य नद्या असून या नद्यांना जोडणाऱ्या अनेक उपनद्या, नाले, ओढे आहेत. नांदेड शहरातून गोदावरी नदीचा सुमारे १० कि.मी. लांबीचा प्रवाह आहे. या शहरात नदीच्या काठी ठिकठिकाणी अधिकृत-अनधिकृत झोपडपट्ट्यांमध्ये लोकवस्ती आहे. नांदेड शहरामध्ये १९ नाले गोदावरी नदीला मिळतात. सन १९६०, १९७२, १९८३, २००३, जुलै २००५ मध्ये अतिवृष्टी होऊन नदीला महापूर येऊन घराचे व मालमत्तेचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. या पुरामुळे बाधित

नांदेड शहरातील २१,३९४ व उर्वरित जिल्ह्यांत इतर २४ गावात १०,१५९ कुटुंबे बाधीत झाली. या निराधार कुटुंबांना शासन निर्णयानुसार सानुग्रह अनुदान व मोफत धान्य वाटप करण्यात आले. पुनर्वसन करताना खालील बाबी प्रामुख्याने लक्षात घेण्यात आल्या. उदा. शासकीय जमिनीची उपलब्धता, खाजगी जमिनीचे भूसंपादन, राहत्या घराचे बांधकामासाठी एकूण किंमत, शाळा, अंगणवाडी, ग्रामपंचायत, तलाठी, चावडी, समाजमंदिर इत्यादी आवश्यक सोई उपलब्ध करणे, रस्ते, नाले, पाणीपुरवठा आणि विद्युतीकरण करणे. त्वरित घटकासाठी खालील मानके लक्षात घेण्यात आली आहेत. नांदेड शहरालगतचा भाग व जिल्ह्यातील २४ गावे यांचे पुनर्वसन करावयाचे आहे. यामध्ये १०,१५९ कुटुंबे आहेत. या पुनर्वसनासाठी खालीलप्रमाणे अंदाजित खर्च अपेक्षित आहे. नांदेड शहरातील बांधकाम खर्च ९,७२,००० लाख रुपये, नांदेड शहर नागरी व मुलभूत सुविधांवरील खर्च ७,६९८.३६ लाख रुपये, जिल्ह्यातील बाधीत २४ गावांसाठी बांधकामावरील खर्च रुपये ४,६०८.०० लाख रुपये व त्यांना नागरी व मुलभूत सुविधासाठी खर्च ३,७०९.७५ लाख रुपये.[१०१]

सन १९८३ साली पुराचा तडाखा बसलेल्या उर्वरित १६ गावांकरिता घरबांधणी खर्च ४,३०७.०० लाख रुपये तर या गावाकरिता नागरी व मुलभूत सुविधावरील खर्च २,१३०.६४ लाख रुपये असा एकूण ३२१७३.७८ लाख रुपये अंदाजित खर्च अपेक्षित आहे. सन २००६ साली अतिवृष्टी होऊन नद्यांना महापूर आल्यामुळे नदीकाठच्या लोकांना सुरक्षित ठिकाणी हलविण्यात आले. आपदग्रस्तांना शासनाच्या सुचनेनुसार सानुग्रह अनुदान वाटप करण्यात आले. नांदेड जिल्ह्यात सानुग्रह अनुदान १६,००० लक्ष रुपये वाटण्यात आले. पुरामुळे घरपडी झाली त्यासाठी ४,००० लक्ष रुपये तर अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान झाले त्यासाठी शेतकऱ्यांना १,३०,००० लक्ष रुपये अनुदान वाटप करण्यात आले व मयत झालेल्या व्यक्तींच्या नातेवाईकांना ४३ लक्ष रुपये वाटप करण्यात आले.

दिनांक २३ ते २५ जुलै १९८९ या कालखंडात महाराष्ट्रात अतिवृष्टी, पूर व वादळी वारे या नैसर्गिक आपत्तीने प्रचंड थैमान घातले होते. या आपत्तीचा तडाखा नांदेड जिल्ह्यातील अनेक गावांना बसला होता. ह्या जिल्ह्यात गोदावरी, मांजरा, मन्याड व पैनगंगा यासारख्या मोठ्या नद्या वाहतात व जिल्हा पूर प्रवण आहे. ही परिस्थिती लक्षात घेऊन एक खास बाब म्हणून नांदेड जिल्ह्यातील पूरग्रस्तांच्या पुनर्वसनाबाबत शासनाने पुढील निर्णय घेतलेला आहे.

सन १९८३ साली आलेल्या पुराने ग्रस्त झालेल्या, मात्र ज्याचे पुनर्वसन अजूनही पूर्णपणे झालेले नाही अशा ९० गावातील आपदग्रस्तांना पुनर्वसनासाठी दिनांक १ ऑगस्ट १९८९ च्या आदेशान्वये घर पुनर्बांधणीसाठी मंजूर करण्यात आलेले वाढीव अर्थसहाय्य. (रुपये १५,०००/- अनुदान + रुपये ६,०००/- आवश्यकता भासल्यास वित्तीय संस्थाकडून कर्ज) देण्यात येते.

नांदेड जिल्ह्यामार्फत पूरग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी खालील बाबींवर रुपये एकोणीस कोटीपर्यंत खर्च करण्यास शासनाने मंजुरी दिली आहे.

---

१०१. जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांनी पाठविलेल्या माहितीवर आधारीत.

(अ) २७ पूर्णतः अपनर्वसित राहिलेल्या गावातील गावकऱ्यांचे पुनर्वसन

(ब) ६३ अंशतः पुनर्वसित झालेल्या गावातील पुनर्वसन न झालेल्या गावकऱ्यांचे पुनर्वसन

(क) १२ गावातील भूसंपादन

(ड) संदर्भाधिन गावात नागरी सुविधा (पाणी रस्ते वगैरे)

१९९० मध्ये नमूद केलेल्या (९०) पुनर्वसित गावांची यादी तक्ता क्र. ८ मध्ये देण्यात आली आहे.

अशाप्रकारे नैसर्गिक आपत्तीमुळे जनजीवन टाळण्यासाठी शासनामार्फत तातडीचे उपाय खालीलप्रमाणे करण्यात आले आहेत. जनजागृती करणे, वरिष्ठ शासकीय अधिकाऱ्यांच्या बैठका घेणे, लोकांना वेळीच सूचना देऊन सावधगिरी पाळणे, जिल्ह्यामध्ये विभाग प्रमुखाच्या बैठका आयोजित करून लोकांना सज्ज राहण्यासाठी सूचना देणे, औषध व अन्नधान्याचा साठा उपलब्ध करून ठेवणे. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन समितीच्या बैठका घेणे, रबरी व फायबर बोटी सुव्यवस्थित व सज्ज ठेवणे, तसेच पुराच्या वेळी लाईफ बायी व लाईफ जॅकेटचा, पेट्रोमॅक्स, दोरखंड इत्यादी साठा उपलब्ध करणे. पोहणाऱ्या व्यक्तींची यादी ठेवणे, प्रशिक्षित कर्मचारी ठेवणे. नैसर्गिक परिस्थितीमुळे जिल्ह्याच्या आर्थिक विकासावर परिणाम होतो, जसे दळणवळण विस्कळीत होणे, विद्युत पुरवठा खंडीत होणे, टेलिफोन योजना नादुरूस्त होणे, यासारखे परिणाम झाल्यामुळे विकासावर थोडाफार होतो.

Maharashtra State Gazetteers

## तक्ता क्र. १

## नांदेड कृषक लोकसंख्या-२००१

| अ.क्र. | तालुका | एकूण लोकसंख्या | एकूण काम करणारे | शेतकरी | शेतमजूर | अल्पकालीन शेतकरी | अल्पकालीन शेतमजूर | एकूण कृषक लोकसंख्या | काम न करणारे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | माहूर | ८६,७८२ | ४३,२३२ | १५,६४५ | १५,४८३ | १,३९५ | ५,०१० | ३७,५३३ | ४३,५५० |
| २ | किनवट | २,१०,६३० | ९७,२९२ | ३१,९५९ | ३२,७६८ | ३,१२७ | १२,३६५ | ८०,२१९ | १,१३,३३८ |
| ३ | हिमायतनगर | ८८,९२४ | ४३,४५९ | १७,०३२ | १५,५८४ | १,६५२ | ३,८५४ | ३८,१२२ | ४५,४६५ |
| ४ | हदगाव | २,२४,३५४ | १,०४,९९४ | ३७,९८० | ३६,३५९ | ३,८४५ | ११,६०७ | ८९,७९१ | १,१९,३६० |
| ५ | अर्धापूर | ९८,७५५ | ४२,१४३ | १४,१३९ | १३,४९३ | १,१७५ | ४,२८९ | ३३,०९६ | ५६,६१२ |
| ६ | नांदेड | ५,९८,९६९ | १,७६,४७४ | १८,०९७ | १७,५९० | २,१४५ | ६,४८५ | ४४,३१७ | ४,२२,४९५ |
| ७ | मुदखेड | ९७,२८६ | ४२,५२९ | १५,४७७ | १२,७९५ | २,४४३ | ४,४६१ | ३५,१७६ | ५४,७५७ |
| ८ | भोकर | १,१९,२२९ | ५४,८८३ | १९,८०४ | १७,७६२ | १,९२४ | ५,३१४ | ४४,८०४ | ६४,३४६ |
| ९ | उमरी | ८६,२०६ | ४०,९०४ | १३,४९७ | १०,२३० | ३,९०७ | ६,८६५ | ३४,४९९ | ४५,३०२ |
| १० | धर्माबाद | ८६,३६२ | ३८,६६१ | १०,७९६ | १२,५९८ | १,२९९ | ४,१६९ | २८,८६२ | ४७,७०१ |
| ११ | बिलोली | १,५५,३१८ | ७२,२९३ | १७,८४० | २२,९४३ | २,४९६ | १५,५५० | ५८,८२९ | ८३,०२५ |
| १२ | नायगाव | १,६१,१३४ | ७४,०२३ | २२,९३१ | २२,८४९ | ३,३५२ | ११,२७६ | ६०,४०८ | ८७,१११ |
| १३ | लोहा | २,०७,३०६ | ८७,४१८ | २९,५४० | २६,७३६ | ४,७४१ | ११,८८० | ७२,८९७ | १,१९,८८८ |
| १४ | कंधार | २,११,३४७ | ९३,००० | २८,३३५ | २९,७७१ | ५,५२७ | १३,१७८ | ७६,८११ | १,१८,३४७ |
| १५ | मुखेड | २,४३,०३० | १,०६,४४६ | २८,१५६ | ३७,८२६ | ४,५२३ | १७,०२७ | ८७,५३२ | १,३६,५८४ |
| १६ | देगलूर | २,००,६२७ | ८४,२८६ | १८,३७८ | २५,०८९ | ३,४०६ | १८,१७४ | ६५,०४७ | १,१६,३४१ |
| | **एकूण (जिल्हा)** | **२८,७६,२५९** | **१२,०२,०३७** | **३,३९,६०६** | **३,४९,८७६** | **४६,९५७** | **१,५१,५०४** | **८,८७,९४३** | **१६,७४,२२२** |

**संदर्भ :** प्रायमरी सेन्सस ॲबस्ट्रॅक्ट, व्हॉल्युम-१, सिरीज-२८, सेन्सस ऑफ इंडिया-२००१, पृ. १०३ ते १११.

**तक्ता क्र. २**
**नांदेड जिल्ह्यातील पर्जन्यमानाच्या नोंदी**

| स्थानक | एकूण आकडेवारीची वर्ष | | जाने. | फेब्रु. | मार्च | एप्रिल | मे | जून | जुलै | ऑगस्ट | सप्टें. | ऑक्टो. | नोव्हें. | डिसें. | वार्षिक | २४ तासातील सर्वाधिक पर्जन्य | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | | | | | आकडेवारी | दिनांक |
| बसर | १० | अ | ५.३ | १४.५ | ४.२ | ३.९ | ६.१ | ९५.१ | २१५.४ | १५९.९ | २१५.२ | १९.७ | १८.३ | ०.० | ७५७.६ | १५८.७ | २४ सप्टें. १९३१ |
| | | ब | ०.२ | ०.८ | ०.४ | ०.२ | ०.३ | ५.५ | ११.५ | ६.८ | ७.१ | १.५ | १.१ | ०.० | ३५.४ | | |
| भोकर | १७ | अ | १२.३ | ८.० | ९.६ | ४.५ | २१.७ | १९८.१ | २६७.८ | ३१२.६ | २०२.३ | ७०.१ | २४.३ | ५.२ | १,१३६.५ | २१८.० | २९ जून १९८९ |
| | | ब | ०.५ | ०.४ | ०.४ | ०.५ | १.४ | ८.४ | १२.६ | १३.३ | ८.७ | ३.१ | १.४ | ०.३ | ५१.० | | |
| बिलोली | ३९ | अ | ५.५ | ६.२ | ६.७ | ९.६ | २०.२ | १६२.१ | २९४.४ | २९०.२ | १८२.० | ८०.१ | १९.८ | ४.७ | १,०८१.५ | २७५.६ | ११ ऑगस्ट १९८३ |
| | | ब | ०.३ | ०.४ | ०.३ | ०.८ | १.२ | ८.४ | १४.१ | १२.८ | ८.१ | ३.५ | १.० | ०.३ | ५१.२ | | |
| देगलूर | ३८ | अ | ३.६ | ४.८ | ९.६ | १३.० | २३.० | १५७.८ | २४५.१ | २४६.३ | १७८.० | ८६.४ | २०.२ | ३.१ | ९९०.९ | १६०.० | १८ सप्टें. १९६२ |
| | | ब | ०.३ | ०.४ | ०.५ | १.० | १.७ | ८.८ | १२.९ | १२.४ | ९.२ | ३.९ | १.१ | ०.३ | ५२.५ | | |
| कंधार | ३७ | अ | ४.३ | ४.० | ८.३ | ५.१ | १७.४ | १४५.१ | २२७.४ | २०९.९ | १६९.५ | ६५.६ | १४.३ | ३.० | ८७३.९ | २६४.४ | ६ ऑक्टो. १९८३ |
| | | ब | ०.३ | ०.४ | ०.५ | ०.५ | १.० | ८.९ | ११.८ | १०.८ | ८.९ | ३.३ | ०.९ | ०.४ | ४७.७ | | |
| किनवट | २० | अ | ७.० | ४.३ | २.२ | २.६ | १०.४ | २०४.८ | ३३६.१ | ३३३.३ | २०३.० | ८४.० | ७.६ | ४.७ | १,२००.० | ३९०.० | २८ जून १९८९ |
| | | ब | ०.६ | ०.३ | ०.३ | ०.४ | ०.८ | ८.४ | १४.२ | १५.१ | ९.८ | ३.८ | ०.६ | ०.२ | ५४.५ | | |
| मुखेड | १० | अ | ६.२ | ०.८ | १०.० | ५.७ | १७.३ | १३७.४ | २२१.८ | २२४.८ | १८७.६ | ९८.७ | १९.० | ४.७ | ९३४.० | १७०.४ | ६ ऑक्टो. १९८३ |
| | | ब | ०.४ | ०.१ | ०.६ | ०.४ | १.२ | ८.५ | ११.६ | १०.९ | १०.१ | ४.१ | १.२ | ०.५ | ४९.६ | | |
| नांदेड | ४८ | अ | ७.६ | ९.३ | ९.२ | ९.४ | १७.५ | १५२.४ | २५२.५ | २४८.६ | २०९.१ | ६३.१ | १६.५ | ७.३ | १,००२.५ | २५४.० | २० ऑगस्ट १९०३ |
| | | ब | ०.६ | ०.७ | ०.७ | ०.८ | १.४ | ८.३ | १३.३ | १२.० | ९.४ | ३.५ | १.१ | ०.४ | ५२.२ | | |
| नांदेड (Obsy) | ३० | अ | ७.१ | ४.९ | १०.८ | ११.७ | १६.६ | १४७.५ | २४४.४ | २३८.९ | १९१.५ | ५२.१ | १३.५ | ८.१ | ९४७.१ | २५२.६ | १२ ऑगस्ट १९८३ |
| | | ब | ०.५ | ०.४ | ०.८ | ०.९ | १.७ | ८.३ | १२.७ | १२.४ | ९.५ | ३.१ | १.१ | ०.४ | ५१.८ | | |
| नांदेड (जिल्हा) | — | अ | ६.५ | ६.३ | ७.८ | ७.३ | १६.७ | १५५.६ | २५६.१ | २५१.६ | १९३.१ | ६८.९ | १७.१ | ४.५ | ९९१.५ | — | — |
| | | ब | ०.४ | ०.४ | ०.५ | ०.६ | १.२ | ८.२ | १२.७ | ११.८ | ९.० | ३.३ | १.१ | ०.३ | ४९.५ | | |

अ : सर्वसाधारण पर्जन्यमान (मिलीमीटरमध्ये), ब : सरासरी पर्जन्याचे दिवस (किमान २.५ मिलीमीटरपेक्षा जास्त पर्जन्याचे दिवस).
संदर्भ : क्लायमेट ऑफ महाराष्ट्र, गव्हर्नमेंट ऑफ इंडिया, मेटेरॉलॉजिकल डिपार्टमेंट, पुणे-२००५.

**तक्ता क्र. ३**

**खते व रासायनिक खते २००६-०७**

| अ.क्र. | पंचायत समिती नाव | निश्चित केलेली मागणी (मे. टन) | | | | साध्य केलेले खताचे वाटप (मे. टन) | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नत्र | स्फुरद | पालाश | एकूण | नत्र | स्फुरद | पालाश | एकूण |
| १ | नांदेड | ५,९९९ | ३,२६३ | १,३४० | १०,६०२ | ५,७३३ | ३,९६० | १,५४८ | ११,२४१ |
| २ | मुदखेड | ५,२४९ | २,८५५ | १,१७२ | ९,२७६ | ५,०१७ | ३,३७७ | १,३५५ | ९,७४९ |
| ३ | अर्धापूर | ५,५४० | २,७९५ | १,१४२ | ९,४७७ | ५,००२ | ३,३१० | १,३६५ | ९,६७७ |
| ४ | भोकर | ३,७४९ | २,०३९ | ८३७ | ६,६२५ | ३,५८३ | २,४१२ | ९६८ | ६,९६३ |
| ५ | उमरी | ४,४९९ | २,४४७ | १,००५ | ७,९५१ | ४,३०० | २,८९५ | १,१६१ | ८,३५६ |
| ६ | हदगाव | ३,८२५ | २,०३९ | ८४७ | ६,७११ | ३,५२० | २,४१० | ९७० | ६,९०० |
| ७ | हिमायतनगर | ३,७१० | २,०१० | ८२७ | ६,५४७ | ३,५०२ | २,३९० | ९६० | ६,८५२ |
| ८ | किनवट | ४,४२५ | २,४२० | १,११० | ७,९५५ | ४,३३० | २,८८० | १,१५० | ८,३६० |
| ९ | माहूर | ३,८४० | २,०२० | ८२० | ६,६८० | ३,५०८ | २,४१५ | ९७५ | ६,८९८ |
| १० | कंधार | ४,५१० | २,४८० | १,११५ | ८,१०५ | ४,२७० | २,७८० | १,११० | ८,१६० |
| ११ | लोहा | ४,५३० | २,४९५ | १,०९५ | ८,१२० | ४,२१० | २,८१० | १,१२० | ८,१४० |
| १२ | मुखेड | ४,५७० | २,४६० | १,१२० | ८,१५० | ४,३०५ | २,८०५ | १,१४० | ८,२५० |
| १३ | देगलूर | ४,४२० | २,५१० | १,०१० | ७,९४० | ४,३१० | २,८९० | १,१६८ | ८,३६८ |
| १४ | बिलोली | ५,२४० | २,८३८ | १,०४० | ९,११८ | ५,१०८ | ३,३८० | १,३६० | ९,८४८ |
| १५ | नायगाव | ५,५७८ | ३,२५८ | १,२४१ | १०,०७७ | ५,९५१ | ४,१७४ | १,६४६ | ११,७७१ |
| १६ | धर्माबाद | ५,३१० | २,८६० | १,०३० | ९,२०० | ५,०२५ | ३,३६५ | १,३६५ | ९,७५५ |
| | **एकूण** | **७४,९४४** | **४०,७८९** | **१६,७५१** | **१,३२,५३४** | **७१,६७४** | **४८,२५३** | **१९,३६१** | **१,३९,२८८** |

संदर्भ :- जिल्हा परिषद नांदेड, वार्षिक प्रशासन अहवाल, सन २००६-०७, पृ. १८०,१८१.

**तक्ता क्र. ४**

**० ते १०० हेक्टर सिंचनक्षमता असलेले जिल्ह्यातील लघुपाटबंधारे प्रकल्प (कोल्हापुरी पद्धतीचे बंधारे व उपसा जलसिंचन योजनेसह)**

**जून, २००५, जि. प. नांदेड (प्रमाण-हेक्टरमध्ये)**

| अ.क्र. | तालुका | पूर्ण झालेले प्रकल्प | | बांधकामाधीन प्रकल्प | | प्रशासकीय मान्यताप्राप्त प्रकल्प | | नकाशे व अंदाजपत्रक तयार होत असलेले प्रकल्प | | भविष्यकालीन योजना | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | सिंचनक्षमता | संख्या | सिंचनक्षमता | संख्या | सिंचन-क्षमता | संख्या | सिंचनक्षमता | संख्या | सिंचनक्षमता | संख्या | सिंचनक्षमता |
| १ | भोकर | ३७ | १,५४९ | १४ | ४६७ | १५ | ६४२ | ०६ | २१० | — | — | ७२ | २,८६८ |
| २ | देगलूर | ३६ | १,३७२ | ०६ | ३२५ | १० | ३३० | — | — | ०१ | २० | ५३ | २,०४७ |
| ३ | किनवट | ४४ | १,७६२ | ३६ | १,३७७ | १४ | २९८ | — | — | — | — | ९४ | ३,४३७ |
| ४ | मुखेड | ७९ | ३,७९२ | २५ | ८१० | ४८ | १,५७३ | — | — | ०५ | १२२ | १५७ | ६,२९७ |
| ५ | हदगांव | २९ | १,२८८ | १६ | ५९२ | २१ | ७७५ | — | — | ०८ | २६९ | ७४ | २,९२४ |
| ६ | नांदेड | ०६ | ३८१ | ०७ | ४६४ | ०४ | १५९ | — | — | ०५ | १९१ | २२ | १,१९५ |
| ७ | लोहा | २८ | १,२८२ | १८ | ६०८ | १४ | २५० | — | — | ११ | ३६५ | ७१ | २,५०५ |
| ८ | कंधार | ५३ | २,२८२ | २२ | ७४२ | ६४ | १,५८७ | — | — | — | — | १३९ | ४,६११ |
| ९ | बिलोली | ३१ | १,१७४ | १२ | २२१ | २३ | ५३६ | — | — | ०२ | ६० | ६८ | १,९९१ |
| १० | मुदखेड | १५ | ९०५ | ०८ | २६० | — | — | — | — | — | — | २३ | १,१६५ |
| ११ | उमरी | १७ | ६३१ | १४ | ४३६ | ०४ | ५९ | — | — | ०१ | ३३ | ३६ | १,१५९ |
| १२ | माहूर | १४ | ६२९ | १४ | ३७० | ०६ | १८४ | — | — | — | — | ३४ | १,१८३ |
| १३ | हिमायतनगर | ०८ | ३१८ | ०२ | १०० | — | — | — | — | — | — | १० | ४१८ |
| १४ | अर्धापूर | ०७ | २७० | ०२ | ९२ | ०२ | ६५ | — | — | — | — | ११ | ४२७ |
| १५ | नायगांव | ३१ | ९८३ | ०८ | ३०४ | ०६ | १६२ | — | — | — | — | ४५ | १,४४९ |
| १६ | धर्माबाद | ०२ | ७२ | ०२ | ७५ | — | — | — | — | — | — | ०४ | १४७ |
| | **एकूण** | **४३७** | **१८,६७०** | **२०६** | **७,२४३** | **२३१** | **६,६२०** | **०६** | **२१०** | **३३** | **१,०६०** | **९१३** | **३३,८२३** |

संदर्भ : लघुपाटबंधारे विभाग, नांदेड, जिल्हा पुस्तिका, पाटबंधारेविषयक माहिती-२००५, पृ. ७५ ते १५८.

**तक्ता क्र. ५**

**१०१ ते २५० हेक्टर सिंचनक्षमता असलेले जिल्ह्यातील लघुपाटबंधारे प्रकल्प (कोल्हापुरी पद्धतीचे बंधारे व उपसा सिंचन योजनेसह)**

**जून २००५, जि. प. नांदेड (प्रमाण-हेक्टरमध्ये)**

| अ.क्र. | तालुका | पूर्ण झालेले प्रकल्प | | बांधकामाधीन प्रकल्प | | प्रशासकीय मान्यताप्राप्त प्रकल्प | | नकाशे व अंदाजपत्रक तयार होत असलेले प्रकल्प | | भविष्यकालीन योजना | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | सिंचनक्षमता | संख्या | सिंचनक्षमता | संख्या | सिंचन-क्षमता | संख्या | सिंचनक्षमता | संख्या | सिंचनक्षमता | संख्या | सिंचनक्षमता |
| १ | भोकर | ०६ | १,०४९ | ०२ | ३३७ | — | — | — | — | १३ | १,४४२ | २१ | २,८२८ |
| २ | देगलूर | ०५ | ९८० | ०२ | ३८२ | — | — | ०२ | ३२६ | ०५ | ४६८ | १४ | २,१५६ |
| ३ | किनवट | ०३ | ५१९ | — | — | — | — | ११ | १,५११ | १९ | ३,२३० | ३३ | ५,२६० |
| ४ | मुखेड | ०६ | १,०९७ | ०२ | ४७० | — | — | — | — | ०८ | १,१३२ | १६ | २,६९९ |
| ५ | हदगांव | ०५ | ८०८ | ०३ | ५७२ | — | — | — | — | ०८ | १,७१३ | १६ | ३,०९३ |
| ६ | नांदेड | ०१ | २३९ | — | — | — | — | — | — | ०२ | ३२४ | ०३ | ५६३ |
| ७ | लोहा | ०४ | ६५१ | ०१ | १२३ | — | — | ०१ | १५९ | ०७ | १,२६९ | १३ | २२०२ |
| ८ | कंधार | ०५ | ७३८ | ०१ | १६६ | — | — | ०४ | ५१५ | २४ | ३,७३५ | ३४ | ५,१५४ |
| ९ | बिलोली | ०३ | ५८२ | — | — | ०१ | २३५ | — | — | १५ | २,०७० | १९ | २,८८७ |
| १० | मुदखेड | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — |
| ११ | उमरी | ०१ | २०४ | — | — | — | — | — | — | ०१ | २५० | ०२ | ४५४ |
| १२ | माहूर | ०२ | ३५९ | ०१ | २११ | — | — | — | — | ०५ | ७८५ | ०८ | १,३५५ |
| १३ | हिमायतनगर | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — |
| १४ | अर्धापूर | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — |
| १५ | नायगांव | ०१ | १९६ | — | — | — | — | — | — | — | — | ०१ | १९६ |
| १६ | धर्माबाद | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — |
| | **एकूण** | **४२** | **७,४२२** | **१२** | **२,२६१** | **०१** | **२३५** | **१८** | **२,५११** | **१०७** | **१६,४१८** | **१८०** | **२८,८४७** |

संदर्भ : लघुपाटबंधारे विभाग, नांदेड, जिल्हा पुस्तिका, पाटबंधारेविषयक माहिती-२००५, पृ. क्र. ७५ ते १५८.

**तक्ता क्र. ६**

**२५० हेक्टर सिंचन क्षमतेपेक्षा जास्त असलेल्या लघुपाटबंधारे तलावांची तालुकानिहाय माहिती (कोल्हापुरी पद्धतीचे बंधारे व उपसासिंचन योजनेसह) जून २००५ (प्रमाण-हेक्टरमध्ये)**

| अ.क्र. | तालुका | पूर्ण झालेले प्रकल्प | | बांधकामाधीन प्रकल्प | | प्रशासकीय मान्यताप्राप्त प्रकल्प | | नकाशे व अंदाजपत्रक तयार होत असलेले प्रकल्प | | भविष्यकालीन योजना | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | सिंचनक्षमता | संख्या | सिंचनक्षमता | संख्या | सिंचन-क्षमता | संख्या | सिंचनक्षमता | संख्या | सिंचनक्षमता | संख्या | सिंचनक्षमता |
| १ | भोकर | ०७ | ३,०५६ | ०१ | ७०० | — | — | ०४ | २,३३५ | १२ | ५,०४६ | २४ | ११,१३७ |
| २ | देगलूर | ०५ | २,५३१ | ०१ | ८६० | — | — | ०२ | ७८६ | ०९ | ७,८२८ | १७ | १२,००५ |
| ३ | किनवट | १२ | ५,०९२ | ०३ | २,४३७ | — | — | ०५ | ४,२८३ | ३४ | २५,६०८ | ५४ | ३७,४२० |
| ४ | मुखेड | ०४ | १,४९३ | ०३ | १,६६५ | — | — | ०२ | ६८६ | १३ | ४,६१६ | २२ | ८,४६० |
| ५ | हदगांव | १४ | ७,४४९ | ०२ | १,१०६ | — | — | ०७ | ३,३५९ | २१ | ११,३८१ | ४४ | २३,२९५ |
| ६ | नांदेड | ०१ | १,४७२ | — | — | — | — | — | — | ०३ | ३,२०० | ०४ | ४,६७२ |
| ७ | लोहा | ०५ | २,५७३ | — | — | — | — | ०९ | ५,२७९ | ३५ | २८,५४५ | ४९ | ३६,३९७ |
| ८ | कंधार | ०३ | ९२१ | ०२ | ७३० | — | — | ०८ | ३,१५६ | २८ | १२,७७९ | ४१ | १७,५८६ |
| ९ | बिलोली | ०३ | १,१२६ | ०२ | १,५६० | — | — | ०१ | ९३१ | १० | ६,४९० | १६ | १०,१०७ |
| १० | मुदखेड | ०२ | ५६६ | — | — | — | — | ०३ | ३,३८९ | ०३ | २,५१८ | ०८ | ६,४७३ |
| ११ | उमरी | ०६ | ४,३२१ | — | — | — | — | ०३ | १,३०४ | ०२ | ८९० | ११ | ६,५१५ |
| १२ | माहूर | ०४ | १,५०७ | — | — | — | — | ०५ | ३,७०१ | ३० | २३,२०६ | ३९ | २८,४१४ |
| १३ | हिमायतनगर | — | — | — | — | — | — | ०१ | २७५ | — | — | ०१ | २७५ |
| १४ | अर्धापूर | ०१ | २५२ | — | — | — | — | — | — | — | — | ०१ | २५२ |
| १५ | नायगांव | ०१ | २८४ | — | — | — | — | — | — | १६ | १२,८९० | १७ | १३,१७४ |
| १६ | धर्माबाद | ०२ | १,९४३ | — | — | — | — | — | — | ०३ | १,५३० | ०५ | ३४७३ |
| | **एकूण** | **७०** | **३४,५८६** | **१४** | **९,०५८** | **—** | **—** | **५०** | **२९,४८४** | **२१९** | **१,४६,५२७** | **३५३** | **२,१९,६५५** |

संदर्भ : लघुपाटबंधारे विभाग, नांदेड, पाटबंधारेविषयक माहिती जिल्हा पुस्तिका, २००५, पृ. ४५ ते ७७.

## तक्ता क्र. ७
## सन २००६-०७ वर्षातील रोगप्रतिबंधक लस टोचणी परिणामाचा सारांश

| अ. क्र. | पं.स. चे नाव (तालुका) | एकूण पशुधन, पक्षी | ज्या रोगाविरुद्ध लस टोचली त्या रोगाचे नाव | | | | | | | | | | बाधित गावांची संख्या | बाधित गावात लस टोचलेल्या प्राण्यांची संख्या | एकूण लस टोचलेले प्राणी, पक्षी संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | घटसर्प | फऱ्या | तोंड व पायखुरी | मानमोडी | को. देवी | इ.टी.क्वी. | ला.सो.आ | पी.पी.आर | ॲन्थ्रॅक्बीज | इतर | | | |
| १ | नांदेड | १,०९,९०९ | ५,५७९ | ४,९८५ | ८,४८८ | — | १३,२४८ | २,६७६ | १,२३० | ३,१६७ | ८,६०५ | — | — | — | ४७,९७८ |
| २ | धोकर | ९१,३५३ | ७,८५० | ११,३४६ | ७,४०५ | — | ११,२८४ | १,७७३ | ६,०२५ | ९३७ | ९,२४१ | — | — | — | ५५,८६१ |
| ३ | किनवट | २,७०,७३२ | १२,२१९ | १,६४,५७९ | ३३,०२२ | — | ११,८३९ | २,००० | ४,३५५ | ४९७ | १३,१३२ | — | — | — | ९३,५४३ |
| ४ | हदगांव | १,४७,००६ | ७,२३९ | ८,८४७ | १९,७४४ | — | ११,३५९ | १,९९९ | ३,४७३ | ३,००० | ५,६०५ | — | — | — | ६१,२६६ |
| ५ | भिलोली | १,४५,१०२ | ८५,५४० | १०,३०० | १३,९५० | — | १६,००० | ४,००० | १,३०० | — | ७,९८० | — | १ | ३९० | ६२,०८० |
| ६ | कंधार | १,८१,२८१ | १४,०५९ | १९,२२० | १३,९३१ | — | २०,६५८ | ३,६०० | २०० | ३,३४१ | ५,९८६ | ६२ | — | — | ८१,१२२ |
| ७ | मुखेड | १,५३,६७४ | ४२,८५३ | ५८,०८६ | २७,६३१ | २,००० | २३,४१७ | ४,१७६ | ३,२८७ | ५,७९७ | ११,९६६ | — | ९ | ५,५५६ | १,७९,२१३ |
| ८ | देगलूर | १,२८,२८३ | ९,३७९ | ९,१८१ | ८,०९८ | — | १६,४०० | ३,६०० | १९० | १,०००ा | ८,०७० | — | १ | ४०० | ५५,९१८ |
| ९ | उमरी | ७७,८८२ | ३,८०५ | ६,२०९ | ७,५२१ | — | १२,९२६ | ३,३५६ | १,९२४ | १,८७९ | ८,१०२ | — | — | — | ४५,७२२ |
| १० | हिमायतनगर | ७६,६५७ | ४,००० | ७,३०० | ११,००० | — | १७,२०० | ३,००० | १,४०० | २,००० | ११,००० | — | — | — | ५६,९०० |
| ११ | माहूर | ७९,६४३ | ५,६४७ | ३,८१४ | ५,४११ | — | १२,९५० | ३,२०० | १,५६८ | ७५५ | ७,३५५ | — | — | — | ४१,२०० |
| १२ | अर्धापूर | ७१,९९९ | ४,१३६ | २,८५० | ६,००७ | — | ९६० | २,०७८ | ४,५१५ | २,९३३ | ४,३१९ | — | — | — | २८,२२८ |
| १३ | मुदखेड | ७१,५७३ | ६,०५६ | ५,५३८ | ९,५१६ | — | १२,३३८ | ९९० | — | ९९० | ५,६९८ | — | — | — | ४१,०२६ |
| १४ | धर्माबाद | १,०४,९२९ | २,३६८ | ४,६७७ | ८,०४१ | — | १२,१५२ | ९,१३१ | ९७० | ९६५ | ७,६२८ | — | — | — | ३८,७३२ |
| १५ | नायगांव | १,३६,०१९ | १३,०७६ | १४,३०३ | ११,७६६ | — | १७,१३५ | ३,९६५ | १,९२८ | ४०० | ११,९६९ | २,९९१ | २ | १,१८० | ७६,६२५ |
| १६ | लोहा | १,४०,३१७ | १८,७१२ | २९,८१७ | २३,००० | — | ८,५७७ | १,९९६ | ९०० | ८८० | ८,७९४ | — | — | — | ९२,६९६ |
| १७ | कुक्कुट प्र. अर्धापूर | — | — | — | — | — | ४,७५३ | १,९८३ | १,५८७ | १७,१६९ | — | — | — | — | २५,४९२ |
| | **एकूण** | **१,६५,५४३** | **२,१२,८५२** | **२,१४,५३१** | **२,०००** | **२,२३,१९६** | **४६,३२३** | **३३,९५२** | **४५,७१०** | **१,३६,४४२** | **३,०५३** | **१३** | **७,५२६** | **१,८३,६०२** |

संदर्भ : वार्षिक प्रशासन अहवाल सन २००६-०७, जिल्हा परिषद, नांदेड, पृ. क्र. १९१.

तक्ता क्र. ८

## ९० पुनर्वसित गावांची यादी खालीलप्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| **१.** | **तालुका नांदेड** | २३. | कूदळा |
| १. | नागापूर | २४. | वळेगांव |
| २. | मुजामपेठ | **४.** | **तालुका किनवट** |
| ३. | आलेगांव | २५. | लिंबायत |
| ४. | त्रिकूट | २६. | हडसणी |
| ५. | कामकाज | **५.** | **तालुका देगलूर** |
| ६. | किकी | २७. | आलू |
| ७. | पिंपळगाव गिश्री | २८. | शेवाळा |
| ८. | गंगाबेट | २९. | कावळगांव |
| ९. | वाजेगांव | ३०. | मुजलगा |
| **२.** | **तालुका हदगांव** | ३१. | मेदन कलूर |
| १०. | कोथाळा | ३२. | कारेगांव |
| ११. | गुरफळी | ३३. | लिंबा |
| १२. | आद्येगाव | ३४. | मनशकरगा |
| १३. | कोपरा | ३५. | नंदूर |
| १४. | वाटेगांव | ३६. | लख्खा |
| १५. | कामारी | ३७. | हवरगा |
| १६. | पवना | ३८. | मडंगी |
| १७. | रावणगांव | ३९. | अचेगांव |
| १८. | काळेश्वर | **६.** | **तालुका कंधार** |
| **३.** | **तालुका भोकर** | ४०. | नारनाळी |
| १९. | मनुर | ४१. | मसलगा |
| २०. | रहाटी खुद | ४२. | कौडगांव |
| २१. | बोळसा | ४३. | थेळी |
| २२. | भायेगांव | ४४. | जवळा |

Maharashtra State Gazetteers

| | | | |
|---|---|---|---|
| ४५. | जाकापूर | ६८. | रामपूर थडी |
| ४६. | कामकाज | ६९. | अटाळा |
| ४७. | येलूर | ७०. | कोळगांव |
| ४८. | शिरूर | ७१. | गुजरी |
| ४९. | पेठवडज | ७२. | अरळी |
| ५०. | कौठा | ७३. | गजगांव |
| ५१. | तेलूर | ७४. | दौलतापूर |
| **७.** | **तालुका बिलोली** | ७५. | अंतरगाव |
| ५२. | अरकळी | ७६. | हुस्सा |
| ५३. | हिप्परगाथडी | ७७. | कुंटूर |
| ५४. | थडीसावळी | ७८. | बरबडा |
| ५५. | कार्ला बु. | ७९. | बरबडावाडी |
| ५६. | गळेगांव | ८०. | मुगाव |
| ५७. | राकळी बु. | ८१. | रोषणगाव |
| ५८. | राहेर | ८२. | चोलाखा |
| ५९. | सातेगाव | ८३. | कौठा |
| ६०. | सांगवी | ८४. | बिलोली |
| ६१. | दिग्रस | ८५. | कोंडलवाडी |
| ६२. | सिरजखेड | **८.** | **तालुका मुखेड** |
| ६३. | कुंचोली | ८६. | लच्छा बु. |
| ६४. | शेळगांव गौरी | ८७. | बावतगांव |
| ६५. | शेळगांव थडी | ८८. | राजुरा खुर्द |
| ६६. | बावलगांव | ८९. | बेरळी बु. |
| ६७. | येसगी | ९०. | बेरळी खुर्द |

संदर्भ : महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र. सीएलएस-४२८९/प्र.क्र.२४९/म.३, दिनांक १५ फेब्रुवारी १९९०.

Maharashtra State Gazetteers

# नांदेड जिल्हा गॅझेटिअर

## प्रकरण-५

## उद्योगधंदे

Maharashtra State Gazetteers

प्रकरण-५

# उद्योगधंदे

## औद्योगिकरणाचा इतिहास

शेती व इतर पूरक व्यवसायांच्या उत्पादनात होणारी वाढ यांची आर्थिक विकासामध्ये महत्त्वाची भूमिका असते. नांदेड जिल्ह्यासारख्या कृषीप्रधान अर्थव्यवस्थेमध्ये जेथे शेतीवर अवलंबून असलेली लोकसंख्या तुलनेने जास्त आहे तेथे आर्थिक विकास व राहणीमानाची प्रगती प्रामुख्याने मुख्य आर्थिक कार्याच्या विभाजनावर अवलंबून असते. ही अशी प्रक्रिया आहे जी मुख्यत्त्वेकरून उद्योगधंद्यांच्या विकासाच्या गतीवरच अवलंबून असल्याने नांदेड जिल्ह्यातील औद्योगिक प्रगतीचा आढावा या प्रकरणात घेण्यात आला आहे.

प्राचीन काळापासून शेती क्षेत्र हे या जिल्ह्यातील अर्थव्यवस्थेचा मुख्य आधार राहिले आहे. ऐतिहासिक काळापासून खेड्यांमध्ये जीवनावश्यक वस्तू व शेतीची अवजारे घडविण्याचा व्यवसाय वंशपरंपरेने चालत असे. कृषि उत्पादनाच्या आधारावर जिल्ह्यात पूर्वी हातमाग, विणकाम आणि तेलघाण्यांवर तेल गाळणे हा कुटिरोद्योग अनेक ठिकाणी चालत असे. जलद व सहज वाहतुकीच्या सोयींचा अभाव, संस्थापना कौशल्याची आणि भांडवलाची कमतरता आणि निझाम राजवटीतील सरकारचे राज्यातील या भागाकडे दुर्लक्ष ही सर्व नांदेड जिल्ह्याच्या उद्योगधंद्यांच्या मागासलेपणाची कारणे होती. आर्थिक कारणांशिवाय शैक्षणिक मागासलेपण, राजकीय अस्थिरता आणि प्रोत्साहन भांडवलाची कमतरता ही देखील इतर कारणे होती.

१९२१ च्या जनगणना अहवालानुसार जिल्ह्याची औद्योगिक लोकसंख्या ६०,८५१ एवढी होती पण तिचे दर हजारी लोकसंख्येशी प्रमाण फक्त ९१ एवढेच होते. १९५९ मध्ये शेती व्यतिरिक्त इतर उत्पादने हे अर्थार्जनाचे साधन असणाऱ्या लोकसंख्येची टक्केवारी ८.५३ एवढीच होती. तरी देखील नांदेड येथे असलेल्या कापड गिरण्या आणि हातमाग उद्योगांमुळे ही टक्केवारी मराठवाड्यातील इतर जिल्ह्यांपेक्षा जास्त होती.[१]

नांदेडमध्ये सन १९२३ साली हैद्राबाद सरकारच्या पुढाकाराने संघटीत उद्योगाद्वारे उस्मानशाही मिल या कापड गिरणीची स्थापना करण्यात आली.

१९४९ मध्ये नांदेड जिल्ह्यात नांदेड व देगलूर येथे औद्योगिक सहकारी संस्था स्थापन झाल्या. १९६५ मध्ये यात वाढ होऊन जिल्ह्यात एकूण १६८ औद्योगिक सहकारी संस्थांची स्थापना झाली.

मार्च, १९५३ मध्ये नांदेड जिल्ह्यात ग्रामीण उद्योगधंद्यात वाढ करण्याची योजना सुरू करण्यात आली. या योजनेनुसार कापूस, लोकर, चामड्याच्या वस्तू, लोखंडी वस्तू इत्यादी संबंधीचे उद्योगधंदे खेड्यात वाढविण्याच्या दृष्टीने सहा ठिकाणी शिक्षणकेंद्रे स्थापन करण्यात आली. नांदेड जिल्ह्यात

---

१. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, १९७१, पृ. २५५.

Maharashtra State Gazetteers

छोट्या धंद्यांस असलेला वाव लक्षात घेऊन हातमाग सल्लागार मंडळ, हस्त व्यवसाय सल्लागार मंडळ आणि खादी ग्रामोद्योग सल्लागार मंडळ अशी तीन मंडळे स्थापन करण्यात आली. तसेच मुदखेड आणि कळमवार येथे कातडी कमाविणे, होजिअरी आणि विणकाम यांचे शिक्षण देण्यासाठी केंद्रे स्थापन करण्यात येऊन त्यात एकूण २५ शिक्षक तयार करण्यात आले. या गटात एकूण ८४ सहकारी संस्था स्थापन झाल्या. त्यात मुदखेड येथील औद्योगिक संस्थेचा देखील समावेश होता.[२]

नांदेड जिल्हा हा पूर्वी सांगितल्याप्रमाणे कृषी उत्पादनांचा जिल्हा असल्याने येथे अन्नधान्यामध्ये डाळी, ज्वारी, गहू यांचे तर नगदी पिकांमध्ये कापूस, तेलबिया इत्यादींचे उत्पादन घेतले जाते आणि त्यामुळेच सरकी काढणे व दाबणी, वनस्पती तेल, डाळ गिरण्या या उद्योगांचे पूर्वापारपासून या जिल्ह्यातील अधिक्य स्पष्ट होते.

जिल्ह्यातील पहिली हातमाग सहकारी संस्था, नांदेड शहरात मार्कंडेय या नावाने १९५८ मध्ये स्थापन झाली, तर त्याच वर्षी चौफाळा येथे जिल्ह्यातील पहिली यंत्रमाग सहकारी संस्था स्थापन झाली. नांदेड येथे नांदेड औद्योगिक सहकारी संस्था या नावाने सन १९६३ मध्ये जिल्ह्यातील पहिली औद्योगिक वसाहत स्थापन झाली. तर १९ ऑक्टोबर १९६८ रोजी राज्यातील लघुउद्योगांचा सर्वांगिण विकास करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र लघुद्योग विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली.

जिल्ह्यातील उद्योगांचा विकास करण्याकरिता आणि बेरोजगारी दूर करण्यासाठी सन १९६४ मध्ये नांदेड येथे जिल्हा सहकारी औद्योगिकरण आणि विकास संस्था मर्यादित, नांदेड या सहकारी संस्थेची स्थापना करण्यात आली. सहकारी संस्थेद्वारे जिल्ह्यामध्ये सहा वेगवेगळ्या ठिकाणी उद्योग केंद्रे स्थापन करण्यात आली. त्यानुसार अर्जापूर येथे आर.सी.सी. स्पून पाईप तर नांदेड येथे विटा निर्मिती केंद्र, छत्र्या निर्मिती केंद्र, कातडी कमाविणे, इलेक्ट्रिक मोटार रिवाईंडिंग केंद्र आणि किटकनाशके निर्मिती केंद्र इत्यादींची स्थापना करण्यात आली. सर्व भाग भांडवल राज्य शासनाच्या मालकीचे असलेल्या या संस्थेचे उत्पादन प्रक्रियेसाठीचे आवश्यक अर्थसहाय्यदेखील राज्य शासनाद्वारे पुरविण्यात आले होते.[३]

१९६० च्या दशकामध्ये मन्याड धरणाच्या निर्मितीमुळे जिल्ह्यातील ऊस लागवडीचे क्षेत्र मोठ्या प्रमाणावर वाढले. परिणामतः सन १९६६ मध्ये जिल्ह्यातील प्रथम सहकारी साखर कारखाना म्हणून कळंबर सहकारी साखर कारखान्याची स्थापना झाली.[४]

मराठवाड्याच्या आर्थिक व औद्योगिक विकासासाठी १९६७ मध्ये मराठवाडा विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली. या महामंडळाने नांदेड जिल्ह्यात मराठवाडा वस्त्रोद्योग महामंडळ, मराठवाडा सिरॅमिक कॉम्प्लेक्स व किनवट रूफिंग टाईल्स या कंपन्या स्थापन केल्या. तर १९७० मध्ये मराठवाड्यात एकत्रित यंत्रमाग प्रकल्प राबविण्यासाठी टेक्स्कॉम या कंपनीची स्थापना झाली. महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळाने १९७७ साली नांदेड येथे किरकोळ विक्री केंद्र सुरू केले. या महामंडळाद्वारे नांदेड शहराव्यतिरिक्त तालुक्याच्या ठिकाणी व प्रमुख व्यापारीपेठा असलेल्या ठिकाणी मर्यादित कालावधीकरिता विक्री स्टॉल उघडण्यात येतात.

---

२. **कल्याणकारी राज्याची वाटचाल**, महाराष्ट्र शासन, १९५७, पृ. १३-१४.

३. **स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, लीड बँक स्कीम, सर्व्हे रिपोर्ट ऑन नांदेड डिस्ट्रिक्ट**, १९७६, पृ. २६.

४. डॉ. र. पु. कुरूलकर यांच्याकडून प्राप्त माहितीवर आधारित.

जिल्ह्यातील १९६० ते १९७० या कालावधीमधील विविध उद्योगांचा तपशील पुढील तक्त्याद्वारे दर्शविण्यात आला आहे.

| अ.क्र. | उद्योगाचे नाव | कारखान्यांची संख्या | रोजगार संख्या |
|---|---|---|---|
| १ | विणकाम | ९१९ | २१२० |
| २ | खळ आणि रंग देणे | १० | २८ |
| ३ | लोहारकाम | १३९ | २६१ |
| ४ | धातूकाम | १९७ | उ.ना. |
| ५ | सुतारकाम | ३०९ | ५४३ |
| ६ | वेतकाम | ११६ | ३३८ |
| ७ | वीटा व फरशी उद्योग | १७७ | उ.ना. |
| ८ | कुंभारकाम | १३७ | उ.ना. |
| ९ | कातडी कमाविणे | ४७३ | ११३० |
| १० | खाद्यतेल | ६१ | १९१ |
| ११ | साबण उत्पादन | ५ | २४ |
| १२ | भात भरडणे | ४१ | १२१ |

सन १९६९-७० मध्ये उद्योग विभागात नोंदणी झालेले १२७ लघुउद्योग जिल्ह्यात सुरू होते. या लघुउद्योगांचे एकत्रित स्थिर भांडवल ३३.९१ लाख रुपये होते. तर वार्षिक उत्पादनाची अंदाजे किंमत १९९.८४ लाख रुपये होती.[५] याच कालावधीत खादी व ग्रामोद्योग महामंडळाने औद्योगिक विकासाच्या दृष्टीकोनातून जिल्ह्यातील ९३ औद्योगिक संस्थांना ८७,५७२ रुपये कर्जाऊ दिले होते.[६] त्यापैकी १२ हातमाग सहकारी संस्था होत्या तर ५२ संस्था बंद होत्या.[७] १९८० मध्ये जिल्ह्यात मे. सुफल उद्योग हा मेणबत्त्या तयार करण्याचा कारखाना नांदेड औद्योगिक क्षेत्रात १००० चौ. मी. क्षेत्रावर उभारण्यात आला.

सन १९८३ मध्ये जिल्ह्यात ११७ नोंदणीकृत कारखाने होते. त्यापैकी १०० कारखाने चालू स्थितीत होते व त्यामध्ये दिवशी सरासरी ८,४२५ कामगार कार्यरत होते. या कारखान्यांपैकी २ साखर कारखाने, ४ खाद्यतेल कारखाने, १९ कापूस वटण व दाबणी कारखाने तर सूती कापडाचे २ मोठे कारखाने होते.[८] १९८६-८७ साली १३५ नोंदणीकृत कारखान्यांपैकी १२२ कारखाने कार्यरत होते व त्यामध्ये दिवशी सरासरी ९,०६३ कामगार कार्यरत होते.[९] सन २००३ मधील एकूण नोंदणीकृत ३४१ कारखान्यांपैकी १०७ कारखाने बंद होते. उर्वरित २३४ कारखान्यांमध्ये ५[illegible]२ कामगार होते. यावेळी जिल्ह्यातील दरलाख लोकसंख्येशी औद्योगिक कामगारांचे प्रमाण १८४ होते.[१०] जिल्ह्यात २००६ मध्ये एकूण २७५ नोंदणीकृत कारखान्यांपैकी ९३ कारखाने बंद होते. चालू असलेल्या १८० कारखान्यांमध्ये ३,३१७ कामगार होते. या कालावधीतील जिल्ह्यातील दर लाख लोकसंख्येशी औद्योगिक कामगारांचे प्रमाण १५५ होते.

५. उपरोक्त, लीड बँक सर्व्हे रिपोर्ट, पृ. २७.

६. कित्ता, पृ. ३०.

७. पूर्वोक्त.

८. **जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन**, नांदेड जिल्हा, १९८३-८४.

९. कित्ता, नांदेड जिल्हा, १९८६-८७.

१०. पूर्वोक्त, नांदेड जिल्हा, २००३-२००४.

नांदेड जिल्ह्यातील इ.स. १९८३ व सन २००७-०८ मधील तुलनात्मक औद्योगिक स्थिती पुढील तक्त्याद्वारे दर्शविली आहे.

**नांदेड जिल्ह्यातील निरनिराळ्या उद्योगांतील रोजगार**

| अ.क्र. | तपशील | आस्थापनांची संख्या | | कर्मचारी वर्ग | |
|---|---|---|---|---|---|
| | | १९८३ | २००७-०८ | १९८३ | २००७–०८ |
| (१) | (२) | (३) | | (४) | |
| १ | कृषी | १३ | २६ | ५८१ | १६३९ |
| २ | खाणकाम | . . | . . | . . | . . |
| ३ | वस्तू निर्माण | ४१ | ३८ | ८९९६ | ३९०३ |
| ४ | वीज निर्मिती, गॅस इत्यादी | ०४ | ३२ | १४५९ | ५७२३ |
| ५ | बांधकाम | ३३ | २७ | ३७५३ | ८७२ |
| ६ | घाऊक, किरकोळ व्यापार, हॉटेल व्यवसाय. | ४२ | ११४ | १२६२ | ७६१८ |
| ७ | परिवहन, गोदामे, दळणवळण | ०६ | ८२ | ३२७१ | ९८२९ |
| ८ | वित्तपुरवठा, विमा, स्थावर मालमत्ता, व्यापार विषयक सेवा. | ५३ | २९७ | २१३५ | २२५४३ |
| ९ | सामुहिक, सामाजिक, व्यक्तिगत सेवा. | १९६ | ०९ | २००११ | ८३५ |
| | एकूण . . | ३८८ | ६२५ | ४१४६८ | ५२९६२ |

यानुसार गेल्या पंचवीस वर्षात एकूण कामगारांच्या संख्येत जवळपास ३० टक्के वाढ झाल्याचे चित्र दिसून येते. तसेच उद्योग गट निहाय जिल्ह्यातील आस्थापना आणि रोजगारांमध्ये सन १९८० ते २००५ या कालावधीत झालेला बदल पुढील तक्त्याद्वारे दर्शविण्यात आला आहे.

| अ.क्र. | तपशील | आस्थापनांची संख्या | | कर्मचारी वर्ग | |
|---|---|---|---|---|---|
| | | १९८० | २००५ | १९८० | २००५ |
| (१) | (२) | (३) | | (४) | |
| १ | कृषी | २९७२३ (७३.७८%) | २२१६ (२.७०%) | १४६६२ (१४.७१%) | ३००२ (१.७८%) |
| २ | बिगर कृषी | १०५६३ (२६.२२%) | ७९९६२ (९७.३०%) | ८५०४२ (८५.२९%) | १६६०९५ (९८.२२%) |
| ३ | सर्व प्रमुख उद्योग गट | ४०२८६ | ८२१७८ | ९९७०४ | १६९०९७ |

Maharashtra State Gazetteers

सन १९८० मध्ये कृषी उद्योगाला फार मोठे प्राधान्य होते व एकूण प्रमुख उद्योगांच्या जवळपास ७३.७८% इतके उद्योग कृषी आस्थापनेत स्थापन करण्यात आले होते. बिगर कृषी उद्योगांचा वाटा २६.२२% इतका होता. तर २००५ च्या आर्थिक गणनेनुसार बिगर कृषीचा वाटा ९७.३०% इतका वाढला ही वाढ १९८० च्या तुलनेत ७.५६ पट होती. त्यामुळे १९८० नंतर बिगर कृषी उद्योगांना प्राधान्य देण्यात आले हे स्पष्ट होते.

कामगारांच्या वाढीचा विचार करता १९८० मध्ये ८५.२९% कामगार बिगर कृषीत कार्यरत होते. तर २००५ मध्ये या कामगारांच्या संख्येत ८५,०४२ वरून १,६६,०९५ इतकी वाढ झाली. ही वाढ १.९५ पट होती. प्रमुख उद्योग गटाची वाढ ही १.७० पट असून बिगर कृषी क्षेत्रात वाढ मोठ्या प्रमाणावर झाली. मानव विकास निर्देशांक सरासरीपेक्षा कमी असणाऱ्या जिल्ह्यांना रोजगार निर्मिती प्रकल्प सुरू करण्यासाठी विशेष सवलत देण्याच्या शासनाच्या धोरणाचा परिणाम म्हणून ही वाढ झालेली दिसून येते.

विमान व रेल्वे सेवेप्रमाणेच हा जिल्हा राज्य व राष्ट्रीय महामार्गाने जोडला गेला असल्याने ट्रक वाहतुकीचा फार मोठा व्यवसाय हे या शहराचे वैशिष्ट्य आहे. विशेषतः शीख समाज या व्यवसायात मोठ्या प्रमाणात आढळतो. शहरात हजारो नोंदणीकृत ट्रक्स असून वाहतुकी सोबतच ऑटोमोबाईल्स, स्पेअर पार्टस्, रिपेअरिंग, टायर रिमोल्डींगसारखे अनेक रोजगार मोठ्या प्रमाणावर चालू आहेत.[११]

आजमितीस सिप्टा कोटेड, टाटा केमिकल्स, पायोनियर डिस्टलरी, किर्ती फूडस्, एडवान्स स्टील, सूरज प्लास्टीक, मेघावी सिमेंट पाईप, ईन्ड भारत, कोहिनूर फिडस्, शिवा फर्टिलायझर्स, सालासर कॉस्टपीन, मंजीत कॉटन व तत्सम मोजके जिनींग प्रेसिंग सोल्वंट प्लँटस्, रिफायनरीज, फ्लोअर मील, दाल मील, खत कारखाने इत्यादी कार्यान्वित असून जिल्ह्यात अनेक ठिकाणी मिनरल वॉटर, बायोकोल, फेब्रीकेशन, राईस मील, मिर्ची उद्योग, ऑईल मिल्स्, आईस फॅक्टरी इत्यादींसारखे लघुउद्योग मोठ्या प्रमाणावर चालू असून स्थानिक रोजगार उपलब्ध करून देत आहेत.[१२] जिल्ह्यात माहे डिसेंबर, २००९ अखेर एकूण १५५७ सुक्ष्म तसेच लघु उपक्रम कार्यान्वित असून सदर उपक्रमांत एकूण रु. ९३.९९ कोटींची गुंतवणूक करण्यात आली आहे. तर उपक्रमांद्वारे ८४८५ लोकांना रोजगार उपलब्ध झाला आहे. स्थापित उपक्रमांमध्ये प्रामुख्याने इंजिनिअरिंग, सोयाबीन प्रक्रीया, बायोकोल, प्रिंटींग, फर्निचर, पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर इत्यादी उद्योगांचा समावेश होतो.

त्याचप्रमाणे जिल्ह्यात १६ मध्यम व मोठे उपक्रम स्थापित असून त्यात रु. ४१५.७३ कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात आली असून याद्वारे ४३४४ लोकांना रोजगार उपलब्ध झाला आहे. यामध्ये प्रामुख्याने साखर उद्योग, कोल्ड रोल्ड, स्टील शीट, ड्रग्ज, ऑईल रिफायनरीज, इथेनॉल, फर्टिलायझर इत्यादी उद्योगांचा समावेश होतो. श्री. अशोकराव चव्हाण राज्याचे उद्योगमंत्री म्हणून

११. हर्षद शहा, सी.ए. अध्यक्ष, व्यापार व उद्योग आघाडी, नांदेड यांच्याकडून प्राप्त माहितीच्या आधारे.

१२. कित्ता.

कार्यरत असताना नांदेडच्या एम.आय.डी.सी. भागात २० कोटी रुपयांचा खाटुरामजी-द-रोलिंग हा पोलाद उद्योग टि.एम.टी. गजाळी उत्पादनासाठी एम.आ.डी.सी. च्या साडेबारा एकर परिसरात १ लक्ष चौ.फूट बांधकामात उच्च दर्जाच्या भूकंपरोधक गजाळीसाठी आंतरराष्ट्रीय जर्मन तंत्रज्ञानावर उभारण्यात आलेला आहे. प्रतिदिन १०० टन गजाळी उत्पादन करण्यात येणारा महाराष्ट्रातील हा पहिलाच आधुनिक तंत्रज्ञान वापरलेला कारखाना आहे. भविष्यात कारखान्यासाठी लागणारा कच्चा माल नांदेड येथील कारखाना परिसरातच निर्माण करण्यात येणार आहे. सद्यःस्थितीत कारखान्यात ३.३ मेगावॅट विद्युत क्षमता उपलब्ध असून ती ५ मेगावॅट इतकी करून विविध प्रकारच्या गजाळी उत्पादनासाठी आवश्यक असलेली १२५० से.ग्रेड तापमानाची उच्च प्रतीची भट्टी नांदेड येथे बसविण्यात आली आहे.[१३]

नांदेड हे दक्षिण मध्य रेल्वेचे विभागीय केंद्र असून येथून दिल्ली, पाटणा, तिरुपती, हैद्राबाद, मुंबई, बंगलोर या महत्त्वाच्या शहरांसाठी थेट रेल्वे सेवा उपलब्ध आहे. याशिवाय दळणवळण आणखी जलद होण्यासाठी नांदेड विमानतळ विस्तारीकरणांतर्गत विविध कामे पूर्ण करून येथून नियमित हवाईसेवा सुरू करण्यात आली आहे. तसेच नांदेड येथून मुंबईसाठी किंगफिशर एअरलाईन्स या कंपनीची विमानसेवा सुरू करण्यात आलेली आहे. विमानतळ विस्तारीकरणामुळे नांदेड येथे विमानाने येणाऱ्या पर्यटकांत व व्यावसायिकांत वाढ झालेली आहे. नांदेड व कृष्णूर औद्योगिक क्षेत्रातील कारखानदारांना विमानसेवेचा फायदा होऊन अप्रत्यक्षरित्या कारखानदारीस त्याचा लाभ झालेला आहे. जिल्ह्यातील कारखान्यांचा सन १९८१ ते २००४-०५ या कालावधीमधील विकासदर्शक तपशील तक्ता क्र. १ मध्ये दर्शविण्यात आला आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने नांदेड, कृष्णूर, देगलूर, कंधार, किनवट व मुदखेड येथे औद्योगिक क्षेत्रे विकसित केलेली आहेत तर दाभड, ता. अर्धापूर, बारड, ता. मुखेड या ठिकाणी औद्योगिक वसाहती विकसित करण्याचे प्रस्तावित आहे. तसेच एक विभागीय तर तीन उपविभागीय कार्यालये स्थापन करण्यात आली आहेत.[१४] अशाप्रकारे नांदेड जिल्ह्याच्या औद्योगिक विकासाला दिशा व गती प्राप्त करून देणारे नेतृत्व लाभल्यामुळे नांदेड जिल्ह्याची औद्योगिक शहर म्हणून ओळख होणार आहे.

भारत सरकारच्या वार्षिक औद्योगिक सर्वेक्षण आकडेवारीचा तसेच अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन यांच्याकडून प्रसिद्ध होणाऱ्या जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन अहवालांचा प्रामुख्याने उप अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, नांदेड यांनी पाठविलेल्या माहितीचा प्रकरणात उपयोग करण्यात आला आहे. तर काही उद्योगांची माहिती संबंधित विभागांनी पुरविलेल्या माहिती आधारे देण्यात आली आहे.

### वीज निर्मिती व वितरण

विजेचा वापर हे औद्योगिक विकासाचे गमक मानले जाते. अविकसित क्षेत्रावर विद्युत उपलब्धतेचा मोठ्या प्रमाणावर प्रभाव असतो. योग्य आर्थिक प्रेरणा प्राप्त करून देण्यात विद्युत

---

१३. प्रा. डॉ. पी. ई. विभुते, सहयोगी प्राध्यापक व विभाग प्रमुख, अर्थशास्त्र विभाग, यशवंत महाविद्यालय, नांदेड यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे.

१४. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्याकडून प्राप्त माहिती आधारे.

उपलब्धता महत्त्वाची भूमिका बजावते कारण विजेच्या पुरेपूर वापरानेच नवीन उद्योग विकसित होऊन ते अविकसित भागात अतिरिक्त आर्थिकक्षेत्र निर्माण करतात.

मराठवाडा विभागाच्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्ये पूर्णा प्रकल्प हा एकमेव लक्षवेधी बहुउद्देशीय प्रकल्प समाविष्ट होता. नदीच्या खोऱ्यामध्ये पूर्णा नदीवर येलदरी येथील सिंचन धरणाच्या पायथ्याशी १७१ लाख रुपये खर्चून हे विद्युत निर्मिती केंद्र स्थापित करण्यात आले. त्याची स्थापित क्षमता १५,००० कि.वॅ. वीज निर्मिती एवढी होती. या प्रकल्पाद्वारे निर्माण करण्यात आलेली वीज नांदेड, परभणी, सेलू, जिंतूर, हिंगोली, कळमनुरी आणि पाथरी या शहरास पुरविली जात असे.

१९५७ मध्ये मराठवाड्यातील वीज निर्माण संचाची स्थापित कार्यक्षमता फक्त १४०० कि.वॅ. होती तर माणसी विजेचा वापर फक्त ०.४ युनिट होता. १९६३ पर्यंत या स्थापित संचाची क्षमता १०,००० कि.वॅ. वाढली तर १९५७ मध्ये ७६० कि.वॅ. असलेली विजेची मागणी ५००० कि.वॅ. पर्यंत वाढली. परिणामतः विजेच्या ग्राहकांमध्ये देखील वाढ होऊन त्यांची संख्या २१,००० झाली. १९५७ पूर्वी जिल्ह्यात विजेवर चालणारे पंपांचे संच वापरात नव्हते. १९७१ मध्ये मात्र १२० हून अधिक विजेवर चालणारे पंप जिल्ह्यामध्ये होते. १९५७ मध्ये मराठवाड्यात विद्युतीकरण झालेली २ शहरे होती. परंतु १९६४ मध्ये या संख्येत वाढ होऊन ती ८७ एवढी झाली. १९५९ मध्ये ०.४ युनिट प्रती माणशी असलेला विजेचा वापर वाढून १९६२ मध्ये १.५ युनिट प्रती माणशी झाला.

१९६२ पूर्वी जिल्ह्यात नांदेड, देगलूर, किनवट या शहरांमध्ये तसेच धर्माबाद शहरातील काही भागातच वीज उपलब्ध होती. १९६३ मध्ये हदगाव तालुक्यातील हदगाव, नांदेड तालुक्यातील अर्धापूर, लहान, मुखेड, लिंबगाव, मुगर आणि बिलोली तालुक्यातील बिलोली, धर्माबाद आणि कुंडलवाडी या गावांचे विद्युतीकरण करण्यात आले.

सन १९४९ आणि १९६१ या वर्षी उस्मानशाही कापड गिरणीने स्वतःच्या वीज निर्मिती संचाद्वारे नांदेड शहराला वीज पुरवठा केला. याविषयीचा सांख्यिकीय तपशील तक्ता क्र. २ मध्ये दर्शविण्यात आला आहे. त्यानंतर मात्र १९५६ पेक्षा १९५९-६० मध्ये विजेचा वापर लक्षणीयरित्या वाढला. उस्मानशाही मिलद्वारे नांदेड शहराला पुरविण्यात येणाऱ्या या अतिरिक्त वीज पुरवठ्यामुळे त्यांच्या अंतर्गत वीज दाबामध्ये अनियमितता निर्माण झाली. त्यानुसार उस्मानशाही गिरणीला नांदेड शहरास वीज पुरविण्याच्या कर्तव्यातून मुक्त करण्यासाठी पूर्वीच्या हैद्राबाद सरकारने नांदेड येथे १५०० कि.वॅ. वीज निर्मितीचे वाफेचे केंद्र सुरू करण्याचे ठरविले. परंतु राज्यांच्या पुनर्रचनेनंतर मुंबई सरकारने हा प्रस्ताव मोडीत काढून त्याऐवजी ९०० कि.वॅ. स्थापित क्षमता असलेले डिझेल केंद्र नांदेड येथे सुरू करण्याचे ठरविले. इ.स. १९५६ मध्ये राज्य पुनर्रचना झाल्यावर १ फेब्रुवारी १९५७ रोजी मुंबई राज्य विद्युत मंडळाची स्थापना करण्यात आली. त्यामध्ये राज्यातील सर्व लहान वीज निर्मिती केंद्रे विलीन करण्यात आली. त्यानुसार १९६१ पासून वीज मंडळाद्वारे शहरास वीज पुरवठा करण्यात येऊ लागल्याने गिरणीद्वारे होणारा वीज पुरवठा बंद झाला. जिल्ह्यातील १९६१ ते १९८७ या कालावधीमधील विजेचा वापर तक्ता क्र. ३ मध्ये दर्शविण्यात आला आहे.

सन १९७० पर्यंत नांदेड विद्युत केंद्राने आपल्या स्थापित क्षमतेचा पूर्ण वापर करून नांदेड शहरास व इतर २८ गावांना २,८३३ कि.वॅ. विजेचा पुरवठा केला. सन १९६४ मध्ये या विद्युत केंद्राचे स्थिर भांडवल रु. ५०,७९,५७४ होते. केंद्राकडे असलेल्या मशिनरींमध्ये Blackstone DG Set, Skoda DG Set आणि तीन Mirrlees Sets या मशिनरींचा समावेश होता. Mirrlees Sets पैकी दोन मशिनरी प्रत्येकी १००० कि.वॅ. क्षमतेच्या होत्या.

देगलूर येथील वीज केंद्राच्या १८० कि.वॅ. स्थापित क्षमतेपैकी १३२ कि.वॅ. वीज देगलूर, बिलोली, कुंडलवाडी आणि धर्माबाद शहरास पुरविली जात असे. रु. ८,००,००० स्थिर भांडवल आणि रु. १,५०,००० खेळते भांडवल असलेल्या या वीज केंद्राच्या मालकीचा एक ५० कि.वॅ. क्षमतेचा MMW आणि १०० कि.वॅ. क्षमतेचा Dentz संच आहे.

किनवट वीज केंद्रामध्ये ३२ कि.वॅ. क्षमतेचा Skoda DG Set आणि ८० कि.वॅ. क्षमतेचा MMW संच होता. या केंद्राचे स्थिर भांडवल १,४६,००० रुपये तर खेळते भांडवल ७०,००० रुपये होते. तर तामसा आणि हदगाव शहरांना विदर्भ ग्रीडद्वारे वीज पुरवठा केला जात असे.

नांदेड वीज केंद्रास २५७.६६ मीटर वीज दाबाचा मार्ग आहे आणि १३६.८० मीटर लघु वीज दाब मार्ग होता. देगलूर वीज केंद्रास ५१.५० मीटर उच्च वीज दाब मार्ग होता. तर २४.१४ मीटर लघु वीज दाबमार्ग होता. संपूर्ण जिल्ह्यामध्ये विजेचे दर प्रत्येक युनिटला सारखे होते. पण शेतीच्या व इतर सर्वसाधारण उपयोगाकरिताचे दर अनुक्रमे १३ पैसे व १५ पैसे होते.

सन १९६०-६१ पासून जिल्ह्यामध्ये शासनाच्या विद्युत मंडळाद्वारे वीज निर्मिती केली जाऊ लागली.[१५]

सन १९६८-६९ दरम्यान जिल्ह्यामध्ये एकूण १२२.३८ लाख KWh विजेचा वापर केला गेला. यापैकी १९.९१ लाख KWh वीज घरगुती वापरासाठी, १६.२० लाख KWh वीज व्यापारी उद्योगासाठी, ३२.०६ लाख KWh वीज औद्योगिक कारणांसाठी, ४०.९७ लाख KWh वीज कृषी उपयोगासाठी तर १३.२४ लाख KWh वीज रस्त्यांवरील विजेचे दिवे आणि इतर कारणांसाठी वापरण्यात आली. या कालावधीतील जिल्ह्यातील विभागवार विजेचा वापर तक्ता क्र. ४ मध्ये दर्शविण्यात आला आहे.

दिनांक ३१ मार्च १९७० पर्यंत जिल्ह्यामध्ये ३७५ खेडी आणि ११ शहरांचे विद्युतीकरण करण्यात आले होते. अशाप्रकारे १,३२५ खेड्यांपैकी २८.३% खेड्यांचे विद्युतीकरण करणे बाकी होते. महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळाने विद्युतीकरण बाकी असलेल्या खेड्यांपैकी सन १९७०-७१ पर्यंत ८० खेड्यांचे आणि सन १९७१-७२ पर्यंत १२० खेड्यांचे विद्युतीकरण करण्याचे योजिले होते.[१६] तसेच सन १९७०-७१ पर्यंत २२५० कृषी आधारित विद्युत जोडणी करण्याचे देखील प्रस्तावित होते.[१७]

---

१५. **नांदेड जिल्हा गॅझेटिअर**, १९७१, पृ. २६४-२६७.

१६. पूर्वोक्त, **लीड बँक सर्व्हे रिपोर्ट**, पृ. ५३.

१७. कित्ता.

Maharashtra State Gazetteers

सन १९८६-८७ पर्यंत जिल्ह्यातील सर्व गावांचे विद्युतीकरण पूर्ण झालेले होते. या कालावधीत जिल्ह्यामध्ये एकूण ८ कोटी ९१ लाख कि.वॅ. तास विजेचा वापर करण्यात आला. त्यापैकी २ कोटी ६७ लाख ९० हजार कि.वॅ. तास घरगुती वापरासाठी म्हणजेच एकूण वापराच्या ३०.०७%, २ कोटी ४२ लाख ९२ हजार कि.वॅ. (२७.३६%) व्यापारी व लघुशक्तीसाठी, २ कोटी ४९ लाख ५३ हजार कि.वॅ. (२८.०१%) औद्योगिक वापरासाठी, ४६ लाख ११ हजार कि.वॅ. (५.१७%) सार्वजनिक दिवाबत्तीसाठी, २५ लाख ७ हजार कि.वॅ. (२.८१%) कृषि वापरासाठी तर याखेरीज ५९ लाख ४८ हजार कि.वॅ. (६.६८%) इतर कारणांसाठी असा विजेचा वापर करण्यात आला.[१८] तसेच ३३,०१२ कृषीपंपांना वीज कनेक्शन देण्यात आले होते.

नांदेड जिल्ह्यात कोणतेही थर्मल पॉवर स्टेशन नसल्याने बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ येथील थर्मल पॉवर स्टेशनकडून जिल्ह्यास वीज पुरवठा केला जात असे. जिल्ह्यातील १९८६-८७ ते २००७-०८ या कालावधीमधील वापरानुसारचे विजेचे वर्गीकरण तक्ता क्र. ५ मध्ये दर्शविण्यात आले आहे.[१९]

सन १९९१ ते सन २००४ या कालावधीमधील जिल्ह्यातील विद्युतीकरणाचे विश्लेषण तक्ता क्र. ६ मध्ये दर्शविले आहे.

मार्च, १९९६ अखेर जिल्ह्यातील सर्व नागरी केंद्रे व गावांचे १०० टक्के विद्युतीकरण झाले. त्याचप्रमाणे शेतीकरिता विजेची मागणी उत्तरोत्तर वाढत गेल्याने मार्च २००४ अखेर १६२२ विद्युतपंप बसविण्यात आले. यापैकी काही पंप विहिरींवर सर्वसाधारण विस्तार कार्यक्रमांतर्गत बसविण्यात आले. कृषी पंपांना मागणीच्या प्रमाणात क्रमावरीने विद्युत पुरवठा करण्यात येत असे. वर्ष २००३-०४ मध्ये एकूण ६,८२,१७० हजार कि.वॅ. तास वीज जिल्ह्यात वापरात आली. त्यापैकी १०३०७५.८९ हजार कि.वॅ. तास घरगुती वापरासाठी, ४५१५२८.५९ हजार कि.वॅ. तास व्यापारासाठी तर १९३०५.४ हजार कि.वॅ. तास इतर कारणासाठी वापरण्यात आली.[२०]

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या निर्देशांक समितीने १ एप्रिल १९९६ चा जिल्ह्याकरिताचा कृषि पंप उर्जीकरणाचा निर्धारित केलेला अनुशेष १,६८२ कृषि पंप होता. या भौतिक अनुशेषाचे आर्थिक मुल्य ६८९.६२ लाख रुपये होते. कंपनीने सन १९९६-९७ मध्ये १,१०९ कृषि पंपांचे व १९९७-९८ मध्ये ५७३ कृषि पंपांचे उर्जीकरण करून हा अनुशेष भरून काढला.

शेतीकरिता वाढत्या प्रमाणावर विजेची मागणी असल्याने मार्च, २००९ अखेर जिल्ह्यात १५६७ विद्युत पंप बसविण्यात आले. वर्ष २००८-०९ मध्ये एकूण ८,६३,३३६ हजार किलोवॅटस् तास वीज

---

१८. **जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन**, नांदेड जिल्हा, वर्ष १९८६-८७, पृ. १६.

१९. कित्ता, पृ. ९२-९३.

२०. पूर्वोक्त, वर्ष २००३-०४, पृ. ७.

जिल्ह्यात वापरात आली. टक्केवारीनुसार घरगुती वापर २२.८३%, शेती ५१.४३%, औद्योगिक व सार्वजनिक दिवाबत्ती १७.७५%, व्यापार ४.२६% व इतर ३.७३% या प्रमाणात जिल्ह्यामध्ये विजेचा वापर केला गेला. सन २००७-०८ या वर्षातील शहर व गावांनुसारची विद्युतीकरणाची सांख्यिकी तक्ता क्र. ७ मध्ये दर्शविली आहे. तर सन २००८-०९ मधील नांदेड जिल्ह्यातील विद्युत वापराचा तपशील पुढीलप्रमाणे[२१]:—

| अ.क्र. | तपशील | परिमाण | नांदेड | महाराष्ट्र |
|---|---|---|---|---|
| १ | विद्युतीकरण झालेली गावे | संख्या | १६११ | ३६३१२ |
| २ | वीज पुरवठा केलेले कृषी पंप संच | हजार | N.A. | २८९५ |
| ३ | विजेचा वापर | दशलक्ष कि.वॅ. तास | | |
| | ३.१ घरगुती | दशलक्ष कि.वॅ. तास | १९७ | १५५३ |
| | ३.२ वाणिज्यिक | दशलक्ष कि.वॅ. तास | ३७ | ६६६१ |
| | ३.३ औद्योगिक | दशलक्ष कि.वॅ. तास | ९२ | ३०३२३ |
| | ३.४ कृषी | दशलक्ष कि.वॅ. तास | ४४४ | १२६७६ |
| | ३.५ इतर | दशलक्ष कि.वॅ. तास | ९३ | ४६२५ |
| | ३.६ एकूण | दशलक्ष कि.वॅ. तास | ८६३ | ६९८३८ |

कंपनीकडून अनुसूचित जाती/जमाती, भटक्या व विमुक्त जाती यांसारख्या मागास प्रवर्गांना सवलतीच्या दराने घरगुती वीज कनेक्शन देण्यात येतात. नांदेडमध्ये ऑक्टोबर, १९७६ पासून अशी एकूण ७६,३९५ कनेक्शन देण्यात आली. त्यापैकी मार्च, २००९ ते मार्च, २०१० या कालावधीमध्ये एकूण ५,७९६ कनेक्शन्स देण्यात आली.[२२] याविषयीचा विस्तृत तपशील पुढीलप्रमाणे आहे :—

| अ.क्र. | कालावधीचा तपशील | सवलतीची घरगुती संबंधने | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती | भटक्या जाती | विमुक्त जाती | नवबौद्ध | एकूण |
| १ | मार्च २०१० मधील संबंधने. | १८९ | ६७ | ४९ | ४४ | ८ | ३५७ |
| २ | मार्च २००९-२०१० मधील संबंधने. | २,८७६ | १,०५८ | १,१४२ | ६६३ | ५७ | ५,७९६ |
| ३ | २/१०/१९७६ पासूनची एकूण संबंधने. | ३६,९३७ | १४,१७३ | ११,३३४ | ९,७५० | ४,२०१ | ७६,३९५ |

सन २००९-१० पर्यंत जिल्ह्यामधील एकूण ६१९ वाड्यांपैकी ६१४ वाड्यांचे महामंडळाद्वारे विद्युतीकरण पूर्ण करण्यात आले होते. तर ५ वाड्यांचे विद्युतीकरण बाकी होते.[२३] याच कालावधीत

२१. **जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन**, नांदेड जिल्हा, वर्ष २००८-०९, पृ. १२ (सी.डी. वरील माहिती)

२२. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीद्वारे प्राप्त माहिती एम.एस.ई.डी.सी. कडून प्राप्त माहितीच्या आधारे, पृ. २६.

२३. कित्ता, पृ. ३६.

Maharashtra State Gazetteers

आदिवासी उपयोजनेकरिता एकूण २४.८५ लाख रुपये मंजूर करण्यात आले होते.[२४] तर आदिवासी उपयोजने व्यतिरिक्तच्या इतर उपयोजना व विशेष घटक उपयोजना यांच्यावर अनुक्रमे रु. ३० लाख व रु. १७५ लाखांची तरतूद करण्यात आली होती. या उपयोजनांवर सन २००९-१० मध्ये करण्यात आलेल्या खर्चाचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे आहे :—

(रुपये लाखात)

| अ.क्र. | विद्युतीकरणाचा तपशील | उपयोजनेचे नाव | | |
|---|---|---|---|---|
| | | आदिवासी उपयोजना | आदिवासी व्यतिरिक्त इतर उपयोजना | विशेष घटक उपयोजना |
| १ | ग्रामीण विद्युतीकरण | १०.०० | १२.०० | . . |
| २ | सामान्य विकास | १०.८५ | ७.०० | . . |
| ३ | रचनेचा विकास | ४.०० | ११.०० | . . |
| ४ | हरीजन वस्ती/आदिवासी वस्तीचे विद्युतीकरण. | . . | . . | . . |
| ५ | शहरी भागातील अ.जा. आणि न.बौ. कुटुंबियांना मोफत विद्युत जोडणी. | . . | . . | १२०.०० |
| ६ | दलित वस्ती रस्त्यावरील विजेचे दिवे. | . . | . . | २५.०० |
| ७ | अ.जा. आणि न.बौ. कुटुंबाच्या मालकीच्या विहिरींचे विद्युतीकरण | . . | . . | ३०.०० |
| | एकूण . . | २४.८५ | ३०.०० | १७५.०० |

आदिवासी उपभोक्त्यांकरिता कृषीपंप विद्युतीकरणाच्या १०० टक्के सवलतीच्या योजनेद्वारे सन २००२-०४, २००४-०५, २००५-०६, २००६-०७, २००७-०८ व २००८-०९ या कालावधीत अनुक्रमे १६, १४५, ७८, ९९, ४३ व ७८ पंपांचे विद्युतीकरण करण्यात आले.[२५]

मार्च २००९ पर्यंत जिल्ह्यामध्ये ३३ कि.वॅ. व २२ कि.वॅ. क्षमतेची एकूण ७७ उपस्थानके बसविण्यात आली.[२६]

२४. कित्ता, पृ. ३७ ते ३९.

२५. पूर्वोक्त, पृ. ८५.

२६. पूर्वोक्त, पृ. ८७.

सन २००८-०९ या कालावधीमधील म.रा.वि.म. कंपनीच्या नांदेड जिल्ह्यातील डी.पी.डी.सी. योजनेंतर्गतच्या संबंधनांच्या जोडणीचा विकास पुढीलप्रमाणे आहे.[२७]

| तपशील | कृषीपंप (कि.मी.) | कमी दाबाची औद्योगिक संबंधने (कि.मी.) | रस्त्यावरील दिवे (कि.मी.) |
|---|---|---|---|
| उद्दिष्ट | ४० | १०४ | ७४० |
| साध्य | ४० | १०४ | ७४० |

| सार्वजनिक सुविधांकरिताची संबंधने (कि.मी.) | १ फेजची संबंधने (कि.मी.) | खेडी, वाड्या/पाड्यांची संबंधने (कि.मी.) |
|---|---|---|
| ०० | २५०० | ०० |
| ०० | ३२९२ | ०० |

| DTC नवीन संबंधने (कि.मी.) | एच. टी. लाईन सर्कीट (कि.मी.) | एल. टी. लाईन सर्कीट (कि.मी.) | अंदाजित खर्च (रुपये लाखात) | झालेला खर्च (रुपये लाखात) |
|---|---|---|---|---|
| १७ | १३.०० | २७.५० | २१७.४८ | . . |
| १५ | १३.०० | २७.५० | . . | २३७.७३ |

महाराष्ट्र शासनाच्या विभागीय केंद्रांतर्गत कार्यरत असणाऱ्या विद्युत निर्मितीच्या ई.व्ही.एच. उपस्थानकांना अनुदान देण्याच्या योजनेनुसार जिल्ह्यात खानापूर येथे १३२ कि.वॅ. क्षमतेचे तर तामलूर येथे ३३ कि.वॅ. क्षमतेचे उपस्थानक निर्माण करण्यात आले आहे. या उपस्थानकांच्या फीडरची लांबी १.५ कि.मी. असून त्याकरिता १० लाख रुपये खर्च करण्यात आले. या प्रकल्पामध्ये हिंगोली व नांदेड या दोन जिल्ह्यांचा 'नांदेड झोन' मध्ये समावेश असून हिंगोली जिल्ह्याचे काम सुरू असून नांदेड जिल्ह्याचे काम पूर्ण झालेले आहे. संपूर्ण प्रकल्पाचा एकत्रित खर्च ६६ लाख रुपये इतका अपेक्षित आहे.[२८]

जिल्ह्यामध्ये २००९-१० मध्ये पेठवडूज येथे P : SI योजनेंतर्गत एक उपस्थानक सुरू करण्याचे काम सुरू असून त्याकरिता १०६.९४ लाख रुपयांचे कर्ज मंजूर करण्यात आले आहे. ३३ के.व्ही. लाईनचा हा प्रकल्प असून पाया, कुंपण, दुभाजक इत्यादींचे काम पूर्ण झाले असून फक्त ट्रान्सफार्मर बसविणे बाकी आहे.[२९]

सध्या जिल्ह्यामध्ये अशाप्रकारच्या विद्युत निर्मिती संबंधीत पाच योजना सुरू असून त्यांच्याकरिता एकत्रितपणे १११२१.६९ लाख रुपये कर्जास मंजुरी मिळालेली आहे. ३१ मार्च २००९ पर्यंत यापैकी

२७. पूर्वोक्त, पृ. ९३.

२८. कित्ता, पृ. ७१.

२९. कित्ता, पृ. ३१.

३३०.९ लाख रुपये खर्च करण्यात आले तर वर्ष २००९-१० दरम्यान १२२४.९६ लाख रुपयांचा वापर करण्यात आला तर ९५६५.८३ लाख रुपयांचा अनुशेष बाकी आहे.[३०]

P : IE योजनेंतर्गत जिल्ह्यामध्ये नांदेड, मुखेड, अर्धापूर, लोहा, कंधार, देगलूर, बिलोली, धर्माबाद, नायगाव, मुदखेड, हिमायतनगर, किनवट आणि माहूर येथे वीज वितरणासंबंधीच्या योजना सुरू असून त्याकरिता २२४५.३४ लाख रुपये कर्ज मंजूर झाले असून अद्याप हा निधी वापरात आणलेला नाही.[३१]

## खाद्यपदार्थांचे उत्पादन

या प्रवर्गात साखर, गूळ, खाद्यतेल, डाळी, मिरची व मसाला पावडर, बेकरी, बिस्किट व गोळ्या, लोणची, पाश्चराईज्ड दूध तयार करणे, दुग्धजन्य इतर पदार्थ तयार करणे, आईस्क्रिम, बर्फ तयार करणे, फळे व पालेभाज्या टिकविणे, फळे व पालेभाज्यांचे ज्यूस (अर्क) तयार करणे, जाम, जेली, सॉस तयार करणे, मुरंबे तयार करणे, चहावरील प्रक्रिया, तांदूळ बनविणे, पशुखाद्य तयार करणे इत्यादी खाद्यवस्तू तयार करणाऱ्या कारखान्यांचा समावेश होतो.

खाद्यपदार्थांचे उत्पादन यांत्रिक साधनांच्या मदतीने मोठ्या प्रमाणावर तयार करण्याचे कार्य खऱ्या अर्थाने विसाव्या शतकात सुरू झाले. तत्पुर्वी अनेक प्रकारच्या खाद्य पदार्थांचे उत्पादन पारंपरिक पद्धतीने केले जात असे. नांदेड जिल्हा पूर्वीपासूनच कृषिप्रधान अर्थव्यवस्था असणारा जिल्हा आहे. मुंबई राज्यामध्ये जिल्ह्याचे विलीनीकरण झाल्यानंतर जे महत्त्वाचे उद्योग निर्माण झाले ते प्रामुख्याने खाद्य पदार्थांशी संबंधित कृषि उत्पादनावर आधारित तसेच कृषिपूरक व्यवसायातील उत्पादनावर आधारित प्रक्रिया उद्योग आहेत. अगदी अलिकडच्या काळात औद्योगिक विकासास खऱ्या अर्थाने सुरूवात झालेली आहे. औद्योगिक विकासाची ही प्रक्रिया उशिरा सुरू होण्यास काही अंशी तंत्रज्ञानाचा अभाव तर काही अंशी मराठवाड्यातील औद्योगिक विकासाबाबत पूर्वीच्या हैद्राबाद संस्थानाची असलेली उदासीनता कारणीभूत आहे. या संस्थानाशी संबंधीत 'द इम्पेरिअल गॅझेटिअर ऑफ इंडिया, व्हॉल्यूम १९' या १९०८ मध्ये प्रकाशित झालेल्या गॅझेटिअरमधील माहितीनुसार जिल्ह्यात कोणताही महत्त्वाचा उद्योग चालविला जात नव्हता तसेच या कालावधीत खाद्य पदार्थांशी संबंधीत प्रक्रिया करणारे मोठ्या प्रमाणावरील उद्योग जिल्ह्यात नव्हते. परंतु त्यानंतरच्या पुढील दशकात मात्र काही उद्योग उदयास आले. सन १९३० नंतर हैद्राबाद सरकारने उद्योग विभाग सुरू केला. परंतु या विभागाने मराठवाड्यातील जिल्ह्यांच्या औद्योगिक विकासास अत्यल्प मदत केली. तथापि, १९४८ मध्ये मराठवाडा द्विभाषिक मुंबईमध्ये सामिल झाल्यानंतर यामध्ये काही प्रमाणात सुधारणा घडून आली.

सन १९५१ मध्ये जिल्ह्यात जवळपास १०० माणसांना रोजगार पुरविणाऱ्या ४ तेल गिरण्या होत्या.[३२] तर १९५७ च्या सुमारास ३०० तेलघाणी आणि ८ तेलगिरण्या होत्या.[३३] १९६० मध्ये जिल्ह्यात

---

३०. पूर्वोक्त, पृ. ५८.

३१. कित्ता, पृ. ६४.

३२. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, १९७१, पृ. २६३.

३३. **कल्याणकारी राज्याची वाटचाल**, नांदेड जिल्हा, १९५७, पृ. ७.

खाद्यतेलाच्या ६१ गिरण्या होत्या व त्यामधून १९१ लोकांना रोजगार प्राप्त झाला होता. तर भात भरडण्याच्या ४१ गिरण्या होत्या व त्यामध्ये १२१ व्यक्ती कार्यरत होत्या. लिंग व वर्गानुसारच्या औद्योगिक वर्गीकरणानुसार १९६१ मध्ये नांदेड जिल्ह्यात खाद्य उत्पादनात गृहउद्योग क्षेत्रामध्ये एकूण ७७० व्यक्ती कार्यरत होत्या, त्यापैकी ५९३ पुरुष तर १७७ स्त्री कामगार होते. याचवेळी गृहोद्योगाव्यतिरिक्त खाद्यनिर्मिती क्षेत्रामध्ये १३३९ पुरुष तर ७३ स्त्रिया असे एकूण १४०५ कामगार कार्यरत होते.[३४]

१९६०-७० च्या कालावधीत जिल्ह्यात हदगाव, येओटी, कुंडलवाडी, वानेगाव आणि उमरी येथे गूळ निर्मिती व्यवसाय केंद्रित झालेला होता. १९६२ मध्ये जिल्ह्यात नीरा व ताडाचा गूळ उत्पादन व विक्री करणाऱ्या ३ औद्योगिक सहकारी संस्था होत्या.[३५] तर हैद्राबाद बँकेच्या १९७१ च्या अहवालानुसार जिल्ह्यात फळे परिक्षण व केळीचे वेफर्स बनविण्याच्या उद्योगाला पुरेसा वाव असून देखील अशाप्रकारचा एकही उद्योग जिल्ह्यामध्ये नव्हता.

सन १९८२-८३ यावर्षी जिल्ह्यात खाटिक काम अथवा मटन तयार करण्याचा व विकण्याचा एक नोंदणीकृत कारखाना होता. त्यामध्ये ११७ पुरुष व १७ स्त्रिया असे एकूण १३४ कामगार कार्यरत होते. या कामगारांनी उपरोक्त साली एकूण ३९,९३२ श्रमदिवस कार्य केले होते.

याच साली लोणी, मलई, खवा, तूप वगैरे बनविण्याचा एक नोंदणीकृत कारखाना होता. परंतु तो बंद झालेला होता. तर जिल्ह्यात डाळ व इतर धान्यांच्या एकत्रितपणे १२ धान्य गिरण्या होत्या. त्यापैकी माहिती पाठविणाऱ्या ४ कारखान्यांमध्ये ३२ पुरुष व ४ स्त्रिया असे एकूण ३६ कामगार कार्यरत होते व त्यांनी एकूण ७,९७२ श्रमदिवस कार्य केले होते. उर्वरित प्रपत्र न पाठविणाऱ्या ८ कारखान्यांमधून २५ व्यक्तींना रोजगार प्राप्त झाला होता. याच वर्षी साखर निर्मितीचे ४ तर खाद्यतेल निर्मितीचे ८ नोंदणीकृत कारखाने होते.

जिल्ह्यातील अन्नपदार्थांचे उत्पादन करणाऱ्या उद्योगांचे एकूण स्थिर भांडवल सन १९८४ मध्ये ७,८३,४१ हजार रुपये तर खेळते भांडवल ३९,८५ हजार रुपये होते. या उद्योगांमध्ये एकूण १,४४२ कामगार व २,१६६ कर्मचाऱ्यांना रोजगार प्राप्त झाला होता व त्यांना एकूण ७९,६६ हजार रुपये वेतन देण्यात आले होते. १८,०५,८५ हजार रुपये किंमतीच्या उत्पादनावर या उद्योगांनी एकूण १,६२,९८ हजार रुपये मिळकत प्राप्त केली व उद्योगातील एकूण निविष्टी १३,९४,९४ हजार रुपये होती आणि उत्पादनामुळे ३,३९,६६ हजार रुपयांची मूल्यवृद्धी झाली. याच कालावधीत जिल्ह्यात पेय उत्पादने व तंबाखूजन्य उत्पादनांच्या उद्योगांमध्ये ७३ हजार रुपये स्थिर भांडवल व ५९,६३ हजार रुपये खेळते भांडवल स्वरूपात गुंतविण्यात आले होते. या उद्योगामध्ये ४६ कामगार तर ६५ कर्मचारी कार्यरत होते व या कामगारांनी एकूण १,५५ हजार रुपये किंमतीच्या उत्पादनावर २,३९ हजार रुपये

---

३४. नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर, १९७१, पृ. २५७-२५८.

३५. कित्ता, पृ. २६९, २७९.

मिळकत प्राप्त केली. कारखान्यांची मूल्यवृद्धी २५,२० हजार रुपये होती, तर एकूण निविष्टी ५७,१९ हजार रुपये होती.

१९८६-८७ मध्येदेखील खाटीक कामाचा एकच नोंदणीकृत कारखाना होता. ज्यामधून ४८ पुरुष व १८ स्त्रिया कार्यरत होत्या व या कामगारांनी एकूण १९,६९४ श्रम दिवस कार्य केले. दुधाच्या पदार्थांची निर्मिती करणारे मात्र दोन नोंदणी झालेले उद्योग या कालावधीत जिल्ह्यामध्ये होते व त्यापैकी एक कारखाना बंद होता तर खाद्यतेलाचे आणि चरबी यांचे ९ नोंदणीकृत कारखाने होते. त्यापैकी ३ कारखाने बंद होते. माहिती पाठविणाऱ्या ५ कारखान्यांमध्ये एकूण १३६ कामगार होते व त्यांनी एकूण २७,१६८ श्रम दिवस कार्य केले होते.

मटणमांस तयार करण्याचे सन २००१-२००२ मध्ये जिल्ह्यात नोंदणी झालेले ७५ उद्योग होते. त्यापैकी २ उद्योग बंद झालेले होते. यापैकी प्रपत्र पाठविणाऱ्या ५ उद्योगांमध्ये १५३ पुरुष व ५ स्त्रिया असे एकूण १५८ कामगार कार्यरत होते व त्यांनी एकूण ४५,४७५ श्रम दिवस कार्य केले. तर उर्वरित ६८ कारखान्यांमध्ये ९२९ कामगार कार्यरत होते. दुग्धजन्य पदार्थ तयार करण्याचे दोन कारखाने जिल्ह्यात सुरू होते व त्यांद्वारे ४५९ व्यक्तींना रोजगार प्राप्त झाला होता. तर इतर खाद्यपदार्थ उत्पादनांचे ८ कारखाने जिल्ह्यात होते. त्यापैकी माहिती पाठविणाऱ्या दोन कारखान्यांमध्ये १,२२५ पुरुष व फक्त ६ स्त्री कामगार कार्यरत होते व या कामगारांनी एकूण २,११,७६२ श्रम दिवस कार्य केले. माहिती न पाठविणाऱ्या ६ कारखान्यांमध्ये १,२८० व्यक्तींना रोजगार प्राप्त झाला होता. याच कालावधीत मद्यार्काचे १० नोंदणीकृत उद्योग जिल्ह्यात होते. त्यापैकी एकाच कारखान्याकडून माहिती प्राप्त झाली होती व माहिती पाठविणाऱ्या या कारखान्यामध्ये १२० पुरुष कामगार काम करत होते व त्यांनी एकूण ३६,३८२ श्रम दिवस कार्य केले तर उर्वरित ९ कारखान्यांमध्ये १८ कामगारांना रोजगार प्राप्त झाला होता.

२००१-२००२ या कालावधीमधील खाद्यपदार्थांच्या उपरोक्त उद्योगांमध्ये एकत्रितपणे २,४३,७३३ हजार रुपये स्थिर भांडवल तर ५६,२७५ हजार रुपये किंमतीचे खेळते भांडवल गुंतविण्यात आले होते. कारखान्यांमध्ये ९३२ कामगार व १,४२९ कर्मचारी कार्यरत होते व त्यांना एकूण २८,०२० हजार रुपये वेतन देण्यात आले होते. खाद्य पदार्थांच्या या उद्योगांनी ४,४७,७५४ हजार रुपये किंमतीच्या उत्पादनामागे ७२,९०३ हजार रुपये मिळकत प्राप्त केली होती. कारखान्यांमधील एकूण निविष्टी ७,०६,२१७ हजार रुपये होती तर उत्पादनामुळे २,३२,३५२ हजार रुपये मूल्यवृद्धी झाली.

पेय व तंबाखूच्या पदार्थांच्या उत्पादनामध्ये १,६७,८४० हजार रुपये स्थिर भांडवल तर १०,११९ हजार रुपये खेळते भांडवल कारखान्यांनी गुंतविले होते. कारखान्यांमध्ये एकूण १,३०२ कामगार व १,४३० कर्मचारी कार्यरत होते व त्यांना एकूण १३,३५१ हजार रुपये वेतन देण्यात आले होते. या कारखान्यांनी सदर वर्षामध्ये २४,४०३ हजार रुपये किंमतीच्या उत्पादनाद्वारे एकूण २२,१२३ हजार रुपये मिळकत प्राप्त केली. कारखान्यांची एकूण निविष्टी ४५,५५१ हजार रुपये होती तर २०,५८९ हजार रुपये मूल्यवृद्धी प्राप्त झाली होती.[३६]

---

३६. **जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, नांदेड जिल्हा,** १९८२-८३, पृ. १०५-११३ व २००१-०२, पृ. ४४-४९.

जून, २००६ मध्ये जिल्ह्यातील नोंदणीकृत खाद्य वस्तुंच्या उद्योगांची संख्या ९७ होती. या उद्योगांमध्ये १२८० लाख रुपयांची भांडवली स्वरूपात गुंतवणूक करण्यात आली होती व त्याद्वारे ७२१ व्यक्तींना रोजगार प्राप्त झाला होता.[३७]

मार्च, २००९ अखेर खाद्यजन्य व खाद्यपदार्थ वस्तूंचे १५८ अतिलघु, लघु व मध्यम स्वरूपातील उद्योग जिल्ह्यामध्ये होते. या उद्योगांद्वारे १,४५१ व्यक्तींना रोजगार मिळाला होता. उद्योगांमध्ये यंत्र व संयंत्र सामग्रीकरिता २८२५ लाख रुपये गुंतविण्यात आले होते तर त्यांची स्थापित क्षमता ११,७३५ लाख रुपये होती.[३८]

ऑगस्ट, २०१० अखेर खाद्यपदार्थांचे ३८५ उद्योग जिल्ह्यामध्ये होतो त्याद्वारे ७,४८९ व्यक्तींना रोजगार प्राप्त झाला होता. या उद्योगांमधील यंत्र व संयंत्रातील गुंतवणूक २६,५८९ लाख रुपये तर उत्पादन क्षमता ३६,४१८ लक्ष रुपये होती.[३९]

अलिकडील काळात वाढत्या शहरीकरणामुळे प्रक्रियायुक्त पदार्थांच्या निर्मितीस मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन मिळाले आणि बिस्किट, ब्रेड, पाव यासारख्या प्रक्रियायुक्त खाद्यपदार्थांची मागणी वाढत गेली. त्यानुसार जिल्ह्यात अनेक बेकरीज देखील सुरू झाल्या. बेकरी उत्पादने बनविण्यासाठी गव्हाचे पीठ, साखर, यीस्ट, बटर, चवीचे इतर घटक आणि अंडी या कच्च्या मालाचा उपयोग केला जातो. या सर्व वस्तू स्थानिक स्तरावर उपलब्ध होतात व त्या बहुदा घाऊक प्रमाणात खरेदी केल्या जातात. जिल्ह्यातील काही महत्त्वाच्या खाद्य उद्योगांच्या स्थापनेचा तपशील तक्ता क्र. १५ मध्ये दर्शविण्यात आला आहे.

**डाळ व धान्य गिरण्या :—**

सन १९५० ते १९६५ या काळात या भागात पावसाचे प्रमाण वाढते होते. त्यामुळे भुईमूग पिकात वाढ होऊन या भागात मोठ्या प्रमाणात ऑईल मिल्स सुरू झाल्या. काही वर्षांनी पावसाचे प्रमाण कमी झाल्याने येथील शेतकरी तुरीचे पीक घेऊ लागले. परिणामतः डाळ (नांदेड भागात डाळ असा शब्द वापरतात) मिल्स सुरू झाल्या.[४०] पुढे हरभरा, मूग, उडीद, वाटाणा ही कडधान्ये देखील मोठ्या प्रमाणात घेण्यात येऊ लागली. या काळात शासनाने देखील सहकारी तत्त्वावर कृषि उत्पादनावर प्रक्रिया करणारे उद्योग सुरू करण्यास प्रोत्साहन देण्यास सुरूवात केली. या उद्योगांमध्ये वापरण्यात येणाऱ्या यंत्रसामग्रीत एलीव्हेटर, हल्लर, गोलाकार चाकण्या, इलेक्ट्रिक मोटार आणि भूसा पाखडण्याचे पंखे यांचा समावेश होतो. आवश्यक असणारा कच्चा माल (कडधान्य, डाळीचे धान्य) स्थानिक बाजारपेठेत खरेदी केला जात असे.

तर धान्य डाळ भरडणीचे तीन नोंदणीकृत कारखाने होते व त्यामधून ४५ व्यक्ती कार्यरत होत्या.[४१] १९६० साली जिल्ह्यामध्ये भात भरडण्याचे ४१ लघुउद्योग होते व त्यामधून १२१ व्यक्ती

---

३७. **प्र. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, नांदेड यांच्याकडून प्राप्त माहिती आधारे.**

३८. उप अभियंता, म.औ.वि.म., नांदेड यांच्याकडून प्राप्त माहिती आधारे.

३९. डॉ. जयंत जोशी, संचालक, बी.सी.यु.डी., स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्याकडून प्राप्त माहितीवर आधारित.

४०. भिंगे, सुभाष, दयानंद कला महाविद्यालय, लातूर यांनी पाठविलेल्या माहितीवर आधारित.

४१. **कल्याणकारी राज्याची वाटचाल**, १९५७, महाराष्ट्र शासन.

कार्यरत होत्या.[४२] देगलूर व बिलोली हे तालुके तांदळाच्या पिकासाठी प्रसिद्ध होते तर उमरी, मुखेड ही ठिकाणे धान्याच्या व्यापारासाठी प्रसिद्ध होती.

१९७१ मध्ये जिल्ह्याच्या एकूण लागवडीखालील जमिनीपैकी १५.४६% (२,८७,९०३ एकर) जमीन कडधान्य पिकाच्या लागवडीखाली होती. त्यापैकी ४.१५% जमिनीवर मूग तर ५,०३% जमिनीवर तुरीची लागवड करण्यात आली होती व त्याद्वारे अनुक्रमे १०,२७१ टन आणि १८,५०४ टन उत्पन्न घेण्यात आले होते. या कालावधीमध्ये मराठवाडा विकास महामंडळाच्या प्रस्तावित औद्योगिक योजनेनुसार जिल्ह्यात ६ डाळ गिरण्यांची तात्पुरती नोंदणी करण्यात आली होती.[४३]

डाळ व इतर धान्य गिरण्यांचे एकूण १२ नोंदणीकृत कारखाने सन १९८२-८३ साली जिल्ह्यामध्ये होते. यापैकी ४ कारखान्यांकडूनच माहिती प्राप्त झाली होती. माहिती पाठविणाऱ्या या कारखान्यांमध्ये ३२ पुरुष व ४ स्त्रिया असे एकूण ३६ कामगार कार्यरत होते व त्यावर्षी त्यांनी एकूण ७,९७२ श्रमदिवस कार्य केले होते. प्रपत्र न पाठविणाऱ्या ८ कारखान्यांमध्ये २५ कामगार कार्यरत होते.[४४] १९८६-८७ मध्ये मात्र धान्य गिरणी उत्पादनांचे फक्त ५ नोंदणीकृत कारखाने जिल्ह्यात होते. त्यापैकी प्रपत्र पाठविणाऱ्या ४ कारखान्यांमधून २५ पुरुष व ४ स्त्री कामगारांना रोजगार प्राप्त झाला होता व त्यावर्षी त्यांनी ८,५२० श्रमदिवस कार्य केले होते तर उर्वरित एका कारखान्यामध्ये १० कामगार कार्यरत होते.[४५] सन २००१-२००२ मध्ये डाळ व इतर धान्य निर्मितीच्या एकूण ९ गिरण्या जिल्ह्यामध्ये होत्या व त्यापैकी माहिती पाठविणाऱ्या एका कारखान्यामध्ये २८ पुरुष कामगार होते व त्यांनी ८,४५६ श्रमदिवस कार्य केले तर उर्वरित ८ कारखान्यांमधून १४८ व्यक्तींना रोजगार प्राप्त झाला होता.[४६] जिल्ह्यातील काही महत्त्वाच्या डाळ उद्योगांच्या स्थापनेचा तपशील तक्ता क्र. १५ मध्ये खाद्य उद्योगांच्या तपशिलाअंतर्गत दर्शविण्यात आला आहे.

**साखर उद्योग :** भारतात साखर उद्योग हा कृषी आधारित दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा प्रक्रिया उद्योग मानला जातो. जगात सर्वाधिक साखर उत्पादन करणाऱ्या देशांत ब्राझील नंतर भारताचा दुसरा क्रमांक लागतो. भारतात साखर उत्पादनाचा पहिला आधुनिक कारखाना बिहार राज्यात सन १९०३ साली स्थापन करण्यात आला. पहिल्या महायुद्ध काळापर्यंत या उद्योगाकडे ब्रिटिश सरकारने फारसे लक्षही दिले नाही. त्यामुळे भारतात साखरेची आयात मोठ्या प्रमाणावर केली जात असे. सन १९३०-३१ मध्ये भारतात केवळ ३२ साखर कारखाने होते. त्यानंतरच्या काळात साखर उद्योगांना संरक्षण देण्याच्या सरकारच्या धोरणामुळे भारतात साखर कारखान्यांची संख्या १४८ पर्यंत वाढली.

सहकारी साखर कारखान्यांची सुरूवात सन १९४४-४५ या काळात उत्तर प्रदेश व आंध्रप्रदेश राज्यात झाली. त्यानंतर महाराष्ट्रात डॉ. धनंजयराव गाडगीळ व श्री. विठ्ठलराव विखे पाटील या दोघांनी

---

४२. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, भारत सरकार, १९७१.

४३. स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, लीड बँक स्किम सर्व्हे रिपोर्ट ऑन नांदेड डिस्ट्रिक्ट, महाराष्ट्र, १९७१, पृ.३१.

४४. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८२-८३, पृ. १०५.

४५. कित्ता, १९८६-८७, पृ. ७९.

४६. कित्ता, २००१-०२, पृ. ४४.

प्रवरानगर, जि. अहमदनगर येथे सन १९४८ साली महाराष्ट्रातील सहकारी तत्त्वावरील पहिला साखर कारखाना स्थापन केला. सन १९६० साली संयुक्त महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर सहकारी साखर कारखान्यांची मोठ्या प्रमाणावर स्थापना करण्यात आली. विशेषतः पश्चिम महाराष्ट्रात सहकारी साखर कारखान्यांनी फार मोठी प्रगती केली. सन १९६०-६१ साली महाराष्ट्रात एकूण १४७ साखर कारखाने कार्यरत होते. त्यापैकी ३० साखर कारखाने सहकारी क्षेत्रातील होते.

१९६०-६१ साली महाराष्ट्रात साखरेचे एकूण उत्पादन ३०.२१ लाख टन होते, ज्यापैकी ४.५ लाख टन म्हणजे १४.९% उत्पादन सहकारी साखर कारखान्यांनी केले. सन २०००-२००१ यावर्षी महाराष्ट्रात एकूण ४३६ साखर कारखाने कार्यरत होते, त्यापैकी २५९ कारखाने सहकारी क्षेत्रातील होते. या सर्व साखर कारखान्यांनी केलेले साखरेचे एकूण उत्पादन १८५.१० मे.टन. होते. ज्यापैकी सहकारी साखर कारखान्यांनी केलेले उत्पादन १०४.९४ मे.टन. म्हणजेच एकूण उत्पादनाच्या ५६.७% होते. यावरून सहकारी साखर कारखान्यांची महाराष्ट्रातील प्रगती लक्षात येते. परिणामतः आज महाराष्ट्रात सहकारी साखर कारखान्यांकडे ग्रामीण विकासाचे एक प्रभावी साधन म्हणून पाहिले जात आहे.[४७]

साखर कारखान्यांमध्ये प्रामुख्याने यांत्रिकी, उत्पादन, शेतकी, हिशोब व सामान्य प्रशासन हे विभाग कार्यरत असतात. साखर उत्पादनासाठी कच्चा माल म्हणून ऊसाचा वापर करण्यात येतो. कारखाना कार्यक्षेत्रातील सभासद व बिगर सभासद/ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या शेतातून नोंदीनुसार ऊस तोडणी व वाहतूक करून कारखान्यात गाळपास आणला जातो व त्यावर प्रक्रिया करून त्यापासून साखर उत्पादित केली जाते. साखर उत्पादन करतांना साधारणतः मिलद्वारे ऊसाचा रस गाळला जातो व चिपाड (बगॅस) वेगळे केल जाते. त्यानंतर चुना व गंधकाचा वापर करून रस शुद्धीकरण केले जाते. पॅन बॉयलिंगमध्ये ग्रेन तयार होतात व पुढे सेंट्रिफ्युगल मशिनद्वारे साखर व मोलॅसेस (मळी) वेगळे केले जातात. चिपाड (बगॅस) बॉयलरसाठी इंधन म्हणून वापरले जाते. तर मोलॅसेस आसवनी प्रकल्पात रेक्टीफाईड स्पिरीट व अल्कोहोल उत्पादनासाठी कच्चा माल म्हणून वापरण्यात येते. मळी पासून अल्कोहोल तयार करण्याच्या उपक्रमामुळे शेतकऱ्यांच्या ऊसास वाजवी दर देणे शक्य होते. तसेच ऊसाच्या चिपाड (बगॅस) वर आधारित विद्युत निर्मिती प्रकल्प उभारणेदेखील शक्य होते.[४८]

राज्यातील साखर उद्योगाची सुरूवात पश्चिम महाराष्ट्रात झाल्यामुळे सुरूवातीच्या २० वर्षात पाण्याची उपलब्धता व सुजाण नेतृत्वामुळे तेथे एकापाठोपाठ एक अनेक साखर कारखाने निर्माण झाले. त्यामानाने मराठवाड्यातील साखर उद्योगास उशिराने सुरूवात झाली. सन १९५० नंतर मराठवाड्यातील ऊसाखालील क्षेत्र सतत वाढत गेले आणि परिणामतः ऊसापासून गूळ तयार करणारे अनेक लहान

---

४७. डॉ. कुरूलकर, र. पु. यांच्याकडून प्राप्त माहितीच्या आधारे.

४८. भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखाना लि., लक्ष्मीनगर, देगांवयेळेगाव, ता. अर्धापूर, जि. नांदेड यांच्याकडून प्राप्त माहितीच्या आधारे.

Maharashtra State Gazetteers

घटक ऊस शेतीच्या परिसरात सुरू झाले. वाढत्या ऊस उत्पादनामुळे सन १९६५ मध्ये लातूर जिल्ह्यातील ढोकी येथे 'तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना' स्थापन करण्यात आला. मराठवाड्यातील हा पहिला सहकारी साखर कारखाना होय.[४९] नांदेड जिल्ह्यातील सर्वच तालुक्यांत काळी माती असून त्यात कॅल्शिअम, मॅग्नेशिअम व कार्बोनचे उच्च प्रमाण सापडते, जे ऊस लागवडीस उपयुक्त आहे.[५०] नांदेड जिल्ह्यात सहकारी साखर कारखाने स्थापन करण्यासाठी पद्मश्री श्यामरावजी कदम यांनी परिश्रमपूर्वक सहकारी साखर उद्योगाचा पाया घातला.

ऊसासारख्या नगदी पिकांचे महत्त्व समजल्यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी स्वातंत्र्योत्तर काळात ऊसाचे उत्पादन घेण्यास सुरूवात केली. १९६० मध्ये कंधार तालुक्यातील एकूण ५,४०० एकर क्षेत्र ऊसाच्या लागवडीखाली होते. नांदेड आणि मुखेड तालुक्यांमध्ये देखील ऊस उत्पादन घेतले जात होते.[५१] सन १९५० ते १९६० च्या दशकामध्ये मन्याड धरणाच्या निर्मितीमुळे ऊस लागवडीचे क्षेत्र जवळपास २,५०० एकरने वाढले. त्यामुळे कंधार जवळील कळंबर येथे सन १९६६ मध्ये सहकारी तत्त्वावर कारखाना सुरू करण्यात आला. या साखर कारखान्याची स्थापनेपूर्वीची ऊस गळीताची अंदाजित क्षमता दर दिवशी १,००० मे.टन ऊस इतकी होती, तर ऑगस्ट १९६० पर्यंत कारखान्याचे स्थिर भांडवल रु. २५ लाख तर भाग भांडवल रु. ७५,००० होते.[५२] त्यानुसार सन १९६६ मध्ये कळंबर सहकारी साखर कारखान्याची स्थापना झाली. ३,५५३ सभासद संख्या असलेल्या या कारखान्याचे स्थापनेच्या वेळी ७१.५५ लाख रुपये भरणा करण्यात आलेले भांडवल होते तर १,२५० मे.टन गाळप क्षमता असलेली १७५.६५ लाख रुपये किमतीची यंत्रे होती. या साखर कारखान्याचे ३१ मे १९७० मधील खेळते भांडवल ३८५.५१ लाख रुपये होते. कारखान्याने त्यावर्षीच्या हंगामामध्ये जवळपास १,१५४ मे.टन साखरेचे उत्पादन केले. तर ७२४ कामगारांना रोजगार प्राप्त करून दिला. १९७० साली या कारखान्यास इंडस्ट्रिअल फायनान्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाने रु. ८०.०० लाख, भारतीय जीवन विमा निगमने रु. ४०.०० लाख तर महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने रु. ३०.०० लाखांचे अर्थसहाय्य केले होते.[५३]

जिल्ह्यात सन १९७७ मध्ये बिलोली येथे गोदावरी सहकारी साखर कारखाना तर भोकर येथे सन १९८४ मध्ये शंकर सहकारी साखर कारखान्याची स्थापना झाली. हे दोन्ही कारखाने प्रतिदिन १,२५० मे.टन गाळप क्षमतेचे होते.[५४] नंतरच्या काळात सन १९८६ ते १९९० पर्यंत नांदेड मध्ये गोदावरी

४९. के. हरिदास, **मराठवाड्यातील साखर उद्योग : सद्यस्थिती व भवितव्य, मायबोलीचा मराठवाडा (खंड दोन), २००४,** औरंगाबाद, पृ. २५३.

५०. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९७२, पृ. ४५१.

५१. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९६०, पृ. २५६.

५२. कित्ता, पृ. २५६.

५३. **स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, लीड बँक स्कीम, सर्व्हे रिपोर्ट ऑन नांदेड डिस्ट्रिक्ट**, महाराष्ट्र अहवालावर आधारित (मार्च, १९७१), पृ. २६.

५४. डॉ. कुरूलकर, र. पु. यांच्याकडून प्राप्त माहितीवर आधारित.

मनार साखर कारखाना, कलंबर सहकारी साखर कारखाना व शंकर सहकारी साखर कारखाना हे तीन साखर कारखाने अस्तित्वात होते. परंतु त्यापैकी गोदावरी मनार साखर कारखानाच फक्त कार्यरत होता. या कारखान्याने १९८६-८७ या गाळप हंगामात १,७४,८८० मे.टन ऊसाचे गाळप करून १,७०,५७० मे.टन साखरेचे उत्पादन केले.[५५] यासंबंधीचे विवेचन तक्ता क्रमांक ८ मध्ये दिले आहे, तो पहावा.

सन १९९० मध्ये मान्यता देण्यात आलेल्या सरकारच्या नवीन धोरणानुसार साखर कारखाने अर्थक्षम ठरविण्यासाठी त्यांची गाळप क्षमता प्रत्येकी २,५०० मे.टन असेल, त्यामुळे या साखर कारखान्यांना जास्तीत जास्त जमीन लागवडीखाली आणावी लागेल. केंद्र सरकारच्या नवीन नियमाप्रमाणे २,५०० मे.टन. गाळप क्षमतेच्या साखर कारखान्याच्या क्षेत्रात किमान १६ हजार एकर जमीन ऊसाच्या लागवडीखाली असावयास पाहिजे.[५६]

नांदेड जिल्ह्यातील ऊस लागवडीखालील क्षेत्र, उत्पादन व दर हेक्टरी उत्पादकता पुढील विवरणपत्रात दिली आहे.

नांदेड जिल्ह्यातील ऊसाखालील क्षेत्र, उत्पादन व उत्पादकता २००३-०८.

| अ.क्र. | वर्ष | ऊसाखालील क्षेत्र (हेक्टर) | उत्पादन (मे.टन) | उत्पादकता (मे.टन/हेक्टर) |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | २००३-०४ | १४,८०० | ९,६२० | ६५ |
| २ | २००४-०५ | ९,६०० | ४,७०४ | ४९ |
| ३ | २००५-०६ | १४,००० | ८,४०० | ६० |
| ४ | २००६-०७ | २७,६०० | १९,३२० | ७० |
| ५ | २००७-०८ | २३,००० | १७,२५० | ७५ |

नांदेड जिल्ह्यात सन २००३-०४ यावर्षी १४,८०० हेक्टर जमीन ऊसाखाली होती, नंतरच्या दोन वर्षात हे क्षेत्र कमी झाले. परंतु सन २००६-०७ यावर्षी ऊसाचे क्षेत्र २००३-०४ च्या तुलनेने जवळपास दुपटीने म्हणजे २७,६०० हेक्टर इतके वाढले. या काळात ऊसाचे उत्पादन देखील ९,६२० मे.टनावरून सन २००६-०७ यावर्षी १९३२० मे.टनापर्यंत वाढले. नांदेड जिल्ह्याची दर हेक्टरी उत्पादकता मात्र महाराष्ट्राच्या दर हेक्टरी उत्पादकतेपेक्षा खूप कमी आहे. सन २००६-०७ मध्ये महाराष्ट्राची दर हेक्टरी उत्पादकता १०७.३ मे.टन/हेक्टर होती. तर नांदेड जिल्ह्याची उत्पादकता सन २००३-०४ मध्ये ४९ मे.टन/हेक्टर होती. ती सन २००६-०७ साली ७५ मे.टन/हेक्टर झाली.[५७]

---

५५. **जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन**, नांदेड जिल्हा, वर्ष १९८६-८७, पृ. १.

५६. तुपे, सु.दा., **मराठवाड्याचा आर्थिक विकास आणि समस्या**, औरंगाबाद, १९९४, पृ. ५१ ते ५५.

५७. डॉ. कुरूलकर, र. पु. यांच्याकडून प्राप्त माहितीच्या आधारे.

सन २००३-०४ साली जिल्ह्यात नोंदणी झालेले एकूण ७ सहकारी साखर कारखाने होते. त्यापैकी हुतात्मा जयंतराव पाटील साखर कारखाना, सुर्यनगर या कारखान्याने ३,५८,९०५ मे.टन ऊसाचे गाळप करून ३,९७,६७५ मे.टन साखरेचे उत्पादन केले. भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखाना लक्ष्मीनगर यांनी ४,६५,३८१ मे.टन ऊसाचे गाळप करून ५४,४५४ मे.टन साखरेचे उत्पादन केले. जय शिवशंकर सहकारी साखर कारखाना, शंकरनगर यांनी १,२५,२३० मे.टन ऊसाचे गाळप करून १३,५०२ मे.टन साखरेचे उत्पादन घेतले. तर शंकर सहकारी साखर कारखाना, वाघलवाडा, भोकर, गोदावरी मनार सहकारी साखर कारखाना, शंकर नगर, बिलोली, जय अंबिका सहकारी साखर कारखाना, कूदूर, नायगाव व कलंबर सहकारी साखर कारखाना, लोहा हे चारही कारखाने बंद होते. तद्संबंधीची माहिती तक्ता क्र. ९ मध्ये दिली आहे.

उत्पादित साखर विक्रीबाबत शासनाच्या धोरणानुसार या कारखान्यांना विहित प्रमाणानुसार उत्पादनाचा काही भाग खुल्या बाजारात विकता येतो व उर्वरित भाग शासन नियंत्रित दराने सार्वजनिक वितरण यंत्रणेला द्यावा लागतो.[५८] साखर उत्पादनासाठी लागणाऱ्या रासायनिक द्रव्यांचा पुरवठा महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ, मुंबई यांच्याकडून व स्थानिक व्यापाऱ्यांकडून होतो. जिल्ह्यातील साखर कारखाने कार्यक्षम बनावित यासाठी काही साखर कारखान्यांनी वैशिष्ट्यपूर्ण व प्रयत्नपूर्वक विविध योजना राबविल्या आहेत व या प्रयत्नांमुळे त्यांची वाटचाल वैशिष्ट्यपूर्ण ठरत आहे. अशा काही कारखान्यांची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

**हुतात्मा जयवंतराव पाटील सहकारी साखर कारखाना लि. सूर्यनगर :** २५ जुलै १९९० मध्ये सूर्यनगर, ता. हदगाव येथे हुतात्मा जयवंतराव सहकारी साखर कारखान्याची स्थापना झाली. सन १९९९-२००० मध्ये कारखान्याने चाचणी गळीत हंगाम घेतला. चाचणी गळीत हंगामापासून सन २००६-०७ गाळप हंगामापर्यंत केलेले ऊसाचे गाळप, साखर उत्पादन, सरासरी साखर उतारा, क्षमता, वापर इत्यादींचा तपशील खालील विवरणपत्रात दिला आहे.

| अ.क्र. | हंगाम वर्ष | ऊस गाळप (मे.टन) | साखर उत्पादन (क्विंटल) | सरासरी साखर उत्पादन | क्षमता वापर (टक्के) |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १ | १९९९-२००० | २,५२,३१६ | २,६६,६५० | १०.६२ | ६४.२३ |
| २ | २०००-२००१ | ३,६३,३९९ | ३,८६,६६० | १०.६१ | १०१.६५ |
| ३ | २००१-२००२ | ४,६६,४५३ | ५,०१,७८० | १०.७० | ११७.३५ |
| ४ | २००२-२००३ | ४,१५,३१६ | ४,९५,३८५ | ११.९५ | ११२.८२ |
| ५ | २००३-२००४ | ३,५८,९०५ | ३,९७,६७५ | ११.०७ | १२९.३४ |
| ६ | २००४-२००५ | १,१५,५५० | १,२६,३०० | ११.०० | ७५.७७ |
| ७ | २००५-२००६ | ७०,५६० | ७२,८८० | १०.४२ | ४४.८० |
| ८ | २००६-२००७ | ४,७०,३०० | ५,१६,७०० | ११.०० | ९०.३५ |

५८. **कोल्हापूर जिल्हा गॅझेटिअर, १९८९,** पृ. २७५.

सन २००४-२००५ व २००५-२००६ या दोन हंगामात पर्जन्यमान कमी झाल्यामुळे ऊसाचे उत्पादन घटले व त्यामुळे अपेक्षित ऊस गाळप होऊ शकले नाही. तरी देखील सन २००३-२००४, २००४-२००५, २००५-२००६ या गाळप हंगामात कारखान्याने अनुक्रमे ४,१३,४१५ क्विंटल, ६,२९,०५७ क्विंटल व २,४४,७६९ क्विंटल साखरेची देशांतर्गत खुली विक्री केली.

कारखान्याची भांडवली गुंतवणूक, कामगार, इंधनाचा वापर, कच्चा माल, उत्पादन, नफा अथवा तोटा याविषयीची स्थापनेपासून ते सन २००६-०७ पर्यंतची माहिती तक्ता क्रमांक १० मध्ये दर्शविण्यात आली आहे.

कारखान्यामध्ये डिस्टिलरी प्रकल्प, विद्युत निर्मिती व आसवणी प्रकल्प यासाठी केंद्र शासनाने मान्यता दिली आहे. हे दोन्ही प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर कारखान्याच्या उत्पन्नात वाढ होऊन शेतकऱ्यांना जादा ऊस भाव देणे शक्य होणार आहे. १ लाख क्विंटल साठवणूक क्षमता असलेली ४ गोदामे कारखान्याच्या मालकीची आहेत.

कारखाना साईटवर गांडूळ खत निर्मिती करण्यासाठी दोन युनिट तयार केले असून इच्छुक शेतकऱ्यांना गांडूळखत निर्मितीसाठी प्रोत्साहित करून मार्गदर्शन केले जाते. कारखाना क्षेत्रात गाळप क्षमते इतपत ऊस उपलब्ध व्हावा म्हणून उर्ध्व पैनगंगा प्रकल्पाचे पाणी कार्यक्षेत्रातील जास्तीत जास्त क्षेत्रासाठी उपलब्ध व्हावे, यासाठी कारखान्यामार्फत सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे.

कामगारांसाठी कारखाना साईटवर राहण्यासाठी निवास, मोफत विद्युत पुरवठा, सवलतीच्या दरात साखर, प्राथमिक आरोग्य सेवा, शैक्षणिक सुविधा, मुलांच्या शिक्षणासाठी हदगाव येथून ये-जा करण्यासाठी वाहन व्यवस्था तसेच कामगार व ऊस तोडणी/वाहतूक मजुरांकरिता दवाखाना, आर्थिक अडी-अडचणी प्रसंगी श्रीमती अंजनाबाई पाटील (सा.का.) कर्मचारी सहकारी पतसंस्थेमार्फत कर्ज वाटप, ऊस तोडणी/वाहतूक मजुरांच्या मुलांसाठी साखर शाळा, वाचनालय, व्यायामशाळा व खेळाचे साहित्य आदी सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. तसेच शासनामार्फत लहान मुलांना वेळोवेळी रोगप्रतिबंधात्मक लसी देण्यात येतात.[५९]

**भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखाना :** कारखान्याचे संस्थापक व राज्याचे माजी मुख्यमंत्री श्री. अशोकराव चव्हाण यांच्या कुशल नेतृत्त्वाखाली दि. २५ जुलै १९९० रोजी कारखान्याची नोंदणी झाली असून केंद्र शासनाकडून प्रतिदिन २,५०० मे.टन गाळप क्षमतेसाठी इरादापत्र प्राप्त झाले आहे. सन १९९६-९७ मध्ये चाचणी गळीत हंगाम घेण्यात आला. चाचणी गळीत हंगामापासून सन २००८-०९ पर्यंत झालेले ऊस गाळप, साखर उत्पादन व साखर उतारा यासंबंधीचा तपशील खालील विवरणपत्रात दिला आहे.

---

५९. हुतात्मा जयवंतराव पाटील सहकारी साखर कारखाना लि., सूर्यनगर, ता. हदगाव यांच्याकडून प्राप्त माहितीवर आधारित.

Maharashtra State Gazetteers

**चाचणी गळीत हंगाम १९९६ ते २००९.**

| अ.क्र. | हंगाम | ऊस गाळप (लाख मे. टन) | साखर उत्पादन (पोती लाखांत) | साखर उतारा (टक्के) |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | १९९६-१९९७ | १.६९ | १.८२ | १०.७४ |
| २ | २०००-२००१ | ५.०६ | ५.४७ | १०.८० |
| ३ | २००४-२००५ | ३.६३ | ३.९७ | १०.९० |
| ४ | २००७-२००८ | ६.२७ | ७.५४ | १२.०० |
| ५ | २००८-२००९ | २.५१ | २.८५ | ११.३० |

दिनांक ३१ मार्च २००६ अखेर पर्यंत कारखाना कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांनी १७,४०० भागांची खरेदी केली होती व त्यानुसार सभासदांकडून रु. ५१२.३२ लाख इतके भागभांडवल जमा झाले. तसेच मार्च २००७ अखेर कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांनी १७,४०० शेअर्स खरेदी केले. त्यानुसार सभासदांकडून रु. ५३८.२६ लाख इतके भाग भांडवल जमा झाले होते.

**आसवनी/इथेनॉल निर्मिती प्रकल्प :** साखरेच्या किमतीमध्ये चढउतार व धोरणामध्ये वरचेवर होणारे बदल याचा विचार करून कारखाना आर्थिकदृष्ट्या सक्षम राहण्याच्या दृष्टीने व कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या ऊसास जास्त भाव देणे शक्य होण्याकरिता कारखान्यात साखरेच्या उत्पादनानंतर निघणाऱ्या मोलॅसेसवर प्रक्रिया करून त्यापासून रेक्टीफाईड स्पिरीट, एक्स्ट्रा न्यूट्रल अल्कोहोल आणि इथेनॉल तयार करण्यासाठी ३०,००० लिटर्स प्रतिदिन क्षमतेचा आसवनी/ इथेनॉल प्रकल्प सन २००६-०७ मध्ये कार्यान्वित केला असून या प्रकल्पात मागील हंगामात झालेल्या उत्पादनाचा तपशील खालीलप्रमाणे दिला आहे.

| अ.क्र. | तपशील | हंगाम (एप्रिल ते मार्च) | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | २००५-०६ | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| | मळीचा वापर (मे.टन) | ९४७.९२० | १५,४१६.७४० | २३,४६३.१४० | २२,६७३.३५५ |
| | उत्पादन (लाख लिटर) | | | | |
| १ | रेक्टीफाईड स्पिरीट | २.५०० | ४३.१२८ | ६७.५१९ | ५०.७५० |
| २ | एक्स्ट्रा न्यूट्रल अल्कोहोल | निरंक | ०.७६ | निरंक | ११.०५० |
| ३ | इथेनॉल | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| ४ | मद्यार्क उतारा (लिटर्स/मे.टन मळी वापर) | २६४.० | २८४.७ | २८७.८ | २७२.६ |

या आसवनी प्रकल्पाचे सन २००५-२००६ साली उत्पादन मूल्य रु. ५,४३७,६३३.३८ होते आणि कारखान्यास रु. ५,२१८,९४०.०२ इतका तोटा त्यामधून झाला.

कारखान्याच्या सध्याच्या ३० के.एल.पी.डी. क्षमतेच्या आसवनी/इथेनॉल प्रकल्पाचे ६० के.एल.पी.डी. क्षमतेचे विस्तारीकरण करण्यात येणार आहे. या विस्तारीकरणामुळे कारखान्याच्या दोन्ही युनिटमधील मोलॅसेसचा वापर होऊन उत्पादित होणाऱ्या उत्पादनांपासून कारखान्यास अधिक उत्पन्न प्राप्त होऊ शकेल.

अल्कोहोल उत्पादनानंतर बाहेर पडणाऱ्या टाकाऊ पदार्थावर (स्पेंटवॉशवर) प्रक्रिया करून त्याद्वारे उत्कृष्ट प्रतीचे कंपोस्ट खत तयार करून ते कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना सवलतीच्या दराने उधारीवर देण्यात येते.

**सहविज निर्मिती प्रकल्प उभारणी :** कारखान्यामध्ये उपलब्ध मशिनरी विचारात घेऊन आवश्यक सुधारणा करून त्यानुसार योग्य क्षमतेचा सहविज निर्मिती प्रकल्प उभारण्यात येणार आहे.

**रिफाईंड शुगर प्रोजेक्ट :** आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील रिफाईंड शुगरला असलेली वाढती मागणी लक्षात घेता कारखान्यात योग्य त्या क्षमतेचा रिफाईंड शुगर प्रकल्प उभारण्यात येणार आहे.

**शेतकरी व कामगारांसाठीच्या सुविधा :**

**ऊस उत्पादकांचा विमा :** कार्यक्षेत्रातील ऊस पुरवठादारांचे हित लक्षात घेऊन कारखान्याने गाळप हंगाम २००६-०७ मध्ये ऊस पुरवठा केलेल्या शेतकऱ्यांचा एक वर्षाच्या कालावधीसाठी रु. १ लाख किमतीचा अपघात विमा नॅशनल इन्शुरन्सकं. लि. यांच्याकडून काढला होता.

**बेणे व खत पुरवठा :** चांगल्या जातीच्या ऊसाची लागवड करू इच्छिणाऱ्या ऊस उत्पादकांना कारखान्यातर्फे बेणे किंवा खत उधारीवर बिनव्याजी देऊन व सदरील बेणे किंवा खताची रक्कम संबंधित ऊस उत्पादकांच्या ऊस बिलातून वसूल करून घेण्यात आली. चांगल्या जातीच्या ऊसाची लागवड करू इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर जादा रक्कम किंवा प्रति एकरी किमान २५ मे. टन ऊस उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांना सुधारित जातीचे प्रती एकरी ३ टन ऊस बेणे किंवा रासायनिक खत अनुदानावर देण्यात येते. एकरी विक्रमी उत्पादन करणाऱ्या ऊस उत्पादकांना ऊस पीक बक्षीस योजनेद्वारे रोख रु. १०,००० देण्यात येतात.

**शेतकरी प्रशिक्षण :** कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्राची व नवीन सुधारित जातीच्या ऊस लागवडीविषयक माहिती व्हावी या उद्देशाने वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट, मांजरी बु., पुणे यांनी आयोजित केलेल्या 'ऊस शेती ज्ञानयान प्रशिक्षण' शिबिरासाठी कारखान्याने कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांचा अभ्यास दौरा माहे डिसेंबर २००७ मध्ये आयोजित केला होता. या अभ्यास दौऱ्याचा लाभ कार्य क्षेत्रातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी घेतला.

**कामगार व्यवस्थापन :** विविध संस्थांनी आयोजित केलेल्या कर्मचारी प्रशिक्षण शिबिरांसाठी विविध विभागातील कर्मचाऱ्यांना कारखान्यातर्फे पाठविण्यात येते. कामगारांना क्रीडा क्षेत्रात रुची निर्माण व्हावी या उद्देशाने राज्य पातळीवरील क्रीडा स्पर्धांमध्ये कर्मचाऱ्यांना कारखान्यातर्फे पाठविण्यात

Maharashtra State Gazetteers

येते. ऊस तोडणी कामगारांच्या पाल्यांची शिक्षणाची सोय व्हावी याकरिता कारखानास्थळी साखर शाळा चालविण्यात येते. कारखान्याच्या परिसरातील कर्मचारी/कामगारांच्या पाल्यांसाठी व कारखान्यालगतच्या गावातील विद्यार्थ्यांसाठी कारखाना स्थळी शारदा भवन शिक्षण संस्था या अग्रगण्य शिक्षण संस्थेची माध्यमिक शाळा चालू करण्यात आलेली आहे.

या कारखान्यास महाराष्ट्रातील सर्वोत्कृष्ट साखर कारखाना म्हणून पद्मश्री डॉ. वसंतदादा पाटील पुरस्कारासह आठ राष्ट्रीय व दहा राज्य पातळीवरील पुरस्कार प्राप्त झाले आहेत. ते खालीलप्रमाणे दिले आहेत :—

**राष्ट्रीय पातळीवरील पुरस्कार :** प्रथम ऊस विकास पुरस्कार (२००१-२००२), प्रथम तांत्रिक कार्यक्षमता पुरस्कार (२००२-२००३), ऊस विकास पुरस्कार (२००२-२००३), सर्वोत्कृष्ट सहकारी साखर कारखाना पुरस्कार (२००३-२००४), प्रथम तांत्रिक कार्यक्षमता पुरस्कार (२००३-२००४), प्रथम ऊस विकास पुरस्कार (२००३-२००४), द्वितीय ऊस विकास पुरस्कार (२००६-२००७), उत्कृष्ट आर्थिक व्यवस्थापन पुरस्कार (२००७-२००८).

**राज्य पातळीवरील पुरस्कार :** वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट, पुणे 'तांत्रिक कार्यक्षमता पुरस्कार' (१९९९-२०००), महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ लि., मुंबई 'उत्कृष्ट तांत्रिक कार्यक्षमता पुरस्कार' (१९९९-२०००), वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट, पुणे 'प्रथम तांत्रिक कार्यक्षमता पुरस्कार' (२००२-२००३), वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट, पुणे 'प्रथम ऊस विकास पुरस्कार' (२००२-२००३), वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट, पुणे 'प्रथम तांत्रिक कार्यक्षमता पुरस्कार' (२००३-२००४), वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट, पुणे 'उत्कृष्ट ऊस विकास पुरस्कार' (२००३-२००४), वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट, पुणे यांच्याकडून राज्यातील बेस्ट ओव्हरऑल परफॉर्मन्स बद्दल 'कै. वसंतदादा पाटील पुरस्कार' (२००४-२००५), वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट, पुणे 'उत्कृष्ट आर्थिक व्यवस्थापन पुरस्कार' (२००४-२००५), वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट, पुणे 'उत्कृष्ट तांत्रिक कार्यक्षमता पुरस्कार' (२००४-२००५), वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट, पुणे 'उत्कृष्ट ऊस विकास पुरस्कार' (२००४-२००५).

तसेच कारखान्यास आंतरराष्ट्रीय गुणवत्ता प्रमाणपत्र आय.एस.ओ. ९००१-२००० मिळालेले असून कारखान्यात गुणवत्ता प्रणालीचा अवलंब करण्यात येतो.[६०]

कारखाना कार्यक्षेत्रातील अतिरिक्त ऊसाचे गाळप होण्याच्या दृष्टीने शंकर सहकारी साखर कारखाना लि., कुसुमनगर, वाघलवाडा, तालुका उमरी, जिल्हा नांदेड हा कारखाना गळीत हंगाम २००७-२००८ मध्ये दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि., मुंबई यांच्याकडून पाच हंगामाकरिता भाडेतत्त्वावर चालविण्यास घेतला आहे. या कारखान्याची मशिनरी दुरुस्ती व इतर कामे अल्पावधीत पूर्ण करून प्रत्यक्ष गाळपास दिनांक ५ फेब्रुवारी २००८ रोजी सुरूवात करण्यात आली. या हंगामात सदर कारखान्यामध्ये एकूण १,१६,६७२ मे.टन ऊसाचे गाळप करून १,२२,१५५ क्विंटल साखरेचे

६०. भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखाना लि., नांदेड यांच्याकडून प्राप्त माहितीवर आधारित.

उत्पादन करण्यात आले. हा कारखाना चालू केल्यामुळे कारखाना कार्यक्षेत्रातील अतिरिक्त ऊस गाळपाचा प्रश्न सुटला.[६१]

हिंगोली जिल्ह्यातील कळमनुरी तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा 'कामधेनू' असलेला मराठवाडा सहकारी साखर कारखाना लि., डोंगरकडा गेल्या दहा वर्षापासून बंद अवस्थेत होता. शासनाने सदरहू अवसायनात निघालेला कारखाना संपूर्ण मालमत्तेसह भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखान्यास विक्री केला.

या कारखान्याची बहुतांशी मशिनरी जुनी झाल्याने आणि दहा वर्षांपासून बंद अवस्थेत असल्याने अत्यंत खराब झालेली होती. सर्व मशिनरी दुरुस्त करण्यासाठी कारखान्यास जवळपास बारा कोटी रुपये खर्च करावा लागला. कारखाना लवकर चालू होण्यासाठी हंगाम २००६-०७ चा प्रथम गाळप हंगाम दिनांक १६ डिसेंबर २००६ पासून सुरू करण्यात आला. या कारखान्यातील मागील तीन हंगामातील ऊस गाळप, साखर उत्पादन व साखर उतारा यासंबंधीचा तपशील खालीलप्रमाणे आहे.[६२] :—

| अ.क्र. | हंगाम | ऊस गाळप (लाख मे.टन) | साखर उत्पादन (पोती लाखात) | साखर उतारा (टक्के) |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | २००६-०७ | १.९० | २.१६ | ११.३३ |
| २ | २००७-०८ | ३.५२ | ४.०६ | ११.५२ |
| ३ | २००८-०९ | १.१२ | १.३५ | ११.३५ |

**साखर उत्पादन व विक्री :** दिनांक १ एप्रिल २००५ ते ३१ मार्च २००६ व दि. १ एप्रिल २००६ ते ३१ मार्च २००६ या कालावधीत खालीलप्रमाणे साखर उत्पादन व विक्री झाली.[६३] :—

**युनिट क्र. १ लक्ष्मीनगर-**

| अ.क्र. | तपशील | साखर (क्विंटल) | |
|---|---|---|---|
| | | ०१/०४/२००५ ते ३१/०३/२००६ | ०१/०४/२००६ ते ३१/०३/२००७ |
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | सुरूवातीचा शिल्लक साठा | ४,६०,५९७ | २,८०,६४७ |
| २ | साखर उत्पादन | २,२३,५०० | ६,६७,९०० |
| ३ | साखर विक्री | ४,०३,४५० | ३,७०,६८१ |
| ४ | अखेरील शिल्लक साठा | २,८०,६४७ | ५,७७,८६६ |

६१. भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखाना लि., अर्धापूर, नांदेड, १६ वा वार्षिक अहवाल, वर्ष २००५-०६ व २००६-०७ मधून प्राप्त माहितीच्या आधारे.

६२. कित्ता.

६३. पूर्वोक्त.

Maharashtra State Gazetteers

दिनांक ०१/०४/२००५ ते ३१/०३/२००६ या कालावधीत साखर विक्रीतून एकूण रु. ६९.५१ कोटी व दिनांक ०१/०४/२००६ ते ३१/०३/२००७ या कालावधीत साखर विक्रीतून एकूण रु. ६२.०४ कोटी उत्पन्न मिळाले. सन २००५-२००६ साली कारखान्यास रु. ३,६६,०६,५८१.९६ तोटा झाला होता, तर सन २००६-०७ साली रु. १,०८,६५,७८५.८५ एवढा नफा प्राप्त केला.

**युनिट क्र. २, डोंगरकडा-**

| अ.क्र. | तपशील | साखर (क्विंटल) | |
|---|---|---|---|
| | | ०१/०४/२००५ ते ३१/०३/२००६ | ०१/०४/२००६ ते ३१/०३/२००७ |
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | सुरूवातीचा शिल्लक साठा | निरंक | निरंक |
| २ | साखर उत्पादन | निरंक | १,०६,५७० |
| ३ | साखर विक्री | निरंक | ७,८६६ |
| ४ | अखेरील शिल्लक साठा | निरंक | ९८,७०४ |

दिनांक ०१/०४/२००६ ते ३१/०३/२००७ या कालावधीत कारखान्यास साखर विक्रीतून एकूण रु. १.१० कोटी उत्पन्न प्राप्त झाले.

कारखान्याकडील साखर साठा, खुल्या बाजारातील साखरेचे दर, साठवणूक क्षमता, साठवणुकमुळे लागणारे बँकेचे व्याज व साखर निर्यात सबसिडी इत्यादी बाबी विचारात घेऊन कारखान्याने आर्थिक वर्ष २००७-०८ मध्ये युनिट क्र. ०१ व ०२ मध्ये एकूण ३,९६,०२६ क्विंटल पांढरी साखर आणि युनिट क्रमांक १ मधील ७५,७८० क्विंटल कच्ची साखर अशी एकूण ४,७१,८०६ क्विंटल साखर निर्यात केली. या निर्यात केलेल्या साखरेपासून रु. ५२.३५ कोटी उत्पन्न कारखान्यास प्राप्त झाले.

**जय शिवशंकर सहकारी साखर कारखाना मर्यादित शेषनगर, मांजरी.—** दिनांक ७ जून १९९९ रोजी शेषनगर, मांजरी, ता. मुखेड येथे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री कै. सुधाकरराव नाईक व कै. शंकरराव चव्हाण यांच्या प्रेरणेने जय शिवशंकर सहकारी साखर कारखान्याची स्थापना झाली. कारखान्याची गाळप क्षमता १२५० मे.टन होती.[६४] सन २००३-०४ या गाळप हंगामात १,२५,२३० मे.टन

६४. जय शिवशंकर सहकारी साखर कारखाना यांच्याकडून प्राप्त द्विवार्षिक अहवाल २००५-०६, २००६-०७, पृ. ५ मधील माहितीनुसार.

Maharashtra State Gazetteers

ऊसाचे गाळप करून १३,५०२ मे.टन साखरेचे उत्पादन घेतले.[६५] कारखान्याने सन २००४-०५ ते २००६-०७ या तीन हंगामात खालीलप्रमाणे ऊसाचे गाळप केले :—

| अ.क्र. | तपशील | हंगाम | | |
|---|---|---|---|---|
| | | २००४-०५ | २००५-०६ | २००६-०७ |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | ऊस गाळप (मे.टन) | | | |
| | (अ) कार्यक्षेत्रातील | १३,५३५ | २५,७९१ | १,१५,२४१ |
| | (ब) कार्यक्षेत्राबाहेरील | ८,६१० | २६,९२९ | १,८१,३५९ |
| | एकूण | २२,१४६ | ५२,७२० | २,९६,६०० |
| २ | साखर उत्पादन | २१,९५० | ५३,२०० | ३,१५,४०० |
| ३ | सरासरी साखर उतारा | १०.१८% | १०.२१% | १०.६५% |

हंगाम २००४-०५ व २००५-०६ मध्ये ऊसावर पडलेल्या खोड किडी व लोकरी मावा इत्यादी रोगांमुळे तसेच अपुऱ्या पर्जन्यमानामुळे ऊस लागवड व उत्पादनात घट झाली. कार्यक्षेत्रातील ऊसाची वाढ व्हावी म्हणून कारखान्याने सभासदांना उधारीवर बेणे व खताचा पुरवठा केला. परिणामी हंगाम २००६-०७ मध्ये कार्यक्षेत्रात चांगले ऊस उत्पादन झाले मात्र साखर दरातील घसरणीमुळे २.९६ लाख मे.टन ऊसाचे गाळप होऊन देखील कारखान्यास अपेक्षित आर्थिक लाभ झाला नाही.

कारखान्याचे २००५ ते २००७ या कालावधीतील भाग भांडवल रु. १०७६.९७ लाख होते. त्यापैकी १४३.६४ लाख रुपये स्वभागभांडवल तर ९३३.३३ लाख रुपये शासकीय भागभांडवल होते. कारखान्याचे प्रकल्प उभारणी अहवालानुसार सहभाग योजनेअंतर्गत बँकांकडून रु. १,६६४.०० लाख मध्यम मुदती कर्ज उभे केले होते. गाळप हंगाम २००५-०६ मध्ये कारखान्यास रु. ७७४,९१,२०५.४८ व गाळप हंगाम २००६-०७ मध्ये ६६८,७९,९७८.८१ रुपये इतका तोटा झाला.

सन २००५-०७ या आर्थिक वर्षाअखेर साखर उत्पादन, विक्री व साठ्यासंबंधीची माहिती खालीलप्रमाणे दिली आहे.

| अ. क्र. | तपशील | वर्ष | |
|---|---|---|---|
| | | २००५-०६ | २००६-०७ |
| १ | २ | ३ | ४ |
| १ | आरंभीचा साठा (दि. १ एप्रिल वरील) | ६३,४०८ | ४४,००२ |
| २ | अहवाल सालात उत्पादन (मार्च अखेर) | ५३,२०० | २,३२,८५० |
| ३ | अहवाल सालात विक्री | | |
| | १. लेव्ही | ४,१६५ | ०६ |
| | २. फ्रि | ६८,४४१ | ५३,३६८ |
| | एकूण विक्री | ७२,६०६ | ५३,३७४ |
| ४ | वर्षाअखेर शिल्लक साठा (३१ मार्च) | ४४,००२ | २,९३,४७८ |

६५. **नांदेड जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन**, वर्ष २००३-०४, पृ. १०६.

Maharashtra State Gazetteers

कारखान्याकडे एक लाख क्विं. साखर पोती साठवणुकीचे एक गोदाम असून ग्रामीण गोदाम योजनेंतर्गत महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या अर्थसहाय्याने दुसऱ्या गोदामाचे बांधकाम करण्यात आलेले आहे.

कारखान्याने कामगारांचा अपघात विमा उतरविला असून त्यांच्या निवासाकरीता पूर्वीची निवास व्यवस्था अपुरी पडत असल्याने निवासांचे बांधकाम करण्यात आले आहे.

**विद्युत निर्मिती व आसवणी प्रकल्प :** कारखाना स्थळी विद्युत निर्मिती व आसवणी प्रकल्प उभारण्याकरिता राज्य सरकारने मान्यता दिली आहे. सदर प्रकल्प बीओटी (बांधा, वापरा, हस्तांतरीत करा) या तत्त्वावर उभारण्यात येत आहे.

कारखाना कार्यक्षेत्रात गाळप क्षमतेएवढा व उच्च प्रतीचा ऊस उपलब्ध व्हावा, तसेच कार्यक्षेत्रात पायाभूत सुविधा निर्मितीसाठी केंद्र शासनाने ऊस विकास निधी योजनेंतर्गत अल्प व्याजदराने रु. २६१.०९ लाख कर्ज मंजूर केलेले आहे. हे कर्ज दोन हप्त्यात प्राप्त होणार असून त्यामधून कारखान्याद्वारे पुढील प्रस्तावित योजनांवर खर्च करण्यात येणार आहे.

| अ.क्र. | योजनेचा तपशील | खर्च करावयाची रक्कम (रुपये लाखात) | | |
|---|---|---|---|---|
| | | प्रथम वर्ष | द्वितीय वर्ष | एकूण |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | बेणे मळा प्रकल्प | ४.८० | ५२.८० | ५७.६० |
| २ | प्रोत्साहन अनुदान | २६.२५ | २६.२५ | ५२.५० |
| ३ | जलसिंचन योजना | १०२.५० | ७७.५० | १८०.०० |
| | एकूण | १३३.५० | १५६.५५ | २९०.१० |
| २ | कारखाना स्वनिधी (-) गुंतवणूक (१०%) | १३.३६ | १५.६५ | २९.०१ |
| ३ | केंद्र शासन कर्ज (९०%) | १०.१८% | १०.२१% | १०.६५% |

हे कर्ज प्राप्त होण्यासाठी कारखान्यास रु. २९.०१ लाख इतका स्वनिधी गुंतवणूक करावा लागणार असून केंद्र शासनास बँक गॅरंटी द्यावी लागणार आहे. कर्ज प्राप्त होताच कारखाना कार्यक्षेत्रात सभासदांकरिता वरील योजनेद्वारे नियोजनबद्धरित्या ऊस विकास कार्यक्रम राबविण्यात येणार आहे.[६६]

गळीत हंगाम २००६-०७ मध्ये भारतात २८५.०० लाख मे.टन साखर उत्पादन झालेले असून त्यात महाराष्ट्राचा वाटा ९१.०० लाख मे.टन आहे.

**नांदेड जिल्ह्यातील चालू साखर कारखान्यांची स्थिती :** सन २००६-०७ या वर्षी नांदेड जिल्ह्यात एकूण ५ साखर कारखाने कार्यरत होते, त्यापैकी ३ कारखान्यांची प्रतिदिन गाळप क्षमता २,५०० मे.टन होती तर बाकीच्या दोन कारखान्याची गाळप क्षमता प्रतिदिन १,२५० मे.टन आहे. २००६-०७ या हंगाम वर्षात भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखाना सर्वाधिक म्हणजे २३० दिवस कार्यरत होता, तर या कारखान्याने गाळप केलेला ऊस सर्वाधिक ७९.०७ मे.टन होता. तसेच या

६६. जय शिवशंकर सहकारी साखर कारखाना यांचा द्विवार्षिक अहवाल २००५-०६, २००६-०७, पृ. ९ मधील माहितीनुसार.

Maharashtra State Gazetteers

कारखान्याने एकूण ८९.०७ लक्ष पोत्यांची साखर निर्माण करून साखरेचा ११.२६% सरासरी उतारा साध्य केला. या कारखान्याने स्थापित क्षमतेच्या १३७% वापर केल्याचे दिसते.[६७]

सन २००७-०८ या गाळप हंगामात या कारखान्याने ६.२७ लाख मे.टन ऊसाचे गाळप करून ७.५४ लाख पोती साखरेचे उत्पादन घेऊन सरासरी १२% उतारा साध्य केला. तर सन २००८-०९ मध्ये २.५१ लाख मे.टन ऊसाचे गाळप करून २.८५ लाख पोती साखरेचे उत्पादन घेतले व सरासरी ११.३०% साखरेचा उतारा साध्य केला.[६८]

दुसऱ्या क्रमांकावर जय अंबिका सहकारी साखर कारखाना असून २,५०० मे.टन प्रतिदिन गाळप क्षमता असलेल्या या कारखान्याने सन २००६-०७ या कालावधीत १७.९५ लाख मे.टन ऊसाचे गाळप करून १५.६५ लक्ष पोती साखरेचे उत्पादन घेतले व सरासरी ११% साखर उतारा प्राप्त केला. या गाळप हंगामात १९० दिवस कार्यरत असलेल्या या कारखान्याने स्थापिक क्षमतेच्या १०८ टक्के वापर केला.

गोदावरी मन्याड साखर कारखान्याची गाळप क्षमता प्रतिदिन २,५०० मे.टन असून स्थापित क्षमतेचा वापर मात्र फक्त ४४% आहे. या कारखान्याने २००६-०७ या गाळप हंगामात १६४ दिवस कार्य केले व एकूण १८.२ लाख पोत्यांचे साखर उत्पादन केले. या कारखान्याचा वार्षिक सरासरी उतारा ९.१४% होता.

जिल्ह्यातील जय शिवशंकर सहकारी साखर कारखान्याची गाळप क्षमता १,२५० मे.टन असून या क्षमतेचा फक्त ४४% वापर करण्यात आला. या कारखान्याने एकूण ११.५४ लक्ष पोत्यांची साखर निर्मिती करून सरासरी उतारा ८.७३% प्राप्त केला, जो तुलनेने सर्वात कमी होता. या विश्लेषणावरून तसेच पुढील तक्त्यावरून नांदेड जिल्ह्यातील साखर कारखान्यांची कार्यक्षमता लक्षात येते. सन २००४ ते २००७ पर्यंतची माहिती तक्ता क्र. ११, १२ व १३ मध्ये दिलेली आहे.

**साखर उद्योगातील वैधानिक किमान किंमत व पणन व्यवस्था[६९] :**

साखर कारखाने ऊस उत्पादकांना केंद्र सरकारने जाहीर केलेल्या वैधानिक किमान किमतीस (Statutory Minimum Price), दर मेट्रिक टनाप्रमाणे किंमत देतात. यासाठी साखरेचा किमान सरासरी उतारा (Recovery Rate) ८.५% असावा लागतो. उदा. सन २००६-०७ यावर्षी सहकारी साखर कारखान्यांनी दर मेट्रीक टनास ८.५% उताऱ्यास रु. ८५०/- किंमत दिली. साखर कारखाने ज्या ऊस उत्पादकांची शेती कारखान्यापासून बरीच लांब असेल त्यांना ऊस वाहतुकीसाठी वाहतूक अनुदान देखील देतात. याच काळात खाजगी साखर कारखान्यांनी मात्र थोडा अधिक म्हणजे दर मे.टनास रु. ९०० इतका भाव दिला.

ऊसाचे भाव हे सरासरी साखर उताऱ्याशी जोडलेले असतात. सन २००५-०६ यावर्षी ऊसाच्या वैधानिक किमान किमती रु. ८५०/- प्रति मेट्रीक टनापासून रु. १,१०० प्रति मे.टन वाढत्या उताऱ्याशी

६७. डॉ. कुरूलकर, र. पु. यांच्याकडून प्राप्त माहितीच्या आधारे.

६८. भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखाना यांनी पाठविलेल्या माहितीच्या आधारे.

६९. डॉ. कुरूलकर, र. पु. यांनी पुरविलेल्या माहितीच्या आधारे.

जोडलेल्या होत्या. परंतु प्रत्येक साखर कारखान्याने किमान रु. ८५०/- प्रति मे.टन किंमत देणे बंधनकारक असते. त्याचप्रमाणे ९% उतारा मिळाल्यास प्रति मे.टन रु. १,१०० देणे बंधनकारक आहे. राज्य सरकारने देखील सदर वर्षी राज्य निर्धारित किंमत (State Advised Price/SAP) रु. ८५० प्रति मे.टन जाहीर केली. ही किमान किंमत सार्वजनिक व खाजगी क्षेत्रातील साखर कारखान्यांना बंधनकारक असते. साधारण ९% वरील प्रत्येक वाढीव उताऱ्यास रु. ८८ प्रति मेट्रीक टन या हिशोबाने प्रोत्साहन दर (Incentive Price) दिला जातो.

मागील तीन वर्षात (२००४-०५ ते २००६-०७) नांदेड जिल्ह्यातील साखर कारखान्यांनी साधारण रु. ८३० प्रति मे.टन ते रु. १,१२५ प्रति मे.टन भाव दिला. पुढील तक्त्यात नांदेड जिल्ह्यातील ३ चालू कारखान्यांनी प्रत्यक्षात दिलेली किंमत दाखविली आहे. सन २००४-०५ यावर्षी किमान वैधानिक किंमत रु. ५६० प्रति मे.टन असतांना साखर कारखान्यांनी रु. १,१०० ते १,२०० प्रति मे.टन भाव दिला. सन २००६-०७ यावर्षी मात्र किमान वैधानिक किंमत रु. ५६० वरून रु. ८५० प्रति मे.टन वाढवून देण्यात आली. हुतात्मा जयवंतराव पाटील सहकारी साखर कारखाना व जय शिवशंकर सहकारी साखर कारखान्यांनी मात्र रु. ८५० प्रति मे.टन हाच भाव दिला. परंतु भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखान्याने मात्र रु. १,१०० प्रति मे.टन भाव दिला आहे. हे सर्व भाव सरासरी साखर उताऱ्याशी निगडित होते.

नांदेड जिल्ह्यातील सहकारी साखर कारखान्यांनी ऊस उत्पादकांना दिलेली प्रत्यक्ष किंमत.

| अ.क्र. | साखर कारखान्याचे नाव | किमान वैधानिक किंमत (रु./टन) | | | साखर कारखान्यांनी प्रत्यक्ष दिलेली (रु./टन) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | २००४-०५ | २००५-०६ | २००६-०७ | २००४-०५ | २००५-०६ | २००६-०७ |
| १ | भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखाना लि., लक्ष्मीनगर. | ५६० | ५६० | ८५० | १,१०० | १,१०० | १,१०० |
| २ | हुतात्मा जयवंतराव पाटील सहकारी साखर कारखाना लि., सूर्यनगर. | ५६० | ५६० | ८५० | ८३० | १,१२५ | ८५० |
| ३ | जय शिवशंकर सहकारी साखर कारखाना लि., बारहाली. | ५६० | ५६० | ८५० | ८५० | १,२०० | ८५० |

**नांदेड जिल्ह्यातील ऊस व साखर उद्योगाच्या प्रगतीसाठी काही उपाय :—**

अ) सेंद्रिय शेतीचा वापर (Organic Farming) :— सध्याच्या ऊस लागवडीच्या पद्धतीत शेतकरी वर्ग मोठ्या प्रमाणावर रासायनिक खते व किटकनाशकांचा वापर करताना दिसतात. अशा

Maharashtra State Gazetteers

सततच्या वापराने जमिनीचा पोत खालावून जमिनीची उत्पादकता घटत जाते. जमिनीतील आर्द्रता व मॅकीबायल क्रिया टिकवून ठेवण्यासाठी सेंद्रिय पद्धतीचा अवलंब करणे आवश्यक आहे. त्यामध्ये बायो फर्टिलायझर्सच्या वापरामुळे रोपास पोषणयुक्त आहार मिळून त्याची उत्पादकता वाढते. व्हर्मी कंपोस्टच्या वापरामुळे जमिनीचा पोत सुधारून जमिनीची पाणी टिकवून ठेवण्याची क्षमता वाढते.

ब) ठिबक सिंचन पद्धतीचा वापर (Drip Irrigation) :— ऊसाला मोठ्या प्रमाणावर पाणी उपलब्ध असावे लागते. नांदेड जिल्ह्यात सिंचन क्षमतेवर मर्यादा असल्याने ठिबक सिंचन पद्धतीद्वारे उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करून जिल्ह्यात ऊसाचे क्षेत्र व उत्पादन वाढविणे शक्य आहे. ऊस लागवडीत दर हेक्टरी ऊसासाठी ३,६०० घनमीटर पाणी लागते. ठिबक सिंचनाचा वापर केल्यास दर हेक्टरी १,८०० घनमीटर पाणी पुरेसे होते. म्हणजेच ठिबक सिंचनामुळे ५०% पाण्याची बचत करणे शक्य होते. तसेच ठिबक सिंचनामुळे ऊसाच्या उत्पादकतेत दर हेक्टरी ३०% वाढ होते.

क) ऊस उत्पादकता वाढीचे शासकीय प्रयत्न :— ऊसावर आधारित चीरस्थायी पीकरचना (Sustainable Development of Sugarcane Based Cropping System) या योजनेचा मूळ उद्देश जिल्ह्यातील ऊसाची दर हेक्टरी उत्पादकता वाढविणे हा आहे. या योजनेअंतर्गत नांदेड जिल्ह्यातदेखील शेतकऱ्यांचे प्रशिक्षण, आदर्श ऊस उत्पादक प्रयोग, मृदा परिक्षण, गाव पातळीवर वीज उत्पादन इत्यादी कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर राबविणे आवश्यक आहे.

**ऊस उत्पादनावरील मर्यादा :—** नांदेड जिल्ह्यात मागील ५ वर्षात ऊसाखालील क्षेत्रफळ सातत्याने वाढते आहे. तसेच ऊसाचे उत्पादनदेखील वाढत आहे. सन २००३-०४ साली केवळ ६५ मे.टन असणारी ऊसाची उत्पादकता सन २००७-०८ यावर्षी दर हेक्टरी ७५ मे.टनापर्यंत वाढली. ऊस उत्पादकता वाढीवर पुढीलप्रमाणे काही अंतर्गत तर काही बहिस्त घटकांचा परिणाम संभवतो.

अ) जिल्ह्यातील खाजगी साखर कारखाने ऊसाची कापणी व गाळप करण्यासाठी फारसे दक्ष नसतात. त्यामुळे हे कारखाने गाळपाचे काम जास्त दिवस चालू ठेवतात. याचा परिणाम ऊसाच्या गुणवत्तेवर होऊन शेवटी शेतकऱ्यांचे उत्पन्न घटण्यावर होतो.

ब) साखर कारखाने शेतकऱ्यांचे हिशेब पूर्ण करण्यास फार विलंब लावतात. विशेषतः खाजगी साखर कारखान्यांकडून हा विलंब मोठा असतो. बँकाकडून शेतकऱ्यांना १२ ते १५ महिन्याच्या कालावधीसाठी पीक कर्ज दिले जाते. या काळात ऊसाचे पीक घेऊन ते साखर कारखान्यांना पुरवून त्यासंबंधीचा आर्थिक व्यवहार पूर्ण करणे साखर कारखान्यांना शक्य असते. मात्र आर्थिक व्यवहाराबाबत होणाऱ्या विलंबामुळे व्याजाचा जादा भार शेतकऱ्यावर पडतो व त्याची शेती अव्यवहार्य ठरते.

क) अनेक ऊस उत्पादक जिल्ह्यातील सहकारी साखर कारखान्याकडे नाव नोंदणी करतात. परंतु प्रत्यक्षात आपला ऊस इतर खोट्या नावावर खाजगी साखर कारखान्यांना विकतात. अशा प्रकारांमुळे सहकारी साखर कारखान्यांना ऊसाचा पुरवठा घटतो व हे कारखाने पूर्ण क्षमतेने ऊसाचे गाळप करू शकत नाहीत. तसेच ज्या बँकांनी या शेतकऱ्यांना पीक कर्जे दिली आहेत त्यांची वसुली होऊ शकत नाही.

वरील मर्यादा लक्षात घेता ऊस उत्पादनाच्या व पर्यायाने साखरेच्या वृद्धीसाठी पुढील पर्याय अवलंबिणे सोयीचे ठरेल-

१. सर्व साखर कारखान्यांनी शेतकऱ्यांनी ऊसाची लागवड करताच १५ दिवसांच्या आत त्यांचे आर्थिक व्यवहार पूर्ण करावेत, ज्यायोगे ऊस शेती व्यवहार्य ठरेल.

२. ऊसाचे पैसे शेतकऱ्यांना त्यांच्या बँकेमार्फतच अदा करण्यात यावेत. त्यामुळे त्यांच्या कर्जाची वसुली वेळेवर होऊन बँकानाही त्याचा फायदा होईल.

३. कृषि खात्याकडून शेतकऱ्यांना खतांचा व किटकनाशकांचा योग्य वेळेवर पुरवठा करण्यात यावा.

४. शेतकऱ्यांना जैवखते व जैवकिटकनाशकांचा वापर करण्यासाठी शासनाने प्रोत्साहीत करावे. संबंधित शासकीय खात्यांनी ऊस उत्पादक शेतकऱ्यांना ठिबक सिंचन पद्धतीचा वापर करण्यासाठी प्रोत्साहित करावे तसेच अनुदानाची माहिती द्यावी. बँकांनी सुद्धा शेतकऱ्यांना ठिबक सिंचन योजनेचे महत्त्व पटवून द्यावे.

भारतातील साखर उद्योगाच्या झपाट्याने होणाऱ्या वाढीकडे जगातील संपूर्ण साखर उद्योगाचे लक्ष आहे. सद्यस्थितीत ऊस हे उर्जा स्रोत म्हणून मोठ्या प्रमाणात वापरात येत असल्याने त्यापासून साखरे व्यतिरिक्त उर्जा व इंधन निर्मिती शक्य असल्याने भविष्यात भारतीय साखर उद्योगातील कुप्रसिद्ध चक्राचा अस्त होऊन देशाची आर्थिक भरारी, वाढती कार्यक्षमता, तरूण लोकसंख्या, दरडोई खप, खरेदीदारांची वाढती आर्थिक क्षमता व कृषि मुल्यवर्धित क्षेत्रातील वाढ या सर्व बाबींचा अनुकूल परिणाम होऊन भारतीय साखर उद्योग जागतिक स्तरावर प्रमुख भूमिका वठविणार असल्याचा तज्ज्ञांचा अनुमान आहे.[७०]

## कृषि आणि अन्न प्रक्रिया उद्योग*[७१]

**प्रास्ताविक :** नांदेड जिल्हा हा प्रामुख्याने कृषि आधारित जिल्हा आहे, त्यामुळे या जिल्ह्यात कृषि आधारित उद्योगासाठी हवा असणारा कच्चा माल मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहे. सध्या जिल्ह्यात ७ कारखाने असून त्यातून बॅगास व मळीचे (मोलॅसिस) मोठ्या प्रमाणावर उत्पादन होते ; त्यावर आधारित अनेक प्रकारचे उद्योग जिल्ह्यात स्थापन करणे शक्य आहे, उदा. कागद कारखाने, दारू, औद्योगिक अल्कोहोल, असिटोन कारखाने, एथिल ॲसिटेट, इस्टर, शुगर कँडी/टॉकि, वगैरे. कृषित उदभवणाऱ्या टाकाऊ पदार्थापासून सुद्धा ब्रिकेटेड कोल, कंपोस्ट खताचे उद्योग स्थापन करता येतात. जिल्ह्यात तेलबिया, फळे आणि डाळींचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होत असल्यामुळे, त्यावर आधारित २९६ कृषिमाल प्रक्रिया उद्योग अस्तित्त्वात आहेत. जिल्ह्यात सोयाबीनचे उत्पादन मोठ्या

७०. जय शिवशंकर सहकारी साखर कारखाना यांचा द्विवार्षिक अहवाल २००५-०६, २००६-०७, पृ. ६ मधील प्राप्त माहितीच्या आधारे.

* या भागाचे लेखन डॉ. र. पु. कुरुलकर, निवृत्त विभाग प्रमुख, अर्थशास्त्र विभाग, डॉ. बा.आ.म. विद्यापीठ, औरंगाबाद यांनी केले आहे.

७१. नाबार्डच्या **पी.एल.पी. नांदेड** २००८-०९ या अहवालातील माहिती व आकडेवारीवर आधारित.

प्रमाणावर होत असल्यामुळे सोयाबीनवर आधारित अनेक प्रकारचे उद्योग जिल्ह्यात स्थापन करण्याची क्षमता आहे; उदा. सोयादूध, सोयापीठ, सोयापनीर, सोया तेल व इतर प्रथिन आधारित उत्पादने.

नांदेड जिल्ह्यात दालवर्गामधील, तूर, उडीद व मुगाचे पीठ मोठ्या प्रमाणावर घेतले जाते. डाळींच्या खरेदी-विक्रीचे नांदेड बाजारपेठ एक प्रमुख केंद्र मानले जाते; सध्या जिल्ह्यात ८ दाल मिल्स आहेत. फळावर आधारित प्रक्रिया उद्योगासही नांदेड जिल्ह्यात मोठा वाव आहे. मोसंबी, संत्रे, आंबे, सफरचंद, पेरू, चिकू, केळी, बोर इत्यादींवर आधारित अनेक फळप्रक्रिया उद्योग जिल्ह्यात काढता येतील. दुधावर आधारित प्रक्रिया उद्योग, शेळीच्या मासांवर आधारित उत्पादने, आणि लोकरीवर आधारित उद्योग जिल्ह्यात स्थापन करण्यास मोठा वाव आहे.

कृषि आधारित प्रक्रिया उद्योग सुरू केल्यास, पीक काढणीतील होणारे ३५% नुकसान कमी करता येते असा अंदाज आहे. एकूण उत्पादनातील ३५% बचत ही महत्त्वाची बाब होय. भारत सरकार व नाबार्डने कृषि-प्रक्रिया उद्योगांचे महत्त्व ओळखून या उद्योगास बलस्थान (Thrust Area) म्हणून मान्यता दिली आहे. रिझर्व बँक ऑफ इंडियाने सुद्धा, बँकांनी कर्ज देताना, कृषि व अन्न प्रक्रिया उद्योगांना, "अग्रक्रम उद्योग" म्हणून कर्ज देण्याचे धोरण ठेवले आहे.

कृषि प्रक्रिया उद्योगांच्या वृद्धीमुळे कृषिक्षेत्रावर अनेक प्रकारचे चांगले परिणाम संभवतात ; उदा.त्यामुळे, कृषि व फळ उत्पादनात मूल्यवृद्धी (Value addition) होऊन शेतकऱ्यांच्या उत्पन्नात व रोजगारात वाढ होते, तसेच या उत्पादनांच्या निर्यातीस चालना मिळून निर्यात उत्पन्नाचा मोठा फायदा शेतकऱ्यांना मिळतो. कृषि क्षेत्राचे विविधिकरण होऊन ते बाजारविरित बनते.

कृषी-प्रक्रिया उद्योग क्षेत्रात पुढील उद्योगांचा समावेश केला जातो. उदा. अन्नधान्य प्रक्रिया उद्योग, फळे व भाज्या प्रक्रिया उद्योग, दुध-प्रक्रिया उद्योग, मांस-प्रक्रिया उद्योग, इ. या उद्योगाचे महत्त्व ओळखून केंद्र शासन व महाराष्ट्र शासनाने या उद्योगांना चालना देण्याचे धोरण आखले आहे.

**नांदेड जिल्ह्यात कृषी उत्पादनाची प्रक्रिया उद्योगासाठी उपलब्धता :**

नांदेड जिल्ह्यात निरनिराळ्या प्रकारची अन्नधान्ये, तेलबिया व डाळी, फळे, भाजीपाला, ऊस, कापूस इत्यादि पिकाखालील सन २००६-०७ चे लागवडी खालील क्षेत्र दाखविले आहे. त्यात तांदूळ, ज्वारी, बाजरी व मका ही प्रमुख अन्नधान्य पिके असून, तेलबिया व डाळीखालील क्षेत्रही मोठे आहे. फळे, भाजीपाला व ऊसही मोठ्या प्रमाणावर घेतला जातो. कापूस हे जिल्ह्याचे प्रमुख नगदी पीक होय (२६१९०० हेक्टर).

वरील सर्व पिकांचे वार्षिक उत्पादन मेट्रिक टनात दाखविले आहे. ज्यापैकी काही उत्पादन कच्चा माल म्हणून व घरगुती वापरासाठी वापरले जाते. ज्याची आकडेवारी तक्त्यात दाखविली आहे. शेवटच्या स्तंभात उपभोगानंतर शिल्लक राहिलेले उत्पादन प्रक्रिया उद्योगासाठी उपलब्ध असल्याचे दाखविले आहे. उदा. कापूस १८,००० मे.टन, फळे १०,००० मे.टन, गहू/तांदूळ ३,५०० मे.टन, तेलबिया १,१०० मे. टन, भाजीपाला ३५,००० मे.टन, ऊस ४,००० मे.टन इत्यादी. या आकडेवारीवरून नांदेड जिल्ह्यात अन्नधान्ये, फळे, भाजीपाला, डाळी, कापूस, मसाले इत्यादिंवर आधारित उद्योग उभारण्यास फार मोठा वाव आहे हे स्पष्ट होते.

अ) कृषि उत्पादने : नांदेड जिल्ह्यात ज्वारी, तांदूळ आणि गहू ही प्रमुख अन्नधान्य पिके असून, सन २००६-०७ यावर्षी या पिकाखाली अनुक्रमे ३०.१५%, ४.७५% व २.०१% जमीन लागवडीखाली होती. कापूस व डाळीच्या लागवडीखालील जमिनीचे प्रमाण अनुक्रमे ३७.४६% व १७.६६% होते. ऊसाखालीही मोठी लागवड केली जाते. ज्वारी व गहू हे शेतकऱ्यांचे प्रमुख अन्नधान्य असल्यामुळे त्यांचा वापर घरगुती उपभोगासाठीही केला जातो. मागील वर्षात, कापूस, सोयाबीन, व ऊसाच्या क्षेत्रात सातत्याने वाढ झाल्याचे दिसते; परंतु त्यामानाने तेलबियांच्या क्षेत्रफळात फारशी वाढ दिसत नाही.

ब) फलोत्पादन : नांदेड जिल्ह्यात सुप्रसिद्ध अर्धापुरी जातीच्या केळीची लागवड केली जाते. त्याशिवाय सिताफळे, केशर आंबा, मोसंबीची लागवड व उत्पादन मोठ्या प्रमाणात होते. परंतु सीताफळांचा १००% तर केळीचा ९०% वापर खाण्यासाठी केला जातो व त्यांची विक्री विक्रेत्याकडून केली जाते. जिल्ह्यात अन्नधान्ये प्रक्रिया व फळप्रक्रिया उद्योग फारसे नसल्यामुळे, त्यांचा वापर सरळ ग्राहकच करतात. त्यामुळे नांदेड जिल्ह्यात अन्न प्रक्रिया व फळ प्रक्रिया उद्योगांना फार मोठा वाव असल्याचे स्पष्ट होते. या उद्योगामुळे, शेतमालाची मूल्यवृद्धी (Value addition) होऊन शेतकऱ्यांच्या उत्पन्नात व रोजगारात मोठी वाढ होऊ शकेल.

आता नांदेड जिल्ह्यात कृषि आधारित उद्योगांची सद्यस्थिती कशी आहे हे पाहू.

**दुग्ध उत्पादन व दुग्धजन्यपदार्थ तयार करणे :**

दूध हे मानवाच्या सदृढ वाढीसाठी एक अतिशय महत्त्वाचे सकस आहार आहे. जिल्ह्याच्या कृषी अर्थव्यवस्थेत पशुपालन व्यवसायाचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. जिल्ह्यात काही भागात देवणी प्रजाती मोठ्या प्रमाणात असून लाल कंधारी प्रजाती हे नांदेड जिल्ह्याचे भूषण आहे. लाल कंधारी गाय कंधार तालुक्यात मोठ्या प्रमाणात आढळते.

येथील दूध उत्पादन हा शेतीवर आधारित पूरक व्यवसाय आहे. शेतकऱ्यांचे आर्थिक जीवनमान सुधारण्यास दुग्ध व्यवसायामुळे मोलाचे सहाय्य झाले. हा उद्योग शेतमजूर, शेतकरी, हमाल, रिक्षा आणि सुशिक्षित बेकार विद्यार्थी या सर्वांना रोजगार उपलब्धी करण्यासाठी फायद्याचा आहे. दिवसेंदिवस डेअरी उद्योगाचे महत्त्व वाढल्याने मोठ्या प्रमाणावर रोजगार

या भागातील शेतकऱ्यांचे जमीन धारण क्षेत्र कमी आहे त्यामुळे बहुसंख्य शेतकऱ्यांकडे सर्व प्रकारची पशुधन संख्या कमी असते. त्यातून दूभती जनावरे देखील कमी संख्येनेच असतात. दूध उत्पादन हा कृषि पूरक व्यवसाय असल्यामुळे शेतकरी प्रामुख्याने ग्रामीण भागातच राहतात आणि वैयक्तिकरित्या त्यांच्याकडील कमी संख्येतील दुभत्या जनावरांचे मिळणारे दूध देखील फारच अल्प प्रमाणात असल्यामुळे त्यांना त्या दूधाकरिता बाजारपेठ मिळवता येत नाही. शिवाय यासाठी शेतकऱ्यांना वेळ देखील मिळत नाही. त्यामुळे ही समस्या सोडविण्यासाठी गावपातळीवर सहकारी दूध संस्था किंवा सोसायट्या स्थापन झाल्या आणि त्या सोसायट्यांमार्फत दूध संकलन करून त्यास बाजारपेठ व योग्य किंमत मिळवून दिली जाऊ लागली. मात्र नांदेड जिल्ह्यात जिल्हा अथवा तालुका दूध सहकारी संघ कार्यान्वित नाहीत. सन १९७८-७९ पासून शासकीय दूध योजना नांदेडमार्फत नांदेड जिल्ह्यात दूध संकलनाचे काम हाती घेण्यात आले.

जून, १९८७ अखेर जिल्ह्यामध्ये दुग्ध व्यवसायाच्या ४२७ कृषि बिगर पतसंस्था होत्या.[७२] या संस्थांची एकूण सभासद संख्या २३,००५ होती. जून, १९७७ ला संपणाऱ्या आर्थिक वर्षामध्ये या संस्थांनी गुंतविलेले भाग भांडवल ६,७६ हजार रुपये तर खेळते भांडवल ५४,६७ हजार रुपये होते तर संस्थांनी राखीव व इतर निधी स्वरुपात ८,४७ हजार रुपये गुंतविले होते. या कालावधीमधील या सहकारी संस्थांनी १७५.११ लाख रुपये किमतीची दूधाची खरेदी तर २१४.५५ लाख रुपये किमतीची विक्री केली होती.

३१ मार्च १९९० पर्यंत जिल्ह्यात दूध संकलन व विक्री करणाऱ्या ५४६ नोंदणी झालेल्या प्राथमिक दूध सहकारी संस्था होत्या. त्यापैकी वर्षभर सुरू राहणाऱ्या संस्था २०७ होत्या तर ८० संस्था पुष्ट हंगामात सुरू राहणाऱ्या होत्या.[73]

सन २००३-०४ मध्ये जिल्हा दूध संकलन व विक्री करणाऱ्या ५५३ संस्था होत्या. या संस्थांची सभासद संख्या २९०८५ होती. संस्थेने ३०६ हजार रुपये भाग भांडवल तर १,४१ हजार रुपये खेळते भांडवल होते. या कालावधीत जिल्ह्यातील दुग्ध व्यवसाय सहकारी संस्थांनी ९५४५ हजार रुपये किमतीच्या दुधाची खरेदी व १०१४५ हजार रुपयांची विक्री केली होती.[74]

जिल्ह्यातील दुग्धजन्य उत्पादन निर्मितीचा सन १९९० ते २००४ या कालावधीचा तपशील पुढील तक्त्यानुसार आहे :—

| तपशील | १९९०-१९९१ | १९९५-१९९६ | १९९९-२००० | २००३-२००४ |
|---|---|---|---|---|
| प्राथमिक दूध संस्था | ३६० | ४७५ | ६१० | ५५३ |
| सभासद (संख्या) | १,४४,४५ | — | — | २९,०८५ |
| वसूल भाग भांडवल | १८,४०,०० | २४,२०,०० | ३१,२०,०० | ३०६,००० |
| राखीव व इतर निधी | १८०,०० | २४०,०० | ३१,००० | १४१,००० |
| दूध खरेदी (लिटर) | १२,४३३ | १३,२९८ | ८,६६६ | २,१२४,००० |

**दुग्धजन्य उत्पादने :** यामध्ये दूध, दही, ताक, श्रीखंड, पनीर, लोणी इत्यादींचा समावेश होतो. दूध विक्रीशिवायचे अतिरिक्त दुधापासून दूध भुकटी, पांढरे लोणी उत्पादित केले जाते. लोणी ठराविक तापमानापर्यंत तापवून त्याचे तूप बनते. संकलित झालेल्या कच्च्या दुधाची टिकाऊ क्षमता वाढविण्यासाठी ते पाश्चरायझर या संयंत्राद्वारे निर्जंतुकीकरण केले जाते. यासाठी दूध ७२.५° सें. पर्यंत तापवून ते १६ सेकंदात ५° सें. पर्यंत थंड केले जाते. दुधाचे दूध भुकटी व पांढऱ्या लोण्यामध्ये रुपांतर करताना दुधातील फॅट (मलई) हे विभक्तीकरण संयंत्राद्वारे वेगळे केले जातात व या फॅटचे रुपांतर संयंत्राद्वारे पांढऱ्या लोण्यामध्ये केले जाते. या विभक्तीकरणातून मिळालेले स्निग्धांश विरहित दूध संयंत्रामध्ये आटवून त्यापासून स्प्रे ड्राईंग पद्धतीने दूध भुकटीमध्ये रुपांतर केले जाते.

७२. **जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन**, नांदेड जिल्हा, १९८६-८७, पृ. १०४.

७३. **यथार्थदर्शी योजना, नांदेड जिल्हा** १९९२-९३ ते १९९६-९७, पृ. ७०-७१.

७४. जि.सा.व.आ.स., नांदेड जिल्हा, २००३-२००४, पृ.

सन १९८१-१९८२ मध्ये लोणी, मलई, खवा, तूप वगैरे बनविणाऱ्या एकमेव नोंदणीकृत उद्योग जिल्ह्यामध्ये होता व हा उद्योगदेखील बंद झालेला होता.[७५] सन १९८६ मध्ये मात्र दुग्धजन्य पदार्थांचे दोन नोंदणीकृत उद्योग जिल्ह्यामध्ये होते, त्यापैकी एक उद्योग बंद होता तर उर्वरित एका उद्योगामध्ये १०० कामगार कार्यरत होते.[७६]

सन २००१-२००२ मध्ये या उद्योगाचे २ नोंदणीकृत कारखाने होते व त्यापासून ४५९ व्यक्ती कार्यरत होत्या.[७७]

ऑगस्ट, २०१० अखेर जिल्ह्यामध्ये धनश्री दूध वस्तू खाजगी कंपनी, गजानन दुग्ध उद्योग, अमृत खाद्य उद्योग यासारखे काही महत्त्वाचे उद्योग लघुउद्योग स्वरूपात कार्यरत आहेत.[७८]

जिल्ह्यातील काही महत्त्वाच्या दुग्ध व दुग्धजन्य उद्योगांच्या स्थापनेचा तपशील तक्ता क्र. १६ मध्ये दर्शविण्यात आला आहे.

### बिबा-गोडंबी गृहोद्योग♦:

नांदेड जिल्ह्यामध्ये विशेषतः कंधार, मुखेड व लोहा या भागात पारंपरिक गृहोद्योगांमध्ये बिब्यापासून गोडंबी उत्पादन करणे व बिब्याचे तेल काढणे हा व्यवसाय केला जातो. प्रामुख्याने भोई समाज यात सहभागी असून पुरुष व विशेषत्वाने महिला यात कार्यरत असतात. परंपरेने चालू असलेला हा उद्योग अल्प प्रमाणात असला तरी गोडंबी उत्पादन कुटुंबाला पुरेसे आर्थिक पाठबळ उपलब्ध करून देणारा उद्योग ठरला आहे. गोडंबीच्या औषधी गुणधर्मामुळे व विशेषतः स्त्रियांसाठी बाळंतपणात एक पौष्टिक खाद्य म्हणून त्याचा प्रामुख्याने उपयोग केला जातो. गरीबांचा काजू म्हणून याकडे पाहिले जाते. बिब्यापासून गोडंबी काढणे व तेल उत्पादन करणे हे अत्यंत कष्टप्रद काम आहे. असे असले तरी अलिकडे महिला बचत गट चळवळीने या उद्योगाला मोठ्या प्रमाणावर चालना मिळाली आहे. उदा. कंधारमधील या बचत गटांचा प्रामुख्याने उल्लेख केला जातो.

या परिसरातील भौगोलिक स्थितीचा विचार करता बिबा वृक्ष लागवड जाणीवपूर्वक मोठ्या प्रमाणात केली जाऊ शकते. तथापि बचत गटांच्या चळवळीमुळे गोडंबी उत्पादनाला मोठ्या प्रमाणात मागणी प्राप्त झाली आहे. परिणामतः राज्याबाहेरून देखील बिब्याची आयात केली जाते व या आयात केलेल्या मालातून गोडंबी व रासायनिक तेलाची निर्मिती केली जाते. वर्षभर रोजगार उपलब्ध करून देणारा हा उद्योग अधिक शास्त्रीय पद्धतीने विकसित केला व जाणिवपूर्वक वृक्षारोपण केले तर तो खऱ्या अर्थाने फायदेशीर ठरू शकेल. स्थानिक रोजगार निर्मितीचे साधन म्हणून या उद्योगाकडे बघता येऊ शकते.

---

७५. पूर्वोक्त, १९८२-८३, पृ. १०५.

७६. कित्ता, १९८६-८७, पृ. ७९.

७७. कित्ता, २००१-०२, पृ. ४४.

७८. डॉ. जयंत जोशी, संचालक, बी.सी.यु.डी., स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड यांच्याकडून प्राप्त माहितीवर आधारित.

♦ प्रत्यक्ष कार्यालयीन सर्वेक्षणाच्या आधारे ही नोंद घेण्यात आली आहे. २०१०.

जिल्ह्यातील कच्च्या स्वरूपात उपलब्ध होणाऱ्या कृषी उत्पादनांची उपलब्धता व कृषी व अन्नप्रक्रीया उद्योगांची सद्यःस्थिती पुढील तक्त्यांद्वारे दर्शविली आहे.

**नांदेड जिल्ह्यात कच्च्या स्वरुपात उत्पादीत होणाऱ्या कृषि उत्पादनांची उपलब्धता**

| अ.क्र. | पिकाचा प्रकार | लागवडीखालील क्षेत्र (२००६-०७) (हेक्टर) | वार्षिक उत्पादन (मे.टन) | कच्चा माल/उपभोगासाठी वापर (मे.टन) | प्रक्रियेसाठी उपलब्ध माल (मे.टन) |
|---|---|---|---|---|---|
| १ | अन्नधान्ये | | | | |
| | (अ) गहू/तांदुळ | ५४८०० | ४८५८१ | ४५९२ | ३५०० |
| | (ब) ज्वारी, बाजरी, मका | २३०४०० | २७८३८६ | ७७० | ५०० |
| २ | तेलबिया व डाळी | | | | |
| | (अ) तेलबिया | ६४५१४ | १५४१२ | १३३३ | ११०० |
| | (ब) डाळी | १६४८०० | ८४९२१ | ३३५ | १५० |
| ३ | फळे | ३५०९८ | ४७५६७५ | ४६५६७५ | १०००० |
| ४ | भाजीपाला | १०९०० | ६८४८५ | ६०००० | ३५००० |
| ५ | औषधी वनस्पती | १०० | १२४ | १२४ | १२० |
| ६ | ऊस | १३५०० | ४७१७ | ४५०० | ४००० |
| ७ | मसाले | ७९०० | १६६८० | १६००० | १२००० |
| ८ | कापूस | २६१९०० | ३९२७५ | ३९००० | ३८००० |

संदर्भ : पोटेन्शिअल लिंक्ड क्रेडीत प्लॅन ऑफ नांदेड डिस्ट्रिक्ट २००८-२००९, नाबार्ड, पृ. ८६.

**नांदेड जिल्ह्यातील कृषि व अन्नप्रक्रिया उद्योगांची सद्यःस्थिती :**

i) तक्ता क्र. ५.३ मध्ये नांदेड जिल्ह्यातील कृषि व अन्नप्रक्रिया उद्योगांची सद्यःस्थिती दाखविली आहे. त्यामध्ये पहिल्या प्रकारात अन्नधान्ये व डाळीवर आधारित प्रक्रिया उद्योग दाखविले आहेत, त्यामध्ये तेलगिरण्या १४ तालुक्यांत असून त्यांची एकूण संख्या ९२ आहे. त्यांची स्थापित क्षमता ४७२ मे. टन असून त्यापैकी फक्त २३५.५ मे. टनाचा (४९.८%) प्रत्यक्ष वापर करण्यात आला. याशिवाय दालमिल्स (३२), भातगिरण्या (२३), पशुखाद्य, (२) पापड उद्योग (२०), गुळ प्रक्रिया (१२) तर बेकरी उद्योगांची संख्या (४६) आहे.

ii) इतर पिके : यामध्ये औषधी वनस्पतींचा समावेश असून, त्यावर आधारित ४ कारखाने अस्तित्वात आहेत.

iii) दूध व दुग्धजन्य पदार्थ : अ) नांदेड जिल्ह्यात दूध व्यवसाय वाढीस मोठा वाव आहे. सध्या जिल्ह्यातील १६ विकास गटांत ९७ संस्था कार्यरत आहेत. त्यांची स्थापित क्षमता ९४७ मे. टन असून या क्षमतेचा १००% वापर केला जातो.

iv) कापूस : कापूस हे नांदेड जिल्ह्याचे प्रमुख नगदी पीक होय. साहजिकच कापसावर आधारित जिनिंग, प्रेसिंग व कापड उद्योगाची स्थापना जिल्ह्यात करण्यात आली आहे. या उद्योगांची स्थापना फक्त एकाच विकास गटात झाली असून त्यांची एकूण संख्या २६ आहे. त्यांची वार्षिक स्थापित क्षमता २०४ मे.टन असून या स्थापित क्षमतेचा प्रत्यक्ष वापर १५४ मे.टन किंवा ७५% झाला आहे.

**विकास गटनिहाय उद्योगांची स्थापना :** जिल्ह्यातील तालुक्यामधील विकास असमतोल कमी करणे हे जिल्हा नियोजनाचे एक प्रमुख उद्दिष्ट मानले जाते. समतोल औद्योगिकरणाच्या सहाय्याने हा असमतोल कमी करणे शक्य असते. या दृष्टीकोनातून नांदेड जिल्ह्यातील १६ विकास गटांत, पापड उद्योग, बेकरी, डेअरी व दुग्धजन्य पदार्थांचे उद्योग स्थापन झालेले दिसतात. तसेच तेलगिरण्या १४ विकास गटांत स्थापन झाल्या आहेत. परंतु डाळगिरण्या ८ विकास गटात तर गूळ प्रक्रिया उद्योग ४ तालुक्यात केंद्रित झाले आहेत. कापसावर आधारित उद्योग मात्र फक्त एकाच विकास गटात केंद्रित झाले आहेत.

अशाप्रकारचा औद्योगिक असमतोल निर्माण होण्याची पुढील कारणे असतात.

i) नैसर्गिक साधन संपत्ती : ज्या तालुक्यात पाणी, जमीन व हवामान अनुकूल असते त्या तालुक्यात कृषिवर आधारित उद्योग शक्य असते, कारण अशा तालुक्यात कृषीचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होते. ii) भांडवल व उद्योजकता : उद्योगासाठी भांडवलाची गरज असते, परंतु आता एकूण भांडवलाच्या साधारण ७५% ते ९०% भांडवल बँकांमार्फत मिळू शकते. परंतु जनतेमध्ये उद्योजकतेचा गुण असणे आवश्यक आहे. तालुक्यातील सुशिक्षीत तरुणांमध्ये कुशलता व उद्योगशीलता निर्माण केल्यास त्या तालुक्याचा औद्योगिक विकास करणे सहज शक्य आहे.

**नांदेड जिल्ह्यात नव्या कृषि व अन्नप्रक्रिया उद्योगांची क्षमता :**

नांदेड जिल्ह्यात निर्माण होणारे अतिरिक्त अन्नधान्य व कृषिमाल उत्पादन लक्षात घेता जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर नवे उद्योग स्थापन करण्याची क्षमता आहे असे वाटते. तांत्रिकदृष्ट्या योग्य व वित्तीयदृष्टीने फायदेशीर ठरणाऱ्या अशा उपक्रमांना बँकाही मोठ्या प्रमाणावर अर्थसहाय्य करण्यास तयार आहेत. हे तक्ता क्र. ५.४ वरून स्पष्ट होईल.

नॅशनल बँक फॉर ॲग्रिकल्चर अँड रुरल डेव्हलपमेंटने (नाबार्ड), नांदेड जिल्ह्यात सन २००७-०८ व सन २००८-०९ या दोन वर्षासाठी कोणकोणते नवे कृषि आधारित उद्योग सुरू करता येतील याची माहिती पुढील तक्त्यामध्ये दिली आहे. त्याआधारे पुढील विश्लेषण केले आहे.

**१) फळावर आधारित उद्योग :** नांदेड जिल्ह्यात निरनिराळ्या फळांचे उत्पादन मोठ्या प्रमाणात घेतले जाते हे पूर्वी सांगितलेच आहे. या फळांवर आधारित प्रक्रिया उद्योग सुरू केल्यास शेतकऱ्यांना मुल्यवृद्धीचा लाभ होऊन त्यांच्या रोजगारातही वृद्धी होईल हे स्पष्ट आहे.

अ) केळीचे वेफर्स : नांदेड जिल्ह्यात उत्तम प्रतीच्या केळींचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होते, त्यामुळे या जिल्ह्यात केळीच्या वेफर्स/चिप्सचे कारखाने मोठ्या प्रमाणावर काढता येतील. या उद्योगास

छोट्या (Tiny) उद्योगाचा दर्जा देण्यात आला असून एका उद्योगाचा भांडवली खर्च फक्त रु. ५०,००० आहे. सन २००७-०८ साली ६ उद्योग घटक तर सन २००८-०९ यावर्षी जिल्ह्यात १० उद्योग घटक नियोजित केले आहेत. या १६ उद्योग घटकांना एकूण रु. ८ लक्ष भांडवली खर्च अपेक्षित आहे, ज्यापैकी बँका रु. ६.४० लक्ष कर्ज म्हणून उपलब्ध करून देतात. (८०%)

ब) टोमॅटो ज्यूस/केचप : हा उद्योगसुद्धा छोट्या (Tiny) उद्योगात मोडतो. टोमॅटो विकण्यापेक्षा टोमॅटो केचपचे उत्पादन केल्यास शेतकऱ्यांना अधिक उत्पन्न मिळू शकेल. या उद्योगाचा एकक भांडवली खर्च रु. २ लक्ष असून, सन २००७-०८ यावर्षी ३ उद्योग घटकांची स्थापना नियोजित केली आहे. त्यावर एकूण रु. ६ लक्ष भांडवली खर्च अपेक्षित असून त्यापैकी बँकेकडून रु. ४.८ लक्ष कर्ज म्हणून उपलब्ध होऊ शकतील. सन २००८-०९ साली मात्र एकक उद्योगाचा भांडवली खर्च रु. ५ लक्षापर्यंत वाढला आहे. यावर्षी १० उद्योग घटकांची स्थापना नियोजित केली आहे, त्यामुळे एकूण भांडवली खर्च रु. ५० लक्ष झाला आहे, ज्यापैकी ८०% भांडवल (४० लक्ष रुपये) बँक कर्ज म्हणून मिळू शकतील.

**२) डाळी व तेलबिया :** डाळी व तेलबियांवर आधारित अनेक उद्योग नांदेड जिल्ह्यात सुरू करण्यास मोठा वाव आहे. त्यात प्रामुख्याने १) डाळ मिल्स, २) डाळ मिल्स (मध्यम उपक्रम), ३) सोयाबीनवर आधारित तेल गिरण्या, ४) बेकरी उद्योग, व ५) दुग्धपदार्थ यांचा समावेश होतो. या सर्व उद्योगांचे संक्षिप्त वर्णन पुढे दिले आहे.

अ) डाळ मिल्स : डाळ मिल्सचा समावेश लघुउद्योगात (Small Scale Industries) केला जातो. एका डाळ मीलचा भांडवली खर्च रु. ५ लक्ष असून नांदेड जिल्ह्यात सन २००७-०८ साली ८ तर सन २००८-०९ यावर्षी २० डाळमिल्स नियोजित आहेत. या २८ डाळ मिल्सचा एकूण भांडवली खर्च रु. १४० लाख असून त्यापैकी ७५% रक्कम बँकेतर्फे कर्जाऊ दिली जाते.

डाळ मिल्सच्या दुसऱ्या प्रकारात मिनी डाळ मिल्सचा समावेश होतो म्हणून त्यांचा समावेश ग्राम/कुटीर उद्योगात केला जातो व त्यांना बँकेतर्फे दिले जाणारे कर्ज भांडवली खर्चाच्या ८०% असते. अशा मिनी डाळ मिलचा प्रत्येकी भांडवली खर्च रु. १.५ लाख असून नांदेड जिल्ह्यात सन २००७-०८ साली १५ तर सन २००८-०९ साली ५० मिनी दालमिल्स नियोजित आहेत. त्यांना लागणारा एकूण भांडवली खर्च रु. ९७.५० लक्ष असून त्यापैकी रु. ७८ लक्ष बँकेकडून कर्जाऊ मिळू शकतात.

ब) तेलगिरण्या : नांदेड जिल्ह्यात सोयाबीनचे पीक मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. साहजिकच सोयाबीनवर आधारित तेलगिरण्या स्थापन करण्यात जिल्ह्यात मोठा वाव आहे. तेलगिरण्यांचा समावेश लघुउद्योगात केला जातो, त्यामुळे या उद्योगांना बँकेतर्फे एकूण भांडवली खर्चाच्या ७५% कर्ज दिले जाते. एक तेलगिरणी उभारण्याचा भांडवली खर्च रु. १० लक्ष आहे. नांदेड जिल्ह्यात सन २००७-०८ साली ६ तर सन २००८-०९ यावर्षी १० तेलगिरण्या प्रस्तावित आहेत. त्यांचा एकूण भांडवली खर्च रु. १९० लक्ष आहे, ज्यापैकी रु. १२० लाख बँक कर्ज म्हणून उपलब्ध आहेत.

क) बेकरी उद्योग : हा एक सर्वसामान्य व महत्त्वाचा अन्नप्रक्रिया उद्योग होय. या उद्योगाचा समावेश सुद्धा ग्राम/कुटीर उद्योगात केला जातो व त्यामुळे बँकातर्फे या उद्योगांना एकूण भांडवली खर्चाच्या ८०% बँक कर्ज दिले जाते. या उद्योगाचा एकक भांडवली खर्च रु. ५ लक्ष असून नांदेड जिल्ह्यात सन २००७-०८ साली ४ तर सन २००८-०९ यावर्षी १० बेकरी उद्योग नियोजित आहेत. त्यांना लागणारा एकूण भांडवली खर्च रु. ७० लक्ष असून त्यापैकी रु. ५६ लक्ष बँकेकडून कर्जाऊ मिळू शकतील.

ड) दुग्धजन्य पदार्थ : या उद्योगाचा समावेश ग्राम/कुटीर उद्योगात केल्यामुळे त्यांना एकूण भांडवली खर्चाच्या ८०% भांडवल बँक कर्ज म्हणून उपलब्ध होऊ शकते. या उद्योगाचा एकक भांडवली खर्च रु. ५ लक्ष असून, नांदेड जिल्ह्यात सन २००७-०८ साली ५ व सन २००८-०९ साली १५ उद्योग प्रस्तावित आहे. या सर्व उद्योगांना येणारा एकूण भांडवली खर्च रु. १०० लक्ष असून त्यापैकी ८०% रक्कम (रु. ८० लक्ष) बँक कर्ज म्हणून उपलब्ध आहेत.

**कृषि व अन्नप्रक्रिया उद्योग यशस्वी करण्याचे उपाय :**

यापूर्वीच्या भागात नांदेड जिल्ह्यात अनेक प्रकारची फळे, अन्नधान्ये व कापूस व सोयाबीनसारखी नगदी पिके मोठ्या प्रमाणावर घेतल्यामुळे त्यांचा वापर अन्नप्रक्रिया व कृषि आधारित कच्च्या मालावर करून अनेक उद्योग जिल्ह्यात स्थापन करता येतील हे आकडेवारीसह पाहिले. परंतु हे उद्योग प्रत्यक्षात येऊन यशस्वी करणे तेवढेच महत्त्वाचे आहे. या संदर्भात काही प्रमुख सुचनांचा येथे उल्लेख करू.

अ) जिल्हा उद्योग केंद्राने जिल्ह्यातील शेतकऱ्यांमध्ये उद्योजकता (Enterpreneurship) निर्माण करण्यात पुढाकार घ्यावयास हवा. ग्रामीण भागातील तरूण शेतकऱ्यांना देऊन त्यांना कृषिवर आधारित उद्योग काढण्यास प्रोत्साहन द्यावयास हवे. त्यांना त्यांच्या जिल्ह्यात कृषि आधारित उद्योगाची सविस्तर माहिती आदर्श प्रकल्प अहवालाद्वारे देणे गरजेचे आहे. नाबार्डसारख्या वित्तीय संस्था अशाप्रकारचे आदर्श प्रकल्प अहवाल नेहमीच प्रसिद्ध करते. बँकांनी त्यांचा वापर करून तरूणांना उद्योग स्थापन करण्यास प्रवृत्त करावे. उदा. मिनी डाळ मील, फळ प्रक्रिया उद्योग, तेलगिरण्या वगैरे. हे सर्व उद्योग कसे व्यवहार्य (Feasible) व फायदेशीर आहेत (Profitable) हे शेतकऱ्यांना पटवून देणे आवश्यक आहे.

ब) प्रशिक्षण : उद्योजकांना उद्योगातील तंत्रज्ञान, वित्तीय व्यवस्थापन, बाजारपेठ इत्यादींचे प्रशिक्षण सातत्याने देणे गरजेचे आहे. हे काम महाराष्ट्र राज्य उद्योजकता विकास संस्था व जिल्हा उद्योग केंद्राने संयुक्तरीत्या करणे गरजेचे आहे. सध्या हे काम या संस्था करीतच आहेत, त्यास अधिक गती यावयास हवी.

क) नांदेड जिल्ह्यात वरील उद्योग सुरू करून यशस्वी करण्यासाठी पुढील सूचना करता येतील.

१) आदर्श डाळ मील प्रकल्प : जिल्हा उद्योग केंद्र व बँकांनी संयुक्तपणे जिल्ह्यातील योग्य ग्रामीण उद्योजकांचा शोध घेऊन त्यांना हे उद्योग ग्रामीण भागात सुरू करण्यास उद्युक्त करावे.

Maharashtra State Gazetteers

२) फूड पार्कची स्थापना : नांदेड, कृष्णुर व देगलूर येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने तेथे अन्नप्रक्रिया पार्कची उभारणी करावी, त्यासाठी हवी असणारी आर्थिक मदत केंद्र सरकारच्या अन्न व प्रक्रिया मंत्रालयाकडून घेऊन त्यांचा वापर या उद्योग क्षेत्रात मूलभूत पायाभूत सोयी निर्माण करण्यासाठी करावा.

३) नांदेड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर फळांचे उत्पादन होते. त्यात बोर, पेरू, सीताफळ, मोसंबी, आंबा व केळी इत्यादींचा समावेश होतो. अशा फळांवर आधारित अनेक फळ प्रक्रिया उद्योग नांदेड, मुदखेड, अर्धापूर आणि कंधार विकास गटात स्थापन केल्यास शेतकऱ्यांना ही फळे घटत्या भावाने विकावी लागणार नाहीत.

४) धर्माबाद, देगलूर आणि बिलोली विकास गटात दालमिल्स आणि मिरची व हळदीची पूड तयार करण्याचे प्रक्रिया उद्योग "केंद्रीत विकास कार्यक्रमांतर्गत" (Cluster Development Approach) मोठ्या प्रमाणावर उभारणे शक्य आहे. तसेच मुदखेड, देगलूर व धर्माबाद विकासगटात याच कार्यक्रमांतर्गत पशुखाद्याचे उद्योग सुरू करण्यास वाव आहे.

५) सध्या जिल्ह्यात ३२ डाळ गिरण्या कार्यरत आहेत. जिल्ह्यात आता "डाळ प्रक्रिया व निर्यात मंडळाची" स्थापना करणे गरजेचे आहे, ज्यामुळे डाळींच्या प्रक्रिया केलेल्या मालाला मोठी निर्यात बाजारपेठ मिळू शकेल. राष्ट्रीय समविकास योजनेंतर्गत शेतकऱ्यांना डाळगिरण्या व इतर कृषि आधारित उद्योग सुरू करता येतील. यासाठी जिल्ह्यातील कृषि विभाग व जिल्हा ग्रामविकास प्राधिकरण (DDRA) यांचे समन्वय व सहकार्य घ्यावे लागेल.

**विकास गटनिहाय/तालुकानिहाय प्रक्रिया उद्योगांची नियोजित स्थापना (२००८-०९) :**

जिल्ह्याचा समतोल विकास हे जिल्हा नियोजनाचे एक प्रमुख उद्दिष्ट मानले जाते. त्यामुळे प्रत्येक तालुक्याची विकासक्षमता लक्षात घेऊन नांदेड जिल्ह्यातील १६ तालुक्यात सन २००८-०९ या वर्षी कोणकोणत्या स्वरुपाचे अन्नप्रक्रिया उद्योग स्थापन करणे शक्य आहे, हे तक्ता क्र. ५ मध्ये दाखविले आहे.

नांदेड जिल्ह्यात एकूण १६ तालुके/विकासगट असून प्रत्येक तालुक्यातील पीक रचना, पायाभूत सोई, बँकींगच्या सोई व उद्योजकता लक्षात घेऊन निरनिराळ्या तालुक्यात वेगवेगळ्या प्रकारचे छोटे (Tiny) व लघुउद्योग प्रस्तावित केले आहेत. फक्त माहूर तालुका वगळता इतर १५ तालुक्यात अनेक अन्नप्रक्रिया व कृषि आधारित उद्योग प्रस्तावित केले आहेत. नांदेड तालुक्यात सर्वाधिक म्हणजेच एकूण रु. ११२.५० लाख भांडवल गुंतवणूक प्रस्तावित आहे. त्यानंतर बिलोली (रु. ५२.५० लाख), कंधार (रु. ३५.०० लाख), हदगाव (रु. ३२.५० लाख) असा क्रम लागतो. मुदखेड व किनवट तालुक्यांत भांडवल गुंतवणूक किमान म्हणजे प्रत्येकी रु. ५ लाख आहे. वरील तालुक्यांत प्रामुख्याने केळीचे वेफर्स, टोमॅटो ज्यूस, दालमिल्स, सोयाबीनच्या तेलगिरण्या, बेकरी उद्योग व दुग्ध पदार्थांचा समावेश होतो. वरील प्रकारचे कृषिउद्योग प्रत्यक्षात स्थापन झाल्यास शेतकऱ्यांच्याच नव्हे तर सामान्य ग्रामीण जनतेच्या रोजगारात व उत्पन्नात मोठी वाढ होईल यात शंका नाही. तसेच त्यामुळे तालुक्या-तालुक्यातील विकासाची विषमता कमी होण्यास मदत होईल.

**नांदेड जिल्ह्यातील कृषि व अन्नप्रक्रिया उद्योगाची सद्यस्थिती (२००८-०९)**

| पिकाचे नाव | प्रक्रिया उद्योग | विकास गटांची संख्या जेथे प्रक्रिया उद्योग सुरू आहेत | अस्तित्वात असलेले उद्योग (संख्या) | स्थापित क्षमता (मे. टन) | क्षमतेचा वापर % | उद्योगांसाठी भांडवल पुरवठा |
|---|---|---|---|---|---|---|
| अन्नधान्य व डाळी | (i) तेलगिरण्या | १४ | ९२ | ४७२.०० | २३५.५ (४९.८%)* | बँक कर्ज |
| | (ii) दालमिल्स | ८ | ३२ | २६३.०० | १३.५ (५.०%) | बँक कर्ज |
| | (iii) भातगिरण्या | . . | २३ | १८३०.८३ | १०१.२ (५.५%) | बँक कर्ज |
| | (iv) पशुखाद्य | २ | ७ | ६०.०० | ३०.०० (५०.०%) | बँक कर्ज |
| | (v) पापड उद्योग | १६ | २० | ४०.०० | २०.०० (५०.०%) | बँक कर्ज |
| | (vi) गूळ प्रक्रिया | ४ | १२ | २४.०० | १३.०० (५४.२%) | बँक कर्ज |
| | (vii) बेकरी | १६ | ४६ | ९२.०० | ४७.०० (५१.०%) | बँक कर्ज |
| इतर पिके | औषधी वनस्पती | १ | ४ | ८१८.०० | ७५६.०० (९२.०%) | बँक कर्ज |
| दूध | (i) डेअरी | १६ | ९७ | ९४७.०० | ९४७.०० (१००%) | बँक कर्ज |
| | (ii) गोडपदार्थ | १६ | ४० | १४७.०० | १४७.०० (१००%) | बँक कर्ज |
| कापूस | जिनिंग, प्रेसिंग व कापड उद्योग | १ | २६ | २०४.०० | १५४.०० (७५.०%) | बँक कर्ज |

Maharashtra State Gazetteers

**खाद्यतेल उद्योग—**

खाद्यतेल उद्योग हा जिल्ह्यातील कापूस, वटण व दाबणी पाठोपाठचा दोन नंबरचा प्रक्रिया उद्योग आहे. कापूस व भूईमूग हे जिल्ह्यातील महत्त्वाचे नगदी पीक असल्याने जिल्ह्यातील खाद्यतेल गळीतावर आधारीत कृषी उद्योगांच्या निर्माणास मदत झाली.[७९] नांदेड, देगलूर, कंधार, धर्माबाद, मुखेड, लोहा आणि बटमोगरासारख्या मुख्य भुईमूग उत्पादन क्षेत्रांजवळ भुईमूगापासून तेल गाळण्याच्या गिरण्या निर्माण झाल्या.

* कंसातील आकडे क्षमतेचा शेकडा वापर दर्शवितात.

७९. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, १९७१, पृ. २५६.

१९५१ मध्ये जिल्ह्यात जवळपास १०० माणसांना रोजगार पुरविणाऱ्या ४ तेल गिरण्या होत्या.[८०] तर १९५७ च्या सुमारास ३०० तेल घाणी आणि ८ तेल गिरण्या होत्या.[८१] यामध्ये उत्तरोत्तर वाढ झालेली दिसून येते. १९६० मध्ये खाद्यतेलाचे ६१ उद्योग होते. ज्यामध्ये १९१ कामगार कार्यरत होते. तसेच वनस्पती तेलाचे २ मोठे उद्योग तर १० लघुउद्योग सुरू होते. ज्यामध्ये अनुक्रमे ७४ व ११९ व्यक्तींना रोजगार प्राप्त झाला होता.[८२] जिल्ह्यातील ७ तेलगिरण्यांद्वारे दर दिवशी सरासरी २३५ कामगारांना रोजगार पुरविला जात असे. यापैकी देगलूर येथील तेल गाळणीच्या मोठ्या कारखान्याद्वारे ९० लोकांना रोजगार प्राप्त झाला होता. या कालावधीमधील नांदेड जिल्ह्यातील एकूण तेलगिरण्यांचे स्थिर भांडवल ४ लाख रुपये तर खेळते भांडवल दोन लाख ते तीन लाखांदरम्यान होते. साधारणपणे १२ ते १५ कामगारशक्ती असलेल्या आणि वर्षातील २०० दिवस कार्यरत असलेल्या तेल गिरण्यांमधील स्थिर संपत्तीच्या ६० टक्के भाग मशिनरी आणि सुट्या भागांमध्ये गुंतविलेला होता. खेळत्या भांडवलामधील मोठा भाग कच्च्या मालाच्या खरेदीसाठी वापरण्यात येत असे. प्रत्येक गिरणीचे सरासरी वार्षिक पगार देयक रु. ८००० होते, तर गिरण्यांची १९७० च्या सुमारास वार्षिक प्राप्ती १५ लाख रुपये होती.[८३]

निर्मिती प्रक्रियेमध्ये मुख्यत्वेकरून खनिज तेल अथवा डिझेल, कोळसा आणि विद्युतशक्ती वापरली जाते. १९६२-६३ मधील नांदेड जिल्ह्यातील तेल गिरण्यांची इंधनाची मागणी रु. ५००० ते रु. ७००० एवढी होती. सन १९६०-७० या कालवधीमध्ये तेलघाणी हा जिल्ह्यातील महत्त्वाचा कुटीरोद्योग होता आणि तो मुख्यत्वेकरून नांदेड, कुंडलवाडी, देगलूर, किनवट आणि धर्माबाद येथे स्थापन झालेला होता. जिल्ह्यामध्ये या उद्योगसंस्थेमध्ये ७५० कारागीर कार्यरत होते. त्यापैकी मुख्यत्वेकरून धर्माबाद येथे १००, देगलूरमध्ये ५० तर कुंडलवाडी आणि नांदेड येथे अनुक्रमे १५० आणि २०० कारागीर तेलनिर्मिती क्षेत्रात होते. देगलूरमध्ये २, धर्माबाद ३, नांदेड येथे ४ तेलनिर्मिती उद्योग होते. तर किनवट येथील उद्योगाचे स्वरुप हंगामी होते.

भुईमूग, करडई, तीळ इत्यादी स्वरुपाचा उद्योगाकरीता आवश्यक असलेला कच्चामाल धर्माबाद, देगलूर, नांदेड आणि कुंडलवाडी येथून उपलब्ध होत असे. एरंडेलच्या बीया, तीळ आणि अंबाडीच्या बीयादेखील तेल निर्मितीसाठी वापरल्या जात. १९६१-६२ मध्ये कच्च्या मालाच्या किमती भुईमूग प्रती क्विंटल रु. १०० ते १५०, तीळ प्रामुख्याने किनवट येथे १०० रुपये/क्विंटल तर करडई ४५ ते ५५ रुपये प्रमाणे होत्या.

तेलनिर्मिती प्रक्रियेमध्ये कोलू घाण्या, नूतन घाण्या, पाखडण्याचे पंखे आणि चाळण इत्यादी तंत्र आणि सामग्री वापरली जात असे. तेलनिर्मिती प्रक्रियेदरम्यान तेल हे मुख्य उत्पादन असून तेलाची भुकटी हे दुय्यम उत्पादन असते. या कालावधीमधील दोन ते तीन कारागीर एका महिन्यामध्ये

८०. कित्ता, पृ. २६३.

८१. **कल्याणकारी राज्याची वाटचाल**, महाराष्ट्र शासन, वर्ग १९५७, पृ. २३.

८२. पूर्वोक्त, **नांदेड जिल्हा गॅझेटिअर**, पृ. २५७.

८३. **कित्ता, नांदेड जिल्हा गॅझेटिअर**, पृ. २६३-२६४.

६ ते ७ क्विंटल तेलाची निर्मिती करत. धर्माबादमध्ये हाताने तेल निर्मितीची प्रक्रिया अवलंबीली जात असे. उत्पादीत तेल आणि इतर उपउत्पादने स्थानिक बाजारपेठेमध्ये विकली जात असत, तर खाद्यतेल सहकारी संस्थांमार्फत विकले जात असे. जुन्या तेलघाणी रु. १५० ते रु. २००, नूतन घाणी रु. ५०० ते रु. ६००, वारंगल घाणी रु. ३०० याप्रमाणे घाण्यांच्या किमती असत.

नूतन घाणींचे उत्पादन जुन्या घाणींपेक्षा जास्त असले तरीही ८० टक्के कारागीर प्रामुख्याने जुन्या पद्धतीची घाणी वापरण्यासच अग्रक्रम देत.

कारागिरांचे दिवशी वेतन रु. १.५० ते रु. २ दरम्यान होते. वेतन करार पद्धतीने दिले जात असे. स्त्री कामगारांना भुईमूग साफ करण्यासारखी उपकामे करावी लागत आणि त्यांना दिवशी एक रुपया वेतन मिळत असे.

या कालावधीत खाद्यतेल कामगारांच्या देगलूर, मुदखेड, किनवट, हदगाव, कांजरा, तामसा, मुक्रमाबाद आणि भोकर येथे अशा एकूण जिल्ह्यामध्ये दहा सहकारी संस्था होत्या. या संस्था तेलनिर्मिती उद्योगांच्या विक्रीमध्ये कार्यरत होत्या आणि त्यांच्या खेळते भांडवल आणि भाग भांडवलामध्ये मदत करीत असत.

१९६०-७० च्या सुमारास खेड्यांमधील तेलगिरण्यांकरिता वाहतुकीच्या सुविधांची कमतरता हा मोठा अडथळा होता. मुखेड आणि कंधार सारख्या ठिकाणी असलेल्या तेल गिरण्यांना पावसाळ्यामध्ये अशाप्रकारचा मोठा त्रास सहन करावा लागत असे. त्याचप्रमाणे इंधनाची कमतरता तसेच विजेचा अनियमित पुरवठा या देखील उद्योगामधील प्रमुख अडचणी होत्या.[८४]

सन १९७१ मध्ये जिल्ह्यात दोन सहकारी तेल गिरण्या होत्या.[८५] १९६८-६९ च्या अखेरीस १,३६८ इतकी सभासद संख्या असलेल्या या दोन सहकारी संस्थांनी १७,३९८ क्विंटल तेल बीयांवर प्रक्रिया करून त्यापासून ०.६९ लाख रुपये किमतीची प्राप्ती केली.[८६]

सन १९७० मधील जिल्ह्यातील भुईमूगाच्या उत्पादनाची माहिती पुढीलप्रमाणे :—

| अ.क्र. | तालुक्याचे नाव | लागवडीखालील क्षेत्र (एकर) | उत्पादन |
|---|---|---|---|
| १ | किनवट | उ.ना. | २,६१९ |
| २ | हदगाव | १२ | ३८२ |
| ३ | नांदेड | ६८ | ६४३ |
| ४ | भोकर | ४५ | ६२४ |
| ५ | कंधार | १५० | १,०६३ |
| ६ | बिलोली | ११८ | ५,२६५ |
| ७ | मुखेड | ३० | ३,०८४ |
| ८ | देगलूर | उ.ना. | २,२०० |
| | **एकूण** | **४२३** | **१५,८८०** |

८४. पूर्वोक्त, **नांदेड जिल्हा गॅझेटिअर**, पृ. २७१.

८५. पूर्वोक्त, **लीड बँक सर्व्हे स्कीम**, पृ. २०

८६. कित्ता, **लीड बँक सर्व्हे स्कीम**, पृ. २२.

Maharashtra State Gazetteers

जिल्ह्यामध्ये भुईमूगाव्यतिरिक्त कापसाची सरकी, जवस व इतर तेलबीयांपासून तेल काढले जात असे. या तेलबीयांच्या १९७० मधील तालुकानिहाय उत्पादनाची माहिती पुढील तक्त्यामध्ये देण्यात आली आहे :—

(उत्पादन टनांमध्ये)

| अ. क्र. (१) | तपशील (२) | तालुक्याचे नाव | | | | | | | | जिल्हा एकूण (११) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | किनवट (३) | हदगाव (४) | नांदेड (५) | भोकर (६) | कंधार (७) | बिलोली (८) | मुखेड (९) | देगलूर (१०) | |
| १ | भुईमूग | २,६१९ | ३८२ | ६४३ | ६२४ | १,०६३ | ५,२६५ | ३,०८४ | २,२०० | १५,८८० |
| २ | जवस | १७० | ५९ | ५६ | १३३ | २०९ | ५०२ | २३५ | १०० | १,४६४ |
| ३ | इतर तेलबिया | २४ | ३६१ | ३६७ | २८ | ४०३ | १,१८७ | २५७ | ७२२ | ३,३४९ |
| | एकूण तेलबिया | २,८१३ | ८०२ | १,०६६ | ७८५ | १,६७५ | ६,९५४ | ३,५७६ | ३,०२२ | २०,६९३ |

१९८६-८७ यावर्षी जिल्ह्यातील भुईमूगाचे उत्पादन २,५०० टन झाले. यावर्षी भुईमूग लागवडीचे क्षेत्र ६,५५० हेक्टर होते आणि या लागवडीखालील क्षेत्राची तालुकानिहाय सर्वांत जास्त टक्केवारी बिलोली तालुक्यात २८.६४ टक्के होती व त्याखालोखाल मुखेड १८.६३ टक्के, हदगाव १७.०८ टक्के, देगलूर ९.५१ टक्के, नांदेड ८.५३ टक्के, भोकर ६.६९ टक्के, कंधार ५.५२ टक्के तर किनवट तालुक्यात सर्वांत कमी म्हणजेच ५.४० टक्के अशी होती.

१९८४-८५ यावर्षी जिल्ह्यात भूईमूगाच्या क्षेत्राची लागवडीखालील एकूण क्षेत्राशी टक्केवारी ०.७९ होती, तर १९८५-८६ यावर्षी ती टक्केवारी थोडी वाढून ०.८६ टक्क्यांवर गेली.[८७]

जिल्ह्यात १९८६ मध्ये कंपनी कायद्यांतर्गत खाद्यतेलाचे नोंदणी झालेले ९ कारखाने होते. त्यापैकी ३ कारखाने बंद होते तर प्रपत्र पाठविणारे पाच कारखाने चालू स्थितीत होते. या कारखान्यांमधून राई, मोहरी, शेंगदाणे, तीळ, जवस याद्वारे तेल निर्मितीची प्रक्रिया केली जात असे. या चालू असलेल्या कारखान्यांमध्ये एकूण १३६ कामगार कार्यरत होते. त्यापैकी ९० पुरुष कामगार तर ४६ स्त्री कामगार होते. या कारखान्यांनी १९८६-८७ या सालामध्ये एकूण २७,१६८ श्रमदिवस काम केले. याच वर्षी प्रपत्र न पाठविलेला एक कारखाना होता व त्यामध्ये २० कामगार कार्यरत होते.

सन १९९८-९९ मध्ये जिल्ह्यात एकूण ८,२९,१०० हेक्टर क्षेत्र लागवडीखाली होते, त्यापैकी ६४,५१४ हेक्टर क्षेत्रावर गळीत धान्याची लागवड करण्यात आली होती. या गळीत धान्यामध्ये सूर्यफुल लागवडीचे क्षेत्र सर्वात जास्त होते तर त्यापाठोपाठ भुईमूग, तीळ, कापसाची सरकी इत्यादी गळीत धान्याची लागवड करण्यात आली होती. याबाबत अधिक माहिती तक्ता क्रमांक १४ मध्ये दर्शविण्यात आली आहे.[८८]

सन २००४-०५ मध्ये महाराष्ट्रात ३,८६३ हजार हेक्टर क्षेत्र तेलबिया पिकांच्या लागवडीखाली होते, तर त्याचवेळी नांदेड जिल्ह्यात एकूण ६५ हजार हेक्टर क्षेत्रावर गळीत धान्याची लागवड

८७. **जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, नांदेड जिल्हा, वर्ष १९८६-८७, पृ. ११.**

८८. कित्ता, वर्ष २००३-२००४, पृ. २१.

Maharashtra State Gazetteers

करण्यात आली होती.[८९] यामध्ये जवस, भुईमूग, मोहरी, तीळ, एरंडी या तेलबियांचा समावेश होता. या तेलबियांचे प्रति हेक्टरी उत्पादन पुढीलप्रमाणे होते.

(उत्पादन "००" मे. टनांमध्ये)

| अ.क्र. | तपशील | पिकाचे नाव | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | जवस | भुईमूग | मोहरी | तीळ | एरंडी | नारळ |
| १ | प्रति हेक्टरी उत्पादन | २२६ | ११०० | ३०० | १७६ | ० | ० |
| २ | एकूण उत्पादन | ३ | ५५ | १ | ११ | ० | ० |

जिल्ह्यामध्ये २००६-०७ यावर्षी एकूण ६४,५१४ हेक्टर क्षेत्र तेलबिया लागवडीखाली होते आणि त्याद्वारे १५,४१२ मे.टन वार्षिक उत्पादन प्राप्त झाले. यापैकी १,३३३ मे.टन कच्च्या मालाचा उपभोगासाठी वापर केला गेला, तर १,१०० मे.टन माल तेलनिर्मिती प्रक्रियेसाठी उपलब्ध होता.

सन २००८-०९ मध्येदेखील जिल्ह्यामध्ये ६४,५१४ हेक्टर क्षेत्रावर तेलबियांची लागवड करण्यात आली होती व विकास गटनिहाय १४ तालुक्यांमध्ये ९२ तेलनिर्मिती प्रक्रिया उद्योग कार्यरत होते. या प्रक्रिया उद्योगांची एकूण स्थापित क्षमता ४७२.०० मे.टन असून त्यापैकी फक्त २३५.५ मे.टन म्हणजेच साधारण ४९.८ टक्के क्षमतेचा उत्पादन प्रक्रियेमध्ये वापर करण्यात आला. जिल्ह्यामध्ये सन २००७-०८ साली ६ तर २००८-०९ यावर्षी १० तेलगिरण्या प्रस्तावित होत्या. त्यांचा एकूण भांडवली खर्च रु. १६० लक्ष असून त्यापैकी रु. १२० लाख बँकांद्वारे कर्जाऊ प्राप्त झालेले आहेत.[९०]

१९७० ते १९८० च्या दशकात जिल्ह्यामध्ये चार उल्लेखनीय तेल गिरण्यांची स्थापना झाली. यामध्ये मे. सरस्वती ऑईल मिल, मे. कामध्येनू इंडस्ट्रिज, मे. पोरवाल ऑईल इंडस्ट्रिज, मे. शहा शामजी घारशी ऑईल इंडस्ट्रिज या महत्त्वपूर्ण तेल उद्योगांचा समावेश होता. १९७०-८० मध्ये स्थापन झालेल्या या तेलगिरण्या आजपर्यंत उल्लेखनियरीत्या कार्यरत असून त्यांची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | उद्योग घटकाचे नाव | स्थापना दिनांक | उत्पादन | गुंतवणूक (रुपये लाखांत) | रोजगार | उत्पादन क्षमता |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मे. सरस्वती ऑईल मिल, देगलूर | १९७० | शेंगदाणा तेल व पेंड | ३१०.०० | २५ | ४०००.०० |
| २ | मे. कामध्येनू ऑईल इंडस्ट्रिज, नवा मोंढा, नांदेड | १९७२ | शेंगदाणा तेल व पेंड | २.०० | ४ | ४०.०० |
| ३ | मे. पोरवाल ऑईल इंडस्ट्रिज, नांदेड | १९७९ | शेंगदाणा तेल | १७.०० | ६ | २१.०० |
| ४ | मे. शहा शामजी घारशी ऑईल इंडस्ट्रिज, नांदेड | १९७९ | शेंगदाणा तेल | २०.०० | १५ | ६००.०० |

सन १९८० ते २००० च्या दरम्यानदेखील जिल्ह्यातील वाढत्या गळीत धान्याच्या उत्पादनाच्या परिणामाने अनेक खाद्यतेल निर्मिती उद्योगांची स्थापना झाली. त्यामध्ये प्रामुख्याने मे. तोष्णीवाल ऑईल इंडस्ट्रिज, मे. साई स्मरण ऑईल रिफायनरी व मे. राजेश ऑईल इंडस्ट्रिज या उल्लेखनीय आहेत.

८९. **जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, नांदेड जिल्हा, वर्ष २००७-०८, पृ. २२.**

९०. डॉ. र. पु. कुरुलकर, औरंगाबाद यांच्याकडून प्राप्त माहितीच्या आधारे.

Maharashtra State Gazetteers

१९८२ मध्ये सहकारी औद्योगिक वसाहत, नांदेड येथे स्थापन झालेल्या मे. तोष्णीवाल ऑईल इंडस्ट्रिजमध्ये कापसाच्या सरकीपासून तेलनिर्मिती केली जाते. या गिरणीची भांडवली गुंतवणूक २० लाख रुपये असून उत्पादन क्षमता ४०० लाख रुपये आहे. या गिरणीद्वारे १८ लोकांना रोजगार प्राप्त झाला आहे.

१९९८ मध्ये शेंगदाणा तेलनिर्मितीसाठी नांदेड एम.आय.डी.सी.मध्ये मे. राजेश ऑईल इंडस्ट्रिजची स्थापना झाली. या गिरणीची भांडवली गुंतवणूक ९ लाख रुपये असून ६०० लाख रुपये किमतीच्या मालाची उत्पादन क्षमता आहे. गिरणीने आठ लोकांना रोजगार प्राप्त करून दिला.

एम.आय.डी.सी. नांदेड येथेच १९९५ मध्ये स्थापन झालेली मे. साई स्मरण ऑईल रिफायनरी ही मोठ्या प्रमाणावर उत्पादन करणारी तेल गिरणी असून शेंगदाण्यापासून तेलनिर्मिती करणाऱ्या या गिरणीची भांडवल गुंतवणूक २९५ लाख रुपये असून उत्पादन क्षमता ७००० लाख रुपये आहे. तर गिरणीने ७० लोकांना रोजगार प्राप्त करून दिला आहे.

सन २००० नंतर स्थापन झालेल्या तेल गिरण्या यापूर्वी स्थापन झालेल्या गिरण्यांपेक्षा भांडवल गुंतवणूक, रोजगार व उत्पादन क्षमतेनुसार मोठ्या प्रमाणावर कार्यरत असलेल्या आढळून येतात. तसेच या गिरण्या शेंगदाणा तेलाव्यतिरिक्त इतर तेलबियांपासूनदेखील तेलनिर्मिती करण्यात अग्रेसर आहेत. जिल्ह्यामध्ये जुलै २०१० पर्यंत एकूण ४० नोंदणीकृत खाद्यतेल गिरण्या असून त्या जिल्ह्यामधील औद्योगिक वसाहतींमध्ये मोठ्या प्रमाणावर स्थापन झालेल्या आढळून येतात. यामधील काही प्रमुख तेल गिरण्यांची माहिती पुढीलप्रमाणे :—

| अ. क्र. | उद्योग घटकाचे नाव | स्थापना दिनांक | उत्पादनाचे स्वरूप | गुंतवणूक (रुपये लाखांत) | रोजगार निर्मिती | उत्पादन क्षमता (रुपये लाखांत) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मे. धनश्री ऑईल इंडस्ट्रिज, दाभड, ता. अर्धापूर | ७ मे २०१० | ऑईल ॲण्ड केक | २१.०० | २१ | २०,००० |
| २ | मे. श्री सिद्धरामेया ॲग्रो इंडस्ट्रिज, ढाकणी, ता. लोहा | १० ऑगस्ट २००७ | सॉल्व्हन्ट एक्स्टॅक्शन | ३८०.०० | ७० | ८,००० |
| ३ | मे. श्रीनिवासा ॲग्रो फूड्स प्रा. लि., ढाकणी, ता. लोहा | ३१ ऑक्टो २००९ | सॉल्व्हन्ट प्लॅन्ट | २००.०० | ६० | ९,००० |
| ४ | मे. सत्यश्री ऑईल इंडस्ट्रिज रिफायनरी, एम.आय.डी.सी., नांदेड | ४ जून २०१० | ऑईल ॲण्ड केक | ३०.०० | १७ | ६,००० |

उपरोक्त तेल गिरण्यांव्यतिरिक्तच्या इतर उल्लेखनीय गिरण्यांमध्ये बिलोली येथे एक तर सन २००९ मध्ये देगलूर येथे दोन गिरण्या स्थापन झाल्या. या तेल गिरण्यांची उत्पादन क्षमता अनुक्रमे १०० लाख, ८० लाख व २० लाख रुपये होती.[९१]

९१. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, नांदेड यांनी पाठविलेल्या माहिती आधारे, दि. ७/७/२०१०.

Maharashtra State Gazetteers

**कोहिनूर फिड्स ॲण्ड फॅट्स लिमिटेड**[९२] **:—**नांदेड एम.आय.डी.सी. क्षेत्रात २० डिसेंबर १९९० रोजी कोहिनूर फिड्स ॲण्ड फॅट्स लिमिटेड या खाद्यतेल निर्मिती कंपनीची नोंदणी झाली. हा प्रकल्प नांदेड येथील पंजवानी तसेच उदगीर येथील महाजन या कुटुंबीयांच्या पुढाकारातून साकारला गेला. सन मे १९९२ मध्ये १०० टीडीपी क्षमता असलेल्या तेल गाळप आणि शुद्धीकरण क्षेत्रातील या मोठ्या प्रकल्पाची यशस्वीरीत्या सुरूवात केल्यानंतर या उद्योगक्षेत्रातील विकासाच्या क्षमता लक्षात घेऊन कंपनीने विस्तारीकरण तथा विविधीकरणाच्या दृष्टिकोनातून तेल शुद्धिकरण प्लॅन्ट नव्याने स्थापन केला. यासाठीची आवश्यक यांत्रिक साधने अल्फा लेवल लिमिटेड यांच्याकडून प्राप्त केल्यानंतर मार्च १९९५ मध्ये हा प्लॅन्ट सुरू करण्यात आला. जानेवारी १९९६ मध्ये तेल गाळप प्लॅन्टचे मोठ्या प्रमाणावर विस्तारीकरण झाले. १ जून १९९४ मध्ये कंपनीस मर्यादित उद्योगाचा दर्जा प्राप्त झाला होता.

तेल गाळप प्लॅन्ट मुख्यतः सनफ्लॉवर तेल निर्मितीवर आधारित होता. परंतु एकूणच भारतातील शेतकऱ्यांचा सोयाबीन लागवडीकडे कल वाढल्याने त्याचे सोयाबीन तेल गाळप प्लॅन्टमध्ये स्थित्यंतर करण्यात आले.

सन २००३-०४ मध्ये तेल गाळप प्लॅन्टच्या क्षमतेमध्ये वाढ करून आणि शुद्धीकरण प्लॅन्टचे हंगामी स्वरूपातून सलग प्रक्रियेमध्ये रूपांतर करून कंपनीने प्रकल्पामध्ये विकास व आधुनिकीकरण घडवून आणले. यासाठी आधुनिक तंत्रामध्ये आवश्यक असणाऱ्या डी-वॅक्सिंग युनिट वगैरेची स्थापना करण्यात आली. कंपनीद्वारे शुद्ध खाद्यतेल आणि सोयामील आणि कुक्कुट खाद्याव्यतिरिक्त साबण तसेच पेंडेची निर्मिती केली जाते. कंपनीने ५० लोकांना प्रत्यक्ष तर १५० लोकांना अप्रत्यक्ष रोजगार प्राप्त करून दिला आहे. १०० करोड वार्षिक उलाढाल असलेली ही कंपनी मागील काही वर्षांपासून सातत्याने ४० ते ५० लाखांपर्यंतचा कर भरणा करत असून सातत्याने डीव्हीडंड देणारी कंपनी आहे.

ग्रामीण तेल उद्योगात रोजगाराची प्रचंड क्षमता आहे. आज खाद्यतेलाच्या मिल उद्योगात ८० टक्के तेलबिया गाळल्या जातात व त्यांची रोजगार पुरविण्याची क्षमता महाराष्ट्रात एक लाखाच्या आसपास आहे. तर २० टक्के तेलबिया गाळण्यासाठी ग्रामीण तेल उद्योग महाराष्ट्रात ५ लाख लोकांना काम देत आहे. १०० टक्के तेलबिया तेल्यांना खाद्यतेल गाळण्यासाठी मिळाल्या, तर देशातील १० ते १२ लाख लोकांना रोजगार मिळेल.[९३] जिल्ह्यातही खाद्यतेलाचे उत्पादन करणाऱ्या ग्रामीण तेल उत्पादकांना प्रोत्साहन दिल्यास या उद्योगाला भविष्य आहे. जिल्ह्यात खाद्यतेल या उद्योगातील दुय्यम उत्पादन असणाऱ्या साबण उद्योगालाही भवितव्य आहे. तसेच जिल्ह्यात सोयाबीनचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन होत असल्याने सोयाबीनवर आधारित आधुनिक तेलगिरण्या, सोयाबीनपासून सोयाबीन पनीर, सोयाबीनचे दूध, सोयाबीन खारी, डाळ, सोयाबीन पीठ व सोयाबीनपासून इतर प्रोटीनयुक्त खाद्यपदार्थ बनविणाऱ्या उद्योगास भरपूर वाव आहे.

याव्यतिरिक्त जिल्ह्यातील काही महत्त्वाच्या नोंदणीकृत तेल गिरण्यांच्या स्थापनेचा तपशील तक्ता क्र. १५ मध्ये जिल्ह्यातील खाद्य उद्योगांच्या तपशिलाअंतर्गत देण्यात आला आहे.

---

९२. संचालक, कोहिनूर फिड्स ॲण्ड फॅट्स लिमिटेड, नांदेड यांनी पाठविलेल्या माहितीवर आधारित (जून २०१०).

९३. **लातूर जिल्हा गॅझेटिअर**, वर्ष २००७, पृ. ३७९.

## वस्त्रोद्योग

कापसाची लागवड हा नांदेड जिल्ह्याचा महत्त्वाचा शेतकी व्यवसाय आहे. येथे कापूस व तेलबियांसारख्या नगदी पिकांचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन घेतले जाते. स्वातंत्र्यपूर्वकाळापासून मराठवाड्यातील पाच जिल्ह्यांमध्ये प्रामुख्याने गांवरानी (वाणी) जातीचा कापूस पिकविला जात असे. या जातीचा कापूस दिसावयास रेशमासारखा असून त्याचे सूत अतिशय मजबूत बनत असे. 'डाका' मलमलसुद्धा याच कापसापासून काढली जात असे. या कापसाचे रक्षण व्हावे म्हणून हैदराबाद सरकारने १९४९ साली ज्या भागात हा कापूस पिकतो तो भाग संरक्षित भाग म्हणून जाहीर केला होता.[९४] नांदेड मध्ये सन १९२३ साली हैदराबाद सरकारच्या पुढाकाराने संघटित उद्योगाद्वारे उस्मानशाही मिल या कापड गिरणीची स्थापना करण्यात आली.[९५] दुसऱ्या महायुद्धानंतर सुमारे १९ लाख एकर जमीन कापसाच्या पिकाखाली होती. त्यातून २.६३ लाख गाठी कापूस निघत असे. अधिक धान्य पिकविण्याच्या मोहिमेबरोबरच अधिक कापूस पिकविण्याच्या मोहिमेलादेखील मराठवाड्यातील पाच जिल्ह्यांना चालना देण्यात आली. या कार्यक्रमानुसार १९५५-५६ साली २२.२० लाख एकर जमीन कापसाखाली आणण्यात आली. संस्थाने भारतीय संघराज्यात समाविष्ट झाल्यानंतर जुन्या हैदराबाद राज्यामधील कापूस पिकविणारा २/३ भाग नवीन मुंबई राज्यात समाविष्ट झाला. नव्या मुंबई राज्यातील कापसाखाली असलेल्या जमिनीचे प्रमाण संपूर्ण भारताच्या प्रमाणापैकी ५०% झाले. त्यानुसार नांदेड जिल्ह्यात ५,२५,००० एकर जमीन कापसाखाली होती व त्यात ७०,००० गाठी कापूस पिकत असे. येथील कापसाचा उपयोग मद्रास व मुंबई मधील गिरण्यादेखील करत. उस्मानशाही मिलनेदेखील या कापसापासून कापड बनविण्याच्या बाबतीत प्रगती केली होती. या कापसाच्या उच्च प्रतीची जपणूक व्हावी आणि त्याच्या क्षेत्रात वाढ व्हावी म्हणून प्रयत्न करण्यात आले. शेतकी खात्याने निरनिराळे प्रयोग करून 'दौलत' नावाचा एक चांगल्या प्रकारचा कापूस शोधून काढला. तसेच कापसावर प्रयोग करून तज्ज्ञांनी १९४६ व १४९४ या गावरानी नं. ६ पेक्षा चांगल्या प्रतीच्या जाती शोधून काढल्यामुळे कापूस लागवडीचे हे संरक्षित क्षेत्र ठरविण्यात आले. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्ये कापसाच्या लागवडीला भारत सरकारने महत्त्व दिल्यामुळे मराठवाड्यातील प्रदेशांकरिता शेती व तत्सम वाढीकरिता ६६७.१० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली.[९६] १९६० मध्ये ४.७७ लाख एकर म्हणजे एकूण शेतीखालील क्षेत्राच्या २० टक्के जमीन कापूस उत्पादनाखाली होती.

कापसाच्या एकूण उत्पादनाच्या फारच थोडा भाग स्थानिक कापड गिरण्यांकडून खरेदी केला जात असे. उर्वरित कापूस मुंबई, सोलापूर, मद्रास आणि हैदराबादच्या बाजारपेठेत पाठवला जात असे. स्थानिक पातळीवर मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असणाऱ्या कच्च्या मालाच्या वापराकरीता २० फेब्रुवारी १९६३ मध्ये मराठवाडा सहकारी सूत गिरणीची नांदेड येथे स्थापना करण्यात आली. पुरेशा कापसाच्या

---

९४. **कल्याणकारी राज्याची वाटचाल**, नांदेड जिल्हा, जानेवारी, १९५७, पृ. ९.

९५. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, गॅझेटिअर डिपार्टमेंट, गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र, बॉम्बे, १९७१, पृ. २६१.

९६. **कल्याणकारी राज्याची वाटचाल**, पूर्वोक्त, पृ. ९ ते १०.

उपलब्धतेमुळे नांदेड येथे या दुसऱ्या सूत गिरणीची स्थापना करण्यास प्रोत्साहन मिळाले. ह्यास गोदावरी नदीची नजीकता, पूर्णा प्रकल्पामुळे उपलब्ध झालेली स्वस्त दरातील वीज, उत्तरेस मनमाड व दक्षिणेस हैद्राबादशी रेल्वेमुळे असलेली नजीकता या इतर बाबींचा देखील हातभार होता.

वटण व दाबणी गिरण्या साधनांवर आधारलेल्या असल्यामुळे हे कारखाने कापूस उत्पादन क्षेत्रामध्ये म्हणजेच देगलूर, किनवट, धर्माबाद, नांदेड, मुखेड, भोकर, पेठ उमरी, कारखेली हिमायतनगर आणि लोहा येथे केंद्रित झालेले होते. १९५१ मध्ये जिल्ह्यात ३५ कापूस वटण व दाबणी गिरण्या होत्या. १९६० मध्ये त्या २१ झाल्या. यापैकी करखेलीला एक, नांदेडला चार, मुदखेडला दोन, पेठ उमरीला एक, पळशीला एक, नायगावला एक आणि भोकरला एक अशी ११ पिंजणी व दाबणीची मोठी केंद्र जिल्ह्यामध्ये होती. या सर्व केंद्रांत एकूण १,४३० कामगार कार्यरत होते.[९७] वटण व दाबणी गिरण्यांच्या संख्येमध्ये घट होण्यामागे भांडवल व व्यवस्थापनाचा अभाव हे कारण असावे. तसेच यापैकी बऱ्याच कारखान्यांनी उत्पादन केंद्र म्हणून काम करणे थांबवले. जे व्यापारी पूर्वी या कारखान्यांचे मालक होते त्यांनी स्वतःला सहकारी संस्थांमध्ये संघटीत केले. या सहकारी संस्था व्यापाऱ्यांना कापसाच्या वटण व दाबणीचे दर आकारत. सन १९७० मध्ये वटण व दाबणीचे दर रु. १० ते रु. १५ पर गासडी इतके होते. सहकारी संस्थांच्या या बदलामुळे उद्योगामध्ये मोठा बदल घडून आला.

प्राथमिक स्तरावर वटण व दाबणी उद्योगात मोठ्या प्रमाणावर भांडवलाच्या गुंतवणूकीची गरज असते. कारखाना स्थापनेचा खर्च कारखान्याचा विस्तार, यंत्र व उत्पादनाची व्याप्ती यावर अवलंबून असल्याने १९६० च्या दशकात हा खर्च रू. २ लाखांपासून ३ ते ४ लाखांच्या आसपास होता.

याचकाळात उत्पादन प्रक्रियेतील नवीन तंत्रज्ञानामुळे गुंतवणूकीच्या पद्धतीमध्ये बदल होत गेले. स्थिर भांडवलातील मोठा भाग मशिनरींवर खर्च केला गेला. कारखान्यांनी उत्पादन क्षेत्र म्हणून कार्य करण्याचे थांबविल्यामुळे खेळत्या भांडवलाच्या स्वरूपात देखील बदल घडून आला. १९६० पूर्वी एका कारखान्यास त्या हंगामामध्ये ३,००० गासड्यांचे उत्पादन करण्यासाठी रू. ६०,००० ते रू. १,००,००० खेळते भांडवल लागत असे. मात्र नंतरच्या काळात ते ४० ते ५० टक्क्यांनी घटले.

कारखान्यांचे काम नोव्हेंबरमध्ये सुरू होऊन साधारणपणे मार्च पर्यंत चालते. नोव्हेंबरमध्ये हंगाम सुरू होण्यापूर्वीच यंत्रांच्या दुरूस्ती व निगराणीचे काम केले जाते, ज्यामुळे हंगामात कारखान्याचे काम सुरळीतपणे चालते. नांदेडमध्ये साधारण १०० ते १५० दिवस वटण व दाबणीचे काम चालते.

१९६० मध्ये या उद्योगात रोजगार करणाऱ्या कामगारांची संख्या २,०९६ होती. जी कापड गिरण्यांच्या खालोखाल होती. एक वटण व दाबणी गिरणी एका साधारण हंगामामध्ये ७५ ते १०० माणसांना रोजगार उपलब्ध करून देत असे. एका अपवादात्मक चांगल्या हंगामात एका गिरणीत १५० माणसांना रोजगार मिळाल्याचे देखील आढळले होते.

---

९७. **जिल्हा जनगणनेस निर्देशग्रंथ,** नांदेड जिल्हा, **१९६१, पृ. ४०.**

Maharashtra State Gazetteers

कारखान्यामध्ये प्रशिक्षित, अर्ध-प्रशिक्षित आणि अप्रशिक्षित असे तीन प्रकारचे कामगार आवश्यक असतात. पहिल्या वर्गात बॉयलर अटेंडंट्स, फिटर्स, कापूस वाहक हे तिसऱ्या वर्गात येतात. सन १९६० मध्ये त्यांचा पगार रू. २.५० ते रू. ४ पर्यंत होता. बॉयलर अटेंडंटस् आणि व्यवस्थापकांना सर्वात जास्त पगार होता तर स्त्री कामगार ज्या मुख्यत्त्वे करून कापूस वाहण्याचे आणि कापूस वेचण्याचे काम करत त्यांना सर्वात कमी म्हणजे रू. १ ते रू. १.५० इतका मोबदला दिला जात असे. फक्त तांत्रिक कर्मचाऱ्यांस स्थायीरीत्या वेतन दिले जात असे तर इतर सर्वांची नेमणूक पूर्णतः अस्थायी असे.

जिल्ह्यातील एका वटण व दाबणी गिरणीची सरासरी क्षमता दर पाळीस ३० ते ५० क्विंटल इतकी होती. बऱ्याच कारखान्यांमध्ये यांत्रिक विस्तार व उपलब्ध साधनांचा वापर यांच्या प्रमाणानुसार दर हंगामात १,००० ते ३,००० गासड्या म्हणजेच साधारणपणे ७५० टन कापसावर प्रक्रिया केली जात असे.

कापसाच्या गासड्यांची मुख्य बाजारपेठ मुंबई होती तर एखाद दुसऱ्या कारखान्याद्वारे त्याच्या गासड्या मद्रासला तर तेल अकोल्यास पाठविले जात असे. संपुर्ण उत्पादनाच्या ५ टक्के विक्री स्थानिक विक्री होती. परंतु कार्यप्रणालीत झालेल्या बदलामुळे कारखाने बाजारपेठांशी संबंधीत राहीले नाहीत. कच्च्या मालाची खरेदी विक्री स्थानिक बाजारपेठेतून केली जात असे. व्यापारी कच्चामाल प्रत्यक्षरीत्या शेजारील खेड्यांतील गिरणींकडे पाठवित. गिरण्या प्रत्येक गासडीवर प्रक्रिया करण्याचे कमिशन लावत. तयार माल कारखान्यांच्या मालकीचा न राहता प्रक्रीया करण्याकरीता कापूस पुरविणाऱ्या व्यापाऱ्यांच्या मालकीचा असे.

प्रक्रीयेसाठी कारखान्याद्वारे खनिजतेल व कोळसा इंधन म्हणून वापरले जात असे. खनिज तेलाची साधारण आवश्यकता रू. २,५००/- गॅलन एवढी असे. ज्याची किंमत साधारणपणे रू. ५,०००/- ते रू. ६,०००/- पर्यंत असे. या काळात इंधनासाठी डॉयनॅमो वापरणारी एकच गिरणी होती. दगडी कोळसा व चारकोलचा सरासरी हंगामी वापर २१५ टन होता.[९८]

सन १९८६ मध्ये नांदेड जिल्ह्यात कापसाची सरकी काढणे, साफ सफाई करणे व गासड्या बांधण्याचे २७ नोंदणीकृत कारखाने होते. त्यापैकी चार कारखाने बंद होते. प्रपत्र पाठविणाऱ्या बारा कारखान्यांमध्ये एकूण ८९९ कामगार होते त्यापैकी ४९० पुरुष तर ४०९ स्त्रिया होत्या. प्रपत्र न पाठविणाऱ्या अकरा कारखान्यांमध्ये ७६७ कामगार कार्यरत होते. सर्व चालू कारखान्यांमधील त्या हंगामातील काम केलेल्या एकूण श्रम दिनांची संख्या १,४८,२५७ श्रम दिवस काम केले.[९९] सन २००३ मध्ये मात्र या उद्योगामध्ये नोंद झालेले फक्त ५ कारखाने होते आणि त्यापैकी ३ कारखाने बंद होते तर दोनच कारखाने कार्यरत होते. या चालू कारखान्यांमध्ये एकूण ३०४ कामगार कार्यरत होते.[१००] सन २००६ मध्ये देखील या उद्योगात ५ नोंदणीकृत कारखाने होते मात्र त्यापैकी चार कारखाने बंद

---

९८. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, १९७१, पृ. २६३.

९९. **जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, नांदेड जिल्हा**, वर्षे १९८६-८७, पृ. ७९. अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई.

१००. कित्ता, वर्ष २००३-२००४, पृ. ४१. अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई.

होते. या कारखान्यामध्ये एकूण ३०८ कामगार कार्यरत होते. त्यापैकी १३ स्त्रिया होत्या. या सर्व कामगारांनी एकूण ९४ हजार श्रमदिवस कार्य केले.[१०१]

**कापड उद्योग :**

मराठवाड्यात १९०८ च्या पूर्वीपासू धागा आणि सर्व कापड स्वस्तामध्ये आयात केले जाऊ लागल्यामुळे फक्त जाडे-भरडे कापड आणि धोतर साड्यांचे कापड विणले जाऊ लागले. धनगर त्यांच्याकडील मेंढीच्या लोकरीपासून ब्लँकेट किंवा घोंगडी तयार करीत.[१०२] १९३४ च्या सुमारास मराठवाड्यात स्वावलंबन, स्वदेशीचा वापर व राष्ट्रहिताच्या तत्त्वांसाठी स्वामी रामानंद तीर्थ व गोविंदभाई यांनी 'हैद्राबाद खादी समिती' स्थापन केली व त्यायोगे तेलंगण आणि मराठवाडा भागात खादी केंद्रे स्थापन करण्यात आली. या समितीद्वारे मराठवाड्यातील जिल्हे व त्यांतील अनेक तालुक्यांत विविधप्रकारचे कापड उत्पादन व विक्री केंद्रे सुरू केली गेली. राज्य पुर्नरचनेनंतर १९६२ मध्ये कायद्यानुसार 'मराठवाडा खादी ग्रामोद्योग समिती' स्थापन करण्यात आली. मराठवाडा उत्पादक सहकारी सूत गिरणी मर्यादित, नांदेड, या समितीचे मुख्य कार्यालय डॉ. राजेंद्र प्रसाद रोड, नांदेड येथे आहे. या समितीमार्फत विविध ठिकाणी खादी उत्पादन व विक्री केंद्रे उभारल्यामुळे ग्रामीण भागातील बलुतेदार व कारागीरांना रोजगाराच्या संधी मिळाल्या व त्यातून त्यांना आर्थिक स्थैर्य देखील प्राप्त झाले. केंद्र शासन आणि महाराष्ट्र शासन यांनी रिबेटद्वारे आर्थिक मदत केली. त्यामुळे मराठवाड्यातील नांदेड जिल्ह्यात, कंधार, देगलूर, धर्माबाद या शहरांमध्ये उत्पादन केंद्रे सुरू करण्यात आली. तर नांदेड शहरातही विक्री केंद्र स्थापन करण्यात आले. या संस्थेच्या विविध उत्पादन केंद्रात तयार केलेल्या खादीची विवध विक्रीकेंद्रामार्फत महाराष्ट्रात वर्षाला सुमारे ५ कोटी रुपयांची खादी विक्री करणारी सर्वात मोठी संस्था आहे. राष्ट्रध्वजाची खादी, राष्ट्रध्वज, जीनखादी इत्यादी उत्पादने या संस्थेमार्फत घेतली जातात. नैसर्गिक वनस्पतीच्या रंग निर्मितीपासून खादी रंगाई करणारी ही राज्यातील एकमेव संस्था आहे. या संस्थेद्वारे देशातील २२५ खादी संस्थांशी देवाणघेवाण केली जाते. या व्यवहारात सुमारे १५ कोटींची उलाढाल होते. सन २००५-२००६ अखेर २०० कार्यकर्ते व ३,००० कारागीर तसेच विणकरांना कायम काम देणारी, ना नफा ना तोटा या तत्त्वावर चालणारी अशा प्रकारची ही महाराष्ट्रातील सर्वात मोठी ग्रामोद्योग संस्था आहे.[१०३]

या सूत गिरणीची सन १९६३ च्या सुरूवातीस स्थापना झाली. स्थापनेच्यावेळी या सूत गिरणीची सभासद संख्या ११,८७५ होती आणि गुंतविलेले भाग भांडवल ४४.२० लाख रुपये होते. सन १९६९-७० मध्ये सूत गिरणीने ५७२ टन कापसाच्या गासड्यांचे उत्पादन करून ४७.५५ लाख रुपये किमतीच्या मालाची विक्री केली. आवश्यक खेळते भांडवल आणि मध्यम मुदतीचे कर्ज महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटीव्ह ॲपेक्स बँक आणि राज्य सरकारद्वारा पुरविण्यात आले होते. या कालावधीत गिरणीमध्ये ३८० कामगार कार्यरत होते.[१०४]

---

१०१. पूर्वोक्त, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, वर्ष २००७-२००८, पृ. ९६.

१०२. **द इम्पिरिअल गॅझेटिअर ऑफ इंडिया, व्हॉ. XIX, कॉपरेन प्रेस, ऑक्सफर्ड**, १९०८, पृ. २७२.

१०३. **मराठवाडा खादी ग्रामोद्योग समिती**, शाखा उदगीर यांच्याकडून प्राप्त माहितीच्या आधारे.

१०४. **स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, लिड बँक स्किम सर्व्हे रिपोर्ट**, पूर्वोक्त, पृ. २५-२६.

सन २००४-२००५ मध्ये नांदेड जिल्ह्यामध्ये मराठवाडा खादी ग्रामोद्योग समितीने २,५१,२३५ चौरस मीटर खादीचे तर ५,७४१ चौरस मीटर पॉलिवस्त्राचे उत्पादन केले आणि त्याची उत्पादन किंमत अनुक्रमे १७६.५६ लाख व ५.०४ लाख रुपये होती. याचवर्षी कापसावरील पूर्व प्रक्रीया, सूत कताई, विणाई व अन्य प्रक्रीया या सर्वांमध्ये एकत्रिपणे ८३८ कारागिर कार्यरत होते व त्यांना एकूण २९.८ लाख रुपये मजुरी देण्यात आली.

सन २००८-२००९ मध्ये मात्र खादी ग्रामोद्योग समितीच्या उत्पादनात घट होऊन समितीने १,३७,११३ चौरस मीटर खादीचे उत्पादन केले ज्याची किंमत १४९.३६ लाख रुपये होती तर पॉलीवस्त्राच्या उत्पादनात मात्र जवळपास दुपटीने वाढ होऊन समिती १०,००० चौरस मीटर पालीवस्त्राचे उत्पादन केले ज्याची उत्पादन किंमत १५.२३ लाख रुपये होती. या उत्पादन प्रक्रियेत ६१७ कारागिर कार्यरत होते व त्यांना ४१.७४ लाख रुपये मजुरी देण्यात आली.[१०५]

सन २००५-२००६ व सन २००८-२००९ या अहवाल वर्षात संस्थेच्या भांडारातुन पुढील प्रमाणे विक्री झाली.[१०६]

| अ.क्र. | विवरण | वर्ष २००५-२००६ | वर्ष २००८-२००९ |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | खादी | १५३.२ | २०१.३९ |
| २ | उलन | ११.४२ | ९.५६ |
| ३ | रेशीम | ९.४२ | १०.५६ |
| ४ | पोलीवस्त्र | १३.११ | २८.२३ |
| ५ | | ३८.७० | ५३.८५ |
| | एकूण | २२५.८६ | ३०३.५९ |

नफा नुकसानीच्या बाबतीत मागील अनेक वर्षांपासून संस्था नुकसानीत आहे. त्यासंबंधीचे वर्षेनिहाय स्वरूपमात्र कोष्टक दर्शविल्याप्रमाणे दरवर्षी बदलत्या प्रमाणात दिले आहे.

| अ.क्र. | वर्ष | नफा तोटा (नुकसान) | रुपये |
|---|---|---|---|
| १ | २००३-२००४ | नुकसान | १२,७३,६४८.६३ |
| २ | २००४-२००५ | नुकसान | ५,१३,३२९.५० |
| ३ | २००५-२००६ | नुकसान | ३०,९३,९९५.६३ |
| ४ | २००६-२००७ | नुकसान | २९,८३,६२६.६३ |
| ५ | २००७-२००८ | नुकसान | ५,२९,९३३.२२ |
| ६ | २००८-२००९ | नुकसान | ५७,३४९,४० |

१०५. **मराठवाडा खादी ग्रामोद्योग समिती, नांदेड, वार्षिक अहवाल वर्ष** २००८-२००९, पृ. २-३.

१०६. कित्ता.

Maharashtra State Gazetteers

वरील कोष्टकावरून असे लक्षात येईल संस्थेच्या संचालक मंडळाने आर्थिक व्यवहारात व कार्यपद्धतीत केलेल्या सुधारणांमुळे सन २००८-२००९ मधील संस्थेच्या नुकसानात मोठ्या प्रमाणावर घट झालेली दिसून येते.[१०७]

'मराठवाडा खादी ग्रामोद्योग समिती' या उद्योग संस्थेचे मुख्यालय नांदेड हे असून या संस्थेने मराठवाड्यातील अन्य जिल्ह्यांत खादी उत्पादनांची उपकेंद्रे निर्माण केली. त्याचप्रमाणे नांदेड जिल्ह्यातही खादी उत्पादनाचे उपकेंद्र कंधार या ठिकाणी आहे. त्याची माहिती पुढीलप्रमाणे आहे :—

**कंधार उपकेंद्र** - या उपकेंद्रामध्ये सुती खादी व सतरंजीचे उत्पादन केले जाते. वर्ष २००४-२००५ मध्ये २५,०६,००४ रुपये किमतीच्या ५९,१६६ चौरस मीटर खादीचे व ३०,९९,७५२ रुपये किमतीच्या ९,६२० चौरस मीटर सतरंजीचे उत्पादन केले गेले.

वर्ष २००८-२००९ मध्ये सुती खादी उत्पादनात मोठ्या प्रमाणावर घट होऊन २,२९,०१५ रुपये किमतीच्या ५,६५२ चौरस मीटर खादीचे उत्पादन केले गेले तर ५२,२९,८०९ रुपये किमतीच्या २५,१२६ चौरस मीटर उत्पादनाने सतरंजीच्या उत्पादनात झालेली वाढ दिसून येते.

मराठवाडा खादी ग्रामोद्योग समितीचे कार्य मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांत पसरलेले आहे त्याचे नांदेड येथील प्रधान कार्यालयातून सहज नियंत्रण होणे कठीण झाल्याने लातूर, नांदेड व औरंगाबाद या तीन विभागांतून कामाची विभागणी केली गेली. त्यामुळे प्रत्येक उत्पादन केंद्रास वेळच्यावेळी मजुरीचा पैसा उपलब्ध होण्यास मदत झाली.[१०८]

सर्व उपकेंद्राअंतर्गत वस्त्रनिर्मितीसाठी लागणारा कच्चा माल नांदेड येथील मुख्य कार्यालयाकडून पुरविला जातो. पॉलीवस्त्र निर्मितीसाठी 'पॉली फायबर' केरळातील त्रिचूर येथून नांदेड मुख्यालयामार्फत मागणीप्रमाणे पाठविले जाते. या केंद्रांतर्गत विणकाम केलेले सर्व कापड नांदेड मुख्यालयास पाठविले जाते. तेथून ते मराठवाड्यातील सर्व विक्री केंद्रांवर पाठविले जाते. सर्व चरखे, हातमाग व अन्य भांडवली वस्तू यांची खरेदी समितीच्या मुख्यालयाकडूनच केली जाते. तसेच मुख्यालयाकडून दरमहा कच्चामाल खरेदी, मजुरी, वेतन आणि इतर खर्चासाठी माहवार खर्च भागविला जातो.[१०९]

संस्थेच्या उत्पादनाची गुणवत्ता तपासण्याकरिता खादी आयोगामार्फत टेस्ट लॅब युनिटचा विभाग चालू करण्यात आला आहे. तसेच विक्रीसाठी व दर्जेदार उत्पादन निर्माण करण्यासाठी नांदेड व औरंगाबाद येथे तयार कपड्यांचा स्वतंत्र विभाग विकसित करण्यात येत आहे.[११०]

इ.स. १९९५ पर्यंत महाराष्ट्र शासन व केंद्र शासन खादी मालावर रिबेट देत होते. म्हणून खादी विक्री मोठ्या प्रमाणावर होती. १९९७ पर्यंत वर्षाला ३ कोटी पर्यंत विक्री होत असे. सन १९९५ पर्यंत

---

१०७.कित्ता, पृ. पाच.

१०८.**मराठवाडा खादी ग्रामोद्योग समिती**, पूर्वोक्त, पृ. ४१६.

१०९.**लातूर जिल्हा गॅझेटिअर**, दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, पृ. ३९२-३९३.

११०.**मराठवाडा खादी ग्रामोद्योग समिती**, पूर्वोक्त, पृ. ६.

महाराष्ट्र शासन खादी ग्रामोद्योग समितीकडून शासनाच्या सेवेतील सेवकांसाठी (चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांसाठी) खादी खरेदी करीत होते. त्यानंतर मात्र शासनाने आर्थिक मदत बंद केल्यामुळे कच्चा माल व खेळते भांडवल कमी होऊन उत्पादनात घट झाली.[१११]

**हातमाग उद्योग** :—

हातमाग चालविणाऱ्या विणकरांची सहकारी संस्था काढणे, त्यांच्या मालाची विक्री करणे त्याचप्रमाणे लोकरीच्या व्यवसायासाठी धनगरांना शासनातर्फे सन १९५४ अखेर नांदेड आणि परभणी जिल्ह्यांत १ लक्ष ५ हजार २५० रुपये बिनव्याजी कर्जाऊ देण्यात आले होते. १९५५-५६ साली सुमारे १० लाख रुपये या कामी बिनव्याजी कर्ज म्हणून देण्याची योजना हातमाग मंडळातर्फे नांदेड व परभणी जिल्ह्यांमध्ये सुरू करण्यात आली. हातमागाचे कापड गिरणीच्या कापडाच्या भावात विकता यावे म्हणून हातमाग कापडाला रुपायांस दिड आणा रिबेट म्हणून देण्यात आला. त्यामुळे नांदेड, देगलूर, मानवत आणि बसमत येथील सहकारी विणकर संस्थांना 'रिबेट' म्हणून सुमारे ५०,००० रुपये मिळाले. बसमत येथे नांदेड आणि परभणी जिल्ह्यांसाठी मिळून रंग देण्याचे एक केंद्र स्थापन करण्यात आले. याकामासाठी सुमारे ९,००० रुपयांची ग्रँट या सहकारी संस्थांना देण्यात आली. तसेच २,००० रुपये कर्ज देण्यात आले. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्ये नांदेड जिल्ह्यात सूत काढण्याच्या सहकारी संस्थांसाठी ६० लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली होती.[११२]

१ एप्रिल १९५६ पासून भोकर राष्ट्रीय विस्तार योजनेअंतर्गत विणकरांची एक औद्योगिक सहकारी संस्था स्थापन करण्यात आली तसेच उमरी येथे अम्बर चरख्याचे एक केंद्र स्थापन करण्यात आले.

सन १९६३ मध्ये नांदेड जिल्ह्यामध्ये सूती कापडाचे नोंदणी झालेले ३,१३५ हातमाग उद्योग होते तर सुती कापडाव्यतिरिक्तचे ५ हातमाग उद्योग होते.[११३]

हातमाग विणकाम उद्योग नांदेड जिल्ह्यातील कुटिरोद्योगामधील महत्त्वाचा उद्योग आहे. हा उद्योग मुख्यत्वे करून नांदेड, देगलूर, लोहा, कंधार, मुदखेड, उमरी, बिलोली आणि मुखेड येथे केंद्रित झालेला आहे. सन १९७१ मध्ये या उद्योगामध्ये कार्यरत असलेल्या कारागिरांची संख्या अनुक्रमे नांदेड १०००, देगलुरकर १०००, कुंडलवाडी २००, मुखेड ५००, मुदखेड ३०० आणि जिल्ह्यातील इतर ठिकाणी १,००० याप्रमाणे होती.

या कालावधीत नांदेड जिल्ह्यामध्ये हातमाग विणकामाची १६ केंद्रे होती. पद्मशाली, रंगारी, मोमिन, हरीजन आणि कोष्टी या जातींचे लोक परंपरागत व्यवसाय म्हणून हा उद्योग करीत. उद्योगाकरिता आवश्यक असलेला कच्चा माल उदा. धागा, रंग आणि इतर रसायने नांदेड, हैद्राबाद, मुंबई आणि सोलापूर येथून प्राप्त केला जात असे. साधारणपणे दर महिन्यास १ ते २ लाख रुपये किमतीच्या कच्च्या मालाची खरेदी उद्योगसंस्थेकडून केली जात असे.[११४]

---

१११. **लातूर जिल्हा गॅझेटिअर**, दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, २००८, पृ. ३९१.

११२. **कल्याणकारी राज्याची वाटचाल**, पूर्वोक्त, पृ. १८-१९.

११३. **स्टॅटिस्टिकल ॲबस्ट्रॅक्ट ऑफ महाराष्ट्र स्टेट**, १९६१-६२ आणि १९६२-६३, पृ. क्र. १९७.

११४. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, पूर्वोक्त, पृ. २७१.

Maharashtra State Gazetteers

३० जून १९६५ पर्यंत जिल्ह्यामध्ये ३,१३५ नोंदणीकृत सूती हातमाग उद्योग होते. हातमाग उद्योग मुख्यत्वेकडून नांदेड, माहूर, धर्माबाद, वानेगाव, मुदखेड, सोहा, कंधार, मुक्रमाबाद, मुखेड, मानसपुरी आणि कराडखेड येथे केंद्रित झालेले होते. हैद्राबाद बँकेच्या सर्वेक्षण गटाने केलेल्या लोहा येथील काही हातमाग उद्योगांच्या मुलाखतीनुसार एका विणकरास एक भाग विकत येण्यासाठी मागाच्या स्वरूपानुसार रु. ३०० ते रु. ६०० आवश्यक असत. त्याचप्रमाणे खेळत्या भांडवलासाठी साधारणपणे रु. २५० पर्यंतची आवश्यकता असे. जिल्ह्यामध्ये एकूण २,७४५ सभासद संख्या असलेल्या १२ हातमाग सहकारी संस्था कार्यरत होत्या.[११५] ३० जून १९६९ पर्यंत या हातमाग विणकरांच्या १२ संस्थांपैकी फक्त ५ संस्थाच कार्यरत होत्या. या संस्थांमध्ये २,७४५ सभासद होते. सन १९६८-६९ मध्ये संस्थेकडे १.८५ लाख रुपयांचा निधी होता. तर ७.६१ लाख रुपये किमतीचे खेळते भांडवल होते. याच वर्षामध्ये त्यांनी ५.१९ लाख रुपये किमतीच्या मालाची विक्री केली ती दर सभासदामागे रु. १८९ एवढीच होती. या १२ हातमाग विणकर सहकारी संस्थांपैकी फक्त चारच संस्थांचे 'ए' आणि 'बी' असे लेखा वर्गवारीनुसार वर्गीकरण झालेले होते.[११६]

सन १९८६-८७ मध्ये जिल्ह्यात एकूण ४० विणकर संस्था होत्या. त्यांची एकूण सभासद संख्या १६,३६९ होती. त्यांनी १,२४,९९ हजार रुपये भाग भांडवल ६,४८ हजार रुपये राखीव निधी ४,३९,१३ हजार रुपये खेळते भांडवल प्राप्त केले होते.[११७] या ४० संस्थांपैकी २६ हातमाग कामगार संस्था, ८ विणकर संस्था, बिगर कृषी पतसंस्था होत्या.[११८]

सन २००८ मध्ये मात्र हातमाग व यंत्रमाग विणकर उत्पादक सहकारी संस्थांमध्ये थोड्या प्रमाणात वाढ झाली. जिल्ह्यामध्ये २७ हातमाग विणकर संस्था होत्या.[११९]

**यंत्रमाग :**

मराठवाडा विकास महामंडळाने वस्त्रोद्योगाला प्रोत्साहन म्हणून सन १९७१ मध्ये यंत्रमाग प्रकल्प सुरू केला होता. या योजनेअंतर्गत मराठवाड्यातील विविध ठिकाणी २४ औद्योगिक सहकारी संस्था सुरू केल्या. या सहकारी संस्थांमध्ये २,३०४ यंत्रमाग पुरविण्यात आले होते. यापैकी नांदेड जिल्ह्यामध्ये ४ सहकारी संस्थांची स्थापना करण्यात आली होती, ज्यामध्ये ३८४ यंत्रमाग बसविण्यात आले. याशिवाय नांदेडमध्ये यंत्रमाग प्रकल्पाकरिता प्रक्रिया प्लॅन्ट उभारणे देखील प्रस्तावित होते.[१२०] हा नांदेड जिल्ह्यातील सर्वात मोठा प्रस्तावित प्रकल्प होता. या प्रकल्पाची एकूण अंदाजित भांडवली किंमत रु. ५.५८ कोटी होती व महाराष्ट्र शासनाने त्यापैकी १० लाख रुपये आगाऊ दिले होते. तर १९७०-७१ मध्ये ४० लाख रुपयांचा निधी देणे प्रस्तावित होते.[१२१]

---

११५. पूर्वोक्त, **स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, लिड बँक सर्व्हे रिपोर्ट**, पृ. २८-२९.

११६. कित्ता, पृ. २४.

११७. पूर्वोक्त, **जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन**, पृ. ११७.

११८. कित्ता, पृ. १०५.

११९. **जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन**, नांदेड जिल्हा, वर्ष २००३-२००४.

१२०. पूर्वोक्त, **स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, लिड बँक स्किम सर्व्हे रिपोर्ट**, पृ. ३१.

१२१. कित्ता, पृ. ५५.

मराठवाडा विकास महामंडळाच्या औरंगाबाद येथील केंद्राने ५ फेब्रुवारी १९७० साली मराठवाड्यात एकत्रित यंत्रमाग प्रकल्प राबविण्यासाठी 'टेस्कॉम' या महामंडळाची कंपनी कायद्यांतर्गत स्थापना केली. तसेच या महामंडळास लागणारे कच्चे कापड (Grey Cloth) पुरविण्यासाठी मराठवाड्यात नऊ ठिकाणी ४८ यंत्रमाग औद्योगिक सहकारी संस्था स्थापन करण्यात आल्या. त्यामध्ये एकूण २,३०४ यंत्रमाग बसविण्यात आले होते.

मराठवाड्यातील आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या व रोजगाराअभावी इतरत्र स्थलांतरित होत असलेल्या विणकरांची भटकंती थांबवून त्यांना रोजगार मिळवून देण्यासाठी शासनाने नांदेड सारख्या औद्योगिकदृष्ट्या मागास भागात टेक्स्कॉम प्रकल्पाची स्थापना केली व मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांत विणकरांच्या ४८ यंत्रमाग औद्योगिक सहकारी संस्थांची स्थापना केली. या विणकरांना एक राहते घर व दोन यंत्रमाग उपलब्ध करून दिले. या संस्थांमार्फत टेक्स्कॉमला लागणाऱ्या कच्च्या कापडाचा पुरवठा होत असे. त्यासाठी विणकरांना ठराविक दराने विणाई मजुरी टेक्स्कॉम कडून मिळत असे. ही व्यवस्था सप्टेंबर, १९९५ पर्यंत कार्यरत होती.

या महामंडळाने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून (MIDC) ३२.३३ एकर जमीन कारखाना उभारणीसाठी ९५ वर्षांच्या अवधीसाठी भाडे तत्त्वावर घेऊन त्यावर कपड्यावर प्रक्रिया करण्याचे अत्यंत आधुनिक असे प्रक्रिया गृह (Processing House) उभारले. या प्रक्रिया गृहामध्ये सूती व कृत्रिम धाग्याच्या कच्च्या कापडावर विविध प्रक्रिया केल्या जात असत. या प्रक्रिया गृहाची उत्पादक क्षमता सूती कापडाकरिता रु. ३६० लक्ष मीटर्स प्रतिवर्षी इतकी होती.

कंपनीच्या वाणिज्यिक उत्पादनाची सुरूवात १९७२ मध्ये झाली. स्थापनेच्यावेळी कंपनीचे प्राकृतिक भागभांडवल ५ कोटी रुपये होते तर भरणा केलेले भाग भांडवल देखील ५ कोटी रुपये होते. महाराष्ट्र शासन, मराठवाडा विकास महामंडळ मर्यादित व भारतीय औद्योगिक विकास बँक यांनी कंपनीचे भागधारण केले होते.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने कंपनीस ८ इंच पाईपलाईनमधून २२०० घन लिटर्स शुद्ध पाणी प्रतिदिन पुरवठा करण्याची व्यवस्था केली होती. तसेच कारखान्यातील दुषित पाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी दुषित पाणी शुद्धीकरण यंत्रणा कार्यान्वित केली होती.[१२२]

मराठवाडा वस्त्रोद्योग महामंडळाने आपल्या मालकीची कापड विक्री केंद्रे व त्यामधून झालेल्या उलाढालींचा तपशील पुढीलप्रमाणे दिला आहे.—सन २०००-२००१ रोजी २७.७१ लक्ष, सन २००१-२००२ रोजी १०.४१ लक्ष, सन २००२-२००३ रोजी ३.०१ लक्ष तर सन २००३-२००४ रोजी ३.१९ लक्ष रुपये किमतीची उलाढाल केली. तर आर्थिक स्थितीसंबंधीत दि. ३१ मार्च २००५ पर्यंतचा गिरणीचा एकूण संचित तोटा रु. ११९.८७ कोटी होता.[१२३]

टेक्स्कॉम प्रकल्प अंतिमतः निकाली निघण्यासाठी शासनाच्या निर्णयानुसार निविदा मागविण्यात आल्या. त्यानुसार १६ ऑगस्ट २००५ रोजी या निविदा उघडून सर्वात जास्त रकमेची निविदा स्विकृत करण्यात आली व प्रकल्प अवसायनात काढण्यासाठी शासनाच्या मान्यतेकरिता प्रस्ताव पाठविण्यात आला.[१२४]

---

१२२. महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ मर्यादित, मुंबई यांच्याकडून प्राप्त माहितीवर आधारित.

१२३. मराठवाडा वस्त्रोद्योग महामंडळाकडून प्राप्त माहितीवर आधारित.

१२४. कित्ता.

याशिवाय सन २००३-२००४ मध्ये जिल्ह्यात हातमाग व यंत्रमागाच्या ३२ सहकारी विणकर संस्था होत्या. या संस्थांमध्ये एकूण ४,७२४ सभासद संख्या होती. या संस्थांनी २२३० हजार रुपये भागभांडवल जमा केले होते. त्यांचे खेळते भांडवल एकत्रितपणे १९,९४५ हजार रुपये होते, तर १,९९ हजार रुपयांची राखीव व इतर निधीची तरतूद करण्यात आली होती.[१२५]

सन २००७-२००८ मध्ये जिल्ह्यात २२ यंत्रमाग विणकर सहकारी संस्था कार्यरत होत्या.[१२६]

महाराष्ट्र राज्य सहकारी वस्त्रोद्योग महासंघानेदेखील नांदेड जिल्ह्याच्या वस्त्रोद्योगास चानला देण्याच्या दृष्टिने सहकारी सूत गिरण्यांच्या स्थापनेस प्रोत्साहन दिले आहे. या महासंघाद्वारे स्थापन करण्यात आलेल्या सूत गिरण्यांबाबतचा स्वतंत्रपणे तपशील पुढीलप्रमाणे आहे.

**१. नृसिंह आदिवासी सहकारी सूत गिरणी लि., देगलूर :** श्री. भास्करराव पाटील खतगांवकर यांच्या प्रयत्नांनी दिनांक २५ फेब्रुवारी १९९१ रोजी या सूत गिरणीची नोंदणी झाली. सूत गिरणीचे कार्यक्षेत्र जिल्ह्यातील देगलूर, बिलोली व मुखेड या तालुक्यांमधील आहे. गिरणीच्या प्रकल्प अहवालाची किंमत ५२९८.०० लाख रुपये इतकी असून चात्यांची क्षमता २५,००० आहे. गिरणीचे जमा झालेले सभासद भाग भांडवल २८०.०१ लाख रुपये आहे तर, शासनाकडून गिरणीस २३८४.१० लाख रुपये भाग भांडवल प्राप्त झालेले आहे. सद्यस्थितीत गिरणीच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले असून मशिनरीसाठी ऑर्डर देण्यात आली आहे. साधारण एका वर्षामध्ये गिरणी उत्पादनाखाली येऊन त्याद्वारे ६०० ते ६५० व्यक्तींना रोजगार प्राप्त होणे अपेक्षित आहे.

**२. मधुकरराव घाटे मागासवर्गीय सहकारी सूत गिरणी लि., मुखेड :** गिरणीचे मुख्यप्रवर्तक, श्री. अविनाश घाटे हे असून दिनांक २४ जुलै १९९२ रोजी गिरणीची नोंदणी करण्यात आली. गिरणीचे कार्यक्षेत्र नांदेड जिल्ह्यातील मुखेड, देगलूर व कंधार या तालुक्यांतील आहे. गिरणीची स्थापित क्षमता २५,२०० चात्यांची असून प्रकल्प किंमत ५२८०.०० लाख रुपये आहे. गिरणीचे सन २०१० पर्यंतचे जमा झालेले सभासद भाग भांडवल १४०.३२ लाख रुपये आहे. तर गिरणीस शासनाकडून ६१८.४१ लाख रुपये भाग भांडवल प्राप्त झाले आहे. सद्यस्थितीत गिरणीच्या बांधकामास मंजुरी मिळाली असून बांधकामास सुरूवात झालेली आहे. उर्वरित शासकीय भाग भांडवल व कर्ज मिळाल्यास दोन वर्षांत गिरणी उत्पादनासाठी येईल व त्यामुळे ६०० ते ६५० व्यक्तींना रोजगार मिळणे अपेक्षित आहे.

**३. रेणूका आदिवासी सहकारी सूत गिरणी लि., किनवट :** दिनांक ५ जून १९८२ रोजी नोंदणी करण्यात आलेल्या या सूत गिरणीचे मुख्य प्रवर्तक, श्री. किसनराव पाचपूते हे होते. सूत गिरणीचे कार्यक्षेत्र किनवट तालुका आहे. गिरणीची स्थापित क्षमता २४,९६० चात्यांची असून प्रकल्प

---

१२५. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, नांदेड जिल्हा, वर्ष २००३-२००४, पृ. ६८.

१२६. कित्ता, वर्ष २००७-२००८, पृ. ७७.

किंमत १२७८.०० लाख आहे. गिरणीने ७५.९५ लाख रुपये सभासद भाग भांडवल जमा केलेले होते तर शासनाकडून ४९४.१५ लाख रुपये भाग भांडवल प्राप्त झाले होते. आय.डी.बी.आय. ने गिरणीच्या इमारतीचे बांधकाम होऊन मशिनरी उभारणीचे काम सुरू असताना मुख्य प्रवर्तक, श्री. किसनराव पाचपूते यांचे निधन झाल्यामुळे गिरणीची पुढील प्रक्रिया कोणीही राबविली नाही. परिणामी गिरणी दिनांक २१ फेब्रुवारी १९९६ रोजी अवसायनात गेली. त्याचबरोबर काही मशिनरीदेखील चोरीला गेली.

**४. नांदेड सहकारी सूत गिरणी लि., नांदेड :** या सूत गिरणीची दिनांक २८ फेब्रुवारी १९६३ रोजी मराठवाडा को.-ऑपरेटिव्ह स्पिनिंग मिल्स या नावाने नोंदणी करण्यात आली. सूत गिरणीचे सभासद भाग भांडवल रुपये १२.९६ लाख रुपये व कर्ज ३८.८७ लाख रुपये होते. गिरणीची स्थापित क्षमता १२,००० चात्यांची असून प्रकल्प किंमत ६४.७९ लाख होती.

फेब्रुवारी १९६९ मध्ये २८६.९४ लाख रुपये खर्च करून ११,९८४ चात्या बसवण्यात आल्या व मा. शामराव कदम यांच्या अध्यक्षतेखाली गिरणीच्या उत्पादनास सुरूवात करण्यात आली होती व त्यामुळे ४०० लोकांना रोजगार प्राप्त झाला. फेब्रुवारी १९६९ ते एप्रिल १९८९ पर्यंत गिरणी नियमित उत्पादनाखाली होती. सन १९८९ पासून गिरणी कधी बंद तर कधी सुरू होती. शेवटी २८ मे १९९३ रोजी गिरणी बंद पडली व त्यानंतर दिनांक २४ जून १९९४ रोजी ती अवसायात काढण्यात आली.[१२७]

त्यानंतर गिरणीचे नांदेड सहकारी सूत गिरणी असे नामकरण करण्यात आले. गिरणीचे सन १९९७ अखेर सभासद भाग भांडवल १९.२८ लाख रुपये होते. गिरणीस शासनाकडून ३७.६३ लाख रुपये भाग भांडवल म्हणून प्राप्त झाले. तसेच गिरणीने २३१.०३ लाख रुपये कर्ज घेतले होते.

या गिरणीमधील उत्पादन चालू असतानाच्या कालावधीतील उत्पादन खर्चाची टक्केवारी नुसार माहिती खालील तक्त्यात दिली आहे :—

| अ.क्र. | उत्पादनाची मानीव विक्री किंमत | खर्चाचा तपशील | वर्ष | |
|---|---|---|---|---|
| | | | १९८०-८१ | १९९०-९१ |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | १०० | एकूण कच्चा माल | ६३.१४ | ६६.२३ |
| २ | १०० | वीज व इंधन | ५.५७ | ९.६५ |
| ३ | १०० | वेष्टनाचा खर्च | ०.९३ | १.१७ |
| ४ | १०० | साठवणुकीचा खर्च | ३.४८ | ४.०१ |
| ५ | १०० | विक्री व वितरण | ०.४५ | ०.४७ |
| ६ | १०० | तांत्रिक व प्रशासकीय वेतन | ७.६८ | २.३७ |
| ७ | १०० | विमा | ०.२६ | ०.३६ |
| ८ | १०० | मुदतीच्या कर्जांवरील व्याज | १७.८७ | १.९५ |

१२७.महाराष्ट्र राज्य सहकारी वस्त्रोद्योग महासंघ मर्यादित, मुंबई यांच्याकडून प्राप्त माहितीवर आधारित.

Maharashtra State Gazetteers

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| ९ | १०० | खेळत्या भांडवलासाठीचे कर्ज | . . | २.३० |
| १० | १०० | इतर प्रशासकीय व उत्पादन खर्च | ४.१० | १.७२ |
| ११ | १०० | घसाऱ्या पूर्वीची एकूण किंमत | ५९.३९ | ३८.११ |
| १२ | १०० | घसारा | २.६९ | १.०२ |
| १३ | १०० | घसाऱ्यासहीत एकूण किंमत | ६२.०८ | ३९.१३ |

सन १९८१ ते २००५ या कालावधीमधील नांदेड सहकारी सूत गिरणीची आर्थिक स्थिती तक्ता क्र. १७ द्वारे दर्शविण्यात आली आहे.

**उस्मानशाही मिल :** उस्मानशाही मिल ही हैद्राबाद-डेक्कन कंपनी ॲक्ट IV नुसार १३३० फसली म्हणजेच इ.स. १९२२ मध्ये कायदेशीरपणे संस्थापित केली गेली. नांदेड जिल्ह्यातील कापड उद्योगामधील संघटीत रोजगारीचा ताळाबंद हैद्राबाद सरकारच्या पुढाकाराने स्थापन झालेल्या या सूत गिरणीच्या माध्यमातून मांडता येतो. हैद्राबादच्या निजाम सरकारकडून श्री. फाजलभाई करीमभाई आणि त्यांच्या समूहास सूतकताई व विणकाम करणाऱ्या या मिलची स्थापना करण्यास परवानगी देण्यात आली होती. या कंपनीकडून २९ जून १९२३ मध्ये उस्मानशाही मिलच्या इमारतीचा पाया भरला. प्रत्यक्ष उत्पादन मात्र नोव्हेंबर, १९२५ पासूनच सुरू झाले. सुरूवातीला या मिलमध्ये १६,५५२ स्पिन्डल्स आणि ४०० लूम्स होत्या. पहिल्या वर्षात या मिलचे उत्पादन जवळजवळ २१.२८ लक्ष रुपये इतके झाले. निजामराज्यात मराठवाडा प्रदेशातील सर्वात मोठा उद्योग म्हणून या उद्योगाकडे बघितले जात होते. पुढील ५० वर्षांच्या काळात औद्योगिकदृष्ट्या या उद्योगाला मराठवाड्यात अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले होते. मिलला प्रगतीपथावर येण्यासाठी विशेषतः दुसऱ्या महायुद्धाचा काळ यावा लागला. या काळात मराठवाड्यातील कापडाला विदेशात म्हणजे अमेरिका, रशिया, इंडोनेशिया, जपान, थायलंड, ब्रिटन इत्यादी देशांमध्ये मागणी वाढल्यामुळे उस्मानशाही मिलमध्ये तयार होणारे कापड हे स्थानिक बाजापेठांऐवजी आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमध्ये निर्यात होऊ लागले. पर्यायाने मिलला उत्पादन आणि उत्पादन गुणवत्ता वाढवावी लागली. हे सर्व करण्यासाठी कामगारांना विविध सुविधा देऊन एकंदरीत निर्यात क्षमता वाढवावी लागली. यावेळी नांदेड येथील मिल्ट्री कापड आणि नांदेड टेरीकॉट हे प्रसिद्ध कापड होते. तसेच नेहरु छाप, बैंगण छाप, तीर छाप हे कापडही स्थानिक बाजारपेठांमध्ये प्रसिद्ध होते.

मिल स्थापन झाल्यानंतर पहिल्या दोन दशकांतील कापडाची गुणवत्ता ही २०$^{s}$ ते २५$^{s}$ काऊंट एवढी होती. परंतु भारतातील कापड विदेशात जाऊ लागल्यामुळे यंत्रसामग्रीत सुधारणा केल्या गेल्यामुळे दररोज ६० ते ७० हजार मीटर ऐवजी ९० हजार ते एक लाख मीटर कापड तयार होऊ लागले. तसेच कापडाची गुणवत्तादेखील वाढविण्यात आली. त्यानुसार ३०$^{s}$ ते ४०$^{s}$ काऊंट जाडीचे कापड तयार होऊ लागले आणि पर्यायाने आर्थिक उत्पादनही वाढत गेले. हा भरभराटीचा काळ इ.स. ते १९७० च्या दशकापर्यंत होता. नांदेड जिल्ह्यातील कापड उद्योगामधील संघटीत रोजगारीचा ताळाबंद १९२३ मध्ये हैद्राबाद सरकारच्या पुढाकाराने स्थापन झालेल्या या सूत गिरणीच्या माध्यमातून मांडता येतो. हैद्राबाद सरकार काही समभाग धारण करत असल्याने ही एक मिश्र संस्था होती. परंतु १९५६ मध्ये झालेल्या पुनर्बांधणीनुसार या मिलचे मालकीहक्क महाराष्ट्र शासनाकडे हस्तांतरीत केले गेले.

Maharashtra State Gazetteers

सन १९६३ मध्ये गिरणीमध्ये ३८,७९८ चरखे आणि ९०२ विद्युत भाग होते. कच्चा कापूस स्थानिक बाजारपेठ तसेच परभणी आणि औरंगाबादच्या बाजारातून खरेदी केला जात असे. मुख्यत्वेकरून चादरी आणि ताग्याच्या कापडाचे उत्पादन केले जात असे. एकूण उत्पादनातील ४० टक्के उत्पादन अफ्रिकेस निर्यात केले जात असे. गिरणीद्वारे नियमितपणे ३०००० गासड्या दोऱ्याची विक्री केली जात असे. यामुळे सुमारे ४,२०० लोकांना रोजगार पुरविला गेला.

१९६३ साली गिरणीचे प्राधिकृत भांडवल १२ कोटी ५० लाख रुपये होते. विक्रीस काढलेले भांडवल रुपये १५ लाख होते तर अभिदत्त भांडवल ८७,२६,१०० रुपये होते. गिरणीचे कर्ज रोखे रु. ४,८४,९५९ रुपये होते आणि रुपये २,२४,४५० इतका राखीव व अतिरिक्त निधी उपलब्ध होता. स्थिर भांडवल आणि गुंतवणूक अनुक्रमे रुपये १,०२,९९,५९१ आणि १,७२,९३३ रुपये होती. तर खेळते भांडवल रुपये ७७,५७,५७३ होते. गिरणीचे ताळाबंद पत्रक १४,२४,८०९ रुपयांचा नफा दर्शवित होते. या साली गिरणीने एकूण २,१३,९२,००७ रुपये किंमतीच्या मालाची विक्री केली. सूत विक्रीद्वारे २१,५०,७४६ रुपये तर उत्पादन प्रक्रीयेत निर्माण झालेल्या अनुपयोगी मालाच्या विक्रीद्वारे रुपये ४,१९,३९१ प्राप्त झाले. वर्ष अखेर गिरणीकडे ३६,३३,१४६ रुपये किमतीच्या मालाचा साठा शिल्लक होता.[१२८]

सन १९६९ मध्ये उस्मानशाही मिलचे भरणा करण्यात आलेले भांडवल ८७.२६ लाख रुपये होते तर स्थिर मालमत्ता १०६.७३ लाख रुपये होती. मिलने सप्टेंबर १९६९ अखेरीस २९१.३२ लाख रुपये किमतीच्या मालाची विक्री केली. या मिलची खेळत्या भांडवलाची आवश्यकता व्यापारी बँकामार्फत पुरविली जात असे. मात्र गिरणीची कार्यक्षमता समाधानकारक नव्हती.[१२९]

कंपनीचे मूळ प्राधिकृत भाग भांडवल रुपये १ कोटी होते. जून, १९५९ मध्ये २५,००० भागांची निर्मिती करून रुपये २५,००,००० अधिकचे भांडवल वाढविण्यात आले.

१९७६ मध्ये कंपनीचे प्राधिकृत भाग भांडवल रुपये १,२५,००,००० होते. त्यापैकी विक्रीस काढलेले भांडवल ९५,००,००० होते तर जमा झालेले भांडवल रुपये ८७,२६,२०० इतके होते. मिलचे संचालक, श्री. बी. पी. सिन्हा हे होते. मिलचे लेखापरीक्षणाचे काम नटराज अय्यर आणि कंपनी, हैद्राबाद यांच्यामार्फत केले जात होते.

मिलमध्ये सूत कताई वटण व दाबणी तसेच कापड निर्मितीसाठीच्या कापसावरील इतर प्रक्रिया केल्या जात. उत्पादनासाठी मिलमध्ये ४०,४६० चात्या आणि ९०२ माग होते. कच्चे कापड, रंगीत आणि खळ दिलेले कापड यांचे उत्पादन केले जाई. ज्यामध्ये लांब ताग्याचे कापड, चादर, बेडशीट, सदरे, सुसी (susy) इत्यादींचा समावेश होता. उत्पादन प्रक्रियेत चाती निहाय १ ते ४० चात्यांकरिता भांडवली खर्च रुपये ११४ होता.[१३०]

---

१२८. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, पूर्वोक्त, पृ. २६१-२६२.

१२९. **स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, लिड बँक स्किम सर्व्हे रिपोर्ट**, पूर्वोक्त, पृ. २७.

१३०. **कोठारी, इकॉनॉमिक ॲण्ड इंडस्ट्रिअल गाईड ऑफ इंडिया**, १९७६, पृ. २०५.

Maharashtra State Gazetteers

**उस्मानशाही मिलचे अपयश आणि त्याची कारणे :** २० व्या शतकाच्या उत्तरार्धात म्हणजे १९७५ नंतर या कापड गिरणीस अनेक आंतर व बाह्य कारणांमुळे अपयश आले. व्यवस्थापनातील सरकारीकरण व दुर्लक्ष, प्रशासनाचा हस्तक्षेप, विणकाम आणि सुतकाम मिळून कारखाने चालत नव्हते, जुनाट मशिनरीज व लूम्स, लूम्सचे साचे कामगारांना विकण्यात आले, भाग भांडवलाची गुंतवणूक कमी, कच्च्या मालाचा आणि विजेसारख्या अंतर्गत वस्तुंचा पुरवठा, इतर उद्योगांचा स्पर्धात्मक होणारा परिणाम, नविन तंत्रज्ञानाचा विकास न होणे, सरकारची या क्षेत्राकडे होणारी डोळेझाक, उद्योगांतर्गत विकासाकडे दुर्लक्ष, आर्थिक संस्थांची देयके न देणे ही उस्मानशाही मिलला अपयश येण्यामागची काही महत्त्वाची कारणे होती.

**उस्मानशाही मिलच्या अपयशावरील आवश्यक उपाययोजना :** उस्मानशाही तथा एन.टी.सी. मिल पूर्वस्थितीत आणण्यासाठी तसेच कार्यक्षम बनविण्यासाठी पुढील काही उपाययोजना करणे आवश्यक आहे.

प्रशासकीय अधिकारी आणि कामगार यांच्यात कार्यक्षमता आणि सहकार्याची भावना निर्माण करणे, सरकारच्या एक्साईज ड्युटीज, कस्टम ड्युटीज, एक्सपोर्ट ड्युटीज, रिझर्वेशन इत्यादी धोरणांवर लक्ष ठेवणे, शासनाकडून जास्तीत जास्त कामगारांना रोजगार उपलब्ध करून देणे, परिसरात कापूस उत्पादनासंबंधी इतर उद्योग उभारणे, कामगार संघटनांद्वारे मिलच्या कारभारावर लक्ष ठेवणे, कापड गिरण्यांचे खाजगीकरण करण्याच्या धोरणामुळे कामगार वर्ग, शासन आणि खाजगी मालक यांच्या दुहेरी संकटात सापडण्याची शक्यता असल्याने मिलचे खाजगीकरण केले जाऊ नये. जागतिक स्पर्धेत टिकण्यासाठी अत्याधुनिक यंत्रसामग्री वापरणे, उत्पादीत मालाची योग्यवेळी योग्य दराने विक्री होण्यासाठी विविध योजनांद्वारे केंद्र व राज्य शासनाने पुढाकार घेणे, अत्याधुनिक यंत्र आणि कामगार यांच्यात संतुलन साधण्यासाठी प्रशिक्षित कामगारांची नियुक्ती तसेच पुर्वीच्या कामगारांनाही प्रशिक्षित करणे.

कच्च्या मालाची म्हणजेच कापसाची गुणवत्ता वाढविण्याकडे शासनाने लक्ष देणे त्याकरिता कापसाच्या नवीन संशोधित जाती बाजारपेठेत वितरीत करणे, विविध कापूस संशोधन केंद्र उभारणे आवश्यक आहे. बाजार व्यवस्थापनाच्या बाबतीत शेअर्स विक्री करणे, बाजारातील तेजी मंदीवर लक्ष ठेवणे, मूल्य आणि किमतीतील ताळेबंद साधणे आणि उद्योगाची अनेक विभागांत विभागणी करणे आवश्यक आहे.

**लोकर व रेशीम उद्योग :**

**लोकर विणकाम :** प्राणीज तंतुपैकी लोकर व रेशीम हे दोन प्रकार महत्त्वाचे आहेत. मेंढ्या, बकऱ्या अपवादात्मकपणे ससे, ऊंट इत्यादी प्राण्यांची लोकर वापरता येते. त्यातही मेंढ्यांची लोकर चांगली व त्यामानाने स्वस्त असल्यामुळे ती सर्वात जास्त वापरात आहे. लोकरीच्या गुणधर्मात उबदारपणा हा प्रमुख गुण असल्यामुळे थंड प्रदेशात व इतरत्र थंडीच्या दिवसात लोकरीचे कपडे प्रामुख्याने वापरतात. सफाई, धुणे, रंगविणे इत्यादी क्रियांच्या दृष्टिनेही लोकरीचे कापड सोईचे असल्याने हा जिल्ह्यातील एक महत्त्वाचा हंगामी लघुद्योग आहे.

तत्कालिन मराठवाड्यात सन १९०८ च्या सुमारास धनगर त्यांच्याकडील मेंढ्यांच्या लोकरीपासून ब्लँकेट बनवत असत. त्याकाळी त्यांनी तयार केलेले ब्लँकेट प्रती नग रु. २ ते ३ ला विकली जात असत. सन १९६१ मध्ये जिल्ह्यात २७९४२ कामगार लोकरीसाठी मेंढ्या पाळण्याचा धंदा करत होते. मुखेड व शहापूर या दोन केंद्रांच्या ठिकाणी लोकर विणणाऱ्यांच्या संस्था होत्या व तेथे लोकरीची कांबळी किंवा घोंगड्या धोट्यावर विणल्या जात. लोकरीवस्त्र निर्मितीच्या उद्योगांपैकी घरगुती उद्योगात १६७ पुरुष कारागीर व १६४ स्त्री कारागीर कार्यरत होते. तसेच बिगर घरगुती लोकरी वस्त्रोद्योगात फक्त २ पुरुष कारागीर होते.

नांदेडमध्ये मुख्यत्वे करून बिलोली तालुक्यात हा उद्योग केंद्रित झालेला होता. यामध्ये धनगर आणि सनगर या जाती प्रामुख्याने कार्यरत होत्या. त्यापैकी धनगर मेंढ्या पाळण्याचे तर सनगर हे कांबळी विणण्याचे काम करीत. लोकर विणकामाच्या या उद्योगात माग, ब्रश, लाकडी धोटे आणि चाटी हे साहित्य आवश्यक असे. माग प्रती रुपये १५०, ब्रश रु. १०, लागडी धोटे रु. २ व चाटी रु. १ या किंमतीला हे साहित्य बाजारात उपलब्ध होते.

१९६२ मध्ये जिल्ह्यात औद्योगिक सहकारी संस्थांमध्ये ३ लोकरी विणकाम करण्याच्या संस्थांचा समावेश होता. सुत व लोकर विणकाम करणाऱ्या या सहकारी संस्थांनी एकत्रितपणे १,४७,५१४ लाख रुपये किंमतीच्या वस्तुंचे उत्पादन केले.[१३१]

या कालावधीमधील जिल्ह्यातील मेंढ्या मध्यम प्रतीच्या होत्या व त्यांच्यापासून मिळणाऱ्या लोकरीचे प्रमाण कमी होते. तसेच लोकरीचा दर्जा फारसा चांगला नसे.[१३२]

मराठवाडा खादी ग्रामोद्योग समितीदेखली जिल्ह्यामध्ये लोकरीवस्त्र निर्मितीच्या क्षेत्रामध्ये कार्यरत असून नांदेड येथील समितीच्या केंद्रामधून सन २००५-२००६ साली ११.४२ लाख रुपये किंमतीची विक्री करण्यात आली तर वर्षाअखेर ८.९३ लाख रुपये किंमतीचा साठा समितीकडे शिल्लक होता. सन २००८-२००९ रोजी ९.५६ लाख रुपये किंमतीच्या लोकरी मालाची विक्री झाली तर वर्ष अखेर ११.६१ लाख रुपये किंमतीचा साठा शिल्लक होता.[१३३] अलिकडच्या काळात यंत्रावर विणलेल्या सुबक, आकर्षक व स्वस्त लोकरी वस्तू तसेच तिबेट, लडाख, नेपाळ येथून येणाऱ्या मोठ्या प्रमाणावरील लोकरी वस्त्रांशी स्पर्धा करण्यास स्थानिक कारागिर असमर्थ ठरत आहेत.

**रेशीम उद्योग :**

प्राणिज तंतूपैकी कापड विणकामासाठी वापरण्यात येणारे रेशीम हे किड्यांपासून मिळते. या किड्यांची विशिष्ट पद्धतीने पैदास करून त्यांच्या सभोवतीच्या कोषापासून रेशीम मिळविण्यात येते. सुबकता, आकर्षकपणा, स्पर्शास मुलायम व सुखदायक यादृष्टीने रेशमीवस्त्र अद्वितीय आहे.

---

१३१. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर, १९७१,** पृ. २७९.

१३२. **कल्याणकारी राज्याची वाटचाल**, नांदेड जिल्हा, जानेवारी, १९५७, पृ. ८.

१३३. मराठवाडा खादी ग्रामोद्योग समिती, नांदेड, वार्षिक अहवाल, वर्ष २००८-२००९, पृ. ७.

Marathwada State Gazetteers

जिल्ह्यात रेशीम संचालनालय, नागपूर यांच्या नियंत्रणाखाली एकही रेशीम निर्मिती उद्योग सध्या अस्तित्त्वात नाही.[१३४] परंतु मराठवाडा खादी ग्रामोद्योग समितीद्वारे रेशीम वस्त्राची निर्मिती व विक्री केली जात असे. सन २००३-२००४ साली रेशीम उत्पादनाअंतर्गत १७६ एकर जमिनीवर तुतीची लागवड करण्यात आली.[१३५] वर्ष २००५ ते २००९ पर्यंतची मराठवाडा खादी ग्रामोद्योग समितीकडे उपलब्ध असलेल्या रेशीम साठ्याची आणि या कालावधीत केलेल्या विक्रीची स्थिती पुढे दर्शविल्याप्रमाणे आहे.[१३६]

| वर्ष | शिल्लक साठा | विक्री | |
|---|---|---|---|
| २००५-२००६ | ३०.२९ | ९.४२ | १ |
| २००६-२००७ | २७.८४ | ९.३७ | ८ |
| २००७-२००८ | २३.४४ | १२.७ | ५ |
| २००८-२००९ | १९.९३ | १७.५६ | ७ |

**पॉलिवस्त्र :**

मराठवाडा खादी ग्रामोद्योग समितीद्वारे नांदेडमध्ये पॉलिवस्त्राची देखील उत्पादन व विक्री केली जाते. या प्रकारच्या कापडाला चांगली मागणी असून समितीद्वारे सन २००५ ते २००९ या कालावधीत केलेल्या उत्पादन, शिल्लक साठा व विक्रीची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

| वर्ष | उत्पादन | उत्पादनाची किंमत | शिल्लक साठा | फुटकर विक्री | परप्रांत ठोक विक्री |
|---|---|---|---|---|---|
| २००४-२००५ | ५,७४१ | ५.०४ | . . | २२.१९ | ३.१९ |
| २००५-२००६ | १,०६९ | ०.९३ | ४९.२० | १३.११ | ०.७७ |
| २००६-२००७ | ७,६२० | ९.७३ | ५३.६१ | १३.२१ | ०.६२ |
| २००७-२००८ | ७,७०६ | ९.१७ | २८.०६ | १३.८९ | ०.७१ |
| २००८-२००९ | १०,००७ | १५.२३ | ६८.७७ | २८.२३ | १.३० |

Maharashtra State Gazetteers

## कागद, कागदाच्या वस्तू, मुद्रण, प्रकाशने व संबंधित उद्योग

या उद्योगांतर्गत पल्प (कागदाचा लगदा) कागद, कागदी पुठ्ठा, वर्तमानपत्राचा कागद, पेपर बॉक्स, पेपर बॅग, विशेष उद्योगासाठी तयार केलेला कागद, वर्तमानपत्र, छपाई आणि प्रकाशन, नियतकालिके, पुस्तके, निर्देशिका, नकाशे, पाम्प्लेटस् इत्यादींची छपाई व प्रकाशन व तत्सम उद्योगांचा समावेश होतो.

१३४.रेशीम संचालनालय, नागपूर यांनी पाठविलेल्या माहितीच्या आधारे.

१३५.**जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, नांदेड जिल्हा**, वर्ष २००३-२००४, पृ. ९९.

१३६.**मराठवाडा खादी ग्रामोद्योग समिती, नांदेड, वार्षिक अहवाल**, वर्ष २००८-२००९, पृ. ३ व ७.

**कागद व कागदाच्या वस्तू :** नांदेड जिल्ह्यातील किनवट तालुका वनसंपत्तीने संपन्न असल्याने कागद व कागदी वस्तू निर्मितीसाठी आवश्यक असणाऱ्या कच्च्या मालाच्या उपलब्धतेची नैसर्गिक पार्श्वभूमीच जिल्ह्याला लाभलेली आहे.

लघुउद्योगांतर्गत येणाऱ्या या उद्योगामध्ये जिल्ह्यात सन १९६१ मध्ये एकूण फक्त दहा कामगार कार्यरत होते. त्यापैकी ४ पुरुष तर ६ महिला कामगार होते. त्यापैकी गृहउद्योग क्षेत्रामध्ये ४ पुरुष आणि ५ महिला कार्यरत होत्या, तर गृहोद्योग व्यतिरिक्तच्या क्षेत्रामध्ये फक्त १ महिला कामगार होती.[१३७]

१९७१ मध्ये जिल्ह्यामध्ये कागदी पिशव्या बनविणाऱ्या एका प्रस्तावित कारखान्यास मान्यता देऊन तात्पुरत्या स्वरुपाचा नोंदणी क्रमांक देखील देण्यात आला होता.[१३८]

लगदा, कागद, वर्तमानपत्राचा कागद, पुठ्ठा वगैरे बनविण्याचे लघुद्योगांतर्गत सन १९८२-८३ या कालावधीत नोंदणी झालेले दोन कारखाने जिल्ह्यामध्ये होते. यापैकी एक कारखाना बंद झालेला होता तर उर्वरित एका कारखान्यामध्ये २२ पुरुष व १२ स्त्रिया असे एकूण ३४ कामगार कार्यरत होते. या कामगारांनी यावर्षभरामध्ये एकूण १०,४३८ श्रमदिवस कार्य केले होते. याच साली कागदाच्या अगर पुठ्ठ्याच्या वस्तू बनविण्याचादेखील एक नोंदणीकृत कारखाना जिल्ह्यामध्ये होता. या कारखान्यामध्ये ४५ पुरुष व ३५ स्त्रिया कार्यरत होते व त्यांनी एकूण २१,११४ श्रमदिवस कार्य केले होते. कागद व कागदाच्या वस्तू बनविणे तसेच छपाई व प्रकाशन या संलग्न उद्योगांमध्ये या कालावधीत स्थिर भांडवल व खेळते भांडवल स्वरुपात अनुक्रमे ९२,४४ हजार रुपये व १२,४३ हजार रुपये गुंतविण्यात आले होते. उद्योगांमध्ये ११४ कामगार आणि १५७ कर्मचारी कार्यरत होते व त्यांना १,६५ हजार रुपये वेतन देण्यात आले होते. सर्व उद्योगांची एकूण १८,९९ हजार रुपये किमतीच्या एकूण उत्पादनावरील एकत्रित मिळकत ३,२० हजार रुपये होती. कारखान्यांची एकूण निविष्टी २०,६७ हजार रुपये होती तर उत्पादनामुळे होणारी मूल्यवृद्धी मात्र उणे ६,५५ हजार रुपये होती. याशिवाय लेटरहेड छापणे, रबरी शिक्के बनविण्याचा एक उद्योग जिल्ह्यामध्ये होता व त्यामधून १० कामगार कार्यरत होते.[१३९]

सन १९८६-८७ मध्ये लगदा, कागद, वर्तमानपत्राचा कागद बनविण्याचे दोन उद्योग जिल्ह्यामध्ये होते. त्यामध्ये १११ पुरुष व १४ स्त्रिया कार्यरत होते व त्यांनी एकूण ३९,२२५ श्रमदिवस उत्पादन कार्य केले होते तर कागदाच्या अगर पुठ्ठ्याच्या वस्तू बनविण्याचा एक कारखाना होता व त्यामधून १२३ कामगार कार्यरत होते. तसेच लेटरहेड छापणे, रबरी शिक्के बनविणे इत्यादींचा एक नोंदणीकृत उद्योग जिल्ह्यामध्ये होता. या उद्योगामध्ये ९ पुरुष कामगार कार्यरत होते व त्यांनी एकूण २,५४९

---

१३७. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, १९७१, पृ. २५९.

१३८. **स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, लीड बँक स्किम, सर्व्हे रिपोर्ट ऑन नांदेड डिस्ट्रिक्ट**, महाराष्ट्र, मार्च १९७१, पृ. ३२.

१३९. **जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, नांदेड जिल्हा अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन**, १९८१-८२, पृ. १०६-११५.

श्रमदिवस उत्पादनाचे कार्य केले होते. या उद्योगांमध्ये एकूण ९९,३२ हजार रुपये स्थिर भांडवल गुंतविण्यात आले होते. तर उद्योगांची आर्थिक स्थिती विशेष अनुकूल नव्हती. कारण उद्योगाचे खेळते भांडवल -११,१५ हजार रुपये होते. २०६ कामगार व २३३ कर्मचारी यामध्ये कार्यरत होते व त्यांना एकूण १०,५० हजार रुपये वेतन देण्यात आले होते. या उद्योगांनी उपरोक्त कालावधीत १,२७,६५ हजार रुपये किमतीच्या उत्पादनांवर १३,५७ हजार रुपये मिळकत प्राप्त केली होती. उद्योगांची एकूण निविष्टी १,१५,४२ हजार रुपये होती तर उत्पादनामुळे १३,१० हजार रुपये मूल्यवृद्धी प्राप्त झाली होती.[१४०]

सन २००१-२००२ साली कागद व कागदापासूनच्या इतर उत्पादनांचे ४ उद्योग जिल्ह्यामध्ये होते. यापैकी माहिती पाठविणाऱ्या एका उद्योगामध्ये १९ पुरुष व ६ स्त्रिया असे एकूण २५ कामगार कार्यरत होते व त्यांनी एकूण ७,५६२ श्रमदिवस उत्पादनाचे कार्य केले होते. उर्वरित ३ लघुउद्योगांद्वारे १५० व्यक्तींना रोजगार प्राप्त झाला होता.[१४१]

सन २००६ मध्ये कागद निर्मिती व मुद्रण इत्यादींचे एकूण ९१ उद्योग जिल्ह्यामध्ये होते. या उद्योगांमध्ये यंत्र व सयंत्र स्वरुपात २१५ लाख रुपये गुंतविण्यात आले होते व २६५ व्यक्तींना रोजगार प्राप्त झाला होता.[१४२]

कागद आणि कागदी वस्तू निर्मितीचे १५ नोंदणीकृत उद्योग जिल्ह्यामध्ये मार्च २००९ अखेर होते. या उद्योगांमध्ये १८१ कामगार कार्यरत होते. उद्योगांची यंत्र व संयत्रातील एकूण गुंतवणूक ३६६ लाख रुपये होती. तर स्थापित क्षमता ८१६ लाख रुपये होती.[१४३]

ऑगस्ट २०१० अखेरच्या नोंदीनुसार फक्त कागद व कागदाच्या वस्तू बनविण्याचे १७ उद्योग जिल्ह्यामध्ये होते. या उद्योगांमध्ये ४७४ व्यक्ती कार्यरत असून यंत्र व संयंत्रातील गुंतवणूक ६६६ लाख रुपये तर उत्पादन क्षमता १,३१६ लाख रुपये आहे.[१४४]

**छापखाने, प्रकाशने व संलग्न उद्योग :** जिल्ह्यातील छपाई व मुद्रण उद्योगास विसाव्या शतकापूर्वीचा इतिहास आहे. ब्रिटिशकाळात तत्कालीन रेव्हेन्यू अधिकाऱ्यांनी कै. भुजंगराव दादासाहेब अंबेकर व कै. नागोराव अंबेकर या बंधुंच्या मोडी लिपीतील मोत्यासारख्या वळणदार अक्षरात लिहिलेल्या जमाबंदी फाईल पाहून त्यांना एक शिळा प्रेस टाकण्यासाठी प्रोत्साहन दिले. त्यांनी सुंदर उर्दू अक्षर असलेल्या एका गृहस्थांना भागीदारीत घेऊन 'शारदाप्रेस' नावाने नांदेड जिल्ह्यातील प्रथम छापखाना सुरू केला. सन १९०१ मध्ये या शारदा प्रेसचे नामांतर व रुपांतर 'गोदावरी प्रिंटींग प्रेस' मध्ये झाले. त्यानंतर अंबेकर बंधूंनी नांदेड व नांदेडच्या आसपास बोलल्या जाणाऱ्या भाषांचे टाईप्स मागवून त्यानुसार छापखान्याचा विकास करत सर्व प्रकारच्या गरजूंची गैरसोय दूर केली.

---

१४०. पूर्वोक्त, वर्ष १९८६-८७, पृ. ८०-८६.

१४१. कित्ता, वर्ष २००१-२००२, पृ. ४५.

१४२. प्र. व्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, नांदेड यांच्याकडून प्राप्त माहितीआधारे.

१४३. उप अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्याकडून प्राप्त माहितीआधारे.

१४४. डॉ. जयंत जोशी, संचालक, बी.सी.यु.डी., स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या लेखनावर आधारित.

सन १९३० मध्ये श्री. ग. ना. अंबेकर यांनी व्यवसायाची सूत्रे स्विकारल्यानंतर व्यवसायाची बिघडलेली आर्थिक परिस्थिती सुधारण्याबरोबरच परभणी येथे 'आनंद सागर' व निजामाबाद येथे 'श्रीधर प्रिंटींग प्रेस' या जोडशाखा सुरू केल्या.

सन १९६६ मध्ये गोदावरी मुद्रणालयात मराठी, उर्दू, इंग्रजी, गुजराथी, गुरूमुखी, तेलगू अशा अनेक भाषांचे तसेच अनेक रंगी व अनेक ढंगी मुद्रण केले जात असे. याच सुमारास श्री. अंबेकर यांनी जर्मन मुद्रणतज्ज्ञ श्री. वाल्टर आर्प यांच्या 'मल्टि कलर्ड प्रिंटींग' बाबतच्या मार्गदर्शनाचा लाभ घेऊन तसेच अद्ययावत मशिनरी व उत्तम कारागिरांच्या सहाय्याने प्रेसमध्ये विकास घडवून आणला. या प्रेसला अनेक पारितोषिके प्राप्त झालेली आहेत.[१४५]

पै. महंमद अब्दुल्ला यांनी सन १९१९ मध्ये महबूबीया प्रेसची स्थापना केली. तयार फॉर्मचा स्टॉक सतत तयार असतो हे या प्रेसचे वैशिष्ट्य असून दरवर्षी दीवाळीच्या सुमारास व्यापाऱ्यांना लागणाऱ्या वह्यांचा जंगी स्टॉक विक्रीसाठी तयार करून ठेवले जाते.

१९४४-४५ साली श्री. काबरा बंधू यांनी उमरखेड येथे मुद्रण व्यवसाय सुरू केला. १९४९ साली पोलीस ॲक्शन नंतर त्यांनी आपला व्यवसाय जिल्ह्याच्या ठिकाणी नांदेड येथे स्थलांतरीत करून हिंदुस्थान प्रिंटींग प्रेस या नावाने त्याची सुरूवात करण्यात आली. २ ऑक्टोबर १९५९ रोजी श्री. बालाप्रसादजी काबरा यांनी महाराष्ट्र प्रिंटींग प्रेसची स्थापना केली. या प्रेसमध्ये प्रिंटींग, बायडिंग, रूलिंग तसेच स्टॅम्पस् तयार करण्याचे काम केले जाते. सन १९५१ मध्ये सुभाष रोड येथे जयराम प्रिंटींग प्रेस, १९५९ साली मोंढा येथे भारत प्रिंटींग प्रेस, १५ ऑक्टोबर १९६४ रोजी पावडे प्रिंटींग प्रेस, १९६४ मध्ये सिटी प्रिंटींग प्रेस या प्रिंटींग प्रेसची स्थापना झाली. नंतरच्या काळात सन १९६३ मध्ये 'विजय प्रिंटींग प्रेस' ची स्थापना झाली. १९३२ साली श्री. विनायकराव टोंगे यांनी हैद्राबाद येथे माणिक प्रभू प्रिंटींग प्रेसची स्थापना केली. सुरूवातीस या प्रेसमध्ये लियो छपाईची व्यवस्था होती. त्याकाळी मुद्रांकाचा प्रचलित राजकारणाशी संबंध येत असल्याने सरकारने १९४५ साली या छापखान्यावर बंदी घातली. सन १९६४ मध्ये माणिक प्रभू प्रिंटींग प्रेस या प्रेसचे साहित्य खरेदी करून प्रजावाणी प्रेस चालू करण्यात आली. ही प्रेस स्थापण्यामध्ये श्री. पळनिटर, श्री. नंदकुमार देव, श्री. सुधाकर डोईफोडे व श्री. बियाणी यांचा विशेष सहभाग होता. प्रजावाणी पत्र अल्पावधीत लोकप्रिय झाल्याने प्रेसचाही विस्तार करून नियतकालिकाव्यतिरिक्त ग्राहकांची अन्य कामेदेखील स्विकारली जाऊ लागली. सध्या ही प्रेस गुरू गोविंद रोडच्या टोकावर गुरूद्वार मंदिराशेजारी कार्यरत आहे.

श्री. बंकटलाल काबरा यांनी दि. ७ ऑगस्ट १९६३ रोजी नांदेडमधील जुना मोंढा येथे हैद्राबादहून आणलेल्या जुन्या मशीन व टाईपवर लक्ष्मी प्रिंटींग प्रेस चालू केली. याच कालावधीत उस्मानशाही मिल वर्कर्स युनियनतर्फे एकजूट प्रिंटींग प्रेस सुरू करण्यात आली. या प्रेसद्वारे 'श्रमिक एकजूट' साप्ताहिक प्रसिद्ध करण्यात येत असे.

सरदार अमसिंग यांनी हजुरी समाचार या गुरूमुखी नियतकालिकाच्या निर्मिती व संपादनाकरीता सन १९६१ मध्ये सुभाष रोड येथे गुरूनानक प्रिंटींग प्रेसची स्थापना केली. या प्रेसमध्ये गुरूमुखी, हिंदी,

१४५. **स्मरणिका, महाराष्ट्र मुद्रण परिषद,** १५ वे अधिवेशन, नांदेड १९६६ मधील माहितीवर आधारित.

इंग्रजी व मराठी या भाषांतून काम केले जाते. स्वतःच्या प्रेसमध्ये छापले जाण्यापूर्वी प्रजावाणी साप्ताहिक याच प्रेसमधून प्रसिद्ध होत असे.

सन १९३० ते १९६५ या कालावधीत अशाप्रकारे नांदेड जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणावर छपाई उद्योगाचा विस्तार झाला. परंतु या कालावधीमधील जिल्ह्यातील छपाई उद्योगातील विशेष उल्लेखनिय बाब म्हणजे सौ. कुसुमावती रसाळ यांनी इतर प्रेसकडून आपले 'प्रतिभा' हे साप्ताहिक मुद्रित करून घेताना कंपोझिंगचे ले-आऊट, शुद्धीकरण या बाबतीत येणाऱ्या अडचणी ध्यानात घेऊन स्वतंत्रपणे मशिनरी खेरदी करून इ.स. १९६० च्या फेब्रुवारीमध्ये रमेश प्रिंटींग प्रेसची स्थापना केली. स्थापनेच्या वेळी प्रेसमध्ये तीन ट्रेडल्स, कटिंग व रूलिंग मशीन्स होते. मुद्रणालयात मराठी व इंग्रजी छपाई केली जाते. तसेच रूलिंग व बाईंडिंगची कामे स्विकारली जातात. तसेच सध्या प्रतिभा साप्ताहिकाशिवाय गोदातीर समाचार दैनिक, मॅट्रिक मार्गदर्शक व इतर पाक्षिके यांचे देखील प्रकाशन केले जाते.

याव्यतिरिक्त सतगुरू प्रिंटींग प्रेस, बालाजी प्रिंटींग प्रेस, योगेश्वरी प्रिंटींग प्रेस, प्रभात प्रिंटींग प्रेस, अशोक प्रिंटींग प्रेस व इतर काही मुद्रणालयांची या कालावधीत स्थापना झाली.

सन २००१ मध्ये नांदेड शहरात १२२ नोंदणीकृत मुद्रणालये होती.[१४६] नांदेड शहराव्यतिरिक्त जिल्ह्यामध्ये अर्धापूर येथे १, उमरी २, कंधार १०, किनवट ७, देगलूर ८, धर्माबाद ५, बिलोली ६, भोकर ६, मुखेड ९, मुदखेड ३, माहूर २, लोहा ८, हदगाव ६, हिमायतनगर ३, तामसा २ तर नायगाव (खैरगाव) येथे १० नोंदणीकृत मुद्रणालये कार्यरत होती.

नवीन सहस्त्रकामध्ये मुद्रण तंत्रामध्ये आमुलाग्र बदल होत आहेत. लेटर प्रेसच्या काळामध्ये बदलाची प्रक्रिया अतिशय धीम्या गतीने पुढे सरकत होती. त्यामुळे मुद्रण तंत्राचे प्रशिक्षण घेण्यासाठी शैक्षणिक संस्थेचा आधार घेण्याची आवश्यकता सामान्य मुद्रकांना जाणवत नव्हती. कुठल्याही प्रेसमध्ये मदतनीस म्हणून कामाला सुरूवात करून हळूहळू कामाचे कसब हस्तगत करणे हीच प्रक्रिया सामान्यपणे रूढ होती. कम्प्युटर व ऑफसेट तंत्रज्ञानाचे मुद्रण क्षेत्रामध्ये आगमन होताच पूर्वीची रूढ पद्धत मागे पडून या क्षेत्रामध्ये तंत्रशुद्ध शिक्षणाची गरज निर्माण झाली. बदलत्या तंत्रज्ञानाचा वेध घेत दर्जेदार मुद्रणाची ग्राहकाची गरज पूर्ण करण्यासाठी तांत्रिक शिक्षण घेणे अपरिहार्य बनले.

सन २००६ मध्ये जिल्ह्यात मुद्रणाचे ९१ नोंदणीकृत उद्योग होते. या उद्योगांमधील भांडवली गुंतवणूक २१५ लाख रुपये होती तर २६५ व्यक्तींना रोजगार प्राप्त झाला होता.[१४७]

प्रकाशन, छपाई आणि रेकॉडेड मेडिआच्या पुनरूत्पादनाचे अतिलघु, लघु व मध्यम स्वरुपाचे ९२ उद्योग मार्च २००९ अखेर जिल्ह्यामध्ये होते. या उद्योगांमध्ये २६९ व्यक्ती कार्यरत होत्या तर उद्योगातील भांडवली गुंतवणूक २२१ लाख रुपये तर स्थापित उत्पादन क्षमता ९८१ लाख रुपये होती.[१४८]

---

१४६. **स्मरणिका प्रतिरुप २००१**, नांदेड जिल्हा मुद्रक संघ, वर्ष २००१, पृ. ६०-८३.

१४७. प्र. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, नांदेड यांच्याकडून प्राप्त माहितीआधारे.

१४८. प्र. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, नांदेड यांच्याकडून प्राप्त माहितीआधारे.

ऑगस्ट २०१० अखेर मात्र यामध्ये घट झालेली दिसून येते. मुद्रण व प्रकाशनाचे ५४ नोंदणीकृत उद्योग जिल्ह्यामध्ये होते. या उद्योगांमधून ४६२ व्यक्ती कार्यरत होत्या व उद्योगांची यंत्र व संयंत्रामधील गुंतवणूक ४८० लाख रुपये असून उत्पादनाची स्थापित क्षमता एकूण ११७९ लाख रुपये आहे.[१४९]

जिल्ह्यातील कागद व कागदाच्या वस्तू व छपाई व मुद्रण उद्योगातील काही महत्त्वाच्या नोंदणीकृत उद्योगांच्या स्थापनेचा तपशील तक्ता क्र. १८ मध्ये दर्शविण्यात आला आहे.

**रसायने व रासायनिक पदार्थ :**

या प्रवर्गात मूलभूत सेंद्रीय व असेंद्रीय रसायने व वायू उत्पादन (आम्ल, अल्कली व त्यांचे द्रावण ॲसेटिलिन, प्राणवायू व नायट्रोजन वायू), खते व किटकनाशके, रंग, वार्निश व तत्सम उत्पादन, औषध उत्पादन, सुगंधी द्रव्ये, सौंदर्य प्रसाधने, केशभूषा साहित्य, सर्व प्रकारचे साबण, टर्पेटाईन, आगपेटी, फटाके व इतर रासायनिक उत्पादन (इतरत्र उल्लेख नसलेले) करणारे मोठे, मध्यम व लघु उद्योग क्षेत्रातील कारखाने यांचा समावेश होतो.

सन १९६१ मध्ये जिल्ह्यात रसायने व रासायनिक उत्पादन करण्याच्या कामात एकूण ५० कामगार कार्यरत होते. त्यापैकी ३९ पुरुष कामगार तर ११ स्त्री कामगार होते. यामध्ये गृहोद्योग पातळीवर चालणाऱ्या रासायनिक उद्योगांमध्ये ११ पुरुष व ७ महिला होत्या तर गृहोद्योग व्यतिरीक्तच्या इतर रासायनिक उद्योगांमध्ये २८ पुरुष व ४ महिला होत्या.[150]

१९६९-७० मध्ये औरंगाबाद येथील उद्योग विभागाच्या उप संचालकांद्वारे प्रसिद्ध केल्या गेलेल्या "औरंगाबाद विभागाच्या औद्योगिक विकास आराखड्या" नुसार जिल्ह्यामध्ये मोठ्या उद्योगांच्या स्वरूपात रंग, वार्निश, डिस्टेंपर, मळीपासून औद्योगिक अल्कोहोल निर्मिती करण्यासारख्या रासायनिक उद्योग उभारणीला मोठा वाव होता.[१५१] तर कुटीरोद्योगांतर्गत किनवट येथे रोशा गवतापासून सुगंधी तेले काढण्याचा उद्योग असंघटीत स्वरूपात केला जात असे. सुगंधी व औषधी गुणधर्म असलेले हे तेल साबण व अत्तर बनविण्यासाठी वापरले जात असे. १९७१ मध्ये मराठवाडा विकास महामंडळाद्वारे लघुद्योगांतर्गत ३ रासायनिक उद्योगांची तात्पुरती नोंदणी करण्यात आली होती.[152] १९७५-७७ पासून १९९४-९५ पर्यंत या उद्योगाचे जिल्ह्यातील उद्योगांच्या निवडक वैशिष्ट्यांनुसार सातवे स्थान होते.[१५३]

सन १९८२ मध्ये जिल्ह्यात औषधी द्रव्ये आणि औषधे तयार करण्याचा एक नोंदणीकृत कारखाना होता. १९ पुरुष कामगार तर २० स्त्री कामगार असे एकूण ३९ कामगारांना या कारखान्याद्वारे रोजगार प्राप्त झाला होता व त्यांनी एकूण १०,४९१ श्रमदिवस कार्य केले. याव्यतिरीक्त फोटो फिल्म,

१४९. डॉ. जयंत जोशी, संचालक, बी.सी.यु.डी., स्वा.रा.ती.म.वि., नांदेड यांच्याकडून प्राप्त माहितीआधारे.

१५०. नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर, १९७१, पृ. २५९.

१५१. **स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, लीड बँक स्कीम, सर्व्हे रिपोर्ट ऑन नांदेड डिस्ट्रिक्ट**, महाराष्ट्र, मार्च, १९७१, पृ. २८.

१५२. कित्ता, पृ. ३२.

१५३. **जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन**, **नांदेड जिल्हा** १९८६-८७.

Maharashtra State Gazetteers

रासायनिक प्रक्रिया केलेला कागद फोटोमध्ये लागणारी रासायनिक द्रव्ये इ. तयार करण्याचा १ कारखाना होता व त्यामध्ये १४ पुरुष कामगार कार्यरत होते व एकही स्त्री कामगार नव्हती. या कारखान्याने एकूण ४,२९८ श्रमदिवस उत्पादन कार्य केले.[154]

सन १९८४ मधील जिल्ह्यातील या उद्योगांमधील कारखान्यांचे एकत्रित स्थिर भांडवल १७,६० हजार रुपये होते तर खेळते भांडवल ५७,७२ हजार रुपये होते. कारखान्यांमध्ये एकत्रितपणे ८४ कामगार तर १३० इतर कर्मचारी होते व या कालावधीकरीता त्यांना ७,८८ हजार रुपये वेतन देण्यात आले. कारखान्यांनी एकूण ३९.९४ हजार रुपये किमतीच्या मालाचे उत्पादन केले. एकूण निविष्टी २४,०१ हजार रुपये होती व उत्पादनामुळे १५,०३ हजार रुपयांची मूल्यवृद्धी झाली. या उत्पादनाद्वारे कारखान्यांना एकूण १३,३५ हजार रुपयांची मिळकत प्राप्त झाली.[१५५]

१९८६-८७ यावर्षी जिल्ह्यामध्ये रासायनिक खते आणि किटकनाशके तयार करणे, रसायने, औषधी द्रव्ये आणि औषधी तयार करणे, फोटो फिल्म, रासायनिक प्रक्रिया केलेला कागद, फोटोमध्ये लागणारी रासायनिक द्रव्ये तयार करणे या स्वरूपाच्या कारखान्यात अनुक्रमे प्रत्येकी १ असे तीन नोंदणीकृत कारखाने होते. या तीनही कारखान्यांमध्ये एकूण ३०६ कामगारांना रोजगार प्राप्त झाला. यामध्ये २८४ पुरुष कामगार होते तर स्त्री कामगार फक्त २२ होत्या.[156]

या कालावधीत तीनही कारखाने एकूण ३०९ दिवस कार्यरत होते व यापैकी दोन कारखाने ३०० हून अधिक दिवस कार्यरत होते.[157]

सन २००३-२००४ मध्ये जिल्ह्यात मूलभूत रासायनिक उत्पादन करणारे ७ कारखाने तर इतर रासायनिक उत्पादन करणारे ६ कारखाने असे या क्षेत्रात एकूण १३ नोंदणीकृत कारखाने होते. यापैकी इतर रासायनिक उत्पादन करणाऱ्या कारखान्यांपैकी तीन कारखाने बंद होते. मूलभूत रासायनिक उत्पादन करणाऱ्या सात कारखान्यांपैकी प्रपत्र पाठविणाऱ्या पाच कारखान्यांमध्ये एकूण ८७ पुरुष कामगार होते तर एकही स्त्री कामगार नव्हती आणि या कामगारांनी या वर्षभराच्या कालावधीमध्ये एकूण २२,३०३ श्रमदिवस कार्य केले. प्रपत्र न पाठविणाऱ्या दोन कारखान्यांमध्ये २७ कामगार कार्यरत होते. इतर रासायनिक उत्पादन करणाऱ्या कारखान्यांमध्ये चालू स्थितीत असलेल्या तीन कारखान्यांपैकी २ कारखान्यांनी प्रपत्र पाठविले होते. यामध्ये ७० पुरुष कामगार व ४ स्त्री कामगार असे एकूण ७४ कामगार कार्यरत होते व त्यांनी एकूण २०,१८० श्रमदिवस कार्य केले तर प्रपत्र न पाठविऱ्या उर्वरित एका कारखान्यामध्ये ६९ कामगार कार्यरत होते.[158]

---

१५४. जिल्हा सामाजिक व आर्थक समालोचन, वर्ष १९८२-८३, पृ. १०७.

१५५. कित्ता, पृ. ११५.

१५६. पूर्वोक्त, वर्ष १९८६-८७, पृ. ८०.

१५७. कित्ता, पृ. ८४.

१५८. पूर्वोक्त, २००३-०४, पृ. ४१.

मार्च, २००९ अखेर जिल्ह्यामध्ये लघूउद्योगांतर्गत रसायने व रासायनिक पदार्थांचे उत्पादन करणारे ३५ उद्योग कार्यरत होते. या उद्योगांची एकत्रित भांडवली गुंतवणूक ३२५ लाख रुपये होती तर त्यांची स्थापित उत्पादन क्षमता १,१२३ लाख रुपये होती. या उद्योगांनी २८१ व्यक्तींना रोजगार प्राप्त करून दिला. याशिवाय कोक, रिफाईड पेट्रोलिअम उत्पादने आणि न्युक्लिअर इंधनाचे उत्पादन करणारे ७ उद्योग जिल्ह्यामध्ये होते. या उद्योगांची एकत्रित भांडवली गुंतवणूक २२१ लाख रुपये होती तर स्थापित क्षमता २५४ लाख रुपये किमतीच्या उत्पादनाएवढी होती. उद्योगांद्वारे ११८ व्यक्तींना रोजगार प्राप्त झाला होता.[159]

जिल्ह्यातील रसायने व रासायनिक पदार्थ निर्मितीचे ऑगस्ट, २०१० अखेर अतिलहान, लघु व मध्यम उद्योगांतर्गत ६१ उद्योग कार्यान्वित होते. या उद्योगांची यंत्र व संयंत्रातील गुंतवणूक ३,४२१ लाख रुपये होती तर उत्पादन क्षमता ९,४५९ लाख रुपये होती व उद्योगांद्वारे १,१०० व्यक्तींना रोजगार प्राप्त झाला. तसेच औषध निर्मितीचा एक उद्योग असून त्यांची भांडवली गुंतवणूक ७ लाख रुपये तर उत्पादन क्षमतादेखील ७ लाख रुपये आहे. या उद्योगांनी ११ व्यक्तींना रोजगार प्राप्त करून दिला.

याच कालावधीत जिल्ह्यामध्ये तेलशुद्धीकरण व कोक निर्मितीचे देखील २९ उद्योग असून त्यामध्ये ९३५ कामगार कार्यरत आहेत. या उद्योगांची भांडवली गुंतवणूक १,२३३ लाख रुपये आहे तर उत्पादन क्षमता २,६१३ लाख रुपये आहे.[१६०]

मार्च, २००९ ते ऑगस्ट, २०१० या कालावधीत या उद्योगांमध्ये झालेल्या लक्षणीय वाढीवरून या उद्योगास जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रात चांगला वाव असल्याचे दिसून येते. औषधी निर्मिती क्षेत्रात नांदेड औद्योगिक वसाहती मधील मेसर्स गोदावरी ड्रग्ज प्रायव्हेट लिमिटेड हा महत्त्वाचा उद्योग आहे. तर विशेष महत्त्वाचे म्हणून कृष्णूर औद्योगिक क्षेत्रावर १५० हेक्टर क्षेत्रावर विशेष आर्थिक प्रक्षेत्र म्हणून प्रस्तावित असलेला औषधी प्रकल्प वाणिज्य व उद्योग मंत्रालय भारत सरकार यांच्याकडून मंजूर करण्यात आला आहे. पार्श्वनाथ एस.ई.झेड. लिमिटेड हा औषधी उत्पादनाचा कारखाना येथे सुरू करण्यात येत आहे. यामध्ये अंदाजे ३०० कोटींची गुंतवणूक होणार असून अंदाजे २००० ते २२०० रोजगार उपलब्ध होणार आहेत.

याशिवाय रासायनिक खत निर्मिती उद्योगामध्ये नांदेड औद्योगिक वसाहत क्षेत्रातील एम.ए.आय.डी.सी., मे. बालाजी फर्टीलायझर, मे. गजानन फर्टिलायझर, मे. पार्वती फर्टिलायझर हे कारखाने आहेत. तर इतर रासायनिक उद्योगांमध्ये कृष्णूर विशेष आर्थिक प्रक्षेत्रातील मे. टाटा केमिकल्स हा महत्त्वाचा उद्योग आहे. देशातील अग्रणी उद्योग समूहाद्वारे कृष्णूर येथे ४० हेक्टर क्षेत्रफळाच्या भूखंडावर ५५ कोटी रुपयांची गुंतवणूक करून इथेनॉल चे उत्पादन करणारा कारखाना स्थापित करण्यात येणार आहे. या उद्योगामुळे जवळपास ५०० रोजगारांची निर्मिती होणार आहे. सदर

---

१५९. उप अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, नांदेड यांच्याकडून प्राप्त माहिती आधारे.

१६०. श्री. जयंत जोशी, रजिस्ट्रार, बी.सी.यू.डी. नांदेड यांच्या लेखनावर आधारित.

Maharashtra State Gazetteers

कंपनीस भूखंड क्रमांक डी-१ क्षेत्र ४,००,८९२ चौ.मी.चे क्षेत्र इथेनॉल उत्पादनाकरिता वाटप करण्यात आला असून सदर भूखंडाचा ताबा दि.१० ऑक्टोबर २००७ रोजी देण्यात आला.[१६१]

**साबण उद्योग :** सन १९६० मध्ये जिल्ह्यात साबण निर्मितीचे पाच उद्योग होते व त्यामध्ये १२१ कामगार कार्यरत होते. नांदेड, कंधार व देगलूर येथे कुटिरोद्योग स्वरूपात हे उत्पादन केले जात असे. यामध्ये वापरण्यात येणारा कच्चा माल मुंबई व इतर स्थानिक बाजारपेठांतून खरेदी केला जात असे.[१६२]

नांदेड जिल्ह्यामध्ये खाद्यतेल निर्मिती उद्योग मोठ्या प्रमाणावर सुरू झाल्याने शेंगदाणा, कापसाची सरकी यासारख्या कच्च्या मालापासून तेल निर्मिती प्रक्रियेत तेलाशिवाय भूकटी अथवा पेंडे उप उत्पादन स्वरूपात प्राप्त होते. ही भूकटी अथवा पेंड जनावरांच्या खाद्य म्हणून वापरण्याशिवाय साबण निर्मिती प्रक्रियेस देखील उपयोगाची असल्याने जिल्ह्यातील साबण उद्योगासदेखील चालना मिळाली. नांदेड येथील औद्योगिक वसाहतीमध्ये सन १९७९ मध्ये नंदीग्राम केमिकल्स व सीमा इंडस्ट्रिज या दोन उद्योगांची अनुक्रमे २५६६ चौ.मी.व २१०० चौ.मी. क्षेत्रावर उद्योग निर्मितीकरिता नोंदणी करण्यात आली. हे उद्योग सोडिअम सिलिकेट निर्मिती क्षेत्रात कार्यरत आहेत. १९८१ मध्ये अंबिका इंडस्ट्रीज, २ जून १९८२ रोजी मेसर्स कैलास वाशिंग सोप या धुण्याच्या साबणाची निर्मिती करणाऱ्या कारखान्यांची १००० चौ.मी. क्षेत्रावर नोंदणी झाली. सन १९९३ मध्ये प्रत्यक्ष उत्पादनास सुरूवात झाली. परंतु सध्या हा कारखाना बंद आहे.

डिसेंबर, १९९० मध्ये नांदेड औद्योगिक क्षेत्रात नोंदणी झालेल्या कोहीनूर फिडस ॲण्ड फॅटस लिमिटेड या कंपनीद्वारे तेल निर्मितीशिवाय उप उत्पादन म्हणून साबण निर्मिती केली जाते. सन १९९५ मध्ये जानकी केमिकल्स हा उद्योग ब्लिचींग पावडर निर्मिती क्षेत्रात कार्यरत होता. तर लक्ष्मण केमिकल्स या उद्योगाद्वारे ब्लॅक फिनॉईलची निर्मिती केली जात असे.

याव्यतिरिक्त सन १९९५ ते २०१० या कालावधीतील जिल्ह्यातील रसायने व रासायनिक पदार्थ निर्मितीमध्ये कार्यरत असलेल्या उद्योगांची सांख्यिकी तक्ता क्र. १९ मध्ये देण्यात आली आहे.

**खाणकाम आणि दगड खाणकाम :**

खनिजाच्या व्यावहारीक अर्थानुसार दगडी कोळसा, स्लेट, लिग्नाईट, मँगनीज, लोह, शाडूमाती, चुनखडी ही सारी खनिजे होत. "खनिज तेल" आणि "खनिज जल" हे शब्दप्रयोगही रूढ आहेत. अजैविक क्रियांनी तयार झालेल्या नैसर्गिक पदार्थांना खनिजे म्हणतात.[१६३]

नांदेड जिल्ह्यात मात्र चुनखडी व्यतिरिक्त इतर महत्त्वाचे खनिज आढळत नाही. किनवट तालुक्यातील परिसरात भू-गर्भाच्या पट्ट्यामध्ये चुनखडीचे साठे आढळतात. ही चुनखडी सर्वत्र सारख्याच प्रकारची नसून या चुनखडीमध्ये रेतीचे प्रमाण अधिक आहे. जिल्ह्यातील चुनखडीचा साठा १० दशलक्ष टन असावा असा अंदाज आहे.

---

१६१. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, नांदेड यांच्याकडून प्राप्त माहिती आधारे.

१६२. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, भारत सरकार, १९७१, पृ. २५७.

१६३. सोवनी, प्र. वि., **पाषाणशास्त्र**, १९७४, पृ. ६.

जिल्ह्यातील बऱ्याच प्रदेशात बांधकामास अत्यंत उपयुक्त असा दगड आढळतो. परंतु खाणकाम उद्योग दगड खाणकामापुरताच मर्यादित आहे. सन १९५७ मध्ये जिल्ह्यातील खाणींतून दररोज काम करणाऱ्या कामगारांची संख्या सरासरी ३७ होती.[१६४] १९६१ च्या जनगणनेनुसार १,४३६ माणसे दगड, माती, वाळू इत्यादी खाणकामावर असल्याची नोंद असून त्यापैकी १,०३८ पुरुष व ३९८ स्त्रिया होत्या. याशिवाय २ माणसे इतर खाणकाम करीत असल्याची नोंद आहे. ही माणसे शेजारील जिल्ह्यात खाणकामावर असावित व १९६१ च्या जनगणनेच्यावेळी ती नांदेड जिल्ह्यात तात्पुरती आली असावीत.[१६५]

१९७१ मध्ये किनवट येथे सापडणाऱ्या चुनखडी व्यतिरिक्त डेक्कन ट्रेप अथवा बेसाल्ट, सँड स्टोन आणि विटासांठीची माती हे बांधकामासाठी आवश्यक असणारे साहित्य जिल्ह्यामध्ये आढळत असल्याची नोंद आढळते. याच काळात जिल्ह्यामध्ये ०.०१ लाख रुपये किंमतमूल्य असणारा ८५५ दगड खाणींमधून काढण्यात आला.[166]

१९८१-८२ या साली धातूजन्य खनिज पदार्थांच्या उत्पादनात कार्यरत असणाऱ्या उद्योगांचे एकूण स्थिर भांडवल रु.१९,१४ हजार रुपये तर खेळते भांडवल रु. २०,१३ हजार रुपये होते. या उद्योगात एकूण १९६ कामगार व २४१ कर्मचारी कार्यरत होते. या वर्षासाठी कामगारांना एकूण ५,०१ हजार रुपये वेतन देण्यात आले.[167]

१९८६-८७ साली दगड घडविणे आणि दगडाच्या वस्तू बनविणारे ३ उद्योग होते त्यापैकी दोन उद्योग नोंदणीकृत होते तर एक उद्योग नोंदणी न झालेला होता व त्यामध्ये ४५ कामगार कार्यरत होते.[168]

सन १९९८ मध्ये खनिज उत्पादन व खाणकामाचे जिल्ह्यामध्ये एकूण १५० उद्योग होते व त्यामधून ५१५ कामगारांना रोजगार प्राप्त झाला होता. या कालावधीतील या उद्योगाचा तपशील पुढीलप्रमाणे.[169]

**खनिज उत्पादन व खाणकाम वर्ष १९९८**

| तपशील | उद्योग | कामगार |
|---|---|---|
| ग्रामीण | १२४ | ४३७ |
| नागरी | २६ | ७८ |
| एकूण | १५० | ५१५ |

१६४. **कल्याणकारी राज्याची वाटचाल**, नांदेड जिल्हा, जानेवारी, १९५७, महाराष्ट्र शासन, पृ. ३.

१६५. **जिल्हा जनगणना निर्देशग्रंथ**, भारत सरकार, १९६१, पृ. ४०.

१६६. **स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, लीड बँक स्कीम, सर्व्हे रिपोर्ट ऑन नांदेड डिस्ट्रिक्ट**, महाराष्ट्र मार्च, १९७१, पृ. ९.

१६७. **जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, नांदेड जिल्हा** महाराष्ट्र शासन १९८२-८३, पृ.११४.

१६८. कित्ता, १९८६-८७, पृ.

१६९. पूर्वोक्त, वर्ष २००१-२००२, पृ. ५२-५३.

Maharashtra State Gazetteers

या कालावधीत जिल्ह्यात खनिज उत्पादनाच्या १८ ग्रामीण व २ नागरी आस्थापना होत्या. ग्रामीण आस्थापनेत २११ तर नागरी आस्थापनेत ४ असे एकूण २१५ कामगार कार्यरत होते.

सन २००३-२००४ मध्ये रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन कार्यक्रमांतर्गत नोंदणी केलेले ३०१ कामगार होते व एका खाणकामगारास नोकरी देण्यात आली होती.[१७०] या कालावधीतील या उद्योगाद्वारे जिल्ह्याचे स्थूल जिल्हा उत्पन्न १३९२७ हजार रुपये तर निव्वळ जिल्हा उत्पन्न १०६३७ हजार रुपये होते.

सन २००८ मध्ये खनिज उत्पादना अंतर्गत जिल्ह्यामध्ये दगड खाणकामाचे २ नोंदणीकृत उद्योग होते. या उद्योगांमधील भांडवली गुंतवणूक १७ लाख रुपये होती तर २३ व्यक्तिंना रोजगार प्राप्त झाला होता.[171]

**रबर व प्लास्टिक उत्पादने :**

१९६९-७० च्या "प्रोफाईल ऑन इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट इन औरंगाबाद" या उद्योग उप संचालकांनी प्रसिद्ध केलेल्या अहवालानुसार जिल्ह्यामध्ये यांत्रिक खेळणी व पॉलिथिन बॅग्ज तयार करण्याच्या उद्योगाला चांगला वाव असल्याचे नोंदविले आहे. परंतु त्यापूर्वीच्या या उद्योगाच्या जिल्ह्यात नोंदी आढळत नाहीत. १९७१ मध्ये जिल्ह्यामध्ये प्लास्टिकच्या वस्तू व पी.व्ही.सी पाईपचा तात्पुरत्या स्वरूपाची नोंदणी करण्यात आलेला एक कारखाना होता.[१७२] १९८२ ते १९८६ दरम्यान प्लॅस्टिक व प्लॅस्टिकच्या उत्पादनांशी संबंधित एकमेव नोंदणीकृत उद्योग जिल्ह्यामध्ये होता.

सन १९९६-९७ मध्ये जिल्ह्यातील रबर व प्लास्टिकच्या वस्तू उत्पादन करणाऱ्या कारखान्यांची एकूण स्थिर भांडवलामधील गुंतवणूक ५७,३४१ हजार रुपये होती तर खेळते भांडवल ४८,९४३ हजार रुपये होते. या कालावधीमध्ये एकूण ३२४ कामगार व ४०९ कर्मचारी या उद्योगामध्ये कार्यरत होते व कर्मचाऱ्यांना एकूण ९,२३८ हजार रुपये वेतन देण्यात आले होते. या उद्योगांनी ५,८८,१९९ हजार रुपये किमतीच्या उत्पादनापासून १७,३१३ हजार रुपये किमतीची मिळकत प्राप्त केली. उत्पादनांची एकूण निविष्टी ७,०२,१२० हजार रुपये होती तर मुल्यवृद्धी १,०९,२४२ हजार रुपये होती.[१७३] सन २००३ मध्ये जिल्ह्यात प्लास्टिक व रबरी वस्तुंचे उत्पादन करणारे तीन कारखाने होते त्यापैकी दोन कारखाने बंद होते. यापैकी प्रपत्र पाठविणाऱ्या एका कारखान्यामध्ये एकूण ७ पुरुष कामगार कार्यरत होते तर एकही स्त्री कामगार नव्हती. या कामगारांनी एकूण १,३३० श्रमदिवस कार्य केले.[१७४]

---

१७०. **जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, नांदेड** वर्ष २००३-२००४, पृ. ४७.

१७१. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, नांदेड यांनी पाठविलेल्या माहितीनुसार.

१७२. **स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, लीड बँक स्कीम, सर्व्हे रिपोर्ट ऑन नांदेड डिस्ट्रिक्ट, महाराष्ट्र**, मार्च १९७१, पृ. ३२.

१७३. **जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, नांदेड जिल्हा**, २००३-२००४, पृ. ४६.

१७४. **जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, नांदेड जिल्हा**, २००३-०४, पृ. ४१.

मार्च, २००९ अखेर जिल्ह्यामध्ये लघुउद्योगांतर्गत ३७ नोंदणीकृत रबर व प्लास्टिक उद्योग होते. त्याद्वारे २८१ व्यक्तिंना रोजगार प्राप्त झाला. या उद्योगांमधील भांडवली गुंतवणूक ३९१ लाख रुपये होती व त्यांची उत्पादन क्षमता १,५५५ लाख रुपये किमतीच्या मालाचे उत्पादन इतकी होती.[१७५] तर ऑगस्ट, २०१० मध्ये जिल्ह्यात रबर व प्लास्टिक उत्पादनाचे ८२ अतिलघू व लघू व मध्यम उद्योगांतर्गत ८२ उद्योग होते. या उद्योगांद्वारे १,५३२ कामगारांना रोजगार प्राप्त झाला. उद्योगांची एकत्रित भांडवली गुंतवणूक १,९८४ लाख रुपये असून उत्पादन क्षमता ३,२३१ लाख रुपये आहे.[१७६] जिल्ह्यातील सन १९८५ ते आजपर्यंतच्या या कालावधीतील काही महत्त्वपूर्ण नोंदणीकृत रबर व प्लास्टिक निर्मिती उद्योगांची माहिती तक्ता क्र. २० मध्ये देण्यात आली आहे.[177]

**मूलभूत व मिश्र धातू :**

या प्रवर्गात लोखंड, पोलाद व इतर धातूंचे मुख्यत्वे कास्टिंग व फोर्जिंग करणे, लोहमिश्रीत धातूचे उत्पादन व इतर धातू उत्पादन करणे, पोलाद वाकविणे, धातूची ओतकामे करणे, धातूच्या तारा तयार करणे इत्यादी कारखान्यांचा समावेश होतो.

१९६० मध्ये जिल्ह्यात या उद्योगात १,२८७ पुरुष व ३२६ स्त्रिया असे एकूण १,६१३ कामगार कार्यरत होते यापैकी गृहद्योग पातळीवरील उद्योगांमध्ये ९६६ पुरुष व २१८ स्त्रिया तर लघू व मोठ्या उद्योगांमध्ये ३२१ पुरुष व १७ स्त्रिया कार्यरत होत्या. जिल्ह्यात नांदेड, कुंडलवाडी, लोहा, धर्माबाद, कंधार, मुखेड, मुक्रमाबाद, देगलूर या ठिकाणी हा उद्योग केंद्रित झालेला होता.[178]

लिंग व वर्गानुसारच्या औद्योगिक वर्गीकरणानुसार १९६१ मध्ये नांदेड जिल्ह्यात मूलधातू व त्यांचे उत्पादन करण्याच्या उद्योगांमध्ये गृहोद्योगपातळीवरील उद्योगांत ९६६ पुरुष तर २१९ स्त्रिया असे एकूण १,१८५ कामगार व गृहोद्योग व्यतिरिक्तच्या उद्योगांमध्ये ३२१ पुरुष व १७ स्त्रिया असे एकूण ३८८ कामगार कार्यरत होते.[१७९]

धातूजन्य खनिज पदार्थांचे उत्पादन करण्याच्या उद्योगांमधील सन १९८२-८३ मध्ये १९,१४ हजार रुपयांचे स्थिर भांडवल तर २०,१३ हजार रुपयांचे खेळते भांडवल गुंतविण्यात आले होते. याद्वारे १९६ कामगार तर २४१ कर्मचाऱ्यांना रोजगार प्राप्त झाला. कामगारांना ५,०१ हजार रुपये वेतन देण्यात आले.[180]

१९९६-९७ या कालावधीत मूलभूत व मिश्र धातू उत्पादनांच्या उद्योगात जिल्ह्यामध्ये एकत्रितपणे ७,८०,०७२ हजार रुपयांचे स्थिर भांडवल तर ४७,४२,२४ हजार रुपयांचे खेळते भांडवल

१७५. उप अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, नांदेड यांच्याकडून प्राप्त माहितीच्या आधारे.

१७६. श्री. जयंत जोशी, रजिस्ट्रार, बी.सी.यु.डी. नांदेड यांच्याकडून प्राप्त माहिती आधारे.

१७७. उपरोक्त, म.औ.वि.म., नांदेड.

१७८. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, भारत सरकार, १९७१, पृ. २५९.

१७९. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, भारत सरकार, १९७१, पृ. २५९.

१८०. **जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, नांदेड जिल्हा,** वर्ष १९८२-८३, पृ. ११४.

Maharashtra State Gazetteers

गुंतविण्यात आले होते. ४९२ कामगारांना व ६५१ कर्मचाऱ्यांना या उद्योगामध्ये रोजगार प्राप्त झाला तर कर्मचाऱ्यांना १६,४६८ हजार रुपये वेतन देण्यात आले होते.

सन २००३ मध्ये प्राथमिक स्वरूपात लोखंड बनविण्याचे ५ नोंदणीकृत कारखाने जिल्ह्यामध्ये होते. त्यापैकी २ कारखाने बंद झाले होते. प्रपत्र पाठविणाऱ्या चालू कारखान्यांमध्ये २११ पुरुष कामगार कार्यरत होते व त्यांनी एकूण ६५,८५१ श्रमदिवस कार्य केले. तर प्रपत्र न पाठविणाऱ्या एका कारखान्यामध्ये ४० कामगार कार्यरत होते.[१८१] २,६३,४२,४६ हजार रुपये किमतीच्या उत्पादनामागे ४,६८,०७ हजार रुपये मिळकत उद्योगांना उपरोक्त कालावधीत झाली तर उद्योगांची एकूण निविष्टी ३५,६९,७७१ हजार रुपये व मूल्यवृद्धी ८१,०२,३९ हजार रुपये होती.[182]

ऑगस्ट, २०१० अखेर मूलभूत धातू निर्मितीचे ३१ उद्योग अतिलहान, लघू व मध्यम उद्योगांच्या स्वरूपात नोंदविण्यात आले होते. या उद्योगातील यंत्र व संयत्रांमधील गुंतवणूक ९९० लाख रुपये तर स्थापित उत्पादन क्षमता १,१२९ लाख रुपये होती. उद्योगांनी एकूण ७१२ व्यक्तिंना रोजगार प्राप्त करून दिला.[183] जिल्ह्यातील काही महत्त्वाच्या मूलभूत व मिश्रधातू उद्योगांच्या स्थापनेचा तपशील तक्ता क्र. २१ मध्ये देण्यात आला आहे.

**धातूच्या वस्तू व सुटे भाग :**

या प्रवर्गात स्लिपप्लेट किंवा इनॅमल्ड शीट मेटलपासून तयार केलेले धातूचे काम, कॅन, मेटल, बॅरल, ड्रम, पिंजरे, धातूच्या वस्तू, औजारे, हार्डवेअर, भांडी, कंटेनर इत्यादी फॅब्रीकेटेड धातूंचे उत्पादन, पेट्या, फर्निचर व फिक्श्चर, वजने-मापे, धातूचे कटलरी सामान किंवा वस्तू, किचन वेअर, लोखंडी दरवाजे, रोल शटर, खिडक्या, रेझर ब्लेड, बिद्रीच्या वस्तू, धातूचे मेडल बनविणे इत्यादी वस्तुंचा यात समावेश आहे.

१९६० मध्ये नांदेड, कुंडलवाडी, लोहा, धर्माबाद, कंधार, मुखेड, मुक्रमाबाद, देगलूर येथे कुटीरोद्योग स्वरूपात धातूकाम उद्योग केंद्रित झालेला होता. परंतु पोलादी अथवा धातूच्या वस्तू निर्मितीचा एकही उद्योग कारखाना कायद्यांतर्गत नोंद झालेला नव्हता. परंतु जिल्ह्यात नांदेड शहरात काही ठिकाणी २० पेक्षा कमी कामगार कार्यरत असलेले धातूकामाचे लहान उद्योग सुरू होते. या उद्योगांमधील कार्य मुख्यत्वेकरून हातोडा, ऐरण आणि कानस यांच्याद्वारेच चालत असे. कार्यशाळेसाठी लागणाऱ्या या औजारांची किंमत २०० रुपयांपेक्षा जास्त नसे. मध्यम स्वरूपाच्या कार्यशाळेसाठी सर्वसाधारणपणे रु. ५०० ते रु. १००० च्या दरम्यान प्राथमिक भांडवल आवश्यक असे. साधारणपणे स्थानिकरित्या उपलब्ध असलेल्या कारागिरांना रोजंदारीवर रोजगार दिला जाई. हा रोजगार रु. २ ते रु. ४ च्या दरम्यान असे.

---

१८१. **जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, नांदेड जिल्हा,** वर्ष २००२-०३, पृ. ४१.

१८२. पूर्वोक्त, २००२-०३, पृ. ४१-४६.

१८३. श्री. जयंत जोशी, संचालक, बी.सी.यु.डी. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या लेखनावर आधारित.

मजुरांना उक्त्यावर देखील मजूरी दिली जात असे. औजारांची प्रत्येक कामगारामागे सरासरी गुंतवणूक रू. ४० ते रू. ५० च्या दरम्यान असे. या उद्योगांद्वारे मुख्यत्त्वेकरून घमेली आणि बादल्या, साखळया, पेटया, घागरी, लोटे यासारख्या विविध गृहोपयोगी वस्तुंचे उत्पादन केले जाई. विशेष म्हणजे कारखान्याचे मालक हे साधारणपणे आपल्या कुटुंबासमवेत कारखान्यात काम करणाऱ्या स्वरोजगारीत व्यक्ती असत.

धातूच्या पत्र्यासारख्या चांगल्या प्रतीच्या कच्च्या मालाची कमतरता आणि अनियमित पुरवठा, प्रशिक्षीत कामगार, तांत्रिक ज्ञान आणि सुरवातीचे भांडवल यांची अनुपलब्धता हे जिल्ह्यामधील या उद्योगासमोरचे अडथळे होते. १९५९-६० मधील नांदेड जिल्ह्यातील पोलाद अथवा धातूच्या वस्तुंच्या उत्पादन केंद्रांची सांख्यिकी पुढील तक्त्यामध्ये दर्शविली आहे.[184]

**१९५९-६० मधील नांदेड जिल्ह्यातील पोलाद उत्पादन केंद्रांची सांख्यिकी**

| केंद्र (१) | स्थापनेचे वर्ष (२) | रोजगार (३) | उत्पादन रुपयांमध्ये (४) |
|---|---|---|---|
| A | १९४२ | १८ | ६०,००० |
| B | १९५० | १२ | ३५,००० |
| C | १९५४ | ६ | १८,००० |
| D | १९५६ | ६ | २०,००० |
| E | १९५८ | १२ | १२,००० |
| F | १९५५ | १३ | १९,७८० |
| G | १९५८ | २ | ६,००० |
| H | उ.ना. | १३ | ३५,००० |
| I | उ.ना. | ७ | २०,००० |
| | | ८९ | २,२५,७८० |

सन १९७१ मध्ये जिल्ह्यात स्टील फर्निचर उत्पादन करणारे ५ लघुद्योग होते.[185] उप संचालक, उद्योग, औरंगाबाद यांनी केलेल्या १९६९-७० च्या औरंगाबाद विभागातील उद्योग विकासाच्या आराखड्यामध्ये जिल्ह्यामध्ये लोखंडी नांगर, फावडा, कुदळ, रोलिंग शटर या सारख्या धातूच्या उत्पादन निर्मिती उद्योगांना विशेष वाव असल्याचे नोंदविण्यात आले होते.[१८६]

१८४. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, भारत सरकार, १९७१, पृ. २७७.

१८५. **स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, लीड बँक स्कीम, सर्व्हे रिपोर्ट ऑन नांदेड डिस्ट्रिक्ट, महाराष्ट्र**, मार्च १९७१, पृ. २७.

१८६. कित्ता, पृ. २८.

Maharashtra State Gazetteers

सन १९८२-८३ मध्ये जिल्ह्यात पिंपे, बादल्या व इतर विविध प्रकारच्या धातूच्या वस्तू बनविण्याचे दोन नोंदणीकृत कारखाने होते. या कारखान्यांमध्ये १६ पुरुष व २ स्त्रिया असे एकूण १८ कामगार कार्यरत होते व त्यांनी एकूण ५,५२६ श्रमदिवस कार्य केले.[१८७] या दोन उद्योगांचे उपरोक्त कालावधीत स्थिर भांडवल १९,१४ हजार रुपये तर खेळते भांडवल २०,१३ हजार रुपये होते. कारखान्यात एकूण १९६ कामगार व २४१ कर्मचारी कार्यरत होते तर कामगारांना ८,५८ हजार रुपये वेतन देण्यात आले. या कारखान्यांनी एकूण १,६८,२० हजार रुपये किमतीच्या मालाच्या उत्पादनाद्वारे २५,८१ हजार रुपये मिळकत प्राप्त केली. तसेच त्यांची एकूण निविष्टी १,२९,६७ हजार रुपये होती व उत्पादनामुळे २१,८६ हजार रुपये किमतीची मूल्यवृद्धी झाली.[१८८]

नांदेड औद्योगिक क्षेत्रात डिसेंबर १९८० मध्ये हॅण्डमेड मशिनरीजची निर्मिती करण्याकरिता ७८०० चौ.मी.क्षेत्रावर अमित सेल्यूलोज प्रोडक्टस या कारखान्याची स्थापना झाली. १९८५ मध्ये वॉटर कूलर तयार करणाऱ्या अभिजित इंजिनिअरींग या कंपनीची २१०० चौ.कि. क्षेत्रावर सुरूवात करण्यात आली. याशिवाय अशोक इंजिनिअरींग या सहकारी संस्थेची इंजिनिअरींग जॉब वर्क क्षेत्रात स्थापना करण्यात आली. १९९१ मध्ये ३,८८७ चौ.मी. क्षेत्रावर अशोका इन्टरप्रायझेस या फॅब्रीकेशन कंपनीची स्थापना करण्यात आली. नंतरच्या काळात जिल्ह्यांमध्ये धातूकामाशी संबंधी फॅब्रीकेशन, इंजिनिअरींग, आर.सी.सी. पाईप, दी रोलींग ऑफ बार्स यासारख्या उद्योगांमध्ये अनेक कारखान्यांची स्थापना करण्यात आली. या उद्योगांमध्ये अनेक कारखान्यांची स्थापना करण्यात आली.[१८९]

धातूच्या टाक्या, पिंप व कंटेनर्स इ.वस्तू बनविणे तसेच धातूजन्य पदार्थांचे उत्पादन व धातूच्या इतर वस्तू तयार करण्याच्या उद्योगाचे २००१ साली जिल्ह्यात एकूण दहा कारखाने होते.यापैकी प्रपत्र पाठविणाऱ्या पाच कारखान्यांमध्ये ३ पुरुष व २ स्त्री कामगार कार्यरत होते व त्यांनी एकूण १२,८७२ श्रमदिवस कार्य केले तर प्रपत्र न पाठविणाऱ्या उर्वरित पाच कारखान्यांमध्ये १७९ कामगारांना रोजगार प्राप्त झाला.[190]

सन २००३ मध्ये या उद्योगामध्ये नोंदणी झालेल्या १० कारखान्यांपैकी २ कारखाने बंद झालेले होते. उर्वरित चालू कारखान्यांपैकी प्रपत्र पाठविणाऱ्या सहा कारखान्यांमध्ये एकूण ५० कामगार होते. त्यापैकी ४८ पुरुष तर दोन स्त्री कामगार होते व त्यांनी एकूण १५,३४७ श्रमदिवस कार्य केले. प्रपत्र न पाठविणाऱ्या २ चालू कारखान्यांमध्ये ३९ कामगार कार्यरत होते.[१९१]

मार्च २००९ मध्ये फॅब्रिकेटेड धातूच्या उत्पादनाचे १५९ लघुद्योग जिल्ह्यामध्ये होते. या उद्योगांमधील यंत्र व सयंत्र इ. बाबतची एकत्रित गुंतवणूक ४४४ लाख रुपये तर स्थापित क्षमता १,६८६ लाख रुपये होती. उद्योगाद्वारे ६९३ व्यक्तींना रोजगार प्राप्त झाला.[१९२]

---

१८७. **जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, नांदेड जिल्हा**, वर्ष १९८२-८३, पृ. १०७.

१८८. कित्ता, पृ. ११३-११४.

१८९. **प्रिंटेड गाईड टू महाराष्ट्र डाटाबेस एम.आय.डी.सी. व सी.कॉम. Vol. ५, हिरा इंडेक्स**, नाशिक, १९९५- ९६, पृ. १०७ ते १५०.

१९०. **जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, नांदेड जिल्हा,** वर्ष २००१-२००२, पृ. ४४.

१९१. कित्ता, पृ.४१.

१९२. उप अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्याकडून प्राप्त माहिती आधारे.

ऑगस्ट २०१० अखेर जिल्ह्यात धातूच्या वस्तू व सूटे भागाचे १८८ तर यंत्रसामुग्री व सुटे भागाचे ३६ लघुउद्योग सुरू होते. या उद्योगांद्वारे अनुक्रमे २,३४१ व २९३ व्यक्तींना रोजगार प्राप्त झाला. जिल्ह्यातील काही महत्त्वाच्या नोंदणीकृत धातूच्या वस्तू व सुटे भाग उद्योगांच्या स्थापनेचा तपशील तक्ता क्र. २२ मध्ये देण्यात आला आहे.

**परिवहन सामग्री, यंत्रसामग्री व सुटे भाग :**

या प्रवर्गात बांधकाम व खाणकाम उद्योगात वापरल्या जाणाऱ्या इतर जड यंत्र सामग्रीचे उत्पादन व दुरूस्ती, बॉयलर व स्टीम जनरेटर, अन्न प्रक्रिया उद्योग व वस्त्रोद्योगात लागणारी यंत्रे यांचे उत्पादन, साखर आणि बेकरी व मिठाई बनविण्याच्या कार्यात वापरण्यात येणारी यंत्रे, औषधी किंवा रासायनिक उद्योगात वापरण्यात येणारी यंत्रे व औजारे, रेफ्रिजरेटर, एअर-कंडीशनर यांचे औद्योगिक व व्यापारी उपयोगासाठी उत्पादन, वस्तू उचलण्याची आणि हाताळण्याची औजारे, यांत्रिक हत्यारे, त्यांचे सूटे भाग आणि त्यांचे जोडकाम साहित्याचे उत्पादन, ग्राईंडिंग मशिन व लाकूड कापण्याचे कार्य करणाऱ्या मशिनचे उत्पादन, डिझेल इंजिन व त्याच्या सुटया भागाचे उत्पादन करणारे उद्योग, शेतीत वापरण्यात येणारी यंत्रे तसेच परिवहन यंत्रे व त्यात वापरण्यात येणारे सुटे भाग इत्यादी उत्पादन करणाऱ्या उद्योगांचा समावेश होतो.

१९६० मध्ये जिल्ह्यात परिवहन सामग्रीमध्ये ४२७ व्यक्ती कार्यरत होत्या. त्यापैकी ४१३ पुरुष तर १४ स्त्रिया होत्या. यापैकी गृहोद्योग पातळीवरील उद्योगामध्ये २७३ पुरुष व १४ स्त्रिया तर लघुद्योग पातळीवर १४० पुरुष कार्यरत होते.[193]

१९८१-८२ मध्ये जिल्ह्यात ड्रील क्रेन सारखी अवजड यंत्रे बनविणे व त्यांची दुरुस्ती करण्याचा १ कारखाना होता. या कारखान्यामध्ये १८६ पुरुष कामगार होते तर एकही स्त्री कामगार नव्हती. या कामगारांनी ५३,५६८ श्रमदिवस कार्य केले.[१९४] तर १९८६-८७ मध्ये देखील या क्षेत्रात एक उद्योग जिल्ह्यामध्ये होता. या उद्योगामध्ये २०५ पुरुष कार्यरत होते व त्यांनी ५५,३५० श्रमदिवस कार्य केले.[195]

सन २००१-२००२ मध्ये या प्रवर्गामध्ये यंत्र सामग्री उत्पादनाचा एक कारखाना होता व या कारखान्याद्वारे ११ व्यक्तींना रोजगार मिळाला. या कामगारांनी ३,१९५ श्रमदिवस कार्य केले.[196] तर २००३ मध्ये देखील यंत्र सामग्री निर्मितीचा १ कारखाना होता. त्यामध्ये ९ पुरुष कामगार कार्यरत होते व त्यांनी एकूण २,७९० श्रमदिवस कार्य केले.[१९७]

मार्च २००९ अखेर मोटार व्हेहीकल्स, ट्रेलर्स आणि सेमी ट्रेलर्स निर्मितीच्या एकाही कारखान्याची नोंदणी झालेली नव्हती तर इतर परिवहन सामग्री निर्मितीचे ५ कारखाने होते. या कारखान्यांमधून

१९३.**नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, भारत सरकार, १९७१, पृ. २५९.

१९४.**जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन**, **नांदेड जिल्हा,** पृ. १०८.

१९५.कित्ता, वर्ष १९८६-८७, पृ. ८१.

१९६. कित्ता, वर्ष २००१-०२, पृ. ४४.

१९७.कित्ता, वर्ष २००३-०४, पृ. ४१.

३६ व्यक्तींना रोजगार प्राप्त झाला. या कारखान्यांची यंत्र व संयंत्र स्वरूपातील भांडवली गुंतवणूक ८ लाख रुपये होती तर उत्पादन क्षमता १६ लाख रुपये होती.[१९८]

ऑगस्ट २०१० पर्यंत या उद्योगात वाढ होऊन या क्षेत्रात परिवहन सामग्री, ट्रेलर्स, परिवहन सामग्रीचे इतर प्रकार असे एकत्रितपणे १५ उद्योग होते. या उद्योगांद्वारे २१६ व्यक्तींना रोजगार प्राप्त झाला. उद्योगांची यंत्र व संयंत्रातील गुंतवणूक एकत्रितपणे २०६ लाख रुपये असून उत्पादन क्षमता ७६६ लाख रुपये इतकी आहे.[१९९]

या प्रवर्गात सुरू असलेल्या उद्योगांच्या स्थापनेचा तपशिल तक्ता क्र. २३ मध्ये देण्यात आला आहे.

**इलेक्ट्रिक, इलेक्ट्रॉनिक यंत्रसामग्री, साधने, उपकरणे व सुटे भाग**

या प्रवर्गात विद्युत उपयोगाकरिता यंत्रसामग्री, उपकरणे व सुटे भाग तयार करणे, जसे जनरेटर, व्होल्टेज स्टॅबिलायझर्स, इलेक्ट्रिक मोटार इत्यादी उपकरणे व त्यांचे भाग तयार करणे. तसेच इन्शुलेटेड वायर व केबल (ऑप्टिकल फायबर केबलसह) तयार करणे, प्राथमिक सेल व बॅटरीज तयार करणे, ड्रायसेल तयार करणे, बॅटरीचे रिचार्जर तयार करणे, विविध प्रकारचे विद्युत दिवे, पंखे तयार करणे, इतर घरगुती वापरातील विद्युत उपकरणे तयार करणारे कारखाने, त्याच प्रमाणे संगणक व संगणकाधारित सिस्टिम तयार करणे इत्यादी उत्पादने तयार करणाऱ्या कारखान्यांचा समावेश होतो.

सन १९६० मध्ये जिल्ह्यात यंत्र व विद्युत साधने निर्मिती क्षेत्रामध्ये एकूण २७ व्यक्ती कार्यरत होत्या. यापैकी गृहोद्योग पातळीवर २ स्त्रिया तर ५ पुरुष कार्यरत होते. व गृहोद्योग व्यतिरिक्तच्या उद्योगांमध्ये २० पुरुषांना रोजगार प्राप्त झाला होता तर एकही स्त्री कामगार नव्हती.[200]

इलेक्ट्रॉनिक भाग आणि सामग्री यांची निर्मिती करणारा सन १९८२-८३ या कालावधीत एकमेव नोंदणीकृत उद्योग जिल्ह्यामध्ये होता. या उद्योगामध्ये एकूण ३६ पुरुष कामगार कार्यरत होते. व त्यांनी एकूण ११,१९६ श्रमदिवस कार्य केले.[२०१] तर १९८६-८७ पर्यंत जिल्हात या प्रवर्गात एकच उद्योग होता.[२०२] सन २००१-०२ मध्ये या उद्योगामध्ये एकूण १३ कामगार कार्यरत होते.[२०३] २००२-०३ यामध्ये अजून घट होऊन ही संख्या ४ कामगार एवढी झाली.[२०४]

---

१९८. उप अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्याकडून प्राप्त माहिती आधारे.

१९९. श्री. जयंत जोशी, संचालक, बी.सी.यु.डी., स्वा.रा.ती.प.वि., नांदेड यांच्याकडून प्राप्त लेखनानुसार.

२००. नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर, भारत सरकार, १९७१, पृ. २५९.

२०१. **जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, नांदेड जिल्हा,** १९८२-८३, पृ. १०८.

२०२. कित्ता, नांदेड जिल्हा, १९८६-८७, पृ. ८१.

२०३. **जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, नांदेड जिल्हा**, २००१-२००२, पृ. ४५.

२०४. कित्ता, नांदेड जिल्हा, २००२-२००३, पृ. ४२.

Maharashtra State Gazetteers

यानंतरच्या कालावधीत या उद्योगामध्ये मोठी वाढ होऊन मार्च २००९ अखेर जिल्ह्यात इलेक्ट्रीकल मशिनरीची ३४ उद्योग केंद्रे होती. त्यामध्ये एकूण २२३ कामगारांना रोजगार प्राप्त झाला. उद्योगांची यंत्र व संयंत्रांतील एकूण भांडवली गुंतवणूक ५२ लाख रुपये तर उत्पादन क्षमता २८१ लाख रुपये होती.[२०५]

ऑगस्ट २०१० पर्यंत मात्र उद्योगात घट होऊन इलेक्ट्रीकल यंत्रसामग्री, साधने, उपकरणे व सुटे भाग यांचे २१ तर रेडिओ, दूरदर्शन व संदेशवहन विषयक उपकरणे व सूटे भाग यांचे २ नोंदणीकृत उद्योग आढळतात. या उद्योगांमध्ये २४४ कामगारांना रोजगार प्राप्त झाला असून उद्योगांची यंत्र व संयंत्रामधील गुंतवणूक २५७ लाख रुपये तर उत्पादन क्षमता ६३४ लाख रुपये आहे.[२०६] जिल्ह्यातील इलेक्ट्रिक व त्यासंबंधीच्या काही महत्त्वाच्या नोंदणीकृत उद्योगांच्या स्थापनेचा तपशील तक्ता क्र. २४ मध्ये दर्शविण्यात आला आहे.

**अधातू खनिज उत्पादने**

या प्रवर्गात सिमेंटच्या वस्तू, प्लास्टर ऑफ पॅरिसच्या वस्तू, मातीच्या वीटा, काँक्रिटच्या वीटा, कौले, काच व काचेच्या वस्तू, दगडी वस्तू, मोझाईक टाईल्स, सिमेंटच्या जाळ्या, सिमेंटचे पाईप व खांब, मृदाशिल्प, चीनी मातीची भांडी इत्यादी उत्पादनांचा समावेश होतो.

१९६० मध्ये जिल्ह्यात अधातू खनिज उत्पादनांच्या उद्योगात एकूण ३,८६८ कामगार कार्यरत होते. त्यापैकी २,२८७ पुरुष कामगार तर १,५८१ स्त्री कामगार होत्या. या मध्ये घरगुती पातळीवर एकूण ३,४१८ कामगार होते. त्यापैकी १,९९१ पुरुष तर १,४२७ स्त्रिया होत्या तर घरगुती व्यतिरिक्तच्या अधातू खनिज उद्योगांमध्ये १४० पुरुष कामगार कार्यरत होते.[207]

जिल्हा सहकारी औद्योगिकरण आणि विकास संस्था मर्यादित, नांदेड या १९६४ मध्ये स्थापन झालेल्या सहकारी संस्थेद्वारे वीट निर्मितीचा १९७१ मध्ये नोंदणी असलेला १ उद्योग नांदेड मध्ये कार्यरत होता.[२०८]

दगडी पाट्या, सिलिकाच्या वस्तू इत्यादी संकिर्ण अधातू व खनिज पदार्थांच्या उत्पादनाचे चार कारखाने १९८२-८३ या कालावधीत जिल्ह्यामध्ये होते. यापैकी प्रपत्र पाठविणाऱ्या एका कारखान्यामध्ये ११४ पुरुष तर ३० स्त्री कामगार कार्यरत होते व त्यांनी एकूण ३३९८४ श्रमदिवस कार्य केले तर प्रपत्र न पाठविणाऱ्या उर्वरित तीन कारखान्यांमध्ये ७२ कामगार कार्यरत होते.[२०९]

महाराष्ट्र शासनाचा अंगीकृत व्यवसाय म्हणून कंपनी कायदा १९५६ अन्वये मराठवाड्याच्या अविकसित भागात सिरॅमिक्सच्या नविन तंत्रज्ञानाचा उपयोग करण्यासाठी मराठवाडा सिरॅमिक कॉम्प्लेक्स या कंपनीची नांदेड येथे सन १९८३ मध्ये स्थापना करण्यात आली. हा प्रकल्प औद्योगिक

---

२०५. उपअभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्याकडून प्राप्त माहिती आधारे.

२०६. श्री. जयंत जोशी, संचालक, बी.सी.यू.डी., स्वा.रा.ती.प.वि., नांदेड यांच्याकडून प्राप्त लेखनानुसार.

२०७. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, भारत सरकार, १९७१, पृ. २५९.

२०८. पूर्वोक्त, **लीड बँक स्कीम सर्व्हे रिपोर्ट**, १९७१, पृ. २६.

२०९. **जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, नांदेड जिल्हा**, १९८२-८३, पृ. १०७.

क्षेत्र घनेगाव, नांदेड येथे सुमारे १० एकर क्षेत्रामध्ये उभारला आहे. मराठवाड्यातील अविकसित भागाला चालना देणे, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळास लागणाऱ्या किटकॅट व शॅकल तसेच कपबशा, संडासची भांडी इत्यादी वस्तू तयार करून त्याची विक्री करणे, सिरॅमिकचे नवीन तंत्रज्ञान मराठवाड्याच्या अविकसित भागात आणणे यासाठी खाजगी उद्योजकांना प्रशिक्षण देणे व त्यांना मूलभूत सोयी उपलब्ध करून देणे व अविकसित भागात लोकांना रोजगार उपलब्ध करून देणे या उद्देशाने ही कंपनी स्थापन करण्यात आली होती.

या प्रकल्पात खाजगी उद्योजकांना सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी १६ विविध आकाराचे गाळे बांधून ते भाड्याने उपलब्ध करून देण्यात आले. तसेच कच्चामाल व माल आणण्याची सुविधा देखील उपलब्ध करून देण्यात आली.

**किनवट रुफिंग टाईल्स :**

मराठवाडा विकास महामंडळाने किनवट सारख्या आदिवासी अतीदुर्गम व मागासलेल्या भागामध्ये सर्वसामान्य माणसास घर बांधणीसाठी आवश्यक असलेली मातीची कौले तयार करून किफायतशीर भावाने विक्री करण्याकरिता व आदिवासी व इतर कामगारांना कामाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी १९७७ मध्ये हा प्रकल्प गोकुंदा, ता. किनवट येथे सुरू करण्यात आला होता. या प्रकल्पात सुमारे ११० स्त्री-पुरुषांना रोजगार मिळाला होता. परंतु सध्या हा प्रकल्प बंद आहे.

सन १९८६-८७ मध्ये जिल्ह्यात दगड घडविणे अथवा दगडाच्या वस्तू बनविणारे ३ नोंदणीकृत कारखाने होते. त्यापैकी २ कारखाने बंद होते तर इतर संकिर्ण अधातू व खनिज पदार्थांचे उत्पादन करणारे ५ कारखाने होते.

दगड व दगडाच्या वस्तूंचे उत्पादन करणाऱ्या चालू कारखान्यांमध्ये ४५ कामगार कार्यरत होते तर इतर अधातू खनिज पदार्थांचे उत्पादन करणाऱ्या ५ कारखान्यांमध्ये १८३ पुरुष तर ४५ स्त्री कामगार कार्यरत होते व त्यांनी एकूण ६४,२९० श्रमदिवस कार्य केले.[210]

सन २००१-२००२ मध्ये या उद्योगामध्ये वाढ होऊन अधातू खनिज पदार्थांचे उत्पादन करणाऱ्या एकूण नोंदणीकृत कारखान्यांची संख्या या कालावधीत १४ झाली. यापैकी एक कारखाना बंद होता तर प्रपत्र न पाठविणाऱ्या उर्वरित १३ कारखान्यांमध्ये १८५ कामगार कार्यरत होते.[२११]

सन २००३ मध्ये देखील जिल्ह्यात १४ नोंदणीकृत कारखाने होते परंतु त्यापैकी १० कारखाने बंद झाले होते. तर प्रपत्र न पाठविणाऱ्या उर्वरित चालू असलेल्या चार कारखान्यांमध्ये ६४ कामगार कार्यरत होते.[२१२]

---

२१०. पूर्वोक्त, सन २००१-०२, पृ. ४४.

२११. पूर्वोक्त, सन २००३-०४, पृ. ४१.

२१२. उपअभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, नांदेड यांच्याकडून प्राप्त माहिती आधारे.

विकासाभिमुख औद्योगिक धोरणामूळे मार्च, २००९ अखेर पर्यंत या उद्योगात मोठी वाढ होऊन ५० अधातू खनिज पदार्थ उद्योगांची नोंदणी झाली. या उद्योगांची यंत्र व संयंत्रामधील एकूण भांडवली गुंतवणूक ५७७ लाख रुपये होती तर उत्पादन क्षमता १,२८० लाख रुपये होती. या उद्योगांनी ४०४ व्यक्तींना रोजगार प्राप्त करून दिला.

ऑगस्ट, २०१० च्या नोंदीनुसार जिल्ह्यामध्ये या प्रवर्गाअंतर्गत नोंदणी झालेले ८२ उद्योग असून त्याद्वारे १,४१८ कामगारांना रोजगार प्राप्त झाला आहे. या कालावधीतील उद्योगांची एकत्रित यंत्र व संयंत्रातील भांडवली गुंतवणूक २,६५७ लाख रुपये असून उत्पादन क्षमता ४,२७६ रुपये आहे.[213]

या उद्योगांपैकी काही महत्त्वाच्या नोंदणीकृत उद्योगांच्या स्थापनेचा तपशील तक्ता क्र. २५ मध्ये दर्शविण्यात आला आहे.

**लाकडाच्या वस्तू आणि फर्निचर**

या प्रवर्गात लाकडी साहित्य, लाकूड चिरणे, खिडक्या, दरवाजे, लाकडी खेळणी, बैलगाडी, खोकी, फर्निचर व फिक्श्चर इत्यादी वस्तूंचे उत्पादन केले जाते.

१९६० मध्ये जिल्ह्यात लाकडी वस्तू निर्मितीचे ३०९ लघूउद्योग होते व त्यामधून ५४३ कामगार कार्यरत होते तर जिल्ह्यात एकच नोंदणीकृत सॉ मिल होती व त्यामधून ५ व्यक्तींना रोजगार प्राप्त झाला होता. १९६१ मधील औद्योगिक वर्गिकरणाच्या नोंदीनुसार या प्रवर्गात गृहोद्योग पातळीवर ४,०३२ पुरुष कामगार व ८४४ स्त्री कामगार होते व गृहोद्योग व्यतिरीक्त ६२० पुरुष कामगार व ८ स्त्री कामगारांना या उद्योगाद्वारे रोजगार प्राप्त झाला होता.[२१४] अशा प्रकारे या कालावधीत या उद्योगामध्ये एकूण ५,५०४ कामगार कार्यरत होते.

जिल्ह्यामध्ये नांदेड, किनवट, सहस्त्रकुंड येथे सॉ मील उद्योग केंद्रित झालेला होता तर वानेगाव, कुंडलावाडी, धर्माबाद, लोहा, मुखेड आणि हदगाव येथे वेतकामाचे उद्योग केले जात.[२१५]

१९७१ मध्ये जिल्ह्यात लघुउद्योगांतर्ग लाकडी फर्निचरचे १६ नोंदणीकृत कारखाने होते. तर मराठवाडा विकास महामंडळाद्वारे या कालावधीत जिल्ह्यामध्ये सॉ मिल आणि लाकडी फर्निचरच्या १४ उद्योगांना तर लाकडी बॉबिन्स निर्मितीच्या एका उद्योगास तात्पुरती मान्यता देण्यात आली होती.[216]

औरंगाबाद येथील उद्योग विभागाच्या उप संचालकांनी प्रसिद्ध केलेल्या "प्रोफाईल ऑन इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंट इन औरंगाबाद रीजन, १९६९-७०" या अहवालानुसार जिल्ह्यामध्ये लाकडी खेळणी निर्मितीच्या उद्योगास वाव असल्याचे नोंदविण्यात आले होते.[२१७]

---

२१३. श्री. जयंत जोशी, संचालक, बी.सी.यु.डी., स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्याकडून प्राप्त लेखनानुसार.

२१४. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, १९७१, पृ. २५९.

२१५. कित्ता, पृ. २६८-२६९.

२१६. पूर्वोक्त, लीड बँक स्कीम सर्व्हे रिपोर्ट, १९७१, पृ. ३१.

२१७. कित्ता, पृ. २८.

Maharashtra State Gazetteers

सन १९८२-८३ मध्ये प्लायवूड व्यतिरीक्त इतर लाकूड कापून, रंधा फिरवून वैगरे तयार करण्याचे ३१ कारखाने तर लाकडी फर्निचर, फळ्या इत्यादी बनविण्याचा १ कारखाना होता. यापैकी प्रपत्र पाठविणाऱ्या १३ कारखान्यांमध्ये ३८ कामगार कार्यरत होते व त्यांनी एकूण ९,५०४ श्रमदिवस कार्य केले. तर प्रपत्र न पाठविणाऱ्या १८ कारखान्यांमध्ये ३६ कामगार कार्यरत होते.[२१८] सन १९८६-८७ मध्ये प्लायवूड व्यतिरिक्त इतर लाकूड कापून रंधा फिरवून वैगरे तयार करण्याचे ४३ नोंदणीकृत कारखाने होते. त्यापैकी प्रपत्र पाठविणाऱ्या २६ कारखान्यांमध्ये ८० पुरुष व १ स्त्री कामगार कार्यरत होते व त्यांनी एकूण १८,०९८ श्रमदिवस कार्य केले तर प्रपत्र न पाठविणाऱ्या १७ कारखान्यांमध्ये ९३ कामगारांना रोजगार प्राप्त झाला होता.

सन २००१-०२ मध्ये लाकडापासून फळ्या तयार करण्याचे नोंद झालेले ९० कारखाने होते. त्यापैकी प्रपत्र पाठविणाऱ्या ५ कारखान्यांमध्ये एकूण २० कामगार होते व त्यांनी एकूण ५,९५२ श्रमदिवस कार्य केले. प्रपत्र न पाठविणाऱ्या ८५ चालू कारखान्यांमध्ये १७४ कामगार कार्यरत होते. तर लाकडी फर्निचर बनविण्याचे २ नोंदणीकृत कारखान्यांपैकी प्रपत्र पाठविणाऱ्या एका कारखान्यामध्ये ८ कामगार होते व त्यांनी २,४४० श्रमदिवस कार्य केले तर उर्वरित प्रपत्र न पाठविणाऱ्या कारखान्यामध्ये ३ कामगार कार्यरत होते.[२१९]

मार्च, २००९ अखेर जिल्ह्यात लाकूड आणि लाकडी वस्तू निर्मितीचे ९० नोंदणीकृत लघुउद्योग होते. या लघुउद्योगांद्वारे ४८७ व्यक्तिंना रोजगार प्राप्त झाला. या उद्योगांची यंत्र व संयंत्रातील भांडवली गुंतवणूक २२५ लाख रुपये होती. तर लाकडी फर्निचर निर्मितीच्या १२ उद्योगांची नोंद झालेली होती. या उद्योगांद्वारे ७६ व्यक्तिंना रोजगार प्राप्त झाला होता. उद्योगांची यंत्र व संयंत्रातील गुंतवणूक ६६ लाख रुपये होती तर स्थापित क्षमता ३७१ लाख रुपये होती.[२२०]

जिल्ह्यातील अतिलहान, लघू व मध्यम उद्योगातील रोजगार गुंतवणूकीनुसार ऑगस्ट २०१० मध्ये लाकडाच्या वस्तू आणि फर्निचर निर्मितीचे ३८ तर फर्निचर उत्पादनाचे ४० नोंदणीकृत उद्योग असून त्याद्वारे एकत्रितपणे ८९४ व्यक्तिंना रोजगार प्राप्त झाला. उद्योगांमधील यंत्र व संयंत्रातील एकत्रित गुंतवणूक ६६५ लाख रुपये असून स्थापित क्षमता ७,६११ लाख रुपये आहे.[२२१]

जिल्ह्यातील या प्रवर्गातील काही महत्त्वाच्या नोंदणीकृत उद्योगांच्या स्थापनेचा तपशील तक्ता क्र. २६ मध्ये दर्शविण्यात आला आहे.

Maharashtra State Gazetteers

## भांडवली वस्तू व यंत्रसामग्री दुरुस्ती

सन १९६० मध्ये जिल्ह्यात स्वयंचलीत यंत्र दुरुस्ती व कार्यशाळेचा एकच नोंद झालेला उद्योग होता व या उद्योगाद्वारे ६१ व्यक्तींना रोजगार प्राप्त झाला होता.[२२२] तर लिंग व वर्गानुसारच्या औद्योगिक

२१८. **जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, नांदेड जिल्हा,** वर्ष १९८२-८३, पृ. १०६.

२१९. पूर्वोक्त, वर्ष २००१-२००२, पृ. १०६.

२२०. उपअभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, नांदेड यांच्याकडून प्राप्त माहिती आधारे.

२२१. श्री. जयंत जोशी, संचालक, बी.सी.यु.डी., स्वा.रा.ती.प.वि., नांदेड यांच्याकडून प्राप्त माहिती आधारे.

२२२. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, भारत सरकार, १९७१, पृ. २५७.

वर्गिकरणान्वये १९६१ मध्ये जिल्ह्यात वाहतुकीच्या साधनांच्या उद्योगांमध्ये गृहोद्योग पातळीवरील उद्योगांत २७३ पुरुष व १४ स्त्रिया तसेच गृहोद्योग व्यतिरीक्तच्या उद्योगांमध्ये १४० पुरुष असे एकूण ४२७ कामगार कार्यरत होते.[२२३]

सन १९८२-८३ दरम्यान जिल्ह्यात मोटार गाड्या व मोटार सायकल दुरुस्तीचे ८ नोंदणीकृत कारखाने होते. यापैकी प्रपत्र पाठविण्याऱ्या ४ उद्योगांमध्ये ४८४ पुरुष कामगार होते व त्यांच्या १,५१,८२२ श्रमदिवस कार्य केले तर प्रपत्र न पाठविणाऱ्या चार उद्योग २१० कामगार कार्यरत होते.[२२४] या प्रवर्गात १९८६ मध्ये नोंद झालेले ९ कारखाने होते. यापैकी प्रपत्र पाठविणाऱ्या ९ उद्योगांमध्ये ५७२ कामगार होते व त्यांनी १,६७,५२३ श्रमदिवस कार्य केले. तर प्रपत्र न पाठविणाऱ्या उर्वरित एका उद्योगामध्ये ५० कामगारांना रोजगार प्राप्त झाला होता.[२२५]

१९८५-८६ या कालावधीमध्ये दुरुस्ती सेवांतर्गत येणाऱ्या उद्योगांमध्ये ३५,१२ हजार रुपये स्थिर भांडवल तर ७.१९ हजार रुपये खेळत्या भांडवलाची गुंतवणूक करण्यात आली होती. याद्वारे मोठे उद्योग, लघु उद्योग, ७२१ कामगार तर ९०१ कर्मचाऱ्यांना रोजगार प्राप्त झाला. कामगारांना १,१९,१५ हजार रुपये वेतन देण्यात आले होते. तर एकूण ४,५१,२१ हजार रुपये किमतीच्या उत्पादनावर १,६०,६७ हजार रुपये मिळकत प्राप्त झाली. या कालावधीतील उद्योगांची एकूण निविष्टी २,७७,०२ हजार रुपये होती तर उत्पादनामुळे १,७२,८३ हजार रुपये झाली.

१९९६-९७ मध्ये जिल्ह्यात सर्व प्रकारच्या यंत्रांच्या दुरुस्ती उद्योगामध्ये ४०,४९ हजार रुपये स्थिर भांडवल तर ३,६०,०३ हजार रुपये खेळते भांडवल गुंतविण्यात आले होते. या उद्योगांद्वारे ४८९ कामगारांना तर ६८६ कर्मचाऱ्यांना रोजगार प्राप्त झाला व कर्मचाऱ्यांना ३०,३०७ हजार रुपये वेतन देण्यात आले. यामधील उद्योगांची एकूण ६,६२,९७ हजार रुपये किमतीच्या उत्पादनामागे ५,११,०४ हजार रुपये किमतीची मिळकत प्राप्त झाली होती. या कालावधीतील उद्योगांची एकूण निविष्टी ११,७५,४९ हजार रुपये होती तर उत्पादनाला ५,११,०४ हजार रुपयांची मूल्यवृद्धी प्राप्त झाली.[२२६]

मोटार वाहन दुरुस्तीचे १३ नोंदणीकृत उद्योग सन २००१ मध्ये जिल्ह्यात होते. यापैकी प्रपत्र पाठविणाऱ्या ५ उद्योगांमध्ये एकूण ५८९ कामगार होते. त्यापैकी ५७८ पुरुष तर ११ स्त्री कामगार होते व त्यांनी एकूण १,७३,३६३ श्रमदिवस कार्य केले तर प्रपत्र न पाठविणाऱ्या ८ उद्योगांमध्ये ५८० कामगार कार्यरत होते.

मोटार वाहने व मोटार सायकल दुरुस्तीचे लघु, मोठे व गृहोद्योग असे एकूण ४५ उद्योग मार्च, २००९ अखेर जिल्ह्यात नोंदणी झालेले होते. या उद्योगांमध्ये यंत्र व सयंत्र सामग्रीमध्ये २०९ लाख

---

२२३. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, भारत सरकार, १९७१, पृ. २५९.

२२४. **जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, नांदेड जिल्हा,** वर्ष १९८२-८३, पृ. १०८.

२२५. कित्ता, वर्ष १९८६-८७, पृ. ८१-८६.

२२६. **जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, नांदेड जिल्हा,** वर्ष २००१-०२, पृ. ४१-४९.

रुपये गुंतवणूक करण्यात आली होती. तर उद्योगांची एकत्रित स्थापित क्षमता ६७१ लाख रुपये होती. या उद्योगांनी उपरोक्त कालावधीत ८२ व्यक्तिंना रोजगार प्राप्त करून दिला.[२२७] तर ऑगस्ट २०१० अखेर या प्रवर्गामध्ये जिल्ह्यात १०२ नोंदणीकृत उद्योग असून त्यामध्ये यंत्र व सयंत्र सामग्रीमध्ये ७९७ लाख रुपयांची गुंतवणूक करण्यात आली. तर उद्योगांची या कालावधीमधील स्थापित उत्पादन क्षमता १,५२,७७ लाख रुपये आहे. या उद्योगाद्वारे १,१६८ व्यक्तिंना रोजगार प्राप्त झाला.[२२८]

**ग्रामोद्योग व कुटिरोद्योग**

जिल्ह्यातील कुटिरोद्योगात हातमाग, चर्मोद्योग, सुतार व लोहार काम, कुंभार उद्योग, तांब्या पितळेची भांडी, लोकर विणकाम, हात कागद, मध उद्योग, वेत व बांबूची कामे इत्यादी महत्त्वाच्या उद्योगधद्यांचा समावेश होतो. त्यापैकी काही उद्योगधदे पिढीजात कारागिरीच्या स्वरुपात तसेच बलुतेदारी पद्धतीने चालविण्यात येतात.

प्राचीन काळी भारतातील खेडी ही स्वयंपूर्ण होती. परकी सत्तेमुळे तसेच वाढत्या शहरीकरणामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेत परावलंबीत्त्व येत गेले आणि येथील पारंपारिक ग्रामीण उद्योग अडचणीत येऊन येथील अर्थव्यवस्था असंतुलित होऊन बेरोजगाराची समस्या वाढू लागली. ग्रामीण अर्थव्यवस्थेत संतुलित विकास घडवून आणणे व स्वयंपूर्णतः साध्य करण्यासाठी विविध संस्थांच्या परस्पर सहकार्यातून ग्रामीण भागाचा जलद विकास घडवून आणण्याच्या दृष्टिने स्वातंत्र्यानंतर संयुक्त महाराष्ट्र शासनाने ग्रामीण औद्योगिक करणासाठी अनेक योजना आखल्या. त्या अंतर्गत महाराष्ट्रातील खादी व ग्रामोद्योग महामंडळाची स्थापना करण्यात आली. यानुसार मंडळामार्फत राज्यातील ग्रामीण भागात केंद्र शासन व राज्य शासनाच्या सहकार्याने अर्थसहाय्याच्या विविध योजना राबविण्यात येतात. यात प्रामुख्याने आर.ई.जी.पी. (मार्जिन मनी) योजना, विशेष घटक योजना, कारागीर रोजगार हमी योजना, ग्रामोद्योग वसाहत योजना यांचा समावेश आहे. या अंतर्गत ग्रामीण क्षेत्रातील गरजू लोकांना रोजगार, खेड्यातील कारागीर व बलुतेदार यांच्या उद्योगाचे स्थैर्य, स्वयंरोजगाराच्या क्षेत्राची व्यापक प्रमाणात वृद्धी, खादी व ग्रामोद्योगासाठी पतपुरवठा, कच्चा मालपुरवठ्याची शिफारस, कारागिरांचे तांत्रिक कौशल्य वाढविण्यासाठी उत्तेजन, तयार मालाच्या विक्रीस मदत, निवडक, ग्रामोद्योग प्रशिक्षण, खादी ग्रामोद्योगाच्या विकासास पोषक असे धोरण ठरविण्याबाबत शासनाशी प्रभावी संपर्क, स्थानिक साधन संपत्तीचा वापर करून ग्रामीण भागातील कारागिरांना रोजगार मिळवून देणे हे मंडळाचे उद्दिष्ट आहे. अलिकडे ग्रामोद्योग म्हणजे ज्या गावाची लोकसंख्या २०,००० पेक्षा जास्त नाही अशा गावात सुरू केलेला उद्योग (पूर्वी ही मर्यादा १०,००० पेक्षा कमी लोकसंख्येची होती.) ज्यात भांडवली गुंतवणुकीची रक्कम प्रति कारागीर किंवा कामगार रुपये ५०,००० पेक्षा जास्त असणार नाही अशा उद्योगास ग्रामोद्योग म्हणून संबोधण्यात येते.

राज्यातील ग्रामीण भागात केंद्र शासन व राज्य शासनाच्या सहकार्याने उद्योजकता विकासासाठी अर्थ सहाय्याच्या विविध योजना राबविण्यात येतात. यात प्रामुख्याने वीज भांडवल योजना, जिल्हा

२२७. उप अभियंता, म.औ.वि.मं., नांदेड, यांच्याकडून प्राप्त माहिती आधारे.

२२८. डॉ. जयंत जोशी, संचालक, बी.सी.यु.डी. स्वा.रा.ती.म.वि., नांदेड यांच्या लेखनावर आधारित.

उद्योग केंद्र योजना, उद्योगजकता विकास प्रशिक्षण योजना, जिल्हा पुरस्कार योजना इत्यादींचा समावेश होतो.

नांदेड जिल्ह्यातील औद्योगिक विकासाकरिता सन २००३-०४ ते २००८-०९ या कालावधीत उपरोक्त योजनानिहाय प्रत्यक्ष खर्च व साध्य पुढील तक्ता क्र.१ ते ४ मध्ये दर्शविण्यात आला आहे.[२२९]

**तक्ता क्र. १**

**वीज भांडवल योजना**

(रु. लाखात)

| अ.क्र. | वर्ष | उद्दिष्ट | | साध्य | |
|---|---|---|---|---|---|
| | | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक |
| १. | २००३-०४ | ८ | ०४.२३ | ८ | ४.०१ |
| २. | २००४-०५ | २८ | २०.०० | १६ | १०.५७ |
| ३. | २००५-०६ | ९८ | २४.४२ | ३६ | १४.७२ |
| ४. | २००६-०७ | ७० | २७.०० | ६२ | १९.५१ |
| ५. | २००७-०८ | ५८ | २३.४७ | ५८ | २०.९३ |
| ६. | २००८-०९ | ४७ | ३४.५० | ८१ | ३४.५० |
| | एकूण . . | ३०९ | १३३.६२ | २६१ | १०४.२४ |

**तक्ता क्र. २**

**जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजना**

| अ.क्र. | वर्ष | उद्दिष्ट | | साध्य | |
|---|---|---|---|---|---|
| | | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक |
| १. | २००३-०४ | ५ | १.१२ | १ | १.१२ |
| २. | २००४-०५ | ३ | ०.५६ | ३ | ०.५६ |
| ३. | २००५-०६ | ३० | ६.२४ | १६ | ४.५० |
| ४. | २००६-०७ | ०७ | ५.०० | ०७ | ३.०० |
| ५. | २००७-०८ | १२ | ३.०० | १२ | ३.०० |
| ६. | २००८-०९ | ८ | ३.०० | ०८ | ३.०० |
| | एकूण . . | ६५ | १८.९२ | ४७ | १५.१८ |

२२९. उप अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, नांदेड यांच्याकडून प्राप्त माहिती आधारे.

Maharashtra State Gazeteers

**तक्ता क्र. ३**

**उद्योजकता विकास प्रशिक्षण**

| अ.क्र. | वर्ष | उद्दिष्ट | | साध्य | |
|---|---|---|---|---|---|
| | | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक |
| १. | २००३-०४ | १८४ | २.४२ | २१० | २.४२ |
| २. | २००४-०५ | १६४ | २.३३ | १४४ | २.३३ |
| ३. | २००५-०६ | २४५ | ५.१३ | २६५ | ५.१३ |
| ४. | २००६-०७ | ३४७ | ५.३० | ३७६ | ५.३० |
| ५. | २००७-०८ | ११९४ | ५०.८० | १५०८ | ५०.८० |
| ६. | २००८-०९ | ८९८ | ३०.९० | १११२ | ३०.९० |
| | एकूण . . | ३०३२ | ९६.८८ | ३६१५ | ९६.८८ |

**तक्ता क्र. ४**

**जिल्हा पुरस्कार योजना**

| अ.क्र. | वर्ष | उद्दिष्ट | | साध्य | |
|---|---|---|---|---|---|
| | | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक |
| १. | २००३-०४ | २ | ०.१३ | ४ | ०.१३ |
| २. | २००४-०५ | २ | ०.१३ | २ | ०.१३ |
| ३. | २००५-०६ | २ | ०.१७ | २ | ०.१७ |
| ४. | २००६-०७ | २ | ०.२१६ | २ | ०.२१६ |
| ५. | २००७-०८ | २ | ०.३० | २ | ०.३० |
| ६. | २००८-०९ | २ | ०.३० | २ | ०.३० |
| | एकूण . . | १२ | १.२४६ | १४ | १.२४६ |

विकसनशील अर्थव्यवस्थेमध्ये कुटिरोद्योग महत्त्वाची भूमिका बजावतात. या औद्योगिक संस्थांना कमी भांडवलाची आवश्यकता असते आणि त्यांच्याद्वारे जास्तीची मानवी शक्ती सामावून घेतली जाते. अशा प्रकारे कुटिरोद्योग हा बेरोजगारी व अर्धरोजगारीच्या प्रश्नावरचा एक प्रकारे उपायच आहे.

जिल्ह्यामध्ये कुटिरोद्योग सर्वत्र पसरलेले असून १९६० पूर्वी पासून ते सहकारी संस्थांखाली आणले जात आहेत. जिल्ह्यातील महत्त्वाचे कुटिरोद्योग विणकाम, कातडी कमाविणे, सुतारकाम, धातूकाम, वीटा बनविणे, कुंभारकाम, इत्यादी आहेत.

Maharashtra State Gazetteers

जिल्ह्यात चालणाऱ्या काही परंपरागत कुटिरोद्योगांची आणि त्यातील कारागिरांना सदर मंडळामार्फत देण्यात आलेल्या आर्थिक सहाय्याबाबतची माहिती पुढे देण्यात येत आहे.

**हातमाग विणकाम उद्योग :**

हातमाग चालविणाऱ्या विणकरांची सहकारी संस्था काढणे, त्यांचा माल खपविणे, त्याचप्रमाणे लोकरीच्या व्यवसायासाठी धनगरांना आणि इतरांना मदत देण्यासाठी १९५४ अखेर नांदेड आणि परभणी जिल्ह्यात १ लक्ष ५ हजार २५० रुपये बिनव्याजी कर्जाऊ देण्यात आले. १९५५-५६ साली सुमारे १० लाख रुपये या कामी बिनव्याजी कर्ज म्हणून देण्याची योजना हातमाग मंडळातर्फे नांदेड व परभणी जिल्ह्यामध्ये सुरू करण्यात आली. हातमागाचे कापड गिरणीच्या कापडाच्या भावाने विकता यावे म्हणून हातमाग कापडास रुपयाला दिड आणा रिबेट म्हणून देण्यात आला. त्यासाठी नांदेड, देगलूर, मानवत आणि बस्मत येथील सहकारी विणकर संस्थांनी रिबेट म्हणून सुमारे ५०,००० रुपये मिळविले. बस्मत येथे नांदेड आणि परभणी जिल्ह्यासाठी मिळून रंग देण्याचे एक केंद्र स्थापन करण्यात आले. या कामासाठी या सहकारी संस्थेस सुमारे ९००० रुपयाची ग्रँट व २००० रुपये कर्जाऊ देण्यात आले.

या कालावधींत नांदेड येथे एक हातमाग विक्री केंद्र स्थापन करण्याची योजना प्रस्तावित होती. तर साडेतीन हजार हातमागांची नोंद झालेली होती. तर कंधार येथे कावळिची लोकर कातण्याच्या व्यापार मोठ्या प्रमाणावर चालत असे.[२३०]

मार्च, १९५३ मध्ये जिल्ह्यात हातमाग व्यवसायास असलेला वाव लक्षात घेऊन हातमाग सल्लागार मंडळ, हस्तव्यवसाय सल्लागार मंडळ आणि खादी ग्रामोद्योग सल्लागार मंडळ अशी तीन मंडळे स्थापन करण्यात आली.

सन १९६० मध्ये कापड व लोकर कातण्याच्या उद्योगामध्ये गृहोद्योग क्षेत्रात १६७ पुरुष व १६४ स्त्रिया असे एकूण ३३१ कामगार कार्यरत होते.[२३१] जिल्ह्यात नांदेड, कुंडलवाडी, माहूर, धर्माबाद, वानेगाव, मुदखेड, लोहा, कंधार, मुक्रमाबाद, मानसपूरी, कराडखेड, शहापूर, मुखेड येथे हा उद्योग केंद्रित झालेला होता. याठिकाणी कार्यरत असलेल्या कारागिरांची संख्या पुढीलप्रमाणे होती. १९६१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यामध्ये एकूण २,१०८ सूत कताईकार, विणकर, रंगारी आणि इतर संबंधित कामगार हाते. त्यापैकी ९२८ पुरुष तर ११७९ स्त्री कामगार होते.

| स्थान | कारागीर संख्या |
|---|---|
| नांदेड | १००० |
| देगलूर | १००० |
| कुंडलवाडी | २०० |
| मुखेड | ५०० |
| मुदखेड | ३०० |
| जिल्ह्यातील इतर ठिकाणे | १००० |

२३०. **कल्याणकारी राज्याची वाटचाल,** नांदेड जिल्हा, महाराष्ट्र शासन, जानेवारी १९५७, पृ. १८-१९.

२३१. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, भारत सरकार, १९७१, पृ. २५८.

Maharashtra State Gazetteers

जिल्ह्यामध्ये हातमाग विणकामाची १६ केंद्र होती. पद्मशाली, रंगारी, मोमिन, हरीजन, कोष्टी या जातींचे लोक परंपरागत व्यवसाय म्हणून हा उद्योग करत. उद्योगातील कच्चामाल धागा, रंग आणि इतर रसायने असून तो नांदेड, हैद्राबाद, मुंबई आणि सोलापूर येथून प्राप्त केला जात असे. या उद्योग संस्थामध्ये कच्च्या मालाची खरेदी दर महिन्यास एक ते दोन लाख रुपये किमतीची होत असे.[२३२]

३० जून १९६५ मध्ये जिल्ह्यात ३,१२५ नोंदणीकृत हातमाग होते. ३० जून १९६९ मध्ये जिल्ह्यात १२ नोंदणीकृत हातमाग विणकाम संस्था होत्या त्यापैकी ५ संस्था चालू होत्या. कार्यरत संस्थांचे २,७४५ सदस्य होते आणि संस्थेचे भाग भांडवल १.८५ लाख रुपये होते. तर खेळते भांडवल ७.६१ लाख रुपये होते. संस्थांनी वर्षभरामध्ये ५.१९ लाख रुपये किमतीच्या मालाची विक्री केली.

स्टेट बँक ऑफ हैद्राबादच्या सर्वेक्षण समितीद्वारे लेहा येथील काही हातमाग विणकरांची घेण्यात आलेल्या मुलाखती नुसार सर्वसाधारणपणे एक नवीन माग विकत घेण्यासाठी विणकरास मागाच्या प्रकारानुसार रुपये ३०० ते रुपये ६०० ची आवश्यकता असे. तर खेळत्या भांडवलासाठी साधारणपणे २५० रुपये लागत.

जिल्ह्यात पहिली हातमाग सहकारी संस्था नांदेड येथे मार्कंडेय या नावाने १९५८ मध्ये स्थापन झाली. सन १९९०-९१ ते २००४-०५ मधील या संस्थेची माहिती खाली दिली आहे.

(रुपये हजारांत)

| अ.क्र. | तपशील | १९९०-९१ | १९९५-९६ | १९९९-२००० | २००४-०५ |
|---|---|---|---|---|---|
| १. | संस्था (संख्या) | २१ | २३ | २३ | ३६ |
| २. | सभासद (संख्या) | ३,५८० | ३,७६० | ३,७६० | ९०० |
| ३. | भाग भांडवल | १२,३६ | १२,३६ | १२,३६ | ५,७५ |
| ४. | स्वतःचा निधी | १,६० | १,८५ | १,८५ | १,०० |
| ५. | खेळते भांडवल | १५१,७१ | १६१,३० | १६,१६० | . . |

तिडके समितीच्या शिफारसीनुसार सहकार क्षेत्राबाहेरील हातमाग विणकरांना विणकाम व्यवसायाकरिता आवश्यक असलेले सर्व प्रकारचे सहाय्य देऊन त्यांना रोजगार मिळवून देण्याच्या उद्देशाने या महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळाची स्थापना करण्यात आली. हे महामंडळ कंपनी कायदा १९५६ अंतर्गत २९ ऑक्टोबर १९७१ मध्ये पंजीबद्ध झाले. महामंडळाचा मुख्य उद्देश नफा कमविणे हा नसून सामाजिक बांधीलकीतून परंपरागता असलेली कला अस्तित्वात ठेऊन विणकरांना नियमित रोजगार उपलब्ध करून देणे हा आहे. विणकरांनी तयार केलेल्या कापडाची विक्री व्हावी या हेतूने व विणकरांना रोजगार उपलब्ध व्हावा हेतूने महामंडळाने नांदेड येथे १९७७ साली किरकोळ विक्री केंद्र सुरू केले. महामंडळाकडून विशेष सूट योजनादेखील राबविण्यात येते. विशेष सूट योजना राबविण्यात येत असताना नांदेड शहराव्यतिरिक्त तालुक्याच्या ठिकाणी व प्रमुख व्यापारीपेठ असलेल्या

२३२. पूर्वोक्त, १९७१, पृ. २७१.

ठिकाणी मर्यादीत कालावधी करीता विक्री स्टॉल उघडण्यात येतात. याशिवाय शासनाच्या विविध विभागांना हातमाग कापडाचा पुरवठा शासनाने निर्धारीत केलेल्या दराने केला जातो.

१९६२ मध्ये जिल्ह्यात सूत आणि लोकर विणकामाच्या एकूण १८ औद्योगिक सहकारी संस्था होत्या. या संस्थांनी सदर वर्षामध्ये एकत्रितपणे १४७.५१४ रुपये किमतीच्या मालाचे उत्पादन केले.[२३३]

१९८६-८७ मध्ये जिल्ह्यात बिगर कृषि बिगर पतसंस्था अंतर्गत हातमागाच्या २६ तर विणकामाच्या ८ सहकारी संस्था होत्या.[२३४]

महाराष्ट्र शासनाने मराठवाड्यातील ठिकठिकाणी विखुरलेल्या विणकरांच्या पूनर्वसनासाठी व त्यांना आपल्या भागातच रोजगार मिळवून देण्यासाठी मराठवाडा विकास महामंडळ या राज्य शासनाच्या मालकीच्या उपक्रमामार्फत एकत्रित यंत्रमाग प्रकल्प राबविण्याचे १९७० साली ठरविले होते. या योजनेंतर्गत मराठवाड्यातील ६ जिल्ह्यांत विणकरांच्या ४८ यंत्रमाग औद्योगिक सहकारी संस्था स्थापन केल्या. या संस्थांमार्फत २,३०४ यंत्रमाग विकत घेऊन प्रत्येक विणकराला दोन यंत्रमाग व एक राहते घर मिळण्याची व्यवस्था करण्यात आली होती. उपरोक्त यंत्रमाग संस्थांनी उत्पादित केलेल्या कापडावर प्रक्रिया करून, बाजारपेठेत विक्री करण्यासाठी मराठवाडा वस्त्रोद्योग महामंडळाची कंपनी कायद्यांतर्गत १९७० साली स्थापना केली. टेक्स्कॉमची वार्षिक कापड उत्पादन क्षमता ३६० लक्ष मीटर होती. ४८ विणकर संस्थांमध्ये ११५२ विणकर कुटुंबियांना रोजगार मिळालेला होता. तसेच विणकरांचे मदतनीस म्हणून तेवढ्याच ११५२ मदतनीसांना सुद्धा काम मिळत होते. तसेच मराठवाडा वस्त्रोद्योग व टेक्स्कॉम प्रकल्पांतर्गत जवळ जवळ ५००० लोकांना रोजगार मिळत होते. विणकरांना त्यांच्या विणाईद्वारे दरमहा साधारणपणे रुपये ४,००० ते रुपये ५,००० दरमहा प्राप्ती होत होती व त्यांची आर्थिक भरभराट देखील झाली. परंतु १९९५ मध्ये विणकर सहकारी संस्थांनी टेक्स्कॉम पासून विभक्त होण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर काही अपरिहार्य कारणांमुळे हा प्रकल्प बंद झाला.

मार्च, २००४ अखेर जिल्ह्यात हातमाग व यंत्रमागाच्या एकत्रितपणे ३२ सहकारी संस्था होत्या. व त्यांची एकूण सभासद संख्या ४,७२४ होती. या संस्थांमध्ये गुंतविण्यात आलेले एकत्रित भाग भांडवल व खेळते भांडवल अनुक्रमे २२,३० हजार रुपये व १,९९,४५ हजार रुपये होते. तर राखीव नीधी स्वरूपात १,९९ हजार रुपये गुंतविण्यात आले होते.[२३५]

हातमाग व विणकाम तसेच इतर कापड उद्योगांचे सन २००६ मध्ये जिल्ह्यात ५० नोंदणीकृत उद्योग होते. या उद्योगांमधील या कालावधीमधील भांडवली गुंतवणूक १२० लाख रुपये होती तर उद्योगांद्वारे १०२ व्यक्तींना रोजगार प्राप्त झाला.[२३६]

---

२३३. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, १९७१, भारत सरकार, पृ.

२३४. **जि.सा.व आ.स., नांदेड जिल्हा**, वर्ष १९८६-८७, पृ.

२३५. कित्ता, वर्ष २००३-२००४, पृ. ६८.

२३६. प्र. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, नांदेड यांच्याकडून प्राप्त माहिती आधारे.

**सुतारकाम**

जिल्ह्यातील कुटिरोद्योगामध्ये सुतारकामास महत्त्वाचे स्थान आहे. सुतारकाम हे पूर्वी सुतार समाजापर्यंतच मर्यादीत होते. आता मात्र हा उद्योग इतर समाजाच्या व्यक्ति देखील करतात. सुतारांना गृहनिर्माण प्रक्रियेत रोजगार मिळतो. ते लाकडी सामान बनवितात. तर ग्रामिण भागात या बरोबरच शेतीच्या औजारांची दुरुस्ती करतात.

१९६१ च्या जनगणनेनुसार सुतार, सांध्यप्ये, लाकडाचे नमुने बनविणारे असे सुतार कामाच्या कुटिरोद्योगामध्ये २९८१ पुरुष तर ९ स्त्रिया कार्यरत होत्या. तसेच चिरकामे आणि लाकूड कामाच्या यंत्राचे कामगार ३७६ होते.[२३७] नांदेड, किनवट, हदगाव, देगलूर, भोकर आणि बिलोली ही जिल्ह्यातील या उद्योगाची महत्त्वाची केंद्रे होती जेथे जवळपास १५०० कारागीर या व्यवसायात कार्यरत होते.

जंगलाखाली असलेल्या पुरेशा क्षेत्रामुळे नांदेड आणि किनवट हे सागाच्या लाकडी सामानासाठी प्रसिद्ध आहेत. महत्त्वाचा कच्चामाल असलेले लाकूड या क्षेत्रातूनच प्राप्त केले जात असे व ते सुतारांच्या सहकारी संस्थांकडून खरेदी केले जात असे. लाकडाची किंमत रुपये १५ ते रुपये २० पर क्यूबीक फीट असे. उद्योगासाठी लागणाऱ्या सामग्रीमध्ये छीन्नी, करवत, कानस, फुटपट्टी, हातोडा, विंधण्याचे हत्यार, इत्यादींचा समावेश होतो, १९६०-७० मध्ये या सर्व सामग्रींचा संपूर्ण संच रुपये ५०० पर्यंत पडत असे आणि तो स्थानिकरित्या उपलब्ध असे एक कारागीर दिवशी रुपये ५ ते रुपये ७ दरम्यान कमवत असे.

कामाच्या जुन्या पद्धतीमुळे उद्योगास जिल्ह्यामध्ये बरेचसे नुकसान भोगायला लागल्याने उद्योगांना प्रोत्साहन देण्याच्या योजनेनुसार जिल्हा परिषदेने जिल्ह्यातील प्रत्येक विभागामध्ये सुतारांकरिता प्रशिक्षण केंद्र उभारले व सुतारांच्या सहकारी संस्थांनादेखील प्रोत्साहन दिले जाऊ लागले. १९६२ मध्ये जिल्ह्यात सुतारांच्या आठ सहकारी संस्था होत्या.[२३८]

१९६२ मध्ये जिल्ह्यात सुतारकाम आणि लोहारकामाच्या एकत्रितपणे ८ सहकारी संस्था होत्या. या संस्थांनी वर्षभरामध्ये ३३,१९८ रुपये किमतीच्या मालाचे उत्पादन केले.[२३९]

सन २००६ मध्ये सुतारकाम, लोहारकाम आणि इतर अभियांत्रिकी कामाचे एकूण १३९ उद्योग होते. त्यांची एकत्रित भांडवली गुंतवणूक ३७३ लाख रुपये होते व या उद्योगाद्वारे ६६३ व्यक्तींना रोजगार प्राप्त झाला.[२४०]

**लोहारकाम**

लोहार हा अद्याप ग्रामीण अर्थव्यवस्थेत बलुते पद्धतीतील आपले प्रमुख अस्तित्व टिकवून असलेला एक महत्त्वाचा घटक आहे. तथापि, नजीकच्या काळात ग्रामीण भागात अनेक ठिकाणी

२३७. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, भारत सरकार, पृ. १९७१, पृ. २६९.

२३८. कित्ता, १९७१, पृ. २७६.

२३९. कित्ता, १९७१, पृ. २७९.

२४०. प्र. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, नांदेड, यांच्याकडून प्राप्त माहितीआधारे.

Maharashtra State Gazetteers

लोहाराकडून काही प्रमाणात बलुतेदारी पद्धतीने व काही प्रमाणात कामाच्या मोबदल्यात वस्तूच्या निर्मिती किंवा दुरुस्तीच्या स्वरुपावरून ठराविक दर आकारला जातो. जिल्ह्यातील बहुतेक गावांमध्ये लोहारकाम चालते. अनेक गावांत लोहारकाम व सुतारकाम ही दोन्ही प्रकारची कामे एकाच व्यक्तिकडून केली जातात. कुदळ, कुऱ्हाड, हात कुऱ्हाड, नांगर, कोयता, खुरपे, चाकाचा आस, तवा, कढई आणि सांडशी सारखी शेतींची औजारे आणि घरगुती वस्तु बनविणारी लोहारांची एक दोन कुटुंबे हे ग्रामिण भागातील सामान्य दृष्ट्या आहे.

या उद्योगामध्ये लागणाऱ्या महत्त्वाच्या साधनसामग्रीमध्ये सांडशी, भाता, ऐरण, घण, हातोडा इत्यादींचा समावेश होतो. १९६०-७० दरम्यान या संपूर्ण संचाची साधारणपणे किंमत रु.२०० होती.[२४१] नांदेड, लोहा, हदगाव, मुखेड, कुंडलवाडी या क्षेत्रामध्ये हा उद्योग केंद्रित झालेला होता.[२४२]

१९६१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यात ७४१ पुरुष तर १९८ स्त्रिया असे एकूण ९३९ कामगार लोहार, घणकरी आणि लोहभट्टी कामगार म्हणून कार्यरत होते.[२४३] या कारागिरांचे दिवशी उत्पन्न रुपये ३ ते रुपये ५ दरम्यान होते. १९६२ साली नांदेड मध्ये लोहारांच्या दोन सहकारी संस्था होत्या. या संस्थांना शासनाद्वारे भाग भांडवलामध्ये सहाय्य केले जाई तसेच कर्जाच्या स्वरुपात आर्थिक मदत देखील पुरविली जाई.[२४४]

ग्रामीण भागातील लोहार कारागीर हे अर्धकुशल असून त्यांचा परंपरागत व्यवसाय म्हणून ते हा व्यवसाय स्वीकारतात. ग्रामीण लोहारांकडून जूनी कालबाह्य हत्यारे आणि औजारे वापरली जात होती. या कारागिरांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी जिल्हा खादीग्रामोद्योग कार्यालयामार्फत आर्थिक सहाय्य उपलब्ध करून दिले जाते.

१९६० मधील कुटिरोद्योग विकास कार्यक्रमांतर्गत लोहारकाम उद्योग संस्थेस प्रोत्साहन देण्याच्या दृष्टिकोनातून नांदेड येथे लोहारकाम शिक्षण केंद्र सुरू करण्यात आले होते. एक वर्षाचा कालावधी असणाऱ्या या केंद्रामधून यामध्ये १५ विद्यार्थ्यांची नोंदणी झाली होती व त्यांना दर महिन्यास २५ रुपये प्रशिक्षण भत्ता दिला जाई.[२४५]

अलिकडच्या काळात शेती उपयोगी औजारांशिवाय या व्यवसायात लोखडी पलंग, टेबल, खुर्च्या, पाळणे, लोखंडी दरवाजे, लोखंडी खिडक्या, लोक ग्रील (सळ्या), लोखंडी गेट इत्यादी पक्का माल तयार केला जातो.

१९६२ मध्ये जिल्ह्यात सुतारकाम आणि लोहारकामाच्या एकत्रितपणे औद्योगिक सहकारी संस्था होत्या. या संस्थांनी उपरोक्त सालामध्ये ३३,१९८ रुपये किमतीच्या मालाचे उत्पादन केले. सुतारकाम,

२४१. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, पूर्वोक्त, १९७१, पृ. २७६.

२४२. पूर्वोक्त, **लीड बँक सर्व्हे स्कीम रिपोर्ट**, १९७१, पृ. २९.

२४३. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, पूर्वोक्त, १९७१, पृ. २६९.

२४४. कित्ता, पृ. २७७.

२४५. पूर्वोक्त, १९७१, पृ. २७०.

लोहारकाम व इतर अभियांत्रिकी कामांचे १३९ उद्योग होते. या उद्योगांमधील एकत्रित भांडवली गुंतवणूक ३७६ लाख रुपये होती व त्याद्वारे ६६२ व्यक्तींना रोजगार प्राप्त झाला होता.[२४६]

**कुंभार उद्योग**

मातीची मडकी व विटा, मातीचे बाऊल किंवा वाट्या तयार करण्याच्या परंपरागत व्यवसायात प्रामुख्याने कुंभार लोक गुंतलेले आहेत. मातीची भांडी बनविणे हा जिल्ह्यात सर्वत्र आढळणारा एक महत्त्वाचा कुटिरोद्योग आहे. कुंभार ही मातीची भांडी घडविणारी एक धंदेवाईक जत आहे. या जातीच्या कुळासंबंधी प्रचलित असलेल्या अनेक दंत कथा सोडून दिल्या तरी ऋग्वेदात मातीच्या भांड्यांचा उल्लेख आहे. यावरुन कुंभार उद्योग हा अत्यंत प्राचीन काळातही अस्तित्वात होता हे सिद्ध होते. कुंभार हा १२ बलुतेदारांपैकी एक असून तो मातीच्या घागरी, माठ दुधाचे-ताकाचे डेरे, सुगडे, वेळण्या, पणत्या, लोटकी, रांजण, कोथळी इत्यादी वस्तू तयार करून पूर्वी शेतकऱ्यांना देत असे. मातीची मडकी रोखीने विकली जातात. तसेच बलुते पद्धतीनुसार त्यांना वर्षभर मातीच्या भांड्यांचा पुरवठा करावा लागत असे व त्याबदल्यात त्यांना शेतकऱ्यांकडून हंगामात ठराविक धान्य मिळे. कुंभाराचा उद्योग हा वंश परंपरागत व्यवसाय असून जिल्ह्यात हा उद्योग कुंडलवाडी, नांदेड, फुलबेल, एकलारा, बेटमोगरा, मुखेड येथे केंद्रित झालेला होता. कुंभाराकडून मातीच्या भांड्याचे उत्पादन लहान प्रमाणावर केले जाते. या कार्यात कुंभाराचे सबंध कुटुंब एक घटक म्हणूनच कार्यरत असते. कुटुंबातील पुरुष कौशल्याने मातीच्या भांड्याला आकार देतात आणि कुटुंबातील इतर सदस्य हे माती आणणे, चिखल तयार करणे इत्यादी कामे करतात. सन १९६१ च्या जनगणनेनुसार या व्यवसायात १८९९ पुरुष व १३५० स्त्रिया असे एकूण ३२४९ व्यक्ती कार्यरत होत्या.[२४७]

१९६२ मध्ये जिल्ह्यात कुंभारकाम आणि वीट निर्मितीच्या १४ सहकारी संस्था होत्या व त्यांनी एकूण ७,६२५ रुपये किमतीच्या वस्तूंचे उत्पादन केले.

कुंभाराच्या सामग्रीमध्ये भांडी बनविण्यासाठी लागणारे मातीचे चाक, वीटा भाजण्यासाठी वीट भट्टी आणि वीटा बनविण्यासाठी लाकडी साचा इत्यादींचा समावेश होतो. कुंभाराच्या चाकाची निर्मिती करताना लाकडाचा एक सपाट तुकडा प्रथम ८″ व्यासाच्या गोल आकारात कापला जातो आणि एक पोकळी असलेला छोटा वर्तुळाकार सपाट दगड लाकडाच्या तुकड्याच्या मधोमध बसविला जातो. सहा बारीक काठ्या आरे म्हणून लाकडाच्या तुकड्याला बसविल्या जातात. या काठ्या तुंबा म्हणून कार्य करतात. नंतर तीन वैरणे आऱ्यांच्या टोकाला बारीक दोऱ्याने बांधले जातात आणि चाकाचा परिघ जड बनविण्यासाठी मातीच्या मिश्रणाने भरला जातो. ९″ लांबीची एक तिरकस खुंटी जमिनीमध्ये गाडली जाते जी तुंब्यामध्ये व्यवस्थित बसलेल्या दगडाच्या पोकळीमध्ये स्थिरावते. १९६०-७० मध्ये या सामग्रीचा एक संच रु. ५० किमतीचा असे.

चिकणमाती, अर्ध जळलेला कोळसा, कोळशाची भुकटी हे महत्त्वाचा कच्चामाल म्हणून वापरले जाते. चिकणमाती स्थानिकरीत्या गोदावरीच्या पात्रामधून उपलब्ध केली जाते. उपरोक्त कालावधीमध्ये चिकणमातीची किंमत एकरी रु. ३०० ते रु. ४०० पर्यंत असे. कोळशाची भुकटी, लाकडी कोळसा इत्यादी स्थानिकरीत्या नांदेडच्या उस्मानशाही गिरणी व नांदेड रेल्वे स्थानक येथून उपलब्ध होत असे.

---

२४६. प्र. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, नांदेड, यांच्याकडून प्राप्त माहितीआधारे.

२४७. नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर, इंडिया गॅझेटिअर, १९७१, पृ. २६९.

कोळशाच्या भुकटीची किंमत रु. ३० ते रु. ३५ प्रति ब्रासच्या दरम्यान असते. एक कारागीर तीन मजुरांच्या सहाय्याने एका दिवसात १००० पर्यंत वीटा बनवू शकतो.

एक कारागिराचे एका दिवसाचे सरासरी उत्पादन रु. ३ इतके असे. उद्योगांमधील गुंतवणूक व्यवसायाच्या आकारावर अवलंबून असे व ती रु. २००० ते रु. ७००० दरम्यान असे. उद्योगाकरिता भांडवल मुख्यत्वेकरून सावकारांकडून घेतले जाई.

मातीची भांडी तयार करताना माती घोड्याच्या लीदमध्ये मिसळवून एका ठराविक काळापर्यंत मळले जाते. हे मिश्रण त्यानंतर व्यवस्थितरीत्या मळले जाते तसेच पायाने देखील दोनदा मळले जाते. नंतर मिश्रण कुंभाराच्या लाकडी तुळ्यांवर आवश्यक प्रमाणामध्ये बसविले जाते व ते चाकाच्या पोकळीमध्ये बसविलेल्या काठीने आवश्यक हालचाल करण्याच्या उद्देशाने फिरविले जाते. कारागीर नंतर हातातील ओल्या फडक्याच्या सहाय्याने चिकणमातीला आवश्यक आकार देतो. भांड्याचा आकार सततच्या हाताळण्याने, फिरविण्याने आणि ताजी माती लावून वाढविला जातो आणि त्यास आवश्यक तो आकार दिला जातो. नंतर भांडे सूकवून लाल आणि काळ्या मातीच्या लेप त्यास बाहेरून लावला जातो. नंतर ते मऊ कांजकाच्या दोऱ्यांनी आणि कधीतरी तेलामध्ये मिश्रण केलेल्या काटे भोराने चोळून गुळगुळीत केले जातात. भट्टीच्या तळाशी भूसा आणि गायीचे शेण पसरले जाते आणि भांडी भूसा आणि शेणींच्या मोठ्या प्रमाणावर रचलेल्या ढिगांमधून रांगेने मांडले जातात. भट्टी संध्याकाळी पेटविली जाते. दुसऱ्या दिवशी सकाळी सर्व भूसा आणि शेणी जळल्यावर भांडी बाहेर काढली जातात.

१९६२ मध्ये जिल्ह्यात कुंभार आणि वीटा बनविणाऱ्या १४ औद्योगिक सहकारी संस्था होत्या. या संस्थांना पैशाची कमतरता, व्यवस्थित मार्गदर्शनाचा/शिक्षणाचा अभाव, कच्चा माल कमी किमतीस मिळवताना येणाऱ्या अडचणींसारख्या उद्योग संस्थेला तोंड द्याव्या लागणाऱ्या प्रश्नांना सोडविण्याचा प्रयत्न करते. या सहकारी संस्थांनी १९६२ मध्ये ७,६२५ रुपये किमतीच्या मालाचे उत्पादन केले.

जिल्ह्यात नांदेड विभाग या नावाने नांदेड येथे १९७३ मध्ये पहिली कुंभारकाम सहकारी संस्था स्थापन झाली. त्या वर्षी तिची सभासद संख्या २१ व भाग भांडवल ६६० रुपये होते. सन २००४-०५ मध्ये जिल्ह्यात या संस्थांची संख्या फक्त १ होती. १९९०-९१, १९९५-९६, १९९९-२००० व २००४-०५ ची जिल्ह्यातील अशा संस्थांची माहिती खाली दिली आहे. "

(हजार रुपये)

| अ.क्र. | तपशील | १९९०-९१ | १९९५-९६ | १९९९-२००० | २००४-०५ |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १. | संस्था (संख्या) | ३ | ३ | ३ | १ |
| २. | सभासद (संख्या) | ७५ | ७५ | ७५ | २५ |
| ३. | भागभांडवल | २०,०० | २०,०० | २०,०० | २ |
| ४. | खेळते भांडवल | ५०,०० | ५०,०० | ५०,०० | ४ |
| ५. | राखीव व इतर निधी | ७५ | ७५ | ७५ | १ |
| ६. | कामगारांची (संख्या) | ७५ | ७५ | ७५ | २५ |

आजही बांधकाम उद्योगाच्या वाढत्या विस्तारामुळे वीटभट्टी उद्योग जिल्ह्यातील प्रधान उद्योगांपैकी एक आहे.

**चामडे (कातडे) कमावणे/चर्मोद्योग**

कातडे कमाविणे आणि चर्मोद्योग हा जिल्ह्यातील जुना आणि महत्त्वाचा उद्योग आहे. हा उद्योग मुख्यत्त्वेकरून ढोर व चांभार या वंश परंपरागत कारागिरांकडून चालविला जातो. नांदेड जिल्ह्यातील या उद्योगांची महत्त्वाची केंद्रे नांदेड, नायगाव, देगलूर येथे आहेत. १९७१ मध्ये जिल्ह्यात दोन हजार कारागीर कार्यरत होते. कातडे कमावण्याचे काम मुख्यत्त्वेकरून ढोर समाजाच्या व्यक्ती करते तर चामड्याच्या वस्तू बनविण्याचे काम चांभार करत.

न कमाविलेले कातडे, चुना आणि पोटॅशिअम डायक्रोमेट सारखी रसायने हे कातडी कमाविण्याच्या प्रक्रीयेत वापरला जाणारा प्रमुख कच्चामाल आहेत. तसेच हिरडा, बाभळीच्या फांद्या आणि तरवडीच्या फांद्यांचा प्रक्रियेमध्ये वापरल्या जातात. दोन किंवा तीन चुन्याचे खळगे, कातडी कमाविण्याचे खळगे, धुण्याचे हौद आणि लाकडी हातोडे, रापी, आऱ्या, काही नळ्या तसेच पिंप ही प्रक्रियेसाठी लागणारी सामग्री आहे. हे कारागिर पिशवीने कातडी कमाविण्याची पद्धत वापरत. ही पद्धत आणि कोल्हापूरमध्ये वापरली जाणारी पद्धत यामध्ये कोणत्याच प्रकारचा फरक नसे. कातड्यावरील केस, चरबी आणि मांसल भाग वेगळा होण्यासाठी चुन्याच्या पाण्यात भिजत घालतात. व्यवस्थितरीत्या भिजल्यानंतर त्यावरील केस वस्तऱ्याने तपासून काढले जातात आणि चरबी व मांसल भाग चाकूने अथवा रापीने अलग केले जाते. नंतर ते धूऊन बाभळीच्या किंवा तरवडी फांद्या आणि हिरड्याच्या पाण्याच्या हलक्या मिश्रणामध्ये जवळपास तीन दिवस भिजवले जाते. पक्के चामडे मिळविण्यासाठी भिजविण्याची प्रक्रिया तीनदा करावी लागते. नंतर चामडे एका पिशवीमध्ये बांधून बाभळीच्या फांद्या आणि हिरड्याच्या पाण्याच्या कडक मिश्रणासोबत टांगले जाते. या स्थितीमध्ये ते सात दिवस ठेवले जाते. आठव्या दिवशी ते धूऊन पुन्हा वाळविले जाते. यानंतर ते विकण्यासाठी तयार असते.

कमाविलेले चामडे मुख्यत्त्वे करून स्थानिक बाजार पेठेमध्येच विकले जाई. कातडे कमाविणाऱ्या कुटुंबाचे मासिक उत्पादन रु. १०० ते रु. १५० दरम्यान असे. नांदेड जिल्ह्यातील कारागिरांना नवीन खळगे निर्माण करण्यासाठी तसेच जुन्या खळग्यांची दुरुस्ती करण्यासाठी शासनाकडून आर्थिक सुविधा पुरविल्या जात.

चर्मोद्योग हा बारमाही उद्योग आहे. यातील कामटे हातानेच केले जाते. चप्पल जोडे, वहाणा हे या उद्योगातील महत्त्वाचे उत्पादन असून ते मुख्यत्वे करून स्थानिक बाजारपेठेमध्ये विकले जाते. उद्योगामध्ये आवश्यक असणाऱ्या कच्च्या मालामध्ये पादत्राणाच्या तळव्यासाठी कमावलेले कातडे, क्रोम रंगाचे चामडे आणि इतर लकाकी आणणारे साहित्य इत्यादींचा समावेश होतो. १९६० सालच्या उपलब्ध माहितीनुसार एक सर्वसाधारण कारागीर एका दिवसामध्ये शूजचा एक जोड किंवा चप्पलींचे तीन जोड बनवू शकत असे. चप्पलेच्या एका जोडीची किंमत रु. ४ ते रु. ६ च्या दरम्यान असे. स्थानिक बाजारपेठेत विक्री झालेल्या वस्तूंमधून कारागिरास दिवशी रु. २ ते रु. ४ मिळत. यासुमारास जिल्ह्यामध्ये चर्मकारांच्या ४८ सहकारी संस्था होत्या. या संस्था सभासदांस स्वस्त कच्चामाल आणि मालाची विक्री करण्यासाठी बाजारपेठ पुरवित. नांदेडमध्ये चर्मकामाचे प्रशिक्षण देण्यासाठी एक प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात आले होते. तर देगलूर येथे कुटिरोद्योग विकास कार्यक्रमांतर्गत चर्मकामशाळा सुरू करण्यात आली होती. चर्मोद्योग प्रशिक्षणांतर्गत १५ विद्यार्थ्यांना एक वर्षाचे प्रशिक्षण देण्यात आले व त्यांना महिना पंचवीस रुपये प्रशिक्षण भत्ता देण्यात आला.

१९६२ मध्ये कातडी कमाविणे आणि चर्मोद्योगाच्या औद्योगिक सहकारी संस्थांनी ४८,४८९ रुपये किमतीच्या वस्तूंचे उत्पादन केले. १९६२ मध्ये जिल्हा औद्योगिक सहकारी संस्थेने चामड्याच्या वस्तूंच्या विक्रीसाठी नांदेड येथे एक विक्री भांडार उघडले होते.[२४८] १९६९-७० मध्ये उप संचालक, औरंगाबाद यांनी प्रसिद्ध केलेल्या औरंगाबाद विभाग उद्योग विकास आराखड्यानुसार जिल्ह्यामध्ये कातडी कमाविण्याच्या ४७० संस्था होत्या व त्यामधून ११०० कामगार कार्यरत होते तर कातडी कमाविण्याच्या १६ सहकारी संस्था होत्या व त्यांची सभासद संख्या २७९ होती.[२४९]

जिल्ह्यात भोकर येथे संत रोहिदास या नावाने १९८९ मध्ये पहिली चामडी कमाविणारी सहकारी संस्था स्थापन झाली. त्या वर्षी तिची सभासद संख्या २७ व भाग भांडवल ५५० रुपये होते. सन २००४-०५ मध्ये जिल्ह्यात एकूण ३ चामडी कमाविणाऱ्या सहकारी संस्था होत्या. सन १९९०-९१, १९९५-९६, १९९९-२००० व २००४-०५ ची जिल्ह्यातील अशा संस्थांची माहिती खाली दिली आहे :—

(हजार रुपये)

| अ.क्र. | तपशील | १९९०-९१ | १९९५-९६ | १९९९-२००० | २००४-०५ |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १. | कारखान्यांची (संख्या) | ८ | ४ | ४ | ३ |
| २. | सभासद (संख्या) | २२० | १२० | १२० | ९० |
| ३. | भाग भांडवल | ४६,०० | २७,०० | २७,०० | २० |
| ४. | राखीव व इतर निधी | २२० | १२० | १२० | २० |
| ५. | कामगारांची (संख्या) | २२० | १२० | १२० | ९० |

जिल्ह्यात नांदेड येथे चर्मोद्योग या नावाने १९६९ मध्ये पहिली चर्मोद्योग सहकारी संस्था स्थापन झाली. त्या वर्षी तीची सभासद संख्या ११ व भाग भांडवल ६६० रुपये होते. सन २००४-०५ मध्ये जिल्ह्यात या संस्थांची संख्या १३ होती. सन १९९०-९१, १९९५-९६, १९९९-२००० व २००४-०५ ची जिल्ह्यातील अशा संस्थांची माहिती खाली दिली आहे :—

(हजार रुपये)

| अ.क्र. | तपशील | १९९०-९१ | १९९५-९६ | १९९९-२००० | २००४-०५ |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १. | कारखान्यांची (संख्या) | ११ | ११ | ११ | १३ |
| २. | सभासद (संख्या) | ६०० | ६०० | ६०० | ६०० |
| ३. | भाग भांडवल | २ | २ | २ | ६ |
| ४. | स्थिर भांडवल | ६०,०० | ६०,०० | ६०,०० | ६०,०० |
| ५. | कामगारांची (संख्या) | ६०० | ६०० | ६०० | ६०० |
| ६. | कामगारांना दिलेले वेतन | १५,०० | १५,०० | १५,०० | . . |

सन २००६ मध्ये जिल्ह्यात कातडे कमाविणे आणि चर्मोद्योगाचे २४ उद्योग होते. या उद्योगांमधील भांडवली गुंतवणूक ५९ लाख रुपये होती तर उद्योगाद्वारे ५४ व्यक्तींना रोजगार प्राप्त झाला होता.[२५०]

२४८. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, १९७१.

२४९. **स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, लीड बँक स्कीम, सर्व्हे रिपोर्ट ऑन नांदेड डिस्ट्रिक्ट, महाराष्ट्र**, मार्च १९७१, पृ. ३०.

२५०. प्र. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, नांदेड यांच्याकडून प्राप्त माहितीआधारे.

Maharashtra State Gazetteers

**ग्रामीण तेल**

तेली कुटूंबांकडून तेल घाण्यावर बैलाच्या साहाय्याने तेल गाळले जाई. तेलघाणी उद्योग हा जिल्ह्यातील महत्त्वाचा कुटिरोद्योग होता आणि तो मुख्यत्त्वेकरून नांदेड, कुंडलवाडी, देगलूर, किनवट आणि धर्माबाद येथे स्थापन झालेला होता. १९६० साली जिल्ह्यामध्ये या उद्योगात ७५० कारागीर कार्यरत होते. त्यापैकी धर्माबाद येथे १००, देगलूर येथे ५० तर कुंडलवाडी आणि नांदेड येथे १५० ते २०० कारागीर हा व्यवसाय करत होते. याच सुमारास या उद्योगाच्या देगलूर येथे २, धर्माबाद येथे ३, कुंडलवाडी येथे ३ तसेच नांदेड येथे ४ सहकारी संस्था होत्या. तर किनवट येथील या उद्योगाचे स्वरूप हंगामी होते.

उद्योगाकरिता भुईमूग, करडई इत्यादींच्या स्वरूपात आवश्यक असलेला कच्चामाल धर्माबाद, देगलूर, नांदेड आणि कुंडलवाडी येथून उपलब्ध होत असे. जिल्ह्यामध्ये तेल निर्मितीकरिता एरंडेलच्या बिया, तीळ आणि अंबाडीच्या बियादेखील वापरल्या जात. १९६१-६२ मध्ये वापरण्यात आलेल्या तेलबीयांचे प्रमाण पुढीलप्रमाणे :—

भुईमूग- प्रतिक्विंटल रु. १०० ते रु. १५०, तीळ- प्रतिक्विंटल रु. १०० (प्रामुख्याने किनवट येथे), करडई- प्रतिक्विंटल रु. ४५ ते रु. ५५.

तेल गाळण्याचा प्रमुख हंगाम ऑक्टोबर ते जानेवारी दरम्यान असतो, तर करडईपासून फेब्रुवारी ते एप्रिल दरम्यान तेल गाळले जाते.

ग्रामीण तेलनिर्मिती उद्योगामध्ये पारंपरिक पद्धतीने तेल गाळताना कोलू घाण्या, नूतन घाण्या, पाखडण्याचे पंखे आणि चाळण इत्यादी तंत्र आणि सामग्री वापरली जात असे. जुन्या तेल घाणीची किंमत रु. १५० ते २००, नूतन तेल घाणीची किंमत रु. ५०० ते रु. ६००, वारंगल घाणीची किंमत रु. ३०० दरम्यान असे.[२५१]

यंत्राच्या साहाय्याने मोठ्या प्रमाणावर तेल गाळण्याचे कारखाने सुरू झाल्यावर बड्या भांडवलदारांच्या मिलबरोबर तेल घाण्यांना स्पर्धा करणे अशक्य झाले. पूर्वी तेली कुटुंबाकडून तेल घाण्यावर बैलाच्या साहाय्याने तेल गाळले जाई. पुढे बैलाच्या देखभालीच्या खर्चातही वाढ होऊन त्यांना तेल घाण्यावर तेल गाळणे खर्चीक झाले. परिणामतः हळूहळू तेल घाणे बंद पडू लागले व तेली बेकार होऊ लागले. तेव्हा त्यांना आधार देण्यासाठी त्यांच्या पारंपरिक उद्योगाचे पुनरुज्जीवन करण्यासाठी केंद्रीय खादी ग्रामोद्योग आयोगाने संशोधन करून बैलघाणीऐवजी विजेवर चालणाऱ्या घाणीचे वितरण सुरू केले. ही घाणी तेल्यांना किफायतशीर ठरली.[२५२]

ग्रामीण तेलनिर्मितीमध्ये मुख्य उत्पादन तेल असते तर तेलाची भुकटी हे उपउत्पादन असते. १९६०-७० च्या दरम्यान कारागिरांनी वापरलेल्या घाणींपैकी ८० टक्के घाणी जुन्या पद्धतीची असत.

---

२५१. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९७१, भारत सरकार, पृ. २७१.

२५२. **लातूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, वर्ष २००८, पृ. ४२५.

दोन ते तीन कारागीर एका महिन्यामध्ये ६ ते ७ क्विंटल तेलाची निर्मिती करत. परंतु नूतन घाणींचे उत्पादन जुन्या घाणींपेक्षा जास्त असे.

उत्पादित तेल आणि इतर उपउत्पादने स्थानिक बाजारपेठेमध्ये खाद्यतेल सहकारी संस्थांमार्फत विकले जात असे.

कारागिरांचे दिवशी वेतन रु. १.५० ते २ दरम्यान असे. वेतन करारपद्धतीने दिले जाई. स्त्री कामगारांना भुईमूग सफ करण्यासारखी उपकामे करावी लागत आणि त्यांना दिवशी एक रुपया वेतन मिळे. या कालावधीत खाद्यतेल कामगारांच्या देगलूर, मुदखेड, किनवट, हदगाव, कांजरा, तामसा, मुक्रमाबाद आणि भोकर येथे एकूण दहा सहकारी संस्था स्थापन झालेल्या होत्या. या सहकारी संस्था उद्योगांच्या उत्पादनांच्या विक्रीस साहाय्य करतात. या संस्थांच्या खेळते भांडवल आणि भाग भांडवलाकरिता शासनाद्वारे साहाय्य केले जाते. या सहकारी संस्थांनी १९६२ मध्ये एकूण २२,९३६ रुपये किमतीच्या मालाचे उत्पादन केले होते.

**वेत व बांबूकाम**

या व्यवसायामध्ये बांबूपासून टोपल्या, सूप, दुरड्या, परड्या व करंडे, चटया, पंखे, चाळण्या इत्यादी वस्तू बनविल्या जातात. हा व्यवसाय प्रामुख्याने बुरूड व मांग जातीचे लोक करतात. हा त्यांचा वंशपरंपरागत धंदा आहे.

१९६१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यात टोपल्या विणणारे आणि बांबूकामाशी संबंधित एकूण १,६०५ कामगार होते. त्यापैकी ७७२ पुरुष तर ८३३ स्त्रिया होत्या. १९६२ मध्ये जिल्ह्यात वेत आणि बांबूकामाच्या ७ सहकारी संस्था होत्या व त्यांनी एकूण ९,५५० रुपये किमतीच्या मालाचे उत्पादन केले.

जिल्ह्यातील वेत व बांबूकामाची माहिती ही सुतारकामाच्या उद्योगांमध्ये एकत्रितपणे देण्यात आल्याने येथे या उद्योगाची सद्यस्थिती सविस्तरपणे नोंदविण्यात आलेली नाही.

**बचतगट :**

महिलांना उद्योग उपलब्ध करून देणारी व महिला सक्षमीकरण करणारी चळवळ अनेक दृष्टिने महत्त्वाची असून याबाबतचा आढावा या गॅझेटिअरमध्ये प्रथमच देण्यात येत आहे. मात्र या नोंदी प्रातिनिधिक स्वरूपाच्या आहेत.

बचतगट या प्रभावी माध्यमाद्वारे शहरातील झोपडपट्ट्यांमध्ये तसेच ग्रामीण भागात राहणाऱ्या कनिष्ठ आर्थिक वर्गातील चित्र बदलण्याची कामगिरी करून दाखविली ती बांगलादेशमधील अर्थतज्ज्ञ डॉ. महंमद युनूस यांनी. लघुउद्योग अथवा कुटीरोद्योग पातळीवरील कामगारांना उद्योग सुरू करण्यासाठी आवश्यक असणारे प्राथमिक भांडवल कर्जाच्या स्वरूपात पुरवणारी संस्था श्री. युनूस यांनी स्थापन केली. १९७६ मध्ये सुरू झालेल्या या संस्थेचे जणू काही एखाद्या सामाजिक चळवळीत रूपांतर झाले. २८ हजार सदस्य लाभलेल्या या संस्थेचे १९८३ मध्ये अधिकृत अशा ग्रामीण बँकेत रूपांतर झाले. बँकेद्वारे दिल्या जाणाऱ्या कर्जाच्या वसुलीसाठी 'समूह गटांची' संकल्पना राबविण्यात आली. हे गट आपल्या सहकाऱ्याच्या कर्जाची आणि त्याच्या परतफेडीची हमी घेतात. या उपक्रमाद्वारे ग्रामीण बँकेने महिलांना स्वावलंबी बनविण्याचा विक्रम घडवून आणला. ग्रामीण बँकेकडे जमा होणारा निधी इतर

Maharashtra State Gazetteers

क्षेत्रांमध्ये गुंतविण्याकरिता मच्छिमार संस्था, शेतकरी संस्था सुरू करण्यात आल्या. पुढे चालून ग्रामीण सॉफ्टवेअर लिमिटेड, ग्रामीण सायबरनेट आणि ग्रामीण नीटवेअर लिमिटेड कंपन्यादेखील स्थापन करण्यात आल्या.

१९९० च्या सुमारास नाबार्ड, राज्य सरकार आणि केंद्र सरकार यांच्याकडून संयुक्तपणे ग्रामविकासाच्या योजना राबविल्या जात होत्या. काही स्वयंसेवी संस्थादेखील यामध्ये कार्यरत होत्या. महाराष्ट्रात आंतरराष्ट्रीय कृषीविकास निधीच्या साहाय्याने राबविलेला ग्रामीण पतपुरवठा कार्यक्रम यशस्वी झाला.

या सात वर्षांच्या कालावधीत शासकीय यंत्रणा आणि स्वयंसेवी संस्था यांनी मिळून एकत्र केलेलं काम ही बचतगटांच्या चळवळीची सुरूवात म्हणता येईल.

केंद्र सरकारची सुवर्ण जयंती ग्रामीण स्वरोजगार योजना १९९९ मध्ये सुरू झाली. राज्यभरातील दारिद्र्यरेषेखालील लोकांचे जीवनमान उंचावणं हा या योजनेमागचा महत्त्वाचा उद्देश होता. सन २००७ मध्ये अल्प उत्पन्न गटातील १ लाख ५५ हजार ४९९ बचतगटांची या योजनेखाली नोंदणी झाली. त्यातील १५ हजार १९७ गट केवळ महिलांचे आहेत. त्यातल्या २५ हजार ९६८ गटांनी स्वतःचे उद्योग व्यवसाय सुरू करून आत्मनिर्भरतेच्या दिशेने पावलं उचलली आहेत. मागासवर्गीय विकास महामंडळाच्या अंतर्गत एकूण ५३ हजार ५५४ गट आहेत. स्वर्णजयंती योजनेअंतर्गत अनुदान देताना ग्रेडेशनचा विचार केला जातो. याद्वारे कर्जव्यवहार सुरू केलेले गट ग्रेड १ खाली येतात. असे ९० हजारांपेक्षा जास्त गट आहेत अशा गटांना फिरत्या निधीच्या स्वरूपात ५ ते १० हजार रुपये अनुदान दिले जाते. प्रत्यक्ष व्यवसाय सुरू केलेले गट ग्रेड २ मध्ये येतात. अशा गटांची संख्या ४८ हजारांच्या आसपास आहे. या आर्थिक वर्षात केंद्र सरकारचे १३४ कोटी आणि राज्य शासनाचे ४४ कोटी अशी १७८ कोटी रुपयांची तरतूद या योजनेसाठी करण्यात आली.

यामधील साधारण ६० टक्के रक्कम अनुदानावर, २० टक्के इन्फ्रास्ट्रक्चरसाठी, १० टक्के फिरत्या निधीवर तर १० टक्के वस्तूंच्या विक्रीसाठी तालुक्याच्या ठिकाणी दोन आणि जिल्ह्याच्या ठिकाणी दोन असे गाळे उभारले जात आहेत. तसेच अनेक जिल्ह्यांच्या ग्रामीण विकास यंत्रणेने त्यांच्या जिल्ह्यातील वस्तुंचे जिजाऊ, सिंधू, सावित्री अशा विशिष्ट नावाने ब्रँडिंग केले आहे. दरवर्षी राज्य आणि केंद्र शासनामार्फत विविध विभागांच्या 'सरस' मध्ये वस्तूंची विक्री केली जाते. दिल्ली येथे भरणाऱ्या दिल्ली हाट किंवा वेगवेगळ्या राज्यांमधील मेळ्यांसाठी बचतगटातील महिलांना शासकीय खर्चाने पाठविले जाते. अनेक ठिकाणी सरकारी कार्यालयांच्या आवारातील स्टॉल किंवा स्टेशनरी दुकाने बचतगटातील महिला चालवितात. बचतगटातील महिलांना शासकीय यंत्रणांशी जोडून घेण्याचं कामही केलं जात आहे. शालेय पोषण आहार योजनेचं काम तसेच जिल्हा परिषदेच्या शाळांमधील गणवेशांची शिलाई बचतगटांमधील महिलांकडून करवून घेतली जाते. याद्वारे मिळणाऱ्या उत्पन्नाची रक्कम जिल्ह्यामागे काही लाखांच्या घरात आहे.

प्रामुख्याने महिलांना आत्मसन्मान मिळवून देणारी अशी ही बचत गटाची चळवळ आहे. लहान लहान गटातून महिलांचे संघटन त्यांच्या स्वतः अधिक कुवतीने व मिळकत विषयक काम देणारी ही चळवळ फार मोठ्या प्रमाणात सर्वत्र पसरत असून नांदेड जिल्हा त्याला अपवाद नाही.

महाराष्ट्र राज्यात बचतगटांची उभारणी करण्यामध्ये राज्य शासनाचा ग्रामविकास विभाग, महिला व बालकल्याण विभाग, जिल्हा ग्रामीण यंत्रणा, महिला आर्थिक विकास महामंडळ तसेच मागासवर्गीय, इतर मागासवर्गीय व अपंग विकास महामंडळांचाही सहभाग आहे. शिवाय जलसंधारण विभाग आणि 'यशदा' या संस्थाही यामध्ये सहभागी आहेत. याव्यतिरिक्त इतर यंत्रणांमार्फत उभारण्यात आलेले व नोंदणी न केलेले जवळजवळ अडीच लाख बचतगट सध्या महाराष्ट्रात अस्तित्त्वात आहेत.

महाराष्ट्रात 'चैतन्य' आणि BAIF या स्वयंसेवी संस्थादेखील स्वयंसहाय्यता गट बनविण्यात १५ वर्षांपासून कार्यरत आहेत. शासनाचा पाठिंबा असणाऱ्या या कार्यक्रमाची सुरूवात १९९४ साली IFAD च्या निधीद्वारे १२ जिल्ह्यांमध्ये करण्यात आली. या कार्यक्रमाची अंमलबजावणी महिला विकास संस्थेने केली.

सुवर्ण जयंती ग्रामस्वयंरोजगार योजनेच्या माध्यमातून सन २००७ मध्ये एकूण १,५५,४९९ नोंदणी झालेले बचत गट होते. तर नांदेड जिल्ह्यामधील बचतगटांची संख्या ४,८८५ होती. यापैकी ४,४०९ नोंदणीकृत महिला बचत गट होते. या बचतगटांपैकी व्यवसायास सुरूवात केलेले एकूण १,०११ बचत गट होते. तर ७८२ महिला बचतगटांनी व्यवसायास सुरूवात केलेली होती.[२५३]

याच योजनेअंतर्गत फेब्रुवारी २०१० अखेर नांदेड जिल्ह्यात ग्रामीण भागात महिला बचत गट व पुरुष बचत गट असे एकूण ७,८३९ नोंदणीकृत बचतगट असून त्यापैकी २००९-२०१० या आर्थिक वर्षात नोंदणी करण्यात आलेले ८१५ बचतगट आहेत. यापैकी ५,८६५ गटांना खेळते भांडवल प्राप्त झालेले आहे.

सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेअंतर्गत फेब्रुवारी २०१० अखेर जिल्ह्यातील नागरी भागात एकूण १२ महानगरपालिका व नगरपालिकांमध्ये १,३४० बचतगट असून त्यांची सभासद संख्या १३,६३८ आहे. जिल्ह्यातील नागरी भागात स्थापन झालेले हे बचतगट सर्वसाधारणपणे लोणची, पापड, बूट तयार करणे, पर्स तयार करणे, शिवणकाम, एम्ब्रॉयडरी, किराणा दुकान, शेळीपालन, म्हैसपालन, दुग्धव्यवसाय इत्यादी उद्योगांमध्ये कार्यरत आहेत. या बचतगटांची गट व सभासद संख्यानिहाय माहिती पुढील तक्त्यात दिली आहे.

**सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना**

**नागरी भागातील बचत गटांची फेब्रुवारी, २०१० पर्यंतची माहिती.[२५४]**

| अ. क्र. | महानगरपालिका/ नगरपालिकेचे नाव | योजना सुरू झाल्यापासून फेब्रुवारी २०१० पर्यंत स्थापन झालेले बचतगट | |
|---|---|---|---|
| | | गट संख्या | सभासद संख्या |
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | उमरी | ४६ | ४५० |
| २ | किनवट | ०३ | ९६० |

२५३. **'लोकराज्य'**, महाराष्ट्र शासन, मुंबई, डिसेंबर, २००७, पृ. ६.

२५४. जिल्हा उद्योग केंद्र, नांदेड यांच्याकडून प्राप्त माहितीच्या आधारे.

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ३ | मुदखेड | ५९ | ६०० |
| ४ | कुंडलवाडी | ४० | ६७० |
| ५ | बिलोली | ६१ | ६९० |
| ६ | धर्माबाद | ६४ | ७०० |
| ७ | मुखेड | १०८ | ९९० |
| ८ | हदगाव | ९१ | ९८० |
| ९ | देगलूर | १३३ | १३०० |
| १० | लोहा | १३० | १३३० |
| ११ | कंधार | १०७ | ९७८ |
| १२ | नांदेड म.न.पा. | ३९८ | ३९९० |
| | एकूण . . | १३४० | १३६३८ |

कंधार नगरपालिका क्षेत्रामधील सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने अंतर्गत येणाऱ्या एकूण १०७ महिला बचतगटांपैकी काही निवडक व महत्त्वपूर्ण बचत गटांची माहिती पुढीलप्रमाणे[२५५] :—

| अ.क्र. | स्वयंसहाय्यता/ बचत गटाचे नाव | गट स्थापन झाल्याचा दिनांक | गटा-तील सदस्य संख्या | महिला व बाल विकास गटात रूपांतर झाल्याचा दिनांक | गट करीत असलेल्या व्यवसायाचे नाव | गट कार्यरत आहे/ नाही | गटाने विक्री प्रदर्शनात किती वेळा भाग घेतला | स्थापन केलेल्या लोकसेवा केंद्रांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| १ | दुर्बल घटक महिला बचत गट. | १८/०६/०२ | १९ | मार्च ०५ | गोडंबी | आहे | ३ | १ |
| २ | सावित्रीबाई फुले महिला बचत गट. | १०/०९/०२ | १० | . . | मिर्ची हळद पावडर | आहे | ३ | १ |
| ३ | जिजामाता महिला बचत गट. | २३/०१/०३ | १२ | मार्च ०५ | दुग्ध व्यवसाय | आहे | ३ | १ |
| ४ | अण्णाभाऊ साठे महिला बचत गट. | २०/०२/०३ | १२ | मार्च ०५ | चप्पल शुज विक्री | आहे | ३ | १ |
| ५ | समाज सुधार महिला बचत गट. | २६/०२/०३ | १६ | मार्च ०५ | मसाला-हळदी पावडर | आहे | ३ | १ |
| ६ | मगदुमिया महिला बचत गट. | २७/०६/०३ | १३ | मार्च ०५ | पापड-नरडे इ. | आहे | २ | १ |

२५५. कंधार महानगरपालिकेकडून प्राप्त माहिती आधारे.

| अ.क्र. | स्वयंसहाय्यता/ बचत गटाचे नाव | गट स्थापन झाल्याचा दिनांक | गटा-तील सदस्य संख्या | महिला व बाल विकास गटात रूपांतर झाल्याचा दिनांक | गट करीत असलेल्या व्यवसायाचे नाव | गट कार्यरत आहे/ नाही | गटाने विक्री प्रदर्शनात किती वेळा भाग घेतला | स्थापन केलेल्या लोकसेवा केंद्रांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| ७ | साईनाथ महिला बचत गट. | २५/०७/०३ | १२ | जानेवारी ०६ | खराटे तयार करून विक्री | आहे | २ | १ |
| ८ | हाजी सय्यद महिला बचत गट. | १०/०१/०४ | १० | मार्च ०६ | पापड-नरडे इ. | आहे | २ | १ |
| ९ | राजीव गांधी महिला बचत गट. | २०/०५/०४ | १० | मार्च ०६ | स्वीट तयार करणे व विक्री. | आहे | ३ | १ |
| १० | वीर लहुजी साळवे महिला बचत गट. | २६/०२/०३ | १२ | फेब्रुवारी ०७ | चप्पल-बुट विक्री | आहे | ३ | १ |
| ११ | रमाबाई आंबेडकर महिला बचत गट. | १५/०३/०३ | ११ | फेब्रुवारी ०७ | किराणा दुकान | आहे | ३ | १ |
| १२ | जय अंबिका महिला बचत गट. | १५/०४/०३ | १० | नोव्हेंबर ०७ | फुटाणे-वटाणे विक्री | आहे | ३ | १ |
| १३ | माता रमाई महिला बचत गट. | १३/०४/०५ | ११ | नोव्हेंबर ०७ | किराणा व जनरल स्टोअर्स | आहे | ३ | १ |
| १४ | बहिणाबाई चौधरी महिला बचत गट. | २१/०७/०५ | १२ | फेब्रुवारी ०७ | चप्पल बूट विक्री | आहे | ३ | १ |
| १५ | संत गाडगेबाबा महिला बचत गट. | ०३/१०/०५ | १० | मार्च ०७ | भाजीपाला/ फळे व्यवसाय | आहे | ३ | १ |
| १६ | स्वामी रामानंद तीर्थ महिला बचत गट. | ०३/१०/०५ | १० | २९ मार्च ०७ | कापडी पर्स विक्री | आहे | ३ | १ |
| १७ | यशोधरा महिला बचत गट. | २०/१०/०५ | ११ | नोव्हेंबर ०७ | भूसार विक्री | आहे | ३ | १ |
| १८ | आम्रपाली महिला बचत गट. | २८/१०/०५ | १२ | नोव्हेंबर ०७ | कटलरी भूसार | आहे | ३ | १ |
| १९ | वंदना महिला बचत गट. | १५/०२/०६ | १२ | मार्च ०७ | बिबा गोडंबी | आहे | ३ | १ |
| २० | महंमदिया महिला बचत गट. | २०/०७/०६ | १० | नोव्हेंबर ०७ | किराणा दुकान | आहे | ३ | १ |

Maharashtra State Gazetteers

| अ.क्र. | स्वयंसहाय्यता/ बचत गटाचे नाव | गट स्थापन झाल्याचा दिनांक | गटा-तील सदस्य संख्या | महिला व बाल विकास गटात रूपांतर झाल्याची दिनांक | गट करीत असलेल्या व्यवसायाचे नाव | गट कार्यरत आहे/ नाही | गटाने विक्री प्रदर्शनात किती वेळा भाग घेतला | स्थापन केलेल्या लोकसेवा केंद्रांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| २१ | डॉ. राधाकृष्णन महिला बचत गट. | १/०९/०७ | १० | मार्च ०८ | दुग्ध व्यवसाय | आहे | ३ | १ |
| २२ | राजेंद्र प्रसाद महिला बचत गट. | ११/०९/०७ | १० | नोव्हेंबर ०८ | बिबा गोडंबी | आहे | ३ | १ |
| २३ | तुळजा भवानी महिला बचत गट. | १०/११/०७ | १० | नोव्हेंबर ०८ | वटाणे-फुटाणे | आहे | ३ | १ |
| २४ | छत्रपती शिवाजी महिला बचत गट. | २१/१२/०७ | १० | मार्च ०८ | दुग्ध व्यवसाय | आहे | ३ | १ |
| २५ | भवानी नगर महिला बचत गट. | १०/१२/०७ | १० | मार्च ०८ | दुग्ध व्यवसाय | आहे | ४ | १ |
| २६ | संत साईबाबा महिला बचत गट. | १३/०९/०७ | १० | जानेवारी ०९ | बिबा गोडंबी | आहे | ४ | १ |
| २७ | महालक्ष्मी महिला बचत गट. | ०९/०१/०८ | १० | जानेवारी ०९ | सुप व्यवसाय | आहे | ४ | १ |
| २८ | वैभवी महिला बचत गट. | २०/०१/०८ | १० | जानेवारी ०९ | ब्यटी पार्लर | आहे | ४ | १ |
| २९ | ओम शांति महिला बचत गट. | १२/०१/०८ | १० | जानेवारी ०८ | गारमेंटस् | आहे | ४ | १ |
| ३० | सूजाता महिला बचत गट. | २१/०२/०८ | १० | जानेवारी ०९ | बिबा-गोडंबी | आहे | ४ | १ |
| ३१ | व्यंकटेश महिला बचत गट. | १०/०३/०८ | १० | जानेवारी ०९ | किराणा दुकान | आहे | ४ | १ |
| ३२ | लक्ष्मी महिला बचत गट. | १४/०३/०८ | १० | जानेवारी १० | किराणा दुकान | आहे | ४ | १ |
| ३३ | सैलानी बाबा महिला बचत गट. | १४/०३/०८ | १० | जानेवारी १० | कापड व्यवसाय | आहे | ४ | १ |
| ३४ | जय श्रीराम महिला बचत गट. | १७/०४/०८ | १० | जानेवारी १० | किराणा दुकान | आहे | ४ | १ |
| ३५ | जय भिम महिला बचत गट. | ०९/०५/०८ | १० | जानेवारी १० | रेडिमेड ड्रेसेस | आहे | ४ | १ |

**ही नोंद प्रातिनिधीक स्वरूपाची आहे.**

Maharashtra State Gazetteers

नांदेड जिल्ह्यातील प्रातिनिधिक स्वरूपातील काही बचत गटांची माहिती पुढीलप्रमाणे[२५६] :—

**१) प्रज्ञाशिल करूणा महिला बचत गट १ लहान (ता. अर्धापूर)** :—

दिनांक १० जुलै २००७ रोजी या गटाची स्थापना झाली. गटामध्ये एकूण ११ सदस्या असून त्यापैकी ९ मागासवर्गीय महिला आहेत. या सर्व सदस्या दारिद्र्यरेषेखालील आहेत. सदस्यांकडून नियमितपणे १,१०० रुपये बचत केली जात असून १३ नोव्हेंबर २००९ अखेर २७,४५० रुपये बचत जमा झाली. बचत गटास दिनांक २५ जानेवारी २००८ रोजी २०,००० रुपये खेळते भांडवल महाराष्ट्र ग्रामीण बँक, लहान कडून वाटप झाले व गटाने त्याची परतफेड देखील केली. दुग्धव्यवसायासाठी महाराष्ट्र ग्रामीण बँक लहानने २ लक्ष रुपयांचे कर्ज मंजूर केले असून त्यापैकी १ लाख रुपये दि. २४ जुलै २००९ रोजी वाटप करून ११ महिलांना म्हैशीचे वाटप करण्यात आले. दरमहा रु. ५,५०० याप्रमाणे २७,५०० रुपये कर्जाची परतफेड करण्यात आली असून रु. ७२,५०० भरणे बाकी आहे. गटातील सर्व महिलांना मासिक रु. ५,५०० उत्पन्न प्राप्त होते. गट विविध तालूका तसेच जिल्हा स्तरीय विक्री प्रदर्शनामध्ये सहभागी होतो. बचतगटामार्फत गावात उर्जा बचत मोहिम राबविली आहे. तसेच गटातर्फे शोभेच्या वस्तू उदा. गोल्डन ट्री, झेंडूच्या फुलांचे हार, मोती बोर्ड, पेरिंग बोर्ड, साडी पॅण्ट इत्यादींचे दुग्धव्यवसाया व्यतिरिक्त उत्पादन केले जाते. उत्पादित वस्तू बचत गटाच्या माध्यमातून जिल्हास्तरावर विक्री प्रदर्शनांमध्ये विक्रीसाठी ठेवल्या जातात. मा. अण्णा हजारे भ्रष्टाचार निर्मूलन समितीद्वारे दिनांक २२ जून २००९ रोजी गटाचा सत्कार करण्यात आला.

**२) महालक्ष्मी महिला बचत गट, शेलवाडी (ता. लोहा.)[२५७] :—**

दिनांक २७ ऑगस्ट २००५ रोजी बचत गटाची स्थापना झाली. यामध्ये एकूण ११ महिला सदस्य असून ८ महिला दादिद्र्यरेषेखालील आहेत. यामध्ये मागासवर्गीय तसेच इतर जातीच्या महिलांचा समावेश आहे. बचत गटातील प्रत्येक सदस्याची दरमहा बचत ५० रुपये असून एकूण दरमहा बचत ५५० रुपये आहे. दिनांक १२ नोव्हेंबर २००९ अखेर गटाची एकूण बचत २५,७०० रुपये होती.

बचत गटातील सदस्यांनी बचत केलेल्या रकमेतून त्यांच्या मागणी प्रमाणे बचतीच्या तीन पट गरजू सदस्यांना त्यांच्या गरजेप्रमाणे २% व्याजदराने अंतर्गत कर्ज वाटप सुरू असून त्यांचा परतावा नियमित चालू आहे.

दिनांक ९ डिसेंबर २००९ रोजी स्टेट बँक ऑफ हैद्राबाद कडून रू. २.५० लाख अर्थसहाय्य प्राप्त झाले. तसेच जिल्हा ग्रामीण विकास योजनेद्वारे ८०,००० रुपये प्राप्त झाले.

गटाचा व्यवसाय म्हैसपालनाचा असून जोड व्यवसाय म्हणून सांडगे, लोणचे, पापड व तिखट तयार करण्याचे प्रकल्प हाती घेतले असून शासनामार्फत भरविण्यात येणाऱ्या वेगवेगळ्या ठिकाणच्या प्रदर्शनांमध्ये सहभाग घेऊन मालाची विक्री करण्यात येते.

विशेष बाब म्हणजे या गटाच्या पुढाकाराने गावामध्ये एकूण १५ ते २० महिला बचतगट स्थापन झाले आहेत.

---

२५६. प्रज्ञा शिल करूणा महिला बचत गट, लहान यांच्याकडून प्राप्त माहितीच्या आधारे.

२५७. महालक्ष्मी महिला बचत गट, शेलवाडी, ता. लोहा यांच्याकडून प्राप्त माहितीच्या आधारे.

Maharashtra State Gazetteers

**महाकाली धुरपता महिला बचत गट-कुंटूर, ता. नायगाव (खैरी)**

या बचतगटाची स्थापना दिनांक २१ सप्टेंबर २००५ रोजी झाली. १२ सदस्य संख्या असलेल्या या बचत गटाची मासिक बचत १,२०० रुपये प्रति माह असून आजपर्यंतची एकूण बचत ४५,६०० रुपये आहे. गटाने २५,००० रुपये खेळत्या भांडवलाद्वारे मेंढी पालन तसेच धोंगडी उत्पादन या व्यवसायाची सुरूवात केली. व्यवसायासाठीचा आवश्यक निधी रु. २,३८,००० मराठवाडा ग्रामीण बँक, शाखा कुंटूर यांच्याद्वारे प्राप्त झाला. गटाने खेळत्या भांडवलाचा विनियोग अंतर्गत देवाण-घेवाणसाठी केला.

गटातील सर्व महिला धनगर समाजाच्या असल्याने परंपरागत व्यवसाय म्हणून त्यांना मेंढीपालन असल्याने परंपरागत व्यवसाय करण्यासाठी बँकेद्वारे मेंढ्या घेऊन देण्यात आल्या. गटाने मेंढी पालनाबरोबरच त्यांच्या लोकरीपासून घोंगड्या तयार करण्यास सुरूवात केली असून चांगल्या प्रकारच्या घोंगड्या तयार करून त्यांची आवठवडी बाजारात विक्री करण्यात येते. तसेच आजूबाजूच्या खेड्यांमधून देखील घोंगड्या घेऊन गटामार्फत त्यांची विक्री केली जाते.

अशाप्रकारे बचतगटांची चळवळ ही विकासप्रक्रीयेचाच एक भाग आहे. बदल हा विकासाचा मुख्य गाभा असतो हे ध्यानात घेऊन योजना म्हणून तिचं सरकारीकरण कमी करत जाणं ही काळाची गरज आहे. स्वयंसिद्धतेचा एक मार्ग म्हणून ती महिलांची स्वयंचलित चळवळ म्हणून पुढे आली पाहिजे. महिलांना आत्मसन्मानाची वाट दाखविणाऱ्या या चळवळीला अजून बराच मोठा पल्ला गाठायचा आहे.

## औद्योगिक वसाहती

मोठ्या उद्योगांबरोबरच लघुद्योगांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने आणि उपलब्ध साधन सामग्रीचा उपयोग करून घेण्यासाठी महाराष्ट्रच्या अनेक शहरांमध्ये शासनाच्या सहकार्याने आणि सल्ल्याने अनेक औद्योगिक वसाहती निर्माण केल्या जात आहेत. राज्याच्या एखाद्या विशिष्ट भागामध्ये जेव्हा बऱ्याच कालावधीपासून एखाद्या प्रभावशाली पायाभूत औद्योगिक संस्थेचा अभाव असतो तेव्हा औद्योगिक वसाहतीस पुढाकार घेऊन त्या विभागाच्या औद्योगिक विकासाकरीता आवश्यक प्रेरणा पुरवावी लागते. या औद्योगिक वसाहती त्यानुसार अविकसीत क्षेत्रांच्या औद्योगिक विकासाकरीता एकत्रित व सुनियोजित प्रयत्नांचे कार्य करतात.

नांदेडमध्ये औद्योगिक वसाहत सुरू करण्याच्या उद्देशाने पूर्व हैद्रबाद राज्याने दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्ये १३ लाख रुपयांची अंदाजे योजना केली होती. १९५६ मध्ये राज्यांच्या पूनर्रचनेनंतर मराठवाडा विभागाचे महाराष्ट्रात विलिनिकरण झाल्यावर तेव्हाच्या मुंबई सरकारने योजनेची अंमलबजावणी नांदेड नगरपालिकेवर सोपवली आणि औद्योगिक वसाहत निर्मितीसाठी प्राथमिक योजनेकरीता २ लाख रुपये आगाऊ दिले. त्यानुसार ६० एकर जमिनीचे क्षेत्र संपादन करून तेथे नांदेड सहकारी औद्योगिक वसाहतीची स्थापना करण्यात आली.[२५८] नांदेड जिल्ह्यामधील औद्योगिक वसाहत निर्मितीची ही सुरूवात होती.

---

२५८. **नांदेड जिल्हा गॅझेटिअर, भारत सरकार, १९७१,** पृ. २६८.

१९६२ मध्ये औद्योगिक सहकारी संस्थांमध्ये १५ सूत विणकाम संस्था, ३ लोकरी विणकाम संस्था, १० खाद्य तेल गिरण्या, ७ वेत आणि बांबूकाम संस्था, ४७ कातडे कमाविणे आणि चर्मकाम संस्थां, ८ सुतारकाम आणि लोहारकाम संस्था, तीस काथ्या आणि सूतळी संस्था, १४ कुंभारकाम आणि वीट निर्मिती, ३ नीरा व ताडाचा गूळ तयार करणाऱ्या संस्था, ४ शिवणकाम संस्था, ५ औद्योगिक वसाहती, ५ वनमजूर सहकारी संस्था, तर औद्योगिक वसाहती, ५ वनमजूर सहकारी संस्था, तर औद्योगिक वसाहत, ५ वनमजूर सहकारी संस्था, तर औद्योगिक वसाहत सहकारी संस्था, साबण निर्मिती संस्था व जिल्हा औद्योगिक सहकारी संस्था प्रत्येकी १ होत्या.

नांदेड शहरात जिल्ह्यातील औद्योगिक संस्थांच्या कार्याच्या देखरेखीसाठी या औद्योगिक सहकारी संस्थांची एक संयुक्त संस्था स्थापन करण्यात आली. ही संस्था इतर सहकारी संस्थांना कच्चा माल उपलब्ध करून देते.

संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर राज्यात औद्योगिकीकरणाच्या माध्यमातून समतोल, नियोजित व रचनाबद्ध विकास होण्याच्या दृष्टिने दि. १ ऑगस्ट १९६९ रोजी MID ACT १९६१ नुसार महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची स्थापना झाली.

मऔविमने महाराष्ट्रात जवळपास ६०,००० हेक्टर जमिनीवर २२९ औद्योगिक संकुले उभारली आहेत. संपूर्ण राज्यात समतोल विकास व्हावा या दृष्टिने राज्यात ९ ठिकाणी पंचतारांकीत औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्यासोबतच मराठवाड्यामध्ये लातूर, नांदेड व उस्मानाबाद येथे बोईंग जातीचे विमान उतरण्यासाठी विमानतळ विस्तारीकरणाचा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. राज्यभर विकसित होत असलेल्या विशेष आर्थिक क्षेत्राचा विचार करून मराठवाड्यात शेंद्रा (औरंगाबाद), लातूर व कृष्णूर (नांदेड) येथे विशेष आर्थिक क्षेत्र उभारण्यात येत आहे.

नांदेड जिल्ह्यामध्ये दळणवळण, पाणीपुरवठा व अन्य आद्योगिक विकासास अनुषांगिक बाबी मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत याचा विचार करून महामंडळाने नांदेड, कृष्णूर, देगलूर, कंधार, किनवट व मुदखेड येथे औद्योगिक क्षेत्र विकसित केलेली आहेत आणि त्यानुसार उपरोक्त सर्वच औद्योगिक क्षेत्रांमधील उद्योजकांना सर्वसाधारणपणे दळणवळणाच्या मुलभूत सोयी, बँक, पोस्ट ऑफिस, टेलिकम्युनिकेशन, वीज पुरवठा, पाणी पुरवठा, डांबरीकरण झालेले रस्ते, आवश्यक सोयींनी युक्त असे गाळे आणि पोलीस स्टेशन यासारख्या सुविधा पुरविण्यात आलेल्या आहेत.[२५९]

**१. नांदेड औद्योगिक क्षेत्र :**

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने १९६८-६९ मध्ये नांदेड-लातूर महामार्ग क्र. २ आणि नांदेड-हैद्राबाद राज्य महामार्ग क्र. ६ सीमेलगत नांदेड शहरापासून ८ कि.मी. अंतरावर नांदेड औद्योगिक क्षेत्राची स्थापना केली. या औद्योगिक क्षेत्रास सर्वात जवळचे रेल्वे स्थानक आणि विमानतळ नांदेड येथे असून ते अनुक्रमे ८ कि.मी. आणि ११ कि.मी. अंतरावर आहे. 'डी' झोन मध्ये येणाऱ्या या वसाहतीचे एकूण क्षेत्र २७१.८९ हेक्टर असून त्यामध्ये ६१३ भूखंड पाडलेले आहेत. त्यापैकी ५७२ भूखंडांचे वाटप झालेले आहे आणि उर्वरित गाळे निर्मिती अवस्थेत आहेत.

---

२५९. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र शासन यांच्याकडून प्राप्त माहितीच्या आधारे.

Maharashtra State Gazetteers

उद्योगनिहाय वर्गवारी नुसार नांदेड औद्योगिक क्षेत्रामध्ये ११२ इंजिनिअरींग उद्योग, ०२ केमिकल, २१ टेक्सटाईल, २ फार्मास्युटिकल, १७३ सर्व्हिस इंडस्ट्री संबंधीत तर २६२ इतर उद्योग आहेत. विशेष उल्लेखनिय उद्योगांमध्ये मेसर्स जय कॉरप्स लिमिटेड लोखंडाच्या गिलावा केलेल्या पन्हळी पाडलेल्या पत्र्याचे उत्पादक, मेसर्स गोदावरी ड्रग्ज, औषध निर्माण केंद्र, मेसर्स कोहीनूर ऑईल एक्सट्रैक्शन तेल आणि पेंडचे उत्पादक, एम.ए.आय.डी.सी. खत उत्पादन केंद्र, इत्यादी मोठे उद्योग आहेत.

जून २००९ पर्यंतच्या प्राप्त माहितीनुसार या औद्योगिक क्षेत्रात ८१२० लाख रुपये गुंतवणूकी मागे एकूण वार्षिक उलाढाल ६२,०१५ लाख रुपये होती तर २,९३८ कामगारांना रोजगार प्राप्त झाला.

**२. कृष्णूर औद्योगिक क्षेत्र :**

नांदेड औद्योगिक क्षेत्र पूर्णपणे विकसित झाल्यामुळे महामंडळाने उद्योजकांची वाढती गरज लक्षात घेऊन नांदेड-हैद्राबाद महामार्गावर नांदेड शहरापासून २८ कि.मी. अंतरावर सन १९९५-९६ पासून कृष्णूर औद्योगिक क्षेत्र विकसित करण्यात आले आहे. डी. झोन मध्ये येणाऱ्या या औद्योगिक क्षेत्रासाठी महामंडळाने ६४५.८१ हेक्टर जमीन संपादित केलेली असून त्यापैकी २२५ भूखंडांचे वाटप झालेले आहे. ३८ भूखंडावर उत्पादनाचे काम सुरू आहे तर ७ भूखंडांवर बांधकाम सुरू आहे. २३ भूखंड वाटपासाठी उपलब्ध आहेत.

या औद्योगिक क्षेत्रामध्ये मे. एक्स. एल. लि., अश्वराज मिनरल वॉटर, मे. किर्ती गोल्ड व टाटा केमिकल्स हे प्रमुख उद्योग कार्यरत आहेत. मे. किर्ती फुडस् हा किर्ती ग्रुपचा उद्योग सन २००० पासून शेतीमाल प्रक्रिया उत्पादनात आहे. यामध्ये ५ इंजिनिअरींग, ७ केमिकल, २ सर्व्हिस इंडस्ट्रीशी संबंधीत तर ७४ इतर प्रकारच्या उत्पादनांचे कार्य चालते.

सन २००९ मधील प्राप्त माहितीनुसार या औद्योगिक क्षेत्रामधील एकूण गुंतवणूक ३७०.१५ लाख रुपये होती. तर एकूण वार्षिक उलाढाल ६७५.२२ लाख रुपये झाली. ६१५ कामगारांना रोजगार प्राप्ती झाली.

**कृष्णूर विशेष आर्थिक प्रक्षेत्र —**

वाणिज्य व उद्योग मंत्रालय भारत सरकार यांचेकडून करण्यात आलेल्या अधिसूचनेनुसार कृष्णूर औद्योगिक क्षेत्राच्या ६४५.८१ हेक्टर क्षेत्रफळापैकी १५० हेक्टर क्षेत्रावर विशेष आर्थिक प्रक्षेत्र (औषधी) विकसीत करावयाचे प्रस्तावित आहे. यापैकी १२८.९९ हेक्टर क्षेत्र हे प्रक्रिया क्षेत्र उर्वरित २१.०१ हेक्टर क्षेत्र हे अप्रक्रिया क्षेत्र म्हणून विकसित करण्यात येणार आहे.

**१. पार्श्वनाथ एस.ई.झेड.लि. :**

देशात १२ ठिकाणी विशेष आर्थिक क्षेत्र विकसित करण्यासाठी वाणिज्य मंत्रालयाकडून पार्श्वनाथ एस.ई.झेड.लि. यांना मान्यता देण्यात आली असून त्यांच्या मार्फत कृष्णूर येथे विशेष आर्थिक क्षेत्र विकसित करण्यात येत आहे. ज्यामध्ये अंदाजे ३०० कोटींची गुंतवणूक होणर असून २००० ते २२०० कामगारांना रोजगार उपलब्ध होणार आहे.

**२. मे. टाटा केमिकल्स लि. :**

या उद्योग समूहातर्फे कृष्णूर येथे ४० हेक्टर क्षेत्रफळाच्या भूखंडावर रु.५५ कोटींची गुंतवणूक करून इथेनॉल उत्पादन करावयाचे प्रस्तावित आहे. या उद्योगामुळे जवळपास ५०० रोजगार निर्मिती होणार आहे. सदर कंपनीस इथेनॉलच्या उत्पादनाकरीता ४,००,८९२ चौ.मी.क्षेत्राचे वाटप करण्यात आले आहे.

**३. मे. गोविंदराज ॲग्रो. प्रा. लि. :**

मे. गोविंदराज ॲग्रो प्रा.लि. या कृषी उत्पादनावर आधारित असलेल्या उद्योग समूहाद्वारे ०४ हेक्टर क्षेत्रावर रु. १२ कोटींची गुंतवणूक करून खाद्यतेलाचे उत्पादन करण्यात येणार आहे. या उद्योगामुळे २५८ कामगारांना रोजगार प्राप्त होणार आहे.

**४. मे. वराली रिअल इस्टेटस् - इंडीया बूल्स रिअल इस्टेटस् :**

या कंपनीस अन्न प्रक्रिया उद्योग सुरू करण्यासाठी २० हेक्टर क्षेत्रफळाच्या भूखंडाचे वाटप करण्यात आले आहे. कंपनीची एकूण गुंतवणूक ७५० लक्ष असून त्यामध्ये १००० व्यक्तींना प्रत्यक्ष व २००० व्यक्तींना अप्रत्यक्ष रोजगार प्राप्त होणार आहे.

**५. मे. किर्ती ॲग्रो प्रा. लि. (किर्ती ग्रुप) :**

या उद्योगसंस्थेद्वारे २५ कोटी रुपयांची गुंतवणूक करून डाळ मिल व रिफायनरी तेल उद्योग सुरू करण्यात येत आहे. यामध्ये ४०० ते ५०० कामगारांना रोजगार मिळणार आहे. या कंपनीस ४००० चौ.मी. क्षेत्राचे वाटप करण्यात आले आहे.

**६. मे. जे. एल. मॉरीसन इंडीया लि. :**

या इंजिनिअरींग कंपनीची एकूण गुंतवणूक २०० लक्ष रुपये असून त्यामध्ये ८१० व्यक्तींना रोजगार प्राप्त होणार आहे. या कंपनीस ४००२५ चौ.मी. क्षेत्राचे वाटप करण्यात आले आहे.

**७. मे. ॲडव्हान्स स्टील वर्ल्ड लि. :**

सदर कंपनीची एकूण गुंतवणूक ८५० लक्ष असून त्यामध्ये २१७० व्यक्तींना रोजगार प्राप्त होणार आहे.

Maharashtra State Gazetteers

या सर्व उद्योगांव्यतिरीक्त श्री. साई ऑरगॅनिक्स लि., मे. ॲडव्हान्स स्टील वर्ल्ड लि. इत्यादी उद्योग समूहांचे कृष्णूर येथे उद्योग सुरू करण्यात येणार आहेत. वरील सर्व उद्योगांमुळे कृष्णूर औद्योगिक क्षेत्रात एकूण १०० कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असून ३००० रोजगार निर्मिती होणार आहे.

**३) देगलूर औद्योगिक क्षेत्र—**

म. औ. वि. म. ने सन १९९०-९१ मध्ये नांदेड-हैद्राबाद महामार्गावर देगलूर शहरापासून ७ कि.मी. अंतरावर देगलूर औद्योगिक क्षेत्र विकसित केले आहे. यासाठी महामंडळाने ७१.०६ हेक्टर जमीन

संपादित केली असून त्यापैकी १६.१३ हेक्टर जमीन औद्योगिक क्षेत्रासाठी विकसित करण्यात आलेली आहे.

हे डी + झोन मध्ये मोडणारे औद्योगिक क्षेत्र आहे. यामध्ये एकूण ९८ भूखंड आरेखीत केलेले असून त्यापैकी ६३ भूखंडांचे वाटप करण्यात आलेले आहे. तर ३५ भूखंड वाटपासाठी उपलब्ध आहेत. ४ भूखंडांवर उत्पादन सुरू असून ४ भूखंडांवर बांधकाम सुरू आहे. एकूण भूखंडांपैकी २ भूखंडांवरील उद्योग बंद आहेत.

मे. व्यंकटेश्वरा दाल इंडस्ट्रीज - डाळ उत्पादक, मार्टिन मेटल्स - गृहपयोगी भांडी उत्पादक हे येथील प्रमुख कारखाने आहेत. जून, २००९ पर्यंत एकूण गुंतवणूक ३५.२४ लाख रुपये तर एकूण वार्षिक उलाढाल ९१.२० लाख रुपये होती. एकूण १०५ कामगारांना या औद्योगिक क्षेत्राद्वारे रोजगार प्राप्त झाला.

**४) कंधार औद्योगिक क्षेत्र—**

सन १९९०-९१ मध्ये म.औ.वि.म.ने कंधार मुखेड या मार्गावर कंधार शहरापासून ५ कि.मी. अंतरावर कंधार औद्योगिक क्षेत्र विकसित केले आहे. यासाठी महामंडळाने ११.३९ हेक्टर जमीन संपादित केलेली आहे.

डी झोन मध्ये येणाऱ्या या औद्योगिक क्षेत्रामध्ये एकूण ५० भूखंड असून त्यापैकी १३ भूखंडांचे वाटप झालेले आहे. ३७ भूखंड वाटपासाठी उपलब्ध आहेत. एका भूखंडावर उत्पादन सुरू असून उर्वरित ९ भूखंडांवर बांधकाम सुरू आहे.

सन २००९ मध्ये एकूण १६० लक्ष रुपयांची गुंतवणूक या ओद्योगिक क्षेत्रामध्ये करण्यात आली होती.

**५) किनवट विकास केंद्र—**

किनवट विकास केंद्रासाठी महामंडळाने ५४.५४ हेक्टर जमीन संपादित केली असून येथील विकासाची कामे सुरू आहेत व भूखंड वाटपास तयार आहेत.

या औद्योगिक क्षेत्रामध्ये एकूण १२ भूखंडांचे आरेखन करण्यात आलेले असून त्यापैकी एका भूखंडाचे वाटप करण्यात आलेले आहे तर उर्वरित ११ भूखंड वाटपासाठी उपलब्ध आहेत.

**६) भोकर लघू औद्योगिक क्षेत्र—**

भोकर येथील लघू औद्योगिक क्षेत्रासाठी १४.४८ हेक्टर क्षेत्राचे संपादन करण्यात आले आहे.

**७) मुदखेड लघू औद्योगिक क्षेत्र—**

मुदखेड पासून २.५० कि.मी. अंतरावर भोकर मार्गावर १० हेक्टर क्षेत्रावर लघू औद्योगिक क्षेत्र विकसित करण्यात येत आहे. या औद्योगिक क्षेत्रामध्ये जिल्ह्यामध्ये प्रथमच पुष्पसंवर्धन उद्यान विकसित करावयाचे प्रस्तावित आहे.

Maharashtra State Gazetteers

**सहकारी वसाहती (२००८-२००९)**[२६०]

१. **नांदेड सहकारी वसाहत :—**

सहकारी औद्योगिक वसाहतीकरता नांदेडमध्ये ५५.२९ हेक्टर क्षेत्राचे संपादन करण्यात आले असून त्यापैकी १८७ भूखंड औद्योगिक कारणांसाठी विकसित करून त्यांचे वाटप देखील करण्यात आलेले आहे.

२. **देगलूर सहकारी वसाहत :—**

देगलूर सहकारी वसाहतीकरता ५.७५ हेक्टर क्षेत्राचा विकास करण्यात आलेला असून ५६ भूखंड औद्योगिक कारणांसाठी विकसित करण्यात आलेली आहेत. त्यापैकी ४८ भूखंडांचे वाटप झालेले असून ८ भूखंड वाटपासाठी उपलब्ध आहेत.

३. **लोहा सहकारी वसाहत :—**

५ हेक्टर क्षेत्रफळामध्ये लोहा सहकारी वसाहतीची स्थापना करण्यात आली असून येथे २६ भूखंडांचे औद्योगिक वसाहतीकरता विकास करण्यात आला आहे. त्यापैकी २३ भूखंडांचे वाटप केले असून ३ भूखंड वाटपासाठी उपलब्ध आहेत.

४. **धर्माबाद सहकारी वसाहत :—**

सहकारी औद्योगिक वसाहतीकरता ६.१२ हेक्टर क्षेत्राचे संपादन करण्यात आले असून औद्योगिक कारणासाठी ३१ भूखंड विकसित करून त्यांचे वाटप करण्यात आले आहे.

या औद्योगिक वसाहतींव्यतिरिक्त नांदेड जिल्ह्यामध्ये दाभड, ता. अर्धापूर, बारड, ता. मुदखेड या ठिकाणी देखील औद्योगिक वसाहती विकसित करण्याचे प्रस्तावित आहे. तसेच जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्राच्या देखभालीकरता महामंडळाकडून एक विभागीय तर तीन उपविभागीय कार्यालये स्थापन करण्यात आली आहेत.

Maharashtra State Gazetteers

## कामगार चळवळ

१९२५ मध्ये नांदेडला उस्मानशाही मील कार्यरत झाली व कामगार चळवळीचा नांदेड जिल्ह्यात प्रारंभ झाला. हैद्राबाद मुक्ती संग्रामाच्या काळात जिल्ह्यात कामगार चळवळीने गती घेतली. निझाम विरोधी लढ्यात जिल्ह्यातील कामगार पुढाऱ्यांनी भाग घेतला.

हैद्राबाद मुक्तिसंग्रामात ज्या कामगारांच्या संघटना सहभागी होत्या त्यात उस्मानशाही कापडगिरणी कामगार संघटना, पिवळ्या बावट्याची संघटना, विणकर संघटना व विद्यार्थी संघटना यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागतो.

---

२६०. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, नांदेड यांच्याकडून प्राप्त माहितीनुसार.

कॉ. व्ही. डी. देशपांडे आणि कॉ. आर. डी. देशपांडे यांच्या कुशल नेतृत्त्वाखाली नांदेड येथे कामगार चळवळीचा पाया रोवला गेला. या काळात संपूर्ण हैद्राबाद राज्यामध्ये अनेक कामगार संघटना स्थापन झाल्या. या सर्व कामगार संघटना कम्यूनिस्ट नेतृत्वाखाली होत्या. कालांतराने याच कामगार चळवळींच्या नेतृत्त्वाखाली जिल्ह्यामध्ये स्वातंत्र्योत्तर काळातही कार्य केले जाऊ लागले असे दिसते.

हैद्राबाद मुक्तिसंग्रामाच्या सुमारास मराठवाडा कमिटीची स्थापना झाली. ही समिती हैद्राबाद कमिटीच्या अधिपत्याखाली होती. तिला स्वतंत्र प्रांतिक कमिटीचा दर्जा देखील मिळाला होता. कमिटीमधील नांदेड केंद्राचे काम कॉ. व्ही. डी. देशपांडे, कॉ. चौधरी व कॉ. आर. डी. देशपांडे यांनी पाहिले.

मधल्या काळात कम्यूनिस्ट चळवळ नांदेड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर पसरल्याने अनेक विचारप्रवाह या चळवळीत सामील झाले. मराठवाड्यातही श्री. गोविंदभाई श्रॉफ यांनी लीग ऑफ सोशॅलिस्ट वर्कर्स गट स्थापन केला.

नांदेड जिल्ह्यात औद्योगिकीकरणाची सुरूवात गिरण्यांच्या स्थापनेमुळे झाली. नांदेड गिरणी कामगार युनियनची स्थापना करण्यात कॉ. व्ही. डी. देशपांडे, कॉ. आर. डी. देशपांडे, कॉ. अनंत नागपूरकर यांनी पुढाकार घेतला तर कॉ.चौधरी यांनी बीडी कामगारांना त्यांच्या श्रमाचा मोबदला मिळवून देण्यासाठी बीडी कामगारांची संघटना बांधली. निजामी सत्तेविरुद्ध श्रमजीवी वर्गाचा सहभाग कामगार चळवळीद्वारे कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्त्वाखाली संघटीत झाला.

ऑल हैद्राबाद ट्रेड युनियन काँग्रेस या कामगार संघटनेची स्थापना होऊन त्याद्वारे मराठवाड्यातील कामगार चळवळीस संघटीत स्वरुप प्राप्त झाले. तर औरंगाबाद येथे स्थापन झालेल्या मराठवाडा कामगार परिषदेने कामगारांना जागृत करण्याचे प्रयत्न केले.

हैद्राबाद संस्थानामधील नांदेड येथील उस्मानाशाही मिल मजूरांच्या बोनसच्या मागणीसाठी उत्स्फूर्त संप करण्यात आला. स्वातंत्र्योत्तर काळात गुमास्ता संघटना, कापड दुकानातील नोकर संघटना, सिनेमा कामगार युनियन, हॉटेल कामगार युनियन, प्रेस कामगार युनियन यांचे कार्य सुरू होते. तर साखर कारखाने स्थापन झाल्यानंतर त्या-त्या क्षेत्रात कामगार संघटना अस्तित्त्वात आल्या. टेक्स्कॉम, सिप्टा या कारखान्यांत कामगार संघटना कार्यरत होत्या.

उद्योगांच्या स्थिर विकासाकरिता मजूर आणि व्यवस्थापनामध्ये चांगले आणि निकोप संबंध जतन करणे आवश्यक असते. उद्योगांच्या सर्वंकष विकासासोबतच मजूर संघटनांचा विकास होतो. मजूर संघटनांची शक्ती मुख्यत्त्वेकरून त्यांच्या घासाघीस करण्याच्या क्षमतेवर अवलंबून असते. १९६०-७० च्या दशकामध्ये नांदेड जिल्ह्यात अनेक औद्योगिक संस्था योग्य वाढीव वेतन देऊन सुरू करण्यात आलेल्या होत्या. यामुळे जिल्ह्यामध्ये संघटीत मजूर शक्ती स्थापन करण्याची आवश्यकता निर्माण झाली. उस्मानशाही मिल, नांदेड येथील औद्योगिक क्षेत्रातील प्रथम मोठी संस्था होती. परंतु, नांदेड जिल्हा मुळातच औद्योगिकदृष्ट्या मागासलेला असल्याने जिल्ह्यातील मजूर संघटना विशेष वजनदार किंवा परिणामकारक नव्हत्या.

स्वातंत्र्योत्तर काळातील जिल्ह्यातील कामगार संघटना विविध राजकीय पक्षांनी स्थापन केलेल्या कामगार संघटनांशी संलग्न राहिल्या. ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस, द इंडियन नॅशनल ट्रेड युनियन

काँग्रेस, हिंद मजदूर सभा, सी टु व भारतीय मजदूर संघ यांच्याशी संबंधित संघटना जिल्ह्यात कार्यरत आहेत. बँकांमध्ये काम करणारे कर्मचारी हे मुख्यत्त्वे करून सी टु या संघटनेशी संबंधित आहेत तर भारतीय मजदूर संघाशी संबंधित कामगारांची संख्या जिल्ह्यात लक्षणिय आहे. कॉम्रेड व्ही. डी. देशपांडे, कॉम्रेड नागपूरकर, डॉ. शंकररावजी चव्हाण, कॉम्रेड हरगंगे, राजाप्रसादजी पारीख यांचे कामगार चळवळीत मोलाचे योगदान आहे.

नांदेड जिल्ह्यातील कामगार चळवळीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तत्त्वज्ञानाचा प्रभाव दिसून येतो. त्यानुसार कामगारांचे कारखान्यातील जीवनमान सुधारण्याकरिता नोकरीची शाश्वती, कामाचे तास, योग्य वेतन, पगारी रजा, निवृत्ती वेतन, बोनस इत्यादींकरिता या संघटनांनी कार्य केले. निजाम सरकारने या संपाला चिरडण्यासाठी कामगारांच्या नेत्यांना अटक केली व कामगारांनी तीव्र निदर्शने केली असता त्यांच्यावर बेझूट लाठीमार केला. स्वामी रामानंद तीर्थ यांनी प्रत्यक्ष नांदेडला भेट देऊन संपातील कामगारांना पाठींबा व्यक्त केला होता. तर स्थानिक राजकीय नेतृत्व श्री. शामराव बोधनकर, गोपाळ शास्त्री देव, कल्याणजी केशवजी यांनी संपकऱ्यांसाठी धान्य, इत्यादींची मदत संघटीत केली होती.[२६१]

जिल्ह्यात इंडिअन ट्रेड युनिअन ॲक्ट, १९२६ अंतर्गत ३१ मार्च १९६३ पर्यंत नोंद झालेल्या फक्त ८ व्यापारी संघटना होत्या. त्यापैकी एक शेतकी, वन, मासेमारी संघातंर्गत वर्गीकृत होती. पाच संघटना उत्पादन संघ अंतर्गत नोंदणी झालेल्या तर वाहतूक आणि दळणवळण (कार्यशाळांव्यतिरिक्त) व यथायोग्य विश्लेषण न केलेल्या संघटनेच्या कार्यवाहीसाठी प्रत्येकी एक संघटना वर्गीकृत केली गेली होती. कामगार संघटना वाद मुख्यत्त्वेकरून कापड उद्योगाशी संबंधित असत. या कालावधीमधील जिल्ह्याचा वेतनाचा दर कमी-जास्त प्रमाणात महाराष्ट्रातील इतर अविकसित जिह्यांमध्ये आढळणाऱ्या दरा एवढाच होता. औद्योगिक वादांचे मूळे हे मुख्यत्त्वेकरून वेतन प्रश्नामध्येच असते. १९५७ आणि १९५९ मध्ये उद्‌भवलेल्या १२ वादांपैकी ५ वाद वेतनाशी, एक बोनसशी, एक वैयक्तिक तर पाच वाद इतर विषयांशी संबंधित होते. नांदेड जिल्ह्यातील विविध उद्योगांच्या संदर्भातील वेतन निश्चितीचे स्वरूप पुढीलप्रमाणे होते.

१. राज्य वाहतूक —इंडिस्ट्रिअल डिस्प्युट्स ॲक्टच्या तरतुदीनुसार ठरविले जात असे.

२. व्यापारी संस्थापना—नांदेड मधील किमान वेतनदर दुकानांकरिता महिन्यास ३५ रुपये तर संस्थापनांकरिता कमालदर वार्षिक रु.३५०० म्हणजेच महिना ३०० रुपये होता.

३. लहान प्रमाणात असणाऱ्या अभियांत्रिकी उद्योगांची स्वतःची वेतन रचना असे.

तत्कालिन मुंबई सरकारच्या अनुक्रमे २९ सप्टेंबर १९४७ आणि १ एप्रिल १९४७ ला अस्तित्वात आलेल्या बॉम्बे इंडस्ट्रिअल रिलेशन्स ॲक्ट व इंडस्ट्रिअल डिसप्यूट्स ॲक्ट च्या मान्यतेपासून औद्योगिक मालक व कामगारांमधील संबंध ॲक्ट नुसार नियंत्रित करण्यात येत. उपरोक्त दोन्ही ॲक्ट औद्योगिक वाद मिटविण्याकरिता समूपदेशन आणि मध्यस्थीची साधने पुरवित.

---

२६१. प्रा. डॉ. बालाजी विठ्ठल पवार यांच्याकडून प्राप्त लेखनावर आधारित.

Maharashtra State Gazetteers

सन १९५७ आणि १९६२ या कालावधी दरम्यान कामगार संघटना व औद्योगिक संस्थांमध्ये झालेल्या वादांचे निकाल पुढीलप्रमाणे होते :—

| अ.क्र. | वर्ष | जिंकलेले | तडजोड झालेले | हारलेले | प्रलंबित | अनिर्णित |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| १ | १९५७ | — | — | ३ | १ | — |
| २ | १९५८ | — | — | २ | २ | — |
| ३ | १९५९ | १ | — | — | ३ | — |
| ४ | १०६० | — | — | — | — | — |
| ५ | १९६१ | — | — | — | — | — |
| ६ | १९६२ | — | — | — | — | — |

१९५७-५९ मधील वादांमध्ये समावेश असणाऱ्या १३,७६६ कामगारांपैकी १३,३८९ कामगार कापड उद्योगांचे तर उरलेले इतर उद्योगांतील होते. वाया गेलेल्या मानवी दिवसांपैकी ९० टक्के नुकसान कापड उद्योगांच्या दिवसांचे झाले होते. बारा वादांपैकी एकच वाद यशस्वीरित्या सोडविला गेला होता. ५ वाद अयशस्वी होते तर इतरांच्या बाबतीत कोणताच निर्णय घेतला गेला नाही. सन १९६० आणि १९६३ दरम्यान जिल्ह्यात औद्योगिक वाद झाले नाहीत. या कालावधीमधील औद्योगिक वादाचा तपशील पुढील तक्त्याद्वारे दर्शविण्यात आला आहे :—

**नांदेड जिल्ह्यातील १९५६ आणि १९६३ मधील औद्योगिक वाद दर्शविणारा तक्ता**

| वर्ष | वादांची संख्या | | | | कार्यरत कामगारांची संख्या | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | कापड उद्योग | अभियांत्रिकी उद्योग | इतर | एकूण | कापड उद्योग | अभियांत्रिकी उद्योग | इतर | एकूण |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| १९५६ | माहिती उपलब्ध नाही | | | | माहिती उपलब्ध नाही | | | |
| १९५७ | २ | ... | २ | ४ | ६,८८२ | ... | २६० | ७,१४२ |
| १९५८ | ४ | ... | | ४ | ५.५२१ | ... | ... | ५.५२१ |
| १९५९ | १ | ... | ३ | ४ | ९८६ | ... | ११७ | १,१०३ |
| १९६० | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| १९६१<br>१९६२<br>१९६३ | नोंदी उपलब्ध नाहीत. | | | | नोंदी उपलब्ध नाहीत. | | | |

Maharashtra State Gazetteers

| वाया गेलेले मानवी दिवस | | | | मागण्या | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कापड उद्योग | अभियांत्रिकी उद्योग | इतर | एकूण | वेतन | बोनस | सुट्टीचे तास | वैयक्तिक | इतर |
| (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) | (१५) | (१६) | (१७) | (१८) |
| माहिती उपलब्ध नाही. | | | | माहिती उपलब्ध नाही. | | | | |
| ५५,०८५ | ... | १०६० | ५६,१४५ | ३ | १ | ... | ... | ... |
| १२,६७० | ... | ... | १२,६७० | २ | ... | ... | १ | १ |
| ९८६ | ... | १५२ | १,१३८ | ... | ... | ... | ... | ४ |
| नोंदी उपलब्ध नाहीत. | | | | नोंदी उपलब्ध नाहीत. | | | | |

**कामगार कल्याण**

मुंबई मजूर कल्याण निधी कायदा, १९५३ अंतर्गत निर्माण झालेल्या महाराष्ट्र मजूर कल्याण मंडळाने मराठवाडा आणि विदर्भातील इतर मजूर कल्याण केंद्रांप्रमाणे मजूर उपमुख्य अधिकारी, नागपूर यांच्या अधिकारांतर्गत असलेल्या नांदेड मजूर कल्याण केंद्राचे काम दिनांक १ जानेवारी १९६२ मध्ये आपल्या हाती घेतले. हे केंद्र शासनाने सुमारे दोन वर्षांपूर्वी स्थापन केले होते आणि महाराष्ट्र मजूर कल्याण मंडळाने केंद्र आपल्या हाती घेण्यापूर्वी केंद्राची कार्यवाही प्राथमिक अवस्थेत होती.

केंद्राशी पुढील कर्मचारी वर्ग संलग्न होता :—

| ६ | मे. इलेक्ट्रोमोशन इंडस्ट्रिज | पीव्हीसी केबल्स आणि वायर्स | नांदेड औद्योगिक क्षेत्र (सीकॉमचे सहाय्य) | ७२० | - | - |
| ७ | मे. गणेश फुटवेअर इंडस्ट्रिज | पीव्हीसी फुटवेअर | नांदेड औद्योगिक क्षेत्र (सीकॉमचे सहाय्य) | २०३४ | - | बांधकाम चालू |
| ८ | मे. गोदावरी प्लास्टीक पॅकींग | प्लास्टीक पॅकींग | नांदेड औद्योगिक क्षेत्र (सीकॉमचे सहाय्य) | १००० | ५ मार्च १९७९ | उत्पादन चालू |
| ९ | मे. इंगळे पॅकेजिंग इंडस्ट्रिज | पॅकिंग मटेरिअल | नांदेड औद्योगिक क्षेत्र (सीकॉमचे सहाय्य) | १००० | - | उत्पादन चालू |

Maharashtra State Gazetteers

| अ.क्र. | उद्योग संस्थेचे नाव | उत्पादनाचे स्वरूप | औद्योगिक क्षेत्राचे नाव | क्षेत्रफळ (चौ.मी.) | उद्योग स्थापनेचा दिनांक | सद्यःस्थिती |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| १० | मे. महावीर बटाईल रबर इंडस्ट्रिज | बटाईल रबर | नांदेड औद्योगिक क्षेत्र (सीकॉमचे सहाय्य) | ८३२६ | ४ जुलै १९८९ | उत्पादन चालू |
| ११ | मे. महावीर रबर इंडस्ट्रिज | रबर प्रोडक्टस् | नांदेड औद्योगिक क्षेत्र (सीकॉमचे सहाय्य) | ८३२६ | . . | उत्पादन चालू |
| १२ | मे. महावीर पॉलिकेम प्रा. लि. | पीव्हीसी पाईप्स | नांदेड औद्योगिक क्षेत्र (सीकॉमचे सहाय्य) | ९०३४ | १६ सप्टेंबर १९८० | उत्पादन चालू |
| १३ | मे. महावीर इंडस्ट्रिज | टायर रिट्रीडींग | नांदेड औद्योगिक क्षेत्र (सीकॉमचे सहाय्य) | ४२१७ | २९ ऑगस्ट १९७९ | बांधकाम सुरू |
| १४ | मे. मराठवाडा प्लास्टीक्स | प्लास्टीक उत्पादने | नांदेड औद्योगिक क्षेत्र (सीकॉमचे सहाय्य) | २१०० | . . | उत्पादन चालू |
| १५ | मे. नरीमन इंडस्ट्रिज | फायबर ग्लास आर्टिकल्स | नांदेड औद्योगिक क्षेत्र (सीकॉमचे सहाय्य) | १५८४५ | १८ डिसेंबर १९८० | उत्पादन चालू |
| १६ | मे. पट्टवार टायर रिट्रीडींग | टायर रिट्रीडींग | नांदेड औद्योगिक क्षेत्र (सीकॉमचे सहाय्य) | २१०० | . . | उत्पादन चालू |
| १७ | मे. पवन इंडस्ट्रिज | टायर रिट्रीडींग | नांदेड औद्योगिक क्षेत्र (सीकॉमचे सहाय्य) | १००० | १५ सप्टेंबर १९९२ | उत्पादन चालू |

| अ.क्र. | उद्योग संस्थेचे नाव | उत्पादनाचे स्वरूप | औद्योगिक क्षेत्राचे नाव | क्षेत्रफळ (चौ.मी.) | उद्योग स्थापनेचा दिनांक | सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| १८ | मे. पोलटेक इंस्ट्रूमेंटस् कॉर्पोरेशन | स्टॅकेबल प्लास्टीक बीन्स | नांदेड औद्योगिक क्षेत्र (सीकॉमचे सहाय्य) | १८०० | २१ जून १९८८ | बांधकाम चालू |
| १९ | मे. प्रिंट पॅक इंडस्ट्रिज | पॅकींग बॅग्ज | नांदेड औद्योगिक क्षेत्र (सीकॉमचे सहाय्य) | १००० | २० जून १९७८ | . . |
| २० | मे. समीर पॉलिमर्स | पॉलिमर्स | नांदेड औद्योगिक क्षेत्र (सीकॉमचे सहाय्य) | १०२० | २२ एप्रिल १९९२ | बांधकाम चालू |
| २१ | मे. सम्राट प्लास्टीक इंडस्ट्रिज | प्लास्टीक उत्पादने | नांदेड औद्योगिक क्षेत्र (सीकॉमचे सहाय्य) | १००० | २० फेब्रुवारी १९८१ | . . |
| २२ | मे. श्री प्लास्टीक ग्रॅन्यूएल्स | प्लास्टीक ग्रॅन्यूएल्स | नांदेड औद्योगिक क्षेत्र (सीकॉमचे सहाय्य) | १००० | ५ जुलै १९९३ | . . |
| २३ | मे. श्री साईबाबा इंडस्ट्रिज | पॉलिथीन बॅग्ज | नांदेड औद्योगिक क्षेत्र (सीकॉमचे सहाय्य) | २१०० | ३१ जुलै १९९० | बांधकाम चालू |
| २४ | मे. सोनी प्लास्ट प्रा. लि. | डिस्पोजेबल कप्स | नांदेड औद्योगिक क्षेत्र (सीकॉमचे सहाय्य) | २१०० | . . | उत्पादन चालू |
| २५ | मे. सनफ्लॉवर प्लास्टीक इंडस्ट्रिज | प्लास्टीक बॅग्ज | नांदेड औद्योगिक क्षेत्र (सीकॉमचे सहाय्य) | १००० | ३ एप्रिल १९८९ | उत्पादन चालू |

Maharashtra State Gazetteers

| अ.क्र. | उद्योग संस्थेचे नाव | उत्पादनाचे स्वरूप | औद्योगिक क्षेत्राचे नाव | क्षेत्रफळ (चौ.मी.) | उद्योग स्थापनेचा दिनांक | सद्यःस्थिती |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| २६ | मे. तुलसी इंडस्ट्रीज | टायर रिट्रीडींग | नांदेड औद्योगिक क्षेत्र (सीकॉमचे सहाय्य) | ४०५० | २३ जानेवारी १९८७ | उत्पादन चालू |
| २७ | मे. विकास इंडस्ट्रिज | प्लास्टीक प्रोडक्टस् | नांदेड औद्योगिक क्षेत्र (सीकॉमचे सहाय्य) | २१०० | . . | बांधकाम चालू |
| २८ | मे. व्यंकटेश प्लास्टीक इंडस्ट्रिज | प्लास्टीक प्रोडक्टस् | देगलूर औद्योगिक क्षेत्र | . . | २६ मे १९९३ | बांधकाम चालू |
| २९ | मे. अमोदी प्लास्ट | प्लास्टीक प्रोडक्टस् | देगलूर औद्योगिक क्षेत्र | ३४६५ | २१ ऑगस्ट २००७ | . . |
| ३० | मे. राजेश प्लास्ट | प्लास्टीक प्रोडक्टस् | देगलूर औद्योगिक क्षेत्र | ३६४० | २१ ऑगस्ट २००७ | . . |
| ३१ | मे. ओम गणेशाय प्लास्टीक कंपनी | प्लास्टीक प्रोडक्टस् | कृष्णूर औद्योगिक क्षेत्र | ७२०० | २९ जून २००६ | . . |
| ३२ | मे. कोहीनूर इंडस्ट्रिज | प्लास्टीक प्रोडक्टस् | कृष्णूर औद्योगिक क्षेत्र | ८०० | १२ ऑक्टोबर २००६ | मान्यता प्राप्त |
| ३३ | मे. प्रिमिअर प्लास्टीक इंडस्ट्रिज | प्लास्टीक प्रोडक्टस् | कृष्णूर औद्योगिक क्षेत्र | ९१०० | २५ एप्रिल २००५ | बांधकाम चालू |

**तक्ता क्र. २१**

**जिल्ह्यातील काही नोंदणीकृत महत्त्वाच्या मुलभूत व मिश्रधातू उद्योगांच्या स्थापनेचा तपशील**

| अ.क्र. | उद्योग संस्थेचे नाव | उत्पादनाचे स्वरूप | औद्योगिक क्षेत्राचे नाव | क्षेत्रफळ (चौ.मी.) | उद्योग स्थापनेचा दिनांक | सद्यःस्थिती |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| १ | मे. जय कॉरप्स/सिप्टा कोटेड | कोल्ड रोलिंग जी.आय. शिटस् | नांदेड औद्योगिक क्षेत्र | ३५३५० | १९ सप्टेंबर १९८९ | उत्पादन चालू |
| २ | मे. जय कॉरप्स/सिप्टा कोटेड | कोल्ड रोलिंग जी.आय. शिटस् | नांदेड औद्योगिक क्षेत्र | ६०००० | ४ जून १९८५ | उत्पादन चालू |
| ३ | मे. जय कॉरप्स/सिप्टा कोटेड | कोल्ड रोलिंग जी.आय. शिटस् | नांदेड औद्योगिक क्षेत्र | ७९७७२ | ११ सप्टेंबर १९८६ | उत्पादन चालू |
| ४ | मे. जय कॉरप्स/सिप्टा कोटेड | कोल्ड रोलिंग जी.आय. शिटस् | नांदेड औद्योगिक क्षेत्र | ३७४३० | ६ जुलै २००७ | उत्पादन चालू |
| ५ | मे. खाटू श्यामजी रिरोलिंग प्रा. लि. | एम.एस. राऊंड बार्स | नांदेड औद्योगिक क्षेत्र | ५७९५ | २६ डिसेंबर १९९५ | बांधकाम पूर्ण |
| ६ | मे. भारत स्टिल इंडस्ट्रिज | रिरोलिंग | नांदेड औद्योगिक क्षेत्र | ४०५० | १७ मार्च १९८८ | बंद |
| ७ | मे. महाराष्ट्र इंडस्ट्रिज | जी.आय. कास्टिंग | नांदेड औद्योगिक क्षेत्र | ४०५० | १० डिसेंबर १९८१ | बंद |
| ८ | मे. विश्वकर्मा फाऊंड्री वर्क्स | फाऊंड्री आयटम्स आणि जॉब वर्क्स | नांदेड औद्योगिक क्षेत्र | १७९६ | ५ मे १९८० | उत्पादन चालू |
| ९ | मे. श्रीराम कॉर्पोरेशन | जी.आय. शिटस् | नांदेड औद्योगिक क्षेत्र | १००० | १९ जून २००१ | उत्पादन चालू |

Maharashtra State Gazetteers

| अ.क्र. | उद्योग संस्थेचे नाव | उत्पादनाचे स्वरूप | औद्योगिक क्षेत्राचे नाव | क्षेत्रफळ (चौ.मी.) | उद्योग स्थापनेचा दिनांक | सद्यःस्थिती |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| १० | मे. उज्ज्वल मेटल प्रा. लि. | जॉब वर्क जी.आय. शिटस् | नांदेड औद्योगिक क्षेत्र | १७१८९ | ३ सप्टेंबर १९८१ | उत्पादन चालू |
| ११ | मे. उज्ज्वल मेटल प्रा. लि. | जॉब वर्क जी.आय. शिटस् | नांदेड औद्योगिक क्षेत्र | ९६० | ९ ऑगस्ट १९९६ | उत्पादन चालू |
| १२ | मे. गजानन रिरोलिंग मिल | रिरोलिंग | नांदेड औद्योगिक क्षेत्र | ८७१५ | ७ मे १९९१ | बंद |
| १३ | मे. श्रीराम माऊल्डिंग वर्क्स | माऊल्ड | नांदेड औद्योगिक क्षेत्र | २१०० | १७ सप्टेंबर १९८० | उत्पादन चालू |
| १४ | मे. साई मंगल एन्टरप्रायझेस | स्टिल | नांदेड औद्योगिक क्षेत्र | १००० | १७ ऑक्टोबर २००५ | बांधकाम चालू |
| १५ | मे. डायमंड स्टिल प्रोडक्टस् | स्टिल | नांदेड औद्योगिक क्षेत्र | १००० | ४ ऑक्टोबर १९९९ | बंद |
| १६ | मे. ताज मेटल वर्क्स | मेटल | नांदेड औद्योगिक क्षेत्र | १००० | २४ नोव्हेंबर १९८० | उत्पादन चालू |
| १७ | मे. जी. जी. इंडस्ट्रिज | स्टेनलेस स्टिल | नांदेड औद्योगिक क्षेत्र | ४०५० | ९ मार्च १९९४ | उत्पादन चालू |
| १८ | मे. कालिका रोलिंग मिल | ॲल्युमिनिअम | नांदेड औद्योगिक क्षेत्र | ४०५० | ३१ जुलै १९८० | उत्पादन चालू |
| १९ | मे. गुरुदेव स्टिल इंडस्ट्रिज | स्टिल वर्क्स | नांदेड औद्योगिक क्षेत्र | २१०० | २८ एप्रिल १९८३ | उत्पादन चालू |
| २० | मे. खाटू श्यामजी रिरोलिंग प्रा. लि. | स्टिल प्लॅन्ट | नांदेड औद्योगिक क्षेत्र | २६४०७ | १ सप्टेंबर २००५ | उत्पादन चालू |
| २१ | मे. युनायटेड इंडस्ट्रिज | इंजिनिअरिंग माऊल्डिंग | नांदेड औद्योगिक क्षेत्र | १९५० | ३ सप्टेंबर १९९० | उत्पादन चालू |
| २२ | मे. गणेश इंडस्ट्रिज | माऊल्डिंग | नांदेड औद्योगिक क्षेत्र | १८०० | २६ फेब्रुवारी १९९१ | उत्पादन चालू |
| २३ | मे. मार्टिन मेटल ॲण्ड रोलिंग मिल | मेटल | देगलूर औद्योगिक क्षेत्र | १९१२ | २७ जुलै २००० | बंद |
| २४ | मे. हिंदुस्थान वायर्स | एम. एस. वायर्स | नांदेड औद्योगिक क्षेत्र | १००० | १० मे १९९६ | उत्पादन चालू |

**तक्ता क्र. २२**

**जिल्ह्यातील काही महत्त्वाच्या नोंदणीकृत धातूच्या वस्तू व सुटे भाग उद्योगांच्या स्थापनेचा तपशिल**

| अ.क्र. (१) | उद्योग संस्थेचे नाव (२) | उद्योगाचे स्वरूप (३) | औद्योगिक क्षेत्राचे नाव (४) | क्षेत्रफळ (५) | स्थापनेचा दिनांक (६) | सद्यःस्थिती (७) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मे.गंगाशी इंडस्ट्रिज | एम.एस.राऊंड पत्ती | नांदेड औद्योगिक क्षेत्र | ४०५० | १८ जुलै १९९४ | उत्पादन चालू |
| २ | मे. श्रीश्याम उद्योग | बकेट सीड बार्स | नांदेड औद्योगिक क्षेत्र | ४०५० | २५ ऑगस्ट १९९४ | उत्पादन चालू |
| ३ | मे. पद्मा स्टील इंडस्ट्रिज | फॅब्रिकेशन ग्रील्स | नांदेड औद्योगिक क्षेत्र | ४७०५ | २० फेब्रुवारी १९८० | बंद |
| ४ | मे. मार्शल इंडस्ट्रिज | नट बोल्ट | नांदेड औद्योगिक क्षेत्र | १००० | १६ फेब्रुवारी १९८९ | बंद |
| ५ | मे. साई इंजिनिअरींग वर्कस् | बॉडी बडमेकॅनिकल वर्क | नांदेड औद्योगिक क्षेत्र | २७०० | ५ जून १९९६ | बांधकाम चालू |
| ६ | मे. साई इंजिनिअरींग वर्कस् | फॅब्रिकेशन | नांदेड औद्योगिक क्षेत्र | १००० | २२ जुलै १९८८ | बंद |
| ७ | मे. युनायटेड इंजिनिअरींग वर्कस् | इंजिनिअरींग जॉब वर्क | नांदेड औद्योगिक क्षेत्र | १००० | २४ नोव्हेंबर १९८० | उत्पादन चालू |
| ८ | मे. ॲग्रो इंजिनिअरींग सर्व्हिसेस् | फॅब्रिकेशन | नांदेड औद्योगिक क्षेत्र | ३२०० | १ जानेवारी १९८१ | बंद |
| ९ | मे. हाय टेक इंजिनिअर्स | इंजिनिअरींग | नांदेड औद्योगिक क्षेत्र | ८७५ | २२ सप्टेंबर १९९३ | उत्पादन चालू |
| १० | मे. नांदेड फॅब्रिकेशन | फॅब्रिकेशन | नांदेड औद्योगिक क्षेत्र | १००० | १७ ऑक्टोबर १९९० | बंद |
| ११ | मे. आर. के. इंडस्ट्रिज | फॅब्रिकेशन | नांदेड औद्योगिक क्षेत्र | १००० | ३ नोव्हेंबर १९८९ | उत्पादन चालू |
| १२ | मे. चिल्का स्टिल इंडस्ट्रिज | फॅब्रिकेशन | नांदेड औद्योगिक क्षेत्र | १००० | १२ डिसेंबर १९८१ | उत्पादन चालू |

Maharashtra State Gazetteers

| अ.क्र. (१) | उद्योग संस्थेचे नाव (२) | उद्योगाचे स्वरूप (३) | औद्योगिक क्षेत्राचे नाव (४) | क्षेत्रफळ (५) | स्थापनेचा दिनांक (६) | सद्यःस्थिती (७) |
|---|---|---|---|---|---|---|
| १३ | मे. ट्रान्स पॉवर इक्विपमेंटस् | फॅब्रिकेशन | नांदेड औद्योगिक क्षेत्र | १००० | १९ मे २००४ | उत्पादन चालू |
| १४ | मे. आकाश स्टिल इंडस्ट्रिज | स्टिल फर्निचर | नांदेड औद्योगिक क्षेत्र | १००० | ३० जून १९९८ | उत्पादन चालू |
| १५ | मे. मधू इंडस्ट्रि | फॅब्रिकेशन | नांदेड औद्योगिक क्षेत्र | २१०० | ६ जून १९८० | उत्पादन चालू |
| १६ | मे. रॅविटो इंजिनिअरींग वर्कस् | फॅब्रिकेशन | नांदेड औद्योगिक क्षेत्र | २४०० | २४ नोव्हेंबर १९८० | उत्पादन चालू |
| १७ | मे. वेंकटेश ॲग्रो इंडस्ट्रिज | फॅब्रिकेशन | नांदेड औद्योगिक क्षेत्र | ४०५० | १० मे २००६ | बंद |
| १८ | मे. सुमाशंकर स्ट्रिल फनिचर | स्टिल फर्निचर | नांदेड औद्योगिक क्षेत्र | २१०० | ८ जून २००० | मान्यताप्राप्त |
| १९ | मे. बालाजी फॅब्रिकेशन | फॅब्रिकेशन | नांदेड औद्योगिक क्षेत्र | २१०० | ३ जून १९८८ | उत्पादन चालू |
| २० | मे. न्यु गोदावरी इंडस्ट्रिज् | स्टिल फर्निचर | नांदेड औद्योगिक क्षेत्र | ९१०० | ५ एप्रिल १९८३ | उत्पादन चालू |
| २१ | मे. श्रीनिवास इंजिनिअरींग वर्कस् | इंजिनिअरींग वर्कस् | नांदेड औद्योगिक क्षेत्र | ८४०० | १९ ऑगस्ट १९८१ | बंद |
| २२ | मे. निपाज स्टिल इंडस्ट्रिज् | इंजिनिअरींग स्टिल फर्निचर | नांदेड औद्योगिक क्षेत्र | ८४३२ | १२ ऑगस्ट १९८१ | उत्पादन चालू |
| २३ | मे. राघवेंद्र इंडस्ट्रिज् | स्टिल फर्निचर | नांदेड औद्योगिक क्षेत्र | ७९९० | २४ ऑगस्ट १९९९ | बंद |
| २४ | मे. विशाल एन्टरप्रायझेस | तवा | नांदेड औद्योगिक क्षेत्र | ७८७४ | ६ जून १९८१ | बांधकाम चालू |
| २५ | मे. गिरीराज इंजिनिअर्स | रॅली | नांदेड औद्योगिक क्षेत्र | ४६५५ | २९ एप्रिल १९९१ | उत्पादन चालू |

| अ.क्र. (१) | उद्योग संस्थेचे नाव (२) | उद्योगाचे स्वरूप (३) | औद्योगिक क्षेत्राचे नाव (४) | क्षेत्रफळ (५) | स्थापनेचा दिनांक (६) | सद्यःस्थिती (७) |
|---|---|---|---|---|---|---|
| २६ | मे. वेंकटेश इंजिनिअरींग कंपनी | फॅब्रिकेशन | नांदेड औद्योगिक क्षेत्र | १००० | ६ मे १९८१ | उत्पादन चालू |
| २७ | मे. सुमाशंकर इंडस्ट्रिज् | स्टिल फर्निचर | नांदेड औद्योगिक क्षेत्र | २१८४ | ६ फेब्रुवारी १९९६ | उत्पादन चालू |
| २८ | मे. मॉडर्न मेकॅनिकल वर्कस् | मेकॅनिकल वर्क | नांदेड औद्योगिक क्षेत्र | २१०० | २८ ऑक्टोबर १९८२ | बंद |
| २९ | मे. महा इंजिनिअरींग वर्कस् | इंजिनिअरींग वर्कस् | नांदेड औद्योगिक क्षेत्र | ६०८ | २१ जुलै २००५ | बांधकाम पूर्ण |
| ३० | मे. संभाजी कोंडीबा जिंकलवाड | टेन्ट आणि मटेंसिल्स | नांदेड औद्योगिक क्षेत्र | ८०० | २ फेब्रुवारी २००७ | बांधकाम पूर्ण |
| ३१ | मे. कल्याणकर स्टिल शो रुम | स्टिल फर्निचर | नांदेड औद्योगिक क्षेत्र | ८०७ | ११ ऑक्टोबर २००६ | मान्यताप्राप्त |
| ३२ | मे. शिवशंकर हार्डवेअर | हार्डवेअर | नांदेड औद्योगिक क्षेत्र | १०० | १६ फेब्रुवारी १९९५ | बांधकाम पूर्ण |
| ३३ | मे. पद्मावती इंजिनिअर्स | इंजिनिअर्स | नांदेड औद्योगिक क्षेत्र | ५४० | ६ डिसेंबर २००१ | बांधकाम पूर्ण |
| ३४ | मे. गोपाल इंडस्ट्रिज् | बायडींग वायर्स | नांदेड औद्योगिक क्षेत्र | ४२०० | १२ मार्च १९९६ | बांधकाम पूर्ण |
| ३५ | मे. अभिजित इंजिनिअरींग वर्कस् | इंजिनिअरींग इक्विपमेंटस् | नांदेड औद्योगिक क्षेत्र | २१०० | ६ जून १९८५ | बांधकाम पूर्ण |
| ३६ | मे. अभिजित इंजिनिअर्स | इंजिनिअरींग इक्विपमेंटस् | नांदेड औद्योगिक क्षेत्र | १८०० | ८ ऑगस्ट १९९७ | बांधकाम चालू |
| ३७ | मे. अभिजित इंजिनिअर्स | इंजिनिअरींग इक्विपमेंटस् | नांदेड औद्योगिक क्षेत्र | १८०० | १६ मार्च १९९८ | उत्पादन चालू |
| ३८ | मे. अभिजित इंजिनिअर्स | इंजिनिअरींग इक्विपमेंटस् | नांदेड औद्योगिक क्षेत्र | १८०० | ९ मे १९९७ | उत्पादन चालू |
| ३९ | मे. जाधव एन्टरप्रायझेस | बांधकामाचे साहित्य | देगलूर औद्योगिक क्षेत्र | १००० | २१ ऑगस्ट २००७ | कोणतीही प्रक्रीया नाही. |

Maharashtra State Gazetteers

| अ.क्र. (१) | उद्योग संस्थेचे नाव (२) | उद्योगाचे स्वरूप (३) | औद्योगिक क्षेत्राचे नाव (४) | क्षेत्रफळ (५) | स्थापनेचा दिनांक (६) | सद्यःस्थिती (७) |
|---|---|---|---|---|---|---|
| ४० | मे. देसाई फॅब्रिकेशन | फॅब्रिकेशन | देगलूर औद्योगिक क्षेत्र | १२०० | २० सप्टेंबर २००७ | कोणतीही प्रक्रीया नाही. |
| ४१ | मे. अमित मशिन ॲण्ड फॅब्रिकेशन | इंजिनिअरींग | कृष्णूर औद्योगिक क्षेत्र | १५०० | २३ जानेवारी २००७ | मान्यताप्राप्त |
| ४२ | मे. प्रिसिजन इंजिनिअरींग वर्कस् | सुटे भाग | कृष्णूर औद्योगिक क्षेत्र | ८०० | २९ नोव्हेंबर २००५ | कोणतीही प्रक्रीया सुरू नाही. |
| ४३ | मे. मराठवाडा स्टिल वर्कस् | स्टिल फर्निचर | कृष्णूर औद्योगिक क्षेत्र | ८०० | २२ डिसेंबर २००६ | मान्यताप्राप्त |
| ४४ | मे. आर. के. इंडस्ट्रिज् | पम्पचे भाग | कृष्णूर औद्योगिक क्षेत्र | ८०० | ३ जानेवारी २००७ | कोणतीही प्रक्रीया नाही. |

Maharashtra State Gazetteers

**तक्ता क्र. २३**

**जिल्ह्यातील परिवहन सामग्री यंत्र सामग्री व सुटे भाग यांच्या काही महत्त्वाच्या नोंदणीकृत उद्योगांच्या स्थापनेचा तपशील**

| अ.क्र. (१) | उद्योग संस्थेचे नाव (२) | उत्पादनाचे स्वरूप (३) | औद्योगिक क्षेत्राचे नाव (४) | क्षेत्रफळ (५) | स्थापनेचा दिनांक (६) | सद्यःस्थिती (७) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मे. टेक्नोमॅग इंडस्ट्रिज् | फॉरीट कंपोनन्टस् | नांदेड औद्योगिक क्षेत्र | २१०० | ११ जानेवारी १९७९ | बंद |
| २ | मे. बेंगाल ऑटो इंजिनिअरींग वर्कस् | ऑटोमोबाईल्स स्पेअर अॅण्ड जॉब. | नांदेड औद्योगिक क्षेत्र | १००० | ८ जून १९७६ | उत्पादन चालू |
| ३ | मे. बेंगाल मेटल वर्कस् | बांधकामाचे साहित्य | नांदेड औद्योगिक क्षेत्र | १००० | २९ सप्टेंबर १९८४ | उत्पादन चालू |
| ४ | मे. एम.डी.सी.पॉवर लूम | पॉवर लूम | नांदेड औद्योगिक क्षेत्र | ३४२३० | १९७५ | बंद |
| ५ | मे. गीताश्री प्रोडक्टस् | यार्न | नांदेड औद्योगिक क्षेत्र | १००० | २५ जून १९९८ | बंद |
| ६ | मे. युनायटेड इंडस्ट्रिज् | रेफ्रिजरेशन | नांदेड औद्योगिक क्षेत्र | १००० | ४ एप्रिल १९९७ | बांधकाम पूर्ण |
| ७ | मे. अंबिका यार्न मिल | यार्न | नांदेड औद्योगिक क्षेत्र | ४०५० | ६ ऑक्टोबर १९८१ | बंद |
| ८ | मे. कुलर लॅण्ड इंडस्ट्रिज | कुलर | नांदेड औद्योगिक क्षेत्र | २१०० | १२ ऑक्टोबर २००६ | उत्पादन चालू |
| ९ | मे. आदित्य इंडस्ट्रिज | सायकलचे सूटे भाग | नांदेड औद्योगिक क्षेत्र | २१०० | १६ मार्च १९९० | उत्पादन चालू |
| १० | मे. युनायटेड इंडस्ट्रिज् | ऑटो पार्टस् | कृष्णूर औद्योगिक क्षेत्र | ८०० | ३० मार्च २००७ | कोणतीही कार्यवाही नाही. |
| ११ | मे. शिवदास ऑटोमोबाईल्स | ऑटो पार्टस् | कृष्णूर औद्योगिक क्षेत्र | ९६ | २५ जुलै २००४ | कोणतीही कार्यवाही नाही. |

Maharashtra State Gazetteers

**तक्ता क्र. २४**

**जिल्ह्यातील इलेक्ट्रिक, इलेक्ट्रॉनिक यंत्रसामग्री, साधने, उपकरणे व सुटे भाग उद्योगांतील महत्त्वाच्या नोंदणीकृत उद्योगांच्या स्थापनेचा तपशील**

| अ.क्र. (१) | उद्योग संस्थेचे नाव (२) | उद्योगाचे स्वरूप (३) | औद्योगिक क्षेत्राचे नाव (४) | क्षेत्रफळ (५) | स्थापनेचा दिनांक (६) | सद्यःस्थिती (७) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मे. ग्रोवेल एन्टरप्रायझेस | बाइडिंग वायर | नांदेड औद्योगिक क्षेत्र | १२२५ | २७ मे १९९९ | बंद |
| २ | मे. माविन स्विच गिअर | स्विच | नांदेड औद्योगिक क्षेत्र | १००० | ७ जुलै १९८७ | बंद |
| ३ | मे. श्रीनिवास इंडस्ट्रि | स्विच | नांदेड औद्योगिक क्षेत्र | १००० | २७ मे १९९२ | बंद |
| ४ | मे. राजस इंडस्ट्रि | इलेक्ट्रिक फ्लोरिनल | नांदेड औद्योगिक क्षेत्र | १००० | ३ जून १९९७ | उत्पादन चालू |
| ५ | मे. महागावकर इंडस्ट्रि | स्विच गिअर्स | नांदेड औद्योगिक क्षेत्र | १००० | ३१ डिसेंबर १९८८ | उत्पादन चालू |
| ६ | मे. श्री बळवंत इलेक्ट्रोडस् इक्विपमेंटस्. | इलेक्ट्रोडस् | नांदेड औद्योगिक क्षेत्र | १००० | २३ मार्च १९९४ | बंद |
| ७ | मे. नारायण इलेक्ट्रोडस् | इलेक्ट्रोडस् | नांदेड औद्योगिक क्षेत्र | १०८० | ३० जुलै १९९२ | उत्पादन चालू |
| ८ | मे. सनलाईट ट्रान्सफॉर्मर | ट्रान्सफॉर्मर | नांदेड औद्योगिक क्षेत्र | २१०० | ९ ऑक्टोबर १९९१ | उत्पादन चालू |
| ९ | मे. बिडवाई इलेक्ट्रिक्स | इलेक्ट्रिकल्स पार्ट | नांदेड औद्योगिक क्षेत्र | १००० | ७ सप्टेंबर १९९५ | उत्पादन चालू |
| १० | मे. ठाकूर इलेक्ट्रिकल्स | विद्युत उपकरणे | नांदेड औद्योगिक क्षेत्र | १०४५ | १२ ऑक्टोबर | कोणतीही कार्यवाही नाही. |
| ११ | मे. पालिमकर इंजिनिअर्स आणि इलेक्ट्रॉनिक्स. | विद्युत उपकरणे | नांदेड औद्योगिक क्षेत्र | ६८० | २५ एप्रिल २००५ | उत्पादन चालू |
| १२ | मे. पॉवर कंट्रोल | ट्रान्सफॉर्मर | कृष्णूर औद्योगिक क्षेत्र | १८०० | २९ मार्च २००६ | कोणतीही प्रक्रिया नाही. |

**तक्ता क्र. २५**

**जिल्ह्यातील अधातू खनिज उत्पादने उद्योगांपैकी काही नोंदणीकृत महत्त्वाच्या उद्योगांच्या स्थापनेचा तपशील**

| अ.क्र. (१) | उद्योग संस्थेचे नाव (२) | उद्योगाचे स्वरूप (३) | औद्योगिक क्षेत्राचे नाव (४) | क्षेत्रफळ (५) | स्थापनेचा दिनांक (६) | सद्यःस्थिती (७) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मे. एम.डी.सी.सिरॅमिक इंडस्ट्रिज | सिरॅमिक प्रोडक्शन | नांदेड औद्योगिक क्षेत्र | ४०८९० | १ जुलै १९८० | बंद |
| २ | मे. अतुल इंडस्ट्रिज् | आर.सी.सी.पाईप्स | नांदेड औद्योगिक क्षेत्र | ४४२५ | २५ ऑगस्ट १९८० | उत्पादन चालू |
| ३ | मे. गोदावरी इंडस्ट्रिज् | आर.सी.सी.पाईप्स | नांदेड औद्योगिक क्षेत्र | १६८०० | १९ जानेवारी १९८९ | बंद |
| ४ | मे. गोदावरी स्पून पाईप इंडस्ट्रिज् | सिमेंट पाईप्स | नांदेड औद्योगिक क्षेत्र | १५९८१ | १३ ऑगस्ट १९८२ | बंद |
| ५ | मे. गोदावरी सॅण्ड प्लास् | सॅण्ड लाईम ब्रिक्स | नांदेड औद्योगिक क्षेत्र | ९५८५ | २५ जून १९९८ | बांधकाम चालू |
| ६ | मे. इंडिअन प्रीकास्ट | सिमेंट | नांदेड औद्योगिक क्षेत्र | ९६७६ | — | बंद |
| ७ | मे. मेधावी प्रीस्ट्रेस्ड पाईप | आर.सी.सी.पाईप्स | नांदेड औद्योगिक क्षेत्र | ११६२५ | १७ जुलै १९८० | उत्पादन चालू |
| ८ | मे. उमाशंकर सिमेंट इंडस्ट्रि | आर.सी.सी.पाईप्स | नांदेड औद्योगिक क्षेत्र | २१०० | ३१ डिसेंबर १९८१ | बंद |
| ९ | मे. बालाजी आर.सी.सी.पाईप | आर.सी.सी.पाईप्स | नांदेड औद्योगिक क्षेत्र | ४०५० | १३ एप्रिल १९८२ | उत्पादन चालू |
| १० | मे. श्री. सिमेंट इंडस्ट्रि | आर.सी.सी.पाईप्स | नांदेड औद्योगिक क्षेत्र | ४०५० | ३० ऑगस्ट १९८० | उत्पादन चालू |
| ११ | मे. पांडूरंग इंडस्ट्रि | टाईल्स | नांदेड औद्योगिक क्षेत्र | ४०५० | २२ मे १९८१ | उत्पादन चालू |
| १२ | मे. बहेती सिमेंट प्रोडक्टस् | सिमेंटची उत्पादने | नांदेड औद्योगिक क्षेत्र | १५०० | २८ जून २००३ | मान्यता प्राप्त |

Maharashtra State Gazetteers

| अ.क्र. (१) | उद्योग संस्थेचे नाव (२) | उद्योगाचे स्वरूप (३) | औद्योगिक क्षेत्राचे नाव (४) | क्षेत्रफळ (५) | स्थापनेचा दिनांक (६) | सद्यःस्थिती (७) |
|---|---|---|---|---|---|---|
| १३ | मे. श्री. सिमेंट इंडस्ट्रिज् | टाईल्स | नांदेड औद्योगिक क्षेत्र | ४५० | २४ फेब्रुवारी १९८४ | बांधकाम चालू |
| १४ | मे. भारत बिल्डींग मटेरिअल | बांधकामाचे साहित्य | नांदेड औद्योगिक क्षेत्र | ९० | २१ नोव्हेंबर १९९४ | उत्पादन चालू |
| १५ | मे. अक्षय टाईल्स इंडस्ट्रिज् | टाईल्स | नांदेड औद्योगिक क्षेत्र | १०२० | १९ जानेवारी १९९३ | उत्पादन चालू |
| १६ | मे. संगम इंडस्ट्रिज् | आर.सी.सी.पाईप | नांदेड औद्योगिक क्षेत्र | ४००० | ९ जानेवारी १९८६ | उत्पादन चालू |
| १७ | मे. मेधावी सिमेंट इंडस्ट्रिज् | आर.सी.सी.पाईप | नांदेड औद्योगिक क्षेत्र | २१०० | ३ जानेवारी १९८५ | उत्पादन चालू |
| १८ | मे. महावीर इंडस्ट्रिज् | टाईल्स | देगलूर औद्योगिक क्षेत्र | ८२३ | ३ नोव्हेंबर २००६ | कोणतीही प्रक्रीया सुरू नाही. |
| १९ | मे. बालाजी ग्रॅनाईट टाइल्स | टाईल्स | देगलूर औद्योगिक क्षेत्र | ६०० | १ एप्रिल १९९३ | बंद |
| २० | मे. श्रीशाया इंडस्ट्रिज् | स्पून पाईप | कृष्णूर औद्योगिक क्षेत्र | ६८०० | ५ जून २००७ | बंद |
| २१ | मे. नंदिग्राम सिमेंट पाईप | स्पून पाईप | कृष्णूर औद्योगिक क्षेत्र | ४००० | २० मार्च २००७ | कोणतीही प्रक्रीया सुरू नाही. |





Maharashtra State Gazetteers

**तक्ता क्र. २६**

**जिल्ह्यातील लाकूड व लाकडी वस्तूंच्या उत्पादनांच्या काही महत्त्वाच्या नोंदणीकृत उद्योगांचा तपशिल**

| अ.क्र. | उद्योगाचे नाव | उत्पादनाचे स्वरूप | औद्योगिक क्षेत्राचे नाव | क्षेत्रफळ (चौ.कि.मी.) | उद्योग स्थापनेचा दिनांक | सद्यःस्थिती |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| १ | मे. शुभम उद्योग | लाकडी फर्निचर | नांदेड औद्योगिक क्षेत्र | ४०५० | २८ मार्च १९८८ | उत्पादन चालू |
| २ | मे. बेंगाल वुडन फर्निचर | फर्निचर | नांदेड औद्योगिक क्षेत्र | २१०० | ७ ऑगस्ट १९७९ | बांधकाम चालू |
| ३ | मे. सत्यनारायण फर्निचर वर्क्स | ओवीरीनेटेड पॅराफिन वॅक्स. | नांदेड औद्योगिक क्षेत्र | ११७१ | २ फेबुवारी २००६ | बंद |
| ४ | मे. बालाजी फर्निचर वर्क्स | फर्निचर | नांदेड औद्योगिक क्षेत्र | २१०० | १४ जानेवारी १९९४ | उत्पादन चालू |
| ५ | मे. शिव मंगल इंडस्ट्रिज | फर्निचर | नांदेड औद्योगिक क्षेत्र | २१०० | ६ जानेवारी २००५ | बांधकाम चालू |
| ६ | मे. कोटलवार स्टिल वुडन फर्निचर | लाकडी फर्निचर | नांदेड औद्योगिक क्षेत्र | १००० | ९ मे १९९७ | उत्पादन चालू |
| ७ | मे. पांडूरंग वुडन फर्निचर | लाकडी फर्निचर | नांदेड औद्योगिक क्षेत्र | १००० | ७ मे १९८० | उत्पादन चालू |
| ८ | मे. पांडूरंग वुडन फर्निचर | लाकडी फर्निचर | नांदेड औद्योगिक क्षेत्र | २९०० | २६ सप्टेंबर २००२ | बांधकाम चालू |
| ९ | मे. साईराम वुडन फर्निचर | सॉ मिल | नांदेड औद्योगिक क्षेत्र | २१०० | ११ नोव्हेंबर १९९३ | उत्पादन चालू |
| १० | मे. सुमशंकर स्टील आणि वुडन फर्निचर इंडस्ट्रिज्. | लाकडी फर्निचर | नांदेड औद्योगिक क्षेत्र | २१०० | ८ जून २००० | मान्यता प्राप्त |
| ११ | मे. संगम फर्निचर वर्क्स | फर्निचर | नांदेड औद्योगिक क्षेत्र | १००० | १५ डिसेंबर १९९२ | उत्पादन चालू |
| १२ | मे. वेंकटाद्री वुडन फर्निचर | फर्निचर | नांदेड औद्योगिक क्षेत्र | ८०० | ३० नोव्हेंबर २००४ | बांधकाम चालू |
| १३ | मे. सुभाष फर्निचर | फर्निचर | नांदेड औद्योगिक क्षेत्र | ८०० | ७ जून २००६ | मान्यताप्राप्त |
| १४ | मे. बालाजी फर्निचर वर्क्स | फर्निचर | नांदेड औद्योगिक क्षेत्र | १०० | २६ ऑगस्ट १९९४ | उत्पादन चालू |
| १५ | मे. दसरवार टिंबर इंडस्ट्रिज | टिंबर | नांदेड औद्योगिक क्षेत्र | — | २ एप्रिल १९७९ | कोणतीही प्रक्रीया झालेली नाही. |

Maharashtra State Gazetteers

# नांदेड जिल्हा गॅझेटिअर

## प्रकरण-६

## बँक व्यवसाय, व्यापार व वाणिज्य

Maharashtra State Gazetteers

प्रकरण ६

# बँक व्यवसाय, व्यापार व वाणिज्य

## प्रास्ताविक

प्राचीन काळापासून भारतात विविध प्रकारची देवघेव करणाऱ्या संस्था अस्तित्त्वात होत्या. बौद्ध काळामध्ये असलेल्या व्यापारी संघांचे वर्णन जातक कथांमध्ये आढळते. संस्कृत साहित्यामध्ये श्रेणी, पूंग संघ इत्यादी नावे आढळून येतात. दक्षिण भारतामध्ये त्यांना मणिग्रामम, नानादेशी अशी नावे आहेत. मणिग्रामम हा वणिकग्रामचा अपभ्रंश असावा. वैदिक साहित्यातून व्यापारी संघाला वणिक ही संज्ञा होती असे दिसते. विविध व्यापाऱ्यांच्या संघांची विशेष प्रतिष्ठा तत्कालीन राजदरबारात असे. तसेच बचत हा मानवी व्यवहाराचा पूर्वीपासून चालत आलेला स्थायीभाव आहे. आज अनेक प्रकारच्या बँका बचत ठेवी म्हणून स्वीकारतात. पूर्वी सावकार व सराफी पतपेढ्या बँक व्यवसायाचे काम करीत. त्याच्याकडून व्याज आकारले जाई. परंतु पैसा पुरविण्याची त्यांची कुवत बँकांच्या मानाने फारच मर्यादित होती. आज सर्वसामान्यांची बचत करण्याची ताकद वाढलेली आहे. इतकेच नव्हे तर प्रत्येक मिळवत्या व्यक्तीस भविष्यकालीन गरजा व संकटांना तोंड देण्यासाठी बचतीच्या रुपाने तरतूद करण्याच्या आवश्यकतेची जाणीव झालेली आहे. याचा अर्थ असा नव्हे की, पूर्वीच्या काळी लोकांना बचतीचे महत्त्व पटलेले नव्हते. बचत करण्याची त्यांच्यामध्ये कुवत होती, परंतु त्या बचतीचा विनियोग करण्याची साधने उपलब्ध नसल्यामुळे ही बचत सोन्या-चांदीत अथवा इतर मौल्यवान वस्तुमध्ये अडकून राहत असे. आता ही परिस्थिती बदललेली आहे. बचत हे आर्थिकदृष्ट्या समाज प्रगत होण्यासाठी लागणाऱ्या गुंतवणुकीचे एक महत्त्वाचे साधन आहे आणि हे साधन बँका आणि तत्सम संस्था उपलब्ध करून देतात. पूर्वीसारखे आर्थिक व्यवहारांचे स्वरूप विस्कळीत राहिलेले नसून बँकांच्या व्यवहारात सुसूत्रता आणण्यासाठी आणि त्यांच्या कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी सरकारने अनेक कायदे केलेले आहेत. सरकारच्या या धोरणात बँकांचे व्यवहार आणि राष्ट्रहीत या दोन गोष्टींची सांगड घातलेली दिसून येते. नांदेड जिल्हा कृषीप्रधान असल्याने कृषीप्रधान अर्थव्यवस्थेचे पडसाद तेथील अर्थव्यवस्थेवर पडलेले दिसून येतात. इ. स. १९६९ मध्ये बँकांचे राष्ट्रीयीकरण झाल्यानंतर ग्रामीण भागात बँक व्यवसायाचे विकेंद्रीकरण होऊ लागले व इतर जिल्ह्यांप्रमाणेच राष्ट्रीयीकृत बँका व सहकारी बँकांच्या शाखा व त्यांचे व्यवहार नांदेड जिल्ह्यात सुद्धा वाढू लागलेले दिसून येतात.

## पार्श्वभूमी

भारतीय कृषी अर्थव्यवस्थेचा मोठा दोष म्हणजे शेतकऱ्याच्या डोक्यावर असलेले कर्जाचे ओझे. सुगीच्या दिवसांतच काय ते शेतकऱ्याजवळ पैसे असतात. सुगीच्या दिवसांत असलेल्या भावानेच

त्याला आपला माल विकावा लागतो. बऱ्याच वेळी त्याची प्राप्ती गरजांच्या मानाने फार कमी असते. शेतीला लागणारा खर्च, शेतकऱ्याची कौटुंबिक व सामाजिक जबाबदारी, इत्यादी परिस्थितीमुळे अनिवार्य असलेला खर्च त्यास करावाच लागतो. परिस्थितीने गांजून इतर सर्व मार्ग संपल्यावर त्यास सावकाराकडे जावे लागते. वाढत्या कर्जाने शेतकऱ्यांची परिस्थिती अतिशय नाजूक होते. शेतकऱ्याचे कर्ज हा जसा आर्थिक तसाच सामाजिक प्रश्न झालेला आहे. शेतकऱ्यांच्या परिस्थितीत सुधारणा व्हावी म्हणून सरकारकडून तगाई मिळत आहे, परंतू ती फारच कमी व अवेळी मिळे, व्यापारी बँका सुद्धा शेतकऱ्यांना कर्ज देत नसत आणि त्यामुळे निरुपायास्तव त्यांना सावकाराचे उंबरठे झिजवावे लागत. अशा अशिक्षित व कर्जात बुडालेल्या शेतकऱ्याला त्यातून वर काढण्यासाठी सहकाराशिवाय अन्य मार्ग नव्हता. त्यातूनच शेती विकासासाठी कर्जे व पैसा उपलब्ध करून देण्याकरिता व सावकारी पाशातून त्याची सोडवणूक करण्यासाठी सहकारी पतपुरवठा संस्थांचा उगम झाला. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस ग्रामीण कर्ज समस्येने उग्र रुप धारण केले. इ. स. १८८९ मध्ये निजाम राजवटीने हैद्राबाद सहकारी अधिनियम अंमलात आणला तथापि या कायद्याने देशातील इतर राज्यातही मल्टी युनिट को-ऑपरेटिव्ह सोसायटीज ॲक्ट नुसार संस्थाची नोंदणी अनेक राज्यासाठी एक या तत्त्वानुसार केली जाऊ लागली, अशा नोंदविलेल्या संस्थांची देखरेख, चौकशी, तपासणी इत्यादी बाबत अनेक अडचणी येऊ लागल्याने त्यावेळच्या निजाम सरकारने सावकाराच्या जाचातून शेतकऱ्याची सुटका व्हावी व शेतकऱ्यांना ग्रामीण पतपुरवठा संस्थांद्वारे आर्थिक मदत मिळावी या हेतूने हिंदुस्थान सरकारच्या १९१२ च्या सहकारी कायद्याचे अनुकरण करून स्वतःचा १९२४ चा सहकारी संस्थांचा कायदा मंजूर केला. त्याचीच परिणीती इ. स. १९२३ मध्ये नांदेड जिल्ह्यात मध्यवर्ती बँकेच्या स्थापनेत झाली.

मराठवाड्यातील औरंगाबाद, बीड, परभणी, उस्मानाबाद व नांदेड हे पाच जिल्हे १९४८ पर्यंत हैद्राबाद राज्यात समाविष्ट होते. १९०४ मध्ये ब्रिटिश भारतात पहिला "को.-ऑपरेटिव्ह सोसायटीज ॲक्ट" अन्वये सहकारी चळवळ सुरू झाली होती. परंतु हैद्राबाद राज्यात मात्र ह्या कायद्याचा अंमल १९१४ मध्ये सुरू करण्यात आला. ब्रिटिश भारतातील शेतकऱ्यांप्रमाणेच हैद्राबाद राज्यातील शेतकऱ्यांचे जीवन अत्यंत हलाखीचे होते. लागवडीखालील जमिनीचे बहुतांश क्षेत्र जिराईतच होते. येथील शेती निसर्गाच्या लहरींवर अवलंबून असल्याने शेतकऱ्यांचे जीवन अत्यंत हलाखीचे होते. वारंवार पडणाऱ्या ओल्या किंवा कोरड्या दुष्काळामुळे शेतकऱ्यांवर दुर्दैवी प्रसंग येत होते. त्यांच्या डोक्यावरील सावकारी कर्जाचे ओझे दिवसेंदिवस वाढतच होते. त्यामुळे शेतीत झालेले उत्पन्न खळ्यावरूनच सावकाराच्या घरी जात असे आणि पारतंत्र्यामुळे शेतकऱ्यांच्या गाऱ्हाण्यांची फारशी दखलही घेतली जात नसे. असे असले तरीसुद्धा भारतात सुरू झालेल्या सहकारी चळवळीप्रमाणेच हैद्राबाद राज्यातील सहकारी चळवळीची सुरूवातही शासनाच्या पुढाकारानेच सुरू झाली. शेतकऱ्यांचे व जनसामान्यांचे जीवनमान सुधारण्याच्या उद्देशाने निजामी राजवटीत १९१४ मध्ये सहकार चळवळ सुरू झाली. १९१४ ते १९२९ पर्यंतच्या काळात ह्या सहकारी चळवळीची लक्षणीय प्रगती झाली. १९१५ मध्ये पहिली सहकारी मध्यवर्ती बँक हैद्राबाद येथे सुरू झाली आणि जिल्हा बँकांना मदत करण्यासाठी १९२५ साली डोमेनियम बँकेची स्थापना झाली. परंतु १९३० ते १९३५ ह्या कालखंडात कृषी उत्पादनांचे

भाव एकसारखे घसरत गेल्यामुळे आणि जागतिक युद्धजन्य परिस्थितीमुळे आर्थिक मंदिची लाट आल्यामुळे सहकारी चळवळीवर त्याचा परिणाम झाला. शेतकऱ्यांना कर्जे डोईजड झाली आणि वसुलीच्या प्रमाणात घट झाली. त्यामुळे आर्थिक मंदित सापडलेल्या सहकार चळवळीची पुनर्रचना करण्याचे प्रयत्न १९३६ ते १९४४ ह्या काळात झाले. सरकारी अर्थसहाय्य मिळूनही आणि पत पुरवठ्यात वाढ होऊनही शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा कमी झाला नाही.[१]

हैद्राबाद राज्यातील निजामी राजवटीतील मराठवाड्यातील सहकारी चळवळ १९१७ मध्ये सुरू झाली ती प्रथम औरंगाबाद आणि नांदेड जिल्ह्यात. नांदेड जिल्ह्यात या चळवळीचा उदय २३ जून १९२३ मध्ये मध्यवर्ती बँकेच्या स्थापनेने झाला. त्यानंतर १९३८ साली ग्रामीण बँका (Rural Bank) स्थापन करण्यात आल्या. ह्या ग्रामीण बँकांचे क्षेत्र १५ गावापासून ते ३०-४० गावाएवढे प्रचंड असे. या अवाढव्य क्षेत्रांमध्ये सभासदांना दिलेल्या कर्जावर वसुलीचे दृष्टिने नियंत्रण ठेवणे अशक्य झाले. त्याचा परिणाम म्हणून ह्या काळात शेतकी पत पेढ्याकडील कर्जे फार मोठ्या प्रमाणांत थकीत झाली. ही थकबाकी ८० टक्के (त्यावेळी भारतातील इतर राज्यात हे प्रमाण सरासरी ५० टक्के ऐवढे होते) पर्यंत वाढली होती.[२]

१९५६ मध्ये झालेल्या राज्य पुर्नरचनेनंतर मराठवाड्यातील वरील पाच जिल्हे मुंबई राज्यात विलीन झाले आणि पुढील काही वर्षातच मराठवाड्याबरोबरच ह्या जिल्ह्यातील सहकारी चळवळीचा विकास झाला. पुढील भागात याचा विस्ताराने शोध घेतला आहे.

### सावकारी व्यवसाय

ऋणको आणि धनको यांचे अस्तित्त्व फार पूर्वीपासूनचे आहे. त्याचा पुरावा प्राचीन शिलालेखांत तसेच ऐतिहासिक दस्तऐवजांत मिळतो. तत्कालीन हैद्राबाद राज्यात सुद्धा मोठे सावकार असल्याचे पुरावे मिळतात. त्या काळात सावकारी व्यवसायास संघटीत स्वरूप नव्हते. तरी देखील खेडी व शहरे यामधील शेतकऱ्यांच्या व नागरिकांच्या व्यवसायिक व वैयक्तिक कर्जाबाबतच्या गरजा सावकाराकडून भागविल्या जात होत्या. पूर्वीसुद्धा सावकारांचे संघ (Guild) असल्याचे पुरावे सापडतात. आज पतपुरवठा करणाऱ्या अनेक लहानमोठ्या सहकारी संस्था खेड्यापाड्यांतून व शहरातून स्थापन झालेल्या दिसून येतात. तरीसुद्धा परंपरागत व्यवसाय करणारे सावकार आणि सराफी पेढीवालेही आढळतात. हे सावकार व सराफी पेढीवाले लोकांना किंवा राजेरजवाडे यांना कर्जपुरवठा करीत असत व त्याचबरोबर ते सरकारचा महसूल गोळा करीत, नाणी बदलून देणे, नाणी पाडणे, शेतीसाठी शेतकऱ्यांना पैसा उपलब्ध करून देणे ही कामेही करीत असत. जे सावकार हुंड्या वटविण्याचे काम करीत त्यांना सराफी पेढीवाले असेही म्हणत असत. अशा सराफी पेढीवाल्यांची संख्या घटल्याचे दिसून येत असले तरीसुद्धा सावकारी व्यवसाय करणाऱ्यांची संख्या बरीच असल्याचे आढळून येते. पूर्वी सावकाराकडून दर महिन्याला व्याज आकारले जाई. मोठ्या उलाढालीत व्याजाचा दर कमी असला तरी काही वैयक्तिक स्वरूपाच्या कर्जासाठी हा दर दरसाल २४ ते ३० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त असे. बऱ्याच वेळा वस्तू व दागिने तारण म्हणून गहाण ठेवावे लागत. शेतकऱ्यांना पावसाळ्याच्या सुरूवातीस कर्जाऊ स्वरूपात धान्य देऊन सावकार त्याची परतफेड पीक

१. सुवर्ण महोत्सवी वर्ष, **स्मरणिका**, दि. नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, नांदेड, १९८०-१९८१.

२. कित्ता.

आल्यावर करून घेई. या व्यवहारात दिलेल्या कर्जाऊ धान्याच्या एक-चतुर्थांश अधिक धान्य व्याज म्हणून आकारले जात असे.

१९ व्या शतकाच्या तिसऱ्या दशकामध्ये तत्कालीन निजाम (हैद्राबाद) सरकारने ग्रामीण भागात अधिकोश उपलब्धतेसाठी बऱ्याच चौकश्या केल्या तसेच हैद्राबाद सरकारने ग्रामीण भागाची आर्थिक पहाणी केली असता, ग्रामीण भागात सावकारांचे प्राबल्य असल्याचे आढळून आले. नांदेड जिल्ह्यात १९३१ मध्ये २,२१३ लोक सावकारी व्यवसाय करीत होते. सावकाराकडून कर्ज घेणाऱ्यांत बहुसंख्य शेतकरी असत. धार्मिक विधी, लग्न कार्य, बि-बीयाणे, बैल व दैनंदिन गरजेच्या वस्तू खरेदीसाठी शेतकऱ्यांना नेहमीच सावकाराकडून कर्ज घ्यावे लागत असे. वस्तुतः सावकार खेड्यांतील लोकांच्या विविध गरजा भागवित असे. बहुधा सावकार हे धान्याचा व्यापारही करीत असत. अडचणीच्यावेळी ते धान्याचे वाटप करून लोकांना मदतही करीत असत. अवर्षण व दुष्काळी परिस्थितीत शेतकरी जमीन तारण ठेवून सावकाराकडून कर्ज घेत असे व धान्य कापणीच्या वेळी (सुगीत) घेतलेले कर्ज परत करीत असे. परंतु शेतकऱ्यांनी घेतलेली अशी कर्जे त्यांना परत करणे शक्य होत नसे. त्यामुळे अशी कर्जे शेतकऱ्यांवर परंपरागत असत. त्यामुळे ग्रामीण भागातील शेतकरी कर्जबाजारी झाला होता. संस्थानी राजवटीत सरकारचे शेतकऱ्यांना कोणत्याच प्रकारचे संरक्षण नसल्यामुळे सावकार सक्तीने व गैरमार्गाने कर्ज वसूल करीत असत. त्यामुळे शेतकऱ्यांची परिस्थिती फारच बिकट झाली होती. म्हणून शेतकऱ्यांची गाऱ्हाणी दूर करण्यासाठी व सावकारांच्या व्यवहारात सुसूत्रता आणण्यासाठी हैद्राबाद सरकारने १९३९ (फसली १३४९) मध्ये हैद्राबाद सावकार अधिनियम अमलात आणला (" दस्तूर उलमल खराज डेहेडागाव " म्हणून हा अधिनियम प्रसिद्ध आहे.) त्यानुसार प्रत्येक सावकारास तहसील कार्यालयातून सावकारी व्यवसायाचा परवाना घेणे अनिवार्य करण्यात आले. त्यासाठी त्यांना रुपये २५ परवाना फी भरावी लागत असे. परवाना देणे, परवान्याचे नूतनीकरण करणे, खाते पुस्तिका तपासणे इत्यादी बाबी महसुलदार किंवा महसूल अधिकाऱ्यांच्या अखत्यारित येत असे.[३]

परवाना अधिकाऱ्याला सावकाराची लेखी पुस्तके तपासण्याचे अधिकार दिलेले होते. प्रत्येक सावकाराने कर्जदाराला दिलेली कर्जे, परत केलेली रक्कम, शिल्लक देणे रक्कम, इत्यादीबाबत कोणत्याही प्रकारचा तपशील विलंब न लावता देण्याची तरतूद होती. वरील अधिनियमानुसार तारणावरील कर्जाचा व्याज दर ९ टक्के आणि विनावितरणावरील कर्जाचा व्याज दर १२ टक्के होता. त्यापेक्षा जास्त व्याज आकारण्यावर प्रतिबंध घातला होता. कायद्यानुसार गैरप्रकारांना दंड व शिक्षेची तरतूद होती.[४]

मराठवाडा महाराष्ट्र राज्यात विलीन करण्यात आल्यानंतर मराठवाड्यातील अन्य जिल्ह्यांबरोबरच नांदेड जिल्ह्यालासुद्धा फेब्रुवारी, १९६० पासून १९४६ सालचा मुंबई सावकारी अधिनियम (१९४७ सुधारित अधिनियम क्र. ३१ साहित) लागू करण्यात आला.

अनधिकृतरित्या चालविल्या जाणाऱ्या सावकारी व्यवसायावर परिणामकारक प्रतिबंध घालण्यासाठी १९४६ च्या मुंबई सावकारी अधिनियम व सुधारित अधिनियमात जुलै, १९७६ आणि जुलै, १९७७ मध्ये

---

३. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, १९७१, पृ. ८४-८५.

४. **परभणी जिल्हा गॅझेटिअर**, १९८८, पृ. २४८.

दोन वेळा दुरूस्त्या करून त्या अंमलात आणलेल्या आहेत. १९६०-६१ मध्ये नांदेड जिल्ह्यात अधिकृत सावकारांची संख्या १०९ होती. त्यांनी एकूण ६,८२,४७१ रूपये कर्ज दिले होते. त्यापैकी व्यापाऱ्यांना २,५८,१४८ रूपये तर बिगर व्यापाऱ्यांना ४,२४,३२३ रूपये कर्जाऊ रक्कम दिली होती.

जिल्ह्यात कृषी पतपुरवठा करणाऱ्या सहकारी संस्था, व्यापारी व सहकारी बँका खेडोपाडी सुरू झाल्यामुळे बहुसंख्य शेतकऱ्यांच्या आर्थिक गरजा वरील संस्थामार्फत भागविल्या जाऊ लागल्या आहेत. तसेच सावकारी अधिनियमात केलेल्या बदलामुळे ऋणकोवर होणारा जाचही कमी झाला आहे. तसेच सावकारातर्फे गहाण व्यापार कर्जावर व बिगरगहाण कर्जावर पूर्वी आकारले जाणारे व्याज दर व कायद्याने बंधन आणल्यानंतर आकारले जाणारे व्याज दर ह्यात बरीच तफावत पडली. पूर्वी हा दर २४ ते ३० टक्के होता, तर १९७६-७७ मध्ये हा दर १८ ते २० टक्के होता.

सन २००२-२००३ मध्ये नांदेड तालुक्यात परवानाधारक सावकारांची एकूण संख्या ५५ होती. त्यांनी १,९५,२८ हजार रूपये व्यापारी कर्जे तर देगलूर तालुक्यात त्या वर्षी फक्त १२ अधिकृत सावकार होते त्यांनी ३,७८१ हजार रूपये बिगर व्यापारी कर्जे दिली होती. सन २००५-२००६ मध्ये जिल्ह्यातील अधिकृत सावकारांनी व्यापारी कर्जे दिल्याचे दिसून येत नाही परंतु त्यांनी बिगर व्यापारी कर्जे दिल्याचे खालील माहितीवरून दिसून येते. त्यावर्षी किनवट तालुक्यात एकही अधिकृत सावकार नव्हता. सन १९९०-९१, १९९५-९६, १९९९-२०००, २००४-२००५ व २००५-२००६ या वर्षातील जिल्ह्यातील सावकारी व्यवसायाची उपलब्ध झालेली माहिती खाली दिली आहे.

(रूपये हजारांत)

| तालुके | वर्ष | परवानाधारक सावकार (संख्या) | त्यांनी दिलेली कर्जे | |
|---|---|---|---|---|
| | | | व्यापारी | बिगर व्यापारी |
| नांदेड | १९९०-९१ | ३० | १,४८,३७ | ५६,७४ |
| | १९९५-९६ | १९ | ८,३६ | - |
| | १९९९-२००० | २२ | ५३,७८ | ७०,८३ |
| | २००४-२००५ | ७२ | - | ३,३३,६२ |
| | २००५-२००६ | ९० | - | ४,३९,७० |
| हदगाव | १९९०-९१ | ३ | - | - |
| | १९९५-९६ | - | - | - |
| | १९९९-२००० | - | - | - |
| | २००४-२००५ | १ | - | - |
| | २००५-२००६ | ३ | - | ८,२० |

Maharashtra State Gazetteers

(रूपये हजारांत)

| तालुके | वर्ष | परवानाधारक सावकार (संख्या) | त्यानी दिलेली कर्जे | |
|---|---|---|---|---|
| | | | व्यापारी | बिगर व्यापारी |
| भोकर | १९९०-९१ | ३ | - | ११,०० |
| | १९९५-९६ | - | - | - |
| | १९९९-२००० | - | - | - |
| | २००४-२००५ | १ | - | - |
| | २००५-२००६ | ४ | - | १०,०० |
| बिलोली | १९९०-९१ | १ | - | २०,०० |
| | १९९५-९६ | २ | ६० | - |
| | १९९९-२००० | २ | १४,१५ | ६४ |
| | २००४-२००५ | २ | - | १४,२९ |
| | २००५-२००६ | ४ | - | २८,१० |
| देगलूर | १९९०-९१ | १० | १५७,३१ | - |
| | १९९५-९६ | १७ | ७२७,५७ | - |
| | १९९९-२००० | १४ | ६५,२२ | २,६९,४९ |
| | २००४-२००५ | १२ | - | १४,२१ |
| | २००५-२००६ | १६ | - | २०,७० |
| मुखेड | १९९०-९१ | २ | - | - |
| | १९९५-९६ | २ | ३४,६७ | - |
| | १९९९-२००० | ३ | - | ११,५९ |
| | २००४-२००५ | १६ | - | १४,२१ |
| | २००५-२००६ | २३ | - | २,१८,०० |
| कंधार | १९९०-९१ | ५ | २३५ | - |
| | १९९५-९६ | - | - | - |
| | १९९९-२००० | - | - | - |
| | २००४-२००५ | २ | - | १२,३१ |
| | २००५-२००६ | १२ | - | १,७५,३० |

Maharashtra State Gazetteers

(रूपये हजारात)

| तालुके | वर्ष | परवानाधारक सावकार (संख्या) | त्यानी दिलेली कर्जे | |
|---|---|---|---|---|
| | | | व्यापारी | बिगर व्यापारी |
| लोहा | १९९०-९१ | - | - | - |
| | १९९५-९६ | - | - | - |
| | १९९९-२००० | - | - | - |
| | २००४-२००५ | १४ | - | २०,११ |
| | २००५-२००६ | ९ | - | २८,५० |
| हिमायत नगर | २००२-२००३ | २ | १,९५ | - |
| मुदखेड | १९९९-२००० | १ | ७८ | - |
| | २००२-२००३ | १ | - | - |
| उमरी | २००२-२००३ | १ | ९७ | - |
| धर्माबाद | २००२-२००३ | १ | - | ३४,३४ |
| नायगाव | १९९९-२००० | १ | - | - |
| | २००२-२००३ | २ | १८,२२ | - |

**कर्जमुक्तीसाठी केलेले प्रयत्न :—** सावकारी धंद्यावर सरकारचे नियंत्रण येईपर्यंत सावकार आणि शेतकरी यांच्यातील संबंध तणावपूर्ण होते. त्यातून अनेकदा पेच उद्‌भवले. त्यातूनच १८७५-७६ चे दख्खनमधील दंगे (Deccan Riots) या नावाने प्रसिद्ध असलेला प्रचंड उद्रेक निर्माण झाला होता. या दंग्याचे स्वरूप भयानक होते. त्याचे लोकांच्या जीवनावर अतिशय प्रतिकूल आर्थिक व सामाजिक परिणाम झाले. शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा कमी व्हावा त्यांच्या जमिनी व मालमत्ता यावर सावकारांकडून जप्ती आणली जावू नये म्हणून ब्रिटीश सरकारने १८९० मध्ये डेक्कन ॲग्रीकल्चर डेट रिलिफ ॲक्ट संमत केला. मात्र निजामाच्या राज्यात विसाव्या शतकाच्या सुरूवातीपर्यंत स्वतंत्र कृषी खाते नसल्यामुळे असा कायदा निजाम सरकारने केला नाही. मुंबई सरकारने १९३९ मध्ये मुंबई कृषी कर्ज निवारण अधिनियम संमत केला. हा कायदा नांदेड जिल्ह्यास मराठवाड्याचे महाराष्ट्रात विलीनीकरणानंतर लागू करण्यात आला. इ. स. १९७५ मधील महाराष्ट्र राज्य कर्जमुक्ती वटहुकुमाच्या अंमलबजावणीस सुरूवात झाली. तसेच महाराष्ट्र शासनाने १९८० मध्ये लहान शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची योजना राबविली.

सामाजिक व आर्थिक परिवर्तनाचे महत्त्वाचे साधन म्हणून सहकारी चळवळीचा स्विकार करण्यात आला असून ही चळवळ म्हणजे समाजाचे दारिद्र्य दूर करणारी, समानता प्रस्थापित करणारी, दुर्बलांना सबळ बनविणारी समाज परिवर्तनाची मोहीम आहे. समाजातील दुर्बल घटकांचा विकास करणे हा या

चळवळीचा मुख्य हेतू असून लहान शेतकऱ्यांना प्राथमिक सेवा सहकारी संस्थामार्फत शेती उत्पादनांसाठी अल्पमुदती कर्ज पुरवठा करण्यात येतो. एका वर्षातील शेती उत्पादनासाठी होणाऱ्या पीक कर्ज वाटपापैकी किमान १५ ते २० टक्के कर्ज पुरवठा अल्पभूधारकांना व्हावा, अशा प्रकारचे रिझर्व्ह बँकेचे बंधन जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकावर आहे. त्याखेरीज रिझर्व्ह बँकेकडून जिल्हा सहकारी बँकाना " पूल्ड रेट स्कीम " खाली कर्ज पुरवठा होत नाही. या बंधनामुळे जास्तीत जास्त अल्पभूधारक खातेदारांना प्राथमिक सेवा सहकारी संस्थांचे सभासद करून घेऊन त्यांना कर्ज पुरवठा करण्यात आला. लहान शेतकऱ्यांची शेती लहान असल्याने ती आर्थिक दृष्ट्या परवडणारी नाही म्हणून त्यांना पूरक धंदा उपलब्ध करून देवून त्यांचा आर्थिक विकास करण्यासाठी शासनाने अल्पभूधारक आणि शेतमजूर यांचा आर्थिक विकास साधण्याच्या दृष्टीने प्रत्येक जिल्ह्यात अल्पभूधारक विकास संस्था (SFDA) स्थापन केल्या. या संस्थामार्फत अल्पभूधारकांना २५ टक्के व अत्यल्पभूधारक व शेतमजुरांना ३३ टक्के अर्थसहाय्य (सबसिडी) देण्यात येते. अशा सर्व लहान व अतिलहान शेतकऱ्यांना व शेतमजुरांना प्राथमिक सेवा सहकारी संस्था, राष्ट्रीयकृत बँका आणि विशेषतः ग्रामीण बँकेमार्फत (RRBS) विविध कारणांसाठी कर्ज पुरवठा करण्यात येऊ लागला. कर्ज पुरवठ्याचा दर अल्पभूधारकांना ७ टक्के (११ टक्क्याऐवजी) इतका ठेवण्यात आला; व त्याप्रमाणे कर्जपुरवठाही करण्यात आला परंतु त्यांचा आर्थिक विकास झाला नाही. उलट ते कर्जबाजारी झाले. त्यांच्याकडील मुद्दल व व्याज सारखेच झाले. अशा परिस्थितीतून त्यांना बाहेर काढून त्यांना पुन्हा शेतीउत्पादनासाठी व पुरक धंद्यासाठी नवीन कर्जे उपलब्ध करून देऊन त्यांची आर्थिक स्थिती नव्याने सुधारण्याच्या दृष्टिने राज्य शासनाने १९८० मध्ये अल्पभूधारकांकडील जून, १९७९ अखेरची पीक कर्जाची मुद्दल थकबाकी आणि त्यावरील संपूर्ण संचित व्याज माफ करण्याचे धोरण जाहीर करून त्याप्रमाणे अंमलबजावणीही केली.[५]

इ. स. २००७ मध्ये महाराष्ट्र शासनाने सावकारी व्यवसायाचे प्रभावी नियमन करण्यासाठी जिल्हाधिकारी स्तरावर जिल्हास्तरीय समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. राज्यातील शेतकऱ्यांच्या सामाजिक, आर्थिक व मनोवैज्ञानिक अभ्यासासाठी शासनाने इंदिरा गांधी इन्स्टिट्यूट ऑफ डेव्हलपमेंट रिसर्च या संस्थेची नियुक्ती केली होती. त्यानुसार सावकारी कर्जाचे आवश्यक नियमन ही एक महत्त्वपूर्ण उपाययोजना करण्यात आली. या उपाययोजनेनुसार राज्यातील सर्व जिल्ह्यांतील मान्यताप्राप्त नसलेल्या सावकारांकडून घेण्यात आलेली सर्व कर्जे बेकायदेशीर असल्याने त्या कर्जाची परतफेड करणे संबंधित शेतकऱ्यांवर बंधनकारक नाही व सदर कर्जातून सर्व शेतकऱ्यांना पूर्णपणे मुक्त करण्यात आले. आतापर्यंत २८२१ प्रकरणांमध्ये कार्यवाही करून ६३४ गुन्हे दाखल केले. ६० शेतकऱ्यांची ११५ हेक्टर ७४ गुंठे जमीन परत शेतकऱ्यांच्या ताब्यात दिली, २८७ शेतकऱ्यांना २५०.३३ लाख कर्जमुक्ती दिली.[६]

सन १९७५ मधील महाराष्ट्र राज्य वटहुकुमाच्या अंमलबजावणीस सुरूवात झाल्यापासून १९७९ अखेर अनेक शेतकऱ्यांना कर्ज निवारणाचा फायदा मिळाला. बहुसंख्य अल्पभूधारकांकडे शासन, सहकारी संस्था किंवा बँका यांचेपैकी कोणाचे तरी कर्ज असे. त्यामुळे त्यांना नवीन कर्ज घेताना अडचणी येऊ

---

५. नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, सुवर्ण महोत्सवी वर्ष **स्मरणिका**, १९८०-८१.

६. लोकराज्य, एप्रिल २००७, पृष्ठ ४-५.

लागल्या व कृषी विकासाची गती मंद झाली. त्यावर उपाय म्हणून शासनाने १९८० मध्ये अल्पभूधारकांसाठी कर्जमाफीची योजना राबविली. त्याद्वारे शासनाने राज्यातील अल्पभूधारकांना सुमारे ४८ कोटी रुपयांची कर्जमाफी दिली. ही योजना शासनाच्या कृषी व सहकार विभागातर्फे राबविण्यात आली त्यानुसार पाच एकरापर्यन्त कोरडवाहू जमीन असलेले व ज्याचे वार्षिक उत्पन्न २,४०० रुपयांपेक्षा जास्त नाही अशा अल्पभूधारकांकडे ३० जून १९७९ पर्यंत असलेली थकीत कर्जे माफ करण्याची योजना आखण्यात आली. सन १९८० च्या कृषी कर्जमाफीनंतर १९८८ पर्यन्त अनेक शेतकऱ्यांकडे प्राथमिक सहकारी संस्था व बँकांचे कर्ज थकल्यामुळे पुन्हा पूर्ववत स्थिती निर्माण झाली व शेतकऱ्यांना विकासासाठी आणखी कृषी कर्ज मिळणे दुरापास्त झाले. म्हणून शासनाने १९८८ मध्ये थकबाकी पुनर्गठन योजना अंमलात आणली. त्यानुसार कृषी कर्ज माफ न करता शेतकरी भरू शकेल असे थकीत कर्जाचे मुद्दल व व्याजाचे हप्ते पाडण्यात आले. यामुळे पहिला हप्ता भरल्यावर त्यास प्राथमिक सहकारी संस्था व सहकारी संस्था व सहकारी बँकाकडून शेती विकासासाठी पर्याप्त कर्ज मिळण्याची सुविधा प्राप्त झाली.

जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी १९९९ मध्ये शासनाकडून कर्जमाफी जाहिर झाली. त्यानुसार जिल्ह्यातील ९६७ संस्थांचे १,४९,१२६ सभासदांना रूपये ३६३४.७८ लाख इतक्या रक्कमेची कर्जे माफ झाली. त्यामुळे जुन्या थकबाकीदारांना फार मोठ्या प्रमाणात दिलासा मिळाला. कर्ज माफी रूपांतरादी सवलती मिळाल्याने शेती कर्जास पात्र झालेल्या सभासदांना पुनः कर्ज वाटप करून त्यांच्या शेती विषयक गरजा भागविण्याचा प्रयत्न करण्यात आला.[७]

३१ मार्च २००६ मध्ये जिल्ह्यातील २,०२,४४८ सभासदांना २३,९५९.१४ हजार रूपये कर्ज वाटप करण्यात आले होते.

## सहकारी चळवळ

शेकऱ्यांच्या डोक्यावर नेहमीच कर्जाचा बोजा असे. हा कर्जाचा बोजा वाढण्यास सावकाराइतकाच स्वतः शेतकरीसुद्धा जबाबदार होता. शेकऱ्यांना पैशांची नेहमीच अडचण भासत असे. त्यामुळे सावकारांकडून त्यांना कर्ज घेतल्याशिवाय तरणोपाय नव्हता. त्यासाठी त्यांना दामदुपटीचे भरमसाठ व्याज ते फेडता न आल्यामुळे कर्जापोटी जमीन गमाविण्याची पाळी येत असे. अशाप्रकारे अनेक मार्गांनी सावकारांकडून शेतकऱ्यांची पिळवणूक होत असे. सुगीच्या दिवसातच काय ते शेतकऱ्याजवळ पैसे असत. सुगीच्या दिवसात आलेल्या भावानेच त्यास आपला माल विकावा लागत असे. अल्प उत्पन्न, शेतीला लागणारा खर्च, शेतकऱ्यांची कौटुंबिक व सामाजिक जबाबदारी, इत्यादी परिस्थितीमुळे अनिवार्य असलेला खर्च त्यास करावाच लागे. त्यामुळे आर्थिक परिस्थितीने गांजलेल्या शेतकऱ्यास इतर मार्ग संपल्यावर सावकाराकडेच जावे लागत असे. वाढलेल्या कर्जामुळे शेतकऱ्यांची परिस्थिती अत्यंत नाजूक असे. शेतकऱ्यांचे कर्ज हा जसा आर्थिक तसाच सामाजिक प्रश्न झालेला होता. त्याच्या परिस्थितीत सुधारणा व्हावी म्हणून सरकारकडून तगाई मिळत असे. परंतु ती फारच कमी व अवेळी मिळे. व्यापारी बँका सुद्धा शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करीत नसत. त्यामुळे निरुपाय म्हणून त्यांना सावकारांकडे जावे लागत असे. अशा परिस्थितीत सुशिक्षित व कर्जात बुडालेल्या शेतकऱ्यांना त्यातून बाहेर काढण्यासाठी सन १८९५ मध्ये फ्रेड्रीक निकोलसन

७. नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, ६८ वा **वार्षिक अहवाल**, १९९०-९१, पृ. २.

(Frederik Nicholson) याने सहकारी संस्था स्थापन करण्याचा मार्ग सुचविला होता. तसेच सन १९०१ मध्ये दुष्काळी आयोगानेही सहकारी पतसंस्था स्थापन करण्याबाबत सुचविले होते. त्यानुसार १९०४ मध्ये " को. ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी ॲक्ट " पास करण्यात आला. त्यानंतर इ. स. १९१२ मध्ये त्या कायद्यात सुधारणा करण्यात आली.

वरील अधिनियमानुसार नांदेड जिल्ह्यातील भोकर तालुक्यात अबदुल्लापूर येथे " ॲग्रिकल्चरल को ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी " (१३३५ फसली) सन १९२५ मध्ये स्थापना झालेली जिल्ह्यातील पहिली सहकारी संस्था होय. परंतु जिल्ह्यात सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेची स्थापन झाल्यानंतरच खऱ्या अर्थाने सहकारी चळवळीस चालना मिळाली. अशा प्रकारच्या बँक नांदेड व देगलूर येथे स्थापन झाल्या. सहकारी संस्थाचा विकास व्हावा या हेतूने को-ऑपरेटिव्ह क्रेडिट बँकानी शेतकऱ्यांना कर्जपुरवठा केला होता. परंतु त्याची परतफेड न झाल्याने काही वर्षे सहकारी चळवळीच्या विकासास खिळ बसली होती. म्हणून सहकारी चळवळ सरकारी नियंत्रणाखाली आणावी या हेतूने सरकारने सेंट्रल को-ऑपरेटिव्ह युनियनची स्थापना केली व त्यामार्फत ग्रामीण भागात सहकारी चळवळीचा प्रसार केला. शहरी भागात ही चळवळ चांगलीच रूजली होती.

सन १९४२-४३ मध्ये सरकारने धान्याच्या खुल्या व्यापारावर नियंत्रण घालून तालुका को-ऑपरेटिव्ह डेव्हलपमेंट युनियन स्थापन केल्या आणि या संस्थांना हैद्राबाद कमर्शियल कॉर्पोरेशन या एकमेव अभिकर्ता संस्थेद्वारे जीवनावश्यक वस्तुंचा पुरवठा करण्यात येऊ लागला. त्यानंतर या संस्थेचे तालुका ॲग्रिकल्चर को-ऑपरेटिव्ह असोसिएशनमध्ये रूपांतर करून हैद्राबाद ॲग्रिकल्चर को-ऑपरेटिव्ह असोसिएशन या शिखर संस्थेशी संलग्न केल्या. परंतु धान्य पुरवठ्यावरील सरकारचे नियंत्रण शिथिल करूनही सहकारी खरेदी विक्री चळवळ यशस्वी झाली नाही.

सन १९४३-४४ मध्ये जिल्ह्यात धान्य बँका स्थापन करण्याबाबत चळवळ सुरू करण्यात आली व खेड्यांतील प्रत्येक जमीन मालक शेतकऱ्याला धान्य बँकेचे सभासद करून घेण्यात आले. १९४७ मध्ये नांदेड जिल्ह्यात अशा बँकांची संख्या ५४७ होती. या धान्य बँका काही काळानंतर अवसायानात निघाल्यामुळे १९५८ मध्ये त्या बंद करण्यात आल्या.[८] असे असले तरी सुद्धा सहकारी चळवळीस चालना देण्याचे प्रयत्न चालूच होते. याच वेळी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेने आपल्या अधिनियमात सुधारणा करून डिस्ट्रिक्ट को-ऑपरेटिव्ह बोर्ड स्थापन केले व खेड्यापाड्यांतून सहकारी चळवळीचा प्रचार करून तालुका को-ऑपरेटिव्ह युनियन स्थापन करून विभागवार गट सचिवांच्या नियुक्त्या करण्यात आल्या. त्यानंतर तालुका सहकारी संघटनांचे खरेदी-विक्री सोसायटी असे रूपांतर करण्यात आले आणि शेती माल प्रक्रिया संस्था, औद्योगिक प्रक्रिया सोसायटी, साखर कारखाने व शेती सवलती सोसायट्या इत्यादी विविध सहकारी संस्थांची स्थापना करण्यात आली. या सहकारी संस्थांना सरकारकडून आर्थिक मदतही देण्यात आली. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात सहकारी चळवळीची बरीच प्रगती झाली होती.

---

८. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, १९७१, पृ. २९४.

नांदेड जिल्ह्यात सन १९६२ मध्ये १,५३० विविध सहकारी संस्था होत्या. त्यांची सभासद संख्या १,१७,८७३ व भागभांडवल ७४,२१,८९१ रुपये होते.[९]

पंचवार्षिक योजनेत सहकाराला अग्रक्रम व प्रोत्साहन दिल्यामुळे नांदेड जिल्ह्यातील सहकारी चळवळीस चालना मिळाली. सन १९८१-८२ व १९८५-८६ या वर्षी जिल्ह्यातील सहकारी संस्थांची एकूण संख्या अनुक्रमे २,१०२ व २,५९५ होती. त्या वर्षी त्यांची एकूण सभासद संख्या अनुक्रमे ८.०५ लाख व ३.८५ लाख होती. नांदेड जिल्ह्यात किनवट हा तालुका आदिवासी तालुका म्हणून ओळखला जातो. या तालुक्यात पाच आदिवासी सेवा सहकारी संस्था होत्या. सहकारी चळवळीसाठी सातव्या योजनेत ५.४१ लाख रूपये तरतूद केली होती. त्याची माहिती खालील प्रमाणे १) अल्प व अत्यल्प शेकऱ्यांना व्याज अनुदान ०.६७ लाख रूपये, २) आदिवासी संस्थेचे भाग खरेदीसाठी कर्ज ३.२९ लाख रूपये, ३) बलुतेदार सहकारी संस्थांना शासकिय भाग भांडवल ०.२० लाख रूपये, ४) बुडीत कर्ज राखीव निधी ०.२५ लाख रूपये, ५) जिनिंग प्रेसिंग संस्थांना शासकीय भाग भांडवल १.०० लाख रूपये असे एकूण ५.४१ लाख रुपये खर्च करण्यात आले.[१०]

या जिल्ह्यातील सहकारी चळवळ ही प्रगतीपथावर आहे. यापैकी कांही प्रकारच्या संस्था चांगल्याप्रमाणे कार्यरत असून शेतकरी वर्ग व इतर आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या सभासदांना भरपूर फायदा झाला आहे. पणन कोठार व सहकार या विकास कामासाठी सातव्या योजनेत एकूण ३४.८२ लाख रूपये खर्च झाला. तर आदिवासी, अनुसुचित जाती, नवबौद्ध यांना सहकारी साखर कारखान्यांचे भाग खरेदीसाठी अर्थसहाय्य या योजनेखाली सातव्या योजनेत ७९० लाभार्थीना अर्थसहाय्य देण्यात आले.[११]

जिल्ह्यात सन १९९०-९१, १९९५-९६, १९९९-२००० मध्ये अनुक्रमे ३,१९७, ३८०१ व ३,६१८ विविध प्रकारच्या सहकारी संस्था होत्या. सन २००४-२००५ मध्ये जिल्ह्यात एकूण ३,६५७ सहकारी संस्था, व सभासद ८९२ होते. त्यापैकी कृषी पतसंस्था २६.९० टक्के, बिगर कृषी पतसंस्था ७.५१ टक्के व इतर संस्था ६५.५९ टक्के होत्या. बिगर कृषी संस्थेत प्रामुख्याने नोकर वर्गांच्या पतसंस्थांचा समावेश होता. एकूण संस्थापैकी दुग्धउत्पादन संस्था ५६८ (१५.५३ टक्के), कामगार कंत्राट सहकारी संस्था २८१ (७.६८ टक्के), इतर औद्योगिक संस्था २४६ (६.७३ टक्के), मत्स्यव्यवसाय संस्था ९६ (२.६२ टक्के), ग्राहक भांडार व गृहनिर्माण संस्था ७९६(२१.७७ टक्के) या जिल्ह्यातील प्रमुख संस्था होत. त्याशिवाय जिल्ह्यात १० सहकारी साखर कारखाने व चार सहकारी सूत गिरण्याही आहेत. तसेच जिल्ह्यात (२००५) ८ सहकारी बँका कार्यरत असून त्यांच्या नागरी व ग्रामीण भागात एकूण २३१ शाखा कार्यरत होत्या. जिल्ह्यातील मार्गदर्शी बँकेमार्फत सर्व बँकाना कर्ज वाटपाचे लक्ष्य दिले जाते.

---

९. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर, १९७१**, पृ. २७४.

१०. यथार्थदर्शी योजना, १९९२ ते १९९६-९७ नांदेड जिल्हा नियोजन व विकास मंडळ नांदेड, पृ. १०४.

११. कित्ता, पृ. १०५-१०७.

नांदेड जिल्ह्यात सन १९९०-९१, १९९५-९६, १९९९-२०००, २००१-२००२, २००२-२००३, २००४-२००५ व २००५-२००६ मध्ये अनुक्रमे ३,१९७, ३,८०१, ३,६१८, ३,६७७, ३,५४२, ३,६५७ व ३,८०० एकूण सहकारी संस्था होत्या. सहकारी संस्था व बँकांची वर्गवारी खालील प्रमाणे करता येईल - १) सहकारी बँका, २) प्राथमिक शेतकी पतसंस्था, ३) शेतकी बिगरपतसंस्था, ४) बिगरशेतकी पतसंस्था ५) बिगरशेतकी बिगरपतसंस्था.

**जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक नांदेड :** प्राथमिक सेवा सहकारी संस्थांची जिल्हा पातळीवरील ही संघ संस्था असून जिल्हा बँक सहकारामार्फत विकास कार्याचे नेतृत्व करणारी संघटित अशी सहकारी संस्था आहे. पूर्वी व्यक्तीही प्राथमिक पतपेढ्यांच्या बरोबरीने या बँकेचे सभासद असत. परंतु आता धोरणात बदल झाला असून फक्त प्राथमिक सहकारी संस्थांनी निवडून दिलेले प्रतिनिधी या बँकेचे कामकाज पाहतात.

**नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, नांदेड :** निजाम राजवटीतील मराठवाड्यात सहकारी चळवळ १९१७ मध्ये सुरू झाली ती प्रथम औरंगाबाद व नांदेड जिल्ह्यात. नांदेड जिल्ह्यात या चळवळीचा उदय २३ जून १९२३ मध्ये मध्यवर्ती बँकेच्या निर्मितीनेच झाला. निजाम राजवटीत या बँकेस उर्दूमध्ये " सदर बँक ईमदाद बाहमी महद्द, नांदेड " असे म्हणत असत. या बँकेचे कार्यालय जून्या नांदेडमधील प्रसिद्ध छत्री बंगल्यातील एका खोलीत सुरू झाले. सहकारी चळवळ ही शासनाच्या पुढाकारानेच सुरू झाल्यामुळे त्यावेळच्या पोटनियमानुसार जिल्ह्याचे कलेक्टर हेच बँकेचे पदसिध्द अध्यक्ष असायचे. १९२३ मध्ये या बँकेचे रजिस्ट्रेशन झाल्यानंतर पहिली कार्यकारिणी ही सरकार नियुक्तच होती. बँकेचे दैनंदिन व्यवहार पाहण्यासाठी सरकारी मॅनेजर असत. हिशोब बुके उर्दुतून लिहीली जात असत. पतपेंढ्यांना कर्ज मंजूर करताना त्यांच्या सभासदांची कमाल मर्यादा व जिंदगीची किंमत ठरविण्याची पद्धत शेतसाऱ्यावर आधारित होती. बँकेने मंजूर केलेले कर्ज सभासदांना वाटप करणे, कर्ज वसुली करणे व पतपेढीचे हिशोब लिहिणे ही कामे शासनाचे इन्स्पेक्टर अथवा सुपरवायझर करीत असत. या काळात बँक केवळ संलग्न शेतकी पतपेढ्यांना कर्ज वाटप हा एकच व्यवहार करीत असे.[१२]

बँकेचे पुनर्रचने करण्यापूर्वी या बँकेचे अधिकृत भाग भांडवल २.०० लाख रूपये होते. १९४० नंतर मर्यादित स्वरूपात काही प्रमाणात मुदती ठेवी स्वीकारण्यास बँकेने सुरूवात केली. बचत खात्याचे व्यवहार मात्र मुळीच स्विकारले जात नसत. या काळात एका जिल्ह्यात एकच मध्यवर्ती बँक असावी असे बंधन नव्हते. त्यामुळे नांदेड जिल्ह्यातील महत्त्वाचे ठिकाण असलेले देगलूर येथेही दुसरी स्वतंत्र मध्यवर्ती बँक कार्यरत होती. परंतु नंतर मात्र प्रत्येक जिल्ह्यात एकच मध्यवर्ती बँक असावी व ती जिल्ह्याच्या ठिकाणी असावी या धोरणामुळे देगलूर सहकारी बँकेचे नांदेड येथील मध्यवर्ती बँकेत १९५३-५४ च्या सुमारास विलीनीकरण झाले. त्यावेळेपासून देगलूर बँक नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँकेची पहिली शाखा म्हणून कार्य करू लागली.[१३] बँकांचा व सोसायट्यांचा संपूर्ण कारभार सहकार खात्याचे नियंत्रणाखाली

---

१२. सुवर्ण महोत्सवी वर्ष, **स्मरणिका**, दि. नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक १९८०-८१.

१३. कित्ता.

चालत होता. म्हणून सहकारी चळवळ ही सरकारी चळवळ आहे अशी भावना समाजात दृढमूल झाली होती. त्यामुळे १९५३ मध्ये रिझर्व्ह बँकेने, डोमिनियन बँक (हैद्राबाद स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक), मकरजी बँक, " इमदाद बाहमी हैद्राबाद," मार्फत जिल्हा बँकेस अधिकाधिक कर्ज देण्याची पद्धत अमलात आली.

महाराष्ट्र राज्य पूनर्रचनेपूर्वी या बँकेची फारशी प्रगती झाली नव्हती. १९५६ मध्ये झालेल्या राज्य पुर्नरचनेनंतर मराठवाड्यातील पाच जिल्हे मुंबई राज्यात विलीन झाले आणि या पाच जिल्ह्यांतील सहकारी बँका महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेस संलग्न करण्यात आल्या. त्यानंतर सहकारी चळवळ राबविण्याच्या धोरणात बदल करण्यात येऊन ३ सप्टेंबर १९५८ रोजी पहिले लोकाभिमुख संचालक मंडळ नेमण्यात आले. देगलूर बँकेने १९५८ पर्यंत बँकेची पहिली शाखा म्हणून काम केले. १९५८ च्या जुलै मध्ये किनवट तर ऑक्टोबरमध्ये उमरी, या दोन नवीन शाखा सुरू करण्यात आल्या. १९५९ ते १९६५ या कालावधीत २४ नवीन शाखा सुरू करण्यात आल्या तर १९६६ ते १९७३ च्या बँकेच्या ५० वर्षे पूर्ण होणाऱ्या कालखंडात ४८ शाखा कार्यरत झाल्या होत्या.

जून १९५९ मध्ये बँकेची एकूण सभासद संख्या फक्त ८११ व बँकेचे भाग भांडवल २५.६९ लाख रूपये होते. जून १९५९, जून १९७२ व जून १९८१ या कालावधीत बँकेने केलेल्या प्रगतीचा आढावा खाली दिला आहे.

(रूपये लाखांत)

| तपशील | जून १९५९ | जून १९७२ | जून १९८१ |
|---|---|---|---|
| सभासद संख्या | ८०१ | १,२४५ | १,३३६ |
| वसूल भाग भांडवल | ७.६० | १,२२.२६ | १,७७.६३ |
| निधी | १.६८ | ३७.१८ | १,०४.०३ |
| ठेवी | १६.४१ | ३,१९.२८ | १३,०९.०८ |
| बँकेचे भांडवल | २५.६९ | ४,७८.७२ | १५,९०.७४ |
| बाहेरील काढलेली कर्जे | २१.५३ | ३,७९.५९ | ३,७६.७३ |
| एकूण गुंतवणूक | १.९८ | १,४७.४३ | ४,७६.३४ |
| दिलेली कर्जे | ०.९९ | ४२.७८ | ३,००.३२ |
| खेळते भांडवल | ४८.३६ | ९,२४.८५ | २२,०९.४६ |
| निव्वळ नफा | ०.२२ | १.३० | १.१० |
| शाखा कार्यालय (संख्या) | ६ | ४८ | ७४ |

Maharashtra State Gazetteers

मध्यम मुदत कर्ज वाटप ढोबळ कारणासाठी करण्यापेक्षा विविध प्रकारचे प्रकल्प तयार करून त्यानुसार कर्ज वाटप करण्याचे धोरण नाबार्ड व राज्य सहकारी बँकेने स्विकारल्यामुळे जिल्ह्यातील सभासदांच्या विविध गरजा लक्षात घेऊन निरनिराळे प्रकल्प तयार करून त्या अनुषंगाने कर्ज वाटप करण्यात येते. जिल्हा बँकेने तयार केलेल्या प्रकल्पात पाणी पुरवठा सुविधा करणाऱ्या मोठया योजनांचा समावेश आहे. तसेच फळबाग, नवीन विहिरी खोदणे, त्यावर विद्युत पंप व पाईप लाईन बसविणे, रेशिम उद्योग, मिनी डेअरी इत्यादि कारणांचा समावेश आहे. तसेच जिल्ह्यातील दोन, सहकारी साखर कारखान्यांना बँकेमार्फत खेळत्या भांडवलासाठी कर्ज पुरवठा करण्यात येतो.

जिल्ह्यातील शेतकऱ्यांना वेळेवर पुरेशाप्रमाणात कर्ज पुरवठा या बँकेकडून केला जातो. शेतकऱ्यांचा आर्थिक विकास साधण्यासाठी बँक प्रयत्नशील असते. मागील पाच वर्षांच्या पीक हंगामात बँकेने खालील प्रमाणे अल्पमुदतीचा कर्जपुरवठा केला होता.

(रूपये लाखात)

| हंगाम वर्ष | संस्था संख्या | सभासद संख्या | हंगामासाठी केलेले एकूण कर्ज वाटप | पैकी अल्प भूधारक सभासदांना केलेले कर्ज वाटप |
|---|---|---|---|---|
| २०००-२००१ | ९६५ | १,३५,२६० | १७१६६.७७ | ४३५१.७४ |
| २००१-२००२ | ९५० | १,३५,०८५ | १०१९८.०९ | २८८७.३६ |
| २००२-२००३ | ९५५ | ५४,६५४ | ६४६५.२२ | १७३४.९७ |
| २००४-२००५ | - | ५६,५३४ | ९४५५.२८ | - |
| २००५-२००६ | - | २८,३९४ | ४८१४.७८ | - |

बँक दारिद्र्य रेषेखालील सभासदांचे जीवनमान उंचावण्यासाठी नेहमीच प्रयत्नशील असते. २०००-२००३ या आर्थिक वर्षांत एकात्मिक ग्रामीण विकास योजनेंतर्गत बँकेने १२.१२ लाख रूपये नवीन कर्ज वाटप केले आहे.

जिल्ह्यातील शेती संस्थांना ज्याप्रमाणे पीक उत्पादनासाठी व शेती विकासासाठी मोठ्याप्रमाणावर पत पुरवठा करण्यात येतो. त्याचप्रमाणे जिल्ह्यातील बिगर शेती सहकारी संस्थांना (साखर कारखाने, पगारदार नोकरांच्या सहकारी संस्था, इत्यादि संस्थांना सुद्धा ही बँक पतपुरवठा करते. २००२-२००३ मध्ये अशा ४८९ सभासदांना बँकेने कर्जपुरवठा केला होता. त्याची थकबाकी ११२०९.२३ लाख रूपये होती.)

बँकेमार्फत ठेवीदारांना त्यांचे ठेवीवर व त्याचप्रमाणे बँक कर्मचाऱ्यांना घरबंधणीसाठी व वाहन खरेदीसाठी वैयक्तिक कर्ज वाटप करण्यात येते.

सन २००१-२००३ मध्ये बँकेच्या एकूण ठेवी ४५९,६२.९८ लाख रूपये होत्या त्यामध्ये वाढ होऊन सन २००२-२००३ मध्ये ७२०२.९२ लाख रूपये झाली असून ठेवी वाढीचे प्रमाण १५.६७ टक्के होते.[१४]

१४. ७८ वा वार्षिक अहवाल, दि. नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, नांदेड, २००२-२००३, पृ. १२.

सन २००२-२००३ मध्ये बँकेची एकूण सभासद संख्या २५२४ व भागभांडवल २६९५.७१ लाख रूपये व एकूण शाखा कार्यालयाची संख्या १८९ होती. जिल्हा मध्यवर्ती बँकेने केलेल्या कार्याची माहिती तक्ता क्रमांक १ मध्ये व तक्ता क्रमांक २ मध्ये बँकेची सांपत्तिक स्थिती बाबत माहिती दिली आहे.

**नांदेड जिल्हा सहकारी कृषी ग्रामीण बहुउद्देशिय विकास बँक :** (भूविकास बँक) :—नांदेड जिल्ह्यातील कंधार व बिलोली येथे ' जमीन तारण सोसायटी ' (Land mortgage society) या नावाने कार्यरत असलेल्या या दोन्ही शाखांचे ' भूविकास बँकेत ' १९५६ मध्ये रूपांतर करण्यात आले. परंतु प्रत्यक्ष कामकाजास १९५८-५९ मध्ये सुरूवात झाली. त्यावेळी जिल्ह्यातील सर्व रहिवाश्यांना या बँकेचे सभासद होता येत होते. परंतु जमीन असणाऱ्या शेतकऱ्यांनाच कर्जपुरवठा केला जात असे. नवीन विहीर खोदने, जुनी विहीर बांधणे, ऑइल इंजिन इत्यादी बाबीसाठी तगाई वाटप करण्यात येत असे.[१५]

या बँकेचा मूळ उद्देश शेतकऱ्यांना कर्ज देणे, जूनी कर्जे फेडणे व शेती विकासासाठी कर्ज देणे हा होता. त्यानंतर जमिनीची बांधबंदिस्ती करणे, पडीक जमीन लागवडीसाठी आणणे, विहीर खोदणे, जूनी विहीर दुरूस्त करणे, ऑईलइंजिन व विद्युत मोटारीसाठी दीर्घ मुदतीची कर्जे देण्यास सुरूवात झाली. शिवाय गोबर गॅस, व मळणीयंत्र खरेदीसाठीही कर्ज दिले जात असे. मे १९७३ पासून भूविकास बँकाच्या कामकाजावर नियंत्रण ठेवून राज्यभर एकसूत्री अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने सर्व जिल्हा भूविकास बँकांचे शिखर बँकेत विलीनिकरण केले व महाराष्ट्र राज्य सहकारी भूविकास बँक नामक राज्यस्तरावरील शिखर बँकेची स्थापना केली. कर्जवाटप धोरणातही काही मूलभूत बदल करण्यात आले. १९८७-८८ मध्ये शिखर बँकेचे नाव बदलून महाराष्ट्र राज्य सहकारी कृषी व ग्रामीण विकास बँक असे ठेवण्यात आले. नांदेड जिल्ह्यात या बँकेने केलेल्या कार्याची माहिती तक्ता क्रमांक ३ मध्ये दिली असून विविध कारणासाठी केलेल्या कर्ज वाटपाची माहिती खाली दिली आहे :—

(रूपये लाखात)

| तपशील | १९९५-९६ | | १९९९-२००० | | २००२-२००३ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | सभासद | रक्कम वाटप | सभासद | रक्कम वाटप | सभासद | रक्कम वाटप |
| भाग भांडवल | ५२,०८९ | - | ५४,४५७ | ३१५.२७३ | ५४,४५७ | २७८.९३ |
| येणे कर्ज | - | ३७९३.८९ | - | ३९४५.०४ | - | ३३१९.४६ |
| कर्ज वाटप | | | | | | |
| सर्वसाधारण खाज योजना | - | ५१४.६६ | - | - | - | - |
| एन.सी.डी.सी गोडावून | - | १.०१ | - | - | - | - |
| ग्रामीण कुटीरोद्योग | - | २२.४२ | - | - | - | - |
| ग्रामीण घरबांधणी योजना | - | १.२० | | | | |

१५. नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर १९७१, पृ. २९७, ऑगस्ट २००२ पासून ही बँक शासनाने अवसायानात काढलेली आहे.

**मराठवाडा ग्रामीण बँक**[१६] **:** बँकांचे राष्ट्रीयीकरण १९६९ मध्ये करण्यात आल्यानंतरही बँकींग सेवा ग्रामीण भागात फारशा कार्यरत न झाल्यामुळे व राष्ट्रीयकृत बँकांच्या बहुतांशी शाखा शहरी भागातच असल्यामुळे तत्कालीन केंद्र शासनाने प्रादेशिक ग्रामीण बँकांची स्थापना केली.

देशातील १९६ ग्रामीण बँकांमध्ये, शाखाविस्ताराने व भौगोलिकदृष्ट्या सर्वात मोठ्या असलेल्या मराठवाडा ग्रामीण बँकेची स्थापना २६ ऑगस्ट १९७६ (प्रादेशिक ग्रामीण बँक कायदा १९७६ नुसार) झाली. या बँकेचे मुख्य कार्यालय नांदेड येथे असून ह्या बँकेस बँक ऑफ महाराष्ट्र ह्या आघाडीच्या राष्ट्रीयकृत बँकेने पुरस्कृत केलेले आहे. बँकेच्या भांडवलामध्ये केंद्र सरकार, बँक ऑफ महाराष्ट्र आणि महाराष्ट्र शासन यांचा अनुक्रमे ५० : ३५ : १५ इतका सहभाग आहे. मराठवाडा विभागातील नांदेड, परभणी, हिंगोली, बीड, लातूर आणि उस्मानाबाद ह्या सहा जिल्ह्यांत (फेब्रुवारी, २००७) २४२ शाखा, दोन विस्तारीत सेवा कक्ष आणि ९ क्षेत्रीय कार्यालये यांच्या माध्यमातून संपूर्ण कार्यक्षेत्रांत बँकीग सेवा पुरविण्यात येत आहे.

नांदेड जिल्ह्यात या बँकेच्या एकूण ६० शाखा ग्रामीण भागात, १२ निमशहरी शाखा, ५ शहरी भागात व एक विस्तारीत सेवा शाखा कार्यालये कार्यरत आहेत. ग्रामीण विकासासाठी पूर्णतः कटीबद्ध असलेली ही बँक शहरी भागातही कार्यरत आहे हे या बँकेचे मुख्य वैशिष्ट्ये आहे.

या बँकेमार्फत नांदेड जिल्ह्यात सन १९९५-९६, २०००-२००१ व २००५-२००६ या वर्षात खालीलप्रमाणे अर्थपुरवठा केला आहे :—

(रूपये लाखांत)

| तपशील | १९९५-९६ | २०००-०१ | २००५-२००६ |
|---|---|---|---|
| पीक कर्ज/किसान क्रेडीट कार्ड | १९८.९९ | १,००८.५७ | १६४४.५८ |
| कृषी कर्ज (मध्यम/दिर्घ मुदत) | १४७.५० | २५३.३५ | १३८.१८ |
| एकूण कृषी कर्ज | ३४६.४९ | १,२२१.९२ | १,७८२.७६ |
| लघु उद्योग | ३३.२९ | १३.५० | ९.१२ |
| इतर प्राथमिकता क्षेत्र | २०९.५२ | ३३९.५४ | ७९३.१५ |
| एकूण (प्राथमिकता क्षेत्र कर्ज) | ५८९.३६ | १,५७४.९६ | २५८५.०३ |
| जिल्ह्यातील एकूण येणे कर्ज बाकी (मार्च अखेर) | ३६५०.४१ | ५,४४४.१३ | ७,६२५.३८ |

नांदेड जिल्ह्यातील अर्थपुरवठ्याबरोबरच बँक संपूर्ण कार्यक्षेत्रांत कार्यरत असून विभागातील बँकांमार्फतच्या अर्थपुरवठ्यामध्ये तसेच शासकीय योजना अंमलबजावणीमध्ये ही बँक उत्कृष्ट कार्य करीत असल्याचे दिसून येते. नाबार्डद्वारे राज्यपातळीवरील स्वयं सहाय्यता बचतगट कार्यासाठी ग्रामीण बँकांना दिल्या जाणाऱ्या पुरस्कारासाठी सतत तीन वर्षे बँकेची निवड करण्यात आली आहे. सन २००५-२००६ ह्या आर्थिक वर्षासाठी महाराष्ट्रातून प्रथम येण्याचा बहुमानही याच बँकेचा आहे.

१६. व्यवस्थापक, मराठवाडा ग्रामीण बँक, नांदेड यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती (मे, २००७).

Maharashtra State Gazetteers

**बिगर कृषी पतसंस्था :** व्यापारी, कारखान्यातील कामगार व पगारदार व्यक्ती संघटित होऊन गरजेच्या वेळी पैसा उपलब्ध व्हावा या उद्देशाने अशा प्रकारच्या संस्था स्थापन करतात. या संस्था भाग भांडवल, अल्प व दीर्घ मुदतीच्या ठेवी, तसेच मध्यवर्ती बँकेकडून कर्ज घेऊन भांडवल निधी उभा करतात. या संस्था सभासदांना वैयक्तिक हमीवर, मालमत्तेच्या तारणावर तसेच गृहीत उत्पादनावर रोख कर्ज देतात. जिल्ह्यात नांदेड येथे ' नांदेड वर्कर्स को-ऑपरेटिव्ह सोसायटी ', नांदेड या नावाने सन १९५६ मध्ये पहिली बिगर शेतकी सहकारी पतसंस्था स्थापन झाली. त्या वर्षी तिची सभासद संख्या २१ व भाग भांडवल ६६० रूपये होते. जिल्ह्यात १९६१-६२ मध्ये अशा संस्थांची संख्या फक्त तीन व सभासद संख्या ५७४ होती. सभासदांनी आपली देणी थकविल्यामुळे या संस्थाचा फारसा विकास झाला नाही. त्यावर्षी या संस्थांना १,००४ रूपये तोटा झाला होता. सन १९७० मध्ये अशा संस्थांची संख्या २१ होती. १९९०-९१, १९९५-९६, १९९९-२००० व २००४-२००५ या कालावधीतील या संस्थांची माहिती खाली दिली आहे :—

(रूपये हजारांत)

| तपशील | १९९०-९१ | १९९५-९६ | १९९९-२००० | २००४-२००५ |
|---|---|---|---|---|
| संस्था (संख्या) | ११८ | १२७ | २४९ | २०० |
| सभासद (संख्या) | १७,३९१ | २०,९१४ | ३३,१३७ | ३९,८५० |
| वसूल भाग भांडवल | ९५६,५३ | ९९६,०७ | १०१३,५५ | ८,०७,६० |
| राखीव निधी | ९८,१६ | ११७,२० | १५१,४० | २,७३,४० |
| इतर निधी | २२,४७ | २८,५९ | ३९,२० | ६२,१० |
| ठेवी | २०९,७८ | २१,८६६ | २७७,०१ | ११,५६,४० |
| बाहेरील कर्जे | ६२३,१४ | ६७१,७१ | ३०७७,६५ | २४,६५,२० |
| येणे कर्जे | ११०७,२८ | ११३३,७० | १३९२,६५ | २३,७६,९७ |
| थकबाकी | २४५,२३ | २९१,४७ | १४,८१,२० | ५,५२,९२ |
| नफा (संस्था संख्या) | १०१ | ११२ | २०७ | ११५ |
| तोटा (संस्था संख्या) | १७ | १५ | ४२ | ८५ |

**नागरी सहकारी बँका :** या बँकांचा मुख्य उद्देश सभासदांना व्यापार, मालमत्ता, लग्नकार्य, शिक्षण, इत्यादीसाठी कर्ज देणे हा असतो. तसेच या संस्था शेतीसाठीसुद्धा कर्ज पुरवठा करतात. सर्वसाधारण बँक व्यवहाराशिवाय वसुली, विजेची देयके व कराचे पैसे भरणे ही कामेसुद्धा करतात. जिल्ह्यातील अशा संस्थांची माहिती खाली दिली आहे :—



Maharashtra State Gazetteers

(रूपये लाखात)

| क्र. | सहकारी बँका | भाग भांडवल | निधी | ठेवी | कर्जे | कर्जे व ठेवी प्रमाण | थकबाकी | थकबाकी (%) | नफा + तोटा (-) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १ | भाग्य लक्ष्मी, महिला सह. बँक नांदेड. | ४२९.५० | १०२१.४१ | ८८६९.९७ | ५३९४.३३ | ६०.८२ | ८१२.१५ | १५०६ | + ५०.९९ |
| २ | गोदावरी अर्बन, सह. बँक, नांदेड. | ४१.४५ | ८४.६८ | ७०२.३६ | ३०७.५० | ५१.३२ | २३.२५ | ६.४५ | + १२.२३ |
| ३ | जय शिवराई नागरी सह. बँक नांदेड. | ११९.१८ | १९१.०२ | १६३५.९१ | १५३४.३८ | ८०.३७ | - | १०.१४ | + ५७.८९ |
| ४ | लोहा अर्बन को. ऑप. बँक, लोहा. | २०.८१ | ७६.४९ | ५७७.६१ | ३७७.१८ | ६५.३० | १९.२३ | ५.७९ | + ५.८६ |
| ५ | मार्कंडेय नागरी सह. बँक, नांदेड. | ६६.३३ | ६९.०७ | ७५९.२० | ४२९.३१ | ४२.५२ | ३३.३५ | ७.७९ | + १०.३३ |
| ६ | नांदेड मर्चन्ट को. ऑप बँक. | १९४.०२ | ४८७.२५ | ९०७७.४८ | ५६५४.३२ | ५३.१० | ३४६.८८ | ६.१३ | + ४९.४२ |
| ७ | साई नागरी सह. बँक हदगाव. | ३९.२९ | ५३.७२ | ४०७.७९ | ३८१.७५ | ८२.८४ | ४६.८६ | १२.२८ | + १.९६ |
| ८ | शंकर नागरी सह. बँक, नांदेड. | ११७.६० | ३७२.८४ | २९९९.१७ | २०६६.५८ | ६८.९० | २९६.१८ | ९.८७ | + २१.६२ |
| ९ | श्री साई अर्बन को. ऑप. बँक, नांदेड. | २९.७५ | ५७.६६ | ५८०.१५ | ४५४.०९ | ७८.२७ | ३५.५९ | ६.५७ | + २६.०८ |
| १० | शंकरराव चव्हाण नागरी सह. बँक, किनवट | २१.५० | ३०.०५ | २५९.७० | २१७.६० | ६६.८८ | ४३.६९ | २९.०७ | + ४.९५ |

वरील नागरी बँकापैकी 'ए' वर्ग ५ 'बी' वर्ग ३ व 'सी' वर्ग २ बँकांना मिळाला होता.

**पगारदारांच्या ग्रामीण व नागरी पतसंस्था :** सन २००४-२००५ मध्ये अशा संस्थांची जिल्ह्यातील एकूण संख्या ६५ होती. त्यांची सभासद संख्या ३७,६६० होती व भाग भांडवल ८०,१० हजार रूपये होते. त्या वर्षी एकूण संस्थापैकी १० संस्था नफ्यात व ५५ संस्था तोट्यात होत्या.

**२) प्राथमिक कृषी पतसंस्था :** या संस्था प्रामुख्याने ग्रामीण भागात विखुरलेल्या असून या संस्थांचा जिल्ह्याच्या विकासात महत्त्वाचा सहभाग आहे. बहुतेक शेतकरी या संस्थेचे सभासद असतात त्यांचा मुख्य उद्देश शेतकरी सभासदांना बी-बीयाणे, खते, कीटकनाशके, कृषी अवजारे, बैल व बैलगाड्या इत्यादीसाठी कर्जे देणे हा असतो. म्हणूनच त्यांना सहकारी सेवा संस्था असेही संबोधतात. सभासदाकडून मिळणारे शुल्क कमी पडत असल्यामुळे अशा संस्था आपले भांडवल निधी प्रामुख्याने

जिल्ह्यातील मध्यवर्ती पतसंस्थेकडून उभा करतात. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत सहकाराला महत्त्व दिले गेल्यामुळे अशा संस्थांची झपाट्याने वाढ झालेली दिसून येते.

सन १९६२ मध्ये जिल्ह्यात एकूण ९०४ अशा प्रकारच्या संस्था जिल्ह्यातील १,२७१ खेड्यांत (९४.८%) कार्यरत होत्या. या संस्थांची सन १९१३ मध्ये तत्कालीन हैद्राबाद राज्याच्या सहकारी संस्था अधिनियम, १९१३ अन्वये स्थापना झाली. अशा प्रकारची जिल्ह्यातील पहिली संस्था १९२५ (१३३५ फसली) मध्ये भोकर तालुक्यातील अबदुल्लापूर येथे स्थापन झाली. सन १९६४-६५ मध्ये अशा प्रकारच्या एकूण ९२४ संस्था होत्या.

सन १९९०-९१ मध्ये जिल्ह्यात ८३५ प्राथमिक कृषी पतसंस्था कार्यरत होत्या. सन १९९०-९१, १९९५-९६, १९९९-२०००, २००२-२००३ व २००४-२००५ मधील जिह्यातील अशा संस्थांची माहिती खाली दिली आहे :—

(रूपये हजारांत)

| तपशील | १९९०-१९९१ | १९९५-१९९६ | १९९९-२००० | २००२-२००३ | २००४-२००५ |
|---|---|---|---|---|---|
| संस्था संख्या | ८३५ | ८६७ | ८८२ | ९८१ | ९८३ |
| **सभासद** | १,९७,५२५ | २,९५,३७५ | ३,७४,८१७ | ३,९९,९३७ | ४,०४,१६१ |
| अ) भूधारक | १,८८,३९० | २,८०,२४० | ३,५२,४२३ | ३,६७,०८४ | ३,६४,८३० |
| ब) इतर | ९,१३५ | १५,१३५ | २२,३९४ | ३२,८५३ | ३९,३३१ |
| **वसूल भाग भांडवल** | १,२१,२४५ | १,४९,८६५ | १,६१,४०९ | २,४८,२९३ | २५,३२,७७ |
| अ) सभासदांचे | १,२०,३४८ | १,४८,८९७ | १,५९,७४१ | २,४७,४३८ | २५,३२,७७ |
| ब) इतर | ८९७ | १६८ | १,६६८ | ८५५ | - |
| **राखीव निधी** | ११,२१० | १४,३९५ | १८,५९४ | २४,९१५ | ८१,०७ |
| इतर निधी | - | - | - | - | २,७९,१८ |
| ठेवी | २,९१० | ३,४३५ | ५,९६५ | ७,१५९ | १,०८,४८ |
| बाहेरील कर्जे | ६,७४,१९० | ९,४२,६४४ | १४,३२,७२६ | २६,६२,८६८ | ३,४४,२१,५३ |
| येणे कर्ज | ५,७१,३९३ | ७,२३,४३१ | १२,४२,२९१ | ३७,३३,०५३ | ७२,६७,८९ |
| थकबाकी | १,६०,२१४ | ४,१२,२३२ | २,७९,१०६ | १४,९०,६९२ | १७२,६३,४० |

**३. शेतकी बिगर पतसंस्था :** या संस्थांमध्ये प्रामुख्याने खरेदी-विक्री संस्था, शेतमाल प्रक्रिया संस्था, दुग्धोत्पादक संस्था, पशुसंवर्धन संस्था, जलसिंचन संस्था, मत्स्यव्यवसाय संस्था, सहकारी शेती संस्था आणि पाणीपुरवठा संस्था यांचा अंतर्भाव होतो. त्यापैकी कांही संस्थांची माहिती खाली दिली आहे.

जिल्ह्यात नांदेड तालुका खरेदी-विक्री संघ, नांदेड या नावाने १९७२ मध्ये पहिली खरेदी-विक्री संस्था स्थापन झाली. त्या वर्षी तिची सभासद संख्या ९१० व भाग भांडवल १.२८ लाख रूपये होते.

Maharashtra State Gazetteers

सहकारी शेतमाल खरेदी-विक्री संस्था जिल्हा व तालुका पातळीवर कार्य करतात. व्यक्तिगत शेतकरी व त्यांच्या प्राथमिक सेवा सहकारी संस्था सहकारी शेतमाल खरेदी-विक्री संस्थांचे सभासद असतात. या संस्था सभासद शेतकऱ्यांच्यावतीने त्यांच्या मालाच्या विक्रीबाबत दलाली स्वरूपाचे व्यवहार, मालाची साठवणूक व वाहतुकीची व्यवस्था, पिकांच्या तारणावर ताबेगहाण कर्जवाटप, शक्य असेल तर शेतमाल प्रक्रियेची व्यवस्था, पीक उत्पादनासाठी खते, बी-बियाणे व जंतूनाशक औषधे पुरविणे, शेतीच्या अवजारांचा पुरवठा, बाजार पेठेतील किंमतीची सभासदांना माहिती पुरविणे इत्यादी कामे करतात. जिल्ह्यातील खरेदी-विक्री संस्थांची माहिती खाली दिली आहे :—

(रुपये हजारांत)

| तपशील | १९९०-९१ | १९९५-९६ | १९९९-२००० | २००२-२००३ | २००४-२००५ |
|---|---|---|---|---|---|
| संस्था (संख्या) | १० | ११ | १२ | १५ | २५ |
| सभासद (संख्या) | ५,६४० | ५,००२ | ५,४४१ | ७,१३५ | ३,६३३ |
| वसूल भाग भांडवल | ५२५ | १,३६४ | १,६५० | ५,१२४ | ११,३२ |
| राखीव निधी | ५,७२२ | ६,२३४ | ९,६५० | १५,९८५ | ६१,१२ |
| इतर निधी | ८,३९२ | ९,८५६ | १०,८७२ | १६,९८५ | १,४३,९३ |
| कर्जे | ३,४५९ | २९,८११ | २९,९५८ | ३०,२५४ | १,९४,९४ |
| शेती उपयोगी माल खरेदी | १०,९९१ | ११,४५९ | १३,९८० | १८,२०८ | - |
| शेती उत्पादीत माल खरेदी | ९२० | - | १,३३५ | १०,४१९ | - |
| ग्राहक उपयोगी वस्तू खरेदी | ४८५ | ७३५ | ८२० | १,१०२ | - |

**मच्छीमार सहकारी संस्था :** मच्छीमार समाजास एकत्र करून सहकार तत्त्वावर व्यवसाय चालवता यावा, म्हणून त्यांच्या संस्था स्थापन करण्यात येतात. संस्थेचा कारभार व्यवस्थित चालविणेसाठी कर्मचारी वर्ग नेमता यावा व इतर व्यवहारासाठी खेळते भांडवल असावे म्हणून संस्था स्थापनेपासून पहिले ५ वर्ष संस्थेस व्यवस्थापकीय अनुदान दिले जाते. सातव्या योजनेच्या कालावधीत या योजनेखाली रूपये ०.५८ लाख रूपये खर्च झाला आहे. तर वर्ष १९९०-९१ मध्ये रूपये ०.११ लाख खर्च झाला. सातव्या योजनेच्या कालावधीत सामान्य योजनेखाली ३६ आदिवासी व आदिवासी उपयोजनेखाली १५ अशा ६१ संस्थांना अनुदान देण्यात आले. त्याचप्रमाणे १९९०-९१ मध्ये सामान्य योजनेखाली १० व आदिवासी उपयोजनेखाली २ अशा एकूण १२ संस्थांना अनुदान देण्यात आले, तसेच हा व्यवसाय अत्यंत जोखमीचा असून त्यात मच्छीमारांना अपघातात मृत्यू किंवा कायमचे अपंगत्व आल्यास विम्याचे संरक्षण मिळण्यासाठी अपघात विमा योजना चालू करण्यात आली आहे. सातव्या योजनेच्या कालावधीत या योजनेंतर्गत रुपये ०.०५ लाख खर्च झाला तर वर्ष १९९०-१९९१ मध्ये १.०१ लाख रुपये खर्च झाला. मत्स्य व्यवसाय या विकास उपशिर्षाखाली सातव्या योजनेच्या

कालावधीत ३१.७२ लाख रुपये खर्च झाला. सन १९९०-९१ मध्ये रुपये ३.१९ लाख खर्च झाला.[१७] सन २००२-२००३ मध्ये जिल्ह्यात एकूण ९६ मच्छीमार सहकारी संस्था होत्या. या संस्थांची सन १९९०-९१ ते २००३ पर्यंतची माहिती खाली दिली आहे.[१८] :—

(रूपये हजारांत)

| तपशील | १९९०-९१ | १९९५-९६ | १९९९-२००० | २००२-२००३ |
|---|---|---|---|---|
| मत्स्य संस्था (संस्था) | ६५ | ७५ | ८२ | ९३ |
| सभासद (संस्था) | २,४७५ | २,८४५ | ३,१०६ | ३,४३३ |
| वसूल भाग भांडवल | ३,३०,०० | ३,८०,०० | ४,२०,०० | ४,७०,०० |
| राखीव व इतर निधी | २०,०० | ३०,०० | ३२,०० | ३५,०० |
| पकडलेले मासे (मे.टन) | १२५ | १३५ | १९७ | २०९ |
| किंमत | ४,३५ | ५,४८ | ८,१२ | ८,३५ |
| विक्री | ५,१२ | ५६७ | ९,४७ | ८९७ |
| नफा (संस्था संख्या) | ६० | ६८ | ७४ | ८२ |
| तोटा (संस्था संख्या) | ५ | ७ | ८ | ११ |

**सहकारी शेती संस्था :** १९५८ पर्यंत नांदेड जिल्ह्यात अशा प्रकारची एकही संस्था अस्तित्त्वात नव्हती. परंतु सन १९५९-६० मध्ये जिल्ह्यातील देगलूर तालुक्यातील उमरसांगवी येथे अशा प्रकारची पहिली संस्था स्थापन झाली. ही जिल्ह्यातील पहिली संस्था होय. १९६५ मध्ये जिल्ह्यात एकूण २६ सहकारी शेती संस्था होत्या. त्यापैकी २० संस्था संयुक्त शेती सहकारी (Joint farming) संस्था होत्या व सहा संस्था सामूहीक सहकारी संस्था होत्या. वरील दोन्ही संस्थांची एकूण सभासद संख्या ३९१ होती व भाग भांडवल रूपये १८,४३० होते.[१९] सन १९९५-९६ मध्ये अशा संस्थांची संख्या फक्त २२ होती. तर जानेवारी २००४ मध्ये अशा संस्था जिल्ह्यात अस्तित्त्वात नव्हत्या.[२०]

**कृषी माल प्रक्रिया संस्था :** कृषी मालावर कमी-अधीक प्रमाणात प्रक्रिया करून ग्राहकोपयोगी वस्तू बनविण्याचे कार्य अशा संस्था करीत असतात. या संस्था अशा तऱ्हेचा खाजगी व्यवसाय करणाऱ्या संस्था आणि व्यक्ती यांची कृषी मालाच्या प्रक्रियेमधील मक्तेदारी दूर करण्यास मदत करतात. त्या द्वारे या संस्था कृषी मालाचे उत्पादन व वितरण यामधील महत्त्वाचा दुवा साधतात. (या संस्थांना राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळाकडून केंद्र व राज्य शासनामार्फत मदत मिळते. तर दीर्घ मुदतीची

१७. **यथार्थदर्शी योजना** १९९२-९३ ते १९९६-९७, नांदेड जिल्हा, जिल्हा नियोजन व विकास मंडळ, नांदेड, पृ. ८४-८५.

१८. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, दि. १ जानेवारी २००४.

१९. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९७१, पृ. २०२.

२०. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र शासन, नांदेड, जानेवारी २००४.

कर्जे औद्योगिक वित्त महामंडळ व आयुर्विमा महामंडळाकडून मिळतात.) १९६५ मध्ये जिल्ह्यात अशा प्रकारच्या तीन वटण व दाबणी सहकारी संस्था उमरी, तामसा व किनवट येथे होत्या. त्यापैकी उमरी येथिल संस्था सुरू होती. कृषी उत्पन्नावर प्रक्रिया करण्याकरिता कापसासाठी नांदेड जिल्ह्यात २३ सहकारी जिनिंग मिल व ३१ खाजगी जिनिंग मिल होत्या.[२१] सन २००२-२००३ मध्ये जिल्ह्यात एकूण तीन कृषी माल प्रक्रिया संस्था होत्या. त्यांची माहिती खाली दिली आहे.

(रूपये हजारात)

| तपशील | १९९५-९६ | १९९९-२००० | २००१-२००२ | २००२-२००३ | २००४-२००५ |
|---|---|---|---|---|---|
| संस्था (संख्या) | १ | १ | १ | ३ | २६ |
| सभासद (संख्या) | २५ | २७ | २७ | ७५ | २२,६३० |
| वसूल भाग भांडवल | २५० | २,७० | २,७० | ७,५० | १,५१,६२ |
| निधी | २५ | २७ | २७ | ७५ | ७,८२ |
| कर्जे | - | - | - | - | ९५,८६ |

**दुग्ध व्यवसाय सहकारी संस्था :** या संस्था खेड्यापाड्यातून आपल्या सभासदांकडून दूध गोळा करून जिल्हा पातळीवर दुग्ध उत्पादन वाढविणे, दुभत्या जनावरांची निगा राखणे, दुधाची व दुग्ध पदार्थांच्या वाहतुकीची व विक्रीची व्यवस्था करणे, जनावरांना खाद्याचा पुरवठा करणे इत्यादी कामे करतात.

नांदेड जिल्ह्यात जिल्हा अथवा तालुका दूध सहकारी संघ कार्यान्वित नाहीत. सन १९७८-७९ पासून शासकीय दूध योजना नांदेड मार्फत नांदेड जिल्ह्यामध्ये दूध संकलनाचे कामकाज हाती घेण्यात आले. नांदेड जिल्ह्यात ३१ मार्च १९९० पर्यंत ५४६ प्राथमिक दूध सहकारी संस्था नोंदणी झालेल्या आहेत. वर्षभर सुरू राहणाऱ्या दूध सहकारी संस्थांची संख्या २०७ आहे तर ८० संस्था पुष्ट हंगामात सुरू राहतात.[२२] सन २००२-२००३ मध्ये जिल्ह्यात प्राथमिक दूध संस्थांची संख्या ५४५ होती. त्याची माहिती खाली दिली आहे :—

(रूपये हजारांत)

| तपशील | १९९०-९१ | १९९५-९६ | १९९९-२००० | २००२-२००३ |
|---|---|---|---|---|
| प्राथमिक दूध संस्था | ३६० | ४७५ | ६१० | ५४५ |
| सभासद (संख्या) | १,४४,४५ | - | - | - |
| वसूल भाग भांडवल | १८,४०,०० | २४,२०,०० | ३१,२०,०० | २७,८०,०० |
| राखीव व इतर निधी | १८०,०० | २४०,०० | ३१,००० | २८०,०० |
| दूध खरेदी (लिटर) | १२,४३३ | १३,२९८ | ८,६६६ | ८०,३०० |

२१. **यथार्थदर्शी योजना** नांदेड जिल्हा १९९२-९३ ते १९९६-९७, पृ. १८.

२२. **यथार्थदर्शी योजना** नांदेड जिल्हा १९९२-९३ ते १९९६-९७, पृ. ७०-७१.

Maharashtra State Gazetteers

**सहकारी जलसिंचन संस्था :** २००४-२००५ मध्ये जिल्ह्यात अशा प्रकारच्या १०८ संस्था होत्या. त्याची माहिती खाली दिली आहे :—

(रूपये हजारांत)

| तपशील | १९९०-९१ | १९९५-९६ | १९९९-२००० | २००२-२००३ | २००४-२००५ |
|---|---|---|---|---|---|
| संस्था (संख्या) | २९ | २८ | ३८ | ९६ | १०८ |
| सभासद (संख्या) | १,३६९ | ९८९ | १,८९७ | १०,७६७ | ३,७०५ |
| वसूल भाग भांडवल | १,१९ | १,२१ | १४,६५ | ३८,८७ | ५५ |
| राखीव निधी | १० | १२ | १,१३ | १,९९ | ५ |
| जलप्रदाय क्षेत्र (हेक्टर) | १२५ | १३८ | १३८ | २,५८ | - |
| प्रत्यक्ष भिजलेले क्षेत्र (हेक्टर) | २५ | १०० | २८ | ४८ | - |

**बिगर कृषी बिगर पत संस्था :** अशा संस्थांमध्ये साधारणतः ग्राहक सहकारी, गृहनिर्माण, विणकर, औद्योगिक संस्था, सूत गिरण्या, औद्योगिक वसाहती, मजूर, वाहतूक, जंगल कामगार व इतर बिगर पत संस्थांचा समावेश होतो. या संस्था प्रत्यक्ष पतपुरवठा करीत नाहीत.

१९४९ मध्ये नांदेड जिल्ह्यात नांदेड व देगलूर येथे औद्योगिक सहकारी संस्था, स्थापन झाल्या परंतु त्यामध्ये फारशी वाढ झालेली नव्हती. १९६५ मध्ये अशा संस्थांची जिल्ह्यातील संख्या १६८ झाली होती. त्यापैकी १६ विणकरांच्या संस्था, ५२ चामडी उद्योग संस्था, १५ कुंभारकाम व विट उत्पादन सहकारी संस्था व १० तेलघाणी सहकारी संस्था होत्या. त्याशिवाय जिल्हा औद्योगिक सहकारी संघ. या संस्थांना मार्गदर्शन व देखरेख करण्यासाठी स्थापन करण्यात आल्या होत्या. १९६५ मध्ये जिल्ह्यात १४ जंगल कामगारांच्या सहकारी संस्था होत्या. त्यांचे भाग भांडवल ८,३७७ रूपये होते. या संस्थेस शासनाकडून १,१०,००० रूपये मिळाले होते. या जंगल कामगार सहकारी संस्थाना मार्गदर्शन व मदत करण्यासाठी जंगल कामगार सहकारी परीक्षण संघाची स्थापना १९६५ मध्ये किनवट येथे करण्यात आली होती.

**हातमाग व यंत्रमाग संस्था :** जिल्ह्यात पहिली हातमाग सहकारी संस्था नांदेड येथे मार्कंडेय या नावाने १९५८ मध्ये स्थापन झाली. तरी त्याच वर्षी चौफाळा येथे स्थापन झालेली यंत्रमाग सहकारी संस्था ही जिल्ह्यातील पहिली संस्था होय. या दोन्ही संस्थांची सन १९९०-९१, १९९५-९६, १९९९-२०००, २००२-२००३ व २००४-२००५ ची माहिती खाली दिली आहे :—

(रूपये हजारांत)

| तपशील | १९९०-१९९१ | १९९५-१९९६ | १९९९-२००० | २००२-२००३ | २००४-२००५ | १९९०-१९९१ | १९९५-१९९६ | १९९९-२००० | २००२-२००३ | २००४-२००५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | हातमाग | | | | | यंत्रमाग | | | | |
| संस्था (संख्या) | २१ | २३ | २३ | २३ | ३६ | ९ | ९ | ९ | ९ | - |
| सभासद (संख्या) | ३,५८० | ३,७६० | ३,७६० | ३,७६० | ९०० | १३५० | १३५० | १३५० | १३५० | - |
| भाग भांडवल | १२,३६ | १२,३६ | १२,३६ | - | ५,७५ | ५०० | ५०० | ५०० | ५०० | - |
| स्वतःचा निधी | १,६० | १,८५ | १,८५ | १,८५ | १,०० | १,३७ | १,४० | १,४० | १,४० | - |
| खेळते भांडवल | १५१,७१ | १६१,३० | १६,१६० | ६१,४५ | - | ७१,५५ | ७१,५५ | ७१,५५ | ७१,५५ | - |

Maharashtra State Gazetteers

**मजूर सहकारी संस्था :** जिल्ह्यात पहिली मजूर सहकारी संस्था आझाद मजूर सहकारी संस्था नांदेड येथे १९६० साली स्थापन झाली. सन २००२-०३ मध्ये अशा संस्थांची संख्या २८२ होती. १९९०-९१, १९९५-९६, १९९९-२०००, २००२-२००३ व २००४-२००५ ची अशा संस्थांची माहिती खाली दिली आहे :—

(रूपये हजारांत)

| तपशील | १९९०-९१ | १९९५-९६ | १९९९-२००० | २००२-२००३ | २००४-२००५ |
|---|---|---|---|---|---|
| संस्था (संख्या) | २१६ | २१२ | २१२ | २८२ | २८१ |
| सभासद (संख्या) | ४,४०६ | ४,२४१ | ४,२६७ | ६,७५७ | ६,८५२ |
| वसूल भाग भांडवल | २,४४४ | २,४८३ | ५,१४८ | ५,७७५ | ४०,२५ |
| निधी | ४९४ | ५१५ | ६९९ | ७५६ | ४,५७ |
| कर्जे | १,९७३ | ४,१५० | ५,६८४ | ६,९८८ | १,२२,३९ |
| केलेले काम | ३८६,६४ | ५०,९१८ | ६८५,८३ | ९९,५३५ | ४६,६४,२६ |
| मजूरी | ६,२८० | ८४,१३ | ९३,१८ | १९७,९८ | - |
| नफा (संस्था संख्या) | १५२ | १५२ | १५४ | २११ | १०६ |
| तोटा (संस्था संख्या) | ६४ | ६० | ५८ | ७१ | १७५ |

**सहकारी गृह निर्माण संस्था :** जिल्ह्यात नांदेड येथे दि नांदेड टाऊन मार्केट को. ऑप. हौसिंग सोसायटी, नांदेड या नावाने १९५५ मध्ये पहिली गृहनिर्माण संस्था स्थापन झाली. २००४-२००५ मध्ये जिल्ह्यातील या संस्थांची संख्या ७५८ होती. सन १९९०-९१, १९९५-९६, १९९९-२०००, २००२-२००३ व २००४-२००५ ची या संस्थांची माहिती खाली दिली आहे :—

(रूपये हजारांत)

| तपशील | १९९०-९१ | १९९५-९६ | १९९९-२००० | २००२-२००३ | २००४-२००५ |
|---|---|---|---|---|---|
| संस्था (संख्या) | ६६४ | ६९५ | ७२७ | ७४६ | ७५८ |
| सभासद (संख्या) | २८,८३७ | ३२,२६३ | ३६,७७९ | ३७,८८७ | ४२,३६५ |
| वसूल भाग भांडवल | ३४४,९८ | ३५९,६६ | ३७,९२९ | ४२१,१२ | ९९,७० |
| राखीव निधी | १४,४९ | १५,३५ | १६,२५ | १८,२२ | १९,३२ |
| बांधलेली घरे (संख्या) | ३,६१५ | ६,१६७ | ७,८०१ | ८,६४८ | २,१२० |
| कर्जे | ६१४,९७ | ६९५,३५ | ७५२,४९ | ८६०,१५ | ३०,२५,५१ |

**चामडी कमाविणाऱ्या सहकारी संस्था :** जिल्ह्यात भोकर येथे संत रोहीदास या नावाने १९८९ मध्ये पहिली चामडी कमाविणारी सहकारी संस्था स्थापन झाली. त्या वर्षी तिची सभासद संख्या २७

Maharashtra State Gazetteers

व भाग भांडवल ५५० रूपये होते. सन २००४-०५ मध्ये जिल्ह्यात एकूण ३ चामडी कमाविणाऱ्या सहकारी संस्था होत्या. सन १९९०-९१, १९९५-९६, १९९९-२०००, २००२-२००३ व २००४-२००५ ची जिल्ह्यातील अशा संस्थांची माहिती खाली दिली आहे :—

(रूपये हजारांत)

| तपशील | १९९०-९१ | १९९५-९६ | १९९९-२००० | २००२-२००३ | २००४-२००५ |
|---|---|---|---|---|---|
| कारखान्यांची (संख्या) | ८ | ४ | ४ | ३ | ३ |
| सभासद (संख्या) | २२० | १२० | १२० | ९० | ९० |
| भाग भांडवल | ४६,०० | २७,०० | २७,०० | २०,०० | २ |
| राखीव व इतर निधी | २२० | १२० | १२० | ९० | २ |
| कामगारांची (संख्या) | २२० | १२० | १२० | ९० | ९० |

**कुंभारकाम सहकारी संस्था :** जिल्ह्यात नांदेड विभाग या नावाने नांदेड येथे १९७३ मध्ये पहिली कुंभारकाम सहकारी संस्था स्थापन झाली. त्या वर्षी तिची सभासद संख्या २१ व भाग भांडवल ६६० रूपये होते. सन २००४-२००५ मध्ये जिल्ह्यात या संस्थाची संख्या फक्त १ होती. १९९०-९१, १९९५-९६, १९९९-२०००, २००२-२००३ व २००४-२००५ ची जिल्ह्यातील अशा संस्थांची माहिती खाली दिली आहे :—

(रूपये हजारांत)

| तपशील | १९९०-९१ | १९९५-९६ | १९९९-२००० | २००२-२००३ | २००४-२००५ |
|---|---|---|---|---|---|
| संस्था (संख्या) | ३ | ३ | ३ | ३ | १ |
| सभासद (संख्या) | ७५ | ७५ | ७५ | ७५ | २५ |
| भाग भांडवल | २०,०० | २०,०० | २०,०० | २०,०० | २ |
| खेळते भांडवल | ५०,०० | ५०,०० | ५०,०० | ४०,०० | ४ |
| राखीव व इतर निधी | ७५ | ७५ | ७५ | १,५० | १ |
| कामगारांची (संख्या) | ७५ | ७५ | ७५ | १७० | २५ |

**चर्मोद्योग सहकारी संस्था :** जिल्ह्यात नांदेड येथे चर्मोद्योग या नावाने १९६९ मध्ये पहिली चर्मोद्योग सहकारी संस्था स्थापन झाली. त्यावर्षी तिची सभासद संख्या ११ व भाग भांडवल ६६० रूपये होते. सन २००४-२००५ मध्ये जिल्ह्यात या संस्थांची संख्या १३ होती. सन १९९०-९१,

Maharashtra State Gazetteers

१९९५-९६, १९९९-२०००, २००२-२००३ व २००४-२००५ ची जिल्ह्यातील या संस्थांची माहिती खाली दिली आहे :—

(रूपये हजारांत)

| तपशील | १९९०-९१ | १९९५-९६ | १९९९-२००० | २००२-२००३ | २००४-२००५ |
|---|---|---|---|---|---|
| कारखान्यांची (संख्या) | ११ | ११ | ११ | ११ | १३ |
| सभासद (संख्या) | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० |
| भाग भांडवल | २ | २ | २ | २ | ६ |
| स्थिर भांडवल | ६०,०० | ६०,०० | ६०,०० | ६०,०० | - |
| कामगारांची (संख्या) | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० |
| कामगारांना दिलेले वेतन | १५,०० | १५,०० | १५,०० | १५,०० | - |

**सहकारी औद्योगिक वसाहती :** जिल्ह्यात नांदेड येथे नांदेड औद्योगिक सहकारी संस्था या नावाने १९६३ मध्ये पहिली औद्योगिक वसाहत स्थापन झाली. त्या वर्षी तिची सभासद संख्या ५१ व भाग भांडवल २६० रूपये होते. जिल्ह्यातील २००३ मधील या संस्थांची माहिती खाली दिली आहे :—

| क्र. | वसाहतीचे नाव | पाडलेले भूखंड | बांधलेले शेड | पुरविलेल्या सुविधा |
|---|---|---|---|---|
| १ | नांदेड औद्योगिक सहकारी वसाहत, नांदेड, स्थापन १९९३. | १४३ | १३५ | - |
| २ | दायड औद्योगिक वसाहत, दायड | - | - | - |
| ३ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर औद्योगिक वसाहत, बारड. | - | - | - |
| ४ | प्रियदर्शनी औद्योगिक वसाहत (स्थापना १९८९). | ६६ | - | - |
| ५ | विश्वकर्मा औद्योगिक वसाहत (स्थापना १९८५). | २४ | - | - |
| ६ | म. ज्योतिबा फुले औद्योगिक वसाहत, लोहा. | ८३ | ३ | - |
| ७ | औद्योगिक वसाहत धर्माबाद (स्थापना १९६५). | ३५ | १० | रस्ते, पाणी व विद्युत पुरवठा |

Maharashtra State Gazetteers

**इतर सहकारी संस्था :** २००४-२००५ मध्ये जिल्ह्यात या संस्थांची संख्या ३२१ होती. सन १९९०-९१, १९९५-९६, १९९९-२०००, २००२-२००३ व २००४-२००५ ची जिल्ह्यातील अशा संस्थांची माहिती खाली दिली आहे :—

(रूपये हजारांत)

| तपशील | १९९०-९१ | १९९५-९६ | १९९९-२००० | २००२-२००३ | २००४-२००५ |
|---|---|---|---|---|---|
| एकूण संस्था (संख्या) | १९१ | २४४ | ३३० | २६३ | ३२१ |
| सभासद (संख्या) | २७,१६७ | ३५,५६० | ३७,१२० | ३६,६५५ | १,६०,८२१ |
| वसूल भाग भांडवल | ८३,७८२ | ११९,३०७ | १५,५०३ | १६६,७९६ | - |
| राखीव निधी | ५०,२०९ | ५१,०९३ | ५५,१४२ | ५९,७१४ | - |
| कर्जे | ३९,३७१ | ११०,१०६ | १५३,६०१ | १७५,४०६ | - |
| विक्री | ११,५२३ | ११,०७५ | ७३,८५२ | १०२,३९६ | - |
| थकबाकी | ४,४८० | १,१२७ | ८,८६३ | ६३,३९८ | - |

**वाहतूक सहकारी संस्था :** नांदेड जिल्ह्यात श्रीनिवास येथे १९५२ साली पहिली वाहतूक संस्था स्थापन झाली त्यावर्षी तिची सभासद संख्या ११ व भाग भांडवल ५५० रूपये होते. या संस्थांची जिल्ह्यातील एकूण संख्या २००२-२००३ मध्ये फक्त तीन होती. जिल्ह्यातील या संस्थांची माहिती खाली दिली आहे :—

(रूपये हजारांत)

| तपशील | १९९९-२००० | २००१-२००२ | २००२-२००३ | २००४-२००५ |
|---|---|---|---|---|
| संस्था (संख्या) | ४ | ३ | ३ | ३ |
| सभासद (संख्या) | १२५ | ११५ | ११७ | १५० |
| वसूल भाग भांडवल | २२,८० | १८,५० | २९,५० | - |
| निधी (राखीव) | १,२८ | १,१५ | १,१७ | - |
| मालकीची वाहने | ४ | ३ | ३ | - |
| तोटा संस्था (संख्या) | ४ | ३ | ३ | - |

**पशुधन सहकारी संस्था :** २००२-२००३ मध्ये जिल्ह्यातील अशा संस्थांची एकूण संख्या ४२ होती. जिल्ह्यातील या संस्थांची माहिती खाली दिली आहे :—

(रूपये हजारांत)

| तपशील | १९९९-२००० | २००१-२००२ | २००२-२००३ | २००४-२००५ |
|---|---|---|---|---|
| संस्था (संख्या) | १८ | २२ | ३१ | ४२ |
| सभासद (संख्या) | ९,२० | ११,२५ | १५,८० | २३,५० |
| वसूल भाग भांडवल | १००,०० | १२०,०० | १५८,१० | २४०,०० |
| राखीव व इतर निधी | १०,०० | १५,०० | २०,०० | ५०,०० |
| एकूण पशूंची (संख्या) | १,१०० | १,२०० | १,६०० | ७,००० |

**आदिवासी सहकारी संस्था :** नांदेड जिल्ह्यात दिनांक १४-१०-१९७६ मध्ये किनवट तालुक्यात राजगड येथे स्थापन झाली. त्या वर्षी तिची सभासद संख्या ५४६ व भाग भांडवल ६,३६० रूपये होते. सन २००४-२००५ मध्ये जिल्ह्यात अशा संस्थांची संख्या २४ व सभासद संख्या २१,१९९ होती. त्यांचे भाग भांडवल, राखीव व इतर निधी, घेतलेली कर्जे, खेळते भांडवल व येणे कर्ज अनुक्रमे, १०,७७,२८; ७,६२,२५; ९,०८,३३ व ५,६४,९२ हजार रूपये होते.

## उद्योगांना आर्थिक सहाय्य

उद्योगधंद्याचे विकेंद्रीकरण करणे व ग्रामीण तसेच विकसनशील भागात औद्योगिकरणाचा वेग वाढविण्यास्तव शासन वचनबद्ध आहे. त्यासाठी विविध कार्यक्रम नियोजित केले जातात. जिल्हा पातळीवर नवीन उद्योग सुरू करणे किंवा जुन्या उद्योगांना जोमाने कार्यरत ठेवणे तसेच आपले उद्योग व्यवस्थित चालविण्यासाठी लघुउद्योजकांना भांडवलाची मोठी अडचण भासते. त्यासाठी शासनाने विविध प्रकारची वित्तीय महामंडळे तसेच आधारभूत औद्योगिक संरचना उपलब्ध करून देणारी महामंडळे स्थापन केलेली आहेत. नांदेड जिल्ह्यातील अशा महामंडळांची माहिती खाली दिली आहे.

**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ :** दि. १ ऑगस्ट १९६२ मध्ये या महामंडळाची स्थापना करण्यात आली. राज्यात समतोल औद्योगिक विकास साधने, विशेष करून राज्याच्या विकसनशील भागामध्ये उद्योगांची वाढ घडवून आणणे, राज्यातील विविध भागात व प्रत्येक जिल्ह्यात उद्योगधंद्याना लागणारे रस्ते, वीज, पाणीपुरवठा, मलनिःसारण आणि अन्य सामाजिक सुविधांची व्यवस्था करून उद्योगांना आपले उद्योगधंदे सुलभतेने व जलदतेने स्थापन करणे शक्य व्हावे हे या महामंडळाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. महामंडळाने निश्चित केलेल्या सुनियोजीत औद्योगिक क्षेत्रात उद्योग घटकांच्या गरजेनुसार भुखंडाचे वाटप, तयार औद्योगिक गाळे, मुबलक पाणीपुरवठा, रस्त्यावरील दिवे, जलःनिस्सारणाची सोय तसेच गृहनिर्माण कार्य कार्यक्रमाद्वारे औद्योगिक कामगारांना घरांची सोय इत्यादी मुलभूत सुखसोयी हे महामंडळ उपलब्ध करून देते. त्याच बरोबर संस्थांच्या सहकार्याने बँका, टपालखाते, दुरध्वनी केंद्र, अलेक्स, पोलीस चौकी, अग्निशामक दल इत्यादी सुविधांची सोय हे महामंडळ लघु-उद्योग घटकांना मिळवून देते.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातर्फे (२००४-२००५) नांदेड येथे ८१५ एकर क्षेत्रावर उद्योजकांकरिता २३८ भूखंड उपलब्ध करून देण्यात आले आहेत. त्यापैकी बऱ्याचशा प्लॉटमध्ये कारखाने सुरू करण्यात आले आहेत. त्याशिवाय सहकारी उद्योग वसाहती नांदेड, लोहा, धर्माबाद, व देगलूर येथे आहेत. मोठ्या उद्योगाबरोबरच लघु व कुटीरोद्योग स्थापनेसाठी जिल्हा उद्योग केंद्रामार्फत सर्व प्रकारचे मार्गदर्शन दिले जाते. जिल्ह्यात सहकारी क्षेत्रांतील नांदेड, धर्माबाद, लोहा व देगलूर येथे प्रत्येकी एक अशा चार सहकारी औद्योगिक वसाहती व मराठवाडा विकास मंडळाच्या दोन लघु औद्योगिक वसाहती किनवट व उमरी येथे आहेत.

**महाराष्ट्र राज्य लघु उद्योग विकास महामंडळ :** या महामंडळाची स्थापना १९ ऑक्टोबर १९६८ मध्ये झाली असून नांदेड येथील विभागीय कार्यालयाची स्थापना १९७४ मध्ये झालेली आहे. या महामंडळाचा मुख्य उद्योग लघु उद्योगांना दुर्मिळ कच्च्या मालाचा पुरवठा करणे व लघु उद्योगांनी बनविलेल्या तयार मालास बाजारपेठा मिळवून देणे हा आहे. लोखंड, पोलाद, कोळसा, कागद तसेच

जस्त, शिसे, मेण इत्यादी हा सर्व कच्चा माल जिल्हा उद्योग केंद्राने शिफारस केल्यानंतरच उद्योग घटकांना नियंत्रित दराने पुरविण्यात येतो. सातव्या योजनेत ५६३ लघु उद्योगांना ८,५५,७४ लक्ष रूपयांची बाजारपेठ मिळवून दिली असून ३१९ लघुउद्योग घटकांना १३,०६.८० लक्ष किमतीचा कच्चा माल या महामंडळाने पुरविलेला आहे. या महामंडळाने लघुउद्योगांना बाजारपेठ उपलब्धतेसाठी नांदेड जिल्ह्यात केलेल्या कार्याची माहिती खाली दिली आहे :—

| वर्ष | मालाच्या विक्रीसाठी मदत केलेल्या उद्योगांची संख्या | माल विकलेली ठिकाणे | विक्री केलेल्या मालाची किंमत (लाख रूपये) |
|---|---|---|---|
| १९९५-१९९६ | ५४ | नांदेड जिल्ह्यातील विविध शासकीय, निमशासकीय कार्यालयांना साहित्य पुरवठा करण्यात आला. | ३४३.४८ |
| १९९९-२००० | ५६ | -"- | ३००.६९ |
| २०००-२००१ | ४४ | -"- | १८०.०० |
| २००१-२००२ | ५८ | -"- | २६१.०० |
| २००२-२००३ | ५५ | -"- | २२८.१० |
| २००३-२००४ | ४२ | -"- | २५०.०० |
| २००४-२००५ | ४५ | -"- | ४२७.५४ |

बंजारा जिप्सी कलेचा विकास व्हावा या उद्देशाने नांदेड जिल्ह्यात एक प्रशिक्षण वर्ग चालविण्याचे शासनाच्या विचाराधीन होते. त्यानुसार महाराष्ट्र शासन पुरस्कृत व महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाच्या विद्यमाने बळीराम पाटील मिशन संचलित रेणुकादेवी कला वरिष्ठ महाविद्यालय माहूर येथे ३० मुलामुलींचे ६ महिन्याचे (एप्रिल, २००१ ते सप्टेंबर, २००१) बंजारा जिप्सी हस्तकला प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. त्यानुसार त्यांना बंजारा जिप्सी कलेचे प्रशिक्षण देण्यात आले आहे.

**महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ (MSFC) :** राज्य वित्तीय महामंडळ कायदा १९५१ अन्वये (महावित्त) या महामंडळाची स्थापना महाराष्ट्र राज्यात १९६३ साली झाली. वित्तीय महामंडळाचे जिल्ह्याचे ठिकाण जिल्हा कार्यालय कार्यान्वित आहेत आणि मध्यम उद्योगांना जमीन, इमारत यंत्रसामुग्री, उपकरणे इत्यादी प्रकारची स्थावर मालमत्ता संपादन करण्यासाठी लागणाऱ्या मुदत कर्जाची गरज भागविणे, उद्योग उभारणीस व आस्तित्त्वात असलेल्या उद्योगास विकास व आधुनिकीकरणासाठी कर्ज देणे व मागास व विकसनशील भागातील उद्योग उभारणीस चालना देणे हे महावित्तचे प्रमुख उद्दिष्ट आहे. महावित्त स्थावर मालमत्ता संपादन करण्यासाठी मर्यादित कंपन्या तसेच नोंदणीकृत सहकारी संस्थांना ६० लक्ष रूपयापर्यंत मालकीच्या आणि भागीदारीतील उद्योगांना ३० लक्ष रूपये पर्यंत कर्ज म्हणून देऊ शकते. महावित्तने कर्ज पुरवठा केल्यानंतर कर्ज परतफेडीचा कालावधी सुरूवातीच्या अर्ध्या वर्षाच्या विलंबावधीसह कर्ज फेडीचा कालावधी ७ ते १० वर्षांचा

असतो. परतफेडीचा कालावधी हा नफ्याचा अंदाज आणि पैशाची जमा यावर आधारित असतो. कर्जाची परतफेड सहामाही पद्धतीने करावयाची असते व कर्ज फेडीचा पहिला हप्ता कर्ज वितरणाचा पहिला हप्ता मिळाल्यापासून दुसऱ्या वर्षाच्या शेवटी सुरू होतो. महावित्तने सन १९६९-७० मध्ये १३ घटकांना ७.७१ लाख रुपये अर्थसहाय्य केले होते.

**महाराष्ट्र राज्य औद्योगिक व गुंतवणूक महामंडळ (सिकॅम) :** ३१ मार्च १९६६ रोजी या महामंडळाची स्थापना झाली असून मुंबई महानगर व पुणे महानगर विभाग सोडून राज्यातील इतर सर्व भाग सिकॅमच्या कार्यक्षेत्रात येतात. सिकॅम तर्फे प्रकल्पाच्या कल्पनेपासून ते उत्पादनोत्तर अवस्थेपर्यंत उद्योजकांना फलदायी सेवा देण्यात येतात. त्यामध्ये प्रकल्पाची निवड, स्थान निर्देशन सेवा, विविध वित्तीय सहाय्य, औद्योगिक सेवा सहाय्य, मर्चंट बँकींग सेवा, भाडे पट्ट्यावर साधन सामग्री, मोठ्या व मध्यम उद्योगास शासनाच्या प्रोत्साहनात्मक सवलती इत्यादी सेवा उद्योजकांना पुरविल्या जातात. सिकॅमने नांदेड जिल्ह्यात सन २०००-२००१ मध्ये १९५.०० लाख रूपये वरील कारणासाठी अर्थ सहाय्य दिले हाते. सन २००३-२००४ व २००५-२००६ ची माहिती निरंक आहे.

**मराठवाडा विकास महामंडळ :** या महामंडळाची स्थापना मराठवाड्यातील मागासलेल्या भागाच्या आर्थिक व औद्योगिक विकासासाठी सन १९६७ मध्ये केली. महामंडळाने नांदेड जिल्ह्यात मराठवाडा वस्त्रोद्योग महामंडळ, मराठवाडा सिरॅमिक कॉम्प्लेक्स व किनवट रूफींग टाईल्स ह्या कंपन्या स्थापन केल्या आहेत. या कंपन्या १९९४-९५ पासून बंद आहेत. या महामंडळाने मराठवाड्यातील तरूणांना स्वयंरोजगार निर्मितीसाठी व लघुउद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी बीजभांडवल योजना व सामुहिक प्रोत्साहन योजना राबविल्या आहेत.

महाराष्ट्र शासनाने मराठवाड्यातील ठिकठिकाणी विखुरलेल्या विणकरांच्या पुनर्वसनासाठी व त्यांना आपल्या भागातच रोजगार मिळवून देण्यासाठी मराठवाडा विकास महाममंडळ या राज्य शासनाच्या मालकीच्या उपक्रमामार्फत एकत्रित यंत्रमाग प्रकल्प राबविण्याचे १९७० साली ठरविले होते. या योजनेंतर्गत मराठवाड्यातील ६ जिल्ह्यात विणकरांच्या ४८ यंत्रमाग औद्योगिक सहकारी संस्था स्थापन केल्या. ह्या संस्थामार्फत २,३०४ यंत्रमाग विकत घेऊन प्रत्येक विणकराला दोन यंत्रमाग व एक राहते घर मिळण्याची व्यवस्था केली. उपरोक्त यंत्रमाग संस्थानी उत्पादित केलेल्या कापडावर प्रक्रिया करून बाजारपेठेत विक्री करण्यासाठी मराठवाडा वस्त्रोद्योग महामंडळाची कंपनी कायद्यातंर्गत १९७० साली स्थापन केली. टेक्स्कॉमची वार्षिक कापड उत्पादन क्षमता ३६० लक्ष मिटर होती. ४८ विणकर संस्थामध्ये ११५२ विणकर कुटुंबियांना रोजगार मिळालेला होता. तसेच विणकरांचे हेल्पर (मदतनीस) म्हणून तेवढेच ११५२ हेल्पर विणकरांना सुद्धा काम मिळत होते. तसेच मराठवाडा वस्त्रोद्योग व टेक्स्कॉम प्रकल्पांतर्गत जवळ जवळ ५००० लोकांना रोजगार मिळत होता. विणकरांना त्यांच्या विणाईपोटी साधारणपणे रूपये ४००० ते ५००० दरमहा प्राप्ती होत होती व त्यांची आर्थिक भरभराटसुद्धा झाली होती. परंतु सन १९९५ मध्ये विणकरांनी टेक्स्कॉमपासून विभक्त होण्याचा प्रस्तवा शासनाला सादर केला व त्याला अनुसरुन शासनाने सप्टेंबर, १९९५ मध्ये विणकर सहकारी संस्थांना टेक्स्कॉम पासून विभक्त करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर काही अपरिहार्य कारणामुळे हा प्रकल्प बंद आहे.

**मराठवाडा सिरॅमिक कॅम्प्लेक्स :** या महामंडळाने मराठवाड्याच्या अविकसित भागात सिरॅमिक्सचे नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करण्यासाठी मराठवाडा सिरॅमिक कॅम्प्लेक्स ही कंपनी स्थापन केली. महाराष्ट्र शासनाचा अंगीकृत व्यवसाय म्हणून कंपनी कायदा १९५६ अन्वये मराठवाडा सिरॅमिक कॅम्प्लेक्सची स्थापना १९८३ मध्ये करण्यात आली. हा प्रकल्प औद्योगिक क्षेत्र धनेगाव, नांदेड येथे सुमारे १० एकर क्षेत्रामध्ये उभारला आहे. मराठवाड्यातील अविकसित भागाला चालना देणे, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळास लागणाऱ्या किटकॅट व शॅकल तसेच कपबशा, संडासची भांडी इत्यादी वस्तू तयार करून त्याची विक्री करणे, सिरॅमिकचे नवीन तंत्रज्ञान मराठवाड्याच्या अविकसित भागात आणणे यासाठी खाजगी उद्योजकांना प्रशिक्षण देणे व त्यांना मूलभूत सोयी उपलब्ध करून देणे व अविकसित भागात लोकांना रोजगार उपलब्ध करून देणे या उद्देशाने ही कंपनी स्थापन करण्यात आली होती.

या प्रकल्पात खाजगी उद्योजकांना सुविधा उपलब्ध करून देण्याची १६ विविध आकाराचे गाळे बांधले व ते भाड्याने दिले. या व्यतिरिक्त तयार कच्चा माल व माल आणण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. सुमारे २५० कामगारांना रोजगार उपलब्ध झाला होता.

**किनवट रुफींग टाईल्स :** मराठवाडा विकास महामंडळाने किनवट सारख्या आदिवासी, अतीदुर्गम व मागासलेल्या भागामध्ये सर्वसामान्य माणसास घर बांधणीसाठी आवश्यक असलेली मातीची कौले तयार करून किफायतशीर भावाने विक्री करण्याकरिता व आदिवासी व इतर कामगारांना कामाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी १९७७ मध्ये हा प्रकल्प गोकुंदा ता. किनवट येथे सुरू केला होता. या प्रकल्पात सुमारे ११० स्त्री-पुरूषांना रोजगार मिळाला होता, परंतु संध्या हा प्रकल्प बंद आहे. मराठवाडा विकास महामंडळाने नांदेड जिल्ह्यात सर्वंकष प्रोत्साहन योजनेंतर्गत उद्योग व्यवसायांना केलेले अर्थसहाय्य जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगारांना पुरविलेले बीज भांडवल त्याची माहिती खाली दिली आहे :—

| क्र. | योजनेचे नाव व वर्ष | सहाय्य मिळालेल्या उद्योग घटकांची (संख्या) | मदत (लाख रूपये) | |
|---|---|---|---|---|
| | | | कर्ज | अनुदान |
| १. | सामुहिक प्रोत्साहन योजना १९७६ | १७ | २२.२३ | - |
| २ | सामुहिक प्रोत्साहन योजना १९७९ | १६६ | ७.७९ | ४.४४ |
| ३ | सामुहिक प्रोत्साहन योजना १९८३ | १०६ | - | ७६.८६ |
| ४ | सामुहिक प्रोत्साहन योजना १९८८ | ११२ | २१.८१ | ३६१.९९ |

महामंडळाने नांदेड जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगारांना पुरविलेले बीज भांडवल

| वर्ष | लाभार्थी संख्या | बीज भांडवल (लाख रूपये) |
|---|---|---|
| १९९०-९१ | २६५ | २३.६१ |
| १९९१-९२ | २०५ | २३.०० |
| १९९२-९३ | १३५ | १२.०० |
| १९९३-९४ | १११ | १८.३० |

**(६) महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ :** यंत्रमाग उद्योगाच्या वाढीस उत्तेजन देण्यासाठी आणि विणकरांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी १९७२ मध्ये या महामंडळाची स्थापना करण्यात आली. हे महामंडळ सुताची खरेदी व त्याचा पुरवठा करणे, असंस्कारित कापडाची विक्री करणे आणि यंत्रमाग संस्थांसाठी आवश्यक ती आर्थिक व्यवस्था करते.[२३]

या महामंडळाचे मुख्य कार्य म्हणजे शासकीय कार्यालयांना लागणारा विविध प्रकारच्या कापडाचा पुरवठा करणे, त्या अनुषंगाने ह्या महामंडळाने सन २००५-२००६ मध्य नांदेड जिल्ह्यात एकूण ११,८९,६९८ रूपये किमतीचा माल पुरविला होता. सन १९९५ ते २००६ पर्यंत महामंडळाने केलेल्या कार्याची माहिती खाली दिली आहे.

(रूपये लाखात)

| तपशील | वर्ष | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | १९९५-१९९६ | १९९९-२००० | २०००-२००१ | २००१-२००२ | २००२-२००३ | २००४-२००५ | २००५-२००६ |
| शासकीय वसतिगृह | ०.०२ | - | - | - | - | - | - |
| तालुका कार्यालय | ०.०५ | ०.१४ | - | - | - | - | - |
| जिल्हा परिषद | - | ५५.९७ | - | ३४.९८ | ४४.३५ | - | - |
| आदिवासी विकास | - | ०.२७ | १.२५ | - | - | - | २.४० |
| शासकीय रूग्णालय/ महाविद्यालय | - | ०.१३ | - | ०.०३ | ०.३२ | ०.५२ | ०.२३ |
| शासकीय दूध योजना | - | - | - | - | ०.६२ | ०.६० | - |
| सार्वजनिक बांधकाम/पाटबंधारे विभाग | - | ०.३२ | ४.२७ | ६.७९ | ४.१५ | ५.९६ | ८.२४ |
| जिल्हाधिकारी कार्यालय | - | ०.१३ | - | - | - | - | - |
| वन विभाग | - | - | - | - | १.४१ | - | ०.६४ |
| पोलिस विभाग | - | ०.६ | ५.१० | - | ०.१६ | - | ०.३८ |
| एकूण | ०.७ | ५८.०२ | १०.६२ | ४१.८० | ५१.०१ | ७.०८ | ११.८९ |

**(७) महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळे :** तिडके समितीच्या शिफारसीनुसार सहकार क्षेत्राबाहेरील हातमाग विणकरांना विणकाम व्यवसायाकरीता आवश्यक असलेले सर्व प्रकारचे सहाय्य

२३. वित्त सल्लागार व मुख्य लेखाधिकारी, महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ, मुंबई, जुलै, २००३.

Maharashtra State Gazetteers

देऊन त्यांना रोजगार मिळवून देण्याच्या उद्देशाने या महामंडळाची स्थापना करण्यात आली. हे महामंडळ कंपनी कायदा १९५६ अंतर्गत २९ ऑक्टोबर १९७१ मध्ये पंजीबद्ध झाले. महामंळाचा मुख्य उद्देश्य नफा कमविणे हा नसून सामाजिक बांधीलकीतून परंपरागत असलेली कला अस्तित्त्वात ठेऊन विणकरांना नियमित रोजगार उपलब्ध करून देणे हा आहे. विणकरांनी तयार केलेल्या कपडाची विक्री व्हावी या हेतूने व विणकरांना रोजगार उपलब्ध व्हावा या हेतूने महामंडळाने नागपूर, मुंबई, पुणे, औरंगाबाद, जळगाव, अमरावती, अकोला, यवतमाळ व नांदेड इत्यादी ठिकाणी विक्री केंद्रे सुरू केली आहेत. त्यातून हातमाग कापडाची विक्री करण्यात येते.[२४] हातमाग महामंडळाने नांदेड येथे १९७७ साली किरकोळ विक्री केंद्र सुरू केले आहे. हातमागावरील कापड व रंग पक्के असतात. महामंडळाकडून विशेष सूट योजनाही राबविण्यात येते. विशेष सूट योजना राबविण्यात येत असताना नांदेड शहराव्यतिरिक्त तालुक्याच्या ठिकाणी व प्रमुख व्यापारीपेठा असलेल्या ठिकाणी मर्यादीत कालावधीकरिता विक्री स्टॉल उघडण्यात येतात. त्याशिवाय शासनाच्या विविध विभागांना हातमाग कापडाचा पुरवठा शासनाने निर्धारित केलेल्या दराने केला जातो. महामंडळाने नांदेड जिल्ह्यात २००२-२००३ मध्ये १९,१३,८८४ रुपये किंमतीच्या हातमाग कापडाची विक्री केली होती. त्याची माहिती खाली दिली आहे :—

(रूपये लाखांत)

| वर्ष | एकूण विक्री | वर्ष | एकूण विक्री |
|---|---|---|---|
| १९९९-२००० | ७.८७ | २००२-२००३ | १९.१४ |
| २०००-२००१ | १०.२१ | २००३-२००४ | ४०.९३ |
| २००१-२००२ | ८.७८ | २००४-२००५ | २१.२४ |
| | | २००५-२००६ | १०.२५ |

**(८) महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ :** महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमाखाली १९७२ साली या महामंडळाची स्थापना मुख्यतः आदिवासी क्षेत्रामध्ये अन्नधान्य आणि दैनंदिन वापराच्या इतर वस्तू यांचा पुरवठा करण्यासाठी प्राथमिक केंद्रे चालविणे व आदिवासी मुलांसाठी निवासी आश्रमशाळा चालविणे यासाठी झाली.

आदिवासी व्यक्तींची पिळवणूक होऊ नये म्हणून त्यांचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने १९७६ मध्ये खाजगी अभिकरणांना आदिवासींना कर्जे देण्यास व आदिवासी क्षेत्रामध्ये कृषी उत्पादनांची व वन उत्पादनांची खरेदी-विक्री करण्यास कायद्यान्वये मनाई करण्यात आल्यामुळे, आदिवासी विकास महामंडळे शासनाच्या एकाधिकार खरेदी व खावटी वित्त व्यवस्था या योजना राबविणारा 'मुख्य अभिकर्ता' म्हणून कार्य करतात.

या महामंडळाचे उप प्रादेशिक कार्यालय नांदेड जिल्ह्यात किनवट येथे असून या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रांत नांदेड, परभणी व हिंगोली जिल्हे आहेत. किनवट (माहूर तालुक्यातील टीएसपी क्षेत्रांतील

२४. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ, नागपूर, सप्टेंबर, २००३.

आदिवासी विकास कार्य. सहकारी संस्था २४, संस्थेची खरेदी केंद्रे १६, मंडळाची खरेदी केंद्रे १७, चिखली, जलधारा, राजगड, सारखणी व मांडवी येथे गोदामे २२, शासकीय आश्रमशाळा व वसतिगृहे १५ आहेत.

एकाधिकार योजनेंतर्गत शेतमाल, गहू, तूर, ज्वारी, मूग, उडिद, तीळ, भुईमूगशेंग, हरभरा व सुर्यफूल व वनमालापैकी मोहफूल, मोहबिज, डिंक, आवळा, बेहडा, लिंबोळी, चिंच, चिंचबी, गुंजबी, पलसलाख, वाहवाबी व बिबा, या वस्तू अधिसुचीत केल्या आहेत.

आदिवासींच्या शेती उत्पादीत मालाला योग्य भाव मिळावा म्हणून व त्यांची व्यापाऱ्याकडून पिळवणूक थांबवावी या दृष्टिकोनातून (महाराष्ट्र राज्य आर्थिक सुधारणा कायदा १९७६) नांदेड जिल्ह्यातील किनवट व माहूर तालुक्यांतील आदिवासी उपयोजना क्षेत्रात शासनाचे मुख्य एजंट म्हणून आदिवासी सेवा सह. संस्था मार्फत धान्य खरेदी योजना राबविली जाते. या योजनेंतर्गत सन २००५-२००६ मध्ये ७४,६४,१०१ रूपये किंमतीचा माल खरेदी करण्यात आला. सन १९९९ ते २००५-२००६ पर्यंत या योजनेची माहिती खाली दिली आहे.

| हंगाम | एकूण झालेली खरेदी | |
|---|---|---|
| | वजन (क्विंटल) | किंमत (रूपये) |
| १९९९-२००० | १२४५१.०३ | १,२३,३६,५४१ |
| २०००-२००१ | १०६०३.०८ | ९०,६६,०९९ |
| २००१-२००२ | ४५९६.९९ | ५०,६४,४६५ |
| २००२-२००३ | ३०२०.४५ | ८३,९७,७१९ |
| २००३-२००४ | २६६९.६५ | ४१,८४,८९४ |
| २००४-२००५ | १०६७४.०० | १,६६,०६,४९१ |
| २००५-२००६ | ४७५९.८८ | ७४,६४,१०१ |

एकाधिकार व आधारभूत खरेदीच्या हुंडीचे व्यवहार सन २००५-२००६ पासून मराठवाडा ग्रामीण बँकेमार्फत करण्यात येतात.

**खावटी कर्ज वाटप योजना :** या योजनेंतर्गत आदिवासी लोकांना पावसाळ्यात (जून-जुलै) काम मिळत नाही. त्यामुळे त्यांची उपासमार होऊ नये आणि त्यांनी आपले पीक व्यापाऱ्यांकडे गहाण ठेवून नये म्हणून सन १९७७-७८ पासून ही योजना राबविण्यात येते. यामध्ये सन २००३-२००४ पर्यंत ९० टक्के धान्य व १० टक्के रोख रक्कम वाटप करण्यात येत होते. सदर योजनेंतर्गत

Maharashtra State Gazetteers

सन २००३-२००४ मध्ये ५५२ सभासदांना ४,५९,८०० रूपये रक्कम वाटप करण्यात आले होते. सन १९९९-२००० ते २००३-२००४ पर्यंत खावटी कर्ज वाटपाचा तपशील खाली दिला आहे :—

| हंगाम | सभासद संख्या | एकूण वाटप रक्कम (रूपये) | हंगाम | सभासद संख्या | एकूण वाटप रक्कम (रूपये) |
|---|---|---|---|---|---|
| १९९९-२००० | १,८२५ | १५,३१,४८४ | २००१-२००२ | २,४२५ | १,८६,६७,६०० |
| २०००-२००१ | ६,३६० | ५२,१५,२०० | २००२-२००३ | ५७६ | ४,८५,६०० |
| | | | २००३-२००४ (नियमित) | ५५२ | ४,५९,८०० |

२० जुलै २००४ च्या निर्णयानुसार सन १९८८-८९ ते सन २००२-२००३ मध्ये वाटप केलेले व थकीत असलेले खावटी कर्ज शासनाने माफ केले असून सुधारीत दराने दारिद्र्य रेषेखालील सन २००३-२००४ मध्ये ५,४०० पात्र आदिवासी लाभार्थींना सन २००३-२००४ मध्ये ५० टक्के रोख स्वरूपात एकूण खावटी कर्ज १,७२,७९,००० रूपये वाटप करण्यात आले त्याचा तपशील खाली दिला आहे :—

(रूपये)

| तालुके | लाभार्थी संख्या | माल स्वरूपात खावटी कर्ज | रोख वाटप | एकूण वाटप |
|---|---|---|---|---|
| किनवट (टीएसपी क्षेत्र) | ३,५८५ | ५७,३१,४४६ | ५७,६७,५५४ | १,१४,९९,००० |
| माहूर (टीएसपी क्षेत्र) | १,०५५ | १७,१७,०९७ | १७,२७,९०३ | ३४,४५,००० |
| किनवट (ओटीएसपी क्षेत्र) | २५८ | ३,९०,२५४ | ३,९२,७४६ | ७,८३,००० |
| माहूर (ओटीएसपी क्षेत्र) | १३४ | २,०५,३५५ | २,०६,६४५ | ४,१२,००० |
| हदगाव (ओटीएसपी क्षेत्र) | १५० | २,२६,७६७ | २,२८,२३३ | ४,५५,००० |
| भोकर (ओटीएसपी क्षेत्र) | ५९ | ८४,२२५ | ८४,७७५ | १,६९,००० |
| हिमायतनगर (ओटीएसपी क्षेत्र) | १७२ | २,५७,१६८ | २,५८,८३२ | ५,१३,००० |
| एकूण (क्षेत्र) | ५,४०० | ८६,१२,३१२ | ८६,६६,६८८ | १,७२,७९,००० |

शासनाने नांदेड जिल्ह्याकरीता सुधारीत खावटी कर्ज वाटपासाठी ५,४०० लाभार्थींचे उद्दिष्ट दिले होते, ते वरील प्रमाणे साध्य झाले असून यामध्ये कुपोषित (ग्रेड ३ व ४) २८ लाभार्थींस व आदिम जमातींपैकी ४६१ कोलाम कुटुंबाना खावटी कर्ज वाटप करण्यात आले. सन २००४-२००५ मध्ये एकूण ४,९१४ आदिवासी बीपीएल कार्डधारकांना खावटी कर्ज वाटपाचे उद्दिष्ट ठरवून दिलेले होते.

Maharashtra State Gazetteers

त्याप्रमाणे टीएसपी कार्यक्षेत्रात ३,१२३ व ओटीएसपी कार्यक्षेत्रात १,७९१ सभासदांचे खावटी कर्ज मंजूर करून त्याचे खालील प्रमाणे वाटप करण्यात आले :—

(रूपये)

| तालुके | लाभार्थी संख्या | माल रूपाने खावटी कर्ज | रोख वाटप | एकूण वाटप |
|---|---|---|---|---|
| किनवट (टीएसपी क्षेत्र) | २,७३७ | ५,९८,०३० | २५,५८,६९२ | ३५,३९,००० |
| माहूर (टीएसपी क्षेत्र) | ३८६ | ८८,१४३ | ३,७६,५६७ | १२,५८,००० |
| किनवट (ओटीएसपी क्षेत्र) | ३९० | ८,३४,९२६ | ३,५८,०७४ | ११,९३,००० |
| माहूर (ओटीएसपी क्षेत्र) | १९६ | ४,५६,६९८ | १९५,३०२ | ६५,२०० |
| हदगाव (ओटीएसपी क्षेत्र) | ४०८ | १०,१४,४४६ | ४,३३,५५४ | १४,४८,००० |
| भोकर (ओटीएसपी क्षेत्र) | ३५० | ६,४२,४४७ | २,७५,५५३ | ९,१८,००० |
| हिमायतनगर (ओटीएसपी क्षेत्र) | ४४७ | १०,५५,७०७ | ४,५१,२९३ | १५,०७०,००० |
| एकूण (ओटीएसपी क्षेत्र) | ४,९१४ | १,०८,६५,९६५ | ४६,४९,०३५ | १,५५,१५,००० |

सन २००५-२००६ या वर्षाचे नांदेड जिल्ह्यासाठी एकूण १,६८३ लाभार्थींना एकूण ५३,७४,००० रूपयांचे खावटी कर्ज वाटपाचे उद्दिष्ट ठरवून दिलेले असून ३० सप्टेंबर २००६ पर्यंत १०० टक्के खावटी कर्ज वाटप पूर्ण झालेले आहे. त्यामध्ये आदिवासी कुपोषित बालकांचे कुटुंब दारिद्र्य रेषेखालील व अंत्योदय मधील ५३३ आदिवासी कुटुंबाना खावटी कर्जाचा लाभ देण्यात आला. त्यामध्ये ७० टक्के खावटी कर्ज वसूल पात्र आहे.

**विद्युतपंप व तेलपंप वाटप योजना :** या योजनेंतर्गत आदिवासी उपयोजना क्षेत्रांतील व बिगर आदिवासी उपयोजना क्षेत्रांतील शेतकऱ्यांना शेतीचा विकास करण्यासाठी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प (कार्यालय किनवट) योजने अंतर्गत १०० टक्के अनुदानावर मंजूर केलेले विद्युतपंप व तेलपंप पुरविण्याचे काम हे महामंडळ सन १९८०-८१ पासून करते. या योजनेंतर्गत (प्रकल्प कार्यालय किनवटकडून) सन १९७३-७४ ते २००३-२००४ या कालावधीत मंजूर केलेल्या एकूण ४,४६४ विजपंपापैकी (ऑगस्ट २००६ पर्यंत) वाटप केलेल्या ४,३३० पंपापैकी २,८२७ विद्युतपंप चालू आहेत. तर उर्वरित १,६०३ विद्युतपंप चालू करण्याची कार्यवाही सुरू आहे. तर सन १९७३-७४ ते २००५-२००६ या कालावधीत मंजूर १,५२४ तेलपंपापैकी १,०७० तेलपंप वाटप करून ते कार्यान्वीत करण्यात आले आहेत. ४५४ तेलपंप वाटप करावयाचे आहेत.

**वसतिगृह व आश्रमशाळांना माल पुरवठा :** किनवट व माहूर तालुक्यात नांदेड, परभणी व हिंगोली जिल्ह्यातील शासकीय आश्रमशाळा व शासकीय वसतिगृहांना राष्ट्रीय उपभोक्ता संघ मुंबई या संघाकडून प्राप्त झालेला माल या कार्यालयाकडून पुरविला जातो. हा माल नांदेड जिल्ह्योबरोबरच

परभणी व हिंगोली जिल्ह्यातील वरील शाळांना पुरविला जातो. सन २००६ मध्ये २२ आश्रमशाळा व १५ वसतिगृहांना माल पुरवठा केला होता. त्याची माहिती खाली दिली आहे :—

| तालुके | जिल्हा | आश्रमशाळा | वसतिगृह |
|---|---|---|---|
| किनवट-माहूर | नांदेड | १४ | ५ |
| हदगाव | नांदेड | ३ | २ |
| नांदेड | नांदेड | ० | ३ |
| भोकर | नांदेड | ० | २ |
| परभणी | परभणी | ० | १ |
| कळमनुरी | हिंगोली | ५ | २ |
| एकूण | | २२ | १५ |

**द्वार वितरण योजना :** आदिवासी उपयोजना क्षेत्रांतील शासकीय गोदामातून स्वस्त धान्य दुकानदारांना त्यांच्या दुकानापर्यंत माल वाहतूक करण्यासाठी शासनाकडून पाच वाहने उपलब्ध करून दिली आहेत. त्यापैकी चार वाहनांतून किनवट, तालुक्यातील २९९ व माहूर तालुक्यातील ६१ स्वस्त धान्य दुकानदारांना जुलै, २००६ अखेर रूपये ६,४७,५९७ किंमतीच्या ४३,१७३.०८ क्विंटल मालाची वाहतूक केली.

**एन.एस.एफ.डी.सी.योजना :** राष्ट्रीय अनुसूचित जाती-जमाती आर्थिक विकास निगम नवी दिल्ली यांच्या सहाय्याने या महामंडळाने आदिवासी होतकरू व सुशिक्षित तरूणांना स्वावलंबी होण्यासाठी ही योजना १९९४-९५ ते १९९८-९९ मध्ये सुरू केली. लाभार्थींना विविध धंद्यासाठी अल्प दराने ५३,०७,००० रूपये (वसूलपात्र हप्त्याची रक्कम ) अर्थ पुरवठा केला होता. सन २००२-२००३ पासून सदर योजना शबरी आदिवासी आर्थिक विकास व वित्त महामंडळाकडे वर्ग करण्यात आली आहे.

**धान्यकोष योजना :** डोंगराळ व दुर्गम भागातील आदिवासींचे जीवनमान सुधारण्यासाठी शासनाकडून ही योजना सन १९९५ पासून राबविली जाते. ही योजना आदिवासी उपयोजना क्षेत्रांत सेवाभावी संस्थांच्या सहकार्याने किंवा स्वतंत्रपणे स्वतःचे धान्य वर्गणी म्हणून देऊ शकत नाहीत अशा सभासदांना त्यांच्या वर्गणीचा २/३ सहभाग महामंडळाकडून फक्त एकवेळ अनुदान रूपाने दिले जाते. १/३ वर्गणी स्वतः सभासदाने धान्यकोषात जमा करावयाची असते. अशा प्रकारे जमा झालेले धान्य संस्थेच्या निर्णयानुसार सभासदांना वाटप करणे व व्याज रूपात काही द्यावयाचे धान्य पुढील हंगामात जमा करून साठा वाढविणे ही संबंधीत मंडळाची जबाबदारी असते. ही योजना राबविण्याची जबाबदारी प्रकल्प कार्यालय, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय व आदिवासी विकास मंडळाची संयुक्त असते. सन १९९७-९८ मध्ये राज्य पुरस्कृत धान्य कोष योजनेंतर्गत ५ संस्थां मधील ४५ सभासदांना ४५ क्विंटल गहू व ४२ क्विंटल तांदूळ वाटप केले. तर त्या वर्षी केंद्र पुरस्कृत धान्यकोष योजनेंतर्गत ७ संस्थांच्या एकूण ७४ सभासदांना रुपये २,९४,८४४ रकमेचे ३,२६५ क्विंटल (गहू ११६ + तांदूळ

१४९) या प्रमाणे वाटप केले. सन २०००-२००१ मध्ये राज्य पुरस्कृत धान्यकोष योजनेंतर्गत १९ संस्थांचे एकूण १,५८९ सभासदांना तांदूळ १६४.६३ क्विंटल रुपये १४,३७,२५४ रकमेचा धान्य पुरवठा करण्यात आला.

**महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ :** या महामंडळाची स्थापना सप्टेंबर, १९६६ मध्ये, महाराष्ट्रातील आजारी गिरण्यांचे व्यवस्थापन व पुनर्वसन व महाराष्ट्रातील औद्योगिकदृष्ट्या मागासलेल्या विभागात नवीन गिरण्या उभारणे या उद्दिष्टांसाठी स्थापन करण्यात आले.

**मराठवाडा वस्त्रोद्योग महामंडळ, नांदेड :** मराठवाडा विकास महामंडळ, औरंगाबाद या महाराष्ट्र शासनाच्या मालकीच्या कंपनीने १९७० मध्ये मराठवाड्यात एकत्रित यंत्रमाग प्रकल्प राबविण्यासाठी मराठवाडा वस्त्रोद्योग महामंडळ टेक्स्कॅाम या महामंडळाची कंपनी आशयांतर्गत स्थापना केली. तसेच या महामंडळास लागणारे कच्चे कापड (Grey Cloths) पुरविण्यासाठी मराठवाड्यास नऊ ठिकाणी ४८ यंत्रमाग औद्योगिक सहकारी संस्था स्थापन करण्यात आल्या. त्यामध्ये एकूण २,३०४ यंत्रमाग बसविण्यात आले.[२५]

मराठवाड्यातील आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या व रोजगाराअभावी इतरत्र स्थलांतरीत होत असलेल्या विणकरांची भटकंती थांबवून त्यांना रोजगार मिळवून देण्यासाठी शासनाने नांदेड सारख्या औद्योगिकदृष्ट्या मागास भागात टेक्स्कॅाम प्रकल्पाची स्थापना केली व विणकरांच्या ४८ यंत्रमाग औद्योगिक सहकारी संस्थांची स्थापना मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांत केली. या विणकरांना एक राहते घर व दोन यंत्रमाग उपलब्ध करून दिले. या संस्थामार्फत टेक्स्कॅामला लागणाऱ्या कच्च्या कापडाचा पुरवठा होत होता. त्यासाठी विणकरांना ठराविक दराने विणाई मजूरी टेकस्कॅाम कडून मिळत असे. ही व्यवस्था सप्टेंबर १९९५ पर्यंत कार्यरत होती.

या महामंडळाने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून (M.I.D.C.) ३२.३३ एकर जमीन कारखाना उभारणीसाठी ९५ वर्षांच्या कालावधीसाठी भाडे तत्त्वावर घेऊन तेथे कपड्यावर प्रक्रिया करण्याचे अत्यंत आधुनिक प्रक्रियागृह (Process House) उभारले आहे. या गृहात सूती व कृत्रिम धाग्यांच्या कच्च्या कपड्यावर विविध प्रक्रिया केल्या जात असत. त्यांची उत्पादन क्षमता, सूती कपडा ३६० लक्ष मीटर्स प्रतिवर्षी व कृत्रिम धाग्याचा कपडा १८ लक्ष मीटर्स प्रतिवर्षी असून टेक्स्कॅामला सतत होणाऱ्या तोट्यामुळे शासनाने १२ डिसेंबर २००२ च्या निर्णयाने टेक्स्कॅाममधील सर्व कामगार, कर्मचारी व अधिकारी यांना स्वेच्छा निवृत्तीचा लाभ देऊन दिनांक ३१ जानेवारी २००३ रोजी सेवानिवृत्त करण्यात आले असून या महामंडळाच्या मालकीची नांदेड जिल्ह्यातील ही एकमेव उद्योग (गिरणी) हस्तांतरीत करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

या महामंडळाने सन २०००-२००१, २००१-२००२, २००२-२००३ व २००३-२००४ यावर्षी अनुक्रमे, २७.७१ लाख, १०.४१ लाख, ३.०१ लाख व ३.१९ लाख रूपये उलाढाल केली होती.

---

२५. महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ, मुंबई (सप्टेंबर, २००६).

Maharashtra State Resource Centers

**महाराष्ट्र कृषी-उद्योग विकास महामंडळ :** शेतकऱ्यांना कृषी भरणा साहित्यांचे वितरण आणि इतर कृषी विषयक सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने सरकारने १७ कृषी उद्योग महामंडळांची स्थापना केली असून भारत सरकारने जारी केलेल्या राष्ट्रीय मार्गदर्शक तत्वानुसार महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ हे कृषी उद्योग या नावाने ओळखले जाते. या महामंडळाची स्थापना १५ डिसेंबर १९६५ रोजी कंपनी कायद्याखाली करण्यात आली. कृषी अवजारांचे उत्पादन आणि वितरण, खते व जंतूनाशके इत्यादीसारख्या कृषी भरणा साहित्यांचे उत्पादन व वितरण, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन व त्याला पुरक अशा उद्योगांकरिता लागणाऱ्या उत्पादनाचे उत्पादन व वितरण, कृषी मालावर प्रक्रिया करण्याकरिता कृषीवर आधारीत उद्योग विकसित करणे व अशा प्रकारच्या उद्योगांना सहाय्य करणे व कृषी क्षेत्र व पुरक उद्योगधंदे असणाऱ्या व्यक्तींना त्यांच्या शेती आणि उद्योगांचे आधुनिकीकरण करण्याकरिता सहाय्य करणे ही या महामंडळाची प्रमुख उद्दीष्टये होत. तसेच पशुखाद्यांचे उत्पादन व विक्री, दाणेदार खतांचे उत्पादन आणि विक्री, किटकनाशक प्रक्रिया व विक्री इत्यादी कार्ये आहेत. त्यापैकी दाणेदार खतांचे उत्पादन नांदेड येथे करून त्याची कृषी उद्योग या व्यापारी नावाने विक्री करण्यात येते. सदर कारखान्याची उत्पादन क्षमता आणि त्यामध्ये केलेली गुंतवणूक (मार्च २००१) अनुक्रमे १५,००० मे. टन व १४२.७३ लाख रुपये होती. तसेच मार्च २००५ मध्ये या कारखान्याची उत्पादन क्षमता ७०,००० मे. टन व गुंतवणूक १५५.८७ लाख रुपये होती.[२६]

## कृषी अर्थ सहाय्य

कृषी व्यवसाय प्रगत करण्यासाठी शेतकऱ्यांना आवश्यक तेवढा अर्थपुरवठा करणे महत्त्वाचे आहे. बहुसंख्य शेतकरी गरीब असल्यामुळे त्यांना पुरेसे आर्थिक सहाय्य दिल्याशिवाय त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारणार नाही. या उद्देश्याने शासन शेतकऱ्यांना बी-बीयाणे, खते, कृषी अवजारे, जमीन सुधारणा, विहिरी, बैल खरेदी, इत्यादीसाठी कर्ज देणे वरील कारणास्तव कर्जे देत असतानाच शासन कृषी विकास योजना देखील राबवित असते. शेतकऱ्यांना तगाई सुद्धा दिली जात असे. शासकीय मदतीशिवाय काही महामंडळे व पत पुरवठा करणाऱ्या संस्था सुद्धा शेतकऱ्यांना आर्थिक मदत करतात.

विसाव्या शतकाच्या सुरूवातीपर्यंत तत्कालीन हैद्राबाद राज्यात स्वतंत्र कृषी खाते नव्हते. हा विभाग महसूल विभागाच्या अंतर्गत होता व त्याच्याकडे शेकऱ्यांना नियमीत आर्थिक मदत मिळण्याची तरतुदही नव्हती. दुष्काळाच्या वेळी विहिरी खोदण्यासाठी शेतकऱ्यांना आर्थिक मदत केली जात असे. त्यासाठी विहिर व शेत शासनाकडे अभिहस्तांतरीत करावे लागे व कर्जाची परत फेड हप्त्याने करावी लागत असे. त्यासाठी वार्षिक ६ टक्के व्याजाचा दर होता.

तत्कालीन हैद्राबाद राज्यास दुष्काळाचे अनेक तडाखे बसले होते. परंतु नांदेड जिल्ह्यास दुष्काळाचा फारसा तडाखा बसलेला नव्हता. इतकेच नव्हे तर १८९९ ला पडलेल्या दुष्काळाचा देखील तडाखा नांदेड जिल्ह्यास बसलेला नव्हता. त्याचे मुख्य कारण म्हणजे जिल्ह्यातील सुपीक जमीन तसेच जिल्ह्यात ५,७६४ विहिरी व १६९ लहान मोठे तळी होती. त्यातून शेतीसाठी पाणीपुरवठा होत असे. त्यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना अर्थसहाय्य दिल्याचे आढळून येत नाही.

---

२६. **राज्य सार्वजनिक उपक्रमांचे कार्य** २०००-२००१ व २००४-२००५, पृ. ८१ व ७१.

तत्कालीन हैद्राबाद राज्याने विसाव्या शतकात शेतकऱ्यांना अर्थ सहाय्य देण्याची योजना अंमलात आणली. १८८३ च्या लँड इम्प्रूव्हमेंट लोन्स ॲक्ट नुसार व १८८४ ॲग्रिकल्चरिस्ट लोन्स ॲक्ट नुसार शेतकऱ्यांना तगाई कर्जे देण्यात येत असत. १८८४ च्या ॲक्ट अन्वये शेतकऱ्यांना वार्षिक ५.५० टक्के दराने, बैल खरेदीसाठी, बी-बियाणे खरेदीसाठी अर्थसहाय्य करण्यात येत होते तर १८८३ च्या लँड इम्प्रूव्हमेंट ॲक्ट अन्वये शेतकऱ्यांना वार्षिक ४.५० टक्के दराने विहिर बांधण्यासाठी ऑईल-इंजिन पंपसेट, ट्रॅक्टर, नांगर इत्यादी खरेदीसाठी अर्थसहाय्य दिले जात होते. १९२१, १९४१, १९५१-५२ व १९५९-६० यावर्षी जिल्ह्यातील शेतकऱ्यांना अनुक्रमे २५,३४८.९४, १४,९६८.९५, १,७६,५००.७६ व १०,६०,६६०.५३ रूपये तगाई कर्ज वाटप करण्यात आले होते. तर १८८४ च्या ॲग्रिकल्चरिस्ट ॲक्ट अन्वये १९३१, १९४१, १९५१-५२ व १९५९-६० मध्ये अनुक्रमे २७,५३०.००, १,७०,०५६.७४, २,६३,३३०.८६ व २२,१५,६६२.२८ रूपये प्रत्यक्ष कर्ज वाटप केले होते. अधिक धान्य पिकवा या योजनेखाली १९५४-५५ व १९५९-६० मध्ये अनुक्रमे १२,००० व ३७,६९३ रुपये कर्ज वाटप केले होते.[२७]

महाराष्ट्र शासनाकडून देण्यात येणारे तगाई कर्ज २२ सप्टेंबर १९७२ पासून बंद करण्यात आले असून शेतकऱ्यांना दीर्घ, मध्यम व अल्प मुदतीच्या कृषीविषयक आर्थिक गरजा विविध सहकारी संस्था, जिल्हा मध्यवर्ती बँक, महाराष्ट्र राज्य सहकारी कृषी व ग्रामीण विकास बँक आणि राष्ट्रीयीकृत बँकांमार्फत भागविल्या जातात. यापैकी सहकारी संस्थांव्यतिरिक्त इतरांना पुनर्वित पुरवठा करण्याचे कार्य राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक (नाबार्ड) करते.

शेतकऱ्यांना तगाई कर्ज जिल्हा परिषद महसूल विभागाकडून देण्यात येत होते. १९६८-६९ मध्ये ८,३१९ शेतकऱ्यांना २०.६८ लाख रूपये वरील दोन्ही विभागाकडून दिले होते. १९७२ पासून तगाई कर्ज योजना शासनाने बंद केली आहे.

## विविध बँका

**महाराष्ट्र राज्य सहकारी कृषी व ग्रामीण विकास बँक, (भूविकास बँक) :** ही बँक जमीन सुधारणा, नवीन विहिरी खोदणे, जुन्या विहिरी दुरूस्ती, वीजपंप, ऑईल इंजिन इत्यादी विविध कारणासाठी शेतकऱ्यांना अर्थपुरवठा करते. याशिवाय अल्पभूधारक व नवभूधारकांनाही मेषपालन, बकरीपालन, गोबर गॅस इत्यादीसाठी भांडवली कर्जपुरवठा करते. नाबार्डकडून या बँकेला पुरर्वित्त पुरवठा होतो.

इ.सन १९६९ मध्ये बँकेने २,८३५ सभासदांना विविध कारणासाठी ९८.१० लाख रूपये कर्ज वाटप केले होते. सन १९९०-९१ मध्ये बँकेने नवीन विहीर, संयुक्त विज मोटार, दुग्ध व्यवसाय, फळबाग योजना, पाईप लाईन, मळणी यंत्र, कुक्कुटपालन इत्यादीसाठी २,२२५ सभासदांना ४५६.८७ लाख रूपये कर्जपुरवठा केला होता.[२८]

---

२७. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९७१, पृ. ३१२, ३१३, ३१४, ३१८.

२८. नांदेड जिल्हा सहकारी कृषी व ग्रामीण विकास बँक मुंबई यांच्याकडून माहिती प्राप्त, इ.स. २००२ पासून ही बँक शासनाने अवसायनात काढलेली आहे.

**राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक (नाबार्ड) :** या बँकेची स्थापना नॅशनल बँक फॅार ॲग्रिकल्चर ॲण्ड रूरल डेव्हलपमेंट ॲक्ट १९८१ अन्वये जुलै १९८२ मध्ये रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या कृषी पतपुरवठा विभाग, ग्रामीण नियोजन व पत विभाग आणि कृषी पुनर्वित महामंडळ यांचे विलीनीकरण करून झाली. ही बँक ग्रामीण पतपुरवठ्याच्या संघटित संरचनेत शिखर संस्था म्हणून कार्य करते. बँकेने ग्रामीण भागातील उत्पादक कार्यक्रमासाठी वित्त पुरवठा करणाऱ्या विविध सहकारी संस्था, राज्य भू-विकास बँक, राज्य सहकारी बँक, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक अशा संस्थाना पुनर्वित पुरवठा करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. या बँकेने बायोगॅस, कुक्कुटपालन, मत्स्यव्यवसाय, दूध-डेअरी, ग्रामविकास, इत्यादीसाठी सन १९९८-९९, १९९९-२०००, २००३-२००४ व २००४-२००५ मध्ये जिल्ह्यात अनुक्रमे १३०९.६४३, १७४८.५३६, ४८४.९१७ व ३३७.६०० लाख रुपये कर्ज वाटप केले होते. सदरहू माहितीचा सन २००४-२००५ मधील तपशील खाली दिला आहे.[२९]

(रूपये लाखात)

| क्र. | तपशील | २००४-२००५ |
|---|---|---|
| १. | लघु सिंचन | २८.५४१ |
| २. | ग्रामीण विद्युतीकरण व विशेष कृषी प्रकल्प | ०.००० |
| ३. | भूविकास व कोरडवाहू शेती विकास | १६.१५५ |
| ४. | फॅार्म यांत्रिकीकरण | ०.४७७ |
| ५. | वने व पडीत जमीन | ०.००० |
| ६. | रोप वाटिका व फळबाग | ०.००० |
| ७. | कुक्कुटपालन | ०.००० |
| ८. | बायोगॅस | ०.००० |
| ९. | शेळी, मेंढी व डुक्कर पालन | १.०११ |
| १०. | मत्स्यव्यवसाय | ०.००० |
| ११. | दुग्धव्यवसाय | ८.३११ |
| १२. | कृषी उद्योगधंदे | ०.००० |
| १३. | कृषीतर क्षेत्र | ११९.८५९ |
| १४. | इतर | १.११२ |
| १५. | एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम | ९८.१५७ |
| १६. | अनुसूचित जाती व जमाती कार्य योजना | ४२.८१८ |
| १७. | इतर | २१.१५९ |
| | एकूण | ३३७.६०० |

२९. राष्ट्रीय कृषी और ग्रामीण विकास बँक, पुणे. (ऑगस्ट, २००५). प्राप्त माहिती आधारे घेतलेली नोंद.

Maharashtra State Gazetteers

**जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक :** ही बँक जिल्हा मध्यवर्ती वित्त संस्था म्हणून कार्य करते. या बँकेने शेतकऱ्यांना आर्थिक गरजा भागविण्यासाठी सन १९९०-९१ मध्ये ३५,३९० सभासदांना १७५६.८८ लाख रूपये अल्प मुदतीचे कर्ज वाटप केले होते. सन २००२-२००३ मध्ये बँकेने विविध कारणासाठी केलेला अर्थ पुरवठा खाली दिला आहे :—

(रूपये लाखात)

| क्र. | तपशील | २००२-२००३ |
|---|---|---|
| १. | इलेक्ट्रीक मोटार | ११.५२ |
| २. | पाईप लाईन | ४.६३ |
| ३. | लिफ्ट इरिगेशन सर्व प्रोजेक्ट | ००.५० |
| ४. | ट्रॅक्टर | १.४५ |
| ५. | जीप | ११.३२ |
| ६. | गोबर गॅस सिलेंडर | . . . |
| ७. | दुभती जनावरे | ००.९८ |
| ८. | साखर कारखाने व सुत गिरणी भाग भांडवल | १६.३५ |
| ९. | इतर | १२.१२ |

## बँक पत योजना

बँकांच्या कामकाजाचे अत्यंत महत्त्वाचे अंग किंबहुना त्यांच्या अस्तित्त्वाचा प्रमुख हेतू म्हणजे पतपुरवठा होय. जिल्ह्यातील शेती व बिगर शेती उद्योगधंद्यांना सहकारी माध्यमातून आवश्यक प्रमाणांत व योग्य वेळेवर पतपुरवठा करण्याचे जिल्हा बँकांचे महत्त्वाचे कार्य होय. शेतीसाठीचा पतपुरवठा प्राथमिक व विविध सहकारी सोसायट्यांमार्फत व बिगर शेती उद्योगांना सहकारी संस्थाद्वारे कर्ज पुरवठा करण्यात येतो.

परंपरेनुसार व्यापारी बँका कृषी विकासासाठी पत पुरवठा करीत नसत. ग्रामीण अर्थव्यवस्थेमध्ये ही एक गंभीर स्वरूपाची त्रुटी होती. बँकांच्या सहभागाचा अभाव ही कृषी विकासाच्या दृष्टीने मोठी अडचण होती. पुरोगामी विचारसरणीबरोबर स्टेट बँक ऑफ इंडियाने या बाबत पुढाकार घेऊन ही पुरोगामी योजना हाती घेतली तद्नुसार कृषी विकासासाठी बँकांकडील ठेवींच्या स्वरूपातील पैशाचा विनियोग कृषी उत्पादन कार्यासाठी करण्याच्या दृष्टीने ही एक महत्त्वपूर्ण योजना आहे. एप्रिल, १९७४ ते डिसेंबर, १९७९ ह्या कालखंडाकरिता विविध बँकाद्वारा एप्रिल, १९७६ मध्ये प्रथमच पत योजना आखली गेली. तिची अंमलबजावणी ९ सप्टेंबर १९७६पासून करण्यात आली. प्रत्येक जिल्ह्यासाठी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने 'अग्रणी बँक' (Lead Bank) नियुक्त केलेली आहे. त्यानुसार नांदेड जिल्ह्यासाठी भारतीय स्टेट बँक 'अग्रणी बँक' म्हणून कार्य करते. ही बँक रिझर्व्ह बँकेच्या

Maharashtra State Gazetteers

मार्गदर्शनानुसार इतर अर्थसहाय्य करणाऱ्या संस्था व राज्य शासनाच्या मदतीने प्रत्येक वर्षासाठी वार्षिक कार्य योजना राबवित असते. उत्पादन व उत्पादकता तसेच रोजगार वाढविणे आणि कृषी उत्पादनात सुधारणा करण्यासाठी ही बँक प्रयत्न करते. या योजनेत इतर व्यापारी बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक व भूविकास बँकेचाही सहभाग प्राप्त करण्यात येतो. गेल्या काही वर्षात राष्ट्रीयकृत, सहकारी व ग्रामीण बँकांचा शाखा विस्तार मोठ्या प्रमाणात झाल्याचे दिसून येते.

१९८७ ते १९९० जिल्हा अग्रणी बँकेने तयार केलेला पतपुरवठा आराखडा पूर्णपणे साध्य केला आहे. तो खाली दिला आहे.[३०]

(रूपये लाखांत)

| विकास शिर्ष | १९८७-८८ | | १९८८-८९ | | १९८९-९० | |
|---|---|---|---|---|---|---|
| | उद्दिष्ट | साध्य | उद्दिष्ट | साध्य | उद्दिष्ट | साध्य |
| कृषी | २२१९.०० | २२३१.०० | २६१३.०० | ५८८८.०० | ३२०७.०० | ३९३३.०० |
| उद्योग | २२३.०० | १५४.०० | ३००.०० | ३१८.०० | ३९०.०० | १२५.०० |
| सेवा | ३६.०० | ५३.०० | ४६०.०० | ६२८.०० | ३९१.०० | ३९५.०० |

जिल्हा अग्रणी बँकेने वार्षिक कर्ज योजनेनुसार नांदेड जिल्ह्यात विविध कारणासाठी केलेल्या पतपुरवठ्याचा १९९५-९६ व २००५-२००६ मधील तपशील खाली दिला आहे :—

(रूपये लाखांत)

| तपशील | पतपुरवठा | | पतपुरवठा | |
|---|---|---|---|---|
| | लक्ष | साध्य | लक्ष | साध्य |
| | १९९५-९६ | | २००५-२००६ | |
| पीक कर्ज | २६,६०,९३.०० | २६,३३,९२.०० | १३,२८,२.९५ | १,२७,५९.०३ |
| मुदत कर्ज | १८,११,३६.०० | १२,२७,९८.०० | २०,११.२१ | १५,०८.९७ |
| एकूण कृषी कर्ज | ४४,७२,२७.०० | ३८,६१,९०.०० | २,५२,९४.१६ | १,४२,६८.०० |
| लघुउद्योग कर्ज | ६,२१,३४.०० | ४,३७,६९.०० | ७,९७.९२ | ६,८७.०१ |
| कुटीरोद्योग कर्ज | ६२,३१.०० | ५८,५७.०० | - | - |
| व्यापार व सेवा कर्ज | ४,३६,१७.०० | ४,१२,८६.०० | - | - |
| इतर कर्जे | १,२४,६२.०० | १,१७,१४.०० | ५४,५६.६३ | ५९,८२.९४ |
| एकूण | ५७,१६,७३.०० | ४८,८८,१६.०० | ३,१६,४६.६१ | २,०९,३७.९५ |

३०. यथार्थदर्शी योजना १९९२-९३ व १९९६-९७ जिल्हा नांदेड, जिल्हा नियोजन व विकास मंडळ नांदेड, पृ. २००.

Maharashtra State Gazetteers

**व्यापारी बँका :** व्यापारी बँकांना संयुक्त भांडवली बँका असे सुद्धा म्हणतात. विसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत नांदेड जिल्ह्यात बँक व्यवसायात फारशी प्रगती झाली नव्हती. पूर्वी मुख्यतः सावकारच लोकांना कर्जपुरवठा करीत असत. परंतु सध्या बँक व्यवसायात खूपच प्रगती झाल्यामुळे अनेक संयुक्त भांडवली बँका शेतकऱ्यांना अर्थपुरवठा करतात. सन १९२८ मध्ये इम्पिरीयल बँक ऑफ इंडिया या बँकेची एक शाखा नांदेड येथे सुरू झाली त्यानंतर बँक व्यवसायात वाढ होत गेली. इतर बँकानीही आपली शाखा कार्यालये नांदेड येथे सुरू केली. १९६२ मध्ये स्टेट बँक ऑफ इंडिया, नांदेड, स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, नांदेड, किनवट, देगलूर व धर्माबाद, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, पंजाब नॅशनल बँक नांदेड व बँक ऑफ महाराष्ट्र नांदेड, या बँका नांदेड जिल्ह्यात कार्यरत होत्या. या बँका निझाम संस्थानात अर्थपुरवठा करीत. इम्पिरीअल बँक या भूतपूर्व बँकेची बँक ऑफ इंडिया ही एक शाखा होती. १९५५ मध्ये इम्पिरिअल बँकेचे राष्ट्रीयीकरण करण्यात येऊन एका खास कायद्यान्वये या बँकेचा सर्व कारभार स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकेने घेतला व ग्रामीण व निमशहरी भागात बँक सुविधा उपलब्ध केली.[३१]

जुलै १९६९ मध्ये देशातील चौदा मोठ्या संयुक्त भांडवली बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. जिल्ह्यातील १९७५ मध्ये आणखी काही बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. राष्ट्रीयीकरणानंतर बँक व्यवसायाचे विकेंद्रीकरण होऊन विकासास वेग आला. जिल्ह्यातील प्रमुख शहरे, मोठी गावे व ग्रामीण भागात त्यांच्या शाखा सुरू करण्यात आल्या.[३२]

**अनुसूचित व्यापारी बँका :** रिझर्व्ह बँकेचे संयुक्त भांडवली बँकांशी प्रस्थापित झालेल्या संबंधावरून त्यांची विभागणी अनुसूचित व्यापारी बँका व अननुसूचित व्यापारी बँक अशा दोन प्रकारच्या बँकात केली जाते. ज्या बँकांचे जमा झालेले भांडवल आणि शिल्लक ५ लाख रूपये अगर त्यापेक्षा जास्त असेल अशा बँकांचा निर्देश अनुसूचित बँका असा केला जातो.

१९६९-७० मध्ये नांदेड जिल्ह्यात १७ व्यापारी बँकांची शाखा कार्यालये होती. जिल्ह्यातील कुंडलवाडी शहर वगळता बाकीच्या १० शहरात व्यापारी बँकांची कार्यालये होती.[३३]

जून १९८० मध्ये नांदेड जिल्ह्यात व्यापारी बँकांची एकूण ६६ कार्यालये होती. त्यामध्ये एकूण खात्यांची संख्या १,२४,३८८ व जमा रक्कम १४,१४ लाख रूपये होती. तर मार्च २००४ मध्ये जिल्ह्यातील व्यापारी बँकांची कार्यालये १३२ होती व एकूण खाती ५,००,६६९ व जमा रक्कम ८७३,३४ लाख रूपये होती.[३४] मार्च १९९१ अखेर जिल्ह्यात व्यापारी व सहकारी बँकांची एकूण २७९ शाखा कार्यान्वित होत्या. त्यापैकी व्यापारी बँकांची शाखा कार्यालये १२४ होती. नागरी व ग्रामीण

---

३१. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर, १९७१, पृ. २८६-८७.**

३२. परभणी जिल्हा गॅझेटिअर, १९८८, पृ. २४७.

३३. स्टेट बँक ऑफ हैद्राबाद लिड बँक स्किम, सर्व्हे रिपोर्ट, नांदेड डिस्ट्रिक्ट, १९७१.

३४. बँकिंग स्टॅटिस्टीकल बेसिक स्टॅटिस्टिकल रिटर्न्स, व्हॉ. १०, जून १९८१, पृ. २०४ व बेसिक स्टॅटिस्टिकल रिटर्नस ऑफ शेड्युल्ड कमर्शिअल बँकिंग इन इंडिया, व्हॉ. २३, मार्च २००४. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, पृ. ५८.

क्षेत्रातील व्यापारी बँकांची टक्केवारी ३५ टक्के व ६५ टक्के अशी होती.[३५] सन २००४-२००५ मध्ये जिल्ह्यात २० व्यापारी बँका व त्यांच्या शाखा कार्यालयांची एकूण संख्या १९२ होती. त्यापैकी ४१ शाखा नांदेड व २१ शाखा नागरी क्षेत्रांत तर १३० शाखा इतर क्षेत्रांत कार्यरत होत्या. जून १९८०, मार्च २००४ मध्ये व्यापारी बँकांच्या ठेवी व त्यांनी दिलेली कर्जे बाबतची माहिती खाली दिली आहे.

(रूपये लाखात)

| तपशील | कार्या- | १९८० | | | २००४ | | | कार्या- |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | लयांची संख्या | खाते संख्या | जमा रक्कम | दिलेली कर्जे | खाते संख्या | जमा रक्कम | दिलेली कर्जे | लयांची संख्या |
| एकूण | ६६ | १,२४,३८८ | १९,८० | १४,१४ | ५,००,६६९ | ८७३,३४ | ५०१,०१ | १३२ |
| ग्रामीण | ३७ | ४२,५९७ | ३३८ | ३,३७ | १,६१,२४८ | १६३,५२ | १२२,२७ | ६७ |
| निम-शहरी | ९ | १८,९०५ | २,३६ | १,३९ | १,४३,८९७ | २३३,१४ | ११५,९९ | ३३ |
| शहरी | २० | ६२,८८३ | १४,०६ | ९,३८ | १,९५,५२४ | ४७६,६८ | २६२,७६ | ३२ |

जिल्ह्यातील व्यापारी बँकांनी शेती, उद्योग, व्यापार, सेवा, गृहबांधणी, कारागीर व कुटीरोद्योग इत्यादी क्षेत्रांत जून १९८० व मार्च २००४ मध्ये अनुक्रमे १५,६५,२८ लाख रूपये व ४,६८,७९,६० लाख रूपये अर्थ सहाय्य दिले होते. मार्च २००४ मध्ये बँकेने केलेल्या कर्ज पुरवठ्याची माहिती खाली दिली आहे.[३६]

(रूपये)

| तपशील | मार्च २००४ | |
|---|---|---|
| | एकूण खातेदार | कर्ज पुरवठा |
| १. कृषी | ५५,४०८ | ११०,४१,२६ |
| २. उद्योग | २,५१५ | ४३,८१,७३ |
| ३. वाहतूक | १,१०८ | ६,५३,४३ |
| ४. व्यवसायिक व इतर सेवा | ३,९५८ | २०,५२,५० |
| ५. खाजगी कर्ज | २५,८१३ | १६२,३०,९४ |
| ६. व्यापार | १४,८२२ | ८७,२८,१८ |
| ७. वित्त पुरवठा (फायनान्स) | ४० | ३५,७८ |
| ८. इतर | ९,६०४ | ३७,५५,७८ |
| एकूण | १,१३,२६८ | ४६८,७९,६० |

३५. यथार्थदर्शी योजना १९९२-९३ ते १९९६-९७ नांदेड जिल्हा, पृ. २४.

३६. बेसिक स्टॅटिस्टिकल रिटर्न्स ऑफ शेड्युल्ड कमर्शियल बँक इन इंडिया, व्हॉ. ३३, मार्च २००४ रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, पृ. ३२९.

Maharashtra State Gazetteers

## भारतीय जीवन विमा नियम

लाईफ इन्शुरन्स (इमर्जन्सी प्रोव्हिजन) ऑर्डिनन्स, १९५६ अनुसार आयुविर्म्याचे राष्ट्रीयीकरण झाल्यापासून आयुर्विमा महामंडळ ही संघटना देशात आयुर्विम्याचा व्यवसाय करीत आहे. आयुर्विम्याच्या राष्ट्रीयीकरणापूर्वी अनेक खाजगी कंपन्या विमा व्यवसाय करीत असत. १९७२ मध्ये आग, दुर्घटना, सागरी विमा, तसेच आयुर्विमेत्तर विम्यांचेही राष्ट्रीयीकरण करण्यात आले. नवीन संरचना व प्रशासकीय सोयीसाठी आयुर्विमा महामंडळाचे विभाग पाडून पुणे विभागामध्ये नांदेड जिल्ह्याचा समावेश करण्यात आला होता. तसेच महामंडळाच्या नांदेड शाखेअंतर्गत परभणी जिल्ह्याचा समावेश करण्यात आला होता.

दिनांक २ मे १९६१ मध्ये नांदेड येथे पहिले शाखा कार्यालय सुरू केले. त्यानंतर दिनांक १५ ऑक्टोबर १९९१ रोजी नांदेड येथे दुसरी शाखा सुरू केली तसेच जिल्ह्यातील भोकर व देगलूर येथे प्रत्येक एक शाखा कार्यालय अनुक्रमे जून १९८९ व ऑक्टोबर १९८४ मध्ये सुरू केले. सन १९६१ मध्ये नांदेड जिल्ह्यात महामंडळाने १,४८१ विमा पत्र व ४५,३१,००० रूपये विमा व्यवसाय केला होता. तर सन १९६९-७० मध्ये या महामंडळाने १४५.८१ लाख रूपये विमा व्यवसाय केला होता.

सन २००४-२००५ मध्ये या महामंडळाचा एकूण ३३२६९.९४५ लाख रूपयांचा व्यवसाय झाला होता. सन १९९५-९६, २०००-२००१, २००३-२००४ व २००४-२००५ या वर्षी महामंडळाने केलेल्या कार्याची माहिती खाली दिली आहे :—

(रूपये लाखांत)

| क्र. | तपशील | १९९५-९६ | २०००-२००१ | २००३-२००४ | २००४-२००५ |
|---|---|---|---|---|---|
| १. | प्रस्तावित विमा पत्रांची संख्या | २३,७१८ | ३४,१०७ | ६०,७९८ | ५२,७७९ |
| २. | प्रस्तावित रक्कम | १,०४,३६.१७ | २,०२,९३.६७ | ३,८९,८०.३६ | ३,३५,९८.५० |
| ३. | प्रत्यक्ष विमा पत्रांची संख्या | २३,१२८ | ३३,६४२ | ६०,३२८ | ५२,२५९ |
| ४. | एकूण रक्कम | १,०२,१५.७३ | २,००,१७.५५ | ३,८६,७९.५६ | ३,३२,६९.९४५ |
| ५. | प्रत्येक विमा पत्रांची सरासरी | ४४,००० | ५९५,०० | ६४,००० | ६४,००० |
| | विमा एजंटांची संख्या | — | — | २,१५९ | २,११३ |
| | पुरूष | — | — | १,७९२ | १६८२ |
| | महिला | — | — | ३६७ | ४३१ |

नांदेड जिल्ह्यात मार्च १९८७ मध्ये एकूण ३२ संयुक्त भांडवली कंपन्या कार्यरत होत्या. त्यापैकी भागीदारी संस्था संख्या ३१ होती. तर मार्च २००२ मध्ये अशा संस्थांची जिल्ह्यातील संख्या १८९ होती.

Maharashtra State Gazetteers

## राष्ट्रीय बचत योजना

जनसामान्यांना बचतीची सवय लागावी, बचत योजनांमधून मिळणाऱ्या पैशातून राष्ट्रीय विकासास हातभार लागावा तसेच लोकांकडील अतिरिक्त पैसा बचत योजनामध्ये गुंतवून थोड्याफार प्रमाणात का होईना चलनवाढीस आळा घालावा या हेतूने विविध बचत योजना अंमलात आणल्या गेल्या. त्यामध्ये अल्पबचत योजनेचा समावेश आहे. सन १९६१-६३ मध्ये नांदेड जिल्ह्यातील ५४.७५ लाख रूपये अल्प बचत गुंतवणूक झाली होती. सन १९८६-८७ मध्ये विविध अल्पबचत योजनेत ७,८६,१० हजार रूपये जमा झाले होते. सन १९९०-९१, १९९५-९६, १९९९-२००० व २००५-२००६ मध्ये अल्पबचत उद्दिष्ट व झालेली गुंतवणूक बाबत माहिती खाली दिली आहे. तसेच जिल्ह्यातील अल्पबचत योजनेची माहिती तक्ता क्रमांक ४ मध्ये दिली आहे.

(रूपये कोटीत)

| | तपशील | १९९०-९१ | १९९५-९६ | १९९९-२००० | २००५-२००६ |
|---|---|---|---|---|---|
| १ | उद्दिष्ट | ७.५० | १०.६० | २२.०० | ५३.२८ |
| २ | ढोबळ गुंतवणूक | १८.०० | ३७.६३ | ५९.०५ | १४९.४४ |
| ३ | नक्त गुंतवणूक | ९.५३ | १२.७५ | २३.२५ | ६७.३० |
| ४ | अल्पबचत एजंट | — | ३९१ | ३२१ | २२४ |
| ५ | महिला प्रधान एजंट | — | ८०६ | ७८२ | १,३३८ |
| ६ | पी.पी.एफ. एजंट | — | ११ | ३६ | ६३ |

Maharashtra State Gazetteers

## (भाग-२ व्यापार व वाणिज्य)

नांदेड शहर महाराष्ट्रातील प्रमुख नद्यांपैकी असणाऱ्या गोदावरी नदीच्या काठावर वसलेले आहे. नांदेड जिल्हा मराठवाड्यातील एकूण (७) जिल्ह्यांपैकी एक असून महाराष्ट्राच्या दक्षिण-पूर्व सीमेला दक्षिणोत्तर पसरलेला आहे. जिल्ह्याच्या उत्तरेस यवतमाळ जिल्हा तर पश्चिमेस परभणी जिल्हा व नैऋत्येस लातूर जिल्हा आहे. जिल्ह्याच्या पूर्वेस व दक्षिण पूर्व दिशेस आंध्र प्रदेशातील आदिलाबाद व निजामाबाद जिल्हे आहेत. तर दक्षिणेस कर्नाटक राज्यातील बिदर जिल्ह्याचा काही भाग नांदेड जिल्ह्याच्या सीमेला लागून आहे. दक्षिण-मध्य रेल्वेची मीटरगेज लाईन काचिगुडा औरंगाबाद रेल्वे लाईन व मुदखेड आदिलाबाद लोहमार्ग जिल्ह्यातून जात असल्यामुळे जिल्ह्यातील माल वाहतूकीसाठी त्याचा चांगलाच फायदा झाला आहे. हा मार्ग १९०० साली वाहतूकीस खुला करण्यात आला. त्यामुळे व्यापारी माल इतर जिल्ह्यांच्या ठिकाणी पाठविणे सुलभ झाले. सेलू, जालना, औरंगाबाद, मनमाड, मुंबई, हिंगोली, अकोला, खांडवा, निझामाबाद, हैद्राबाद व बेंगलोर इत्यादी महत्त्वाच्या मोठ्या व्यापारी बाजार पेठांशी माल वाहतूक होऊ लागली. धर्माबाद, करखेडी, मुदखेड व उमरी या रेल्वे स्थानकांकडून व्यापारी मालाची वाहतूक चालते. मुदखेड-आदिलाबाद या रेल्वेमार्गावरील मुदखेड येथून जंगल उत्पादनांची वाहतूक मोठ्या प्रमाणात चालते. या विभागातील हा एकमेव रेल्वे मार्ग असून या मार्गावरील किनवट व भोकर येथून मालाची वाहतूक चालते. जिल्ह्यातील रेल्वे मार्गावर लहान मोठी २१ रेल्वे स्थानके असून जिल्ह्यातील एकूण ६ शहरे व १५ गावे रेल्वे मार्गाने जोडली असल्याने जिल्ह्यातील माल वाहतूक व जिल्ह्याबाहेरील माल वाहतूक ब्रॉडगेज व मीटरगेज रेल्वेने होते. तसेच मालमोटारी मार्फत सुद्धा माल वाहतूक चालते. नांदेड शहर उद्योगधंद्यात विकसीत होत असल्याने माल वाहतुकीचा वेग वाढत असून नांदेड येथे (सन २००५) १०० पेक्षा जास्त खाजगी मालवाहतूक यंत्रणा असून जिल्ह्याच्या मुख्य ठिकाणी दररोज ६० ते ११० मालमोटारीने मालाची वाहतूक चालते.

रेल्वे मार्गाशिवाय जिल्ह्यातून जाणाऱ्या चार राज्यमहामार्गावरून मालाची मोठ्याप्रमाणात वाहतूक चालते. हैद्राबाद-अकोला हा व्यापारीदृष्ट्या महत्त्वाचा राज्य महामार्ग असून या मार्गावर हैद्राबाद-निझामसागर-हिंगोली-अकोला व नागपूरपर्यंत व्यापारी वाहतूक चालते. नांदेड-औरंगाबाद या मार्गावरून नांदेड-परभणी-औरंगाबादपर्यंत माल वाहतूक चालते. नांदेड-अहमदपूर-बिदर हा मार्ग सुद्धा महत्त्वाचा असून नांदेड-उस्मानाबाद ते बिदरपर्यंत व्यापारी वाहतूक चालते. लातूर-अहमदपूर या मार्गावरील लातूर पर्यंत व्यापारी वाहतूक चालते.

लातूर ही मराठवाड्यातील महत्त्वाची व्यापारी पेठ असून हा मार्ग पुढे सोलापूर, बार्शी, लातूर व उस्मानाबाद पर्यंत जातो. या मार्गावरून जिल्ह्यातील बहुतेक सर्व व्यापारी वाहतूक नांदेड, लातूर, उस्मानाबाद, बार्शी, पंढरपूर व सोलापूरपर्यंत चालते. नांदेड-अहमदपूर-बिदर या मार्गापासून सुरू होणाऱ्या लोहा-गंगाखेड या महामार्गावरून नांदेड, परभणी व बिदरपर्यंत व्यापारी वाहतूक चालते.

नांदेड जिल्हा कापूस उत्पादनासाठी प्रसिद्ध असून देगलूर व बिलोली ही व्यापारी ठिकाणे आहेत. धर्माबाद व कुंडलवाडी येथे मिरचीचा व्यापार मोठ्या प्रमाणात चालतो. उमरी, मुखेड, भोकर ही ठिकाणेही धान्याच्या व कापसाच्या व्यापारासाठी प्रसिद्ध आहेत. तर कंधार येथे लोकर कातण्याचा व्यापार मोठ्या प्रमाणात चालतो.

Maharashtra State Gazetteers

## व्यापार आकृतिबंधातील परिवर्तन.

दळणवळणाची साधने, कृषी अर्थव्यवस्थेतील बदल, शासकीय धोरणे व आर्थिक नियोजन या कारणांमुळे व्यापार आकृतिबंधात परिवर्तन झाल्याचे दिसून येते. शैक्षणिक विकास, नागरीकरण व सामाजिक सुधारणांचाही या आकृतिबंधावर प्रभाव पडलेला आहे. अशा प्रकारच्या परिवर्तनास स्वातंत्र्योत्तर काळात गती प्राप्त झाली. कृषीमालाची विक्री करणाऱ्या सहकारी संस्था, विनियमित बाजारपेठा, सांविधिक बंधने यामुळे कृषीमालाच्या व्यापारात मोठा बदल झालेला दिसून येतो. तसेच लोकांचे राहणीमान आणि बदलत्या गरजा याचा परिणाम उपभोग्य वस्तूंच्या मागणीमध्ये झाला. वाहतूकीच्या साधनात झालेली सुधारणा व वाढ यामुळे व्यापार पद्धतीत परिवर्तन घडून आले. घाऊक उलाढाल होणाऱ्या वस्तूंमध्ये फारसा बदल झाला नाही. पूर्वीप्रमाणेच कापूस, ज्वारी, तूर, भूईमूग हे घाऊक व्यापारातील घटक आजही आपली जागा निश्चित टिकवून आहेत. तसेच जिल्ह्यात स्थापन झालेल्या अनेक प्रकारच्या बँकांच्या शाखांमुळे भांडवल पुरवठा सहज उपलब्ध होऊन व्यापार वृद्धीस हातभार लागलेला आहे.

जिल्ह्यात १९३२ पासून कृषी मालाचा व्यापार संघटित नियंत्रणाखाली आणून विनियमित बाजारपेठा सुरू करण्यात आल्या. त्यामुळे शेतकऱ्यांची होणारी फसवणूक थांबली. शेतकरी विनियंत्रित बाजारपेठेत आपला माल आणू लागला. या बाजारपेठा घाऊक व्यापारी केंद्रे बनली; त्याशिवाय जिल्हा पातळीवर जिल्हा मध्यवर्ती सहकारी खरेदी-विक्री संघ व तालुका पातळीवर तालुका सहकारी खरेदी-विक्री संघ स्थापन झाल्यापासून पूर्वी सारखे व्यापारावर फक्त व्यापाऱ्यांचे वर्चस्व न राहता त्यांच्या बरोबरीने सहकारी संस्थाही व्यापार क्षेत्रात उतरल्या आहेत. त्यामुळे व्यापारी क्षेत्रात लक्षणीय बदल झाल्याचे दिसून येते, त्यामुळे शेतकऱ्यांच्या हिताची जपणूक करण्यात मदत झाली.

**आयात माल :** आयात केल्या जाणाऱ्या मालामध्ये मुख्यतः जिल्ह्यात उत्पादीत न होणारा माल किंवा तयार न झालेला माल आयात केला जातो. बदललेला व्यापारी दृष्टीकोन व लोकांची आवड यामुळे आयात मालामध्येसुद्धा बदल झालेला असून वाहतूकीची साधने, लोकांचे राहणीमान, यामध्ये झालेल्या बदलामुळे आयात मालामध्येही बदल झाला आहे. इमारत बांधकाम साहित्य, लोखंड, लोखंडी सळ्या व लोखंडी सामान मुंबई, कोलकात्ता, दिल्ली, इंदोर, रतलाम, जालंधर व निझामाबाद येथून आयात करण्यात येते. किराणामाल आकोला, लातूर व परळीवैजनाथ येथून, लेखनसामग्री व चाकू सुऱ्या इत्यादी वस्तू मुंबई, दिल्ली, मद्रास, कोलकात्ता, अलिगड, हैद्राबाद, नागपूर, पुणे व जालंधर येथून व चांगल्या उच्च प्रतिचे कापड मुंबई, अहमदाबाद व मद्रास येथून तर मध्यम व जाडेभरडे कापड नागपूर, मालेगाव, सोलापूर, इचलकरंजी, सिकंदराबाद व धुळे येथून आयात करण्यात येते. नायलॉन व डॉकरोन (docron) टेरिलीन कापडाची मागणी वाढली होती. औषधे व औषधी द्रव्ये मुंबई, बडोदा, कोलकात्ता, सातारा, पनवेल व अहमदनगर येथून आयात केली जातात. आयुर्वेदिक औषधे सातारा, पनवेल व अहमदनगर येथून तर भांडी, मुंबई, पुणे व नाशिक येथून, चिनी मातीची भांडी मुख्यतः जामनगर, मुंबई व पंजाब येथून आयात केली जातात. रेडिओ, दूरदर्शन संच व विजेवर चालणारे पंखे व विजेवर चालणारी उपकरणे मुंबई, कोलकत्ता, हैद्राबाद व दिल्ली

येथून आयात करतात. आयात केल्या जाणाऱ्या वस्तू या मुख्यतः मोठे घाऊक व्यापारी विविध ठिकाणच्या बाजार पेठेतील एजंट मार्फत किंवा कंपनीच्या प्रतिनिधी कडून नांदेड येथे आयात करतात. या सर्व आयात मालाची वाहतूक मुख्यतः मनमाड-काचीगुडा रेल्वे मार्गावरून होते.

**निर्यात :** राज्यात नांदेड हा जिल्हा कापसाच्या उत्पादनासाठी प्रसिद्ध असून येथील कापूस मोठ्या प्रमाणात विक्रीसाठी निर्यात केला जातो. सन १९६१-६२ मध्ये ५४,८७० टन कापूस उत्पादन झाले होते. जिल्ह्यात नांदेड, देगलूर, उमरी, धर्माबाद, भोकर, करखेडी व नायगाव येथील बाजार पेठेत कापसाची मोठ्या प्रमाणात उलाढाल चालते. शेतकरी बैलगाडीतून कापूस विक्रीकरीता बाजारात आणतात. कापसाची उलाढाल नोव्हेंबर ते मार्च पर्यंत चालते. कापसाची विक्री मुख्यतः शेतकऱ्याकडून कापूस विकत घेऊन तो व्यापाऱ्यांस विकणे, एखाद्या मोठ्या व्यापारी कंपनीचा किंवा व्यापाऱ्याचा एजंट म्हणून कापसाची खरेदी करणे व एखाद्या कापड गिरणीचा किंवा बाहेरील कंपनीचा प्रतिनिधी म्हणून कापसाची खरेदी करणे अशा तीन प्रकरणांत कापसाची जाहीर लिलाव पद्धतीने उलाढाल चालते.

निर्यात होणारा कापूस स्थानिक वटण व दाबणी कारखान्यांत स्वच्छ करण्यात येतो. मुख्यतः मुंबई येथे कापसाची निर्यात होते. त्याशिवाय हैद्राबाद, नागपूर, सोलापूर, मद्रास व अहमदाबाद येथेही कापूस निर्यात केला जातो. कापसाची निर्यात मुख्यतः रेल्वेतून होते.

**भुईमूगशेंग :** नांदेड जिल्ह्यातून निर्यात होण्याच्या मालापैकी महत्त्वाचे व हमखास पैसा उपलब्ध करून देणारे पीक म्हणजे भुईमूगशेंग हे असून भुईमूगशेंगांची नांदेड, देगलूर व धर्माबाद येथे घाऊक व्यापार चालतो. त्याशिवाय लोहा, नायगाव, मुखेड व कुंडलवाडी येथेही भुईमूग शेंगांचा घाऊक व्यापार चालतो. शेतकरी आपला माल कमिशन एजंटामार्फत विकत असत. काही वेळा हे कमिशन एजंट व्यापाऱ्यांच्यावतीने माल खरेदी करीत. काही खरेदीदार खरेदी केलेली भुईमूगशेंग जिल्ह्याबाहेरील खरेदी-विक्री केंद्रावर विक्रीसाठी पाठवित असत. भुईमूगशेंग बीया व तेलाची निर्यात इतर जिल्ह्यांच्या ठिकाणी मुख्यतः मुंबई, पुणे, नाशिक, जालना व सोलापूर येथे पाठवितात. नांदेड व धर्माबाद येथून होणाऱ्या मालाची निर्यात रेल्वेमधून व मालवाहतूक करणाऱ्या मालमोटारीतून केली जाते. शेंगदाण्याचा व्यापार मुख्यतः ऑक्टोबर ते जानेवारीपर्यंत चालतो. जिल्ह्यात १९६१-६२ मध्ये १८,८२६ टन भुईमूगशेंग उत्पादन झाली होती. भुईमूगशेंग व शेंगतेलाची किंमत मुंबई बाजारावर होते.

**तूर :** जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणात निर्यात होणाऱ्या मालापैकी तूर हे एक महत्त्वाचे पीक असून १९६१-६२ मध्ये १३,३५८ टन तूर उत्पादन झाले होते. नांदेड, धर्माबाद, देगलूर, उमरी, नायगाव व लोहा येथे तूरीची उलाढाल होते. तूरडाळ मुख्यतः मुंबई, पुणे, निझामाबाद, हैद्राबाद, जालना व नाशिक येथे पाठविली जाते.

**ज्वारी :** जिल्ह्यातील मुख्य पीक ज्वारी असून नांदेड, देगलूर, उमरी, धर्माबाद व लोहा येथे ज्वारीची उलाढाल होते. शेतकरी आपला माल अडत्यामार्फत विक्री करतात. ही खरेदी विक्री बाजार समितीच्या नियंत्रणाखाली चालते, ज्वारी मुख्यतः मुंबई, पुणे, नागपूर व हैद्राबाद येथे रेल्वेतून किंवा मालमोटारीतून विक्रीसाठी पाठविली जाते.

**विनियमित बाजारपेठा आणि घाऊक व्यापारी केंद्रे :**

स्वातंत्र्यपूर्व काळात शासन नियंत्रणाअभावी कृषी मालाच्या व्यापारात मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार होऊन शेतकऱ्यांना तोटा सहन करावा लागत होता. शेतकऱ्यांच्या अज्ञानाचा व दारिद्र्याचा गैरफायदा व्यापारी घेत असत. त्यामुळे शेतकऱ्यांचे शोषण होई. म्हणून कृषी माल विपणन क्षेत्रातील अनिष्ट प्रथा दूर करणे, व्यापारी व दलाल यांचेकडून कृषी माल उत्पादकांची पिळवणूक थांबविणे व त्यांना त्यांच्या उत्पन्नांची रास्त किंमत त्वरित देणे या दृष्टीने भारतात प्रथम १८९७ मध्ये विदर्भासाठी बेरार कापूस व धान्य अधिनियम संमत करण्यात आला. सन १९२५ नंतर भारतातील अनेक राज्यांनी तसे कायदे संमत केले. मुंबई सरकारने १९२७ मध्ये कापूस बाजार अधिनियम (Bombay cotton market Act, 1927) संमत केला. त्यावेळच्या हैद्राबाद शासनाने हैद्राबाद कृषी बाजार अधिनियम १९३० (Hyderabad Agricultural market Act, 1930 (Fasli 1339)) संमत केला. हा अधिनियम नोव्हेंबर १९३० मध्ये नांदेड कृषी उत्पन्न बाजार समितीस लागू करण्यात आला. त्यानंतर नांदेड जिल्ह्यातील देगलूर, लोहा, नायगाव, कुंडलवाडी, किनवट, मुखेड, मुदखेड, भोकर, करखेडी, धर्माबाद, उमरी व भोकर या कृषी उत्पन्न बाजार समित्यांना लागू करण्यात आला. १९३० मधील जागतिक मंदीच्या वेळी, भारतातील कृषी उत्पादक आणखीनच भरडला गेला. त्यावेळी हैद्राबाद राज्यात वरील १९३० चा अधिनियम लागू करण्यात आला होता तरी तो फारच थोड्या ठिकाणी अंमलात आला होता. नंतरच्या कालावधीत मराठवाडा महाराष्ट्रात समाविष्ट करण्यात येईपर्यंत नांदेड जिल्ह्यात १९३० चा हैद्राबाद कृषी बाजार अधिनियम लागू होता. नंतर मात्र १९३९ चा 'मुंबई कृषी उत्पन्न बाजारपेठ अधिनियम' लागू करण्यात आला. या कालावधीतही कृषी मालाचे बाजारभाव ठरविण्याबाबत काही त्रुटी राहून गेल्यामुळे महाराष्ट्र शासनाने १९६३ साली कृषी माल विपणनासंबंधी १९६३ चा महाराष्ट्र कृषी उत्पादन खरेदी-विक्री (विनियमन) अधिनियम संमत केला. सर्व महाराष्ट्रात या अधिनियमाची अंमलबजावणी करण्यात आली असून त्यानुसार किंमत ठरवितांना मालाची प्रत ठरवून जाहीर लिलाव केला जातो. १९६७ मध्ये या कायद्यात दुरुस्त्या करण्यात आल्या.

वरील अधिनियमांनुसार एकूण ५४ वस्तुंचे विनियमन करण्यात आले होते. त्यामध्ये तांदूळ, ज्वारी, गहू, बाजरी, तूर, मूग, मसूर, हरभरा, जवस, भुईमूगशेंग, साळ (Caster seed), तीळ, सूर्यफूल, गूळ, जव, कापूस, कापूस बी, तंबाखू, कांगणी, नाचणी, सावा, बल्लार, मेथी, चिंच, मोहरी, लसूण, कांदा, हळद, लाख, वाटाणा, माठ, उडीद, राजगीरा, कारळ, आंबाडी, लोणी, सरसू, काकवी, पाक, ऊस, जूट, आंबा, बडीशेप, ओवा व सुंठ इ.

नांदेड जिल्ह्यात कृषी मालास व शेतकऱ्यांस त्यांच्या उत्पादित मालाचा योग्य तो मोबदला व मालाची साठवणूक करण्यासाठी पणन संस्था शेतकऱ्यांना मदत करते. जिल्ह्यातील एकूण १५ कृषी उत्पन्न बाजार समित्या व त्यांचे अंतर्गत ४४ दुय्यम बाजार तळ आहेत. या मुख्य व उप बाजार समिती विकासाकरिता केंद्र शासनाच्या केंद्रीय अनुदान योजनेंतर्गत जिल्ह्यात १० कृषी उत्पन्न बाजार समिती व त्यांच्या अंतर्गत असलेल्या दुय्यम बाजार समित्यांना रुपये ५१.०३ लाख रुपये केंद्रीय अनुदान देण्यात आले असून या अनुदानाचा उपयोग बाजार समित्यांना बाजार क्षेत्रांतील रस्ते, दिवा बत्ती, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, शेतकरी निवास व जाहीर लिलाव पद्धतीची व्यवस्था इत्यादी बाबतीत खर्च केले आहेत.[३७]

---

३७. यथार्थदर्शी योजना १९९२-९३ ते १९९६-९७ नांदेड जिल्हा, पृ. ९९.

सन २००३-२००४ मध्ये जिल्ह्यात नांदेड, मुदखेड, हदगाव, किनवट, भोकर, उमरी, धर्माबाद, कुंडलवाडी, नायगाव, देगलूर, हानेगाव, मुखेड, कंधार, लोहा व माहूर अशा एकूण १५ कृषी उत्पन्न बाजार समित्या होत्या. त्यांचे अंतर्गत ५१ उप-बाजार तळ आहेत. त्या वर्षी या बाजार समित्यांनी ९६,८१७ टन म्हणजे १२,२७,७०३ हजार रुपये किंमतीच्या कृषी मालाची उलाढाल केली. कापूस खरेदीसाठी एकाधिकार खरेदी तत्वानुसार कापसाची उलाढाल कापूस महामंडळ करते. सन २००३-२००४ मध्ये ८,१३१ टन, १९४६.८२ लाख रुपये किंमतीचा कापूस खरेदी करण्यात आला. तसेच धान्याची साठवण करण्याची वखार महामंडळाची नांदेड येथे १२ गोदामे आहेत. याशिवाय जिल्ह्यात शासकीय गोदामे, सहकारी क्षेत्राची गोदामे, मार्केट फेडरेशनची गोदामे, महाराष्ट्र वखार महामंडळाची गोदामे व खाजगी अशी एकूण १८३ गोदामे आहेत. जिल्ह्यातील बाजार समित्यांची माहिती खाली दिली आहे :—

## कृषी उत्पन्न बाजार समिती

**१. कृषी उत्पन्न बाजार समिती, नांदेड :** ह्या विनियमित बाजारपेठेची स्थापना १९३० च्या हैद्राबाद कृषी अधिनियमानुसार दिनांक १४ नोव्हेंबर १९३० रोजी झाली. ही नांदेड जिल्ह्यात स्थापन झालेली पहिली विनियमित बाजारपेठ होय. पूर्वी हैद्राबाद कृषी बाजार अधिनियमानुसार एकूण ५४ वस्तुंचे विनियम करण्यात येत होते.[३८]

कृषी उत्पन्न बाजार समिती, नांदेडच्या कार्यक्षेत्रात २०१ गावांचा समावेश असून नांदेड येथील नवा मोंढा येथे या बाजार समितीचे मुख्य बाजार आवार आहे. त्याचे क्षेत्र १८.१५ हेक्टर असून मालेगाव व लिंबगाव येथे उप बाजार तळ आहेत.

**उप बाजार तळ, मालेगाव :** ही उप बाजार पेठ १७ जानेवारी १९७९ रोजी स्थापन करण्यात आली. सदर उप बाजारपेठ योजनेअंतर्गत तयार करण्यात आली असून त्याचा ताबा दिनांक २३ ऑगस्ट १९८४ रोजी बाजार समितीस मिळाला. या बाजारपेठेचे क्षेत्र ५.२० हे. असून येथे ७७ प्लॉट पाडण्यात आले आहेत. उप बाजारपेठ, लिंबगाव दिनांक २१ जानेवारी १९८३ रोजी स्थापन करण्यात आली असून त्याचा ताबा दिनांक १४ ऑगस्ट १९८४ रोजी समितीस मिळाला. या उप बाजारपेठेचे क्षेत्र ५.५ हे. असून येथे ६१ प्लॉट पाडण्यात आले आहेत. या दोन्ही उप बाजारपेठा कार्यान्वीत करण्यासाठी बाजार समिती प्रयत्नशील आहे. तसेच अर्धापूर (तालुका अर्धापूर) येथील शेतकऱ्यांची गरज लक्षात घेऊन अर्धापूर येथे उप बाजारपेठ स्थापन करण्याचा समितीचा प्रयत्न चालू आहे. बाजार आवार समितीच्या मालकीचे असून मुख्य बाजार आवारास पाच (लोखंडी) गेट व प्रमुख द्वारावर विशाल कमान आहे. तसेच शेतकरी, व्यापारी, अडते इत्यादीसाठी आवश्यक त्या सुखसोई उपलब्ध करून दिल्या आहेत. बाजार आवारात कार्यालयाची इमारत, उद्यान, पिण्याच्या पाण्याची सोय, जनावरांसाठी गोठा व पाण्याची सोय, आवारात पक्के रस्ते, शेतकरी निवास, कँटीन, बँक इमारत, पोलीस चौकी, गूळ गोदाम, पोस्ट कार्यालय इत्यादी सोई केल्या आहेत. शेतकऱ्यांच्या बैलगाड्या उभ्या करण्यासाठी जागा, कापसाचे मोजमाप करण्यासाठी भुईकाट्याची सोय केली आहे. बाजार आवारात मालाची विक्री करण्यासाठी पक्के ओटे बांधलेले आहेत.[३९]

---

३८. **नागपूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९७१, पृ. ३३३.

३९. कृषी उत्पन्न बाजार समिती, नांदेड, ऑक्टोबर, २००३ यांच्या माहितीवरून.

नांदेड बाजारपेठ ही रेल्वेमार्ग, राज्यमार्ग व विविध पक्क्या रस्त्यांनी जोडलेली असल्याने शेतीमालाची वाहतूक जलद व सुलभ होते. बाजार आवारात विक्रीस आलेला बहुतांश माल त्याच दिवशी समितीच्या अधिकृत कर्मचाऱ्यांसमोर लिलाव पद्धतीने दर निश्चित केला जातो. तसेच संगणकाद्वारे बाजार भावाबाबतची माहिती प्रसारणाची सुविधाही उपलब्ध केली आहे. ही बाजार समिती केळी, हळद व कापूस या मालासाठी प्रसिद्ध आहे.

कापूस, रुई, निरुपयोगी कापूस, ज्वारी, बाजरी, गहू, तूर, मूग, मसूर, हरभरा, जवस, भुईमूगशेंग, साळ व तांदूळ, एरंडी, तीळ, करडी, गूळ, पाक, जव, सरकी, जाई, आंबाडी, तंबाखू, कुलथी, कांगणी, सनवान, बल्लर, मेथी, धने, मिरची, राई, लसूण, कांदे, हळद, लोथा, लाख, वाटाणा, मठ, उडीद, राजगीरा, कराळ, रागी, तूप, चिंच, सरसू, साखर (खांडसरी), जिरा, मका, ताग, आंबे, सर्व प्रकारच्या डाळी, सोप, अजवान, आले व केळी या वस्तुंचे बाजार समितीच्या आवारात विनियमन करण्यात येते.

सन २००१-२००२ मध्ये समितीने नांदेड जिल्हा मध्यवर्ती कृषी औद्योगिक सर्व्हे सेवा सहकारी संस्था, नांदेड, नांदेड तालुका सहकारी खरेदी विक्री संघ, नांदेड, महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस पणन व महासंघ, उप विभाग नांदेड व नांदेड जिल्हा फळे व भाजीपाला खरेदी-विक्री संघ, नांदेड या चार सहकारी संस्थांना खरेदी-विक्रीचे परवाने दिले होते.

सन २००१-२००२ मध्ये बाजार समितीच्या आवारात ३१,४२,६८,३८५ रुपये किंमतीच्या ३,१९,२८२ क्विंटल मालाची आवक झाली होती. सन १९६३ मध्ये बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात उलाढाल करणाऱ्या लहान मोठ्या व्यापाऱ्यांची संख्या २२२ होती. सन २००१-२००२ मध्ये एकूण अडते ३२७, "अ" वर्ग व्यापारी २८९ व "क" वर्ग व्यापारी २५४, "अ" वर्ग प्रक्रियाकार ४७, "ब" वर्ग प्रक्रियाकार १, मदतनीस ६९, तोलारी ४७ व हमाल (पुरुष ८८२ व महिला ३१३) ११९५ होते. त्यापासून बाजार समितीस ७४,९९७ रुपये अनुज्ञाप्ती फी मिळाली होती.

ह्या बाजार समितीस "अ" वर्ग मिळाला असून उत्पादक व ग्राहक यांच्यातील दुवा असलेली व्यापारी व शेतकरी या सर्वांचे हक्क संवर्धन करून खरेदी-विक्रीच्या व्यवहारात सुत्रबद्धता व सोपेपणा आणणे यासाठी नांदेड कृषी उत्पन्न बाजार समितीची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण ठरलेली आहे.

सन १९९९-२००० मध्ये समितीचे एकूण उत्पन्न व खर्च अनुक्रमे ३९,८७,०८१ रुपये व ४३,७१,६०५ रुपये होते. तर सन २००१-२००२ मध्ये समितीचे उत्पन्न व खर्च अनुक्रमे ७१,३१,२४५ रुपये व ४८,६६,००६ रुपये होते. बाजार समितीच्या आवारात एकाधिकार कापूस खरेदी योजनेनुसार सन २००१-२००२ मध्ये एकूण ४०,०५७ क्विंटल ५,९८,५१,३२७ रुपये किंमतीच्या कापसाची शासनाच्या दराप्रमाणे उलाढाल झाली होती. व त्यावर्षी ३,१९,२८२ क्विंटल ३१,४२,६८,३८५ रुपये किंमतीची कृषी मालाची उलाढाल झाली होती.

बाजार समितीच्या आवारात एकाधिकार कापूस खरेदी योजनेनुसार सन २००१-०२ मध्ये एकूण ४०,०५७ क्विंटल ५,९८,५१,३२७ रुपये किंमतीच्या कापसाची शासनाच्या दराप्रमाणे उलाढाल झाली. सन २००४-०५ मध्ये एकाधिकार कापूस योजनेनुसार ३,४४,८२,३६१ रुपये किंमतीचा कापूस खरेदी करण्यात आला. नांदेड, दाभड, नाळेश्वर व अर्धापूर येथील कापूस संकलन केंद्रावर १५,७५३ विविध वाहनातून कापूस विक्रीसाठी आणण्यात आला होता. तसेच त्या वर्षी समितीचे उत्पन्न व खर्च अनुक्रमे

१,१४,३४,६७५ रुपये व ७४,९५,६२४ रुपये होते. त्या वर्षी समितीच्या आवारात ९२,९७,३३,३३६ रुपये किंमतीच्या कृषी मालाची उलाढाल झाली होती. बाजार समितीने सन १९९०-९१ ते २००५ पर्यंत केलेल्या कृषी मालाची उलाढाल समितीचे उत्पन्न व खर्च इत्यादीबाबत माहिती तक्ता क्रमांक ५ मध्ये दिली आहे.

**२. कृषी उत्पन्न बाजार समिती, धर्माबाद :** ह्या बाजार समितीची स्थापना २५ जून १९३८ मध्ये तत्कालीन हैद्राबाद राज्याचा कृषी बाजार अधिनियम, १९३० (नियमन) अन्वये झालेली असून या समितीस उपरोक्त अधिनियम मे १९६७ पर्यंत लागू होता. त्यानंतर मात्र महाराष्ट्र शासनाचा १९६३ चा महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी-विक्री (नियमन) व त्याचा १९६७ चा सुधारित अधिनियम लागू करण्यात आला आहे. ह्या बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात धर्माबाद तालुक्यातील ५१ गावांचा समावेश आहे. बाजार समितीचे मुख्य बाजार आवार धर्माबाद (क्षेत्रफळ ७.७१ हेक्टर) येथे असून ते समितीच्या मालकीचे आहे. करखेली (स्थापना १ ऑक्टोबर १९७१, क्षेत्रफळ १.६० हेक्टर) व जारीकोट स्थापना (१ ऑक्टोबर १९८२, क्षेत्रफळ ६.०० हेक्टर) येथे दोन उप बाजार तळ आहेत. मुख्य बाजार आवारात कार्यालय इमारत, पाणीपुरवठा, लिलाव ओटे, लिलाव शेड, सिमेंटचे रस्ते, विद्युत व्यवस्था, गोदाम, शॉपिंग सेंटर, शेतकरी निवास, संगणक, प्रोजेक्शन टी.व्ही. इत्यादी सोयी पुरविल्या आहेत. त्यासाठी १,५४,६७,७०४ रुपये खर्च करण्यात आले. तर दुय्यम बाजार आवार करखेली व जारीकोट येथे ऑफिस, पाणीपुरवठा, गोदाम, तारेचे कुंपण, भुईकाटा इत्यादी सोयी केल्या आहेत.

समितीच्या आवारात गहू, ज्वारी, टाकळी, बाजरी, मका, जव, राजगीरा, सूर्यफूल, कागणी, साळ, रागी, तूर, मूग, मसूर, हरभरा, उडीद, लाख, वाटाणा, मठ, कुळथी, जवस भुईमूगशेंग, एरंडी, तीळ, करडी, राई, धणे, लसूण, कांदा, खांडसरी, हळद, मेथी, मिरची, चिंच, गूळ (काळा), साखर, तूप, सरकी, कापूस, रुई, आंबा, सुंठ, ओवा, अद्रक, डाळी, कापूस (खराब), रवा, सुकामेवा, खाद्यतेल इत्यादी मालाचे विनियमन करण्यात येते. बाजारपेठेत मिरचीची उलाढाल मोठ्या प्रमाणात होते. येथील मिरची विक्रीसाठी परप्रांतात निर्यात करण्यात येते. येथून रुपये २२ लाखांपेक्षा जास्त किंमतीची मिरची दरवर्षी निर्यात केली जात होती. १९६०-६१ मध्ये या बाजारपेठेत ७०,७१,१०४ रुपये किंमतीच्या २,६७,३९० क्विंटल कृषी मालाची उलाढाल झाली होती.

बाजार समितीच्या आवारात धर्माबाद तालुका सहकारी खरेदी-विक्री संघ, कापूस उत्पादक पणन महासंघ, मुंबई व भारतीय कापूस निगम या परवाना धारक संस्था कार्यरत होत्या.

जुलै २००४ पर्यंत समितीने बाजार विकास कामे व बांधकाम यावर एकूण १,३३,५२,३७८ रुपये खर्च केला. सन २००१-२००२ मध्ये एकूण २६,४६,०१,७०२ रूपये किंमतीच्या २,०४,४९६ क्विंटल मालाची उलाढाल झाली होती. त्या वर्षी समितीचे उत्पन्न व खर्च अनुक्रमे ३,७८,१७,९२९ रुपये व २५,९४,६०९ रुपये होते.[४०] बाजार समितीची माहिती तक्ता क्रमांक ६ मध्ये दिली आहे. बाजार समितीच्या कार्यालयात बाजारभाव कक्ष निर्माण करण्यात आला असून इतर बाजारपेठेतील

४०. सचिव, कृषी उत्पन्न बाजार समिती, धर्माबाद यांनी पुरविलेली माहिती, जुलै २००४.

बाजार भाव प्रोजेक्शन टी.व्ही.द्वारे प्रसिद्ध करण्यात येतो. २००२-२००३ या आर्थिक वर्षात समितीचे उत्पन्न ५१.९३ लाख रुपये होते. हे उत्पन्न गत वर्षापेक्षा १२ लाख रुपये जास्त होते.

**३. कृषी उत्पन्न बाजार समिती, भोकर :** बाजार समितीची स्थापना दिनांक २५ ऑगस्ट १९६० मध्ये १९३० च्या हैद्राबाद कृषी बाजार अधिनियमानुसार झाली. समितीस हैद्राबाद राज्याचा अधिनियम १९६३ पर्यंत लागू होता. त्यानंतर मात्र महाराष्ट्र शासनाचा १९६७ चा सुधारीत नियम लागू करण्यात आला. बाजार समितीस स्वतःचा बाजार तळ नव्हता म्हणून समितीने (३.५७ हेक्टर) जागा घेऊन त्यावर ४६ प्लॉट पाडून व्यापाऱ्यांना लिजवर दिलेले आहेत. तसेच लहान व्यापाऱ्यांसाठी ८६ गाळे बांधून दिले आहेत. बाजार समितीचे दोन उप बाजारतळ[४१] असून समितीच्या कार्यक्षेत्रात भोकर तालुक्यातील ६४ गावांचा समावेश आहे.

समितीने बाजार आवारात पाण्यासाठी विहीर, पिण्याचे पाणी, जनावरांसाठी पाणी, सिमेंटचे रस्ते, लिलाव ओटे, विद्युत पुरवठा, भव्य शेतकरी निवास, जनावरांसाठी गोठा इत्यादी सुविधा पुरविलेल्या आहेत. उप बाजार तळ, किनी (स्थापना १८ ऑक्टोबर १९८०, क्षेत्रफळ २.३० हेक्टर) येथे तार फेन्सींग, ऑफिस कम गोदाम, विहीर व लिलाव ओटा बांधण्यात आला आहे. तर उप बाजारतळ मौजे भातुल (स्थापना १७ जून १९८६, क्षेत्रफळ ३.०० हेक्टर) येथे ऑफिस कम गोदाम, विद्युत पुरवठा, पाण्याची टाकी, लिलाव ओटा इत्यादी सोयी केल्या आहेत. केंद्र शासनाच्या योजनेंतर्गत वरील बांधकामे करण्यात आली असून कृषी मालाची कमी वेळात व कमी खर्चात विक्री करता यावी या मुख्य हेतूने नवीन उप बाजारपेठा स्थापन करण्यात आल्या आहेत.

समितीच्या आवारात कापूस, रुई, निरुपयोगी कापूस, गहू, ज्वारी, बाजरी, तूर, मूग, मसूर, हरभरा, जवस, भुईमूगशेंग, साळी व तांदूळ, ताग, एरंडी, तीळ, करडी, गूळ व पाक, जव, जाई, सरकी, तंबाखू, कुळीथ, लसूण, सनवान, मेथी, धणे, मिरची, मोहरी (राई), कांदे, हळद, वाटाणा, लाख, मठ, उडीद, सरसू, राजगीरा, काराळा, आंबाडी, तूप, चिंच, साखर, मका, ऊस, आंबे, सोप, अजवान (ओवा), आले, सुंठ या मालांचे विनियमन करण्यात येते.

समितीच्या आवारात दि उमरी सहकारी खरेदी-विक्री संघ उमरी शाखा, किनी, दि उमरी सहकारी खरेदी-विक्री संघ उमरी शाखा, भोकर व दि महाराष्ट्र राज्य कॉटन ग्रोअर्स, मार्केटींग फेडरेशन कापूस खरेदी केंद्र, भोकर या संस्था कार्यरत होत्या. ही बाजार समिती कापूस, उडीद, मूग, तूर, ज्वारी, गहू व हरभरा या कृषी उत्पादनासाठी प्रसिद्ध असून मद्रास, दिल्ली, नांदेड, हैद्राबाद, उत्तरप्रदेश इत्यादी ठिकाणी माल विक्रीसाठी निर्यात केला जातो.

मालाची खरेदी-विक्री, लिलाव पद्धतीने समितीच्या नियंत्रणाखाली केली जाते. १९६०-६१ मध्ये १६ "अ" वर्ग व्यापारी व २० "ब" वर्ग व्यापारी होते. २००२-२००३ मध्ये समितीने एकूण २४,३७,६३,२६८ रुपये किंमतीच्या ३,१७,५५७ क्विंटल मालाची उलाढाल केली होती. तर त्या वर्षी समितीचे एकूण उत्पन्न व खर्च अनुक्रमे ३८,९१,०८६ रुपये व २६,४१,८४७ रुपये होता. १९९० ते २००३ पर्यंतची बाजार समितीची माहिती तक्ता क्रमांक ७ मध्ये दिली आहे.

---

४१. सचिव, कृषी उत्पन्न बाजार समिती, भोकर, यांच्या माहितीआधारे, जून, २००४.

बाजार समितीच्या आवारात नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा भोकर, मराठवाडा ग्रामीण बँक शाखा भोकर व शंकर नागरी सहकारी बँक शाखा भोकर या बँकानी आपली सेवा उपलब्ध करून दिल्या आहेत.

**४. कृषी उत्पन्न बाजार समिती, उमरी :** या बाजार समितीची स्थापना तत्कालीन हैद्राबाद राज्याच्या १९३० च्या अधिनियमानुसार २४ ऑक्टोबर १९३१ मध्ये झाली. या समितीस हैद्राबाद राज्याचा वरील अधिनियम १९६७ पर्यंत लागू होता. त्यानंतर मात्र महाराष्ट्र राज्याचा १९६३ चा महाराष्ट्र कृषी उत्पादन खरेदी-विक्री (नियमन) अधिनियम व त्यानंतरचा १९६७ चा सुधारित अधिनियम लागू करण्यात आला आहे.

ही बाजार समिती कापसासाठी प्रसिद्ध असून येथे मनमाड-काचीगुडा रेल्वे मार्गावरील स्थानक आहे. तसेच उमरी येथून नांदेड, परभणी, अकोला, औरंगाबाद, जालना, मनमाड, निजामाबाद व सिकंदराबाद पर्यंत रेल्वे वाहतूक चालते. समितीचे कापसासाठी व धान्यासाठी एक असे दोन बाजार तळ आहेत. तत्कालीन हैद्राबाद राज्याच्या कृषी उत्पन्न खरेदी-विक्री अधिनियमानुसार एकूण ५४ मालाचे विनियमन करण्यात येत होते. त्यामध्ये कापूस, ज्वारी, तूर, भूईमूग शेंगा, आंबाडी, तांदूळ, गूळ व उडीद या वस्तू प्रमुख होत्या.

समितीच्या आवारात अनुज्ञप्ती धारक ४० अडते, १० खरेदीदार एक दलाल व तीन मापाडी होते. कापसाने भरलेल्या गाडीची विक्री उघड लिलाव पद्धतीने होत असे. कापसाशिवाय इतर सर्व कृषी मालाचे वजन करण्यात येत असे. धान्याची विक्री करण्यापूर्वी त्याची चाळण करण्यात येते. वटण व दाबणी कारखान्यात कापसाच्या गाठी तयार करून अडत्याकडून मालाची "टाकपट्टी" केल्यानंतर २४ तासांत शेतकऱ्यांना त्याचे पैसे मिळत.

समितीचे मुख्य बाजार आवार उमरी येथे असून त्याचे क्षेत्र तीन हेक्टर आहे. येथे पिण्याचे पाणी, विद्युत पुरवठा, शेतकरी निवास, जनावरांसाठी पाणी इत्यादी सुविधा केल्या आहेत. समितीच्या कार्यक्षेत्रात एकूण ७० गावांचा समावेश आहे. सन २००२-२००३ मध्ये समितीच्या आवारात २५,३६७ क्विंटल २,२६,८०,९०८ रुपये किंमतीच्या मालाची उलाढाल झाली होती. १९९० ते २००३ मधील बाजार समितीची माहिती तक्ता क्रमांक ८ मध्ये दिली आहे.

**५. कृषी उत्पन्न बाजार समिती, मुदखेड :** या बाजार समितीची स्थापना १६ नोव्हेंबर १९५३ रोजी हैद्राबाद राज्याच्या कृषी बाजार अधिनियमानुसार झाली. या समितीस उपरोक्त अधिनियम मे १९६७ पर्यंत लागू होता. त्यानंतर मात्र महाराष्ट्र शासनाच्या १९६३ चा महाराष्ट्र कृषी उत्पादन अधिनियम लागू करण्यात आला आहे.

या बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात मुदखेड तालुक्यातील १४ खेडेगावांचा समावेश असून समितीस स्वतःचा बाजार तळ नाही. परंतु बाजार समितीच्या मालकीचे कॉटन मार्केट यार्ड असून त्याचे क्षेत्र एक हेक्टर ४९ आर आहे. सदर जागेवर बाजार समितीतर्फे नवीन बाजार संकूल उभारण्यासाठी समिती प्रयत्नशील आहे. बाजार आवारात शेतकऱ्यांना पिण्याच्या पाण्याची सोय,

Maharashtra State Gazetteers

शेतकरी निवास व जनावरांसाठी पाण्याचा हौद आहे. मुदखेड येथे ९ नोव्हेंबर, १९८९ पासून जनावरांच्या बाजाराचे नियमन करण्यात आले आहे. परंतु नगर परिषद, मुदखेडने गुरांचा बाजार समितीच्या ताब्यात अद्याप दिलेला नाही.[४२]

१९६२ मध्ये एकूण ५४ कृषी उत्पादनांचे व इतर वस्तुंचे विनियमन करण्यात आले होते. त्यामध्ये मुख्यतः कापूस, ज्वारी, गूळ व तूर या मालाची खरेदी-विक्री होत होती. सन १९६१-६२ मध्ये समितीच्या आवारात ४,७४६ क्विंटल मालाची उलाढाल झाली होती. त्या वर्षी समितीच्या आवारात २१ "अ" वर्ग व १४ "ब" वर्ग व्यापारी होते. येथे मनमाड-काचीगुडा रेल्वे मार्गावरील रेल्वे जंक्शन व मुदखेड अदीलाबाद रेल्वे मार्गामुळे व्यापारी वाहतूक सुलभरीत्या होते.[४३]

समितीच्या आवारात एकूण ६४ कृषी उत्पादनांचे व इतर वस्तुंचे नियमन करण्यात येते. त्यामध्ये कापूस, रुई, कॉटन वेस्ट, गहू, ज्वारी, बाजरी, तूर, मूग, मसूर, हरभरा, जवस, शेंगा, साळ व तांदूळ, एरंडी, तीळ, करडी, गूळ व गूळपाक, जव, सरकी, तंबाखू, कुळीथ, कंगणी, रागी, सावा, मेथी, धणे, मिरची, मोहरी, लसूण, कांदा, हळद, लाख, वाटाणा, मेथी, उडीद, राजगीरा, कऱ्हाळ, आंबाडी, तूप, चिंच, खांडसरी, साखर, मका, ताग, ऊस, आंबे, डाळी, ओवा, आले, सोयाबीन, जल्लोश, साखर, सर्वप्रकारच्या डाळी, खाद्यतेल, गव्हाचे पीठ, सुकामेवा, शेळी-मेंढी, कोंबडी, सर्व प्रकारची गुरेढोरे व इतर जनावरे, कातडी, चामडी, चारा व वैरण यांचा समावेश आहे.

सन २००१-२००२ मध्ये समितीच्या आवारात ३२,४९५ क्विंटल ३,५३,४७,४४६ रुपये किंमतीच्या कृषी मालाची उलाढाल झाली होती. समितीने नांदेड तालुका सहकारी खरेदी-विक्री संघ, नांदेड शाखा मुदखेड व जयकिसान फळे व भाजीपाला खरेदी-विक्री सहकारी संघ, मुदखेड या सहकारी संस्थांना खरेदीचे परवाने दिले होते. सन २००१-०२ मध्ये समितीचे एकूण उत्पन्न ३,१९,६०१ रुपये व खर्च ३,५८,४८४ रुपये होता. त्या वर्षी समितीच्या आवारात ठोक व्यापारी, किरकोळ व्यापारी, मापाडी, हमाल इत्यादी परवानाधारकांची संख्या २१३ होती. बाजार समितीची माहिती तक्ता क्रमांक ९ मध्ये दिली आहे.

**६. कृषी उत्पन्न बाजार समिती, लोहा :** या कृषी उत्पन्न बाजार समितीची स्थापना १४ जानेवारी १९६० रोजी तत्कालीन हैद्राबाद कृषी बाजार अधिनियमानुसार झाली. या बाजार समितीस हैद्राबाद राज्याचा अधिनियम १९६७ पर्यंत लागू होता. त्यानंतर मात्र महाराष्ट्र शासनाचा १९६३ चा महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी-विक्री (नियमन) अधिनियम व त्याचा १९६७ चा सुधारित अधिनियम लागू करण्यात आला आहे. ही बाजार समिती लातूर, बार्शी, पंढरपूर, अकोला, नांदेड, हैद्राबाद, मोमीनाबाद, गंगाखेड इत्यादी व्यापारी केंद्रांशी जोडलेली आहे. १९६० मध्ये एकूण ५४ वस्तुंचे विनियमन करण्यात येत होते. भुईमूगशेंगा, ज्वारी, भात, गूळ, तूर व मूग या मालाची उलाढाल मोठ्या प्रमाणात होत होती. त्यावेळी २५ जनरल कमिशन एजंट २० व्यापारी व पाच मापाडी यांना समितीने परवाने दिले होते.

---

४२. कृषी उत्पन्न बाजार समिती, मुदखेड कडून प्राप्त झालेली माहिती ऑक्टोबर, २००३.

४३. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९७१, पृ. ३३९.

सन २००३ मध्ये या बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात १२६ गावांचा समावेश असून मुख्य बाजार आवार लोहा येथे असून त्याचे क्षेत्र ५.७४.१/२ हेक्टर आहे. या बाजार समितीचे उप बाजारतळ लोहा तालुक्यात खालील नऊ ठिकाणी आहेत.—१. कापशी (बु.) स्थापना २८.४.१९८१; २. माळांकोळी स्थापना २९.४.१९८१; ३. सोनखेड स्थापना ८.१०.१९८५; ४. उमरा स्थापना १५.६.१९९२; ५. मारतळा स्थापना २४.६.१९९२; ६. किवळा स्थापना २४.६.१९९२; ७. पेनूर स्थापना २४.६.१९९२; ८. आष्टूर स्थापना २४.६.१९९२ व ९. कलंबर स्थापना २४.६.१९९२ वरील उप बाजारपेठांपैकी कापशी बु. व सोनखेड येथे बाजार समितीच्या मालकीची जागा व इमारत असून कापशी बु.,सोनखेड, कलंबर बु., मारताळा, माळाकोळी येथे कापूस खरेदीचे व्यवहार चालतात. तर आष्टूर, पेनूर व किवळा येथे काहीही व्यवहार झालेले नाहीत.

मुख्य बाजार आवार लोहा येथे कृषी माल विक्रीसाठी ५ लिलाव ओटे, कार्यालय इमारत आवाराभोवती कंपाऊंड, शॉपिंग कॉम्प्लेक्स, शेतकरी निवास, हमाल भवन, पिण्याच्या पाण्याची सोय, तसेच शेतकऱ्यांच्या बैलगाड्यांसाठी गोठा इत्यादींची व्यवस्था केली असून जनावरांना पिण्यासाठी पाण्याचा हौद, लोहा व मोंठा येथे सिंमेटचे रस्ते व डांबरीकरण, नाल्यांचे बांधकाम, इत्यादी सोयींबरोबरच बाजार आवारात इलेक्ट्रॉनिक (३० टन क्षमतेचा) सोय केली आहे. तसेच सावलीसाठी बाग-बगीचा व वृक्षारोपण केले असून पर्जन्यमापक यंत्रही बसविले आहे.

कापूस खरेदी योजनेंतर्गत लोहा, सोनखेड, माळाकोळी, पारडी, पांगरी, कलंबर बु., कापशी बु. व मारतळा येथे कापूस संकलन केंद्रे तर शासनाचे हमी दराने ज्वारी खरेदी योजनेंतर्गत लोहा, कलंबर बु., कापशी बु. व उमरा येथे ज्वारी खरेदी केंद्रे सुरू केली आहेत.

बाजार समितीच्या आवारात गहू, ज्वारी, बाजरी, जव, मका, राजगीरा, सनवान, कंगणी, जाई, धान व तांदूळ, बल्लर, रागी, तूर, मूग, मसूर, हरभरा, उडीद, लाख, वाटाणा, मठ, कुळीथ, लोहबीया, जवस, भुईमूगशेंगा, एरंडी, तीळ, करडी, नायगरसीड (कारळ), आंबाडी, राई, धणे, लसूण, मिरची, हळद, मेथी, कांदा, चिंच, गूळ, ऊस, जिरा, तूप, आंबाडा (सलम), तंबाखू, सरकी, कापूस (कच्चा), रुई, खांडसरी साखर, आंबा, ॲनिसीड, ओवा, आद्रक, सर्व प्रकारच्या डाळी व खराब अर्क इत्यादी वस्तुंचे नियमन करण्यात येते.

समितीच्या आवारात महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ उप विभाग, लोहा या संस्थेमार्फत फक्त कापसाची खरेदी केली जाते. परंतु २००२-२००३ या वर्षी या महासंघामार्फत कापसाची खरेदी झाली नाही.

नांदेड, लातूर, गंगाखेड, परळी, बार्शी, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, पंढरपूर, नागपूर, हैद्राबाद, औरंगाबाद, जालना, अमरावती, नाशिक, धुळे, जळगाव, परभणी, मुंबई, पुणे, अकोला, उदगीर, वाशिम व नगर या बाजारपेठेत माल विक्रीसाठी निर्यात केला जातो. ही बाजारपेठ कापूस, ज्वारी, तूर, चना (हरभरा), मूग, उडीद, हळद, गहू, भुईमूगशेंगा व सोयाबीन या मालासाठी प्रसिद्ध आहे.

Maharashtra State Gazetteers

बाजार समितीच्या आवारात दि.नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, शाखा लोहा, लोहा अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक, लोहा, मराठवाडा ग्रामीण बँक शाखा लोहा, देना बँक शाखा लोहा, भारतीय स्टेट बँक शाखा लोहा, दि मर्चन्ट को-ऑपरेटिव्ह बँक शाखा लोहा, या बँकांनी बँकिंग सेवा उपलब्ध करून दिली आहे.

बाजार समिती "अ" वर्गात असून सन १९९०-९१ ते २००५ या कालावधीतील बाजार समितीची माहिती तक्ता क्रमांक १० मध्ये दिली आहे.

**७. कृषी उत्पन्न बाजार समिती, किनवट :** या बाजार समितीची स्थापना १९३० च्या हैद्राबाद कृषी बाजार अधिनियमानुसार १४ सप्टेंबर १९५५ रोजी झाली. महाराष्ट्र सरकारने सन १९६३ साली महाराष्ट्र राज्य शेती उत्पादनांचे खरेदी-विक्री (नियमन) अधिनियम, १९६३ पूर्ण महाराष्ट्र राज्यास २५ मे १९६७ पासून लागू करण्यात आला. त्यानुसार या बाजार समितीचे कामकाज चालते. सन १९६१-६२ मध्ये मुख्यतः ज्वारी, तांदूळ, तूर, मूग, उडीद व गहू यांची मोठ्या प्रमाणात उलाढाल होत होती. त्या वर्षी समितीने १५ व्यापारी, ५ आडत्ये व दोन मापाडी यांना परवाने दिले होते. किनवट हे त्यापूर्वी आदिलाबाद जिल्ह्यात समाविष्ट होते. त्यानंतर ते नांदेड जिल्ह्यात समाविष्ट करण्यात आले.

किनवट बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात १९९९ पर्यंत २०४ गावांचा समावेश होता. परंतु १६ मार्च १९९९ मध्ये किनवट बाजार समितीचे विभाजन करण्यात आले व किनवट, माहूर व इस्लापूर अशा तीन बाजार समित्या निर्माण करण्यात आल्या. किनवट बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात बोधडी बु. व मांडवी या दोन उप बाजारपेठा आहेत. मांडवी उप बाजारपेठेची स्थापना १९७३ मध्ये झाली असून बोधडी बु. उप बाजारपेठेची स्थापना १९७९ मध्ये करण्यात आली आहे.

संपूर्ण मराठवाड्यात किनवट तालुका हाच एकमेव तालुका आदिवासी क्षेत्रामध्ये मोडणारा तालुका असून या बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात कृषी उत्पादनांची उघड लिलावाने खरेदी-विक्री होत नाही. आदिवासी विकास महामंडळामार्फत एकाधिकार पद्धतीने धान्यांची खरेदी होत असते. त्यामुळे शेतकरी आपला माल इतर बाजारपेठेत विक्रीसाठी नेतात.

बाजार समितीने शेतमाल विक्रीसाठी येणाऱ्या शेतकऱ्यांना शेतकरी निवास, पिण्याच्या पाण्याची सोय केली आहे. दुय्यम बाजार आवारात लिलाव ओटे, ऑफिस कम गोदाम, पिण्याच्या पाण्याची सोय तसेच वे ब्रीज बसवून शेतीमालांच्या (कापूस) वजनाची व्यवस्था केली आहे.

किनवट बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात ८३ गावांचा समावेश असून बोधडी बु. येथील उप बाजारतळावर (दोन हेक्टर) तारकुंपण, लिलाव ओटे, ऑफिस कम गोदाम, व्यापारी गाळे व अंतर्गत रस्ता इत्यादी विकास कामे केली आहेत. बोधडी येथे नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची शाखा व मराठवाडा ग्रामीण बँकेची शाखा आहे. तर मांडवी उप बाजार तळावर तारेचे कुंपण, ऑफीस कम गोदाम, लिलावओटे, १० मे.टन क्षमतेचा वेब्रीज काटा बसविला आहे. तसेच येथे शॉपिंग कॉम्प्लेक्सही उभारण्याचा बाजार समितीचा प्रयत्न आहे.

बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात आदिवासी विकास महामंडळ, नाशिक यांच्या मार्फत धान्याची खरेदी एकाधिकार पद्धतीने होते. तूर व भुईमूगशेंगा अकोला व नांदेड येथे निर्यात केल्या जातात. तर सोयाबीन व कापूस हे आदिलाबाद (आंध्र प्रदेशात) निर्यात होते.

कापूस, ताग, भात, ज्वारी, तांदूळ, बाजरी, गहू, मका, जवस, हरभरा, तूर, उडीद, मूग, भुईमूगशेंगा, बटबटी, लाख, मठ, वाटाणा, कुळीथ, शेंगदाणा, करडी, तीळ, अंबाडी, सरकी, एरंडी, आंबा, कारळा, सोप, तंबाखू, गूळ, ओवा, कांदे, तूप व वनस्पती तूप, हळद, काजू, लसूण, धणे, मिरची, मेथी, मोहरी, चिंच, जिरा, राजगिरा, आळीव, साखर, केळी, खाद्यतेल, रवा, मैदा, आटा, सुकामेवा, सर्व प्रकारच्या डाळी, सर्व प्रकारचे मसाले व फळे या वस्तुंचे समितीच्या आवारात नियमन करण्यात येते. तसेच सोयाबीन, मासे व जलचर प्राणी, बांबू व जळाऊ लाकूड या वस्तुंचीही खरेदी-विक्री सुरू करण्याचा समितीचा प्रस्ताव आहे.

सन १९९०-९१ ते २००१-२००२ पर्यंतची बाजार समितीने केलेल्या कृषी मालाची उलाढाल, एकूण व्यापारी परवानाधारक सहकारी संस्थाची खरेदी, एकूण कापूस आवक व किंमत व बाजार समितीचे उत्पन्न व खर्च याबाबतची माहिती तक्ता क्रमांक ११ मध्ये दिली आहे.

**८. कृषी उत्पन्न बाजार समिती, कुंडलवाडी :** बाजार समितीची स्थापना १९५१ मध्ये १९३० च्या हैद्राबाद कृषी बाजार अधिनियमानुसार झाली. या विनियमित बाजारपेठेस उपरोक्त अधिनियम मे १९६७ पर्यंत लागू होता. त्यानंतर मात्र महाराष्ट्र शासनाचा १९६३ चा महाराष्ट्र कृषी उत्पादन खरेदी-विक्री (नियमन) अधिनियम व त्याचा १९६७ चा सुधारित अधिनियम लागू करण्यात आला आहे.

ही बाजार समिती आंध्र प्रदेशाच्या सीमेलगत असून समितीच्या कार्यक्षेत्रात चार ओसाड खेड्यांसह एकूण ४६ गावांचा समावेश आहे. समितीस स्वतःचे बाजार आवार नव्हते म्हणून समितीने बाजार समितीसाठी स्वतंत्र बाजार आवार (चार हेक्टर) घेतले. समितीने बाजार समितीच्या आवारात शेतकऱ्यांना पिण्यासाठी पाणी, जनावरांसाठी पाण्याचा हौद, विद्युत सोय इत्यादी सोयी बरोबरच मुख्य बाजार आवारात चार लिलाव ओटयांची सोय उपलब्ध करून दिली आहे.[४४] ही बाजार समिती मिरची व भुईमूगशेंगसाठी मराठवाड्यांत प्रसिद्ध असून ज्वारी, कापूस, मिरची, भुईमूगशेंग, तूर, गहू व मूग इत्यादी कृषी मालाची येथे उलाढाल चालते. १९६३-६४ मध्ये येथे १० खरेदीदार व अडते, १४ किरकोळ व्यापारी व ६ परवानाधारक तोलारी होते. १९६३-६४ मध्ये समितीच्या आवारात ४४,५३,६१३ रुपये किंमतीचा ३८,६३३ क्विंटल कृषी मालाची उलाढाल झाली होती. पावसाळ्यात बाजार समिती पर्यंत मालाची वाहतूक तितकीशी सुलभ होत नाही.[४५]

ऑगस्ट, २००४ मध्ये समितीच्या आवारात परवानाधारक ८ आडते व ११६ व्यापारी होते. समितीच्या आवारात विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी, कुंडलवाडी ही सहकारी संस्था कार्यरत होती. या बाजारपेठेतून मिरची, उडिद व मूग या कृषी मालाची निर्यात लातूर, पुणे, मुंबई,

४४. सचिव, कृषी उत्पन्न बाजार समिती, कुंडलवाडी (ऑगस्ट, २००४).

४५. नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर, १९७१, पृ. ३४२.

अकोला व जळगाव येथे होते. २००२-२००३ मध्ये समितीच्या आवारात ५,९९,१४,८४८ रुपये किमतीच्या ५५,९०७ क्विंटल कृषी मालाची उलाढाल झाली होती. तर त्या वर्षी समितीचे एकूण उत्पन्न व खर्च अनुक्रमे ९,११,०५४ रुपये व ५,८१,०८१ रुपये होते. बाजार समितीची माहिती तक्ता क्रमांक १२ मध्ये दिली आहे.[४६]

**९. हदगाव कृषी उत्पन्न बाजार समिती, हदगाव :** बाजार समितीची स्थापना १३ एप्रिल १९६३ मध्ये झाली व प्रत्यक्ष कामकाजास मे, १९६३ पासून सुरूवात झाली. ही बाजार समिती हैद्राबाद राज्याच्या १९३० (फसली १९३९) च्या मार्केट ॲक्ट अन्वये स्थापन झाली असून त्यानंतरचा महाराष्ट्र शासनाचा खरेदी-विक्री (नियमन) अधिनियम, १९६३ व १९६७ चा हा अधिनियम या बाजार समितीस लागू करण्यात आला. या बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात तालुक्यातील १९२ खेड्यांचा समावेश असून मुख्य बाजार पेठ हदगाव येथील दत्तवाडी मंदिराच्या पायथ्याशी आहे. त्याचे क्षेत्रफळ आठ हेक्टर आहे.

' भारत जोडो ' पंतप्रधान सडक योजनेंतर्गत हदगाव शहर नांदेड जिल्हा बाजार पेठेपासून ६५ कि.मी. अंतरावरील राष्ट्रीय मार्ग क्र. ३ तुळजापूर ते नागपूरच्या महामार्गावरील प्रमुख ठिकाण असून येथे विविध सोई उपलब्ध केल्या आहेत. तसेच मुदखेड ते अदिलाबाद या नव्याने विस्तारित होत असलेल्या ब्रॉडगेज रेल्वे मार्गावरील दहा कि.मी. अंतरावरील हे शहर आहे.

हदगाव तालुक्यातील शेतकऱ्यांना आपला शेतीमाल विक्री करण्यास सुलभ व्हावे म्हणून या बाजार समितीने हिमायतनगर तमसा, निवघा, मनाठा, कामरी, तळणी, आष्टी (वाळकी) व हिमायतनगर येथे उपबाजार तळ कार्यान्वित केले आहेत. तसेच बाजारतळावर शेतकऱ्यांसाठी विविध सुविधा उपलब्ध केल्या आहेत. शेतकऱ्यांकडील वाढते उत्पादन व खरेदी-विक्रीतील विविध अडचणी लक्षात घेऊन आणि समितीचे कार्यक्षेत्र मोठे असल्याने महाराष्ट्र शासनाच्या (२० ऑगस्ट १९९२) अधिसुचनेप्रमाणे हदगाव बाजार समितीचे विभाजन करून हिमायतनगर येथे स्वतंत्र बाजार समिती १ ऑक्टोबर १९९२ रोजी स्थापन करण्यात आली. शासकीय अधिसुचनेप्रमाणे हदगाव बाजार समितीचे (२० ऑगस्ट १९९२) एकूण आर्थिक व स्थावर (जंगम) मालमत्तेपैकी दोन तृतीयांश भाग हदगाव कृषी उत्पन्न बाजार समितीस ठेवून उर्वरित एक तृतीयांश भाग हिमायतनगर बाजार समितीस देण्यात आला. त्यानुसार सध्या (ऑगस्ट, २००४) हदगाव बाजार समितीच्या अंतर्गत,—

१. मुख्य बाजार आवार हदगाव, हे हदगाव शहराच्या दक्षिणेकडील आठ हेक्टर सरकारी गायरान जागेवर हदगाव ते वाटेगाव या रस्त्यालगत श्रीदत्तबर्डी देवस्थानाच्या पायथ्याशी आहे. ही बाजारपेठ कापसासाठी सुप्रसिद्ध असून बाजार पेठेत दोन खाजगी ऑईल मील व एक सहकारी खरेदी-विक्री संघाचे जिनिंग युनिट आहे. हदगाव बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात असलेल्या व्यापारी पेठेतील किराणा, भुसार, स्वस्त धान्य दुकान, कापड दुकाने, हॉटेल्स, रॉकेल दुकान, सराफी दुकान, फळे व भाजीपाला दुकान, मासळी व मांस विक्री इत्यादी दुकानावरील वजने, मापे व तोलन उपकरणे शासकीय सवलतीच्या दरात दुरुस्ती करणेचा परवाना (२८ सप्टेंबर १९९९) मिळालेली मराठवाड्यातील

४६. उपरोक्त.

एकमेव बाजार समिती होय. तसेच या बाजार समितीस जनावरांची खरेदी, विक्री करण्याचा परवाना (१९ डिसेंबर २००२) मिळालेला असून ३ मार्च २००३ पासून त्याची अंमल बजावणी सुरू करणारी ही जिल्ह्यातील एकमेव बाजार समिती आहे.

**२. उप बाजार, तामसा :** (स्थापना १९७२) ही बाजारपेठ हदगाव शहरापासून फक्त १५ कि.मी. अंतरावर असून ही बाजारपेठ कापूस व गळीताच्या धान्यासाठी प्रसिद्ध असून छत्रपती शिवाजी महाराजांचे विश्वासू सरदार नेताजी पालकर यांचे वास्तव्य याच ठिकाणी होते. येथील बाजारतळ गावाच्या पश्चिमेकडील (२.५९ हेक्टर) हदगाव-नांदेड-नाव्हा या रस्त्यालगत आहे. येथे दोन ऑईल मील व सहकारी संस्थेचे एक व खाजगी एक अशी दोन जिनिंग युनिट आहेत.

**३. उप बाजार, निवघा :** (स्थापना १९७९) हदगाव बाजारपेठेपासून २५ कि.मी. अंतरावरील ही बाजारपेठ कापूस उत्पादनासाठी प्रसिद्ध असून बाजारतळ निवघा गावाच्या दक्षिणेस एक हेक्टर जागेवर हदगाव-बालापूर रस्त्यालगत आहे. येथे सहकारी खरेदी-विक्री संघाचे एक व खाजगी एक अशी दोन जिनिंग युनिट्स आहेत.

**४. उप बाजार, मनाहा :** (स्थापना १९८०) ही बाजारपेठ हदगाव बाजारपेठेपासून ४० कि.मी. अंतरावर असून बाजारतळ मनाहा-नांदेड रस्त्याच्या पश्चिमेस (क्षेत्रफळ २.०२ हेक्टर) आहे. येथे सहकारी खरेदी-विक्री संघाचे एक जिनिंग युनिट आहे.

**५. उप बाजार तळणी :** (स्थापना १९८७) हदगाव बाजारपेठेपासून ४० कि.मी.अंतरावर असलेला हा बाजारतळ हदगाव-शेंबाळपिंपरी-पुसद रस्त्यालगत (क्षेत्रफळ ३.०८ हेक्टर) आहे. हा बाजारतळ यवतमाळ जिल्ह्याच्या सरहद्दीवरील कापसाची बाजारपेठ असून येथे सहकारी खरेदी-विक्री संघाचे जिनिंग युनिट आहे.

**६. उप बाजार, आष्टी :** (वाळकी बा. स्थापना १९८९) : मुख्य बाजारतळ हदगाव पासून ३० कि.मी.वर हदगाव ते हिमायतनगर या रस्त्यालगत असलेल्या या बाजारतळाचे क्षेत्र एक हेक्टर असून येथे एकूण चार लिलाव ओटे बांधलेले आहेत. हा बाजार तळ आंध्र प्रदेशाच्या सरहद्दीवरील जनावरांच्या बाजारतळासाठी प्रसिद्ध आहे. हा जनावरांचा बाजार ग्रामपंचायतीकडे आहे.

**७. कापूस केंद्र, आंबाळ :** हदगाव बाजारापासून हा बाजार सात कि.मी. अंतरावर असून हदगाव ते नांदेड या रस्त्यालगत (क्षेत्र ०.८० हेक्टर) असलेल्या ह्या बाजारतळावर शासकीय कापूस खरेदी योजनेंतर्गत तालुक्यातील प्रमुख जिनिंग प्रेसिंग युनिट येथे आहे. येथे कापूस हंगाम १९८९-९० पासून कापूस खरेदी करण्यात येतो.

शेती उत्पादनात वाढ व्हावी म्हणून शासन नेहमीच प्रयत्नशिल असते. याचाच एक भाग म्हणून महाराष्ट्र राज्य कृषी उत्पन्न बाजार समितीची शिखर संस्था कृषी पणन मंडळ, पुणे मार्फत शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टिने अनेक योजना अनुदान स्वरूपात राबविते. तसेच शेतकऱ्यांच्या मालास योग्य किंमत मिळावी म्हणून शासनाने मुक्त अर्थ व्यवस्थेचे धोरण अवलंबिलेले आहे. कृषी माल विक्रीत

Maharashtra State Gazetteers

निरनिराळ्या मार्गांनी होणारी पिळवणूक, आर्थिक फसवणूक, बाजारातील अनधिकृत तूट, अवाजवी बाजार आकार इत्यादी बाबतीत शेतकऱ्यांची फसवणूक होऊ नये म्हणून शेतकऱ्यांच्या मालाची उघड लिलाव पद्धतीने विक्री, मालाचे अचूक वजन, मालाची कटनी, सूट व इतर प्रकारची दलाली कपात करण्यासंबंधात, मालाचे वेळच्या वेळी रोखीने पेमेंट, शासनाच्या धोरणानुसार आडत्या मार्फत शेतकऱ्यांकडील सहकारी कर्जाच्या वसुलीस सहकार्य, शासनामार्फत एकाधिकार कापूस, ज्वारी, साळभात, चारा टंचाई केंद्राअंतर्गत योजना राबविण्यास बाजार समिती मदत करते. समितीने बाजार तळावर पाण्याची व्यवस्था, अंतर्गत रस्ते, लिलाव शेड, स्वच्छतागृह, लाईट, शॉपिंग सेंटर, शेतकरी निवास, गोदाम काही ठिकाणी वेब्रीज काटा व यार्डवायरफेन्सींग इत्यादी व्यवस्था केल्या आहेत.

हदगाव बाजार समिती एकूण ५९ वस्तुंचे विनियमन करते. त्यामध्ये कापूस, रुई, निरुपयोगी कापूस, सरकी, ज्वारी, गहू, तूर, मूग, उडीद, मसूर, वाटाणा, चना (हरभरा), करडी, एरंडी, साल व तांदूळ, भुईमूगशेंगा, तीळ, गूळ व पाक, हळद, बाजरी, जवस, मेथी, धणे, मिरची (लाल), मोहरी (राई), लसूण, कांदे, लाख, मठ, लोभा, कारळा, चिंच, अंबाडी (बी), राजगीरा, रताळी, आंबा, जव, जाई, तंबाखू, कुळीथ, कांगणी, रागी, सागवान, साखर (शुद्ध केलेली सोडून), मका, ताग, सोप, आले/सुंठ, सर्व डाळी, साखर, तूप/डालडा, खोबरेल तेल, गव्हाचे पीठ/मैदा, सूर्यफूल बी, केळी व सोयाबीन या वस्तुंचा समावेश आहे.

ह्या बाजारपेठेतून नांदेड, लातूर, यवतमाळ, अदिलाबाद व आंध्र प्रदेशातील म्हैसा येथील बाजारपेठेत कापूस, सोयाबीन, गहू, तूर, मूग व उडीद निर्यात होते. तसेच ही बाजारपेठ कापूस, ज्वारी व सोयाबीन या कृषी मालासाठी प्रसिद्ध आहे.

बाजार समितीच्या आवारात हदगाव तालुका सहकारी खरेदी-विक्री संघ, हदगाव व महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ उप विभाग, हदगाव या दोन सहकारी संस्था कार्यरत आहेत. एकाधिकार कापूस खरेदी योजना हंगाम २००२-२००३ मध्ये अंबाला व निंबघा या दोन केंद्रांवर एकूण ४,४४,५७,०४३ रुपये किंमतीच्या २१,३२५ क्विंटल कापसाची खरेदी झाली होती. तर त्या वर्षी कृषी मालाची एकूण १७,४४,१५,३७५ रूपये किंमतीच्या १,६१,४५० क्विंटल मालाची उलाढाल झाली.[४७] बाजार समितीची माहिती तक्ता क्रमांक १३ मध्ये दिली आहे.

सप्टेंबर २००३ मध्ये समितीच्या आवारात एकूण (गाय, म्हशी व बैल) ४,६८,९०० रुपये किंमतीच्या १३८ जनावरांची उलाढाल झाली होती.

**१०. कृषी उत्पन्न बाजार समिती, नायगाव (बाजार) :** बाजार समितीची स्थापना जानेवारी, १९६० मध्ये १९३० च्या हैद्राबाद कृषी बाजार अधिनियमानुसार झाली. या समितीस उपरोक्त हैद्राबाद राज्याचा अधिनियम, १९६७ पर्यंत लागू होता. त्यानंतर मात्र महाराष्ट्र शासनाच्या १९६३ चा महाराष्ट्र कृषी उत्पादन खरेदी-विक्री (नियमन) अधिनियम व त्याचा १९६७ चा सुधारित अधिनियम लागू करण्यात आला आहे. समितीच्या कार्यक्षेत्रात बिलोली तालुक्यातील ९६ गावांचा समावेश

४७. सचिव, कृषी उत्पन्न बाजार समिती, हदगाव यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती, ऑगस्ट, २००४.

करण्यात आला होता. ८ डिसेंबर १९९७ रोजी नायगाव बाजार समितीचे विभाजन करून कुंटूर येथे दुसरी कृषी उत्पन्न बाजार समिती स्थापन करण्यात आली आहे. त्यामुळे डिसेंबर, १९९७ पासून दोन बाजार समित्या स्थापन झाल्या आहेत. त्यामुळे कृषी उत्पन्न बाजार समिती, नायगाव ह्या बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात ५५ गावे समाविष्ट आहेत.[४८]

समितीचे मुख्य बाजार आवार नायगाव (बाजार) येथे (क्षेत्रफळ ३३० × ४८० फूट) असून ही जागा बाजार समितीस अनुदान म्हणून ग्रामपंचायत कार्यालय नायगावने विनामुल्य दिली आहे. तसेच नायगाव येथे मुख्य मिरची बाजार आवार (क्षेत्र ४.२ हेक्टर) असून उप बाजारतळ धुप्पा, (स्थापना सप्टेंबर, १९८३, क्षेत्रफळ १.२३ हेक्टर), उप बाजारतळ मांजरस (स्थापना मार्च, १९८१, क्षेत्रफळ २.८५ हेक्टर) व उप बाजारतळ नरसी (स्थापना ऑक्टोबर, १९९९, क्षेत्रफळ २.१४ हेक्टर) असे तीन उप बाजारतळ कार्यरत आहेत.[४९]

बाजार समितीच्या आवारात भव्य शेतकरी निवास, लिलाव ओटे, सिमेंटचे रस्ते, स्वच्छतागृह, जनावरांना पिण्याचे पाणी, कापसाच्या वजनासाठी भुईकाटा, मर्क्युरी लाईट, कार्यालयीन इमारत, तसेच उप-बाजार धुप्पा येथे वायर फेन्सींग अंतर्गत रस्ते, बोर, विद्युत मोटर इत्यादी सुविधा उपलब्ध केल्या आहेत.

बाजारसमितीस केंद्र शासनाकडून विकास कामासाठी विकास योजनेंतर्गत खालीलप्रमाणे अनुदान मिळाले आहे.[५०]

| तपशील | वर्ष | अनुदान रक्कम रुपये | केलेली कामे |
|---|---|---|---|
| मुख्य बाजार आवार नायगाव | १९८४-८५ | ४,००,००० | लिलाव ओटे बांधकाम |
| एस.एफ.डी.ओ. नायगाव | १९७४ | ५०,००० | — |
| झुणका भाकर नायगाव | १९९८ | २५,००० | झुणकाभाकर केंद्र |
| मोंढा/जमीन नायगाव | १९६० | १,०१,१०५ | जमीन खरेदी |

बाजार समितीच्या आवारात कृषी माल विक्रीसाठी आल्यानंतर प्रत्येक आडत्याच्या दुकानासमोर खरेदीदारांना कृषी माल उघड लिलाव पद्धतीने बाजार समितीच्या प्रतिनिधीसमक्ष विकला जातो. बाजार आवारात होणाऱ्या उलाढालीवर समितीचे संपूर्ण नियंत्रण असते. त्यामुळे शेतकऱ्यांची अडवणूक व फसवणूक होत नाही. बाजार भावाची माहिती जाहीर केली जाते. तसेच बाजार समिती संगणकाद्वारे बाजार भाव प्रसिद्धी करण्याकरीता प्रयत्नशील आहे. बाजार समितीच्या कायद्यात नवीन दुरुस्ती

४८. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९७१, पृ. ३३६ व सचिव, कृषी उत्पन्न बाजार समिती, नायगाव, यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती, जुलै, २००४.

४९. कृषी उत्पन्न बाजार समिती, नायगाव, वार्षिक अहवाल २००२-२००३, पृ. ६.

५०. कृषी उत्पन्न बाजार समिती, नायगाव, वार्षिक अहवाल २००२-२००३, पृ. १४.

झाल्यामुळे खेड्यातील किरकोळ खरेदीदारांना परवाने दिले आहेत. त्यामुळे खेड्यातील बाजारातील उलाढालीवरही समितीचे नियंत्रण असल्याने शेतकऱ्यांची फसवणूक होत नाही.

बाजार समितीच्या आवारात कापूस, गहू, ज्वारी, बाजरी, तूर, मूग, चणा, जवस, भुईमूग, साळ, तांदूळ, सरंडी, करडी, तीळ, गूळ, पाक, जाई, तंबाखू, कुळीथ, कोयली, रागी, सागवान, मेथी, मठ, उडीद, राजगिरा, कारळा, आंबाडी, चिंच, सरस, साखर, जिरा, मका, ऊस, तेल, आंबे, अगवान, आले, फळे, भाजीपाला, आटा, रवा, मैदा, द्राक्षे, ताग, नागली, वरी, कोदरा, बावरी, जव, नाचणी, साळी, चिंचोका, वाल, चवळी, सूर्यफुल बी, नारळ, निबोंळ्या, चामडी व कातडी, चखमा मसाला, पेंड (वैरण), बीडीची पाने, मोसंबी, संत्री, लिंबू, केळी, द्राक्ष, डाळींब, अंजिर, खरबुज, बटाटे, कांदे, टमाटे, सुरज, रताळी, कोंबड्या, मेंढ्या व बकऱ्या इत्यादी मालाचे नियमन करण्यात येते.

बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात नायगाव तालुका सहकारी खरेदी-विक्री संघ, नायगाव सहकारी जिनींग ॲण्ड प्रेसिंग संस्था, सेवा सहकारी सोसायटी नायगाव, गंगाराम जिनींग ॲण्ड प्रेसिंग, नायगाव, महाराष्ट्र जिनींग प्रेसिंग फॅक्टरी, नायगाव, साईबाबा ऑईल मिल, नायगाव, बालाजी ऑईल इंडस्ट्रीज, नायगाव, गजानन दाल मील, नायगाव, पांडुरंग ऑईल मिल, नायगाव, माधव मिल, नायगाव व गोदावरी मनार सहकारी साखर कारखाना, शंकरनगर ह्या सहकारी संस्था कार्यरत आहेत.

बाजार समितीच्या आवारात २००२-२००३ मध्ये १२,१९,७७,३१२ रुपये किंमतीच्या १,३५,९३१ क्विंटल कृषी मालाची उलाढाल झाली होती. तसेच ९,७२,४२५ रुपये किंमतीच्या कृषी मालाची सहकारी संस्थांनी खरेदी केली होती. तर त्या वर्षी समितीचे उत्पन्न व खर्च अनुक्रमे १२,७१,५१७ रुपये व १२,४३,०३९ रुपये होते.[५१] ही बाजार समिती गहू, ज्वारी, उडीद, भुईमूग, सोयाबीन, तूर, सूर्यफूल, मिरची, कापूस, चणा, मूग व करडी या कृषी मालासाठी प्रसिद्ध असून या बाजार पेठेतून हैद्राबाद, लातूर, सुरत, मद्रास, अकोला, मुंबई, दिल्ली, बार्शी, पुणे, इंदापूर, इंदोर, खांडवा, मद्रास, इत्यादी बाजार पेठेत कृषी माल विक्रीसाठी निर्यात केला जातो.

बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, शाखा नायगाव, नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, शाखा टाकळी, स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा नायगाव, स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, शाखा नायगाव, मराठवाडा ग्रामीण बँक, शाखा नायगाव व नांदेड मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँक, शाखा नायगाव या बँकांनी आपली सेवा उपलब्ध करून दिली आहे.

**११. कृषी उत्पन्न बाजार समिती मुखेड :** (स्थापना मार्च, १९६०) : या बाजार समितीची स्थापना हैद्राबाद राज्याच्या १९३० च्या अधिनियमानुसार मार्च, १९६० मध्ये झाली. या बाजार समितीस हैद्राबाद राज्याचा अधिनियम १९६७ पर्यंत लागू होता. त्यानंतर मात्र महाराष्ट्र शासनाच्या १९६३ चा महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी-विक्री (नियमन) अधिनियम व त्याचा १९६७ चा सुधारित अधिनियम लागू करण्यात आला.

---

५१. सचिव, कृषी उत्पन्न बाजार समिती, नायगाव, बाजार यांनी पुरविलेली माहिती, जुलै, २००४.

बाजार समिती स्थापन झाल्यानंतर समितीस सुयोग्य असा बाजारतळ नव्हता. त्यामुळे कृषीमाल देगलूर, उदगीर व नांदेड येथील बाजारात विक्रीसाठी पाठवित असत. कापूस, भुईमूग शेंग, ज्वारी, तूर व उडीद या कृषी मालाची येथे आवक होत होती. येथे २१ **†** वर्ग खरेदीदार, २१ **ब** वर्ग खरेदीदार व १० किरकोळ कमिशन एजंट होते. येथील माल नांदेड, अकोला व निझामाबाद येथे पाठवित असत.[५२]

बाजार समितीचे मुख्य बाजार आवार (क्षेत्र ४.३० हेक्टर) मुखेड येथे असून या बाजार समितीच्या कार्यक्षेत्रांर्तगत तालुक्यातील १३५ गावांचा समावेश आहे. तसेच मुझुमाबाद (स्थापना जुलै, १९७२), बोटमोगरा (स्थापना मार्च, १९७२), बाऱ्हाळी (स्थापना जून, १९७२), येवती (स्थापना ऑगस्ट, १९८६), व जांब बु.,(स्थापना जून, १९९२) येथे उप-बाजारतळ आहेत.[५३]

समितीने बाजार तळावर अंतर्गत रस्ते, जनावरांना पिण्याचे पाणी, दिवाबत्ती, पाणीपुरवठा, स्वच्छतागृह, भुईकाटा व लिलाव ओटे इत्यादी सुविधा केल्या आहेत. ही बाजार समिती कापूस, उडीद, मूग, तूर, गहू व संकरीत ज्वारी या मालासाठी प्रसिद्ध असून येथील माल लातूर, अकोला, पुणे, सोलापूर, बार्शी, हैद्राबाद व दिल्ली येथे विक्रीसाठी पाठविला जातो.

सन २००२-२००३ मध्ये समितीने २५,२८,९०,११५ रुपये किंमतीच्या २३,१०७ क्विंटल कृषी मालाची उलाढाल केली. त्या वर्षी समितीचे उत्पन्न व खर्च अनुक्रमे १८,४९,४२३ रुपये व १६,४३,५५९ रुपये होते. बाजार समितीची माहिती तक्ता क्र.१४ मध्ये दिली आहे.

**१२. कृषी उत्पन्न बाजार समिती, देगलूर :** या बाजार समितीची स्थापना दि.२४ सप्टेंबर १९४९ मध्ये झाली असली तरी बाजार समितीच्या प्रत्यक्ष कामकाजास सन १९६४-६५ मध्ये सुरूवात झाली. समितीच्या कार्यक्षेत्रात संपूर्ण देगलूर तालुका असून त्यामध्ये ७९ गावांचा समावेश आहे. समितीचा स्वतःच्या मालकीचे बाजार आवार देगलूर येथे असून त्याचे क्षेत्रफळ १३.२३ एकर; कॉटन मार्केट (क्षेत्रफळ ७.०० एकर) व मिरची मार्केट देगलूर (क्षेत्रफळ ७.०० एकर) आहे. तसेच समितीचे दुय्यम बाजार तमलूर संलग्न सांगवी, शेगाव (क्षेत्रफळ ७.०० एकर) व दुय्यम बाजार शहापूर येथे आहेत.

देगलूर येथे भव्य मार्केट यार्ड उभारले असून त्याच्या चारही बाजूस सिमेंट काँक्रीटचे रस्ते, यार्डाच्या मध्यभागी कार्यालयाची इमारत व शेतकऱ्यांच्या बैलगाड्यांसाठी मोठे पटांगण आहे. तसेच मार्केट यार्डात वीज, पाणी, सिमेंटचे रस्ते, जनावरांसाठी पिण्यासाठी पाण्याचे हौद इ. सोईबरोबरच बँका, पोस्ट, कार्यालय, शेतकऱ्यांसाठी शेतकरी निवासाची सोय केली आहे.

समितीच्या आवारात उघड लिलाव पद्धतीने मालाची खरेदी-विक्री केली जाते. त्यामध्ये साळी, तांदूळ, गहू, ज्वारी, टाकळी, ज्वारी लेव्ही, मूग (हिरवा), मूग, चमकी, उडीद, तूर (गजरा), हरभरा, धणे, मिरची, सूर्यफूल, करडी, भुईमूगशेंग, अंबाडी व कापूस इत्यादी मालाचा समावेश आहे.

---

५२. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९७१, पृ. १४३-४४.

५३. कृषी उत्पन्न बाजार समिती, मुखेडकडून प्राप्त झालेली माहिती, जून, २००४.

समितीच्या आवारांत लिलाव ओट्यांच्या बांधकामास कोर्टाने स्थगिती दिल्यामुळे बांधकाम थांबविण्यात आले आहे. समितीच्या आवारात देगलूर तालुका सहकारी खरेदी-विक्री संघ, देगलूर, नरंगल सेवा सहकारी संस्था, शाखा देगलूर व महाराष्ट्र राज्य कापूस उत्पादक पणन महासंघ, उपविभाग देगलूर, या संस्थाही कृषी मालाची उलाढाल करतात. तसेच समितीच्या आवारात भारतीय स्टेट बँक, शाखा देगलूर, नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, शाखा मोंढा देगलूर, नांदेड जिल्हा मर्चंट बँक, शाखा देगलूर, पिपल्स को-ऑपरेटिव्ह बँक हिंगोली, शाखा देगलूर व भाग्यलक्ष्मी महिला बँक, शाखा देगलूर या बँकांनी आपल्या सेवा उपलब्ध केल्या आहेत.

उडीद, मूग व तूर या कृषी मालासाठी ही बाजार समिती प्रसिद्ध असून मूग, उडीद, तूर, हरभरा, व ज्वारी उत्तर प्रदेश, दिल्ली, मद्रास, गुजराथ, हैद्राबाद, जालना व लातूर येथे विक्रीसाठी निर्यात केली जाते.

बाजार समितीने सन २००४-२००५ या वर्षी एकूण ११,९३,७९,३१० रुपये किंमतीच्या ७४,४१२ क्विंटल कृषी मालाची उलाढाल केली होती. त्या वर्षी बाजार समितीचे एकूण उत्पन्न व खर्च अनुक्रमे २०,९२,१८७ रुपये व १८,९५,५४१ रुपये होते. बाजार आवारातील लिलाव ओट्यांची संख्या, एकूण आडत्या, एकूण खरेदीदार इत्यादी परवानाधारकांची संख्या, त्यापासून मिळालेली अनुज्ञाप्ती फी, कृषी मालाची उलाढाल, समितीचे उत्पन्न व खर्च, कापूस खरेदी, परवानाधारक सहकारी संस्थांची खरेदी व समितीचे उत्पन्न व खर्च याबाबतची सन १९९०-९१ ते २००४-२००५ पर्यंतची माहिती तक्ता क्रमांक १५ मध्ये दिली आहे.

**१३. कृषी उत्पन्न बाजार समिती, बिलोली :** या बाजार समितीची स्थापना २० जून २००६ मध्ये झाली. ही बाजार समिती कुंडलवाडी बाजार समितीच्या अंतर्गत उप-बाजारपेठ म्हणून कार्यरत होती. सध्या या बाजार समितीचे दोन उपबाजारतळ आहेत. मुख्य बाजार आवाराचे क्षेत्र एक हेक्टर असून समितीच्या कार्यक्षेत्रात ४६ गावांचा समावेश आहे. उपबाजारतळ कासराळी, स्थापना ९ जानेवारी १९८०, तर उपबाजारतळ खातगाव, १५ जानेवारी १९८५, स्थापना (क्षेत्रफळ एक हेक्टर) झाली. मुख्य बाजार आवारात पिण्याचे पाणी, वीजपुरवठा, अंतर्गत रस्ते व आवाराभोवती तारेचे कुंपण घातलेले आहे. उपबाजारतळ, खतगाव येथे अंतर्गत रस्ते व आवाराभोवती तारेचे कुंपण घातलेले आहे. कासराळी उपबाजारतळाची स्वतंत्र अशी जागा नाही.

Maharashtra State Gazetteers

या बाजार समितीच्या आवारात मूग, उडीद, तूर, ज्वारी, गहू, हरभरा, करडी, शेंग, अंबाडी, सोयाबीन, सूर्यफूल, कापूस या कृषीमालाचे नियमन करण्यात येते. तसेच अकोला, अमरावती, जालना व लातूर या बाजार पेठांमधून कृषीमालाची निर्यात करण्यात येते. तर उडीद आंध्र प्रदेशात निर्यात केला जातो.

समितीच्या आवारात सन २००५-०६ मध्ये ४७ † वर्ग, ८० ब वर्ग व ४१ क वर्ग खरेदीदार होते. तर १५३ हमाल, १६ तोलारी व २ प्रक्रीयाकार होते. या पासून समितीस २०,५१२ रुपये अनुज्ञाप्ती फी मिळाली होती.

सन २००५-०६ मध्ये समितीच्या आवारात १,८९,९७,६३७ रुपये किंमतीच्या ८,६३३ क्विंटल कृषी मालाची उलाढाल झाली. (त्या वर्षी समितीचे एकूण उत्पन्न व खर्च अनुक्रमे ९,३०,९१३ रुपये व ११,२३,०२० रुपये होते.) तसेच मार्केटींग फेडरेशनने बाजार समितीच्या आवारात ५३,८७,३७७ रुपये किंमतीच्या कापसाची खरेदी केली. त्या वर्षी समितीचे एकूण उत्पन्न व खर्च अनुक्रमे ९,३०,९१३ रुपये व ११,२३,०२० रुपये होते.

**१४. कृषी उत्पन्न बाजार समिती, माहूर :** बाजार समितीची स्थापना २७ फेब्रुवारी १९९९ मध्ये झाली असून मुख्य तळ माहूर असून उप बाजार तळ वाई व आष्टा येथे आहेत. या बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात ९५ गावांचा समावेश आहे. मुख्य बाजार तळ माहूर येथे २.९२ हेक्टर तर उप बाजार वाई २.०२ हेक्टर आणि आष्टा बाजार तळ १.६० हेक्टर इतका आहे.

माहूर मुख्य बाजार तळ येथील आवारास तार कुंपण गेट, पाणीपुरवठा, विजेची व्यवस्था, ऑफीस शेड, वेब्रीज काटा, स्वच्छता गृह, शेतकरी निवास, गोडावुन २५ × ८० चा लिलाव शेड, लिलाव ओटा व ३ व्यापारी गाळे आहेत. दुय्यमस्थळ आष्टा येथेही तार कुंपण व गेट, पाणीपुरवठा, वीज व्यवस्था, ऑफीस शेड, स्वच्छता गृह व शेतकरी निवास गोडाऊन इत्यादी सोयी आहेत. तसेच दुय्यम बाजार वाई येथे तारकुंपण व गेट, पाणीपुरवठा, विजेची व्यवस्था, ऑफीस कम गोदाम, लिलाव ओटे, स्वच्छता गृह, वेब्रीज काटा इत्यादी सुविधा उपलब्ध आहेत.

सन २००१-२००२ मध्ये बाजार समितीच्या आवारात ३१,१८,४२६ रुपये किंमतीच्या १८,०३८ क्विंटल मालाची आवक झाली. सन २००५-०६ मध्ये अ वर्ग खरेदीदार ११९, ब वर्ग ५५ होते तर हमाल ७५ होते. तोलारी २ होते. या समितीच्या आवारात सन २०००-०१ मध्ये मार्केटींग फेडरेशनने केलेली कापूस खरेदी आवक ८,७५४ क्विंटल होती व त्याची किंमत १,३५,७७,८७३ रुपये होती तर २००५-०६ मध्ये आवक १०,२६६ क्विंटल झाली आणि त्याची किंमत २,०४,३९,८०७ रुपये झाली. तर २००५-०६ मध्ये ७९,५६६ क्विंटल मालाची आवक झाली व त्याची किंमत ३१,२२,७०,३०० रुपये झाली होती.

या कृषी बाजार समितीचे उत्पन्न सन २०००-०१ मध्ये ३,४७,५७६ रुपये होते तर खर्च ४,४३,५५२ रुपये होते व २००५-०६ मध्ये उत्पन्न खर्च अनुक्रमे ९,५७,११६ व ७,९६,३७३ रुपये होते.

या बाजार समितीच्या आवारात सहकारी संस्थांनी १०,२६६ क्विंटल माल २,०४,३९,८०७ रुपये किंमतीस खरेदी केला.[५४]

या बाजार समितीच्या आवारात कापूस, ताग, साळ, ज्वारी, तांदूळ, बाजरी, गहू, मका, जवस, हरभरा, तूर, उडीद, भुईमूग, वाटाणा, शेंगदाणा, मूग, तीळ, करडी, अंबाडी एरंडी, काराळा, आंबा, तंबाखू, गूळ, ओवा, कांदे, हळद, आळू, तूप, लसूण, धणे, मिरची, मोहरी, मेथी, चिंच, जिरा, राजगिरा, आळीव, केळी, साखर, गोडेतेल, रवा, मैदा, ओवा, सरकी, सोयाबिन इत्यादी शेतमालाची खरेदी विक्री होते.

---

५४. वरील माहिती सचिव, कृषी बाजार समिती, माहूर यांनी पाठविलेल्या माहितीवर आधारित आहे.

Maharashtra State Gazetteers

माहूर येथे जनावराचा बाजारही भरतो. ही बाजार समिती "अ" वर्गात असून सन २०००-०१ ते २००५-०६ या कालावधीत बाजारसमितीची माहिती तक्ता क्रमांक १६ मध्ये दिली आहे.

**सहकारी विपणन :**

नांदेड जिल्ह्यात कृषी मालास व शेतकऱ्यांस त्यांच्या उत्पादीत मालाचा योग्य तो मोबदला मिळवून देणे व त्यांना लागणाऱ्या जिन्नसांचा योग्य किंमतीत पुरवठा करणे ह्या उद्देशाने या संस्थांची स्थापना केली आहे. शेतीसाठी पतपुरवठा करणे व उत्पादकतेमध्ये वाढ होण्याच्या दृष्टीने साधन सामग्री पुरविणे व किफायतशीर विक्री करण्यासाठी सहकारी पणन संस्था निर्माण झालेल्या आहेत. हे संघ स्वतः कृषी माल व कृषी गरजांच्या वस्तू खरेदी करून विकतात. तसेच दुसऱ्या सहकारी संस्थाचे प्रतिनिधी म्हणूनही प्रातिनिधिक खरेदी किंवा प्रातिनिधिक विक्री करतात. नांदेड जिल्ह्यात **एक जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघ** कार्यरत आहे. या संघाचे मुख्य कार्य म्हणजे शेतमालास जास्तीत जास्त भाव मिळवून देण्यासाठी बाजारात आणलेल्या कृषी मालाची विक्री करणे, कृषी मालाची स्वतः खरेदी करणे किंवा कृषी माल तारणावर कर्ज देण्याची व्यवस्था करणे, तसेच खते, कीटकनाशके, बी-बियाणे, पंप, पत्रे, बैल इत्यादी शेतकऱ्यांच्या गरजा किफायतशीर दराने पुरविणे, कृषी माल साठवणूक व्यवस्था करणे, इत्यादी कामाबरोबरच जांगड पद्धतीने शासकीय खत वाटप, एकाधिकार कापूस खरेदीत सहभाग, ग्राहकोपयोगी वस्तुंचे वितरण इत्यादी शासकीय योजना राबविण्यातही हे संघ मोलाची कामगिरी बजावतात.

नांदेड जिल्ह्यात २००४ मध्ये जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात एक व एक जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघ कार्यरत होते. त्यापैकी माहिती प्राप्त संघाची माहिती खाली दिली आहे.—

**१. उमरी सहकारी खरेदी-विक्री संघ, उमरी :** या संघाची स्थापना निजामी राजवटीत २५ जानेवारी १९४४ रोजी **टाका** या नावाने झाली. तद्नंतर मल्टीपर्पज सोसायटी, दि मार्केटिंग को-ऑपरेटिव्ह सोसायटी, उमरी आणि १ जानेवारी १९६१ रोजी दि उमरी सहकारी खरेदी-विक्री संघ असे नामकरण झाले. १९६१-६२ साली ह्या संघाची सभासद संख्या ५४७ व भाग भांडवल ३९,६६८ रुपये होते. ह्या संघाचे मुख्य कार्यालय उमरी येथे असून भोकर येथे अडत दुकान आहे. नियंत्रित कालाचा खरेदी-विक्रीचा व्यवहार महाराष्ट्र राज्य शासनाच्या धोरणानुसार संस्थेने तीन शाखांमार्फत स्वस्त धान्य दुकाने चालविली आहेत. त्याच्यामार्फत मार्च, २००३ मध्ये एकूण ८,०५,६३० रुपये मालाची विक्री करण्यात आली. तसेच त्या वर्षी खते, बी-बियाणे व औषधींची खरेदी-विक्रीची उलाढाल अनुक्रमे १९,२५,३९४ व २३,५९,२५७ रुपये करण्यात आली. एकाधिकार कापूस खरेदी योजनेनुसार महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ, नागपूर यांचे सब एजंट म्हणून कापूस एकाधिकार योजनेत ही संस्था काम करीत असून हंगाम २००२-२००३ मध्ये संस्थेने दोन ठिकाणी कापूस खरेदी केंद्रे सुरू करून २,२३,३०,१३८ रुपये किंमतीच्या कापसाची उलाढाल केली. मार्च, २००३ मध्ये संघाची एकूण सभासद संख्या ३,२३६ होती.[५५]

५५. व्यवस्थापक, उमरी सहकारी खरेदी-विक्री संघ यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती ऑगस्ट २००४ व उमरी सहकारी खरेदी-विक्री संघ, ६० वा वार्षिक अहवाल, ३१ मार्च २००३.

**२. हदगाव तालुका सहकारी खरेदी-विक्री संघ :** या संघाची स्थापना दिनांक २७ ऑक्टोबर १९६४ रोजी झाली. संघाचे हदगाव येथे मुख्यालय असून तालुक्यातील सभासदांना व शेतकऱ्यांना नजीकच्या ठिकाणी व वेळेवर सर्व प्रकारच्या शेतीपयोगी मालाचा पुरवठा व्हावा म्हणून संघाने हदगाव, तामसा, निवधा, हिमायतनगर, तळणी, मनाला, आष्टी व किरकोळ खत विक्री केंद्र बरडशेवाळा येथे शाखा व किरकोळ विक्री केंद्रे सुरू केली आहेत. मार्च, २००३ मध्ये संघाची एकूण सभासद संख्या ८,७५२ होती व सभासद भाग भांडवल १२,४८,७९६ रुपये होते. तसेच संघाच्या तालुक्यात सहा ठिकाणी जिनिंग फॅक्टरी असून अंबाला येथे एक प्रेसिंग फॅक्टरी आहे. हिमायतनगर येथिल जिनिंग फॅक्टरी बंद होती.[५६]

**३. मुखेड तालुका सहकारी खरेदी-विक्री संघ :** या संघाची स्थापना २८ डिसेंबर १९६१ रोजी झाली. २००२-२००३ मध्ये संघाची एकूण सभासद संख्या २३१ व भागभांडवल २,५९,००० रुपये होते. एकाधिकार कापूस खरेदी धोरणानुसार फक्त मुखेड कापूस संकलन केंद्रावर २००२-२००३ मध्ये २०३४ क्विंटल कापसाची खरेदी झाली. त्यासाठी संघास २८,९१७ रुपये कमिशन मिळाले.

**४. लोहा तालुका शेतकरी सहकारी खरेदी-विक्री संघ :** या संघाची स्थापना ५ नोव्हेंबर १९९३ रोजी झाली. या संघास खताची व शासकीय आधारभूत धान्य खरेदी व कापूस खरेदीचाही परवाना मिळाला असून संघातर्फे मारताळा, कलंबर येथील दोन, लोहा येथील दोन, पार्डी व बेरळी अशा एकूण सात कापूस खरेदी केंद्रावर हंगाम २००४-०५ मध्ये एकूण ९०५८८.७७ क्विंटल कापूस खरेदी केला. त्यापासून संघास १२,१०,०७० रुपये कमिशन मिळाले.[५७]

**५. किनवट तालुका सहकारी खरेदी-विक्री संघ :** या संघाची स्थापना १९६४ मध्ये झाली. या संघाचे विभाजन होऊन माहूर व किनवट असे दोन संघ स्थापन झाले आहेत. किनवट संघाची नोंदणी ४ जुलै २००२ मध्ये झाली आहे. या संघाचे (२००३) भाग भांडवल ०.६० लाख रुपये असून सभासद संख्या १४५ आहे.

**६. माहूर तालुका सहकारी खरेदी-विक्री संघ, माहूर :** स्थापना ४ जुलै २००२ मध्ये झाली, त्यावेळी त्याची सभासद संख्या ५२ व भाग भांडवल १३,४०० रुपये होते.

**७. बिलोली तालुका शेतकरी सहकारी खरेदी-विक्री संघ, बिलोली :** या संघाची स्थापना ३ मार्च २००१ रोजी झाली. यापूर्वी बिलोली, नायगाव, धर्माबाद हे नवीन अस्तित्वात आलेले तालुके बिलोलीस जोडलेले होते. त्यामुळे बिलोली येथे यापूर्वी बिलोली तालुका सहकारी खरेदी-विक्री संघ, मुख्य कार्यालय नायगाव या नावाने संघ अस्तित्वात होता. त्यानंतर बिलोली तालुक्याचे विभाजन होऊन बिलोली तालुक्यासाठी नवीन संघ स्थापन करण्यात आला. सन २००५-०६ मध्ये संघाने ३९,९४९ रुपये किंमतीच्या शेती उपयोगी व ४,५९,३७६ रुपये किंमतीच्या ग्राहकोपयोगी वस्तुंची विक्री केली. त्या वर्षी संघास २,६३८ रुपये नफा झाला होता.

---

५६. हदगाव तालुका सहकारी खरेदी-विक्री संघ, हदगाव, ३९ वा वार्षिक अहवाल, २००२-२००३.

५७. लोहा तालुका शेतकरी सहकारी संघ, लोहा १२ वा **वार्षिक अहवाल,** सन २००४-०५.

**राज्य व्यापार आणि रास्त भावाची दुकाने :** दुसऱ्या महायुद्धाच्या काळात स्वस्तधान्य दुकाने सुरू करून उपभोग्य मालाच्या खुल्या व्यापारावर नियंत्रण घातले गेल्यामुळे जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या किंमतीला आळा बसला आणि गरीब जनतेस रास्त भावाने अन्नधान्ये व जीवनोपयोगी वस्तू मिळू लागल्या. तांदूळ, गहू, ज्वारी, बाजरी, साखर, गूळ, रॉकेल व कपडे या वस्तू रास्त भाव दुकानांमधून जनतेस वाटप करण्यात आल्या व या वस्तू खाजगी दुकानातून विक्री करण्यास बंदी करण्यात आली. तसेच सक्तीची लेव्ही पद्धती सुरू करण्यात आली व शेतकऱ्याकडून धान्याच्या उत्पादनानुसार काही टक्के धान्य वसूल करण्यात आले. ही पद्धती १९४८ पर्यंत चालू होती. १९४८ मध्ये रेशनिंग पद्धतीत शिथिलता आणण्यात आली व लेव्ही पद्धती बंद करण्यात आली. धान्य उत्पादनात वाढ झाल्यामुळे १९५० नंतर खुल्या व्यापारावर घातलेली बंधने शिथिल केली गेली व १९५४ नंतर ती पूर्णपणे उठविण्यात आली. परंतु पुन्हा १९५६ मध्ये अन्नधान्यांच्या टंचाईमुळे वरील वस्तुंच्या खुल्या व्यापारावर पुन्हा नियंत्रण घालून व रेशनिंग पद्धती सुरू करून जिल्ह्यात रास्त भावाची दुकाने सुरू करण्यात आली. १९५९, १९६१, १९६२, १९६३ व १९६४ या वर्षी धान्यांच्या किंमती वाढल्यामुळे शासनास रास्त भावाची दुकाने सुरू करण्यात आली. एप्रिल, १९६३ मध्ये नांदेड जिल्ह्यात एकूण १२३ रास्त भावाची दुकाने होती.[५८]

सन १९८६ मध्ये जिल्ह्यात स्वस्त धान्य दुकानांची एकूण संख्या १,५७७ होती. तर सन २००३-२००४ मध्ये अशा दुकानांची जिल्ह्यातील एकूण संख्या १,९२७ होती.

## किरकोळ व्यापार

**किरकोळ व्यापार :** पूर्वी किरकोळ वस्तुंची दुकाने लहान होती व त्यात थोडयाच वस्तू विक्रीस ठेवल्या जात. गरजेनुसार लोक आठवडे बाजारातून वस्तू एकदम खरेदी करीत. लोकांच्या गरजा हळूहळू बदलत गेल्या. त्यानुसार किरकोळ दुकानांचे स्वरूपही बदलत गेले. हा बदल ग्रामीण भागापेक्षा नागरी भागात मोठ्या प्रमाणात होत असून त्याचे मुख्य कारण म्हणजे नागरी भागात होत असलेले लोकांचे स्थलांतर. सध्या हरतऱ्हेच्या वस्तू एकाच ठिकाणी मिळण्याची सोय अनेक व्यापारी संस्थांनी केल्याचे दिसून येते.

जिल्ह्यामध्ये किराणा, कापड, स्टेशनरी, मिठाई, तयार कपडे, विजेची उपकरणे, करमणुकीची साधने, भांडी इत्यादींची विक्री किरकोळ व घाऊक दुकानातून होते. नागरी भागात मात्र अशा दुकानांची संख्या वाढलेल्या लोकसंख्येमुळे अधिक दिसून येते.

किराणा जिन्नसांची दुकाने संख्येने जास्त आढळतात. सन १९६३ मध्ये नांदेड शहरांत अशी दुकानांची एकूण संख्या २६१ होती व त्यामध्ये ५४१ लोक गुंतलेले होते. कंधार येथे ३०, मुखेड येथे ४७, लोहा येथे ७५, देगलूर येथे ५० व करखेडी येथे ८ दुकाने होती.[५९] अशा दुकानांमधून ज्वारी, बाजरी, गहू, तांदूळ, तूरडाळ, कडधान्ये, गूळ, साखर, तेल, मसाल्याचे जिन्नस, साबण, चहा, कॉफी, तंबाखू, विडी इत्यादी विविध प्रकारच्या वस्तू विक्रीस ठेवल्या जातात. अशा वस्तू स्थानिक

---

५८. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९७१, पृ. ३५१.

५९. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९७१, पृ. ३४७.

घाऊक व्यापाऱ्याकडून रोखीने किंवा उधारीने खरेदी केल्या जात. परंतु सध्या अशा मालांची विक्री रोखीनेच करण्याकडे व्यापाऱ्यांचा कल असतो.

**कापड व तयार कपडे :** किराणा वस्तुच्या खालोखाल कापड व तयार कपडे विकणाऱ्यांचा क्रमांक लागतो. अशा दुकानामधून सर्व प्रकारची तयार कपडे विक्रीस ठेवतात. सर्वसाधारणपणे त्यामध्ये, सुती व लोकरीचे कपडे, शर्ट, कोट, साडी, धोतर इत्यादींचा समावेश असतो. अशी दुकाने मोठ्या शहरांतून आढळतात. तयार कपडे होजिअरी दुकानात विक्रीस ठेवतात. सन १९६३ मध्ये ६४ कापड दुकाने, २५६ तयार कपड्यांची दुकाने नांदेड शहरात होती. २५ कंधार, ४ मुखेड, ५ करखेडी, ३९ देगलूर तर ७ उमरी येथे कापडांचे व्यापारी होते. त्यामध्ये एकूण २३३ रोजगार काम करीत होते.[६०]

**स्टेशनरी व कटलरी वस्तू दुकाने :** स्टेशनरी वस्तूंशिवाय, विविध प्रकारचे आंघोळीचे साबण, सौंदर्य प्रसाधने, बांगड्या, तयार कपडे, पेन्सील, पेननिब, फाउंटन पेन, चाकू व सुऱ्या इत्यादी वस्तू विक्रीस ठेवतात. या वस्तू मुंबई व सिकंदराबाद येथून आयात केल्या जातात. सन १९६३ मध्ये अशा दुकानांची एकूण संख्या ६३ होती व त्यामध्ये १५५ लोक काम करीत होते.

**चामडी वस्तुंची दुकाने :** सन १९६३ मध्ये नांदेड येथे चामडी वस्तुंची ३३ दुकाने होती. त्यामध्ये ४२ लोक काम करीत होते. काही दुकानांतून चप्पला तयार करतात. तसेच कानपूर, लखनौ व आग्रा येथून विविध चामडी वस्तू आयात केल्या जातात. पावसाळ्यात हा व्यवसाय अल्प प्रमाणात चालतो.

**औषधी दुकाने :** ३ कंधार, ४ देगलूर, ४ धर्माबाद व ३ उमरी येथे औषधी दुकाने होती. त्यामध्ये ३८ लोक काम करीत होते. या दुकानांतून सर्व प्रकारच्या औषधांबरोबरच आयुर्वेदीक व युनानी औषधेही विक्रीस ठेवली जातात. आयुर्वेदीक औषधे पनवेल, सातारा व अहमदनगर येथून आयात करतात. ॲलॉपथी औषधे मुंबई, बरोडा व कोलकत्ता येथून आयात करतात.

**इमारती लाकूड व जळाऊ लाकूड :** जिल्ह्यात १९६३ मध्ये ६६ वखारी व इमारती लाकडाची १६ दुकाने होती. त्यामध्ये अनुक्रमे ६६ व ४२ लोक काम करीत होते. नांदेड येथे इमारती लाकडाचा व्यापार मोठ्या प्रमाणात चालतो. तसेच किनवट येथेही हा व्यापार बऱ्यापैकी चालतो. किनवट व अदिलाबाद येथील जंगलातील लाकूड किनवट येथे जमा करून ते इतर ठिकाणी निर्यात करतात. तसेच जळाऊ लाकूडही किनवट येथून निर्यात करतात.

**हार्डवेअर व इमारती बांधकाम साहित्य :** अशा वस्तुंची दुकाने शहरी भागातच दिसून येतात. लोखंडी सळ्या, पत्रे, जस्ताचे पातळ आच्छादन केलेले (गॅल्व्हनाइझ) पत्रे, बीम इत्यादी बांधकामासाठी लागणारे लोखंडी साहित्य, बांबू, चिनी मातीचे पाईप व बांधकामासाठी लागणारे इतर विविध साहित्या बरोबरच, लोखंडी हत्यारे, स्वयंपाक घरात लागणारे साहित्य, कुलपे, रंग, वॉर्निश व सिमेंट इत्यादी वस्तू विक्रीस ठेवतात. मोठ्या प्रमाणात उलाढाल करणारे व्यापारी अशा प्रकारचा माल मुंबई, कालेकत्ता व हैद्राबाद यथेनू अ ायात करतात. तर किरकाळे विक्रेते घाऊक व्यापा-याकडनू घेतात.

---

६०. कित्ता, पृ. ३४७.

बांधकाम साहित्यास पावसाळ्यात फारशी मागणी नसते. सन १९६३ मध्ये नांदेड शहरात १७ हार्डवेअर दुकाने व बांधकाम साहित्याची विक्री करणारी ९ दुकाने होती. त्यामध्ये १३१ लोक काम करीत होते.[६१]

**धातूंची भांडी व इतर दुकाने :** नांदेड शहरात सन १९६३ मध्ये धातुंची भांडी दुकाने ५ होती. त्यामध्ये तांबे, पितळ, अल्युमिनियम व स्टेनलेस स्टील भांडी विक्रीस ठेवतात. बहुतेक सर्व भांडी मुंबई, पुणे व हैद्राबाद येथून आयात करतात. तांब्या-पितळेची भांडी स्थानिक तांबट लोक अल्प प्रमाणात तयार करतात. किरकोळ व्यापारी स्थानिक घाऊक व्यापाऱ्याकडून माल विकत घेतात.

वरील दुकानांशिवाय शहरात फळे व भाजीपाला, तंबाखू, सायकल व सायकलचे सुटे भाग, पुस्तके व शालेय साहित्य, विद्युत उपकरणे, रेडीओ, घड्याळे, फोटो स्टुडीओ, फोटोसाठी लागणारे साहित्य, मटण इत्यादी विक्री करणारी दुकानेही आहेत.

**फेरीवाले :** वरील दुकानांशिवाय फेरीवालेही ग्रामीण भागात विविध प्रकारचा माल घेऊन विक्रीसाठी फिरत असतात. अद्यापही काही फेरीवाले आपला माल घाऊक पद्धतीने विकतात. फेरीवाले आपला माल दुकानात विकल्या जाणाऱ्या किंमतीपेक्षा स्वस्त विकतात. त्यामुळे गिऱ्हाईक त्याच्याकडून वस्तू खरेदी करीत असत. परंतु सध्या व्यापारी आकृतीबंधात बदल झाल्यामुळे अशा फेरीवाल्यांचा व्यवसाय बंद झाल्यासारखाच आहे. खेड्यातील लोक फेरीवाल्यांकडून वस्तू खरेदी न करता दुकानातून खरेदी करतात. जिल्ह्यातील तालुक्याच्या ठिकाणीच सध्या फेरीवाले दिसून येतात. नांदेड शहरातील फेरीवाल्यांना नगरपालिकेने परवाने दिले होते. फळे विक्रेते ५४, मिठाई विक्रेते ५८, कटलरी साहित्य विक्रेते १९, मशिन्स (Machines) विक्रेते ४४, भाजीपाला विक्रेते २५, पानबीडी विक्रेते १५ व बिस्किट (विक्रेते) फेरीवाल्यांना नगरपालिकेने परवाने दिले होते.

सन १९९१ च्या जनगणनेनुसार २,६०८ (११.६५) नांदेड, ३,३४४ (२.७१) हदगाव, ३,४६७ (३.२०) किनवट, २,६८३ भोकर, ५,४७० (३.७५) बिलोली, ३,६३१ (५.३४) देगलूर, ३,२६६ (३.९०) मुखेड व कंधार येथे ४,२५३ (३.१४) लोक व्यापारात गुंतलेले होते. त्यांची जिल्ह्यातील एकूण संख्या ४७,७२२ होती. त्यापैकी महिलांची संख्या १,८८९ (०.५६%) होती.[६२]

**आठवडे बाजार :** आठवडे बाजार फार प्राचीन काळापासून अस्तित्वात आहेत. ग्रामीण भागातील लोकांना काही वस्तुंसाठी जवळच्या शहराकडे धाव घ्यावी लागते. परंतु ठिकठिकाणी भरणाऱ्या आठवडे बाजारामुळे ग्रामीण भागातील लोकांची काही प्रमाणात सोय होते. त्यामुळे ग्रामीण भागात आठवडे बाजारांना महत्त्व आहे. बाजार म्हणजे माल गोळा करण्यापेक्षा मालाचे वितरण करणारी केंद्रे होत. येथे विकल्या जाणाऱ्या वस्तुंमध्ये सर्व तऱ्हेची धान्ये, मीठ, तेले, मिरच्या, सर्व प्रकारचे वापरावयाचे कपडे, खाद्यपदार्थ, मिठाई, भाजीपाला, गळिताची धान्ये, भांडी, थाळ्या, जनावरे

६१. नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर, १९७१, पृ. ३४८-४९.

६२. सेंसस ऑफ इंडिया, १९९१, सिरीज १४, पार्ट II, डिस्ट्रिक्ट सेंसस हँडबुक, नांदेड, महाराष्ट्र, पृ. ३०-४०.

Maharashtra State Gazetteers

इत्यादी विविध प्रकारचा संकीर्ण माल यांचा समावेश असतो. बाजाराचे दिवशी फेरीवाले आपापली दुकाने बाजारात आणतात. त्याशिवाय खेड्यातील दुकानदार व व्यापारीही आपली तात्पुरती दुकाने लावतात. बाजारात ५-१० कि.मी.च्या परिसरातून ग्राहक येतात. त्या जिल्ह्यातील किंवा शेजारच्या जिल्ह्यातील मोठ्या बाजारपेठांना माल पुरविण्याचे कामही या बाजारातूनच केले जाते. हे बाजार सकाळी सुरू होतात व दुपारी काही वेळ विश्रांतीनंतर सायंकाळी बंद होतात. म्हणजे दुकानदारांना व ग्राहकांना अंधार पडण्यापूर्वी आपापल्या घरी जाता येते. एखाद्या मध्यवर्ती खेड्याच्या आसपास ५-६ आठवडी बाजार भरतात.

नांदेड, अर्धापूर, मुखेड, नायगाव, कुंडलवाडी, धर्माबाद, हदगाव, उमरी, भोकर, किनवट, मुदखेड, लोहा, कंधार, करखेडी, तमसा व माळेगाव ही ठिकाणे आठवडी बाजारासाठी महत्त्वाची समजली जातात.[६३] सन १९९१ च्या जनगणनेनुसार नांदेड जिल्ह्यातील १,५१५ खेड्यांपेकी ७१ (४.६९%) खेड्यांमध्ये आठवडी बाजार भरत होते. ४७ बाजार १६-५० कि.मी.पेक्षा जास्त अंतरावर आणि फक्त तीन बाजार जवळच्या शहरापासून ५१ कि.मी.पेक्षा जास्त अंतरावर भरत होते. नांदेड ६ (३.२१%), हदगाव ११ (५.०७%), किनवट २० (८.१३%), भोकर २ (१.३५%), बिलोली ९ (४.०७%), देगलूर ४ (३.९२%), मुखेड ६ (४.०५%), व कंधार १३ (५.२८%) येथे आठवडी बाजार भरतात.[६४]

## यात्रा

दरवर्षी भरणाऱ्या यात्रांमधून किरकोळ वस्तुंचा व जनावरांच्या खरेदी-विक्रीचा व्यापार चालत असे. काही यात्रा एक दिवसाच्या, काही तीन-चार तर काही आठवडाभर चालत असत. सध्या मोठ्या खेडेगावांत व शहरांत किरकोळ व घाऊक विक्रीची दुकाने असल्याने यात्रांमधून चालणाऱ्या किरकोळ व्यापाराचे प्रमाणात कमी झाल्याचे दिसून येते. देगलूर, होट्टल, नांदेड, अर्धापूर, हदगाव, हिमायतनगर, तमसा, किनी, किनवट व माहूर येथे मोठ्या प्रमाणात यात्रा भरतात. या यात्रा धार्मिक स्थळे, साधू पुरुष व देवदेवतांच्या नावाने भरतात. नांदेड हे शहर महाराष्ट्रातील प्रमुख शहरांपैकी एक असून पवित्र गोदावरी नदीच्या काठावर वसलेले असल्याने या शहरास पवित्र तिर्थक्षेत्राचे महत्त्व प्राप्त झालेले आहे. अमृतसर (पंजाब) येथील सुवर्णमंदिराप्रमाणेच शिख लोकांचे दक्षिणेतील महत्त्वाचे श्रद्धास्थान म्हणून नांदेड येथील संचखंड गुरुद्वारा सुप्रसिद्ध आहे. येथे दूरदूरहून भाविक दर्शनासाठी येतात.

नांदेड येथे शिखांचे दहावे गुरु श्रीगुरुगोविंदसिंघजी महाराज यांचे समाधीस्थान असून दसऱ्यास "हल्लाबोल" ही मिरवणूक वैशिष्ट्यपूर्ण असते. श्रीगुरुगोविंदसिंघजी यांनी आपला देह त्यागापूर्वी श्रीगुरुग्रंथसाहेब यांना गुरुगादी प्रदान केली. यास "गुरु-ता-गद्दी" समारोह असे म्हणतात. या घटनेची त्रिशताब्दी आणि श्रीगुरुगोविंदसिंघजी यांची तीनशेवी पुण्यतिथी यानिमित्ताने इ.स.२००८ मध्ये नांदेड येथे आंतराष्ट्रीय समारोहाचे आयोजन करण्यात आले होते. त्या निमित्ताने तत्पूर्वी अमृतसरप्रमाणेच

६३. नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर, १९७१, पृ. ३५०.

६४. सेंसस ऑफ इंडिया, १९९१, सिरीज ४, पार्ट XII डिस्ट्रिक्ट सेन्स हँडबुक, नांदेड, पृ. ४२, ४६.

नांदेडच्या गुरुद्वारालादेखील सोनेरी मुलामा देण्याचे कार्य प्रगतिपथावर आहे. या स्थानावर सन २००० मध्ये दसऱ्याच्या मुहूर्तावर विमानातून पुष्पवृष्टी करण्यात आली. केवळ देशातूनच नव्हे तर परदेशातूनही लाख-दीडलाख भाविक येतात. हल्ला म्हणजे भरधाव घोड्यावरून हाती तलवार घेऊन शिख लोकांनी सादर केलेली कलाकृती होय. तसेच नांदेडचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे बालाजीच्या रथाची मिरवणूक होय. शहरातील गुरुनानक मार्केटजवळ पुरातन बालाजी मंदिर असून येथे दहा दिवस नवरात्रौत्सव काळात धार्मिक ग्रंथाचे वाचन होते व त्याची समाप्ती दसऱ्यास होते व त्याच दिवशी रथाची मिरवणूक निघते.

लोहा तालुक्यातील माळेगाव येथे म्हाळसाकांताचे मंदिर असून दरवर्षी येथे मार्गशिर्ष (नोव्हे.-डिसेंबर) महिन्यात मोठी यात्रा भरते. ही यात्रा (मार्गशीर्ष वद्य १२ ते पौष शुद्ध ४) आठ दिवस भरते. या यात्रेस मुख्यतः जनावरे व घोडे खरेदी करण्यासाठी मराठवाडा, तसेच गुजरात, म्हैसूर, आंध्रप्रदेश, राजस्थान इत्यादी ठिकाणचे व्यापारी व लोक मोठ्या संख्येने येतात. माहूर तालुक्यातील श्रीक्षेत्र माहूगडाच्या तीन शिखरांच्या टोकावर श्रीक्षेत्र दत्तात्रयाचे मंदिर व महाराष्ट्रातील देवींच्या साडेतीन पीठापैकी एक पूर्ण रेणुकामातेचे मंदिर व अनुसया मातेचे मंदिर वसलेले आहे. माहूर येथे दत्तजन्म उत्सव (मार्गशिर्ष शु. १५) मोठ्या प्रमाणात साजरा करतात. यावेळी एक ते दीड लाख लोक जमतात. जिल्ह्यात भरणाऱ्या यात्रापैकी ही यात्रा मोठ्या प्रमाणात भरते. येथे पश्चिम महाराष्ट्र, गुजरात व विदर्भातील भाविक यात्रेस मोठ्या संख्येने येतात. तसेच येथील रेणुकामाता मंदिर सुप्रसिद्ध असून येथे प्रत्येक वर्षी नवरात्र उत्सव व दसऱ्यास मोठ्या प्रमाणात यात्रा भरते. त्यावेळी ३० ते ३५ हजार लोक जमतात.

जिल्ह्यात विविध ठिकाणी यात्रा भरतात. विष्णुपुरी येथे महाशिवरात्रीस महादेवाची यात्रा, हिमायतनगर येथे श्री परमेश्वर यात्रा श्रावण महिन्यात भरते त्यावेळी १० ते १२ हजार लोक जमतात. कंधार येथे श्री. हाजीसचा सखरे मगदूम उरुस (ऑगस्ट महिन्यात) भरतो. त्यास १० ते १२ हजार लोक जमतात. दाभड बावरीनगर (अर्धापूर) येथे बौद्ध धर्मियांचे वार्षिक संमेलन भरते. त्यावेळी ५० ते ७५ हजार लोक जमतात. याशिवाय शिवजयंती मिरवणूक १९ फेब्रुवारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती १४ एप्रिल मिरवणूक व शाहिर अण्णाभाऊ साठे यांची जयंती (१ ऑगस्ट) निमित्ताने संपूर्ण नांदेड जिल्ह्यात उत्साहाने मिरवणुकी काढतात. त्यावेळी मोठ्या संख्येने लोक जमतात.[६५]

## वजने व मापे

हैद्राबाद राज्यात सन १९४७ पर्यंत तरी एकरुप अशी वजने किंवा मापे अस्तित्वात नव्हती. व शहरात वेगवेगळी वजने व मापे होती. मुंबई प्रांतात १८४७ मध्ये प्रमाणित वजने व मापे अस्तित्वात आली. एकोणीसाव्या शतकाच्या सहाव्या दशकात हिच वजने व मापे हैद्राबाद राज्यात लागू केली होती. तरी त्यांचे काटेकोर पालन केले जात नव्हते. मुंबई वजने व मापे कायद्यात १९३२ मध्ये दुरुस्त्या करण्यात आल्या. हिच वजने व मापे हैद्राबाद राज्याने अंगिकारली व त्यानुसार हैद्राबाद वजने व

६५. पोलीस अधीक्षक नांदेड (२००६).

मापे कायदा १९४७, (१३५६ फसली) मध्ये मंजूर करून त्याच वर्षी अंमलात आणला. त्यानुसार वजने व मापांची कोष्टके खालीलप्रमाणे होती. वजने- आठ गुंजा = एक मासा, १२ मासे = एक तोळा, पाच तोळे = एक छटाक, सोळा छटाक = एक शेर, चाळीस शेर = एक मण, तीन मण = पल्ला आणि २० मण = एक खंडी. साधारणतः कापूस, धान्ये मोजण्याकरिता खंडी हे परिमाण वापरले जाई. भूईमूग शेंग मात्र पल्ल्याच्या हिशेबात मोजली जाई. द्रव पदार्थासाठी-६० मिनिम (१ मिनिम = १ थेंब) = १ फ्ल्युईड ड्रम (एक चहाचा चमच्याएवढा), आठ फ्ल्युईड ड्रम = एक फ्लुईड औस (एक औस मोठ्या चमच्याएवढा), पाच औस = एक जील, वीस आस किंवा चार जील = एक पिंट, दोन पिंट = एक क्वार्ट, चार क्वार्ट = एक गॅलन व साडे एकतीस गॅलन = एक बॅरल. ही मापे वापरीत. तर लांबी मोजण्यासाठी ३ फूट = एकवार १,७६९ फूट = एक फर्लांग व ८ फर्लांग = एक मैल हे कोष्टक वापरले जाई. वरील परिमाणांमध्ये असा दोष होत होता की, त्यानुसार कोणत्याही विक्रेत्याने फसगत केली तरी चाचणी व तपासणीची शासकीय पातळीवर व्यवस्था नव्हती. त्यामुळे कित्येक ठिकाणी व्यापारी दोन प्रकारची वजने व मापे वापरत असत. व्यापारी माल घेताना व देताना वेगवेगळी मापे वापरत. तर कित्येक ठिकाणी वजनासाठी दगडाचाही वापर करीत. वजने व मापे जनतेच्या दैनंदिन व्यवहाराशी निगडित असल्यामुळे त्यांच्यात सारखेपणा आणण्याची गरज भासली. म्हणून कमीत कमी दोष असलेली मेट्रिक वजने व मापे अवलंबिण्यासाठी भारतीय संसदेने १९५६ मध्ये मेट्रिक वजने व मापे कायदा संमत केला. या कायद्यानुसार १० वर्षांच्या आत मेट्रिक वजने व मापे अवलंबिण्याचे ठरले. त्यानुसार राज्य शासनाने नवीन वजने व मापे विषयक कायदा संमत केला. त्यानुसार महाराष्ट्रात पूर्वीच्या मुंबई राज्य शासनाने १९५८ मध्ये मुंबई वजने व मापे (अंमलबजावणी) अधिनियम संमत केला. महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आल्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रात हाच अधिनियम लागू करण्यात आला. हा नवीन कायदा ताबडतोब लागू झाला, तरी जुनी वजने व मापे ताबडतोब बदलणे शक्य नव्हते. म्हणून महाराष्ट्र शासनाने डिसेंबर, १९६६ पर्यंत जुनी वजने व मापे वापरण्यास सवलत दिली. शासनाने नवीन परिमाण पध्दतीचा सर्व स्तरांवर अवलंब करण्यास्तव प्रसार माध्यमांद्वारे लोकशिक्षण दिले. अधिनियमानुसार नांदेड जिल्ह्यात दशमान पध्दती पूर्णपणे लागू करण्यात आली. तेव्हापासून जिल्ह्यातील व्यापार मेट्रिक पद्धतीनुसार चालतो.

Maharashtra State Gazetteers

## तक्ता क्रमांक १

## नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे कार्य १९९० ते २००५

(रूपये लाखांत)

| क्र. तपशील | १९९०-९१ | १९९९-२००० | २००४-२००५ | २००५-२००६ |
|---|---|---|---|---|
| १ सभासद (संख्या) | — | — | — | — |
| १) संस्था | 1594 | 2,360 | 2,280 | 2,293 |
| २) व्यक्ती | ११३ | ११३ | ११३ | ११३ |
| ३) राज्यशासन | ०१ | ०१ | ०१ | ०१ |
| २ वसूल भाग भांडवल | — | — | — | — |
| सभासद | ७,६०.७३ | १९,४८.१८ | २८९३.९४ | २९०१.०४ |
| शासकीय | १२.५० | १०.०० | १०.०० | १०.०० |
| ३ राखीव व इतर निधी | ३९०.२४ | ४१२१.४९ | — | — |
| ४ ठेवी | — | — | — | — |
| १) व्यक्ती | ५०,२०.०७ | २२९१६.४७ | ५,६७,०५.८२ | ५,०२,७५.६५ |
| २) संस्था | १४,०३.०३ | ७५१६.०७ | ३,८२,५९.३७ | ३,४६,२३.०७ |
| ३) इतर | ८,५६.९९ | ४४,०२.४८ | १,८४,४६.४५ | १,५६,५२.५८ |
| घेतलेली कर्जे | ५०,२८.०७ | १,१४,०९.९१ | १,८३,३३.३४ | १,६७,४५.३५ |
| २) गुंतविलेले भाग भांडवल | १,४३.०५ | ४३७.०६ | — | — |
| ३) गुंतवणूक | १९,७७.४६ | ६०३८.११ | १,१०,७३.६३ | ३५९१.८३ |
| ५ दिलेली कर्जे | — | — | ६,५८,७६.५१ | ६३२९.७२ |
| शेती अल्पमुदत | ३४,२६.४५ | १,५२,४०.४० | २८,६१९.२४ | २६७८१.३१ |
| शेती मध्यममुदत | २२,५९.२८ | ६१,८२.५७ | ७२६९.०९ | ६७१७.७८ |
| दिर्घ मुदत | ४६,२६.५६ | ५३४.५३ | ४२,२६.२२ | ६४,३५.६३ |
| इतर | ३,२३.१७ | १६,८९०.०४ | २,५७,६१.९६ | २,३३,६०.०० |
| खेळते भांडवल | १,७९,९३.२१ | ५,८०,०५.२४ | १,१०,३७.०८ | ११,२९,०५.४५ |
| शाखा कार्यालये (संख्या) | १५२ | १७४ | १४५ | ११५ |

## तक्ता क्रमांक २

## नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची सांपत्तिक स्थिती, १९९०-९१ ते २००५-२००६

(रूपये लाखांत)

| क्र. तपशील | १९९०-९१ | १९९५-९६ | २००१-२००२ | २००५-२००६ |
|---|---|---|---|---|
| १ वसूल भाग भांडवल | ७,७३.२२ | १३,६६.३६ | १९५८.१८ | २९,११.०४ |
| २ निधी | ५,०१.९१ | ९,९५.३७ | ४१,२१.४९ | — |
| ३ ठेवी | ७२,८०.०९ | १,७५,३५.०३ | ३४८,३५.०२ | ५,०२,७५.६५ |
| ४ बाहेरील कर्जे | ५०,२८.०७ | ९३,५९.४२ | १,१४,०९.२१ | १,६७,४५.३५ |
| ५ दिलेली कर्जे | १,०८,९८.७८ | २,३६,३४.३७ | ४,०५,०१.८९ | ६,३२,९४.७२ |
| पैकी | | | | |
| १ शेती अल्पमुदत | ३९,२८.३६ | ९६,४९.२३ | १,५२,४०.४० | २,६७,८१.३१ |
| २ शेती मध्यममुदत | २२,०७.५५ | २४,८४.०९ | ६००३.२३ | १,२६,८३.८५ |
| ३ मध्यम मुदत भाग खरेदी | १,५४.११ | ३,९९.५६ | १८३.८२ | ६९.५३ |
| ४ मध्यम मुदत औद्योगिक | — | — | — | २,९२.९८ |
| ५ मध्यम मुदत बिगर शेती | १,९४.६२ | २१,८३.०९ | ४२,८५.५३ | १,२१,१४.२१ |
| ६ दिर्घ मुदत उपसा जलसिंचन | ३,१३.८३ | ५,२६.०३ | ५२२.९१ | ४,००.०४ |
| ७ पगारदार नोकरांच्या संस्था | १६,८६.७० | ३२,३९.०९ | ५०६०.८१ | ४१,८८.३९ |
| ८ कॅश क्रेडिट | १७,४६.८८ | ४०,२३.७८ | ६२९१.७२ | ५६,३८.४३ |
| ९ इतर (वैय.आय.बी.पी.) | ६,६६.७३ | ११,२९.५० | २९१३.४७ | ११,२५.९८ |
| १० गुंतवणूक | २१,२०.५१ | ३५,७४.३६ | ६४,७५.१७ | ३५,९१.८३ |
| ११ खेळते भांडवल | १,७९,९३.२१ | ३,३५,२६.३९ | ५,८०,०५.२४ | ११,२९,०५.४५ |
| १२ नफा | + २७.८९ | + ५६.०६ | ४५.०४ | — |

Maharashtra State Gazetteers

## तक्ता क्रमांक ३

## नांदेड जिल्हा सहकारी कृषी ग्रामीण बहुउद्देशिय विकास बँकेने, नांदेड जिल्ह्यात केलेल्या कार्याची माहिती १९९० ते २००३

(रूपये लाखांत)

| तपशील | १९९०-९१ | १९९५-९६ | २००१-२००२ | २००२-२००३ |
|---|---|---|---|---|
| एकूण शाखा | ७ | ७ | ७ | ७ |
| एकूण सभासद | ३९,५५५ | ५२,०८९ | ५४,४५७ | ५४,४५७ |
| भाग भांडवल | ८९.५० | २७७.८६ | ३०१.३८ | २७८.९३ |
| खेळते भांडवल | ८९.५० | २७७.८६ | ३०१.३८ | २७८.९३ |
| ठेवी | | | | |
| मध्यम मुदतीची कर्जे | - | - | - | - |
| दिर्घ मुदतीची कर्जे | १०२१.१९ | ३७९३.८९ | ३५३४.१७ | ३३१९.४६ |
| अल्प मुदतीची कर्जे | - | - | - | - |
| वसूल झालेली कर्जे | ३४०.७८ | २९८.२८ | ५२७.०३ | ५२०.५७ |
| थकीत कर्जे | ८९.९३ | ५६५.४१ | १३८५.२७ | १४८३.१७ |

Maharashtra State Gazetteers

## तक्ता क्रमांक ४

## नांदेड जिल्ह्यातील अल्पबचत योजनेची माहिती

(रूपये लाखांत)

| योजना | १९९५-९६ | | १९९९-२००० | | २००५-२००६ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | ढोबळ | नक्त | ढोबळ | नक्त | ढोबळ | नक्त |
| १. टपाल कार्यालय बचत बँक | ४४८.५८ | ५.२० | ६१९.६० | (-)१०३.३३ | १८९२.२९ | १३३.१२ |
| २. संचित मुदत ठेव | १.३० | (-)२४.९७ | ० | ० | - | - |
| ३. पुनरावर्ती ठेव | १२८०.०६ | २३१.१५ | २२००.३७ | ८००.९३ | ४६१७.०७ | १४८३.१४ |
| ४. समयबद्ध ठेव | २५.८० | (-)२५.९१ | ५८.२१ | १६.४९ | ७५६.३३ | ३३१.२३ |
| ५. राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र ८वी मालिका. | ४५२.६५ | ३२८.७३ | ७८६.८८ | ५५३.०२ | ७४०.८९ | ५.६१ |
| ६. इंदिरा विकास पत्र | ३०६.०९ | १३३.४० | १५३.०७ | (-)४०.३८ | - | (-)४६३.५५ |
| ७. राष्ट्रीय बचत योजना १९८७ | ० | (-)१८८.३४ | ० | (-)२३.५२ | - | (-)२०.८० |
| ८. राष्ट्रीय बचत योजना १९९२ | २.४८ | २.२९ | २.८७ | (-)१.८१ | - | (-)६८४ |
| ९. मासिक प्राप्ती योजना | २३७.१५ | १८७.९४ | ५२२.०४ | ३५४.०३ | ४१३२.८६ | ३४६०.५७ |
| १०. किसान विकास पत्र | ८४६.१२ | ५६२.२५ | १०३१.९७ | ३१८.६७ | १४६७.४१ | ५९३.१० |
| ११. इतर जुनी प्रमाणपत्रे | ० | (-)५७.०९ | ० | (-)१.०२ | - | (-)०.१५ |
| १२. सार्वजनिक भविष्य निर्वाहनिधी | १६३.४४ | १२०.८५ | ५२९.७२ | ४५१.६७ | १०७०.१४ | ९४७.०३ |
| १३. सेवानिवृत्तीसाठी ठेव योजना ८९/९१ | ० | ० | ० | ० | - | - |
| १४. वरीष्ठ नागरीक बचत योजना | - | - | - | - | २६७.२६ | २६७.२६ |

Maharashtra State Gazetteers

## तक्ता क्र. ५

## नांदेड कृषी उत्पन्न बाजार समितीची माहिती व बाजार आवारात कृषी मालाची झालेली उलाढाल.

| तपशील | १९९०-९१ | १९९५-९६ | १९९९-२००० | २००४-२००५ |
|---|---|---|---|---|
| १. एकूण लिलाव ओटे | ७ | ७ | ७ | — |
| २. एकूण आडत्ये | २३५ | २९२ | २८० | २७४ |
| ३. व्यापारी व खरेदीदार अ वर्ग | २७१ | २८५ | २७६ | २६६ |
| ४. व्यापारी व खरेदीदार क वर्ग | ७४१ | १२६ | ४४ | १७ |
| ५. एकूण खरेदीदार | १,०१२ | ४११ | ३२० | — |
| ६. प्रक्रियाकार | ६२ | ६६ | ५४ | ३५ |
| ७. हमाल | ४१८ | ३५३ | ४१३ | ४८५ |
| ८. वखारवाले | १ | १ | १ | २ |
| ९. एकूण मापाडी | ६० | ४१ | ३९ | ३२ |
| १०. मदतनीस | ४ | २३६ | १०७ | ९ |
| ११. मिळालेली अनुज्ञाप्ती फी (रुपये) | ४४,६४३ | ७५,२१७ | ६०,२७५ | — |
| १२. कृषी मालाची एकूण आवक क्विंटल | २,५२,८१६ | २,९३,३१७ | ३,५७,३५८ | ९,४७,५७६ |
| किंमत रुपये | १२,३८,९८,३१८ | २५,९५,८२,७३० | ३८,२९,३४,४५७ | ९२,९७,३३,३३६ |
| १३. एकूण कापूस आवक (वरीलपैकी) क्विंटल | ३४,५३२ | ८७,४४८ | ९५,९२७ | — |
| किंमत रुपये | २,३५,०९,९९० | ९,७८,२८,८१७ | १४,३०,३७,५५३ | — |
| १४. परवानाधारक सहकारी संस्थाची खरेदी क्विंटल | ४०,२२२ | ९०,११८ | १,०२,१७१ | २०,०११ |
| किंमत रुपये | २,६७,७८,१२६ | ९,९५,०५,००० | १४,८०,०९,०४७ | ३,१७,११,३२२ |
| १५. बाजार समितीचे एकूण उत्पन्न (रुपये) | २१,४२,५१६ | ३२,८७,६२९ | ३९,८६,०८१ | १,१४,३४,६७५ |
| खर्च रुपये | १६,११,३१४ | २२,४५,५७४ | ४३,७०,६०५ | ७४,९५,६२४ |

## तक्ता क्रमांक ६

कृषी उत्पन्न बाजार समिती धर्माबादची माहिती

| तपशील | १९९०-९१ | १९९९-२००० |
|---|---|---|
| १. एकूण लिलाव ओटे (संख्या) | ४ | ४ |
| एकूण आडत्ये | ५७ | ९१ |
| अ वर्ग | ५७ | ९१ |
| ब वर्ग | — | — |
| क वर्ग | — | — |
| २. एकूण खरेदीदार | १७२ | २६२ |
| प्रक्रियाकार | १७ | १४ |
| हमाल | १४५ | २१७ |
| वखारवाले | १ | १ |
| मापाडी | — | १ |
| मदतनीस | — | — |
| ३. मिळालेली अनुज्ञाप्ती फी रुपये | २०,९३५ | ४५,३७८ |
| ४. कृषी मालाची एकूण | | |
| आवक (क्विंटल) | १,०५,९७२ | १,९८,९४९ |
| किंमत (रुपये) | ५,८८,३२,८४३ | ३०,२४,८८,७४८ |
| ५. एकूण कापूस आवक | | |
| गाडया | — | — |
| किंमत (रुपये) | — | — |
| ६. परवाना धारक सहकारी संस्थांची माल खरेदी | | |
| खरेदी (क्विंटल) | — | २६,७३२ |
| किंमत (रुपये) | — | ४,०३,८७,२८६ |
| ७. बाजार समितीचे एकूण उत्पन्न व खर्च | | |
| उत्पन्न (रुपये) | ९३,७६६ | ४३,६९,००० |
| खर्च (रुपये) | ५,७८,५१३ | १९,१५,६६९ |

Maharashtra State Gazetteers

## तक्ता क्रमांक ७

## कृषी उत्पन्न बाजार समिती भोकरची माहिती

| तपशील | १९९०-९१ | १९९५-१९९६ | १९९९-२००० | २००२-२००३ |
|---|---|---|---|---|
| १. एकूण लिलाव ओटे (संख्या) | २ | २ | २ | २ |
| एकूण आडत्ये | ५१ | ५७ | ६० | १५९ |
| अ वर्ग | ५५ | १३८ | १११ | १२६ |
| ब वर्ग | १३३ | ३१ | १६ | १६ |
| क वर्ग | २९९ | ४५ | ५९ | १९८ |
| २. एकूण खरेदीदार | ५५ | १३८ | १११ | १२६ |
| प्रक्रियाकार | ३ | ३ | ४ | ३ |
| एकूण हमाल | ६३ | ७५ | १०७ | ९२ |
| एकूण मापाडी | २ | १९ | १७ | १७ |
| मदतनीस | ३५ | ६३ | ४३ | ६२ |
| ३. मिळालेली अनुज्ञाप्ती फी रुपये | ३६,०६९ | २४,१७० | ३९,४९६ | २७,२८० |
| ४. कृषी मालाची एकूण | | | | |
| आवक (क्विंटल) | ३४,२२८ | १,०५,१९१ | १,८३,३३७ | ४,०४,६०० |
| किंमत (रुपये) | १,३६,५५,४६५ | ९,५३,६८,४५० | २४,८४,०२,०५९ | ४६,६९,७४,००० |
| ५. एकूण कापूस | | | | |
| आवक (गासडया) | २,२७३ | २४,३७५ | ५६,६२३ | ३४,८६४ |
| किंमत (रुपये) | १७,३९,७१९ | २,७३,६३,१९० | ११,२०,७२,६९० | ६७,४२,००० |
| ६. परवाना धारक सहकारी संस्थांची एकूण माल | | | | |
| खरेदी (क्विंटल) | २,२७३ | २४,३७५ | ५६,६२३ | ६,१५४ |
| किंमत (रुपये) | १७,३९,७१९ | २,७३,९३,१९० | १,१०,७२,६९० | १२,३०,००० |
| ७. बाजार समितीचे एकूण | | | | |
| उत्पन्न (रुपये) | ५,६७,८७० | १८,२५,०४४ | ३०,३७,३३० | २८,३९,८८२ |
| खर्च (रुपये) | ३,८६,१५५ | ७,४६,०८३ | २४,२३,३१८ | २२,०९,८३७ |

Maharashtra State Gazetteers

## तक्ता क्रमांक ८

## कृषी उत्पन्न बाजार समिती उमरीची माहिती

| तपशील | १९९०-९१ | १९९५-१९९६ | १९९९-२००० | २००२-२००३ |
|---|---|---|---|---|
| १. आडत्ये (एकूण) | १२ | १४ | १६ | ३४ |
| अ वर्ग | ३४ | ४० | ४६ | ६२ |
| ब वर्ग | १२ | १४ | १६ | १५ |
| क वर्ग | | | | |
| २. खरेदीदार (एकूण) | ४६ | ५४ | ६२ | ७७ |
| प्रक्रियाकार | १ | १ | १ | १ |
| हमाल | १६ | १८ | २६ | २५ |
| मापाडी | २ | २ | ३ | ३ |
| मदतनीस | २० | २६ | ४० | ७२ |
| ३. मिळालेली अनुज्ञाप्ती फी रुपये | ५,३३२ | ७,५९५ | ६,४७४ | १०,०६५ |
| ४. कृषी माल आवक | | | | |
| क्विंटल | २०,४३३ | २५,५७४ | २१,२३८ | २५,३६७ |
| किंमत (रुपये) | ७९,४६,९०१ | २,०१,१३,४९१ | १,९४,२०,८६२ | २,२६,८०,९०८ |
| ५. कापूस आवक | | | | |
| गासडया | ८,७५१ | ३८,४७२ | ४३,४४८ | ६,४६७ |
| किंमत (रुपये) | ८१,५१,८८९ | ६४,८७,७७० | ५,६९,१६,८८० | ८४,७१,७७० |
| ७. बाजार समितीचे एकूण उत्पन्न व खर्च | | | | |
| उत्पन्न (रुपये) | २,४०,१३१ | ४,९२,४२४ | ८,९२,४५६ | १२,६८,६२६ |
| खर्च (रुपये) | १,३६,७०० | ३,१६,६०८ | ४,५४,८१७ | ६,३०,८४४ |

Maharashtra State Gazetteers

## तक्ता क्रमांक ९

## कृषी उत्पन्न बाजार समिती मुदखेडची माहिती

| तपशील | १९९०-९१ | १९९५-१९९६ | १९९९-२००० | २००१-२००२ | २००२-२००३ |
|---|---|---|---|---|---|
| १. एकूण आडत्ये | ७ | २० | २४ | २५ | २४ |
| अ वर्ग | ७ | २० | २४ | २५ | २४ |
| २. एकूण खरेदीदार | ६६ | ७६ | ८२ | १०८ | १८३ |
| ३. प्रक्रियाकार | १ | १ | — | १ | १ |
| ४. एकूण हमाल | ९ | ३५ | ६० | ७७ | ७७ |
| ५. वखारवाले | — | — | — | — | — |
| ६. एकूण मापाडी | २ | ४ | २ | २ | २ |
| ७. मदतनीस | — | — | — | — | — |
| ८. मिळालेली अनुज्ञाप्ती फी रुपये. | २,५८८ | ३,९२९ | ४,३३० | ६,०२६ | ६,६६६ |
| ९. कृषी मालाची एकूण आवक | | | | | |
| आवक क्विंटल | १५,६४४ | ३२,६१९ | ४२,९४० | ३२,४९५ | ३६,३५३ |
| किंमत (रुपये) | ९६,४८,६९३ | ५,७९,५०,५९८ | ३,९८,८३,६९२ | ३,६१,४६,३४६ | ३,५०,५६,३२० |
| १०. एकूण कापूस आवक | | | | | |
| गासडया | १०,०३१ | २८,८५६ | १०,१८२ | ९,०९१ | — |
| किंमत | ७०,१२,५३८ | ५,५५,२८,६२३ | १,५१,६९,०८२ | १,३८,०५,५५१ | — |
| ११. परवाना धारक सहकारी संस्थाची माल खरेदी | | | | | |
| एकूण खरेदी (क्विंटल) | — | २८,८५६ | १०,१८२ | ९,०९१ | — |
| किंमत (रुपये) | — | ५,५५,२८,६२३ | १,५१,६९,०८२ | १,३८,०५,५५१ | — |
| १२. बाजार समितीचे उत्पन्न व खर्च | | | | | |
| उत्पन्न (रुपये) | ८५,२०५ | १,५९,००८ | ३,५९,६३२ | ३,१९,६०१ | ३,८०,७८९ |
| खर्च (रुपये) | ८३,६८३ | १,२३,४०४ | ३,३६,२५६ | ३,५८,४८४ | ५,१४,५४० |

Maharashtra State Gazetteers

## तक्ता क्रमांक १०

## कृषी उत्पन्न बाजार समिती लोहाची माहिती

| तपशील | १९९०-९१ | १९९५-१९९६ | १९९९-२००० | २००४-२००५ |
|---|---|---|---|---|
| एकूण लिलाव ओटे (संख्या) | — | ५ | ५ | — |
| एकूण आडत्ये | ३८ | ६९ | ७७ | ८५ |
| एकूण खरेदीदार | | | | |
| अ वर्ग | ९६ | २४२ | २०४ | २२७ |
| ब वर्ग | २७ | ४२ | २३ | २० |
| क वर्ग | ३४ | ३२ | २५ | २० |
| प्रक्रियाकार | | | | |
| अ वर्ग | १० | १४ | २० | ११ |
| ब वर्ग | १ | १ | १ | — |
| एकूण हमाल | ९४ | २१२ | २२५ | २७५ |
| वखारवाले | — | — | — | १ |
| एकूण मापाडी | १७ | २२ | २५ | २३ |
| मदतनीस | २ | — | १ | — |
| मिळालेली अनुज्ञाप्ती फी रुपये | १६,८३५ | ४४,१०५ | ६४,८१० | ६२,३५२ |
| कृषी मालाची एकूण आवक | | | | |
| आवक (क्विंटल) | ५८,८५५ | ३६,४९७ | ८९,८०७ | १,९५,२३९ |
| किंमत (रुपये) | १,४६,७७,२२६ | ३,५७,८१,५१४ | ७,६३,७०,३३६ | २४,७२,९६,६७९ |
| एकूण कापूस आवक | | | | |
| आवक (गासडया) | ६४,२१२ | १,१०,४५१ | ८१,६३८ | — |
| किंमत (रुपये) | ४,९७,९९,६६६ | १२,५६,४५,९३५ | १२,०५,९७,७२८ | — |
| परवाना धारक सहकारी संस्थांची माल खरेदी | | | | |
| खरेदी (क्विंटल) | ६४,२१२ | १,१०,४५१ | ८१,६३८ | ६८,९७६ |
| किंमत (रुपये) | ४,९७,९९,६६६ | १२,५६,४५,९३५ | १२,०५,९७,७२८ | १०,३६,०४,६६९ |
| समितीचे उत्पन्न व खर्च | | | | |
| उत्पन्न (रुपये) | ६,१०,३७० | १६,२०,८२७ | १९,८५,००३ | १६,१२,०१४ |
| खर्च (रुपये) | ४,९२,३३७ | १३,२८,६७४ | १७,६३,७९१ | १७,००,७८३ |

Maharashtra State Gazetteers

## तक्ता क्रमांक ११

## कृषी उत्पन्न बाजार समिती किनवटची माहिती

| तपशील | १९९०-९१ | १९९५-१९९६ | १९९९-२००० | २००१-२००२ |
|---|---|---|---|---|
| एकूण आडत्ये | ५ | — | २ | — |
| अ वर्ग | ४७ | ७५ | १०० | ५७ |
| ब वर्ग | ४६ | ४७ | १९२ | ८४ |
| क वर्ग | ३०६ | ३४८ | १२६ | ६४ |
| एकूण खरेदीदार | २ | २ | २ | २ |
| प्रक्रियाकार | २ | — | १ | — |
| एकूण हमाल | ७३ | २६ | ७८ | २४ |
| एकूण मापाडी | ३ | २ | २ | — |
| मिळालेली अनुज्ञाप्ती फी रुपये | १४,६१२ | १६,२१२ | २२,४४६ | २१,८६४ |
| कृषी मालाची एकूण | | | | |
| आवक (क्विंटल) | ५१,०९४ | ७२,०७२ | ५७,३६८ | ६५,१४५ |
| किंमत (रुपये) | ३,२१,५७,१५७ | ९,९२,९१,१७९ | ८,६६,६७,९७० | ७,२८,६३,३४९ |
| एकूण कापूस आवक | | | | |
| गासडया | ३०,९७४ | ५२,३२७ | ५६,८१७ | ३८,०५२ |
| किंमत (रुपये) | १,९६,९०,४०० | ४,०१,५२,८९६ | ८,५७,९७,७४३ | ५,८९,६०,०३२ |
| परवाना धारक सहकारी संस्थांची खरेदी | | | | |
| खरेदी (क्विंटल) | ५१,०९४ | ६५,०९२ | ५७,३६८ | ४७,१३५ |
| किंमत (रुपये) | ३,२१,५७,१५७ | ९,९२,९१,१७९ | ८,६६,६७,९७० | ६,२३,६०,६०४ |
| बाजार समितीचे | | | | |
| उत्पन्न (रुपये) | ३,६७,००४ | ९,४५,४२६ | ११,००,७१७ | १२,९२,४४० |
| खर्च (रुपये) | ३,३२,६२८ | ९,०६,८५६ | ९,८४,०६२ | ९,०७,६३५ |

Maharashtra State Gazetteers

## तक्ता क्रमांक १२

## कुंडलवाडी कृषी उत्पन्न बाजार समितीची माहिती

| तपशील | १९९५-१९९६ | १९९९-२००० | २००२-२००३ |
|---|---|---|---|
| १. एकूण लिलाव ओटे | ४ | ४ | ४ |
| २. एकूण आडत्ये | | | |
| अ वर्ग | २३ | २१ | ८ |
| ब वर्ग | — | — | — |
| क वर्ग | — | — | — |
| ३. एकूण खरेदीदार | ४४३ | ११६ | १५१ |
| ४. प्रक्रियाकार | ७ | ६ | ४ |
| ५. एकूण हमाल | २१२ | १४८ | ८६ |
| ६. वखारवाले | — | — | — |
| ७. एकूण मापाडी | ७ | १२ | ५ |
| ८. मदतनीस | — | — | — |
| ९. मिळालेली अनुज्ञाप्ती फी रुपये | ४०,७८० | २१,६६८ | १९,३४० |
| १०. कृषी मालाची एकूण | | | |
| आवक (क्विंटल) | २७,३२९ | ४९,७०५ | ५५,९०७ |
| किंमत (रुपये) | २,१४,६०,०२२ | ६,०३,००,५१८ | ५,९९,१४,८४८ |
| ११. एकूण कापूस | | | |
| गासडया | ३२,४२७ | ४५,५५५ | — |
| किंमत (रुपये) | ३,६५,७०,७२१ | ६,८५,०२,१३१ | — |
| १२. परवाना धारक सहकारी संस्थांची खरेदी | | | |
| खरेदी (क्विंटल) | २,७८२ | २,५३१ | २,२३१ |
| किंमत (रुपये) | ५०,८०,८६८ | ३०,६०,७२० | २४,६४,६४१ |
| १३. समितीचे उत्पन्न व खर्च | | | |
| उत्पन्न (रुपये) | — | १६,६०,८५२ | ९,११,०५४ |
| खर्च (रुपये) | — | ११,८८,३१३ | ५,८१,०८१ |

Maharashtra State Gazetteers

## तक्ता क्रमांक १३

## हदगाव कृषी उत्पन्न बाजार समितीची माहिती

| तपशील | १९९०-१९९१ | १९९९-२००० | २००२-२००३ |
|---|---|---|---|
| १. एकूण लिलाव ओटे | ४ | ४ | ४ |
| २. एकूण आडत्ये | | | |
| अ वर्ग | २५ | २७ | ३५ |
| ब वर्ग | — | — | — |
| क वर्ग | — | — | — |
| ३. एकूण खरेदीदार | २४६ | १३० | २९१ |
| ४. प्रक्रियाकार | १४ | ११ | १० |
| ५. एकूण हमाल | १०१ | ७९ | १४२ |
| ६. वखारवाले | २६ | २५ | २६ |
| ७. एकूण मापाडी | १८ | ६ | १२ |
| ८. मदतनीस | १० | १५ | २५ |
| ९. मिळालेली अनुज्ञाप्ती फी रुपये | ३२,२९८ | ९८,७०० | १,२१,८१२ |
| १०. कृषी मालाची एकूण | | | |
| आवक (क्विंटल) | ९७,२०३ | २,२४,०१९ | १,६१,४५० |
| किंमत (रुपये) | ६,२९,०२,१५० | ३१,८९,४७,३०४ | १७,४४,१५,३७५ |
| ११. एकूण कापूस | | | |
| गासडया | ८२,३२० | १,९०,२४८ | २६,९७५ |
| किंमत (रुपये) | ५,७१,२४,६५७ | २८,६८,४९,०६४ | ४,४४,५७,०४३ |
| १२. परवाना धारक सहकारी संस्थांची खरेदी | | | |
| खरेदी (क्विंटल) | ८७,०४३ | १,९०,२४८ | २१,३२५ |
| किंमत (रुपये) | ५,८०,४५,५७० | २८,६८,४९,०६४ | ३,३४,७९,४३२ |
| १३. समितीचे उत्पन्न व खर्च | | | |
| उत्पन्न (रुपये) | ३,९२,३७१ | २१,०५,१८५ | २५,२८,८२५ |
| खर्च (रुपये) | ५,४८,४३६ | १५,३३,३७० | २१,९८,३२२ |

Maharashtra State Archives

## तक्ता क्रमांक १४

## कृषी उत्पन्न बाजार समिती मुखेडची माहिती

| तपशील | १९९०-१९९१ | १९९९-२००० | २००२-२००३ |
|---|---|---|---|
| १. एकूण लिलाव ओटे (संख्या) | २ | ३ | ३ |
| २. एकूण आडत्ये | २२ | ४२ | ५७ |
| अ वर्ग | १३३ | २८२ | ४५३ |
| ब वर्ग | १० | ४५ | ३५ |
| क वर्ग | २२ | २३५ | ३५५ |
| ३. एकूण खरेदीदार | २८ | ४२ | ५७ |
| ४. प्रक्रियाकार | १० | १५ | ९ |
| ५. हमाल | २९५ | ३८६ | ६५९ |
| ६. मापाडी | २२ | ३७ | ५४ |
| ७. मिळालेली अनुज्ञाप्ती फी रुपये | ३२,३०० | १,२३,९४० | १,१०,८१४ |
| ८. कृषी मालाची एकूण | | | |
| आवक (क्विंटल) | ५८,८३३ | १,१४,३४१ | २३,१०७ |
| किंमत (रुपये) | ६,६९,८५,१०१ | १५,५९,६१,९६५ | २५,२८,९०,११५ |
| ९. एकूण कापूस | | | |
| गासडया | ११,३२३ | ९८,४७१ | ५,५७४ |
| किंमत (रुपये) | ७,४७,०५७ | १४,८४,१५,८३९ | ९५,१५,१२९ |
| १०. परवाना धारक सहकारी संस्थांची खरेदी | | | |
| खरेदी (क्विंटल) | ११,३२३ | ९८,४७१ | ५,५७४ |
| किंमत (रुपये) | ७,४७,०५७ | १४,८४,१५,८३९ | ९५,१५,१२९ |
| ११. समितीचे उत्पन्न व खर्च | | | |
| उत्पन्न (रुपये) | ३,३५,९९७ | १६,१७,२९७ | १८,४९,४२३ |
| खर्च (रुपये) | ३,६७,६४८ | १३,८८,४६२ | १६,४३,५५९ |

Maharashtra State Gazetteers

## तक्ता क्रमांक १५

## देगलूर कृषी उत्पन्न बाजार समितीची माहिती व आवारातील कृषी मालाची उलाढाल.

| तपशील | १९९०-१९९१ | १९९५-१९९६ | १९९९-२००० | २००४-२००५ |
|---|---|---|---|---|
| १. एकूण लिलाव ओटे (संख्या) | ४ | ४ | ४ | ४ |
| एकूण आडत्या | ७० | ११३ | १०५ | ११६ |
| अ वर्ग | ८५ | १३० | १३६ | १४२ |
| ब वर्ग | १८ | २६ | २१ | १० |
| क वर्ग | — | — | — | २ |
| २. एकूण खरेदीदार | ८५ | १३० | १३६ | १४२ |
| प्रक्रियाकार | ७ | १३ | ११ | १३ |
| एकूण हमाल | ४७ | १२० | २८८ | ३२९ |
| वखारवाले | — | — | — | — |
| एकूण मापाडी | ११ | २३ | ४० | ४७ |
| मदतनीस | १५१ | १९५ | २०४ | १२५ |
| मिळालेली अनुज्ञाप्ती फी रुपये | १३,५७८ | २०,९८५ | ५१,९५४ | ५४,१७८ |
| ३. कृषी मालाची एकूण | | | | |
| आवक (क्विंटल) | ४६,४३६ | ३१,१७४ | १,१२,६२४ | ७४,४१५ |
| किंमत (रुपये) | ३,०७,९३,२४२ | ४,८९,३६,६७२ | १७,४०,८८,५०० | ११,९३,७९,३१० |
| ४. एकूण कापूस आवक (गासडया) | २,९८५ | ३१,६०७ | ३८,९९१ | — |
| एकूण किंमत (रुपये) | २५,३४,५६५ | ६,००,०९,८७२ | ८,५२,४०,२०० | — |
| ५. परवाना धारक सहकारी संस्थांची माल खरेदी | | | | |
| एकूण माल खरेदी (क्विंटल) | २,९८५ | ३२२ | ३८,९९१ | — |
| एकूण किंमत (रुपये) | २५,३४,५६५ | २,९६,४३३ | ८,५२,४०,२०० | — |
| ६. समितीचे उत्पन्न व खर्च | | | | |
| उत्पन्न (रुपये) | ७,७०,०५९ | १८,६०,१८३ | २७,५३,९२२ | २०,९२,१८७ |
| खर्च (रुपये) | ६,८६,४०४ | १५,४३,३०८ | २३,११,५१४ | १८,९५,५४१ |

Maharashtra State Gazetteers

## तक्ता क्रमांक १६

## कृषी उत्पन्न बाजार समिती माहूरची माहिती

| तपशील | २०००-०१ | २००४-०५ | २००५-०६ |
|---|---|---|---|
| १. एकूण लिलाव ओटे (संख्या) | | | |
| एकूण आडत्या | | | |
| अ वर्ग | ७४ | ९० | ११९ |
| ब वर्ग | ११३ | १२१ | ५५ |
| क वर्ग | ३३ | १ | — |
| २. एकूण खरेदीदार | — | — | — |
| प्रक्रियाकार | १ | १ | १ |
| एकूण हमाल | २० | २१ | ७५ |
| एकूण मापाडी | ४ | २ | २ |
| मदतनीस | — | — | — |
| मिळालेली अनुज्ञाप्ती फी रुपये | ३०,६०८ | ३६,८७० | ३६,३०८ |
| ३. कृषी मालाची एकूण | | | |
| आवक (क्विंटल) | १८,०३८ | १,४८,७१२ | ७९ |
| किंमत (रुपये) | ३,११,८१,४२६ | २६,७१,३२,२७६ | ३१,२२,७०,३०० |
| ४. एकूण कापूस आवक (गासडया) | ८,७५४ | ४७,७०४ | १०,२६६ |
| एकूण किंमत (रुपये) | १,३५,७७,८७३ | ६,७५,१२,९६९ | २,०४,३९,८०७ |
| ५. परवाना धारक सहकारी संस्थांची माल खरेदी | | | |
| एकूण माल खरेदी (क्विंटल) | — | — | — |
| एकूण किंमत (रुपये) | — | — | — |
| ६. समितीचे उत्पन्न व खर्च | | | |
| उत्पन्न (रुपये) | ३,४७,५७६ | ९,२६,१८५ | ९,५७,११६ |
| खर्च (रुपये) | ४,४३,५५२ | ८,३०,७०१ | ७,९६,३७३ |

Maharashtra State Gazetteers

# नांदेड जिल्हा गॅझेटिअर

## प्रकरण-७

## वाहतूक व दळणवळण

Maharashtra State Gazetteers

प्रकरण ७

# वाहतूक व दळणवळण

## प्राचीन रस्ते आणि दळणवळणाची साधने

सातवाहन काळामध्ये महाराष्ट्रातील पैठण, नाशिक, जुन्नर सोपारा इत्यादी मोठी शहरे इतर शहरांशी रस्त्यांनी जोडली गेली होती. परंतु पेरिप्लसने वर्णिल्याप्रमाणे दक्षिण भारतातून भडोचला जाण्यासाठी चांगले मार्ग नव्हते. इसवी सनाच्या १७ व्या शतकात टॅव्हरनिअरच्या म्हणण्याप्रमाणे दक्षिण भारतातील घाटांमधून व डोंगराळ प्रदेशातून जाणारे मार्ग चांगले नव्हते, परंतु संबंधित काळातील मार्गांची परिस्थिती चांगली असावी असे म्हणता येईल. दळणवळणाच्या साधनांमध्ये बैलगाडी हे मुख्य साधन होते. जलद वाहतुकीसाठी बैल, कनिष्ठ प्रतीची गाढवे, घोडे यांचाही उपयोग होत असे. त्याचप्रमाणे डोंगराळ भागामध्ये ज्याठिकाणी बैलगाडी जाऊ शकत नाही, अशा भागांमध्येही या जनावरांचा वाहतुकीसाठी उपयोग होत असे. काही वेळेस माल नेण्यासाठी हमालही करीत असत. चोरांपासून आपल्या मालाचे रक्षण व्हावे यादृष्टीने व्यापारी नेहमी संयुक्तपणे (काफला, जथ्था) प्रवास करीत. निरनिराळ्या मंदिराच्या ठिकाणी होणाऱ्या यात्रांप्रसंगी विशिष्ट जागी आपला माल जाऊन पोचला पाहिजे यादृष्टीने ते त्यांचा प्रवास कार्यक्रम आखीत. आळतेकराच्या म्हणण्याप्रमाणे मुसलमान शासनकाळात बऱ्याच उपजातींनी काफल्याचा व्यवसाय स्वीकारला होता. ते एका गावांहून दुसऱ्या गावाला माल पोहोचवित. यासाठी प्रत्येकाजवळ जास्तीत जास्त १०० बैल असत.[१] मराठवाडा प्रदेशावर सातवाहनांचे अनेक वर्षे राज्य असल्याचे ऐतिहासिक पुरावे आढळतात. या काळात व्यापार भरभराटीस आला होता. भूमार्ग आणि जलमार्गाद्वारे व्यापार चालत असे. त्या काळातील एक मार्ग म्हणजे पैठण - वेरूळ - पितळखोरा - बहाळ - भडोच हा होता, तर दुसरा मार्ग पैठण - नेवासे-नाशिक - भडोच असा होता.[२] मोगल काळात बऱ्हाणपूर - हैद्राबाद मार्गे लातूर जिल्ह्यातील उदगीर मार्गे बिदर वरून जात होता अशी नोंद आहे.[३] नांदेड जिल्ह्याच्या संदर्भामध्ये असे नोंदविता येईल की सातवाहन, वाकाटक काळामध्ये तीर्थयात्रा करणारे आणि पायीक मंडळी हे पैठणपासून गोदावरीच्या काठाने नांदेडला येत असावेत, तर मध्ययुगीन काळामध्ये बऱ्हाणपूर-हैद्राबाद या मुख्य मार्गाला माहुर-कंधार मार्गे लातूर असे उपमार्ग जोडलेले होते. तत्कालीन प्रशासकीय केंद्रांना जोडणारे हे मार्ग वाहतुकीचे मार्ग म्हणून कार्यान्वित होते. शिवाय कंधार, देगलूर या परिसरामध्ये वाहतुकीसाठी उंटांचा उपयोग करीत असत. आजही काही प्रमाणात अशी वाहतूक बघायला मिळते.

---

१. **महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, इतिहास : प्राचीन काळ,** खंड एक, भाग-१, मुंबई २००२, पृष्ठ ६७१.

२. काटे, पी. व्ही. **मराठवाड्याचा इतिहास,** पृष्ठ ६१.

३. इरफान हबीब, **ॲन ॲटलास ऑफ दि मुघल एम्पायर,** पृ. ५८.

विसाव्या शतकाच्या प्रारंभापासून मराठवाडा प्रदेशातून रेल्वे सेवा सुरू झाली. इ.स. १९०० मध्ये हैद्राबाद शहर मनमाडला रेल्वे मार्गाने जोडण्यात आले. परभणी ते परळी रेल्वे लाईन १९२१ ते १९३१ या दशकात निर्माण झाली आणि परळी ते हैद्राबाद या रेल्वे लाईनचा प्रारंभ झाला.

निजामी राज्यात दळणवळणाचा विकास झालेला नव्हता. पक्क्या सडका नसल्यामुळे व्यापारास अधिक चालना मिळू शकली नाही. निजामी राजवटीत इसवी सन १९४१ पर्यंत २२८३.६६ कि.मी. लांबीचे रस्ते होते. त्यात औरंगाबाद जिल्ह्यातील कन्नड, पैठण, रोटेगाव, अजिंठा हे रस्ते उल्लेखनीय आहेत. याशिवाय दुधना नदीवर पुलबांधण्यासाठी सुमारे दीड लाख रुपये खर्च करण्यात आले होते. उस्मानाबाद जिल्ह्यात हैद्राबाद - सोलापूर रस्ता तयार करण्यात आला होता. याशिवाय परभणी जिल्ह्यात कोल्हा - मानवत रस्ता, नांदेड जिल्ह्यात नांदेड-माजलगाव आणि नांदेड - बासर रस्ता, तर बीड जिल्ह्यात शहागड - बीड हे महत्त्वाचे रस्ते तयार करण्यात आले. या विविध रस्ते व पुलांच्या बांधणीसाठी सुमारे ३१ लाख रुपये खर्च करण्यात आले. तथापि रस्ते तयार करण्याचे काम विशेष प्रभावीपणे हाती घेतले गेले नाही.[४]

नांदेड जिल्ह्यात २० व्या शतकाच्या अखेरपर्यंत नियमित वाहतुकीसाठी रस्ते सुस्थितीत नव्हते. तथापि १९१५ मध्ये बांधण्यात आलेल्या हदगाव - सिददरा मार्ग (१९.३१ कि.मी.) बसर - ब्हैसा (२८.९७ कि.मी.) हेच काय ते मार्ग वाहतुकीस सुयोग्य होते. त्याचप्रमाणे जहिराबाद-नांदेड मार्गामुळे नांदेड व उस्मानाबाद, बीड जिल्हे प्रवासासाठी व मालाची वाहतूक करण्यासाठी तयार करण्यात आले व यामार्गे दक्षिणेकडे मोठ्या प्रमाणात वाहतूक होऊ लागली. या मार्गाशिवाय सन १८९९ मध्ये हैद्राबाद-मनमाड किंवा गोदावरी व्हॅली रेल्वे मार्गामुळे वाहतुकीस चालना मिळाली होती. तसेच इ. स. १९३१ मध्ये मुदखेड-अदिलाबाद रेल्वे मार्ग वाहतुकीस खुला करण्यात आला होता.[५]

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेपूर्वी जिल्ह्यात दळणवळणाच्या सोई अत्यल्प प्रमाणात उपलब्ध होत्या. तिसऱ्या योजनेच्या सुरूवातीस जिल्ह्यात २०४.३८६ कि.मी. (१२७ मैल) लांबीचे राज्य मार्ग, १८६.६८४ कि.मी. (११६ मैल) लांबीचे प्रमुख जिल्हा रस्ते व १२.८७४ कि.मी. (८ मैल) लांबीचे इतर जिल्हा मार्ग आणि १४४.८४१ (९० मैल) लांबीचे ग्रामीण रस्ते अस्तित्वात होते. तिसऱ्या पंचवार्षिक योजना काळात भोकर ते तामसा, मुखेड ते सिरुरताजबंद, मारतळा ते उस्माननगर, मुखेड ते कंधार आणि उमरी ते मुदखेड या १०१.३८९ कि.मी. (६३ मैल) लांबीच्या पाच सडकांची कामे हाती घेण्यात आली. या रस्त्यांवर १३,३३,६०० रुपये खर्च करण्यात आले होते. मराठवाड्यातील दळणवळणविषयक सोयी वाढाव्या म्हणून महाराष्ट्र शासनाने तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत रस्ते बांधणीसाठी ४ कोटी रुपयांची तरतूद केली. त्यामुळे जिल्ह्यात हदगाव ते हिमायतनगर, पांडरवाडी ते मालकवठा, सावरगाव ते पाळज (किणी मार्गे), धर्माबाद ते उमरी, मुखेड ते मुकमाबाद व कंधार ते माळाकोळी या सहा सडकांची कामे हाती घेण्यात आली, त्यावर सुमारे ५० लाख रुपये खर्च झाले. बांधकाम विभागामार्फत तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात नांदेड ते जहिराबाद ५३.१०८ कि.मी. (३३ मैल), अर्धापूर ते वारंगा १६.०९३ कि.मी. (१० मैल) व बसवत ते अर्धापूर हा ६.४३७

---

४. काटे. पी. व्ही., **मराठवाड्याचा इतिहास,** पृ. ११५ व ११६.

५. **नांदेड जिल्हा गॅझेटिअर,** १९७१, पृ. ३५५.

(४ मैल) या प्रमाणे रस्त्यांचे डांबरीकरण करण्यात आले. चतुर्थ पंचवार्षिक योजनेत सर्व महत्त्वाचे रस्ते डांबरी करण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात आला.[६]

इ. स. १९५० ते ६० या दहा वर्षांच्या कालावधीमध्ये गंगाखेड-नांदेड, नागपूर-नांदेड, श्रीगोंदा-बीड-अर्धापूर-नांदेड इ. महत्त्वाचे मार्ग तसेच अनेक प्रमुख जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्गांची कामे करण्यात आली.[७]

**स्वातंत्र्योत्तर विकास :** निजाम राजवटीमध्ये रस्ते बांधणे अथवा रस्ते सुधारणांकडे दुर्लक्ष झालेले दिसते. एकूण त्या राजवटीमध्ये रस्ते बांधण्याला आवश्यक तो अग्रक्रम दिलेला नव्हता. अस्तित्वात असलेले बहुसंख्य रस्ते केवळ बैलगाड्यांच्या संचारामुळे निर्माण झालेले धोपट मार्ग होते. त्यांची दुरुस्ती अथवा सुधारणा केली जात नव्हती. स्वातंत्र्यानंतरही काही वर्षे नांदेड जिल्ह्यात योग्य असे रस्ते नव्हते; परंतु दळणवळणाशिवाय विकास जलद होत नाही हे लक्षात आल्यानंतर शासनाने या बाबीकडे लक्ष दिल्याचे दिसून येते. त्यादृष्टीने शासनाचे रस्ते विषयक धोरण खालील प्रमाणे होते :—

भारतात प्राचीन काळापासून जरी रस्ते अस्तित्वात असले तरी संपूर्ण राष्ट्रासाठी रस्त्यांच्या एकत्रित विकास योजनेचा आराखडा सर्वप्रथम १९४३ मध्ये नागपूर येथे झालेल्या मुख्य अभियंत्यांच्या परिषदेत तयार करण्यात आला. त्यास " नागपूर योजना " असे संबोधण्यात आले. नागपूर योजनेत देशातील रस्त्यांची राष्ट्रीय महामार्ग, राज्यमार्ग, प्रमुख जिल्हा मार्ग, इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्ग अशी वर्गवारी करण्यात आली. यापैकी पहिल्या तीन प्रकारांना मुख्य रस्ते पद्धत व उर्वरित दोन प्रकारांना इतर रस्ते पद्धत संबोधण्यात येऊ लागले. ही योजना रस्त्यांचा सर्वंकष विकास साधण्याच्या दृष्टीकोनातून तयार करण्यात आली. योजनेनुसार रस्त्यांचे उद्दीष्ट ठरवितांना त्या रस्त्यांची निरनिराळ्या प्रकारातील लांबी " ग्रीड आणि स्टार " या सुत्राने ठरविण्यात आली. त्यामुळे रस्ते विकासास वेग येऊन नागपूर योजनेनुसार ठरविलेली रस्त्यांची उद्दीष्टे १९६१ पर्यंत जवळजवळ साध्य झाल्यामुळे पुढील २० वर्षांकरिता १९६१-१९८१; रस्ते विकास योजना तयार करण्यात आली. तिला 'मुंबई योजना' असे संबोधण्यात आले.

ह्या योजनेचे सर्वसाधारण मुख्य उद्दिष्ट रस्त्यांची घनता २६ ते ५२ (४१.८४ ते ६३.६८ कि.मी.) मैलाप्रती १०० चौ. मैल (१६०.९३ कि.मी.) वाढविण्याचे होते आणि हे उद्दिष्ट संभाव्य विकास तसेच ग्रामीण व शहरी भागाची गरज लक्षात घेता ठरविलेले होते. रस्त्यांचे वेगवेगळे वर्गीकरण करण्यासाठी " ग्रीड व स्टार " सूत्र वापरावयाचे ठरले. १९६१-८१ योजनेत विविध दर्जाच्या रस्त्यांकरिता काही ठराविक मापदंड आणि विनिर्देश घोषित केले होते. ते म्हणजे विस्तृत प्रमाणात पाटबंधारे प्रकल्प पूर्ण झाल्यामुळे आणि नवीन औद्योगिक वसाहतींचा विकास झाल्यामुळे तसेच १९७२-७३ या दुष्काळी कालावधीत भरपूर लांबीचे रस्ते बांधल्यामुळे राज्यातील परिस्थिती व वाहतुकीतील बदल लक्षात येऊन १९६१-८१ महाराष्ट्राची रस्ते विकास योजना १९७६ साली सुधारित करण्यात आली. ह्या

६. **योजनेने आपल्यासाठी काय केले? प्रसिद्धी विभाग, महाराष्ट्र शासन, नांदेड जिल्हा १९६६**, पृष्ठे ४६-४७.

७. कित्ता, उपरोक्त पृष्ठ क्र. ३५५.

सुधारित योजनेचे लक्ष्य मूळ १९६१-८१ लक्ष्याच्या तुलनेत आदिवासी क्षेत्राकरिता ३३ टक्के व इतर क्षेत्राकरिता १६ टक्के इतके जास्त होते. आता १९६१-८१ व १९८१-२००१ रस्ते विकास योजना भारतीय रस्ते महासभेच्या (इंडियन रोड कॉंग्रेस) सल्लागार मंडळाने स्वीकारली होती व तिला सप्टेंबर, १९८४ मध्ये त्रिवेंद्रम येथे देशातील मुख्य अभियंत्यांनी संमती दिली होती. भारत सरकारच्या वाहतूक व नौकानयन मंत्रालयाच्या रस्ते विभागाच्या वतीने भारतीय रस्ते महासभेने १९८४ मध्ये भारतीय रस्ते विकास योजना १९८१-२००१ म्हणून प्रकाशित केली आहे. राष्ट्रीय स्तरावरील विचारधारा लक्षात घेऊन व ग्रामीण क्षेत्रातील सर्वसाधारण माणसाच्या सतत वाढणाऱ्या उत्कट इच्छेची परिपूर्ती करणारी रस्ते विकास योजना ही बृहत् योजना म्हणून तयार करण्यात आली आहे. १९८१-२००१ रस्ते विकास योजना तयार करताना देशाच्या ग्रामीण भागाची काटकसरीची व्यवस्था सुरक्षित ठेवणे, खेड्यांच्या व लहान गावांच्या विकासाच्या दृष्टीने शहरे व मोठ्या गावांकडे स्थलांतरित होणारी लोकसंख्या खात्रीलायक थांबविणे हा मुख्य उद्देश ठेवला आहे. पर्यायाने यामुळे खेड्यांची सर्वसाधारण राहणीमानाची स्थिती उंचावण्यास मदत होईल. वरील उद्दिष्ट साध्य करण्याकरिता राज्यातील सर्व खेडी ही किमान एक बारमाही रस्त्याने जोडली जातील. तथापि ५०० ते १००० लोकसंख्येच्या दरम्यानच्या खेड्यांना दोन पेक्षा जास्त रस्त्यांनी, १००० ते १५०० लोकसंख्येच्या दरम्यानच्या खेड्यांना तीन पेक्षा जास्त रस्त्यांनी तर १५०० लोकसंख्येच्या गावांना चार पेक्षा जास्त रस्त्यांनी कदाचित जोडावी. तसेच १९८१-२००१ रस्ते योजनेची इतर उद्दिष्टे - राष्ट्रीय महामार्गाचा विस्तार करावा. राष्ट्रीय महामार्गांच्या ज्या भागात वाहनांची वर्दळ १०,००० पी.सी.यु. पेक्षा जास्त असेल तेथे हे मार्ग सध्या चौपदरी असावेत. १९८१-२००१ रस्ते विकास योजनेनुसार एकूण नवीन बांधावयाच्या रस्त्यापैकी ५०% लांबी दुपदरी असावी. तसेच पूर्ण मार्गाची लांबीमध्ये पृष्ठभाग अत्याधुनिक म्हणजे सिमेंट कॉंक्रीटचा अथवा डांबरी असावा. उरलेल्या ५०% नवीन बांधावयाच्या लांबीतील वाहन मार्ग एकपदरी असावेत. काही ठिकाणी राष्ट्रीय महामार्गावरील वाढलेली वाहतूक वर्दळ लक्षात घेता अशा भागातील वाहन मार्ग चौपदरी असावेत या मुख्य द्रुत मार्गास छेदून जाणाऱ्या दुसऱ्या रस्त्याच्या कडेने वाहने एका बाजूस उभी करण्यासाठी आवश्यक ती स्थाने निर्माण करून येथे करमणूक केंद्रे तसेच वैयक्तिक सोयी, प्रवास मदत सेवा उपलब्ध असाव्यात, रस्त्यावर आवश्यक तेथे पेट्रोल पंप असावेत, २००१ सालापर्यंत द्रुत मार्गाची लांबी १०० कि.मी. असावी. राज्य मार्ग हे एकपदरी व पूर्ण डांबरी असावेत. १९८१-२००१ या वीस वर्षांच्या कालावधीत एकूण अस्तित्वातील राज्य महामार्गाच्या लांबी पैकी २५% लांबी मधील वाहन मार्ग दुपदरी करावेत. ५०% लांबीतील वाहन मार्ग एकपदरी व दुपदरीयांचे मधील म्हणजे ५.५ मीटर रुंदीचे असतील तसेच उरलेले ७५% मार्ग एकपदरी असतील. प्रमुख्य जिल्हा मार्गांपैकी २५% लांबीतील पृष्ठभाग २००१ सालापर्यंत ५.५० मीटर रुंदीचा असावा. तर ७५% मार्ग एकपदरी असावेत १००० टनांपेक्षा जास्त वाहन गणना असेल अथवा जो ग्रामीण मार्ग ५००० लोकवस्ती जोडणारा असेल अशा ग्रामीण मार्गाचा पृष्ठभाग डांबरी असावा. आदिवासी विभागातील इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्ग यावरील वाहन गणना प्रतिदिन ५०० टनांपेक्षा जास्त असेल अथवा असे रस्ते जेव्हा २००० लोकवस्तीला जोडत असतील तेव्हा त्यांचा पृष्ठभाग डांबरी असावा व ० ते ९९९ लोकसंख्येच्या गावांना, वाड्या, तांडे, वस्त्या, यात्रास्थळे, पर्यटन ठिकाणे, बाजारपेठा, दवाखाने, साखर कारखाने इत्यादी ठिकाणे रस्त्यानी जोडण्याचे प्रस्तावित आहे.[८]

---

८. **महाराष्ट्रातील रस्ते विकासाची योजना** (नागपूर जि. १९८१–२००१), पृ. ६१ व **रस्ते विकास योजना मध्यवर्ती पुनर्विलोकन**, नांदेड जिल्हा (सन १९८१-२००१), मधून संकलित केली आहे.

सन २००१-२०२१ रस्ते विकास योजना तयार करणेबाबत मार्गदर्शक सूचना शासनाकडून प्राप्त झालेल्या असून त्या अभ्यासून रस्ते विकास योजना २००१-२०२१ प्रारूप आराखडा तयार करण्यात आलेला आहे. केंद्र शासनाच्या रस्ते विकास योजना Vision २०२१ च्या नुसार २००१-२०२१ खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या आहेत. एक्सप्रेस-वे हे १९८१-२००१ च्या रस्ते विकास योजनेत समाविष्ट नसल्याने द्रुतगती मार्गांचा समावेश रस्ते विकास योजना २००१-२०२१ मध्ये करण्यात यावा. ज्या राष्ट्रीय महामार्गावर वाहतूक अतिशय जास्त आहे त्याचे चौपदरीकरण २०२१ पर्यंत करणे आवश्यक आहे. खाली नमूद केलेल्या द्रुतगती मार्ग म्हणून रस्ते विकास योजनेत समाविष्ट करावेत. मुंबई-वडोदरा, मुंबई-नाशिक, धुळे-आग्रा, धुळे-नागपूर-कलकत्ता, मुंबई-मडगाव, पुणे-कोल्हापूर-बंगलोर, जबलपूर-नागपूर-हैद्राबाद. रस्ते विकास योजना २००१-२०२१ प्रमाणे त्यामध्ये सुधारणा करण्यात येतील.[९]

आंतरराष्ट्रीय रस्त्यांच्या घनतेची तुलना करता (प्रति चौ.कि.मी.क्षेत्रफळास रस्त्यांची लांबी). भारतात हा इंडेक्स ०.४६ आहे. तर इतर देशाशी तुलना करता युरोपमध्ये हा १ च्या वर आहे. आफ्रिकेत कमी जवळपास ०.१ च्या आसपास आहे. आशिया खंडात जपानमध्ये हा २.१६, नेपाळ ०.०३, श्रीलंका ०.४८, अमेरिका ०.६८, आस्ट्रिलिया ०.१४ आहे. १९८१-२००१ रस्ते विकास योजनेच्या शेवटी म्हणजे २००१ च्या क्षितिजावर हा इंडेक्स ०.८० असावा असे अपेक्षित आहे.[१०]

राज्यांची पुनर्रचना १ जानेवारी १९५६ साली झाली. त्या वेळी नांदेड हा हैद्राबाद राज्याचा भाग असलेल्या मराठवाड्यातील प्रदेशात समाविष्ट होता. तो द्वैभाषिक मुंबई राज्यात समाविष्ट करण्यात आला. तद्नंतर १ मे १९६० साली महाराष्ट्राची निर्मिती झाली तेव्हा सन १९६१-१९८१ रस्ते विकास योजनेच्या प्रारंभी नांदेड जिल्ह्यातील रस्ते विकासाची स्थिती ही हैद्राबाद राज्यात अस्तित्वात असलेल्या रस्ते विकासाप्रमाणे होती. दिनांक ३१ मार्च १९६१ ची नांदेड जिल्ह्याची वर्गनिहाय रस्त्यांची लांबी तसेच १९६१-१९८१ च्या सुधारित योजनेची प्रत्यक्ष प्रगती खालीलप्रमाणे होती :—

(लांबी कि.मी.मध्ये)

| मार्ग | ३१.३.१९६१ ची स्थिती | ३१.३.१९६१ ची स्थिती | |
|---|---|---|---|
| | | संकल्प | पूर्ती |
| राज्य महामार्ग | २०३ | ७९३ | ७९४ |
| प्रमुख जिल्हा मार्ग | १३९ | ८६२ | ७५९ |
| इतर जिल्हा मार्ग | १३ | १३०१ | ८३१ |
| ग्रामीण मार्ग | २९ | १६२९ | १७३५ |

९. **रस्ते विकास योजना, सन २००१-२०२१**, नांदेड जिल्हा, मधून उद्धृत केली आहे.

१०. कित्ता, उपरोक्त, पृष्ठ क्र. १४.

अशा प्रकारे सर्व मार्गांची लांबी ३१ मार्च १९६१ मधील रस्ते विकास योजना नुसार ३८४ कि.मी. इतकी असून त्यामध्ये ६७ कि.मी. लांबीचे मार्ग सिमेंट व डांबरी तर २७५ कि.मी. लांबीचे मार्ग खडीचे व ४२ कि.मी. लांबीचे मार्ग अपृष्ठांकित होते.[११]

सध्या अस्तित्वात असलेल्या रस्ते विकास योजनेच्या आराखड्याबाबत लोकप्रतिनिधी संस्था, मंडळे इत्यादीं कडून रस्त्यांच्या आलेल्या मागण्यांचा मार्गदर्शक सूचनेनुसार रस्ते योजनेत समाविष्ट करण्यात आला असून नांदेड जिल्ह्यासाठी असलेल्या रस्ते विकास १९८१-२००१ व २००१ ते २०२१ यांचा रस्त्यांच्या दर्जानुसार तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे[१२] :—

| अ.क्र. | रस्त्याचा दर्जा | १९८१-२००१ प्रमाणे उद्दिष्ट कि.मी. | २००१-२०२१ प्रमाणे उद्दिष्ट कि.मी. |
|---|---|---|---|
| (१) | राष्ट्रीय महामार्ग | निरंक | ६०६.५८ |
| (२) | प्रमुख राज्यमार्ग | २८९.०० | २९०.९५ |
| (३) | राज्यमार्ग | १०६२.४० | १५०६.१२ |
| (४) | प्रमुख जिल्हा मार्ग | २६७७.२० | २८६५.०० |
| (५) | इतर जिल्हा मार्ग | १४४५.४० | ११०४.०५ |
| (६) | ग्रामीण मार्ग | ५२४१.०९ | ४६५२.२६ |
| | एकूण | १०७१५.०९ | ११०२४.९६ |

खाजगीकरणातून रस्ते व पुलांची कामे करून घेण्याबाबत शासनाचे धोरण सन १९९६ पासून असून विहित अटीनुसार सध्या रस्ते व पुलांची कामे खाजगी व्यक्तींकडून करून घेण्यात येतात. प्रामुख्याने महाराष्ट्रामध्ये अनेक उड्डाण पुलांची कामे खाजगीकरणातून करण्यात आली आहेत.

नांदेड जिल्ह्यात सन १९६६-६७ मध्ये १,२१२ कि.मी. लांबीचे मार्ग होते तर १९८०-८१ मध्ये एकूण ४,८५१ कि.मी. लांबीचे मार्ग होते. सन १९९८-९९ मध्ये जिल्ह्यात राज्य महामार्ग १,३४६ कि.मी., प्रमुख जिल्हा मार्ग २,८०३ कि.मी. व इतर जिल्हा मार्ग १,२४५ कि.मी. तर ग्रामीण मार्ग ४,४४८ कि.मी. लांबीचे असे एकूण ९,८४२ कि.मी. लांबीचे मार्ग अस्तित्वात होते. सध्या जिल्ह्यात जवळजवळ ८५ टक्के गावे बारमाही रस्त्यांनी जोडली गेली आहेत. तक्ता क्रमांक १ मध्ये रस्त्यांचा प्रवर्ग व पृष्ठ भागानुसार मार्च, २००५ या वर्षाची माहिती दिली आहे. रस्ते विकास योजना १९८१-२००१ नुसार जिल्ह्यात ११०३३.३९ कि.मी. लांबीचे मार्ग अस्तित्वात होते, तर रस्ते विकास योजना २००१-२०२१ प्रमाणे ११,५०९.११ कि.मी. एकूण लांबीचे मार्ग प्रस्तावित आहेत.

## रस्ते विकास

रस्त्यांचे राष्ट्रीय महामार्ग, प्रमुख राज्य मार्ग, राज्य मार्ग, प्रमुख जिल्हा मार्ग, इतर जिल्हामार्ग व ग्रामीण मार्ग असे प्रवर्ग आहेत. लोहमार्गांना पूरक म्हणून महामार्गांना तर जिल्ह्याच्या अंतर्भागात प्रमुख जिल्हा मार्ग, इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्गांना अतिशय महत्त्व प्राप्त झाले आहे.

११. कित्ता, पूर्वोक्त, पृष्ठ ११.

१२. महाराष्ट्र राज्य २००१-२०२१ **रस्ते विकास योजना,** नांदेड जिल्हा सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड मधून.

## राष्ट्रीय महामार्ग

राष्ट्रीय महत्त्वाच्या दृष्टीने लांब पल्ल्याचे काही मार्ग बांधण्यात आले आहेत. हे मार्ग शेकडो किलो मीटर लांबीचे असतात. त्यांनी देशातील घटक राज्याच्या राजधान्या, महत्त्वाची बंदरे, शहरे, मोक्याची ठिकाणे एकमेकांशी जोडली जातात. नांदेड जिल्ह्यातून कल्याण-अहमदनगर-पाथर्डी-माजलगाव-परभणी-नांदेड-भोकर-निर्मल-आंध्रप्रदेश राष्ट्रीय महामार्ग ७ ला मिळणारा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक २२२ हा एकच मार्ग जात असून रस्ते विकास योजना २००१-२०२१ नुसार वापी-नाशिक-औरंगाबाद-नांदेड-निजामाबाद, नांदेड-चंद्रपूर-भानुप्रतापपूर-तितलाबाद, नांदेड-सोलापूर-कोल्हापूर, अकोला-नांदेड-रायचूर हे मार्ग प्रस्तावित राष्ट्रीय महामार्ग आहेत.[१३]

**कल्याण-अहमदनगर-पाथर्डी-माजलगाव-परभणी-नांदेड-भोकर-निर्मल आंध्रप्रदेश राष्ट्रीय महामार्ग क्र. ७ ला मिळणारा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक २२२ :** हा रस्ता हिंगोली जिल्ह्यातील बसमत मार्गे येऊन कि.मी. ५२५.०० मध्ये नांदेड जिल्ह्यात प्रवेश करतो त्यानंतर माळेगाव-नांदेड-तरोज नाका-सांगवी फाटा-दाभड फाटा बारड-भोकर मार्गे कि.मी. ६१५.०० मध्ये आंध्रप्रदेशात प्रवेश करतो. या मार्गाची जिल्ह्यातील एकूण लांबी १०५.९३ कि.मी. इतकी आहे. हा मार्ग परभणी जिल्ह्यातून पुढे नांदेड जिल्ह्यात प्रवेश करतो. हा मार्ग जिल्ह्यात पश्चिमेकडून पूर्वेकडे जातो. या मार्गाचा पृष्ठभाग डांबरी आहे व कि.मी. ६०८.०० मध्ये या मार्गावर मातुल घाट लागतो. या मार्गावर खालील महत्त्वाची गावे आहेत :—

माळेगाव (५२८.०० कि.मी.) नांदेड (५४३.०० कि.मी.), बारड (५६६ कि.मी.), भोकर (५८९.०० ते ५९१.०० कि.मी.)* या मार्गास खालील मार्ग मिळतात :—

| जंक्शन नाव व कि.मी. | रस्त्याचे नाव | रस्त्याचा दर्जा+ |
|---|---|---|
| माळेगाव ५२८.६० | औरंगाबाद-जालना-परभणी-बसमत-नांदेड-देगलूर-हैद्राबाद मार्ग | प्र.रा.मा. ६ |
| तरोडा नाका नांदेड ५४२.०० | नांदेड-पुर्णा रोड | रा.मा.४४ |
| सांगवी नाका नांदेड ५४६.०० | मुंबई-अहमदनगर-बीड-नांदेड-जगदाळपूर भाग नांदेड-लोहा-गंगाखेड. | प्र.रा.मा. २ |
| दाभड फाटा ५५४.०० | रत्नागिरी-कोल्हापूर-सोलापूर-लातूर-नांदेड-यवतमाळ-वर्धा-नागपूर भाग अर्धापूर-वारंगा-हदगाव. | प्र.रा.मा. ३ |
| बारड ५६६.०० | प्र.रा.मा.३ चोरबां-निमगाव-सोनाळा-चाभरा-लहान-आंबेगाव-बारड-डोंगरगाव मुदखेड. | प्र.जि.मा.१६ |
| भोकर ५९०.०० | मुदखेड-भोकर-किनवट-सारखनी-माहूर-पुसद जिल्हा सिमापर्यंत | रा.मा. २३० |
| भोकर | हदगाव-भोकर-उमरी-लोहगाव. | रा.मा. २२९ |

१३. २००१-२०२१ **रस्ते विकास योजना नांदेड** जिल्हा मधून.

*. कि.मी. क्रमांक कल्याणपासून देण्यात आले आहेत.

+. रा.म. = राष्ट्रीय महामार्ग,
प्र.रा.मा. = प्रमुख राज्य मार्ग
रा.मा. = राज्य मार्ग
प्र.जि.मा. = प्रमुख जिल्हा मार्ग
इ.जि.मा. = इतर जिल्हा मार्ग

Maharashtra State Gazetteers

या मार्गावर मे २००५ मध्ये पासदगाव येथे कि. मी. ५३८.२०० वर आसना नदीवर तर मातूल येथे कि.मी.६०७.०० मध्ये मातूल नदीवर पूल आहेत. या मार्गावर मे, २००५ मध्ये कि.मी. ५२८.०० माळेगाव येथे सरासरी वाहतूक भार १५४०५.७० मे.टन प्रतिदिनी झाली तर भोकर फाटा येथे सरासरी २०३१३.३५ मे. टन वाहतूक भार झाली होती.

**प्रमुख राज्य मार्ग :** राज्य मार्गांना दर्जेउन्नती देऊन प्रमुख राज्य मार्गामध्ये वर्गवारी केली जाते. हे मार्गही एका जिल्ह्यातून दुसऱ्या जिल्ह्यातील महत्त्वाची शहरे तसेच दुसऱ्या राज्यांना रस्त्याने जोडतात. नांदेड जिल्ह्यामध्ये (१) मुंबई-अहमदनगर-बीड-नांदेड-जबदाळपूर (प्र.रा.मा.२), (२) रत्नागिरी-सोलापूर-तुळजापूर-लातूर-नांदेड-हदगाव-यवतमाळ-वर्धा-नागपूर (प्र.रा.मा.३), (३) औरंगाबाद-जालना-परभणी-बसमत-नांदेड-देगलूर-हैद्राबाद (प्र.रा.मा.६) हे तीन प्रमुख राज्य मार्ग आहेत. या सर्व प्रमुख राज्य मार्गांची जिल्ह्यातील एकूण लांबी रस्ते विकास योजना १९८१-२००१ प्रमाणे २८९ कि.मी. इतकी होती तर सन २००१-२०२१ प्रमाणे २९०.९५ कि.मी. चे उद्दिष्ट होते.

**१. मुंबई-अहमदनगर-बीड-नांदेड-जगदाळपूर (प्र.रा.मा.२) :** हा रस्ता परभणी जिल्ह्यातील गंगाखेड, पालम हून येऊन कि.मी. क्रमांक ४९३.४०० मध्ये नांदेड जिल्ह्यात प्रवेश करतो. पश्चिमेकडून निघून पूर्वेकडे लोहा पर्यंत कि.मी. ५०३.०० पर्यंत जातो व नंतर हा मार्ग पुढे उत्तरेकडे जातो व नांदेड जवळील सांगवी नाका कि.मी. ५४०.०० येथे संपतो. या मार्गांची जिल्ह्यातील एकूण लांबी ४६.६० आहे. या मार्गाची रुंदी ७.०० मीटर असून हा मार्ग डांबरी आहे.

या मार्गास जिल्ह्यात सोनखेड (५१६.०० कि.मी.)* जानापुरी (५२१.०० कि.मी.), विष्णूपुरी (५२७.०० कि.मी.) वाजेगाव जंक्शन (५३५.०० कि.मी.), नांदेड वाफना जंक्शन (५३८.०० कि.मी.) ही महत्त्वाची गावे लागतात.

या मार्गावरून सुरू होणारे व ओलांडणी करणारे महत्त्वाचे रस्ते :—

| जंक्शन गाव कि.मी. | रस्त्याचे नाव | रस्त्याचा दर्जा |
|---|---|---|
| लोहा जंक्शन | १) रत्नागिरी-कोल्हापूर-सोलापूर-लातूर-नांदेड-यवतमाळ | प्र.रा.मा. ३ |
| ५०३.०० कि.मी. | २) लोहा-कंधार-मुखेड-खानापूर-नरंगल-सगरोळी कारला फाटा-कोंडलवाडी. | प्र.रा.मा. २२३ |
| सोनखेड ५१६.०० कि.मी. | १) निळा-तळणी-नाळेश्वर-दगडगाव-सोनखेड-नारूळ-वरवटं-मुखेड. | प्र.जि.मा. २० |
| नांदेड (सिडको चौक) ५३०.०० कि.मी. | नांदेड-उस्मानगर | रा.मा. २२४ |
| वाजेगाव ५३५.०० कि.मी. | नांदेड-पूर्णा-मुदखेड | रा.मा. ४४ |
| सांगवी ५४० कि.मी. | कल्याण-अहमदनगर-माजलगाव-परभणी-नांदेड-भोकर | रा.मा. २२२ |

*. कि.मी. क्रमांक मुंबईहून देण्यात आले आहेत.

Maharashtra State Gazetteers

या मार्गावर कि.मी. क्रमांक ४९६.४०० खांबेगाव येथे नाल्यावर तर अंबेसांगवी जवळ कि.मी. ५११.२०० नाल्यावर पूल आहेत. या पूलाचे काम अनुक्रमे १९९८-९९ व १९९७-९८ मध्ये करण्यात आले आहे. तसेच नांदेड येथे सन १९२९ मध्ये कि.मी.५३५.४०० ते .८०० गोदावरी नदीवर पूल बांधण्यात आलेला आहे.

या मार्गावर कि.मी. ५१६.०० सोनखेड येथे मे, २००५ मध्ये सरासरी वाहतूक भार २२९० मे.टन झाली. तर धनेगाव येथे कि.मी.५३३.०० येथे ३४०५ मे.टन वाहतूक भार झाली होती. हा मार्ग वर्षभर वाहतुकीस खुला असतो.

**२. रत्नागिरी-सोलापूर-तुळजापूर-लातूर-नांदेड-हदगाव-यवतमाळ-वर्धा-नागपूर मार्ग (प्र.रा.मा.३) :** हा रस्ता तुळजापूर-लातूर-अहमदपूर मार्गे येऊन माळेगाव जवळ कि.मी. ५६७.०० मध्ये नांदेड जिल्ह्यात प्रवेश करतो. दक्षिणेकडून येऊन उत्तरेकडे जातो. या मार्गावर लोहा जंक्शन कि.मी. क्रमांक ५८९.२०० ला येते. या मार्गाची एकूण लांबी २२.२० कि.मी. आहे. या मार्गाची रुंदी ५.५० मीटर इतकी आहे. माळेगाव रिंग रोड १.५० कि.मीटरचा मार्गाची रुंदी ७.०० मीटर आहे. तसेच कि.मी. ५८२.०० ते ५८२.४०० कि.मी. मंगरुळ घाट आहे. पुढे लोहा जंक्शन ते सांगवी नाका कि.मी. ५०३ ते ५४० अशी एकूण ३७.०० कि.मी. लांबी प्रमुख राज्यमार्ग क्र.२ ची आहे (over lap length) तसेच सांगवी नाका ते दाभडफाटा कि.मी. ५४६.०० ते कि.मी. क्र.५४५.०० अशी एकूण ८.०० कि.मी. लांबी अन्य मार्गात म्हणजे राष्ट्रीय महामार्ग २२२ ची आहे.

हा रस्ता दाभड फाटा येथे कि.मी. ५८९.२०० ला उत्तरेकडून सुरू होऊन पुढे अर्धापूर-पार्डीमक्ता नांदेड जिल्हा सीमा कि.मी. क्रमांक ६०१.४०० मध्ये हिंगोली जिल्ह्यात प्रवेश करतो व पुढे वारंगा फाटा मार्गे पूर्वेकडे वळतो. कि.मी. क्रमांक ६१९.०० मध्ये पुन्हा नांदेड जिल्ह्यात हदगाव तालुक्यात प्रवेश करतो व हदगाव येथे जातो. कि.मी. ६३८.०० येथून हदगाव १.४० कि.मी. अंतरावर आहे. हदगाव जंक्शन येथून हा रस्ता उतरेकडे वळून कि.मी. ६४३.४०० ला यवतमाळ जिल्ह्यात प्रवेश करतो. हदगाव तालुक्यातील ३२.२० कि.मी. व हदगाव लिंक रोड १.४० अशी एकूण ३३.६० कि.मी. लांबीचा मार्ग सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेडकडे देखभाल व दुरुस्तीसाठी आहे व हा मार्ग ७.०० मीटर रुंदीचा आहे.

या मार्गावर जिल्ह्यातील खालील गावे लागतात. माळेगाव (५६८.३०० ते ५६८.७०० कि.मी.)*, माळाकोळी (५७६.६०० कि.मी.), लोहा (५८८ कि.मी.), अर्धापूर (५९५ कि.मी.), वारंगा (६११.२०० कि.मी.), हदगाव शहर (६३९.००, ६४०.४० कि.मी.). या मार्गावर माळेगाव, लोहा, अर्धापूर, हदगाव येथे शासकीय विश्रामगृहे आहेत.

---

*. कि.मी. क्रमांक रत्नागिरीकडून देण्यात आले आहेत.

या रस्त्यावरून सुरू होणारे व ओलांडणी करणारे रस्ते :—

| जंक्शन गाव कि.मी. | रस्त्याचे नाव | रस्त्याचा वर्ग |
|---|---|---|
| माळेगाव ५६८.६०० कि.मी. | जिल्हा सीमा मंबुलगा अष्टुर लोहराळा बनवस-माळेगाव-लिंबोटी-कुराळा-डिग्रस-पांडुरनी खारकावाडी रा. मा. २४४ ला मिळणार. | प्र.जि.मा. ३८ |
| माळाकोळी ५७६.६५० कि.मी. | जिल्हा सीमा अष्टुर-रिसनगाव-माळाकोळी-वायुळगाव-घोडज-कंधार. | प्र.जि.मा. ३७ |
| बसमतफाटा ५९१.५०० कि.मी. | औरंगाबाद-जालना-परभणी-बसमत-नांदेड-देगलूर-हैद्राबाद मार्ग. | प्र.रा.मा. ६ |
| अर्धापूर | अर्धापूर-तामसा-हिमायतनगर | रा.मा. २२० |
| सिबदरा ६२१.०० | जिल्हा सीमा तळणी-कोळी सिबदरा-मनठा-सावरगाव-स्वैरगाव-पांगरी-निळा-बारसगाव-देगाव ते प्र.रा.मा. २. | प्र.जि.मा. १५ |
| कि.मी. ६३४.०० | जिल्हा सीमा येळेगाव-कोळी-निवगा प्र.रा.मा. ३. | प्र.जि.मा. १२ |

या मार्गावर वरडशेवाळा येथे नाल्यावर १९६७ मध्ये पूल बांधण्यात आला तसेच सिबदरा येथेही नाल्यावर १९६७ मध्ये ३०.४८ मीटर लांबीचा पूल बांधण्यात आला आहे. या मार्गावर हदगाव येथे कि.मी. ६३८.०० वर मे, २००५ मध्ये १५,७६७ मे. टन सरासरी वाहतूक भार झाली होती.

**३. औरंगाबाद-जालना-परभणी-बसमत-नांदेड-देगलूर, प्र.रा.मा. ६ :** हा मार्ग हिंगोली जिल्ह्यातील बसमतमार्गे कि. मी. क्र. २४८.६५० येथे नांदेड जिल्ह्यात प्रवेश करतो व माळेगाव मार्गे पश्चिमेकडून पूर्वेकडे अर्धापूर फाटा कि.मी. २६३.६५० मध्ये येऊन मिळतो. सदर रस्त्याची कि.मी. २४८.६५० ते २५२.२५० ही ३.६० कि.मी. लांबी राष्ट्रीय महामार्ग क्र. २२२ ची आहे. कि.मी. २५२.२५० ते २६३.६५० ही ११.४० कि.मी. लांबीचा मार्ग ७.०० मीटर रुंदीचा डांबरी आहे.

अर्धापूर फाटा ते दाभड फाटा कि.मी. ५८९.२०० ते ५९१.५०० हा २.३० कि.मी. लांबीचा मार्ग अन्यमार्गात म्हणजे राष्ट्रीय महामार्ग क्र.२२२ ची आहे. पुढे सांवगी नाका ते धनेगाव (जं.) कि.मी. ५३४.०० ते ५४०.०० म्हणजे ६.०० कि.मी. लांबी प्रमुख राज्यमार्ग २ मध्ये अंतर्भूत आहे. सदर रस्ता अर्धापूर फाट्याहून उत्तरेकडून येऊन दक्षिणेकडे देगलूर मार्गे हैद्राबादला जातो. या मार्गामुळे हैद्राबादला वाहतूक करणे सोईचे झाले आहे.

या मार्गावर खालील महत्त्वाची गावे येतात. माळेगाव (२५२.२५० कि.मी.)*, काकांडी (२७०.६५० कि.मी.), मारताळा (२७५.५०० कि.मी.), घुगराळा (२९४.०० कि.मी.), नायगाव खै. (३०३.०० कि.मी.), नरसी (३०७.२०० कि.मी.), देगलूर (३४० कि.मी.). माळेगाव येथे खंडोबाची मोठी यात्रा भरते.

*. कि.मी. क्रमांक औरंगाबादकडून देण्यात आले आहेत.

या रस्त्यावरून सुरू होणारे व ओलांडणी करणारे महत्त्वाचे मार्ग :—

| स्थानकाचे नाव व कि.मी. | मार्गाचे नाव | प्रवर्ग |
|---|---|---|
| माळेगाव २५२.२५० कि.मी. | कल्याण-अहमदनगर-पाथर्डी माजलगाव-परभणी-नांदेड-भोकर-निर्मल-आंध्रप्रदेश, रा.म.मा.क्र. ७ ला मिळणारा. | रा.म. २२२ |
| अर्धापूर फाटा २६३.६५० कि.मी. | रत्नागिरी-सोलापूर-तुळजापूर-लातूर-नांदेड-हदगाव-यवतमाळ-वर्धा-नागपूर मार्ग. | प्र.रा.मा. ३ |
| धनेगाव (जं.) २६३.६५० कि.मी. | मुंबई-अहमदनगर-बीड-नांदेड-जवदाळपूर मार्ग. | प्र.रा.मा. २ |
| कहाळ (बु.) २८५.६५० कि.मी. | रा.मा. २२० पाटनूर-पांढरवाडी मुदखेड-माळकौठा-महाटी-कहाळा-मांजरम-गडगा. | प्र.जि.मा.२४ |
| नायगाव ३०३.१०० कि.मी. | बाचोटी-मंगलसागवी-सावळेश्वर-चिखली-हाळदा-कोलंबी गोदमगाव-लालवंडी-नायगाव प्ररामा ६. | प्र.जि.मा.२४ |
| नायगाव ३०३.६५० कि.मी. | प्र.रा.मा.-६ नायगाव-गोळेगाव-बेंद्री-मांजरम-मांजरमवाडी-धानोरा-कौठा शिरशी बु., शिरशी खु., पेठवडज, कल्हाळी रुई-वरताळा-सांगवी-सावरगाव नि. कामजळगाव-रावणकोळ जिल्हा सीमा. | प्र.जि.मा.४७ |
| नरसी ३०७.२०० कि.मी. | शिरुर-ताजबंद-मुखेड-नरसी-बिलोली-बोधन राज्य सीमा. | रा.मा.२२५ |
| अहमदपूर ३२४.५०० कि.मी. | प्र.रा.मा. ६ आदमपूर-बिलोली-कुंडलवाडी-धर्माबाद-मुधोळ ते राज्य सीमा. | रा.मा.२२७ |
| देगलूर ३४०.०० कि.मी. | रेणापूर-उदगीर मार्ग | रा.मा. १६८ |

या मार्गावर ३३८.३०० कि.मी. वर लेंडी नदीवर १९३० मध्ये मेसोनरी आर्च ब्रिज बांधला असून त्याला १.६९ लाख रुपये खर्च आला असून या पुलाची लांबी १२१.९ मीटर आहे. तसेच कि.मी. ३२७.१०० मध्ये मनार नदीवर पूल आहे. कि.मी. ३०४.९०० खैरगावजवळ नाल्यावर पूल आहे. तसेच कि.मी. ३०३.३०० नायगाव येथे नाल्यावर तर देगाव येथेही कि.मी.२९८.३७५ वर देगाव नाल्यावर पूल आहे. याचप्रमाणे कि.मी. ३८९.०० कृष्णूरनाला, कि.मी. ३८५.४५० कहाळा नाला, कि.मी.२८१.४५० वाका नाला, कि.मी.२७१.०० काकांडी कि.मी.२६०.४७५ मेंढला नाल्यावर पूल बांधले आहेत.

या मार्गावर मे, २००५ मध्ये धनेगाव (जं.) कि.मी.२६३.६५० वर २७३६९ मे. टन वाहतूक भार झाली तर देगलूर येथे कि.मी.३३९.०० वर ३५१०१ मे.टन सरासरी वाहतूक भार झाली.

## राज्यमार्ग

राज्य मार्ग हे राष्ट्रीय महामार्ग, प्रमुख राज्य महामार्ग, प्रमुख जिल्हा मार्ग यांना जोडलेले असतात. शिवाय ते राज्यातील महत्त्वाची ठिकाणे, जिल्हा मुख्यालये, महत्त्वाच्या बाजारपेठा, औद्योगिक केंद्रे, ऐतिहासिक व धार्मिक स्थळे यांना जोडतात. सन २००५ मध्ये नांदेड जिल्ह्यात १६ राज्य मार्ग होते. त्यांची एकूण लांबी १०५६.६० कि.मी. होती. त्यांची माहिती खाली दिलेली आहे.

**१. शहापूर-संगमनेर-शेवगाव-माजलगाव-पार्थी-पुर्णा-नांदेड-मुदखेड-उमरी-धर्माबाद-बेलूर ब्रीज कंदकुर्ती राज्य सीमा (राज्य मार्ग क्रमांक ४४) :** हा मार्ग परभणी जिल्ह्यातील प्रार्थी-पुर्णाहून येऊन कि.मी. क्रमांक ४५३.०० मध्ये नांदेड जिल्ह्यात प्रवेश करतो. हा मार्ग जिल्ह्यात पश्चिमेकडून पूर्वेकडे जातो. भोकर विभागाच्या रस्त्याची रुंदी १०.०० मीटर (Top width) असून ५२.२० कि.मी. लांबी मध्ये ३.७५ मीटर व ६.८७५ कि.मी. लांबीमध्ये ५.५० मीटर रुंदीचा डांबरी पृष्ठभागाचा वाहनमार्ग अस्तित्त्वात आहे. तसेच या मार्गाची हद्द रस्त्याच्या मध्यभागापासून दोन्ही बाजूमध्ये १५.०० मीटर आहे. रस्त्यावर कि.मी. क्रमांक ५४२.७०० येथे नांदेड-सिंकदराबाद ब्रॉडगेज रेल्वे क्रॉसिंग असून उमरी धर्माबाद येथे रेल्वे स्थानक अस्तित्वात आहे. या मार्गावर कि.मी. ५५४.५०० मध्ये बेल्लूर जवळ गोदावरी नदीवर मोठा पूल असून अतिवृष्टी झाल्यास किंवा मोठा पूर आल्यास पुलावरून पाणी वाहत असल्यास वाहतूक बंद पडते.

सदर राज्य मार्ग भोकर विभागाच्या कार्यक्षेत्रामधील नांदेड जिल्ह्यातील उमरी तालुक्याला सीमा कि.मी. ४९६.८०० पासून सुरू होऊन उमरी व धर्माबाद तालुक्याच्या हद्दीतून आंध्र प्रदेश सीमेवरील कंदकुर्ती या गावाजवळ निजामाबाद शहराकडे जाणाऱ्या रस्त्यास कि.मी. ५५५.८७५ वर मिळतो. अशा प्रकारे या विभागाअंतर्गत रस्त्याची नांदेड जिल्ह्यातील एकूण लांबी ५९.०७५ कि.मी. आहे.

या मार्गावर मोठी गावे खालीलप्रमाणे आहेत.—लिंबगाव (४५४.०० कि.मी.)* वाजेगाव नांदेड शहर (४७०.०० कि.मी.), आमदुरा (४७६ कि.मी.), मुगट (४८०.०० कि.मी.), मुदखेड (४८७.८०० कि.मी.), उमरी (५११.८०० कि.मी.), मंडाळा (५१७.०० कि.मी.), जुन्नी (५२७.३०० कि.मी.), करखेळी फाटा (५३५.४०० कि.मी.), धर्माबाद (५४१.७०० कि.मी.), बेलूर ब्रीज (५५४.५०० कि.मी.).

या रस्त्यावरून सुरू होणारे व ओलांडणी करणारे महत्त्वाचे रस्ते :—

| | | |
|---|---|---|
| धानोरा कि.मी.४५५.५०० | प्र.रा.मा.६ माळेगाव-निळा-तळणी-लिंबगाव-नाळेश्वर रहाटी-सोमेश्वर बेट सांगवी-सोनखेड-कलंबर-बारूळ-वरवंटा ब्रीज-पेढवडज-मुखेड. | प्र.जि.मा.२० |
| वाजेगाव ५३५.०० कि.मी. | मुंबई-अहमदनगर-बीड-नांदेड-जवदाळपूर मार्ग | प्र.रा.मा. २ |
| मुखेड | रा.मा.२२० पाटनूर-पांढरवाडी मुदखेड-माळकौठा-महाटी कहाळा-मांजरम-गडगा. | प्र.जि.मा.२४ |
| उमरी ५११.८०० कि.मी. | हदगाव-भोकर-उमरी लोहगाव रस्ता | रा.मा.२२९ |
| धर्माबाद ५४१.७० कि.मी. | बिलोली-आदमपूर रस्ता | रा.मा.२२७ |
| चिंचोली फाटा ५५१.५०० कि. मी. | कारेगाव-धर्माबाद-नायगाव बासर रस्ता | प्र.जि.मा.७१ |

*. कि.मी. क्रमांक शहापूरकडून देण्यात आले आहेत.

Maharashtra State Gazetteers

**२. रेणापूर-उदगीर-देगलूर मार्ग राज्य मार्ग क्रमांक १६८ :** हा मार्ग लातूर जिल्ह्यातील उदगीर कडून निघून कि.मी. क्रमांक ८५.०० ला नांदेड जिल्ह्यात प्रवेश करतो. हा मार्ग पश्चिमेकडून उत्तरेकडे समांतर जात आहे. मुक्रमाबाद-करडखेड मार्गे देगलूर कि.मी. क्रमांक १२४.४०० ला प्र.रा.मा. क्र. ६ ला जाऊन संपतो या रस्त्याची एकूण जिल्ह्यातील लांबी ३९.४० कि.मी. असून सदर रस्त्याचा पृष्ठभाग १३.२०० कि.मी., ५.५० मी. रुंदीचा व २६.२० कि.मी., ३.७० मीटर रुंदीचा व डांबरी पृष्ठभागाचा आहे.

या मार्गावर खालील मोठी गावे आहेत. मुक्रमाबाद (९९.०० कि.मी.), गोजेगाव (१०७.०० कि.मी.), करडखेड (११४.०० कि.मी.), बोरगाव (११५.०० कि.मी.) देगलूर (१२४.४०० कि.मी.).

या रस्त्यावरून सुरू होणारे व ओलांडणी करणारे महत्त्वाचे रस्ते—

| | | |
|---|---|---|
| हाळणी कि.मी. ९१.०० | नांदेड-उस्मानानगर-कौठा-मुखेड-मुक्रमाबादऔराद जिल्हा सीमेपर्यंत. | रा.मा.२२४ |
| मुक्रमाबाद कि.मी. १००.०० | नांदेड-उस्मानगर-कौठा-मुखेड-मुक्रमाबाद-औराद जिल्हा सीमेपर्यंत | रा.मा.२२४ |
| गोजेगाव कि.मी. १११.०० | रा.मा.२२५ खंडगाव-चांडोळा-मंडळापूर-पाला-जाहूर-भोकसखेडा-अमदापूर-वळग-अंबदेगाव-तुमारपल्ली-शिळवणी. | प्र.जि.मा.६० |
| करडखेड कि.मी. ११३.०० | करडखेड-हानेगाव-मरपल्ली ते राज्य सीमा | प्र.जि.मा.२२६ |
| कावळगाव कि.मी. ११७.०० | बोटमोगरा-उच्यामाउली- एकलारा-नांदगाव-तडखेड-सायगाव रा.मा. १६८ ला मिळणारा. | प्र.जि.मा. ६३ |
| देगलूर कि.मी.१२४.४०० | देगलूर-हैद्राबाद | प्र.रा.मा.६ |

**३. कन्नड-सिल्लोड-देऊगावराजा-लोणार-वाशीम-पुसद-महागाव-सारखनी-मांडवी-राज्य सीमेपर्यंत रा.मा. क्रमांक १८३ :** हा राज्य मार्ग भोकर या विभागाअंतर्गत नांदेड जिल्ह्यातील माहूर किनवट तालुक्याच्या हद्दीतून कि.मी. ३९७.७०० पासून आंध्र प्रदेशातील अदिलाबाद जिल्ह्यात प्रवेश करतो. या मार्गाची माहूर तालुक्यातील लांबी २१.२० कि.मी. तर किनवट तालुक्यातील लांबी ३३.७० कि.मी आहे व एकूण लांबी ५४.९० कि.मी. आहे.

या रस्त्याची रुंदी १०.०० मीटर (Top width) असून काही भागाची रुंदी ३.७५ मीटर तर काही ६.०० मीटर डांबरी पृष्ठभागाची आहे. हा मार्ग खालील महत्त्वाच्या गावाजवळून जातो.

कुपटी (३२५.०० कि.मी.), वानोळा (३३१.८०० कि.मी.), सारखणी (३४६ कि.मी.), दहेलीतांडा (३५०.०० कि.मी.), उमरी (३५६.५०० कि.मी.), मांडवी (३६८.०० कि.मी.), पानोळा (३३४.५०० कि.मी.), जुनापाणी (३३९.२०० कि.मी.), पलाईगुडा (३४२.०० कि.मी.).

या मार्गास कोणतीही मोठी नदी आडवी येत नाही. संपूर्ण पृष्ठभाग डांबरी आहे. या मार्गास खालील मार्ग मिळतात.

| संगमस्थानाचे ठिकाण | रस्त्याचे नाव | रस्त्याचा क्रमांक |
|---|---|---|
| कुपटी कि.मी. ३२९ | मोहपूर-घोटी-अंबाडी-पिंपळगाव-कोठारी ते प्रजिमा ४ रस्ता कि.मी. २२/२०० | प्र.जि.मा. ६ |
| वानोळा कि. मी. ३३१.८०० | माहूर दतशिखर दत्तमंजरी-पानोळा-वानोळा निजपूर राजगड रा.मा. ३० | प्र.जि.मा. ५ |
| सारखणी कि. मी. ३४६.०० | मुदखेड-भोकर किनवट रस्ता | रा.मा. २३० |
| दहेली तांडा कि. मी. ३५० | कि.मी.८.०० दहेली तांडा तिराळा तांडा जवराळा मांडवी रस्ता. | प्र.जि.मा. ३ |
| मांडवी ३६८.५०० कि.मी. | कि.मी.२९.०० देवठाना-काळेगाव सोनारी डोर रस्ता. | प्र.जि.मा. १८ |
| बोथ कि.मी. ३५८.०० | सिंदखेड-चिंचखेड-उमरी-उनकेश्वर कि.मी. १७/४०० | प्र.जि.मा. २ |
| सिंगोडा कि. मी. ६६४.०० | मांडवी-पारवा-पांढर कवडा कि.मी. १८८.६०० | रा.मा.२५७ |
| पिंपळगाव फाटा कि.मी. ३७५.८६० | मोहपूर घोटी पिंपळगाव कि.मी. ७७.८०० | प्र.जि.मा. ६ |
| कोठारी कनक कि. मी.३७५.२०० | कोठारी-कनकी प्र.जि.मा. ६ | प्र.जि.मा. ६ |

या मार्गावर कि.मी. १९.६०० वानोळा येथे मे २००५ मध्ये सरासरी वाहतूक भार ३८६५.२५ मे.टन झाला होता. तर कि.मी.३७४.०० पिंपळगाव येथे सरासरी वाहतूक भार मे २००५ मध्ये १२९२७.७५ मे.टन नोंदविला आहे. त्यामध्ये २०१२ जलदगती वाहने नोंदविण्यात आली असून मंदगती वाहने ८१९ नोंदविली आहेत. हा मार्ग डांबरी पृष्ठभागाचा असून वाहतुकीस वर्षभर खुला असतो.

**४. दारव्हा-पुसद-उमरखेड-किनवट रा. मा.२१३ :** हा मार्ग यवतमाळ जिल्ह्यातून निघून दारव्हा-पुसद-उमरखेड मार्गे येऊन किनवट तालुक्यातील रा.मा.क्रमांक २३० ला येऊन मिळतो. या मार्गाची नांदेड जिल्ह्यातील एकूण लांबी फक्त ०.५० कि.मी. एवढी आहे.

**५. वाटूर फाटा प्र. रा. मा.६ पासनू ते देवगाव-चारठाणा-जिंतूर-औंढा-बसमत-अर्धापूर-तामसा-हिमायतनगर-निर्मल रा.मा. २२० :** हा रस्ता जिंतूर औंढा-बसमत फाटा येथे येऊन पुन्हा नांदेड जिल्ह्यात अर्धापूरपासून कि.मी ११८.५०० हा सुरू होतो. अर्धापूर शहरातून जाणारा प्रमुख राज्य मार्ग क्रमांक ३ कि.मी. क्रमांक ५९५.०० येथून सूरु होतो. पुढे पश्चिमेकडून पूर्वेकडे

लहान-चेनापूर-तामसा-अष्टी-जवळगाव मार्गे सोनारी गावाजवळ कि.मी. १७४.५०० ला येऊन उत्तरेकडे हिमायतनगरला जातो. हिमायतनगर पासून पुन्हा पूर्वेकडे सवना-जिरोना कोस्मेट-शिवणी (बु.) दयाळ-धानोरा मार्गे कि.मी. २२६.९०० मध्ये आंध्रप्रदेश मध्ये प्रवेश करतो व निर्मलकडे जातो. अर्धापूर ते सोनारी फाटा या एकूण ५६.०० कि.मी. लांबीत ५४.५० कि.मी. चा मार्ग ५.५० मीटर रुंदीचा आहे. काही ठिकाणी या मार्गाची रुंदी ३.७५ मीटर आहे. हा संपूर्ण मार्ग डांबरी पृष्ठभागाचा असून वर्षभर वाहतुकीस खुला असतो.

या मार्गावर खालील मोठी गावे आहेत.

अर्धापूर (११८.५०० कि.मी.), लोण (१२२.०० कि.मी.), लहान (१२८.०० कि.मी.), चेनापूर (१३१.०० कि.मी.), तामसा (१५१.५०० कि.मी.), जवळगाव (१७१.०० कि.मी.), सोनारी (१७४.०० कि.मी.), हिमायतनगर (१८८.५०० कि.मी.), सवना (१९२.०० कि.मी.), जिरोना (१९५.०० कि.मी.).

या रस्त्यावरून सुरू होणारे व ओलांडणी करणारे महत्त्वाचे रस्ते.

| | | |
|---|---|---|
| लोण कि. मी. १२२.५०० | जिल्हासिमा-तळणी-कोळी-नेवरी-तालंग-सिबदरा-मनाठा सावरगाव-पांगरी-लोण-बारसगाव-देवगाव | प्र.जि.मा. १५ |
| लहान कि. मी. १२८.५०० | अंबेगाव-बारड-डोंगारगाव-मुखेड | प्र.जि.मा. १६ |
| तामसा | हदगाव-भोकर-उमरी-लोहगाव | रा.मा.२४ |
| आष्टी | रा.मा.२२९ वाळकीखुर्द-आष्टी कांडली-पारवा ते रा. मा. २३० देवठाणा-काळेगाव-सोनारी-धामधरी-मुखेड | प्र.जि.मा. १८ |
| सोनारी कि. मी. १७४.४०० | मुदखेड-भोकर-किनवट-सारखनी-माहूर-पुसद जिल्हा सीमा पर्यंत. | रा.मा. २३० |

या मार्गावर तामसा येथे मे २००५ मध्ये एकूण सरासरी वाहतूक भार ५०५४ मे. टन झाली होती.

**६. कंधार-जांब-उदगीर-मार्ग रा.मा. क्रमांक २२२ :** हा रस्ता कंधार पासून कि.मी. ०.०० पासून सुरू होतो व पुढे बहादूरपुरा-फुलवळ-गौळ-हरबल डिग्रस (खु.) जांब (बु.) असा जाऊन व रा.मा.२२५ ला ओलांडून लातूर जिल्ह्यात प्रवेश करतो व पुढे उदगीरकडेजातो. या रस्त्याची नांदेड जिल्ह्यातील एकूण लांबी २९.०० कि.मी. असून २६ कि.मी. मार्गाची रुंदी ३.७५ मीटर व उर्वरीत मार्गाची रुंदी ५.५० मीटर डांबरी पृष्ठभागाची आहे.

या मार्गावर खालील मोठी गावे आहेत. कंधार (०.०० कि.मी.), फुलवळ (७.०० कि.मी.), डिग्रस (खु.) (१९.०० कि.मी.), जांब बु.।। (२८.०० कि.मी.).

Maharashtra State Gazetteers

या रस्त्यावरून सुरू होणारे व ओलांडणी करणारे महत्त्वाचे रस्ते.

| | | |
|---|---|---|
| फुलवळ कि.मी.७ | लोहा-कंधार-मुखेड-खानापूर-नरंगल-सगरोळी-करला फाटा-कोंडलवाडी रा.मा.२२३. | रा.मा. २२३ |
| डिग्रस बु.ा | जिल्हासिमा-अंबुलगा-अष्टुर-लोहराळा-बनवस घोटका-डिग्रस-गुंटुर-वरताळा पाडुरणी-खैरका-रा.मा.२२४. | प्र.जि.मा. ३८ |
| जाब बु. कि.मी.२८ | सिरुर-ताजबंद-मुखेड-नरसी-बिलोली-बोधन | रा.मा. २२५ |

या मार्गावर बहादरपूरा कंधार कि.मी. १ मध्ये मनार नदीवर पूल असून त्या पूलाची लांबी १६० मीटर आहे. हा पूल सन १९७३ मध्ये बांधण्यात आला असून हा पूल आर.सी.सी. सॉलीड स्लॅब प्रकाराचा आहे. या मार्गावर फुलगाव येथे मे २००५ मध्ये ४०७७ सरासरी वाहतूक भार मे.टन झाली होती. कंधार येथे सार्वजनिक बांधकाम विभागाचे विश्रामगृह आहे. हा मार्ग वाहतुकीस वर्षभर खुला असतो.

**७. लोहा-कंधार-मुखेड-खानापूर-नरंगल-सागरोळी-कारलाफाटा-कोंडलवाडी रा. मा. २२३ :** हा रस्ता लोहा जंक्शन वरील प्र.रा.मा.२ पासून कि.मी. ०.०० पासून सुरू होतो. व पुढे पश्चिमेकडून पूर्वेकडे गोळेगाव पाटी ते कंधार शहरापर्यंत जातो. कि.मी. क्रमांक १२.८०० नंतर हा रस्ता दक्षिणेकडे घोडज मार्गे वळून नंतर पूर्वेकडे वळून रुई-मुखेड-केरुर-एकलारा मार्गे खानापूर-नरंगल मार्गे पुन्हा उत्तर दिशेला शेळगाव-शेवाळामार्गे कोंडलवाडीला जाऊन रा.मा.२२७ ला मिळतो. या रस्त्याची एकूण निव्वळ लांबी १२२.८० कि.मी. आहे. या रस्त्याची कंधार ते शेवाळा या एकूण १००.५० कि.मी. लांबी पैकी ६४.६० कि.मी. ३.७० मीटर रुंदीची व २०.४० कि. मी. लांबी ५.५० मीटर रूंदीची तर ९.५० कि.मी. लांबी ७.०० मीटर रुंदीची डांबरी पृष्ठभागाची आहे. शेवाळा पुलाजवळ ६.०० कि.मी. लांबी खडीच्या पृष्ठभागाची आहे. सदर रस्त्याची १.८० कि.मी. लांबी नगरपालिका कंधारकडे आहे. भोकर विभागातील सदरील राज्यमार्ग नांदेड जिल्ह्यातील बिलोली तालुक्यात सीमा कि.मी. १०२.०० पासून सुरू होते. व हिप्परगा सगरोळी कार्ला मार्गे कोंडलवाडी येथे राज्यमार्ग क्रमांक २२७ ला मिळतो. अशा प्रकारे नांदेड जिल्ह्याअंतर्गत बिलोली तालुक्यातील या राज्यमार्गाची एकूण लांबी १०.५० कि.मी. असून ती ३.७५ मीटर रुंदीची व डांबरी पृष्ठभागाची आहे. या मार्गाची कि.मी. ११२.५०० ते १२०.०० ही लांबी राज्यमार्ग क्रमांक २२३ मध्ये समाविष्ट आहे.

या रस्त्यावरील प्रमुख गावे खालीलप्रमाणे आहेत.

लोहा जंक्शन, कंधार (१२.८०० कि.मी.), घोडज (१५.०० कि.मी.), शेकापूर (१७.०० कि.मी.), फुलवळ ( २४.८०० कि.मी.), अंबुलगा (२७.०० कि.मी.), निपाणी सावरगाव (३३.०० कि.मी.), रुई (३७.०० कि.मी.), मुखेड (४६.८०० कि.मी.), खानापूर (७३.०० कि.मी.), चैनपूर (७९.०० कि.मी.), नरंगल (८५.०० कि.मी.), तुमंलूर (९०.०० कि.मी.), शेळगाव (९४.०० कि.मी.), नवीन

शेवाळा (९८.०० कि.मी.), शेवाळा (१००.०० कि. मी.), हिप्परगाथडी (१०२.५०० कि. मी.), सगरोळी (१०७.५०० कि. मी.), बोळेगाव (११०.२०० कि. मी.), कार्ला (बु.ा), फाटा (११२.५०० कि. मी.).

या रस्त्यावरून सुरू होणारे व ओलांडणी करणारे महत्त्वाचे रस्ते

| | | |
|---|---|---|
| फुलवड<br>कि.मी. २४.८०० | रा. मा. २२२ | कंधार-जांब उदगीर मार्ग |
| मुखेड<br>कि.मी. ४६.०० | रा. मा. २२५ | शिरुर ताजबंद-मुखेड-नरसी-बिलोली-बोधन<br>राज्य सीमा रा. मा. क्रमांक २२५. |

या शिवाय या मार्गाला मिळणारे खालील प्रमुख जिल्हा मार्ग आहेत. ४०, ४९, ७४, ३७, ४४, ४७, ५८, ६१, ६२, ६३, ६४, ६९ या शिवाय या मार्गास प्रमुख राज्य महामार्ग ६ हा कि. मी. ७३.३०० मध्ये ओलांडतो.

या मार्गावर घोडज येथे कि.मी. १६.७०० मनार नदीवर आर.सी.सी.सॉलीड स्लॅबचा पूल असून त्याची लांबी १६२.५ मीटर आहे. या मार्गावर खानापूर येथे मे २००५ मध्ये सरासरी वाहतूक भार ७८९६ मे.टन झाली होती. तसेच कंधार येथे ही ९२०९ वाहतूक भार मे. टन झाली होती. या मार्गावर लोहा, कंधार, मुखेड, कोंडलवाडी येथे शासकीय विश्रामगृहे आहेत. हा मार्ग वहातुकीस वर्षभर खूला असतो.

**८) नांदेड-उस्माननगर-कौठा-मुखेड-मुक्रमाबाद-औराद राज्य सीमा पर्यंत रा. मा. २२४ :** हा रस्ता नांदेड शहरातून गोदावरी नदीवरील पुलापासून कि.मी. ०.०० ला सुरू होऊन प्रमुख राज्य मार्ग २ ला सिडको (चौक) कि. मी. ३.०० ला मिळतो. त्यानंतर हा रस्ता पुन्हा प्रमुख राज्यमार्ग २ ला कि. मी.३ पासून सुरू होऊन उस्माननगर-हळदा-कौठा-मादाळी-मुखेड-बाऱ्हाळी-हळणी-मुक्रमाबाद-सावरमाळ हंगरगा-वझर राज्य सीमा कि.मी. १२१.५०० ला कर्नाटक राज्यात प्रवेश करतो व पुढे औरादकडे जातो. हा रस्ता उत्तरेकडून दक्षिणेकडे प्रवास करतो. या मार्गाची निव्वळ लांबी १२१.५० कि. मी. आहे. या मार्गाची रुंदी ३.७० ते ५ मीटर पर्यंत असून डांबरी पृष्ठभागाची आहे. या मार्गावर खालील महत्त्वाची प्रमुख गावे आहेत.

नांदेड मेंढा घाट (कि.मी. ०.००), किवळा (१३.०० कि.मी.), उस्माननगर (२३.०० कि.मी.), शिराढोण (२५.०० कि.मी.), कौठा (४८.०० कि.मी.), मुखेड (६१.०० कि.मी.), बाऱ्हाळी (८३.०० कि.मी.), मुक्रमाबाद (१००.०० कि.मी.), वझर (१२०.०० कि.मी.).

या रस्त्यावरून सुरू होणारे व ओलांडणी करणारे महत्त्वाचे रस्ते.

| | | |
|---|---|---|
| सिडको चौक कि. मी. ३.०० | प्र.रा.मा. २ | मुंबई-ठाणे-अहमदनगर-बीड-नांदेड-जगदाळपूर. |
| मुखेड कि. मी. ६१.०० | रा.मा. २२५ | शिरुर ताजबंद-मुखेड-नरसी-बिलोली-बोधन राज्य सीमा. |
| हाळणी कि. मी. ९९.५०० | रा.मा. १६८ | रेणापूर-उदगीर-देगलूर. |

या शिवाय खालील प्रमुख जिल्हामार्ग या मार्गास मिळतात किंवा ओलांडतात ते म्हणजे प्रमुख जिल्हा मार्ग ४२,३५,३६,४५,७३,४७,५८,६५, इत्यादी.

या मार्गावर नांदेड येथे गोदावरी नदीवर मोंढाघाट येथे पूल असून त्याची लांबी ३८०.४० मीटर आहे. तसेच येलूर येथे मनार नदीवर २००७ मध्ये पूल बांधला असून त्यासाठी १९२.०० लाख रुपये खर्चून १३० मीटर लांबीचा पूल बांधला आहे. हतराळा गावाजवळ तिरु नदीवर सन १९९९ मध्ये २८.८३ लाख रुपये खर्च करून पूल बांधण्यात आला आहे. या पूलाची लांबी ६८.०० मीटर आहे. हातळणी पूल लेंडी नदीवर २००४ मध्ये बांधला असून त्या पूलासाठी ९८.०० लाख रुपये खर्च आला होता. या पूलाची लांबी ८०.०० मीटर आहे.

या रस्त्यावर मे २००५ मध्ये मेंढाघाट पूलाजवळ नांदेड शहरामध्ये वाहतूक भार २८,०९७ मे. टन झाली होती. त्यामध्ये जलदगती वाहने ९१९७ तर मंदगती वाहने १०५९ धावल्याची नोंद आहे.

या मार्गावर नांदेड येथे शासकीय विश्रामगृहे आहे. हा मार्ग वहातुकीस वर्षभर खुला आहे.

**९) शिरूर-ताजबंद-मुखेड-नरसी-बिलोली-बोधन ते राज्य सीमा (रा. मा.२२५) :** हा रस्ता लातूर जिल्ह्यातून येऊन नांदेड जिल्ह्यामध्ये कि.मी. क्रमांक २०.५२० मध्ये प्रवेश करतो. पूर्वेकडून पश्चिमेकडे मुखेड नरसी बिलोली मार्गे निजामाबादकडे आंध्र प्रदेश राज्यात जातो. सदर रस्त्याची एकूण लांबी ८३.६० कि. मी. आहे. भोकर विभागाकडील हा रस्ता नांदेड जिल्ह्यातील बिलोली तालुक्याच्या हद्दीपासून कि. मी. ७२.०० पासून सुरू होऊन आंध्रप्रदेश राज्य सीमा येसगी पूलाला पुढे कि. मी. १०५.०० च्या ठिकाणी संपतो व पुढे निझामाबाद मार्गे हैद्राबादला जातो. सदरील रस्त्याची रुंदी (Top width) १०.०० मीटर ते ७ मीटर आहे. दिनांक १६/४/२००५ पासून २/१/२०२२ पर्यंत पथकर लावण्यात आला आहे. हा रस्ता खाजगीकरण अंतर्गत सुधारणा करण्यात आला असून विजयनगर येथे कि.मी. ९०.०० मध्ये पथकर नाका सुरू करण्यात आला आहे. या संपूर्ण डांबरी पृष्ठभागाच्या मार्गावर जिल्ह्यात खालील गावे लागतात.

जांब (बु.) (२३.३२० कि.मी.), सावरगाव ( ३२.५०० कि.मी.), मुखेड (४५.५२० कि.मी.), सलगरा (खु.) (५३.५०० कि.मी.), रातोळी (५५.४२० कि.मी.), गडगा (६३.०० कि.मी.), नरसी जं. (७२.०२० कि.मी.), लोहगाव (७६.२५० कि.मी.), तळणी (८०.२०० कि.मी.), बिलोली तालुका मुख्यालय (९२.०० कि.मी.), कार्ला (बु.) (१००.०० कि.मी.), येसगी (१०३.२०० कि.मी.).

रस्त्यावरून सुरू होणारे व ओलांडणी करणारे महत्त्वाचे मार्ग.

| | | |
|---|---|---|
| जाब बु.ा कि.मी. २३.३२० | कंधार-जांब-उदगीर मार्ग | रा. मा. २२२ |
| मुखेड कि.मी.४५.५०० | लोहा-कंधार-खानापूर-कोंडलवाडी | रा. मा. २२३ |
| लोहगाव फाटा कि. मी. ७८.०० | हदगाव-भोकरी-उमरी-लोहगाव रस्ता | रा. मा. २२९ |
| बिलोली कि. मी. ९८.८०० | आदमपूर-बिलोली धर्माबाद रस्ता | रा.मा. २२७ |
| कार्ला कि. मी. ९९.०० | सगरोळी-कार्ला-कोंडलवाडी | रा. मा. २२३ |
| नरसी कि.मी. ७२.०० | औरंगाबाद-जालना-परभणी-नांदेड-हैद्राबाद. | प्र. रा. मा.६ |

Maharashtra State Gazetteers

या मार्गास अनेक जिल्हा मार्ग मिळतात व काही जिल्हा मार्ग या मार्गास छेदतात. या मार्गावर मुखेड बिलोली येथे शासकीय विश्रामगृहे आहेत. तसेच या मार्गावर कि. मी. ५५.४२० रातोळी गावा जवळ मनार नदीवर पूल आहे. हा मार्ग डांबरी पृष्ठभागाचा असून वर्षभर वाहतुकीस खुला असतो. या मार्गावर मे. २००५ मध्ये कि.मी. ७२.०२० नरसी जंक्शन येथे सरासरी वाहतूक भार १७,६२५ मे. टन नोंदवली असून त्यामध्ये ३,३०७ जलदगती वाहने तर १,२६४ मंदगती वाहने धावल्याची नोंद आहे.

**१०) करडखेड-हाणेगाव-मरपल्ली ते राज्य सीमा (रा.मा.२२६) :** हा रस्ता नांदेड जिल्हा राज्य महामार्ग १६८ पासून कि. मी. ०.०० मध्ये सुरू होतो व पुढे मरखेल-हानेगाव मार्गे कर्नाटक राज्यात कि. मी. २१ मध्ये संपतो व पुढे औरादकडे संक्रमन करतो. हा मार्ग एकूण २१.०० कि.मी. लांबीचा असून ३.७५ मीटर डांबरी पृष्ठभागाचा आहे व हा मार्ग उत्तरेकडून दक्षिणेकडे प्रवास करतो.

या मार्गावर करडखेड (१.०० कि. मी.), मरखेल (६.५०० कि. मी.), हानेगाव (१७.५०० कि. मी.), ही महत्त्वाची गावे लागतात.

या रस्त्यावरून सुरू होणारे व ओलांडणी करणारे महत्त्वाचे मार्ग खालील प्रमाणे आहेत.

करडखेड १ कि.मी. व राज्य माहामार्ग १६८ तर मरखेल कि.मी. ६.५०० वर प्रमुख जिल्हा मार्ग ६५ तर हानेगाव कि.मी. १७.५०० वर प्रमुख जिल्हा मार्ग ६६ पार करतात. या मार्गावर मरखेल येथे मे २००५ मध्ये सरासरी वाहतूक भार १७६२५ मे. टन झाली होती. हा मार्ग वहातुकीस वर्षभर खुला असतो.

**११) प्रमुख राज्य महामार्ग ६ औरंगाबाद-जालना-परभणी-बसमत-नांदेड-देगलूर-ला जोडून आदमपूर-बिलोली-कोंडलवाडी धर्माबाद-मुधोळ ते राज्य सीमा पर्यंत : (रा.मा.२२७)** सदरील रस्त्याचा हा भाग भोकर विभागाच्या कार्यक्षेत्रातील असून नांदेड जिल्ह्यातील बिलोली तालुक्यामधून या मार्गाची प्र.रा.मा.६ पासून सुरूवात होते व बिलोली तथा धर्माबाद तालुक्यामधून राज्य सीमा वर पुढे आंध्रप्रदेशातील बासर व निजामाबाद कडे जातो. या मार्गाची जिल्ह्यातील लांबी ४६.२० कि. मी. इतकी आहे. या मार्गाची रुंदी ३.७५ मीटर तर काही ठिकाणी ५.५० मीटर आहे.

या मार्गावर आदमपूर (२.२०० कि. मी.), मिनकी (७.०० कि. मी.), बडूर (१३.०० कि. मी.), बिलोली (१९.५०० कि. मी.), बाभळी (३४.८०० कि. मी.), धर्माबाद तालुका मुख्यालय (४१.०० कि. मी.) इत्यादी गावे लागतात. या मार्गावर बिलोली व धर्माबाद येथे शासकीय विश्रामगृहे आहेत.

या मार्गावर कि. मी. ३३.५०० मध्ये गोदावरी नदीवर उंच मोठा पूल असून कि.मी. ४१.०० मध्ये धर्माबाद जवळ नांदेड-सिकंदराबाद ब्रॉडगेज रेल्वे लाईन क्रॉसिंग व धर्माबाद येथे रेल्वे स्थानक आहे.

या मार्गास खालील रस्ते मिळतात.

| गावाचे नाव | रस्त्याचे नाव | राज्यमार्ग क्रमांक |
|---|---|---|
| बिलोली कि. मी. १९.२५० | शिरुर ताजबंद मुखेड-नर्सी-बिलोली-येसगी रस्ता | रा.मा. २२५ |
| कोंडलवाडी कि. मी. २७.०० | कुंभारगाव-कोंडलवाडी नागणी रस्ता | प्र.जि.मा. ३५ |
| कोंडलवाडी कि. मी. २८.२०० | कुंभारगाव-आरळी-कोंडलवाडी-नागणी रस्ता | प्र.जि.मा. ३५ |
| बाबळीफाटा कि. मी. ३८.०० | कारेगाव-धर्माबाद रस्ता कि. मी. ८८.०० | प्र.जि.मा. ७१ |
| धर्माबाद कि. मी. ४२.०० | मुदखेड-उमरी-रामखडक-धर्माबाद. | रा.मा. ४४ |

या मार्गावर कि. मी. १३.४०० वर बडूर येथे मे २००५ मध्ये ४,९६२.२५ मे. टन सरासरी वहातूक भार झाली तर धर्माबाद कि. मी. ४१ मध्ये (रत्नाळी रेल्वे गेट) येथे वाहतूक भार ७,१८५ मे. टन झाली होती. हा मार्ग डांबरी पृष्ठभागाचा असून वहातुकीस वर्षभर खुला असतो.

**१२) उमरी-बळेगाव-नायगाव-(रा.मा. २२८) :** हा रस्ता उमरी येथे कि. मी. ०.०० पासून सुरू होऊन बळेगाव-कुंटूर मार्गे येऊन नायगाव येथे औरंगाबाद-जालना-परभणी बसमत-नांदेड-देगलूर-हैद्राबाद प्रमुख राज्य महामार्ग क्रमांक ६ ला कि. मी. २९.१० ला मिळतो. हा मार्ग उत्तरेकडून दक्षिणेकडे संक्रमण करतो. या रस्त्याची जिल्ह्यातील एकूण लांबी २९.१० कि. मी. असून तो पूर्ण ५.५० मीटर रुंदीचा असून पूर्ण डांबरी आहे.

सदरील रस्त्याची भोकर या विभागाअंतर्गत उमरी लोहगाव रा. मा. २२९ उमरी गावाजवळ कि. मी. ५६.०० पासून सुरू होतो व उमरी तालुक्याच्या हद्दीपर्यंत कि. मी. १०.४०० आहे. अशा प्रकारे नांदेड जिल्ह्यातील उमरी तालुक्यातील एकूण लांबी १०.४० कि. मी. असून हा रस्ता ३.७५ मी. रुंदीस डांबरी पृष्ठभागाचा आहे. या मार्गास खालील गावे लागतात. तळेगाव (२.४०० कि. मी.), बळेगाव (१०.४०० कि. मी.). या मार्गावर कि. मी. १०.२०० मध्ये बळेगावाजवळ गोदावरी नदीवर मोठा पूल असून पुराच्या वेळी पूलावरून पाणी वहात असल्यामुळे काही काळ हा मार्ग वहातुकीस बंद होतो. या मार्गावर कुंटूर (१९.५०० कि. मी.), कोकलेगाव (२३.०० कि. मी.), शेलगाव (२७.०० कि. मी.), नायगाव (२९.१०० कि. मी.), ही महत्त्वाची गावे लागतात.

या रस्त्यावरून सुरू होणारे व ओलांडणी करणारे महत्त्वाचे रस्ते.

| | | |
|---|---|---|
| सातेगाव कि.मी. १५.५०० | पारवा-पेनूर-कोंडलवाडी-नागणी राज्य सीमा | प्र.जि.मा. ३५ |
| कुंटूर कि.मी. १९.५०० | लोहराळ-नगाखाडी घुंगराळा फाटा कुटूंर | प्र.जि.मा. ३६ |
| नायगाव २९.१०० कि.मी. | औरंगाबाद-जालना-परभणी-बसमत-नांदेड-देगलूर-हैदाबाद | प्र.जि.मा. ६ |

या मार्गावरील बळेगाव येथे गोदावरी नदीवर सन १९८१ मध्ये मोठा पूल बांधण्यात आला असून त्यासाठी ५५,४३,६१६ रुपये खर्च झाला. या मार्गावर कि.मी. ११.२०० मध्ये बळेगाव येथे सन १९८६ मध्ये आर. सी. सी. पूल बांधला असून त्यासाठी १०,३४,४७३ रुपये खर्च आला. या मार्गावर कि.मी.

Maharashtra State Gazetteers

८.२०० मध्ये बळेगाव फाटा येथे मे २००५ मध्ये सरासरी वहातूक भार ५७१६ मे.टन इतकी झाली होती. हा मार्ग वर्षभर वहातुकीस खुला असतो.

**१३) हदगाव-भोकर-उमरी-लोहगाव-(रा.मा.२२९) :** या मार्गाची सुरूवात हदगाव शहरातून कि. मी. ०.०० मध्ये सुरू होऊन तामसा-भोकर-उमरी मार्गे लोहगावला कि. मी. ८८.७०० ला मिळतो. या मार्गाची एकूण लांबी ८८.७० कि. मी. असून पूर्ण डांबरी पृष्ठभागाची आहे. हा मार्ग जिल्ह्यात उत्तरेकडून दक्षिणेकडे मार्ग संक्रमण करतो. या मार्गाची भोकर तालुक्यातील लांबी २८.४० कि. मी. उमरी तालुक्यातील २९.२० कि.मी. तर बिलोली तालुक्यातील १६.३० कि.मी. इतकी आहे. या मार्गाची रुंदी काही ठिकाणी १०.०० मीटर तर काही ठिकाणी ३.७५ मीटर इतकी आहे. मुदखेड ते सिकंदराबाद जाणारा रेल्वेमार्ग उमरी गावाजवळ (कि. मी. ५११.८००) मधून जातो.

या मार्गावर खालील महत्त्वाची गावे लागतात तामसा (१४.६०० कि. मी.), धावरी (२६.१०० कि. मी.), भोकर (३२.८०० कि. मी.), हस्सापूर (३६.२०० कि. मी.), हाळदा (३९.२०० कि. मी.), मोघाली (४२.२०० कि. मी.), सोमठाणा (५०.०० कि. मी.), उमरी (५५.०० कि. मी.), आमठाणा (४१.५०० कि. मी.), गोळेगाव (६५.८०० कि. मी.), कारेगाव फाटा (६९.५०० कि. मी.), राहेर (७१.१०० कि. मी.), तोरणा (७३.८०० कि. मी.), इत्यादी.

या मार्गावर कि.मी. ७२.०० मध्ये नदीवर राहेर जवळ मोठा पूल आहे. राहेर येथे नृरसिंहाचे हेमाडपंथी पवित्र मंदिर आहे. तसेच कि.मी. ५४ मध्ये सिंकदराबाद ब्रॉडगेज रेल्वे लाईन क्रॉसिग व उमरी येथे रेल्वे स्थानक आहे.

सदरील रस्त्यावर येणारे खालील संगमस्थान व क्रॉसिंग आहेत.

| गावाचे नाव | रत्याचे नाव | राज्यमार्ग क्रमांक |
|---|---|---|
| तामसा १४.६० कि. मी. | अर्धापूर-तामसा-हिमायतनगर | रा.मा.२० |
| धावरी २६.१०० कि. मी. | जोडरस्ता धावरी | प्र.जि.मा. २७ |
| भोकर ३२.८०० कि. मी. | कल्याण-परभणी-नांदेड-भोकर निर्मल रस्ता | रा.म.मा.२२२ |
| सोमठाणा ५० कि. मी. | उमरी रामखडक धर्माबाद रस्ता | प्र.जि.मा. २९ |
| उमरी ५२.८०० कि. मी. | नांदेड सिंकदराबाद रेल्वे लाईन | ब्रॉडगेज लाईन |
| उमरी ५२.८०० कि. मी. | उमरी बळेगाव-धर्माबाद | रा.मा.२२९ |
| कारेगाव फाटा ६९.५०० कि.मी. | मुदखेड कारेगाव-धर्माबाद | प्र.जि.मा. ७१ |
| तोरणा ७३.८०० कि. मी. | कोंडलवाडी-कुंभारगाव | प्र.जि.मा. ३५ |
| गागलेगाव | कोंडलवाडी कुंभारगाव | प्र.जि.मा. ५७ |
| लोहगाव ८८.७०० कि. मी. | मुखेड नर्सी बिलोली | रा.मा.२२५ |

एचएफ ४२१०—४४अ

Maharashtra State Gazetteers

या मार्गावर कि. मी. ३२.२०० मध्ये धानोराजवळ मे २००५ मध्ये १२,३९२.२५ मे. टन वाहतूक भार झाली तर लोहगाव फाटा येथे ८,६२७.२५ मे. टन तर तामसा येथे कि. मी. १४.६०० मध्ये ५१३० मे. टन वाहतूकभार झाली. या मार्गावर हदगाव भोकर, तामसा येथे शासकीय विश्रामगृहे आहेत. हा मार्ग वहातुकीस वर्षभर खुला असतो.

**१४) मुदखेड-भोकर-किनवट-सारखनी-माहूर-पूसद जिल्हा सीमेपर्यंत (रा. मा. २३०) :** सदरील राज्यमार्ग भोकर विभागाच्या कार्यक्षेत्रामधील नांदेड जिल्ह्यातील मुदखेड शहरापासून सुरू होतो व मुदखेड भोकर हिमायतनगर व किनवट माहूर तालुक्याच्या हद्दीतून यवतमाळ जिल्ह्यात प्रवेश करतो. या मार्गाची जिल्ह्यातील एकूण लांबी १५७.६० कि. मी. असून त्यापैकी मुदखेड तालुक्यात ५.२० कि. मी., भोकर २६.८० कि. मी., हिमायतनगर २५.०० कि.मी., किनवट ७२.०० कि. मी. माहूर तालुक्यात २८.६० कि. मी. इतकी लांबी आहे.

या मार्गाची रुंदी १०.०० मी. (Top Width) असून डांबरी पृष्ठभागाची आहे. या मार्गावर भोकर, हिमायतनगर, किनवट येथे रेल्वे स्थानके आहेत. तसेच येथे शासकीय विश्रामगृहे आहेत. या मार्गावर कि. मी. २५.२०० मध्ये सुधा नदीवर मोठा पूल आहे.

या मार्गावर खालील महत्त्वाची गावे लागतात. पाडुर्णी (१०.६०० कि. मी.), भोकर (२१.०० कि. मी.), सोमठाणा (२८.२०० कि. मी.), इस्लापूर (५८.०० कि. मी.), थारा (८०.०० कि. मी.), बोधडी (८४.२०० कि. मी.), चिखली (९०.८०० कि. मी.), किनवट (१०३.७०० कि. मी.), घोटी (१०८.६८० कि. मी.), लोणी (११३.६३० कि. मी.), सारखणी (१२८.०२० कि. मी.), वाई (१३८.५०० कि. मी.), माहूर (१५२.८०० कि. मी.) ही महत्त्वाची स्थानके लागतात. या मार्गावर भोकर, किनवट, माहूर येथे शासकीय विश्रामगृहे आहेत.

या मार्गावर कि.मी. २१.६०० जवळ भोकर जिल्हा परिषद शाळेजवळ मे. २००५ मध्ये ६,३४४.७५ मे. टन सरासरी वाहतूक झाली तर हिमायतनगर जवळ कि. मी. ४५.३०० मध्ये मे. टन २००५ मध्ये १०,३८० मे. टन वाहतूक झाली तर चिखली जवळ १२,७८६ मे. टन सरासरी वाहतूक भार नोंदविला व माहूर जवळ कि. मी. १६४.६०० मध्ये सरासरी वहातूक भार १२,३६९.७५ मे. टन झाली होती.

या मार्गावर भोकर, माहूर, किनवट, येथे शासकीय विश्रामगृहे आहेत.

**१५) चिखली-बोथ राज्य सिमेपर्यंत रा. मा. २३१ :** सदरील राज्य मार्गाची या विभागाअंतर्गत येणारी नांदेड जिल्ह्यातील किनवट तालुक्यातील एकूण लांबी १०.२० कि. मी. आहे. या लांबीपैकी २.२० कि.मी. लांबी ३.७५ मीटर डांबरीपृष्ठभागाची व ८.०० कि. मी. लांबी ५.५० मी. रुंदीची आहे. हा मार्ग डांबरी पृष्ठभागाचा असून वहातुकीस वर्षभर खुला असतो. या मार्गावर देहगाव (१.७५० कि. मी.), पाटोदा (५.२०० कि. मी.), ही महत्त्वाची गावे लागतात. या मार्गाची रस्त्याची रुंदी १०.०० मी. (Top Width) असून रस्त्याची हद्द रस्त्याच्या मध्यभागापासून दोन्ही बाजूमध्ये १५.०० मी. अंतरापर्यंत आहे. या मार्गावर पाटोदा जवळ कि. मी. ५.२०० मध्ये मे २००५ मध्ये सरासरी वहातूक भार १२,३१८.१५ मे. टन झाल्याची नोंद आहे. हा मार्ग वहातुकीस वर्षभर खुला असतो.

Maharashtra State Gazetteers

**१६) आर्वी-वर्धा-वायेगाव-राळेगाव-घाटंजी-पारवा-मांडवी रस्ता (रा. मा. २५७) :** सदरील रस्ता या विभागाकडे नांदेड जिल्ह्यातील किनवट तालुक्यामध्ये राज्यमार्ग क्रमांक १८३ मध्ये माडंवी गावापासून सुरू होतो व यवतमाळ जिल्ह्याकडे जातो. या मार्गाची नांदेड जिल्ह्यातील लांबी फक्त ७.०० कि. मी. असून या लांबी मध्ये काही ३.७५ मी. तर काही भागाची रुंदी ५.०० इतकी आहे.

या मार्गावर कि.मी. १८३.०० वर उनकेश्वर हे गाव लागते.* या मार्गावर पेनगंगा नदीवर मोठा पूल असून पावसाळ्यात अतिवृष्टी व महापूराचे वेळी पुलावरून पाणी वाहत असल्यामुळे वाहतूक काही काळ बंद पडते.

या मार्गावर उनकेश्वर जवळ मे २००५ मध्ये १३,७३१.७५ मे. टन वहातूक भार झाली होती.

## प्रमुख जिल्हा मार्ग

राज्य महामार्गामुळे राज्यातील प्रमुख शहरे एकमेकांशी जोडली जातात, तर प्रमुख जिल्हा मार्ग हे जिल्ह्यातील प्रमुख गावांना एकमेकाशी जोडतात. रस्ते विकास योजनेच्या मार्गदर्शक सूचनाप्रमाणे जिल्ह्यातील सर्व १५०० व त्यावरील लोकसंख्येची गावे प्रमुख जिल्हामार्गाने जोडण्याचे प्रस्तावित करण्यात आलेले आहे. तसेच ५०% जिल्हा मार्ग दिड पदरी व जास्त वाहतूक आलेल्या मार्गांचे दुपदरीकरण व चौपदरीकरण प्रस्तावित करण्यात आले आहे. जिल्ह्यातील सर्व बाजार मुख्यालय मार्गदर्शक सूचनेप्रमाणे प्रमुख जिल्हा मार्गाने जोडण्यात आली आहेत. नांदेड जिल्ह्यामध्ये सन १९६६-६७ मध्ये ३७८ कि.मी., १९७२-७३ मध्ये ६६८ कि.मी., १९८८-८९ मध्ये १३१५ कि. मी., तर १९९७-९८ मध्ये १,६३० कि. मी. लांबीचे प्रमुख जिल्हा मार्ग अस्तित्वात होते.

रस्ते विकास योजना २००१-२०२१ नुसार जिल्ह्यात १२३ प्रमुख जिल्हा मार्ग होते, त्यांची एकूण लांबी २९८९.८० कि. मी. इतकी होती. तर नवीन प्रस्तावित मार्गांची लांबी १४७.५० कि. मी. इतकी आहे. सन १९८१-२००१ रस्ते विकास योजना नुसार जिल्ह्यात प्रमुख जिल्हा मार्गाची लांबी २८३६.३० कि.मी. इतकी होती. एकूण प्रमुख मार्गापैकी ४०६.३० कि. मी. लांबीचा मार्ग सार्वजनिक बांधकाम विभाग, २३११.२० कि.मी. लांबीचे मार्ग जिल्हा परिषदेच्या तर १२४.८० कि.मी. लांबीचे मार्ग अन्य मार्गात अंतर्भूत होते. तक्ता क्रमांक २ मध्ये जिल्ह्यातील प्रमुख जिल्हा मार्गांची एकूण लांबी, अस्तित्वात एकूण लांबी व नवीन प्रस्तावित लांबी याची माहिती दिली आहे.

**इतर जिल्हा मार्ग :** हे मार्ग जिल्ह्यातील शहरे, मोठी गावे व खेडी यांना जोडतात. नांदेड जिल्ह्यात १९६६-६७ मध्ये ८७ कि. मी. १९७२-७३ मध्ये ७४१ कि. मी. तर १९८८-८९ मध्ये १,४९२ कि. मी. व २००५ मध्ये १२५९.०५ कि. मी. लांबीचे इतर जिल्हा मार्ग अस्तित्वात होते. रस्ते विकास योजना १९८१-२००१ नुसार जिल्ह्यात इतर जिल्हा मार्गांची एकूण लांबी १५०२.८० कि.मी. इतकी होती. तर रस्ते विकास योजना २००१-२०२१ नुसार जिल्ह्यातील इतर मार्गांची लांबी ११४३.२५ कि. मी. इतकी असून नवीन प्रस्तावित लांबी १०६.४० कि. मी. आहे. तक्ता क्रमांक ३ मध्ये सार्वजनिक बांधकाम विभाग जिल्हा परिषदेच्या नियंत्रणाखालील इतर जिल्हा मार्गांची माहिती दिली आहे.

*. कि.मी. क्रमांक आर्वीकडून दिले आहेत.

Maharashtra State Gazetteers

**ग्रामीण मार्ग :** रस्ते विकास योजनेच्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे १००० पेक्षा कमी लोकसंख्या असलेली गावे तसेच ह्या गावाअंतर्गत येणाऱ्या वाड्या, तांडे, पाडे, उपवस्त्या ज्यांची १०० पेक्षा जास्त लोकसंख्या आहे, अशा सर्व गावांना, वाडींना, तांडे, पाडे यांना ग्रामीण मार्ग दर्जाच्या रस्त्याने जोडण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. ग्रामीण मार्गांची एकंदर लांबी ४६५२.२६ कि.मी. प्रस्तावित आहे. तसेच १९८१-२००१ योजनेमध्ये असलेले योजना बाह्य असलेले रो. ह.योजना कार्यक्रमाअंतर्गत बांधलेले रस्ते यांचाही समावेश करण्यात आला आहे.

ग्रामीण भागात शेती हा मुख्य धंदा असून त्यात सुमारे ७० टक्के लोक काम करतात. शेती व्यवसाय हा अर्थव्यवस्थेचा कणा असून नांदेड जिल्हाही त्यास अपवाद नाही. नांदेड जिल्ह्यात ७० टक्क्यापेक्षा जास्त लोक शेती व्यवसाय करतात. ग्रामीण भागाचा आर्थिक विकास हा शेतमालाचे उत्पादन वाढविणे आणि त्यास योग्य बाजारपेठ उपलब्ध करून देणे यावर अवलंबून असते. शेतमालाचे अधिक उत्पादन, सुधारित बी-बीयाणे, खते, अवजारे शेतीच्या नवनवीन शास्त्रीय पद्धती यांच्या आधारे करता येते. परंतु बाजारपेठा जरी उपलब्ध केल्या तरी बाजारपेठापर्यंत शेतमाल घेऊन जाण्यासाठी रस्त्यांची विशेषतः दळणवळणाच्या दृष्टीने बारमाही वाहतुकीस उपयोगी पडतील अशा रस्त्यांची नितांत गरज असते. याच जाणीवेतून स्वातंत्र्यपूर्व काळात ग्रामीण भागातील रस्त्यांचा अभाव तसेच अस्तित्वात असलेल्या रस्त्यांची दुर्दशा लक्षात घेवून नागपूर योजनेत ग्रामीण भागातील रस्ते बांधणीस महत्त्व दिले. स्वातंत्र्योत्तर काळातही ग्रामीण भागातील रस्त्यांच्या विकासाकडे विशेष लक्ष दिले. हैद्राबाद योजना या नावाने प्रसिद्ध असलेल्या १९६०-६१ व १९८०-८१ या वीस वर्षाच्या रस्ते विकास योजनेत ग्रामीण भागातील रस्ते विकासावर विशेष भर दिला होता.

निजाम राजवटीत ग्रामीण मार्गाकडे विशेष लक्ष दिले गेले नव्हते. जिल्ह्यात सन १९६६-६७ मध्ये ५२५ कि. मी., १९७२-७३ मध्ये ३,०३६ कि. मी. तर सन १९८८-८९ मध्ये १,३९६ व मे २००५ मध्ये ३,८१५ कि. मी. लांबीचे ग्रामीण मार्ग अस्तित्वात होते.

नांदेड जिल्ह्यात रस्ते विकास योजना १९८१-२००१ अन्वये जिल्ह्यातील ग्रामीण मार्गांची एकूण लांबी ५२४६.०९ कि. मी. होती तर रस्ते विकास योजना २००१-२०२१ नुसार १६२३.८० कि.मी. ग्रामीण रस्ते प्रस्तावित आहेत. मार्च २००१ मध्ये प्रत्येक तालुक्यातील ग्रामीण मार्गाची लांबी पुढील प्रमाणे होती. माहुर ३००.१५, किनवट ६०५.८५, हिमायतनगर १२८.२०, हदगाव ३४०.६०, अर्धापूर ७४.५९, नांदेड २१४.३१, मुदखेड १२४.२४, भोकर २२३.८५, उमरी १६५.५०, धर्माबाद ७२.५०, बिलोली २६७.२०, नायगाव (खै) २६६.९०, लोहा ४३५.८०, कंधार ४८७.९७, मुखेड ५१८.०० देगलूर ३७९.२० कि.मी. होती.

**पूल :** नांदेड जिल्ह्यातून गोदावरी, लेंडी, मनार, मांजरा, आसना, पैनगंगा व सीता सींध या उपनद्या जात असल्याने अनेक ठिकाणी जागोजागी पूल बांधण्यात आले आहेत तर काही ठिकाणी मार्गावर येणाऱ्या नाल्यावरही पूल बांधण्यात आले आहेत. नांदेड जिल्ह्यामध्ये गोदावरी नदीवर मुंबई-अहमदनगर-बीड-नांदेड-जगदाळपूर प्रमुख राज्य मार्गावर कि.मी. ५३५/४०० ते ८०० मध्ये सन १९२९ मध्ये स्टोन मेसोनरी आर्च ब्रिज बांधण्यात आला असून त्यासाठी ८ लाख रुपये खर्च झाले होते.

या पुलाची उंची १८.०० मीटर व रुंदी ६.४० मीटर असून पुलाची एकूण लांबी ४२५ मीटर इतकी असून त्यामध्ये २०.७५ मीटरचे १५ गाळे, २२.५० मीटरचे ६ गाळे आहेत. तसेच औरंगाबाद-जालना-परभणी-बसमत-नांदेड-देगलूर-हैद्राबाद प्रमुख राज्य मार्ग ६ वर कि.मी. ३३८.३०० लेंडी नदीवर सन १९३० मध्ये बांधण्यात आलेल्या मेसोनरी आर्च ब्रिज हा १२१.९ मीटर लांबीचा आहे. तसेच कि.मी. ३२७.१०० मध्ये मनार नदीवर सन १९३० मध्ये १.९५ लाख रुपये खर्चून सी. आर. एस. आर्च ब्रिज मेसोनरी आर्च सुपरस्ट्रक्चर पद्धतीचा पूल आहे. त्याची लांबी १२१.९ मीटर आहे.[१४] नांदेड जिल्ह्यात बांधण्यात आलेल्या पूलाची माहिती तक्ता क्रमांक ४ मध्ये देण्यात आली आहे.

**वाहतूक प्रगणना :** नांदेड जिल्ह्यातील सर्व रस्त्यावरील वाहतूक प्रगणनेसंबंधीची संपूर्ण आकडेवारी देणे शक्य नसले तरी जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग, प्रमुख राज्यमार्ग आणि राज्यमार्ग या महत्त्वाच्या मार्गावरील वेगवेगळ्या ठिकाणी मे, २००५ मध्ये झालेली वाहतूक भार (Load Transport) या विषयी आकडेवारी तक्ता क्रमांक ५ मध्ये दिली आहे. यावरून असे दिसून येते की, राष्ट्रीय महामार्ग कल्याण-अहमदनगर-पाथर्डी-माजलगाव-परभणी-नांदेड-भोकर निर्मल आंध्रप्रदेश रा. म. मा. क्र. ७ ला मिळणारा राष्ट्रीय महामार्ग क्र.२२२ वर कि.मी. ५५४.०० भोकर फाटा येथे २०,३१३.३५ मे.टन प्रतिदिन वाहतूक भार झाली होती. तसेच त्यामध्ये जलदगती वाहने ३,१९८.६ तर मंदगती ६७९.४९ वाहने धावण्याची नोंद आहे. तसेच औरंगाबाद-जालना-परभणी-बसमत-नांदेड-देगलूर-हैद्राबाद मार्ग प्रमुख राज्य मार्गावरील देगलूर येथे कि.मी. ३३९.०० मध्ये एकूण सरासरी वाहतूक भार ३५,१०१ मे. टन झाली होती. त्यामध्ये ८,२६३ जलदगती वाहने तर २,०२० मंदगती वाहने धावली होती.

## रेल्वेमार्ग

नांदेड आणि नांदेड लगतच्या परभणी, औरंगाबाद जिल्ह्यातील कापूस व इतर अन्नधान्यांनी संपन्न असलेल्या जिल्ह्यांमध्ये हैद्राबादच्या निजामाने सन १८९९ मध्ये प्रथम हैद्राबाद-मनमाड रेल्वे सेवा सुरू केली. या मार्गास प्रथम गोदावरी व्हॅली मार्ग असे संबोधले होते. नंतर या मार्गाचे रुपांतर काचीगुडा मनमाड असे करण्यात आले.[१५]

सन १९३१ मध्ये मुदखेड-अदिलाबाद दुसरा रेल्वे मार्ग वाहतुकीस खुला करण्यात आला. सध्या या दोन्ही मार्गांची जिल्ह्यातील एकूण लांबी २२५.६१ कि.मी. आहे. त्यापैकी मनमाड-मुदखेड या मार्गाची लांबी ९३.४७ कि.मी. तर मुदखेड-अदिलाबाद मार्गाची लांबी १३२.१४ कि.मी. इतकी आहे. हे मार्ग पूर्वी मीटरगेज होते परंतु सन १९९५ मध्ये पूर्णा-नांदेड या मार्गाचे रुंदमापी मार्गामध्ये रुपांतर करण्यात आले. तर सन १९९६ मध्ये नांदेड-मुदखेड मार्गाचे तसेच सन २००७ मध्ये मुदखेड-किनवट मार्गाचे रुंदमापी रुपांतर करण्यात आले.

---

१४. **नांदेड जिल्हा गॅझेटिअर**, १९७१, पृष्ठ ३६८.

१५. कित्ता, पृष्ठ ३५६.

Maharashtra State Gazetteers

मुदखेड-किनवट रुंदमापी मार्गास ९० कोटी रुपयाचा निधी आवश्यक होता. यापैकी ६० कोटी रुपये द.म.रेल्वे विभाग तर ३० कोटी रुपये केंद्रीय रेल्वे विभागाकडून उपलब्ध करण्यात येणार होते.[१६]

दि.३१ मार्च २००३ पर्यंत हे मार्ग दक्षिण-मध्य रेल्वे, हैद्राबाद विभागाच्या नियंत्रणाखाली होते. तथापि १ एप्रिल २००३ मध्ये नांदेड विभागाची निर्मिती झाली व या विभागाचे मुख्यालय नांदेड येथेच करण्यात आले. यामुळे एकूणच मराठवाड्याच्या सर्वांगिण विकासाला चालणा मिळाली. सन २००४-०५ मध्ये रेल्वेमुळे १.०९ लाख रुपये स्थूल जिल्हा उत्पादन तर ०.९२ लाख रुपये निव्वळ जिल्हा उत्पन्न प्राप्त झाले.

**मनमाड-काचिगुडा मार्ग :** हा मार्ग जिल्ह्यात कि.मी. क्रमांक ३३८.२८ ते कि.मी. क्रमांक ४२१.०३ पर्यंत जात असून जिल्ह्यातील कि.मी. क्रमांक ३३३.५४ ते ३७३.४० पर्यंतचा मार्ग नांदेड जिल्ह्यामध्ये येतो. त्यानंतर कि.मी. ३७३.४० ते कि.मी. क्रमांक ४२७.०१ पर्यंतचा भाग हैद्राबाद विभागामध्ये येतो. म्हणजे या मार्गाची नांदेड विभागाची लांबी ९३.४७ कि.मी. इतकी आहे.

या मार्गावर खालील स्थानके आहेत. लिंबगाव (३३८.२८ कि.मी.)[१७], वाणेगाव (३४३.० कि.मी.), नांदेड (३४९.३८ कि.मी.), पाथरड (३५९.३६ कि.मी.), मुगट (३६२.६१ कि.मी.), मुदखेड (ज) (३७१.८७ कि.मी.), शिरुणगाव (३७८.०३ कि.मी.), सेलगाव (३८३.८५ कि.मी.), उमरी (३९१.५५ कि.मी.), बोलसा (४००.०० कि.मी.), करखेली (४०७.४४ कि.मी.), सामराळा (४१४.६१ कि.मी.), धर्माबाद (४२१.०३ कि.मी.). या नंतर हा मार्ग सिकंदराबादकडे जातो. या मार्गावरून मालाची व प्रवाशांची मोठी वाहतूक होते. महत्त्वाच्या स्थानकामध्ये प्रवाशांसाठी प्रतिक्षा कक्ष, पाण्याची व वीजेची सोय तसेच शौचालय, उपहारगृह, प्रवाशांना बसण्यासाठी बाके इ. सोयी करण्यात आल्या आहेत.

मूळ नांदेड रेल्वे स्टेशनच्या जवळच २ कि.मी. अंतरावर मालटेकडी नावाचे नवीन रेल्वे स्टेशन नांदेड-मुदखेड मार्गावर गुरु-ता-गद्दी निमित्ताने विकसित करण्यात आले असून ते अत्याधुनिक पद्धतीने बांधण्यात आले आहे.

**मुदखेड-अदिलाबाद मार्ग :** मुदखेड-अदिलाबाद हा मार्ग सन १९३१ मध्ये वाहतुकीस खुला करण्यात आला. या मार्गाची जिल्ह्यातील एकूण लांबी १३२.७४ कि.मी. इतकी आहे. मुदखेड येथून सुरू होऊन हा मार्ग जिल्ह्यात ईशान्येकडून नैऋत्यकडे जातो. तसेच पुढे हा मार्ग आंध्र प्रदेशामध्ये सिंकदराबादकडे जातो. हा मार्ग रूंदमापी करण्यात आला आहे.

या मार्गावर मुदखेड (०.० कि.मी.),[१८] जांभळी (९.३३ कि.मी.), नीमबारी (१४.१२ कि.मी.), भोकर (२१.१४ कि.मी.), तेरबन (२९.४६ कि.मी.), देवठाणा (३१.८८ कि.मी.), हदगाव रोड (३९.१० कि.मी.), पारवा खुर्द (४६.६५ कि.मी.), जवळगाव (द्र) (४९.६० कि.मी.), खडकी बाजार (५३.५५ कि.मी.), हिमायतनगर (५७.३७ कि.मी.), जिरोना (८७.८४ कि.मी.), सहस्त्रकुंड (७२.४१

---

१६. दैनिक **प्रजावणी** नांदेड, दिनांक १९ सप्टेंबर २००५, पृ. ४.

१७. कि.मी. क्रमांक मनमाडकडून देण्यात आले आहेत.

१८. कि.मी. क्रमांक मुदखेडकडून देण्यात आले आहेत.

कि.मी.), माहिंबा (७९.६० कि.मी.), धानोरा (८७.८४ कि.मी.), बोधाडी बुजर्ग (१०२.२२ कि.मी.), मदनापूर (११०.५० कि.मी.), किनवट (११६.७४ कि.मी.) अंबाडी (१२४.७४ कि.मी.) ही स्थानके लागतात. या मार्गावरील सर्व स्थानकांवर पिण्याचे पाणी, बसण्यासाठी बाके, उपहारगृहे, शौचालये इ. सोई उपलब्ध केल्या आहेत.

नांदेड जिल्ह्यातील रेल्वे मार्गावरून मालाची मोठ्याप्रमाणात आवक-जावक होते. नांदेड स्टेशनवरून सन २००५-०६ मध्ये २७५ वाघीणी मालाने भरल्या होत्या. त्याचे वजन ०.०१६८ मीलीयन टन होते, तर २००७-०८ मध्ये १४५८ वाघीणी द्वारे ०.९१६ मीलीयन टन मालाची निर्यात झाली तर २००५-०६ मध्ये ७१७० वाघीणीद्वारे माल उतरविण्यात आला. त्याचे वजन ०.४५२८ मीलीयन टन होते. मालामध्ये प्रामुख्याने कापूस, अन्नधान्य, खते यांचा समावेश असतो.

या मार्गांवर सन २००५-०६ ते सन २००७-०८ मध्ये झालेल्या प्रवाशी वाहतुकीबाबतची माहिती तक्ता क्रमांक ६ मध्ये दिली आहे. तर तक्ता क्रमांक ७ मध्ये जिल्ह्यातील रेल्वे पुलाची माहिती दिली आहे.

नांदेड जिल्ह्यातून या मार्गावरून खालील प्रवाशीगाड्या ये-जा करतात.

१) निजामाबाद-पुणे-निजामाबाद (रोज)

२) नांदेड-बंगलुर-नांदेड (रोज)

३) धर्माबाद-मनमाड-धर्माबाद (रोज)

४) रामेश्वर-ओका-रामेश्वर (आठवड्यातून एक वेळा)

५) पाटणा-पूर्णा-पाटणा (आठवड्यातून एक वेळा)

६) हैद्राबाद-परभणी-हैद्राबाद (रोज)

७) अदिलाबाद-परळी-अदिलाबाद (रोज)

८) निजामाबाद-नांदेड-निजामाबाद (रोज)

९) नांदेड-अमृतसर-नांदेड (रोज)

१०) नांदेड-मुंबई-नांदेड (रोज)

११) काचीगुड्डा-नांदेड-काचीगुड्डा (रोज)

१२) निजामाबाद-परळी-निजामाबाद (रोज)

१३) काचीगुड्डा-मनमाड-काचीगुड्डा (रोज)

१४) नागपूर-मुंबई-नागपूर (रोज)

१५) नांदेड-मनमाड (रोज)

१६) सिकंदराबाद-मुंबई (रोज)

Maharashtra State Gazetteers

१७) अदिलाबाद-पूर्णा (रोज)

१८) नांदेड-दौंड-नांदेड (रोज)

१९) नांदेड-पुणे-नांदेड (आठवड्यातून दोन वेळा)

२०) सिकंदराबाद-नांदेड (रोज)

२१) सिकंदराबाद-मनमाड-सिकंदराबाद (रोज)

२२) नागरसोल-नांदेड पॅशेंजर (रोज)

२३) परळी-अदिलाबाद (पॅशेंजर) (रोज)

२४) नांदेड-सिकंदराबाद (पॅशेंजर रोज)

२५) नांदेड-श्रीगंगानगर (साप्ताहिक)

**नवीन प्रस्तावित रेल्वे मार्ग[१९] :** मराठवाड्याचा विचार केल्यास या भागामध्ये दर १०० चौ.कि.मी. मागे रेल्वे मार्गाचे प्रमाण अत्यंत कमी आहे. स्वातंत्र्यानंतर मराठवाड्यात एकही नवीन रेल्वेमार्ग झाला नाही. तेंव्हा राज्य शासनाने काही नवीन रेल्वे मार्ग तयार करण्यासाठी केंद्र शासनाकडे सतत पाठपुरावा करावा अशी महामंडळाद्वारे विनंती करण्यात येते. सुचविण्यात आलेले मार्ग खालीलप्रमाणे आहेत :—

१) परळी, बीड, अहमदनगर, माळशेज कल्याणमार्ग.

२) सोलापूर उस्मानाबाद, कुंथलगिरी-बीड-औरंगाबाद, वेरूळ-अजिंठा-जळगाव मार्ग (सर्वेक्षणाचे काम लवकर पूर्ण करणे.).

३) रोहेगाव-पूणतांबा मार्ग (सर्वेक्षणाचे काम लवकर पूर्ण करणे).

४) बोधन-देगलूर-उदगीर मार्ग.

५) मनमाड-मुदखेड मार्गाचे दुहेरीकरण.

६) जालना-खामगाव मार्ग.

तसेच नांदेड विभाग मध्य रेल्वेत समाविष्ट करावा अशी लोकांची अपेक्षा आहे.

## नागरी वाहतूक

नागरी वाहतुकीमध्ये जिल्ह्यातील महानगरपालिका नगरपालिकांच्या शहरातील रस्ते प्रवासी वाहतूक टॅक्सी, ऑटोरिक्षा व इतर वाहने यांचा समावेश होतो. नांदेड शहरामध्ये महाराष्ट्र राज्य परिवहन नांदेड द्वारे चार बसेस द्वारे नांदेडमध्ये वेगवेगळ्या ठिकाणी जाण्यासाठी ८० फेऱ्या केल्या

१९. मराठवाडा वैधानिक विकास मंडळ, वार्षिक अहवाल २००८-०९, पृष्ठ १९.

Maharashtra State Gazetteers

जातात नांदेड शिवाय इतर नगरपालिकेच्या ठिकाणी प्रवासासाठी रिक्षाचा वापर केला जातो. खालील तक्त्यामध्ये १९९३-९४ ते २००५-०६ पर्यंत जिल्ह्यात वाहतुकीच्या साधनात कशा प्रकारे वाढ झाली त्याची आकडेवारी दिली आहे.

**नांदेड जिल्ह्यातील वाहने**

| वर्ष | प्रवासी वाहने | | | | | | मालवाहतूक वाहने | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | बसेस | मोटारी आणि स्टेशन वॅगन | जीप | टॅक्सी | तीन चाकी वाहने रिक्षा | दुचाकी वाहने | चार चाकी | तीन चाकी | ट्रॅक्टर्स | जड वाहने | इतर वाहने | इतर | एकूण |
| १९९३-९४ | ४२६ | ७४५ | ९९४ | ७९ | १,५६७ | २४,१३५ | २,३४२ | — | ९९२ | ९९७ | २२ | ३२ | २९९ |
| १९९८-९० | ४२७ | ५८७ | ६२७ | १७ | ६५० | १७,८६३ | १,७९७ | १४२ | ७१६ | ७१२ | ११ | २३ | ४५९ |
| १९९९-२००० | ४५४ | २४०४ | ३१३७ | १४२ | ४,८६२ | ४३,५१० | ५,०७९ | ६ | १,९१९ | १,७६२ | ४१ | ६३ | ३१६ |
| २००५-०६ | ४२६ | ४२ | ९,३२० | १६८ | १०,११८ | ७८,२८४ | ९७४ | १७५ | ५,१०२ | ५,४९९ | ३२ | ११० | २१२ |

## रस्ते अपघात

महाराष्ट्रात मुंबई, पुणे, ठाणे व नागपूर जिल्ह्यात रस्ते अपघाताचे प्रमाण जास्त असून इतर जिल्ह्यामध्ये हे तुलनात्मक प्रमाण कमी आहे. सन १९९९ मध्ये जिल्ह्यात झालेल्या वेगवेगळ्या अपघातामध्ये १६२ व्यक्ती मृत्यूमुखी पडल्या होत्या तर ९३८ व्यक्तिंना अपघातामुळे दुखापत झाली होती. खालील तक्त्यामध्ये नांदेड जिल्ह्यात घडलेल्या प्राणांतिक व क्षतिकार अपघाताची आकडेवारी दिली आहे.[२०] रस्ते अपघात यामध्ये नांदेड जिल्ह्यात डोर्ली येथे मोठा अपघात झाला होता. तसेच डिसेंबर, २००८ मध्ये नांदेड येथे मा. मुख्यमंत्री यांनी भेट दिली त्यावेळी सलामी देऊन पोलीस बॅन्ड पथकाची गाडी तरोडा नाका येथे उलटून अपघात झाला. यात एक पोलीस ठार तर ५० जण जखमी झाले.

| वर्ष | प्राणांतिक अपघात | क्षतिकारक अपघात | एकूण |
|---|---|---|---|
| २००१ | १२२ | ६३५ | ७५७ |
| २००२ | १३८ | ६६९ | ८०७ |
| २००३ | १३४ | ५९९ | ७३३ |
| २००४ | १५४ | ६२५ | ७७९ |
| २००५ | १२२ | ६६६ | ७८८ |

## महाराष्ट्र राज्य परिवहन

मराठवाड्यातील संघटित स्वरूपाच्या प्रवासी परिवहनाचा इतिहास इ. स. १९३२ पासून सुरू होतो. इ. स. १९३२ मध्ये निजाम राज्य सरकारने परिवहन सेवेचे राष्ट्रीयकरण सुरू केले. तथापि

२०. सदर माहिती पोलीस अधीक्षक नांदेड यांनी पाठविलेल्या माहितीवर आधारित आहे.

Maharashtra State Gazetteers

राष्ट्रीयीकृत परिवहन सेवेचा लाभ या जिल्ह्याला अत्यल्प झाला. एक तर चांगल्या रस्त्यांचा अभाव व दुसरे म्हणजे या सेवेची व्याप्ती अगदीच कमी होती. त्यामुळे काही मार्गावर खाजगी परिवहन सेवा सुरू होती. तिचीही स्थिती अत्यंत खराबच होती. जुन्या पुराण्या बसगाड्या, त्यांचा अनियमितपणा व प्रवाशांचे हाल हीच त्यांची विशेषता होती. परंतु हैद्राबाद राज्याचे विभाजन झाल्यानंतर मराठवाडा राज्य परिवहन ही संघटना औरंगाबाद येथे अस्तित्वात आली. नोव्हेंबर, १९५६ मध्ये राज्य पुनर्रचनेनंतर मराठवाड्यातील परिवहन सेवेसाठी एक स्वतंत्र विभाग अर्थातच मुंबई राज्य शासनाच्या अधिकाराखाली होता. तो विभाग ट्रान्सफर्ड रोड अंडरटेकींग विभागाच्या प्रशासनाखाली आणण्यात आला. त्यानुसार इ. स. १९६१ पासून जिल्ह्यामध्ये महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाकडून परिवहन सेवा राबविली जात आहे.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस उतारूंच्या मोटार वाहतुकीच्या राष्ट्रीयकरणाचे प्रमण ३४ टक्के होते. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस हे प्रमाण ५३ टक्क्यापर्यंत वाढविण्याचे ठरले. तिसऱ्या योजनेत अधिक बस स्थानके व मध्यंतरीचे थांबे बांधणे आणि उतारूना अधिक सुखसोयी प्राप्त करून देणे यांचा समावेश होता.

नांदेड जिल्ह्यात मार्च, २००३ मध्ये अनुक्रमे १० आगारे होती ती खालीलप्रमाणे—नांदेड १, नांदेड २, भोकर, किनवट, मुखेड, देगलूर, कंधार, हदगाव, बिलोली, माहूर. या जिल्ह्यात मार्गाची संख्या ४५४ असून जिल्ह्यातील मार्गाची एकूण लांबी ३९,४६२ कि.मी. इतकी आहे. तर कार्यरत गाड्यांची संख्या ४४० असून चालकांची संख्या ९०१ इतकी तर वाहकांची संख्या ८७८ होती. पुढील तक्त्यामध्ये आगारेनुसार कार्यरत गाड्या, चालक व वाहक याची सांख्यकिय आकडेवारी दिली आहे.—

| आगारे (१) | कार्यरत गाड्या (२) | चालक (३) | वाहक (४) |
|---|---|---|---|
| नांदेड-१ | ६७ | १४५ | १४८ |
| नांदेड-२ | ६५ | १३६ | १४३ |
| भोकर | ३७ | ६९ | ७० |
| किनवट | ४२ | ७८ | ७५ |
| मुखेड | ४९ | ९९ | ९६ |
| देगलूर | ५० | ९७ | ९४ |
| कंधार | ४७ | ९७ | ८६ |
| हदगाव | ३६ | ७४ | ६६ |
| बिलोली | ३७ | ७५ | ६९ |
| माहूर | १० | ३१ | ३१ |
| एकूण | ४४० | ९०१ | ८७८ |

प्रवाशांच्या सुखसोयीच्या दृष्टीने प्रत्येक बसस्थानकावर अनेक सोयी उपलब्ध करण्यात आलेल्या आहेत. नांदेड येथे भव्य बस स्थानक बांधले आहे. मागील सात-आठ वर्षात परिवहन सेवेची व्याप्ती

Maharashtra State Gazetteers

शासनाने बरीच वाढवली आहे. नांदेड जिल्ह्यातील परिवहन सेवेसंबंधी मार्च, २००३ ची सांख्यिकीय माहिती खालीलप्रमाणे आहे :—

| अ.क्र. | तपशील | |
|---|---|---|
| १ | वर्षाअखेरीस असलेल्या मार्गाची संख्या | ४५४ |
| २ | मार्गाची एकूण लांबी (कि.मी.) | ३९,४६२ |
| ३ | मार्गाची सरासरी लांबी (कि.मी.) | ८६.९२ |
| ४ | सरासरी दैनिक प्रभारी अंतर (कि.मी.) | १.३६ |
| ५ | गाड्यांची एकूण संख्या | ४४० |
| ६ | गाड्यांचा सरासरी वापर | ९१.९० |
| ७ | प्रवाशांची दैनिक सरासरी | १.५० |
| ८ | वाहतुकीपासून मिळालेले वार्षिक उत्पन्न (हाजारांत) | ६१२१.८७ |
| ९ | दर प्रवाशामागे मिळालेले वार्षिक सरासरी उत्पन्न (रुपयांत) | १११६.०९ |
| १० | उपाहारगृहे व इतर सुविधा | १५० |
| ११ | चालक संख्या | ९०१ |
| १२ | वाहक संख्या | ८७८ |

महाराष्ट्रातील विविध शहरांमध्ये थेट मार्ग परिवहन सेवा उपलब्ध करून देण्याचे शासनाने अलिकडील काळात बरेच प्रयत्न केले असून त्यानुसार नांदेडहून खालील लांब पल्ल्याच्या गाड्या ये-जा करीत आहेत. उदा. नांदेड-हैद्राबाद, सुरत, वरंगल, चंद्रपूर, गुलबर्गा, गांणगापूर, पुणे, मुंबई, आकलूज, भुसावळ, सोलापूर, कोल्हापूर, नागपूर. तक्ता क्रमांक ८ मध्ये गाड्यांची नावे, अंतर (कि.मी.) व परतीच्या फेऱ्या याची माहिती दिली आहे.

नांदेड जिल्ह्यात १४ ठिकाणी कायमस्वरूपी बस स्थानके असून ती नांदेड व इतर तालुक्याच्या ठिकाणी आहेत. कायमस्वरूपी बस स्थानकामध्ये स्थानकांशी संलग्न असलेल्या मार्गावरील वेळापत्रकाचे तक्ते लावलेले आहेत. बाजाराचे दिवशी व यात्रेच्या वेळी उतारूंच्या सोईसाठी खासगाड्या सोडण्याची तरतूद केली असून बाजाराचे दिवस मार्ग व वेळा या गोष्टी वेळापत्रकामध्ये दाखविल्या जातात. तसेच लोकांच्या सोयीच्या दृष्टीने यात्रा, सहली, क्रीडा महोत्सव, लग्नकार्य, परीक्षा, शिबिरे इत्यादींसाठी खास गाड्या पुरविण्याची व्यवस्था करण्यात येते. विद्यार्थी व स्वातंत्र्य सैनिकांना सवलतीच्या दराने पास दिले जातात. त्याचप्रमाणे ज्येष्ठ नागरिक म्हणज ६० वर्षांवरील व्यक्तिंचे अर्धे तिकीट घेतले जाते. तसेच कुष्ठरोग्यांना यापूर्वी फक्त औषधोपचारास जाण्या-येण्यासाठी एस.टी. प्रवास भाड्यात ७५% सवलत दिली जात होती. आता अंध व अपंग व्यक्तीप्रमाणे कुष्ठरोग्यांना देखील कोणत्याही कारणासाठी एस.टी.च्या साध्या बसने प्रवास करताना ओळखपत्रांच्या आधारे प्रवास भाड्यात ७५% सवलत देण्यात येते. तर रोग्यांच्या साथीदारास ५०% सवलत देण्यात येते. तसेच

अंध, मूक, बधीर, मतिमंद, अपंग व्यक्तीस ७५% सवलत तर त्यांच्या बरोबर एका साथीदारास अनुमती देऊन ५०% प्रवास भाड्यात सवलत अनुज्ञेय आहे. राज्य परिवहन कर्मचाऱ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी महामंडळ वेगवेगळ्या स्पर्धा घेत असते. तसेच एस.एस.सी., एच.एस.सी परिक्षेत मेरीट यादीमध्ये आलेल्या महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या मुलांना उत्तेजनार्थ शिष्यवृत्ती दिली जाते. चालक व वाहक यांसाठीही प्रोत्साहन योजना सुरू केली आहे.

प्रत्येक मोठ्या स्थानकावर प्रवाशांच्या सुख सोयीसाठी आरक्षण प्रतीक्षागृह, पाणी, उपाहार गृह, पुस्तकालय, इत्यादी व्यवस्था केलेली आहे.

## जलवाहतुक पद्धती-टोकरा[२१]

नांदेड जिल्ह्यातून गोदावरी ही प्रमुख नदी जात असून जिल्ह्यात प्रामुख्याने पावसाळ्यात जून, जुलै या महिन्यात नदी पार करण्यासाठी टोकऱ्याचा उपयोग केला जातो. नांदेड तालुक्यात विष्णुपूरी प्रकल्पाचे बॅक वॉटर मौजे वाहेगाव येथे येत असून या गावाला संपर्क साधण्यासाठी गावकरी तरसेवेचा, या टोकऱ्याचा वापर करतात. टोकऱ्याचा आकार गोलाकार असून तो ७ फूटा इतका मोठा आहे. जाण्यासाठी ठराविक भाडे घेतले जाते. या शिवाय वारु डॅम मर्नेड नदीलगत बहादूरपुरा येथे टोकरा वाहतूक होते. विष्णुपूरी जवळ गोदावरी नदीतून पावसाळ्यात टोकराद्वारे वाहतूक होते.

## पर्यटकांसाठी सुविधा

नांदेड हे गोदावरीच्या उत्तर तीरावरील प्राचीन ठिकाण आहे. पुराणकाळात पांडव नांदेडला येऊन गेल्याचे सांगतात. मौर्यवंशाचा संबंध या आला असावा शीख धर्मीयांसाठी तर नांदेड शहर भारतात अमृतसरच्या खालोखाल पवित्र व महत्त्वाचे मानले जाते. शिखाचे दहावे धर्मगुरू गुरू गोविंदसिंग यांची येथे समाधी आहे. गुरू गोविंदसिंगांची हत्यारे तेथे ठेवली आहेत. येथील हुजूर साहेब या गुरुद्वाराची इमारत संगमरवरी असून त्यावरील कळस व भिंती सोन्याने मढविलेल्या आहेत. या गुरुद्वारात एक रत्नागार असून त्यातील जडजवाहीर दसरा, दिवाळी, होळी व वैशाखीसारख्या महत्त्वाच्या सणांच्या दिवशी लोकांना पाहण्यासाठी खुले ठेवण्यात येते. गुरुद्वारात यात्रेकरुंच्या सोयीशिवाय दवाखाना, शाळा, स्वस्तमालाची दुकाने इत्यादी कामेही गुरुद्वारानिधीतून चालतात. यांशिवाय शहराच्या निरनिराळ्या भागात हिराघाट, मातासाहेब, शिकारघाट, बंदाघाट, मालटेकडी साहेब, संगत साहेब हे लहान गुरुद्वारा आहेत. नांदेड रेल्वे स्थानकापासून सु.४ कि.मी. वर कळंबच्या राजाने बांधलेला नांदेडचा पडका किल्ला आहे. तेथे आता सुंदर बाग व पाणीपुरवठा केंद्र आहे. हिंदूंचीही देवालये या शहरात नदीकाठी असून त्यात नृसिंह, नागेश्वर, गणपती, राम व महादेव यांची मंदिरे महत्त्वाची आहेत. तसेच मुसलमानांची जामा मशीद व बडी दर्गा ही ठिकाणे प्रसिद्ध आहेत.[२२]

अमृतसर येथील सुवर्ण मंदिराप्रमाणेच सचखंड गुरुद्वार हे शिखांचे दक्षिणेतील श्रद्धास्थान म्हणून प्रसिद्ध आहे. जवळपास पाच एकराचा परिसर व्यापणाऱ्या या परिसरात मुख्य वास्तु तर भव्य बनविली

---

२१. गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय नांदेड यांनी पाठविलेल्या माहितीवरून.

२२. **मराठी विश्वकोश** खंड ८वा प्र. संपादक तर्कतीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी, १९७९, पृष्ठे ३९७-९८.

आहेच. याशिवाय भाविकांच्या सुविधांसाठी धर्मशाळा, लंगर म्हणजेच अन्नछत्र याही वास्तु उभारल्या गेल्या आहेत. या शिवाय नांदेड जिल्ह्यात नांदेड पासून १४० कि.मी. अंतरावर असलेले महाराष्ट्रातील असंख्य भाविकांचे श्रद्धास्थान म्हणजे श्रीक्षेत्र माहूरगड. महाराष्ट्रातील देवीच्या साडेतीन पिठांपैकी माहूर हे एक मुख्य पीठ आहे. अनेक भाविक या स्थळाला भेट देतात. या शिवाय जिल्ह्यात कंधार येथील भुईकोट किल्ला, मुखेड तालुक्यात असलेल्या बेटमोगरा येथे हिंदू-मुस्लिम बांधवांचे श्रद्धास्थान असलेले शिवलिंग बादशहा हे एक प्रसिद्ध स्थळ आहे. येथे हिंदू-मुस्लिम समाजाचे लोक श्रद्धेने एकत्र येतात. राष्ट्रीय एकात्मतेचे उत्तम उदाहरण म्हणून याकडे पाहिले जाते. या शिवाय जिल्ह्यात होट्टल येथील सिद्धेश्वर मंदिर, बिलोलीचा दर्गा, माळेगाव येथील मल्हारी तथा म्हाळसाकांत मंदिर यांची भव्य यात्रा भरते. या यात्रेमध्ये महाराष्ट्रासह आंध्रप्रदेश, गुजरात, कर्नाटक, उत्तर प्रदेश आदि राज्यातून लोक मोठ्या प्रमाणात या यात्रेमध्ये सहभागी होतात. ही यात्रा पाच दिवस भरत असून या यात्रेमध्ये जनावरांची मोठ्या प्रमाणात खरेदी-विक्री होते. सहस्त्रकुंडचा मनमोहक धबधबा हा किनवट तालुक्यात सहस्त्रकुंड इस्मामपूर येथे असून शेकडो वर्षांपासून जनतेच्या मनाचा ठाव घेणारा प्रचंड धबधबा म्हणजे सतत पर्यटकांसाठी आकर्षक बनलेला आहे. या धबधब्याचे पाणी साठण्यासाठी एक खोल कुंड आहे. नेरली हे नांदेड पासून १२ कि.मी. अतंरावर असून तेथे कुष्ठरुग्णासाठी उपचार केंद्र व पुनर्वसन केंद्रही आहे. या शिवाय नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ पाहाण्यासारखे आहे. पर्यटकांच्या सोईसाठी नांदेड येथे अनेक हॉटेल्स उपलब्ध आहेत.

या शिवाय खालील ठिकाणी पर्यटक भेट देतात. उनकेश्वर (ता. किनवट) गरम पाण्याचे झरे, केदार गुडा (ता. हदगाव), महादेव मंदिर, दत्तबर्डी (ता. हदगाव) दत्त संस्थान शिंगारवाडी (ता. किनवट) आश्रम गोरठा (ता. उमरी) दासगणु महाराज प्रतिष्ठाण, दाभड (ता. अर्धापूर) बुध्दमहाविहार, मश्लक (ता. नांदेड) महादेव मंदिर, बेटमोगरा (ता. मुखेड) शिवलिंग बादशहा मंदिर, येवती (ता. मुखेड) नराशम महाराज संस्थान, खानापूर व रामपूर (ता. देगलूर) महादेव मंदिर होट्टल, महादेव मंदिर, कंधार दर्गा, बिलोली येथील दर्गा, तसेच मुखेड येथील श्रावण चमला इत्यादी महत्त्वाची पर्यटन स्थळे आहे. या शिवाय नांदेड येथे प्रवाशांसाठी खालील लॉजेस असून तेथे राहाण्याची व जेवणाची उत्तम सोय होते. अनुराधा पॅलेस, हिंगोली गेट नांदेड, उमा एक्सिक्युटीव्ह, शिवाजी नगर, नांदेड; हॉटेल चंद्रलोक, हिंगोली रोड, नांदेड, हॉटेल रूबी, सिडको नवीन नांदेड; हॉटेल सुरजकुंवर, जूना मोंढा, नांदेड, हॉटेल नागार्जुना, विमानतळरोड, नांदेड; हॉटेल गोदावरी, आय.टी.आय.जवळ, नांदेड, गुरू इन, स्टेशन रोड, नांदेड; बि.के.इन, कला मंदिर, नांदेड; रवीराज लॉज, वजीराबाद, हॉटेल कुनाल, रेल्वे स्टेशन जवळ, पंजाब लॉज, नांदेड, वैभव लॉज, एस.पी.ऑफीस जवळ, समर्थ, वैभव, गितांजली, दिपक लॉज, नांदेड इत्यादी.

## विश्रामगृहे

पूर्वी आतासारखी शासकीय व खाजगी विश्राम गृहे, हॉटेल्स व लॉजींग-बोर्डीगची सोय नव्हती. त्यामुळे प्रवाशी धर्मशाळांमध्ये राहात असत. परंतु ब्रिटीशांनी देशावर राज्य करण्यासाठी, जिल्ह्याच्या

व महत्त्वाच्या पर्यटन स्थळांवर त्यांच्या अधिकारी यांना ठरावीक कालावधीसाठी, मुक्कामासाठी शासकीय विश्रामगृहे बांधली होती. भारत देश स्वतंत्र झाल्यानंतर वेगवेगळ्या पंचवार्षिक योजना राबविण्यात आल्या, त्यामध्ये कृषि व जलसिंचन तसेच रस्ते विकासाबाबत शासनाने फारच भरिव कार्य केल्याचे दिसून येते. जिल्ह्यात शासकीय अधिकारी तसेच आमदार व खासदार यांना त्या त्या जिल्ह्यात भेट देऊन तेथील जनतेच्या अडीअडचणी जाणून घेण्यासाठी तसेच प्रत्येक विभागाच्या शासकीय अधिकारी यांचेबरोबर विकासाबाबत चर्चसत्रासाठी जिल्हा मुख्यालय आणि जिल्ह्यांतील तालुके या ठिकाणी शासकीय अधिकारी यांची राहण्याची सोय व्हावी या दृष्टीने शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद पाटबंधारे विभाग, वन विभाग इत्यादी विभागांची विश्रामगृहे महाराष्ट्रातील बहुतेक जिल्ह्यात आहेत. नांदेड जिल्हाही याला अपवाद नाही. आरक्षणासाठी आठ दिवस अगोदर संबंधित विभाग प्रमुखास लेखी कळवावे असे नियम असून शासकीय अधिकारी कामासाठी जेव्हा दौऱ्यावर जातील तेव्हा त्यांना विश्रामगृहासाठी प्रतिसूट प्रतिदिन २० रुपये भाडे द्यावे लागते. त्याची रितसर पावती दिली जाते. खाजगी व्यक्तिंसाठी प्रतिदिन १०० रुपये भाडे आकारले जाते. नांदेड जिल्ह्यात असलेल्या शासकीय, निमशासकीय विश्रामगृहांची माहिती तक्ता क्रमांक ९ मध्ये दिली आहे.

## धर्मशाळा

पूर्वी आतासारखी सरकारी वा खाजगी विश्रामगृहे नव्हती, त्यावेळी वाटसरूंना रात्रीच्या निवाऱ्यासाठी धर्मशाळेचा आश्रय घ्यावा लागे. अशा धर्मशाळा बहुधा मुख्य रस्त्यांवर व धार्मीक स्थळांच्या ठिकाणी असत. धर्मशाळेचे विनामुल्य किंवा अत्यल्प शुल्क घेऊन राहण्याची सोय केली जात असे. काही ठिकाणी अल्प शुल्क घेऊन स्वयंपाक व जेवणाची भांडीसुद्धा पुरवली जात असत. आता धर्मशाळांना पूर्वीसारखे महत्त्व राहिले नाही. त्यांची जागा खाजगी निवासीगृहे व सरकारी विश्रामगृहांनी घेतली असली तरी धर्मशाळांचे स्वतःचे वेगळे स्थान आहे.

नांदेड जिल्ह्यात धार्मिक व ऐतिहासीक महत्त्व असलेल्या ठिकाणी धर्मशाळा अस्तित्वाच आहेत. नांदेड येथील गुरुद्वार संस्थेच्यावतीने येणाऱ्या भाविकांसाठी दररोज भोजनाची, प्रसादाची सोय केली जाते. नांदेड जिल्ह्यात खालील ठिकाणी धर्मशाळा आहेत. जिजामाता धर्मशाळा पब्लिक ट्रस्ट वजिराबाद, ता., जि. नांदेड येथे धर्मशाळा असून येथे राहण्याची सोय अल्प शुल्क घेऊन केली जाते. तसेच रेणूकादेवी मंदिर संस्थान माहूर, ता. माहूर येथे धर्मशाळेचे १५ कक्ष व २ हॉल आहेत. तसेच नांदेड येथे मारवाडी धर्मशाळा व हनुमान मंदिर ही धर्मशाळा असून येथे ८ कक्ष व ३ हॉल व १ किचन आहे.[२३]

---

२३. वरील माहिती सहायक धर्मादाय आयुक्त नांदेड यांनी दिलेल्या माहितीवर आधारित आहे.

## डाक, तार आणि दूरध्वनी सेवा

दख्खणमध्ये बातमीपत्रे आणि नियंत्रित डाक वाहतुकीचा उगम तेराव्या शतकात झाल्याची नोंद आढळते. सन १३१८ मध्ये दिल्ली राजवटीचे पूर्व दख्खणमध्ये डाकसेवा विस्तारली होती.[२४] इ. स. १५९५ मध्ये मराठवाडा हा भाग सर्वसाधारणपणे दख्खण म्हणून संबोधला जात होता.[२५] कुतुबशाहीमध्ये तत्पर आणि कुशल डाकसेवा उपलब्ध असल्याची नोंद टॅव्हर्निअरने आपल्या प्रवास वर्णनात केली आहे.[२६] फेरिस्ताच्या नुसार अकबराने त्याच्या राज्यात सर्वत्र डाकसेवा उपलब्ध करून दिली होती. प्रत्येक पाच कोसाच्या अंतरावर दोन घोडे आणि काही पायदळ लोक याकामी नेमले होते. मराठा काळात डाकसेवेला महत्त्वपूर्ण स्थान मिळाले नव्हते. मराठा काळात महाराष्ट्रातील डाकसेवा सरकारच्या गरजा पूर्ण करण्यासाठी अस्तित्वात होती. त्याकाळात महाराष्ट्रात सरकारी डाक आणि सावकारी डाक या दोन प्रकारच्या डाकसेवा अस्तित्वात होत्या. मराठा डाक पद्धती महाराष्ट्रातील प्रमुख शहरातून सुरू झाली होती. मोगल सरकारात पोस्ट आणि गुप्तवार्ता ही महत्त्वाची खाती होती आणि दरोगा नावाचा अधिकारी त्याचा प्रमुख असे.[२७] सन १६८८ पर्यंत पट्टामार, कासीद आणि हरकारे हे कर्मचारी डाकसेवेत कार्यरत होते. त्यानंतर ईस्ट इंडिया कंपनीने मद्रास आणि मुंबई येथील व्यापाऱ्यांच्या सोईसाठी डाक कार्यालये स्थापण्याचे आदेश दिले होते. हैद्राबाद राज्यात इ. स. १८६९ मध्ये पोस्टाची व्यवस्था अस्तित्वात आली.[२८]

सन १९६३ मध्ये मराठवाड्यातील पाच जिल्ह्यांसाठी औरंगाबाद येथे मुख्य बटवडा कार्यालय होते. १९७१ मध्ये नांदेड जिल्ह्यासाठी स्वतंत्र पोष्ट व तार विभाग होते. सन १९७१ मध्ये नांदेड तालुक्यात ३२, भोकर १९, देगलूर १८, कंधार २४, बिलोली ४०, मुखेड १६, किनवट ३०, हदगाव २६ टपाल व तार कार्यालये होती.

नांदेड जिल्ह्यात सन १९९९-२००० मध्ये प्रती लाख लोकसंख्येमागे १८ टपाल व तार कार्यालये तर प्रती लाख लोकसंख्येमागे ६५ टपाल पेट्या तर ४८७ दूरध्वनीची सेवा उपलब्ध होती तर २०००-२००१ हेच प्रमाण पुढीलप्रमाणे होते. टपाल व तार कार्यालये १७, टपाल पेट्याची संख्या ६३ तर दूरध्वनीची संख्या १८५६ इतकी प्रती लाख लोकसंख्येमागे होती. तर महाराष्ट्र राज्यात हेच प्रमाण २०००-०१ मध्ये अनुक्रमे १४ व ५१ आणि ३,२३९ इतके प्रती लाख लोकसंख्येमागे होते.[२९]

---

२४. शेखाणी, एच. के. आणि जोशी, पी. एम. **हिस्टरी ऑफ मिडिव्हल डेक्कन** (१२९५-१७७४) खंड दुसरा, पृ. ४५३ व ४५५.

२५. काटे, पी. व्ही. **मराठ्यांचा इतिहास**, पृष्ठ ८१.

२६. शेखाणी, एच. के. आणि जोशी, पी. एम. पूर्वोक्त पृ. ४५७.

२७. कित्ता, पृ. ४६४.

२८. काटे, पी. व्ही. **मराठ्यांचा इतिहास**, पृ. १०६.

२९. **महाराष्ट्रातील जिल्ह्यांचे आणि भारतातील राज्यांचे निवडक निर्देशक**, सन १९९९-२००० व २०००-०१ अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मधून घेण्यात आले आहेत. पृष्ठ ३६.

सन २००५-०६ मध्ये नांदेड जिल्ह्यात ४६९ टपाल कार्यालये, १,९२८ पत्रपेट्यांची संख्या व ६१ पोस्टमन तर १,४९२ पोस्टाची सुविधा असलेली गावे होती. नांदेड जिल्ह्यातील डाक कार्यालयाची संख्या खालील विवरणपत्रात दिली आहे.—

| वर्ष | टपाल कार्यालय | तार घराची संख्या | पत्रपेट्यांची संख्या | पोस्टमन संख्या | दूरध्वनी संख्या* | पोस्टाची सुविधा असलेली गावे |
|---|---|---|---|---|---|---|
| १९७९-८० | ३९४ | ४४ | १,२८७ | उ. ना. | २,१०३ | उ. ना. |
| १९८९-९० | ४२९ | २७ | १,२०१ | उ. ना. | ३,९१५ | |
| १९९५-९६ | ४५६ | २७ | १,७९८ | ७३ | उ. ना. | १,४२९ |
| २०००-०१ | ४६५ | उ. ना. | १,८८३ | ८४ | उ. ना. | १,४५४ |
| २००२-०३ | ४६८ | उ. ना. | १,९२२ | ८७ | उ. ना. | १,४९२ |
| २००३-०४ | ४६९ | २४ | १,९३३ | ८७ | उ. ना. | १,४९२ |
| २००४-०५ | ४६९ | उ. ना. | १,९२८ | ६१ | उ. ना. | १,४९२ |
| २००५-०६ | ४६९ | उ. ना. | १,९२८ | ६१ | उ. ना. | १,४९२ |

## गुरू गोविंद सिंग विमानतळ

महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार नांदेड विमानतळ देखभाल, दुरुस्ती, श्रेणीवाढविस्तारीकरणासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे दिनांक १० एप्रिल २००० रोजी हस्तांतरित करण्यात आलेले आहे. यापूर्वी नांदेड विमानतळावरून वायुदूत ही विमानसेवा चालू होती व लहान प्रकारच्या विमान उतरण्या व उड्डाणासाठी उपयुक्त होती गुरू-ता-गद्दीच्या कार्यक्रमासाठी व येथून नियमीत विमानसेवा सुरू करण्यासाठी एअर बस ३२० व बोईंग ७३७ या प्रकारची विमाने उतरण्यासाठी विमानतळाचे विस्तारीकरण व श्रेणीवाढीचे काम पूर्ण करण्यात आलेले आहे. ऑक्टोबर २००८ साली झालेल्या श्री गुरूग्रंथ साहेब गुरू-ता-गद्दी त्रिशताब्दी सोहळ्यासाठी नांदेड येथे हजारो शीख भाविक विमानाने भारतातून व विदेशातून येणार असल्यामुळे शासनाने विमानतळाचे विस्तारिकरण व श्रेणीवाढ करण्यासाठी २०.०० कोटी इतका निधी उपलब्ध करून दिला होता. भारतीय विमान पतन प्राधिकरणाच्या सल्ल्यानुसार विमानतळ विस्तारीकरणाचे काम करण्यात आले. या प्रकल्पासाठी एकूण रुपये ९४.०० कोटी खर्च अपेक्षित आहे. आजतागायत महामंडळाने नांदेड विमानतळ विस्तारीकरण व श्रेणीवाढ या कामावर अंदाजे रु. ५७ कोटी इतका खर्च केलेला आहे.

महामंडळाने विकसित केलेल्या विमानतळाची खालील ठळक वैशिष्ट्ये आहेत. विमानतळाची श्रेणी ४ सी, विमानतळाचे क्षेत्रफळ १०४ हेक्टर, धावपट्टीची लांबी २३०० मीटर, धावपट्टीची रुंदी ४५ मीटर ॲप्रॉनचा आकार १६० मी. × १२० मी. जुना ॲप्रान आकार १०० मी. × ६० मी. टर्मिनल इमारत ३०० प्रवाशी क्षमता, (५००० चौ.मी.), अग्निशमन व्यवस्था श्रेणी ५ तसेच विमानतळ सुरक्षेची जबाबदारी महाराष्ट्र राज्य पोलीस नांदेड यांचेकडून करण्यात येते. तसेच विमानतळ येथे प्रथोमोपचारासाठी शासकीय रुग्णालय, नांदेड हे उपलब्ध आहे.

*. दूरध्वनीबाबत स्वतंत्र माहिती दिली आहे. जिल्ह्यातील सर्व गावांना टपाल सेवा उपलब्ध केली आहे. याकरिता काही फिरती टपाल कार्यालये आहेत.

नांदेड येथून किंग फिशर कंपनी नांदेड-लातूर-मुंबई ६६ प्रवाशी क्षमतेची (ATR-७२/५००) विमानसेवा दिनांक ६ ऑक्टोबर २००८ पासून सुरू करण्यात आली आहे. नांदेड शहरात शिख धर्मियांचे दहावे गुरू श्री गुरू गोविंदसिंग यांचा गुरुद्वारा असून भारत व परदेशातून लाखो भावीक गुरुद्वारा दर्शनासाठी येत असतात, त्यांच्यासाठी विमानसेवा ही खूप सोईची झाली आहे.

| २२ | नांदेड-औरंगाबाद | २९१.० | ०३ |
| २३ | मुखेड-औरंगाबाद | ३६५.५ | ०१ |
| २४ | कंधार-औरंगाबाद | ३०५.० | ०२ |
| २५ | किनवट-औरंगाबाद | ४०५.२ | ०१ |
| २६ | किनवट-नागपूर | २७५.० | ०२ |
| २७ | माहूर-पुणे | ५९७.७ | ०१ |
| २८ | माहूर-र्शिडी | ५०६.५ | ०१ |
| २९ | माहूर-बार्शी | ३७५.६ | ०१ |
| ३० | बिलोली-मुंबई | ३७०.० | ०१ |
| ३१ | देगलूर-मुंबई | ६०१.० | ०१ |
| ३२ | देगलूर-पंढरपूर | ३४५.० | ०१ |
| ३३ | नांदेड-सातारा | ४७८.१ | ०१ |
| ३४ | देगलूर-पुणे | ५२०.० | ०१ |
| ३५ | धर्माबाद-औरंगाबाद | ३८३.० | ०१ |

Maharashtra Gazetteers

**तक्ता क्रमांक ८**—(समाप्त)

| अनुक्रमांक | मार्गाचे नाव | अंतर कि.मी. | परतीच्या फेऱ्या |
|---|---|---|---|
| ३६ | भोकर-शेगाव | ३१०.९ | ०२ |
| ३७ | भोकर-अक्कलकोट | २७०.० | ०१ |
| ३८ | किनवट-लातूर | २८४.७ | ०३ |
| ३९ | किनवट-पुणे | ६१०.६ | ०१ |
| ४० | मुखेड-मांडवी | २५८.९ | ०१ |
| ४१ | मुखेड-शिंगणापूर | ४०१.६ | ०१ |
| ४२ | देगलूर-औरंगाबाद | ३७३.० | ०२ |
| ४३ | देगलूर-आकोला | २९९.० | ०१ |
| ४४ | कंधार-अमरावती | ३२६.६ | ०२ |
| ४५ | माहूर-नाशिक | ५८५.२ | ०१ |
| ४६ | हदगाव-सोलापूर | ३८६.० | ०१ |





Maharashtra State Gazetteers

**तक्ता क्रमांक ९**

**नांदेड जिल्ह्यातील विश्रामगृहे मार्च २००५**

| अनुक्रमांक | विश्रामगृहे | तालुका | कक्ष संख्या |
|---|---|---|---|
| | **(अ) सार्वजनिक बांधकाम विभाग** | | |
| १ | शासकीय विश्रामगृह नांदेड | नांदेड | १५ |
| २ | शासकीय विश्रामगृह कंधार | कंधार | २ |
| ३ | शासकीय विश्रामगृह देगलूर | देगलूर | २ |
| ४ | शासकीय विश्रामगृह मुखेड | मुखेड | २ |
| ५ | शासकीय विश्रामगृह हदगाव | हदगाव | २ |
| ६ | शासकीय विश्रामगृह हिमायतनगर | हिमायतनगर | २ |
| ७ | शासकीय विश्रामगृह नायगाव | नायगाव (खैरगाव) | २ |
| ८ | शासकीय विश्रामगृह लोहा | लोहा | २ |
| ९ | शासकीय विश्रामगृह नरसी | नायगाव | २ |
| १० | शासकीय विश्रामगृह तामसा | हदगाव | २ |
| ११ | शासकीय विश्रामगृह भोकर | भोकर | ५ |
| १२ | शासकीय विश्रामगृह किनी | भोकर | २ |
| १३ | शासकीय विश्रामगृह किनवट | किनवट | ४ |
| १४ | शासकीय विश्रामगृह मांडवी | किनवट | २ |
| १५ | शासकीय विश्रामगृह माहूर | माहूर | २ |
| १६ | शासकीय विश्रामगृह धर्माबाद | धर्माबाद | २ |
| १७ | शासकीय विश्रामगृह बिलोली | बिलोली | २ |
| १८ | शासकीय विश्रामगृह कोंडलवाडी | बिलोली | २ |

**तक्ता क्रमांक ९**—(पुढे चालू)

| अनुक्रमांक | विश्रामगृहे | तालुका | कक्ष संख्या |
|---|---|---|---|
| | **(ब) जिल्हा परिषदेच्या नियंत्रणाखालील** | | |
| १ | शासकीय विश्रामगृह किनवट | किनवट | २ |
| २ | शासकीय विश्रामगृह बिलोली | बिलोली | २ |
| ३ | शासकीय विश्रामगृह मुक्रमाबाद | मुखेड | २ |
| | **(क) वन विभागाच्या नियंत्रणाखालील** | | |
| १ | वन विभागगृह माहूर | माहूर | २ |
| २ | वन विभागगृह किनवट | किनवट | २ |
| ३ | वन विभागगृह किनवट | किनवट | २ |
| ४ | वन विभागगृह राजगड | किनवट | २ |
| ५ | वन विभागगृह सावरी | किनवट | २ |
| ६ | वन विभागगृह जलधारा | किनवट | २ |
| | **(ड) कार्यकारी अभियंता मध्यम प्रकल्प व पाटबंधारे मंडळः** | | |
| १ | मध्यम प्रकल्प विभाग निरिक्षक डाक बंगला गोकूदा | किनवट | २ |
| २ | उर्ध्व पेनगंगा प्रकल्प विश्रामगृह | हदगाव | २ |
| ३ | पाटबंधारे डाक बंगला नांदेड | नांदेड | ३ |
| ४ | पाटबंधारे विश्रामगृह असर्जन | नांदेड | ४ |
| ५ | तपासणी विश्रामगृह विष्णुपुरी प्रकल्प तुप्पा | नांदेड | २ |
| ६ | पाटबंधारे व्यवस्थापक विभाग विश्रामगृह उमरी | उमरी | २ |

**तक्ता क्रमांक ९**—(समाप्त)

| अनुक्रमांक | विश्रामगृहे | तालुका | कक्ष संख्या |
|---|---|---|---|
| ७ | पाटबंधारे विश्रामगृह खतगाव | बिलोली | २ |
| ८ | पाटबंधारे विश्रामगृह बारुळ | कंधार | ३ |
| ९ | महालिंगी प्रकल्प विश्रामगृह केप कंधार | कंधार | १ |
| १० | महालिंगी प्रकल्प विश्रामगृह केप बोळका | कंधार | २ |
| ११ | मध्यम प्रकल्प विश्रामगृह बहादूरपुरा | कंधार | ३ |
| १२ | पाटबंधारे विश्रामगृह कुद्राळ | मुखेड | २ |
| | **(इ) विभागीय नियंत्रण महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ नांदेड** | | |
| १ | मध्यवर्ती बस स्थानक राज्य परिवहन माहूर | माहूर | १ |
| २ | मध्यवर्ती बस स्थानक राज्य परिवहन किनवट | किनवट | १ |
| ३ | विभागीय कार्यालय विश्रामगृह राज्य परिवहन नांदेड | नांदेड | २ |
| ४ | मध्यवर्ती बसस्थानक विश्रामगृह राज्य परिवहन नांदेड | नांदेड | १ |
| | **(ई) नगरपरिषद विश्रामगृहे** | | |
| १ | नगरपालिका विश्रामगृह धर्माबाद | धर्माबाद | २ |
| २ | नगरपालिका विश्रामगृह बिलोली | बिलोली | १ |
| ३ | नगरपालिका विश्रामगृह लोहा | लोहा | २ |

**तक्ता क्रमांक १०**

**नांदेड जिल्ह्यातील दूरध्वनी विनिमय केंद्रे प्रकार, धारण क्षमता आणि दूरध्वनीची संख्या मार्च २००८**

| अ.क्र. (१) | दूरध्वनी विनिमय केंद्र (२) | प्रकार (३) | धारण क्षमता (४) | कार्यरत दूरध्वनी (५) | प्रतिक्षा यादी (६) |
|---|---|---|---|---|---|
| १ | अलूर | AN (RAX) | १५२ | ६५ | ११ |
| २ | अप्पाराव पेट | AN (RAX) | १५२ | ७८ | ८२ |
| ३ | अर्धापूर | RSU (XL) | १००० | ४९७ | १७ |
| ४ | अर्धापूर BTS. | CDMA—WLL | ७५० | १२२ | ३० |
| ५ | अर्धापूर DIU | COR—DECT WLL | ४०० | ३४ | ० |
| ६ | अष्टा | AN (RAX) | २४८ | १७३ | ० |
| ७ | आटकळी | AN (RAX) | २४८ | १२१ | १ |
| ८ | बाचोटी | AN (RAX) | २४८ | १४० | १८ |
| ९ | बारड | RSU (XL) | १००० | ४१० | ० |
| १० | बारड BSD | COR—DECT WLL | २०० | २० | ० |
| ११ | बरडशेवाळा | AN (RAX) | २४८ | २०८ | ० |
| १२ | बरडशेवाळा BTS. | CDMA—WLL | २५० | २३५ | ० |
| १३ | बारबडा | ZAN (RAX) | ४९६ | ३७१ | ० |
| १४ | बारहाळी | RSU (XL) | ७४४ | ४४७ | ७ |
| १५ | बारुळ | ZAN (RAX) | ४९६ | २६३ | १०१ |



Maharashtra Organizers

**तक्ता क्रमांक १०**—(पुढे चालू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| १६ | बेंबरा | AN (RAX) | २४८ | ३८ | ३ |
| १७ | बेट-मोगरा | AN (RAX) | २४८ | १२७ | ६ |
| १८ | भोकर | MBM (XL) | २००० | १२२६ | ८ |
| १९ | भोकर BTS. | CDMA—WLL | ७५० | ५२१ | ११ |
| २० | भोशी | AN (RAX) | १५२ | १४० | ० |
| २१ | बिलोली | RSU (XL) | १०९६ | ५३१ | २ |
| २२ | बिलोली BSD | COR—DECT WLL | २०० | ८८ | १ |
| २३ | बिलोली BTS. | CDMA—WLL | ७५० | ५८४ | ५२ |
| २४ | बीटनाळ | AN (RAX) | १८४ | ९७ | ० |
| २५ | बोथरोड | RSU (XL) | ७४४ | ५१६ | २८ |
| २६ | बोथ तांडा | AN (RAX) | १५२ | १५१ | ३८९ |
| २७ | बोथ तांडा BTS. | CDMA—WLL | ७५० | ७३६ | २३ |
| २८ | चांडोळा | AN (RAX) | १५२ | ७३ | ५ |
| २९ | चिकाळा | AN (RAX) | २४८ | ७१ | ० |
| ३० | दाभड | ZAN (RAX) | ३०४ | १७९ | ० |
| ३१ | दहेली तांडा | RSU (XL) | ३६० | १९१ | ० |
| ३२ | दापका-गंडोपंत | AN (RAX) | २४८ | १०४ | १३ |

Maharashtra Legislature

**तक्ता क्रमांक १०**—(पुढे चालू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| ३३ | देगलूर | MBM (XL) | ३००० | २१९३ | ४१ |
| ३४ | देगलूर BTS | CDMA—WLL | ७५० | ५३९ | ८५ |
| ३५ | देगलूर DIU | COR—DECT WLL | ४०० | २०६ | ० |
| ३६ | धर्माबाद | RSU (XL) | १५१२ | १२४९ | ८१ |
| ३७ | धर्माबाद BSD | COR—DECT WLL | २०० | ५० | ० |
| ३८ | धर्माबाद BTS | CDMA—WLL | २५० | ० | ० |
| ३९ | दिग्रज | AN (RAX) | २४८ | ११६ | ० |
| ४० | गडगा | AN (RAX) | २४८ | १८६ | ० |
| ४१ | गोळेगाव | AN (RAX) | २४८ | १३२ | २० |
| ४२ | हदगाव | MBM (XL) | २००० | १२१३ | १५ |
| ४३ | हदगाव BTS. | CDMA—WLL | ७५० | ६६२ | ७ |
| ४४ | हदगाव DIU | COR—DECT WLL | ४०० | ३३ | ० |
| ४५ | हळदा | AN (RAX) | २४८ | १८५ | ३ |
| ४६ | हळनी | AN (RAX) | २४८ | ४८ | ३ |
| ४७ | हानेगाव | RSU (XL) | ७४४ | ५१२ | १०७ |
| ४८ | हानेगाव BSD | COR—DECT WLL | २०० | ९८ | ३ |
| ४९ | हानेगाव BTS | CDMA—WLL | २५० | ११२ | ० |

**तक्ता क्रमांक १०**—(पुढे चालू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| ५० | हिमायतनगर | RSU (XL) | ११९२ | ७४९ | ३६३ |
| ५१ | हिमायतनगर BTS | CDMA—WLL | ५०० | २०८ | ० |
| ५२ | हिमायतनगर | COR—DECT WLL | १५० | ७८ | ० |
| ५३ | होट्टल | AN (RAX) | १८४ | ५४ | १६६ |
| ५४ | इस्लापूर | ZAN (RAX) | ४९६ | ३५६ | १०८ |
| ५५ | इटग्याळ | AN (RAX) | १८४ | ७४ | ११ |
| ५६ | इज्जतगाव | AN (RAX) | १५२ | १२५ | २ |
| ५७ | जाहूर | AN (RAX) | २४८ | १८४ | १४ |
| ५८ | जाहूर BSD | COR—DECT WLL | २०० | ४७ | ० |
| ५९ | जलधारा | AN (RAX) | १५२ | ९३ | ३ |
| ६० | जलधारा BTS | CDMA—WLL | ७५० | १२६ | ० |
| ६१ | जांब | RSU (XL) | ३६० | २३९ | ७ |
| ६२ | जांब BTS | CDMA—WLL | २५० | ७ | ० |
| ६३ | जरीकोट | AN (RAX) | १५२ | १०७ | ४ |
| ६४ | जवळगाव | RSU (XL) | ४८८ | २१७ | १ |
| ६५ | जवळगाव BSD | COR—DECT WLL | २०० | १७७ | ० |
| ६६ | काहाळा | AN (RAX) | २४८ | १६४ | ० |

Maharashtra Legislature

**तक्ता क्रमांक १०**—(पुढे चालू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| ६७ | कामठा | ZAN (RAX) | ३६८ | २६५ | ० |
| ६८ | कंधार | RSU (XL) | १६४० | ११९४ | ११० |
| ६९ | कंधार BSD | COR—DECT WLL | २०० | ३४ | ० |
| ७० | कंधार BTS | CDMA—WLL | ७५० | ७०८ | १२ |
| ७१ | करधखेड | AN (RAX) | २४८ | २०७ | ६५ |
| ७२ | करखेली | AN (RAX) | २४८ | २०० | ९ |
| ७३ | करखेली BSD | COR—DECT WLL | २०० | ४१ | ० |
| ७४ | कासर्ली | AN (RAX) | २४० | १७९ | ६ |
| ७५ | कौठा | ZAN (RAX) | ४९६ | २५७ | २८ |
| ७६ | खानापूर | AN (RAX) | २४८ | १३३ | ६८ |
| ७७ | खातगाव | AN (RAX) | २४८ | ९३ | ० |
| ७८ | किनी | AN (RAX) | १५२ | ११६ | १२ |
| ७९ | किनवट | MBM (XL) | ३००० | १७४५ | ४६ |
| ८० | किनवट BTS | CDMA—WLL | ७५० | ३४१ | ३० |
| ८१ | किवळा | AN (RAX) | २४८ | ८५ | ७५ |
| ८२ | कोळंबी | AN (RAX) | २४८ | १११ | ० |
| ८३ | कोळी | AN (RAX) | २४८ | ८० | ४ |

**तक्ता क्रमांक १०**—(पुढे चालू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| ८४ | कोळी RBS | COR—DECT WLL | ५० | ३१ | ० |
| ८५ | कुशनूर | AN (RAX) | २४८ | १४५ | २ |
| ८६ | कुंडलवाडी | RSU (XL) | ७४४ | ३०३ | ० |
| ८७ | कूटूंर | ZAN (RAX) | ४९६ | २३३ | ० |
| ८८ | कुपटी | AN (RAX) | १५२ | ८१ | ९ |
| ८९ | कुरळा | ZAN (RAX) | ४९६ | ३३७ | ४३ |
| ९० | कुरळा BSD | COR—DECT WLL | २०० | ५० | ० |
| ९१ | कुरळा BTS | CDMA—WLL | २५० | २४० | ० |
| ९२ | लहान | AN (RAX) | २४८ | २११ | १ |
| ९३ | लिंबगाव | ZAN (RAX) | ४९६ | १८१ | १२ |
| ९४ | लिंबगाव BSD | COR—DECT WLL | २०० | १३ | ० |
| ९५ | लोहा | MBM (XL) | २००० | ८४७ | १५६ |
| ९६ | लोहा DIU | COR—DECT WLL | ४०० | ५८ | ० |
| ९७ | महादेव-पिंपळगाव | AN (RAX) | १५२ | ७३ | ३ |
| ९८ | माहूर | MBM (XL) | १००० | ५३७ | ५ |
| ९९ | माहूर BTS | CDMA—WLL | २५० | १०२ | २३ |
| १०० | माळाकौळी | RSU (XL) | ३८८ | ३०१ | ० |

Maharashtra Gazetteers

**तक्ता क्रमांक १०**—(पुढे चालू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| १०१ | माळेगाव | RSU (XL) | ७४४ | ५१८ | ० |
| १०२ | माळेगाव (यात्रा) BTS | CDMA—WLL | २५० | २०७ | ० |
| १०३ | माळेगाव (M) | AN (RAX) | २४८ | १३२ | २४ |
| १०४ | माळेगाव (यात्रा) | AN (RAX) | २४० | ७५ | ० |
| १०५ | मनाठा | ZAN (RAX) | ४९६ | २९७ | १ |
| १०६ | मांडवी | RSU (XL) | ७४४ | ४६६ | ० |
| १०७ | मांजरम | RSU (XL) | ३६० | २६५ | ३ |
| १०८ | मरखेल | AN (RAX) | २४८ | १७६ | ७ |
| १०९ | मरखेड BSD | COR—DECT WLL | २०० | ११६ | ० |
| ११० | मारताळा | AN (RAX) | २४८ | १६७ | १० |
| १११ | मातूल | AN (RAX) | १८४ | ११५ | ६ |
| ११२ | मोतारगा | AN (RAX) | २४८ | ५२ | १ |
| ११३ | मूखेड | RSU (XL) | १००० | ४११ | १३ |
| ११४ | मुखेड BTS | CDMA—WLL | ७५० | ७७ | ३० |
| ११५ | मुगत | AN (RAX) | २४८ | १५९ | १ |
| ११६ | मुखेड | MBM (XL) | २००० | १२०६ | ४ |
| ११७ | मुखेड BTS | CDMA—WLL | ७५० | ३५४ | ९ |
| ११८ | मुखेड DIU | COR—DECT WLL | ४०० | १६० | ० |

**तक्ता क्रमांक १०**—(पुढे चालू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| ११९ | मुक्रमाबाद | RSU (XL) | ७४४ | ४६४ | १२० |
| १२० | मुक्रमाबाद BSD | COR—DECT WLL | २०० | ६६ | ० |
| १२१ | मुक्रमाबाद BTS | CDMA—WLL | २५० | १३४ | ० |
| १२२ | नायगाव | MBM (XL) | २००० | ८८३ | २ |
| १२३ | नायगाव BTS | CDMA—WLL | ७५० | ३६० | १ |
| १२४ | नायगाव DIU | COR—DECT WLL | ४०० | ११६ | ० |
| १२५ | नांदेड APMC | OCB—283 RSU | २००० | ७८० | ० |
| १२६ | नांदेड C DOT | MBM (XL) | ७५०० | ३१९६ | १ |
| १२७ | नांदेड देगलेमका | OCB 283 RSU | २०४८ | १२४५ | २ |
| १२८ | नांदेड हनुमानगड | OCB 283 RSU | २४३२ | १७६० | ६ |
| १२९ | नांदेड MIDC | OCB 283 RSU | ५००० | ३१०६ | १ |
| १३० | नांदेड MIDC BTS | CDMA—WLL | ७५० | ५५ | ० |
| १३१ | नांदेड OCB 283 | OCB 283 MSU | १०७८० | ५९३२ | ४ |
| १३२ | नांदेड सिंहनगर | OCB 283 RSU | ६८०० | ४४३० | ० |
| १३३ | नांदेड तरोडा नाका | OCB 283 RSU | ८९४० | ६३१४ | १ |
| १३४ | नरसी | RSU (XL) | १०१८ | ४१८ | ० |
| १३५ | निळा | AN (RAX) | २४८ | ९८ | ० |

Maharashtra Gazetteers

**तक्ता क्रमांक १०**—(पुढे चालू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| १३६ | निमगाव | AN (RAX) | २४८ | ९४ | १ |
| १३७ | निवधा | RSU (XL) | ८७२ | ४७४ | ८१ |
| १३८ | निघवा BSD | COR—DECT WLL | १५० | १०५ | ० |
| १३९ | उस्मानागर | RSU (XL) | ७४४ | ३२२ | ४४७ |
| १४० | उस्मानागर BTS | CDMA—WLL | ५०० | १२५ | ० |
| १४१ | पळज | AN (RAX) | १८४ | ५१ | २ |
| १४२ | पळसा | AN (RAX) | २४० | १३५ | ० |
| १४३ | पानभोशी | AN (RAX) | २४८ | १८३ | १५ |
| १४४ | पाटोदा | AN (RAX) | १५२ | ८१ | ७ |
| १४५ | पेनुर | AN (RAX) | १५२ | १५४ | ४३ |
| १४६ | पेटवडज | ZAN (RAX) | ४९६ | ३०३ | १९१ |
| १४७ | फुलवेल | RSU (XL) | ४८८ | ३०८ | १४३ |
| १४८ | राहाटी | AN (RAX) | २४८ | ७१ | १ |
| १४९ | राहेर | AN (RAX) | २४८ | १३६ | १ |
| १५० | रातोळी | AN (RAX) | २४८ | ७२ | १ |
| १५१ | रेशनगाव | AN (RAX) | २४८ | १३५ | २ |
| १५२ | रोहीपिंपळगाव | AN (RAX) | २४८ | १२१ | २ |

**तक्ता क्रमांक १०**—(पुढे चालू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| १५३ | रोहीपिंपळगाव BSD | COR—DECT WLL | २०० | १४ | १ |
| १५४ | सग्रोळी | ZAN (RAX) | ३०४ | २६६ | १ |
| १५५ | सारखणी | ZAN (RAX) | ३३६ | २९८ | २ |
| १५६ | सावरगाव | AN (RAX) | २४८ | १०६ | १ |
| १५७ | सावरगाव BSD | COR—DECT WLL | २०० | ४८ | ० |
| १५८ | शाहापूर | RSU (XL) | ४८८ | ३०९ | १५९ |
| १५९ | शंकरनगर | RSU (XL) | ४८८ | २३६ | ० |
| १६० | शेळगाव | AN (RAX) | १८४ | १०२ | ४२ |
| १६१ | शेवडी | AN (RAX) | १५२ | १११ | ३४ |
| १६२ | शिवणी | AN (RAX) | १५२ | १०६ | ७ |
| १६३ | शिंदखेड | AN (RAX) | १५२ | १०४ | १ |
| १६४ | सोनारी | AN (RAX) | १५२ | १४३ | १० |
| १६५ | सोनखेड | RSU (XL) | ७४४ | ३२० | १६५ |
| १६६ | सोनखेड BSD | COR—DECT WLL | २०० | ४९ | ० |
| १६७ | टाकळी | AN (RAX) | २४८ | ६४ | १ |
| १६८ | तळणी | AN (RAX) | २४८ | ३६९ | १७ |
| १६९ | तळणी | RSU (XL) | ३६८ | ३६९ | १७ |

Maharashtra Gazetteers

**तक्ता क्रमांक १०**—(समाप्त)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| १७० | तळणी (बीलोली) | AN (RAX) | १५२ | ४८ | ६८ |
| १७१ | तमलूर | AN (RAX) | २४८ | १४५ | ६२ |
| १७२ | तामलूर BSD | COR—DECT WLL | २०० | ६० | ० |
| १७३ | तामसा | RSU (XL) | १००० | ८४१ | १९७ |
| १७४ | तामसा BTS | CDMA—WLL | २५० | २२ | ० |
| १७५ | उमरी | RSU (XL) | १०६४ | ६१६ | २६ |
| १७६ | उमरी BTS | CDMA—WLL | ७५० | ३९४ | ० |
| १७७ | उम्रा | AN (RAX) | २४८ | ८६ | ५८ |
| १७८ | वीसपूरी | OCB 283 RSU | १००० | ५४९ | ० |
| १७९ | वाघवाडा | AN (RAX) | १५२ | ९२ | १ |
| १८० | वाई | RSU (XL) | ७४४ | ४३६ | ० |
| १८१ | वाळकी | AN (RAX) | २४८ | २३५ | २ |
| १८२ | वनोडा | AN (RAX) | १५२ | ९८ | ९ |
| १८३ | येवली | AN (RAX) | २४८ | ६१ | २ |
| १८४ | येवली RBS | COR—DECT WLL | ५० | ८७ | ० |
| १८५ | येताळा | AN (RAX) | २४८ | १६१ | १५ |

# नांदेड जिल्हा गॅझेटिअर

## प्रकरण-८
## आर्थिक विकास

Maharashtra State Gazetteers

प्रकरण ८

# आर्थिक विकास

## उपलब्ध साधनसामग्री

आर्थिक विकास हा जिल्ह्यातील उपलब्ध मनुष्यबळ, जमीन, जलसंपत्ती, खनिज संपत्ती, उद्योगांना आधारभूत संरचना, मानवी विकास इत्यादी घटकांवर अवलंबून असतो. या घटकांचा थोडक्यात आढावा घेतला आहे.

जिल्ह्यातील मनुष्यबळाच्या दृष्टिने २००१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्याची लोकसंख्या २८,७६,२५९ असून ती राज्याच्या लोकसंख्येच्या २.९७ टक्के आहे. लोकसंख्येच्या दृष्टिने जिल्ह्याचा राज्यात १२ वा क्रमांक लागतो. जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येपैकी एकूण काम करणारे ४१.७९% (१२,०२,०३७); मुख्य काम करणारे ३३.५६% (९,६५,०८७); शेतकरी ११.८१% (३,३९,६०६); शेतमजूर १२.१६% (३,४९,८७६); घरकाम करणारे ०.७१% (२०,४६१) व सिमांतिक कामगार ८.२४% (२,३६,९५०) होते. मुख्य कामगारांची ग्रामीण व शहरी भागातील टक्केवारी अनुक्रमे २७.६५% (२१,८७,१९५) व ५.९०% (६,८९,०६४) इतकी होती. ग्रामीण भागातील ही टक्केवारी अधिक असण्याचे कारण तेथील लोकसंख्येच्या प्रमाणाची सामाजिक व आर्थिक स्थितीशी असलेली सांगड होय. तद्वतच ग्रामीण भागात शेती, पशुसंवर्धन इत्यादींमध्ये काम करणाऱ्या पुरुष व स्त्रियांना सारख्याच संधी उपलब्ध असल्यामुळे हे प्रमाण अधिक आहे. मुख्य काम करणाऱ्यांमध्ये राज्याच्या तुलनेत शेतकरी ३२.२% व शेतमजूर ४१.७% होते. उपरोक्त विवेचनावरून जिल्ह्यातील लोकांच्या उपजीविकेच्या साधनांची कल्पना येते.[१]

जिल्ह्यातील जमीन सर्वसाधारणपणे काळी, सुपीक व कसदार अशा स्वरुपाची असून जिल्ह्याच्या सर्व तालुक्यांत काळी जमीन उपलब्ध आहे. या जमिनीत कॅल्शियम, मॅग्नेशियम व कार्बोनेटचे प्रमाण अधिक आहे. परंतु नायट्रोजन, पोटॅश फॉस्फेट व ह्युमसचे प्रमाण फार कमी आहे. या जमिनीत ओलावा व आर्द्रता टिकवून ठेवण्याची फार मोठी क्षमता असल्यामुळे जिल्ह्यातील कमी पावसाच्या भागात अशी जमीन उपयुक्त ठरते. उत्तम प्रतीची काळ्या मातीची जमीन गोदावरी नदी व तिच्या उपनद्यांच्या काठाकाठाने अरूंद पट्टयात आढळते, चांगल्या प्रतीची काळी जमीन मांजरा व मन्याड नदीच्या काठाने बिलोली तालुक्यात आढळते, तर बिलोली तालुक्यात इतरत्र जमीन हलक्या प्रतीची व मोकळ्या दगडांनी झाकलेली अशा प्रतीची आहे. नांदेड तालुक्यातील जमीन मुख्यतः काळी व गाळ साचलेली आहे. टेकड्यांच्या पायथ्याशी लागून असलेल्या भागात मात्र काळी जमीन दुर्मिळ असून तेथील जमीन फारच हलक्या प्रतीची आढळते. देगलूर तालुक्यात उत्तम प्रतीची काळ्या मातीची जमीन

---

१. **सेन्सस ऑफ इंडिया,** २००१, सिरीज २८, खंड १, पृ. ८.

प्रामुख्याने उपलब्ध असून तालुक्याच्या पश्चिमेकडील थोडासा भाग सोडून तालुक्यातील सर्व जमीन उच्च प्रतीची व रब्बी पिकांसाठी योग्य अशी आहे. कंधार तालुक्याचा अर्धा भाग काळ्या व भारी जमिनीचा असून उर्वरित अर्ध्या भागात हलकी व लहान टेकड्या व झुडपे असलेली जमीन आहे. हदगाव तालुक्यातील जवळपास ३/४ जमीन, विशेषतः पैनगंगेच्या काठाजवळील जमीन सुपीक आहे. तालुक्याच्या दक्षिणेकडील टेकड्यांजवळील जमीन थोडी क्षारयुक्त असल्याचे आढळून येते. भोकर व किनवट या दोन तालुक्यात टेकड्या व माळरानाचा भाग वगळून इतर सर्व जमीन काळी व भारी आहे.

जिल्ह्यात २००४-०५ मध्ये ९१,९१६ हेक्टर क्षेत्र जंगलव्याप्त होते. एकूण भौगोलिक क्षेत्राचा विचार केल्यास जंगलव्याप्त क्षेत्र फक्त ८.९० टक्के असून महाराष्ट्रातील जंगलव्याप्त (१७.५६ टक्के) क्षेत्रापेक्षा फारच कमी आहे. किनवट तालुक्यामध्ये जंगलव्याप्त क्षेत्राची सर्वात जास्त टक्केवारी ६२.२९%, तर सर्वात कमी टक्केवारी देगलूर तालुक्यात ०.९८% आहे. सन २००४-०५ यावर्षी जिल्ह्यातील वन उत्पादनाच्या विक्रीपासून १७,६०८ हजार रुपयांचे उत्पन्न प्राप्त झाले होते.[२] हे उत्पन्न जळाऊ बांबू, गवत, विडीची पाने आणि इतर विक्रीपासून मिळाले होते.

जिल्ह्यातून वाहणाऱ्या महत्त्वाच्या नद्या गोदावरी, मांजरा, मन्याड, पैनगंगा, आसना, सीता व लेंडी या आहेत. गोदावरी नदी ही जिल्ह्यातील प्रमुख नदी असून ती जिल्ह्यात पश्चिमेकडून प्रवेश करते व जिल्ह्याच्या मध्य भागातून पूर्वेकडे वाहून आंध्रप्रदेशातील निजामाबाद जिल्ह्यात प्रवेश करते. गोदावरी नदीची सर्वात मोठी उपनदी मांजरा ही दक्षिणेकडून उत्तरेकडे वाहते. मन्याड नदी कंधार तालुक्यातून पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहते. सरस्वती नदी वाखेड पर्वत राजीतून उत्तरेकडून दक्षिणेकडे जिल्ह्याच्या पूर्वेकडील भागातून वाहते व माळकौठा गावाजवळ गोदावरीला मिळते. पूर्वेकडे वाहणारी आसना नदी नांदेडजवळ गोदावरीला मिळते. लेंडी नदी देगलूर तालुक्यात पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहते व नंतर ती मांजरा नदीस मिळते. पैनगंगा नदी पूर्वेकडून वाहत जाऊन यवतमाळमध्ये वर्धा नदीस मिळते. सीता नदी उत्तरेकडून निघून गोदावरीस मिळते. जिल्ह्यातील गोदावरी, मांजरा, मन्याड व पैनगंगा या बारमाही वाहणाऱ्या नद्या आहेत.

जिल्ह्यात महत्त्वाचे व उल्लेखनीय असे कोणतेही खनिज पदार्थ नाहीत. किनवट तालुक्याच्या काही भागात हलक्या प्रतीचे चुनखडीचे साठे आढळतात. परंतु ही चुनखडी एकसारख्या प्रतीची नसते. ती वाळू मिश्रीत असते. बांधकामासाठी लागणारी वाळू किंवा वाळूचे मोठे गोटे व विटांसाठी लागणारी विशिष्ट प्रकारची माती मात्र जिल्ह्यात आढळते. विज्ञान व तंत्रज्ञान उद्योजकता विकास प्रकल्प कार्यालयामार्फत करण्यात आलेल्या पाहणीनुसार जिल्ह्यात ग्रॅफाइट व इतर काही मूल्यवान खनिज पदार्थांचे साठे उपलब्ध आहेत असा निष्कर्ष काढण्यात आला आहे.[३] तथापि, त्यांची उपलब्धता अत्यल्प आहे.

जिल्ह्यात २००४ मध्ये असलेल्या एकूण ३४५ नोंदणीकृत कारखान्यांपैकी १०६ कारखाने बंद होते. उर्वरित २३९ कारखान्यांमध्ये ४,४८८ कामगार होते. जिल्ह्यातील दर लाख लोकसंख्येशी

---

२. **जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन,** जिल्हा नांदेड २००४-२००५, पृ. ४.

३. **यथार्थदर्शी योजना,** १९९२-९३ ते १९९६-९७ नांदेड, जिल्हा नियोजन व विकास मंडळ, नांदेड, पृ. १४.

औद्योगिक कामगारांचे प्रमाण १५६ होते. मोठ्या उद्योगांच्या विकासाबरोबरच लघु व कुटीर उद्योगांची वाढ करण्याच्या दृष्टिने जिल्हा उद्योग केंद्रामार्फत प्रयत्न केला जात आहे. स्वयंरोजगारासाठी लघु व कुटीर उद्योग स्थापनेसाठी जिल्हा उद्योग केंद्रामार्फत प्रयत्न केला जात आहे. तसेच केंद्रामार्फत सर्व प्रकारचे मार्गदर्शन मिळते.

## कृषि अर्थव्यवस्था

जिल्ह्याच्या आर्थिक विकासात शेतीचे अत्यंत महत्वाचे स्थान आहे. जिल्ह्याचे एकूण भौगोलिक क्षेत्र १०.३३ लक्ष हेक्टर असून एकूण लागवडीखालील क्षेत्र ७.५५ लक्ष हेक्टर आहे. यापैकी सर्वसाधारण प्रत्येक वर्षी खरीप पिकाखालील लागवडीचे क्षेत्र ६.३९ लक्ष हेक्टर व रब्बी व उन्हाळी पिकाखाली १.१६ लक्ष हेक्टर क्षेत्र असते. जिल्हा मुख्यतः खरीप पिकांचा असून खरीपात प्रामुख्याने ज्वारी, भात, तूर, मूग, उडीद, भुईमूग, सूर्यफूल, कापूस इत्यादी पिके घेतली जातात. त्यापैकी २.६० लक्ष हेक्टर क्षेत्रावर खरीप ज्वारी; ३४,८०० हेक्टर क्षेत्रावर भात; १,००० हेक्टर क्षेत्रावर बाजरी; १,७०० हेक्टर क्षेत्रावर मका व इतर धान्ये व तृणधान्य पिके घेतली जातात. गळीत धान्यात ५,७०० हेक्टर क्षेत्रावर भुईमूग; ७,९०० हेक्टर क्षेत्रावर तीळ; ५,६०० हेक्टर क्षेत्रावर सूर्यफूल व १,८०० हेक्टर क्षेत्रावर इतर गळीत पिके घेतली जातात. रब्बी हंगामात १ लाख ९ हजार हेक्टर क्षेत्रावर रब्बी पिके व ७,३०० हेक्टर क्षेत्रावर उन्हाळी पिके घेतली जातात. जिल्ह्यात मिरचीचे नगदी पीक म्हणून मोठ्या प्रमाणात घेतले जाते.[४]

जिल्ह्याच्या एकूण १०.३३ लाख हेक्टर भौगोलिक क्षेत्रापैकी ०.९२ लक्ष हेक्टर हे वनक्षेत्र असून त्याची एकूण क्षेत्रफळाशी टक्केवारी ८.९० टक्के आहे. शेतीयोग्य नसलेले एकूण क्षेत्र ०.६४ लक्ष हेक्टर हे कायम गुरचरण क्षेत्र आहे. जिल्ह्यात पावसाचे पुरेसे प्रमाण असले, तरी बऱ्याच वर्षी पाऊस वेळेवर तसेच पुरेशा प्रमाणात पडत नसल्याने ओलीत क्षेत्राचे प्रमाण कमी असते. पर्यायाने दुबार पिकाखालील क्षेत्र कमी असते.

जिल्ह्यातील सन १९६०-६१ पासून दशवार्षिक अंतराने लागवडीखालील क्षेत्र व त्याची भौगोलिक क्षेत्राशी टक्केवारी पुढीलप्रमाणे होती :—

| वर्ष | लागवडीखालील क्षेत्र (क्षेत्र '००' हेक्टरमध्ये) | लागवडीखाली क्षेत्राची भौगोलिक क्षेत्राशी टक्केवारी |
|---|---|---|
| १९६०-६१ | ७९,१४ | ७६.६० |
| १९७०-७१ | ७५,४१ | ७१.८७ |
| १९८०-८१ | ७७,३० | ७४.५६ |
| १९९०-९१ | ७७,८० | ७५.३१ |
| २०००-०१ | ८२,२५ | ७९.६१ |

४. **यथार्थदर्शी योजना**, १९९२-९३ ते १९९६-९७, नांदेड, पूर्वोक्त, पृ. ३८.

**वहितींची खाती व त्यांचे क्षेत्र** : सन १९७६-७७ च्या कृषि गणनेनुसार जिल्ह्यात व्यक्तिगत खातेदार १,९७,४०० होते. त्यांनी धारण केलेले क्षेत्र ७,८३,६०० हेक्टर होते. संयुक्त खातेदार २,८०० होते. त्यांनी धारण केलेले क्षेत्र १२,९०० हेक्टर होते. एकूण खातेदारांशी तुलना करता व्यक्तिगत खातेदार ९८.६० टक्के तर संयुक्त खातेदार १.४० टक्के होते.

सन १९८५ च्या कृषि गणनेनुसार जिल्ह्यात ३,१२,३२४ खातेदार होते. त्यांनी धारण केलेली जमीन ८,२४,२५८ हेक्टर होती. या खातेदारांपैकी एक हेक्टरपेक्षा कमी जमीन धारण करणारे एकूण ६६,२३३ खातेदार होते. त्यांनी धारण केलेली जमीन ३९,९०६ हेक्टर होती. त्याचप्रमाणे १ ते २ हेक्टर पर्यंत जमीन धारण करणारे एकूण ९१,९४९ खातेदार होते व त्यांनी धारण केलेली जमीन १,३३,३७४ हेक्टर होती. याचाच अर्थ असा की, जिल्ह्यात १,५८,१८२ अत्यल्प व अल्प भूधारक होते व त्यांनी धारण केलेली जमीन १,७३,२८० हेक्टर होती. जमीन धारण करणारे खातेदार व त्यांनी धारण केलेली जमीन याबाबतची माहिती खाली दिली आहे.

| अ. क्र. | जमीन धारण क्षेत्र (हेक्टर) | एकूण खातेदार | एकूण धारण केलेली जमीन (हेक्टर) | एकूण खातेदाराशी प्रमाण | एकूण जमिनीशी प्रमाण (हेक्टर) |
|---|---|---|---|---|---|
| १ | ०.० ते १.० | ६६,२३३ | ३९,९०६ | २१.२१ | ४.८४ |
| २ | १.० ते २.० | ९१,९४९ | १,३३,३७४ | २९.४४ | १६.१८ |
| ३ | २.० ते ५.० | १,१४,३२३ | ३,४८,७०१ | ३६.६० | ४२.३० |
| ४ | ५.० ते १०.० | ३४,३४९ | २,२९,६१३ | ११.०० | २७.८६ |
| ५ | १०.० ते २०.० | ५,२२३ | ६६,०१४ | १.६७ | ८.०१ |
| ६ | २०.०० पेक्षा जास्त | २४७ | ६,६५० | ०.०८ | ०.८१ |
| | एकूण | ३,१२,३२४ | ८,२४,२५८ | १००.०० | १००.०० |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, ५ ते १० हेक्टर जमीन धारकांचे प्रमाण ११ टक्के असून त्यांनी धारण केलेल्या जमिनीचे एकूण जमिनीशी प्रमाण जवळपास २८ टक्के आहे, तर १० ते २० हेक्टर जमीन धारकांचे प्रमाण १.६७ टक्के व त्यांनी धारण केलेल्या जमिनीचे प्रमाण ८.०१ टक्के आहे. जिल्ह्यात २० हेक्टरपेक्षा जास्त जमीन धारण करणारे २४७ खातेदार असून त्यांचे एकूण खातेदारांशी व धारण केलेल्या जमिनीचे प्रमाण अनुक्रमे ०.०८ व ०.८१ टक्के होते.[५]

सन १९९०-९१ च्या कृषि गणनेनुसार जिल्ह्यात ३,७९,५०५ खातेदार होते. त्यांनी धारण केलेली जमीन ८,०३,६०७ हेक्टर होती. या खातेदारांपैकी एक हेक्टरचे आत जमीन धारण करणारे एकूण १,००,४८९ खातेदार असून त्यांनी धारण केलेली जमीन फक्त ६१,२७५ हेक्टर होती. १ ते २ हेक्टरपर्यंत जमीन धारण करणारे खातेदार १,३२,९८८ होते व त्यांनी १,९५,१८६ हेक्टर जमीन धारण केली होती. जिल्ह्यात एकूण २,३३,४७७ अत्यल्प व अल्प भूधारक होते. त्यांनी २,५६,४६१ हेक्टर जमीन धारण केली होती. अल्प व मध्यम भूधारकांचे खातेदारांशी प्रमाण ६१.५२ टक्के होते व

५. **यथार्थदर्शी योजना,** पूर्वोक्त, पृ. ३९.

त्यांच्याकडे असलेल्या जमिनीचे प्रमाण फक्त ३१.९१ टक्के होते. वहिती खातेदार व त्यानी धारण केलेली जमीन याबाबतची माहिती खाली दिली आहे.

| जमीन धारण क्षेत्र हेक्टर | एकूण खातेदार | एकूण धारण केलेली जमीन (हेक्टर) | एकूण खातेदारांशी प्रमाण | एकूण जमिनीशी प्रमाण |
|---|---|---|---|---|
| ०.० ते १.० | १,००,४८९ | ६१,२७५ | २६.४८ | ७.६२ |
| १.० ते २.० | १,३२,९८८ | १,९५,१८६ | ३५.०४ | २४.२९ |
| २.० ते ५.० | १,१९,७४० | ३,५८,०६३ | ३१.५५ | ४४.५६ |
| ५.० ते १०.० | २३,६७२ | १,५४,७९९ | ६.२४ | १९.२६ |
| १०.० ते २०.० | २,४८८ | ३०,८१९ | ०.६६ | ३.८४ |
| २०.०० पेक्षा जास्त | १२८ | ३,४६५ | ०.०३ | ०.४३ |
| एकूण | ३,७९,५०५ | ८,०३,६०७ | १००.०० | १००.०० |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, ५ ते १० हेक्टर जमीन धारकांचे प्रमाण ६.२४ टक्के असून त्यांनी धारण केलेल्या जमिनीचे एकूण जमिनीशी प्रमाण जवळपास १९.२६ टक्के आहे, तर १० ते २० हेक्टर जमीन धारकांचे प्रमाण ०.६६ टक्के व त्यानी धारण केलेल्या जमिनीचे प्रमाण ३.८४ टक्के आहे, जिल्ह्यात २० हेक्टरपेक्षा जास्त जमीन धारण करणारे १२८ खातेदार असून त्यांचे एकूण खातेदारांशी व धारण केलेल्या जमिनीचे प्रमाण अनुक्रमे ०.०३ व ०.४३ टक्के आहे.[६]

सन १९९५-९६ च्या कृषि जनगणनेनुसार जिल्ह्यात ४,१३,१४५ खातेदार होते. त्यांनी ७,४५,२७२ हेक्टर जमीन धारण केली होती. यात एक हेक्टरपर्यंत जमीन धारण करणारे अत्यल्प गटात, एक हेक्टर ते दोन हेक्टर पेक्षा कमी जमीन धारण करणारे अल्प गटात, दोन हेक्टर ते चार हेक्टरपेक्षा कमी जमीन धारण करणारे मध्यम गटात व १० हेक्टर पेक्षा अधिक जमीन धारण करणारे मोठ्या गटात असे त्यांचे वर्गीकरण होते. या गटांनुसार खातेदारांची जिल्ह्यातील संख्या अनुक्रमे १,३१,६०९ (क्षेत्र-७७,२४२ हेक्टर), १,४९,६०६ (क्षेत्र-२,१३,३७८ हेक्टर), ९९,५६६ (क्षेत्र-२,६४,७१६ हेक्टर), ३०,९१० (क्षेत्र-१,६९,३०१ हेक्टर), व १,४५४ (क्षेत्र-२०,६३५ हेक्टर) इतकी होती, त्यात अनुसूचित जातीचे एकूण खातेदार ३६,१५१ (धारण क्षेत्र-४९,६४१ हेक्टर), अनुसूचित जमातीचे २६,०३५ (धारण क्षेत्र-४९,१७६ हेक्टर) व इतर गटात मोडणारे ३,५०,७४६ (धारण क्षेत्र-६,५४,३२८ हेक्टर) खातेदार जिल्ह्यात होते.[७]

**कृषि विकास :** ग्रामीण भागातील जनतेची आर्थिक परिस्थिती व कृषि उत्पादनाबाबत स्थितीची पाहणी करण्यासाठी भारत सरकारने सन १९२६ मध्ये रॉयल कमिशनची नियुक्ती केली होती. कमिशनचा अहवाल १९२८ मध्ये सादर झाला. या अहवालात ग्रामीण लोकांचे राहणीमान सुधारण्यासाठी शेती उत्पादन वाढविण्याबरोबरच दुग्ध व्यवसायासारखे जोडधंदे शेती क्षेत्रात सुरू करण्याबाबत सुचविले होते. या अहवालातील शिफारशीनुसार शेतीविषयक संशोधन करण्याकरिता ' भारतीय कृषि अनुसंधान परिषद ' ही संस्था १९२९ साली स्थापन झाली. त्यानंतर १९४२ साली ' जास्त धान्य पिकवा ' ही मोहिम देशात सुरू झाली. या मोहिमेचे नंतर एकात्मिक उत्पादन कार्यक्रमात

६. **जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन,** नांदेड, २००४-०५, पृ. ४.

७. **कृषि सांख्यिकी विषयक माहिती,** महाराष्ट्र राज्य, २००६, भाग-२, कृषि आयुक्तालय, पुणे-२००६, पृ. २१८-२२५.

रुपांतर करण्यात आले. पुढे १९५१-५२ पासून पंचवार्षिक योजनेत शेती विकासाला बरेच महत्त्व दिले गेले. पण त्यावेळी कृषि तंत्रज्ञान फारसे विकसित झाले नव्हते. राज्यात संशोधनाची व कृषि विस्ताराची कामे १९६० नंतर जोरात सुरू झाली. त्यानंतर शेती विकासाबाबत सखोल अभ्यास करून उत्पादन वाढविण्याबाबत शिफारशी करण्याकरिता सन १९७२ मध्ये 'राष्ट्रीय कृषि आयोगाची' स्थापना करण्यात आली.[८]

**कृषि अर्थव्यवस्थेतील प्रमुख पिकांचे स्थान :** जिल्ह्यात खरीप व रब्बी पिके घेतली जातात. खरीप हंगामात ज्वारी, बाजरी, तूर, मूग, उडीद, भुईमूग व कापूस ही पिके घेतली जातात. रब्बी हंगामामध्ये गहू, हरभरा, करडई ही पिके प्रामुख्याने घेतली जातात. बारमाही पिकांमध्ये ऊस व केळी ही पिके घेतली जातात. जिथे ओलिताची सोय आहे अशा क्षेत्रात उन्हाळी भुईमूग, गहू, सूर्यफूल ही पिके घेतली जातात. भाजीपाला व फळे ही पिके पाण्याची सोय आहे, अशा ठिकाणी सर्वसाधारण वर्षभर घेतली जातात.

जिल्ह्यात १९९८-९९ मध्ये एकूण लागवडीखालील क्षेत्रापैकी ज्वारी ३०.१५ %, गहू २.०१ %, भात ४.७५ %, आणि बाजरी पिकांखाली ०.८५% क्षेत्र होते. एकूण तृणधान्याखाली ३७.०९% क्षेत्र होते. एकूण कडधान्याचे क्षेत्र १७.६६%, तर खाद्य पिकांचे क्षेत्र ५८.२०% होते. कापसाखाली ७.४६% क्षेत्र होते. व्यापारी पिकांमध्ये कापूस व ऊस ही पिके घेतली जातात. यासंबंधी सविस्तर माहिती याच ग्रंथात प्रकरण ४ मध्ये दिलेली आहे.

जिल्ह्यातील १९६०-६१ पासून दशवार्षिक अंतराने प्रमुख पिकांखालील क्षेत्राची माहिती खालील तक्त्यात दिली आहे.[९]

**जिल्ह्यातील प्रमुख पिकांखालील क्षेत्र**

(क्षेत्र '००' हेक्टरमध्ये)

| पिके | १९६०-६१ | १९७०-७१ | १९८०-८१ | १९९०-९१ | १९९५-९६ | २०००-०१ | २००४-०५ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| तांदूळ | २४० | २५५ | ३३७ | २९९ | २९० | २६७ | १६४ |
| गहू | २०५ | १७९ | ४०९ | २४९ | २३० | २६१ | ३१६ |
| ज्वारी (ख.) | २,३१२ | २,४९४ | २,५५६ | २,३२२ | २,१६० | २,०९० | १,६५३ |
| ज्वारी (र.) | ८१७ | ३९० | ४५३ | ३७८ | ३१६ | ३०१ | ३२६ |
| बाजरी | १९ | १४ | १९ | १७ | १० | २ | २ |
| इतर तृणधान्ये | ५३ | १६ | २४ | ६ | ९ | १६ | २५ |
| एकूण तृणधान्ये | ३,६४६ | ३,३४८ | ३,७९८ | ३,५७१ | ३,०१५ | २,९३७ | २,४८६ |

८. **महाराष्ट्र जल व सिंचन आयोग, अहवाल खंड १,** तात्विक चिंतन, महाराष्ट्र शासन, १९९९, पृ. २४७-२४८.
९. **कृषि सांख्यिकी विषयक माहिती,** महाराष्ट्र राज्य, २००२ व २००६ (भाग २), पृ. ७६ ते ९६.

क्षेत्र '००' हेक्टरमध्ये

| पिके | १९६०-६१ | १९७०-७१ | १९८०-८१ | १९९०-९१ | १९९५-९६ | २०००-०१ | २००४-०५ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| तूर | ४०३ | ४३९ | ३७२ | ४३३ | ४९६ | ५३२ | ५२८ |
| हरभरा | १४६ | १८२ | १४१ | १५१ | २६० | २१८ | ४०७ |
| इतर कडधान्ये | ३२८ | ६५७ | ५७७ | ४७० | ६९४ | १,०५१ | ७९२ |
| एकूण कडधान्ये | ८७७ | १,२७८ | १,०९० | १,०५४ | १,४५० | १,८०१ | १,७२७ |
| एकूण अन्नधान्ये | ४,५२३ | ४,६२६ | ४,८८८ | ४,३२५ | ४,४६५ | ४,७३८ | ४,२१३ |
| ऊस | — | ३२ | ४५ | १३० | १५० | १४७ | ९६ |
| कापूस | १,८८६ | १,९८६ | २,०४२ | २,३४९ | २,७४७ | २,७०० | २,३३२ |
| भुईमूग | १८२ | २९० | १५७ | ३८ | ५ | ४ | ५ |
| करडई | — | — | २८ | १०२ | ११६ | ७५ | ९४ |
| सूर्यफूल | — | — | ९ | ३४४ | २९९ | १३८ | १५७ |
| सोयाबीन | — | — | — | — | १५ | १०१ | १,१०३ |
| एकूण तेलबिया | — | — | ४०५ | ८९९ | ६०४ | ५१८ | १,५५८ |

जिल्ह्यातील सन १९६०-६१ पासून दशवार्षिक अंतराने प्रमुख पिकांचे उत्पादन खालीलप्रमाणे होते.[१०]

(उत्पादन ०० मे.टन)

| पिके | १९६०-६१ | १९७०-७१ | १९८०-८१ | १९९०-९१ | १९९५-९६ | २०००-०१ | २००४-०५ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| तांदूळ | १९५ | १३९ | ४१३ | २९३ | १६७ | २०१ | ८२ |
| गहू | १११ | ५६ | २७५ | २१५ | २३९ | २८२ | ३८५ |
| ज्वारी (ख.) | २,००९ | ६१२ | १,८७९ | २,८४४ | २,०४६ | २,५६६ | २,१२७ |
| ज्वारी (र.) | ६५२ | १०२ | २१३ | २५१ | २७८ | २१५ | २७८ |
| बाजरी | ५ | ६ | ८ | १० | ६ | १ | १ |
| इतर तृणधान्ये | १५ | ५ | ११ | ६ | १४ | १२ | २३ |
| एकूण तृणधान्ये | २,९८७ | ९२० | २,८१७ | ३,६१९ | २,७५० | ३,२७७ | २,८९६ |

१०. **कृषि सांख्यिकी विषयक माहिती,** पूर्वोक्त, २००६, पृ. ९८ ते ११९.

(उत्पादन ०० मे.टन)

| पिके | १९६०-६१ | १९७०-७१ | १९८०-८१ | १९९०-९१ | १९९५-९६ | २०००-०१ | २००४-०५ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| तूर | २११ | ९८ | १२५ | १२२ | १२८ | २५४ | ४७८ |
| हरभरा | ४३ | २३ | ५२ | ६२ | ८९ | ७५ | २०४ |
| इतर कडधान्ये | १०७ | ९१ | १३७ | १३५ | ४३१ | ४३२ | ३९४ |
| एकूण कडधान्ये | ३६१ | २१२ | ३१४ | ३१९ | ६४८ | ७६१ | १,०७६ |
| एकूण अन्नधान्ये | ३,३४८ | १,१३२ | ३,१३१ | ३,९३८ | ३,३९८ | ४,०३८ | ३,९७२ |
| ऊस | — | २,१५१ | ३,५२४ | ९,६२३ | ९,००९ | ९,५३६ | ४,७१७ |
| कापूस | १,२४३ | २७३ | ९५१ | १,२३९ | १,८३९ | ८३४ | १,९४९ |
| भुईमूग | १५९ | १३४ | ६२ | १४ | २ | २ | १ |
| करडई | — | — | ५ | ४३ | ६१ | २६ | ४४ |
| सूर्यफूल | — | — | ४ | २१९ | — | ६० | १० |
| सोयाबीन | — | — | — | — | १९ | ९१ | १,०३५ |
| एकूण तेलबिया | — | — | १३९ | ४९८ | ३५५ | २४६ | १,२५१ |

जिल्ह्यातील सन १९६०-६१ ते १९८६-८७ या कालावधीतील पिकनिहाय सरासरी उत्पादन व महाराष्ट्र राज्याचे सरासरी उत्पादन खालीलप्रमाणे होते.[११]

(प्रति हेक्टरी उत्पादन किलोग्रॅममध्ये)

| पिकाचे नाव | | १९६०-६१ | १९७०-७१ | १९८०-८१ | १९९०-९१ | २०००-०१ | २००४-०५ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| खरीप ज्वारी | जि. | ८६९ | २४५ | ६९९ | १,२२५ | १,२२८ | १,२८७ |
| | रा. | ८६४ | ३५० | १,१२५ | ९३९ | ७८३ | — |
| रब्बी ज्वारी | जि. | ७९८ | २६२ | ४७० | ६६४ | ७१३ | ८५३ |
| | रा. | ५४१ | २१२ | ५३८ | ८५५ | ६२३ | — |
| भात | जि. | ८१३ | ५४५ | १,२७९ | ९८१ | ७५३ | ५०० |
| | रा. | १,०५४ | १,२२९ | १,१२५ | १,४६३ | १,२७६ | — |
| बाजरी | जि. | २६२ | ४१४ | ४२१ | ५६८ | ६३० | ४३२ |
| | रा. | २९९ | ४०४ | ४२१ | ५७८ | ६०४ | — |
| गहू | जि. | ५३९ | ३१६ | ६७२ | ८६३ | १,०८० | १,२१८ |
| | रा. | ४४२ | ५४२ | ८६६ | १,०५२ | १२७ | — |

११. **यथार्थदर्शी योजना,** पूर्वोक्त, पृ. ४६, आणि कृषि सांख्यिकी विषयक माहिती पूर्वोक्त २००२, (भाग २) पृ. १८०-२१० आणि कित्ता, २००६ (भाग २) पृ. १२०-१३४.

(प्रति हेक्टरी उत्पादन किलोग्रॅममध्ये)

| पिकाचे नाव | | १९६०-६१ | १९७०-७१ | १९८०-८१ | १९९०-९१ | २०००-०१ | २००४-०५ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| तूर | जि. | ५२५ | २२३ | ३३६ | २८२ | ४७८ | ९०५ |
| | रा. | ८८३ | ४३२ | ६०३ | ४१८ | ६०२ | — |
| हरभरा | जि. | २९२ | १२५ | ३६१ | ४१० | ३४४ | ५०१ |
| | रा. | ३३४ | २८१ | ४४८ | ५३२ | ५१९ | — |
| भुईमूग | जि. | ८७२ | ४६२ | ३९५ | ३५९ | ४५६ | ६०८ |
| | रा. | ७३४ | ६४० | ७३६ | १,१२५ | ९५९ | — |

(जि.-जिल्हा, रा.-राज्य.)

सातव्या योजनेअखेर (१९८५-८६ ते १९८९-९०) शासनाने अन्नधान्याच्या बाबतीत राज्याची गरज पूर्ण करण्यासाठी व स्वयंपूर्ण होण्याच्या दृष्टिने विकासाचे धोरण ठरविले. त्याप्रमाणे डाळवर्गीय व तेलबियाणांचे बाबतीत स्वयंपूर्ण होण्यासाठी जमिनीच्या मगदुराप्रमाणे भूमी उपयोग क्षमतेनुसार आणि भूपर्जन्यमानाचा विचार करून धान्य उत्पादन वाढीसाठी आराखडा व पीक रचना घेण्याचे धोरण आखून देण्यात आले. त्यानुसार पिकांच्या उत्पादन वाढीसाठी कृषि उत्पादनात नवीन वाणांचा समावेश, रासायनिक खतांचा संतुलित वापर, जैविक खतांचा वापर, कीड नियंत्रक बियाणांचे प्रमाण वाढवून संकरित बियाणांचा वापर करण्याचे धोरण ठरविले. तसेच उत्पादन वाढीसाठी निरनिराळ्या साधन सामुग्रीवर भर देऊन व जमिनीच्या प्रकारानुसार पिकांचे फेरबदल सूचवून, त्याचप्रमाणे आंतरपिके घेऊन हेक्टरी उत्पादनात वाढ करण्याचे धोरणसुद्धा शासनाने ठरवून दिले. शासनाचा उत्पादन वाढीचा उद्देश लक्षात घेऊन सन १९९०-९१ मध्ये जिल्ह्यात जास्त उत्पादनाचे उद्दिष्ट साध्य करण्यात आले. आठव्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधीत १९९६-९७ मध्ये जास्त उत्पादन काढण्यात आले. मात्र अवर्षण, गारपीट व अतिवृष्टीमुळे पीक परिस्थितीवर परिणाम झाल्यामुळे आठव्या पंचवार्षिक योजना कालावधीत उत्पादन वाढीचा दर कायम राहिला नाही.

सन १९९९-२००० मध्ये जिल्ह्यातील प्रमुख पिकाचे प्रत्येक पिकाचे राज्यस्तरावरील एकूण क्षेत्राशी शेकडा प्रमाण पुढीलप्रमाणे होते.[१२] भात (खरीप) १.८, ज्वारी (खरीप) १२.५, ज्वारी (रब्बी) २.३, हरभरा ४.८, तूर ५.२, ऊस २.३, कापूस ८.६, भुईमूग (खरीप) ०.१, भुईमूग (उन्हाळी) ८.१, तीळ ५.७, करडई २.३ व जवस १.६.

सन १९९१-२००० मध्ये जिल्ह्यात एकूण निव्वळ बागायत क्षेत्र ८७,६०० हेक्टर होते. राज्याच्या एकूण बागायत क्षेत्रापैकी जिल्ह्यात २.०० टक्केपेक्षा अधिक बागायत क्षेत्र होते. अधिक धान्य उत्पादनासाठी जिल्ह्यात २००१-०२ व २००४-०५ मध्ये सुधारित बियाणांचे वर्षनिहाय पुढील प्रमाणे वाटप करण्यात आले होते. भात २११ व ७९ क्विंटल, ज्वारी २,२१४ व १,२६८ क्विंटल, बाजरी २८ व ३ क्विंटल, गहू ७,११८ व ९,८८२ क्विंटल, तूर १३५ व २९२ क्विंटल, मूग १,०९४ व ७१८ क्विंटल, उडीद ३,८२० व ३,०३१ क्विंटल, हरभरा २५४ व ९२४ क्विंटल, संकरित कापूस

१२. **कृषि सांख्यिकी विषयक माहिती,** पूर्वोक्त, २००६, पृ. १६७-१६८.

१,०७४ व ५२८ क्विंटल, सुधारित कापूस ८८४ व ६५६ क्विंटल व करडई १७३ व १५६ क्विंटल. भुईमूग २००४-०५ मध्ये ९७ क्विंटल, सूर्यफूल ७३ क्विंटल, तीळ १६ क्विंटल व सोयाबीन ४४,३०९ क्विंटल.[१३] वरील आकडेवारीवरून असे दिसून येते की, जिल्ह्यात सर्वात जास्त सोयाबीन बियाणाचे वाटप झाले होते. कारण कापसाला मिळणारा कमी भाव व विविध किडींमुळे मिळणरे कमी पीक. यामुळे शेतकऱ्यांचा जास्त कल सोयाबीनचे पीक नगदी पीक म्हणून घेण्याकडे दिसून येतो. सन २०००-०१ मध्ये जिल्ह्यात पेरलेले निव्वळ क्षेत्र ७,३३,६००, दुसोटा क्षेत्र ८३,१००, व पिकाखालील एकूण क्षेत्र ८१,६७,०० हेक्टर होते. हे क्षेत्र राज्याच्या तुलनेत अनुक्रमे ४.११, २.०८, ३.७४ टक्के होते.

सन १९६१ ते २००४ या ४४ वर्षांच्या कालावधीतील प्रमुख पिकांचे कृषि क्षेत्र, उत्पादन व उत्पादकता यांच्या संयुक्त वाढीचे प्रमाण खालीलप्रमाणे होते.[१४]

**संयुक्त वाढीच्या प्रमाणाची टक्केवारी**

| पीक | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता |
|---|---|---|---|
| भात (खरीप) | २.२६ | ०.२९ | ०.५५ |
| ज्वारी (खरीप) | ०.५९ | २.१३ | २.७३ |
| बाजरी | ४.१९ | १.७६ | २.२८ |
| गहू | १.१४ | ३.२४ | ३.३७ |
| ज्वारी (रब्बी) | १.५७ | ०.१९ | १.७९ |
| एकूण तृणधान्ये | ०.७२ | १.८१ | २.५५ |
| तूर | १.१५ | २.५१ | १.३५ |
| हरभरा | ०.०५ | १.४३ | १.४९ |
| एकूण कडधान्ये | १.२२ | २.१९ | १.४१ |
| एकूण अन्नधान्ये | ०.०९ | २.१० | २.२० |
| भुईमूग (खरीप) | ११.२४ | ११.६५ | ०.५१ |
| करडई | ४.२३ | ६.४१ | २.१२ |
| एकूण गळीत धान्य | २.९५ | ६.०२ | ३.१८ |
| ऊस | ६.३१ | १०.९३ | ०.९६ |
| कापूस | १.०९ | २.६१ | १.६१ |

१३. **कृषि सांख्यिकी विषयक माहिती,** पूर्वोक्त, २००२ व २००६, पृ. ५५-६९ व ५६ ते ६८.

१४. **कृषि सांख्यिकी विषयक माहिती,** पूर्वोक्त, २००६, भाग २, पृ. २२४-२४०.

Maharashtra State Gazetteers

सन २००१-०२ मध्ये जिल्ह्यातील व राज्यातील प्रमुख पिकांखालील क्षेत्राशी असलेली राज्यातील व जिल्ह्यातील पीक उत्पादनाची टक्केवारी खालील प्रमाणे होती.[१५]

| पिकांचा प्रकार | राज्य क्षेत्र '००' हेक्टर | राज्याच्या पिकाखालील क्षेत्राशी जिल्ह्याच्या पिकांखालील क्षेत्राची टक्केवारी | राज्य उत्पादन '००' मे.टन | राज्य उत्पादनाशी जिल्हा उत्पादनाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| भात | १५,१४० | १.५८ | २६,५१२ | ०.९२ |
| गहू | ७,७६० | ३.४४ | १०,७७० | ३.२२ |
| ज्वारी (खरीप) | १७,८०३ | १०.१८ | २०,७३१ | १०.०६ |
| ज्वारी (रब्बी) | ३३,५६० | ०.९० | १८,३६५ | १.६९ |
| बाजरी | १३,९९२ | ०.०४ | ८,३०८ | ०.०२ |
| एकूण तृणधान्ये | ९४,१६० | २.८१ | ९३,०५३ | ३.२७ |
| तूर | १०,१७३ | ५.१४ | ७,७०६ | ५.१८ |
| हरभरा | ७,५६३ | ३.४४ | ४,५०५ | ३.५१ |
| एकूण कडधान्ये | ३३,८७६ | ५.३३ | १८,७९६ | ४.५३ |
| एकूण अन्नधान्ये | १,२७,९८२ | ३.४८ | १,११,८४९ | ३.४८ |
| ऊस | ५,७८२ | २.५४ | ४,५१,३९८ | २.०४ |
| कापूस | ३१,०४७ | ७.९१ | २६,८९६ | ६.१४ |
| भुईमूग (ख.) | ३,५३४ | ०.०६ | ४,१८४ | ०.४३ |
| सोयाबीन | ११,०४९ | १.९३ | १३,८५५ | २.४८ |
| एकूण तेलबिया | २३,५९२ | २.७७ | २२,२६२ | २.७८ |

आर्थिक विकासाला हातभार लावण्यासाठी जिल्ह्यात फळे व भाजीपाल्यामध्ये कांदा व केळी ही पिके प्रामुख्याने घेतली जातात. त्याचबरोबर जिल्ह्यात १९९९ पासून द्राक्षाचे पिकसुद्धा घेण्यात येत आहे. जिल्ह्यातील वरील पिकांचे क्षेत्र व उत्पादन खाली दिले आहे.[१६]

केळी

| वर्ष | क्षेत्र ('००' हेक्टर) | दर हेक्टरी उत्पादन क्षमता (टनात) | वर्ष | क्षेत्र ('००' हेक्टर) | दर हेक्टरी उत्पादन क्षमता (टनात) |
|---|---|---|---|---|---|
| १९८७-८८ | ८ | ४६.६८ | २०००-०१ | ६० | ५०.५५ |
| १९९०-९१ | १४ | ४४.८० | २००४-०५ | ६२ | ६९.३२ |
| १९९५-९६ | ५७ | ५३.४९ | | | |

१५. **कृषि सांख्यिकी विषयक माहिती,** २००६, पूर्वोक्त, पृ. ७६ ते ११९.

१६. कित्ता, पृ. १४५, १६२, १४९.

| वर्ष | क्षेत्र ('००' हेक्टर) | दर हेक्टरी उत्पादन क्षमता (टनात) | वर्ष | क्षेत्र ('००' हेक्टर) | दर हेक्टरी उत्पादन क्षमता (टनात) |
|---|---|---|---|---|---|
| कांदा | | | | | |
| १९८८-८९ | ३ | ७.३३ | १९९५-९६ | ८ | ९.५७५ |
| १९९०-९१ | ३ | ९.२७१ | २०००-०१ | २.३५ | १३.७०२ |
| द्राक्षे | | | | | |
| १९९९-२००० | ३८ | २२.५२ | २०००-०१ | ३८ | २१.२२ |
| | | | २००४-०५ | ५३ | २८.०७ |

## जलसिंचन

राष्ट्रकूट घराण्यातील तिसरा कृष्णराज याच्या कालखंडातील कालमेघ नावाच्या एका अधिकाऱ्याने कोरलेल्या एका शिलालेखात कंधार नगरातील जगत्तुंग नावाचे सरोवर आणि या नगरातील जलसिंचन व्यवस्थेचे विस्तृत वर्णन आलेले आहे. ह्या लेखात या परिसरात एकूण पाच 'प्रपा' (पाणपोई) निर्माण केल्याचा उल्लेख आहे. जगत्तुंग तलाव हा कंधार या सद्याच्या तालुक्याच्या गावाजवळ असून तो पिण्याचे व सिंचनाचे पाणी उपलब्ध करून देत आहे.[१७]

**सिंचन विकास :** सन १८५८ ते १८६७ या कालावधीत त्यावेळच्या ब्रिटिश सरकारने भांडवली गुंतवणुकीवर पाच टक्के फायदा देण्याचे कबूल करून ईस्ट इंडिया इरिगेशन कंपनी व मद्रास इरिगेशन कंपनी यांच्यावर सिंचन प्रकल्पाची कामे करण्याची जबाबदारी सोपविली. परंतु या दोन्ही कंपन्या काम करण्यामध्ये अपयशी ठरल्यामुळे सरकारने या कंपन्यांकडून झालेली अर्धवट कामे परत घेतली. सन १८६७ नंतर सरकारने स्वतंत्र पाटबंधारे विभाग स्थापन करून बांधकाम संघटना तयार केली. या नवीन पद्धतीत सरकारने हाती घेतलेली प्रकल्पांची कामे व त्यातील भांडवली गुंतवणूक ही समाधानकारक व उपयुक्त वाटल्याने त्यापुढील सिंचनाचे प्रकल्प शासकीय खर्चाने शासकीय संघटनेमार्फत करण्याचे धोरण राबविण्यात आले. सध्याच्या शासकीय पाटबंधारे यंत्रणेचा व कार्यपद्धतीचा उगम येथून झाला असे म्हणावे लागेल.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात भीषण दुष्काळ पडल्यामुळे ब्रिटिश सरकारला नाईलाजाने किमान संरक्षक पाटबंधारे योजना हाती घ्याव्या लागल्या. महाराष्ट्रातील पहिले मोठे सिंचन काम म्हणजे १८७० साली बांधलेला खोडशी (जिल्हा-सातारा) येथील कृष्णेचा कालवा होय.[१८]

महाराष्ट्राची निर्मिती दि. १ मे १९६० रोजी झाली. पंचवार्षिक योजना १९५१ पासून सुरू झाल्या. मराठवाड्यात सन १९५४ पर्यंत कोणतेही नाव घेण्यासारखे सिंचन काम पूर्ण झाले नव्हते. सन १९६०

१७. महाराष्ट्र जल व सिंचन आयोग, **अहवाल** खंड १, पूर्वोक्त, पृ. २२.

१८. कित्ता, पृ. ३०-३१.

मध्ये तत्कालीन पाटबंधारे खात्याचे मंत्री व अर्थतज्ञ स. गो. बर्वे यांच्या अध्यक्षतेखाली भविष्यकालीन सिंचनाची दिशा व धोरण आखण्यासाठी महाराष्ट्र सिंचन आयोग नेमण्यात आला.[१९] यानंतर सिंचन विकासाबाबत सुधारणा करण्याकरिता सन १९७३ मध्ये अवर्षण प्रवण क्षेत्रासाठी सत्यशोधन समिती, सन १९७९ मध्ये आठमाही पाणी वापर समिती व सन १९८१ मध्ये सुरेश जैन यांच्या अध्यक्षतेखाली सिंचन व्यवस्थापनाबाबत उच्चाधिकार समिती नेमण्यात आली.

जिल्ह्यातील शेती ही सर्वस्वी मोसमी पावसावर अवलंबून आहे. मोसमी पाऊस अपुरा व बेभरवशाचा असल्याने स्वातंत्र्यापूर्वी सिंचनाचे धोरण याच वस्तुस्थितीवर आधारलेले होते. आजही स्वातंत्र्यानंतर हाच नियोजनाचा आधार मानला जातो. या पार्श्वभूमीवर मध्यम आणि मोठी धरणे बांधून कालव्यांच्या जाळ्यांमधून सिंचनाची निश्चिती करण्यात आली आहे. त्यातूनच उसाची शेती व सहकारी कारखानदारी स्थिरावली आहे. त्यांची शक्ती राज्याच्या ग्रामीण आणि आर्थिक व्यवस्थेला मिळाली आहे. या संघटित सिंचनाचे फायदे दिसत असले, तरी त्यातून सुमारे दोन ते तीन टक्के शेतजमिनीला आणि शेतकऱ्यांना फायदा मिळालेला आहे. यातून मोठ्या प्रमाणात ग्रामीण जीवनात असमतोल निर्माण झाला आहे. त्याबरोबरच ग्रामीण भागात वेगवेगळ्या वर्गात प्रादेशिक असमतोलही निर्माण झाला आहे. संघटित सिंचनाची मर्यादित क्षेत्रे सोडल्यास उरलेल्या जिराईत शेतीचे प्रश्न हे प्रामुख्याने नियोजन कार्यापुढे आजही आहेत.

कृष्णा आंतरराज्य पाणी वाटप तंटा लवादाच्या निर्णयानुसार महाराष्ट्र राज्यात कृष्णा खोऱ्यातील ५९९ अब्ज घनफूट पाण्याचा वापर अनुज्ञेय आहे. हे लक्ष्य सन २००० मध्ये साध्य करण्यासाठी शासनाने महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाची १९९६ मध्ये स्थापना केली. त्यानंतर राज्यातील इतर पाटबंधारे प्रकल्पांची कामे जलद गतीने पूर्ण होण्यासाठी शासनाने विदर्भ, तापी व गोदावरी-मराठवाडा ही पाटबंधारे विकास महामंडळे स्थापन केली असून त्या त्या भागातील पाटबंधारे प्रकल्पांची कामे ह्या महामंडळांकडे हस्तांतरीत केली आहेत. गोदावरी-मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाची स्थापना दि. २७ सप्टेंबर १९९८ रोजी झाली. या मंडळाकडून नांदेड जिल्ह्यातील पाटबंधाऱ्याचे काम केले जाते. गोदावरी खोऱ्याअंतर्गत मराठवाड्यातील आठ जिल्हे व नाशिक महसूल विभागातील नाशिक व अहमदनगर या दोन जिल्ह्यात ९३८ प्रकल्प प्रस्तावित असून ते सर्व पूर्ण झाल्यावर एकूण १६.५३ लाख हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होईल.[२०]

जिल्ह्यात पाटबंधाऱ्यांच्या सोयी तिसऱ्या पंचवार्षिक योजनेपासून खऱ्या अर्थाने सुरू झाल्या. दुसऱ्या पंचवार्षिक योजना काळात नांदेड जिल्हा परिषदेमार्फत जिल्ह्यातील १२७ तळ्यांची पाहणी करून त्यांचे पाणी शेतीसाठी पुरविण्याच्या दृष्टिने कार्यक्रम आखण्यात आला. तिसऱ्या योजना काळात यापैकी ६५ तळ्यांचे काम हाती घेण्यात आले. त्यापैकी ३२ तळ्यांचे काम पूर्ण करण्यात आले. या तळ्यांपासून ३,२३२ हेक्टर शेती ओलिताखाली आली.[२१]

---

१९. महाराष्ट्र जल व सिंचन आयोग, **अहवाल**, खंड १, पूर्वोक्त, पृ. ३३-३४.

२०. कित्ता, पृ. ९४७.

२१. **योजनेने आपल्यासाठी काय केले?** नांदेड जिल्हा, प्रसिद्धी संचालनालय, महाराष्ट्र शासन, १९९६, पृ. ११. एचएफ ४२१०—४९अ

Maharashtra State Gazetteers

दुसऱ्या पंचवार्षिक योजना काळात जिल्ह्यात २,१८० नव्या विहिरी खोदण्यात आल्या व १,०९७ जुन्या विहिरी दुरुस्त करण्यात आल्या. यावर ४३.६ लाख रुपये खर्च करण्यात आले होते. या विहिरींपासून १०,१०० हेक्टर जमीन सिंचनाखाली आली. तिसऱ्या पंचवार्षिक योजना काळात ५,८८१ नवीन विहिरी खोदण्यात आल्या व २८९ विहिरींची दुरुस्ती करण्यात आली.[२२]

तिसऱ्या पंचवार्षिक योजना काळात जिल्ह्यात केदारनाथ, किणी, गोरठा, शेंबोली, आमठाणा, मुखेड, देगलूर, कोष्टेवाडी, कारला, बेदराळी, लडका व पिंपराळा या ठिकाणी लघु पाटबंधारे कार्यक्रम हाती घेण्यात आला. यापैकी या योजना काळात केदारनाथ व किणी या तलावांचे काम पूर्ण करण्यात आले. त्यायोगे २,४९२ हेक्टर जमीन ओलिताखाली आली. तसेच गोरठा, शेंबोली व आमठाणा येथील सुद्धा कामे पूर्ण होऊन १,१११ हेक्टर जमीन ओलिताखाली आली होती. चौथ्या योजनेत सीता व कुंद्राळा तलावांचे काम हाती घेतले होते.[२३]

चौथ्या पंचवार्षिक योजना काळात उर्ध्व पैनगंगा या मोठ्या प्रकल्पाचे आणि कुद्रांळा, करडखेड, पेठवडज व महालिंगी या मध्यम प्रकल्पांचे तसेच अन्य २२ लघु पाटबंधारे तलावांचे काम हाती घेण्यात आले.

पाचव्या पंचवार्षिक योजना काळात विष्णुपुरी या मोठ्या प्रकल्पाचे काम हाती घेण्यात आले. त्याचबरोबर नागझरी, लोणी व डोंगरगाव या मध्यम प्रकल्पांचे व १६ लघु पाटबंधारे तलावांचे काम सुरू करण्यात आले.

सहाव्या पंचवार्षिक योजना कालावधीत लेंडी, सावरगाव व लोहा मांडवा या मोठ्या प्रकल्पांचे व उर्ध्व मानार या मध्यम प्रकल्पाचे काम हाती घेण्यात आले. याच कालावधीत ११ लघु पाटबंधारे तलावांचे काम हाती घेण्यात आले.

सातव्या योजनेपर्यंत जिल्ह्यात पूर्ण झालेल्या प्रकल्पांमध्ये एक मोठा सिंचन प्रकल्प, नऊ मध्यम प्रकल्प व ६६ राज्यस्तरीय लघु पाटबंधारे प्रकल्प पूर्ण झाले होते. या सर्व प्रकल्पांपासून ७७,१९३ हेक्टर क्षेत्र ओलिताखाली आले होते. याव्यतिरिक्त परभणी जिल्ह्यातील पूर्णा प्रकल्पाच्या क्षेत्रात सुमारे २० हजार हेक्टर क्षेत्र तसेच उर्ध्व पैनगंगा प्रकल्पाच्या क्षेत्रात सुमारे १६ हजार हेक्टर क्षेत्र ओलिताखाली होते. स्थानिकस्तरीय लघु पाटबंधाऱ्यांची संख्या १५७ होती व त्यापासून ८,७७५ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली होती. जिल्ह्यात ४२ उपसा सिंचन योजना होत्या व त्यापासून १५,५०६ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली होती. योजनेअखेर जिल्ह्यात विविध साधनांद्वारा १.३८ लाख हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली होती. त्यात सर्वात जास्त नांदेड तालुक्यात सुमारे ४१ हजार हेक्टर व सर्वात कमी मुखेड तालुक्यात ८ हजार हेक्टर होती. सातव्या योजनेअखेर जिल्ह्यात राज्य स्थानिक स्तरीय अनुक्रमे सहा व ५२ कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांचे सर्वेक्षण करण्यात आले होते. त्यापैकी नऊ बंधाऱ्यांचे काम पूर्ण झाले होते. याच कालावधीत जिल्ह्यात ५४ पाझर तलावांचे काम पूर्ण करण्यात आले होते.[२४]

**गावतळी :** सिंचनाच्या सोयी होण्यापूर्वी प्रत्येक गावात लहान-मोठे गावतळे असे. पावसाळ्यानंतर घरगुती वापराकरिता व पशुधनासाठी लागणाऱ्या पाण्याची सोय व्हावी म्हणून आवश्यकतेप्रमाणे अनेक

---

२२. **योजनेने आपल्यासाठी काय केले?** पूर्वोक्त, पृ. ११-१२.

२३. कित्ता, पृ. १०.

२४. **यथार्थदर्शी योजना,** जिल्हा नांदेड, पूर्वोक्त, पृ. १८.

गावी गावतळी बांधलेली आहेत. सन १९७५ पासून शासनाने वेळोवेळी आदेश काढून अवर्षणप्रवण भागात गावतळी बांधण्याचे आदेश दिले आहेत. एप्रिल १९९५ मध्ये जिल्ह्यात बांधकाम पूर्ण झालेल्या गावतळ्यांची संख्या ३२ व बांधकामाधीन तळ्यांची संख्या ४५ होती.[२५]

**मालगुजारी तलाव :** या तलावांची सुरुवात विदर्भात गोंड राजाच्या कालावधीत झाली. या तलावांची मालकी मालगुजारांकडे असे म्हणून यांना मालगुजारी तलाव असे संबोधण्यात येऊ लागले. अशा तलावांचे जाळे पूर्व मराठवाड्यात (तालुका बिलोली, जिल्हा नांदेड) येथेही अस्तित्वात असल्याचे दिसते. या भागात आज सुद्धा १०० पेक्षा जास्त जुने मालगुजारी तलाव कार्यान्वित आहेत. यावरील सिंचन व्यवस्थापन आजसुद्धा लोकव्यवस्थेतून राबविले जाते.[२६] कंधार तालुक्यात अल्प प्रमाणात असे तलाव आहेत.

**विहिरींद्वारे जलसिंचन :** कालव्यांद्वारे सिंचनाच्या सोयी होण्यापूर्वी विहिरींद्वारे शेतीला पाणी दिले जात असे. त्यास मोटस्थळ म्हणत असत. विहिरींसाठी शासनाने बँकेमार्फत तसेच इतर योजनाअंतर्गत नवीन विहीर खोदणे, जुन्या विहिरींची दुरुस्ती तसेच विहिरींवर विद्युतपंप किंवा ऑईल इंजिन बसविण्यासाठी कर्ज पुरवठा करण्याची योजना अंमलात आणल्यामुळे या योजनेस चांगला प्रतिसाद मिळत आहे. खालील विवरणात जिल्ह्यातील विहिरींची संख्या व त्याखाली भिजणारे क्षेत्र दिले आहे.[२७]

| वर्ष | विहिरींची संख्या | सिंचनक्षेत्र (००) हेक्टर | वर्ष | विहिरींची संख्या | सिंचनक्षेत्र (००) हेक्टर |
|---|---|---|---|---|---|
| १९५६-५७ | २,८८० | १५२ | १९८०-८१ | १२,२९३ | १४९ |
| १९६०-६१ | ६,७४७ | १७६ | १९८४-८५ | १३,८४१ | १४१ |
| १९६५-६६ | ७,६३५ | २९५ | १९९१-९२ | १८,७४२ | २९८ |
| १९७०-७१ | १०,२०२ | १०३ | १९९४-९५ | २१,४०० | ६८३ |
| १९७४-७५ | १०,९९८ | १४० | १९९९-२००० | २४,०१५ | ४४५ |

**कोल्हापूर पद्धतीचे बंधारे :** महाराष्ट्रात कोल्हापूर पद्धतीचा बंधारा हा एक वैशिष्ट्यपूर्ण सिंचन बंधाऱ्याचा प्रकार कालौघात विकसित झाला आहे. सन १९३८ मध्ये कोल्हापूरच्या राजाराम महाराजांनी कोल्हापूर जवळ बावडा येथे पहिला दगडी बंधारा बांधला. हा बंधारा आजच्या कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्याचे प्राथमिक रूप मानले जाते. जिल्ह्यात एप्रिल १९९५ पर्यंत २६ बंधाऱ्यांचे काम पूर्ण झाले होते, तर जून २००५ पर्यंत १३२ बंधाऱ्यांचे काम पूर्ण झाले होते व त्यापासून ६,३९० हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली होती.

---

२५. **महाराष्ट्र जल व सिंचन आयोग,** पूर्वोक्त, पृ. ८४७ व ८७९.

२६. कित्ता, पृ. २६-२७.

२७. **सिझन अँड क्रॉप रिपोर्ट,** कृषि आयुक्तालय, पुणे, संबंधित वर्षाचे.

यात दर्शविलेल्या विहिरींमध्ये नादुरुस्त विहिरी, सिंचनासाठी उपयुक्त असूनही त्याद्वारे सिंचन केले जात नसलेल्या विहिरी व घरगुती कारणासाठी वापरल्या जात असल्यामुळे सिंचनासाठी उपयोग होत नसलेल्या विहिरींचा समावेश असल्याने विहिरींची संख्या व सिंचनक्षेत्राचे प्रमाण यात तफावत दिसत आहे.

**पाझर तलाव :** राज्यात १९७२ साली तीव्र दुष्काळ पडला होता. त्यावेळी दुष्काळावर कायमचे व दीर्घकालीन उपाय म्हणून लोकांना रोजगार पुरविण्याच्या दृष्टिने पाझर तलावांची कामे मोठ्या प्रमाणात हाती घेण्यात आली. सन १९९२-९३ मध्ये ५३ पाझर तलावांचे बांधकाम पूर्ण झाले होते, तर एप्रिल १९९५ अखेर ६२ पाझर तलावांचे काम पूर्ण झाले होते.

जिल्ह्यात जून २००५ अखेर प्रत्यक्षात सिंचन क्षमता निर्माण झालेल्या प्रकल्पांची संख्या व त्यांची सिंचन क्षमता यांचा तपशील खाली दिला आहे.[२८]

| प्रकल्पांचा प्रकार | संख्या | एकूण सिंचन क्षमता (हेक्टर) | जून २००५ अखेर निर्माण झालेली सिंचन क्षमता (हेक्टर) |
|---|---|---|---|
| १. मोठे प्रकल्प | १ | ४३,६६३ | ४३,६६३ |
| २. मध्यम प्रकल्प | ८ | ११,९२४ | ११,९२४ |
| ३. लघु प्रकल्प (राज्यस्तर) (२५० हेक्टरपेक्षा जास्त) | ४९ | २२,१४६ | २२,१४६ |
| ४. लघु प्रकल्प (स्थानिकस्तर) (१०१ ते २५० हेक्टर) | २० | ३,७८९ | ३,७८९ |
| ५. लघु प्रकल्प (स्थानिकस्तर) (० ते १०० हेक्टर) | ३०७ | १३,५८६ | १३,५८६ |
| ६. उपसा सिंचन योजना (राज्यस्तर) (२५० हेक्टरपेक्षा जास्त) | १९ | ११,८९२ | ११,८९२ |
| ७. उपसा सिंचन योजना (स्थानिकस्तर) (१०१ ते २५० हेक्टर) | १५ | २,३०४ | २,३०४ |
| ८. उपसा सिंचन योजना (स्थानिकस्तर) (० ते १०० हेक्टर) | ६ | ५१२ | ५१२ |
| ९. कोल्हापूर बंधारे (राज्यस्तर) (२५० हेक्टरपेक्षा जास्त) | २ | ५४३ | ५४३ |
| १०. कोल्हापूर बंधारे (राज्यस्तर) (१०१ ते २५० हेक्टर) | ७ | १,२२२ | १,२२२ |
| ११. कोल्हापूर बंधारे (स्थानिकस्तर) (० ते १०० हेक्टर) | १२३ | ४,६२५ | ४,६२५ |
| एकूण . . | ५५७ | १,१६,२०६ | १,१६,२०६ |

२८. लघु पाटबंधारे विभाग, नांदेड, **जिल्हा पुस्तिका**, २००५, पृ. २.

Maharashtra State Gazetteers

जिल्ह्यातील जून, २००५ पर्यंत पूर्ण झालेले सर्व प्रकल्प, कोल्हापूर पद्धतीचे बंधारे व उपसा सिंचन योजना व त्याखाली भिजणाऱ्या क्षेत्राची तालुकानिहाय माहिती तक्ता क्रमांक १ मध्ये दिली आहे. तसेच जिल्ह्यातील सर्व सिंचन योजनांवर पंचवार्षिक योजनानिहाय झालेला खर्च तक्ता क्रमांक २ मध्ये दिला आहे.[२९]

जिल्ह्यातील पंचवार्षिक योजनानिहाय हाती घेतलेले प्रकल्प व प्रकल्पनिहाय सिंचनाखालील क्षेत्राचा तपशील खालील विवरणात दिला आहे.[३०]

| अ. क्र. | कालावधी | मोठे प्रकल्प संख्या | मध्यम प्रकल्प संख्या | लघु प्रकल्प को.प.बं.सह संख्या | उपसा सिंचन योजना संख्या | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | सिंचन क्षेत्र (हे.) | सिंचन क्षेत्र (हे.) | सिंचन क्षेत्र (हे.) | सिंचन क्षेत्र (हे.) | सिंचन क्षेत्र (हे.) |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| १ | योजनापूर्व | ० | ० | ० | ० | ० |
| २ | पहिली योजना (१९५१-५६) | ० | ० | ० | ० | ० |
| ३ | दुसरी योजना (१९५६-६१) | पूर्णा प्रकल्प १/१९१८८ | मानार प्रकल्प १/२४४७५ | २/१८१९ | ० | ४/४५४८२ |
| ४ | तिसरी योजना (१९६१-६६) | ० | ० | ११/४८२१ | ० | ११/४८२१ |
| ५ | तीन वार्षिक योजना<br>१९६६-६७<br>१९६७-६८<br>१९६८-६९ | ०<br>०<br>०<br>० | कुंद्राळा<br>१/१५६८<br>०<br>० | <br>८/३८८३<br>०<br>० | <br>५/६३१<br>०<br>० | <br>१४/६०८२<br>०<br>० |
| ६ | चौथी योजना (१९६९-७४) | उर्ध्व पैनगंगा १/९२१०४ | कुंद्राळा ५३७<br>करडखेड २६३५<br>पेठवडज २०७०<br>महालिंगी ७९०<br>४/६०३२ | २२/३८८३ | ११/३१९२ | ३८/१०५२११ |
| ७ | पाचवी योजना (१९७४-७८) | विष्णुपुरी १/२८३४० | नागझरी १२६०<br>लोणी १७९०<br>डोंगरगांव १२५०<br>३/४३०० | १६/१०५३१ | २६/११६८७ | ४६/५४८५८ |

२९. सर्व तक्ते प्रकरणाच्या शेवटी दिले आहेत.

३०. जिल्हा पुस्तिका लघु पाटबंधारे विभाग, नांदेड, पूर्वोक्त, २००५, पृ. १७ व १८.

Maharashtra State Gazetteers

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
|---|---|---|---|---|---|---|
| ८ | दोन वार्षिक योजना (१९७८-७९) | ० | १/१५६८ | ८/३८८३ | ५/६३१ | १४/६०८२ |
| | (१९७९-८०) | ० | ० | ० | ० | ० |
| ९ | सहावी योजना (१९८०-८४) | | | | | |
| | १९८०-८१ | ० | ० | ० | ० | ० |
| | १९८१-८२ | १/१४०० | २/११३७० | ९/२५७१ | ० | १२/१५३४१ |
| | १९८२-८३ | ० | ० | तळणी-१२०० | ० | १/१२०० |
| | १९८३-८४ | ० | उर्ध्व मानार ९००० | ० | ० | १/९००० |
| १० | १९८४-८५ | लेंडी/१५७८९ | ० | सुना ५०६ सावरगांव १७८ लोहा मांडवा २७७ | ० | ४/१६७५० |
| ११ | सातवी योजना (१९८५-९०) | | | | | |
| | १९८५-८६ | ० | ० | जामखेड ८३२ | ० | १/१३५० |
| | १९८६-८७ | ० | ० | शिरपूर ४४२७ पलाईगुडा ७१३ | ० | २/१२८५ |
| | | ० | ० | ० | ० | ० |
| | | ० | ० | ० | ० | ० |
| | १९८७-८८ | ० | ० | चांडोळी ४६३ | ० | १/६७५ |
| | १९८८-८९ | ० | ० | ० | ० | ० |
| | १९८९-९० | ० | ० | ० | ० | ० |
| १२ | द्विवार्षिक योजना | | | | | |
| | १९९०-९१ | ० | ० | ० | ० | ० |
| | १९९१-९२ | ० | ० | ० | ० | ० |
| १३ | आठवी योजना (१९९२-९७) | | | | | |
| | १९९२-९३ | ० | ० | ० | ० | ० |
| | १९९३-९४ | ० | ० | पाटोदा १०३६ मांडवी ६८८ मुगांव २८४ | ० | ३/२१११ |
| | १९९४-९५ | ० | ० | रेणापूर-सुधा ७०० | ० | १/७०० |
| | १९९५-९६ | ० | ० | ० | ० | ० |
| | १९९६-९७ | ० | ० | ० | ० | ० |
| १४ | नववी योजना (१९९७-२००२) | | | | | |
| | १९९७-९८ | ० | ० | ० | ० | ० |
| | १९९८-९९ | ० | ० | ० | ० | ० |

Maharashtra State Gazetteers

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
|---|---|---|---|---|---|---|
| | १९९९-२००० | ० | बाभळी उच्च पा.बं.७९९५ | टाकळी को.प.बं. ६०० दिग्रस ३६० येडूर ८६० वर्ताळा ३७० | ० | ५/१०१०० |
| | २०००-२००१ | ० | ० | ० | ० | ० |
| | २००१-२००२ | ० | ० | ० | ० | ० |
| १५ | दहावी योजना २००२-२००३ | ० | | | | |
| | २००३-२००४ | ० | मानार १ मी. उंची वाढ पुनर्प्रस्थापित | भेंडेवाडी सा.त ३७० | ० | १/३७० |
| १६ | २००४-२००५ | ० | ० | कुचोली को.प.बं. ३७० | ० | १/३७० |
| | | | | आमदुरा नि.पा.ब. १४७३ | ० | १/१४७३ |

## जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार (सेवायोजन)[३१]

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात बरेचसे भारतीय सैनिक जायबंदी झाले होते. त्यांच्या पुनर्वसनासाठी भारत सरकारने १९४५ मध्ये सेवायोजन यंत्रणा स्थापन केली. त्यानंतर भारत-पाक फाळणीच्या वेळेस जे नागरिक विस्थापित झाले होते, त्यांच्या पुनर्वसनासाठी स्वतंत्र भारत सरकारने १९४७ मध्ये स्वतंत्र सेवायोजन कार्यालयाची स्थापना केली. त्यानंतर १९४९ मध्ये सर्व प्रवर्गाच्या उमेदवारांकरिता केंद्र सरकारने सेवायोजन कार्यालयाची निर्मिती केली. सध्या माजी सैनिकांसाठी सेवायोजन कार्यालय व बाकी सर्व प्रकारच्या प्रवर्गांसाठी सेवायोजन कार्यालय अशी दोन कार्यालये कार्यरत आहेत.

केंद्र सरकारच्या धर्तीवर महाराष्ट्रात बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी सन १९५९ मध्ये सेवायोजन कार्यालयांची निर्मिती केली. नांदेड जिल्ह्यात १९ फेब्रुवारी १९५९ रोजी सेवायोजन कार्यालयाची स्थापना झाली. सुरुवातीच्या काळात सुशिक्षित बेरोजगारांची संख्या अल्प असल्यामुळे बेरोजगारीचा प्रश्न जाणवत नव्हता. जसजसे साक्षरतेचे प्रमाण वाढले, लोकसंख्येत वाढ झाली तसतशी बेरोजगारांच्या संख्येतही वाढ झाली. सर्वांना नोकरीच्या स्वरूपात रोजगार उपलब्ध करणे शक्य नसल्याने राज्यात १ मे १९९७ रोजी रोजगार व स्वयंरोजगार विभागाची स्थापना करण्यात येऊन सेवायोजन कार्यालयाचे ' जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र ' असे नामकरण करण्यात आले. या कार्यालयामार्फत जास्तीत जास्त उमेदवारांना स्वयंरोजगारास प्रवृत्त करून त्यांनी स्वतःचा रोजगार स्वतःच प्राप्त करावा हा उद्देश समोर ठेवून जिल्हा स्तरावर विविध यंत्रणेमार्फत स्वयंरोजगार उपलब्ध करून देण्यात येतो.

३१. जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन कार्यालय, नांदेड यांच्याकडून आलेल्या माहिती आधारे.

सार्वजनिक क्षेत्रातील तृतीय व चतुर्थ श्रेणीच्या जागा सेवायोजन कार्यालयामार्फत भरल्या जात असत. परंतु मध्यंतरीच्या काळात केंद्र शासनाने या जागा भरण्यासाठी कर्मचारी चयन आयोगाची स्थापना केली. तसेच बँका, रेल्वे, भारतीय जीवन विमा निगम यामध्ये तृतीय श्रेणीची पदे भरण्यासाठी रिक्रुटमेंट बोर्डाची स्थापना केली. महाराष्ट्र शासनाने तृतीय श्रेणीची पदे भरण्यासाठी १९८८ पासून विभागीय स्तरावर राज्य निवड मंडळाची स्थापना केली. त्यामुळे तृतीय श्रेणीची पदे या मंडळामार्फत भरण्यात येऊ लागली. सेवायोजन कार्यालयामार्फत चतुर्थ श्रेणीतील पदे भरण्यात येतात. सेवायोजन कार्यालयाप्रमाणेच जिल्हा समाज कार्यालयामार्फत मागासवर्गीय उमेदवारांना तसेच आदिवासी विभागातील उमेदवारांना नाव नोंदणी करता येते. केंद्र शासनाने सेवायोजन कार्यालये (रिक्त पदे अधिसूचित करण्याची सक्ती करणारा) कायदा, १९५९ मध्ये मंजूर केलेला असून त्याची नियमावली १९६० साली तयार करण्यात आली. सर्व सार्वजनिक क्षेत्रातील आस्थापना या नियमात मोडत असून खाजगी क्षेत्रातील ज्यांच्याकडे २५ किंवा त्यापेक्षा अधिक कर्मचारी आहेत अशा आस्थापनांना हा कायदा लागू होतो. या नियमानुसार या आस्थापनांतर्गत कर्मचाऱ्यांच्या रिक्त पदांची व भरतीबाबतची विवरणपत्रे सेवायोजन कार्यालयास पाठविणे बंधनकारक आहे. तसेच सेवायोजन कार्यालयास ही पदे अधिसूचित करणे बंधनकारक आहे. तथापि, भरती सेवायोजन कार्यालयामार्फतच केली पाहिजे असे बंधन नाही. त्यामुळे याबाबत फारसे साध्य झाले नाही. मात्र सार्वजनिक क्षेत्रात निर्माण होणारी व लोकसेवा आयोग व तत्सम आयोगातर्फे भरावयाची पदे वगळता रिक्त पदे सेवायोजन कार्यालयामार्फत भरण्यासंबंधी शासनाने वेळोवेळी आदेश निर्गमित केले आहेत.

वरील प्रमाणे केंद्र शासनाचा कायदा असला, तरी महाराष्ट्र शासनाने याबाबत दिनांक १० एप्रिल १९९१ रोजी शासन निर्णय निर्गमित करून शासनातर्फे अनुदान, वित्तीय सहाय्य अथवा कर्ज मिळणाऱ्या शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे, उद्योग, वसतिगृहे, वाचनालये, सहकारी संस्था, सहकारी अधिकोष इत्यादींच्या आस्थापनेवरील तृतीय व चतुर्थ श्रेणीची रिक्त पदे सेवायोजन कार्यालयामार्फतच भरण्याचे बंधन घालण्यात आले आहे.

या कार्यालयातर्फे नोकरीसाठी इच्छुक उमेदवारांना नाव नोंदणी सुलभ व्हावी म्हणून दर महिन्यात प्रत्येक तालुक्यात एकदा व मोठ्या तालुक्यात दोनदा सेवायोजन कार्यालयाचे प्रतिनिधी प्रत्यक्ष जाऊन नवीन नाव नोंदणी व जुन्या नोंदणीचे पुनरूज्जीवन करतात. या कार्यालयातील नोंदणी केलेल्या उमेदवारांची माहिती खाली दिली आहे.

| वर्ष | एकूण नोंदणी पट | वर्षातील नोंदणी | अधिसूचित रिक्त पदे | पाठवणी केलेले उमेदवार | नोकरीस लागलेले उमेदवार |
|---|---|---|---|---|---|
| २००१-०२ | १,१५,०६० | १४,५७० | ३७५ | १,७६१ | २९९ |
| २००२-०३ | १,१२,३६० | १७,०५७ | १,०९९ | ५,१२१ | ४९६ |
| २००३-०४ | १,१५,६३० | २०,५३८ | १,३४० | ७,४६५ | २७३ |
| २००४-०५ | १,२०,५०० | १९,६४७ | ३४३ | ५,८५९ | ५६ |
| २००५-०६ | १,०८,६६६ | १७,५८३ | २३३ | ६,५५३ | ३० |

रोजगार व स्वयंरोजगार केंद्रामार्फत बेरोजगारीच्या निर्मूलनासाठी पुढीलप्रमाणे योजना राबविण्यात येतात—

**बेकारी निर्मुलन योजना :** बेकारी निर्मुलनासाठी राज्य शासन जिल्हा स्तरावर विविध यंत्रणांच्या माध्यमातून स्वयंरोजगाराच्या योजना राबवित असते. विविध योजनांद्वारे स्वयंरोजगार प्राप्त झालेल्या उमेदवारांची माहिती खालील विवरणात दिली आहे.

| अ. क्र. | यंत्रणेचे नाव | योजनेचे नाव | स्वयंरोजगार प्राप्त झालेले उमेदवार | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | २००२-०३ | २००३-०४ | २००४-०५ | २००५-०६ |
| १ | प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, नांदेड. | स्वर्णजयंती ग्राम स्वयं-रोजगार योजना | — | — | ३५ | १५४ |
| २ | जिल्हा उद्योग केंद्र | पंतप्रधान रोजगार योजना | ८३५ | ७४५ | ९७५ | ८४९ |
| ३ | महात्मा फुले मागास वर्ग विकास महामंडळ. | १) एस.सी.ए.स्कीम | १,३३४ | ८६१ | ८३८ | ६७५ |
| | | २) मार्जिन मनी स्कीम | ४४ | २९ | ३७ | २६ |
| | | ३) एन.एस.एस.स्कीम | १५ | ७ | १० | ९ |
| ४ | अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ. | विशेष घटक योजना | ५६५ | ७२ | ७९५ | ४३२ |
| ५ | वसंतराव नाईक विमुक्त जाती भटक्या जमाती विकास महामंडळ. | | ८० | १०३ | — | ४३ |
| ६ | महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ. | १) विशेष घटक योजना | १३२ | ११२ | १२१ | ८९ |
| | | २) मार्जिन मनी स्कीम | २२ | २५ | २९ | १८ |
| ७ | महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग विकास महामंडळ. | मार्जिन मनी स्कीम | ५४ | १४ | — | — |
| ८ | महाराष्ट्र राज्य लघुउद्योजक विकास अधिकारी. | १) ग्रामीण उद्योग योजना | ८८ | ११७ | १७८ | — |
| ९ | अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ | १) थेट कर्ज योजना | १३५ | ५५ | ११९ | — |
| | | २) बीज भांडवल कर्ज योजना. | ४ | ११ | १५ | — |
| १० | मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ | मुदत कर्ज योजना | — | — | ३६ | ४४ |
| ११ | नगर पालिका नांदेड | स्वर्णजयंती शहरी रोजगार योजना. | २७८ | — | — | ११८ |

**रोजगार प्रोत्साहन कार्यक्रम :** हा कार्यक्रम सन १९७३-७४ पासून राबविला जात आहे. केंद्रीय नियोजन मंडळाने आखून दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार सुशिक्षितांची बेरोजगारी दूर करण्यासाठी

महाराष्ट्र शासनाने ही योजना कार्यान्वित केली आहे. विविध व्यवसायाच्या प्रत्यक्ष प्रशिक्षणाद्वारे उमेदवारांचे कसब व पात्रता वाढवून त्यांना नियमित रोजगार उपलब्ध करून देणे अथवा प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांना स्वतंत्रपणे स्वयंरोजगार सुरू करणे शक्य व्हावे हा या योजनेचा मुख्य हेतू आहे. यात प्रशिक्षणाचा कालावधी सहा महिन्यांचा असून शासनातर्फे या कालावधीसाठी उमेदवारांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार ३०० रुपयांपासून १,००० रुपयांपर्यंत विद्यावेतन देण्यात येते. या कार्यक्रमांतर्गत लाभार्थी व त्यांच्या विद्यावेतनावर झालेल्या खर्चाचा तपशील खाली दिला आहे.

| वर्ष | रिक्त पदांची संख्या | पाठवणी केलेल्या उमेदवारांची संख्या | प्रशिक्षण पुर्ण केलेल्या उमेदवारांची संख्या | खर्च (रुपये) |
|---|---|---|---|---|
| २००१-०२ | २८ | ९६ | १६ | १,६०८ |
| २००२-०३ | ५४ | ६८ | ५२ | १,२९९ |
| २००३-०४ | २११ | ३०६ | ७१ | ७०,०४५ |
| २००४-०५ | ९९ | ४६६ | ६५ | १,२८,१०८ |
| २००५-०६ | ११८ | ४५१ | ७५ | १,३४,६५५ |

**रोजगार व स्वयंरोजगार विशेष कालबध्द कार्यक्रम :** वाढत्या बेरोजगारीचा प्रश्न विचारात घेऊन महाराष्ट्र शासनाने बेरोजगारांना स्वयंरोजगार अथवा रोजगार पुरविण्यासाठी दि. १५ ऑगस्ट १९९७ पासून एक कालबध्द कार्यक्रम कार्यान्वित केला आहे. या विशेष कार्यक्रमाची शिक्षण, कृषि, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, मत्स्य व्यवसाय, उद्योग, ग्रामविकास, पर्यटन व बांधकाम या आठ उप गटात विभागणी केलेली आहे. तरुणांची केवळ नोकरीच्या मागे लागण्याची मानसिकता बदलून त्यांना वरील आठ उपगटांपैकी पसंतीच्या उपगटातून स्वयंरोजगारान्वये कायम व स्थिर उत्पन्नाचे साधन मिळवून देणे शक्य व्हावे, तसेच त्यान्वये त्यांचा अर्थव्यवस्थेमध्ये सहभाग असावा हा या योजनेचा उद्देश आहे. यात स्वयंरोजगार हा रोजगाराला पर्याय असून जिल्हा स्तरावरील रोजगार, स्वयंरोजगार व प्रशिक्षण या संबंधीच्या ४२ योजना आहेत. यातील महत्त्वाच्या योजनांची माहिती खाली दिली आहे

| योजनेचे नाव | उद्दिष्ट | | साध्य | | उद्दिष्ट | | साध्य | | उद्दिष्ट | | साध्य | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २०००-०१ | २००१-०२ | २०००-०१ | २००१-०२ | २००२-०३ | २००३-०४ | २००२-०३ | २००३-०४ | २००४-०५ | २००५-०६ | २००४-०५ | २००५-०६ |
| १. फळबाग लागवड योजना (हेक्टर) | — | — | — | — | — | १,५६० हेक्टर | — | १,५१३ हेक्टर | — | — | — | — |
| २. स्वर्णजयंती ग्रामीण स्वयं-रोजगार योजना | गट ७५ | गट ४५ | १०० | ५० | ८५ | १५० | ३९ | २१६ | १६० | १६० | १४४ | १६५ |

| योजनेचे नाव | उद्दिष्ट | | साध्य | | उद्दिष्ट | | साध्य | | उद्दिष्ट | | साध्य | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २०००-०१ | २००१-०२ | २०००-०१ | २००१-०२ | २००२-०३ | २००३-०४ | २००२-०३ | २००३-०४ | २००४-०५ | २००५-०६ | २००४-०५ | २००५-०६ |
| ३. स्वर्णजयंती नागरी स्वयं-रोजगार योजना | — | — | — | — | — | ८८० | — | ५९ | ४१९ | — | ३४३ | — |
| ४. जिल्हा उद्योग केंद्र | — | — | — | — | १,००० | ९०० | ७०२ | ७४५ | १,१९७ | १,०४७ | ९७५ | ८५५ |
| ५. जिल्हा ग्रामोद्योग उद्योग | १२० | २०० | ४३ | १२५ | २०० | १७० | १०६ | १७१ | १०० | १०० | ८९ | ८५ |
| ६. अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ | ३५४ | — | ३७० | — | ५६५ | ९२५ | ८५५ | ७४२ | ९०० | ७५० | ८३५ | ६१३ |
| ७. वसंतराव नाईक विकास महामंडळ | ५५० | ५५० | १५० | ६६ | ५५० | ५५० | ८० | १२० | ३०० | ३०० | ९४ | ४८ |
| ८. महात्मा फुले मागासवर्गीय महामंडळ | ७०० | ७०० | ३१० | ५०० | ७०० | १,०४० | ६७६ | ८६१ | १,०६० | ६६६ | ८३८ | ७१० |
| ९. चर्मोद्योग विकास महामंडळ | — | — | — | — | — | १८५ | — | ३२ | — | १०५ | — | ४७ |
| १०. इतर मागासवर्ग विकास महामंडळ | — | — | १० | १६ | — | — | ६५ | ८० | — | — | ४९ | २७ |
| ११. समाज कल्याण अपंग बीज भांडवल योजना | — | ८८ | — | २५ | ४९ | ४५ | ३२ | २० | ४५ | १२६ | २३ | ३० |
| १२. विशेष घटक योजना | — | — | — | — | ७०० | १७० | ५६२ | ११२ | — | — | — | — |
| १३. स्वर्णजयंती शहरी रोजगार योजना | — | — | — | — | — | १३६ | — | ४५ | — | ४३४ | — | १८१ |
| १४. निराधार महिलांना स्वयंरोजगारासाठी आर्थिक सहाय्य | — | १२० | — | १२० | १०० | १०० | ७० | ९६ | १०० | ५० | १२ | ३६ |
| १५. पंतप्रधान रोजगार योजना | १,५६० | ८०६ | १,२६० | ८२० | ८२५ | ७४० | ८३५ | ७६३ | ७४० | १,१९७ | ७६३ | ९७५ |

**व्यवसाय मार्गदर्शन :** तरुणांची आवड व कला आणि शैक्षणिक अर्हतेप्रमाणे ते ज्या व्यवसायासाठी जास्तीत जास्त पात्र असतील त्या व्यवसायाचे मार्गदर्शन करणे व नोकरी देणे हा या

योजनेचा उद्देश आहे. व्यवसायानुसार उमेदवारांची नोंदणी व नोकरी मिळालेल्यांची माहिती खालील विवरणात दिली आहे.

| अ. क्र. | बाब | २००१-०२ | | २००२-०३ | | २००३-०४ | | २००४-०५ | | २००५-०६ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नोंदणी केलेले | नोकरी दिलेले | नोंदणी केलेले | नोकरी दिलेले | नोंदणी केलेले | नोकरी दिलेले | नोंदणी केलेले | नोकरी दिलेले | नोंदणी केलेले | नोकरी दिलेले |
| १ | व्यावसायिक, तांत्रिक व संबंधित | ७५० | २३९ | १,५६८ | ३८० | १,९६४ | १४२ | १,७१३ | २५ | १,६७१ | ६ |
| २ | प्रशासकीय, शास्त्रीय व व्यवस्थापकीय | २ | — | — | — | २ | १ | २ | — | — | — |
| ३ | लेखनिक व तत्संबंधीचे | १,२५० | ४० | ३३२ | ९६ | ३६२ | ९७ | ३७१ | १० | २७४ | १७ |
| ४ | मत्स्यव्यवसाय, शिकारी व संबंधीत | २१ | २ | १८५ | १० | १९६ | ३१ | १५६ | २१ | १४६ | ५ |
| ५ | खाण कामगार | २४० | — | २०३ | — | ३०१ | १ | ३०७ | — | ३०१ | — |
| ६ | वाहतूक व दळणवळण | २५० | ८ | २३२ | २ | ३४५ | १ | ३२१ | — | २८७ | — |
| ७ | उत्पादन व प्रक्रिया | ७४८ | ५ | २१५ | ६ | २३२ | — | २०२ | — | १९७ | २ |
| ८ | सेवा, खेळ व तत्सम | ६५० | ५ | १९६ | २ | २०४ | — | २१६ | — | २३२ | — |
| ९ | इतर कोठेही वर्गीकरण न केलेले | १०,६५९ | — | १४,१२६ | — | १६,९३२ | — | १६,३५९ | — | १४,४७५ | — |

जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार केंद्रामार्फत उपलब्ध करून दिलेल्या रोजगारांची प्रवर्गनिहाय माहिती खालीलप्रमाणे आहे.

| वर्ष | अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती | भटक्या जाती | विमुक्त जाती | इतर मागासवर्गीय | इतर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २००१-०२ | ५४ | २१ | ३७ | १२ | ६३ | ११२ | २९९ |
| २००२-०३ | ७३ | ५ | २३ | ८ | ७७ | ३१० | ४९६ |
| २००३-०४ | ४९ | १४ | २५ | ८ | ६२ | ११५ | २७३ |
| २००४-०५ | ४ | ५ | ५ | ६ | १३ | २३ | ५६ |
| २००५-०६ | ९ | — | १ | ५ | ७ | ८ | ३० |

**स्वयंरोजगार सेवा सोसायट्या :** शासनाने राज्यातील बेरोजगारीचा प्रश्न सोडविण्यासाठी ऑक्टोबर २००० मध्ये रोजगार व स्वयंरोजगाराचे धोरण जाहीर केले. या धोरणाचा एक भाग म्हणून शासनाने सन २००१ पासून बेरोजगार उमेदवारांच्या सेवा सोसायट्या स्थापन करून बेरोजगार उमेदवारांना या सोसायट्यांच्या माध्यमातून रोजगार व स्वयंरोजगार मिळवून देण्याचा प्रयत्न सुरू केला

Maharashtra State Gazetteers

आहे. या सोसायट्यांना त्यांना येणारा खर्च भागविण्याकरिता शासनाकडून आर्थिक सहाय्य देण्यात येते. सोसायटीच्या प्रत्येक सदस्यास रुपये १,२०० प्रमाणे व्यवस्थापकीय अनुदान म्हणून देण्यात येते. हे अनुदान तीन वर्षांकरिता असते.

जिल्ह्यात २०००-०१ मध्ये १५ सेवा सोसायट्या स्थापन होऊन त्यात १६५ बेरोजगारांचा समावेश होता. सन २००१-०२ मध्ये १७ सेवा सोसायट्या स्थापन होऊन त्यात १७७ बेरोजगारांचा समावेश होता. सन २००२-०३ मध्ये नवीन ८ सोसायट्या स्थापन होऊन त्यावर्षी एकूण १६ सोसायट्यांना रुपये २,३५,२०० अनुदान दिले होते. सन २००४-०५ मध्ये २५ सेवा सोसायट्या नव्याने स्थापन होऊन पूर्वीच्या १६ व २५ अशा एकूण ४१ सोसायट्यांना त्यावर्षी ३,५१,६०० रूपयांचे अनुदान देण्यात आले होते. सन २००५-०६ मध्ये ५८ सेवा सोसायट्यांची स्थापना झाली. त्यातील ३८ सोसायट्यांना ५,४९,६०० रुपयांचे अनुदान देण्यात आले.[३२]

जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार केंद्रात नोंदणी झालेल्या बेरोजगारांची (वर्गवारीनुसार) संख्या खालील प्रमाणे होती :—

| शैक्षणिक पात्रता | वर्ष | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | २००१ | २००२ | २००३ | २००४ | २००५ |
| अशिक्षित ते ९ वी पर्यंत | ८,५४० | ९,११० | ८,०६० | ६,९०० | ८,६८२ |
| एस.एस.सी. | ८९,६९३ | ८५,७८८ | ८८,६४० | ९२,५१० | ५२,३०२ |
| १२ वी उत्तीर्ण | ९,६०० | १०,५०० | १२,००० | १४,१२० | ३४,१०३ |
| पदवीधर | ६,८०० | ६,५०० | ६,५२० | ६,५४० | १३,०२९ |
| पदव्युतर | ५७ | ५९ | ५० | ५० | १६२ |
| पदविकाधारक (डिप्लोमा) | ३७० | ३६५ | ३६० | ३८० | ३८८ |

## ग्रामीण विकासाचा कार्यक्रम

चौथ्या पंचवार्षिक योजना काळात क्षेत्र विकासाच्या कल्पनेस मूर्त स्वरूप प्राप्त झाले. नियोजनाच्या प्रारंभी सामुहिक विकास प्रकल्पसुद्धा क्षेत्र विकासाचाच भाग होता. विकास योजनांच्या फलश्रुतीस्तव अवर्षण प्रवण क्षेत्र विकास कार्यक्रम, जलसिंचनाच्या पुरेपूर उपयोगासाठी लाभक्षेत्र विकास कार्यक्रम, एकात्मिक ग्रामीण विकास योजना या क्षेत्र विकासाच्या योजनांची अंमलबजावणी सुरू आहे. त्यांचा जिल्ह्याच्या अर्थव्यवस्थेवर अनुकूल प्रभाव पडत असल्याचे दिसून येते.

**ग्रामीण विकासासाठी विशेष कार्यक्रम :** ग्रामीण विभागातील दारिद्र्य निर्मुलन कार्यक्रम सहाव्या पंचवार्षिक योजनेत सुरू झाला. एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम, राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम व ग्रामीण भूमिहीन रोजगार हमी कार्यक्रम या कार्यक्रमांना राष्ट्रीय पातळीवर महत्त्व देण्यात आले असून याद्वारे ग्रामीण विभागातील कुटुंबांचे उत्पन्न वाढविण्यावर भर देण्यात येत आहे.

३२. जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयाच्या माहितीवरून.

ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांचे उत्पन्न वाढवून त्यांना दारिद्र्य रेषेच्या वर आणण्यासाठी उत्पन्न वाढविणारे उद्योग सुरू करणे हा एकात्मिक ग्रामीण विकासाचा मूळ उद्देश आहे. तथापि, याद्वारे उद्दिष्ट साध्य न झाल्याने पुरक उत्पन्नासाठी रोजगार निर्मिती कार्यक्रम सुरू करण्यात आले. सध्या एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम आणि जवाहर रोजगार योजना हे कार्यक्रम स्वतंत्र न राबविता एकात्मिक घटक म्हणून राबविण्यात येतात. याशिवाय क्षेत्र विकास कार्यक्रम हा पाचव्या पंचवार्षिक योजनेपासून सुरू होता.

महाराष्ट्र शासनाच्या नियोजन कार्यपद्धतीमध्ये एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम, जवाहर रोजगार योजना, अवर्षण प्रवण क्षेत्र विकास कार्यक्रम आणि रोजगार हमी कार्यक्रम या जिल्हास्तरीय योजना आहेत. यापैकी एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम व जवाहर रोजगार योजना या केंद्र शासन सहाय्यित असून केंद्र शासन ५० टक्के व राज्य शासनाच्या २० टक्के हिस्स्याची तरतूद जिल्हा नियोजन व विकास मंडळास करावी लागते. याशिवाय रोजगार हमी योजनेकरिता अपेक्षित खर्चाच्या २५ टक्के तरतूद जिल्हा नियोजन व विकास मंडळास करावी लागते. राष्ट्रीय ग्रामीण विकास कार्यक्रम व ग्रामीण भूमिहीन रोजगार हमी कार्यक्रम या योजनांचा एक भाग म्हणून जीवन धारा योजना १९८८-८९ मध्ये सातव्या पंचवार्षिक योजनेत सुरू करण्यात आली. कालांतराने राष्ट्रीय ग्रामीण रोजगार व ग्रामीण भूमिहीन रोजगार हमी कार्यक्रम या दोन्ही योजनांचे विलीनीकरण करून जवाहर योजना ही नवीन योजना सुरू करण्यात आली. या कार्यक्रमांतर्गत जीवन धारा विहीर योजना व अनुसूचित जाती जमातीच्या कुटुंबांसाठी घरकूल योजना या योजना नव्याने सुरू करण्यात आल्या असून त्या जवाहर रोजगार योजनेअंतर्गत चालू ठेवण्यात आल्या आहेत.

सातव्या पंचवार्षिक योजनेत केंद्र शासन व राज्य शासन स्तरावर या जिल्हा योजनेस प्राधान्य देण्यात आले. वरील योजनांची थोडक्यात माहिती पुढे दिली आहे.

**एकात्मिक ग्रामीण विकास योजना** : या योजनेअंतर्गत जिल्ह्यातील ग्रामीण लोकांना, विशेषतः मागासवर्गियांना आणि गरिबातील गरीब कुटुंबांना वर्षभर पुरतील अशी कामे गाव पातळीवर घेऊन तेथील गरजूंना रोजगाराची संधी उपलब्ध करून देणे व त्याअन्वये गावाची विकासाची गरज भागविणे हा या योजनेचा उद्देश आहे. या सार्वजनिक कामामुळे तेथील निवडीच्या कामांना प्राधान्य मिळून सर्व गावकऱ्यांचा विकास साधेल आणि गरिबांना स्थानिक ठिकाणी रोजगार मिळाल्यामुळे त्यांचे रोजगारासाठी शहराकडे होणारे स्थलांतर टळेल अशी अपेक्षा ठेवण्यात आली आहे.

नांदेड जिल्ह्यातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबे निश्चित करण्यासाठी ग्रामीण भागात राहणाऱ्या कुटुंबांची पाहणी प्रथम १९८२ साली करण्यात आली. ज्या कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न ६,४०० रुपये आहे अशा कुटुंबांची गणना दारिद्र्य रेषेखाली करण्यात आली. या सर्वेक्षणानुसार जिल्ह्यात दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांची संख्या ८८,८३४ एवढी होती. सातव्या पंचवार्षिक योजना कालावधीत ८८,८३४ दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांपैकी ४७,२९९ कुटुंबांना आर्थिक मदत देऊन दारिद्र्य रेषेच्या वर आणण्याचा प्रयत्न करण्यात आला.[३३]

---

३३. **यथार्थदर्शी योजना,** जि. नांदेड, पूर्वोक्त, पृ. ११०.

सातव्या पंचवार्षिक योजना कालावधीत (८५-८६ ते ८९-९०) एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रमावर ६३२.१५ लाख रुपये खर्च करण्यात आले. सन १९९०-९१ व १९९१-९२ मध्ये अनुक्रमे १५३.१६ व ८४.८९ लाख रुपये खर्च करण्यात आले. आठव्या पंचवार्षिक योजना कालावधीत (१९९२-९३ ते १९९६ -९७) या कार्यक्रमावर ४९८.०२ लाख रुपये खर्च करण्यात आले होते.[३४]

**स्वयंरोजगार :** स्वयंरोजगार योजनेअंतर्गत दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील व्यक्तिला त्याच्या आवडीप्रमाणे धंद्याचे प्रशिक्षण देऊन नंतर त्यास धंद्यासाठी बँकांमार्फत कर्ज व शासनाच्या निकषाप्रमाणे अनुदान देण्यात येते. अशा प्रकारे सहाव्या व सातव्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधीत ३,४३३ व्यक्तिंना प्रशिक्षण व १,३३१ व्यक्तिंना अर्थसहाय्य देण्यात आले. आठव्या पंचवार्षिक योजना काळात ८८,८३४ व्यक्तिंना प्रशिक्षण व ७,५१६ व्यक्तिंना आर्थिक मदत देऊन दारिद्र्य रेषेच्या वर आणण्यात आले.

**राष्ट्रीय ग्रामीण रोजगार :** सदरची योजना सहाव्या पंचवार्षिक योजनेच्या तिसऱ्या वर्षी म्हणजे १९८२-८३ पासून अंमलात आली. या योजनेचा मूळ उद्देश ग्रामीण भागातील दारिद्र्य निर्मुलन आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून त्यातून सामुदायिक एकात्मता निर्माण करणे हा होता. या योजनेअंतर्गत आर्थिक वाटपाबरोबरच धान्याचे कुपन्स देऊन ग्रामपातळीवर रोजंदारीवर असलेल्या मजुरांना रोजंदारीच्या पैशांमधून स्वस्त धान्य दुकानातून धान्य पुरवठा करण्यात येत होता. त्यामुळे ग्रामीण भागात धान्याचे भाव स्थिर ठेवणे आणि मजुरांच्या खाद्यान्नाचा स्तर उंचावणे शक्य झाले. या योजनेअंतर्गत गावाच्या गरजेप्रमाणे कामाची निवड करून ती कामे करण्यात येत असत. ही योजना अत्यंत उपयुक्त असून त्यामुळे ग्रामपातळीवर पायाभूत सोयी निर्माण करणे शक्य होते. या योजनेवर सातव्या पंचवार्षिक योजनेत ४३४.८९ लक्ष रुपये खर्च झाला असून १५.४८ लक्ष मनुष्यदिन रोजगार निर्मिती करण्यात आली. या योजनेवर झालेला खर्च व मनुष्यदिन रोजगार निर्मितीबाबतची माहिती खालील विवरणात दिली आहे.

| वर्ष | योजनेवरील खर्च (रुपये लाख) | मनुष्यदिन रोजगार निर्मिती (लाख) |
|---|---|---|
| १९९५-९६ | १,७७१.६२ | ३३.०६ |
| २०००-२००१ | ८०४.५७ | ५.९४ |
| २००३-२००४ | १,९३५.७८ | २३.०५ |
| २००५-२००६ | २,२१५.७० | २९.२९४ |

**ग्रामीण भूमिहीन रोजगार कार्यक्रम** : सदरची योजना या जिल्ह्यात १९८५-८६ पासून कार्यान्वित करण्यात आली. या योजनेचा मुख्य उद्देश हा होता की, शेतमजूर यात प्रामुख्याने भूमिहीन मजूर, ज्यांना वर्षभर रोजगार उपलब्ध होत नव्हता, अशांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देऊन

३४. **यथार्थदर्शी योजना**, पूर्वोक्त, पृ. ११४.

अशी कामे घेणे की, त्यातून लाभार्थींकरिता वैयक्तिक निवाऱ्यासाठी घरकुले मिळतील. ही योजना केवळ अनुसूचित जाती व जमार्तींच्या कुटुंबांसाठीच राबविण्यात येत होती. सन १९८५-८६ ते १९८८-८९ पर्यंत या योजनेच्या आर्थिक व भौतिक प्रगतीचा तपशील खालीलप्रमाणे होता.[३५]

(रु. लाख)

| वर्ष | उपलब्ध निधी | झालेला खर्च | खर्चाची टक्केवारी | घरकुलांचे उद्दिष्ट | साध्य | साध्याची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १९८५-८६ | ५९.३२ | ५० | ८४.२८ | ६०० | ६०० | १०० |
| १९८६-८७ | ३१.५ | २७.४१ | ८७.०१ | ३२० | ३२० | १०० |
| १९८७-८८ | ३१.५ | २५.०२ | ७९.४२ | ३२० | ३२० | १०० |
| १९८८-८९ | ३८.४ | ३७.८६ | ९८.५९ | ३२० | ३२० | १०० |

सन १९८९-९० मध्ये ४५० घरकुलांच्या उद्दिष्ट पूर्तीसाठी जवाहर रोजगार योजनेच्या सहा टक्के निधीमधून ५०.२५ लक्ष रुपये खर्चाची तरतूद करून वरील घरकुले पूर्ण करण्यात आली.

**जवाहर रोजगार योजना :** ही योजना एप्रिल १९८५ पासून केंद्र शासनाने राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम व ग्रामीण भूमिहीन रोजगार कार्यक्रम यांचे एकत्रिकरण करून लागू केली. सदर योजनेचा प्रमुख उद्देश ग्रामीण भागातील बेरोजगारांना तसेच अर्धवेळ रोजगार असलेल्या स्त्रिया व पुरुषांना त्यांच्या गावीच लाभदायक योजना किंवा कामे उपलब्ध करून देणे हा आहे. तसेच उत्पादक व समाज उपयुक्त अशी मालमत्ता निर्माण करून ग्रामीण लोकांचे जीवनमान उंचावणे हा हेतू योजनेत अभिप्रेत आहे. या योजनेवर सातव्या पंचवार्षिक योजना काळात (८५-८६ ते ८९-९०) ७६७.११ लाख रुपये खर्च करण्यात आला. या योजनेवर झालेला खर्च खालीलप्रमाणे आहे.

| वर्ष | उपलब्ध निधी (रु. लाख) | झालेला खर्च (रु.लाख) |
|---|---|---|
| १९९०-९१ | ८६९.७८ | ८३२.५६ |
| १९९१-९२ | ९३४.४६ | ८०३.१३ |
| १९९२-९३ | १,१४९.५७ | १,०५९.४४ |
| १९९३-९४ | १,०५३.८० | ९२४.०५ |
| १९९४-९५ | १,६९३.९३ | १,५१५.४८ |
| १९९५-९६ | २,२०२.२४ | १,७६१.६२ |
| १९९६-९७ | १,४८०.५२ | १,३९७.५९ |

**जीवनधारा विहीर योजना :** ही योजना १९८८-८९ मध्ये लागू करण्यात आली. सदरच्या योजनेचा मूळ हेतू मागासवर्गीय अल्प व अतिअल्प भूधारक किंवा या जातीतील ज्या नवभूधारकांची

३५. **यथार्थदर्शी योजना,** जिल्हा नांदेड, पूर्वोक्त, पृ. ११२.

जमीन पाच एकर पर्यंत आहे, अशा लोकांच्या शेतात शासन खर्चाने विहीर खोदून, बांधून पूर्ण करणे आणि पाणी लागलेल्या विहिरीवर विद्युत मोटारी व आवश्यक असल्यास पाईप लाईनकरिता कर्ज व अनुदान देऊन त्या शेतकऱ्यास दारिद्र्य रेषेच्यावर आणणे असा होता. सदरची योजना पूर्णतः नवीन असल्याने ती १९८८-८९ ऐवजी १९८९-९० पासून कार्यान्वित करण्यात आली. सन १९८९-९० मध्ये २८२ विहिरींसाठी ६४.८६ लक्ष रुपये खर्चाचे उद्दिष्ट होते. त्यापैकी १९९० मार्च अखेर १३१ विहिरींचे काम पूर्ण करून त्यावर ३४.०४ लाख रुपये खर्च करण्यात आले. सन १९९०-९१ व १९९४-९५ मध्ये अनुक्रमे १२१ व ४५० लाभार्थींना या योजनेचा फायदा झाला असून त्यावर अनुक्रमे ३१.२५ व २०२.०५ लाख रुपये खर्च करण्यात आले. सन १९९९ पासून ही योजना बंद करण्यात आली.

**स्वर्णजयंती ग्राम-स्वरोजगार योजना :** देशात दारिद्र्य निर्मुलनाच्या विविध योजना राबवूनही देशातील गरिबीचे प्रमाण मात्र अपेक्षेप्रमाणे कमी झालेले नाही. अनेक उपाय योजना करूनही गरिबांच्या संख्येतही अपेक्षित घट झालेली नाही. या परिस्थितीत तात्काळ सुधारणा करण्यासाठी दारिद्र्य निर्मुलनाच्या दृष्टिने सर्वांगीण विकासात्मक कार्यक्रमाची गरज भासली. ही गरज लक्षात घेऊन तात्काळ प्रभावी उपाययोजना करण्याच्या दृष्टिने दारिद्र्य निर्मुलनासाठी सुरू असलेल्या एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम, ग्रामीण महिला व बालकांचा विकास, ट्रायसेम, सुधारित हत्यार संच पुरवठा, दशलक्ष विहीर योजना, जीवनधारा योजना, घरकूल योजना, राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजना या सारख्या पूर्वीच्या सर्व योजना एकत्रित करून, दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांसाठी स्वयंरोजगार निर्माण करून त्यांच्या उत्पन्नात वाढ होऊन गरिबीचे प्रमाण कमी करण्यासाठी सर्वार्थाने परिपूर्ण पुनर्रचित **स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना** एप्रिल, १९९९ पासून देशात सुरू करण्यात आली. या योजनेमध्ये स्वयंरोजगार निर्मितीसाठी प्रशिक्षण, पत पुरवठा, तंत्रज्ञान, मूलभूत सुविधा, बाजारपेठ उपलब्धता अशा सर्वच आवश्यक गरजांचा पूर्नविचार केला आहे. योजनेचा लाभ घेणाऱ्या कुटुंबांना **स्वयंरोजगारी** नावाने संबोधण्यात येते.[३६]

स्वर्णजयंती ग्राम-स्वरोजगार योजनेचा उद्देश दारिद्र्य रेषेखालील गरीब कुटुंबांना उत्पन्न मिळवून देण्यासाठी सहाय्य करणे, स्वरोजगारींना बँकेद्वारे कर्ज व शासनातर्फे अनुदान उपलब्ध करून देणे हा आहे. या योजनेमध्ये स्वरोजगाराच्या सर्व घटकांचा समावेश करण्यात आला आहे. ग्रामीण भागातील स्वसहाय्यता समुहात काम करणाऱ्या संघटनांना सोबत घेऊन त्यांच्यातील समतेला चालना देणे, बेरोजगारांना प्रशिक्षण देणे, विकासात्मक मजबुती प्रदान करणे तसेच तांत्रिक आणि विपणन संबंधी सहकार्य करणे असेही या योजनेचे उद्देश आहेत. या योजनेत दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांना बँक कर्ज व शासकीय अनुदानाच्या माध्यमातून उत्पन्न वाढीसाठी आवश्यक असणाऱ्या सर्व मूलभूत सुविधा उपलब्ध करून देऊन एका कुटुंबास वाढीव नियमित उत्पन्नाची पातळी काही कालावधीत तयार होऊन

३६. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, नांदेड, **माहिती पुस्तिका**, पृ. ३.

ते कुटुंब दारिद्र्य रेषेच्या वर येईल याची खातरजमा केली जाते.[३७] या योजनेअंतर्गत झालेला कामाचा तपशील खाली दिला आहे.

(रु. लाख)

| अ. क्र. | बाब | आर्थिक प्रगती | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १९९९-२००० | २०००-०१ | २००१-०२ | २००२-०३ | २००३-०४ | २००४-०५ | २००५-०६ |
| १ | तरतूद | ३९६.४९ | ३०६.०७ | १७७.०९ | १७७.०९ | २४४.६५ | ३०६.२५ | ३०६.२५ |
| २ | उपलब्ध निधी | ४१९.३९ | ३८३.८४ | २२१.४६ | १३१.३५ | २७९.३७ | ३०९.२५ | २५०.१५ |
| ३ | झालेला खर्च | ४१७.०१ | ३७९.०५ | २२१.४६ | १३१.३५ | २७९.२६ | ३०९.२५ | २५०.१५ |
| | (अ) अनुदान | २४३.६० | ३२४.३३ | १७२.४३ | ८६.७५ | २३४.३२ | १५२.३० | १७१.३० |
| | (ब) खेळते भांडवल | १२.२० | २१.५० | ७.९० | १९.५० | २७.९४ | ४८.१५ | ३३.७६ |
| | (क) प्रशिक्षण | १८.७१ | ३३.२२ | १७.८१ | ३.२० | ६.६९ | १६.१८ | १३.२९ |
| | (ड) मूलभूत सुविधा | १४२.५० | — | २३.३२ | १८.०० | — | ४९.६० | — |
| | (ई) इतर | — | — | — | ३.९० | १०.३१ | ४३.०२ | ३१.७३ |
| ४ | खर्चाची उपलब्ध निधीशी टक्केवारी. | ९९ | ९९ | १०० | १०० | १०० | १०० | १०० |

**बचत गट**

| अ. क्र. | बाब | भौतिक प्रगती | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १९९९-२००० | २०००-०१ | २००१-०२ | २००२-०३ | २००३-०४ | २००४-०५ | २००५-०६ |
| १ | एकूण स्थापन गट | १०० | ७५ | ४५ | ८५ | १५० | १६० | १६० |
| २ | कर्ज मंजूर झालेले स्वरोजगारी. | ७०० | १,००० | ५०० | ३९० | २,१६० | १,४४० | १,६५० |
| ३ | कर्ज मंजूर झालेले बचत गट. | ७० | १०० | ५० | ३९ | २१६ | १४४ | १६५ |

**संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना :** जवाहर ग्राम समृद्धी योजना व आश्वासित रोजगार योजना बंद करून दि. १ जानेवारी २००१ पासून ही योजना सुरू करण्यात आली. रोजगार व अन्नधान्य यांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांना सामाजिक सुरक्षितता देणे, मनुष्य बळाच्या

३७. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, नांदेड, **माहिती पुस्तिका**, पृ. ४.

माध्यमातून ग्रामीण भागात जलसंवर्धन पाणलोट विकसित करणे हे या योजनेचे स्वरूप आहे. ही योजना पंचायतराज मार्फत राबविली जाते. या योजनेअंतर्गत झालेले काम खालील विवरणपत्रात दिले आहे.

(रु. लाख)

| अ. क्र. | बाब | आर्थिक प्रगती[३८] | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १९९९-२००० | २०००-०१ | २००१-०२ | २००२-०३ | २००३-०४ | २००४-०५ | २००५-०६ |
| १ | तरतूद | — | — | — | ७९१.५६ | ८८७.१७ | ९३६.७५ | १,१२२.२६५ |
| २ | उपलब्ध निधी | ९११.८३ | ८५२.९१ | ९४५.७५ | ८११.८ | ९९२.८० | १,०८३.२७ | १,१६१.१०६ |
| ३ | झालेला खर्च | ५६८.८९ | ८०४.५७ | ७९७.२८ | ६९५.१८ | ९००.३५ | १,०६७.१५ | १,१२८.१०६ |

| अ. क्र. | बाब | भौतिक प्रगती | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १९९९-२००० | २०००-०१ | २००१-०२ | २००२-०३ | २००३-०४ | २००४-०५ | २००५-०६ |
| १ | सुरुवातीची अपूर्ण कामे. | ६८ | ३४० | १८८ | २७९ | ४०८ | ४९३ | २८६ |
| २ | नवीन मंजूर कामे | २९७ | २८१ | ३६७ | ९३४ | ७८३ | १,५०३ | १,७९१ |
| ३ | हाती घेतलेली एकूण कामे. | ३६५ | ६२१ | ५५५ | १,२१३ | १,१९१ | १,९९६ | २,०७७ |
| ४ | पूर्ण झालेली कामे | ३६५ | ६२१ | ५५५ | १,२१३ | १,१९१ | १,९९६ | २,०२१ |

## जवाहर ग्राम समृद्धी योजना - भाग २

(रु. लाख)

| अ. क्र. | बाब | आर्थिक प्रगती | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | जवाहर ग्राम समृद्धी योजना | | | संपूर्ण ग्रामीण योजना | | | |
| | | १९९९-२००० | २०००-०१ | २००१-०२ | २००२-०३ | २००३-०४ | २००४-०५ | २००५-०६ |
| १ | तरतूद | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | ७४७.०० | ८६६.५७ | ९३६.७२५ | १,१२२.२६५ |
| २ | उपलब्ध निधी | ६१६.७६ | ७८८.६५ | ८२६.२१ | १,०९३.४१ | १,०३५.५५ | १,०३२.१० | १,०९५.९६४ |
| ३ | झालेला खर्च | ५३५.२२ | ७४६.४० | ७५४.६७ | १,०५२.३० | १,०३५.४३ | १,०२६.५३ | १,०८७.०६ |

३८. सन १९९९ ते २००२ पर्यंतची माहिती आश्वासित रोजगार योजनेची असून सन २००२ ते २००६ पर्यंतची माहिती संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेची आहे.

Maharashtra State Gazetteers

| अ. क्र. | बाब | भौतिक प्रगती | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १९९९-२००० | २०००-०१ | २००१-०२ | २००२-०३ | २००३-०४ | २००४-०५ | २००५-०६ |
| १ | सुरुवातीची अपूर्ण कामे. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | ४४९ | १,२९६ | ३८२ | ३०७ |
| २ | नवीन मंजूर कामे | १,९३७ | ३,३७३ | २,८८३ | २,८०६ | २,७७१ | २,६८८ | २,८३१ |
| ३ | हाती घेतलेली एकूण कामे. | १,९३७ | ३,३७३ | २,८८३ | ३,२५५ | ४,०६७ | ३,०७० | ३,१३८ |
| ४ | पूर्ण झालेली कामे | १,९३७ | ३,३७३ | २,४३४ | ३,२५५ | ४,०८७ | ३,०७० | ३,११२ |

**इंदिरा आवास योजना :** पूर्वीच्या घरकुल योजनेऐवजी सन १९९६-९७ पासून केंद्र शासनाने ही योजना सुरू केलेली आहे. या योजनेतून दारिद्र्य रेषेखालील गरजू व्यक्तिंना घरकूल बांधण्यासाठी अनुदान उपलब्ध करून देण्यात येते. याशिवाय वेठबिगार, अनुसूचित जाती, अनुसूचित जमातींची कुटुंबे, इतर प्रवर्गातील कुटुंबे, शारीरिकदृष्ट्या अपंग, सैनिकी कारवाईत हुतात्मा झालेल्यांची (संरक्षण व निमलष्करी दल) कुटुंबे, विधवा, माजी सैनिक व निमलष्करी दलाच्या निवृत्त सदस्यांनाही या योजनेचा लाभ देण्यात येतो. या योजनेत प्रति लाभार्थी शासकीय अनुदानात केंद्र शासनाकडून ७५ टक्के, राज्य शासन ५ टक्के तसेच राज्य शासनाचा अतिरिक्त हिस्सा व लाभार्थीच्या मजुरीच्या स्वरुपातील हिस्सा असे एकूण रुपये ३०,००० अनुदान दिले जाते. यानंतर घराचा दर्जा सुधारण्यासाठी केंद्र व राज्य शासनातर्फे रुपये १०,००० चे अनुदान दिले जाते. या योजनेअंतर्गत झालेले काम खालील विवरणात दिले आहे.

| वर्ष | बांधलेली घरकुले | नवीन घरांचा दर्जा सुधारणे | झालेला खर्च (रु. लाख) |
|---|---|---|---|
| १९९६-९७ | ५,४८३ | उ.ना. | ९३०.५० |
| १९९९-२००० | ३,५६७ | उ.ना. | १,०२७.२० |
| २००१-२००२ | २,६१२ | १,२१४ | ५०६.०७ |
| २००२-२००३ | ८४४ | २,८०१ | ३४३.९७ |
| २००३-२००४ | १,४४७ | ८६८ | ६६२.१५ |
| २००४-२००५ | २,४८८ | १,२५० | ७८९.७७ |
| २००५-२००६ | २,३९३ | १,१८३ | ६१२.४६ |
| २००६-२००७ | ५५१ | उ.ना. | ५८७.२६ |

**अवर्षण प्रवण क्षेत्र विकास कार्यक्रम :** सन १९७०-७१ मध्ये केंद्र शासनाने देशातील अवर्षण प्रवण क्षेत्रांसाठी ग्रामीण कामांचा एक कार्यक्रम सुरू करण्याचे ठरविले होते. त्याच कार्यक्रमाला १९७३ मध्ये अवर्षण प्रवण क्षेत्र कार्यक्रम असे नाव देण्यात आले. या योजनेत स्थानिक पातळीवर पाणी अडविणे व पाणी जिरविणे हा महत्त्वाचा कार्यक्रम राबविला जातो. एकात्मिक पाणलोट विकासांतर्गत

मृदसंधारण, जलसंधारण, वनीकरण व भूजल विकासाची कामे प्राधान्याने केली जातात. ही योजना १९९५-९६ पासून जिल्ह्यात लागू करण्यात आली. सदर योजना स्वयंसेवी संस्था व शासकीय यंत्रणेमार्फत राबविण्यात येते. या योजनेअंतर्गत झालेल्या कामांची आर्थिक व भौतिक प्रगती खालील विवरणपत्रात दिली आहे.

(रु. लाख)

| अ. क्र. | बाब | आर्थिक प्रगती | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १९९९-२००० | २०००-०१ | २००१-०२ | २००२-०३ | २००३-०४ | २००४-०५ | २००५-०६ |
| १ | तरतूद | १७२.०५ | ३४५.०० | ३४७.०० | १७२.०५ | ११५.०० | उ.ना. | उ.ना. |
| २ | उपलब्ध निधी | ३४.५० | ६९.६८ | ४७.२८ | ३०.२६ | २७.८७ | ३११.४० | उ.ना. |
| ३ | झालेला खर्च | उ.ना. | उ.ना. | ६.५० | ५१.५६ | १४६.३० | २०८.८१ | १५.०० |

| अ. क्र. | बाब | भौतिक प्रगती | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १९९९-२००० | २०००-०१ | २००१-०२ | २००२-०३ | २००३-०४ | २००४-०५ | २००५-०६ |
| १ | सुरुवातीची अपूर्ण कामे. | ३ | ३ | ३ | ४६ | ४६ | ४६ | ४६ |
| २ | नवीन मंजूर कामे | २३ | १५ | ८ | — | — | — | — |
| ३ | हाती घेतलेली एकूण कामे. | — | — | ३ | ४६ | ४६ | ४६ | ४६ |
| ४ | पूर्ण झालेली कामे | — | — | ३ | — | — | — | — |

**ग्रामीण महिला व बालकांचा विकास (डवाक्रा योजना) :** ही योजना जिल्ह्यात १९९१-९२ पासून लागू करण्यात आली. दारिद्र्य रेषेखालील कार्डधारक महिलांना गटवार संघटित करून त्यांना रोजगार निर्मितीस प्रवृत्त करणे व त्याद्वारे त्यांचा आर्थिक विकास करणे हा या योजनेचा प्रमुख हेतू आहे. महिलांशी संबंधित इतर सर्व योजनांचे काम महिलांनी करून द्यावयाचे आहे. ही योजना २०००-०१ मध्ये बंद होऊन स्वर्णजयंती ग्राम योजनेत समाविष्ट करण्यात आली. या योजनेच्या प्रगतीची माहिती खाली दिली आहे.

| वर्ष | आर्थिक सहाय्य (रु.लाख) | लाभार्थी |
|---|---|---|
| १९९२-९३ | १.५३ | १०० |
| १९९४-९५ | ०.४३ | ३० |
| १९९६-९७ | ४.५० | ३०३ |
| १९९८-९९ | २५.७९ | १,०९० |

**संजय गांधी स्वावलंबन योजना :** दुर्बल घटकातील व्यक्तिंना उदरनिर्वाहाचे साधन उपलब्ध होऊन स्वतंत्र व्यवसाय करता यावा यासाठी महाराष्ट्र शासनाने दि.२ ऑक्टोबर १९८० पासून ही योजना सुरू केली होती. पात्र उमेद्वारास तारणाशिवाय २५,००० रुपयांपर्यत बिनव्याजी कर्ज देण्याची या योजनेत तरतूद होती. यामध्ये नियमित नोकरी करणारी एकही व्यक्ती नसलेल्या कुटुंबांना अग्रक्रम देण्यात येत असे. जिल्ह्यातील लाभार्थीची आकडेवारी खालील विवरणात दिली आहे.[३९] जानेवारी २००४ पासून ही योजना बंद करण्यात आलेली आहे.

| वर्ष | लाभार्थी | अनुदान वाटप (रुपये) |
|---|---|---|
| १९८०-८१ | ३,५८८ | ११,५९,९५० |
| १९८४-८५ | २,०४७ | ७,११,८१४ |
| १९९०-९१ | ५१७ | ४,३४,००० |
| १९९५-९६ | २०१ | २,००,००० |
| २०००-२००१ | ४०८ | ५,००,००० |
| २००२-२००३ | ४७४ | ४,६४,००० |

**संजय गांधी निराधार अनुदान योजना :** दुर्बल घटकांच्या कल्याणासाठी महाराष्ट्र शासनाने दि.२ ऑक्टोबर १९८० पासून ही योजना सुरू केली आहे. वृध्दत्व, अपंगत्व अथवा असाध्य रोगांमुळे उदरनिर्वाह करू न शकणाऱ्यांसाठी ही योजना आहे. पात्र व्यक्तीस दरमहा ६० रुपये मदत देण्यात येते. वरील योजनेअंतर्गत अर्थसहाय्य मिळाल्यांची माहिती खाली दिली आहे.

| वर्ष | लाभार्थी | वितरित रक्कम (रुपये) |
|---|---|---|
| १९८०-८१ | ३,९१८ | ४,९७,३४० |
| १९८५-८६ | ९,९४७ | ७२,४९,३३५ |
| १९९०-९१ | २१,३११ | २,६१,५६,६३५ |
| १९९५-९६ | २४,६१४ | २,७७,९९,७०९ |
| २०००-२००१ | ३१,८२३ | १०,७२,९२,६७६ |
| २००५-२००६ | ८,६९८ | २,६१,४१,५०० |
| २००६-२००७ | ८,६९८ | २,३७,६७,००० |

३९. संजय गांधी स्वावलंबन, संजय गांधी निराधार, इंदिरा गांधी निराधार व श्रावण बाळ सेवा योजना या योजनांची माहिती जिल्हाधिकारी, नांदेड यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहिती आधारे.

**इंदिरा गांधी निराधार/भूमिहीन शेतमजूर महिला अनुदान योजना :** ही योजना सन १९९१ पासून महाराष्ट्र शासनाने सुरू केली. ज्या महिलांना कोणाचाच आधार नाही अथवा ज्या महिला भूमिहीन शेतमजूर आहेत अशांना आर्थिक मदत दिली जाते. या योजनेअंतर्गत येणारे लाभार्थी व त्यास वितरित केलेल्या रकमेचा तपशील खाली दिला आहे.

| वर्ष | लाभार्थी | वितरित रक्कम (रुपये) |
|---|---|---|
| १९९१-९२ | ६२० | १,८०,१४९ |
| १९९५-९६ | ४२,२३७ | ५,८४,९९,६९६ |
| २०००-२००१ | ४२,७१३ | ९,९१,१६,८८२ |
| २००५-२००६ | ४,७०० | ९७,४८,७५० |
| २००६-२००७ | ४,७०० | ९१,००,००० |

**श्रावण बाळ सेवा योजना :** दुर्बल घटकातील निराधार वृद्ध व्यक्तींकरिता ही योजना राबविली जाते. वृद्धापकाळात ज्या व्यक्तिंना काही काम करता येत नाही, त्यांना निवृत्ती वेतनाच्या रुपाने याद्वारे आर्थिक मदत दिली जाते. ही योजना सन २००३ पासून सुरू करण्यात आली असून ती केंद्र व राज्य शासन मिळून राबविते. या योजनेचा तपशील खाली दिला आहे.

| वर्ष | लाभार्थी | केंद्र शासनाचा हिस्सा (रुपये) | राज्य शासनाचा हिस्सा (रुपये) |
|---|---|---|---|
| २००३-२००४ | १५,६५५ | १४,८९,५०० | ४,०९,४४,००० |
| २००४-२००५ | ४७,५१७ | ४,२७,८५,३०० | १९,७१,२५,१०० |
| २००५-२००६ | १८,९०४ | १,७०,१३,६०० | २,७०,२५,९५० |
| २००६-२००७ | १८,९०४ | १,७०,१३,७०० | २,४९,१६,००० |

**भारतीय विकास लोक कार्यक्रम :** या कार्यक्रमाची मूळ कल्पना संयुक्त राष्ट्रसंघाच्या कृषि व अन्न संघटनेने १९६० साली हाती घेतलेल्या भूकमुक्ती मोहिमेत आहे. विकसित राष्ट्रांमधील दानशूर संस्थांनी विकसनशील राष्ट्रांतील उत्पादन वाढीसाठी हातभार लावावा असे या मोहिमेचे मूळ स्वरूप आहे. केंद्र सरकारने या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी केंद्रीय कृषि संस्थांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापून स्वयंसेवी संस्थांना योजना तयार करावयास सांगितले. त्याचप्रमाणे महाराष्ट्रात कृषि मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करून त्याद्वारे कार्यप्रकल्प अहवाल तयार करून केंद्राकडे पाठविला. या कार्यक्रमासाठी परदेशातून सहाय्य मिळविताना अंतर्गत निधिही उभारण्याचे आवाहन केंद्रीय समितीने केले. सन १९७३ मध्ये केंद्रीय समितीने या कार्यक्रमाचे नामांतर 'भारतीय विकास लोक कार्यक्रम' असे केले. त्याच वर्षी 'भारतीय विकास लोक कार्यक्रम' या नवीन नावाने राज्य समितीची पुनर्रचना झाली. पुनर्रचित समितीने हे काम मोठ्या प्रमाणात करण्याचे ठरवून परकीय

मदतीवर अवलंबून न राहता स्वतःच्या निधीतून लहान योजनांना सहाय्य देण्याचा निर्णय घेतला. अंतर्गत निधी उभारून स्वयंसेवी संस्थांना सहाय्य देणारे महाराष्ट्र हे अग्रेसर राज्य आहे. हा कार्यक्रम म्हणजे स्वावलंबन व स्वयंपूर्ततेची मोहीम असून त्याचे कार्य मुख्यमंत्र्यांच्या मार्गदर्शनाखाली चालते. कार्यक्रमासाठी निधी लोकांच्या सहभागातून उभा करण्यात येतो. त्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात येतात, स्मरणिका काढण्यात येतात व एक रुपया निधीचा प्रचार करण्यात येतो. यात प्रत्यक्ष सहाय्य फक्त संस्थांनाच दिले जाते. तथापि, रोजगार उपलब्ध झाल्यामुळे व्यक्तिगत फायदा होतो.[४०] भारतीय विकास लोक कार्यक्रम अंतर्गत नांदेड जिल्ह्यात पुढीलप्रमाणे काम करण्यात आले.

**कृषि व दुग्ध व्यवसाय आणि कुष्ठधाम प्रकल्प :** कुष्ठरोगाला आवर घालणे, कुष्ठरुग्णांवर उपचार करणे आणि कुष्ठरोगाचा फैलाव रोखण्यासाठी व अशा रुग्णांना आसरा देऊन त्यांना विनामूल्य जीवन गरजा, अन्न, वस्त्र आणि वैद्यकीय गरज उपलब्ध करून देणे हा उद्देश नजरेसमोर ठेवून "मराठवाडा लोक सेवा मंडळ" ही संस्था १९७९ मध्ये स्थापन झाली. कुष्ठरोग्यांना स्वावलंबी बनविणे आणि कृषि उत्पादन, विणकाम, शिवणकाम, रेशीम उत्पादन व इतर कुटिरोद्योगांद्वारे त्यांना स्वयंरोजगार मिळवून देणे असे संस्थेचे उद्देश आहेत. या संस्थेस नेरली या खेड्यातील २४.२८ हेक्टर जमीन महाराष्ट्र शासनाने लोकोपयोगी कार्यासाठी देणगी म्हणून दिली आहे. नांदेड जिल्ह्यातील निरनिराळ्या गावातून या संस्थेमार्फत वैद्यकीय तपासणी व पाहणी करण्यात येते. संस्थेने कुष्ठधाम प्रकल्पास वित्तीय सहाय्य मिळण्यासाठी भा.वि. लोक समितीकडे प्रकल्प सादर केला. प्रकल्पावर समितीने विचार करून या प्रकल्पासाठी संस्थेला ७० हजार रुपयांचे वित्तीय सहाय्य दिले.[४१]

**कृषि व पशुसंवर्धन प्रकल्प :** नांदेड जिल्ह्यातील बिलोली तालुक्यातील सगरोळी येथे १९५९ साली या संस्थेची स्थापना झाली. ग्रामीण भागातील अनुसूचित जाती व जमाती, भटक्या व विमुक्त जातीच्या व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या लोकांचे जीवनमान सुधारणे, त्यांच्या मुलांचा बौद्धिक, शारीरिक, मानसिक, औद्योगिक व सांस्कृतिक विकास करणे, या लोकांत स्वावलंबन, स्वाभिमान, देशभक्ती, बंधुभाव, भारतीय संस्कृती, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय एकात्मकता या गुणांचा विकास करणे व रुजविणे व त्यांना सहकार्य, आरोग्य व सामाजिक जबाबदाऱ्यांची जाणीव करून देणे व विकास करणे, तसेच अनाथ निराश्रित व अपंग मुलामुलींचे पालन-पोषण करणे ही उद्दिष्टे समोर ठेवून संस्था कार्य करीत आहे. या संस्थेस भा.वि. लोक समितीने कृषि व पशुसंवर्धन, सूबाभूळ व बकरी संवर्धन या प्रकल्पासाठी ५२,८०० रुपयांचे अर्थसहाय्य दिले.[४२]

**कृषि व सामाजिक वनीकरण प्रकल्प :** जिल्ह्यातील मुखेड या गावातील सुशिक्षित व जागृत नागरिकांनी एकत्रित येऊन १९७८ मध्ये पुरोगामी मित्रमंडळाची स्थापना केली. सदर संस्थेमार्फत समाजात जागृती, लोक संघटन व आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी संस्था कार्यरत आहे. संस्थेकडे असलेल्या १०.१२ हेक्टर जमिनीस पाणीपुरवठा करून शेतकऱ्यांना अत्याधुनिक शेती तंत्राचे

४०. **भारतीय विकास लोक कार्यक्रम (महाराष्ट्र) प्रकल्प,** भा. वि. लोक समिती, महाराष्ट्र राज्य, पृ. २.

४१. कित्ता, पृ. २२.

४२. कित्ता, पृ. २२-२३.

प्रात्यक्षिक दाखविणे, शेतकरी व गाव पातळीवरील कार्यकर्ते यांचे प्रशिक्षण वर्ग आयोजित करणे, सामाजिक वनीकरणासाठी रोपवाटिका तयार करणे अशी योजना संस्थेने तयार करून भा. वि. लोक समितीकडे पाठविली होती. समितीने त्याचा सविस्तर विचार करून संस्थेस ५९,५०० रुपयांचे आर्थिक सहाय्य दिले.

**दुग्धव्यवसाय व कृषि प्रकल्प :** जिल्ह्यातील यशवंत महाविद्यालय, नांदेड या संस्थेची ६.०७ हेक्टर शेत जमीन असून त्यात एक विहीर आहे. संस्थेने शेती व दुग्धव्यवसाय विकास करण्यासाठी एक प्रकल्प भा. वि. लोकलेखा समितीकडे सादर केला. समितीने या प्रकल्पासाठी ५०,००० रुपयांचे आर्थिक सहाय्य दिले. या मदतीने महाविद्यालयात डेअरी फॅक्टरी सुरू करण्यात आली.[४३]

जिल्ह्यातील नळ पाणीपुरवठा योजनेस भा.वि.लोक लेखा समितीने पुढीलप्रमाणे अर्थसाहाय्य दिले आहे :—[४४]

| नळ पाणीपुरवठा योजनेचे नाव | तालुका | भा. वि. लोक समितीने दिलेले वित्तीय सहाय्य (रुपये) |
|---|---|---|
| किनी | देगलूर | १०,३२० |
| उंचेगाव | हदगाव | १३,२८० |
| साप्ती | हदगाव | ९,४४० |
| ढेकापूर | कंधार | १९,००० |
| सेलभाव | भोकर | १२,०८० |
| सोमठाणा | भोकर | १३,४४० |
| कनकी | किनवट | १०,०८० |
| पाथरी | किनवट | १३,३२० |
| पादूरणी | मुखेड | १४,४५० |
| सलगरा | मुखेड | १३,००० |
| कार्ला (बु.) | बिलोली | १२,४०० |

**रोजगार हमी योजना :** अल्पभूधारक, भूमिहीन शेतमजूर व बेरोजगारांना उत्पादक स्वरुपाचा रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने १९७२ मध्ये ही योजना सुरू केली. ही योजना सुरू करणारे महाराष्ट्र राज्य हे देशातील पहिले राज्य होय. मे १९७२ मध्ये ही योजना नांदेड जिल्ह्यासह संपूर्ण राज्यात कार्यान्वित झाली. योजनेची उपयुक्तता लक्षात घेऊन दि. २० डिसेंबर १९७४ रोजी शासनाने राज्य विधिमंडळात ठराव करून ग्रामीण भागातील प्रत्येक प्रौढास भारतीय संविधानातील

४३. भारतीय विकास लोक कार्यक्रम प्रकल्प, पूर्वोक्त, पृ. २३-२४.

४४. कित्ता, पृ. ६०-६१.

राज्य धोरणाच्या निवडक तत्त्वानुसार काम मिळविण्याचा कायदेशीर हक्क मिळवून दिला. योजनेच्या अंमलबजावणीसाठी निधी उभारणे व साधनसंपत्ती वाढविण्यासाठी शासनाने १९७५ च्या महाराष्ट्र राज्य व्यावसायिक, व्यापार व रोजगार अधिनियमानुसार व्यापारी व पगारदारांवर दि.१ एप्रिल १९७५ पासून कर बसविला. सन १९७७ मध्ये ' महाराष्ट्र रोजगार हमी योजना अधिनियम ' मंजूर करून या योजनेला सांविधानिक स्वरूप देण्यात आले. अधिनियमाची अंमलबजावणी दिनांक २६ जानेवारी १९७९ पासून सुरू झाली. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ४१ नुसार रोजगाराचा कायदेशीर हक्क प्राप्त करून देणारे महाराष्ट्र हे भारतातील पहिले राज्य होय.

जिल्हाधिकारी या योजनेचा सर्वाधिकारी असतो. योजनेखालील कामांसाठी उपाय योजना तयार करून मुख्य जिल्हा योजनेशी सांगड घालावयाची असते. ही प्रामुख्याने जिल्हा पातळीवरील योजना असल्यामुळे त्यासाठी जिल्हा योजनेमध्ये तरतूद केली जाते. योजनेखाली सुरू करावयाची बहुतांशी कामे उत्पादक स्वरुपाची असून बेरोजगारांना, ग्रामीण भागातील अकुशल मजुरांना रोजगार उपलब्ध करून देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश असल्यामुळे कामाच्या एकूण खर्चाच्या ६० टक्के रक्कम मजुरीस्तव खर्च केली जाते. राहण्याच्या ठिकाणापासून शक्यतो जवळ काम देण्याचा प्रयत्न केला जातो. मजुरांना मजुरी देताना किमान वेतन तत्त्वाचा अवलंब, तसेच शेती उत्पादनावर विशेष परिणाम होणार नाही याची दक्षता घेण्याची जबाबदारी जिल्हाधिकाऱ्यावर सोपविली आहे. काम करू इच्छिणाऱ्या प्रत्येक प्रौढाने गावातील तलाठ्याकडे आपल्या नावाची नोंदणी करावयाची असते. कामाची मागणी केल्यापासून १५ दिवसांच्या आत काम पुरविले जाते. रोजगार देणे शक्य नसल्यास योजनेच्या फंडातून प्रतिदिनी दहा रुपये प्रमाणे बेरोजगार भत्ता देण्यात येतो. तसेच ५० व्यक्तिंनी कामाची मागणी केल्यास नवीन काम सुरू करण्यात येते. योजनेखाली लघु पाटबंधारे, पाझर तलाव, सामूहिक विहिरी, मृदसंधारण, भूविकास, वनविकास व रस्ते विकासाची कामे केली जातात. रोजगार हमी योजनेखाली पुरविलेले काम व दुष्काळ निवारण योजनेखाली पुरविलेले काम यामध्ये फरक असतो. कारण रोजगार हमी योजनेखालील काम उत्पादक स्वरुपाचे व सामाजिक मालमत्ता निर्माण करणारे असते.

जिल्ह्यात शेतीची आणि ऊस तोडणीची हंगामी कामे असतात. हंगामी कामे संपल्यानंतर मजुरांना मोठ्या प्रमाणात जिल्ह्यात औद्योगिक क्षेत्र नसल्यामुळे रोजगाराची गरज लागते. सातव्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधीत या योजनेवर ३,९७७.७८ लाख रुपये खर्च करण्यात आले. सन १९९०-९१ व १९९१-९२ मध्ये अनुक्रमे ९४४.१४ व २२३.०० लाख रुपये खर्च करण्यात आले. आठव्या पंचवार्षिक (१९९२-९३ ते १९९६-९७) योजना कालावधीत संभाव्य योजनेखाली रुपये १,४९३.१५ लाख व आदिवासी उपाय योजनेखाली रुपये १२७.०७ लाख खर्च करण्यात आले. जिल्ह्यात दळणवळणाची साधने फारच अपूर्ण असल्यामुळे विकासात अडथळा येत होता. यास्तव सन १९८५-८६ व १९८७-८८ या कालावधीत रस्त्यांच्या कामावर १,१५७.५९ लाख रुपये खर्च करण्यात आले होते.[४५]

---

४५. **यथार्थदर्शी योजना,** जि. नांदेड, पूर्वोक्त, पृ. ११५-११६.

जिल्ह्यातील सन २००४-०५ मध्ये रोजगार हमी योजनेअंतर्गत झालेला कामाचा तपशील खाली दिला आहे.[४६]

| अ. क्र. | बाब | कामाचा प्रकार | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | सिंचन | सार्वजनिक कामे/रस्ते | कृषि | वनीकरण | एकूण |
| १ | नियोजित कामांची संख्या | ३५९ | २,३३३ | २३,३०६ | — | २५,९९८ |
| २ | मंजूर केलेल्या कामांची संख्या. | — | — | ९४२ | — | ९४२ |
| ३ | सुरू केलेल्या कामांची संख्या. | — | — | ५४५ | — | ५४५ |
| ४ | पूर्ण केलेल्या कामांची संख्या. | — | — | ५४५ | — | ५४५ |
| ५ | कामांसाठी केलेली तरतूद (रुपये लाख). | ४१०.६८ | २,५७५.२१ | ४,७६०.३० | ८५०.७९ | ८,५९६.९८ |
| ६ | कामावर झालेला एकूण खर्च (रुपये लाख). | १९४.६१ | ४६०.१९ | १,८६९.६९ | १०५.१८ | २,६२९.६७ |
| ७ | रोजगार निर्मिती (मनुष्य दिवस लाखात). | २.७८ | ६.५७ | २६.०१ | १.३६ | ३६.७२ |

सन २००४-२००५ मध्ये रोजगार हमी योजनेखाली घेतलेली कामे, त्यावरील रोजगार खर्च व मनुष्य दिवस यांचा तपशील खाली दिला आहे.[४७]

| महिना | खर्च (रुपये लाख) | | | |
|---|---|---|---|---|
| | प्रत्यक्ष (महिन्यातील) | संचित (आर्थिक वर्षाच्या आरंभापासून) | मनुष्य दिवस (लाखात) | रोजगार हमी योजनेखालील कामांची संख्या |
| एप्रिल २००४ | — | — | — | ५१४ |
| मे | ४१५.१२ | ४१५.१२ | ५.९३ | ५३४ |
| जून | ८३०.२५ | १२४५.३७ | ११.८६ | ५४५ |
| जुलै | १४३.६१ | १३८८.३७ | २.०५ | ३८५ |
| ऑगस्ट | २४०.३४ | १६२९.३१ | ३.४३ | २९८ |
| सप्टेंबर | २१०.५३ | १८३९.८४ | ३.०० | ३२२ |
| ऑक्टोबर | १३५.६२ | १९७५.४६ | १.९३ | ३११ |
| नोव्हेंबर | ११२.५० | २०८७.९७ | १.६० | २२९ |
| डिसेंबर | १८२.७१ | २२७०.६७ | २.६१ | २१८ |
| जानेवारी २००५ | ११७.३३ | २३८८.७ | १.६७ | १९१ |
| फेब्रुवारी | ९०.२४ | २४७८.२४ | १.२८ | २७० |
| मार्च | १५१.४३ | २६२९.६७ | २.०६ | ८४ |

४६. **जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन,** जिल्हा नांदेड, २००४-०५, पृ. १२६.
४७. कित्ता, पृ. १२७.

## आर्थिक नियोजन

उपलब्ध साधनसामग्रीतून अधिकाधिक विकास साधने आणि अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रातील असमतोल दूर करणे यासाठी १९३८-३९ मध्ये जवाहरलाल नेहरू व सुभाषचंद्र बोस यांच्या नेतृत्त्वाखाली काँग्रेसने प्लॅनिंग कमिटी नेमली होती. कमिटीने एक योजनाही तयार केली होती. तथापि, इंग्रज सरकारने काहीही कार्यवाही केली नाही. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारत सरकारने आर्थिक नियोजनाचे धोरण स्वीकारले. नियोजनामध्ये राष्ट्रीय विकासाबरोबरच प्रादेशिक असमतोल घालविणे हे मार्गदर्शक तत्त्व मानण्यात येऊन त्यादृष्टिने भारत सरकार आणि राज्य शासनाने सन १९५१-५२ पासून समयबद्ध नियोजनास प्रारंभ केला. कल्याणकारी राज्य हे भारतातील नियोजनाचे उद्दिष्ट ठरले. मार्च, १९५० मध्ये पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली पहिल्या योजना आयोगाची स्थापना करण्यात आली. दि. १ एप्रिल १९५० पासून भारताचे नियोजनपर्व अधिकृत सुरू झाले. त्यानुसार पहिली पंचवार्षिक योजना १९५१-५२ मध्ये सुरू करण्यात आली. त्यानंतरच्या सर्व योजनांचा आढावा पुढीलप्रमाणे :—

**पहिली पंचवार्षिक योजना (१९५१-५२ ते १९५५-५६) :—** दुसरे महायुद्ध, देशाची फाळणी, काश्मिरवरील पाकिस्तानचे आक्रमण (१९४७) इत्यादींमुळे विस्कळीत झालेल्या अर्थव्यवस्थेला रूळावर आणणे हे या योजनेचे सर्वाधिक महत्त्वाचे उद्दिष्ट ठरविण्यात आले. चलन फुगवटा, अन्नधान्य टंचाई व परिवहनातील अडथळे यावर उपाययोजना करणे, मार्गदर्शक तत्त्वे अमलात आणून सामाजिक न्याय प्रस्थापित करणे, आवश्यक त्या यंत्रणा उभारणे ही या योजनेची इतर उद्दिष्ट्ये होती. अन्नधान्य टंचाई निवारण्यासाठी शेती विकासाला अग्रक्रम देऊन कृषि उत्पादन वाढीसाठी ही योजना आखण्यात आली. कृषि व संलग्न सेवा, जलसिंचन व उर्जा विकास योजनांच्या खालोखाल वाहतूक व दळणवळण आणि सामाजिक सेवा या विषयांना प्राधान्य देण्यात आले. उद्योगधंदे विकासाचा क्रम बराच खाली होता. नियोजनामधील या पहिल्या टप्प्यात त्रुटी व मर्यादा असूनही या योजनेतील उद्दिष्टांची बऱ्याच प्रमाणात पूर्ती झाल्याचे नाकारता येत नाही.

पहिल्या पंचवार्षिक योजना कालावधीत जिल्ह्यात १७.८ लक्ष एकर जमीन लागवडीखाली होती. सन १९४१ मध्ये नांदेड येथे कापूस संशोधन केंद्र उघडण्यात आले. सन १९५७ मध्ये जिल्ह्यात ५४७ सहकारी संस्था होत्या.[४८] या योजना काळात मध्यवर्ती सहकारी बँकेची स्थापना झाली. त्यावेळी बँकेचे भाग भांडवल ४,३६,१५१ रुपये होते.[४९] सन १९५७ मध्ये नांदेड शहरास उस्मानशाही मिलमार्फत तयार होणारी वीज मिळत असे. १९६१ साली नांदेड, देगलूर, किनवट येथे तेलावर चालणारी वीज निर्मिती केंद्रे स्थापन करण्यात आली.[५०] पहिल्या पंचवार्षिक योजनाकाळात तीन तार कचेऱ्या, २१ उप कार्यालये व ११९ शाखा कार्यालये होती.[५१]

---

४८. **योजनेने आपल्यासाठी काय केले?** प्रसिद्धी विभाग, महाराष्ट्र शासन, १९६६, पृ. ७, १८.

४९. कित्ता, पृ. १९.

५०. कित्ता, पृ. २८.

५१. कित्ता. पृ. ५०.

**दुसरी पंचवार्षिक योजना (१९५६-५७ ते १९६०-६१) :—** पहिल्या योजना काळात हा जिल्हा हैद्राबाद राज्यात होता. राज्य पुनर्रचनेनंतर हा जिल्हा महाराष्ट्रात विलीन करण्यात आला. या योजनेत कृषि विकासास दुय्यम स्थान देऊन उत्पादन वाढविण्यासाठी निरनिराळ्या योजना राबविण्यावर भर देण्यात आला होता. उद्योगधंदे विकासास अग्रक्रम देऊन एकूण तरतुदींचा मोठा हिस्सा उद्योगधंदे, खाणी आणि वाहतूक व दळणवळण विकासासाठी राखून ठेवण्यात आला. राष्ट्रीय उत्पादनात वाढ करून जनतेचे राहणीमान उंचावण्यासाठी जलद औद्योगिकरणाद्वारे रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले. तथापि, या काळात लोकांची श्रमशक्ती व उत्पादन यातील असंतुलनामुळे चलन फुगवट्यात वाढ होऊन परकीय चलनात घट झाली. नैसर्गिक आपत्तीमुळे शेती उत्पादनात घट झाली. उपलब्ध संसाधने, उपभोग्य वस्तुंची टंचाई वाढून भावपातळीत वाढ झाली. परिणामी या योजनांच्या उद्दिष्टानुसार लक्ष्यावर मर्यादा पडल्या.

या योजनाकाळात शेतीला पाणीपुरवठ्यासाठी २,१८० नव्या विहिरी बांधण्यात आल्या व १,०९७ विहिरी दुरूस्त करण्यात आल्या. यासाठी ४३.६ लाख रुपये खर्च करण्यात आले.[५२] मन्याड नदीवर कंधार तालुक्यातील बारूळ गावाजवळ सुमारे पाच कोटी रुपये खर्चाच्या धरण बांधण्याच्या कामास सुरुवात झाली (१९६०).[५३] या योजनाकाळात सहकारी चळवळीचा मोठ्या प्रमाणात विकास झाला. या कालावधीत ८९ औद्योगिक सहकारी संस्था स्थापन झाल्या.[५४] योग्य व्यक्तिस योग्य व्यवसाय पुरविणे व ज्या संस्थांना नोकरवर्ग पाहिजे त्यांचेकडे मुलाखतीसाठी उमेदवार पाठविणे हे कार्य करण्यासाठी १९५० मध्ये नांदेड येथे उद्योग विनिमय केंद्र स्थापन करण्यात आले.[५५]

**तिसरी पंचवार्षिक योजना (१९६१-६२ ते १९६५-६६) :—**दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत निर्माण झालेल्या अन्नधान्याच्या प्रश्नामुळे कृषि विकासास अग्रक्रम देऊन ही योजना आखण्यात आली. यात जलसिंचन, खते, बी-बियाणे, शेती उपयोगी यंत्रे यावर भर देण्यात आला. योजनेत औद्योगिक विकासाची अपेक्षा न करता जलद व सर्वांगीण विकासासाठी कोळसा, पोलाद, तेल, वीज व रसायने यांचे उत्पादन वाढविणे आणि जलद वाहतुकीची साधने विकसित करणे याकडेही लक्ष पुरविण्यात आले. एकंदरीत अर्थव्यवस्थेचा विविध क्षेत्रातील विकासात संतुलन राखण्याचा प्रयत्न करण्यात आला. याच काळात १९६२ मध्ये चीनचे, तर १९६५ मध्ये पाकिस्तानचे आक्रमण झाल्यामुळे नियोजन प्रक्रियेवर प्रतिकूल परिणाम होऊन व चलन फुगवट्यात वाढ होऊन भाव पातळी वाढली. दुसऱ्या योजनेपेक्षा ही योजना दुप्पट खर्चाची आखण्यात आली होती. या योजनेत राज्याच्या एकूण ४९९ योजनांपैकी ६५ योजना जिल्हा स्तरावर राबविण्यात आल्या.

जमिनीचा पोत कायम राखणे व जास्त असलेले पावसाचे पाणी पिकाचे नुकसान न होता बाहेर काढणे या उद्देशाने शेतीस ताली बांधल्या जातात. जिल्ह्यात हा कार्यक्रम १९६३ साली लागू करण्यात आला. तत्पूर्वी जुन्या हैद्राबाद राज्यात या जिल्ह्यात १,९२६ एकरांत ताली घालण्यात आल्या होत्या.

---

५२. **योजनेने आपल्यासाठी काय केले?** प्रसिद्धी विभाग, महाराष्ट्र शासन, १९६६, पृ. ११.

५३. कित्ता, पृ. १२.

५४. कित्ता, पृ. २१.

५५. कित्ता, पृ. ५१.

तिसऱ्या योजनेअखेर जिल्ह्यात ७४,७११ जमिनीतून ताली घालण्याचे काम पूर्ण करण्यात आले. त्यासाठी ३९ लक्ष ५४ हजार रुपये खर्च करण्यात आले.[५६] तेल, बियाणे विस्तार कार्यक्रम तृतीय पंचवार्षिक योजनाअखेर ८० हजार ५५२ एकरांत राबविण्यात आला.[५७] फळांचे उत्पादन अधिक व्हावे या उद्देशाने या योजना काळात १८,५०० एकरांतून फळबागांच्या वाढीसाठी ४ लक्ष ४० हजार ७०० रुपये खर्च करण्यात आले. सन १९६३ मध्ये नांदेड येथे शेतकी शाळा स्थापन केली.[५८] सधन पीक कार्यक्रमात सुधारलेली शेती अवजारे, खते, बियाणे व पीक संरक्षणाची उपकरणे पुरविण्यात येतात. या कार्यक्रमात तिसऱ्या योजनेअखेर ८,५७,६५० एकर क्षेत्र या कार्यक्रमाखाली आणण्यात आले. कापूस विस्तार कार्यक्रमानुसार जिल्ह्यात ३९ हजार ९३६ क्विंटल कापसाचे बियाणे वाटण्यात आले.[५९] तिसऱ्या योजनेच्या काळात जिल्ह्यात केदारनाथ, किणी, गोरठा, शेंबोली, आमठाणा, मुखेड, देगलूर, कोदेवाडी, कारला, बेदराळी, लाडका व पिंपराळ या ठिकाणी लघु पाटबंधारे कार्यक्रम हाती घेण्यात आले. यापैकी केदारनाथ व किणी या तलावांची कामे पूर्ण झाली होती व त्याद्वारे ६,१७० एकर जमीन पाण्याखाली आली होती. दुसऱ्या योजनेत १२७ तळ्यांची पाहणी करून त्यांचे पाणी शेतीसाठी पुरविण्याच्या दृष्टीने कार्यक्रम आखण्यात आला होता. तिसऱ्या योजनेत ३२ तळ्यांची कामे पूर्ण करण्यात आली होती. याच कालावधीत सहकारी तत्त्वावर उपसा जलसिंचन कार्यक्रम हाती घेण्यात आला होता.[६०] या योजनाकालावधीत नांदेड येथील भूविकास बँकेमार्फत ५,८८१ नवीन विहिरी बांधणे, २८९ विहिरी दुरूस्त करणे यासाठी कर्ज देण्यात आले. जिल्ह्यातील मुख्य रस्त्यांना जोडरस्त्यांद्वारे गावे जोडण्याच्या कार्यक्रमानुसार या योजनाकाळात १३२ मैल लांबीच्या जोडरस्त्यांची कामे हाती घेण्यात आली. त्यावर ५,६०,४०० रुपये खर्च करण्यात आले. ग्रामीण मनुष्यबळ कार्यक्रमानुसार जिल्ह्यात निरनिराळ्या रस्त्यांची जी कामे हाती घेण्यात आली, त्यावर १२,९२,२६० रुपये खर्च करण्यात आले व १२० मैल लांबीचे रस्ते बांधण्यात आले.[६१] या योजना कालावधीत ३२ औद्योगिक सहकारी संस्था स्थापन करण्यात आल्या. तसेच किनवट व धर्माबाद येथे औद्योगिक वसाहती स्थापन करण्यात आल्या.

या योजनाकाळात जून १९६४ अखेर जिल्ह्यातील ३९ गावांना वीज पुरवठा करण्यात आला, तर ३१ मार्च १९६६ अखेर १५० गावांना वीज पुरविण्यात आली. शेतीस पाणी पुरवठा करण्यासाठी ७७२ विजेचे पंप बसविण्यात आले. डिसेंबर, १९६५ पासून विदर्भातील पारस येथून जिल्ह्यात वीज मिळू लागली.[६२] सन १९६२ पासून जिल्हा स्तरावरील काही योजना उदा. लघुसिंचन तलाव, कोल्हापूर पद्धतीचे बंधारे, विहिरी, ठिबक व तुषार सिंचन, फलोत्पादन विकास इत्यादी योजना जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित करण्यात आल्या.

---

५६. **योजनेने आपल्यासाठी काय केले?** पूर्वोक्त, पृ. ३.

५७. कित्ता, पृ. ४.

५८. कित्ता, पृ. ५.

५९. कित्ता, पृ. ६.

६०. कित्ता, पृ. ११-१२.

६१. **योजनेने आपल्यासाठी काय केले?** प्रसिद्धी विभाग, महाराष्ट्र शासन, १९६६, पृ. १६.

६२. कित्ता, पृ. २८-२९.

**वार्षिक योजना (१९६६-६७, १९६७-६८ व १९६८-६९) :**—तृतीय पंचवार्षिक योजनेच्या कालावधीत चीन व पाकिस्तानच्या युद्धामुळे गंभीर स्वरुपाच्या अडचणी निर्माण झाल्या. सन १९६२ मधील चिनी आक्रमण व १९६५ मधील पाकिस्तानी आक्रमणामुळे राष्ट्रीय संरक्षणावर अतिरिक्त खर्च करणे अपरिहार्य ठरले. तसेच १९६५-६६ मधील भीषण दुष्काळामुळे विस्कळीत झालेली अर्थव्यवस्था आणि १९६६ मधील रुपयाचे झालेले अवमूल्यन यामुळे चौथ्या योजनेसंबंधी फेरविचार करून नियोजन प्रणालीत काही बदल करणे क्रमप्राप्त ठरले. नियोजन प्रणाली न सोडता उपलब्ध साधनसामग्री लक्षात घेऊन चौथ्या योजनेची पुनर्रचना करून १९६६-६७, १९६७-६८ व १९६८-६९ सालांसाठी वार्षिक योजनांची आखणी करण्यात आली. चौथ्या योजनेसाठी योग्य ती पार्श्वभूमी व पाया तयार करणे हे या वार्षिक योजनांचे प्रमुख उद्दिष्ट होते. त्यास अनुसरून कृषि उत्पादनात वाढ, किमतींचे स्थैर्य आणि दुय्यम व तिय्यम क्षेत्रातील गुंतवणुकीस उत्तेजन यावर भर देण्यात आला.

**चतुर्थ पंचवार्षिक योजना (१९६९-७० ते १९७३-७४) :**—वस्तुतः या योजनेचे प्रारूप १९६६ मध्येच तयार केले होते. तथापि, बदललेली परिस्थिती व अर्थव्यवस्थेच्या गरजा लक्षात घेऊन मूळ प्रारूपात बरेच बदल करून १९६९ मध्ये नवीन प्रारूप तयार करण्यात आले. उपरोक्त वरील तीन वार्षिक योजनांच्या कालावधीत बरेच स्थैर्य प्राप्त झाले होते. तसेच काही बाबतीत प्रगतीही झाली होती. तरीसुद्धा चौथ्या योजनेच्या प्रारंभी देशातील आर्थिक परिस्थिती असमाधानकारक होती. ही परिस्थिती लक्षात घेऊन स्थैर्याधिष्ठित विकास आणि आर्थिक स्वावलंबन ही चौथ्या योजनेची उद्दिष्ट्ये ठरविण्यात आली. त्यानुसार कृषि उत्पादन, जलसिंचन व वीज, वाहतूक व दळणवळण आणि सामाजिक सेवा या विकास कार्यक्रमांना अधिक प्राध्यान्य देण्यात आले. कृषि विकासावरच औद्योगिक विकास अवलंबून आहे हे लक्षात घेऊन सधन शेती कार्यक्रम, समन्वित संशोधन, उपलब्ध पाण्याचा जलसिंचनासाठी पुरेपूर वापर, खते व किटकनाशकांचा वापर, दुबार पिके, पतपुरवठ्यात वाढ, कृषि मालासाठी बाजारपेठ उपलब्ध करून देणे व किमान भावाची हमी यावर विशेष लक्ष देण्यात आले. वाढत्या लोकसंख्येला आळा घालण्यासाठी कुटुंबनियोजनाकडे विशेष लक्ष पुरविण्यात आले. मुळातच या योजनेने आधीच्या योजनांपेक्षा विकासाचा अधिक वाजवी वेग निर्धारित केला होता. तथापि, प्रत्यक्षात मात्र आधीच्या योजनांएवढाही विकासाचा वेग साधता आला नाही. तरीसुद्धा सामाजिक न्यायासाठी विकेंद्रीत नियोजनाद्वारे ग्रामीण भागाकडे लक्ष देणे, सार्वजनिक क्षेत्राच्या विकासासाठी उपाययोजना करणे, लघु उद्योगांद्वारे रोजगाराच्या अधिक संधी उपलब्ध करणे व मानवी संसाधने विकासाकडे लक्ष पुरविणे ही या योजनेची इतर योजनांपेक्षा निराळी वैशिष्ट्ये असल्यामुळे ती महत्त्वपूर्ण ठरली.

चौथ्या पंचवार्षिक योजना काळात क्षेत्र विकासाच्या कल्पनेस मूर्त स्वरूप प्राप्त झाले. नियोजनाच्या प्रारंभी सामुहिक विकास प्रकल्प, क्षेत्र विकास कार्यक्रम, जलसिंचन क्षमतेच्या पुरेपूर उपयोगासाठी लाभक्षेत्र विकास कार्यक्रम, एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम, अनुसूचित जनजातींच्या उन्नतीसाठी आदिवासी क्षेत्र उपाययोजना व रोजगार हमी योजना या क्षेत्र विकासाच्या योजनांची अंमलबजावणी सुरू करण्यात आली. या योजनांचा जिल्ह्याच्या अर्थव्यवस्थेवर अनुकूल प्रभाव पडत असल्याचे दिसून येते. या योजना काळात उर्ध्व पैनगंगा या मोठ्या प्रकल्पाचे काम हाती घेण्यात आले.

तसेच कुंद्राळ, करडखेड, पेठवडज व महालिंगी या मध्यम प्रकल्पांचे काम हाती घेण्यात आले. याच कालावधीत २२ लघु पाटबंधारे तलावांचे काम हाती घेण्यात आले.[६३]

**जिल्हा नियोजन :**—सन १९६० मध्ये राज्याची स्थापना करण्यात आल्यानंतर लगोलग प्रादेशिक आणि जिल्हास्तरावरील नियोजनांची गरज भासू लागली. कारण पूर्वीच्या मध्यप्रदेश आणि हैद्राबाद राज्याचा भाग असलेले विदर्भ आणि मराठवाडा विभाग हे पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेने अविकसित आहेत आणि पश्चिम महाराष्ट्रात देखील सर्वांगीण विकास करण्यासाठी विशेष प्रयत्न करणे आवश्यक आहे, असा निष्कर्ष नियोजन तज्ज्ञांनी त्यावेळी काढला होता. विशिष्ट गरजांवर आधारित स्थानिक स्तरावर नियोजनाची आवश्यकता आहे ही गरज राज्याच्या तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत प्रतिबिंबीत झाली होती. त्याच सुमारास १९६२ मध्ये राज्य शासनाने लोकशाहीचे विकेंद्रिकरण करून त्रिस्तरीय स्थानिक स्वराज्य संस्थांची स्थापना केली. त्यानंतर साधन संपत्तीचा सर्वोचित उपयोग करून जिल्ह्याच्या योजनाबद्ध विकासास चालना देण्याचे महत्त्वपूर्ण काम जिल्हा परिषदेकडे सोपविण्यात आले. सन १९७१ मध्ये जिल्हा परिषदांच्या कामाचा आढावा घेतल्यानंतर मूल्यमापन समितीस असे आढळून आले की, मुळातच स्थानिक साधन संपत्ती अतिशय मर्यादित असल्याने स्थानिक क्षेत्रात जाणीवपूर्वक कोणतेही पद्धतशीर नियोजन करण्यात आलेले नाही. समितीच्या शिफारशीनुसार जिल्हा नियोजन प्रभावी करण्याकरिता जिल्हा परिषदांकडे जिल्ह्याची वित्तीय साधनसंपत्ती सुपूर्द करण्यात आली आणि प्रारंभी राज्य शासनाकडे असलेल्या ग्रामविकास योजना जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित करण्यात आल्या.[६४] समतोल विकास साधण्यासाठी नियोजनबद्ध विकासाच्या दृष्टीने जिल्हा हा पायाभूत घटक मानण्याचा शासनाचा निर्णय महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी दिनांक २० ऑगस्ट १९६९ रोजी विधिमंडळात जाहीर केला होता. महाराष्ट्र शासनाने दिनांक २० ऑक्टोबर १९७२ रोजी केलेल्या ठरावानुसार प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा नियोजन मंडळाची स्थापना करण्यात आली.

भारतीय नियोजन आयोगाच्या निर्णयापूर्वीच महाराष्ट्र शासनाने जिल्हा नियोजनाचा कार्यक्रम हाती घेतला. माणूस हा नियोजनाचा केंद्रबिंदू मानून गरजेवर आधारित कार्यक्रम राबविण्यासाठी जिल्हा नियोजन हे प्रभावी साधन म्हणून वापरण्यास प्रारंभ झाला. पाचव्या योजनेच्या प्रारंभी, १९७४-७५ मध्ये या ठरावाची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू झाली.

जिल्हा योजनेचे प्रारूप तयार करणे, मंजूर जिल्हा योजनेच्या अंमलबजावणीवर नियंत्रण व देखरेख ठेवणे, तसेच अंमलबजावणी करणाऱ्या निरनिराळ्या यंत्रणांमध्ये जिल्हा पातळीवर एकसूत्रता साधणे ही जिल्हा नियोजन व विकास मंडळाची कार्ये होत. सुरुवातीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी हे जिल्हा नियोजन व विकास मंडळाचे सदस्य सचिव होते. स्थानिक आणि राज्यक्षेत्र योजनांसाठी सूत्रबद्ध पद्धतीने योजना तयार करण्याचे काम जिल्हा नियोजन व विकास मंडळाच्या कक्षेत येत असल्याने आणि त्याच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी स्थानिक आणि राज्य अशा दोन्ही कार्यक्षेत्रातील सर्व संबंधीत विकास अभिकरणांचा सातत्याने समन्वय साधणे आणि त्यांचे सनियंत्रण

---

६३. लघु पाटबंधारे विभाग, नांदेड, **जिल्हा पुस्तिका**, २००५, पृ. १७.

६४. **यथार्थदर्शी योजना १९९२-९३ ते ९६-९७,** पूर्वोक्त, पृ. १.

करणे आवश्यक असल्याने जिल्हाधिकारी हे त्यांचे एकूण जिल्हा प्रशासनातील स्थान विचारात घेऊन सदस्य सचिव म्हणून १९७५ पासून जिल्हा विकास व नियोजन मंडळाचे काम करीत आहेत.[६५] या मंडळामध्ये जिल्ह्यातील खासदार, आमदार, नागरी व ग्रामीण स्वराज्य संस्थांच्या प्रतिनिधींचा समावेश असतो. जिल्ह्याचा नियुक्त पालकमंत्री हा मंडळाचा व कार्यकारी समितीचा अध्यक्ष असतो. मंडळाची बैठक वर्षातून किमान दोन वेळा आणि कार्यकारी समितीची बैठक महिन्यातून किमान एक वेळा तरी भरविणे आणि त्यात जिल्हा पातळीवरील योजनांच्या प्रगतीची चर्चा करणे अशी कार्यपद्धती विहित केलेली आहे. पंचायतराज संस्थांचे प्रतिनिधी जिल्हा नियोजन आणि विकास मंडळावर आणि मंडळाच्या कार्यकारी समितीवर असतात. जिल्हा परिषद अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी हे दोघे जिल्हा नियोजन व विकास मंडळ तसेच मंडळाची कार्यकारी समिती आणि जिल्ह्यासाठी वार्षिक योजनेचा मसुदा तयार करणाऱ्या समितीचेही सभासद असतात. ज्या बैठकीत मंडळ जिल्हा योजनेस मंजुरी देते, त्या बैठकींना तालुका पंचायत समितीच्या सभापतींनाही निमंत्रित केले जाते. जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण समितीचा सभापती आणि आदिवासी क्षेत्र उपयोजनेच्या कार्यक्षेत्रामध्ये समाविष्ट असलेल्या तालुका पंचायत समित्यांचे सभापती हे आदिवासी क्षेत्र उपयोजनेच्या विशेष कार्यकारी समितीचे सभासद असतात.

जिल्हा पातळीवरील नियोजनाच्या पूर्वतयारीसाठी पाचव्या पंचवार्षिक योजनेतील योजनांची राज्य आणि जिल्हा पातळीवरील योजनांमध्ये विभागणी करण्यात आली. राज्य शासनाद्वारे योजनेवर करावयाच्या एकूण नियोजित खर्चापैकी सुमारे ६० टक्के खर्च जिल्हा नियोजन व विकास मंडळावर करावा, तसेच तेवढ्या भागाची जबाबदारी जिल्हा मंडळावर सोपवावी अशी कल्पना होती. त्यानुसार मोठे पाटबंधारे व उद्योग धंद्यासाठी सामुहिक उत्तेजन योजना यांचा जिल्हा पातळीवरील योजनांमध्ये समावेश होतो. परंतु १९७६-७७ मध्ये व्यावहारिक कारणांसाठी वर्गीकरण बदलून त्याचा राज्य पातळीवरील योजनांमध्ये समावेश करण्यात आला. त्यामुळे राज्याच्या योजनेमधील जिल्हा पातळीवरील योजनांचा भाग अदमासे ४० टक्के झाला. पुढे अनुभवांती असे दिसून आले की, जिल्हा पातळीवरील योजनांमध्ये समाविष्ट असलेल्यांपैकी काही योजनांचे नियोजन आणि त्यांच्या निधीची तरतूद राज्य पातळीवर करणे अपरिहार्य आहे. जेव्हा योजनांतर्गत नवीन योजना सुरू केल्या जातात किंवा मोठ्या प्रमाणात पैशांची तरतूद करावी लागते, तेव्हा अशा योजनांसाठी वेगळी वर्गवारी केली जाते. अशा योजनांना राज्य पातळीवरील संचित निधी (स्टेटपूल) योजना असे म्हणतात. यामुळे स्वाभाविकच जिल्हा नियोजन व विकास मंडळामार्फत होणाऱ्या खर्चावरील भार थोडा कमी होतो. जिल्हा पातळीवरील नियोजनासाठी उपलब्ध करावयाच्या निधीचे सूत्र शासनाने निश्चित केले आहे. यात जिल्ह्याची लोकसंख्या, मागासवर्गियांची संख्या, नागरी लोकसंख्या, कृषि व जलसिंचनाची उपलब्धता, औद्योगिक मागासलेपणा, अवर्षणप्रवण क्षेत्र, वनक्षेत्र, विशेष समस्यांसाठी राखीव मानलेले क्षेत्र इत्यादी बाबींचा प्रामुख्याने विचार केला जातो. त्यामुळे गरजेवर असणारा आर्थिक विकास कार्यक्रम राबविणे सुलभ जाते.[६६]

---

६५. **यथार्थदर्शी योजना, १९९२-९३ ते १९९६-९७,** पृ. ४.

६६. **वार्षिक योजना, २००६ व २००७,** महाराष्ट्र शासन नियोजन विभाग, पृ. १५.

**पाचवी पंचवार्षिक योजना (१९७४-७५ ते १९७८-७९) :**—राष्ट्रीय योजनेत नमूद केलेल्या ध्येय धोरणानुसार राज्याच्या पाचव्या पंचवार्षिक योजनेत कृषि उत्पादन वाढविणे, रोजगाराची अधिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी रोजगार निर्मिती, लोकांच्या मूलभूत गरजा भागविणे ही प्रमुख उद्दिष्ट्ये ठरविण्यात आली. तसेच गरिबी हटाव कार्यक्रमास अग्रक्रम देण्यात आला. रासायनिक खते वाटप आणि अधिक उत्पादन देणाऱ्या बी-बियाणांच्या वापरात वाढ, जलसिंचनासाठी पाण्याचा योग्य वापर, प्रमुख पिकांसाठी विशेष मोहीम, अल्प भू-धारकांचा विकास, कोरडवाहू शेतीस चालना देणे, कृषि विस्तार कार्यक्रम, बीजगुणन व वाटप, बाजारपेठा व शेतमाल प्रक्रिया यासंबंधी कार्यक्रम हाती घेण्यात आले. या योजनेत कृषि व उद्योगधंदे यांच्या विकासाबाबत संतुलन राखण्याचा प्रयत्न होता. नैसर्गिक आपत्तींचा फटका बसूनही कृषि मालाच्या उत्पादनात अपेक्षित प्रमाणात वाढ होऊ शकली नाही. गरिबी हटाव उद्दिष्टांबाबत योजना निष्फळ ठरून स्वावलंबनाचे उद्दिष्टही अपुरे राहिले.

या योजनाकाळात विष्णुपुरी या मोठ्या सिंचन प्रकल्पाचे काम हाती घेण्यात आले. त्याचबरोबर नागझरी, लोणी व डोंगरगाव या मध्यम सिंचन प्रकल्पांचेसुद्धा काम हाती घेण्यात आले. याच कालावधीत १६ लघु पाटबंधारे तलावांचे काम सुरू करण्यात आले.

देशातील राजकीय उलथापालथीमुळे पाचवी योजना मुदतीपूर्व एक वर्ष आधीच संपविण्यात येऊन त्या वर्षासाठी (१९७९-८०) सरकती वार्षिक योजना राबविण्यात आली.

**सहावी पंचवार्षिक योजना (१९८०-८१ ते १९८४-८५) :**—ऑगस्ट, १९८० मध्ये झालेल्या राष्ट्रीय विकास परिषदेच्या बैठकीत सहाव्या योजनेची मुख्य उद्दिष्ट्ये व चौकट याना मान्यता देण्यात आली. निरनिराळ्या विकास कार्यक्रमाखाली स्थापित क्षमतेचा पूर्णतः वापर करणे, स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करणे, ग्रामीण भागातील लोकांचे जीवनमान सुधारणे, कृषि व्यवसाय आर्थिकदृष्ट्या लाभप्रद होण्यासाठी बहुउद्देशीय दृष्टिकोन अवलंबणे यावर भर देण्यात आला. कृषि विस्तारासाठी 'बेनार' योजना हाती घेऊन आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे ठरविण्यात आले. पाणीपुरवठ्याचा सुयोग्य वापर, शेती-व्यवस्थापन, अधिक जमीन लागवडीखाली आणणे, दुधाचे मोठ्या प्रमाणात उत्पादन वाढविण्यासाठी दुधाचा महापूर कार्यक्रम, अवर्षण प्रवण भागात सुधारणा, गळित व कडधान्याचे उत्पादन वाढविणे याबाबत विशेष कार्यक्रम राबविण्यात आले. उपलब्ध संसाधनांच्या तुलनेत विपर्यस्त अंदाज, एकीकडे तुटीचे अर्थप्रबंधन, तर दुसरीकडे उत्पादनाची अंदाजातील असाध्यता अशी दुहेरी कोंडी, परकीय मदतीवर अवलंबून राहण्याची भिस्त इत्यादीमुळे ही योजना उद्दिष्टानुरुप यशस्वी ठरली नाही.

सहाव्या पंचवार्षिक योजना कालावधीत लेंडी, सावरगाव व लोहा मांडवा या मोठ्या प्रकल्पांचे व उर्ध्व मानार या मध्यम प्रकल्पांचे काम हाती घेण्यात आले होते. या योजना कालावधीत अन्नधान्य पिकांचे उत्पादन सन १९८०-८१, ८१-८२, ८२-८३, ८३-८४ व १९८४-८५ मध्ये अनुक्रमे ३,१३,१००; ३,३१,९००; ५,०१,०००; २,१७,८०० व ४,२३,३०० मेट्रिक टन झाले होते.[६७] सहकाराला अग्रक्रम देऊन प्रोत्साहन दिल्याने जिल्ह्यातील अर्थव्यवस्था जोमाने वाढीला लागली. या योजनेच्या सुरुवातीस सहकारी संस्थांची संख्या २,१०२ होती ती योजना अखेर २,५८५ झाली.

---

६७. **यथार्थदर्शी योजना, पूर्वोक्त,** पृ. ४४.

**सातवी पंचवार्षिक योजना (१९८५-८६ ते १९८९-९०) :—** या योजनेची मुख्य ध्येय-धोरणे अन्न, रोजगार व उत्पादकता वाढविणे ही होती. प्रादेशिक असमतोल दूर करणे हे राज्याच्या सातव्या योजनेचे महत्त्वाचे तत्त्व होते. जिल्हा नियोजनाच्या प्रक्रियेचा एक भाग म्हणून जिल्ह्या-जिल्ह्यातील विकासातील असमतोल शोधून काढण्यासाठी शासनाने १९८३-८४ मध्ये प्रा.व्ही.एम.दांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली एक सत्यशोधन समिती नियुक्त केली होती.[६८] दोन योजनांच्या कालावधीत अनुशेष संपुष्टात आणण्याकरिता सुमारे ३,१५० कोटी रुपये निधीची आवश्यकता भासेल असा निष्कर्ष समितीने काढला. परिणामतः जिल्हा योजना नियतनाचा काही भाग अनुशेष संपुष्टात आणण्याकरिता आवश्यक म्हणून गणला गेला. त्यामुळे जिल्हा योजनाकरिता नियतन कमी झाला व जिल्हा नियोजनाची प्रक्रिया तेवढ्या निधीपुरती शिथिल करण्यात आली.[६९]

सातव्या योजनाकाळात सन १९८६-८७ मध्ये अन्नधान्य पिकांचे उत्पादन २,०५,३०० मे.टन होते. त्यात वाढ होऊन ते योजना अखेरीस ४,५५,१०० मे.टनावर गेले. कारण या कालावधीत खतांचा वापर मोठ्या प्रमाणात झाला होता. या कालावधीत खताच्या वापराबाबत राज्यात जिल्ह्याचा तिसरा व मराठवाड्यात पहिला क्रमांक होता.[७०] या योजनाकाळात बीजगुणन विकास कार्यक्रमावर रुपये ४.५५ लाख, सधन कापूस कार्यक्रमावर रुपये २३.४७ लाख, रोप संरक्षण मोहिमेवर रुपये २२.०० लाख व तेलबिया कार्यक्रमावर रुपये ४६.९० लाख खर्च झाले होते. मागासवर्गीय व नवबौद्धांना दारिद्र्यरेषेच्या वर आणण्यासाठी या योजनेअखेर ६५.१६ लाख रुपये खर्च झाले होते.[७१] सातव्या योजनेअखेर पीक संवर्धन या विकास शीर्षाखाली २६३.८७ लाख रुपये खर्च झाले होते. पशुसंवर्धन या विकास शीर्षाखाली १७७.१९ लाख रुपये, दुग्ध व्यवसायासाठी ८.३० लाख रुपये, वन विकासासाठी ८०.६२ लाख रुपये खर्च झाले होते.[७२] या योजना काळात ८८,८३४ दारिद्र्य रेषेखालील कुटुंबापैकी ४७,२९९ कुटुंबांना आर्थिक मदत देऊन दारिद्र्य रेषेच्या वर आणण्याचा प्रयत्न केला होता.[७३] या योजनेत विकास शीर्षानुसार झालेला खर्च खाली दिला आहे.[७४]

| विकास शीर्ष | झालेला खर्च (लाख रुपये) | विकास शीर्ष | झालेला खर्च (लाख रुपये) |
|---|---|---|---|
| कृषि व संलग्न सेवा | ७५२.२९ | उद्योग व खाणकाम | १६०.९५ |
| ग्रामीण विकास | १,५०१.५६ | वाहतूक व दळणवळण | ५८२.४२ |
| पाटबंधारे व पूरनियंत्रण | १,१४३.८१ | सामान्य आर्थिक सेवा | ०.४० |
| विद्युत विकास | १,२२४.९९ | सामाजिक व सामुहिक सेवा | ५,०४१.३३ |
| | | एकूण | १०,४०७.७५ |

६८. अधिक माहितीस्तव याच प्रकरणातील 'विकासाच्या प्रादेशिक असमतोलाचा अनुशेष' हा विभाग पहावा.

६९. **यथार्थदर्शी योजना,** पूर्वोक्त, पृ. ८.

७०. कित्ता, पृ. ४५.

७१. कित्ता, पृ. ४५-५०.

७२. कित्ता, पृ. ४९-९६.

७३. कित्ता, पृ. ११०.

७४. कित्ता, पृ. २११-१३.

**वार्षिक योजना (१९९०-९१ व १९९१-९२) :**—सन १९९०-९१ व १९९१-९२ या वर्षासाठी वार्षिक योजना राबविण्यात आल्या. या योजना कालावधीत तालुका बीजगुण क्षेत्र विकास कार्यक्रमासाठी १९९०-९१ व १९९१-९२ वर्षामध्ये अनुक्रमे १.०० व ०.२० लाख रुपये खर्च करण्यात आले. सधन विकास कार्यक्रमावर अनुक्रमे ३.८८ व १२.०० लाख रुपये खर्च करण्यात आले. मागासवर्गीय व नवबौद्धांना दारिद्र्य रेषेच्या वर आणण्यासाठी ८.६० लाख रुपये खर्च करण्यात आले व २०० लाभार्थींना अर्थसाहाय्य देण्यात आले. तसेच आदिवासींना दारिद्र्य रेषेच्या वर आणण्यासाठी ९०-९१ मध्ये २.७० लाख रुपये खर्च करण्यात आले. पीक संवर्धन या विकास शीर्षाखाली २६३.८७ लाख रुपये खर्च करण्यात आले.[७५] या योजना कालावधीत विकास शीर्षानुसार झालेला खर्च खाली दिला आहे.

(खर्च रुपये लाख)

| विकास शीर्ष | १९९०-९१ | १९९१-९२ |
|---|---|---|
| कृषि व संलग्न सेवा | ६२.२३ | ५८.३९ |
| ग्रामीण विकासाकरिता विशेष कार्य | ४३०.२१ | ३९१.३० |
| पाटबंधारे व पूर नियंत्रण | १०९.५६ | ९५.५६ |
| विद्युत विकास | ६७.०० | ४४.२८ |
| उद्योग व खाणकाम | ३९.१५ | ४५.९६ |
| वाहतूक व दळणवळण | ५३.३७ | ९१.५७ |
| सामाजिक व सामुहिक सेवा | ६२८.४५ | ५८०.७९ |

**यथार्थदर्शी योजना (१९९२-९३ ते १९९६-९७) :**—जिल्ह्याच्या वार्षिक योजनेतील मर्यादित आर्थिक तरतुदीतून जास्तीत जास्त व समतोल विकास साधने शक्य होत नाही. त्यासाठी जिल्ह्याची पाच वर्षांची यथार्थदर्शी योजना तयार करण्याचे ठरविण्यात आले. नांदेड जिल्ह्याची वर्ष १९९२-९३ ते १९९६-९७ ची यथार्थदर्शी योजना महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागाकडील सुचनेनुसार व यशवंतराव चव्हाण विकास प्रबोधिनी, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आली. शासनाने जिल्हा हा नियोजनाचा घटक स्वीकारल्यामुळे जिल्ह्याच्या आशा-आकांक्षा, गरजा व उपलब्ध साधनसंपत्ती आठव्या पंचवार्षिक योजनेत प्रतिबिंबीत होणे आवश्यक आहे. त्या दृष्टिने नांदेड जिल्ह्याची यथार्थदर्शी योजना तयार करण्यात आली.[७६]

सन १९७२ पासून सुरू केलेल्या जिल्हा नियोजनानुसार राहत्या गावाजवळ जास्तीत जास्त सोयी उपलब्ध करून देण्यासाठी ग्रोथ सेंटर, सेवा केंद्र अथवा मध्यवर्ती गावाची निवड करण्यात येते. जे गाव कमी सोयी उपलब्ध करून देते त्याला मध्यवर्ती गाव, मध्यवर्ती गावापेक्षा अधिक सोयी उपलब्ध करून देते त्याला सेवा केंद्र व दोन्ही निवडलेल्या गावांपेक्षा अधिक सोयी उपलब्ध करून देणाऱ्या

७५. **यथार्थदर्शी योजना,** पूर्वोक्त, पृ. ४९-५०.

७६. कित्ता, (प्रस्तावना).

गावास ग्रोथ सेंटर म्हणतात. योग्य नियोजनाद्वारे या मध्यवर्ती गावांचा, सेवा केंद्राचा व ग्रोथ सेंटरचा दर्जा वाढविण्यासाठी आठव्या योजनेत विविध सोयी उपलब्ध करून देण्यासाठी या गावांचा विचार करण्यात आला. त्यामुळे योजनेच्या उद्दिष्टांची पूर्ती होण्यास मदत झाली.

**आठवी पंचवार्षिक योजना (१९९२-९३ ते १९९६-९७) :**—सातव्या योजनेवरील खर्च व त्यातून प्राप्त झालेल्या भौतिक साध्याचा विचार करून आठव्या पंचवार्षिक योजनेकरिता पार्श्वभूमी तयार करण्यासाठी १९९०-९१ व १९९१-९२ या दोन वर्षासाठी वार्षिक योजना राबविण्यात आली. त्यानंतर १९९२-९३ ते १९९६-९७ या वर्षात आठवी पंचवार्षिक योजना राबविण्यात आली. या योजनेत ग्रामीण विकासावर भर देण्यात आला होता. त्याखालोखाल पाटबंधारे योजनांवर भर देण्यात आला होता. या योजना काळात पाटोदा, मांडवी, मुगांव व रेणापूर - सुधा या लघु पाटबंधाऱ्याची कामे हाती घेण्यात आली. या योजनेत विकास शीर्षानुसार झालेला खर्च खाली दर्शविला आहे.

| विकास शीर्ष | खर्च (रु. लाख) | विकास शीर्ष | खर्च (रु. लाख) |
|---|---|---|---|
| कृषि व संलग्न सेवा | ६६०.१६ | विद्युत विकास | ५६४.७६ |
| ग्रामीण विकासाकरिता विशेष कार्यक्रम . | ३,४५७.३७ | उद्योग व खाणकाम | १९५.२९ |
| | | वाहतूक व दळणवळण | ६९१.६० |
| पाटबंधारे व पूर नियंत्रण | १,२५०.६३ | सामाजिक व सामुहिक सेवा | ४,०६३.१३ |
| | | एकूण | १०,८८१.९४ |

**वार्षिक योजना (१९९७-९८, १९९८-९९ व १९९९-२०००) :**—सन १९९७-९८, १९९८-९९ व १९९९-२००० या वर्षासाठी वार्षिक योजना राबविण्यात आल्या. वरील योजना कालावधीत ग्रामीण विकासावर जास्त लक्ष केंद्रित करण्यात आले होते. दारिद्र्य रेषेखालील लोकांचे राहणीमान उंचावण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. याच योजनाकाळात १९९९ पासून स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना कार्यान्वित करण्यात आली. या योजना कालावधीत विकास शीर्षानुसार झालेल्या खर्चाचा तपशील खाली दिला आहे.

(खर्च रुपये लाख)

| विकास शीर्ष | १९९७-९८ | १९९८-९९ | १९९९-२००० |
|---|---|---|---|
| कृषि व संलग्न सेवा | ४०.६० | ४८.७० | १६४.२५ |
| ग्रामीण विकासाकरिता विशेष कार्य | १,६१५.२० | १,७१७.५० | १,९७२.१२ |
| पाटबंधारे व पूर नियंत्रण | २१४.५० | ३१६.३२ | २९०.६८ |
| विद्युत विकास | ५७.४० | ७६.४० | ३६.७० |
| उद्योग व खाणकाम | ३५.४५ | ४४.१९ | ६३.०० |
| वाहतूक व दळणवळण | ९५.८८ | २४९.३७ | ३६१.०१ |
| सामाजिक व सामुहिक सेवा | ५९८.६० | ६४७.०३ | ६८४.४२ |
| एकूण | २,६५७.६३ | ३,०९९.५१ | ३,५७१.८८ |

**वार्षिक योजना (२०००-०१, २००१-०२ व २००२-०३) :**—या योजना कालावधीत ग्रामीण विकासाला मोठ्या प्रमाणात चालना देण्यात आली. या कालावधीत स्वयंरोजगार योजना, घरकूल योजना, अवर्षण प्रवण क्षेत्र योजना, आर्थिक दुर्बल घटक योजना या ग्रामविकासाच्या योजना राबविण्यात आल्या. बेरोजगारी हटविण्यासाठी विविध योजना राबविण्यात आल्या. रस्ते विकासावर जास्त भर देण्यात येऊन ग्राम सडक योजना राबविण्यात आली. या योजनांवर विकास शीर्षानुसार झालेला खर्च पुढील प्रमाणे होता.

(खर्च रुपये लाख)

| विकास शीर्ष | २०००-०१ | २००१-०२ | २००२-०३ |
|---|---|---|---|
| कृषि व संलग्न सेवा | ६३.५६ | ३६.१३ | २५.५८ |
| ग्रामीण विकासाकरिता विशेष कार्यक्रम | ६५०.६३ | ४७६.३३ | ५४९.०२ |
| पाटबंधारे व पूर नियंत्रण | १४३.४४ | ६३.०३ | १२२.६३ |
| विद्युत विकास | ४०.०७ | ४०.०० | ४०.०० |
| उद्योग व खाणकाम | ८.४० | ५.२० | ६.२७ |
| वाहतूक व दळणवळण | ४९४.०४ | ५४.३४ | ८२.५६ |
| सामाजिक व सामुहिक सेवा | ५२७.२३ | ५२१.६३ | २५२.१८ |
| एकूण | १,९२७.३७ | १,१९६.६६ | १,०७८.२४ |

**वार्षिक योजना (२००३-०४ व २००४-०५) :**—सन २००३-०४ व २००४-०५ या वर्षासाठी वार्षिक योजना राबविण्यात आल्या. या योजनांवर झालेला खर्च खाली दिला आहे.

(खर्च रुपये लाख)

| विकास शीर्ष | २००३-०४ | २००४-०५ |
|---|---|---|
| कृषि व संलग्न सेवा | ६८.३९ | ८५.१५ |
| ग्रामीण विकासाकरिता विशेष कार्यक्रम | ५५५.७३ | ४७०.५१ |
| पाटबंधारे व पूर नियंत्रण | ९४.०३ | ३६.७१ |
| विद्युत विकास | ३५.०० | ३०.३२ |
| उद्योग व खाणकाम | ५.४५ | ११.२१ |
| वाहतूक व दळणवळण | ६५.४३ | १०२.७० |
| सामाजिक व सामुहिक सेवा | १६८.८९ | १७३.४२ |
| एकूण | ९९२.९२ | ९१०.०२ |

**वार्षिक योजना (२००५-०६) :**—राष्ट्रीय विकास परिषदेने २००१ मध्ये दहाव्या पंचवार्षिक योजनेसंदर्भात ठरविलेले अग्रक्रम राज्याच्या पहिल्या चार वार्षिक योजनेत प्रतिबिंबीत झालेले आहेत. या योजनेची उद्दिष्ट्ये पुढील प्रमाणे होती. पायाभूत क्षेत्राच्या विकासाद्वारे आर्थिक विकास गतिमान करणे ज्यायोगे गतिमान औद्योगिक प्रगती करून मोठ्या प्रमाणावर रोजगार संधी उपलब्ध करणे, कृषि विकास क्षेत्र कार्यक्रम गतिमान करणे, फलोत्पादन, फूलक्षेत्र, उच्च कृषि तंत्रज्ञानाचा वापर व कृषि उत्पादनाच्या क्षेत्रातील निर्यातीत वाढ करणे, पाणी हा विकासातील महत्त्वाचा घटक मानून त्याचे समन्यायी वाटप करणे, सामाजिक सेवांसाठी प्राधान्याने विचार करून त्यांच्या खाजगीकरणासाठी प्रयत्न करणे आणि त्याचबरोबर त्यासाठी अधिक निधी उपलब्ध करून देणे. या योजनेवर विकास शीर्षानुसार झालेला खर्च खाली दिला आहे.

(खर्च रुपये लाख)

| विकास शीर्ष | खर्च रुपये लाख |
|---|---|
| कृषि व संलग्न सेवा | १९०.६३ |
| ग्रामीण विकासाकरिता विशेष कार्यक्रम | ४५०.२५ |
| पाटबंधारे व पूर नियंत्रण | १०५.८२ |
| विद्युत विकास | ४५.०८ |
| उद्योग व खाणकाम | १५.९४ |
| वाहतूक व दळणवळण | १४२.४९ |
| सामाजिक व सामुहिक सेवा | २४९.८८ |
| एकूण | १,२००.०९ |

**विकासाच्या प्रादेशिक असमतोलाचा अनुशेष :** विकासाच्या विविध क्षेत्रातील विभागीय अनुशेष निश्चित करण्यासाठी व तो दूर करण्याच्या दृष्टिने उपाययोजना सुचविण्यासाठी शासनाने ऑगस्ट १९८३ मध्ये अर्थतज्ञ डॉ.वि.म.दांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली एक सत्यशोधन समिती स्थापन केली होती. सत्यशोधन समितीने जून १९८४ मध्ये आपला अहवाल शासनास सादर केला. समितीने आपल्या अहवालात ९ विकास क्षेत्रात एकूण रुपये ३,१८६.७८ कोटींचा अनुशेष दाखविला होता. यामध्ये मराठवाड्याचा अनुशेष ७५०.८५ कोटी रुपयांचा होता. सन १९८५-८६ पासून हा अनुशेष दूर करण्याची प्रक्रिया सुरू झाली.

Maharashtra State Gazetteers

विभागीय अनुशेष दूर करण्यासाठी १९८५-८६ ते २००३-२००४ या कालावधीत मराठवाड्यासाठी मंजूर करण्यात आलेली तरतूद व झालेला खर्च खालीलप्रमाणे होता.[७७]

(रुपये कोटीत)

| वार्षिक योजना | तरतूद | खर्च | वार्षिक योजना | तरतूद | खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १९८५-८६ | ५०.२५ | ३२.३८ | १९९५-९६ | १९१.०० | १७५.३० |
| १९८६-८७ | ६१.०४ | ४८.०० | १९९६-९७ | २३५.४९ | १९४.८० |
| १९८७-८८ | ७४.१४ | ५९.५९ | १९९७-९८ | ३११.५९ | २७७.२१ |
| १९८८-८९ | ९६.०२ | ७९.१५ | १९९८-९९ | २९१.८६ | २७७.३३ |
| १९८९-९० | ९९.८४ | ९१.१५ | १९९९-२००० | २९२.०० | २६५.८१ |
| १९९०-९१ | ८४.४९ | ७७.१० | २०००-०१ | २९२.०० | ३०१.२७ |
| १९९१-९२ | ९०.५० | ८०.८२ | २००१-०२ | ४९०.५५ | ३५१.०६ |
| १९९२-९३ | ११०.१७ | १०८.६५ | २००२-०३ | २६३.३३ | ८१.९९ |
| १९९३-९४ | ९७.९४ | १११.६८ | २००३-०४ | २६९.७८ | ८४.२५ |
| १९९४-९५ | १२४.९१ | १६१.३७ | | | |

सन २०००-०१ मध्ये विकास मंडळाच्या निधीतून नांदेड जिल्ह्यातील सर्व तालुक्यांच्या रस्त्यांच्या कामासाठी रुपये २००.०० लाख मंजूर केले होते. तसेच अर्धापूर येथील तुती रेशीम विस्तार तथा पथदर्शक प्रशिक्षण केंद्राचे बळकटीकरण करण्यासाठी रुपये ९.०० लाख मंजूर केले होते. सन २००१-०२ मध्ये जिल्ह्यासाठी ३०३.५९ लाख रुपये निधी मंजूर केला होता. सन २००२-०३ मध्ये राखीव विशेष निधीतून जिल्ह्यातील विकास कामासाठी २७४.२४ लाख रुपये मंजूर केले होते. सन २००३-०४ मध्ये विशेष निधीतून जिल्ह्यातील विकास कामासाठी २७२.०० लाख रुपये मंजूर करण्यात आले होते सन २००४-०५ सालासाठी विशेष निधीतून जिल्ह्यासाठी ४१८.६० लाख रुपये मंजूर करण्यात आले होते. हा निधी पाटबंधारे, रस्ते, सामान्य शिक्षण, तांत्रिक शिक्षण, पाणीपुरवठा, पशुवैद्यकिय सेवा या विकास क्षेत्रासाठी खर्च करण्यात आला होता.[७८]

संपूर्ण महाराष्ट्रात विकासाचा अनुशेष भरून काढण्यासाठी भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३७१(२) अंतर्गत प्राप्त झालेल्या अधिकारानुसार, भारताच्या राष्ट्रपतींनी 'महाराष्ट्र राज्य (विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र) यासाठी राज्यपालांची विशेष जबाबदारी आदेश १९९४' निर्गमित केला. या आदेशान्वये राज्यामध्ये विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्रासाठी स्वतंत्र विकास मंडळे दि. २ मे १९९४ रोजी स्थापन करण्यात आली. मराठवाडा वैधानिक विकास मंडळाचे कार्यक्षेत्र संपूर्ण मराठवाडा

---

७७. **वार्षिक योजना २००६-०७,** महाराष्ट्र राज्य, भाग-१, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, पृ. ४८.

७८. **मराठवाडा वैधानिक विकास महामंडळ, वार्षिक अहवाल,** २०००-०१ ते २००४-०५ वर आधारित.

Maharashtra State Gazetteers

विभागासाठी असून, त्यात औरंगाबाद महसूल विभागातील औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, बीड व उस्मानाबाद जिल्ह्यांचा समावेश आहे. मंडळाचे मुख्यालय औरंगाबाद येथे आहे.

सन १९९४-९५ ते १९९९-२००० दरम्यान दूर झालेला अनुशेष विचारात घेता दि.१ एप्रिल २००० रोजीच्या शिल्लक अनुशेषाची मराठवाडा वैधानिक विकास मंडळाची विकास क्षेत्रनिहाय विगतवारी खालीलप्रमाणे होती.[७९]

| विकास क्षेत्र | मराठवाडा | एकूण अनुशेषाची विभाग-निहाय टक्केवारी |
|---|---|---|
| पाटबंधारे | २१७३.९६ | ५५.२७ |
| रस्ते | ४३७.५७ | १४.९४ |
| सामान्य शिक्षण | १३.१३ | ००.६५ |
| तांत्रिक शिक्षण | ७३.२३ | ३.५० |
| पाणीपुरवठा | ७८.७२ | ०.८९ |
| भूविकास, मृद व जलसंधारण आणि फलोत्पादन. | ५०.९८ | ३.५९ |
| पशुवैद्यकीय सेवा | ०.८७ | ०.०४ |
| पंपांचे उर्जीकरण | २९५.६६ | ९.८२ |

राज्यातील विविध विभागाचा समतोल विकास साधण्याची बांधिलकी शासनाने स्वीकारली आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी तुलनेने मागासलेल्या विभागातील विकासाचा वेग वाढविणे आवश्यक आहे. याकरिता शासनाने मराठवाडा, विदर्भ व कोकण विभागांसाठी सुधारित विकासाची आखणी केली आहे. त्यानुसार मराठवाडा विभागाकरिता रु. ५८८.२८ कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर करण्यात आले. त्यापैकी सप्टेंबर २००५ अखेर मराठवाडा पॅकेजखाली रु.४२२.२५ कोटी खर्च करण्यात आले.[८०] औरंगाबाद येथे दि.२२ फेब्रुवारी २००५ रोजी झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत मराठवाड्याच्या विकासासाठी रुपये ३,२४२.३३ कोटी मंजूर करण्यात आले. त्यापैकी नांदेड येथील वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय हे विष्णुपुरी येथे स्थलांतरित करण्यासाठी ८४.१० कोटी रुपये देण्यात आले.[८१]

## किमती व भावपातळी

किमतीमधील चढउतारांचे लोकांच्या आर्थिक जीवनावर दूरगामी परिणाम होतात. म्हणून त्यांच्या राहणीमानाची पातळी किमतीमध्ये होणाऱ्या चढउतारावर अंशतः अवलंबून असते. विशेषतः ज्यांचे

७९. **वार्षिक योजना अहवाल,** २००६-०७, पूर्वोक्त, पृ. ४९.

८०. कित्ता, पृ. ४८.

८१. **प्रगतीच्या वाटेवर १ वर्ष,** नोव्हेंबर, २००५, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई, पृ. ६४.

वेतन स्थिर असते अशा लोकांच्या आर्थिक परिस्थितीवर भाववाढीमुळे विपरीत परिणाम होतो. कृषिप्रधान अर्थव्यवस्थेमध्ये भावपातळी स्थिर राहणे ही एक अत्यंत महत्त्वाची बाब असते. प्रत्येक जिल्ह्यातील किमती व भावपातळी सर्वसामान्यपणे राष्ट्रीय भाव पातळीशी निगडित असतात. त्यामुळे नांदेड जिल्ह्यातील भाव पातळी भारतातील भाव पातळीपेक्षा फारशी भिन्न असू शकणार नाही. तथापि, जिल्ह्यातील लोकांच्या राहणीमानाचा विचार करण्याच्या दृष्टिने भाव पातळीचा अभ्यास करणे ही एक आवश्यक बाब आहे.

स्वातंत्र्यापूर्वी नांदेड जिल्हा भूतपूर्व हैद्राबाद संस्थानात असताना निजामी राजवटीतील प्रचलित रुपयाची क्रयशक्ती ब्रिटिश रुपयापेक्षा कमी होती. त्यामुळे नांदेड जिल्ह्यातील भाव पातळी ब्रिटिश अमदानीतील प्रदेशात असलेल्या भाव पातळीनुरूप असणे शक्य नव्हते.

जिल्ह्यातील सन १९०० पूर्वीच्या कालावधीसाठी किमती विषयक आवश्यक सांख्यिकी माहिती उपलब्ध नाही. तथापि, ढोबळपणे असे म्हणता येईल की, अलिकडील काळातील भाव पातळीशी तुलना करता मागील शतकात वस्तूंच्या किमती अत्यंत कमी होत्या. सन १९०० मध्ये भीषण दुष्काळ पडला होता. त्या दुष्काळी वर्षात औरंगाबादमध्ये ज्वारीची किंमत रुपयाला पाच शेर आणि बीड व नांदेडमध्ये रुपयाला पावणेचार शेर इतकी होती.[८२] वाहतुकीच्या साधनांच्या अभावी लांबच्या ठिकाणाहून वस्तू आणणे त्याकाळी बरेच कठीण होते. त्यामुळे दुष्काळ अथवा अवर्षण यासारखी आपत्ती कोसळल्यास वस्तुंच्या किमती झपाट्याने वाढत असत. सन १९०० मध्ये रेल्वे वाहतुकीची सोय उपलब्ध झाल्यानंतर दुष्काळी व टंचाईग्रस्त प्रदेशात इतर ठिकाणाहून अन्नधान्य आयात करणे शक्य झाले. तेव्हापासून हैद्राबाद संस्थानातील प्रदेशात भाव पातळीत समानता येण्यास सुरुवात झाली.[८३]

हैद्राबाद स्टेटमधील उस्मानाबाद केंद्रातील १८९०,१९०० व १९०१ या[८४] वर्षातील अन्नधान्याच्या किमतीतील सरासरी पातळी खाली दर्शविली आहे.[८५]

दशकातील सरासरी दर (निजामी रुपयामध्ये)

| निवडक अन्नधान्य | परिमाण | १८९० | १९०० | १९०१ |
|---|---|---|---|---|
| तांदूळ | शेर | ८ | ९ | ८ |
| ज्वारी | शेर | २२ | २१ | १७ |
| गहू | शेर | १३ | १५ | ११ |

सन १९०७ मध्ये ब्रिटिश रुपयाची किंमत निजामी राजवटीतील तेरा आणे नऊ पैसे इतकी होती. परंतु नंतरच्या कालावधीत हळूहळू निजामी रुपयाच्या क्रयशक्तीमध्ये बरेच चढउतार झाले.

८२. **इम्पिरिअल गॅझेटिअर ऑफ इंडिया, प्रॉव्हिन्शिअल सिरिज, हैद्राबाद स्टेट,** १९०९, पृ. ३६.

८३. कित्ता, पृ. ३६.

८४. सरासरी किमतीमध्ये १८७७-७८ व १८९९-१९०० या सारख्या तीव्र दुष्काळी वर्षातील किमतीची पातळी वगळण्यात आली आहे.

८५. **इम्पिरिअल गॅझेटिअर ऑफ इंडिया,** पूर्वोक्त, पृ. ८४.

परिणामतः निजामी रुपयाची ब्रिटिश रुपयातील किंमत कमी होऊ लागली. स्वातंत्र्यपूर्व काळात हैद्राबाद राज्यातील अन्नधान्याच्या किमती ब्रिटिश प्रदेशातील किमतीपेक्षा बऱ्याच कमी होत्या. पुढील तक्त्यामध्ये हैद्राबाद राज्यातील १९१० ते १९२० या कालखंडातील गहू, तांदूळ व ज्वारी या वस्तुंच्या भावामध्ये झालेले चढउतार दर्शविले आहेत.[८६]

| वर्ष | गहू | तांदूळ | ज्वारी |
|---|---|---|---|
| १९१०-११ | १२५ | १२९ | १३९ |
| १९११-१२ | १३६ | १४१ | १४७ |
| १९१२-१३ | १६७ | १५५ | १९१ |
| १९१३-१४ | १७३ | १५५ | १८३ |
| १९१४-१५ | १७३ | १४८ | १४९ |
| १९१५-१६ | १४१ | १२९ | १४९ |
| १९१६-१७ | १४१ | १२९ | १६० |
| १९१७-१८ | २५० | १७२ | ४०० |
| १९१८-१९ | ४०९ | २५८ | ४४० |
| १९१९-२० | ३४६ | २५८ | २५९ |

पहिल्या महायुद्धाच्या कालावधीत उपभोग्य वस्तुंच्या किमती मोठ्या प्रमाणावर वाढल्या होत्या. विशेषतः ब्रिटिश प्रदेशामध्ये वस्तूंचे भाव बरेच वाढले होते. हैद्राबाद राज्यामध्ये १९१५-१६ व १९१६-१७ साली महागाईची झळ फारशी जाणवली नाही. तथापि, महायुद्धाच्या उत्तरार्धात १९१७-१८ मध्ये भाव पातळी सर्वोच्च होती. या कालावधीमध्ये शेतकऱ्यांना त्यांच्या मालासाठी चांगला मोबदला मिळाला. सन १९२६ नंतर भाव पातळीतील चढउताराची गती अतिशय मंद होती. त्यावर्षी कापसाची किंमत एकदम घसरली व त्या दशकाच्या अंतिम वर्षामध्ये कापसाची किंमत एकदम खाली आली. सन १९२९-३० च्या जागतिक आर्थिक मंदीचा हा परिणाम होता.

सप्टेंबर, १९२९ ते मार्च, १९३३ हा काळ आर्थिक मंदीचा होता. या कालावधीत सर्व वस्तूंच्या किमती आणि विशेषकरून शेतीमालाच्या किमती फारच कमी झाल्या होत्या. एप्रिल, १९३३ पासून १९३७ पर्यंतच्या कालावधीस आर्थिक पुनरुज्जीवनाचा कालावधी म्हणता येईल. या काळात शेतमालाच्या वस्तू पूर्ववत वाढू लागल्या व त्यांनी मंदीपूर्व पातळी गाठली. यापुढील काळामध्ये दुसऱ्या महायुद्धाच्या प्रारंभापर्यंत पुन्हा आर्थिक मंदीची लक्षणे दिसू लागली. हैद्राबाद संस्थानातील अर्थव्यवस्थेवरसुद्धा जागतिक चढउताराचे दूरगामी परिणाम झालेले होते. सप्टेंबर, १९३९ मध्ये दुसऱ्या महायुद्धाचा प्रारंभ झाल्यानंतर आर्थिक तेजीचा प्रार्दुभाव होऊन किमती विलक्षण झपाट्याने वाढल्या होत्या. वस्तुतः महायुद्धाच्या प्रारंभीच्या काळात भावपातळीमध्ये अचानक कृत्रिम टंचाईचा आभास निर्माण केला गेला होता.

---

८६. **परभणी जिल्हा गॅझेटिअर,** १९८८, पृ. ४४४.

हैद्राबाद राज्यातील काही प्रमुख कृषि मालाच्या घाऊक किमतींचे निर्देशांक खाली दर्शविले आहेत. नांदेड जिल्हा हैद्राबाद राज्याचा भाग असल्यामुळे पुढील आकडेवारी नांदेड जिल्ह्याची प्रातिनिधीक आहे असे म्हणणे उचित ठरेल.[८७]

| वस्तू | १९३१-३२ | १९३२-३३ | १९३३-३४ | १९३४-३५ | १९३५-३६ | १९३६-३७ | १९३७-३८ | १९३८-३९ | १९३९-४० | १९४०-४१ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तांदूळ | ५० | ५० | ४७ | ५५ | ५४ | ५६ | ५८ | ५७ | ७४ | ७० |
| गहू | ३७ | ३७ | ३६ | ३४ | ३३ | ४४ | ४७ | ४१ | ४६ | ४७ |
| ज्वारी | ४३ | ४३ | ४३ | ५४ | ४९ | ५३ | ५१ | ६१ | ६५ | ५५ |
| बाजरी | ४५ | ४५ | ४७ | ५० | ५३ | ५९ | ५५ | ५९ | ६८ | ५७ |
| हरभरा | ३१ | ३१ | ३४ | ४० | ३७ | ४८ | ५० | ५२ | ५४ | ५४ |
| तूर | ३६ | ३४ | ३६ | ४५ | ४३ | ५० | ५५ | ५१ | ५३ | ४९ |
| कापूस | ७५ | ७२ | ६७ | ७५ | ७४ | ७९ | ७३ | ७० | ८४ | ७७ |
| सरकी | ७० | ७३ | ६० | ७० | ६८ | ६२ | ६० | ६७ | ७७ | ६७ |
| जवस | ४१ | ४३ | ४३ | ४३ | ४६ | ५० | ५० | ४८ | ४९ | ५१ |
| एरंडी | ५६ | ५८ | ४८ | ५० | ५४ | ६४ | ६० | ५९ | ७५ | ५९ |

दुसऱ्या महायुध्द काळामध्ये भावपातळी वाढल्यामुळे सट्टेबाजी व काळाबाजार करण्याची प्रवृत्ती दृष्टोत्पत्तीस आली. सतत वाढणाऱ्या मागणीचा फायदा घेऊन व्यापाऱ्यांनी बराच माल भूमिगत करण्यास सुरुवात केली व त्यामुळे किमती अधिकच वाढून ग्राहकांची पिळवणूक सुरू झाली. खुल्या बाजारातील परिस्थिती शासनाच्या नियंत्रणाबाहेर जाईल अशी भिती निर्माण झाली होती. प्राप्त परिस्थितीमध्ये ब्रिटिश सरकारने शिधा वाटप व भाव नियंत्रणाचे धोरण अंमलात आणले होते. हैद्राबाद शासनाने देखील याच धोरणांचा अंगिकार करून हैद्राबाद संरक्षण अधिनियमानुसार शासकीय सदस्यांची एक किंमत नियंत्रण समिती स्थापन केली. प्रत्येक जिल्ह्यातील प्रथम दर्जाचे तालुकदार (जिल्हाधिकारी) यांची त्यांच्या अधिकार क्षेत्रासाठी भावपातळी नियंत्रक म्हणून नेमणूक करण्यात आली. किंमत पातळीवर नियंत्रण आणण्यास्तव जे विक्रेते ऑगस्ट, १९३९ च्या शेवटच्या आठवड्यातील सरासरी किमतीपेक्षा ५ टक्क्यांहून अधिक भावाने वस्तुंची विक्री करतील अशा विक्रेत्यांवर हैद्राबाद संरक्षण अध्यादेशाच्या ८१ व्या कलमानुसार खटला भरण्यात येईल असा आदेश काढण्यात आला. या अध्यादेशाच्या कार्यकक्षेखाली सर्व अन्नधान्ये, साखर, तूप व काही उपभोग्य वस्तू आणण्यात आल्या. त्याचप्रमाणे यंत्रनिर्मित वस्तुंसाठी १० टक्क्यांची मर्यादा निर्धारित करण्यात आली. नांदेड जिल्ह्यामध्ये उपरोक्त अध्यादेशाची अंमलबजावणी चांगल्या प्रकारे करण्यात आली.

---

८७. **परभणी जिल्हा गॅझेटिअर,** १९८८, पृ. ४४५.

उपरोक्त अध्यादेश, निर्यात व विनिमय यावरील निर्बंध आणि भाव नियंत्रणाबाबत केलेली कार्यवाही या सर्व घटकांचा परिणाम म्हणून जानेवारी ते जुलै १९४० या सात महिन्यांच्या कालावधीमध्ये वाढत्या किमतींना आळा बसला. त्याच सुमारास युरोपियन बाजारपेठ भारतीय मालासाठी युद्धजन्य परिस्थितीमुळे उपलब्ध होऊ न शकल्याने निर्यात होणाऱ्या मालावर आपोआप बंधने पडली. त्यामुळे निर्यात होणाऱ्या वस्तुंच्या किमती कमी झाल्या. तथापि, परिस्थितीमुळे आयात मालाची तीव्र टंचाई जाणवू लागली. ज्या वस्तुंच्या किमती भरमसाठ वाढल्या त्या वस्तुंमध्ये औषधे, औषधीद्रव्ये, रसायने, कापड, साखर, चहा व अनेक यंत्रनिर्मित वस्तुंचा समावेश होता. त्याचबरोबर ब्रिटिश सरकारने आयात वस्तुंवर कडक निर्बंध लादले होते. परिणामतः आयात वस्तुंच्या किमती अभूतपूर्व पातळीवर जाऊन पोहोचल्या. विशेषतः अशा वस्तू सामान्य ग्राहकाला जवळ जवळ उपलब्ध नव्हत्या. स्थानिक विक्रेते व संघाच्या साह्याने औषधे व इतर आवश्यक वस्तुंच्या घाऊक व किरकोळ किमती निश्चित करून दिल्या होत्या. ग्राहकांच्या माहितीसाठी नियंत्रित केलेल्या वस्तुंच्या किमतींची सूची किरकोळ औषधी दुकानावर प्रदर्शित करणे शासनाने अनिवार्य केले होते.

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात सर्वच वस्तुंच्या किमतींमध्ये भरमसाठ वाढ झाली होती. सन १९४५ मध्ये युद्ध संपल्यानंतरसुद्धा भावपातळी खाली आली नाही. इतके मात्र खरे की, १९४८ मध्ये हैद्राबाद संस्थान जेव्हा भारतामध्ये विलीन झाले तेव्हा तेथील भावपातळी भारतातील भाव पातळीपेक्षा बऱ्याच प्रमाणात कमी होती. विशेषतः अन्नधान्य व शेतमालाच्या वस्तू मराठवाड्यातील इतर जिल्ह्यांमध्ये बऱ्याच अंशी कमी होत्या. स्वातंत्र्योत्तर काळामध्ये कोरियन युद्धाचे जागतिक अर्थव्यवस्थेवर दूरगामी परिणाम झाले. या परिस्थितीमुळे भारतामध्ये व त्याचबरोबर नांदेड जिल्ह्यामध्ये देखील भावपातळी पुन्हा वाढू लागली. अन्नधान्याच्या किमती पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या उत्तरार्धात कमी होऊ लागल्या. परंतु १९५५-५६ मध्ये त्या पुन्हा वाढू लागल्या. भारत सरकारने वाढत्या किमती व अन्नधान्य समस्या याबाबतीत चौकशी करण्यास्तव १९५५ मध्ये अन्नधान्य व आवश्यक वस्तू अधिनियम काढले. या अधिनियमानुसार आवश्यक वस्तुंचे उत्पादन, वितरण व व्यापार या बाबींवर नियंत्रण ठेवण्यासाठी, आवश्यक ते आदेश काढण्यासाठी शासनाला अधिकार देण्यात आले. या उपाययोजनांचा परिणाम होऊन भावपातळी नियंत्रणाखाली आली.

सन १९५५ च्या अन्नधान्य विषयक वस्तू अधिनियमानुसार मिळालेल्या अधिकारांमुळे राज्य शासनाला वेळोवेळी भावपातळीवर नियंत्रण ठेवणे शक्य झाले. सदरहू अधिनियमानुसार १९६६ मध्ये राज्य शासनाने महाराष्ट्र अन्नधान्य वाटप (द्वितीय) आदेश काढला. या आदेशामुळे शिधावाटप योजनांतर्गत येणाऱ्या अन्नधन्याचे नियंत्रण करणे शक्य झाले. सन १९६६ मध्ये साखर नियंत्रण आदेश व १९७२ मध्ये महाराष्ट्र शासनाने केरोसिन नियंत्रण (कमाल किंमत निश्चिती) आदेश काढला. या आदेशान्वये निश्चित केलेल्या कमाल किमतीपेक्षा अधिक किंमत आकारण्यास मनाई करण्यात आली.

सन १९७५ मध्ये महाराष्ट्र अनुसूचित वस्तू नियंत्रण (वितरण विनिमय) आदेश काढण्यात आला. हा आदेश शिधा वाटप केंद्रे वगळता संपूर्ण राज्यभर लागू करण्यात आला. सन १९७५ मध्ये महाराष्ट्र कापड नियंत्रण (वितरणाचे विनिमयन) आदेश काढण्यात आला. या आदेशानुसार घाऊक विक्रेते तसेच किरकोळ विक्रेते यांच्यामार्फत होणाऱ्या नियंत्रित कापडाच्या विक्रीवर नियंत्रण ठेवण्यात आले. सन १९९५ पासून ज्वारीची विक्री रास्त भाव दुकानातून होऊ लागली.

सन १९७०-७१ पासून अन्नधान्याच्या भावामध्ये भरमसाठ वाढ झाली. त्यामुळे अन्नधान्याच्या किमती स्थिर ठेवण्यासाठी आणि जनतेला अन्नधान्य रास्त किमतीत उपलब्ध करून देण्यासाठी दि. १ एप्रिल १९७३ पासून गव्हाचा घाऊक व्यापार शासनाने ताब्यात घेतला. एप्रिल, १९७४ मध्ये घोषित केलेल्या अन्नविषयक धोरणानुसार गव्हाची प्रमाणित किंमत दर क्विंटलला रुपये १०५ निश्चित करण्यात आली. गव्हाच्या बाबतीत शिलकी साठा असलेल्या राज्यांमध्ये खुल्या बाजारात गव्हाची खरेदी करण्यास खाजगी व्यापाऱ्यांना परवानगी देण्यात आली. त्याचबरोबर लेव्ही गव्हाची किंमत दर क्विंटलला रुपये १०५ निश्चित करण्यात आली होती. त्याबाबत शासनाने बरीच नियंत्रणे घालून दिली होती. खुल्या बाजारातील गव्हाची किंमत दर क्विंटलला रुपये १०५ पेक्षा अधिक ठेवण्यास प्रतिबंध केला होता. तसेच १९६४ पासून जारी करण्यात आलेली "एक राज्य एक विभाग पद्धती" चालू ठेवण्यात आली. या धोरणानुसार सार्वजनिक वाटप पद्धती व त्याचबरोबर खुली व्यापार पद्धती यांचा अवलंब करण्यात आला होता. सन १९६९-७० पासूनची नांदेड जिल्ह्यातील प्रचलित असलेल्या कृषि मालाच्या किरकोळ किमतीतील बदलाची माहिती तक्ता क्रमांक ३ मध्ये दिली आहे.

**किमती निर्देशांक :** राज्यातील किमतीविषयक स्थितीचा आढावा घेण्याकरिता महाराष्ट्र शासनाचे अर्थ व सांख्यिकी संचालनालय नागरी व ग्रामीण भागातील निवडक केंद्रातून जीवनावश्यक वस्तू व सेवा यांच्या किरकोळ वस्तुसंबंधी माहिती नियमितपणे गोळा करते. या किंमतींच्या आधारे राज्याच्या नागरी आणि ग्रामीण भागाकरिता वेगवेगळे ग्राहक किंमतींचे मासिक निर्देशांक (पायाभूत वर्ष १९८२) तयार करण्यात येत होते. सदर निर्देशांकाची मालिका आता २००३ हे नवीन पायाभूत वर्ष धरून सुधारित करण्यात आली आहे. राष्ट्रीय नमुना पाहणीच्या ५९ व्या फेरीतील कुटुंबाच्या घरगुती खर्चाविषयक माहितीचा उपयोग करून नवीन मालिकेसाठी भारांकन रचना तयार करण्यात आली आहे. महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील ग्राहक किमती निर्देशांक तयार करण्याकरिता ६८ ग्रामीण केंद्रांतून व नागरी भागाकरिता ७४ नागरी केंद्रांतून गोळा केलेल्या साप्ताहिक किमतींचा वापर करण्यात आलेला आहे. सन २००५-०६ मधील एप्रिल ते डिसेंबर या कालावधीतील नागरी ग्राहक किमतींचा सरासरी निर्देशांक आधीच्या वर्षाच्या तत्सम कालावधीतील सरासरी निर्देशांकापेक्षा ३.५ टक्क्यांनी जास्त होता. मार्च, २००५ (१०४.९) च्या तुलनेत डिसेंबर, २००५ मध्ये नागरी ग्राहक किमती निर्देशांक (१०८.२) ३.१ टक्क्यांनी जास्त होता. या वाढीस प्रामुख्याने ' खाद्य पदार्थ ' या गटातील तांदूळ, गहू, बटाटे, कांदे इत्यादी वस्तुंच्या किमतीतील वाढ कारणीभूत होती.[८८]

सन २००५-०६ मधील एप्रिल ते डिसेंबर या कालावधीतील ग्रामीण ग्राहक किमतींचा सरासरी निर्देशांक आधीच्या वर्षाच्या तत्सम कालावधीतील सरासरी निर्देशांकापेक्षा ४.४ टक्क्यांनी जास्त होता. ग्रामीण ग्राहक किमतींचा निर्देशांक मार्च, २००५ (१०५.०) च्या तुलनेत डिसेंबर, २००५ (१०८.०) मध्ये २.८ टक्क्यांनी जास्त होता. ही वाढ मुख्यत्वे ' खाद्य पदार्थ ' या गटातील गहू, हरभरा डाळ, बटाटे, कांदे इत्यादींच्या किमतीत झालेल्या वाढीमुळे होती.[८९]

---

८८. **महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, अर्थ व सांख्यिकी संचालनालय,** नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, २००५-०६, पृ. ४०, ४१.

८९. कित्ता, पृ. ४१.

**उपजीविकेचा आकृतिबंध :** नांदेड जिल्ह्यातील लोकांच्या राहणीमानाच्या अभ्यासासाठी तेथील उपजीविकेच्या आकृतिबंधाचा थोडक्यात आढावा घेणे आवश्यक आहे. त्यासाठी जनगणना प्राधिकाऱ्यांनी केलेल्या वर्गीकरणानुसार जिल्ह्यातील विविध व्यवसायांत काम करणाऱ्यांचे स्थूलमानाने आर्थिक वर्गात केलेले पुढील वर्गीकरण विचारात घेण्यात आले. शेतकरी, शेतमजूर, खाणकाम व दगडकाम, पशुसंवर्धन, वन्यव्यवसाय, मत्स्यव्यवसाय, शिकार आणि रोपणी व फळबाग तसेच अन्य तत्सम कामे, घरगुती उद्योगधंदे, घरगुती उद्योगांव्यतिरिक्त इतर उत्पादक उद्योगधंदे, बांधकाम, व्यापार व वाणिज्य, परिवहन, साठवण व दळणवळण आणि नोकरी व इतर व्यवसाय या वर्गवारीनुसार १९८१, १९९१ व २००१ मध्ये विविध व्यवसायातील कामगारांचे एकूण कामगारांशी शेकडा प्रमाण तसेच कामगारांची उपजीविकेच्या साधनांनुसार वर्गवारी खाली दिली आहे :—

**विविध व्यवसायात काम करणाऱ्यांचे एकूण कामगारांशी शेकडा प्रमाण**

| अ. क्र. | व्यवसाय | १९८१ | | १९९१ | | २००१ | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | राज्य | जिल्हा | राज्य | जिल्हा | राज्य | जिल्हा |
| १ | शेतकरी | ३५.१२ | ४०.१४ | ३२.८१ | ३६.७२ | २४.७३ | २८.२५ |
| २ | शेतमजूर | २६.६३ | ३६.९३ | २६.८१ | ४१.३६ | १८.५६ | २९.११ |
| ३ | पशुसंवर्धन, जंगलकाम, मच्छिमारी, शिकार, मळे, फळभाज्या आणि अनुषंगिक व्यवसाय. | २.०१ | ३.१४ | १.५२ | १.२५ | उ.ना. | उ.ना. |
| ४ | खाणकाम व दगडकाम | ०.२७ | ०.०२ | ०.३७ | ०.०६ | उ.ना. | उ.ना. |
| ५ | घरगुती उद्योग | २.५५ | २.०९ | १.६१ | १.३४ | १.९८ | १.७ |
| ६ | इतर घरगुती उद्योग | ११.४३ | १.१४ | ११.६० | ३.९० | उ.ना. | उ.ना. |
| ७ | बांधकाम | २.१० | १.५५ | २.५९ | १.९९ | उ.ना. | उ.ना. |
| ८ | व्यापार व वाणिज्य | ७.१८ | ४.९० | ८.५७ | ५.१५ | उ.ना. | उ.ना. |
| ९ | परिवहन, साठवण व दळणवळण. | ३.३० | १.२३ | ३.७४ | १.५२ | उ.ना. | उ.ना. |
| १० | इतर सेवा | ९.४१ | ५.८८ | १०.३८ | ९.९० | ३९.१४ | २१.२३ |

उ.ना. = उपलब्ध नाही.

**कामगारांची उपजीविकेच्या साधनांनुसार वर्गवारी[९०]**

| क्र. | व्यवसाय | १९८१ | १९९१ | २००१ |
|---|---|---|---|---|
| १ | शेतकरी | २,८५,०२९ | ३,४०,७०९ | ३,३९,६०६ |
| २ | शेतमजूर | २,६२,२४५ | ३,८३,२०५ | ३,४९,८७६ |
| ३ | पशुसंवर्धन, जंगलकाम, मच्छिमारी, शिकार, मळे, फळभाज्या आणि अनुषंगिक व्यवसाय. | २२,२९९ | ११,५७१ | उ.ना. |
| ४ | खाणकाम व दगड काम | १३१ | ५९६ | उ.ना. |
| ५ | घरगुती उद्योग | १४,८२२ | १२,४०९ | २०,४६१ |
| ६ | इतर घरगुती उद्योग | २९,३९२ | ३६,१४३ | उ.ना. |
| ७ | बांधकाम | १०,९८५ | १८,४०५ | उ.ना. |
| ८ | व्यापार व वाणिज्य | ३४,७६४ | ४७,७२२ | उ.ना. |
| ९ | परिवहन, साठवण व दळणवळण | ८,७१६ | १४,१२३ | उ.ना. |
| १० | इतर सेवा | ४१,७९१ | ६१,७०० | २,५५,१४४ |
| | एकूण . . | ७,१०,१७४ | ९,२६,५८३ | ९,६५,०८७ |

जिल्ह्यातील १९८१ व १९९१ मधील पुरुष व महिला कामगारांचा विविध व्यवसायातील तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | व्यवसाय | १९८१ | | १९९१ | |
|---|---|---|---|---|---|
| | | पुरुष | महिला | पुरुष | महिला |
| १ | शेतकरी | २,१२,९७९ | ७२,०५० | २,२६,१६१ | १,१४,५४८ |
| २ | शेतमजूर | १,२९,१५७ | १,३३,०८८ | १,८१,८६७ | २,०१,३३८ |
| ३ | पशुसंवर्धन, जंगलकाम, मच्छिमारी, शिकार, मळे, फळभाज्या आणि अनुषंगिक व्यवसाय. | २१,३३२ | ९६७ | १०,८७४ | ६९७ |
| ४ | खाणकाम व दगडकाम | १०९ | २२ | ४६० | १३६ |
| ५ | घरगुती उद्योग | १०,९६७ | ३,८५५ | ८,४२४ | ३,९८५ |
| ६ | इतर घरगुती उद्योग | २६,२९७ | ३,०९५ | ३१,४४७ | ४,६९६ |
| ७ | बांधकाम | ८,५९७ | २,३८८ | ११,१७६ | १,२२९ |
| ८ | व्यापार व वाणिज्य | ३२,९८९ | १,७७५ | ४५,८३३ | १,८८९ |
| ९ | परिवहन, साठवण व दळणवळण | ८,६३२ | ८४ | १३,९२८ | १९५ |
| १० | इतर सेवा | ३६,७८० | ५,०११ | ५१,४७५ | १०,२२५ |
| | एकूण . . | ४,८७,८३९ | २,२२,३३५ | ५,८७,६४५ | ३,३८,९३८ |

९०. (अ) **भारताची जनगणना, १९८१,** मालिका १२, भाग तीन, ए व बी (एक), (ब) **भारताची जनगणना, १९९१**, मालिका १४, महाराष्ट्र, भाग दोन, बी (एक), (क) **भारताची जनगणना, २००१**, मालिका २८, खंड १.

राज्य व जिल्ह्यातील सन २००१ मधील विविध व्यवसायामधील मुख्य काम करणारे, अल्पकालीन काम करणारे व त्यांचे एकूण कामगारांशी शेकडा प्रमाण याचा तपशील खाली दिला आहे.

| अ. क्र. | बाब | राज्य | जिल्हा | शेकडा प्रमाण | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | राज्य | जिल्हा |
| | मुख्य काम करणारे | ३,४७,४८,०५३ | ९,६५,०८७ | ८४.३९ | ८०.२९ |
| १ | शेतकरी | १,०१,८१,७०८ | ३,३९,६०६ | २४.७३ | २८.२५ |
| २ | शेतमजूर | ७६,४१,२१९ | ३,४९,८७६ | १८.५३ | २९.११ |
| ३ | घरगुती उद्योग | ८,१०,०८६ | २०,४६१ | १.९७ | १.७० |
| ४ | इतर | १,६१,१५,०४० | २,५५,१४४ | ३९.१४ | २१.२३ |
| | अल्पकालीन काम करणारे | ६४,२५,२९८ | २,३६,९५० | १५.६१ | १९.७१ |
| १ | शेतकरी | १६,३१,५६७ | ४६,९५७ | ३.९६ | ३.९१ |
| २ | शेतमजूर | ३१,७४,०४३ | १,५१,५०४ | ७.७१ | १२.६० |
| ३ | घरगुती उद्योग | २,७९,२३२ | ८,४९० | ०.६८ | ०.७१ |
| ४ | इतर | १३,४०,४५६ | २९,९९९ | ३.२६ | २.५० |
| | एकूण | ४,११,७३,३५१ | १२,०२,०३७ | १०० | १०० |

वरील आकडेवारीवरून असे दिसून येते की, शेतकरी व शेतमजुरांचे प्रमाण राज्याच्या सरासरीपेक्षा जास्त होते. तसेच अल्पकालीन काम कारणाऱ्यांचे प्रमाणसुद्धा राज्याच्या सरासरीपेक्षा जास्त होते. यावरून अनुमान निघते की, जिल्ह्यात उद्योगधंद्यांचा पाहिजे तसा विकास झाला नाही.

जिल्ह्यातील २००१ च्या जनगणनेनुसार एकूण कामगार, पुरुष व महिला कामगार व त्यांचे एकूण लोकसंख्येशी शेकडा प्रमाण खालील विवरणात दिले आहे.[९१]

| राज्य/जिल्हा/ तालुका | एकूण कामगार | पुरुष | महिला | शेकडा प्रमाण | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | एकूण कामगार | पुरुष | महिला |
| राज्य | ४,११,७३,३५१ | २,६८,५२,०९५ | १,४३,२१,२५६ | ४२.५० | २७.७२ | १४.७८ |
| जिल्हा | १२,०२,०३७ | ७,२१,९२२ | ४,८०,११५ | ४१.४९ | २५.१० | १६.६९ |
| **तालुके** | | | | | | |
| माहूर | ४३,२३२ | २३,८४५ | १९,३८७ | १.५० | ०.८३ | ०.६७ |
| किनवट | ९७,२९२ | ५४,४८७ | ४२,८०५ | ३.३८ | १.८९ | १.४९ |

९१. **जनगणना निर्देशग्रंथ २००१,** मालिका २८, भाग एक.

| राज्य/जिल्हा/ तालुका | एकूण कामगार | पुरुष | महिला | शेकडा प्रमाण | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | एकूण कामगार | पुरुष | महिला |
| हिमायतनगर | ४३,४५९ | २३,९८८ | १९,४७१ | १.५१ | ०.८३ | ०.६८ |
| हदगाव | १,०४,९९४ | ६०,०११ | ४४,९८३ | ३.६५ | २.०९ | १.५६ |
| अर्धापूर | ४२,१४३ | २५,६९६ | १६,७७४ | १.४७ | ०.८९ | ०.५८ |
| नांदेड | १,७६,४७४ | १,३७,६२० | ३८,८५४ | ६.१३ | ४.७८ | १.३५ |
| मुदखेड | ४२,५२९ | २५,३४२ | १७,१८७ | १.४८ | ०.८८ | ०.६० |
| भोकर | ५४,८८३ | ३०,५८५ | २४,२९८ | १.९० | १.०६ | ०.८४ |
| उमरी | ४०,९०४ | २२,४१३ | १८,४९१ | १.४२ | ०.७८ | ०.६४ |
| धर्माबाद | ३८,६६१ | २२,४८३ | १६,१७८ | १.३४ | ०.७८ | ०.५६ |
| बिलोली | ७२,२९३ | ३९,७६४ | ३२,५२९ | २.५१ | १.३८ | १.१३ |
| नायगाव | ७४,०२३ | ४०,८०७ | ३३,२१६ | २.५७ | १.४२ | १.१५ |
| लोहा | ८७,४१८ | ५१,३४९ | ३६,०६९ | ३.०४ | १.७९ | १.२५ |
| कंधार | ९३,००० | ५३,०२८ | ३९,९७२ | ३.२३ | १.८४ | १.३९ |
| मुखेड | १,०६,४४६ | ६०,२०७ | ४६,२३९ | ३.७० | २.०९ | १.६१ |
| देगलूर | ८४,२८६ | ५०,२९७ | ३३,९८९ | २.९३ | १.७५ | १.१८ |

वरील विवरणावरून असे दिसून येते की, जिल्ह्यातील एकूण कामगारांची संख्या राज्य सरासरीपेक्षा कमी आहे. परंतु महिला कामगारांचे शेकडा प्रमाण राज्य सरासरीपेक्षा जास्त आहे. तालुक्यांचा विचार केल्यास नांदेड तालुक्यात एकूण कामगारांची संख्या जास्त दिसून येते. याचे कारण खेड्यातील लोक मजुरीसाठी जिल्ह्याच्या ठिकाणी स्थलांतरित झाले असावेत.

सन १९८१, १९९१ व २००१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यातील मुख्य कामगार, सिमांतिक कामगार, काम न करणारे यांची ग्रामीण व नागरी लोकसंख्या तसेच त्यांचे एकूण ग्रामीण व नागरी लोकसंख्येशी शेकडा प्रमाण खाली दिले आहे.[९२]

| वर्ष | मुख्य काम करणारे | सिमांतिक कामगार | काम न करणारे |
|---|---|---|---|
| **१९८१** | | | |
| एकूण | ७,१०,१७४ (४०.६०) | १,५३,३६८ (८.७७) | ८,८५,७९२ (५०.६४) |
| ग्रामीण | ६,२०,५६७ (४३.६६) | १,४८,३२६ (१०.४३) | ६,५२,५९२ (४५.१०) |

९२. १. **भारतीय जनगणना निर्देशग्रंथ,** १९८१, मालिका १२, भाग तीन, ए व बी.

२. **भारतीय जनगणना निर्देशग्रंथ,** १९९१ मालिका १४, भाग दोन

३. **भारतीय जनगणना निर्देशग्रंथ,** २००१, मालिका, २८ भाग एक

४. कंसातील संख्या एकूण ग्रामीण व नागरी लोकसंख्येशी शेकडा प्रमाणाची आहे.

| वर्ष | मुख्य काम करणारे | सिमांतिक कामगार | काम न करणारे |
|---|---|---|---|
| **१९८१**—पुढे चालू | | | |
| नागरी | ८९,६०७<br>(२७.३३) | ५,०४२<br>(१.५४) | २,३३,२००<br>(७१.१३) |
| **१९९१** | | | |
| एकूण | ९,२६,५८३<br>(३९.७६) | १,१५,८७८<br>(४.९७) | १२,८७,९१३<br>(५५.२७) |
| ग्रामीण | ७,९०,१७७<br>(४३.३२) | १,०९,१०८<br>(५.९८) | ९,२४,९४९<br>(५०.७०) |
| नागरी | १,३६,४०६<br>(२६.९५) | ६,७७०<br>(१.३४) | ३,६२,९६४<br>(७१.७१) |
| **२००१** | | | |
| एकूण | ९,६५,०८७<br>(३३.५५) | २,३६,९५०<br>(८.२४) | १६,७४,२२२<br>(५८.२१) |
| ग्रामीण | ७,९५,३७५<br>(३६.३७) | २,१५,१२०<br>(९.८४) | ११,७६,७००<br>(५३.८०) |
| नागरी | १,६९,७१२<br>(२४.६३) | २१,८३०<br>(३.१७) | ४,९७,५२२<br>(७२.२०) |

## राहणीमान

आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक घटकांबरोबरच राहणीमानावर कुटुंबांना उपलब्ध असलेला निवारा व त्याची बांधणी या घटकांचा फार मोठा प्रभाव पडतो. म्हणून राहणीमानाचा विचार करताना कुटुंबाच्या निवाऱ्याचा विचार करणे आवश्यक आहे. नांदेड जिल्ह्यातील घरबांधणी पारंपरिक पद्धतीची आहे. जिल्ह्यात धाब्याची, शहाबादी फरशीची छप्पर असलेली घरे आहेत. ही घरे कच्च्या, पक्क्या विटा, चुना व मातीने बांधलेली आहेत. घरांच्या खिडक्या व दरवाज्यांसाठी सागाचे अथवा कडूनिंबाचे लाकूड वापरतात, क्वचित प्रसंगी यासाठी आंब्याचे लाकूडही वापरतात. शहरातील घरबांधणी आधुनिक पद्धतीची, तर ग्रामीण भागात आधुनिक व पारंपरिक पद्धतीची असते. सन २००१ च्या जनगणनेनुसार नागरी व ग्रामीण भागातील घरांच्या भिंती व छपरांच्या बांधणीसाठी वापरलेल्या साधन सामग्रीवर आधारित घरांची संख्या तक्ता क्रमांक ४ मध्ये दिली आहे.

निवासी घरातील खोल्यांच्या संख्येवरून लोकांच्या राहणीमानाची कल्पना करता येते. खोल्यांच्या संख्येशी परिवाराच्या आकाराची सांगड घालून अभ्यास केल्यास राहणीमानावर स्पष्ट प्रकाश पडतो. तक्ता ५ मध्ये जिल्ह्यातील खोल्यांच्या संख्येनुसार वर्गीकरण दिलेले आहे. सन २००१ च्या

जनगणनेनुसार धारणाधिकार खोल्यांच्या संख्येनुसार कुटुंबांची संख्या तक्ता क्र. ६ मध्ये दिली आहे. जिल्ह्यातील वीज, शौचालये व पाणीपुरवठ्याच्या सोयीनुसार नागरी व ग्रामीण भागातील घरांची संख्या खाली दिली आहे.

| | एकूण घरे | | शौचालय असलेली | | विजेची सुविधा असलेली | | पाणीपुरवठ्याची सोय असलेली | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | नागरी | ग्रामीण | नागरी | ग्रामीण | नागरी | ग्रामीण | नागरी | ग्रामीण |
| | १,५१,२३४ | ४,९१,४६५ | ७४,६८० | ५२,८७२ | १,००,५२१ | २,२०,२५८ | १,१२,९९४ | ४,१०,५४५ |
| एकूण | ६,४२,६९९ | | १,२७,५५२ | | ३,२०,७७९ | | ५,२३,५३९ | |
| एकूण घरांशी प्रमाण | | | १९.८५ | | ४९.९१ | | ८१.४६ | |

**वेतन पातळी :** शेतमजुरांचे रोजगारांच्या दृष्टिने नैमित्तिक आणि संलग्न असे दोन गटात वर्गीकरण केले जाते. संलग्न शेतमजूर अथवा कामगार हे कोणत्यातरी जमीनदाराशी संलग्न असतात आणि अशा शेतमजुरांना जमीनदारांकडून काही काळ सातत्याने काम मिळते. नैमित्तिक शेतमजुरांना मिळणारे काम अल्पकाळ असते व त्यांना रोजगाराची शाश्वती नसते.

निजामी राजवटीत जिल्ह्यातील वेतनपातळी अतिशय कमी होती. शेतमजूर व घरगुती नोकरांना वार्षिक ३० ते ६५ रुपये वेतन मिळत असे. त्याशिवाय वर्षाला एक कांबळे, चप्पल जोडी व दररोज एक वेळचे जेवण मिळत असे. जिल्ह्याच्या ग्रामीण भागात मजुरी वस्तू रूपात मिळत असे. शेतमजुराला रोजची, आठवड्याची, महिन्याची मजुरी पैशाच्या किंवा वस्तुच्या स्वरुपात मिळत असे. काही ठिकाणी वार्षिक मजुरी मिळत असे. कृषि मालाच्या उत्पादनावर मजुरी कमी-जास्त प्रमाणात मिळत असे.[९३]

जिल्ह्यातील वेतनपातळी ही बदलत्या किमती निर्देशांकानुसार बदलत असते. पहिल्या महायुद्धाच्या काळात व त्यानंतरच्या वर्षामध्ये वाढत्या महागाईनुसार वेतन पातळी उंचावलेली होती. परंतु १९३० च्या आर्थिक पुनर्प्रस्थापनेच्या काळात वेतन पातळीमध्ये थोड्या प्रमाणात का होईना, वाढ झाली. सन १९३९ च्या दुसऱ्या महायुध्द काळापासून स्वातंत्र्य प्राप्तीपर्यंत भाव पातळीमधील वाढता क्रम कायम होता. परंतु श्रमिकांची मजबूत अशी संघटना नसल्यामुळे वेतन पातळीमधील वाढ ही भाव पातळीमधील वाढीपेक्षा फार कमी प्रमाणात होती.

नांदेड जिल्ह्याचा महाराष्ट्रात समावेश करण्यात आल्यानंतर शेतमजुरांची स्थिती सुधारण्यासाठी योजण्यात आलेला महत्त्वाचा उपाय म्हणजे १९४८ च्या किमान वेतन कायद्याच्या कक्षेत १९७४ साली शेतमजुरांचा केलेला समावेश होय. स्थूलमानाने शेतमजुरांचे पुढीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात येते. शेतात काम करणारे शेतमजूर, सर्वसामान्य मजूर व कुशल काम करणारे कामगार. शेतमजुरांच्या वेतन पातळीवरून शेतमजुरांची जिल्ह्यातील आर्थिक स्थिती स्पष्ट होते.

महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमधील शेतमजुरांची वेतनपातळी सुधारून त्यांना किमान वेतन मिळावे या हेतुने शासनाने नियुक्त केलेल्या पागे समितीने १९७३ मध्ये राज्यातील शेतमजुरांच्या रोजगार स्थिती

९३. **नांदेड डिस्ट्रीक्ट गॅझेटिअर,** १९७१, पृ. ४०९.

Maharashtra State Gazetteers

संबंधीचा अहवाल सादर केला. या समितीने शेतमजुरांची वेतन निश्चिती करण्यासाठी संपूर्ण राज्याची तीन परिमंडळात विभागणी केली. पारदासानी व सुखटनकर समितीने निश्चित केलेल्या दीर्घकाळ टंचाईग्रस्त क्षेत्राच्या बाहेरील परंतु परिमंडळ एक मध्ये समाविष्ट क्षेत्राव्यतिरिक्त क्षेत्राचा अंतर्भाव परिमंडळ क्रमांक दोन मध्ये केला. शेतमजूर हा असंघटित कामगार असून त्याला संरक्षण देणे आवश्यक आहे या हेतुने १९७४ मध्ये शेतमजुरांना १९४८ चा किमान वेतन अधिनियम लागू करण्यात आला. तसेच सालदार, महिनेदार व रोजंदारीवरील शेतमजुरांनाही किमान वेतन ठरवून देण्यात आले. गेल्या काही वर्षांत वाढलेल्या महागाईमुळे शासनाने दिनांक १ नोव्हेंबर १९७८ मध्ये किमान वेतन दर वाढवून दिले होते. त्यामध्ये अकुशल कामगार व सालदार (वार्षिक दर) रुपये २,०००, अकुशल महिनेदार (मासिक दर) १६५ रुपये व अन्य कुशल शेतमजूर (दैनिक दर) ५ रुपये असा होता. मार्च २००१ पासून महाराष्ट्र शासनाने वेतनाचे दर वाढविले आहेत. दुष्काळी भागात जानेवारी २००१ मध्ये किमान मजुरी ३५ रुपये होती. यात वाढ करून मार्च २००१ पासून ती ४५ रुपये करण्यात आली. महापालिका क्षेत्र व पाटबंधारे प्रकल्पात येणारे सिंचन क्षेत्र व या दोन प्रकारात समाविष्ट न होणाऱ्या क्षेत्रातील किमान वेतनात सरसकटपणे वाढ करण्यात आली असून तेथील मजुरीचे दर अनुक्रमे ५१, ४१ व ४७ रुपये करण्यात आले आहेत. तक्ता क्रमांक ७ मध्ये जिल्ह्यातील कुशल व अकुशल मजुरांचे दैनिक मजुरीचे दर दिले आहेत.

फेब्रुवारी २००६ पासून राज्य शासनाने राज्यातील रोजगार हमी योजनेत मागेल त्याला वर्षातील ३६५ दिवस रोजगार उपलब्ध करून देण्याची योजना सुरू केली. तसेच केंद्रिय योजनेप्रमाणे राज्यातील मजुरांनाही ४५ रुपये ऐवजी ६५ रुपये मजुरी देण्याची व काम नसेल तेव्हा १५ रुपये बेकार भत्ता देण्याची योजना सुरू केली आहे.

## मानव विकास निर्देशांक[९४]

जिल्ह्यातील निरनिराळ्या आर्थिक व रोजगार विषयक प्रकल्पांचा वा योजनांचा जिल्ह्यातील सामान्य जनतेच्या राहणीमानावर कसा परिणाम झाला हे अभ्यासणे महत्त्वाचे आहे. आर्थिक विकासाची संकल्पना आता खूप विस्तृत झाली असून अलिकडेच यू.एन.डी.पी. (United Nations Development Programme) या संस्थेने (१) मानव विकास निर्देशांक व (२) मानव दारिद्र्य निर्देशांक या संकल्पना विकसित केल्या आहेत.

अर्थशास्त्रात एखादा प्रदेश अथवा देशातील सामान्य जनतेचे राहणीमान मोजण्यासाठी त्या प्रदेशातील दरडोई उत्पन्न हा एक प्रमुख निर्देशक समजला जातो. परंतु १०/१५ वर्षात एखाद्या देशातील जनतेचे सर्वांगीण जीवनमान मोजण्यासाठी मानव विकास निर्देशांकाचा उपयोग केला जातो. मानव विकास निर्देशांक ही संकल्पना विकसित करण्याचे श्रेय पाकिस्तानचे अर्थतज्ञ डॉ. मेहबूब उल हक व भारतीय अर्थशास्त्राचे नोबेल पारितोषिक विजेते प्रा. अमर्त्य सेन यांना दिले जाते. सन १९९० मध्ये संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमातर्फे (यू.एन.डी.पी.) पहिला मानव विकास अहवाल प्रसिद्ध करण्यात आला. ही संस्था जगातील साधारण १७३ देशांचे मानव विकास निर्देशांक प्रसिद्ध करीत असते.

९४. **मानव विकास अहवाल-महाराष्ट्र,** २००२, महाराष्ट्र शासन, यावर आधारित.

यू.एन.डी.पी. च्या सन १९९७ च्या अहवालात मानव विकासाची संकल्पना पुढीलप्रमाणे मांडली आहे. "मानवी विकास म्हणजे जनतेच्या कल्याणाचा उच्च स्तर साध्य करून, त्यांच्या निवडीच्या प्रक्रिया विस्तारित करणे होय. हाच मानवी विकास संकल्पनेचा गाभा होय. त्यापैकी जनतेला अत्यावश्यक असणाऱ्या निवडी म्हणजे दीर्घ व निरोगी जीवन, ज्ञानाची उपलब्धता व उत्तम जीवन जगण्यासाठी हवे असणारे उत्पन्न होय."

मानवी विकासाची संकल्पना येथेच संपत नाही, कारण इतर गरजा व निवडीसुद्धा जनतेच्या दृष्टिने महत्त्वपूर्ण आहेत. त्यात राजकीय, आर्थिक व सामाजिक स्वातंत्र्याची संकल्पनाही समाविष्ट आहे. त्याशिवाय व्यक्तिला नवनिर्माण व उत्पादक होणाऱ्या संधीही उपलब्ध असाव्यात व त्याला स्वाभिमानाने जगता येऊन त्याच्या मानवी हक्कांची हमी त्यास मिळावयास हवी.

वरील व्याख्येवरून दरडोई उत्पन्नापेक्षा मानव विकास निर्देशांकाची संकल्पना अधिक उपयुक्त, श्रेष्ठ व विस्तृत असल्याचे स्पष्ट होते. कारण त्यात दरडोई उत्पन्नाचा समावेश तर आहेच, याशिवाय शैक्षणिक, आरोग्य विषयक स्थितीचा समावेश आहे.

केंद्रिय नियोजन मंडळाने भारतातील सर्व राज्यांचे मानव विकास निर्देशांक प्रसिध्द केले आहेत. महाराष्ट्र शासनानेसुद्धा यू.एन.डी.पी. व केंद्रिय नियोजन मंडळाच्या सहकार्याने महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांचे मानव विकास निर्देशांक प्रसिध्द केले आहेत. प्रत्येक जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक काढताना पुढील बाबींचा समावेश करण्यात आला.

१. जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न (१९९८-९९), स्थिर किमती १९९३-९४
२. जिल्ह्याचा साक्षरता दर (२/३ भार देऊन),
३. विद्यार्थ्यांची शाळेत जाण्याची सरासरी वर्षे (१/३ भार देऊन)
४. जिल्ह्याचा दर हजारी अर्भक मृत्यू दर (सरासरी आयुर्मानाऐवजी)

वरील निकष वापरून नांदेड जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक ०.३७ येतो, तर राज्याचा मानव विकास निर्देशांक ०.५८ आहे. याचा अर्थ नांदेड जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक राज्य सरासरीच्या बराच खाली आहे. एकूण ३५ जिल्ह्यात नांदेड जिल्ह्याचा क्रम २९ वा आहे. तसेच नांदेड जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न सन १९९८-९९ मध्ये १३,०६८ रुपये होते, तर त्याच वर्षी राज्याचे दरडोई ऊत्पन्न २२,७६३ रुपये होते. दोनही निकषांवर नांदेड जिल्हा राज्य सरासरीच्या बराच खाली असल्याचे दिसते.[९५] जिल्ह्याचा आर्थिक विकास म्हणजेच मानव विकास निर्देशांकात वाढ करण्याचे धोरण होय.

सन १९९३-९४ च्या गरिबीच्या जिल्हानिहाय आढाव्यानुसार नांदेड जिल्ह्यात शहरी व ग्रामीण भागात गरिबीचे प्रमाण अनुक्रमे ५७.०३ व ३४.१६ टक्के होते, तर राज्याचे हेच प्रमाण अनुक्रमे ३१.२४ व २६.६० टक्के होते. जिल्ह्यात ग्रामीण भागापेक्षा शहरी भागात गरिबीचे प्रमाण जास्त दिसून येते. राज्य सरासरीपेक्षा जिल्ह्यात गरिबीचे प्रमाण जास्त आहे. याचवर्षी जिल्ह्यात दरमहा दरडोई सरासरी उत्पन्न उपभोगाची पातळी शहरी भागात रुपये ३५९.६७, तर ग्रामीण भागात रुपये २८७.२५ होती. राज्यात हेच प्रमाण अनुक्रमे रुपये ५३७.१९ व रुपये ३०२.९० होते.[९६] सन १९९६-९७ मध्ये जिल्ह्यात दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांची संख्या १,१०,७४१ होती. जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येच्या २६.३० टक्के लोक दारिद्र्य रेषेखाली होते. राज्याचे हे प्रमाण ३४.५५ टक्के होते.[९७] सन १९८१ व १९९१

९५. **मानव विकास अहवाल-महाराष्ट्र,** २००२, महाराष्ट्र शासन, पृ. ११७.

९६. कित्ता, पृ. ४५.

९७. कित्ता, पृ. १६५.

मध्ये जिल्ह्याचा साक्षरतेमध्ये राज्यात अनुक्रमे १९ वा व १४ वा क्रम होता.[९८] संगीता कामदार व अशोक बसाक या संशोधकांनी महाराष्ट्रातील जिल्ह्यांचे मानव दारिद्र्य निर्देशांक प्रसिद्ध केले आहेत. महाराष्ट्र राज्याचा मानव दारिद्र्य निर्देशांक १६.२२ असून, मुंबईचा सर्वात कमी (६.४८), तर राज्यात सर्वात तळाशी नांदेड जिल्ह्याचा (३३.३९) मानव दारिद्र्य निर्देशांक आहे, असे सिद्ध केले आहे.[९९]

**दरडोई उत्पन्न :**—राज्य उत्पन्नाचे अंदाज तयार करण्याकरिता वापरण्यात येणाऱ्या पद्धतीप्रमाणे "उत्पन्न स्रोत पद्धती" या संकल्पनेचा अवलंब करून जिल्हास्तरावरील उत्पन्नाचे अंदाज तयार करण्यात आले आहेत. जिल्हास्तरावरील उत्पन्नाचे अचूक अंदाज तयार करण्यासाठी "प्रदेशात संचयित होणारे उत्पन्न" ही संकल्पना वापरणे अधिक चांगले असले तरी जिल्हास्तरावरील आर्थिक उलाढालीचा परिणाम जिल्ह्यापुरताच मर्यादित राहत नसल्याने तसेच संबंधित जिल्ह्याला बाहेरून प्राप्त होणाऱ्या व संबंधित जिल्ह्यातून बाहेर जाणाऱ्या उत्पन्नाचे मोजमाप पूर्णतः करणे शक्य नसल्याने सदर पद्धतीचा वापर करता येत नाही. त्यामुळे राज्य उत्पन्न अंदाजातील सर्व अंगभूत मर्यादा जिल्हा उत्पन्न अंदाजाबाबतही लागू पडतात. जिल्हा उत्पन्नाचे अंदाज तयार करण्याकरिता लागणारी जिल्हावार मूलभूत माहिती अजूनही समाधानकारकरित्या उपलब्ध नाही. वस्तू निर्माण क्षेत्राकरिता बहुतांश आकडेवारी उपलब्ध आहे. मात्र इतर क्षेत्राकरिता आकडेवारी अतिशय अल्प प्रमाणात उपलब्ध आहे. त्यामुळे त्या क्षेत्राकरिता जिल्हास्तरावरील उत्पन्नाचे अंदाज राज्य उत्पन्न अंदाज तयार करण्याची कार्यपद्धती अवलंबून तयार केले आहेत अशी माहिती ज्या क्षेत्राकरिता उपलब्ध नाही, त्या क्षेत्राकरिता जिल्हावार अनुरुप असे निर्देशांक वापरून त्या आधारे राज्य स्तरावरील उत्पन्नाची जिल्ह्यामध्ये विभागणी करण्यात आली आहे. आकडेवारीच्या उपलब्धतेचा अभाव, अनुरूप निर्देशांकाचा वापर, तसेच पद्धतीमधील अंगभूत उणिवा या सर्वांमुळे जिल्हा उत्पन्नाचे अचूक अंदाज बांधण्यामध्ये मर्यादा येत असल्याने हे अंदाज ढोबळमानाने जिल्ह्यातील उत्पन्नाची पातळी अजमावण्याकरिता वापरतात.[१००] जिल्ह्यातील निव्वळ जिल्हा उत्पन्न व दरडोई उत्पन्न खाली दिले आहे.[१०१]

| वर्ष | निव्वळ जिल्हा उत्पन्न | | | दरडोई उत्पन्न | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | स्थिर किमती नुसार | चालू किमती नुसार | शेकडा बदल | स्थिर किमतीनुसार | चालू किमती नुसार | शेकडा बदल |
| १९९९-२००० | २,२९,८७६ | ३,५७,१०५ | १.१९ | ८,२२५ | १२,७७७ | ०.६७ |
| २०००-२००१ | २,२४,२४८ | ३,६१,३४२ | | ७,८७६ | १२,६९१ | |
| २००१-२००२ | २,३३,७७२ | ३,९६,३६० | ११.२१ | ८,०६४ | १३,४८८ | ९.२७ |
| २००२-२००३ | २,६०,१५३ | ४,४७,९४३ | ९.४० | ८,८३४ | १५,२१२ | ७.८३ |
| २००३-२००४ | २,७५,४४६ | ४,९०,०५२ | | ९,२२० | १६,४०३ | |
| २००४-२००५ | २,८८,५६७ | ५,२९,८१३ | ४.९ | ९,५२७ | १७,४९१ | ३.४ |

९८. **मानव विकास अहवाल-महाराष्ट्र,** पूर्वोक्त, पृ. १२१.

९९. संगीता कामदार ॲण्ड अशोक बसाक, बियाँड द ह्यूमन डेव्हलपमेंट इंडेक्स **इकॉनॉमिक अँड पोलिटिकल विकली**, ऑगस्ट २०, २००५.

१००. **महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, २००५-२००६,** अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, पृ. २४-२५.

१०१. **महाराष्ट्राची आर्थिक पाहणी अहवाल,** संबंधित वर्षांचे.

**तक्ता**

**जिल्ह्यातील तालुकानिहाय**

| अ. क्र. | पूर्ण झालेले प्रकल्प | कंधार | | लोहा | | नांदेड | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | सिंचन क्षमता हेक्टर | संख्या | सिंचन क्षमता हेक्टर | संख्या | सिंचन क्षमता हेक्टर |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| १ | मोठे प्रकल्प | १ | १,८५५ | ० | ० | ० | ९,१२१ |
| २ | मध्यम प्रकल्प | २ | २,८५४ | ० | ० | ० | ० |
| | एकूण (मोठे+मध्यम) | ३ | ४,७०९ | ० | ० | ० | ९,१२१ |
| ३ | लघु पाटबंधारे योजना | | | | | | |
| | अ) राज्यस्तर २५०हे. पेक्षा जास्त. | २ | ५६१ | ५ | २,५७३ | ० | ० |
| | ब) स्थानिक स्तर १०१ ते २५० हे. | २ | ३६६ | २ | ३७० | ० | ० |
| | क) ० ते १०० हे. | ४१ | १,८२१ | २३ | १,१३९ | १ | ६५ |
| | एकूण ल.पा. | ४५ | २,७४८ | ३० | ४,०८२ | १ | ६५ |
| ४ | को. प. बंधारे | | | | | | |
| | अ) राज्यस्तर २५० हे. पेक्षा जास्त. | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | ब) स्थानिक स्तर १०१ ते २५० हे. | १ | ११० | १ | १६९ | १ | २३९ |
| | क) ० ते १०० हे. | १० | ३०५ | ५ | १८१ | ५ | ३१६ |
| | एकूण को. प. बंधारे | ११ | ४१५ | ६ | ३५० | ६ | ५५५ |
| ५ | एकूण उपसा सिंचन योजना | | | | | | |
| | अ) राज्यस्तर २५०हे. पेक्षा जास्त. | १ | ३६० | ० | ० | १ | १,४५२ |
| | ब) स्थानिक स्तर १०१ ते २५० हे. | २ | २६२ | १ | ११२ | ० | ० |
| | क) ० ते १०० हे. | २ | १५६ | ० | ० | ० | ० |
| | एकूण उपसा सिंचन योजना | ५ | ७७८ | १ | ११२ | १ | १,४५२ |
| | सर्व एकूण | | ८,६५० | ३७ | ४,५४४ | ८ | ११,२१३ |

Maharashtra State Gazetteers

**क्रमांक १**

**पूर्ण झालेले प्रकल्प**

| मुखेड | | देगलूर | | हदगाव | | भोकर | | बिलोली | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| संख्या | सिंचन क्षमता हेक्टर | संख्या | सिंचन क्षमता हेक्टर | संख्या | सिंचन क्षमता हेक्टर | संख्या | सिंचन क्षमता हेक्टर | संख्या | सिंचन क्षमता हेक्टर |
| (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) | (१५) | (१६) | (१७) | (१८) |
| ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २२,६२० |
| १ | १,५६८ | १ | २,६६५ | ० | ० | १ | ५६७ | ० | ० |
| १ | १,५६८ | १ | २,६६५ | ० | ० | १ | ५६७ | ० | २२,६२० |
| | | | | | | | | | |
| ४ | १,४९३ | ३ | १,२३५ | १२ | ६,३४० | ६ | २,७९७ | ० | ० |
| ३ | ६१३ | २ | ४०६ | ३ | ५८५ | ३ | ४८८ | १ | २३८ |
| ५९ | २,९६२ | २८ | ९०५ | २७ | १,१४६ | २६ | १,०८६ | २० | ८४३ |
| ६६ | ५,०६८ | ३३ | २,५४६ | ४२ | ८,०७१ | ३५ | ४,३७२ | २१ | १,०८१ |
| | | | | | | | | | |
| ० | ० | ० | ० | ० | ० | १ | २५९ | ० | ० |
| २ | ३६४ | २ | ३४० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| १९ | ८२६ | ७ | ३६३ | २ | १४२ | ९ | २८५ | १० | ३२१ |
| २१ | १,१९० | ९ | ७०३ | २ | १४२ | १० | ५४४ | १० | ३२१ |
| | | | | | | | | | |
| ० | ० | २ | १,२९६ | २ | १,१०४ | ० | ० | ३ | १,१२६ |
| १ | १२० | १ | २३४ | २ | २२३ | ३ | ४५४ | २ | ३४४ |
| १ | ८४ | १ | ९४ | ० | ० | १ | ८६ | ० | ० |
| २ | २०४ | ४ | १,६२४ | ४ | १,३२७ | ४ | ५४० | ५ | १,४७० |
| ९० | ८,०३० | ४७ | ७,५०८ | ४८ | ९,५४० | ५० | ६,०२२ | ३६ | २५,४९२ |

Maharashtra State Gazetteers

**तक्ता क्रमांक १**

**जिल्ह्यातील तालुकानिहाय**

| अ. क्र. | पूर्ण झालेले प्रकल्प | किनवट | | अर्धापूर | | मुदखेड | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | सिंचन क्षमता हेक्टर | संख्या | सिंचन क्षमता हेक्टर | संख्या | सिंचन क्षमता हेक्टर |
| (१) | | (१९) | (२०) | (२१) | (२२) | (२३) | (२४) |
| १ | मोठे प्रकल्प | ० | ० | ० | १०,०६७ | ० | ० |
| २ | मध्यम प्रकल्प | ३ | ४,३०० | ० | ० | ० | ० |
| | एकूण (मोठे+मध्यम) | ३ | ४,३०० | ० | १०,०६७ | ० | ० |
| ३ | लघु पाटबंधारे योजना | | | | | | |
| | अ) राज्यस्तर २५० हे. पेक्षा जास्त. | ११ | ४,६६३ | ० | ० | १ | २८७ |
| | ब) स्थानिक स्तर १०१ ते २५० हे. | ३ | ५१९ | ० | ० | ० | ० |
| | क) ० ते १०० हे. | १८ | ८७७ | ४ | १९२ | ८ | ५५४ |
| | एकूण ल.पा. | ३२ | ६,०५९ | ४ | १९२ | ९ | ८४१ |
| ४ | को. प. बंधारे | | | | | | |
| | अ) राज्यस्तर २५०हे. पेक्षा जास्त. | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | ब) स्थानिक स्तर १०१ ते २५० हे. | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | क) ० ते १०० हे. | २६ | ८८५ | ३ | ७८ | ७ | ३५१ |
| | एकूण को. प. बंधारे | २६ | ८८५ | ३ | ७८ | ७ | ३५१ |
| ५ | एकूण उपसा सिंचन योजना | | | | | | |
| | अ) राज्यस्तर २५० हे. पेक्षा जास्त. | १ | ४२९ | १ | २५२ | १ | २७९ |
| | ब) स्थानिक स्तर १०१ ते २५० हे. | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | क) ० ते १०० हे. | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | एकूण उपसा सिंचन योजना | १ | ४२९ | १ | २५२ | १ | २७९ |
| | सर्व एकूण | ६२ | ११,६७३ | ८ | १०,५८९ | १७ | १,४७१ |

**आधार :** लघु पाटबंधारे विभाग, नांदेड, **जिल्हा पुस्तिका,** २००५.

Maharashtra State Gazetteers

—पुढे चालू

**पूर्ण झालेले प्रकल्प**

| नायगांव | | उमरी | | माहूर | | हिमायतनगर | | धर्माबाद | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| संख्या | सिंचन क्षमता हेक्टर | संख्या | सिंचन क्षमता हेक्टर | संख्या | सिंचन क्षमता हेक्टर | संख्या | सिंचन क्षमता हेक्टर | संख्या | सिंचन क्षमता हेक्टर | संख्या | सिंचन क्षमता हेक्टर |
| (२५) | (२६) | (२७) | (२८) | (२९) | (३०) | (३१) | (३२) | (३३) | (३४) | (३५) | (३६) |
| ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ४३,६६३ |
| ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ८ | ११,९२४ |
| ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ९ | ५५,५८७ |
| | | | | | | | | | | | |
| ० | ० | ३ | १,४८५ | २ | ७१२ | ० | ० | ० | ० | ४९ | २२,१४६ |
| ० | ० | १ | २०४ | ० | ० | ० | ० | ० | ० | २० | ३७८९ |
| २१ | ६८१ | १२ | ४४८ | ९ | ४७७ | ८ | ३१८ | २ | ७२ | ३०७ | १३,५८६ |
| २१ | ६८१ | १६ | २,१३७ | ११ | १,१८९ | ८ | ३१८ | २ | ७२ | ३७६ | ३९,५२१ |
| | | | | | | | | | | | |
| २८४ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | ५४३ |
| ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ७ | १,२२२ |
| १० | ३०२ | ४ | १०४ | ५ | १५२ | ० | ० | १ | १४ | १२३ | ४,६२५ |
| १० | ५८६ | ४ | १०४ | ५ | १५२ | ० | ० | १ | १४ | १३२ | ६,३९० |
| | | | | | | | | | | | |
| ० | ० | ३ | २,८३६ | २ | ७९५ | ० | ० | २ | १९४३ | १९ | ११,८९२ |
| १ | १९६ | ० | ० | २ | ३५९ | ० | ० | ० | ० | १५ | २,३०४ |
| ० | ० | १ | ९२ | ० | ० | ० | ० | ० | ० | ६ | ६,५१२ |
| १ | १९६ | ४ | २,९२८ | ४ | १,१५४ | ० | ० | २ | १९४३ | ४० | १४,८०० |
| ३२ | १,४६३ | २४ | ५,९६९ | २० | २,४९५ | ८ | ३१८ | ५ | २०२९ | ५५७ | १,१७,००६ |

Maharashtra State Gazetteers

## तक्ता क्रमांक २

## पंचवार्षिक योजनानिहाय झालेल्या खर्चाचा तपशील

(रु. लाखांत)

| अ. क्र. (१) | कालावधी (२) | मोठे प्रकल्प (३) | मध्यम प्रकल्प संख्या (४) | मध्यम प्रकल्प खर्च (४) | लघु प्रकल्प को.प.बं.सह संख्या (५) | लघु प्रकल्प को.प.बं.सह खर्च (५) | उपसा सिंचन (६) | एकूण संख्या खर्च (७) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पहिली योजना (१९५१-५६) | — | — | — | — | — | — | — |
| २ | दुसरी योजना (१९५६-६१) | १२३.०० | ४९.२४ | | — | — | — | १७२.२४ |
| ३ | तिसरी योजना (१९६१-६६) | ३२२.५६ | २७१.२९ | | २१.२४ | | — | ६१५.०९ |
| ४ | तीन वार्षिक योजना (१९६६-६७-६८) | ९९.४२ | २२७.६३ | | २३९.६२ | | १५.१६ | ५८१.८४ |
| ५ | चौथी योजना (१९६९-७४) | ९८.६३ | २२७.६३ | | २३९.६२ | | १५.९६ | ५८१.८४ |
| ६ | पाचवी योजना (१९७४-७८) | १,१२०.९३ | २२१.७८ | | १६७.३२ | | ५३.५१ | १,५६३.५४ |
| ७ | वार्षिक योजना | | | | | | | |
| | (१९७८-७९) | ५९५.५० | ४७.८५ | | ३४.८८ | | ० | ६७८.२३ |
| | (१९७९-८०) | १,२३२.२६ | ३६.०६ | | ३४.२४ | | ० | १,४०४.५६ |
| ८ | सहावी योजना (८०-८५) | | | | | | | |
| | १९८०-८१ | ९५१.५८ | ५१.०९ | | २२.९८ | | १२०.२५ | १,१४५.९० |
| | १९८१-८२ | ४१.८२ | ९३.९१ | | ३३.९० | | ० | १६९.५३ |
| | १९८२-८३ | १,८०२.०७ | १४५.७३ | | ५५.९१ | | ० | २,००३.७१ |
| | १९८३-८४ | २,४५३.७१ | १५९.१३ | | ७२.९५ | | ० | २,७५७.७४ |
| | १९८४-८५ | २,४३५.५८ | १५४.२४ | | ७२.८२ | | ० | २,६६२.६४ |
| ९ | सातवी योजना (८५-९०) | | | | | | | |
| | १९८५-८६ | ६११.३३ | ७४.३५ | | ६४.८६ | | ० | ७५०.५४ |

Maharashtra State Gazetteers

**तक्ता क्रमांक २**—पुढे चालू

(रु. लाखात)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
|---|---|---|---|---|---|---|
| | १९८६-८७ | ७८८.५१ | ७५.४३ | ६९.७७ | १७.५० | ९५१.२१ |
| | १९८७-८८ | १,२६९.९९ | ९६.७० | २०३.३१ | ४०.१४ | १,६०९.३१ |
| | १९८८-८९ | १,०५९.२५ | ६७.९४ | १५१.१२ | २८.०१ | १,३०६.३२ |
| | १९८९-९० | ७६९.२७ | ८१.१५ | १८५.३८ | ३३.५१ | १,०६९.३१ |
| १० | वार्षिक योजना | | | | | |
| | १९९०-९१ | ६२६.०० | ४३.४० | ३६.५४ | ३०.२७ | ७२६.२१ |
| | १९९१-९२ | ३०७.६७ | २९.७६ | ९३.३७ | ५०.३० | ४८०.९३ |
| ११ | आठवी योजना | | | | | |
| | (९२-९७) | | | | | |
| | १९९२-९३ | ६४३.२४ | २१४.४३ | २०६.३० | २९.१६ | १,०९३.१३ |
| | १९९३-९४ | ४६५.०९ | ३३.५४ | ४०.०३ | ०.०० | ५३८.६६ |
| | १९९४-९५ | १,३१५.०६ | १८१.९७ | ३९४.९७ | ०.०० | १,८९२.०० |
| | १९९५-९६ | १,३०५.६६ | १५५.६५ | ५८४.१९ | ०.०० | २,०४५.५० |
| | १९९६-९७ | १,२२३.८१ | २५८.९१ | ७१५.९५ | ०.०० | २,१९८.६७ |
| १२ | नववी योजना | | | | | |
| | (९७-२००२) | | | | | |
| | १९९७-९८ | ७५६.६० | ३५३.७४ | १,०३४.७४ | ०.०० | २,१४५.०८ |
| | १९९८-९९ | ३८७.२३ | ४२४.१८ | ४५५.५७ | ०.०० | १,२६६.९८ |
| | १९९९-२००० | ९८८.५० | ३९८.५२ | १,४६४.६६ | ०.०० | २,८५१.६८ |
| | २०००-२००१ | ७२३.१२ | २,०२४.२० | ५९०.२४ | ०.०० | २,३३७.५६ |
| | २००१-२००२ | १,३६०.०० | २,६४४.०० | ५९५.०० | ०.०० | ४,५९९.०० |
| १३ | दहावी योजना | | | | | |
| | २००२-२००३ | २६५.८१ | ४२.९३ | ८७८.७९ | ० | ११,८३१.२३ |
| | २००३-२००४ ना.पा.मं. | २,०८२.३३ | ७८१.११ | ५६३.३५ | ० | ० |
| | २००४-२००५ उ.पे.प्र.मं. | ३,५१७.५५ | ३,९३३.५८ | ४,९७३.२० | ० | १२,४२४.३३ |

आधार-लघु पाटबंधारे विभाग, नांदेड, **जिल्हा पुस्तिका,** २००५, पूर्वोक्त, पृ. १९.

Maharashtra State Gazetteers

## तक्ता क्रमांक-३

### जिल्ह्यातील प्रमुख कृषि मालाच्या सरासरी किमती

(किमती रुपयामध्ये, वजन क्विंटलमध्ये)

| वर्ष | भात | गहू | ज्वारी | बाजरी | मका | तूर (डाळ) | हरभरा | कापूस | गूळ | बटाटा | भुईमूग | एरंडी | जवस | तीळ | तंबाखू | मिरची |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९६९-७० | — | १४८.६७ | — | ७३.५० | ५५.५० | १२२.७३ | ११६.८७ | २००.४१ | — | — | १३९ | ११६.१७ | १८१.१३ | २१६.१७ | — | ३९६.६७ |
| १९७०-७१ | — | ११६.०० | ८२.५० | ७६.०० | ६२.५ | १३७.७५ | ८१.३३ | २६४.३३ | — | — | १५३.६७ | १४८.३७ | ९५.४ | २३७.६७ | — | ४६८.३५ |
| १९७१-७२ | ८५.०० | १०६.४० | ८४.०० | ७३.३३ | ६८.६७ | १३९.८ | ९४.१७ | — | — | — | १३३.८३ | १२६.४३ | १५१.३३ | — | २२१.४७ | ३२०.७० |
| १९७२-७३ | १८६.८७ | २१६.६० | १४७.७८ | ९५.०० | १०२.५० | २३७.२२ | १८६.९० | १४८.३३ | ३८६.६६ | ७० | १७०.७५ | १७० | १५८.३३ | — | — | ३२८.७५ |
| १९७३-७४ | २१०.७१ | १८१.५० | २३७.५० | १५.१.३३ | १८८.६७ | २०१.२३ | २३५.७५ | २७६.१५ | — | — | १८८.५७ | २२६ | — | २४४.२३ | — | — |
| १९७४-७५ | २०६.७१ | १९२.२२ | १४३.५६ | १६०.३३ | १९४.५० | २३६.६ | २२३.१७ | — | — | १०० | २१६.३७ | १८२ | २६० | २९५.१७ | — | ७८४.६६ |
| १९७७-७८ | १०५ | १५०.०० | १०९.१७ | — | — | ३८१.५ | २१६.१६ | — | १३०.३७ | १४५ | २४३.७३ | १८२.४३ | २७२ | ३७२.५६ | — | ६०० |
| १९७८-७९ | १०२.२९ | १३७.५४ | १०७.१२ | ९८.८६ | ९५ | ४०८.३३ | २०७.६० | — | ११५ | — | २२७ | १७७.६९ | २४८ | ३६४ | — | ५५० |
| १९७९-८० | १०७ | १६०.०० | १२५ | १०८.०० | १०० | ३४० | २२७.२५ | — | २३० | — | २८५ | २१८ | ३१९ | ४३२ | — | ५२१ |
| १९८०-८१ | १२५.२ | १९४.०० | १४० | १३८.०० | ११९ | ४१६ | २९० | — | ३८९.६ | — | ४३६ | २९१.२५ | ४१३ | ५५६ | — | ८५२.०० |
| १९८१-८२ | १४६ | १९७.३० | ९५१ | १३९.०० | — | ४३०.२५ | २५०.३० | — | २७६ | — | ४९७.६ | २९० | ४०२.५ | ५६० | — | ८२८.८५ |
| १९८२-८३ | १४९.२५ | २२६.३० | १४५.०० | — | — | ४६५.७ | २९६.१० | — | २२१.८ | — | ४५२ | २९९.३० | ४३१.८० | ५८४.३० | — | ८२२ |
| १९८३-८४ | १४६.३० | २००.६५ | १४९.८० | १३२.०० | — | ४८०.१ | ३११.४० | — | २७३.३० | — | ४३५ | २९४.८० | ४३८.१० | ६००.३० | — | ८११.६० |
| १९८४-८५ | १५८ | २००.८५ | १३७.९० | १३९.०० | — | ४८० | ३२८.३० | — | २७५.५० | — | ४५० | ३१८ | ४३५.३० | ६११.२५ | — | ८७९.०० |
| १९८६-८७ | २०३ | २४७.७० | १७२.२० | १५१.५० | — | ६१२.७ | ३६४.३५ | — | ३११ | — | ४६७.८ | ३१२.५० | ४६६.५० | ८१२ | — | ७८९.४० |
| १९८७-८८ | २११ | २५०.३५ | १६९.८० | १५८.०० | — | ६१७.८ | ३७८.१० | — | ३१५.८ | — | ५३६ | ३७५ | ५३४.३५ | ८३३.६० | — | ८६४.३५ |
| १९८८-८९ | २०४.३५ | २५९.४० | १८६.५० | १६५.२५ | — | ६२९.६ | ४३७.५० | — | ३२६.४ | — | ४५८.३ | ३८६.९० | ५६०.१० | ८३५.२० | — | १,५६७.५० |
| १९८९-९० | २२७.७ | २७८.१ | १८९.२३ | १६०.०० | — | ७२५.३ | ५१४.२ | — | ३२०.१५ | — | ६१७ | ४११.३५ | ६६७ | ८८८.५ | — | १३८९.५० |

Maharashtra Government Publishers

**तक्ता क्रमांक-३**—पुढे चालू

(किमती रुपयामध्ये, वजन क्विंटलमध्ये)

| वर्ष | भात | गहू | ज्वारी | बाजरी | मका | तूर (डाळ) | हरभरा | कापूस | गूळ | बटाटा | भुईमूग | एरंडी | जवस | तीळ | तंबाखू | मिरची |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९९०-९१ | २२७.८० | ३१९.३ | २४३.८ | १९५.२० | १६१.४० | ९८७.४० | ५२८.७५ | — | ३२९.२० | — | ८३५.५० | ४४१.४० | ७,६६.७ | १,००१.७० | — | १,६१४.३० |
| १९९१-९२ | ३४८.५० | ४३३.४० | ४०९.३० | ३६१.४० | ३६६.२५ | १,२११.५० | ६३५.३० | — | ४३५.३० | — | १,१३३.४० | ५१८.३० | ८७०.५ | १,४०९.७० | — | २,००१.५० |
| १९९२-९३ | ३४२.६० | ३९८.२५ | ३०५.४० | २११.३० | २६१.५० | १२९० | ६४३ | — | ७५२.४० | — | १,०२३.५० | ५९०.२० | ८४१.५ | १,२७६.५० | — | १,६७७.६० |
| १९९३-९४ | ३६१.३० | ३९५.४० | ३१०.३० | २३७.४० | २५९.३० | १,१५८.५० | ६९७.४० | — | ७७१.२५ | — | १,०११.६० | ६२१.७० | ८३२.२ | १,३३३.२५ | — | १,७४१.२५ |
| १९९४-९५ | ३६९.५० | ४५७.८० | ३२१.४० | २८७.४० | २९०.४० | १,६२२.२५ | ८६३.४० | — | ७६१.६५ | — | १,२८०.१० | ८३१.५० | ९०४.५ | १,६९०.१० | — | १,७४७.६० |
| १९९६-९७ | ३९८.४० | ५२६.२० | ३७४.६० | ३११.२० | ३१०.७५ | १,६८४.७० | ८७८.६० | — | ८४४.२० | — | १,२२३.७० | ८१५.४० | ८८९.५ | १,७२०.१० | — | १,९५५.६० |
| १९९७-९८ | ४८५.२५ | ५६२.५ | ४६८.४० | ३९२.५० | ४०५.३० | २,१८०.४० | १३१९.४० | — | ८४०.५० | — | १,३२७.३० | १,१३२.२० | १,१५३.६ | २,२२०.४० | — | २,१२३.५० |
| २००४-२००५ | | ७४५.०० | ४७३.०० | ४८१.०० | | १,६६८.०० | १३७३.०० | — | १,३९०.०० | — | १,७३७.०० | | | | | |

**संदर्भ :** कृषि व सांख्यिकी विषयक माहिती, महाराष्ट्र राज्य, २००२, २००६, भाग २, सांख्यिकी विभाग, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन, पुणे.

**तक्ता क्रमांक-४**

**भिंती व छपरे यासाठी वापरलेल्या साधन सामग्रीनुसार घरांचे वर्गीकरण, २००१**

| तपशील | ग्रामीण | नागरी | एकूण |
|---|---|---|---|
| **एकूण जनगणना घरे** | ४,९१,४६५ | १,५१,२३४ | ६,४२,६९९ |
| **छप्परांसाठी वापरलेली सामग्री** | | | |
| गवत, पाने, वेळू, माती, कच्च्या विटा व बांबू | ४३,९५० | २,२६५ | ४६,२१५ |
| प्लास्टिक किंवा पॉलिथिन | ३,४५६ | ५८८ | ४,०४४ |
| कौले | १,७१,२६५ | १३,९७० | १,८५,२३५ |
| माती | १,५१४ | ३८७ | १,९०१ |
| जस्ताचे, धातूचे व अस्बेटॉस पत्रे | २,१६,६३५ | ७१,३९३ | २,८८,०२८ |
| विटा व चूना | २,१९८ | ९४४ | ३,११२ |
| दगड | ३,२१७ | १४९ | ३,३६६ |
| प्रचलित सिमेंट कँक्रिट | ३९,२०८ | ५९,८८८ | ९९,०९६ |
| वर उल्लेखिलेल्या व्यतिरिक्त वापरलेली सामग्री | १०,०२२ | १,६५० | ११,६७२ |
| **भिंतीची सामग्री** | | | |
| गवत, पाने, वेळू व बांबू | ६९,७६८ | ४,२०१ | ७३,९६९ |
| प्लास्टिक अथवा पॉलिथिन | २,५०२ | ७७४ | ३,२७६ |
| माती व कच्च्या विटा | १,६१,३७३ | ४२,२१९ | २,०३,५९२ |
| लाकूड | २१,२५६ | ४,५९२ | २५,८४८ |
| गॅल्वानाइज्ड लोखंडी व इतर पत्रे | २,६२० | ३,०९७ | ५,७१७ |
| पक्क्या विटा | ८६,६३७ | ७७,०६६ | १,६३,७०३ |
| दगड | १,३३,६४६ | ५,६०४ | १,३९,२५० |
| सिमेंट काँक्रिट | १०,५०६ | १३,४०२ | २३,९०८ |
| वर उल्लेखिलेल्या व्यतिरिक्त वापरलेली सामग्री | ३,१५७ | २७९ | ३,४३६ |

आधार - सेन्सस ऑफ इंडिया, टेबल्स ऑन हाऊसेस, हाऊसहोल्ड ॲमिनिटीज अँड असेट्स, सिरीज-२८, खंड १, २००१.

**तक्ता क्रमांक ५**

**ग्रामीण व नागरी क्षेत्रातील घरांमधील खोल्यांचे संख्येनुसार वर्गीकरण, २००१**

| एकूण ग्रामीण नागरी | घरातील सदस्य संख्या | कुटुंबांची संख्या | वेगळी खोली नसलेले | एक खोली असलेले | दोन खोल्या असलेले | तीन खोल्या असलेले | चार खोल्या असलेले | पाच खोल्या असलेले | सहा व त्यावरील खोल्या असलेले |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १ | १३,३३५ | १,३३२ | ९,५१३ | १,८७८ | ३७६ | १३२ | ३२ | ७२ |
| | २ | ४२,२२४ | २,४५० | २९,२६१ | ८,१५५ | १,३३६ | ५५० | १४६ | २६६ |
| एकूण | ३ | ५०,३७३ | २,३५१ | ३१,६८१ | १२,२०५ | २,६५७ | ९११ | २३४ | ३३४ |
| | ४ | ८५,५७४ | ३,५५४ | ४७,७०३ | २४,१४० | ६,१९८ | २,५८९ | ६२१ | ७६९ |
| | ५ | १,०९,५८५ | ४,३१२ | ५८,८०० | ३२,५८० | ८,५०५ | ३,२१४ | ९९५ | १,०९९ |
| | ६-८ | १,७०,७८४ | ५,९१७ | ८१,८५० | ५५,२८० | १६,४०१ | ७,०२६ | १,९०१ | २,४०९ |
| | ९ व अधिक | ५१,६६४ | १,१०२ | १४,०५५ | १६,११९ | ९,५१६ | ५,६३३ | २,१४३ | ३,०९६ |
| | १ | १०,४३६ | १,१५० | ७,६२५ | १,३०१ | २२६ | ६९ | १२ | ५३ |
| | २ | ३४,८१९ | २,३३७ | २५,२६३ | ५,९४३ | ७७१ | २७९ | ५७ | १६९ |
| ग्रामीण | ३ | ४०,१४० | २,२३९ | २७,११९ | ८,६६९ | १,३७४ | ४४६ | ९१ | २०२ |
| | ४ | ६६,८६६ | ३,४२१ | ४१,०७९ | १७,३५४ | ३,२१० | १,१३८ | २४३ | ४२१ |
| | ५ | ८८,००२ | ४,१७६ | ५१,६०२ | २४,५६४ | ४,९६६ | १,६४८ | ४४१ | ६०५ |
| | ६-८ | १,३४,८३७ | ५,६७७ | ७०,८९६ | ४१,९८५ | १०,३३० | ३,८०० | ८६६ | १,२८३ |
| | ९ व अधिक | ३५,४४५ | १,०२२ | ११,५३६ | ११,४६१ | ५,९९३ | ३,०९७ | १,०४८ | १,२८८ |
| | १ | २,८९९ | १८२ | १,८८८ | ५७७ | १५० | ६३ | २० | १९ |
| | २ | ७,४०५ | ११३ | ३,९९८ | २,२१२ | ६२५ | २७१ | ८९ | ९७ |
| नागरी | ३ | १०,२३३ | ११२ | ४,५६२ | ३,५३६ | १,२८३ | ४६५ | १४३ | १३२ |
| | ४ | १८,७०८ | १३३ | ६,६२४ | ६,७८६ | २,९८८ | १,४५१ | ३७८ | ३४८ |
| | ५ | २१,५८३ | १३६ | ७,१९८ | ८,०१६ | ३,५३९ | १,६४६ | ५५४ | ४९४ |
| | ६-८ | ३५,९४७ | २४० | १०,९५४ | १३,२९५ | ६,०७१ | ३,२२६ | १,०३५ | १,१२६ |
| | ९ व अधिक | १६,२१९ | ८० | २,५१९ | ४,६५८ | ३,५२३ | २,५३६ | १,०९५ | १,८०८ |

आधार—सेंसस ऑफ इंडिया, टेबल्स ऑन हाऊसेस, हाऊस होल्ड ॲमिनिटीज ॲण्ड ॲसेट्स् सिरीज-२८, खंड-१, २००१.

**तक्ता क्र. ६**

**धारणाधिकार खोल्यांच्या संख्येनुसार कुटुंबांची संख्या**

| धारणाधिकार | उपलब्ध खोल्यांच्या संख्येनुसार कुटुंबांची संख्या | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | कुटुंबांची एकूण संख्या | वेगळी खोली नसलेले | एक खोली असलेले | दोन खोल्या असलेले | तीन खोल्या असलेले | चार खोल्या असलेले | पाच खोल्या असलेले | सहा व अधिक खोल्या असलेले |
| | | | | **ग्रामीण** | | | | |
| एकूण | ४,१०,५४५ | २०,०२२ | २,३५,१२० | १,११,२७७ | २६,८७० | १०,४७७ | २,७५८ | ४,०२१ |
| स्वतःच्या मालकीचे | ३,८५,६१७ | १८,८१८ | २,२२,१२२ | १,०३,३१७ | २४,७६२ | १०,०५२ | २,६७१ | ३,८७५ |
| भाड्याचे | १७,७९५ | ५६८ | ८,४७३ | ६,६४७ | १,६१८ | ३३१ | ५६ | १०२ |
| इतर | ७,१३३ | ६३६ | ४,५२५ | १,३१३ | ४९० | ९४ | ३१ | ४४ |
| | | | | **नागरी** | | | | |
| एकूण | १,१२,९९४ | ९९६ | ३७,७४३ | ३९,०८० | १८,१७९ | ९,६५८ | ३,३१४ | ४,०२४ |
| स्वतःच्या मालकीचे | ७२,५७३ | ५१७ | २०,१२४ | २३,७३० | १३,०८१ | ८,२८९ | ३,०४२ | ३,७९० |
| भाड्याचे | ३६,८४९ | ३४९ | १५,८२० | १४,२७४ | ४,७५० | १,२१३ | २३८ | २०५ |
| इतर | ३,५७२ | १३० | १,७९९ | १,०७६ | ३४८ | १५६ | ३४ | २९ |
| | | | | **एकूण** | | | | |
| एकूण | ५,२३,५३९ | २१,०१८ | २,७२,८६३ | १,५०,३५७ | ४५,०४९ | २०,१३५ | ६,०७२ | ८,०४५ |
| स्वतःच्या मालकीचे | ४,५८,१९० | १९,३३५ | २,४२,२४६ | १,२७,०४७ | ३७,८४३ | १८,३४१ | ५,७१३ | ७,६६५ |
| भाड्याचे | ५४,६४४ | ९१७ | २४,२९३ | २०,९२१ | ६,३६८ | १,५४४ | २९४ | ३०७ |
| इतर | १०,७०५ | ७६६ | ६,३२४ | २,३८९ | ८३८ | २५० | ६५ | ७३ |

**आधार :** सेंसस ऑफ इंडिया, टेबल्स ऑन हाऊसेस, हाऊसहोल्ड ॲमिनिटीज अँड ॲसेट्स, सिरीज २८, खंड १ २००१.

## तक्ता क्रमांक ७

## कुशल व अकुशल कामगारांचे दैनिक मजुरीचे सरासरी दर

(मजुरी रुपये व पैसे)

| वर्ष | कुशल कामगार | | | अकुशल कामगार | | | इतर शेतमजूर | | कष्टकरी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | सुतार | लोहार | चांभार | पुरूष | महिला | मुले | पुरूष | महिला | |
| १९६९-७० | ६.१९ | ५.५८ | ४.५७ | २.९० | १.८९ | १.३७ | २.७३ | १.७८ | २.३८ |
| १९७०-७१ | ६.५५ | ६.०० | ४.८८ | ३.०३ | २.०२ | १.४५ | २.७९ | १.८६ | २.४४ |
| १९७१-७२ | ६.८८ | ६.२३ | ५.१५ | ३.०६ | २.०७ | १.५० | २.८७ | १.९५ | २.४७ |
| १९७२-७३ | ७.३८ | ६.७५ | ५.४१ | ३.३० | २.३२ | १.६१ | ३.०९ | २.१६ | २.७५ |
| १९७३-७४ | ७.७१ | ७.१३ | ५.७९ | ३.५८ | २.५२ | १.७७ | ३.३६ | २.४४ | २.९४ |
| १९७४-७५ | ८.४८ | ७.६२ | ६.०८ | ३.८१ | २.७१ | १.९५ | ३.५५ | २.५५ | ३.०९ |
| १९७७-७८ | १०.३८ | ९.३३ | ७.३५ | ४.४८ | ३.३० | २.३४ | ४.२१ | ३.१० | ३.७६ |
| १९७८-७९ | ११.२२ | १०.२३ | ८.११ | ४.८८ | ३.५५ | २.५८ | ४.६० | ३.३६ | ४.१० |
| १९७९-८० | १३.०० | ११.८० | ९.२९ | ५.२६ | ४.०३ | ३.०३ | ५.२७ | ३.८९ | ४.६३ |
| १९८०-८१ | १३.३५ | १२.३३ | ९.८१ | ५.९५ | ४.२२ | ३.१८ | ५.५९ | ४.०३ | ४.२७ |
| १९८१-८२ | १६.१७ | १४.५४ | १२.२४ | ७.३८ | ५.१३ | ३.७३ | ६.८७ | ४.८६ | ५.३९ |
| १९८२-८३ | १९.७७ | १७.९४ | १५.१९ | ९.०५ | ६.२४ | ४.४६ | ८.५२ | ५.८६ | ७.९८ |
| १९८३-८४ | २१.०९ | १९.०३ | १६.३५ | ९.८६ | ६.७५ | ४.८१ | ९.४० | ६.४२ | ८.७३ |
| १९८४-८५ | २३.३८ | २१.२६ | १७.९३ | १०.७५ | ७.२९ | ५.१६ | १०.०६ | ९.८६ | ९.५८ |
| १९८६-८७ | २८.१८ | २५.१२ | २०.६७ | १३.१३ | ८.८५ | ६.३२ | १२.६१ | ८.३७ | १२.२४ |
| १९८७-८८ | ३०.२९ | २७.१७ | २२.७६ | १५.५१ | १०.६६ | ७.५४ | १४.३१ | ९.८६ | १३.०८ |
| १९८८-८९ | ३२.६० | ३०.१७ | २६.१३ | १७.०३ | ११.८६ | ८.७२ | १६.०६ | ११.२८ | १५.१३ |
| १९८९-९० | ३७.३६ | ३४.८३ | ३०.२२ | १९.६१ | १३.८९ | १०.२४ | १८.३२ | १३.०८ | १७.७४ |
| १९९१-९२ | ३७.९२ | ३८.०० | ३४.९२ | २३.२५ | १६.२५ | ९.७५ | २१.८३ | १५.२५ | १२.०८ |
| १९९२-९३ | ४०.६७ | ४१.५० | ४०.४२ | २६.८३ | १९.०८ | ११.३३ | २४.५८ | १७.२५ | १४.१७ |
| १९९३-९४ | ३८.१५ | ३७.०४ | ३३.२२ | ३०.७४ | २२.५७ | १०.०० | २८.६७ | २०.५० | १०.९२ |
| १९९४-९५ | ४४.०९ | ४२.६२ | ३५.०६ | ३३.०१ | २४.९८ | ११.८९ | ३३.३३ | २४.५७ | १६.७५ |
| १९९७-९८ | ५६.१७ | ५३.९१ | ५४.३१ | ४३.७३ | ३४.२६ | १६.७१ | ३४.४५ | २९.०० | ३०.८३ |

**आधार : सिझन ॲंड क्रॉप रिपोर्ट,** कृषि आयुक्तालय, पुणे, संबंधीत वर्षाचे.

# नांदेड जिल्हा गॅझेटिअर

## प्रकरण ९

## प्रशासन

Maharashtra State Gazetteers

प्रकरण ९

# प्रशासन

## प्रशासकीय व्यवस्था

नांदेड जिल्ह्यातील सांप्रतच्या सर्व प्रदेशाचा समावेश ऐतिहासिक काळात सम्राट अशोकाच्या राज्यामध्ये होता. पुढे ख्रिस्तपूर्व १८४ मध्ये मौर्य राजवटीचा शेवट करून शुंग राजवंशाचा संस्थापक सेनापती पुष्यमित्र याने पाटलिपुत्राची (पाटणा) गादी बळकावली. शुंग राजवटीमध्ये वर्ध्याच्या पूर्वेकडील व पश्चिमेकडील असे विदर्भाचे दोन भागांमध्ये विभाजन करण्यात आले. त्यावेळी पश्चिमेकडील विदर्भामध्ये नांदेडबरोबर अमरावती, अकोला, बुलडाणा, यवतमाळ आणि परभणी या आधुनिक जिल्ह्यांचा समावेश होता.[१] शुंगांनंतर दक्षिणेत सातवाहनांनी साम्राज्य प्रस्थापित केले. स्थूलमानाने म्हणता येईल की, सातवाहनांचा प्रारंभ इ.स. पूर्व दुसऱ्या शतकाच्या शेवटी झाला. उत्तरकालीन सातवाहनांनी इ.स.च्या दुसऱ्या शतकाच्या सुरुवातीपासून ते तिसऱ्या शतकाच्या प्रथमार्धापर्यंत दख्खनवर राज्य केले.[२] इ.स.२५० मध्ये सातवाहनांच्या ऱ्हासानंतर वाकाटकांचा उदय झाला. वाकाटकांचा अंमल इ.स.५५० पर्यंत होता. तदनंतर कलचुरी घराण्याकडे अधिसत्ता आली.अदमासे ६२० सालात पुलकेशिन दुसरा याने कलचुरींचा पराभव केल्यावर राष्ट्रकूट राजांची अधिसत्ता स्थापन झाली. राष्ट्रकूट राजे चालुक्य घराण्याचे मांडलिक होते. राष्ट्रकूटांनंतर कल्याणीच्या चालुक्यांनी सत्ता काबीज केली. बाराव्या शतकाच्या अंतिम चतुर्थांशामध्ये देवगिरीच्या यादवांची राजवट प्रबळ झाली. यादव राजांनी आपल्या कारकिर्दीत बऱ्याच प्रशासकीय सुधारणा केल्या. यादवांच्या पदरी हेमाद्रि ऊर्फ हेमाडपंत नावाचा मंत्री होता. तो वास्तुकला व काव्यशास्त्र यामध्ये तर पारंगत होताच, पण त्याचबरोबर त्याने बऱ्याच प्रशासनविषयक सुधारणासुद्धा घडवून आणल्या. इ.स.१३१८ मध्ये यादवांचा पाडाव करून दिल्लीचा सुलतान अल्लाउद्दीन खिलजी याने देवगिरीचे साम्राज्य काबीज केले. तेव्हापासून नांदेड जिल्ह्यावर बहमनी, इमादशाही व अहमदनगरचे निजाम, इत्यादी राजघराण्यांचेआधिपत्य होते.[३] बहमनी राज्याची विभागणी प्रारंभी दौलताबाद, वऱ्हाड, बीदर आणि गुलबर्गा या चार प्रांतात करण्यात आली होती. नंतर मुहंमद गवान यानी या प्रांताची पुनर्रचना करून ती आठ विभागात विभागली. तेव्हा माहूर हे सुभ्याचे मुख्य केंद्र बनले. पुढे दिनांक २३ मार्च १५९६ च्या तहानुसार वऱ्हाड प्रांत अकबर बादशहाच्या अधिपत्याखाली आला. मोगल बादशहा औरंगजेब दिनांक २० फेब्रुवारी १७०७ रोजी मृत्यू पावला तेव्हा गाझीउद्दीन फिरोजजंग हा वऱ्हाडचा सुभेदार होता.

---

१. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९७१, पृ. २८.

२. **जळगाव जिल्हा गॅझेटिअर,** १९९४, पृ. ६२.

३. कित्ता, (१९७१), पृ. २७-५५.

औरंगजेबानंतर १७१३ मध्ये दिल्लीच्या मोगल बादशहांनी असफजाहा या सेनापतीला, त्याने मोगल साम्राज्यासाठी जी उत्कृष्ट कामगिरी बजावली त्याप्रीत्यर्थ दख्खनचा सुभेदार केले. तद्वत असफजाहा या ला निजाम-उल्-मुल्क असा किताब बहाल केला. त्या कालावधीपासून हा किताब वंशपरंपरागत त्याच्याच घराण्याकडे राहिला. अशा प्रकारे हैद्राबादचे निजामशाही घराणे उदयास येऊन सत्ताधीश झा ले. इ.स.१८५३ मध्ये निजामाने ब्रिटिश राज्यकर्त्यांशी जो तह केला त्यानुसार वऱ्हाड प्रांत ब्रिटिशांकडे अभिहस्तांकित करण्यात आला. या अभिहस्तांकन करारानुसार वऱ्हाडचा बराच मोठा भाग आणि उस्मानाबाद व रायचूर दोआब हे जिल्हे व नांदेड जिल्ह्यातील हदगाव, माहूर आणि किनवट तालुके ि ब्रिटिशांकडे सुपुर्द करण्यात आले, मात्र पुढे १८५७ च्या उठावामध्ये निजामाने ब्रिटिशांना मदत केल्याने ब्रिटिशांनी १८६० मध्ये १८५३ च्या तहाच्या अटी शिथिल करून वऱ्हाडमधील औरंगाबाद जिल्ह्याचा जाफराबाद तालुका, सध्याच्या परभणी जिल्ह्याचा बहुतांश भाग आणि हदगाव, माहूर व किनवट हे नांदेड जिल्ह्याचे तालुके वऱ्हाडमधून काढून पुन्हा निजामाकडे सुपुर्द केले व अशा प्रकारे ते त्यावेळच्या औरंगाबाद, परभणी व नांदेड जिल्ह्यामध्ये समाविष्ट झाले. पुढे १८५८ मध्ये सालारजंग या प्रधान मंत्र्याने बऱ्याच प्रशासकीय सुधारणा घडवून आणल्या.[४] कालांतराने ब्रिटिश अमलाखालील हिंदुस्थानात ज्या प्रशासनिक प्रथा व कायदेकानून होते त्यांचा हैद्राबाद राज्यातसुद्धा बऱ्याच अंशीअंगीकार करण्यात आला.[५]

उपरोक्त ऐतिहासिक पार्श्वभूमीवर नांदेड जिल्ह्याचे सामान्य प्रशासन, शासन यंत्रणा व लोककल्याणप्रवण शासकीय कार्यक्रम यांची माहिती खालील पृष्ठांमध्ये दिलेली आहे.

**निजामशाहीतील प्रशासन :** प्राचीन भारतात पूर्वीच्या राज्यकर्त्यांनी त्यांच्या राज्यामध्ये ग्राम शासन (village administration) पद्धतीचा अवलंब केला होता. मात्र भारतात ज्यावेळी मुसलमान राज वटीने पाय रोवला तेव्हा पूर्वीपासूनच अस्तित्वात असलेल्या बऱ्याच प्रशासन पद्धती त्यांनी पुढे चालू ठे वल्या. त्यांच्या राज्यपद्धतीवर बहुतांशी हिंदू राज्यकर्त्यांच्या पद्धतीचे ठसे उमटलेले दिसतात. मुसलमान राज्यकर्त्यांनी हिंदूंच्या राज्यपद्धतीतील नाम पद्धती (Nomenclature) बदलून त्याऐवजी सरकार दर बारी पर्शियन अरबी भाषेतील शब्दांचा उपयोग केला.[६] मोगलांचे साम्राज्य बंगाल, अवध,अलाहाबाद आणि दख्खन अशा मोठमोठ्या प्रांतांमध्ये विभागलेले होते. ह्या प्रांतांमध्ये विभागलेले होते. ह्या प्रांतांना सुभा असे संबोधिले जात होते. प्रत्येक सुभा काही जिल्ह्यांमध्ये विभागलेला असे आणि त्यास "सिरकार " (सरकार) असे म्हणत. सिरकाराच्या प्रत्येक उपविभागास "परगणा" किंवा "महाल" हे ना व होते. त्या काळातील परगणे किंवा महाल सध्याच्या तालुक्यांच्या आकाराचे होते.

हैद्राबाद संस्थान मोगल साम्राज्याचा एक सुभा होता. त्यावेळच्या हैद्राबाद राज्यात मोगलांनी रूढ केलेली महसूल आखण्याची पद्धती स्वीकारण्यात आली होती. हैद्राबाद राज्यात त्यावेळी सहा सुभे समाविष्ट होते. इ.स.१७४८-१८१८ या संघर्षमय काळात मराठे, फ्रेंच, इंग्रज आणि म्हैसूर राज्यकर्ते

---

४. कित्ता, (१९७१), पृ. ८२.

५. या ग्रंथातील प्रकरण २-इतिहास यामध्ये जिल्ह्याचा सखोल इतिहास दिलेला आहे.

६. इम्पीरीअल गॅझेटिअर ऑफ इंडिया, प्रॉव्हिन्शल सीरिज, हैद्राबाद स्टेट, (कलकत्ता, १९०९), पृ. २१५.

यांच्या स्वाऱ्यामुळे हैद्राबाद राज्याचा बराचसा मुलूख त्यांच्या अधिकाराखाली गेला. त्यामुळे हैद्राबाद राज्यात हैद्राबाद, औरंगाबाद, बीदार, विजापूर आणि वऱ्हाड हे पाच सुभे आणि अनेक सिरकार होते. परंतु हे सुभे दीर्घकाळापर्यंत कायम राहिले नाहीत.[७]

इ. स. १८५३ मध्ये एका तहान्वये वऱ्हाड सुभा ब्रिटिशांकडे अभिहस्तांकित करण्यात आल्याने हैद्राबाद राज्यात फक्त चार सुभे राहिले. या संपूर्ण प्रदेशावर दिवाणी प्रशासकाचे म्हणजेच पंतप्रधानाचे प्रत्यक्ष नियंत्रण होते. या चार सुभ्यांचे १४ जिल्हे होते. त्यांची ७३ तालुक्यांत विभागणी करण्यातआली होती. त्यात पाच सर्फ-इ-खास तालुक्यांचा समावेश होता. १८८१ च्या शेवटी संपूर्ण हैद्राबाद राज्याची १८ जिल्ह्यांमध्ये (एक अमलदारीचा समावेश) विभागणी करण्यात आली. हे सर्व जिल्हे एकूण १०९ ता लुक्यांत विभागण्यात आले.

हैद्राबाद संस्थानात सुभ्यांचा कारभार पाहण्यासाठी सुभेदारांना मुलकी व लष्करी अधिकार होते. तसेच प्रत्येक जिल्ह्याच्या कारभारासाठी प्रथम तालुकदार व तालुक्याच्या कारभारासाठी तहसीलदार नेम ले होते. जिल्हाधिकाऱ्याला प्रथम तालुकदार असे संबोधिले जात असे.

हैद्राबाद राज्यातील बहुतेक प्रशासनिक सुधारणा पहिल्या सर सालारजंग या प्रधानमंत्र्याने इ.स.१८५८ मध्ये व त्यानंतर त्याच्याच कारकिर्दीत घडवून आणल्या. त्याने भ्रष्ट अधिकाऱ्यांना जि ल्ह्यामधून काढून त्यांच्या ठिकाणी चांगल्या वर्तणुकीच्या अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या. इ.स.१८६० मध्ये ब्रिटिशांकडून पुन्हा ताब्यात आलेल्या धाराशीव आणि रायचूर जिल्ह्यांतील ईस्ट इंडिया कंपनीचे उत्कृष्ट प्रशासन पाहून सालारजंगला महसूल प्रशासनाची सुधारित पद्धती सुरू करण्याला प्रोत्साहन मिळाले. त्यामुळे १८६५ मध्ये मुलकी खात्याचे काम महसूल मंडळाकडे देण्यात आले. तेव्हापासून जमीन महसुलाच्या पद्धतीत आमूलाग्र बदल घडून आला. त्याकरिता तालुक्याच्या ठिकाणी सरकारी तिजोरी ठेवण्यात आली. इ.स.१८६७ मध्ये जिल्हाबंदी पद्धत प्रस्थापित करण्यात आली. या योजने अंतर्गत राज्याचे ५ उप-विभाग आणि १७ जिल्ह्यांमध्ये विभाजन करण्यात आले. तसेच उप-विभाग, जि ल्हा व तालुका पातळीवर कर्मचाऱ्यांच्या वेतनावर नेमणुका करण्यात आल्या. याबरोबरच न्यायिक, सा र्वजनिक बांधकाम, वैद्यकीय, नगरपरिषदा, पोलीस आणि शैक्षणिक विभागांची त्याने योग्य रचना केली.

Maharashtra State Gazetteers

हैद्राबाद संस्थानात १८८९ च्या दस्तूर-अल्-अमल प्रशासन-पद्धती नुसार मराठवाड्यातील जि ल्ह्यात जिल्हा व तालुका बोर्डांची स्थापना करून त्यांचेकडे सार्वजनिक सेवा, शिक्षण,आरोग्यविषयक कामे सोपविण्यात आली. संस्थानातील प्रत्येक खेड्यात पाटील व पटवारी (कुलकर्णी) यांना जमीन महसूल गोळा करण्याचे व इतर मुलकी अधिकार होते. १८७७ पर्यंत पाटील पटवाऱ्यांना इनाम जमिनी देण्यात आल्या होत्या.

निजामी राजवटीत जिल्ह्याचा प्रशासनिक कारभार बहुतांशी संस्थानात रूढ असलेल्या कायद्यानुसार सुरू होता. बरेच कायदे व शासकीय प्रथा ब्रिटिश अंमलाखालील भारतीय प्रांतात

७. रिपोर्ट ऑफ दि ॲडमिनिस्ट्रेशन ऑफ एच.इ.एच. दि निजाम्स डोमिनियन्स, १३३१ फसली (१९२१-२२), पृ. २८-२९.

प्रमाणित असलेल्या कायद्यापेक्षा भिन्न असल्या तरी त्यांच्यात साधर्म्य होते. मुंबई राज्यात हा भाग इ.स.१९५६ सालात समाविष्ट होईपर्यंत निजाम राजवटीतील कायदेकानून अस्तित्वात होते. या कायद्यांतील बऱ्याच तरतुदी त्या वेळच्या मुंबई राज्यात प्रचलित असलेल्या कायद्यांपेक्षा बऱ्याच अंशी भिन्न होत्या. याच कारणामुळे कालांतराने हैद्राबाद संस्थानातील प्रचलित कायदे निरसन करून महाराष्ट्रातील कायदे या भागास लागू करण्यात आले. महाराष्ट्रातील प्रचलित असलेले काही कायदे सुधारून व त्यात हैद्राबादच्या कायद्यांतील काही तरतुदींचा समावेश करून त्यात सुधारणा घडवूनआण ली. सध्या संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर सर्व जिल्ह्यांत समान कायदे प्रचलित आहेत.

निजाम राजवटीत नांदेड जिल्ह्यामध्ये विकास कार्याकडे विशेष लक्ष दिल्याचे आढळत नाही. जमीन महसूल व इतर बाबींद्वारे महसूल गोळा करणे आणि कायदा, सुव्यवस्था कायम ठेवणे हीच राज्यकर्त्यांची मुख्य उद्दिष्ट्ये होती. नांदेड जिल्ह्याचा समावेश भूतपूर्व मुंबई राज्यात इ.स.१९५६ मध्ये करण्यात आल्यावर या जिल्ह्यातील विकास कार्याला चांगलीच गती मिळाली. राज्यातील सर्व जि ल्ह्यांचा समतोल विकास करण्यासाठी जिल्हास्तरावर जिल्हाधिकाऱ्यापासून ग्रामपातळीवरील तलाठी आणि ग्रामसेवक यांच्याद्वारे सुधारणा घडवून आणण्यासाठी शासकीय यंत्रणा निर्माण करण्यात आली आहे. तसेच जनतेला विकास कार्यक्रमात सामिल करण्यासाठी लोकनियुक्त ग्रामपंचायती, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदा या सारख्या संस्था निर्माण करण्यात आल्या आहेत. ह्या पद्धतीस पंचायतराज पद्धती असे संबोधण्यात येते.

**प्रादेशिक बदल :** मोगल काळातील नांदेड जिल्ह्याच्या सीमा व त्यात समाविष्ट केलेला भाग या बाबत निश्चित माहिती उपलब्ध नसली तरी मुघल राजवटीमध्ये दख्खनचा प्रदेश खानदेश, वऱ्हाड, औरंगाबाद, बीदर, विजापूर आणि हैद्राबाद अशा सहा सुभ्यांमध्ये विभागण्यात आला होता. त्यावेळी सध्याचा नांदेड जिल्हा माहूर आणि नांदेड या दोन जिल्ह्यांत विभागला गेला होता. माहूर जिल्हाव ऱ्हाडमध्ये तर नांदेड जिल्हा बीदर सुभ्यामध्ये होता. त्यावेळीसुद्धा नांदेड शहर हेच जिल्ह्याचे मुख्यालय होते. मुनीमखान औरंगाबादी याने "सावनेहे दख्खन" या पर्शियन ग्रंथामध्ये या दोन जिल्ह्यांच्या त्या वेळच्या प्रशासकीय व्यवस्थेचे किंवा रचनेचे सविस्तर वर्णन केलेले आहे. त्याच्या नोंदीप्रमाणे माहूर जि ल्ह्यामध्ये त्यावेळी २० तालुके व १,१४१ गावे तर नांदेडमध्ये ३० तालुके व ९४९ गावे होती. माहूर आणि नांदेड जिल्ह्यांचा सहामाही महसूल अनुक्रमे रु. ८,४७,११३ व रु. २०,६८,१९३ इतका होता.[८] इ.स. १८५३ मध्ये निजाम व ब्रिटिश सरकार यांच्यात झालेल्या तहानुसार नांदेड जिल्ह्यातील हदगाव, माहूर आणि किनवट तालुके ब्रिटिशांकडे सुपूर्द करण्यात आले, मात्र ब्रिटिशांनी या तहाच्याअटी इ.स. १८६० मध्ये शिथिल करून पुन्हा हे तिन्ही तालुके निजामास सुपूर्द केले व ते नांदेड जिल्ह्यामध्ये पुन्हा समाविष्ट झाले.[९]

इ. स. १९०५ मध्ये झालेल्या बदलापूर्वी हैद्राबाद राज्यात उत्तरेस, औरंगाबाद विभागामध्ये ८,६७४ चौ.कि.मी. (३,३४९ चौ.मैल) इतके क्षेत्र असलेला नांदेड जिल्हा अस्तित्वात होता. या

८. कित्ता, (१९७१), पृ. ६२.

९. कित्ता, (१९७१), पृ. ८१-८२.

जिल्ह्यास पेनगंगेमुळे वऱ्हाडमधील वाशिम जिल्ह्यापासून विभक्त केले होते तर पूर्वेस निजामाबाद, दक्षिणेस बीदर आणि वायव्य दिशेस परभणी जिल्ह्यांच्या सीमा होत्या. इ.स.१९०१ मध्ये जिल्ह्याचे उस्माननगर, हदगाव, म्हैसा, बिलोली, देगलूर, कंधार, नांदेड असे सात तालुके व एक जाहगीर होती.[१०] इ.स.१९०५ मध्ये निजामाबाद जिल्ह्यातील मुधोळ तालुका व बानसवाड्यामधील काही गावांचा नांदेड जिल्ह्यात समावेश करण्यात आला आणि पूर्वीच्या म्हैसा तालुक्याचेही त्यात विलीनीकरण करण्यातआ ले. निजामाबाद जिल्ह्यातील आओला नरसापूर तालुका रद्द करण्यात आला आणि त्याऐवजी किनवट येथे मुख्यालय असलेला एक नवीन तालुका निर्माण करण्यात आला. उस्माननगर (लाठी) येथे मुख्या लय असलेला दुसरा तालुकासुद्धा रद्द करण्यात आला आणि त्यातील खेड्यांची बिलोलीआणि कंधार तालुक्यांत वाटणी करण्यात आली. नांदेड तालुक्यातील उत्तरेकडील खेडी परभणी जिल्ह्यातील कळमनुरी तालुक्यात समाविष्ट करण्यात आली आणि थोडासा इतर भाग हा हदगावव मुधोळ ता लुक्यात समाविष्ट करण्यात आला. कंधार तालुक्याचे मुख्यालय हे बरीच वर्षे मुखेड येथे होते.[११] अशा प्रकारे जिल्ह्याचे हदगाव, मुधोळ, बिलोली, देगलूर, कंधार आणि नांदेड असे सहा तालुके व विस्तृत पैगाह इस्टेट आणि जाहगीर यांचा जिल्ह्यामध्ये समावेश होता.

**जिल्ह्याचे उप-विभाग व अधिकारी वर्ग :** १. नांदेड आणि कंधार, २. देगलूर आणि बिलोलीव ३.मुधोळ आणि हदगाव अशा तीन उप-विभागांमध्ये त्यावेळी जिल्ह्याची विभागणी करण्यात आली होती. दुसऱ्या व तिसऱ्या उप-विभागातील प्रत्येक तालुक्यास दुसरा तालुकदार तर पहिल्या उप-वि भागातील तालुक्यास तिसरा तालुकदार असून पहिला तालुकदार हा त्याच्या हाताखालील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कामावर सर्वसाधारणपणे पर्यवेक्षण ठेवत असे. त्यावेळी प्रत्येक तालुक्यास एक तहसीलदार होता मात्र नांदेड तालुक्यास एक नायब (उप) तहसीलदार-सुद्धा होता.[१२] त्यानंतर म्हणजे १९०६ ते १९४८ पर्यंत जिल्ह्याच्या किंवा तालुक्याच्या सीमांमध्ये मोठे बदल झाले नाहीत.

१९४९ साली सर्फ-इ-खास (विलीनीकरण) विनिमयानुसार खडका किंवा मुक्रमाबाद येथे मुख्या लय असलेला सर्फ-इ-खास तालुका सरकारने आपल्या ताब्यात घेतला. जिल्ह्यातील इतर सर्व जहागिरीसुद्धा नाहीशा करण्यात आल्या आणि त्या जहागिरी सरकारी प्रशासनाने त्याच वर्षात हैद्राबाद (जहागिरीच्या खालसा) विनिमयानुसार ताब्यात घेतल्या. सर्फ-इ-खास आणि जहागिरींचे विलीनीकरण केल्यानंतर तालुके व महाल यांच्या सीमांच्या पुनर्रचनेचे काम इ.स.१९४९-५० मध्ये पार पडले. दोन न वीन महाल निर्माण करून त्यापैकी एकाचे मुख्यालय मुखेड येथे आणि दुसऱ्याचे भोकर येथे ठेवण्यात आले.

१९५६ मध्ये राज्य पुनर्रचना करण्यात आल्यावर ह्या जिल्ह्याचा समावेश हैद्राबाद राज्यातून मुंबई राज्यात करण्यात आला. अदिलाबाद जिल्ह्यातील किनवट आणि राजुरा तालुके व इस्लामपूर ता लुक्यांचे महसूल निरीक्षक मंडळ १ नोव्हेंबर १९५६ रोजी नांदेड जिल्ह्यामध्ये समाविष्ट करण्यात

---

१०. **इम्पीरिअल गॅझेटिअर ऑफ इंडिया,** प्रॉव्हिन्शल सीरीज, हैद्राबाद स्टेट, (कलकत्ता, १९०९), पृ. २२३-२२५.

११. **जिल्हा जनगणना निर्देशग्रंथ,** नांदेड (१९६१), पृ. २.

१२. कित्ता, १९०९, पृ. २२६, २२८.

आले. देगलूर तालुक्याची बिचकौंदा आणि जुकल ही दोन महसूल मंडळे व मुधोळ तालुक्यातील तीन महसूल मंडळे आंध्रप्रदेशाच्या अदिलाबाद आणि निजामाबाद जिल्ह्यांकडे हस्तांतरित करण्यातआली. पूर्वीच्या मुधोळ तालुक्यातील उरलेल्या धर्माबाद महसूल मंडळाचा बिलोली तालुक्यात समावेश करण्यात आला. इस्लामपूर महसूल मंडळ किनवट तालुक्यात समाविष्ट करण्यात आले. जिल्हा मुख्यालयापासून ४८२.८०३ कि.मी. (३०० मैल) दूर असलेला राजुरा तालुका १ एप्रिल १९५९ ला चांदा जिल्ह्यात समाविष्ट करण्यात आला. १ मे १९६० पासून हा जिल्हा महाराष्ट्राचा एक भाग झाला.

१९६१ च्या जनगणना निर्देशग्रंथानुसार नांदेड जिल्ह्यात ६ तालुके व दोन महाल होते. एकूण जिल्ह्याचे क्षेत्र १०३३३.३२३ चौ.कि.मी.होते. हा जिल्हा त्यावेळी दोन उप-विभागात खालीलप्रमाणे विभागला गेला होता.

| | क्षेत्र (चौ.कि.मी.) | लोकसंख्या (१९६१) |
|---|---|---|
| **अ) नांदेड उप विभाग** | | |
| १. नांदेड तालुका | १,०२२.७९१ | १,९६,३०७ |
| २. हदगाव तालुका | १,५५६.५९० | १,३७,२३६ |
| ३. किनवट तालुका | २,०७६.९२१ | १,१७,१३७ |
| ४. भोकर महाल | १,०३४.४४६ | ८८,१३७ |
| **ब) देगलूर उप विभाग** | | |
| १. देगलूर तालुका | ६७८.५८० | ८९,९१३ |
| २. बिलोली तालुका | १,४५९.४६५ | १,७६,०५५ |
| ३. कंधार तालुका | १,६२९.३६९ | १,७३,४१२ |
| ४. मुखेड महाल | ८७५.१६१ | १,०१,४७७ |
| एकूण . . | १०,३३३.३२३ | १०७९,६७४ |

भोकर व मुखेड महालांची १९७१ च्या नांदेड जिल्हा जनगणना निर्देशग्रंथामध्ये तालुक्यांमध्ये श्रेणीवाढ करण्यात आली. अशा प्रकारे नांदेड जिल्ह्याचे एकूण ८ तालुके निर्माण झाले. इ.स.१९९९ पर्यंत या तालुक्यांमध्ये विशेष बदल झाल्याचे दिसून येत नाही. मात्र १४.८.१९९२ ते ३०.१२.१९९९ दरम्यान या तालुक्यांमध्ये आमुलाग्र बदल घडून या जुन्या ८ तालुक्यांमधील गावांची अदलाबदल करून नवीन ८ तालुके खालीलप्रमाणे निर्माण करण्यात आले.

**(१) लोहा :** महसूल व वन विभागाच्या दिनांक १४ ऑगस्ट १९९२ च्या अधिसूचने (असा क्र. १६६) नुसार दिनांक १५ ऑगस्ट १९९२ पासून कंधार तालुक्याची पुनर्रचना करून त्याचे मुख्यालय लोहा येथे असेल अशा लोहा या नावाने ओळखल्या जाणाऱ्या एका अतिरिक्त नवीन तालुक्याची

रचना करून सदर नवीन तालुका त्यावेळी अस्तित्वात असलेल्या नांदेड या उप-विभागाच्या कार्यक्षेत्रात ठेवण्यात आला. त्यावेळी कंधारमध्ये १२६ तर लोह्यामध्येसुद्धा १२६ गावांचा समावेश होता.

**(२) हिमायतनगर :** महसूल व वन विभागाच्या २३ जून १९९९ च्या अधिसूचने (असा क्र.१९१) नुसार दिनांक २६ जून १९९९ पासून नांदेड जिल्ह्यातील हदगाव या तालुक्याची पुनर्रचना करून हिमायतनगर या नावाने ओळखल्या जाणाऱ्या एका अतिरिक्त नवीन तालुक्याची रचना करण्यातआली व उक्त नवीन तालुका त्यावेळी अस्तित्वात असलेल्या किनवट या महसूल उप-विभागाच्या कार्यक्षेत्रात ठेवण्यात आला. त्यावेळी हदगावमध्ये १४१ तर हिमायतनगरमध्ये ६४ गावे होती.

**(३) माहूर :** महसूल व वन विभागाच्या २३ जून १९९९ च्या अधिसूचने (असा क्र.१९४) नुसार दिनांक २६ जून १९९९ पासून नांदेड जिल्ह्यातील किनवट या तालुक्याची पुनर्रचना करून माहूर या ना वाने ओळखल्या जाणाऱ्या एका अतिरिक्त नवीन तालुक्याची रचना करण्यात आली व उक्त नवीन तालुका त्यावेळी अस्तित्वात असलेल्या किनवट या महसूल उप-विभागाच्या कार्यक्षेत्रात ठेवण्यात आ ला. त्यावेळी किनवटमध्ये १९१ तर माहूरमध्ये ९२ गावे होती.

**(४) मुदखेड :** महसूल व वन विभागाच्या २३ जून १९९९ च्या अधिसूचने (असा क्र.१९५) नुसार दिनांक २६ जून १९९९ पासून नांदेड या तालुक्याची पुनर्रचना करून मुदखेड या नावानेओळख ल्या जाणाऱ्या एका अतिरिक्त नवीन तालुक्याची रचना करण्यात आली व उक्त नवीन तालुका त्या वेळी अस्तित्वात असलेल्या नांदेड या महसूल उप-विभागाच्या कार्यक्षेत्रात ठेवण्यात आला. त्यावेळी नांदेडमध्ये १५३ तर मुदखेडमध्ये ६१ गावे होती.

**(५) उमरी :** महसूल व वन विभागाच्या २३ जून १९९९ च्या अधिसूचने (असा क्र.१९७) नुसार दिनांक २६ जून १९९९ पासून नांदेड जिल्ह्यातील भोकर या तालुक्याची पुनर्रचना करून उमरी या ना वाने ओळखल्या जाणाऱ्या एका अतिरिक्त नवीन तालुक्याची रचना करण्यात आली व उक्त नवीन तालुका त्यावेळी अस्तित्वात असलेल्या नांदेड या महसूल उप-विभागाच्या कार्यक्षेत्रात ठेवण्यातआला. त्यावेळी भोकरमध्ये ७७ तर उमरीमध्ये ६२ गावे होती.

**(६) धर्माबाद :** महसूल व वन विभागाच्या २३ जून १९९९ च्या अधिसूचने (असा क्र.१९९) नुसार दिनांक २६ जून १९९९ पासून नांदेड जिल्ह्यातील बिलोली या तालुक्याची पुनर्रचना करून धर्मा बाद या नावाने ओळखल्या जाणाऱ्या एका अतिरिक्त नवीन तालुक्याची रचना करण्यात आलीव उक्त नवीन तालुका त्यावेळी अस्तित्वात असलेल्या देगलूर या महसूल उप-विभागाच्या कार्यक्षेत्रात ठेवण्यात आला. त्यावेळी बिलोलीमध्ये १७९ तर धर्माबादमध्ये ५६ गावांचा समावेश होता.

**(७) अर्धापूर :** महसूल व वन विभागाच्या २९ डिसेंबर १९९९ च्या अधिसूचने (असा. क्र.३७९) नुसार दिनांक ३० डिसेंबर १९९९ पासून नांदेड आणि मुदखेड या तालुक्यांची पुनर्रचना करून अर्धापूर या नावाने ओळखला जाणारा एक अतिरिक्त नवीन तालुका नांदेड या उप-विभागाच्या कार्यक्षेत्राखाली निर्माण करण्यात आला. त्यावेळी नांदेडमध्ये १०४, मुदखेडमध्ये ५५ तर अर्धापूरमध्ये ५६ गावे विभागण्यात आली.

**(८) नायगाव (खैरगाव) :** महसूल व वन विभागाच्या २९ डिसेंबर १९९९ च्या अधिसूचने (असा. क्र.३८०) नुसार दिनांक ३० डिसेंबर १९९९ पासून बिलोली तालुक्याची पुनर्रचना करून त्याचे मुख्यालय नायगाव येथे असेल अशा नायगाव (खैरगाव) या नावाने ओळखल्या जाणाऱ्या एका अतिरिक्त नवीन तालुक्याची रचना करून सदर नवीन तालुका त्यावेळी अस्तित्वात असलेल्या देगलूर या उप-विभागाच्या कार्यक्षेत्रात ठेवण्यात आला. त्यावेळी बिलोलीमध्ये ९१ तर नायगाव (खैरगाव) मध्ये ८८ गावांचा समावेश होता.

अशा प्रकारे नांदेड जिल्ह्यात सध्या १६ तालुके असून २००१ च्या जनगणना निर्देशग्रंथानुसार प्रत्येक तालुक्यातील गावांची संख्या खालीलप्रमाणे आहे :—

| अ.क्र. | तालुका | गावे | अ.क्र. | तालुका | गावे |
|---|---|---|---|---|---|
| १ | नांदेड | ९० | ९ | उमरी | ६६ |
| २ | मुदखेड | ५३ | १० | देगलूर | ११५ |
| ३ | अर्धापूर | ५६ | ११ | बिलोली | ८९ |
| ४ | हदगाव | १५४ | १२ | नायगाव | ९० |
| ५ | हिमायतनगर | ७३ | १३ | धर्माबाद | ५४ |
| ६ | किनवट | १९० | १४ | कंधार | १२७ |
| ७ | माहूर | ९३ | १५ | मुखेड | १५१ |
| ८ | भोकर | ८३ | १६ | लोहा | १२५ |

**विभागीय आयुक्त :** महाराष्ट्र राज्याचे एकंदर सहा प्रशासकीय विभाग असून नांदेड जिल्ह्याचा अंतर्भाव औरंगाबाद विभागात आहे. औरंगाबाद विभागात औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, बीड, नांदेड, उस्मानाबाद व लातूर या मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांचा समावेश आहे. औरंगाबाद येथे मुख्यालय असलेल्या औरंगाबाद विभागाच्या प्रशासकीय कामकाजाची अंमलबजावणी करण्यासाठी विभागीय आयुक्ताची नेमणूक केली आहे.*

स्वातंत्र्योत्तर काळात विकास कामांचा, विशेषतः आर्थिक विकास, जमीन सुधारणा, आणि सामाजिक विकास यांचा वाढता वेग आणि शासनाच्या प्रशासनासंबंधीच्या इतर गरजा लक्षात घेता पर्यवेक्षण, समन्वय आणि तपासणी या कामासाठी उच्च दर्जा आणि अधिकार असलेली यंत्रणा विभागाच्या मुख्य ठिकाणी निर्माण करण्याची गरज भासू लागली. त्यामुळे विभागीय अधिकाऱ्याच्या जागी आयुक्ताची नेमणूक करण्याची शासनास जरुरी वाटली. ही गरज ध्यानात घेऊन मुंबई विभागीय आयुक्त कायदा, १९५७ मध्ये करण्यात आला आणि विकास, जमीनसुधारणा आणि इतर प्रशासकीयबाबीसंबंधी त्यांच्या विभागापुरते व्यापक अधिकार आयुक्तांना देण्यात आले.

*. नव्याने नांदेड येथे आयुक्त कार्यालय निर्माण करण्याविषयी प्रयत्न सुरू आहेत.

Maharashtra State Gazetteers

आयुक्त हा विभागाचा मुख्य अधिकारी असून जमीन महसूल संहिता आणि नियम, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियम, भूनिर्धारण अधिनियम, कायदा व सुव्यवस्था, अन्न व नागरी पुरवठा, अल्पबचत आणि इतर प्रशासकीय बाबींचे नियंत्रण करणारा मुख्य अधिकारी आहे. शासनाच्या नियमांची व धोरणांची अंमलबजावणी करण्याच्या कामी त्यास सहायक आयुक्त, नगर रचनाकार, उप संचालक, अल्पबचत, इत्यादी अधिकाऱ्यांचे व कर्मचाऱ्यांचे साहाय्य मिळते.

सध्या लोकाभिमुख राज्यकारभार आणि जिल्हा पातळीवर नियोजनावर विशेष भर देण्यात येत असल्यामुळे विभागीय आयुक्ताचे अधिकार व कार्यक्षेत्रे यांना महत्त्व प्राप्त झाले आहे. विभागीय आयुक्त प्रशासकीय विभागाच्या जमीन महसूल आणि प्रशासकीय कारभाराचे नियंत्रण करतो. तो राज्य पातळीवरील सचिव आणि जिल्हा पातळीवरील जिल्हाधिकारी यामधील दुवा साधण्याचे काम करतो. त्याला त्यासंबंधीची अनेक कर्तव्ये पार पाडावी लागतात. आयुक्तांना उप विभागाच्या सीमा बदलणे, सार्वजनिक रस्ते व मार्ग ह्या संबंधीचे आदेश मंजूर करणे, कराच्या आकारणीत बदल करणे व पुनर्मूल्यनिर्धारण करणे, नगरपालिका व शासनामधील जमिनीचे वाद मिटविणे, दुष्काळ निवारण कामांचे अग्रक्रम ठरविणे, टंचाई व दुष्काळग्रस्त भागाची पाहणी करणे, विभागातील सर्व महसूल अधिकाऱ्यांवर देखरेख व नियंत्रण, महसूल कार्यालये, जिल्हा परिषद व पंचायत समित्यांची तपासणी आणि विकास कार्याचे संदर्भात जिल्ह्यातील विभागप्रमुखांच्या कार्यावर देखरेख व त्यामध्ये समन्वय करण्याची कामे करावी लागतात. विभागीय प्रशासक या नात्याने शासनाने आयुक्ताला महत्त्वाचे अधिकार प्रदान केलेले आहेत.

**जिल्हाधिकारी :** निजाम राजवटीत राज्यकारभार सुकर करण्याच्या हेतूने प्रशासकीय कारभाराच्या सोयीकरिता जिल्ह्यांची आखणी करण्यात आल्यानंतर प्रत्येक जिल्ह्यासाठी प्रथम तालुकदाराची १९०५ मध्ये नियुक्ती करण्यात आली होती.[१३] त्यावेळी त्यांना महसूल आणि न्यायविषयक अशी दोन्ही प्रकारची कामे करावी लागत. हे पद जिल्हाधिकाऱ्याच्या दर्जाचे होते. तसेच जिल्ह्यात शांतता व सुव्यवस्था राखण्याची त्याचेवर संपूर्ण जबाबदारी होती. भारतीय संघराज्यात हैद्राबाद संस्थान १९४८ मध्ये पोलीस कारवाईनंतर विलीन करण्यात आले. राज्य पुनर्रचनेनंतर १९५६ मध्ये नांदेड जिल्हा भूतपूर्व मुंबई राज्यात समाविष्ट करण्यात आला. पुढे दिनांक १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्य निर्मिती झाल्यावर हा जिल्हा महाराष्ट्राचा अविभाज्य भाग बनला.

Maharashtra State Gazetteers

भारत देश इंग्रजांच्या अमलाखाली असताना जिल्हाधिकाऱ्याचे पद १८७२ मध्ये अस्तित्वातआले. बंगालचे नायब राज्यपाल सर जॉर्ज कॅम्पबेल याने बंगालमधील जिल्ह्याच्या कारभाराकरिता "कलेक्टर" ची नेमणूक प्रथमच केली होती.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतीय संघराज्यात लोकनियुक्त राज्ये अस्तित्वात आली. तेव्हा त्यांनी सत्तेचे विकेंद्रीकरण करून प्रशासन लोकाभिमुख करण्याच्या दृष्टीने सुरूवात केली. त्यामुळे जिल्हा प्रशासनाचे प्रमुख स्थान असलेल्या जिल्हाधिकाऱ्याच्या अधिकारक्षेत्रात बरीच वाढ झाली. परंतु स्थानिक स्वराज्य संस्थांच्या उदयाने जिल्हाधिकाऱ्याच्या अधिकारक्षेत्रावर मर्यादा पडत गेल्या व त्याचे

१३. **इम्पीरीअल गॅझेटिअर ऑफ इंडिया,** प्रॉव्हिन्शल सीरीज, हैद्राबाद स्टेट, (कलकत्ता, १९०९), पृ. ५१.

अधिकार बऱ्याच बाबतीत कमी झाले. जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि नगर परिषदा, ह्या संस्था आपल्या अधिकार क्षेत्रात विकासाची कामे राबवीत असल्यामुळे जिल्हाधिकाऱ्याच्याअधिकारावर आपोआप बंधने आली. तरीही जिल्हा प्रशासनात शासनाचा प्रतिनिधी म्हणून जिल्हाधिकाऱ्याचे महत्त्वाचे स्थान टिकून आहे. जिल्ह्यातील महसूलविषयक व इतर प्रशासकीय महत्त्वाची कामे, शांतता व सुव्यवस्था राखणे व लोकांच्या हितसंबंधांची जपणूक करणे यांची संपूर्ण जबाबदारी जिल्हाधिकाऱ्यावरच असते. उदाहरणार्थ, पूर, दुष्काळ आदि नैसर्गिक आपत्ती किंवा दंगेधोपे झाल्यास प्रत्यक्ष चौकशी करून त्याचा अहवाल शासनाला सादर करावा लागतो व त्यावर योग्य ती कारवाई त्यालाच करावी लागते.

स्वातंत्र्यानंतर देशाचा संतुलित विकास आणि उपलब्ध साधनसंपदा यांची नव्याने जडणघडण करून नवीन विकासाच्या दिशेने पाऊल टाकण्यासाठी समयबद्ध राष्ट्रीय कार्यक्रम आखण्यासाठी राष्ट्रीय पातळीवर नियोजन मंडळाची स्थापना करण्यात आली. राष्ट्रीय नियोजन मंडळाने देशाचा सर्वांगीण विकास आणि समाजवादी समाजरचनेचे स्वप्न साकार करण्याच्यादृष्टीने निश्चित कार्यक्रम पार पाडण्यासाठी १९५०-५१ पासून पंचवार्षिक योजनांची मुहूर्तमेढ रोवली. आर्थिक समस्या प्रादेशिक पातळीवरून सोडविणे आणि योजनांतर्गत कार्यक्रम लोकाभिमुख करण्यासाठी जिल्हा नियोजनाची कल्पना महाराष्ट्रात १९७२ पासून साकार झाली. विकासयोजनांची आखणी व अंमलबजावणी करण्याच्यादृष्टीने जिल्हा नियोजन हे शासनाने उचललेले एक क्रांतिकारक पाऊल होते. जिल्ह्याचा पालकमंत्री या नियोजन मंडळाचा अध्यक्ष असतो. त्याशिवाय काही लोकप्रतिनिधी असतात. त्यामुळे विकास कार्यात जनतेचा सहभाग साधला जातो. प्रत्यक्ष विकास योजनांची आखणी व अंमलबजावणीचे महत्त्वाचे कार्य जिल्ह्याचा प्रमुख या नात्याने जिल्हाधिकाऱ्यास पार पाडावे लागते.

जिल्ह्यातील विविध शासकीय विभागांच्या कार्याचे एकसूत्रीकरण करून विकास योजनांच्या कामात एकजिनसीपणा आणणे महत्त्वाचे असते. त्या संदर्भात योजनांचा आराखडा तयार करणे, त्याची कार्यवाही करणे, यासाठी प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा स्तरावर एका समन्वय समितीची नेमणूक करण्यात आली आहे. जिल्हाधिकाऱ्याच्या मार्गदर्शनाखाली अनेक शासकीय विभागांमार्फत जिल्ह्यात विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येतात.

जिल्हाधिकाऱ्याचा संबंध मुख्यतः जमीन आणि जमीन महसूल संबंधित बाबींशी असला तरीअशा बऱ्याचशा बाबी आहेत की, ज्या जमीन आणि जमीन महसूल यांच्या कक्षेतील नाहीत. परंतु जिल्हाधिकाऱ्याला मात्र त्याबाबत कार्ये करावी लागतात. ऐतिहासिकदृष्ट्या जिल्हाधिकाऱ्याचे कार्य जिल्ह्यातील महसूल व्यवस्था व जमीन महसूल वसुलीचे कामाभोवती केंद्रित झाले होते. परंतु नंतरच्या काळातील घडामोडींमुळे अनेक प्रकारची कामे त्याच्याकडे सोपविण्यात आली. यामध्ये निवडणुका, दुष्काळ निवारण, शिधावाटप, पुनर्वसन, अल्पबचत, जिल्हा नियोजन, रोजगार हमी इत्यादी बहुविध कामांचा समावेश होतो.

परंपरागतदृष्ट्या जिल्हाधिकारी हा शासनाचा मुख्य प्रशासनिक अधिकारी समजला जातो. खरे पाहता, जिल्हा पोलीस प्रमुख व अन्य विविध खात्यांचे प्रमुख हे जिल्हाधिकाऱ्याप्रमाणे स्वतःच्या

Maharashtra State Gazetteers

विभागाचे प्रमुख असतात. पण त्या सगळ्यांवर जिल्हाधिकारी असतो. जरी जिल्हाधिकारी हा त्यांचा प्रमुख नसला, तरी तो जिल्हा प्रशासकीय शासनाचा संपर्काधिकारी या नात्याने कुटुंबातील मुख्य असतो, असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. जिल्हाधिकाऱ्याला निरनिराळ्या अधिनियमांची अंमलबजावणी करण्याकरिता अधिकार दिलेले आहेत. जिल्हाधिकारी निरनिराळ्या समित्यांच्या अध्यक्षपदावर असतो. त्याच्या काही महत्त्वाच्या कामांबाबत खाली माहिती दिली आहे.

**महसूल :** हैद्राबाद जमीन महसूल कायद्यानुसार (१३१७ फसली) महसुलासंबंधी विस्तृतअधिकार जिल्हाधिकाऱ्यास दिलेले आहेत. तो शासकीय मालमत्तेचा परिरक्षक असतो. कृषियोग्य व इतर जमिनी वर आकारलेला महसूल वसूल करण्याचे महत्त्वाचे काम जिल्हाधिकारी कार्यालयाला पार पाडावे लागते. जमिनीच्या उत्पादनानुसार महसुलाचे दर आकारले जातात. फक्त जमीन महसूल संहितेच्या कलम ४५ नुसार स्पष्टपणे सूट देणारे विशेष करार करण्यात आलेले असल्यास महसूल भरण्यापासून सूट देण्यात येते. जमीन महसूल तीन प्रकारचा असतो. शेतजमिनीवरील आकारणी, बिगर-शेती आकारणी व किरकोळ महसूल. यामध्ये शेतसारा निश्चिती, वसुली व जमीन महसूलाचा जमा-खर्च ठेवणे या बाबी जिल्हाधिकाऱ्याच्या कर्तव्याशी निगडित असतात. दर तीस वर्षांनी तालुकावार महसुलाचे पुनर्निर्धारण केले जाते. भूमि-अभिलेख विभागाद्वारे जमिनीचे सर्व्हेक्षण आणि जमाबंदी केली जाते. दुष्काळग्रस्त किंवा टंचाई उद्‌भवलेल्या भागात एकंदर परिस्थितीचा विचार करून शेतसाऱ्यात सूट दिली जाते. काही वेळा त्या त्या वर्षीचा शेतसारा पूर्णपणे माफ केला जातो. हैद्राबाद जमीन महसूल कायद्याच्या ६१ व्या कलमानुसार बिगरकृषी जमिनीच्या महसुलाचे कृषियोग्य जमीन महसुलातबदल करण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यास आहेत. याकरिता हैद्राबाद जमीन महसूल कायद्यान्वये (१३१७ फसली) अनेक अधिकारांची जिल्हाधिकारी अंमलबजावणी करतो. १९६२ मध्ये जिल्हा परिषदेची स्थापना झाल्यानंतर शेतसारा वसूल करण्याचे जिल्हाधिकाऱ्याचे परंपरागत काम जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित करण्यात आले होते. परंतु प्रत्यक्ष कार्यवाहीचा अनुभव लक्षात घेऊन पुन्हा हे काम जिल्हाधिकाऱ्याकडे सोपविले गेले. उपरोक्त कामाशिवाय जिल्हाधिकारी कार्यालयाकडून भारतीय मुद्रांक अधिनियम, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, मुंबई दारुबंदी अधिनियम इ. अधिनियमांखाली कर आणि शुल्क गोळा केले जाते. वन कायद्यानुसार वन विभागाच्या प्रशासनाची जबाबदारीअप्रत्यक्षरीत्या जिल्हाधिकाऱ्याची असते. त्याला तांत्रिक बाबीमध्ये विभागीय वन अधिकारी मदत करतो. मुंबई दारुबंदी कायद्यानुसार मद्य वितरण दुकानांचे परवाने जिल्हाधिकाऱ्याकडून दिले जातात. तसेच दारुबंदीविषयक प्रचार करण्याकडे तो लक्ष देतो. नांदेडचे जिल्हाधिकारी हे जिल्हा दारुबंदी समितीचे अध्यक्ष आहेत. खरे पाहता, संचालक, दारुबंदी व उत्पादनशुल्क हे त्यांच्या विभागाचे धोरण जिल्हापातळीवर जिल्हाधिकाऱ्याच्या मार्फतच कार्यान्वित करतात.

**इनाम आणि जागीर :** पूर्वीच्या सरकारांनी जिल्ह्यातील काही जमिनींवरील महसुलात मोठ्या प्रमाणात सूट दिली होती व ती तशीच पुढे त्यांच्या वारसांच्या बाबतीतसुद्धा सुरू ठेवली. तसेच विविध अधिनियमांतर्गत रोख भत्त्याचेसुद्धा निश्चितीकरण करण्यात आले. ज्या शर्तींनुसार अशा प्रकारच्या जमिनींचे हस्तांतरण झाले होते त्याच साक्षेप शर्तीनुसार ते पुढे चालू ठेवून या जमिनी योग्य त्याच अधिकृत व्यक्तींकडे पुढे कायम ठेवण्यात आल्या आहेत हे पाहणेसुद्धा जिल्हाधिकाऱ्याचे कर्तव्यअसते. याबाबतीत राज्य शासनाने अशा प्रकारे देण्यात आलेल्या जमीन महसुलातील सवलती काढून

घेण्यासाठी एक योजना कार्यान्वित करून या सर्व सवलती काढून घेतल्या व सरसकट सर्व जमिनींवर महसूल आकारणे सुरू केले. १३५८ फसली या जाहगीर रद्द विनियमनाद्वारे १५ सप्टेंबर १९४९ पासून जाहगीर आणि सर्फ-इ-खास रद्द करण्यात आली. तसेच २० जुलै १९५५ पासून इनाम अधिनियमानुसार इनामसुद्धा रद्द करण्यात आले. या कायद्यांतर्गत काही धर्मादाय व धार्मिक संस्थांच्या मदतीसाठी व गा वाच्या सामूहिक विकासाच्या दृष्टीने देण्यात आलेल्या विविध इनाम जमिनी वगळून इतर सर्व इनाम जमिनी रद्द (नष्ट) करण्यात आल्या व अशा इनाम जमिनींच्या भोगवट्याचा अधिकार शासनानेआप ल्याकडे ठेवला.

इ.स. १९५९ मध्ये (१९५९ चा दुरुस्ती अधिनियम ख्ख्ख्ज नुसार) पुन्हा अधिनियमाची दुरुस्ती होऊन हा नियम २० जुलै १९६० ला अमलात आला. त्यानुसार वर उल्लेख केलेल्या काही इनाम जमिनी वगळून इतर सर्व इनाम जमिनी नष्ट करण्यात आल्या. सदर जमिनी ज्यांच्या ताब्यात होत्या अशा इनामदार व काबिजेकादीम कुळांना भोगवट्याचे अधिकार बहाल करण्यात आले. माश-ए-खिदमतआणि माश-ए-मदत पैकी पुढे माश-ए-खिदमत कायम ठेवण्यात आला. याच अधिनियमांतर्गत वंशपरंपरागत पटवारी वतनेसुद्धा १ जुलै १९६० पासून नष्ट करण्यात आली.

महाराष्ट्र महसूल पाटीलस् (ॲबॉलिशन ऑफ ऑफिस) अधिनियम, १९६२ (१९६२ चा ख्ख्व्वा) नुसार १ जानेवारी १९६३ पासून महसूल पाटील आणि पाटील वतने पद्धती संपुष्टात आली.

**सार्वजनिक उपयुक्तता :** कृषक कर्ज अधिनियम (१८८४ चा १२) आणि जमीन सुधारणा कर्ज अधिनियम (१८८३ चा १९) नुसार शेतकऱ्यांना शेतकामासाठी स्वस्त दरात कर्ज मंजूर केले जाते. शासननिर्धारित धोरणानुसार जिल्हाधिकाऱ्यास एखाद्या खराब हंगामामध्ये पूर्ण जिल्ह्याची पाहणी करून शेतकऱ्यांना आवश्यक असलेल्या कर्जाचा अंदाज करून तशी शासनाकडे अतिरिक्त मागणी करता येते. शेतकऱ्यांच्या मदतीसाठी त्यांचेकडे उपलब्ध असलेल्या निधीचे योग्य वितरण करून या कर्जाची नियमित वसुली होईल हे जिल्हाधिकाऱ्यास पाहावे लागते.

**लेखा :** जिल्हाधिकारी हा कोषागाराचा प्रमुख असून कोषागाराच्या सामान्य प्रशासनासाठी तो व्यक्तीशः जबाबदार असतो. यामध्ये जमा व वितरित रकमेचा हिशोब, कोषागार प्राप्तीची अचूकता आणि त्यामधील किमती वस्तूंची सुरक्षितता ठेवणे या प्रमुख जबाबदाऱ्या असतात. लेखा आणि लेखापरीक्षेच्या बाबतीत जिल्हाधिकारी (त्याच्या अधिकाराखालील कोषागार अधिकाऱ्यासह) महालेखापा लास जबाबदार असून महालेखापालाच्या सूचना त्याला पाळाव्या लागतात. कोषागाराच्या दैनंदिन कामकाजात तो भाग घेत नाही. मात्र त्या कामासाठी कोषागार अधिकारी हा त्याचा प्रतिनिधी म्हणून काम पाहतो.

**स्थानिक स्वराज्य संस्था :** अशी सर्व प्रकरणे ज्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कामकाजावर परिणाम करणारे आदेश पारित करण्याचे अधिकार संचालक, नगर परिषद प्रशासन, मुंबई किंवा शासनाकडे असतात. हे सर्व प्रस्ताव जिल्हाधिकारी तयार करतो किंवा जिल्हाधिकाऱ्याच्याअभिप्रायासह संचालक, स्थानिक प्राधिकरण, प्राप्त करून घेतो. तथापि, अशा अनेक बाबी असतात

ज्यामध्ये जिल्हाधिकारी स्वतः अंतिम आदेश देवू शकतो. स्थानिक संस्थांवर नियंत्रण ठेवणाऱ्या विविध अधिनियमांच्या कलमांनुसार शासनाचा प्रमुख प्रतिनिधी म्हणून स्थानिक संस्थांच्या कार्यावर पर्यवेक्षण करण्याचा प्राधिकार जिल्हाधिकाऱ्यास दिलेला आहे.

**नगरपरिषद :** जिल्हाधिकारी घटना निर्धारित करून नगरपरिषदेचे सदस्य, अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची निवडणूक घेतात. हैद्राबाद डिस्ट्रिक्ट म्युन्सिपालिटीज ॲक्ट १९५६ च्या कलम २६५ व २६६ अंतर्गत, नगरपरिषदा किंवा शहर समित्यांच्या निर्णयाविरुद्धची अपिले जिल्हाधिकाऱ्यास ऐकून घ्यावी लागतात. याच अधिनियमाच्या कलम २५२ नुसार त्याला नगरपरिषदांवर पर्यवेक्षण करण्याचे अधिकार आहेत.

**जिल्हा परिषद आणि पंचायत समित्या :** महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांबाबतचा कायदा (१९६१) दिनांक १ मे १९६२ पासून अंमलात आला. त्यापूर्वी नांदेड जिल्ह्यात १९५५ सालच्या हैद्राबाद जिल्हा मंडळ अधिनियमाचा अंमल होता. जिल्हा परिषदेचे सदस्य, अध्यक्षआणि उपाध्यक्ष, तसेच पंचायत समित्यांचे सदस्य आणि सभापती यांच्या निवडणुका जिल्हाधिकाऱ्याच्या देखरेखीखाली होतात. तसेच या अधिनियमाच्या कलम २६६ नुसार जिल्हा परिषदेच्या कामकाजाबाबत माहिती मागविण्याचेसुद्धा त्याला अधिकार आहेत. जिल्हा परिषदेने संमत केलेले ठराव जर सार्वजनिक हिताच्यादृष्टीने हानीकारक किंवा शांतता व सुव्यवस्थेस धोका निर्माण करणारे असतील तर जिल्हाधिकारी ते रद्दबातल करू शकतो. जिल्ह्यात गंभीर परिस्थिती निर्माण झाल्यास जिल्हाधिकारी जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांना सार्वजनिक आरोग्याचे संरक्षण करण्यासाठी वा इतर अन्य कामासाठी कार्यवाही करण्याचे आदेश देतो.

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ नुसार जिल्हाधिकाऱ्यास ग्रामपंचायतीचे एकूण सभासद ठरविणे, सरपंच व उप सरपंच यांच्या निवडणूका घेणे याबाबतची कार्यवाही करावी लागते. तसेच ग्रामपंचायत सदस्यांना निवडणूक लढविण्याकरिता किंवा सदस्यत्व चालू राहण्याकरिता पात्रता ठरविणे, निवडणुकीची वैधता, सरपंच व उप सरपंच यांची निवडणूक, अविश्वासाचे ठराव इत्यादी बाबींची जबाबदारी त्याचेवर असते.

**जिल्हा दंडाधिकारी :** जिल्हा दंडाधिकारी म्हणून जिल्हाधिकाऱ्याची बहुतांश कर्तव्ये कार्यकारी स्वरूपाची असतात. भारतीय दंडविधान व फौजदारी कार्यप्रणाली संहिता यानुसार त्याला अनेकअधिकार असतात. तो जिल्ह्यातील इतर सर्व कार्यकारी दंडाधिकाऱ्यांचा प्रमुख असतो. शांतता व सुव्यवस्था तसेच कायद्याचे अधिराज्य टिकविण्यासाठी त्याला अनेक कर्तव्ये पार पाडावी लागतात. इतर अधिकारांसमवेत तो खालील अधिकारांचा वापर करतो.

(१) शांतता व चांगली वागणूक यांच्या संरक्षणार्थ देण्यात आलेल्या आदेशांवरील अपिले ऐकून घेण्याचा अधिकार (कलम ४०६. फौजदारी प्रक्रिया संहिता) ;

(२) कोणत्याही दुय्यम कार्यकारी दंडाधिकाऱ्यांकडून अभिलेख मागविण्याचा अधिकार (कलम ४३६) ;

(३) साक्षीदारांची तपासणी करण्याकरिता राजादेश जारी करण्याचा अधिकार (कलम ५०३आणि ५०६) ;

(४) दुय्यम कार्यकारी दंडाधिकाऱ्यांकडून आलेल्या अपिलांची सुनावणी करून सुधारित आदेश मंजूर करण्याचा अधिकार (कलम ५१४), तसेच बंधपत्राची समपहरण प्रक्रिया (कलम ५१५).

जिल्हा दंडाधिकारी नांदेड हा नांदेड मध्यवर्ती कारागृहाच्या अभ्यागत मंडळाचा अध्यक्ष असून जिल्ह्यातील इतर उप-कारागृहांची कार्यकारी व्यवस्थापने त्याच्या आदेशाचे पालन करतात. जिल्ह्यातील पोलीस दलावरील नियंत्रणाव्यतिरिक्त जिल्हा दंडाधिकाऱ्यास फौजदारी प्रक्रिया संहिता, १९५१ चा २२वा बॉम्बे पोलीस अधिनियम आणि इतर अधिनियमांतर्गत कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी व्यापक अधिकार प्रदान केलेले आहेत. पोलीस स्टेशन आणि पोलीस चौक्यांमधील कागदपत्रे तपासून गुन्हेगारी विहित मर्यादा क्षमतेत असून पोलिसात नोंद झालेली प्रकरणे कार्यतत्परतेने निकाली काढण्यात आलेली आहेत याची खातरजमा करणे हा त्याच्या कर्तव्याचा भाग असतो. शस्त्रे अधिनियम (१८७८ चा ४), पेट्रोलियम अधिनियम (१८९९ चा ७), स्फोटके अधिनियम (१८८४ चा ४) आणि विष (घृत्व्यदृद्य) अधिनियम (१९०४ चा १) या अधिनियमांतर्गत जिल्हा दंडाधिकाऱ्यास त्याच्या कार्यकारी क्षमतेमध्ये अनुज्ञप्ती व परवाने निर्गमित करावे लागतात. या अधिनियमांच्या सामान्य प्रशासनावर पर्यवेक्षण करून कारखाने व शस्त्रागारांचे निरीक्षण करणे आणि इतर विविध पर्यवेक्षी कार्ये त्याला पार पाडावी लागतात.

**प्रांत अधिकारी :** जिल्हाधिकाऱ्याच्या अधिकाराखाली प्रत्येक उप विभागाच्या प्रशासनिक कारभारासाठी उप विभागीय अधिकारी किंवा प्रांत अधिकारी असतात. त्यांना उप-जिल्हा दंडाधिकारी म्हणून सुद्धा ओळखले जाते. नांदेड जिल्ह्यात सध्या असे तीन उप-विभाग निर्माण करण्यात आलेअसून त्यांची मुख्यालये नांदेड, देगलूर व किनवट येथे आहेत. या प्रत्येक उप विभागाचा प्रमुख प्रांतअधिकारी असून त्याच्यामार्फत त्या-त्या विभागाचा कारभार चालविला जातो. याशिवाय जिल्हाधिकाऱ्यास दैनंदिन कामकाजात मदत करण्यासाठी निवासी उपजिल्हाधिकारी असतो. नियोजन व विकासाच्या कार्यक्रमात वाढ झाल्यामुळे शासनाच्या कामाची व्याप्ती वाढली असून उपजिल्हाधिकाऱ्याच्या कामात विलक्षण वाढ झाली आहे. उप विभागीय किंवा प्रांत अधिकारी हा तहसीलदार आणि जिल्हाधिकारी यामधील दुवा समजला जातो. हा अधिकारी जिल्हाधिकाऱ्याच्या मार्गदर्शनानुसार शासकीय आदेशाबरहुकूम कार्यवाही करतो. उप विभागीय अधिकाऱ्यांचे कार्यक्षेत्र त्यांच्या उप विभागापुरते मर्यादित असते.

प्रांत अधिकारी हा तहसीलदार, मंडळ निरीक्षक आणि ग्राम अधिकारी यांच्या कामावर नियंत्रण ठेवून सर्व प्रकारच्या कामावर देखरेख ठेवतो. सरकारी जमिनीची निगा राखण्याचे तसेच अतिक्रमण क रून कायद्याचा भंग करणाऱ्यावर कायदेशीर कारवाई करण्याचे काम त्याला करावे लागते. तहसी लदाराच्या निर्णयाविरुद्धच्या अपिलांची सुनावणी करून सरकारी हुकूमनाम्याच्या कार्यवाहीबाबत महत्त्वाची कामे करावी लागतात. पीक पाहणी, आणेवारीची तपासणी, पिकांच्या उत्पन्नाचे लक्ष निर्धारण, जमीन महसुलात सूट व निलंबन, अधिकार अभिलेखांची चौकशी, सरकारी महसुलाची देखभाल, संपत्तीचे उत्तराधिकार, भूसंपादन, जमिनीची कमाल मर्यादा ठरविणे इत्यादी कामे प्रांतअधिकाऱ्यास करावी लागतात.

प्रांत अधिकारी हा उप विभागीय दंडाधिकारीही समजला जातो. तालुका दंडाधिकाऱ्याचे स र्वसाधारण अधिकार त्याला असतात. तसेच शांतता आणि सुव्यवस्था राखण्यासाठीही अधिकार प्रदान केलेले आहेत. सार्वजनिक शांतता राखण्याकरिता आदेश देण्याचे काम त्याला करावे लागते. उदाहरणार्थ फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १४४ प्रमाणे पाचपेक्षा जास्त लोक एकत्र येऊ नयेत ही घोषणा करण्याचा त्याला अधिकार आहे. याशिवाय उप विभागीय अधिकाऱ्यांना त्यांच्या उप विभागासं बंधीची जिल्हाधिकाऱ्यास केवळ महसुलाचीच नव्हे तर कायदा व सुव्यवस्थेबाबतच्या परिस्थितीची जाणीव करून द्यावी लागते. त्याशिवाय जंगल वसाहतीची व तगाई कर्जासंबंधीची कामे करावी लागतात.

**तहसीलदार व नायब तहसीलदार :** तहसीलदार हा तालुक्याचा कार्यकारी प्रभारी अधिकारी तर नायब तहसीलदार हा महालाचा कार्यकारी प्रभारी अधिकारी असे. सध्या जिल्ह्यामध्ये महालअस्तित्वात नसल्याने प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी तहसीलदार हेच पद अस्तित्वात आहे. तहसीलदाराच्या मदतीस लिपिक (अव्वल कारकून) व त्याचे सहायक असतात तर क्षेत्रकार्यामध्ये त्याच्या मदतीस मंडल अधिकारी व मंडल निरीक्षक असतात. नांदेड जिल्ह्यात १६ तालुके असून प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी तहसीलदार असून तो उप विभागीय अधिकारी आणि जिल्हाधिकाऱ्यास महसुलासंबंधी मूलभूत स्वरू पाची मदत करतो.

तहसीलदारांना जमीन महसुलाव्यतिरिक्त तगाई कर्ज, विक्रीकर, उत्पन्न कर, उत्पादन शुल्क व इतर सरकारी महसुलाची वसुली करण्याची कामे करावी लागतात. शेतीसाठी तगाई कर्जे मंजूर करून वितरण करणे ही एक महत्त्वाची बाब स्वातंत्र्यानंतरच्या काळात तहसीलदाराकडे सोपविण्यात आली आहे. तगाईच्या बाबतीत शासनाने अलिकडे प्रागतिक धोरणांचा अवलंब केलेला आहे. अधिकाधिक शेतकऱ्यांना तगाईचा लाभ मिळवून देण्याचा प्रयत्न करण्यात येतो. तसेच तगाईची थकबाकी वसूल करण्याची कामे त्यालाच करावी लागतात.

तहसीलदारास काही न्यायिक कामे करावी लागतात. त्यात मामलेदार न्यायालय अधिनियम (१९०६ चा २) नुसार चौकशी आणि आदेश, दिवाणी न्यायालयाच्या हुकुमनाम्याची अंमलबजावणी, जमीन महसूल वसुली अर्जाबाबत निर्णय, प्रत्येक खेड्यातील अधिकार अभिलेखांच्या संबंधातील वादातीत प्रकरणांची चौकशी इत्यादी कामांचा समावेश होतो. तहसीलदाराच्या कामामध्ये सहाय्य करण्यासाठी सर्वसाधारणपणे दोन नायब-तहसीलदार आणि तीन किंवा तीनपेक्षा अधिक अव्वल कारकून असतात. तहसीलदार आणि नायब-तहसीलदार हे फिरते अधिकारी असतात. तहसीलदाराच्या अनुपस्थितीत त्याचे नियमित काम नायब-तहसीलदार (महसूल) पाहतो. प्रत्येक तहसीलदार त्या त्या ता लुक्यातील पदसिद्ध तालुका दंडाधिकारी असतो. फौजदारी व्यवहार संहितेनुसार तहसीलदारास सा र्वजनिक शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक ते अधिकार असतात. तालुक्यात घडणारे गुन्हे किंवा प्रक्षोभक घटना याबद्दल तो जिल्हाधिकारी अथवा उप-जिल्हाधिकाऱ्यांना माहिती पुरवितो.

तहसीलदार हा उपकारागृहाचा व्यवस्था प्रभारीसुद्धा असतो. त्याच्या अधिकार क्षेत्रातील ता लुक्यामध्ये घडणाऱ्या प्रत्येक गुन्हेगारी स्वरूपाच्या हालचालीबाबत त्याला जिल्हा दंडाधिकारी व उप-ि वभागीय दंडाधिकारी यांना माहिती पुरवावी लागते. तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित

राखण्याच्या दृष्टीने वेळीच योग्य पावले उचलावी लागतात. गंभीर स्वरूपाच्या विक्षोभ प्रसंगी जेव्हा समाजात अशांतता पसरते तेव्हा स्थानिक पातळीवरील वरिष्ठ कार्यकारी दंडाधिकारी म्हणून तहसीलदारवर फार मोठी जबाबदारी असते. जोपर्यंत त्याचे वरिष्ठ अधिकारी प्रत्यक्षात घटनास्थळी येत नाहीत तोपर्यंत आवश्यक ते आदेश देऊन परिस्थिती नियंत्रणाखाली ठेवणे ही त्याची जबाबदारीअसते.

तहसीलदार तालुका कोषागाराचे कामकाज पाहतो. तालुक्याच्या ठिकाणी उप-कोषागारे आहेत. तालुका कोषागारात जमीन महसूल, वन, सार्वजनिक बांधकामे व इतर माध्यमांपासून उपलब्ध झालेला पैसा जमा केला जातो. तालुक्याच्या ठिकाणी सरकारी खर्चाकरिता लागणारा पैसा याच कोषागारातून घेतला जातो. या व्यतिरिक्त स्टँप्स, मुद्रांक कागद इत्यादींची विक्रीसुद्धा केली जाते. जिल्हाधिकारी किंवा प्रांत अधिकाऱ्यामार्फत उप-कोषागाराचे वार्षिक निरीक्षण केले जाते.

पंचायत राज्य स्थापनेनंतर गटविकास अधिकाऱ्यांची नेमणूक झाल्यापासून तहसील प्रशासनातील तहसीलदाराचे महत्त्व काही अंशी कमी झाले आहे. तरीसुद्धा अनेक निरनिराळ्या विकास योजना सुरू झाल्यामुळे तहसीलदाराच्या कामामध्ये विविधता येत आहे. अल्पबचत, नागरीपुरवठा, कर्जपुरवठा, सार्वजनिक आरोग्य इत्यादीबाबत त्याला मोलाची कामगिरी बजवावी लागते. दुष्काळग्रस्त परिस्थिती, विस्थापितांचे पुनर्वसन, भूमिहीनांना घरकुले, संजय गांधी निराधार योजना, पूरग्रस्तांचे पुनर्वसन, बेघरांसाठी निवारा इत्यादी महत्त्वाची कामे तहसीलदाराला करावी लागतात. तालुक्यातील गुरांची शिरगणती करण्याचे काम तहसीलदाराकडे सोपविले आहे. तालुक्याच्या ठिकाणी असणाऱ्या पोलीस निरीक्षक, उपनिबंधक, वनक्षेत्र अधिकारी, तालुका वैद्यकीय अधिकारी इत्यादींच्या कार्यामध्ये तहसीलदाराकडून तालुका पातळीवरील कामामध्ये समन्वय घडवून आणला जातो.

जनतेच्या दृष्टीने तालुका पातळीवर तहसीलदार जिल्हाधिकाऱ्याप्रमाणेच सरकारचा प्रतिनिधी असून, साधारणपणे संपूर्ण प्रशासकीय कामाकरिता जबाबदार असतो. स्वातंत्र्योत्तर काळात कूळ व जमीन धारणाविषयक अनेक पुरोगामी कायदे करण्यात आले आहेत. त्यांची तहसील पातळीवरअंमल बजावणी तहसीलदार व नायब तहसीलदाराकडून केली जाते.

**मंडळ निरीक्षक :** ग्राम-अधिकारी व ग्राम-सेवक यांच्यावर व्यवस्थित पर्यवेक्षण ठेवून प्रत्येक स्थानिक चौकशी तत्पर करण्याच्या तहसीलदाराच्या कामास मदत करण्यासाठी अव्वल कारकूनाच्या श्रेणीतील मंडल अधिकारी आणि कारकूनाच्या श्रेणीतील मंडल निरीक्षक यांची नेमणूक केली जाते. ग्रामपातळीवरील तलाठ्यांच्या कामावर देखरेख ठेवण्याचे काम मंडल निरीक्षक करतो. मंडल अधिकारीअधिकाराभिलेख प्रमाणित करून तहसीलदाराचा दैनंदिन कामाचा बराचसा भार कमी करतो. मंडलअधिकारी किंवा मंडल निरीक्षक हे ३० ते ५० गावांचे प्रभारी अधिकारी असतात. हे अधिकारी तहसीलदार व ग्राम अधिकारी यांच्यामधील दुवा साधण्याचे काम करतात. सर्वसाधारणपणे प्रत्येक तालुक्यामध्ये एक मंडल अधिकारी व चार मंडल निरीक्षक असतात. त्यांना पिकांची चौकशी,आणेवारी, तगाईसंबंधी कामे, कृषिविषयक सांख्यिकीय माहिती गोळा करणे, गुरांची शिरगणती,अधिकार अभिलेखांची निगा राखणे, तसेच कूळ कायदे व इतर दस्तऐवजांची सोय पाहणे, यासारखी जमीन महसूलविषयक बहुविध कामे करावी लागतात.

**तलाठी :** सर्वसाधारणपणे हैदराबाद संस्थानी राजवटीत कुलकर्णी वंशपरंपरेने तलाठ्याची कामे करीत असे. इ.स. १९१४ पासून सेवेबाबतच्या काही अटी घालून कुलकर्णी वतने पुढे चालू ठेवण्यात आली. मात्र बॉम्बे (दुरुस्ती) अधिनियमा (१९५९ चा ख्ब्ब्ज) द्वारे हैद्राबाद ॲबॉलिशन ऑफ इनामस् ॲण्ड कॅश ग्रान्टस् अधिनियम, १९५४ ची दुरुस्ती करून १ जुलै १९६० पासून सर्व सेवा हक्कांसह कुलकर्णी वतने नष्ट करण्यात आली. त्यानंतर वृत्तिधारी तलाठ्यांच्या नेमणुका करण्यात आल्या. गावे लहान असल्यास दोन किंवा दोनहून अधिक गावांसाठी एकच तलाठी नेमण्यात येई. महसुली पाटलाची वतने संपुष्टात येऊन जमीन महसूल वसुलीची कार्ये व कृषिविषयक कामे ग्रामपंचायतीकडे हस्तांतरित झाल्यानंतर १ जानेवारी १९६३ पासून तलाठ्यांची आस्थापना जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित करण्यात आली होती. परंतु असे असले तरीही पुन्हा तलाठ्यांच्या सेवा शासनाकडेच पुनःस्थापित करण्यात आल्या. अधिकाराभिलेखाचा विचार करता तलाठी प्रत्यक्ष महसूल अधिकाऱ्याच्या नियंत्रणाखाली कार्य करतो. जमीन महसुलाची मागणी, वसुली व थकबाकी, महसुलासंबंधी हिशेब,अधिकार अभिलेख व इतर सरकारी दस्तऐवजांचे जतन करण्याची कामे त्याला करावी लागतात. पिकांची चौकशी व आणेवारी तयार करणे, लेव्ही वसुलीची यादी करणे, फेरफार नोंदवहीमध्ये नोंद करणे, जमीन नोंदणीपत्रक महसूल कार्यालयात सादर करणे इत्यादी कामे त्याला करावी लागतात.

तथापि शासनाच्या प्रागतिक धोरणाप्रमाणे यापैकी बरीच कामे कालबाह्य झाली आहेत.

**पोलीस पाटील :** पोलीस पाटलाकडे कायदा व सुव्यवस्थेची जबाबदारी असे. त्याची कर्तव्ये खालीलप्रमाणे असत :—

**महसूलविषयक कर्तव्ये :**

१. रयतेकडून शासनास देय असलेला महसूल तलाठ्याच्या साहाय्याने वसूल करणे.

२. शासकीय जमिनीवरील अतिक्रमणाचा शोध घेणे तसेच झाडांचे व इतर शासकीय मालमत्तेचे संरक्षण करणे.

३. महसूल वसुली आणि इतर प्रकरणांच्या संदर्भातील तहसील कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या आदेशांची अंमलबजावणी करणे.

४. तलाठी अधिकाराभिलेख व ग्राम-खाती व्यवस्थित ठेवून शासनाची येणी नियमित व वक्तशीरपणे भरत आहेत हे पाहणे.

५. गावामध्ये निरीक्षण किंवा इतर कामासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी भेट दिली असता त्यांनाआवश्यक ते साहाय्य देणे.

तथापि महसुली पाटलांची वतने नष्ट करण्यात आली असल्याने ही सर्व कर्तव्ये ग्राम-पंचायतींकडे वळविण्यात आली आहेत.

**दंडाधिकारविषयक कर्तव्ये :** पोलीस पाटील हा जन्म-मृत्यूच्या नोंदी ठेवण्यासाठी तसेच गावातील निदर्शनास आलेल्या एखाद्या हक्कविरहीत मालमत्तेचा ताबा घेणे यासाठी जबाबदार असतो.

Maharashtra State Gazetteers

बॉम्बे व्हिलेज पोलीस ॲक्ट (ज्ञ्ज्ज्ञ्ज्ञ दृढ १८६७) नुसार पोलीस पाटलावर अनेक कर्तव्ये सोपविण्यातआ लेली आहेत. त्याला त्याची कर्तव्ये पार पाडण्यासाठी गावातील सर्व सेवकांची मदत घेण्याचाअधिकार असतो. त्याला गावाची आस्थापना चालवून, चोरीला आळा घालण्यासाठी संरक्षण तयार करणे, गावात शांतता भंग होणार नाही हे पाहणे तसेच समाजास इजा पोहोचणार नाही हे पाहावेलागते. तहसील दंडाधिकाऱ्याने मागणी केलेली सर्व माहिती पुरविणे हे पोलीस पाटलाचे कर्तव्यअसते. तसेच गावातील गुन्हेगारी, आरोग्य व समाजाची सर्वसाधारण स्थिती याबाबत त्याला जिल्हा दंडाधिकाऱ्यास नियमित माहिती पुरवावी लागते. ज्या ज्या वेळी पोलीस अधिकारी त्याला मदत मागतील त्या त्या वेळी त्याला त्याच्या अधिकारांतर्गत शक्य होईल तेवढी मदत द्यावी लागते. त्याला कार्यकारी दंडाधिकारी किंवा पो लीस अधिकारी यांच्या आज्ञांचे पालन करून त्यांनी निर्गमित केलेल्याआदेश व अधिपत्रांची अंमलबजा वणी करावी लागते. सार्वजनिक शांततेस धक्का पोहोचेल अशा घटनेबाबतची आगाऊ माहिती जिल्हा पोलीस गुप्तचर विभागास कळविणे, त्याच्या अखत्यारीतील गाव-क्षेत्रामध्ये गुन्हे व सार्वजनिक उपद्रवास प्रतिबंध घालणे, तसेच अशा प्रकारचा गुन्हा किंवा सार्वजनिक उपद्रव घडून आल्यास सदर दोषी व्यक्तींना ओळखून त्यांच्यावर गुन्हा दाखल करणे. जर त्याच्या गावाच्या हद्दीत एखादा गुन्हा घडला व गुन्हेगार पळाला किंवा गुन्हेगाराबाबत माहिती मिळू शकली नाही तर अशा परिस्थितीत त्याचे गाव ज्या पोलीस स्टेशनच्या अंतर्गत येत असेल त्या पोलीस स्टेशनला त्वरित गुन्ह्याबाबतची माहिती त्याला द्यावी लागते व स्वतः सदर गुन्ह्याची प्राथमिक चौकशी करण्यासाठी घटनास्थळी रवाना व्हावे लागते तसेच सदर गुन्ह्याचे शक्य होतील तेवढे पुरावे गोळा करून ते पोलीस अधिकाऱ्याला पाठवावे लागतात. जे व्हा एखादा अनैसर्गिक किंवा अकस्मात मृत्यू होतो किंवा एखादे शव निदर्शनास येते तेव्हा त्याच्या गा वातील किंवा शेजारच्या गावातील दोन किंवा दोनपेक्षा अधिक सज्ञान व्यक्तींच्या साहाय्याने सदर घटनेचा तपास करून त्याला पंचनामा करावालागतो. त्यानंतर त्याला हा तपासाचा अहवाल संबंधित पो लीस अधिकाऱ्याकडे पाठवावा लागतो. तसेच गावातील एखाद्या व्यक्तीने गंभीर स्वरूपाचा गुन्हा के ल्यास किंवा तसा गुन्हा याच व्यक्तीने केला असावा अशी त्याची खात्री झाली असल्यास पुराव्यादाख लच्या सर्व वस्तूंसोबत त्या व्यक्तीस त्याला पोलीस अधिकाऱ्याच्या स्वाधीन करावे लागते.

**प्रशासकीय कर्तव्ये :** पाटलाच्या प्रशासकीय कर्तव्यामध्ये त्याच्याकडून गावाची स्वच्छता व सा र्वजनिक आरोग्याच्या जबाबदारीची अपेक्षा केली जाते. साथीच्या रोगाचा उद्रेक झाल्यास त्याला त्याबा बत तहसील कार्यालयास त्वरित कळविणे आवश्यक असते.

**कोतवाल :** बॉम्बे इनफेरिअर व्हिलेज वतनस् ॲबॉलिशन ॲक्ट, १९५८ नुसार रामोशी, जाग ल्या, शेतशिंदी इ. गाव सेवकांची वंशपरंपरागत वतने नष्ट करण्यात आली व त्यानंतर वेतनधारी कोत वाल पद्धतीअंतर्गत कोतवालांचा सेवाप्रवेश व सेवायोजन सुरू करण्यात आले. इ.स. १९७१ मध्ये ५०० पेक्षा कमी लोकसंख्येच्या गावास एक, ५०१ ते २००० दरम्यानच्यालोकसंख्येच्या गावास दोन तर २००० पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या गावास तीन कोतवाल

Maharashtra State Gazetteers

नेमण्यात येत. कोतवाल सरकारी अधिकारी, पोलीस पाटील व तलाठ्यांना त्यांच्या कामात मदत करतात.

**लोक कल्याण योजना :** लोक कल्याणाचा कार्यक्रम शासनाने आखलेला असून त्यानुसार निरनिराळ्या योजना हाती घेतलेल्या आहेत. या योजना राबविण्याचे काम मुख्यतः जिल्हाधिकाऱ्याला करावे लागते. या योजनांपैकी काहींची माहिती खाली दिलेली आहे.

**भूमिहीनांना निवासस्थाने :** शासनाने १९७५ मध्ये घोषित केलेल्या वीस-कलमी कार्यक्रमांतर्गत भूमिहीन व बेघर लोकांना निवाऱ्याची जागा व घरकुले पुरविण्याचा एक विकास कार्यक्रम अमलात आणला. मूळच्या कार्यक्रमात वेळोवेळी महाराष्ट्र शासनाने सुधारणा करून ही योजना राबविली आहे. भूमिहीन व बेघर शेतमजुरांना घरांसाठी जागा देणे व घरकुले बांधण्याच्या योजनेखाली भूमिहीन वबेघर शेतमजुरांना व गावातील कारागिरांना १०० चौरस वाराचा एक भूखंड निःशुल्क देण्यात येतो. भूमिहीनांना घराकरिता जमीन देण्याची "विस्तार योजना" म्हणून शासनाने मार्च १९७५ पासून अल्प खर्चात घरकुले बांधण्याची योजना हाती घेतली आहे. त्यानुसार ही घरकुले ग्रामीण भूमिहीनांना व बेघरांना निःशुल्क दिली जातात. सुरूवातीस प्रत्येक घरकुलासाठी होणारा शासकीय खर्च १५० रुपयांपर्यंत मर्यादित होता. ही मर्यादा पुढे ३५० रुपयांपर्यंत वाढविण्यात आली. घरकुलासाठी लागणारी सामग्री शासन मूळ किमतीत पुरविते. या योजनेत सुधारणा करून दहा वर्षे टिकणारी अर्धपक्की घरकुलेबांधण्याचे उद्दिष्ट ठेवून शासनाने घरकुले बांधण्याचा खर्च ३५० वरून ७५० रुपयांपर्यंत वाढविलाव इ.स. १९८८ मध्ये तो २००० रुपये इतका होता. सदरहू योजना ज्या खेड्यांची लोकसंख्या पाच हजारांपर्यंत आहे अशाच खेड्यांना लागू होती. १९७९ मध्ये या निर्णयात बदल करून सर्व गावांना तसेच १५,००० पर्यंत लोकवस्ती असलेल्या " " वर्गाच्या नगरपालिका क्षेत्रासही ही योजना लागू करण्यात आली. १९८३-८४ मध्ये २,७०० रुपये दराने घरकुले बांधण्याचा निर्णय झाला असून त्यासाठी हुडकोकडून कर्जसहाय्य घेण्याचे ठरले होते. याविषयीची नोंद सन १९८८ मध्ये प्रकाशित परभणी जिल्हा गॅझेटिअरमध्ये उपलब्ध आहे.

**गावठाण विस्तार योजना :** गावठाण विस्तार योजनांतर्गत लोकसंख्या वाढीमुळे ग्रामीण भागातील गावठाणांचा आवश्यक विस्तार तसेच भटक्या व विमुक्त जाती आणि मागासवर्गीयांचे पुनर्वसन हे दोन कार्यक्रम राबविले जातात. ज्या ठिकाणी योग्य अशा सरकारी तसेच ग्रामपंचायतीच्या मालकीच्या जमिनी उपलब्ध आहेत त्या जमिनी गावठाण वाढीसाठी विहित करण्यात येतात, तेथे ही योजना राबविली जाते. जेथे अशा जमिनी उपलब्ध नाहीत तेथे खाजगी जमीन संपादन करण्यात येते. भटक्या जमातीस व भूमिहीन शेतमजुरांना सदर योजनेखाली घरांसाठी भूखंड मोफत दिले जातात. तर इतरांना कब्जे हक्कावर भूखंड दिले जातात. कब्जे हक्काची रक्कम हप्त्यात भरण्याची सवलतआहे. भूमिहीन लोकांना १५०० चौरस फुटाचा भूखंड देण्यात येतो. शेतकऱ्यांना त्यांच्या कुटुंबीयांची संख्या विचारात घेता ३,००० ते ६,००० चौरस फुटापर्यंतचा भूखंड देण्यात येतो.

**संजय गांधी निराधार अनुदान योजना :** महाराष्ट्र शासनाने राज्यातील निराधार व निराश्रित व्यक्तींना आर्थिक मदत देण्यासाठी दिनांक २ ऑक्टोबर १९८० पासून संजय गांधी निराधार अनुदान

योजना सुरू केली. योजनेच्या अंमलबजावणीसाठी तालुका आणि जिल्हा पातळीवर समित्या स्थापन करण्यात आल्या असून या योजनेनुसार एका व्यक्तीला दरमहा साठ रुपये आर्थिक मदत दिली जाते. एकाच कुटुंबात दोनपेक्षा अधिक निराधार व्यक्ती असल्यास १५० रुपयेपर्यंत मदत दिली जाते.

## जमीन महसूल

प्राचीन काळात कौटिलिय अर्थशास्त्रात महसूल वसुलीसाठी असलेल्या अधिकाऱ्यांविषयीची नोंद आढळते. मध्ययुगीन कालखंडात अकबराच्या काळात राजा तोडरमल याने महसूल वसुलीविषयक न व्याने धोरण ठरविले. महाराष्ट्राच्या संदर्भामध्ये निजामशाही राजवटीत मलिकंबर याने सारावसुलीसाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केल्याचे दिसते. नांदेड जिल्ह्याच्या संदर्भामध्ये कालौघात हैदराबादच्या निजामी सत्तेच्या काळापर्यंत फारसे वेगळे परिवर्तन झाले नाही.

इ.स. १९०५ मध्ये झालेल्या जमिनीच्या एकूण क्षेत्राच्या बदलानुसार १९०९ मध्ये जमीन महसुलाची मागणी अंदाजे १५ लाख एवढी होती.[१४]

हैदराबाद जमीन (जादा आकारणी) अधिनियम, १९५२ अन्वये जिल्ह्यातील सर्व जिरायत जमिनी वर प्रत्येक रुपयामागे दोन आणे म्हणजेच जमीन महसुलाच्या १२.५ टक्के आणि जलसिंचनाखालील जमिनीवर प्रत्येक रुपयामागे एक आणा म्हणजेच जमीन महसुलाच्या ६.२५ टक्के जादा आकार बसविण्यात आला होता. काही जहागिरीखालील खेड्यांच्या बाबतीतसुद्धा जमीन मोजणीचेआणि जमाबंदीचे काम सरकारच्या जमीन मोजणी आणि जमाबंदी विभागाकडून केले जात होते. तर काही खेड्यांबाबतीत जहागिरदारांच्या स्वतःच्या कर्मचाऱ्यांकरवी हे काम केले जात असे. जहागीर खेड्यातील साऱ्याचा दर लगतच्या सरकारी खेड्यापेक्षा सर्वसाधारण जास्त होता. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर १९४९ मध्ये जहागिरी खालसा केल्यानंतर अशा प्रकारच्या बहुसंख्य प्रकरणांची सरकारने तपासणी केली. स्वतंत्र भारतातील शासनाने समन्यायी तत्त्व म्हणून तेथील साऱ्याचा दर शेजारच्या सरकारी खेड्यातील दराच्या पातळीवर आणला. याचा लाभ अनेक जमीनधारकांना झाला.[१५]

**स्वातंत्र्योत्तर काळातील महसूल प्रशासन :** मराठवाड्यामध्ये मुख्यतः रयतवारी ही भूधारणापद्धती अस्तित्वात होती. गुंतवणुकीचे संरक्षण व त्याबरोबरच मिळणारा सामाजिक व आर्थिक दर्जा यामुळे १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात जमीन न कसणाऱ्या जमीन मालकांचा एक मोठा वर्ग उदयासआला. शेतीविषयक कोणत्याही प्रकारची पार्श्वभूमी नसताना सर्वच क्षेत्रातील लोक, जमिनी कसण्यासाठी न घेता त्या केवळ आर्थिक गुंतवणूक व आवकीचे साधन म्हणून अधिकाधिक जमिनी संपादन करू लागले. अशा प्रकारे रयतेचा मालक व प्रत्यक्ष जमीन कसणारे कूळ असे दोन गट उदयास येऊन यामधूनच कुळवहिवाट पद्धतीचा उगम झाला. या बदलामुळे कूळ व जमीनदार यांच्यामधील संबंध समायोजनाबाबतच्या नवीन अडचणी निर्माण झाल्या. परिणामस्वरूप कुळांच्या संख्येत वाढ होऊन, जास्तीत जास्त जमीन, जमीन न कसणाऱ्या जमीनदारांकडे गेल्यामुळे खंडाने

---

१४. **इम्पीरिअल गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. २२८-२९.

१५. **परभणी जिल्हा गॅझेटिअर,** महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८८, पृ. ४६७.

जमिनी मिळविण्यासाठी कुळांमध्ये स्पर्धा निर्माण होऊन त्याचे पर्यावसान धारणाधिकाराच्या असुरक्षिततेमध्ये झाले. हळू-हळू जमिनीच्या खंडाचे दर वाढू लागले, मात्र याउलट लागवडीचे प्रमाण कमी होऊ लागल्याने कृषि उत्पादनामध्ये घट दिसू लागली. ज्या विभागात रयतवारी पद्धत लागू नव्हती त्या विभागातसुद्धा अशाच प्रकारची परिस्थिती निर्माण झाल्याने यावर त्वरित उपाययोजना करणेआ वश्यक होते.

शेतीव्यवसायात अभिरुची असलेल्या लोकांच्या आर्थिक संधी, व्यवस्थापकीय जबाबदाऱ्या तसेच शेती उत्पादनातील वाट्याशी निगडीत असल्याने, सर्वसाधारणपणे शासनाची भू-धारणेबाबतची धोरणे कोणत्याही ग्रामीण विकासाच्या योजनेमध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडीत असतात आणि म्हणून नियोजन आयोगाने ठोकळमानाने शासनाची ही धोरणे खालीलप्रमाणे निर्धारित केली :—

१. उत्कृष्ट जमीन व्यवस्थापन पद्धतीतून उत्पादनात वाढ.

२. मिळकत आणि संधी यामधील असमानता कमी करणे.

३. कुळांना धारणाधिकाराचे संरक्षण देऊन त्यांना जमिनीचे मालक होण्यास मदत करण्याची तरतूद करणे.

अशाप्रकारे आयोगाने कुळांचा दर्जा उंचावणाऱ्या, त्यांना जमिनीमध्ये हळू-हळू शिरकाव करू देणाऱ्या व त्यांनी कसलेल्या जमिनी खरेदी करण्यासाठी त्यांना मदत करणाऱ्या जमीन धोरणांचे समर्थन केले. कृषिव्यवसायातील मिळकत व संधी यामधील असमानता दूर करून, त्यावेळी अस्तित्वातअसले ल्या व भविष्यातील सर्व धारण जमिनींवर कमाल मर्यादेचे बंधन घालणे हा या धोरणामागील दुसरा हेतू होता. प्रत्येक शेतकरी हा त्याची स्वतःची जमीन कसणारा शेतकरी असेल असे गृहीत धरून व त्याची आर्थिक स्थिती दृष्टीसमोर ठेवून हे धोरण आखण्यात आले. जमीनदारांच्या मालकी हक्काचे जबरीने ि वलीनीकरण करून ते हक्क कुळांना देणे हा एक यामागील दुसरा उद्देश असून जमीनदारापुढे एक तर स्वतः जमीन कसणे किंवा ती प्रत्यक्षात जमीन कसणाऱ्या कुळांना हस्तांतरित करणे हे दोनच पर्याय ठे वण्यात आले.

**हैद्राबाद कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम :** नियोजन आयोगाच्या शिफारसींचीअंमलबजा वणी करण्यासाठी "हैद्राबाद कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९५०" मध्ये इ.स. १९५४ व १९५७ मध्ये मोठ्या प्रमाणात फेरबदल करण्यात आले. धारणजमिनीच्या कमाल मर्यादेच्या तरतुदीची अंमलबजावणी करण्यासाठी "कुटुंबाची धारणजमीन" हा घटक प्रमाणभूत मानण्यातआला. वेगवेगळ्या स्थानिक क्षेत्रातील, वेगवेगळ्या प्रकाराच्या जमिनींमधील कौटुंबिक धारणजमिनीचे क्षेत्र ठरविताना, पाच व्यक्तीच्या कुटुंबाला वार्षिक निव्वळ मिळकत रु. ८०० होईल असे आश्वासन देण्यात आले.

कुळांनी स्वतः कसलेल्या जमिनींमधील हितसंबंध जपण्यासाठी त्यांच्या धारणाधिकाराच्या संरक्षणाची तरतूद अधिनियमात करण्यात आली. जमीनदाराच्या केवळ लहरी इच्छेनुसार कुळांना जमिनीतून बाहेर काढता येणार नाही तसेच कुळाकडून नियमात अंतर्भूत असलेली कसूर घडूनआल्यास किंवा त्याने स्वतःच्या इच्छेनुसार जमीन सोडली तरच त्याला जमिनीतून बाहेर काढता येईल.

जमीनदार स्वतः व्यक्तीशः त्याची जमीन कसण्यास इच्छुक असल्यास त्याने त्याचे तसे मत ३१ मार्च १९५९ पूर्वी पर्याय निवडून व्यक्त करणे आवश्यक होते. जमीनदाराने स्वतः जमीन कसण्याचा पर्याय निवडला तरी त्याला जास्तीत जास्त तीन कुटुंबांच्या धारण जमीनीइतकीच जमीन त्याच्याकडे ठेवण्याची अट घालण्यात आली. तसेच या अधिनियमानुसार जमीनदारास देय खंडाची जास्तीत जास्त रक्कम अधिकृतरीत्या निश्चित करण्यात आली व वाजवी खंड निश्चित करण्यासाठी यंत्रणासुद्धा उपलब्ध करू न देण्यात आली. अशा प्रकारे खंड भरण्याच्या बाबतीतसुद्धा कुळांना सुरक्षितता देण्यातआली.

या अधिनियमाद्वारे शेतजमिनीचे जमीन कसणाऱ्या कुळांमध्ये वाटप करण्यासाठी एक तर्कसंगत असा आधार निर्माण झाला. शेतजमिनीच्या मालकी हक्कांचे प्रत्यक्षात जमीन कसणाऱ्या कुळांकडे हस्तांतरण करण्याची प्रक्रिया खालीलप्रमाणे दोन प्रकारे यशस्वी करण्यात आली :—

(१) भविष्यात संपादन करण्यात येणाऱ्या जमिनी मग त्या देणगीच्या स्वरूपात असो किंवा कायमस्वरूपी अन्यसंक्रामण अथवा विक्री किंवा इतर कोणत्याही प्रकारचे हस्तांतरणअसो, या सर्व प्रकारच्या जमिनींवर कमाल मर्यादा निश्चित करण्यात आली आणि

(२) त्यावेळी अस्तित्वात असलेल्या धारण जमिनींचीसुद्धा कमाल मर्यादा निश्चित करू न व अतिरिक्त ठरलेल्या जमिनींचे सहकारी शेती संस्था व भूमिहीन लोकांमध्ये वाटप करण्यात आले.

जिल्हाधिकाऱ्याच्या पूर्व परवानगीशिवाय जमिनीची विक्री, हस्तांतरण किंवा कायमस्वरूपी अन्यसंक्रामण करता येणार नाही अशी तरतूद कुळवहिवाटीच्या अधिनियमात करून वरीलप्रमाणे पहिले उद्दिष्ट साध्य करण्यात आले. काही विशेष बाबींमध्ये परवानगी देता येईल, मात्र अशी जमीन ज्या कुळाकडे किंवा हस्तांतरित व्यक्तीकडे देण्यात येईल त्या व्यक्तीची एकूण धारण जमीन तीन कुटुंबांच्या धारण जमिनीपेक्षा अधिक होता कामा नये, असे कमाल मर्यादेचे बंधन ठेवण्यात आले.अशाच प्रकारे कुळवहिवाटीच्या अधिनियमानुसार धारण जमिनीची कमाल मर्यादा ४ १/२ कुटुंबांच्या धारणजमिनीइतकी स्पष्ट करण्यात आली. तसेच कमाल मर्यादेपेक्षा जास्त असलेली जमीन शासनाद्वारे भूमिहीन शेतकऱ्यांना वाटण्यासाठी ताब्यात घेण्यात येईल, अशी नियमात तरतूद करण्यात आली.

स्वतः कसलेल्या जमिनीचे पूर्णतः मालक होण्यास कुळांना मदत करण्याची तरतूद कुळवहिवाटीच्या अधिनियमात आहे. एका कुटुंबांच्या धारण जमिनीइतकी जमीन सवलतीच्या दरात खरेदी करण्याचा त्यांना हक्क होता. मात्र ज्या जमीन मालकाची जमीन खरेदी करण्यात येई त्या मालकाची खरेदीनंतर त्याची स्वतःची जमीन एका कुटुंबाच्या धारणजमिनीपेक्षा कमी होणार नाही याचीही दक्षता घेण्यात येई. जमिनीची योग्य किंमत सुलभ हप्त्यांमध्ये चुकती करण्याची कुळांना मुभा होती. एखादे कूळ त्याला घालून दिलेल्या एका कुटुंबाच्या मर्यादेपेक्षा जास्त जमीन खरेदी करण्यास इच्छुक असेल तर त्याला खुल्या बाजारातील दराने ती खरेदी करण्याची मुभा होती, मात्र त्याची एकूण धारण जमीन ३ कुटुंबांच्या धारणजमिनीपेक्षा अधिक होता कामा नये असे बंधन घालण्यातआले.

Maharashtra State Gazetteers

जिल्हाधिकाऱ्याच्या पूर्वपरवानगीशिवाय जमिनींचे हस्तांतरण करता येत नसले तरी या नियमा विरुद्ध जमिनींचे अनेक व्यवहार झाल्याचे निदर्शनास आले. मात्र अशा प्रकारच्या हस्तांतरणाच्याव्य वहारानुसार वाटप झालेल्या सर्व जमिनींच्या वस्तुनिष्ठतेची दखल नियोजन आयोगाच्या अखत्यारीतआ ली. त्यानुसार जर हा नियम कडकपणे अमलात आणला असता तर हस्तांतरित झालेल्या सर्व जमिनींचे व्यवहार अवैध ठरवावे लागले असते व जमिनी खरेदी केलेल्या सर्व अल्प भू-धारकांना ते त्रासदायक झाले असते. म्हणून अशा प्रकारच्या व्यवहारात अडकलेल्या लहान शेतकऱ्यांची कोंडी दूर करण्यासाठी व या जमिनींचे हस्तांतरण अधिकृत करण्यासाठी शासनाने दंडाचे प्रमाणशीर नियमन स्पष्ट केले. परंतु ही सवलत दुरुस्ती नियम, १९५७ हा ज्यावेळी दि.८ जून १९५८ ला लागू झाला, त्यानंतर हस्तांतरित झालेल्या जमिनींना देण्यात आली नाही. ८ जून १९५८ नंतर अशा प्रकारच्याअवैध हस्तांतरणाच्या बाबतीत गंभीर दखल घेऊन कारवाई करण्याचे निश्चित करण्यात आले, त्यानुसार अशा प्रकारचा व्यवहार झाल्यास जमीन व जमीन खरेदीस देण्यात आलेली रक्कम या दोन्हीबाबी जप्त करण्याची तरतूद करण्यात आली.

नांदेड जिल्ह्यामध्ये भूदान योजने अंतर्गत ७००.७१ हेक्टर (१,७३१ एकर २० गुंठे) इतकी जमीन दान करण्यात आली. त्यापैकी मागासवर्गीय कुटुंबातील ७९ भूमिहीन व्यक्तींना १६१.८७ हेक्टर (४०० एकर) इतक्या जमिनीचे वाटप करण्यात आले.

**कमाल जमीनधारणा अधिनियम :** सामाजिक न्याय व समाजवादी तत्वप्रणालीचा अंगिकार करा वयाचे धोरण ठेवून शासनाने महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१, दिनांक २६ जानेवारी १९६२ पासून कार्यान्वित केला. या कायद्यानुसार व्यक्तीगत जमीनधारणेची कमा ल मर्यादा विहित केली. सिंचनाखालील जमिनीस पाण्याच्या उपलब्धतेनुसार कमाल मर्यादा क्षेत्र १८ एकर ते ४८ एकरांपर्यंत ठरविण्यात आले. कोरडवाहू जमिनीबाबत राज्याची एकूण सात प्रकारच्या स्थानिक क्षेत्रात विभागणी करण्यात आली व त्या प्रत्येक क्षेत्राकरिता ६६ ते १२६ एकरांपर्यंतची कमाल मर्यादा ठरविण्यात आली.

उपरोक्त १९६१ सालच्या अधिनियमानुसार विहित केलेली कमाल मर्यादा शासनाने कमी करण्याचे ठरविले. त्यानुसार १९७५ मध्ये त्यात सुधारणा करण्यात आली. (दिनांक २ ऑक्टोबर १९७५). या कायद्यानुसार बागायत जमिनीकरिता १८ ते ३६ एकर कमाल मर्यादा क्षेत्र उपलब्धतेनुसार विहित केले गेले. कोरडवाहू जमिनीच्या बाबतीत निश्चित पावसाच्या क्षेत्रातील भाताच्यालागवडीखालील जमिनीकरिता ३६ एकर व इतर सर्व जमिनीकरिता ५४ एकर एवढी कमाल मर्यादा ठरविण्यात आली. या सुधारित कमाल मर्यादा क्षेत्रासाठी व्यक्ती हा घटक नसून कुटुंब हा घटक धरला जातो. सुधारित कायद्यानुसार अतिरिक्त जमीन निर्धारित करण्याचे बहुतांशी काम नांदेड जिल्ह्यात संपलेले आहे. सन १९६१ चा मूळ कायदा व सन १९७५ चा सुधारित कायदा या दोन्ही कायद्यांनुसार ज्यांच्या जमिनी अतिरिक्त म्हणून घोषित करून ताब्यात घेण्यात आल्या त्यांना भरपाई देण्यात आली.

Maharashtra State Gazetteers

**भूमापन (सर्व्हेक्षण) :** राज्य पुनर्रचनेअगोदर नांदेड जिल्हा भूतपूर्व हैद्राबाद राज्याचा एक भाग होता. राज्याच्या इतर विभागात प्रचलित असलेली सर्व्हेक्षण व वर्गीकरणाची पद्धती याही ठिकाणी सुरू असल्याने त्यामध्ये विशेष फेरफार न करता स्थानिक आवश्यकतेनुसार काही मामुली फेरफार करून तीच पद्धती सुरू ठेवण्यात आली. जिल्ह्यामध्ये जमीन महसुलाची रयतवारी पद्धती अस्तित्त्वात होती.

प्रत्यक्षात धारण जमिनीच्या कब्ज्यानुसार प्रत्येक जमिनीचे वस्तुतः सर्व्हेक्षण करण्यात आले. जमीन महसूल अधिनियमाच्या कलम ७ नुसार शासनाच्या पूर्व मंजुरीनुसार सर्व्हेक्षणाचे काम हाती घेण्यात आले. सर्वसाधारणपणे नोव्हेंबर महिन्याच्या सुरूवातीपासून जूनच्या मध्यापर्यंत सर्व्हेक्षणाची कामे करण्यात आली. सर्व्हेक्षणामध्ये वर्गवारी, जमाबंदी व पुनरीक्षण बाबींसाठीच्या तांत्रिक क्षेत्रातील कर्मचारीवृंदाच्या कामाचे प्रमाणशीर नियमन निश्चित करण्यात आले. सर्व्हेक्षण आणि वर्गवारीच्या कार्याचे पर्यवेक्षणाचे काम जमाबंदी आयुक्तास थेट जबाबदार असलेल्या उप आयुक्तांकडे असे. कामाची सूचीबद्धता अंशतः उप आयुक्ताकडे तर अंशतः नीमतंदाराकडे केली जात असे. नीमतंदारव उप आयुक्तांनी पर्यवेक्षण केलेले जमिनीचे प्लॉट पुढील तपासणीसाठी त्यांना उच्च प्राधिकरणाकडे सादर करावे लागत असत.

पूर्वी निरीक्षणाचे काम बहुधा थेरोलाईट (Therolight) या भूमापन उपकरणाद्वारे केले जात असे. मात्र आता जिल्ह्यातील मोजणी कामाचा वेगाने निपटारा करण्यासाठी कद्र.च.। (क्ष्ड्डड्डद्यद्धद्धदृदत्ड़ द्र्दृद्यद्धड्ड्ड्

१६ आणे तर दुसऱ्या प्रकारच्या जमिनीचे जास्तीत जास्त मूल्यांकन १५ आणे निश्चित करण्यातआले. पहिल्या प्रकारच्या जमिनीचे एकूण ७ प्रकार (१६, १५, १४, ११, ८, ५, ३ आणे प्रत्येकी) निश्चित करण्यात आले तर दुसऱ्या प्रकारच्या जमिनीचे ६ प्रकार (१५, १४, ११, ८, ५, ३ आणे प्रत्येकी) निश्चित करण्यात आले आहेत. तथापि, वर्गवारीच्या मूल्यांकनानुसार जमिनीच्या मातीची खोली कमीजास्त होते. १६ आणे वर्गवारी मूल्यांकनासाठी १ १/५ हात इतकी खोली असणे आवश्यकअसते. ज्यावेळी जमिनीचे मूल्यांकन एका श्रेणीने कमी होते तेव्हा मातीची खोली १/४ हात इतकी कमी होते. कापसाच्या काळ्या जमिनीच्या मूल्यांकनाच्या बाबतीत पहिल्यांदा मूल्यांकन करताना सर्वसाधारणपणे वर्गीकरणातील सातवी श्रेणी गाळली जाते. अपवादात्मक परिस्थितीतच यास मान्यता मिळते. दुसऱ्या प्र ाकारच्या जमिनीमध्ये सर्वात मोठी श्रेणी. १५ आणे असून या प्रकारच्या जमिनीच्या मातीची खोली १ १/२ फूटापासून सुरू होते.

बागायती आणि ओल्या (भाताच्या) जमिनींच्या बाबतीत, जमिनीच्या मृद घटकाबरोबरच, जमिनीस होणारा पाणीपुरवठा, त्याचा कालावधी व पाण्याचे उगमस्थान या पाणी घटकांचेसुद्धा वर्गीकरण केले जाते. विहिरींच्या बाबतीत विहिरीतील पाणी गोडे आहे किंवा खारट आहे तसेच त्या विहिरीचे जमिनीपासूनचे अंतर या घटकांचासुद्धा जमिनीच्या मूल्यांकनासाठी विचार केला जातो. जमीन व विहीर यामधील अंतर १० साखळ्यांपेक्षा (chains) अधिक असल्यास मूल्यांकनामध्ये ६ पैसे कमी केले जातात, तर त्यानंतरच्या प्रत्येक २० साखळ्यांसाठी ६ पैसे कमी करण्यात येतात. पाणी उच लण्यासअतिरिक्त श्रम पडत असल्यास त्याच प्रमाणात मूल्यांकन कमी केले जाते. अशा प्रकारे मोटेद्वारे पाणी उचलण्यात येत असल्यास एक आणा व शारीरिक श्रमाद्वारे उचलण्यात येत असल्यास फक्त ६ पैसे कमी करण्यात येतात.

ओलिताखालील जमीन ३० एकरांपेक्षा कमी असल्यास कुंता (kunta) दर व ३० एकरापेक्षा जास्त असल्यास तलाव दर लागू होतो. ओलिताखालील वेगवेगळ्या जमिनीच्या वर्गास वेगवेगळे पाणी दर लागू होते. याविषयीची अधिक माहिती सन १९७१ च्या नांदेड जिल्हा गॅझेटिअरमध्ये देण्यात आली असल्याने त्याची येथे पुनरावृत्ती करण्यात येत नाही.

**सर्व्हे नंबर :** पहिल्या प्रतीच्या कोरड्या जमिनीच्या सर्व्हे नंबरसाठी कमीतकमी १२ एकर व दुस ऱ्या प्रतीच्या जमिनीसाठी १० एकर जमीन निश्चित केली जाते. त्याचप्रमाणे पहिल्या प्रतीच्या जमिनीसाठी जास्तीत जास्त ३६ एकर व इतर जमिनींसाठी जास्तीत जास्त ३० एकर जमीन निश्चित के ली जाते. या प्रकारच्या (कोरड्या) जमिनीच्या उप-विभागासाठी ८ एकरपेक्षा कमी जमिनीस नंबर दिला जात नाही. प्रत्येकी ४ एकर जमिनीस पोत नंबर दिला जातो. एका सर्व्हे नंबरमध्ये चारपेक्षाअधिक पोत नंबर देण्यास मुभा नसते. तसेच १० गुंठ्यांपेक्षा कमी जमिनीस सर्व्हे नंबर दिला जात नाही. बागायत जमिनीस सर्व्हे नंबर देताना विहिरी व मोटेस जोडलेल्या बैलांची संख्या विचारात घेतली जाते. एक ि वहीर व त्यावर दोन बैलांची मोट असल्यास त्याखाली भिजणाऱ्या तीन एकर जमिनीस एक सर्व्हे नंबर तर एक विहीर व त्यावर चार बैलांची मोट चालत असल्यास त्याखाली भिजणाऱ्या

चार एकर जमिनीस एक सर्व्हे नंबर दिला जाई. ऊस व पानमळ्याच्या जमिनींच्या बाबतीत १० गुंठ्यांच्या जमिनीस सुद्धा स्वतंत्र सर्व्हे नंबर देण्यात येई. पूर्वीच्या जमाबंदीनुसार जिल्ह्यामध्ये ओली जमीन आढळून आली नाही.

**जमाबंदी व आकारणी*** : जमाबंदी आयुक्तांच्या प्रत्यक्ष पर्यवेक्षणाखाली असलेल्या जमाबंदी शाखेकडे हे काम सोपविले जाते. हवामान, बाजार सुविधा, शेतीविषयक कौशल्य, शेतकऱ्याची प्रत्यक्ष स्थिती, पाण्याची उपलब्धता आणि शेतकऱ्याचा सर्वसाधारण उत्कर्ष या घटकांचा साकल्याने विचार क रून संपूर्ण तालुक्यासाठी दर प्रस्तावित केले जात. याव्यतिरिक्त त्या जमिनीची उत्पादनक्षमता आणि शेतीव्यवसायावर अवलंबून असलेल्या बहुसंख्याक लोकांचे उत्पन्न यांचासुद्धा विचार केला जात असे. अशा प्रकारे तालुक्यातील एकूण जमिनीची आवश्यकतेनुसार दोन किंवा तीन समूहांत विभागणी करून कोरडी, बागायत व ओल्या जमिनीवर जास्तीत जास्त दर प्रस्तावित केला जात असे. जमिनीचीवेग वेगळ्या समुहात विभागणी केल्यानंतर त्यामध्ये बदल करण्याबाबत जिल्हाधिकाऱ्याचा अभिप्राय घेवून त्यांच्या सूचना व्यावहारिक असल्यास त्या मान्य केल्या जात असत.

भूमापन पथकाद्वारे आकारणीचे प्राथमिक स्वरूपाचे काम पूर्ण झाल्यानंतर वर्गकार नोंदवही,वसूल बाकी, सार नक्शा, बागायत तक्ता आणि वर्गकार दरवई याबाबतची कागदपत्रे पुढील कार्यवाहीसाठी जमाबंदी विभागाकडे पाठविली जात.

वर्गीकरणाच्या प्रक्रियेमध्ये पटवारी आणि तहसील यांच्याकडून वर्गकारांनी प्राप्त करून घेतलेली खालील किरकोळ कागदपत्रेसुद्धा जमाबंदी विभागाकडे पाठविण्यात येत. त्यामध्ये सिंचन साधनाबाबतचे विवरणपत्र, प्रत्येक गावाची जनगणना विषयक आकडेवारी, जत्रा व उरुसांची ठिकाणे, शाळा, डाकघरे, रेल्वे सुविधा, गेल्या १० वर्षांतील पर्जन्यमानाची आकडेवारी, घेतलेल्या वेगवेगळ्या पिकांचे प्रकार, धान्य व इतर वस्तूंच्या भावामध्ये झालेले चढउतार, जमिनीची (स्थानिक) किंमत, वेगवेगळ्या समूहाती ल जमीन धारकांची संख्या, जनावरांची संख्या व गहाण ठेवलेल्या जमिनीबाबतच्या कागदपत्रांचा समा वेश असे.

वरीलप्रमाणे कागदपत्रे प्राप्त झाल्यानंतर जमाबंदी विभाग "अ" विवरणपत्र तयार करून त्यामध्ये जमिनीचे शासकीय, इनाम, मक्ता आणि खारीज खाता असे वेगवेगळे प्रकार दर्शविले जात. तसेच या प्रत्येक प्रकारांतर्गत लागवडी योग्य व बिगर लागवडी योग्य क्षेत्र दर्शवून लागवडीयोग्य जमिनीची कर आकारणी दर्शविण्यात येई, तर वसुलबाकीवर आधारीत असलेले दुसरे "ळु" विवरणपत्र तयार करून त्यामध्ये जमाबंदीच्या अगोदरचे जमिनीचे क्षेत्र व त्यावरील सारा आकारणी याबाबतचा तपशील देण्यात येई.

सिंचन आणि पाण्याचे साधन याबाबतचे एक अतिरिक्त विवरणपत्र तयार करून त्यामध्ये एकूण तलाव, विहिरी व कालवे यांची संख्या दिली जात असे. त्यानंतर कोरडी, बागायत आणि ओल्या

---

* सन १९७१ च्या नांदेड जिल्हा गॅझेटिअरमध्ये शेतजमिनीच्या महसूल आकारणीविषयीचे तपशील दिले आहेत ते सारांशाने येथे नोंदविण्यात आले आहेत.

जमिनींची तीन वेगवेगळी विवरणपत्रे तयार करून त्यामध्ये जमिनीचे क्षेत्र व आकारणी, तसेच सद्याची सारा आकारणी व पुढील वर्षाची प्रस्तावित आकारणी या मधील फरक दर्शविण्यात येई त्यास नतीजा माळी (अपेक्षित वित्तीय भार) असे संबोधण्यात येई. त्यानंतर नतीजा माळी वर आधारित "क्यू" विवरणपत्र तयार करून त्यामध्ये ज्या जमिनीचे पुनरीक्षण (Revision) होणे आवश्यक आहे. अशा प्रत्येक गावातील त्या त्या प्रवर्गातील जमिनीचे क्षेत्र व त्यावरील आकारणी दर दर्शविण्यात येत. ही आकडेवारी कोरडवाहू, बागायत आणि ओल्या जमिनींना वेगवेगळी दर्शविण्यात आल्याने शासनास दर मंजूर करण्याबाबतचा व्यापक अंदाज येत असे. जमाबंदी आयुक्तास तालुक्यातील सर्व जमिनींचावर्ग वारीनुसार नकाशा तयार करून व तो त्याच्या प्रस्तावीत दरासोबत जोडून, सदरचा प्रस्ताव शासनाच्या मंजुरीसाठी सादर करावा लागत असे. शासनाची मंजुरी मिळाल्यानंतर जमाबंदी आयुक्त खालीलप्रमाणे अंतीम दर आकारणी निश्चितीबाबतची विवरणपत्रे तयार करीत असे :—

(अ) जमिनीच्या वेगवेगळ्या मृद प्रवर्गानुसार व पाणीपुरवठा स्रोत्रानुसार जंत्री किंवा चढउताराचे मान दर लावण्यात येत.

(ब) गट श्रेणी व जंत्री श्रेणीतील जमिनींची वर्गकार नोंदवहीत नोंद घेण्यात येई.

(क) प्रत्येक सर्व्हे नंबरचे क्षेत्र व त्यावरील आकारणी दर यांचा आकारबंद तयार केला जाई.

(ड) आकारबंदामधील नोंदी वसुलबाकीमध्ये घेतल्या जात.

(इ) उप-जिल्हाधिकारी किंवा सहायक जमाबंदी आयुक्तांमार्फत खातेदारांना किंवा नोंदणीकृत जमिनधारकांना खातेदार चिठ्ठ्या वाटल्या जात.

वसुलबाकी व शेतवार यांच्या प्रती, व दोन छापलेले नकाशे, तहसील कार्यालयास संदर्भासाठी पाठविले जात व त्यापैकी एक प्रत संबंधित खेड्याच्या अधिकाऱ्याकडे पाठविली जात असे.

जमीन महसूल अधिनियमाच्या कलम ८७ अंतर्गत अपिलांच्या सुनावणीची घोषणा झाल्याच्या दिनांकानंतर ही जमाबंदीची कागदपत्रे जमाबंदी आयुक्त स्वतःकडे ठेवून घेत. दोन वर्षांचा कालावधी लोटल्यानंतर ही कागदपत्रे सुरक्षित रक्षण करण्यासाठी जिल्हा जमीन अभिलेख कार्यालयास पाठविली जात. जिल्हा जमीन अभिलेख कार्यालयात जमाबंदीची कागदपत्रे प्राप्त झाल्यानंतर त्यामध्ये दुरुस्त्या करण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना होते. पट्टेदारांच्या नावांच्या चुकीच्या नोंदी झाल्या असल्यास त्या बाबतच्या चुका किंवा उणिवा दूर करण्यासाठी जमीन महसूल अधिनियमाच्या कलम ८७ अंतर्गत घोषणा झाल्यापासून दोन वर्षांपर्यंत अपील ऐकून घेण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यास होते. इतरबाबींविषयीच्या दुरुस्त्या अन्य कोणत्याही वेळी करण्यास मुभा होती.

जमाबंदीचे दर प्रस्तावित करताना खालील मर्यादा अमलात आणल्या जात :—

(अ) तालुक्यांमध्ये जास्तीत-जास्त दर आकारताना महसुलातील वाढ ३० टक्क्यांपेक्षा अधिक नसावी.

(ब) एका स्वतंत्र खेड्याची महसूल वाढ ६६ टक्क्यांपेक्षा अधिक लादण्यात येऊ नये.

(क) वैयक्तिक धारणजमिनीवरील वाढ १०० टक्क्यांपेक्षा अधिक असू नये.

(ड) विहित दरापेक्षा अधिक दर आढळून आल्यास रयतेस सूट देण्यात येई, त्यास इगतपुरी सूट असे म्हणत. तसेच प्रस्तावित वाढ सात वर्षांच्या कालावधीत विभागूनआकारण्यात येत असे.

संपूर्ण तालुक्याच्या जमाबंदीचा तपशील ''जमाबंदी अहवाल'' नावाच्या पुस्तकात जतन करून त्याच्या प्रती जिल्हा निरीक्षक, भूमी अभिलेख कार्यालयास पाठविल्या जात. सर्वसाधारणपणे पहिल्या जमाबंदीनंतर पुढील पुनरीक्षणासाठी ३० वर्षे इतक्या कालावधीचे आश्वासन दिले जाई.

प्रत्येक सर्व्हेनंबरची फेरतपासणी करताना खालील नियमांची अंमलबजावणी होत असे. प्रत्येक सर्व्हे नंबरची सीमा चिन्हे तपासून त्यानुसार यादी तयार करणे, प्रत्येक सर्व्हेनंबरचे क्षेत्रफळ तपासणे, जमिनीचा पोत-खराब तपासणे, सर्व्हे नंबर विहित प्रमाणात नसल्यास त्यात फेरफार करणे, पाणीपुरवठा साधनाच्या वर्गीकरणाची तपासणी करणे, गेल्या १० वर्षात पाणी-पुरवठा झाला नसल्यासओलिताखाली ल जमिनीचे कोरडवाहूमध्ये रूपांतर करणे, तसेच कोरडवाहू जमिनीस गेल्या ३ वर्षात निरंतर पाणीपुर वठा झाला असल्यास तिचे ओलिताखालील जमिनीमध्ये रूपांतर करणे, नविन विहिरीचे खोदकाम चालू असताना किंवा जुन्या विहिरी दुरुस्त होत असताना त्या विहिरीवर अवलंबून असलेली जमीन कोरड वाहू ठरविणे, आजीव देणगीदाखल दिलेल्या इनाम जमिनीचे अनधिकृत व्यक्तीकडे हस्तांतरण झाले असल्यास ही बाब संबंधित अधिकाऱ्याच्या निदर्शनास आणून देणे, कायमस्वरूपी कोणतीही अट न घा लता इनाम जमीन दिली गेली असल्यास तिची पोट विभागणी करणे, राज्य शासनाच्या इमारती व दळणवळण तसेच सिंचन व उर्जा विभागांतर्गत नवीन रेल्वे व रस्ते मार्ग तसेच कालव्यांच्या बांधकामासाठी प्रत्यक्ष घटनास्थळी पोटविभाग करणे, बैलगाडीची गाडेवाट किंवा नाल्यांच्या दुतर्फा त्या जमिनी जर एकाच चैनमध्ये असतील तर त्यांना वेगवेगळे सर्व्हे नंबर देणेआणि रस्त्यावर टाकण्यासाठी उचलण्यात आलेल्या माती व मुरमांच्या खड्डयांनी युक्त असलेल्या जमिनीस वेगळे नंबर देणे, हे नियम पाळले जात. सन १९५१ ते १९६० या दहा वर्षांमध्ये जिल्ह्यातीलआणि प्रत्येक तालुक्यातील जमीन महसुलाची आकारणी आणि वसूल झालेला महसूल तक्ता क्रमांक १ मध्ये दर्शविला आहे.*

Maharashtra State Gazetteers

## भूमि अभिलेख विभाग

नांदेड जिल्हा भू-अभिलेख कार्यालय इ.स.१९५८ पासून स्वतंत्रपणे अस्तित्वात आले. त्यापूर्वी जि ल्ह्यामध्ये नांदेड आणि परभणी जिल्ह्यांसाठी संयुक्तीकरीत्या एकमेव भू-अभिलेख अधिकारी होता. जि ल्ह्यात आठ तालुके असून एकूण गावांची संख्या १,४०० होती, यामध्ये पूर्वीच्या ३९८ जाहगीर गा वांचाही समावेश होता. या गावांचे सर्व्हेक्षण अंशतः शासनाकडून व अंशतः जाहगीर प्राधिकरणाच्या

* सर्व तक्ते प्रकरणाच्या शेवटी दिले आहेत.

मान्यताप्राप्त अभिकरणाद्वारे करण्यात आले. एकूण ३९८ गावांपैकी ४१ गावांचे शासनाद्वारे तर इतर स र्व गावांचे जाहगीर प्राधिकरणाद्वारे सर्व्हेक्षण करण्यात आले. इ.स. १९७१ मध्ये जिल्ह्याच्या एकूण २५,५३,०१३ एकर आणि २८ गुंठे जमिनीपैकी २०,०४,२४५ एकर आणि ७ गुंठे जमीन लागवडीखाली तर बाकी बिगर लागवडीखालील होती. तसेच इ.स. १९५४ ते इ.स. १९५६ दरम्यान जिल्ह्यातील सर्व तालुक्यांचे कृषि-अर्थशास्त्रीय सर्व्हेक्षण करण्यात आले. इ.स.१९६३ मध्ये संपूर्ण जिल्ह्याची एकूण महसू ल आकारणी रु. ३०,७३,८४६.१५ इतकी होती.

इ.स. १९७१ मध्ये जिल्हा निरीक्षक, भूमि अभिलेख नांदेड हा जिल्ह्याच्या भूमि-अभिलेख ि वभागाचा प्रमुख प्रभारी अधिकारी असून त्याच्या मदतीस एक मुख्यालय सहायक, एक जिल्हा स र्व्हेक्षक, नऊ भूकर सर्व्हेक्षक आणि इतर लिपिकवर्ग होता. या कार्यालयाचे कार्यक्षेत्र संपूर्ण जिल्हा होते. मात्र शासन निर्णयानुसार दिनांक ०१ ऑक्टोबर १९९४ पासून भूमि अभिलेख खात्याची पुनर्रचना होऊन प्रत्येक तालुक्यास तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख हे पद निर्माण करण्यात आले. अशा प्रकारे नांदेड जिल्ह्यात १६ तालुक्यांच्या ठिकाणी ही कार्यालये निर्माण झाली व या सर्व कार्यालयांवरअधीक्षक, भूमि अभिलेख, नांदेड, यांचे नियंत्रण ठेवण्यात आले.

जमीन महसूल, जमाबंदी व अधिकार अभिलेख इत्यादींसाठी व शेतजमिनीच्या मोजणीसाठी वर्गीकरणाचे काम त्याचप्रमाणे नागरी व ग्रामीण विभागातील बिगरशेतीखालील जमिनीच्या मोजणीचे काम या विभागाकडून केले जाते. त्यामध्ये प्रारंभिक मोजणी, पुनर्मोजणी, पोटहिस्सा मोजणी, गावठाण मोजणी, नागरी मोजणी आणि अशाच इतर कामांचा समावेश होतो.

**जमाबंदी :** व्यक्तीगत धारण केलेल्या जमिनीची महसूल आकारणी निश्चित करण्याचे काम या विभागाद्वारे केले जाते. जमिनीचे वर्गीकरण करून जमिनीची उत्पादनक्षमता आणि त्या प्रदेशातील इतर परिस्थितीचा विचार करून जमाबंदी करण्यात येते. नांदेड जिल्ह्यात एकूण १,६०९ गावे असून सर्व गा वांत जमाबंदी निश्चित करण्यात आलेली आहे. पूर्वी जहागीर असलेल्या गावामध्ये आवश्यक तेथे सूट देऊन फेरजमाबंदी करण्यात आली आहे. जिल्ह्यात एकूण १०.६४ लक्ष हेक्टर शेतजमीनअसून जमीन महसुलाचे इ.स.२००५-२००६ मधील वार्षिक उत्पन्न २५,२१,६८३ रुपये होते.

**जिल्हा भूमापन :** भूमापनाची व जमाबंदीची कामे पूर्ण झाल्यावर ग्रामवार, तालुकावार भूमिअभि लेख ठेवून त्यांचे जतन केले जाते. त्यानंतर वारसा, खरेदी, विक्री, शेतीचे बिगरशेती उपयोगासाठी वर्गीकरण व भूसंपादनामुळे झालेले बदल इत्यादींबद्दलच्या नोंदी करून भूमि अभिलेख अद्ययावत केले जातात. नांदेड, अर्धापूर व मुदखेड तालुक्यांमध्ये भूमापनास इ.स. १८८३-८४ मध्ये आणि बिलोली, नायगाव (खै.), धर्माबाद, हदगाव व हिमायतनगर तालुक्यांमध्ये इ.स. १९२२-२३ मध्ये सुरूवात झाली. कंधार तालुक्यामध्ये इ.स.१९२४ मध्ये भूमापनास सुरूवात झाली तर किनवट व माहूर तालुक्यांत इ.स. १९६२ मध्ये भूमापनास सुरूवात झाली. तसेच भोकर, उमरी, मुखेड व लोहा तालुक्यांमध्ये इ.स. १९२३-२४ मध्ये तर देगलूर तालुक्यात इ.स. १९२४-२५ मध्ये भूमापनास सुरूवात झाली. या कामासाठी इ.स.२००५-२००६ मध्ये जिल्ह्यात एकूण ३८ भूकरमापक होते. तसेच इ.स.२००५-२००६

पर्यंत जिल्ह्यात एकूण ३६०९ भूखंडांची मोजणी पूर्ण करण्यात आली होती व भूमापनासाठी एकूण ५५,९९,८३२ रुपये शुल्क वसूल करण्यात आले होते.

**धारण जमिनींचे एकत्रीकरण :** जमिनीची तुकडेबंदी आणि तुकडेजोड करण्याबाबत मुंबई अधिनियम, १९४७ या उपबंधान्वये महाराष्ट्र राज्यातील शेतजमिनीचे एकत्रीकरण करण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. त्यामध्ये स्थानिक क्षेत्र व प्रमाणभूत क्षेत्र निश्चित करून तुकड्यांचे हस्तांतरण करण्यावर व नवीन तुकडे पाडण्यावर निर्बंध घालण्यात आले आहेत. या योजनेमध्ये शेतकऱ्यांचे विखुरलेले तुकडे एकत्र करून त्यांचे कमीत कमी संलग्न गट तयार करण्यात येतात. त्यामुळे खर्च, श्रम यामध्ये तर बचत होतेच त्याशिवाय शेतकऱ्यास शेती सुधारणा करण्यास मदत होते, तसेच उत्पादनवाढीस प्रोत्साहन मिळते.

नांदेड, अर्धापूर, मुदखेड, बिलोली, नायगाव (खै.), धर्माबाद, हदगाव व हिमायतनगर तालुक्यांमध्ये इ.स.१९७० मध्ये, देगलूर तालुक्यात इ.स. १९७२ मध्ये; भोकर व उमरी तालुक्यात इ.स.१९७३ मध्ये; मुखेड तालुक्यात इ.स.१९७८ मध्ये; कंधार तालुक्यात इ.स.१९८० मध्ये; तर किनवट, माहूर आणि लोहा तालुक्यांत इ.स.१९८३ मध्ये एकत्रीकरण योजना सुरू झाली. त्यानुसार नांदेडमधील ९१ गावे, अर्धापूर ५६ गावे, मुदखेड ५५ गावे, बिलोली ८२ गावे, नायगाव (खै.) ८७ गावे, धर्माबाद ५४ गावे, हदगाव १०० गावे, हिमायतनगर ४२ गावे, किनवट ८३ गावे, माहूर ४५ गावे, भोकर ७४ गावे, उमरी ३४ गावे, मुखेड ११५ गावे, देगलूर ९५ गावे, कंधार ९६ गावे वलोहा १०५ गावे यांच्या एकत्रीकरणाचे काम पूर्ण झालेले आहे. शासनाच्या ई-गव्हर्नर या धोरणाचा एक भाग म्हणून आता कास्तकारांना संगणकीकृत ७/१२ चे उतारे उपलब्ध होत आहेत.

**नागरी भूमापन व गावठाण योजना :** शेतजमिनीच्या प्रारंभिक महसुलाच्या मोजणीच्या वेळी शहरे व गावे यातील गावठाणाखालील क्षेत्राचे भूमापन केले नव्हते. त्यामुळे व्यक्तीगत मालकीचे हक्क दर्शी वणारे अधिकार अभिलेख व नकाशे उपलब्ध होत नव्हते. असे अभिलेख व नकाशे तयार करण्याच्या दृष्टीने व विकास योजना तयार करणे सोपे जावे म्हणून महाराष्ट्र जमीन महसूलअधिनियम, १९६६ च्या कलम ७९ व १२६ मधील उपबंधानुसार अशा गावातील आणि शहरातील गावठाणाच्या भूमापनाची कामे हाती घेण्यात आली. त्यानुसार नांदेड जिल्ह्यामध्ये एकूण १५३ गावांमध्ये नागरी व गावठाण भूमापनाचे काम पूर्ण झाले आहे. नगर व गावठाण भूमापनासाठी होणारा खर्च शुल्करुपाने खातेदारांकडून वसूल केला जातो. या भूमापन योजनेमुळे अकृषक मालमत्तेवर महसूलआकारणी करण्यास व विकसनशील नगरांसाठी विकास योजना हाती घेण्यास मदत होते.

राज्यातील सर्व गावांतील गावठाण मोजणी योजनेला शासनाने १९६४ साली मंजुरी दिली. सध्या या योजनेखालील भूमापनाचे काम दोन हजारपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या गावांपुरते मर्यादित आहे.

## पोलीस

ऐतिहासिक काळी प्रजेच्या जीविताचे व मालमत्तेचे संरक्षण करण्याची संपूर्ण जबाबदारी राजावर असे. तो राज्यात सुव्यवस्था व शांतता राखण्यासाठी पदरी फौज बाळगत असे. फौजेवर नियंत्रण ठेवण्यासाठी सुभेदार, कमाविसदार, महालकरी वगैरे अधिकाऱ्यांच्या नेमणुका केल्या जात. पुढे मुलकीव फौजदारी कामे पाहणारांना फौजदार, ठाणेदार, कोतवाल, पाटील, चौगुला इत्यादी विविध नावांनी संबोधले जाऊ लागले.

इ.स. १९०९ पर्यंत निजाम राजवटीत भूतपूर्व नांदेड जिल्ह्यामध्ये पहिला तालुकदार हा पोलिसांचा प्रमुख असे व त्याला दुय्यम अधीक्षक (मोहतामीम) हा त्याचा कार्यकारी प्रतिनियुक्त म्हणून काम पहात असे. त्याच्या नियंत्रणाखाली ८ निरीक्षक, ७४ दुय्यम अधिकारी, ४८३ शिपाई, २५ शस्त्रधारी पोलीस हे २९ ठाणी आणि ३६ चौक्यांमध्ये (outpost) विभागण्यात आले होते.[१६]

१९२२ मध्ये न्यायिक आणि कार्यकारी शाखा वेगळ्या करण्यात येऊन महसूल अधिकाऱ्यांकडे न्यायिक व्यवस्था देण्यात आली आणि जिल्हाधिकाऱ्याकडे जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेची जबाबदारी सोपविण्यात आली. हैद्राबाद संस्थान भारतीय संघराज्यात विलीन होईपर्यंत तेथे थोड्याफार फरकाने सर सालारजंग यांनी निर्मिलेली पोलीस यंत्रणा अस्तित्वात होती. मराठवाडा विभाग महाराष्ट्र राज्यात समाविष्ट झाल्यानंतर राज्याच्या इतर जिल्ह्यांप्रमाणेच तेथे पोलीस यंत्रणा कार्यरत झाली.

१९७१ पासून नांदेड जिल्ह्यातील पोलीस विभाग जिल्हा पोलीस अधीक्षकाच्या नियंत्रणाखाली असून पोलीस दलाच्या प्रशासनाकरिता जिल्ह्याची विभागणी नांदेड उप-विभाग व देगलूर उप-विभाग अशा दोन उप-विभागात करण्यात आली होती. या प्रत्येक उप-विभागावर सहाय्यक पोलीस अधीक्षक किंवा उप-पोलीस अधीक्षक यांची नेमणुक करण्यात आली होती. या उप-विभागांची अनुक्रमे नांदेड व देगलूर येथे मुख्यालये होती.

१९५५ साली नांदेड जिल्ह्यात पोलिसांची एकूण संख्या १,१०१ होती. त्यापैकी ४७ पोलीस अधिकारी होते. १९६० साली हीच संख्या ५२ अधिकारी व १,१६० पोलीस शिपाई अशी होती. १९५० साली पोलिसांनी दखल घेण्यायोग्य गुन्हे १,०१० होते, हीच गुन्ह्यांची संख्या १९५५ मध्ये ९३५ इतकी कमी झाली, मात्र १९६० मध्ये ती पुन्हा १,५३५ इतकी वाढली. १९६१ साली नांदेड जिल्ह्यामध्ये २७ पोलीस ठाणी होती.

१९७० मध्ये २१ पोलीस ठाणी, ७ पोलीस चौक्या व पोलिसांची जिल्ह्यातील एकूण संख्या १,०२४; १९८० मध्ये २६ पोलीस ठाणी, १० पोलीस चौक्या, तर पोलिसांची संख्या १,४८१; १९९० मध्ये २९ पोलीस ठाणी, १६ पोलीस चौक्या व पोलीसांची संख्या २,७००, सन २००० मध्ये ३२ पोलीस ठाणी, १९ पोलीस चौक्या व पोलिसांची संख्या २,७५१ आणि २००५ मध्ये ३५ पोलीस ठाणी, २२ पोलीस चौक्या, ३१ पोलीस कोठड्या व पोलिसांची संख्या २,९७८ झाली. २००५ साली जिल्ह्यातील

---

१६. **इम्पीरिअल गॅझेटिअर ऑफ इंडिया,** प्रॉव्हिन्शल सीरीज, हैद्राबाद स्टेट, (कलकत्ता, १९०९), पृ. २२९.

पोलिसांची वर्गवारी पुढीलप्रमाणे होती.- दोन पोलीस अधीक्षक, १२ पोलीस उप-अधीक्षक, ३५ पोलीस निरीक्षक, ३५ स.पो.निरीक्षक, १४५ पो.उप-निरीक्षक, २२३ स.पो. उप-निरीक्षक, ६४८ पोलीस हवा लदार, ४०१ पोलीस नाईक व १,४७७ पोलीस शिपाई होते. यामध्ये २ महिला स.पो.उप-निरीक्षक, ६ महिला पोलीस हवालदार, ४ महिला पोलीस नाईक व १२२ महिला पोलीस शिपाई यांचा समावेश होता.

जिल्ह्यातील पोलीस दलावर इ.स. १९९० मध्ये ४,८७,९६,०२६ रुपये; २००२-०३ मध्ये २५,५७,९१,१०५ रुपये तर २००५-२००६ मध्ये ३५,०५,६५,१४८ रुपये इतका खर्च झाला.

खालील सारणीत सप्टेंबर, २००६ अखेरची गुन्हे विषयक संख्या दर्शविली आहे :—

| गुन्ह्याचा प्रकार | दाखल | उघड | टक्के | गेला माल रु. | मिळाला माल रु. | टक्के |
|---|---|---|---|---|---|---|
| खून | ६० | ५० | ८३ | — | — | — |
| खुनाचा प्रयत्न | ६० | ६० | १०० | — | — | — |
| दरोडा | १४ | १० | ७१ | ४,०३,५१० | १२,०५० | ३ |
| जबरी चोरी | ६६ | ४२ | ६४ | २८,१२,१६८ | १८,२६,६२० | ६५ |
| दिवसा घरफोडी | १५ | ७ | ४७ | ५,०९,४४८ | ४,६०० | ०.९० |
| रात्री घरफोडी | १७९ | ४८ | २७ | ६०,७१,७३२ | २,७८,७४५ | ५ |
| सर्व चोऱ्या | ४०१ | १७० | ४२ | ७३,७३,७६१ | २६,४७,२०२ | ३६ |
| दंगा | १९८ | १९३ | ९७ | — | — | — |
| दुखापत | १००१ | ९९३ | ९९ | — | — | — |
| बलात्कार | २५ | २५ | १०० | — | — | — |
| इतर भादंवि | १,३१४ | १,२५९ | ९६ | — | — | — |
| एकूण | ३,३३३ | २,८५७ | ८६ | १,७१,७०,६१९ | ४७,६९,२१७ | २८ |

पोलीस बिनतारी संदेश विभाग नांदेड येथे इ.स.२००५ मध्ये २ एच एफ संच, १६० व्ही एच एफ संच तर ६८ वॉकीटॉकी असून सदर कार्यालयात अधिकारी व कर्मचारी यांची संख्या पुढीलप्रमाणे होती :—

१ पोलीस निरीक्षक, २ पोलीस उपनिरीक्षक, ४ प्रमुख यंत्रचालक, १२ रेडिओ यांत्रिकी, १५ बीनतारी यंत्रचालक, ४ वीजतंत्री, १ स्तंभ कारागीर व ९ कर्मशाळा मदतनीस.

**पोलीस कल्याण योजना :** नांदेड जिल्ह्यामध्ये पोलीस कुटुंब कल्याण निधीद्वारे पोलिसांच्या कुटुंबियांना वैद्यकीय आणि शैक्षणिक सोयी उपलब्ध करून दिल्या जातात. सन १९८३ मध्ये जिल्ह्यात पोलीस मुख्यालयाच्या ठिकाणी शहराच्या मध्यवस्तीमध्ये शासकीय जागेवर पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी शोभानगर पोलीस को.ऑपरेटीव्ह हाउसिंग सोसायटी निर्माण करून त्यामध्ये एकूण

१५८ सदस्यांना या योजनेअंतर्गत घरे उपलब्ध करून देण्यात आली. तसेच इ.स. २००६ मध्ये दक्षता पोलीस कर्मचारी सहकारी पतसंस्थेमार्फत नियोजित दक्षता पोलीस गृहनिर्माण संस्था मर्यादित, नांदेड या नावाने पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचेसाठी बँकेकडून कर्ज घेऊन २०० नवीन घरे निर्माण करावयाचे नियोजित होते. याच संस्थेच्या माध्यमातून गॅस एजन्सी, विमा योजना, टेलीफोन, पी.सी.ओ. सेवा, पाणपोई, हुशार मुलांना मोफत वह्यांचे वाटप इत्यादि उपक्रम राबविले जातात. माहे जुलै २००६ मध्ये ९४,००० रुपये किंमतीच्या वह्यांचे वाटप करण्यात आले होते. तसेच पोलीस कल्याण निधीतून १० वी मध्ये ७५ टक्के व १२ वी मध्ये ७० टक्के गुण व वैद्यकीय तसेच अभियांत्रिकी प्रवेश मिळालेल्या पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्या पाल्यांना शैक्षणिक अनुदान देण्यात येते. इ.स.२००५- २००६ साली या शैक्षणिक अनुदानाची रक्कम १,८४,५०० रुपये होती. कर्मचाऱ्यांच्या मनोरंजनाकरिता प्रत्येक पोलीस ठाण्याला दूरदर्शन संच पुरविण्यात आला आहे. तसेच पोलीस कल्याण निधी योजनेअंतर्गत बँक कर्ज घेऊन काही पोलिसांना मोटार सायकली पुरविण्यात आलेल्या आहेत.

## कारागृह प्रशासन

कारागृह व्यवस्थेत जिल्हा हा घटक मानला आहे. महाराष्ट्रात प्रत्येक जिल्ह्याला एक मध्यवर्ती जिल्हा कारागृह असून दोन वर्षांहून अधिक मुदतीच्या शिक्षा झालेल्यांकरिता व सराईत गुन्हेगारांकरिता येरवडा, नाशिक रोड, औरंगाबादजवळचे हरसूल येथे केंद्रीय कारागृहे आहेत. जिल्हा कारागृहाच्या खालोखाल बहुधा तालुक्याच्या ठिकाणी उप-कारागृहे असतात.

नांदेड जिल्हा कारागृह वर्ग-२ हे निजामशाहीकालीन असून सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांचे नोंदीनुसार या कारागृहाचे बांधकाम सन १९२० चे आहे. कारागृह परिसराचे क्षेत्र ४.५० एकरआहे. निजाम राजवटीत हे जिल्हा कारागृह असून त्यावेळी प्रत्येक तहसील कार्यालयांच्या ठिकाणीलहान अटक कोठड्यांची व्यवस्था ठेवण्यात येई. अल्प मुदतीची शिक्षा झालेल्या कैद्यांना जिल्हा कारागृहामध्ये ठेवण्यात येई, मात्र ज्या कैद्यांची शिक्षा ६ महिन्यांपेक्षा अधिक असे अशा कैद्यांनाऔरंगाबादच्या मध्यवर्ती कारागृहात पाठविण्यात येई.[१७] ब्रिटिशकाळात या कारागृहामध्ये स्वातंत्र्य सैनिकांना बंदिस्त ठेवण्यात आले होते, मात्र त्याबाबतच्या नोंदी असलेल्या नोंद वह्या अत्यंत जीर्णावस्थेत असून त्यामधील नोंदी अस्पष्ट असल्याने वाचता येत नाहीत.

या कारागृहाची क्षमता ९० पुरुष आणि १५ स्त्रिया मिळून १०५ अशी असली तरी कारागृहात सरासरी २५० च्या जवळपास बंदी बंदिस्त असतात. तसेच हिवाळ्यात, उन्हाळ्यात, दुर्गा उत्सव व गणेश उत्सव या कालावधीत बंदीची संख्या जास्तीत जास्त ३५० पर्यंत पोहोचते. यापेक्षा कैद्यांची संख्या वाढल्यास त्यांना परभणी, बीड किंवा उस्मानाबाद येथील कारागृहांमध्ये पाठविण्यात येते. कारागृहास ४ विभक्त कोठड्यांची सोय असून पुरुष कैद्यांकरिता ६ तर स्त्रियांकरिता १ बराक आहे. याव्यतिरिक्त बिलोली व कंधार येथे उप कारागृहे असून त्यांची १० ते १५ कैदी इतकी क्षमता आहे. त्यापेक्षा बंदींची संख्या वाढल्यास त्यांना नजीकच्या कारागृहात वर्ग करण्यात येते.

---

१७. **इम्पीरिअल गॅझेटिअर ऑफ इंडिया,** प्रॉव्हिन्शल सीरिज, हैद्राबाद स्टेट, (कलकत्ता, १९०९), पृ. २२९.

Maharashtra State Gazetteers

नांदेड जिल्हा कारागृहामध्ये अधीक्षक तुरुंग अधिकारी, मिश्रक व सुभेदार यांचे प्रत्येकी एक पद, दोन लिपिक, तीन हवालदार व ४० रक्षक अशी अधिकारी व कर्मचारी यांची संख्या आहे. अधीक्षकापासून तुरुंगरक्षकांपर्यंत नियुक्त अधिकाऱ्यांना विशिष्ट प्रशिक्षण पुणे येथील दौलतराव जाधव प्रशिक्षण महाविद्यालयात दिले जाते. रक्षकांपैकी काही हत्यारी तर काही बिन-हत्यारी रक्षक असतात. राज्य पातळीवरचे शारीरिक प्रशिक्षण निर्देशक जिल्हा कारागृहांना क्रमानुसार भेटी देऊन तेथील कैद्यांना व रक्षकांना खेळ, सांघिक कवायत यांत मार्गदर्शन करतात. स्त्रीकैदी असतील, तेथे स्त्रीरक्षकही नेमले जातात.

१९८५ मध्ये या कारागृहात एकूण ८३७ कैदी असून त्यापैकी ८२३ पुरुष तर १४ स्त्रिया होत्या. १९९८-९९ मध्ये कैद्यांची एकूण संख्या २,००५ इतकी वाढली, त्यामध्ये पुरुष १,९०९ तर स्त्रिया ९६ होत्या. सन २००३-०४ पर्यंत कैद्यांच्या संख्येत २,७५५ पर्यंत वाढ झाली व त्यामध्ये २,५६४ पुरुष तर १९१ स्त्रिया होत्या.

कारागृहातील सुशिक्षित कैद्यांकडून इतर बंदिवानांना साक्षरतेचे धडे दिले जातात. तसेच प्रजापिता ब्रह्माकुमारी विश्वविद्यालयाकडून कारागृहात संस्कार वर्ग घेण्यात येतात. बंदिवानांचा बाहेरील जगाच्या नित्य जीवनाशी संपर्क राहावा तसेच त्यांची करमणूकही व्हावी या हेतूने प्रत्येक बराकीमध्ये दूरदर्शन संच उपलब्ध करून देण्यात आला आहे. तसेच प्रवचने, भजन, रक्षाबंधन यासारख्या धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. समाजातील इतर घडामोडींचीसुद्धा त्यांना जाणीव करून देण्यासाठी, बंदिवानांमध्ये दररोज वर्तमानपत्रे वाचून दाखविण्यात येतात.

कारागृहातील ३२.४६ आर जमिनीमध्ये कैद्यांद्वारे फळभाज्या व पालेभाज्यांचे उत्पादन करून ते कारागृहातील बंदिवानांसाठी वापरले जाते.[१८]

## नगरसेना

नगरसेना ही नागरी संरक्षण दल तसेच गृहरक्षक दल या नावानेही संबोधली जाते. नगरसेना ही एक मानसेवी संघटना असून सार्वजनिक कार्याची आवड असलेले नागरिक स्वतःचा व्यवसाय सांभाळून विविध प्रकारचे प्रशिक्षण घेऊन या संघटनेचे सभासद होतात. पोलिसांना कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या कामी मदत करण्यासाठी ज्या अनेक संघटना निर्माण केलेल्या आहेत त्यामध्ये नगरसेनेचा अंतर्भाव होतो. नगरसेना कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने पोलिसांना मदत करते. त्याचप्रमाणे आणीबाणीच्या प्रसंगी दळणवळण व वाहतूक, आरोग्य आणि इतर आवश्यक सेवा चालू ठेवण्यासाठी नागरिकांना मदत करते. समाजाच्या सर्व थरांतील लोक धर्मनिरपेक्ष भावनेने या संघटनेत सामील होऊनअडचणीच्या वेळी आपली सेवा प्रदान करण्यास उद्युक्त होतात.

मुंबईमध्ये जातीय दंगलीच्या वेळी ६ डिसेंबर १९४६ ला पोलिसांना मदत करण्यासाठी ही संघटना प्रथम स्थापण्यात आली. या संघटनेने त्यानंतरच्या काळात केलेले भरीव कार्य लक्षात घेऊन

---

१८. कारागृह अधीक्षक, नांदेड जिल्हा कारागृह, नांदेड यांच्या माहितीच्या आधारे.

ही संघटना राज्यात सर्वत्र सुरू करण्यात आली. नगरसेनेच्या कार्याचा व्याप पूर्वीपेक्षा वाढलेला असून ही पथके गरजेच्या काळात सरकारला मदत करतात. नगर सैनिकांना अग्निशमन, प्रथमोपचार, रुग्ण वाहिका, वाहतूक आणि इतर नागरी जीवनाशी संबंधित असे प्रशिक्षण दिले जाते. तसेच मोठ्या शहरातील बस वाहतूक, दूरध्वनी सेवा, याबाबतीत त्यांना प्रशिक्षण दिले जाते. या संघटनेचे मुख्यालय मुंबई येथे असून शासनाने नियुक्त केलेल्या महासमादेशकांच्या अधिपत्याखाली ही संघटना कार्य करते.

नांदेड जिल्ह्यामध्ये मुंबई होमगार्ड अधिनियम, १९४७ नुसार सन १९६२ मध्ये नगरसेनेची स्थापना झाली. तेव्हापासून जिल्हा समादेशक हे नगरसेनेचे प्रमुख असून त्यांच्या अधिकाराखालील पथकाच्या कार्यासंबंधी ते महासमादेशकास जबाबदार असतात. तालुक्यासाठी तालुका पथके स्थापण्यात आली असून ती समादेशक अधिकाऱ्याच्या नियंत्रणाखाली काम करतात. समादेशक अधिकाऱ्यांची नियुक्ती जिल्हा समादेशक महासमादेशकांच्या परवानगीने करतात. ग्राम पथके प्रभारी अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली काम करतात. सन २००४ मध्ये नांदेड जिल्ह्यातील तालुकानिहाय शहरी, महिला व ग्रामीण नगरसेनेची संख्या खालीलप्रमाणे होती :—

| अ.क्र. | शाखेचे नाव | शहरी | महिला | ग्रामीण |
|---|---|---|---|---|
| १ | नांदेड | ४५० | ८० | २९० |
| २ | भोकर | ६० | १० | ८० |
| ३ | किनवट | ८० | १० | ६० |
| ४ | हदगाव | ६० | — | ८० |
| ५ | बिलोली | ७५ | — | ९० |
| ६ | मुखेड | ५० | — | ५० |
| ७ | देगलूर | ५५ | — | ५० |
| ८ | कंधार | ७० | — | १०० |
| | एकूण . . | ९०० | १०० | ८०० |

**उल्लेखनीय कामगिरी :** नांदेड येथे गुरू गोविंदसिंगांची समाधी असल्याने नांदेड जिल्ह्यास शिखांची दक्षिण काशी म्हणून संबोधले जाते व त्यामुळे संपूर्ण भारतातूनच नव्हे तर संपूर्ण जगातून या ठिकाणास भेट देण्यास शीख बांधव व इतर भाविक येतात. तसेच माहूर येथे रेणुका मातेचे पुरातन मंदिर असून साडेतीन शक्तिपीठांपैकी एक समजले जाते. त्यामुळे संपूर्ण भारतातून या ठिकाणास भाविक भेट देत असतात. तसेच कंधार येथील उरूस व माळेगाव येथील खंडोबाची यात्रा प्रसिद्धअसल्याने तेथेही सतत गर्दी असते. त्याचप्रमाणे नांदेड शहर हे दक्षिणगंगा गोदावरी नदीच्या किनाऱ्यावरवसलेले असल्याने नांदेड शहरासह जिल्ह्यातील इतर गावांनाही सतत पुराचा धोका संभवतो. प्राप्त परिस्थितीत कायदा व सुव्यवस्था तसेच नैसर्गिक आपत्तीचा प्रश्न पोलीस खाते व प्रशासनावर सतत

Maharashtra State Gazetteers

ताण निर्माण करीत असतो व तो ताण हलका करण्याचे काम नांदेड जिल्हा होमगार्ड संघटना करीत असते. रेल्वे अपघात, जातीय दंगे, भूकंप, वादळ, महापूर आदी निसर्गनिर्मित तसेच मानवनिर्मित घटनांच्या प्रसंगी नांदेड होमगार्ड संघटनेने चांगले काम केल्याचे दिसून येते. त्यांनी पार पाडलेल्या कामगिरीचे क्षेत्र फक्त नांदेड जिल्ह्याशीच मर्यादित राहिले नसून किल्लारी भूकंप, गुजरात भूकंप, आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश आदी राज्यातील लोकसभा तसेच विधानसभा निवडणुकांच्या प्रसंगी व १९७७ च्या शासकीय संपाच्यावेळीही या संघटनेने उल्लेखनीय कामगिरी पार पाडली आहे. एवढेच नव्हे तर ज्या-ज्या वेळी महाराष्ट्र होमगार्डने दिल्ली येथे होणाऱ्या प्रजासत्ताक दिन सोहळ्यात भाग घेतला, त्या-त्या वेळी सदर पथकात नांदेड जिल्ह्यातील होमगार्ड हे अग्रस्थानी होते.

याव्यतिरिक्त रोगनिदान शिबीर, नेत्ररोग तपासणी शिबीर, रक्तदान, श्रमदान यासारख्या सामाजिक कार्यातही ही संघटना आघाडीवर राहून सामाजिक बांधिलकीची जपणूक करीत असते. अशा सामाजिक कार्य करणाऱ्या होमगार्ड सदस्यांना प्रशिक्षण देण्यासाठी जिल्हा प्रशिक्षण केंद्राची निर्मिती करण्यात आलीअसून त्यासाठी आवश्यक असणाऱ्या अधिकारी व कर्मचारी वर्गाच्या नेमणुकाही करण्यात आल्याआहेत. तसेच नांदेड जिल्ह्यासाठी भाग्यनगर, असदुल्लाबाद, नांदेड येथे संघटनेच्या मालकीची ९१ आर जमीन असून सदर जमिनीवर प्रशिक्षण केंद्राची इमारत लवकरात लवकर उभी करण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू आहेत. त्यामुळे लवकरच नांदेड जिल्हा होमगार्डच्या प्रशिक्षण केंद्राची इमारत पूर्ण होऊन सदस्यांना सदर जागेत अद्ययावत प्रशिक्षण घेता येईल.[१९]

## न्यायालये

नांदेड जिल्ह्यातील स्वातंत्र्यपूर्व काळातील न्यायपद्धती ही थोड्याफार प्रमाणात मध्ययुगीन कालखंडापासून चालत आलेली होती, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. मुघल राजवटीत न्यायदानाला अतिशय महत्त्व होते आणि न्यायदानासाठी खास काजी नेमलेले असत. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर निजाम-उल-मुल्क हैद्राबादचा सत्ताधीश झाल्यानंतर मुघलकालीन न्यायसंस्थेची जी घटना होती तीच निजामाने चालू ठेवली. सर्वसाधारण एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत जिल्ह्यात दिवाणीआणि फौजदारी न्यायासंबंधीचे अधिकार महसूल अधिकारी म्हणजेच तालुकदार, मामलतदार आणि पाटील यांचेकडे सोपविले होते. हैद्राबाद संस्थानात न्यायदानाकरिता स्वतंत्र अशी न्यायदान व्यवस्था नव्हती. प्रामुख्याने परंपरा आणि रूढी यांच्या आधारे न्यायदान पद्धती रूढ झालेली होती.

खेडेगावातील किरकोळ बाबींचे न्यायदान गावचे पाटील करीत. परंतु पाटलांनी दिलेला निकाल प्रतिवादींना मान्य नसल्यास त्याबाबत पुढील सुनावणी पाटलांच्या पंचायतीसमोर होत असे. एखादावाद निकाली निघाला नाही तर त्याची सुनावणी मामलतदारापुढे चालत असे. न्यायदानाचे अंतिमअधिकार सुभेदाराला होते. त्यांनी दिलेला निकाल अंतिम असे. वारसा हक्क, जाहागीर वतन, पैशांचेव्यवहार, अहस्तांतरित संपत्ती, इत्यादी प्रकारांच्या खटल्यांवर निकाल देण्यासाठी काजी आणि मुफ्ती यांना अधिकार होते.

---

१९. जिल्हा समादेशक, नांदेड यांच्या माहितीच्या आधारे.

पूर्वपरंपरेनुसार शिक्षा सुनावण्याचे अधिकार सुभेदारास होते. परंतु त्यानंतर हे अधिकार माम लतदाराकडे सोपविण्यात आले. इ.स. १८४५ मध्ये हैद्राबाद संस्थानात नबाब सिराज-उल-मुल्क याच्याकडे पंतप्रधानपद आले. त्याच्या कारकिर्दीत दाव्याच्या रकमेवर दरसाल बारा टक्के व्याजाची आकारणी केली जात असे. फौजदारी गुन्ह्याकरिता शिक्षा ठरविण्यासाठी न्यायाधीशांची नेमणूक करण्यातआली होती. नबाबाच्या कारकीर्दीत प्रत्येक जिल्ह्याचे न्यायविषयक काम मुन्सफ आणि अदिल करीतअसत. हुशार व लायक काजींची मुन्सफ आणि मीर अदिल या पदांवर नेमणूक केली जात असे. त्याने दिलेला न्याय अंतिम स्वरूपाचा समजला जाई. परंतु काही महत्त्वाचे खटले मात्र हैद्राबाद येथील फौजदारी अदालतीसमोर फेर तपासणीसाठी पाठविण्यात येत असत. जिल्हा न्यायालयात दिवाणी आणि फौजदारी खटल्यांच्या निकालासंबंधी नियमांची मार्गदर्शिका तयार करण्यात आली होती.

**निजामशाहीतील दिवाणी व फौजदारी न्यायदान :** निजामशाहीकालीन हैद्राबाद राज्यात न्याय प्र शासनासाठी उच्च न्यायालयासह १२३ दिवाणी व २७१ फौजदारी न्यायालये होती. त्यावेळी तहसी लदारांना १०० रु.पर्यंतचे दावे चालविण्याचे अधिकार होते परंतु राज्यामध्ये असे अधिकारवापरणारे एकूण तहसीलदार ७९ तर नायब तहसीलदार पाच होते. जेथे मुन्सफ नेमलेले असत तेथे तहसीलदारास दिवाणी अधिकारिता नसे. राज्यात ५०० रु. पर्यंतचे दावे चालविणाऱ्या मुन्सफांची संख्या १५ होती. नाझिम-इ-दिवाणी किंवा जिल्हा दिवाणी न्यायाधीश आणि पहिल्या तालुकदारांचे न्याय- सहायक यांना ५,००० रु.पर्यंतचे दावे चालविण्याचे अधिकार होते, मात्र मेडक सुभ्यामध्ये ही मर्यादा १०,००० रु.पर्यंत होती. राज्यामध्ये फक्त पाच प्रथम तालुकदारांना दिवाणी अधिकारांचा वापर करून कितीही किमतीचे दावे चालविण्याची मुभा होती. नाझिम-इ-सुभा किंवा विभागीय न्यायाधीश ५,००० रु. व त्याहून अधिक किमतीचे वाद चालवीत असत. तहसीलदार किंवा मुन्सफाकडून नाझिम-इ-दिवाणी किंवा दिवाणी अधिकारिता असलेल्या प्रथम तालुकदाराकडे, तर नाझिम-इ-दिवाणी किंवा प्रथम तालुकदाराकडून नाझिम-इ-सुभाकडे अपील करता येत असे. हैद्राबाद शहरातील लघुवाद न्यायालयामध्ये ५,००० रु. पर्यंतचे दावे चालविले जात असून ५०० रु.पर्यंतच्या दुय्यम न्यायाधीशांच्याअपिलांची सुनावणी होत असे. शहर लघुवाद न्यायालय आणि नाझिम-इ-सुभा किंवा विभागीय न्यायाधीश यांचेकडील अपिले उच्च न्यायालयाच्या खंड न्यायाधीश मंडळाकडे पाठविली जात. ३०० रु. पर्यंतच्या दिवाणी दाव्याच्या दुय्यम न्यायालयाच्या निर्णयाशी जिल्हा न्यायालय सहमतअसल्यास, तो निर्णय अंतिम मानून त्यावर अपील करता येत नसे परंतु विधीचा मुद्दा म्हणून त्यावर सुधारणा करण्याची मुभा असे. त्याचप्रमाणे लघुवाद न्यायालयाच्या दुय्यम न्यायाधीशांच्या ५०० रु.पर्यंतच्या वादावरील निर्णयाशी त्याच न्यायालयाचे वरिष्ठ न्यायाधीश सहमत असल्यास त्यावरहीअपील करता येत नसे, मात्र उच्च न्यायालयात सुधारणा होऊ शके.[२०]

फौजदारी खटल्यांच्या बाबतीत तहसीलदार तृतीय वर्गाचे तर द्वितीय व तृतीय तालुकदार, द्वितीय वर्गाचे दंडाधिकारविषयक अधिकारांचा वापर करीत. प्रथम तालुकदार जिल्ह्याचा प्रमुख दंडाधिकारी असल्याने तो वर्ग-१ चा दंडाधिकारी असे. तहसीलदार व दुय्यम तालुकदारांची अपिले प्रथम

---

२०. **इम्पीरिअल गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ५४ व **परभणी जिल्हा गॅझेटिअर,** १९८८, पृ. ४७८ ते ८०.

तालुकदाराकडे तर प्रथम तालुकदाराच्या निर्णयाविरुद्धची अपिले नाझिम-इ-सुभा किंवा विभागीय न्यायाधीशाकडे वर्ग करण्यात येत. फौजदारी खटल्यांमध्ये, खुनाची न्यायचौकशी वगळता, देण्यातआलेल्या दंडाची रक्कम ५०० रुपयांपेक्षा कमी असल्यास नासिम-इ-सुभाने दिलेला निर्णय अंतिम निर्णय म्हणून ग्राह्य धरण्यात येई परंतु विधीचा मुद्दा म्हणून त्यामध्ये सुधारणा करण्यास मुभा असे. इतर सर्व खटल्यांच्या बाबतीत उच्च न्यायालयाच्या खंड न्यायपीठाकडे अपील केले जाई व त्यांचा निर्णय अंतिम मानला जाई. शहरांच्या इतर दुय्यम न्यायदंडाधिकाऱ्यांनी सुनावलेल्या तीन महिन्यांपेक्षा कमी शिक्षेच्या किंवा १०० रुपये पर्यंतच्या दंडाच्या निर्णयाविरुद्ध मुख्य शहर न्यायदंडाधिकाऱ्याकडेअपील करता येत असे. मात्र या मर्यादेपेक्षा जास्त शिक्षा किंवा दंड झालेल्या खटल्यांच्या बाबतीत उच्च न्यायालयाकडे अपील करावे लागत असे. मूळ अर्जासंदर्भात उच्च न्यायालय सत्र न्यायाधिशाचेअधिकार वापरीत असे. उच्च न्यायालयाच्या विभागीय खंडपीठांना १४ वर्षांची शिक्षा ठोठावण्याचेअधिकार होते, परंतु आजीवन तुरुंगवासाची शिक्षा ठोठाविलेल्या प्रकरणांच्या बाबतीत न्यायालयाचा निर्णय पक्का करण्यासाठी ती प्रकरणे मंत्र्यांकडे पाठविली जात. मृत्युदंडाची शिक्षा झालेली प्रकरणे निजामाकडे सादर केली जात. बहुतांश मोठे जाहगीरदार आणि संस्थानिक आपापल्या अधिकार क्षेत्रापुरते दिवाणी व फौजदारी असे दोन्ही प्रकारचे न्यायिक अधिकार वापरीत व त्यांना त्यांच्या न्यायिक कामाबाबतचा अहवाल नियमितपणे राज्याच्या न्याय विभागाकडे पाठविणे आवश्यक असे.[२१]

सर सालारजंग यांनी हैद्राबाद राज्याच्या पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर प्रथमच प्रशासकीय विभागाबरोबर न्यायालयीन कामकाजात मुलगामी सुधारणा केल्या. त्यांनी इ.स.१८५५ मध्ये मुन्सफ आणि मीर अदिल यांची दिवाणी दावे आणि फौजदारी खटल्यांची चौकशी करण्यासाठी नेमणूक केली. न्यायालयाचे निकाल कार्यवाहीत आणण्यासाठी कार्यक्षम अशा पोलीसदलाची जरुरी होती. त्या वेळी अशा प्रकारचे नियमितपणे काम करणारे पोलीस दल शासनाकडे नव्हते. परंतु प्रत्येक तालुकदाराच्या अधिकारात निजामतमधील शंभर ते दोनशे पोलीस नियुक्त केले जात असत. दरोडेखोरी, चोऱ्या आणि इतर गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी १८५८ पासून सुसज्ज फौजा तयार करण्यात आल्या.[२२] सन १८७० साली सर सालारजंग यांनी कायदे करण्याकरिता एक कमिटी नेमली. त्यानंतर १८९० साली लॉ कमिशन नावाची एक संस्थाही निर्माण करण्यात आली. या कमिशनच्याअध्यक्षाने संस्थानाच्या कायद्याची तपासणी करावी व त्यात दुरुस्त्या सुचवाव्या असे ठरले. त्यानुसार काही कायदे पासही करण्यात आले. १८९३ साली स्वतंत्र वैधानिक परिषद निर्माण करण्यात येऊन कार्यकारी परिषदेच्या अध्यक्षानेच वैधानिक परिषदेच्या अध्यक्षांचेसुद्धा काम करावे अशी व्यवस्था झाली. या वैधानिक परिषदेच्या सभासदांची संख्या २५ होती.[२३] पुढे निजामाने १९१९ मध्ये मुख्य राज्य

---

२१. **इम्पीरिअल गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ५५.

२२. **परभणी जिल्हा गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ४७९.

२३. शर्मा, रा. भी., **हैद्राबाद व देशी संस्थाने अर्थात हैद्राबादची राज्यपद्धती आणि संस्थानी स्वराज्याच्या चळवळी,** भाग १ला, पुणे, १९२८, पृ. १२.

कारभाराचे काम कार्यकारी परिषदेकडे सोपविण्याचे फर्मान काढले. तत्पूर्वी १९१४ साली निजामाने स्वतःकडे सर्व अधिकार घेतांना जी मंत्रिपरिषद अस्तित्वात आणली होती ती १९१९ च्या फर्मानाने रद्द करण्यात आली.[२४]

नांदेड जिल्ह्यात १९०९ मध्ये जिल्हा दिवाणी न्यायालय, दिवाणी न्यायाधीशाच्या शैलीच्या नाझिम-इ-दिवाणीच्या अधिपत्याखाली तर तीन दुय्यम दिवाणी न्यायालये मुन्सफांच्या अधिपत्याखाली होती. प्रथम तालुकदार हा जिल्ह्याचा मुख्य दंडाधिकारी आणि जिल्हा दिवाणी न्यायाधीश हा संयुक्त दंडाधिकारी म्हणून प्रथम दंडाधिकाऱ्याच्या गैरहजेरीत आपल्या अधिकाराचा वापर करीत असे. विशेष बाब म्हणून दोन दुसरे तालुकदार प्रथम वर्गाच्या तर तिसरे तालुकदार दुसऱ्या वर्गाच्या व तहसीलदार तिसऱ्या वर्गाच्या अधिकारांचा आपापल्या उप विभागामध्ये वापर करीत असत. सर्वसाधारण परिस्थितीत गंभीर गुन्ह्यांचे प्रमाण अल्प असे मात्र एखादा हंगाम खराब गेल्यास दरोडेखोरी व गुरांच्या चोरीच्या प्रमाणात वाढ होत असे.[२५]

यानंतरच्या काळात न्यायदान विभागात बरेच बदल करण्यात आले. न्यायशाखा १९२१ पर्यंत स्वतंत्र नव्हती. महसूल विभागामध्येच न्यायदान करण्याची यंत्रणा होती. तथापि, १९२१ मध्ये स्वतंत्र न्यायशाखा निर्माण करण्यात आली. जिल्हा न्यायालयाच्या प्रमुखपदी जिल्हा व सत्र न्यायाधीशाची नेमणूक करण्यात आली. तरीसुद्धा जिल्हाधिकारी आणि तहसिलदारांना न्यायविषयक काही अधिकार होते. स्वातंत्र्यानंतर संपूर्ण भारतीय संघ राज्यासाठी उपलब्ध असलेली न्याय व्यवस्था याही जिल्ह्याला लागू झाली.

१९६१ मध्ये जिल्हा व सत्र न्यायाधीश यांच्या हाताखाली एक सहायक न्यायाधीश आणि वरिष्ठ स्तरातील न्यायाधीश होते. या न्यायाधीशांच्या अधिकारकक्षेत संपूर्ण जिल्हा येत असे. ते फौजदारीआणि दिवाणी स्वरूपाच्या मूळ दाव्यांचे कामकाज पाहत असत. दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर संपूर्ण जिल्ह्यात कितीही किमतीचे दिवाणी दावे चालवित असत. त्यावेळी जिल्ह्यामध्ये ६ दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, होते व त्यांची मुख्यालये निरनिराळ्या तालुक्यांच्या मुख्य ठिकाणी होती. १०,००० रुपयांहून कमी किमतीचे नेहमीचे दिवाणी दावे व सर्वसामान्य फौजदारी दावेसुद्धा ते चालवीत असत. नांदेड व देगलूर येथील दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर यांच्या अधिकारकक्षेत अनुक्रमे भोकर आणि मुखेड महाल होते.[२६]

सध्या नांदेड जिल्ह्यात (दि. ३१ डिसेंबर २००८ रोजी) एकूण १९ न्यायालये असून त्यामध्ये ४३ न्यायाधीश न्यायदान प्रशासनाचे काम पाहत आहेत. त्यापैकी ८ अपील अधिकारिता असलेली न्यायालये आहेत. तसेच नांदेड जिल्ह्यात मुख्य न्यायदंडाधिकारी यांचे (१), दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर (६) व दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग यांची (२८) न्यायालये

---

२४. कित्ता, पृ. ९.

२५. **इम्पीरिअल गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. २२८.

२६. **जिल्हा जनगणना निर्देशग्रंथ,** नांदेड, १९६१, पृ. ५.

Maharashtra State Gazetteers

आहेत. प्रत्येक प्रवर्गातील एकूण न्यायाधीशांची संख्या व त्यांच्या न्यायालयात ३१ डिसेंबर २००८ अखेर प्रलंबित असलेल्या प्रकरणांची संख्या तक्ता क्र. २ मध्ये दर्शविली आहे.

नांदेड मुख्यालयी असलेली न्यायालये तीन इमारतीत कार्यरत आहेत. सन १९८० सालीबांधण्यात आलेल्या नवीन इमारतीमध्ये प्रमुख जिल्हा न्यायाधीश, जिल्हा न्यायाधीश-१, तदर्थ जिल्हा न्यायाधीश-१ व २ यांची न्यायालये आहेत. पहिल्या व दुसऱ्या मजल्यावर जिल्हा न्यायालयास संलग्नअसलेले प्र शासनिक विभाग आहेत. तसेच तळ मजल्यावर मुख्य न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयव कार्यालये आहेत. निजामकालीन जुन्या इमारतीमध्ये दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर व दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर यांची न्यायालये व इतर विभाग आहेत. तिसरी इमारत अलिकडच्या काळात जलदगती न्यायालयांकरिता बांधण्यात आली आहे.

नांदेड जिल्ह्यातील बिलोली व कंधार तालुक्यात जिल्हा न्यायाधीश १ व दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर यांची न्यायालये असून त्यामध्ये कंधार येथे एक तदर्थ जिल्हा न्यायाधीश कार्यरत आहे. नांदेड जिल्ह्यात भोकर, हदगाव, हिमायतनगर, किनवट, माहूर, लोहा, कंधार, मुखेड, नायगांव-बाजार, बिलोली व धर्माबाद येथे दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग यांची न्याया लये आहेत. तसेच कंधार, हदगांव, किनवट व बिलोली येथे प्रत्येकी एक सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर कार्यरत आहे. जिल्ह्यातील दिवाणी व फौजदारी स्वरूपाच्या निकाली दाव्यांची उपलब्ध आकडेवारी खाली दर्शविली आहे :—

| वर्ष | मूळ अधिकारिता | | अपील | |
|---|---|---|---|---|
| | दिवाणी | फौजदारी | दिवाणी | फौजदारी |
| १९९० | ४,३६७ | १६,४३९ | ५३० | २४३ |
| २००० | ५,९४५ | १४,३७६ | ४८० | १७९ |
| २००१ | ५,७७२ | १६,३६१ | ५३६ | २८५ |
| २००२ | ५,१९२ | १९,१४८ | ९५५ | ११५ |
| २००३ | ४,६९५ | १८,८७१ | ५२८ | ५९४ |
| २००४ | ६,३८७ | १५,७७६ | ३७८ | २८७ |
| २००५ | ४,८३८ | १६,८१४ | ३३६ | २३७ |
| २००६ | ५,६८५ | १८,२७६ | ४२१ | ४१० |
| २००७ | ६,४७४ | २५,१४२ | ६२९ | ४५५ |
| २००८ | ५,१२५ | १६,९७५ | ५४५ | ३९३ |

नांदेड मुख्यालयी जिल्हा सरकारी वकील यांचे कार्यालय असून एक जिल्हा सरकारी वकीलव ७ सहायक सरकारी वकील कार्यरत आहेत. कंधार येथे तीन व बिलोली येथे दोन सहायक सरकारी वकील आहेत. जिल्ह्यातील एकूण ८०० वकिलांपैकी १५० महिला वकील आहेत.

Maharashtra State Gazetteers

नांदेड मुख्यालयी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण कार्यालय असून त्याद्वारे गरजू लोकांना कायदेविषयक सहाय व सल्ला देण्यात येतो. याअंतर्गत विविध विषयांवर शिबीर तसेच चर्चासत्रांचेआयोजन करण्यात येते. तसेच लोक न्यायालयाचे आयोजन करून जास्तीत जास्त प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्याचे या माध्यमाद्वारे प्रयत्न करण्यात येतात. याच प्रयासाचा एक भाग म्हणून वैकल्पिकवाद निवारण केंद्राची स्थापना करण्यात आली आहे.

सन १९९९ ते २००७ पर्यंत एकूण ७,४०६ प्रकरणे लोक न्यायालयात तडजोडीद्वारे निकाली काढण्यात आली. लोक न्यायालयात मोटार अपघात दावा प्रकरणे, भूसंपादनाची प्रकरणे, बँकेची प्रकरणे, पोटगीची प्रकरणे, कौटुंबिक वाद असलेली प्रकरणे, इत्यादींचा समावेश होतो. या साखळीचीच एक कडी म्हणून (घ्द्धड्ड-थ्त्यत्ढ्ढड्ढयत्दृद) नोंदणी पूर्व प्रकरणांबाबतचे विशेष लोक न्यायालय भरविण्यात येऊन, त्याद्वारे देखील बहुतांश प्रकरणे मिटविण्यात आली. एकूण १८,०६,७५,१९२ रुपयांची प्रकरणे तडजोडीद्वारे मिटविण्यात आली.[२७]

## स्थानिक स्वराज्य संस्था

भारतातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विकासाच्या दृष्टीने १९ व्या शतकातील शेवटची तीन दशके महत्त्वाची मानावी लागतात. परंतु नगरपरिषद प्रशासनाची खरी सुरुवात इ.स. १६८७ मध्ये मद्रास येथे स्थापन झालेल्या पहिल्या नगरपरिषदेने झाली आणि त्यानंतर थोड्याच कालावधीत मुंबईव कलकत्ता या शहरांमध्येसुद्धा अशाच प्रकारचे नगरपरिषद प्रशासन प्रस्थापित करण्यात आले. यानंतर देशाच्या विविध भागांमध्ये स्थानिक स्वराज्य प्रशासन प्रस्थापित करण्यास चालना देण्यासाठी अनेक अधिनियम करण्यात आले. यापैकी काही महत्त्वाचे अधिनियम पुढीलप्रमाणे होते. १) इ.स.१८१४ च्या विनियम १६ नुसार मोठ्या शहरांमध्ये विविध प्रभाग समित्यांची स्थापना करण्यात आली. २) १८३७ च्या अधिनियमानुसार शहरांच्या सुधारणेसाठी चौकीदार कराचा विनियोग करण्यात आला. ३) १८४२ च्या बंगाल अधिनियमानुसार २/३ रहिवाशांनी मागणी केली असता नगरपालिका समिती स्थापन करण्याची तरतूद करण्यात आली. ४) १८५० चा अधिनियम क्र.२६ हा सुद्धा बंगाल अधिनियमासारखाच होता, मात्र हा अधिनियम ब्रिटिश इंडियातील सर्व प्रदेशावर लागू केला होता. ५) सार्वजनिक स्वच्छतेचे कार्य पार पाडण्यासाठी स्थानिक समित्या स्थापन करण्याची तरतूद १८६३ च्या "दी रॉयल सॅनिटरी कमिशन रिपोर्ट" मुळे झाली. परंतु हे सर्व अधिनियम, त्यांच्या "सरकारी खाक्या व संकुचित दृष्टिकोन" या गुणांमुळे देशातील स्थानिक स्वराज्य संस्थाचा विकास घडवून आणण्यास अयशस्वी ठरले.[२८]

यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या इतिहासात लॉर्ड मेयोचा १८७० चा ठराव व दिनांक १८ मे १८८२ चा रिपन ठराव या दोन घटना अत्यंत महत्त्वाच्या मानाव्या लागतात कारण लॉर्ड

---

२७. जिल्हा व सत्र न्यायालय, नांदेड यांचे माहिती आधारे.

२८. पांडे व्ही. के., **म्युनिसिपल फायनान्स इन मराठवाडा,** पीएच.डी. प्रबंध, मराठवाडा युनिवर्सिटी, १९६३,पृ. ३४.

मेयोच्या १८७० च्या ठरावामुळे प्रशासनाचे आर्थिक विकेंद्रीकरण होऊन सार्वजनिक आरोग्य, स्वच्छता, वैद्यकीय मदत, शिक्षण व सार्वजनिक बांधकाम यासारख्या ग्रामीण व शहरी भागातील महत्त्वाच्या स्थानिक सार्वजनिक सेवा देशभर सुरू करणाऱ्या स्थानिक संस्थांच्या स्थापनेची खरी सुरुवात झाली, तर १८८२ च्या रिपन ठरावामुळे भारतात स्थानिक संस्थाच्या मार्फत लोकशाहीचे शिक्षण व विचार रुजण्यास मदत होऊन स्थानिक स्वराज्याविषयीची तत्त्वे स्पष्टपणे प्रतिपादन करण्यात आली. ब्रिटिशांनी सुरू केलेल्या या सुधारणा हैद्राबाद राज्यानेसुद्धा सुरू केल्या. इ.स. १८८४ च्या दस्तूर अल-अमलअन्वये मराठवाड्यात जिल्हा व तालुका बोर्डांची स्थापना झाली.[२९] हैद्राबाद संस्थानात प्रथम १८८७ मध्ये लोकल बोर्डांची स्थापना झाली व ते हैद्राबाद येथील मध्यवर्ती मंडळाच्या देखरेखीखाली ठेवण्यातआले. हे सद्र किंवा मध्यवर्ती मंडळ १८९४ मध्ये बरखास्त करण्यात आले आणि सुभेदारास पाच हजार रुपयांपर्यंतची स्थानिक हिताची कामे मंजूर करण्याचे अधिकार देण्यात आले. महसूल मंडळाकडे त्यांच्या कामकाजावर सामान्य स्वरूपाचे नियंत्रण ठेवण्याचे अधिकार दिले होते. त्याचप्रमाणे दहा हजार रुपयांपर्यंतच्या कामांना मंजुरी देण्याचे प्राधिकार देण्यात आले होते. मात्र यापेक्षा जास्त रकमेच्या कामांना मंत्र्याची मान्यता घ्यावी लागे.[३०]

हैद्राबाद संस्थानात इ.स.१९०१ मध्ये १३ जिल्हा मंडळे आणि ७० तालुका मंडळे होती. त्यांची सभासदसंख्या अनुक्रमे १८२ आणि ५६० इतकी होती.[३१] तर सन १९२५ मध्ये १५ जिल्हा मंडळे व १०३ तालुका मंडळे होती.[३२] जिल्हा मंडळात सर्वसाधारणपणे प्रथम तालुकदार हा अध्यक्ष असून इतर १३ सदस्य असत. यापैकी सात अवैधानिक सदस्य हे जमीनदार, नामांकित व्यापारी व वकील यांच्यामधून निवडले जात. वैधानिक सदस्यांमध्ये अध्यक्षांव्यतिरिक्त मुख्यालयातील महसूल सहायक, जिल्हा अभियंता, पोलीस अधीक्षक, जिल्हा वैद्यकीय अधिकारी, मुख्यालयातील तहसिलदार व शाळा मुख्याध्यापक यांचा समावेश असे. जिल्हा मंडळास दोन हजार रुपयांपर्यंतच्या कामांना मंजुरी देण्याचा अधिकार होता. तालुका मंडळ हे जिल्हा मंडळाची कनिष्ठ शाखा असून त्यामध्ये तालुका प्रमुख म्हणून द्वितीय किंवा तृतीय तालुकदार आणि तहसीलदार हे दोन शासकीय तर तीन अशासकीय सदस्य असत. तालुक्याशी संबंधित कामावरील खर्चावर तालुका बोर्ड नियंत्रण ठेवीत असे. या खर्चास जिल्हा बोर्डाची मंजुरी लागे.[३३] नांदेड जिल्ह्यामध्ये इ.स. १८९९ मध्ये जमीन महसुलाच्या प्रत्येक रुपयामध्ये एक आणा कर वसुली करून स्थानिक मंडळे घटित करण्यात आली. त्यावेळी एकूण कराच्या एक चतुर्थांश किंवा २०,६०० रुपये इतकी रक्कम म्युनिसिपल व स्थानिक कामासाठी वेगळी ठेवण्यात आली होती. त्या वेळी नांदेड येथे म्युनिसिपालीटी असून प्रत्येक तालुका मुख्यालयाच्या ठिकाणी लहान साफसफाई

---

२९. **परभणी जिल्हा गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ४८३.

३०. **इम्पीरिअल गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ६४.

३१. कित्ता, पृ. ६४.

३२. शर्मा रा. भी., पूर्वोक्त, भाग १, पृ. २९.

३३. **इम्पीरिअल गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ६४.

आस्थापना अस्तित्वात होत्या. जिल्हा व तालुका मंडळे नगरपालिकांच्या कामावरसुद्धा नियंत्रण ठेवीत असत. इ.स.१९०१ मध्ये स्थानिक मंडळाचा खर्च १६,००० रुपये होता.[३४]

शेतसाऱ्याबरोबरच वसूल केलेल्या स्थानिक मंडळाच्या उपकरामधून रस्ते बांधणे व दुरुस्ती, शाळा, दवाखाने व विश्रांतीगृहे बांधणे, देखभाल करणे इत्यादी लोकोपयोगी कामे केली जात. हे उपकर ग्राम पोलीस निधी ४ पैसे, शिक्षण निधी २ पैसे, रस्ते निधी दोन पैसे, वैद्यकीय निधी एक पैसा, सामान्य सुधारणा निधी ३ पैसे या दराप्रमाणे होते. वरील बाबींव्यतिरिक्त शहरातील रस्तेदुरुस्ती, पूल, उपमार्ग, तर सेवेस जोडणारे रस्ते, धर्मशाळा, सराई, बाजार, विहिरी, बागा, दिवाबत्ती, स्वच्छता, शहर पोलीस, स्थानिक मंडळांच्या शाळा व जनावरांचे रोग यावरही मंडळांच्या निधीचा खर्च होत असे.[३५]

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर राज्याचा सर्वांगीण व समतोल विकास करण्याच्या हेतूने निम्न पातळीवरून विकासाची प्रक्रिया सुरू करणे ही काळाची गरज होती. महाराष्ट्रात जिल्हा लोकल बोर्ड तर विदर्भात जनपदसभा इत्यादी संस्था कार्यरत होत्या. त्या संस्थांमध्ये समन्वय साधण्यासाठी संपूर्ण राज्यात विकास साधणारी एकच संस्था निर्माण करून समाज विकास आणि ग्रामीण विकासावर भर देणे आवश्यक होते. स्वातंत्र्यानंतर लोकांच्या अपेक्षा वाढल्या व त्या पूर्ण करण्याची जबाबदारी शासनावर पडली. त्यासाठी पंचवार्षिक योजनांचा कार्यक्रम हाती घेऊन लोककल्याणाचा एक सर्वसमावेशक भरीव कार्यक्रम हाती घेण्यात आला. १९५२ साली निवडक विभागात प्रायोगिक योजना म्हणून समाज विकासाच्या कार्यक्रमांना सुरुवात करण्यात आली आणि या निवडक भागांना समाजविकास प्रकल्प समजण्यात येऊ लागले. त्यानंतर विस्तार संघटनेच्या रूपाने एक कायम यंत्रणा स्थापण्याचे शासनाने ठरविले. प्रत्येक प्रकल्प विकास गटासाठी एक प्रकल्प वा विकास सल्लागार मंडळ नेमण्यात आले. हाती घ्यावयाच्या कार्यक्रमांची आखणी व अंमलबजावणी करण्याच्या कामी सल्ला देणे हे या मंडळाचे काम होते.[३६]

## पंचायत राज

राज्याचा सर्वांगीण व समतोल विकास करण्याच्या हेतूने सत्तेचे विकेंद्रीकरण करून विविध पातळ्यांवर समाज विकास प्रक्रिया सुरू करणे ही काळाची गरज होती. समाज विकास योजनांच्या कामकाजाचे मूल्यमापन करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने इ.स. १९५७ मध्ये बलवंतराय मेहता समिती नेमली होती. सामूहिक विकास योजनांचा आशय, कार्यपद्धती व कामाचा उरक इत्यादीबाबींचा अभ्यास करणे हा या समितीचा उद्देश होता. यातूनच जिल्हा पातळीवर जबाबदाऱ्या देऊन सत्तेचे विकेंद्रीकण करावे, विभागातील विकासाच्या कामांची संपूर्ण जबाबदारी ज्या संस्थांकडे जाईल त्या संस्थेकडे शक्तींचे प्रत्यायोजन करून सरकारने मार्गदर्शन, देखरेख व पैसा उपलब्ध करून देण्याचे अधिकारआपल्याकडे ठेवावेत, अशी समितीने शिफारस केली. या हेतूने त्यांनी ग्रामपंचायत, तालुका पंचायतआणि जिल्हा परिषद अशी त्रिस्तरीय योजना सुचविली. या मुद्द्यांचा विचार करून वसंतराव नाईक यांचे अध्यक्षतेखाली महाराष्ट्रासाठी एका "लोकशाही विकेंद्रीकरण समितीची नेमणूक" २० जून १९६०

---

३४. **इम्पीरिअल गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. २२९.

३५. कित्ता, पृ. ६५.

३६. **परभणी जिल्हा गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ४८४.

मध्ये करण्यात आली. तिने आपला अहवाल ३१ मार्च १९६१ रोजी सरकारकडे सादर केला. शासनाने नाईक समितीच्या बहुतेक शिफारशी मान्य करून त्यानुसार १९६१ सालीच महाराष्ट्र जिल्हा परिषदआणि पंचायत समित्या अधिनियम संमत केला. १९६२ साली जिल्हा परिषदांच्या निवडणूका होऊन त्या रीतसर अस्तित्वात आल्या.

## जिल्हा परिषद

महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१ नुसार जिल्ह्यात १९६२ साली एक जिल्हा परिषद आणि आठ पंचायत समित्या स्थापन झाल्या. त्यावेळी जिल्हा परिषद आणि पंचायत समित्या यांच्या अधिकारक्षेत्रात अनुक्रमे संपूर्ण जिल्हा आणि तालुके यांचा समावेश होता, मात्र या अधिकारक्षेत्रातून नगरपालिका असलेली शहरे वगळण्यात आली. इ.स.२००१ च्या जनगणनेनुसार नांदेड जिल्ह्यामध्ये १६ पंचायत समित्या असून १०,५२८ चौ.कि.मी.क्षेत्रापैकी १०,३२९.१ चौ.कि.मी. ग्रामीण तर १९८.९ चौ.कि.मी. शहरी क्षेत्र होते आणि २१,८७,१९५ इतकी लोकसंख्या जिल्हा परिषदेच्या अधिकार क्षेत्रात होती.

जिल्हा परिषदेचे कामकाज स्थायी, बांधकाम, आरोग्य, शिक्षण, अर्थ, कृषी, पशुसंवर्धन, समाजक ल्याण, महिला व बाल कल्याण आणि जलसंधारण या समित्यांमार्फत चालते. स्थायी समितीच्या अध्यक्षपदी जिल्हा परिषदेचा अध्यक्ष असतो. दोन विषय समित्यांच्या अध्यक्षपदी परिषदेचा उपाध्यक्ष असतो. इतर समित्यांच्या अध्यक्षपदी निवडून दिलेले सभापती असतात. भारतीय प्रशासन सेवेच्या वरिष्ठ श्रेणीतील अधिकारी जिल्हा परिषदेचा मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून काम पाहतो. उप-मुख्य कार्यकारी अधिकारी स्थायी समितीचा पदसिद्ध सचिव असतो. जिल्ह्यातील विविध कार्यालयांचे खातेप्र ामुख संबंधित विषय समित्यांचे सचिव असतात. सर्व विषय समित्यांचे सभापती हे स्थायी समितीचे पदसिद्ध सभासद असतात. या सर्व समित्या एकल संक्रमणीय मताद्वारे प्रमाणशीर प्रतिनिधित्वाच्या पद्धतीनुसार उभारल्या जातात. त्यामुळे त्या त्या समित्यांवर सर्व पक्षांना आणि हितसंबंधितांना प्र ातिनिधित्व मिळते.

महाराष्ट्रात पंचायत राज संस्था, जिल्हा स्तरावर जिल्हा परिषद, तालुका पातळीवर पंचायत समिती आणि ग्रामपातळीवर ग्रामपंचायत अशा तीन स्तरांवर सन १९६२ पासून कार्यरत आहे. या पंचायत संस्थांना स्वयंशासन म्हणून सक्षम करून घटनात्मक दर्जा देण्याच्या उद्देशाने केंद्र सरकारने भारतीय संविधानात ७३ वी सुधारणा करून संविधान (७३ वी सुधारणा) अधिनियम, १९९२ हा दिनांक २४ एप्रिल १९९३ पासून अमलात आणून संविधानात "पंचायती" हे नववे प्रकरण समाविष्ट करून उपरोल्लिखित तिन्ही संस्थांबाबत वैशिष्ट्यपूर्ण तरतुदी केलेल्या असून त्या खालीलप्रमाणे आहेत.

वरील सुधारणा दुरुस्तीनुसार तिन्ही स्तरावरील पंचायत संस्थांमधील जागा या सरळ नि वडणुकांद्वारे निवडून आलेल्या सदस्यांद्वारेच भरण्यात येतील तसेच या जागांमध्ये अनुसूचित जातीव अनुसूचित जमातींना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व मिळेल, तर महिलांना एकूण जागांच्या १/३ जागांमध्ये प्रतिनिधित्व मिळेल. इतर मागास प्रवर्गाकरिता या संविधानात निश्चित तरतूद नसली तरी त्यांच्याकरिता आरक्षण ठेवण्यास बंधन नसल्याने राज्य शासनाने प्रत्येक पंचायतीमधील

एकूण जागांच्या २७ टक्के जागा इतर मागास वर्गाकरिता राखून ठेवल्या आहेत.[३७] केंद्र सरकारने दिनांक २४ डिसेंबर १९९६ रोजी केलेल्या संविधानाच्या पंचायती तरतुदी (अनुसूचित क्षेत्रात लागू करणे)अधिनियम, १९९६ मधील तरतुदीनुसार राज्य सरकारने पंचायतीबाबतच्या कायद्यात दुरुस्ती करून न पूर्णतः अनुसूचित क्षेत्रात येणाऱ्या पंचायतींमध्ये एकूण जागांच्या ५० टक्क्यांपेक्षा कमी जागा असणार नाहीत एवढे आरक्षण ठेवण्यात आले आहे. राज्यात एकूण ३१९ पंचायत समित्यांपैकी ज्या २२ पंचायत समित्या पूर्णतः अनुसूचित क्षेत्रात आहेत तेथे ही तरतूद लागू करण्यात आली आहे. पंचायत समित्यांच्या सभापतींची पदेसुद्धा अनुसूचित जमातींकरिता कायम आरक्षित ठेवलेली आहेत. पंचायतींच्या निवडणूकांकरिता तत्पूर्वीच्या जनगणनेतील लोकसंख्या विचारात घेतली जाते. जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांकरितासुद्धा आरक्षण ठेवण्यात आले आहे. पंचायत समितीचे सभापती हे पूर्वी जिल्हा परिषदेचे पदसिद्ध सभासद असत ते आता नवीन सुधारणेनुसार फक्त निमंत्रित सदस्य राहतीलव त्यांना सभेमध्ये मतदानाचा हक्क राहणार नाही. जिल्हा परिषद सदस्यांना फक्त जिल्हा परिषद सभेस व ते ज्या समितीवर निवडून आलेले आहेत त्या समितीच्या सभेसच बोलाविले जाते.

महाराष्ट्र जिल्हा परिषद (अध्यक्ष, उपाध्यक्ष व विषय समित्यांचे सभापती) आणि पंचायत समित्या (सभापती व उप-सभापती) (पदांचे आरक्षण व निवडणूक) (सुधारणा) नियम, १९६२ मध्ये सुधारणा करणाऱ्या नियमांचा मसूदा प्रसिद्ध करणारी शासन अधिसूचना ग्राम विकास व जलसंधारण ि वभाग क्रमांक झेडपीआर. १०९७/प्र.क्र.२७५९/०६, दिनांक २ डिसेंबर १९९७ नुसार जिल्हा परिषद अध्यक्ष व उपाध्यक्ष, विषय समित्यांचे सभापती तसेच पंचायत समित्यांचे सभापती व उप सभापती यांच्या पदांचा कालावधी यापूर्वी पाच वर्षांचा होता तो आता एक वर्षाचा करण्यात आला. जिल्हा परिषदेच्या उत्पन्नाची साधने कशी वाढविता येतील याबाबत शिफारशी करण्याकरिता नवीन सुधारणेनुसार राज्य वित्त आयोगाची स्थापना करण्यात आली आहे.

पंचायतींच्या निवडणुका दर पाच वर्षांनी घेण्याचे बंधन कायद्यात ठेवण्यात आले आहे. या नि वडणुका राज्य निवडणूक आयोग या यंत्रणेमार्फत घेण्याची तरतूद आहे. इ.स. २००५ मध्ये नांदेड जि ल्हा परिषदेमध्ये निवडून दिलेल्या सदस्यांची संख्या ६४ असून त्यामध्ये अनुसूचित जातीचे १२, अनुसूचित जमातीचे ७, मागासवर्ग प्रवर्गातील १७ व स्त्री सदस्य २७ होते.

**वित्त व्यवस्था :** जमीन महसुलाच्या प्रत्येक रुपयामागे वीस पैसे आणि पाणीपट्टीच्या प्रत्येक रुपयामागे जास्तीत जास्त १९ पैसे दराने उपकर वसूल करण्याची तरतूद कायद्यात आहे. याशिवाय जि ल्हा परिषद उद्योगधंदे, व्यापार, मनोरंजन, नोकरी करणारे इसम, पाणीपुरवठा आणि यात्रेकरू यांवर कर बसवू शकते. त्याशिवाय जमीन व इमारती यावर खास कर व आणखीही अन्य कर बसवू शकते. विशिष्ट स्थावर मालमत्तेच्या हस्तांतरणावरील मुद्रांक शुल्क अर्धा टक्क्याने वाढवून त्यायोगे मिळणारी रक्कम सरकार जिल्हा परिषदेला देऊ शकते.[३८]

जिल्हा परिषदेला राज्य सरकारकडून मिळणाऱ्या आर्थिक मदतीत परिषदेच्या क्षेत्रामध्ये जमा झा लेल्या जमीन महसुलाच्या ७० टक्के रकमेचा समावेश असतो. तथापि, ज्यावेळी जमीन महसुलाच्या हिश्याची रक्कम दरडोई २ रुपयांपेक्षा कमी असेल त्यावेळी ही तूट भरून काढण्यासाठी जिल्हा

---

३७. महाराष्ट्र ॲक्ट क्र. २१ (१९९४).

३८. भारतीय जनगणना, १९६१, **जिल्हा जनगणना निर्देशग्रंथ,** नांदेड, पृ. ८.

परिषदेला समानीकरण अनुदान देण्यात येते. त्याशिवाय जिल्हा परिषदेकडे देण्यात आलेल्या विनिर्दिष्ट बांधकामासाठी व विकास योजनांकरिता खर्चाच्या किमान ७५ टक्के एवढे प्रयोजन अनुदान सरकार जिल्हा परिषदेला देते. याशिवाय सरकार आस्थापना अनुदान देते. हे अनुदान ज्या जागांचा समावेश जिल्हा तांत्रिक सेवा वर्ग-३, जिल्हा सेवा वर्ग-३ आणि वर्ग-४ यामध्ये केलेला आहे, आणि ज्या जागा जिल्हा परिषदेकडे वर्ग करण्यात आल्या आहेत त्या जागांवरील सरकारी कर्मचाऱ्यांचे पगार व भत्ते यांच्या सरासरी वार्षिक खर्चाच्या रकमेच्या ७५ टक्के एवढे असते. याखेरीज जिल्हा परिषदेला तूट समायोजन अनुदान देण्यात येते. तसेच विकासाची कामे लवकर पूर्ण व्हावीत याकरिता काही उत्तेजनपरअनुदाने दिली जातात. जर जिल्हा परिषद अगर पंचायत समित्या यांच्या प्रस्तावानुसार राज्य सरकारने सबंध जिल्ह्यात किंवा एखाद्या गट विभागात जमीन महसुलावर अधिनियमाद्वारा ठरवून दिलेल्या किमान दरापेक्षा अधिक दराने उपकर बसविला तर त्या जिल्हा परिषदेला किंवा पंचायत समितीला राज्य सरकारकडून दरवर्षी स्थानिक उपकर सापेक्ष अनुदान दिले जाते.[३९] नांदेड जिल्हा परिषदेचे १९७०-७१ ते २००५-०६ पर्यंतचे निवडक वर्षांचे उत्पन्न व खर्च तक्ता क्र. ३ मध्ये दिले आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी :** भारतीय प्रशासन सेवेच्या वरिष्ठ श्रेणीतील हा अधिकारी जिल्हाधिकाऱ्याच्या दर्जाचा असतो. जिल्हा परिषदेचा नित्याचा कारभार पाहण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याची असून जिल्हा परिषदेच्या विकासाची सर्व कार्ये त्याला पहावी लागतात. अर्थात हे सर्व कार्य जिल्हा परिषदेचे अध्यक्ष व जिल्हा परिषद यांच्या देखरेखीखाली त्याला करावे लागते. जिल्हा परिषदेचे कोणतेही ध्येयधोरण ठरवितांना नेहमी त्याला पुढाकार घ्यावा लागतो. इतर तज्ज्ञअधिकारी त्याच्या देखरेखीखाली कार्य करतात. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषदेचे अंदाजपत्रक तयार करतो व ते अर्थ आणि प्रशासन किंवा स्थायी समितीला व नंतर जिल्हा परिषदेला सादर करतो.अंदाज पत्रकाबरोबर जिल्हा विकास योजना मंजूर केल्या जातात. अंदाजपत्रक व जिल्हा विकास योजनांना मंजुरी मिळाल्यावर त्यांची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने उपाययोजना केली जाते. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याला निविदा करारास मंजुरी देण्याचा अधिकार आहे. तसेच त्याला ठराविक किमतीपर्यंतची कामे व योजना मंजूर करण्याचा अधिकार आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी हा जिल्हा परिषद आणि राज्य शासन तसेच जिल्हा परिषद व पदाधिकारी यामधील महत्त्वाचा दुवा आहे. तो जिल्हा परिषदेच्या कारभाराबद्दलचे राज्य शासनालाअहवाल सादर करतो. जिल्हा परिषदेला कोणत्याही विषयावरील निर्णय घेण्यापूर्वी त्या विषयाची कायदेशीर व आर्थिक बाजू व त्यांची उपयुक्तता याबाबत तो सल्ला देतो. जिल्हा परिषदेच्या प्रशासनासाठी हा अधिकारी विभागीय आयुक्तास जबाबदार असतो.

**अध्यक्ष :** जिल्हा परिषदेमध्ये निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींमधूनच अध्यक्षाची निवड केली जाते. तो जिल्हा परिषदेच्या विकास कार्याच्या शासकीय यंत्रणेचा प्रमुख असतो. जिल्हा परिषदेचे सर्व कार्य त्याच्याच देखदेखीखाली चालते. त्याने घेतलेल्या निर्णयाला जिल्हा परिषदेची मंजुरी लागते. मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर अधिकारी यांच्यावर अध्यक्ष देखरेख ठेवतो. अध्यक्षाला बरेच प्रशासकीय अधिकार आहेत. उदा. जिल्हा परिषदेने संमत केलेल्या ठरावाच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवणे,

---

३९. भारतीय जनगणना, १९६१, पृ. ८.

जिल्हा परिषदेच्या कागदपत्रांची तपासणी करणे, आणीबाणीच्या परिस्थितीत एखाद्या कार्याच्याअंमलबजावणीबाबत हुकूम काढणे, इत्यादी. जनतेच्या दृष्टीने अहितकारक असलेले एखादे काम तो थांबवू शकतो किंवा तहकूब करू शकतो. यानंतर ही बाब तो स्थायी समिती व तत्संबंधी विषय समितीसमोर ठेवतो. अध्यक्षांच्या अनुपस्थितीत उपाध्यक्ष हा अध्यक्षांचे सर्व अधिकार वापरतो.

**पंचायत समित्या :** जिल्हा परिषदेची विकासविषयक कामे गट पातळीवर पंचायत समिती पार पाडते. त्यासाठी शेती, सहकार, पशुसंवर्धन व शिक्षणविषयक कामे करण्यासाठी विस्तार अधिकारीव ग्रामसेवक असतात. कामकाजावर गटविकास अधिकारी देखरेख ठेवतो. पंचायत समितीला गट अनुदानातून कोणत्याही कामास किंवा विकास योजनांना मंजुरी देणे, त्यांची अंमलबजावणी करणे, देखरेख ठेवणे, कारभार पाहणे आणि त्यासाठी खर्च करणे इत्यादी कामे करावी लागतात. पंचायत समितीस जिल्हा परिषदेकडून गटामध्ये हाती घेण्यात यावयाची कोणतीही कामे विकास परिषदेकडे ि वचारार्थ पाठविण्याबद्दल शिफारस करण्याचा आणि अशा कामांत किंवा विकास योजनांत कोणत्या मर्यादेपर्यंत स्थानिक साधनसंपत्ती उपलब्ध होण्याचा संभव आहे, हे दर्शविण्याचा अधिकार आहे.पंचायत समितीच्या सभापतीला सभा बोलाविणे, प्रशासन आणि समितीचे हिशेब व अभिलेख यांच्याबाबतीत गटात काम करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या कामावर देखरेख व नियंत्रण ठेवणे इत्यादी कामे करावी लागतात.

**गट विकास अधिकारी :** गट विकास अधिकारी सचिव म्हणून पंचायत समितीचा कारभार पाहतो. त्याला विकास गटाच्या कोणत्याही अधिकाऱ्याकडून कोणतेही माहितीपत्रक, हिशेब, विवरणपत्र किंवा अहवाल मागविण्याचा अधिकार असतो. तसेच पंचायत स्तरावरील विकास योजनांचीअंमलबजावणी त्याला करावी लागते. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याचे आदेश अमलात आणणे, पंचायत समितीला पैसे खर्च करण्यास मंजुरी देणे, सरकारी मालमत्तेचे संवर्धन करणे वगैरे कामे करावीलागतात.

सन १९६१ मध्ये तत्कालीन पंचायत समित्यांमध्ये समाविष्ट असलेल्या खेड्याची संख्या, क्षेत्रफळ व लोकसंख्या खालील कोष्टकात दर्शविली आहे.[४०]

| पंचायत समिती | क्षेत्रफळ चौ.मैल | वस्ती असलेली खेडी | १९६१ मधील लोकसंख्या |
|---|---|---|---|
| नांदेड जिल्हा परिषद | ३,८९७.९ | १,३२५ | ९,२३,८०६ |
| किनवट | ७८८.९ | १९१ | १,०९,९१६ |
| हदगाव | ५९१.१ | १८६ | १,३१,७१४ |
| नांदेड | ३८५.४ | १८१ | १,०८,६१९ |
| भोकर | ३९६.२ | १२७ | ८३,६९४ |
| कंधार | ६२३.५ | २०० | १,६६,७८२ |
| बिलोली | ५३३.० | २१८ | १,५२,९३७ |
| मुखेड | ३२५.१ | १२४ | ९४,८६७ |
| देगलूर | २५४.७ | ९८ | ७५,२७७ |

४०. भारतीय जनगणना, १९६१, **जिल्हा जनगणना निर्देशग्रंथ,** नांदेड, पृ. ७.

Maharashtra State Gazetteers

सध्या नांदेड जिल्ह्यातील १६ गटांसाठी एकूण १६ पंचायत समित्या स्थापन केलेल्या असून त्यांची २००८-०९ मध्ये एकूण सदस्य संख्या १२८ होती. पंचायत समित्यांची थोडक्यात माहिती पुढीलप्रमाणे :—

**पंचायत समिती, नांदेड :** नांदेड विकास गटाची स्थापना दिनांक २ ऑक्टोबर १९५३ रोजी झाली असून दिनांक १ मे १९६२ पासून विकास गटाचे पंचायत समितीच्या स्थापनेत रूपांतर झालेआहे. पंचायत समितीचे क्षेत्रफळ ४१२.७ चौ.कि.मी. आहे. समिती अंतर्गत ९० गावे असून त्यापैकी ५ गावे बेचिराग आहेत तर ७५ ग्रामपंचायतींपैकी ११ गट ग्रामपंचायती आहेत. या गटातील निवडणुकीद्वारे निवडलेल्या सभासदांची संख्या १० आहे. समितीने २००५-०६ या वर्षामध्ये १० बायोगॅस संयंत्रे सुरू करण्याचे उद्दिष्ट पूर्ण केले. आरोग्य सुविधेअंतर्गत तालुक्यामध्ये लिंबगाव, तुप्पा, वडगाव, रहाटी, विष्णुपुरी व वाघाळा येथे ६ प्राथमिक आरोग्य केंद्रे, मरळक व निळा येथे २ जिल्हा परिषद दवाखाने तर एकूण १८ प्राथमिक आरोग्य उपकेंद्रे आहेत. तसेच समिती अंतर्गत श्रेणी-१ चा एक पशुवैद्यकीय दवाखाना असून श्रेणी-२ चे ४ पशुवैद्यकीय दवाखाने आहेत. तसेच सन २००५-०६ मध्ये इंदिरा आवास योजनेअंतर्गत एकूण ४६ घरकुलांचे काम पूर्ण करण्यात आले असून २० घरकुलांचे काम प्रगतिपथावर होते. सन २००५-०६ या आर्थिक वर्षामध्ये पंचायत समितीस विकास कामांसाठी फेरबदल केल्यानंतरची मंजुरी रक्कम ४,६४,९०० रुपये तर प्रत्यक्ष खर्च केलेली रक्कम ४,२६,६१९ रुपये होती.

**पंचायत समिती, किनवट :** या पंचायत समिती अंतर्गत एकूण १९० गावे असून त्यापैकी १० गावे ओसाड आहेत. १,५६६.८ चौ.कि.मी. इतके क्षेत्रफळ असलेल्या या समितीअंतर्गत १३४ ग्रामपंचायती आहेत. एकूण ०९ प्राथमिक आरोग्य केंद्रे, ६५ प्राथमिक आरोग्य उपकेंद्रे, ४ फिरती आरोग्य पथके, श्रेणी-१ चे १३ पशुवैद्यकीय दवाखाने तर श्रेणी २ चे ८ पशुवैद्यकीय दवाखाने व २५१ प्राथमिक शाळा आहेत. या गटातील निवडणुकीद्वारे निवडलेल्या सभासदांची संख्या १० आहे. सन २००५-०६ मध्ये इंदिरा आवास योजनेअंतर्गत एकूण ३९७ घरकुलांचे काम पूर्ण करण्यात आले, तसेच सदर वर्षात १५ बायोगॅस संयंत्रे उभारण्यात आली.

**पंचायत समिती, कंधार :** पंचायत समितीचे क्षेत्रफळ ८७६.१ चौ.कि.मी. इतके असून सन २००५-०६ मध्ये एकूण १२७ गावांपैकी ३ गावे ओसाड होती, तर ग्रामपंचायतींची संख्या ११६ होती. पंचायत समितीच्या कार्यक्षेत्रात ५ प्राथमिक आरोग्य केंद्रे, ३१ प्राथमिक आरोग्य उपकेंद्रे, ८ प्रथम श्रेणी पशुवैद्यकीय दवाखाने व ७ द्वितीय श्रेणी दवाखाने आहेत. २००५-०६ या वर्षामध्ये समितीने ग्रामपंचायत कराच्या १०५.२५ लक्ष रु. एवढ्या मागणीपैकी ९६.८२ लक्ष रु. एवढी वसुली करून ९१ टक्के उद्दिष्ट साध्य केले. तसेच सदर वर्षात समितीने २५ बायोगॅस संयंत्रे सुरू करण्याचे उद्दिष्ट पूर्ण केले. २००५-०६ मध्ये गटातून निवडून आलेल्या किंवा स्वीकृत केलेल्या विभागात राहणाऱ्या जिल्हा परिषदेच्या सभासदांची संख्या ५ होती आणि गटातील निर्वाचन गटातून प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे निवडलेल्या सभासदांची संख्या १० होती.

Maharashtra State Gazetteers

**पंचायत समिती, बिलोली :** पंचायत समितीचे क्षेत्रफळ ५५३.९ चौ.कि.मी. असून एकूण ८९ गा वांपैकी ८ गावे ओसाड आहेत तर ग्रामपंचायतींची संख्या ७३ आहे. सन २००५-०६ मध्ये गटातील नि र्वाचन गटातून प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे निवडलेल्या सभासदांची संख्या ८ होती. समिती अंतर्गत ८३ जि ल्हा परिषद प्राथमिक शाळा, ३ जिल्हा परिषद माध्यमिक शाळा, १० खाजगी अनुदानित प्राथमिक शाळा, १ खाजगी विनाअनुदानित प्राथमिक शाळा, १ नगरपालिका शाळा, प्राथमिक २ तर माध्यमिक १ आश्रम शाळा, २२ खाजगी अनुदानित माध्यमिक शाळा, ३ खाजगी विनाअनुदानित माध्यमिक शाळाव केंद्र शासनाच्या २ मिळून बिलोली तालुक्यात एकूण १२८ शाळा आहेत. तसेच तालुक्यात १ ग्रामीण रुग्णालय, ३ प्राथमिक आरोग्य केंद्रे, २१ प्राथमिक आरोग्य उपकेंद्रे, १ युनानी दवाखाना, ४ श्रेणी- १ चे पशुवैद्यकीय दवाखाने व ६ श्रेणी-२ चे पशुवैद्यकीय दवाखाने आहेत. सन २००५-०६ या वित्तीयवर्षात समितीने १० बायोगॅस संयंत्रे सुरू करण्याचे उद्दिष्ट पूर्ण केले. तसेच इंदिरा आवास योजनेअंतर्गत एकूण १७६ घरकुलांचे काम पूर्ण केले व ८७ घरकुलांचे काम प्रगतीपथावर होते.

**पंचायत समिती, भोकर :** सन २००१ च्या जनगणनेनुसार भोकर तालुक्याचे क्षेत्रफळ ६८८.० चौ.कि.मी.असून समिती अंतर्गत एकूण ८३ गावे आहेत व त्यापैकी २ ओसाड गावे होती. तालुक्यात एकूण ६७ ग्रामपंचायती आहेत. सन २००५-०६ मध्ये गटातील निर्वाचन गटातून प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे निवडलेल्या सभासदांची संख्या ६ होती. या समितीला स्वर्ण जयंती ग्राम स्वयंरोजगार योजनेअंतर्गत सन २००५-०६ मध्ये ३० गटाचे उद्दिष्ट देण्यात आले, त्यामध्ये २१ गटास सामूहिक कर्जासाठी मंजुरी देऊन ७० टक्के उद्दिष्ट साध्य करण्यात आले. तसेच सदर वर्षात समितीने १० बायोगॅस संयंत्रे सुरू करण्याचे उद्दिष्ट पूर्ण करून कुटुंब कल्याण योजने अंतर्गत एकूण १,२१५ शस्त्रक्रियांचे उद्दिष्ट पूर्ण के ले.

**पंचायत समिती, हदगाव :** सन २००१ च्या जनगणनेनुसार हदगाव तालुक्याचे क्षेत्रफळ १,१४९.६ चौ.कि.मी. असून समिती अंतर्गत एकूण १५४ गावे आहेत व त्यापैकी ६ ओसाड गावे होती. ता लुक्यात एकूण १२५ ग्रामपंचायती आहेत. सन २००५-०६ मध्ये गटातील निर्वाचन गटातून प्रत्यक्ष नि वडणुकीद्वारे निवडलेल्या सभासदांची संख्या १२ होती. समितीअंतर्गत ७ प्राथमिक आरोग्य केंद्रे, ३१ प्र ाथमिक आरोग्य उपकेंद्रे, ६ आयुर्वेदिक केंद्रे, २ आयुर्वेदिक दवाखाने, श्रेणी-१ चे ६ पशुवैद्यकीय द वाखाने व श्रेणी-२ चे ७ पशुवैद्यकीय दवाखाने आहेत. तसेच समिती अंतर्गत जिल्हा परिषदेच्या एकूण २६६ प्राथमिक शाळा आहेत. व्यापारी अधिकोषांची संख्या ८ व सहकारीअधिकोषांची संख्या १५ आहे. सन २००५-०६ मध्ये समितीने इंदिरा आवास योजने अंतर्गत २३८ घरकुलांचे तर कच्च्या घरांचे पक्क्या घरात रूपांतर करण्याच्या योजनेअंतर्गत ९८ घरांचे काम पूर्ण करून १५ बायोगॅस संयंत्रे सुरू केली. तसेच कुटुंब कल्याण योजनेअंतर्गत एकूण १,४३६ शस्त्रक्रियांचे उद्दिष्ट पूर्ण केले.

**पंचायत समिती, देगलूर :** सन २००१ च्या जनगणनेनुसार देगलूर तालुक्याचे क्षेत्रफळ ६८६.४ चौ.कि.मी. असून समिती अंतर्गत एकूण ११५ गावे आहेत व त्यापैकी ९ ओसाड गावे होती. तालुक्यात एकूण ९० ग्रामपंचायती असून त्यापैकी गट ग्रामपंचायतींची संख्या १४ आहे. तालुक्यातील शहरी भागाचे क्षेत्रफळ ११ चौ.कि.मी. आहे. तालुक्यात प्राथमिक आरोग्य केंद्रे ३ असून उपकेंद्रांची संख्या

२४ आहे. श्रेणी-१ चे पशुवैद्यकीय दवाखाने ३ असून श्रेणी-२ चे पशुवैद्यकीय दवाखाने ४ आहेत. तसेच जिल्हापरिषदेकडे हस्तांतरीत योजनेचे राज्यस्तरीय श्रेणी-२ ची १० उपकेंद्रे आहेत असे एकूण तालुक्यात १७ पशुवैद्यकीय दवाखाने आहेत. सन २००५-०६ मध्ये समितीने २५ बायोगॅस संयंत्रे सुरू करण्याचे उद्दिष्ट पूर्ण केले. तसेच इंदिरा आवास योजने अंतर्गत १५६ घरकुलांचे काम पूर्ण करून ३५ घरकुलांचे काम प्रगतिपथावर होते. याच योजनेअंतर्गत सदर वर्षामध्ये कच्च्या घरांचे अर्धपक्क्या किंवा पक्क्या घरात रूपांतर करण्याची समितीने ५३ कामे पूर्ण केली व २६ कामे प्रगतिपथावर होती. कुटुंब कल्याण योजनेअंतर्गत सन २००५-०६ अखेर समितीने १,४७४ इतक्या शस्त्रक्रिया करून ९९ टक्के उद्दिष्ट साध्य केले.

**पंचायत समिती, मुखेड :** सन २००१ च्या जनगणनेनुसार मुखेड तालुक्याचे क्षेत्रफळ १,०६७.१ चौ.कि.मी. होते. समिती अंतर्गत एकूण १५१ गावे असून ग्रामपंचायतींची संख्या १२७ आहे. सन २००५-०६ मध्ये गटातील निर्वाचन गटातून प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे निवडलेल्या सभासदांची संख्या १२ होती. तालुक्यात ६ प्राथमिक आरोग्य केंद्रे, ३४ प्राथमिक आरोग्य उपकेंद्रे, १ नागरी दवाखाना, १ युनानी व १ आयुर्वेदिक दवाखाना तर १ प्राथमिक आरोग्य पथक कार्यरत आहे. कुटुंब कल्याण कार्यक्रमांतर्गत सन २००५-०६ साठी समितीने १,३३८ शस्त्रक्रिया करून ८५ टक्के उद्दिष्ट साध्य केले. तसेच सदर वर्षामध्ये समितीने १५ बायोगॅस संयंत्रे सुरू केली. इंदिरा आवास योजनेअंतर्गत सन २००५- ०६ मध्ये २३८ घरकुलांचे काम पूर्ण केले व ४३ घरकुलांचे काम प्रगतिपथावर होते.

**पंचायत समिती, लोहा :** सन १९९७ मध्ये शासनाने राज्याच्या अधिसूचनेनुसार कंधार तालुक्याचे विघटन करून लोहा येथे नव्याने पंचायत समिती स्थापन केली. जिल्हापरिषदेच्या पाचव्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर पंचायत समितीची पहिली सभा दिनांक १४ मार्च १९९७ रोजी होऊन त्या तारखेपासून लोहा पंचायत समिती प्रत्यक्षात कार्यान्वित झाली. सन २००१ च्या जनगणनेनुसार तालुक्याचे क्षेत्रफळ ९०१.० चौ.कि.मी असून गावांची संख्या १२५ आहे व त्यापैकी २ ओसाड गावेआहेत. समितीअंतर्गत एकूण ११८ ग्रामपंचायती आहेत. या गटातील निर्वाचन गटातून प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे निवडलेल्या सभासदांची संख्या १० आहे. समितीने इंदिरा आवास योजनेअंतर्गत सन २००५-०६ मध्ये १४२ घरकुलांची कामे पूर्ण केली व ३१ घरकुलाची कामे प्रगतिपथावर होती. पंचायत समिती, लोहा गटाअंतर्गत जिल्हा परिषदेच्या १५५ प्राथमिक व ६ माध्यमिक शाळा आहेत. सन २००५- ०६ मध्ये समितीने १० बायोगॅस संयंत्रांची कामे पूर्ण केली. समितीअंतर्गत ५ प्राथमिक आरोग्य केंद्रे, २८ प्राथमिक आरोग्य उपकेंद्रे, १ ग्रामीण रुग्णालय व १ आयुर्वेदिक दवाखाना तर पशुसंवर्धन विभागांतर्गत श्रेणी-१ चे ६ पशुवैद्यकीय दवाखाने व श्रेणी-२ चे १० पशुवैद्यकीय दवाखाने कार्यरतआहेत.

**पंचायत समिती, हिमायतनगर :** सन २००१ च्या जनगणनेनुसार तालुक्याचे क्षेत्रफळ ६११ चौ.कि.मी. असून गावांची संख्या ७३ आहे व त्यापैकी ४ गावे ओसाड आहेत. तसेच तालुक्यात एकूण ५२ ग्रामपंचायती आहेत. सन २००५-०६ मध्ये गटातून निवडून आलेल्या किंवा स्वीकृत केलेल्या सदस्यांची संख्या ३ असून गटातील निर्वाचन गटातून प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे निवडलेल्या

सभासदांची संख्या ६ होती. तालुक्यामध्ये २ प्राथमिक आरोग्य केंद्रे, १२ प्राथमिक आरोग्य उपकेंद्रेव १ आयुर्वेदिक दवाखाना आहे. कुटुंब कल्याण कार्यक्रमांतर्गत समितीने सन २००५-०६ मध्ये ६५१ शस्त्रक्रिया करून ९५ टक्के उद्दिष्ट साध्य केले. पशुसंवर्धन विभागांतर्गत श्रेणी-१ चा १ पशुवैद्यकीय द वाखाना व श्रेणी-२ चे ३ पशुवैद्यकीय दवाखाने कार्यरत आहेत. समितीने इंदिरा आवास योजनेअंतर्गत सन २००५-०६ मध्ये १२७ घरकुलांचे काम पूर्ण केले.

**पंचायत समिती, धर्माबाद :** सन २००१ च्या जनगणनेनुसार तालुक्याचे क्षेत्रफळ ३०५.८ चौ.कि.मी. असून एकूण गावांची संख्या ५४ आहे व त्यापैकी ४ गावे ओसाड आहेत, तर ग्राम-पंचायतींची एकूण संख्या ४५ आहे. त्यापैकी ५ गट ग्रामपंचायती आहेत. सन २००५-०६ मध्ये गटातून निवड झालेल्या किंवा स्वीकृत केलेल्या जिल्हापरिषदेच्या सभासदांची संख्या २ असून गटातील नि र्वाचन गटातून प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे निवडलेल्या सभासदांची संख्या ४ होती. तालुक्यामध्ये ५१ जि ल्हापरिषद प्राथमिक शाळा व ४ जिल्हापरिषद माध्यमिक शाळा, २ खाजगी अनुदानित प्राथमिक शाळा, २ खाजगी विनाअनुदानित प्राथमिक शाळा, ३ खाजगी अनुदानित माध्यमिक शाळा व ४ खाजगी विना अनुदानित माध्यमिक शाळा आहेत. तसेच तालुक्यात १ प्राथमिक आरोग्य केंद्र, ७ प्राथमिकआरोग्य उपकेंद्रे, १ ग्रामीण रुग्णालय व १ नागरी दवाखाना आहे. तसेच श्रेणी-१ चा १ पशुवैद्यकीय दवाखाना व श्रेणी-२ चे ३ पशुवैद्यकीय दवाखाने आहेत. कुटुंबकल्याण कार्यक्रमांतर्गत समितीने सन २००५-०६ मध्ये एकूण ३३७ शस्त्रक्रिया केल्या. तसेच सदर वर्षात ५ बायोगॅस संयंत्रांचे काम पूर्ण केले.

**पंचायत समिती, उमरी :** उमरी पंचायत समितीची स्थापना दिनांक ११ मार्च २००२ ला झाली. सन २००१ च्या जनगणनेनुसार तालुक्याचे क्षेत्रफळ ४२३.५ चौ.कि.मी. असून एकूण गावांची संख्या ६६ आहे व त्यापैकी १ गाव ओसाड आहे तर ग्रामपंचायतींची संख्या ५८ आहे. २००५-०६ मध्ये गटातून निवड झालेल्या किंवा स्वीकृत केलेल्या जिल्हापरिषदेच्या सभासदांची संख्या २ असून गटातील निर्वाचन गटातून प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे निवडलेल्या सभासदांची संख्या ४ होती. सन २००५-०६ मध्ये इंदिरा आवास योजनेअंतर्गत समितीने ७४ घरकुलांचे काम पूर्ण केले असून १७ बायोगॅस संयंत्रे सुरू केली. तसेच कुटुंब कल्याण कार्यक्रमांतर्गत ५३२ शस्त्रक्रिया करून ७८ टक्के उद्दिष्ट साध्य केले.

**पंचायत समिती, मुदखेड :** मुदखेड तालुक्याची स्थापना दिनांक २६ जून १९९९ ला झाली. सन २००१ च्या जनगणनेनुसार तालुक्याचे क्षेत्रफळ ३३५.२ चौ.कि.मी. असून गावांची एकूण संख्या ५३ आहे व त्यापैकी २ ओसाड गावे आहेत. तसेच ग्रामपंचायतींची संख्या ५० आहे. गटातून निवड झाले ल्या किंवा स्वीकृत केलेल्या जिल्हा परिषदेच्या सभासदांची संख्या २ असून गटातील निर्वाचन गटातून प्र ात्यक्ष निवडणुकीद्वारे निवडलेल्या सभासदांची संख्या ४ होती. तालुक्यामध्ये २ प्राथमिकआरोग्य केंद्रे असून बारड येथे नागरी दवाखाना आहे. एकूण शाळांची संख्या ६१ असून माध्यमिक शाळांची संख्या ४ आहे व २ आश्रमशाळा आहेत. समितीने कुटुंबकल्याण कार्यक्रमांतर्गत सन २००५- ०६ मध्ये ७१८ शस्त्रक्रिया करून ७७.५३ टक्के उद्दिष्ट साध्य केले तसेच १० बायोगॅस संयंत्रांचे काम पूर्ण करून १०० टक्के उद्दिष्ट साध्य केले. सदर वर्षामध्ये इंदिरा आवास योजनेअंतर्गत ५० घरकुलांचे काम पूर्ण केले व १३ घरकुलांची कामे प्रगतिपथावर होती.

**पंचायत समिती, अर्धापूर :** सन २००१ च्या जनगणनेनुसार अर्धापूर तालुक्याचे क्षेत्रफळ ३२५.० चौ.कि.मी. असून पंचायत समिती अंतर्गत एकूण ५६ गावे आहेत व त्यापैकी ७ गावे ओसाड आहेत. तसेच एकूण ४० ग्रामपंचायती असून त्यापैकी ६ गट ग्रामपंचायती आहेत. पंचायत समिती,अर्धापूर अंतर्गत २ प्राथमिक आरोग्य केंद्रे, १० प्राथमिक आरोग्य उपकेंद्रे, ५१ जिल्हापरिषद प्राथमिक शाळा, ३ खाजगी प्राथमिक शाळा, २ खाजगी आश्रमशाळा, ६ जिल्हा परिषद माध्यमिक शाळा, ६ खाजगी अनुदानित माध्यमिक शाळा व २ खाजगी विनाअनुदानित माध्यमिक शाळा आहेत. समितीने इंदिरा आ वास योजनेअंतर्गत सन २००५-०६ या वर्षात ३२ घरकुलांचे काम पूर्ण केले. तसेच कुटुंब कल्याण योजनेअंतर्गत ७०८ शस्त्रक्रिया पूर्ण करून सदर वर्षात ५ बायोगॅस संयंत्रांचे बांधकाम पूर्ण करून १०० टक्के उद्दिष्ट पूर्ण केले.

**पंचायत समिती, नायगांव (खैरगाव) :** सन २००१ च्या जनगणनेनुसार नायगाव (खै.) ता लुक्याचे क्षेत्रफळ ५४७.० चौ.कि.मी.असून एकूण गावे ९० आहेत व त्यापैकी ४ गावे ओसाड आहेत. या गावांसाठी एकूण ८० ग्रामपंचायती कार्यरत आहेत. सन २००५-०६ मध्ये या गटातील निर्वाचन गटातून प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे निवडलेल्या सभासदांची संख्या १० होती. तालुक्यात एकूण ४ प्राथमिक आरोग्य केंद्रे व २४ प्राथमिक आरोग्य उपकेंद्रे आहेत. तसेच तालुक्यात ९२ प्राथमिक शाळा, २८ माध्यमिक शाळा व ३ आश्रमशाळा आहेत. सन २००५-०६ मध्ये कुटुंब कल्याण योजनेअंतर्गत समितीने १,२३० शस्त्रक्रिया करून ९७ टक्के उद्दिष्ट साध्य केले. तसेच सदर वर्षात ५ बायोगॅस संयंत्रे सुरू करून १०० टक्के उद्दिष्ट पूर्ण केले.

**पंचायत समिती, माहूर :** सन २००१ च्या जनगणनेनुसार माहूर तालुक्याचे क्षेत्रफळ ५२०.० चौ.कि.मी. असून एकूण गावे ९३ आहेत. त्यापैकी ५ गावे ओसाड असून ४९ गावे आदिवासी क्षेत्रात मोडतात. या विकास गटातील विकासाची कामे पंचायत समितीच्या अधिपत्याखालील ६३ ग्रामपंचायती मार्फत सुरू आहेत. सन २००५-०६ मध्ये तालुक्यात ३ जिल्हा परिषद व ६ पंचायत समिती गट समाि वष्ट होते. सन २००५-०६ या वर्षात पंचायत समिती, माहूर अंतर्गत १० बायोगॅस संयंत्रांचे काम पूर्ण क रून १०० टक्के उद्दिष्ट साध्य केले. इंदिरा आवास योजनेअंतर्गत १७० घरकुलांची कामे पूर्ण केली व ४१ घरकुलांची कामे प्रगतिपथावर होती. समिती अंतर्गत आष्टा, वाई, सिंदखेड, पालाईगुडा, तुळशी, हिंगणी व करंजी येथे प्रत्येकी एकप्रमाणे एकूण ७ श्रेणी-१ चे पशुवैद्यकीय दवाखाने तर माहूर,वानोळा व कुपटी येथे प्रत्येकी एक याप्रमाणे एकूण तीन श्रेणी-२ ची पशु उपचार केंद्रे आहेत. माहूर ता लुक्यामध्ये जिल्हापरिषदेच्या एकूण ११८ शाळा असून २७ बालवाड्या आहेत. तसेच १ खाजगी प्र ाथमिक शाळा, १८ खाजगी माध्यमिक शाळा, १ शासकीय आश्रमशाळा, १ खाजगी आश्रमशाळा व ११ वस्तीशाळा आहेत. समितीअंतर्गत आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी ५ प्राथमिक आरोग्य केंद्रे, ३० प्राथमिक आरोग्य उपकेंद्रे व माहूर येथे सर्व सोयी उपलब्ध असलेले शासकीय ग्रामीण रुग्णालय आहे.

## ग्रामपंचायती

स्थानिक पातळीवर गावाचा कारभार पाहणारी ग्रामपंचायत ही स्थानिक स्वराज्य संस्था होय. अगदी प्राचीन काळापासून ही संस्था कार्यरत असल्याचे दिसून येते. ह्या संस्थेत कमीतकमी पाच सदस्य असत म्हणून तिला हे नाव मिळाले. गावातील वयोवृध्द व अनुभवी लोक तिचे सदस्य असत. संस्कृत व पाली वाङ्मयातही ग्रामपंचायतीचे उल्लेख सापडतात. इसवीसनाच्या नवव्या व दहाव्या शतकातील शिलालेखावरून दक्षिण भारतात ग्रामपंचायती राजमान्य असल्याचे आढळून येते.

मराठवाड्यातील २,५०० ते ५,००० लोकसंख्येच्या प्रत्येक खेड्यासाठी किंवा एकापेक्षा अधिक खेड्यांच्या समूहासाठी १९४१ च्या अधिनियमानुसार ग्रामपंचायतींची स्थापना झाली होती. त्यावेळी तहसीलदार खेड्यातील सर्व प्रौढांची एक यादी तयार करीत असे आणि या यादीतून जिल्हाधिकारीआवश्यक तेवढ्या सदस्यांची नियुक्ती करीत असे तसेच सरपंच व मानसेवी सचिव याच यादीतून निवडण्यात येत असत. १९५१ च्या हैद्राबाद ग्रामपंचायत कायद्यानुसार ग्रामपंचायतींना निवडणुकीचे तत्त्व लागू करण्यात आले होते. एखादा अनुसूचित जातीचा सदस्य नियुक्त करीत असत. या कायद्याने न्यायपंचायतींची स्थापना करण्यात आली व काही विशिष्ट मर्यादेपर्यंत ग्रामपंचायतींच्या कार्याचा व्यापहीवाढविण्यात आला. १९५६ च्या हैद्राबाद ग्रामपंचायत कायद्यानुसार ग्रामसभा स्थापन करण्याची तरतूद करण्यात आली. या कायद्याद्वारे काही आवश्यक कर लागू करण्यात आले व सरकारी मंजुरीने पंचायतींना जमीन महसुलावर उपकर लादण्याचे अधिकार देण्यात आले. राज्य पुनर्रचनेनंतर १९५८ सालचा मुंबई ग्रामपंचायत कायदा संमत करण्यात आला. त्यानुसार विकासाची सर्व कामे ग्रामपंचायतींकडे सोपविण्यात आली. पुढे हा कायदा राज्यातील सर्व ग्रामपंचायतींना लागू करण्यातआला.[४१] या कायद्यातील ६३ व्या कलमानुसार एकमेकांलगतच्या पाच गावांपेक्षा अधिक गावेअसलेल्या गट ग्रामपंचायतींसाठी त्यांच्या अधिकारक्षेत्रातील दिवाणी व फौजदारी न्यायाच्या प्रशासनासाठी न्यायपंचायत स्थापन करण्याची तरतूद करण्यात आली आहे. गटग्रामपंचायतीमधील प्रत्येक गावातून ग्रामसभेद्वारे निवडून आलेल्या सदस्यांपैकी निवडलेला सदस्य या न्यायपंचायतीमध्येआपल्या गावाचे प्रतिनिधित्व करतो. त्यामुळे न्यायपंचायतीमधील कमीत कमी सदस्यसंख्या पाचअसते. न्यायपंचायतींची मुदत गट ग्रामपंचायतीबरोबर संपते. न्यायपंचायतीच्या निकालाविरोधात जिल्हाव सत्र न्यायालयात अपील करता येते.[४२]

Maharashtra State Gazetteers

**रचना :** ग्रामपंचायतीच्या सभासदांची निवड गुप्त मतदान पद्धतीने होत असून त्या सभासदांची संख्या कमीत कमी सात व जास्तीत जास्त पंधरा असते.[४३] ग्रामपंचायतीमध्ये अनुसूचित जाती-जमाती, इतर मागास प्रवर्ग व महिलांकरिता लोकसंख्येच्या प्रमाणात राखीव जागा ठेवल्या जातात. ग्रामपंचायतीमध्ये निवडून आलेले सभासद सरपंच व उप-सरपंचाची निवड करतात. सरपंच व उप-

---

४१. **परभणी जिल्हा गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ४९२.

४२. **उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९७२, पृ. ७००-७०१.

४३. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९७१, पृ. ५०९.

सरपंच यांच्याव्यतिरिक्त प्रत्येक ग्रामपंचायतीस किंवा दोन अथवा तीन ग्रामपंचायतींना मिळून एका सचिवाची (ग्रामसेवक) जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याद्वारे नेमणूक केली जाते. सरपंच हाच ग्रामपंचायतीचा प्रमुख असतो. निवडून आलेल्या सभासदांची कालमर्यादा पाच वर्षांची असते.

**कार्ये :** भारतासारख्या विकसनशील देशाच्या ग्रामस्तरावरील प्रशासनव्यवस्थेमध्ये ग्रामपंचायतींचे अनन्यसाधारण महत्त्व ओळखून शासनाने ग्रामपंचायतींचे कार्यक्षेत्र वाढविले आहे. त्यासाठी त्यांनाअनेक अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. ग्रामपंचायतींनी पार पाडावयाच्या विविध कामकाजात दैनंदिन गावकारभार, न्यायदान आणि विकासविषयक कामांचा समावेश होतो. या सर्व कार्यामध्ये सध्या ि वकासविषयक कामांना अग्रक्रम देण्यात आला असून त्यांचे कार्यक्षेत्रसुद्धा व्यापक झालेले आहे. शेतीसुधारणा व लघुसिंचनाच्या काही योजना हाती घेण्याचे काम ग्रामपंचायतीकडे सोपविण्यात आलेले आहे. त्याशिवाय पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणे, शाळा व इतर सार्वजनिक इमारती बांधणे, गावाची स्वच्छता व आरोग्य राखणे, रोगप्रतिबंधक उपाययोजना, बेकारांना रोजगार पुरविणे, संकटग्रस्तांना मदत, विकासासाठी सहकारी चळवळींना प्रोत्साहन देणे, विहिरी, रस्ते, मोऱ्या व पुलांचे बांधकाम करणे, अशी विविध प्रकारची कार्ये पार पाडण्याची जबाबदारी ग्रामपंचायतीवर टाकण्यात आली आहे. याशिवाय महसूल जमा करणे, गावाच्या संरक्षणाकडे लक्ष देणे, गावाचे तंटे गावातच मिटविणे ही कार्येदेखील ग्रामपंचायतीकडे सोपविली आहेत. थोडक्यात स्थानिक अडचणी व गरजा, उपलब्ध साधनसंपत्ती व मिळणारे आर्थिक सहाय्य या गोष्टी लक्षात घेऊन गावाच्या विकासासाठी अल्प व दीर्घ मुदतीच्या लहानमोठ्या उत्पादक व कल्याणकारी योजना आखण्याची व त्या पार पाडण्याची जबाबदारी आता ग्रामपंचायतींवर टाकण्यात आली आहे.

**ग्राम सचिवालय योजना :** गावपातळीवर महत्त्वाच्या खात्यांचा समन्वय राहावा व जनतेची नित्याची कामे त्वरेने व्हावीत या दृष्टिकोनातून राज्यातील सर्व महसूल मंडळांच्या मुख्यालयी ग्रामसचि वालय बांधण्याची योजना राबविण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. एकूण १५०० महसूल मंडळाच्या मुख्यालयाच्या ठिकाणी ग्राम सचिवालय बांधण्याचे शासनाचे धोरण आहे. याबाबतचा आदेश दि. २७ डिसेंबर १९९९ रोजी निर्गमित करण्यात आलेला आहे. शासनाने या योजनेचा समावेश "१०० दिवसांचा विशेष कार्यक्रम" यामध्ये केलेला आहे. त्यानंतर दि.२ एप्रिल २००२ व दि. १९ ऑक्टोबर २००२ च्या शासन निर्णयान्वयें महसूल मंडळाच्या मुख्यालयाखेरीज इतर गावातही अशी ग्राम सचिवा लये बांधण्याबाबत कार्यवाही करण्याचे अधिकार जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्यात आलेले आहेत. ग्राम सचिवालय इमारतीचे प्रशासकीय नियंत्रण व मालकी संबंधितअधिकार जि ल्हा परिषदेकडे राहणार आहेत. या सचिवालयांमध्ये ग्रामपंचायत कार्यालय, महसूल मंडळ कार्यालय, त लाठी कार्यालय, सहकारी संस्था कार्यालय, महिला व बालविकास कार्यालय, महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनीचे कार्यालय तसेच कृषि व पाटबंधारे ही कार्यालये समाविष्ट असतील. जागेच्या उपलब्धतेनुसार महसूल मंडळ मुख्यालयी इतर शासकीय कार्यालयांनादेखील ग्राम सचिवालयामध्ये सामावून घेता येईल. थोडक्यात, ग्राम सचिवालयांमुळे ग्रामीण जनतेच्या अडीअडचणी व तक्रारींची तात्काळ दखल घेऊन, शासनाच्या विविध खात्यात समन्वय साधला जाऊन जनतेच्या कामाचा त्वरित निपटारा होईल.

**ग्रामस्वराज्य :** पंचायत राज संस्था दीर्घकाळ अस्तित्वात असल्या तरी त्यामध्ये नियमित नि वडणुकांचा अभाव, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व स्त्रिया यांच्यासारख्या दुर्ब ल घटकांचे अपुरे प्रतिनिधित्व व आर्थिक पाठबळाचा अभाव यासारख्या अनेक कारणांमुळे या पंचायत राज संस्था जनतेच्या वर्धनक्षम व संवादी संस्था म्हणून स्थान मिळवू शकलेल्या नाहीत. अशा काही त्रुटींचा विचार करता संसदेला असे वाटले की, या पंचायत राज संस्थांना निश्चिती, सातत्यव सामर्थ्य प्र ाप्त करून देण्याच्या दृष्टीने त्यांच्या मुलभूत व अत्यावश्यक वैशिष्ट्यांचा संविधानात समावेश करणे ही आजची अपरिहार्य गरज आहे. त्यानुसार भारत सरकारने, नियमित निवडणुका,अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व स्त्रिया यांना पुरेसे प्रतिनिधीत्व देणे, तसेच पंचायत राज संस्थाचे अर्थबळ वाढविणे यासारख्या गोष्टींची तरतूद करण्यासाठी संविधान (त्र्याहत्तरावी सुधारणा) अधिनियम १९९२ अधिनियमित केला. हा अधिनियम दिनांक २४ एप्रिल १९९३ पासूनअमलात आला. अधिनियम १९९२ याद्वारे करण्यात आलेल्या तरतुदी अमलात आणण्याकरिता, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ मध्ये अनेक सुधारणा करण्यात आल्या.[४४] या दुरुस्तीमुळे पंचायतीस संविधानात्मक दर्जा मिळाला व ग्रामसभेसारखे प्रत्यक्ष लोकशाहीत सहभागी होण्याचे व्यासपीठ प्राप्त झाले. विकासाच्या योजना आखणे, त्यांची अंमलबजा वणी करणे, त्यासाठीच्या खर्चाची तरतूद करणे, झालेल्या खर्चाचे हिशेब तपासणे, त्यावर टीका-टिपणी तयार करणे इत्यादीसारख्या अनेक जबाबदाऱ्या ग्रामस्वराज्य योजनेखाली ग्रामसभेवर सोपविण्यात आले ल्या आहेत. ग्रामसभेस दिलेले अधिकार व त्यामध्ये दिवसेंदिवस घातली जाणारी भर हे लोकांचा वि वकासामध्ये सहभाग व निर्णय प्रक्रियेमधील सहभाग वाढविण्यासाठी उचललेले महत्त्वाचे पाऊल आहे. गावातील मतदारांपैकी १५ टक्के किंवा १०० मतदार हजर राहिल्यास ग्रामसभा घेता येतात. ग्रामसभा हे "सहभागी लोकशाही" चे प्रतिक आहे.

**संत गाडगे बाबा ग्राम स्वच्छता अभियान :** ग्रामीण परिसर स्वच्छ राहावा म्हणून ज्यांनी परिश्रम घेतले, त्या संत गाडगेबाबा यांच्या नावाने हे अभियान सन २०००-२००१ पासून राबविण्यात येते. पू र्वीच्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धा, ग्रामीण भागातील महिला व बाल कल्याण, आदि वासी व मागासवर्गियांचे कल्याण व जवाहर रोजगार या सर्व योजना संत गाडगे बाबा ग्राम स्वच्छता अभियानात विलीन करण्याचा निर्णय शासनाने २००२-२००३ या आर्थिक वर्षापासून घेतलेला आहे. या अभियानाचा उद्देश गावाचा विकास व्हावा, गाव स्वच्छ व घाणमुक्त व्हावे, ग्रामीण भागातील स र्वसामान्य जनतेचे जीवनमान सुधारावे हा आहे. या योजनेअंतर्गत उत्कृष्ट काम करणाऱ्या जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, आणि ग्राम पंचायतींना स्व. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मरणार्थबक्षिसे देण्यात येतात. तसेच संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाच्या प्रचार/प्रसिद्धीसाठी उत्कृष्टबातम्या देणाऱ्या पत्रकारांनाही राज्य व जिल्हा स्तरावर बक्षिसे देण्यात येतात.

संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान अंतर्गत कुटुंब कल्याण, पिण्याचे पाणी व सांडपाणीव्य वस्थापन, सामाजिक एकता यात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या ग्रामपंचायतींना जिल्हा स्तरावर, विभाग

---

४४. **सातारा जिल्हा गॅझेटिअर,** १९९९, पृ. ६२६-६२७.

स्तरांवर व राज्य स्तरावर बक्षिसे देण्यात येतात. या अभियानांतर्गत प्रत्येक जिल्ह्यातील सर्वात स्वच्छ अशा तीन उत्कृष्ट ग्रामपंचायतींना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या नावाने रु. ५, ३ व २ लाखाचे बक्षिस देण्यात येते.

**निर्मल ग्राम पुरस्कार योजना :** संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत ही योजना राबविण्यात येते. या योजनेद्वारे शासनाने "हागंदारीमुक्त गाव" ही अभिनव लोकचळवळ सुरू केलीअसून त्यास उत्तम प्रतिसाद लाभत आहे. या योजनेतील प्रयोगामुळे उंचावणारी स्वच्छतेची स्थितीव आरोग्यमान विचारात घेऊन केंद्र शासनानेही, उघड्यावरील प्रातर्विधीची पद्धत पूर्णपणे बंद करण्यासंदर्भात निर्मल ग्राम पुरस्कार ही योजना दि. २० जून २००३ रोजी जाहीर केली. या योजनेनुसार १००ऽ घरे व शाळांमध्ये शौचालयाची सुविधा निर्माण करून त्यांचा वापर करणाऱ्या व हागंदारीमुक्तव स्वच्छ परिसर असलेल्या ग्रामपंचायती, पंचायत समित्या व जिल्हा परिषदांना रु. २ लाख ते ५० लाखाची बक्षिसे देण्यात येतात.

**इंदिरा आवास योजना :** ही योजना एप्रिल १९८९ पासून डिसेंबर, १९९५ पर्यंत जवाहर रोजगार योजनेची उपयोजना म्हणून पुढे चालू ठेवण्यात आली हाती. सदर योजना केंद्र शासनाने दि. १ जानेवारी १९९६ पासून स्वतंत्रपणे राबविण्याचे ठरविले. तसेच शासनाने सदर योजना राबविण्यासाठी त्यात दि. १ एप्रिल १९९९ पासून काही बदल केले. त्यानुसार आता नवीन घरकुलेबांधण्यासोबतच टिकाऊ नसलेल्या कच्च्या घरांचा दर्जा सुधारून त्यांचे अर्धपक्क्या व पक्क्या घरांमध्येरूपांतर करण्यात येते. या योजनेकरिता केंद्र व राज्य शासन अनुक्रमे ७५ : २५ या प्रमाणात अनुदान देतात व खर्च सोसतात. ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील अनुसूचित जातीतेतर/अनुसूचित जमातीतर/ग्रामीण गरीब व्यक्तींनाही घरे मोफत उपलब्ध करून देणे हे या योजनेचे प्राथमिक उद्दिष्टआहे. या योजनेअंतर्गत शासनाकडून प्रतिवर्षी जिल्ह्यासाठी घरकुलांचे उद्दिष्ट प्राप्त होते. हे उद्दिष्ट तालुक्यातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंब संख्येच्या प्रमाणात ठरविण्यात येते. सदर योजनेअंतर्गतलाभार्थींच्या स्वतःच्या १०० चौ.मी. क्षेत्रफळाच्या भूखंडावर घरकुल बांधण्यात येते व बांधकामाचे क्षेत्रफळ २० चौ. मीटर इतके असते. नांदेड जिल्ह्यासाठी या योजनेअंतर्गत सन २००५-०६ या आर्थिकवर्षासाठी ३,११४ घरकुलांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले. त्यापैकी सदर वर्षात २,२१३ घरकुलांचे काम पूर्ण करण्यात आले व ४३८ घरकुलांचे काम प्रगतिपथावर होते तर ४६३ घरकुलांचे काम प्रस्तावित होते.

Maharashtra State Gazetteers

## जलस्वराज्य

**ग्रामीण पाणीपुरवठा कार्यक्रम :** पाणी ही मुलभूत गरज असल्याने केंद्र व राज्य शासनाने या कार्यक्रमास प्रथम प्राधान्य दिलेले आहे. त्याची परिणती म्हणून सन २०००-२००१ पासून केंद्र शासनाने जाहीर केलेल्या "पंतप्रधान ग्रामोदय योजने" तही ग्रामीण पाणीपुरवठा कार्यक्रम समाविष्ट केलाआहे.

साध्या विहिरी, विंधणविहिरी, लघु पाणीपुरवठा योजना, नळ पाणीपुरवठा योजना अशा उपाय योजनांद्वारे ग्रामीण भागात पिण्याचे पाणी उपलब्ध करण्यात आले आहे. पावसाळ्यानंतर पिण्याच्या

पाण्याची टंचाई भासणाऱ्या गावांना पाणीपुरवठा करण्यासाठी विशेष उपाययोजना करण्यात येतात. त्याचप्रमाणे दूषित पाणीपुरवठा असलेल्या भागासाठी शुद्ध पाणीपुरवठा करण्यासाठी उपाययोजना करण्यात येतात. सुधारित धोरणानुसार आता हा कार्यक्रम ''मागणी आधारित लोकसहभाग'' या तत्त्वानुसार राबविण्यात येत आहे. याद्वारे दरडोई दरदिवशी ४० लीटर या प्रमाणात पिण्याचे पाणी उपलब्ध केले जाते. या कार्यक्रमात योजना निश्चितीपासून ते योजनेच्या अंमलबजावणीच्या प्रत्येक टप्प्यात व व्यवस्थापनात लोकांचा सक्रिय सहभाग ग्रामसभेद्वारे अनिवार्य केला असून योजनेच्या भांडवली खर्चाच्या १० टक्के भाग लाभार्थ्यांनी लोकवर्गणी म्हणून खर्च करावयाचा आहे. तसेच योजनेच्या देखभाल व दुरुस्तीचा १०० टक्के खर्च लाभार्थ्यांनी करावयाचा आहे. या योजनेच्याअंमलबजावणीसाठी ग्रामसभेच्या मान्यतेने ''ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समिती'' ची स्थापना करण्यात येते. योजनेसंबंधी सर्व आर्थिक व्यवहार करण्याचे अधिकार या समितीस आहेत. ७५ लाख रुपयापर्यंत स्वतंत्र गावाच्या नळ पाणीपुरवठा योजना, साधी विहीर, विंधन विहीर हे कार्यक्रम जिल्हा परिषदा राबवितात. या कार्यक्रमांतर्गत स्वजलधारा योजनाही राबविण्यात येत आहे.

**नागरी पाणीपुरवठा कार्यक्रम :** नागरी जनतेला पुरेसा शुद्ध पाणीपुरवठा करणे ही प्रत्येक महानगरपालिका/नगरपालिकेची जबाबदारी असते. बृहन्मुंबई महानगरपालिका वगळून २१ महानगरपालिका, २२१ नगरपालिका व ३ नगरपंचायतींच्या पाणीपुरवठा व जलनिःस्सारण योजनांची कामे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण करते. राज्य शासनाकडून नगरपालिकांना वर्गवारीनुसार अनुदान व कर्ज मंजूर केले जाते. राज्य शासनाने या कार्यक्रमांसाठी सर्व नगरपालिका/महानगरपालिकांना १० टक्के लोकवर्गणी लागू केलीआहे. सन २००५-२००६ मध्ये यासंबंधीत एकूण १९५ मोठ्या योजना प्रगतिपथावर होत्या.

**उत्पन्न व खर्च :** घरपट्टी व मालमत्ता कर, जकात, बाजार कर, जत्रा आदी उत्पन्नाच्याबाबींबरोबरच ग्रामपंचायतीस जिल्हा परिषदेचे अनुदान मिळते. हे अनुदान खेड्यातून वसूल केलेल्या जमीन महसुलाच्या ३०% इतकी रक्कम अणि दरडोई एक रुपया धरून होणारी रक्कम या दोहोतील जी अधिक असेल तेवढ्या रकमेचे असते. सन १९७२-७३ पासून हे अनुदान १००% देण्यात येते. त्यापैकी ५०% रक्कम ग्रामपंचायतींना ग्रामीण रोजगार योजनांवर खर्च करावी लागते. जिल्ह्यातील ग्रामपंचायतींची सद्याची संख्या व सदस्य संख्या तक्ता क्र.४ मध्ये तर नांदेड जिल्ह्यातील ग्रामपंचायतींचे सन १९८०-८१ पासूनच्या काही निवडक वर्षांचे उत्पन्न व खर्च तक्ता क्र.५ मध्ये दर्शविला आहे.

Maharashtra State Gazetteers

## नगरपालिका

इंग्रजांनी नगरपालिका स्थापण्याचा कायदा करून स्थानिक स्वराज्याची अल्प प्रमाणात सुरुवात केली, असे म्हणण्यास हरकत नाही. ब्रिटिश अमलाखाली असलेल्या प्रदेशात ज्या स्थानिक संस्थांची झपाट्याने वाढ होत गेली त्या प्रमाणात ही वाढ संस्थानिक अमलाखाली असलेल्या प्रदेशात झाली नाही. नांदेड जिल्ह्याचा समावेश असलेले हैद्राबाद संस्थान यास अपवाद नव्हते. ज्यावेळी राष्ट्रीय चळवळीचे लोण हैद्राबाद संस्थानात पसरले, त्यावेळेला स्थानिक संस्थांच्या चळवळीला उत्तेजन मिळाले.[४५]

---

४५. **परभणी जिल्हा गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ४९८.

हैद्राबाद संस्थानाच्या विलीनीकरणादरम्यान हैद्राबाद संस्थानातील नगरपालिकांना हैद्राबाद नगरपरिषद आणि नगरसमित्या अधिनियम १९५१ हा कायदा लागू होता.[४६] पुढे हैद्राबाद संस्थान १९५६ मध्ये मुंबई राज्यात विलीन झाल्यानंतर हा कायदा बदलून नांदेड जिल्ह्यामधील नगरपरिषदांचे नियमन दिनांक ११ ऑगस्ट १९५६ पासून हैद्राबाद जिल्हा नगरपरिषद अधिनियम, १९५६ नुसार सुरू करण्यात आले. सध्या जिल्ह्यामध्ये एकंदर ११ नगरपरिषदा असून त्याशिवाय नांदेड येथील नगरपालिका सर्वात जुनी असून तिची स्थापना १९३५ साली झाली. व तिचे २६ मार्च १९९७ रोजी महानगरपालिकेतरूपांतर करण्यात आले. हैद्राबाद जिल्हा नगरपरिषद अधिनियम, १९५६ नुसार शासनास १५,०००लोकसंख्येपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या शहरास शहर नगरपरिषद तर ५,००० ते १५,००० यालोकसंख्येदरम्यान लोकसंख्या असणाऱ्या गावास नगरसमिती घोषित करण्याचे अधिकार होते.[४७] इ.स.१९६२-६३ मध्ये मराठवाड्यामध्ये एकूण ५२ नगरपालिका होत्या व त्यापैकी १३ शहर नगरपालिका तर ३९ नगरसमित्या होत्या. नांदेड जिल्ह्यामध्ये नांदेड येथे एकमेव शहर नगरपालिका होती व इतर १० नगरसमित्या होत्या[४८]. नांदेड जिल्हा महाराष्ट्र राज्यात समाविष्ट झाल्यानंतर महाराष्ट्र राज्यातील नगरपालिकांसंबंधीचे कायदे नांदेड जिल्ह्यातील नगरपालिकांना लागू करण्यात आले. १९६५ साली महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम संमत करण्यात आला व सध्या त्यानुसार नगरपरिषदांचा कारभार चालतो.

१९६५ च्या महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियमानुसार संचालक, नगरपालिका प्रशासन, राज्यातील नगरपरिषदांवर नियंत्रण ठेवतात. नगरपरिषदेने अनेकदा अधिनियमबाह्य क्षेत्रात हस्तक्षेप केल्यास किंवा अधिकाराचा गैरवापर केल्यास किंवा आपला कारभार चालविण्यास असमर्थ ठरल्यास, शासन ती नगरपरिषद बरखास्त करू शकते. आता या नगरपरिषदा पूर्णपणे लोकनियुक्त असून त्यांच्या अधिकारकक्षेत अधिकाधिक बाबी दिलेल्या आहेत. स्थानिक कारभारामध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींना भाग घेता यावा या दृष्टीने त्या त्या जाती जमातींसाठी राखीव जागा ठेवण्यातआ ल्या आहेत.[४९]

स्थानिक स्वराज्य संस्थेचा लोकशाही घटक म्हणून नगरपालिका प्रभावी रीतीने कार्य करू शकती ल हे सुनिश्चित करण्यासाठी घटना (७४ वे) दुरुस्ती अधिनियम, १९९२ अमलात आला. यानुसार महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५, तसेच नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ व मुंबई महानगरपालिका अधिनियम, १९४९ मध्ये दुरुस्त्या करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने ६ डिसेंबर १९९४ रोजी अधिनियम, १९९४ अमलात आणला. नवीन नियमानुसार पूर्वीच्याअधिनियमांमध्ये आमु लाग्र बदल करण्यात आले. या नियमांचे ठळक वैशिष्ट्य म्हणजे नगरपालिकांच्या निवडणूका घेण्यासाठी राज्य निवडणूक आयोग व स्थानिक स्वराज्य संस्थांना आर्थिकदृष्ट्या बळकट

---

४६. **लातूर जिल्हा गॅझेटिअर,** (भाग-१) २००८, पृ. ६९२.

४७. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९७१, पृ. ४८५.

४८. पांडे डॉ. व्ही. के., **म्युनिसिपल फायनान्स इन मराठवाडा,** पी.एच.डी. प्रबंध, मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, १९६३, पृ. ३.

४९. **परभणी जिल्हा गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ४९८.

करण्यासाठी वित्त आयोग निर्माण करण्यात आला. याबरोबरच या अधिनियमानुसार ''नगर पंचायत'' व ''औद्योगिक शहरीकरण'' ही दोन नवीन प्रकरणे समाविष्ट करण्यात आली असून त्यासाठी क्षेत्र निश्चिती करण्याबाबतचे नियम विहित करण्यात आले आहेत. ''लहान नागरी क्षेत्र'' घोषित करण्यासाठी त्या विभागातील लोकसंख्या २५,००० पेक्षा अधिक असणे आवश्यक असून बिगर-कृषी क्षेत्रातील नोकरवर्गाची संख्या ३५ टक्क्याहून अधिक असणे आवश्यक आहे.

दुरुस्ती अधिनियम, १९९४ नुसार नगरपालिकांचे तीन प्रकार करण्यात आलेले आहेत. एक लाखापेक्षा अधिक लोकसंख्या असणाऱ्या नगरपालिकेस ''अ'' वर्ग, चाळीस हजार पेक्षा जास्त परंतु एक लाखापेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या नगरपालिकेस ''ळु'' वर्ग, अणि चाळीस हजार किंवा त्यापेक्षा कमी लोकसंख्या आलेल्या नगरपालिकेस ''क'' वर्ग असे वर्गीकरण करण्यात आले आहे. जिल्ह्यातील नांदेड-वाघाळा महानगरपालिका वगळता इतर सर्व ''क'' वर्ग नगरपरिषदा आहेत. नवीन नियमांनुसार नगरपालिकांमध्ये वॉर्ड कमिटीच्या सरळ निवडणुकीद्वारे प्रत्यक्ष निवडून आलेले सदस्यव नामनिर्देशित सदस्य यांचा समावेश होतो. नामनिर्देशित केलेले सदस्य निवडून आलेल्या सदस्य संख्येच्या १० टक्क्यांपेक्षा जास्त नसतील किंवा ते पाच असतील, या दोन्हीपैकी जी संख्या लहानअसेल तेवढे सदस्य नामनिर्देशित केले जातात. विशेषतः नगरपालिका प्रशासनाचा अनुभव व ज्ञान ज्या व्यक्तींना असेल अशाच व्यक्ती नामनिर्देशित केल्या जातात. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास प्रवर्ग व स्त्रिया यांना आरक्षण ठेवण्यात आले आहे. नगरपालिकांच्या वर्गवारीनुसार निवडून येणाऱ्या सदस्यांची संख्या खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आली आहे.

| नगरपालिका वर्ग | निवडून येणाऱ्या सदस्यांची संख्या |
|---|---|
| ''अ'' वर्ग | निवडून येणाऱ्या सदस्यांची संख्या कमीत कमी ३८ राहील आणि १,००,००० लोकसंख्येच्या वर प्रत्येक ८,००० लोकसंख्येसाठी एक अतिरिक्त सदस्य परंतु, अशा प्रकारे होणाऱ्या एकूण सदस्यांची संख्या ६५ पेक्षा अधिक नसेल. |
| ''ळु'' वर्ग | निवडून येणाऱ्या सदस्यांची संख्या कमीत कमी २३ राहील आणि ४०,००० लोकसंख्येच्या वर प्रत्येक ५,००० लोकसंख्येसाठी एक अतिरिक्त सदस्य परंतु, अशा प्रकारे होणाऱ्या एकूण सदस्यांची संख्या ३७ पेक्षा जास्त नसेल. |
| ''क'' वर्ग | निवडून येणाऱ्या सदस्यांची कमीत कमी संख्या १७ राहील आणि २५,००० लोकसंख्येच्या वर प्रत्येक ३,००० लोकसंख्येसाठी एक अतिरिक्त सदस्य परंतु, अशा प्रकारे निवडून येणाऱ्या एकूण सदस्यांची संख्या २३ पेक्षा अधिक नसेल. |

सामाजिक व आर्थिक विकासाचे नियोजन, शहरी वनीकरण पर्यावरण, संरक्षण, गलिच्छ वस्ती सुधार व उन्नती, दारिद्र्य निवारण, जनावरांचे कोंडवाडे तसेच त्यांच्यावरील क्रूरता प्रतिबंध, कातडी कमावण्याबाबत नियमन, सार्वजनिक रस्ते व दिवाबत्तीची सोय करणे, पिण्याच्या पाण्याची सोय करणे, सार्वजनिक जागा, गटारे, सार्वजनिक बागबगीच्यांची देखभाल, सार्वजनिक लसीकरण करणे,पशुद वाखाने उभारणे इत्यादी कामांबरोबरच नवीन अधिनियमांतर्गत वेळोवेळी सोपविण्यात येणाऱ्या एचएफ

योजना नगरपरिषदा कार्यान्वित करतात. वार्ड कमिट्यांच्या कामामध्ये पाणीपुरवठा, जलनिःस्सारण स्वच्छता इत्यादी नगरपरिषदेच्या अत्यावश्यक सेवांबाबत लोकांच्या तक्रारींचे अग्रक्रमाने निवारण करणे, आर्थिक तरतुदीबाबतचे नियोजन करणे, आर्थिक तरतूद असलेल्या योजनांसाठी २०,००० रुपयांपर्यंतच्या कामांसाठी प्रशासकीय व वित्तिय मंजुरी देणे इत्यादी कामांचा समावेश होतो. वार्ड कमिटीच्या सदस्यांना महिन्यातून कमीतकमी एकदा सभा आयोजित करणे बंधनकारक आहे.

**नगरपंचायत :** हे नवीन प्रकरण नगरपरिषद अधिनियमाच्या कलम ३४१ नंतर समाविष्ट करण्यात आले आहे. त्यानुसार एखाद्या ग्रामीण क्षेत्राचे नागरी क्षेत्रामध्ये रूपांतर करतांना त्या क्षेत्रामधील लोकसंख्या १०,००० पेक्षा जास्त परंतु २५,००० पेक्षा कमी असणे आवश्यक आहे. हे क्षेत्र एखाद्या नगरपरिषदेच्या किंवा "अ" वर्ग नगरपरिषदेच्या हद्दीपासून २० किलोमीटरपेक्षा अधिकअंतरावर नसून त्या क्षेत्रातील बिगर-शेती नोकरवर्गाची टक्केवारी २५ पेक्षा कमी असू नये तसेचअसे क्षेत्र नगरपरिषदेच्या किंवा "अ" वर्ग नगरपरिषदेच्या हद्दीपासून २० किलोमीटरपेक्षा अधिकअंतरावर आहे परंतु, तेथील बिगर-शेती व्यवसायातील नोकरवर्गाचे प्रमाण ५० टक्के पेक्षा अधिकअसल्यास त्या क्षेत्रासाठी "नगर पंचायत" संघटित करण्याची तरतूद आहे. अशा नगरपंचायतीमधील परिषदेत सरळ निवडणुकीद्वारे निवडून आलेले १० सदस्य असतील. प्रत्येक सदस्यासाठी वॉर्ड निर्माण केला जाईल. तसेच नगरपरिषदांच्या नवीन नियमांप्रमाणे आरक्षणाबाबतचे सर्व नियम नगरपंचायतीसाठीसुद्धालागू होतील.

**नगरपरिषदांचे उत्पन्न :** जमीन व इमारती कर, माल वाहतुकीसाठी किंवा प्रवासासाठीवापरण्यात येणारी सर्व किंवा काही वाहने, बोटी व प्राण्यांवरील कर, जकात कर, पाणीपट्टी, वीजपट्टी, यात्रा कर, मनोरंजन कर, अचल मालमत्तेच्या हस्तांतरणावरील कर, व्यवसाय व व्यापार कर आणि सरकारच्या संमतीने इतरही काही करांद्वारे नगरपरिषदांना उत्पन्न मिळते. विविध मार्गांनी करआकारुनसुद्धा नगरपरिषदांच्या निधिमध्ये तूट संभावत असल्यास शासनाद्वारे आवर्त व अनावर्त या शीर्षकांखाली अनुदान देऊन नगरपरिषदांच्या निधीमध्ये भर टाकली जाते.

जिल्ह्यातील नगरपरिषदांची थोडक्यात माहिती खाली दिलेली आहे :—

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका :** तत्कालीन हैद्राबाद राज्यातील नांदेड शहर हे जिल्हा व तालुका मुख्यालय असून इ.स.१९३५ साली या शहरात शासन नियुक्त नगरपालिकाअस्तित्वात आली होती. अर्थात ती लोकनिर्वाचित नव्हती. हैद्राबाद संस्थानाच्या भारतीय संघराज्यातील विलीनीकरणानंतर ही नगरपालिका बरखास्त होऊन १९५२ मध्ये नवीन नांदेड नगरपरिषद अस्तित्वातआली. या नगरपालिकेचे पहिले लोकनियुक्त अध्यक्ष शंकरराव चव्हाण होते. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची स्थापना, दिनांक २६ मार्च १९९७ ला झाली. सन २००१ च्या जनगणनेनुसार नांदेड शहराची लोकसंख्या ४,३०,५९८ होती. सन २००६ मध्ये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे क्षेत्रफळ ४९ चौ.कि.मी. होते.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत एकूण २४ प्रभाग असून या प्रभागातून एकूण ७३ नगरसेवक निवडून आलेले आहेत व ५ नामनिर्देशित सदस्य आहेत. याशिवाय महापौर, उप महापौर,

स्थायी समिती सभापती, विरोधी पक्षनेता, सभागृह नेता इत्यादी पदाधिकारी आहेत. तसेच नांदेड वाघाळा महानगरपालिका, सर्वसाधारण सभा व स्थायी समिती अस्तित्वात आहेत. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ नुसार या सभेचे व समितीचे कामकाज चालते. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत आयुक्त, हे महानगरपालिका कार्यालय प्रमुख असून, ५ उपआयुक्त पदे आहेत व ९ सहायक आयुक्त कार्यरत आहेत. नांदेड शहराची ५ क्षेत्रीय कार्यालये असून त्यावर ५ क्षेत्रीय अधिकारी नियुक्त करण्यात आलेले आहेत. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत श्रेणीनिहाय अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये वर्ग-१ चे १ पद, वर्ग-२ ची ४ पदे, वर्ग-३ ची ७८६ पदे व वर्ग-४ ची १,४९४ पदे आहेत.

महानगरपालिका स्थापनेनंतर शासनाच्या अनेक योजनांची कामे महानगरपालिकेने हाती घेऊन नांदेड शहराचा विकास साधला. त्यामध्ये रस्ते, नाले, पाणीपुरवठा लाईन, ड्रेनेज लाईन, मुख्य रस्त्यांचे डांबरीकरण, पादचारी मार्ग तसेच सखल भागातील पाण्याचा निचरा होण्यासाठी मोठ्या नाल्याचे व छोट्या पुलांचे बांधकाम इत्यादी कामे महानगरपालिकेने हाती घेऊन ती पूर्ण केली. दिनांक ३ डिसेंबर २००५ रोजी केंद्र शासनाने देशभरातील ६३ शहरांकरिता जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियान ही योजना लागू केली. या योजनेच्या निकषांनुसार १० लाखांपेक्षा जास्त लोकसंख्येची शहरे, राज्यांच्या राजधानीची शहरे व ऐतिहासिक वारसा असलेली शहरे यांचा समावेश करावयाचा होता. नांदेड येथे सन २००८ मध्ये होणाऱ्या गुरु-ता-गद्दी या ऐतिहासिक सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर एक विशेष बाब म्हणून नांदेड शहराचा जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियान अंतर्गत समावेश करण्यात आला व त्यासाठी रु. १००० कोटींचा निधी नांदेड शहर व परिसराचा विकास करण्यासाठी मंजूर करण्यात आला. तसेच गुरु-ता-गद्दी कार्यक्रम २००८ अंतर्गत केंद्र व राज्य शासनाकडून रु. ८१७ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला. सदरील दोन्ही योजनेच्या निधीमधून गुरुद्वारा परिसरातील नागरिकांचे पुनर्वसन, नांदेड शहरातील प्रमुख रस्त्याचे रुंदीकरण, उड्डाण पूल तसेच नांदेड शहराच्या सभोवतालच्या १५ किलोमीटर परिसराचा विकास व मुख्य इमारतींचे बांधकाम, प्रमुख रस्त्यांचे मज बुतीकरण, डांबरीकरण, सी.सी. रोड, ड्रेनेज व्यवस्था, पाणीपुरवठा लाईन व शहराला जोडणाऱ्याअनेक रस्त्यांची कामे या निधीमधून करण्यात येणार आहेत. नांदेड शहरातील सर्व प्रमुख रस्ते केंद्र शासनाच्या (जेएनएनयूआरएम) योजनेअंतर्गत चौपदरी करण्यात आले आहेत. तसेच काही रस्ते विकास महामंडळामार्फत चौपदरी करण्यात आले आहेत.

रस्ते व पूल या योजनेअंतर्गत नांदेड शहरातील एकूण ३८ प्रमुख रस्त्यांचा व दोन प्रमुख पुलांचा समावेश आहे. यासाठी रु.३३४.२१ कोटी च्या विकास आराखड्यास केंद्र शासनाने मान्यता दिली आहे. यामध्ये सुमारे ४९.२४ कि.मी. लांबीच्या रस्त्यांचा समावेश आहे. या सर्व रस्त्यांचे आवश्यकतेप्रमाणे रुंदीकरण आणि नूतनीकरण करण्याची कामे हाती घेण्यात आलेली आहेत. तसेच या योजनेमध्ये गोवर्धन घाट येथे गोदावरी नदीवर ५७० मीटर लांबीचा चार पदरी पूल व हिंगोली गेट येथे ४७५ मी.लांबीच्या चार पदरी उड्डाणपुलाचे बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे. एचएफ

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या एकूण १० शाळा असून त्यापैकी ४ मराठी माध्यमाच्या, ३ उर्दू माध्यमाच्या व ३ मराठी व उर्दू माध्यमाच्या संयुक्त शाळा आहेत. या शाळांतील एकूण विद्यार्थी संख्या २,४१० असून शिक्षकांची संख्या ७१ आहे. तसेच शहरामध्ये महानगरपालिकेचे डॉ.राम मनोहर लोहिया वाचनालय व तिच्या ७ शाखा शहराच्या विविध विभागात कार्यरत असून सदर वाचनालयांमध्ये विविध प्रकारचे साहित्य वाचकांना उपलब्ध करून देण्यात आले आहे.

**पाणीपुरवठा व मलनिःस्सारण योजना :** नांदेड शहरासाठी, शहरामधून वाहणारी गोदावरी नदी हा पाण्याचा मुख्य स्रोत आहे. गोदावरी नदीवर शहराच्या वरील बाजुला विष्णुपुरी बंधारा बांधलेलाअसून तेथून शहराच्या दक्षिण व उत्तर भागासाठी अशुद्ध पाणी उपसा करण्यात येतो. शहराच्या दक्षिण भागात सिडको जलशुद्धीकरण केंद्र (क्षमता-१२ द.ल.घ.मी./दिन) व असदवन जलशुद्धीकरण केंद्र (क्षमता-३५ द.ल.घ.मी./दिन) अशी दोन जलशुद्धीकरण केंद्रे आहेत. तर शहराच्या उत्तर भागासाठी न वे डंकिन (क्षमता-१७ द.ल.घ.मी./दिन), काबरानगर (जुने) (क्षमता-६० द.ल.घ.मी./दिन) व का बरानगर (नवे) (क्षमता-३५ द.ल.घ.मी./दिन) अशी तीन जलशुद्धीकरण केंद्रे आहेत. शुद्ध पाणी ि वतरणाकरिता शहराच्या वेगवेगळ्या भागात ९ उंच पाण्याच्या टाक्या असून नवीन १८ टाक्यांचे काम चालू आहे.

नांदेड शहरात नवीन पाणीपुरवठा लाईन्स टाकण्यासाठी व पाण्याच्या टाक्या बांधण्यासाठी केंद्र शासनाने रु. १४०.३१ कोटींचा निधी मंजूर केला आहे. यामध्ये एकूण ३३०.०० कि.मी. लांबीची पाणी-पुरवठा लाईन व १८ पाण्याच्या टाक्या करण्यात येणार आहेत. सदरील ३३०.०० कि.मी. पाणीपुरवठा लाईन पैकी ४०.०० कि.मी. गुरु-ता-गद्दीसाठी प्राधान्यक्रमावर असणाऱ्या रस्त्यांवर आहे. या नवीन योजनेमुळे ३५५ लक्ष लिटर्स पाणी साठविणे शक्य होईल व त्यामुळे वर्ष २०३८ पर्यंत १८.३८ लक्ष लोकसंख्येस पाणी पुरविणे शक्य होईल.

नांदेड शहरातील मलनिःस्सारण योजनेसाठी केंद्र शासनाने रु.१६९.३८ कोटी एवढा निधी मंजूर केला आहे. यामध्ये दक्षिण व उत्तर नांदेडचा समावेश आहे. तसेच शहरात २५८.०० कि.मी. लांबीची मलनिःस्सारण लाईन टाकण्याचे प्रस्तावित असून महानगरपालिका हद्दीतील जवळ-जवळ सर्व भागांचा समावेश करण्यात आलेला आहे.

Maharashtra State Gazetteers

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे इ.स.१९७०-७१ पासूनचे काही निवडक वर्षांचे उत्पन्न व खर्च खाली दर्शविला आहे.

| वर्ष | जमा (रु.) | खर्च (रु.) |
|---|---|---|
| १९७०-७१ | ५२,४०,८४४ | ३९,१९,७१७ |
| १९८०-८१ | २,६०,०५,४१८ | २,३६,९४,४०९ |
| १९९०-९१ | ७,५०,९३,१०० | ७,२६,५७,९९८ |
| २०००-०१ | ४१,१३,०५,६३५ | ३३,२९,६९,१४९ |
| २००२-०३ | ४७,९२,३३,९४६ | ३२,०७,६३,०३१ |

**किनवट नगरपरिषद (स्था. १९४६) :** सन १९६१ मध्ये नगरपरिषदेचे क्षेत्र १३ चौ. मैलव नि वडून आलेले सदस्य १० होते व त्यापैकी महिलांसाठी व अनुसूचित जातीसाठी प्रत्येकी १ जागा आरक्षित होती. त्यावेळी शहराची लोकसंख्या ७,२२१ होती. सध्या ही नगरपरिषद " " वर्गात मोडत असून सन २००१ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या २४,८७८ असून यापैकी ३०.२ टक्के लोक विविध व्यवसायात गुंतलेले आहेत.

**कंधार नगरपरिषद (स्था. १९४५) :** सन १९६१ मध्ये नगरपरिषदेचे क्षेत्र ५.६ चौ. मैल, सदस्यसंख्या १२ व त्यापैकी महिलांसाठी व अनुसूचित जातीसाठी प्रत्येकी १ जागा आरक्षित तर लोकसंख्या ६,६३० होती. सन २००१ च्या जनगणनेनुसार क्षेत्र ११.१ चौ.कि.मी. व लोकसंख्या २०,७७२आहे. यापैकी २४ टक्के लोक विविध व्यवसायात गुंतलेले असून सध्या ही नगरपरिषद " " वर्गात मोडते. नगरपरिषदेचे एकूण ५ प्रभाग असून १७ निर्वाचित नगरसेवक व २ स्वीकृत सदस्य आहेत. नांदेड जिल्ह्यात कंधार हे तालुक्याचे प्रसिद्ध ऐतिहासिक शहर आहे. शहराच्या दक्षिणेस मानार नदीचा प्रवाह बारमाही वाहात असून पुढे हाच प्रवाह बारुळच्या धरणापर्यंत पोहचतो. तसेच शहराच्या दक्षिणेस मध्यभागी प्रसिद्ध "जलतुंग तलाव " आहे, त्यामुळे शहरास मानार नदी व शहरालगतच्या त लावातून मुबलक पाणीपुरवठा करण्यात येतो. नगरपरिषदेमार्फत पिण्याचे पाणी फिल्टर करून तसेच ब्लिचिंग पावडर व तुरटीचा वापर करून शुद्ध केले जाते. नगरपरिषदेने नागरिकांच्या आरोग्यासाठी गल्लोगल्ली सार्वजनिक नाल्या, रस्ते, दिवाबत्ती इ. आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. तसेच व्यापारी वर्गासाठी २९ गाळ्यांनी युक्त असलेली दोन शॉपिंग संकुले बांधली आहेत. हुतात्मा स्मारक परिसरात सार्वजनिक बाग विकसित करण्यात आली असून सर्व सोयींनी युक्त अशी स्मशानभूमि उपलब्ध करून दिली आहे. नगरपरिषदेच्या हद्दीमध्ये अनेक मंदिरे, मठ व दर्गे आहेत. सन २००३-०४ मध्ये नगरपरिषदेस महाराष्ट्र शासनाचा संत गाडगेबाबा नागरी स्वच्छतेचा मराठवाडा पातळीवरील प्रथम पुरस्कार (रु. १० लाख) प्राप्त झाला.

नगरपरिषदेच्या क्षेत्रात एकूण १५ खाजगी दवाखाने असून ३० खाटांनी युक्त असलेले सरकारी रुग्णालय आहे. तसेच शहरातील शैक्षणिक सोयीसाठी १६ प्राथमिक शाळा, १० माध्यमिक शाळा, ३ उच्च माध्यमिक शाळा, १ विधी महाविद्यालय, १ चित्रकला कॉलेज व ४ संगणक प्रशिक्षण संस्था आहेत. याव्यतिरिक्त शहरामध्ये सेशन्स कोर्ट, तंत्रशाळा, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, कृषि मालासाठी बाजार समिती (मोंढा) आहे. तसेच नगरपरिषदेद्वारा दिनांक २६ जानेवारी १९८१ पासून सर्व सोयींनी उपयुक्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक वाचनालयाची सुरुवात करण्यात आली. सदर ग्रंथालयाची स्वतःची दुमजली इमारत असून तिला "अ" वर्ग शासन मान्यता आहे. याशिवाय स्वातंत्र्यापूर्वीचे विचार विकास मंदीर वाचनालय आजही उत्तम चालते. सन २००२-०३ मध्ये नगरपरिषदेचे प्रत्यक्ष उत्पन्न १९३.०५ लक्ष रुपये तर प्रत्यक्ष खर्च १७२.८८ लक्ष रुपये असून सन २००९-१० मध्ये प्रत्यक्ष उत्पन्न ४९२.२९ लक्ष रुपये तर प्रत्यक्ष खर्च ४७३.३२ लक्ष रुपये होता.

**कुंडलवाडी नगरपरिषद (स्था. १९४७) :** कुंडलवाडी, ता.बिलोली येथील नगरपरिषदेची स्थापना निजाम राजवटीत झाली असून सन १९४७ ते १९५२ या कालावधीत नगर पालिकेमध्ये निवडून आलेल्या प्रतिनिधी ऐवजी शासन नियुक्त अधिकारी कार्यरत होते. सन १९६१ मध्ये नगरपरिषदेचे क्षेत्र ८.५ चौ. मैल व निवडून आलेल्या सदस्यांची संख्या १५ असून त्यापैकी महिलांसाठी दोन तर अनुसूचित जातीसाठी एक जागा राखीव होती. त्यावेळी शहराची लोकसंख्या ८,७६१ होती. सन २००१ च्या जनगणनेनुसार नगरपरिषदेची लोकसंख्या १४,३३४ असून त्यापैकी ५,८३३ किंवा ४०.७ टक्के लोक वि विविध व्यवसायामध्ये गुंतलेले आहेत.

**देगलूर नगरपरिषद (स्था. १९३६) :** हैद्राबाद राज्यामध्ये १९०१ मध्ये देगलूर हे ६,९१७लोकसंख्या असलेले तालुका मुख्यालयाचे शहर होते, त्यावेळी तालुक्यात एकूण १५९ गावे होतीव त्यापैकी ५६ गा वांमध्ये जाहागीर होती. १९०१ मधील जमीन महसूल[५०] २ लाख रुपये होता. सन १९६१ मध्ये नगरपरिषदेचे क्षेत्र ७.३ चौ.मैल, सदस्यसंख्या १५ व त्यापैकी महिलांसाठी २ तर अनुसूचित जातीसाठी १ जागा आरक्षित होती. त्यावेळी शहराची लोकसंख्या १४,६३६ इतकी होती. सन २००१ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या ४८,०२८ असून त्यापैकी १३,८२० म्हणजेच २८.८ टक्के लोक विविधव्य वसायात गुंतलेले आहेत.

**धर्माबाद नगरपरिषद (स्था.१९४८) :** सन १९६१ मध्ये नगरपरिषदेचे क्षेत्र १४.४ चौ. मैल, सदस्यसंख्या १५ व त्यापैकी महिलांसाठी व अनुसूचित जातीसाठी प्रत्येकी १ जागा आरक्षित असून शहराची लोकसंख्या ९,९१७ होती. सन २००१ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या २९,९५१ असून. त्यापैकी १०,६९९ म्हणजेच ३५.७ टक्के लोक विविध व्यवसायात गुंतलेले आहेत.

हे शहर मनमाड-सिकंदराबाद या ब्रॉडगेज लोहमार्गावर वसलेले असून येथे प्रमुख बाजारपेठआहे. एके काळी या ठिकाणी पोहे कारखाने व मिरचीचा फार मोठा व्यापार होत असे. आता फक्त मिरचीसाठी प्रसिद्ध आहे. या ठिकाणी एक महाविद्यालय, आय.टी.आय, चार माध्यमिक व सहा प्र ाथमिक शाळा आहेत. नगरपरिषद स्थापनेपूर्वी या नगरपालिकेचे कार्य हैद्राबाद लोकल सेल्फ गव्हर्नमेंट अधिनियमाच्या तरतुदीनुसार चालत असे. महाराष्ट्र राज्य नगरपरिषद व नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ च्या अंमलबजावणीनंतर या नगरपालिकेचे कार्य उक्त अधिनियमाच्या तरतुदीनुसार कार्यान्वित करण्यात आले. प्रस्तुत कायदा अमलात येण्यापूर्वी या नगरपरिषदेस पूरपा लिका (पुर-पूरउशहर) असे म्हटले जात असे. सध्या नगरपरिषदेचे १८ प्रभाग व तितकेच सदस्यआहेत. नगरपरिषद अधिनियमाच्या तरतुदीनुसार नागरिकांना स्वच्छता, दिवाबत्ती, पाणीपुरवठा इ. सेवा उपलब्ध करून दिल्या जातात. या शहरात एकात्मिक शहर विकास योजना लागू करण्यास केंद्र शासनाने मान्यता दिली असून प्रस्तुत योजनेअंतर्गत सुमारे १४ एकर जागेवर क्रांतितीर्थ प्रकल्प उभारण्याचा नगरपरिषदेचा मानस आहे. शहरात २२ कि.मी. लांबीच्या नाल्या व ३७ कि.मी. लांबीच्या रस्त्यांचा समावेश आहे. सन १९७६ साली शहराचा विकास आराखडा मंजूर झाला असून तो २००७ मध्ये सुधारित करण्यात आला. त्यानुसार दलित वस्ती सुधार योजना, राष्ट्रीय समविकास योजना, झोपडपट्टी विकास योजना, गरीबांसाठी मूलभूत सेवा योजना, राष्ट्रीय एकात्मीक विकास योजना, सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना इत्यादि विकास योजनांची नगरपरिषद प्रत्यक्ष अंमलबजावणी करीत असून संपूर्ण शहराचा विकास करणे हे नगरपरिषदेचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

Maharashtra State Gazetteers

धर्माबाद नगरपरिषदेचे १९७०-७१ पासून काही निवडक वर्षांचे उत्पन्न व खर्च खाली दर्शविला आहे :—

| वर्ष | उत्पन्न (लाख रु.) | खर्च (लाख रु.) |
|---|---|---|
| १९७०-७१ | ४.८० | ४.५० |
| १९८०-८१ | २१.१५ | १७.२४ |
| १९९०-९१ | ४८.६३ | ४३.६२ |
| २०००-०१ | १९१.१८ | २३१.५७ |
| २००२-०३ | २२१.४२ | १६४.१७ |

५०. **इम्पीरिअल गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. २३०-३१.

**पेठ उमरी नगरपरिषद (स्था. १९५१) :** सन १९६१ मध्ये नगरपरिषदेचे क्षेत्र ३.२ चौ.मैल, सदस्यसंख्या १० व त्यापैकी १ महिलांसाठी तर २ अनुसूचित जातीसाठी राखीव जागा होत्या. त्यावेळी शहराची लोकसंख्या ४,४४३ होती. सन २००१ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या ११,१५१ असून त्यापैकी २,४३४ म्हणजेच ३१.८ टक्के लोक विविध व्यवसायात गुंतलेले आहेत.

**बिलोली नगरपरिषद (स्था. १९५४) :** सन १९०९ मध्ये हैद्राबादच्या निजाम राजवटीत बिलोली हे तालुका मुख्यालय असून या शहराची लोकसंख्या २,९२६ होती. १९०१ मध्ये या तालुक्याचा जमीन महसूल १.६ लाख रुपये होता. १९६१ मध्ये नगरपरिषदेचे क्षेत्र ७.६ चौ. मैल व सदस्य संख्या १० होती. त्यापैकी महिला व अनुसूचित जातीसाठी प्रत्येकी १ जागा राखीव होती. सन २००१ च्या जनगणनेनुसार क्षेत्र १९.६ चौ.कि.मी. व लोकसंख्या १३,४३३ आहे. त्यापैकी ४,५४३ म्हणजेच ३३.८ टक्के लोक विविध व्यवसायामध्ये गुंतलेले आहेत.

निजामाच्या काळात स्थापन झालेल्या या नगरपरिषदेचे कामकाज लोकलफंडाद्वारे चालतअसे, मात्र १९६५ ला महाराष्ट्र म्युनिसिपालिटीज ॲक्ट अस्तित्वात आल्याने लोकलफंडाचे रूपांतर नगर परिषदेमध्ये झाले. सध्या बिलोली नगरपरिषद " " वर्गीकृत लहान नगरपरिषद आहे. नगरपालिका स्थापनेच्या वेळी सदस्य संख्या दहा होती. तद्नंतर त्यामध्ये १५, २५ व १७ असे शासनाच्या निकषानुसार बदल झाले. मात्र सध्या नगरपरिषदेचे निवडून आलेले १७ सदस्य असून २ स्वीकृत सदस्य आहेत. नगरपरिषदेत वर्ग-३ चे २०, वर्ग-४ चे २० तर सफाई कामगार २० आहेत. नगरपरिषदेने शासनाकडून प्राप्त झालेल्या अनुदानातून दलित वस्ती सुधार योजना, रस्ते दुरुस्ती व बांधकाम योजना, शौचकूप बांधकाम योजना, पिण्याच्या पाण्याची योजना इत्यादीसारख्या योजना राबविल्या आहेत. बिलोली नगरपरिषद हद्दीमध्ये निजामाच्या काळात संपूर्ण दगडाची बांधलेली किमान ५०० वर्षांपूर्वीची "जामा मस्जिद" ही इमारत प्रसिद्ध आहे. या इमारतीस दगडाचे घुंगरू असून ते वाऱ्याने वाजतात. नगरपरिषदेचे सन २०००-२००१ चे उत्पन्न रु.७२,७३,४८३ व खर्च रु.७९,७५,२१९ तर सन २००६- ०७ चे उत्पन्न रु.१,९५,५२,५९५ व खर्च रु.१,२८,५२,०२२ इतका होता.

**मुखेड नगरपरिषद (स्था. १९३८) :** निजाम राजवटीत मुखेड हे कंधार तालुक्याचे मुख्यालय होते. या शहराची १९०१ मधील लोकसंख्या ६,१४८ होती. त्यावेळी कापूस उद्योगाचे हे केंद्रस्थानअसून या ठिकाणी जिनिंग फॅक्टरी होती. तसेच पितळ आणि तांब्याची भांडी येथे मोठ्या प्रमाणात तयार केली जात. सन १९०१ मध्ये तहसील कार्यालयाव्यतिरिक्त या शहरात मुन्सिफाचे न्यायालय,पोलीस निरीक्षक कार्यालय, दवाखाना, पोस्ट ऑफिस, शाळा व एक प्राचीन शीव मंदीर आहे.[५१]

सन १९६१ मध्ये मुखेड नगरपरिषदेचे क्षेत्र १२.८ चौ. मैल व निवडून आलेले १२ सदस्य होते. त्यापैकी महिला व अनुसूचित जातीसाठी प्रत्येकी १ जागा राखीव होती, तर शहराची लोकसंख्या ६,६१० होती. २००१ च्या जनगणनेनुसार नगरपरिषदेचे क्षेत्र ३३.१ चौ.कि.मी. व लोकसंख्या २५,९३३ होती. त्यापैकी ७,५३४ म्हणजेच २९.१ टक्के लोक विविध व्यवसायामध्ये गुंतलेले होते.

---

५१. **इम्पीरिअल गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. २३२.

**मुदखेड नगरपरिषद (स्था. १९४५) :** सन १९६१ मध्ये नगरपरिषदेचे क्षेत्र ५.८ चौ.मैलव निवडून आलेल्या सदस्यांची संख्या ११ असून त्यापैकी महिलांसाठी एक व अनुसूचित जातीसाठी दोन जागा आरक्षित होत्या. त्यावेळी शहराची लोकसंख्या ६,६०१ होती. सन २००१ च्या जनगणनेनुसार नगरपरिषदेचे क्षेत्र १८.२ चौ.कि.मी.असून लोकसंख्या १८,७०० आहे. त्यापैकी ६०७७ किंवा ३२.५ टक्के लोक विविध व्यवसायामध्ये गुंतलेले आहेत.

नगर परिषद अस्तित्वात येण्यापूर्वी निजाम राजवटीमध्ये मुदखेड पूरपालिका म्हणून ओळखली जात होती. मुदखेड हे मराठवाड्यातील विदर्भ व आंध्र प्रदेशास जोडणारे महत्त्वाचे रेल्वे जंक्शन आहे. केंद्रीय राखीव पोलीस दलाचे भारतातील तिसरे प्रशिक्षण केंद्र या शहरात आहे. तसेच मुदखेड शहरास औद्योगिक प्रशिक्षण केंद्रसुद्धा लाभलेले आहे. नगरपरिषदेचे कामकाज स्थायी समिती, नियोजन व ि वकास समिती, महिला व बालकल्याण समिती, आरोग्य व शिक्षण समिती, सार्वजनिक बांधकाम समिती व पाणीपुरवठा समिती या विविध समित्यांमार्फत चालत असून नगरपरिषदेचे वर्ग-३ चे १० तर वर्ग-४ चे ४४ कर्मचारी आहेत. नगरपरिषदेने स्थापनेनंतर दलित वस्ती सुधार योजना, रस्ते विकास, सांस्कृतिक सभागृह बांधकाम करून गरजू लोकांना त्यांच्या कार्यासाठी ते उपलब्ध करून देणे, व्यापारी गाळ्यांचे बांधकाम करणे, शाळा बांधकाम करणे यासारख्या शासनाच्या विविध योजना राबवून शहराच्या विकासात मोलाचे योगदान केले आहे.

सन १९९४-९५ पासूनच्या काही निवडक वर्षांचे नगरपरिषदेचे उत्पन्न व खर्च खाली दर्शविला आहे :—

| वर्ष | उत्पन्न (रु.लाख) | खर्च (रु.लाख) |
|---|---|---|
| १९९४-९५ | ३५.५६ | २६.१९ |
| १९९९-२००० | ६०.०५ | ६१.१७ |
| २००४-०५ | १२७.४५ | १५६.७३ |
| २००५-०६ | २६०.३९ | ८८.२० |
| २००६-०७ | २४४.२६ | २९१.१६ |

**लोहा नगरपरिषद (स्था. १९८७) :** बेनाळ देवणेवाडी तसेच लोहा ग्रामपंचायत एकत्र करून दि. १८ नोव्हेंबर १९८७ रोजी लोहा नगरपरिषद अस्तित्वात आली, व नगर परिषदेवर शासननियुक्त १६ सदस्यीय प्रशासकीय मंडळाची नियुक्ती करण्यात आली. नगरपरिषद स्थापनेच्या वेळी ग्रामपंचायतीमधी ल कर्मचारी वर्ग नगरपरिषदेमध्ये वर्ग करण्यात आला. सुरुवातीस वर्ग ३ व वर्ग ४ च्या कर्मचाऱ्यांना रोजंदारीवर ठेवून प्रशासकीय, साफसफाई तसेच पाणीपुरवठा इ. कामे पार पाडण्यातआली. पुढे हेच कर्मचारी कायम करण्यात आले. सध्या नगरपरिषदेचे वर्ग-३ चे ४२, वर्ग ४ चे ५५ व रोजंदारीवरील ११ असे एकूण १०८ कर्मचारी कार्यरत आहेत.

Maharashtra State Gazetteers

नगरपरिषदेची १९९३ मध्ये पहिली सार्वत्रिक निवडणूक झाली व १७ सदस्य निवडून आले. नंतर इ.स.१९९८ ला दुसरी व नोव्हेंबर २००३ मध्ये नगरपरिषदेची तिसरी निवडणूक, प्रभाग रचनेनुसार झा ली व १७ सदस्य निवडून आले. सन २००७ मध्ये नगरपरिषदेचे निवडून आलेले सदस्य १७ तर स्वि वकृत सदस्य २ होते.

लोहा नगरपरिषदेमध्ये बांधकाम, पाणीपुरवठा, आरोग्य व स्वच्छता, शिक्षण आणि महिला वबा लकल्याण अशा एकूण पाच समित्यांमार्फत विकासाची कामे राबविली जातात. नगरपरिषदेने दलित वस्ती सुधार योजना राबवून शहरास पाणी, रस्ते, नाले, दिवाबत्ती यासारख्या मूलभूत नागरी सुविधा पुरविणाऱ्या योजना राबविल्या आहेत. नगरपरिषदेद्वारे १० वा, ११ वा आणि १२ वा वित्तआयोग तसेच यु डी-६, वैशिष्ट्यपुर्ण योजना, वैधानिक विकास महामंडळ, मराठवाडा विकास निधी तसेच नगरपरिषद अर्थसंकल्पातील तरतुदीनुसार विकास कामे करण्यात येतात.

सन १९९०-९१ पासून काही निवडक वर्षांचे नगरपरिषदेचे उत्पन्न व खर्च खाली दर्शविला आहे :—

| वर्ष | उत्पन्न (रु.) | खर्च (रु.) |
|---|---|---|
| १९९०-९१ | १३,३४,३८० | २३,१५,४४८ |
| २०००-०१ | १,१७,१२,८३७ | ८७,०४,६६६ |
| २००५-०६ | १,७३,६७,६०४ | १,६५,६३,३२३ |
| २००९-१० | २,१०,७९,९७० | २,९५,७८,२०० |

## गॅझेटीअर

[भाग २]

दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई

# नांदेड जिल्हा
# गॅझेटिअर
## (भाग-२)

Maharashtra State Gazetteers

महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर

महाराष्ट्र शासन

# नांदेड जिल्हा

(भाग - १)

संपादक

**अरुणचंद्र शं. पाठक**

एम. ए., एम. फिल., पीएच. डी.

**दर्शनिका विभाग**

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग

महाराष्ट्र शासन, मुंबई.

२०११

# महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर
# नांदेड जिल्हा

प्रथम आवृत्ती ( इंग्रजी ) : १९७१
प्रथम आवृत्ती ( मराठी ) : २०११
जिल्हा दर्शनिका खंड-नऊ

**प्रकाशक :**
श्री. आनंद कुलकर्णी
अध्यक्ष, संपादक मंडळ, दर्शनिका
प्रधान सचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,
महाराष्ट्र शासन, मुंबई.

( सर्व हक्क प्रकाशकांचे स्वाधीन. )

**मुद्रक :**
व्यवस्थापक
शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय
मुंबई.

**कार्यालय :**
दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन,
२७, बरजोरजी भरुचा मार्ग, फोर्ट,
मुंबई ४०० ०२३.

**संकेत स्थळ :** www.maharashtra.gov.in
**ई-मेल :** stategazetteers_maharashtra@yahoo.co.in

**ग्रंथ मिळण्याची ठिकाणे :**
(१) शासकीय ग्रंथ भांडार, नेताजी सुभाष रोड,
मुंबई ४०० ००४.
(२) शासकीय मुद्रणालय व ग्रंथ भांडार, सिव्हिल लाईन्स,
नागपूर ४४० ००१,
(३) शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथ भांडार,
पुणे ४११ ००१.
(४) शासकीय मुद्रणालय व ग्रंथ भांडार,
औरंगाबाद ४३१ ००१.
(५) शासकीय मुद्रणालय व लेखन सामग्री भांडार,
ताराबाई पार्क, कोल्हापूर ४१६ ००३.

**किंमत रु.**

**टीप : ( सर्व पूर्वप्रकाशित ग्रंथांच्या ई-बुक आवृत्ती कार्यालयात उपलब्ध. )**

---

**या गॅझेटिअरमधील नोंदी तज्ज्ञ सहयोगकर्ते लेखक तसेच कार्यालयातील संदर्भ साहित्य, शासकीय, निमशासकीय कार्यालयांनी पुरविलेल्या माहितीआधारे केल्या असून त्या संपादक मंडळ सदस्यांनी तपासल्या आहेत.**

## आभार

नांदेड जिल्हा दर्शनिकेची निर्मिती होत असताना कार्यरत असणाऱ्या संपादक मंडळाचा मी आभारी आहे. याशिवाय या जिल्हा दर्शनिकेशी संबंधित असलेल्या या पूर्वीच्या संपादक मंडळातील ज्येष्ठ सदस्य डॉ. म. के. ढवळीकर, कै. डॉ. भा. ल. भोळे, डॉ. नागोराव कुंभार, डॉ. श्रीनिवास ओमनवार, डॉ. जयकुमार मगर, डॉ. शेषराव मोरे यांच्या सहकार्यासाठी मी ऋणी आहे.

डॉ. गो. बं. देगलूरकर

डॉ. रा. श्री. मोरवंचीकर

श्री. स. दि. महाजन

डॉ. के. बी. पाटील

डॉ. एस. जी. देवगांवकर

डॉ. भागवतराव डेंगळे

डॉ. डी. व्ही. जहागिरदार

डॉ. श्रीनंद बापट

डॉ. सुनिल पुरी

डॉ. श्रद्धा कुंभोजकर

डॉ. प्रभाकर देव (जिल्हा स्वीकृत सदस्य, नांदेड)

श्री. मदन धनकर (जिल्हा स्वीकृत सदस्य, चंद्रपूर)

Maharashtra State Gazetteers

# अनुक्रमणिका


**पृष्ठ**

प्रस्तावना . . . . . (अकरा)

ऋणनिर्देश . . . . . (एकवीस)

**प्रकरण १० : सामाजिक सेवा** . . . . . १

शिक्षण १, साक्षरता १३, पूर्व प्राथमिक व प्राथमिक शिक्षण २०, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण २६, उच्च शिक्षण ३०, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ ३६, वैद्यकीय शिक्षण ४०, तंत्रशिक्षण ४१, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण ४३, आरोग्य ४५, कुटुंब कल्याण ६१, माता व बालसंगोपन कार्यक्रम ६३, राज्य शासनाच्या योजना ६६, बालविकास ७०, समाजकल्याण ७४, मागासवर्गीयांचे कल्याण ७५, अपंग कल्याण ८१, धर्मादाय व सेवाभावी संस्था ८३, ग्रंथालये ८८, तालुका ग्रंथालये ९०, तक्ते ९६.

**प्रकरण ११ : संस्कृती** १०५

ऐतिहासिक वारसा १०५, मध्ययुगीन विद्वत परंपरा ११९, वारकरी संप्रदाय १२३, निजामप्रांतीय मराठी साहित्य चळवळ १२५, आधुनिक साहित्य १३०, प्राच्यविद्या १४६, संस्कृत अध्ययनाचा वारसा १४८, कीर्तन परंपरा १४९, रंगभूमी १५३, वृत्तपत्रांची वाटचाल १६०, क्रीडा १६३, जिल्ह्यातील नेतृत्व १७२, जिल्ह्यातील वृत्तपत्रांची यादी १८६.

**प्रकरण १२ : प्रेक्षणीय स्थळे** १८९

अर्धापूर १८९, उनकेश्वर १९२, कंधार १९५, करडखेड २१७, किनवट २१९, कुंडलवाडी २२०, खानापूर २२१, गणपूर व कामठा २२२, तडखेल २२३, तामसा २२५, दाभड २२६, देगलूर २२६, धर्माबाद २२८, नांदेड २३०, पाळा २५२, पेठ उमरी २५३, बारूळ २५४, बिलोली २५५, भोकर २५६, मरळक २५७, माहूर २५८, माळेगाव २७२, मुखेड २७५, मुदखेड २८०, येवती २८२, येरगी २८४, राहेर २८७, लहान २९०, लोहा २९१, विष्णूपुरी २९२, शंखतीर्थ २९३, शिऊर २९४, शिरढोण २९६, शेळगाव २९७, सगरोळी २९८, हदगाव ३०१, हिमायतनगर ३०२, हिरड जुन्नी ३०४, होट्टल ३०७.

**परिशिष्ट १** मध्ययुगीन मठ ३१२

**परिशिष्ट २** प्राचीन शिलालेखांची वर्णसूची ३२७

**परिशिष्ट ३** मध्ययुगीन शिलालेखांची सूची ३४७

**ग्रामनिर्देशिका** ३५१

**संदर्भसूची** ७०७

**सूची** ७१३

**छायाचित्रे**


Maharashtra State Gazetteers

## नांदेड जिल्हा गॅझेटिअर

### भाग-२ नकाशे

(१) नांदेड जिल्हा - भारतातील स्थान

(२) नांदेड जिल्हा - प्राकृतिक

(३) कंधार किल्ल्याची उपग्रहीय प्रतिमा

### आरेखने

(१) शिऊर लेण्यांचा तलविन्यास आणि उठावचित्र

(२) होट्टल येथील सोमेश्वर मंदिर तलविन्यास

(३) योग नरसिंह मंदिर तलविन्यास, राहेर

(४) मुखेड येथील शिवमंदिराचा तलविन्यास

(५) सिद्धेश्वर मंदिर तलविन्यास, होट्टल

(६) नवरंगपुरा येथील रामकुंडाचा तलविन्यास व उभा छेद

(७) बिलोली मस्जीदचा तलविन्यास व दर्शनी भागाचे उठावचित्र

(८) शिवलिंग बादशाह मठ, बेटमोगरा

(९) माहूर येथील इदगाहचे उठावचित्र

(१०) नांदेड किल्ला तलविन्यास

(११) माहूर किल्ल्याचा तलविन्यास

(१२) कंधार किल्ला तलविन्यास

(१३) क्षेत्रपाल मंदिर उत्खनीत आराखडा मानसपुरी, कंधार

### भाग - २

### छायाचित्रे

**फलक १ -** (अ) माहूर संग्रहालय (ब) माहूर संग्रहालयातील एक शिल्प (क) विठ्ठल रुक्मिणी मूर्ती.

**फलक २ -** (अ) श्री माता रत्नेश्वर मंदिर परिसर व बारव (ब) बेटमोगरा येथील शिवलिंग बादशाह (क) माळेगाव मंदिराचे प्रवेशद्वार.

**फलक ३ -** (अ) माळेगाव यात्रा (ब) बारव, मुखेड (क) काळेश्वर मंदिर परिसरातील समाधी, नांदेड.

**फलक ४ -** (अ) गोंधळ, माळेगाव यात्रा (ब) शिऊर लेणी (क) कंधार येथील दर्गा.

Maharashtra State Gazetteers

(दहा)

**फलक ५ -** (अ) कंधार किल्ल्यावरील तोफ (ब) कंधार किल्ला (क) माहूर किल्ला

**फलक ६ -** (अ) उनकेश्वर येथील कुंड (ब) माहूर येथील रेणुकादेवी मंदिर (क) उनकेश्वर येथील प्रवेशद्वार.

**फलक ७ -** (अ) वैशिष्ट्यपूर्ण मिनार, बिलोली मशीद (ब) देगलूर येथील दर्गा (क) संतकवी, श्री. दासगणू महाराज (ड) केशवराज मूर्ती, कंधार.

**फलक ८ -** (अ) होट्टल येथील मंदिर (ब) होट्टल मंदिरावरील शिल्प (क) काळेश्वर मंदिर, विष्णूपुरी.

**फलक ९ -** (अ) सचखंड गुरुद्वारा, नांदेड (ब) नगिना घाट आणि गुरुद्वारा नांदेड

**ग्रामनिर्देशिका :** ग्रामनिर्देशिकेतील तालुकाशः नकाशे (१ + १६ = एकूण १७)

Maharashtra State Gazetteers

## प्रस्तावना

नांदेड जिल्हा गॅझेटिअर प्रकाशित करीत असताना मनस्वी आनंद होत आहे. या विभागाने केलेल्या सामुहिक परिश्रमाची ही फलश्रुति आहे. हा ग्रंथ ऐतिहासिक संदर्भसाहित्यात मोलाची भर घालील असा विश्वास वाटतो. तसेच जिल्ह्याच्या विकासविषयक भावी वाटचालींसाठी पायाभूत संदर्भ पुरविणारा ग्रंथ म्हणून उपयुक्त ठरेल. वास्तविक पाहाता गॅझेटिअरनिर्मिती ही एक स्वतंत्र ज्ञानशाखा बनली आहे. गॅझेटिअरच्या संकल्पनेत होणारे परिवर्तन स्वाभाविक आहे. गॅझेटिअर म्हणजे प्राकृतिक भूस्वरूप, नद्या, वनसंपदा, स्थळांची भौगोलिक माहिती, लोकांच्या चालीरिती, इतिहास, अर्थव्यवस्था, महसूल, प्रशासन आणि पुरावशेषाचा तपशिल पुरविणारा कोश ही मूळ संकल्पना प्रमाण मानून गॅझेटिअरची मर्यादा संकुचित करून चालत नाही. नवनवीन संशोधनातून विविध विषयांचे, पैलूंचे ऐतिहासिक दृष्टीकोनातून विवेचन करणे आवश्यक असते. नवीन साधनसामग्रीच्या आधारे राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक इतिहासावर नवा प्रकाश टाकणे अपरिहार्य ठरते. विद्यमान ग्रंथ या दृष्टीकोनातूनच लिहिण्याचा प्रयत्न केलेला असून मराठी जिल्हा गॅझेटिअर मालिकेतील हा नववा खंड आहे. गॅझेटिअर किंवा विश्वकोश हे अत्यंत उपयुक्त ठरणारे असे ग्रंथ असून त्याची विशिष्ट कालावधीनंतर पुनरावृत्ती होणे सर्वार्थाने उपयुक्त ठरते व त्या दृष्टीकोनातून नांदेड जिल्हा गॅझेटिअरची ही मराठी आवृत्ती उपलब्ध करून देण्यात येत आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात बॉम्बे प्रेसिडेन्सीमधील जिल्ह्यांसाठी गॅझेटिअर ग्रंथ निर्मिती झाली. पण निझाम डोमिनिअन्समधील मराठवाड्याच्या प्रत्येक जिल्ह्यासाठी असे स्वतंत्र गॅझेटिअर निर्माण करण्यात आले नाही. केवळ औरंगाबाद जिल्हा गॅझेटिअर सन १८८४ मध्ये प्रकाशित झाले ते पुनर्मुद्रित स्वरूपात या विभागाने उपलब्ध करून दिले आहे. इम्पिरिअल गॅझेटिअर ऑफ इंडिया, प्रोव्हिंशिअल सिरिज, हैद्राबाद स्टेट या मालिकेत अत्यंत त्रोटक स्वरूपात मराठवाड्यातील तत्कालीन जिल्ह्यांविषयीच्या नोंदी करण्यात आल्या. स्वातंत्र्योत्तर काळात भारत सरकारने निश्चित केलेल्या आकृतिबंधाप्रमाणे नांदेड जिल्ह्यासाठी सन १९७१ मध्ये गॅझेटिअरची इंग्रजी आवृत्ती प्रकाशित करण्यात आली. याचे संपादन डॉ. भ. ग. कुंटे यांनी केले होते. तथापि, या आकृतिबंधाच्या स्वतःच्या काही मर्यादा होत्या. नांदेड जिल्हा दर्शनिका या मराठी आवृत्तीचे संपादन करताना विविध क्षेत्रात झालेल्या मूलगामी स्वरूपाच्या संशोधनाची व विकासविषयक वाटचालींची नोंद घेण्याचा प्रयत्न केला आहे.

नांदेड जिल्ह्याला स्वतःचे असे व्यक्तिमत्व लाभले आहे. मूळात महाराष्ट्र व आंध्राला संपन्न करणाऱ्या गोदावरीच्या नाभि स्थानावर वसलेला हा जिल्हा गोदावरीच्याच प्रवाहामुळे उत्तर व दक्षिण अशा दोन भागांत विभागला आहे. भौगोलिकदृष्ट्या मराठवाड्याच्या पूर्वेस असून त्याच्या पूर्व सरहद्दीवर आंध्रप्रदेशातील निजामाबाद व अदिलाबाद जिल्हे येतात. जिल्ह्याच्या दक्षिण बाजूला कर्नाटकातील बिदर जिल्हा आहे तर सर्वसाधारणपणे पश्चिमेला परभणी, हिंगोली व लातूर हे मराठवाड्यातील जिल्हे येतात. उत्तरेला विदर्भातील यवतमाळ जिल्ह्याची सरहद्द आहे. एकूण नांदेड जिल्ह्याचे भौगोलिक स्थान हे महाराष्ट्रातील मराठवाडा, विदर्भ आणि आंध्र, कर्नाटक यांच्या सीमारेषेवर असल्याचे जाणवते. परिणामतः सांस्कृतिक व भाषिक वाटचाल पाहता इथल्या राहणीमानावर सभोवतालच्या प्रदेशाचा परिणाम जाणवतो.

Maharashtra State Gazetteers

मूळात गोदावरीच्या काठावर वसले म्हणून नांदिकट - नांदिकड आणि नांदिकट या संस्कृत शब्दापासून नांदेडची उत्पत्ती होते. उत्तर भारतातील नंद घराण्यानंतर मौर्य राजवंशाच्या सत्तेचा संबंध या भागाशी आला. तसेच शुंगांनीही विदर्भालगत असलेल्या या प्रदेशावर सत्ता प्रस्थापित केली असावी. गोदावरीच्या दोन्ही तीरावर वसलेले म्हणून नांदिकट अशी स्थलउत्पत्ती असलेल्या जिल्ह्याला संपन्न असा पौराणिक वारसा लाभला आहे. लोकस्मृतीनुसार नवनंदडेरा यापासून नांदेड झाले. त्यानुसार नांदेड हा नंदवंशाच्या साम्राज्याचा एक भाग असावा. बौध्द साहित्याप्रमाणे बुध्दाच्या काळात असलेला बावरी हा साधक या भागातील होता. रामायण आणि महाभारताचा देखील जिल्ह्यातील नांदेड व कंधार या स्थानांशी लोकस्मृतीतून संबंध दर्शविला जातो. उनकदेव येथील शिलालेखात प्रभू रामचंद्राने येथील गरम पाण्याचा झरा त्रेता युगात निर्माण केल्याची नोंद आहे. युगानुयुगाचा संबंध या उष्णोदकाच्या झऱ्यांशी व माहूर येथील दत्तात्रय व रेणुका या स्थानांशी अवगुंठीत आहे. प्रागैतिहासिक काळात देखिल या जिल्ह्याचे अस्तित्व जाणवते. मध्याश्मयुगीन कालखंडामध्ये मानवाचा वावर या परिसरात होता. नांदेड जिल्ह्यातील गोदावरी, मांजरा, मण्याड या नद्यांच्या किनारी मध्यपुराश्मयुगीन मानवाच्या वसाहती होत्या. किवळा,शंखतीर्थ राहेगाव, वारगा इत्यादी ठिकाणी मध्यपुराश्मयुगीन तसेच भोकर या गावी टेकडीच्या पायथ्याशी चर्ट जातीच्या दगडात बनविलेली उत्तरपुराश्मयुगीन हत्यारे सापडली. ही हत्यारे २० ते ३० हजार वर्षांपूर्वीची आहेत. अशी हत्यारनिर्मिती केंद्रेच या ठिकाणी असल्याचे पुरातत्वज्ञ मानतात.

सात-आठ लक्ष वर्षांपूर्वी भूगर्भजन्य हालचालींमुळे मूळ भीमेची उपनदी असलेली मांजरा नदी गोदावरीकडे आकर्षित झाली असे भूरिपिकी शास्त्राच्या आधारे तज्ज्ञांनी नोंदवले आहे. शंखतीर्थाच्या परिसरात आढळणारे अश्मीभूत स्वरूपातील उजव्या सोंडीचे शंख हे अशाच भूगर्भीय हालचालींची साक्ष देतात. असे असले तरी ताम्रपाषाणकालीन वसाहतींचे पुरावे मात्र उपलब्ध होत नाही. सन १९७१ चे गॅझेटिअर प्रकाशित करताना प्रागैतिहासिक कालखंडावरील कुठलेही संशोधन प्रकाशित नसल्यामुळे याबाबतची नोंद त्यात करण्यात आली नव्हती. ती यावेळी जाणीवपूर्वक घेतली आहे.

नांदेड जिल्ह्याने कै.शंकरराव चव्हाणांच्या रूपाने या राज्याला कार्यक्षम मुख्यमंत्री तसेच कर्तबगार केंद्रीय मंत्री; विशेषतः गृहमंत्री लाभले. तर अशोकराव चव्हाण यांच्या रूपाने निर्मितीक्षम कार्याची दृष्टी असलेले मुख्यमंत्री लाभले. हे वर्तमानातले सत्य इतिहासकाळात सुध्दा वेगवेगळ्या राजवंशाच्या रूपात अधोरेखित झाले आहे. नांदेड जिल्ह्याचा अखिल भारतीय संपर्क सांचीच्या स्तूपावरील दानलेखातील नोंदीवरून स्पष्ट होतो. लुडर्स यादीत नांदेड येथील एकूण २३ दात्यांची नोंद सांची स्तूपावर उपलब्ध आहे. यावरून येथे बौध्दधर्म केंद्र असावे. नांदेड जिल्ह्याची नोंद अश्मक व पुढे कुंतल या जनपदाचा एक भाग म्हणून मिळते. उत्तर भारतातील नंद घराण्यानंतर मौर्य राजवंशाच्या सत्तेचा संबंध या भागाशी आला. ऐतिहासिक दृष्ट्या इ.स.चौथ्या शतकातील नांदेड जिल्ह्यातील कंधारची नोंद उपलब्ध आहे. पुरातत्वीय अवशेषांचा विचार करता नांदेड परिसरात सातवाहनकालीन पुरातत्वीय अवशेष मिळाले. विशेषतः असरजंग या ठिकाणी सातवाहन राजवंशाचे नाणे उपलब्ध झाले आहे. काळाच्या ओघात सातवाहन व क्षत्रप यांची सत्ता येथे राहीली. अमरावतीहून विदिशाकडे जाणाऱ्या राजमार्गावरील एक प्रमुख नगर म्हणून याचे महत्व होते.

नांदेड जिल्ह्याचा विकास गोदावरीच्या दोन्ही काठांवर झाला आहे. सातवाहन राजा हाल याने संपादित केलेल्या गाथासप्तशतीमधे या परिसरातील तत्कालीन लोकजीवनाचे प्रतिबिंब उमटल्याचे जाणवते.

वाकाटक राजांपैकी वाशीम शाखेच्या (वत्सगुल्म) राजा विंध्यशक्ती दुसरा याच्या ताम्रपटात नांदेड व परिसरातील गावांच्या दानांविषयीचा उल्लेख आहे. विंध्यशक्तीच्या कारकीर्दीत ३७ व्या वर्षी ताकालख्खोप्पक या गावाजवळील आकासपद्द या खेड्याचे दान दिले. ताम्रपटात नोंदवलेले हे गाव नांदिकडच्या उत्तर मार्गावर होते. या नोंदीप्रमाणे ताम्रपटात नांदेड परिसराचा उल्लेख चौथ्या शतकातील आहे. या परिसरातील विद्वानांना त्यांच्या विद्वत्तेसाठी म्हणून अग्रहाराचे दान मिळत असे हे विशेष. बदामीच्या चालुक्य कालखंडात पुलकेशीची सत्ता महाराष्ट्रावर व त्या अनुषंगाने या जिल्ह्यावरही होती. नांदेडचा नंद्याल असा उल्लेख या काळात मिळतो. या घराण्यातील विजयादित्याने गोदावरीकाठी नंद्याल येथे आपला लष्करी तळ उभारला होता. याच काळात देगलूर तालुक्यातील होट्टलचा उल्लेख पोट्टलिकनगर असा येतो. राष्ट्रकूट कालखंड हा नांदेडच्या इतिहासात अभिमानाने नोंदवावा असा काळ होता. वेरूळचे कैलास लेणे निर्माण करणाऱ्या या राजवंशाचे सत्ताकेंद्र कंधार येथे होते. या घराण्यातील कृष्ण तिसरा (इ.स. ९३९ ते ९६७) हा राष्ट्रकूट राजा स्वतःला ' कंधारपूरवराधीश्वर ' असे म्हणवून घेत असे. या काळात एक राजधानीचे शहर म्हणून कंधारचा विकास झाला व दहाव्या शतकातील आदर्शनगररचनेचा मापदंड लावता येईल अशाप्रकारे शहराची उभारणी करण्यात आली. याविषयीचे तपशिल येथील शिलालेखात उपलब्ध आहेत. त्यांनी निर्माण केलेला जगतुंगसमुद्र हा जलाशय आजही कंधार येथे उपलब्ध असून महाराष्ट्राच्या जलव्यवस्थापनाच्या इतिहासात ही एक उल्लेखनीय बाब आहे. याच काळात महाराष्ट्रातील एकमेव कामदेवाचे मंदिर त्याने उभारले. शिवाय सर्व लोकाश्रय मंडप तसेच मध्य आशियातील सर्वात मोठे असे क्षेत्रपालाचे मंदिर उभारले. सन १९८४ मध्ये करण्यात आलेल्या उत्खननातून २२ मी.लांब व १५ मी. रुंदीचे क्षेत्रपाल मूर्ती अवशेष उपलब्ध झाले. या सर्वांचे तपशिल प्रथमच या गॅझेटिअर ग्रंथात एकत्रितपणे देण्याचा प्रयत्न झाला आहे.

कल्याणीच्या चालूक्य कालखंडामध्ये दहाव्या, अकराव्या व बाराव्या शतकात या जिल्ह्यात प्रामुख्याने देगलूर व बिलोली तालुक्यात संस्कृत भाषा व कन्नड लिपितील जवळपास ३६ शिलालेख उपलब्ध झाले आहेत. या लेखांतून साधारणतः इ.स.१०७९ ते ११४८ पर्यंत चालूक्यांच्या विविध राजांची सत्ता येथे होती हे स्पष्ट होते. यामध्ये सोमेश्वर पहिला, दुसरा व तिसरा तसेच जगदेकमल्ल विक्रमादित्य सहावा या राजांच्या काळात विविध निर्मितीक्षम कामे अदमपूर, एकलारा, करडखेड, जुन्नी, तडखेळ, देवापूर, नरखेड, बिम्रा, होट्टल, येरगी, एताळा, सगरोळी, संगम या स्थानांवर करण्यात आली. नांदेड जिल्ह्याचा दक्षिण भाग हा प्रामुख्याने चालुक्यांच्या अधिपत्याखाली असल्याचे स्पष्ट होते व यातूनच कन्नड भाषिक प्रभाव तसेच सांस्कृतिक वैशिष्ट्ये या जिल्ह्यात सर्वदूर पर्यंत जाणवतात. चालुक्यांच्या काळात सोमलदेवी आणि बिज्जलदेवी या राण्या होट्टलच्या निवासी होत्या. याविषयीची अभिलेखीय नोंद उपलब्ध आहे. होट्टल या स्थानाचे महत्व बदामीच्या चालूक्यांपासून कल्याणीच्या चालूक्यांपर्यत सातत्याने राहिल्याचे दिसते. सोमेश्वर पहिला, दुसरा, तिसरा, चौथा आणि सहावा विक्रमादित्य यांच्या लेखांतून या क्षेत्रातील त्यांचा प्रभाव स्पष्ट होतो. तर सोमेश्वर चौथा (सन ११८३

ते ११९०) चालुक्यांची दुसरी मांडलिक घराणी वन्हीकूल व वाजीकूल ही नांदेड परिसरातच नांदत होती. करडखेड येथे वन्हीकूल तथा पावककूल ही राजधानी होती. तर कलचुरी घराण्याचा एकमेव महत्वाचा अभिलेख जुन्नी येथे मिळाला असून बाराव्या शतकातील मराठवाड्याशी संबंधित या घराण्याची सत्ता या अभिलेखामुळे स्पष्ट होते.

यादव राजवंशाशी संबंधित अभिलेख अर्धापूर, उनकदेव, कंधार, मरळक, भोकर, माहूर या परिसरातील सत्ता स्पष्ट करतात. सिंघण यादवापासून रामचंद्र यादवांपर्यत या भागात यादवांची असलेली सत्ता प्रामुख्याने गोदावरी नदीच्या उत्तर भागात होती. महाराष्ट्रातील आंध्र-कर्नाटक असा सांस्कृतिक संपर्क असलेला व मोठ्या प्रमाणात अभिलेखीय नोंद उपलब्ध होणारा असा हा जिल्हा आहे. यादवकाळामधील रट्टबल्लाळ हे मूळ अमरदकपूर म्हणजे औंढयाचे घराणे. तेथे त्यांची राजधानी होती तर उपराजधानी अराध्यपूर (अर्धापूर) येथे होती. बल्लाळाचा सेनापती चाऊंड हा अर्धापूरचा निवासी होता. यादव राजा मल्लबी यास बल्लाळाने संकट काळात सहाय्य केले. अर्धापूर शिलालेखात बल्लाळाचा उल्लेख 'यादवराज्य स्थैराचार्य' असा आला आहे. तर यादवकाळात कंधार हे देश या प्रशासकीय विभागाचे प्रमुख केंद्र होते. प्राचीन काळात राष्ट्रकूट राजा तिसरा याची कंधार ही राजधानी होती. तर होट्टल येथे काही काळ कल्याणीच्या चालुक्यांची राजधानी होती. रट्टबल्लाळाची अर्धापूर ही उपराजधानी होती तर चालुक्य काळात करडखेड (करडीकल्ल) येथे वन्हीकुळाची तथा पावककुळाची राजधानी होती. तसेच हे एक सहस्त्र मंडलाचे प्रशासकीय केंद्र होते. अशाप्रकारे पराक्रमी राजवंशांचे निवासस्थान म्हणून नांदेड जिल्ह्याचा उल्लेख करावा लागतो. या जिल्ह्यात बौध्द व जैन संप्रदायाचे अस्तित्वदेखील येथील अभिलेखीय पुरावे स्पष्ट करतात. विशेषतः कंधार व करडखेड ही स्थाने. या काळातील दुसरे वैशिष्ट्य म्हणजे कंधार, होट्टल, सगरोळी, तडखेल, करडखेड येथील घटीकास्थान (पाठशाळा) व महाघटीकास्थानातून धर्मशास्त्रासारख्या विषयातील पारंगत तज्ज्ञ अभ्यासक व विद्यार्थी असल्याचे स्पष्ट होते. मठांची परंपरा ही कोलंबी येथील तांत्रिक मठ तसेच लिंगायतांच्या मठापर्यंत कायम राहिल्याचे दिसते.

मध्ययुगीन कालखंडातील या जिल्ह्याचे वेगळे वैशिष्ट्य स्पष्ट होते ते येथे विकसित झालेल्या माहूर आणि कंधार या किल्ल्यांमुळे. गोंडांनी बहमनींविरूध्द मोहिम उघडून संपूर्ण वऱ्हाड बहमनींपासून जिंकून घेतले. यावेळी माहूर परिसरात गोंडांची सत्ता विकसित झाली होती. पुढे बहमनींनी सन १४२६ मध्ये माहूर किल्ला परिसर ताब्यात घेतला. अहमदशहा खिलजी याने आपल्या सैन्यानिशी माहूरवर चढाई करून १४५६ पर्यंत माहूर परिसरात तळ दिला होता. याचप्रमाणे बहमनी सल्तनतीचा वजीर महमूद गवान याने बहमनी राज्याची प्रशासकीय पुनर्रचना केली व आपले लष्करी ठाणे नांदेड शहरात ठेवले. त्यांनी बहमनी राज्याचे आठ सूभ्यांत विभाजन केले. यावेळी आजचा नांदेड जिल्हा माहूर या सूभ्याचा एक भाग बनला. नांदेड जिल्ह्याची उभारणी माहूर व तेलंगणा तरफेतूनच झाल्याची दिसते. पुढे कासिम बरीद याने बरीदशाहीची स्थापना करताना कंधार किल्ल्याचा आश्रय घेऊन तेथे सत्ताकेंद्र निर्माण केले असे दिसते. एकूण या जिल्ह्यातील मध्ययुगीन अभिलेखाचा विचार केला तर तुघलक, बहमनी व बहमनीच्या शाह्या, निजामशाही, आदिलशाही, इमादशाही यांचा सत्तासंघर्ष या परिसरात झाल्याचे दिसते. मोगलांनी निजामशाहीकडून सन १५७४ मध्ये संपूर्ण वऱ्हाड सूभा आपल्या

नियंत्रणाखाली आणला त्यावेळी नांदेड जिल्ह्यातील माहूर परिसर निजामशाहीचा एक भाग झाला. पुढे सन १६२२ मध्ये जहांगिरचा मुलगा राजपुत्र खूर्रम (शहाजहान) याने वडीलांविरूध्द बंड केले तेव्हा तो माहूर येथे आश्रयाला आला. माहूरचे किल्लेदार उदयराम आणि यादवराम यांनी त्याला आश्रय दिला. निजामशाहीचे मोठे केंद्र कंधार येथे होते. मोगलांनी निकराचा संघर्ष करून १७ मे १७३१ रोजी कंधार ताब्यात घेतले. तेलंगणा सूभ्याचे मुख्य केंद्र म्हणून नांदेड येथून कारभार होऊ लागला. आज मराठवाड्यातील दुसरे विभागीय केंद्र म्हणून नांदेडला असलेले महत्व या पार्श्वभूमीवर अधिक स्पष्ट होते. छत्रपती शिवरायांच्या सत्तासंघर्षात त्यांच्या पदस्पर्शाने ही भूमी पावन झाली असावी (१६७० च्या सुमारास वऱ्हाडवरील चढाईच्या वेळी) असे मत सेतु माधवराव पगडी यांनी नोंदवले आहे. नांदेड परिसरातील मोगली हालचालींच्या नोंदी भीमसेन सक्सेना यांच्या तारीख-ए-दिलकुशा या ग्रंथात मिळतात. मोगल काळात सन १७६० नंतर आजचा नांदेड जिल्हा नांदेड व माहूर अशा दोन सत्ताकेंद्रात विभागला होता. माहूरचा समावेश वऱ्हाडच्या सूभ्यात झाला तर नांदेडचा बिदर सूभ्यात. गुरु गोविंद सिंग हे शिखांचे दहावे गुरु १९ जुलै १७०८ रोजी नांदेड येथे आले. येथील वास्तव्यात हा परिसर त्यांच्या पदस्पर्शाने पावन झाला. १८ ऑगस्ट १७०८ या दिवशी त्यांच्यावर प्राणघातक हल्ला झाला व ७ ऑक्टोबर १७०८ रोजी ते पंचतत्वात लीन झाले. गुरु गोविंदसिंग यांनी गुरुग्रंथसाहेब हेच यापुढे शिखांचे गुरु व मार्गदर्शक असतील हे नांदेड येथे घोषित केल्यामुळे नांदेडला अनन्यसाधारण असे महत्व प्राप्त झाले. या गोष्टीला तीनशे वर्षे पूर्ण झाली असून त्रिशताब्दी महोत्सव साजरा करीत असताना दूरदर्शी नेतृत्वामुळे नांदेड परिसराचा विकास झाला आहे. विशेषतः गुरुद्वारा, गोदावरीचा घाट, विमानतळ परिसर विकसित झाल्याचे आपल्याला दिसते.

नांदेड व परिसराची नोंद युरोपियन प्रवासी ट्रॅव्हरनीअर याच्या प्रवासवर्णनातून मिळते. तो सन १६४५ मध्ये गोदावरी नदी पार करून नांदेड गावी आला. यावेळी मोगल सूभेदाराची परवानगी त्याला घ्यावी लागली. नदीकाठी असलेल्या किल्ल्यावर माणसांचा वावर होता व या तटबंदीच्या लगत गाव वसले होते असे तो नोंदवतो. त्यानंतर कॅप्टन फिट्झेराल्ड या इंग्रज अधिकाऱ्याने गुरु गोविंदसिंगांच्या गुरुद्वाराला इ.स. १८४० मध्ये भेट दिली. तो म्हणतो शीखबाग आणि बाभुळबन यांच्या मधोमध हा गुरुद्वारा असून घनदाट जंगलातून पाऊलवाट आहे. निजाम संस्थानच्या ताब्यात हा जिल्हा होता. सन १७२४ मध्ये आजचा नांदेड जिल्हा हा नांदेड सरकार या नावाने ओळखला जाई. त्यात ४१ महल व परगण्यांचा समावेश होता. आंध्रातील अदिलाबाद व निजामाबाद जिल्ह्याचे काही क्षेत्र सुध्दा नांदेड सरकारचा भाग होता. कंधार येथे यावेळी गोपाळसिंग गौड घराण्याची सत्ता होती. निजाम-उल-मुल्क याला या गोपाळसिंग व दलबतसिंग याने मदत केली. निजाम मराठा संघर्षाच्या काळात नांदेडचे सूभा म्हणून असलेले महत्व कायम होते. नांदेड सूभ्यावर जमिलबेग खान हा सुभेदार होता. निजाम काळामध्ये ज्या प्रशासकीय सुधारणा हाती घेण्यात आल्या त्याचा भाग म्हणून नांदेड हा आठ तालुक्यांचा एक जिल्हा बनविण्यात आला. १८८१ मध्ये मूळ नांदेड सुभा नांदेड जिल्हा म्हणून औरंगाबाद सुभ्याचा एक भाग बनला. निजाम राजवटीबरोबर जो संघर्ष नांदेड जिल्ह्यात झाला तो अत्यंत रोमहर्षक असाच आहे.

(सोळा)

सन १८१८ नंतर साधारणपणे महाराष्ट्राच्या आधुनिक काळाची सुरुवात मानली जाते. या काळात निजामी हुकूमशाहीविरूध्द भिल्ल, रामोशी, हाटकर यांनी केलेला उठाव उल्लेखनीय होता. सन १८०० मध्ये इंग्रज, मराठे, निजाम यांचा सत्तासंघर्ष सूरुच होता. सन १८१८ मध्ये नांदेड जिल्ह्यातील नोहा या ठिकाणी इंग्रज फौजांनी मेजर पिटमनच्या नेतृत्वाखाली हाटकरांचा उठाव मोडून काढण्यासाठी हल्ला केला. ८ जानेवारी १८१९ रोजी ब्रिटिश फौजांनी नोहा येथील नौसाजी नाईक याच्या किल्ल्याला वेढा घातला. ८ जानेवारी ते ३१ जानेवारी पर्यंत ब्रिटिशांच्या विरूध्द नाईक याने दिलेला लढा हा उल्लेखनीय आहे. हौसाजी नाईक व त्याची पत्नी गंगाबाई यांची आहुती यात पडली. १८२२ मध्ये सुध्दा माहूर गडावर एतद्देशीयांशी ब्रिटिशांचा संघर्ष झाला कॅप्टन सर जॉन गार्डन याने हा किल्ला ताब्यात घेवून निजामाकडे परत केला. सन १८४७ मध्ये कंधार किल्ल्यावरील राजा हणमंतसिंग गौड याने निजामी वर्चस्व झुगारून दिले. या सर्व पार्श्वभूमीवर सन १८५३ मध्ये इंग्रज आणि निजाम यांच्यात एक करार झाला. १८५७ च्या उठावाचे पडसाद नांदेड जिल्ह्यातही उमटले. नानासाहेब पेशव्यांकडून रंगराव नावाचा माणूस देगलूर येथे आला. त्याने स्वतःचे सैन्यउभारणीचा प्रयत्न केला. हा उठाव मोडून काढण्यात आला. सन १८६७ मध्ये हैद्राबाद राज्याचे पाच सुभे आणि १७ जिल्ह्यांत प्रशासनाच्या दृष्टीने पुन्हा विभाजन करण्यात आले. हैद्राबाद - मनमाड हा रेल्वेमार्ग सन १९०० मध्ये पूर्ण होऊन नांदेड येथे रेल्वे आली. याबरोबरच भारतीय स्वातंत्र्याच्या आंदोलनाचे पडसाद नांदेड जिल्ह्यात ऊठू लागले.

स्वातंत्र्य संग्रामाशी संबंधित असलेल्या सामाजिक परिषदेचे अधिवेशन नांदेड जिल्ह्यात कवाना येथे सन १८१८ मध्ये झाले. त्यावेळी जिल्ह्यातील रामराव मांजरकर, केशवराव गोळेगावकर, केशवराव कोरटकर, श्रीधर वामन नाईक, दे.ल.महाजन यासारख्यांनी या परिसरात सामाजिक परिषदेचे काम उभे केले. आर्य समाजाची चळवळ १९२०-३० या दशकात वाढताना दिसते. निजामी जुलूमशाही विरूध्द आर्यसमाजाच्या चळवळीत शंकरराव टेळकीकर, गुरुराव देशपांडे, रामदास कोळनूरकर यांच्यावर राजद्रोहाचा खटला झाला. यावेळी सन १९२१ मध्ये निजामाने गस्ती निशाण ५२, गस्ती निशाण ५३ अशा फर्मानांद्वारे स्थानिक जनतेला दडपून टाकण्याचा प्रयत्न केला. ५ मे १९३९ रोजी नांदेड येथे सत्याग्रह झाला. दुसरा सत्याग्रह १४ मे १९३९ रोजी झाला. या आर्यसमाजाच्या चळवळीची नोंद नांदेडच्या आधुनिक इतिहासाच्या दृष्टीने महत्वाची ठरते. जिल्ह्यातील उमरी, धर्माबाद, कंधार, देगलूर ही आर्य समाजाची सक्रीय केंद्रे होती. नांदेड जिल्ह्यात सप्टेंबर १९४३ मध्ये निजाम प्रांतीय मराठी साहित्य परिषदेचे दुसरे संम्मेलन झाले. यावेळी शंकरराव मोरे, वि. अ. कानोले हे प्रमुख होते. १९१७-१८ च्या दरम्यान ' नागरिक ' हे पहिले वर्तमानपत्र नांदेडमधून निघाले तर सन १९४७ च्या दरम्यान ग.ना.आंबेकर यांनी ' प्रतोद ' सुरू केले. दासगणुंच्या किर्तनातून तसेच दे.ल.महाजनांच्या प्रवचनांतून जिल्ह्यांतील प्रबोधनाची चळवळ सुरु होती. स्वातंत्र्य आंदोलनातील वंदे मातरम् ही चळवळ, १९४२ चे आंदोलन, आझाद हैद्राबादची चळवळ, याच बरोबर अर्जापूर जवळ गोविंदराव पानसरे यांच्यावर २१ ऑक्टोबर १९४६ मध्ये झालेला प्राणघातक हल्ला हे सर्व स्वातंत्र्य चळवळीला नवी दिशा देणारे ठरले. अशाचप्रकारे दत्ता उत्तरवार यांच्यावरील उमरी येथील बेधुंद गोळीबार, या गोष्टी निजामी सत्तेचे क्रौर्य स्पष्ट करणाऱ्या होत्या. नांदेड येथे १५ ऑगस्ट १९४७ रोजी रेल्वे स्टेशनवर तिरंगा

फडकविण्यात आला. हदगाव तालुक्यातील डोरली या गावी लोकांनी झेंडा सत्याग्रह व जंगल सत्याग्रहाचा कार्यक्रम केला असताना त्यांच्यावर गोळीबार करण्यात आला. सन १९४८ च्या मार्च-एप्रिल मध्ये उमरखेड जवळ विड्ळला नांदेड जिल्ह्यात आणखी एक कॅम्प सुरु करण्यात आला. अशाच चळवळी नांदेड, कंधार परिसरात देखील होत होत्या. ३० जानेवारी १९४८ रोजी उमरी बँकवर केलेला हल्ला ही निजामी संघर्षाविरूध्दची एक यशस्वी लढाई होती.

निजामी सत्तेविरुध्द स्वातंत्र्य पुकारून कयाधु आणि पैनगंगा नदीच्या खोऱ्यातील हदगाव तालुक्यातील ३२ गावांनी १५ ऑगस्ट १९४८ रोजी आपले स्वातंत्र्य घोषित केले. शेवटी १७ सप्टेंबर १९४८ रोजी निजामाच्या शरणागतीने हा संघर्ष संपला.

नांदेड जिल्ह्याला लाभलेल्या वैशिष्ट्यपूर्ण भौगोलिक पार्श्वभूमीबरोबरच जिल्ह्याच्या किनवट व माहूर तालुक्यात बंजारा तसेच मथुरा बंजारा, गौंड, परधान, आंध हे आदिवासी प्रामुख्याने आढळतात. अल्पप्रमाणात भिल्लही आढळतात. निजामी राजवटीमुळे आलेल्या मागासलेपणाची जाणीव स्वातंत्र्योत्तर काळातही सर्व क्षेत्रांत जाणवत राहते. असे असले तरी स्थानिक नेतृत्वातून विविध क्षेत्रात नांदेड जिल्ह्याचा विकास झाला आहे. यातून रेल्वेचे विभागीय कार्यालय म्हणून नांदेड स्थानकाचे महत्व असून मुदखेड या स्थानकाचे जंक्शन म्हणून असलेले स्वरूप महत्वाचे ठरते. मराठवाडा जनता विकास परिषद, मराठवाडा रेल्वे संघर्ष समिती, जिल्हा रेल्वे संघर्ष समिती यामध्ये सक्रीय कार्यकर्ते म्हणून सुधाकरराव डोईफोडे व त्यांच्या सहकाऱ्यांचे योगदान उल्लेखनीय आहे. नांदेड जिल्ह्यात एकूण २२६.२१ कि.मी.लांबीचा रेल्वे मार्ग आहे.

नांदेड जिल्ह्याला जलव्यवस्थापनाची प्राचीन परंपरा लाभली असून राष्ट्रकूट काळात इ.स.च्या दहाव्या शतकात जगतुंगसमुद्र हा जलाशय कंधार येथे निर्माण करण्यात आला. चालूक्य व यादव राजवंशांनी या क्षेत्रात काम केले. यातून सगरोळी, अर्धापूर, माहूर या ठिकाणी जलाशय तर होट्टल, येरगी, येवती या ठिकाणी पुष्करणी व बारवांची निर्मिती झाली. यापैकी बहुतांश वास्तू आजही अस्तित्वात आहेत. स्वातंत्र्योत्तर काळातील काही दशकांत झालेल्या सुनियोजित प्रयत्नांचा परिणाम म्हणून जिल्ह्यात विष्णपुरी हा उपसा सिंचन प्रकल्प व मन्याड या प्रमुख प्रकल्पांबरोबर पूर्णा, उर्ध्वपैनगंगा, लेंडी हे आंतरराज्य प्रकल्प आहेत. तर मध्यम प्रकल्पांमध्ये अन्य प्रकल्पांबरोबर बाभळी प्रकल्पाचे काम सुरु आहे. एकूण जिल्ह्यातील प्रकल्पीय सिंचनक्षेत्र ४,३४,९९८ हेक्टर असून प्रकल्पीय सिंचनक्षेत्र लागवडीलायक क्षेत्राच्या ५० टक्के आहे हे विशेष. यातून विकसित होणारे कृषि क्षेत्र व परिणामतः उभारण्यात आलेल्या सूत गिरण्या व साखर कारखाने हे नांदेड जिल्ह्याच्या विकासाच्या वाटचालीवरील विविध टप्पे आहेत. तर बचत गटाच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण व स्थानिक रोजगार यादृष्टिने जिल्ह्यात झालेले काम निश्चितच उल्लेखनीय आहे.

या जिल्ह्यात दासगणु महाराज, विष्णुकवि ही संत परंपरा वरदानंदांपर्यंत येते. त्यांचे साहित्यक्षेत्रातील काम उल्लेखनीय आहे. तर किर्तन परंपरेमध्ये धुंडामहाराज देगलूरकर, शंकरमहाराज खंदारकर (साधुमहाराज),यांचीही नोंद घ्यावी लागते. जिल्ह्यातील निर्मितीक्षम काम करणाऱ्यांच्या मालिकेत शामराव बोधनकर, दिगंबरराव बिंदु, पद्मश्री श्यामराव कदम तसेच भगवानराव गांजवे, कॉ. व्ही. डी.

देशपांडे यांची जाणीवपूर्वक नोंद केली आहे. साहित्य परंपरेमध्ये स.रा.गाडगीळ, नरहर कुरुंदकरांमुळे नांदेड जिल्ह्याला महाराष्ट्राच्या साहित्य विश्वामध्ये वेगळी प्रतिष्ठा निर्माण झाली. या सर्वांची नोंद करण्याचा प्रयत्न संस्कृती या प्रकरणामध्ये केला आाहे. शिक्षणविषयक वाटचालीमध्ये नांदेड येथील प्रतिभा निकेतन महाविद्यालय, पिपल्स कॉलेज, यशवंत महाविद्यालय तसेच देगलूर व कंधार येथील महाविद्यालयांचे कार्य उल्लेखनीय आहे. नांदेड येथे स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ हे विविध ज्ञानशाखेंचे मुख्य प्रेरणास्त्रोत ठरत आहे.

एकूणच जिल्ह्याची भौगोलिक वैशिष्ट्ये, इतिहास, संस्कृति, परंपरा, लोकजीवन, कृषि व जलसिंचन यात असलेले जिल्ह्याचे योगदान, उद्योगधंदे, बँकव्यवसाय, व्यापार व वाणिज्य, वाहतूक व दळणवळण, रेल्वेचा झालेला विकास, आर्थिक क्षेत्रात झालेली प्रगती, प्रशासन, सामाजिक सेवा, संपूर्ण जिल्ह्याचा सांस्कृतिक वारसा, यामध्ये संत साहित्य, साहित्य, क्रीडाक्षेत्र, इत्यादींचा सर्वंकष वेध घेण्याचा प्रयत्न झालेला आहे. प्रेक्षणीय स्थळांसंबंधी जिल्ह्यातील सर्व प्रेक्षणीय स्थळे विशेषतः पर्यटनाची संधी म्हणून ज्याकडे पाहता येईल अशा नांदेड, माहूर व कंधार, होट्टल या स्थानांची तपशिलात नोंद दिली आहे.

मूलतः गॅझेटिअरची सातत्याने होणारी वाटचाल आणि पुनरावृत्ती ही निरंतर सुरु असणाऱ्या संशोधन प्रक्रीयेचा एक भाग ठरते. विभाग प्रमुखांसह कार्यालयातील सहकाऱ्यांनी प्रत्यक्ष केलेले सर्व्हेक्षण, विविध शासकीय, निमशासकीय पातळीवरून, संस्था व व्यक्तींकडून मिळालेली माहिती यांचे संकलन व संपादन करताना संपादक मंडळ सदस्यांकडून लाभलेले मार्गदर्शन यातून हा ग्रंथ साकार झाला आहे. नांदेड जिल्हा गॅझेटिअर प्रकाशित करताना जाणीवपूर्वक विविध क्षेत्रातील विकासविषयक माहिती येथे अधोरेखित करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. या गॅझेटिअरचे वैशिष्ट्य म्हणून ज्याची नोंद करता येईल त्यात ग्रामनिर्देशिकेचा उल्लेख करावा लागतो. या ग्रामनिर्देशिकेसह भारतीय जनगणना कार्यालयाने प्रकाशित केलेल्या ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ॲटलास मधील नांदेड जिल्ह्यातील तालुकाशः नकाशे व त्यात दर्शविलेले प्रत्येक गावाचे स्थान याचे मराठी रूपांतर प्रथमच प्रकाशित करण्यात येत आहे. शिवाय उपग्रहीय छायाचित्रे व नकाशे हे याचे वैशिष्ट्य म्हणून नोंदवता येईल. आजपर्यंत उपलब्ध झालेल्या एकूण अभिलेखांविषयीचा सारांशाने दिलेला तपशिल जिल्ह्याच्या सांस्कृतिक वैभवाचे साक्ष देणारा व भावी अभ्यासकांना नवी दिशा देणारा ठरावा. एकूण माहितीच्या दृष्टीने वाढती पृष्ठसंख्या विचारात घेऊन ग्रंथ हाताळण्याच्या दृष्टीने ही दर्शनिका दोन भागांत प्रकाशित करण्यात येत आहे. ज्यात प्रथम भागामध्ये प्रकरण १ ते ९ यांचा समावेश असून दुसऱ्या भागामध्ये प्रकरण १० ते १२ आणि ग्रामनिर्देशिकेचा अंतर्भाव करण्यात आला आहे. या विभागाच्या वतीने पूर्वप्रकाशित सर्व राज्य गॅझेटिअर, जिल्हा गॅझेटिअर तसेच ब्रिटिशकालीन जिल्हा गॅझेटिअर हे ई-बूक आवृत्तीच्या स्वरूपात उपलब्ध असून महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेत स्थळावर (www.maharashtra.gov.in) उपलब्ध करून देण्यात आले आहेत. या विभागाने केलेले काम निश्चितच उल्लेखनीय असून मराठी राज्य गॅझेटिअर ग्रंथांची दुसरी आवृत्ती देखील प्रकाशित करण्यात आली आहे. महाराष्ट्र : लॅण्ड ॲण्ड इटस पीपल हे राज्य गॅझेटिअर राज्याच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त प्रकाशित करण्यात आले आहे. विभागात जिल्हा गॅझेटिअर मालिकेमध्ये बुलडाणा व चंद्रपूर गॅझेटिअरचे काम सुरु आहे.

Maha Mumbai Gazetteer Gaz Letters

विविध विषयांची माहिती संकलित करताना प्रकाशनास थोडा विलंब होत असल्याने मंदन अवधी (Timelag) गेला आहे. यातील उणीवांची जाणीव ठेवून एका मर्यादेत ही दर्शनिका प्रकाशित करत आहे. मूळात गॅझेटिअर हा एक भौगोलिक कोश या प्रारंभिक संकल्पनेपासून ब्रिटिशकाळातील प्रशासनाच्या सोयीसाठी माहिती पुरविणारा ग्रंथ असे याचे असलेले स्वरूप बदलून शासनाचा समाजाभिमुख दृष्टीकोन विचारात घेवून विविध क्षेत्रात होणारा विकासविषयक संकल्पनेचा आराखडा मांडतांना सहाय्यभूत होणारा ग्रंथ या दृष्टीने या दर्शनिकेची निर्मिती करण्यात आली आहे. तेव्हा नांदेड गॅझेटिअरमध्ये केलेला हा प्रयत्न अभ्यासू संशोधक, सामान्य नागरिक आणि प्रशासक यांना उपयुक्त ठरेल अशी आशा व्यक्त करतो.

मुंबई,
स्वातंत्र्यदिन,
१५ ऑगस्ट २०११.
(श्रावण कृ. २, शके १९३३)

**डॉ. अरुणचंद्र शं. पाठक**
कार्यकारी संपादक व सचिव.

Maharashtra State Gazetteers

## ऋणनिर्देश

भारतामध्ये गॅझेटिअर निर्मिती करताना ब्रिटिश शासनाने बॉम्बे प्रेसिडेन्सी आणि सेन्ट्रल प्रोव्हिन्सेस या दोन स्वतंत्र प्रशासकीय केंद्रांतून काम केले. त्यातून गॅझेटिअर निर्मितीच्या दोन स्वतंत्र परंपरा निर्माण झाल्या. असे असले तरी निजामी अंमलाखाली असलेल्या मराठवाड्यासाठी मात्र जिल्हानिहाय विस्तृत असे गॅझेटिअर लिहिले गेले नाही. केवळ औरंगाबाद जिल्ह्यासाठी निजाम डोमिनियन्सच्यावतीने औरंगाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर विस्तृतपणे सन १८९४ ला प्रकाशित झाले व याचे पूनर्मुद्रण सन २००६ मध्ये केले आहे. स्वातंत्रोत्तर काळात तत्कालीन मराठवाड्याच्या पाच जिल्ह्यांसाठी भारत सरकारने निश्चित केलेल्या आकृतीबंधाप्रमाणे 'गॅझेटिअर ऑफ इंडिया' या मालिकेतून सन १९७१ नांदेड जिल्हा गॅझेटिअर प्रकाशित करण्यात आले.

मराठीमध्ये जिल्हा दर्शनिका (गॅझेटिअर) प्रकाशित करावयाच्या निर्णयाप्रमाणे महाराष्ट्रातील सर्वप्रथम परभणी जिल्हा गॅझेटिअर प्रकाशित करण्यात आले. तर संयुक्त महाराष्ट्र निर्मिती नंतरच्या कालखंडात नव्याने निर्माण झालेल्या जिल्ह्यांपैकी प्रादेशिक भाषांतून सर्वप्रथम गॅझेटिअर निर्मितीचा मान सन २००८ मध्ये लातूर जिल्ह्याला मिळाला. नांदेड जिल्हा गॅझेटिअरच्या मराठी सुधारीत आवृत्ती विषयक काम कार्यालयात गेले काही वर्ष सुरू असले तरी प्रत्येक विषयाची माहिती संकलित होत असताना प्रकाशनास होत जाणारा विलंब यामुळे उपलब्ध माहितीत अपरिहार्यपणे मंदन अवधी (Time lag) गेलेला आहे हे मी नम्रपणे नमूद करतो. वस्तूतः ग्रंथ प्रकाशित होईपर्यंतच्या प्रक्रियेत विविध पातळ्यांवर अनेकांचे सहकार्य लाभले आहे. प्रामुख्याने जिल्हाधिकारी कार्यालय व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालय व अनुक्रमे डॉ. श्रीकर परदेशी, जिल्हाधिकारी व श्री. श्रावण हर्डिकर, मुख्य कार्यकारी अधिकारी यांची व त्यांच्या सर्व सहका-यांची मी नोंद करायला हवी. अन्य शासकीय कार्यालय, निमशासकीय कार्यालय, संस्था तसेच मान्यवर अभ्यासक व जाणकार मार्गदर्शक, संपादक मंडळ सदस्य यांच्या मदत, मार्गदर्शन व सक्रीय सहभागाशिवाय ग्रंथ पूर्ण होणे शक्य नव्हते. सर्व पातळीवर हा सहभाग लाभला. या गॅझेटिअर ग्रंथाचे काही पैलू ठळकपणे अधोरेखित करता येतील जसे जिल्ह्यातील ग्रामांविषयीचे संपूर्ण तपशिल पुरवणारी ग्रामनिर्देशिका (Directory of village and town) दिली आहे. यासाठी प्रामुख्याने जिल्ह्यातील सर्व गटविकास अधिकारी व ग्रामसेवकांचे सहकार्य मोलाचे ठरले आहे. नांदेड जिल्ह्याचे वैशिष्ट्य म्हणून जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात उपलब्ध होणारे कन्नड, देवनागरी, फार्शी भाषेतील शिलालेख यांची स्वतंत्र तालिका उपलब्ध करून दिली आहे.

नांदेड जिल्हा गॅझेटिअर ग्रंथ निर्मिती होत असताना संकल्प व कार्यसिध्दी दरम्यान दोन संपादक मंडळांचे मार्गदर्शन लाभले. त्यामध्ये डॉ. के. बी. पाटील, कुलगुरु, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांच्यासह ज्येष्ठ सदस्य म्हणून डॉ. म. के. ढवळीकर, डॉ. भा. ल. भोळे, डॉ. रा. श्री. मोरवंचीकर, डॉ. नागोराव कुंभार, डॉ. जयकुमार मगर, प्रा. स. दि. महाजन, डॉ. भागवतराव डेंगळे, डॉ. श्रीनिवास ओमनवार, डॉ. एस. जी. देवगावकर, डॉ. शेषराव मोरे यांचे सहकार्य लाभले. संपादक मंडळाची

नव्याने रचना होत असताना नांदेड जिल्ह्याशी संबंधित तज्ञ मार्गदर्शक म्हणून प्रा. स. दि. महाजन, डॉ. भागवतराव डेंगळे यांच्या बरोबरच डॉ.प्रभाकर देव हे ज्येष्ठ अभ्यासक व कार्यप्रवण मार्गदर्शक म्हणून विभागास लाभले. तसेच नवीन संपादक मंडळामध्ये सर्वश्री डॉ.गो.बं.देगलूरकर, डॉ.जहागिरदार या ज्येष्ठ अभ्यासकांबरोबर डॉ. सुनिल पुरी, डॉ. श्रध्दा कुंभोजकर, डॉ. श्रीनंद बापट या तरूण अभ्यासकांचे संपादक मंडळ सदस्य या नात्याने सहकार्य लाभले. या सर्वांनी केलेल्या सहकार्यासाठी मी ऋणी आहे.

विद्यमान ग्रंथामध्ये सहयोगकर्ते लेखक म्हणून पूढील मान्यवरांचे योगदान लाभले आहे. भूगोल या प्रकरणात जिल्ह्याची भौगोलिक वैशिष्ट्ये व भूशास्त्र या भागाचे लेखन नांदेड विद्यापीठाचे निवृत्त कुलगुरु डॉ. धनंजय येडेकर व त्यांचे सहकारी डॉ. कपले यांनी केले. जिल्ह्यातील वनसंपदेचे तपशिल डॉ. वा. ना. नाईक यांनी नोंदवले आहेत तर श्री. पांडे यांनी वन्यजीवांविषयी काही नोंदी केल्या. इतिहास प्रकरणात प्राचीन काळाचे लेखन डॉ. गो. बं. देगलूरकर यांनी केले. यासाठी त्यांनी केलेल्या विशेष अभ्यासातून व डॉ. हरिहर ठोसर यांनी लिहिलेल्या ग्रंथामुळे होट्टल ही काही काळ चालूक्यांची राजधानी राहिली होती हे प्रथमच नोंदविण्यात आले. जिल्ह्याच्या मध्ययुगीन व आधुनिक इतिहासाचे लेखन, शिलालेख सूची डॉ. प्रभाकर देव यांनी केले आहे. जिल्ह्यातील मध्ययुगीन शिलालेखांची तालिका डॉ. दिलीप बलसेकर, सहसंपादक यांनी केली आहे. जिल्ह्यातील मठ या विषयावर डॉ. सुनिल पुरी यांनी नोंद केली असून जिल्ह्यातील बहुतांश सर्वेक्षण डॉ. अ. शं. पाठक यांनी स्वतः केले आहे. उद्योगधंद्याविषयीचे लेखन जसे कार्यालयात झाले तसेच डॉ. र. पु. कुरूलकर व डॉ. जयंत जोशी यांनीही आपले योगदान दिले आहे. संस्कृती प्रकरणामध्ये साहित्यावरील नोंद प्रा. स. दि. महाजन यांनी केली असून क्रिडाविषयक नोंद प्रा. नंदकुमार मेगदे यांनी केली आहे.

याशिवाय गॅझेटिअर ग्रंथ निर्मितीच्या प्रक्रीयेत अनेकांचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सहभाग राहिला आहे. प्रातिनिधिक स्वरूपात श्री. सुधाकर डोईफोडे, प्रा. यु. डी. कुलकर्णी, प्रा. प्रकाश मेदककर, श्री. अरुण किनगावकर, श्री. राम कोंडे तसेच डॉ. अनिल कठारे, डॉ. उत्तम सावंत, श्री. समुद्रगुप्त पाटिल यांचे सहकार्य लाभले असून श्री. सुरेश जोंधळे, डॉ. मोघे, जिल्हा प्रसिध्दी अधिकारी, छायाचित्रकार श्री. महेश होकर्ण, श्री. गिरिष ठक्कर, श्री. लक्ष्मीकांत तांबोळी, श्री. रविंद्र रसाळ, श्री. अतुल डोईफोडे, प्रा. जीवन कुलकर्णी ही व अशी अनेक नावे नोंदवता येतील. याशिवाय एक उल्लेखनीय नोंद म्हणजे महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन यांनी उपग्रहीय नकाशे उपलब्ध करून दिले. तर ग्रामनिर्देशिकेमध्ये या गॅझेअिरमध्ये प्रथमच जिल्ह्यातील प्रत्येक गावाचे स्थान दर्शविणारे तालुकाशः नकाशे आवश्यक तपशिलांसह दिले आहेत. 'भारतीय जनगणना कार्यालयाचे ॲडमिनिस्ट्रेटीव्ह ॲटलास २००१' याचा वापर केला असून त्यासाठी भारत सरकारच्या जनगणना कार्यालयाच्या सौजन्यासाठी दर्शनिका विभाग ऋणी आहे. संचालक, राज्य पुरातत्वीय विभाग यांनी जिल्ह्यातील संरक्षित स्मारकांचे नकाशे दिले आहेत.

विद्यमान ग्रंथाच्या संकलन व प्रकाशन प्रक्रियेमध्ये मला सहाय्य करणारे सर्वश्री डॉ. दि. प्र. बलसेकर, सहसंपादक, सौ. सा. प्र. पिंपळे, उपसंपादक, त्रि. मा. केंद्रे (प्रकरण १ + सहयोगकर्ते लेखक), प्र. रा. गवळी (प्रकरण ३), सु. श्री. गायकवाड (प्रकरण ६ व ७), डॉ. वै. ह. भागवत (प्रकरण २ + सहयोगकर्ते लेखक व प्रकरण १२) सर्व संशोधन अधिकारी तसेच शा. का. मोरे (प्रकरण ८ व १०), अं. रा. पवार (प्रकरण ९), दि. वि. भगत, सौ. चा. बा. चंदनशिवे (प्रकरण ५), रा. र. वळवी (ग्रामनिर्देशिका), श्री. श. दराडे (प्रकरण ४), सौ. स्व. शै. फडके (प्रकरण ११ + सहयोगकर्ते लेखक) या सर्व सहायक संशोधन अधिकाऱ्यांबरोबरच कार्यालयातील लघुलेखक, सहाय्यक तसेच विविध स्तरावरील कर्मचारी यांनी केलेल्या सहकार्याचा उल्लेख करणे मला आवश्यक वाटते.

या ग्रंथाची उत्कृष्ठ छपाई करून दिल्याबद्दल श्री. प. ज. गोसावी, संचालक, शासकीय मुद्रण व लेखन सामग्री, मुंबई तसेच व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, मुंबई व या मुद्रणालयातील सर्व सहकारी कर्मचाऱ्यांचे मी ऋण व्यक्त करतो.

हे गॅझेटिअर विस्तृत नोंदींमुळे दोन खंडांत प्रकाशित करण्यात येत असून याच्या ग्रंथनिर्मितीसाठी जाणीवपूर्वक प्रेरणा देणारे मा. ना. श्री. पृथ्वीराज चव्हाण (मुख्यमंत्री), श्री. अजित पवार (उप मुख्यमंत्री), श्री. संजय देवतळे (मंत्री, पर्यावरण व सांस्कृतिक कार्य), श्रीमती फौजिया खान (राज्यमंत्री, सांस्कृतिक कार्य, सामान्य प्रशासन व अन्य विभाग) यांचे मी आभार व्यक्त करतो. माजी मुख्यमंत्री श्री. अशोक चव्हाण यांनी या ग्रंथनिर्मितीच्या कामात व्यक्तिशः लक्ष देऊन सातत्याने प्रोत्साहन दिले तर श्री. आनंद कुलकर्णी, प्रधान सचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांनी केलेल्या मार्गदर्शनासाठी मी ऋणी आहे.

Maharashtra State Gazetteers

मुंबई
स्वातंत्र्यदिन,
१५ ऑगस्ट २०११.
(श्रावण कृ. २, शके १९३३)

**डॉ. अरुणचंद्र शं. पाठक,**
कार्यकारी संपादक व सचिव.

# नांदेड जिल्हा गॅझेटिअर

## प्रकरण १०
## सामाजिक सेवा

Maharashtra State Gazetteers

प्रकरण १०

# सामाजिक सेवा

**पूर्वपीठिका :** इ. स. १७२४ पासून ते इ. स. १९४८ पर्यंत मराठवाड्यातील नांदेड जिल्हा हा हैद्राबाद राज्याचा एक भाग होता. तत्पूर्वीही तो यादवानंतर मुस्लिम राजवटीखाली राहिला. हा भूभाग सतत परकीय अमलाखाली असल्याने येथील जनतेस राजकीय हक्क व मुक्त नागरी जीवनाचा पुरेपूर उपभोग घेता आला नव्हता. हा प्रदेश हैद्राबाद राज्यात असतांना इ. स. १८५४ मध्ये ब्रिटिश भारतातील सुधारणा पाहून निजामाचे मुख्य प्रधान सर सालारजंग यानी राज्यकारभाराच्या सुधारणेच्या दृष्टिने न्याय, शिक्षण, पोलीस वगैरे खात्यांना नियोजनपूर्वक वेगळे प्रशासकीय रूप दिले. त्यांच्या अखेरच्या काळात अपिल न्यायालये व उच्च न्यायालय अस्तित्त्वात आले. सर सालारजंग यांच्या सुधारणा, आर्य समाजाची आंदोलने, राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना, सामाजिक परिषदा या माध्यमांद्वारे पुढे हैद्राबाद राज्य व पर्यायाने नांदेड जिल्ह्यात नवीन विचारप्रवाह रूजू लागले. भारतीय स्वातंत्र्यानंतर तर नांदेड जिल्ह्याने शिक्षण, आरोग्य वगैरे क्षेत्रात लक्षणीय प्रगती केली. मराठवाड्यातील एक प्रगत जिल्हा म्हणून या जिल्ह्याची घोडदौड सुरू आहे.

## शिक्षण

**स्वातंत्र्यपूर्व काळ :** इ. स. च्या १३ व्या शतकापासून पुढे सुमारे ४०० वर्षे मुस्लिम सत्ता या प्रदेशात नांदली. या काळातील शैक्षणिक इतिहासाकडे नजर टाकल्यास असे दिसते की, महाराष्ट्रात प्रत्येक गावात तात्यापंतोजी प्रकारच्या लेखन, वाचन आणि अंकज्ञान हे विषय अनौपचारिकपणे शिकविण्याऱ्या अनेक शाळा होत्या. औरंगाबाद, नांदेड, पैठण, वाई इत्यादी गावांत विशेषतः धर्मक्षेत्री संस्कृत पाठशाळाही होत्या.[१] इ. स. १८१८ पर्यंत ब्रिटिशांनी बव्हंशी भारत आपल्या अंकित केल्यानंतर शिक्षणाबद्दलची माहिती मिळविण्यास सुरूवात केली होती. तथापि, तत्कालीन मुंबई राज्य व हैद्राबाद राज्य ही स्वतंत्र असल्याने ब्रिटिशांना हैद्राबाद राज्याच्या शैक्षणिक विकासात हस्तक्षेप करता आला नाही. इ. स. १८५४ पर्यंत मराठवाड्याचा अत्यल्प शैक्षणिक विकास झाला होता. शिक्षण संस्था नगण्य आणि शासनही त्याबाबतीत उदासिन होते. पुढे हैद्राबाद राज्यात उर्दू माध्यमाच्या शाळा सुरू केल्या. त्यात वाचन, लेखन व मुलभूत अंकगणित उर्दूतून शिकविले जाई. शिक्षकांना खेड्याचा आकार व त्याचा महसूल यावर आधारित वेतन दिले जाई.[२] हैद्राबाद शहरात इ. स. १८३४ मध्ये इंग्लंडच्या चर्चच्या ख्रिस्ती धर्माधिकाऱ्याने पहिली इंग्रजी शाळा सुरू केली होती.[३] इ. स. १८५४ मध्ये राज्य

१. **मराठवाड्यातील प्राथमिक शिक्षणाचा अभ्यास : १९८१-८२,** प्रकल्प अहवाल, स्वा. रा. तीर्थ संशोधन संस्था, औरंगाबाद, प्रकल्प मार्गदर्शक प्रा. श्री. ब. गोगटे, प्रकल्प समन्वयक-पु. बा. जोशी, २५ जानेवारी १९८४, पृ. १६.

२. **लातूर जिल्हा मराठी गॅझेटिअर,** महाराष्ट्र शासन, मुंबई, २००८, पृ. २.

३. **इम्पेरियल गॅझेटिअर ऑफ इंडिया,** प्रॉव्हिन्सियल सिरीज, हैद्राबाद स्टेट, गव्हर्नमेंट प्रिंटींग प्रेस, कलकत्ता, १९०९, पृ. ७३.

शिक्षण मोहिमेस प्रारंभ झाला. त्यानुसार प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी सातवीपर्यंत व जिल्ह्याच्या ठिकाणी हायस्कूलपर्यंत उर्दू माध्यमाच्या शाळा काढण्याचे व त्यांचे मुख्यालय जिल्हास्थळी ठेवण्याचे आदेश सर सालारजंग यांनी इ. स. १८५९ मध्ये दिले होते. मराठी एक विषय असायचा यालाच मदरसे वैतानिया वस्तानीया व फोकानीया म्हटले जायचे. या शाळांच्या नियंत्रणासाठी एक समिती स्थापन करण्यात आली होती.[४] त्यात तालुका शाळांसाठी दोन पाटील, दोन पटवारी या सदस्यांबरोबर तहसीलदार हा अध्यक्ष असे. जिल्हा शाळांसाठी वरील सदस्यांसोबतच पोलीस निरीक्षक हा सदस्य व दुय्यम (द्वितीय) तालुकदार हा समिती अध्यक्ष असे. हा तालुकदार जिल्ह्याचा माजी शिक्षण-निरीक्षक असे. त्याने अशा सर्व शाळांचे निरीक्षण करणे गरजेचे असे. अशा प्रकारे शिक्षण हे पूर्णतः शासकीय (तालीमात) अधिपत्याखाली असे. त्यामुळे त्याकडे दुर्लक्ष होत असे.

सन १८५३ ते सन १८८३ हा सर सालारजंग यांचा पंतप्रधानपदाचा कार्यकाल हैद्राबाद राज्याच्या व पर्यायाने नांदेड जिल्ह्याच्या पायाभूत विकासाचा व संवर्धनशील कार्याचा कार्यकाळ होता. त्यांच्या काळात शिक्षण क्षेत्रात भरीव सुधारणा झाल्या. इ. स. १८४४ मध्ये स्थापन झालेल्या वैद्यकीय शाळेने नांदेड जिल्ह्याला कित्येक डॉक्टर्स पुरविले. इ. स. १८५५ मध्ये इंग्रजी आणि पौर्वात्य भाषांचे शिक्षण देणारी दार-उल-उलूम ही माध्यमिक शाळा स्थापन झाली. सीटी हायस्कूल १८७० साली व चादरघाट (cadarghat) हायस्कूल १८७२ मध्ये स्थापन झाले.[५] सार्वजनिक बांधकाम खात्यातील नोकरीसाठी विद्यार्थ्यांना प्रशिक्षित करण्यासाठी इ. स. १८७० मध्ये राज्यात इंजिनियरिंग स्कूल सुरू झाले. निजाम कुटुंबियांसाठी सन १८७८ मध्ये मदरसा-ई-अईज्जा स्कूल (Madrsa-e-Aizza) स्थापन झाले. उमराव व सरदारांकरीता स्थापन झालेल्या एका शाळेचे सन १८७८ मध्ये मदरसा-ई-अलिया (Madrasa-e-Aliya) मध्ये रूपांतर करण्यात आले. काही वर्ग, जे पूर्वोक्त चादरघाट (Cadarghat) शाळेला जोडण्यात आलेले होते ते नंतर मदरसा-ई-अलिया शाळेला जोडण्यात आले. पुढे सन १८८७ मध्ये इंग्रजी माध्यमातील निजाम कॉलेज हैद्रबादला स्थापन झाले.[६] हे दर्जेदार कॉलेज मद्रास विद्यापीठाला जोडलेले होते. सालारजंगांच्या या सुधारणांमुळे राज्यातच नव्हे, तर देशातही शैक्षणिक वारे जोरदारपणे वाहू लागले. त्यांच्या काळातच राज्यात उर्दू व इंग्रजी पाक्षिके व नियतकालिके निघू लागली. त्यामुळे शिक्षणाचा विकास झाला. लोकांची शिक्षणविषयक मते बदलविण्याचे काम या पाक्षिक व नियतकालिकांनी केले. याच काळात अलिगड येथे सर सय्यद अहमद यांनी सुरू केलेल्या शैक्षणिक व सामाजिक चळवळींशी सालारजंगाचा संबंध येऊन व त्यातून प्रभावित होऊन त्यांनी अहमद व त्यांच्या सहकाऱ्यांना अशा चळवळींसाठी आर्थिक सहाय्यही पुरविले. त्यातूनच वकार-उल्-मुल्क व मोहसिन-उल्-मुल्क या हैद्राबादच्या अधिकाऱ्यांनी अलिगड कॉलेज व इतर शैक्षणिक चळवळींच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावली.[७]

---

४. **कित्ता.**

५. **गॅझेटिअर ऑफ इंडिया, महाराष्ट्र स्टेट, नांदेड डिस्ट्रिक्ट,** महाराष्ट्र स्टेट, बॉम्बे, १९७१, पृ. ८३.

६. कित्ता.

७. महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, **परभणी जिल्हा गॅझेटिअर,** दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८८, पृ. ५०५.

इ. स. १८६८ साली नांदेडला पहिली पर्शियन शाळा स्थापन झाली. या शाळेचे रूपांतर पुढे ऑग्लो व्हर्नाक्युलर मिडलस्कूलमध्ये झाले. २० व्या शतकाच्या प्रारंभापर्यंत ही शाळा नांदेड येथे होती. या शाळेतून पास होणारे विद्यार्थी लॉ क्लास (कायदा) करून वकील बनू शकत असत. नांदेडमध्ये काही काळ असा लॉ क्लास चालविला गेला.

१९०९ च्या दरम्यान हबीब इदरूस यांनी नांदेडमध्ये 'मदरसे इदरूसिया' स्थापन केला. त्यामुळे मुस्लिमधर्मिय विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय झाली. नंतर १९१८ साली 'मदरसे फोकानिया' स्थापन झाला. याच शाळेच्या इमारतीत नंतर जिल्हा परिषदेचे हायस्कूल सुरू झाले. याचवर्षी नांदेड शहरात 'मोहतमीन तालीमात' म्हणजे शिक्षणाधिकारी नेमला गेला.

१९१६ साली नांदेड शहरात एक नाईट स्कूल चालविण्याचा प्रयत्न केला गेला होता. दोन-तीन वर्षे ही शाळा सुरू होती. दरम्यान प्लेगची साथ आली. त्यानिमित्ताने शाळा बंद पडली ती कायमचीच.

इ. स.१८६८ मध्ये सालारजंगांच्या कार्यकाळात शिक्षणाचा कारभार सहायक मंत्र्यांकडे सुपूर्द करण्यात आला होता.[८] हा शिक्षण विभाग नंतर संकिर्ण विभाग म्हणून ओळखला जाऊ लागला. शिक्षकी पेशा पत्करू इच्छिणाऱ्या सर्व उमेदवारांना दार-उल्-उलूम मध्ये प्रशिक्षण घेऊन तसे प्रमाणपत्र प्राप्त करणे सक्तीचे करण्यात आले. दोन वर्षांनंतर सार्वजनिक शिक्षणाची सुत्रे मि. विल्किन्सन या इंजिनियरिंग कॉलेजच्या प्राचार्याकडे देण्यात आली. तथापि, या बदलाचा हैद्राबाद शहराबाहेर फारसा उपयोग झाला नाही. यावेळी दार-उल्-उलूम ची विभागणी पाच शाखा व एका अँग्लो व्हर्नाक्युलर शाळेत झाली होती. इ. स. १८७१ मध्ये व्हर्नाक्युलर शिक्षण संचालक नेमण्यात आला. त्यामुळे जिल्हा शाळांच्या पद्धतीत सुधारणा झाल्या. तथापि, या शाळांचे प्रत्यक्ष नियंत्रण महसूल अधिकाऱ्याकडेच राहिल्याने प्रशासनात दिरंगाई सुरूच राहिली. या पद्धतीत सार्वजनिक शिक्षणाच्या संचालकाकडून निघणारी सर्व परिपत्रके प्रथम महसूल अधिकाऱ्याकडून मंजूर करून घ्यावी लागत व त्यानंतर ती जिल्ह्यातील शाळांना रवाना होत. यात पुष्कळ दिरंगाई होत असे.[९] हा दोष निवारण करण्यासाठी इ. स. १८७५ मध्ये राज्यातील प्रत्येक जिल्ह्यासाठी पाच उप निरीक्षक नेमण्यात आले. याव्यतिरिक्त विभागीय व जिल्हा शिक्षण निरीक्षकांची नियुक्ती करण्यात आली. त्यामुळे महसूल अधिकाऱ्यांकडील शिक्षण विषयक काम कमी झाले.[१०]

इ. स. १८७८ पासून हैद्राबाद राज्यातील शाळांमध्ये शुल्क आकारण्याची सक्ती करण्यात आली. सन १८८३ मध्ये सार्वजनिक शिक्षण खात्याला इतर मोठ्या खात्यांप्रमाणे दर्जा देण्यात आला व वार्षिक अडीच लाख रूपयांची तरतूद अंदाजपत्रकात करण्यात आली. प्रत्येक सुभ्याच्या मुख्यालयाच्या ठिकाणी उच्च माध्यमिक शाळा उघडण्यात येऊन जिल्ह्यात अन्यत्रही माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा स्थापन करण्यात आल्या. इ. स. १८९१ पासून माध्यमिक शाळेच्या परीक्षा सुरू करण्यात आल्या.[११]

८. **इम्पेरियल गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ७३.

९. कित्ता, पृ. ७३-७४.

१०. **परभणी जिल्हा गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ५१०.

११. कित्ता, पृ. ५०५.

Maharashtra State Gazetteers

त्यानंतर १८९४ मध्ये पाठ्यपुस्तक समिती व शिक्षण मंडळाची स्थापना झाली. शिक्षकांना प्रशिक्षण देणारी राज्यातील पहिली शाळा सन १८९९ मध्ये सुरू करण्यात आली, तर १९०१ च्या सुमारास शिक्षकांना वेतनश्रेणी पद्धत लागू करण्यात आली.[१२] वेतनाचा दर पूर्व प्राथमिक शाळेत १० ते १५ रुपये, तर उच्च माध्यमिक शाळेत १५ ते २५ रुपये होता. माध्यमिक शाळेत इंग्रजी ही प्रथम भाषा समजली जाई. या शाळांमध्ये मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण मिळे. यावेळी राज्यात परीक्षा मंडळे नसल्यामुळे या शाळा परीक्षेसाठी मद्रास विद्यापीठास संलग्न केलेल्या होत्या. शासन नियुक्त सल्लागारांनी प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाच्या विस्तारासाठी केलेल्या सूचनांनुसार पुढे बऱ्याच शैक्षणिक सुधारणा झाल्या.

इ. स. १८७२ मध्ये हैद्राबाद शहर व अन्यत्र १६ शाळा होत्या व त्यातील एका शाळेत इंग्रजी शिकविले जाई. यावेळी सर्व जिल्ह्यांत एकंदर १२५ व्हर्नाक्युलर शाळा होत्या. इ. स. १८७८ मध्ये हैद्राबाद शहरातील अँग्लो-व्हर्नाक्युलर माध्यमिक शाळा बंद करण्यात आली व त्यातील मुले चादरघाट (Cadarghat) शाळेत पाठविण्यात आली. सन १८८० मध्ये ही शाळा द्वितीय दर्जाचे महाविद्यालय म्हणून मद्रास विद्यापीठाकडे वर्ग करण्यात आली व दुसऱ्याच वर्षी तिला प्रथम दर्जा देण्यात आला. पूर्वी उल्लेखिल्याप्रमाणे याच दशकात हैद्राबाद शहरात उच्च शिक्षणासाठीच्या दोन शाळा सुरू करण्यात आल्या. मदरसा-ई-अलिया या शाळेच्या अधिपत्याखाली एक खाजगी शाळाही उघडली गेली होती. सुरूवातीला ही शाळा सालारजंग यांचे पुत्र व नातेवाईक यांना शिक्षण देण्यासाठी सुरू करण्यात आली होती, पण नंतर तिचे उच्चवर्णियांना शिक्षण देणाऱ्या शाळेत रूपांतर करण्यात आले.[१३] त्यानंतर एका खाजगी एजन्सीने मदरसा-ई-अईज्जा ही शाळा उघडली. यात फी कमी असे व अनेक शिष्यवृत्त्या दिल्या जात.[१४]

औरंगाबाद येथे सन १८८९ मध्ये एक औद्योगिक शाळा स्थापन झाली होती. तर दुसरी १८९० मध्ये वरंगळला स्थापन झाली होती, जी नंतर हैद्राबादला स्थलांतरित केली गेली. सन १८९९ मध्ये हैद्राबाद येथे एक शासकीय मदतीची संस्कृत शाळाही होती. १९०५ मध्ये उपरोक्त शाळा काही अंशी शिक्षण विभागाच्या अखत्यारित देण्यात आल्या. पुढे शिक्षण सल्लागारांनी केलेल्या शिफारशींनुसार दुय्यम शिक्षण मंडळाची व तांत्रिक व औद्योगिक शिक्षण खात्याची स्थापना करण्यात आली. १९२४ साली नांदेड येथे उस्मानशाही मिलच्या प्रांगणात तांत्रिक विद्यालय स्थापन करण्यात आले. त्याचा उपयोग मिल कामगार व त्यांच्या पाल्यांना झाला. १९३७ मध्ये शहरात शासकीय तंत्रशाळा अस्तित्वात आली. तथापि त्यात शिक्षणाचे माध्यम उर्दू होते. माध्यमिक स्तरावर मातृभाषा हे अध्ययनाचे माध्यम मान्य होण्यास १९३७ साल उजाडले.

हैद्राबाद संस्थानात मुलींच्या शिक्षणाच्या सोयी नगण्य होत्या. सन १८८५ पूर्वी शालेय मुलांची संख्या ६.१ टक्के, तर मुलींची संख्या केवळ ०.५ टक्के होती. याबाबतीत होणारे प्रयत्नही फारसे उत्साहवर्धक नव्हते. सन १८८५ मध्ये शिक्षण विभागाच्या स्थापनेनंतर राज्यात राजधानीबाहेर मुलींसाठी

---

१२. **लातूर जिल्हा गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. २.

१३. **इम्पेरियल गॅझेटिअर ऑफ इंडिया,** पूर्वोक्त, पृ. ७४.

१४. **कित्ता**.

एक कोरान शाळा होती.[१५] व त्यात ३० मुलींची उपस्थिती होती. राजधानीत यावेळी इंग्रजी माध्यमाच्या तीन शाळा होत्या व त्यात २२४ मुली शिकत होत्या. याशिवाय चार इंग्रजी शाळा व चार व्हर्नाक्युलर प्राथमिक शाळा होत्या. त्यात मिळून अनुक्रमे ९९ व ३२३ मुली शिक्षण घेत होत्या. १८९१ मध्ये या शाळांची संख्या ७१ व १९०१ मध्ये ७७ एवढी झाली. सन १९०१ मध्ये या शाळांतील मुलींची संख्या ४,४६७ एवढी होती. यातील काही शाळा लोकल बोर्डांनी स्वतःकडे घेतल्या होत्या. मराठवाड्यात फक्त औरंगाबाद शहरातच 'शारदा मंदिर' ही मुलींसाठीची खाजगी शाळा होती.[१६] मराठवाड्यातील मुली फारशा शाळेत जातच नव्हत्या. त्यांना गोषातच रहावे व शिकावे लागत असे. इयत्ता ५ वी पासून उर्दू हा अनिवार्य विषय त्यांच्यावर लादण्यात येई, पण ७ वी पर्यंत मराठी माध्यमातून शिक्षण घेण्याची सोय होती. पुढे हैद्राबाद येथे सन १९२१ ते १९३१ या दशकात स्त्रियांसाठी माध्यमिक शाळा व महाविद्यालय स्थापन झाले. सन १९०३ मध्ये नांदेड जिल्ह्यात ६८ प्राथमिक व तीन माध्यमिक शाळा होत्या. त्यात मिळून १५५ मुली शिक्षण घेत होत्या.[१७] स्टेट काँग्रेसचे भगवानराव गांजवे मास्तर जिल्ह्यात महिला शिक्षण समितीचे काम पाहत. त्यांनी महिलांना कर्वे विद्यापीठाच्या परीक्षांना बसण्याची शासनाकडून परवानगी मिळविली व अनेक महिलांच्या उच्च शिक्षणाची सोय केली. एस. आर. देशपांडे यांनी गावोगाव फिरून एक हजाराहून जास्त मुलींना शिक्षणासाठी प्रवृत्त केले. त्यांनी महिलांसाठी ठिकठिकाणी शाळा उघडल्या. नांदेड शहरातही त्यांनी मुलींसाठी शाळा सुरू केली होती.

सर्व घटकातील स्त्रियांसाठी वेगळी शिक्षक प्रशिक्षण शाळा नव्हती. मात्र उच्चवर्णियांसाठी हैद्राबादला जनाना शाळा होती. त्यात ४१ मुली प्रशिक्षण घेत होत्या. या शाळेत युरोपियन व स्थानिक कर्मचारीवृंद असे. त्यात अरेबिक, इंग्रजी व पर्शियन शिकविले जाई. पुढे सन १९२१ ते १९३१ या दशकात हैद्राबाद शहर, वरंगळ, औरंगाबाद व गुलबर्गा येथे स्त्रियांसाठी चार प्रशिक्षण शाळा सुरू झाल्या. हैद्राबाद येथील मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था राज्यातील इतर उर्दू शाळांना प्रशिक्षित शिक्षिकां पुरवित असे. वरंगळ, औरंगाबाद व गुलबर्गा येथील शाळांमधून अनुक्रमे तेलगु, मराठी व कानडी शिक्षक पुरविले जात.

राजधानीत युरोपियन शिक्षण देणाऱ्या आठ शाखा होत्या. या शाळांना ब्रिटिश सरकारकडून अनुदान मिळत होते. त्यांचे व्यवस्थापन 'बेंगाल कोड फॅार युरोपियन स्कूल्स' (Bengal code for European Schools) खाली चालत असे. त्यातील तीन शाळांना हैद्राबाद राज्याकडून अतिरिक्त अनुदान मिळत असे. सन १९०१ मध्ये या शाळांमध्ये ६५० मुले शिकत होती.[१८]

हैद्राबाद राज्यात सर्व जाती-धर्माच्या विद्यार्थ्यांना शाळेत मुक्त प्रवेश असे. सन १९३५ मध्ये शासनाने अनुसूचित जाती व जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी खास शाळा सुरू करण्याची योजना आखली.

---

१५. **इम्पेरियल गॅझेटिअर ऑफ इंडिया, पूर्वोक्त,** पृ. ७६-७७.

१६. **मराठवाड्यातील प्राथमिक शिक्षणाचा अभ्यास,** पूर्वोक्त, पृ. २७.

१७. **इम्पेरियल गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. २२९-३०.

१८. **कित्ता**, पृ. ७७.

सन १९४१ च्या जनगणना अहवालानुसार राज्यात एकूण ७२ खास शासकीय शाळा व त्यातील विद्यार्थी-संख्या जवळपास तीन हजार होती. मुस्लिम शाळांमध्ये मुस्लिम शिक्षक, तर हिंदू शाळांमध्ये हिंदू शिक्षक नेमत. क्वचित ख्रिश्चन धर्मिय शिक्षकांचीही नियुक्ती केली जाई. विद्यार्थ्यांना पुस्तके, वह्या व इतर साहित्य मोफत पुरविले जाई. होतकरू विद्यार्थ्यांना शुल्कही माफ करण्यात येत असे.

निजामी राज्यात प्रौढ शिक्षण मोहीमही हाती घेण्यात आली होती. सुरूवातीस हैद्राबादमध्ये १० प्रौढ शिक्षण शाळा, गुलबर्गा येथे ८ शाळा व औरंगाबाद आणि नांदेड येथे मिळून २६ शाळा होत्या.[१९] लक्ष्मणराव वाळूंजकर यांच्या प्रयत्नामुळे नांदेड जिल्ह्यात या काळात अनेक प्रौढशिक्षण शाळा व साक्षरता केंद्रे उघडण्यात आली होती. त्या बहुतेक खाजगी संस्थांमार्फत चालविल्या जात. काही शाळांना शिक्षण विभागाकडून अनुदान मिळत असे. शासकीय प्रौढ शिक्षण शाळेत मोफत शिक्षण देत. त्यात १६ वर्षांखालील विद्यार्थ्यांना प्रवेश नव्हता. तथापि, या वयाखालील नोकरी करणाऱ्या मुलांना प्रौढ शिक्षणाची परवानगी होती.

१९०१ च्या जनगणना अहवालानुसार राज्यातील एकूण लोकसंख्येतील १,००० लोकांमागे २९.५५ लोक साक्षर होते. स्त्री-पुरूष निहाय हे प्रमाण ५४.७ व ३.४ असे होते. प्रती १,००० लोकांमधील १.३ लोक इंग्रजी जाणत होते. साक्षरतेत ख्रिश्चन लोकं आघाडीवर होते. त्याचे प्रमाण १,००० लोकसंख्येमागे ४४३ एवढे होते.[२०] सन १९०१ मध्ये नांदेड जिल्ह्यातील साक्षर लोकसंख्येचे प्रमाण १.२ टक्के (४.२% पुरूष, ०.०३% स्त्री) असे होते. यापूर्वी सन १८८१, १८९१, १९०१ व १९०३ या वर्षी अनुक्रमे ६६५, ९५१, २,३४६ व २,९०५ एवढी शिक्षण घेणारी लोकसंख्या होती. १९०१ मध्ये जिल्ह्यातील शिक्षणावर १६ हजार रुपये खर्च झालेले होते. त्यातील १०,३०० रुपये शासनाकडून व उर्वरित लोकल बोर्डाकडून मिळाले होते तर फी च्या रूपाने ८१० रुपये मिळाले होते. सन १९३० च्या सुमारास राज्यातील साक्षरतेचे प्रमाण तरीही अल्प म्हणजे ५% एवढे होते.[२१] त्यामुळे येथील जनता सामाजिकदृष्ट्या मागासलेली होती. आपल्या सरंजामी व्यवस्थेस पोषक अशा प्रकारची शिक्षण व्यवस्था निजामाने चालू ठेवली होती.

खालील विवरणपत्रात नांदेड जिल्ह्याची मागील काही वर्षांची प्रतिमैलावरील साक्षरता व इंग्रजी माध्यमातील साक्षरता याची आकडेवारी दिलेली आहे.[२२]

Maharashtra State Gazetteers

प्रतिमैलावरील साक्षरता (वय वर्षे १० व त्यावरील)

| | १८९१ | १९०१ | १९११ | १९२१ | १९३१ |
|---|---|---|---|---|---|
| पुरूष | ४४ | ५४ | ५४ | ४७ | ६६ |
| स्त्रिया | १ | - | १ | २ | ४ |

१९. **परभणी जिल्हा गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ५०६.

२०. **इम्पेरियल गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ७८.

२१. गोगटे, श्री. ब. (संपा.) **मराठवाड्यातील सूची,** स्वा. रा. तीर्थ संशोधन संस्था, औरंगाबाद, २००१, पृ. चार.

२२. **सेंसस ऑफ इंडिया,** १९३१, पूर्वोक्त, पृ. १८८-२००.

इंग्रजी माध्यमातील साक्षरता (प्रति १० हजार लोकसंख्येमागे)

| | ५ वर्षे व त्यापुढील | | | | २० वर्षे व त्यापुढील |
|---|---|---|---|---|---|
| | १९०१ | १९११ | १९२१ | १९३१ | १९३१ |
| पुरूष | २ | ९ | १४ | ४१ | ४९ |
| स्त्रिया | - | - | १ | १ | १ |

सन १९३१ मध्ये नांदेड जिल्ह्यात १९,२९७ लोक (पु.१८,२३६, स्त्री-१,०६१) होते. त्यात १,२९७ लोक (पु. १२६१, स्त्री-३६) इंग्रजी माध्यमातील तर ३,८५० लोक (पु. ३,५९७, स्त्री. २५३) उर्दू माध्यमातील साक्षर होते. तक्ता क्र. १ मध्ये नांदेड जिल्ह्यातील तत्कालीन तालुक्यांमधील १९३१ ची धर्मानुसार साक्षरता दर्शविली आहे.

सन १८८३ मध्ये संस्थानात १४८ प्राथमिक शाळा होत्या. त्यापैकी १३ शाळा राजधानीत होत्या. त्यात एकूण ७,७५७ मुले शिकत होती. हे प्रमाण संस्थानाच्या लोकसंख्येपैकी शाळेत जाणाऱ्या मुलांच्या प्रमाणात ०.५% होते. १८९१ मध्ये हे प्रमाण २.५% झाले. सन १९०१ मध्ये संस्थानातील प्राथमिक शाळांची संख्या ७५३ इतकी वाढली व त्यात ४१,८७६ मुले शिक्षण घेत होती. शाळेत जाणाऱ्या मुलांपैकी हे प्रमाण २.४% इतके होते. या शाळांसाठी नवीन शिक्षकांची भरती करण्यात आली. ज्या शिक्षकांकडे शैक्षणिक पात्रता नव्हती. त्यांना ती सामान्य शाळांतून प्राप्त करणे बंधनकारक करण्यात आले. निम्नस्तरीय प्राथमिक शिक्षकाला यावेळी संस्थानात महिना ७, ८ किंवा ९ रुपये वेतन मिळत असे.[२३] नांदेड जिल्ह्यात १९०३ मध्ये ६८ प्राथमिक व तीन माध्यमिक शाळा होत्या.

संस्थानात १९२१ मध्ये ३,८३५ प्राथमिक शाळा व त्यात १,८४,६२८ विद्यार्थी होते. हे प्रमाण १९३१ मध्ये ४,०४१ शाळा व २,४२,४२२ वाढले हे प्रमाण वाढण्याचे कारण म्हणजे निजाम सरकारने उदार दृष्टीकोनातून राज्यात केलेले साक्षरतेचे प्रयत्न हे होय. राज्यात याशिवाय अन्य ५२ शाळा व त्यात ४,४०१ मुले होती. राज्यात खाजगी प्राथमिक शाळाही खूप होत्या. पण त्या वेगाने स्थापन होत, त्याच वेगाने लोप पावत. १९३१ मध्ये राज्यात सर्व प्रकारच्या ५,३३२ शाळा व त्यात ३,२८,८५९ विद्यार्थी होते.[२४]

सन १९२२ पासून निजाम राज्यात प्राथमिक शिक्षण मोफत करण्यात आले होते. तथापि, प्रत्यक्षात ते लोकांपर्यंत न पोहोचल्याने राज्यातील साक्षरतेचे प्रमाण १९३१ मध्ये ५%, तर १९४१ मध्ये केवळ ९.३% होते.[२५] प्राथमिक स्तरावर मराठी हे माध्यम होते. तथापि, इयत्ता तिसरीपासून उर्दू भाषा शिकविली जाई. खाजगी शाळांमध्ये पाचवीपासून उर्दू शिकविले जात असे.[२६] इयत्ता

२३. **इम्पेरियल गॅझेटिअर,** पूर्वोक्त पृ. ७६-७७.

२४. **सेंसस ऑफ इंडिया, १९३१,** व्हॉ. XXIII, एच.ई.एच., दि निजाम डोमिनियन्स, (हैद्राबाद स्टेट) रिपोर्ट, पार्ट I, हैद्राबाद डेक्कन, १९३३, पृ.२०७-२०८.

२५. गोगटे, श्री.ब., पूर्वोक्त, पृ. चार.

२६. **मराठवाड्यातील प्राथमिक शिक्षणाचा अभ्यास :** १९८१-८२, प्रकल्प अहवाल, पूर्वोक्त, पृ. १६ ते २०.

Maharashtra State Gazetteers

पाचवीपासून मराठी माध्यमाची तरतूद नव्हती. परिणामी ५ वी पासूने पुढच्या परभाषेतील शिक्षणामुळे बरेच विद्यार्थी शाळा सोडीत. याचबरोबर ५ वी पासून अभ्यासक्रम तोलणार नाही या सबबीवर विद्यार्थ्यांना उर्दू माध्यमातील इ. ४ थी च्या वर्गात बसविले जाई.[२७] साहजिकच त्यांचे एक वर्ष वाया जात असे. त्यामुळे कित्येक पालकांनी मुलांना प्राथमिक शिक्षण मराठी ऐवजी उर्दूतून देण्यास सुरूवात केली. सरकार दरबारीही १९१८ पासून उर्दू हेच माध्यम निजामाने अधिकृत ठरविल्याने उर्दू शिकण्यावाचून गत्यंतर नव्हते. यामुळे इतर भाषांना शिक्षणामध्ये वाव राहिला नाही. या कारणामुळे खाजगी शाळांकडे नोकरदारांची मुले फारशी आकर्षित व्हावयाची नाहीत. सन १९३५ पासून प्राथमिक शाळांची संख्या वाढू लागली व हे शिक्षण मराठी माध्यमातून मिळविण्यासाठी लोकांची मागणी होऊ लागली. तथापि, सरकारने त्याकडे दुर्लक्ष केल्याने सन १९४८ पर्यंत सरकारी शाळांमध्ये मराठी माध्यम आले नाही. खाजगी शाळांमध्ये मराठी माध्यम असले तरी त्यातून परीक्षेची सोय नव्हती. निजाम सरकारने चालविलेल्या शाळांमधून मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण इंग्रजी व उर्दूतून मिळत असे.[२८] त्यामुळे मराठी माध्यमाच्या शाळांना फारशी लोकप्रियता लाभली नाही. त्या काळात वकिलीचा अभ्यासक्रमही इयत्ता ७ वी नंतर सुरू होत असे. तोही उर्दूतूनच. त्यामुळे वकील होऊ इच्छिणारे मराठवाड्यातील विद्यार्थी इयत्ता ७ वी नंतर हैद्राबादला जाऊन शिक्षण घेत.

नांदेड शहरातील काही दानशूर व्यापाऱ्यांनी इतवारा पेठेतील राजा लक्ष्मीचंद यांच्या धर्मशाळेत अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठी मराठी प्राथमिक शाळा सुरू केली होती. त्यात महार, चांभार व ढोर समाजाचे मिळून ५०-६० विद्यार्थी होते. या शाळेस `मदरसा-ए-अर्जल' असे नाव होते. पुढे निजाम सरकारकडून या शाळेस अनुदान मिळू लागले. सन १९३८ मध्ये हणमंतराव मोरे व गणपतराव वाघमारे यांनी घामोडिया फॅक्टरीच्या टीनशेडमध्ये अस्पृश्य व कामगारांच्या मुलांसाठी श्री मुळगेकर वकील यांच्या मदतीने खाजगी प्राथमिक शाळा सुरू केली. या शाळेतील संतराम कुकडे, शामलाल राठौर, हणमंतराव मोरे व गणपतराव मोरे यांनी अत्यल्प मानधनावर शिकविण्याचे काम केले. कल्याणजीभाई ठक्कर, भगवानराव गांजवे, शामराव बोधनकर, देवरे वकील यांनी शाळेला खूपच आर्थिक सहाय केले होते. ठक्कर बाप्पानी भेट दिल्यावर ही शाळा हरिजन सेवक संघाकडे हस्तांतरित करण्यात आली.

प्राथमिक शिक्षणाप्रमाणे दुय्यम शिक्षणाचीही स्थिती अशीच होती. इयत्ता ५ वी पासून ७ वी पर्यंत मराठी हा आवश्यक विषय, पण ८ वी मध्ये मात्र मराठी, गणित वगैरे विषय ऐच्छिक असत. त्यात जो विद्यार्थी गणित विषयक घेत नसे त्याला महाविद्यालयात शास्त्र विषय घेऊन वैद्यकीय किंवा अभियांत्रिकी शाखांचे शिक्षण घेणे अशक्य होई. यामुळे वैद्यकीय, अभियांत्रिकी किंवा शास्त्र विषयाचे पदवीधर होऊ इच्छिणारे विद्यार्थी इयत्ता आठवीपासूनच मराठी त्यागून ऐच्छिक अशा गणिताकडे वळत.

सन १९४८ पूर्वी मराठवाड्यात अगदी हाताच्या बोटावर मोजता येतील इतक्याच स्वयंसेवी संस्थांच्या खाजगी शाळा होत्या. बहुतेक सर्व शाळा निजाम सरकारतर्फे चालविल्या जात. तालुक्याच्या

---

२७. **परभणी गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ५०८.

२८. **मराठवाड्यातील प्राथमिक शिक्षणाचा अभ्यास,** पूर्वोक्त, पृ. २६-२७.

गावी आणि इतर महत्त्वाच्या ठिकाणी प्राथमिक शाळा असत. खेडोपाडी त्यांचा आजच्याप्रमाणे विस्तार झाला नव्हता. स्वातंत्र्य चळवळीच्या भीतीमुळे निजामाला किंवा त्याच्या अधिकाऱ्यांना लोकांनी खाजगी शाळा काढणे फारसे मान्य नसे. तरीही या काळात ज्या काही खाजगी शाळा होत्या, त्यांना सरकारची मान्यता होती, पण अनुदान फारसे नव्हते.

वरील शाळांप्रमाणेच अनौपचारिक शिक्षण देणाऱ्या काही संस्था मराठवाड्यात होत्या. त्यापैकी ' मकतब ' मधून उर्दू आणि पाठशाळांमधून संस्कृत व मराठी भाषा शिकविली जात असे. याशिवाय पूर्वी वर्णिल्याप्रमाणे खेडोपाडी तात्या-पंतोजी स्वरूपाच्या गावठी शाळा होत्या. गावातील लोकांच्या आश्रयाने एखादा शिक्षक शाळा चालवित असे. अशांकडे ४-५ मुले शिक्षणाकरिता असत. कधीकधी सधन लोक आपल्या मुलांच्या शिक्षणाच्या सोयीसाठी शिक्षक नेमीत व त्याचा लाभ इतर मुलांनाही करून देत. अशा प्रकारच्या शाळा मराठवाड्यात मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होत्या. त्यामुळे स्वातंत्र्यपूर्व काळात खेड्यातील विद्यार्थी अशा शाळांमध्ये १-२ वर्षे शिक्षण घेऊन शहरातील शाळेत जात. तथापि, निजाम सरकारने आपले सरकार प्राथमिक शिक्षणाची सोय करणार आहे असे जाहीर करून गावठी शाळा सन १९३० च्या सुमारास बंद केल्या.[२९] त्यामुळे या प्रकारच्या नव्या शाळा निघाल्या नाहीत व जुन्या बंद पडल्या. अशा तऱ्हेने खेड्यातील लोकांच्या शिक्षणाची दारे बंद झाली.

अशा खडतर स्थितीत काही शिक्षण संस्थांनी बहुमोल कामगिरी बजावली. महाराष्ट्रात ज्याप्रमाणे कै. विजापूरकरांनी राष्ट्रीय शिक्षणाचा पाया घातला, तसाच पाया या संस्थांनी मराठवाड्यात घातला. त्यापैकी ' विवेकवर्धिणी ' नामक शिक्षण संस्था ही एक होय. निजामी राजवटीत उर्दूला प्राधान्य असताना मराठी भाषेला राजकीय व सामाजिक स्थान प्राप्त होण्याच्या दृष्टिने केशवराव कोरटकर, वामनराव नाईक आणि वासुदेवराव हर्डीकर यांच्या प्रयत्नातून सन १९०८ मध्ये हैद्राबाद येथे ही संस्था स्थापन झाली होती. संस्थेचे कार्य वरील जबाबदार व्यक्तींनी हाती घेतल्याने हैद्राबादच्या सधन व मान्यवर महाराष्ट्रीयन व्यक्तींनी या संस्थेस भरपूर वित्तसहाय्य केले. वासुदेव हर्डीकर यांनी प्राथमिक शिक्षणाचे वर्ग सुरु केले व २-४ वर्षांच्या प्रयत्नाने या शिक्षण संस्थेने मराठी सातवीपर्यंत शिक्षण देणाऱ्या चार शाळा हैद्राबाद येथे सुरू केल्या. मराठवाड्यातील नांदेडसहित अन्य जिल्ह्यांनाही या शाळांचा लाभ होऊ शकला. पुढे मराठी माध्यमातून शिक्षणाची होत असलेली प्रगती व मराठी वजनदार पुढाऱ्यांचे दडपण यामुळे लवकरच निजामाला फायनल परीक्षा मंडळ स्थापन करणे भाग पडले. अशा तऱ्हेने हैद्राबाद येथे मराठी भाषेच्या शिक्षणाला स्थैर्य प्राप्त झाल्यानंतर विवेकवर्धिणीनंतर मराठवाड्यातील अन्य जिल्ह्यांत वेगवेगळ्या शाळा उघडल्या. याच संस्थेतून र. मु. जोशी, वाघमारे, हणमंतराव वैष्णव, धुंडीराज बहादूर, स्वामी रामानंद तीर्थ, गाढे, न. शं. पोहनेरकर वगैरे ख्यातनाम मंडळींनी शिक्षण घेऊन पुढे त्या संस्थेत शिक्षक म्हणूनही काम केले.

या संस्थेसारखीच ' सरस्वती भुवन ' ही मातृभाषेतून शिक्षण देण्याचे उद्दिष्ट समोर ठेवून सन १९१५ मध्ये स्थापन झालेली मराठवाड्यातील सर्वात जुनी शिक्षण संस्था होती. १९७१ साली उस्मानिया विद्यापीठाची स्थापना व उर्दू भाषेचे वर्चस्व यामुळे संस्थेस पुढे काही उर्दू माध्यमाचे वर्गही चालवावे लागले. तथापि, मराठी माध्यमासाठी पाठपुरावा चालूच ठेवला. याच संस्थेच्या शारदामंदिर शाळेत मात्र

२९. **मराठवाड्यातील प्राथमिक शिक्षणाचा अभ्यास,** पूर्वोक्त, पृ. २६.

संस्थेने उर्दूचा प्रवेश होऊ दिला नाही. सन १९४२ पर्यंत फक्त जिल्ह्याच्या ठिकाणीच मॅट्रिकचे वर्ग होते व परीक्षा देण्यासाठी हैद्राबाद किंवा औरंगाबादला जावे लागे. निजामी राजवटीच्या अस्तानंतर सन १९४८ मध्ये स्वातंत्र्यानंतर मात्र सर्व शाळांमध्ये मराठी माध्यम स्वीकारण्यात आले.[३०]

सन १९०१ मध्ये हैद्राबाद राज्यात १६ माध्यमिक शाळा होत्या. मुलांच्या सर्व शाळांमध्ये इंग्रजी ही प्रथम भाषा होती. तिचा अभ्यासक्रम मद्रास मॅट्रिक्युलेशनच्या अभ्यासक्रमावर आधारित होता. या वर्षी शाळेत जाणाऱ्या एकूण मुलांचे प्रमाण लोकसंख्येच्या १.५% होते.[३१] राज्यात माध्यमिक शाळा सरकारी मालकीच्या होत्या. तथापि, काही शाळा सर्फेखास व लोकल फंडांच्या म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मालकीच्या होत्या. काही विनाअनुदानित खाजगी शाळाही होत्या. १९२१ मध्ये राज्यातील अशा सर्व माध्यमिक शाळांची संख्या १७३ व विद्यार्थी संख्या ५१,५८१ इतकी होती. १९३१ मध्ये ही संख्या १२४ शाळा व २८,९२३ विद्यार्थी इतकी कमी झाली होती कारण जाचक अटींमुळे खाजगी शाळा बंद करणे भाग पडले होते.[३२] सन १९३७ मध्ये माध्यमिक स्तरावर मातृभाषा हे अध्ययनाचे माध्यम निजाम सरकारने मान्य केले.

सन १९११ ते १९२० या दशकात नांदेड जिल्ह्यातच नव्हते तर, संस्थानातील कोणत्याही जिल्ह्याच्या ठिकाणी महाविद्यालयीन शिक्षणाची सोय नव्हती. हैद्राबाद शहरात तीन कला महाविद्यालये होती. त्यापैकी निजाम महाविद्यालय व औरंगाबाद महाविद्यालय ही मद्रास विद्यापीठाशी संलग्न केलेली होती, तर दार-उल्-उलूम किंवा ओरिएण्टल महाविद्यालयाचे विद्यार्थी पंजाब ओरिएण्टल टायटल परीक्षेसाठी पाठविले जात असत. ही तीनही महाविद्यालये शासन चलित संस्था होत्या. हैद्राबाद शहरातील या महाविद्यालयांमध्ये संस्थानातील विविध जिल्ह्यांतील विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी येत. तेथे वसतिगृहाचीही सोय होती.

खालील तक्त्यात संस्थानातील सर्व जिल्ह्यातील तत्कालीन शिक्षणाच्या सोयींची आकडेवारी दिलेली आहे. त्यात नांदेड जिल्ह्याचाही समावेश आहे.[३३]

| प्रकार | १८८१ | १८९१ | १९०१ | १९०३ |
|---|---|---|---|---|
| मॅट्रिक्युलेशन | ३ | ४२ | १८ | १३ |
| उच्च माध्यमिक (कला व शास्त्र) | २ | ३ | ४ | ३ |
| पदवी | १ | १ | २० | ८ |
| उच्च व विशेष पदवी | — | १४ | ४७ | — |

३०. **परभणी जिल्हा गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ५०८-५०९.

३१. **इम्पेरियल गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ७६-७७.

३२. **सेंसस ऑफ इंडिया, १९३१,** व्हॉ. XXIII,एच.ई.एच. दि निजाम डोमिनियन्स, (हैद्राबाद स्टेट) रिपोर्ट, पार्ट I, हैद्राबाद, डेक्कन, १९३३, पृ. २०७.

३३. कित्ता, पृ. ७६.

Maharashtra State Gazetteers

इ.स. १९२१ च्या अखेरीस हैद्राबादमध्ये निजाम महाविद्यालय आणि उस्मानिया विद्यापीठ महाविद्यालय ही दोन महाविद्यालये होती. त्यात ३८३ विद्यार्थी शिक्षण घेत होते. नांदेड जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना याचा लाभ होत असे. पुढे १९२७ मध्ये औरंगाबाद, वरंगळ आणि गुलबर्गा येथे इंटरमिजिएट कॉलेजेस उघडण्यात आली. त्यांचे माध्यम उर्दू असे. यापैकी औरंगाबादच्या कॉलेजमध्ये मराठी हा एक विषय म्हणून शिकविला जाई. उस्मानिया विद्यापीठ, निजाम कॉलेज व सिटी कॉलेज येथेही मराठी शिकण्याची सोय होती.[३४] १९३१ मध्ये राज्यात ५ कला महाविद्यालये, एक अभियांत्रिकी, एक वैद्यकीय व एक शिक्षक प्रशिक्षण महाविद्यालय होते. या सर्वांमध्ये ८१८ विद्यार्थी शिक्षण घेत होते.[३५]

हैद्राबाद राज्य किंवा संस्थानाच्या शैक्षणिक इतिहासातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा म्हणजे तत्कालिन निजाम सर मीर उस्मान अलीखान बहादूर याने इ.स.१९१७ मध्ये केलेली उस्मानिया विद्यापीठाची स्थापना हा होय.[३६] हीच संस्थानामधील पहिली मध्यवर्ती शिक्षण संस्था होती. यात केवळ उर्दू माध्यमातून अध्यापन केले जात असे. विद्यापीठाच्या विविध विद्याशाखांमध्ये धर्मज्ञान शाखेचाही समावेश होता. इतर साहित्याचे उर्दू मधून भाषांतर करून ते विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्याची मोलाची कामगिरी या विद्यापीठाने केली. विद्यापीठात सर्वप्रथम भाषांतर केंद्राची स्थापना झाली. त्यासाठी सुरुवातीला आठ भाषांतरकार सुप्रसिद्ध उर्दू लेखक मौलवी अब्दूल हक साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली काम करीत होते. या विद्यापीठाच्या स्थापनेमुळे संस्थानात उच्च शिक्षणाची सोय झाली. निजामी राज्यात शालेय शिक्षणाबरोबरच इतर खास विषयांचे शिक्षण देणाऱ्या संस्थाही उदयास आल्या होत्या. सार्वजनिक बांधकाम खात्यासाठी मनुष्यबळ तयार करण्याच्या हेतूने वरंगळ येथे एक लहान अभियांत्रिकी शाळा स्थापन झाली होती.[३७] त्याशिवाय येथे एक वैद्यकीय शाळाही होती. या दोन्ही शाळा सन १८९६ मध्ये हैद्राबादला स्थलांतरित करण्यात आल्या. वैद्यकीय शाळेचा शिक्षण खात्याशी संबंध नव्हता. तथापि, या शाळेस शासनाची मदत मिळत होती. सन १८९९ मध्ये दोन शिक्षकी विधी शाळा हैद्राबादला स्थापन करण्यात आल्या होत्या. याशिवाय राजधानीत एक सर्वसाधारण शाळा होती. प्राथमिक शिक्षकांना या शाळेतून उत्तीर्ण व्हावे लागे. मुलींसाठी वेस्लियन मिशनने सिकंदराबाद येथे शाळा स्थापन केली होती.[३८] त्याच मिशनमधून शिक्षकांची या शाळेत भरती केली जाई. या सर्व शाळा उत्तम होत्या.

१९३० ते १९४० हे दशक नांदेडच्या शैक्षणिक वाटचालीत महत्त्वाचे ठरले. कारण याच दशकात नांदेडमध्ये प्रतिभा निकेतन आणि शारदाभवन सारख्या शिक्षण संस्था स्थापन झाल्या व मराठी माध्यमातून शिक्षण देण्याचा प्रयत्न सुरू झाला. वजिराबाद, गाडीपुरा, लोहारगल्ली, मळा याठिकाणी मराठी बरोबरच गुजराती, हिंदी व तेलगु माध्यमाच्या शाळा सुरू झाल्या.

---

३४. **परभणी डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ५०६.

३५. **सेंसस ऑफ इंडिया, १९३१,** व्हॉ. XXIII, पार्ट I, रिपोर्ट, पूर्वोक्त, १९३३, पृ. २०७.

३६. कित्ता.

३७. **इम्पेरियल गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ७७.

३८. कित्ता, पृ. ७७.

थोडक्यात, स्वातंत्र्यपूर्व काळात संस्थानातील समाजधुरीण शिक्षणतज्ञ व विचारवंत यांनी निजाम सरकारशी झगडून शिक्षण क्षेत्रातील विकासाची पायाभरणी केली. त्याचाच परिणाम म्हणून स्वातंत्र्योत्तर काळात संपूर्ण मराठवाडा शिक्षण क्षेत्रात अग्रेसर राहिला. त्यातूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, स्वा. रा. तीर्थ विद्यापीठ अशा ज्ञानसंस्था उदयास आल्या.

**स्वातंत्र्योत्तर काळ :** सन १९४८ मध्ये हैद्राबाद राज्याचे भारतीय संघराज्यात व त्यानंतर सन १९५६ मध्ये द्विभाषिक मुंबई राज्यात विलिनीकरण झाल्यानंतर राज्यातील शैक्षणिक पद्धतीत आमुलाग्र बदल करण्यात आले. मुख्यतः मातृभाषेतून शिक्षणाचे काम सुरू झाले. शिक्षणसंस्था स्थापण्यासाठी स्वयंसेवी संस्थांना उत्तेजन देण्यात आले.

मराठवाड्यातील जिल्हे द्विभाषिक मुंबई राज्यात समाविष्ट झाल्यानंतर दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचा आराखडा तयार करण्यात आला. त्यानुसार मराठवाड्यातील त्यावेळच्या प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाचा आकृतिबंध पुढीलप्रमाणे होता. (१) कनिष्ठ प्राथमिक वर्ग- ५ वर्षे (पूर्व प्राथमिक आणि १ ली ते ४ थी), (२) वरिष्ठ प्राथमिक वर्ग-३ वर्षे (५ वी ते ७ वी) (३) माध्यमिक वर्ग-३ वर्षे (८ वी ते १० वी). या आकृतिबंधामुळे मराठवाड्यातील विद्यार्थ्याला शालांत परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी प्राथमिक शाळेची सात वर्षे आणि माध्यमिक शाळेची तीन वर्षे अशी दहा वर्षे खर्ची घालावी लागत असत. तर पदवीपूर्व १ वर्ष व पदवीसाठी तीन वर्ष लागत अशा प्रकारे पदवी प्राप्तीसाठी विद्यार्थ्याला एकूण १४ वर्षे लागत असत.

तत्कालीन मुंबई सरकारने मुंबई राज्यातील सर्व विभागांमध्ये शिक्षणाचा समन्वय कशा तऱ्हेने करावा यासाठी सन १९५८ मध्ये एक इंटिग्रेशन समिती नेमली होती. यावर्षी मराठवाड्यात ५६.६% जनतेसाठी शिक्षणाची अजिबात सोय नव्हती, त्यांची मराठवाड्यातील टक्केवारी २४.८४ इतकी होती.[३९] या समितीने बालवर्ष काढून टाकावे असे सुचविले होते. सन १९५८ पूर्वी मराठवाड्यात वरिष्ठ प्राथमिक वर्गात म्हणजे इयत्ता ५ वी ते ७ वी मध्ये इंग्रजी हा आवश्यक विषय म्हणून शिकविला जात असे.[४०] इ.स. १९४८ मध्ये महाराष्ट्राच्या उर्वरित भागातही खेर मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयाप्रमाणे इयत्ता ५ वी तून इंग्रजी काढून टाकले होते. मराठवाड्यात मात्र यावेळी काही काळ इयत्ता ५ वी पासून इंग्रजी होते. अशा स्थितीत उपरोक्त इंटिग्रेशन समितीने नांदेडसहित मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यांतील नगरपरिषदांकडे प्राथमिक शिक्षणाचे काम सोपविण्याची शिफारस केली होती. प्रत्यक्षात १९८१ पर्यंत त्यावर काहीही कार्यवाही झालेली नव्हती, व अगदी अल्प नगरपरिषदांनी स्वेच्छेने ही कामगिरी स्वीकारली होती.

इ.स. १९४८ मध्ये महाराष्ट्रात लोकनियुक्त सरकार स्थापन झाल्यानंतर मराठवाड्यात मोठ्या प्रमाणावर खाजगी शाळा सुरू झाल्या. कालांतराने त्या जिल्हापरिषदांकडे हस्तांतरित करण्यात आल्या. त्यानंतर अनुदानाच्या बाबतीत उर्वरित महाराष्ट्राचे नियम या शाळांना लागू करण्यात आले व मातृभाषेतून शिक्षण उपलब्ध करून देण्यात आले.

---

३९. **मराठवाड्यातील प्राथमिक शिक्षणाचा अभ्यास,** पुर्वोक्त, पृ. २८.

४०. कित्ता पृ. ३०.

## साक्षरता

निजाम राजवटीत मराठवाड्यात निरक्षरतेचे प्रमाण बरेच मोठे होते. बऱ्याच काळापर्यंत हा विभाग सर्वच दृष्टिने दुर्लक्षित राहिल्याने या विभागाचा विकास झाला नव्हता. परंतु राज्य पुनर्रचनेनंतर शासनाने शिक्षणाकडे विशेष लक्ष पुरविले. सन १९११ मध्ये नांदेड जिल्ह्यात प्रति चौरस अंतरात २१ लोक साक्षर होते. १९२१ व १९३१ मध्ये हे प्रमाण ३१ पुरुष व ३२ स्त्रिया असे होते. यावर्षी जिल्ह्यात शिक्षणप्राप्त १२४ पुरुष व ३ स्त्रिया, कला व विज्ञान पदवीधरांची संख्या १०० पुरुष व ९ स्त्रिया, याच शाखांतील पदव्युत्तरांची संख्या केवळ ७ होती. अभियांत्रिकी पदवीधरांमध्ये २७ पुरुष, तर वैद्यकीय शिक्षण घेतलेले केवळ ३६ पुरुष व २ स्त्रिया होत्या. यावर्षी अभियांत्रिकी, विधी, शेतकी किंवा अध्यापन पदवी घेतलेली आणि कला किंवा विज्ञानातील पदव्युत्तर शिक्षण घेतलेली एकही स्त्री नव्हती. १९९१, १९२१ व १९३१ या तीन वर्षांतील नोंदीप्रमाणे मराठवाडा विभागात प्रतिमैल अनुक्रमे २, ४ व ८ स्त्रिया साक्षर होत्या. नांदेड जिल्ह्यात हे प्रमाण अनुक्रमे ४, २ व १ असे होते.[४१] हैद्राबाद राज्यात १९३१ च्या प्रमाणात १९४१ मध्ये साक्षरतेचे प्रमाण ११३ टक्क्यांने वाढले.[४२] पण नांदेड जिल्ह्याचे साक्षरतेचे प्रमाण १९४१ मध्ये ६.१५ टक्के, तर १९५१ मध्ये ७.८९ टक्के होते. म्हणजे १९४१-५१ या दशकात साक्षरता केवळ १.७४ टक्क्यांनी वाढली होती. खालील तक्त्यात नांदेड जिल्ह्यातील १९५१ मधील साक्षरता दर्शविली आहे.[४३]

| घटक | एकूण | पुरुष | स्त्री |
|---|---|---|---|
| साक्षर | ६५,८३३ | ५७,७४७ | ८,०८६ |
| माध्यमिक शाळा | ३,९५८ | ३,६११ | ३४७ |
| मॅट्रिक किंवा एस.सी.सी. | १,३०५ | १,२४१ | ६४ |
| आर्ट किंवा सायन्स शिकणारे (Intermediate) | १२७ | १२४ | ३ |
| आर्ट किंवा सायन्स पदवीधर | १०९ | १०० | ९ |
| एकूण | ७२,२०५ | ६३,६५२ | ८,५५३ |
| आर्ट व सायन्सचे पदव्युत्तर पदवीधारक | ७ | ७ | — |
| शिक्षकी | १८२ | १६५ | १७ |
| अभियांत्रिकी | २७ | २७ | — |
| शेतकी | ६ | ६ | — |
| पशुवैद्यकीय | ३ | ३ | — |
| व्यापार | १५ | १५ | — |
| विधी | १४४ | १४४ | — |
| वैद्यकीय | ३८ | ३६ | २ |
| इतर | ४५१ | ४२६ | २५ |

४१. **सेंसस ऑफ इंडिया, १९३१,** व्हॉ. XXIII, पार्ट I, पूर्वोक्त, १९३३, पृ. १९९.

४२. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ५१७.

४३. **डिस्ट्रिक्ट सेन्सस हॅण्डबुक,** नांदेड, १९५१ व **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९७१, पृ. ५१७.

सन १९५१ ते १९६० या १० वर्षांच्या काळात प्राथमिक व माध्यमिक शिक्षण संस्थांच्या संख्येत जलद गतीने वाढ झाली. तथापि, नांदेड जिल्ह्यातील साक्षरतेचे प्रमाण राज्याच्या सरासरीपेक्षा खूप कमी होते. १९०१ ते १९८१ या आठ दशकांतील साक्षरतेची वाढ खालील कोष्टकात दिलेली आहे [४४].—

| वर्ष | एकूण टक्केवारी | पुरूष | स्त्री |
|---|---|---|---|
| १९०१ | २.१८ | ४.३५ | ०.०४ |
| १९११ | २.०९ | ७.०७ | ०.११ |
| १९२१ | १.८६ | ६.५२ | ०.१८ |
| १९३१ | २.६७ | ४.९७ | ०.३० |
| १९४१ | ६.१५ | ९.८४ | २.३३ |
| १९५१ | ७.८९ | १३.६९ | १.९७ |
| १९६१ | १५.१४ | २४.८३ | ५.१६ |
| १९७१ | २२.७८ | ३४.६४ | १०.३६ |
| १९८१ | २९.७८ | ४३.३२ | १५.६७ |

या कोष्टकावरून स्पष्ट होते की, साक्षरतेचे जिल्ह्यातील प्रमाण १९५१ नंतर वाढीस लागले. १९५१ मध्ये १.९७% असणारी स्त्री-साक्षरता १९६१ मध्ये ५.१६% पर्यंत वाढली. त्यानंतरच्या दोन दशकातील साक्षरतेच्या टक्केवारीतील वाढ लक्षणीय आहे. पहिल्या दोन पंचवार्षिक योजनांच्या काळात शिक्षणाच्या सोयींमध्ये वाढ झाल्याने साक्षरतेच्या प्रमाणात वाढ झाली असावी. १९५३ मध्ये जिल्ह्यात सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची योजना लागू केली हेही वाढीमागील एक कारण असू शकेल.

सन १९५१ ते १९६१ या दशकात नांदेड शहराच्या आसपासच्या भागातील लोक सर्वात जास्त प्रमाणात साक्षर होते. त्यापलिकडे गेल्यास हे प्रमाण कमी होत जात असे. देगलूर शहरात नागरी लोकसंख्या अधिक असल्याने साक्षरता प्रमाणही जास्त होते. या दशकाच्या अखेरीस जिल्ह्यातील साक्षरतेची टक्केवारी नांदेड तालुक्यात सर्वात जास्त म्हणजे २३.३३% तर भोकर महाल मध्ये सर्वात कमी म्हणजे १२.१४% होती. ग्रामीण क्षेत्रात हदगाव तालुक्यात ती सर्वात जास्त म्हणजे १४.४०% व नागरी क्षेत्राच्या बाबतीत कंधार तालुक्यातील एकूण पुरूष व स्त्री साक्षरतेचे प्रमाण जास्त होते. [४५]

जिल्ह्याच्या तत्कालीन एकूण लोकसंख्येशी तुलना केल्यास अनुसूचित जातीचे लोक साक्षरतेच्या बाबतीत खूपच मागासलेले होते. विशेषतः स्त्रिया यात आघाडीवर होत्या. जिल्ह्यात मांग, महार आणि चांभार या अनु. जातींची संख्या मोठी असली तरी या जाती उपलब्ध शैक्षणिक सोयी व सवलतींचा आजच्यासारखा लाभ घेत नव्हत्या. [४६] या जातींची १९६१ मधील साक्षरता टक्केवारी खालीलप्रमाणे :—

| | साक्षरतेचे प्रमाण | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | ग्रामीण | | | नागरी | | |
| | पुरूष | स्त्री | एकूण | पुरूष | स्त्री | एकूण |
| जिल्हा सरासरी | २१.२० | ३.१२ | १२.२६ | ४५.६९ | १७.६८ | ३२.२६ |
| सर्व अनुसूचित जाती | ६.५५ | ०.२५ | ३.४१ | २५.८२ | ३.५८ | १४.८७ |

तक्ता क्र. २ मध्ये नांदेड जिल्ह्यातील १९६१ ची ग्रामीण व नागरी क्षेत्रातील साक्षरता दिलेली आहे.

४४. **डिस्ट्रिक्ट सेंसस हॅण्डबुक,** नांदेड, १९६१, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई, १९६६, पृ २३ व १९८१, पृ. १५ पूर्वोक्त,

४५. **डिस्ट्रिक्ट सेंसस हॅण्डबुक,** पूर्वोक्त, १९६१, पृ. २३.

४६. कित्ता, पृ. २०.

**साक्षर :** १९८१ च्या जनगणनेनुसार साक्षरतेच्या बाबतीत नांदेड जिल्ह्याचा राज्यात २६ वा क्रमांक, तर स्त्री साक्षरतेच्या बाबतीत ३० वा क्रमांक होता. या वर्षी जिल्ह्यातील एकूण साक्षरता प्रमाण २९.७८% पुरूष साक्षरता प्रमाण ४३.४% व स्त्री साक्षरता प्रमाण १५.५% होते, तर राज्याचा साक्षरता दर ४७.१८% होता.[४७] यावर्षी जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये नांदेडची साक्षरता सर्वोच्च म्हणजे ५३.८९% तर सर्वात निम्न साक्षरता तत्कालीन कुंडलवाडी तालुक्याची (२७.१५%) होती. १९०१ ते १९८१ या ८० वर्षांत जिल्ह्याची साक्षरता २.१८% वरून २९.७८% पर्यंत वाढली.[४८] याच वर्षी अनुसूचित जाती व जमातींचे साक्षरता प्रमाण अनुक्रमे २०.०% व २०.५% होते. यापैकी भोकर तालुक्यात साक्षरता प्रमाण सर्वात कमी म्हणजे २४.७३% होते. किनवट हा आदिवासी बहुल तालुका असून तो शैक्षणिक दृष्ट्याही मागासलेला आहे. १९८५-८६ या शैक्षणिक वर्षात ६ ते ११ वयोगटातील २,२४,१३७ मुलामुलींना शाळेत प्रवेश देण्यात आला होता. ही संख्या १९९० च्या अखेरीस २,८०,१६६ वर पोहोचली. १९८५-८६ यावर्षी ११ ते १४ वयोगटातील शालेय विद्यार्थ्यांची संख्या ७७,२९७ तर १९९० च्या अखेरीस १,४४,७६७ म्हणजे दुप्पटीने वाढली होती.[४९] सन १९९१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्याची साक्षरता ४८.१७ (६४.३८% पु., २०.९६% स्त्री.)[५०] होती. यावेळी राज्याच्या साक्षरतेचा दर चांगला म्हणजे ६४.८७ टक्के होता, पण राज्यातील साक्षरतेत नांदेड जिल्ह्याचा क्रमांक २७ वा होता. यावर्षी जिल्ह्याची एकूण नागरी साक्षरता ६८.०२% (पु. ७९.८८%, स्त्री. ५४.८९%), तर ग्रामीण साक्षरता ४२.४९% होती. यावर्षीच्या जनगणनेनुसार तत्कालीन १३ तालुक्यात वाघाला शहराची साक्षरता सर्वात जास्त म्हणजे ७३.७३% (पु.८५.६७%, स्त्री. ५९.९७%), तर सर्वात कमी म्हणजे ४३.०९% (पु.५७.७८%, स्त्री. २८.१४%) कुंडलवाडी शहराची होती.[५१] याचवर्षी अनुसूचित जातीचे साक्षरता प्रमाण ४०.५०% (पु.५६.९०%, स्त्री. २३.१०%), तर अनुसूचित जमातीचे ३६.०९% (पु.५२.०८%, स्त्री. १९.१३%) होते. अनुसूचित जातींमध्ये या वर्षी सर्वात जास्त म्हणजे ५०.९०% (पु.६६.७७%, स्त्री. ३४.४०%) साक्षरता किनवट तालुक्याची तर सर्वात कमी म्हणजे ३३.१३% (पु.४९.५१%, स्त्री. १५.९५%) साक्षरता भोकर तालुक्याची होती. अनुसूचित जमातींमध्ये सर्वात जास्त म्हणजे ५०.०३% (पु.६४.९२%, स्त्री. ३३.२७%) साक्षरता नांदेड तालुक्याची, तर सर्वात कमी म्हणजे ३१.९७% (पु.४९.०७%, स्त्री. १३.८३%) साक्षरता भोकर तालुक्याची होती.[५२] यावर्षी अनुसूचित जातीचे साक्षरता प्रमाण ४०.५३% (५६.९०% पु., २३.१०%

४७. **डिस्ट्रिक्ट सेंसस हॅण्डबुक,** सेंसस ऑफ इंडिया, १९८१, दि महाराष्ट्र सेंसस डिरेक्टोरेट, मुंबई, १९८६, पृ. १४.

४८. कित्ता, पृ. १५.

४९. **शिक्षणावर दृष्टिक्षेप,** १९८२-८३, वार्षिक अंक, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे, १९८५, पृ. ८, ९ आणि १९९४-९५, पृ. ७ ग. वि. अकोलकर, **माध्यमिक शिक्षण,** समाजप्रबोधन संस्था, पुणे, १९६५, पृ. १५१.

५०. **जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन,** नांदेड जिल्हा १९९८-९९ अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई, १९९९, पृ. १३८.

५१. **सेंसस ऑफ इंडिया,** डिस्ट्रिक्ट सेंसस हॅण्डबुक, नांदेड, १९९१, दि महाराष्ट्र सेंसस डायरेक्टोरेट, बॉम्बे, १९९५, पृ. ३२-३३.

५२. **सेंसस ऑफ इंडिया,** डिस्ट्रिक्ट सेंसस हॅण्डबुक, नांदेड, १९९१, दि महाराष्ट्र सेंसस डायरेक्टोरेट, बॉम्बे, १९९५, पृ. ३४-३५.

Maharashtra State Gazetteers

स्त्री.), तर अनुसूचित जमातीचे ३६.०९% (पु. ५२.०८%, स्त्री. १९.१३%) होते. सन २००१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्याची साक्षरता ६८.५२% (पु.८१.१४%, स्त्री. ५५.१२%) असून राज्याची साक्षरता ७७.३% आहे. याच वर्षीची नांदेडची ग्रामीण व नागरी साक्षरता अनुक्रमे ६५.२८ व ७८.६१% होती. यावरून १९७० नंतर शैक्षणिक विकासाकडे जिल्ह्याची वाटचाल सुरू झाल्याचे जाणवते. तरीही साक्षरेतेच्या बाबतीत ग्रामीण व नागरी भागांमध्ये बरीच तफावत दिसते. यावर्षी नागरी भागाची साक्षरता टक्केवारी ७८.६१, तर ग्रामीण भागाची ६२.२८% होती. त्यातही नागरी भागात सर्वांत जास्त टक्केवारी नांदेड शहराची (८१.८२) व सर्वात कमी बिलोली शहराची (६१.४५) होती. ग्रामीण भागातही सर्वात जास्त टक्केवारी नांदेड तहसीलची (६९.०३), तर सर्वात कमी धर्माबाद तहसीलची (५८.६२) होती. ग्रामीण भागात पुरुष साक्षरता सर्वात जास्त माहूर तालुक्याची (८५.३३%), तर सर्वांत कमी धर्माबाद तालुक्याची (५२.६२%) होती. महिलांच्या बाबतीत ग्रामीण भागात सर्वात जास्त टक्केवारी माहूर तालुक्याची (५९.१७%), तर धर्माबाद तालुक्याची ४३.५२% होती.[५३]

तक्ता क्र. ३ मध्ये जिल्ह्याची सन २००१ ची तालुकावार साक्षरता दर्शविलेली आहे. यावर्षी साक्षरांची संख्या १६.५० लाख होती. त्यात स्त्रियांची संख्या ६.४४ लाख व पुरुषांची संख्या १०.६ लाख होती. याचवर्षी ० ते ६ वर्षे वयोगटातील ४.५९ लाख मुले (पु.२३६, स्त्री. २.२३) साक्षर होती. यावर्षीची जिल्ह्याची साक्षरता टक्केवारी ६८.५२% इतकी होती.[५४] साक्षरतेचे हे प्रमाण ८१.१४% पुरूष व ५५.१२% स्त्रिया असे होते. यात ग्रामीण व नागरी साक्षरता अनुक्रमे ६५.२८% व ७८.६१% होती.

**स्त्री साक्षरता :** १९६१ साली मराठवाड्यातील स्त्रियांच्या साक्षरतेचे प्रमाण जवळजवळ नगण्यच होते. त्यातही नांदेड जिल्ह्याचे हे प्रमाण महाराष्ट्राच्या प्रमाणाच्या ३०.८% इतके होते. १९६२ च्या जिल्हा परिषदा व पंचायत समितीज् ॲक्ट अन्वये खेड्यापाड्यातील शिक्षण जिल्हा परिषदेच्या नियंत्रणाखाली आले. १९८४-८५ मध्ये प्राथमिक शिक्षण स्तरावर मराठवाड्यातील मुलींची संख्या महाराष्ट्रातील मुलींच्या संख्येच्या १२.५५% होती. माध्यमिक स्तरावर ती ९.४५%, तर ११ वी च्या स्तरावर केवळ ५.२३% होती.[५५] प्रथम पदवी, पदव्युत्तर पदवी आणि व्यावसायिक शिक्षणाच्या बाबतीत तर हे प्रमाण खूपच कमी होते. सन १९९१ व २००१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्याचे स्त्री साक्षरता प्रमाण अनुक्रमे २०.९६% व ५५.१०% होते. १९८५ नंतर शिक्षणविषयक मुबलक सेवा-सुविधा व स्त्री जगतात शिक्षणाचे आलेले भान याकडे जिल्ह्यातील ही वाढती साक्षरता अंगुलिनिर्देश करते.

---

५३. **जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन,** नांदेड जिल्हा, २००३-२००४, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई २००४, पृ. ३ आणि **शिक्षणावर दृष्टिक्षेप,** २०००-२००१, पृ. २१.

५४. गोगटे, श्री. ब. (संपा.), **मराठवाड्यावरील सूची,** स्वा. रा. तीर्थ, संशोधन संस्था, औरंगाबाद, २००१, पृ. सहा.

५५. गोगटे, श्री. ब. संकलित **प्राथमिक शाळांतील शिक्षकांचे उद्‌बोधन साहित्य,** स्वा. रा. तीर्थ संशोधन संस्था, औरंगाबाद, १९८९, पृ. ७३.

**प्रौढ साक्षरता**[५६] **:** नांदेड जिल्ह्यात " राष्ट्रीय प्रौढ शिक्षण कार्यक्रम " (राज्यपुरस्कृत) हा " ग्रामीण कार्यात्मक साक्षरता योजना " (केंद्रपुरस्कृत) या नावाने दि. २ ऑक्टोबर १९७८ मध्ये सुरू झाला. जाणीव जागृती कार्यात्मकता आणि साक्षरता ही या कार्यक्रमाची उद्दिष्ट्ये होती. सन १९८५-८६ मध्ये नांदेड जिल्ह्यात केंद्रपुरस्कृत ३००, राज्यपुरस्कृत २६० व स्वयंसेवी संस्थांची मिळून ६८० प्रौढ शिक्षण केंद्रे कार्यरत होती. त्यात एकूण २०,४०० प्रौढ दाखल झालेले होते. त्यात स्त्रियांची संख्या ९,६०० इतकी होती. या सर्व प्रौढांमध्ये ६,४०० प्रौढ अनुसूचित जातींचे तर ३,७०० प्रौढ अनुसूचित जमातींचे होते. सन १९९०-९१ मध्ये प्रौढ शिक्षण केंद्रांची संख्या ९६० होऊन त्यात २८,८०० प्रौढ (स्त्रिया-१५,६९०) दाखल झाले. या सर्व प्रौढांमध्ये अनुसूचित जातींचे ९,१२६ तर अनुसूचित जमातींचे १,४६७ प्रौढ होते.[५७] त्यानंतर संपूर्ण जिल्ह्याच्या साक्षरतेसाठी ' नांदेड जिल्हा संपूर्ण साक्षरता अभियाना ' ची सुरूवात दि. २६ जानेवारी १९९२ रोजी करण्यात आली. हे अभियान दि. ३१ मार्च १९९३ पर्यंत राबविण्यात आले. ते प्रभावीपणे राबविण्यासाठी जिल्ह्यातील आठ तालुक्यांतील १,५०७ गावे व १३ नगरपालिका अंतर्गत असणाऱ्या निरक्षरांच्या संख्येनुसार ग्रामीण भाग ६२ विभागांमध्ये विभागून सरासरी २५ ते ३० गावे एका विभागात घेतली व तेथील ८ ते १० हजार निरक्षरांना साक्षर करण्याची जबाबदारी त्या त्या विभागावर सोपविण्यात आली. नगरपालिका कार्यक्षेत्रातील निरक्षरांची विभागणी ३० विभागांमध्ये करून प्रत्येक विभागाकडे ५ हजार निरक्षरांना साक्षर करण्याची जबाबदारी निश्चित केली. साक्षरता अभियान सुसूत्र पद्धतीने चालविण्यासाठी तालुका, विभाग, गाव, वार्ड, तांडा या ठिकाणी साक्षरता अभियान समित्या स्थापन करण्यात आल्या. हे अभियान राबविण्याची सर्वस्वी जबाबदारी जिल्हा साक्षरता अभियान समितीने स्विकारली.

' संपूर्ण साक्षरता अभियान ' हा जनतेचा कार्यक्रम होण्यासाठी व या मोहिमेचा प्रसार व प्रचार करण्यासाठी पहिल्या टप्प्यात वरीलप्रमाणे समित्या स्थापन करून त्यांच्यामार्फत साक्षरता दिंडी, पदयात्रा, सायकल रॅली, ग्रामसभा, चर्चासत्र, महिला संम्मेलन, हळदीकुंकू कार्यक्रम आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले. शिक्षिका, बालवाडी ताई, अंगणवाडी ताई व आरोग्य सेविका यांच्यामार्फत स्त्रियांमध्ये वातावरण निर्मिती करण्यात आली. दुसऱ्या टप्प्यात ७५ कला जथ्थे तयार करून जिल्हाभर २,००० कार्यक्रम सादर करण्यात आले. याबरोबरच वातावरण निर्मितीसाठी अभियान समितीमार्फत पांढरी टोपी, क्रिकेट कॅप, साक्षरता ध्वज, टी-शर्ट, बॅनर्स, स्टीकर्स, पोस्टर्स, साक्षरता बॅचेस, साक्षरता गीतांच्या ध्वनिफिती होर्डिंग्ज यांचाही वापर करून ही मोहीम घराघरापर्यंत पोहोचविली. याकामी प्रसारमाध्यमांनीही मोलाची भूमिका बजावली.

दि. १ मे १९९२ पासून पथदर्शी कार्यक्रम म्हणून ग्रामीण भागातील ६२ विभागांतील प्रत्येक खेड्यात व शहरातील काही भागात २५० साक्षरता वर्ग सुरू करण्यात आले. साक्षरता अभियानाच्या कार्यकर्त्यांना टप्प्याटप्प्याने आठ दिवसांचे प्रशिक्षण देऊन तयार करण्यात आले. या कार्यक्रमात

---

५६. शिक्षणाधिकारी, निरंतर शिक्षण, जिल्हा परिषद, नांदेड कडील माहिती.

५७. **शिक्षणावर दृष्टिक्षेप :** १९८५-८६, पूर्वोक्त, पृ. ८० ते ८३ व १९९०-९१, पृ. ८४-८७.

दि. ३ जुलै १९९२ च्या एक दिवसाच्या ९ ते ६० वयोगटाच्या सर्वेक्षणात जिल्ह्यात ६.६२ लाख निरक्षर आढळून आले. त्यात २.४१ पुरूष व ४.२१ स्त्रिया होत्या.

शैक्षणिक साहित्य निर्मितीमध्ये ' नांदेड जिल्हा साक्षरता अभियान ' अग्रेसर आहे. याद्वारे अनेक शैक्षणिक पुस्तकांची निर्मिती करण्यात आली. साक्षरता अभियानाचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे मराठी, उर्दू, हिंदी व तेलगु या भाषेतून निरक्षरता निर्मूलनाचे काम करण्यात आले. उर्दू माध्यमाच्या स्वयंसेवकांसाठी हस्तपुस्तिका म्हणून 'तन्वीरे' व 'महकते नगमे' या दोन पुस्तिका तयार करण्यात आल्या.

दि. १५ ऑगस्ट १९९२ रोजी नांदेड जिल्ह्यात साक्षरतेच्या कार्यात आरंभ होऊन जिल्ह्यात १० हजार वर्ग सुरू करण्यात आले. व दि. १ मे १९९३ ला पहिल्या टप्प्यात १ लाख २५ हजार नवसाक्षर घोषित करून प्रथम निर्धारपूर्ती दिवस साजरा करण्यात आला. त्यानंतर टप्प्याटप्प्याने मे व जून १९९३ मध्ये ३ लाख ७५ हजार प्रौढांनी अंतर्गत मुल्यमापनामध्ये यश संपादन केले.

काही कालावधीनंतर जिल्ह्यातील साक्षरता कार्याचे मुल्यमापन कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्र राज्य प्रौढ शिक्षण संस्थने तयार केलेल्या प्रश्नपत्रिकांनुसार टाटा सामाजिक विज्ञान संस्था, मुंबई च्या प्रकल्प संचालकांच्या नेतृत्वाखाली ४५ व्यक्ती व तज्ञ मार्गदर्शकांच्या चमुने दि. १ ऑगस्ट १९९३ ते दि.१५ ऑगस्ट १९९३ या कालावधीत जिल्ह्यातील १२६ गावे व २७ वार्डांतील २५ हजार ९० प्रौढांचे मुल्यमापन केले. या संस्थेने यावर्षी नांदेड जिल्ह्यात ८३% साक्षरता साध्य झाल्याचा अहवाल शासनास सादर केला. जिल्ह्यात अंतर्गत मुल्यमापनात यशस्वी झालेल्या ३ लाख ७५ हजार नवसाक्षरांची नवीन सुधारित प्रश्नपत्रिकेनुसार सप्टेंबर १९९३ मध्ये पुन्हा एकदा परीक्षा घेण्यात आली व खऱ्या अर्थाने साक्षरोत्तर कार्यक्रम जोमाने सुरू झाला.

अभियानाच्या सुरुवातीस सहा लाख निरक्षरांना साक्षर करण्याचे उद्दिष्ट होते. परंतु ४५ वर्षे वयोगटातील लोकांच्या विविध अडचणींमुळे ४ लाख २५ हजार हे उद्दिष्ट ठेवण्यात आले. जानेवारी १९९४ पासून एप्रिल १९९४ पर्यंत ४ लाख २५ हजार ९४४ इतके नवसाक्षर तयार करून हे उद्दिष्ट साध्य करण्यात आले व द्वितीय निर्धारपूर्ती दिन साजरा करण्यात आला. या योजनेसाठी केंद्र सरकारकडून ०२.७५ कोटी रुपये अनुदान प्राप्त झाले होते.

**साक्षरोत्तर कार्यक्रम :** दि. १ मे १९९३ ते दि. ३१ जुलै १९९६ या कालावधीत हा कार्यक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमासाठी केंद्र शासनाकडून १.७० कोटी रु. चे अनुदान प्राप्त झाले होते. संपूर्ण साक्षरता अभियानातील लाभार्थींची साक्षरता वृद्धिंगत करण्यासाठी व साक्षरतेचे कौशल्य टिकविण्यासाठी या कार्यक्रमाची जिल्ह्यात सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमाचे उद्दिष्ट ४.२५ लाख इतके होते. ते पूर्ण करण्यात आले. या कार्यक्रमांतर्गत लाभार्थींना जिल्हा साक्षरता समितीने तयार केलेली वेगवेगळ्या विषयांवरील ५१ प्रकारची पुस्तके उपलब्ध करून देण्यात आली.

प्रौढ शिक्षण कार्यक्रमांतर्गत साक्षरता व नवसाक्षरांना इयत्ता चौथीच्या परीक्षेस बसविण्यात आले. त्यात सन १९८०-८१ पासून २००३-२००४ पर्यंत ३८,३१७ (पु.-२१,१२०, स्त्री. १७,१९७) प्रौढ परीक्षा

Maharashtra State Gazetteers

उत्तीर्ण झाले. साक्षरोत्तर कार्यक्रमांतर्गत नवसाक्षरांना वाचन साहित्य सतत मिळावे व साक्षरोत्तर कार्यक्रमावर देखरेख व प्रभावीपणे नियंत्रण व्हावे यासाठी जिल्ह्यात ८,५०० जन शिक्षण केंद्रे व ४२५ जन शिक्षण निलयम केंद्रे स्थापन करण्यात आली. साक्षरता विभागाची ८५ विभागांत विभागणी करून प्रत्येक विभागावर मंडल कार्यकर्त्यांची नियुक्ती करण्यात आली.

साक्षरता कार्यक्रमात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांचा जिल्हा, तालुका व विभाग पातळीवर सन्मान चिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

**निरंतर शिक्षण कार्यक्रम :** ज्या जिल्ह्यात साक्षरता अभियान व साक्षरोत्तर अभियान यशस्वीरित्या राबविण्यात आले, त्या जिल्ह्यात केंद्र शासनाच्या राष्ट्रीय साक्षरता मिशनच्या धोरणानुसार निरंतर शिक्षण योजना कार्यान्वित केली गेली. नांदेड जिल्ह्यातही ही योजना दि. १ सप्टेंबर २००४ रोजी कार्यान्वित करण्यात आली. नवसाक्षरांचे साक्षरता कौशल्य टिकवून ठेवण्यासाठी त्यांना मूलभूत साक्षरतेनंतर निरंतर शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून देणे, सांस्कृतिक व मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित करून त्यात समाजाचा सहभाग वाढविणे, नवसाक्षरांच्या राहणीमानाचा दर्जा सुधारणे, त्यांच्यात राष्ट्रीय एकात्मता, पर्यावरण रक्षण, स्त्री-पुरूष समानता, छोटे कुटूंब इत्यादीबाबत जाणीव-जागृती निर्माण करणे, नवसाक्षरांना ग्रंथालये व वाचनालयाच्या स्वरूपातील कायमस्वरूपी संधी उपलब्ध करून देणे. शासनाच्या नानाविध विकास योजनांची माहिती देणे व व्यावसायिक प्रशिक्षण देणे ही या कार्यक्रमाची उद्दिष्ट्ये आहेत.

प्रौढ साक्षरता कार्यक्रमातून नवसाक्षर झालेले प्रौढ, शाळा सोडलेली मुले-मुली, अनौपचारिकरित्या शिक्षण पूर्ण झालेले नवसाक्षर व आजीवन शिक्षणाची संधी घेण्यास उत्सूक असलेले इतर घटक हे या कार्यक्रमाचे लाभार्थी असतात.

या योजनेचा ४.२५ लाख लाभार्थींना लाभ मिळावा म्हणून केंद्र शासनाने सन २००० मध्ये या योजनेस १ कोटी ५ लाख २८ हजार रुपयांचा निधी मंजूर केला. त्यानुसार जिल्ह्यात ही योजना दि. १ सप्टेंबर २००४ रोजी कार्यान्वित करण्यात आली. यावेळी निरंतर शिक्षण केंद्र प्रेरकांच्या नियुक्त्या करण्यात आल्या. जिल्ह्यात ७५ प्रमुख निरंतर शिक्षण केंद्रे स्थापन करण्यात आली. ही केंद्रे दि. २८ मार्च २००५ पर्यंत कार्यान्वित होती. त्यानंतर निधीअभावी ती बंद करण्यात आली. या केंद्रांना एक वर्तमानपत्र, वेगवेगळ्या विषयांची पुस्तके, मासिके, पाक्षिके व अन्य सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.

या निरंतर केंद्रामार्फत २००४-२००५ मध्ये १,२५० नवसाक्षरांना इयत्ता चौथीच्या बोर्ड परीक्षेस बसवून उत्तीर्ण करण्यात आले. त्यात ५५० स्त्रियांचा समावेश होता. दि. ८ सप्टेंबर २००४ मध्ये राज्यस्तरीय आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनाचा भव्य कार्यक्रम नांदेड येथे घेण्यात आला. यानिमित्ताने जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये साक्षरता दिंडी, साक्षरता ज्योत वगैरे अनेक उपक्रम राबविण्यात आले. सद्यस्थितीत या जिल्ह्यात विनामोबदला तत्त्वावर निरंतर केंद्रे सुरू आहेत.

Maharashtra State Archives

एकंदरीत संपूर्ण साक्षरता अभियान, साक्षरोत्तर कार्यक्रम व निरंतर शिक्षण कार्यक्रम हे प्रौढ शिक्षणाचे विविध उपक्रम या जिल्ह्यात उद्दिष्टाप्रमाणे राबविले गेले. वरील योजना सुरू झाल्यापासून आतापर्यंत आठ तालुक्यांतील ५,३८,७९५ लाभार्थींनी (पु. २,४१,४७८, स्त्री. २,९७,३१७) त्यांचा लाभ घेतला ग्रामीण कार्यात्मक साक्षरता (केंद्रपुरस्कृत) योजनेखाली जिल्ह्यातील एकूण आठ तालुक्यांत ३०० केंद्रे स्थापन करण्यात आली. त्यात आतापर्यंत ९,००० लोकांनी (पु. ४,०००, स्त्री. ५,०००) भाग घेतला. वरील सर्व योजनांद्वारे अनुसूचित जातींतील १,७१,१९८ पुरुष व १,५२,११४ स्त्रिया आणि अनुसूचित जमातींतील ९३,६०० पुरुष व १,११,७४४ स्त्रिया साक्षर झाले.

सन १९८०-८१ या वर्षी जिल्ह्यात कंधार व बिलोली तालुक्यात स्वयंसेवी संस्थाद्वारे प्रत्येकी ३० प्रौढ शिक्षण केंद्रे चालविण्यात येत होती. त्याद्वारेही १,९०० प्रौढांना (पु. ७८०, स्त्री. १,१२०) साक्षर करण्यात आले. त्यानंतर ही केंद्रे बंद करण्यात आलेली आहेत.

सन २००५-०६ मध्ये निरंतर शिक्षण योजना गटात जिल्ह्यातील ७३७ गावांचा समावेश होता. त्यातून १५ ते ३५ वर्षे वयोगटातील दाखल झालेल्या एकूण ५७,७७१ प्रौढांमध्ये अनुसूचित जाती व जमातींच्या प्रौढांची संख्या २८,३५८ (स्त्रिया-१३,९६७) इतकी होती. या सर्व प्रौढांनी निरंतर शिक्षण कार्यक्रम यशस्वीपणे पूर्ण केला होता. यावर्षी एकूण ६८,८३७ प्रौढ (स्त्रिया-३३,५८९) इयत्ता चौथीच्या परीक्षेस बसून त्यापैकी ६२,८३१ (स्त्रिया-३०,३०७) प्रौढ ही परीक्षा उत्तीर्ण झाले. त्यानंतर जिल्हा पातळीवर घेण्यात आलेल्या इयत्ता सातवीच्या परीक्षेस निरंतर शिक्षण योजनेतील ४५६ प्रौढांना तर खाजगी संस्थांच्या केंद्रातून ३२ प्रौढांना बसविण्यात आले. त्यापैकी अनुक्रमे २२१ (स्त्रिया-१८४) व ३२ (स्त्रिया-१४) प्रौढ ही परीक्षा उत्तीर्ण झाले.

## पूर्व प्राथमिक व प्राथमिक शिक्षण

निजाम सरकारच्या शिक्षणविषयक धोरणानुसार नांदेड जिल्ह्यात सन १९२२ पासून मोफत प्राथमिक शिक्षणाची योजना लागू करण्यात आली. या धोरणानुसार १९२२ पासून वयाची चार वर्षे पूर्ण झाली की, बालवर्गात प्रवेश मिळत असे. प्राथमिक शाळा पाच वर्षांची होती. अक्षरओळख व आकडेओळख तसेच आरोग्याच्या सवयी, वयोगटानुसार खेळ आणि प्राथमिक स्वरूपाचे नीतीशास्त्र शिकविले जाई. या नीतिशास्त्राला उर्दूत अख्लाखियात म्हणत. क्रमाने अधिक गंभीर मजकूर पुढील भागात चौथी पर्यंत असे. हे संस्कारक्षम वय असल्याने या वयात उत्तम संस्कार कसे घडतील याची काळजी घेतली जाई. मुलांना अक्षरओळख करून देताना खरडे आणि बोरू आवश्यक असे. त्यामुळे मराठी किंवा उर्दू अक्षर स्वच्छ व सुंदर येई. जुन्या पिढीतील बहुसंख्यांचे अक्षरवळण सुंदर असण्याचे कारण हे होते. मोडीही शिकविली जाई. स्वातंत्र्योत्तर काळात हा बालवर्ग काढून टाकला गेला आणि ४+३+३ हा शालेयआकृतिबंध स्वीकारण्यात आला. हा आकृतिबंध ब्रिटीश शिक्षणपद्धतीनुसार होता. सक्तीचे प्राथमिक शिक्षण अधिनियम, १९५१ नुसार जिल्ह्यात १९५३ साली नांदेड तालुक्यातील २० खेड्यांत ६ ते ११ वर्षे वयोगटातील मुलांना व १९५५ मध्ये कंधार तालुक्यातील २० खेड्यांना ही योजना लागू करण्यात आली.[५८]

---

५८. **सेंसस ऑफ इंडिया,** डिस्ट्रिक्ट सेंसस हॅण्डबुक, नांदेड, १९६१, दि महाराष्ट्र सेंसस डायरेक्टोरेट, १९६६, बॉम्बे, पृ. २४.

**प्राथमिक शिक्षण :** सन १९५१ मध्ये जिल्ह्यात ४०३ प्राथमिक शाळा होत्या व त्यात २१,९१३ विद्यार्थी (मुले-१९,८९८, मुली-२,०१५) शिक्षण घेत होते. यावर्षी या विद्यार्थ्यांना ८८८ शिक्षक ज्ञानदान करण्याचे कर्तव्य बजावित होते. सन १९५५ पूर्वी मराठवाड्यात स्थानिक संस्थांचा कारभार त्यांवरील नियुक्त सदस्यांकडून पाहिला जात असे. तथापि यावर्षी हैद्राबाद जिल्हा मंडळ अधिनियम संमत होऊन स्थानिक संस्थांवरील नियुक्त सदस्य पद्धती बंद झाली व निवडणुकीच्या माध्यमाने निवडून आलेल्या सदस्यांकडे हा कारभार सुपूर्द केला गेला. त्यानुसार जिल्हा मंडळाच्या कारभारातील समित्यांमधील जिल्हा शिक्षण समितीकडे प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी सोपविण्यात आली होती. त्यानंतर सन १९५६ च्या राज्य पुनर्रचनेनंतर तात्कालिन मुंबई सरकारने मराठवाड्याच्या शैक्षणिक विकासासाठी १) प्राथमिक शिक्षण विकास योजना, २) माध्यमिक शिक्षण विकास योजना, ३) प्रशासकीय पुनर्रचनेच्या योजना व ४) संकीर्ण शैक्षणिक विकास योजना संमत केल्या. स्वयंसेवी संस्थांचे एकशिक्षकी शाळांमध्ये रूपांतर करणे, प्राथमिक शाळांना गरजेप्रमाणे शिक्षक पुरविणे, ३०० किंवा अधिक लोकवस्तीच्या गावी प्राथमिक शाळा उघडणे अशा प्रकारचे सरकारने प्रयत्न केले. राज्य पुनर्रचनेनंतर मराठवाड्यातील शैक्षणिक पद्धतीत बदल करून ती उर्वरित महाराष्ट्रसारखी करण्यात आली. आता उर्दू ऐवजी येथे मातृभाषेतून शिक्षण दिले जाते. वरील शैक्षणिक बदलामुळे मातृभाषेतून शिक्षण मिळण्यास उत्तेजन मिळाल्याने १९६१ मध्ये प्राथमिक शाळांची संख्या ९८३ इतकी व विद्यार्थी संख्याही त्याप्रमाणात ६०,६९५ (मुले-४५,४२६, मुली-१५,२६९) इतकी वाढली शाळांची संख्या वाढल्याने शिक्षकांची संख्याही १९५१ च्या तुलनेत दुप्पट म्हणजे १,७२५ इतकी झाली.[५९]

सन १९६२ च्या महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियमानुसार प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी आता जिल्हा परिषदेकडे सोपविण्यात आली आहे. याच अधिनियमानुसार पूर्वीचे डिस्ट्रिक्ट स्कूल बोर्ड, डिस्ट्रिक्ट बिल्डिंग कमिटी, डिस्ट्रिक्ट डेव्हलपमेंट बोर्डाची एज्युकेशन कमिटी व शिक्षणावरील इतर समित्या व उपसमित्या रद्द करून त्यांची मालमत्ता जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित करण्यात आली. सध्या ग्रामीण भागातील पूर्व प्राथमिक व प्राथमिक शाळा जिल्हा परिषदांकडे तर नागरी भागातील शाळा नगरपरिषदांकडे सुपूर्द करण्यात आलेल्या आहेत. याव्यतिरिक्त प्राथमिक शाळा चालविणाऱ्या खाजगी संस्थांना शासनाकडून अनुदान दिले जाते. पूर्व प्राथमिक व प्राथमिक शिक्षणासाठी जिल्हा परिषदेचा शिक्षणाधिकारी जबाबदार असतो. बहुतेक पूर्व प्राथमिक शाळा प्राथमिक शाळांना जोडण्यात आलेल्या आहेत.

सन १९६२-६३ मध्ये जिल्ह्यात मुले व मुलींच्या मिळून १,१४२ प्राथमिक शाळा होत्या. त्यापैकी १,११७ शाळा जिल्हा परिषदेकडून तर एक शाळा केंद्र शासनाकडून चालविली जाई. यावर्षी या शाळांमध्ये ७२,४७४ विद्यार्थी (५५,३४८ मुले, १७,१२६ मुली) जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये, २८१ विद्यार्थी (२२१ मुले, ६० मुली) केंद्र शासनाच्या शाळेत शिकत होती. यावर्षी या सर्व शाळांमध्ये १,१९६ शिक्षक होते. त्यापैकी केंद्र शासनाच्या शाळेतील व विनाअनुदानित खाजगी शाळेतील किमान एक पुरुष शिक्षक प्रशिक्षित होता. जिल्हा परिषदेच्या १,८६९ शिक्षकांपैकी (१,६८२ पु. १८७ स्त्री.) ४१६

५९. **सेंसस ऑफ इंडिया,** डिस्ट्रिक्ट सेंसस हॅण्डबुक, नांदेड, १९६१, दि महाराष्ट्र सेंसस डायरेक्टोरेट, १९६६, बॉम्बे, पृ. २२१.

Maharashtra State Gazetteers

पुरूष शिक्षक व ५१ स्त्री शिक्षिका प्रशिक्षित होत्या, त्या खाजगी अनुदानित शाळेतील १२७ शिक्षकांपैकी (१२० पु., ७ स्त्री.) ९ पुरूष व एक स्त्री शिक्षिका प्रशिक्षित होती. यावर्षी जिल्ह्यात उर्दू माध्यमाच्या ९ शाळा होत्या व त्यात २,६०८ मुले व १,४९७ मुली शिक्षण घेत होत्या.[६०]

प्राथमिक शाळांचे मुलोद्योग शाळांत रूपांतर करण्याच्या धोरणाची या जिल्ह्यात अंमलबजावणी केली गेली. या धोरणानुसार दुसऱ्या पंचवार्षिक योजना काळात ६९ प्राथमिक शाळांचे मुलोद्योग शाळांत रूपांतर करण्यात आले. दि. ३१ मार्च १९६२ रोजी जिल्ह्यात ८८ मूलोद्योग शाळा होत्या.[६१]

सन १९८२-८३ मध्ये जिल्ह्यात असलेल्या एकूण २९ स्वतंत्र पूर्व प्राथमिक शाळांमध्ये १,९०२ विद्यार्थी (७६६ मुली) शिकत होते. त्यांना ४५ शिक्षक शिकवित होते. तर संपूर्ण पूर्व प्राथमिक स्तरांवर ९,२०५ विद्यार्थी (३,६३५ मुली) शिक्षण घेत होते.[६२] सन १९९४-९५ मध्ये सर्व पूर्व प्राथमिक शाळांमध्ये एकूण १५,३७४ (मुली ७,४९७) विद्यार्थ्यांना ७९४ शिक्षिका शिकवित होत्या. याच वर्षी स्वातंत्र्य पूर्व प्राथमिक शाळांमध्ये २,५२७ विद्यार्थ्यांना (१,९८३ मुली) १५१ शिक्षिका शिकवित होत्या.[६३] सन १९९९-२००० या शैक्षणिक वर्षी नांदेड जिल्ह्यात ५०३ पूर्व प्राथमिक शाळा होत्या. त्यात १३,०२७ मुलांना (६,०४७ मुली) ५०३ शिक्षिका शिकवित होत्या. पुरूष शिक्षक नव्हते.[६४] सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षाच्या अखेरीस नांदेड जिल्ह्यातील पूर्व प्राथमिक शाळांची संख्या तेवढीच असली तरी १९९१ च्या तुलनेत विद्यार्थीसंख्या घसरून १२,५४३ (मुली-६,८७०) इतकी झाली होती. शिक्षिकांच्या संख्येतही बदल झाला नव्हता.[६५] सन २००५-०६ मध्ये मात्र पूर्व प्राथमिक शाळांची संख्या ३६४ व पर्यायाने विद्यार्थी संख्याही १०,७७० अशी कमी झाली.[६६]

जिल्ह्यात सन १९८० मध्ये ७१४ एकशिक्षकी शाळा होत्या. त्यातील ५५ शाळा खाजगी, तर ८ शाळा नगरपरिषदेच्या होत्या. उर्वरित जिल्हा परिषदेच्या होत्या.[६७] १९८१-८२ मध्ये त्यात बरीच घट होऊन त्या अनेकशिक्षकी करण्याकडे शासनाने लक्ष पुरविले. परिणामी १९८१-८२ मध्ये शहरी विभागात एकशिक्षकी ३, तर ग्रामीण विभागात ९ शाळा होत्या. त्या सर्व मराठी माध्यमाच्या होत्या.[६८]

---

६०. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ५१६.

६१. **सेंसस ऑफ इंडिया,** डिस्ट्रिक्ट सेंसस हॅण्डबुक, १९६१, नांदेड, पूर्वोक्त, पृ. २४.

६२. **शिक्षणावर दृष्टिक्षेप,** १९८२-८३, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे, १९८३, पृ. १२.

६३. कित्ता, १९९४-९५, प्रकाशन वर्ष, १९९६, पृ. ३३.

६४. कित्ता, १९९९-२०००, प्रकाशन वर्ष, २००२, पृ. ३३.

६५. **शिक्षणावर दृष्टिक्षेप,** २०००-२००१, शिक्षण संचालनालय (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे, २००५, पृ. ३५.

६६. **वार्षिक प्रशासन अहवाल,** २००५-२००६, जिल्हा परिषद, नांदेड, २००८, पृ. २०५.

६७. **मराठवाड्यातील प्राथमिक शिक्षणाचा अभ्यास,** १९८१-८२, पूर्वोक्त, पृ. ६४-७२.

६८. कित्ता, पृ. ६४-७२.

Maharashtra State Gazetteers

सन १९९०-९१ मध्ये जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या २१३ एक शिक्षकी प्राथमिक शाळा होत्या. किनवट व भोकर तालुका वगळता उर्वरित तालुक्यांमध्ये या शाळा होत्या.[६९] सातव्या पंचवार्षिक योजना काळात ६९४ एकशिक्षकी शाळांचे रूपांतर द्विशिक्षकी शाळांमध्ये करण्यात आले. त्यात केंद्र शासन पुरस्कृत खडू-फळा योजनेंतर्गत भोकर व किनवट तालुक्यातील २०७ एकशिक्षकी शाळांचा समावेश होता.[७०] त्यामुळे जिल्ह्यात आता एकशिक्षकी शाळा नाहीत.[७१] सन १९९१ च्या जनगणनेनुसार[७२] या वर्षी जिल्ह्यातील १,४८८ गावांत प्राथमिक शिक्षणाच्या सोयी उपलब्ध होत्या. जिल्ह्याच्या तत्कालिन १,५१५ रहिवाशी गावात हेच प्रमाण ९८.२२% एवढे होते. १,४८८ गावांत १,५५८ प्राथमिक शाळा होत्या. त्यातील २२ शाळा केवळ मुलींसाठीच होत्या. यावर्षी सरासरी प्रत्येक खेड्यात अशा शाळा होत्या. १९८१ च्या तुलनेत हे प्रमाण वाढले होते. उदा. नांदेड तालुक्यात १९८१ च्या तुलनेत ९५.६८% वरुन १९९१ मध्ये ९६.७९% पर्यंत, हदगावमध्ये ते ९६.३९% वरुन ९९.५४% पर्यंत तर किनवट तालुक्यात ते ९७.७१% वरुन ९९.५५% पर्यंत वाढले. तथापि, भोकर तालुक्यात हे प्रमाण १९८१ च्या तुलनेत ९९.२५% वरुन ९८.६५% पर्यंत, देगलूरमध्ये ९६.९७% वरुन ९६.०८% पर्यंत, मुखेड मध्ये १००% वरुन ९९.३२% पर्यंत व कंधार तालुक्यात ९८.६९% वरुन ९८.३७% पर्यंत घसरले होते. असे असले तरी जिल्ह्याची शैक्षणिक प्रगती नजरेआड करता येत नाही.

नांदेड-वाघाळा महानगरपालिकेतर्फे महानगरपालिका क्षेत्रात वजिराबाद येथे दि.१९ जून १९७२ रोजी पहिली प्राथमिक शाळा सुरू करण्यात आली. त्यानंतर सन २००१ पर्यंत गणेशनगर, विष्णूनगर, जंगमवाडी, लेबर कॉलनी, ब्रह्मपुरी, स्वातंत्र्य सैनिक कॉलनी, खयूमप्लॉट, किल्ला व आंबेडकर नगर येथे मराठी माध्यमाच्या एकूण ९ प्राथमिक शाळा सुरू करण्यात आल्या. पैकी विष्णूनगर, जंगमवाडी, लेबरकॉलनी, ब्रह्मपुरी, स्वातंत्र्यसैनिक कॉलनी व किल्ला येथील शाळांमध्ये उर्दू माध्यमातून शिकण्याचीही सोय आहे. सन २०००-२००१ व सन २००४-२००५ मध्ये वरील सर्व शाळांमध्ये अनुक्रमे २,६८१ व १,९११ विद्यार्थी शिक्षण घेत होते. त्यात अनुक्रमे ८२२ व ७१७ विद्यार्थी उर्दू माध्यमातून शिक्षण घेत होते.[७३]

सध्या जिल्ह्यातील काही गावांत एकपेक्षा जास्त प्राथमिक शाळा आहेत. काही मोठ्या खेड्यात पूर्व प्राथमिक शाळांना उच्च प्राथमिक (इयत्ता ५ वी ते ७ वी) वर्ग जोडलेले आहेत.

---

६९. **यथार्थदर्शी योजना, १९९२-९३ ते १९९६-१९९७,** जिल्हा नांदेड, जिल्हा नियोजन व विकास मंडळ, नांदेड, पृ. १५४.

७०. कित्ता, पृ. १५५.

७१. **वार्षिक प्रशासन अहवाल,** जिल्हा परिषद, नांदेड, २००५-०६, पृ. २०५.

७२. **डिस्ट्रिक्ट सेंसस हॅण्डबुक,** नांदेड, सेंसस ऑफ इंडिया, १९९१, महाराष्ट्र सेंसस डायरेक्टोरेट, १९९५, बॉम्बे, पृ. ४१, २२८.

७३. नांदेड-वाघाळा महानगरपालिकेकडून प्राप्त माहिती.

शतकाअंती सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षी नांदेड जिल्ह्यात २,३३८ प्राथमिक शाळा होत्या.[७४] त्यापैकी ४८ शाळा केवळ मुलींसाठी होत्या. या शाळांमध्ये एकूण ४,६३,५६४ विद्यार्थी (मुली-२,२६,६५२) शिकत होते, तर त्यांना एकूण ११,२३३ शिक्षक (शिक्षिका-२,८१०) शिकवित होते. या शिक्षकांपैकी यावर्षी १०,७१७ (शिक्षिका-२,६६४) एवढे शिक्षक प्रशिक्षित होते. वरील शाळांपैकी ५८ शाळा उर्दू माध्यमाच्या (एकूण विद्यार्थी ४३,६३१), आठ शाळा इंग्रजी माध्यमाच्या (विद्यार्थी-२,८८१), चार शाळा हिंदी माध्यमाच्या (विद्यार्थी-२,१६८), एक शाळा तेलगु माध्यमाची (विद्यार्थी ६०) व उर्वरित २,२६७ शाळा (विद्यार्थी-४,१४,८६४) मराठी माध्यमाच्या होत्या.[७५] यावर्षी या सर्व प्राथमिक शाळांमध्ये ३,८१,०३६ इतकी मागासवर्गीय मुले होती.[७६] याच शैक्षणिक वर्षात जिल्ह्यात किनवट येथे ९ शासकीय व एक खाजगी, हदगाव येथे दोन शासकीय व एक खाजगी आणि भोकर व कंधार येथे अनुक्रमे १ व २ आश्रमशाळा होत्या.[७७] त्यापैकी एक केवळ मुलींसाठी होती. या सर्व शाळांमध्ये १५,७४३ मुले (मुली-५,६३७) शिकत होती. तक्ता क्र. ४ मध्ये जिल्ह्यातील प्राथमिक शाळांची सन २०००-२००१ ची व्यवस्थापनानुसार वर्गवारी, विद्यार्थी व शिक्षकसंख्या दर्शविलेली आहे.

सन २००५-०६ या शैक्षणिक वर्षात जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या १,८९६ प्राथमिक शाळा व खाजगी संस्थांमार्फत चालविल्या जाणाऱ्या ४३७ इतर प्राथमिक शाळा होत्या. या सर्व शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या एकूण ४,५०,३०१ (मुले २,२९,५८७, मुली-२,२०,७१४) इतकी होती. त्यांना ज्ञानदान करणाऱ्या एकूण ८,२०८ शिक्षकांपैकी (पु.६,६७०, म.१,५३८) ८,१७१ शिक्षक प्रशिक्षित (पु.६,६३५, म.१,५३६) होते.[७८]

सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाची तरतूद हा भारताच्या राष्ट्रीय शिक्षण पद्धतीतील एक अविभाज्य घटक मानण्यात आलेला आहे. याबाबतीतील पहिले निवेदन दादाभाई नौरोजी यांनी १८८२ साली केले व ना. गोपाळकृष्ण गोखले यांनी या मागणीचा १९११-१२ मध्ये पुरस्कार केला. १९१९ मध्ये जेव्हा द्विदल राज्यपद्धती अंमलात आली व शिक्षण खाते लोकप्रतिनिधींकडे देण्यात आले तेव्हा त्यांनी सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचे मर्यादित स्वरूपाचे प्रांतिक कायदे केले व प्राथमिक शिक्षणाच्या सोयींमध्ये बरीच वाढ केली. इ.स.१९५१ च्या सक्तीच्या शिक्षणविषयक कायद्यानुसार ६ ते ११ वर्षे वयोगटातील मुला-मुलींना प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले गेले.[७९] पंचवार्षिक योजनांमध्ये शिक्षणविषयक सुधारणेला प्राधान्य दिले गेले. त्यानुसार समाजशिक्षण व ग्रामशिक्षणाद्वारे शैक्षणिक प्रगतीस हातभार लागला.

---

७४. **शिक्षणावर दृष्टिक्षेप : २०००-२००१,** पूर्वोक्त, पृ. ३६-३७.

७५. **शिक्षणावर दृष्टिक्षेप : २०००-२००१,** शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे, २००५, पृ. ५६-६३.

७६. कित्ता, पृ. १२२-१२३.

७७. **यथार्थदर्शी योजना : १९९२-९३ ते ९६-९७,** जिल्हा नांदेड, जिल्हा नियोजन व विकास मंडळ, नांदेड, पृ. १९०.

७८. **वार्षिक प्रशासन अहवाल, २००५-०६,** जिल्हा परिषद, नांदेड, पृ. २००५-२००९.

७९. **परभणी जिल्हा गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ५१०.

राष्ट्राच्या आर्थिक विकासातही शिक्षणास अत्यंत महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे. त्यानुसार नवे शैक्षणिक धोरण आखून त्यान्वये आता ६ ते १४ वर्षे वयोगटातील मुलांच्या प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण व प्रौढ निरक्षरतेचे निर्मूलन यांना अग्रक्रम देण्यात आलेला आहे. प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचे उद्दिष्ट विहित कालावधीत पूर्ण करण्यासाठी केंद्र शासनाने राज्यांच्या सहभागाने ' **सर्व शिक्षा अभियान** ' हा कार्यक्रम सुरू केला आहे. त्यानुसार वरील वयोगटातील सर्व मुलामुलींना सन २०१० पर्यंत सुयोग्य व उपयुक्त प्राथमिक शिक्षण देण्याचे या अभियानाचे उद्दिष्ट आहे. महाराष्ट्र राज्य शासनाने सर्वत्र शिक्षा अभियान सुरू करण्याचा निर्णय सन २००१ मध्ये घेऊन त्याच वर्षापासून ते राज्यात राबविले जात आहे. त्यानुसार किमान २०० इतकी लोकसंख्या असलेल्या वस्तीसाठी १.५ कि.मी. परिसरात प्राथमिक शाळा उघडण्याचे प्रमाणक शासनाने निश्चित केले आहे. आदिवासी क्षेत्रासाठी हे प्रमाणक १०० लोकसंख्या व १ कि.मी. परिसर असे आहे.[८०] सन २००५-०६ या शैक्षणिक वर्षात प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण योजनेखाली जिल्ह्यातील ६ ते १० वर्षे वयोगटातील एकूण ३,८०,४६१[८१] विद्यार्थ्यांपैकी (मुले-१,९८,६१३, मुली-१,८१,८४८), ३,७८,०२५ विद्यार्थ्यांची (मुले-१,९७,८८३, मुली-१,८०,१४२), तर ११ ते १३ वर्षे वयोगटातील १,७१,७१९ विद्यार्थ्यांपैकी (मुले-९०,७६९, मुली ८०,९५०), १,६२,८१६ विद्यार्थ्यांची (मुले-८६,०९९, मुली-७६,७१७) प्रत्यक्ष नावनोंदणी करण्यात आली. दुर्गम - डोंगराळ भाग, वाड्या, वस्त्या, तांडे अशा ठिकाणी राहणाऱ्या मुलांना प्राथमिक शाळेत जाणे गैरसोयीचे असल्याने शासन आता 'वस्तीशाळा योजना' राबवित आहे, तर हलाखीच्या आर्थिक स्थितीमुळे शिक्षणापासून वंचित राहिलेल्या बालकामगारांकरिता 'महात्मा फुले शिक्षण हमी योजना' राज्यात राबविली जात आहे. शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाच्या मोहिमेचा भाग म्हणून शासनाने राज्यात १९८५-८६ पासूनच मुलांना इयत्ता १० वी पर्यंतचे व मुलींना १२ वी पर्यंतचे शिक्षण मोफत केले आहे. तसेच इंग्रजी माध्यमाच्या शाळा वगळून इतर शाळांमध्ये इंग्रजी हा विषय इयत्ता पहिलीपासून सुरू करण्याचा क्रांतिकारी निर्णयही सन २०००-२००१ मध्ये घेतलेला आहे.[८२] जिल्हा परिषदेतफे वसतीगृहे चालविण्यात येत नाहीत.

**विद्यार्थ्यांना पोषण आहार :** प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढविण्याच्या दृष्टिने विद्यार्थ्यांना पोषण आहार पुरविण्याची योजना राज्यात राबविण्यात येत आहे. ही योजना पूर्णतः केंद्र पुरस्कृत असून राज्यामध्ये १९९६-९७ या आर्थिक वर्षापासून ती प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांकरिता राबविण्यात येते. या योजनेखाली राज्यातील शासकीय व शासन अनुदानित शाळांमधील इयत्ता १ ली ते ५ वी मधील दरमहा किमान ८०% उपस्थिती असणाऱ्या विद्यार्थ्यांना दरमहा तीन किलो तांदूळ पोषण आहार म्हणून किंवा खिचडी शिजवून दररदिवशी दिली जाते. या योजनेचा राज्यात उत्साहवर्धक परिणाम आहे.

---

८०. **महाराष्ट्राची आर्थिक पाहाणी :** २००१-२००२, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, २००२, पृ. ८३-८४.

८१. **वार्षिक प्रशासन अहवाल, २००५-०६** जिल्हा परिषद, नांदेड, पृ. २०७.

८२. **महाराष्ट्राची आर्थिक पाहाणी २००१-२००२, उपरोक्त, पृ. ८३-८४.**

**क्रमिक पुस्तकांचे मोफत वाटप :** विद्यार्थ्यांना प्राथमिक शिक्षणाकडे आकृष्ट करण्याच्या दृष्टिकोनातून ज्या पंचायत समितीच्या क्षेत्रात स्त्री-साक्षरता प्रमाण ३९.३% कमी आहे अशा क्षेत्रातील इयत्ता १ ली ते ४ थी च्या विद्यार्थ्यांना क्रमिक पुस्तके मोफत वाटण्याचा निर्णय राज्य शासनाने १९९६-९७ मध्ये घेऊन तो राबविला होता. तथापि, आता साक्षरतेचा निकष न लावता सरसकट सर्व मुलांना क्रमिक पुस्तके मोफत देण्यात येतात.

**अहिल्याबाई होळकर योजना :** मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी राज्य शासनाने १९९६-९७ मध्ये ही योजना सुरू केली. या योजनेखाली ग्रामीण भागातील इयत्ता ५ वी ते १० वी मधील मुलींना त्यांच्या गावात माध्यमिक शाळा उपलब्ध नसेल, तर दुसऱ्या गावातील शाळेत जाण्यासाठी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसमधून मोफत प्रवास करण्याची सवलत दिलेली होती. तथापि, आता माफक शुल्क घेऊन ही योजना राबविण्यात येत आहे. या खर्चापैकी १/३ भार राज्य शासन व उर्वरित भार म.रा.परिवहन महामंडळाकडून उचलला जातो.

**उपस्थिती भत्ता :** शाळेत जाणाऱ्या मुलींच्या गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी व उपस्थितीचे प्रमाण वाढविण्याच्या दृष्टिने आदिवासी उपयोजना क्षेत्रातील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबातील सर्व मुलींकरिता व उर्वरित क्षेत्रातील अनुसूचित जाती, जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमातीतील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबातील मुलींकरिता ही योजना राज्यात १९९२ पासून राबविली जाते. या योजनेंतर्गत इयत्ता १ ली ते ४ थी मधील लाभधारक मुलींना प्रतिदिन एक रूपया दराने उपस्थिती भत्ता दिला जातो.

## माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण

**माध्यमिक व उच्च माध्यमिक (कनिष्ठ महाविद्यालयीन) शिक्षण :** भूतपूर्व मुंबई राज्यात विलीन झाल्यावरही काही वर्षे मराठवाड्यातील विद्यार्थ्यांची शालांत परीक्षा पश्चिम महाराष्ट्रातील परीक्षेहून वेगळी होती. अभ्यासक्रमही काही अंशी भिन्न स्वरूपाचा व चार वर्षांचा होता. सन १९७५ पूर्वी १० वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना विद्यापीठ संलग्न पी.यू.सी. आणि पी.टी.सी.चे शिक्षण घ्यावे लागे. पी.यू.सी. उत्तीर्ण विद्यार्थ्यांना चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम असे. पी.टी.सी.उत्तीर्ण विद्यार्थ्यांना इंजिनियरिंग, मेडिकल इत्यादी अभ्यासक्रम अंगिकारता येई. सहाव्या पंचवार्षिक योजनेपर्यंत माध्यमिक शिक्षण प्रामुख्याने जिल्हा परिषदेकडून दिले जात असे. त्यावेळी अशासकीय माध्यमिक शाळांची संख्या आजच्या तुलनेत कमी होती. अशा तऱ्हेने वर उल्लेखिल्याप्रमाणे एकाच राज्यात भिन्न स्वरूपाच्या शिक्षण पद्धती असणे हितावह नसल्याने शासनाने परीक्षा प्रशासनामध्ये महत्त्वाचे परिवर्तन घडवून आणले. सदरहू परिवर्तन घडविताना पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा व विदर्भातील तत्कालीन प्रचलित शिक्षण पद्धती व नव्या गरजा लक्षात घेऊन संपूर्ण महाराष्ट्रासाठी समान शिक्षण व्यवस्थापन निर्माण करण्यात आले. त्याचबरोबर केंद्र सरकारने स्वीकृत केलेला १०+२+३ असा नवा शैक्षणिक आकृतिबंध राज्य शासनाने सन १९७२ मध्ये स्वीकारल्यानंतर तो इ.स. १९७५-७६ पासून महाराष्ट्रभर कार्यान्वित करण्यात आला. माध्यमिक शिक्षण क्षेत्रात अत्यंत दूरगामी परिणाम घडविणाऱ्या या सुधारित आकृतिबंधामुळे शालांत परीक्षेचा १० वर्षांचा सुधारित अभ्यासक्रम नव्याने सुरू करण्यात आला. १९७२ च्या शालेय वर्षापासून आठव्या इयत्तेमध्ये माध्यमिक शिक्षणाचा नवीन अभ्यासक्रम कार्यान्वित करण्यात आला व तीन भाषा, गणित, विज्ञान व सामाजिक अभ्यास हे विषय सक्तीचे करण्यात आले. त्यानुसार १९७५-७६ या शैक्षणिक वर्षापासून सुधारित आकृतिबंधानुरूप १० वी

शालांत परीक्षा घेण्यास प्रारंभ झाला. याच वर्षापासून + २ स्तरावरील ११ वी आणि १२ वीचा उच्च माध्यमिक अभ्यासक्रम कार्यान्वित करण्यात आला. या + २ स्तरास कनिष्ठ महाविद्यालय म्हणून संबोधण्यात येते. या कनिष्ठ महाविद्यालयांचे प्रथम व द्वितीय वर्षाचे (११ वी व १२ वी) वर्ग आवश्यकतेनुसार माध्यमिक शाळा व महाविद्यालये यांना जोडण्यात आले. परिणामतः पदवी परीक्षेचा अभ्यासक्रम तीन वर्षांचा करण्यात आला. सातव्या पंचवार्षिक योजना-काळात माध्यमिक शाळा उघडण्यासाठी खाजगी संस्थांना प्रोत्साहन देण्यात आले. त्यामुळे या काळात मोठ्या प्रमाणावर अशा शाळा उघडण्यात आल्या. माध्यमिक शाळांचा अभ्यासक्रमही तीन वर्षांचा करण्यात आला. प्रशासकीय सुलभतेसाठी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाच्या अधिपत्याखाली मराठवाड्यासाठी या मंडळाचे विभागीय मंडळ स्थापन करण्यात आले.[८३]

सध्या मराठवाड्यात, पर्यायाने नांदेड जिल्ह्यात ५ वी ते ७ वी चे वर्ग काही ठिकाणी माध्यमिक शाळांना जोडलेले आहेत. तसेच उच्च वर्गही आवश्यकतेनुसार माध्यमिक शाळा किंवा महाविद्यालयांना जोडण्यात आले आहेत. या दोन वर्षांच्या अभ्यासक्रमात विविध प्रकारच्या महाविद्यालयीन अभ्यासक्रमाची ओळख करून देण्याबरोबरच अभियांत्रिकी व वैद्यकीय वगैरेसारख्या व्यावसायिक शिक्षणासाठी लागणारी पूर्वपीठिकाही तयार करण्यात येते. १२ वी विज्ञान उत्तीर्ण विद्यार्थ्यांना इंजिनिअरिंग, मेडिकल व इतर व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमांना गुणसंख्यांधारे प्रवेश दिला जातो. गेल्या काही वर्षांपासून अभियांत्रिकी (इंजिनियरिंग), वैद्यकीय (मेडिकल) व फार्मा (औषधनिर्माण शास्त्र) या अभ्यासक्रमासाठी सामायिक प्रवेश परीक्षा (सी.ई.टी.) घेतली जाते. त्यासाठी १२ वी विज्ञान उत्तीर्ण ही अट आहे. सध्या नांदेड जिल्ह्यातील बहुतांश माध्यमिक शाळांचे व्यवस्थापन खाजगी संस्थांकडे आहे. तथापि, या शिक्षणावर होणाऱ्या खर्चात सरकारचा हिस्सा जवळजवळ २/३ असतो. जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी जिल्ह्यातील सर्व माध्यमिक शाळांवर नियंत्रण ठेवतात, त्यांची तपासणी करतात.

नांदेड जिल्ह्यात माध्यमिक शाळांची प्रगती झपाट्याने झाली. सन १९५१ मध्ये केवळ ८ असलेल्या माध्यमिक शाळा १९५६ मध्ये १४, १९६१ मध्ये ४५, तर १९६२ मध्ये ६३ इतक्या झाल्या.

दि. ३१ मार्च १९६२ रोजी जिल्ह्यात अस्तित्त्वात असलेल्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांची संख्या व व्यवस्थापन खालीलप्रमाणे होते.[८४]

| व्यवस्थापन | एकूण | माध्यमिक शाळा | उच्च माध्यमिक शाळा | |
|---|---|---|---|---|
| | | | सामान्य | बहुउद्देशिय |
| जिल्हा परिषद/ राज्य शासन | २४ | - | २२ | २ |
| खाजगी | ३९ | १० | २८ | १ |

८३. **परभणी जिल्हा गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ५२९.

८४. **डिस्ट्रिक्ट सेंसस हॅण्डबुक, नांदेड १९६१,** पूर्वोक्त, पृ. २५.

यावर्षी किनवट तालुक्यात एकच शाळा, तर सर्वात जास्त म्हणजे १३ शाळा नांदेड तालुक्यात होत्या.[८५] सन १९८२-८३ मध्ये जिल्ह्यात १५८ माध्यमिक (मुलींसाठी ७) व १० उच्च माध्यमिक शाळा होत्या व त्यात अनुक्रमे ७०,१८४ (मुले-५१,२८५ मुली-१८,८९९) व ७,४५९ (मुले-६,४२४, मुली-१,०३५) असे एकूण ७७,६४३ विद्यार्थी शिकत होते. या शाळांमध्ये राज्य शासनाच्या तीन, जिल्हा परिषदेच्या व जिल्हा परिषद अनुदानित अनुक्रमे ६५ व १० शाळा, खाजगी मदतीच्या ८४ व खाजगी बिनमदतीच्या ६ अशा एकूण १६८ शाळांचा समावेश होता. या आकडेवारीवरून बहुतांश शाळा खाजगी संस्थांच्या होत्या हे स्पष्ट होते. नगरपालिकांनी मात्र ही जबाबदारी घेतली नव्हती. सन १९८५ पासून जिल्ह्यात विविध ठिकाणी उच्च माध्यमिक शिक्षणाच्या सोयी मोठ्या प्रमाणावर उपलब्ध करून देण्यात आल्या. त्यामुळे यावर्षी ४३ इतक्या असलेल्या उच्च माध्यमिक शाळा १९९० च्या अखेरीस ६४ झाल्या. सन १९९४-९५ मध्ये तर जिल्ह्यात माध्यमिक व उच्च माध्यमिक मिळून ३५३ शाळा होत्या. त्यात केवळ मुलींसाठी ३७ शाळा होत्या. या सर्व शाळांमध्ये मिळून १,८७,०५५ विद्यार्थी (मुले-१,२२,७९३, मुली ६४,२६२) शिक्षण घेत होते. त्यात ६६,६७६ मागासवर्गीय विद्यार्थी (मुली-१८,५९४) होते. या सर्वांसाठी ५,१८९ शिक्षक ज्ञानदानाचे कर्तव्य बजावित होते.[८६]

सन २०००-२००१[८७] या वर्षी जिल्ह्यात ३२१ (मुलींच्या ३६) माध्यमिक शाळा तर ८९ उच्च माध्यमिक शाळा (मुलींच्या ६) अशा एकूण ४१० माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा होत्या. त्यात उर्दू माध्यमाच्या १७, इंग्रजी माध्यमाच्या ६, हिंदी माध्यमाची एक, व मराठी माध्यमाच्या ३८६ शाळांचा समावेश होता. त्यातील एकूण विद्यार्थीसंख्या २,४२,६३८ (मुले-१,४०,४४४, मुली-१,०२,१९४) इतकी होती व त्यांना शिकविणाऱ्या एकूण ६,३३६ शिक्षकांमध्ये १,०३२ स्त्री शिक्षिका होत्या. वरील विविध माध्यमाच्या ४१० माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये मुलींसाठी ४२ शाळा होत्या. उच्च माध्यमिक शाळांमधील विद्यार्थीसंख्या स्वतंत्रपणे दर्शवावयाची तर ती ९९,२५५ (मुली-३८,४११) व शिक्षक संख्या २,४६३ होती. व्यवस्थापनानुसार वरील ४१० शाळांपैकी एक शाळा केंद्र सरकार, ९ शाळा राज्य सरकार, ६२ शाळा जिल्हा परिषद, जिल्हा परिषद अनुदानित ९, खाजगी संस्थांच्या २७५ व खाजगी बिनमदतीच्या ५४ शाळा होत्या. म्हणजेच बहुसंख्य शाळा या खाजगी संस्थांमार्फत चालविल्या जात होत्या. यावर्षी माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये अनुक्रमे ७०,७०२ (मुली-२९,१५६) व २५,०५० (मुली-७,३२७) इतके मागासवर्गीय विद्यार्थी शिक्षण घेत होते.[८८]

सन २००५-०६ या शैक्षणिक वर्षात जिल्ह्यात असणाऱ्या एकूण ५२३ माध्यमिक शाळांमध्ये जिल्हा परिषदपूर्व ६१ शासकीय शाळा, जिल्हा परिषद अनुदानित ९ शाळा, केंद्र शासनाची एक शाळा, १३ राज्य शासकीय आश्रमशाळा व उर्वरित खाजगी संस्थांमार्फत चालविल्या जाणाऱ्या शाळांचा समावेश होता. त्यापैकी जिल्हा परिषदपूर्व शासकीय शाळांमधील विद्यार्थी संख्या १,५०३ (मुले-७९७,

---

८५. **डिस्ट्रिक्ट सेंसस हॅण्डबुक,** नांदेड, १९६१, पूर्वोक्त, २५.

८६. **शिक्षणावर दृष्टिक्षेप : १९९४-९५,** शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे, १९९६, पृ. ५४-५५.

८७. कित्ता, २०००-२००१, पूर्वोक्त, पृ. ६६-९३.

८८. **शिक्षणावर दृष्टिक्षेप : २०००-२००१,** शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे, २००५, पृ. १२४-२५.

Maharashtra State Gazetteers

मुली-७०६) इतकी होती. यावर्षी वरील दोन्ही आस्थापनांच्या शाळांमधील शिक्षक संख्या अनुक्रमे ३६४ व ४३ अशी होती, तर राज्य शासनाच्या आश्रमशाळा व अन्य खाजगी संस्थांतर्फे चालविल्या जाणाऱ्या शाळांमध्ये अनुक्रमे १२८ व ५,३९९ शिक्षक ज्ञानदान करीत होते.[८९]

**जवाहर नवोदय विद्यालय, नांदेड :** भारत सरकारने १९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार २७ राज्ये व ७ केंद्रशासित प्रदेशांमध्ये जवाहर नवोदय विद्यालये सुरू केली आहेत. भारत सरकारच्या संपूर्ण आर्थिक सहाय्याने 'नवोदय विद्यालय समिती' या स्वायत्त यंत्रणेमार्फत मुला-मुलींसाठी निवासी जवाहर विद्यालये चालविली जातात. महाराष्ट्र राज्यातील ३२ जिल्ह्यांत अशी ३२ विद्यालये असून त्यापैकी नांदेड जिल्ह्यातही शंकरनगर, नांदेड येथे एक विद्यालय आहे. या विद्यालयात इयत्ता ६ वी मध्ये नवोदय विद्यालय निवड चाचणी परीक्षेद्वारे प्रवेश देण्यात येतो. इयत्ता ८ वी पर्यंत शिक्षणाचे माध्यम मातृभाषा हेच असून त्यानंतर गणित व विज्ञान हे विषयक इंग्रजीतून आणि समाजशास्त्र हा विषय हिंदीतून शिकविण्यात येतो. या विद्यालयातील विद्यार्थी केंद्रिय माध्यमिक परीक्षा मंडळाच्या इयत्ता १० वी व १२ च्या परीक्षांना बसतात.

या विद्यालयातील विद्यार्थ्यांना भोजन, गणवेश, निवास आणि वह्या-पुस्तके मोफत पुरविण्यात येतात. तथापि नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांना दरमहा २००/- रुपये इतके नाममात्र शुल्क आहे. अनुसूचित जाती/जमातीचे विद्यार्थी, सर्व मुली आणि ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न दारिद्र्य रेषेखाली आहे, अशा सर्वांना हे शुल्क माफ आहे.

ग्रामीण भागातून येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांना दर्जेदार आधुनिक शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देणे, त्यांच्यामध्ये संस्कार, पर्यावरणाचे ज्ञान, शारीरिक शिक्षण इत्यादी वाढीस लावणे, विद्यार्थ्यांमध्ये त्रिभाषा सुत्राप्रमाणे तीन भाषांचे किमान ज्ञान वृद्धिंगत करणे आणि हिंदी भाषिक विद्यार्थ्यांना अहिंदी प्रदेशामध्ये व अहिंदी भाषिक विद्यार्थ्यांना हिंदी भाषिक प्रदेशामध्ये स्थलांतरित करून राष्ट्रीय एकात्मता साधणे ही या योजनेची उद्दिष्टे आहेत.

वरील उद्दिष्टानुसार विद्यार्थी नववीत गेला की त्याची बदली दुसऱ्या विद्यालयात केली जाते. या विद्यालयात सहावीत जास्तीत जास्त ८० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येतो. (प्रत्येक जिल्ह्यातील किमान ७५% जागा ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी राखीव ठेवल्या जातात.) सन २००५-२००६ मध्ये या विद्यालयात इयत्ता ६ वी ते १२ वी पर्यंत एकूण ३९३ विद्यार्थी शिक्षण घेत होते, तर पुढील वर्षी ही संख्या ४०५ इतकी झाली.

**शालेय शिक्षणासंबंधी माहिती व तंत्रज्ञान धोरण**[९०] **:**— केंद्र शासनाने गठीत केलेल्या माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ञ व तंत्रज्ञांच्या कार्यबल समितीच्या शिफारशी राज्य शासनाने स्वीकारल्या असून त्या अनुषंगाने शालेय शिक्षणासंबंधी "माहिती व तंत्रज्ञान : धोरण १९९८" हे वर्ष

८९. **वार्षिक प्रशासन अहवाल,** पूर्वोक्त, पृ. १५.

९०. **महाराष्ट्राची आर्थिक पाहणी : २००१-२००२,** अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, २००२, पृ. ८३-८४. अधिक माहिती **माहिती तंत्रज्ञान** या शीर्षकाखाली देण्यात आलेली आहे.

१९९९ मध्ये जाहीर केले. या धोरणाचे मुख्य उद्दिष्ट अध्ययन व अध्यापनात संगणकाच्या वापरास प्रोत्साहन देणे असे आहे. त्यानुसार "माहिती व तंत्रज्ञान" हा विषय ८ वी ते १० वी च्या अभ्यासक्रमात जून १९९९ पासून तर जून २००० पासून इयत्ता ११ वी व १२ वी च्या अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आलेला आहे.[९१] राज्य शासनाने या विषयाच्या अध्यापनासाठी शाळांमध्ये संगणक प्रयोगशाळेची स्थापना करण्यासाठी विविध पर्याय सुचविले आहेत. अशा पर्यायांतर्गत शाळा व्यवस्थापनाचा स्वतःचा निधी तसेच खाजगी औद्योगिक संस्था, स्थानिक सहकारी संस्था, व्यापारी संस्था यांच्या मदतीने शाळांकरीता संगणक प्रयोगशाळा स्थापन करू शकतात. त्याशिवाय खाजगी संगणक संस्थांच्या चालकांना शाळेमध्ये जागा उपलब्ध करून देऊन त्यांच्याकडून स्थापल्या जाणाऱ्या संगणक प्रयोगशाळेचा शाळेच्या व्यतिरिक्त व्यापारी तत्त्वावर वापर करण्यास आणि त्या मोबदल्यात शाळेतील विद्यार्थ्यांना विनामूल्य संगणक प्रशिक्षण देण्याच्या अटीवर परवानगी देण्यात आली आहे.

**पुस्तक पेढी योजना**[९२] **:** या योजनेंतर्गत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि इतर दुर्बल समाजघटकांतील विद्यार्थ्यांना क्रमिक पुस्तकांचे संच पुरविले जातात. जिल्हा परिषदा, नगरपरिषदा आणि महानगरपालिका संचलित प्राथमिक व माध्यमिक शाळा आणि मान्यताप्राप्त/अनुदानित माध्यमिक शाळांतील मुलांकरिता शासनाने पुस्तकपेढ्या स्थापन केलेल्या आहेत. पुस्तक पेढीद्वारे वितरित केलेले संच शैक्षणिक वर्षाच्या अखेरीस पुस्तक पेढीस परत करावयाचे असतात. या योजनेत इयत्ता १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

## उच्च शिक्षण

**उच्च शिक्षण :** स्वातंत्र्यपूर्व काळात मराठवाडा विभागात प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाप्रमाणेच उच्च शिक्षणाचीही आबाळ होती. यावेळी संपूर्ण विभागात केवळ शासनाच्या वतीने चालविण्यात येणारे एक इंटरमिजिएट कॉलेज औरंगाबाद येथे होते.[९३] महाविद्यालयीन शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना एक तर हैद्राबाद किंवा मुंबई येथे जावे लागे. सन १८९९ मध्ये संपूर्ण हैद्राबाद राज्यात ८ विविध महाविद्यालये होती.[९४] अर्थात स्वातंत्र्यप्राप्तीनंतर यात बदल होत गेला. १९५० मध्ये औरंगाबाद येथे मिलिंद कला व विज्ञान महाविद्यालय स्थापन झाल्यानंतर तेथे नांदेड जिल्ह्यातील बरेच विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी जाऊ लागले.[९५] याच वर्षी हैद्राबाद मुक्तिसंग्रामाचे नेते स्वामी रामानंद तीर्थ यांनी नांदेड एज्युकेशन सोसायटी अंतर्गत पिपल्स कॉलेजची स्थापना केली.

मराठवाडा विभागात उच्च शिक्षणाच्या प्रसारासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि स्वामी रामानंद तीर्थ यांनी सातत्याने प्रयत्न केले. या विभागाची उच्च शिक्षणाची गरज लक्षात घेऊन तत्कालिन मुख्यमंत्री कै. यशवंतराव चव्हाण यांनी न्यायमूर्ती एस.एम.पळणीकर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती

९१. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, २००१-२००२, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई. पृ. ८३-८४ व २००४ : २००५, पृ. ९८.

९२. **महाराष्ट्राची आर्थिक पाहणी : २००४-०५,** अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, २००५, पृ. ९९.

९३. **दृष्टिक्षेपात मराठवाडा,** विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद, १९९२, पृ. १०७.

९४. **इम्पेरियल गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ७६-७७

९५. **परभणी जिल्हा गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ५३१.

स्थापन केली. या समितीच्या अहवालानुसार दि. २३ ऑगस्ट १९५८ रोजी मराठवाडा विभागासाठी मराठवाडा विद्यापीठ (सध्याचे डॉ. बा. आं. मराठवाडा विद्यापीठ) स्थापन करण्यात आले. यावेळी मराठवाडा विभागात केवळ नऊ महाविद्यालये होती.[९६] या विद्यापीठाच्या स्थापनेपूर्वी नांदेड येथे पिपल्स कॉलेज (स्थापना-१९५०) हे एकच महाविद्यालय होते. विद्यापीठाच्या स्थापनेनंतर १९६१ पर्यंत ही संख्या तीन झाली. त्यात ५९४ विद्यार्थी (४१ मुली) शिकत होते. सन १९६३ पर्यंत जिल्ह्यात पाच महाविद्यालये झाली. त्यातून वाङमय, विज्ञान, वाणिज्य व आयुर्वेद यांचे शिक्षण दिले जाई. या पाचपैकी शासकीय आयुर्वेद महाविद्यालयासहीत नांदेड येथे तीन व कंधार आणि देगलूरला प्रत्येकी एक महाविद्यालय होते.[९७] नांदेडच्या पिपल्स कॉलेजमध्ये आर्ट, सायन्स व कॉमर्स या ज्ञानशाखा होत्या. कंधार येथील शिवाजी महाविद्यालयामध्ये उच्च शिक्षण मोफत होते. ही सर्व मराठवाडा विद्यापीठाशी संलग्न होती.[९८]

सन १९५८ ते १९७५ या काळात मराठवाड्यातील उच्च शिक्षणाची वाटचाल संथ होती. कारण १९७५ पर्यंत मराठवाड्यातील उच्च शिक्षण देणाऱ्या महाविद्यालयांची संख्या केवळ ९० होती. त्यापैकी १२ महाविद्यालये नांदेड जिल्ह्यात होती. १९८४ पासून महाराष्ट्र शासनाने विनाअनुदानित शिक्षण संस्थांना परवानगी देण्याचे धोरण अवलंबिले. परिणामी १९९४ पर्यंत मराठवाडा विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांची संख्या २०० झाली.

मराठवाडा विद्यापीठाची संलग्न कार्यकक्षा औरंगाबाद, परभणी, नांदेड, उस्मानाबाद, लातूर, बीड व जालना अशा सात जिल्ह्यांमध्ये पसरली होती. त्यामुळे उत्तम व्यवस्थापनासाठी या विभागास आणखी एका विद्यापीठाची मागणी जोर धरू लागली. त्यातूनच नांदेड येथे दि. १७ सप्टेंबर १९९४ रोजी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाची स्थापना झाली.[९९] या विद्यापीठाच्या कार्यकक्षेत मराठवाडा विद्यापीठाकडील नांदेड, परभणी, लातूर व नवनिर्मित हिंगोली हे जिल्हे वर्ग करण्यात आले. या वर्षापर्यंत नांदेड जिल्ह्यात मराठवाडा विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयांची संख्या २२ होती व त्यात १८,५०८ विद्यार्थी शिकत होते.[१००] या २२ महाविद्यालयांमध्ये पिपल्स एज्युकेशन सोसायटीचे नांदेड येथील पिपल्स कॉलेज (स्था-१९५०) सर्वात जुने महाविद्यालय होते. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाची स्थापना झाल्यावर ही सर्व महाविद्यालये या विद्यापीठाकडे वर्ग करण्यात आली, एवढेच नव्हे, तर विविध प्रकारचे शिक्षण देणाऱ्या महाविद्यालयांच्या संख्येत जोमाने भर पडत गेली.

स्वा. रा. तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या स्थापनावर्षी या विद्यापीठाशी ५८ महाविद्यालये संलग्न होती. त्यापैकी २२ महाविद्यालये नांदेड जिल्ह्यात होती. यात कला, वाणिज्य, शास्त्र, अभियांत्रिकी,

---

९६. **दृष्टिक्षेपात मराठवाडा,** पूर्वोक्त, पृ. १०७.

९७. **डिस्ट्रिक्ट सेंसस हॅण्डबुक,** नांदेड डिस्ट्रिक्ट, १९६१, पूर्वोक्त, पृ. २५, २२१.

९८. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** पूर्वोक्त, ५१७.

९९. या विद्यापीठाची सविस्तर माहिती पुढे दिलेली आहे.

१००. **वार्षिक अहवाल,** डॉ. बा. आं. मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, १९९३, पृ. ९३-९७.

Maharashtra State Gazetteers

वैद्यकीय वगैरे विविध ज्ञानशाखा होत्या. यातील बहुतांश महाविद्यालये ही खाजगी संस्थांची होती. १९९५-९६ पर्यंत या संख्येत बदल झाला नव्हता. यावर्षी जिल्ह्यातील या सर्व महाविद्यालयांमध्ये एकूण ३१,८०८ विद्यार्थी (मुली-६,०६२) शिक्षण घेत होते, तर ७३८ प्राध्यापक (प्राध्यापिका-७६) ज्ञानदानाचे कार्य करीत होते. वरील सर्व विद्यार्थ्यांमध्ये १७,६९९ विद्यार्थी (मुली-२,७६८) मागासवर्गीय होते. यावर्षी कला, शास्त्र व वाणिज्य या शाखांमध्ये ३,५६५ विद्यार्थी (मुली-५८१) हे स्नातकोत्तर स्तरावरील शिक्षण घेत होते. तक्ता क्र. ५ मध्ये जिल्ह्यातील महाविद्यालयांची सन २००६ ची यादी देण्यात आली आहे.

नांदेड जिल्ह्यातील ज्या महाविद्यालयांची माहिती उपलब्ध झाली त्यांची थोडक्यात माहिती पुढे देण्यात आलेली आहे.

**यशवंत महाविद्यालय, नांदेड :** येथील श्री. शारदा भवन शिक्षण संस्थेने सन १९६३ मध्ये या महाविद्यालयाची स्थापना केली. ग्रामीण व शहरी भागातील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून देणे हा यामागील संस्थेचा उद्देश आहे. त्यासाठी संस्थेने महाविद्यालयांबरोबरच महात्मा गांधी मोफत वसतिगृहांचीही स्थापना करून गरीब विद्यार्थ्यांच्या भोजन व निवासांचा प्रश्न सोडविला. कला, वाणिज्य व विज्ञान या तिन्ही शाखेतील पदव्युत्तर शिक्षणाबरोबरच त्या शाखांतील संशोधन स्तरावरील शिक्षणही येथे दिले जाते. एकंदरीत १४ विषयातील संशोधन स्तरावरील शिक्षण येथे उपलब्ध आहे. बी.ए.च्या विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मदतीद्वारे फॅशन आराखडा प्रमाणपत्र, वृत्तविद्या, कम्युनिकेटिव्ह इंग्लिश, वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी वित्तीय अकाऊंटिंग प्रमाणपत्र, व्यावसायिक प्रमाणपत्र, जाहिरात व विक्रीकला प्रमाणपत्र तर विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यासाठी जैवतंत्रज्ञान प्रमाणपत्र, जैव माहिती प्रमाणपत्र आणि संगणक प्रमाणपत्र हे अभ्यासक्रम येथे शिकविले जातात. त्यामुळे आपली विद्याशाखा शिकता शिकताच नवीन अतिरिक्त ज्ञान विद्यार्थ्यांना आत्मसात करता येते. याशिवाय, गणित, संख्याशास्त्र, संगीत, शिक्षणशास्त्र, संगणकशास्त्र, सैनिकीशास्त्र व संस्कृत हे विषय शिकण्याची येथे सुरुवातीपासूनच व्यवस्था आहे. या महाविद्यालयातील विद्यार्थी शामाप्रसाद मुखर्जी यासारख्या देशपातळीवरील पारितोषिके तसेच आंतरराष्ट्रीय संशोधन शिष्यवृत्तींचे पात्रताधारक आहेत.

अनुसूचित जाती/जमातींच्या विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणासाठी येथे रिमिडीयल कोचिंग क्लासेस महाविद्यालयाच्यावतीने चालविले जातात. याशिवाय विद्यार्थ्यांमधील सर्व प्रकारच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी येथे अनेकविध योजना राबविल्या जातात. त्यामुळे या महाविद्यालयातील विद्यार्थी विविध क्षेत्रांत लक्षणीय यश मिळवितांना दिसतात. म्हणूनच हे महाविद्यालय संपूर्ण भारतात नॅक समितीकडून मानांकित करण्यात येणाऱ्या 'अ' दर्जाच्या महाराष्ट्रातील नऊ 'अव्वल' महाविद्यालयांपैकी एक आहे.

स्थापनावर्षी या महाविद्यालयात एकूण २०१ विद्यार्थी होते. त्यात केवळ दोन विद्यार्थी होत्या. २००५-०६ या वर्षी ही विद्यार्थी संख्या लक्षणीय म्हणजे ३,८११ (१,४९५) इतकी वृद्धिंगत झाली होती. याचे कारण म्हणजे या महाविद्यालयाने प्राप्त केलेले विविध क्षेत्रातील यश हेच होय.

Maharashtra State Gazetteers

**श्री. संत गाडगे महाराज महाविद्यालय, लोहा :** स्वातंत्र्यपूर्व काळात मराठवाड्यातील कंधार व लोहा या डोंगराळ भागात शिक्षणाची कोणतीही सोय उपलब्ध नव्हती. उच्च शिक्षणासाठी तर औरंगाबाद, अमरावती किंवा हैद्राबाद येथे जावे लागत असे. ही अडचण लक्षात घेऊन जेष्ठ स्वातंत्र्यसेनानी, माजी खासदार व आमदार डॉ. केशवराव धोंडगे यांनी दि.१२ जुलै १९८९ रोजी या महाविद्यालयाची स्थापना केली. या कार्यासाठी त्यांना गाडगे महाराजांचा वरदहस्त लाभला होता. कला, वाणिज्य व विज्ञान या शाखांबरोबरच येथे मराठी विषयातील पदव्युत्तर पदवीचेही शिक्षण दिले जाते. स्थापनावर्षी या महाविद्यालयातील विद्यार्थी संख्या २१४ इतकी होती. पुढे त्यात क्रमाक्रमाने वृद्धि होत गेली. विविध शाखांतील शिक्षणाबरोबरच येथे क्रीडा, एन.सी.सी., एन.एस.एस., विविध वक्तृत्व स्पर्धा अनेकविध शिबिरे असे अनेक उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना स्पर्धेच्या युगात तोंड देण्यास सक्षम बनविले जाते.

**शारीरिक शिक्षण महाविद्यालय, नांदेड :** मराठवाडा मुक्तीनंतरही नांदेड जिल्ह्यात शारीरिक शिक्षणाची सोय नव्हती. त्यासाठी विद्यार्थ्यांना औरंगाबाद किंवा बीड येथे जावे लागत असे. ही गैरसोय दूर करण्यासाठी येथील सरस्वती शिक्षण प्रसारक मंडळाने दि.२१ मे १९८५ रोजी या महाविद्यालयाची स्थापना केली. सुरुवातीस यात पदवीपर्यंतचे शिक्षण दिले जात असे. तथापि, सन १९८९-९० पासून शारीरिक शिक्षणातील पदव्युत्तर अभ्यासक्रमही येथे सुरू करण्यात आला. स्थापनावर्षी महाविद्यालयात बी.पी.एड् साठी १२० विद्यार्थी होते. तथापि एम.पी.एड् अभ्यासक्रम सुरू झाल्यानंतर येथे बी.पी.एड् साठी ६० विद्यार्थी व एम.पी.एड् साठी २० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. या महाविद्यालयातही इतर महाविद्यालयांप्रमाणे विविध उपक्रम राबविले जातात.

**सायन्स कॉलेज, नांदेड :** हैद्राबाद मुक्ति लढ्याचे अध्वर्यू स्वामी रामानंद तीर्थ यांनी स्थापन केलेल्या नांदेड एज्युकेशन सोसायटीचे हे महाविद्यालय आहे. या संस्थेने जून, १९६३ मध्ये या महाविद्यालयाची स्थापना केली. सन १९७० नंतर त्यात गणित व वनस्पतीशास्त्र या विषयाच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमाची सोय करण्यात आली. सध्या या महाविद्यालयात १३ पदवी, दोन विशेष पदवी व सात विषयांमध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रम शिकविला जातो. हे महाविद्यालय संशोधनासाठीचे विद्यापीठ मान्य केंद्र आहे. त्यात रसायनशास्त्र, विश्लेषण रसायनशास्त्र, गणित, वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र व पर्यावरण शास्त्र या विषयांत संशोधन करण्याची सुविधा आहे. सन १९९०-९१ व २००४-०५ मध्ये या महाविद्यालयातील विद्यार्थीसंख्या अनुक्रमे १,९९६ व १,८२८ होती. प्रत्येक वर्षी साधारणतः ५-६ विद्यार्थी स्वा. रा. तीर्थ विद्यापीठातून पीएच. डी. पदवी प्राप्त करतात. आजमितीस येथे ४० पीएच. डी. प्राप्त प्राध्यापक आहेत. या महाविद्यालयातर्फे विविध चर्चासत्रे, व्याख्यानमाला व अन्य उपक्रम राबविले जातात. विद्यार्थी, शेतकरी, शासकीय व स्वयंसेवी संस्था यांना विज्ञानाचे ज्ञान दिले जाते. वैज्ञानिक समुपदेश सेवा दिली जाते. सन २००४-०५ या वर्षासाठी या महाविद्यालयास महाराष्ट्र शासनातर्फे उत्कृष्ट राष्ट्रीय सेवा योजना पुरस्कार प्राप्त झाला आहे.

**खोर्शेदबानू आर. मेवावाला महिला महाविद्यालय, वजिराबाद :** महिला शिक्षण संस्था, नांदेडचे हे महाविद्यालय १९८९ मध्ये सुरू झाले. यात कला व वाणिज्य या पदवी अभ्यासक्रमाची

सोय आहे. शिवाय कला शाखेतील पदव्युत्तर अभ्यासक्रमही येथे शिकविला जातो. महाविद्यालयातर्फे राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना या योजना राबवून अनेक समाजोपयोगी कार्य केली जातात. गरीब व होतकरू विद्यार्थिनींसाठी राजर्षी शाहू मोफत शिक्षण योजनाही राबविण्यात येते. प्रतिवर्षी जागतिक महिला दिनानिमित्त शालेय शिक्षिका व महिला प्राध्यापिका यांचे आरोग्य शिबीर आयोजित केले जाते. सन २००७-०८ मध्ये या महाविद्यालयात १७३ विद्यार्थिनी पदवीचे, तर १० विद्यार्थिनी पदव्युत्तर शिक्षण घेत होत्या. त्यांना एकूण ३२ प्राध्यापक ज्ञानदान करीत होते. त्यात ९ प्राध्यापक पीएच. डी. धारक आहेत.

**जवाहरलाल नेहरु समाजकार्य महाविद्यालय, नांदेड :** श्री. सेवादास शिक्षण प्रसारक मंडळ, नांदेड या संस्थेने दि. १५ जून १९९२ रोजी या महाविद्यालयाची स्थापना केली. समाजकार्य ही मानवी समाजाच्या मानसिक व सामाजिक समस्यांचे निराकरण करणारी एक आधुनिक व शास्त्रीय पद्धत आहे. त्यासाठी मानवी बळाचे प्रभावी व्यवस्थापन करण्यासाठी कुशल व प्रशिक्षित मनुष्यबळ निर्माण करणे हा या स्थापनेमागील उद्देश आहे. या महाविद्यालयात बी.एस.डब्ल्यू व एम.एस.डब्ल्यू हे अनुक्रमे पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम शिकविले जातात. स्थापनावर्षी या महाविद्यालयात केवळ ६० विद्यार्थी होते. त्यानंतर ही संख्या वाढून सन २००७-०८ मध्ये २२० इतकी झालेली आहे. यावर्षी येथे १२ प्राध्यापक असून त्यापैकी दोन पीएच. डी. पदवीप्राप्त आहेत. महाविद्यालयामार्फत राष्ट्रीय सेवा योजना, बहिःशाल केंद्र, आपत्कालीन व्यवस्थापन केंद्र, रोजगार मार्गदर्शन केंद्र, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, सांस्कृतिक क्रीडा केंद्र वगैरे अनेक उपक्रम राबविले जातात.

सन २००० पर्यंत विद्यापीठ अनुदान आयोगाकडून प्रमाणित करणाऱ्या आलेल्या जिल्ह्यातील महाविद्यालयांमध्ये पीपल्स कॉलेज, यशवंत महाविद्यालय, सायन्स कॉलेज, नेताजी सुभाषचंद्र बोस कॉलेज; प्रतिभा निकेतन महाविद्यालय, वजिराबाद; वसंतराव नाईक महाविद्यालय, सिडको, नांदेड; श्री शिवाजी कॉलेज, कंधार; पानसरे महाविद्यालय, अर्जापूर; लालबहादूर शास्त्री महाविद्यालय, धर्माबाद; देगलूर कॉलेज, देगलूर; महात्मा ज्योतिबा फुले कॉलेज, मुखेड; बळीराम पाटील कॉलेज, किनवट; श्री गुरू गोविंदसिंघजी कॉलेज ऑफ इंजिनियरिंग ॲण्ड टेक्नॉलॉजी, विष्णुपुरी; गव्हर्नमेंट कॉलेज ऑफ एज्युकेशन, नांदेड आणि लॉ कॉलेज, नांदेड यांचा समावेश होता.

सन २००० पर्यंत नांदेड जिल्ह्यातील वरिष्ठ महाविद्यालयांची संख्या ३५ होती. तक्ता क्र.६ मध्ये जिल्ह्यातील नॅक (NACC) प्रमाणित महाविद्यालयांची यादी व स्थापनावर्षे दिलेली आहेत. यावर्षी या सर्व महाविद्यालयांमध्ये १४,४२० विद्यार्थी (मुली ४,००२) शिक्षण घेत होते.[१०१]

**आदिवासी उपयोजना क्षेत्रातील शैक्षणिक स्थिती :** नांदेड जिल्ह्यात आदिवासी जाती-जमातींच्या लोकांची मोठ्या प्रमाणावर वस्ती आहे. विशेषतः किनवट तालुका हा आदिवासी तालुका म्हणूनच ओळखला जातो. तो शैक्षणिकदृष्ट्याही मागासलेला आहे. म्हणूनच जिल्ह्यातील या आदिवासी जाती-जमातींच्या शिक्षणासाठी शासनाने ठोस उपाय केले. त्याचाच परिणाम म्हणून सन १९८५-८६

१०१. **शिक्षणावर दृष्टिक्षेप : २०००-२००१,** पूर्वोक्त, पृ. १४९.

या शैक्षणिक वर्षाअखेर जिल्ह्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रात ९७ एकशिक्षकी व ११६ कनिष्ठ व वरिष्ठ मिळून एकूण २१३ प्राथमिक शाळा सुरू होत्या. त्यातील एक शाळा केवळ मुलींसाठी होती. शासनाने अशा सोयी उपलब्ध करून दिल्यानंतर आदिवासी जनतेनेही त्यांचा लाभ घेतला. त्यामुळे वरील सर्व शाळांमध्ये २४,१४३ मुले (मुली-९,७०४) शिक्षण घेत होती. त्यांना शिकविणाऱ्या प्रशिक्षित शिक्षकांचे शेकडा प्रमाण ८४.८ टक्के इतके होते. याच वर्षी या क्षेत्रातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांची संख्या १६ होती. यातही ६,२८८ विद्यार्थी (मुली १,६३७) शिक्षण घेत होत्या. सन १९९०-९१ या शैक्षणिक वर्षापर्यंत एकशिक्षकी प्राथमिक शाळांची संख्या कमी करून एकूण प्राथमिक शाळांची संख्या २४२ वर नेण्यात आली. परिणामी १९८५-८६ च्या तुलनेत विद्यार्थीसंख्याही २८,२५७ (मुली १२,२६६) इतकी वाढली. विशेषतः शालेय मुलींच्या संख्येतील वाढ लक्षणीय होती. याच वर्षी माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांची संख्याही २२ एवढी करण्यात आली. त्यातही विद्यार्थ्यांची संख्या १९८५-८६ च्या तुलनेत ८,१९९ (मुली २,३८२) इतकी झाली. या विद्यार्थ्यांना शिकविणाऱ्या प्रशिक्षित शिक्षकांचे शेकडा प्रमाण ८५.८९% होते. स्त्री शिक्षिका तर सर्वच प्रशिक्षित होत्या.[१०२] सन १९९१ च्या जनगणनेनुसार आदिवासी उपयोजना विभागात नांदेड जिल्ह्यातील १८५ गावे व १ शहर मोडत होते, तर सुधारित क्षेत्र विकास खंडात ३५ गावांचा समावेश होता. म्हणजेच एकूण गावांची संख्या २२० (एक शहर) होती.[१०३]

सन १९९५ अखेर ही संख्या १८५ वरून १९३, तर सुधारित क्षेत्र विकास खंडातील गावांची संख्या ३५ वरून ४८ झाली. सन १९९५-९६ च्या अखेरीस आदिवासी क्षेत्रात ३०७ प्राथमिक शाळा होत्या व त्यात ३५,०५३ विद्यार्थी (मुली १६,९७७) शिक्षण घेत होते. त्यांना ९६७ शिक्षक शिकवित होते. याचवर्षी या विभागात ४१ माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा होत्या. त्यातील ३ शाळा केवळ मुलींसाठीच होत्या. या सर्व माध्यमिक शाळांमध्ये एकूण १५,३३७ विद्यार्थी (मुली-५,६३१) पटावर होते व त्यांना ४६३ शिक्षक शिकवित होते. याच वर्षी या क्षेत्रात एक कला, शास्त्र व वाणिज्य महाविद्यालय होते. त्यात ५९९ विद्यार्थी (मुली ९१) शिक्षण घेत होते. ह्या विद्यार्थ्यांमध्ये ४७९ विद्यार्थी (मुली ६१) मागासवर्गीय होते.[१०४]

आदिवासी व सुधारित क्षेत्र विकास विभागातील शिक्षणसंस्थांमध्ये प्रामुख्याने अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नवबौद्ध, भटक्या जाती व इतर मागासवर्गीय विद्यार्थी शिक्षण घेत असतात. सन २०००-२००१ अखेरीस जिल्ह्यातील आदिवासी उपयोजना विभागात १९३ गावे व १ शहर, तर सुधारित क्षेत्र विकास खंडात ४८ गावे अशी एकूण २४१ गावे होती. यावर्षी आदिवासी उपयोजना क्षेत्रात ३१९ कनिष्ठ व वरिष्ठ प्राथमिक शाळा (विद्यार्थी ३६,६७४) होत्या, तर ४८ माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा (विद्यार्थी २२९७५) होत्या. त्यांना ६७७ शिक्षक शिकवित होते. या क्षेत्रातील विविध शाखांचे

---

१०२. **शिक्षणावर दृष्टिक्षेप : १९८५-८६,** पृ. ६८ ते ७१ व १९९०-९१, पृ. ७२-७५.

१०३. कित्ता, १९९४-९५, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे, १९९६, पृ. १५२.

१०४. कित्ता, १९९५-९६, पृ. १६२-१७६.

केवळ एकच महाविद्यालय होते व त्यात ४३५ विद्यार्थी (मुली ८१) शिक्षण घेत होते. यात ३३६ मागासवर्गीय विद्यार्थी होते.[१०५]

## राज्यातील सर्व विद्यार्थ्यांना शिक्षणाची ई-सुविधा[१०६]

राज्यातील सर्व शिक्षण संस्था, त्यांचे शैक्षणिक अभ्यासक्रम, प्रशासकीय माहिती, स्पर्धा परीक्षा, स्वयंरोजगार योजना यांची एकत्रित स्वरूपाची माहिती विद्यार्थी व पालकवर्गाकडे उपलब्ध नसते. ही माहिती एकाच ठिकाणी व एकाच वेळी उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने दि.१५ ऑगस्ट २००६ पासून पदवी/पदविका/पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना अत्यंत माफक दरात ' ई-सुविधा ' या प्रणालीद्वारे राज्यातील सर्व शिक्षण संस्था, त्यांमध्ये शिकविले जाणारे अभ्यासक्रम, विविध स्वरूपाच्या शिष्यवृत्त्या, विविध शासकीय योजना, परीक्षांची वेळापत्रके, मागील वर्षांच्या प्रश्नपत्रिका, निकाल प्रमाणपत्रे, स्पर्धा परीक्षांचे अर्ज, इत्यादींची माहिती संगणकाद्वारे उपलब्ध करून दिलेली आहे. अशी योजना राबविणारे महाराष्ट्र राज्य हे देशातील पहिले राज्य आहे. या ई-सुविधा योजनेत सर्व अकृषी विद्यापीठे, त्यांच्या अखत्यारीतील महाविद्यालये व तंत्रनिकेतन संस्था यांचा समावेश आहे.

## महाराष्ट्र ज्ञान महामंडळ

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शहरी विद्यार्थ्यांप्रमाणेच शैक्षणिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी या महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे. या महामंडळाने डिजिटल युनिव्हर्सिटी, डिजिटल कॉलेज व डिजिटल डायरेक्टोरेट अशा तीन सॉफ्टवेअर प्रणाली विकसित केलेल्या आहेत. या तीनही प्रणाली ई-सुविधेसाठी आधुनिक सर्व्हरच्या सहाय्याने विद्यापीठे व संचालनालयांना जोडण्यात येऊन हे जाळे पुढे राज्यातील सर्व महाविद्यालये व तंत्रनिकेतने यांना जोडण्यात येणार आहे.

## स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ

**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ**[१०७] : पूर्वी वर्णिल्याप्रमाणे १९४८ पर्यंत मराठवाडा प्रांत हा हैद्राबाद राज्यात समाविष्ट होता. साहजिकच निजाम राजवटीमुळे येथील उच्च शिक्षणाचे माध्यम उर्दू होते. येथील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी हैद्राबादचे उस्मानिया विद्यापीठ हेच सर्वात जवळचे विद्यापीठ होते. भाषावर प्रांत रचनेनंतर मराठवाडा विभाग महाराष्ट्रात समाविष्ट केला गेला. यामुळे या मराठी भाषिक प्रदेशाकरीता स्वतंत्र विद्यापीठाची मागणी पुढे आली. स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ, स. कृ. वैशंपायन आदी थोर व्यक्तिंनी औरंगाबाद येथे स्वतंत्र विद्यापीठ स्थापनेचा आग्रह धरला. त्यातूनच सन १९५८ मध्ये औरंगाबाद येथे मराठवाडा विद्यापीठाची स्थापना करण्यात आली. या विद्यापीठाच्या अखत्यारीत त्यावेळी औरंगाबाद, परभणी, नांदेड, बीड व

१०५. **शिक्षणावर दृष्टिक्षेप :** २०००-२००१, पृ १८२-१८३.

१०६. **दैनिक लोकसत्ता,** गुरुवार, दिनांक २२ जून २००६, मुंबई आवृत्ती, पृ. ३.

१०७. स्वा. रा. तीर्थ, मराठवाडा विद्यापीठाकडून प्राप्त झालेल्या माहितीवर आधारित.

उस्मानाबाद या पाच जिल्ह्यांचा समावेश होता. पुढे त्यात जालना, लातूर व हिंगोली या तीन नवनिर्मित जिल्ह्यांची भर पडली. त्यामुळे या विभागाचे विस्तीर्ण भौगोलिक क्षेत्र विचारात घेऊन तत्कालीन मराठवाडा विद्यापीठाने नांदेड येथे सन १९७५ मध्ये एका उप केंद्राची स्थापना केली. या उपकेंद्राचे पुढे विद्यापीठात रूपांतर करण्यासाठी व त्याच्या कार्याची दिशा ठरविण्यासाठी डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र शासनाने दि. ३१ जानेवारी १९९४ रोजी एका समितीची स्थापना केली. या समितीचे सचिव डॉ. विजय खोले, तर भुजंगराव कुलकर्णी, भगवानराव चव्हाण व गो.रा.म्हैसकर हे अन्य सदस्य होते.

या समितीने आपल्यावर सोपविलेले काम पूर्ण करून स्वतंत्र विद्यापीठाच्या स्थापनेला दुजोरा दिला. यासाठी समितीने मराठवाड्यातील तत्कालीन जिल्हा मुख्यालयांच्या ठिकाणी जाऊन शिक्षण व इतर क्षेत्रातील मान्यवरांच्या भेटी घेऊन तसेच विविध क्षेत्रातील लोकांच्या सूचनांचा विचार करून आपला १३३ पृष्ठांचा अहवाल शासनास सादर केला. सदर अहवाल स्वीकारून व दि. १७ सप्टेंबर १९९४ रोजी मराठवाडा मुक्तिदिनाचे औचित्य साधून शासनाने त्याच दिवशी नांदेडच्या या उपकेंद्राचे विद्यापीठात रूपांतर केले व त्यास स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ असे नाव दिले. या विद्यापीठाच्या कक्षेत लातूर, नांदेड, परभणी व हिंगोली असे चार जिल्हे आहेत. या विद्यापीठाच्या स्थापनेवेळी या विद्यापीठाशी ८६ महाविद्यालये संलग्न होती. आता ही संख्या १५४ इतकी आहे. त्यापैकी ७५ महाविद्यालये नांदेड जिल्ह्यात आहेत. विद्यापीठ परिसरात १० शैक्षणिक संकुले कार्यरत आहेत. या संकुलातील अभ्यासक्रम अपारंपारिक स्वरूपाचे आहेत. आतापर्यंत सहा नियमित व एक विशेष दिक्षांत समारंभ संपन्न झाले आहेत.

या विद्यापीठात कला, सामाजिक शास्त्रे, विज्ञान, विधी, वाणिज्य व व्यवस्थापन, वैद्यकीय, आयुर्वेद, अभियांत्रिकी व तत्त्वज्ञान, शारिरीक शिक्षण आणि शिक्षणशास्त्र अशा विविध विद्याशाखा असून संलग्नित महाविद्यालयांद्वारे अध्यापनाचे कार्य केले जाते. याशिवाय युनिव्हर्सिटी कॅम्पस शिक्षण केंद्रांमध्ये मॅनेजमेंट सायन्स, सोशल सायन्स, लाईफ सायन्स, केमिकल सायन्स, फिजिकल सायन्स, अर्थ सायन्स, एज्युकेशन, लँग्वेज ॲण्ड लिटरेचर, इन्फॉ. सायन्स वगैरे अभ्यासक्रम तसेच नर्सिंग कोर्सेस, आरोग्यविषयक डिप्लोमा कोर्सेस, निसर्गोपचार कोर्सेस वगैरेचे शिक्षण दिले जाते. विद्यापीठातील हे विविध अभ्यासक्रम विद्यापीठ अनुदान मंडळ, नवी दिल्ली यांच्या शिफारशींप्रमाणे सुधारित केले जातात. विद्यापीठाने स्थापनेपासूनच संगणकीकरणावर भर देऊन विद्यापीठाचे संपूर्ण संगणकीकरण केलेले आहे. NAAC तर्फे विद्यापीठाचे मुल्यांकन आणि अधिस्वीकृती ऑक्टोबर, २००० मध्ये करण्यात आली. विद्यापीठ अनुदान मंडळाने विद्यापीठास ९ व्या पंचवार्षिक योजनेत १.५० कोटी, तर १० व्या पंचवार्षिक योजनेत २.२५ कोटी रूपयांचे अनुदान मंजूर केले आहे. शिवाय महाराष्ट्र शासनाने मराठवाड्याच्या कालबध्द विकासांतर्गत २५ कोटी रुपयांचे अर्थसहाय्य मंजूर केले असून सन २०००-२००३ अखेर त्यापैकी ७.७४ कोटी रुपये अनुदानरूपात विद्यापीठास प्राप्त झाले. शिवाय विविध संशोधन प्रकल्पांतर्गत १.९१ कोटी रूपयाचे अनुदान विद्यापीठातील संकुलांना मिळाले आहे. अशा तऱ्हेने आर्थिक पातळीवर घडी बसवीत विद्यापीठ आपली पुढील वाटचाल करीत आहे.

सर्व पारंपारिक अकृषि विद्यापीठांकरिता दि. २२ जुलै १९९४ पासून महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ अमलांत आणला गेला. त्याअन्वये सर्व विद्यापीठांना सारखीच कार्ये व अधिकार प्रदान करण्यात आले. या कायद्याला अनुसरून शैक्षणिक व प्रशासकीय कार्ये सक्षमतेने पार पाडण्यासाठी योग्य ते अधिनियम तयार करण्याची जबाबदारी विद्यापीठांवर सोपविण्यात आलेली आहे. आता विद्यापीठांकरिता स्वतंत्र न्यायाधिकरण स्थापन करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

## शिक्षक प्रशिक्षण

**शिक्षक प्रशिक्षण :** सन १९३९ पूर्वी इयत्ता ७ वी उत्तीर्ण हीच मराठवाड्यात शिक्षक प्रशिक्षणासाठी प्रवेश देण्याची पात्रता समजली जात असे. प्राथमिक शिक्षकांकरिता तीन वर्षांचा प्रशिक्षण अभ्यासक्रम असे. १९३९ नंतर हा कालावधी दोन वर्षांचा करण्यात आला. या अभ्यासक्रमात मानसशास्त्र व अध्यापन पद्धतीबरोबरच शालेय विषय, संस्कृत, बीजगणित आणि हस्तव्यवसाय यांचा समावेश असे. १९३९ नंतर काही वर्षे या प्रशिक्षणात मुलोद्योग शिक्षणाचाही समावेश करण्यात आला. सन १९६९ पासून शासनाने दोन वर्षाचा डिप्लोमा इन एज्युकेशन (डी.एड.) असा नवा अभ्यासक्रम सुरू करून पूर्वीचा अभ्यासक्रम किंवा परीक्षा रद्द केल्या. डी.एड. अभ्यासक्रमापूर्वी एस.टी.सी., टी.डी., डी.एड., सी.पी.एड., हिंदी शिक्षक सनद, काव्यतीर्थ इत्यादी अनेक पदविका उपलब्ध होत्या. त्यानंतर शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमात सुसूत्रता येण्याच्या दृष्टिने डी.एड. हा अभ्यासक्रम सुरू करण्यात आला. १९६९ नंतर यातही बदल करण्यात आला. सर्वात अलिकडचा बदल १९८२ साली करण्यात आला. त्यानुसार या अभ्यासक्रमात विषय कसा शिकवावा, याबरोबरच शालेय विषयांचा आशय, नवोदित भारतीय समाजातील शिक्षक आणि शिक्षणाचे स्थान हे पाठ्यक्रम तसेच सूक्ष्म अध्यापन आणि समाजाबरोबरील काम या विषयातील प्रात्यक्षिके समाविष्ट करण्यात आली.[१०८]

माध्यमिक व त्यापुढील शिक्षकांसाठी प्रशिक्षण पदविका परीक्षा (एस.टी.सी.) १८९९ साली मुंबई राज्यात सुरू होती. सन १९२३ मध्ये मुंबई विद्यापीठात प्रशिक्षण पदवी परीक्षा (बी.टी.) सुरू करण्यात आली. स्वातंत्र्यानंतर या पदवीचे नाव शिक्षणशास्त्र पदवी (बी.एड.) असे करण्यात आले. १९८० नंतर बी.एड. अभ्यासक्रमामध्ये आमुलाग्र बदल करण्यात आला व हाच अभ्यासक्रम आता मराठवाड्यासहीत संपूर्ण महाराष्ट्राला लागू करण्यात आला. आता त्यात पारंपारिक विषयांबरोबरच शालेय विषयांचा आशय आणि तो शिकविण्याचे ज्ञान, नवोदित भारतीय समाजातील शिक्षक आणि शिक्षणाचे स्थान, तसेच समाजाबरोबरील कार्य अशा विषयावरील प्रात्यक्षिकांचा समावेश करण्यात आला आहे. बहुतेक सर्व विद्यापीठांमध्ये शारिरीक शिक्षण आणि शालेय विषय अशी सोय असलेला द्विकेंद्री बी.एड. अभ्यासक्रम सुरू आहे. सध्या राज्यामध्ये बी.एड. आणि द्विकेंद्री बी.एड. असे दोन अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. मराठवाड्यातील पहिले बी.एड महाविद्यालय औरंगाबाद येथे सन १९५४ साली स्थापन झाले.[१०९]

स्वातंत्र्यानंतर प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाची जबाबदारी जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकाऱ्याकडे सोपविण्यात आली. प्राथमिक शिक्षकांसाठी प्रशिक्षण शाळा आणि विशेष शाळा यांचेही प्रशासकीय नियंत्रण जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडेच असते. सन १९६२-६३ मध्ये नांदेड जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या १,८६९ शिक्षकांपैकी ४६७ शिक्षक असे शिक्षण घेऊन प्रशिक्षित झाले होते. तर खाजगी

---

१०८. गोगटे, श्री.ब., **: मराठवाड्यातील व्यावसायीक शिक्षण,** इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एज्यूकेशन, पुणे, १९८५, पृ. ५६.

१०९. कित्ता, पृ.५७

अनुदानित शाळेतील १२७ शिक्षकांपैकी १० शिक्षक प्रशिक्षित होते. सन १९८०-८१ मध्ये जिल्ह्यात तीन अध्यापक विद्यालये (डी.एड) व त्यात ३२७ विद्यार्थी (मुली-१३४) प्रशिक्षण घेत होते.[११०] याच वर्षी जिल्ह्यात एक अध्यापक महाविद्यालय सुरू होते व त्यात १०० प्रशिक्षणार्थी (मुली-२४) प्रशिक्षण घेत होते.[१११] पुढील पाच वर्षात अध्यापक विद्यालयांच्या संख्येत ६ ने भर पडून ती ९ झाली, तथापि १९९०-९१ मध्ये त्यातील ३ विद्यालये बंद झाल्याने जिल्ह्यातील यावर्षीची अध्यापक विद्यालयांची संख्या ६ झाली. यात प्रत्येकी ३ विद्यालये शासकीय व खाजगी होती. यावर्षी त्यात ९७५ प्रशिक्षणार्थी (मुली-२६३) प्रशिक्षण घेत होते. मात्र या वर्षाअखेरपर्यंत अध्यापक महाविद्यालयांची संख्या एक वरून ४ झाली. त्यापैकी एक शासकीय महाविद्यालय होते, तर केवळ विद्यार्थिनींसाठी नांदेड येथे विवेकवर्धिणी अध्यापिका महाविद्यालय कार्यरत होते. त्यात ३५३ प्रशिक्षणार्थी (मुली-१६९) शिक्षण घेत होते. याच वर्षी जिल्ह्यात एक शारीरिक शिक्षण महाविद्यालय सुरू होते व त्यात २२० प्रशिक्षणार्थी (मुली १४) शिक्षण घेत होते.[११२]

सन २०००-२००१ या वर्षी जिल्ह्यात ३ शासकीय व ४ खाजगी (विनाअनुदानित) अशी एकूण ७ अध्यापक विद्यालये सुरू होती व त्यात ५६९ प्रशिक्षणार्थी (मुली-३२९) शिक्षण घेत होते. त्यातील मागासवर्गीय प्रशिक्षणार्थींची संख्या ३१२ होती. यावर्षी चारही अध्यापक महाविद्यालयांमध्ये ३३० प्रशिक्षणार्थी (मुली-१५७) अध्ययन करीत होते. त्यात १७६ प्रशिक्षणार्थी मागासवर्गीय होते. याच वर्षी जिल्ह्यात सरस्वती शिक्षण प्रसारक मंडळाचे शारीरिक शिक्षण महाविद्यालय, कवठा व श्री सेवादास शिक्षण प्रसारक मंडळाचे यशवंत शारीरिक शिक्षण महाविद्यालय, सिडको ही दोन खाजगी विनाअनुदानित शारीरिक शिक्षण महाविद्यालये होती. त्यातील ४७९ प्रशिक्षणार्थींमध्ये (मुली-२२) तब्बल ३४० प्रशिक्षणार्थी मागासवर्गीय होते. यावरून मागील दोन दशकात मागासवर्गीय जाती/जमातींमध्ये शिक्षक प्रशिक्षण घेण्याचे प्रमाणे उत्साहवर्धक असल्याचे दिसून येते.[११३] जिल्ह्यातील अध्यापक महाविद्यालये ही स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठांतर्गत येतात.

सन २००४-२००५ मध्ये जिल्ह्यातील खाजगी अध्यापक महाविद्यालयांच्या संख्येत फरक पडला नव्हता. त्याची प्रवेशक्षमता १०० प्रशिक्षणार्थी इतकी आहे.

**विधी शिक्षण :** मराठवाडा स्वातंत्र्यापूर्वी मराठवाड्यात एकही विधी (Law) महाविद्यालय नव्हते. त्यासाठी विद्यार्थ्यांना हैद्राबाद, पुणे, मुंबई व नागपूर येथे जावे लागे. १९६५ साली औरंगाबाद येथे मराठवाड्यातील पहिले माणिकचंद पहाडे विधी महाविद्यालय स्थापन झाले, तर १९६८ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालय स्थापन झाले.[११४] त्यामुळे येथील विद्यार्थ्यांचा कायद्याचे शिक्षण घेण्याचा मार्ग काहीसा सुकर झाला. सध्या मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यात किमान एक तरी

११०. **शिक्षणावर दृष्टिक्षेप :** १९८०-८१, पृ. ५५.

१११. कित्ता, १९९०-९१, पृ. ६५.

११२. कित्ता, पृ. ६५.

११३. कित्ता, २०००-२००१, पृ. १५६-१६३.

११४. **शिक्षणावर दृष्टिक्षेप :** १९८५-८६, पृ. ६४.

विधी महाविद्यालय आहे. नांदेड जिल्ह्यात सध्या शासकीय विधी महाविद्यालय, नांदेड (स्थापना-१९७०) व खाजगी संस्थेचे श्री शिवाजी विधी महाविद्यालय, कंधार, (स्था.-१९९३) ही दोन महाविद्यालये आहेत. या महाविद्यालयांमध्ये एल.एल.बी., बी.एस.एल., एल.एल.एम. व बी.बी.एल. हे अभ्यासक्रम शिकविले जातात. या दोन्ही महाविद्यालयांत सन १९९५-१९९६ या वर्षी शासकीय विधी महाविद्यालयात २,०२० विद्यार्थी (मुली-७९) कायद्याचे शिक्षण घेत होते. १९९०-९१ मध्ये ही विद्यार्थी संख्या २,१८३ इतकी झाली.[११५] सन १९९४-९५ मध्ये शासकीय व खाजगी अशा दोन्ही विधी महाविद्यालयांमध्ये शिकणाऱ्या एकूण १,२७७ (मुली-१२८) विद्यार्थ्यांमध्ये ६०१ विद्यार्थी मागासवर्गीय होते.[११६] २०००-२००१ मध्ये मात्र विधी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ५४७ (मुली-११३) वर घसरली. त्यात २२३ मागासवर्गीय विद्यार्थी होते.[११७] कदाचित माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रास आलेल्या महत्त्वामुळे विद्यार्थीवर्गाचा ओढा त्याकडे झुकल्याचा हा परिणाम असावा. तथापि, २००४-२००५ या शैक्षणिक वर्षात ही संख्या पुन्हा काहीशी वाढून १,८७२ इतकी झाली. त्यात बहुसंख्येने म्हणजे १३५३ विद्यार्थी मागासवर्गीय होते. मागास जाती-जमातींचा कायद्याचे शिक्षण घेण्यातील हा उत्साह त्यांच्या सामाजिक जाणिवा जागृत होत असल्याचे द्योतक आहे.

## वैद्यकीय शिक्षण

**वैद्यकीय शिक्षण :** स्वातंत्र्यापूर्वी मराठवाड्यात वैद्यकीय शिक्षणाची सोय नव्हती. हैद्राबाद राज्यात प्रथम सुरू झालेली वैद्यकीय संस्था म्हणजे १८४६ मध्ये स्थापन झालेले हैद्राबाद मेडीकल स्कूल होय. हैद्राबाद मेडीकल सर्विसमध्ये उमेदवारांना व वऱ्हाडच्या (बेरारच्या) हॉस्पिटलमधील असिस्टंटना प्रशिक्षण देण्यासाठी ही संस्था उपयुक्त होती. निवासी शल्यचिकित्सक हा या स्कूलचा प्राचार्य होता. त्याचा शिक्षण खात्याशी संबंध नसे.[११८] प्रथम उर्दूमध्ये हे शिक्षण देण्यात येई. १८८४ पासून ते इंग्रजी माध्यमातून देण्यास सुरुवात झाली. १८८५ पर्यंत सिकंदराबादच्या बोर्ड ऑफ मेडीकल कॉलेज किंवा ग्रँट मेडीकल कॉलज, बॉम्बे यांच्या बोर्ड ऑफ एक्झामिनर्सकडून लेखी परीक्षा घेतल्या जाऊ लागल्या, तर तोंडी परीक्षा सिकंदराबादच्या बोर्डाकडून घेण्यात येऊ लागल्या. हा अभ्यासक्रम मद्रास विद्यापीठाच्या एल.एम.ॲण्ड सी. सारखाच होता.[११९]

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर वैद्यकीय शिक्षण हे वैद्यकीय शिक्षण संचालक, महाराष्ट्र शासन, यांच्या अधिपत्याखाली सुरू आहे. नांदेड जिल्ह्यात शासनाने १९५६ मध्ये पहिले शासकीय आयुर्वेद महाविद्यालय सुरू केले. त्यात बी.ए.एम.एस. व एम.डी. या विषयांत पदवी प्राप्त करता येते. शासनाने त्यानंतर खाजगी संस्थांना अशी महाविद्यालये स्थापन करण्यास परवानगी दिल्याने आता जिल्ह्यात त्यांची वैद्यकीय महाविद्यालये कार्यरत आहेत. ॲलोपॅथीप्रमाणे आयुर्वेद आणि होमिओपॅथी यांचे तसेच नर्सिंग कॉलेज, आरोग्यविषयक डिप्लोमा कोर्सेस, सर्टिफिकेट कोर्सेस, निसर्गोपचार यांचेही शिक्षण आता नांदेडमध्ये उपलब्ध आहे. सध्या जिल्ह्यात एक शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय व रुग्णालय व इतर प्रकारची ३ महाविद्यालये सुरू आहेत.

---

११५. **शिक्षणावर दृष्टिक्षेप :** १९९०-९१, पृ. ६४.

११६. कित्ता, १९९५-९६, पृ. १३८-३९.

११७. कित्ता, २०००-२००१, पृ. १५८-५९.

११८. **इम्पेरियल गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ७९.

११९. कित्ता.

## तंत्रशिक्षण

१९४८ पूर्वी मराठवाड्यात औरंगाबाद, बीड, जालना व नांदेड येथे तंत्र शिक्षण देणाऱ्या तंत्रशाळा उपलब्ध होत्या.[१२०] सध्याच्या आय.टी.आय. अभ्यासक्रमाशी मिळतेजुळते अशा प्रकारचे अभ्यासक्रम उपलब्ध होते. तांत्रिक शिक्षणातील पदविका किंवा पदवी मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांना हैद्राबाद किंवा तत्कालिन मुंबई राज्यातील विविध ठिकाणी जावे लागे. मराठवाड्याचा तेव्हा औद्योगिक विकासही झालेला नसल्याने तेथील जनता व खुद्द निजामांना उच्च स्तरावरील तंत्र शिक्षणाची गरज भासली नाही. व्यावसायिक शिक्षणाबाबतही मराठवाड्यात हीच स्थिती होती.

त्यानंतर प्रगत औद्योगिक युगात तंत्रशिक्षणाला मिळालेले महत्व लक्षात घेऊन महाराष्ट्र राज्यात सर्व स्तरावर तांत्रिक शिक्षण देण्याची जबाबदारी एकाच आस्थापनेकडे एकत्रितरीत्या सोपविण्याच्या दृष्टिने १९४८ साली तंत्र शिक्षण संचालनालयाची स्थापना करण्यात आली व सदरहू संचालनालयाकडे अभियांत्रिकी महाविद्यालये, तंत्रशिक्षण विद्यालये, तंत्रनिकेतने, औद्योगिक प्रशिक्षण कार्यशाळा व उच्च माध्यमिक तांत्रिक प्रयोगशाळा/केंद्रे व इतर प्रमाणपत्र अभ्यासक्रम सोपविण्यात आले. हे संचालनालय १९६३ पर्यंत राज्यातील तंत्रनिकेतने आणि इतर तांत्रिक शिक्षणक्रमातील पदविका आणि प्रमाणपत्र परीक्षा घेत असे.[१२१] तथापि, याच वर्षी तांत्रिक शिक्षण मंडळाची स्थापना झाल्याने हे काम या मंडळाकडे सोपविण्यात आले. संचालनालयाचे प्रशासन कार्यक्षम होण्यासाठी त्याची प्रादेशिक कार्यालये स्थापन करण्यात आली. नांदेड जिल्हा समाविष्ट असलेल्या औरंगाबाद विभागाचे काम १९६६ पर्यंत नागपूरच्या प्रादेशिक कार्यालयाकडे होते.[१२२] त्यानंतर औरंगाबाद येथे स्वतंत्र प्रादेशिक कार्यालय स्थापन करण्यात आले. तसेच वाढत्या औद्योगिकीकरणामुळे सतत वाढत असलेली प्रशिक्षित मनुष्यबळाची गरज पुरविणे व त्याद्वारे विकास साधणे या उद्देशाने दि. ३० मार्च १९८१ पासून तंत्रशिक्षण संचालकांची नेमणूक करण्यात आली.[१२३]

मागील चार दशकांमध्ये राज्यात औद्योगिक उत्पादनाच्या घटक रचनेत बदल झाल्यामुळे या औद्योगिक घटकांना निरनिराळ्या स्तरावर लागणारे तांत्रिक प्रशिक्षित मनुष्यबळ व त्याला पुनर्प्रशिक्षणाच्या सोयी उपलब्ध करण्याच्या दृष्टिने राज्यात प्रशिक्षणाच्या सोयींमध्ये प्रचंड वेगाने वाढ झाली. या विविध कार्यक्रमांचे संचालन व प्रशासन यांची सर्वांगीण प्रगती होण्याच्या दृष्टिने तंत्रशिक्षण संचालनालयाचे डिसेंबर १९८४ मध्ये विभाजन करून (१) तंत्रशिक्षण व (२) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय अशी दोन स्वतंत्र संचालनालये निर्माण करण्यात येऊन त्यांचे प्रशासन स्वतंत्र संचालकांकडे सोपविण्यात आले. यापैकी तंत्रशिक्षण संचालनालयाकडे अभियांत्रिकी महाविद्यालये, तंत्रशास्त्र संस्था, तंत्रनिकेतने, व्यवस्थापनशास्त्र पदव्युत्तर पदवी, वस्त्रनिर्माण व औषधनिर्माणशास्त्र पदवी व पदविका, अन्य तत्सम पदव्युत्तर अभ्यासक्रम व संशोधन इत्यादी सर्व प्रकारचे तंत्र शिक्षणाचे काम सोपविण्यात आले.

---

१२०. गोगटे, श्री. ब., **मराठवाड्यातील व्यावसायिक शिक्षण,** पृ. १२-१३.

१२१. **परभणी जिल्हा गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ५३५.

१२२. कित्ता.

१२३. कित्ता.

इयत्ता ८ वी ते १० वी पर्यंतच्या माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना तंत्रशिक्षणाचा लाभ घेता येतो. नवीन शैक्षणिक धोरणानुसार राज्यात १९९६-९७ या शैक्षणिक वर्षापासून इयत्ता ८ वी मध्ये अभियांत्रिकी शास्त्राची मूलतत्त्वे हा तांत्रिक विषय आणि नववी व दहावीमध्ये (१) Elements of Mechanical Engineering, (२) Elements of Electrical & Electronics Engineering हे तांत्रिक विषय अंतर्भूत करण्यात आले आहेत. जिल्ह्यात सध्या नांदेड येथे शासकीय तंत्रनिकेतन असून त्यात स्थापत्य, उत्पादन, यंत्र, वैद्यकीय अनुविज्ञान, विद्युत व माहिती तंत्रज्ञान हे तीन-तीन वर्षांचे अभ्यासक्रम आहेत. या तंत्रनिकेतनाची प्रवेशक्षमता ६० इतकी आहे. यास वसतिगृहाची सुविधा आहे. जिल्ह्यात याव्यतिरिक्त नांदेड फार्मसी कॉलेज (प्रवेशक्षमता-५०) व ग्रामीण शिक्षण प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन, नेहरूनगर (प्रवेशक्षमता ४० ते ६०) अशी दोन अशासकीय तंत्रनिकेतने आहेत. १९९४ मध्ये स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाची स्कूल ऑफ कॉमर्स ॲण्ड मॅनेजमेंट सायन्स ही संस्था नांदेड शहरात विष्णुपुरी येथे स्थापन झाली. याची प्रवेशक्षमता ६० इतकी असून त्यात सिव्हिल, कम्प्युटर सायन्स ॲण्ड इंजिनियरिंग, इलेक्ट्रिकल्स ॲण्ड इलेक्ट्रॉनिक्स इंजिनियरिंग, इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलिकम्युनिकेशन, इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, मेकॅनिकल ॲण्ड प्रॉडक्शन इंजिनियरिंग हे अभ्यासक्रम आहेत.

जिल्ह्यात दोन औषधनिर्माणशास्त्र संस्था असून त्यांची प्रवेशक्षमता १०० इतकी आहे, तर नांदेड येथे गुरू गोविंदसिंघजी अभियांत्रिकी व तंत्रशिक्षण महाविद्यालय ही अशासकीय, पण अनुदानित संस्था असून त्याची प्रवेशक्षमता त्यातील विविध अभ्यासक्रमांनुसार ४० ते १२० विद्यार्थी एवढी आहे. यात २ ते ४ वर्षांच्या कालावधीचे अभ्यासक्रम शिकविले जातात.

**माहिती तंत्रज्ञान (Information Technology) :** जगभर हा विषय जीवनाची सर्व क्षेत्रे जलदगतीने पादाक्रांत करीत आहे. विशेषतः व्यापारी क्षेत्रामध्ये माहिती तंत्रज्ञानाचे परिणाम जबरदस्त व जलदगतीने होत आहेत. या होऊ घातलेल्या बदलास योग्य असे समाजमन तयार करणे जेवढे आवश्यक आहे, तेवढेच माहिती तंत्रज्ञान विषयांतील कुशल व तज्ज्ञ मनुष्यबळ निर्माण होणेही आवश्यक आहे. या दृष्टिकोनातून शासनाने व्यापक विचार करून पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा.राम ताकवले यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली. या समितीने शासनास केलेल्या शिफारशींना अनुसरून महाराष्ट्र राज्यात माहिती तंत्रज्ञानाचे उच्च शिक्षणाच्या माध्यमातून सार्वत्रिकीकरण करण्यासाठी व त्यादृष्टिने राज्यातील सर्व शैक्षणिक संस्थांमधील विद्यार्थी व शिक्षकांना माहिती तंत्रज्ञान व संबंधित शिक्षण माहिती तंत्रज्ञानाच्या सहाय्याने शिकण्याची संधी उपलब्ध करण्यासाठी शासनाने शैक्षणिक संस्था, विद्यापीठे व माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील खाजगी उद्योगांच्या भागीदारीने 'महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित' नावाची संस्था स्थापन केलेली आहे. त्या आधारे राज्यातील सर्व विद्यापीठे, महाविद्यालये, तंत्रनिकेतने व औद्यागिक प्रशिक्षण संस्थांमध्ये Network Access Centre (NAC) ची खाजगी प्रशिक्षण संस्थांच्या सहाय्याने स्थापना करून सर्व विद्यार्थी, शिक्षक, शासकीय सेवक व सर्वसामान्य नागरिक यांच्यासाठी 'महाराष्ट्र राज्य माहिती तंत्रज्ञान प्रमाणपत्र अभ्यासक्रम' (MS-CIT, Maharashtra State Certificate in Information Technology) व त्याचे

प्रशिक्षण घेण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे. याचबरोबर E-Commerce कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्र ज्ञान महामंडळातर्फे Digital University, Digital Cource व Digital Department हे उपक्रम हाती घेण्यात आले आहेत. शिवाय सर्व विद्यापीठे व शैक्षणिक संस्थांच्या सहाय्याने राज्यातील विशेषतः दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना विविध अभ्यासक्रमांचे दर्जात्मक शिक्षण उपलब्ध करून देण्याच्या हेतुने शासन प्रयत्नशील आहे. राज्यभर प्रत्येक तालुक्यांत या महामंडळाकडून Community Learning & Information Centre ही केंद्रेही सामान्य जनतेकरिता स्थापण्यात येत आहेत.

या माहिती तंत्रज्ञानासंबंधी जगभर चर्चा होऊ लागल्यामुळे सन १९९८ पासून महाराष्ट्र शासनाने ' माहिती तंत्रज्ञान पदवी अभ्यासक्रम ' सुरू केला. याव्यतिरिक्त १९९९-२००० पासून महाराष्ट्रातील प्रगत तंत्रनिकेतनांमधून १० वी, १२ वी व पदवी नंतर अशा तीन स्तरावर MS-CIT हा एक वर्षीय अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. शासकीय नोकरीसाठीही शासनाने या अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र अनिवार्य केल्याने राज्यातील इतर जिल्ह्यांप्रमाणेच नांदेड जिल्ह्यातही कित्येक संस्था हा अभ्यासक्रम राबवित आहेत.

## व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण

पूर्वी वर्णिल्याप्रमाणे निजामकाळात मराठवाड्याचा औद्योगिक विकास झालेला नसल्याने तेथील जनता व खुद्द निजामांनाही तंत्रशिक्षण वा व्यवसाय शिक्षणाची गरज भासत नव्हती. त्यामुळे मराठवाड्यात व्यवसाय शिक्षणाच्या सोयी केवळ नगण्य अशाच होत्या. मराठवाडा मुक्तीनंतर १९५२ च्या सुमारास मराठवाड्यात काही ठिकाणी बहुद्देशीय शाळा स्थापन झाल्या होत्या. त्यात विविध व्यावसायिक विषयांचे शिक्षण उपलब्ध होते. या शाळाही नंतर बंद करण्यात आल्या.[१२४] १९७२ मध्ये शासनाने शिक्षणाचा नवा आकृतिबंध स्वीकारण्याचे ठरविल्यानंतर १९७७-७८ या वर्षापासून त्याची निवडक जिल्ह्यात अंमलबजावणी सुरू करण्यात आली. प्रथमतः औरंगाबाद व त्यानंतर नांदेड व उस्मानाबाद या जिल्ह्यांची त्यासाठी निवड करण्यात आली व हळूहळू सर्व जिल्ह्यांमधील निवडक शाळा व महाविद्यालयांमध्ये + २ स्तरावर हे अभ्यासक्रम सुरू झाले.

१९७९ मध्ये शासनाने ३ वर्षे मुदतीचा ॲलोपॅथिक पदविका अभ्यासक्रम सुरू केला होता. नांदेड जिल्ह्यात तो उपलब्ध होता. पण १९८१ नंतर तो बंद करण्यात आला.[१२५] पुढे १९८४ मध्ये शासनाने तंत्रशिक्षण संचालनालयाचे विभाजन करून त्यातून व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण असे स्वतंत्र संचालनालय निर्माण केले व त्याकडे शिल्प कारागिर प्रशिक्षण योजना (औद्योगिक प्रशिक्षण संस्था), शिकाऊ उमेदवारी योजना, औद्योगिक शाळा, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण कार्यशाळा, + २ स्तरावरील व्यवसाय शिक्षण, माध्यमिक व उच्च माध्यमिक तांत्रिक विद्यालय/केंद्र व इतर प्रमाणपत्र अभ्यासक्रम या वेगवेगळ्या योजनांची जबाबदारी सोपविण्यात आली. या योजनांपासून कुशल व

१२४. गोगटे, श्री. ब., **मराठवाड्यातील व्यावसायिक शिक्षण,** पूर्वोक्त, पृ. ४८.

१२५. कित्ता, पृ. ३३.

निमकुशल कारागीर निर्माण केले जातात. तसेच कारखान्यांतील कुशल/निमकुशल कारागिरांचे कौशल्य वाढविण्यासाठी प्रगत स्वरूपाचे प्रशिक्षण कार्यक्रम राबवून कारखान्यांना पर्यवेक्षीय स्तरावरील मनुष्यबळ मिळविण्यासही मदत होते.

सन १९८५ पासून राज्य शासनाने केंद्र शासन पुरस्कृत व्यावसायिक अभ्यासक्रम सुरू केले. या अभ्यासक्रमात कम्प्युटर, इलेक्ट्रॉनिक्स, अकाऊंटस् आणि ऑडीट, पॅथॉलॉजी, डेअरी, क्रॉप सायन्स, हॉर्टीकल्चर, इलेक्ट्रिकल अप्लायन्सेस इत्यादी अभ्यासक्रम आहेत. हे अभ्यासक्रम कनिष्ठ महाविद्यालयांना जोडण्यात आले आहेत.

१९८८-८९ या वर्षापासून केंद्र शासन पुरस्कृत योजनेंतर्गत + २ स्तरावर व्यवसाय अभ्यासक्रम राज्यात सुरू करण्यात आले आहेत. आता या क्षेत्रातील संस्थांची वाढती संख्या लक्षात घेऊन व योजना राबविण्यासाठी प्रभावी नियंत्रण असावे म्हणून या संचालनालयांतर्गत दोन संचालकांची पदे मार्च, १९९८ पासून निर्माण करून त्यांच्याकडे (१) व्यवसाय शिक्षण व (२) व्यवसाय प्रशिक्षण अशी स्वतंत्र जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे. यापैकी आता व्यवसाय शिक्षण संचालकांच्या कार्यकक्षेत माध्यमिक स्तरावरील तंत्र शिक्षण, + २ स्तरावरील द्विलक्षी व्यवसाय शिक्षण, + २ स्तरावरील केंद्र शासन पुरस्कृत व्यवसाय शिक्षण (एम.सी.व्ही.सी.), रोजगार व स्वयंरोजगार, व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळाचे प्रमाणपत्र अभ्यासक्रम व व्यवसाय शिक्षणाच्या अनुषंगाने येणारे सर्व विषय येतात, तर प्रशिक्षण संचालकांच्या कार्यकक्षेत शिल्प कारागीर प्रशिक्षण योजना, शिकाऊ उमेदवारी योजना, प्रगत व्यवसाय शिक्षण, औद्योगिक कामगारांकरिता सायंकालीन वर्ग व प्रशिक्षणाच्या अनुषंगाने येणारे सर्व विषय येतात.

१९९०-९१ या शैक्षणिक वर्षापर्यंत नांदेड जिल्ह्यात ७ अशासकीय कनिष्ठ महाविद्यालयांकडून + २ स्तरावरील द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम शिकविले जात.[१२६] त्यात तंत्रविषयक, शेती, वाणिज्य, अन्न तंत्रशास्त्र, मत्स्य व अर्धवैद्यकीय आदी १२ अभ्यासक्रम शिकविले जात. यावर्षी ७५ विद्यार्थी असे शिक्षण घेत होते. याशिवाय दोन शासकीय संस्थांकडूनही असे अभ्यासक्रम शिकविले जात. याचवर्षी किमान कौशल्यावर आधारित व्यवसायाभिमुख अभ्यासक्रम जिल्ह्यात ८ कनिष्ठ महाविद्यालयांकडून चालविले जात. त्यात २२ अभ्यासविषय होते व ४४० विद्यार्थी ते शिकत होते. किनवट तालुक्यात आदिवासी उपयोजनेंतर्गत सदर अभ्यासक्रम सुरू आहे.[१२७] नांदेड जिल्ह्यात २००० अखेर १३ अशासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था होत्या. याशिवाय धर्माबाद, हदगाव, भोकर व किनवट येथे प्रत्येकी एक शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था होती.[१२८] सध्या जिल्ह्यात ९ शासकीय व ४ अशासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था असून त्यापैकी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची प्रवेशक्षमता एकूण १,६१२ व अशासकीय संस्थांची प्रवेशक्षमता ४६० इतकी आहे. प्रत्येक तालुक्यात नवीन औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरू करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. त्यानुसार मुदखेड,

---

१२६. गोगटे, श्री. ब., पूर्वोक्त, पृ. १६७.

१२७. कित्ता.

१२८. **जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन,** नांदेड, २००३-२००४, पृ. ८.

उमरी, बिलोली, माहूर, नायगाव, हिमायतनगर व अर्धापूर तालुक्यात या संस्था सुरू करण्याचे प्रस्तावित आहे. जिल्ह्यातील अशा सर्व शासकीय व अशासकीय संस्थांमधून शेकडो व्यवसायिक विषयांचे प्रशिक्षण सुरू आहे.

**प्रगत व्यवसाय प्रशिक्षण पद्धती :** देशातील औद्योगिक विकासाला गती मिळावी, औद्योगिक उत्पादन वाढावे, त्यास उत्तेजन मिळावे व सहाय्य व्हावे या हेतूने ही पद्धती १९८२ पासून राज्यात नांदेडसह सुरू करण्यात आलेली आहे. अतिशय उच्च प्रकारचे कसबप्राप्त कामगार व तंत्रज्ञ निर्माण करणे हा या योजनेचा हेतू आहे. त्यात १) इंडियन स्टॅन्डर्ड ॲण्ड रिडींग ऑफ इंजिनियरिंग ड्रॉईंग, २) मशिन टूल्स मेन्टेनन्स (इलेक्ट्रिकल) व रेफ्रीजरेशन ॲण्ड एअर कंडीशन मेकॅनिक हे अभ्यासक्रम शिकविले जातात.

थोडक्यात, नांदेड जिल्ह्यात अन्य शिक्षणाच्या सोयींप्रमाणे तंत्र व व्यवसाय शिक्षणाच्या सोयीही मोठ्या प्रमाणात उपलब्ध होत आहेत. त्यायोगे जिल्ह्याची प्रगत औद्योगिक विकासाकडे वाटचाल सुरू आहे.

## आरोग्य

**स्वातंत्र्यपूर्व काळ (१९ वे शतक) :** निजाम राज्यात सुरूवातीला स्वतंत्र असे आरोग्य खाते नव्हते. त्यादृष्टिने १८४५ मध्ये हैद्राबाद येथे पहिली वैद्यकीय शाळा (Hyderabad Medical School) स्थापन झाली. सुरूवातीस या विद्यालयात वैद्यकीय अधिकारी, हैद्राबाद वैद्यकीय सेवेतील दुय्यम सेवा कर्मचारी तसेच वऱ्हाडातील रुग्णालयांसाठी आवश्यक असलेल्या सहाय्यकांना उर्दू माध्यमातून प्रशिक्षण देण्यात येत असे. हे शिक्षण १८८४ पासून इंग्रजी माध्यमातून देण्यात येऊ लागले. १८८५ पर्यंत सिकंदराबादच्या बोर्ड ऑफ मेडीकल कॉलेज किंवा ग्रँट मेडीकल कॉलेज, बॉम्बे यांच्या बोर्ड ऑफ एक्झामिनर्सकडून लेखी परीक्षा घेतल्या जाऊ लागल्या, तर तोंडी परीक्षा उपरोक्त सिकंदराबादच्या बोर्डाकडून घेतल्या जात. हा कोर्स किंवा शिक्षण मद्रास विद्यापीठाच्या एल.एम.ॲण्ड एस या कोर्सशी समकक्ष होते.[१२९] सालारजंग यांच्या कारकिर्दीत स्थापन केलेल्या न्याय, महसूल, पोलीस आणि किरकोळ खात्याची कामे करण्यासाठी नियुक्त केलेल्या विभागीय मंत्र्यांच्या मार्गदर्शनासाठी आरोग्य विभाग सुरू केला. तेव्हाही राज्यात पोलीस पाटील हा जन्म-मृत्यूची नोंद ठेवत असे.[१३०]

साधारणतः राज्यात १८८० च्या सुमारास वैद्यकीय विभाग सुरू झाला. हैद्राबाद शहर जिल्ह्यांचे ठिकाण व उपनगरात १८८४-८५ मध्ये एकूण ५ नागरी रुग्णालये व ४८ दवाखाने होते. १८९१ मध्ये ही संख्या ६७ तर १९०१ मध्ये ८४ इतकी झाली.[१३१] या सर्वांतून १८८४ मध्ये २,९२,५१५, १८९१ मध्ये ३,८४,६६० आणि १९०१ मध्ये ६,६३,०४४ बाह्यरुग्णांवर उपचार केले गेले. याचवर्षामध्ये

१२९. **इम्पेरियल गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ७९.

१३०. **परभणी जिल्हा गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ५३७.

१३१. **इम्पेरियल गॅझेटिअर,** उपरोक्त, पृ. ८९.

अनुक्रमे ३९३, ३,३१३ व ४,६२८ मोठ्या शस्त्रक्रिया व ३,३३७, १६,७९५ व १५,००७ लहान शस्त्रक्रिया करण्यात आल्या. १९०१ मध्ये संपूर्ण हैद्राबाद राज्यात ७४ सर्जन्स, १२ महिला डॉक्टर्स, ३१ हॉस्पिटल असिस्टंट, १०४ कंपाऊंडर्स व ११६ लसटोचक होते. जिल्हा पातळीवर ३ ते ५ सर्जन, १ ते ५ हॉस्पिटल्स असिस्टंट, ४ ते ७ कंपांऊडर्स व ५ ते ११ लसटोचक असत.[१३२]

सन १९०१ मध्ये नांदेड जिल्ह्यात २ रुग्णालये होती, व त्यात ६ आंतरुग्ण ठेवण्याची सोय होती. त्यात यावर्षी २०,१६० बाह्यरुग्ण व ७३ आंतरुग्णांवर उपचार करण्यात आले, तर ३४८ शस्त्रक्रिया करण्यात आल्या. यासाठी झालेला ६,५१६ रुपये इतका खर्च शासनाकडून मिळाला होता.[१३३]

सन १९११ मध्ये हैद्राबाद राज्यात ९२ रुग्णालये व दवाखाने कार्यरत होते. १९२१ च्या सुमारास ही संख्या १२१ पर्यंत वाढली. त्यात अफजलगंज, व्हिक्टोरिया जनाना, आयसोलेशन व सीटी पोलीस रुग्णालय या चार खास रुग्णालयांचा समावेश होता. त्यातील प्रथम दर्जाची १६ रुग्णालये जिल्हा मुख्यालयांच्या ठिकाणी, तर ८२ दुय्यम दर्जाचे दवाखाने तालुका मुख्यालयांच्या ठिकाणी होते. याशिवाय त्यात स्थानिक निधीवर चालविलेल्या १६ दवाखान्यांचा समावेश होता. उर्वरित आयुर्वेदिक व युनानी दवाखाने मुख्य युनानी वैद्यकीय अधिकाऱ्याच्या नियंत्रणाखाली होते. वरील संख्येत नांदेड जिल्ह्यातील वैद्यकीय केंद्रांचाही समावेश होतो. १९३८ मध्ये राज्यात रुग्णालये व दवाखान्यांची एकत्रित संख्या १५१ इतकी होती. याच वर्षी हैद्राबादला निजाम जनरल हॉस्पिटलची स्थापना करण्यात आली.[१३४]

मनोरुग्णांसाठी राज्यात स्वतंत्र रुग्णालय नसले, तरी हैद्राबाद सेंट्रल जेलमध्ये मनोरुग्णांना ठेवण्याची थोडीफार सोय होती. अशा रुग्णालयांचा खर्च अन्य रुग्णालयाप्रमाणे राज्य सरकारच करीत असे.

इ.स. १८८४-८५ मध्ये हैद्राबाद राज्यात लसटोचणी कार्यक्रम सुरू झाला. यासाठी प्रथम ४८ लसटोचकांची नियुक्ती करण्यात आली. त्यांनी एकूण ४४,०६२ लोकांचे लसीकरण केले होते. एक वर्षाखालील मुलांना विशेषतः रोगप्रतिबंधक लस टोचण्यात येई. १८९१ मध्ये ७६,८८० लोकांना तर १९०१ मध्ये ३७,८८० लोकांना अशी लस टोचण्यात आली. १८९१ मधील लसटोचणी केलेल्यांची संख्या वाढण्याचे कारण म्हणजे लोकल बोर्डाच्या जास्तीत जास्त लसटोचकांनी या कार्यक्रमात भरीव काम केले होते, पण १९०१ मध्ये लस टोचकांना मोठ्या संख्येने दुष्काळ प्लेग मोहिमेवर पाठविण्यात आल्याने त्यावर्षी लस टोचून घेणाऱ्यांची संख्या कमी झाली. हे लसीकरण युरोपियन पद्धतीने केले गेले.[१३५] १९०१ मध्ये नांदेड जिल्ह्यातील ८६० लोकांचे लसीकरण करण्यात आले होते. हे प्रमाण १ हजार लोकसंख्येमागे १.७१% इतके होते.[१३६] लस विभाग हा स्वच्छता विभागाचा सहाय्यकारी विभाग

१३२. **इम्पेरियल गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ७९.

१३३. कित्ता, पृ. २३०.

१३४. **परभणी जिल्हा गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ५३७.

१३५. **इम्पेरियल गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ८०.

१३६. कित्ता, पृ. २३०.

म्हणून १९१२ पासून काम करीत असे. याच वर्षी राज्यात स्वच्छता विभागाची निर्मिती करण्यात आली होती. या विभागाचा अतिरिक्त भार वैद्यकीय विभागाच्या संचालकाकडे सोपविण्यात आला होता. जिल्हा शल्यचिकित्सक जिल्ह्याच्या स्वच्छतेसाठी जबाबदार असे.[१३७]

वैद्यकीय महाविद्यालयात दाखल होऊन अभ्यासक्रम पूर्ण करू इच्छिणाऱ्या विद्यार्थिनींना शासनाकडून शिष्यवृत्ती दिली जात असे. अफजलगंज व व्हिक्टोरिया महिला रुग्णालय येथे परिचारिकांना प्रशिक्षण देण्यात येत असे, तर प्रसविका व दायिंना रुग्णालयातच प्रशिक्षण मिळे.[१३८]

हैद्राबादच्या स्वातंत्र्यापूर्वी त्या राज्यात कुष्ठरोगाचे रुग्ण आढळत असत. तथापि, त्यांचे प्रमाण फारच अल्प असे.

राज्यातील नांदेड जिल्ह्यातील तत्कालीन काही वर्षांतील कुष्ठरोग्यांची आकडेवारी खालील विवरणपत्रात दर्शविलेली आहे.[१३९]

**१००० लोक संख्येमागील कुष्ठरोगी लोकसंख्या**

| १८८१ | | १८९१ | | १९०१ | | १९११ | | १९२१ | | १९३१ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पु. | स्त्री. | पु. | स्त्री. | पु. | स्त्री. | पु. | स्त्री. | पु. | स्त्री. | पु. | स्त्री. |
| ३२ | १० | २२ | ७ | २२ | ३ | ३३ | ११ | ३५ | १४ | १० | ५ |

यावेळी राज्यात फक्त डिचापल्ली येथे वेस्लेयम मिशन अथॉरिटीजने (Wesleyam Mission Authorities) १९१६ मध्ये 'लेपर हॉस्पिटल' सुरू केले होते. त्याचे प्रारंभीचे ' होम फॅार लेपर्स ' हे नाव पुढे १९२८ मध्ये बदलून ते लेप्रसी हॉस्पिटल असे करण्यात आले. या मिशनला निजाम सरकार भरघोस मदत देत असे.[१४०]

त्यानंतर १९२१ ते १९३० या दशकात हैद्राबाद शहरातील धुळपेठ येथे बाह्यरुग्ण विभाग सुरू करण्यात आला. त्याचे प्रशासन वरील हॉस्पिटलकडेच होते. हा विभाग एप्रिल १९३० मध्ये खुर्दाद येथील Civil Medical Dept. कडे हस्तांतरित करण्यात आला. निजामाबाद येथेही अशाच प्रकारचा एक बाह्यरुग्ण विभाग होता. त्यात प्रशिक्षित वैद्यकीय अधिकारी असे. दरवर्षी राज्यात जवळपास एक डझन वैद्यकीय अधिकारी कुष्ठरोगाच्या आधुनिक उपचारासंदर्भात प्रशिक्षित केले जात.[१४१]

---

१३७. **परभणी जिल्हा गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ५३७.

१३८. कित्ता, पृ. ५३८.

१३९. **सेंसस ऑफ इंडिया, १९३१,** व्हॉ. XXIII, एच.ई.एच. निजाम डोमिनियन्स (हैद्राबाद स्टेट), पार्ट-I, रिपोर्ट, गव्हर्नमेंट प्रिंटींग प्रेस, हैद्राबाद, डेक्कन, १९३३, पृ. १३१-१३४.

१४०. **सेंसस ऑफ इंडिया, १९३१,** पूर्वोक्त, पृ. १३१-१३४.

१४१. कित्ता.

इ.स. १९३८ मध्ये राज्यात प्रसुती व बालसंगोपन व्यवस्थापनासाठी स्त्री वैद्यकीय अधिकाऱ्याची नियुक्ती केली गेली. हा अधिकारी मुख्यतः जनजागृती व प्रचाराचे कार्य करीत असे. शालेय विद्यार्थ्यांची या कार्यक्रमात वैद्यकीय तपासणी करण्यात येत असे.[१४२]

राज्यात प्रामुख्याने प्लेग, कॉलरा, देवी, एन्फ्ल्यूएंझा व ताप या साथीच्या रोगांचा वारंवार प्रादुर्भाव होत असे. राज्यात प्रामुख्याने प्लेग प्रतिबंधक कार्यासाठी आरोग्य खात्याच्या मंत्र्याच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली होती, तर पटकी, ताप वगैरे रोगांसाठी आरोग्य संचालकांनी पुढाकार घेतल्याने इतर समित्या त्यांच्या अध्यक्षतेखाली नेमल्या गेल्या. १९०८ पर्यंत राज्यात मृत्यू पावलेल्या एकूण रुग्णांपैकी निम्मे रुग्ण तापाच्या साथीमुळे मृत्यू पावले होते. देवीच्या साथीमुळेही बरेच दगावले होते. प्लेग समूळ नष्ट करण्यासाठी रोगप्रतिबंधक औषधांची संपूर्ण राज्यात फवारणी केली होती. ठिकठिकाणी आरोग्य पथके नेमून साथीची लागण झालेल्या रोग्यांवर पथकाद्वारे उपचार करण्याची व्यवस्था होती. जिल्ह्याच्या ठिकाणी जिल्हा स्वच्छता निरीक्षक हे स्थानिक पोलीस व महसूल विभागाच्या मदतीने प्रतिबंधक उपाय अमलात आणित. इ.स. १९४० मध्ये राज्यात मृत्यू पावलेल्या लोकांपैकी ६०% लोक तापामुळे मृत्यू पावले होते. हिवताप बळींची संख्याही बरीच होती.[१४३]

हैद्राबाद राज्यात सुरूवातीच्या कालखंडानंतर आरोग्य खाते स्थापन करून त्यासाठी स्वतंत्र संचालक नेमले गेले. हे संचालक निवासी शल्यचिकित्सक म्हणून काम पहात. मुख्यालयातील सक्षम शल्यचिकित्सक कर्मचारी वर्ग संचालकांना कामात मदत करीत असे. जिल्ह्याच्या ठिकाणी पूर्वी वर्णिल्याप्रमाणे ३ ते ५ शल्यचिकित्सक, १ ते ५ रुग्णालय सहाय्यक व ४ ते ७ मिश्रक आणि ५ ते ११ लसटोचक असत. ही संख्या जिल्ह्यात आवश्यकतेनुसार बदलत असे. औरंगाबाद येथे दोन महिला डॉक्टर्स होत्या.[१४४] बहुतांश शल्यचिकित्सक हे हैद्राबाद वैद्यकीय विद्यालयाचे माजी विद्यार्थी असत.

**स्वातंत्र्योत्तर काळातील आरोग्य सेवा** : स्वातंत्र्यानंतर सार्वजनिक आरोग्यविषयक कामे राज्य शासन, जिल्हा परिषदा व नगरपालिका यांच्याकडून पार पाडण्यात येतात. राज्य पुनर्रचनेपूर्वी वैद्यकीय व 'सार्वजनिक आरोग्य विभाग' असे एक खाते हैद्राबाद राज्यात होते. १९५९-६० मध्ये जिल्हा आरोग्य अधिकाऱ्याचे पद या जिल्ह्यात निर्माण करण्यात आले. १९६२ मध्ये जिल्हा परिषदेच्या स्थापनेनंतर जिल्हा आरोग्य प्रशासन जिल्हा आरोग्य अधिकाऱ्याकडे हस्तांतरित करण्यात आले. यावेळी वैद्यकीय आणि सार्वजनिक अधिकाऱ्याकडे हस्तांतरित करण्यात आले. यावेळी वैद्यकीय आणि सार्वजनिक आरोग्य विभाग (नागरी व कुटीर रुग्णालये वगळून) व पूर्वीचे जिल्हा लोकल बोर्डमधील कर्मचारी जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित करण्यात आले.[१४५] आता जिल्हा आरोग्य अधिकारी हा जिल्हा परिषदेच्या आरोग्य खात्याचा प्रमुख म्हणून काम करतो. या अधिकाऱ्यास साथीच्या रोगांचे नियंत्रण

१४२. **परभणी जिल्हा गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ५३८-३९.

१४३. कित्ता, पृ. ५३८-३९.

१४४. कित्ता, पृ. ५३८-३९.

१४५. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ५०४.

करणारा वैद्यकीय अधिकारी, स्वच्छता निरीक्षक, कुष्ठरोग पर्यवेक्षक, आरोग्य निरीक्षक व इतर आवश्यक कर्मचारीवर्ग सहाय्य करतो. कॉलरा, देवी, प्लेग, एन्फ्लुएंझा, डेंग्यू, हिवताप वगैरे रोगावर नियंत्रण व प्रतिबंधक उपाययोजना राबविणे, प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत प्रसुती, माता व बाल आरोग्याचे काम, शालेय मुलांची वैद्यकीय तपासणी, ग्रामस्वच्छता, पाणी निर्जंतूक करणे वगैरे आरोग्य योजना राबविण्यासाठी जिल्हा आरोग्य अधिकारी जबाबदार असतो. याव्यतिरिक्त कुटूंब-नियोजन आणि कुष्ठरोग नियंत्रण ही कामेही या जिल्हा आरोग्य खात्याकडे आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्रे, उप केंद्रे, कुटीर रुग्णालये, दवाखाने वगैरेंमार्फत जिल्हा परिषद आरोग्य सुविधा पुरविते. या सर्व योजना राज्याच्या वैद्यकीय खात्याकडून जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित करण्यात आलेल्या आहेत.[१४६]

जिल्हा परिषदेचे आरोग्य विषयक प्रशासन वरीलप्रमाणे असले तरी जिल्ह्यातील सर्व आरोग्य सेवा प्रशासनाचा प्रमुख म्हणून जिल्हा शल्य चिकित्सक हा अधिकारी काम पाहतो. संचालक, आरोग्य सेवा हे राज्याचे प्रमुख आरोग्य प्रशासक असून त्यांचे मुख्यालय मुंबई येथे, तर उपकेंद्र पुणे येथे आहे. ' सर्वांसाठी आरोग्य ' हे उद्दिष्ट साध्य करण्याची बांधिलकी राज्य शासनाने स्वीकारली असून गेल्या काही दशकांपासून प्रतिबंधक, प्रवर्तक, उपचारात्मक आणि पुनर्वसनात्मक आरोग्यसेवा पुरविण्यासाठी आरोग्यविषयक पायाभूत सुविधांचे जाळे विकसित करण्याच्या दृष्टिने शासनाकडून प्रयत्न करण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून आरोग्य सेवा राज्यातील ग्रामीण व नागरी अशा दोन भागांमध्ये विभाजित करून त्या पुरविण्यात येत आहेत. राज्याच्या कानाकोपऱ्यांमध्ये उप केंद्रे, प्राथमिक आरोग्य केंद्रे अशा पायाभूत सुविधा पोहोचविण्यासाठी या सुविधांचे एकत्रिकरण करण्यावर सार्वजनिक आरोग्य क्षेत्रावर भर देण्यात येत आहे. अगदी अलिकडे मानसिक आरोग्य दक्षता, एड्स नियंत्रण, कर्करोग नियंत्रण आणि आदिवासी क्षेत्रामध्ये विशेष आरोग्य सुविधा या कार्यक्रमावरही भर देण्यात येत आहे. पावसाळ्यामध्ये मलेरिया, गॅस्ट्रो व पाण्यामुळे होणाऱ्या इतर रोगांच्या प्रतिबंधासाठीही विविध आरोग्य कार्यक्रम राबविण्यात येतात.

सार्वजनिक आरोग्याच्या प्रयोजनार्थ राज्यात सध्या ७ प्रभारी मंडळे असून जिल्हा परिषद संबंधित ग्रामीण आरोग्यविषयक कार्यक्रम पुणे येथील केंद्रामार्फत चालतो. हिवताप, हत्तीरोग, कुष्ठरोग, प्लेग व पटकीसारख्या संसर्गजन्य रोगांचे नियंत्रण व उच्चाटन, आरोग्य, शिक्षण व प्रसिद्धी, जीवनविषयक आकडेवारी, कुटूंबकल्याण, माता-बाल आरोग्य, शालेय आरोग्य आणि प्रशासनासंबंधी कामकाज पाहणारे विभाग पुणे येथे आहेत. औरंगाबाद येथे या विभागासाठी दोन उप संचालक व एक सहायक संचालक आहे. जिल्ह्यातील जिल्हा आरोग्य अधिकारी, प्रादेशिक सहायक कुष्ठरोग अधिक्कारी, प्रादेशिक व जिल्हा हिवताप अधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक व रुग्णालयांचे अधीक्षक हे प्रादेशिक उप संचालकांच्या कक्षेत व मार्गदर्शनाखाली काम करतात.[१४७] जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली सहायक जिल्हा आरोग्य अधिकारी, प्रभारी वैद्यकीय अधिकारी ग्रामीण रुग्णालये आणि प्राथमिक आरोग्य केंद्रांचे वैद्यकीय अधिकारी येतात. जिल्हा सामान्य रुग्णालयांचे शल्यचिकित्सक हे

१४६. नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर, पूर्वोक्त, पृ. ५०४.

१४७. **परभणी जिल्हा गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ५३९.

जिल्हा क्षयरोग रुग्णालये व कुटीर रुग्णालये यांच्यावर नियंत्रण ठेवतात. ग्रामीण भागात प्राथमिक आरोग्य केंद्रे व उप केंद्रे, प्राथमिक आरोग्य पथके, जनस्वास्थ रक्षक यांमार्फत वैद्यकीय व आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध होतात.[१४८]

ग्रामीण भागात सुलभ आरोग्य सेवा उपलब्ध करण्यासाठी शासनाने प्राथमिक आरोग्य केंद्रांची स्थापना केली आहे. प्रसुती व बालआरोग्य सेवांची तरतूद असलेली परिसर स्वच्छता व साथीच्या रोग नियंत्रणाबाबत दक्ष असलेली व पूर्वी जिल्हा आरोग्य खात्याच्या नियंत्रणाखाली असलेली प्राथमिक आरोग्य केंद्रे जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित करण्यात आली.[१४९]

१९५१ मध्ये जिल्ह्यात एक शासकीय रुग्णालय व ७ अन्य दवाखाने होते. या सर्वात मिळून ११ डॉक्टर्स व ५ परिचारिका होत्या. शासकीय रुग्णालयात ८२ खाटांची सोय होती. १९६१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यात वैद्यकीय व्यवसायात ग्रामीण भागात १७३ लोक होते. त्यात ४ स्त्रिया होत्या, तर शहरी भागात ७९ लोक होते, त्यातही ४ स्त्रिया होत्या. यावर्षी नांदेड जिल्ह्यात नांदेड येथे सार्वजनिक रुग्णालय व शासकीय आयुर्वेदिक रुग्णालय अशी दोन शासकीय रुग्णालये होती. यापैकी आयुर्वेदिक रुग्णालय आयुर्वेदिक महाविद्यालयास जोडलेले आहे. या दोन्ही रुग्णालयात यावर्षी अनुक्रमे ११३ व ६० खाटांची सोय होती.[१५०] याचवर्षी जिल्ह्यात १३ दवाखाने होते. १९६३ च्या अखेरीस ते २७ झाले. त्यापैकी एक दवाखाना शासकीय व अन्य जिल्हा परिषदेचे होते.[१५१] या वर्षी नांदेड जिल्ह्यात ६ प्राथमिक आरोग्य केंद्रे होती.[१५२] १९६३-६४ मध्ये यांची संख्या ९ व खाटांची संख्या ४८ झाली. १९६१ मध्ये देगलूर तालुक्यात एक प्रसुतीगृह स्थापन झाले. यावर्षी जिल्ह्यात दर एक लाख लोकसंख्येमागे वैद्यकीय व्यवसायातील व्यक्तींचे प्रमाण १६ होते.[१५३] वैद्यकीय सोयींची ही स्थिती १९७० पर्यंत विशेष बदलली नव्हती.

सध्या शासनाच्या धोरणान्वये गरजू नागरिकांना वैद्यकीय व आरोग्य सुविधा पुरेशा प्रमाणात उपलब्ध करून देण्यासाठी जिल्ह्यात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, एक शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय व रुग्णालय, ६३ प्राथमिक आरोग्य केंद्रे, ३७४ उप केंद्रे, ११ प्राथमिक आरोग्य पथके, ५ फिरती आरोग्य पथके, प्रत्येकी ७ नागरी व आयुर्वेदिक दवाखाने, ६ युनानी दवाखाने व १४ ग्रामीण रुग्णालये आहेत. वरील सुविधांपैकी आदिवासी क्षेत्रात ३ ग्रामीण रुग्णालये, १४ प्राथमिक आरोग्य केंद्रे, ९२ उप केंद्रे, ७ प्राथमिक आरोग्य पथके, ५ फिरती आरोग्य पथके व मांडवी येथे खान अब्दूल गफारखान शासकीय नेत्ररुग्णालय आहे. वरील ९२ प्राथमिक आरोग्य उपकेंद्रे ही एकट्या किनवट या आदिवासी तालुक्यात आहेत.[१५४]

---

१४८. **परभणी जिल्हा गॅझेटिअर**, पूर्वोक्त, पृ. ५२९.

१४९. कित्ता, पृ. ३९०.

१५०. **डिस्ट्रिक्ट सेंसस हॅण्डबुक,** नांदेड डिस्ट्रिक्ट, १९६१, पृ. २६.

१५१. कित्ता.

१५२. कित्ता, पृ. ६.

१५३. **डिस्ट्रिक्ट सेंसस हॅण्डबुक,** नांदेड डिस्ट्रिक्ट, १९६१, पृ. २६.

१५४. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड कडील माहिती.

जागतिक आरोग्य संघटनेने ' सर्वांसाठी आरोग्य सुविधा ' या योजनेनुसार ठरविल्याप्रमाणे बिगर आदिवासी क्षेत्रात दर ५० हजार लोकसंख्येसाठी एक प्राथमिक आरोग्य केंद्र हा निकष बदलून दर ३० हजार लोकसंख्येसाठी एक प्राथमिक आरोग्य केंद्र व आदिवासी भागात दर २० हजार लोकसंख्येसाठी १ प्राथमिक आरोग्य केंद्र हे निकष स्वीकारण्यात आलेले आहेत. त्यानुसार जिल्ह्यात प्राथमिक आरोग्य केंद्रांची स्थापना करण्यात आलेली आहे.[१५५] शासनाने दर ५ प्राथमिक आरोग्य केंद्रांमागे एक ग्रामीण रुग्णालय स्थापण्याचे ठरविले होते. तथापि आता केंद्र शासनाच्या तत्त्वानुसार दर ४ प्राथमिक आरोग्य केंद्रांमागे एक ग्रामीण रुग्णालय स्थापण्यात येत आहे.

दि. ३, ४ व ५ ऑगस्ट २००६ रोजी नांदेड जिल्ह्यात अतिवृष्टी होऊन १३५ गावांना पुराचा तडाखा बसला होता. त्यातील ४० गावांना पुराचा पूर्ण वेढा पडला होता. त्यामुळे पूर ओसरल्यानंतर पसरणाऱ्या संभाव्य रोगराईच्या नियंत्रणासाठी जिल्हास्तरावर साथ नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला होता. तसेच वरील १३५ गावांत प्राथमिक आरोग्य केंद्रांची १३६ वैद्यकीय पथके तैनात करण्यात आली होती. तसेच सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रांना साथ नियंत्रक औषधांचा पुरेसा पुरवठा करण्यात आला होता. त्याचा परिणाम म्हणून जिल्ह्यात साथीचे रोग पसरण्यापूर्वी त्यांच्यावर नियंत्रण मिळविण्यात जिल्हा आरोग्य खाते यशस्वी झाले.

**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय :** श्री गुरू गोविंदसिंगजी स्मारक शासकीय रुग्णालय नांदेड हेच येथील जिल्हा सामान्य रुग्णालय होय. याची स्थापना १९५६ साली झाली. महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी किमान २०० खाटांचे जिल्हा रुग्णालय कार्यरत आहे. तथापि नांदेड जिल्हा आंध्र व कर्नाटक या राज्यांच्या सीमेवर असल्याने, तसेच व्यापारी केंद्रे आणि रेल्वे मार्गाच्या सुविधांमुळे आजुबाजूच्या जिल्ह्यांतून व लगतच्या राज्यातून मोठ्या प्रमाणावर रुग्ण नांदेडच्या जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी येतात. शिवाय नांदेड शहराचा मागील २० वर्षांपासून औद्योगिक विकासही मोठ्या प्रमाणावर झाल्याने सिडको, हडको सारख्या नागरी वसाहती अस्तित्वात आल्या. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्यविषयक गरजा वाढल्याने शासनाने या रुग्णालयातील खाटांची संख्या ५०८ इतकी वाढविलेली आहे. जिल्हा शल्यचिकित्सक हा या रुग्णालयाचा प्रमुख जिल्ह्यातील विविध वैद्यकीय सेवा केंद्रांचाही प्रशासकीय प्रमुख असतो. जिल्ह्यातील वैद्यकीय रेकॉर्ड ठेवुन आवश्यकतेनुसार तो ती माहिती शासनास पुरवितो. या रुग्णालयात स्त्री रोग व प्रसुतीशास्त्र, अस्थिव्यंगोपचार, औषण शल्यचिकित्सा, नाक-कान-घसा, बालरोग चिकित्सा, बधिरीकरण चिकित्सा, क्षयरोग चिकित्सा, क्ष-किरण, जीवरसायण, शरीर-विकृती, सूक्ष्मजीवशास्त्र, दंतरोग, त्वचारोग, न्याय वैद्यकशास्त्र व मनोविकृती इत्यादी वैद्यकीय चिकित्सा विभाग आहेत. याशिवाय एड्स समुपदेशन चिकित्सा केंद्र उपलब्ध आहे. बालरोग चिकित्सेसाठी ५० खाटांचा स्वतंत्र कक्ष आहे.

या रुग्णालयातील खाटांची संख्या व सुविधा लक्षात घेऊन शासनाने १९९१ मध्ये यास ५० विद्यार्थी क्षमतेचे वैद्यकीय महाविद्यालयही जोडले आहे.[१५६] त्यात ऑर्थोपॅडिक एम.बी.बी.एस.,

१५५. **यथार्थदर्शी योजना, १९९२-९३ ते ९६-९७,** जि. नांदेड, जिल्हा नियोजन व विकास मंडळ, नांदेड, पृ. १७०-७१.

१५६. **यथार्थदर्शी योजना, १९९२-९३ ते ९६-९७,** पृ. १७०-७१.

एम.एस.एम.डी, पॅथॉलॉजी, मेडीसिन, मायक्रोबायोलॉजी व डिजीओ हे अभ्यासक्रम शिकविले जातात. या रुग्णालयात १९५८ ला २० विद्यार्थी क्षमता असलेली प्रसविका प्रशिक्षण शाळा, तसेच १९९४ मध्ये रक्तपेढीची स्थापना करण्यात आलेली आहे. जिल्हा शल्यचिकित्सक यांच्या मदतीस येथे चार वैद्यकीय अधिकारी, (वर्ग-१), २९ वैद्यकीय अधिकारी, (वर्ग-२), एक दंतशल्य चिकित्सक व एक सहायक अधिव्याख्याता आहे. याशिवाय अन्य कर्मचारीवृंद आहे. १९६१ मध्ये या रुग्णालयात २,८६,२८४ बाह्य व ४०,५२९ आंतररुग्णांवर उपचार करण्यात आले होते.[१५७] रुग्णालयाच्या व्यवस्थापनासाठी शल्यचिकित्सक अध्यक्ष असलेल्या ११ अन्य सदस्यांची एक समिती आहे. जनतेच्या कल्याण व आरोग्यविषयक गरजांच्या पुर्ततेसाठी रुग्णालयास मदत करणे हे या समितीचे काम होय.

सन २००० मध्ये या रुग्णालयात ३६,५९३ आंतर व १,४०,४१९ बाह्यरुग्णांवर, तर सन २००५ मध्ये ५०,९४३ आंतर व ३,३९,०४१ बाह्य रुग्णांवर उपचार करण्यात आले होते. या दोन्ही वर्षी अनुक्रमे ५,६९८ व ६,७७३ मोठ्या आणि ४,८६२ व ३,६३६ लहान शस्त्रक्रिया करण्यात आल्या होत्या. अधिष्ठाता, वैद्यकीय महाविद्यालय यांच्या नियंत्रणाखाली क्षयरोग रुग्णांकरिता २० खाटांची आंतररुग्ण विभागही येथे उपलब्ध आहे. जिल्हा क्षयरोग अधिकारी त्याचे प्रशासन व उपचार या बाबी सांभाळतात.

**शासकीय आयुर्वेद रुग्णालय, नांदेड :** नांदेड शहरातील वजिराबाद परिसरात सन १९५८ मध्ये या रुग्णालयाची स्थापना झालेली आहे. यात स्त्रीरोग प्रसुती, कौमारभृत्य, बालरोग, शल्य, शालक्य, कायाचिकित्सा, पंचकर्म चिकित्सा तसेच कुटूंब कल्याण, एड्स तपासणी केंद्र, बधिरीकरण एक्स-रे, सोनोग्राफी व पॅथॉलॉजी असे अनेक महत्त्वाचे वैद्यकीय चिकित्सा विभाग आहेत. या रुग्णालयात मार्च, १९६७ मध्ये शहरी कुटुंब कल्याण केंद्र कार्यान्वित करण्यात आले. या केंद्रात माता व बालसंगोपन विषयक सर्व आरोग्य सुविधा उपलब्ध आहेत.

या रुग्णालयात स्थापनावर्षी खाटांची संख्या १२० होती. सध्या ती २२० इतकी आहे. यात सर्व रोगांवर उपचार घेतलेल्या आंतररुग्ण व बाह्यरुग्णांची संख्या व केलेल्या लहान-मोठ्या शस्त्रक्रिया यांची काही निवडक वर्षांची आकडेवारी खालील तक्त्यात दर्शविली आहे.

| वर्ष | आंतररुग्ण | बाह्यरुग्ण | शस्त्रक्रिया | |
|---|---|---|---|---|
| | | | मोठ्या | लहान |
| १९९० | — | — | ४१७ | ६,५०४ |
| २००० | २४,९०७ | १,२९,४२६ | ६१० | ८,७४८ |
| २००५ | ३०,२९८ | ७,०१,९१६ | ९४७ | ७,७९६ |
| २००९ | २२,२७१ | २,६०,३१३ | ६२८ | ६,५६१ |

१५७. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ५२८.

या रुग्णालयात शिबिरांद्वारे आयुर्वेदिक वनस्पती, औषधे, रुग्णतपासणी, औषधोपचार, आयुर्वेदाचा प्रचार व प्रसार केला जातो. यात जानेवारी २००७ पासून एडस् तपासणी केंद्र सुरू करण्यात आलेले असून या केंद्रामार्फत सन २००९ पर्यंत ८,१४१ रुग्णांची तपासणी करण्यात आलेली आहे.

रुग्णालयास वैद्यकीय महाविद्यालय जोडण्यात आलेले असून पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी विद्यार्थीक्षमता अनुक्रमे ६० व ३४ इतकी आहे.

**प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे व ग्रामीण रुग्णालये :** केंद्र सरकारने ग्रामीण जनतेस आरोग्य सेवा पुरविण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे व ग्रामीण रुग्णालये अशी त्रिस्तरीय संरचना मंजूर केली आहे. त्यानुसार पूर्वी उल्लेखिल्याप्रमाणे ३० हजार लोकसंख्येसाठी एक प्राथमिक आरोग्य केंद्र, ५ हजार लोकसंख्येसाठी एक उपकेंद्र व आदिवासी उपयोजना क्षेत्र व डोंगरी क्षेत्रासाठी २० हजार लोकसंख्येसाठी एक प्राथमिक आरोग्य केंद्र व ३ हजार लोकसंख्येसाठी एक उपकेंद्र केंद्र शासनाचे निकष आहेत. तथापि याही पुढे जाऊन राज्य शासनाने दर ५ प्राथमिक आरोग्य केंद्रांमागे एक ग्रामीण रुग्णालय स्थापन करण्याचे ठरविले आहे.[१५८]

सन १९६१ मध्ये जिल्ह्यातील नांदेड तालुक्यात निमगाव, देगलूर तालुक्यात मिरखेल, मुखेड महालात बाऱ्हाळी, हदगाव तालुक्यात कोळी, भोकर महालात पेठ उमरी आणि किनवट तालुक्यात इस्लामपूर येथे अशी एकूण ६ प्राथमिक आरोग्य केंद्रे होती. १९६३ च्या अखेरीस ती ९ झाली. यात ४८ खाटांची सोय होती.[१५९]

१९७१ मधील जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रे[१६०]

| क्र. | प्राथमिक आरोग्य केंद्रे | प्राथमिक आरोग्य उपकेंद्रे. |
|---|---|---|
| १ | मारखेल | हनेगाव, मालेगाव, तांबलूर |
| २ | बाऱ्हाळी | राजुरा बु. , सावरगाव |
| ३ | कोळी | निवधा, आष्टी, जवळगाव |
| ४ | इस्लामपूर | बूथ, पातोडा, शिवणी |
| ५ | उमरी | किन्ही, गोळेगाव, भोकर |
| ६ | नायगाव | कोळंबी, कुंटूर, अत्कल |
| ७ | पेठ-वडूज | डिंग्रस, बारूल, सुगाव |
| ८ | लोहा | शेवडी, आष्टी, कुर्ला |
| ९ | लिंबगाव | डोगाव, अर्धापूर, माळेगाव |
| १० | कुंडलवाडी | बाल्कोनी, सागरोळी, जरीकोटे |

१५८. **कार्यक्रम अंदाजपत्रक २००४-२००५,** पृ. २०.

१५९. **डिस्ट्रिक्ट सेंसस हॅण्डबुक,** १९६१, पूर्वोक्त, पृ. २६.

१६०. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ५२६.

**वैद्यकिय सेवा :** प्राथमिक आरोग्य केंद्राचे प्रमुख म्हणून वैद्यकीय अधिकारी, तर उपकेंद्राचे प्रमुख म्हणून मुख्य परिचारिका काम पाहते. वैद्यकीय अधिकारी त्यांच्या दैनंदिन कामाव्यतिरिक्त उपकेंद्राचे निरीक्षण व पर्यवेक्षण करतो. परिसराची स्वच्छता, व संसर्गजन्य रोगांचा प्रतिबंध यास प्राथमिक आरोग्य केंद्राचा आरोग्य निरीक्षक जबाबदार असतो.

सन १९९० मध्ये जिल्ह्यात ५८ प्राथमिक आरोग्य केंद्रे व ३३१ उपकेंद्रे होती. याचवर्षी जिल्ह्यात कंधार, लोहा, बिलोली, नायगाव, उमरी, देगलूर, हदगाव, मुखेड, गोकुंदा, माहूर व मांडवी येथे एकूण ११ ग्रामीण रुग्णालये होती.[१६१] २००१ मध्ये प्राथमिक आरोग्य केंद्रांची संख्या ६२, व ग्रामीण रुग्णालयांची संख्या १४ झाली. त्यापैकी ग्रामीण रुग्णालयात ४,८१,८७० बाह्य व ५६,८६० आंतररुग्णांवर उपचार करण्यात आले. याच वर्षी यात ३,३१४ मोठ्या व १,४२८ छोट्या शस्त्रक्रिया करण्यात आल्या, तर ५,०२७ प्रसुती शस्त्रक्रिया करण्यात आल्या. २००४-२००५ या वर्षी या ग्रामीण रुग्णालयांमध्ये ५,४२,३८१ आंतर व २,७३,७३७ बाह्य अशा एकूण ८,१६,११८ रुग्णांवर उपचार करण्यात आले. सध्या जिल्ह्यात ६३ प्राथमिक आरोग्य केंद्र, ३६४ उपकेंद्रे व १४ ग्रामीण रुग्णालय कार्यरत आहेत. पैकी पूर्वी वर्णिल्याप्रमाणे ९२ उपकेंद्र ही केवळ किनवट या आदिवासीबहूल तालुक्यात आहे.

**इतर सोयी :** वरील सोयींव्यतिरिक्त १९६१ मध्ये जिल्ह्यात असलेले १३ दवाखाने १९६३ अंती २७ झाले. त्यापैकी एक दवाखाना शासकीय होता, तर अन्य जिल्हा परिषदेकडे व्यवस्थापनासाठी देण्यात आले होते.[१६२] १९७१ मध्ये नांदेड, कंधार, मुखेड युक्रमाबाद, बरड, हदगाव, भोकर, मांडवी, हिमायतनगर, किनवट, धर्माबाद, उमरी व बिलोली येथे एकूण १३ ॲलोपॅथिक दवाखाने होते. त्यापैकी काहींना प्रसुतीकक्ष जोडलेले होते. याशिवाय लोहा, तामसा, नांदेड, कामरी, मंजराव, नीमगाव व जांब येथे प्रत्येकी एक मान्यताप्राप्त आयुर्वेदिक दवाखाना होता, तर अर्धापूर, मुदखेड, नायगाव, किणी, उस्माननगर आणि बटमोगरा येथे एकूण सहा युनानी दवाखाने होते. हा प्रत्येक दवाखाना तबीब (मुख्य) च्या नियंत्रणाखाली असे. १९६२ मध्ये आयुर्वेदिक व युनानी दवाखान्यांमध्ये एकूण २,०४,१२२ रुग्ण तपासले गेले.[१६३] यावर्षी आरोग्य खात्याचा खर्च ५ लाख ५० हजार रुपये इतका होता.[१६४] १९९०-९१ मध्ये जिल्ह्यात ४ युनानी, ५ आयुर्वेदिक व ११ नागरी दवाखाने होते.[१६५] २००४-२००५ अखेर ही संख्या युनानी दवाखाने ६, आयुर्वेदिक ७ व नागरी दवाखाने ७ अशी झाली.

**फिरती वैद्यकीय पथके :** जिल्ह्यातील विविध भागात, पाड्यांमध्ये, तसेच डोंगराळ भागात राहणाऱ्या लोकांच्या वसाहतीत फिरून त्यांना आरोग्य सेवा पुरविण्यासाठी व विविध संसर्गजन्य व सार्थीच्या रोगांच्या नियंत्रणासाठी अशा पथकांची स्थापना करण्यात आलेली आहे. ही पथके विविध संसर्गजन्य रोग नियंत्रणात आणणे, उपचार करणे, प्रसुती व इतर आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे यास जबाबदार असते. या पथकांचे नियंत्रण जिल्हा आरोग्य अधिकाऱ्याकडे असते व त्यास सहाय्यक आरोग्य अधिकारी, स्वच्छता अधिकारी, आरोग्य सेवक आणि इतर कर्मचारीवर्ग सहाय्य करीत असतो. १९९०-९१ मध्ये जिल्ह्यात अशी ६ पथके होती.[१६६] सध्या ११ प्राथमिक आरोग्य पथके व

१६१. **यथार्थदर्शी योजना,** १९९२-९३ ते १९९६-९७, पृ. १७२.

१६२. **डिस्ट्रिक्ट सेंसस हॅण्डबुक,** १९६१, नांदेड डिस्ट्रिक्ट, पूर्वोक्त, पृ. २६.

१६३. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ५२९.

१६४. कित्ता, पृ. ५०५.

१६५. **यथार्थदर्शी योजना,** १९९२-९३ व १९९६-९७, पूर्वोक्त, पृ. १७२.

१६६. कित्ता, पृ. १७२.

५ फिरती आरोग्य पथके कार्यरत आहे. पूर्वी वर्णिल्याप्रमाणे ऑगस्ट २००६ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे जिल्ह्यात पुरग्रस्त झालेल्या १३५ गावात १३६ आरोग्य पथके स्थापन करण्यत आली होती.

**जन्म-मृत्यू :** १९०१ च्या जनगणना अहवालावरून स्पष्ट होते की, १८९७ आणि १९०० मधील दुष्काळामुळे प्लेग व कॉलराच्या साथीत अनेकांचा मृत्यू झाला होता. साधारणतः १८९१ ते १९०० पर्यंत या मृत्यूंचे प्रमाण एकूण लोकसंख्येच्या ३.४५% होते. हे मृत्यू विशेषतः हैद्राबाद राज्यातील बिदर, औरंगाबाद, बीड, परभणी आणि उस्मानाबाद जिल्ह्यात झाले होते. या जिल्ह्यांमध्ये हे प्रमाण १३ ते २०% इतके होते. १९०० मधील दुष्काळात बालमृत्यूचे प्रमाणही खूप होते.

सन १९२१, १९२५ व १९३० या वर्षी हैद्राबाद राज्याचा जन्मदर अनुक्रमे ६.७, ८.३ व ९.३ टक्के, तर मृत्युदर ७.९, ८.५ व १३.९ टक्के इतका होता. जन्मदरापेक्षा मृत्युदर मोठा असण्याचे कारण म्हणजे या दशकात राज्यात झालेला कॉलरा, प्लेग, कांजण्या, मलेरिया व अन्य रोगांचा उद्‌भव हे होय. या दशकात राज्यात कॉलराने ४.५% कांजण्याने ०.२%, प्लेगने १६.४%, मलेयिाने ६३.४% व अन्य रोगांनी ०.५% इतके मृत्यू झाले होते.[१६७]

हैद्राबाद राज्यात पोलीस पाटील हे जन्म-मृत्यूचे रेकॉर्ड ठेवीत असत.[१६८] आता हे काम नागरी भागात नगरपरिषदा किंवा महानगरपालिका आणि ग्रामीण भागात ग्रामसेवक करतात. ग्रामीण भागात या जनजागृतीसाठी लघुपट, भित्तीपत्रके, आकाशवाणी, पंचायतीच्या मासिक सभा आणि दवंडी याद्वारे मार्गदर्शन केले जाते.

इ.स. १९५७ मध्ये नांदेड जिल्ह्यात विविध रोग व अन्य कारणांमुळे ८,०६० मृत्यू झाल्याची नोंद आहे.[१६९] या वर्षी १ हजार लोकसंख्येमागील जन्मदर ९.६% (पुरूष ५.२%, स्त्री ४.४%) इतका होता, तर जन्मापासून पुढील २४ तास ते एक वर्ष या काळात ४४८ पुरूष व ३९१ स्त्री असे एकूण ८३९ बालमृत्यू झाले होते.[१७०] सन १९७२ मध्ये जिल्ह्यातील जन्मदर २०.१% (ग्रामीण २०%, नागरी २०.२%) इतका, तर मृत्यूदर ७.८% (ग्रा.९.१%, ना.३.८%) इतका होता. हे मृत्यू वेगवेगळे ताप, मलेरिया, एन्फ्लूएंझा, क्षय, श्वासरोग, अतिसार, गोवर, कुष्ठ, कॅन्सर व इतर अनेक रोगांनी झाले होते. त्यात बालमृत्यूचे प्रमाणे ग्रामीण भागात ६४ व नागरी भागात ६ इतके होते.[१७१] यावेळी जिल्ह्यात पुरेशा आरोग्याच्या सोयींचा अभाव व अंधश्रद्धा हे कारण एकूण सर्व मृत्युमागे असावे.

सन १९८१ या वर्षाअखेर जिल्ह्याचा जन्मदर १६.०% (ग्रा. १३.७ व ना.२४.४%), तर मृत्यूदर ५.७% (ग्रा.५.५%, ना.६.४%) इतका होता. याचवर्षी ग्रामीण भागात ३३ तर नागरी भागात ३६ बालमृत्यू झाले होतें. १९९१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्याचा जन्मदर २६.५%, मृत्यूदर ६.०% तर बालमृत्यूदर ५.८ इतका खाली आला होता. सरकारने राबविलेल्या आरोग्याच्या विविध सुविधा हे कारण मृत्यूदर कमी होण्यामागे असावे. शिवाय वैद्यकीय क्षेत्रातील क्रांतिकारक शोध व उपचारांचाही यात मोठा सहभाग आहे.

---

१६७. **सेंसस ऑफ इंडिया, १९३१,** व्हॉ. XIII, एच. ई. एच. दि निजाम्स डोमिनियन्स (हैद्राबाद स्टेट), पार्ट १, रिपोर्ट, गव्हर्नमेंट सेंट्रल प्रेस, हैद्राबाद, डेक्कन, १९३३, पृ. १०३.

१६८. **इम्पेरियल गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. २१.

१६९. **नांदेड जिल्हा गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ५२३.

१७०. कित्ता, पृ. ५२४-२५.

१७१. **स्टॅटिस्टिकल ॲबस्ट्रॅक्ट : १९७२-७३,** १९७६, पृ. २७५-२८५.

खालील विवरणपत्रात जिल्ह्यातील जन्मदर व मृत्युदराची निवडक वर्षांची आकडेवारी दिलेली आहे.[१७२]

| वर्ष | जन्मदर | मृत्यूदर | वर्ष | जन्मदर | मृत्यूदर |
|---|---|---|---|---|---|
| १९८८ | २८.४ | ७.२ | १९९८ | २६.६ | ८.० |
| १९९० | २८.८ | ५.८ | २००० | २७.९ | ६.२ |
| १९९२ | २३.७ | ६.९ | २००२ | २३.५ | ५.१ |
| १९९४ | २९.६ | ६.०० | २००४ | २१.२ | ६.९ |
| १९९६ | २६.३ | ७.० | २००५ | २१.४ | ७.४ |

**रोग व प्रतिबंधक उपाय :** जिल्ह्यात हिवताप व अन्य विविध प्रकारचे ताप, क्षय, कुष्ठ, हत्तीरोग, पटकी, डेंग्यू वगैरे रोगांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर आढळतो. त्यामुळे या रोगांपासून होणाऱ्या मृत्यूंचे प्रमाण जास्त असे. पूर्वी देवी हा रोगही आढळत असे. १९५८ मध्ये या रोगांमुळे जिल्ह्यात १,९४४, तर १९६० मध्ये आठ लोक मृत्यूमुखी पडले होते.[१७३] त्यामुळे १९६२ मध्ये राज्यात सुरू करण्यात आलेला राष्ट्रीय देवी निर्मूलन कार्यक्रम नांदेड जिल्ह्यात परिणामकारकपणे राबविला गेला. त्यावेळी जिल्ह्यात ५३ लस टोचक होते व त्यांनी १,४४,३६० लोकांचे लसीकरण केले होते. १९६४ मध्ये १५० लोकांना याची लागण होऊन १७ लोक मृत्यू पावले होते. १९७० मध्ये जिल्ह्यात ३०,२९९ लोकांचे प्राथमिक लसीकरण करण्यात आले होते. त्यानंतर या रोगाचे समूळ उच्चाटन झाल्याने सन १९८१ पासून शासनाने देवी प्रतिबंधक लसीचा पुरवठा बंद केला. प्लेग या रोगाचेही जवळजवळ उच्चाटन झालेले आहे. आता विविध रोगांच्या उच्चाटनासाठी अत्याधुनिक औषधोपायांबरोबरच अशा प्रकारच्या संशोधीत लसी देण्यात येतात. राज्याचे आरोग्य खाते व जिल्हा परिषदेचे आरोग्य खाते यांच्याकडून वरील रोगांच्या प्रतिबंधासाठी विविध उपाययोजना केल्या जातात. साथीचे रोगही आता अशाच प्रकारे आटोक्यात आणले जातात.

**हिवताप निर्मूलन कार्यक्रम :** या रोगाचा जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर प्रादुर्भाव होतो. नांदेड जिल्ह्यात सर्वात जास्त मृत्यू या रोगामुळे होतात. त्यासाठी १९४८ मध्ये जिल्ह्यात हिवताप निर्मूलन कार्यक्रम सुरू करण्यात आला. त्यान्वये बाधित लोकांवर उपचार करण्यात आले. तथापि, या कार्यक्रमात रोगाचा प्रतिबंध करण्यासाठी काही योजना नव्हती. त्यातच १९५७ मध्ये या रोगामुळे ४२३ जणांचा मृत्यू झाला.[१७४] म्हणून जिल्ह्यात १९५८ मध्ये हिवताप निर्मूलनासाठी खास पथक नेमण्यात

---

१७२. **जिल्हा आरोग्य अधिकारी, जि. प. नांदेड कडील माहिती.**

१७३. **डिस्ट्रिक्ट सेंसस हॅण्डबुक,** नांदेड डिस्ट्रिक्ट, १९६१, पूर्वोक्त, पृ. २६.

१७४. कित्ता, पृ. २६.

Maharashtra State Gazetteers

आले. राज्यात राष्ट्रीय हिवताप नियंत्रण योजना १९५३ ते १९५८ या काळात कार्यान्वित होती. या योजनेंतर्गत हे पथक नेमण्यात आले होते. त्यानुसार प्रत्येक घरात वर्षातून ६ वेळा D.D.T. चा फवारा मारण्यात आला. १९६०-६१ मध्ये किनवट तालुक्यात एक जादा फवारणी करण्यात आली. या कार्यक्रमाचा दुसरा टप्पा, जो हिवतापाचे रुग्ण शोधणे, तो ऑक्टोबर १९६० मध्ये सुरू करण्यात आला.[१७५] या रोगाच्या प्रतिबंध व उपचारासाठी जिल्हा पातळीवर मलेरिया अधिकारी जबाबदार असतो. त्यास सहाय्यक मलेरिया अधिकारी व मलेरिया निरीक्षक हे मदत करतात. या कार्यक्रमांतर्गत मुख्य कार्य म्हणजे वर्षातून दोनदा संपूर्ण जिल्ह्यात D.D.T. पावडरची फवारणी करणे, तसेच प्रत्येक खेड्याचे सर्वेक्षण करून मुले व प्रौढांचे रक्त तपासणे हे होय. लागण झालेल्या रुग्णाची वारंवार रक्ततपासणी केली जाते व औषधोपचार केला जातो. या परिणामकारक उपायांमुळे १९६१ मध्ये ६३,२५१ लोकांची रक्त तपासणी केली गेली तेव्हा त्यात केवळ १० लोक मलेरियाग्रस्त आढळले होते. त्यामुळे १९६२ पासून जिल्ह्यात D.D.T. ची फवारणी बंद करण्यात आली. १९६४ मध्ये १,८६,०९८ लोकांच्या केलेल्या रक्त तपासणीत ३२३ लोक मलेरियाग्रस्त आढळले होते.[१७६]

१९६५ नंतरच्या काळात राज्यातील हिवतापग्रस्तांच्या प्रमाणात वाढ झाल्याने १९७७ पासून राज्यात हिवतापाच्या सुधारित योजनेची अंमलबजावणी सुरू झाली. या काळात जिल्ह्यातील मलेरिया निर्मूलन पथकात ९८ सर्व्हेक्षण कर्मचारी, २४ सर्व्हे निरीक्षक, मलेरिया पर्यवेक्षक व मलेरिया अधिकारी यांचा समावेश होता. याशिवाय रक्त तपासणीसाठी ५ तंत्रज्ञांची नियुक्ती केली गेली होती.[१७७] त्यानंतर मलेरिया झाल्याची जिल्ह्यात नोंद नाही. तथापि, त्यानंतर पुन्हा या रोगापासून होणाऱ्या मृत्यू-प्रमाणात हळूहळू वाढ होऊ लागली. इतर राज्यातही ही वाढ निदर्शनास आल्याने केंद्र शासनामार्फत सप्टेंबर १९९४ मध्ये एका तज्ज्ञ समितीची स्थापना करण्यात आली. या समितीच्या शिफारशीनुसार व हिवताप सुचनांनुसार राज्यात हिवतापविरोधी कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात येते. १९९९ पासून या योजनेचे 'राष्ट्रीय हिवताप प्रतिरोध योजने' त रूपांतर करण्यात आले आहे.

सहसंचालक, आरोग्यसेवा (हिवताप व हत्तीरोग), पुणे हे राज्यस्तरावर या कार्यक्रमाचे प्रमुख आहेत. त्यांना जिल्हा स्तरावर जिल्हा हिवताप अधिकारी सहाय्य करतात. १९७९ पासून बहुविध आरोग्य सेवांतर्गत स्थानिक कर्मचाऱ्यांनाही या कार्यक्रमात सहभागी करून घेतले जाते. गरजेनुसार जादा कर्मचारी किटकनाशकांची फवारणी करण्यासाठी नेमले जातात. राष्ट्रीय हिवताप निर्मूलन योजना ही ५०% केंद्रपुरस्कृत आहे. या योजनेंतर्गत नांदेड शहरात नागरी हिवताप योजना कार्यान्वित आहे.

**पटकी (कॉलरा) नियंत्रण :** हा रोग व्हिब्रीओ कॉलरा नामक जीवाणूपासून होतो. यामुळे मृत्युचाही धोका असतो. नांदेड जिल्ह्यात नदीकिनारी राहणाऱ्या अंदाजे २ ते ३ लाख लोकांना या रोगाची प्रतिबंधक लस दरवर्षी दिली जाते. १९६४ मध्ये जिल्ह्यात ४९७ लोकांना पटकीची लागण झाली होती, तर १९६८ मध्ये यामुळे १४१ लोक मृत्यू पावले होते.[१७८] सन १९७० मध्ये जवळजवळ

१७५. कित्ता.

१७६. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ५२७-५८.

१७७. कित्ता.

१७८. **स्टॅटिस्टिकल अॅबस्ट्रॅक्ट, १९६९-७०,** पृ. ३३६.

५,९६,१६३ लोकांना कॉलरा प्रतिबंधक लस टोचण्यात आली होती.[१७९] १९८० मध्ये कॉलरामुळे केवळ एका व्यक्तिचा मृत्यू झाला होता.[१८०] या रोगाचा प्रसार रोखण्यासाठी शुध्द पाणीपुरवठा, वैयक्तिक स्वच्छता, विहिरींतील पाणी निर्जंतूक करणे व रोगप्रतिबंधक लस टोचण अशा प्रतिबंधात्मक उपाययोजना कॉलरा नियंत्रण कार्यक्रमाखाली राबविल्या जातात. जिल्ह्यात दरवर्षी ३५ हजार विहिरी औषधे टाकून निर्जंतूक केल्या जातात. जिल्ह्यात माळेगाव व माहूर येथील जत्रेच्या वेळी कॉलरा लसीकरणाची विशेष मोहीम राबविली जाते. यासाठी स्टॉल उभारून, पत्रके वाटून व चलचित्रपटांद्वारे जनजागृती केली जाते. या रोगाचा प्रादुर्भाव संपूर्ण महाराष्ट्रभर झालेला दिसून येतो. त्यामुळे सर्वच जिल्ह्यात हा कार्यक्रम प्रभावीपणे राबविला जातो. परिणामी १९८२ मध्ये ग्रामीण व नागरी भागात मिळून ३,९४,८०५ लोकांना कॉलरा लस टोचण्यात आली होती. १९८५ मध्येही २,६५,२९२ लोकांचे लसीकरण केलेले होते. शासनाच्या अशा प्रभावी उपाययोगनांमुळे या रोगापासून होणाऱ्या मृत्यूंचे प्रमाण शुन्यावर आलेले आहे. सन १९८५ पासून २००६ पर्यंत या रोगाने मृत्यू पावल्याची नोंद नाही.[१८१] सध्या ही लसीकरण योजना बंद करण्यात आलेली आहे.

**राष्ट्रीय हत्तीरोग नियंत्रणक कार्यक्रम :** राज्यात हा कार्यक्रम १९९५ पासून सुरू करण्यात आलेला असून यासाठी केंद्र व राज्य सरकारकडून प्रत्येकी ५०% खर्च केला जात असे. सध्या हा संपूर्ण खर्च राज्य सरकारच करीत असून या कार्यक्रमाच्या सुधारित योजनेखाली राज्याच्या गरजेनुसार, अबेट, बेटेक्स, डी.ई.सी गोळ्यांचा पुरवठा केंद्र शासनाकडून केला जातो. या रोगाचा प्रसार रोखण्यासाठी शासनाने राष्ट्रीय हत्तीरोग नियंत्रण पथके स्थापन केलेली आहेत. या पथकांनी नांदेड जिल्ह्यासहीत २९ जिल्ह्यांचे हत्तीरोग विषयक १०% सर्वेक्षण पूर्ण केले असून सध्या हत्तीरोग विषयक पुनःसर्वेक्षण सुरू आहे.

सहसंचालक, (राष्ट्रीय हिवताप व हत्तीरोग) पुणे हे राज्यस्तरावर योजना प्रमुख आहेत. त्यांना सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (हत्तीरोग), पुणे हे सहाय्य करतात. नांदेड जिल्ह्यात राष्ट्रीय हत्तीरोग पथक स्थापन करण्यात आलेले असून त्यांचे कार्यक्षत्र बिलोली व भोकर हे तालुके आहेत. याशिवाय औरंगाबाद महसूल विभागासाठीही औरंगाबाद येथे असे एक पथक आहे.

हा रोग डासांपासून होत असल्याने या कार्यक्रमात अळी अवस्थतील डासांचा नाश करण्यासाठी साचलेल्या पाण्याच्या पृष्ठभागावर दर आठवड्यास डास अळी प्रतिबंधक तेलाची फवारणी केली जाते. डासांमधील रोगाच्या लागणीचे प्रमाण व रोगप्रसारक डासांचे प्रमाण अजमाविण्यासाठी डास गोळा करून त्यांचे विच्छेदन केले जाते. तसेच रोग्यांसाठी डी.ई.सी. गोळांचा उपचार केला जातो. नमुना निरीक्षण पद्धतीने रात्रीच्या वेळी रक्तनमुने घेऊन रक्तात या रोगाचे जंतू असलेले व बाह्यलक्षणे दिसणारे रुग्ण शोधून काढून त्यावरील निष्कर्षावरून हत्तीरोगाचे रुग्ण जास्त असलेल्या विभागात नवीन हत्तीरोग पथके स्थापन केली जातात. काही ठिकाणी रात्र-चिकित्सालये स्थापन केलेली आहेत. नांदेड जिल्ह्यात मुखेड, होट्टल येथे अशी चिकित्सालये स्थापन करण्याचे प्रस्तावित आहे.

---

१७९. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ५२५.

१८०. **स्टॅटिस्टिकल अॅबस्टॅक्ट, १९७९-८०,** पृ. २८८.

१८१. जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद, नांदेड.

**क्षयरोग नियंत्रण :** क्षयरोग हा 'मायक्रोबॅक्टेरियम ट्यूबरक्युलोसिस' नावाच्या जीवाणूंमुळे होतो. प्राचीन काळातील 'राजयक्ष्मा' रोग तो हाच होय. अद्यापही क्षयरोग ही सार्वजनिक आरोग्याची महत्त्वाची समस्या आहे. क्षयरोगाचा मृत्यूदर हा इतर कोणत्याही संसर्गजन्य रोगाच्या मृत्यूदरापेक्षा जास्त आहे. या रोगाची नांदेड जिल्ह्यातील व्याप्ती लक्षात घेऊन १९५६ मध्ये येथे एक क्षयरोग रुग्णालय सुरू करण्यात आले. दुसऱ्या पंचवार्षिक योजनाकाळात जिल्ह्यात बी.सी.जी. लस टोचणी कार्यक्रम सुरू करण्यात आला. १९८२ ते १९८४ या वर्षांमधे जिल्ह्यात ४३४ व्यक्तिंचा क्षयाने मृत्यू झाला होता.[१८२] सन २००२ ते २००६ या पाच वर्षात याच रोगाने ६७९ लोकांचा मृत्यू ओढवला होता.[१८३]

सन १९६२ पासून देशात राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. तथापि या कार्यक्रमाचे मर्यादित यश लक्षात घेऊन केंद्रशासनाने सन १९९३ पासून सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम राबविण्यास सुरूवात केली आहे. महाराष्ट्रामध्ये हा कार्यक्रम १९९८-९९ पासून टप्प्याटप्प्याने राबविण्यात येत आहे. यासाठी राज्य क्षयरोग नियंत्रण सोसायटी व ४८ जिल्हा/शहर क्षयरोग नियंत्रण सोसायटींची स्थापना करण्यात आली आहे. सध्या याच कार्यक्रमांतर्गत राज्यातील लोकसंख्येला औषधोपचार मिळत आहेत. नांदेड जिल्ह्यात शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांतर्गत २० खाटांचा आंतरुग्ण विभाग क्षयरुग्णांकरिता उपलब्ध आहे.[१८४]

**राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रम :** पूर्वी वर्णिल्याप्रमाणे स्वातंत्र्यपूर्व काळात हैद्राबाद राज्यात कुष्ठरोग उपचार केंद्र नव्हते. त्यामुळे राज्यातील डिचापल्ली येथील वेस्लियम (Wesleyam) मिशनमध्ये कुष्ठरोग्यांवर उपचार केले जात.[१८५] स्वातंत्र्यानंतर शासनाने जिल्ह्यात कुष्ठरोगी शोधन त्यांच्यावर उपचार करण्यासाठी चार पथके स्थापन केली होती. मुक्रमाबाद आणि किनवट येथे आणखी दोन दुय्यम कुष्ठरोग उपचार केंद्रे होती. या रोगाच्या प्रतिबंधासाठी १९५८ साली एक राज्यव्यापी कार्यक्रम हाती घेण्यात आला होता. १९६१ च्या अखेरपर्यंत जिल्ह्यात २१,६५ रोग्यांवर उपचार केले गेले होते.[१८६]

सहसंचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग) पुणे, हे राज्याचे कुष्ठरोग निर्मूलनाचे सर्वंकष काम पाहतात. त्यांना सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा, (कुष्ठरोग) पुणे, हे मदत करतात. जिल्ह्यात हा कार्यक्रम जिल्हा वैद्यकीय अधिकारी, प्रभारी कुष्ठरोग नियंत्रण पथके, पर्यवेक्षीय नागरी कुष्ठरोग पथके, अवैद्यकीय पर्यवेक्षक, अवैद्यकीय सहाय्यक व कुष्ठतंत्रज्ञ यांच्या मदतीने राबविला जातो. पाहणी, शिक्षण व उपचार केंद्रे ही जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या देखरेखीखाली जिल्हा परिषदेला अभिकरण तत्त्वावर चालविण्यासाठी देण्यात आलेली आहेत. कुष्ठरोग नियंत्रण पथकामध्ये ग्रामीण भागातील २ ते ४ लाख लोकसंख्येचा समावेश केलेला असतो. पथकातील प्रत्येक कुष्ठतंत्रज्ञास २० ते २५ हजार लोकसंख्येचे कार्यक्षेत्र नेमून दिलेले असते. सामान्यतः ज्या भागाचे कुष्ठरोगाचे प्रमाण दरहजारी ५ पेक्षा अधिक आहे. अशा भागातच कुष्ठरोग नियंत्रण पथके स्थापन

१८२. **सामाजिक व आर्थिक समालोचन, १९८२-८३,** पृ. १८४.

१८३. **जिल्हा क्षयरोग केंद्र नांदेड,** कडील माहिती.

१८४. कित्ता.

१८५. **परभणी जिल्हा गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ५३८.

१८६. **डिस्ट्रिक्ट सेंसस हॅण्डबुक,** नांदेड डिस्ट्रिक्ट, पूर्वोक्त, १९६१, पृ. २६.

करण्यात येतात. प्रत्येक पथकाकरिता एक स्वतंत्र वैद्यकीय अधिकारी, अवैद्यकीय पर्यवेक्षक, कुष्ठतंत्रज्ञ तसेच अन्य कर्मचारी वर्ग नेमलेला असतो.

पाहणी, शिक्षण व उपचार केंद्रांतर्गत २० ते २५ हजार लोकसंख्या असते. ही केंद्रे सामान्यतः प्राथमिक आरोग्य केंद्रांशी अथवा इतर कोणत्याही आरोग्य केंद्राशी संलग्न असतात. नागरी कुष्ठरोग केंद्रे नगरपालिकांच्या कार्यक्षेत्रात स्थापन करण्यात येतात. अशा केंद्रामध्ये ३० ते ७० हजार नागरी लोकसंख्येचा समावेश असतो. ही केंद्रे शासकीय अथवा नगरपालिकेच्या दवाखान्यांशी संलग्न असतात.

पर्यवेक्षीय नागरी कुष्ठरोग पथके ही चार नागरी कुष्ठरोग केंद्रासाठी एक या प्रमाणात नागरी विभागात स्थापन्यात येतात. कुष्ठरोगासंबंधीच्या प्रशिक्षणासाठी राज्यात ज्या पाच ठिकाणी शासकीय कुष्ठरोग प्रशिक्षण केंद्रे आहेत, त्यापैकी नांदेड येथे एक आहे.

जिल्ह्यात मराठवाडा लोकसेवा मंडळ, नेली याठिकाणी अनुदानित स्वयंसेवी संस्थेमार्फत पुनर्वसन व संवर्धन केंद्र चालविले जाते. येथे कुष्ठरोग्यांना व्यावसायिक प्रशिक्षण देणे, काहींना कृत्रिम अवयव पुरविणे हे कार्यक्रम राबविले जातात.

सध्या नांदेड जिल्ह्यात १४ ग्रामीण रुग्णालये, ६३ प्राथमिक आरोग्य केंद्रे, १० नागरी कुष्ठरोग पथके, आठ उपचार केंद्रे व एक कुष्ठरोग नियंत्रण पथकांमार्फत हा कार्यक्रम राबविला जातो. या केंद्राकडून १९७० पर्यंत २१५ गावातील ४ लाख ५० हजार लोकांची तपासणी करण्यात आली.[१८७] १९८१ या वर्षी या रोगामुळे ग्रामीण भागात २५, तर नागरी भागात २ व्यक्तिंचा मृत्यू झाला होता.[१८८] कुष्ठरोग फैलावाचा दरहजारी दर हा १९८५-८६ मध्ये १०८.९%, १९९०-९१ मध्ये १४.५%, १९९५-१९९६ मध्ये ३.०% तर, २०००-२००१ मध्ये ३.५% इतका होता. सध्या सर्व जिल्ह्यात टप्प्याटप्प्याने बहुविध औषधोपचार प्रकल्प राबविण्यात येतात. या बहुविध उपचाराच्या सुविद्या आता जिल्ह्यात उपलब्ध आहेत.

खालील विवरणपत्रात काही निवडक वर्षांची कुष्ठरोग विषयक आकडेवारी दिलेली आहे.[१८९]

| वर्ष | क्रियाशील रुग्ण | दर दहा हजार लोकांमागील प्रमाण | नवीन शोधलेले रुग्ण | दर दहा हजार लोकांमागील रुग्ण | रोगक्त केलेले रुग्ण |
|---|---|---|---|---|---|
| १९८१ | १८,३०५ | १०.२ | ३,५१२ | २.० | — |
| १९८६ | २०,३२९ | १०.६ | ५,५१७ | ३.५ | ४,५२९ |
| २००० | १,०५३ | ३.६ | १,६६१ | ५.५ | २,०६१ |
| २००१ | १,०४६ | ३.५ | १,६७५ | ५.६ | १,६६९ |
| २००४ | ८७९ | २.८ | १,१९५ | ३.८ | १,५१३ |
| २००५ | १६३ | ०.५ | ३९७ | १.२ | १,११४ |

१८७. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ५२७.

१८८. **स्टॅटिस्टिकल ॲबस्ट्रॅक्ट, १९८१-८२,** पृ. ३०६.

१८९. जिल्हा आरोग्य अधिकारी, जि. प., नांदेड.

डिसेंबर २००५ पर्यंत जिल्ह्यात कुष्ठरोगाचे निर्मूलन करणे हे शासनाचे उद्दिष्ट होते. ते उद्दिष्ट नांदेड जिल्ह्याने सप्टेंबर २००५ पर्यंत साध्य केले आहे.

वरील रोगांव्यतिरिक्त जिल्ह्यात एडस्, हृदयरोग, कर्करोग, श्वसनासंबंधीचे रोग, विविध प्रकारचे ताप, डेंग्यू यासारख्या रोगांचाही प्रादुर्भाव आढळतो. यापैकी सन १९९१, २००० व सन २००५ मध्ये गॅस्ट्रोची अनुक्रमे ८५५, ५,५७१ व ६,००३ लोकांना लागण होऊन त्यापैकी अनुक्रमे २१, ६ व २ लोकांचा मृत्यू ओढवला होता.[१९०]

## कुटुंब कल्याण

लोकसंख्येमध्ये स्थिरता आणणे व लोकांच्या जीवनाचा दर्जा उंचावणे हा कुटुंब कल्याण कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे. बाल आरोग्य जपण्यास प्रोत्साहन देणारा हा कार्यक्रम आहे. महाराष्ट्र राज्यात हा कार्यक्रम १९५७ पासून शासकीय पातळीवर सुरू झाला. केंद्र शासनाने आखून दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार पूर्णपणे केंद्र शासनाने केलेल्या आर्थिक तरतुदीतून हा कार्यक्रम राबविण्यात येतो.

सर्वांना आरोग्य व त्याअनुषंगाने माता-बाल संगोपन, बाल जिवीत्व व सुरक्षित मातृत्व, प्रजनन व बाल आरोग्य हे या कार्यक्रमाचे भाग आहेत व त्याअनुषंगाने जन्मदर, बालमृत्यू दर, माता मृत्यू दर व एकूण मृत्यू दरात घट करण्याचे प्रयत्न केले जात आहेत. नागरी व ग्रामीण क्षेत्रात प्रस्थापित असलेल्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या आरोग्य सेवा यंत्रणेद्वारे कुटुंब नियोजनासाठी मुख्यतः पाच पद्धतीची सेवा/साधने लोकांना देण्यात येतात. त्यात पुरूष नसबंदी, स्त्री नसबंदी, स्त्रियांसाठी तांबी, संततीप्रतिबंधक गोळ्या तसेच पुरूषांसाठी निरोध यांचा समावेश आहे. यामध्ये आता एन.एस.व्ही. व इमर्जन्सी कॉन्ट्रासेप्टीव्हजचा अंतर्भाव करण्यात आला आहे. या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी दरवर्षी केंद्र शासनातर्फे देण्यात येणाऱ्या उद्दिष्टांची पद्धत बदलून १९९६-९७ पासून हा कार्यक्रम केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार संपूर्ण राज्यात स्वयंउद्दिष्ट तत्त्वावर राबविण्यात येत आहे.

नसबंदी कार्यक्रमामध्ये महाराष्ट्र राज्य प्रथमपासूनच आघाडीवर आहे. या कार्यक्रमाची गुणात्मक प्रगती करण्याचेही राज्याचे उद्दिष्ट आहे. याखेरीज मुलींचे विवाहाचे वय वाढविणे, जनतेतील पुत्रप्राप्तीचा हव्यास कमी करणे, अल्पसंख्याकांचा अधिकाधिक सहभाग प्राप्त करणे व पुरूष नसबंदी शस्त्रक्रियांचे प्रमाण वाढविणे या बाबींवर विशेष भर देण्यात येत आहे.

कुटुंब कल्याण कार्यक्रम हा राज्याच्या आरोग्य खात्याचे सचिव व आयुक्त (कुटुंब कल्याण) यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यात राबविला जातो. जिल्हा पातळीवर या कार्यक्रमाची जबाबदारी जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, नगरपालिका यांच्या अधिपत्याखाली जिल्हा कुटुंब कल्याण केंद्रे, नागरी व ग्रामीण कुटुंब कल्याण केंद्रे, स्वयंसेवी संस्था व महिला संघटना तसेच खाजगी वैद्यकीय व्यावसायिक यांच्यावर सोपविण्यात आलेली आहे. यापैकी महानगरपालिकेच्या क्षेत्रातील नागरी कुटुंब कल्याण केंद्रे,

---

१९०. कित्ता.

नागरी आरोग्य केंद्रे यांच्यामार्फत राबविल्या जाणाऱ्या कुटुंब कल्याण कार्यक्रमाचे संनियंत्रण व देखरेख करण्यासाठी शहर कुटुंब कल्याण विभागाची स्थापना करण्यात आलेली आहे, तर ग्रामीण भागात कुटुंब कल्याण सेवा अंतर्गत उपकेंद्रे स्थापन करण्यात आलेली आहेत. त्यांच्यामार्फत या कार्यक्रमाच्या सर्व योजना राबविण्यात येतात.

लैंगिक शिक्षण, मुलांच्या जन्मात अंतर व वंध्यत्व निवारण अशा तीन टप्प्यात हा कार्यक्रम राबविला जातो. १९६० मध्ये नांदेड, देगलूर, हदगाव, किनवट, कंधार व मुखेड येथे कुटुंब नियोजन केंद्रे होती. यावर्षी एकूण २६५ कुटुंब नियोजनाच्या शस्त्रक्रिया करण्यात आल्या होत्या,[१९१] तर १९६३-६४ मध्ये १,०९ शस्त्रक्रिया पार पाडण्यात आल्या होत्या.[१९२] १९७० मध्ये देगलूर, इस्लामपूर व उमरी येथेही कुटुंब नियोजन केंद्रे उघडण्यात आली. कुटुंब कल्याण संघटनेकडे फिरते नसबंदी युनिट आहे. या युनिटतर्फे गर्भनिरोधक गोळ्यांचे वाटप केले जाते. १९७२-७३ मध्ये जिल्ह्यात १९ कुटुंब नियोजन केंद्रे होती व त्यामार्फत १५,३८४ पुरूष व २,००० स्त्री अशा १७,३८४ नसबंदी शस्त्रक्रिया (उद्दिष्ट-१४,४२०) करण्यात आल्या. यावर्षी ४९ गर्भाशय वलये किंवा लूप (I.C.U.D.) बसविण्यात आले होते.[१९३] सन १९८१-८२ मध्ये जिल्ह्यातील कुटुंब नियोजन केंद्रांची संख्या १५ वर आली. त्यातून १,०८८ पुरूष व ८,२१२ स्त्री अशा ९,३०० नसबंदी शस्त्रक्रिया (उद्दिष्ट-१०,९०८) करण्यात आल्या. यावर्षी २२४ गर्भाशय वलये (लूप) बसविण्यात आली होती.[१९४] आणि ६,३२७ गर्भनिरोधक गोळ्यांचे वाटप करण्यात आले होते. सन १९८५ च्या अखेरीस मात्र जिल्ह्यात ग्रामीण भागात २१ व नागरी भागात ११ मिळून एकूण ३२ केंद्रे होती. यावरून यावर्षी शासनाने या कार्यक्रमाच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी जोरदार प्रयत्न केल्याचे स्पष्ट होते. या केंद्रांमार्फत २,५४१ पुरूष शस्त्रक्रिया (ग्रा. ६९१, ना. १,८५०) व ८,१८९ स्त्री शस्त्रक्रिया (ग्रा. ३,६७६, ना. ४,५१३) करण्यात आल्या होत्या. यावर्षी गर्भाशय वलये (लूप) बसविण्याच्या संख्येतही २६,०७५ इतकी वाढ झाली होती. त्यापैकी १८,६६९ गर्भाशय वलये ही ग्रामीण केंद्रांमार्फत बसविण्यात आली. यावरून जनतेतही कुटुंब नियोजनविषयक जागृती होत असल्याचे स्पष्ट होते.[१९५] सन १९९१-९२ या वर्षी वरील कुटुंब नियोजन केंद्रांमार्फत १५,७३१ नसबंदी शस्त्रक्रिया व ९,२०४ गर्भाशय वलये बसविण्यात आली होती. शासकीय यंत्रणेमार्फत कुटुंब नियोजनाची अन्य साधने वापरण्याबाबतही जनजागृती केली गेल्याने यावर्षी अशी साधने वापरणाऱ्यांची जिल्ह्यातील संख्या २५,२२२ एवढी, तर संतती प्रतिबंधक गोळ्या वापरणाऱ्यांची संख्या १३,०४२ एवढी होती.[१९६] सन २०००-२००१ मध्ये जिल्ह्यास २२,३१० नसबंदी शस्त्रक्रियांचे उद्दिष्ट देण्यात आले होते. त्यापैकी २३,११७ शस्त्रक्रिया करून हे उद्दिष्ट साध्य करण्यात आले होते. यावर्षी

१९१. **डिस्ट्रिक्ट सेंसस हॅण्डबुक,** नांदेड डिस्ट्रिक्ट, १९६१, पृ. २६.

१९२. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ५२७.

१९३. **स्टॅटिस्टिकल ॲबस्ट्रॅक्ट, १९७२-७३,** पृ. २८९.

१९४. कित्ता, १९८२-८३, पृ. ३९१.

१९५. **जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन,** नांदेड जिल्हा १९८२-८३ व ८४-८५, पृ. १९०.

१९६. **महाराष्ट्राची संक्षिप्त सारणी, १९९५,** अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९९६, पृ. १३७.

८,९७३ गर्भाशय वलये बसविण्यात आली, तर ९,५४८ गर्भनिरोधक गोळ्यांचे वाटप करण्यात आले होते. निरोध वाटण्याचे उद्दिष्टही १०४% इतके पूर्ण करण्यात आले होते[१९७] सन २००३-२००४ मध्ये जिल्ह्यात कुटुंबनियोजन केंद्रांची संख्या ७९ इतकी होती. त्यातील ६८ केंद्रे ग्रामीण भागात होती. या सर्वांमार्फत १०८ पुरुष (ग्रा. ९७) व १६,२३९ स्त्री (ग्रा. १४०,११) अशा एकूण १६,३४७ नसबंदी शस्त्रक्रिया करण्यात आल्या. तर ६,४३० (ग्रा. ५,८२१) गर्भाशय वलये बसविण्यात आली होती.[१९८]

सन २००५-२००६ मध्ये जिल्ह्यास २१,२५० नसबंदी शस्त्रक्रियांचे उद्दिष्ट देण्यात आले होते. त्यापैकी २०,८०४ (पुरूष-८५) शस्त्रक्रिया पार पाडण्यात आल्या होत्या, तर तांबी बसविण्याचे ८,६६० इतके उद्दिष्ट ९९% पूर्ण करण्यात आले होते. याच वर्षी १२,२२१ गर्भनिरोधक गोळ्या व १४,५५७ निरोधचे वाटप करण्यात आले होते.[१९९]

या कार्यक्रमाचा भाग म्हणून निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करून घेणाऱ्या लाभार्थीस शासन अनेक प्रकारे आर्थिक प्रोत्साहन देते. केंद्र शासनाच्या मापदंडाप्रमाणे या आर्थिक सहाय्यात अंतर्भूत असलेल्या आहार, वाहतूक, औषधे, मलमपट्टी वगैरे बाबींवरील खर्चाचे दर शासनाने ठरवून दिलेले आहेत. या संपूर्ण कार्यक्रमामध्ये स्त्रियांप्रमाणे पुरूषांचा सहभाग वाढविण्याच्या दृष्टीने नसबंदी करणाऱ्या पुरूष लाभार्थीस राज्य शासनातर्फे दि. १ सप्टेंबर २००१ पासून ३५१ रुपये व केंद्र शासनातर्फे १५० रुपये असे मिळून ५०१ रुपये देण्यात येतात व त्यास उत्तम प्रतिसाद आहे.

## माता व बालसंगोपन कार्यक्रम

या कार्यक्रमात मुलांचे संगोपन, शाळेतील मुलांच्या आरोग्याची काळजी, कुटुंब नियोजन आणि स्त्रियांची प्रसुतीपूर्व व प्रसवोत्तर तपासणी यांचा समावेश होतो, किंबहुना कुटुंब कल्याण कार्यक्रमाची यशस्वीता ही या कार्यक्रमावरच अवलंबून आहे. या कार्यक्रमांतर्गत रोगांपासून मुलांचे संरक्षण व्हावे म्हणून लस टोचणे, 'अ' जीवनसत्वयुक्त गोळ्यांचा पुरवठा करणे वगैरे योजना राबविल्या जातात. मुलांना होणारा घटसर्प, डांग्या खोकला, धनुर्वात व गोवर तसेच गरोदरपणी किंवा बाळंतपणी स्त्रियांना होणारा धनुर्वात, शालेय मुलांना (५ ते ६ वर्षे वयोगट) होणारा घटसर्प, धनुर्वात, पक्षघात, विषमज्वर या संसर्गजन्य रोगांविरूध्द प्रतिकारशक्ती निर्माण करणारी लस टोचणी योजना महाराष्ट्र राज्यात १९६९ पासून अंमलात आली आहे, तर दुहेरी लसीमार्फत धनुर्वात प्रतिबंधक योजना १९७५ पासून राबविण्यास सुरुवात झाली.[२००]

लस टोचणी योजना ही केंद्र पुरस्कृत आहे. या योजनेचा विस्तारित लस टोचणी हा कार्यक्रम राज्यात दि. १ एप्रिल १९७८ पासून कार्यान्वित करण्यात आला. १९९० पर्यंत सर्व पात्र माता-बालकांना लाभ देता यावा या उद्देशाने १९८५-८६ सालापासून सार्वत्रिक लस टोचणी हा कार्यक्रम टप्प्याटप्प्याने

१९७. जिल्हा आरोग्य अधिकारी, जि. प., नांदेडकडील माहिती.

१९८. **जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, २००३-२००४,** नांदेड जिल्हा, पृ. ७७.

१९९. जिल्हा आरोग्य अधिकारी, जि. प., नांदेडकडील माहिती.

२००. **परभणी जिल्हा गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ५४८.

अंमलात आणला गेला. या कार्यक्रमास केंद्र शासनाने फार महत्त्व दिलेले असून नवीन २० कलमी कार्यक्रमात याचा अंतर्भाव करण्यात आलेला आहे. तसेच त्यासाठी एका स्वतंत्र टेक्नॉलॉजी मिशनचीही स्थापना करण्यात आली आहे.

सन १९८५-८६ पासून बी.सी.जी. लस टोचणी हा कार्यक्रम सार्वत्रिक लस टोचणी कार्यक्रमात अंतर्भूत करण्यात आला आहे. ही लस एक वर्षाच्या आतील सर्व बालकांना दिली जाते. सन २००५-२००६ मध्ये जिल्ह्यातील एकूण ५८,८५७ बालकांना त्रिगुणी लस व डोस, ५२,०७४ बालकांना ट्रिपल बुस्टर, ५८,५३४ बालकांना बी.सी.जी. लस, ५५,०२७ बालकांना गोवर व जीवनसत्त्व 'अ' युक्त लस, ५४,०७९ बालकांना द्विगुणी (D.T.) व ६४,८८२ गरोदर स्त्रियांना रोगप्रतिबंधक लस टोचण्यात आली होती. बालकांप्रमाणेच गरोदर मातांना धनुर्वात प्रतिबंधक लस देण्यात येते. ग्रामीण भागात माता व बाल संगोपन कार्यक्रमाची जबाबदारी प्राथमिक आरोग्य केंद्रावर टाकण्यात आली आहे. तक्ता क्रमांक ७ मध्ये माता व बाल संगोपन कार्यक्रमांतर्गत केलेल्या लसीकरण कामाची आकडेवारी दिलेली आहे.

**पल्स पोलिओ लसीकरण :** जागतिक आरोग्य संघटनेच्या मार्गदर्शक सुचनांनुसार महाराष्ट्रात पोलिओ निर्मूलन कार्यक्रम कार्यान्वित असून सन १९९५-९६ पासून पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेमुळे राज्यातील पोलिओग्रस्तांच्या संख्येत लक्षणीयरित्या घट झालेली आहे. या कार्यक्रमांतर्गत दरवर्षी ०-५ वयोगटातील सर्व बालकांना पोलिओचे दोन डोस दिले जातात. याशिवाय ज्या ठिकाणी पोलिओ रुग्ण आढळून येतो त्या व त्याभोवतीच्या, कार्यक्षेत्रात विशेष पल्स पोलिओ लसीकरण मोहीम राबविण्यात येते. या मोहिमेकरिता केंद्र सरकारकडून पोलिओ लस, शीतसाखळी उपकरणे व काही प्रमाणात अनुदान उपलब्ध होते. तसेच महाराष्ट्र शासनाकडूनही अतिरिक्त अनुदान देण्यात येते.

सन २००३-२००४ मध्ये मॉप अप राऊंड मोहिमेखाली नांदेड जिल्ह्यात दि. २९ जून व ४ जुलै २००३ रोजी पहिला डोस १२,६२,२४२ बालकांना व दि. १० ऑगस्ट व १६ ऑगस्ट २००३ रोजी दुसरा डोस १२,८८,३०० बालकांना देण्यात आला. नांदेड-वाघाळा महानगरपालिकेतर्फेही ही योजना घरोघरी जाऊन राबविण्यात येते.

**शालेय आरोग्य कार्यक्रम :** शालेय आरोग्य तपासणी कार्यक्रम राज्यात १९९६ पासून मोहीम स्वरुपात राबविण्यात येतो. यापूर्वीही हा कार्यक्रम राज्यात सुरू होता. शालेय विद्यार्थ्यांमधील आजारपणाचे व मृत्यूचे प्रमाण कमी करणे, वैयक्तिक स्वच्छता व परिसर स्वच्छता या आरोग्यदायी व सशक्त पिढी निर्माण करणे ही या कार्यक्रमाची उद्दिष्टे आहेत. या कार्यक्रमांतर्गत इयत्ता १ ली ते ४ थी मधील मुलांची शाळांमध्ये जाऊन वैद्यकीय तपासणी करण्यात येते. यात आजारी आढळणाऱ्या मुलांना आवश्यकता भासल्यास पुढील उपचारासाठी जिल्हा रुग्णालयाकडे किंवा तज्ज्ञ डॉक्टरांकडे शिफारस करून पाठविण्यात येते. ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांवर व नागरी भागात महानगरपालिकेच्या आरोग्य अधिकाऱ्यांवर हा कार्यक्रम राबविण्याची जबाबदारी सोपविलेली आहे.

संपूर्ण राज्यातील प्राथमिक शाळांमधील इयत्ता १ ली ते ४ थी मधील विद्यार्थ्यांची विशेष आरोग्य तपासणी दिनांक २ ते १६ डिसेंबर २००२ या काळात करण्यात आली. ही संपूर्ण मोहीम आरोग्य विभाग व शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राबविली गेली होती. हा कार्यक्रम दरवर्षी राबविण्यात येतो. सन २००६-०७ यावर्षी जिल्ह्यातील २,०६० शाळांमध्ये राबविण्यात आलेल्या या कार्यक्रमात १,८८,२७९ विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करून ३१,५१५ विद्यार्थ्यांवर उपचार करण्यात आले.

**सावित्रीबाई फुले कन्या कल्याण योजना :** महिलांचा सामाजिक दर्जा वाढविणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. एकही मुलगा नसलेल्या आणि एक अथवा दोन मुलींवर नसबंदी करून घेतलेल्या जोडप्यांना राष्ट्रीय बचत प्रमाणपत्रे व युनिट ट्रस्ट इंडिया प्रमाणपत्रे या स्वरूपात बक्षिस देण्याची ही योजना दिनांक १ एप्रिल १९९५ पासून अमलात आहे.[२०१] तथापि, नवीन लोकसंख्याविषयक धोरणानुसार या योजनेत दिनांक १ एप्रिल २००० पासून बदल करण्यात आला आहे. त्यानुसार मुलगा नसलेल्या ज्या कुटुंबांनी एक किंवा दोन मुलींनंतर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करून घेतली असेल त्यांना प्रोत्साहनपर बक्षिस देण्याचे राज्य शासनाने जाहीर केले आहे. मात्र ही योजना दारिद्र्य रेषेखालील कुटुंबानांच लागू आहे. या योजनेनुसार एक मुलगी असल्यास १० हजार रुपये व दोन मुली असल्यास प्रत्येकी ५ हजार रुपये प्रमाणे भारतीय युनिट ट्रस्टच्या चिल्ड्रन्स् व करिअर योजनेखाली १८ वर्षांच्या मुदत ठेवीच्या स्वरूपात सर्टिफिकेटस् देण्यात येतात. या मुली १० वी इयत्ता उत्तीर्ण झाल्यास त्यांना ५ हजार रुपयांची ५ वर्षांची राष्ट्रीयकृत बॅकेची मुदत ठेव सर्टिफिकेटस् देण्यात येतात. तथापि त्यांनी २० वर्षापर्यंत विवाह न केल्यासच त्या सदर लाभास पात्र ठरतात.[२०२]

**महिला व बालविकास :** दिनांक २४ जून १९९३ च्या अधिसूचनेनुसार शासनाने महिला व बाल विकास विभाग या स्वतंत्र विभागाची निर्मिती केली आहे. समाजातील दुर्बल महिला व बालक या घटकांच्या कल्याणाचे प्रश्न हाताळण्यासाठी महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई, महिला आर्थिक विकास महामंडळ, मुंबई, महाराष्ट्र राज्य समाजकल्याण बोर्ड, मुंबई व राज्यातील सर्व जिल्हानिहाय जिल्हास्तरीय कार्यालये व नागरी प्रकल्प इत्यादी कार्यालये स्थापन केलेली आहेत. सदर कार्यालयांमार्फत महिला कल्याण, बाल कल्याण, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नागरी प्रकल्प, महात्मा गांधी प्रशिक्षण संस्था, पुणे, सराईत अपराधी व अपराधी परिविक्षा अधिनियम योजना, शिक्षा प्रतिबंध योजना इत्यादी योजना राबविल्या जातात. जिल्हा स्तरावर जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी हे राज्य व केंद्र पातळीवर योजना राबवितात, तसेच या योजनांच्या अंमलबजावणीवर देखरेख करतात.

---

२०१. **महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, २००१-२००२,** अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, २००२, पृ. ९०.

२०२. **महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, २००१-२००२,** अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, २००२, पृ. ९०.

**महिला विकास :** यासंबंधीच्या योजना प्रामुख्याने दोन प्रकारांत राबविण्यात येतात. मुली/स्त्रियांचा अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम, १९५६ अंतर्गत अनैतिक संकटात सापडलेल्या स्त्रियांच्या संरक्षण व पुनर्वसनासाठी महिला संरक्षणागृहे स्थापन करण्यात आलेली आहेत. तसेच दुसऱ्या कल्याणकारी उपक्रमामध्ये निराश्रीत, आर्थिकदृष्ट्या मागास, परित्यक्ता, विधवा प्रशिक्षण घेणाऱ्या मुली या प्रकारामध्ये येणाऱ्या महिलांच्या पुनर्वसनासाठी महिला राज्यगृहे (वसतिगृहे), आधारगृहे, माहेर योजना इत्यादी योजना/संस्था कार्यरत आहेत. महिलांच्या व्यक्तिगत प्रगतिसाठी विद्यावेतन, स्वयंरोजगार, महिला प्रशिक्षण केंद्र, विवाहभत्ता इत्यादी योजनाही कार्यरत आहेत. नोकरी करणाऱ्या महिलांच्या कल्याणासाठी केंद्र पुरस्कृत योजनांतर्गत वसतिगृहे, अल्पमुदतीची निवासस्थाने, नोरॉड (प्रशिक्षण-व्यवसाय व उत्पादन केंद्र सुरू करण्याबाबत) इत्यादी योजनांचा समावेश आहे. यातील काही ठळक योजना पुढीलप्रमाणे :—

## राज्य शासनाच्या योजना

**महिला व बाल कल्याण समिती :** महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ च्या संबंधित कलमात सुधारणा करून जिल्हा परिषदेमध्ये 'महिला बाल विकास समिती' अशी नवीन विषय समिती स्थापन करण्यात आलेली आहे. या समितीकडे जिल्हा परिषद अंतर्गत असलेल्या महिला व बालविकास विषयक योजना सोपविण्यात आलेल्या आहेत. त्यात (१) एकात्मिक बाल विकास योजना, (२) एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रमाखालील (४०% महिला कार्यक्रम) योजना, (३) महिला व बालके यांचा विकास कार्यक्रम व (४) ट्रायसेम योजना (महिला कार्यक्रम) यांचा समावेश आहे. याशिवाय या समितीकडे जिल्हा परिषदेच्या स्वतःच्या निधीतून ५ ते १०% पर्यंत, परंतु किमान ५% पेक्षा कमी नाही इतकी रक्कम समितीवर सोपविलेल्या कामासाठी उपलब्ध करून देण्यात येते. तसेच जिल्हा नियोजन व विकास मंडळ समितीसाठी स्वतंत्र तरतूदही उपलब्ध करून देण्यात येते.

**राज्य महिला आयोग :** भारतीय संविधानाद्वारे तसेच विविध विधेयकांद्वारे महिलांसाठी तरतूद करण्यात आलेल्या संरक्षक उपाययोजनांच्या संबंधातील सर्व बाबींचे अन्वेषण व तपासणी करणे व त्यासंबंधातील अहवाल केंद्र शासनाला सादर करणे यासाठी केंद्र शासनाने राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना केलेली आहे. याच धर्तीवर महाराष्ट्र शासनाने राज्यात महिला आयोगाची स्थापना केलेली आहे. यात एक अध्यक्ष, एक सदस्य सचिव व सहा अशासकीय सदस्य आहेत.

**निराधार व निराश्रीत विधवांच्या मुलींच्या विवाहाकरिता विवाहभत्ता :** कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न १५ हजार रुपयांपेक्षा अधिक नसणे, मुलीचे वय १८ वर्षापेक्षा कमी नसणे व अनुदानाची रक्कम हुंड्यासाठी वापरू नये या अटींवर निराश्रीत विधवांच्या मुलींच्या लग्नासाठी राज्य शासनाकडून २ हजार रुपये विवाह अनुदान देण्यात येते. लाभार्थींच्या अर्जांची छाननी करून त्यांना अनुदान देण्याचा अधिकार जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांना देण्यात आलेला आहे. या योजनेखाली नांदेड जिल्ह्यात सन १९९९-२००० मध्ये ६० लाभार्थींना एक लाख रुपये अनुदान देण्यात आले होते.

**हुंडा पद्धतीचे निर्मूलन :** हुंडा प्रतिबंधक कायदा सन १९६१ पासून अस्तित्त्वात आलेला आहे. या अनिष्ट पद्धतीचे कायमचे उच्चाटन करण्यासाठी कायद्याबरोबरच सामाजिक प्रयत्नांची जोड म्हणून शासनाने जिल्हास्तरावर जिल्हाधिकाऱ्यांच्या अधिपत्याखाली प्रत्येक जिल्ह्यात दक्षता समिती नियुक्त केलेली आहे. याबाबत विविध माध्यमांद्वारे जनजागृतीही करण्यात येते. १९९९-२००० मध्ये या योजनेसाठी, आठ हजार रुपये खर्च करण्यात आले होते.

**महिला मंडळाना सहायक अनुदान :** महिला मंडळे ग्रामीण भागातील गरजू स्त्रियांना प्रशिक्षण अथवा उत्पादन केंद्रातून तसेच सामुहिक स्वयंपाकगृहांमधून स्वयंरोजगार उपलब्ध करून देतात. कुटुंबाचा चरितार्थ चालविण्यासाठी ज्या स्त्रियांना नाईलाजाने अनेक हलक्या दर्जाची कामे करावी लागतात, अशांना मदत करण्याकरिता त्यांना व्यावसायिक शिक्षण देऊन, त्यांनी त्यांचा स्वतःचा धंदा किंवा स्वयंरोजगार तालुका किंवा ग्रामीण पातळीवर सुरू करण्यास सहाय्य देण्यात येते. त्यासाठी या स्त्रियांच्या संस्थांना अनावर्ती अनुदान म्हणून वर्षातून एकदा २८,५०० रुपये, तसेच आवर्ती अनुदान म्हणून वर्षातून दोन वेळा २१,५०० असे एकूण ४३ हजार रुपये देण्यात येतात. सन १९९९-२००० मध्ये नांदेड जिल्ह्यातील अशा २६ स्त्रियांना ११,१८ हजार रुपये अनुदान देण्यात आले होते.

**व्यवसायाभिमुख प्रशिक्षण घेणाऱ्या महिलांना विद्यावेतन :** एस.एस.सी. अथवा १२ वी पर्यंत शिक्षण झालेल्या ज्या स्त्रियांना आर्थिक स्थितीमुळे पुढील शिक्षण घेता येत नाही, किंवा एखादे व्यवसाय प्रशिक्षण घेता येत नाही, अशांना प्रशिक्षण देऊन आर्थिक निर्भर होण्याकरिता ही योजना सुरू करण्यात आलेली आहे. ही योजना ऑक्टोबर, १९८५ मध्ये सुरू करण्यात आलेली असून एप्रिल, १९९५ पासून संबंधित जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांना योजनेतील लाभार्थींना विद्यावेतन मंजूर करण्याचे अधिकार सुपूर्द करण्यात आलेले आहेत. या योजनेंतर्गत एका महिलेस दरमहा १०० रुपये विद्यावेतन देण्यात येते. प्रशिक्षणाचा कालावधी ६ महिने ते २ वर्षे असा आहे. या योजनेंतर्गत सन १९९९-२००० यावर्षी १,०४२ लाभार्थींना ६,२५ हजार रुपये विद्यावेतन दिले गेले.

**बहुउद्देशिय महिला केंद्रे स्थापन करणे :** ही योजना ऑक्टोबर, १९९४ पासून कार्यान्वित केलेली असून त्यान्वये प्रत्येक जिल्ह्यात एक एक केंद्र स्थापन करण्यात आलेले आहे. महिला वर्गाचा सर्वतोपरी विकास व उन्नतीसाठी सुरू असलेल्या चळवळींबद्दलची त्यांना माहिती देणे, मोकळ्या वातावरणात परस्परांशी विचार-विनिमय करून विचारांची देवाणघेवाण करणे, महिलांना व्यावसायिक प्रशिक्षणांसंदर्भात मार्गदर्शन व कायदाविषयक सल्ला देणे, आपद्ग्रस्त महिलांना आधार देण्याबाबत मदत करणे, वाचनालयाच्या सुविधा पुरविणे इत्यादी सेवा या केंद्रांमार्फत पुरविण्यात येतात. ही केंद्रे स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येतात. अशा संस्थांना वार्षिक आवर्ती व अनावर्ती अनुदान राज्य शासनाकडून देण्यात येते.

**देवदासींसाठी पुनर्वसनाच्या योजना :** देवदासी झालेल्या मुली/महिलांना रूढीनुसार दुसरा विवाह करता येत नाही. त्यामुळे गावोगावी फिरून देवीच्या नावाने भिक्षा मागून उदरनिर्वाह करावा लागतो. त्यांच्या संततीसही नाईलाजाने याच मार्गाने जावे लागते. म्हणून या अनिष्ट रूढीच्या निर्मूलनासाठी निरनिराळ्या स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने देवदासींच्या पुनर्वसनासाठी विविध योजना

सुरू केलेल्या आहेत. त्यात अविवाहित देवदासी किंवा देवदासीच्या मुलीच्या विवाहासाठी आर्थिक सहाय्य म्हणून रुपये १० हजार व देवदासींच्या मुलामुलींसाठी वसतिगृहे व प्रशिक्षणकेंद्रे यांचा समावेश आहे. या योजना १९८६-८७ पासून सुरू आहेत. याशिवाय देवदासींच्या इयत्ता पहिली ते दहावी पर्यंतच्या मुलामुलींच्या शिक्षणासाठी या योजनेंतर्गत शालेय साहित्य, गणवेश इत्यादीसाठी प्रत्येक मुलाला वर्षाला ३७० रुपये व मुलीला ४०० रुपयांचे लेखन साहित्य पुरविण्यात येते. तसेच वाहन खर्चासाठी २० ते ३० रुपये दरमहा देण्यात येतात. सन १९९९-२००० मध्ये नांदेड जिल्ह्यातील अशा एका मुलीस विवाहासाठी १० हजार रुपये सहाय्य देण्यात आले होते.

**पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर पुरस्कार :** महिला व बालविकास क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करीत असलेल्या समाजसेविकांच्या व संस्थांच्या कामाची दाद घ्यावी व इतर समाजसेविका/संस्थांना त्यापासून प्रेरणा मिळावी याकरिता राज्यातील समाजसेविका व संस्थांना १९९६-९७ पासून वरील पुरस्कार देण्यात येतो. दरवर्षी प्रत्येक जिल्ह्यातील एका महिला समाजसेविकेस हा पुरस्कार देण्यात येतो, तर सहा महसूल विभागातील एका संस्थेस तो देण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. यात समाजसेविकांना सन्मानपत्र व १ लाख रुपये रोख हे वैयक्तिक स्तरावर दिले जातात. याशिवाय शासनाकडून १० हजार रुपये रोख व सन्मानपत्र दिले जाते, तर संस्थेला सन्मानपत्र, संस्थेच्या नावाचे स्मृतिचिन्ह व २५ हजार रुपये रोख दिले जातात.

**कामधेनू योजना :** ही योजना १९९५-९६ पासून सुरू करण्यात आलेली आहे. नोंदणीकृत महिला संस्थाना जिल्हा परिषद, महानगरपालिका, स्वयंसेवी संस्था वगैरेंकडून चालविल्या जाणाऱ्या शाळा, संस्था, इस्पितळासाठी लागणारे गणवेश, चादरी, उशा, कपडे, फिनेल, अभ्रे, झाडू तसेच स्वयंपाकासाठीचे मसाले, पापड, लोणची इत्यादी तयार करण्याचे काम देण्यात येऊन त्यायोगे महिला संस्था व गरजू महिलांना स्वयंरोजगार उपलब्ध करून देण्यात येतो. या संस्थांनी एका गरजू महिलेस खर्च वजा जाता दरमहा कमीत कमी ५०० रुपये मिळवून दिल्यास शासनाकडून दरमहा २० रुपये प्रमाणे व्यवस्थापन अनुदान देण्यात येते. ही योजना परिणामकारकपणे राबविण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा उद्योग, समिती अंतर्गत एक कामधेनू योजना उप समिती स्थापन करण्यात आलेली आहे. सध्या ऑक्टोबर, २००० पासून ही योजना जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित करण्यात आलेली आहे. सन १९९९-२००० मध्ये नांदेड जिल्ह्यात २००० लाभार्थींना ४ लाख रुपये अनुदान देण्यात आले होते.

**जिजामाता महिला आधार विमा योजना :** ही योजना दिनांक १ मे १९९९ या महाराष्ट्र दिनापासून सुरू केलेली आहे. या योजनेंतर्गत २१ ते ७० वर्षे वयोगातील कुटुंब प्रमुखाचे किंवा कर्त्या पुरूषाचे अपघाती निधन झाल्यास त्याच्या विधवा पत्नीस अथवा मुली-मुलास २५ हजार रुपये इतके एकरकमी अर्थसहाय्य 'नॅशनल विमा कंपनी' कडून देण्यात येते. सदर व्यक्तीस कायमस्वरूपी अपंगत्व आले तरीही एवढे अर्थसहाय्य देण्यात येते. या योजनेचा लाभ महाराष्ट्रातील फक्त केशरी व पिवळ्या रंगाच्या सर्व शिधापत्रिकाधारक कुटुंबांना अनुज्ञेय आहे.

**केंद्र शासनाच्या योजना :** राज्यात केंद्र शासनातर्फे महिला विकासासाठी अनेक योजना राबविण्यात येतात. स्वयंसेवी संस्थांकडून प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांची छाननी करून राज्य शासनातर्फे परिपूर्ण व योग्य असे प्रस्ताव अनुदान मंजुरीच्या शिफारशींसह केंद्र शासनाकडे पाठविले जातात. अशांपैकी काही महत्त्वाच्या योजना पुढीलप्रमाणे :—

**नोकरदार महिलांसाठी वसतिगृहे :** नोकरीमुळे शहरात वास्तव्य करणाऱ्या ज्या स्त्रिया, शहरात घर घेण्यास असमर्थ असतात, अशांसाठी काही स्वयंसेवी संस्था वसतिगृहे उभारून देतात. या स्वयंसेवी संस्थांना जमीन खरेदी करण्यासाठी ५०% व वसतिगृह बांधण्यासाठी ७५% अनुदान देण्यात येते. मासिक उत्पन्न रुपये २,५००/- पेक्षा अधिक नसलेल्या नोकरदार महिलांना अशा वसतिगृहांमध्ये प्रवेश दिला जातो. एका महिलेस एका खोलीसाठी १५%, दोन महिलांना एका खोलीसाठी १०% व एका खोलीत दोनपेक्षा अधिक महिलांसाठी ७.५% भाडे आकारण्यात येते. या वसतिगृहांमध्ये पाळणाघराची सुविधाही उपलब्ध असते. एका वसतिगृहाची क्षमता १०० लाभधारक इतकी असते.

**स्टेप योजना :** या योजनेंतर्गत प्रकल्पासाठी कोणत्याही प्रकारची आर्थिक मर्यादा ठेवण्यात आलेली नसून प्रकल्पाच्या ९०% इतके अर्थसहाय्य केंद्र सरकारकडून दिले जाते, तर १०% खर्च स्वयंसेवी संस्थेला करावा लागतो. महिलांसाठी व्यवसाय प्रशिक्षण व व्यवसायासाठी या योजनेद्वारे सहाय्य केले जाते. शेती, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय, हातमाग, मत्स्यव्यवसाय, हस्तकला, खादी व ग्रामोद्योग आणि रेशीम उद्योग या क्षेत्रातील प्रकल्पास प्रामुख्याने १ ते ४ वर्षांपर्यंत मदत देण्यात येते.

**नोराड योजना :** गरजू मागासवर्गीय महिलांना कायमस्वरूपी व्यवसाय उपलब्ध होईल अशा प्रकारचा प्रकल्प राबविण्यासाठी आंतरराष्ट्रीय विकासासाठी निर्माण करण्यात आलेल्या नॉर्वेजियन एजन्सीमार्फत १००% अर्थसहाय्य दिले जाते. हे सहाय्य प्रशिक्षणासाठी किंवा उत्पादन केंद्रासाठी शेड बांधणे, प्रशिक्षणाचा खर्च निर्देशकांचे वेतन, इमारत भाडे, प्रशिक्षण व उत्पादन साहित्य खरेदी करणे, प्रति लाभार्थींसाठी दरमहा २०५ रु. विद्यावेतन, खेळते भांडवल, महिलांसाठी निवास सुविधा व पाळणाघरे, व्यवस्थापकीय प्रशिक्षण व सुसाध्यता अध्ययन या बाबींसाठी दिले जाते. सर्वसाधारणपणे एक वर्षाच्या प्रशिक्षणासाठी प्रत्येक लाभार्थीमागे आठ हजार रुपयेप्रमाणे ५० लाभार्थींसाठी एकूण ४ लाख रूपयेंपर्यंत अर्थसहाय्य दिले जाते. हा प्रकल्प शासकीय, निमशासकीय मंडळे, खाजगी कंपन्या, महाविद्यालये अथवा स्वयंसेवी संस्थांमार्फत तयार करण्यात येतो. प्रशिक्षण कालावधीत दर तिमाही प्रगती अहवाल शासनास पाठविणे आवश्यक असते.

**अल्प मुदतीची निवासी गृहे :** अडचणीत सापडलेल्या स्त्रिया व मुली यांच्याकरिता अल्प मुदतीच्या निवासाची व्यवस्था करण्यासाठी स्वयंसेवी संस्थांमार्फत अल्प मुदतीची निवासी गृहे चालविली जातात. एका निवासीगृहात सरासरी ३० लाभार्थींना सुविधा पुरविण्यात येतात. एका गृहासाठी आवर्ती वार्षिक अनुदान रु.४,०१,३५० व अनावर्ती अनुदान रुपये १,५०,००० असे एकूण १००% अनुदान केंद्र शासनाकडून दिले जाते. राज्य शासन अर्जाची छाननी करून शिफारशींसह अर्ज केंद्र शासनास सादर करते.

**राष्ट्रीय महिला कोष :** आर्थिकदृष्ट्या मागास व अप्रशिक्षित महिलांना त्यांच्या सोयीनुसार कमी व्याजाच्या दराने कर्ज उपलब्ध करून देणे, हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. ग्रामीण भागातील महिलेस व्यवसायासाठी लागणारा कच्चा माल खरेदी करण्यासाठी स्थानिक सावकारांकडून जादा दराने कर्ज घेऊ लागू नये यासाठी राष्ट्रीय महिला कोष स्थापन करण्यात आला असून त्यामार्फत स्वयंसेवी संस्थांना ८% प्रतिवर्ष व्याजावर कर्ज दिले जाते. हे कर्ज ६ ते १५ महिन्यांसाठी रु. २५००/- प्रति लाभार्थी व २ ते ५ वर्षांसाठी रु. ५००० प्रतिलाभार्थी दिले जाते. स्वयंसेवी संस्था सदर रक्कम महिलांना १२% व्याजापर्यंत कर्जाऊ देतात. शक्यतो महिला गटाला कर्ज दिले जाते.

## बालविकास

बालविकास कार्यक्रम हा शासकीय व निमशासकीय अशा द्विस्तरावर विभागलेला आहे. हा कार्यक्रम बालन्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २००० च्या अनुषंगाने अमलात आणला जातो. यान्वये मुख्यतः उन्मार्गी, अवखळ, भटकी, निराश्रित, वाममार्गाच्या वाटेवर असलेली बालगुन्हेगार मुले इत्यादींचे संरक्षण, शिक्षण, संगोपन व भावी आयुष्यात जबाबदार नागरिक बनविण्याच्या दृष्टीने उपाय योजले जातात. ही मुले प्रथमतः निरीक्षण अथवा बालगृहात आणून त्यानंतर त्यांची प्रकरणे बालन्याय मंडळाकडे किंवा बालगृहात आणून त्यानंतर त्यांची प्रकरणे बालन्याय मंडळाकडे किंवा बालकल्याण समितीकडे योग्य त्या कारवाईसाठी पाठविली जातात. येथे प्रत्येक मुलाचे प्रकरण पूर्णतः समजावून घेऊन योग्य ती कारवाई केली जाते. काही मुलांना जामिनावर सोडले जाते, तर काहींना परिवीक्षा अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली सोडतात.

मुलांना शिक्षण मिळावे व भावी आयुष्यात स्वतःच्या पायावर उभे राहून आपला चरितार्थ योग्य रितीने चालवावा. या हेतूने या मुलांना वयाच्या १८ वर्षापर्यंत वरील बालगृहात किंवा विशेष गृहात पाठविले जाते. सन १९९९-२००० मध्ये नांदेड जिल्ह्यात ५० इतक्या क्षमतेचे मुलींसाठीचे एक बालगृह होते. त्यात यावर्षी असलेल्या ३० मुलींपैकी ११ मुलींचे पुनर्वसन करण्यात आले होते. याचवर्षी जिल्ह्यात मुली व मुलांसाठी प्रत्येकी एक निरीक्षण गृह होते. त्यांची एकूण प्रवेशक्षमता १५० होती. व त्यात १०० मुलामुलींना प्रवेश देण्यात आला होता. शासकीय बालगृहात अगर शासनमान्य स्वयंसेवी बालगृहात वरील प्रकारच्या मुलांना अन्न, वस्त्र, निवारा, संरक्षण, वैद्यकीय सेवा, शालेय शिक्षण, व्यवसाय शिक्षण अशा प्रकारचे सहाय्य देऊन समाजात मानाने जगण्यासाठी योग्य बनविण्यात येते. अशा मुलांना नंतर काही अटींवर सोडण्यात येते. काहींना त्यांच्या पालकांकडे सोपविले जाते. हेही शक्य नसल्यास त्यांना कोल्हापूर व चेंबूर येथील अनुरक्षण वसतिगृहात व मुलींना बोरीवली येथील अनुरक्षण वसतिगृहात प्रवेश दिला जातो.

राज्यातील ३५ निरीक्षणगृहे ही जिल्हा परिवीक्षा व अनुरक्षण संघटना चालवितात. जेथे अशा संघटना या कामासाठी पुढाकार घेत नाहीत, तेथील निरीक्षणगृहे शासनामार्फत चालविली जातात, व जेव्हा अशा संस्था पुढाकार घेतात, त्यावेळी ही निरीक्षणगृहे त्यांच्याकडे सोपविली जातात.

Maharashtra State Board Question Answers

महाराष्ट्र राज्य परिवीक्षा व अनुरक्षण संघटना या संस्थेस शासनाची मान्यता असून ती वरील उल्लेखिलेल्या अधिनियमान्वये परिवीक्षा पश्चात जपणुकीच्या कार्यासाठी कार्यरत आहे. राज्यातील स्वयंसेवी निरीक्षणगृहे या संघटनेशी संलग्न असतात. चिल्ड्रेन एड सोसायटी मुंबई ही मुलांच्या कल्याणासाठी ५० वर्षे नावाजलेली व कार्यक्षम संस्था आहे. ही शक्यतो मुंबईत मोठ्या प्रमाणावर काम करते.

बालन्याय अधिनियम, २००० मधील कलम (४) च्या तरतुदींनुसार दि.३ ऑक्टोबर १९९१ च्या अधिसुचनेद्वारे राज्यात ३७ बालकल्याण मंडळांची स्थापना करण्यात आली आहे. या मंडळांद्वारे दुर्लक्षित मुलांचे संगोपन व संवर्धन विषयक काम हाताळले जाते. यासंबंधी काही योजना पुढीलप्रमाणे :—

**स्वयंसेवी निरीक्षणगृहे व बालगृहे चालविण्यासाठी सहाय :** गुन्हेगारी प्रवृत्तीकडे झुकणाऱ्या व उन्मार्गी मुलांचे निरीक्षण करण्यासाठी व त्यांना सुधारण्यासाठी बालन्याय अधिनियम, २००० मध्ये परिवीक्षा अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली स्वयंसेवी संस्थांमध्ये किंवा बालसुधार गृहात (निरीक्षणगृह) प्रथम ठेवले जाते. खाजगी बालगृहे व विशेषगृहे यांना वरील अधिनियमान्वये मान्यता दिलेली आहे. या स्वयंसेवी संस्थांना प्रत्येक मुलामुलीमागे दरमहा ७५० रुपये दरानुसार मुलांच्या पोषण, उन्नती व शिक्षणासाठी अनुदान दिले जाते. निरीक्षणगृहात या मुलांना अल्प कालावधीसाठीच ठेवले जाते. बालगृहात पाठविण्यापूर्वीच्या काळात या मुलांची योग्य ती काळजी घेऊन व्यक्तिचिकित्सा केली जाते. बालगृहात राहण्याचा कालावधी जास्तीत जास्त वयाची १८ वर्षे एवढा असतो. स्वयंसेवी संस्थांना अंतिम उद्देश मुलांचे पुनर्वसन करणे हाच असतो. हे पुनर्वसन मुलांची संस्थेतून मुक्तता, मुदतपूर्व सुटका, पालकांच्या स्वाधीन करणे, मुलींचे विवाह करणे अगर दुसऱ्या संस्थेत बदली करून केले जाते. सन १९९९-२००० मध्ये जिल्ह्यात अशा संस्थांची मुलांसाठी पाच व मुलींसाठी तीन अशी एकूण आठ बालगृहे होती. त्यांची प्रवेशक्षमता ५६५ इतकी होती. तथापि, यावर्षी त्यात ३७० मुला-मुलींना प्रवेश देण्यात आला होता, तर ४० मुले व ३५ मुलांचे पुनर्वसन करण्यात आले होते. यासाठी २२ लाख २० हजार रुपये खर्च झाले होते.

**निराधार मुलांसाठी कायदाविरहित बालसदन योजना :** ही योजना राबविण्यासाठी १९७३ मध्ये बालग्राम, महाराष्ट्र या संस्थेची स्थापना करण्यात आली व त्यानंतर राज्यात ठिकठिकाणी अनेक बालसदने सुरू करण्यात आली. निराधार मुलांना कौटुंबिक जीवन जगण्याची संधी देणे व एक पर्यायी कुटुंब चालविणे असा उद्देश ही योजना सुरू करण्यामागे आहे. प्रत्येक सदनात नऊ ते दहा मुले व त्यांची आई (पर्यायी) असा घटक तयार होतो व असे २० घटक एकत्र येऊन एक बालग्राम तयार होते. सन १९९९-२००० मध्ये नांदेड जिल्ह्यात अशी १८ बालसदने होती. त्यांची प्रवेशक्षमता एकूण ५०१ इतकी होती. शासनातर्फे प्रत्येक मुलामागे दरमहा ५०० रुपये उदरनिर्वाह, शिक्षण व संगोपनासाठी तर संस्थेच्या भाडे व प्रशासन खर्चापोटी ५० रुपये असे एकूण ५५० रुपये बालसदने चालविणाऱ्या स्वयंसेवी संस्थाना अनुदान म्हणून दिले जातात. यावर्षी ३० लाख ६ हजार रुपये अनुदान देण्यात आले होते. याशिवाय जिल्ह्यात याचवर्षी ८ अनाथालये होती. त्यांची एकूण प्रवेशक्षमता ५२५

इतकी होती व तेवढ्या मुलांना प्रवेश देण्यात आला होता. यासाठीही ३१ लाख ५० हजार रुपये अनुदान देण्यात आले होते.

वरील योजनांव्यतिरिक्त स्वयंसेवी संस्थांकडून बालमार्गदर्शन केंद्रे चालविली जातात. शासनाकडूनही अशी केंद्रे व बालमार्गदर्शन चिकित्सा केंद्रे चालविली जातात. तसेच सानुदान संगोपन योजना व बहुउद्देशीय सामूहिक केंद्रेही चालविली जातात. या सर्व योजनांचा उद्देश वरील प्रकारच्या मुलांचे सर्व दृष्टीने पुनर्वसन करणे हाच आहे.

महाराष्ट्र राज्य समाजकल्याण सल्लागार बोर्ड, मुंबई हे केंद्रिय समाजकल्याण बोर्ड, नवी दिल्ली यांच्याशी संलग्न असून, त्यांनी महिला व बालविकास विषयक अनेक कार्यक्रम हाती घेतले आहेत. त्यापैकी कुटुंब व बाल कल्याण केंद्रे, समाजकल्याण विस्तार केंद्रे व मुख्य कार्यालयातील नोकरवर्ग यांच्यासाठी महाराष्ट्र शासन राज्य सल्लागार बोर्डाला अनुदान देते.

यापैकी कुटुंब व बाल कल्याण केंद्रांचे कार्य ग्रामीण भागातील मुले व महिलां यांच्या कल्याणासाठी चालविले जाते. त्यांचा उद्देश पूर्व प्राथमिक शालेय वयातील मुलांची सर्वांगीण प्रगती करणे व तरूण मातांना गृहव्यवस्था, आरोग्य, घराभोवतालची स्वच्छता, सकस आहार, कुटुंबासाठी लागणारे कपडे यासंबंधी मार्गदर्शन करणे हा आहे. मुख्य केंद्र हे तालुक्याच्या ठिकाणी असते. त्यात बालविकास केंद्रे व गृहकल्याण केंद्रांचा समावेश असतो. बालविकास केंद्रात सहा वर्षाखालील मुलांना पूर्व प्राथमिक शिक्षण, सकस आहार व आरोग्यविषयक मदत दिली जाते. आसपासच्या पाच प्रमुख खेडेगावात कुटुंब व बालकल्याण केंद्रांची उपकेंद्रे उघडून त्यात बालविकास केंद्रे चालविली जातात. एका बालविकास केंद्रात साधारणपणे ३० मुले असतात, तर एका गृहकल्याण केंद्रात १५ स्त्रिया असतात. सन १९९९-२००० मध्ये नांदेड जिल्ह्यात किनवट व देगलूर तालुक्यात कुटुंब व बालकल्याण केंद्र होते.

अशाच तऱ्हेचे काम समाजकल्याण विस्तार केंद्रातून केले जाते व त्याचा फायदा ग्रामीण भागातील स्त्रिया व मुले यांना मिळतो.

**एकात्मिक बाल विकास सेवा योजना** : भारत सरकारने दि. २ ऑक्टोबर १९७५ रोजी ही योजना सुरू केली. ० ते ६ वर्षे वयोगटातील मुले, गरोदर स्त्रिया व स्तनदा माता यांचा पोषण व आरोग्यविषयक दर्जा सुधारणे, मुलांच्या मानसिक, शारीरिक व सामाजिक विकासाचा पाया घालणे, बालमृत्यू, बालरोग, कुपोषण व मध्येच शाळा सोडण्याचे प्रमाण कमी करणे, ही या योजनेची उद्दिष्टे आहेत. महाराष्ट्र राज्य, महिला व बालविकास विभागाच्या अधिपत्याखाली नागरी, ग्रामीण व आदिवासी भागात ही योजना राबविण्यात येते. सध्या ही योजना प्रकल्पाच्या माध्यमातून राबविण्यात येते आहे. सुरूवातीला प्रायोगिक तत्त्वावर राज्यात ३३ प्रकल्प सुरू केले गेले. त्यानंतर त्याचा चांगला परिणाम पाहून टप्प्याटप्प्याने ही योजना विस्तारित करण्यात आली. सन २००० पर्यंत राज्यात या योजनेचे २६ नागरी प्रकल्प होते. त्यातील एक नांदेड जिल्ह्यात होता.

सन २०००-२००१ पासून जागतिक बँकेच्या सहाय्याने आय.सी.डी. एस.-३ प्रकल्प राबविण्यास राज्यात सुरूवात झाली आहे. यान्वये ६३ नवीन ग्रामीण प्रकल्प, ३६ नागरी प्रकल्प व १० जिल्हा कक्ष कार्यान्वित आहेत. ग्रामीण, आदिवासी आणि नागरी क्षेत्रामध्ये सदरची योजना आयुक्तालय ए.बा.वि. योजना, नवी मुंबई यांच्या मार्फत राबविण्यात येते. या योजनेमार्फत खालील सेवा पुरविण्यात येतात.

**लसीकरण :** या सेवेंतर्गत ६ वर्षातील सर्व बालकांना वयानुसार सहा बालरोगांपासून संरक्षण करण्यासाठी क्षयरोग प्रतिबंधक डी.पी.टी., पोलिओ, गोवर लसी देण्यात येतात. तसेच गरोदर स्त्रियांना धनुर्वात प्रतिबंधक लस देण्यात येते. लसीकरणाचा हा कार्यक्रम राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राबविण्यात येतो.

**आरोग्य तपासणी :** या सेवेंतर्गत ६ वर्षाखालील सर्व बालके, गरोदर स्त्रिया व स्तनदा माता यांची वर्षातून किमान दोन वेळा आरोग्य विभागाकडून आरोग्य तपासणी करण्यात येते. अंगणवाडी केंद्रास प्रति अंगणवाडी रु.६०० अनुदान देण्यात येतात. सन २००४-२००५ या वर्षी नांदेड जिल्ह्यात ६ वर्षाखालील १३३ हजार मुले, १६ हजार गरोदर स्त्रिया व १८ हजार स्तनदा मातांना याचा लाभ झाला.

वरील योजना/सेवांव्यतिरिक्त आरोग्य संदर्भ सेवा, आरोग्य व सकस आहार विषयक शिक्षण व पूर्व शालेय शिक्षण या योजना राबविण्यात येतात.

सध्या महाराष्ट्रात २०२ ग्रामीण प्रकल्प, ४० आदिवासी व २८ नागरी असे २७० प्रकल्प कार्यान्वित आहेत. सर्वसाधारणपणे ग्रामीण व शहरी क्षेत्रात १,००० व आदिवासी क्षेत्रात ७०० लोकसंख्येसाठी एक अंगणवाडी याप्रमाणे ग्रामीण क्षेत्रात ६,६३१ व नागरी क्षेत्रात ४५,२१७ अंगणवाडी केंद्रे कार्यरत आहेत.

**ग्रामीण प्रकल्प :** राज्यातील ३५,६४७ ग्रामीण प्रकल्प सर्वसाधारण एकात्मिक बालविकास योजना, जिल्हापरिषद व पंचायत समित्यांमार्फत राबविण्यात येतात. ही योजना महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६२ च्या कलम १२३ अन्वये परिषदांना अभिकरण तत्त्वावर राबविण्यासाठी सोपविण्यात आली आहे. यासाठी जिल्हापरिषदांना प्रतिवर्षी ५% अभिकरण शुल्क देण्यात येते. या प्रकल्पाखाली अंगणवाडी पोषण केंद्रे सुरू करण्यात येतात. सन १९९९-२००० मध्ये नांदेड जिल्ह्यात सुरू असलेल्या आठ ग्रामीण प्रकल्पांतर्गत १,९१६ अंगणवाडी पोषण केंद्रे सुरू होती. त्याचा १ लाख ५६ हजार लाभार्थी लाभ घेत होते. सन २००४-२००५ मध्ये तेवढ्याच प्रकल्पांतर्गत १,९५९ पोषण केंद्राचा व २ लाख ३० हजार लाभार्थींना लाभ होत होता.

**आदिवासी प्रकल्प :** राज्यातील ४० आदिवासी प्रकल्प जिल्हापरिषदा आणि पंचायत समित्यांमार्फत राबविण्यात येतात. ही योजनाही जिल्हापरिषदेकडे अभिकरण तत्त्वावर राबविण्यासाठी सोपविण्यात आलेली आहे. यासाठी जिल्हापरिषदांना प्रतिवर्षी ५% अभिकरण शुल्क देण्यात येते. नांदेड जिल्ह्यात किनवट तालुक्यातील प्रकल्पामध्ये २९४ अंगणवाड्या चालविण्यात येतात.

**नागरी प्रकल्प :** या प्रकल्पांतर्गत समाजातील दुर्बल घटकांतील मुलांमधील पोषक आहाराची उणीव दूर करण्याच्या दृष्टिने भारत सरकारने १९७०-७१ साली नागरी विभागातील गलिच्छ वस्त्यांमधील ज्या मुलांच्या पालकांचे मासिक उत्पन्न रु. ५०० च्या आत आहे अशांसाठी विशेष सकस आहार योजना सुरू केली. (सन १९९९-२००० मध्ये नांदेड जिल्ह्यातील २४ गलिच्छ वस्त्यांमधील २२ हजार लोकसंख्येला याचा लाभ देण्यात आला.) प्रथम ही योजना तीन वर्षांखालील मुलांना लागू होती. त्यानंतर त्यात ६ वर्षांखालील मुले, गरोदर स्त्रिया व प्रसुत मातांना समाविष्ट करण्यात आले. पूर्वी केंद्र शासन पुरस्कृत असलेली ही योजना एप्रिल, १९७४ पासून राज्य सरकारकडे सुपूर्द करण्यात आली आहे. या योजनेखाली लाभार्थींना प्रत्येकी ८ ते १० ग्रॅम प्रथिने व २५० ते ३०० उष्मांक असलेला १०० ग्रॅम वजनाचा सकस आहार वार्षिक ३० दिवस देण्याची तरतूद आहे. गरोदर स्त्रियांना प्रसुतीपूर्वी व प्रसुतीनंतर प्रत्येकी ३ महिने पूरक आहार दिला जातो. नांदेड जिल्ह्यात नांदेड तालुका नागरी प्रकल्प कार्यान्वित असून त्याअंतर्गत १११ अंगणवाड्या सुरू आहेत. त्याचा १० हजार लाभार्थींना वार्षिक सरासरी ३०० दिवस लाभ होत आहे.

## समाजकल्याण

सर्वप्रथम सन १९३२ मध्ये बॅकवर्ड क्लास वेल्फेअर या नावाने तत्कालिन मुंबई राज्यात समाजकल्याण खात्याची सुरूवात झाली. तदनंतर या खात्यातून खालीलप्रमाणे वेगवेगळी संचालनालये व आयुक्तालये स्वतंत्र करण्यात आली :—

राज्याच्या पूर्वीच्या शिक्षण व समाजकल्याण विभागाची विभागणी करून मार्च, १९७२ मध्ये समाजकल्याण विभागाची स्वतंत्र निर्मिती करण्यात आली. त्यानंतर दिनांक २२ एप्रिल, १९८३ च्या शासन अधिसूचनेनुसार समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभागाची विभागणी करून दिनांक १ मे १९८३ रोजी आदिवासी विकासासंबंधीचे नियम व निर्मिती प्रक्रिया आदिवासी विकास विभागाकडे हस्तांतरित करण्यात आली. त्यानंतर समाजकल्याण खात्यास सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन ही खाती जोडण्यात आली. पुन्हा समाजकल्याण विभागाचे विभाजन करून त्यातून विमुक्त जाती, भटक्या जाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग या स्वतंत्र विभागाची दिनांक १० मार्च १९९९ रोजी निर्मिती केली. तथापि, त्यानंतर दिनांक २७ फेब्रुवारी २००१ च्या अधिसूचनेद्वारे समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभागाचे नाव सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग असे करण्यात आले. यावेळी उपरोक्त विमुक्त जाती व अन्य जातींसाठी निर्मिलेला विभाग या विभागामध्ये समाविष्ट केला.

समाजकल्याण संचालनालय पुणे येथे असून ते संचालकांच्या अधिपत्याखाली कार्यरत आहे. ते अतिरिक्त संचालक, सहसंचालक, उप संचालक व सहाय्यक संचालकांच्या मदतीने काम करतात. मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक आणि अमरावती येथील विभागीय अधिकारी आपापल्या विभागांत राज्य व केंद्र शासनाच्या योजना राबवितात. ते जिल्हापरिषदेकडील व इतर जिल्हा पातळीवरील योजनांच्या अंमलबजावणीवर देखरेख करतात. जिल्हा पातळीवरील योजना राबविण्यासाठी जिल्ह्याच्या ठिकाणी विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी नियुक्त केलेल असून जिल्हापरिषदेकडे हस्तांतरित केलेल्या

योजनांच्या अंमलबजावणीकरिता प्रत्येक जिल्हापरिषदेत समाजकल्याण अधिकारी हे पद आहे. विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी हे राज्य व केंद्र शासनाच्या योजना राबवितात. त्यांना समाजकल्याण निरीक्षक कामात मदत करतात.

## मागासवर्गीयांचे कल्याण[२०३]

घटनेच्या ७३ व्या घटना दुरुस्तीनुसार शासनाने सामाजिक न्याय विभागाकडील अनेक योजना जिल्हापरिषदेकडे हस्तांतरित केलेल्या आहेत. त्यापैकी आर्थिकदृष्ट्या मागास मुला-मुलींसाठी वसतिगृह सुरू करणे व त्यांची देखभाल करणे, अनु. जातीच्या मुला-मुलींकरिता असलेल्या शासकीय वसतिगृहांना परिरक्षण अनुदान (जिल्हा मुख्यालय आणि महानगरपालिका स्तराव्यतिरिक्त) व सफाई कामगारांच्या विशेषतः मेहतरांच्या मुलांकरिता शाळा या योजना राज्य शासनाकडे परत घेण्यात आलेल्या आहेत. सध्या शासनातर्फे मागासवर्गीयांच्या कल्याणांतर्गत राज्य व केंद्र शासनाकडून ज्या विविध योजना राबविण्यात येतात, त्या तीन विभागात विभागलेल्या आहेत. (१) शैक्षणिक योजना, (२) आर्थिक उन्नतीच्या योजना, (३) सामाजिक व इतर सामूहिक योजना. त्यापैकी काही ठळक योजना पुढीलप्रमाणे - या योजना विशेष जिल्हा समाजकल्याण कार्यालयाकडून राबविण्यात येतात.

**विशेष घटक योजना :** अनुसूचित जातीतील लोकांकडे उत्पन्नाची साधने अत्यल्प असल्याने ते सहसा शेतमजुरी व अन्य कमी उत्पन्न असणाऱ्या व्यवसायामध्ये काबाडकष्ट करून उपजीविका करतात. देशातील निरनिराळ्या आर्थिक उपक्रमांद्वारे निर्माण होणाऱ्या नोकरी व व्यवसायासंबंधी संधीचा लाभ घेण्याकडे त्यांची प्रवृत्ती नसते. म्हणून लोकशाहीत सर्वांना समान हक्क, समान न्याय या भूमिकेतून या जातींना प्रमुख प्रवाहात सामावून घेणे, त्यांचा आर्थिक-शैक्षणिक व सामाजिक विकास साधणे या भूमिकेतून केंद्र व राज्य शासनाने सन १९८० पासून या योजना सुरू केल्या आहेत. राज्यात या योजनेची १९८१-८२ पासून अंमलबजावणी सुरू असून त्याद्वारे वरील वर्गासाठी १८ विविध खात्यांमार्फत ५९ योजना राबविण्यात येतात. यात पशुधन विकास कार्यक्रम, मच्छिमार सहकारी संस्थांचा विकास, अनुसूचित जातीच्या सभासदांना साखर कारखान्याचे भाग खरेदीसाठी अर्थसहाय्य, नागरी क्षेत्रातील ग्राहक भांडारांना सहाय्य, दलित वस्त्यांचे विद्युतीकीकरण, शहरी भागातील अनुसूचित जाती व नवबौद्ध कुटुंबांना मोफत घरगुती वीज, ग्रामीण व लघुउद्योग विकासासंबंधी कार्यक्रम, दुर्बल घटकातील मुला-मुलींसाठी शैक्षणिक साहित्य व उपस्थिती भत्ता, पुस्तकपेढ्या उघडणे, सामाजिक सेवा शिबिरे भरविणे, अनुसूचित जाती व नवबौद्ध शेतकरी कुटुंबांना दारिद्र्य रेषेच्यावर आणण्यासाठी विशेष सहाय्य, पशुविकास सहाय्य, सुवर्ण जयंती ग्राम स्वयंरोजगार योजना, इंदिरा आवास योजना, जवाहर ग्राम समृद्धी योजना, ग्रामीण पाणीपुरवठा वगैरे योजनांचा समावेश आहे. या सर्व योजनांवर नांदेड जिल्ह्यासाठी सन २००१-२००२ मध्ये ९६०.७५ हजार रुपये व २००४-२००५ मध्ये १३५०.५७ हजार रुपये खर्च करण्यात आले. सन २००५-२००६ मध्ये १९७५.०० हजार रुपये इतकी तरतूद प्राप्त होती. त्यापैकी १६७.६८ हजार रुपये खर्च झाले होते. उर्वरित योजनांवर खर्च सुरू होता.

---

२०३. यासंबंधी योजनांची माहिती विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी कार्यालय, नांदेड यांच्याकडून प्राप्त झालेली आहे.

**शासकीय वसतिगृहे सुरू करणे :** मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या मुला-मुलींसाठी शिक्षणाची सोय करणे, त्यांना उच्च शिक्षण घेता यावे यासाठी त्यांची शिक्षणाच्या ठिकाणी राहण्याची व उदरनिर्वाहाची सोय व्हावी म्हणून ही योजना राबविण्यात येते. त्यानुसार नांदेड जिल्ह्यात नांदेड, बिलोली, धर्माबाद, देगलूर व मुखेड येथे एकूण सात वसतिगृहे असून त्यातील तीन मुलींसाठीची आहेत. या सर्वांची मिळून प्रवेशक्षमता ६६० इतकी आहे. या योजनेचा जिल्ह्यात पूर्णपणे लाभ घेतला जातो. यातील विद्यार्थ्यांना शासनामार्फत भोजन, निवास, गणवेश, पुस्तके, लेखन साहित्य वगैरे बाबी विनामूल्य पुरविल्या जातात. शिवाय तेल, साबण इत्यादी वस्तुंसाठी प्रत्येक विद्यार्थ्यास दरमहा १२५ रुपये निर्वाह भत्ता देण्यात येतो. या वसतिगृहांमध्ये इयत्ता ८ वी पुढील शिक्षणासाठी प्रवेश दिला जातो.

वरील वसतिगृहांशिवाय स्पर्धात्मक परीक्षांसंबंधी शिक्षणाच्या सोयीसाठी वरीलप्रमाणे नवीन शासकीय वसतिगृहे सन २००३-२००४ पासून राज्यात सुरू करण्यात आलेली आहेत. अशा उद्देशास्तव नांदेड जिल्ह्यातही एक वसतिगृह सुरू करण्यात आलेले असून त्याची प्रवेशक्षमता १०० इतकी आहे. यातही वरील वसतिगृहांप्रमाणे सर्व सोयी-सुविधा पुरविण्यात येतात. यात सन २००४-२००५ मध्ये ७५ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आलेला होता. सध्या जिल्ह्यात स्वयंसेवी संस्थांमार्फत १६८ अनुदानित वसतिगृहे चालविली जातात. त्याचा ७,७९२ विद्यार्थ्यांना लाभ होत आहे. प्रत्येक विद्यार्थ्यास रु. ५०० इतके निर्वाह अनुदान दरमहा दिले जाते.

**भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती :** मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शालांत परीक्षोत्तर शिक्षण घेण्यास उत्तेजन मिळावे म्हणून केंद्र शासनाने ही योजना सुरू केलेली आहे. यान्वये अभ्यासक्रमाच्या वर्गीकरणानुसार अनुसूचित जातीच्या वसतिगृहात न राहता शिक्षण घेणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांना सन २००३-२००४ पासून रु.१४० ते ३३० या दराने शिष्यवृत्ती देण्यात येते. नांदेड जिल्ह्यात वरिष्ठ, कनिष्ठ व व्यावसायिक अभ्यासक्रमांशी संलग्न अशी २२५ शैक्षणिक केंद्रे असून सन २००५-२००६ मध्ये यासाठी ८००० लाभार्थींसाठी ३८३.४१ हजार रुपये खर्च करण्यात आले होते.

**राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता पुरस्कार :** माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाच्या दहावी व बारावीच्या परीक्षेत सर्वसाधारण विद्यार्थ्यांमधून प्रथम येणाऱ्या अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जाती व विशेष मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना हा पुरस्कार सन २००३-२००४ पासून देण्यात येतो. यामध्ये राज्यात प्रथम आल्यास रुपये २ लाख ५० हजार रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र, विभागात प्रथम आल्यास रुपये एक लाख रोख व तसेच जिल्ह्यात व तालुक्यात व शाळेतून प्रथम आल्यास अनुक्रमे २५ हजार, १५ हजार व पाच हजार रुपये रोख व वरीलप्रमाणे स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात येते. सन २००५-२००६ मध्ये नांदेड जिल्ह्यात या योजनेवर १.७५ लाख रुपये खर्च झालेला होता.

वरील योजनेव्यतिरिक्त अनुसूचित जातीचे विद्यार्थी शैक्षणिक स्पर्धेत टिकून राहावेत यासाठी इयत्ता १० मध्ये ७५% पेक्षा जास्त गुण मिळवून ११ वी मध्ये प्रवेश घेणाऱ्या मुला-मुलींना दरमहा ३०० रुपये प्रमाणे १० महिन्यांसाठी ३,००० रुपये प्रदान करण्यासाठी राजर्षी छत्रपती शाहू महाराज

गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना जिल्ह्यात सुरू आहे. या योजनेवर सन २००५-२००६ मध्ये ६.०९ लाख रुपये खर्च करण्यात आले होते.

**विद्यावेतन :** मागासवर्गीय विद्यार्थ्यांना तांत्रिक शिक्षणाकडे तसेच वैद्यकीय, अभियांत्रिकी, कृषी इत्यादी व्यावसायिक अभ्यासक्रमाकडे वळविण्यासाठी महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जातीमधील विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत रु. १०० इतके विद्यावेतन देण्यात येते. सदर योजना सन १९७२-७३ पासून सुरू आहे. सन २००५-२००६ या आर्थिक वर्षात सदर योजनेवर नांदेड जिल्ह्यात २.४९ लाख रुपये खर्च करण्यात आले.

**समाजकार्य महाविद्यालयांना सहाय्यक अनुदान :** ज्या स्वयंसेवी संस्थांच्या महाविद्यालयांकडून मान्यताप्राप्त, सामाजिक कार्याचे पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम राबविले जातात, अशा महाविद्यालयांना शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन, इमारत भाडे व व्यवस्थापन खर्च यासाठी सहाय्यक अनुदान देण्यात येते. नांदेड जिल्ह्यात एक समाजकार्य महाविद्यालय असून त्यासाठी ४२.२५ लाख रुपये एवढी तरतूद सन २००५-२००६ साठी प्राप्त झालेली होती. त्यापैकी २३.५९ लाख रुपये खर्च झाले आहेत.

**कन्यादान योजनेखाली अर्थसहाय्य :** या योजनेन्वये अनुसूचित जाती (नवबौद्धासह), विमुक्त जाती, भटक्या जमाती (धनगर व वंजारीसह) व विशेष मागास प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या कुटुंबातील सामूहिक विवाह सोहळ्यामध्ये सहभागी होऊन विवाह करणाऱ्या जोडप्यास एकूण रुपये दहा हजार इतके अर्थसहाय्य वस्तुरुपात देण्याचा निर्णय सन २००३-२००४ पासून राज्य शासनाने घेतलेला आहे. त्यानुसार सोन्याचे मणी-मंगळसूत्र व संसारोपयोगी साहित्य देण्यात येते. सन २००५-२००६ या आर्थिक वर्षात सदर योजनेवर जिल्ह्यात ७.५० लाख रु. ची तरतूद प्राप्त झाली.

**मोटार वाहन चालक प्रशिक्षण योजना :** अशा प्रशिक्षणासाठी प्रति मागासवर्गीय उमेदवारास रु. १,३०० याप्रमाणे प्रशिक्षण संस्थेस अनुदान देण्यात येते. ही योजना सर्व जिल्ह्यांमध्ये सन २००५-२००६ पासून राबविण्यात येत आहे.

**कर्मवीर दादासाहेब गायकवाड स्वाभिमान व सबळीकरण योजना :** शासनाने दारिद्र्य रेषेखालील अनुसूचित जाती व नवबौद्ध भूमिहीन शेतमजूर कुटुंबाना उत्पन्नाचे स्त्रोत उपलब्ध व्हावेत म्हणून त्यांना बसण्याकरिता ४ एकर कोरडवाहू जमीन किंवा २ एकर ओलिताखालील जमीन उपलब्ध करून देऊन त्याचे सबळीकरण करण्याकरिता व स्वाभिमान वाढविण्याकरिता ही योजना सुरू केलेली आहे. या योजनेंतर्गत नांदेड जिल्ह्यासाठी रुपये २,००,००० लाख ची प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

**ग्रामीण निवारा योजना :** राज्यातील नागरी/ग्रामीण भागातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, बेघर, अल्पभूधारक यांच्याकरिता मुंबई व मुंबई उपनगर जिल्हे वगळता राज्यातील ३३ जिल्ह्यांकरिता सप्टेंबर २००१ पासून ही योजना सुरू करण्यात आलेली आहे. या योजनेसाठी कुटुंबाच्या वार्षिक उत्पन्नाची मर्यादा रु.३२ हजार इतकी आहे. या योजनेनुसार ग्रामीण भागात ३३ हजार घरे व शहरात १८ हजार घरे दरवर्षी टप्प्याटप्प्याने बांधण्यात येणार आहेत.

**दलित वस्ती सुधार योजना :** या योजनेंतर्गत दलित वस्त्यांमधून स्वच्छता विषयक सोई, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, विजेच्या सोयी, अंतर्गत रस्ते, जोडरस्ते, समाज मंदिर, नाली बांधकाम इत्यादी सोयींसाठी ५ लाख रुपये अनुदान ग्रामपंचायतीस देण्यात येते.

**अत्याचारग्रस्तांना आर्थिक मदत :** जातीयतेच्या कारणांवरून अत्याचारास बळी पडलेल्या अनुसूचित जाती/जमातीच्या लोकांना आर्थिक सहाय्य करून या योजनेद्वारे त्यांचे पुनर्वसन करण्यात येते. झालेल्या हानीनुसार व गुन्ह्याच्या स्वरूपानुसार शासनाने ठरवून दिलेल्या दराने त्यांना आर्थिक सहाय्य प्रदान करण्यात येते. सन २००५-२००६ मध्ये या योजनेवर एका लाभार्थींसाठी जिल्ह्यात ४ लाख रुपये खर्च करण्यात आले होते.

**अस्पृश्यता निर्मूलनार्थ पारितोषिक :** खेड्यातील सवर्ण व दलित समाजात एकोपा रहावा, दोन्ही घटकांमध्ये भ्रातृभाव निर्माण व्हावा या उद्देशाने ही योजना राबविण्यात येते. यात उत्कृष्ट कार्य केलेल्या खेड्यांना प्रथम पुरस्कार म्हणून रुपये २,००० व द्वितीय पुरस्कार म्हणून १,००० रुपयांचे पारितोषिक देण्यात येते.

वरील योजनांव्यतिरिक्त जाती प्रमाणपत्र पडताळणी योजना, डॉ. बाबासाहेब आंबेडकर दलित मित्र पुरस्कार योजना, मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शिक्षण व परीक्षा शुल्क प्रदान करण्याची योजना, सैनिकी शाळेतील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता, अस्वच्छ व्यवसायातील पालकांच्या मुलांना मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती, माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय प्राविण्य पुरस्कार योजना वगैरे अनेक योजना राबविल्या जातात.

**विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्गियांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजना**[२०४] **:** पूर्वी वर्णिल्याप्रमाणे राज्य शासनाने दि. २७ फेब्रुवारी २००१ च्या अधिसूचनेद्वारे समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग आणि भटक्या जमाती, विमुक्त जाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग या दोन विभागांच्या एकत्रिकरणातून सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग निर्माण केला. नांदेड जिल्ह्यात विमुक्त जाती व भटक्या जमातींची एकूण लोकसंख्येशी टक्केवारी १७ इतकी आहे. त्यामुळे या विभागाकडून वरील घटकांसाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. या योजना शैक्षणिक सवलती, आर्थिक उन्नती आणि गृहनिर्माण व इतर योजना अशा तीन प्रकारात मोडतात. त्यातील काही ठळक योजना पुढीलप्रमाणे :—

**शालांत परीक्षोत्तर शिष्यवृत्त्या :** ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. ६५,२९० पेक्षा जास्त नाही, असे विद्यार्थी या शिष्यवृत्तीस पात्र समजले जातात. या योजनेन्वये वसतिगृहात न राहणाऱ्या विद्यार्थ्यांना दरमहा ९० ते १९० रुपये व वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना दरमहा १५० ते ४२५ रुपये देण्यात येतात. विद्यार्थ्यांना भराव्या लागणाऱ्या अनिवार्य फीचाही या शिष्यवृत्तीत समावेश आहे. ही योजना केंद्र शासनाने ठरवून दिलेल्या मानकांप्रमाणे राबविली जाते. तथापि, संपूर्ण खर्च राज्य सरकारकडून केला जातो.

---

२०४. विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी कार्यालय, नांदेड यांच्याकडील माहिती.

**प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा योजना :** विमुक्त जाती व भटक्या जमातीतील लोक चरितार्थासाठी गावोगावी भटकत असल्याने त्यांची मुले शिक्षणापासून वंचित राहतात. या समाजाची भटकंती थांबावी व शैक्षणिक प्रगती व्हावी, त्यांच्या मुलांच्या शिक्षणाची व निवासाची सोय व्हावी म्हणून शासनाने सन १९५३ पासून ही योजना कार्यान्वित केलेली आहे. यान्वये विमुक्त जाती व भटक्या जमातींच्या १०,००० लोकसंख्येमागे एक आश्रमशाळा सुरू करण्यात येते. या योजनेंतर्गत विद्यार्थ्यांचे भोजन, निवास, पाठ्यपुस्तके, अंथरूण-पांघरूण याची विनामूल्य व्यवस्था करण्यात येते. अशा आश्रमशाळा चालविणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना शासन शंभर टक्के अनुदान देते. नांदेड जिल्ह्यातील या जाती-जमातींची लोकसंख्या अंदाजे ५ लाख एवढी आहे. त्यामुळे जिल्ह्यात त्यांच्यासाठी ४१ अनुदानित प्राथमिक व १९ माध्यमिक आश्रमशाळा आहेत. तर सन २००३-२००४ मध्ये नवीन ६ शाळा मंजूर करण्यात आलेल्या आहेत. वरील ६० आश्रमशाळांचा ६,९२० निवासी व १२,००० अनिवासी विद्यार्थी लाभ घेत आहेत.

**विद्यानिकेतन योजना :** जुलै १९९६ पासून ही योजना राबविण्यात येते. यान्वये विमुक्त जाती व भटक्या जमातीतील गुणवान व होतकरू विद्यार्थ्यांसाठी राज्यात विद्यानिकेतने चालविणाऱ्या स्वयंसेवी संस्थेस काही बाबींचे अटींवर अनुदान देण्यात येते. नांदेड जिल्ह्यात विमुक्त जाती सेवा समिती, वसंतनगर (कोटग्याळ), ता.मुखेड या संस्थेस कमळेवाडी, ता. मुखेड येथे असे विद्यानिकेतन सुरू करण्यास योजना परवानगी देण्यात आलेली आहे. यात इयत्ता ५ वी ते १२ पर्यंतच्या हुशार विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. प्रत्येक वर्गाच्या दोन तुकड्यांत मिळून ८० निवासी मुलांना यात प्रवेश मिळतो. सन २००३-२००४ मध्ये अशाप्रकारे ६४० निवासी विद्यार्थी याचा लाभ घेत होते. सदर विद्यार्थ्यांची भोजन, निवास, पुस्तके शासनामार्फत पुरविली जातात. यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यामागे दरमहा ५०० रुपये इतके अनुदान संस्थेस देण्यात येते.

**भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती :** अनुसूचित जाती-जमातींच्या विद्यार्थ्यांप्रमाणेच विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास व इतर मागास प्रवर्ग यांनाही ही शिष्यवृत्ती देण्यात येते. नांदेड जिल्ह्यात वरिष्ठ, कनिष्ठ व व्यावसायिक अभ्यासक्रमांशी संलग्न अशा २०० शिक्षण संस्था किंवा केंद्रे असून सन २००१-२००२ मध्ये विमुक्त जाती व भटक्या जमातींच्या ६,००७ विद्यार्थ्यांना व विशेष मागास प्रवर्गाच्या ६१६ विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती देण्यात आली होती. सन २००४-२००५ मध्ये लाभार्थींची ही संख्या अनुक्रमे ७,७८२ व ८१० इतकी होती. याचवर्षी इतर मागास प्रवर्गातील ३,८९४ विद्यार्थ्यांनाही ही शिष्यवृत्ती देण्यात आलेली होती.

**तांडा/वस्ती सुधार योजना :** राज्यात दलित वस्ती सुधारणा योजना सन १९०२ पासून राबविण्यात येते. त्याच धर्तीवर राज्यातील विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या वस्त्या/तांड्यांमध्ये मुलभूत सुविधा उपलब्ध करून देणे व त्यातील नागरिकांच्या जिवनाचा दर्जा सुधारणे या उद्देशाने ही योजना सन २००३-२००४ पासून राज्यात कार्यान्वित करण्यात आलेली आहे. या योजनेसाठी त्या त्या वस्ती/तांड्यातील लोकसंख्या किमान ५० असावी लागते. त्यान्वये ५० ते १०० लोकसंख्येस रुपये २ लाख, १०० ते १५० लोकसंख्येस रुपये ३ लाख, तर त्यापेक्षा अधिक लोकवस्तीच्या तांड्यास

रुपये ५ लाख इतके मुलभूत सोयी-सुविधांसाठी देण्यात येतात. सन २००३-२००४ या वर्षी या योजनेवर नांदेड जिल्ह्यात १३८.०२ लाख रूपयांची तरतूद प्राप्त झाली होती व त्याचा ३२ गावांतील वस्ती/तांड्यांना लाभ देण्यात आला होता.

**सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना :** विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील शालेय मुलींचे गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी सन २००३-२००४ पासून ही योजना सुरू करण्यात आलेली आहे. त्यानुसार प्रत्येक मुलीला जून ते मार्च असे दहा महिने दरमहा रुपये १०० याप्रमाणेही शिष्यवृतती देण्यात येते. ही योजना शासनमान्य शाळा, जिल्हा परिषद, महानगर व नगरपालिकांच्या शाळा तसेच अनुदानित व विनाअनुदानित खाजगी शाळांमधील इयत्ता आठवी ते दहावीच्या मुलींसाठी लागू आहे. मात्र शाळेत नियमित उपस्थिती असणे आवश्यक आहे. या योजनेवर नांदेड जिल्ह्यात सन २००३-२००४ या वर्षात ७.२० हजार रुपये खर्च करण्यात आले होते.

विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष व इतर मागास प्रवर्गासाठी याव्यतिरिक्त शिक्षण फी, परीक्षा फी देण्यापासून सूट देणे, स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविल्या जाणाऱ्या सर्व वसतिगृहांना सहाय्यक अनुदाने देणे, औद्योगीक प्रशिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांना विद्यावेतन देणे, व्यावसायिक पाठ्यक्रमाशी संलग्न असणाऱ्या वसतिगृह निवासी विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता देणे, महिलांसाठी शिवणकला केंद्रांना सहाय्यक अनुदान देणे, मागासवर्गीय गृहनिर्माण संस्थांना अर्थसहाय्य देणे, लोक आवास योजना, ग्रामीण निवारा योजना तसेच इतर शिष्यवृत्ती व गुणवत्ता पुरस्कार देण्याच्या योजना राबविल्या जातात. नांदेड जिल्ह्यातील वरील जाती/जमातींचे लाभार्थीही त्याचा लाभ घेत असल्याचे दिसते.

**जिल्हा परिषदेकडून राबविण्यात येणाऱ्या योजना :**

**मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षणशुल्क व परीक्षा शुल्क देणे :** अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग यातील विद्यार्थ्यांना पालकांचे उत्पन्न विचारात न घेता सर्व स्तरावरील मान्यताप्राप्त शैक्षणिक अभ्यासक्रमासाठी या योजनेन्वये शिक्षण, परीक्षा, प्रयोगशाळा व क्रीडा शुल्क माफ केले जाते.

**माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती :** या योजनेद्वारे मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यास उत्तेजन देण्यासाठी ही शिष्यवृत्ती देण्यात येते. ही शिष्यवृत्ती किमान ५०% गुण मिळविणाऱ्या तसेच प्रत्येक वर्गात पहिला किंवा दुसरा क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यास देण्यात येते. यान्वये इयत्ता ५ वी ते ७ वीतील विद्यार्थ्यास ५०० रुपये व इयत्ता ८ वी ते १० वी मधील विद्यार्थ्यास १,००० रुपये असे दर दहा महिन्यांसाठी दिले जातात.

**अस्वच्छ व्यवसायातील पालकांच्या मुलांना मॅट्रिकपूर्ण शिष्यवृत्ती :** भंगी, मेहतर व्यवसाय व कातडी कमावणे असे व्यवसाय करणाऱ्या पालकांच्या मुलांना मॅट्रिकपूर्व शिक्षण घेता यावे या उद्देशाने दि. ४ ऑक्टोबर १९७७ पासून ही शिष्यवृत्ती देण्याची योजना सुरू आहे. यासाठी उत्पन्नाची कोणतीही अट नसून पालकाचे अस्वच्छ व्यवसाय करीत असल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

यान्वये इयत्ता १ ली ते ५ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना दरमहा रु. २५ ते ५०० रु. तदर्थ अनुदान देण्यात येते. त्यानंतर ६ वी ते ८ वी व इयत्ता ९ वी ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना अनुक्रमे ४० व ५० रु. तसेच वरीलप्रमाणे ५०० रु. तदर्थ अनुदान देण्यात येते.

**आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन :** अस्पृष्यतेचे निर्मूलन व उच्च व कनिष्ठ जातीतील जातीभेद नष्ट होण्यासाठी ही योजना राबविली जाते. या योजनेन्वये सवर्ण हिंदू व अनुसूचित जाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती यांत आंतरजातीय विवाह करणाऱ्या जोडप्यास उत्तेजन व भेट वस्तू देऊन सत्कार केला जातो. यान्वये अस्पृश्यता निर्मूलन कार्यक्रमातंर्गत रु. ७,००० रोख देण्यात येतात. शिवाय अल्पबचत गुंतवणूक म्हणून ४०० रुपयांची भांडी व १०० रु. देऊन सत्कार करण्यात येतो.

वरील योजना जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण अधिकाऱ्यांमार्फत राबविल्या जातात. याव्यतिरिक्त व्यसनमुक्ती प्रचार व कार्य ही योजना एप्रिल, २००१ पासून जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित करण्यात आलेली आहे. यान्वये दारूबंदी प्रचार कार्य, दारूबंदी संस्कार केंद्रे, अमली पदार्थ सेवन विरोधी मोहीम, व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार योजना व व्यसनक्ती केंद्रे चालविणाऱ्या संस्थाना अर्थसहाय्य या उपयोजना राबविण्यात येतात. यांच्याव्यतिरिक्त विशेष घटक योजनेखाली अनुसूचित जाती व नवबौद्ध कुटुंबांना विशेष सहाय्य, फलोत्पादन व इतर पिकांसाठी तुषार व ठिबक सिंचन, सुवर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजना, इंदिरा आवास योजना व जवाहर ग्राम समृद्धी योजना जिल्हा परिषदेकडून राबविल्या जातात.

## अपंग कल्याण

राज्यातील दृष्टिहीन, कर्णबधीर, अस्थिविकलांग व मनोविकलांग मुलांना शिक्षण व प्रशिक्षणाची संधी उपलब्ध करून देऊन त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील करण्याच्या दृष्टीने सामाजिक न्याय विभागाच्या अपंग कल्याण आयुक्तालयामार्फत अपंगांचे शिक्षण व पुनर्वसन विषयक योजना राबविल्या जातात. अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग) अधिनियम, १९९५ या कायद्याच्या अंमलबजावणीचे कामकाज अपंग कल्याण आयुक्तालयामार्फत केले जाते. या आयुक्तालयाची निर्मिती ऑगस्ट २००० मध्ये करण्यात आली आहे. अपंगांसाठीच्या योजना जिल्हा स्तरावर समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या कार्यालयामार्फत राबविल्या जातात.

वय वर्षे ६ ते १८ वयोगटातील अपंग विद्यार्थ्यांच्या शिक्षण व निवासाची विनामूल्य व्यवस्था शासकीय संस्थांमधून केली जाते. तसेच १८ वर्षावरील अपंग विद्यार्थ्यांना शासकीय प्रौढ अपंगांच्या व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांमधून (कर्मशाळा) विविध व्यवसायांचे प्रशिक्षण दिले जाते. त्याचप्रमाणे ६ ते १८ वर्षे वयोगटातील अशा विद्यार्थ्यांना स्वयंसेवी संस्थांमार्फतही चालविण्यात येणाऱ्या अपंगांच्या विविध शाळांमधून शिक्षण व निवासाच्या विनामूल्य सुविधा पुरविल्या जातात. वरीलप्रमाणेच १८ वर्षावरील अपंगानाही विविध व्यवसायाचे अंपगत्वानुरूप व्यवसाय प्रशिक्षण कार्यशाळांमधून दिले जाते. अशा संस्थांना शासनातर्फे अनुदान देण्यात येते. नांदेड जिल्ह्यात अशा सन २०००-२००१ या वर्षी अंधांच्या ४, मुकबधिरांच्या ११, अस्थिव्यंगांच्या १३ व मतिमंदांच्या ५ संस्था होत्या. त्यातील

विद्यार्थ्यांची सरासरी संख्या ५० (संमत संख्या ९५०) इतकी होती व त्यावर दरडोई १६१ रुपये इतका खर्च झाला होता.

इयत्ता १ ली ते १० पर्यंत अंध, अंशतः अंध, कर्णबधीर, अस्थिव्यंग, मतिमंद, मनोरुग्ण व कुष्ठरोगमुक्त अपंग विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणासाठी 'महाराष्ट्र शासन अपंग शिष्यवृत्ती' दिली जाते. यासाठी उत्पन्नाची कोणतीही अट नाही, पण ४०% पेक्षा जास्त अपंगत्व असणे आवश्यक आहे. या शिष्यवृत्तीचे दर इयत्ता १ ली ते चौथीपर्यंत दरमहा ५० रुपये, ५ वी ते ७ वी पर्यंत ७५ रुपये व ८ वी ते १० वी पर्यंत १७० रुपये, तसेच मतिमंद विद्यार्थ्यांकरिता दरमहा ७५ रुपये असे आहेत. सन २०००-२००१ मध्ये नांदेड जिल्ह्यात १,३५० अपंग शिष्यवृत्तीधारक होते व त्यांच्यासाठी २.८३ हजार रुपये खर्च झाला होता.

अपंग विद्यार्थ्यांना कृत्रिम अवयव साधने पुरविणे या योजनेंतर्गत अपंगांच्या शारीरिक पुनर्वसनासाठी आवश्यक असणाऱ्या सहाय्यभूत साधनांकरिता उदा. कॅलिपर्स, तीन चाकी सायकल, कुबड्या, श्रवणयंत्रे, सफेद काठ्या, चष्मे व १० वी नंतरचे शिक्षण घेणाऱ्या अंधांना टेपरेकॉर्ड व कोऱ्या कॅसेटस् करिता तीन हजार रुपये अर्थसहाय्य देण्यात येते. याशिवाय १८ ते ५० वर्षे वयोगटातील दृष्टिहीन, कर्णबधीर व अस्थिविकलांग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी ८०% बँकेमार्फत कर्ज व २०% किंवा कमाल पाच हजार रुपये सामाजिक न्याय विभागामार्फत अनुदान देण्यात येते. या योजनेंतर्गत सन १९९९-२००० मध्ये नांदेड जिल्ह्यात ४ लाभार्थींसाठी १.४६ हजार रुपये खर्च करण्यात आले होते. तसेच शासनमान्य संस्थेमधून विशिष्ट प्रशिक्षण पूर्ण केलेल्या वरील वयोगटातील अपंगाना तो व्यवसाय सुरू करण्यासाठी लागणाऱ्या साधनांकरिता रुपये एक हजार अर्थसहाय्य देण्यात येते. सन २०००-२००१ या वर्षी नांदेड जिल्ह्यातील ७ अपंगांना ७,००० हजार रुपये असे सहाय्य देण्यात आले होते.

वरील योजनांव्यतिरिक्त राज्य स्तरावर अपंग विद्यार्थी गुणवत्ता पुरस्कार, अपंग मार्गदर्शन व सल्ला केंद्र, अपंग क्रीडा स्पर्धा, जागतिक अपंग दिन अशा विविध योजना व कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. अपंग कल्याणाच्या या कार्यक्रमावर देखरेख ठेवण्यासाठी पूर्वोक्त १९९५ च्या अधिनियमान्वये केंद्रिय स्तरावर केंद्रिय समन्वय समिती करण्यात आलेली आहे. राज्य स्तरावर हे काम राज्य समन्वय समितीकडे सोपविण्यात आलेले आहे. केंद्र शासनाच्या वतीने मुख्य आयुक्त, अपंग कल्याण हे पद निर्माण केले असून त्यांचे मुख्यालय नवी दिल्ली येथे, तर राज्यासाठी आयुक्त पद असून त्याचे मुख्यालय पुणे येथे आहे. महाराष्ट्रातील काही जिल्ह्यात अपंगांसाठी स्वतंत्र्य सेवा योजना केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. मुळात अपंगत्व येऊ नये, म्हणून आरोग्य विभागामार्फत प्रयत्न करणे, ६-१८ वर्षे वयोगटातील अपंग मुलामुलींसाठी शैक्षणिक सोयी-सुविधा उपलब्ध करून देणे ही कामे प्रामुख्याने आरोग्य विभाग, अपंग कल्याण आयुक्तालय व शासनाच्या विविध विभागाच्या समन्वयाने सुरू करण्यात आलेली आहेत. तसेच १८ वर्षावरील अपंगांसाठी रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र राज्य अपंग आर्थिक विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे. अपंगांसाठी शासकीय सेवेतही ३ टक्के जागा राखीव ठेवण्यात आलेल्या असतात.

## धर्मादाय व सेवाभावी संस्था

सन १९५० पूर्वी राज्यातील धार्मिक आणि धर्मादाय न्यासांचे व्यवस्थापन केंद्र व राज्य शासनाच्या विविध कायद्यान्वये चालत असे. हे कायदे धर्मावर आधारित असत. १९५० मध्ये अशा न्यासांसाठी बॉम्बे पब्लिक ट्रस्ट ॲक्ट (XXIX) हा खास कायदा पारित करण्यात येऊन धर्माधर्मात भेद न करता सर्व सामाजिक न्यासांसाठी लागू करण्यात आला. या कायद्यान्वये सार्वजनिक न्यास म्हणजे 'सार्वजनिक, धार्मिक किंवा धर्मादाय उद्देशासाठी किंवा या सर्व उद्देशांसाठी उदा. मठ, मंदिरे व वक्फसाठी एखादे धार्मिक किंवा धर्मादाय वर्षासन (नेमणूक, जहागीर) देणे आणि धार्मिक किंवा धर्मादाय उद्देशासाठी संस्था स्थापन करून तिची सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्ट (XXI), १८६० खाली नोंदणी करणे होय. हा अधिनियम धार्मिक संस्था व सर्व प्रकारच्या सामाजिक कार्य करणाऱ्या संस्थांना लागू करण्यात आला. तसेच १८६० च्या संस्था नोंदणी कायद्यानुसार नोंदणीकृत संस्थानाही हा अधिनियम लागू करण्यात आला. तत्पूर्वी विदर्भाला सी.पी. आणि बेरारचा कायदा आणि मराठवाड्याला हैद्राबाद राज्याचा कायदा लागू होता.

या कायद्याच्या (१९५० च्या) अंमलबजावणीचे अधिकार राज्य सरकारला देण्यात आले आहेत. त्यान्वये एखादा सार्वजनिक न्यास किंवा न्यासाचा घटक यांस पूर्वीचे कायदे लागू करण्यात आले. हा कायदा मुंबई राज्यात दि. २१ जानेवारी १९५२ पासून तर मराठवाडा व विदर्भात दि. १ फेब्रुवारी १९६१ पासून लागू करण्यात आला. या कायद्यान्वये आता सामाजिक, धार्मिक किंवा अन्य क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्थांना नोंदणी करणे आवश्यक करण्यात आले आहे.

राज्याचे धर्मादाय आयुक्तालय मुंबई येथे असून अन्य विभागीय पातळीवर सहाय्यक धर्मादाय आयुक्त असतात. नांदेड येथेही असे सहाय्यक धर्मादाय आयुक्तांचे कार्यालय आहे. हे कार्यालय स्थापन होण्यापूर्वी औरंगाबाद येथील विभागीय सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालयाकडे नांदेड जिल्ह्यातील न्यासांची नोंदणी होत असे. दि. ३० जून १९६३ पर्यंत या कार्यालयाकडे नोंदणी झालेल्या नांदेड जिल्ह्यातील न्यासांची आकडेवारी खाली दर्शविली आहे.[२०५] त्यात त्यांची मालमत्ता व उत्पन्न खर्चाचीही नोंद आहे.

| प्रकार | नोंदलेले एकूण न्यास | मालमत्ता मूल्य (रु.) | | सरासरी वार्षिक उत्पन्न रु. | सरासरी वार्षिक खर्च रु. |
|---|---|---|---|---|---|
| | | चल | अचल | | |
| ए. (हिंदूसाठीचे न्यास) | २२१ | १४,०७९.०० | १,५२,७९२.०१ | २४,१८४.८१ | २२,२६२.८१ |
| बी. (मुस्लिमांसाठीचे न्यास) | - | - | - | - | - |
| सी. (पारशीसाठींचे न्यास) | - | - | - | - | - |
| डी. (ख्रिश्चनांसाठीचे न्यास) | - | - | - | - | - |
| इ. (विशिष्ट समाजासाठीचे न्यास) | १३ | २९,७२८.८८ | २,२७,१७९.५८ | ७५,०४२.३१ | ७६,२७४.१२ |
| फ. (सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्ट, १८६० खाली नोंदलेले न्यास) | ३८ | ३,३६,१६३.०४ | ९,१८,१३५.०० | ५,६४,५०३.८९ | ५,५२,६६४.५८ |

२०५. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ५४३-५४४.

प्रत्येक न्यासाच्या विश्वस्ताला आपल्या न्यासाचे नियमित जमाखर्च पत्रक ठेवावे लागते. त्याची वार्षिक तपासणी चार्टर्ड अकौंटंट किंवा कायद्याने अधिकृत केलेली व्यक्ती करते. हे तपासणीस आपला अहवाल आपल्या उप विभागाच्या सहाय्यक धर्मादाय आयुक्तांकडे पाठवितात.

नांदेड जिल्ह्यात शिक्षण, आरोग्य, कला, मनोरंजन व धार्मिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या अनेक संस्था आहेत. त्यापैकी या न्यायाखाली नोंदणी झालेल्या खाजगी दवाखान्यांना नागरिकांसाठी काही आरोग्यविषयक सोयी सवलतीच्या दरात उपलब्ध करून द्याव्या लागतात. सन १९३९ साली स्थापन झालेली प्रतिभा निकेतन शिक्षण संस्था ही येथील सर्वात जुनी शिक्षण संस्था असून अभिनव भारत शिक्षण संस्था, महात्मा गांधी मिशन, सेवादास शिक्षण संस्था, राजस्थानी शिक्षण संस्था अशा अनेक नामांकित शिक्षण संस्थांनी जिल्ह्याच्या शैक्षणिक विकासात मोलाची भूमिका बजावलेली आहे अशा काही संस्थांना शासनाकडून अनुदानही दिले जाते. समाजाच्या विकास कार्यात तसेच सामाजिक ऐक्य व हितसंबंध दृढ करण्यात अशा संस्थांनी महत्त्वाची भूमिका बजावलेली असून जिल्ह्यात आपल्या कार्याने आपला ठसा उमटविलेला आहे. तथापि, सर्वच संस्थांची माहिती उपलब्ध झाली नसल्याने माहिती उपलब्ध झालेल्या काही मोजक्या संस्थांची माहिती पुढीलप्रमाणे आहे :—

**अभिनव चित्रशाळा कलाशिक्षण संस्था, नांदेड :** हैद्राबादच्या विलिनीकरणानंतरही मराठवाडा राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक अशा सर्वच क्षेत्रात अत्यंत मागासलेला होता. सांस्कृतिक क्षेत्रात, साहित्य, नाट्य आणि संगीतविषयक कार्य करणाऱ्या काही व्यक्ती आणि संस्था अस्तित्त्वात होत्या. परंतु चित्रकलेसाठी कार्य करणारी एकही व्यक्ती किंवा संस्था मराठवाड्यात नव्हती. म्हणून ही उणीव दूर करण्यासाठी चित्रकार श्री.त्र्यंबकराव वसेकर यांनी दि. १ जुलै १९५५ रोजी कै. वि. द. सर्जे व कै. शंकरराव चव्हाण यांच्या सहकार्याने मराठवाड्यातील या पहिल्या कलाशिक्षण संस्थेची स्थापना केली. अजिंठा-वेरूळच्या निर्मितीनंतर खंडित झालेल्या मराठवाड्यातील गौरवशाली चित्रकला परंपरेचे पुनरूज्जीवन करण्याचे कार्य या संस्थेने यथाशक्ती केले आहे.

प्रारंभी या संस्थेतर्फे चित्रशाळा स्थापून लहान मुलांसाठी बालचित्रकला वर्ग आणि प्रौढांसाठी चित्रकलेचा पदविका अभ्यासक्रम सुरू करण्यात आला. त्यानंतर कला शिक्षण प्रशिक्षण अभ्यासक्रम सुरू करण्यात आला. याच चित्रशाळेचे पुढे कलाविद्यालयात रूपांतर झाले. आज त्याचे चित्रकला महाविद्यालय झाले आहे. या संस्थेच्या वाटचालीत स्वातंत्र्यसेनानी कै. श्यामरावजी बोधनकर, सुप्रसिद्ध साहित्यिक कै. नरहर कुरूंदकर, कै. एल. एम. देशमुख, प्राचार्य सुभाष वसेकर, व श्री. डी. व्ही. फुलारी यांनी मौलिक योगदान दिले आहे.

बालक व युवकांना चित्रकलेचे शिक्षण देणे, सर्वसामान्यांच्या सौंदर्यदृष्टीचा विकास करणे व चित्रकलेचा प्रसार करणे या उद्देशाने स्थापन झालेल्या या संस्थेची नांदेड जिल्ह्यात चित्रकला महाविद्यालय व बालचित्रकला परीक्षा विभाग अशी शैक्षणिक केंद्रे आहेत. सन २००४-२००५ मध्ये या महाविद्यालयात ४७ विद्यार्थी शिक्षण घेत होते. मागील ५० वर्षांत जवळपास दोन हजारपेक्षा जास्त विद्यार्थी येथे चित्रकार बनले आहेत. बालचित्रकला परीक्षा विभागाची याच वर्षी महाराष्ट्रात ६० केंद्रे

कार्यरत होती. मागील ५० वर्षात त्यांतून सहा लाख विद्यार्थ्यांनी चित्रकलेचे शिक्षण घेतले आहे. या परीक्षा महाराष्ट्रातच नव्हे, तर आंध्र, कर्नाटक, गुजरात व गोवा प्रांतातही लोकप्रिय झाल्या आहेत.

या कलासंस्थेच्या अनेक माजी विद्यार्थ्यांनी कलावंत आणि कलाध्यापक म्हणून नावलौकिक मिळविला आहे. श्री.त्र्यंबकराव वसेकरांना 'नांदेड भूषण' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

**श्री शारदाभवन शिक्षणसंस्था, नांदेड :** नांदेड नगरीत सन १९५२ मध्ये या शिक्षण संस्थेची स्थापना करण्यात आली. संस्थेचे पहिले अध्यक्ष श्री. बापुसाहेब भगवंतराव नाईक यांनी प्रथम येथे शारदा भवन माध्यमिक शाळेची स्थापना करून शिक्षणाची मूहर्तमेढ रोवली. त्यानंतर भारताचे माजी गृहमंत्री मा. श्री. शंकरारावजी चव्हाण यांनी अध्यक्ष म्हणून, तर पद्मश्री शामरावजी कदम यांनी उपाध्यक्ष म्हणून सन १९५४ मध्ये या संस्थेची धुरा हाती घेतली. ग्रामीण व शहरी भागातील गरीब, होतकरु विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय करणे हा या संस्थेचा उद्देश आहे. त्या दृष्टीने आज या संस्थेच्या शिक्षण क्षेत्रातील कार्याचा व्याप संपूर्ण जिल्हाभर विस्तारलेला आहे. या संस्थेच्या संपूर्ण विकासात वरील महनीय व्यक्तिंखेरीज श्री. ब. जी. फालक, ॲड. श्री. एस. के. निंबाळकर, श्री. लक्ष्मणराव हस्सेकर, श्री. नारायणरावजी वाघमारे यांनी मोलाची भूमिका पार पाडलेली आहेत. याशिवाय श्री. अशोकरावजी चव्हाण, श्री. डी. पी. सावंत, श्री. गंगाधररावजी शक्करवार व श्री. उदयरावजी निंबाळकर हेही या कार्यात महत्त्वाची भूमिका पार पाडीत आहेत. सध्या या संस्थेची जिल्ह्यात पाच कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालये, एक विधी महाविद्यालय, एक अध्यापक विद्यालय व एक अध्यापक महाविद्यालय एक तंत्रज्ञान व व्यवस्थापन महाविद्यालय, एक तंत्रज्ञान महाविद्यालय, औषधनिर्माण शास्त्रातील पदविका व पदवी बहाल करणारी दोन महाविद्यालये, मुलींसाठी एक उच्च माध्यमिक विद्यालय, अन्य चार माध्यमिक विद्यालये, सावित्रीबाई फुले कन्याशाळा, तसेच तीन प्राथमिक शाळा ज्ञानदानाचे कार्य करीत आहेत.

**नांदेड एज्युकेशन सोसायटी, नांदेड :** हैद्राबाद मुक्ति लढ्याचे अध्वर्यू स्वामी रामानंद तीर्थ यांनी सन १९५० मध्ये या संस्थेची नांदेड येथे स्थापना केली. हैद्राबाद मुक्तिसंग्राम संपताच संपूर्ण मराठवाड्याच्या शैक्षणिक, सांस्कृतिक जीवनाचे पुनरुज्जीवन घडवून आणण्याच्या त्यांच्या स्वप्नाची ही मुहूर्तमेढ होती. स्वामींजीनी या संस्थेचे पहिले महाविद्यालय म्हणून दि. २० जून १९५० रोजी पीपल्स कॉलेजची स्थापना केली. स्वामींजींनी स्थापन केलेले हे महाविद्यालय व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे औरंगाबाद येथील मिलींद महाविद्यालय ही हैद्राबाद मुक्तिनंतरची मराठवाड्यातील पहिली शिक्षणकेंद्रे होती. त्यातूनच संस्थेने आवश्यक ती जमीन खरेदी केली. त्यानंतर संस्थेने आतापर्यंत मराठवाड्याच्या शैक्षणिक क्षेत्रात नेत्रदिपक प्रगती केलेली आहे. संस्थेची अनेक शैक्षणिक केंद्रे सध्या जिल्ह्यात कार्यरत आहेत.

**गुजराती शिक्षण संस्था, नांदेड :** गुजराती समाजाबरोबरच इतर सर्व समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षण देणे या उद्देशाने गुजराती समाजातील अनेक प्रतिष्ठितांनी एकत्र येऊन सन १९३८ मध्ये वजिराबाद येथे या संस्थेची स्थापना झाली. या वर्षी एका छोट्याशा टिनशेडमध्ये इयत्ता पहिली ते

चौथी पर्यंतचे वर्ग सुरू करून या संस्थेचा श्रीगणेशा करण्यात आला. या शाळेच्या स्थापनेच्या रूपाने व स्व.श्री.चिमनलालभाई नागडा, विसनजी लोंडाया, चुनीलाल रावल, डाह्याभाई पटेल, मणीभाई पटेल, धनजी भोजा, केशवजी शहा, जॉन महमदभाई, कासमअली मुलजीभाई, लक्ष्मीदास गांधी, कल्याणजीभाई ठक्कर, नेणसीभाई शहा, शामजीभाई शहा वगैरे मान्यवरांच्या श्रमाने संस्थेचा आज हा वटवृक्ष उभा आहे. सध्या संस्थेतर्फे अतिथीगृह, बालक मंदिर, गुजराती प्राथमिक शाळा, गुजराती हायस्कूल व संगणक वर्ग चालविण्यात येतात. पैकी हायस्कूलमध्ये सन २००४-२००५ मध्ये १,४०० व हायस्कूलमध्ये २,१०७ विद्यार्थी शिक्षण घेत होते. हायस्कूल व प्राथमिक विभागातून महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षा, राष्ट्रीय प्रज्ञा शोध परीक्षा, गणित संबोध परीक्षा, विविध शिष्यवृत्ती परीक्षा असे अनेकविध उपक्रम तसेच सांस्कृतिक व क्रीडा उपक्रम राबविले जातात.

**गांधी राष्ट्रीय हिंदी विद्यालय संस्था, नांदेड :** नांदेडचे महंत जीयरजी महाराज स्वामी लक्ष्मणाचार्यजी यांनी दि. १ जून १९४८ रोजी या संस्थेची स्थापना केली. त्यांना या कार्यात पंडित बालाप्रसादजी शुक्ल, सचिन्द्रनाथ राय, वालचंदजी मुथा, मांगीलालजी जाजू वगैरे अनेक प्रतिष्ठीत सहकाऱ्यांनी सहकार्य केले होते. राष्ट्रभाषा हिंदीची सेवा करणे, अहिंदी क्षेत्रात हिंदीचा प्रचार व प्रसार करणे, सांस्कृतिक, सामाजिक व राष्ट्रीय भावना निर्माण करणे, व समाजातील गोरगरीब मुलांना सर्व स्तरावर हिंदी शिक्षण देऊन त्यांचा सर्वांगीण विकास करणे हा या संस्थेचा उद्देश आहे.

या संस्थेची नांदेड शहरात गाडीपुरा व गवळीपुरा येथे प्रत्येकी एक प्राथमिक शाळा, एक माध्यमिक शाळा अशी शिक्षणकेंद्रे हिंदी माध्यमातून चालतात. संस्था स्थापनावर्षी असलेली २५ एवढी विद्यार्थीसंख्या आज २००४-२००५ मध्ये २,००० एवढी आहे. संस्थेमार्फत गरजु विद्यार्थ्यांना शालेय गणवेश, पाठ्यपुस्तके, वह्या यांचे विनामूल्य वितरण करण्यात येते. संस्थेमार्फत गरजु विद्यार्थ्यांचे एस.एस.सी.चे शुल्कही भरले जाते. शिवाय 'साधना' नावाचा वार्षिक अंक प्रसिद्ध केला जातो.

**श्री शिवाजी मोफत एज्युकेशन सोसायटी, कंधार :** माजी लोकप्रतिनिधी डॉ. केशवरावजी धोंडगे यांनी आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने या संस्थेची इ.स.१९४८ मध्ये कंधार तालुक्यातील गडूळ येथे स्थापना केली. याचबरोबर सन १९४९ मध्ये गडूळ पानशेवाडी येथे शिवाजी मोफत वाचनालयाची व बहाद्दरपुरा येथे सुभाष मोफत वाचनालयाची स्थापना केली, तर १९५० मध्ये त्यांनी कंधार शहरात कै. माधवरावजी नळगे यांच्या सहकार्याने शिवाती बोर्डिंगची स्थापना केली. त्यानंतर सन १९५३ मध्ये कंधार शहरात कै.गणेशराव व बाबासाहेब पाटील लुगारे या पितापुत्रांच्या सहकार्याने श्री शिवाजी मोफत हायस्कूलची स्थापना केली. त्याचे उद्घाटन त्यावेळचा हैद्राबाद राज्याचे शिक्षणमंत्री कै. देवीसिंगजी चव्हाण यांच्या हस्ते संपन्न केले. याच संस्थेतर्फे सन १९५८ मध्ये कंधार येथे महात्मा फुले दलित विद्यार्थी वसतिगृह तसेच कुरळा, दिग्रस, वाखरड, हाळदा व सोनखडे या कंधार तालुक्यातील गावांमध्येही श्री शिवाजी मोफत हायस्कूलची स्थापना केली. तर लोका येथे संत गाडगेबाबा महाराज मोफत हायस्कूल स्थापन केले. पुढील वर्षी कंधार येथे श्री शिवाजी मोफत महाविद्यालयाचीही स्थापना केली. आज येथे तीनही शाखातील पदव्युत्तरपर्यंचे शिक्षण दिले जाते.

वरील शैक्षणिक केंद्रांच्या यशस्वी स्थापनेनंतर सन १९६१ मध्ये औरंगाबाद व नांदेड येथे शिवाजी हायस्कूल, तर लोहा येथे संत गाडगे महाराज महाविद्यालय स्थापन करण्यात आले हाच ओघ पुढे सुरू ठेवत सन १९९० साली कंधार व लोहा तालुक्यातील ५२ वाड्या व तांड्यांवर एकाच वर्षी प्राथमिक शाळा सुरू करण्यात आल्या, तर १९९२ मध्ये कंधार येथे शिवाजी विधी महाविद्यालय स्थापण्यात आले.

सध्या या संस्थेतर्फे २८ प्राथमिक, ११ माध्यमिक, १० उच्च माध्यमिक शाळा तसेच दोन वरिष्ठ महाविद्यालये, एक विधी महाविद्यालय, उर्दू माध्यमाच्या प्राथमिक व माध्यमिक शाळा, ३ बालक मंदिरे अशी अनेक शैक्षणिक केंद्रे यशस्वीपणे ज्ञानदान करीत आहेत.

**अडत व्यापारी शिक्षण संस्था, देगलूर :** या संस्थेची स्थापना सन १९६३ मध्ये करण्यात आली. या संस्थेमार्फत देगलूर महाविद्यालय (कनिष्ठ व वरिष्ठ), व्यावसायिक अभ्यासक्रमाचे महाविद्यालय, पदव्युत्तर महाविद्यालय, संगणकशास्त्र महाविद्यालय, श्री शिवाजी इंग्लिश स्कूल, देगलूर वगैरे शैक्षणिक केंद्रांबरोबरच व्यावसायिक अभ्यासक्रम तसेच व्यवसाय मार्गदर्शन केले जाते.

**श्री माणिकप्रभू शिक्षण संस्था, अंबुलगा :** श्री बापुराव पाटील-तेलंग यांनी जून १९५७ मध्ये कंधार तालुक्यातील अंबुलगा येथे ही संस्था स्थापन केली. गरीब व मागास विद्यार्थ्यांना शिक्षण व अन्य विकासविषयक शिक्षण देण्याच्या ध्येयाने तसेच इंग्रजी, हिंदी, मराठी व उर्दू भाषेचा प्रसार करणे, मुले व प्रौढांना बौद्धिक शारीरिक, तांत्रिक, आध्यात्मिक व सांस्कृतिक शिक्षण देऊन त्यांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी प्रयत्न करणे या उद्देशाने या संस्थेची स्थापना करण्यात आली आहे. या संस्थेचे अंबुलगा येथे इयत्ता ५ वी ते १० पर्यंतचे माणिकप्रभू विद्यालय, माणिकप्रभू उच्च माध्यमिक विद्यालय व होतकरू व गरीब मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह या संस्था कार्यरत आहेत. याशिवाय आधुनिक पद्धतीनुसार शिशु शाळा व प्रौढ शिक्षण वर्ग सुरू करणे, आरोग्य शिबिरे, वाचनालये, वृक्षलागवड व शाळाबाह्य मुलांचे वर्ग चालवून शिक्षणास प्रोत्साहन देणे वगैरे उपक्रम सुरू आहेत.

**क्षत्रिय समाज, नांदेड :** या संस्थेमार्फत नांदेड येथील श्री रेणुकादेवी मंदिर ट्रस्टचे व्यवस्थापन पाहिले जाते. पूर्वीच्या छोट्या मंदिराच्या जागी संस्थेने आता मोठे मंदिर उभारलेले आहे. संस्थेतर्फे नवरात्रात येथे विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. ही संस्था रजपूत समाज बांधवांची आहे. ही संस्था मागील १५ वर्षापासून सामूहिक विवाह-मेळावे आयोजिक करते. त्याद्वारे रजपुत समाजातील गोरगरीब वधु-वरांचे विवाह घडवून आणले जातात. याशिवाय पहिली ते सातवी पर्यंतच्या गोरगरीब वर्गातील मुला-मुलींना मोफत वह्या व पुस्तकाचे वाटप प्रतिवर्षी केले जाते. समाजातील विधवा महिलांना संस्थेतर्फे साडीचोळी देण्यात येते. तसेच गंभीर आजाऱ्याला दहा हजार रुपयांचे अनुदान मदत म्हणून दिले जाते. या संस्थेतर्फे सर्व समाजातील लोकांसाठी एक धर्मादाय दवाखानाही चालविला जातो. क्षत्रिय समाजाच्या मुला-मुलींसाठी रोजगाराच्या दृष्टिकोनातून विविध व्यावसायिक उपक्रमांचेही आयोजन केले जाते.

Maharashtra State Archive Question Papers

## ग्रंथालये

निजामकाळात मराठवाड्यात ग्रंथालये व वाचनालये यांना राजाश्रय नसल्याने तसेच राज्यकारभाराची भाषाही उर्दू असल्याने बहुसंख्येने असलेल्या मराठी भाषिकांना वाचनाची गरज भागविण्यात अनंत अडचणी येत असत. त्यामुळे मराठवाडा मुक्तीपर्यंत तरी मराठवाड्यात ग्रंथालये व वाचनालयांच्या फारशा सोयी नव्हत्या. स्वातंत्र्यानंतर मात्र मराठवाड्याने या क्षेत्रात नेत्रदिपक प्रगती केली.

नांदेड शहरातील ग्रंथालयीन इतिहासाचा मागोवा घेतांना १६ व्या शतकातील थोर कवी वामन पंडित यांचा उल्लेख करणे आवश्यक ठरते. नांदेड शहराने दिलेला हा पहिला ग्रंथपाल. वामन पंडित अर्थात वामन अनंत शेष हे नांदेडचे मूळ रहिवाशी होत. ते आदिलशहाच्या शाही ग्रंथालयाचे ग्रंथपाल होते. शाही ग्रंथालयातील उर्दू, अरबी, फार्शी व संस्कृत ग्रंथ पोथ्या, पुराणे व ऐतिहासिक कागदपत्रांच्या साहित्याचे जतन व संवर्धनाचे काम त्यांच्याकडे होते. विजापूरच्या अली आदिलशहाला ग्रंथ व दुर्मिळ पुस्तके संग्रहित करण्याचा छंद होता. त्याचा स्वतःचा किताबखाना व त्यासाठी स्वतंत्र महाल बांधलेला होता. अली आदिलशहा शाही ग्रंथालयाच्या ग्रंथपालांचा वेळोवेळी मानपत्र देऊन सन्मान करीत असे. त्यांस वार्षिक एक हजार होन एवढी बिदागी किंवा पगार मिळे.

निजामकाळात नांदेड शहरात सन्मित्र समाज, ऐक्यवर्धक मित्र समाज, गणेश मित्र समाज, सौमित्र समाज, बालमित्र समाज, व्यापारी समाज, स्टेशन पार्टी, शारदाश्रम व कीर्तन संस्था अशा अनेक संस्था निर्माण झाल्या. त्यातूनच नव्या विधायक कार्यक्रमासंबंधी विचार मंथन होऊन ग्रंथालय चळवळ आकार घेऊ लागली. याची सुरुवात १९०८ मध्ये ऐक्यवर्धक मित्रसमाज नावाच्या वाचनालयाच्या स्थापनेने झाली. यातील उत्साही कार्यकर्त्यांमुळे हे ग्रंथालय त्याकाळी बरेच नावारूपास आले होते. संस्थेचे सुसंघटीत कार्य व अल्पावधीत जमलेला चांगला ग्रंथसंग्रह यामुळे वाचकांमध्ये वाचनाची अभिरुची निर्माण करण्यात या वाचनालयाने यश मिळविले होते. तथापि कालौघात कार्यकर्ते उद्योगधंद्यानिमित्त विखुरले गेल्याने तसेच सरकारी बंधने यामुळे हे वाचनालय बंद झाले. इतिहास संशोधक तात्यासाहेब कानोले यांचेही एक संशोधन ग्रंथालय नांदेडमध्ये सुरू झाले होते.

सुमारे १९२९ मध्ये होळी भागात काही विद्यार्थ्यांनी शिवाजी वाचनालय, दत्त वाचनालय व विद्यार्थी वाचनालय अशी तीन वाचनालये स्थापन केली काही काळातच शिवाजी वाचनालयात अन्य दोन्ही वाचनालये विलीन करण्यात आली. हे वाचनालय पुढे चार वर्षे जोमाने चालून बंद झाले.

जुलै १९३० मध्ये वजिराबाद भागात तीन विद्यार्थ्यांनी केवळ तीन पुस्तके एवढ्या भांडवलावर श्री. हनुमान वाचनालयाची स्थापना केली. कल्पक व अनुभवी कार्यकर्त्यांच्या जोरावर या वाचनालयाने लवकरच उत्तम प्रगती केली. याच्या वर्गणीदारांमध्ये वजिराबादमधील सुशिक्षितांचा भरणा होता.

पुढे ऐक्यवर्धक मित्र समाज वाचनालयाचे पुनरुज्जीवन करण्यात येऊन व दिनांक २३ जुलै १९३० रोजी ऐक्यवर्धक मित्र समाज व हनुमान वाचनालयाच्या एकत्रिकरणातून 'नगरवाचनालयाचा' जन्म झाला. याचे अध्यक्ष देविदासराव लव्हेकर, उपाध्यक्ष शामराव बोधनकर, कोषाध्यक्ष ल. ना.

सरदेशपांडे, तर कार्याध्यक्ष माधवराव नांदेडकर हे होते. तीन वर्ष अखेर या वाचनालयात ३५० ग्रंथ होते. याचा वार्षिक समारंभ साजरा होत असे. त्यानिमित्ताने नामवंतांची व्याख्याने होत.

शहरात याशिवाय गुजराथी वाचनालय तसेच महाजनांचे उत्तम ग्रंथालय होते. श्री. भगवान शेटे यांचेही सुदर्शन वाचनालय होते. ते सायकलवरून ग्रंथ पोचवित असत. अशा प्रकारची वाचनालये स्थापन करणे शासनविरोधी कृत्य मानले जायचे. तरीही निजामकाळात ही वाचनालये स्थापन तर झालीच. पण शासनविरोधी भावना प्रबळ करणे, बंदी असलेले साहित्य जास्तीत जास्त लोकांपर्यत पोहोचविणे, राजकीय साहित्य प्रसिद्ध करणे व चळवळीतील नेत्यांचे संदेश सामान्यांपर्यत पोहोचविणे ही कार्येही या वाचनालयांनी केली. त्यादृष्टीने त्यांचे कार्य मोलाचे आहे.

शासनही ग्रामीण व शहरी विभागातील जनतेत वाचण्याची आवड निर्माण व्हावी म्हणून ग्रंथालय चळवळीच्या प्रसाराकरीता सार्वजनिक ग्रंथालयांना प्रोत्साहन देण्यासाठी ग्रंथालयांना सहाय्यक अनुदान देण्याची योजना राबविते. त्यानुसार जिल्ह्यातील 'अ' व 'ब' वर्गातील सार्वजनिक ग्रंथालयांना मागील वर्षाच्या खर्चाच्या ७५% अनुदान, तर 'क' व 'ड' वर्गातील ग्रंथालयांना मागील वर्षाच्या खर्चाच्या विहीत मर्यादेत ७५% अनुदान मिळते. 'क' वर्गासाठी ही मर्यादा ८,००० रु. व 'ड' वर्गासाठी २,००० रु. आहे.[२०६]

१९६१ मध्ये नांदेड जिल्ह्यात शासकीय मान्यताप्राप्त अशी १४ ग्रंथालये होती.[२०७] पुढील वर्षी म्हणजे १९६३ मध्ये ही संख्या ५१ इतकी झाली. त्यात काही फिरती वाचनालयेही होती.[२०८] तथापि त्यानंतरच्या वर्षी यातील फिरती वाचनालये बंद झाल्याने केवळ ३७ ग्रंथालये कार्यरत होती. त्यात १२ खाजगी व २५ ग्रामीण मान्यताप्राप्त ग्रंथालये होती.[२०९] सन १९९० मध्ये जिल्ह्यात प्रत्येकी एक अ वर्गीकृत जिल्हा व तालुका वाचनालय, 'ब' वर्गाची पाच, व 'क' वर्गाचे एक तालुका ग्रंथालय व इतर ब वर्गाची ८, क वर्गाची ६९ व 'ड' वर्गाची १०० अशी एकूण १८५ मान्यताप्राप्त ग्रंथालये व वाचनालये होती.[२१०] सन २००६ मध्ये जिल्हा ग्रंथालयाव्यतिरिक्त नांदेड जिल्ह्यात ३७६ ग्रंथालये व वाचनालये होती. त्यापैकी माहिती प्राप्त झालेल्या काही ग्रंथालयांची व वाचनालयांची माहिती खालीलप्रमाणे :—

**कै. डॉ. राममनोहर लोहिया, नगरपरिषद, ग्रंथालय व वाचनालय, नांदेड**[२११] **:** हे 'अ' वर्गीकृत जिल्हा ग्रंथालय असून त्याची स्थापना दि. १८ जानेवारी १९५४ मध्ये झाली. नांदेड शहरातील नागरिकांना सुसज्ज असे दर्जेदार ग्रंथालय व वाचनालय उपलब्ध करून देणे, त्यायोगे देशातील व देशाबाहेरील घडामोडींचे ज्ञान मिळविणे, व वाचकांत वाचनाची आवड निर्माण करणे या उद्देशाने नांदेड

२०६. अकोलकर, ग. वि., **माध्यमिक शिक्षण,** समाजप्रबोधन संस्था, पुणे, १९६५, पृ. १६६.

२०७. **डिस्ट्रिक्ट सेंसस हॅण्डबुक,** नांदेड डिस्ट्रिक्ट, १९६१, पूर्वोक्त, पृ. २५.

२०८. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** पूर्वोक्त, १९७१, पृ. ५०३.

२०९. कित्ता, पृ. ५२२.

२१०. ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई कडील माहिती.

२११. संबंधित ग्रंथालयाकडील माहिती.

नगरपरिषदेने या ग्रंथालय व वाचनालयाची स्थापना केली. या ग्रंथालयाच्या इमारतीच्या तळमजल्यात ५० × ४० फूट आकाराच्या प्रशस्त दालनात मुक्तदार कक्ष चालविला जातो. याशिवाय १० × २० व १० × १५ फूट आकाराचे प्रत्येकी एक महिला व बाल वाचनकक्ष आहेत. ग्रंथालय विभागही प्रशस्त्र असून त्यात मुबलक प्रमाणात विविध विषयांवरील मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू भाषेतील पुस्तके आहेत. शिवाय स्वतंत्र संदर्भ ग्रंथ विभागही आहे. ग्रंथालयात स्वतंत्र मासिक विभागही सुरू आहे. या ग्रंथालयामार्फत शहरात विविध ठिकाणी वाचनालयाच्या ७ शाखा चालविण्यात येतात. सध्या या ग्रंथालयात मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेतील ६३,७८० व उर्दू भाषेतील ४,८४० इतकी विपूल ग्रंथसंपदा आहे. दरमहा ग्रंथालयाचा लाभ घेणाऱ्या सभासदांची संख्या १५००, तर वाचन कक्षाचा लाभ घेणाऱ्या वाचकांची संख्या जवळपास ३,००० इतकी आहे. वाचनालयात विविध भाषांची ५० दैनिके, ७७ पाक्षिके, साप्ताहिके व मासिके, तसेच २२ उर्दू मासिके वाचकांसाठी उपलब्ध करून दिली जातात. या ग्रंथालयास दरवर्षी ४,८० हजार रुपयांचे अनुदान प्राप्त होते.

## तालुका ग्रंथालये

**विचार विकास मंदिर वाचनालय, कंधार :** स्वामी रामानंद तीर्थ यांनी दि. १९ मार्च १९५० रोजी या वाचनालयाची स्थापना केली. त्यांना या कार्यात गोपाळशास्त्री देव, बाबासाहेब परांजपे, जिवनराव बोधनकर व भ.रू.गाजवे यांचे सहकार्य मिळाले 'अ' दर्जाच्या या तालुका वाचनालयाची शहराच्या मध्यभागी दोन मजली इमारत आहे. या जागेवर पूर्वी चावडी होती. राजाराम मामडे व स्थानिक स्वराज्य मंत्री फुलचंद गांधी यांच्या परिश्रमाने ही जागा मुंबई राज्य सरकारने वाचनालयाच्या ताब्यात दिली. इमारतीसाठी अनेक मान्यवरांनी सढळ हस्ते मदत दिली.

आज ग्रंथालयात इंग्रजी, मराठी, हिंदी मिळून २५,५४० ग्रंथ असून दररोज २३ वर्तमानपत्रे, ५० मासिके नियमितपणे येथे उपलब्ध असतात. ग्रंथांमध्ये मराठी २४,९९० हिंदी ३०० व इंग्रजी २५० ग्रंथांचा समावेश आहे. वाचनालयाचा दैनिक ३२५ वाचक लाभ घेतात. वाचनालयातर्फे सामाजिक व सांस्कृतिक जागृतीसाठी दरवर्षी ग्रंथालय सप्ताह, व्याख्यानमाला असे उपक्रम राबविण्यात येतात.

**विचार विकास मंदिर सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालय, होली, नांदेड :** प्रतिभा निकेतन शिक्षण संस्था, नांदेड संचालित हे ग्रंथालय व वाचनालय दि. १५ ऑगस्ट १९५० रोजी दे भ. स्वातंत्र्यसेनानी बाबासाहेब परांजपे यांनी स्थापन केले. राष्ट्रीय शिक्षण, जनजागरण व वाचन संस्कृतीचा विकास या उद्देशाने याची स्थापना करण्यात आली. नांदेड शहरात प्रबोधनाची चळवळ समर्थ वाचनालय व ऐक्यवर्धक रूपाने अस्तित्त्वात होती. विचार विकास मंदिर वाचनालयाच्या स्थापनेनंतर १९६५ मध्ये प्रतिभा निकेतन शिक्षण संस्थेला हे 'ब' दर्जाचे वाचनालय जोडले गेले. प्राचार्य स. दि. महाजन, (सरचिटणीस प्र. नि. शिक्षणसंस्था) यांच्या कारकिर्दीत या वाचनालयाचा विकास फार मोठ्या प्रमाणावर झाला असून २० हजार ग्रंथ व ६५० वर्गणीदार आहेत.

सन १९६० मध्ये यातील ग्रंथसंपदा केवळ १००० इतकी होती. पुढे त्यात उत्तरोत्तर वृद्धी होऊन सन २००५ मध्ये ती १३,४५६ इतकी झाली. त्यात १२,४७१ मराठी, ७०५ इंग्रजी व २८० हिंदी

भाषेतील ग्रंथ आहेत. वाचनालयात १७ दैनिके व २४ अन्य नियतकालिके नियमितपणे घेतली जातात. याचे एकूण सदस्य २६७ असून २५०० वाचक दरमहा या वाचनालयाचा लाभ घेतात. वाचनालयातर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, चर्चासत्रे, भाषणे, व्याख्याने असे अनेक उपक्रम राबविले जातात.

**हुतात्मा माधव सार्वजनिक वाचनालय, मुखेड :** हे 'ब' वर्गीकृत वाचनालय जुन्या मुखेड शहराच्या मध्यभागात आहे. मुखेडसारख्या ग्रामीण भागात ज्ञानार्जनाचे मुख्य स्रोत म्हणजे ग्रंथ व नियतकालिके होत ही गरज ओळखून मुखेड येथील प्रल्हाद गो. कवटिकवार, हाणमंत देबडवार, किशन नारलावार, भगवान कवटिकवार, मारोती मुक्कावार अशा प्रतिष्ठित व्यापाऱ्यांनी १९५० मध्ये शहरातील निजामकालीन चावडीचे रूपांतर लोकवर्गणीच्या सहाय्याने वाचनालयात केले. यास निजाम राजवटीत गणेशोत्सव प्रसंगी हौतात्म्य पत्करलेला तरूण माधवराव एकलारे याचे नाव देण्यात आले. सन १९९० मध्ये यातील ग्रंथसंख्या ११,८४२ एवढी होती. ती आता २००५ मध्ये १६,३२९ एवढी झाली आहे. यात २२ दैनिके, १० साप्ताहिके, ७५ मासिके व ५ पाक्षिके नियमितपणे उपलब्ध करून दिली जातात. मुखेड तालुक्यातील हे पहिले सार्वजनिक वाचनालय असून सरासरी दरमहा एक हजार वाचक याचा लाभ घेतात. वाचनालयाची सभासदसंख्या १८० इतकी असून शासनाकडून १.९२ हजार रु. वार्षिक अनुदान मिळते.

**नगरपरिषद सार्वजनिक वाचनालय, बिलोली :** बिलोली नगरपरिषदेतर्फे चालविल्या जाणाऱ्या या 'ब' वर्गीकृत वाचनालयाची स्थापना दि. २६ जानेवारी १९५४ रोजी झाली. समाजातील सर्व घटकांना जागतिक घडामोडी कळाव्यात, वाचनातून ज्ञान वाढवावे या हेतूने तत्कालिन नगराध्यक्ष कै. डॉ. गोविंदराव भोसीकर व कै. शिवाजीराव पाटील यांनी या वाचनालयाची स्थापना केली. सन २००५ मध्ये या वाचनालयामध्ये मराठी ग्रंथ २०,११०, इंग्रजी १००, हिंदी ४०० व उर्दू ३०० असे एकूण २०,९१० ग्रंथ होते. वाचनालयात नियमितपणे मराठी, हिंदी व इंग्रजी भाषांतील २४ दैनिके व ६० नियतकालिके वाचकांसाठी उपलब्ध असतात. यावर्षी वाचनालयाची सदस्यसंख्या ३२० इतकी होती. मासिक सरासरी ३,२०० वाचक या वाचनालयाचा लाभ घेतात. शासनाकडून यास २.५६ हजार रुपये वार्षिक अनुदान मिळते.

**लायब्ररी अंजुमन तरक्की-इ-उर्दू (हिन्द), देगलूर :** निजामकालीन साप्ताहिक 'हालात' चे संपादक कै.जोश मोहमदाबादी, तसेच कै.अख्तर हुसेन देशमुख, कै.समदानी मियाँ सरदेशमुख, कै. शा. ल. देसाई, सय्यद काजी हामेद तनवीर आणि कै. माधवराव देशमुख या समाजधुरिणांनी एकत्र येऊन १९५८ साली या वाचनालयाची स्थापना केली. वाचन संस्कृती वाढावी याउद्देशाने या वाचनालयातर्फे परिसरातील शाळांना पुस्तके पुरविण्यात येतात. सन १९६० मध्ये या वाचनालयातील एकूण पुस्तकांची संख्या २,२०० एवढी होती त्यातील १,७०० पुस्तके केवळ उर्दू भाषेतील, तर ३०० पुस्तके मराठी भाषेतील होती. सन २००७ मध्ये एकूण पुस्तकांची संख्या १२,४१३ इतकी वाढली. त्यात ८,४४७ पुस्तके उर्दू, २,१४५ पुस्तके मराठी व १,८२१ पुस्तके हिंदी भाषेतील होती. या वाचनालयात १६ दैनिके, चार साप्ताहिके, २१ मासिके व दोन त्रैमासिके नियमित उपलब्ध असतात. वाचनालयाचे सध्या ३०० सभासद असून दैनिक ५० ते ७० वाचक याचा नियमितपणे लाभ घेतात. या 'ब' वर्गीकृत वाचनालयास दरवर्षी शासनाचे अनुदान प्राप्त होते. त्यातून वाचनालयाचा खर्च भागविला जातो.

**विवेक वाचनालय पेठ-उमरी :** हैद्राबाद मुक्ती संग्रामातील हुतात्मा कै.दत्तात्रय देविदास उत्तरवार यांच्या स्मरणार्थ या वाचनालयाची सन १९६२ मध्ये स्थापना करण्यात आली. हे 'ब' वर्गीकृत वाचनालय पेठ-उमरी नगरपरिषदेतर्फे चालविले जाते. या वाचनालयात विविध भाषेतील २२ दैनिके, ४ मासिके, ५ पाक्षिके, ८ साप्ताहिके व ३२ वार्षिक अंक वाचकांसाठी सदोदित उपलब्ध असतात. येथील ग्रंथसंख्या १२,७५७ इतकी असून सभासद संख्या ४३२ आहे. या वाचनालयाच्या परिसरात 'झाडे लावा झाडे जगवा' उपक्रमानुसार ४,००० झाडांची लागवड करण्यात आलेली आहे.

**श्री हजुर साहिब सार्वजनिक वाचनालय, नांदेड :** नांदेड शहर हे शिखांचे पवित्र स्थळ आहे, त्याचबरोबर ऐतिहासिक शहर आहे. त्यामुळे येथे दरवर्षी अनेक प्रांतांतून व परदेशातून हजारो पर्यटक व यात्रेकरू भेट देतात. या यात्रेकरू व पर्यटकांना नांदेड शहर व जिल्ह्याचा इतिहास, गुरू साहेबांचा व शिखांचा इतिहास, तसेच इतर संतकवींची व त्यांच्या काव्याची, कार्याची माहिती व्हावी या हेतुने गुरूद्वारा बोर्ड तर्फे वरील वाचनालयाची सन १९६२ मध्ये स्थापना करण्यात आली. हे शासनमान्य 'ब' वर्गीकृत वाचनालय असून त्यात मराठी, हिंदी, पंजाबी, इंग्रजी व उर्दू भाषेतील ५० दैनिके, ५० साप्ताहिके, १० मासिके व २५ वार्षिके उपलब्ध असतात. सध्या हे वाचनालय विविध भाषेतील १६,९८५ इतक्या ग्रंथांनी समृद्ध आहे. वाचनालयात दैनिकांसाठी व ग्रंथांसाठी स्वतंत्र कक्ष आहेत. दररोज ३०० ते ४०० वाचक या वाचनालयाचा लाभ घेतात. वाचनालयाची सभासद संख्या ४१५ इतकी आहे. येथे बालवाचक व महिला वाचकांसाठीही स्वतंत्र व्यवस्था आहे. शासनाने या वाचनालयास सन २००० मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्काराने सन्मानित केले आहे. शासनातर्फे दरवर्षी मिळणाऱ्या १,९६,००० रुपये अनुदानातून या वाचनालयाचा व्यवहार चालविला जातो, तर अतिरिक्त खर्च गुरूद्वारा बोर्डाकडून केला जातो.

**लोकनायक जयप्रकाश नारायण वाचनालय, देगलूर :** हे 'ब' वर्गकृत वाचनालय देगलूर नगरपरिषदेकडून चालविले जात असून त्याची स्थापना दि. १ मे १९६५ रोजी तत्कालिन नगराध्यक्ष चिद्रावार नारायण रामण्णा यांनी केली. हे 'ब' वर्गीकृत वाचनालय असून त्यात विविध भाषिक २१ दैनिके, १९ मासिके, १० साप्ताहिके व ६ पाक्षिके वाचकांसाठी नियमित उपलब्ध असतात. यात मराठी ७,८४६, इंग्रजी १,५००, हिंदी २,६००, उर्दू २,१०० अशी विविध भाषिय एकूण १४,०३६ इतकी ग्रंथसंख्या आहे. तर सभासद संख्या ३०६ आहे. या वाचनालयाचा सरासरी दरमहा २५०० वाचक लाभ घेतात. या वाचनालयातर्फे ग्रंथवाचक मेळावा, ग्रंथदिंडी, सभा व मेळावे असे कार्यक्रमही राबविले जातात. शासनाकडून मिळणाऱ्या वार्षिक एक लाख इतक्या अनुदानातून या वाचनालयाचा खर्च भागविला जातो.

**नेहरू नगरपरिषद वाचनालय, किनवट :** किनवट हा आदिवासीबहूल तालुका असून तालुक्यातील जनतेस उत्तम वाचनालय उपलब्ध करून देऊन त्यायोगे जनतेस ज्ञानप्राप्ती व आधुनिक विचार निर्माण करण्यासाठी पं. जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीदिनी दि. १४ नोव्हेंबर १९६५ रोजी याची स्थापना करण्यात आली. हे 'ब' दर्जाचे वाचनालय असून सन २००५ च्या अखेरीस या वाचनालयात विविध भाषेतील ८,६३० ग्रंथ होते. वाचनालयात नियमितपणे विविधभाषिक २७ दैनिके,

४ साप्ताहिके, २ पाक्षिके व ४ मासिके घेतली जातात. हे वाचनालय किनवट नगरपरिषदेतर्फे चालविले जात असून त्याचा दरमहा १५७ सभासद व २५० वाचक लाभ घेतात.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाचनालय, कंधार :** कंधार नगरपरिषदेतर्फे चालविले जाणारे हे 'अ' वर्गकृत वाचनालय दि. २६ जानेवारी १९८१ रोजी स्थापन झालेले आहे. वाचकांमध्ये वाचनाची आवड निर्माण करून ज्ञानार्जन करावे हा या मागील उद्देश आहे. त्यास अनुसरून या वाचनालयातर्फे दरवर्षी साने गुरूजी व अन्य व्याख्यानमाला, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, विविध स्पर्धा, वगैरे उपक्रम राबविले जातात. या वाचनालयात विविध भाषिक २७ दैनिके, ७७ मासिके, ६ त्रैमासिके, ७ द्वैमासिके व ९ साप्ताहिके अशी एकूण १०० च्या आसपास नियतकालिके उपलब्ध असतात. सन २००० मध्ये या वाचनालयात १३,३८५ मराठी, १,१५६ हिंदी, ३५८ इंग्रजी व २,३२९ उर्दू ग्रंथ होते. सन २००६ मध्ये या वाचनालयातील एकत्रित ग्रंथसंख्या २०,१०० इतकी होती. तर सभासद संख्या ३६४ होती. दैनिक सरासरी २०० वाचक या वाचनालयाचा निःशुल्क लाभ घेतात. या वाचनालयास शासनाकडून १ लाख ९६ हजार रुपये अनुदान प्राप्त होते, तर नगरपरिषद वार्षिक किमान सहा लाख रुपये यासाठी खर्च करते.

या वाचनालयाच्या दर्गापूर वाचनालय (स्थापना १९८९) व हुतात्मा स्मारक वाचनालय अशा दोन शाखाही कार्यरत आहेत. सन १९९५ मध्ये येथील ग्रंथपाल भगवान बनसोडे यांना सी. ना. सुर्वे उत्कृष्ट ग्रंथपाल पुरस्कार, तर सन २००३-२००४ या महाराष्ट्र शासनाचा डॉ. एस. आर. रंगनाथन ग्रंथमित्र पुरस्कार, स्तृतिचिन्ह व रु. १५ हजार प्रदान करण्यात आले. या वाचनालयास याच वर्षी पुणे विद्यापीठाच्या महात्मा फुले अध्यासन केंद्राचा राज्यपातळीवरील पुरस्कारही प्राप्त झालेला आहे.

**ग्रामपंचायत सार्वजनिक वाचनालय, हिमायतनगर :** 'गाव तेथे ग्रंथालय' या योजनेखाली ज्ञानदानाच्या हेतुने या वाचनालयाची दि. १९ जानेवारी १९८१ रोजी स्थापना करण्यात आली. हे 'क' वर्गकृत ग्रंथालय असून सन २००० मध्ये याची सभासदसंख्या ८९ तर यातील ग्रंथसंख्या १,५४८ इतकी होती. सध्या या ग्रंथालयाचे १०१ सभासद असून ग्रंथ संपदा ३,०७१ इतकी आहे. येथील अनेक मान्यवरांनी या ग्रंथालयास ग्रंथ देऊन सहकार्य केले आहे. या वाचनालयात सध्या १९ दैनिके, ६ साप्ताहिके व ४ मासिके उपलब्ध असतात. त्याचा दरमहा ७५८ वाचक लाभ घेतात.

**इंदिरा वाचनालय, नरंगल (ता. देगलूर) :** भारताच्या भूतपूर्व पंतप्रधान स्व. इंदिरा गांधी यांच्या स्मृतीदिनी दि. ३१ ऑक्टोबर १९८७ रोजी इरवंतराव पाटील यांनी ग्रामस्थांच्या सहकार्याने या वाचनालयाची स्थापना केली आहे. नरंगल हे गाव आंध्र प्रदेशाच्या सीमेलगत असल्याने तेथील तेलुगू व कानडी भाषेच्या प्रभावाखाली मराठी भाषाही समृद्ध राखण्यासाठी या वाचनालयाची निकड भासू लागली होती ती याद्वारे पूर्ण केली गेली. हे 'ब' वर्गीकृत ग्रामीण वाचनालय असून त्यात दररोज सहा दैनिके व १८ ते १९ नियतकालिके उपलब्ध असतात. यात सन २००० अखेर ५,७२१ ग्रंथ होते. ही संख्या २००६ च्या अखेरपर्यंत ७,४२६ इतकी झाली. यात हिंदी व इंग्रजी भाषेतीलही ग्रंथ आहेत. या वाचनालयाचा दररोज ३० ते ३५ वाचक लाभ घेतात, तर वर्गणीदार सभासद संख्या ११५ इतकी आहे.

Maharashtra State Gazetteers

**सानेगुरुजी सार्वजनिक वाचनालय, भोकर :** अशोककुमार मुंदडा यांनी १९८८ मध्ये या वाचनालयाची स्थापना केली. या वाचनालयाची सन २००७ मधील ग्रंथसंख्या १२,०३२ इतकी असून येथे १७ दैनिके, १० साप्ताहिके, सहा पाक्षिके, चार त्रैमासिके व ३४ मासिके वाचकांसाठी नियमित उपलब्ध असतात. वाचनालयाची सभासद संख्या ३५७ इतकी असून प्रतिमाह सरासरी १,८०० ते १,९०० वाचक वाचनालयाचा नियमित लाभ घेतात. या 'ब' वर्गकृत वाचनालयास शासकीय अनुदान प्राप्त होते.

**सावित्रीबाई फुले सार्वजनिक वाचनालय, लोहा :** लक्ष्मीबाई जाधव या समाजसेविकेने सन १९९१ मध्ये या वाचनालयाची स्थापना केली. वाचन-संस्कृती वाढविणे व ज्ञानोपासना करणे या उद्देशाने स्थापन झालेल्या या वाचनालयास अल्पावधीतच 'ब' वर्गकृत वाचनालयाचा दर्जा प्राप्त झालेला आहे. याची सन २००७ मधील ग्रंथसंपदा ८,७७६ इतकी असून त्यात ७०० हिंदी व १२० इंग्रजी पुस्तके समाविष्ट आहेत. वाचनालयात नियमितपणे १० दैनिके, १५ साप्ताहिके, १० मासिके, तीन पाक्षिके व इतर विविध प्रकारची ३८ नियतकालिके उपलब्ध असतात. वाचनालयाची सदस्य संख्या १३२ इतकी असून पुस्तक प्रदर्शने भरविणे, वक्तृत्त्व, भाषणे, वादविवाद आदी स्पर्धाचे आयोजन करणे, महिलांसाठी वेगवेगळ्या स्पर्धा आयोजित करणे व समाजाला शासकीय योजनांची माहिती देणे वगैरे उपक्रमही राबविले जातात. शासकीय अनुदानातून वाचनालयाचा खर्च भागविला जातो. याशिवाय संस्थेस काही प्रतिष्ठीत दानशूर आर्थिक मदत करतात.

**महात्मा ज्योतिबा फुले सार्वजनिक वाचनालय, धर्माबाद :** सन १९९२ मध्ये गंगाधर वाघमारे यांनी या वाचनालयाची स्थापना केली. सध्या या वाचनालयातील ग्रंथसंख्या ६,४९५ इतकी असून १० मासिके, सहा साप्ताहिके व आठ दैनिके वाचकांसाठी उपलब्ध असतात. या वाचनालयाचे १२७ नियमित सभासद असून वाचनालयास शासकीय अनुदान प्राप्त होते. 'ब' दर्जाचे हे वाचनालय आहे.

**का. मातोश्री सुंदराबाई सार्वजनिक वाचनालय, बिलोली :** देशमुखनगरमधील या 'ब' वर्गकृत वाचनालयाची स्थापना १९९२ मध्ये झालेली आहे. बिलोली येथील पुनर्वसित भागाजवळील नवीन वसाहतीतील कर्मचारीवृंद व जनता यांच्यात वाचनाची आवड निर्माण करणे, बौद्धिक प्रवचने आयोजित करून लोकजागृतीचे काम करणे, ग्रंथ, मासिके, दैनिके आदि साहित्य जनतेस सहजासहजी उपलब्ध करून देणे व ग्रंथालय चळवळीत भाग घेऊन तिचा प्रचार व प्रसार करणे हा या वाचनालयाचा उद्देश आहे. सध्या या वाचनालयात दैनिके, ९ मासिके व ५ साप्ताहिके वाचकांसाठी उपलब्ध करून दिली जातात. येथील ग्रंथसंख्याही बऱ्यापैकी म्हणजे ५४०० इतकी आहे. दरमहा सरासरी २०० ते ३०० वाचक या वाचनालयाचा लाभ घेतात.

Maharashtra State Gazetteers

मार्च २००६ अखेर जिल्ह्यातील शासनमान्य ग्रंथालयांची तालुकानिहाय यादी खालीलप्रमाणे :—

| अ.क्र. | तालुका | जिल्हा | | तालुका | | | इतर | | | | एकूण | योजना | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अ | ब | अ | ब | क | अ | ब | क | ड | | | |
| १ | अर्धापूर | - | - | - | - | - | - | १ | ६ | २ | ९ | २ | ११ |
| २ | उमरी | - | - | - | - | - | - | १ | ३ | ० | ४ | २ | ६ |
| ३ | कंधार | - | - | १ | - | - | १ | १४ | २० | ४ | ४० | ६ | ४६ |
| ४ | किनवट | - | - | - | १ | - | - | - | २ | ० | ३ | १ | ४ |
| ५ | देगलूर | - | - | १ | - | - | - | १९ | ४१ | ३ | ६४ | ६ | ७० |
| ६ | धर्माबाद | - | - | - | - | - | - | - | - | १ | ३ | २ | ५ |
| ७ | नांदेड | १ | - | - | १ | - | १ | २१ | ९ | ३ | ३६ | ३ | ३९ |
| ८ | नायगाव | - | - | - | - | १ | - | ५ | १० | ५ | २१ | ४ | २५ |
| ९ | बिलोली | - | - | १ | - | - | - | ८ | ७ | १ | १७ | २ | १९ |
| १० | भोकर | - | - | - | १ | - | - | २ | २ | १ | ६ | १ | ७ |
| ११ | माहूर | - | - | - | - | - | - | - | ३ | ० | ३ | २ | ५ |
| १२ | मुखेड | - | - | - | १ | - | - | २५ | ५२ | ११ | ८९ | ८ | ९७ |
| १३ | मुदखेड | - | - | - | - | - | - | १ | ४ | १ | ६ | २ | ८ |
| १४ | लोहा | - | - | - | १ | - | - | ६ | १० | २ | १९ | ४ | २३ |
| १५ | हदगाव | - | - | - | १ | - | - | १ | ३ | - | ५ | १ | ६ |
| १६ | हिमायतनगर | - | - | - | - | - | - | - | २ | १ | ३ | २ | ५ |
| | एकूण | १ | - | ३ | ६ | १ | २ | १०६ | १७४ | ३५ | ३२८ | ४८ | ३७६ |

**संदर्भ :** ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई.

## तक्ता क्रमांक १

नांदेड जिल्ह्यातील धर्मानुसार तालुकावार साक्षरता (१९३१)

| तालुके | हिंदू | | जैन | | शीख | | मुस्लिम | | ख्रिश्चन | | झोरो-स्ट्रीयन | | इतर | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | पु. | स्त्री | पु. | स्त्री | पु. | स्त्री | पु. | स्त्री | पु. | स्त्री | पु. | स्त्री | पु. | स्त्री |
| नांदेड | ३,०९१ | २३३ | २४ | १ | ३५६ | ६० | २,४१५ | २३० | ६० | ८ | १ | - | - | - |
| कंधार | २,२३८ | ३७ | २३ | ३ | १८ | १ | २८६ | २९ | - | - | - | - | ७ | - |
| मुधोळ | २,७७४ | ७२ | २ | - | २ | - | ८२९ | ४४ | - | - | ७ | ४ | - | - |
| देगलूर | २,४७६ | १३६ | १ | - | २ | - | २७६ | ३० | १ | - | २ | १ | - | ४ |
| हदगाव | १,४३५ | २६ | २१ | १ | २ | - | १५८ | १० | ६ | २ | - | - | ३ | ४८ |
| बिलोली | १,२४४ | ६५ | - | - | - | - | ४७६ | २० | - | - | - | - | - | - |

**आधार : सेंसस ऑफ इंडिया, १९३१,** व्हॉ.XXIII, एच.ई.एच.दि. निजाम डोमिनियन्स (हैद्राबाद स्टेट) पार्ट-I, रिपोर्ट, गव्हर्नमेंट सेंट्रल प्रेस, हैद्राबाद, डेक्कन, १९३३, पृ. २७०-२७२.

Maharashtra State Gazetteers

## तक्ता क्रमांक २

नांदेड जिल्ह्यातील १९६१ ची साक्षरता

| | | नागरी | | | | | ग्रामीण | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | घटक | पुरूष | स्त्री | एकूण | अ.क्र. | घटक | पुरूष | स्त्री | एकूण |
| १ | एकूण लोकसंख्या | १८,१३८ | ७४,७३० | १,५५,८६८ | १ | एकूण लोकसंख्या | ४,६६,८३६ | ४,५६,९७० | ९,२३,८०६ |
| २ | अशिक्षित | ४४,०६८ | ६१,५१९ | १,०५,५८७ | २ | अशिक्षित | ३,६७,८५४ | ४,४२,७३३ | ८,१०,५८७ |
| ३ | साक्षर (शैक्षणिक पात्रता) नसलेले | १७,६२६ | ८,५१४ | २६,१४० | ३ | साक्षर (पण शैक्षणिक पात्रता नसलेले) | ७०,८१७ | ११,५६२ | ८२,३७९ |
| ४ | शैक्षणिक स्तर- | | | | ४ | शैक्षणिक स्तर- | | | |
| | अ) प्राथमिक किंवा कनिष्ठ | १५,२८० | ४,२४९ | १९,५२९ | | अ) प्राथमिक किंवा कनिष्ठ स्तर | २६,०४६ | २,६२० | २८,६६६ |
| | ब) मॅट्रिक किंवा उच्च माध्यमिक | ३,३९१ | ३९८ | ३,७८९ | | ब) मॅट्रिक व त्यापेक्षा अधिक | २,११९ | ५५ | २,१७४ |
| | क) तांत्रिक पदविका (पदवीशी समतुल्य नसलेली) | ८१ | ९ | ९० | | | | | |
| | ड) विद्यापीठ पदवी/पदव्युत्तर पदवी (तांत्रिक पदवी वगळून) | ४२९ | २७ | ४५६ | | | | | |
| | ई) पदवी किंवा पदव्युत्तर पदवीसमान तांत्रिक पदवी किंवा पदविका- | | | | | | | | |
| | १) अभियांत्रिकी | ३० | - | ३० | | | | | |
| | २) वैद्यकीय | २९ | १ | ३० | | | | | |
| | ३) शेतकी | १४ | - | १४ | | | | | |
| | ४) पशुवैद्यकीय व दुग्धसंबंधी | ६ | - | ६ | | | | | |
| | ५) शास्त्रीय | - | - | - | | | | | |
| | ६) शिक्षकी | ६२ | ८ | ७० | | | | | |
| | ७) इतर | ९२ | ४ | ९६ | | | | | |

**आधार : नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** पूर्वोक्त, पृ. ५१८-१९.

Maharashtra State Gazetteers

## तक्ता क्र. ३

## २००१ ची जिल्हा साक्षरता - जिल्हा नांदेड

| अ.क्र. | तालुका | साक्षराची टक्केवारी | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ग्रामीण | | | नागरी | | | एकूण | | |
| | | पु. | स्त्री | एकूण | पु. | स्त्री | एकूण | पु. | स्त्री | एकूण |
| १ | माहूर | ८५.३३ | ५९.१७ | ७२.६३ | ० | ० | | ०८५.३३ | ५९.१७ | ७२.६३ |
| २ | किनवट | ७१.१४ | ५०.२० | ६४.१६ | ८४.०२ | ६६.३८ | ७५.३९ | ७९.७३ | ५२.१६ | ६६.२२ |
| ३ | हिमायतनगर | ७४.८० | ४८.२८ | ६१.८६ | ० | ० | ० | ७४.८० | ४८.२८ | ६१.८६ |
| ४ | हदगाव | ८०.९७ | ५५.४२ | ६८.६७ | ८७.५९ | ६५.८१ | ७७.१३ | ८१.६६ | ५६.५० | ६९.५५ |
| ५ | अर्धापूर | ७८.३४ | ५१.८८ | ६५.५० | ० | ० | ० | ७८.३४ | ५१.८८ | ६५.५० |
| ६ | नांदेड | ८१.०३ | ५६.१७ | ६९.०३ | ८९.३२ | ७३.३१ | ८१.८२ | ८७.१३ | ६८.९४ | ७८.४२ |
| ७ | मुदखेड | ७५.७८ | ४५.९३ | ६१.१५ | ७९.८८ | ५८.९९ | ७०.०३ | ७६.५९ | ४८.३५ | ६२.८५ |
| ८ | भोकर | ७९.६१ | ४९.९८ | ६५.१० | ०० | ० | ० | ७९.६१ | ४९.९८ | ६५.१० |
| ९ | उमरी | ७४.४५ | ४४.१६ | ५९.४९ | ८९.५२ | ६४.३६ | ७७.३४ | ७४.४७ | ४६.७७ | ६१.८४ |
| १० | धर्माबाद | ७३.६२ | ४३.५२ | ५८.६२ | ७९.९८ | ५५.८४ | ६८.१० | ७५.८८ | ४७.८२ | ६१.९६ |
| ११ | बिलोली | ७४.०३ | ४४.७३ | ५९.७३ | ७३.२३ | ४९.३९ | ६१.४५ | ७३.८९ | ४५.५८ | ६०.०४ |
| १२ | नायगाव (खैर) | ८०.१० | ४९.८० | ६५.३६ | ० | ० | ० | ८०.१० | ४९.८० | ६५.३६ |
| १३ | लोहा | ८२.३९ | ५१.१६ | ६७.२१ | ८९.०५ | ६५.३६ | ७७.५४ | ८३.०४ | ५२.५४ | ६८.२२ |
| १४ | कंधार | ८२.०८ | ५०.३४ | ६६.७६ | ८६.१७ | ६५.६६ | ७६.५० | ८२.५० | ५१.८७ | ६७.७५ |
| १५ | मुखेड | ७८.९४ | ५१.६५ | ६५.६५ | ८६.११ | ६३.१८ | ७४.९२ | ७९.७० | ५२.८९ | ६६.९८ |
| १६ | देगलूर | ७५.७८ | ४८.३४ | ६२.३६ | ८५.३७ | ६४.१२ | ७५.०१ | ७८.११ | ५२.१५ | ६५.४३ |
| | एकूण | ७९.१४ | ५०.६७ | ६५.२८ | ८७.३० | ६९.२१ | ७८.६१ | ८१.१४ | ५५.१२ | ६८.५२ |

**आधार : जनगणना निर्देशग्रंथ, २००१.**

## तक्ता क्र. ४

### व्यवस्थापनानुसार प्राथमिक शाळा, जि. नांदेड-सन २०००-२००१

| व्यवस्थापन | शाळांची संख्या | विद्यार्थी | | | शिक्षक | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मुले | मुली | एकूण | पुरुष | स्त्री | एकूण | प्रशिक्षित |
| केंद्र शासन | - | - | - | - | - | - | - | - |
| राज्य शासन | २२ | ४,००५ | २,६९० | ६,६९५ | १४४ | २२ | १६६ | १४४ |
| जिल्हा परिषद | | | | | | | | |
| ग्रामीण | १,८४३ | १,४६,१९१ | १,४६,२५६ | २,९२,४४७ | ६,३१६ | १,११० | ७,४२६ | ७,२८३ |
| नागरी | ५९ | ९,९७६ | १०,६४९ | २०,६२५ | १७९ | | ५०३ | ४९४ |
| नगरपालिका | ११ | २,११७ | २,०११ | ४,१२८ | २६ | ३२४ | ९२ | ९१ |
| खाजगी अनुदानित | २९१ | ६६,२९२ | ५७,७८८ | १,२४,०८० | १,४७० | ६६ | २,५३९ | २,३४६ |
| खाजगी विना अनुदानित | ११२ | ८,३३१ | ७,२५८ | १५,५८९ | २८८ | १,०६९ | ५०७ | ३५९ |
| एकूण | २,३३८ | २,३६,९१२ | २,२६,६५२ | ४,६३,५६४ | ८,४२३ | २,८१० | ११,२३३ | १०,७१७ |

**आधार : शिक्षणावर दृष्टिक्षेप, २०००-०१**, शिक्षण संचालनालय, (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे-२००५, पृ. ३८-४७.

Maharashtra State Gazetteers

## तक्ता क्रमांक ५

## नांदेड जिल्ह्यातील महाविद्यालये : सन-२००९

| महाविद्यालयाचे नाव | स्थापना वर्ष | महाविद्यालयाचे नाव | स्थापना वर्ष | महाविद्यालयाचे नाव | स्थापना वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| **कला-वाणिज्य व शास्त्र महाविद्यालये** | | | | | |
| पीपल्स कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड कॉमर्स नांदेड. | १९५० | महात्मा ज्योतिबा फुले कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड कॉमर्स, मुखेड | १९७२ | सरस्वती आर्टस् कॉलेज, किनवट | १९९० |
| श्री शिवाजी कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स, शिवाजीनगर कंधार. | १९५९ | प्रतिभा निकेतन कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स, वजिराबाद, नांदेड | १९७२ | शाहीर अण्णाभाऊ साठे कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड कॉमर्स, मुखेड | १९९० |
| यशवंत कॉलेज ऑफ आर्ट, कॉमर्स ॲण्ड सायन्स नांदेड | १९६३ | वसंतराव नाईक कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स, नवीन नांदेड | १९८९ | ग्रामीण (रूरल) कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स, वसंतनगर, (कोटग्याळ), मुखेड. | १९९१ |
| देगलूर कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स, देगलूर. | १९६३ | शरदचंद्र आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज, नायगाव | १९८४ | आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायस कॉलेज, शंकरनगर, बिलोली. | १९९७ |
| सायन्स कॉलेज, नांदेड. | १९६३ | के.आर.एम.लेडीज कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड कॉमर्स वजिराबाद, नांदेड | १९८९ | कै.बापूसाहेब पाटील-एकंबेकर ग्रामीण (रूरल) कॉलेज ऑफ आर्टस्, देगलूर. | १९९६ |
| लालबहादूर शास्त्री कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स, धर्माबाद. | १९६७ | दिगंबरराव बिंदू आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज, भोकर. | १९८९ | कै.धुंडा महाराज देगलूरकर कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड सायन्स, देगलूर. | १९९८ |
| नेताजी सुभाषचंद्र बोस कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स नांदेड. | १९७१ | आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज, हदगाव | १९८९ | कै.भीमराव चव्हाण कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड सायन्स, बाऱ्हाळी, मुखेड. | १९९८ |
| पानसरे कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड कॉमर्स, अर्जापूर, बिलोली. | १९७२ | श्री संत गाडगे महाराज कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स लोहा. | १९८९ | लोकमान्य कॉलेज ऑफ आर्टस् सोनखेड, लोहा. | १९९९ |
| बळीराम पाटील आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, किनवट. | १९७२ | श्री दत्त आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज, हदगाव | १९८९ | | |

| महाविद्यालयाचे नाव | स्थापना वर्ष | महाविद्यालयाचे नाव | स्थापना वर्ष | महाविद्यालयाचे नाव | स्थापना वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| स्वामी विवेकांनंद कॉलेज ऑफ आर्टस्, मुक्रमाबाद, मुखेड. | १९९९ | इंदिरा गांधी सिनिअर कॉलेज, सिडको, नांदेड. | उ.ना. | यशवंत शारीरिक शिक्षण महाविद्यालय, नवीन नांदेड. | १९९४ |
| आर्टस् ॲण्ड सायन्स कॉलेज, बा-हाळी, मुखेड | २००० | क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सिनिअर कॉलेज, आनंदनगर, नांदेड. | उ.ना. | **विधी व वैद्यकिय महाविद्यालये** | |
| | | | | विधी (लॉ) महाविद्यालय, नांदेड. | १९७० |
| श्री रेणुकादेवी आर्टस् सिनिअर कॉलेज, माहूर | २००० | हुतात्मा जयवंतराव पाटील कॉलेज, हिमायतनगर. | उ.ना. | शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, नांदेड | १९५६ |
| जयवंतराव पाटील आर्टस् कॉलेज, हिमायतनगर | २००१ | | | श्री शिवाजी विधी महाविद्यालय, कंधार | १९९३ |
| | | **अध्यापक व शारीरिक शिक्षण महाविद्यालये** | १९६८ | नारायणराव चव्हाण विधी महाविद्यालय, नांदेड. | १९७० |
| ग्रामीण (रूरल) आर्टस् ॲण्ड सायन्स कॉलेज, नेहरूनगर, कंधार. | २००१ | शासकीय अध्यापक महाविद्यालय, वसंतनगर, नांदेड. | | | |
| शंकरराव चव्हाण कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड सायन्स, अर्धापूर | २००१ | शारदाभवन अध्यापक महाविद्यालय, नांदेड. | १९८६ | होमिओपॅथी मेडीकल कॉलेज, सिडको, नवीन नांदेड. | २००० |
| राजीव गांधी कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड सायन्स, मुदखेड. | २००१ | श्रीमती इंदिरा गांधी अध्यापक महाविद्यालय, वसंतनगर, नांदेड | १९९० | शारदाभवन कॉलेज ऑफ फार्मसी, नांदेड. | १९९४ |
| नूतन कॉलेज ऑफ आर्टस्, उमरी | २००१ | शारीरिक शिक्षण महाविद्यालय, कवठा, नवीन नांदेड. | १९८५ | नांदेड कॉलेज ऑफ फार्मसी, नांदेड | २००० |
| ग्रामीण आर्टस् ॲण्ड सायन्स कॉलेज, नेहरुनगर, नागलगाव, कंधार | उ.ना. | विवेकवर्धिनी अध्यापिका महाविद्यालय, शिवाजीनगर, नांदेड. | १९९० | शासकीय वैद्यकिय महाविद्यालय, वजिराबाद, नांदेड. | १९५६ |
| संजीवनी कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स, पूर्णा रोड, नांदेड | उ.ना. | संत गाडगे महाराज, शारीरिक शिक्षण महाविद्यालय, माळेगाव रोड, नांदेड. | उ.ना. | एस.एम.पी.एस.के. होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज ॲण्ड हॉस्पिटल, सिडको, नांदेड. | उ.ना. |
| स्वामी विवेकानंद कॉलेज ऑफ आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स, कुंटूर, | उ.ना. | छत्रपती शिवाजी कॉलेज ऑफ फिजिकल एज्यु., तरोडा नाका, नांदेड. | उ.ना. | नांदेड कॉलेज ऑफ फार्मसी, नांदेड | उ.ना. |

## अभियांत्रिकी व तंत्र महाविद्यालये

| महाविद्यालयाचे नाव | स्थापना वर्ष | महाविद्यालयाचे नाव | स्थापना वर्ष | महाविद्यालयाचे नाव | स्थापना वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| श्री गुरू गोविंदसिंगजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र महाविद्यालय, विष्णुपूरी, नांदेड. | १९८१ | सत्यसाई बहुउद्देशिय कॉलेज ऑफ इन्फॉ. ॲण्ड टेक्नॉ. नांदेड. | उ.ना. | एम.जी.एम. अभियांत्रिकी महाविद्यालय, एअरपोर्टजवळ, नांदेड. | १९८४ |
| मयुर इन्फॉ. टेक्नॉ. ॲण्ड मॅनेजमेंट कॉलेज, नांदेड. | २००७ | एम.जी.एम. संगणक महाविद्यालय, नांदेड. | २००० | वसंत काळे कॉलेज ऑफ कॅम्प्युटेशनल ॲण्ड मॅनेजमेंट सायन्सेस, नांदेड. | २००७ |
| राजीव गांधी कॉलेज ऑफ कॅम्प्युटर सायन्स ॲण्ड मॅनेजमेंट, नांदेड. | २००१ | **अन्य** | | कॉलेज ऑफ कॅम्प्युटर इंन्फॉ. टेक्नॉ, नांदेड. | उ.ना. |
| श्री शारदाभवा एम.सी.ए. कॉलेज, नांदेड. | १९९७ | इस्टिट्यूट ऑफ टेक्नॉ. ॲण्ड मॅनेजमेंट, नांदेड. | १९९७ | जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय, नवीन नांदेड. | १९९२ |
| एम.जी.एम. कॉलेज ऑफ फाईन आर्ट, नांदेड. | उ.ना. | स्कूल ऑफ मॅथ. स्टॅटेस्टिक ॲण्ड कंम्प्यु. सायन्स, नांदेड. | उ.ना. | | |

## युनिव्हर्सिटी कॅम्पस महाविद्यालये/शिक्षण केंद्रे

- स्कूल ऑफ कॉमर्स ॲण्ड मॅनेजमेंट सायन्स.
- स्कूल ऑफ सोशल सायन्स.
- स्कूल ऑफ सोशल सायन्स, एम.लिब.ॲण्ड इन्फॉ.सायन्स.
- स्कूल ऑफ लाईफ सायन्स.
- स्कूल ऑफ केमिकल सायन्स.
- स्कूल ऑफ फिजिकल सायन्स.
- स्कूल ऑफ अर्थ सायन्स.
- मास्टर ऑफ एज्युकेशन.
- स्कूल ऑफ लँग्वेज ॲण्ड लिटरेचर (एम.ए.इन्जि.)

**आधार :** वार्षिक अहवाल स्वा.रा.तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, २००८

Maharashtra State Gazetteers

## तक्ता क्रमांक ६

## नॅक प्रमाणित नांदेड जिल्ह्यातील महाविद्यालये : सन २००८ - २००९.

| अ.क्र. | महाविद्यालयाचे नाव | स्थापना वर्ष | नॅक ग्रेड |
|---|---|---|---|
| ०१ | यशवंत महाविद्यालय, नांदेड | १९६३ | A |
| ०२ | सायस महाविद्यालय, नांदेड | १९६३ | A |
| ०३ | पीपल्स कॉलेज, नांदेड | १९५० | B++ |
| ०४ | प्रतिभा निकेतन महाविद्यालय, नांदेड | १९७२ | B++ |
| ०५ | शारदा भवन ए.सो.चे. अध्यापक महाविद्यालय, नांदेड | १९८६ | B++ |
| ०६ | नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालय, नांदेड | १९७१ | B+ |
| ०७ | के.आर.एम. महाविद्यालय, नांदेड | १९८९ | B+ |
| ०८ | लालबहादूर शास्त्री महाविद्यालय, धर्माबाद | १९६७ | B+ |
| ०९ | देगलूर महाविद्यालय, देगलूर | १९६३ | B+ |
| १० | वसंतराव नाईक महाविद्यालय, वरसणी, नांदेड | १९८९ | B |
| ११ | श्रीमती इंदिरा गांधी बी.एड महाविद्यालय, नांदेड | १९९० | B |
| १२ | पानसरे महाविद्यालय, अर्जापूर | १९७२ | C++ |
| १३ | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शंकरनगर | १९९७ | C++ |
| १४ | बळीराम पाटील महाविद्यालय, किनवट | १९७२ | C++ |
| १५ | ग्रामीण महाविद्यालय, वसंतनगर, मुखेड | १९९१ | C++ |
| १६ | महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, मुखेड | १९७२ | C++ |
| १७ | शाहीर अण्णाभाऊ साठे महाविद्यालय, मुखेड | १९९० | C++ |
| १८ | सरस्वती विद्यामंदीर कला महाविद्यालय, किनवट | १९९० | C++ |
| १९ | जवाहरलाल नेहरू सोशलवर्क महाविद्यालय, नांदेड | १९९२ | C++ |
| २० | शरदचंद्र पवार महाविद्यालय, नायगाव | १९८४ | C+ |
| २१ | श्री शिवाजी महाविद्यालय, कंधार | १९५९ | C+ |
| २२ | दत्त कला व वाणिज्य महाविद्यालय, हदगाव | १९८९ | C+ |
| २३ | नारायणराव चव्हाण विधी महाविद्यालय, नांदेड | १९७० | C |
| २४ | दिगंबरराव बिंदु महाविद्यालय, भोकर | १९८९ | C |
| २५ | श्री गुरू गोविंदसिंहजी अभियांत्रिकी महा., नांदेड | १९८१ | NBA |
| २६ | महात्मा गांधी अभियांत्रिकी महाविद्यालय, नांदेड | १९८४ | NBA |
| २७ | कॉलेज ऑफ फिजीकल एज्युकेशन, नांदेड | १९८५ | C |

**संदर्भ : वार्षिक अहवाल**, स्वा.रा.ती. मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

Maharashtra State Gazetteers

## तक्ता क्रमांक ७

## माता व बाल संगोपन लसीकरण कार्यक्रम

| क्र. | बाब | १९९०-९१ | | | १९९४-९५ | | | २०००-२००१ | | | २००४-२००५ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | उद्दिष्ट | साध्य | टक्केवारी | उद्दिष्ट | साध्य | टक्केवारी | उद्दिष्ट | साध्य | टक्केवारी | उद्दिष्ट | साध्य | टक्केवारी |
| १ | ट्रिपल/पोलिओ त्रिगुणी लस | ४६,६०० | ५२,९२९ | ११४ | ६२,००० | ५९,८२० | ९६ | ७५,६४० | ७६,०७४ | १०१ | ५७,९१३ | ५९,४१४ | १०३ |
| २ | गोवर/जीवासत्व-अ | ४६,६०० | ५०,६१७ | १०९ | ६२,००० | ५५,५४० | ९० | ७५,६४० | ७३,७७१ | ९८ | ५७,९१३ | ५६,०९७ | ९७ |
| ३ | ट्रिपल/पोलिओ बुस्टर | ५०,७५६ | ५०,२२२ | १०२ | ५८,१४० | ४९,२९८ | ८५ | ७२,२३६ | ६७,४८४ | ९३ | ५९,९०६ | ५५,७७३ | ९३ |
| ४ | टि.टि.ए.एन.सी. | ४९,८०० | ५५,८०९ | ११२ | ६८,००० | ६५,०७५ | ९६ | ८३,२०४ | ७६,५४७ | ९२ | ६५,०१५ | ६०,९६० | ९४ |
| ५ | बी.सी.जी. | ४६,६०० | ५८,१४८ | १२५ | ६२,००० | ६७,१२० | १०८ | ५,६४० | ७८,०१९ | १०३ | ५७,९१३ | ५८,५४४ | १०१ |
| ६ | माता | ७२,२०० | ७२,९५७ | १०१ | ६८,००० | ५१,४९७ | ७६ | ४१,६०२ | ५५,४५७ | १३३ | ३२,७५८ | ३३,९६५ | १०४ |
| ७ | बालके | ४६,०८० | ८२,१५७ | १७८ | १,४०,३८० | ९९,३७१ | ७१ | १,४२,१८० | १,२२,७०५ | ८६ | ८१,८२४ | ८२,८९६ | १०१ |
| ८ | डी.टी. | ३८,८०० | ५१,२६१ | १३२ | ५७,६०० | ३६,०३६ | ६३ | ६५,४०३ | ६२,८०८ | ९६ | ५८,४१५ | ५७,७४७ | ९९ |

**आधार :** जिल्हा आरोग्यधिकारी, जिल्हा परिषद नांदेड, कडील माहिती.

Maharashtra State Gazetteers

# नांदेड जिल्हा गॅझेटिअर

## प्रकरण ११
## संस्कृती

Maharashtra State Gazetteers

प्रकरण ११

# संस्कृती*

नांदेड जिल्ह्याचे प्राचीनत्व सर्वमान्य आहे. भौगोलिकदृष्ट्या मराठवाड्यातील हा जिल्हा भाषावार प्रांत रचनेनंतर म्हणजे दिनांक १ नोव्हेंबर १९५६ नंतर मुंबई राज्यात आणि १९६० पासून महाराष्ट्रात समाविष्ट केला गेला असला तरी दीर्घकाळपर्यंत तो निजाम राज्याचा भाग होता. गोदावरीच्या काठी या जिल्ह्याचे केंद्रस्थान वसलेले असल्याने नांदेड शहराचे पारंपरिकरीत्या धार्मिक महत्त्वही मानले गेलेले आहे. गोदावरीचे नाभीस्थान म्हणूनच या शहराला ओळखले जाते. हा जिल्हा भारताच्या भूगोलात मध्यवर्ती ठिकाणी असल्याने त्या त्या काळातील राजांच्या आपापसातील लढायांपासून अलिप्त राहिलेला आहे.

जवळपास सातशे वर्षे म्हणजे १३ वे ते २० वे शतक या दीर्घकाळात मुस्लिमांशिवाय अन्य धर्मियांची राज्यव्यवस्था या भागाला माहीत नव्हती. परिणामी या प्रदेशावर मुस्लिम संस्कृतीचे, सुफी संप्रदायाचे खोलवर परिणाम झालेले दिसून येतात. त्यामुळे सतत वंचित राहिलेला हा प्रदेश गुणवत्ता असूनसुद्धा मागासलेलाच राहिला.

मराठवाड्याची जडणघडण देवगिरीच्या यादवांच्या काळात झाली असली, तरी त्याची पायाभरणी सातवाहन काळापासून सुरू होती. प्राचीन ग्रंथातील उपलब्ध संदर्भानुसार ऋग्वेदातील दक्षिणापथात, महाभारतातील दण्डकारण्यात व रामायण आणि मत्स्यपुराणातील दक्षिणापथात मराठवाड्याचा प्रदेश सामावलेला होता. सौधलाच्या 'उदयसुंदरी' कथेतून या परिसराचे उल्लेख येतात. ऐतिहासिकदृष्ट्या 'मराठवाडा' हे नाव फारसे जुने नाही. निजामाच्या संस्थानातील वऱ्हाडचा भाग वगळला गेल्यानंतर मराठी भाषिक बहुसंख्य असलेल्या या प्रदेशाला 'मराठवाडा' असे संबोधत असल्याचा उल्लेख १८६४ नंतर आढळतो. काही संशोधकांच्या मते 'मराठवाडा' या शब्दातील 'मराठ' हे पूर्वपद 'महाराष्ट्र' या संस्कृत शब्दाचे अपभ्रंश रूप आहे. त्याचे उपपद 'वाडा' हे 'वाटक' या संस्कृत शब्दाचे तद्भव आहे. प्राचीन काळात दक्षिण भारतात प्रांतिक प्रशासन विभागाला 'वाडा' किंवा 'वाडी' ही उपपदे लावण्याची प्रथा होती. अर्थात त्यामुळे मराठवाडा या भौगोलिक प्रदेशाचे महत्त्व कमी जास्त होत नाही. कारण या भागाचे भौगोलिकदृष्ट्या एक वैशिष्ट्यपूर्ण स्थान होते.

## ऐतिहासिक वारसा

सम्राट अशोकाच्या कारकिर्दीपूर्वी मराठवाड्यात बौद्ध धर्माचा प्रसार झालेला दिसतो. बौद्ध धर्माच्या स्थापनेनंतर अत्यंत कमी काळात या धर्माचे अनुयायी देशभर पसरले. या अनुयायांत बावरी नावाचे एक व्युत्पन्न ब्राह्मण पंडित प्रवजित झाले. ते कोसल प्रदेश प्रसेनाजितांचे पुरोहित होते. शाक्य

*. या भागाचे लेखन श्री. स. दि. महाजन, निवृत्त प्राचार्य, प्रतिभा निकेतन महाविद्यालय, नांदेड यांनी केले आहे.

कुळाचे राज्य कोसल देशास सलग होते. बौद्धधर्म स्वीकारल्यानंतर बावरी हे आपल्या अनेक शिष्यांसह उत्तरपथाने दक्षिणापथ येथे आले आणि गोदावरीच्या किनारी आश्रम उभारून राहू लागले, असा उल्लेख 'सूतनिपात' या ग्रंथातील 'परायणवग्ग' या प्रकरणात वथ्थुगाथेमध्ये आहे. बावरींचा आश्रम गोदावरी नदीच्या काठी म्हणजे नांदेडला असावा.

मध्यप्रदेशातील सांची येथील स्तुपाच्या उभारणीसाठी नांदेड नगरीतील व्यापारी व उपासकांनी सर्वात अधिक दान दिल्याचा उल्लेख तेथील दानशिलालेखात असून त्यात त्या सर्व दान देणाऱ्या श्रेष्ठींची नावे दिलेली आहेत.[१] नांदेडच्या सांस्कृतिक महत्त्वाची यावरून कल्पना यावी. अशोकपूर्व काळात बावरी यांनी केलेले कार्य प्राचीन काळातील नांदेडचे महत्त्व वाढवणारे ठरेल. बावरींच्या स्मृतिप्रीत्यर्थ नांदेडपासून १० कि.मी. अंतरावर दाभड येथे महाविहार बांधण्यात आलेला असून दरवर्षी येथे बौद्ध धम्म परिषद भरविली जाते. जानेवारी महिन्याच्या पहिल्या आठवड्यात या ठिकाणी मोठ्या संख्येने उपासक सहभागी होतात.[२] यावरून बावरी यांचे स्थान नांदेडच्या सांस्कृतिक वैभवात उपलब्ध पुराव्यांनुसार सर्वात प्राचीन आहे.

मौर्यपूर्व काळात प्रतिष्ठान ही नंदांची दक्षिणेकडील राजधानी होती आणि नांदेड हे त्यावेळी 'नंद आहार' म्हणजे नंदांचा जिल्हा म्हणून विख्यात होते. विश्वेश्वर अंबादास ऊर्फ तात्यासाहेब कानोले यांनी तर नांदेड शहर हे नवनंदाच्या टेकड्यांवर वसलेले शहर आहे, असे आग्रहाने प्रतिपादन केले आहे. मौर्य राजवटीच्या उदयानंतर कदाचित नंद राजे या भागात राहिले असतील असाही तर्क सांगितला जातो, पण त्याला पुरावा नाही. गुणाढ्यांची 'बृहतकथा', राजा हालाची 'गाथा सप्तशती' ही सातवाहन काळात लिहिली गेली. संस्कृत बरोबरच पाली, प्राकृत, पैशाची या भाषांचाही विकास झाला. नांदेड परिसरात सातवाहनकालीन नाणी सापडली आहेत.

एकाप्रकारे सातवाहन काळात एक औद्योगिक क्रांतीच झालेली होती आणि नागरीकरणाचा विकास झाला होता. इतिहासकार सातवाहनाच्या कालखंडाला महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाचा आरंभ मानतात. या सांस्कृतिक जीवनाची सुरुवात गोदावरीच्या परिसरात झाली हे मुद्दाम नमूद केले पाहिजे.

'महाराष्ट्र आणि गोव्याचा ऐतिहासिक भूगोल' (Historical Geography of Maharashtra and Goa.)[३] या ग्रंथात नांदेडसंबंधी दिलेली माहिती मौलिक व महत्त्वाची आहे. सांचीच्या स्तुपावर जवळपास २३ बौद्ध भिक्खूंची नावे आढळून आली असून हे सर्वजण नंदीनगर येथून दान अर्पण करण्यासाठी आल्याचा उल्लेख आहे. हे नंदीनगर किंवा नंदीकड म्हणजे नांदेड. यावरून सातवाहन काळात नांदेड शहर व परिसर बौद्ध धर्माचे एक मुख्य केंद्र होते. तसेच या सर्व पुराव्यांआधारे नांदेडचा

१. केतकर, श्री. व्यं., 'प्राचीन महाराष्ट्र', भाग २, पृ. क्र. ८९ यात पालीभाषेतील सांचीलेख आणि त्याचे मराठी लेखन दिलेले आहे.

२. सत्यपाल भदंत आणि प्रा. गायकवाड (अनु.), **पुत्तानिपात,** केतकर, उपरोक्त, **महाराष्ट्र संस्कृती कोश**, खंड तिसरा, नियतकालिके व दैनिके.

३. हरिहर ठोसर, **'हिस्टॉरीकल जिओग्राफी ऑफ महाराष्ट्र ॲण्ड गोवा'**.

उत्तर भारताशी घनिष्ठ संबंध होता, हेही स्पष्ट होते. 'नगर' या शब्दाची जागा पुढे वाकाटकांच्या काळात 'कड' या शब्दाने घेतली तर त्याहीपुढे बदामीच्या चालुक्याच्या काळात 'नंदपाळ' आणि राष्ट्रकूट व कल्याण चालुक्याच्या काळात 'नंदीतट' असे रूपांतर झाले. या सर्व शब्दांत 'नंदी' हा शब्द वापरला गेला आहे. 'नंदी' आणि 'नदी' या दोन शब्दांत फरक करायलाच हवा. या भागात शैव पंथियांची सुद्धा संख्या मोठ्या प्रमाणात असली पाहिजे. कारण नंदी हे शिवाचे वाहन असून तो गणनायकही आहे.[४] रॉय चौधरी यांच्या मते नांदेड या शब्दाचे मूळ रूप नवनंदाशी निगडीत आहे. भारत स्तुपाच्या एका शिलालेखात 'बिंबिका नंदीकटक' असा या शहराचा उल्लेख आढळतो.

वाशिमला सापडलेल्या इसवीसनाच्या चौथ्या शतकातील ताम्रपटात नांदेडचा उल्लेख 'नंदीतट' आणि 'नंदीतरू' या शब्दांनी केलेला आढळतो. वाकाटक राजांपैकी बहूतेक साहित्याचे आश्रयदाते होते. वाकाटकांच्या काळात नांदेड हे राजकीय चळवळीचे महत्त्वाचे केंद्र होते.

वाकाटकांची राजवट विस्कळीत झाल्यानंतर चालुक्यांचे घराणे उदयाला आले. बदामीचे पूर्वकालीन पश्चिमी चालुक्य मराठवाड्यावर वाकाटकानंतर राज्य करीत होते. हे दक्षिणेतील राजघराणे. दक्षिण भारताच्या इतिहासात चालुक्य वंशाचे स्थान महत्त्वपूर्ण आहे. या चालुक्यांचे संस्कृत भाषेतील परंतु कन्नड लिपीतील किंवा हळकन्नड लिपीतील कित्येक शिलालेख नांदेड जिल्ह्यात सापडलेले आहेत. इतर सर्व प्राचीन सत्तांच्या तुलनेत राष्ट्रकूटांचा मराठवाड्यातील प्रभाव विशेषत्वाने जाणवतो. तीनशे वर्षांपेक्षाही अधिक काळ हे घराणे अस्तित्त्वात होते. सातवाहन, वाकाटक इत्यादी राजघराण्यांचा जसा संपूर्ण इतिहास उपलब्ध होत नाही, तसाच राष्ट्रकूटांचाही इतिहास उपलब्ध नाही. मात्र राजस्थानपासून तुंगभद्रेपर्यंत या राष्ट्रकूटांचे उल्लेख सापडतात.

स्वतःला यदुवंशीय मानणारे राष्ट्रकूट मूलतः कंदाहारपूर आणि लत्तलूरपूरचेच आहेत हे आता सिद्ध झाले आहे. राष्ट्रकूट नृपती सौंदत्तीच्या ताम्रपटात राष्ट्रकूट राजाचा उल्लेख 'कंधारपूरवराधिश्वर' आणि 'लत्तलूरपूराधीश' असा करण्यात आला आहे. या आधारेच डॉ. फ्लिट यांनी त्यांना लातूरचे ठरविले. सन १९५० साली डॉ. डी. सी. सरकार आणि भट्टाचार्य यांनी नांदेड जिल्ह्यातील कंधार या तालुक्याच्या गावी मिळालेल्या राष्ट्रकूटांच्या एका शिलालेखाआधारे कंधार हीच राष्ट्रकूटांची राजधानी होती हे प्रतिपादन केले आणि ते आता सर्वमान्य झाले आहे.

तिसऱ्या अमोघवर्षाचा मुलगा कृष्ण तिसरा याने पुन्हा एकदा आपले श्रेष्ठत्व प्रस्थापित केले. कृष्ण तिसरा (इ.स. ९३९-९६८) यानेच नांदेड जिल्ह्यातील कंधार येथे आपली राजधानी निर्माण करून स्वतःला 'कंधारपूरवराधिश्वर' अशी उपाधी लावली. वेरूळ, लातूर आणि कंधार या बरोबरच पुढे मान्यखेड ही सुद्धा एक राजधानी झाली. मात्र कंधारचे महत्त्व राष्ट्रकूटांनी सदैव मानले. साधारणपणे इसवी सनाच्या आठव्या शतकात कंधार अस्तित्त्वात आले. त्याचे नावसुद्धा तिसऱ्या कृष्णावरून ठेवलेले दिसते. इसवीसनाच्या चौथ्या शतकात आनंद राजा दामोदरवर्मन हा येथे राज्य करीत असल्याचा ठोसरांनी आपल्या पुस्तकात उल्लेख केला आहे. कंधारला कालप्रियनाथाचे मंदिर आहे, त्या कालप्रियनाथाच्या मंदिराला एक दीर्घ परंपरा आहे. असे मानले जाते की, भवभूती हा प्रसिद्ध

४. रायचौधरी, एच. सी., '**पॉलिटिकल हिस्टरी ऑफ एन्शंट इंडिया**'.

नाटककार नांदेडजवळच्या उमरी या गावचा रहिवाशी होता. त्याने आपली नाटके या कालप्रियनाथाच्या मंदिराच्या भव्य सभामंडपात सादर केली होती. या मंदिरात नृत्य, नाट्य, संगीत यांची साधना चालत असे याचेही पुरावे उपलब्ध होऊ लागले आहेत.[५]

राष्ट्रकूटांनी आरंभी नांदेड शहराजवळ गोदावरी काठी रत्नागिरीच्या डोंगरावर आपली राजधानी उभारण्याचा निर्णय घेतला. तो निर्णय अर्धवट सोडून ते कंधारला गेले. कारण चहूभोवताली असणाऱ्या टेकड्या, निसर्गरम्य वातावरण, जलतुंग समुद्र नावाचे सरोवर ही सगळी निसर्गमोहक स्थळे राज्यकर्त्यांना आवडली असावीत. मन्याड नदीच्या काठी बांधलेला अप्रतिम किल्ला आजही त्या गतवैभवाची साक्ष देत उभा आहे.

पुढे दुबळ्या झालेल्या या राष्ट्रकूट घराण्याचा फायदा उत्तर कल्याणीच्या चालुक्यांनी घेतला. या चालुक्यांची राजवट ९७४ ते ११९० पर्यंत अस्तित्त्वात होती आणि मराठवाडा विशेषतः नांदेड जिल्हा या चालुक्यांच्या नेतृत्वाखाली आला याचे अनेक पुरावे आज उपलब्ध आहेत. कल्याणच्या चालुक्याचे प्रमुख कार्यक्षेत्र महाराष्ट्र व कर्नाटकात राहिले. नांदेड जिल्ह्यावर त्यांचे वर्चस्व होते. याचे पुरावे इतके दिवस सापडत नव्हते. आता इतिहास संशोधकांना एकट्या नांदेड जिल्ह्यात त्यांचे ४० शिलालेख सापडले आहेत. कल्याणीच्या चालुक्यांचे हे नांदेड जिल्ह्यातील उपलब्ध झालेले शिलालेख प्रामुख्याने देगलूर, मुखेड व बिलोली तालुक्यात सापडले असून भाषा संस्कृत असली तरीही लिपी मात्र हळकन्नड आहे. आजही देगलूर आणि मुखेड तालुक्यातील खेड्यापाड्यात कर्नाटक सीमेवर असल्याचे परिणाम खोलवर रूजलेले दिसतात. बिलोली तालुका आंध्राच्या तेलंगण भागातील सीमारेषेवर वसलेला असून त्याला सलग असलेला देगलूर व मुखेड तालुका मात्र कर्नाटक सीमारेषेशी जोडला गेला आहे. बदामी ही पूर्वीच्या चालुक्याची राजधानी विजापूर जिल्ह्यात येते. मात्र चालुक्यांची कल्याणी ही राजधानी मराठवाड्याच्या उस्मानाबाद जिल्ह्यातील उमरग्याजवळ येते. हे गाव देगलूर-मुखेडला निकटवर्ती आहे. नांदेड जिल्ह्यातील कित्येक मंदिरे या चालुक्यांच्या काळात निर्माण झाली आहेत. देगलूर तालुक्यातील होट्टल आणि करडखेड येथे तसेच तडखेल येथे सापडलेले सोमेश्वर चालुक्याचे शिलालेख इ.स. ९७४ च्या सुमारास असलेली ऐतिहासिक परिस्थिती विशद करतात. तडखेलचा शिलालेख १०७४ मधील आहे. कल्याणच्या चालुक्याच्या काळात नांदेड जिल्ह्याचा परिसर जसा अनेक मंदिरांनी विख्यात झाला होता, तसेच अनेक विद्यालयांनी सुद्धा त्या काळात लौकिक मिळविला होता. काही ठिकाणी चालुक्यांचे मांडलिक असणारे वण्ही व वाजी कुलाचे राजे वेगवेगळ्या ठिकाणी राज्य करीत होते. होट्टल, मिरखेल, एकलारे, सुगाव, करडखेड, तडखेल इत्यादी गावांना अतिशय महत्त्व प्राप्त झाले होते. चालुक्यांचा पराक्रमी सेनापती नागवर्मा याला सोमेश्वराने लग्नात इ.स. १०४७ मध्ये तडखेल हे गाव भेट दिल्याचा उल्लेख आहे. हा नागवर्मा केवळ धर्मनिष्ठच नव्हता, तर विद्याप्रेमीही होता. शेकडो ब्राह्मणांना त्याने घरे व जमिनी दान देऊन संस्कृतीची जोपासना करण्याची जबाबदारी सोपविली होती. एवढेच नव्हे, तर कालमुख संप्रदायाच्या वागेश्वर पंडिताच्या नियंत्रणाखाली काही विद्यालये स्थापून तसेच विद्यार्थ्यांच्या भोजनाची सोय करून शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून

५. महामहोपाध्याय मिराशींनी भवभूतीसंबंधी एक स्वतंत्र ग्रंथ लिहिला असून भवभूती हा मूळचा उमरखेडचा असावा असे नमूद केले आहे.

दिल्या होत्या. या चालुक्य घराण्यात एकापेक्षा एक कर्तबगार राजे झालेले दिसतात. तैल, सत्याश्रय, जयसिंह, जगदेकमल्ल, पहिला सोमेश्वर, तिसरा सोमेश्वर, विक्रमादित्य दुसरा या राजांनी अत्यंत कर्तबगारी दाखवून राज्य तर केलेच, परंतु चित्र आणि शिल्प याबरोबरच इतर सर्व कलांच्या विकासासाठी भरघोस प्रयत्न केलेले दिसतात.

वास्तविक चालुक्य हे राष्ट्रकूटांचे मांडलिक राजे होते. राष्ट्रकूटांच्या ऱ्हासानंतर पराक्रमाने ते शास्ते बनले. तडखेलच्या शिलालेखातील उल्लेखावरून पहिल्या सोमेश्वराने केलेला राज्यविस्तार माळवा, कोसल, कलिंग येथपर्यंत विस्तारला होता याची माहिती मिळते. दुसऱ्या विक्रमादित्याचे राज्य १०७६ ते ११२७ पर्यंत होते. याच्याच दरबारात 'विक्रमांकदेवचरित' हा ग्रंथ लिहिणारा बिल्हण आणि 'मिताक्षरी' हा ग्रंथ लिहिणारा विज्ञानेश्वर हे श्रेष्ठ विद्वान होते. या विज्ञानेश्वरांनीच याज्ञवल्क्य स्मृतीवर भाष्य लिहिले आहे. ते आजही प्रमाणित मानले जाते. त्याच्यानंतर तिसरा सोमेश्वर ११३८ पर्यंत राज्यावर होता. साहित्यक्षेत्रात राजकीय क्षेत्रापेक्षाही त्याने मौलिक कार्य केलेले दिसते. त्याचा 'मानसोल्लास' हा ग्रंथ प्रसिद्ध असून त्यात युद्धनिती, न्यायशास्त्र, राजकारण, ज्योतिष्यशास्त्र, अलंकारशास्त्र, चित्रकला इत्यादी विषयांवर माहिती दिलेली आहे. अंबेजोगाई जवळील धर्मापुरी येथे याचा शिलालेख उपलब्ध झाला असून त्यात इतर माहिती बरोबरच मराठवाड्यातील धार्मिक व सामाजिक जीवनाची माहिती देखील लिहिली गेली आहे. भारतातील विविध भागांतील अनेक व्यापारी, शिल्पज्ञ आणि कलावंत या भागात निमंत्रित व स्थिर करून चालुक्य राजांनी सामाजिक व सांस्कृतिक प्रतिष्ठा वाढविली. इ.स. च्या १२ व्या शतकाच्या शेवटी चालुक्यांची सत्ता संपुष्टात आली. ती कमकुवत होत असतानाच देवगिरीच्या यादवांनी आणि द्वारसमुद्रच्या होयसळ राजांनी चालुक्यांच्या सत्तेचे लचके तोडण्यास सुरुवात केली होती.

सातवाहन ते कल्याणीचे चालुक्य म्हणजे इ.स.पू. २३० ते १२ वे शतक अशा साधारण दीड हजार वर्षांच्या काळात नांदेड जिल्हा अतिशय महत्त्वपूर्ण कामगिरी बजावित होता. सातवाहन राजांनी एका वेगळ्या संस्कृतीची मुहूर्तमेढ मराठवाड्यात आणि नांदेड जिल्ह्यात रोवली. पराकोटीचे परिश्रम घेऊन त्यांच्यानंतर झालेल्या बदामीचे चालुक्य, वाकाटक, राष्टकूट आणि कल्याणीच्या चालुक्यांच्या आणि यादवांच्या काळात खूपच भरभराट झालेली दिसते. गेल्या अर्धशतकात उपलब्ध झालेले ऐतिहासिक पुरावे विशेषतः अनेक शिलालेख, संस्कृत, तेलुगु, कानडी, प्राकृत, महाराष्ट्री, पैशाची, पाली इत्यादी भाषांतील उपलब्ध झालेल्या ग्रंथांतून मिळालेली माहिती या काळातील इतिहास, सामाजिक आणि सांस्कृतिक विकास यावर खूप मोठा प्रकाशझोत टाकत असली, तरीही भारतभर आपल्या पराक्रमाचा दिग्विजय मिळविलेल्या या राजवटींचा सलग इतिहास शोधण्याचे काम मोठ्या प्रमाणावर शिल्लक आहे. डॉ. मोरवंचीकरांच्या मते, पराकोटीचे कष्ट घेऊनही लुप्त इतिहास जोडला जाऊ शकणे अवघड झाले आहे. याचे कारण नंतर आलेल्या परकियांच्या राजवटी हे तर आहेच, त्याबरोबरच सतत पडलेले दुष्काळ हे ही त्याला कारणीभूत आहेत.

गोदावरीच्या खोऱ्यात मौर्यपूर्व काळात होऊन गेलेल्या राजवटी समाज जीवनावर आपापले संस्कार रूजवून गेल्याच असल्या पाहिजेत. रामायण काळात या भागात झालेला बदल विलक्षण होता. काही इतिहासकारांनी रामायण काळाचे तपशील देताना दंडकारण्य म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या

भागात दाट जंगलांच्या आश्रयाने वाली सुग्रीवासारखे सुसंस्कृत, तर राक्षस या नावाने ओळखल्या जाणाऱ्या टोळ्या अस्तित्त्वात होत्या असे म्हटले आहे. रामचंद्राच्या रूपाने दक्षिणेत आर्यांचे आगमन झाले.

देवीप्रसादांचे लोकायत आणि 'In Defence of Materialism in Ancient India' तसेच देवराज चनाना यांचे 'Slavery in Ancient India' त्याचप्रमाणे कोसंबीचे 'An Introduction to Indian History' आणि 'Myth and Reality' या ग्रंथातून त्या काळातील समाज परिस्थितीची तार्किक पद्धतीने केलेली मांडणी लक्षात येऊ शकते. अरविंद घोषांनी 'The Foundation of Indian Culture' या ग्रंथात भारतीय संस्कृतीचे केलेले ऐतिहासिक विश्लेषण या परिस्थितीवर प्रकाश टाकते. कुठलीही संस्कृती ही एकाएकी निर्माण होत नाही. अनेक प्रहार सोसत तिच्यात झालेले बदल समजूनच घ्यावे लागतात. महाभारताचे युद्ध इ.स.पू. ३१०१ मध्ये झाले असावे, असे चिंतामणराव वैद्यांनी म्हटले आहे. या महाभारत युद्धात कौरव पांडवाच्या बाजूने ज्या राजवटी सामील झाल्या त्यात दक्षिणेतील राजवटीसुद्धा अनेक होत्या. उपनिषदोत्तर कालखंडात जैनांमध्ये झालेले महावीर वर्धमानांसह २३ तीर्थंकर देशभर भ्रमंती करीत प्रभाव निर्माण करीत होते. तद्वतच महात्मा गौतम बुद्धांपासून प्रेरणा घेऊन हजारो बौद्ध स्त्री-पुरूष भिक्षू यांचीही भ्रमंती सुरू होती. मौर्यांच्या काळापर्यंत जैन आणि बौद्धांचा प्रभाव समाजाच्या फार मोठ्या घटकांवर पडला. त्यांच्याबरोबर कपिल व चार्वाक यांचा निरीश्वरवाद आणि तांत्रिकांचा प्रभावसुद्धा समाजात होताच. म्हणजे वैदिक, बौद्ध, जैन, तांत्रिक आणि लोकायत यांच्या अनुयायांनी समाज जीवन वेढलेले होते. मराठवाड्यात या सर्वांचाच प्रभाव आढळतो. नांदेड जिल्ह्यात अनेक ठिकाणी ऐतिहासिक कालखंडातल्या जैन तीर्थंकरांच्या मूर्ती सापडलेल्या आहेत. तथागताच्या मूर्तीचे व स्तुपाचे अवशेष सापडले आहेत. त्याचप्रमाणे तांत्रिकांची केंद्रस्थानेही अनेक ठिकाणी आढळलेली आहेत. नागसंस्कृतीचाही जसा प्रभाव आहे तसाच आदिवासींच्या आणि भटक्यांच्या वस्त्याही विमुक्त अवस्थेत आजपर्यंत शिल्लक आहेत. सांचीच्या बौद्ध स्तुपावर असलेला लेख श्रीधर व्यंकटेश केतकरांनी 'प्राचीन महाराष्ट्र, भाग दुसरा' या ग्रंथात विस्ताराने देऊन नांदेड नगरीतील अनेकांनी दिलेल्या दानाचा उल्लेख मुद्दाम केला आहे.[६] केतकरांच्या मते भारतातून सांची लेखाच्या काळात दाने देणारे सर्वात जास्त लोक उज्जैनीचे आहेत. त्या खालोखाल नंदीनगर म्हणजे नांदेडचा क्रम लागतो. हा काळ इ.स. पूर्व तिसरे शतक आहे. बहुतेक हा काळ सातवाहन राजा सिमुक यांच्या राजवटींशी जोडता येईल. वास्तविक सिमुक सातवाहन संकर्षणपूजक आणि यज्ञधर्मीय होता. राजा बौद्ध नसतानाही किंबहुना भागवतधर्मीय असूनही इतके लोक बौद्ध संस्थेस दान देण्यासाठी जातात याचा अर्थ बौद्धांची प्रतिष्ठा राजांना मान्य होती, असा काढता येऊ शकतो. परधर्मसहिष्णुतेचाही भाग यात असू शकेल. जैनांच्या दोनही दिगंबर व श्वेतांबर या पंथांची अनेक पूजास्थाने, तीर्थंकरांच्या मूर्ती, स्तंभ मोठ्या प्रमाणात मराठवाड्यात आढळतात.

सर्वसाधारणपणे वैदिक हिंदू, जैन, बौद्ध, तांत्रिक इत्यादींच्या तत्वज्ञानाचा या जिल्ह्यावर प्रभाव दिसतो. प्राचीन काळातील समाजव्यवस्था वर्णांवर आधारित होती. हे चातुर्वर्ण्य आता अस्तित्त्वात

---

६. केतकर, श्री. व्यं., '**प्राचीन महाराष्ट्र**', भाग दुसरा, पृ. ८८-९६.

नाहीत. फार पूर्वीपासून व्यवसायानुसार जाती-जमातींचे निर्माण झालेले गट दीर्घकाळ अस्तित्त्वात दिसतात. धर्मबदल किंवा जातीबदल हा बदललेल्या राजवटीच्या संदर्भात झालेला असणे शक्य आहे. मुस्लिमपूर्व काळात जैन-बौद्ध-हिंदू अशी एकमेकांतील पंथीय परिवर्तने गृहीत धरावी लागतील. धर्मबदल झालेला असूनही परंपरेने चालत आलेले काम यावरच उपजीविका अवलंबून होती. म्हणून या जिल्ह्यात अनेक जाती-जमाती आहेत. जातीची निर्मिती हा एक स्वतंत्र विषय आहे. महाभारत युद्धोत्तर काळात समाजात झालेली परिवर्तने, परकियांचे हल्ले, दुष्काळ, भूकंप अशा नैसर्गिक आपत्तींमुळे लोकसंख्या घटली. त्याचे परिणाम म्हणून झालेले जातपातविरहित विवाह याबाबीही विचारात घ्याव्या लागतील. अभ्यासकांच्या मते जातीसंस्था निर्माण होण्याची प्रक्रिया इ.स. पूर्व दीड हजार वर्षे अगोदर सुरू झाली असली पाहिजे. यातही भिन्न भिन्न मते आहेत. मनुस्मृती लिहिणारा मनू एकच होता काय, हाही वादविषय आहे. वैदिकांची तसेच रामायण, महाभारत अशा आर्ष महाकाव्यांचे परिणाम अगदी लहानातल्या लहान खेड्यांपाड्यांपर्यंत कसे पोचले असतील, हे ही विचार करण्यासारखे आहे. विष्णु, शंकर, राम, कृष्ण याबरोबरच गणपती, हनुमान आणि दत्तात्रय पूजा हा या समाजाच्या श्रद्धेचा आधार होता. समाज प्रामुख्याने पापभीरू होता, आत्मसंतुष्टी होता. पंचमहाभूतांच्या म्हणजे पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश यांच्या शक्ती आणि प्रभावाची वैज्ञानिक चिकित्सा करण्याची क्षमता कमी असलेला समाजगट आपापल्या ठराविक उत्पन्नात समाधान मानीत असल्याने तुरळक श्रीमंती आणि उदंड दारिद्र्य या आर्थिक व्यवस्थेत समाधान मानणारा होता. बहुतेक व्यापार जीवनावश्यक वस्तूंचा, वस्त्र-दागिन्यांचा असे. एक विशिष्ट वर्ग सोडला, तर उर्वरितांच्याकडे मातीची भांडी असत. सोने, रूपे, तांबे, पितळ आणि लोह हे प्रमुख धातू होते. बरी परिस्थिती असणाऱ्यांची वस्त्र प्रावरणे प्रामुख्याने सुती व रेशमी असत. थंडी वाऱ्यापासून बचाव करण्यासाठी लोकरीचा वापर असे. संयुक्त कुटुंबपद्धतीमध्ये तीन पिढ्यांपर्यंतचे लोक असत. कुस्त्या, मल्लखांब यासारखे खेळ आणि मनोरंजनाच्या साधनांत संगीत वाद्यवादन याबरोबरच नृत्य असे. कोरडवाहू जमिनीत खरीप आणि रब्बी अशी वाटणी झालेली असे. बहुतेक पावसाच्या पाण्यावर निघणारी पिके, पालेभाज्या, रानफळे आणि तुरळक अशा नदीतळी किंवा विहिरीच्या पाण्यावर अवलंबून असलेल्या शेतीतून मिळणाऱ्या फळे, भाज्या आणि भरपूर दुभती जनावरे यामुळे दुधाचे पदार्थ हा आहाराचा भाग असे. बांधलेले रस्ते, शिक्षणाच्या सोयी असा प्रकार फारसा नव्हता. त्यामुळे ज्या भागात जे पैदास होई तोच त्या भागात उपजीविकेचा आधार असे. अक्षर, आकडे ओळख, धर्मग्रंथाचे पाठांतर यांचे प्रमाण जास्त होते. मात्र ज्योतिष्यशास्त्र, खगोलशास्त्र, युद्धशास्त्र, नितीशास्त्र, विविध कलांचा अभ्यास कमी प्रमाणात का होईना उपलब्ध होता. विवाहाच्या पद्धती पारंपरिक होत्या. अगदी इसवी सनाच्या ११ व्या शतकापर्यंत ब्राह्म, दैव, आर्ष, राक्षस, प्रजापत्य, असूर, पैशाच, गांधर्व असे विवाहाचे प्रकार अस्तित्त्वात होते. अर्थात त्या सर्वात ब्राह्म विवाह पद्धत अधिक प्रचलित होती. विवाह संस्कार आपापल्या धर्मानुसार केले जात. स्त्रियांचे महत्त्व मान्य केले जात होते; मात्र स्थान दुय्यमच होते. तीर्थयात्रा हा विरंगुळा होता. पण पंचक्रोशीत राहून जगणे ही मर्यादा सांभाळली जायची. त्यामुळे बारा कोसांतच नातीगोती असायची. शेती बैलांच्या आधारे केली जायची, घोडा आणि बैलगाडी ही वाहतुकीची प्रमुख साधने मानली जायची. घोडा बाळगणारा माणूस प्रतिष्ठित असे. मुखेड, देगलूरच्या

काही भागात तिकोनी दगडांचा भाग असल्याने उंट आणि सांडणी प्रवास वाहतुकीसाठी वापरले जायचे. मंदिराच्या ठिकाणी वार्षिक यात्रा भरविली जायची. १०-१२ खेड्यांतून एखाद्या केंद्रठिकाणी जीवनावश्यक वस्तूंचा बाजार भरवला जायचा. धातूची नाणी व्यवहारासाठी वापरली जायची. खेड्यांपाड्यांतून मात्र वस्तूंची अदलाबदल हाच चलनाचा भाग होता. आरोग्य प्रामुख्याने औषधी वनस्पती व आयुर्वेद औषधी याआधारे सांभाळले जायचे. वैद्य पारंपरिक असायचे. अनेक आजारांचा शोधही लागायचा नाही. त्यामुळे आयुष्यमर्यादा खूपच कमी असायची. ओला सुका दुष्काळ आणि प्रचंड प्रमाणावर येणाऱ्या साथी, भूकंप यात समाज भरडून निघायचा. ईश्वरावर श्रद्धा आणि साधुसंतांवर निष्ठा हा जगण्याचा मानसिक आधार मानला जायचा. मुद्रणकला माहीत नव्हती. हस्तलिखिते व पाठांतर या आधारे प्राचीन तत्त्वज्ञान पिढ्यानपिढ्या जपले गेले. तीर्थयात्रेनिमित्त आणि व्यापारानिमित्त नांदेड परिसरातले लोकही प्राचीन काळापासून भ्रंमती करीत होते. आंतराष्ट्रीय व्यापारातही ते गुंतले होते. सातवाहनकालीन इंडो रोमन व्यापाराचे कैक पुरावे उपलब्ध झाले आहेत. जलव्यापार ज्या मार्गाने होत असे, तो मार्ग सोपाऱ्यापासून तेरपर्यंत होता. सातवाहनांच्या कारकिर्दीतील ३० मोठ्या शहरांत मराठवाड्यातील जी शहरे येतात त्यात तेर बरोबरच नंदीनगर म्हणजे नांदेड, भोगवर्धन इत्यादी शहरांचा समावेश असावा. व्यापार वाढावा म्हणून देशातील व्यापारी परंपरा असलेले गुजराथी, राजस्थानी लोकांना आवर्जून निमंत्रणे देऊन तत्कालीन राजांनी बोलावून घेतले. सैन्यात भरती करताना सुद्धा लढवय्ये म्हणून प्रसिद्ध असलेले जाट, रजपूत, पंजाबी आणले गेले. हे सर्वजण येताना आपापली संस्कृती, भाषा आणि परंपरा घेऊन आले. आजतागायत हे लोक या परंपरा, संस्कृती आणि भाषा जपत आले. मारवाडी किंवा गुजराथी समाज देश किंवा परदेशात जिथे कुठे गेला तिथल्या संस्कृतीशी मिळून मिसळून गेला. मात्र आपल्या स्वतःच्या घरात आल्यानंतर आहार, विहार, विवाहपद्धती, भाषा आणि संस्कृती त्यांनी काळजीपूर्वक जोपासली. या बाबतीत स्त्रियांचा वाटा अत्यंत महत्त्वाचा आहे.

कृष्ण यादवांच्या परंपरा सांगणाऱ्या अहिर गवळ्यांनी आजपर्यंत आपली जनावरे सांभाळण्याचा आणि दूध पुरवठ्याचा व्यवसाय सांभाळलेला आहे. वडार समाजाच्या दोन जाती, माती वडार आणि दगड वडार ग्रामीण तेलुगूत बोलतात. गाढवांच्या आधारे सामानांची ने-आण व इतर श्रमांची कामे करणारा कैकाडी समाज दाक्षिणात्य भाषांची हिंदी व त्या त्या भाषेशी मिश्रण करून काही भागात तामिळी तर काही भागात तेलुगू, काही भागात कानडी असा मिश्र भाषासंकर परंपरेने बोलत आला आहे. अठरापगड, बारा बलुतेदार आणि छप्पन्न लोकांची बोलीभाषा मराठी होती. संस्कृत ही विद्वान ब्राह्मणांची लिहिण्यावाचण्याची भाषा होती; तर भटपण करणारे, श्रमिकाचे काम करणारे, शेती करणारे ब्राह्मण लेखनासाठी संस्कृत व बोलण्यासाठी मराठी वापरत. सातवाहनांच्या काळात संस्कृतपेक्षाही प्राकृतचे महत्त्व जास्त होते. हालाच्या गाथासप्तशती प्राकृतातील महाराष्ट्री वाङ्मय मात्र टिकले. मागधी आणि शौरसेनी या भाषेतही वाङ्मय लिहिले गेले.

जुने जैन वाङ्मय अर्धमागधीत आणि काही महाराष्ट्रीत होते. काही प्राकृतामध्ये सुद्धा होते. बौद्धांनी महाराष्ट्री भाषेस महत्त्व दिले नाही. प्रामुख्याने त्यांचे वाङ्मय पाली भाषेत होते. पुढे ते सर्वच भाषांत उपलब्ध झाले. संस्कृतही ब्राह्मणांपुरती मर्यादित राहिली. उरलेल्या समाजाने आपापल्या भाषा

टिकवल्या. हीच परिस्थिती नांदेड जिल्ह्याची होती. या जिल्ह्यातही मराठी भाषा ही बहुसंख्य समाजाची भाषा होती. अर्थात तिचे स्वरूप लिखित नव्हते, बोलीभाषेच्या स्वरूपात होते. त्यामुळे ती शास्त्रशुद्ध नव्हती. नामदेवाने ज्ञानेश्वरांचा गौरव करताना समाधीच्या अभंगात ज्ञानेश्वरी मराठीत लिहिली म्हणून 'छपन्न भाषेचा केलासे गौरव' असे म्हटले असून त्यामागे गोरगरीब श्रमिकांची मराठी संवादभाषा होती, असे सांगितले आहे.

सातवाहन, वाकाटक, राष्ट्रकूट, चालुक्य आणि यादव इत्यादी सर्व राजवटीत या भागातील सामाजिक, धार्मिक, आर्थिक जीवन सारखेच होते. फारसा फरक नव्हता. चातुर्वर्ण्य आश्रमव्यवस्था, जातिव्यवस्था अस्तित्त्वात होती. मात्र जातीजातींत अस्मितेची भांडणे नव्हती. त्यामुळे जातीय वादावरील संघर्ष पुढे आढळून येत नाही. एकसमंजसपणा सर्वांनीच स्वीकारलेला होता. विश्वास होता, एकदुसऱ्याला सांभाळून घेण्याची प्रवृत्ती होती. स्त्रियांना आपापल्या कुटुंबात सन्मानाचे स्थान होते. श्रीमंत घरातील स्त्रिया आवश्यक ते शिक्षण घेत असत. मात्र बहुपत्नीत्व व सतीप्रथा या चाली अस्तित्त्वात होत्या. नंतरच्या काळात त्याबरोबरच बालविवाह व विधवाविवाह पद्धतीही अस्तित्त्वात होती. नांदेड जिल्ह्यात अनेक ठिकाणी अगदी खेड्यांपाड्यांतून सुद्धा कितीतरी शिळा पूजेसाठी उभ्या केलेल्या दिसतात. चार ते सहा इंच जाडीच्या उभट शिळेवर हाताची आकृती खोदलेली असते. अशा शिळा सतीच्या असतात. खेड्यापाड्यातून पसरलेल्या या शिळांची संख्या पाहता पतिनिधनानंतर स्त्रीने सती जाण्याची चाल रूढ होती असे वाटते. पिण्याच्या पाण्यासाठी विहिरी खोदल्या जात. बहुतेक वस्ती नदीच्या काठी किंवा जवळपास वसलेली दिसते. शक्य होते त्या ठिकाणी तळी बांधली गेली. अशोकाच्या काळात नदीचे पाणी अडवून कालव्याने शेतीला पाणीपुरवठा केल्याचा उल्लेख आढळतो. ही सिंचनव्यवस्था सर्वत्र आढळत नाही. त्या काळातील राजे किंवा प्रशासक ठिकठिकाणी बारवा बांधवून त्या ठिकाणी पाण्याची सोय करीत असत. या बारवांच्या बांधणीत एकरेखीवपणा असे. मोठ मोठी मंदिरे बांधून, त्या मंदिरांच्या परिसरात मोठमोठ्या बारवा बांधत. त्यातही चौरस, आयताकृती, अष्टकोनी आकार ठेवणे, उतरण्यासाठी पायऱ्या, मधल्या भिंतीत देवळ्या, काही ठिकाणी मध्येच मंडप अशी भिन्नभिन्न प्रकारे सोय उपलब्ध करून दिलेली असे.[७] नांदेड जिल्ह्यात अशा बारवांची संख्या खूप दिसते. कंधार तालुक्यातील मानसपुरी, बहादरपुरा, नवरंगपुरा, देगलूर तालुक्यातील येरगी, होट्टल, किनवट तालुक्यातील माहूर, बिलोली तालुक्यातील जुन्नी, मुखेड तालुक्यातील येवती, मुखेड व नांदेड तालुक्यातील मरळक या ठिकाणच्या बारवा अभ्यासण्यासारख्याच आहेत. साधारणपणे या बारवा इ.स. च्या ४ थ्या शतकापासून १२ व्या शतकापर्यंत बांधल्या गेल्या. या सर्व राजवटींच्या काळात नांदेड हे प्रमुख व्यापारी केंद्र होते. दहाव्या शतकाच्या नंतरच्या काळात आलेल्या राजकीय राजवटी, त्यामुळे झालेली स्थित्यंतरे याचा प्रभाव नांदेड जिल्ह्यावर खूप झालेला दिसतो. कल्याणीच्या चालुक्यांच्या ऱ्हासाच्या काळात देवगिरीचे यादव, द्वारसमुद्रचे होयसळ आणि वरंगलच्या काकतियांनी हल्ले करून निरनिराळे विभाग जिंकण्यास सुरुवात केली. खिळखिळी झालेली चालुक्यांची सत्ता ११९० साली संपुष्टात आली. यानंतर मध्ययुगीन काळात मराठवाड्यावर यादव, खिलजी, तुघलक, बहमनी, मोगल आणि निजामांच्या राजवटी आल्या. देवगिरीचे यादव घराणे इ.स. ८६० ते १३१८ या काळात राज्य

७. पाठक, अ. शं., **'महाराष्ट्रातील बारव स्थापत्य'**, लातूर, २००१.

करीत होते. सातवाहनांपासून ते यादवांपर्यंत सर्व हिंदू राजांच्याच राजवटी या भागात राज्य करीत होत्या. अधूनमधून काही राजांनी जैन आणि बौद्ध पंथ स्वीकारल्याने त्यांच्या तत्त्वज्ञानांचाही प्रभाव राहिला. शिवाय या सर्व राजवटी आपापल्या काळात एकमेव राज्य करीत होत्या अशी परिस्थिती नव्हती. राष्ट्रकूट, चालुक्य यांचा ऱ्हास झाला म्हणून त्यांच्या राजवटी संपल्या नाहीत. बलिष्ट राजांचे मांडलिकत्व पत्करल्यामुळे विशिष्ट भूभागावर त्यांचे राज्य होतेच.

राष्ट्रकूटांचे बलवान राजे मात्र आठव्या व नवव्या शतकात फार मोठा राज्यविस्तार करू शकले. याच काळात नांदेड जिल्ह्यातील कंधारला त्यांची राजधानी होती. नांदेडपासून १५ कि.मी. वर असलेल्या अर्धापूरचे जुन्या काळातील नाव आराध्यपूर असे होते. या गावी एक शिलालेख सापडला आहे. हा शिलालेख चुडामणीचा पूत्र ईश्वरदेव याने रचला असून श्रीदेवाने तो दगडावर लिहिला आणि मल्लया नावाच्या कोरक्याने तो दगडावर कोरला. हा काळ इ.स. ११९२ असून त्यात बल्लाळ घराण्याची वंशावळ नोंदवली आहे. इसवी सनाच्या बाराव्या शतकातील अर्धापूरचे सविस्तर वर्णन तर यात येतेच; पण देवगिरीच्या सिंघणदेवाचा उल्लेख यात येतो. तो रट्टवंशीय बल्लाळ राजाचा असून या शिलालेखावरून हे गाव बल्लाळाची राजधानी होती आणि तो यादवांचा एक सामंत व यादव राजाचा एक आधारस्तंभ होता असा उल्लेख आहे. आराध्यपूर या गावची प्राचीनता सातवाहनापर्यंत मागे नेता येते. वाकाटकाच्या काळातही या गावाचे महत्त्व होतेच. नांदेड येथून ५० कि.मी. वर औंढा येथे बारा ज्योतिर्लिंगापैकी एक असलेले नागनाथ मंदिर आहे. अर्धापूर हे नांदेड आणि वाशिम रस्त्यावर वसलेले असून या गावात या राजाने अनेक राजवाडे, मंदिरे निर्माण केली होती. सिद्धेश्वर आणि मल्लिकार्जूनाची देवळे यांनी बांधली. पण सर्वात महत्त्वाचे म्हणजे अर्धापूर हे काळमूख शैवांचे एक प्रमुख केंद्र होते. याच अर्धापूरला सिंघण यादवांचा एक शिलालेख सापडला आहे. संकम आणि लखमपंडित हे अर्धापूरचे नंतर सर्वाधिकारी होते. त्यांनी सोळा देवळे बांधल्याचा उल्लेख आहे. अर्धापूरला इतस्ततः पसरलेली अनेक जैन तीर्थंकरांची शिल्पेही आहेत. अर्धापूरवरून ६-७ कि.मी. वर असलेल्या चनापूर या गावी जैन तीर्थंकरांच्या मूर्तींचे अवशेष मोठ्या प्रमाणात आढळलेले आहेत. तसेच अर्धापूरवरून पाच कि.मी. अंतरावर असलेल्या लहान या गावी शिवमंदिराचे काही अवशेष सापडले असून फार पूर्वी नागसंस्कृती या भागात नांदत असावी आणि तांत्रिकांचीही प्रसिद्ध केंद्रे असावीत. अर्धापूरवरून उत्तरेकडे २० कि.मी. वर वसुमतीनगर आहे. तर साधारणपणे एवढ्याच अंतरावर दक्षिणेकडे मुदखेड नावाचे गाव आहे. अनुक्रमे या दोन्ही ठिकाणी शुकानंद व शिवानंद या तांत्रिक पिठाच्या किमान हजार वर्षांच्या परंपरा सांभाळल्या गेलेल्या मठांचे आजही अस्तित्त्व आहे. यावरून अर्धापूरची २० कि.मी. ची सर्व बाजूंची पंचक्रोशी अभ्यासली तर अनेक विद्वान वैदिक पंडित, तांत्रिक, बौद्ध व जैन पंडित तसेच शैव व वैष्णवांचा या भागात फार मोठा प्रभाव होता हे लक्षात यावे.[८] यामुळे नांदेड जिल्ह्याच्या अज्ञात इतिहासावर प्रकाश पडला आहे.

८. नांदेड येथील यशवंत कॉलेजने **'Inscriptions from Nanded District'** या नावाचा एक ग्रंथ १९६८ साली प्रकाशित केला असून धारवाडचे प्रसिद्ध इतिहास संशोधक डॉ. श्रीनिवास रित्ती आणि नांदेडचे प्रा. डॉ. शेळके यांनी या ग्रंथात जवळपास ४६ शिलालेख मुद्रांकित केले आहेत. प्रस्तावना— श्री. तात्यासाहेब कानोले.

कंधारच्या राष्ट्रकूटांचा संस्कृत शिलालेख, अर्धापूरचा रट्टवंशीय शिलालेख, देवगिरीच्या यादवांचे माहूर, उनकेश्वराचे शिलालेख सोडून जवळपास ३५ शिलालेख एखादा अपवाद सोडता संस्कृत भाषेतील पण कन्नड लिपीतील आहेत. नांदेडच्या दक्षिणेस गोदावरी आणि मांजरा या दोन नद्यांच्या अंतर्वेदीत कल्याणच्या उत्तर चालुक्याचे मांडलिक असलेले वण्ही कुलोत्पन्न एक राजघराणे राज्य करीत होते. देगलूर तालुक्यातील होट्टल येथे या राजांच्या उपराजधानीचे ठिकाण होते. या वण्ही कुलोत्पन्न किंवा पावक कुलोत्पन्न राजाच्या अधिपत्याखाली २००० गावे असलेला विस्तृत भूभाग गोदावरी आणि मांजरेच्या दरम्यान होता. होट्टलच्या शिलालेखात या वण्हीकुलास 'विशंद ग्राम शतपती' असे म्हटले आहे. देगलूर, मुखेड, बिलोली हा भाग मिळून प्रत्येकी एक गावाचा विभाग अशा दोन विभागांमध्ये ही उत्तर चालुक्यांची मांडलिक राज्ये नांदत होती. अर्ग नावाच्या राजावरून ओळखला जाणारा देगलूरकडील एक हजार खेड्यांचा येरगी एक सहस्र मंडळ व दुसरा अव्वरवाडी ७००, सक्करगे ८० व जुन्नी वळगे वगैरे मुखेड बिलोलीत समाविष्ट होणारा 'यरडीच सायरबार' किंवा 'सहस्र ग्राम मंडळ' अशी या मांडलिकांची सीमा होती. बिलोली तालुक्यातील सगरोळी म्हणजे जुने सव्वरवळी. हा २४ गावांचा भाग त्या काळी बोधन या ७०० गावाच्या मंडळात समाविष्ट होता. या शिलालेखांपैकी बहुसंख्य कल्याणीच्या उत्तर चालुक्यांचे शिलालेख असून ते बहुतेक देगलूर, मुखेड, बिलोली या तालुक्यातील होट्टल, करडखेड, तडखेल, एकलारा, सुगाव, खानापूर, येरगी, सगरोळी, आदमपूर, बिंबरा, नारंगल, वेताळा, मुळी, जुन्नी इत्यादी ठिकाणी उपलब्ध झालेले आहेत. यात चालुक्य राजांच्या मांडलिक व इत्यादींनी केलेल्या मोहिमांची, पराक्रमांची, बांधलेल्या मंदिरांची माहिती संकलित केली आहे. हे शिलालेख कल्याणीला उत्तर चालुक्यांची राजधानी स्थापन करणारा पहिला सोमेश्वर (१०४३ ते १०६८), दुसरा सोमेश्वर (१०६८ ते १०७६), सहावा विक्रमादित्य (१०७६ ते ११२६), तिसरा सोमेश्वर (११२६ ते ११३८), दुसरा जगदेकमल्ल (११३८ ते ११५१) यांच्या काळातील आहे. या शिलालेखात चालुक्यकालीन धार्मिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व राज्यकारभार याविषयांच्या अनेक महत्त्वाच्या बाबींची माहिती मिळते. तत्कालीन भौगोलिक मर्यादांचीही जाणीव होते. सेनापती प्रधान यांनी या भागात कुठे कुठे देवस्थाने बांधली याबरोबरच मंदिराच्या पूजेकरिता दिलेली दाने, ब्राह्मण व विद्यार्थ्यांना अध्ययन-अध्यापनाकरिता, तसेच योगक्षेमाकरता अग्रहार देऊन चालविलेली अन्नछत्रे इत्यादी सर्व माहिती येते. त्यामुळे दहाव्या आणि अकराव्या शतकातील नांदेड जिल्ह्यातील असलेली परिस्थिती समजून येऊ शकेल. हे शिलालेख उपलब्ध होईपर्यंत नांदेड जिल्ह्याचा फक्त कंधारच्या राष्ट्रकूट राजांशी इतिहासात संबंध होता एवढेच गृहीत धरले जाई. या नव्या पुराव्यामुळे एक वण्ही कुलोत्पन्न घराणेही या भागात राज्य करीत होते, ही अज्ञात माहिती प्रकाशात आली.

देगलूर तालुक्यातील होट्टलची मंदिर बांधणारा अर्ग किंवा कर्क यालाच रेभैय म्हणत असत. होट्टलच्या मंदिरातील संस्कृत शिलालेख याने उभारला आहे. मात्र त्यामुळेच वण्हीकुल या राज्यकर्त्यांची माहिती उपलब्ध झाली आहे. देगलूर तालुक्यातील करडखेड हे त्या काळात मोठे देवस्थान तसेच चालुक्य व वण्हीकुलाचे महत्त्वाचे केंद्र असावे. वण्हीकुलातील या राजांनी करडखेडच्या आपल्या पूर्वजांच्या नावाने अनेक मंदिरे बांधली आहेत. या कुळातील एक कर्तृत्ववान पुरूष महामंडलेश्वर, दुसरा कलिचोरस, त्याची राणी महामंडलेश्वरी रेब्बलदेवी यांनी करडखेडच्या

शिवस्थानुका देवळावर सुवर्णकळस चढविल्याचा उल्लेख इ.स. १०७९ च्या शिलालेखात आढळतो. या होट्टलजवळील येरगी गावाचे खूप महत्त्व आहे. करडखेड, येरगी, होट्टल ही चालुक्यांची कधी उपराजधानी तर कधी केंद्रस्थाने मानली जात. येरगीचे तर महत्त्व खूपच होते. या ठिकाणी एक वेदविद्यालय होते. या विद्यालयातील छात्रशाळेत त्रीपुरूषदेव या देवतेचे मोठे मंदिर होते. चालुक्य राजे आणि त्यांचे पदाधिकारी यांच्या इथे भेटी असत. कारण ती त्यांची श्रद्धास्थाने होती. या सर्व कन्नड शिलालेखांत सहाव्या विक्रमादित्यांच्या शिलालेखांची संख्या जास्त आहे. चालुक्य विक्रमादित्यांच्या काळातच 'मिताक्षरी' या प्रसिद्ध धर्मग्रंथाचा लेखक विज्ञानेश्वर आणि काश्मिरी कवी कल्हणचा भाऊ बिल्हण या कल्याणीला येऊन गेले. त्यांचा भ्रमंती परिसर हा आजचा बिलोली, मुखेड, देगलूर तालुका होता. बिलोली तालुक्यातील कलकुंभरी म्हणजेच हल्लीचे कुंभाळ गाव. येथे चालुक्याचा वाजीकुलोत्पन्न सेनापती आणि प्रधान नागवर्मा याचे घराणे फार पूर्वीपासून राहत. येथे रेवणेश्वरांचे मोठे मंदिर होते. त्याचप्रमाणे सगरोळीला सर्वेश्वरदेव नावाचे मंदिर आणि अग्रहार होते. एका ठिकाणी असा उल्लेखही आहे की, इ.स. ११२० च्या सुमारास विक्रमादित्याचा पुत्र मल्लिकार्जुन हा देगलूर, मुखेड, बिलोली परिसरात राज्यकारभार पाहत होता. राजघराण्यांचा इतिहास सांगण्याचे येथे प्रयोजन नाही, पण राजाश्रयाशिवाय धर्मसंस्कृतीचा विचारच करता येत नाही. शिलालेखांतील माहितीवरून असे दिसते की, शैव पंथापैकी पाशुपत व कालमुख या संप्रदायाचे प्रवर्तक आणि अनेक आचार्य या भागात येऊन गेले. त्यांची पीठे व स्थाने नांदेड जिल्ह्यात अनेक ठिकाणी होती. कालमुख संप्रदायाचे आचार्य हे राजे, मांडलिक, अधिकारी, जनतेचे गुरू आणि देवतेचे पुजारी किंवा महंत असत. जनतेच्या ठायी त्यांच्याबद्दल पूज्यभाव होता. देवस्थानाच्या आवारात ते वेदशाळा चालवित. तसेच विद्यार्थ्यांच्या राहण्याजेवण्याची व्यवस्था करून अध्ययन-अध्यापनाचे कार्य करीत. वागीश्वरपंडित, चंद्रशेखर पंडित, ज्ञानेश्वर पंडित, ब्रह्मर्षी पंडित इत्यादी आचार्यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. त्यांची नावे या शिलालेखात आढळतात. या भागातील सामाजिक माहितीचे आणि सांस्कृतिक चळवळीचे अनेक पैलू या शिलालेखावरून कळतात. चालुक्य राजांच्या काही राण्या राजकारभारात व सामाजिक कार्यात भाग घेत. चालुक्य राजांनी शिवपूजक असताना सुद्धा अनेक जैन मंदिरे बांधलेली आहेत. हे त्यांच्या परपंथसहिष्णुतेचे निर्देशक आहे. राष्ट्रकूट आणि चालुक्यांच्या शिलालेखांवरून नांदेड हे वेदविद्येचे मोठे पीठे होते हे लक्षात येते. कंधारच्या राष्ट्रकूट राजवटीनंतर कल्याणीच्या चालुक्याच्या काळात या भागाला विलक्षण महत्त्व प्राप्त झाले होते. काही कागदपत्रांतून कल्याणहून वीरशैव श्री बसवेश्वराने आपली राजधानी हलवून नांदेडला आणण्याचा प्रयत्न केला याचेही धागेदोरे सापडतात असे कानोले यांनी नमूद केले आहे.

मध्ययुगीन मराठवाड्यात यादव राजघराणे आपला प्रभाव गाजवू लागले. देवगिरीच्या यादवांची राजवट इ.स. ८६० ते १३१८ पर्यंत होती. यादवांचे राजघराणे हे चालुक्याचे मांडलिक घराणे होते. चालुक्यांच्या उतरत्या काळात संधी मिळताच त्यांनी आपले स्वातंत्र्य घोषित केले आणि एकूण साडेचारशे वर्षांच्या आपल्या राजवटीत मराठवाड्यावर सुमारे दीडशे वर्षे राज्य केले. यादवांच्या काळात देवगिरी, पैठण आणि लातूर ही शहरे प्रगतीवर होती. त्याचप्रमाणे 'चर्तुवर्गचिंतामणी' हा ग्रंथ लिहिणारा हेमाद्री हा रामदेव यादवांच्या काळात करणाधीष होता. सर्व राजे वैदिक धर्माभिमानी होते.

हेमाद्रीबरोबरच कल्याणीचा विज्ञानेश्वर, अपरार्क आणि बोपदेव असे चौघेही धर्मशास्त्रकार होते. संस्कृत बरोबरच मराठी भाषेला प्रतिष्ठा मिळवून देण्याचे काम इतिहासात पहिल्यांदा या राजवटीत झाले. बलशाली राजवटीमुळे स्थिर जीवन लोकांना जगता आले. त्यामुळे अनेक ग्रंथांची निर्मिती झाली. याच काळात अनेक निरनिराळे पंथ उदयाला आले. एकीकडे हेमाद्री आणि बोपदेवांची कठोर, कर्मठ आणि सनातनी वैदिक धर्माची मांडणी तर दुसरीकडे बौद्ध व जैन धर्माश्रय यामुळे हिंदू, बौद्ध व जैन यांची अनेक मंदिरे निर्माण झाली. या सर्वच पंथांचा महाराष्ट्राच्या समाजजीवनावर खोलवर परिणाम झाला. यादवांच्या काळापर्यंत नांदेड परिसरातही शिल्पकला, विविध विद्या आणि शास्त्रांच्या अभ्यासास उत्तेजन मिळाले. शिल्पकला ही तशी सातवाहनांच्या काळापासून मराठवाड्यात विकसित होतच होती. काळाच्या ओघात लिहिले गेलेले अनेक ग्रंथ नष्ट झाले असतील किंवा ग्रीक, शक, हूण, कुशाण, इस्लाम इत्यादी परकियांनी हस्तगत केले असतील. मात्र यादवांच्या काळापासून पुढे एका निश्चित अशा धर्मपंथ निष्ठेला आधार मिळालेला दिसतो. चालुक्य काळातील बिलोली, मुखेड, देगलूर तालुक्यात कन्नड भाषेत कोरलेल्या अनेक शिलालेखांची भाषा अत्यंत काव्यमय आहे. अनेक शिलालेखात कोरक्यांनी त्या त्या भागातील नामवंत कवींची नावेही लिहिली आहेत. कदाचित तेलुगू आणि कानडी या भाषांतील अनेक हस्तलिखितांचा अपुरा राहिलेला अभ्यास पूर्ण झाला तर या भागातील कवींचे लेखनही उपलब्ध होऊ शकेल.

महात्मा बसवेश्वरांच्या समकालीन असलेले आणि कन्नड भाषेतील एक श्रेष्ठ कवी उरूलेंगपेद्दी गुरूलेंगपैद्दी हे मूळचे कंधारचे ! हे नांदेडच्या सिद्धनाथपुरीतील मठप्रमुख होते. ते आणि त्यांच्या पत्नी कल्लग यांनी कन्नड भाषेत शिवचिंतनपर अनेक पदे रचली असून त्यांच्या लेखनाचा प्रभाव कर्नाटकात ९०० वर्षांपासून आजपर्यंत तसाच आहे. या कवींचा जन्म व घराणे नांदेड जिल्ह्याचे. काही संशोधकांच्या मते त्यांची समाधी कंधार येथे असून इस्लामी राजवटीच्या काळात वास्तुबदल झाला आहे. बसवेश्वरांचे अनुयायी असलेल्या या कवीचे कार्यक्षेत्र नांदेड हे शहर राहिल्याने वीरशैव पंथीयांत या शहराबद्दल आदर आहे. ९०० वर्षांपूर्वी नांदेड शहर केवळ संस्कृतच नव्हे, तर इतरही भाषेतील व प्रतिभाशाली व्यक्तींनी सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध केले होते हे यावरून स्पष्ट होते. लेणी व मंदिरे उभी केली जात होती. अवतीभवती संस्कृतचे व्युत्पन्न पंडित होते. त्यामुळे गोदावरीचे नाभीस्थान असलेले नांदेड विविध कलांच्या निर्मितीपासून वंचित राहीले असे वाटत नाही. माहूर आणि शिवूरच्या लेण्या जशा वाकाटककालीन आहेत, तशाच प्रकारची हिंदू, जैन आणि बौद्ध या सर्वांचीच उदंड शिल्पे या जिल्ह्यात आढळतात. यादवांच्या काळात सामान्य माणसांची बोलीभाषा असलेल्या मराठीत लेखन झाले. विशेषतः वारकरी आणि महानुभावांनी जाणीवपूर्वक आपले ग्रंथ मराठीतूनच लिहिले. या ग्रंथांची समृद्ध मराठी भाषा पाहता मराठीत अगोदर काही शतकांपासून लेखनाची परंपरा असावी हे कबूल करावे लागते. मराठीतील आद्यकवी मुकुंदराज यादवांच्या काळात झाले, तर चक्रधर, ज्ञानेश्वर आणि नामदेव यांची कारकीर्द रामदेव यादवाच्या काळात झाली. मराठी भाषेचा जन्म मराठवाड्यात झाला. मराठी लिखित स्वरूपात पहिल्यांदा श्रवणबेळगोळ (कर्नाटक) येथील गोमटेश्वराच्या मूर्तीखालील चौथऱ्यावर कोरलेल्या शिलालेखात आहे. हा शिलालेख इ.स. ९८३ चा असून त्यानंतर नांदेड जिल्ह्यातील उनकेश्वर येथे मराठी भाषेतील शके १२०१ मध्ये कोरलेला शिलालेख उपलब्ध आहे.

किनवट तालुक्यातील उनकेश्वर गरम पाण्याच्या झऱ्यासाठी प्रसिद्ध असून १८ ओळींतील या शिलालेखात प्रत्येकी ३५ ते ४० अक्षरे आहेत. किनवटहून माहूरला जाताना उनकेश्वर लागते. रामदेव यादवांच्या काळातील हा शिलालेख असून उनकेश्वर मंदिरातील सभामंडपाच्या भिंतीत तो आढळला. हेमाद्रीपंत, राजपुत्र व्यंकदेव, सोमदेव पंडित इत्यादींचे उल्लेख या लेखात आले आहेत. मराठीतील आरंभीचे ग्रंथलेखनही मराठवाड्यात झाले. संस्कृतचा पुरस्कार कमी करण्याची जाणीव यादवांच्या राजवटीत निर्माण झाली. परिणामी प्रचलित पद्धतीनुसार संस्कृतमध्ये लिहिले गेलेले धर्मग्रंथ सर्वसामान्य माणसांसाठी मराठी व इतर बोलीभाषेत लिहिले गेले. भगवद्गीतेवरील टीका 'ज्ञानेश्वरी' या अप्रतिम आणि उत्कृष्ट काव्याच्या निमित्ताने मराठीत अवतीर्ण झाली. त्याबरोबरच 'अमृतानुभव', 'चांगदेव पासष्टी' आणि 'हरिपाठाचे अभंग' ज्ञानेश्वरांनी लिहिले. नामदेव हे संतशिरोमणी नांदेडच्या सीमारेषेवरील नरसी बामणीचे, परभणी जिल्ह्यातले. त्यांचे गुरू विसोबा खेचर नांदेडहून ६० कि.मी. वर असलेल्या औंढ्याचे. ज्ञानेश्वर आणि नामदेव यांनी जातपातविरहित, नैतिकता, साधेपणा, निष्काम कर्म, भक्ती या तत्वप्रणालींचा स्वीकार करून वारकरी संप्रदाय निर्माण केला. पंढरपूरच्या विठोबाचे महत्त्व आवर्जून सांगितले. विठोबा म्हणजेच कृष्ण. नाथ संप्रदायी असलेल्या ज्ञानेश्वरांनी ही धर्मक्रांती करून महाराष्ट्रात सांस्कृतिक क्रांती घडवून आणली. याबरोबरच याच काळात चक्रधरांनी महानुभाव संप्रदाय निर्माण केला. चक्रधरस्वामी मूळचे फलटणचे असले तरी पैठण ते माहूर हे त्यांचे भ्रमणक्षेत्र राहिले. त्यांनीही वैदिकांमधील अतिरेक सोडून देऊन पंचकृष्ण हे देवता अधिष्ठान स्वीकारले. महानुभावांची प्रमुख उपास्यदेवता कृष्णच होती. धर्मग्रंथाची भाषा मराठी होती. चक्रधरांनी नागदेवाचार्य, भास्करभट्ट बोरीकर, नरेंद्र इत्यादी संस्कृत पंडित असलेल्या प्रतिभाशाली शिष्यांना मराठीत लेखन करण्यास प्रवृत्त केले. स्वतः रामदेवराय हे चक्रधरांचे अनुयायीही झाले. नांदेड जिल्ह्यात चक्रधरांची भ्रमणयात्रा सतत होत असे. नांदेड शहरातील भावतीर्थ, तसेच परिसरातील राहेर, गोपाळचावडी इत्यादी ठिकाणी ते अनेकदा निवास करून असत. रामदेवाचा पंतप्रधान हेमाद्री यांनी वैदिक धर्माची मांडणी करणारे 'चतुर्वर्गचिंतामणी' सारखे ग्रंथ लिहिले, तर त्यांचे मंत्री बोपदेव यांनी व्याकरणावर दहा, वैद्यकावर नऊ, तीथी निर्णयावर एक, अलंकारावर तीन आणि भागवतधर्मावर तीन असे विख्यात ग्रंथ संस्कृतमधून लिहिले. याच काळात बसवेश्वर झाले. त्यांनी लिंगायत पंथाची स्थापना केली आणि शैव मताचा प्रसार केला. थोडक्यात हेमाद्री, ज्ञानेश्वर, नामदेव, चक्रधर आणि बसवेश्वर यांनी मराठवाड्यातील सांस्कृतिक आणि धार्मिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण कामगिरी केली आहे. जवळपास सर्वच जातीधर्मातील लोक या विविध पंथांचे अनुयायी झाले. ही संतांची मांदियाळी सर्वच जातिधर्मातून उदयाला आली. त्यामुळे मराठवाड्याच्या समाजजीवनात झालेले बदल आजपर्यंत टिकून आहेत. यापुढेही ते टिकतील इतके खोलवर ते रूजले आहेत. याचे श्रेय या संतांच्या अलौकिक व्यक्तिमत्वाला तर आहेच, पण रामदेवरायांच्या सर्वधर्मसहिष्णुतेला द्यावे लागेल. नांदेड जिल्ह्यात वारकरी संप्रदायाचा फार मोठा प्रभाव आहे. महानुभाव आणि लिंगायत यांची संख्याही लक्षणीय आहे.

द्रव्यरत्नाकर निघण्टूचा कर्ता मुद्गल हा ज्येष्ठ वैद्यराज आणि राजदरबारी वजन असलेला संस्कृत पंडीत होता. याने शके १४०२ म्हणजे इ.स. १४८० मध्ये आयुर्वेदावरील 'द्रव्यरत्नाकर' हा ग्रंथ लिहिला. जो १८ वर्गाचा (सर्ग) असून पाठांतराच्या दृष्टीने सोयीचा असून अनुष्टुप श्लोकात

रचला आहे. विविध वनस्पतींचे द्रव्यांचे पर्याय व गुणकर्मांची नोंद त्यात केली गेली आहे. मुद्‌गल भट्ट वैद्य व विमलबोध अशी दोन नावे या संदर्भात येतात. या मुद्‌गलाचे ठिकाण गोदावटी नांदितटे म्हणजे नांदेड येथे होते. याच्या वंशावळीत मुद्‌गल व रामकृष्ण अशी नावे वारंवार येतात. या विषयीची नोंद कानोले यांनी केली आहे.[९]

१३१८ मध्ये शंकरदेव यादवाला संपवून टाकून खिलजीची राजवट सुरू झाली. नांदेड जिल्हाही त्यांच्या ताब्यात गेला. दक्षिणेत इस्लामचे राज्य सुरू झाले. तिथून पुढे मराठवाड्याच्या पर्यायाने नांदेड जिल्ह्याच्या समाजजीवनावर इस्लामी संस्कृतीचे वर्चस्व निर्माण होण्यास आरंभ झाला. केवळ आठ हजार सैन्यांनिशी आलेला अल्लाउद्दीन यादवांची राजवट जिंकू शकला. अतिशय वैभवशाली असलेली यादवांची राजवट मराठवाड्याच्या समाज जीवनात आमुलाग्र बदल करणारी ठरली. मात्र या सत्तेच्या ऱ्हासानंतर मराठवाड्याचे जीवन विस्कळीत झाले. खिलजीची सत्ता फार दिवस टिकली नाही. दिल्ली तुघलक घराण्याच्या ताब्यात गेली. या तुघलकाने आपली राजधानी दिल्लीवरून देवगिरीला आणली. तलवारीच्या जोरावर धर्मप्रसार केला. परंतु पुन्हा त्याला दिल्लीला जावे लागले. अल्लाउद्दीन खिलजीच्या काळात त्याच्या प्रधानाने बिलावल रागाची निर्मिती करणारा गोपाल नायक हा मराठवाड्यातील गायक जबरदस्तीने दिल्लीला नेला. या गोपाल नायकाची पूर्वपरंपरा लक्षात घेता, मराठवाड्यात शास्त्रीय संगीतात फार मोठे योगदान देणारे गायक होऊन गेले हे लक्षात येते. पुढे दक्षिणेतील तुर्क सरदारांनी तुघलकाच्या काळात बंड केले. हसन गंगू बहामनी याने १३४७ मध्ये आपले स्वतंत्र राज्य निर्माण केले.

## मध्ययुगीन विद्वत परंपरा

या बहामनीच्या काळात कंधारचे महत्त्व देवगिरी इतकेच मानले जाई. या बहामनी राज्याचे नंतर विभाजन होऊन पाच तुकडे पडले. त्यातील बिदरच्या बरिदशाहीच्या ताब्यात नांदेड जिल्हा गेला. वऱ्हाडची इमादशाही मुघलांनी १५७६ मध्ये काबिज केली, त्यावेळी 'ऐन-ए-अकबरी' या ग्रंथातील नोंदीप्रमाणे नांदेड जिल्ह्यातील हदगाव, माहूर, तामसा, किनवट, अर्धापूर, कंधार, देगलूर हा भाग आपोआपच मोगलांच्या ताब्यात जाऊन त्यास 'दख्खन' ही संज्ञा दिली गेली. इ.स. १६१९ मध्ये बिदरची बरिदशाही नष्ट केल्यावर विजापूरच्या आदिलशाहीचा नांदेडवर अंमल सुरू झाला. तत्पूर्वी मुघल सम्राट अकबराने जिंकलेल्या भागात नांदेड होते. अबुल फजलच्या लिखाणात हा उल्लेख आलेला आहे. मुघल बादशहा शहाजहानच्या काळात दख्खनमध्ये जे चार सुभे निर्माण करण्यात आले त्यातल्या तेलंगण सुभ्याची सुभेदारी नांदेडला होती. इ.स. १६२५ साली नांदेड शहराचे महत्त्व खूपच वाढलेले दिसते. या काळातच गोदावरी काठची अनेक विद्वान घराणी इस्लामच्या भीतीने काशीला स्थलांतरित झाली. मुघलांच्या राजपूत सेनानींबरोबर अनेक संस्कृत ग्रंथ राजस्थानात गेले. याच काळात नांदेडच्या सुप्रसिद्ध शेष घराण्यातील वामन पंडित हे मराठीतील नामवंत पंडितकवी (इ.स. १६०८ ते १६९५) अगोदर विजापूरला आणि नंतर काशीला स्थलांतरित झाले. वामन पंडितांनी जवळपास ७० काव्यग्रंथ

९. व्ही. एस. कानोले मुद्‌गल भट्ट व विमलबोध, **भारत इतिहास संशोधक मंडळ,** पुणे, सप्टें. १९३४ मधील लेख तसेच वे. स. दि. कामत, एक अप्रकाशित आयुर्वेदिक ग्रंथ परिचय हा लेख.

लिहिले असून 'यथार्थदीपिका' कार म्हणून त्यांचा गौरवास्पद उल्लेख केला जातो. पांडित्य आणि कवित्व यांचा मनोज्ञ संगम वामन पंडितांच्या रचनेत पाहावयास मिळतो. त्यांची स्तुती करतांना मोरोपंतांनी भक्ती-ज्ञान-रस भरित यत्कवन असे म्हटले आहे. 'निगमसार', 'कर्मतत्व', 'ब्रह्मस्तुती', 'अनुभूतिलेश' ही वामनांची वेदांतपर रचना आहे. वामन पंडितांनी प्रथम 'समश्लोकी गीताटीका' लिहिली आणि नंतर 'यथार्थदीपिका' लिहून ज्ञानयुक्त सगुण भक्तीचे प्रतिपादन केले. 'रामायण', 'महाभारत', 'भागवत' यातील काही निवडक प्रसंगावर त्यांनी आख्याने रचली आहेत. या आख्यानांतून रसानुकूल, नादवती अनुप्रासात्मक रचना, शृंगार-भक्ती यांचे यथायोग्य मिश्रण आणि अध्यात्मप्रवणता हे विशेष दिसून येतात. शब्दचित्रे, रेखाटन व स्वभावोक्तीचे कौशल्य याबरोबरच प्रसंगचित्रणात कल्पनांची, रेखीव वर्णनांची भर घालून भावना फुलवून रसाला अत्यंत पोषक अशी वृत्तरचना करून वामनपंडित कवित्वविलास प्रगट करतात. त्यांचे चिरंजीव रघुनाथ शेष यांनी लिहिलेला 'कृष्णकौतुक' हा ग्रंथ उल्लेखनीय आहे. या घराण्याचे वंशज आजही नांदेडला राहतात. औरंगजेबाने बिदर जिंकले, मात्र सुभ्याचे मुल्की ठाणे नांदेडलाच राहिले. इ.स. १६५७ पर्यंत नांदेडचे महत्त्व प्रभावी होते. याच काळात रामदास स्वामींनी निजामाबाद जिल्ह्यातील सारंगपूर येथे हनुमान मंदिराची स्थापना केली. निजामाबाद व नांदेड जिल्ह्यातील कुंडलवाडी, तामसा येथे रामदासी मठ निर्माण झाले.

नांदेडच्या सुभेदारीवर अनेक ख्यातनाम मुघल सरदार अंमल करून गेले. विशेषतः सय्यद अब्दुल्ला, शमसुद्दीन, मुख्तारखान, खुदा बंदाखान, रूहुल्लाखान इत्यादीची कारकीर्द गाजलेली दिसते. इ.स. १७०३ मध्ये शमसुद-अल-मुल्क हा नांदेडचा सुभेदार झाला. याचाच मुलगा निजाम-उल-मुल्क याने मुघली सत्ता खिळखिळी झाल्यावर १७२४ मध्ये आपले स्वतंत्र राज्य स्थापन केले. त्याने औरंगाबादनंतर हैद्राबाद ही राजधानी केली. हीच असफजाही सत्ता १७ सप्टेंबर १९४८ पर्यंत मराठवाड्यात कायम राहिली. देवगिरीच्या यादवानंतर म्हणजे तेराव्या शतकापासून ते एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धापर्यंत नांदेड जिल्ह्याने इस्लामी राजवटीखाली दिवस काढले. हा काळ पूर्वीचे सर्व वैभव निष्प्रभ करणारा ठरला. या सर्व काळात अनेक सुफी संत या भागात येत होते. इस्लामचा प्रसार करण्यात ते अग्रेसर होते. संस्कृतीच बदलल्याने येथील समाजजीवनात फार बदल झाले. मराठी ही बोलभाषा राहिली, मात्र संस्कृत रसातळाला गेली. हिंदू जीव मुठीत धरून आपल्या परंपरा सांभाळत होते. इस्लामीकरणाचा प्रभाव पडत चालल्याने अनेक पीर आणि त्यांचे दर्गे उदयाला आले. यात कंधार आणि अर्धापूर येथील दर्गे महत्त्वाचे आहेत. फार्सी आणि उर्दू भाषेचा प्रभाव वाढला. राहणीमान बदलले. दत्त सांप्रदायिक संतश्रेष्ठ श्री नरसिंह सरस्वतीचे बराच काळ बासरला वास्तव्य होते. एक सत्य लक्षात घेतले पाहिजे की, चक्रधर, नामदेवांपासून रामदासांपर्यंत अनेक संतांचे भ्रमणक्षेत्र या भागात होते. वारकरी, महानुभाव, लिंगायत आणि दत्त सांप्रदायिक यांच्या टिकलेल्या प्रभावामुळे इस्लामची राजवट असूनही हिंदूचे मोठ्या प्रमाणात इस्लामीकरण झाले नाही. दारिद्र्यात समाधान मानण्याची वृत्ती असल्याने आपल्या धर्मनिष्ठा यांना सांभाळता आल्या. तांत्रिकांची प्रभाव क्षेत्रे कमी झाली. बौद्ध, जैनांच्या अनुयायांची संख्याही कमी झाली. खेड्यापाड्यातील गोरगरिबांनी आपल्या प्राचीन परंपरा काळजीपूर्वक जोपासल्या. शेती हा मुख्य व्यवसाय असल्याने तसेच सरंजामशाही पद्धत

असल्याने जनतेने परकियांच्या राजवटीतही जीवन सुसह्य करून घेतले. इ.स. १७०८ मध्ये एक महत्त्वाची घटना घडली. शिखांचे दहावे गुरू श्री. गुरू गोविंदसिंघजी यांचे नांदेडला आगमन झाले आणि १८ व्या शतकाच्या पहिल्या दशकात नांदेडला वेगळेच महत्त्व प्राप्त झाले. 'गुरूशोभा' या ग्रंथात गुरूंच्या नांदेडच्या वास्तव्याचा तपशिलाने उल्लेख आला आहे. मुघलांशी लढतांना त्यांना याच शहरात हौतात्म्य प्राप्त झाले. त्यांचे समाधीस्थान जगातील शिख समाजात दक्षिणकाशीएवढे महत्त्वाचे मानले जाते. 'गुरूग्रंथसाहेबां' कडे पंथ नेतृत्व राहील अशी धर्माज्ञा देऊन या पंथातील गुरू परंपरा येथेच खंडित झाली. त्यांचा शिष्य बंदाबहादूर म्हणजेच माधवबुवा बैरागी. बंदाबहादूरने मुघलांचा बदला घेण्यासाठी पंजाबपर्यंत आपला पराक्रम गाजविला. डॉ. प्रभाकर देव यांनी या काळातील ऐतिहासिक तपशील नमूद करताना १७ व १८ व्या शतकातील नांदेड अनेक प्रवासवर्णनांतून चित्रित केलेले आढळते, असे नमूद केले आहे. १६७० च्या सुमारास नांदेडात आलेल्या ट्रव्हर्निअर नावाच्या इंग्रजी प्रवाशाने आपल्या प्रवासवर्णनात तत्कालीन नांदेड शहराचे वर्णन केले असून, त्यावेळी लोकवस्ती फक्त किल्ल्याच्या आसपास होती. बाजारपेठ गजबजलेली असे. दुथडी भरून नेहमी वाहणाऱ्या नदीतून होड्यांमधून मालवाहतूक केली जाई इत्यादी तपशील नमूद केला आहे. १८४० साली कॅप्टन फीटझराल्ड हा सैनिकी अधिकारी नांदेडला आला होता. तेव्हा घनदाट बाभूळबन शहराच्या अवतीभवती असल्याचा उल्लेख आहे. गुरू गोविंदसिंगजींच्या वास्तव्याने नांदेड हे देशभर कीर्तिवंत झाले होते. फीटझराल्ड याने गुरूद्वाऱ्यात जाऊन दर्शन घेतल्याचा उल्लेख आहे. नांदेडचा गुरूद्वारा तख्त सचखंड 'श्री हुजूर अबचलनगर साहीब' म्हणून जगभर प्रसिद्ध असून मध्ययुगीन स्थापत्य कलेचा एक उत्कृष्ट नमुना आहे. पंजाबचे महाराज सरदार रणजितसिंगजी यांनी गुरूद्वाऱ्याची इमारत स्वखर्चाने बांधली असून पुढे निजामाच्या काळात नसिरूदौलाने काही खेडी आणि नांदेड व परभणी जिल्ह्याचा वार्षिक महसूल गुरूद्वाऱ्याला इनाम म्हणून दिल्याची नोंद आहे.

मुघलांच्या राजवटीतून निजामाच्या राजवटीत मराठवाड्याचे पाच जिल्हे समाविष्ट झाले. या घराण्याचे नांदेड जिल्ह्यावर नियंत्रण २२४ वर्षे (१७२४ ते १९४८) राहिले. निजामाच्या राज्यात ८५% हिंदू, १०.५% मुसलमान व ४.५% इतर धर्माचे लोक राहत असत. या काळात १. निजाम-उल-मुल्क, २. सलाबत जंग, ३. निजाम अली, ४. नासिरौदौला, ५. अफजल-उद्-दौला, ६. मीरमहबूब-अलीखान आणि ७. मीर उस्मान अली खान हे सात निजाम बादशहा याच कालखंडात झाले. भारतीय राजकारणात इंग्रज, फ्रेंच, डच, पोर्तुगीज यांचे आगमन झाले होते. देशात १८१८ ला पेशवाईनंतर ईस्ट इंडिया कंपनीमार्फत इंग्रजांचे रीतसर राज्य सुरू झाले. इंग्रजांमुळे पाश्चिमात्य राज्यपद्धती आणि आधुनिक विकसित जगाची ओळख झाली. संस्थानिक सुद्धा या सुधारणांपासून अलिप्त राहू शकत नव्हते. हळूहळू बलशाली झालेल्या इंग्रजांचे मांडलिकत्व निजामालाही स्वीकारावे लागले. निजामाने अनेक विद्वान व अनुभवी शासक आपल्या राज्यात आणले. १८६६ साली प्रशासकीय व्यवस्था पूर्ण बदलली. १८८४ पासून राज्याची शासकीय भाषा फार्सी ऐवजी रीतसर उर्दू झाली. सहाव्या निजामाच्या काळात ब्रिटिशांच्या तोडीचे आदर्श व कार्यक्षम प्रशासन देण्याचा अयशस्वी प्रयत्न झाला. पहिल्या निजामाच्या काळातच सरंजामी अर्थव्यवस्थेचा आरंभ झाला होता. सरकारी जमिनी, जहागिरी, सर्फ-इ-खास निर्माण केले गेले. १८५३ मध्ये सालारजंग या दिवाणाने जमीन महसुलाच्या क्षेत्रात

अमुलाग्र सुधारणा केल्या. जमिनीची प्रतवारी करून ठरविलेला जमीन महसूल कायम राहील याची व्यवस्था केली. सर्वत्र एक चलन रूढ केले गेले. निजाम स्टेट रेल्वे स्थापन करण्यात येऊन इ.स. १९०० मध्ये हैद्राबाद-औरंगाबाद ही रेल्वेलाईन टाकण्यात आली. या रेल्वेमार्गामुळे वाहतूक सोपी झाली आणि कृषी व औद्योगिक क्षेत्र विकसित झाले. पक्क्या सडका बांधण्यास सुरुवात झाली. बारा बलुतेदार सांभाळले गेले. साक्षरतेचे प्रमाण ९.३% होते. ८०% हिंदूमधील साक्षरता ६.२२% होती. गावठी शाळांच्या ऐवजी १९४० पर्यंत मराठवाड्यात ११०० प्राथमिक शाळा सुरू करण्यात आल्या. जिल्ह्याच्या ठिकाणी हायस्कूलच्या शिक्षणाची सोय झाली. इंग्रजांची न्यायालयीन पद्धत स्वीकारल्यामुळे मोठ्या तालुक्याच्या ठिकाणी न्यायालये व पगारी न्यायाधीश आले. लिखित कायद्याच्या आधारे नागरिकांना न्याय मिळू लागला. पहिल्या पाच निजामांनी परधर्मसहिष्णुता स्वीकारली होती. पण सहाव्या निजामापासून हिंदूंची ससेहोलपट सुरू झाली. हैद्राबाद हे इस्लामी राज्य झाले. त्यामुळे धार्मिक स्वातंत्र्यावर बंधने आणली गेली. शेवटच्या निजामाच्या काळात तर जातीय दंगलीही सुरू झाल्या. १९२९ साली नांदेडला मोठा जातीय दंगा झाला. शेवटचा निजाम १९११ साली गादीवर आला. हा अत्यंत धूर्त, पाताळयंत्री असला तरी दूरदर्शी होता. आधुनिक सुधारणांपासून अलिप्त राहता येणार नाही याची त्याला तीव्र जाणीव होती. १९१७ साली त्याने उस्मानिया विद्यापीठ स्थापन केले. त्यामुळे उच्च शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली गेली. पाश्चिमात्य देशांतील आधुनिक शिक्षणाचा आरंभ केला गेला. उर्दू हे शिक्षणाचे माध्यम होते. निजामाने सर्व ज्ञानशाखा उर्दू माध्यमातून शिकविल्या जातील याची काळजी घेतली. मराठीची व प्रादेशिक भाषांची गळचेपी झाली. मात्र उर्दूतून का होईना आधुनिक विज्ञाननिष्ठ ज्ञानाचा परिचय झाल्याने सर्व समाजाच्या सांस्कृतिक अभिरूचीत बदल झाला. हैद्राबाद संस्थानच्या अवतीभवती इंगजांचेच राज्य पसरलेले होते. त्यामुळे वर्तमानपत्रे माहीत झाली. स्वातंत्र्यलढा १८५७ सालीच सुरू झाला होता. मात्र या स्वातंत्र्यलढ्याशी येथील जनता परिचित होऊ नये यासाठी निजाम दक्ष असे. जगात फार मोठे बदल होऊ घातले होते. रशियात १९१७ साली झालेली बोल्शेव्हिक क्रांती, तसेच पहिले महायुद्ध (१९१४ ते १९१८) याचे पडसाद दूरवर उमटले होते. या भागातील लोक या सर्व घटनांचे अवलोकन करीत होतेच. १८५७ च्या स्वातंत्र्य लढ्यात देगलूर तालुक्यातील कौलास येथील एका संस्थानिकाचे मुख्य कारभारी श्री. देशपांडे सहभागी झाले होते. जिवंत सापडल्यामुळे जन्मठेपेची सजा भोगण्यासाठी इंग्रजांनी त्यांना अंदमान बेटावर पाठविले होते. नांदेड जिल्ह्यातला भारतीय स्वातंत्र्य लढ्यात सहभागी झालेला हा पहिला स्वातंत्र्यसैनिक आहे. निजामाच्या काळात उरलेला देश इंग्रजी राजवटीमुळे आधुनिक शिक्षणाकडे झुकू लागला होता. इंग्रजांचे स्वतःचे राज्य आणि संस्थानिकांचे राज्य यात खूपच फरक होता. काही संस्थानिक इंग्रजांचा पुरोगामी दृष्टीकोन स्वीकारीत असले, तरी एकूण सहाशे संस्थानिकांपैकी अशा संस्थानांची संख्या तुलनेने कमी होती. इंग्रजांचे राज्य प्रत्यक्षात नसले तरी निजामाला सोयीच्या वाटणाऱ्या सुधारणा तो स्वीकारीत असे. नांदेड जिल्ह्यात नद्यांचे पाणी विपुल प्रमाणात होते. मात्र ते पाणी अडवून धरणे बांधली नव्हती (निजामनगर अपवाद). नदीच्या काठी राहूनही जनतेला विहिरी व जुनी ऐतिहासिक तळी येथील पाणीपुरवठ्यावरच अवलंबून रहावे लागे.

## वारकरी संप्रदाय

या जिल्ह्यात वारकरी संप्रदायाचा प्रभाव खोलवर रूजलेला होता. देगलूरला बंडा महाराज, धुंडा महाराज, कंधारला साधू महाराज या धार्मिक संस्थानांचा सर्व जातीगटात प्रभाव निर्माण झाला होता. ही संस्थाने कडवी वारकरी असल्याने कीर्तन-प्रवचनातून संतांची शिकवण मोठ्या प्रमाणात पसरत होती. समाज निर्व्यसनी, पापभीरू व भक्तिरसात न्हाऊन जाऊ लागला. ज्ञानेश्वरीची पारायणे व एकनाथ, रामदास, तुकाराम, नामदेव यांच्या ओव्या अभंगांचे अशिक्षितांमध्येही पाठांतर झाले होते. त्यामुळे सर्वधर्म समभावाची मनोवृत्ती तयार झाली होती. याच देगलूरच्या घराण्यात झालेले हरिभक्त परायण धुंडा महाराज देगलूरकर आणि कंधारच्या घराण्यात झालेले हरिभक्त परायण शंकर महाराज कंधारकर हे केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर भारतीय कीर्तीचे वारकरी संत झाले. धुंडा महाराज यांच्या वक्तृत्वाची विलक्षण मोहिनी पडत असे. १९०३ साली जन्मलेले धुंडा महाराज महाराष्ट्र संस्कृतीचे कैलास लेणे असलेल्या भागवत धर्माचे श्रेष्ठ अध्वर्यु आणि ख्यातनाम दर्शनिक संत कुलगुरू होते. मराठी इतकेच त्यांचे इंग्रजी, संस्कृत आणि उर्दूवर प्रभुत्व होते. हैद्राबादच्या विनायकबुवा गवई यांच्याकडे त्यांनी संगीताचे शास्त्रोक्त शिक्षण घेतले होते. १९६० साली नाशिक येथे भरलेल्या अखिल भारतीय नारदीय कीर्तन संमेलनाचे अध्यक्षस्थान विभूषित केले होते. त्यांचे व्यक्तिमत्व मुळातच गोरे, देखणे आणि प्रसन्न होते. त्यांनी 'हरिपाठ विवरण', 'ज्ञानेश्वरी विवेचन', 'सार्थ एकनाथी हरिपाठ', 'नारद भक्तिसूत्र विवरण', 'ज्ञानदेवाच्या दहा गूढ अभंगावरील कीर्तने', 'अभंग निरूपण', 'पसायदान', 'ज्ञानदेवाचे मागणे' हे महत्त्वाचे ग्रंथ लिहिले. महाराष्ट्र शासनाने प्रकाशित केलेल्या संत एकनाथांच्या भागवत व भावार्थ रामायणास त्यांनी लिहिलेल्या प्रस्तावना गाजल्या. जवळपास ३,००० पृष्ठे होतील इतके त्यांचे लेखन आहे. धुंडा महाराजांनी मराठी साहित्यात अमूल्य भर घातली असे मानले जाते. वयाच्या ८९ व्या वर्षी इ.स. १९९२ मध्ये त्यांचे निधन झाले. शंभू महादेवाविषयीचे काही वीरशैवीय भक्तिसाहित्य उपलब्ध आहे. वास्तविक या साहित्याचे मध्यवर्ती केंद्र शिवभक्ती रहायला हवी. मात्र काही साहित्यातून विठ्ठलभक्तीचा प्रभाव पडलेला दिसतो.[१०] नांदेड जिल्ह्याच्या देगलूर तालुक्यातील हणेगाव येथे एका जंगम कुळात जन्म झालेले शिवगुरूदास (१८७३ ते १९१९) हे विख्यात वीरशैव कवी होते. रामलिंग महादैया स्वामी (शास्त्री) हे त्यांचे मूळ नाव. त्यांनी अभंग, पदे इत्यादी स्फुटरचना तर केली आहेच; पण 'शिवगीतासारामृत' हा ओवीबद्ध आणि 'श्री बसवजन्माख्यान' हा श्लोकबद्ध असे दोन महत्त्वाचे ग्रंथ रचले आहेत. त्यांचे हे ग्रंथ वीरशैव समाजात प्रतिष्ठित मानले जातात.

या भागातील दुसरे प्रभावी संत झाले ते म्हणजे दासगणू. ६ जानेवारी १८६८ साली जन्मलेले संत दासगणू मूळचे अहमदनगर जिल्ह्यातील. त्यांनी आपले कार्यक्षेत्र नांदेड व पंढरपूर निवडले होते. शिर्डीच्या श्री. संत साईबाबाच्या सूचनेवरून त्यांचे केलेले चरित्रलेखनाचे कार्य अतिशय महत्त्वपूर्ण आहे. त्यांनी 'कीर्तनोपयोगी आख्याने', 'भक्तीलीलामृत', 'संतकथामृत', 'भक्तिसारामृत' व 'अमृतानुभव' हे ग्रंथ लिहिले असून नामवंत कीर्तनकार व समाजसुधारक म्हणून त्यांची ख्याती होती.

---

१०. रा. चिं. ढेरे यांनी **'शिखर शिंगणापूरचा शंभू महादेव'** या आपल्या ग्रंथात हा उल्लेख केला आहे.

२६ नोव्हेंबर, १९६५ रोजी त्यांचे निधन झाले. त्यांची समाधी पंढरपूर येथे असून वस्त्रसमाधी नांदेड जिल्ह्यातील गोरठा, ता. उमरी येथे आहे. माहूर येथील विष्णुकवी या नावाने विख्यात असलेले संतकवी (मूळ नाव : कृष्णा रावजी धांदरफळे) यांचा जन्म १८४४ मध्ये झाला. त्यांचा निवास माहूर येथे असे. त्यांनी पूर्वायुष्यात लिहिलेल्या शृंगारिक लावण्या अतिशय गाजल्या. विरक्तीनंतर त्यांनी अनेक देवदेवतांच्या वर्णनाची स्तोत्रे, अष्टके, पदे, आरत्या रचल्या. 'विष्णुकवींची कविता' या त्यांच्या संग्रहात हे सर्व समाविष्ट असून रसाळ व प्रासादिक वाणीची त्यांना देणगी होती. त्यांचे निधन इ.स. १९१७ मध्ये झाले. १९ व्या शतकात नांदेड येथे संस्कृत भाषेच्या अध्ययन-अध्यापनात षट्शास्त्र विद्यापारंगतपंडित व नैय्यायिक मयुरेश्वर शास्त्री जोशी होऊन गेले. त्यांनी मराठीतून ओवीबद्ध 'नंदीतटविजय' नावाचा ग्रंथ लिहिला असून, नांदेड शहर हे एक विख्यात धर्मपीठ असल्याचे तसेच सांस्कृतिक क्षेत्राचे मोठे केंद्र असल्याचे या ग्रंथात नमूद केले आहे. मयुरेश्वर शास्त्रीचेच समकालीन असलेले विख्यात कविसम्राट रामकृष्णबापू सोमय्याजी हे सत्पुरूष होऊन गेले. ते मूळचे वसमत येथील रहिवाशी होते. त्यांचा 'गुरूपरंपरा' हा ग्रंथ प्रसिद्ध असून त्याचे मराठी भाषांतर दे. ल. महाजन यांनी केले आहे. सदानंद तथा बाबा महाराज उमरीकर हे अलौकिक संतकवी उमरी येथे होते. 'सुंदरविलास दीपिका' आणि 'देशिक लीलामृत' हे त्यांचे दोन ग्रंथ प्रसिद्ध असून विपुल साहित्य अप्रकाशित आहे. ते आनंद संप्रदायी शुकानंद परंपरेचे अनुयायी होते. १९ व्या शतकाच्या प्रारंभीच पेशवाई संपल्यानंतर देशात इंग्रजांनी विज्ञाननिष्ठ सुधारणांचा कार्यक्रम हाती घेतला. या राजवटीमुळे लोकशाहीची मूलतत्त्वे प्रसृत झाली. स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व ही मूल्ये इंग्रजी शिक्षणाच्या सोयी उपलब्ध झाल्याने परिचित होऊ लागली. निजामाच्या राज्याभोवती ब्रिटिशांचा अंमल सुरू झाला होता. मांडलिकत्व स्वीकारलेले असल्याने इंग्रजांचा निजामावर आधुनिक सोयी उपलब्ध करून देण्यासाठी दबाव वाढत होता. हळूहळू राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, धार्मिक दृष्टिकोनात अमूलाग्र परिवर्तन सुरू झाले. प्राचीन संतवाङ्मय तसेच पंडिती परंपरेचे वाङ्मय यांचा प्रभाव ओसरत चालला. पाश्चिमात्य वाङ्मयातील नव्या प्रेरणा आणि प्रवृत्ती मराठी वाङ्मयात प्रतिबिंबित होऊ लागल्या. पारलौकिक, आध्यात्मिक चिंतनाची जागा ऐहिक चिंतनाने घेतली. टिळक-गांधी युग यांचा क्रमाने प्रभाव वाढत होता. साहित्यात व सामाजिक सुधारणांत न्यायमूर्ती रानडे, आगरकर, केशवसुत, हरिभाऊ आपटे यांच्या लेखनाचे गडद, खोल परिणाम रूजत होते. निजामाने मात्र उर्दूचा प्रभाव राहावा, सरंजामी संस्कार नष्ट होऊ नयेत यासाठी अनेक योजना आखल्या. आपली राजवट टिकण्यासाठी हे राजकारण करणे त्याला योग्य वाटले. मात्र देशात इतरत्र संचार मुक्त असल्याने आधुनिक शिक्षणासाठी नागपूर, पुणे, मुंबई, बनारस, मद्रास अशा ठिकाणी विद्यार्थ्यांचे जाणे-येणे सुरू झाल्याने २० वे शतक उजाडले तेव्हा परिवर्तनाचा विचार समाजात सुरू झाला होता. या शतकाच्या दुसऱ्या दशकात नांदेड शहरात सन्मित्र समाज, ऐक्यवर्धक समाज, हनुमान वाचनालय अशा संस्था सुरू झाल्या.

**दे. ल. महाजनांची आख्यानरत्नमाला :** या काळात कविवर्य दे.ल.महाजन यांनी (१८९६ ते १९६७) कीर्तने, प्रवचने आणि काव्यवाचन या माध्यमातून जिल्ह्यात एक मोहीमच राबविली. 'आख्यानरत्नमाला', 'नामदेवचरित्र', 'मानसविहार', 'केकावली सार', 'भर्तुहरिची तिन्ही शतकं' अशा विपुल कविता त्यांनी लिहिल्या. सामाजिक अभिसरणात आणि मुक्तिसंग्रामात त्यांच्या कीर्तनाचा प्रभाव

पडला. उदगीर येथील मराठवाडा साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. त्यांचे समकालीन वा.रा.कांत, कृष्णकुमार आणि पार्थिव यांनी दिलेले योगदान महत्त्वाचे होते. वा.रा.कांत (जन्म : १९१३) तर श्रेष्ठ प्रतिभाशाली कवी म्हणून महाराष्ट्रभर ख्यातनाम होते. त्यांचे 'वाजली विजेची टाळी', 'पहाटतारा', 'फटत्कार', 'दोनुली', 'वेलांटी', 'मरणगंध' हे काव्यसंग्रह आणि अनुवादित कादंबरी 'सुलताना रझिया' अतिशय गाजली. पार्थिव यांच्या कविता 'फटत्कार' या संग्रहात समाविष्ट आहेत. कृष्णकुमार यांच्याही कविता याच संग्रहात आहेत. कृष्णकुमार या टोपण नावाने कविता लिहिणारे श्रीनिवास केशव गोळेगावकर यांनी 'तीच माती तेच आव्हान' हे दिगंबरराव बिंदू यांचे चरित्र लिहिले असून 'मोहोंजोदारो : लिपी, समाज आणि संस्कृती' हे सिंधू संस्कृतीवर संशोधनात्मक पुस्तक लिहिले आहे. नांदेड येथून 'अमरज्योत' नावाचे साप्ताहिक प्रकाशित करण्याचा त्यांनी प्रयत्न केला, पण परवानगी न मिळाल्यामुळे पुढे ते अकोला येथून प्रकाशित केले. नांदेड येथील मराठी साहित्य चळवळ हळूहळू वाढत गेली. दे.ल.महाजनांनी 'आख्यानरत्नमाला' हे द्वैमासिक सुरू केले. या अंकातून अनेकांनी लिहिलेली आख्याने प्रकाशित झाली. मारोतीबुवा ब्रह्मचारी उर्फ दास मारोती शर्मा (१८८० ते १९५६) हे वेदांती प्रवचनकार, भाष्यकार कवी व प्रभावी कीर्तनकार होते. यांनी लिहिलेली आख्याने प्रकाशित झाली आहेत. परभणी जिल्ह्यातील ताडकळस येथे जन्मलेले मारोतीबुवा नांदेड जिल्ह्यातील लोहा या गावी स्थायिक झाले. सखाराम महाराज काशीकर आणि विनायक महाराज साखरे यांचे शिष्यत्व पत्करून त्यांनी त्यांच्याकडे वेदांत, शास्त्रे व संत वाङ्मयाचे सखोल अध्ययन केले. अभंग, पदे, 'श्रीराम गीता' व दहा चरित्र आख्याने ही त्यांची ग्रंथ संपदा आहे. मुखेडचे शिवदास यांचे 'चंद्रहास' राजेजी कंधारकर यांची काही आख्याने प्रसिद्ध झाली आहेत. कांत, पार्थिव आदिंनी शारदाश्रम नावाची एक संस्था साहित्यविषयक कार्यासाठी स्थापन केली होती, तर दिगंबर गणेश उदगीरकर यांनी 'मंदारपुष्पमाला' हे मासिक सुरू केले होते. गोळेगावकर यांनी १९३०-१९३२ या साली 'विहंगमाला' नावाने एक मासिक चालविले. महाजनांचे समकालीन दत्ता अनंत सराफ यांनी जवळपास १६ पुस्तके लिहिली असून त्यांचे बंधू बाळ गणू यांनीही लहान लहान पुस्तिका लिहिल्या आहेत. हदगाव तालुक्यातील मनाठा येथील सी.ग.मनाठकर यांनी 'जानकीकाव्य', 'निबापांजली' हे खंडकाव्य, 'अभिमन्यू भग्न तरी', 'विरहगंजन' ही काव्ये लिहिली आहेत. हा काळ मुक्तिसंग्रामाचा होता.

## निजामप्रांतीय मराठी साहित्य चळवळ

राष्ट्रीय शिक्षणासाठी १९३९ साली प्रतिभा निकेतन शिक्षण संस्थेची स्थापना झाली होती. सार्वजनिक वाचनालये सुरू होत होती. 'निजामविजय', 'केसरी', 'मराठवाडा' अशी अनेक वर्तमानपत्रे लोकांना वाचायला मिळत होती. तुरळक ठिकाणी रेडिओची सोय उपलब्ध झाली होती. मराठीतील अनेक पुस्तके वाचण्यासाठी उपलब्ध होत होती. अशा लोकजागृतीच्या काळात नांदेडला निजाम प्रांतीय मराठी साहित्य संमेलनाचे दुसरे अधिवेशन १९४३ साली म.म.दत्तो वामन पोतदारांच्या अध्यक्षतेखाली भरविण्यात आले. या संमेलनातच 'निजाम प्रांतीय मराठी साहित्य संमेलन' या नावाचा त्याग करून 'मराठवाडा साहित्य परिषद' या नावाचा स्वीकार करण्यात आला. सुप्रसिद्ध इतिहास संशोधक विश्वेश्वर अंबादास तथा तात्यासाहेब कानोले (जन्म : १९०५) हे संमेलनाचे चिटणीस होते. कानोले

Maharashtra State Gazetteers

अगदी लहानपणापासूनच ऐतिहासिक कागदपत्रे जमा करून संशोधन करण्याच्या छंदात रमले होते. वामन पंडिताची अस्सल कागदपत्रे शोधून ते नांदेडचे असल्याचे संशोधन त्यांनीच पहिल्यांदा मांडले. वामन पंडिताचा मुलगा रघुनाथ शेष यांचे 'कृष्णकौतुक' शोधून त्यांनी ते संपादित केले. मराठीचे आद्यकवी मुकुंदराज हे विदर्भातील आंभोरचे नसून मराठवाड्यातील अंबाजोगाईचे आहेत. यासंबंधी त्यांनी स्वतंत्र ग्रंथ लिहून अनेक पुरावे दिले. छत्रपती शिवाजी महाराजांचे एक सेनापती नेताजी पालकर यांची हदगाव तालुक्यातील तामसा ही जहागीर शोधून काढून ताम्रपटाच्या आधारे ते पिंगळीला राहत होते हेही त्यांनी आग्रहाने पुढे आणले. कंधार येथील राष्ट्रकूट राजघराण्याच्या शोधात त्यांचा महत्त्वपूर्ण सहभाग होता. अर्धापूर, काकांडी इत्यादी गावांत सापडलेले शिलालेख, अनेक हस्तलिखिते, जुनी ऐतिहासिक कागदपत्रे मोठ्या प्रमाणावर शोधून काढून त्यांनी 'गोदातीर इतिहास संशोधन मंडळ' स्थापन केले. 'नवनंदाच्या टेकड्यांवर वसलेले नांदेड याची प्राचीनता' आणि 'गुरू गोविंदसिंघाचे चरित्र' हे त्यांचे महत्त्वपूर्ण ग्रंथ आहेत. त्यांनी अनेक लेख लिहिले, काही महत्त्वाच्या प्रस्तावना लिहिल्या. उर्दू, इंग्रजीसारख्या भाषा शिकून घेतल्या, मोडीतील कागदपत्रांचे वाचन केले, महानुभावांची 'सकळा' लिपी उलगडून दाखविली. बीड येथे भरलेल्या मराठवाडा साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. श्री. राजेश्वर यादवराव मुळावेकर हे यादवसूत या नावाने कविता लिहीत असत. चंद्रशेखर यांनी त्यांना बालकवी ही उपाधी दिली होती. महामहोपाध्याय यज्ञेश्वर शास्त्री कस्तुरे हे विख्यात संस्कृत पंडित नांदेडला संस्कृत पाठशाला चालवत असत (जन्म : १९०८, मृत्यू : २००६). ते संस्कृत महाविद्यालयाचे दीर्घकाळ प्राचार्य राहिले. संस्कृत व वेद अध्ययनातील त्यांचा व्यासंग विद्वत्मान्य होता. शंकराचार्यांनी त्यांना महामहोपाध्याय ही पदवी, तर करवीर पीठाने विश्वतीर्थ ही पदवी दिली होती. `रसविचार', 'भामती प्रकाश' आणि 'वेदान्त परिभाषा' ही त्यांची महत्त्वाची पुस्तके. संन्यासाश्रम स्वीकारल्यानंतर त्यांनी गोदावरीच्या काठी सावरगाव येथे चतुर्वेदाच्या शिक्षणासाठी स्वतंत्र आश्रम काढला. निधनापर्यंत ते याच कार्यात मग्न होते.

ग.ना.अंबेकर (जन्म : १९११) हे एक रसिक आणि चोखंदळ व्यक्तिमत्व होते. नांदेडच्या साहित्य, संगीत आणि नाट्य चळवळींचा ते एक प्रमुख आधार होते. प्रतिभा निकेतन, कलामंदिर आणि गायनवादन विद्यालय या संस्थांचे ते संस्थापक होते. कृष्णकांत या नावाने त्यांनी अनेक कविता लिहिल्या असून 'प्रतोद' साप्ताहिकाचे ते दीर्घकाळ संपादक होते. त्यांचे 'स्मृतीतरंग' हे आत्मचरित्र प्रकाशित झाले असून १९४३ साली झालेले मराठवाडा साहित्य संमेलन, १९५७ साली झालेले संगीत संमेलन आणि १९६५ साली झालेले नाट्य संमेलन त्यांच्या कार्यकुशलतेमुळे यशस्वी झाले. या सर्व संमेलनांचे ते चिटणीस होते. अंबेकर प्रकाशन ही संस्था काढून काही चांगली पुस्तके त्यांनी प्रकाशित केली आहेत.

राम पिंगळीकर हे एक तरल प्रतिभेचे कवी होते. गायक, कीर्तनकार, प्रवचनकार तसेच संस्कृत, मराठी, उर्दू, इंग्रजी या भाषांवर प्रभुत्व असलेले अभ्यासक म्हणून त्यांचा लौकिक होता. 'साद' हा त्यांच्या कवितांचा संग्रह असून जगन्नाथ पंडितांच्या 'गंगालहरी' या काव्याचा त्यांनी रसाळ अनुवाद केला आहे.

श्री. हरिहरराव सोनुले (१९२७ ते १९७०) हे हदगाव येथे जन्मलेले प्रतिभाशाली कवी, बहुजनांचे प्रतिनिधी. प्रसिद्ध उर्दू कवी मगदुम मोईद्दीन यांचा त्यांच्या कवितेवर फार प्रभाव होता. सर्व प्रकारचा संघर्ष करून त्यांनी उच्च शिक्षण मिळविले होते. हैद्राबाद मुक्तिसंग्रामात त्यांचा सक्रिय सहभाग होता. १९५७ साली ते खासदार म्हणून निवडून आले. ध्येयवादी तसेच साम्यवादी विचारसरणीच्या अनेक कविता त्यांनी लिहिल्या. ते एक उत्कृष्ट वक्ते होते. त्यांची कविता स्वतंत्र शैली, प्रासादिकता, लालित्य या वैशिष्ट्यांनी नटलेली आहे.

गोधुबुवा वाठोरे यांचे अंधश्रध्देवर प्रहार करणारे 'भीम अभंगांजली' व 'बुध्द पदावली' ही दोन पुस्तके प्रसिद्ध आहेत. शाहीर कोंडूरकर यांनी पहाडी आवाजातले बहाद्दर कवी म्हणून लौकिक मिळविला.

दासगणू महाराजांचे शिष्य श्री. अनंतराव आठवले हे नांदेडचे भूषण होते. रसाळ कवी, कीर्तनकार आणि प्रवचनकार म्हणून ते ख्यातनाम होते. पुण्याच्या टिळक आयुर्वेद महाविद्यालयाचे ते प्राचार्य होते. त्यांनी प्राचीन वैद्यक शास्त्रातील पारंगत ही पदवी आणि काशी येथून शास्त्री ही पदवी मिळविली होती. संस्कृत वाङ्मयाचा आणि प्राचीन संत वाङ्मयाचा त्यांचा सखोल अभ्यास होता. विशेषतः रामायण, महाभारत, भागवत आणि ज्ञानेश्वरी यावर त्यांचे विलक्षण प्रभुत्व होते. 'श्रीकृष्ण कथामृत', 'महाभारताचे वास्तव दर्शन', 'अनुवाद ज्ञानेश्वरी', 'दासगणु महाराजांचे चरित्र', 'ब्रह्मसूत्रार्थ दर्शनी', 'कर्मयोग', 'मनोबोध विवरिणी' असे अनेक ग्रंथ त्यांनी लिहिले असून शेवटी उमरी तालुक्यातील गोरठा ह्या गावी आपले कार्यक्षेत्र ठेवले. संन्यासाश्रमानंतर त्यांनी 'वरदानंद' हे नाव स्वीकारले. हरिद्वार येथे आश्रम बांधून ते उत्तरायुष्यात राहत. तेथेच त्यांनी प्रायोपवेषण करून स्वेच्छा मृत्यू स्वीकारला.

**महाविद्यालयीन शिक्षणाचा प्रारंभ :-** हैद्राबाद मुक्तिसंग्रामानंतर पारतंत्र्य तर संपलेच, पण दीर्घकाळ वर्चस्व गाजवणाऱ्या उर्दू आणि इस्लामच्या प्रभावातून सुटका झाली. एकदम संपूर्ण देशाशी या भागाचे नाते जुळले गेले. स्वातंत्र्याचे वारे वाहू लागले होतेच, आता लोकशाहीची चाहूल लागली होती. आंदोलनातून मोकळे झालेले स्वातंत्र्यसैनिक समाजामध्ये आदरणीय मानले जाऊ लागले. यातच जून १९५० मध्ये मुक्तिसंग्रामाचे सर्वश्रेष्ठ नेते आणि भाग्यविधाता पूज्य स्वामी रामानंद तीर्थ यांनी आपल्या सहकाऱ्यांना एकत्र करून नव्या सुधारक समाजाची बांधणी सुरू केली. बंधमुक्त झालेल्या समाजाने मानेवर बसलेले उर्दू शिक्षणाचे जोखड फेकून दिले आणि राष्ट्रप्रेमाने भारलेले मराठी शिक्षण वेगाने सुरू झाले. स्वामीजींनी जून १९५० मध्ये मराठवाड्यातले कला, वाणिज्य, विज्ञान शाखेचे पहिले महाविद्यालय पीपल्स कॉलेज, नांदेड या नावाने सुरू केले. वेगवेगळ्या प्रांतातून निमंत्रण देऊन तज्ज्ञ प्राध्यापकांची नियुक्ती केली. भारतीय कीर्तीचे तत्त्वज्ञानाचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. सुरेंद्र बारलिंगे पहिले प्राचार्य झाले. विविध विषयांचे नामवंत प्राध्यापक आल्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय तर झालीच, त्याबरोबर गावात विद्वत्तेचे वारे वाहू लागले. नांदेडला खरे तर सामाजिक, सांस्कृतिक परिवर्तनाची चाहूल २० जून १९२० ला भरलेल्या सामाजिक परिषदेपासून लागली होती. बालविवाहाविरूद्ध कणखर भूमिका घेतली जाऊ लागली होती. काही विधवांचे पुनर्विवाह झाले होते. दासगणू, दे. ल. महाजन

यांच्या कीर्तनांनी सुधारणावादी दृष्टीकोन समाजात पसरू लागला होता. यातूनच इ.स. १९६० साली वा.रा.कांत यांच्या अध्यक्षतेखाली नांदेडला पहिले मराठवाडा कवीसंमेलन भरविले गेले होते.

संगीत आणि नाट्य जसे नांदेडच्या सांस्कृतिक जीवनाला आकार आणत होते तसा नांदेडच्या विद्वत्तेचा दबदबा कस्तुरीगंधासारखा पसरत गेला त्याचे श्रेय दोन दिग्गजांना जाते ते म्हणजे नरहर कुरूंदकर आणि राम शेवाळकर. राम शेवाळकर नांदेडला १९६४ पर्यंत होते. सरस्वतीचे वरदान लाभलेले आणि ओजस्वी भाषाशैलीची ईश्वरदत्त देणगी असलेले शेवाळकर हे रसाळ वक्ते, संस्कृत आणि मराठी भाषेचे पंडित होते. प्रतिभाशाली कवी असलेले शेवाळकर यांचे 'असोशी' आणि 'रेघा' हे दोन काव्यसंग्रह नांदेडला प्रसिद्ध झाले. त्यांच्या व्याख्यानांनी नांदेड शहरात रसिकतेची लाट निर्माण झाली. शेवाळकर नांदेड सोडून वणी येथे लोकमान्य बापूजी अणे महाविद्यालयात प्राचार्य म्हणून नियुक्त झाले. निवृत्तीनंतर ते नागपूरला स्थायिक झाले. पुढे त्यांची अनेक पुस्तके प्रकाशित झाली असून पणजी येथील अ.भा. साहित्य संमेलनाचे ते अविरोध अध्यक्ष निवडले गेले. शेवाळकरांचे घराणे मूळ हिंगोली जिल्ह्यातील शेवाळ्याचे असून विदर्भातील एलिचपूर येथे स्थलांतरित झाले. त्यांचे वडील नामवंत कीर्तनकार व व्याख्याते होते. शेवाळकरांची कीर्ती ओजस्वी वक्तृत्वामुळे देशभर पसरली.

नरहर कुरूंदकरांच्यामुळे तर नांदेडचे वातावरण बदलून गेले. आपल्या विद्वत्तापूर्ण व प्रभावी वक्तृत्वाने फार थोड्या वर्षात त्यांची भारतभर कीर्ती पसरली. त्यांनी अनेक विद्यार्थी घडविले. भारतीय तत्त्वज्ञान, सौंदर्यशास्त्र, मराठी साहित्य, इतिहास अशा विविध विषयांचा त्यांचा असलेला सखोल अभ्यास आणि हा अभ्यास मांडण्याची त्यांची विशिष्ट तार्किक शैली यामुळे देशभरातील मातब्बर विद्वानांत त्यांची गणना होऊ लागली. १९५५ ते १९६३ पर्यंत ते प्रतिभा निकेतन हायस्कूलमध्ये शिक्षक होते. १९६३ ला ते पीपल्स कॉलेजला मराठीचे प्राध्यापक झाले. याच कॉलेजचे १९७८ साली ते प्राचार्य झाले. ३ ऑक्टोबर १९३२ साली जन्मलेले कुरूंदकर अल्पायुषी ठरले. १० फेब्रुवारी १९८२ रोजी त्यांचे दु:खद निधन झाले. त्यावेळी त्यांचे वय फक्त ५० वर्षे होते. 'रिचर्डस्‌ची कलामिमांसा', 'रूपवेध', 'धार आणि काठ', 'मागोवा', 'नेहरू : एक मागोवा', 'यात्रा', 'वाटा : माझ्या तुझ्या', 'जागर', 'शिवरात्र', 'रसयात्रा', 'मनुस्मृती', 'अभयारण्य', 'परिचय', 'ओळख', 'भजन' इत्यादी विद्वत्तापूर्ण ग्रंथ त्यांच्या कीर्तीत भर घालणारे आहेत. केवळ ग्रंथांच्या नावावरूनही अनेकविध विषयांचा त्यांचा असणारा सखोल व्यासंग लक्षात येऊ शकेल. 'श्रीमान योगी' या रणजित देसाई यांच्या गाजलेल्या कादंबरीला त्यांनी लिहिलेली प्रस्तावना, तसेच इरावती कर्वे यांच्या दोन पुस्तकांना त्यांनी लिहिलेल्या प्रस्तावना अतिशय गाजल्या. मराठवाड्यातील लेखकांची एक पिढीच्या पिढी त्यांच्यामुळे घडली. अनेक तरूण लेखकांच्या पुस्तकांना त्यांनी लिहिलेल्या प्रस्तावना, पुरस्कार आवर्जून वाचण्यासारख्या आहेत. बारलिंगे नांदेडला असताना तत्त्वज्ञानावरील त्यांचे लेख जागतिक पातळीवरील संशोधन नियतकालिकांतून प्रसिद्ध होत होते. 'सौंदर्याचे व्याकरण' हे पुस्तक नांदेडला असतानाच त्यांनी लिहिले.

डॉ. स. रा. गाडगीळ (जन्म : १९१६) पीपल्स कॉलेजमध्ये मराठीचे प्राध्यापक म्हणून आले आणि प्राचार्य पदावरून निवृत्त झाले. अनेक विद्वत्तापूर्ण ग्रंथ त्यांनी लिहिले आहेत. विशेषत: 'वैदिक

यज्ञ, मध्ययुगीन तंत्रसाधना आणि ज्ञानेश्वर प्रणित भक्तियोग', 'लोकायत', 'काव्यशास्त्रप्रदीप', 'आधुनिक भारताचे शिल्पकार : पं. जवाहरलाल नेहरू', 'शोकात्म विश्वरूप दर्शन', 'प्राचीन भारतीय धर्मविचार' आणि 'मराठी संत' इत्यादी त्यांचे ग्रंथ लोकप्रिय ठरले. त्यांची व्याख्याने महाराष्ट्रात सर्वत्र होत असत. नांदेडच्या विद्वत्तेचा लौकिक त्यांनी वाढविला. निवृत्तीनंतर ते पुण्याला स्थायिक होते.

एकनाथ महाराज खडकेकर (१९३१-१९८४) हे संस्कृत वाङ्मयाचे गाढे व्यासंगी तसेच आयुर्वेद कॉलेजमध्ये संस्कृतचे प्राध्यापक होते. भरतमुनींचे नाट्यशास्त्र, सांख्य, वेदांत, साहित्य इत्यादीसंबंधी त्यांचे लेखन आदरास पात्र ठरले आहे. 'विचारदर्शन' या त्यांच्या पुस्तकात त्यांनी काव्यशास्त्र, संस्कृत वाङ्मयावर लिहिलेले लेख संग्रहित करण्यात आलेले आहेत. संस्कृत वाङ्मयाचे प्रकांड पंडित असलेल्या महाराजांनी संस्कृत महाविद्यालयात व घरीही जातीपातीचा विचार न करता संस्कृत भाषा शिकविण्यात पुढाकार घेतला, हे त्यांचे महत्त्वाचे योगदान आहे.

पीपल्स कॉलेजचे दीर्घकाळ प्राचार्य राहिलेले इंग्रजीचे नामवंत प्राध्यापक केशव रंगनाथ शिरवाडकर यांचे नांदेड येथे जवळपास २५ वर्षे वास्तव्य होते. शैलीदार भाषेत त्यांचे अनेक लेख मराठी आणि इंग्रजी नियतकालिकांतून प्रकाशित झाले. उत्कृष्ट व्याख्याते आणि सखोल चिंतन असणारे विचारवंत म्हणून नांदेडच्या सांस्कृतिक जीवनात त्यांनी आपले योगदान दिले होते. नांदेड सोडल्यावर त्यांचे अनेक ग्रंथ प्रकाशित झाले. विशेषतः शेक्सपियरवर, मार्क्सवादी समीक्षेवर आणि ज्येष्ठ बंधू कुसुमाग्रजांवर लिहिलेली पुस्तके विशेष गाजली. निवृत्तीनंतर ते पुण्याला स्थायिक झाले आहेत.

मराठवाड्यातील चित्रकलेच्या शिक्षणाचा पाया घालणारी अभिनव चित्रकला ही शिक्षण संस्था देशभर विख्यात करणारे त्र्यंबक वसेकर हे चित्रकाराबरोबरच कवी आणि कथाकार म्हणून प्रसिद्ध होते. बालवाङ्मयातही त्यांनी बरेच लेखन केले आहे. 'स्मृतितरंग' हे त्यांचे आत्मचरित्र प्रसिद्ध असून त्यांचे चिरंजीव प्राचार्य सुभाष वसेकर यांनीही बालवाङ्मयात वैशिष्ट्यपूर्ण लेखन केले आहे. त्यांच्या काही पुस्तकांना शासनाचे व इतर पुरस्कार मिळाले आहेत.

डॉ. प्रभाकर देव यांनी यशवंत महाविद्यालयात इतिहासाचे पदव्युत्तर विभाग प्रमुख म्हणून मोलाची कामगिरी बजावली आहे. मराठवाड्याच्या इतिहासात विशेषतः मंदिरे आणि शिल्पे यांच्या शोधात त्यांनी केलेली कामगिरी महत्त्वाची आहे. त्यांची एकूण २० पुस्तके प्रकाशित झाली असून त्यांचा व्यासंग त्यावरून लक्षात येऊ शकेल. 'कंधार : एक ऐतिहासिक शहर', 'इतिहास एक शास्त्र', 'टेंपल्स ऑफ मराठवाडा' हे महत्त्वाचे ग्रंथ असून अनेक स्फूट लेख ग्रंथरूपात प्रकाशित व्हावयाचे आहेत. हदगाव तालुक्यातील शिवूर येथील वाकाटककालीन वैष्णव लेण्या त्यांनीच प्रथम प्रकाशात आणल्या. ऑल इंडिया हिस्ट्री कॉन्फरन्समध्ये अनेक शोधनिबंध सादर केलेल्या डॉ. प्रभाकर देव यांनी मराठवाडा इतिहास परिषदेचे अध्यक्षपद विभूषित केले असून हैद्राबाद मुक्तिसंग्रामाचा मौखिक दस्तावेजही त्यांनी संपादित केला आहे. हेरिटेज नांदेड हा त्यांचा ग्रंथ नांदेडची परंपरा अधोरेखित करतो.

कुठलीही आर्थिक मदत नसताना श्री. समुद्रगुप्त पाटील यांनी नांदेड जिल्ह्यातील अनेक गावांचा पायी दौरा करून प्राचीन नाणी, मातीची भांडी, ताम्रपट अशा ऐतिहासिक वस्तूंचा शोध लावून त्यावर लिहिलेले चिकित्सक लेख संशोधनविषयक नियतकालिकांत प्रसिद्ध केले आहेत.

## आधुनिक साहित्य

वाकाटककालीन प्रसिद्ध अग्रहाराची परंपरा असलेल्या नंदीनगरातील नंदीतडावरील प्राचीन विद्वत परंपरा आणि ज्ञानसाधना अनेक शतके नांदेड परिसरात ख्यातकिर्त होती. मध्ययुगातही साहित्यसाधना होत राहिली. निजामप्रांतीय मराठी साहित्य चळवळीतही नांदेडचे योगदान राहिले. स्वातंत्र्योत्तर कालखंडात महाविद्यालयीन शिक्षणाचा विस्तार झाल्यानंतर साहित्य अभिव्यक्तीला अधिक बहर आला. साहित्यिक, कथाकार, कादंबरीकार, कवी, समीक्षक असा एक वर्ग नांदेड परिसरात उदयाला आला. महाविद्यालयीन अध्यापन करीत अनेकांनी साहित्य निर्मिती केली. साहित्य समिक्षा केली. यात प्रामुख्याने महाविद्यालयातल्या प्राध्यापकांचा समावेश राहिला.

यशवंत महाविद्यालयात आरंभी मराठी विभाग प्रमुख व नंतर उपप्राचार्य म्हणून निवृत्त झालेले प्रा. भूजंग वाडीकर व्यासंगी वक्ते असून आस्वादक समीक्षक आहेत. त्यांची 'गजर', 'साक्षेप', 'पाणी नितळ गंगेचे', 'ज्ञानर्षी', 'लोभस' ही पुस्तके प्रकाशित झाली असून महाराष्ट्र शासनाच्या उत्कृष्ट वाङ्मय पुरस्कारासह त्यांना अनेक पुरस्कार मिळालेले आहेत.

प्रतिभानिकेतन महाविद्यालयाचे प्राचार्य असलेले डॉ. प्रकाश मेदककर यांचे वास्तव्य येथे येण्यापूर्वी बराच काळ परभणी जिल्ह्यात असले तरी ते मूळचे नांदेड येथील राहणारे आहेत. मराठी समीक्षेच्या क्षेत्रात त्यांच्या लेखनाला महाराष्ट्रातून मान्यता मिळालेली आहे. त्यांचे एकूण १५ ग्रंथ प्रकाशित आहेत. त्यापैकी 'सामाजिक नाटक : स्वरूप व विचार', 'नाटक : लोक आणि लौकिक', 'कविता म्हणजे काय?', 'साहित्यविचार : स्वरूप आणि परिसर', 'स्वामी रामानंद तीर्थ यांचे चरित्र' या ग्रंथांनी जाणकारांचे लक्ष वेधून घेतले आहे. स्वतंत्र लेखनाबरोबरच संपादन क्षेत्रातही त्यांनी उल्लेखनीय कार्य केले आहे. मराठवाडा साहित्य परिषदेच्या 'प्रतिष्ठान' या मुखपत्राचे ते दोन वर्ष संपादक होते. परभणी येथील अक्षर प्रतिष्ठान या दिवाळी अंकाचे सलग दोन वर्ष त्यांनी संपादन केले आणि त्या अंकांना मराठी मुद्रक परिषदेचे पुरस्कार प्राप्त झाले. याशिवाय परभणी येथील अखिल भारतीय नाट्य संमेलनाची 'नांदी' ही स्मरणिका त्यांनी संपादित केली होती.

देगलूर महाविद्यालयाचे प्राचार्यपद विभूषित केलेले प्राध्यापक लक्ष्मीकांत सखाराम तांबोळी कवी, कादंबरीकार आणि समीक्षक म्हणून ओळखले जातात. मराठवाडा साहित्य संमेलनाचे अध्यक्ष राहिलेले श्री. तांबोळी यांनी 'अस्वस्थ सूर्यास्त', 'गोकुळवाटा' हे महत्त्वाचे काव्यसंग्रह आणि 'दूर गेलेले घर', 'कृष्णकमळ' या कादंबऱ्या लिहिल्या आहेत. 'सयसावल्या' हे त्यांचे व्यक्तिपरिचयात्मक ललितलेखन प्रकाशित झाले असून अनेकविध विषयांवर बोलणारे रसाळ वक्ते म्हणूनही ते महाराष्ट्रात परिचित आहेत.

औरंगाबाद येथील सरस्वती भुवन महाविद्यालयाचे उपप्राचार्य म्हणून निवृत्त झालेले प्रा. तु. शं. कुळकर्णी यांनी बी. रघुनाथनंतर कथाकार म्हणून मराठवाड्यात नावलौकिक मिळविला. 'तृणाची वेदना', 'ग्रीष्मरेखा', 'अखेरच्या वळणावर' हे त्यांचे कथासंग्रह असून मराठवाडा साहित्य परिषदेच्या 'प्रतिष्ठान' या वाङ्मयीन नियतकालिकाचे दीर्घकाळ संपादनही त्यांनी केले आहे. कथालेखनाशिवाय समीक्षा, कविता व भाषांतरे प्रकाशित झाली असून मराठवाडा साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी

विभूषित केले आहे. 'कानोसा' त्यांचा काव्यसंग्रह प्रकाशित झाला असून 'स्वातंत्र्योत्तर मराठी कविता' हा त्यांचा मौलिक ग्रंथ साहित्य अकादमीने प्रकाशित केला आहे.

यशवंत महाविद्यालयातील मराठीचे प्राध्यापक अ.प.सूर्यवंशी यांनी भाषांतरित केलेला 'भारतीय मुस्लिम' हा ग्रंथ साहित्य आणि संस्कृती मंडळाने प्रकाशित केला आहे. उदय कुमठेकर यांनी बँक ऑफ बडोदातून मॅनेजर पदावरून स्वेच्छा निवृत्ती घेतली असून महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषदेचे ते २००२ ते २००५ पर्यंत कार्यकारिणी सदस्य होते. भारतीय तत्त्वज्ञान, संस्कृती व धर्म, प्राचीन भारतीय इतिहास ही त्यांची अध्ययनक्षेत्रे आहेत. 'वेध चार्वाकाचा', 'चार्वाकमंथन', 'श्रीमद्भगवद्गीता शांकरभाष्य भावानुवाद', 'सनातन धर्म', 'पू. जयेन्दू सरस्वती शंकराचार्य-कांची कामकोटी यांच्या व्याख्यानाचा मराठी अनुवाद', 'विष्णु सहस्रनाम शांकरभाष्याचा मराठी अनुवाद' ही त्यांची प्रकाशित पुस्तके आहेत.

प्रा. डॉ. गो. बं. देगलूरकर हे देगलूरच्या हरिभक्तपरायण बंडा महाराजांचे चिरंजीव आहेत. इतिहास आणि पुरातत्त्वशास्त्र यांचे अखिल भारतीय पातळीवरील अभ्यासक म्हणून त्यांना मान्यता आहे. नागपूर विद्यापीठातून पीएच.डी. पदवी संपादन केल्यानंतर १९७६ मध्ये नागपूर विद्यापीठाने 'टेंपल आर्किटेक्चर अॅन्ड स्कल्पचर ऑफ महाराष्ट्र' या प्रबंधाबद्दल त्यांना डी.लीट् ही पदवी प्रदान केली आहे. ब्रिटिश म्युझियम लंडन, रोम, नापोली, इटाली, लॉस एंजिल्स, शिकागो, बोरोबुद्दूर, इंडोनेशिया इ. ठिकाणी त्यांनी आमंत्रणावरून अभ्यासदौरे केले आहेत. त्यांचे प्राचीन भारतीय इतिहास, पुरातत्त्व, भारतीय मंदिर स्थापत्य, शिल्पकला, मूर्तिशास्त्र या विषयांवर सहा इंग्रजी व सात मराठी ग्रंथ प्रकाशित झालेले आहेत. याशिवाय त्यांचे १०० हून अधिक संशोधनपर लेख प्रसिद्ध झालेले आहेत.

प्राचार्य स. दि. महाजन हे नांदेडच्या शैक्षणिक व सांस्कृतिक चळवळीमध्ये अग्रेसर असून ख्यातनाम प्रतिभा निकेतन शिक्षण संस्थेचे ते मागील २२ वर्षांपासून सरचिटणीस आहेत. याच संस्थेच्या प्रतिभा निकेतन महाविद्यालयाचे प्राचार्यपद त्यांनी दीर्घकाळ विभूषित केले. याशिवाय अनेक संस्थांची महत्त्वाची पदे त्यांनी सांभाळली आहेत. त्यांचा व्यासंग व वाचन चौफेर असून मराठी साहित्य, इतिहास व मिथक ही त्यांच्या अभ्यासाची विशेष क्षेत्रे आहेत. १९८५ साली नांदेड येथे संपन्न झालेल्या ५९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते कार्याध्यक्ष होते. तसेच अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ आणि मराठवाडा साहित्य परिषदेचे ते कोषाध्यक्ष होते.

महाराष्ट्र शासनाच्या सहकारी विभागात अधिकारी असलेल्या श्री. भूजंग मेश्राम यांचा जन्म १ ऑक्टोबर १९५८ रोजी किनवट तालुक्यातील तुलशी मलकागुडा या जंगलातल्या वस्तीवर झाला. आश्रम शाळेत शालेय शिक्षण झालेल्या भुजंग मेश्रामची मातृभाषा गोंडी असून ते मराठी सोबतच गोंडी, बंजारी, परधानी, वऱ्हाडी, वारली अशा बोलीभाषांमधूनही काव्यलेखन करीत. 'गोंडी भाषेचे व्याकरण' आणि 'गोंडी-मराठी शब्दकोश' ही दोन संशोधनपर पुस्तके व 'उलगुलान' हा त्यांचा कवितासंग्रह प्रकाशित आहे. त्यांना राज्य व राष्ट्रीय स्तरावरील अनेक सन्मान लाभले आहेत. दुर्दैवाने त्यांचे अकाली निधन झाले. दु. म. लोणे हे दलित साहित्य मंडळाचे कार्यवाह असून 'घुगऱ्या' (कथासंग्रह) आणि 'आत्ममुद्रा' ही त्यांची पुस्तके आहेत.

Maharashtra State Gazetteers

महाराष्ट्र बँकेतील निवृत्त अधिकारी श्री. विजय पाडळकर यांनी लिहिलेली आस्वादक समीक्षा मौलिक असून त्यांचे अनेक ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. विशेषतः त्यांचे कथासंग्रह आणि चित्रपट समीक्षाविषयक लेखन प्रतिष्ठित व पुरस्कारप्राप्त आहेत. त्यांची 'देखिला अक्षरांचा मेळावा', 'चंद्रावेगळं चांदण', 'कथांच्या पायवाटा', 'चेकॉव्ह', 'भुवनशोम' (अनुवाद), 'गाण्याचे कडवे', 'मृगजळाची तळी', 'रानातील प्रकाश', 'रावीपार', 'वाटेवरचे सोबती', 'पाखरांची वाट', 'अल्पसंख्य' इत्यादी पुस्तके प्रकाशित झाली. जागतिक कथा व सिनेमा हे त्यांच्या अभ्यासाचे विषय असून त्यांचे लेखन शैलीदार आणि काव्यात्मक आहे.

प्रजावाणी दैनिकाचे संपादक म्हणून मराठवाड्यात स्वतंत्र स्थान निर्माण केलेले ज्येष्ठ पत्रकार सुधाकर डोइफोडे यांनी प्रजावाणीतून लिहिलेल्या अग्रलेखांचा 'शब्दबाण' हा संग्रह 'परवड' ही कादंबरी आणि 'प्रत्यार्पणाचे दिवस' हे हैद्राबाद मुक्तिसंग्रामावर आधारलेले पुस्तक प्रकाशित झाले आहे. त्यांचे विविध विषयावर चिंतन, मनन, लेखन चाललेले असते.

नांदेड येथे 'प्रतिभा' या नावाचे पहिले मराठी साप्ताहिक आणि 'गोदातीर समाचार' नावाचे दैनिक प्रकाशित करणारे ॲड. श्री. देविदास गंगाधर रसाळ हे रॉयवादी विचारवंत म्हणून प्रसिद्ध होते. त्यांचे चिरंजीव डॉ. रवींद्र रसाळ यांनी अनेक पुस्तके प्रकाशित केली असून विशेषतः त्यांनी लिहिलेले कार्ल मार्क्सचे चरित्र महत्त्वाचे आहे.

श्री. राजा मुकुंद यांनी ग्रामीण कवी म्हणून लिहिलेली दर्जेदार कविता 'तणावा' या त्यांच्या संग्रहात समाविष्ट आहे. श्री. गोविंद कुलकर्णी यांनी दर्जेदार कविता लिहिल्या असून 'मनाचे डोह', 'अनिमिष', 'पाऊले', 'तीन रंगाचे इंद्रधनुष्य', 'प्रेमाचा शब्द' इत्यादी काव्यसंग्रह प्रकाशित केले आहेत.

प्रतिभा निकेतन कॉलेजचे निवृत्त प्राचार्य डॉ. एल. एस. देशपांडे यांनी 'शोध संरचनांचा' हा वाङ्मय निर्मिती प्रक्रियेचा शोध घेणारा ग्रंथ आणि 'साहित्य सेतू' हा समीक्षेचा ग्रंथ लिहिला असून तूर्त ते बिर्ला फाऊंडेशनच्या अभ्यासवृत्तीच्या आधारे मराठी भाषांतरावर स्वतंत्र ग्रंथ लिहीत आहेत. त्यांनी लिहिलेले नरहर कुरूंदकरांचे इंग्रजी चरित्र साहित्य अकादमीने प्रकाशित केले आहे. भाषांतर प्रक्रिया हा त्यांचा अभ्यास विषय असून इंग्रजी व मराठी वाङ्मयाचा तौलनिक अभ्यास हे त्यांचे व्यासंगक्षेत्र आहे.

यशवंत महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख डॉ. जगदीश कदम यांनी 'मुडदे', 'आखर', 'मुक्कामाला फुटले पाय' हे कथासंग्रह लिहिले असून 'रास आणि गोंडर', 'झाड आणि माती', 'नामदेव शेतकरी' हे काव्यसंग्रह प्रकाशित केले आहेत. त्यांच्या पुस्तकांना महाराष्ट्र शासनाचे व इतर पुरस्कार मिळाले आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या मराठी विभागातून निवृत्त झालेले प्रा. दत्ता भगत यांनी 'खेळिया', 'अश्मक', 'वाटा आणि पळवाटा' ही नाटके लिहिली असून 'आवर्त' आणि 'जहाज फुटले आहे' हे एकांकिका संग्रह व 'दलित साहित्य : दिशा आणि दिशांतर' हे दलित साहित्य

समीक्षेवरील पुस्तक लिहिले आहे. मराठी नाट्यसंमेलनाचे अध्यक्षपद विभूषित केलेले दत्ता भगत दलित साहित्यिक म्हणून ख्यातनाम आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबादचे सध्याचे कुलगुरू डॉ. नागनाथ कोत्तापल्ले (जन्म : मार्च १९४४) हे मुखेड तालुक्यातील आहेत. १९७७ पासून ते औरंगाबाद येथे विद्यापीठात प्राध्यापक, नंतर १९९६ पासून पुणे विद्यापीठात मराठी विभाग प्रमुख म्हणून काम केल्यावर औरंगाबाद येथील विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून नियुक्त झाले. ते एक नाणावलेले समीक्षक, कवी, लेखक, कथाकार असून त्यांची 'मुड्स' (काव्य), 'कर्फ्यू आणि इतर कविता', 'काफिला', 'संदर्भ', 'राजधानी', 'रक्त आणि पाऊस', 'काऊची गोष्ट', 'देवाचे डोळे', 'सावित्रीचा निर्णय', 'मध्यरात्री', 'गांधारीचे डोळे', 'पराभव', 'ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि शोध', 'नवकथाकार शंकर पाटील यांच्या साहित्याचा अन्वयार्थ', 'अपार्थिवाचे गाणे' इत्यादी पुस्तके प्रकाशित झाली आहेत. याशिवाय अनेक पुस्तकांचे त्यांनी संपादन केले आहे.

नांदेड जिल्ह्यातील हदगाव येथील मूळ रहिवासी प्राचार्य गो. रा. म्हैसेकर रसायनशास्त्राचे प्राध्यापक असले तरी ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ, विविध विषयांचे अभ्यासक आणि उत्कृष्ट वक्ते म्हणून महाराष्ट्राला परिचित आहेत. हैद्राबाद मुक्ती संग्रामात त्यांनी मोलाची कामगिरी केली. शासकीय महाविद्यालय, औरंगाबाद येथे १९६३ पर्यंत प्राध्यापक राहिल्यानंतर नांदेड येथे नामदार शंकरराव चव्हाण यांनी स्थापन केलेल्या यशवंत महाविद्यालयाचे ते संस्थापक प्राचार्य झाले. मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरूपद विभूषित केल्यानंतर राज्यसभेचे खासदार म्हणून त्यांची नियुक्ती झाली. अनेक शासकीय समित्यांचे सदस्य व प्रमुख म्हणून त्यांनी दिलेले योगदान महत्त्वाचे आहे. इंग्रजी, मराठी व उर्दूतून त्यांचे अनेक लेख प्रकाशित झाले आहेत. त्यांनी आपले आत्मचरित्र प्रकाशित केले आहे. नांदेड जिल्ह्यातील प्राचीन शिलालेखांचा शोध घेण्यात प्राचार्य म्हैसेकरांचा मोलाचा वाटा आहे. डॉ.जी.सी.शेळके हे याच महाविद्यालयातील प्राध्यापक संशोधक लेखक म्हणून ख्यातकिर्त आहेत. शिलालेखावरचा त्यांनी संपादीत केलेला इंग्रजी भाषेतला ग्रंथ प्रसिद्ध आहे.

लातूर येथील बसवेश्वर महाविद्यालयात तत्त्वज्ञान विभाग प्रमुख म्हणून सेवारत असलेले नागोराव कुंभार (जन्म : १६ जून, १९५२) हे मूळ नांदेड जिल्ह्यातील मुखेडचे. विशिष्ट दर्जेदार मूल्य असलेले 'विचारशलाका' हे त्रैमासिक ते दीर्घकाळ प्रकाशित करीत आहेत. त्यांनी लिहिलेल्या महत्त्वपूर्ण ग्रंथांपैकी 'तरूण मनाच्या वाटा आणि वळणे', 'भ्रष्टाचार : स्वरूप आणि संदर्भ', 'विचारतरंग', 'डॉ. बाबासाहेब विचार दर्शन', 'शाहीर अण्णाभाऊ साठे', 'न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे', 'आचार्य शं.द.जावडेकर', 'भूकंप : एक नैसर्गिक आपत्ती', 'सामाजिक चळवळ : काल, आज आणि उद्या', 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे', 'महाराष्ट्रातील नियतकालिके', 'मुस्लिम साहित्य व समाज चिंतन' इत्यादी ग्रंथ महत्त्वाचे आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात समाजशास्त्राचे प्राध्यापक असलेले डॉ. बा. ह. कल्याणकर (जन्म : ऑक्टोबर १९४७) हे नांदेड जिल्ह्यातील गोबदरी या गावचे एक प्रतिभाशाली कवी आणि फर्डे वक्ते. 'उत्सव', 'जागर', 'तांबडं फुटलं', 'शिलालेख', 'सोनचाफा' आणि

'युद्धशाला' हे त्यांचे काव्यसंग्रह आणि 'कंदील', 'अराजक' आणि 'पूर्वसंध्या' या कादंबऱ्या प्रकाशित झाल्या आहेत. 'सूर्यपंख', 'दिशा आणि दृष्टी', 'महात्मा फुले यांचे सामाजिक विचार' ही त्यांची वैचारिक पुस्तके असून अनेक ग्रंथाचे संपादन त्यांनी केले आहे. 'लोकमित्र' या साप्ताहिकाचे आणि 'युगकर्ता' या त्रैमासिकाचे त्यांनी संपादन केले आहे. त्यांना अनेक पुरस्कार मिळाले असून अनेक सन्माननीय पदे त्यांनी विभूषित केली आहेत.

विद्युत मंडळाच्या सेवेतून निवृत्त झालेले श्री. सुधाकर गाजरे (जन्म : नोव्हेंबर, १९४१) हे सातत्याने विविध प्रकारचे लेखन करीत असतात. त्यांची 'जखमा', 'क्षितिजरेषा', 'गंमतजंमत', 'जमाडी जंमत', 'सदाबहार' इत्यादी पुस्तके प्रकाशित झाली आहेत. अर्जापूर ता. बिलोली येथील पानसरे महाविद्यालयातून हिंदीचे प्राध्यापक म्हणून निवृत्त झालेले प्रा. अमृत देशमुख (जन्म : जून, १९३६) हे नांदेड तालुक्यातील तरोडा येथील रहिवाशी. त्यांनी कविता, अभंग, कादंबरी, आत्मचरित्र इत्यादी वाङ्मयप्रकार हाताळले असून 'तराणा', 'कॉकटेल', 'अमृताचे अभंग', 'अभिषेक', 'जीवनवाटा', 'संत पाचलेगावकर', 'माहेरी नांदते सासू' इत्यादी पुस्तके लिहिली असून अजून काही पुस्तके प्रकाशनाच्या मार्गावर आहेत.

आय.ए.एस. अधिकारी म्हणून महाराष्ट्रात प्रसिद्ध असलेले आणि अनेक ठिकाणी महत्त्वाची अधिकारपदे विभूषित केलेले श्री. लक्ष्मीकांत देशमुख (जन्म : सप्टेंबर, १९५५) हे एक उत्तम लेखक म्हणून प्रसिद्ध आहेत. कथा, कादंबरीसारखे अवघड वाङ्मयप्रकार त्यांनी हाताळले असून मराठी साहित्यात मोलाची भर घातली आहे. 'सलोणी', 'अंधेर नगरी', 'इन्कीलाब विरूध्द जिहाद' या उत्कृष्ट कादंबऱ्या आणि 'अंतरीच्या गूढगर्भी', 'उदक' इत्यादी कथासंग्रह प्रसिद्ध आहेत.

हदगाव तालुक्यातील हडसनीचे रवीचंद्र हडसणकर नांदेडच्या नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालयात मराठीचे प्राध्यापक होते. त्यांनी लिहिलेली कविता दर्जेदार असून त्यांचे अनेक काव्यसंग्रह प्रकाशित झालेले आहेत.

हदगाव तालुक्यातील कोळी येथील रहिवाशी प्रा. भगवंत क्षीरसागर हे एक प्रतिभाशाली कवी असून 'मध्यान्ह' हा त्यांचा काव्यसंग्रह प्रकाशित झाला आहे. त्यांनी यवतू शेनको या लोकविलक्षण रशियन कवीच्या आत्मकथेचा अनुवाद केला आहे.

हैद्राबाद मुक्तीसंग्रामात स्वातंत्र्यसैनिक म्हणून काम केलेल्या नांदेडच्या पीपल्स कॉलेजच्या निवृत्त प्राचार्या डॉ. तारा परांजपे यांनी संशोधनाच्या क्षेत्रात महत्त्वाची कामगिरी केली आहे. विशेषतः 'तेलुगू आणि मराठी सीमारेषेवरील लोकगीतांचा अभ्यास' हा त्यांचा प्रबंध व 'स्वामी रामानंद तीर्थांचे चरित्र' हे त्यांचे ग्रंथ विद्वतमान्य झालेले आहेत. स्त्रीमुक्ती, जाती निर्मूलन, निराधार मुलांचे संगोपन, प्रौढ शिक्षण इत्यादी सामाजिक कार्य करतानाच त्यांनी अनेकविध विषयांवर लेखन केले आहे.

नांदेड येथील स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. वृषाली किन्हाळकर या कवयित्री आणि ललित लेखिका म्हणून प्रसिद्ध आहेत. 'वेदना', 'तिन्हीसांज होताना', 'ठेवणीतले आठव', 'जीवनगाणे' ही त्यांची काही प्रसिद्ध पुस्तके असून त्यांना अनेक पुरस्कार व सन्मान मिळाले आहेत.

Maharashtra State Gazetteers

नांदेड जिल्ह्यातील कवठ्याचे राहणारे डॉ. भगवान कवठेकर (जन्म : फेब्रुवारी, १९४२) हे एक प्रतिभाशाली कवी असून 'कविवर्य दे.ल.महाजन यांच्या कवितेचा विवेचक अभ्यास' हा त्यांचा पीएच.डी. चा प्रबंध प्रकाशित झाला आहे. 'आगलावा', 'गगनगंध', 'अनुगामी', 'भाळआभाळ', 'वंचना', 'अभिषिक्त', 'भ्रमविभ्रम', 'वसुधा', 'विशांत' इत्यादी त्यांची ग्रंथसंपदा असून कादंबरी कविता आणि विशेषतः गझल हा काव्यप्रकार त्यांनी समर्थपणे हाताळला आहे.

नांदेड जिल्ह्यातील मूळ रहिवाशी शिवाजी गऊळकर (जन्म : सप्टेंबर, १९३३) हे जालना येथील महाविद्यालयात मराठीचे प्राध्यापक होते. नरहर कुरूंदकरांच्या बरोबर सहलेखक म्हणून त्यांनी 'रिचर्डस्‌ची कलामीमांसा' हा ग्रंथ लिहिला असून त्यांनी लिहिलेल्या महत्त्वाच्या पुस्तकांत 'प्राचीन मराठीतील प्रणयाख्याने', 'उपासना', 'साधना', 'निर्मोही', 'अपर्णा', 'प्राचीन मराठी आख्यानक कविता : उद्‌गम आणि विकास' इत्यादी पुस्तके महत्त्वाची असून प्राचीन मराठी वाङ्‌मयाचे संशोधन करून त्यांनी लिहिलेले काही ग्रंथ आणि शोधनिबंध मराठी वाङ्‌मय कोशात नोंदविले गेले आहेत. 'प्राचीन मराठी आख्यानक कवितेच्या विकासाचा चिकित्सक अभ्यास' हा नामवंत समीक्षक वा.ल.कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली लिहिलेला पीएच.डी चा प्रबंध महत्त्वपूर्ण आहे. ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक पद्मविभूषण गोविंदभाई श्रॉफ यांचे चरित्र त्यांनी लिहिले आहे.

नायगाव येथील महाविद्यालयातील हिंदीचे प्राध्यापक डॉ. भारतभूषण गायकवाड (जन्म : ऑगस्ट, १९५५, मृत्यू जुलै, १९९४) एक चिंतनशील मराठी कवी म्हणून प्रसिद्ध होते. त्यांनी स्थापन केलेल्या आविष्कार साहित्य मंडळाकडून प्रतिवर्षी मेळावे, संमेलने आयोजित केली जातात. या मेळाव्यांतून त्यांनी वाङ्‌मयीन चळवळीला गती दिली. 'आयुध', 'दिशांतर' हे त्यांचे काव्यसंग्रह प्रकाशित झालेले आहेत.

**गुराखी साहित्य :** शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ राजकीय नेते आणि कंधार मतदार संघातून अनेक वेळा निवडून आलेले आमदार श्री. केशवराव धोंडगे हे लोकप्रिय वक्ते असून सामाजिक, राजकीय आणि शैक्षणिक या सर्व क्षेत्रात त्यांनी केलेल्या कामगिरीबरोबरच अनेकविध विषयांचा अभ्यास करून आपल्या वैशिष्ट्यपूर्ण शैलीत महत्त्वाचे ग्रंथ प्रकाशित केले आहेत. 'सज्जनगडास', 'आसनगावच्या समर्थ दासीचा दासबोध', 'शंबुकाचा खुनी राम व त्याची वानरशाही', 'महाराष्ट्राच्या शक्तीची भारगर्जना', 'केशवायन', 'मुक्तेश्वरी गीता', 'गीता रहस्याचे रहस्य', 'गुराखी नित्यपाठ' इत्यादी जवळपास २५ पेक्षा अधिक पुस्तके त्यांनी लिहिली आहेत. निर्भीड व पुरोगामी विचारवंत म्हणून त्यांनी सार्थ लौकिक मिळविला आहे. श्री. केशवराव धोंडगे यांची विशेषता म्हणजे ते दरवर्षी जिल्ह्यातील कंधार येथील गुराखी गडावर प्रजासत्ताकदिनी 'जागतिक गुराखी साहित्य संमेलन' आयोजित करतात. सुमारे २५ वर्षांपूर्वी लोहा व कंधार तालुक्यांच्या सीमेवर असलेली एक टेकडी विकसित करून त्यांनी तिला गुराखीगड हे नाव दिले आणि सन १९९३ मध्ये येथे पहिले गुराखी साहित्य संमेलन भरविले. आजपर्यंत अशी १७ साहित्य संमेलने पार पडलेली आहेत. भारतीय संस्कृतीचा गाभा उलगडून दाखविणारे गुराखी साहित्य मौलिक स्वरूपात असून ग्रामीण दैनंदिन जीवन नियंत्रित करण्याचे सामर्थ्य या संमेलनात असते. यात गुराख्यांचे सवंगडी सालदार, मेंढपाळराजा असून

त्यांचे गणगोत मसणजोगी, पोतराज, वासुदेव, कुडमुडे जोशी, गोंधळी, वाघ्या मुरळी, पांगूळ, डोंबारी, कैकाडी, वारू, फकीर, गोसावी राईंदर, अस्वलवाले, नंदीवाले, मनकवडी, सापगारूडी, खेळवाले, तमाशेवाले, माकडवाले, गोंदणवाले आपापली सांस्कृतिक कला सादर करतात. या संमेलनात गुराखी मुक्तनाट्य, मुक्तकथा, मुक्तगीते सादरीकरणातून ग्रामीण भागातील सूक्ष्म बारकावे, जनजीवनाचे सूक्ष्म निरीक्षण आणि विविध भावतरंग लक्षणीयरित्या उमटतात.

साहित्य, संगीत, नाट्य अशा अनेकविध क्षेत्रात निरपेक्ष व निःस्पृहपणे अखंड योगदान दिलेल्या डॉ. लीला चंद्रशेखर धर्मापुरी (जन्म : ११ फेब्रुवारी, १९३०) या नांदेडच्या रहिवाशी असून त्यांची 'मधुबोल' ही कादंबरी तसेच 'निळेपाणी', 'हिरवी झाडे', 'सुषमा', 'वेलू गेला गगनावरी', 'अंदमान सागरातील मोती पोवळे', 'खडकावरील अंकुर', 'श्रावणस्वप्न', 'ललिता पंचमी', 'साद', 'हे माझे घर' हे त्यांचे कथासंग्रह प्रकाशित झाले आहेत. अजूनही त्यांचे लेखन चालू आहे.

नांदेडचे रविन्द्र तांबोळी हे प्रतिभाशाली तरूण कवी असून 'अनुवंश' हा त्यांचा काव्यसंग्रह प्रकाशित झाला आहे. नांदेडचे हरी गणपत देशमुख (जन्म : ऑक्टोबर, १९३३) हे निवृत्त गटशिक्षणाधिकारी संत साहित्याचे अभ्यासक असून 'चांगदेव पासष्टी विवरण', 'चिरंजीव पद विवरण', 'भूवैकुंठ' इत्यादी २४ पुस्तके त्यांनी लिहिली आहेत. नांदेड जिल्ह्यातील मुदखेडचे ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक हैद्राबाद निवासी ॲड. द. मा. देशमुख हे प्रभावी वक्ते म्हणून प्रसिद्ध होते. हिंदू महासभेचे ज्येष्ठ नेते असणाऱ्या देशमुखांनी 'हिंदूंचे पुनरूत्थान', 'जनपद' आणि 'अतिमानव' इत्यादी ग्रंथ लिहिले आहेत.

तंत्रनिकेतन मध्ये इंजिनिअरींगची पदवी घेतल्यानंतर प्राध्यापक झालेले ज्येष्ठ विचारवंत शेषराव मोरे हे आपल्या व्यासंगासाठी देशभर विख्यात आहेत. नांदेड जिल्ह्यातील मुखेड तालुक्यातील जाम या गावी एका शेतकरी कुटुंबात जन्मलेले (१७ ऑगस्ट, १९४८) श्री. मोरे निवृत्तीनंतर नांदेडच्या न्यायालयात वकिली करतात. बी.ई. नंतर त्यांनी कायद्याची पदवी मिळवली. त्यांची पुढील पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. 'सावरकरांचा बुध्दीवाद : एक चिकित्सक अभ्यास', 'सावरकरांचे समाजकारण : सत्य आणि विपर्यास', 'काश्मिर : एक शापित नंदनवन', 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक धोरण : एक अभ्यास', 'अप्रिय पण .....', 'मुस्लीम मनाचा शोध', 'शासन पुरस्कृत मनुवादी : पांडुरंग शास्त्री आठवले', 'चार आदर्श खलिफा' या त्यांच्या महत्त्वपूर्ण ग्रंथांच्या आवृत्त्या निघाल्या असून शासकीय व अनेक प्रतिष्ठित पुरस्कारांनी त्यांचा गौरव झाला आहे. महाराष्ट्रातील अनेक ठिकाणी त्यांची व्याख्याने झाली आहेत.

उमरी गावी प्राध्यापक असलेले श्री. भगवान अंजनीकर (जन्म : जुलै, १९५४) वाङ्मयीन चळवळीत अग्रभागी असतात. बालसाहित्यात त्यांनी अनेक पुस्तके लिहिली असून 'अस्वस्थ किनारा' ही कादंबरी, 'निमित्त' हा ललित लेख संग्रह, 'साक्षदा' हा काव्यसंग्रह आणि इतर काही पुस्तके त्यांनी लिहिली आहेत. त्यांच्या लोकनाट्याचे विदर्भ-मराठवाड्यात अनेक प्रयोग झाले आहेत.

गुरू गोविंदसिंघ इंजिनिअरींग कॉलेजचे उपप्राचार्य डॉ. शंभुनाथ कहाळेकर यांनी विविध पुस्तके लिहिली असून विशेषतः विज्ञान विषयावर त्यांची २० पेक्षा अधिक पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत.

विज्ञानकीर्तनाद्वारे जनजागृती व अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य हे त्यांचे वैशिष्ट्य आहे. नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालयातील मराठीचे प्राध्यापक डॉ. दीपक कासराळीकर यांनी विविध विषयांवर लेखन केले असून त्यांचा 'अंतर्वेध' हा समीक्षाग्रंथ प्रकाशित झाला आहे. नांदेडच्या श्रीमती विजया प्रभाकर कुळकर्णी (जन्म : डिसेंबर, १९२८) या विदर्भात हिंगणघाट येथे शिक्षिका होत्या. 'स्मृतीगंध' हा त्यांचा ग्रंथ प्रसिद्ध आहे. त्यांनी अनेक विषयांवर स्फुट ललित लेखन केले असून त्यांची भाषाशैली ओघवती आहे.

नांदेडच्या रहिवाशी असलेल्या सौ. शारदा तुंगार (जन्म : जून, १९४५) या युगमंथनच्या संपादिका असून हिंदीच्या प्राध्यापिका म्हणून निवृत्त झाल्या आहेत. 'शिकवणी' हा वैचारिक लेखसंग्रह, 'दीर्घग्रंथातून अभिव्यक्त झालेले वास्तव जीवन', 'मराठवाड्याची वैचारिक व सामाजिक जडणघडण', 'पाथेय' ही पुस्तके त्यांनी लिहिली आहेत. धर्माबाद येथे मराठीच्या प्राध्यापिका म्हणून सेवानिवृत्त झालेल्या डॉ. अरूणा चौधरी यांनी 'कांत : काव्यदर्शन आणि शोध' ही पुस्तके लिहिली आहेत.

सेलू येथे मराठीचे प्राध्यापक असलेले डॉ. या. रा. गायकवाड हे मूळचे बिलोली तालुक्यातील रहिवाशी. त्यांनी अनेक पुस्तके लिहिली असून 'अन्वयार्थ', 'दलित साहित्य चित्र आणि चरित्र', 'जनसंवाद', 'डॉ. आंबेडकर : जीवन आणि कार्य', 'अस्वस्थ किनारा', 'अब्राहम लिंकनची पत्रे' ही त्यापैकी काही महत्त्वाची पुस्तके. त्यांना अनेक पुरस्कार मिळाले आहेत.

स्टेट बँक ऑफ हैद्राबादमध्ये असलेले श्री. तुकाराम खिल्लारे (जन्म : जुलै, १९५९) नांदेड जिल्ह्यातील सोनखेड या गावचे रहिवाशी. त्यांचे 'अरूण', 'मुक्त फकीर', 'निळ्या हिरव्या तळ्यात' हे काव्यसंग्रह प्रकाशित झाले आहेत. नांदेडच्या महिला महाविद्यालयात मराठीचे प्राध्यापक असलेले श्री. शशी खुळे (जन्म : जून, १९५०) यांनी विपुल काव्यलेखन केले असून त्यांचा 'राधा' हा काव्यसंग्रह प्रकाशित आहे. नांदेड जिल्ह्यातील देगलूर गावी बँकेत अधिकारी असलेले बाबू बिरादार हे नामवंत कादंबरीकार आहेत. त्यांनी लिहिलेल्या 'कावड', 'मातीखालचे पाय', 'अग्निकाष्ट', 'गोसावी', 'संभूती', 'अंतःपुरूष' या कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत. नांदेडच्या पीपल्स कॉलेजमधील मराठीचे प्राध्यापक म्हणून निवृत्त झालेले ज्येष्ठ अभ्यासक श्री. माधवकृष्ण सावरगावकर हे विख्यात कवी आहेत. अलोन या टोपण नावाने त्यांनी लिहिलेल्या कविता अनेक दर्जेदार नियतकालिकांतून प्रसिद्ध झाल्या असून 'हायकू' हा काव्यप्रकार त्यांनी विशेषत्वाने हाताळला.

नांदेडच्या प्रतिभा निकेतन महाविद्यालयातील मराठीचे प्राध्यापक डॉ. जीवन पिंपळवाडकर (जन्म : २४ ऑगस्ट, १९५१) हे सातत्याने वाङ्मयीन लेखन करीत असतात. मराठी नाट्य चळवळीत विशेष रस असणारे पिंपळवाडकर अ.भा. मराठी नाट्य परिषदेचे नियामक मंडळ सदस्य आहेत. त्यांनी अनेक संगीत व गद्य मराठी नाटकात काम केलेले असून त्यांची 'प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास' व 'भारतीय साहित्य विचार' ही पुस्तके प्रसिद्ध आहेत.

नांदेडच्या प्रतिभा निकेतन महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. हरिहर कुलकर्णी यांनी फुलब्राईट स्कॉलरशीप मिळवून अमेरिकेतील कॅलिफोर्निया येथून नोबेल पारितोषिक विजेत्या आफ्रिकन कादंबरीकार डॉ. पॉल मार्शल यांच्यावर पीएच.डी. चा प्रबंध लिहिला आहे. त्याआधारे 'व्हाईसेस

ऑफ ब्लॅक फेमिनिझम' हा ग्रंथ प्रकाशित केला आहे. नांदेडच्या यशवंत महाविद्यालयाचे निवृत्त प्राचार्य डॉ. बी. एस. ढेंगळे यांनी इतिहास संशोधनाच्या क्षेत्रात महत्त्वाचे ग्रंथ प्रकाशित केले असून त्यांचा हैद्राबाद मुक्तिसंग्रामावरील प्रबंध संदर्भ ग्रंथ म्हणून मौलिक आहे. पीपल्स कॉलेजमधील इंग्रजीचे प्राध्यापक डॉ. एस. जी. भानेगावकर यांनी 'नॉव्हेल्स ऑफ जीन रीस ॲन एक्झीस्टेंशीयल परस्पेक्टीव्ह' हा महत्त्वपूर्ण ग्रंथ लिहिला आहे. यशवंत महाविद्यालयातील इंग्रजीच्या प्राध्यापिका श्रीमती विद्या गहिलोत यांनी 'शॉर्ट स्टोरीज ऑफ रविंद्रनाथ टागोर' : 'ए स्टडी इन फेमिनाईन कॉंशेसस' हा ग्रंथ प्रकाशित केला आहे.

माहूरच्या उदाराम राजे घराण्यात जन्मलेले मधुकर जगजीवनराम देशमुख (१९२२ ते २००६) हे महाराष्ट्रात शिकारी व जंगलाचा अभ्यास यासाठी विख्यात होते. आपल्या अनुभवावर त्यांनी 'शिकारनामा' आणि 'शिकारीराजा' ही दोन पुस्तके प्रसिद्ध केली असून त्यांचे मराठी, संस्कृत, इंग्रजी, फ्रेंच, उर्दू, अरबी, फार्सी इत्यादी भाषांवर प्रभुत्व होते. शास्त्रीय संगीत त्यांच्या आवडीचा भाग होता.

नांदेड निवासी प्रा. देवदत्त तुंगार, रोहा (जिल्हा रायगड) येथून प्राचार्य म्हणून निवृत्त झाले आहेत. ते एक जुने जाणते पत्रकार असून अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत. आर्य समाजाचे सक्रिय कार्यकर्ते असलेले श्री. तुंगार आंतरजातीय विवाहाचे पुरस्कर्ते असून गेली ५० वर्षे विविध नियतकालिकांतून, वृत्तपत्रातून सातत्याने लेखन करीत असतात. डॉ. प्रभावती देव एक प्रतिभाशाली कवयित्री असून त्यांचा काव्यसंग्रह प्रकाशनाच्या मार्गावर आहे. सायन्स कॉलेजमधील वनस्पती शास्त्राच्या निवृत्त प्राध्यापिका डॉ. उषा देशपांडे यांनी कथा व ललित लेखन केले असून त्यांची काही पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

पीपल्स हायस्कूलमधून शिक्षिका म्हणून निवृत्त झालेल्या श्रीमती उषा एकताटे यांनी कथा, कादंबरी, कविता इत्यादी वाङ्मय प्रकारात लेखन केले असून नांदेड जिल्ह्यातील गढ्या आणि बुरूज यांच्या अभ्यासावर आधारित त्यांचे एक पुस्तक प्रकाशित झाले आहे. डॉ.एस.जी.देशपांडे हे पीपल्स कॉलेजमधील इंग्रजीचे निवृत्त प्राध्यापक असून स्वातंत्र्यवीर सावरकर हा त्यांचा निष्ठाविषय आहे. डॉ. देशपांडे अनेकविध विषयांचे अभ्यासक आहेत. 'पानिपत ते पानिपत', 'मराठ्यांचा इतिहास', 'प्राचीन भारतीय राजनिती', 'सावरकरांचे आठवावे विचार', 'सावरकरवाद', 'राष्ट्रविचार', 'सावरकर', 'प्रॉफेटिक व्हाईस', 'सावरकर राजधर्म' इत्यादी त्यांची पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

संस्कृत, मराठीवर विलक्षण प्रभुत्व असलेले श्री. भा. रं. कुलकर्णी हे नांदेड येथील पीपल्स हायस्कूलचे मुख्याध्यापक होते. विविध धर्मांच्या व पंथांच्या तत्त्वज्ञानाचा तौलनिक अभ्यास हे त्यांचे वैशिष्ट्य होते. त्यांचा 'ॲस्ट्रानॉमिकल ओरिजिन ऑफ हिंदू ट्रिनेरी (भारतीय देवत्रयी)' हा इंग्रजी ग्रंथ श्री. कानोले यांच्या गोदातीर इतिहास संशोधन मंडळाने प्रकाशित केला असून तो विद्वत्मान्य आहे. त्यांनी पारसी पंथाचे संस्थापक झरत्रुष्टांच्या आवेस्ता या धर्मग्रंथाच्या आधारे लिहिलेला विश्लेषणात्मक ग्रंथ विख्यात आहेत.

नांदेड शहरातील प्रसिद्ध स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. सौ. ज्योती देशमुख (माजी आमदार डॉ. डी. आर. देशमुख यांच्या पत्नी) या संवेदनशील कवयित्री असून त्यांचा 'जीवनगाणे' हा कविता संग्रह प्रकाशित

झाला आहे. नांदेडचे प्रसिद्ध हृदयरोग तज्ज्ञ डॉ. व्यंकटेश काब्दे हे माजी खासदार असून विद्यार्थी दशेपासूनच काव्यलेखन करतात. त्यांचा 'उन्मेष' हा काव्यसंग्रह प्रकाशित झाला आहे. मराठीचे प्राध्यापक श्या. द. जोंधळे हे दलित कवी असून त्यांचा 'आडोसा' हा काव्यसंग्रह प्रकाशित झाला आहे.

पीपल्स कॉलेज, नांदेड येथे एकेकाळी राज्यशास्त्राचे प्राध्यापक असलेले आणि उपजिल्हा निबंधक, सहकार खाते या शासकीय अधिकारी पदावर काम केलेले श्री. श्रीकांत देशमुख हदगाव तालुक्यातील मूळ रहिवाशी असून त्यांची सामाजिक जाणीव असलेली कविता रसिकांच्या कसोटीस उतरली आहे. 'बळीवंत' या त्यांच्या काव्यसंग्रहास आणि 'महाराष्ट्रातील शेतकरी चळवळ' या संदर्भ ग्रंथास अनेक पुरस्कार मिळाले आहेत. 'आषाढमाती' हा त्यांचा नवीन काव्यसंग्रह असून 'महानोरांची कविता' या पुस्तकाचे संपादन त्यांनी केले आहे.

श्री. मधुकर धर्मापुरीकर यांनी महाराष्ट्रात नामवंत कथाकार आणि व्यंगचित्र अभ्यासक म्हणून प्रतिष्ठा प्राप्त केली आहे. त्यांच्या कथा महाराष्ट्रातील दर्जेदार नियतकालिकांत प्रकाशित झाल्या असून 'अप्रूप', 'रूप', 'विश्वनाथ', 'चिनमुल' हे कथासंग्रह प्रकाशित झाले आहेत. विख्यात व्यंगचित्रकार श्री. वसंत सरवटे यांच्याशी दीर्घकाळ चर्चा करून काढलेल्या निष्कर्षाच्या आधारे त्यांनी लिहिलेला 'व्यंगचित्र : एक संवाद' हा ग्रंथ या क्षेत्रातील अभ्यासकांनी महत्त्वपूर्ण मानला आहे.

सौ. लीला धंपलवार यांनी विविध विषयांवर लेखन केले आहे. 'गुलमोहर' हा कवितासंग्रह, 'वर्षा हसली' हा बालगीत संग्रह, 'कॅलेंडर बाबाची मुले' हे आत्मवृत्त ही त्यांची पुस्तके प्रकाशित झाली आहेत. मधु कुरूंदकर यांचे आरंभीचे लेखन भृंगराज कुरूक्षेत्री या नावाने प्रसिद्ध झाले आहे. कथा, कविता, कादंबरी हे वाङ्मयप्रकार त्यांनी हाताळले असून 'संगत नरहरीचे' हे व्यक्तिवेध घेणारे पुस्तक, 'सुकन्या', 'महिमा' इत्यादी कादंबऱ्या लिहिल्या आहेत. श्री.एल.के.कुलकर्णी हे विज्ञान विषयक लेखनात अग्रेसर असून त्यांनी लिहिलेली 'विज्ञानातील गमती जमती', 'आकाशवेध', 'भूगोलकोश' इत्यादी पुस्तके प्रकाशित आहेत.

यशवंत महाविद्यालयातील समाजशास्त्र विषयाचे निवृत्त पदव्यूत्तर विभाग प्रमुख श्री.जे.पी.करवा यांनी समाजशास्त्र विषयक जवळपास सहा ग्रंथ लिहिले असून अनेक देशांतील चर्चासत्रात सहभागी होऊन आपले शोधनिबंध सादर केले आहेत. त्यांची पुढील पुस्तके प्रसिद्ध आहेतः- 'समाजशास्त्राची मूलतत्त्वे', 'अभिनव समाजशास्त्र', 'सुलभ समाजशास्त्र', 'समाजव्यवस्था आणि समाज परिवर्तन', 'समाजशास्त्रातील मुलभूत सिद्धांत' इत्यादी.

नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालयातील लोकप्रशासन विभाग प्रमुख प्रा. लक्ष्मण कोत्तापल्ले यांनी 'पाश्चिमात्य व भारतीय प्रशासकीय विचारवंत', 'सामाजिक प्रशासन' इत्यादी अभ्यासपूर्ण ग्रंथ प्रसिद्ध केले आहेत.

श्री. शिवाजी कॉलेज, कंधार येथील इतिहासाचे प्राध्यापक श्री. अनिल कठारे यांनी 'अमेरिकेचा इतिहास', 'जागतिक घडामोडीचा इतिहास', 'आशियाचा इतिहास', 'प्राचीन भारत', 'मध्ययुगीन भारत', 'आधुनिक भारताचा इतिहास', 'आधुनिक युरोप', 'आधुनिक चीन', 'आधुनिक जगाचा

इतिहास' इत्यादी ग्रंथ लिहिले असून २००६ साली जुन्नर येथे झालेल्या इतिहास परिषदेचे अध्यक्षपद त्यांनी विभूषित केले आहे. पीपल्स कॉलेजमधील इतिहासाचे प्राध्यापक श्री.पी.जी.जोशी यांनी स्वामी रामानंद तीर्थ आणि गानमहर्षी अण्णासाहेब गुंजकर यांची चरित्रे लिहिली असून इतिहासाशी निगडित अनेक पुस्तके प्रकाशित केली आहेत. नांदेड जिल्ह्यातील कीर्तन परंपरेचा त्यांनी धांडोळा घेतला आहे. नांदेड येथील पहिल्या स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. प्रमिलाताई नारायणराव भालेराव यांनी आपले 'अश्वत्थ्याची सळसळ' हे आत्मचरित्र प्रकाशित केले आहे.

पीपल्स कॉलेजमध्ये वाणिज्य शाखेत दीर्घकाळ प्राध्यापक राहिलेले आणि आध्यात्मिक वाङ्मयाचा सखोल अभ्यास असलेले श्री. दिलीप गोगटे यांनी अनेक ग्रंथ लिहिले आहेत. त्यापैकी 'एक तरी ओवी अनुभवावी' हा त्यांचा ज्ञानेश्वरीवरील ग्रंथ महत्त्वपूर्ण असून 'कंठोपनिषद : एक चिंतन', 'अभंग चिंतन', 'उपनिषदाचे तत्त्वज्ञान : एक तोंडओळख', 'गुणगंधा' ही त्यांची इतर पुस्तके आहेत. शिखांचे दहावे गुरू श्री. गुरू गोविंदसिंघजी यांच्या पंथीय गुरूत्व लाभलेल्या गुरू ग्रंथसाहेब या महत्त्वपूर्ण ग्रंथाचा अनुवाद त्यांनी केला आहे.

नांदेड येथील सुप्रसिद्ध मनोरूग्णतज्ज्ञ डॉ. नंदकुमार मुलमुले हे त्यांच्या एकपात्री 'मनाचिये गुंती' या उत्कृष्ट कार्यक्रमामुळे महाराष्ट्रात ख्यातनाम आहेत. सिग्मंड फ्राईड, युंग यांच्यापासून आधुनिक मानसशास्त्रज्ञांचा त्यांनी चिंतनपर अभ्यास केला असून ग्रेसच्या कवितांवर मनोविश्लेषणात्मक पद्धतीने त्यांनी लिहिलेला 'रचनेच्या खोल तळाशी' हा अप्रतिम शोधग्रंथ व इतर स्फुट लेखन वेगळ्या वळणाचे व महत्त्वपूर्ण आहे. सायन्स कॉलेजमधील मराठीचे प्राध्यापक रावजी राठोड यांचे 'तांडेल' व 'अस्वस्थ तांडा' हे आत्मकथनाचे दोन भाग आणि 'विमुक्तवेध' हा भटक्या व विमुक्त समाजाच्या प्रश्नांची मांडणी करणारा तसेच 'मलाण' हा काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला आहे. त्यांच्या लेखनास अनेक पुरस्कार मिळाले आहेत.

यशवंत कॉलेजमधील इतिहास विभाग प्रमुख डॉ. उत्तम सावंत यांनी मराठवाड्याचे ज्येष्ठ नेते, माजी मुख्यमंत्री तसेच केंद्रीय गृहमंत्री नामदार शंकरराव चव्हाण यांच्या कार्याचे संशोधन करून पीएच.डी. साठी प्रबंध लिहिला आहे. या प्रबंधाच्या आधारे त्यांनी लिहिलेले 'शंकरराव चव्हाण जीवनकार्य' तसेच 'महाराष्ट्र विधिमंडळातील शंकरराव चव्हाण' हा मौलिक ग्रंथ महाराष्ट्राच्या राजकारणाचा अभ्यास करणाऱ्यांसाठी उपयुक्त आहे. याशिवाय 'माहूर : एक सांस्कृतिक अभ्यास', 'मराठवाडा आंबेडकरी चळवळ : एक चिंतन', 'मराठवाड्यातील ऐतिहासिक किल्ले' इत्यादी ग्रंथ त्यांनी लिहिले आहेत. 'मराठवाड्यातील आदिवासी गौंड संस्कृती' आणि 'बुध्दायन' हे त्यांचे ग्रंथ लवकरच प्रकाशित होतील. यशवंत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ढेंगळे यांचे हैद्राबाद मुक्तिसंग्रामावरील मराठवाड्याचा सहभाग नोंदवणारे संशोधन (इंग्रजी भाषेत) ग्रंथाच्या रुपात प्रकाशित झाले आहे.

राजर्षी शाहू विद्यालयाचे मुख्याध्यापक डॉ. सुरेश सावंत हे अनेक पुरस्कारप्राप्त लेखक आहेत. 'अबोली' आणि 'दुभंग' हे काव्यसंग्रह, 'आपण सारे भाऊ भाऊ', 'अंधार गेला उजेड आला' या किशोर कादंबऱ्या, 'संत दासगणु महाराज', 'पाचलेगावकर महाराज', 'गुरू गोविंदसिग', 'गरिबांचा कैवारी बाबुराव यादव' आणि 'महाराष्ट्राचे शिल्पकार शंकरराव चव्हाण' ही चरित्रे लिहिली आहेत.

किशोर वाङ्मय निर्मिती हा त्यांचा लेखन विशेष असून 'हिरवे हिरवे झाड', 'जांभुळबेट', 'भुताचा भाऊ', 'बालकनीती', 'काठीचा घोडा', 'पळसपापडी', 'कॉमिक्सच्या जगात', 'रानफुले' हे त्यांचे बालगीत संग्रह वाचकप्रिय ठरले आहेत. 'श्रीमती शांता शेळके यांच्या साहित्याचा विवेचक अभ्यास' हा त्यांचा पीएच.डी. चा प्रबंध आहे. त्यांच्या पत्नी डॉ. मथु सावंत या पीपल्स कॉलेज, नांदेड येथे मराठीच्या प्राध्यापिका असून त्यांचा 'भास्कर चंदनशिव यांच्या साहित्याचा विवेचक अभ्यास' हा पीएच.डी. प्रबंध आहे. त्यांना अनेक पुरस्कार प्राप्त झाले असून प्रतिभाशाली लेखिका म्हणून त्यांचा गौरव झाला आहे. त्यांची 'पाण्यातील पायवाट', 'निवडुंगाची फुलं', 'तिची वाटच वेगळी', 'पाणबळी' हे कथासंग्रह, 'राहूकेतू' आणि 'जिनगाणी' या कादंबऱ्या, 'नवरसांची नवलाई' हे नाटक, 'कथाकार भास्कर चंदनशिव' हा समीक्षा ग्रंथ, 'समाजशिक्षिका सावित्रीबाई फुले', 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे', 'राजर्षी शाहू महाराज' यांची चरित्रे प्रसिद्ध झाली आहेत.

श्री देविदास फुलारी हे दूरसंचार निगम कार्यालयात कार्यरत असून त्यांना विविध वाङ्मय प्रकारातील निर्मितीसाठी अनेक गौरव व पुरस्कार मिळाले असून त्यांनी 'अक्षर नारायण' आणि 'वेधांच्या प्रदेशात' हे समीक्षा ग्रंथ, 'कविता क्रांतीच्या' आणि 'राधा' हे कवितासंग्रह आणि 'दुधावरची साय', 'देश जोडण्याचा खेळ', 'वसंतडोह' या किशोर कादंबऱ्या लिहिल्या आहेत. 'फुलपाखरांचा गाव' हा त्यांचा बालगीतसंग्रह असून प्रौढशिक्षणासाठी काही उपयुक्त पुस्तिका लिहिल्या आहेत.

उमरी येथील कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून निवृत्त झालेले श्री. ग. पि. मनुरकर हे बहुआयामी लेखक म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांच्या पुस्तकांना अनेक पुरस्कार व पारितोषिके मिळाली असून एक उत्कृष्ट वक्ते म्हणूनही ते प्रसिद्ध आहेत. 'गुडबाय', 'मेण्यातील चंद्रकोर', 'कळसाविना देऊळ', 'शेवटचे वर्तुळ' हे काव्यसंग्रह, 'बुरूज' ही कादंबरी, 'दलितांच्या दारी' हा काव्यसंग्रह आणि 'शिक्षणालेख' ही पुस्तके लिहिली आहेत.

नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालयातून उप प्राचार्य म्हणून निवृत्त झालेले प्रा. मधुकर राहेगावकर यांनी प्रासंगिक लेखनाबरोबरच 'भाऊसाहेबांची बखर', 'तुकारामाचे निवडक अभंग', 'गद्यसौरभ', 'उपयोजित मराठी', 'आकलन' या पुस्तकांच्या संपादनाबरोबरच गोविंद कुलकर्णी यांच्या कवितांचा रसास्वाद असणाऱ्या 'आस्वाद' चे ही सुरेख संपादन केले आहे.

एम.जी.एम. इंजिनिअरिंग कॉलेजच्या प्राचार्या डॉ. सौ. गीता लाठकर या कवयित्री असून त्यांचा 'माझे मूठभर आकाश' हा काव्यसंग्रह प्रकाशित झाला आहे. नांदेड जिल्हा परिषदेच्या नंदिग्राम मासिकाचे काही काळ संपादक राहिलेले एम.के.गुम्मलवार यांनी अनेक काव्यसंग्रह लिहिले असून त्यापैकी 'चांदोरा' हा काव्यसंग्रह उल्लेखनीय आहे. आकाशवाणीतील नितीन देशपांडे यांचा 'अनोखा स्वातंत्र्यदिन' हा कथासंग्रह प्रकाशित झाला आहे. म. फुले विद्यालयातील अध्यापक श्री. दिगंबर कदम यांनी शंकरराव चव्हाण यांचे चरित्र लिहिले असून 'माळ आणि माती' हा काव्यसंग्रह आणि 'कुसुमाग्रज' ही त्यांची पुस्तके प्रकाशित झाली आहेत. दूरसंचार निगम येथील लेखाधिकारी श्रीमती नंदिनी देशमुख यांनी 'औट घटकेची राणी' ही उत्कृष्ट कादंबरी लिहिली आहे. लोहा येथील प्राध्यापक डॉ. वसंत बिरादार यांनी मराठी वाङ्मयाच्या अभ्यासासाठी उपयुक्त पडणारे अनेक ग्रंथ लिहिले असून

Maharashtra State Gazetteers

त्याशिवाय त्यांचा 'हिरवे झंकार' हा ललित लेखसंग्रह प्रकाशित झाला आहे. श्री. गोविंद थेटे यांचा 'गाणे मातीचे' हा काव्यसंग्रह प्रकाशित झाला आहे. श्री. रघू बोरगावकर यांनी बरेच स्फुट व प्रासंगिक लिखाण केले असून त्यांचे 'गीतगौरव', 'चंद्र लपे पापणीत' हे काव्यसंग्रह व 'अवघे धरू सुपंथ' ही एकांकिका प्रसिद्ध आहे. प्राचार्य डॉ. नागनाथ पाटील यांच्या 'कोंडणातील जिणं', 'लंबाडी' ह्या कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत. बाबुराव उप्पलवार हे देगलूर येथे संगीताचे प्राध्यापक असून त्यांचे 'रसवेध' हे पुस्तक प्रसिद्ध आहे. कृष्णाबाई कासराळीकर यांचे 'भावकृष्ण' आणि 'आख्यानमालिका' हे दोन भक्तिपर काव्यग्रंथ प्रकाशित झाले आहेत.

वारकरी संप्रदायाचे संस्कार लाभलेले व धुंडा महाराज देगलूरकर यांचे नातू चंद्रशेखर महाराज देगलूरकर यांचे 'संजीवन समाधी-एक अन्वयार्थ', 'अभंगसंकीर्तन' व 'पसायपायस' हे ग्रंथ प्रसिद्ध असून त्याद्वारे त्यांनी वारकरी संप्रदायाची संतांनी दिलेली शिकवण सुलभपणे मांडली आहे. त्यांचे बंधू डॉ. शरदचंद्र देगलूरकर यांचा 'संतसाहित्याचा सामाजिक अन्वयार्थ' हा ग्रंथ प्रकाशित आहे. महाराष्ट्रातील व आंध्र, कर्नाटकातीलही गावोगावी या दोघांची कीर्तने, प्रवचने होत असतात. कावलगाव जि. नांदेड येथील प्रा.स.ना.जोशी यांचा 'पडशी' हा काव्यसंग्रह प्रकाशित झाला असून 'शेंडेफळ' ही त्यांची कादंबरी प्रकाशनाच्या मार्गावर आहे.

डॉ. ल. का. मोहरील हे शासकीय अध्यापक महाविद्यालयात अध्यापन करीत असून 'संत तुकारामाची जीवननिष्ठा' हा त्यांचा शोधप्रबंध ग्रंथरूपाने प्रकाशित झाला असून 'जनाचे श्लोक', 'झाडांची गाणी', 'गीताभावार्थ बोधिनी', 'गणपती अथर्वशीर्ष भाष्य' ही त्यांची पुस्तके प्रकाशित झाली आहेत. याशिवाय 'संतांची अभंगवाणी' व इतर काही संपादने त्यांनी केली आहेत. राजेंद्र देसले हे एक पुरस्कारप्राप्त लेखक असून त्यांची 'वृक्ष संजीवनी', 'भारतीय शास्त्रज्ञ' इत्यादी पुस्तके प्रकाशित आहेत.

डॉ. अनंत राऊत हे नांदेड येथील पीपल्स कॉलेजमध्ये मराठीचे प्रपाठक असून अस्मितादर्श आणि अनंत फंदी वाङ्मय पुरस्कारांनी ते सन्मानित आहेत. 'तळभारत' (कथासंग्रह), 'विद्रोहमूल्य', 'आदरणीय गुरूजी', 'धर्म ते राष्ट्रधर्म', 'समाज सुधारकांची तुतारी', 'प्रजासत्ताक भारताची नैतिक मूल्ये' आणि 'भारतीयांचा पवित्र आचार ग्रंथ : भारतीय संविधान' हे त्यांचे लेखन प्रकाशित आहे. दिलिप गोगटे यांनी शिखांचा धर्मग्रंथ 'गुरूग्रंथसाहिब' चा सुबोध परिचय करून देणारे पुस्तक 'श्री गुरूग्रंथसाहिब : एक अवलोकन' लिहून मराठी वाचकांना एक अमोल भेट दिली आहे. यात केवल प्राथमिक माहिती नसून सुबोध, रसाळ व अर्थवाही भाषेत शीख धर्माचे दार्शनिक महत्त्व विशद केले आहे. यशवंत बेंडे यांची 'कल्पना तरंग', 'गंधवारा', 'ही ओढ मिलनाची' ही तीन पुस्तके प्रसिद्ध आहेत. डॉ. हंसराज वैद्य यांनी 'पक्ष्यांची शाळा' (बालकविता), 'जीवनधारा', 'राजाई' (काव्यसंग्रह) ही पुस्तके लिहिली आहेत. लोहा येथील अशोक गवते यांचा 'ऋतू' हा काव्यसंग्रह प्रकाशित आहे. शैलेंद्र टिकारिया हे मूळ हदगाव तालुक्यातील निवासी असून त्यांचे 'स्वप्नात', 'थवे चातकाचे' आणि 'स्वातीचे थेंब' हे तीन काव्यसंग्रह, 'चकवा' ही कादंबरी व 'अनपेक्षित' हा एकांकिका संग्रह प्रकाशित असून सध्या ते जालना येथे राहतात. हिमायतनगर येथे राहणारे भास्कर

देविदास दुसे यांचे 'पडसाद' आणि 'गजर' हे काव्यसंग्रह प्रकाशित असून 'चक्रपाणि' या साप्ताहिकाचे ते संपादक आहेत. हृषिकेश कांबळे हे औरंगाबाद येथील सरस्वती भवन महाविद्यालयात मराठीचे प्राध्यापक असून ते मूळचे कंधार तालुक्यातील आहेत. त्यांची 'कालवाह' (समीक्षा), 'अस्तित्त्व आणि अस्मिता' (वैचारिक), 'संदर्भ आणि संदर्भ', 'खोलपाणी', 'वेदना आणि आविष्कार' इत्यादी पुस्तके प्रसिद्ध असून काही मौलिक संपादनेही त्यांनी केली आहेत. मूळचे नांदेड जिल्ह्यातील व आता डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे मराठी विभागात प्राध्यापक असणारे डॉ. परशुराम गिमेकर यांचे 'वडारवाडी', 'मोहाडी' हे काव्यसंग्रह प्रकाशित असून 'मराठवाड्यातील दलितांचे लोकसाहित्य' या संशोधनपर ग्रंथास शासनाचा पुरस्कार प्राप्त झाला आहे. याशिवाय 'वणवा', 'संघर्ष', 'वामन कर्डक यांची गीतरचना' इत्यादी संपादनेही त्यांनी केली आहेत. निर्मलकुमार सूर्यवंशी यांची 'निर्मल प्रकाशन' ही प्रकाशन संस्था असून या प्रकाशनातर्फे प्रकाशित झालेल्या अनेक पुस्तकांना प्रतिष्ठित पुरस्कार प्राप्त झाले आहेत. सूर्यवंशी यांची 'गोंदण', 'माणूस नावाचा प्राणी', 'देव दगडात नाही', 'शेतकरी राजा', 'साथ' इत्यादी पुस्तके प्रकाशित आहेत. प्राचार्य डॉ. ओमप्रकाश राठौर यांनी 'डायनोसोरचा उद्‌भव आणि अंत' हे पुस्तक लिहिले असून अनेक हिंदी पुस्तके लिहिली आहेत.

श्रीमती कविता महाजन या आजच्या पिढीच्या नामवंत लेखिका म्हणून ओळखल्या जातात. सध्या त्या मुंबईला राहत असल्या तरी मूळच्या नांदेडच्या असून प्राचार्य स.दि.महाजन यांच्या ज्येष्ठ कन्या आहेत. त्यांच्या 'ब्र' व 'भिन्न' या दोन कादंबऱ्या आणि 'तत्पुरूष', 'वारली लोकगीत', 'जागर', 'धुळीचा आवाज' आणि 'मृगजळीचा मासा' हे काव्यसंग्रह प्रकाशित आहेत. 'कोश व सूची वाङ्‌मय : स्वरूप आणि साध्य' हे संपादित पुस्तक, इस्मत चुगताईंच्या कथांचा अनुवाद 'रजई' आणि भारतीय विविध भाषांतील आजच्या नामवंत कथा लेखिका यांची आठ पुस्तके संपादित केली आहेत. समाजजीवनाचा विशेषतः परितक्त्य प्रवृत्तींचा आणि त्यात स्त्रियांचा, त्यांच्या प्रश्नांचा त्या खोलवर अभ्यास करतात. नांदेड जिल्ह्यातील इतर उल्लेखनीय कवी, लेखक म्हणून पुढील प्रतिभावंतांचा उल्लेख करावा लागेल. त्यापैकी अनेकांना शासकीय व इतर संस्थांचे प्रतिष्ठित पुरस्कारही मिळाले आहेत. श्रीमती लता बोधनकर (कर्पूर-काव्यसंग्रह), बळवंत बडवे (अंगणातील चांदणे-कथासंग्रह), करूणा जमदाडे (रमाई), प्राचार्य किरण देशमुख (मुक्तिबोध व इतिहास संशोधनपर लेखन), शंकरराव देशमुख बारडकर (मोरपंखी), गीता निर्झर (काव्य), जोगवा (कथा), डॉ. नीरज साळुंखे (दैत्यबळी व कुंतलदेश महाराष्ट्र-संशोधनपर लेखन), धनाजीराव घोडजकर (हिरापुत्र-आत्मचरित्र), प्रा. डी. यू. देशपांडे (चेहरे-कथासंग्रह), महेश मोरे (हिरवे रान, पाऊसकाळ-काव्यसंग्रह), दत्ता डांगे (बालवाङ्‌मय), मानव कोंडलवाडीकर (गीतसंग्रह), आनंद कदम (शिमगा-काव्यसंग्रह), नारायण पारेकर (पोळा-कथासंग्रह), नारायण शिंदे (सपनसुगी-कथासंग्रह), प्रा. उत्तम सूर्यवंशी (हैद्राबाद मुक्तिसंग्राम), सिंधू तिडके (राजमाता जिजाऊ), दि. रा. वाघमारे (आंबेडकरी धम्म : एक आकलन), बाबू गंजेवार (व्यंगचित्रे), राम मांडुरके (मला व्यंगचित्रकार व्हायचंय), श्रीमती सरोज शिंपाळे (अनौरस-कथासंग्रह, चक्रव्यूह-नाटक), शिवा कांबळे (शाहीर अण्णाभाऊ साठे), दिलीप शिंदे (कायदा कोश), व्यंकटेश चौधरी (गंधबन-काव्यसंग्रह), डॉ. तेजस्विनी वाडेकर (स्त्रीधन-लेखसंग्रह), ना. गो. पतंगे (राजयोगिनी

अहिल्या-चरित्र), बालाजी सुतार (क्वचितानेक-कविता संग्रह), व्यंकटेश काटकर (पिसारा-काव्यसंग्रह), प्रदीप पाटील (संदर्भ शोधतांना), लता पाध्ये (बोगनवेल-कथासंग्रह), नंदा देशमुख (नंदादीप-काव्यसंग्रह), सु.ग.चव्हाण (रानगंध-काव्यसंग्रह), बसवेश्वर गुरूलिंगप्पा घोडके (ॐ नमोजी आद्या-काव्यसंग्रह), संजय बालाघाटे (रात्र पिकली काळोखात-काव्यसंग्रह), मीना जयंत कुलकर्णी (मेघदूत-काव्यसंग्रह), शाहीर दिवाकर निटूरकर (शिवराय अभंग गाथा), मनोहर धर्मापुरीकर ऊर्फ विठ्ठलदास (ज्ञानेश्वरी : परागकण), प्रकाश मोगले (कावस-कथासंग्रह), भाग्यश्री वर्मा (दरवळ-चारोळी संग्रह), डॉ. सुजाता जोशी-पाटोदेकर (भेट कांगारूची स्मरते-प्रवासवर्णन), प्रा. भारती पौळ-गिजरे (चंद्रसाक्षी-काव्य), गणेशराज सोनाळे (आठवणींचे शिलालेख), प्रशांत आढे (सायली-काव्यसंग्रह), गीतांजली सुकळकर (निमिष-ललित), कमल कदम (आक्रोश-काव्य, जांब-प्रवासवर्णन), आनंद साखरे (ओलावा), नंदकुमार वालुरे (उनसावली, माय, उदयगिरीतील आठवणी, डोंगरशेळकी दर्शन, बोरूळ दर्शन, शिक्षणतज्ज्ञ जनार्दन वाघमारे), अलका कुलकर्णी (आकाशी झेप घे रे पाखरा, गोष्ट एका विक्रमाची, स्वप्ननगरी), राजीव देशपांडे-लाठकर (ऐसे किस्से शास्त्रज्ञांचे), श्रीराम गव्हाणे (संत गाडगेबाबा), निवृत्ती चांडोळकर (रानातील अभंग, माती माझी माय), डॉ. विजय बंडेवार (अमृत मेघ), मोहन देशमुख (वेदना), सु. च. कोतवाले (अंतरीचे उमाळे), राजेंद्र गहाळ (दोन एकर, कोंडी-कथासंग्रह), प्रदीप पाटील-कामरसपल्लीकर (संदर्भ शोधतांना-काव्य), डॉ. यशवंत पांडे (परिवार-काव्य), साईजी (शिवचरित्रमाला-चार भाग), मा. ह. लांडगे (साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे), शंकर वाडेवाले (कढवाही, आभाळमाती, माती बोले गूज, माईचे गाणे-काव्यसंग्रह), मीनल वसमतकर (झणत्कार) इत्यादी. मार्तंड कुलकर्णी यांचा विष्णुदासांवरील ग्रंथ प्रकाशित झाला आहे.

डॉ. अच्यूत बन नामवंत वैद्यकीय व्यावसायिक असून त्यांनी विविध देशांचा प्रवास केला आहे. 'परिक्रमा पश्चिम युरोपची', 'केनीयन सफरी', 'मुकाबला मधुमेहाशी', 'यांकीच्या देशात' अशी सुंदर पुस्तके त्यांनी लिहिली आहेत.

महाराष्ट्र शासनाच्या वतीने देण्यात येणारा उत्कृष्ट वाङ्मय निर्मिती पुरस्कार प्रदान सोहळा दिनांक २४ नोव्हेंबर, २००७ रोजी नांदेड येथे पार पडला. यात नांदेड नगरीतील प्रा. नरहर कुरूंदकर (रूपवेध), वा.रा.कांत (मरणगंध), प्रा. लक्ष्मीकांत तांबोळी (दूर गेलेले घर), डॉ.स.रा.गाडगीळ (शोकात्म विश्वरूप दर्शन), प्रा. दत्ता भगत (आकर्त आणि इतर एकांकिका, चक्रव्यूह आणि इतर एकांकिका, जहाज फुटलं आहे, वाटा पळवाटा, निळी वाटचाल), प्रा. शेषराव मोरे (सावरकरांचा बुद्धीवाद : एक चिकित्सक अभ्यास, काश्मीर : एक शापित नंदनवन, मुस्लिम मनाचा शोध, चार आदर्श खलिफा), डॉ. भगवान कौठेकर (बाबा आमटे), विजय पाडळकर (चंद्रावेगळं चांदणं, गाण्याचे कडवे, कवडसे पकडणारा कलावंत), सुधाकर डोईफोडे (शब्दबाण), प्रा.भु.द.वाडीकर (ज्ञानर्षि नरहर कुरूंदकर), डॉ. जगदीश कदम (रास आणि गोंडर, बुडत्याचे पाय खोलात), एल.के.कुलकर्णी (थोडे विज्ञान, थोडी गंमत), डॉ. सुरेश सावंत (जांभूळ बेट, बालकनीती, पळसपापडी), डॉ. एल. एस. देशपांडे (साहित्य सेतू), प्रा. रविचंद्र हडसनकर (बगळ्या बगळ्या पाणी दे), डॉ. मथु सावंत (राहू-केतू, तिची वाटच वेगळी, निवडुंगाची फुले), डॉ. वृषाली किन्हाळकर (तारी), प्रा. डॉ. शंभुनाथ

कहाळेकर (घर पाहावे बांधून), डॉ. करूणा जमदाडे (रमा), शिवाजी अंबुलगेकर (तुका म्हणे ऐशा नरा), डॉ. विलासराज भद्रे (आमचाबी पंधरा ऑगस्ट) आणि प्रा. दिलीप गोगटे (श्री गुरू ग्रंथसाहिब : एक अवलोकन) हे राज्य पुरस्कारप्राप्त सारस्वत ठरले होते.

नांदेड जिल्ह्यातील पुढील अनेक साहित्यिकांनी कविता, कथा, वैचारिक लेख, चरित्र, बालसाहित्य, नाटक इत्यादी लेखन तसेच स्फुट व प्रासंगिक लेखन केले असून पैकी काहींची पुस्तकेही प्रसिद्ध झाली आहेत. त्यात संजीवनी दीपके, संध्या रंगारी, मंजिरी देशपांडे, विमल चौधरी, वर्षा बडवे (गलगली), शेषराव जाधव, अशोक कोल्हे, विलास ढवळे, विकास कदम, माधव चुकेवाड, मनोज बोरगावकर, प्रभाकर शिरपूरकर, राज सोनाळे, माधव फुलारी, देवदत्त साने, शिवाजी आंबुलगेकर, गोविंद गव्हाणे, प्रभाकर सुर्वे, पुरूषोत्तम पांडे, अनिकेत कुलकर्णी, डॉ. अशोक बंडेवार, ओमप्रकाश सूर्यवंशी, अनुराधा शेटे, नाथ चितळे, सुभाष सारंगधर, आत्माराम खंडागळे, शंकरानंद एडके, मधुसूदन बडवणे, संजय बामणीकर, धोंडिबा गायकवाड, राम जाधव, कल्पना जाधव, पंडित पाटील बेळीकर, प्रा. हनुमंत बोकारे, प्रा. रामदास बोकारे, डॉ. अरूण हिवरेकर यांचा समावेश करावा लागेल.

पुढील लेखकांनी विद्यापीठाच्या अभ्यासक्रमासाठी उपयुक्त ठरू शकतील अशी काही अभ्यासपूर्ण महत्त्वाची पुस्तके लिहिली आहेत. डॉ. आनंद भंडारे (भाषाशास्त्र), डॉ. वसंत देशपांडे (मध्ययुगीन भारताचा इतिहास, आधुनिक भारताचा इतिहास), डॉ. आर. डी. साबळे (भारतीय शासन व राजकारण, ब्रिटन, अमेरिका, स्वित्झरलॅण्डच्या शासनप्रणाली, आंतरराष्ट्रीय संबंध, भारतीय राजकीय विचारवंत, पाश्चिमात्य राजकीय विचारवंत, महाराष्ट्र शासन व राजकारण), प्रा. अनंत जोशी (थोर समाजशास्त्रीय विचारवंत, समाजशास्त्र : मुलभूत संकल्पना, सामाजिक गट आणि सामाजिक संस्था), डॉ. सुरेश सातारकर (ग्रंथालय व्यवस्थापन, तालिकीकरण, तत्त्व आणि व्यवहार), गोविंद यमलवाड (स्थानिक स्वराज्य संस्था), डॉ. विठ्ठलसिंह परिहार व प्रा. जुझारसिंह शिलेदार (खेळ संचालन आणि क्रीडा मार्गदर्शन), महेश बच्चेवार (इन ऑरगॅनिक केमेस्ट्री), प्रा. सुंदरसिंह जी. ठाकूर (आदिवासी समाजाचे समाजशास्त्र) इत्यादी. प्रा. मधुकर राहेगावकर, प्रा. श्रीनिवास पांडे यांनी मराठीच्या अभ्यासक्रमाशी निगडित काही पुस्तकांचे इतर लेखकांसोबत सहलेखक म्हणून लेखन केलेले आहे. त्र्यंबक वाघमारे यांनी प्रचंड खपाचा 'सुबोध विद्युतशास्त्र' हा ग्रंथ लिहिला आहे.

**संमेलने :** सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये छोट्या-मोठ्या तालुका व जिल्हास्तरीय साहित्य संमेलनांचीही मोठी भूमिका असते. आविष्कार साहित्य मंडळ, प्रेरणा साहित्य परिषद, डॉ. बाबासाहेब आंबेडकर युवा मंच यांनी आयोजित केलेली संमेलने संस्मरणीय ठरली. आविष्कार साहित्य मंडळातर्फे दरवर्षी कै. नरहर कुरूंदकर साहित्य संमेलन आयोजित केले जाते. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या वतीने कंधार येथे आयोजलेले जिल्हास्तरीय संमेलन, प्रेरणा साहित्य परिषदेचे कुरूळा येथील साहित्य संमेलन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य संमेलन, करकाळा येथे दिगंबर कदम यांनी भरवलेले ग्रामीण साहित्य संमेलन व कै. भाऊराव फुलारी स्मृती संत साहित्य संमेलन (गोरठा) ही वैशिष्ट्यपूर्ण ठरली.

अध्यात्मिक पार्श्वभूमी असलेले काही मोठे कार्यक्रमही जिल्ह्यात होत असतात. प. पु. पांडुरंगशास्त्री आठवलेंचा वाघाळा येथे असाच भव्य कार्यक्रम झाला होता. वसंतनगर येथील संत पाचलेगावकर महाराज यांच्या मुक्तेश्वर आश्रमात प्रवचने-कीर्तने वगैरे सांस्कृतिक कार्यक्रम वर्षभर

सुरू असतात. १९९४ साली स्थापन झालेल्या चिन्मय मिशन, नांदेड शाखेनेही मुले व स्त्रियांसाठी विविध उपक्रम राबवून आपले सांस्कृतिक योगदान दिले आहे.

गेल्या काही वर्षात विविध व्याख्यानमाला सुरू करण्यात आल्या आहेत. कै. शंकरराव चव्हाण व्याख्यानमाला त्यातीलच एक प्रमुख व्याख्यानमाला होय. यात अनेक सन्माननीय व्याख्याते व अभ्यासूंची व्याख्याने होतात. देगलूर येथील कै. नारायण चिद्रावार, स्वयंवर प्रतिष्ठान, अभंग पुस्तकालय, कै. कुरूंदकर वगैरे व्याख्यानमालाही वैशिष्ट्यपूर्ण आहेत. पत्रकार संजीव कुलकर्णी यांची दर्पण प्रतिष्ठानही वेगळी व्याख्याने आयोजित करते. नांदेडच्या कल्चरल असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या फुले-शाहू-आंबेडकर व्याख्यानमालेलाही श्रोत्यांचा प्रचंड प्रतिसाद मिळत असतो. याशिवाय वेगवेगळ्या प्रसंगी नामवंत व्याख्यात्यांची व्याख्याने नांदेडकरांचे कान तृप्त करीत असतात. शारदाश्रम एज्युकेशन सोसायटीमार्फत सुरू झालेले 'कुसूम' आणि महानगरपालिकेचे 'कै. शंकरराव चव्हाण सभागृह' या चळवळीत मोलाची भूमिका पार पाडते.

नांदेड जिल्ह्याचा सांस्कृतिक इतिहास लिहितांना शक्य तेवढी माहिती संग्रहित व संपादित केली आहे. यापुढे जे जे नवे पुरावे उपलब्ध होतील त्याआधारे काही नवी माहिती समाविष्ट करावी लागेल. यापैकी किती लेखक, कवी, कलावंत काळाच्या ओघात आपले लेखनसातत्य राखू शकतील हे आज तरी सांगता येत नाही. मात्र १९७० नंतरच्या काळात लेखन करणाऱ्यांची संख्या विलक्षण वाढली असून हे उत्तम अभिरूचीचे लक्षण आहे.

लोककलांचा अभ्यास नमूद करताना गुराखी गीते, लोकगीते यांचा उल्लेख करावा लागेल. डॉ. ना. गो. नांदापूरकरांनी बरीच लोकगीते संकलित केली आहेत. तद्वतच डॉ. प्रभाकर मांडे व डॉ. ताराबाई परांजपे यांचे लेखन महत्त्वाचे आहे. प्रत्यक्ष लोककलांमध्ये मसनजोगी, सकाळीच फिरणारे फकीर, वासुदेव, गोंधळी, वाघ्या-मुरळी यांच्या कला पारंपरिक असून शक्यतो धर्मशक्तीशी जोडलेल्या आहेत. तमाशा व कलावंतिणी, कोल्हाटिणी यांचे नृत्य ठिकठिकाणी होत असत. कव्वालीचे कार्यक्रम ईश्वरभक्तीवर असत व शक्यतो दर्ग्यात होत. परंतु या सर्व क्षेत्रात सर्वदूर नावलौकिक मिळालेला कुणी कलावंत या जिल्ह्यात आढळला नाही. भजने, भारूडे हा शेतकऱ्यांचा विरंगुळा असे. चित्रकला, शिल्पकला, उपयोजित कला यात प्राचीन काळी उल्लेखनीय असे कलावंत झालेले दिसत नाहीत. कीर्तने व प्रवचने यांची मात्र रेलचेल असे. नाटके, एकांकिका गावोगाव बसवल्या जात. त्यातही शेदीडशे वर्षांपेक्षा अधिक परंपरा दिसत नाही. शिवाय हे सर्व प्रयोग स्थानिक पातळीवर होत.

नांदेड जिल्हा ऐतिहासिक परंपरेमुळे मुख्यतः गोदावरीचे नाभीस्थान म्हणून व पुढे शिखांची दक्षिण काशी म्हणून देशात ओळखला जातो.

## प्राच्यविद्या*

नाट्यकला चित्रकला आणि संगीताच्या साधनेबरोबरच नांदेडच्या रसिकांनी इतिहास आणि साहित्य संशोधन परंपराही जोपासली. विसाव्या शतकाच्या प्रारंभी जेव्हा उर्दू भाषेचाच सर्वत्र प्रभाव

*. या भागाचे लेखन डॉ. प्रभाकर देव यांनी केले आहे.

होता त्या नांदेडमध्ये श्री. वि. अं. तथा तात्यासाहेब कानोले यांनी हस्तलिखित कागदपत्रांचा धांडोळा घेत इतिहास आणि साहित्य संशोधनाला प्रारंभ केला. पुण्याच्या 'भारत इतिहास संशोधन मंडळाच्या' पाक्षिक सभांमधून इतिहासाचार्य तात्यासाहेब कानोले यांनी शोधनिबंध वाचले. मंडळाच्या संशोधन पत्रिकांमधून त्याकाळात त्यांचे अनेक लेख प्रकाशित झाले. त्यांनी केलेल्या हस्तलिखित कागदपत्रांच्या धांडोळ्याला मूर्तरूप आले. ते 'गोदातीर इतिहास संशोधन मंडळा'च्या स्थापनेने १५ फेब्रुवारी, १९५४ रोजी महामहोपाध्याय दत्तो वामन पोद्दार यांच्या शुभहस्ते या संस्थेची प्रतिष्ठापना झाली. प्रारंभी 'हिस्टॉरीकल ॲण्ड लिटररी सोसायटी' या नावाने ही संस्था अस्तित्त्वात आली आणि प्रांत पूर्नरचनेनंतर 'गोदातीर इतिहास संशोधन मंडळ' या रूपाने ही संस्था कार्यरत झाली.

संस्थेचे सचिव तात्यासाहेब कानोले यांनी पदरमोड करून आयुष्यभर हस्तलिखित कागदपत्राचा धांडोळा घेतला. ज्ञानेश्वरीच्या दुर्मिळ प्रती त्यांच्या संग्रहालयात उपलब्ध आहेत. इतिहासाचार्य वि. का. राजवाडेंच्या भ्रमंतीतून प्रेरणा घेऊन तात्यासाहेबही हस्तलिखितांच्या शोधात गावोगावी हिंडत राहिले. त्यांच्या या भ्रमंतीतूनच हस्तलिखितांचा प्रचंड संग्रह संग्रहीत झाला. अनेक दुर्मिळ हस्तलिखिते त्यांच्या संग्रही आहेत. अंबानगरीचे मुकुंदराज आणि रघुनाथ शेष घराण्यासंदर्भातली दुर्मिळ कागदपत्रे 'गोदातीर इतिहास संशोधन मंडळाच्या' संग्रहात आहेत.

संस्थेच्या वतीने कृष्णा कौतुक, मुकुंदराजांची अंबानगरी, ओरिजन ऑफ हिंदु ट्रिनिटी या सारखी पुस्तकेही प्रकाशित झाली आहेत. नांदेड नगरपालिकेने १९५० च्या दशकात संस्थेसाठी प्लॉटही दिला होता याच प्लॉटवर 'गोदातीर इतिहास संशोधन मंडळाच्या' 'तात्यासाहेब कानोले वस्तुसंग्रहालयाची' इमारत उभी राहते आहे. प्राचार्य म्हैसेकर आणि शंकररावजी चव्हाण यांच्या प्रयत्नाने इमारत बांधणी प्रकल्प कार्यरत झाला होता. महाराष्ट्रातील एक ख्यातनाम संस्था म्हणून 'गोदातीर इतिहास संशोधन मंडळ' नावारूपाला आलेले आहे.

'गोदातीर इतिहास संशोधन मंडळाशिवाय' मूलभूत संशोधन संस्था या नावाची आणखी एक संशोधन संस्था नांदेडमध्ये कार्यरत आहे. समुद्रगुप्त पाटील हे या संस्थेचे अध्यक्ष असून त्यांनीही इतिहास संशोधन क्षेत्रात लक्षणीय कामगिरी केली आहे. अनेक शिलालेखांचा, मूर्ती, ताम्रपटांचा त्यांनी धांडोळा घेतला आहे. इतिहास संशोधन क्षेत्रात नांदेडच्या यशवंत महाविद्यालयातील पदव्युत्तर इतिहास अध्यापन आणि संशोधन विभागाचे योगदानही लक्षणीय आहे. १९६८ साली नांदेड जिल्ह्यातील प्राचीन शिलालेखांचा धांडोळा या विभागाने घेतला. डॉ. रित्ती आणि शेळके यांनी संपादित केलेला Inscriptions from Nanded Dist. हा ग्रंथ शारदाभवन शिक्षण संस्थेने प्रकाशित करून प्राचीन इतिहास संशोधनात मोलाची भर टाकली. याच विभागातील डॉ. प्रभाकर देव यांनी शिऊरच्या लेण्याचा धांडोळा घेतला. डॉ. ढेंगळेनी हैद्राबादच्या मुक्तिसंग्रामातला मराठवाड्याचा सहभाग शोधला. डॉ. उत्तम सावंत यांनी माहुरच्या लेणीचा आणि किल्ल्याचा शोध घेतला. डॉ. कमल लोहगावकरांनी प्राचीन भारतीय स्त्रीयांचा प्रशासकीय सहभाग धुंडाळला. या जेष्ठ प्राध्यापकांचे अनेक विद्यार्थी आज संशोधक म्हणून महाराष्ट्रभर विखूरलेले आहेत. अलीकडच्या काळात इतिहास संशोधनाला निश्चित स्वरूप प्राप्त झाले असून साहित्य व इतिहास संशोधन परंपरा समृद्ध बनत चालली आहे. स्वामी रामानंद

तीर्थ मराठवाडा विद्यापीठात इतिहास विभाग नसला तरी हैद्राबाद मुक्तिलढ्यातील सामान्यांच्या सहभागाचा धांडोळा घेणारा प्रकल्प हैद्राबाद मुक्तिलढा संशोधन साधन केंद्राच्या वतीने हाती घेण्यात आला. हैद्राबाद मुक्तिलढ्याचा मौखिक दस्तावेज हा मराठी ग्रंथ डॉ. प्रभाकर देव यांच्या संपादनात विद्यापीठाने प्रकाशित केला. डॉ. देवांच्याच संपादनात 'Hydrabad Freedom Struggle, Select documents in Oral History' हा इंग्रजी ग्रंथही विद्यापीठाने प्रकाशित केला. इतिहास संशोधनाच्या क्षेत्रातले विद्यापीठाचेही कार्य लक्षणीय आहे. पिपल्स कॉलेजनेही काही काळ केतकर संशोधन पत्रिका चालवून इतिहास व साहित्य संशोधन क्षेत्रात आपला सहभाग नोंदवला होता हे लक्षात घेतले पाहिजे.[११]

## संस्कृत अध्ययनाचा वारसा

नांदेडचा प्राचीनतम् उल्लेख वाकाटकांच्या ताम्रपटातून येतो तो इथल्या संस्कृत अध्यापन केंद्र असलेल्या अग्रहाराचे संदर्भात. नंदीतटावरील अग्रहाराला वाकाटक नृपतीने दान दिल्याची नोंद असलेला वाशीम ताम्रपट नांदेडची संस्कृत अध्ययन अध्यापन परंपरा थेट ४ थ्या शतकापर्यंत मागे घेऊन जातो. ही प्राचीन परंपरा मध्ययुगात लोप पावली. मराठवाड्यात इतरत्रही संस्कृत शिक्षणाची सोय नव्हतीच एकोणीसाव्या शतकापर्यंत हीच अवस्था होती. तरीही रघुनाथ शेष, वामनपंडीत या सारखी विद्वान मंडळी नांदेड परिसरात गेल्या दोन तीन शतकात होऊन गेली. एकोणीसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आणि विसाव्या शतकाच्या प्रारंभी नांदेडमधून काही तुरळक मुल संस्कृत अध्ययनार्थ बाहेर जात असत.

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात परिस्थिती बदलली. १९५० च्या दशकात महामहोपाध्याय यज्ञेश्वरशास्त्री कस्तुरे आणि पंचतीर्थ बाळाचार्य जोशी यांनी नंदीतटावरील संस्कृत भाषेचे व वेदाध्ययनाच्या प्राचीन परंपरेचे पुनरूज्जीवन केले. या द्वयींनी १९५८ च्या वसंत पंचमीस संस्कृत पाठशाळेची स्थापना नांदेडमध्ये केली. या संस्कृत पाठशाळेत भारतीय विद्या भवनचे संस्कृत भाषा परीक्षा केंद्रही चालवले गेले. पुण्याच्या वेदशास्त्रोत्तेजक सभेचा अभ्यासक्रमही संस्कृत पाठशाळेने राबवला.

संस्कृत पाठशाळेने 'महाराष्ट्र प्रांतिक संस्कृत संमेलन' आयोजित केले होते. महामहोपाध्याय चित्राव शास्त्रीच्या अध्यक्षतेखाली झालेले हे संमेलन खूप गाजले. होळीवरची संस्कृत पाठशाळा ही नांदेडच्या सांस्कृतिक जीवनातील एक लक्षणीय चळवळ होती. दरवर्षी साजऱ्या होणाऱ्या शारदोत्सवात व्याख्याने परिसंवाद आयोजिले जात. चर्चा होत. संस्कृत पाठशाळेच्या व्यासपीठाला एक आगळे महत्त्व प्राप्त झाले होते. प्रा. नरहर कुरूंदकर, डॉ. सुरेंद्र बारलिंगे, राम शेवाळकर, डॉ. स. रा. गाडगीळ यांच्या उपस्थिती आणि चर्चेतल्या सहभागाने संस्कृत पाठशाळेच्या या व्यासपीठाला एक प्रतिष्ठा प्राप्त झाली होती. अनेक दशके या व्यासपीठावरील विचारमंथनाची परंपरा नांदेडमध्ये चालू होती. संस्कृत पाठशाळा ही केवळ संस्कृत वेदपाठशाळा नव्हती तर नांदेडच्या सांस्कृतिक जीवनातले एक विचारप्रवर्तक प्रबोधन केंद्र होते. या केंद्रानेच ४ थ्या शतकातली नंदीतटावरील अग्रहार परंपरा २० व्या शतकात पुनरूज्जीवीत केली.

---

११. ग. ना. अंबेकर, **'सांस्कृतिक जीवन, स्थानिक इतिहास आणि साहित्य नांदेड : एक शोध',** संपादक डॉ. देव, डॉ. गाडगीळ.

**इतर भाषिकांच्या सांस्कृतिक संघटना :** नांदेड हा जिल्हा आंध्र आणि कर्नाटक प्रदेशाच्या सीमावर्ती भागात वसलेला असल्याने येथे कानडी आणि तेलगू भाषिकांचे योगदानही लक्षणीय आहे. गुरू गोविंदसिंहाच्या पदस्पर्शाने पूनीत झालेल्या नांदेडात पंजाबी भाषेचा आणि गुरूमुखी वाणीचाही लक्षणीय प्रभाव आहे. हिंदी भाषिकांच्याही अनेक सांस्कृतिक संघटना कार्यरत आहेत. तुळसीमानस मंडळाच्या रूपाने तुलसी रामायणाचे सामुहिक पठण होत असते. महाविद्यालयातील हिंदी विभागाच्यारूपाने हिंदी नाट्यसृष्टी रूपाला येते आहे. अंजूमन-ए-इस्लामिया, बज्मे-अहबाब, कुलहिद जमीयत सारख्या उर्दूभाषिकांच्या संघटना १९८० च्या दशकापर्यंत सक्रिय होत्या. उर्दू मुशाईरे होत. तशाच कन्नड संगीत सभाही होत. महानगरपालीकेच्या वतीने दरवर्षी बहुभाषी कवी संमेलन, हिंदी कवीसंमेलन मुशाईरा आयोजिला जातो. तात्पर्य नांदेडचे सांस्कृतिक जीवन असे बहुरंगी बहुढंगी भाषांनी नटलेले आहे.

## कीर्तन परंपरा*

महाराष्ट्राला आणि विशेषतः मराठवाड्याला कीर्तन परंपरेचा समृद्ध वारसा लाभला आहे. परमार्थसाधना, जनप्रबोधन, आत्मोन्नती आणि लोक कल्याणाच्या हेतूने कीर्तनपरंपरेचा उदय तेराव्या शतकात झाला. कीर्तन म्हणजे कीर्तगान. साहित्यशास्त्र, तत्त्वज्ञान, वेदान्त, नितीमुल्ये, संगीतनाट्य आणि अभिनय तसेच वक्तृत्व यांचा सुरेख संगम कीर्तनात साधलेला असतो. वैष्णव संप्रदायांच्या विस्ताराच्या निमित्ताने वारकरी संत नामदेव महाराज हे कीर्तनाचे जनक मानले जातात.[१२] त्यांनी भजन पद्धतीने कीर्तन केले. एकनाथ महाराजांनी आधुनिक वारकरी कीर्तन प्रयोग प्रथम सादर केला. पुढे कीर्तनाची एक समृद्ध परंपराच महाराष्ट्रात निर्माण झाली. मल्लाप्पा वासकर, गुंडामहाराज, नानासाखरे विष्णुबुवा जोग, दादामहाराज सातारकर, श. ना. दांडेकर अशा नामवंतांनी वारकरी कीर्तन परंपरा समृद्ध केली.

दुसऱ्या बाजीरावाच्या कारकिर्दीत 'गुंडा महिपती महाराज' (१७५३-१८१७) हे सत्पुरूष कीर्तनकार होते. त्यांचे वास्तव्य पंढरपूर व देगलूर मुक्कामी असे. ते पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात चातुर्मासभर 'चक्रीभजन ' करीत. त्यांनी सुमारे १५०० अभंगांची रचना केली. भजन करताना त्यांची भावसमाधी लागत असे. राहेर, भागानगर, रामलिंग, देगलूर व पंढरपूर येथे त्यांनी कीर्तने केली. गुंडामहाराजांची कीर्तने वेदान्त भक्ती व भजन प्रधान होती. 'धुंडामहाराज देगलूरकर' (१९०४-१९९२) महाराष्ट्रातील श्रेष्ठ दर्जाचे लोकोत्तर कीर्तनकार होते. त्यांनी देगलूरकर संस्थानचा लौकिक वाढविला. सौ. मनुबाई व रामचंद्र महाराज ही त्यांच्या माता पित्याची नांवे होती. चुलते महिपती महाराजांनी पालन, पोषण व मार्गदर्शन केले. देगलूरकर दिंडी सोहळा व पंढरपूरचा चातुर्मास उपक्रम त्यांनी वृध्दिंगत केला. धुंडामहाराज पंढरपूरच्या चातुर्मासात (१२५ दिवस) ज्ञानेश्वरी व संतग्रंथावर सलग प्रवचने करीत. त्यांनी हरिपाठ विवरण, संत, अभंग निरूपण, नारद भक्तिसूत्र व पसायदान ह्या

*. या भागाचे लेखन डॉ. पी. जी. जोशी यांनी केले आहे.

१२. डॉ. पी. जी. जोशी **'मराठवाड्यातील कीर्तन परंपरेचा इतिहास',** पीएचडी प्रबंध, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, पृष्ठ १०.

विद्वत्ताप्रचूर ग्रंथाची निर्मिती केली. नाशिक, पुणे व कवळे गोवा येथील अ.भा.कीर्तन संमेलनाचे ते अध्यक्ष होते. त्यांनी भावार्थप्रधान, व्याख्यानप्रधान व परमार्थप्रधान कीर्तने करून स्वतंत्र देगलूरकर कीर्तनशैली विकसीत केली. त्यांचे कीर्तन व्यासंगी, विचारप्रवर्तक, रंजक व रसाळ होते. त्यांच्या नागपूरच्या कीर्तनाला ४०,००० श्रोते उपस्थित होते. कीर्तन, प्रवचन व्याख्यान व ग्रंथ लेखनाच्या माध्यमातून त्यांनी वारकरी संप्रदायाचा चौफेर प्रसार केला आणि सुशिक्षित वर्गात कीर्तनाविषयीची आस्था निर्माण केली. देगलूरकर घराण्यात गेल्या दोनशे वर्षात गुंडा नारायण महाराज, एकनाथ महाराज, भानुदास महाराज व चंद्रशेखर महाराज हे मान्यवर कीर्तनकार झाले. चैतन्य महाराज देगलूरकर विद्यमान प्रभावी कीर्तनकार आहेत.

'खंदारकर घराणे' हे वारकरी कीर्तनकाराचे दुसरे श्रेष्ठ घराणे आहे. 'हनुमंतराय साधु महाराज खंदारकर' (१७०८-१८१२) हे या घराण्यातील तपस्वी आद्यकीर्तनकार होते. त्यांनी काही अभंगाची रचनाही केली. गोर-गरीब दीन पिडीतांना त्यांनी भरपूर साह्य केले. खंदारकर घराण्यात 'शंकर महाराज खंदारकर' (१९२३-८५) हे मान्यवर कीर्तनकार होऊन गेले. सौ.मथुराबाई व धुंडिराज महाराज हे त्यांचे जन्मदाते होते. द्विखंडात्मक तुकाराम गाथा भाष्य, ज्ञानेश्वरी भावदर्शन, भावार्थ एकनाथी भागवत, हरिपाठ भाष्य व श्री अमृतानुभव भाष्य हे त्यांचे विद्वताप्रचुरग्रंथ आहेत. त्यांचे कीर्तन वेदान्त प्रधान, व्यासंगी, रसाळ व सुबोध असे. ते उत्तम प्रवचनकार होते. ग्रामीण भागातील सहस्त्रावधी श्रोत्यांचे त्यांनी कीर्तनाच्या माध्यमातून प्रबोधन केले. या घराण्यात यशवंत महाराज, धुंडिराज महाराज व डॉ. यशवंत साधु हे मान्यवर कीर्तनकार झाले. 'बाबामहाराज उमरीकर' श्रेष्ठ कवी कीर्तनकार व तपस्वी वेदान्ती होते. त्यांचे शेकडो अभंग लोकप्रिय झाले. भगवद्भक्त खंडेराव भागवत महाराज, गजानन भागवत महाराज अंबुलगेकर (ता. मुखेड) हे पितापुत्र व्यासंगी कीर्तनकार होते. गोडगळ्याचे गजानन महाराज वारकरी व नारदीय कीर्तने सारख्याच प्रभावाने करीत. बापू म. कौठेकर, शंकर म. खडंकेकर, ज्ञानोबा माऊली उम्रजकर, मारवळकरमामा ही जुन्यापिढीतील कीर्तनकार मंडळी होती. किसन म. बरबडेकर, निळोबा म. हरबळकर, बलाजी म. घागरदरेकर, बाबु म. काकांडीकर, प्रा.डॉ.सु.ग.चव्हाण, डॉ. बाळासाहेब साजणे, यशवंत मिठ्ठू महाराज, प्रकाश महाराज, प्रा.शरद म. देगलूरकर व कालिदास महाराज पाळेकर हे विद्यमान लोकप्रिय कीर्तनकार आहेत. उपरोक्त सर्व कीर्तनकारांनी बहुजन समाजाला सन्मार्गाला लावण्याची, वारकरी संप्रदायांच्या विस्ताराची महनीय कामगिरी पार पाडलेली आहे.

सतराव्या शतकात महाराष्ट्रात 'नारदीय कीर्तन' प्रकार अस्तित्त्वात आला. संत रामदास स्वामी याचे प्रवर्तक असल्याने त्यास 'रामदासी कीर्तन' म्हणूनही संबोधिले जाते. रामदासी पंथाचा प्रसार, जनप्रबोधन व स्वराज्य स्थापनेची प्रेरणा देण्यासाठी या कीर्तन पद्धतीचा फार मोठा उपयोग झाला. कारण

मुख्य हरिकथा निरूपण ।
दुसरे ते राजकारण ।
मराठा तितुका मेळवावा । महाराष्ट्र धर्म वाढवावा (दासबोंध)

Maharashtra State Gazetteers

हे रामदास स्वामींचे उद्दिष्टच होते. पेशवेकालीन वामन पंडित, अमृतराय, भुजंगनाथ, विष्णुदास, मध्वमुनिश्वर, श्रीधरस्वामी रघुनाथ पंडित, मोरोपंत, पठ्ठेबापुराव, होणाजी बाळा व राम जोशी ह्या पंत-तंत कवींनी नारदीय कीर्तनाची भरपूर सामुग्री उपलब्ध करून दिली. हे सर्व कवी उत्तम कीर्तनकार होते. अर्वाचीन नमन पूर्वरंग व आख्यानाची कीर्तनपद्धती काशीच्या गोविंदबुवा होशिंग यांनी रूढ केली. चुडामणिसुत, पंत प्रतिनिधी, साठे, बडोदेकर, केमकर, दत्तोपंत पटवर्धन, वा.शि.कोल्हटकर, शिरवळकर, कव्हाडकर, निजामपूरकर, चौंडेकर स्वामी, धेनुदासबुवा, दे.ल.महाजन, दासगूण महाराज, गोविंदस्वामी आफळे व गं. ना. कोपरकर यांसारख्या शेकडो दिग्गज कीर्तनकारांनी नारदीयकीर्तन समृद्ध केले. नारदीय कीर्तन प्रयोगाचे मंगलाचरण, पूर्वरंग व उत्तररंग हे तीन भाग असतात. पेटी, तबला व झांज ही प्रमुख वाद्ये वापरली जातात. कीर्तनकार बुवा कीर्तनस्थानी उभे राहून ईशस्तवन करून जयजयराम कृष्ण हरि गोवर्धनधर गोपालनरत, रामदास माऊली दया करी ही भजन पदे व नंतर पूर्वरंगाचे पद रागदारीत गातात. या विधीला नमन मंगला चरण म्हणतात. त्यातील पदे सारखी नसतात. पूर्वरंगासाठी बुवा संतांचे अभंग तर सतपदे किंवा स्वकृत पदे घेतात. पदाच्या अनुषंगाने नीतीमूल्ये, सदाचरण, वेदान्त, तत्वज्ञान इतिहास, संस्कृती, परमार्थ, देशनिष्ठा व राष्ट्रीय सामाजिक समस्यांचे सांगोपांग विवेचन पूर्वरंगात केले जाते. नंतर सामुदायिक भजन व पेटी मास्तराचे पद चालू असताना यजमान, बुवांना माळ बुक्का अर्पण करतात. कीर्तनाच्या उत्तररंगात पौराणिक, ऐतिहासिक किंवा संत सत्पुरूषाची चरित्र आख्याने विविध काव्यप्रकारासह दिंडी, आर्या, पोवाडा, कटाव, कीर्तनकार सादर करतात. चरित्राख्यानाचा सांधा पूर्वरंगपदाशी जोडल्यानंतर (मूळपदावर येणे) आरतीने कीर्तनाची समाप्ती होते. हा कीर्तन प्रयोग दोन ते तीन तासांचा असतो. कीर्तनकार हा बहुश्रुत, व्यासंगी, गायक, वक्तृत्व संपन्न व चारित्र्यवान असावा लागतो. रामदासी कीर्तन, एकनाथी कीर्तन, दासगणूकीर्तन, राष्ट्रीय कीर्तन, सरकारी कीर्तन व रेडिओ-दूरदर्शन कीर्तन हे नारदीय कीर्तनाचे उपप्रकार आहेत.

नारदीय कीर्तनाची समृद्ध परंपरा नांदेड जिल्ह्यातही निर्माण झालेली होती. विशेषतः 'दासगणू कीर्तनपद्धती' चा प्रभाव मोठा होता. त्याचप्रमाणे येथील कीर्तनकारांचा पूर्वरंग वारकरी कीर्तनाच्या धाटणीचा आहे. नांदेड परिसरात अनेक प्रतिभासंपन्न कवी कीर्तनकार होऊन गेले. मातृभक्त विष्णुदास माहूरकर (१८४४-१९१७ किनवट ता.) हे श्रेष्ठ संतकवी कीर्तनकार होते. सातारला जन्मलेल्या विष्णुदासाचे पूर्ण आयुष्य माहूर परिसरातच गेले. त्यांना माहूरच्या रेणूकेचा साक्षात्कार झाला. विष्णु दासांनी एकूण तेरा पौराणिक चरित्राख्याने रचली. त्याचप्रमाणे त्यांनी पदे, अभंग, लावण्या, पोवाडे, आरत्या, अष्टके, स्तोत्रे, भुपाळ्या, गोंधळ व फटका ही वैविध्य पूर्ण काव्यनिर्मिती केली. त्यांनी 'वात्सल्य भक्तिचा' प्रसार केला. 'माझी रेणुका माऊली' व 'ऐकुनी करूणावाणी' हृदयी सप्रेमे द्रवली हो ह्या सुप्रसिद्ध रचना त्यांच्याच आहेत. कारूण्य, मातृभक्ती, अलंकारिकता, व्यक्तिचित्रण, प्रभावी प्रसंगनिर्मिती व प्रौढभाषा ही त्यांच्या काव्याची वैशिष्ट्ये आहेत. न.स.जोशी खरशीकरांनी तीन खंडात विष्णुदासाच्या चरित्र काव्याचे संपादन केलेले आहे. 'कीर्तन मुक्त हार' या खंडात त्यांची कीर्तनोपयोगी चरित्राख्याने संग्रहित केलेली आहेत. ते स्वकृत पदाचा पूर्वरंग व स्वरचित आख्यानाचा उत्तररंग सादर करीत. कुबेर व माहूर परिसरात त्यांनी कीर्तने केल्याचे संदर्भ मिळतात. चरित्राख्यानाच्या आधारे विष्णुदास प्रभावी, रसाळ, रंजक व वातावरण निर्मिती करणारी कीर्तने करीत असावे. लाह्याचे

'मारूतीबुवा ब्रह्मचारी' (१८८०-१९५६) महानवेदान्ती साखरे संप्रदायाचे अनुयायी, प्रतिभावान कवी व श्रेष्ठ कीर्तनकार होते. श्रीरामगीता, चांगदेव पासष्टी भाष्य, विचारचंद्र (विचारसागर), साधुसधाचरित्र (साधु म. कंधारकर) भक्तकथा रसराज (४० चरित्रकथा), २०० अभंग, संगीतनाटके व दहा पौराणिक चरित्रे ही त्यांची साहित्य संपदा आहे. चौरंगी, मदालसा धनेश्वर व गोपीचंदाख्यान ही चरित्रे विलक्षण प्रभावी आहेत. मारूतीबुवा दत्तोपासक असल्याने माला कमंडलू व गुरूपद सुखकर या श्लोकपदाने ते आपल्या कीर्तनाचा प्रारंभ करीत संतांचे अभंग किंवा स्वरचित पदाचा पूर्वरंग सादर करीत. त्यांचा पूर्वरंग वेदान्त प्रधान व वारकरी निरूपणाच्या धाटणीचा असे. बहुधा स्वरचित चरित्र आख्याने ते उत्तररंगासाठी वापरीत. त्यांचे कीर्तन सुबोध व ग्रामीण श्रोत्यांना भावणारे होते. दासगणूमहाराज (१८६८-१९६२) विसाव्या शतकातील प्रसिद्ध संतकवी व आख्यान कवी होते. अकोळनेर (नगर जि.) गांवी जन्मलेल्या दासगणू महाराजांनी आपली ४२ वर्षे गोदातटाकीच्या नांदेड नगरीत व्यतीत केली व काव्यनिर्मितीचे कार्य पार पाडले. 'गणपती दत्तात्रय सहस्त्रबुध्दे' हे त्यांचे पूर्ण नाव त्यांनी चतुरस्त्र ग्रंथ निर्मिती केली आणि शिष्योत्तम अनंत महाराज आठवले यांनी ती १० खंडात प्रकाशित केली. दासगूणमहाराजांनी १४४ संत चरित्रे, वेदान्तपरग्रंथ, ८४ कीर्तनोपयोगी आख्याने व स्तोत्रे, महात्म्य, पूर्वरंग, पोवाडे आदी स्फुट रचना ही प्रचंड (एक लक्षपद्ये) काव्यसंपदा निर्माण केली. अर्वाचीन संत कवी व आधुनिक महिपती म्हणून त्यांचा गौरव केलेला आहे. दासगणू महाराजांची समाधी गोरठे (जि. नांदेड) येथे आहे. कीर्तनाख्यानात त्यांनी संतचरित्रांची मोलाची भर घातली. त्यांची आख्याने पौराणिक, संत चरित्रे व ऐतिहासिक या तीन प्रकारात मोडतात. रामदासपंथी दासगणूंनी स्वतंत्र 'दासगणू कीर्तनपद्धती' प्रचलीत केली. धोतर, उपरणे व उघड्याने उभे राहून ते कीर्तन करीत. ईशस्तवन, रामदास माय माझी, रहम नजर करो, पूर्वरंगाचे पद व जय सच्चिदघन भजन यांचा मंगलाचरणात स्वरचित पदांचा समावेश होता. त्यांचा पूर्वरंग संक्षिप्त पंधरावीस मिनिटांचा व चरित्राख्यानाची पार्श्वभूमी विशद करणारा असे. 'रहम नजर करना साई' या पदानंतर ते स्वकृत आख्यानाचा उत्तररंग सादर करीत. तो परिणामकारक, विस्तृत, करूण व भक्तिरस प्रधान असे. दासगणू महाराजांनी नारदीय कीर्तनक्षेत्रात आपले अलौकिक स्थान निर्माण केले.

नांदेडचे 'दे. ल. महाजन' (१८९६-१९६७) प्रतिभावान साहित्यिक व कीतर्नकार होते. काळोखातील कविता, मोत्याची मागणी (खंडकाव्य), श्री गुरूपरंपरा (मराठी), नीती शतक (अवधी), मनोबोधसार (हिंदी), महाराष्ट्र गीतांजली (मराठी), मानस विहार (मराठी) व ३३ कीर्तनोपयोगी चरित्राख्याने ही त्यांची वाङमय संपदा आहे. चरित्राख्याने पौराणिक, ऐतिहासिक व संतचरित्रात्मक आहेत. त्यातील व्यक्तिचित्रण, वर्णनशैली, भाषासौष्ठव व वातावरणनिर्मिती अत्यंत परिणामकारक आहे. महाजनांनी नवरात्रौत्सव, शारदोत्सव व विविध व्यासपीठावरून कीर्तने केली. औरंगाबादच्या अ.भा.मराठी साहित्य संमेलनात (१९४५) त्यांचे कीर्तन झाले. 'दक्षिणा प्राईज पुरस्कार' व 'साहित्याचार्य' पदवी त्यांना प्राप्त झाली. महाजनांचे कीर्तन व्यासंगी, 'विचारप्रवर्तक' वक्तृत्व संपन्न, संगीत प्रधान, विनादगर्भ व वाङ्मयगुणांनी नटलेले असे. त्यांचा पूर्वरंग अत्यंत उद्बोधक व मार्मिक असे. निजामी अत्याचाराचे ते अप्रत्यक्ष परंतु प्रभावी चित्रण करीत. संतांचे अभंग व स्वरचितपदांवरील पूर्वारंग ते सादर करीत. स्वकृत आख्याने उत्तररंगात लावीत. 'गोप्यरचनेने' आख्यानाचा प्रारंभ करीत.

व्यक्तिचित्रण व प्रसंगवर्णने ते हुबेहुब सादर करीत. महाजनांच्या कीर्तनांमधून राष्ट्रीय प्ररेणा मिळत असे. 'अनंत दामोदर आठवले' उपाख्य 'वरदानंदभारती' (१९२०-२०००) हे विसाव्या शतकातील ज्येष्ठ श्रेष्ठ नारदीय कीर्तनकार होते. पंढरपूर व पुण्यात पूर्वायुष्य व्यतित केलेल्या अनंत महाराजांनी मराठवाडा व गोरठे (जि. नांदेड) हीच आपली कर्मभूमी मानली. संतदासगणू महाराजांनी त्यांचे पालन पोषण केले. पुढील काळात त्यांनी दासगणू कीर्तन परंपरा समृद्ध केली व त्यांचे अप्रकाशित वाङ्मय १० खंडात प्रसिद्ध केले. त्यांनीच चतुरस्त्र लेखन केले. वेदान्तशास्त्रे, टीका ग्रंथ, अनुवाद, महाकाव्ये, स्तोत्रे, अष्टके, चरित्रे, समीक्षा, आयुर्वेदशास्त्र, इतिहास व चरित्राख्याने (३) आदी विषयांवर त्यांचे सुमारे ३५ ग्रंथ आहेत. संस्कृतमधील ज्ञानभांडार त्यांनी मराठीत उपलब्ध करून दिले. वरदानंदभारती तर्कशुद्ध विचारवंत व पट्टीचे वक्ते होते. या सर्वाचे प्रतिबिंब त्यांच्या कीर्तनात उमटलेले दिसून येते. ते दासगणूंच्या पदाचाच विचारप्रधान, प्रबोधनात्मक उच्च दर्जाचा पूर्वरंग सादर करीत. त्यांत ते परमार्थिक विषयाबरोबरच राष्ट्रीय सामाजिक प्रश्नांची चिकित्सा करीत. दासगणू व प्रसंगी स्वकृत आख्यानाचा उत्तररंग ते सादर करीत. त्यातील व्यक्तिचित्रण व प्रसंगवर्णन अत्यंत रेखीव, रसाळ, रंजक, वाङ्मय संपन्न व भक्तिरसप्रधान असे. तुकारामबुवा आजगावकर, छगन महाराज व मनु महाराज आपल्या गायनाने कीर्तनात रंग भरीत.

उपरोक्त कीर्तनकारांशिवाय नांदेड जिल्ह्यात अनेक मान्यवर कीर्तनकार झाले आहेत. जुन्यापिढीतील कवी शिवदास मुखेडकर, श्रीधर रामकृष्णदेव, भाऊसाहेब शेवाळकर (हिमायतनगर), हरिमहाराज दीक्षित, छगनमहाराज बारटक्के व पंचवीस आख्याने रचणारे किशनराव लाठकर हे प्रसिद्ध कीर्तनकार होते. प्रा.डॉ.शंभुनाथ कहालेकरांनी 'नांदेड विज्ञान कीर्तन' प्रकार लोकप्रिय केला. मनोहर म.को.कलेगांवकर, मोरेश्वरबुवा खंदे, बासरीबाई मोहन पुरकर, बाळकृष्ण म. खडकेकर, शरद म. अंबेकर, वसुमती गार्गी देशपांडे, प्रा.स्मिता आजेगावकर, प्रभाकरबुवा आजेगावकर, शरद म. नेरळकर व प्रा. श्रीकांत देशपांडे हे आघाडीचे विद्यमान कीर्तनकार आहेत.

## रंगभूमी*

नांदेडच्या नाट्यरंगभूमीची परंपरा हजार बाराशे वर्षांमागे जात असल्याच्या नोंदी इतिहास अभ्यासातून पुढे आल्या आहेत. राष्ट्रकूट काळातल्या ख्यातकिर्त नाटककार भवभूति याची नाटकं राष्ट्रकूटाच्या उपराजधानीत म्हणजे नांदेड जिल्ह्यातल्या कंधार या नगरीतल्या कालप्रियनाथ मंदिराच्या प्रांगणात झाली असल्याची शक्यता वर्तविली जाते. कालप्रियनाथ मंदिराच्या प्रांगणात प्रयोग झाल्याचा संदर्भ खुद्द भवभूतिच्या नाट्यसंहितेतच येतो. तात्पर्य नांदेड परिसरातल्या नाट्यरंगभूमिची नांदी अशी हजार बाराशे वर्षापूर्वी गायली गेली. ही पुढची वाटचाल कशी झाली असावी हे मात्र इतिहासालाही अज्ञात असलेले कोडे आहे.

विसाव्या शतकाच्या प्रारंभी निजाम स्टेट रेल्वेने नांदेड हा भाग मनमाडशी जोडला गेला आणि पश्चिम महाराष्ट्राशी काही प्रमाणात संपर्क वाढला. विसाव्या शतकाचा पूर्वाध रझाकारांची अत्याचारी चळवळ आणि मुक्तिआंदोलनाने पेटलेला असल्याने नाट्यरंगभूमिच्या वाढीसाठी आवश्यक तो

*. या भागाचे लेखन डॉ. जीवन पिंपळवाडकर यांनी केले आहे.

निवांतपणा इथल्या समाजजीवनात शिल्लकच नव्हता. हैद्राबाद मुक्ति आंदोलनाची यशस्वी सांगता होताच संपूर्ण मराठवाड्यात सांस्कृतिक पुनरूज्जीवनाची लाट आली. त्याचे पडसाद नांदेडमध्येही उमटले. ॲड. पद्माकर लाटकर हैद्राबादेहून नांदेड मुक्कामी परतले आणि त्यांनी नांदेडच्या नाट्यचळवळीची मुहर्तमेढ रोवली. प्राचार्य डॉ.बारलिंगे यांनी पुढाकार घेऊन नांदेड नाट्यसंघ ही संस्था उभी केली. पिपल्स कॉलेज आणि नांदेड नाट्यसंघ यांच्या वतीने नियमितपणे नाटके सादर होऊ लागली. याच सुमारास नांदेडचे कलेक्टर के.बी.लाल यांच्या प्रयत्नाने कलामंदिर हे सांस्कृतिक सभागृह उभे राहिले. सांस्कृतिक क्षेत्रात कार्यकरणारी एक संस्था म्हणूनच कलामंदिरपुढे आले. त्यामुळेच नाट्यसंघ, पिपल्स कॉलेज आणि कलामंदिर या तीन्ही संस्थांच्या रूपाने नांदेडचे सांस्कृतिक विश्व संपन्न बनले. या तिन्ही संस्थाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व कलावंत जवळपास एकच होते. अण्णासाहेब गुंजकर, तात्यासाहेब कानोले, त्र्यंबक वसेकर, नरहर कुरूंदकर, स. रा. गाडगीळ, राम शेवाळकर, आनंदीदासराव लव्हेकर, ग. ना. अंबेकर या सर्वांच्या सहकार्याने नांदेड येथील सांस्कृतिक चळवळीला आकार येऊ लागला. नाट्य चळवळी या सांस्कृतिक चळवळीचा मोठा भाग होत्या. पद्माकर लाटकर आणि कुसुमावती रसाळ यांनी नांदेडच्या नाट्यचळवळीत लक्षणीय योगदान दिले आहे.

१९५८ साली नांदेड येथे पहिले मराठवाडा नाट्य संमेलन आयोजिण्यात आले. नांदेडची रंगभूमी गजबजून उठली. देवमाणूस, एकचप्याला, झाशीची राणी, एक होता म्हातारा, ही नाटके या संमेलनात सादर झाली. डॉ.स.रा.गाडगीळ यांनी १९४३ ते १९५० या कालखंडातील प्रातिनिधीक नाटकांमधील निवडक नाट्यप्रवेशाचा नाट्यपुष्पगुच्छ या नाट्यसंमेलनात सादर केला. हा नाट्यपुष्पगुच्छ वैशिष्ट्यपूर्ण ठरला. या नाट्यसंमेलनाने नांदेडच्या नाट्यरंगभूमिची दमदार वाटचाल सुरू राहिली.

या पुढील दशकात नांदेडच्या नाट्यसृष्टीत अनेक नवे कलाकार पुढे आले. नाट्यवाचन, नाट्यचर्चा, नाट्यसमीक्षा, अधिकाऱ्यासंबंधीचे मूलभूत विचार, भरतमुनींच्या नाट्यशास्त्रातील नाट्य, साहित्य, रससिद्धान्त यांचे चिकित्सक मंथन सुरू झाले. गुरूवर्य यज्ञेश्वरशास्त्री कस्तुरे, एकनाथ महाराज, प्राचार्य बारलिंगे, नरहर कुरूंदकर, स. रा. गाडगीळ, के. र. शिरवाडकर हे अभ्यासक या नाट्यविचारमंथनाचे आद्य प्रवर्तक होत. या विचारमंथनाच्या जोडीला प्रत्यक्ष नाट्य प्रसंगांचीही साथ या काळात महत्त्वाची ठरली. 'श्रीमंत', 'राणीचा बाग', 'एक रात्र अर्धा दिवस', 'दुरिताचे तिमिर जावो', 'साष्टांग नमस्कार', 'भ्रमाचा भोपळा', 'खडाष्टक', 'अंमलदार', 'तो मी नव्हेच', 'कवडी चुंबक', 'हाच मुलाचा बाप', 'भावबंधन' सारखी अनेक नाटके नांदेडच्या रंगभूमीवर अवतरली. पद्माकर लाटकर, मनोहरराव कांडलीकर, व्यंकट लाटकर, वसंतराव गंगाखेडकर, आर. पी. देवळे, माधव अर्धापुरे, शकुंतला वाघमारे, लीला धर्मापुरी, नलिनी लाटकर हे पहिल्या पिढीचे कलावंत नांदेडच्या रंगभूमीवर चमकून गेले. 'एक रात्र अर्धा दिवस' या नाट्यप्रयोगाने तर मराठवाड्याबरोबर नागपूर येथे नांदेडचा यशोध्वज फडकविला.

१९६५ साली पु. ल. देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली नांदेड येथे संपन्न झालेले अखिल भारतीय नाट्यसंमेलन सर्व नाट्यप्रेमींच्या चिरस्मरणात राहील असे ठरले. यावेळी पु. भा. भावे, कै. नारायण काळे, प्र. के. अत्रे आदि मान्यवरांनी आपली उपस्थिती लावली. यानंतर नांदेडच्या नाट्यचळवळीला

अधिक व्यापक स्वरूप आले. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेची शाखा स्थापन होऊन नांदेड नाट्यसंघ आपल्या पूर्ववैभवासह नाट्य परिषदेत विलीन झाला. पुरूषोत्तम दारव्हेकरांच्या हस्ते नाट्य परिषद शाखेचे उद्‌घाटन झाले. नरहर कुरूंदकर अध्यक्ष तर डॉ.स.रा.गाडगीळ व डॉ. मोहन भालेराव यांची उपाध्यक्षपदी निवड झाली. महाराष्ट्र बँकेचे व्यवस्थापक श्री.जोगळेकर यांनी नाट्यस्पर्धेत 'शांतता कोर्ट चालू आहे' या नाटकाचा प्रयोग सादर केला. पहिल्या फेरीत या नाटकाला द्वितीय पारितोषिक मिळाले. सौ.अरूणा जोगळेकर, कु. अरूंधती पांडे, भालचंद्र सरदेशपांडे हे कलावंत या नाटकाने नांदेड रंगभूमीला दिले. प्रा. दत्ता भगत यांना दिग्दर्शनाचे दुसरे पारितोषिक मिळाले.

प्रतिभा निकेतन हायस्कूलचे मुख्यापक व ल. प्र. पांडे एक उत्कृष्ट दिग्दर्शक व अभिनेते होते. प्रा.एल.एस.देशपांडे यांनी या संस्थेतर्फे 'केअर टेकर' व 'आम्ही शिखंडीचे पुत्र' ही नाटके लिहून व सादर करून प्रादेशिक स्पर्धेत पारितोषिके मिळविली. प्रतिभा निकेतन शिक्षण संस्थेचे वसंतराव गंगाखेडकर, ल.प्र.पांडे, नाथराव नेरलकर, पांडुरंग कंडारकर, मकरंद जोशी, जीवन पिंपळवाडकर, उषा कुमार यांच्यासारखे कलावंत रंगभूमीवर आणले.

ह्याच सुमारास कामगार कल्याण केंद्राचे नाट्यप्रेमी अधिकारी, संघई यांनीही येथील नाट्यचळवळीला गतिमान ठेवले. 'एखाद्याचे नशीब', 'घुम्मस', 'सारे प्रवासी तिमिराचे', 'पळा पळा कोण पुढे पळे तो', 'गाडी चुकली', 'काका किशाचा' इत्यादी नाटके सादर करून पारितोषिके मिळविली. स्टेशनमास्तर बसवेश्वर घोडके यांच्या दिग्दर्शनाखाली ही नाटके उभी राहिली. पैकी त्यांच्या 'गाडी चुकली' या नाटकाचा नागपूर येथील धनवटे रंगमंदिरात अंतिम फेरीतील प्रयोग झाला. या नाटकांत जीवन पिंपळवाडकर, श्याम बोर्डे, श्रीमती सहस्त्रबुद्धे, सौ. वाडेकर, शशिकांत वाघमारे, नारायण सेलूकर, छानदार बोर्डे, कै.दिवाकर आदि कलावंतांचा सहभाग होता.

एस.टी.महामंडळ व वीज मंडळ ह्यांच्याही स्पर्धा सुरू झाल्या. या स्पर्धांमधून 'प्रेमा तुझा रंग कसा', ' चांदणे शिंपीत जा', 'कासव', 'भौमा', 'सूर्याची पिल्ले' इत्यादी नाटकांनी यश मिळविले. राजीव किवळेकर, लक्ष्मीकांत सांगवीकर, सुधाकर गाजरे इत्यादी कलावंत या स्पर्धांसाठी नाटके बसवीत. सांस्कृतिक कला विकास केंद्राद्वारे, 'पद्मश्री धुंडिराज', 'पती गेले ग काठेवाडी', 'माझा खेळ मांडू दे' इत्यादी नाटके सादर झाली. डॉ. सुरेश पुरी, मकरंद जोशी, प्रशांत खरवडकर, प्रिया खरवडकर, इत्यादी कलावंतांनी श्रीमती कुसुमावती रसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली येथे काम केले.

अखिल भारतीय नाट्य परिषद नांदेड शाखेतर्फे सातत्याने नाटके सादर होत आली आहेत. अश्मक, आर्य चाणक्य, इत्यादी काही नाटकांनी नाट्यरसिकांची दाद मिळविली. पैकी अश्मक नाटक १९९० साली राज्य नाट्य स्पर्धेच्या अंतिम फेरीत निवडले गेले. मुंबई येथील रविन्द्र नाट्य मंदिरात त्याचा प्रयोग करण्यात आला.

डॉ. स. रा. गाडगीळ आणि प्रा.दत्ता भगत यांनी नांदेड सोडताना नाट्यपरिषदेची जबाबदारी डॉ.सुरेश पुरी यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. जीवन पिंपळवाडकर यांना कार्यवाहपदी नेमून सुपूर्त केली. दरम्यान डॉ. जीवन पिंपळवाडकर यांची नाट्य परिषद शाखा, मुंबई येथे दोन वेळेस नियामक मंडळावर नियुक्ती झाली. नाट्य परिषदेच्या विद्यमान कार्यकारी मंडळावर डॉ. सुरेश पुरी यांची निवड झाली.

मराठवाड्याला हा प्रथमच मिळालेला बहुमान आहे. डॉ. लक्ष्मण देशपांडे आणि प्रा. दत्ता भगत यांना संमेलनाध्यक्ष म्हणून निवडून आणले.

नांदेडची नाट्यपरिषद शाखा सातत्याने नवनवीन नाट्यप्रयोग व नाट्यविषयक उपक्रम सादर करीत असते. 'आई रिटायर होते', 'मंतरलेली चैत्रवेल', 'पुत्रकामेष्ठी', 'माझं काय चुकल', 'सं. ययाती देवयाची', 'सं. सुवर्णतुला', 'सं. मानापमान' इत्यादी नाटकांबरोबर काही संगीत नाटकांतील प्रयोग व एकांकिकाही सादर करून संस्थेने अनेक सन्मान मिळविले. २००४ साली नांदेड येथे ख्यातनाम अभिनेते मोहन जोशी यांच्या उपस्थितीत संगित मानापमानचा देखणा प्रयोग सादर केला. तसेच हे नाटक पुण्याच्या भरत नाट्य मंदिरातही सादर केले गेले. नाट्यक्षेत्रातील या कामगिरीवरून दि.१४ जून २००४ रोजी पुणे येथील टिळक स्मारक मंदिरात ख्यातनाम अभिनेते व दिग्दर्शक अमोल पालेकरांच्या हस्ते डॉ.सुरेश पुरी, डॉ.जीवन पिंपळवाडकर व राजश्री देव यांचा सत्कार करून सन्मानित करण्यात आले. नाट्य परिषद शाखेची अनेक नाटके महाराष्ट्रात व बाहेर झाली.

डॉ. सुरेश पुरींना 'पुत्र कामेष्ठी' साठी राज्य नाट्यस्पर्धेच्या प्रथम फेरीत दिग्दर्शनाचे प्रथम तर मीरा कुलकर्णी, मनिष देशपांडे, प्रशांत खरवडकर यांना अभिनयाची आणि एस. आर. कुलकर्णी व राहुल कुलकर्णी यांना अनुक्रमे नेपथ्य व ध्वनी योजनेची पारितोषिके मिळाली. नाट्यपरिषदेने संगीत नाट्यस्पर्धेत सादर केलेल्या नाटकांमध्ये प्रकाश सेनगावकर यांना अभिनयाचे व गणेश पांडे यांना दिग्दर्शनाचे पारितोषिक मिळाले. यांच्याशिवाय नाट्यपरिषद शाखेतर्फे सादर होणाऱ्या अनेक नाटकांत संजय जोशी, अनिता नेरलकर, धनंजय जोशी, स्मीता कानोले, मुकुंद पांडे, सुभाष शारंगधर, आर.के.देशपांडे, स्वाती ठाकूर, रवी नांदेडकर, रश्मी वडवळकर, डॉ. दीनबंधू शेळके, त्र्यंबक मगरे, स्मिता आजगावकर, ज्युगलकिशोर शुक्ल आदि कलावंत सहभागी झालेले दिसतात.

नाथा चितळे यांचे नांदेड येथील नाट्यचळवळीतील योगदान मोलाचे आहे. या दशकातील विभागीय व राज्यस्तरावरील अनेक नाट्यस्पर्धांमधील अनेक पारितोषिकांचे ते मानकरी आहेत.

राजीव किवळेकरांच्या नेतृत्वाखाली मागील अनेक वर्षांपासून कार्यरत असणाऱ्या सांस्कृतिक मंचाचे स्थानही येथील नाट्यचळवळीत महत्त्वपूर्ण आहे. त्यांनी सादर केलेल्या घर या नाटकास राज्य नाट्य स्पर्धेच्या पहिल्या फेरीत प्रथम पारितोषिक मिळाले होते. याशिवाय 'रातराणी', 'किरवंत', 'कफन' इत्यादी त्यांनी सादर केलेल्या नाटकांना विविध पारितोषिके मिळाली. अनेक एकांकिका स्पर्धांमध्येही त्यांचा मोलाचा सहभाग असतो. रवी श्यामराज, डॉ. सुनील वझरकर, दिलीप पाध्ये, सौ.ज्योती पाध्ये, दिपक मुळे आदि मंडळी या ठिकाणी कार्यरत असतात. साई एकांकिका स्पर्धांच्या आयोजनातील या सर्वांचा सहभाग महत्त्वपूर्ण ठरला.

नांदेडच्या नाट्य चळवळीत कल्चरल असोसिएशनचे कार्यही वैशिष्ट्यपूर्ण आहे. विविध नाट्यप्रयोगांच्या सादरीकरणाबरोबरच नाट्यविषयक शिबिरे, कार्यशाळा व संमेलनांच्या आयोजनात या संस्थेने सातत्य राखले आहे. प्रा.दत्ता भगत व डॉ. विजयकुमार माहुरे यांनी सादर केलेल्या 'वाटा-पळवाटा', 'खेळीया' या नाटकांनी दलित रंगभूमीला मिळालेले नवे संयत स्वरूप दाखवून दिले. १९८९

साली अंबाजोगाई येथे भरलेल्या दलित नाट्य संमेलनाचे अध्यक्षपद नांदेडच्या डॉ. दत्ता भगत यांनी भूषविले होते. तर १९९० सालच्या दलित नाट्य संमेलनाचे आयोजन नांदेड येथे केले गेले. उमेश धूत, डॉ. विलास भद्रे, राजेश दुर्गे, गजान कुलकर्णी, चंद्रकांत गजभारे, कमलाकर बिरादार हे व असे अनेक समर्थ नाट्यकर्मी नांदेडची नाट्यचळवळ समृद्ध करण्यात महत्त्वाचा सहभाग नोंदवत आहेत.

सामाजिक कृतज्ञता निधीच्या उभारणीसाठी सादर केलेल्या 'लग्नाची बेडी' या प्रयोगाचे संयोजन प्राचार्य स.दि.महाजन यांनी प्रतिभा निकेतन महाविद्यालयाच्या प्रांगणात करून येथील नाट्यचळवळीसंबंधी आपली आस्था दाखवून दिली. नांदेड येथील 'कुसुम' व महानगरपालिकेचे कै. शंकरराव चव्हाण नाट्यगृह ही भव्य व अद्ययावत नाट्यगृहे नाट्य व सांस्कृतिक चळवळींसाठी उपकारक ठरली आहेत.

**संगीत रंगभूमी* :** इतर नाटकांबरोबरच संगीत नाटकांचेही अनेक प्रयोग नांदेड नगरीत होत राहिले. बालगंधर्व गोहरजान. छोटा गंधर्व, वामनराव सडोलीकर, सरस्वती राणे, हिराबाई बडोदेकर, किर्ती शिलेदार यांच्यासारख्या अनेक दिग्गजांनी प्रयोगाच्या निमित्ताने नांदेडला येऊन संगीत रंगभूमीला आणि संगीत नाट्यकर्मींना प्रेरणा दिली. या पार्श्वभूमीवर १९६० च्या दशकात भावबंधन हे संगीत नाटक नांदेडच्या कलाकारांनी सादर केले. डॉ.स.रा.गाडगीळ, ग.ना.अंबेकर आणि आण्णासाहेब गुंजकर यांनी नाट्यपरिषद आणि गायनवादन विद्यालयाच्या वतीने हा प्रयोग सादर केला. मनोहर व कांडलीकर यांच्यासारखा एक सुरेख गायक नट भावबंधनने नांदेडच्या रंगभूमीला दिला. या नंतर देवमाणूस हे संगीत नाटक रंगभूमीवर आले. मनोहरराव कोंडलीकर आणि नाथ नेरळकरांनी त्यात भूमिका केल्या. १९६४ च्या नाट्यसंमेलनात संगीत शारदा हे नाटक नांदेडकरांनी सादर केले. नाथराव नेरळकरांनी या नाटकातला कोदंड इतका अप्रतिम उभा केला की अनेक वर्ष त्यांची ती भूमिका लोकांच्या स्मरणात राहिली. याच दरम्यान गायन वादन विद्यालयाने संगीत सुवर्णतुला सादर केले. या नाट्यप्रयोगात नाथ नेरळकर आणि नलिनी देशपांडे बरोबरच रमेश कानोले यांच्या भूमिका सरस ठरल्या.

१९६२ च्या आसपास नांदेडला संगीत सौभद्र सादर झाले आणि आण्णासाहेब गुंजकरांसारखा एक गायक नट नांदेडच्या रंगभूमीला मिळाला. गंधर्व जन्मशताब्दी निमित्त नांदेडच्या नाट्यपरिषदशाखेने संगीत मानापमान सादर केले. रमेश कानोले यांनी धैर्यधराच्या भूमिकेत तर राधिका वळवेकर यांनी भामिनीच्या भूमिकेत अप्रतिम नाट्यपदे सादर केली. या नाटकाचे प्रयोग अनेक ठिकाणी झाले. ठाणे, सांगली, दिल्ली येथील प्रयोगाला पुरस्कार मिळाले.

१९८९ साली 'यशोधरा' ही संगितिका नांदेडच्या संगीत रंगभूमीवर सादर झाली. १९९२ साली नाट्यपरिषद नांदेडने सांगली येथे नाटक 'कट्यार काळजात घुसली' सादर केले. या संगीत नाटकाने नांदेडच्या संगीत रंगभूमीवर इतिहास घडवला. हे नाटक राज्य नाट्य स्पर्धेत प्रथम पारितोषकाचे मानकरी ठरले. या नाटकाला एकूण ९ बक्षीसे मिळाली. या नाटकातल्या रमेश कानोले, संजय जोशी, राधिका वाळवेकर, कल्पना महाजन यांनी वठवलेल्या गायक नटांच्या भूमिका अप्रतिम ठरल्या. डॉ.स.रा.गाडगीळांचे दिग्दर्शन टि. एम. देशमुखांचे संगीत नियोजन, गंगाधर देव यांची ऑर्गल, बालाजी तामसेकराचा तबला या साऱ्याच गोष्टी चिरस्मरणीय ठरल्या. या नाटकाच्या दिग्दर्शनाचे पारितोषिक

*. या भागाचे लेखन पंडित रमेश कानोले यांनी केले आहे.

डॉ. स. रा. गाडगीळ यांना तर, रमेश कानोले यांना खाँसाहेब अलताफहुसेनच्या मध्यवर्ती भूमिकेसाठी पारितोषिके मिळाली. संजय जोशी यांना शासनाचा व नाट्यपरिषदेचा पुरस्कार मिळाला.

दरम्यानच्या काळातत 'संगीत मत्यगंधा', 'संगीत देवयानी' आणि 'संगीत सुवर्णतुला' ही नाटके सादर झाली. २००७ साली संगीत 'स्वरसम्राज्ञी' चा प्रयोग घेऊन नांदेडचे संगीत नाट्य कलावंत नाट्यस्पर्धेत उतरले. स्वरसम्राज्ञीच्या रूपाने नांदेडच्या संगीत रंगभूमीला पुन्हा एकदा प्रथम पारितोषकाचा मान मिळाला. धनंजय जोशी या प्रतिभावान युवा गायकाने आपल्या कसदार भूमिकेत रंग भरला. धनश्री देव आणि राजश्री देव या देवभगीनींनी आपल्या अभिनयाने आणि गायकीने साऱ्या प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले.

**संगीत साधना* :** नांदेड येथील संगीत चळवळीच्या वाटचालीत येथील संगीत विद्यालये, कीर्तने, मेळे, संगीत नाटके, शिबिरे, चर्चासत्रे, संमेलने व नाट्य रसिकांच्या मैफली यांचा महत्त्वाचा सहभाग आहे. प्रारंभीच्या काळात कीर्तनांना हार्मोनियम व तबल्याची साथ देऊन दामुअण्णा आठवले, पंडितराव खेडकर, आबासाहेब कानोले, बंडा महाराज देगलूरकर, बाळा गोसावी या कलावंतांनी नांदेडच्या संगीतप्रेमींना प्रभावीत केले. सचखंड गुरूद्वारा येथे आपल्या सेवेची हजेरी लावणारे रागी शार्दुलसिंगजी यांनी पखवाज व तक्त्याचे शिक्षण पंजाबमधील तरनतारन महाविद्यालयात घेतले होते. ते प्रतिभावान असून त्यांनी अनेकांना संगीताचे प्रशिक्षण दिले. निजामाच्या दरबारात सन्मानित झालेले पानसे घराण्यातील मार्तंडबुवांचे शिष्य रंगनाथबुवा वारकरी होते. यांनी आयुष्याच्या उत्तरार्धात नांदेड येथे येऊन येथील संगीत चळवळीत महत्त्वपूर्ण योगदान दिले. औपचारिक पद्धतीने संगीताचे शिक्षण घेता आले नसले तरी दर्जेदार संगीताची अभिरूची निर्माण करणारे धोंडुशास्त्री नेरलकर, धोंडु कंचन बरवे, गजाननराव जोशी यांचे येथील संगीतक्षेत्रातील कार्य वैशिष्ट्यपूर्ण होते. श्रेष्ठ कव्वाली गायक नरसिंगराव कव्वाल आणि गंगासानी यांनी जोपासलेले निराळ्या प्रकारचे संगीतही रसिकांच्या पसंतीस उतरले होते. नानासाहेब कानोले, श्यामराव बक्षी, धोंडुशास्त्री नेरलकरांनी अनेक मुलामुलींच्या सहाय्याने विविध मेळाव्यांमध्ये, गणपती उत्सवात रागदारीवर आधारित पदे बसवून कार्यक्रम सादर केले. संगीताच्या अभिरूची निर्मितीमध्ये अनेक वारकरी मंडळींचे प्रयत्नही दुर्लक्षिता येणार नाहीत.

नांदेड येथे औपचारिकरित्या जाणीवपूर्वक श्रद्धेने अभिजात शास्त्रीय संगीत शिक्षणाच्या कार्याचा प्रारंभ संगीत महर्षी अण्णासाहेब गुंजकर यांनी केला. गायन, वादन, तबला, सतार इत्यादी शिक्षणाची अद्ययावत सोय, गांधर्व महाविद्यालयाची विशारद, अलंकार या पदव्या प्राप्त होतील अशी उपलब्धी अथक परिश्रमाने व निष्ठेने त्यांनी केली. गायक वादकांची एक प्रशिक्षित पिढी तयार करण्याचे श्रेय त्यांनाच द्यावे लागेल. नाथराव नेरलकर, श्यामराव गुंजकर, रमेश कानोले, नलिनी देशपांडे, उत्तमराव अग्निहोत्री, त्रिंबक देशमुख, शिवदास देगलूरकर, संजय जोशी, रत्नाकर अपस्तंभ, अतुल सोदंणकर कलावंतांना घडविण्याचे श्रेय अण्णासाहेबांकडेच जाते. कांतराव कांडलीकर, माधवराव कांजाळकर, सीताभाभी राममोहनराव, यशवंतराव देशपांडे, बालाजी तामसेकर, अतुल देशपांडे, प्रमोद देशपांडे,

*. या भागाचे लेखन डॉ. जीवन पिंपळवाडकर यांनी केले आहे.

आशालता भांडारे, शोभा हातवळणे, रजनी पप्पू, उषा जोशी, निर्मला लेले इत्यादी कितीतरी नांदेड येथील संगीत क्षेत्रातील कलावंतांचा उल्लेख अण्णासाहेबांचा शिष्य संप्रदायात करावा लागेल.

धनंजय जोशी, महेंद्र टोके, संगीता आचार्य, अंकिता जोशी, शिल्पा गुणे, महेश कानोले इत्यादी नांदेड येथील गायकवादक मंडळी आज नांदेड बाहेर आपल्या कला कौशल्याद्वारे रसिकांची मने जिंकीत आहेत. सूरमणी श्याम गुंजकर, पं. रमेश कानोले, सीताभाभी राममोहनराव, धनंजय जोशी, जगदीश देशमुख, विजया कोंदडे, यशवंतराव देशपांडे, सौ. आंबुलगेकर जोशी असे कितीतरी संगीत क्षेत्रातील कलावंत सध्या नांदेडमध्ये संगीत शिक्षणाचे व अभिरूची घडविण्याचे कार्य निष्ठेने चालवत आहेत.

भूतपूर्व नभोवाणी मंत्री केसकर यांनी १९५४ साली येथील पहिल्या मराठी संगीत संमेलनाचे उद्घाटन केले. गांधर्व महाविद्यालयाचे प्रोफेसर बी.आर.देवधर यांच्या अध्यक्षतेखाली हे संमेलन पार पडले. अनेक संगीत नाटकांद्वारे संगीताचा आस्वाद येथील संगीत प्रेमींना घेता आला. शिलेदार कंपनीची बहुतेक सर्व संगीत नाटके प्रभाकर गारेवार यांच्या प्रयत्नांमुळे नांदेडच्या नाट्यरसिकांना पहावयास व ऐकावयास मिळाली.

सीताभाभी राममोहनराव आपल्या 'स्वर संगम' संस्थेद्वारे भातखंडे, पलुस्कर व गुंजकर स्मृती समारोहाचे आणि शारदा भवन शिक्षणसंस्थेद्वारे कै. शंकरराव चव्हाणांच्या स्मृतीप्रित्यर्थ 'शंकर दरबार' या समारोहाचे सातत्याने आयोजन करून नांदेडच्या संगीत प्रेमींना मान्यवर गायक वादक कलावंतांचे सुश्राव्य संगीत उपलब्ध करून देतात. लक्ष्मीकांत खंदे व त्यांच्या सहकाऱ्यांनी मागील काही वर्षांपासून संगीत विषयक उत्कृष्ट उपक्रमांच्या आयोजनास प्रारंभ केला आहे. आदरणीय पं.स.भ.देशपांडे, डॉ.स.रा.गाडगीळ, लीलाताई धर्मापुरी यांचे मार्गदर्शन येथील संगीत विषयक उपक्रमांना सदैव लाभले आहे.

पेंटर झाडबुके, नानासाहेब गोळेगावकर, नरहर कुरूंदकर, ग.ना.अंबेकर या काळाच्या पडद्याआड गेलेल्या कलावंत व संगीत प्रेमींनी नांदेडची संगीत चळवळ सशक्त करण्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले.

## चित्रपट*

नाट्यक्षेत्रात प्रचंड भरारी घेणारे नांदेड चित्रपटक्षेत्रात मात्र बरेच उशीरा उतरले. चित्रपटक्षेत्रातल्या अभिनयात लक्षणीय सहभाग असल्याची विशेष नोंद या भागात आढळत नाही. असे जरी असले तरी सहकारी तत्त्वावर चित्रपट निर्मितीचा प्रयत्न मात्र नांदेडमध्येच झाला ही गोष्ट आवर्जुन नोंदवली पाहिजे. गोदावरी नावाची सहकारी फिल्म सोसायटी डॉ. भरत गुहीलोत यांनी १९८० च्या दशकात काढली. 'बळी' नावाच्या सिनेमाचे चित्रिकरण नांदेड शहरातल्या निरनिराळ्या स्पॉटवर करण्यात आले. अनेक तरूण कलाकार प्रथमच बळीच्या चित्रिकरणातून पडदयावर झळकले. चित्रपट प्रदर्शितही झाला. नांदेडच्या चित्रपट निर्मितीतला पहिला चित्रपट म्हणून 'बळी' चा उल्लेख केला जातो. त्यानंतर नांदेडच्याच सुनील मोरे या शासकिय अधिकारीपदावर असलेल्या हुन्नरी नटाला एका चित्रपटातून महत्त्वाची भूमिका करण्याची संधी मिळाली हे लक्षणीय ठरावे.

*. यापासून पुढील सर्व भागांचे लेखन डॉ. प्रभाकर देव यांनी केले आहे.

## चित्रकला

मराठवाड्याला अजिंठ्याच्या आणि पितळ खोऱ्याच्या लेण्यातील जगप्रसिद्ध चित्रकलेचा वारसा लाभलेला आहे खरा, परंतु ही परंपरा अनेक शतके मध्यंतरी खंडीत राहीली. मराठवाड्यामध्ये चित्रकलेची साधना करणारे चित्रकार अठराव्या एकोणीसाव्या शतकापर्यंत जवळपास नाहीतच. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात अजिंठ्याच्या चित्रकलेवरून चित्र बनवण्याचे मोठे कार्य काही चित्रकारांकडून झाले. चित्रकला परंपरा काही प्रमाणात पुनरूज्जीवीत झाली. नांदेडला चित्रकलेची परंपरा पुनरूज्जीवीत करण्याचा प्रयत्न १९५०-५५ च्या दरम्यान झाला. मराठवाड्यात चित्रकलेचा विकास झाला पाहिजे, या विचाराने प्रेरित होऊन हैद्राबाद स्कूल ऑफ आर्टचे जी.डी.आर्ट झालेले त्र्यंबक वसेकर हे चित्रमहर्षी नांदेडला आले आणि त्यांनी अभिनव चित्रशाळेची मुहुर्तमेढ रोवली.

चित्रकलेची साधना करणारी, चित्रकलेच्या शिक्षणाचा प्रसार करणारी मराठवाड्यातील ही एकमेव जुनी संस्था. वसेकरांनी प्रतिभा निकेतनच्या वास्तुत अभिनव चित्रशाळेचा शुभारंभ केला. लवकरच त्यांची बालचित्रकलेची योजना पूर्णत्वास गेली. शालेय विद्यार्थ्यासाठी चित्रकलेच्या परीक्षा आयोजित करून त्यांनी बालचित्रकरांच्या सप्तगुणांना प्रगट होण्याची संधी दिली. गेल्या अनेक वर्षांपासून त्यांनी हा उपक्रम चिकाटीने मराठवाडाभर राबवला. अभिनव चित्र शाळेच्या या परीक्षांना गतशतकापासून एक प्रतिष्ठा लाभली होती आज चित्रकलेच्या शिक्षणाच्या अनेक सोयी उपलब्ध झाल्या परंतु पन्नास वर्षापूर्वी चित्रकलेच्या प्रसारासाठी धडपड करणारी अभिनव चित्रशाळा नांदेडचे सांस्कृतिक भूषण होती.

अभिनव चित्रशाळेतून अप्लाईड आर्ट आणि टेक्स्टाईल डिझाईन्सचा अभ्यासक्रमही मध्यंतरी राबवला गेला. १९७५ च्या दरम्यान या संस्थेच्या वतीने एक भव्य चित्रप्रदर्शन झाले होते. या प्रदर्शनात त्र्यंबक वसेकरांचा सिंहाचा वाटा होता. चित्रकलेच्या क्षेत्राच्या अशा परीक्षा घेणारी आणि चित्रप्रदर्शनाचे आयोजन करणारी अभिनव चित्रशाळा ही मराठवाड्यातलीच नव्हे तर महाराष्ट्रातील एक अग्रगण्य संस्था. महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यातून चित्रकलेच्या परीक्षा घेतल्या जात.

अभिनवचित्रशाळेने आणि त्र्यंबक वसेकरांच्या चित्रसाधनेने कलाकारांची एक समर्थ पिढी नांदेडमध्ये निर्माण झाली. त्यांचे अनेक शिष्य आज महाराष्ट्रात मान्यता पावले आहेत. आजही शिक्षकासाठी आवश्यक असलेल्या अभ्यासक्रमाबरोबरच अभिजात कलाकरांना प्ररेणा देण्याचे महत्कार्य चित्रशाळेतून घडत आहे. त्यामुळेच नांदेडच्या सांस्कृतिक जीवनात नाट्य संगीत या अभिजात कलासाधनेप्रमाणेच चित्रकलाही अविभाज्य अंग बनली आहे.

## वृत्तपत्रांची वाटचाल

नांदेड जिल्ह्यातील वृत्तपत्रांची वाटचाल हैद्राबादच्या निजामी सल्तनतीच्या पार्श्वभूमिवर रेखाटावी लागणार आहे. मुंबई-पुण्याकडच्या वृत्तपत्रीय प्रेरणा होत्याच परंतु हैद्राबादशी संपर्क अधिक दृढ होता. मराठी वृत्तपत्रे इकडे यायची पण तुरळक स्वरूपात. उर्दूचा सराव अधिक होता. औरंगाबादकर यांनी माशीर-ए-दख्खन नावाचे उर्दू नियतकालीक काढले. हे वृत्तपत्र नांदेडला यायचे. शिवाय हैद्राबादची सियासत, रहबर-ए-दख्खन ही वृत्तपत्रेही यायची.

हैद्राबाद राज्यातले पहिले मराठी वृत्तपत्र साप्ताहिकाच्या स्वरूपात निजामविजय या नावाने हैद्राबादेतून निघाले. लक्ष्मणराव फाटक हे संपादक होते. नांदेडच्या दिगंबरराव बिंदूचाही निजामविजयच्या संपादनात महत्त्वाचा सहभाग होता. त्यावेळी ते हैद्राबादेत विवेकवर्धिनीत शिक्षक होते आणि लेखन संपादनाची त्यांची धडपड चालू होती. मराठीभाषा संवर्धनाबरोबरच राजकीय जागृतीचा उद्देश बाळगून केसरी मराठाचा आदर्श मनापुढे ठेवून निजामविजय चालले. निजामविजयचा पहिला अंक १२ डिसेंबर १९२० रोजी प्रकाशित झाला. या वृत्तपत्रातून राजकीय लिखाण करू नये अशी अट लादूनच निजाम सरकारने प्रकाशनाची परवानगी दिली होती. तरीही धाडसाने राजकीय लिखाण होत राहिले. राजकीय जागृतीचे कार्य निजामविजयातून लिखाणातून सातत्याने झाले. नांदेडला त्याकाळात निजामविजय बऱ्यापैकी वाचले जाई. याच काळात नांदेडमधून एक मराठी मासिकही निघाले.

१९३० च्या दशकात हैद्राबाद राज्यातले सर्वात ख्यातकिर्त मराठी वृत्तपत्र 'मराठवाडा' या नावाने प्रकाशित होऊ लागले. हैद्राबाद राज्यात या वृत्तपत्राच्या प्रकाशनास, मुद्रणास परवानगी मिळाली नाही. म्हणून पुण्यातून हे वृत्तपत्र छापले जाऊ लागले. १० फेब्रुवारी १९३८ या दिवशी मराठवाडा वृत्तपत्राचा पहिला अंक साप्ताहिकाच्या स्वरूपात पुण्याहून प्रकाशित झाला.[१३] हैद्राबाद मुक्ति आंदोलनाचे मुखपत्र म्हणून मराठवाड्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. 'मराठवाडा' या साप्ताहिकावर हैद्राबाद राज्यात बंदी आली. त्यानंतर निरनिराळ्या नावाने हे साप्ताहिक प्रकाशित होत राहिले आणि राज्यात त्याचे गुप्तपणे वितरण होत राहिले. मुक्तिआंदोलनात आ. कृ. वाघमारे यांनी आणि कालांतराने अनंत भालेराव यांनी मराठवाड्याच्या संपादकत्वाची धूरा वाहिली आणि वृत्तपत्रसृष्टीत अग्रलेखाचे नवे मानदंड प्रस्थापित केले. २० व्या शतकाच्या अखेरपर्यंत मराठवाड्याने मराठी सारस्वताची आणि जन आंदोलनाची पाठराखण केली. नांदेडला मराठवाडा आवडीने वाचला जायचा.

प्रत्यक्ष नांदेडमधली वृत्तपत्राची वाटचाल १९१७ च्या दरम्यान 'नागरीक' नावाच्या एका वृत्तपत्राने झाली.[१४] नांदेड मधून प्रकाशित झालेले हे पहिले वृत्तपत्र. त्यानंतर दे. ल. महाजनांचे अख्यानरत्नमालेचे अंक छापले जायचे. १९२९ च्या दरम्यान शारदाश्रमाचे 'मंदारमाला' हे मासिक नांदेडमधून निघू लागले. गोळेगावकरांच्या संपादकत्वाखाली हे मासिक काही वर्षे चालले. त्यांनीच कालांतराने 'विहंगमाला' हे मासिकही नांदेडमधून काढले. दिगंबरराव उदगीरकरांनी या मासीकाचे प्रकाशन व मुद्रणाची जबाबदारी घेतलेली होती.

आर्यसमाज आणि हिंदुमहासभेच्या विरांना वाहिलेले 'अमरज्योत'[१५] नावाचे साप्ताहिक नांदेडमधून निघत होते. त्यावर बंदी आल्यामुळे 'मराठवाड्या' सारखेच या साप्ताहिकाचेही निरनिराळ्या नावाने अंक प्रकाशित होत व ते मराठवाड्यात पोहचत. १९३७ च्या दरम्यान गोळेगावकरांच्या धडपडीतूनच या साप्ताहिकाची धडपड सुरू होती.

---

१३. रा. के. लेले, **'मराठी वृत्तपत्रांचा इतिहास',** पुणे १९८४, पृ. ८२७.

१४. कित्ता, पृ. ८३०.

१५. कित्ता, पृ. ८४४.

Maharashtra State Gazetteers

१९३० च्या दशकात छापील साप्ताहिके, मासिके नांदेडमधून प्रकाशित होत असली तरीही मराठी हस्तलिखिताच्या स्वरूपात वृत्तपत्र, नियतकालीक चालविण्याची धडपडही इकडे सुरू होती.[१६] 'सारथी' आणि 'अरूणोदय' ही दोन हस्तलिखित नियतकालिके इथून निघत. 'अरूणोदय' हे मासिक होते. शंकरराव नांदेडकरांनी 'अरूणोदयाच्या' काही अंकाचे संपादन केल्याचे दिसते. १९४७-४८ या वर्षी हैद्राबाद राज्यातला संघर्ष मुक्ति आंदोलन आणि रझाकारांचे अत्याचार शिगेला पोहचले होते. त्याकाळात नांदेडला ग. ना. अंबेकरांनी 'प्रतोद' साप्ताहिक सुरू केले खरे पण त्यांचे सातत्य टिकू शकले नाही. मुक्ति आंदोलनाच्या धकाधकीत हे घडले. तरीही सेतू माधवराव पगडीं सारखे सिद्धहस्त लेखक त्याकाळात प्रतोदमधून लिहित असत. १९५५ पासून ते साप्ताहिक पुन्हा प्रकाशित होऊ लागले आणि आजतागायत त्याचे सातत्य कायम आहे. नांदेडमधले सर्वात जुने नियतकालिक म्हणून 'प्रतोदचा' उल्लेख करावा लागेल.

१९५६ च्या दरम्यान स. रा. देशपांडे यांनी 'प्रतिभा' नावाचे साप्ताहिक नांदेडमधून सुरू केले. कालांतराने या साप्ताहिकाचे संपादन दे. ग. रसाळांकडे आले. याच दरम्यान त्यानी नांदेडमधून गोदातीर समाचार नावाचे दैनिक काढले. १९६२ ला समाजवादी विचारांनी भारावलेल्या सुधाकरराव डोईफोडे बियाणी, पाळणीटकर, नंदकुमार देव यांनी एकत्र येवून 'साप्ताहिक प्रजावाणी' हे वृत्तपत्र नांदेडमधून प्रकाशित करायला प्रारंभ केला. कालांतराने या साप्ताहिकाचे दैनिकात रूपांतर झाले. मराठवाडा विकास आंदोलनात, मराठवाड्याच्या रेल्वेप्रश्नात 'प्रजावाणी' या वृत्तपत्राचे आणि संपादक सुधाकरराव डोईफोडे यांचे स्थान अनन्यसाधारण राहिले. शंतनु डोईफोडे यांनी आज समर्थपणे प्रजावाणीची धुरा सांभाळली आहे. अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचा अध्यक्ष होण्याचा मान ज्येष्ठ पत्रकार श्री. सुधाकरराव डोईफोडेंना मिळाला आणि मराठी वृत्तपत्र सृष्टीत नांदेडची एक ओळख निर्माण झाली. 'प्रजावाणी' च्या अग्रलेखाबद्दल तीन वेळा डहाणूकर पारितोषिक सुधाकरराव डोईफोडेंना मिळाले आणि एका सिद्धहस्त पत्रकाराचे, संपादकाचे नांदेड म्हणून या शहराला वेगळी ओळख प्राप्त झाली.

नांदेड शहरातूनच विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात प्रभाकर रावते यांचे 'सत्यप्रभा' श्रीमती सूर्यकांता पाटील यांचे 'गोदावरी टाईम्स', कृष्णा शेवडीकरांचे 'श्रमिक एकजूट', श्री. मांजरकरांचे 'समतादर्पण', श्री. लक्ष्मण गायकवाडांचे 'पंचनामा' ही मराठी दैनिके आणि रघुनाथसिंह ठाकूर यांचे 'प्रत्याघात' हे हिंदी दैनिक अशी दहा दैनिके निघू लागली. 'लोकपत्र' या दैनिकाने गतशतकातली शेवटची दोन दशके गाजवली. या दैनिकाशिवाय साप्ताहिके आणि अर्धसाप्ताहिके या स्वरूपातही नांदेडची वृत्तपत्रसृष्टी संपन्न बनली. रोहिदास सूर्यवंशाचे 'विकास वाटचाल', भास्कर दुसेंचे 'चक्रपाणी', मा. मा. येवळे यांचे 'भूमिपुत्र', कमलकिशोर कदम यांचे 'तरुण टाइम्स' आणि 'लोकपत्र', विठ्ठलराव जाधवांचा 'महाराष्ट्र संचार', आनंद कल्याणकर यांचे 'मराठी स्वराज्य', नागोराव जाधवांचे 'आघात' ही नियतकालिके नांदेडमधून प्रकाशित होत राहिली. राम शेवर्डीकरांच्या 'उद्याचा मराठवाडा' या दैनिकाने लक्षणीय वाचकवर्ग निर्माण केला आहे.

---

१६. शंकरराव नांदेडकर, **'वृत्तपत्रांची वाटचाल, स्थानिक इतिहास आणि साहित्य एक शोध'**, नांदेड, संपादक डॉ. देव, गाडगीळ, नांदेड, १९८४, पृ. १५८.

नांदेड जिल्ह्यातील कंधारमधून माजी आमदार केशवराव धोंडगे यांचे साप्ताहिक 'जयक्रांती' हे पत्र शेतकरी कामगार पक्षाचे मुखपत्र असल्याच्या स्वरूपात जनजागरण करीत राहिले. बिलोलीतील गंगाविरराव पटणे यांची 'जनक्रांती' समाजवादी विचाराचा वसा घेवून वाटचाल करते आहे. देगलूरच्या किरजवळकरांचे 'विदर्भ मराठवाडा' आपले सातत्य राखून आहे. नामदेवराव केशवेंची 'मुक्तिसेना' आपला वाचकवर्ग सांभाळून आहे. मराठी पत्रकारीतेशिवाय हिंदी पत्रकारीतेचीही लक्षणीय वाटचाल नांदेडमधून होत राहिली. १९५९ च्या सुमारास बियाणी आणि शुक्ल यांनी 'नवप्रभा' नावाचे हिंदी पाक्षिक काढले.[१७]

त्याचकाळात कुवरदेवी राठोड आणि बियाणी यांनी 'गोदावरी' नावाचे हिंदी मासिक प्रकाशित व संपादित करायला सुरूवात केली.[१८] हिंदी प्रचार सभेचे 'देवगिरी' मासिकही याच काळात प्रकाशित होऊ लागले. उर्दू पत्रकारीतेची सुरूवात नांदेडमधून महंमद चुगताईंच्या 'सहर' या उर्दू साप्ताहिकाच्या स्वरूपात झाली. त्यानंतर पाचदहा वृत्तपत्रे उर्दूतून प्रकाशित होत राहिली. देगलूरहून 'हलाल' नावाचे एक उर्दू साप्ताहिकही प्रकाशित होते.

हिंदी, उर्दू प्रमाणेच नांदेडच्या वृत्तपत्रसृष्टीत पंजाबी भाषेतील आणि गुरूमुखी लिपीतील वृत्तपत्रांचे योगदानही लक्षणीय राहिले. सरदार मनमोहनसिंग यांनी 'सचखंड संदेश' नावाचे पंजाबी भाषेतले साप्ताहिक सुरू केले होते. त्याशिवाय गुरूद्वाराबोर्डाचे पाक्षिकही निघते. तात्पर्य नांदेडची वृत्तपत्रसृष्टी मराठी, हिंदी, उर्दू, पंजाबी अशा विविध भाषेतील नियतकालिकांनी नटलेली आहे. काही तेलगू नियतकालिकेही निघतात. आज प्रकाशित होणाऱ्या नियतकालिकांची सविस्तर यादी या ग्रंथात दिलेली आहेच. त्यावरून नांदेडच्या वृत्तपत्रसृष्टीचे स्वरूप स्पष्ट व्हावे.*

## क्रीडा*

हैद्राबाद संस्थान भारतीय संघराज्यात विलीन होण्यापूर्वी निजामाच्या अंमलाखालील नांदेड जिल्ह्यात दशावतार, पंचिशी, व्यापार, आट्यापाट्या, सूरपारंब्या, हुतूतू, कुस्ती, मलखांब, रेड्यांच्या-बकऱ्यांच्या टकरी, कोंबड्यांच्या झुंजी, गाढवाच्या-घोड्याच्या व बैलगाडीच्या शर्यती इत्यादी अनेक पारंपरिक क्रीडाप्रकार व मनोरंजनाचे प्रकार प्रचलित होते. माळेगाव येथील खंडोबाच्या यात्रेतील क्रीडा व मनोरंजनाच्या प्रकारात सहभागी होण्यासाठी मराठवाड्याबाहेरील लोकही हजेरी लावतात.

हैद्राबाद संस्थानाच्या विलिनीकरणानंतर मात्र जिल्ह्यातील क्रीडाक्षेत्रात लक्षणीय बदल घडून आले. वजिराबाद भागातील मल्टिपर्पज हायस्कूल, पोलीस मुख्यालय, तत्कालिन उस्मानशाही मिल प्रशालेचे क्रीडांगण खेळासाठी वापरण्यात येऊ लागले. त्यातूनच विविध क्रीडाविषयक उपक्रम अत्यंत

१७. शंकरराव नांदेडकर, **'वृत्तपत्रांची वाटचाल, स्थानिक इतिहास आणि साहित्य एक शोध'**, उपरोक्त, पृष्ठ १६२.

१८. कित्ता, पृष्ठ १६४.

*. जिल्ह्यातील वृत्तपत्रांची यादी या प्रकरणाच्या शेवटी देण्यात आली आहे.

*. या भागाचे लेखन प्रा. नंदकुमार मेगदे, श्री. गुरू गोविंद सिंगजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्था, नांदेड यांनी केलेले आहे.

Maharashtra State Gazetteers

प्रभावीपणे राबविले जाऊ लागले. जेव्हा शारीरिक शिक्षण व क्रीडा हा विषय अभ्यासक्रमात अंतर्भूत नव्हता तेव्हा शरीर कमावणे हा प्रकार किती महत्त्वाचा आहे याविषयी आग्रही प्रतिपादन करणारे सर्वश्री वि. द. सर्जे, गरूड, पी. जी. कुलकर्णी, एम. पी. आल्फ्रेड यांसारखे गुरूजन शिक्षण क्षेत्रात कार्यरत होते. यातूनच सन १९५० ते १९६० च्या दशकात नांदेडमध्ये क्रीडा कार्यालयाची निर्मिती झाली. त्याद्वारे राबविल्या जाणाऱ्या विविध क्रीडाविषयक उपक्रमात सर्वश्री सुधाकरराव देशमुख, डी. व्ही. देशमुख, प्रभाकरराव टाकळकर, चांगलेरकर, तामसेकर, माधवराव कस्तुरे, डी. बी. फुलारी यांसारख्या राष्ट्रीय छात्रसेना व स्काऊटशी संबंधित मान्यवरांचे मोलाचे योगदान असे.

**कुस्ती :** या पारंपरिक क्रीडा प्रकारास नांदेडमध्ये फार मोठी समृद्ध परंपरा लाभलेली आहे. श्री. घनश्याम नाईक-आडे यांच्या स्वतःच्या तालमीत बाबुराव ब्रम्हदेव (रसाळ) स्वतः आडे, शंकरराव तांबोळी, गुम्मन पहेलवान यांच्या सारख्या प्रतिभावान मल्लांनी आपल्या चपळ व गतिमान कुस्ती कौशल्यांनी अनेक फड गाजविले आणि ते ख्यातकीर्त ठरले. सर्वश्री भोज्यु भैय्या पहेलवान, छनतुलाल, दत्तु, देवी पहेलवान, नागनाथराव गिरगांवकर, राजाराम तांबोळी, भुरालाल सांवळ, नारायण सांवळ, मंगल पहेलवान, माधवराव काटकळंबेकर, बाबुराव कोलासकर, दाभाडे पहेलवान, दत्ता भाऊ, भगवानराव, माधवराव व बाबुराव हे सरसर बंधु, प्रभाकरराव गिरगांवकर, किशन व बाबा लंकाढाई, भैय्यालाल, रूपालाल, लक्ष्मण, श्यामलाल, माधवराव जोंधळे आदि नामवंत कुस्तीगिरांनी नांदेडची कुस्ती जोपासली. तर बापूराव पाटिल खतगावकर यांनी कुस्तीगीराला प्रोत्साहन दिले.

सन १९३२ मध्ये स्थापन झालेली नावघाटची समर्थ व्यायामशाळा ही जुन्या नांदेडच्या अनेक कुस्तीगिरांची जननी. या व्यायामशाळेच्या माध्यमातून श्री. नरसिंग पहेलवान गोडवे यांनी अनेक शिष्य उभे केले. श्री. रविकिरण डोईफोडे हे या शाळेचे आधारस्तंभ होत. जुन्या नांदेड व्यतिरिक्त वजिराबाद, मिल एरिया, गुरुद्वारा, गाडीपूरा आदि भागात देखील कुस्ती चांगलीच विकसित झाली होती. सर्वश्री भुजंगसिंघ गाडीवाले, नंदलाल यादव, सफर पहेलवान, उस्मान रंगरेज, करण लंकाढाई, शितलसिंह परिहार, नारायणसिंह पहेलवान, पिराजी पहेलवान आदि नामवंतानी नांदेड नगरपालिका आणि इतर तालमीतून कुस्ती फुलविली. नांदेडच्या दिलीपसिंघ गाडीवाले या तरूणाने भारतीय रेल्वेकडून खेळतांना नांदेडचे नांव सबंध देशभर गाजविले आहे. नांदेड शहराव्यतिरिक्त सर्वश्री माधवराव पाटील (आलेगाव), श्यामराव सूर्यवंशी (कोटतीर्थ), किशनराव पाटील (कामठा), वामन पहेलवान (बोंडार), केरबा पहेलवान (पुयणी), नागा पहेलवान (पुणेगाव), बाबा (कासारखेडा), अली हुसैन व महंमद (सलगरा), इलियास (बिलोली), शंकर (धर्मापूरी), स. हैदर पटेल पहेलवान (डोंगरगाव), बाळू (गोरठा), केशव (ढोल उमरी), नागनाथ (नागीन) आदि जुन्या पिढीतील कुस्तीगिरांनी आपला दबदबा निर्माण केला होता. त्यांच्याच पावलावर पाऊल ठेवत सर्वश्री भगवानराव पाटील (आलेगाव), बालाजी आणि रामु मंडकर (वाकरड), दिगंबर भोसले (थुगांव), नारायण सुर्यवंशी (कोटतीर्थ), बालाजी वडजकर, श्रीमंत माने, जगन्नाथ तरके (किवळा) आदिंनी आंतर-विद्यापीठ, राज्य व राष्ट्रीय स्पर्धांमधून भूषणावह कामगिरी केलेली आहे.

**फुटबॉल :** हा नांदेडचा एके काळचा अत्यंत लोकप्रिय खेळ, स्वातंत्रोत्तर काळातील श्री. नईम कादरी यांच्या सारख्या संघटकाच्या उल्लेखाशिवाय नांदेडच्या फुटबॉलचा आढावा पूर्ण होऊच शकणार नाही. जवाहर क्लबसारख्या अत्यंत दर्जेदार फुटबॉल क्लबने नांदेडमध्ये फुटबॉलचे रोपटे लावले.

या संघाने हैद्राबाद, निजामाबाद, कामारेड्डी, नांदेड, औरंगाबाद, परभणी, हिंगोली, पुसद इत्यादी ठिकाणी अनेक स्पर्धा गाजविल्या सर्वश्री हफिज यार खान, अख्तर हुसेन, सय्यद हाजी रसुल, हबीबखान, के. विजय, विजयकुमार संगम, साजिद अन्सारी, प्रभुलाल बत्तिन, निहालखान, तेहसीन आदि फुटबॉलपटुंनी नांदेडचे नांव मराठवाड्यात सातत्याने तळपत ठेवले. श्री. हरीशंकर गालेवाडने म. रा. मार्ग परिवहन महामंडळातर्फे तर श्री विश्वनाथने महाराष्ट्र पोलीस दलातर्फे राष्ट्रीय पातळीवरील अनेक स्पर्धा गाजविल्या. सर्वश्री हफिज यार खान व के. विजय हे राष्ट्रीय क्रीडा प्राधिकरणात, तर जावेद आणि निहाल हे खान बंधु राज्य क्रीडा खात्यात फुटबॉलचे उत्तम प्रशिक्षक म्हणून नावाजलेले आहेत. अशा प्रकारचा समृद्ध वारसा असूनसुद्धा नांदेड मधील फुटबॉल आज समाधानकारक नाही.

**हॉकी :** हा नांदेडचा दुसरा अत्यंत लोकप्रिय खेळ, सर्वश्री मुकूंद उदगीरकर, गंगाराम दर्शन, गणेश, प्रिथपालसिंघ, बाबुसिंघ, सदाशिव कुळकर्णी, सोहनलाल यादव, जब्बार खान, धोंडीराज बम्ब्रुळे, शंकरलाल तिवाडी, अशोक यादव, वैजनाथ फुलारी, शकुरभाई, डी. आर. हळदे, रघुनाथ बम्ब्रुळे, अमोलकसिंघ रामगडीया, योगेन्द्रसिंघ रागी, बलजितसिंघ गील, तुलाराम यादव आदि जुन्या पिढीतील हॉकीपटुंनी मराठवाड्यात नांदेडच्या हॉकीचा दबदबा निर्माण केला. पुढे सर्वश्री नानकसिंघ घडिसाज, विश्वनाथ, जुजारसिंघ शिलेदार, ओमप्रकाश मुंदडा, गुरूदिपसिंघ संधु, गुरूबच्चनसिंघ (बाबा), देवेन्द्रसिंघ (पेडा), रघुवीरसिंघ, देवेन्द्रसिंघ, शंकर नन्दे दिपसिंघ, सुखमिंदरसिंघ हुंदल, गुरूमितसिंघ नवाब, विजय नन्दे, बंदिछोडसिंघ सारख्या अनेकांनी नांदेडची हॉकी फुलविली. विजय क्लब, यंग बॉईज क्लब, खालसा क्लब सारख्या क्लब्जच्या रूपाने नांदेडची हॉकी महाराष्ट्रभर सुपरिचित झाली.

सन १९७२-७३ साली नांदेड नगरपालिकेचे तत्कालीन नगराध्यक्ष मा. श्री मधुकरराव जालनेकर यांच्या अध्यक्षतेखाली सर्वश्री लड्डूसिंघ महाजन, नरेन्द्रपाल बरारा यांच्या पुढाकाराने श्री गुरू गोविंद सिंघजी सिल्वरकप हॉकी स्पर्धा समिती स्थापन झाली. चषकासह रोख रू.५०१/- बक्षिसाने सुरूवात झालेली ही स्पर्धा आज सातत्याने ३३ वर्षांपासून चालू असून तिचे रूपांतर एका राष्ट्रीय स्पर्धेत झालेले आहे. गुरूद्वारा लंगर साहेबचे जथ्थेदार 'नांदेड भूषण' बाबा बलविंदरसिंघजी यांनी श्री गुरू गोविंद सिंघजींच्या जन्मदिनानिमित्त संपन्न होणाऱ्या या स्पर्धेसाठी एक लाख रूपये किंमतीचा सुवर्ण चषक जानेवारी २००८ मध्ये संपन्न झालेल्या स्पर्धेदरम्यान समितीकडे सुपूर्द केला आहे. सन १९८० च्या दशकारंभी नांदेडमध्ये अखिल भारतीय पातळी वरिल श्री गुरू गोविंद सिंघजी सुवर्ण चषक हॉकी स्पर्धा भरविण्यास सुरुवात झाली. या निमित्ताने भारतातील अग्रगण्य हॉकी संघाचे सामने पाहण्याची संधी नांदेडकर हॉकी प्रेमींना प्राप्त झाली. पुढे हॉकी प्रेमी शासकीय अधिकारी आणि स्थानिक नेत्यांच्या मध्यस्थीने दर दोन वर्षांतून एकदा या स्पर्धेचे आयोजन होऊ लागले. नांदेड नगर पालिकेचे माजी अध्यक्ष श्री नरेन्द्रपाल बरारा आणि गुरूद्वारा बोर्डाचे माजी अध्यक्ष श्री लड्डूसिंघ महाजन यांचा या स्पर्धा आयोजनात मोठा वाटा असतो.

**व्हॉलीबॉल :** हा खेळ देखील नांदेडमध्ये फुटबॉल, हॉकी इतकाच लोकप्रिय होता. सर्वश्री रणजितसिंघ, हुजूरासिंघ मास्टर, गुरूबक्षसिंघ, सत्यनारायण रेड्डी, किशनसिंघ सुजाउद्दीन नागोराव नेमानिवार, लक्ष्मणराव नेमानिवार आदिंच्या रणजित क्लबने मराठवाड्यात आणि मराठवाड्याबाहेर आपल्या खेळाचे उत्तम प्रदर्शन करून नावलौकिक मिळविला होता. सन १९६० च्या दशकात आपल्या

अष्टपैलू खेळाने नांदेडमध्ये व्हॉलीबॉल फुलविणाऱ्या दिग्गजांचा वारसा पुढे सर्वश्री इकबालखान, वासिफखान, प्रदिप अमृतवार, विनोद नेमाणीवार, प्रदिप देशपांडे, शिवपालसिंह ठाकूर, नारायण उपलेंचवार, मुखत्यार अहमद, अशफाकखान, निसार अहमद, अजय चौधरी, मुकर्रम, फय्याज अशा अनेक राज्य व राष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंनी चालविला आहे. सन १९८६-८७ साली सोव्हियत युनियनच्या व्हॉलीबॉल संघाचे प्रदर्शनीय सामने महाराष्ट्र संघासोबत नांदेड नगर पालिकेच्या श्री गुरू गोबिंद सिंघजी स्टेडीयमवर विद्युत झोतात आयोजित केले गेले. प्रदिप अमृतवारसारख्या नांदेडच्या व्हॉलीबॉलपटुचा महाराष्ट्र संघात तेव्हा समावेश होता ही नांदेडसाठी भूषणावह बाब होय. पुढे हळूहळू नांदेडमधून व्हॉलीबॉलचा केन्द्रबिंदू देगलूर, हदगांव, किनवट असा फिरत गेला आणि जिल्हा व्हॉलीबॉल संघटनेची स्थापना किनवट सारख्या दुर्गम भागात होऊन तिथेच स्थिरावला.

**खो-खो :** या खेळात सर्वश्री गणेश कुंडकर, तुलाराम यादव, मणिराम यादव, हलीमभाई, साखळे, किशन अंबेकर, नारायण सुरकुटवार, प्रकाश चौहान, पाराजी कुंडकर, श्रीराम गालेवाड, लक्ष्मण कागणे, पांडूरंग क्षीरसागर, नारायण मोतीवाल, मोहन घन, अशोक यादव, गंगाधर क्षीरसागर, मधुकर गिरगांवकर, माणिक नाईकवडे, गणेश कुंडकर आदि अनेक नामवंत खेळाडूंनी नांदेडचा नावलौकिक सबंध महाराष्ट्रभर पसरविला. यातूनच सन १९८० च्या दशकात जिल्हा खो-खो संघटना स्थापन झाली होती.

**कबड्डी :** नांदेडच्या कबड्डीने प्रा. पुंडलिक तादलापूरकर आणि प्रा. हरीभाऊ रावळे यांच्या रूपाने संपूर्ण भारतभर आपली कीर्ती पसरविली. औरंगाबादच्या मराठवाडा सांस्कृतिक मंडळाच्या शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्यपद भूषविणाऱ्या तादलापूरकरांनी बंगलोर येथील भारतीय क्रीडा प्राधिकारणाच्या राष्ट्रीय क्रीडा केन्द्रात बरीच वर्ष कबड्डीचे राष्ट्रीय प्रशिक्षक म्हणुन काम केले, तर वसमत येथील हुतात्मा बहिर्जी स्मारक महाविद्यालयात क्रीडा संचालक म्हणून कार्यरत असलेल्या हरिभाऊ रावळे यांनी भारतातील अनेक नामावंत संघांना आपल्या चढाईने पाणी पाजले आहे. सर्वश्री नंदकुमार गिरगांवकर, बब्रूवाहन पाठक, लक्ष्मीकांत गिरगांवकर, प्रा. श्रीनिवास साब्रु, मुगाराव, राधाकिशन ठाकूर, मोहन जाधव, विजय चौहान, ललकारसिंह ठाकूर, के. बी. चौहान, शेषराव राठोड, पी. एस. चौहान, अंकुशकर, डी. एफ. राठोड, सोनसळे, सुखदेव, भगवानराव आलेगांवकर, किशन रसाळ, अरूण कुलकर्णी, दिगंबर पवार, गंगाधर गुजर, सखाजी पहेलवान, महंमद हुसेन, जफर खान, सोनबा अलसटवार, अयुब खान पठाण, प्रशान्त अंकुशकर, सुभाष खंडेराय, फैयाज, इत्यादी आदि कबड्डीपटुंनी नांदेडची कबड्डी नावारूपाला आणली. १९७० च्या सुमारास जिल्हा कबड्डी संघटनेची स्थापना झाली. जिल्हा संघटनेचे तहह्यात सचिव श्री.एस.एम.पटेल यांना राज्य कबड्डी संघटनेतर्फे उत्कृष्ट संघटक, तर राज्यशासनातर्फे जिल्हास्तरीय गुणवंत क्रीडा कार्यकर्ता पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. ते राष्ट्रीय स्तरावर पंच म्हणूनही कार्यरत होते. जिल्हा संघटनेतर्फे यानंतर नोव्हेंबर-डिसेंबर, २००७ च्या दरम्यान बिलोली तालुक्यात संघटनेच्या राज्यस्तरीय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

**टेबल टेनिस :** नांदेड नगरपालिकेने १९७० च्या दशकात श्री गुरू गोविंद सिंगजी स्टेडीयम उभारले. यात तत्कालीन प्रशासक श्री. शां. को. सगने आणि नंतर श्री. सुभाष लोलगे यांचा सिंहाचा वाटा होता. या स्टेडीयमच्या उभारणीनंतर नांदेड नगरपालिकेच्या लालबहादुर शास्त्री सभागृहापुरते मर्यादित असलेल्या टेबल टेनिसने नांदेडचा नावलौकिक सबंध महाराष्ट्रभर नव्हे देशभर पसरविला. सर्वश्री सी. डी. पाटील, नरेन्द्रपाल बरारा, सुरेन्द्र रेड्डी, सय्यद युनूस, व्ही. एस. बोकन, रामलु पारे,

विजय पाटील, प्रकाश खेडकर, सय्यद हाजी रसूल, मनोहर काबरा, श्रीमती सूर्यकांताबाई पाटील, सुहास कंदले, अनिल वझरकर यांचा नामोल्लेख केल्याशिवाय नांदेडचे टेबल टेनिस अपुरे राहील.

श्री रामलु पारे यांनी एप्रिल १९९४ मध्ये मेलबोर्न ऑस्टेलिया येथे आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्रौढांच्या (Veterans) टेबल टेनिस स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करीत नांदेडचा पहिला आंतरराष्ट्रीय खेळाडू होण्याचा सन्मान प्राप्त केला. यानंतर त्यांनी अनेक राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राच्या टेबल टेनिस संघटनेच्या विविध संघांच्या प्रशिक्षकपदाची धूरा समर्थपणे सांभाळली. सौ. निशा सौंदनकर-कापसे ह्या ज्येष्ठ महिला टेबल टेनिसपटुने मे २००८ मध्ये रिओ-डी-जनरिओ, ब्राझील (दक्षिण अमेरिका) येथे संपन्न होणाऱ्या जागतिक प्रौढांच्या (Veterans) टेबल टेनिस स्पर्धेत भारतील संघाचे प्रतिनिधित्व केले आहे. सर्वश्री प्रकाश खेडकर, अश्विन बोरीकर, अनिल बंदेल आणि सौ. महेमुदा खान यांच्यासारखे एन. आय. एस. प्रशिक्षक आणि अनेक राष्ट्रीय खेळाडू तयार करणाऱ्या या जिल्हा संघटनेचे सर्वेसर्वा श्री नरेन्द्रपाल बरारा आणि श्री रामलु पारे यांना राज्य शासनातर्फे क्रीडा संघटकासाठीचा शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे. ऑक्टोबर २००९ मध्ये सायन्स कॉलेज नांदेड आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ टेबलटेनिस (पुरूष/ महिला) स्पर्धांचे उपयोजन जिल्हा क्रिडा संकुलात करण्यात आले. सध्या मात्र संघटनेचे कार्य मंदावलेले आहे.

**बॅडमिंटन :** सन १९७० च्या दशकाच्या मध्यात मा. कमलकिशोर कदम यांच्या अध्यक्षतेखाली नांदेड जिल्हा बॅडमिंटन संघटनेची स्थापना करण्यात आली. तत्पुर्वी नांदेड क्लबच्या कोर्टवर सन १९५६-५७ मध्ये एक खुली बॅडमिंटन स्पर्धा आयोजित केली गेली होती, ज्यात सर्वश्री विरेन्द्र सचदेवा, मिनु वाडीया, अमिरोद्दीन शहा, मिर्झा उस्मान बेग आदी तत्कालिन नामावंत खेळाडूंचा समावेश होता.

सन १९६० च्या दशकात सर्वश्री मदनसिंह रावत, श्रीनिवास गुजराथी, अरूण मक्तेदार, अशोक सचदेवा, दिलिप साठे, राजू वाळवेकर, सय्यद हाजिभाई, महम्मद रउफ, प्रा. पार्वतीशम्, गोखले आदि स्थानिक खेळाडूंसह सर्वश्री अरूण भाटिया, व्ही. एम. लाल, अरूण मागो, डॉ. कायरकर, डॉ. चारी अशा शासकीय अधिकाऱ्यांनीही नांदेडचे बॅटमिंटन फुलविण्यास मदत केली या काळात नांदेडमध्ये बॅडमिंटनसाठी स्वतंत्र असा बंदिस्त हॉल नसल्यामुळे कधी विद्युत भवनाच्या हॉलमध्ये, तर कधी सायन्स कॉलेजच्या पुरणमल लाहोटी सभागृहात बॅडमिंटन खेळले जाऊ लागले.

दरम्यान १९७० च्या दशकात नांदेड नगरपालिकेने उभारलेल्या श्री गुरू गोविंद सिंघजी स्टेडीयममध्ये वुडन फ्लोअरींगच्या तीन बॅडमिंटन कोर्टस्सह भव्य हॉलची निर्मिती करण्यात आली. परिणामी सर्वश्री नरोत्तम फल्लोर, बी. के. मोहन, राजू गूल्हाणे, रमेश देशमुख, अरविंद पनपलिया, दिपक शहा, महेश भारतीया, पात्रे, सुरेश मेनन, सुजित कांबळे, महेश वाकरडकर, भास्कर रेड्डी, हरजिंदसिंघ चिरगीया, प्रशांत व विशाल हे बहात्तरे बंधु, मयुर चौधरी, अजय मोहन तर सर्वकुमारी शिरीष वाळवेकर, शिरवाडकर भगिनी, दांडेकर, स्मिता व अनिता या मुरूगकर भगिनी, श्वेता केरकर, एस. मनि, रूचा जोशी आदि प्रथितयश खेळाडूंनी नांदेडच्या बॅडमिंटनची पताका सबंध महाराष्ट्रभर गौरवाने मिरविली.

पुढे १९८० च्या दशकात जिल्हा बॅडमिंटन संघटनेची धुरा प्राचार्य बी. एन. चव्हाण तसेच अरूण मक्तेदार आणि प्रकाश रामदासी या संघटनेच्या सचिवांनी सांभाळली. आज श्री.डी.पी.सावंत यांच्या कुशल नेतृत्वाखाली बॅडमिंटन विकासाला गतिमानता प्राप्त झाली असून, दर वर्षी किमान एक तरी राज्य अथवा राष्ट्रीय स्पर्धा नांदेडमध्ये आयोजित केली जात आहे. सन २००६ मध्ये ऑल इंग्लंड बॅडमिंटन विजेता याने नांदेड जिल्हा बॅडमिंटन संघास भेट दिली. पुढे जुलै २००९ मध्ये नांदेड जिल्हा बॅडमिंटन संघटने तर्फे कनिष्ठ गट मुलामुलींच्या राज्य बॅडमिंटन स्पर्धा आयोजिण्यात आल्या होत्या. या स्पर्धांना खूप चांगला प्रतिसाद मिळाला. विशेष लक्षणीय बाब म्हणजे स्पर्धांच्या समारोप प्रसंगी कुमारी सायना नेहवाल आणि तिचे प्रशिक्षक श्री. पुलेला गोपीचंद यांची उपस्थिती. मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांनी इंडोनेशियन सुपर सिरीज बॅडमिंटन स्पर्धेत अजिंक्यपद पटकावणाऱ्या पहिल्या भारतीय महिला बॅडमिंटनपटू हैद्राबादच्या कुमारी सायना नेहवाल यांचा महाराष्ट्र शासनाच्या वतीने पाच लाखांचा धनादेश देऊन सन्मान केला. समारोप प्रसंगी उपस्थित असलेले प्रशिक्षक ऑल इंग्लंड बॅडमिंटन स्पर्धेचा विजेता श्री. पुलेला गोपीचंद याचाही एक लाखाचा धनादेश देऊन मुख्यमंत्र्यांनी गौरव केला.

**जलतरण :** सन १९७७ साली नांदेड नगरपालिकेने उभारलेल्या ऑलिंपिक आकाराच्या जलतरणिकेमुळे नांदेडला जलतरण क्षेत्रात महाराष्ट्राच्या नव्हे, तर देशाच्या नकाशावर नावलौकिक प्राप्त झाला. सर्वश्री खोचरे, गुरूचरणजितसिंघ, अनिल पांडे या भारतीय क्रीडा प्राधिकरण व राज्य क्रीडा खात्याच्या प्रशिक्षकांसह जिल्हा जलतरण संघटनेचे सचिव क्रीडा महर्षी श्री. डी. व्ही. देशमुख यांच्या अथक प्रयत्नांमुळे नांदेडने अनेक जलतरणपटू राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर पाठविले आहेत. सर्वश्री पांडुरंग गवते, राजेश सोनकांबळे, किरण शूरकांबळे, विश्वनाथ येरगे, अजय चौधरी, सुधीर प्रधान, रवी देगलूरकर, गोपाळ सूर्यवंशी, जयप्रकाश क्षीरसागर, निवृत्ती वाघमारे, अनिल रामोड, विजय सोनकांबळे, भेलोंडे, बाबुशा सूर्यवंशी, माने, ओझा, निळकंठ बेहरे, निलेश मंदाडे, कुमारी पारूल पांडे अशा एक ना अनेक जलतरणपटूंनी शालेय, राज्य, राष्ट्रीय, विद्यापीठीय अशा विविध स्तरावरील स्पर्धांमधून नांदेडचा नावलैकिक प्रस्थापित केलेला आहे.

सन १९८६ साली याच जलतरणिकेमध्ये सोव्हियत युनियनच्या महिला जलतरणपटूंनी सिंक्रोनाईझड स्विमिंग या प्रकारातील विविध कौशल्याचे चित्तथरारक प्रदर्शन सादर करून नांदेडकर क्रीडा रसिकांची मने जिंकली होती.

शालेय मुले किंवा महाविद्यालयीन तरूणांपुरताच हा क्रीडा प्रकार नांदेडमध्ये लोकप्रिय नसून प्रौढ लोक देखील यात अग्रेसर आहेत. ॲड. दिलीप ठाकूर यांच्या कुशल नेतृत्त्वाखाली स्थापन झालेला एन्जॉय स्विमिंग ग्रुप प्रौढांसाठी कार्यरत असून त्यामार्फत जिल्हा, विभागीय, राज्य व राष्ट्रीय स्तरावर विविध गटात अनेक जलतरणपटू चमकत आहेत. एप्रिल २००८ मध्ये पर्थ, ऑस्ट्रेलिया येथे संपन्न होणाऱ्या प्रौढांच्या (Veterans) जागतिक जलतरण स्पर्धेत नांदेडचे रहिवासी श्री गंगालाल यादव हे ५० मीटर व १०० मीटर ब्रेस्ट स्ट्रोक या स्पर्धा प्रकारात भारतातर्फे सहभागी झाले होते. पांडुरंग गवते व किरण शूरकांबळे ह्या ज्येष्ठ जलतरणपटूंनी स्वित्झर्लंड मध्ये सागरी जलतरणाचा साहसी प्रवास यशस्वीपणे पूर्ण केला आहे.

Maharashtra State Gazetteers

**क्रिकेट :** सन १९७४ साली प्राचार्य बी. एन. चव्हाण व अनेक स्थानिक क्रीडा कार्यकर्त्यांच्या पुढाकाराने यशवंत महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर महाराष्ट्र विरूध्द हैद्राबाद असा क्रिकेटचा एक महोत्सवी सामना आयोजित केला गेला. मागील अनेक वर्षापासून नांदेडमध्ये सर्वश्री भूपेंद्रसिंघ वासरीकर, मुकूंद उदगीरकर, प्रितपालसिंघ, रामन, तामन, भिडे, अमिरोद्दीन शाह, प्राचार्य भगवानराव चव्हाण, दिनकर साब्दे, नरेन्द्र मालिवाल, अमरजितसिंघ रागडीया, प्रेम शहा, प्रकाश रावके, गंगाराम दर्शन, विठ्ठलराव नेरकर, राधेश्याम बाहेती, शिंदे, रणधिरसिंघ उर्फ बाबुसिंघ, चरणसिंघ अखबारवाले अशा दिग्गज क्रिकेटपटुंनी आणि त्यांच्या प्रभात, खालसा, एमसीसी आदि संघानी निर्माण केलेल्या क्रिकेटमय वातावरणाची त्याला पार्श्वभूमी लाभलेली होती.

पुढे सन १९७८ साली प्राचार्य बी. एन. चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली नांदेड जिल्हा क्रिकेट संघटनेची स्थापना झाली. १९८० च्या दशकाच्या पूर्वार्धात या संघटनेने दोन रणजी ट्रॉफीचे सामने आणि दोन-तीन प्रदर्शनीय सामने आयोजित केले होते. या निमित्ताने नांदेडच्या क्रिकेट रसिकांना अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडूंचे दर्शन घडले. सर्वश्री वेंकटेश पत्की, बंडु खरवडकर, केदार ओझा, अवतारसिंघ व अमोलकसिंघ हे रामगडीया बंधु, गोपाळ दमाम, अशोक तेरकर, श्याम आडे, नंदु कुलकर्णी, जसपालसिंघ व दिलीपसिंघ हे रागी बंधु, हेमंत देशपांडे, सुभाष देशपांडे, राजेन्द्र नागडा, सुरेष गुथा, रवी जोंघळे, राजु किवळेकर, अशोक नलावडे, पाराजी कुंडकर आदिंनी आपल्या रॉयल, विजय, श्रीकृष्ण फ्रेंडस, मायओन, दशमेश, रणजित आदि क्लबच्या माध्यमातून नांदेडचे क्रिकेट फुलविले.

सर्वश्री लखमेरसिंघ, रमेश मेगदे, शिवाजी डहाळे, सुशिल गोपरे, सुधाकर पांडरे, मधुगुप्ता, राजा जाधव, सुरेश माने, मोईज, मिलींद एकताटे, संजय पांडे, सुशिल वाघमारे, सिद्धार्थ वाघमारे, तुषार चौहाण, सुनिल जाधव, सुनिल यादव, दिगांबर वाघमारे आदि खेळाडूंनी विद्यापीठीय स्पर्धासह राज्य व राष्ट्रीय पातळीवरील विझी टॉफी, सी. के.नायडू ट्रॉफी, कुचबिहार ट्राफी, रणजी ट्रॉफी सारख्या विविध स्पर्धांमधून सुद्धा नांदेडचे नांव अधुनमधून झळकविण्याचे कार्य केलेले आहे. त्यातूनच प्राचार्य बी. एन. चव्हाण यांना महाराष्ट्र शासनाच्या वतीने १९८८ साली क्रीडा संघटकासाठीचा शिवछत्रपती पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. सध्या जिल्हा संघटनेचे अध्यक्षपद माजी गृहराज्य मंत्री डॉ. माधवराव किन्हाळकर यांच्याकडे असून सचिवपदी प्रा. नंदू कुळकर्णी कार्यरत आहेत.

**बास्केटबॉल :** हा खेळ नांदेड जिल्ह्यात म्हणावा तेवढा लोकप्रिय नाही. यशवंत महाविद्यालय, श्री. गुरू गोबिंद सिंघजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्था, महात्मा गांधी मिशनचे अभियांत्रिकी महाविद्यालय, महात्मा फुले हायस्कूल, ग्यान माता विद्या मंदिर, गुजराथी हायस्कूल या जिल्ह्याच्या मुख्यालयातील संस्था, तर संत गाडगेबाबा हायस्कूल, लोहा ही तालुक्याची संस्था येवढ्या मर्यादित वर्तुळातच बास्केटबॉल सीमित आहे.

सर्वश्री ज्ञानेश्वर अंकरला, बालाजी जाधव, विनोद गोस्वामी, मनोज पैंजने, गुलाब राठोड, संजय गोविंदे, विष्णु शिंदे, प्रदिप खानसोळे यांनी विद्यापीठ स्तरावर या खेळात चमकदार कामगिरी केली आहे. तर सर्वकुमारी रंजना अडकिणे, माया पाटील, प्रफुल्लता पत्की, रोहिणी पाथरकर आदि मुलींनी शालेय राज्य, राष्ट्रीय व विद्यापीठीय स्पर्धामधून जिल्ह्याचे, राज्याचे प्रतिनिधित्व केले आहे.

एचएफ ४१९७—१३

Maharashtra State Gazetteers

**कॅरम :** श्री. विजय मालपाणी यांच्या अथक प्रयत्नामुळे नांदेड जिल्हा कॅरम संघटनेने आपला नावलौकिक सबंध महाराष्ट्रभर पसरविला आहे. जिल्ह्यात अनेक कॅरम क्लब स्थापन करून त्यांनी कॅरम हा खेळ सर्वसामान्यांमध्ये अत्यंत लोकप्रिय केला आहे. दोन-तीन राज्यस्तरीय स्पर्धांच्या आयोजनामुळे जिल्ह्यातील कॅरमचा प्रचार व प्रसार सुलभ झाला.

**बुध्दीबळ :** सर्वश्री डी. पी. सावंत, डी. जी. जोशी आणि जी. डी. देशपांडे यांच्या अविरत प्रयत्नांमुळे नांदेड जिल्हा बुध्दीबळ संघटनेने मूळ धरले आहे. मागील किमान पंधरा वर्षापासून सातत्याने सत्यसाई सेवाभावी ट्रस्टच्या सहकार्याने माजी केन्द्रिय गृहमंत्री शंकरराव चव्हाण यांच्या जन्मदिनानिमित्त राज्यस्तरीय बुध्दीबळ स्पर्धा आयोजित केली जात असून ती अत्यंत लोकप्रिय ठरली आहे.

**लॉन टेनिस :** नांदेड लॉन टेनिस संघटनेने आपली वाटचाल अतिशय उत्तमरित्या केली आहे. सन १९८५ साली स्थापना झाल्यानंतर संघटनेने सलग पाच-सहा वर्ष मराठवाडा पातळीवरील स्पर्धाचे आयोजन केले. कार्यकर्त्यांच्या व मैदानाच्या अभावी काही काळ या संघटनेला मरगळ आली होती. परंतु श्री अली पंजवाणी, अध्यक्ष आणि श्री मधुसूदन गुप्ता, सचिव यांच्या कुशल नेतृत्वाखाली संघटनेने बाळसे धरले असून मागील आठ-दहा वर्षापासून स्थानिक, जिल्हा, विभागीय, राज्य व राष्ट्रीय अशा विविध स्तरांवरील स्पर्धा व प्रशिक्षण शिबीरे आयोजित करून संघटनेने सबंध देशभर आपला नांवलौकिक पसरविला असून एक अत्यंत क्रियाशिल संघटना म्हणून लॉन टेनिसच्या प्रचार व प्रसारात बांधिलकी स्वीकारली आहे. विशेष उल्लेखनीय बाब अशी की, २९ डिसेंबर २००८ ते २ जानेवारी २००९ या दरम्यान नांदेड जिल्हा लॉन टेनिस संघटनेतर्फे, १४ ते १६ वर्षे वयोगटातील मुलामुलींसाठी अखिल भारतीय पातळीवरच्या कै. शंकरराव चव्हाण स्मृती सुपर सिरिज लॉन टेनिस स्पर्धा आयोजिण्यात आल्या होत्या. या स्पर्धेचे उद्घाटन नांदेड क्लब मधील डॉ.अशिष कुलकर्णी टेनिस संकुलात मुख्यमंत्री श्री. अशोकराव चव्हाण यांचे हस्ते संपन्न झाले. स्पर्धेला प्रचंड प्रतिसाद होता. त्यानंतर नोव्हेंबर-डिसेंबर २००९ दरम्यान जिल्हा लॉन टेनिस संघटनेतर्फे दुसऱ्यांदा शंकरराव चव्हाण स्मृती अखिल भारतीय सुपर सिरिज लॉनटेनिस स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धा यंशवंत महाविद्यालय टेनिस कोर्ट व आशिष कुलकर्णी टेनिस संकुल येथे संपन्न झाल्या.

**मैदानी क्रीडा :** या स्पर्धांमध्ये नांदेड जिल्हा स्वातंत्र्योत्तर काळात अत्यंत प्रगत होता. सर्वश्री हफीजयारखान, नारायण मोतीवाल, गणेश कुंडकर, तुकाराम यादव, पाराजी कुंडकर, गंगाधर शिरसकर, विश्वनाथ, ह्या धावपटूंनी विविध प्रकारच्या धावण्याच्या शर्यती, उंच उडी व लांब उडी मध्ये नांदेडचे नाव उज्वल केले. अलिकडे सगरोळी येथील रामेश्वर चिदगीरे व नांदेड पोलीस दलातील कु. लोकमुद्रा आनेराव सारख्या काही खेळाडूंनी यात चांगली कामगिरी केली आहे.

**जिम्नॅस्टिक :** नांदेड जिल्हा जिम्नॅस्टिक संघटनेची स्थापना सन १९८० च्या दशकाच्या पूर्वार्धात आमदार कमल किशोर यांच्या नेतृत्वाखाली झाली. त्यातूनच मे १९८८ मध्ये एक राज्यस्तरीय स्पर्धा आयोजित केली गेली. जिल्हा क्रीडा अधिकारी सुधीर मोरे स्वतः जिम्नॅस्टिक्सचे प्रशिक्षक असल्यामुळे त्यांनी नांदेडमध्ये या क्रीडा प्रकाराच्या चळवळीला जोरदार चालना दिली. अत्याधुनिक साहित्यांनीशी गुजराथी हायस्कूल मध्ये प्रशिक्षण केन्द्र सुरू करण्यात आले. महाराष्ट्र राज्य कारागृह व्यवस्थापन सेवेतील कॉन्स्टेबल आणि स्वतः जिम्नॅस्टिक चे राष्ट्रीय खेळाडू असलेल्या संतोष सोनटक्के यांनी या केन्द्राला भरपूर मदत केली आहे.

सन २००० मध्ये वारणानगर कोल्हापूर येथे संपन्न झालेल्या राज्यस्तरीय जिम्नॅस्टिक्स स्पर्धेत मराठवाड्यात १७ वर्ष वयोगटातील मुलींनी विजेतेपद पटकाविले. त्यात नांदेडच्या सर्वकुमारी अश्विनी मेगदे, प्रिती भोरे, केतकी चितळे व रितिका भारतीया या मुलींचा समावेश होता.

बिलीयर्डस, स्नुकर, स्क्वॉश, सॉफ्टबॉल, हॅण्डबॉल, स्केटींग, आर्म रेसलिंग असे खेळ देखील नांदेडमध्ये प्रचलित आहेत. परंतु यात सर्वसामान्यांचा सहभाग मात्र म्हणावा तेवढ्या मोठ्या प्रमाणात नाही. तरी लक्षणीय बाब अशी की जून २००९ मध्ये श्री गुरू गोविंदासिंगजी क्रिडा संकुलात अखिल भारतीय तायक्वांदो स्पर्धा संपन्न झाल्या. नांदेडच्या क्रिडा रसिकांना तायक्वांदो स्पर्धा पाहण्याचा एक नवा योग आला.

सरस्वती शिक्षण प्रसार मंडळातर्फे कौठा, नांदेड येथे चालणारे शारीरिक शिक्षण महाविद्यालय प्राचार्य शंकरलाल तिवाडी यांच्या अथक परिश्रमामुळेच आज नावारूपाला आलेले आहे. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ परिक्षेत्रातील हे एकमेव शारीरिक शिक्षण महाविद्यालय आहे, ज्याने NAAC द्वारा Accreditation प्राप्त केलेले आहे. या शिवाय सिडको येथील श्री सेवादास शिक्षण संस्थेचे यशवंत शारीरिक शिक्षण महाविद्यालय देखील कार्यमग्न आहे. श्री गुरू गोविंदसिंगजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्था, विष्णुपुरी, नांदेड यांच्या नौकानयन व जलक्रीडा केन्द्राच्या उल्लेखाशिवाय नांदेडच्या क्रीडाक्षेत्राच्या वाटचालीचा उल्लेख पूर्ण होऊ शकणार नाही. सन १९८५-८६ साली तत्कालीन प्राचार्य बा.मा.नाईक यांच्या कल्पनेतून साकार झालेल्या या जलक्रीडा केन्द्रात रोईंग, कॅनोईंग, कयाकिंग वगैरे नौकानयनाच्या सोयी सुविधा व जलतरणाची सुविधा उपलब्ध करण्यात आलेली आहे. या शिवाय संस्थेच्या प्रांगणात विविध खेळांच्या अत्याधुनिक सुविधा देखील उपलब्ध करण्यात आल्या आहेत. जिल्हाधिकाऱ्यांच्या पदसिद्ध अध्यक्षतेखाली ५० वर्षांपूर्वी सुरू झालेल्या नांदेड क्लब मध्ये वातानुकुलीत कार्ड रूम्स आणि अद्ययावत व्यायामशाळेसह (जिम्नॅस्टिक्स) दोन बॅडमिंटन कोर्टस, एक स्क्वॉश कोर्ट, दोन टेबल टेनिस, जलतरण तलाव, तीन लॉन टेनिस कोर्टस्, सोना स्टिम बाथ अशा अत्याधुनिक क्रीडा विषयक सुविधांची सुसज्ज व्यवस्था निर्माण करण्यात आलेली असून हे नांदेडमधील एक अत्याधुनिक क्रीडा केन्द्र म्हणून लौकिक प्राप्त ठरले आहे. या भागातील क्रीडा विषयक सर्व क्षेत्रात अनेकांनी चांगली कामगिरी केली आहे. तथापि, दिलेली नोंद प्रातिनिधिक स्वरूपाची मानावी.

Maharashtra State Gazetteers

महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा व युवकसेवा मंत्रालयातर्फे उत्कृष्ट सेवेबद्दल पुरस्कार देऊन गौरविण्यात आलेल्या नांदेड जिल्ह्यातील मान्यवर व्यक्ती :—

| अ. क्र. | नाव | पुरस्काराचे नाव | क्षेत्र | वर्ष |
|---|---|---|---|---|
| १. | प्राचार्य बी.एन.चव्हाण. | शिवछत्रपती क्रीडा संघटक/ कार्यकर्ता | क्रिकेट | १९८७-८८ |
| २. | श्री. नरेन्द्रपाल बरारा. | शिवछत्रपती क्रीडा संघटक/ कार्यकर्ता | टेबल-टेनिस | १९९१-९२ |

| अ. क्र. | नाव | पुरस्काराचे नाव | क्षेत्र | वर्ष |
|---|---|---|---|---|
| ३. | श्री. रामलु पारे. | शिवछत्रपती क्रीडा संघटक/ कार्यकर्ता | टेबल-टेनिस | १९९७-९८ |
| ४. | श्री. शिवाजी डहाळे. | जिल्हा क्रीडा कार्यकर्ता | क्रिकेट | २००२-०३ |
| ५. | श्री. स. लड्डूसिंग हरीसिंग महाजन. | जिल्हा क्रीडा कार्यकर्ता | व्हॉकी | २००२-०३ |
| ६. | श्री. नारायण परमेशू. उपलेंचवार. | जिल्हा क्रीडा कार्यकर्ता | व्हॉली बॉल | २००३-०४ |
| ७. | श्री. एस.एम.पटेल. | जिल्हा क्रीडा कार्यकर्ता | कबड्डी | २००४-०५ |
| ८. | श्री. प्रशांत बहात्तरे.* | शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार | बॅडमिंटन | २००७-०८ |
| ९. | श्री. एस. एम. पटेल.* | शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार | कबड्डी क्रीडा संघटन कार्यकर्ता | २००७-०८ |

## जिल्ह्यातील नेतृत्व*

नांदेड जिल्हा १७ सप्टेंबर १९४८ पर्यंत निजामाच्या राज्यात होता. हैद्राबाद राज्यात देशाच्या उर्वरित भागाप्रमाणे १९ व्या शतकाच्या शेवटच्या कालावधीत सुरू झालेले सामाजिक व राजकीय लढे इकडील मूठभर सुशिक्षितांच्या ऐकिवात होते. प्रत्यक्ष भारतीय पातळीवरील कुठल्याही राजकीय पक्षास निजामाने आपल्या राज्यात येऊ दिले नाही. परिणामी अगदी राष्ट्रीय काँग्रेसचे सुध्दा कार्य या भागात सुरू होण्यास अनेक वर्षे जावी लागली. यातही अपवाद म्हणून आर्य समाजाने धार्मिक कामाच्या नावाखाली २० व्या शतकाच्या आरंभापासून ठिकठिकाणी आपले काम सुरू केले होते. हिंदू महासभेनेही मुक्तीच्या लढ्यासाठी व हिंदूच्या छळाविरुद्ध १९३० पासूनच कायदे तोडून जेलभरो आंदोलने केली. १९३६ साली स्टेट काँग्रेसची स्थापना पूज्य स्वामी रामानंद तीर्थांच्या नेतृत्वाखाली झाली. अर्थात प्रेरणा, आशीर्वाद आणि मार्गदर्शन महात्मा गांधीजींचे होते. डॉ.आंबेडकरांच्या रिपब्लिकन पार्टीच्या धोरणावर आधारित शेड्युल्ड कास्ट फेडरेशन अस्तित्वात येऊ लागले. विविध राजकीय पक्षांचे कार्य वेगवेगळी नावे धारण करून सुरू होऊ लागले होते. मात्र खरी चळवळ आणि राजकीय नेतृत्वाचा उदय स्वामी रामानंद तीर्थांच्या नेतृत्वाखाली आकाराला आला. स्वातंत्र्यपूर्व हा कालखंड १९३६ ते १९४८ असा गृहीत धरावा लागेल.

हैद्राबाद राज्य भारतीय संघराज्यात सम्मिलित झाल्यानंतर १९४८ ते १९५२ या कालावधीत केंद्र शासनाने नियुक्त केलेल्या प्रशासनाखाली कार्यरत होते. भारतीय संविधान २६ जानेवारी १९५०

*. २४ जुलै २००९ रोजी महाराष्ट्र शासनातर्फे प्रकाशित झालेल्या यादीत या पुरस्काराचा उल्लेख आहे. त्यानुसार ही नोंद.

*. प्रा. स. दि. महाजन यांनी या भागाचे लेखन केले आहे.

रोजी अस्तित्वात आले. त्यावेळी स्वातंत्र्य चळवळीतून आलेले नेतृत्वच राजकारणात अग्रेसर राहिले. सत्तेच्या राजकारणाचा व डावपेचांचा अनुभव येण्यासाठी काही काळ जाऊ द्यावा लागणे साहजिक होते. १९४८ नंतर जहाल आणि मवाळ असे दोन गट काँग्रेसमध्ये निर्माण झाले होते. मवाळ गटाचे नेतृत्व बी.रामकृष्णराव, काशीनाथराव वैद्य इत्यादिंच्याकडे होते. तर जहाल गटाचे नेतृत्व स्वामीजी, गोविंदभाई श्रॉफ व दिगंबरराव बिंदू यांच्याकडे होते. याच काळात स्वातंत्र्यलढ्यात अग्रेसर असलेला कम्युनिस्ट विचारसरणीच्या कार्यकर्त्यांचा एक गट अत्यंत सक्षम होता. त्यात रवी नारायण रेड्डी, महदुम मोईनोद्दीन, डॉ.राजबहादूर गौड, व्ही.डी.देशपांडे, आर.डी.देशपांडे, चंद्रगुप्त चौधरी इ.नेते अग्रेसर होते. समाजवादी विचारसरणीचाही एक गट कार्यरत होता. पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी कामगार पक्षाचे कार्य या भागात सुरू झाले होते. काँग्रेसमधील गट सत्तेसाठी आणि निवडणुका जिंकण्यासाठी वेगवेगळे डावपेच आखण्यात आपापली मातब्बरी दाखवत होते. बाकीचे पक्षही आपापल्या पद्धतीने निवडणुका जिंकण्याची तयारी करीत होते.

स्वातंत्र्यलढा त्यागाने भारलेला होता. स्वातंत्र्योत्तर काळात सत्ता महत्वाची ठरली. राजकीय पक्षांची विचारसरणीही आपापल्या परीने समाजात रूजविण्यासाठी त्या त्या पक्षाचे कार्यकर्ते कार्यरत होते. नगरपालिकाही अस्तित्वात येणार होत्या. अशी परिस्थिती असताना ज्यांनी नांदेड जिल्ह्यात येऊन नेतृत्व, समाजात प्रभुत्व मिळविलेले होते असे नेते म्हणजे सर्वश्री श्यामराव बोधनकर, भगवानरावजी गांजवे, गोपाळशास्त्री देव, व्ही.डी.देशपांडे, शंकरराव चव्हाण, जीवनराव बोधनकर, नागनाथराव परांजपे, साहेबराव बारडकर, केशवराव धोंडगे, आनंदराव टेळकीकर आणि त्याबरोबर प्रत्येक तालुक्यात वेगवेगळे कार्यकर्ते प्रामुख्याने कार्यरत होते. १९५२ च्या निवडणुकीच्या वेळी या नेत्यांपैकी काहींनी लोकसभा व विधानसभेच्या निवडणुका लढविल्या. गोविंदभाई श्रॉफच्या नेतृत्वाखाली बाहेर पडलेल्या ज्येष्ठ कार्यकर्त्यांनी पी.डी.एफ. (पीपल्स डेमॉक्रटिक फ्रंट) कायम केला होता. त्या पक्षामार्फत अनंतराव भालेराव, जीवनराव बोधनकर इत्यादि ज्येष्ठ कार्यकर्त्यांनी निवडणूका लढविल्या. १९५२ च्या निवडणुकीत श्री. शंकरराव टेळकीकर (काँग्रेस) खासदार झाले. आमदार म्हणून सर्वश्री दिगंबरराव बिंदू (भोकर), भगवानराव गांजवे (नांदेड), गोपाळशास्त्री देव (मुधोळ), नारायणराव कासराळीकर (बिलोली), जयवंतराव मोरे (देगलूर), गोविंदराव नरसिंगराव (कंधार), श्रीहरी (किनवट), सवाई माधवराव (कंधार), हे काँगेसपक्षातर्फे निवडून आले, तर माधवराव वायपनकर हे हदगाव मतदारसंघातून पी.डी.एफ.मार्फत निवडून आले. या आमदारांचा कालावधी १९५२ ते १९५७ हा होता. निवडून आलेल्या उमेदवारांतून दिगंबरराव बिंदू हे हैद्राबाद राज्याचे गृहमंत्री झाले आणि श्री.भगवानराव गांजवे काँग्रेस पक्षाचे प्रतोद झाले. ज्येष्ठ नेते श्री. श्यामराव बोधनकर इत्यादींनी निवडणूक लढविली नव्हती. परंतु काँग्रेस पक्षाच्या विजयात त्यांचा मोलाचा भाग होता. या सर्वांच्या मागे पूज्य स्वामी रामानंद तीर्थांचे आर्शीवाद, मार्गदर्शन मोलाचे होते. श्री. शंकररावजी चव्हाण हे काँग्रेसपक्षाचे जिल्हा चिटणीस होते. १९५२ ची निवडणूक हदगाव मतदारसंघातून त्यांनी लढविली मात्र तेथे पी.डी.एफ.चा उमेदवार विजयी झाला. काही दिवसांनंतर नांदेड नगरपालिकेच्या निवडणुका झाल्या व शंकररावजी चव्हाण सदस्य आणि नंतर पहिले नगराध्यक्ष म्हणून निवडून आले. यांच्यापैकी काहींचा संक्षिप्त परिचय पुढीलप्रमाणे आहे.

**श्री. दिगंबरराव बिंदू :** हैद्राबाद काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राहिलेले दिगंबरराव बिंदू ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक होते. १९३६ साली ते स्वातंत्र्यलढ्यात अग्रेसर होते. त्यांचा जन्म १२ जुलै, १८९६ रोजी नांदेड जिल्ह्यातील भोकर येथे झाला. पूर्वी भोकर हे हदगाव तालुक्यातील मोठे खेडे होते. त्यांचे शिक्षण भोकर आणि नांदेड येथे झाले. मॅट्रिकनंतर वकिलीची परीक्षा देऊन ते वकील झाले. नांदेड येथील कोर्टात १९२५ साली व नंतर हैद्राबाद हायकोर्टात त्यांनी वकिली केली. काही दिवस विवेकवर्धिनी पाठशाळेत त्यांनी शिक्षकाची नोकरी केली. 'निजामविजय' साप्ताहिकात विविध विषयांवर त्यांनी लेखन केले. ते कट्टर काँग्रेसवादी व स्वामी रामानंद तीर्थांचे सहकारी होते. स्वतंत्र हैद्राबादचे भवितव्य काय असावे, या संदर्भात ज्येष्ठ नेते म्हणून पं.नेहरु, सरदार पटेल व इतर केंद्रीय नेते त्यांचा सल्ला मोलाचा मानीत. १९५२ साली भोकर मतदारसंघातून हैद्राबाद विधानसभेवर त्यांची आमदार म्हणून निवड झाली. बी.रामकृष्णराव हे हैद्राबाद राज्याचे पहिले मुख्यमंत्री झाले आणि दिगंबरराव बिंदू हे गृहमंत्री झाले. त्यांची विचारसरणी पुरोगामी होती. कायदा आणि सुव्यवस्था राखण्यात ते यशस्वी ठरले. इंग्रजी आणि मराठी भाषेवर त्यांचे प्रभुत्व होते. वक्तृत्व प्रभावी होते आणि नेतृत्व सर्वमान्य होते. भाषावार प्रांतरचनेनंतर १९५६ साली ते मुंबई राज्यात विधानसभेचे आमदार झाले. १९५७ साली निवडणुका झाल्या. लोकसभेची निवडणूक त्यांनी लढविली मात्र रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे उमेदवार श्री.हरिहरराव सोनुले यांनी त्यांचा पराभव केला. त्यानंतर श्री.बिंदू हे राजकारणातून निवृत्त झाले. निवृत्तीनंतर त्यांनी विविध सामाजिक प्रश्न हाताळले. भाषावार प्रांतरचनेच्या वेळी झालेला नागपूर करार आणि गृहमंत्री असतांना त्यांनी प्रयत्नपूर्वक मंजूर करून घेतलेला कूळ कायदा ही त्यांची कामगिरी अविस्मरणीय आहे.

**श्री. श्यामराव बोधनकर :** श्यामराव माधवराव बोधनकर यांचा जन्म डिसेंबर, १९०८ मध्ये गर्भश्रीमंत घराण्यात झाला. त्यांचे वडील सराफी व सावकारीच्या व्यवसायात अग्रणी होते. वडिलांचा मृत्यू १९१९ साली झाल्यानंतर सर्व जबाबदारी त्यांना स्वीकारावी लागली. मात्र लहान असल्याने त्यांची सर्व इस्टेट शासनाने कुलूपबंद करून ताब्यात घेतली. काही वर्षांनंतर ही इस्टेट मुक्त झाली आणि श्यामराव बाबांनी अत्यंत समर्थपणे पिढीजात शेती, सावकारी व सराफीचा धंदा केला. अकाली आलेल्या जबाबदारीमुळे त्यांना आठवी-नववीच्या पुढे शिक्षण घेता आले नाही. मात्र विलक्षण बुद्धिमत्ता आणि उपजत व्यावहारिक शहाणपण यामुळे ते नेहमीच यश मिळवीत राहिले. निजामच्या राजवटीत गोरगरीब व विशेषतः हिंदूंवर होणारे अन्याय यामुळे क्रमाने व्यवसायातून लक्ष काढून घेऊन सामाजिक प्रश्नांत ते रमू लागले. नांदेड जिल्ह्यातील सर्व आंदोलनांना त्यांचा समर्थ पाठिंबा असे. १९३६ पासून हैद्राबाद मुक्ती संग्रामात त्यांनी स्वतःला झोकून दिले. आपली संपत्ती गरजेनुरूप मुक्ती संग्रामासाठी उपलब्ध करून दिली. अनेक कार्यकर्त्यांची संघटना उभी केली. सर्व जातीधर्मात त्यांना झोकून देणारे कार्यकर्ते मिळाले. महात्मा गांधींच्या आज्ञेने १९३८ साली झालेल्या पहिल्या सत्याग्रहात ते सामील झाले. पुढे १९४८ पर्यंत त्यांना अनेकदा तुरूंगात रहावे लागले. १९५२ साली नांदेड नगरपालिकेत ते निवडून आले. श्री.शंकररावजी चव्हाण यांची त्यांच्यावर विलक्षण निष्ठा होती. १९५७ साली त्यांनी हदगाव विधानसभेची निवडणूक लढविली. पुढे संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत फार मोठा सहभाग घेतला. पीपल्स कॉलेजच्या उभारणीत त्यांचा मोठा सहभाग होता. १९५० पासून ते मृत्यूपर्यंत पीपल्स कॉलेजच्या संस्थेचे ते पदाधिकारी राहिले. प्रतिभा निकेतन शिक्षण संस्था १९४० साली स्थापन झाली.

तेव्हापासून मृत्यूपर्यंत ते या संस्थेत पदाधिकारी होते. नांदेडच्या शैक्षणिक विकासात, वेगवेगळ्या सामाजिक आंदोलनात, मुक्तीसंग्रामात त्यांनी केलेले प्रत्यक्ष कार्य केव्हाही विस्मृतीत जाणार नाही. त्यांचे निधन २१ एप्रिल, १९९६ रोजी झाले. ८८ वर्षे आयुष्य मिळालेल्या या कर्तबगार माणसाने निःस्वार्थपणे जवळजवळ साठ वर्षे सार्वजनिक जीवनासाठी दिली.

**श्री. भगवानराव गांजवे :** हैद्राबाद मुक्ती संग्रामात नांदेड जिल्ह्यातून अग्रणी राहिलेल्या श्यामराव बोधनकर, भगवानराव गांजवे व गोपाळशास्त्री देव या तिघांपैकी श्री. भगवानराव रुक्मानंद गांजवे (जन्म : १७ जून, १९०७, मृत्यू : २२ नोव्हेंबर, १९८८) यांचे व्यक्तिमत्व आगळेवेगळे होते. परभणी जिल्ह्यातील कडती या गावी त्यांचा जन्म झाला. वयाच्या १५ व्या वर्षापूर्वीच वडिलांचे व बहिणीचे छत्र हरपले. यवतमाळ जिल्ह्यातील पुसदला असणाऱ्या बहिणीकडे काही काळ ते शिक्षणासाठी राहिले होते. परंतु तिचे छत्र हरपल्यावर आलेल्या एकाकीपणात आणि कठोर प्रतिकूल परिस्थितीत अकिंचन अवस्थेत ते नांदेडला आले. शंकराचार्य, डॉ. कुर्तकोटी यांच्या एका पाठशाळेचे ते १९२८ साली मुख्याध्यापक झाले. पुढे ती शाळा सोडून खाजगी शिकवणींकडे वळले. श्यामराव बोधनकरांच्या घनिष्ठ मैत्रीमुळे ते राजकारणाकडे वळले. आर्य समाजाचे संस्कार त्यांच्यावर झाले होते. १९३५ साली परतूरला झालेल्या महाराष्ट्र परिषदेच्या पहिल्या अधिवेशनाला ते उपस्थित होते. महात्मा गांधींच्या आदेशानुसार १९३८ साली मोंढा मैदानावर झालेल्या बैठकीतील ते पहिले सत्याग्रही होते. २ वर्षे सक्तमजुरी व २ हजार रुपये दंड अशा शिक्षा त्यांना देण्यात आल्या. १९४६ साली झालेल्या झेंडा प्रकरणी ते सर्वात पुढे होते. उमरखेड कँम्पवर त्यांनी अहोरात्र काम केले. मुक्तीसंग्रामात त्यांनी केलेली कामगिरी मोठी होती. १९५२ साली झालेल्या निवडणुकीत नांदेड मतदारसंघातून काँग्रेस पक्षाचे आमदार म्हणून त्यांची निवड झाली. हैद्राबाद विधानसभेत पक्षाचे प्रतोद म्हणून त्यांनी केलेले कार्य महत्त्वपूर्ण मानले गेले. स्वच्छ व उज्ज्वल ध्येयवाद, निःस्वार्थी आणि निरपेक्ष सामाजिक काम ही त्यांची जीवननिष्ठा होती. त्यांनी अनेक पदे सांभाळली. प्रतिभा निकेतन, गोदातीर इतिहास संशोधन मंडळ, कलामंदिर या संस्थांशी त्यांचा निकटचा संबंध होता. नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या स्थापनेपासून म्हणजे १९५० पासून पुढे सतत ३५ वर्षे ते चिटणीस होते. पीपल्स आणि सायन्स कॉलेजच्या उभारणीत यांचा सिंहाचा वाटा होता. आयुष्यभर त्यांनी सार्वजनिक काम केले. उपजीविकेसाठी शिकवण्यानंतर व्यापार केला, पण रमले मात्र सार्वजनिक जीवनात. अनेक विद्यार्थ्यांचे त्यांनी भले केले. परित्यक्ता, पतिता स्त्रियांच्या जीवनाला त्यांनी स्थैर्य मिळवून दिले. शांत, सुस्वभावी, निरलस प्रकृतीच्या गांजवेमामांनी आदरणीय जीवन जगताना निर्मोहीपण सांभाळले. २२ नोव्हेंबर, १९८८ रोजी नांदेड जिल्ह्याचा हा लोकप्रिय नेता काळाच्या पडद्याआड गेला.

**श्री. गोपाळशास्त्री देव :** मुक्ती संग्रमातील त्रीमूर्तींपैकी गोपाळशास्त्री देवांचा जन्म औंढा नागनाथ येथे १९०८ मध्ये झाला. एका याज्ञिकी कुटुंबात जन्मलेले भाऊ नाशिक येथे वामनशास्त्री दातारांकडे आयुर्वेदाचे शिक्षण घेण्यासाठी राहिले. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या सहवासाने ते पुनित झाले. व्यवसायनिमित्त नांदेडला आल्यानंतर बोधनकर, गांजवे यांच्याशी त्यांचा संपर्क आला. आर्य समाजाशीही त्यांचा निकटचा संबंध होता. संस्कृत आणि मराठी भाषेवर प्रभुत्व होते. त्यागशीलता,

धडाडी, पुरूषार्थ ऋजुता अणि सभ्यता ही त्यांची स्वभाववैशिष्ट्ये होती. १९३० पासून ते नांदेडच्या राजकीय आणि सामाजिक चळवळीत अग्रेसर राहिले. निजामाने धर्मांतराची लाट आणली होती. हिंदू अत्याचारांनी त्रस्त होते. अशावेळी मुसलमानी अत्याचारापासून हिंदूंचे संरक्षण, हिंदूंचे संघटन, पळवून नेलेल्या मुली परत आणून शुद्ध करून त्यांचे लग्न लावणे, गोरगरिबांच्या मदतीसाठी तत्पर असणे याबरोबरच दातारशास्त्री, वैद्य गुणे, वैद्य बिंदुमाधव यांच्याकडून मिळविलेल्या वैद्यकीय ज्ञानाने लोकांना रोगमुक्त करणे, याबरोबरच चळवळी संघटित करणे हा त्यांचा छंद होता. १९३८ साली झालेल्या सत्याग्रहात ते सहभागी झाले. उमरखेड येथील कँपवर ते व त्यांच्या पत्नी गंगुताई यांनी उपसलेले कष्ट अवर्णनीय होते. १९५२ साली झालेल्या हैद्राबाद विधानसभेच्या निवडणुकीत काँग्रेसचे आमदार म्हणून मुधोळ मतदारसंघातून ते निवडून आले. १९५७ नंतर सर्वोदय व दारूमुक्तीची चळवळ यात त्यांनी महनीय कार्य केले. त्यांचा पिंड कार्यकर्त्याचा व संघटकाचा होता. पल्लेदार, आक्रमक, संस्कृतप्रचूर मराठी भाषेतील त्यांचे वक्तृत्व अत्यंत प्रभावी होते. वैयक्तिक जीवनातील पडझडीची पर्वा न करता त्यांनी सातत्याने काम केले. गोपाळशास्त्री देव यांचा मृत्यू ६ एप्रिल, १९७१ रोजी नांदेड येथे झाला.

**कॉ. व्ही. डी. देशपांडे :** विख्यात कम्युनिस्ट नेते श्री.विठ्ठल देविदासराव देशपांडे यांचे नांदेड हे कार्यक्षेत्र. त्यांचा जन्म औरंगाबाद येथे १० मे, १९१४ रोजी झाला. ते मूळचे जिंतूरचे. त्यांचे शिक्षण औरंगाबाद व हैद्राबाद येथे झाले. बी.एस्सी., एल.एल.बी. असलेले व्ही.डी.देशपांडे अगदी विद्यार्थीदशेतच महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली १९३० साली झालेल्या सत्याग्रहात सहभागी होण्यासाठी गेले होते. वय लहान असल्यामुळे अगोदर शिक्षण पूर्ण करण्याचा सल्ला गांधीजींनी दिला. हैद्राबादला शिकत असतानाच ते वंदेमातरम लढ्यात उतरले. आंदोलनात सतत सहभागी असतानाही बी.एस्सी. पदवीत ते पहिल्या वर्गात पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले होते. काही वर्षे अंबेजोगाईला स्वामीजींच्या योगेश्वरी शाळेत शिक्षक म्हणून त्यांनी काम केले. परतूरच्या पहिल्या महाराष्ट्र परिषदेला ते उपस्थित होते. सतत संघर्षात उतरणे ही त्यांची जीवननिष्ठा होती. महात्मा गांधी व स्वामीजींच्या नेतृत्वावर त्यांचा विश्वास होता. मार्क्सवाद व समाजवाद यांचा त्यांनी सखोल अभ्यास केला होता. पुढे ते केवळ मराठवाडाच नव्हे तर हैद्राबाद संस्थानात कम्युनिस्ट नेते म्हणून गाजले. अनेक ठिकाणी कामगारांच्या संघटना उभ्या केल्या. त्यांच्यात एकजूट निर्माण केली. व्ही.डी.देशपांडे, सी.डी.चौधरी व आर.डी.देशपांडे या तिघांनी एकत्रितपणे कामगारांच्या एकजुटीचे दर्शन घडविले. १९४४ साली ते नांदेडला आले आणि कायमचे नांदेडचे झाले. उस्मानशाही मिलमध्ये लालबावटा युनियन त्यांनी कायम केली. व्ही.डी. आणि आर.डी. यांनी या कापडगिरणीतील कामगारांसाठी जिवापाड कष्ट घेतले. याबरोबरच हैद्राबाद राज्यातील अनेक ठिकाणी कामगारांचे लढे उभारतानाच मुक्ती संग्रामातील चळवळीत सक्रिय सहभाग घेतला. पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत १९५२ साली ते तेलंगणाच्या नलगोंडा जिल्ह्यातील इलागुंडा मतदारसंघातून निवडून आले आणि हैद्राबाद राज्यातल्या लोकनियुक्त विधानसभेत विरोधी पक्षनेते म्हणून निवडले गेले. संयुक्त महाराष्ट्र समितीच्या लढ्यात त्यांचे नेतृत्व गाजले. १९५७ ते १९६२ पर्यंत ते विधानसभेत असताना आमदारकीच्या तिसऱ्या वर्षी विरोधीपक्ष नेते झाले. संयुक्त महाराष्ट्र झाला तेव्हा पक्षनेतेपद त्यांच्याकडेच होते. हैद्राबाद विधानसभेत भाषावार

प्रांतरचनेचा व मुंबई विधानसभेत संयुक्त महाराष्ट्राचा एकमताने मंजूर झालेला ठराव त्यांनीच मांडला होता. या दोन्ही विधानसभेत मराठवाडा विद्यापीठ स्थापनेचा ठराव त्यांचाच होता. कुळकायद्याच्या निर्मितीत त्यांचा मोलाचा सहभाग होता. नांदेड, हैद्राबाद आणि मुंबई येथे त्यांनी वकिलीही केली. त्यांच्या पत्नी माई देशपांडे यांनीही त्यांच्या खांद्याला खांदा भिडवून कम्युनिस्ट चळवळीत काम केले. निष्कलंक चारित्र्य, उत्कृष्ट वकील, कामगार व शेतमजुराचा हितकर्ता, अनेकदा तुरूंगवास सोसलेला जाज्ज्वल्य निष्ठेचा धुरंधर राजकारणी सर्व जातीधर्माच्या कार्यकर्त्यांना आपलेसे करून घेतलेला प्रभावी संघटक म्हणून व्ही.डी.चे नाव इतिहासात सुवर्णाक्षराने नोंदवावे लागेल. त्यांचे निधन १८ जानेवारी, १९८६ रोजी झाले.

**कै. शंकररावजी चव्हाण :** नामदार शंकररावजी चव्हाण यांचा जन्म १४ जुलै, १९२० रोजी पैठण येथे झाला. त्यांचे वडील श्री. भाऊराव चव्हाण हे शेतकरी व छोटे व्यापारी होते. दहावीपर्यंतचे शिक्षण पैठणला झाल्यानंतर महाविद्यालयीन शिक्षण त्यांनी हैद्राबाद येथे घेतले. निजाम कॉलेजमध्ये प्राविण्यासह बी.ए. आणि उस्मानिया युनिव्हर्सिटीमध्ये एल.एल.बी. असे महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी हैद्राबाद येथे वकिली सुरू केली. घरची आर्थिक परिस्थिती बेताची असल्यामुळे महाविद्यालयीन शिक्षण घेतांना त्यांना खाजगी शिकवण्या कराव्या लागल्या. याच काळात ते स्वामी रामानंद तीर्थांचे शिष्य झाले आणि मुक्तीसंग्रामात सहभागी झाले. स्वामीजींच्या आज्ञेनुसार त्यांनी नांदेडला काँग्रेस पक्षाचे काम सुरू केले. उपजीविकेचे साधन म्हणून नांदेड येथील न्यायालयात वकिलीचा व्यवसाय सुरू केला. १९४७ ते १९४९ पर्यंत नांदेड जिल्हा काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस होते. लढ्याच्या काळात उमरखेड कँपवर त्यांनी काम केले. त्याचप्रमाणे त्यांनी परभणी जिल्ह्यात बहुजन समाजात निजामाची बाजू घेणारे जे गट होते त्यांना स्वातंत्र्यलढ्यात सहभागी करून घेतले. आरंभापासून शेवटपर्यंत ते काँग्रेसचेच कार्यकर्ते राहिले. आणीबाणीच्या काळानंतर त्यांनी महाराष्ट्र समाजवादी काँग्रेसची त्यांनी स्थापना केली. पण काँग्रेसच्या मूळ प्रवाहापासून वेगळे झाले नाहीत. १९५३ मध्ये नांदेड नगरपालिकेचे ते पहिले नगराध्यक्ष झाले आणि येथूनच पुढे सातत्याने त्यांनी अनेक सन्माननीय पदे विभूषित केली. भाषावार प्रांतरचनेनंतर १९५६ साली ना. यशवंतराव चव्हाण यांच्या मंत्रिमंडळात महसूल खात्याचे उपमंत्री झाले. त्याचप्रमाणे मुंबई राज्य विधानपरिषद नियोजन मंडळाचे उपाध्यक्ष झाले. १९५७ साली धर्माबाद विधानसभा मतदारसंघातून त्यांची आमदार म्हणून निवड झाली. १९६० साली संयुक्त महाराष्ट्र मंत्रिमंडळात ते पाटबंधारे व ऊर्जा खात्याचे मंत्री झाले. १९६२ साली भोकर विधानसभा मतदारसंघातून ते निवडले गेले. पाटबंधारे व ऊर्जा खात्याचे मंत्री म्हणून त्यांनी केलेली कामगिरी मराठवाड्याला सुजलाम सुफलाम करणारी ठरली. जायकवाडी, येलदरी, सिद्धेश्वर, विष्णुपुरी ही मोठी धरणे आणि अनेक लहान व मध्यम प्रकल्प उभे करून इतिहासात पहिल्यांदाच मराठवाड्याची कोरडवाहू शेती मोठ्या प्रमाणात बागाईत होईल ही व्यवस्था केली. महाराष्ट्राच्या उर्वरित भागात सुद्धा कृष्णा, कोयना, वैनगंगा इ.प्रकल्प निर्माण करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. जवळपास १४ वर्षे त्यांनी विविध पाटबंधारे व धरण विभागाच्या निर्मितीसाठी परिश्रम घेतल्याचे दिसते. "शंकररावांनी महाराष्ट्रास भारताच्या पाटबंधारे विभागाच्या नकाशावर आणले", अशी नोंद पंडित नेहरुंनी केली आहे.

नांदेड येथील विष्णुपुरी हा गोदावरी नदीवर उभारलेला आशिया खंडातील सर्वात मोठा उपसा जलसिंचन प्रकल्प होय. यामुळेच २६ फेब्रुवारी, २००४ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी हा दिन 'सिंचन दिन' म्हणून पाळण्याचे जाहीर केले; तर विष्णुपुरी प्रकल्पाचे 'शंकरराव चव्हाण विष्णुपुरी प्रकल्प' असे नामकरण केले. महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात कृषिमंत्री म्हणूनही त्यांचे योगदान राहिले. या काळात विविध सर्व्हेक्षणविषयक विभाग त्यांनी निर्माण केले. मराठवाडा व कोकण कृषी विद्यापीठांची स्थापना, स. गो. बर्वे यांच्या अध्यक्षतेखाली झालेली सिंचन आयोगाची स्थापना, आठमाही पाणीवाटप धोरण, कृष्णा-गोदा पाणीवाटप तंटा, पोचंपाड हे धरण या सर्वांच्या निमित्ताने शंकररावांचा दृष्टिकोन त्यांनी वेळोवेळी विधीमंडळात दिलेल्या भाषणातून व्यक्त होतो.*

कृष्णा व गोदावरी पाणी तंट्यात महाराष्ट्राची बाजू मांडतांना एखादा श्रेष्ठ इंजिनिअरही फिका पडावा असा तांत्रिक अभ्यास केला होता. मराठी, हिंदी, इंग्रजी, उर्दू इ. भाषांवर विलक्षण प्रभुत्व त्याबरोबरच सतत अभ्यास ही त्यांची वैशिष्ट्ये होती. राज्य आणि भारतीय पातळीवर या गुणांमुळेच त्यांचे नेतृत्व प्रस्थापित झाले. सीमावर्ती राज्य आणि पंजाबच्या संदर्भात राष्ट्रीय नेता म्हणून त्यांचे कार्य वाखाणण्यासारखे आहे.* १९७५ साली ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. भिकाऱ्यांना मुंबईतून पुनर्वसित करण्याचे प्रयत्न, रेल्वेमार्ग रुंदीचा प्रश्न, रोजगार हमी योजना, विशेषतः शून्याधारित अर्थसंकल्प या शंकररावांच्या काळातील लक्षणीय बाबी आहेत.* आणीबाणीनंतर आलेल्या पुलोद मंत्रिमंडळात ते अर्थमंत्री होते. १९८० साली नांदेड लोकसभा मतदारसंघातून ते निवडून आले आणि केंद्रशासनात मनुष्यबळ विकास खात्याचे मंत्री झाले. स्वर्गीय इंदिरा गांधीच्या नेतृत्वाखाली त्यांना काम करण्याची संधी मिळाली. १९८१ साली ते नियोजन मंडळाचे उपाध्यक्ष झाले. १९८४ साली राजीव गांधी मंत्रिमंडळात प्रारंभी संरक्षणमंत्री व नंतर गृहमंत्री म्हणून त्यांनी मोलाची कामगिरी बजावली. १९८५ साली नांदेड लोकसभा मतदारसंघातून ते आठव्या लोकसभेवर निवडून गेले. मात्र महाराष्ट्रातील राजकारणाची विस्कळित झालेली घडी नीट करण्यासाठी १९८६ साली दुसऱ्यांदा ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. १९८८ साली त्यांची राज्यसभेवर निवड झाली व केंद्रीय अर्थमंत्री झाले. १९९० साली त्यांची दुसऱ्यांदा राज्यसभेवर निवड झाली. १९९१ साली राज्यसभेचे सभागृह नेते म्हणून काम करतांना ते केंद्रीय गृहमंत्री झाले. गृहमंत्री म्हणून प्रशासनावर त्यांनी आपला ठसा उमटवला. १९९६ साली राज्यसभेचे सदस्य असतांना कायदामंडळ, मंत्रालय सल्लागार समिती आणि सामान्य प्रशासन समितीचे ते सदस्य राहिले त्याबरोबर मनुष्यबळविकास विकास समितीचे अध्यक्ष राहिले. १९९७ साली राज्यसभेचे सचिव राहिले. तसेच ते टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू होते. भारतीय लोकप्रशासन समितीचे (I.P.A) अध्यक्ष होते. नांदेड येथील शारदा भवन शिक्षणसंस्थेचे ते शेवटपर्यंत अध्यक्ष होते. त्यांच्याच काळात या शिक्षणसंस्थेच्या वटवृक्षाचा विस्तार झाला.

मराठवाड्याच्या इतिहासात देशाचे दीर्घकालीन नेतृत्व केले आणि अनेक पदे विभूषित करतांना व्यासंग, प्रशासनकौशल्य यात सातत्याने आपल्या अलौकिक बुद्धिमत्तेची छाप पाडलेले ते पहिले नेते होते. त्यांच्या अगोदर देशपातळीवर मराठवाड्यातील कुणीही नेतृत्व केले नाही. निष्कलंक चारित्र्य

*. दै. सकाळ, दिनांक १४ जुलै २००९ मधील डॉ. अ. शं. पाठक यांच्या **'जनहितासाठी झिजलेले कणखर नेतृत्व'** या लेखातून या नोंदी घेण्यात आल्या आहेत.

आणि अनेकविध विषयांचा व्यासंग याबरोबरच वैयक्तिक जीवनात शिस्त आणि सातत्याने संसदीय नेतृत्व करण्याची हातोटी हे त्यांचे विलोभनीय गुण होते. इंग्रजी आणि उर्दू भाषांवरील प्रभुत्वामुळे देशभर त्यांना लोकप्रियता मिळाली. ते मराठवाड्याचे भाग्यविधाते ठरले. २६ फेब्रुवारी, २००४ रोजी त्यांचे निधन झाले.

**पद्मश्री श्यामराव कदम :** सहकार आणि विकासाच्या क्षेत्रात ज्यांनी केवळ महाराष्ट्रातच नाही तर देशात लौकिक मिळविला त्या श्यामराव सखाराम कदम यांचा जन्म लिंबगाव, ता. नांदेड येथे १० ऑक्टोबर, १९२० रोजी झाला. व्यवसायाने ते वकील होते. त्यांचे कार्य विविधांगी आहे. नांदेड जिल्ह्याच्या विकासासाठी त्यांनी केवळ योजनाच आखल्या असे नव्हे तर त्या राबवूनही दाखविल्या. ते कै.शंकरराव चव्हाणांचे विश्वासू सहकारी राहिले. १९५८ मध्ये ते नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे पहिले अध्यक्ष झाले. मुंबई राज्यात आल्यानंतर सहकारी चळवळीमार्फत ग्रामीण विकास साधता येऊ शकतो. याची जाणीव झाली होती. ज्येष्ठ अर्थशास्त्रज्ञ कै. धनंजयराव गाडगीळ यांच्या मार्गदर्शनाखाली आणि पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील यांनी नगर जिल्ह्यात केलेल्या कार्याचे अवलोकन केल्यानंतर सहकाराचे महत्त्व त्यांना समजले. मुळात बुद्धिमान व उपजत हुशारी असलेले श्री. श्यामरावजी हळूहळू या क्षेत्रातील दिग्गज नेतेच झाले. मग जिल्हा खरेदी विक्री संघ, कन्झ्युमर्स सोसायटी, मध्यवर्ती सहकारी बँकेच्या ठिकठिकाणी शाखा, पतपेढ्या, दूधसंस्था, फळविक्री संस्था अशा संस्थांचे जिल्ह्यात त्यांनी जाळेच तयार केले. अर्जापूर पाईप फॅक्टरी, कलंबर सहकारी साखर कारखाना, मराठवाडा सूतगिरणी यांचेही ते संस्थापक होते. पुढे ते महाराष्ट्र राज्य सहकारी शिखर बँकेचे अध्यक्ष झाले. केवळ सहकार एवढेच त्यांचे कार्यक्षेत्र नव्हते. १९५० साली स्थापन झालेल्या शारदा भवन शिक्षण संस्थेत उपाध्यक्ष या नात्याने त्यांनी भरीव कामगिरी केली. एवढेच नव्हे तर जांबची नीती निकेतन शिक्षण संस्था, धर्माबादचे लालबहादूर शास्त्री महाविद्यालय, मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ इत्यादि अनेक संस्थांचे ते प्रवर्तक राहिले. त्यांची विकासविषयक कामगिरी लक्षात घेऊन त्यांना १९६२ साली स्थापन झालेल्या नांदेड जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद मिळाले. तत्पूर्वी ते जिल्हा विकास मंडळाचे उपाध्यक्ष राहिले होते. नांदेड जिल्ह्यात पक्षीय राजकारण असले तरी शत्रुत्वाचा दृष्टीकोन नव्हता याचे कारण सर्वांशी सौहार्दयुक्त संबंध ठेवणे हा त्यांचा गुण होता. १९७२ पर्यंत जिल्हा परिषदेचे अध्यक्ष राहिल्यानंतर त्यांची नियुक्ती विधानपरिषदेवर आमदार म्हणून झाली. नामदार शंकररावजी चव्हाण, मुख्यमंत्री असतांना काही वर्षे ते माहिती, प्रसारण व पाटबंधारे खात्याचे राज्यमंत्री होते. उर्दू, मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषा त्यांना अवगत होत्या. दीर्घकळ ते मराठवाडा विद्यापीठाचे कार्यकारिणी सदस्य होते, सिनेटवर होते. संगीत व साहित्य यांची त्यांना अभिरूची होती. नांदेड सांस्कृतिकदृष्ट्या संपन्न असले पाहिजे म्हणून वेगवेगळ्या क्षेत्रांतील संमेलने भरली पाहिजेत असा त्यांचा आग्रह असे व पुढाकारही असे. १९६४-६५ मध्ये ज्येष्ठ विनोदी लेखक पु. ल. देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलनाचे ते स्वागताध्यक्ष होते. १९८५ साली भरलेल्या ५९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचेही ते स्वागताध्यक्ष होते. अण्णासाहेब गुंजकरांचे गायन वादन विद्यालय, वसेकरांची अभिनव चित्रशाळा, वेगवेगळ्या विचारसरणीच्या नांदेडमधील सर्व शिक्षणसंस्था यांच्या विकासात त्यांचा मोलाचा हातभार लागला आहे. साहित्यिक

व कलावंत यांच्या सहवासात राहणे त्यांना मनापासून आवडे. मराठवाडा साहित्य परिषदेला मुख्यमंत्री सुधाकरराव नाईक यांच्याकडून यशवंतराव चव्हाण व अनंतराव भालेराव यांच्या नावे असलेल्या सभागृहाच्या उभारणीसाठी त्यांनी २५ लाख रुपये मिळवून दिले. मराठवाड्यातील सामाजिक व सांस्कृतिक चळवळींचे ते मार्गदर्शक होते, मदतनिस होते. त्यांना देशाच्या राष्ट्रपतींनी 'पद्मश्री' पुरस्कार देऊन 'लोकनेते' व 'सहकार महर्षी' या उपाध्या दिल्या. आयुष्यभर कार्यमग्न असलेल्या या नेत्याचे निधन २० ऑक्टोबर, १९९९ रोजी झाले.

**भाई केशवरावजी धोंडगे :** शेतकरी कामगार पक्षाचे दिग्गज नेते, धुवांधार वक्तृत्व शैलीचे वरदान लाभलेले भाई केशव शंकर धोंडगे यांचा जन्म जुलै, १९२२ मध्ये झाला. महाराष्ट्रात शेतकरी कामगार पक्षाची लोकप्रियता आणि संघटनात्मक वैभव ज्या नेत्यांनी विकसित केले त्यात भाई केशवरावजींचे स्थान महत्वाचे आहे. ग्रामीण भागातील त्यांची लोकप्रियता एवढी विलक्षण होती, की मुंबई महाराष्ट्र राज्यात कंधार विधानसभा मतदारसंघातून १९५७ ते १९७५ या कालावधीत चार वेळेला आणि १९८५ ते १९९५ या काळात दोन वेळेला आमदार म्हणून ते निवडून आले. १९७७ ते १९८० या कालावधीत ते लोकसभेचे सदस्य होते. इतका दीर्घकाळ एखाद्या मतदार संघावर आपली पकड ठेवण्याची कामगिरी श्री.धोंडगे यांनी करून दाखविली. या काळात अनेक स्थनिक प्रश्न त्यांनी विधीमंडळात धसास लावले. शिवाय त्यांच्या जनसंपर्कामुळे सामान्य माणूस निर्भिड बनला तो ताठ कण्याने वावरू लागला. हे केशवरावांच्या संपर्काचे श्रेय मानावे लागते. विधानसभेत आपल्या वक्तृत्वाच्या तोफेने त्यांनी चांगल्या चांगल्यांना जर्जर केले. संयुक्त महाराष्ट्राचा लढा त्यांनी अहमहमिकेने लढविला. बहुजन समाज, दलित व पददलित यांच्यासाठी अहर्निश झटणारे श्री.धोंडगे यांनी १ मे, १९४८ ला कंधार येथे श्री. शिवाजी मोफत शिक्षणसंस्थेची स्थापना केली. आज या शिक्षणसंस्थेचा झालेला विस्तार आश्चर्यचकित करणारा आहे. आज या संस्थेची दोन वरिष्ठ महाविद्यालये, एक लॉ कॉलेज, १० कनिष्ठ महाविद्यालये, केवळ मुलींसाठी असलेली दोन कनिष्ठ महाविद्यालये, ९ शाळा, तांड्यावर असणाऱ्या २२ शाळा, दोन वसतिगृहे इतक्या संस्था चालविल्या जातात. खेड्यापाड्यातून अनेक विद्यार्थी या संस्थांतून बाहेर पडले आहेत, एवढेच नव्हे तर कंधार जवळील गुराखी टेकडीवर त्यांनी एक गुराखी विद्यापीठ कायम केले आहे. कंधार हे ९ व्या शतकातील राष्ट्रकूटांच्या राजधानीचे शहर आहे. या राष्ट्रकूटांचा जाज्ज्वल इतिहास आणि कंधारचा एक हजार वर्षांचा इतिहास सुरक्षित रहावा म्हणून त्यांनी अखंड प्रयत्न केले आहेत. राष्ट्रकूटांच्या नावे सर्वलोकाश्रय मंडप काढलेल्या वस्तुसंग्रहालयात शेकडो अवशेष संग्रहित केलेले आहेत. जीवनाला दिशा दिली म्हणून केशवराव आईला परमेश्वरस्वरूप मानतात. 'मुक्ताई' हे त्यांचे श्रद्धास्थान, 'मुक्ताईसुत' या नावाने त्यांनी आपला व्यासंग ग्रंथरूपात आणला. 'सज्जनगडास आसनगावच्या समर्थ दासीचा दासबोध', 'केशवायन', 'मुक्तेश्वरीगीता', 'गीतारहस्याचे रहस्य', 'बहिष्कृत युवराज युयुत्सू', 'गुराखी मुक्तीपाठ' इत्यादी अनेक पुस्तके त्यांनी लिहिलेली आहेत. 'जनक्रांती' नावाचे साप्ताहिक ते अनेक वर्षांपासून संपादित करीत आहेत. देव, धर्म, अध्यात्म, जातीपरंपरा, रूढी, अज्ञान, अंधश्रद्धा अशा समाजजागृतीविषयी कविता लिहिल्या आहेत. रचनात्मक कार्यकर्ता आणि कार्यसंस्कृती जपणारा हा नेता आजही वयाच्या ८८ व्या वर्षी कार्यमग्न आहे.

**श्री. उत्तमराव राठोड :** श्री. उत्तमराव राठोड हे बंजारा समाजातील उच्चविद्याविभूषित ज्येष्ठ काँग्रेस कार्यकर्ते पहिल्यांदा किनवट विधानसभा मतदारसंघातून आमदार म्हणून निवडून आले. त्यांचे वडील बळीराम राठोड हे बंजारा समाजातील आदरणीय व्यक्तिमत्व होते. १९६२ व १९६७ साली झालेल्या निवडणूकीत त्यांची आमदार म्हणून फेरनिवड झाली. सलग १९५७ ते १९७२ नंतर पुन्हा एकदा १९७८ ला ते आमदार झाले. खासदार म्हणूनही ते एकदा निवडून आले. काही वर्षे मंत्रिमंडळात मंत्री म्हणूनही त्यांनी चोख कामगिरी बजावली. अभ्यासू, सौजन्यशील स्वभावामुळे सर्व जाती-धर्मांत त्यांनी स्वतःचे एक वेगळे स्थान निर्माण केले. इंग्रजी, हिंदी आणि मराठी या भाषांवर त्यांचे प्रभुत्त्व होते. किनवट तालुक्यातील बंजारा, आंध, गौंड समाजातील मागासलेपणा आणि अशिक्षितपणा घालविण्यासाठी त्यांनी अनेक योजना शासनाकडून मंजूर करून घेतल्या. आज किनवट तालुका विकसित झाला आहे त्याचे श्रेय श्री. राठोड यांना जाते.

**श्री. बळवंतराव चव्हाण :** नायगाव येथील ज्येष्ठ नेते श्री. बळवंतराव अमृतराव चव्हाण यांचा जन्म २ नोव्हेंबर १९२९ रोजी झाला. उर्दू माध्यमातून त्यांचे शिक्षण झाले होते. ग्रामीण भागात आपल्या कार्याने त्यांनी प्रभाव निर्माण केला होता. १९७६ ते १९८० या काळात ते विधान परिषदेचे सदस्य होते. १९८० ते ८५ याकाळात ते विधानसभेचे सदस्य होते व पुढील कालावधीत ते आमदार राहिले. नांदेड जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद त्यांनी समर्थपणे सांभाळले. जिल्हा सहकारी बँकेवर १९७४ ते १९९६ पर्यंत ते डायरेक्टर राहिले. जिल्हा खरेदी-विक्री संघाचे १९७६ ते १९८८ पर्यंत ते पदाधिकारी राहिले. त्यांनी स्थापन केलेल्या नायगाव एज्युकेशन सोसायटीच्या वतीने नायगाव व परिसरात शाळा व महाविद्यालये चालविली जातात. धूर्त व धोरणी राजकारणी असा त्यांचा लौकिक होता. ७ ऑगस्ट, २००७ रोजी त्यांचे दुःखद निधन झाले.

**कॉ. अनंतराव नागापूरकर :** कॉ. अनंतराव नागापूरकर यांचा जन्म ६ ऑक्टोबर १९२० साली झाला. वकिलीपर्यंतचे त्यांचे शिक्षण आंबेजोगाई व हैद्राबाद येथे झाले. ज्येष्ठ कामगार नेते म्हणून आपल्या कामाने त्यांनी आदरणीय स्थान मिळविले होते. तेलंगणा व मराठवाड्यातील कम्युनिस्ट पक्ष तसेच कापडगिरण्या व इतर कारखान्यांच्या कामगारांना संघटित करून आपली लालबावटा युनियन प्रभावी केली होती. मुक्तीसंग्रामात अनेकदा त्यांनी तुरूंगवास भोगला. दारिद्र्यात राहिले मात्र सत्त्व सोडले नाही. सर्व जातीधर्माचे विशेषतः दलित आणि पददलितांचे प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी अनेकदा आंदोलने केली, चळवळी उभ्या केल्या. १९५६ पासून नांदेडच्या उस्मानशाही मिलमध्ये लालबावटा युनियनचे नेतृत्त्व केले. कॉ.व्ही.डी.देशपांडे त्यांना गुरूस्थानी होते. त्यांचे धाकटे बंधू जनार्दन मामा मुक्तीसंग्रामात हुतात्मे झाले. दीर्घकाळ ते नांदेड नगरपालिकेचे सदस्य राहिले. कुणाही पुढे न झुकलेला, आयुष्यभर दारिद्र्यातच आनंद मानलेला, तत्त्वनिष्ठ आणि अनेक विषयांचा अभ्यासक असलेला, कॉ. मगदूम मुईनोद्दीन, डॉ. राजबहादूर गौड, आर.डी.देशपांडे, सी.डी.चौधरी इ. नेत्यांच्या बरोबरीने कम्युनिस्ट पक्षात सन्मान मिळविलेला हा कार्यकता ६ जुलै, २००८ रोजी निधन पावला.

**साहेबराव बारडकर :** हैद्राबाद मुक्तीसंग्रामात स्वामीजींच्या नेतृत्त्वाखाली धडाडीची कामगिरी बजावलेले श्री. साहेबराव सखोजीराव बारडकर यांचा जन्म ८ एप्रिल, १९३५ ला झाला. ३० जानेवारी, १९४४ रोजी उमरी बँकेवर हल्ला केलेल्या स्वातंत्र्य सैनिकांत श्री. साहेबराव होते. ते काँग्रेसचे नेहमीच

एकनिष्ठ कार्यकर्ते राहिले. पक्ष संघटनेच्या कार्यात ते नेहमीच स्वतःला झोकून देत. नांदेड जिल्हा परिषदेचे ते १९६२ ते १९७२ पर्यंत उपाध्यक्ष होते. जिल्हा मार्केट कमिटी, नांदेड जिल्हा कन्झ्यूमर्स सोसायटीचे अध्यक्ष होते. १९९१ ते १९९९ पर्यंत ते महाराष्ट्र विधानसभेवर आमदार म्हणून दोनदा निवडून गेले. महाराष्ट्र रोजगार हमी योजनेचे मंत्रीपदाच्या समकक्ष असलेले अध्यक्षपद त्यांनी विभूषित केले. अत्यंत निर्भिड आणि जनतेच्या प्रश्नांसाठी सातत्याने आवाज उठविलेल्या ह्या नेत्याचे ११ जुलै २००१ मध्ये निधन झाले.

**श्री. गंगाधरराव कुटुंरकर :** श्री. गंगाधरराव मोहनराव कुंटुरकर हे नांदेड जिल्ह्यातील काँग्रेस पक्षाचे दिग्गज नेते असून सध्या ते राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये आहेत. त्यांचा जन्म १६ जून, १९३९ रोजी झाला. नांदेड जिल्हापरिषदेचे ते अध्यक्ष होते. १९९६ साली ते काँग्रेस पक्षाच्या वतीने लोकसभेवर खासदार म्हणून निवडून गेले. १९८५ ते १९९० या कालावधीत ते बिलोली मतदारसंघातून आमदार म्हणून निवडून गेले. याच काळात काही काळ ते राज्यमंत्री होते. जनतेशी सतत संपर्क ही त्यांची कार्यशैली आहे. आजही राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते म्हणून नांदेड जिल्ह्यात त्यांना मान आहे.

**श्री. बाबासाहेब गोरठेकर :** श्री. बाबासाहेब ऊर्फ श्री. बालाजीराव गोपाळराव देशमुख गोरठेकर हैद्राबाद मुक्तीसंग्रामातील ज्येष्ठ कार्यकर्ते होते. त्यांचा जन्म १३ एप्रिल, १९३४ रोजी गोरठा ता. भोकर येथे झाला. श्री. संत दासगणू महाराजांचे ते निष्ठावंत अनुयायी होते. त्यांच्या प्रेमापोटीच निधनानंतर संत दासगणू महाराजांची समाधी गोरठ्याला बांधण्यात आली. श्री. शंकररावजी चव्हाण यांच्या आमदारकीच्या निवडणुकीत त्यांनी मोलाचे सहकार्य केले. नांदेड जिल्हा परिषदेचे ते अध्यक्ष राहिले. नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्षपदही त्यांना मिळाले. १९८० ते १९९० ते महाराष्ट्र विधानसभेवर काँग्रेस पक्षाचे आमदार म्हणून निवडून गेले. त्यांच्या नेतृत्त्वाचा नांदेड जिल्ह्यावर प्रभाव होता. १ नोव्हेंबर, २००३ रोजी त्यांचे निधन झाले.

**श्री. गंगाधर पटणे :** बिलोलीचे ज्येष्ठ समाजवादी कार्यकर्ते श्री. गंगाधर महालप्पा पटणे यांचा जन्म १४ एप्रिल, १९४१ रोजी झाला. पत्रकार म्हणून त्यांनी आपल्या कार्याची सुरूवात केली. व्यवसायाने ते वकील आहेत. **'जनक्रांती'** या साप्ताहिकाचे ते दीर्घकाळापासून संपादक आहेत. बिलोली नगरपरिषदेचे ते जवळपास १२ वर्षे अध्यक्ष राहिले. महाराष्ट्र राज्य तमाशा परिषदेचे अध्यक्षपद त्यांनी सांभाळले. गेली अनेक वर्षे महाराष्ट्र ग्रंथालय परिषदेचे ते अध्यक्ष आहेत. महाराष्ट्र राज्याच्या ग्रंथालयीन चळवळीत त्यांचे कार्य विलोभनीय आहे. माजी पंतप्रधान श्री. चंद्रशेखर हे जनता पक्षाचे अध्यक्ष असतांना त्यांनी संपूर्ण देशात पदयात्रा काढली. त्यात श्री. पटणे सहभागी होते. समाजवादी पक्ष आणि जनता पक्ष यांच्याशी ते सदैव एकनिष्ठ राहिले. महाराष्ट्र को. ऑप. हाऊसिंग फायनान्स कॉर्पोरेशनचे डायरेक्टर म्हणून त्यांनी १५ वर्षे काम केले. १९७८ ते १९८० या कालावधीत बिलोली मतदार संघातून जनता पक्षाचे आमदार म्हणून निवडून गेले. १९९८ ते २००४ पर्यंत ते विधानपरिषदेवर आमदार म्हणून निर्वाचित झाले. सध्या ते अखिल भारतीय साने गुरूजी कथामालेचे अध्यक्ष आहेत. मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेवर त्यांचे प्रभुत्त्व आहे. आरंभापासून राष्ट्रसेवा दलाचे ते कार्यकर्ते होते. वाङ्मयाचा अभ्यास आणि जनसंपर्क हे छंद त्यांनी कसोशीने जपले आहेत.

**श्री. गो. रा. म्हैसेकर** : यशवंत महाविद्यालयाचे संस्थापक प्राचार्य श्री. गोविंद रामचंद्रराव म्हैसेकर यांचा जन्म दि. १६ डिसेंबर, १९२३ रोजी झाला. त्यांचे मूळ गाव हदगाव. वडील रामचंद्रराव नामवंत वकील होते. सर्व जातीधर्माच्या लोकांना त्यांच्या घरी मुक्त प्रवेश असे. त्यांचे शिक्षण औरंगाबाद व हैद्राबाद येथे झाले. रसायनशास्त्रात एम.एस्सी. झाल्यानंतर एल.एल.बी. ही पदवी त्यांनी मिळविली. हैद्राबाद मुक्तीसंग्रामामध्ये पूज्य स्वामीजी व गोविंदभाई श्रॉफ यांच्या नेतृत्वाखाली महत्त्वाची कामगिरी बजावली. नांदेड जिल्ह्यातून जी कर्तबगार माणसे झाली त्यात म्हैसेकरांची गणना होते. मुक्तीसंग्रामानंतर शासकीय महाविद्यालयात त्यांनी प्राध्यापकाची नोकरी स्वीकारली. या नोकरीच्या काळात औरंगाबाद शासकीय महाविद्यालयात असताना बहुजन समाजातील तसेच दलित विद्यार्थ्यांना शिक्षण मिळवून जीवनात स्थिर होण्यासाठी लक्षणीय मदत केली. आयुष्यभर काँग्रेसपक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते राहिलेल्या म्हैसेकरांनी खादी वापरण्यात सातत्य राखले. १९६३ साली नांदेड येथे यशवंत कॉलेज स्थापन करण्यात त्यांचा सक्रीय पुढाकार होता. १९६३ ते १९७७ पर्यंत ते या महाविलयाचे प्राचार्य होते. मराठी बरोबरच इंग्रजी आणि उर्दू या भाषांवर प्रभुत्त्व असणारे म्हैसेकर या काळात ख्यातनाम शिक्षणतज्ज्ञ झाले. प्राथमिक, माध्यमिक व महाविद्यालयांच्या समस्यांचा खोलवर अभ्यास केला. अनेक शासकीय समित्यांवर सदस्य किंवा पदाधिकारी म्हणून त्यांनी महत्त्वाची कामगिरी बजावली. १९७६ ते १९८२ पर्यंत ते राज्यसभेचे खासदार होते. १९८३ ते १९८५ पर्यंत ते मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू होते. त्यानंतर प्रवरानगरच्या विखे पाटलांच्या संस्थेत ते महत्त्वाचे पदाधिकारी होते. मराठवाडा विद्यापीठ आणि नांदेडचे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू होते. या दोन्ही विद्यापीठांच्या स्थापनेत त्यांनी मोलाची कामगिरी बजावली. साहित्य, संगीत व सर्व कलांप्रकारांत त्यांचा व्यासंग आहे. इंग्रजी, मराठी व उर्दू वाङ्मयाचे वाचन, विविध विषयांचा व्यासंग आणि प्रभावी वक्तृत्त्व ही त्यांची वैशिष्ट्ये आहेत. ते आजही वार्धक्यात विविध सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक प्रश्नांचा सातत्याने चिंतनपर अभ्यास करतात.

**श्री. डी. बी. पाटील :** श्री.डी.बी.पाटील हे काँग्रेस पक्षाच्या वतीने किनवट मतदार संघातून १९९५ ते १९९९ पर्यंत आमदार होते. या काळातच महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात राज्यमंत्री म्हणून त्यांचा समावेश झाला. उत्कृष्ट संघटक व लोकसंपर्क असलेला नेता म्हणून त्यांनी लौकिक मिळविला. २००४ साली भारतीय जनता पक्षाचे खासदार म्हणून लोकसभेवर त्यांची निवड झाली या पदावर २००९ पर्यंत काम करण्याची संधी त्यांना मिळाली. आजही ते सातत्याने लोकसंपर्क राखून पक्षाचे काम करत असतात.

**श्रीमती सूर्यकांता पाटील :** श्रीमती सूर्यकांता पाटील यांचा जन्म १५ ऑगस्ट, १९४८ रोजी झाला. त्यांचे मूळ गाव हदगाव तालुक्यातील वायपना आहे. त्यांचे वडील श्री. जयवंतराव पाटील हैद्राबाद मुक्तीसंग्रामात संघर्ष करताना हुतात्मा झाले. त्यांचे चुलते श्री. माधवराव पाटील पी.डी.एफ.च्या वतीने आमदार म्हणून १९५२ साली निवडून आले. श्रीमती पाटील कलाशाखेच्या पदवीधर असून १९७१ साली राजकारणात आल्या. आरंभाला जिल्हा काँग्रेस कमिटीच्या स्त्रीविषयक समितीच्या त्या अध्यक्ष होत्या. नंतर युवक काँग्रेसच्या सरचिटणीस झाल्या. १९७४ ते १९८२ या काळात त्या नांदेड नगर परिषदेच्या सदस्य होत्या. १९८० साली त्या हदगाव मतदार संघातून कॉग्रेसच्या आमदार म्हणून निवडून आल्या. १९८६ ते १९९१ पर्यंत त्या राज्यसभेच्या खासदार राहिल्या. १९९१ साली दहाव्या

Maharashtra State Gazetteers

लोकसभेवर त्या नांदेड मतदार संघातून निवडल्या गेल्या. १९९८ साली १२ व्या लोकसभेवर हिंगोली मतदार संघातून त्या खासदार म्हणून निवडून आल्या. महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र कौंसिल फॉर ॲग्रिकल्चर, एज्युकेशन अँड रिसर्च या संस्थेच्या त्या चेअरमन होत्या. हदगाव येथे त्यांनी हुतात्मा जयवंतराव पाटील सहकारी साखर कारखाना स्थापन केला. महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या त्या दहा वर्षे डायरेक्टर होत्या. २००४ साली १४ व्या लोकसभेवर त्या निवडून आल्या. आणि केंद्रीय मंत्रिमंडळात ग्रामीण विकास व संसंदीय खात्याच्या राज्यमंत्री म्हणून त्यांनी काम पाहिले. ग्रामीण विकास शेतीविषयक प्रश्न या क्षेत्रांत त्यांनी महत्त्वाची कामगिरी केली.

**श्री. कमलकिशोर कदम :** श्री. कमलकिशोर नानासाहेब कदम यांचा जन्म २९ ऑक्टोबर, १९४५ रोजी झाला. एम.टेक्. ही पदव्युत्तर पदवी घेतल्यानंतर त्यांनी नांदेड जिल्ह्याच्या राजकारणात सक्रीय भाग घेण्यास सुरुवात केली. आरंभाला जिल्हा परिषदेत निवडून आल्यानंतर ते शिक्षण समितीचे सभापती झाले. नांदेड मतदार संघातून आमदार म्हणून महाराष्ट्र विधानसभेवर ते निवडून आले. १९८० साली पहिल्यांदा आणि १९८८ साली दुसऱ्यांदा. विधानसभेचे ते १९८५ ते १९८६ पर्यंत उपाध्यक्ष होते. १९८८ ते १९९० या कालावधीत ते शिक्षणमंत्री राहिले. १९९४-९५ या कालावधीत ते मराठवाडा वैधानिक विकास मंडळाचे अध्यक्ष झाले. १९९८ पासून ते आजतागायत विधानपरिषदेचे ते सदस्य आहेत. 'महात्मा गांधी मिशन' या संस्थेचे ते संस्थापक, अध्यक्ष असून या संस्थेतर्फे नांदेड, औरंगाबाद, मुंबई येथे त्यांनी इंजिनिअरिंग कॉलेजेस काढली. नांदेड आणि नोएडा (उ.प्र.) वगळता उर्वरित ठिकाणी मेडिकल कॉलेजेसही काढली. ठिकठिकाणी माध्यमिक ते पदव्युत्तर अशी विविध शिक्षण देणारे एक संस्थांचे जाळे आपल्या कर्तृत्वाने त्यांनी उभे करून दाखविले. विनाअनुदानित पद्धतीने या शिक्षण संस्था नावारूपाला आणल्या. शैक्षणिक क्षेत्रांत त्यांनी लौकिक मिळविला. सातत्याने वाचन आणि विविध विषयांचा व्यासंग तसेच प्रभावी वक्तृत्त्व, मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषांवरील प्रभुत्त्व, लोकसंपर्क ही त्यांची गुणवैशिष्ट्ये आहेत.

**श्री. भास्करराव खतगावकर :** श्री. भास्करराव बापुराव पाटील खतगावकर यांचा जन्म २३ जुलै, १९४४ रोजी झाला. त्यांनी इंजिनिअरिंगमधील पदवी घेतली आहे. महाराष्ट्र विधानसभेवर ते आमदार म्हणून १९९० ते १९९५ आणि १९९५ ते १९९८ पर्यंत कार्यरत होते. पुढे २० ऑक्टोबर २००४ ते २००९ या कालावधीत आमदार राहिले. १९९१ ते ९३ पर्यंत गृह, सहकार, ग्रामीण विकास आणि पुनर्वसन खात्याचे ते राज्यमंत्री होते. १९९८ ते २००४ पर्यंत ते १२ व्या १३ व्या लोकसभेत खासदार म्हणून निवडले गेले. २००९ साली ते १५ व्या लोकसभेत खासदार म्हणून निवडून आले आहेत. महाराष्ट्र राज्य शुगर फॅक्टरी फेडरेशनचे २००१ ते २००२ पर्यंत ते चेअरमन होते. मार्केटिंग फेडरेशनचे काही वर्षे उपाध्यक्ष होते. जिल्हा सहकारी बँकेचे काही वर्षे चेअरमन होते. स्टेट को. ऑप. बँकेचे डायरेक्टर होते. १९७१ ते १९७६ पर्यंत स्टेट बँक ऑफ हैद्राबादचे डायरेक्टर होते. मराठवाडा ग्रामीण बँक नांदेडची स्पिनिंग मिल येथेही ते डायरेक्टर राहिले. शंकर नगर सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष राहिले. महाराष्ट्र काँग्रेस कमिटीचे २००३ पासून उपाध्यक्ष आहेत. नृसिंह सहकारी सूतगिरणी, खानापूरचे ते चेअरमन आहेत. ते अध्यक्ष असलेल्या गोदावरी-मनार चॅरिटी ट्रस्ट मधून कॉलेजेस व शाळा चालविल्या जातात. अभ्यासुवृत्ती, पक्षीय कामांमध्ये अग्रेसरत्व, सामाजिक कार्यात पुढाकार आणि दाट लोकसंग्रह ही त्यांची वैशिष्ट्ये आहेत.

**श्री. अशोक चव्हाण :** श्री. अशोक चव्हाण महाराष्ट्राचे ज्येष्ठ नेते, माजी मुख्यमंत्री आणि अनेक खात्यांचे केंद्रीय मंत्री राहिलेले कै. शंकररावजी चव्हाण यांचे सुपुत्र. त्यांचे शिक्षण मुंबई येथे झाले. त्यांनी बी.एससी. पदवी भारतीय विद्याभवन या महाविद्यालयातून घेतली. नाशिक मधून त्यांनी एम.बी.ए. ही पदवी प्राप्त केली. वयाच्या २६ व्या वर्षी प्रत्यक्ष राजकारणात सहभागी होण्यापूर्वी युवक आणि विद्यार्थी चळवळीत ते सक्रीय होते. श्री. शंकररावजी चव्हाण व मातोश्री कुसुमताई यांनी त्यांचे आयुष्य संस्कारित केले. शिस्त व अथक काम करण्याची प्रेरणा दिली. १९८५ साली संजय गांधी निराधार योजनेचे ते अध्यक्ष राहिले. १९८७ ते १९८९ याकाळात पर्यावरण विभाग, सार्वजनिक तक्रारी, विभागीय रेल्वे यूजर्स कंसल्टेटिव्ह कमिटी यांचे ते सदस्य होते. महाराष्ट्र राज्य युवक काँग्रेस कमिटीचे १९८६ ते १९९२ या कालावधीत ते आधी सरचिटणीस व नंतर अध्यक्ष होते. १९८७ साली ते नांदेड लोकसभेवर निवडून गेले. १९९१-९२ मध्ये ते सेंट्रल फिल्म सेंसर बोर्डाच्या सल्लागार पॅनलचे सदस्य होते. १९९२ ते १९९८ पर्यंत ते महाराष्ट्र विधानपरिषदेचे सदस्य होते. १९९९ साली ते मुदखेड मतदारसंघातून महाराष्ट्र विधानसभेवर निवडून गेले. २००४ साली याच मतदारसंघातून आमदार म्हणून त्यांची फेरनिवड झाली. श्री. शरद पवार, श्री. सुशीलकुमार शिंदे, श्री. विलासराव देशमुख यांच्या मुख्यमंत्री पदाच्या काळात त्यांना मंत्रिमंडळात सहभागी होण्याची संधी मिळाली. मार्च, १९९३ ते सप्टेंबर, १९९४ मध्ये ते सार्वजनिक बांधकाम, विकास, नगरविकास व संसदीय कार्याचे राज्यमंत्री होते. ऑक्टोबर, १९९९ ते जानेवारी, २००३ पर्यंत ते महसूल आणि राजशिष्टाचार खात्याचे मंत्री राहिले. नोव्हेंबर, २००४ ते ४ डिसेंबर, २००८ या काळात उद्योग, खनीकर्म, सांस्कृतिक कार्य व राजशिष्टाचार खात्याचे मंत्री राहिले. ८ डिसेंबर, २००८ रोजी महाराष्ट्राचे २४ वे मुख्यमंत्री म्हणून त्यांनी शपथ घेतली. २००९ साली ते भोकर मतदारसंघातून विधानसभेवर निवडून आले. त्यानंतर महाराष्ट्राचे २५ वे मुख्यमंत्री म्हणून त्यांची निवड झाली. राजकारणावर पक्की मांड असलेले, सांस्कृतिक व सामाजिक कार्याची मूळातच आवड असलेले, इंग्रजी, मराठी आणि हिंदी भाषांतून प्रभावी वक्तृत्त्व असलेले श्री. अशोकराव चव्हाण यांनी अत्यंत धडाडीने अनेक निर्णय घेतलेले आहेत. नांदेड येथे गुरू-ता-गद्दीच्या काळात ते मुख्यमंत्री होते म्हणूनच केंद्र सरकारकडून भरीव निधी मिळवून देऊ शकले. नांदेड शहराच्या दीर्घकालीन इतिहासात पहिल्यांदाच शहराचा चेहरा मोहरा बदलून टाकण्याचे काम त्यांनी करून दाखविले आहे आणि शहर व जिल्ह्याचा सर्वांगिण विकास घडवून आणला.

ऐतिहासिक महत्त्व असलेल्या नांदेड जिल्ह्यात मुक्तीसंग्राम झाल्यानंतर जे राजकीय नेते उदयाला आले. त्यात भारतीय पातळीवर व राज्यपातळीवर नेतृत्त्व केलेल्या आणि करणाऱ्या नेत्यांच्या कार्याचा थोडक्यात आढावा घेतलेला आहे. काँग्रेस पक्षाचे या जिल्ह्यात नेहमीच वर्चस्व राहिले त्याचबरोबर कम्युनिस्ट, समाजवादी, जनता पक्ष, भारतीय जनता पक्ष, रिपब्लिकन पार्टी, शिवसेना, मनसे या पक्षांचे अनेक कार्यकर्ते विविध पदांवर निवडून आले. जिल्ह्यातील निवडून आलेल्या संसद व विधानसभेतील, लोकप्रतिनिधींची यादी याच गॅझेटिअरमधील प्रकरण ९ 'प्रशासन' मध्ये देण्यात आली आहे. ग्रामपंचायती, पंचायत समित्या, जिल्हा परिषद, नगरपालिका महानगरपालिका या स्थानिक स्वराज्य संस्थांमधून अनेक नेते उदयाला आले.

Maharashtra State Gazetteers

## जिल्ह्यातील वृत्तपत्रांची यादी *

| अ.क्र. (१) | वृत्तपत्राचे/प्रसार माध्यमाचे नाव (२) | संपादकाचे नाव व पत्ता (३) | प्रकाशन स्थळ (४) |
|---|---|---|---|
| १ | दै. श्रमिक एकजूट | श्री. कृष्ण शेवडीकर<br>रामकृष्ण टॉकीजच्या मागे, नांदेड. | नांदेड |
| २ | दै. प्रजावाणी | श्री. शंतनु डोईफोडे<br>औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर,<br>नांदेड. | नांदेड |
| ३ | दै. गोदातीर समाचार | डॉ. रविंद्र रसाळ<br>शिवाजीनगर, नांदेड. | नांदेड |
| ४ | दै. लोकपत्र | श्री. कमलकिशोर नानासाहेब कदम<br>कैलासनगर, नांदेड. | नादेड |
| ५ | दै. रिपब्लिकन गार्ड | श्री. विजय सोनवणे<br>आंबेडकरनगर, नांदेड. | नांदेड |
| ६ | दै. सत्यप्रभा | श्री. ओमप्रकाश चालीकवार<br>गोदावरी कॉम्प्लेक्स, नांदेड. | नांदेड |
| ७ | दै. उद्याचा मराठवाडा | श्री. राम शेवडीकर<br>रामकृष्ण टॉकीजच्या पाठीमागे, नांदेड | नांदेड |
| ८ | दै. तहेलका टाईम्स (उर्दू) | श्री. ताहेर सौदागर<br>देगलूर नाका, नांदेड. | नांदेड |
| ९ | दै. गोदावरी ऑब्झर्व्हर (उर्दू) | श्री. म. अब्दुल मुख्तार आबेद<br>गोवर्धनघाट रोड, नांदेड. | नांदेड |
| १० | दै. नगुषे (उर्दू) | श्री. म. अब्दुल सत्तार आरेफ<br>गोवर्धनघाट रोड, नांदेड. | नांदेड |
| ११ | दै. बहुरंगी वार्ता | श्री. धर्मपाल नरवाडे<br>शिवाजीनगर, नांदेड. | नांदेड |
| १२ | दै. वर्क ए ताजा (उर्दू) | श्री. मोहमद तक्की<br>इतवारा चौक, नांदेड. | नांदेड |
| १३ | दै. सहेर (उर्दू) | श्री. तौफिख मिर्झा<br>मंडई, नांदेड. | नांदेड |
| १४ | दै. समता दर्पण | श्री. हरिभाऊ धोंडिबा मांजरमकर<br>वसंतनगर, नांदेड. | नांदेड |
| १५ | दै. टाईम्स ऑफ गौरव | श्री. विलास वामनराव महाजन<br>वसंतनगर, नांदेड. | नांदेड |

* ही नोंद जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, नांदेड, महाराष्ट्र शासन यांच्याकडून प्राप्त नोंदी आधारे घेण्यात आली आहे.

Maharashtra State Gazetteers

**जिल्ह्यातील वृत्तपत्रांची यादी**–(चालू)

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| १६ | दै. अजिंठा एक्सप्रेस | श्री. दिलीप विनायक शिंदे<br>शिवाजीनगर, नांदेड. | नांदेड |
| १७ | सांज. दै. नगुषे उर्दू | श्री. म. अब्दुल सत्तार आरेफ<br>गोवर्धनघाट रोड, नांदेड. | नांदेड |
| १८ | सांज. दै. नांदेड वार्ता | श्री. प्रदिप अनंतराव नागापूरकर<br>आयटीआयसमोर, नांदेड | नांदेड |
| १९ | सायं. दै. नांदेड सांज | श्री. दिलीप विनायक शिंदे<br>शिवाजीनगर, नांदेड. | नांदेड |
| २० | दै. प्रकरण | श्री. जे. एम. मुदखेडकर<br>नल्लागुट्टा चाळ, नांदेड. | नांदेड |
| २१ | सायं. दै. नांदेड डायरी (उर्दू) | श्री. महमद युसुफ अ. मजिद<br>पिर-बुऱ्हाणनगर, नांदेड. | नांदेड |
| २२ | दै. नांदेड रहेबर (उर्दू) | श्री. शेख प्यार मोहमद<br>वजीराबाद, नांदेड. | नांदेड |
| २३ | सांज. दै. करारनामा | श्री. राजीव भोकरे<br>सोमेश कॉलनी, कलामंदिरच्या मागे,<br>नांदेड. | नांदेड |
| | **साप्ताहिके** | | |
| १ | सा. मराठी स्वराज्य | श्री. आनंद कल्याणकर<br>विष्णू कॉम्प्लेक्स, नांदेड. | नांदेड |
| २ | सा. नंदीग्राम लोकक्रांती वार्ता | श्री. धोडापंत विष्णुपुरीकर<br>यात्री निवासच्या पाठीमागे, नांदेड. | नांदेड |
| ३ | सा. श्रीमंत दर्शन | श्री. चैतन्य कुलकर्णी<br>उदयनगर, नांदेड. | नांदेड |
| ४ | सा. दलित जागृती | श्री. गौतम मांजरमकर<br>बळीरामपूर, एम.आय.डी.सी.<br>एरीया, सिडको. | नांदेड |
| ५ | सा. प्रतोद | श्री. सुधीरचंद्र अंबेकर<br>वजीरबाद, नांदेड. | नांदेड |
| ६ | सा. महाराष्ट्र सांर | श्री. विठ्ठलराव जाधव<br>लेबर कॉलनी, नांदेड. | नांदेड |
| ७ | सा. इर्तेसाम (उर्दू) | श्री. महमद अब्दुल खयुम खादरी<br>गोवर्धनघाट रोड, नांदेड. | नांदेड |
| ८ | सा. जयक्रांती | श्री. केशवराव धोंडगे,<br>मु.पो. बहादरपुरा, ता. कंधार, नांदेड. | नांदेड |

**जिल्ह्यातील वृत्तपत्रांची यादी–**(समाप्त)

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ९ | सा. चक्रीवादळ | श्री. राजेश जळकोटे<br>सिडको, नवीन नांदेड. | नांदेड |
| १० | सा. गोदावरी ऑब्झर्व्हर (उर्दू) | श्री. महमद अब्दुल मुख्तार<br>गोवर्धनघाट रोड, नांदेड. | नांदेड |
| ११ | सा. बालचाल (उर्दू) | श्री. बाबु मौलाना, नांदेड | नांदेड |
| १२ | सा. सिंह गर्जना | श्री. बालाजी मारोती गुंडाळे<br>वसंतनगर, नांदेड. | नांदेड |
| १३ | सा. छावा समाचार | श्री. तानाजी हुस्सेकर<br>शारदानगर, नांदेड. | नांदेड |
| १४ | सा. देवमन समाचार | गोरे, दादऱ्याजवळ, शिवाजीनगर,<br>नांदेड. | नांदेड |
| १५ | सा. रिपोर्ट | श्री. गुणरत्न सदावर्ते<br>सोमेश कॉलनी, नांदेड | नांदेड |
| १६ | सा. क्रांती मशाल | श्री. प्रदीप लक्ष्मण पवळे<br>क्रांती चौक, वसंतनगर, नांदेड. | नांदेड |
| १७ | सा. जनक्रांती | श्री. गंगाधर पटणे<br>विष्णु कॉम्प्लेक्स, नांदेड. | नांदेड |
| १८ | सा. नांदेड रहेबर (उर्दू) | श्री. शेख प्यार मोहम्मद<br>वजीराबाद, नांदेड. | नांदेड |
| १९ | सा. शिक्षण संदेश | श्री. महमद रईसोदिन अन्सारी<br>गोवर्धनघाट रोड, नांदेड. | नांदेड |
| २० | सा. गोदावरी ऑब्झर्व्हर (मराठी) | श्री. महमद अब्दुल मुख्तार आबेद,<br>गोवर्धनघाट रोड, नांदेड. | नांदेड |
| २१ | सा. कंधार वार्ता | श्री. माधवराव बापूराव पवार<br>मु. काटकळबा, ता. कंधार,<br>जि. नांदेड. | नांदेड |
| २२ | सा. लोकोन्नती | श्री. नंदकुमार केशटवार<br>सहयोगनगर, नांदेड. | नांदेड |
| २३ | सा. नांदेडचा फेरीवाला | श्री. सुर्यकांत पटणे<br>विनायकनगर, नांदेड. | नांदेड |
| २४ | सा. गुलाम नायम | श्री. नागोराव पतंगे<br>वसंतनगर, नांदेड. | नांदेड |
| २५ | सा. नांदेड विकास वार्ता | श्री. गोपाळकृष्ण नायर<br>विमानतळरोड, पांडुरंगनगर, नांदेड | नांदेड |
| २६ | सा. रण संग्राम | श्री. भा. ग. देशपांडे<br>चिखलवाडी, नांदेड. | नांदेड |

Maharashtra State Gazetteers

# नांदेड जिल्हा गॅझेटिअर

## प्रकरण १२

## प्रेक्षणीय स्थळे

Maharashtra State Gazetteers

प्रकरण १२

# प्रेक्षणीय स्थळे

## प्रास्ताविक

नांदेड जिल्ह्याला मोठा ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा लाभला आहे. सांचीच्या स्तुपावर नंदगिरी उर्फ नांदेडचा उल्लेख सापडतो. गोदावरीचे नाभीस्थान असलेल्या शंखतिर्थाबरोबरच नांदेड, माहूर व कंधार या स्थानांना पौराणिक परंपराही आहे. या जिल्ह्यात प्राचीन व मध्ययुगीन शिलालेख विपुल प्रमाणात आढळतात. कंधार, होट्टल, अर्धापूर यासारखी स्थाने प्राचीन राजवंशांच्या राजधानीची नगरे म्हणून प्रसिद्धीस आली होती. नांदेड येथील गुरु-ता-गद्दी म्हणजेच सचखंड श्री हुजुरसाहिब अबचल नगर गुरुद्वारा शिख धर्मियांच्या दृष्टीने पवित्र स्थान आहे. याशिवाय कंधार, माहूर व नांदेड येथील किल्ल्यांनी मराठवाड्याच्या मध्ययुगीन इतिहासात महत्त्वाची कामगिरी पार पाडली आहे. किनवट सारखा तालुका आदिवासी बहुल व समृद्ध वनसंपदा असलेला तालुका आहे. तसेच उनकेश्वर इथे उष्णोदकाचे झरेही पर्यटनदृष्ट्या महत्त्वाचे आहेत. मंदिर स्थापत्याच्या दृष्टीने होट्टल, मुखेड, खानापूर, मुक्रमाबाद, येवती, येरगी इथे असलेल्या मंदिर स्थापत्याचा परिचय या प्रकरणात दिला आहे. एकूणच या प्रकरणातून जिल्ह्याचे कालौघात विकसित झालेले व्यक्तिमत्त्व अधोरेखित करण्याचा प्रयत्न केला आहे.

## अर्धापूर

**अर्धापूर** (१९°१५′ उ. ७७°२०′ पू) : अर्धापूर हे तालुका मुख्यालय नांदेडपासून १५ कि.मी. वर वसले आहे. गावाचे एकूण क्षेत्र २,३९२.० हेक्टर एवढे आहे. गावात ग्रंथालय, व्यायामशाळा तसेच मंदिरे, मशिदी, दर्गा, इदगाह वगैरे प्रार्थनास्थळे आहेत. गावाला विहिरी,कूपविहिरी, तलाव, नळयोजना मार्फत पाणीपुरवठा होतो. हे नगर प्राचीन काळी आराध्यपूर म्हणून प्रसिद्ध होते गोदावरीच्या खोऱ्यामध्ये यादव काळात अनेक सामंतांनी आपली सत्ता निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याचे जाणवते. भौगोलिकदृष्ट्या सुरक्षित असलेल्या स्थानावर सत्ताकेंद्र म्हणून ज्या स्थानांचा विकास झाला त्यात अर्धापूर हे एक स्थान होते. यादव सेनानी रट्ट वंशीय बल्लाळ हा सिंघणदेव यादवाच्या काळातील एक महत्त्वकांक्षी सामंत होता. अर्धापूर येथे यादवकालीन मंदिरांचे तथा शिल्पांचे घटक अवशेष दिसतात.

अर्धापूरमध्ये अस्तंगत होत जाणाऱ्या पुरातत्त्व गर्भक्षेत्रात प्रारंभिक ऐतिहासिक काळापासूनचे अवशेष विशेषतः मृद्‌भांडी उपलब्ध झाली आहेत. सातवाहन काळातील सांचीच्या शिलालेखात बौद्ध अनुयायाने दिलेल्या देणगीचा उल्लेख आढळतो. यात अर्धापूरचा उल्लेख अधोपरिक किंवा अधपूरचा रहिवासी असा केला आहे.[१] उच्चार साधर्म्यामुळे हे गाव नांदेड जिल्ह्यातील अर्धापूर असावे असे ठोसरांचे मत आहे.[२] या ठिकाणी सापडलेल्या प्राचीन ऐतिहासिक अवशेषांवरून या निष्कर्षाला पुष्टी मिळते. सातवाहन-वाकाटक काळात नांदेडला वाशिमशी (प्राचीन वत्सगुल्म) जोडणाऱ्या मार्गावरील

१. ठोसर, हरिहर, **हिस्टॉरिकल जॉग्रॉफी ऑफ महाराष्ट्र ॲण्ड गोवा**, दि एपिग्राफीकल सोसायटी ऑफ इंडिया, म्हैसूर, २००४, पृ. ६३.

२. कित्ता.

ते महत्त्वाचे ठिकाण असावे.[३] पुढील काळात विशेषतः यादव काळात अर्धापूर व लहान या ठिकाणांचा मोठ्या प्रमाणामध्ये विकास झाला असावा असे उपलब्ध अवशेषांवरून वाटते.

अर्धापूर येथील प्रमुख अवशेषांमध्ये दोन शिलालेखांचा अंतर्भाव होतो, त्याचा तपशील पुढीलप्रमाणे

**रट्ट बल्लाळाचा शिलालेख[४] :** अर्धापूर मध्ये यादवकालीन दोन शिलालेख सापडले असून त्यापैकी रट्ट बल्लाळाचा शिलालेख (इ.स.११९२) ऐतिहासिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. हा शिलालेख संस्कृत भाषेत व देवनागरी लिपीत आहे. शिलालेखात ¾ घराण्याची व घराण्यातील बल्लाळ या सामंताची प्रथमच ओळख करून दिली आहे. तसेच त्याची वंशावळ दिली आहे. त्यावरून त्याच्या पित्याचे नाव विक्रमार्क तर आजोबांचे नाव देवपाल असल्याचे समजते. यानंतर बल्लाळ व त्याची पत्नी पोम्मलादेवी यांची प्रशंसा केली आहे. त्यानंतर श्रीवत्स या घराण्याची ओळख करून दिली आहे. य घराण्यातील भीम हा बल्लाळाचा मंत्री होता. भीमाचे दोन लहान भाऊ अरसय्या आणि चावुण्ड देखील बल्लाळाच्या सेवेत असावेत असे दिसते. या चावुण्डाने आराध्यपूरात म्हणजेच अर्धापूरात मंदिर बांधून त्यात मल्लीनाथ या देवाची प्रतिष्ठापना केली.

बल्लाळाच्या प्रशस्तीमध्ये त्याला अनेक बिरुदे देण्यात आली आहेत. त्यापैकी सर्वात महत्त्वाची दोन 'मल्लुगी-मंडलीक-राज्य-प्रतिष्टाचार्य' आणि 'यादवराज्य स्थैर्याचार्य' ही आहेत. याचा अर्थ बल्लाळाने यादव नृपती मल्लुगी दुसरा याला त्याच्या राज्याला स्थैर्य मिळावे म्हणून मदत केली असा होतो.

यानंतर मल्लिकार्जून व सिद्धेश्वर या देवांच्या पुजेसाठी दिलेल्या विविध दानांचा उल्लेख आहे. यात दान दिलेली जमीन, अर्धापूर, बारसग्राम, आणि पोहरग्राम या गावांतील आहे. सिद्धेश्वर मंदिरातील दिवा लावण्यासाठी प्रत्येक तेलाच्या घाण्याकडून व पोफळीचे व्यापारी यांच्याकडून एक निष्क व जुनवणी (सध्याचे हिरड जुन्नी) प्रशासन विभागातील प्रत्येक गावातून एक चतुर्थांश निष्क गोळा करावा अशी व्यवस्था केली आहे.

या शिलालेखातील आराध्यपूर हे प्रशस्त प्रासाद, सुंदर मंदिरे व इतर इमारतींचे शहर असल्याचे वर्णन आले आहे. बहुदा बल्लाळाला मुलगा नसावा. परिणामतः यादव नृपती सिंघण दुसरा याने त्याची जमीन अर्धापूरसह यादव साम्राज्याला जोडून घेतली व सर्वाधिकारी लखण पंडित या पदावरील अधिकाऱ्याला प्रशासक म्हणून नेमले.[५] या शिवाय या लेखात 'करडलेय समुद्र' असा तलावाचा उल्लेख आला आहे. त्याचे अवशेष आजही गावाच्या पूर्वेस पहावयास मिळतात.[६]

**यादव नृपती सिंघण दुसरा याचा शिलालेख[७] :** अर्धापूरमधील देशमुख गल्लीमध्ये चौतोंडा गणपती मंदिराजवळ एक शिलालेख असून ही लेखशिळा (१२×३०×२८ सें.मी.) यादव नृपती सिंघण दुसरा याच्या राजवटीतील (इ.स. १२३६) आहे. भाषा मराठी व लिपी देवनागरी आहे. सिंघण दुसरा याचे खूप कमी शिलालेख मराठीत आढळतात. त्यापैकी हा एक आहे. यामध्ये अर्धापूर मधील इंद्रेश्वर,

---

३. कित्ता.

४. श्रीनिवास रित्ती, जी.सी.शेळके, इन्स्क्रिप्शन्स फ्रॉम नांदेड डिस्ट्रीक्ट, यशवंत महाविद्यालय, नांदेड, १९६८, शिलालेख क्र. ४०.

५. हरिहर ठोसर, हिस्टॉरिकल जॉग्रॉफी, पूर्वोक्त, पृ. ४४०.

६. कित्ता.

७. कित्ता.

Maharashtra State Gazetteers

केदारदेव, भीमेश्वर, विश्वेश्वर, नागेश्वर, सकलेश्वर, राजेश्वर, सोमनाथ, नरसिंह, शुभनारायण, विनायक, चंडीकादेवी आणि इतर देवांना एकूण तेहतीस द्रम्म दान दिल्याचा उल्लेख आहे. हे दान सर्वाधिकारी संकण आणि सर्वाधिकारी लक्ष्मणपंडीत या दोन अधिकाऱ्यांनी दिले आहे.

वरील शिलालेखात आढळणारी मंदिरांची यादी यादव काळात अर्धापूरचे एक पवित्र नगर म्हणून असलेले स्थान स्पष्ट करते. यावरून असे सिद्ध होते की, अर्धापूरने प्राचीन काळी भरभराटीला आलेले नगर, व्यापारी केंद्र, पवित्र क्षेत्र तसेच सामंताची राजधानी अशा अनेक भूमिका पार पाडल्या आहेत. चालुक्य-यादव काळात ते कालमुख शैवपंथाचे पीठ होते. आराध्य हे शैव पंथातील एका आम्नायाचे नाव असून त्याचे अनुयायी प्रामुख्याने आंध्रप्रदेशात दिसतात.[८] या पंथाशीही अर्धापूरचा संबंध असावा असे वाटते. किंबहुना या पंथाच्या नामाची उत्पत्ती "आराध्यपूर" या स्थलनामातून झाली असण्याची शक्यताही नाकारता येत नाही.[९]

अर्धापूर या शहराचा जाणीवपूर्वक विकास करताना एका मोठ्या जलाशयाची निर्मिती करण्यात आली होती. या जलाशयाला केंद्र मानून त्याच्या काठाने गावाचा विस्तार झाला होता. याच काळात मोठ्या प्रमाणामध्ये काही मंदिरे, बारवा यांची निर्मिती करण्यात आली होती. अर्धापूर बस स्थानकालगत एका यादवकालीन वितान शिळेवर नंतर निजामशाही कालखंडामध्ये देवनागरी लिपी व मराठी भाषेत एक पथदर्शक लेख कोरून ठेवण्यात आला आहे. या लेखाशिळेवरून तत्कालीन दळणवळणाच्या रूढ मार्गाची माहिती उपलब्ध होते.

**केशवराज मंदिर :** मूळात एका भव्य मंदिराच्या उद्ध्वस्त अवशेषावर किंबहुना अधिष्ठानाच्या एका भागावर एका लहानशा गाभाऱ्यात ही मूर्ती ठेवण्यात आली आहे. मूळ मंदिर पूर्णपणे नष्ट झाले आहे. असे असले तरी मूर्तीवरून एकूण मंदिराच्या शिल्पशैलीची कल्पना केली जाऊ शकते. केशवराज मूर्ती ही काळ्या पाषाणात असून ती १२०×६५×२५ सें.मी. ची आहे. समभंगात उभा असलेला केशवराज चतुर्भूज असून प्रदक्षिणा क्रमाप्रमाणे पद्म, शंख, चक्र, गदा धारण केलेला आहे. तो सालंकृत असून किरीट मुकुट धारण केलेला आहे. प्रभावळीवर दशावतार कोरलेले आहेत.[१०] दशावतराचा क्रम देताना एका बाजूस नृसिंह, वामन, वराह, बुद्ध असा क्रम दाखवला आहे. तर दुसऱ्या बाजूने कलंकी, परशुराम, बलराम आणि राम कोरलेला आहे. तर प्रभावळीच्या मधोमध एकीकडे कच्छ व दुसरीकडे मत्स्य अवतार दाखविलेला आहे. मूर्तीच्या पायाजवळ गरूड आहे व दोन्ही बाजूस परिवार देवता, चवरीधारणी आहेत. एकूणच मूर्तीचे रेखाटन, अलंकरण, तालबद्धता आणि शिल्पांकन रेखीव आणि अप्रतिम आहे.

इ.स. १२३६ च्या शिलालेखात 'सुभग नारायण' मंदिराचा उल्लेख आहे. यादवकाळात सुभग नारायणाचे मंदिर आराध्यपुरात नव्हते. त्यामुळे आज केशवराज मूर्ती म्हणून ओळखली जाणारी ही मूर्ती म्हणजेच सुभग नारायणाची मूर्ती असावी असे काही विद्वानांचे मत आहे.[११]

---

८. काळे भगवान (संपा.), **मराठवाडा काल आणि आज**, ठोसर, हरिहर "प्राचीन मराठवाड्याचे व्यक्तिमत्व," जालना, १९८६, पृ. ६५.

९. कित्ता.

१०. राजन अमिताभ (संपा.) **स्थानिक इतिहास आणि साहित्य : एक शोध नांदेड,** नांदेड जिल्हा संदर्भ ग्रंथ समिती, नांदेड, १९८६, देव, प्रभाकर "स्थापत्य अवशेष", पृ. २७, २८.

११. कित्ता.

याच मंदिराच्या बाहेरील बाजूस जैन तीर्थंकराची पद्मासनात बसलेली एक मोठी मूर्ती आहे. या मूर्ती बरोबरच येथे काही खंडीत शिल्पांचे अवशेष पहावयास मिळतात. गरूडमूर्ती शिल्प असलेली एक वैशिष्ट्यपूर्ण आसनशिळा (पादपीठ) असून या आसनशिळेवर अश्व, गज, सिंह यांचे शिल्प दाखविले आहेत. अर्धापूर येथे स्वतंत्र असे जैन मंदिर असावे. साधारण एक दशकापूर्वी एक जैन सहा बिंब खोदकाम करताना अचानकपणे मिळाले. यादवकाळामध्ये तलावाच्या सभोवताली ४ हेक्टरच्या परिसरात वसाहतीचा विकास झाला होता. एवढ्या क्षेत्रामध्ये प्राचीन व मध्ययुगीन वसाहतीचे अवशेष सापडतात.

एकूणच गावात अनेक शिल्पावशेष, शिवलिंगे, देवळांचे स्तंभ, मूर्ती अवशेष इतस्ततः विखुरलेले आढळतात. शिवपिंडीच्या प्रचंड आकारावरून येथील शिवालयाच्या भव्यतेची कल्पना यावी. त्यामुळे अर्धापूर हे यादव काळातील मंदिर नगर असावे.[१२]

**शिवमंदिर :** केशवराज मंदिराच्या पाठीमागच्या बाजूला एका शिवमंदिराचे अवशेष दिसतात. हे मुळचे त्रिदल पद्धतीचे एक मोठे मंदिर होते. पण आज गावातील लोकांनी केलेल्या बदलांमुळे मंदिराचे मूळ स्वरूप नष्ट झाले आहे. शिवमंदिराचे गर्भगृह व एक उपगर्भगृह शिल्लक आहे. या मंदिराच्या पाठीमागे रट्ट बल्लाळाचा प्रसिद्ध शिलालेख ठेवला आहे, त्याचे वर्णन या आधी करण्यात आले आहे. या त्रिदल मंदिराच्या बाहेरच्या बाजूस काही शिल्पे विखुरलेली आढळतात.

**दर्गाह आसाबे रसूल**[१३] **:** अर्धापूर येथे इस्लामिक राजवटीत जी स्थित्यंतरे झाली, त्यात हे मूळ यादवकालीन स्थान ओस पडले. तथापि तळ्याच्या पाळूवर एक मोठा दर्गा निर्माण झाला. अर्धापूरच्या मध्ययुगीन अवशेषांमध्ये असाब-ए-रसूल दर्ग्याला विशेष महत्त्व आहे. हा दर्गा शहराच्या पूर्वेला आहे. दर्ग्याचे मुख्य प्रवेशद्वार पश्चिमेस आहे. मराठवाड्यातीलच नव्हे तर महाराष्ट्रातील एक प्रचंड कबर या ठिकाणी आढळते. जवळजवळ २९ मीटर लांब एकच कबर आहे. औरंगजेबाने या दर्ग्याला १८ एकर जमीन दान दिल्याची कागदपत्रे आढळतात. निजाम सरकारनेही काही जमिनी इनाम म्हणून दिल्या होत्या. जानेवारी महिन्यात इथे मोठा उरूस भरतो. हिंदू-मुस्लीम तसेच इतर लोक मोठ्या संख्येने भेट देतात.

## उनकेश्वर

**उनकेश्वर :** (उनकेश्वर-ता. किनवट) किनवट तालुक्यातील उनकेश्वर किंवा उनकदेव हे गरम पाण्याच्या झऱ्यांसाठी प्रसिद्ध असणारे ठिकाण तालुका मुख्यालयापासून उत्तरेला ४६ कि.मी. वर पैनगंगा नदीच्या खोऱ्यात वसले आहे. या गावाचा पूर्वी हैद्राबाद संस्थानातील आदिलाबाद जिल्ह्यात समावेश होत होता.

Maharashtra State Gazetteers

या ठिकाणी उनकदेव हे शिवाचे मंदिर आहे. सदर मंदिरात एकूण तीन शिलालेख असून त्यापैकी दोन अलिकडच्या काळातील आहेत, तर एक यादवकाळातील आहे.

**यादवकालीन शिलालेख**[१४] **:** रामचंद्र या यादव नृपतीच्या काळातील हा शिलालेख इ.स. १२८०-८१ या वर्षातील आहे. नागरी लिपीतील व मराठी भाषेतील हा शिलालेख एक महत्त्वाचा

---

१२. राजन अमिताभ (संपा.) **स्थानिक इतिहास आणि साहित्य : एक शोध,** नांदेड, नांदेड जिल्हा संदर्भ ग्रंथ समिती, नांदेड, १९८६, प्रभाकर देव, 'स्थापत्य अवशेष', पृ. २७, २८.

१३. कित्ता, पृ. ३२.

१४. रित्ती श्रीनिवास व शेळके, जी. सी. पूर्वोक्त, शिलालेख क्र. ४२.

शिलालेख म्हणून गणला गेला आहे. या लेखात रामचंद्र यादव, त्याचा मांडलिक भावकदेव व प्रधान हेमाद्री पंडीत[१५] आणि त्यांचा अधिकारी सोमदेव यांचा उल्लेख आढळतो. या शिलालेखात या ठिकाणासंबंधी एक आख्यायिका सांगितली आहे. तिच्यानुसार त्रेतायुगात प्रभु रामचंद्र वनवासात असताना या ठिकाणी आले होते. येथे तेव्हा शरभंग ऋषींचा आश्रम होता. ऋषींवर कृपा करण्यासाठी रामाने गरम पाण्याचा झरा निर्माण केला. तेव्हापासून हे पवित्र स्थान म्हणून ओळखले जाऊ लागले. या ठिकाणी मातापुरच्या (सध्याचे माहूर) सरणुनायकाचा पुत्र मेघदेवाने मंदिर बांधण्यास सुरूवात केली व प्रभु रामचंद्राच्या कृपेने ते बांधून पूर्ण केले. यानंतर मंदिराला मिळालेल्या दानांचा तपशील दिला आहे. त्यामध्ये बोथी, सांगवी तसेच इतर गावातील उद्याने दान दिल्याचा उल्लेख आहे. या शिलालेखात एकूण २० गावांचा उल्लेख आला आहे.[१६]

शिलालेखात आलेल्या आख्यायिकेप्रमाणेच एक आख्यायिका इथे प्रचलित आहे. त्यानुसार हा भूभाग मूळचा दंडकारण्याचा असून ज्या ठिकाणी हल्ली उनकेश्वराचे मंदिर आहे, तेथे पूर्वी शरभंग

१५. हा हेमाद्री पंत म्हणजेच 'चतुर्वर्ग चिंतामणी' या ग्रंथाचा लेखक हेमाद्री हा होय. महादेव व रामचंद्र या यादव नृपतींच्या दरबारात तो प्रधान होता.

१६. उनकेश्वर शिलालेखात उल्लेखिलेली २० गावे पुढीलप्रमाणे :—

| अ.क्र. | शिलालेखातील नाव | सध्याचे नाव | तालुका | जिल्हा |
|---|---|---|---|---|
| १ | माहूर | माहूर-मातापूर | माहूर | नांदेड |
| २ | ओघली | वाघरी | किनवट | नांदेड |
| ३ | करंडी | करंजी | किनवट | नांदेड |
| ४ | काप | काप | किनवट | नांदेड |
| ५ | कुरवली | कुर्ली | किनवट | नांदेड |
| ६ | गुढा | गुढे | किनवट | नांदेड |
| ७ | चिंचवली | चिंचखेड | किनवट | नांदेड |
| ८ | उंबरे | उंबरी | किनवट | नांदेड |
| ९ | जिरवली | जरवली | किनवट | नांदेड |
| १० | तलेशल | तलरी | किनवट | नांदेड |
| ११ | पाटवदे | पाटोदे | किनवट | नांदेड |
| १२ | पिंपळसेंडा | पिंपळशेंडा | किनवट | नांदेड |
| १३ | पिंपळजाई | पिंपळजे | किनवट | नांदेड |
| १४ | बोंथी | बोथ | किनवट | नांदेड |
| १५ | लिंग | लिंगी | किनवट | नांदेड |
| १६ | सापर | खापरी | किनवट | नांदेड |
| १७ | सकरगाव | साखरगाव | किनवट | नांदेड |
| १८ | सांगवी | संगवी | किनवट | नांदेड |
| १९ | सावेरी | सावली | किनवट | नांदेड |
| २० | निंबशेत | निंबायत | किनवट | नांदेड |

(ठोसर, हरिहर **हिस्टॉरिकल जॉग्रॉफी ऑफ महाराष्ट्र ॲण्ड गोवा ग्रंथातील नोंद आधारे)** पृ. २४५, २४६.

ऋषींचा आश्रम होता. हे ऋषी कुष्ठरोगाने पिडीत होते. श्रीरामाने दंडकारण्यात प्रवेश केल्यानंतर अत्री ऋषींच्या आश्रमाला भेट दिली व नंतर विराट नावाच्या राक्षसाचा वध करून तो शरभंग ऋषींच्या आश्रमात आला. तेव्हा शरभंगाने रामचंद्रास सुतीष्ण ऋषींच्या आश्रमात जावयास सांगून स्वतः अग्निकुंडात प्रवेश केला व अग्निकुंडातून दिव्य देह प्राप्त करून ते ब्रह्मलोकात गेले. ऋषींचा आश्रम होता तेथे रामाने उष्णोदकाचे कुंड निर्माण केले.[१७] येथे स्नान केल्यामुळे शरभंग ऋषींच्या रोगाचे निर्मुलन झाले असाही एक प्रवाद आहे.

वर उल्लेखिलेल्या शिलालेखाशिवाय इ.स. १६९९-१७०० या वर्षातील एक शिलालेख आढळला आहे. त्यातही या आख्यायिकेचा संदर्भ आढळतो. त्यानुसार त्रेतायुगात श्रीरामाने शरभंग ऋषींना त्यांच्या वृद्धत्वातून मुक्त करण्यासाठी गरम पाण्याचे कुंड निर्माण केले व शिवमंदिर बांधले. या शिलालेखात पुढे नमूद केल्याप्रमाणे कालांतराने हे मंदिर जीर्ण झाले. तेव्हा प्रभुला (बहुतेक या ठिकाणचा प्रमुख) मंदिराचा जीर्णोध्दार करण्यासंबंधी दृष्टांत झाला. त्यानुसार मंदिराचा जीर्णोध्दार करण्यात आला.[१८] याशिवाय एक इ.स. १९०० मधील शिलालेख असून त्यावेळी या मंदिराचा जीर्णोध्दार कोण्या एका व्यंकटराव देसाई सिंदखेडकर यांनी केल्याचा उल्लेख आहे.

उनकेश्वर मंदिरात शिवलिंग असून उन्हकदेवाच्या लिंगासमोर पूर्व बाजूस वनवासी वेशातील प्रभू रामचंद्रांची कोदंडधारी मूर्ती लक्ष्मण व सीतेसह स्थापन केली आहे तर सभामंडपास लागून दक्षिणेकडील भागात 'शरभंग ऋषींचे आसन' नावाचे ठिकाण असून तेथे ऋषीच्या पादुका कोरल्या आहेत. मंदिरात दर श्रावण सोमवारी व महाशिवरात्रीचे वेळी सात दिवस मोठा उत्सव होतो. त्यावेळी मोठ्या प्रमाणावर भंडारा केला जातो. मंदिराच्या मागच्या बाजूला उंबराच्या झाडाखाली दत्ताची देवळी आहे. येथे दत्त जयंतीचे वेळी मोठा उत्सव होतो. तेव्हा मोठ्या प्रमाणावर अन्नदान केले जाते. मंदिराच्या आवाराबाहेर मारुतीचे देऊळ असून मारुती वज्रासनात दाखविला आहे, अशी नेहमीपेक्षा वेगळ्या धाटणीची मूर्ती आहे. मंदिराच्या आवारात भाविकांसाठी खोल्या बांधल्या असून तेथे राहण्याची सोय होऊ शकते.

मंदिराच्या जवळच उष्णोदकाची दोन कुंडे आहेत. या कुंडातल्या पाण्यात औषधी गुणधर्म असून त्यामुळे त्वचारोग बरे होतात असा समज आहे. त्वचारोगांनी ग्रस्त असलेले लोक कुंडामध्ये स्नान करण्यासाठी येतात. एका कुंडातील पाण्याचे तापमान ४२.२०° सेल्सीअस (१८०° फॅरनहॅटस्) असून त्यात गंधक आढळून येते.[१९] कुंड ३.६५ मी. खोल असून त्यात गरम पाण्याचे नैसर्गिक झरे आहेत. गोमुखातून अतिरिक्त पाणी वाहून नेण्याची सोय केली आहे. स्त्रियांसाठी स्नानाची वेगळी व्यवस्था केली आहे. या कुंडातून पाणी वाहून दुसऱ्या लहान कुंडात साठविण्याची व्यवस्था केली आहे. या ठिकाणी स्नानाची सोय केली आहे. दुसऱ्या गरम पाण्याच्या कुंडात स्नान करायला बंदी आहे. या

---

१७. पुरी, सुनिल **नांदेड जिल्ह्याचे ऐतिहासिक महत्त्व (इ.स. पूर्व ते १३ वे शतक)**, अप्रकाशित पीएचडी प्रबंध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, २०००, पृ. २४८.

१८. रित्ती व शेळके, पूर्वोक्त, शिलालेख क्र. ४७.

१९. नांदेड डिस्ट्रीक्ट गॅझेटिअर, पूर्वोक्त, पृ. ५८५-५८६.

कुंडात असंख्य बुडबुडे दिसतात. तज्ज्ञांच्या मते गंधकाच्या अतिरिक्त प्रमाणामुळे हे बुडबुडे निर्माण होतात.[२०] याशिवाय गावात आणखी काही मंदिरे व मशीद आहे.

## एकलारा

**एकलारा** (ता. मुखेड) : एकलारा मुखेड व देगलूर या रस्त्यावर मुखेडपासून २२ कि.मी. अंतरावर आहे. गावाच्या शेजारी एक टेकडी आहे. गावात प्राचीन अशी दोन महादेव मंदिरे व वीरभद्राचा मठ म्हणून ओळखला जाणारा मठ आहे.

गावात दोन चालुक्यकालीन शिलालेख आढळतात. त्यामध्ये गावाचे प्राचीन नाव एकलगाव असल्याचे समजते. यापैकी पहिला शिलालेख (इ.स. १०४९) सोमेश्वर पहिला याच्या राजवटीतील आहे. या लेखात एकलगावचा मल्लगापुंड याने बांधलेल्या मंदिराला दंडनायक काळीदासय्याचा पुत्र केशीराज व मन्नेय नाकरस याने जमीन व काही रकमेचे दान दिल्याचे नमूद केले आहे.[२१] दुसरा लेखही (इ.स. १०५०) सोमेश्वर पहिला याच्याच राजवटीतील असून एक्कलगावे येथील मल्लगौड याने बांधलेल्या मंदिराला (या मंदिराचा संदर्भ आधीच्या शिलालेखातही आला आहे) एरगे (आधुनिक येरगी, ता. देगलूर) येथील जमीन दान दिल्याचे लेखात नमूद केले आहे.[२२]

गावातील दोन शिलालेखांपैकी एक शिलालेख मंदिराच्या जवळ ठेवण्यात आला आहे. महादेव मंदिर म्हणून ओळखले जाणारे हे शिलालेखातील मल्लेश्वराचे मंदिर असावे. सध्या या मंदिराचा सभामंडप फक्त शिल्लक असून तोही मोडकळीस आला आहे. दुसरा शिलालेख एका झाडाखाली ठेवण्यात आला आहे.

गावातील दुसरे मंदिरही महादेवाचे असून मंदिराच्या बाहेर एक गणेश प्रतिमा ठेवण्यात आली आहे.

याशिवाय गावात एक वीरभद्राचे मंदिर किंवा मठ असून ते नंतरच्या काळातील आहे. मंदिरात वीरभद्राची १.२१ मी. उंचीची मूर्ती आहे. वीरभद्राची यात्रा कार्तिक शु.नवमीला भरते. यावेळी देवाच्या लग्नाचा सोहळा नऊ दिवस चालतो. तसेच यावेळी भंडारा होतो.

## कंधार

**कंधार :** (ता. कंधार, १८°५०′ उ., १०° पू.′) कंधार हे तालुका मुख्यालय नांदेडच्या दक्षिणेस ५२ कि.मी.वर मन्याड नदीच्या उत्तर काठावर वसले आहे. प्राचीन काळी हे नगर राष्ट्रकुट घराण्याची उप राजधानी म्हणून भरभराटीला आले. या ठिकाणी तत्कालीन जैन, बौद्ध व हिंदू शिल्पावशेष तसेच मंदिर अवशेष आजही दृष्टीस पडतात. कंधार हे नगर राष्ट्रकुट काळात एक महत्त्वाचे राजकीय, सामाजिक व धार्मिक केंद्र झाले हे खरे असले तरी कंधारचे प्राचीनत्व राष्ट्रकुट काळाच्याही मागे जाते, हे दर्शविणारे पुरावे सापडले आहेत.

---

२०. कित्ता.

२१. रित्ती व शेळके, पूर्वोक्त, शिलालेख क्र. ४.

२२. कित्ता, शिलालेख क्र. ६.

Maharashtra State Gazetteers

**कंधारची स्थलनाम निश्चिती :** हरिहर ठोसरांच्या मते आनंद नृपती दामोदर वर्मन याच्या मट्टेपद लेखात उल्लेखिलेले कंडारपूर म्हणजेच आजचे कंधार असल्यास या शहराचा इतिहास चौथ्या शतकापर्यंत मागे जातो.[२३] त्यांच्या म्हणण्यानुसार कंडारपूर नावाने ओळखले जाणारे दुसरे ठिकाण अद्यापि माहिती नाही. त्यामुळे त्यांच्या निष्कर्षाप्रमाणे आनंद नृपती कंदारराजा याने वसविलेले 'कंदारपूर' च नंतरच्या शिलालेखांमध्ये 'कंधारपूर' म्हणून उल्लेखिले आहे.[२४] त्याचप्रमाणे नंदीवर्धन शाखेतील वाकाटक नृपती प्रवरसेन दुसरा याच्या पौनी लेखात 'कृष्णालेशालिकटक' मधील अचलपूर येथील जमीन दान दिल्याचा उल्लेख आहे. हे अचलपूर म्हणजे सध्याचे परभणी जिल्ह्यातील असोल असून कृष्णालेशालिकटक हे परभणी-नांदेड या परिसरातीलच एखादे शहर म्हणजेच कंधार असावे असेही मत ठोसर यांनी व्यक्त केले आहे.[२५]

पुढे वेंगीच्या चालुक्य घराण्याच्या शिलालेखांमध्ये चालुक्य विजयादित्य याचे राष्ट्रकुटांशी किरणपुर या ठिकाणी युद्ध झाले असल्याचा उल्लेख आहे.[२६] किरणपूर हे राष्ट्रकुट नृपती कृष्ण दुसरा याचे निवासस्थान असल्याचाही उल्लेख आहे. हे किरणपूर म्हणजेच कंधारपूर आहे असे प्रतिपादन ठोसर यांनी केले आहे.[२७] या पुराव्यांचा पुढे शोध घेतल्यास कंधारच्या इतिहासावर नवीन प्रकाश पडू शकतो.

रित्ती व शेळके यांनी राष्ट्रकुट नृपती कृष्ण पहिला याच्या नावावरून या शहराला कंधारपूर हे नाव प्राप्त झाले असावे असे मत मांडले आहे[२८] तर प्रभाकर देव यांनी उपलब्ध अवशेषांवरून या शहराची स्थापना ८ व्या शतकात झाली असून राष्ट्रकूट नृपती कृष्ण पहिला याने शहराला उपराजधानीचा दर्जा दिला असे प्रतिपादन केले आहे.[२९]

कंधारमध्ये आतापर्यंत दोन शिलालेख सापडले आहेत. त्यापैकी एक शिलालेख आठव्या शतकातील असून एका बुद्ध मूर्तीच्या आसनावर कोरला आहे. त्याचे वाचन पुढीलप्रमाणे :—

ये धर्मा हेतुप्रभवा हेतुं तेषां तथागतोह्यवदत् ।
तेषां च यो निरोधः एवं वादी महाश्रमणः ॥

वरील दोन ओळींत बौद्ध धर्माचे एकूण सार सांगितले आहे.

या शिलालेखामुळे कंधारला राष्ट्रकूट पूर्व इतिहास असल्याचे सिद्ध होते.

---

२३. ठोसर, हरिहर हिस्टॉरिकल जॉग्रॉफी, पूर्वोक्त, पृ. ५०३.
२४. कित्ता, पृ. ५०४.
२५. कित्ता.
२६. कित्ता.
२७. कित्ता.
२८. रित्ती व शेळके, पूर्वोक्त, पृ. xxi.
२९. देव, प्रभाकर **कंधार एक ऐतिहासिक शहर**, पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८५, पृ. २-३.

Maharashtra State Gazetteers

दुसरा शिलालेख १० व्या शतकातील असून कंधारच्या इतिहासासंबंधी तसेच नगर रचनेबाबत भाष्य करणारा हा शिलालेख अतिशय महत्त्वाचा आहे. हन्नेकिरी येथे सापडलेल्या सौंदत्तीच्या रट्टांच्या एका ताम्रपटात कृष्ण तिसरा या राष्ट्रकूट नृपतीचा उल्लेख 'कंधारपूरावराधिश्वर' असा केलेला आढळला. परंतु हा लेख संपादित केलेल्या फ्लीट यांना कंधार या स्थलनामाची संगती लावता आली नाही व त्यांना ते एक कल्पनेतील शहर वाटले.[३०] परंतु पुढे दिनेशचंद्र सरकार व भट्टाचार्य यांना कंधार येथे हा शिलालेख सापडल्यानंतर हन्नेकिरीच्या ताम्रपटातील बिरुदावलीचा अर्थ लागला व कंधारचे ऐतिहासिकत्व निर्विवादपणे सिद्ध झाले.[३१] हा शिलालेख कंधार तालुक्यातील बहादरपूरा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भागात आढळला होता.

**कंधारचा प्राचीन इतिहास :** राष्ट्रकूट काळात कंधार भरभराटीस आले असे जरी असले तरी पुरातत्त्वीय साधनांच्या आधारे शोध घेतल्यास कंधारचे प्राचीनत्व प्रागैतिहासिक काळापर्यंत मागे जाते. मराठवाड्यातील अनेक भागात अश्मयुगीन मानवी वसाहतीचे पुरावे मिळाले आहेत. कंधार येथे या काळातील प्राण्यांचे अवशेष मिळाले आहेत. मन्याड नदीच्या काठावरील सुगाव येथे मध्य व उत्तर पुराश्मयुगीन हत्यारे तसेच प्राण्यांची हाडे मिळाली आहेत. मन्याड व गोदावरीच्या खोऱ्यात असे अनेक प्रागैतिहासिक अवशेष मिळाले आहेत. कंधार हे मन्याडच्या उत्तर किनाऱ्यावर वसले आहे. ही गोष्ट या ठिकाणी विशेष उल्लेखनीय ठरावी. महाभारतातही कंधारचा उल्लेख आढळतो. त्या काळात कंधार दंडकारण्याचा भाग होते. एका दंतकथेनुसार कंधारची प्रतिष्ठापना श्रीकृष्णाने केल्याचे सांगितले जाते.[३२] तर परंपरेने कंधारचा संबंध पांडवांशीही जुळविला आहे. पांडव व द्रौपदीचा विवाह या ठिकाणी झाला असाही एक समज आढळतो. त्यामुळे या शहराचा पांचाळपूरी, पांचाळपूर, पांचाळनगरी असाही उल्लेख आढळतो. दुसऱ्या एका लोकप्रवादाप्रमाणे कंधारची स्थापना कुणार या अर्जुनाच्या वंशजाने केली असेही म्हटले जाते.[३३] परंतु दंतकथांनी कंधारचा संबंध महाभारत काळाशी जोडला असला तरी प्रत्यक्षात तसे पुरावे आढळत नाहीत.

ऐतिहासिक काळाच्या प्रारंभी भारतात सोळा जनपदे अस्तित्वात होती. त्यापैकी दोन दक्षिण भारतात तर चौदा उत्तर भारतात होती. दक्षिण भारतातील अश्मक व मूलक ही दोन राज्ये मराठवाड्यातच होती. यापैकी अश्मक या जनपदात नांदेडचा समावेश होत होता. कंधार व अश्मक जनपदाची राजधानी असलेले पोटन (आजचे बोधन, जि. निजामाबाद, राज्य आंध्रप्रदेश) या दोन ठिकाणांतील अंतर कमी आहे. नंतरच्या काळात नांदेड बरोबरच कंधार हाही नंद व मौर्य साम्राज्याचा भाग होता. कंधार येथे अशोकाचे मूर्तिशिल्प मिळाले आहे. सातवाहन काळात कंधार सातवाहन

---

३०. एडवर्डस्, एस. एम., **बॉम्बे सिटी ॲण्ड आयलंड**, १९७८ (मूळ प्रकाशन १९०९), मुंबई, पृ. ३८४, फुटनोट क्र. ४.

३१. देव, प्रभाकर कंधार एक ऐतिहासिक शहर, पूर्वोक्त, पृ. ३.

३२. कित्ता, पृ. २.

३३. रित्ती श्रीनिवास व शेळके, जी. सी. पूर्वोक्त, पृ. xxi.

साम्राज्याचा भाग असावा. कंधारला लागून असणाऱ्या बहाद्दरपूरा, मानसपुरी इथे काळ्या व लाल रंगाची खापरे सापडली आहेत. सातवाहनानंतर वाकाटक राजवंशाचे राज्य आले. या काळात नांदेड हे विषय मुख्यालय होते व या विषयात कंधारचाही समावेश होत होता. बदामी चालुक्याच्या काळात संपूर्ण मराठवाड्यावर त्यांची सत्ता होती. या काळात नांदेड एक शैक्षणिक केंद्र व विद्वानांचे माहेरघर म्हणून ओळखले जात असे. कंधार परिसरात या काळातील अवशेष आढळतात. याशिवाय चालुक्य कलाशैलीतील मूर्तीशिल्प आढळली आहेत.

**राष्ट्रकूट काळ :** राष्ट्रकूटांचा काळ हा कंधारचा सुवर्णकाळ मानावा लागेल. या काळात कंधारला राष्ट्रकूटांच्या उपराजधानीचा दर्जा मिळाला. काही संशोधकांच्या मते कंधार ही राष्ट्रकुटांची उपराजधानी नसून राजधानी होती. याबद्दल काही ठोस सांगता येत नसले तरी राष्ट्रकूट काळात कंधार हे एक महत्त्वाचे राजकीय केंद्र म्हणून भरभराटीला आले होते, हे नक्की. राष्ट्रकूट सम्राट कृष्ण पहिला (इ.स. ७५७-७७३) याने कंधारची स्थापना केली. डी. सी. सरकार यांच्या मते या नृपतीच्या उत्तर कालखंडात कंधार ही त्याची राजधानी होती.

अमोघवर्ष पहिला (इ.स. ८१४-८७९) व कृष्ण दुसरा (इ.स. ८८०-९१४) या राष्ट्रकुट नृपतींच्या काळात जैनधर्माला राजाश्रय मिळाला. याच्या कारकिर्दीत अनेक जैन मंदिरे बांधण्यात आली. कंधार येथील वीर नारायण हे मंदिर अमोघवर्ष पहिला याने बांधले असावे कारण वीर नारायण हे त्याचे बिरुद होते. कृष्ण दुसरा याच्या काळात कंधारची भरभराट झाली. वेंगीच्या चालुक्य घराण्याचा नृपती गुणग विजयादित्य तिसरा (इ.स.८४४-८८८) यांच्या संघर्षाच्या वेळी चालुक्य नृपतीने कंधार जाळले होते. चालुक्यांच्या शिलालेखांमध्ये या प्रसंगाचे वर्णन तसेच कंधारचे किरणपूर असे नाव आढळते.[३४]

गोविंद चौथा (इ.स. ९३०-९३६) किंवा गोविग्ग याने कंधारला गोविग्ग सोमनाथ या मंदिराची उभारणी केली. पुढे राष्ट्रकूट नृपती कृष्ण तिसरा याचा काळ कंधारच्या दृष्टीने सुवर्णकाळ ठरावा. या नृपतीच्या प्रसिद्ध कंधार शिलालेखात त्या काळातील कंधारच्या नगर रचनेची चर्चा आढळते. तसेच या काळात राबविण्यात आलेल्या लोकोपयोगी योजनांचे दर्शन घडते. त्यात उल्लेखिलेल्या काही वास्तू व मंदिरे ही पूर्वीच्या राजांनी बांधली होती. या शिलालेखाचे विस्तृत वर्णन बहाद्दरपुरा या स्थलाच्या माहितीमध्ये आले आहे. या शिलालेखात 'जगत्तुंग समुद्र' या नावाच्या एका सरोवराचा उल्लेख आढळतो. अनेक राष्ट्रकूट नृपतींनी जगत्तुंग हे बिरुद घेतले होते. हरीहर ठोसर यांच्या मते राष्ट्रकुट कृष्ण दुसरा याने हे सरोवर बांधले असावे व सिंहासनावर येण्या आधीच मरण पावलेल्या आपल्या जगत्तुंग नावाच्या मुलाचे नाव त्याने या सरोवराला दिले असावे.[३५] तर ढवळीकर व जामखेडकर

---

३४. ठोसर, हरिहर **हिस्टॉरिकल जॉग्रॉफी**, पूर्वोक्त, पृ. ५०४; अनिल कठारे यांनी आपल्या **'राष्ट्रकूटकालीन कंधार'** या ग्रंथात या विषयी विस्तृत नोंद केली आहे.

३५. कित्ता, पृ. ३०८.

यांच्या मते हा जलाशय कृष्ण तिसरा याच्या काळात (इ. स. ९३३-९६८) पूर्णत्वास गेला. आजही हे प्राचीन सरोवर शहराच्या उत्तरेस दृष्टीस पडते. अकराव्या शतकातील कृष्ण कंधार या कंधारपुरच्या शासकाच्या शिलालेखावरून कल्याणी चालुक्यांचे मांडलिक म्हणूनही राष्ट्रकूट राज्य करत होते असे दिसते. ठोसरांच्या मते हा कृष्ण कंधार म्हणजे गोविंद चौथा या शेवटच्या राष्ट्रकुट नृपतीचा मुलगा असावा.[३६]

**राष्ट्रकुटांनंतरचा काळ :** राष्ट्रकूटांनंतर कंधार नांदेड परिसरावर वरंगळच्या काकतीयांचे राज्य होते. सुरुवातीला नांदेड हे काकतीयांचे केंद्र होते. पण त्यानंतर हे केंद्र कंधारला हलविण्यात आले. गणपती या प्रसिद्ध काकतीय राजाची मुलगी रुद्रम्मा हिने आपल्या वडीलांच्या नंतर राज्यकारभार हाती घेतला. तिने कंधार येथील किल्ल्याची दुरुस्ती करून घेतली तसेच किल्ल्यात अनेक नवीन वास्तुंची उभारणी केली. काकतीय राजे शिवभक्त होते व त्यांनी कंधार परिसरात अनेक शिवमंदिरे बांधली. यादव काळातही कंधारला अतिशय महत्त्व होते. या काळात कंधार, 'खंधार' म्हणून ओळखले जात होते. सम्राट कृष्णदेव याच्या कान्हेगाव (ता. उदगीर, जि. लातूर) या शिलालेखात कंधार हे देश विभागाचे केंद्र असल्याचे समजते. या देशविभागात बऱ्याच गावांचा समावेश होता. पुढे कंधारचा इतिहास किल्ल्याच्या भोवती फिरताना दिसतो.

**मध्ययुगीन कंधार :** खिलजी घराण्यातील अलाउद्दीन खिलजी हा इ.स. १२९६ मध्ये दिल्लीचा सुलतान झाला. दक्षिणेकडे साम्राज्याचा विस्तार करण्यासाठी त्याने मलिक काफूरला पाठविले. काकतीयांची वारंगळ येथील राजधानी जिंकण्याच्या हेतूने निघालेल्या मलिक काफूरने वाटेत कंधारचा किल्ला जिंकून घेतला. खिलजी साम्राज्यात कंधार परगणा या विभागाचे मुख्य केंद्र झाले. खिलजीनंतर दिल्लीवर तुघलक घराण्याची सत्ता प्रस्थापित झाली. या काळात बिदर हे त्याचे मुख्य केंद्र तर बिदर प्रांतात असलेले कंधार हे प्रमुख लष्करी ठाणे होते. मुहम्मद बीन तुघलकाने कंधार किल्ल्यावर नसरत सुलतान याची किल्लेदार म्हणून नेमणूक केली. त्याने मुहम्मद तुघलकाविरुद्धच बंडाचे निशाण फडकावले. त्यामुळे मुहम्मद तुघलकाने त्याची हकालपट्टी केली व त्याच्या जागेवर किल्लेदार म्हणून मलिक सैफुद्दिन खान याची नेमणूक केली. मलिक सैफुद्दीन याने किल्ल्याच्या तटबंदीची दुरुस्ती केली तसेच पूर्वेकडील बुरुजाचे बांधकाम केले. यानंतर इक्राजची किल्लेदार म्हणून वर्णी लागली. इ.स. १३४८ मध्ये मुहम्मद तुघलकाच्या काळात सैफुद्दीन रफाई उर्फ हाजी सरवर मकदुम सैया या नावाच्या अवलियांचे कंधार इथे आगमन झाले. कंधार इथेच त्यांचा १६ रजब ३६ हिजरी या दिवशी इंतखाम झाला. कंधारमध्ये त्यांचा बांधलेला दर्गा हा येथील ऐतिहासिक वास्तुंमध्ये महत्त्वपूर्ण मानला जातो.

तुघलकानंतर कंधार बहमनी सुलतानांच्या ताब्यात गेले. त्यांनी इ.स. १३४७ ते इ.स. १५२६ या कालखंडात दक्षिणेत राज्य केले. या काळात कंधारचा समावेश बिदर प्रांतात किंवा तरफ मध्ये होत होता. याच काळात कंधारला इस्लामी मदरसा सुरू झाला. यामुळे अभ्यास केंद्र म्हणून कंधारला महत्त्व प्राप्त होऊ लागले. बिदर तरफेतील एक परगणा म्हणून कंधारची बाजारपेठ भरभराटीला आली. कंधार येथे बिदर प्रांतातील मोठे लष्करी ठाणे होते व हुसेन गुरशास्प याच्या ताब्यात हे ठाणे होते. इ.स.१४६३ ते १४८२ या काळात महमदशहा तिसरा हा बहमनी राज्याचा सुलतान होता. त्याचा

३६. कित्ता, पृ. ५०५.

वजीर म्हणजे इतिहासात प्रसिद्ध असणारा महमूद गावान होय. त्याने बहमनी राज्यातील मूळ चार प्रांतांची विभागणी आठ विभागात केली. यावेळी कंधार व नांदेडचा समावेश माहूर प्रांतात करण्यात आला. महमूद गावानचे मुख्यालय बराच काळ कंधारच्या किल्ल्यात होते. पुढे बहामनी साम्राज्याचे विघटन होऊन पाच शाह्यांचा उदय झाला. इ.स. १४९२ मध्ये कासिम बरीद इ ममालिक याने बहमनी सुलतान महमदशहा तिसरा याच्या विरोधात जाऊन राज्याची स्थापना केली. त्याच्या नावावरून बरीदशाही म्हणून ओळखल्या जाणाऱ्या राज्याचा कंधार एक भाग होता. या काळात किल्ल्याची तटबंदी पुन्हा उभारण्यात आली.

यानंतर अहमदनगरची निजामशाही व बिदरची बरीदशाही यांच्यात करार होऊन कंधार निजामशाहीच्या ताब्यात गेले. या काळात कंधार एक जिल्ह्याचे ठिकाण व प्रांत होते. पुढचा इतिहास म्हणजे कंधारवर सत्ता प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या शाह्यांच्या आपापसातील युद्धाचा इतिहास होय. १६०० साली मुघलांनी अहमदनगर जिंकले व निजामशाहीचा ताबा घेतला. परंतु निजामशाहीतील काही सरदारांनी मुघलांविरुद्धचा लढा सुरू ठेवला. त्यापैकी महत्त्वाचे सरदार म्हणजे मलिक अंबर व शहाजी भोसले. यानंतर मलिक अंबरने किल्ल्यावर पुन्हा एकदा १६०२ साली सत्ता प्रस्थापित केली पण ती अल्पकाळच टिकली. शेवटी १६३७ मध्ये कंधार मुघलांच्या ताब्यात गेले. कंधारमध्ये मुघल काळात अनेक विकासविषयक कामे झाली. बागबगीचे, पाण्याचा हौद व कारंजे निर्माण करण्यात आले. बहादुरखान या किल्लेदाराने बहादुरपूरा वसाहतीचा विकास केला. त्याच्या नावावरून ते गाव बहादरपुरा म्हणून ओळखले जाऊ लागले.

मुघलांच्या नंतर कंधारवर हैदराबादच्या निजामाचे राज्य प्रस्थापित झाले. या कालखंडात कंधार हे एक जहागिरीचे ठिकाण होते. गोपालसिंग गौड कंधारवाला हे येथील जहागिरदार. निजाम उल्क-मुल्क (मीर कमरुद्दीन) याने दक्षिणेत स्वतंत्र राज्याची घोषणा केल्यानंतर त्याने गोपालसिंगाला परगणा कंधार हे ठिकाण जहागिर म्हणून दिले. गोपालसिंगाच्या निधनानंतर त्याचा पुत्र अजयसिंग हा जहागिरदार झाला. पुढे एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत कंधार गोपालसिंग कंधारवाला याच्या वंशजांनी राज्य केले.

कंधारचे जुनै वैभव मिरवणारी काही स्मारके व अनेक मूर्ती शिल्पावशेष व मंदिरांचे घटक अवशेष आजही विखुरलेल्या अवस्थेत आढळतात. या मध्ये सगळ्यात महत्त्वपूर्ण स्मारक म्हणजे कंधारचा प्रसिद्ध किल्ला.

Maharashtra State Gazetteers

## कंधार किल्ला

उत्तर, दक्षिण व पश्चिम अशा तिन्ही बाजूने नैसर्गिक टेकाडांनी वेढलेला हा भूभाग मन्याड नदीच्या काठी आहे. मांजरेच्या खोऱ्यात वसलेला हा किल्ला कंधार, मानसपुरी, बहादरपूरा गावांच्या सरहद्दीवर आहे. त्याला भूईकोट किल्ला म्हणता येईल.

नांदेड जिल्हा मुख्यालयापासून ५५ कि.मी. च्या अंतरावर तर नांदेड-लातूर या राज्यमार्गावरील लोहा या स्थानकापासून पूर्वेस १५ कि.मी. अंतरावर किल्ला आहे. बहादरपूरा ग्रामपंचायतच्या सरहद्दीत असलेल्या या किल्ल्यास जाण्यासाठी पक्का रस्ता आहे.

एकूण कंधार परिसराच्या संदर्भामध्ये राष्ट्रकूट व त्यानंतर काकतीय, यादव राजवंशांच्या हालचालींचे उल्लेख मिळतात. प्रत्यक्ष मध्ययुगामध्ये आज दिसणारा किल्ला अस्तित्त्वात आला असला तरी या परिसरातील एक महत्त्वाचे सत्ताकेंद्र म्हणून कंधारचे स्थान राष्ट्रकूट काळापासून सलगपणे कायम होते. मध्ययुगीन कालखंडात दख्खनवर अलाउद्दीन खिलजीच्या स्वाऱ्या सुरू झाल्या. त्यातील मलिक काफूरच्या एका स्वारीत कंधार किल्ल्याचा पाडाव झाला. कंधारपूर नवीन राजवटीत परगणे कंधार झाले. पुढे इ.स.१३२७ मध्ये महंमद तुघलकाने हा किल्ला ताब्यात घेतला. त्यांच्या बिदर तरफेतील कंधार हे प्रमुख लष्करी केंद्र झाले. किल्ल्याचा किल्लेदार म्हणून नसरत सुलतान याची नेमणूक झाली. बारा वर्षे किल्ल्यावर देखरेख केल्यावर त्याच्या मनात बंडाचे विचार आले. त्यामुळे सुलतान महंमद तुघलकाने त्याच्याऐवजी मलीक सैफ्फुद्दीन खान याची किल्ल्यावर नेमणूक केली. त्याने किल्ल्याच्या पूर्वेकडील बुरुज बांधला व तटबंदीची दुरुस्ती केली.

कालांतराने किल्ला बहमनींच्या ताब्यात गेला व मलीक सैफ्फुदुल्ला याची कंधारचा किल्लेदार म्हणून नेमणूक करण्यात आली. या काळात किल्ल्यावर काही इमारती बांधण्यात आल्या व तळ्याला तटबंदी करण्यात आली व इदगाह बांधण्यात आला. इदगाह आजही चांगल्या अवस्थेत आहे. बहमनी काळात कंधारचा किल्ला राजकीय संघर्षाचे केंद्र बनला होता. बहमनींचा प्रसिद्ध वजीर महमूद गवान याचे मुख्यालय बरीच वर्षे किल्ल्यात होते. या काळात खिलजी-बहमनी संघर्ष सुरू होता. इ.स. १४२९ मध्ये किल्ल्याच्या परिसरात खिल्जी-बहमनी संघर्ष झाला. पुढे बहमनी राजवटीत कासीम बेग तुर्क बरीद याने कंधारची जहागिरी मिळवली. त्याने आपल्या जहागिरीचा विस्तार केला व कंधारचा कारभार स्वतंत्रपणे बघावयास सुरुवात केली. परंतु काही दिवसातच दिलवरखाँ हबशीने किल्ल्यावर हल्ला केला व कासीम बेग तुर्क बरीदला पळ काढावा लागला. परंतु त्याने परत बळ एकवटले व किल्ला ताब्यात घेतला. पुढे बहमनी राज्यात एक लढवय्या सेनापती म्हणून प्रसिद्ध झालेल्या कासीम बेगने आपले मुख्य ठाणे कंधार किल्ल्यातच ठेवले. नेमाजी पंडीत या नावाचा दिवाण त्याच्या पदरी होता. या नेमाजी पंडीताने किल्ल्यात काही इमारती बांधल्या. बुरुज बांधले गेले. किल्ल्यातील अनेक अवशेष हे १६ व्या शतकालीन बांधकामाचे आहेत. बरीद घराण्याची सत्ता किल्ल्यावर चाळीस वर्षे राहिली.

बहमनी राज्यात फूट पडल्यानंतर अहमदनगर, गोवळकोंडा आणि बिदर या सत्ताकेंद्रांमध्ये सतत संघर्ष चालू होताच. अहमदनगरच्या निजामशाहीने वर्चस्व प्रस्थापित करण्यात यश मिळवले. हैदर सुलतान आणि मिर्जा यादगीर यांच्या देखरेखीखाली कंधार येथील सैन्य व किल्ला अधिक भक्कम बनले. सतराव्या शतकात किल्ला मुघलांच्या ताब्यात गेला. मलिक अंबरने किल्ला टिकवण्यासाठी जीवाचे रान केले. इ.स. १६३१ मध्ये किल्ल्याला मुघल सैन्याने १९ दिवस वेढा घातला. वेढा यशस्वी झाला व किल्ल्यावर मुघलांचे वर्चस्व प्रस्थापित झाले.

मलीक अंबरच्या काळात किल्ल्यात अंबरी बुरुज तसेच एक दर्गा व मशीद बांधण्यात आली. याविषयी माहिती देणारे हिजरी १००४ मधील शिलालेख किल्ल्यावर आहेत. मुघल राजवटीत

३७. देव, प्रभाकर कंधार, पूर्वोक्त, पृ. २०.

३८. कित्ता, पृ. २१; प्रभाकर देव, **हेरिटेज नांदेड**, इंटॅक चाप्टर नांदेड, नांदेड, २००८, प्रथम आवृत्ती, पृ. ६२.

सरफराजखानाने आणखी एक मशीद बांधली. या काळात किल्ल्यावर अनेक तोफा आल्या. त्यापैकी काही तोफा आजही किल्ल्यावर ठेवल्या आहेत.

मुघल काळात किल्ल्यात बागबगीचे, रंगमहाल, लालमहाल बांधले गेले. रष्क-ए- कश्मीर या बागेचा उल्लेख हिजरी १०९५ च्या शिलालेखात आढळतो. किल्ल्याचा कारभार पाहणाऱ्या अनेक किल्लेदारांनी किल्ल्यात विविध बांधकामे केली.

नंतरच्या काळातील आठवणीत राहणारा संघर्ष म्हणजे मुघल-मराठा संघर्ष. सन १६८०-९० च्या दरम्यान काही लढाया येथे झाल्या. इ.स.१७०३ मध्ये गाझीउद्दीन फिरोज जंग या सुभेदाराने वऱ्हाड व तेलंगण या दोन सुभ्यांवर लक्ष ठेवणे सोईचे जावे म्हणून आपला मुक्काम या किल्ल्यातच ठेवला होता.

हैद्राबादच्या निजामाच्या राज्यस्थापनेनंतर कंधार किल्ल्याचा इतिहास गौड घराण्याशी जोडला गेला. निजामाने परगणे कंधारचा व पर्यायाने कंधारच्या किल्ल्याचा कारभार गौड घराण्याच्या स्वाधीन केला. अनेक वर्षे तो याच घराण्याच्या ताब्यात होता. पुढे १८५० साली कंधार किल्ल्याचा शेवटचा किल्लेदार व जहागिरदार गुलाबसिंग मृत्यु पावला व या घराण्याचे महत्त्व संपले.

**किल्ल्याचे वर्णन :** कंधार किल्ल्याचा विस्तार जवळ जवळ २४ एकर आहे. या २४ एकराभोवती प्रचंड कोट बांधलेला असून संपूर्ण किल्ल्याभोवती ३०.४८ मी. रुंदीचा खंदक आहे. या खंदकाला लागून असलेली किल्ल्याची भिंत १२ मी. उंचीची आहे. खंदकात काही जीवंत झरे असल्यामुळे खंदक नेहमीच पाण्याने भरलेला असतो. पाण्याची पातळी सामान्यतः ३.६५ मी. ते ४.२६ मी. असते. किल्ल्यात दोन तटबंदी आहेत.

किल्ल्यात सर्वात प्राचीन अवशेष म्हणून येथील राणी महालसमोरील बारव दाखवता येते. यादवकालीन म्हणता येईल अशी ही बारव नंतरच्या राजवटीत हौद व कारंजी निर्माण करून काही परिवर्तन करून पुन्हा उपयोगात आणली. कंधारच्या किल्ल्यातील सध्या अवशेषरुप असलेल्या बहुतेक सर्वच इमारती या मध्ययुगीन कालखंडातील आहेत. याच काळात येथील अनेक बुरुज, महाल व दरबार बांधले गेले. या विषयीची माहिती देणारे शिलालेख किल्ल्यात आहेत. यापैकी बहुतांश पर्शियन व काही देवनागरी आहेत.

**किल्ल्याचे प्रवेशद्वार :** किल्ल्यात प्रवेश करण्यापूर्वी ३०.४८ मी. रुंदीचा खंदक पार करावा लागतो. यावर अलिकडील काळात कच्चा रस्ता बांधला आहे. किल्ल्याचे लोहबंदी उर्फ जिन्सी दरवाजा हे एकच प्रमुख प्रवेशद्वार आहे. अन्य स्थानावरून आत जाता येत नाही. पण आणीबाणीच्या काळात किल्ल्यातून बाहेर पडता येईल अशा १२ चोरवाटा आहेत. त्या खंदकात मिळतात. या सर्व वाटाच्या पुढे आणि मुख्य लोहबंदी प्रवेशद्वारापुढे एक जिव्हा (दरवाजा दिसणार नाही अशी बांधलेली भिंत) आहे.

प्रमुख प्रवेशद्वारासमोर मच्छली दरवाजातून किल्ल्याची प्रथम तटबंदी ओलांडता येते. या नंतर परकोट आणि त्यापुढे मुख्य किल्ला आहे. यात प्रवेश करण्यासाठी महाकाली दरवाजा उर्फ रंगीन दरवाजा आहे. यानंतर राजबाग स्वार गेट व दरबारे आम मधील प्रवेशद्वार आहेत.

Maharashtra State Gazetteers

**तटबंदी :** किल्ल्यास नैसर्गिक टेकाडांचे दोन्ही बाजूने संरक्षण आहे. तर एकीकडून मन्याड नदी वाहते आहे. खंदकात सतत पाणीपुरवठा करणारा एक राष्ट्रकूट कालीन जलाशय किल्ल्याच्या वरील भागात निर्माण केलेला आहे. किल्ल्यास दुहेरी तटबंदी असून प्रथम तट १२ मी. उंचीचा आहे. परकोटापासून दुसरा तटही तेवढ्याच उंचीचा आहे. तटबंदी मजबूत दगडी बांधणीची आहे. प्रथम तटासाठी वापरलेल्या दगडी शिळा साधारण आकाराच्या आहेत. तटाच्या बांधकामात केवळ दगड व चुन्याचा वापर झाला आहे. प्रथम तटास १८ बुरुज आहेत. या बुरुजाचे आकार अंतरकोनी आहेत हे विशेष. किल्ला अतिशय चांगल्या अवस्थेत आहे. तटबंदीलगत असलेल्या खंदकाचे बांधकाम अजूनही चांगले पक्के आहे.

**किल्ल्याचे बुरुज :** किल्ल्यास दुहेरी तटबंदी आहे. दुसऱ्या आतील तटाला १७ बुरुज आहेत. बुरुजाच्या ठिकाणी याची उंची वाढलेली असून त्या ठिकाणी तोफा ठेवलेल्या आहेत. प्रमुख बुरुजात महाकाली उर्फ धनबुरुज, शहाबुरुज, नांदेडी बुरुज, लक्ष्मण बुरुज, बालाहिसार बुरुज हे प्रमुख आहेत. यातील शहाबुरुज हा सर्वाधिक उंच (१६.७० मी.) असून त्यावर अरेबिक आणि फारसी भाषेतील एकूण ३ शिलालेख आहेत. हा बुरुज प्रवेशद्वाराच्या डाव्या बाजुला आहे. शहाबुरुज इब्राहीम खानाने बांधल्याचे शिलालेखावरून समजते. याच इब्राहीम खानाने इब्राहीमी बुरुज बांधल्याचेही कळते. तर अरबी बुरुजात सर्वात मोठी तोफ आहे. तटापेक्षा बुरुजाची उंची जास्त आहे व काळाच्या गरजेनुसार विटांचे बांधकाम करून ती वाढविण्यात आल्याचे जाणवते.

**रंगीन दरवाजा :** १६ व्या शतकात हे भव्य प्रवेशद्वार उभारण्यात आले असून शहाबुरुज व धनबुरुज हे याच्या दोन्ही बाजूस आहेत. या दरवाजाचे प्रवेशद्वार २.६० × ४.६० मी. आकाराचे आहे यात असलेल्या धनबुरुजावर एक झरोका बांधलेला आहे. प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूस ओवऱ्या आहेत. यावरील रंगकामामुळेच त्यास रंगीन दरवाजा म्हणतात. विविध भौगोलिक नक्षी व सुरुच्या झाडाची चित्रे येथे रंगवलेली होती. काही अंशी ती आजही टिकून आहेत.

**व्याघ्रद्वार उर्फ राजा बागस्वार गेट :** ही वास्तु किल्ल्याच्या जवळपास केंद्रस्थानी उभी असून हा दरवाजा एक स्वतंत्र वास्तु म्हणून अभ्यासता येतो. याची निर्मिती महंमद तुघलक याच्या काळात किंवा बहमनीच्या प्रारंभिक काळात म्हणजे चौदाव्या शतकाच्या प्रारंभिक दशकात झाली असावी. ही वास्तु पूर्णपणे एकटाकी आहे. त्यात कुठल्याही अन्य वास्तु अवशेषाचा पुन्हा उपयोग केलेला नाही. हे भव्य प्रवेशद्वार बांधताना कमानीच्या वर दर्शनी भागावर हिरवट रंगातील दगडावर वाघ (व्याघ्र) कोरून लावले आहेत, तर कमानीच्या केंद्र चिरा किंवा कि-स्टोन वर शंख व त्रिशुल कोरले आहेत. त्यावर नंतर चुन्याचा गिलावा केला आहे. दरवाज्यात अत्यंत चांगली दगडी फरसबंदी केली आहे. हे गेट निर्माण झाल्यानंतर किल्ल्याच्या अन्य वास्तुंची उभारणी झाली.

मच्छली दरवाजा हा वरील दोन्ही दरवाजाच्या तुलनेत उत्तर कालीन वाटतो. यावर १७ व्या शतकातील एक अरेबिक शिलालेख असून तो तीन ओळीचा आहे.

कंधारच्या किल्ल्यातील सध्या अवशेषरूप असलेल्या बहुतेक सर्वच वास्तु या मध्ययुगीन कालखंडातील आहेत. याच काळात येथे अनेक बुरुज, महाल व दरबार बांधले गेले. या विषयीची माहिती देणारे शिलालेख किल्ल्यात आहेत. किल्ल्यातील बांधकामात प्राचीन वास्तूच्या अवशेषांचा उपयोग नवीन बांधकामासाठी करण्यात आलेला दिसतो. किल्ल्याच्या मुख्य तटात देवनागरी संस्कृत शिलालेख प्रणालात उलटा बसवला आहे. तर अनेक चंद्रशिला, स्तंभ यांचा उपयोग किल्ल्याच्या बांधकामात विशेषतः बुरुजाच्या उभारणीत झालेला दिसतो.

**लाल महाल व दरबार महाल** :- किल्ल्यात लाल महाल व दरबार महाल वास्तु आहेत. लाल महाल २६.२० मी. × १८.५० मी. आकाराच्या जोत्यावर उभा आहे. याच्या समोर एक मोठा पाण्याचा हौद व कारंजा आहे. उंच चौथऱ्यावर असलेल्या या वास्तुच्यापुढे अन्य दोन लहान हौद असून त्यात प्रत्येकी तीन कारंजी आहेत. हौद आयताकृती (९.४ × २.५० मी.) आहेत. या वास्तु स्थापत्याचा विचार करता, सर्व बाजूंनी प्राकार ओवऱ्या विकसित केलेला आराखडा (Lay out) पाहिला म्हणजे याचे स्थापत्य मुघल काळाला जवळचे वाटते. याचा काळ १७ वे शतक असावा. लाल महालाला लागूनच दरबार महाल आहे. दोन्ही महालांमध्ये कोरीव कामाचे अवशेष आढळतात.

**किल्ल्यावरील माची :** किल्ल्यास धनबुरुजावरून टेहळणी करणारी बाल्कनी आहे. तर कंधार किल्ल्यात मच्छली गेट आणि मोमीन दरवाजा याच्यामध्ये असलेल्या बुरुजालगत अंबारखाना आहे. या दोन मजली वास्तुवर एक बाल्कनी किंवा छत्री उभारली आहे. हे किल्ल्यातील सर्वाधिक उंच असे टेहळणी केंद्र आहे. या दोन मजली वास्तुस अंबारखाना म्हणतात.

**राणी महल :** किल्ल्याच्या पूर्व उत्तर भागात राणीमहल नावाची वास्तु आहे. या दोन मजली वास्तुत स्नानगृह असून यात गरम व थंड पाणी साठविण्याची व्यवस्था आहे. शौचकूपपण आहेत. यात असलेली सांडपाण्याची निचरा व्यवस्था भूमिगत असून वैशिष्ट्यपूर्ण वाटते. या शिवाय स्वतंत्र स्वयंपाकगृह (मुदपाकखाना) आहे. यास खंदकाच्या बाजूने एक मोठी बाल्कनी आहे. तर येथून शहाबुरुजापर्यंत जाणारा मार्ग आहे. या वास्तुच्या प्रवेशद्वाराच्या कमानीवरील छतावर रंगीत नक्षीकाम होते.

**शिशमहल :** ही दोन मजली वास्तु असून त्यात असलेल्या विविध लहान मोठ्या आकाराच्या कोनाड्यामुळे ते आकर्षक वाटते. त्यातच एक कारंजा व ज्यावर सतत पाणी पडत असेल अशी चादर आहे. या महालावर राजपूतकाळशैलीला जवळचे असे चुन्यात कोरलेले व्याल आहेत. महालातील भिंतीवर कोरीव काम आहे.

याशिवाय कसबनमहल, दरबारेखास, सुभेदारीमहल या उल्लेखनीय वास्तु आहेत.

**लष्करी वास्तु :** यात उल्लेखनीय असे बारूद कोठार आहे. यामध्ये मोठाले हॉल असून त्याच्या छतास अर्धडोमाकृती असे घुमट आहेत. हे फारसे उठावात नसून बसके आहेत. तसेच त्याच्या छतावर व बाजूने पाणी खेळविले आहे. ज्यामुळे ही वास्तु थंड राहते. ही वास्तु निजामशाहीकालीन असावी.

Maharashtra State Gazetteers

याशिवाय घोड्याचा पागा (तबेला) आहे. तर प्रत्येक प्रमुख बुरुजावर तोफांच्या वेगवेगळ्या दिशांनी मारा करणाऱ्या जागा आहेत. तटास झरोके ठेवण्यात आले आहेत. आतल्या तटास कोठार व तुरुंग बांधलेला आहे.

**धार्मिक वास्तु :** किल्ल्यात इब्राहिम आदिलशहा आणि मलिक अंबर यांच्या काळात बांधलेली मशीद आहे. तसेच राजाबाग स्वार या सुफिचा चिल्ला आहे.

**तोफ :** किल्ल्यातील प्रचंड मोठी तोफ, अंबारी तोफ, अंबारी बुरुजावर ठेवण्यात आली आहे. अंबारी बुरुज मलिक अंबरने बांधल्याचे सांगितले जाते. किल्ल्यावरील हे सर्वात उंच ठिकाण. या बुरुजावर उभे राहिले की सर्व किल्ल्याचा विस्तार, तटबंदी, बुरुज आणि संरक्षण व्यवस्था लक्षात येते. या तोफेसारख्या अनेक तोफा पूर्वी किल्ल्यावर असाव्या. आज मात्र मोठी अशी ही एकच तोफ आहे. किल्ल्याच्या मध्यभागी लाल महालाच्या समोरील भागात बारूदखाना आहे. किल्ल्यात तेथे मोठमोठे तोफगोळे आढळतात. किल्ल्यात इतरत्रही असे तोफगोळे दिसतात.

**बारादरी शहा बुरुज :** लाल महालाच्या उत्तरेला बारादरीचे अवशेष आहेत. ही बारादरी मध्ययुगीन काळात बांधली गेली. बारा कमानी असलेली वास्तु म्हणून याला बारादरी असे म्हणतात.

किल्ल्यातील सैन्याला लागणारे धान्य दळण्यासाठी किल्ल्यातच एक प्रचंड जाते होते. हे जाते व धान्याचे कोठार आवर्जून बघण्याजोगे आहे. बैल किंवा कैदी लावून हे जाते ओढले जात असावे. शिवाय कंधारच्या परिसरात सापडलेले अनेक प्राचीन शिल्पावशेष आज किल्ल्यात आणून ठेवले आहेत. मानसपुरी येथे सापडलेल्या प्रचंड क्षेत्रपालाच्या मूर्तीचे अवशेष आहेत. आपल्या प्रचंड आकारापुढे ते लक्ष वेधून घेतात. त्याशिवाय जैन मूर्ती, गणेश आणि गज शिल्प आहेत. या साऱ्या शिल्पांवशेषांवर राष्ट्रकूटांचा प्रभाव ठळकपणे जाणवतो.

**वैशिष्ट्यपूर्ण पाणीपुरवठा योजना**[३९] **:** कंधार किल्ल्यातील मध्ययुगीन पाणीपुरवठा व्यवस्था उल्लेखनीय आहे. पाणीपुरवठ्यासाठी दोन मार्ग (व्यवस्था) कार्यरत होते. किल्ल्याबाहेरील तलावातून पाईपलाईनद्वारे किल्ल्यात विविध ठिकाणी पाणी खेळविले गेले. हे पाणी खापरी पाईप मधून येई. त्यासाठी आवश्यक त्याठिकाणी उच्छवास केंद्र (टॉवर) बांधले होते. तर या पाण्याच्या आधारे लालमहलमधील सर्व कारंजे, शिशमहल मधील कारंजे व बारादरी मधील कारंजे, मशिदीमधील कारंजे चालत असत. ही व्यवस्था मलिक अंबर काळातील पाणीपुरवठा व्यवस्थेला जवळची होती.

पाणीपुरवठ्याचा दुसरा मार्ग म्हणजे किल्ल्यातील यादवकालीन बारव हा होता. या बारवेवर नंतरच्या काळात नव्याने विविध पातळीवर काही हौद बांधले गेले. विशेष म्हणजे बारवेच्या मध्ये ४.४० मी. लांब व ७५ सें.मी. रुंद अशी एक वैशिष्ट्यपूर्ण चादर तयार करण्यात आली. ज्यावरून सतत पाणी सोडलेले असे. मलिक अंबरच्या काळात या व्यवस्थेचा विकास झाला असावा तर पुढे

३९. अ. शं. पाठक, **मराठवाडा एक शोध**, सुमेरू प्रकाशन, डोंबिवली, २०१०, पृ.

मुघल कालखंडात याच बारवेपुढे दोन मजली बारादरी आणि त्यावर दोन कारंजे निर्माण करण्यात आले.

याशिवाय पारस बावडी नावाने ओळखली जाणारी एक विहिर किल्ल्यात मध्ययुगीन काळात बांधण्यात आली. त्यावर एक मोठा हौद तयार करण्यात आला होता आणि या उंचावर असलेल्या जलकुंभातून किल्ल्यात मुघल काळात पाणीपुरवठा करण्यात आला. किल्ल्यातील बागा याच विहिरीवर वाढत होत्या. या शिवाय दुधबावडी, शक्करबावडी, ताडबावडी या विहीर होत्या.

**शिलालेख :** कंधार किल्ल्यात विविध काळातील राजवटीची साक्ष देणारे असे देवनागरी लिपी, संस्कृत भाषांमधील तीन आणि अरबी व फारसी भाषेतील एकूण लहानमोठे २२ शिलालेख आहेत. यात किल्ल्याच्या तटबंदीवरील पोलाद दरवाजावरील शिलालेख, महंमद तुघलक कालीन लेख, इब्राहिम आदिलशहा दुसरा व मलिक अंबरचा बारादरीवरील लेख, किल्ल्यातील सौंदर्याविषयीचा "रश्के-कश्मीर" नावाने ओळखल्या जाणारा शिलालेख उल्लेखनीय आहेत.

कंधार किल्ल्यात शासनाच्या पुरातत्त्व विभागाने जतन व संशोधनविषयक मोठे काम केले आहे. वेळोवेळी करण्यात आलेल्या या जतन व साफसफाईविषयक कामातून हे स्पष्ट झाले आहे की, आज उभे असणारे स्मारक हे प्रामुख्याने तेराव्या शतकानंतर विकसित झाले व एकोणीसाव्या शतकापर्यंत नांदेलेल्या विविध राजवटींनी आपल्या गरजांप्रमाणे त्यात वेळोवेळी आवश्यक ते बदल केले. विशेषतः आज दिसणारी स्मारकाची पातळी ही आतील वास्तुंचा उपयोग आणि जलःनिसारणाचा प्रश्न सोडविण्यासाठी जाणीपूर्वक वाढविण्यात आली.

**कंधार मधील प्राचीन जलव्यवस्थापन :** प्राचीन जलव्यवस्थापन हा एक स्वतंत्र अभ्यासाचा विषय आहे. इ.स.६ व्या शतकापासून तलाव, बारव, विहीर, पोखरणी, आड यांची निर्मिती करण्यात आली. वाढत्या मानवी वस्तीसाठी पाण्याचा शोध घेऊन या प्रकारे पाण्याची सोय करण्यात आली. भारतासारख्या हंगामी पावसाळा असणाऱ्या देशात विहीर किंवा बारव बांधणे पुण्यकर्म समजले जाई. त्यामुळेच ठिकठिकाणी बारवा बांधल्या गेल्या व त्यातून बारव स्थापत्य हे शास्त्र उदयाला आले. प्राचीन नगर म्हणून विकास पावलेल्या कंधार परिसरातही जलव्यवस्थापनाचे अनेक नमुने पहावयास मिळतात.

**जगत्तुंग समुद्र :** भारताला व पर्यायाने महाराष्ट्राला जलव्यवस्थापनेची मोठी परंपरा आहे. इथल्या पुरातत्त्वीय व शिलालेखीय पुराव्यांवरून निर्माण केलेल्या कुंड, बारव, विहीर, पुष्करणी व त्यांचे अनेक उपप्रकार या कृत्रिम जलस्त्रोतांची माहिती मिळते. चंद्रगुप्त मौर्य (इसवी सन पूर्व ३२४-२९८) याच्या कालखंडात बांधला गेलेला गिरनार (राज्य-गुजरात) येथील सुदर्शन तलाव याचे एक आदर्श उदाहरण ठरावा.

कंधार येथे स्थित राष्ट्रकूटकालीन जगत्तुंग समुद्र हा तलाव महाराष्ट्राच्या इतिहासाचा मानदंड ठरावा. जगत्तुंग समुद्र हा एकमेव असा तलाव आहे, जो नऊशे वर्षांपासून आजही उपयोगात आहे.

Maharashtra State Gazetteers

कंधारच्या शिलालेखात जगत्तुंग समुद्राचा उल्लेख आढळतो. कृष्ण दुसरा याने पाणीपुरवठ्याची एक कायमची व्यवस्था व्हावी या दृष्टीने या तलावाची निर्मिती केली. हरिहर ठोसरांच्या मते जगत्तुंग हे नाव कृष्ण दुसरा याच्या अकाली गेलेल्या मुलाचे असावे. या जलाशयाचा उपयोग नगराला तसेच शेतीसाठी पाणीपुरवठा करणे याबरोबरच किल्ल्याभोवतीच्या खंदकात पाणी सोडले जाऊन किल्ल्याचे संरक्षण व्हावे या साठी केला जात होता.

**तलावाचे वर्णन**[४०] **:** शहराच्या उत्तरेकडे हा तलाव स्थित आहे. सध्या दिसणाऱ्या तलावक्षेत्रापेक्षा पूर्व मध्ययुगीन काळात याचा विस्तार मोठा होता. उपलब्ध पाणलोट क्षेत्राची क्षमता लक्षात घेऊन याची निर्मिती करण्यात आली. पाणलोट क्षेत्राच्या तीन बाजूंस टेकड्या तर मुखाशी दरी आहे. त्याला लागूनच टेकडी आहे. ही टेकडी नैसर्गिक बांधाचे काम करते. त्यामुळे मन्याड नदीकडे जाणारे पाणी अडवले जाते. तसेच किरोज, गोळेगावकडे दरीतून जाणारे पाणीही साठवले जाते. पुलेमान टेकडी आणि लिंबाची वाडी इथून येणाऱ्या नाल्यास हत्ती नाला म्हटले जाते. हत्ती नाल्याचे पाणी अडविण्यासाठी मातीचा बंधारा बांधण्यात आला आहे. बंधाऱ्याची लांबी ८३० मी. आहे. तर रुंदी ८ मी. आहे. याची तंत्रशैली यादवकाळाशी साम्य ठेवून आहे. बांधकामाच्या या तंत्रामुळे भिंतीमध्ये पाण्याचा दाब सहन करण्याची क्षमता निर्माण झाली.

हा बंधारा दक्षिण-उत्तर आहे. बंधाऱ्याला झडपा असणारे दरवाजे आहेत. मुख्य दरवाजा बंधाऱ्याच्या अग्नेयास आहे. कामाई मंदिरापासून २३५ मी. वर एक व २८५ मी. वर दुसरे अशी दोन बहीर्द्वारे (out lets) आहेत. त्यापैकी एक बंद आहे. तलावाला लागून दोन समोरा समोर असणाऱ्या टेकड्यांवर मंदिरे होती. आजही त्यांचे अवशेष पहावयास मिळतात. बंकेश्वर मंदिराच्या समोर जगत्तुंग समुद्राच्या खालच्या बाजूला बांधलेले सर्वेश्वर मंदिर होते.

जगत्तुंग समुद्र ज्या ठिकाणी अर्धचंद्राकृती वळण घेतो त्या ठिकाणी बांधाच्या एका बाजूला मुख्य वस्ती आहे. तेथे तलावात प्रवेश करण्यासाठी काही घाट बांधले आहेत. हे घाट पुढीलप्रमाणे, तुंबिका घाट, चौडा घाट, गणेश घाट, जरी घाट, भोई घाट या घाटांना ३ ते ५ मी. रुंद पायऱ्या आहेत. तुंबिका व भोई घाट समोरासमोर आहेत. प्रत्येक घाटातून प्रवेश करताना दोन हत्तीच्या प्रतिमा ठेवण्यात आल्या होत्या. आज त्याचे अवशेष दिसतात.

**तलावातील कुंड :** जलाशयात जाणाऱ्या मुख्य प्रवाहाच्या वायव्येस अमृतकुंड आहे. ते १०.५० × १२.७ मी. आकाराचे आहे. बांधाच्या पूर्वेकडे बंकेश्वर मंदिराच्या समोर दोन कुंड आहेत. त्यापैकी एकाला बालाजीचा झरा म्हणतात. बहिर्द्वाराच्या समोर जलाशयात दोन बुरुज आहेत. बुरुजांच्या समोर दोन मोठ्या विहिरी आहेत. जलाशयापासून काही अंतरावर रामकुंड व सीता कुंड अशी दोन कुंडे आहेत. या कुंडांना प्राचीन काळी धार्मिक महत्त्व असावे आणि भाविकांची व यात्रेकरुंची सोय व्हावी म्हणून कुंडांची अशी रचना केली असावी. रामकुंड २.४० मी. उंच व ९.९० मी. लांबी रुंदीचे चौरस

---

४०. पाठक, अ. शं. 'जगत्तुंग समुद्र : राष्ट्रकुटांची एक निर्मिती', **संशोधक**, धुळे, १९९१. वर्ष, ५९, अंक-२, पृ. ११ ते २२,

Maharashtra State Gazetteers

आकाराचे आहे. याला १.५५ मी. उंचीची स्वतंत्र संरक्षक भिंत उभारली असून कुंडापर्यंत जाण्यासाठी उत्तर व दक्षिण बाजूने प्रवेश ठेवले आहेत.[४१]

**जलाशयाचा इतिहास :** राष्ट्रकूट नृपती कृष्ण तिसरा याने जलाशयासाठी योग्य ठिकाणाची निवड केली. जलाशयाच्या कडेला मृदा संधारणासाठी पिंपळ, गोरखचिंच या सारखे वृक्ष लावले. नगराच्या इतिहासात जलाशयाचे जतन करणे व गाळ उपसणे या दृष्टीने काही प्रयत्न केल्याचे आढळते. मध्ययुगीन काळात कमीत कमी दोन वेळा तरी गाळ उपसण्याचे काम करण्यात आले होते. ११ व्या शतकात या परिसरात मोठ्या प्रमाणावर पुष्प वाटिकांची निर्मिती करण्यात आली. त्यासाठी लागणारे पाणी या जलाशयांतून कालवा पद्धतीने पुरविण्यात आले. तारीख-इ-कंधारमध्ये वर्णन आल्याप्रमाणे जलाशय निर्मितीच्या जवळ जवळ ४०० वर्षांनंतर जलाशयाची दुरुस्ती करण्यात आली. त्यावेळी मुख्य दरवाजाची उंची वाढविण्यात आली. दोन बुरुज बांधण्यात आले.

अठराव्या शतकात कंधारच्या गौड वंशीय शासकांनी जलाशयाच्या पाळूलगत असलेल्या कामाई मंदिराच्या समोर असलेल्या जलकुंड श्रृंखलेची नव्याने दुरुस्ती केली. ईशान्येला बांधाचे रक्षण व्हावे म्हणून नवीन भिंत बांधण्यात आली. मुख्य दरवाज्याची उंची वाढविण्यात आली. तरीही गाळ साठल्यामुळे जलाशयाची खोली कमी झाली होती. जलाशयाच्या काठावर हाजीसय्या दर्गा आहे. येथे मुख्य निर्गमन मार्ग बांधण्यात आला. याच्या सुरूवातीस सहा मीटर खोल दगडी हौद आहे. त्यात एक विभाजक भिंत आहे. वेगवेगळ्या पातळीवरून या हौदात येणारे पाणी नियंत्रित केले जात असे व ते सांडव्यात सोडण्यात येत असे. हा सांडवा चाळीस मीटरपर्यंत भूमीगत असून तो हाजीसय्या दर्ग्याच्या वास्तुखालून बाहेर पडतो. नगराला शुद्ध पाणीपुरवठा होण्यासाठी जलाशयाच्या प्रवाहालगत नैऋत्य भागात नवरंगपुऱ्याजवळ एक जलकुंड श्रृंखला निर्माण करण्यात आली होती. त्यामुळे पाणी गाळण पद्धतीने शुद्ध होण्यास मदत होत असे. या जलकुंड श्रृंखलेच्या प्रारंभी एक दरवाजा होता. येथून सोडलेले पाणी पहिल्या कुंडातून पुढील चारही कुंडांतून नियंत्रित करून फिरविण्यात येत असे. या चारही जलकुंडांत मिळून अकरा मोऱ्या होत्या. पहिले जलकुंड आच्छादीत होते. मुख्य जलकुंडातून पाणी सोडताना पाण्याच्या प्रवाहात उतरून लाकडी दट्ट्यांच्या मदतीने पाणी नियंत्रित केले जात असे. हे काम अत्यंत कुशलतेने करावे लागत असल्यामुळे हे कौशल्यपूर्ण काम करणाऱ्या व्यक्तीस 'निरडी' म्हणून ओळखले जात होते.

थोडक्यात राष्ट्रकूट काळातील हा जलाशय राष्ट्रकूट काळापासून एक हजार वर्षांच्या जलव्यवस्थापनाचा इतिहास सांगतो.

आज राष्ट्रकुटांचा जगत्तुंग सागर मालगुजारी तलाव, मानसपुरी, म्हणून ओळखला जातो. लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, नांदेड यांच्यातर्फे जलाशयाचे व्यवस्थापन पाहिले जाते. दहा पंधरा वर्षांपूर्वीपर्यंत १०० हेक्टर जमीन जलसिंचनाखाली आणणे शक्य झाले होते. परंतु आज मात्र कालव्याकडे केलेल्या दुर्लक्षामुळे फार कमी जमीन सिंचनाखाली आहे. जर जलाशयातील गाळ उपसला

४१. पाठक, अ. शं. **महाराष्ट्रातील बारव स्थापत्य,** मराठवाडा संशोधन मंडळ, लातूर, २००१ पृ. ४३.

Maharashtra State Gazetteers

व जलाशय आणि कालवा पद्धतीत सुधारणा घडवून आणल्या तर आजही या जलाशयाचा उपयोग या भागातील पाण्याची गरज भागविण्यासाठी होऊ शकतो.

या दोन प्राचीन स्मारकांबरोबरच कंधारच्या प्राचीन व मध्ययुगीन इतिहासाचा वारसा सांगण्याऱ्या अनेक वास्तु, इमारती व अवशेष कंधारमध्ये सर्वत्र आढळतात.

**कंधारमधील शिल्पवैभव :**

राष्ट्रकुटांनी कंधार परिसरात काही मंदिरे बांधली होती. कृष्ण तिसरा याच्या शिलालेखात पुढील बारा मंदिरांचा उल्लेख आढळतो. (१) मंडलसिद्धीविनायक, (२) कामदेव, (३) श्री कालप्रिय, (४) सगर्वेश्वर, (५) बंकेश्वर, (६) वीरनारायण, (७) श्री कृष्णेश्वर, (८) क्षेत्रपाल, (९) छल्लेश्वर, (१०) गोजिग्ग सोमनाथ, (११) तुंबेश्वर, (१२) तुडिगेश्वर. यापैकी काही मंदिरे आजही अस्तित्वात असून उपलब्ध अवशेषांवरून तसेच शिलालेखातील वर्णनावरून त्यांचे स्थान पक्के करता येऊ शकते. परंतु दुर्दैवाने बरीच मंदिरे केवळ अवशेषरूपाने राहिल्यामुळे त्यांच्या स्वरूपाबद्दल केवळ अंदाज बांधता येतो.[४२]

**श्री नगरेश्वर मंदिर :** हे प्राचीन शिवमंदिर शहराच्या मध्यभागी आहे. हे मंदिर उत्तराभिमुख आहे. मंदिर प्राचीन असले तरी त्याचा जीर्णोद्धार आधुनिक पद्धतीने केल्यामुळे मूळ स्वरूप समजून येत नाही. मंदिरास पूर्व व पश्चिम दिशेस प्रवेशद्वारे आहेत. गर्भगृहात शिवलिंग आहे. मंदिराचे बांधकाम दगडी तर शिखराचे बांधकाम विटांचे आहे. गाभाऱ्यासमोर पूर्वी भव्य सभामंडप असावा. सध्या आधुनिक पद्धतीचा सभामंडप आहे. मंदिर परिसरात गजानन महाराजांचे तसेच गणपतीचे मंदिर आहे. येथे दसरा, दिवाळी, शिवरात्र, श्रावण महिना यावेळी भाविक दर्शनासाठी गर्दी करतात.

**रामेश्वर मंदिर :** शहराच्या दक्षिणेला तुंगार गल्लीत हे मंदिर आहे. हे मंदिर पूर्वाभिमुख असून गाभाऱ्यात शिवपिंडी आहे. मंदिराला शिखर असून आधुनिक पद्धतीने बांधलेल्या सभामंडपात पाषाणात कोरलेला नंदी आहे. गाभाऱ्याच्या बाहेरील भिंतीवर असणाऱ्या कोनाड्यांमध्ये विठ्ठल, गणपती, ज्ञानेश्वर यांच्या मूर्ती आहेत. काही वर्षांपूर्वी या मंदिरात माई नावाची साध्वी राहत होती. तिच्यावरून या मंदिराला माईचे रामेश्वर मंदिर म्हटले जाते. सभामंडपात माईच्या पादुका आहेत. शहरातील प्रमुख मंदिरांमध्ये या मंदिराची गणना होते. दरवर्षी मंदिरात भागवत सप्ताह, श्रावण महिन्यात अभिषेक पूजा व इतर धार्मिक कार्यक्रम होतात.

**श्री सिद्धेश्वर मंदिर :** हे प्राचीन शिवमंदिर जोशी गल्लीत जमिनीच्या पातळीपासून १.५२ मी. खोल असलेल्या भागात आहे. मंदिर उत्तराभिमुख आहे. गाभाऱ्यात शिवपिंडी आहे. मंदिरावरील शिखर नष्ट झालेले आहे. मंदिराच्या सभामंडपात सध्या दोन गणेश प्रतिमा आहेत. एक वैशिष्ट्यपूर्ण मातृदेवतेची मूर्ती असून ती प्रभावळयुक्त आहे. तिच्या एकूण चार हातांपैकी वरील दोन हातांत पाशांकूश आहेत.

---

४२. कठारे अनिल यांच्या **राष्ट्रकूटकालीन कंधार**, कल्पना प्रकाशन, नांदेड, २००५ पहिली आवृत्ती, या ग्रंथात या मंदिरांची विस्ताराने नोंद घेण्याचा प्रयत्न केला आहे. सुनिल पुरी यांच्या प्रबंधात याविषयी तपशीलात चर्चा केली आहे.

**शिवेवरचा गणपती :** शिवेवरचा गणपती या नावाने ओळखला जाणारा हा गणपती कंधारच्या दक्षिणेस कंधार घोडज सीमेवर आहे. गणपतीची मूर्ती अतिशय भव्य असून १.७० मी. उंच, १.४० मी. रुंद आहे. हा गणपती शेंदूरचर्चित आहे. या गणपतीला साधु महाराजांचा गणपती असेही म्हटले जाते. कारण सध्याच्या काळात या गणपतीची स्थापना कंधार शहरातील एक संत साधुमहाराज यांनी केली आहे. त्यावरून सदर नाव पडले. कंधार शिलालेखातील मंडल सिद्धिविनायक या मंदिरातील ही गणपतीची मूर्ती असावी. राष्ट्रकुटांनी या मंदिरास दिलेल्या दानाचा उल्लेख आढळतो. या शिवाय शहरात अनेक गणेश मंदिरे आहेत.

राष्ट्रकूट कालीन अनेक शिल्पावशेष कंधार परिसरात विखुरलेल्या अवस्थेत आढळतात. यापैकी काही शिल्पावशेष कंधार किल्ल्यात तर काही बहादूरपूरा येथील शांतीघाट येथील राष्ट्रकूट भवनात ठेवले आहेत.

**विष्णु प्रतिमा :** कंधार किल्ल्याच्या परिसरात खोदकाम करताना ही मूर्ती सापडली. मूर्ती काळ्या पाषाणाची असून मूर्तीच्या प्रभावळीवर मध्यभागी कीर्तीमुख असून दोन्ही बाजूला दशावतार कोरले आहेत. मूर्ती सालंकृत आहे. मूर्तीच्या पायाजवळ चवरीधारिणी तसेच विष्णूचे वाहन गरुड यांच्या प्रतिमा अंकित केल्या आहेत. केशवराज या नावाने ओळखली जाणारी ही मूर्ती पूर्वी किल्ल्यात ठेवली होती.

**अर्धनारी नटेश्वर :** शिव व पार्वती यांचे एकत्रित रूप साकारणारी ही मूर्ती शांतीघाट येथील अतिथीगृहात ठेवली आहे.

**चामुंडा मूर्ती :** ही मूर्ती भंग पावलेल्या अवस्थेत आहे. ही अष्टभूज प्रतिमा साधारणपणे १३७ सें.मी. उंचीची आहे. तिने नर मुंडाचा मुकुट व नरमुंडाच्या माळा धारण केल्या आहेत. हातात कपाल, नाग, नरमुंड अशी आयुधे आहेत. शरीर अस्थिपंजर असून पोटावर विष्णू आहे. चेहरा उग्र असलेली ही मूर्ती सध्या राष्ट्रकुट भवनातील प्रांगणात ठेवली आहे.

**महिषासूरमर्दिनी :** शिवाजी कॉलेज परिसरातील ही मूर्ती बी. जी. देशमुख यांनी आपल्या ग्रंथात ही मूर्ती प्रथम प्रकाशात आणली. १२१ से.मी. उंचीच्या या मूर्तीचा डावा पाय महिषासूरावर आहे. खालच्या डाव्या हाताने तिने महिषासूराचे केस घट्ट पकडले आहेत. तिच्या डाव्या हातात ढाल आहे तर उजव्या हाताने तिने महिषासुराचा वध केला आहे. याशिवाय इतरही काही महिषासूर मर्दिनीच्या प्रतिमा सापडल्या आहेत. त्यापैकी काही शांतीघाटावरील राष्ट्रकुट भवनात ठेवल्या आहेत.

**सप्तमातृका**[४३] **:** मांडीवर मूल घेतलेल्या सप्तमातृकांच्या प्रतिमाही कंधार येथे सापडल्या आहेत. या परिसरात कौमारी व वैष्णवी यांच्या भव्य प्रतिमा सापडल्या आहेत.

---

४३. कंधार शिवारात असलेल्या जोगिणीची पट्टी या शेतातून रस्त्यासाठी खोदकाम करताना सप्तमातृका मूर्ती आढळून आल्या. यापैकीच या मूर्ती असाव्या. इथे एक कुंडही आहे.

राष्ट्रकुट भवनाच्या प्रांगणात ठेवलेली कौमारीची मूर्ती अर्धपर्यांकसनात आहे. तिच्या जवळ असणाऱ्या मयुर या वाहनामुळे ती कौमारी आहे हे कळून येते. तिचा खालचा उजवा हात वरद मुद्रेत आहे तर वरच्या हातात शक्ती आहे. वरच्या डाव्या हातात धनुष्य आहे. डाव्या मांडीवर बसलेल्या मुलाला तिने डाव्या हातात घेतले आहे. मूर्ती सालंकृत असून तिने मुकुट, कंकणे, माळा, नुपुरे व कुंडले धारण केली आहेत.

**वैष्णवी :** पायाशी गरुड कोरलेली ही वैष्णवीची मूर्ती अर्धपर्यांकसनात आहे. मूर्तीच्या वरच्या उजव्या हातात चक्र तर डाव्या हातात शंख आहे. खालचा उजवा हात वरद मुद्रेत आहे. खालच्या डाव्याने मुलाला कवटाळले आहे. ही मूर्ती अतिशय चांगल्या अवस्थेत आहे.

**लज्जागौरी :** लज्जागौरीचे विस्तिर्ण शिळेत कोरलेले हे शिल्प मन्याड नदीच्या पात्रात सापडले आहे. शिल्प शिरोहिन व नग्न आहे. ती उत्तानपाद मातृदेवता असावी.[४४] प्रथमच लज्जागौरीचे एवढे मोठे शिल्प (१०६ × ७६ सें.मी.) सापडले आहे. रा. चिं. ढेरे यांनी या देवीचा संबंध शक्तीपीठाशी तसेच सर्जनाशी लावला आहे. राष्ट्रकूट काळातील हे शिल्प वैशिष्ट्यपूर्ण आहे.

याशिवाय कंधार परिसरात अनेक नागदेवतेची शिल्पेही आढळली आहेत.

**बौद्ध अवशेष :** शहरात आठव्या शतकातील एक भव्य बुद्धप्रतिमा असून तिच्या पादपीठावरील शिलालेखाचा उल्लेख याच प्रकरणात अन्यत्र आला आहे. यावरून इथे बौद्ध विहार असावा असे वाटते. सध्या ही मूर्ती नव्याने बांधलेल्या बौद्धविहारात ठेवली आहे. ही बुद्धाची प्रतिमा आठव्या शतकातील म्हणजे राष्ट्रकूट कालखंडातील आहे. या प्रतिमेची उंची ९१ सें.मी. असून बुद्धाच्या दोन्ही बाजूला त्याचे सेवक, घोडा व हत्ती यांचे अंकन केले आहे. बुद्ध एका उंच आसनावर ध्यान मुद्रेत आहे. त्यांच्या मस्तकाच्या पाठीमागे प्रभामंडल आहे व आसनावर शिलालेख कोरला आहे. याशिवाय कंधारच्या दक्षिणेस घोडज रस्त्यावर बौद्ध शिल्पावशेष विखरुन पडलेले आहेत. त्यामध्ये गौतम बुद्धाच्या तीन प्रतिमा सापडल्या आहेत पण त्यांना चुना लावल्याने तपशील कळत नाही. याशिवाय बौद्ध धर्माचे अनेक भग्नावशेष येथे सापडले आहेत.

याशिवाय कंधार येथील बसस्थानकाजवळ असणाऱ्या माळटेकडीवरही बौद्ध अवशेष पहावयास मिळतात. तसेच कंधार-घोडज रस्त्यावरील बाळांतवाडी येथेही बौद्ध व हिंदू शिल्पावशेष आढळतात.

**जैन शिल्पावशेष :** राष्ट्रकूट काळात जैनधर्माला राजाश्रय मिळाला होता. त्याची परिणिती कंधार येथे जैन मंदिरे बांधण्यात झाली. आजही या परिसरात ठिकठिकाणी आपल्याला जैन शिल्पावशेष आढळून येतात.

याशिवाय राष्ट्रकूट भवनात इतरही काही जैन प्रतिमा आढळून आल्या आहेत. त्यापैकी जैन सहस्त्रबिंब व सर्वतोभद्र प्रतिमा विशेष उल्लेखनिय आहेत. शहरातील भवानी मंदिराच्या प्रवेशद्वाराच्या उजव्या बाजूस तीर्थंकर प्रतिमा आहेत. येथे एका दगडी स्तंभावर तीन बाजूवर तीर्थंकराच्या प्रतिमा आहेत. वर्धमान महावीराची एक वैशिष्ट्यपूर्ण प्रतिमा आढळली असून ती काळ्या पाषाणात आहे.

---

४४. पुरी, सुनिल, पूर्वोक्त, औरंगाबाद, २०००, पृ. ३१५.

ही प्रतिमा ध्यानमुद्रेत आहे. प्रतिमेच्या दोन्ही बाजूस महाविरांचे लांच्छन सिंह आहे. तसेच हत्तीमुख आहे.

शहरातील कमठेश्वर पार्श्वनाथ मंदिरात अनेक प्राचीन जैनप्रतिमा आढळून येतात. राष्ट्रकूट काळातील ऋषभनाथ, पार्श्वनाथ व शांतीनाथ आदींच्या प्रतिमा या ठिकाणी आहेत.

**मध्ययुगीन स्मारके :**

**यमुना मशीद :** गाझीपुऱ्यात यमुना मशीद नावाची एक मशीद आहे. सिद्दी अब्दुलाच्या पदरी असलेल्या कोणा एका यमुना नावाच्या नर्तकीने ही मशीद बांधल्याचे सांगितले जाते.

**मदीना मशीद :** तळ्याच्या काठावर असलेल्या या मशीदीचे बांधकाम मौलाना हाफीज अहमद खुदबूद्दीन खतीब यांनी करून घेतले व समोर ओटा बांधला. त्यांनी पूर्वीची मशीद दुरुस्त करून घेतली.

**राजा गोपालसिंग गौडाची समाधी** : तळ्याच्या काठी बालाजी मंदिराजवळ साधुमठात गोपालसिंग गौड या कंधारच्या जहागिरदाराची समाधी आहे. गौड घराण्यातील इतरांच्या समाध्याही याच परिसरात आहेत.

**हाजी सरवर मकदूम सैया :** हिजरी ७२५ (इ.स. १३४८) च्या दरम्यान सईदुद्दीन उर्फ हाजी सरवर मकदूम सैया नावाचे अवलिया कंधारला आले. त्यांचा मुक्काम महादेवाच्या मंदिरात असे. त्यांचा शिष्यवर्ग खूप मोठा होता. १६ रजब ७३६ हिजरी या दिवशी त्यांचे निधन झाले. त्यानंतर त्यांचा दर्गा उभारण्यात आला. कंधार येथील ऐतिहासिक वास्तुत हा हाजी सैयाचा दर्गा एक महत्त्वपूर्ण मध्ययुगीन दर्गा मानला जातो. येथे उरुस भरतो. अनेक हिंदू-मुस्लिम भाविक दर्ग्याचे दर्शन घेण्यासाठी येतात.

**सांगडे सुलतान मुश्किले आसान :** १३ व्या शतकात (हिजरी ८३२) हजरत शेख अली हे अवलिया कंधार शहरात आले. सुरुवातीला त्यांचे वास्तव्य तळ्याच्या काठावर होते. मूळचे ते कराची जवळील सांगडे या गावचे असल्यामुळे त्यांना सांगडे सुलतान असे संबोधिले जाऊ लागले.[४५] अनेक लोक त्यांच्याकडे आपल्या अडचणी घेऊन येत व ते त्यातून त्यांना मार्ग दाखवित असत. हिजरी ८४६ मध्ये त्यांचा मृत्यू झाला. त्यांचा दर्गा बांधण्यात आला. आजही विविध व्याधींनी व अडचणींनी त्रस्त झालेले नागरिक दर्ग्याला भेट देतात व अडचणींतून यशस्वीरित्या सुटका होण्यासाठी सांगडे सुलतानांची दुवा मागतात. येथे उरुस मोठ्या दिमाखाने पार पडतो. येथे येणाऱ्या लोकांमध्ये सर्व धर्मियांचा सहभाग असतो. याशिवाय शहरात हुतात्मास्मारक व विजयस्तंभ आहे. बांग्लादेश युद्धाच्या विजयाप्रित्यर्थ बांधलेला हा विजयस्तंभ विशेष उल्लेखनीय आहे, याशिवाय कंधार-लोहा मार्गावर गुराखी गड आहे. दरवर्षी तिथे गुराखी संमेलन भरविण्यात येते.

**बहादरपुरा :** बहादरपुरा व मानसपुरी ही कंधारच्या लगत असणारी दोन छोटी गावे प्राचीन काळी कंधारचाच भाग होती. प्राचीन काळी हा भाग भद्रपूर म्हणून ओळखला जात होता. मुघलकाळात बहादूरशहा नावाच्या सरदाराने भद्रपूरचा फार विकास केला. त्याच्या गावास बहाद्दरपूर असे नाव

---

४५. नगरपालिका, कंधार यांनी पुरविलेल्या माहितीच्या आधारे.

ठेवण्यात आले. आज या गावाचे नाव बहादरपुरा असे रूढ झाले आहे. कंधार व त्यालगत असणाऱ्या बहादरपुरा, मानसपुरी या गावांच्या आसपासच्या परिसरात राष्ट्रकूटकालीन वैभवाची साक्ष देणारे अनेक अवशेष विखुरलेले आढळतात. बहादरपुरा इथे आढळणाऱ्या अवशेषांमध्ये कंधारचा राष्ट्रकूटकालीन शिलालेख सर्वात महत्त्वाचा मानला जातो.

**शिलालेखाचे वर्णन :** इ.स. दहाव्या शतकातील राष्ट्रकूट नृपती कृष्ण तिसरा याच्या कालखंडातील कंधारच्या इतिहासासंबंधी तसेच नगर रचनेबाबत भाष्य करणारा हा शिलालेख अतिशय महत्त्वाचा आहे. या शिलालेखामुळे कंधारचे प्राचीनत्व सिद्ध झाले.

हा शिलालेख एका स्तंभाच्या तीन बाजूंवर कोरला असून स्तंभाचा खालचा अर्धा भाग तुटला आहे. शिलालेखाचा बराचसा भाग उपलब्ध नाही. लेख संस्कृत भाषेत व नागरी लिपीत आहे. लेखाची सुरूवात 'नमः शिवाय' या नमोवचनाने झाली आहे. प्रारंभी राष्ट्रकूट नृपतींची प्रशस्ती केली असून त्यानंतर राष्ट्रकुटांची वंशावळ दिली आहे. या शिलालेखात कंधार येथे कृष्ण तृतीय याने बांधलेल्या काही मंदिरांची नावे दिली आहेत. यापैकी काही मंदिरे पूर्वीच्या नृपतींनी बांधली असावी. शिलालेखात पुढील मंदिरे, वास्तु व जलाशय यांचे उल्लेख आढळतात.[४६]

१. जगत्तुंग समुद्र (जलाशय), २. सर्वलोकाश्रय मंडप (धर्मशाळा किंवा अतिथीगृह), ३. प्रधान राजविलासिनी पाटक (राज गणिकेचा महाल), ४. राजगृह (राजमहाल) व १२ मंदिरांचा उल्लेख केला आहे.[४७]

या लेखात कंधार येथील निरनिराळ्या देवळांना पाणपोईसाठी आणि गुराढोरांच्या चारापाण्यासाठी केलेल्या तरतुदींचा उल्लेख आहे. शहरात पाच ठिकाणी ग्रीष्मसंताप निरसनार्थ पाणपोया उभारल्याचे हा शिलालेख सांगतो. तसेच निरनिराळ्या देवतांच्या पंचोपचार सहित पंचामृत स्नानोपयोगादि दुग्धकुसुमार्चन निमित्त केलेली तरतूदही स्पष्ट करतो. याशिवाय गोदावरी तटाध्यासिनी नान्दीतटे म्हणजे गोदावरी तिरावरील नांदेडला तत्कालीन स्थित असलेल्या अध्यासनास म्हणजे तेथील वेदाध्ययन केंद्रासही दान दिल्याचा संदर्भ यात येतो. कंधारमधील १२ देवळांना या शिला शासनाने दान दिले आहे. या दानांचा तपशील लेखात आढळतोच, पण त्यापेक्षाही महत्त्वाचे ठरते ते त्या अनुषंगाने येणारे प्राचीन कंधार नगरीचे वर्णन. या वर्णनामुळे तत्कालीन कंधार, त्याची उपनगरे व त्यातील वास्तु यांचा परिचय होतो. येथे असणारा राजमहाल ही सर्व बाजूंनी प्रवेशद्वारे असणारी प्रशस्त वास्तु होती. त्यापैकी मकरतोरण व यक्षद्वार यांचा उल्लेख लेखात आला आहे.

राष्ट्रकुटांची राजधानी असलेल्या या नगरात बाजार असणे अपरिहार्य आहे. अशाच दोन बाजारांचा, गुर्जरापण व क्षुण्णहट्टीका यांचा उल्लेखही लेखात आला आहे. याशिवाय शिलालेखात पाच ठिकाणी 'अग्निष्ठिका' (शेकोट्या) बांधल्याचा उल्लेख आहे. एक सर्व लोकाश्रय मंडपाजवळ, दोन कालप्रियनाथाच्या जवळ, चौथी सगरेश्वराच्या मंदिराजवळ आणि पाचवी बंकेश्वराच्या मंदिराजवळ. शिलालेखात तत्कालीन द्रम्म या चलनाचा आलेला उल्लेख वैशिष्ट्यपूर्ण आहे. जनावरांसाठी पाच

---

४६. ठोसर, हरिहर **हिस्टॉरिकल जॉग्रॉफी ऑफ महाराष्ट्र ॲण्ड गोवा,** पूर्वोक्त, पृ. ५०५.

४७. रित्ती व शेळके, पूर्वोक्त, शिलालेख क्र. २.

ठिकाणी चारा व पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. त्यासाठी दररोज ५० द्रम्म सरकारी तिजोरीतून पुरविले जात होते. तसेच मंदिरात होणाऱ्या पुजाअर्चेसाठी ५०० द्रम्म राजाकडून पुरविण्यात येते होते.

**राष्ट्रकूट भवन :** बहाद्दरपुरा येथे मन्याड नदीच्या उत्तर किनाऱ्यावर पाटबंधारे विभागाचे शासकीय विश्रामगृह आहे. या परिसराला शांतीघाट या नावाने ओळखले जाते. आठव्या शतकापासून विसाव्या शतकापर्यंतची परंपरा सांगणाऱ्या शांतीघाट या परिसरात राष्ट्रकूटकालीन कलावशेष जतन करण्यासाठी राष्ट्रकूट भवन हे वस्तूसंग्रहालय उभारण्यात आले. तत्कालीन स्थापत्य मंदिरांमधील राष्ट्रकूट शैलीतील कलापरंपरा सांगणारी शिल्पे, प्रतिमा व इतर स्थापत्य अवशेषांचे जतन करणारे हे वस्तुसंग्रहालय अतिशय महत्त्वाचे आहे. या संग्रहालयाच्या उभारणीसाठी श्री केशवरावजी धोंडगे यांचे योगदान उल्लेखनीय आहे.

**शांतीघाट :** शांतीघाट येथे पंडीत जवाहरलाल नेहरु यांचे अस्थिविसर्जन करण्यात आले. या दृष्टीने या स्थानाचे विशेष महत्त्व आहे. कंधारमधील हाजी सरवर मकदूम सैया दर्गा परिसरात असलेल्या राष्ट्रकूट काळातील शिवपिंडीची येथे नव्याने प्रतिष्ठापना करण्यात आली आहे

**चौरस विहीर :** एक दार असलेली वापी म्हणजे विहीर. हिला पायविहीर असेही संबोधले जाते. यामध्ये वर्तुळाकार, चौरस, अष्टकोनी असे आकार आढळतात. बहादरपुरा येथे राष्ट्रकूट नृपती तिसरा याचा शिलालेख ज्या विहिरीजवळ सापडला ती विहीर चौरसाकृती असून खास बावडी म्हणून ओळखली जाते.[४८]

बहादरपुऱ्यात एक वर्तुळाकार विहीर आहे. या विहिरीचे वैशिष्ट्य म्हणजे मुख्य वर्तुळाकार विहीर बांधल्यावर वरील भागाचा चौरस आकार उभारण्यात आला आहे. एका बाजूने प्रवेश तर उर्वरित तीन बाजूंना मोटेसाठी धक्का बांधला आहे. प्रवेशमार्गाची लांबी. ४.५० मी. आहे. विहिरीतील वर्तुळाकाराचा व्यास ३.३० मी. तर चौरस भागाचा आकार ७.७० × ७.७० मी. आहे. चौरस आकारात देवतांसाठी जागा बनविण्यात आली आहे. मोटेचे पाणी नेण्यासाठी दगडी प्रणाल बसवले असून त्यात एक लहानसा हौदही ठेवण्यात आला आहे. १३ व्या शतकाच्या उत्तरार्धात वर्तुळाकार विहिरी लोकप्रिय झाल्याचे आढळते.[४९]

**आड (अष्टकोनी) :** बहादरपुरा येथे अष्टकोनी आडाचे उत्कृष्ट उदाहरण आहे. कंधार किल्ल्याच्या परिसरातील या आडाचा व्यास ३.१० मी. आहे. यासाठी बांधलेली अखंड शिळा १.३० मी. लांब व १.२० मी. रुंद आहे. एखादी टोपली विणावी त्याप्रमाणे येथील शिळांची रचना असून हा आड खाली काहीसा अरुंद होत जातो. राष्ट्रकूटकालीन प्राचीन स्थळावर असलेला हा आड या वास्तुप्रकारात प्रारंभीचा ठरावा.[५०]

---

४८. पाठक, अ. शं. **महाराष्ट्रातील बारव स्थापत्य**, पूर्वोक्त, पृ. ४३.

४९. कित्ता, पृ. ४४.

५०. कित्ता, पृ. ४५.

Maharashtra State Gazetteers

**मानसपूरी :** प्राचीन काळी कंधारचाच एक भाग असलेले मानसपूरी हे गाव कंधारच्या पूर्वेस दोन कि.मी. वर वसले आहे. कंधार व त्याला लागून असलेल्या व प्राचीन कंधारचा भाग असलेल्या बहादरपूरा व मानसपूरी या गावांत अनेक राष्ट्रकूट कालीन अवशेष विखुरलेले दिसतात.

मानसपूरीच्या वायव्येस प्रसिद्ध पुराणवस्तु संशोधक शोभना गोखले यांना काही मोठे शिल्पखंड आढळून आले. हे अवशेष जवळजवळ १८.२८ मी. उंचीच्या मूर्तीचे असल्याचे सिद्ध झाले. सापडलेली मूर्ती राक्षसाची, क्षेत्रपालाची, यक्षाची की वास्तुपुरूषाची असावी असे प्रश्न निर्माण झाले. मूर्तीच्या कपाळावर तिसरा नेत्र असल्यामुळे हे शिल्प क्षेत्रपाल भैरवाचे असल्याचे स्पष्ट झाले.[५१] या शिल्पामुळे या भागात १९८२ साली डेक्कन कॉलेजचा पुरातत्त्व विभाग व महाराष्ट्र सरकारचा पुरातत्त्व विभाग यांनी संयुक्तणे उत्खनन हाती घेतले. या उत्खननात एका अद्वितीय वास्तुचे अवशेष सापडले. या वास्तुचे सविस्तर वर्णन म. के. ढवळीकर व अरविंद जामखेडकर यांनी केले असून ते पुढे उद्धृत केले आहे.[५२] ही वास्तु मोठ्या घडीव दगडाची बांधलेली होती. ती मानवी आकाराची होती. जमिनीच्या पृष्ठभागापासून सुमारे १५ से.मी. खोलीवर घडीव दगडाचे बांधकाम दिसून आले. त्याभोवती प्राकाराची दुहेरी भिंत आहे. ती सुद्धा घडीव दगडाची बांधली आहे. हा प्राकार ३७ × ३३ मी. असा चौकोनी आकाराचा आहे. त्यात पूर्वेकडे प्रवेशद्वाराची योजना केली †ÖÆ. आतील मानवी आकाराची वास्तु २३ मीटर लांब व ७ मीटर रुंद आहे. तिचे डोके पश्चिमेकडे व पाय पूर्वेकडे आहेत. शरीर ६.३५ मीटर लांब व ४.८५ मीटर रुंद आहे. पाय १०.८५ मीटर असून मांडीपाशी रुंदी २.२० मीटर आहे. हात ९.७५ मीटर लांब आहेत. खांद्यापाशी त्याची रुंदी २.२० मीटर असून ते खाली अरुंद होत जातात. मनगटापाशी त्यांची रुंदी १.०५ मीटर आहे. डोक्याच्या उजवीकडील भागाची तेथे उगवलेल्या झाडामुळे मोठ्या प्रमाणात नासधूस झाली आहे. तसेच इतरत्र काही ठिकाणी शेताच्या बांधावर उगवलेल्या मोठ्या झाडांमुळे दगड निसटलेले होते. प्रस्तुत वास्तु शेताच्या बांधाच्या खाली सापडली. डोक्याकडच्या भागात बाजूने दगडगोटे चिखलात बसवले होते.

प्राकाराच्या दोन भिंतींचा उल्लेख वरती केला आहेच. त्याचे दगड संपूर्ण घडीव नाहीत. त्याचे बांधकाम मातीत केले आहे. प्राकाराच्या दोन भिंतीपैकी मोठ्या दगडांची भिंत प्रथम बांधली गेली असावी व लहान दगडांची नंतर बांधली गेली असावी असे स्तरशास्त्रीय पुराव्यावरून सिद्ध होते. पूर्वेकडील भिंत २.३२ मीटर रुंद असून तिच्या दोन्ही बाजूस मोठाले घडीव दगड मातीत बसविलेले आढळून आले आहेत. तसेच दगडांच्या मधील भाग दगड गोट्यांनी बांधून काढला होता. या भिंतीत मध्यभागी प्रवेशद्वार होते. त्याच्या फक्त दोन पायऱ्या आता शिल्लक आहेत. त्या उत्खननात सापडल्या. त्या घडीव दगडाच्या असून २.५० मी. लांब व ०.३० मी. रुंद आहेत. हे प्रवेशद्वार आतील वास्तुच्या नेमके मध्यभागी नसून थोडेसे ईशान्येकडे झुकलेले होते. याचे मुख्य कारण असे की मानवी आकाराच्या वर वर्णिलेल्या वास्तुच्या शेजारी उत्तरेकडे आणखी एक मानवी आकाराची परंतू थोडीशी लहान आकाराची वास्तु होती. या दोन्ही वास्तुंच्या बरोबर मध्यभागी प्रवेशद्वाराची योजना केली होती. दोन्ही वास्तुंच्या आसपासचा बराचसा भाग दगड-गोट्यांनी पक्का केला होता.

---

५१. राजन अमिताभ (संपा), पूर्वोक्त, मधुकर ढवळीकर व अरविंद जामखेडकर, 'कंधार येथील क्षेत्रपाल', पृ. ३७-३९.

५२. कित्ता.

मानवी आकाराची अशा प्रकारची वास्तु जगात एकमेवद्वितीय अशी असून तिचे नक्की प्रयोजन काय हे सांगणे कठीण झाले आहे. परंतू वर उल्लेखिलेल्या शिल्प खंडांचा विचार करता हे शिल्पखंड या वास्तुच्या आसपास आढळले होते. तेथे सापडलेल्या पायाची लांबी व रुंदी १.७० × ०.६२ मी आहे. तसेच पायाचा तळवा अत्यंत काळजीपूर्वक कोरला आहे. आजवर सापडलेल्या शिल्पखंडात एक मोठा पाय, एक कान, दोन हात आणि चेहऱ्याचे दोन मोठाले भाग यांचा समावेश होतो हे सर्व शिल्पखंड एकाच मूर्तीचे भाग असावे असे त्यांच्या आकारावरून वाटते. त्याचबरोबर दोन लहान पाय व दोन लहान हातही सापडले आहेत. ते मोठे असले तरी वर उल्लेखिलेल्या मूर्तीपेक्षा थोडे लहान आकाराचे आहेत. यावरून दोन प्रचंड मोठ्या मूर्ती इथे असाव्यात हे सिद्ध होते. उत्खननात जी वास्तु आढळून आली आहे त्यावरून ही महाकाय मूर्ती इथे शयन अवस्थेत ठेवली असावी अर्थातच मंदिराला शिखर, छत किंवा स्तंभ नव्हते हे मंदिर उघडे असावे.

या प्रचंड मूर्तीचे जे तीन-चार खंड सापडले त्यात दोन हाताचे भागही आहेत. त्यापैकी उजव्या हातात कट्यार असून ती तूटलेली आहे. डाव्या हातात बीजपूरक* आहे. चेहऱ्याचे जे तीन भाग सापडले आहेत. त्यापैकी कपाळाच्या भागावर तिसरा नेत्र स्पष्ट दिसतो. भैरव या शिवाचाच एक अवतार असणाऱ्या देवतेच्या हातात बीजपूरक आढळते. त्याची क्षेत्रपाल म्हणून पूजा करतात. त्यामुळेच ही मूर्ती भैरव क्षेत्रपालाची आहे. बहादरपूरा येथे सापडलेल्या राष्ट्रकुट नृपती कृष्ण तृतीय याच्या शिलालेखात कंधार इथे बांधलेल्या अनेक वास्तुंची नावे आली आहेत. त्यात सर्वलोकाश्रय मंडप क्षेत्रपाल मंदिराच्या जवळ बांधल्याचा उल्लेख आहे.[५३] यावरून हे मंदिर कृष्ण तृतीय याच्या आधीच्या काळातील असावे. उत्खननात सापडलेले प्रस्तुत मंदिर म्हणजेच क्षेत्रपालाचे मंदिर होय. त्याचप्रमाणे भैरवाच्या मूर्तीच्या शिल्पावरूनही ती राष्ट्रकूट काळातील असावी, हे स्पष्ट होते. ढवळीकर व जामखेडकर यांच्या मतानुसार उत्खननात सापडलेले मानवी आकाराचे क्षेत्रपाल मंदिर म्हणजे वास्तुपुरूषाच्या मूळ संकल्पनेचे उत्तम उदाहरण होय.[५४] ही क्षेत्रपाल भैरवाची मूर्ती पूर्वेस लागून असलेल्या टेकडीवर घडवली गेली असावी. मूर्ती डोलराईट दगडाची आहे आणि टेकडीवर या खडकाची भित्ती आहे. तेथेच दगडी चिपांचा खच पडला आहे. मूर्तीचे निरनिराळे अवयव तेथे घडवून खाली मंदिराच्या जागेवर आणले असावेत.[५५] राष्ट्रकूटकालीन कलापरंपरेचा वारसा सांगणारे भैरव-क्षेत्रपालाचे हे मंदिर भारतातच नव्हे तर संपूर्ण आशिया खंडात एकमेवद्वितीय आहे.

**मानसपुरी येथे सापडलेले इतर अवशेष :** वर वर्णन केलेल्या मंदिराशिवाय मानसपूरी येथे अनेक हिंदू, जैन व बौद्ध अवशेष आढळले आहेत. यामध्ये काळ्या पाषाणातून घडवलेली महिषासूर मर्दिनी आहे. ही महिषासूर मर्दिनी सालंकृत असून चतुर्भुज आहे.[५६]

---

*. बीजपूरक म्हणजे डाळिंब किंवा ईडलिंबूसारखे खूप बिया असणारे फळ.

५३. ठोसर, हरिहर, **हिस्टॉरिकल जॉग्रॉफी ऑफ महाराष्ट्र ॲण्ड गोवा**, पूर्वोक्त, पृ. ५०५.

५४. ढवळीकर व जामखेडकर, पूर्वोक्त, पृ. ४२.

५५. कित्ता, पृ. ४३.

५६. कठारे, अनिल **राष्ट्रकूटांची राजधानी कंधार,** पूर्वोक्त, पृ. ७२.

Maharashtra State Gazetteers

मानसपुरी इथे केलेल्या उत्खननात एक चौरसाकृती विहीर व काही जैन तिर्थंकरांच्या मूर्ती मिळाल्या आहेत.[५८]

या सर्व अवशेषांमुळे व क्षेत्रपाल मंदिरामुळे राष्ट्रकूट काळात मानसपुरी[५७] या प्राचीन कंधारचा भाग असणाऱ्या या भागाची किती भरभराट झाली होती, याची साक्ष पटते.

## करडखेड

**करडखेड :** (ता. देगलूर १८° २५′ उ., ७७° २५′ पू.) देगलूर तालुक्यातील हे गाव तालुका मुख्यालयापासून पश्चिमेस बारा कि.मी. अंतरावर आहे. या गावाचे प्राचीन नाव करडीकल्लु होते. गावात मिळालेल्या प्राचीन शिलालेखांमधून ते स्पष्ट होते. या गावात आतापर्यंत कल्याणी चालुक्यांचे नऊ शिलालेख सापडले आहेत. या नऊ शिलालेखांच्या वाचनानंतर करडखेडचे प्राचीन रूप समजून घेण्यास मदत होते. हे सर्व शिलालेख कन्नड लिपीतील आहेत. त्यांचे वर्णन पुढे दिले आहे.

शिलालेख क्र. १[५९] : पहिला शिलालेख हा सन १०७९ मधील असून करडीकल्लू येथील महामंडलेश्वर कक्करस याने बांधलेल्या सोमनाथ, ढोरेश्वर, कलीचोरेश्वर आणि प्रसन्न भैरवनाथ या देवालयांना देणगी देणे हा शिलालेखाचा उद्देश आहे. या देवालयासाठी त्याने कावळीगावे, अवरवाडी ७०० मधील आलरू, सक्करगे ८० मधील भायीगावे ही गावे दान केली. दानांची व मंदिरांची व्यवस्था पाहणाऱ्या श्री चंद्रशेखर पंडीत यांच्याकडे सोपविण्यात आली. संन्यासी, ब्राह्मण व विद्यार्थ्यांसाठी अन्नछत्र उघडणे तसेच मंदिराची दुरुस्ती यासाठी हे दान करण्यात आले.

शिलालेख क्र. २[६०] : (इ.स. १०८८) : वन्ही घराण्याच्या कलिचोरसाने मंदिरावर कलश बांधला व मंदिरास गावुंडगावे हे गाव व इतर काही गावातील जमीन दान दिली. त्याच्या पत्नीने, रेब्बलादेवीनेही काही दान दिले हे नमूद केले आहे.

शिलालेख क्र. ३ (इ.स.११०२)[६१] : महामंडलेश्वर सामंत उक्कर याने स्वयंभू सोमेश्वरदेवाला नेरिलगे गाव दान केले असे नमूद केले आहे. या दानाची व्यवस्था चंद्रशेखर पंडीताकडे सोपविण्यात आली.

शिलालेख क्र. ४ (इ.स.१११३)[६२] : शिक्षणासाठी व सोमेश्वर देवाच्या पुजेसाठी महामंडलेश्वर मदनकर्णरस याने आलूक गावातून मिळणारे उत्पन्न दान केले.

शिलालेख क्र. ५ (१२ वे शतक)[६३] : कल्याणी चालुक्य विक्रमादित्य सहावा याच्या राजवटीतील या लेखात वन्ही घराण्याची सुरूवातीपासूनची वंशावळ दिली आहे.[६४]

---

५७. कित्ता, पृ. १०३.

५८. पाठक, अ. शं. **महाराष्ट्रातील बारव स्थापत्य**, पूर्वोक्त, पृ. ४४.

५९. रित्ती व शेळके, पूर्वोक्त, शिलालेख क्र.१०

६०. कित्ता, शिलालेख क्र. ११

६१. कित्ता, शिलालेख क्र. १३

६२. कित्ता, शिलालेख क्र. १५१

६३. रित्ती व शेळके, पूर्वोक्त, शिलालेख क्र. २४

६४. ठोसर, हरिहर **हिस्टॉरिकल जॉग्रॉफी ऑफ महाराष्ट्र ॲण्ड गोवा**, पूर्वोक्त, पृ. ५११.



Maharashtra State Gazetteers

**वन्ही घराण्याची वंशावळ**




या लेखात चंद्रशेखर मुनिप व ज्ञानेशयोगीश्वर या संन्याश्यांचीही नावे आढळतात.

शिलालेख क्र. ६ (इ.स.११३०)[६५] : हा शिलालेख कल्याणी चालुक्य नृपती सोमेश्वर तिसरा याच्या राजवटीतील आहे. महामंडलेश्वर एरेयमरस याने स्वयंभू सोमनाथ मंदिरास काही गावे दान दिली हे नमूद केले आहे. ज्ञानेश्वर पंडित या बहुधा देवालयाच्या पुरोहिताच्या साक्षीने हे दान दिले गेले.

शिलालेख क्र. ७ (इ.स. ११३०)[६६] : सोमेश्वर तिसरा याच्याच राजवटीतील या लेखात त्याचा मांडलिक प्रमुख, महामंडलेश्वर एरेयमरस दोन हजार गावांच्या प्रशासकीय विभागाचा मुख्य असल्याचा उल्लेख आला आहे. या लेखाचा उद्देश महामंडलेश्वर आनेसाहणी हेम्माडीयरस याने अवरवाडी ७०० मधील काही गावे व सक्करगे ८० मधील एक गाव सोमनाथ देवास दान दिले याची नोंद करणे हा आहे.

शिलालेख क्र. ८ (इ.स.११३३)[६७] : वरील नृपतीच्याच राजवटीतील हा लेख आहे. शिलालेखात दंडनायक श्रीधरय्या याने त्याची जहागीर असणाऱ्या भायीगावे या सक्करगे ८० मधील गावातून होणाऱ्या त्याच्या वैयक्तिक उत्पन्नातून सोमनाथ देवास दान दिले असे नमूद केले आहे. हे दान शिक्षणासाठी तसेच मंदिराच्या दुरुस्तीसाठी देण्यात आले होते.

शिलालेख क्र. ९ (इ.स.११४८)[६८] : महाप्रधानाने दिलेल्या दानाची नोंद करण्यात आली आहे. परंतु दात्याचे नाव व दानाचे तपशील उपलब्ध नाही.

वरील शिलालेखांवरून प्राचीन करडखेड बद्दल अनेक महत्त्वाच्या गोष्टी कळतात. कल्याणी चालुक्य काळात करडखेड वन्ही किंवा पावक मांडलिक घराण्याची राजधानी होते. त्याचप्रमाणे एक

६५. कित्ता, शिलालेख क्र. २८
६६. कित्ता, शिलालेख क्र. २९
६७. कित्ता, शिलालेख क्र. ३०
६८. कित्ता, शिलालेख क्र. ३४

हजार सहस्रमंडल किंवा सयीरबाड या नावाने ओळखल्या जाणाऱ्या प्रशासकीय विभागाचे ते मुख्यालय होते. या शिलालेखात दिल्याप्रमाणे वन्ही राज्यकर्त्यांनी इथे सोमनाथ किंवा सोमेश्वर, ढोरेश्वर, कलीचोलेश्वर व प्रसन्न भैरव अशी चार देवालये बांधली. यापैकी सोमेश्वर मंदिर प्रमुख असून जास्तीत जास्त दाने या मंदिराला मिळाल्याचे दिसून येते. कराडखेड जैन धर्माचेसुध्दा केंद्र होते कारण निगलकमल्ल जिनालय या ठिकाणी जैन मठ असल्याचा उल्लेख आढळतो.[६९]

करडखेड हे चालुक्य काळातील शैक्षणिक केंद्रही होते. शिलालेखांमधील अनेक दाने शिक्षणासाठी व विद्यार्थ्यांसाठी दिलेली आढळतात. ज्ञानेश्वर योगीश्वर आणि चंद्रशेखर मुनी पंडीत हे या केंद्राचे आचार्य होते. हे आचार्य कालामुख पंथांचे अनुयायी होते. एकूणच प्राचीन काळी कराडखेड हे केवळ महत्त्वाचे नगरच नाही तर महत्त्वाचे प्रशासनिक विभाग व धार्मिक आणि शैक्षणिक केंद्र असल्याचे दिसून येते.

करडीकल्लु या ग्रामनामाची व्युत्पत्ती मराठीतील करडई या झाडाच्या नावापासून किंवा कानडीतील करडी (अस्वल) या शब्दापासून झाली असावी तर कल्लू या कानडी शब्दाचा अर्थ होतो खडक.[७०] करडखेड हे नाव कसे पडले या संबंधीही गावात एक आख्यायिका सांगितली जाते त्यानुसार पूर्वी हे गाव महादेव मंदिराजवळ होते. पण या गावी आलेल्या लोकांना मंदिरातील साप चावायचा, त्यामुळे हे गाव तेथून उठले. गाव दुसरीकडे नेताना गावातील लोकांनी नंदीच्या पाठीवर करडईने भरलेले पोते दिले, हे पोते नंदीने ज्या ठिकाणी पाडले त्या ठिकाणी गाव वसविण्यात आले.

**महादेव मंदीर :** गावापासून अर्धा कि.मी. अंतरावर एका ओढ्याशेजारी हे मंदिर आहे. गर्भगृह, अंतराळ व सभामंडप अशी या दक्षिणाभिमुख मंदिराची रचना आहे. मंदिराच्या सभागृहाला १६ खांबांनी आधार दिला आहे. त्यापैकी १२ अर्ध तर ४ पूर्ण स्तंभ आहेत. स्तंभावर नक्षीकाम केलेले आढळते. सभामंडपात नंदी विराजमान आहे. गर्भगृहाचे द्वार चारशाखीय आहे. गर्भगृहात जमिनीलगत गुळगुळीत काळ्या पाषाणाची पिंडी आहे. देऊळ बांधताना प्राचीन अवशेषांचा उपयोग केलेला दिसतो. त्यानुसार भिंतीत गजान्त लक्ष्मीची प्रतिमा बसवली आहे. मंदिराचा परिसर रम्य आहे. जवळच बांधीव कुंड आहे. आवारात एक शिलालेख तसेच एक सतीची शिळा आहे. देवळात श्रावण महिन्याच्या शेवटच्या सोमवारी भंडारा होतो व शिवरात्रीला यात्रा भरते. या मंदिराशिवाय गावात भवानी, बालाजी, विठ्ठलेश्वर व मारूती यांची लहान मंदिरे आहेत. गावात सप्तमातृका पटही सापडला आहे.

## किनवट

**किनवट :** (ता. किनवट, १९° ३५′ उ., ७८° १०′ पू.) हे तालुका मुख्यालय मुदखेड-आदिलाबाद रेल्वे मार्गावरील स्थानक आहे. गेल्या शंभर वर्षात या शहराचा विकास झाला आहे. हा तालुका आंध्रप्रदेश व विदर्भाला जवळ असून येथील जनजीवनावर या दोन प्रांतांचा प्रभाव पडलेला

६९. ठोसर, हरिहर **हिस्टॉरिकल जॉग्रॉफी ऑफ महाराष्ट्र ॲण्ड गोवा**, पूर्वोक्त, पृ. ५११.

७०. कित्ता.

आढळतो. किनवट शहर विषववृत्तीय दाट जंगलांच्या केंद्रस्थानी वसले आहे. पैनगंगा नदीच्या खोऱ्यात वसलेला हा भाग नैसर्गिक साधनसंपत्ती व निसर्गावर अवलंबून असणारे संपन्न आदिवासी जीवन यामुळे समृद्ध आहे. इथे सागाची झाडे मोठ्या प्रमाणावर होत असल्यामुळे टिंबरची निर्यात करण्यासाठी किनवट प्रसिद्ध आहे.[७१] किनवटच्या जवळच चुनखडीचे साठे सापडले आहेत.[७२] त्यामुळे इथे सिमेंटचा उद्योग भरभराटीला येण्याची क्षमता आहे. किनवटमध्ये गोंड, परधान, आंध, भिल्ल, कोलम अशा अनेक आदिवासी जमाती मोठ्या प्रमाणावर वस्ती करून आहेत. त्यामुळेच किनवट आदिवासी तालुका म्हणून घोषित केला आहे.[७३] मराठवाड्यातील हा एकमेव आदिवासी तालुका आहे. त्यामुळे शासनाकडून विविध उपक्रमांमध्ये आदिवासी वस्ती सुधारणा योजना, आदिवासी विकासक्षेत्र योजना अशा प्रकारच्या योजना किनवट नगरपरिषदेत राबविण्यात आल्या आहेत. याशिवाय रस्ते अनुदान, मराठवाडा विकासनिधी अशा प्रकारच्याही योजनांचाही लाभ नगर परिषदेला मिळतो. विविध शासकीय योजनांतून मिळणाऱ्या अनुदानातून नगरपरिषदेने २३० व्यापारी संकुल (दुकान बांधकाम) बांधली आहेत. शहरात विविध धर्मियांसाठी स्मशानभूमी आहे. शिवाय शासनाकडून प्राप्त झालेल्या निधीतून समाजमंदिर सभागृहाचे बांधकाम केले आहे. किनवट नगरपरिषदेच्या हद्दीत प्राचीन किंवा मध्ययुगीन वैशिष्ट्यपूर्ण स्मारके नाहीत.[७४] तसेच आधुनिक काळातील पर्यटनदृष्ट्या विकसित केलेले स्थान नाही. परंतु एक चित्रपटगृह आहे. मात्र किनवटपासून जवळच माहूर व उनकेश्वर ही ऐतिहासिक, सांस्कृतिक व धार्मिकदृष्ट्या महत्त्वाची ठिकाणे आहेत.

किनवट येथे अलीकडच्या काळात बांधलेली काही मंदिरे आहेत. कैलासधाम मंदिर, राममंदिर, दुर्गादेवी मंदिर, विठ्ठल मंदिर, दत्त मंदिर, मारूती मंदिर, श्री गजानन महाराज मंदिर व अन्य देवतांची मंदिरे आहेत.

## कुंडलवाडी

**कुंडलवाडी :** (ता. धर्माबाद, १८° ४५′ उ., ७७° ४५′ पू.) हे धर्माबाद तालुक्यातील एक महत्त्वाचे गाव नांदेडपासून जवळजवळ ७२ कि.मी. अंतरावर आहे. या शहरात मिरची व शेंगदाणे यांचे मुख्य उत्पन्न होते. हे गाव बाजारपेठ म्हणून प्रसिद्ध आहे. कुंडल नावचे एक ऋषी इथे तपश्चर्या करत होते. त्यांच्या नावावरून गावाचे नाव कुंडलवाडी पडले असे सांगितले जाते.[७५]

**कुंडलेश्वर मंदिर :** ग्रामदैवत असलेले कुंडलेश्वर मंदिर कुंडलवाडीचे भूषण आहे. हे मंदिर वर उल्लेख केलेल्या कुंडल ऋषींनी बांधले अशी आख्यायिका या भागात प्रचलित आहे. त्यानंतर मंदिराशेजारी गाव वसवल्याचेही सांगितले जाते. हे मंदिर हेमाडपंथी आहे. गाभाऱ्यातील शिवपिंडी

७१. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, पूर्वोक्त, पृ. ५६८.
७२. कित्ता.
७३. गटविकास अधिकारी, किनवट यांनी पुरविलेल्या माहिती आधारे.
७४. कित्ता.
७५. **नांदेड जिल्हा गॅझेटिअर**, पूर्वोक्त, पृ. ५६९.

चौकोनी आहे. या मंदिराचे बांधकाम अशा पद्धतीने केले आहे की सूर्य उगवल्यानंतर याची पहिली किरणे थेट पिंडीवर पडतील. पिंडीच्या बाजूला गणपती व मारूतीच्या मूर्ती आहेत. मंदिरात ऋषींच्या पादुकाही आहेत. मंदिराच्या सभामंडपात एक शिलालेख ठेवला असून काळाच्या ओघात झिजल्यामुळे वाचता येत नाही. मंदिराशेजारी चौकोनी दगडी बांधीव कुंड आहे.

**श्रीराम मंदिर :** या श्रीराम मंदिराची किंवा मठाची स्थापना श्री रामदास स्वामींचे शिष्य भीमस्वामी यांनी केल्याची सांगितले जाते. येथे राम, लक्ष्मण, सीतेच्या मूर्ती आहेत. यापैकी रामसीतेच्या मूर्ती विहिरीत सापडल्या व लक्ष्मणाची नंतर घडवली गेली असे सांगितले जाते. मंदिराचे स्वरूप मोठ्या वाड्याप्रमाणे आहे. मध्ये चौक व बाजूने ओवऱ्या अशी याची रचना आहे. या वाड्याच्या तळघरात तीन समाध्या आहेत.

**जोड मारूती मंदिर :** सध्या जीर्णोध्दार झालेल्या या मंदिरात मारूतीच्या दोन मूर्ती आहेत. त्यामुळे त्याला जोड मारूती मंदिर म्हटले जाते. याशिवाय गावात गणपती, विठ्ठल रखुमाई, महालक्ष्मी, पंचम्मा, मरीआई यांची मंदिरे आहेत.

गावातील दर्गा चौरस असून १८० पेक्षा जास्त वर्ष जुना असल्याचे सांगितले जाते. दर्ग्याचे बांधकाम दगडी आहे.[७६] मोहरमच्या दिवशी मोठा जुलूस असतो.

## खानापूर

**खानापूर** (ता. देगलूर) : देगलूर या तालुका मुख्यालयापासून सात कि.मी.वर हे गाव वसले आहे. या गावाचे प्राचीनत्व अकराव्या शतकापर्यंत मागे जाते. या गावात अकराव्या शतकातील कल्याण चालुक्य नृपती त्रैलोक्यमल्ल म्हणजेच सोमेश्वर पहिला याचा शिलालेख सापडला आहे. या शिलालेखाची नोंद रित्ती व शेळके यांनी घेतली आहे.[७७] या शिलालेखात दंडनायक कालीदासय्या याचाही उल्लेख सापडतो. कोणी एका पेरगडे चट्टपय्या व इतरांनी काही दान दिल्याचे यात नमूद करण्यात आले आहे. परंतु दुर्दैवाने या शिलालेखाची अवस्था वाईट असून पूर्ण तपशील कळत नाही.

गावामध्ये एक चालुक्यकालीन महादेव मंदीर आहे. या मंदिराची रचना गाभारा, अंतराळ, गुढमंडप व मुखमंडप अशी आहे. चार अर्धस्तंभांवर उभा असलेला गाभारा (२ × २ मी.) अत्यंत साधा असून त्यात शिवलिंग आहे. गाभाऱ्यामागील भिंतीलगत केशवराजाची मूर्ती एका अधिष्ठानावर ठेवली आहे. गाभाऱ्याचे प्रवेशद्वार तीन शाखीय आहे.

अंतराळात डाव्या व उजव्या हाताला प्रत्येकी एकेक देवकोष्ठ आहे. त्यात मूर्ती नाहीत. अंतरारळाला प्रवेशद्वार आहे. तेथे जाळीदार नक्षी आहे. खालील भागास जोडस्तंभ असून त्यात जालवातायान (दगडी जाळी) आहे.

---

७६. कित्ता.

७७. रित्ती व शेळके, पूर्वोक्त, शिलालेख क्र. ७.

सभामंडप (४.५० × ४.५० मी.) एकूण १६ स्तंभांच्यावर उभा आहे. त्याच्या सभोवताली एक मीटर उंचीवर ६५ सें.मी. रुंदीचा ओटा आहे. यावर उभे असलेल्या वितानास अधार देणारे स्तंभ ठेंगणे आहेत. हा सभामंडप पूर्ण बंदीस्त असा गुढ मंडप आहे. त्याच्या उत्तर दक्षिण भिंतीत समोरासमोर वातायन ठेवले आहे. सभामंडपामध्ये पूर्वी उत्तर भिंतीत मुखमंडपालगत एकेक देवकोष्ठ असावे. त्यापैकी आज एक शिल्लक आहे. तर दक्षिण भिंतीत अंतराळाच्या प्रवेशद्वारालगत दोन्ही बाजूंनी एकेक अशी दोन देवकोष्ठे आहेत. एका देवकोष्ठातील सप्तमातृकापट्टाचे शिल्प बाहेर ठेवले आहे.

सभागृहात असलेले स्तंभ हे स्तंभपाद, स्तंभमध्य, स्तंभशिर्षावरील गादी आणि नागबंदयुक्त हस्त व त्यावरील तरंग शिळा असे आहेत. चार स्तंभ वगळता बाकी स्तंभ आकाराने ठेंगणे वाटतात. स्तंभमध्य शिळेचा खालील अर्धा भाग चौरस तर वरील अर्धा भाग अष्टकोनी व वर्तूळाकार असून त्यावर विविध प्रकारची नक्षी काढली आहे.

सभामंडपानंतर मुखमंडप आहे. त्या लगत पूर्वी ओटे होते. ते आज शिल्लक नाहीत.

मंदिराचे वितान क्षिप्त उत्क्षिप्त पद्धतीचे आहे. विशेषतः गर्भगृह व अंतराळ येथील वितान मध्य शिळा पूर्ण विकसित असलेली आहे. सभामंडपाच्या रंगशिळेवरील वितानावर पूर्ण कमल आणि भौमितिक नक्षी आहेत. तसेच त्यावर अष्टदिकपाल दाखविले आहेत.

मंदिराच्या बाह्यभागाचा विचार करता जंघा व मंडोवरावरील विविध प्रकारची भौमितिक नक्षी अधिक लक्षवेधी ठरते. मंदिर अधिष्ठानावर सूरसुंदरी व वाद्यवृंद आणि युगुल व पुष्प नक्षी असलेले दोन स्तर स्पष्ट दिसतात. मंडोवराच्या भागावर उत्तर, दक्षिण आणि पश्चिम भिंतीत मिळून तीन मोठी देवकोष्ठे (भद्र) आहेत. सध्या ती रिकामी आहेत. या देवकोष्ठांना जोडणारा एक पट्टा आहे. त्यावर एक किर्तीमुख व भौमितिक नक्षी आहे. मंदिराच्या बाह्यभागावर असणारी विविध प्रकारची भौमितिक नक्षी हे या मंदिराचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. यामध्ये कमल पुष्प, वर्तुळाकार होत गेलेले वेलबुटीपूर्ण विकसित पुष्प, चौरस, षट्कोन व अष्टकोन यांची नक्षी आहे. तर भद्राच्यावर द्रविड शैलीचे शिखर व व्याल दर्शविले आहेत. एकूणच चालुक्यकालीन मंदिराचा कला अविष्कार या ठिकाणी दृष्टीस पडतो. या मंदिराशिवाय गावात एक लिंगायत मठ व त्याजवळच वीरभद्राचे एक मंदिर आहे.

Maharashtra State Gazetteers

## गणपूर व कामठा

**गणपूर व कामठा** (ता. अर्धापूर) : गणपूर व कामठा ही दोन गावे वेगवेगळी असली तरी ती एकमेकांच्या जवळ असल्याने त्यांचा एकत्र विचार करणे योग्य ठरेल. गणपूर अर्धापूरच्या पश्चिमेस १० कि.मी. वर तर कामठा १५ कि.मी. वर आहे. नांदेड जिल्ह्यातील कला परंपरा जोपासणारा अजून एक परिसर असा या गावांचा उल्लेख करावा लागेल. गावाजवळून वाहणाऱ्या एका मोठ्या ओढ्याच्या* काठावर महादेव मंदिराचे अवशेष आहेत.

---

* गावातील लोक या ओढ्याला उमा नदी म्हणून ओळखतात. परंतु तो मेंढला नाला आहे (**संदर्भ :** सुनिल पुरी, पूर्वोक्त, पृ. २८०).

**महादेव मंदिर :** एका उंच अधिष्ठानावर हे त्रिदल पद्धतीचे मंदिर होते. त्यावरील आजचे शिखर हे नंतरच्या कालखंडातील आहे. मंदिराचे अधिष्ठान, जोता व पायऱ्यांवरून मंदिराची रचना कळून येते. मंदिराच्या गर्भगृहात शिवलिंग आहे. मंदिर पूर्णपणे उद्ध्वस्त झाले असल्यामुळे मंदिरावरचे शिल्पावशेष सर्वत्र विखुरलेले आहेत. त्यात प्रामुख्याने नृत्यांगनांची शिल्पे आहेत. स्त्रिच्या खांद्यावर बसलेला पोपट असे शिल्प या ठिकाणी आढळले आहे. अशा प्रकारचे शिल्प मराठवाड्यात इतरत्रही आढळले आहे. त्यामध्ये प्रामुख्याने निलंगा, धर्मपूरी व होट्टल यांचा उल्लेख करावा लागेल. ही मूर्तीशिल्पे अतिशय कलात्मक आहेत. हे मंदिर उत्तर चालुक्य काळात बांधले गेले असावे.[७८] परंतु अजूनपर्यंत या ठिकाणी एकही शिलालेख आढळलेला नाही.

या मंदिराशिवाय गावात एक मारुती मंदिर आहे. मारुती १.२१ मी. उंचीचा सुस्पष्ट मुखवटा घातलेला आहे. याव्यतिरिक्त गावात एक छोटे महादेव मंदिर आहे.

## गोरटे

**गोरटे** (ता. उमरी) : नांदेडहून ४५ कि.मी. अंतरावर तर मुदखेडहून २१ कि.मी. अंतरावर हे स्थान आहे. हे स्थान श्री दासगणू महाराजांच्या वास्तव्याने पवित्र झाले आहे.

श्री. दासगणु महाराजांचा जन्म दिनांक ६ जानेवारी १८६८ (पौष शु. ११, शके १७८९) रोजी झाला व दिनांक २६ नोव्हेंबर १९६२ रोजी (कार्तिक वद्य १३, शके १८६४) त्यांनी इहलोकाची यात्रा संपविली. त्यांनी महाराष्ट्रात एक भक्तीप्रधान किर्तनकार म्हणून नावलौकीक मिळवला. त्यांची दीड लाखापेक्षा अधिक वाङ्मय संपदा असून ती संतकवी श्री दासगणु महाराज समग्र वाङ्मय म्हणून प्रसिद्ध आहे. गोदावरी महात्म्य, श्री अंबिका स्त्रोत्र, गजानन विजय, भक्तीलीलामृत यांसारखे ग्रंथ आजही अनेकांच्या नित्य पठणात आहेत. महाराष्ट्र व महाराष्ट्राच्या बाहेरही त्यांच्या साहित्यकृर्तीचा प्रभाव जाणवतो. त्यांचे गुरु श्री साईबाबा यांच्या आज्ञेने ते नांदेड जिल्ह्यात आले. ते १९३८ ला गोरटे येथे आले. गोरटे गावातील आनंदीबाई गोपाळराव देशमुख यांनी त्यांना आईची माया दिली. श्रीक्षेत्र गोरटे येथे दासगणु महाराजांचे वस्त्र समाधीमंदिर बांधले आहे. नोव्हेंबर, १९६८ हे त्यांचे जन्मशताब्दी वर्ष होते. यावेळी स्थापन झालेल्या श्रीमद् सद्गुरु श्री दासगणु महाराज प्रतिष्ठानच्या वतीने विविध समाजोपयोगी उपक्रम सुरू असून या स्थानावर नित्य उपासना होते. परिसरात श्री पांडुरंग मंदिर, शनिदेव मंदिर, श्री दासगणु महाराजांच्या नित्य वापरातील वस्तूंचा संग्रह, ध्यानमंदिर, भक्तीनिवास आहे. परिसरातील भाविकांचे हे एक श्रद्धास्थान असून श्री दासगणु महाराजांची परंपरा समृद्ध करण्याचे कार्य त्यांचे शिष्य तथा मानसपुत्र प्राचार्य अनंत दामोदर आठवले तथा स्वामी वरदानंद भारती यांनी चालविली. यांनी उत्तरकाशी येथे संजिवन समाधी घेतली.

## तडखेल

**तडखेल :** (ता. देगलूर) : तडखेल हे गाव तालुका मुख्यालयापासून ११ कि.मी. अंतरावर देगलूर-मुखेड मार्गावर आहे. कल्याणी चालुक्य राजवटीत हे गाव तडकल्लु म्हणून ओळखले जात असे, हे त्यावेळच्या अभिलेखीय नोंदींमधून कळते. तडकल्लु गावाची व्युत्पत्ती ठोसरांनी पुढील प्रमाणे

७८. देव, प्रभाकर **हेरिटेज नांदेड**, पूर्वोक्त, पृ. ५५.

सांगितली आहे.[७९] यातील 'तड' हा नावाचा पहिला भाग 'तडाग' (तलाव) च्या शब्दाचे लघुरूप आहे तर कल्लु म्हणजे दगड किंवा खडक. गावाच्या भौगोलिक वैशिष्ट्यांची ओळख करून देणारे हे गाव आहे.

तडकल्लु हे ग्रामनाम कल्याणी चालुक्य नृपती पहिला व दुसरा यांच्या मिळालेल्या दोन शिलालेखांमध्ये आढळते. दोन्ही शिलालेख कन्नड लिपीत आहेत. यातील पहिला शिलालेख (इ.स. १०४७) सोमेश्वर पहिला याच्या कारकिर्दीतील असून त्यामध्ये कल्याणी चालुक्य घराण्याची वंशावळ दिली आहे. लेखामध्ये नागवर्मा व त्याचा भाऊ माधव या सोमेश्वर पहिलाच्या वाजी घराण्यातील दोन सेनापतींची ओळख करून दिली आहे व त्यांची वंशावळ दिली आहे. नागवर्म्याने राजासाठी अनेक युद्ध जिंकली होती असे शिलालेखावरून आढळते. त्याच्या पराक्रमावर खुश होऊन राजाने त्याला सक्करगे ८० मधील तडकल्लु हे गाव इनाम दिले. या ठिकाणी नागवर्म्याने आपली पत्नी, आई, वडील, मुलगा भाऊ, बहीण या सर्वांच्या नावाने अनेक देवालये उभारली. नागवर्म्याने याठिकाणी पुढील देवालये बांधल्याचा शिलालेखात उल्लेख आढळतो- (१) नारायण, (२) आदित्य, (३) ऐच्छेश्वर, (४) नागेश्वर, (५) भैरव, (६) मल्लिकार्जुन, (७) सरस्वती मंडप याशिवाय नागवर्म्याने नाग, नंदी, गणेश आणि सप्तमातृका अशा विविध देवतांची स्थापना केल्याचाही उल्लेख आढळतो. देवांची पूजा, संन्यासी व विद्यार्थी यांच्यासाठी अन्नछत्र, मंदिरांची दुरुस्ती वगैरे गोष्टींसाठी त्याने विविध कर व महसुलांमधून मिळणाऱ्या रकमेतून जमीन व पैशांच्या रूपाने दान दिले असे शिलालेखात नमूद करण्यात आले आहे.[८०] या दानांची व्यवस्था कालमुख पंथाच्या वागेश्वर पंडीताकडे सोपविण्यात आली होती.

दुसरा शिलालेख (इ.स. १०७०) कल्याणी चालुक्य नृपती सोमेश्वर दुसरा याच्या राजवटीतील आहे. दंडनायक काळीमय्य याने करडीकल्लू (सध्याचे करडखेड, ता. देगलूर) इथे बांधलेल्या निगंकमल्ल जिनालयला दिलेली दाने नोंदविली आहेत. दात्यांमध्ये वरील लेखातील नागवर्मा आहे. तसेच तडखेल मधील श्रेष्ठी व महाजनांचाही उल्लेख आढळतो.[८१]

पहिल्या शिलालेखात आलेल्या सरस्वती मंडपाच्या उल्लेखावरून या ठिकाणी पाठशाळा असल्याची माहिती दिली आहे. यावरून हे एक शैक्षणिक केंद्र असावे असे वाटते. त्याचप्रमाणे दुसऱ्या शिलालेखात असलेल्या महाजन व श्रेष्ठी यांच्या संदर्भावरून तडखेल हे व्यापारी केंद्रही असावे असे वाटते.

सध्या या ठिकाणी केवळ मल्लया मंदिर दिसून येते. ठोसरांच्या मते ते शिलालेखात उल्लेखिलेले नागवर्म्याने बांधलेले मल्लिकार्जून मंदिर असावे.[८२] इतर मंदिरांचे शिल्पावशेष विखुरलेल्या स्थितीत गावात आढळतात.

---

७९. ठोसर, हरिहर **हिस्टॉरिकल जॉग्रॉफी ऑफ महाराष्ट्र ॲण्ड गोवा**, पूर्वोक्त, पृ. ५९०.

८०. रित्ती व शेळके, पूर्वोक्त, शिलालेख क्र. ३.

८१. कित्ता, शिलालेख क्र. ८.

८२. हरिहर ठोसर, **हिस्टॉरिकल जॉग्रॉफी ऑफ महाराष्ट्र ॲण्ड गोवा**, पूर्वोक्त, पृ. ५९०.

Maharashtra State Gazetteers

## तळणी

**तळणी :** (ता. नांदेड) नांदेडपासून १४ कि.मी. अंतरावर तळणी खेड्यात तीन मूर्ती आढळल्या आहेत. त्यापैकी डावी कडील मूर्ती महादेवाची, मधली ब्रह्मदेवाची तर उजवीकडील मूर्ती विष्णूची आहे. महादेवाच्या हातात डमरू, ब्रह्मदेवाच्या रिक्त हातात कमंडलू व दुसऱ्या हातात पोथी आहे, विष्णूमूर्तीच्या एका हातात चक्र आहे.

## तळणी

**तळणी :** (ता. हदगाव) हदगाव तालुक्यातील तळणी हे गाव हदगावपासून २५ कि.मी. अंतरावर व शिरूरच्या अलिकडे १० कि.मी. अंतरावर आहे. या ठिकाणी एका मंदिराचे अवशेष आढळून आले आहेत. मंदिराचा फक्त चौथरा व दोन स्तंभ शिल्लक आहेत.

याशिवाय गावात एक देवीचे जुने मंदिर व विहीर आहे.[८३] ही विहीर विटांचे बांधकाम असलेली (६.२०×६.२० मी.) चौरसाकृती विहीर आहे. प्रवेश मार्ग १०.८० मी. लांब व ३.७० मी. रुंद आहे. बांधकामासाठी उपयोगात आणलेल्या विटांचा आकार ३५ × २१ × ७ सें.मी. आहे. तांत्रिकदृष्ट्या विहिरीचे बांधकाम चांगले आहे. प्रवेशमार्गावरील दोन देवकोष्ठे विटांची आहेत. चौरस आकाराची विहीर स्थापत्यशास्त्रीयदृष्ट्या पाहता काहीशी सुलभ आणि बांधकामपूर्वी करावयाचे उत्खनन व निर्माण करण्यासाठी लागणारी आर्थिक क्षमता या दृष्टीनेही सोयीस्कर ठरते.

## तामसा

**तामसा :** (ता. हदगाव, १९° २०′ उ. ते ७७° ३५′ पू.) हदगाव या तालुका मुख्यालयापासून तामसा १६.०९३ कि.मी. अंतरावर वसले आहे. इथे मोठी बाजारपेठ आहे. या गावात बारलिंगा मंदिर म्हणून प्रसिद्ध मंदिर आहे. हे मंदिर गावाच्या आग्नेयास जवळजवळ दोन कि.मी. अंतरावर आहे. हे मंदिर पश्चिमाभिमुखी असून हेमाडपंथी आहे. गर्भगृह जमिनीच्या पातळीच्या खाली असून शिवपिंडीतील शाळुंकेभोवती पोकळी आहे. त्यामध्ये पावसाळ्यात पाणी साठते. सभामंडपातही एक शिवपिंडी असून तिच्यावर बारा लहान व एक मोठी अशा पिंडी आहेत, त्यामुळे या मंदिराला बारलिंगा मंदिर असे म्हटले जाते. मंदिराबाहेर एका चौरसाकृती उंचवट्यावर जवळजवळ ४ मी. उंच दीपमाळ आहे. या ठिकाणी दर श्रावण सोमवारी भाविकांची गर्दी होते. महाशिवरात्रीला मोठ्या प्रमाणावर यात्रा भरते. सध्या या मंदिराच्या जीर्णोद्धाराचे काम सुरू आहे. त्यानुसार कालानुरूप मंदिरात आधुनिकीकरण केले आहे.

**गौतमतीर्थ :** बारलिंगा मंदिराच्या आग्नेयास जवळजवळ ०.६ कि.मी. वर गौतमतीर्थ नावाचे पवित्र कुंड आहे. या स्थानाबाबत एक आख्यायिका सांगितली जाते.[८४] त्यानुसार गौतमऋषींचा इथे आश्रम होता, याच ठिकाणी गौतमऋषींच्या शापामुळे शिळा होऊन पडलेल्या गौतमऋषींच्या पत्नीचा,

---

८३. पाठक, अ. शं. **महाराष्ट्रातील बारव स्थापत्य**, पूर्वोक्त, पृ.

८४. **नांदेड जिल्हा गॅझेटिअर**, पूर्वोक्त, पृ. ५८३.

अहिल्येचा उद्धार श्रीरामाने केला अशीही कथा लोकमानसात प्रचलित आहे. या ठिकाणी परशुरामाने मारलेल्या बाणामुळे गंगा अवतीर्ण झाली असेही सांगितले जाते. या ठिकाणी गौतमऋषी व अहिल्या यांचे मंदिर आहे. एक लहान पडावयास आलेली खोली असे मंदिराचे स्वरूप आहे. मंदिरात उंच अधिष्ठानावर गौतम व अहिल्येच्या पाषाणात कोरलेल्या प्रतिमा आहेत. मंदिराजवळच गौतमतीर्थ आहे. ते जवळजवळ १५.२४० × १२.१९२ मी. आहे. त्याची खोली ३.०४८ ते ३.६५७ मी. एवढी आहे. जवळच एक शिवपिंडी आहे. मंदिराच्या आवारात काही समाध्या, मोठी मारूतीची मूर्ती व काही पुरातन अवशेष पडले आहेत. याशिवाय गावात बालाजी मंदिर, राममंदिर, मारूती मंदिर, विठ्ठल मंदिर आहे. बालाजी मंदिरात काळ्या पाषाणातील बालाजीची सुरेख मूर्ती आहे. इथे एक काळा मारूती म्हणून मंदिर आहे. दास मारूतीचे मंदिर सहसा आढळत नाही. इथे असलेली दास मारूतीची मूर्ती हे या मंदिराचे वेगळेपण आहे. इथले विठ्ठल मंदिर वैशिष्ट्यपूर्ण आहे. मंदिराला उंच प्रवेशद्वार तसेच तटभिंत आहे. वर नगारखाना आहे, आवारात एक मोठी विहीर व समाधी आहे. याबरोबरच श्री अप्पाजी महाराजांचा मठ, श्री विरुपाक्षमहाराज समाधी तसेच श्री दिगंबरस्वामी बसमतकर महाराज मठ आहे. गावात सय्यद जलाल काद्री दर्गा आहे. हा दर्गा गावाच्या दक्षिणेस दोन कि.मी. अंतरावर आहे. दरवर्षी १६ शाब्बान पासून तीन दिवस इथे ऊरूस भरतो. दर्ग्याला काही जमीन इनाम दिली आहे. याव्यतिरिक्त जामा मशीद म्हणून ओळखली जाणारी एक मशीद आहे. या मशीदीलाही जमीन इनाम दिली आहे.

**दाभड :** महाविहार बावरीनगर, दाभड (नांदेडपासून) १० कि.मी. अंतरावर, नांदेड-नागपूर हायवेवर हे स्थान आहे. जानेवारी, १९८८ पासून दर पौष पोर्णिमेस येथे प्रतिवर्षी अखिल भारतीय बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन करण्यात येते. ४ जून २००४ पासून या स्थानाला महाराष्ट्र शासनाच्या वतीने पवित्र क्षेत्राचा दर्जा देण्यात देऊन २५ कोटींचा निधी उपलब्ध करून देण्यात आला. बावरी यांनी वयाच्या ८०व्या वर्षी येथून सोळा शिष्य उत्तरेत भगवान बुद्ध यांच्याकडे पाठविले होते. डॉ. एस. पी. गायकवाड यांच्या प्रेरणेतून साकारण्यात येणारा आंतरराष्ट्रीय किर्तीचा हा महाविहार आकर्षणाचे केंद्र असणार आहे. पर्यावरणाचा विचार करून हे संपूर्ण केंद्र दगडी बांधकाम उभारण्यात येणार आहे.

## देगलूर

**देगलूर :** (ता. देगलूर, १७° ५८′ उ. ते ७३° ३५′ पू.) देगलूर हा तालुका नांदेड जिल्ह्याच्या दक्षिणेला वसलेला आहे. आंध्रप्रदेश व कर्नाटक या दोन राज्यांच्या लगत असल्यामुळे तेलुगु व कानडी भाषांचा प्रभाव या तालुक्यावर पडलेला आढळतो. हा परिसर मन्याड, लेंडी व मांजरा नदीच्या खोऱ्यात असून तालुका मुख्यालय पाताळगंगा नदीच्या (लेंडी नदी) काठावर वसले आहे. देगलूर हा नांदेडमधील प्रमुख तालुक्यांपैकी एक असून व्यापार व उद्योगधंद्यांचे ते एक महत्त्वाचे केंद्र आहे. तालुक्यातून कापूस, ज्वारी, मिरची, गहू यांची निर्यात केली जाते. शहराचे प्रशासन नगरपरिषदेतर्फे चालविले जाते. शहरास करडखेड मध्यम प्रकल्पातून दर दिवशी दर माणशी ८० लीटर पाणीपुरवठा करण्यात येतो.[८५]

पूर्वी या गावाचे नाव देवपूर होते, परंतु त्यास देवउलुरू असेही म्हणत असत. त्याचाच पुढे अपभ्रंश होऊन गावाचे नाव देगलूर झाले. ऐतिहासिक काळात कल्याणच्या चालुक्य काळातील

८५. नगरपरिषद देगलूर यांनी पाठविलेल्या माहिती आधारे.

राजकीयदृष्ट्या सर्वाधिक कार्यक्षम असणारा हा भाग होता. या तालुक्यात या राजवंशाचे तेवीस शिलालेख सापडले आहेत. कानडी व संस्कृत भाषेतील या लेखांवरून त्याकाळी या तालुक्यास असलेले महत्त्व स्पष्ट होते. काही काळ चालुक्यांची राजधानी राहिलेल्या या भागात वाजीकुल आणि वन्ही किंवा पावक ही मांडलिक घराणी नांदली होती. कोरीव लेखांमुळे ही घराणी, दान देणारे राजपुरूष, अधिकारी, सरदार यांची माहिती तर मिळतेच पण त्यांनी राबविलेल्या लोक कल्याणकारी योजनांची माहितीही मिळते.

तालुक्यातील होट्टल, शेळगाव, करडखेड, खानापूर, रामपूर या गावांमध्ये चालुक्यकालीन मंदिरे व शिल्पावशेष पहावयास मिळतात. प्रत्यक्षात मात्र या शहरात फक्त संत श्री गुंडा महाराज देगलूरकर यांच्या मठात सध्या ठेवण्यात आलेली सरस्वतीची चालुक्यकालीन प्रतिमा आढळून येते.

**सरस्वती :** देगलूर येथील सरस्वतीची प्रतिमा प्रथम बी. जी. देशमुख यांनी आपल्या प्रबंधात प्रकाशित केली.[८६] काळ्याभोर पाषाणात कोरलेल्या या मूर्तीची चकाकी आजही कायम आहे. मूर्तीवरील कोरीव काम अप्रतिम आहे. पद्मासनातील ही मूर्ती चतुर्हस्त आहे. मूर्तीचा खालचा उजवा हात अभय मुद्रेत आहे. उजव्या हातात अक्षमाला तर वरच्या डाव्या हातात पुस्तक धारण केले आहे. खालचा डावा हात वरदहस्त मुद्रेत आहे. मूर्ती सालंकृत असून तिने करंडक मुकुट, माला, रत्नकुंडले, कटीबंध, उदरबंध, कंकण, केयुर धारण केले आहे. शिल्पकलेचा उत्तम नमुना असणाऱ्या या शिल्पावर चालुक्य-होयसळ शिल्पशैलीचा प्रभाव आढळतो.[८७]

या मूर्तीखेरीज दुसरे शिल्प या परिसरात आढळत नाही. या शहरातील इतर प्रेक्षणीय स्थळे पुढीलप्रमाणे :—

**श्री संत गुंडा महाराजांचा मठ :** देगलूर शहर येथे होऊन गेलेल्या संत गुंडा महाराज देगलूरकर यांचे गाव म्हणून प्रसिद्ध आहे. मूलतः ते नाथ संप्रदायी असून देखील नंतर त्यांनी भागवत पंथाचा स्वीकार केला.[८८] संत गुंडा महाराज हे पूर्वाश्रमी श्रीमंत सावकार होते. परंतु काही कारणाने त्यांना वैराग्य प्राप्त झाले. त्यांनी पंढरपूर येथे सन १८१८ साली जिवंत समाधी घेतली. त्यांच्याच वंशजांपैकी धुंडा महाराज हे प्रसिद्ध किर्तनकार झाले. त्यांच्यामुळे या मठाला वारकरी संप्रदायात मान आहे.

गुंडा महाराजांच्या स्मरणार्थ बांधलेला मठ जवळजवळ सव्वाशे वर्ष जुना आहे. मठाचे बांधकाम दगडी शीळांचे असून वर घुमट आहे. मठात तीन गाभारे असून मधल्या मुख्य गाभाऱ्यात राम, लक्ष्मण, सीता आणि हनुमान यांच्या मूर्ती आहेत. यासंबंधी एक कथा सांगितली जाते, ती अशी, एकदा एक गोसावी राम, लक्ष्मण, सीता यांच्या मूर्ती घेऊन जात होता. तो येथे आला असता त्या मूर्ती गुंडा महाराजांकडे देण्याबद्दल त्याला दृष्टांत झाला. त्यानुसार त्याने मूर्ती गुंडा महाराजांकडे स्वाधीन केल्या. मठात दुसऱ्या गाभाऱ्यात विठ्ठल-रखुमाईच्या मूर्तीचीही प्रतिष्ठापना केली आहे. विठ्ठलाच्या सिंहासनासमोर गरूड व हनुमान कोरले आहेत. त्याचप्रमाणे मल्लिकार्जून, पद्मावती, गणपती, पुंडलिक, नारद यांच्याही मूर्तींची स्थापना केली आहे. मठामध्ये अनेक कार्यक्रम होतात. गुंडा महाराजांना महाशिवरात्रीला विठ्ठल दर्शन झाले म्हणून सप्ताह केला जातो. चैत्र शुद्ध प्रतिपदा ते दशमी या कालावधीत रामनवमीचा उत्सव

---

८६. राजन अमिताभ (संपा), पूर्वोक्त, भगवान देशमुख, "मूर्तीशिल्प वैभव", नांदेड जिल्हा, पृ. ६५.

८७. कित्ता.

८८. **नांदेड जिल्हा गॅझेटिअर**, पूर्वोक्त, पृ. ५६३.

असतो. अश्विन शुद्ध प्रतिपदा ते पंचमी या काळात गुंडा महाराजांची पुण्यतिथी साजरी करण्यात येते. त्याचप्रमाणे प्रतिवर्षी कै. धुंडा महाराज देगलूरकर यांच्या पुण्यस्मरण दिनानिमित्त दोन दिवस व कै. एकनाथ महाराज देगलूरकर यांच्या पुण्यस्मरण दिनानिमित्त महाशिवरात्रीच्या वेळी शहरातून भव्य दिंडी काढण्यात येते.[८९]

**सय्यदशहा सैन-उद्दीन दर्गा :** शहराच्या पूर्वेला मुख्य रस्त्याच्या लागून एक मशीद (१८.२८८ मी. उंच व ९.१४४ मी. रुंदी) आहे.[९०] ही मशीद चौदाव्या शतकात इ. स. १३२९ मध्ये बांधली असून त्यात सय्यद शहा सैन-उद्दीन यांचा दर्गा आहे. त्या संबंधीचा एक शिलालेख येथे आहे. पुढच्या बाजूस आणखी एक दर्गा असून तो सय्यद शहा सैन-उद्दीन यांचे गुरु सज्जद बहा-उद्दीन यांचा आहे.[९१]

मशिदीच्या समोर त्यांच्या सात शिष्यांची थडगी असून त्यावर सप्तस्वरांचे सूर निघणारे सात दगड ओळीने सारेगमपधनी या क्रमाने ठेवण्यात आले आहेत.[९२] अशा सप्तसूरमय दगडांचा वापर देगलूर तालुक्यातील होट्टल या गावात असलेल्या चालुक्यकालीन मंदिराच्या बांधकामात झाला आहे.[९३] तेथील देवालयात असे अनेक दगड आजही आढळतात.[९४] दर्ग्याशेजारी कुंडाच्या आकाराची एक विहीर आजही चांगल्या स्थितीत आहे. ती दर्ग्यापेक्षाही प्राचीन असल्याचे सांगितले जाते.[९५]

याशिवाय देगलूरमध्ये इतर अनेक देव-देवतांची मंदिरे आहेत. होट्टलवेस येथील मारुती मंदिरात धर्मशाळा आहे. हनुमान जयंतीला इथे भंडारा केला जातो. पोचमवेस व कापडबाजार या ठिकाणीही मारुती मंदिरे आहेत. मोंढा भागात एक रोकडा हनुमान मंदिर आहे. मंदिराला बाजूने ओटा व छोटी घुमटी बांधली आहे. मारुतीला मुखवटा लावला आहे. बंडा गल्लीत श्री बालाजी मंदिर आहे. मंदिरात ३२ खांब असलेला सभामंडप असून वर दगडी छत आहे. यातच छोटा गाभारा असून त्यात बालाजीची साधारणतः ४५ से.मी. उंचीची मूर्ती आहे. अनेक भाविक या मंदिराला भेट देतात. वर्षभर इथे अनेक कार्यक्रम होतात. उदगीर रोडवर राघवेंद्रस्वामी मंदिर आहे. मंदिराच्या बांधकामाची सुरूवात १९७८ साली झाली, तर १९९२ या वर्षी काम पूर्ण झाले. मंदिराला मोठा सभामंडप व मोठे आवार आहे. राखी पोर्णिमेला देवळात खूप मोठा उत्सव असतो. याशिवाय गावात दत्त, विठ्ठलेश्वर, दुर्गा, साईबाबा, तुळजाभवानी, गणपती, कृष्ण, संतोषीमाता यांची मंदिरे आहेत. गुंडा महाराजांचे गुरु चुडामणी महाराज यांचा मठ आहे. तसेच सिद्धार्थ नगरात बौद्धविहार बांधला आहे.

## धर्माबाद

**धर्माबाद :** (ता. धर्माबाद, १८° ५०′ उ., ७७° ५०′ पू.) तालुका मुख्यालय असलेले हे शहर नांदेडपासून ७०.८४ कि.मी. वर वसले आहे. या शहराचे नाव तुलनेने नवीन आहे. जुन्या हैद्राबाद

८९. देगलूर नगरपरिषदेकडून आलेल्या माहितीवर आधारित.

९०. **नांदेड जिल्हा गॅझेटिअर**, पूर्वोक्त, पृ. ५६३.

९१. कित्ता.

९२. कित्ता.

९३. राजन अमिताभ (संपा), पूर्वोक्त, प्रभाकर देव 'स्थापत्य अवशेष', पृ. ३३.

९४. कित्ता.

९५. **नांदेड जिल्हा गॅझेटिअर**, पूर्वोक्त, पृ. ५६३.

Maharashtra State Gazetteers

राज्यातील धर्मवंत या इथल्या जहागिरदारावरून शहराचे नाव पडले आहे. या जहागिरदाराने हे गाव वसविल्याचे सांगितले जाते.[९६] महाराष्ट्र-आंध्रप्रदेश सीमेवरील ही एक प्रमुख व्यापारी पेठ आहे. कापूस, ज्वारी, मिरची, तेलबिया, उडीद आणि मूग यांचा व्यापार येथून चालतो. देवी सरस्वतीचे स्थान असलेले प्रसिद्ध बासर येथून केवळ पंधरा कि.मी. वर आहे. हैद्राबाद मुक्तीसंग्रामाचे पहिले हुतात्मा गोविंदराव पानसरे यांच्या बलीदानामुळे या शहरास एक आगळे ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

धर्माबादमध्ये नगरपालिका असून तिची स्थापना इ.स. १९४८ मध्ये झाली आहे. या शहराचा इतिहास फार मागे जात नसल्यामुळे धर्माबाद शहरात प्राचीन किंवा मध्ययुगीन इतिहासाची परंपरा सांगणारे अवशेष सापडत नाहीत. तरीही धर्माबादमध्ये इतर काही पर्यटनदृष्ट्या महत्त्वाची ठिकाणे आहेत.

**विठ्ठलेश्वर मंदिर :** मूळ मंदिर कधी बांधले याची नोंद नसली तरी साधारणपणे ७० वर्ष जुन्या असलेल्या या मंदिराचा आता जीर्णोध्दार करण्यात आला आहे. गाभारा लहान असून त्यात विठोबा व रखुमाईच्या मुर्ती आहेत. सभामंडप नव्याने बांधण्यात आला आहे.

**हनुमान व विठ्ठल मंदिर :** या मंदिराचा देखील पूर्णपणे जीर्णोध्दार करण्यात आला आहे. मंदिराचा सभामंडप मोठा असून तोही नव्याने बांधण्यात आला आहे. दोन गर्भगृह असून एकात शिवलिंग तर दुसऱ्यात हनुमान आहे. शेंदूर चर्चित पाषाणावर मारूतीची स्टेनलेस स्टिलची पूर्णाकृती आकृती बसविण्यात आली आहे.

**बालाजी मंदिर :** माहेश्वरी समाजाचे हे मंदिर विसाव्या शतकातील सत्तराव्या दशकात बांधले आहे. येथे राधाकृष्णाच्या सुरेख मुर्ती असून पितळ्याची बाळकृष्णाची मुर्ती आहे.

**यल्लमादेवी मंदिर :** शहरात यल्लमादेवीचे मंदिर असून मंदिराच्या सुशोभिकरणाचा व जीर्णोध्दराचा प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी देण्यात आला आहे. त्यात मंदिरासमोरील सभामंडप, प्रवेशद्वाराची कमान, अंतर्गत रस्ते, यात्रेकरुंसाठी निवासस्थानाची व्यवस्था व विद्युतीकरण यांचा समावेश आहे.

याशिवाय शहरात जैन मंदिर असून ते साधारणतः ५० वर्षापूर्वीचे आहे. काही वर्षापूर्वी या मंदिराचा जीर्णोध्दार झाला आहे. याशिवाय शहरात एक राममंदिर, गावाबाहेरील टेकडीवर मारूती व भवानीमाता व बाळापूर भागात शितलामातेचे मंदिर आहे. तसेच दुर्गामाता मंदिर व कैलास टेकडीवर नव्याने बांधलेले महादेव मंदिर आहे. याशिवाय शहरात पुढील प्रेक्षणीय स्थळे असून नगरपरिषदेतर्फे त्यांच्या सुशोभिकरणाचे काम सुरू आहे.[९७]

**हुतात्मा स्मारक :** शहरात हुतात्मा स्मारक असून नगरपरिषदेने ४ लाख निधी खर्च करून रोपवाटिका, वृक्षरोपण, पुतळे, पक्ष्यांसाठी निवारा आदी सोयी केल्या आहेत.

---

९६. **नांदेड जिल्हा गॅझेटिअर**, पूर्वोक्त, पृ. ५६३.

९७. नगरपरिषद धर्माबाद यांच्याकडून आलेल्या माहितीआधारे.

**इदगाह :** नगरपरीषद क्षेत्रातील पाण्याच्या टाकीजवळ मुस्लिम बांधवांसाठी असलेला इदगाह हे या शहराचे स्वतंत्र आकर्षण आहे. येथे मुस्लिम समाज मोठ्या प्रमाणावर नमाज पढण्यासाठी येतो.

**स्मशानभूमी :** नगरपरिषद क्षेत्रातील स्मशानभूमीचे सुशोभिकरण नगरपरीषदेने हाती घेतले असून प्रस्तुत स्मशानभूमीत शिवमूर्ती बसविणे, प्रवेशद्वार, वेटींग रूम, अंतर्गत रस्ते व इतर सुशोभिकरणाचे काम प्रस्तावित आहे.

**श्री शिवरामसागर तलाव :** बाळापूर या भागात श्री शिवरामसागर नामक तलाव असून त्याच्यातील गाळ काढून त्याच्या सुशोभिकरणाचे काम पूर्ण करण्यात आले आहे. आतापर्यंत या कामावर शासनाने १३ लाख रुपये खर्च केला असून त्या अंतर्गत तलावाभोवती खडीचा रस्ता तयार करणे, तलावाभोवती सुरक्षा भिंत बांधणे, मूर्तीसाठी तलावामध्ये बेसवे बांधकाम, लहान पॉण्डस्, प्रवेश कमान इत्यादी बाबींचा समावेश आहे.

**श्री हिंगुलांबिका मंदिर :** श्री हिंगुलांबिका मंदिर हे शहरातील प्रसिद्ध मंदिर असून नवरात्रीचा महोत्सव इथे साजरा करण्यात येतो. त्यावेळी हजारो भाविक दर्शनासाठी जमतात. गेल्या काही वर्षांपासून इथे भव्य यात्रा भरवली जाते.

**विळेगाव येथील गंगाघाट :** धर्माबाद शहरापासून ४ कि.मी. अंतरावर असलेल्या विळेगाव येथे गोदावरीच्या काठी गंगा घाट म्हणून घाट असून इथे हजारो भाविक गोदास्नानाचा लाभ घेतात. हा घाट पापविनाशी घाट म्हणूनही संबोधला जातो.

केंद्रशासनाने या शहरास एकात्मिक शहर विकास योजना लागू करण्यास मान्यता दर्शविली असून त्या अंतर्गतही काही योजना हाती घेण्यात आल्या आहेत.

**क्रांती तिर्थ प्रकल्प :** चौदा एकरावर हा भव्यदिव्य प्रकल्प उभारला जाणार आहे. यासाठी अनेक वास्तुशास्त्रज्ञ, वस्तुसंग्रहालये व पुरातत्त्वखात्याचा सहभाग लाभणार आहे. या अंतर्गत भव्य कमान व उद्यानाच्या विकासासाठी स्वतंत्र अर्थसहाय्याकरिता शासनाकडे प्रस्ताव सादर केला आहे.

**पुरातत्त्व खात्याचे बहुउद्देशीय संग्रहालय :** हुतात्मा गोविंदरावजी पानसरे वाचनालयात बहुउद्देशीय वस्तु संग्रहालय स्थापन करण्याचा प्रस्ताव आहे. धर्माबाद नगरपालिकेच्या क्षेत्रातील व जिल्ह्याच्या इतर भागातील प्राचीन मूर्ती व अवशेष, क्रांतीकारकांची जुनी छायाचित्रे, त्यांच्या आयुष्याशी निगडीत असणाऱ्या वस्तू, इतर काही वैशिष्ट्यपूर्ण व दुर्मिळ वस्तू जतन करून त्याबद्दल दृकश्राव्य माध्यमातून लोकांपर्यंत माहिती पोहचविणे या दृष्टीकोनातून सदर वस्तुसंग्रहालय उभारण्याचे उद्दीष्ट आहे.

धर्माबाद तालुक्यात येवती, जुन्नी, राहेर अशी चालुक्य-यादव काळात भरभराटीला आलेली गावे आहेत. त्यादृष्टीनेही धर्माबाद तालुका महत्त्वाचा ठरतो.

## नांदेड

**नांदेड :** (ता. नांदेड, १९° ०५′ उ., ७७° १५′ पू.) नांदेड शहर प्राचीन काळी नन्दिकड किंवा नन्दितट या नावाने ओळखले जात असे. हे शहर गोदावरीच्या उत्तर तीरावर वसलेले आहे. सांची

येथील स्तुपावरील दानलेखात एका नन्दिनगराचा उल्लेख आला आहे. हे नन्दिनगर म्हणजेच नांदेड असे काही संशोधकांचे मत आहे. या शिलालेखावरून तसेच या परिसरात सापडलेल्या पुरावशेषांवरून नांदेडचे प्राचीनत्व सातवाहन काळापर्यंत मागे नेता येते.

एकूणच गोदावरीचे खोरे हे महाराष्ट्राचे प्राचीन वस्तीस्थान मानले जाते. प्रागैतिहासिक काळातील मध्यपुराश्मयुगीन हत्यारे नांदेड परिसरातील किवळा येथे मिळाली आहेत. रामायण-महाभारतातही नांदेडचे उल्लेख आढळतात. रामायणात राम रावणाचा वध करून परत जात असता त्याला नंदीग्राम लागले असा उल्लेख आढळतो.[९८] पांडव नांदेडमध्ये येऊन गेल्याचेही सांगितले जाते. पुढे ते कंधार म्हणजे पांचाळपूरला गेले.

ऐतिहासिक काळाच्या प्रारंभी भारतात एकूण सोळा जनपदे अस्तित्वात होती. त्यापैकी अश्मक व मूलक ही दक्षिण भारतात होती. अश्मक जनपद हे दक्षिण भारतातील सर्वात प्राचीन जनपद. प्राचीन वाङ्मयात या जनपदाचा उल्लेख आढळतो. या अश्मक जनपदाची राजधानी पोटन म्हणजे आताच्या आंध्र प्रदेशातील निजामाबाद जिल्ह्यातील बोधन. बोधन नांदेड जिल्ह्याच्या सरहद्दीपासून अगदी जवळ आहे. यावरून नांदेड त्या काळी अश्मक जनपदाचा भाग असल्याचे सिद्ध होते. नंदवंशीयांनीही येथे सत्ता स्थापन केली. पैठण हे शहर नंद वंशीयांची दक्षिणेतील राजधानी होते तर 'नंद आहार' किंवा 'नवनंद डेरा' नावाने ओळखले जाणारे नांदेड हे उपराजधानीचे ठिकाण होते.[९९] नांदेड हे नाव नवनंद डेरा या नावाचे अपभ्रंश रुप आहे. रा.श्री.मोरवंचीकर यांच्या मते नांदेड ही उत्तरेकडील नंदांच्या सामाज्याची दक्षिणेतील सीमा होती. युआन त्सांग या चिनी प्रवाशाने ७ व्या शतकात नोंदविले आहे की, नंद घराण्यातील धनानंदची गोदावरी काठावरील नंदेडरा ही उपराजधानी होती. आजही लोकस्मृतीत नांदेड ही नंद व नवनंदाची राजधानी असल्याचे सांगितले जाते.[१००]

सांची स्तुपावरील दानलेखात नन्दिनगर येथील अनेक बौद्ध भिक्षु-भिक्षुणी तसेच इतर नागरिकांची नावे आली आहेत. यावरून नांदेड हे दक्षिणेतील एक बौद्धपीठ असल्याचे दिसते. अमरावतीहून विदीशेकडे जाणाऱ्या राजमार्गावरील ते एक प्रमुख स्थान होते.[१०१] प्रभाकर देव यांच्या मते नंदगिरी ही सातवाहनांची पहिली राजधानी होती.[१०२] नांदेडपासून केवळ पाच कि.मी. अंतरावर असणाऱ्या असरजंग या खेड्याजवळ सातवाहनकालीन अवशेष मिळाले आहेत.

वाकाटकांच्या वात्सगुल्म या शाखेच्या काळात (इ.स. ३३०-५१०) नांदेड हे विषय मुख्यालय झाले. त्यामुळे नांदेडला राजकीय महत्त्व प्राप्त झाले. वाकाटक नृपती विंध्यशक्ती द्वितीय याच्या वाशीम ताम्रपटात "वाकाटकानां श्री विंध्यशक्तेखचेनात नान्दीकडस उत्तरमग्ये" असा नांदेडचा उल्लेख केला

९८. सुनिल पुरी, पूर्वोक्त, पृ. २८२.

९९. कठारे, अनिल **मराठवाड्यातील किल्ले,** पृ. १५९.

१००. देव, प्रभाकर **हेरिटेज नांदेड,** पूर्वोक्त, पृ. ०५.

१०१. ठोसर, हरिहर **हिस्टॉरिकल जॉग्रॉफी ऑफ महाराष्ट्र ॲण्ड गोवा,** पूर्वोक्त, पृ.

१०२. देव, प्रभाकर **हेरिटेज नांदेड,** पूर्वोक्त, पृ. ५२.

Maharashtra State Gazetteers

आहे. एक शैक्षणिक केंद्र आणि विद्वानांचे माहेरघर म्हणून चालुक्य, राष्ट्रकूट व गंग या राजांच्या शिलालेख व ताम्रपटांमध्ये नांदेडचा गौरवपूर्ण उल्लेख आला आहे. कंधार येथील प्रसिद्ध राष्ट्रकूटकालीन शिलालेखात गोदावरी खोऱ्यातील एक वैभवसंपन्न महानगर अशी नांदेडची प्रशंसा केलेली आढळते. कल्याणच्या चालुक्यांच्या काळात सेनापती भीम याने इथे शाळा व त्रैपुरुषांचे मंदिर बांधल्याचा उल्लेख आला आहे. लीळाचरित्रात या विषयी उल्लेख आढळतो.

प्राचीन काळी नांदेड येथे गोदावरीकाठी काही घाट बांधले होते. यादवांच्या शिलालेखात काही घाट बांधल्याचा उल्लेख आढळतो. नांदेड मधील नाव घाट सर्वात प्राचीन असून प्राचीन काळी ते एक महत्त्वाचे नदीकाठचे बंदर असावे. येथून नाव म्हणजे होड्यांची वाहतूक होत असे. यापैकी बऱ्याचशा घाटांची पुनर्बांधणी करण्यात आली. यापैकी काही घाटांचे तर एकविसाव्या शतकात पूर्णपणे आधुनिकीकरण करण्यात आले.

गोदावरीकाठी असलेल्या भावतिर्थाला महानुभाव पंथाचे संस्थापक श्री चक्रधर स्वामी यांनी भेट दिली होती. महानुभावांच्या लीळाचरित्र या म्हाईंभटाने लिहीलेल्या ग्रंथात नांदेडचा उल्लेख आढळतो. या ग्रंथात नांदेडचे वर्णन केले आहे.

चौदाव्या शतकात नांदेडच्या कायापालटाला सुरुवात झाली. नांदेड जवळ आराध्यपूर (अर्धापूर) हे उपमुख्यालय असणाऱ्या यादवांचा उतरता काळ सुरू झाला. देवगिरीच्या यादवांनंतर वारंगळचे काकतीय हे नांदेडवर राज्य करणारे शेवटचे हिंदू घराणे ठरले. पुढे मुसलमानांच्या पहिल्या आक्रमणात नांदेडवर मुसलमानी राजवट सुरू झाली. काही वर्षांनंतर अल्लाउद्दीन खिलजीचा सेनापती मलिक काफूर याच्या साम्राज्यात नांदेडचा समावेश झाला. मुसलमानी आमदनीत नांदेड राजकीय हालचालीचे प्रमुख केंद्र झाले. या धुमश्चक्रीच्या काळात अनेक प्राचीन वास्तु नाश पावल्या. बहमनी कालखंडात दख्खनचा भाग चार सुभ्यात विभागला गेला त्यापैकी तेलंगण सुभ्यात नांदेडचा समावेश झाला. बहमनींचा वजीर महमूद गावान हा अतिशय शूर व कर्तबगार होता. त्याने नांदेड येथे बराच काळ वास्तव्य केले. त्याच काळात त्याने वजीराबाद ही पेठ वसवली. ही पेठ आधुनिक नांदेडच्या मध्यवर्ती वसली आहे. परंतु शहरात आज बहमनी कालखंडाची आठवण करून देणारी एकही वास्तु नाही.

त्यानंतर काही काळ नांदेड विजापूरच्या आदीलशाहीच्या अमलाखाली आले. पुढे मुघलांनी निजामशाहीचा पाडाव केला व निजामशाहीचे राज्य मुघल साम्राज्यात विलीन झाले. तकमिल-ए-अकबरनामा या ग्रंथात सांगितल्याप्रमाणे नांदेडच्या मातीत मलिक अंबर व मुघल यांच्यात अनेक लढाया झाल्या. औरंगजेब दख्खनचा सुभेदार असताना नांदेड सुभे तेलंगणचे सुभेदारी मुख्यालय होते.[१०३] ही सुभेदारी पंचवीस वर्ष टिकली. पुढे औरंगजेब याने हे मुख्यालय बिदरला हलविले. बिदरचा सुभा एकूण ६ सरकार व ७६ महालात विभागला गेला होता व नांदेड हे त्यापैकी एक सरकार होते. परंतु नांदेड हे सुभे तेलंगणचे नागरी मुख्यालय म्हणून कार्यरत राहिले. आता नांदेड, नांदेड

१०३. कित्ता, पृ. ४७.

Maharashtra State Gazetteers

सरकार झाले होते. नंदगिरी किल्ल्यात काही मुघलकालीन वास्तु आहेत. नांदेडने मुघल-मराठा संघर्षही अनुभवला. याच संघर्षाच्या काळात वऱ्हाडला जात असता छत्रपती शिवाजी महाराजांनी नांदेडला भेट दिली होती. शिवाजी महाराजांनी नांदेड शहराला दिलेली ही भेट शहरात शिवाजी महाराजांचा एक मोठा अश्वारुढ पुतळा उभारून संस्मरणीय केली आहे.

अठराव्या शतकात नांदेड काही अतिशय संस्मरणीय व ऐतिहासिक घटनांचे साक्षीदार झाले. या घटनांची स्मृती नांदेड मध्ये शिख गुरु गोविंदसिंघजी यांच्या आगमनाशी निगडीत आहे. सोधी तेज सिंघजी यांच्या 'जन्म साखी' या पुस्तकात श्री गुरु गोविंदसिंघजी दक्षिणेकडे आले यामागच्या कारणांचा व घटनांचा उहापोह केला आहे.

शिख तत्त्वज्ञानाचा प्रचार करण्यासाठी गुरु गोविंदसिंघजी पंजाबला आले. तिथून ते धोलपूर, मथुरा, वृंदावन ही ठिकाणे फिरले. जवळ जवळ त्यांची ही भ्रमंती सहा ते सात महिने सुरू होती. यादरम्यान बहादूरशहाने दक्षिणेत उद्‌भवलेली बंडाळी मोडून काढण्यासाठी दक्षिणेत मोहीम काढण्याचा निर्णय घेतला आणि आपल्याबरोबर येण्याची गुरु गोविंदसिंघजी यांना विनंती केली. गुरुंनी ही विनंती मान्य केली व बहादूरशहाला पुढे जाण्याची सूचना केली व स्वतः मागाहून येईन असे सांगितले. जानेवारी १७०८ मध्ये शिख जथ्याबरोबर गुरु गोविंदसिंघजींनी दक्षिणेकडे प्रयाण केले. धौलापूर, बुऱ्हाणपूर मार्गे ते हिंगोलीला पोचले. १७०८ मध्ये गुरुंचे नांदेडला आगमन झाले. कामरुनचा दक्षिणेतील वाढता प्रभाव नष्ट करण्यासाठी बहादूरशहा पुढे हैदराबादला गेला. सगळ्या ऐतिहासिक कागदपत्र व दस्तऐवजांनुसार श्री गुरु गोविंदसिंघजी यांचे नांदेडला आगमन झाले, तो दिवस होता १९ जुलै १७०८.

या काळात श्री गुरु गोविंदसिंघजी यांचे नदीकाठावर विविध स्थानांवर वास्तव्य होते. अनेक लोकांनी व भक्तांनी त्यांच्या पवित्र दर्शनाचा लाभ घेतला व त्यांना अनेक अनुभव आले. त्यांचे आलेले अनेक अनुभव लोकस्मृतींमध्ये आख्यायिका म्हणून आजही जिवंत आहेत. हिरा घाट व नगीना घाट या स्थानांशी निगडीत असे काही पवित्र अनुभव आहेत. तर बंदा घाटाने बंदा बैरागी या गुरु गोविंदसिंघजींच्या एकनिष्ठ भक्ताच्या स्मृती जतन केल्या आहेत. १८ ऑगस्ट १७०८ मध्ये गुरु गोविंदसिंघांवर प्राणघातक हल्ला झाला. हा हल्ला सरहिंदचा सुभेदार वझिरखान याने घडवून आणला होता. त्याने गुरु गोविंदसिंघजींच्या मागावर दोन पठाण पाठविले होते. त्यांनी गुरुंवर हल्ला केला व गुरु गंभीररित्या जखमी झाले. गुरु गोविंदसिंघजींवर केलेल्या वैद्यकीय उपचारांचे संदर्भ आढळतात. दुर्दैवाने गुरुंची तब्येत ढासळतच गेली व ७ ऑक्टोबर १७०८ रोजी ते पंचतत्त्वात विलीन झाले.

गुरु ग्रंथसाहिबला गुरु घोषित करण्याच्या प्रसंगाचे तपशीलवार वर्णन जन्म साखीत आढळते. त्यानुसार गुरु गोविंदसिंघजींवर हल्ला केल्यावर त्यांच्यावर ताबडतोब उपचार सुरू करण्यात आले. त्यांच्या जखमा बऱ्या होऊ लागल्या. त्यांच्या प्रकृतीत सुधारणा होत असल्यामुळे बंदासिंघ यांना पंजाबला प्रयाण करण्याविषयी सूचना देण्यात आली. त्यांनी पंजाबला जाण्यासाठी प्रयाण केले व परिस्थिती बदलली.

एचएफ ४१९७—१७

गुरु गोविंदसिंघजींची प्रकृती खालावतच गेली. गुरुंना परिस्थिती कळून चुकली म्हणून एके दिवशी त्यांनी शिखभक्तांना बोलावले व त्यांना नारळ आणि कुंकुमतिलक घेऊन येण्यास तसेच प्रसाद तयार करण्यास सांगितले. गुरुंनी भक्तांना आपल्या पलंगाजवळ येण्याचा आदेश दिला. गुरु ग्रंथ साहिब नक्षीदार पीठावर ठेवण्यात आले. गुरु गोविंदसिंघजींनी नारळ व पाच पैसे गुरु ग्रंथ साहिबांना अर्पण केले त्या भोवती तीन प्रदिक्षिणा घातल्या, त्यांच्यापुढे आपले मस्तक टेकविले व 'वाहेगुरु जी का खालसा' असे उद्‌गार काढले. अशा रीतीने यापुढे श्री गुरु ग्रंथ साहिबांना गुरु म्हणून संबोधण्यात यावे असे त्यांनी स्पष्ट निर्देश दिले.

नांदेड येथेच गुरु गोविंदसिंग यांनी अखेरचा श्वास घेतल्यामुळे नांदेड हे शिख धर्मीयांचे अतिशय पवित्र स्थान झाले आहे. इथे गुरुद्वारा बांधला असून 'श्री हुजूर अबचलगर सचखंड गुरुद्वारा' म्हणून तो प्रसिद्ध आहे.

पुढे निजामाने मुघलांबरोबर बंडखोरी केल्यानंतर इ.स. १७२५ मध्ये त्याने दख्खनमध्ये कायमचे वास्तव्य केले. या काळात नांदेड निजामाच्या हैद्राबाद राज्याचे भाग बनले. भारत स्वतंत्र होईपर्यंत म्हणजे १९४७ पर्यंत नांदेडचा समावेश हैदराबाद राज्यातच होत होता. स्वातंत्र्यानंतर हैद्राबादच्या निजामी राजवटीविरुद्ध पोलिस कारवाई केल्यानंतर नांदेड भारतीय संघराज्यात विलीन झाले. राज्यांच्या पुनर्रचनेनंतर मराठवाड्याचा भाग असलेला नांदेडचा भाग द्वैभाषिक मुंबई राज्याचा भाग झाला. शेवटी १९६० साली महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आल्यानंतर नांदेडचा महाराष्ट्रात समावेश झाला.

नांदेडला थोर ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा लाभला आहे. नांदेड हे संस्कृतच्या अभ्यासाचे केंद्र तर आहेच परंतु त्याचबरोबर विष्णुपंत शेष, रघुनाथ शेष व वामन पंडीत या सारख्या संतकवींची जन्मभूमीही आहे.

नांदेड हे मूलतः दीर्घ ऐतिहासिक परंपरा लाभलेले एक महत्त्वाचे प्राचीन शहर आहे. परंतु कालौघात नांदेडचे प्राचीन स्वरुप पूर्णतः बदलून गेले आहे. आज अतिशय थोड्या प्रमाणावर नांदेड शहरात प्राचीन व मध्ययुगीन वास्तु व अवशेष उपलब्ध आहेत. नंदगिरी किल्ला हे एकमेव प्राचीन स्मारक आहे तर गेल्या शतकात बांधलेले संगमरवरी गुरुद्वारा शहरातील मुख्य आकर्षण आहेत. शहरात काही जैन शिल्पावशेषही आढळतात. त्यामुळे शहराचे प्राचीनत्व सिद्ध होते.

मुख्य गुरुद्वारा व्यतिरिक्त शहरात सात गुरुद्वारे आहेत. हे सर्व गुरुद्वारे गुरु गोविंदसिंघजी यांच्या स्मृतींशी संबंधित आहेत.

## नंदगिरी ऊर्फ नांदेड किल्ला

नंदगिरी ऊर्फ नांदेड किल्ला, गोदावरीच्या अर्धचंद्राकृती वळणावर गोदावरीच्या डाव्या तिरावर होळी नावाने ज्ञात असलेल्या जुन्या वस्तीत आहे. हा भुईकोट किल्ला आहे.

**किल्ल्याचा इतिहास :** नांदेड शहराच्या प्राचीन इतिहासाचा साक्षीदार असणारे हे एकमेव स्मारक आज शहरात आहे. परंतु एकेकाळी वैभवशाली असलेल्या या नगरीतील हा किल्ला आज

Maharashtra State Gazetteers

पूर्णपणे भग्नावस्थेत आहे. हा किल्ला कोणी बांधला असावा नक्की मत व्यक्त करणे कठीण आहे. या परिसरात रुढ असलेल्या समजुतीप्रमाणे नंद घराण्यातील धनानंदाने हा किल्ला बांधला असावा व नंद या नावावरून शहरास नंदीनगर व किल्ल्यास नंदगिरी नाव मिळाले असावे. या नंदगिरी किल्ल्यावरही सातवाहन, राष्ट्रकूट, चालूक्य, यादव या नृपतींचा प्रभाव राहिला असला पाहिजे. मध्ययुगीन काळात नांदेड किल्ला नांदेड शहराबरोबरच खिलजी, तुघलक व नंतर बहामनी निजामशाही आदिलशाही या राजवटींकडे आळीपाळीने हस्तांतरीत झाला असला पाहिजे. नंतर मुघल व त्याही नंतर हैद्राबादच्या निजामाने हा किल्ला ताब्यात घेतला. १७०८ मध्ये उमदतुलमुल्लाखान फिरोझ जंग इथे सुभेदार होता. सुभे बिदरचाही तोच सुभेदार होता. सुभे तेलंगणाच्या सुभेदाराचे येथील एका इमारतीत वास्तव्य होते. सय्यद अब्दुल, साहुल्ला खान आणि अलीमुद्दीन खान यासारखे काही महत्त्वाचे सुभेदार १७ व्या शतकात किल्ल्यात वास्तव्य करून होते. खुदाबंद खान या नांदेडच्या सुभेदाराचे किल्ल्यात वास्तव्य होते. तो शाईस्तेखनाचा मुलगा होता. या किल्ल्याचे राजकीय महत्त्व हळू हळू कमी होत गेले. विसाव्या शतकाच्या प्रारंभी या किल्ल्यात जलनिःस्सारण केंद्र सुरू करण्यात आले. इथे मुख्यतः पाणी शुद्धीकरण केंद्रे होती. निजामाने १९३६ साली सुरु केलेले हे बहुतेक मराठवाड्यातील पहिले जलशुद्धीकरण केंद्र असावे. किल्ल्यातील प्रचंड मोठ्या सभागृहात धातुच्या चार मोठ्या टाक्या बसविण्यात आल्या होत्या. मुंबईच्या कँडीपेटंट फिल्टर कंपनीने त्या बसवल्या होत्या. आज त्याही इथल्या ऐतिहासिक वारशाच्या भाग बनून गेल्या आहेत.

आज किल्ल्यात कोणतेही प्राचीन अवशेष आढळत नाहीत. परंतु किल्ल्यावर विखुरलेल्या अवस्थेतील काही भग्न शिल्पावशेष व मंदिरांचे घटक अवशेष किल्ल्याच्या प्राचीनत्वाची कल्पना देतात. मूळातले प्राचीन शहर या किल्ल्याभोवती जमिनीखाली गाडलेल्या अवस्थेत आढळण्याची शक्यता आहे. या किल्ल्याचा विस्तार लक्षात घेता तसे किल्ल्याभोवतीच्या तटबंदीच्या चार भिंतीचे अवशेष पाहता जुने शहर किल्ल्याच्या परिसरातच वसले असण्याची शक्यताही नाकारता येत नाही.

**किल्ल्यास जाणारा मार्ग :** मनमाड-काचीगुडा रेल्वे मार्गावर नांदेड हे स्थानक आहे. रेल्वे स्थानकापासून ४ कि.मी. अंतरावर हा किल्ला आहे. येथपर्यंत जाणारा कायम रहदारीचा मार्ग आहे. अन्य ठिकाणावरून प्रवेश दुर्गम आहे. किल्ल्याच्या तीन बाजूस गोदावरीचे पात्र आहे. इथे गोदावरी वळण घेते. त्यामुळे पात्राचा उपयोग तटबंदीचे संरक्षण करणाऱ्या खंदकाप्रमाणे होतो.

किल्ल्यास एकच प्रधान प्रवेशद्वार आहे. ते किल्ल्याच्या उत्तर बाजूस आहे, मुख्य प्रवेशद्वारापर्यंत जाणाऱ्या उतारावर दगडी फरशी आहे. मुळ प्रवेशद्वार नष्ट झाल्यामुळे आता नवीन बांधलेले आर.सी.सी. गेट आहे. किल्ल्यातून विशेष प्रसंगी बाहेर पडण्यासाठी त्याच्या दक्षिण तटास एक भूयारी मार्ग होता. हा मार्ग सरळ गोदावरीच्या पात्रापर्यंत येई. तो नंतरच्या काळात बंद करण्यात आला.

**किल्ल्यावरील वास्तु :** आज किल्ल्यात एक उल्लेखनीय उत्तर मध्ययुगीन काळातील वास्तु उभी आहे. या वास्तुस तत्कालीन शासकाचे प्रमुख कार्यालय असावे. या वास्तुपुढे पाण्याचा एक हौद व कारंजा आहे. तर अन्य एका वास्तुचे रूपांतर निझामी राजवटीत शहरास होणाऱ्या पाणीपुरवठा व्यवस्था आणि जलशुद्धीकरण केंद्रात करण्यात आले आहे. आज किल्ल्यातील बहुतांश वास्तु अवशेष नष्ट झाले असून मुख्य तटालगत नगर परिषद नांदेडची कर्मचारी निवासस्थाने आहेत.

एचएफ ४१९७—१७अ

Maharashtra State Gazetteers

**टेहळणीचे स्थान :** किल्ल्यास एकूण पाच प्रधान बुरुज आहेत. यापैकी तीन बुरुज नदीच्या बाजूला आहेत. या बुरुजांच्या पैकी गोदावरी पात्रालगत तीन असून हे प्रमुख टेहळणी केंद्र आहेत. यातील पूर्व दक्षिण कोपऱ्यावरील बुरुज सर्वात उंच असून याची वारंवार पुनर्बांधणी झाली आहे. या बुरुजावर निझामी राजवटीत एक छत्री बांधण्यात आली आहे हे प्रमुख टेहळणी केंद्र आहे.

किल्ल्यास गोदावरीच्या अर्धचंद्राकृती वळणामुळे नैसर्गिक संरक्षण मिळाले आहे. या शिवाय मजबूत दगडाची तटबंदी आहे. एकच तट आहे.

किल्ल्यास मुख्य पाच बुरुज आहेत. गोदावरीच्या पात्रालगतचे तीन बुरुज बांधतांना ते ढासळू नयेत यासाठी म्हणून तीन टप्प्यात काम केल्याचे दिसते. मुळात मातीच्या बुरुजाला दगड व गोटे यांचे आवरण चढविले आहे. तर पश्चिम-दक्षिणेकडील दोन बुरुज हे चिलखती बुरुज म्हणून संबोधता येतील. मुळ बुरुजावर पुन्हा मोठाल्या दगडी तंड्याचे एक संरक्षण कवच बांधले आहे तर या लगत किल्ला घाट नावाने ओळखला जाणारा दगडी घाट आहे. पात्रालगतच्या बाजूस मोठाल्या दगडी शिळांचे पायथ्याशी संरक्षण दिले आहे. पाण्याच्या माऱ्यापासून भिंती खचू नयेत हा त्याचा हेतू असावा. तट व बुरुजाचे शेवटच्या टप्प्यातील काम विट व चुन्यात केले आहे.

नांदेड शहराच्या प्राचिनत्वाची साक्ष सातवाहन काळातील पुरातत्त्वीय अवशेष व स्थळे देतात. तर वाकाटक काळापासूनचे अभिलेखीय व ताम्रपटातील उल्लेख आहेत. गोदावरीच्या या वैशिष्ट्यपूर्ण अशा नाभिस्थानालगत नंदगिरी हे गोदावरीच्या पात्रातील व्यापारावर नियंत्रण ठेवणारे प्रमुख टेहळणी स्थान असावे. नंतर उत्तर काळात विशेषतः मध्ययुगात कंधार किल्ल्यावर शासन करणाऱ्या राजवर्टींनी विशेषतः मुघल काळात एक उपकेंद्र म्हणून याकडे पाहिले. याच काळात नांदेड किल्ल्याची आज दिसणारी तटबंदी उभारली गेली.

## सचखंड गुरुद्वारा

शिखांचे दहावे गुरु गोविंदसिंघजी नांदेड येथे १९ जुलै १७०८ रोजी आले. १८ ऑगस्ट या दिवशी त्यांच्यावर दोन पठाणांनी प्राणघातक हल्ला केला. हे पठाण सरहिंदचा सुभेदार वजिरखान याने पाठवले होते. या हल्ल्यानंतर ७ ऑक्टोबर १७०८ या दिवशी त्यांची प्राणज्योत अनंतात विलीन झाली. याविषयीची अधिकृत नोंद देणारे जे तत्कालीन साधनग्रंथ आहेत, त्यात 'गुरुशोभा' हा ग्रंथ त्यांच्या वास्तव्याचा प्रत्यक्षदर्शी पुरावा आहे. तसेच ११ नोव्हेंबर १७०८ रोजी लिहिले गेलेले 'अखबारात ए-दरबार-मुल्ला' यात आणि औरंगजेबाच्या नंतर आलेला बादशहा बहादूरशहा विषयीच्या साधन ग्रंथातून या विषयीची नोंद मिळते. अन्य नोंदीपैकी काफीखानलिखित 'मुन्ताखिब-उल लुबाब' आणि 'तारिक-ए-बहादूरशाही' या ग्रंथात महत्त्वाच्या नोंदी आहेत. तसेच गुरु गोविंदसिंघजी, बंदा बहादूर आणि मातासुंदरी यांचे हुकूमनामे यातील नोंदीही त्या अनुषंगाने आलेल्या आहेत.

सन १८४० मध्ये कॅप्टन फिट्झेराल्ट याने नांदेड शहराला भेट देऊन काही नोंदी करून ठेवल्या आहे. त्यात तो म्हणतो गुरुद्वारा आहे त्या भागास शीखबाग म्हणून ओळखले जाते. तेथे प्रचंड बाभूळबन होते.

**असाधारण महत्त्व :**

सन १७०८ मध्ये गुरु गोविंदसिंघजी यांनी आपल्या अंतिम दिनापूर्वी तीन दिवस अगोदर ४ ऑक्टोबर १७०८ या दिवशी शिखांचा चिरंजीव गुरु म्हणून 'श्री गुरु ग्रंथ साहेब' यांची स्थापना केली. त्यामुळे या धर्माच्या दृष्टीने या स्थानाला असाधारण महत्त्व आहे. ज्या स्थानावर गुरु गोविंदसिंघजी यांची प्राणज्योत अनंतात विलीन झाली त्याच स्थानावर सन १८३२ ते १८४० या काळात आज आहे ती वास्तु उभारण्यात आली. हैद्राबादेच्या निजामाने आपल्या प्रदेशातील बंड मोडण्यासाठी लाहोर येथील शीख रेजिमेंट बोलावून बंड मोडून काढले होते. या फलटणीतील काही सेनानी तसेच निझामाचा दिवाण चंदुलाल महाराज व पंजाबचे महाराज रणजितसिंग यांनी पुढाकार घेऊन ही वास्तु व वास्तु संकुलाची निर्मिती केली.

हे तख्त सचखंड श्री हुजूरसाहिब अबचल नगर नांदेड संपूर्ण शीख समाजाला महत्त्वाचे वाटते. येथे होला मोहल्ला (होळीचा दुसरा दिवस) गुरुता गद्दी श्री गुरु ग्रंथसाहेबजी (दिवाळी नंतरचे तीन दिवस) या काळात यात्रेकरू पर्यटक मोठ्या प्रमाणात भेट देतात. शिवाय गुरुनानक जयंती, गुरु गोविंदसिंग जयंती, बैसाखी, दसरा ह्या निमित्ताने येणाऱ्या यात्रेकरुंची संख्या वर्षाकाठी तीन लाखांवर असते.

गुरु ग्रंथसाहेब यांची गुरुपदी स्थापना झाल्यापासून अखंड नंदादीप (शुद्ध तुपातील) आणि ग्रंथासाहेबाचे पठण अविरत चालू आहे हे विशेष. यातून हा संपूर्ण परिसर आनंदी व पवित्र झाला आहे.

**गुरुद्वाराच्या वास्तुचे वर्णन :** मुळात १९ व्या शतकामध्ये (सन १८३२ ते १८४०) निर्माण झालेली वास्तु व वास्तु संकुल हिंदू व मुघल कलाशैलीचा सुंदर समन्वय आहे. गुरुद्वाऱ्याची मुख्य वास्तु पश्चिमाभिमुख आहे. या वास्तुसंकुलाला प्राकार असून चार प्रवेशद्वारे आहेत. एका उंच चौथऱ्यावर मुख्य वास्तु उभी आहे. या वास्तुच्या मध्यभागी ७ × ७ मी. आकाराचा गाभारा (मुख्य खोली जेथे गुरु गोविंदसिंघजी यांची जीवनज्योत अनंतात विलीन झाली ते स्थान आहे. याला सिंहासन स्थान म्हणतात.) यात पवित्र शस्त्र व शास्त्र ठेवले आहे.

गुरुद्वाऱ्याची मुख्य वास्तु उभारतांना पूर्व पश्चिम चार कमानी आणि उत्तर दक्षिण तीन कमानींची रांग उभारून त्यावर वास्तु निर्माण केली गेली आहे. मुख्य गाभाऱ्याचा पुढील भाग पहिल्या मजल्याच्या पातळीवर छत न घालता उघडा ठेवण्यात आला. त्याला प्रकाशस्थान म्हणतात. सभा मंडपाप्रमाणे ठेवलेला हा भाग येथे सतत गुरु ग्रंथसाहिब यांचे पठण पाठण सुरू असते. दुसऱ्या माळ्यावर खालील मुख्य खोलीच्या आकाराची एक खोली उभारून त्यावरील छतावर तिसरा माळा उभारला आहे. हे ठिकाण फक्त गाभाऱ्यावरील एका खोली एवढे आहे. येथे या चौरस आकाराच्या (७ × ७ मी.) वास्तुवर अष्टकोन तयार करून साधारणपणे पाच मीटर उंचीचा डोम (घुमट) उभारला आहे. हे संपूर्ण बांधकाम विट व चुन्यात केले आहे. एकूण वास्तुची उंची जमिनीपासून १५ मी. आहे. मुख्य चौथऱ्यावर उभारलेली वास्तु एकसंध वाटते. दोन्ही माळ्यांची एकत्रित उंची प्रथम नजरेत भरते.

गुरुद्वारा या वास्तुची जी वैशिष्ट्ये सांगता येतील त्यात प्रामुख्याने गुरुद्वारा संकुलाचे काम भाजलेल्या विटात केले असून बांधकामात चुन्याचा उपयोग झाला आहे. यावरील उत्तम प्रतीचा गिलावा नजरेत भरतो. वास्तु उभारताना कमानींचा उपयोग केला असला तरी त्यावर आढळणारे छत काहीसे समतल ठेवण्याचा प्रयत्न झाला आहे. या स्थापत्यावर इस्लामिक वास्तुशास्त्राचा प्रभाव जाणवतो. त्याच्या बाहेरील चारही टोकांवर मिनार उभारले असून हे स्तंभ खालपासून वरपर्यंत सरळ अष्टकोनी आकारात कोरून वास्तुची शोभा वाढवण्यासाठी त्याचा उपयोग करून घेण्यात आला आहे. वास्तुच्या आतील बाजूने असलेल्या कमानी बाहेरून प्रथमदर्शनी जाणवत नाहीत. कमानींचा आभास होत असला तरी वास्तुचा एकसंधपणा नजरेत भरतो. भिंतींच्यावर हिंदू अलंकरण पद्धतीचा अंतर्बाह्य उपयोग केला आहे. विशेष म्हणजे चारही दिशांनी दरवाजे ठेवले असून मुख्य वास्तुच्या मागील भिंतीतून वरील मजल्यावर जाण्यासाठी जिने आहेत. वरील घुमट लक्षात येण्यापूर्वी चारही बाजूंनी पालखीच्या आकाराचे केलेले नक्षीकाम नजरेत भरते. यावर लहान कळसांची रांग आहे.

गुरुद्वाराच्या वास्तुला चुन्याचा उत्कृष्ट प्रतीचा गिलावा करून त्यावर चित्रे काढलेली आहेत. यासाठी लाल, पिवळा व निळा रंग प्रामुख्याने वापरला आहे. ही चित्रे काढताना फ्रेस्को तंत्राचा उपयोग केला गेला असावा. चुन्याच्या गिलाव्यावर चित्र काढताना लाल रंगाच्या बाह्य रेषा काढून त्यात अन्य रंग भरले गेले. ही चित्रे मुळात दोन्ही माळ्यांच्या छतावर व घुमटाच्या आतील बाजूने काढली होती. नंतर पण लगोलगच्या काळात पहिल्या मजल्याला म्हणजे मुख्य वीतानावर मिनाकारी केली गेली. यावर सुवर्णाचा पत्रा मोठ्या प्रमाणावर चढवण्यात आला.

**भौमितिक नक्षी :** कमानीदार छतास आतून मिनाकारी करताना काच, रंगीत दगडी चिपा यांचाही उपयोग केला गेला. विशेष म्हणजे उत्तर काळात विकसित झालेली मुघल चित्रशैली आणि या शैलीत काढलेली काचेवरील धर्मगुरुंची चित्रे येथे बसवण्यात आली. याखालील भागात संगमरवरी दगड नंतरच्या काळात बसवण्यात आला. संगमरवरावर 'इनलेवर्क' केले आहे. यांत मुख्य दगड कोरून हिरवट काळा, हिरवा, लाल, निळा व क्वचित पिवळा रंगाचे मौल्यवान दगड बसवून विविध भौमितिक नक्षी तसेच हंस, पोपट यासारखे पक्षी दर्शवले गेले. याशिवाय गुरुद्वाराच्या मुख्य छतावरील घुमट, पहिल्या माळ्यावरील मुख्य खोलीतील भिंती व छत तसेच अन्य काही भागांत तांब्याचा पत्रा बसवून त्यावर मोठ्या प्रमाणात सोन्याचे पाणी चढवण्यात आले. किमान ५० किलो सुवर्ण यासाठी लागले असावे. यावरही विविध भौमितिक नक्षी व गुरुग्रंथसाहिब यातील काही श्लोक कोरले आहेत. या वास्तुपुढे एका अष्टकोनी चौथऱ्यावर उभा असलेला ध्वजस्तंभ २४.३८ मी. उंच आहे. त्यावर १.८२ मी. उंचीचा सोन्याचे पाणी दिलेला बाण आहे. एकूण ही मुख्य वास्तु आणि परिसर यांच विस्तार २.०२३ हेक्टर आहे.

या परिसरातील मुख्य वास्तुची गेली कित्येक दशके सतत दुरुस्ती चालु आहे, दुरुस्तीचा भाग म्हणून संपूर्ण परिसरात नवीन लादी टाकली आहे. तसेच वास्तुच्या बाह्य भागावरील मुळात असलेला चुन्याचा गिलावा उतरवून नवीन संगमरवरी दगड तेथे बसवला. असे करत असताना मुख्य वास्तुवरील चुन्याच्या गिलाव्यावर असलेले नक्षीकाम जशास तसे संगमरवरी दगडावर करण्यात आले आहे. तसेच पहिल्या माळ्यावरील मिनाकारी आहे तेथील काही भाग आता बदलला आहे. सध्या गुरुद्वारा कमिटीने सुरू केलेल्या कामामुळे घुमटाच्या आतील भागातील काही चित्रे जी चुन्याच्या गिलाव्यावर काढली

गेली होती ती आता मूळ स्थितीत नाहीत. मुळात गुरुद्वारा ही वास्तु महाराष्ट्र शासनाच्या पुरातत्त्व व वस्तू संग्रहालय विभागाचे संरक्षित स्मारक आहे.

**गुरुद्वाराचे बदललेले स्वरूप :** गुरुता गद्दी या त्रिशताब्दी महोत्सवाचे निमित्त साधून मूळ गुरुद्वारा परिसराचा विकास करण्यात आला आहे. संपूर्ण गुरुद्वारा परिसराचे स्वरूपच पालटून गेले आहे. यामध्ये गुरुद्वाराच्या आधुनिकीकरणाबरोबरच विस्तारीकरणही करण्यात आले आहे. या विस्तारीकरणासाठी जे लोक विस्थापीत झाले त्यांना अबचलनगर येथे वसाहतीत सदनिका देऊन नव्याने वसविण्यात आले. सध्याचे गुरुद्वारा संकूल १.८२ लाख चौ. मी. एवढ्या परिसरात विकसित करण्यात आले आहे. मूळ मुख्य इमारत तशीच ठेवून तिच्या अवती भोवती हा विस्तार करण्यात आला आहे. संपूर्ण बांधलेले क्षेत्रफळ ३ लाख चौ. फूट आहे. मुख्य गुरुद्वाराभोवती तळमजला अधिक दोन मजले या प्रकारचे चहूबाजूंनी वास्तु संकूल निर्माण केले आहे. या वास्तु संकूलात १६३ प्रशस्त कक्ष (२४० चौ. फूट), ९ परिपूर्ण गृहे (५८० चौ.मी.), २४ बहुउद्देशीय सभागृह (६०० चौ. फूट) आहेत. आतील भागात संगमरवरी व सुनियोजित प्रांगण (कोर्ट यार्ड) केले आहे. मोठ्या संगमरवरी लाद्या, त्यांच्या बाजूने विकसित केलेले हिरवळीचे पट्टे व लहान शोभेची झुडपे, मध्ये लावलेली सावली देणारी झाडे, त्या भोवती बसण्यासाठी बांधलेले पार असे त्याचे भव्य, विलोभनीय स्वरूप आहे. उन्हात फरशी तापते त्यामुळे चालण्यासाठी पायघड्या (कार्पेट) घातल्या जातात. गुरुद्वारातील आवागमनाच्या मार्गावर सहा कमान वजा अतिभव्य प्रवेशद्वारे उभारली असून त्यामुळे गुरुद्वारा परिसराच्या सौंदर्यात भर पडली आहे. इथे नियमीत लंगरसेवाही सुरू आहे. २०० चौ. फूट भागात असलेल्या लंगरच्या वास्तुची क्षमता २००० माणसे मावतील एवढी आहे. गुरुद्वाराच्या वास्तुसाठी नव्याने बांधलेले भव्य प्रवेशद्वार आर.सी.सी. स्तंभाच्या सहाय्याने उभारून त्यावर आकर्षक ग्रॅनाइट दगड बसविले आहेत.

**गुरुद्वारातील दैनंदिन पुजाविधी**[१०४] **:** गुरुद्वारातील दैनंदिन पूजाविधी पुढीलप्रमाणे असतो. रात्री २ ते ३ श्री जपसाहेब व श्री सुखमणी साहेब यांचे पाठ होतात. बाहेर हे पाठ चालू असताना मणजी साहेब, शस्त्र व पोशाखांना पुजारी स्नान घालतात. स्नान गोदावरीच्या पवित्र पाण्याने घातले जाते. पाणी आणण्यासाठी खास माणूस ठेवला आहे. त्याला घागरीया म्हणतात. पहाटे ३ ते ६ 'प्रकाश' स्थानी किर्तन सादर होते. सकाळी ६.१५ ते ७.३० च्या दरम्यान प्रकाश व भोग प्रसाद दाखवला जातो. नंतर सकाळी ६.४५ पर्यंत १० मिनीटे हुकुमनामाचे वाचन होते. सकाळी ८ वाजेपर्यंत किर्तन आनंद साहेब सादर केले जाते. यानंतर तासभर आधी श्री गुरु ग्रंथ साहेबजी कथा होते. सकाळी ८.३० ते १० च्या दरम्यान अखंड पाठाची समाप्ती केली जाते तसेच नव्याने अखंड पाठाची सुरूवात केली जाते.

३ वाजता दरवाजा उघडतो. श्री गुरु ग्रंथ साहिब या प्रकाश दशम ग्रंथ साहिबचा प्रकाश होतो व आसा दी वार या किर्तनाचा आरंभ होतो. बाहेर किर्तन चालू असताना दार लावून मुख्य पुजारी (जत्येदार साहेब) सिंहासन स्थानाला स्नान घालून त्यावर शस्त्र व पोशाख घालतात.

---

१०४ **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, पूर्वोक्त, पृ. ५८०, ५८१. तसेच 'सचखंड गुरुद्वारा', हा नांदेड, दै. महाराष्ट्र टाईम्स, मुंबई, रविवार, दिनांक १४ फेब्रुवारी १९९३ चा अ. शं. पाठक यांचा लेख.

सकाळी १०.३० ते ११.३० या काळात अमृत पान तर ११.०० ते दुपारी १२ पर्यंत भोग प्रसाद चढवला जातो. ही लंगरची वेळ असते. दुपारी १२ ते १ दरम्यान कथा दशम ग्रंथ साहेब सांगितली जाते. दुपारी २ ते ३ श्री उसतति या वाणीचा पाठ होतो. आणि भोग सरदई ४ वाजता दाखवला जातो. संध्याकाळी ४ ते ५ कथा गुरु इतिहासचे पठण केले जाते. त्यानंतर दोन तास किर्तन सोदर साहेब होते. त्यानंतर अर्धातास रहिरास साहिबचा पाठ होतो. तो संध्याकाळी ७.३० ला संपतो. ते झाल्यानंतर आरती आणि शस्त्रदर्शन (ऐतिहासिक आणि धार्मिक शस्त्रास्त्रे) व आरती होते. रात्री ८.३० ते ९ किर्तन सोहिला चौकी होते. रात्री ९ नंतर किर्तनासाठी आमंत्रित केलेल्या रागींकडून किर्तन होते व याबरोबर दिवस संपतो. परंतु दिवस रात्र सतत चोवीस तास अखंड पाठ सुरू असतो. गुरुद्वारातील लंघर २४ तास चालू असतो.

**गुरुद्वारामधील धार्मिक व ऐतिहासिक वस्तु**[१०५] **:** गुरुद्वारामध्ये अनेक ऐतिहासिक शस्त्रास्त्रे व मौल्यवान अलंकार आहेत. यामध्ये गुरु गोविंदसिंघजींची पुढील शस्त्रास्त्रे आहेत, सोनेरी छोटे कृपाण, तीर या शिवाय बाबा फुला सिंघजी, महाराजा रणजीत सिंघ व संत बाबा निधान सिंघजी यांच्या तलवारी आहेत. याबरोबरच अनेक शूरवीर सिंघांची नानाविध प्रकारची शस्त्रे जसे की तोफा, तलवारी, कट्यार, खंजीर, बंदुका, रिव्हॉल्वर्स व पिस्तुले आहेत. यापैकी गुरु गोविंद सिंघजींचे कृपाण, तीर, महाराजा रणजीत सिंघजी व बाबा फूला सिंघजी यांच्या तलवारी तेगा या शस्त्रांचे रोज रात्री दर्शन घडवले जाते.

गुरुद्वारात काही मौल्यवान जडजवाहिर आहेत. त्यामध्ये हार, हिरेजडीत कंकण, कलगी, अनेक कर्णभूषणे, आणि सोने व चांदीचे इतर दागीने आणि भांडी आहेत.

**गुरुद्वारात साजरे केले जाणारे विशेष उत्सव :** गुरुद्वारात कार्तिक शुद्ध दुज, (गुरु गोविंद सिंघजींनी गुरु ग्रंथ साहिबला गद्दी दिली तो दिवस), कार्तिक शुद्ध पंचमी (गुरु गोविंद सिंघजींनी सचखंड गमन केले तो दिवस), कार्तिक शुद्ध पोर्णिमा (श्री गुरु नानक देवजी महाराजांचा जन्म दिवस), पौष शुद्ध सप्तमी संवत १७२३ (श्री गुरु गोविंद सिंघजी यांचा जन्म दिवस आणि वैशाखी (खालसा पंथाचा निर्माण दिवस) हे गुरुपुरब प्रामुख्याने साजरे केले जातात. गेल्या काही वर्षांपासून गुरुपुरब कार्तिक सुदी दुज व गुरुपुरब कार्तिक सुदी पंचमी या दिवशी विशेष मंडप वगैरे बांधून मोठ्या प्रमाणात उत्सव केला जातो. यावेळी संपूर्ण देशांतून मुख्य किर्तनी जत्थे, विद्वान, कवी, कथाकार नांदेडला येतात. हा उत्सव दिवाळीच्या दोन दिवसांनंतर सुरू होतो व पुढे पाच दिवस सुरू राहतो.

Maharashtra State Gazetteers

याशिवाय इतरही काही उत्सव मोठ्या प्रमाणावर साजरे करण्यात येतात. दसरा आणि होळीच्या दिवशी (हल्ला बोल) लाखो शिख संगत पंजाब व इतर आसपासच्या तसेच दूरच्या प्रदेशातून येतात. यावेळी जलूस (मिरवणूक) काढण्यात येतो. यामध्ये खालसाचे निशान, गुरुंच्या घोड्यांची शोभा, आणि सिंघ शूरवीरांच्या कर्तृत्वाचे देखावे मिरवले जातात. वैशाखी, दीपावली, गुरु-ता-गद्दी, कार्तिकी पोर्णिमा व पौष सप्तमी या सणा दिवशीदेखील जलूस काढले जातात. दिवाळीच्या एक दिवस आधी तख्त स्नानाच्यावेळी विशेष प्रेम, श्रद्धा व उत्साह दिसून येतो. यावेळी सिंहासन साहेब मधील शस्त्र समूह साफ सफाईसाठी तसेच संगतला त्यांचे दर्शन देण्यासाठी बाहेर काढून ठेवण्यात येतो.

---

१०५ ज्ञानी अवतार सिंघ शितल (संपा), **सचखंड यात्रा**, गुरुद्वारा बोर्ड तख्त सचखंड श्री हजूर अबिचलनगर साहिब, नांदेड, पृ. २४.

**गुरुद्वाराची व्यवस्था**[१०६] **:-** गुरुद्वारा तख्त सचखंड साहिब आणि शहरातील इतर गुरुद्वारांची व्यवस्था प्रथम गुरु गोविंदसिंघजीं बरोबर आलेला सिंघ शिष्य परिवार करीत होता. गुरु गोविंदसिंघजींच्या परलोक गमनानंतर हा शिष्यपरिवार इथेच राहिला होता. परंतु हळू हळू या भागात वाढणाऱ्या तुर्कांच्या प्रभावामुळे अनेक सिंघ बांधवांनी पंजाबला परत जाण्याचा निर्णय घेतला. शके १८८० च्या दरम्यान हैद्राबादचे दिवाण चंदूलाल यांच्या मंजुरीनुसार उदासी शिख इथे सेवा करू लागले, आणि जेव्हा शेरे पंजाब महाराजा रणजीत सिंघजींनी इथे सेवेस आरंभ केला, तेव्हा सेवेसाठी अनेक कारागीर व स्वयंसेवक पंजाबमधून येऊन इथे राहिले. त्यापैकी काही इथेच स्थायिक झाले. नंतर हैद्राबादच्या निजामाने शेरे पंजाबकडून लाहोरी फौज मागवली तेव्हा त्या फौजेबरोबर आलेलेही अनेक लोक इथेच राहू लागले. शिखांच्या संख्येत वाढ होऊ लागली आणि मग हळू हळू उदासिंकडून पुजारीपण काढून घेतले गेले. उदासिंनी हैद्राबादच्या निजामाकडे याबद्दल फिर्याद केली तेव्हा निजामाने त्यांना अकोल्याजवळ जहागीरी दिली व ते तेथे जाऊन राहू लागले.

इ.स. १९५६ पर्यंत गुरुद्वाराचे व्यवस्थापन सरकारच्या ताब्यात होते. स्वातंत्र्यपूर्व काळात डायरेक्टर जनरल ऑफ पोलीस उर्फ निजाम इथल्या जनरल (मुख्य) व लोकल (स्थानिक) समितींचे अध्यक्ष होता. तो येथील संपूर्ण व्यवस्थापनाची जबाबदारी सांभाळत होता. हळू हळू शिखांमध्ये जागृती निर्माण झाली आणि गुरुद्वाराला सरकारी नियंत्रणातून सोडवण्यासाठी प्रयत्न सुरू करण्यात आले. शेवटी २० सप्टेंबर १९५६ रोजी निजाम सरकारच्या गॅझेटप्रमाणे व्यवस्थापनासाठी " नांदेड सिख गुरुद्वारा तख्त सचखंड श्री हजूर अबचलनगर साहिब बोर्ड " ची स्थापना झाली. हा गुरुद्वारा बोर्ड सतरा सभासदांचा आहे.*

**व्यवस्थापन समिती (कमिटी ऑफ मॅनेजमेंट) :** या व्यवस्थापन समितीमध्ये, (१) नांदेडचा तहसीलदार किंवा राज्य सरकारने नियुक्त केलेले अन्य अधिकारी, (२) गुरुद्वाराचा अधिक्षक आणि नांदेडच्या शिख बांधवांपैकी बोर्डाने नामनिर्देशीत केलेले तीन सभासद यांचा समावेश होतो.

---

१०६ कित्ता, पृ. २६, २७.

*गुरुद्वारा बोर्डचे १७ सभासद पुढीलप्रमाणे :—

| | |
|---|---|
| १. राज्य सरकारतर्फे नामनिर्देशित सभासद | २ |
| २. राज्यातील शिखांमधून निवडून आलेले सभासद | ३ |
| ३. हैद्राबाद व सिकंदराबाद येथील शिखांतून राज्य सरकारने नामनिर्देशन केलेले सभासद | १ |
| ४. शिरोमणी गुरुद्वारा प्रबंधक कमिटी, यांनी मध्यप्रदेश येथील शिखांमधून नामनिर्देशन केलेले सभासद | १ |
| ५. शिरोमणी गुरुद्वारा प्रबंधक कमिटीने नामनिर्देशन केलेले सभासद. | ३ |
| ६. संसदेतील शिख सभासदांपैकी सभासद | २ |
| ७. मुख्य खालसा दिवाण, अमृतसर यांनी नामनिर्देश केलेला सभासद. | १ |
| ८. सचखंड हजुरी खालसा दिवाण, नांदेड यांनी निमनिर्देश केलेले सभासद. | ४ |

Maharashtra State Gazetteers

व्यवस्थापन समितीचे कार्य बोर्डाने दिलेल्या नियमांप्रमाणे गुरुद्वाराचे दैनंदिन कामकाज चालवणे आणि गुरुद्वाराचे व्यवस्थापन योग्य व सुरळीतपणे चालविणे, हे आहे तर बोर्डाचे काम समितीच्या कामावर लक्ष ठेवणे तसेच गुरुद्वाराच्या मिळकतीचा उपयोग योग्य व सुनियोजीतपणे केला जात आहे की नाही यावर लक्ष ठेवणे हे आहे. याशिवाय गुरु-ता-गद्दीच्या त्रिशतक महोत्सवासाठी राष्ट्रीय पातळीवर एक विशेष समिती गठीत करण्यात आली होती.

**बुंगा माता भागो जी :** हा बुंगा तख्य सचखंड साहिबच्या पूर्व दिशेला गुरुद्वारा साहिबच्या हद्दीतच आहे. माता भागोजींची ऐतिहासिक शस्त्रे या ठिकाणी ठेवण्यात आली आहेत. माता भागोजी उच्च आचार-विचारांची स्त्री होती. त्यांचे मूळ गाव झबाल (जि. अमृतसर). जेव्हा काही शिख आनंदपूरच्या लढाईत गुरु गोविंद सिंघजींची साथ सोडून परत आले तेव्हा बायकांनी त्यांचा धिक्कार केला व आम्ही स्त्रिया लढाईच्या मैदानात जातो असे सांगून गुरु गोविंद सिंघजींच्या सेवेत रुजू झाल्या. यापैकी माता भागोजी पुरूषवेशात घोड्यावर स्वार होऊन मुक्तसरच्या लढाईत सामील झाल्या. माता भागोजींच्या प्रेरणेमुळे गेलेले शिख परत आले व युद्ध करून वीर गतिला प्राप्त झाले. या लढाईत भागोजी खूप शौर्याने लढल्या व त्यांनी अनेक घाव झेलले. गुरु गोविंदसिंघजी यांनी भागोजी यांच्या शौर्याची खूप प्रशंसा केली व त्यांना अमृतपान करवून त्यांचे नाव भाग कौर ठेवले. यानंतर त्या नेहमी पुरूषी पेशात गुरुंच्या सेवेत राहिल्या व त्यांच्याबरोबर नांदेडला आल्या. गुरुंच्या सचखंड गमनानंतर त्या बिदरला गेल्या. तेथे त्यांनी बाळाराव व रुस्तमराव यांचे गाव जनवाडे येथे शिखधर्माचा प्रचार केला. जनवाडेलाच त्यांचा स्वर्गवास झाला. या ठिकाणी त्यांचे अंतिम स्थान आहे.

**अंगीठा भाई दया सिंघजी व भाई धरम सिंघजी, नांदेड :** गुरु गोविंदसिंघजींचे जे पाच प्रिय शिष्य (पंज प्यारे) होते त्यामध्ये भाई दया सिंघजी व भाई धरम सिंघजी हे दोघे गुरु गोविंद सिंघजींबरोबर नांदेडला आले व इथेच त्यांचा स्वर्गवास झाला. यांचा अंगीठा तख्त साहिबच्या अतिशय जवळ बुंगा माता भागोजीच्या मागच्या बाजूला आहे. भाई दया सिंघजी व भाई धरम सिंघजी नेहमी गुरु गोविंदसिंघजींच्या सहवासात राहिले व त्यांनी युद्धामध्ये शौर्य गाजवले.

**गुरुद्वारातर्फे करण्यात आलेले समाजकार्य :** गुरुद्वारातर्फे सामाजिक हित व जन कल्याण लक्षात घेऊन अनेक योजना राबविण्यात आल्या आहेत. या योजनांचा उद्देश समाजाची प्रगती व्हावी तसेच जागृती व्हावी हा आहे.

**धार्मिक संगीत विद्यालय :** गेल्या चौदा-पंधरा वर्षांपासून हे धार्मिक संगीत विद्यालय कार्यरत आहे. या विद्यालयातर्फे फक्त आदीवासी व इतर मागास जातींना शिक्षण दिले जाते. विद्यालयात विद्यार्थ्यांना शिख धर्म, किर्तन आदी विषयांचे शिक्षण देण्यात येते. विद्यार्थ्यांच्या अन्न, वस्त्र निवाऱ्याची सोय गुरुद्वारा सचखंड बोर्डद्वारा विनामुल्य केली जाते. याशिवाय गुरुद्वारातर्फे शिक्षणसंस्था चालविल्या आहेत.

**श्री हजूर साहिब आय टी आय :** सन १९८५ मध्ये गुरुद्वाराबोर्डने अजून एक शैक्षणिक केंद्र सुरू करून शिक्षण क्षेत्रात एक महत्त्वाची कामगिरी केली.

**तबेला :** गुरु गोविंदसिंघजी वस्तुसंग्रहालयाच्या उजव्या बाजूला एक विशाल इमारत गुरु साहिबांचे घोडे सांभाळण्यासाठी तयार करण्यात आली आहे. सध्या इथे जवळ जवळ साठ घोडे आहेत.

या शिवाय शहराच्या मध्यभागी असलेले गुरु गोविंदसिंघजी मेमोरियल हॉस्पीटल हे शासकीय जनरल हॉस्पीटल गुरुद्वारा बोर्डने गुरुद्वारा सचखंड साहिब च्या मालमत्तेतून दिलेल्या आठ एकर जमिनीवर उभे आहे.

**दुष्ट दमन प्रिंटींग प्रेस/सचखंड पत्र मासिक :** गुरुद्वारा बोर्डने दुष्ट दमन प्रिंटींग प्रेसचे आधुनिकीकरण केले आहे. इथे नवीन मुद्रण तंत्रज्ञानाचा अवलंब करून ऑफसेट युनिट बरोबर या प्रेस मध्ये संगणकाचा उपयोग केला आहे. गुरुद्वारा बोर्डशी संबंधीत सर्व प्रकाशने या प्रेसमधून छापली जातात.

गुरुद्वारा बोर्डतर्फे प्रकाशित होणारे मासिक सचखंड पत्र १९८९ पर्यंत केवळ पंजाबी व इंग्रजी या भाषांतून प्रसिद्ध होत होते. परंतु १९९० पासून हे मासिक या दोन भाषांव्यतिरिक्त हिंदीतूनही प्रसिद्ध होऊ लागले आहे. या मासिकाचा खप इतर धार्मिक मासिकांपेक्षा कैकपटीने अधिक आहे. आज जवळ जवळ पस्तीस देशांमध्ये या मासिकाचे वितरण होते.

**श्री गुरु गोविंदसिंघजी वस्तुसंग्रहालय :** या तीन मजली वस्तुसंग्रहालयासाठी जवळ जवळ तीन करोड रुपये इतका खर्च आला. यामध्ये ९ मोठी सभागृह आहेत. इथे नानाविध वस्तू प्रदर्शित केल्या आहेत. या संग्रहालयात चित्रांचे प्रदर्शन, पुरातन वस्तुंचे प्रदर्शन, शस्त्र प्रदर्शन व गुरु साहिबांची जुनी वस्त्र प्रावरण यांचे प्रदर्शन करण्याचा मानस आहे. यात लाईट आणि साऊंडच्या सहाय्याने गुरु इतिहास प्रस्तुत करण्याची योजना आहे. मध्यभागी जुन्या हस्तलिखितांचे प्रदर्शनही करण्यात येणार आहे.

या वस्तू संग्रहालयाला सुंदर व भव्य बनविण्यासाठी दुर्मिळ ग्रंथ, चित्रे, छायाचित्रे, गुरु साहिबांची निशानी, शस्त्र किंवा इतर कोणत्याही प्रकारच्या संबंधित वस्तू देण्यासाठी शिख संगतला तसेच संस्थांना आवाहन करण्यात येते.

**एन आर आय यात्री निवास :** श्री गुरु अंगद देव जी निवासाला लागूनच एन आर आय (अनिवासी भारतीय) साठी निवास व्यवस्था करण्यात आली आहे. या निवासात १४७ आधुनिक वातानुकुलित खोल्या आहेत. एन आर आय यात्रेकरुंची गरज लक्षात घेऊन इमारतीत अनेक सोयी सुविधा पुरविण्यात आल्या आहेत.

**पंजाब भवन :** या भव्य इमारतीचे काम पूर्ण झाले आहे. ज्यामध्ये १४४ वातानुकूलीत खोल्या उपलब्ध आहेत.

**श्री गुरु ग्रंथ साहिबजी दिवान हॉल :** त्यामध्ये एकावेळी ७५०० भाविक किर्तन ऐकू शकतील.

मुख्य गुरुद्वारा व्यतिरिक्त शहरात सात गुरुद्वारे आहेत. हे सर्व गुरुद्वारे गुरु गोविंदसिंघजी यांच्या स्मृतींशी संबंधित आहेत.

**गुरुद्वारा, नगिना घाट :** गोदावरीच्या डाव्या काठावर मुख्य गुरुद्वारापासून अर्ध्या कि.मी.वर हा गुरुद्वारा आहे. ही एक सुंदर वास्तु असून आधुनिक संगमरवरी कलेचा व स्थापत्याच्या काही

Maharashtra State Gazetteers

वैशिष्ट्यांच्या अविष्कार इथे आहे. ज्या काठावर हा गुरुद्वारा बांधला आहे तो नगिना घाट म्हणून ओळखला जातो. हे ठिकाण काही पवित्र स्थानांपैकी एक असून इथे काही काळ श्री गोविंदसिंघजींचे व्यास्तव्य होते. इथे त्यांचे वास्तव्य असताना ते गोदावरी नदीवरील विविध घाटांना भेट देत असत. या घाटावर अनेक भक्त गुरु गोविंदसिंघजींचे दर्शन घेण्यासाठी येत असत. एकदा एका भक्ताने नगीना या सर्वात मौल्यवान रत्नाची गुरुंना भेट दिली. गुरुंनी ते रत्न नदीत फेकून दिले. भक्त गुरुंचे हे वागणे पाहून आश्चर्यचकित झाला. श्री गुरु गोविंदसिंघजींनी भक्ताला नदीत जाऊन ते रत्न परत आणण्याचा आदेश दिला. त्याप्रमाणे भक्ताने केले असता नदीत त्याला तशी अनेक मौल्यवान रत्ने दिसली. गुरुंना मौल्यवान रत्नाची भेट दिल्याचा त्याचा अहंकार नष्ट झाला व तो गुरुंचा एक नम्र सेवक झाला. या स्थानावरून गुरुजींनी बाण चालवून सतयुगी स्थान तख्त सचखंड श्री हजुर साहिब प्रगट केला.

**बंदा घाट गुरुद्वारा :** बंदा घाट गुरुद्वारा बंदा बैरागीच्या आठवणींशी व त्यांच्याशी निगडीत आख्यायिकांशी संबंधित आहे. बंदा बैरागीचे मूळ नाव लक्ष्मणदास होते. तो जम्मुच्या पुँछ या भागातील राजुरी येथील रजपूत घराण्यातील होता. पूर्ववयात त्याला शिकार करण्यात अतिशय रस होता. एका शिकारीच्या अनुभवाने त्याच्या स्वभावात बदल झाला व त्याने एका वैष्णव साधुचे शिष्यत्व पत्करले. तो आता माधवदास बैरागी म्हणून ओळखला जाऊ लागला. तो भ्रमंती करत नांदेडला आला व गोदावरीच्या काठी या घाटावर वास्तव्य करून राहू लागला. तो तांत्रिकही होता व आपल्या तंत्रविद्येचा त्याला अतिशय अभिमान होता. जेव्हा गुरु गोविंदसिंघजी नांदेडला आले तेव्हा आपल्या विद्येचे काही प्रयोग त्यांच्यावर करण्याचा त्याने प्रयत्न केला. परंतु ते सगळे प्रयोग अयशस्वी ठरले. गुरु गोविंदसिंघजींची महती त्याला उमगल्यामुळे त्याने त्यांचे शिष्यत्व पत्करले. गुरुंनी त्याला अमृतची दिक्षा देऊन, एक नगारा, पाच प्रमुख शिष्य व पाच बाण देऊन गुन्हेगारांना सजा देण्यासठी पंजाबला पाठविले.

**मालटेकडी गुरुद्वारा :** मुख्य गुरुद्वारापासून जवळजवळ तीन कि.मी. वर मालटेकडी हा भाग आहे. या स्थानाचा ऐतिहासिक संबंध शिख धर्माचे संस्थापक श्री गुरु नानकदेवजी यांच्याशी जोडला आहे. सिंहलद्विप म्हणजेच श्रीलंकेला जात असता ते नांदेडला आले होते. वाटेत ज्या ठिकाणी त्यांनी वास्तव्य केले त्यापैकी एक मालटेकडी आहे. या ठिकाणी जमिनीखाली त्यांनी सोने पुरून ठेवले आहे असे म्हटले जाते. श्री गुरुगोविंदसिंघजीसुद्धा या स्थानाला भेट देत असत व इथे ध्यानधारणा करत असत. आपल्या अर्तींद्रिय शक्तीने ते पुरलेले धन बाहेर काढून संगत साहिब इथे ते वाटत असत असेही सांगितले जाते. त्यामुळे या टेकडीला मालटेकडी म्हणजेच धनाची टेकडी असे म्हटले जाते. एक आकर्षक असा संगमरवरी गुरुद्वारा इथे उभारला आहे. हा गुरुद्वारा अतिशय कलात्मक आहे.

**गुरुद्वारा संगतसाहिब :** नांदेडला आल्यानंतर श्री गुरुगोविंदसिंघजींनी काही काळासाठी या ठिकाणी मुक्काम केला होता. गुरु गोविंदसिंघजी यांचा या जागेला कृपाशिर्वाद मिळाल्यामुळे हे स्थान पवित्र मानले गेले आहे. या स्थानाशी संबंधित आख्यायिका सांगते की बहादूरशहाच्या फौजांना खूप काळ त्यांचे वेतन मिळाले नव्हते. याच ठिकाणी गुरुंनी मालटेकडी येथे मिळालेल्या सुवर्णमुद्रा ढालीने सैनिकांना वाटल्या.

मुख्य गुरुद्वारापासून २ कि.मी. अंतरावर असलेल्या या संगमरवरी ऐतिहासिक वास्तुत अनेक कलात्मक वैशिष्ट्ये आहेत. या वास्तुच्या आजूबाजुचा परिसर रमणीय आहे.

**शिकारघाट गुरुद्वारा :** गोदावरीच्या काठावर असलेले शिकारघाट हे महत्त्वाचे स्थान असून याचा संबंध परंपरेने एका आख्यायिकेशी लावला आहे. श्री गुरु नानकदेवजी यांचे शिष्य भाई मुलाखत्री यांचा या स्थानाशी संबंध आहे. गुरु गोविंदसिंघजी त्यांच्या वास्तव्यात या स्थानाला ते भेट देत असत. एका अशा भेटीदरम्यान त्यांना एक ससा दिसला. सश्याकडे पाहताच तो गेल्या जन्मीचा भाई मुलाखत्री असल्याचे व त्याच्या गेल्या जन्मातील कर्माची तो फळे भोगत असल्याचे त्यांना जाणवले.

श्री गुरु गोविंदसिंघजी यांनी त्याला कृपाशिर्वाद दिले व मुक्त केले. या पवित्र जागी गुरुंच्या अध्यात्मिक व अतींद्रिय शक्तीचा प्रयोग झाला.

येथे असलेला सध्याचा संगमरवरी गुरुद्वारा संत बाबा जीवनसिंघजी व संत बाबा दलिप सिंघजी यांनी इ.स. १९७१ मध्ये बांधला असला तरी मूळ वास्तु एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस बांधली गेली होती. हा गुरुद्वारा बांधण्यासाठी ते दोघे खास पंजाबहून आले होते. हा गुरुद्वारा आणि नदीवर बांधलेला पूल संगतच्या कारसेवेची उत्कृष्ट उदाहरणे ठरावी. हा गुरुद्वारा रमणीय परिसरात एका छोट्या टेकडीवर आहे.

**गुरुद्वारा मातासाहिब :** हा गुरुद्वारा विसाव्या शतकात बांधला गेला आहे. याच्याशी निगडित असलेल्या कथेनुसार गुरु गोविंदसिंघजी यांची पत्नी मातासाहिब कौरजी यांचे नांदेडला वास्तव्य असताना त्या या स्थानाला नियमित भेट देत असत व तासंतास इथे ध्यानधारणा करत असत. गुरु गोविंदसिंघजीही इथे येत असत व भोजन करत असत. त्यांच्या भोजनांच्या स्मृतीप्रित्यर्थ इथे लंगर असतो. त्यावेळेपासून आजतागायत इथे लंगर चालवला जातो. ही परंपरा जवळजवळ तीनशे वर्ष जुनी आहे. श्री गुरु गोविंदसिंघजींनी मातासाहिब कौरजींना दिल्लीला पाठविले. त्यावेळी गुरुंनी त्यांना एक तलवार आणि पाच शस्त्रे दिली व त्यांची रोज पूजा करावयास सांगितले. येथील गुरुद्वारा एक सुंदर संगमरवरी वास्तुशिल्प असून पारंपारिक व आधुनिक स्थापत्यशैलींचा मिलाप आढळतो.

**गुरुद्वारा हिराघाट :** श्री गुरु गोविंदसिंघजी नांदेडला ज्या ज्या स्थानी राहिले ती ती स्थाने ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाची ठरली आहेत. गोदावरी नदीवरील हिराघाट हा गुरु गोविंदसिंघजी व सम्राट बहादूरशहा यांच्या भेटीसाठी प्रसिद्ध आहे. सम्राट बहादूरशहाने या स्थानी गुरुंची भेट घेऊन त्यांना मौल्यवान नजराणे भेट देऊन आपला आदर प्रकट केला होता.

सम्राटाने गुरुंना एक उत्कृष्ट प्रतीचा हिरा भेट दिला. पण गुरु सर्व भौतिक सुखांच्या पलीकडे गेले होते. त्यांच्या लेखी हिऱ्याला अजिबात महत्त्व नव्हते. त्यांनी तो हिरा नदीच्या पात्रात फेकून दिला. ते पाहून सम्राट चक्रावला. तेव्हा गुरुंनी त्याला नदीकाठावर जाऊन हिरा परत आणण्यास सांगितले. त्याप्रमाणे बहादूरशहा गेला असता नदीचा संपूर्ण काठ त्याला अनेक मौल्यवान व किंमती हिऱ्यांनी भरलेला दिसला. या ठिकाणी सम्राट बहादूरशहा गुरु गोविंदसिंघजींच्या समोर नतमस्तक झाला. त्याला याची खात्री पटली होती की चमकणारे वैभव शिखांना भुरळ घालू शकत नाही. गुरु नानकदेवांच्या दरबारात कुठल्याही गोष्टीची वाण नाही. विसाव्या शतकात या घाटावर बांधला गेलेला

हा गुरुद्वारा आधुनिक स्थापत्याचा संगमरवरी चमत्कार ठरावा. मुख्य गुरुद्वाराबरोबरच गुरु गोविंदसिंघजी यांच्या स्मृतींनी पवित्र झालेले हे सात गुरुद्वारा नांदेडचे वैभव आहेत. या सात गुरुद्वारांशिवाय मुख्य सचखंड श्री हुजूर साहिब गुरुद्वाराच्या मागे २ फर्लांग अंतरावर गुरु गोविंद बाग आहे. या ठिकाणी नव्याने गुरुद्वारा बांधला आहे. गुरु-ता-गद्दी सोहळ्याच्या निमित्ताने आठ एकराच्या परिसरात एक बाग निर्माण करण्यात आली असून शिख इतिहासाचे दर्शन घडविणारा लेझर शो येथे दररोज सायंकाळी दाखविला जातो.

**नांदेडमधील शिल्पवैभव :** नांदेडमध्ये काही मूर्तीशिल्पे सापडली आहेत. विविध कालखंडातील ही शिल्प शहराची कला परंपरा अधोरेखित करतात.

**जैन मंदिर :** जैन गल्ली सराफा परिसरात श्री १००८ आदिनाथ दिगंबर जैन अतिशय क्षेत्र मंदिर आहे. मंदिरामध्ये अर्धापूर येथील तिर्थंकर आदिनाथांची मूर्ती ठेवण्यात आली आहे.

**केवल नृसिंह किंवा योग नृसिंह :** १२ व्या शतकातील या मुर्तीचे साम्य रामटेक (जि.नागपूर) येथे सापडलेल्या नृसिंह मूर्तीशी आहे. मूळात ही मूर्ती नंदगिरी किल्ल्यात होती. शहरातील होळी या भागात तळघरात एका छोट्या मंदिरात आता तिची प्रतिष्ठापना करण्यात आली आहे. योग नृसिंह आपले मूळ अवतारकार्य संपल्यावर म्हणजे हिरण्यकश्यपूचा वध करून स्थिर झाला आहे. जणू भक्तांसाठी असलेला हा नृसिंह योगासनात आहे. ही मूर्ती १२२ से.मी. उंचीची द्विभूज आहे. मूर्तीच्या बाजूला १५ सें.मी. उंचीची भक्त प्रल्हादाची मूर्ती आहे. नृसिंह सालंकृत असून मनगटात कडे तर दंडात बाजूबंद आहे. मूर्तीचा उजव्या पायाचा गुडघा वर उचलला असून डाव्या पायाची मांडी घातली आहे. एक हात जमिनीवर ठेवला असून दुसऱ्या हातात चक्र आहे. लीळाचरित्रात नृसिंह मंदिराचा संदर्भ आहे. त्यानुसार मूळ मंदिर भावतीर्थाच्या लगत व उत्तराभिमुख असावे. काही अभ्यासकांच्या मते ते भावतीर्थाच्या उत्तरेस असलेल्या पांढरीच्या टेकडीवर असावे. गोदा नृसिंह या नावाने ओळखली जाणारी ही मूर्ती आता त्या भूयारसदृश्य मंदिरात आहे. सध्याचे मंदिर सतराव्या शतकातील असावे.

**केवल शिवमूर्ती :** नांदेड येथे कुंभारटेकडीवर आज परमेश्वर किंवा त्र्यंबकेश्वर म्हणून ओळखली जाणारी केवल शिवाची मूर्ती आहे. उमा-महेश्वर किंवा केवलशिव यांच्या प्रतिमा क्वचितच आढळतात. त्यामुळेच ही केवलशिवाची मूर्ती विशेष महत्त्वाची आहे.

**विष्णू मूर्ती :** श्री व्यंकटेश म्हणून ओळखली जाणारी एक विष्णू मूर्ती सिद्धपूरी येथील एका मंदिरात ठेवली आहे. हे मंदिर बिंदू माधव यांनी अलिकडच्या काळात बांधले असले तरी मूळ मूर्ती तेराव्या शतकातील आहे.

**माहेंद्री-इंद्रायणी :** राष्ट्रकूट काळात सप्तमातृकांची पूजा लोकप्रिय झाली होती. सप्तमातृकांपैकी एका मातृकेची माहेंद्री किंवा इंद्रायणीची मूर्ती चिखलवाडीत ठेवण्यात आली आहे. ही मूर्ती चतुर्हस्त असून खड्ग, पाश, त्रिशूल व ढाल धारण केलेली आहे. सध्या ही मूर्ती शितलादेवी म्हणून ओळखली जात असून सतराव्या शतकात स्थापन झालेल्या हत्तीवर आरुढ झाली आहे.

**नांदेड शहरातील मंदिरे :** गोदावरी नदीमुळे तिर्थस्थान म्हणून गणल्या गेलेल्या या शहरात गुरुद्वाराबरोबरच इतर अनेक छोटी मोठी मंदिरे, मठ आहेत.

**गंगा मंदिर :** होळीवरा गोदावरीकाठी गंगामाता मंदिर आहे. गंगामातेची मूर्ती (४६×१०से.मी.) संगमरवरी असून १९ व्या शतकातील आहे. हिला चार हात असून प्रदक्षिणा क्रमाने वरदहस्त अक्षमाला युक्त असून इतर तीन हातात कमंडलू, पद्म आणि पुस्तक धारण केलेले आहे. मुर्ती कंचुकी व सकच्छ वस्त्र अशा वस्त्रात आहे. ही गंगा म्हणजे गोदावरीच आहे.

**सरदेशपांडे राम मंदिर :** सरदेशपांडे घराण्याचे हे मंदिर नावघाट येथे एका जुन्या वाड्यामध्ये आहे.

**गायत्री मंदिर :** संत टेकडी भागात नव्याने (१९५४ साली) बांधलेले गायत्री मंदिर आहे. मंदिराला मोठा सभामंडप व गाभारा आहे. गाभाऱ्यात गायत्रीची पंचमुखी संगमरवरी मूर्ती प्रतिष्ठापित आहे. महाराष्ट्रातील हे एकमेव गायत्री मंदिर आहे. गायत्रीदेवीची पाच मुखे पंचतत्त्वांचे प्रतिनिधित्व करतात. या मंदिरात चैत्र, अश्विन, आषाढ व माघ या चार महिन्यात येणाऱ्या चारही नवरात्री साजऱ्या करण्यात येतात. त्यावेळी घटस्थापना केली जाते. याशिवाय ज्येष्ठ शु. पंचमीला गायत्री जयंतीचा उत्सव होतो. देवीला चांदीचा मुकुट व छत्री आहे.

**ओंकारेश्वर मंदिर :** गोदावरीकाठी पेशव्यांच्या काळातील पश्चिमाभिमुख मंदिर आहे. गाभाऱ्यासमोर नंदी असून शेजारी एक समाधी आहे. या मंदिरासमोर एक दर्गा आहे.

याशिवाय नांदेड शहरात लहान मोठी गणेश मंदिरे, बालाजी मंदिरे, रेणुका मंदिर, विठ्ठल मंदिर, श्री राम मंदिर व अन्य देवतांची मंदिरे तसेच अनेक संतपुरुषाचे मठ आहेत.

**बालाजी मंदिर :** हे बालाजी मंदिर निजाम काळात बांधले आहे. मंदिराची रचना काहीशी जुन्या वाड्याप्रमाणे भासते. अतिशय भव्य सभामंडप, अर्धमंडप व गर्भगृह अशी मंदिराची रचना आहे. मंदिरात काळ्या पाषाणाची बालाजीची मूर्ती असून तिच्या उजव्या वरच्या हातात चक्र तर उजवा खालचा हात अभय मुद्रेत व डाव्या वरच्या हातात शंख व खालचा हात कमरेवर अशी आहे. या मूर्तीच्या दोन बाजूस जय व विजय यांच्या प्रतिमा आहेत. ही मूर्ती गरुडावर स्वार आहे. त्यामुळे इथे वेगळा गरुडध्वज नाही. हे या मंदिराचे एक वैशिष्ट्य आहे.

या मूर्तीची स्थापना तिरुपती बालाजी येथील हाथीराम बाबांनी १७ व्या शतकात केली. या मंदिरात महंत परंपरा आहे. हे मंदिर पूर्णपणे खाजगी मालमत्ता असून जवळ जवळ शंभर वर्षांपूर्वी दर दिवशी एक रुपया याप्रमाणे अनुदान मिळत होते. सध्या हे अनुदान बंद पडले आहे. या मंदिराला दोन सनदा मिळाल्या आहेत. दोन्ही सनदा फारशी भाषेत आहेत. त्यापैकी एक सनद राजा दुर्जनसिंग यांनी व दुसरी सरदार राजगोपाल यांनी दिली आहे. पहिलीचे वर्ष फसली ११८० व दुसरीचे फसली ११८२ आहे.[१०७] गोकुळाष्टमी व दसरा हे सण या मंदिरात मोठ्या प्रमाणावर साजरे केले जातात. गोकुळाष्टमीच्या दिवशी पाळणा, भजन, पूजा, भंडारा हे कार्यक्रम असून त्या दिवशी हंडी फोडली जाते.

---

१०७ **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, पूर्वोक्त, पृ. ५८२.

नवरात्रीचा उत्सव अश्विन शु. प्रतिपदेपासून सुरू होतो व दसऱ्याला त्याची सांगता होते. दसऱ्याला बालाजीचा रथ निघतो. रथामध्ये बालाजीची पितळी मूर्ती असून भक्तगण रथ ओढतात. प्रथम रथ बालाजी मंदिराला पाच प्रदक्षिणा घालून नंतर वजिराबाद येथील मारुती मंदिराकडे जातो. तिथले पुजारी देवाची पूजा करतात व रथ बालाजी मंदिरात परत आणला जातो. या मिरवणुकीला जवळ जवळ २०,००० लोक जमतात.

कंधार येथेही एक बालाजी मंदिर असून ते मंदिर या मंदिराशी संबंधित आहे. कंधार येथील मंदिरापुढे अमृतकुंड आहे.

याशिवाय शहरातील गाडीपूरा या भागात अजून एक बालाजी मंदिर आहे. मंदिर त्यामानाने अलीकडच्या काळातील आहे. मंदिर नक्षीकाम युक्त आहे. बाहेर पटांगणात गरुडध्वज आहे.

**बाळगीर महाराजांचा मठ :** गाडीपूराभागात बाळगीर महाराजांचा मठ आहे. बाळगीर महाराज मूळचे राहेरचे होते. नांदेड शहरात येऊन त्यांनी साधारण १००-१२५ वर्षांपूर्वी दत्त मंदीर बांधले. मंदिराच्या मूख्य गर्भगृहात मध्यभागी बाळगीर महाराजांची मूर्ती असून डाव्या बाजूस एकमुखी दत्त व उजव्या बाजूस अनसूया मातेची मूर्ती आहे. दुसऱ्या गाभाऱ्यात गणपतीची शेंदूरचर्चित प्रसन्न मुद्रेची मूर्ती आहे. मूर्ती उजव्या सोंडेची किंवा सिद्धीविनायकाची आहे. गाभारा अतिशय लहान असून दरवाजातून वाकून जावे लागते. मूर्तीच्या कपाळावर पाचू आहे. याशिवाय मंदिरात दत्ताची वैशिष्ट्यपूर्ण मूर्ती आहे. हा दत्ताचा कलियुगातील अवतार मानला जातो.

मठात गादीपरंपरा असून त्यानुसार महंतांची निवड केली जाते. येथे रोज अन्नदान केले जाते. तसेच पौर्णिमेला व दत्तजयंतीला यात्रा असते. यात्रेला ४-५ हजार लोक जमतात.

याशिवाय इतर अनेक देवतांची लहान-मोठी मंदिरे शहरात आहेत. त्यापैकी त्रिकूटकरांचे गणपती मंदिर, चौफळ येथील विठ्ठल मंदिर, गाडीपूरा येथील संकटमोचन मारुती मंदिर उल्लेखनीय आहेत.

**मशीद :** शहरात सतराव्या शतकातील दोन मशीदी आहेत. त्यापैकी एक मालिक अंबरने बांधली असून दुसरी कुतुबशाही कालखंडातील आहे.

**जामा मशीद :** औरंगजेबाच्या काळातील ही मशीद असून तिच्या समोर प्रचंड मंडप आहे. इथे हजारो लोक नमाज पढू शकतात. कालानुरुप मूळ वास्तुमध्ये अनेक बदल व सुधारणा करण्यात आल्या आहेत. मशीदीत महमुद शाह साहेब यांचा दर्गा आहे. इथून जवळच कबरस्तान आहे.

**बडी दर्गा :** नांदेड रेल्वे स्थानकापासून ३ कि.मी.वर गोदावरी नदीकाठी हा दर्गा आहे. दर्गा १७ व्या शतकात बांधला गेला होता. मागील बाजूने दर्ग्याची इमारत काहीशी गोलाकार आहे. दर्ग्यामध्ये आता अनेक बदल करण्यात आले आहेत. मोहरमला इथे उरुस भरतो तेव्हा हजारो लोक जमतात. याशिवाय इतरही मशिदी व लहान दर्गे आहेत. रमझान ईद व मोहरमच्या दिवशी मशीद व दर्ग्यामध्ये नमाज पढण्यासाठी मोठ्या प्रमाणावर मुस्लिम बांधव जमतात.

Maharashtra State Gazetteers

**नांदेड शहरातील विकास कामे**[१०८] **:** नेहरु नागरी पुनरुत्थान अभियान (जे एन एन यु आर एम) अंतर्गत केंद्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी योजनेत एकूण ६३ शहरांचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये महाराष्ट्रातील नांदेड शहराचा अंतर्भाव करण्यात आला आहे. जे एन एन यु आर एम अंतर्गत मंजूर निधीपैकी ८० टक्के केंद्र शासनाचा हिस्सा, दहा टक्के महाराष्ट्र शासनाचा तर उर्वरित दहा टक्के महानगरपालिकेचा हिस्सा याप्रमाणे खर्च करावयाचा आहे. या योजनेअंतर्गत शहरातील रस्ते, पाणीपुरवठा, मलःनिस्सारण, नदीघाट सुशोभिकरण, घनकचरा व्यवस्थापन, मोठ्या नाल्यांचे बांधकाम, मूलभूत नागरी सुविधा पुरविणे, पर्यटन स्थळांचा विकास, सांस्कृतिक वारश्याचे जतन, बी आर टी एस (Bus Rapid Transit System) असे बहुउद्देशीय उपक्रम राबविण्यात आले आहेत. याबरोबरच ऑक्टोबर २००८ मध्ये झालेल्या गुरु ता गद्दी या त्रिशताब्दी सोहळ्याचे निमित्त साधून अनेक विकासकामे नांदेड-वाघाला महानगरपालिकेतर्फे हाती घेण्यात आली आहेत.

**नदीघाट विकास :** गुरु ता गद्दी सोहळ्यासाठी येणाऱ्या भाविकांच्या स्नानाच्या सोयीसाठी नदीघाटाचे सुशोभिकरण करण्यात आले आहे. गोदावरी नदी ही नांदेड शहराच्या पाण्याचा मुख्य स्त्रोत आहे. ती पश्चिम-पूर्व वाहते. या नदीमुळे नांदेडचे उत्तर दक्षिण असे दोन भाग झाले आहेत. यापैकी उत्तरेकडील भाग जुना असून तेथे जुने घाट आहेत. हे घाट धार्मिकदृष्ट्या महत्त्वाचे आहेत. घाटांवर जुनी मंदिरे व गुरुद्वारे आहेत. परंतु त्याच्यांकडे होत असलेल्या दुर्लक्षामुळे घाटांचे सौंदर्य व पावित्र्य हरपत आहे. या गोष्टीचा विचार करून घाटांचे पुनरुज्जीवन करण्याच्या हेतूने नदीघाट विकास योजना हाती घेण्यात आली. यामध्ये दोन्ही काठावरील प्रत्येकी ५ कि.मी. चा नदीकडचा परिसर विकसीत करण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. १.४ कि.मी. च्या पहिल्या टप्प्याचा या योजनेत विकास करण्यात आला आहे व ३ कि.मी. चा विकास गुरु-ता गद्दी योजनेअंतर्गत करण्यात आला आहे. या योजनेत सध्या अस्तित्वात असणाऱ्या घाटांची सुधारणा, नवीन घाटांची निर्मिती, जेट्टी, नदीकाठचा रस्ता, पायऱ्या, बाग, बगीचे, मुलांसाठी खेळण्यासाठी उद्यान, पाण्यातील खेळ, वाहनांसाठी पार्किंगची सोय, स्वच्छता गृह या गोष्टींचा समावेश आहे. या योजनेमुळे या परिसराचा पर्यटनदृष्ट्या विकास होईल व पर्यटन व व्यापारी स्त्रोतांचा उपयोग करून उत्पन्न मिळण्याची संधी निर्माण होईल. तसेच घाटांवर धार्मिकदृष्ट्या महत्त्वाच्या स्थानांमध्ये सुधारणा केल्या आहेत.

**श्री गुरु गोविंदसिंघजी स्टेडियम क्रीडा संकूल विभाग :** हे क्रीडा संकूल जवळ जवळ २६ एकर एवढ्या मोठ्या जागेत विकसीत करण्यात आले आहे. यामध्ये १) २५,००० प्रेक्षक क्षमतेचे श्री गुरु गोविंदसिंघजी स्टेडियम गॅलरी व दोन हजार प्रेक्षक क्षमतेचे पॅव्हेलियन तयार करण्यात आले आहे. २) ४०० मीटर रनिंग ट्रॅक क्रीडांगण, ३) कबड्डी, खो खो, व्हॉलीबॉल या खेळांसाठी क्रीडांगण, ४) क्रिकेटसाठी नैसर्गिक हिरवळीची धावपट्टी, ५) कुस्तीसाठी लालमातीचा आखाडा, ६) सिमेंटचे टेनीस कोर्ट, ७) बॅडमिंटनसाठी अत्याधुनिक दोन क्रीडांगणे, ८) स्केटींग क्रीडांगण, ९) विविध स्पर्धांच्या निमित्ताने येणाऱ्या खेळांडूसाठी निवास व्यवस्था व वसतीगृह, १०) स्नूकर क्लब यांचा समावेश आहे.

---

१०८ नांदेड-वाघाला महानगरपालिकेने प्रकाशित केलेले अहवाल व परिपत्रके यांच्या आधारे.

**कै. श्री शांतारामजी सगने जलतरणीका :** याशिवाय या क्रीडा संकूलात २०-५० चौ.मी.आकाराचा (प्रौढांसाठी) व ५-८ चौ.मी. (लहानांसाठी) जलतरण तलाव केले आहेत. असंख्य लोक याचा लाभ घेत आहेत.

**जिम्नॅशियम् :** क्रीडा संकूलात अत्याधुनिक व्यायामाचे साहित्य असणारे सुसज्ज जीम्नॅशियम आहे. खेळाडूंच्या शारीरिक विकासासाठी या जिम्नॅशियमची निर्मिती करण्यात आली आहे.

**व्यायाम आखाडे :** महानगरपालिकेतर्फे कुस्तीकरिता किल्ला व्यायाम आखाडा व वजिराबाद व्यायाम आखाडा या आखाड्यांची निर्मिती करून तेथे कुस्ती प्रशिक्षकही नियुक्त केले आहेत.

वरील सुविधांचा लाभ घेऊन जिल्ह्यातील अनेक तरुण उदयोन्मुख खेळाडू विविध क्रीडाप्रकारांत चमकत आहेत.

**कै. शंकररावजी चव्हाण प्रेक्षागृह :** महानगरपालिकेद्वारा एक अद्ययावत ८८० आसन क्षमतेचे वातानुकुलीत प्रेक्षागृह बांधले असून इथे सांस्कृतिक कार्यक्रम, नृत्य, संगीत, नाट्य संमेलन, परिसंवाद व इतर सांस्कृतिक कार्यक्रमांकरिता ते उपयोगात आणले जाते. यामध्ये आजपर्यंत २०० पेक्षा अधिक कार्यक्रमांचे आयोजन झाले आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसर सुशोभिकरण :** हैद्राबाद संस्थान भारतात विलिन व्हावे या मागणीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर निजाम राजवटीविरुद्ध हैद्राबाद येथील किंग कोठीवर सत्याग्रह करण्यासाठी नांदेडहून हैद्राबादला गेले होते. त्या प्रसंगाची आठवण म्हणून नांदेड रेल्वे स्थानकासमोरील विक्रीकर कार्यालयाच्या जागेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यात आला. हा पूर्णाकृती पुतळा दीड टन वजनाचा व ३.२० मी. उंचीचा आहे. १९ मार्च १९७० रोजी राज्याचे त्या वेळचे मुख्यमंत्री मा.ना. श्री. वसंतराव नाईक यांच्या हस्ते पुतळ्याचे अनावरण झाले. या परिसराच्या विस्तारीकरणाची व सुशोभिकरणाची योजना महानगरपालिकेने अमलात आणली आहे.

याशिवाय छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य अश्वारूढ पुतळा, वजिराबाद येथील महात्मा गांधींचा पुतळा व सांगवी नाका चौक येथे 'मानव स्वतःचा शिल्पकार' हा संदेश देणारा पुतळा या पुतळा परिसरांचे सुशोभिकरणही करण्यात आले आहे.

**पर्यावरणविषयक सुविधा :** पर्यावरणविषयक सुविधांमध्ये शहराचा पर्यावरणीय विकास व्हावा या दृष्टीने काही सुधारणा करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये शहराच्या मध्यभागी ज्येष्ठ नागरिकांसाठी उद्यान म्हणजे नाना नानी पार्क सुरू करण्यात आले आहे. यामुळे ज्येष्ठ नागरिकांना फिरण्यासाठी एक निवांत हक्काची जागा मिळाली आहे. या पार्कमध्ये जॉगिंग ट्रॅकही उपलब्ध करून दिला आहे. याशिवाय विसावा उद्यानात डायनोसोर थिम पार्कची संकल्पना राबविण्यात आली आहे. शहराच्या हरितीकरणासाठीही काही विशेष प्रयत्न करण्यात आले. त्याचाच एक भाग म्हणून झाडांची एक नर्सरी विकसीत करण्यात आली आहे. यामध्ये नानाविध प्रकारची रोपे ठेवण्यात आली आहेत.

Maharashtra State Gazetteers

**पायाभूत सुविधा :** शहराचे आधुनिकीकरण करण्यासाठी तसेच शहरातील पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी महानगरपालिकेने काही विकासकामे हाती घेतली आहेत. यामध्ये वाहतूक व दळणवळण यादृष्टीने सोयीस्कर व्हावे यासाठी शहराच्या उत्तर-दक्षिण भागांना जोडणारा पूल नावघाट येथे बांधला आहे. या पुलाला संत दासगणू महाराजांचे नाव दिले आहे. रेल्वे लाईनच्या उत्तर व दक्षिणेकडील भाग जोडणारा शिवाजीनगर येथे रेल्वेवरील पूल बांधला आहे. शहरातील मुख्य रेल्वे स्थानकावर पडणारा ताण लक्षात घेऊन मालटेकडी येथे नवीन रेल्वे स्टेशन बांधले असून ते विशेषतः मोठ्या सामानाची चढ-उतार करण्यासाठी बांधले आहे. या नवीन स्थानकाची इमारत आकर्षक असून तिची रचना गुरुद्वाराप्रमाणे केली आहे. गुरु ता गद्दी सोहळ्यानिमित्त येणाऱ्या भाविकांची तसेच पर्यटकांची गर्दी लक्षात घेऊन पायाभूत सोयी पुरविण्याच्या दृष्टीने नांदेड रेल्वे स्थानकाचे नुतनीकरण करण्यात आले. तसेच त्याचे हुजुर साहेब नांदेड असे नामकरण करण्यात आले.

याशिवाय एम.आय.डी.सी. तर्फे विमानतळाचे नुतनीकरण करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे नवीन सोयी, सुविधा उपलब्ध करून त्याचे विस्तारीकरण करण्यात आले आहे. २३०० मीटर लांबीची धावपट्टी व विमानांना रात्री उतरण्याची (Landing) ही या विमानतळाची वैशिष्ट्ये आहेत.

गुरुद्वारा भागातील विकासकामांमध्ये विस्थापीत झालेल्या कुटुंबांचे पुनर्वसन करण्यासाठी अबचलनगर येथे सुनियोजित नवीन वसाहत बांधण्यात आली आहे.

महानगर पालिकेने गुरु ता गद्दी सोहळ्याच्या निमित्ताने अनेक नवीन इस्पीतळे बांधली आहेत. तसेच नवीन शासकीय विश्रामगृहही बांधले आहे. शहरात या निमित्ताने होणारी गर्दी लक्षात घेऊन या सोयी करण्यात आल्या आहेत. लोकांच्या आरोग्यासाठी व शहरात स्वच्छता ठेवण्यासाठी महाागरपालिकेने सरकारी सहभागाने अनेक सार्वजनीक शौचालये बांधली आहेत. अपना शौचालय म्हणून ओळखली जाणारी ही शौचालये आज शहर स्वच्छ ठेवण्यासाठी मदत करत आहेत.

शहरात पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी देना बँक, नगिना घाट रस्ता इथे व देगलूर नाका इथे उड्डाणपूलांचे काम पूर्ण केले आहे. याबरोबरच थोर स्वातंत्र्य सैनिकांच्या कार्याचा गौरव करून आजच्या पिढीला त्यांच्या कर्तृत्वाची जाणीव करून घेण्यासाठी हुतात्मा स्मारक निर्माण केले आहे. आकर्षक, सुनियोजित उद्यानाच्या स्वरुपात असलेल्या या हुतात्मा स्मारकात चांगली निगराणी केलेली हिरवळ (लॉन्स) व झाडे असल्यामुळे पर्यटनदृष्ट्याही हे महत्त्वाचे ठरावे. गोविंद बाग नावाचे एक सुंदर उद्यान गुरुद्वारा बोर्डतर्फे विकसीत करण्यात आले असून हेही पर्यटकांचे आकर्षण ठरावे.

गेल्या काही काळात शहरामध्ये केलेल्या या सुधारणांमुळे नांदेडचे संपूर्ण स्वरुपच पालटले आहे. या विकासकामांचे व सुधारणांचे पर्यवसन शहर आधुनिक व सुनियोजीत होण्यात झाले आहे. यामुळे नांदेडच्या पर्यटन व्यवसायात भर पडेल.

## चनापूर

**चनापूर :** (ता. नांदेड, १९°१५′ उ. ७७°२५′ पू)) चनापूर येथे आढळलेल्या अवशेषांवरून या ठिकाणचा यादवांची लष्करी छावणी म्हणून विकास झाला असावा असे वाटते.

येथे एक यादवकालीन मंदिर आहे. भग्न मंदिराच्या सभा मंडपातील रंगशिळा पाहता त्याखाली जाणिवपूर्वक पोकळी ठेवण्यात आली आहे. तत्कालीन वास्तुचे एक वैशिष्ट्य त्यामुळे स्पष्ट होण्यास मदत होते. गावात अन्य काही देवतांचे शिल्प अवशेष आहेत.

### पांगरा

**पांगरा :** (ता. कंधार) कंधारपासून १५ कि.मी. वर उत्तरेला हे गाव वसले आहे. येथे योग्य अशा नैसर्गिकरित्या उपलब्ध भूभागाचा उपयोग करून विस्तीर्ण अशा जलाशयाची निर्मिती केली होती. हा जलाशय किमान ४०० वर्षे जुना आहे. तिनही बाजूंनी येणारे पाणी अडविण्यासाठी दगडी बंधारा बांधला आहे. तसेच जलनिःसारण व्यवस्था आहे. मध्ययुगीन जलव्यवस्थापनाचा एक अविष्कार म्हणून याची नोंद घेणे आवश्यक ठरेल.

या जलाशयाच्या काठावर एक भव्य असा प्राकार बांधला आहे. प्राकाराच्या मध्ये १७ व्या शतकात बांधलेले एकगर्भी शिवमंदिर आहे. मंदिरापुढे सभामंडप आहे. याला १६ स्तंभांनी आधार दिला आहे. याशिवाय दोन अन्य स्वतंत्र गाभारे आहेत. मुख्य गर्भगृहावर शिखर आहे. मंदिराच्या प्राकारात पुन्हा एक उपप्राकार समोरच्या बाजूला बांधलेला असून त्यात एका बाजूला ओवऱ्या आहेत. प्रवेशद्वाराच्या बाजूसही ओवऱ्या आहेत. हे १७ व्या शतकातील दगड व चुन्यातील बांधकाम आहे.

### पाळा

**पाळा :** (ता.मुखेड, १८° ३५' उ., ७७° २५' पू.) पाळा हे गाव तालुका मुख्यालयापासून १७ कि.मी. अंतरावर मुखेड-राजूर रस्त्यावर आहे. येथे रस्त्यालगतच यादवकालीन हेमाडपंथी शैलीचे मंदिर आहे. ते भवानी मंदिर म्हणून ओळखले जाते. मराठवाड्यात आढळणाऱ्या यादव कालीन मंदिरांपैकी हे एक वैशिष्ट्यपूर्ण व सुंदर मंदिर आहे. अशा मंदिरांचे कलात्मकतेच्या दृष्टीने दोन काळात विभाजन करता येते. प्रारंभिक काळातील म्हणजे साधारणतः अकराव्या ते तेराव्या शतकाच्या पूर्वार्धातील व नंतरची म्हणजे साधारणपणे तेराव्या शतकाचा उत्तरार्ध ते चौदाव्या शतकाच्या पूर्वाधातील मंदिरे. नंतरच्या काळातील मंदिरे शिल्पांकन, कलात्मकता व भव्यतेच्या दृष्टीने पूर्वीच्या मंदिरांच्या तुलनेत साधारण असतात. पाळा येथील भवानी मंदिर हे कालानुक्रमे दुसऱ्या प्रकारात मोडणारे असून चौदाव्या शतकातील आहे.

सदर मंदिर पूर्वाभिमूख असून त्याची रचना गर्भगृह, अंतराळ, उघडा सभामंडप व त्यापुढील अर्धमंडप अशी आहे. हे मंदिर अधिष्ठानाशिवाय असून जमिनीतून एकदम वर आल्यासारखे दिसते. याचे गर्भगृह (२.६०×२.६० मी.) चौरस आकाराचे असून अत्यंत साधे आहे. त्यात मुळात अस्तित्वात असणारी मूर्ती किंवा शिवपिंडी आज अस्तित्वात नाही. गाभाऱ्याचे प्रवेशद्वार चार शाखांचे आहे. त्यावर अनुक्रमे व्यालशाखा, स्तंभशाखा, पद्मशाखा व भौमितीक नक्षी यांचे अंकन आढळते. द्वारशाखेच्या खालील भागात असलेले द्वारपाल हे डमरु, त्रिशुळ, गदा धारण केलेले शैव द्वारपाल आहेत. बाजूला चवरिधारिणी आहेत. प्रवेशद्वाराच्या ललाटबिंबावर गणेशाची प्रतिमा आहे.

गाभाऱ्यापुढे अंतराळ (३.०० × २.०० मी.) आहे. अंतराळास लागून १६ स्तंभांनी युक्त असा सभामंडप (६.४० × ६.५० मी.) आहे. सभागृहात चार भिंतींमध्ये रंगशिळा आहे. सभागृह बंदिस्त

Maharashtra State Gazetteers

नसून खुले आहे. सभागृहाच्या सभोवताली असलेल्या भिंती अर्ध्यापर्यंत (८० सें.मी. पर्यंत) उचलल्या असून त्यावर वितानाला आधार देणारे ठेंगणे स्तंभ आहेत. सभामंडपापुढे अर्धमंडप (४.२० × ३.०० मी.) आहे. त्याच्या वितानाचा भार तोलणारे पूर्ण स्तंभ होते, ते सध्या पडले आहेत.

मंदिरातील पूर्ण स्तंभाची रचना स्तंभ पाद, स्तंभ मध्य, स्तंभशिर्ष व त्याखालील गोलाकार आकाराची गादी व त्यावर असलेले हस्त नागबंद व वितानाला आधार देणाऱ्या तरंगशिळा अशी आहे. स्तंभावर हंस, युगुल, किर्तिमुख, गणेश, शिव, नृसिंह आदी शिल्पे आहेत. स्तंभशिर्षालगत असलेली मणीमाळांची नक्षी आकर्षक आहे.

मंदिर वितान हे क्षिप्त उत्क्षिप्त पद्धतीचे आहे. मंदिरा वितानाची जी मध्यशिळा आहे, त्यावर पूर्ण विकसित कमळ कोरले आहे, तर काही शिळांवर किर्तीमुखाची नक्षी आहे.

सभागृह खुल्या पद्धतीचे असल्यामुळे मंडोवराचा भाग मर्यादीत आहे. याची रचना क्षिप्त उत्क्षिप्त पद्धतीची आहे. यावर नक्षी कोरलेला एक पट्टा आहे. या पट्ट्यात प्रामुख्याने युद्धप्रसंग चितारले आहेत. त्यात हत्ती, अश्व यासारख्या प्राण्यांसह असलेले योध्दे झुंजताना दाखविले आहेत. याशिवाय गरुड, हनुमान, वादक आदि शिल्पे उठावदार आहेत. अन्य शिल्पांत गणेश, गण, नळदमयंती, गायीसह कृष्ण आदि शिल्पे आहेत.

या मंदिरास शिखर नाही. मंदिरावरील शिल्प व द्वारपाल यांचा विचार करता मुळात हे मंदिर शिवाचे असावे. उत्तर यादवकाळातील हे एक वैशिष्ट्यपूर्ण मंदिर आहे.

## पेठ उमरी

**पेठ उमरी :** (ता. पेठ उमरी) पेठ उमरी हे तालुका मुख्यालय गोदावरी खोऱ्यातून जाणाऱ्या व नांदेडला जोडणाऱ्या रेल्वे मार्गावरील एक प्रमुख स्थानक आहे. या शहरात कापसाचा मोठा व्यापार असून त्यामुळेच शहराला पेठ हा प्रत्यय लावण्यात आला आहे. उमरी हे गाव निजाम राजवटीत मुधोळ तालुक्यात व आदिलाबाद जिल्ह्यात थोडक्यात आंध्रात मोडत होते. संयुक्त महाराष्ट्र निर्मितीनंतर ते गाव नांदेड जिल्ह्यातील भोकर या तालुक्यात समाविष्ट करण्यात आले. सध्या हे तालुका मुख्यालय झाले आहे. उमरी येथे इ.स. १९४८ मध्ये बँक लुटण्याचा प्रसंग हैद्राबाद मुक्ती संग्रामात घडला होता. याचे सविस्तर वर्णन प्रकरण-२, इतिहासमध्ये आले आहे.

उमरी येथे पर्यटनदृष्ट्या महत्त्वाची असणारी काही ठिकाणे आहेत.

**बाबा महाराज समाधी :** बाबा महाराज नावाचे एक संतपुरूष उमरीला होऊन गेले आहेत. त्यांचे समाधीस्थान लोकांच्या प्रमुख आकर्षणाचा विषय आहे. बाबा महाराजांचे मूळ नाव शेषराव विश्वनाथ उमरीकर वसमतच्या देशिकानंद महाराजांकडून त्यांना अनुग्रह प्राप्त झाला. त्यांना भगवान दत्तात्रयांचा दृष्टांत झाला असे मानले जाते. त्यांनी इ.स. १९२४ मध्ये समाधी घेतली. लोकपरंपरेनुसार त्यांच्या जन्माबद्दल आख्यायिका आहे. त्यानुसार त्यांच्या आईच्या स्वप्नात शेषशायी (विष्णु) आला व त्याने मी तुझ्या पोटी जन्म घेईन असा तिला आशीर्वाद दिला. जेव्हा बाबा महाराजांना दत्तात्रेयांचे

Marathi Bhasha Gaurav Divas Celebrations

दर्शन झाले, तेव्हा त्यांनी ब्राह्मण बटु रूपातील दत्ताची चाळीस दिवस सेवा केली. त्यानंतर दत्तस्मृतीतून त्यांनी एका कुत्र्याचे पालन केले.[१०९] बाबा महाराजांच्या कवित्वाची प्रचिती देणाऱ्या अनेक रचना आहेत. त्यांची ज्ञानेश्वरी, गुरुचरित्र इत्यादींवरची टीका प्रसिद्ध आहे. त्यांनी ओवी, साकी, श्लोक इ. विविध प्रकार हाताळले आहेत. त्यांच्या २४२ हस्तलिखितांमध्ये जवळजवळ ४२,००० कडव्यांचा समावेश होतो.

बाबा महाराजांची समाधी एका जुन्या वाड्यात आहे. चौकात बाबा महाराजांचे गुरु देशीकानंद महाराज यांची समाधी आहे व मागे गणेश प्रतिमा आहे. हा गणपती नवसाला पावतो असा लोकांचा विश्वास आहे. बाबा महाराजांची प्रत्यक्ष समाधी तळघरात असून पायऱ्या उतरून जावे लागते. वरील खोलीत बाबा महाराजांचा पुतळा व त्यामागे राधाकृष्णाची मूर्ती आहे.

या समाधी व्यतिरिक्त शहरात काही मंदिरे आहेत.

**बालाजी मंदिर :** बालाजी मंदिर तसे अलिकडच्या काळात बांधले आहे. सभागृहाच्या प्रवेशाच्या उजवीकडे गरूड व मारूतीच्या प्रतिमा आहेत. बालाजीची प्रतिमा काळ्या पाषाणाची असून तिच्या दोन बाजूस काळ्या पाषाणातील जय व विजय आहेत. वैष्णव धर्माचे सर्व आचारधर्म इथे पाळले जातात. मंदिर समिती मंदिराची सर्व व्यवस्था पाहते. समितीतर्फे यात्रेकरू व पंडितांसाठी निवासव्यवस्था करण्यात आली आहे.

**विठ्ठल मंदिर :** सदानंद बाबा महाराजांच्या मठाच्या बाजूला विठ्ठल मंदिर आहे. या मंदिराची स्थापना श्री दासगणू महाराजांनी १९३६ मध्ये केली. मूळ गर्भगृहात चौरंगावर शिवपिंडी ठेवली असून त्यामागे कोनाड्यात विठ्ठलाची मूर्ती ०.७६२ मी. तर रूक्मिणीची ०.४५७ मी. उंचीची आहे. सभामंडप १२.१९ × ७.६२ मी. लाकडी व दुमजली आहे. मूळ मंदिरात कालानुरूप अनेक बदल करण्यात आले आहेत. मंदिराचा कारभार मंदिर समितीकडून पाहिला जातो व खर्च सार्वजनिक वर्गणीतून भागविला जातो.

**राममंदिर :** राममंदिर लहान असले तरी महत्त्वाचे आहे. इथे राम, लक्ष्मण, सीता यांच्या स्फटिकातील प्रतिमा आहेत. ज्या स्फटिकातून या मूर्ती घडविण्यात आल्या आहेत, तो स्फटिक अतिशय दुर्मिळ असल्याचे सांगितले जाते. रामाची मूर्ती ०.७६२ मी. उंच असून लक्ष्मण व सीतेच्या मूर्ती ०.४५७ मी. उंच आहेत.

**महादेव मंदिर :** मोठे मोकळे आवार, मोठा सभामंडप, दगडी गाभारा व त्यावर शिखर असे मंदिराचे स्वरूप आहे. या मंदिरात यात्रेकरुंची निवास व्यवस्था होते.

### बारुळ

**बारुळ :** (ता. कंधार, १७° ५५' उ., ७६° ७५' पू.) मानार धरण ज्या ठिकाणी बांधले गेले आहे ते बारुळ हे गाव येथील महादेव मंदिर व तेथे भरणाऱ्या यात्रेसाठी प्रसिद्ध आहे. या गावाचे नाव पूर्वी वारुळ होते. येथे सर्पदंश झालेला माणूस जगत नाही, असे सांगितले जाते. हे मंदिर

१०९ **नांदेड जिल्हा गॅझेटिअर**, पूर्वोक्त, पृ. ५८५.

Maharashtra State Gazetteers

साधारणपणे २५० वर्षे जुने असावे. परंतु आता त्याचा जीर्णोद्धार करण्यात आला आहे. इथे चैत्र शुद्ध द्वादशीला मोठी यात्रा भरते. याशिवाय काही अन्य मंदिरे आहेत. धरणाच्या पाण्यामुळे हा भाग समृद्ध झाला आहे.

## बाऱ्हाळी

**बाऱ्हाळी :** (ता. मुखेड) मुखेड या तालुका मुख्यालयापासून हे गाव २० कि.मी. अंतरावर मुखेड-मुक्रमाबाद रस्त्यावर आहे. बाऱ्हाळी या गावात आणि गावालगत जवळपास १० हेक्टर क्षेत्र पांढरीच्या शेतीने व्यापले असून तेथे यादवकालीन वसाहतीचे अवशेष प्राप्त झाले आहेत. येथे सध्या शेतीसाठी सपाटीचे काम सुरू आहे.

बाऱ्हाळी येथे यादवकालीन मंदिर समूह आहे. त्यात आज भवानी मंदिर, महादेव मंदिर, गणेश मंदिर ही मंदिरे भग्नावस्थेत आहेत. विशेषतः भवानी मंदिर म्हणून ओळखला जाणारा परिसर म्हणजे एका मोठ्या अधिष्ठानावर पूर्ण विकसित मंदिर असून त्याला प्राकार होता. तसेच गढीला असतात तसे बुरुज बांधले होते. आता येथे पूर्णपणे मैदान तयार केले आहे. या परिसरात यादवकालीन घटक अवशेष असून मोर वाहन असलेली एक मातृकादेवतेची पद्मासनातील मूर्ती आहे. तिला चार हात असून ती अनुक्रमे अभय हस्त व पद्म, अंकुश, पाश आणि मातुलिंग धारण केलेली आहे.

गावाबाहेर पूर्व बाजुला एक मंदिर समूह आहे. त्यात मुख्य मंदिर महादेवाचे असून गाभारा, अंतराळ, सभामंडप आणि तीन बाजूंना अर्धमंडप अशी रचना आहे. या मुख्य मंदिरालगत अन्य एक चौरस सभामंडप आहे व त्यापुढे आयताकृती मुखमंडप आहे. मुख्य मंदिर, त्यालगत मठ व याच परिसरात एक बारव असे हे संकुल १३ व्या शतकातील असून तेथे काही निवडक मूर्ती आहेत. त्या अशा (१) गणेश (७० × ६० × २० सें.मी.) प्रतिमा काळ्या पाषाणातील असून ती चतूर्हस्त व पाश, मोदक, दंतधारण केलेली आहे. मूर्तीवर उदरबंध आहे. (२) विष्णू (७५ × ५० × २५ सें.मी.) चतूर्हस्त असून प्रदक्षिणाक्रमाने अनुक्रमे पद्म, चक्र, शंख व गदा धारण केलेली आहे. सोबत गरूड व चामरधारिणी आहेत. (३) सुर्य (६५ × ४० × २० सें.मी.) सप्त अश्वांच्या रथावर स्वार असून उषा, प्रतिउषा दाखवल्या आहेत. हातात पुष्प आहे. सर्व मूर्ती स्थानिक काळ्या पाषाणात घडवल्या असून १३ व्या शतकातील आहेत.

गावात देशपांडे व देशमुख यांचे दोन स्वतंत्र गढीवाडे आहेत. १८ व्या शतकाच्या प्रारंभिक दशकातील हे काम असून देशपांडे यांची गढी चिरेबंदीची आहे. राजस्थानी शैलीतील काष्ठशिल्प विशेष उल्लेखनीय आहेत.

## बिलोली

**बिलोली :** (ता. बिलोली, १८° ४५′ उ., ७७° ४०′ पू.) नांदेड जिल्ह्याच्या पूर्वेस असलेला हा तालुका आंध्र प्रदेशाच्या सीमावर्ती भागात असून गोदावरी, मन्याड आणि मांजरा नदीच्या खोऱ्यात वसलेला आहे. या भागावर तेलुगुचा प्रभाव आढळतो. अश्मक जनपदाची राजधानी असणारे बोधन येथून जवळ आहे. चालुक्य काळामध्ये या तालुक्याला महत्त्व प्राप्त झाले होते. बिलोली हे तालुका मुख्यालय नरसी-दिचापल्ली रस्त्यावर धर्माबादपासून जवळजवळ १३ कि.मी. अंतरावर वसले आहे. शहरात पुढील स्मारके आहेत.

**मशीद :** शहरातील प्रेक्षणीय स्थळांमध्ये प्रामुख्याने हजरत नवाब सरफराज खान शहीद मशीद या प्रसिद्ध मशिदीचा समावेश होतो.[११०] सरफराज खान याने ही मशीद इ.स. १६४५ मध्ये शहाजहान याच्या कारकिर्दीत बांधली. ही मशीद इंडो-पर्शियन स्थापत्यशैलीचा नमुना मानली जाते. सरफराज खान नंतर औरंगजेबाचा सैन्याधिकारी होता. त्याची येथे कबर आहे. या दर्ग्यात दरवर्षी उरूस भरतो.

नांदेड जिल्ह्यातील ही मशीद राज्य पुरातत्त्व विभागाचे संरक्षित स्मारक आहे. दगडी शिल्पकामाचे याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे बिलोली येथील मशीद. एका प्राकारात मशीद, दर्गा व विहीर असे याचे स्वरूप आहे. मशीद दगडी असून मधल्या घुमटाच्या चारही बाजूस चार मिनार आहेत. उत्तरेकडील मिनाराला दगडाच्या आठ साखळ्या असून त्याखाली दगडाचेच घुंगरू लावण्यात आले आहेत. यापैकी एक मिनार वीज कोसळल्यामुळे पडला आहे.[१११] हा कलेचा एक अप्रतिम नमुना ठरावा. मिनारची कला व स्थापत्य उत्कृष्ट आहे. ही मशीद एका अर्थाने कला परंपरेचे काहीसे बदललेले सातत्य दर्शविते. मशीदीच्या वायव्येकडील कोपऱ्यात एक चौरसाकृती बारव आहे.

**विठ्ठल मंदिर :** या मशिदीशिवाय शहरात एक विठ्ठल मंदिर आहे. हे मंदिर ३०० वर्षे जुने असल्याचे सांगितले जाते. मंदिरात कै. उद्धव महाराज मुंगळेकर यांची समाधी आहे. त्यांचे या मंदिरात निधन झाले. दरवर्षी ज्येष्ठ शुद्ध षष्ठीला त्यांच्या पुण्यतिथीचा कार्यक्रम होतो. मंदिराच्या गाभाऱ्यात विठ्ठल रखुमाईच्या काळ्या पाषाणातील मूर्ती आहेत. आषाढी एकादशी येथे मोठ्या प्रमाणावर साजरी करण्यात येते. याशिवाय शहरात मारूती, शेषनाग, महादेव व संतोषी मातेचे मंदिर आहे.

### भोकर

**भोकर :** (ता. भोकर, १९° १०′ उ., ७७° ४०′ पू.) नांदेड जिल्ह्यातील भोकर तालुका गोदावरीच्या खोऱ्यात वसला आहे. या तालुक्याचे मुख्यालय असलेले भोकर हे शहर पूर्वी भोगावतीनगर या नावाने ओळखले जात होते. नंतर त्याचे भोकर झाले.[११२] शहरात एक जुने महादेवाचे मंदिर व कलावंतीणीचा महाल या वास्तू सोडल्यास इतर कोणतेही वैशिष्ट्यपूर्ण प्राचीन व मध्ययुगीन अवशेष सापडत नाहीत. गावाबाहेर पूर्वेस असलेल्या टेकडीवर अश्मयुगीन हत्यारे सापडली आहेत.

**महादेवाचे मंदिर :** हे मंदिर एका उंच अधिष्ठानावर पूर्वाभिमुख असून याची रचना गर्भगृह, अंतराळ, उघडा सभामंडप असा आहे. मंदिरात जाण्यासाठी पायऱ्या आहेत. मंदिरास सभामंडप असून त्याला १२ स्तंभांनी आधार दिला आहे. उघड्या सभामंडपास ओटा बांधून आडोसा निर्माण केला आहे. या उघड्या सभामंडपात नंदीसाठी मुख्यमंडप आहे. मंडपातून गर्भगृहात जाण्यासाठी प्रवेश आहे. गाभाऱ्यात शिवलिंग व शंकराची प्रतिमा आहे. मंदिराच्या समोर दोन दीपमाळा असून त्यांची उंची ६.०९६ मी. आहे.

---

११० कित्ता.

१११. कित्ता.

११२ कित्ता, पृ. ५६०.

Maharashtra State Gazetteers

**कलावंतीणीचा महाल :** शहराच्या उत्तरेस असलेली ही वास्तू कलावंतीणीचा महाल म्हणून ओळखली जाते. हे दगडी बांधकाम बरेच जुने आहे.

याशिवाय गावातील टेकडीवर एक नव्याने बांधलेले महादेव मंदिर आहे. परंतु येथे काही जुने अवशेष सापडले आहेत. याच टेकडीवर एक दत्त मंदिर आहे. दत्ताची मूर्ती एकमुखी असून संगमरवरी आहे. मागे गाय आहे. या बरोबरच शहरात मारूती, विठ्ठल, शनी व अन्य देवतांची मंदिरे आहेत. एक साईबाबा मंदिर नव्याने बांधले आहे. भोकर तालुक्यात भोकरपासून ७-८ कि.मी. अंतरावर सीताखंडी म्हणून ओळखला जाणारा एक भाग आहे. इथे सीता व सुधा या नद्यांचा उगम आहे. पुढे या नद्या मुदखेडजवळ आसना या नदीला मिळतात. याविषयी एक आख्यायिका सांगितली जाते.[११३] त्यानुसार लक्ष्मण गर्भवती सीतेला वनवासात सोडायला गेला. सीता तहानेने व्याकुळ झाली. म्हणून लक्ष्मण सीतेसाठी पाणी आणायला गेला व दोन द्रोणात पाणी आणून तिच्याजवळ ठेवले. झोपेत सीतेचा हात द्रोणांना लागला व सगळे पाणी सांडून गेले. तहानलेल्या सीतेला पाहून शंकराला तिची दया आली व त्याने दोन बाण मारून दोन्ही द्रोणांतून नद्या निर्माण केल्या. याच सीता व सुधा होत. या ठिकाणी सीतेचे मंदिर असून त्यात सीतेची द्विभूज प्रतिमा आहे. मंदिराजवळ एक पाण्याचे कुंड आहे. त्यातील पाणी कधीही आटत नाही असे सांगितले जाते.

### मरळक

**मरळक :** (ता. नांदेड) नांदेड-पूर्णा मार्गावर नांदेडपासून १५ कि.मी. अंतरावर मरळक गाव वसले आहे. गावात एक शिलालेख सापडला होता पण तो अतिशय पुसट झाल्यामुळे अर्थबोध होत नाही. इथे एक प्राचीन महादेव मंदिरही आहे. या मंदिराची रचना गर्भगृह, अंतराळ, उघडा सभामंडप व अर्धमंडप अशी आहे. गाभारा २.१×२.१ मी., अंतराळ १.८×१.८ मी. तर सभागृह ८.५×५.४ मी. आहे. मंदिराच्या डाव्या बाजूला एक दरवाजा आहे. सभामंडपाच्या मध्यभागी नंदी आहे. शिखर नव्याने बांधले आहे.

मंदिरासमोर एक प्रवेश असलेली अष्टकोनी बारव आहे.[११४] बारवेची उत्तर-दक्षिण लांबी ११.७० मी. तर पूर्व-पश्चिम प्रवेशासह असलेली लांबी १७.५० मी. आहे. प्रवेश पूर्वाभिमूख असून तो उतरल्यानंतर पहिला मुख्य सोपान आहे. पूर्वेकडील बाजू सोडून उर्वरित सात बाजूंवर देवकोष्ठे आहेत. सोपानावर सप्तमातृकांच्या मूर्ती असाव्यात. बारवेच्या दक्षिण बाजूस अठरा स्तंभांवर उभारलेला मंडप आहे. बारवेच्या उत्तर बाजूस ९×१.१७×०.५४ मी. आकाराचा दगडी हौद बांधला आहे. हौदाच्या चौथऱ्याची उंची १.५४ मी. आहे. हा हौद बारवेपासून ७.५० मी. वर असून बारवेतील पाणी रहाटाद्वारे आणून ते तेथे असलेल्या दगडी प्रणालाद्वारे हौदात जाईल, अशाप्रकारची परिपूर्ण व्यवस्था १३ व्या शतकातील या रचनेत आढळते.

---

११३ पुरी, सुनिल पूर्वोक्त, पृ. ३०८.

११४ अ. शं. पाठक, **महाराष्ट्रातील बारव स्थापत्य,** पूर्वोक्त, पृ. ४८.

## माहूर

**माहूर :** (ता. माहूर, १९° ४५′ उ., ७७° ५५′ पू.) माहूर हा नव्याने तयार करण्यात आलेला तालुका पूर्वी किनवट तालुक्यातील एक गाव होते. मराठवाडा व विदर्भ यांच्या सीमेवरील हे शहर समुद्रसपाटीपासून ७५५ मी. उंचावर आहे. महाराष्ट्रातील शक्तीपीठामधील साडेतीन पीठांपैकी एक पीठ असलेले हे स्थान रेणूका मातेचे स्थान म्हणून पवित्र मानले गेले आहे. सह्याद्रीच्या उंच पर्वतरांगांनी वेढलेले, पैनगंगा नदीच्या काठावर वसलेले, हिरव्या वनश्रीने नटलेले हे शहर केवळ धार्मिकच नव्हे तर ऐतिहासिक दृष्ट्याही महत्त्वाचे शहर आहे. या शहराचे उल्लेख अभिलेखीय नोंदींमध्ये आढळून आले आहेत. रामचंद्र यादव यांच्या प्रसिद्ध उनकदेव (ता. माहूर) येथील शिलालेखात माहूरचे नाव मातापूर असे आढळते तर पंढरपूरच्या चौऱ्याऐंशीच्या शिलालेखात याचा उल्लेख माहूर असाच आढळतो.[११५] मातापूर हे नाव रेणूका मातेच्या नावावरून पडले असले तरी ठोसर यांच्या मते माहूर हे स्थळनाम या स्थानाच्या महापूर या दुसऱ्या संस्कृत नावाचे अपभ्रंश स्वरूप आहे.[११६] चौऱ्याऐंशीच्या शिलालेखात माहूर येथील रहिवासी असलेल्या एका भाविकाने देणगी दिल्याचा उल्लेख आला आहे.[११७] माहूरमध्ये सापडलेल्या लेणींच्या आधारे या शहराचा इतिहास सातव्या शतकापर्यंत मागे जातो. यादवकाळात ते प्रशासकीय विभागाचे मुख्यालय होते तर बहमनी काळात ते तरफ विभागाचे मुख्य ठिकाण होते. मोगल काळात ते सरकार विभागाचे मुख्यालय होते.

परशुराम व रेणूका यांच्याशी संबंधीत अनेक प्रचलित कथा या ठिकाणाशी निगडीत आहेत. महानुभाव पंथाच्या दृष्टीनेही या स्थानाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. महानुभाव पंथाचे मूळ पुरूष चक्रधरस्वामी यांचे गुरु चांगदेव राऊळ यांनी इथेच दत्तात्रेयांपासून ज्ञानशक्तीचा स्विकार केला अशी भाविकांची समजूत आहे. हे स्थान दत्तात्रेयांचे जन्मस्थान म्हणूनही प्रसिद्ध आहे. पर्यटनदृष्ट्याही हे शहर महत्त्वाचे असून इथे रामगडचा प्राचीन किल्ला, रेणूका माता मंदिर, दत्त शिखर, पुरातत्व वस्तुसंग्रहालय अशी अनेक धार्मिक व ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाची स्थळे आहेत.

**माहूरचा इतिहास**[११८] **:** महाराष्ट्राच्या आणि पर्यायाने दक्षिणेच्या इतिहासात महत्त्वाची भूमिका पार पाडणारे मराठवाड्यातील एक महत्त्वाचे ठिकाण म्हणजे माहूर. या परिसराने दक्षिणेतील मानवी संस्कृतीच्या सर्व महत्त्वाच्या पाऊलखुणा जोपासलेल्या दिसतात. मानवी जीवनाची प्रारंभिक अवस्था म्हणजे अश्मयुग. या संस्कृतीचे अवशेष नांदेड जिल्ह्यातील शंखतीर्थ येथे सापडले आहेत. त्यावरून या भागात अश्मयुगापासून मानवी संचार सुरू झाल्याचे दिसते. अश्मयुग आणि प्राचीन ऐतिहासिक कालखंड या मध्ये महापाषाण संस्कृती उदयास आली. ही संस्कृती उत्तरेकडील विदर्भ, पूर्वेकडील

११५ पठाण, यु. म. (संपा.), **मराठवाड्यातील शिलालेख**, मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, १९८९, पृ. ४२-४३.

११६ काळे भगवान (संपा.), हरिहर ठोसर, पूर्वोक्त.

११७ तुळपुळे, शं. गो. **प्राचीन मराठी कोरीव लेख**, पुणे विद्यापीठ, पुणे, शिलालेख क्र. ३४.

११८ ठोसर, हरिहर श्री क्षेत्र माहूर, मातापूर : एक ऐतिहासिक समालोचन, मराठवाडा इतिहास ८ वे अधिवेशन, माहूर, पृ. १-४.

आंध्र व दक्षिणेकडील कर्नाटक या प्रांतात स्थिरावली. माहूर या तिन्ही प्रदेशांना लागून असल्यामुळे या भागात स्थिर मानवी संस्कृतीचा प्रारंभ महापाषाण संस्कृतीने झाला असला पाहिजे.

प्राचीन ऐतिहासिक काळाच्या सुरूवातीला भारतातील एकूण १६ महाजन पदांपैकी दोन दक्षिणेत असल्याचा उल्लेख यापूर्वी आला आहे. यापैकी अश्मक महाजनपदात नांदेड जिल्हा मोडत होता. नांदेड जिल्ह्यामधील माहूरचा समावेश त्यामुळे अश्मक जनपदात होत असावा हे ओघाने आलेच.

संपूर्ण भारतात राज्य करणाऱ्या मौर्य साम्राज्यातही माहूर परिसराचा समावेश होत होता. कारण विदर्भातील देवटेक येथे अशोककालीन शिलालेख सापडला आहे व माहूर विदर्भाला लागूनच आहे. याचा समावेश वऱ्हाडमध्ये होत होता.

मौर्य साम्राज्याच्या ऱ्हासानंतर दख्खनमध्ये सातवाहन साम्राज्याचा उदय झाला. जवळ जवळ चारशे ते चाडेचारशे वर्षे अधिराज्य गाजवणाऱ्या या घराण्याच्या सीमा उत्तरेस विन्ध्यपर्वतापासून दक्षिणेस कन्याकुमारीपर्यंत व पूर्वेस बंगालच्या उपसागरापासून पश्चिमेस हिंदी महासागरापर्यंत विस्तारल्या होत्या. म्हणजेच या काळात माहूर सातवाहन साम्राज्याचा भाग होते. याचा पुरावा म्हणजे माहूर येथील पेनगंगा नदीच्या काठावरील ओसाड टेकड्यांत सातवाहन कालीन अवशेष सापडतात. सातवाहन व शक-क्षत्रपांचा सत्ता संघर्ष हे या काळातील राजकीय इतिहासाचे वैशिष्ट्य मानावे लागेल. याचा परिणाम म्हणून अनेकदा सातवाहनांच्या प्रदेशावर शकांची सत्ता प्रस्थापित झालेली आढळते. विदर्भ व आंध्रप्रदेशापर्यंत शक व क्षत्रपांची नाणी व लेख सापडले आहेत. माहूर परिसर विदर्भ व आंध्रप्रदेशास लागून असल्यामुळे इथेही काही काळ शक क्षत्रपांचा अंमल असावा.

सातवाहनांनंतर मध्यप्रदेश, महाराष्ट्र व आंध्रप्रदेश या संलग्न भूभागावर वाकाटक राजवंशाची सत्ता प्रस्थापित झाली. नंदीकट म्हणजे आजचे नांदेड हे वाकाटकांच्या राज्यातील विषयाचे प्रमुख केंद्र होते असा उल्लेख वाकाटक विन्ध्यशक्तीच्या वाशिम ताम्रपटात आढळतो. या विषयात परभणी व नांदेड जिल्ह्यांचा अंतर्भाव होत होता. त्यामुळे माहूरचा समावेशही वाकाटक साम्राज्यात होत असावा.

यानंतर या भूभागावर अनुक्रमे महिष्मतीचे कलचूरी, बदामीचे चालुक्य व राष्ट्रकूट ही राजघराणी क्रमाक्रमाने अस्तित्वात आली. या तिनही राज्यांमध्ये माहूरचा समावेश होत होता. माहूर येथे आढळणारी अनेक प्राचीन स्मारके या कालखंडातील आहेत. यापैकी महत्त्वाचे स्मारक म्हणजे माहूर येथील लेणी. दक्षिणेतील या सर्वात प्राचीन हिंदू लेणी आहेत. ही लेणी कलचुरी-चालुक्य काळात इ.स. सहाव्या शतकात खोदली गेली असावी असे मत वॉल्टर स्पिंक यांनी व्यक्त केले आहे. या लेणींमध्ये व कर्नाटकातील ऐहोळे व उस्मानाबाद येथील धाराशिव येथील लेणींमध्ये विलक्षण साम्य आहे.

राष्ट्रकूट काळात कंधारला उपराजधानीचा दर्जा दिला गेला होता व या काळातील अनेक अवशेष कंधार परिसरात विखुरलेले आढळतात. माहूर परिसराला या काळात विशेष महत्त्व प्राप्त झाले असावे, हे ओघाने आलेच. या काळात भौगोलिकदृष्ट्या संरक्षणासाठी योग्य भूभागावर किल्ले बांधण्यात आले. यापैकी एक म्हणजे माहूरचा किल्ला. हरिहर ठोसरांच्या मते माहूरच्या किल्ल्याची

रचना याच काळात झाली असावी. नैसर्गिक भौगोलिक रचनेचा जास्तीत जास्त उपयोग करून बांधलेला हा किल्ला अद्वितीय आहे. दोन समांतर डोंगरांमधील घळीत या किल्ल्याचे बांधकाम करण्यात आले आहे. तीन बाजूंनी असणाऱ्या पैनगंगेच्या प्रवाहामुळे या किल्ल्यास नैसर्गिक संरक्षण लाभले आहे. एवढे नैसर्गिक संरक्षण लाभलेला व आकाराने एवढा विशाल किल्ला दुर्मिळ आहे. या किल्ल्याच्या वैशिष्ट्यामुळे मध्ययुगीन काळात विशेषतः युद्धतंत्रात दारूगोळ्याचा उपयोग सुरू झाल्यावर माहूर किल्ल्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले.

राष्ट्रकुटांनंतर दक्षिणेत कल्याणच्या चालुक्य राजवंशाची सत्ता अस्तित्वात आली. चालुक्य नृपती सहावा विक्रमादित्य याच्या काळात त्याने गोदावरी व पैनगंगा या दोआबातील प्रदेश जगदेव परमार याला जहागीर म्हणून दिला. नांदेड जिल्ह्याच्या दक्षिण भागात जरी या राजवंशाचे अनेक शिलालेख आढळत असले तरी माहूर किनवट भागात ते आढळत नाहीत. बहुधा हा भाग जगदेव परमारच्या जहागिरीत मोडत असावा.

पुढे यादव काळापासून ऐतिहासिक व सांस्कृतिकदृष्ट्या माहूरचे महत्त्व वाढत गेले. रामचंद्र देव या यादव नृपतीच्या उनकेश्वर येथील शिलालेखात मातापूर (माहूर) येथे वास्तव्य असणाऱ्या शरण नायक व सोमदेव पंडीत यांनी उनकेश्वर या तिर्थक्षेत्रास दिलेल्या दानाचा उल्लेख आला आहे. याच शिलालेखात रामचंद्र यादवाचा करणधिप हेमाद्री व इतर काही अधिकाऱ्यांनी या स्थानास भेट दिल्याचाही उल्लेख आढळतो. यादवकाळात अधिकाऱ्यांचे वास्तव्य माहूर येथे असल्याने हे बहुधा एखाद्या प्रशासन विषयाचे मुख्य केंद्र असावे, असा निष्कर्श ठोसरांनी काढला आहे. यादव कालखंडात प्रशासकीय सोयींसाठी साम्राज्य विविध देश विभागात विभागण्यात आले होते. यापैकी माहूर हे देशविभागाचे मुख्य केंद्र असून नांदेड जिल्ह्याच्या उत्तरेकडील भाग या देश विभागात मोडत असावा असे दिसते. माहूर येथील रेणूका देवी मंदिराचे मूळ बांधकामही याच काळात झाले असावे असे मंदिराची स्थापत्य रचना शिल्पांवरून प्रतित होते. मध्ययुगीन काळात किल्ल्यावर होणाऱ्या लढायांची झळ लागून मूळ मंदिराची पडझड झाली व सोळाव्या शतकात त्याचा जीर्णोध्दार करण्यात आला. मंदिराचा आतील भाग मुळचा जुना व बाहेरील जीर्णोध्दारानंतरचा नवीन आहे.

मुस्लिम आमदनीत माहूरला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले. मराठवाडा, विदर्भ व तेलंगण या प्रदेशांच्या सरहद्दी जेथे मिळतात, त्या ठिकाणी माहूर असल्यामुळे या तीनही प्रांतांवर आपली सत्ता प्रस्थापित करण्यासाठी माहूरवर वर्चस्व प्रस्थापित करणे अपरिहार्य होते. त्यामुळे बहमनी, दक्षिणेतील पाच शाह्या व नंतर मुघल या सर्व शासनकाळात माहूरवर ताबा मिळविणे आवश्यक समजले जात असे. त्याचा परिणाम म्हणून या परिसराने अनेक घनघोर लढाया अनुभवल्या. मध्ययुगीन काळात या तीनही शासनपर्वात माहूर हे महत्त्वाचे सत्ताकेंद्र म्हणून कार्यरत राहिलेले दिसते. बहमनी काळात त्यांचे साम्राज्य तरफ या प्रशासकीय विभागात विभागले होते. असे एकूण चार तरफ विभाग होते. त्या काळी माहूर हे तरफ विभागाचे मुख्य केंद्र होते. अहमदशहा बहमनी याने माहूर जिंकल्यावर माहूरचे नामकरण अहमदाबाद असे केले. पंधराव्या शतकाच्या शेवटी निजामशाही कारकिर्दीत तरफे

ऐवजी सुभा प्रशासकीय विभाग अस्तित्वात आले. यावेळीही माहूर सुभ्याचे मुख्य केंद्र बनले. पुढे मुघल काळात जेव्हा सरकार प्रशासकीय विभाग झाले तेव्हाही माहूर सरकार विभागाचे प्रमुख ठाणे होते. एकोणीसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत असफजाही काळात सालारजंगाने केलेल्या पुनर्रचनेपर्यंत माहूरचे हे स्थान कायम राहिले. मुघल काळापासून माहूरची जहागिरी उदाराम घराण्याकडे होती. आजही या घराण्याचे वंशज इथे वास्तव्य करून आहेत. ठोसर यांनी म्हटल्याप्रमाणे प्राचीन ऐतिहासिक पार्श्वभूमी, थोर धार्मिक व सांस्कृतिक वारसा आणि नयनरम्य निसर्ग असा त्रिवेणी संगम माहूरला झाला आहे.

**माहूरची स्थलनाम व्युत्पत्ती :** माहूर आणि मातापूर या दोन्ही स्थलनामांचा उल्लेख यादवकालीन शिलालेखात आणि तत्कालीन महानुभाव वाङ्मयात आढळतो. याची चर्चा यापूर्वी केली आहे. रेणूका मातेच्या वास्तव्यामुळे पुढे ते मातापूर म्हणून ओळखले जाऊ लागले. महापूर म्हणजे मोठे व तटबंदीयुक्त नगर, विशाल व भव्य तटबंदीयुक्त किल्ला असल्यामुळे हे ठिकाण महापूर व त्यातूनच पुढे माहूर म्हणून ओळखले जाऊ लागले. माहूर या स्थलनामाची व्युत्पत्ती आणखी दुसऱ्या प्रकारेही शोधली जाऊ शकते. प्राचीनकाळी देवस्थाने विशेषतः शक्तीपीठे महापूर म्हणून ओळखली जात होती. तसे असल्यास माहूर व मातापूर या दोन्ही नावांची व्युत्पत्ती शक्तिपीठाशीच निगडीत होते व त्यापूर्वी या स्थानाचे नाव दुसरे असण्याची शक्यताही आहे. महानुभाव वाङ्मयात या ठिकाणाचे या दोन नावांशिवाय 'सह्याद्री पर्वत' हे ही नाव आढळते. तसेच बहमनी काळात अहमदशहा बहमनीने खडतर प्रयत्नांनी माहूर गड जिंकला व या विजयाची आठवण म्हणून माहूरचे नामकरण अहमदाबाद असे केले, परंतु ते रूढ झाले नाही.

## लेणी

**पांडव लेणी :** माहूर गावात जुन्या बस स्थानकाजवळ असलेल्या खडकाळ भागात लेणी कोरण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. परंतु हा दगड लेणी स्थापत्य व शिल्परचनेयोग्य न वाटल्यामुळे काम अर्धवट सोडलेले आहे.[११९]

डॉ. अ. प्र. जामखेडकर यांनी "स्थापत्य व कला" या राज्य गॅझेटिअरमध्ये त्याचे पुढीलप्रमाणे वर्णन केलेले आढळते.[१२०] या ठिकाणी एकमेकांलगत अशी दोन लेणी असून त्यातील मुख्य लेणे पूर्वाभिमुख तर दुसरे लेणे उत्तराभिमुख आहे. पूर्ण झालेल्या लेण्याच्या गर्भगृहाच्या मध्यभागी शिवलिंग असून त्याभोवती प्रदक्षिणापथ आहे. या मंदिराच्या प्रवेश मार्गाचे स्वरूप साधे द्वार असे असून त्यावर अगदी साधी चौकट आहे. मधली शाखा स्तंभशाखा असून त्यावर लघुमंदिरांची रांग कोरेलेले उत्तरांग आहे. आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक बाजूस एक असे दोन महाकाय द्वारपाल असून त्यांच्या वरच्या अंगास विद्याधर, तर खालच्या अंगास सेवक दाखविले आहेत. गर्भगृहात जाण्यासाठी एकामागे एक असे दोन व्हरांडे ओलांडावे लागतात. गर्भगृहालगत असलेला व्हरांडा काहीसा अरुंद

११९ राजन अमिताभ (संपा.) पूर्वोक्त, प्रभाकर देव, "स्थापत्य अवशेष".

१२० पाठक अ. शं. (संपा.), **स्थापत्य व कला** (प्रारंभिक ऐतिहासिक काळ ते यादव काळ), महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई २००२, पृ.७८-७९.

आहे. सहा स्तंभ आणि दोन अर्धस्तंभांनी हे व्हरांडे विभक्त केले आहेत. सर्वात पुढील व्हरांड्यालादेखील दोन अर्धस्तंभ आणि सहा स्तंभ आहेत. सर्वात पुढील व्हरांड्यासमोर मोकळे प्रांगण आहे. या प्रांगणात सध्या उत्तरेकडील भिंतीत दोन लयनमंदिरे आणि मुख्य लेण्यांच्या समोर एक लयनमंदिर आहे. अपूर्णावस्थेत असलेल्या लेण्यातही एका मागे एक असे दोन व्हरांडे आणि त्याच्यामागे गर्भगृह असले तरीही त्याचा तलविन्यास काहीसा निराळा आहे. या उत्तराभिमुख लेण्यामध्ये प्रथम आयताकृती व्हरांडा लागतो. त्यात प्रवेश करण्यासाठी चार स्तंभ आणि दोन अर्धस्तंभांनी बनलेली स्तंभांची ओळ ओलांडून पुढे जावे लागते. आयताकृती सभागृहाच्या (पुढील व्हरांड्याच्या) उजव्या आणि डाव्या बाजूस प्रत्येकी एक गर्भगृह आहे. ही गर्भगृहे प्रत्येकी दोन स्तंभांमुळे सभागृहापासून विभक्त झाली आहेत. ह्या मंडपाच्या किंवा पुढच्या व्हरांड्याच्या मागील बाजूस भिंत आहे. या भिंतीच्या मागे दुसरा मंडप किंवा व्हरांडा आहे. या भिंतीत मागील व्हरांड्यात जाण्यासाठी मध्यभागी द्वार असून या द्वाराच्या दोन्ही बाजूस गवाक्षे आहेत. मागच्या आयताकृती व्हरांड्यात पूर्व आणि पश्चिम टोकांमध्ये प्रत्येकी एक छोटे मंदिर आहे. व्हरांड्याच्या मागील भागात मधोमध मुख्य गर्भगृह आहे. दुसरा व्हरांडा आणि गर्भगृह यांच्यामध्ये चार स्तंभ आणि दोन अर्धस्तंभ आहेत.

या शैलगृहाचा तलविन्यास शैलगृहाचा द्वारमार्ग, येथे आढळलेले शिवलिंग व त्यातील रूद्रभागाखाली असलेला चौरसाकृती भाग आणि मूर्तिशिल्पांची (शिव गंगाधर, अर्धनारी शिव, तांडवमूर्ति, त्रिपुरारि शिव आणि नायिका) शैली यावरून हे शैलगृह इ.स.च्या सहाव्या शतकाच्या मध्यात खोदले गेले असावे असे अनुमान काढता येईल.

एकूणच अजिंठा वेरूळची आठवण यावी एवढी भव्यता याही शिल्पांकनात असली तरी मूर्ती काळाच्या ओघात झिजल्या आहेत. मुळात दगडच शैल स्थापत्याला फारसा योग्य नसल्याने झीज अधिक झपाट्याने झाली आहे.

## माहुर ऊर्फ माहोरगड

पैनगंगेच्या अर्धचंद्राकृती वळणालगत साधारण दोन कि.मी.अंतरावर असलेल्या सह्याद्रीच्या डोंगरमाथ्यावर हा किल्ला उभारला आहे. किनवट पासून ५२ कि.मी. अंतरावर हे स्थान आहे. हा गिरीदुर्ग असून सभोवताली सागाचे दाट जंगल आणि उंच डोंगरकडे आहेत.

**किल्ल्याचा इतिहास :** माहूरच्या प्राचीन व मध्ययुगीन इतिहासात महत्त्वाची भूमिका पार पाडणारा माहूरचा किल्ला आजही काही प्रमाणात आपले गत वैभव टिकवून आहे. माहूरचा किल्ला नक्की कोणी बांधला हे पुराव्यांअभावी ठामपणे सांगता येत नाही. तरी राष्ट्रकूट काळात या किल्ल्याची निर्मिती झाली असावी, असा एक मतप्रवाह आढळतो. यादवकाळापासून म्हणजे साधारणतः १२ ते १३ व्या शतकापासून या गडाचा इतिहास काहीसा स्पष्ट होतो. माहूर किल्ल्यावरील तळ्याचा उल्लेख महानुभाव साहित्यात सापडतो. रामचंद्र यादवाने या किल्ल्याच्या दुसऱ्या तटाचे बांधकाम केले असा उल्लेख सापडतो. या राजावरूनच गडाचे नाव रामगड पडले असावे असे मानले जाते. मध्ययुगीन काळात माहूर सत्तासंघर्षाचे केंद्र झाले. येथील डोंगरी किल्ला अनेक लढायांचा मूक साक्षीदार झाला.

बहमनी काळात माहूर विदर्भ तरफेत होते. चौदाव्या शतकाच्या शेवटी शेवटी गोंड राजांनी बहमनींकडून विदर्भ आपल्या ताब्यात घेतले व माहूर किल्ला गोंडाच्या राजकीय सत्तेचे केंद्र झाले. हा लढा गोंडांच्या अस्तित्वाचा लढा होता. १४२६ मध्ये बहामनींनी किल्ला परत मिळविण्याच्या दृष्टीने किल्ल्याला वेढा घातला. गोंडांनी किल्ला वाचविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले परंतु शेवटी गोंडांचे सामर्थ्य बहमनींच्या सामर्थ्यापुढे कमी पडले व पुन्हा एकदा माहूर बहमनींच्या ताब्यात गेले. इ.स. १४५५ मध्ये बहमनी राजवटीत बंडाळी माजली. जलालखानाने तेलंगणचा सुलतान म्हणून स्वतःच्या नावाची घोषणा केली व सिकंदरखानाला सैन्य घेऊन माहूरचा किल्ला ताब्यात घेण्यासाठी पाठविले. परंतु माहूरचा किल्ला ताब्यात येताच सिकंदरखानाने बंडखोरी केली व त्याने मावळ्याचा सुलतान महंमदशहास यास बोलाविले. मावळ्याचा सुलतान आपल्या फौजा घेऊन माहूरवर चालून आला. परंतु बहमनी सुलतानाने ही परिस्थिती खंबीरपणे हाताळली. त्याने दौलताबादच्या सफसिकनखान यास माहूरकडे फौजा घेऊन येण्यास सांगितले व स्वतःही फौजा घेऊन माहूरकडे कूच केले. तथापि मावळ्याच्या सुलतानाने अचानक माघार घेतली व एक मोठा संघर्ष टळला. माहूर तरफ पुन्हा तरफदार फक्र उल मुल्कच्या ताब्यात देण्यात आले. सोळाव्या शतकात माहूर किल्ल्यात अनेक संघर्ष होत राहिले. बहमनी सुलतानाच्या पडत्या काळातही माहूरचा किल्लेदार खुदाबंदखान बहमनींशी एकनिष्ठ होता. परंतु इमादशाही सुलतानाने माहूर किल्ल्यावर आक्रमण करून किल्ला आपल्या ताब्यात घेतला. कालांतराने अहमदनगरच्या मुर्तजा निजामशहाने आपल्या फौजा माहूर किल्ल्याकडे पाठवल्या. इमादशाही व निजामशाही या शाह्यांमध्ये इ.स. १५७२ मध्ये माहूर परिसरात घनघोर लढाई झाली व माहूर निजामशाहीच्या ताब्यात गेले. १७ व्या शतकात दख्खनच्या राजकारणात मुघलही सक्रीय झाले. चांदबिबिने वऱ्हाड प्रांत मुघलांना दिला. मुघलांनी माहूर किल्ल्यावर किल्लेदार म्हणून उदारामची नियुक्ती केली. त्याला देशमुखीची सनदही देण्यात आली. इ.स. १६२२ मध्ये राजपुत्र खुर्रम म्हणजेच शहाजहान याने आपल्या वडलांविरुद्ध बंड केले. तेव्हा तो माहूरच्या किल्ल्यावर आश्रयासाठी थांबला होता. माहूर किल्ल्याचे किल्लेदार उदाराम यांनी त्याला काही काळ आश्रय दिला.या उदारामची पत्नी म्हणजे शिवकाळात प्रसिद्ध झालेली सरस्वती रायबागन. पतीच्या मृत्यूनंतर मुलगा जगजीवनराम लहान असताना सरस्वतीने राजपूत आक्रमणाला यशस्वीरित्या तोंड देऊन माहूरचा किल्ला राखला होता. तिला औरंगजेबाने रायबागन म्हणजे स्त्रीशार्दुल हा किताब देऊन तिचा सन्मान केला. उदारामानंतर आलेल्या जगजीवनराम याने किल्ल्यामध्ये काही वास्तु बांधल्या. किल्ल्यातील उत्तरेकडील प्रवेशद्वार जगजीवनरामने बांधले. माहूर किल्ला अनेक काळ या घराण्याकडे होता.

अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात माहूर किल्ल्याचा ताबा गौड घराण्याकडे होता. माहूरची जहागीर आणि विशेषतः माहूरचा किल्ला नरपतसिंग गौडाकडे होता. पुढे हटकरांनी निजामी सत्तेविरुद्ध जो प्रभावी पण अयशस्वी लढा दिला त्याचे पडसाद माहूरच्या किल्ल्यातही पडले. माहूरच्या किल्लेदाराने स्थानिक रयतेला एकत्र करून निजामाशी लढा देण्याचा प्रयत्न केला. इ.स.१८२२ मध्ये माहूरगडावर असा संघर्ष झाला. कॅप्टन सरजॉन गार्डनच्या तुकडीने या किल्ल्यावर हल्ला केला आणि निजामाला किल्ला परत मिळवून दिला. पुढे स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंत माहूर किल्ला निजामाच्याच ताब्यात राहिला.

**किल्ल्याकडे जाणारा मार्ग** - माहूर या गावापासून साधारणपणे ४ कि.मी.अंतरावर किल्ल्याचा उत्तर दरवाजा आहे. हा दरवाजा हत्ती दरवाजा म्हणूनही ओळखला जातो. तर रेणुका देवी या प्रसिद्ध शक्तीपिठापासून पायवाटेने डोंगर चढला की किल्ल्याचा दक्षिण दरवाजा लागतो. किल्ल्यालगत जाणारा पक्का रस्ता आहे. पण सभोवतालच्या जंगल व डोंगर कड्यांमुळे या वाटा दुर्गम वाटतात.

**किल्ल्याचे डोंगरावरील स्थान** - पैनगंगेच्या कुशीत सह्याद्रिच्या एका डोंगरमाथ्यावर हा किल्ला उभारला आहे. मुख्य किल्ला हा संपूर्ण डोंगरमाथा व्यापणारा असून त्याचे तीन प्रमुख बुरुज म्हणजे धनबुरुज, महाकाली बुरुज व निशानी बुरुज ही या डोंगराची तीन टोके आहेत. या स्थानावरून समोरील १५ ते २० कि.मी.पेक्षा जास्त परिसर सहज माऱ्याच्या टप्प्यात येतो. तर या डोंगरमाथ्यावर इंजाळा उर्फ ब्रह्मतीर्थ तलाव आहे.

ज्या डोंगरावर हा किल्ला आहे. तो डोंगर या परिसरातील अन्य डोंगर माथ्यांपेक्षा पैनगंगेच्या खोऱ्यावर टेहळणी करण्यासाठी सर्वाधिक उपयुक्त आहे. त्या पुढे उत्तर दक्षिण भागात विस्तीर्ण मैदान व त्यानंतर पैनगंगा आहे. तर पूर्व पश्चिम भागास अन्य लहान मोठ्या डोंगर कड्यांमुळे उदा.रेणूकेचा डोंगर, दत्तशिखर इत्यादींमुळे नैसर्गिक संरक्षण लाभले आहे.

**डोंगरावरील मार्ग** - डोंगरावर जाणारा मार्ग हा स्वाभाविकपणे उताराचा निसरडा असून सभोवतालचे जंगल यामुळे दुर्गम आहे. रामगड किंवा डूक्कर किल्ला या स्थानापर्यंत सहज जाता येईल अशा पायवाटा आहेत.

**किल्ल्याचे प्रवेशद्वार -** किल्ल्यास प्रमुख प्रवेश उत्तर दरवाजातून होतो. यास हत्ती दरवाजा पण म्हणतात. येथपर्यंत जाण्यासाठी प्रथम किल्ल्याच्या पहिल्या तटात किंवा उप किल्ल्यात (डूक्करगड) प्रवेश करावा लागतो. तेथे एक प्रवेशद्वार आहे. या स्थानालगत एक प्रवेशद्वार आणि काही अंतरावर आत नेऊन सोडणारा रस्ता आहे. भूलभूलय्या असे याचे वर्णन करता येईल. येथून सरळ आत चढत गेल्यास प्रथम कमान आणि त्यालगत ओवऱ्या आहेत. त्यानंतर दोन तटातून अरुंद असा चढावाचा रस्ता आहे. तो काटकोनात वळतो आणि समोर येते ते मुख्य प्रवेशद्वार. दोन्ही बाजूंनी भक्कम बुरुज असणारा हा दरवाजा हत्ती दरावाजा म्हणून ओळखला जातो. याची उंची ८ मी.असून २.४० मी.रुंदी आहे. ८ मी. उंचीवर बाल्कनी (झरोका) बांधलेली आहे.

या प्रवेशद्वाराच्या दर्शनी भागावर चांगल्या दर्जाचा चुन्याचा गिलावा आहे व त्यावर भौमितिक नक्षी काढलेली आहे. एकेकाळी त्याला चकाकी असलेले निळे व हिरवे रंग दिले होते. या प्रवेशद्वारावर कुठले विशेष चिन्ह नाही पण बांधकामातील उठावदारपणा आणि त्यावरील झरोका उल्लेखनीय आहे. प्रवेशद्वाराच्या आत दिड मीटर उंचीच्या चौथऱ्यावर दोन्ही बाजूने प्रशस्त अशी (६.५५ × १६.१० मी. रुंदी व लांबीचे) दोन दालने आहेत. हे वर्तुळाकार स्तंभावर उभारले असून या दगडी स्तंभावर २० कमानी आहेत. एक सलग छत आहे. हे स्थापत्य निजामशाही काळाला जवळचे वाटते. हे काम मुघलकाळात उदाराम यांचा वारस जगजीवनराम याने केले असावे.

किल्ल्यास दक्षिणेकडे एक प्रवेशद्वार आहे. त्या लगतच्या तटाचा काही भाग कोसळल्यामुळे पुन्हा भराव घालून बांधल्याचे दिसते. नाल्यालगतच्या (गरूडनाला) तटबंदीची मुघल काळात पुन्हा उभारणी झाली. याशिवाय महाकाली बुरुजालगत किल्ल्यास एक प्रवेशद्वार आहे. ते रेणुकादेवी मंदिराच्या समोरील बाजूस येते.

**किल्ल्याची तटबंदी :** किल्ल्यास एकूण ७ कि.मी.पेक्षा जास्त लांबीची तटबंदी आहे. या तटबंदीचे दोन भाग करता येतात. मुख्य तट साधारणपणे ११.६० मी. उंचीचा आहे. हा तट डोंगरमाथ्याला संपूर्ण वेढा घालतो. त्यास एकूण १९ बुरुज आहेत. या मुख्य तटाची लांबी अंदाजे २ हजार ८३ मी. आहे.

किल्ल्याच्या वाढत जाणाऱ्या गरजा आणि परिपूर्ण संरक्षण या दृष्टीने पुन्हा एक उपतट उभारण्यात आला. हा तट विस्तीर्ण असा मैदानी प्रदेश आणि मुख्य डोंगरमाथ्याच्या समोरच पण काहीसा खुजा असा अन्य एक डोंगरमाथा कवेत घेणारा आहे. यामुळे संरक्षणाच्या दृष्टीने किल्ला अधिक सुरक्षित झाला. या वाढत्या विस्ताराचा भाग म्हणून दक्षिण भागात मुख्य तटालगत येता येवू नये म्हणून गरूड नाल्याजवळ दक्षिण दरवाजापुढे तट बांधला. तर संपूर्ण उत्तर आणि पश्चिम दिशेच्या काही भाग यात एक व्यापक तटबंदी उभारली गेली आहे. ही प्रथम तटबंदी व मजबूत होती व यामध्ये अनेक नागरी सुविधा उपलब्ध करून दिल्या गेल्या. मारा करण्याच्या दृष्टीने या तटात पुन्हा १७ बुरुज उभारण्यात आले होते. बहुतेक बुरुज हे तटाच्या वळणावर उभारले आहेत.

बहमनी काळात यमाजी ठाकूर या जमिनदाराने हा तट १४ व्या शतकात उभारल्याचे मानले जाते. दुसऱ्या विस्तारित तटबंदीची उंची ७ मी.ची आहे. हे आणि अन्य दुरुस्तीचे काम १७ व्या शतकात झाले असावे. तटास बुरुजास काही ठिकाणी गजलक्ष्मी, सिंह, हत्ती यांची शिल्पे कोरून बसविली आहेत.

**किल्ल्याचे बुरुज :** यात धनबुरुज, महाकाली बुरुज आणि निशानी बुरुज उल्लेखनिय आहेत. नदीच्या पात्रापासून अंदाजे ७०० मी.उंचीवर बांधलेला निशानी बुरुज आहे. पहिल्या तटास १९ व विस्तारित तटबंदीस १८ बुरुज आहेत. या सर्व स्थानांवरून समोरील परिसरावर मारा करता येतो.

**किल्ल्यातील वास्तु :** हत्ती दरवाजावरच विस्तीर्ण अशी दोन दालने दोन्ही बाजूंनी बांधले असून त्यावर झरोका महल आहे. या महालाच्या लगत स्वतंत्र असे शौचकूप (संडास) बांधलेले आहेत. ही विशेष व्यवस्था आहे. या महालात कारंजे व हौद आहे. मुख्य तटाच्या आत हत्ती दरवाज्यालगत कार्यालयाची एक मुख्य इमारत आहे. त्याला स्थानिक लोक चिनी महल म्हणतात. १४.२० × ११.८० मी. आकाराचा हा महल निजामशाही स्थापत्य शैलीतील आहे. तो २५ स्तंभांवर उभा आहे.

किल्ल्यात हत्ती दरवाजाच्या पूर्व भागात आहे बारूदखाना नावाची एक प्रशस्त वास्तु या वास्तूत अंबरखाना व बारूद कोठार आहे. या लगत राणीमहल या नावाने ओळखली जाणारी प्रशस्त वास्तु आहे. किल्ल्यात निशानी बुरुजालगत एक निवास व्यवस्था आहे. तसेच एक मशीद आहे. तर याच भागात किल्ल्याच्या उत्तर तटालगत दोन दर्गे आहेत. याशिवाय उभ्या स्थितीतील फारशा वास्तु नाहीत.

**पाणीपुरवठा व्यवस्था :** किल्ल्याच्या बाहेर भोजनतातलाव, अक्राळ तळे, चक्रट, फरसाळे हे जलाशय आहेत. तसेच मोहनतळे आहे व मुख्य डोंगर माथ्यावर ब्रह्मतिर्थ किंवा इंजाळा या नावाचा जलाशय आहे.

तर किल्ल्याच्या विस्तारित तटालगत उत्तर भागात एक कटोरा बावडी आहे. याला गौतमझरा म्हणतात. इ.स. १७७३ मध्ये येथील किल्लेदार पुरणचंद्र याने ती बांधल्याची नोंद येथील अरबी शिलालेखात आहे. महाकाली बुरुजाजवळ एक भव्य दगडी टाके असून त्याची खोली १ मीटरची आहे व मधला घेर ३.७५ मीटर आहे. अशी काही टाकी पाणी साठविण्यासाठी बनवलेली असत.

पुढील काळात माहूर किल्ल्यावर गौड व त्याच्या वारसदारांनी सत्ता गाजवली. स्वातंत्र्योत्तर काळात १७ सप्टेंबर १९४८ रोजी हैद्राबाद संस्थानातून हा भाग मुक्त झाला तर १ ऑक्टोबर १९५६ रोजी भाषावार प्रांतरचनेनंतर हा नांदेड जिल्ह्याचा एक भाग बनला.

मोडकळीस आलेल्या किल्ल्याची डागडुजी करणे पर्यटनाच्या दृष्टीने गरजेचे आहे.

**रेणुका देवी मंदिर :** महाराष्ट्रातील अनेकांचे कुलदैवत असलेले रेणुका मातेचे हे मंदिर महाराष्ट्रातील साडेतीन शक्तीपीठांपैकी एक आहे.[१२१] देवीचा निवास तीन शिखरांपैकी एका शिखरावर असून ते शिखर देवीच्या नावानेच ओळखले जाते. मंदिराच्या भोवतालचा परिसर रम्य आहे.

येथील रेणुका देवी मंदिराबद्दल एक कथा सांगितली जाते. ती पुढीलप्रमाणे - जमदग्नी हे तपस्वी आपल्या रेणुका या भार्येसह एका आश्रमात निवास करत होते. त्यांच्याकडे मनोवांच्छित कामना पुरविणारी कामधेनू होती. या कामधेनूचा मोह सहस्त्रार्जून नावाच्या एका बलशाली राजाला पडला. त्याने तिची जमदग्नीकडे मागणी केली. तथापि जमदग्नीने कामधेनू देण्यास नकार दिला. त्यामुळे संतापून सहस्त्रार्जुनाने जमदग्नीचा वध केला. त्यांचा पुत्र व विष्णूचा सहावा अवतार असलेल्या परशुरामास ही हकीकत कळल्यावर जमदग्नीचा अंत्यसंस्कार करण्यासाठी कोऱ्या भूमीच्या शोधात परशुराम माहूर गडावर आला. भगवान दत्तात्रेयांनी परशुरामाला या ठिकाणी जमदग्नींचा अंत्यसंस्कार करण्याचा आदेश दिला व स्वतः दत्तात्रेयांनी पौरोहित्य केले. यावेळी रेणुका माता सती गेली. परशुरामास जेव्हा मातृविरह असह्य होऊन त्याने मातेस आवाहन केले तेव्हा त्रैलोक्याचा उद्धार करण्यासाठी रेणुका पृथ्वीचा भेद करून केवळ मुखकमलाच्या स्वरूपात प्रकट झाली. त्यामुळेच इतर ठिकाणांप्रमाणेच या ठिकाणी देवीची पूर्णाकृती मूर्ती नसून तांदळाच्या स्वरूपात केवळ देवीचे मुखकमल आहे. नंतर परशुरामाने सहस्त्रार्जुनाशी युद्ध करून त्याची हत्या केली. रेणूकेला एकविरा असेही म्हटले जाते.

माहूरचा संपूर्ण परिसरच वनश्रीने नटलेला आहे. डोंगर दऱ्यांच्या या परिसरातील एका उंच डोंगरमाथ्यावर रेणुकादेवीचे मंदिर आहे. वर चढण्यासाठी २३० पायऱ्या आहेत. मंदिर उत्तराभिमुख असून गर्भगृह आणि सभामंडप असा या मंदिराचा विस्तार आहे. सभामंडपात सोळा खांब आहेत.

१२१ महाराष्ट्रातील साडेतीन शक्तीपीठे पुढीलप्रमाणे- तुळजापूरची तुळजा भवानी, कोल्हापूरची महालक्ष्मी, माहूरची रेणूका आणि वणीची सप्तश्रृंगी. यापैकी वणीची सप्तश्रृंगी हे अर्धे पीठ मानले असून उर्वरित तिन्ही पूर्ण पीठे मानली गेली आहेत. संपूर्ण भारतात अशी एकूण ५१ शक्तीपीठे आहेत. दक्ष यज्ञात सतीने प्राणत्याग केला तेव्हा तिच्या देहाचे विविध अवयव ज्या ज्या ठिकाणी पडले तेथे शक्तीपीठांची निर्मिती झाली.

सभामंडपाच्या पूर्व दिशेला एक छोटा झरोका आहे. ही खिडकी वास्तुशास्त्राचा उत्कृष्ट नमुना मानली गेली आहे. या झरोक्यातून वर्षातून दोन वेळा सुर्याची किरणे थेट रेणूका देवीच्या मुखावर पडतात. हे मंदिर वास्तुशास्त्राच्या दिशासाधना या सिद्धान्तानुसार बांधले गेले आहे. प्रवेशद्वार दक्षिणाभिमुख असून ते चांदीने मढविलेले आहे. देवळात देवीची मूर्ती नसून तांदळा आहे. गाभाऱ्यातील देवीचा तांदळा भव्य असून शेंदूर चर्चित आहे. साधारणपणे १.५२ मी. उंच व १.२१ मी. रुंद अशा या देवीच्या या तांदळावर डोळे, नाक, ओठ इत्यादी अवयव रेखलेले आहेत. देवीचे डोळे सुवर्णाचे तर मुकुट चांदीचा आहे. देवीला नऊवारी साडी परिधान केली जाते. विविध सुवर्णालंकारांनी तिची मूर्ती सजविली आहे. कपाळावर मळवट भरला असून तिच्या तोंडात तांबुल दिलेला आहे. तिच्या बैठकीसाठी सिंह कोरलेला आहे. देवीचे ध्यान भव्य व प्रसन्न आहे.[१२२] देवीच्या समोरच सतत तेवणारा नंदादीप आहे. गाभाऱ्यासमोर सभामंडपात परशुरामाचा पाळणा आहे.

मंदिर परिसरात अनेक देव-देवतांची मंदिरे आहेत. मुख्य मंदिराजवळच एक शिवपिंडी असून ती जमदग्नीचे स्थान म्हणून ओळखली जाते. जमदग्नी ऋषींचे दर्शन घेऊनच रेणूका मातेचे दर्शन घ्यावे असा संकेत आहे. मंदिराच्या दक्षिणेस तुळजाभवानीचे उत्तराभिमुख असे मंदिर आहे. तसेच महालक्ष्मीचे पूर्वाभिमुख मंदिर आहे. गडाच्या पायथ्याजवळ दक्षिणेला परशुरामाचे मंदिर आहे.

**मंदिरातील दैनंदिन पूजा विधी :** रेणूका मंदिराचा दैनंदिन नित्यक्रम येथील वंशपरंपरागत असलेल्या मराठा समाजातील भोपींकडून केला जातो. त्यानुसार पहाटे देवीच्या मुखकमलावर शेंदूर लावला जातो. मंत्र पठण व सप्तशतीचे पाठ केले जातात. नंतर महावस्त्र अर्पण करून पुरणपोळीचा नैवेद्य अर्पण केला जातो. तसेच देवीच्या मुखात तांबुल भरविला जातो. महाआरती केल्यानंतर गडावरील इतर मंदिरांमधील देव देवतांची पूजा केली जाते.

याशिवाय मंदिरात गुढीपाडवा, नागपंचमी, पोळा, नवरात्र, कोजागिरी पोर्णिमा, दिवाळी, मकरसंक्रांत असे विविध सण व उत्सव साजरे केले जातात. यापैकी पोळा या सणास विशेष महत्त्व आहे. यावेळी मानाचा बैल व घोड्यावर देवीचे निशाण अशी वाजत गाजत मिरवणूक निघते. नवरात्र उत्सव अश्विन शुद्ध प्रतिपदेपासून विजयादशमीपर्यंत सुरू असतो. उत्सवाच्या पहिल्या दिवशी रानातील माती (ओवरी) आणली जाते. विधीवत पूजा करून तिच्यावर घट (मातीचा कलश) ठेवला जातो, कलशात पाणी असते. त्याच्या बाजूच्या मातीवर पाच प्रकारची धान्य विशेषतः गहू पेरला जातो. विड्याची पाने व नारळ ठेवला जातो. घटाच्या बाजूला पाच ऊस उभारून फुलांची माळ चढविली जाते. तसेच प्रतिपदेपासून नवमीपर्यंत तेल व तुपाचे दिवे तेवत ठेवले जातात. नऊही दिवस देवीस दहीभात व पुरणपोळीचा नैवेद्य दाखविला जातो व छबिना काढला जातो. या छबिन्याची देवीची आरती झाल्यानंतर ज्या पहाडावर रेणूका प्रकटली त्या गडाला प्रदक्षिणा घालण्यात येते व त्याचे विसर्जन रेणूका देवी मंदिरात होते. दसऱ्याच्या दिवशी परशुरामाची पालखी काढण्यात येते.

---

१२२ तर्कतीर्थ जोशी, लक्ष्मणशास्त्री **मराठी विश्वकोश** खंड १३, महाराष्ट्र राज्य विश्वकोश मंडळ, मुंबई, १९८७, पृ. ४८२. यांनी मूळ मूर्ती उत्तानपाद व शिरोहीन असावी असे नोंदवले आहे.

माहूर येथे देवीला तांबूल अर्पण केला जातो. येथे मिळणारा तांबुल हा इथले एक वैशिष्ट्य आहे. विड्याचे पान सुपारी, काथ, वेलदोडा, बडीशेप वगैरे घालून कुटलेला हा तांबुल बरेच दिवस टिकतो. पाच पानांपासून ते हजार पानांपर्यंत हा विडा तयार करून देवीला अर्पण करण्याचा प्रघात आहे.

रेणूकादेवी हे मंदिर राज्य संरक्षित स्मारक असून याशिवाय माहूरमध्ये इतर अनेक मंदिरे आहेत. त्यामध्ये तुळजाभवानी, महालक्ष्मी, दत्तशिखर (दत्तमंदिर), श्री चिंतामणी (दत्तशिखर), अनसुया माता, शरभंग ऋषी, महाकाली देवी (माहूरगड), झंपटनाथ, जमदग्नी ऋषी, श्री सती मंदिर (मातृतीर्थ तलाव परिसर), श्री गणेश मंदिर (गणपती टेकडी), श्री देवदेवेश्वर मंदिर (दत्त मंदिर), वनदेव मंदिर, विठ्ठल मंदिर, काशी विश्वेश्वर सोमदेव मंदिर (महादेव मंदिर), कपिलेश्वर मंदिर, पोचमाई मंदिर, हरिगीर मंदिर व अनेक मारूतीची मंदिरे आहेत.

**माहूर परिसरातील इतर स्थाने :**

**दत्त शिखर :** रेणूका देवी मंदिराच्या पूर्वेस व माहूर शहरापासून दक्षिणेस दत्त शिखर नावाचे एकमुखी दत्ताचे स्थान असून या शिखरावर भगवान दत्तात्रेयांचा नित्यवास असतो अशी समजूत आहे. नाथजोगी परंपरेतील हे एक महत्त्वाचे स्थान आहे. मुख्य मंदिरात प्रवेश केल्यावर डाव्या हाताला एका गाभाऱ्यात अत्री ऋषी, अनसुया माता, गुरु दत्तात्रेय व दत्तात्रेयांची शक्ती असलेल्या अनघादेवीची मूर्ती आहे. मुख्य गाभाऱ्यात शिवपिंडी असून त्यावर चांदीचा मुखवटा आहे. हे दत्तात्रयांचे स्थान आहे. गाभाऱ्याची चौकट अतिशय लहान असून गाभाऱ्यात काहीसा अंधार आहे. गाभाऱ्याच्या बाहेर एक पंचमुखी शिवपिंडी व नंदी आहे. येथील गर्भगृह व प्रवेशद्वाराची चौकट यादवकालीन आहे. हे भारती महंतांचे स्थान असून त्यापैकी मुकुंदभारती नावाच्या महंतांनी सध्याचे मंदिर बांधले. मूळ मंदिर फक्त १०′ × १२′ आकाराचे होते. शिखरावर एक धुनी अखंड तेवत असते. तिला दत्तात्रेयांची धुनी म्हटले जाते. याशिवाय शिखरावर चिंतामणी, भैरव व कामाक्षी यांची मंदिरे आहेत. तसेच एक भव्य दीपमाळ असून जवळच एक गोलाकार शिळा आहे. ती शिळा दुर्वास मुनींची तपोभूमी मानली जाते. या दत्तस्थानाला औरंगजेबाकडून चाळीस हजार रुपयांची देणगी मिळाली होती असे कागदपत्रांवरून स्पष्ट होते.

**अनसुया शिखर :** दत्त शिखरापासून २ कि.मी. अंतरावर अनसुया शिखर आहे. इथे भगवान दत्तात्रेयांचा जन्म झाल्याची कथा आहे. अत्री ऋषी आपली पत्नी अनसुया हिच्यासह या शिखरावरील आश्रमात वास्तव्य करून होते. तिच्या पातिव्रत्याची किर्ती सगळीकडे पसरली होती. त्यामुळे मत्सर वाटून विष्णूपत्नी लक्ष्मी, शिवपत्नी पार्वती व ब्रह्मपत्नी सावित्री यांनी आपापल्या पतींना अनसुयाचे पातिव्रत्य भंग करण्यास पाठविले. त्याप्रमाणे ते तिघेही अतिथीच्या वेशात आश्रमात आले व अनसुयेला विवस्त्र होऊन भोजन देण्याची मागणी केली. अनसुयेने तसे भोजन देण्याचे मान्य केले व अतिथी माझी बाळे आहेत अशी भावना मनात आणून आपल्या पतीचे चिंतन केले. त्याबरोबर त्या तिनही देवांचे बालके झाली. अशा तऱ्हेने अनसुया तिनही श्रेष्ठ देवांची माता झाली. या देवांचे एकत्र अविनाशी स्वरूप म्हणजे दत्तात्रेय. या पूर्वाभिमुखी मंदिराला एकच प्रवेशद्वार आहे. गाभाऱ्यात

Maharashtra State Gazetteers

अनसुयेची तसेच एकमुखी दत्तात्रेयांची मूर्ती आहे. मुख्य मंदिराच्या परिसरात अनसुयेचे माता, पिता-देहुला व कर्दमऋषी यांचे मंदिर आहे. तसेच रामेश्वराचे मंदिर आहे. एका पिंपळाच्या पारावर छोटी शिवपिंडी असून तिला नारदमुनी मानले जाते. येथून थोड्या अंतरावर अत्रीऋषींचे मंदिर असून शिवपिंडी व नंदी आहेत.

**वनदेव मंदिर :** स्थानपोथीत उल्लेख आलेले हे ठिकाण दत्तशिखराच्या जवळ असलेल्या एका टेकडीवर आहे. इथे लोक तप साधना करतात. हा परिसर भगवान दत्तात्रेयांच्या वास्तव्याने पवित्र झाला असल्याचा लोकांचा विश्वास आहे. येथेच यदुराजाला दत्तात्रेयांनी दर्शन दिले होते असा समज आहे.

**कैलास टेकडी :** दत्तात्रेयांच्या पादुका असणारी ही टेकडी वनदेवपासून एक कि.मी. अंतरावर आहे. या ठिकाणी भगवान दत्तात्रेयांनी गोरखनाथांना दर्शन दिले असा नाथपंथीयांचा विश्वास आहे.

**झंपटनाथ मंदिर :** माहूरपासून दक्षिणेस १ कि.मी. अंतरावर हे मंदिर असून ते माहूरचे ग्रामदैवत आहे. झंपटनाथ हा रेणूकेची बहीण कालिकामाता हिचा पुत्र असल्याचे मानले जाते.

**भगवान परशुराम मंदिर :** रेणूका मातेच्या गडाच्या पायथ्यापासून पन्नास पायऱ्यांवर परशुराम मंदिर आहे. दसऱ्याच्या दिवशी परशुरामाची पालखी काढली जाते. ही पालखी सिमोल्लंघनासाठी वरदायीच्या डोंगरावर नेऊन तेथून रेणूका देवी मंदिरात आणली जाते.

**सती सयामाय मंदिर :** माहूरपासून ८ कि.मी. अंतरावर हे मंदिर आहे. सती सयामाय अनसुयेची बहीण मानली जाते.

**देवदेवेश्वर :** हे स्थान माहूर शहरालगत एका टेकडीवर आहे. हे स्थान महानुभाव पंथीयांच्या दृष्टीने अत्यंत पवित्र व महत्त्वाचे आहे. महानुभाव पंथीयांच्या पंचकृष्णांपैकी दत्तात्रेय हे एक कृष्ण आहेत. चांगदेव राऊळ यांनी दत्तात्रयांपासून या ठिकाणी शक्तीचा स्वीकार केला अशी महानुभाव पंथीयांची श्रद्धा आहे. हे स्थान उत्तराभिमुख असून त्याला पूर्व, पश्चिम व उत्तर बाजूला तीन दरवाजे आहेत. गाभाऱ्यात खाली चौरसाकार व वर अष्टकोन व त्यावर वर्तुळाकार होत जाणारे असे वैशिष्ट्यपूर्ण लिंग आहे. याला लागूनच दत्ताचे पश्चिमाभिमुखी देऊळ आहे. त्याला उत्तर व दक्षिण बाजूस दरवाजे आहेत. इथे एकमुखी दत्ताची प्रतिष्ठापना करण्यात आली आहे. देवदेवश्वर संस्थान दत्ताचे निद्रास्थान म्हणूनही प्रसिद्ध आहे.

याशिवाय गावात महानुभाव पंथाचे संस्थापक श्री चक्रधरस्वामी यांचेही मंदिर आहे.

माहूरमध्ये प्राचीनकाळापासून जलव्यवस्थापनेचे तंत्र विकसित झाल्याचे आढळून येते. प्राचीन व मध्ययुगीन कालखंडातील या ठिकाणी असणारी अनेक कुंड, विहिरी, बारवा, जलाशय असे अनेक जलस्त्रोत आजही उपयुक्त ठरतात. त्यापैकी महत्त्वाच्या जलस्त्रोतांचे वर्णन पुढे दिले आहे.

**सर्वतीर्थ :** सर्वतीर्थ ही यादवकालीन बारव आहे. ही बारव दत्तशिखराच्या पायथ्यापासून अगदी जवळ आहे. या स्थानाचा उल्लेख महानुभव पंथाच्या ग्रंथातही आढळतो. हे स्थान धार्मिकदृष्ट्या पवित्र मानले गेले आहे. दत्तशिखरावरील दत्ताचा अभिषेक येथीलच जलाने केला जातो. याला चारही बाजूंनी जाळीची चौकट बसविली आहे.

Maharashtra State Gazetteers

**मातृतीर्थ :** मातृतीर्थ किंवा मोवाळे या नावाने प्रसिद्ध असणारी पोखरण माहूरपासून दक्षिणेकडे दीड कि.मी. अंतरावर आहे. बारवेपेक्षा विस्तीर्ण जलाशय म्हणजे पोखरणी. हा शब्द पुष्करणी या मूळच्या संस्कृत शब्दाचे अपभ्रंश रूप आहे. कमी खोलीवर विस्तीर्ण असा भाग तळाशी ठेवून हिचे बांधकाम केले जाते.[१२३] माहूर येथील ही पोखरण यादवकालीन आहे. रेणूका मातेने आपल्या पतीसह अग्निप्रवेश केल्यानंतर या ठिकाणी भगवान दत्तात्रेयांनी परशुरामाकडून सर्व और्ध्वदेहिक कर्म करून घेतली असे या स्थानासंबंधी सांगितले जाते. या ठिकाणी आता धार्मिक पिंडदान व श्राद्धविधी करण्यात येतात. मातृतीर्थाला सर्व बाजूंनी व्यवस्थित दगडी पाळू बांधून त्यावर एकगर्भी मंदिरे उभारली आहेत.

मातृतीर्थाच्या परिसरातच भानूतीर्थ, कमलतीर्थ आणि अमृतकुंड ही तीर्थे आहेत. याशिवाय या ठिकाणी पांडव तीर्थ, आत्मबोध तीर्थ, रामतीर्थ, ऋणमोचन तीर्थ अशी अनेक तीर्थे आहेत.

**जाकमाता कुंड :** वर उल्लेख केलेल्या जलाशयांव्यतिरिक्त माहूरला एक वैशिष्ट्यपूर्ण चार प्रवेशयुक्त बारव आहे.[१२४]

वर उल्लेखिलेल्या जलाशयांशिवाय इतर अनेक पवित्रतिर्थ या परिसरात आढळतात, ती पुढीलप्रमाणे. अमृततीर्थ, कमंडलूतीर्थ, गणेशतीर्थ, कालभैरवतीर्थ, नवनाथतीर्थ (गायमुख तीर्थ), पुण्यहरतीर्थ, (जगदग्नी, मुद्गलेश्वर खोरी), फरसाळा तीर्थ, उखळी तीर्थ (पुसद रोड).

## वस्तू संग्रहालय[१२५]

माहूर परिसराला लाभलेली ऐतिहासिक परंपरा तसेच येथील संपन्न आदिवासी समाज जीवन लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाच्या वतीने १९८६ साली राज्य पुरातत्त्व विभागाच्या अखत्यारीत इथे एक वस्तू संग्रहालय उभारण्यात आले. येथील वस्तु संग्रहालयात माहूर येथील ऐतिहासिक व धार्मिक स्थळांची माहिती दिली आहे. हा परिसर आदिवासी बहुल असल्यामुळे येथील आदिवासी समाजाची, त्यांच्या धार्मिक, सांस्कृतिक जीवनाची माहिती करून देणाऱ्या वस्तु आहेत. यामध्ये आदिवासी घरांमध्ये पारंपरिकरित्या वापरली जाणारी स्वयंपाकाची भांडी जसे की, मातीची भांडी, लाकडी काटवट व चाटू, भाकरी ठेवण्यासाठी बांबुच्या दुरड्या, रात्रीच्या अंधारात प्रकाशासाठी वापरात असणारे कंदील, मातीचे दिवे, लोखंडी पत्र्याचे दिवे आहेत. त्यांच्या सांस्कृतिक जीवनाची ओळख करून देणारे लाकडी मुखवटे (कोड्यात), पितळी तसेच जनावरांच्या शिंगांपासून तयार केलेल्या बासऱ्या, धान्य मोजण्याची मापटी, माती व लाकडाची चिलीम, हुक्का अशा प्रकारच्या वस्तू आहेत.

याशिवाय मध्ययुगीन कालखंडातील तमचे, बंदुका, तलवारी, कट्यार, गुप्ती, भाले, परशु यांसारखी शस्त्रास्त्रे आहेत.

---

१२३ पाठक, अ. शं. **महाराष्ट्रातील बारव स्थापत्य**, पूर्वोक्त, पृ. ६६.

१२४ कित्ता, पृ. ५५.

१२५ कोण्डे, राम पुरातत्त्व वस्तु संग्रहालय, माहूर यांनी पाठविलेल्या माहितीआधारे. आता या संग्रहालयाची सुसज्ज अशी नवीन वास्तु उभी रहात आहे.

संग्रहालयात कांस्य धातुची भांडी, तांबे व पितळ यांची भांडी, पानदाणी, पूजापात्रे तसेच लोखंडी कुलुप यासह विविध प्रकारची भांडी व नाना प्रकारचे दिवे व कंदील, दागिने प्रदर्शनासाठी ठेवण्यात आले आहेत.

ऐतिहासिक अवशेषांमध्ये फॉसिल्स (जीवाश्म), शक-क्षत्रप कालीन नाणी, वाकाटक-सातवाहन कालीन अवशेष आहेत. तसेच परिसरात सापडलेले वीरगळ, सतीशिळा, ब्रह्मदेव, लक्ष्मी, विष्णू यासारख्या प्रतिमाही ठेवल्या आहेत.

माहूर येथे अनेक मठ व आश्रम आहेत. या मठ व आश्रमांना अनेक भाविक व साधक भेट देत असतात. जसे की, विष्णुकवी मठ, वडगुंफा, वनदेव (कपिलेश्वर धर्मशाळेपुढे), रामबनबुवा मठ, तुळशीबन महाराज, चंचल भारती, आनंदबन बाळगीर महाराज, शारदाबाई मठ, अन्नपूर्णाबाई मठ, तुकाराम धोंडगेकर महाराज आश्रम (लेगडे महाराज), गुळवेलकर महाराज, प्रेमदास महाराज, बठाणकरशास्त्री आश्रम, दत्तसेवा आश्रम. यामध्ये विष्णुकवींचा मठ विशेष प्रसिद्ध व महत्त्वाचा आहे.

**संत विष्णूकवीचा मठ :** माहूरपासून दक्षिणेला दीड कि.मी. अंतरावर हे स्थान आहे. संत विष्णू कवी हे रेणूका मातेचे परमभक्त होते. त्यांनी आरती, भारूड, पद, अभंग, लावणी, गौळण, पोवाडा, कटाव, अष्टक आदि काव्यप्रकारांची रचना केली. त्यांनी रेणूकेवर रचलेली अनेक कवने, पदे, आरत्या प्रसिद्ध आहेत. याच मठात विष्णुकवींना रेणूकेने दर्शन दिले असे मानले जाते. इथे विष्णुपंतांची समाधी तसेच रेणूकेने ज्या स्वरूपात दर्शन दिले त्या स्वरूपाचे स्वतः विष्णुकवींनी काढलेले चित्र आहे.

**मुस्लिम धर्मीयांची प्रार्थना स्थळे**[१२६] **:** माहूरमध्ये मुस्लिम समाजाची अनेक पवित्र स्थाने आहेत. सोनापीर दर्गाह (सैयद सनाउल्लाशहा उर्फ सोनापीर), हजरत हबीबउल्ला शहा उर्फ लंगोटबंद दर्गा, दर्गाह बाबा तानुशा, दर्गाह बाबा बानुशा, बाबु चंदुमिया, जामा मशीद, नगीना मशीद व ईदगाह आहे. हा इदगाह बहमनी काळातील आहे. शहा शर्फोद्दीन दर्गाह हे शेकापूर येथील राज्य संरक्षित स्मारक आहे. या पवित्र स्थानांमध्ये वर्षातून एकदा उरूस (यात्रा) भरते. दर गुरुवारी व शुक्रवारी शेकडो हिंदू-मुस्लिम भाविक दर्शनाला येतात. दर्गाह हजरत सोनापीर उर्फ सैय्यद सनाउल्लाशहा व दर्गाह बाबा लंगोटबंद उर्फ हजरत हबीबउल्लाशहा येथे दर महिन्याच्या ५ तारखेला उरूस भरतो, तर दर मार्चमध्ये मोठा उरूस भरतो. यावेळी लाखोंच्या संख्येने भाविक •0´0Y00Y0.

**दर्गाह शेख फरीद बाबा :** शेख फरीद हे परम दत्त भक्त होते. त्यांना प्रत्यक्ष दत्ताने दर्शन दिल्याचे सांगितले जाते. हे हिंदू-मुस्लिमांचे श्रद्धास्थान आहे. या निसर्गरम्य ठिकाणी धबधबा असल्यामुळे पर्यटनदृष्ट्या हे एक महत्त्वाचे स्थान होऊ शकते.

**सोनापीर बाबा दर्गा :** माहूर शहरापासून १ कि.मी. अंतरावर असलेला हा १७व्या शतकातील दर्गा एका सूफी संताचा असून मुस्लिम तसेच हिंदूंचे श्रद्धा स्थान आहे. हे राज्य संरक्षित स्मारक आहे.

---

१२६ नगर परिषद, माहूर यांनी पाठविलेल्या माहितीआधारे.

## माळेगाव

**माळेगाव :** (ता. लोहा) (१८° ४५′ उ., ७७° ००′ पू.) महाराष्ट्रातील खंडोबाच्या महत्त्वाच्या स्थानांपैकी असणारे माळेगाव लातूर-नांदेड राज्य मार्गावर आहे. खंडोबाची महाराष्ट्रात-कर्नाटकात एकूण बारा स्थाने आहेत.[१२७] यापैकी माळेगाव हे एक खंडोबाचे प्रमुख स्थान आहे. पूर्वी कंधार तालुक्यात असणारे हे गाव तालुका पुनर्रचनेनंतर लोहा तालुक्यात समाविष्ट करण्यात आले. खऱ्या अर्थाने हे गाव नांदेड-लातूर आणि परभणी या तीन जिल्ह्यांच्या सीमेरेषेवर आहे. गावात प्रवेश करण्यासाठी वेस आहे. इथे आजही पांढऱ्या मातीची घरे आढळतात.

**खंडोबा मंदिर :** खंडोबा हे महाराष्ट्रातील अत्यंत लोकप्रिय दैवत आहे. माळेगाव हे खंडोबाचे पवित्र स्थान म्हणून विशेष प्रसिद्ध आहे. या संबंधी एक आख्यायिका सांगितली जाते, ती अशी की, बिदरहून एक व्यापारी या गावात आला होता. त्याच्या जवळ असलेले पोते गावात कोणाकडूनही उचलले जाईना. पोते उघडून पाहिले असता गोलाकार तपकिरी रंगाचे दोन तांदळे मिळाले. ही गोष्ट मार्गशिर्ष महिन्यात घडली. या तांदळांची खंडोबा म्हणून प्रतिष्ठापना करण्यात आली.[१२८]

खंडोबाच्या मंदिराचे काम सतराव्या शतकात झाले असावे. मंदिर व यात्रेची व्यवस्था निजामी राजवटीत कंधार परगण्याचे राजे गोपालसिंग कंधारवाला व त्याचा पुत्र कंधारचा किल्लेदार अजयचंद यांच्याकडे होती. सध्या मंदिराची व्यवस्था विश्वस्तांकडे व इथे भरणाऱ्या यात्रेची व्यवस्था जिल्हा परिषदेकडे आहे.

माळेगाव या ठिकाणी माळावर साधारणपणे पूर्व-पश्चिम ५८ मी. व उत्तर-दक्षिण ३८ मी. एवढे आवार बांधलेले आहे. या बांधलेल्या आवाराच्या आतील आकार ५३.८ × ३४.३० मी. आहे. आवाराच्या चारही कोपऱ्यांवर बुरुज बांधलेले आहेत. या बुरुजाच्या बाहेरील घेर २० मी. चा आहे. आवाराची भिंत साधारणपणे २ मी. जाडीची असून २.२० मी. उंचीची आहे. ती दगडी चिऱ्याने बांधलेली आहे. वर १.५ मी. उंचीची मातीच्या भेंड्याची भिंत आहे. या आवारास पूर्वाभिमुख महाद्वार आहे. महाद्वाराच्या कमानीतून आत प्रवेश केला की, समोर खंडोबा मंदिर आहे. या प्रमुख आवारापासून ३० मीटर अंतरावर गावाची वेस बांधली असून बांधकाम दगडाचे आहे. बांधलेली वेस साधारणपणे १७ व्या शतकातील असावी. ही वेस उत्तराभिमुख आहे. मुख्य मंदिराची रचना ही गर्भगृह (५.१० × २.३८ मी.) त्यापुढील अंतराळ (१.६० × २.२० मी.) व त्यापुढील सभामंडप (५.१० × ५.१० मी.) अशी आहे. गाभारा अत्यंत साधा असून या मध्ये अर्ध्या भागात दगडी हौद बांधलेला आहे. ओट्याची लांबी २.३८ × १.२० मी. आहे. या ओट्यावर ०.६५ × ०.६५ मी. आकाराचा छोटा ओटा

---

१२७ ही बारा स्थाने पुढीलप्रमाणे, १) जेजुरी (पुणे), २) निमगाव, ३) पाली पेंबर (सातारा), ४) नळदुर्ग (उस्मानाबाद), ५)शेगुड (नगर), ६) सातारे (औरंगाबाद), ७) माळेगाव (नांदेड) ८)मैलारपूर पेंबर (बिदर), ९) मंगसुळी (बेळगाव), १०) मैलारलिंग (धारवाड), ११) देवरगुड (धारवाड) व १२) मण्मैलार (बेळ्ळारी). खंडोबाबद्दलच्या अधिक माहितीसाठी पहा : जोशी, महादेवशास्त्री **भारतीय संस्कृतीकोश**, खंड दुसरा, भारतीय संस्कृतीकोश मंडळ, पुणे, १९६४, पृ.६१३-६१५.

१२८ **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, पूर्वोक्त, पृ. ५७२.

किंवा देवाचे अधिष्ठान आहे. यावर एका लाकडी देवघरामध्ये श्री खंडोबा व म्हाळसा यांचे चांदीचे मुखवटे ठेवले आहेत. लाकडी देवघर सुद्धा चांदीच्या पत्र्यात मढविलेले आहे. अंतराळाचे छत समतल पद्धतीचे असून चार स्तंभांवर उभे आहे. अंतराळाच्या पुढे १६ स्तंभांवर उभे असलेले सभागृह आहे. १६ स्तंभांपैकी चार पूर्ण व उर्वरित अर्धस्तंभ आहेत. मधोमध रंगशीळा (२.८० × २.८० मी.) आहे. सभागृहाच्या मुख्य प्रवेशद्वारास एक शाखी दार असून द्वारपालाच्या जागी विष्णूची प्रतिमा कोरलेली आहे. सभागृहात दक्षिण बाजूच्या भिंतीत एक छोटे अन्य प्रवेशद्वार आहे. सभागृहाचे छत हे उभारुन पूर्ण करण्यात आले. यावेळी मुळातला उघडा असलेला सभामंडप सर्व बाजूंनी बांधण्यात आला.

**शिलालेख :** सभामंडपात प्रवेश केल्यावर उजव्या बाजूला भिंतीस जो अर्धस्तंभ उभा आहे या अर्धस्तंभाच्या शिळेवर एक शिलालेख आहे. वर सूर्य-चंद्र तर खाली गाढवाची प्रतिमा आहे. अक्षर वाटीकेवरून लेखाचा काळ १८व्या शतकाच्या पूर्वार्धातील असावा असे वाटते. हा लेख गद्धेगाळ प्रकारचा शिलालेख आहे.

मुळात १३ व्या शतकात बांधण्यात आलेल्या मंदिराच्या अधिष्ठानावर नंतरच्या काळात हे मंदिर उभारण्यात आले. येथे १३-१४व्या शतकातील मंदिर होते, असे सभामंडपातील चंद्रशिळा, मंदिरातील स्तंभपाद, स्तंभशिर्ष, गर्भ गृह व अंतराळाच्या भिंतीवर कोरलेली शिव, प्रेमीयुगुल यांची शिल्पे तसेच मंदिर परिसरातील गणेश, नागबंद यांच्या शिल्पांवरून वाटते. परंतु सध्याचे संपूर्ण मंदिर नव्याने १७ व्या शतकाच्या उत्तरार्धात पूर्ण करण्यात आले. या मंदिरातील सभामंडपाचे प्रवेशद्वार व विशेषतः सभामंडपाचे छत विशेष आकर्षक आहेत.

मंदिर परिसर आवाराच्या आत मुख्य मंदिराच्या सभोवताली १) बाणाईचे मंदिर (२.६० × ३.२५मी.) बाणाई ही खंडोबाची दुसरी बायको २) प्रधान हेगडे यांचे मंदिर (४.४० × २.९५मी.) हेगडे प्रधान हे खंडोबाचे प्रधान होते असे म्हणतात व अन्य मंदिरे आहेत. याशिवाय वाघोबा मंदिर आहे. मंदिराच्या आवारामध्ये व मुख्य मंदिरालगत सभामंडपाला लागून भांडारगृह आहे. सभामंडपापुढील दिपमाळ काढून टाकून मुख्य मंदिराच्या आवारात दगडी चिऱ्याची फरशी बसवली आहे. त्याचप्रमाणे २२.२५ मी. लांब व ८.६५ मी. रुंद असा मंडप टाकला आहे. त्याचे छत पत्र्याचे होते सध्या त्याऐवजी सिमेंट काँक्रीटचा मंडप बांधला आहे. मुख्य गाभाऱ्यावर नव्याने शिखर बांधले आहे.

**माळेगावची यात्रा :** खंडोबाचा उत्सव व यात्रा दरवर्षी मार्गशिर्षातील वद्य एकादशीला सुरु होते. या दिवशी देवस्वारीची गावातून पालखी निघते. यावेळी रिसनगावचे नाईक यांचा प्रमुख मान असतो. रिसनगाव माळेगावापासून १५ ते २० कि.मी. अंतरावर आहे. या घराण्यातील नागोजी नाईकने निजामशाही विरुद्ध बंडखोरी केली तेव्हा इ.स. १८०९ मध्ये त्यांना पकडल्याचा आणि कंधार येथे तोफेच्या तोंडी दिल्याचा उल्लेख आहे.[१२९] नागोजी नाईक हे खंडोबाचे मोठे भक्त होते. वंशपरंपरेने आता यात्रेतील पालखीचा मान या नाईकांच्या घराण्याचा आहे. तर कंधारजवळ असलेल्या भोसी गावातील वाणी कुटुंबीयांकडे खंडोबाच्या पागोटयाचा मान आहे. या संदर्भात एक दंतकथा सांगितली

---

१२९. आलुरकर अनिल (संपा.), **श्री श्रेत्र माळेगावची आनंदयात्रा**, भगवान कोठेकर, " महाराष्ट्राचे ग्रामदैवत ", पृ. ७.

Maharashtra State Gazetteers

जाते, पूर्वी या मानकऱ्याची पूजा करण्यात येत असे व त्याचे शिर धडापासून वेगळे करण्यात येते असे. त्याच्या शिरावर खंडोबाचा मुखवटा ठेवून ते शिर चंपाषष्ठीला माळेगाव येथे आणण्यात येई. नंतर मार्गशिर्ष वद्य चतुर्दशीला धड भोसीहून पळत माळेगावला येत असे व धड शिराला चिकटून एकजीव होत असे, म्हणून आताही भोसीचे पाटील आपले पागोटे घेऊन चंपाषष्ठीला माळेगावाला येतात व आपले पागोटे खंडोबापुढे ठेवतात. यात्रेपर्यंत हे पागोटे मंदिरातच असते. आजही चंपाषष्ठीपासून अमावस्येपर्यत मानकरी पोगोटे वापरत नाहीत.[१३०]

माळेगावची यात्रा सुप्रसिद्ध असून यावेळी भरणारा गुरांचा बाजार व विविध भटक्या व विमुक्त जातींच्या जातपंचायती ही तिची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. यात्रेला ३०० वर्षांची परंपरा असल्यामुळे जनावरांची खेरेदी-विक्री, शर्यती, प्रदर्शन, कुस्त्यांची दंगल, लोककला, संगीत वाद्य, लोकनाट्य असे विविध कार्यक्रम स्थानिक समितीच्या सहकार्याने आयोजित केले जातात. पूर्वी तीन-तीन महिने माळेगावची यात्रा भरत असे परंतु सध्या ती पाच दिवस भरते.[१३१]

गेल्या पन्नास वर्षापेक्षा जास्त कालावधी पासून या ठिकाणी जनावरांचा बाजार भरतो. या बाजारात प्रतिवर्षी साधारणपणे एक हजार मोठे घोडे, पाच हजार लहान घोडे (तट्टू), तीन हजार ते पाच हजार उंट, पाच हजार ते दहा हजार गाढवे पर्यंत विक्रीसाठी येतात. वर्षातून एकदाच भरणारा हा बाजार म्हणजे महाराष्ट्रातील सर्वात मोठा जनावरांचा बाजार आहे. घोडे, उंट, गाढव याबरोबरच इतर जनावरांचाही बाजार भरतो. येथे अस्सल जनावरे चढ्या किंमतीला विकली जातात. त्यामध्ये प्रामुख्याने गाढवे, घोडे, उंट यांचा समावेश असतो.

जिल्हा परिषद या ठिकाणी भव्य पशु प्रदर्शनाचे आयोजन करते. या आयोजनामागे चार हेतू आहेत. (१) जातिवंत जनावरांची खरेदी विक्री, (२) गाई, म्हशी व पशू या उत्तम प्रतिच्या पशुंची निर्मिती व संगोपन, (३) जनावरांच्या पोषक आहाराबद्दलची माहिती व जागृती, (४) जनावरांचे रोगांपासून संरक्षण करण्याची माहिती पशु पालकांना पुरविणे.

पशु प्रदर्शनाशिवाय पशुंची स्पर्धा आयोजित केल्या जातात. त्यामध्ये लाल कंधारी गायी सारख्या जातीवंत गायींची दुग्ध स्पर्धा तर घोडे, उंट व गाढवांच्या धावण्याच्या शर्यतीचे आयोजन केले जाते. जिल्हा परिषद, नांदेडतर्फे या शर्यतींवर तीन लाखांपेक्षा जास्त रक्कम खर्च करण्यात येते.[१३२]

भटक्या जमातींच्या जीवनप्रणालीचा महत्त्वाचा घटक असलेल्या जात पंचायतींच्या सभाही या यात्रेमध्ये भरविल्या जातात. अशा प्रकारच्या मेळ्यांमधून सामाजिक सुसंवादही घडत असतो. या सभांमध्ये जातीअंतर्गत भांडणे, तंटे, गुन्हे, कौटुंबिक प्रश्न, देवाणघेवाण, सोयरीकी इ. गोष्टींवर सखोल चर्चा चालते व नंतर त्यांची सुनावणी होते. या यात्रेत गोसावी, गारुडी, घिसाडी, जोशी, कोल्हाटी, मसणजोगी, नंदीवाले, पांगुळ, वासुदेव, वैदु आदि भटक्या व विमुक्त जातींची जात पंचायत असते.[१३३]

---

१३० कित्ता, पृ. ८.

१३१ पाटील, श्रीराम **मायबोलीचा मराठवाडा**, योगेश प्रकाशन, औरंगाबाद, २००४, पृ. ६९.

१३२ कित्ता, आष्टुरकर, आर. डब्ल्यु. चांगल्या पशुधनासाठी', पृ. ९-११.

१३३ कित्ता, तोगरे, गंगाधर 'जातपंचायतीचा मेळावा', पृ. १७.

Maharashtra State Gazetteers

या यात्रेमध्ये लोककलांना देखील प्रोत्साहन मिळते. त्यात गोंधळी, वाघे, मुरळी, पोतराज, डोंबारी, कळसूत्री बाहुलीवाले, कोल्हाटी, माकडवाले, अस्वलवाले असे अनेक लोककलाकार आपल्या कलांचे सादरीकरण करतात. याशिवाय इथे लोक कला महोत्सव साजरा करण्यात येतो. त्यामध्ये तमाशा व लावणीच्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते.

**यात्रेचे व्यवस्थापन :** निजामाच्या राजवटीनंतर काही वर्ष शासनाच्या यंत्रणेने यात्रेचे संपूर्ण नियोजन केले. जिल्हा परिषदेच्या स्थापनेनंतर हे काम नांदेड जिल्हा परिषदेकडे देण्यात आले. त्यानुसार सध्या लोकप्रतिनिधी आणि अधिकारी यांची बैठक जिल्हा परिषदेत व नंतर आढाव्याची बैठक माळेगाव येथे घेतली जाते. त्यावेळी पाणीपुरवठा, रस्ते, विद्युत व्यवस्था, आरोग्य, पशुसंवर्धन विभागाचे उपक्रम, प्रदर्शने, विविध स्पर्धा याबद्दल चर्चा करून निर्णय घेतले जातात. परंपरेने पूर्वी कंधार पंचायत समिती व सध्या लोहा पंचायत समिती स्वतंत्रपणे शंकरपट स्पर्धा, कुस्त्यांची स्पर्धा, लोककला महोत्सव या व अशासारख्या उपक्रमांचे नियोजन करते. माळेगाव ग्रामपंचायतही नियोजनामध्ये जागावाटप करणे, यात्रेकरुंच्या सोयी सुविधांकडे लक्ष देणे, याशिवाय कबड्डी व व्हॉलीबॉलचे सामने आयोजित करण्याचे कामही करते. याशिवाय श्री क्षेत्र खंडोबा देवस्थानाच्या ट्रस्टतर्फे मंदिरातील व्यवस्था पाहिली जाते.

शासनाने माळेगाव या तीर्थक्षेत्राच्या सर्वांगिण विकासासाठी विशेष कार्यक्रम राबविला आहे. त्यातील कामांमध्ये मंदिराची दुरुस्ती, भव्य प्रवेशद्वाराची निर्मिती, यात्री निवास, वाहनतळ, जनावरांसाठी निवारा बांधकाम, विश्रामगृह, पोलीस चौकी, प्रदर्शनासाठी खुल्या गाळ्यांचे बांधकाम, रस्ते, पाणीपुरवठा, यात्रेसाठीची सुविधा तसे मंदिराच्या परिसरातील बांधकामाचा समावेश आहे.

## मुखेड

**मुखेड :** (ता. मुखेड, १८° २०′ उ., ७७° १५′ पू.) नांदेड जिल्ह्यातील मुखेड हा एक तालुका असून तो मन्याड, लेंडी व तीरू नदीच्या खोऱ्यात वसलेला आहे. या तालुक्यात बालाघाटच्या उपरांगा पसरलेल्या असल्यामुळे हा तालुका डोंगराळ म्हणून ओळखला जातो. या तालुक्याच्या पश्चिमेस कंधार तालुका व लातूर जिल्ह्याचा काही भाग येतो. पूर्वेस देगलूर तालुका व उत्तरेस कंधार व बिलोली तालुका येतो तर दक्षिणेस लातूर जिल्हा येतो.

नांदेडच्या दक्षिणेस ८५ कि.मी. वर वसलेले मुखेड शहर तालुका मुख्यालय आहे. हा परिसर राष्ट्रकूट - चालुक्य काळात प्रसिद्धीस आला.[१३४] हे शहर मोहनावती नदीच्या काठावर वसलेले आहे.

या शहराला पौराणिक परंपरा लाभली असून लोकस्मृतीप्रमाणे ही परंपरा रामायण कालखंडापर्यंत जाते. गावात प्रचलित असणाऱ्या दंतकथा त्याचप्रमाणे मंदिर व शिल्पावशेष यामुळे या शहराच्या प्राचीन वैभवाची कल्पना येते. राष्ट्रकुटांची उपराजधानी असणारे कंधार हे शहर येथून ३६ कि.मी. वर आहे.

---

१३४ नांदेड डिस्ट्रीक्ट गॅझेटिअर, पूर्वोक्त, पृ. ५७४.

या गावाचा इतिहास सांगणाऱ्या साधनांमध्ये १२ व्या शतकातील एक शिलालेख आढळला आहे. त्यामध्ये कल्याणी चालुक्य नृपती विक्रमादित्य सहावा याच्या संदर्भात उल्लेख आला आहे.[१३५] परंतु शिलालेख भंगलेल्या स्वरूपात असल्यामुळे इतर तपशील उपलब्ध नाही.

शहरात आढळणारी पर्यटनदृष्ट्या महत्त्वाची अशी ठिकाणे पुढीलप्रमाणे :—

**दाशरथेश्वर मंदिर :** या शहराचे प्रमुख आकर्षण असणारे हे मंदिर महादेव मंदिर म्हणूनही ओळखले जाते. लोकस्मृतीत हे मंदिर दशरथाने बांधल्याचे सांगितले जाते. त्यावेळी श्रावणचलमा येथे पाणी भरण्यासाठी आलेल्या श्रावणबाळाच्या हालचालींनी दशरथराजाला तो प्राणी वाटल्याने त्याने सोडलेल्या बाणामुळे श्रावणबाळ गतप्राण झाला. हे ऐकून श्रावण बाळाच्या वृद्ध मात्यापित्यांनीही प्राणत्याग केला. या कृत्याचा पश्चात्ताप होऊन दशरथाने हे मंदिर बांधल्याचे लोकस्मृतीतून सांगितले जाते.[१३६]

**मंदिराचे वर्णन :** मुखेड येथील दाशरथेश्वर मंदिर चालुक्यकालीन शैलीचे उत्कृष्ट उदाहरण आहे. एका अधिष्ठानावर (जोते) गर्भगृह, अंतराळ, बंदिस्त सभामंडप आहे. सभामंडपाला पूर्व, उत्तर व दक्षिण असे तीन बाजूंनी असणारे मुखमंडप अशी मंदिराची रचना आहे.

या मंदिराचे गर्भगृह अत्यंत साधे आहे. परंतु या साध्या गर्भगृहाचे वैशिष्ट्य म्हणजे शिवलिंगाला आधार देणारे भद्रपीठ. ०.९१ मी. उंचीच्या या भद्रपीठाच्या मध्यभागी अत्यंत भव्य अशी उत्तराभिमुखी शिवपिंडी आहे. गर्भगृहाचे प्रवेशद्वार द्विशाखीय आहे. ललाटबिंबावर श्री गणेश आहे तर उत्तररंगशिळेवर भौमितिक नक्षी आहे. खाली मंडारका लगत दोन सिंह असून पुढे चंद्रशिळा आहे.

**अंतराळ :** मंदिराच्या गर्भगृहानंतर अंतराळाच्या प्रवेश भागालगत असलेल्या स्तंभयुक्त प्रवेशद्वारावर श्री गणेश कोरले आहेत. अंतराळाच्या प्रवेशाला पूर्ण घंटांची नक्षी व गज तोरण आहे. त्यावर मगर मुखाची नक्षी (मकर तोरण) तसेच वेलबुट्टी व गंधर्व आणि विद्याधर आहेत. या तीन तोरणांच्या वर उत्तर रंगशिळेवर मध्यभागी भिक्षाटन शिव व त्या भोवती शिवगणांचा परिवार कोरलेला आहे. मुद्दाम जाऊन पहावे असे हे शिल्प वैभव आहे.

**सभामंडप :** अंतराळाच्या पुढे बंदिस्त असा सभामंडप (गुढमंडप) आहे. सभामंडपाच्या मध्यभागी चार पूर्ण स्तंभांना आधार देणारी एक रंगशिळा आहे. मुख्य रंगशिळेवर एक वर्तुळाकार अशी रंगशिळा कोरलेली आहे. सभा मंडपाचे स्तंभ स्थापत्यशास्त्राच्या दृष्टीने स्तंभ पाद, स्तंभ शिर्ष, त्यावरील कीचक (हस्त) व त्याही वरील तरंग अशी मांडणी असलेले आहेत. स्तंभाच्या मध्य शिळेवर विविध प्रकारचे नक्षीकाम करताना खालील चौरस अर्धा भाग साधा ठेवला असून त्यावरील अष्टकोनी भाग विविध भौमितिक नक्षींनी युक्त असा दिसतो. स्तंभावर अनेक प्रकारची नक्षी पहावयास मिळते. यात कीर्तिमुखांच्या सह दशावतार शिल्प, विद्याधर, वाद्यवृंद, गणेशासह मातृदेवता कोरल्या आहेत. तर अर्धस्तंभांच्यावर विशेषतः शिर्ष भागावर प्रामुख्याने मिथुन शिल्पांचे अंकन आहे. याशिवाय

१३५ रित्ती व शेळके, पूर्वोक्त, शिलालेख क्र. २५.

१३६ पुरी, सुनिल पूर्वोक्त, पृ. ३१५.

रती-मदनाचेही शिल्पही आहे. सभामंडपाचे वितान समतोल वितान असून क्षिप्त उत्क्षिप्त पद्धतीचे आहे. साधारणतः गाभारा, अंतराळ आणि रंगशिळेवरील वितानाची रचना सारखी आहे. वितान मध्यशिळेवर उत्कृष्ट प्रकारचे शिल्पकाम केलेले आहे. रंगमंडपाच्या स्तंभावरील तरंगशिळांच्या नंतर असलेल्या उत्तररंगशिळेवर योगी, शिवगण, गणेश, पार्वती व वाद्यवृंद कोरले आहेत व उत्तररंग शिळेवरील पाच शिखरांची एक रांग कोरलेली दिसते. प्रत्येक दोन शिखरांच्यामध्ये सिंह किंवा हत्ती दाखविलेले आहेत. वितानाच्या पूर्व भागावर किर्तीमुख कोरलेले आहे तर काही ठिकाणी युद्धप्रसंग कोरेलेले आहेत. विशेष म्हणजे मुख्य वितान मध्यशिळेवर नृत्यरत शिव कोरला असून त्याचा नृत्य अविष्कार असाधारण आहे. मंदिरामध्ये तत्कालीन कलाकारांची एकाग्रता व उत्कृष्ट प्रकारची कला साधना यांची प्रचिती येते. मंदिरामध्ये तत्कालिन कलाकारांनी कोरलेल्या विविध प्रकारच्या शिखरांच्या प्रतिकृती आपण येथे पाहू शकतो. या ठिकाणी वेसर, द्राविड आणि नागर शैलीची शिखरे प्रतिकात्मक स्वरूपात कोरलेली आहेत.

**प्रवेशद्वार :** भूमिज शैलीच्या या मंदिराचे मुख्य प्रवेशद्वार पूर्वाभिमुख आहे. या प्रवेशद्वारापुढे अर्धमंडप असून पाच शाखांचे हे ज्येष्ठ प्रवेशद्वार आहे. समोरच चंद्रशिला असून प्रवेश द्वाराच्या खालील बाजूस गंगा, चवरी धारिणी आणि डाव्या व उजव्या बाजूस स्त्री व पुरूष प्रतिमा दाखविल्या आहेत. पाच शाखांमध्ये पहिली शाखा कमलपुष्प व वेली असलेली आहे. दुसरी शाखा व्याल शाखा असून त्यावर नरव्याल शिल्प कोरले आहे. तिसरी शाखा स्तंभ शाखा असून त्यावर भौमितिक नक्षी आहे. यानंतर वाद्यवृंद आणि मिथुन शिल्प तसेच वरील बाजूला पुष्पमाळा हातात घेतलेल्या गंधर्वाची रांग असलेली शाखा आहे. तर शाखेवर माणिक-मौक्तिक पट आहे. ललाटबिंबावर गणेश आहे. उत्तररंगशिळेवर सप्तमातृकांचा पट असून येथे मधोमध पार्वतीचे शिल्प उठावात कोरलेले आहे. याच्याही वर कीर्तीमुख व शिखरांची रांग आहे. त्यावर मिथुन शिल्पपट आहे. या पुढील अर्धमंडप हा सुंदर स्तंभांवर उभा असून यावर घटपल्व उठावात कोरले आहेत.

**मंडोवर :** मुख्य मंदिराच्या बाह्य भागाला जंघा भाग किंवा मंडोवर म्हणतात. दाशरथेश्वर मंदिराचे मंडोवर होट्टल येथील मंदिराच्या मंडोवराशी साम्य दाखविते परंतु होट्टलपेक्षा येथील मंदिराच्या भिंती अधिक अलंकृत आहेत.[१३७] पूर्णपणे गुढमंडप असलेल्या या मंदिराच्या मंडोवरावर विविध प्रकारचे शिल्पांकन आहे. या मंदिराच्या बाह्य भागावर इंद्र, अग्नि, यम, वरूण, कुबेर, ईशान्य व सोम हे अष्टदिक्पाल आहेत. तर ब्राह्मी, कौमारी, माहेश्वरी, वैष्णवी, वराही, माहेंद्री, नारसिंही या सप्तमातृका आपापल्या वाहनांसह आहेत. त्या नृत्यमुद्रेत आहेत. याशिवाय शिवपार्वती, चामुंडा, गणेश, लक्ष्मी, क्वचित आढळणारी ज्येष्ठा देवी या ठिकाणी कोरल्या आहेत. यापैकी काही शिल्पे वैशिष्ट्यपूर्ण आहेत. त्यामध्ये वृषभवाहन शिव आहे. सामान्यतः मंदिरांवर अशाप्रकारचे शिल्पांकन दुर्मिळ आहे. एकूणच अन्य देवी, देवता व सुरसुंदरींची शिल्पे कोरताना कलाकारांचा, मूर्तीकलेचा व शरीरशास्त्राचा अभ्यास लक्षात येतो. मंडोवरावर तीन मुख्य दिशांना तीन मोठाली देवकोष्टे कोरली आहेत. त्यांना

---

१३७ देगलूरकर, गो. बं. पूर्वोक्त, पृ.१९.

भद्र म्हणतात. भद्रांवरील शिल्पांकन व त्यांच्या वितानावरील बारीक नक्षीकाम हे तत्कालीन रूढ काष्ठ शिल्पाची कल्पना देतात. उत्तर, दक्षिण व पूर्व भागास असलेल्या या भद्रांमध्ये आज मूर्ती नसल्या तरी मूळात मूर्ती होत्या. यावरील विमान व गवाक्षाच्या शिल्पांवर शिवपार्वती, पार्वतीपाणिग्रहणाचा प्रसंग लीलया कोरला आहे. तर कोठे अभिषेक लक्ष्मी (गजलक्ष्मी) कोरली आहे.

मंदिराच्या मंडोवरावर अनेक वैशिष्ट्यपूर्ण प्रतिमा आहेत. त्यापैकी एक म्हणजे वृषभवाहन मूर्ती. शिव पार्वती व त्या मागे नंदी असे स्वरूप असणारी ही प्रतिमा अतिशय चांगली असली तरी भंगलेली आहे त्यामुळे मूर्तीच्या हातात कोणती आयुधे आहेत हे सांगणे कठीण आहे. मंदिराच्या जंघाभागावरील सरस्वतीची मूर्ती त्रिभंग असून सहा हातांची आहे. तिचे तीन हात तुटलेले आहेत. वरच्या उजव्या हातात अक्षमाला दिसते. खालच्या हातात पुस्तक असावे. आयुधे कालौघात झिजलेली असल्यामुळे निश्चित सांगता येत नाही. ही मूर्ती अलंकृत असून सरस्वतीच्या पायाखाली तिचे वाहन हंस आहे. त्याची चोच तुटलेली आहे. याशिवाय पार्वतीची गोधासना मूर्ती आहे. तिच्या वरच्या दोन हातात लिंग व कमळ आहेत तर खालचे दोन्ही हात भंगलेले आहेत. ही मूर्ती अप्रतिम असली तरी भंगलेल्या अवस्थेत आहे. याबरोबरच ज्येष्ठा देवीची मूर्ती आहे. सामान्यतः ज्येष्ठा देवी द्विभूज असून तिच्या एका हातात निलोत्पल कमळ असते व दुसरा हात अभय मुद्रेत असतो. तिच्याजवळ केरसुणी व कावळा बसलेला ध्वज असतो. मुखेड येथील ज्येष्ठा देवी मात्र चार हातांची आहे. तिने खालच्या उजव्या हातात तलवार, वरच्या उजव्या हातात कमळ, वरच्या डाव्या हातात सूप तर खालच्या डाव्या हातात कपाल धारण केलेले आहे. नृत्यरत मातृकांचे शिल्पांकन हे महाराष्ट्रात केवळ नांदेड जिल्ह्यातच आढळते.[१३८] मंदिराच्या मंडोवरावर नृत्यरत मातृका आपापल्या वाहनांसह अंकित केलेल्या आहेत. याशिवाय मंदिराच्या जंघाभागावरील नृत्यगणेश प्रतिमा उभी असून तिचे दोन्ही हात खंडित आहेत. मंदिराचे मूळ शिखर पूर्णपणे नष्ट झाले असून नव्याने छत घातले आहे.

एकूणच हे मंदिर चालुक्यकालीन स्थापत्यशैलीचा एक उत्कृष्ट नमुना असून जिल्ह्याच्या ऐतिहासिक व सांस्कृतिक परंपरेचा मानदंड ठरावा.

**बारव :** मुखेड, दाशरथेश्वर मंदिराप्रमाणेच बारव किंवा पायऱ्यांच्या विहिरीसाठीही प्रसिद्ध आहे. लोकपरंपरेने या बारवेचा इतिहासही रामायण काळापर्यंत मागे नेला आहे. श्रावणाचलमा या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या कुंडाच्या जवळ श्रावणबाळ पाणी भरण्यासाठी आला होता अशी आख्यायिका आहे.

दहाव्या व अकराव्या शतकात बांधण्यात आलेल्या अनेक मंदिरांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्या शेजारी असलेला जलाशय किंवा कुंड.[१३९] हे कुंड दाशरथेश्वर मंदिराच्या उजव्या बाजूस असून नांदेड जिल्ह्यात आढळणाऱ्या ऐतिहासिक उत्कृष्ट बारवांपैकी एक अशी त्याची गणना होते. या बारवेप्रमाणेच

---

१३८ पुरी, सुनिल पूर्वोक्त, पृ.३१७.

१३९ **स्थापत्य व कला**, राज्य गॅझेटिअर, महाराष्ट्र शासन, मुंबई, वर्ष २००८, पृष्ठ २९८.

मराठवाड्यात पिंगळी, माहूर व वेरूळ या ठिकाणीही बारवा आढळल्या आहेत. ही बारव उत्तराभिमुख प्रवेश असलेली आहे. बारव उत्तर-दक्षिण १६ मी. × पूर्व-पश्चिम १०.५० मी. आहे. बारवेस असलेला प्रवेश १.२० मी. रुंदीचा आहे. प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूला ओवरीसारखे दोन बंदिस्त मंडप आहेत. प्रवेशद्वारावर एक कमान चार जोडस्तंभांच्यावर उभारली होती. आज याचे फक्त अवशेष शिल्लक आहेत. बारवेचा पहिला सोपान प्रवेशद्वारापासून १.५० मी. खोलीवर आहे. येथे येण्यासाठी नऊ पायऱ्या असून सोपानाची रुंदी ८० सें.मी. आहे. दुसऱ्या सोपानावर उतरण्यासाठी प्रत्येक कोपऱ्यात दोन्ही बाजूंनी पायऱ्या ठेवल्या आहेत. याशिवाय उपलब्ध जागेचा शक्य तितका उपयोग करून घेता यावा या हेतूने पूर्व पश्चिम बाजूस उतरता येईल अशा पायऱ्या ठेवल्या आहेत. एकूण या सोपानावरून बारा ठिकाणांहून खाली उतरता येते. चार पायऱ्या उतरल्या की दुसरा सोपान सुरू होतो. त्याची रुंदी ७० सें.मी. आहे. येथून कुंड सुरू होते. या बारवेची रचना वैशिष्ट्यपूर्ण असून पायऱ्यांची रचना काही अंशी कर्नाटकातील हंपी (ता. बेलारी) येथे उत्खननात मिळालेल्या बारवेप्रमाणे आहे.

याशिवाय दाशरथेश्वर मंदिरालगत ९० × ९० सें.मी. आकाराचा चौरसाकृती आड आहे. आड व्यक्तिगत उपयोगासाठी असल्याने त्याचा आकार लहान असून त्याला प्रवेशद्वार नसते. सामान्यतः आड मोठ्या वास्तुच्या किंवा मंदिराजवळ बांधण्यात येत असे.[१४०]

**वीरभद्र मठ :** मुखेडचे ग्रामदैवत असलेल्या वीरभद्राचा हा मठ भव्य आहे. मध्ययुगीन काळात लिंगायत संप्रदायाच्या या मठाची स्थापना झाली. मठाला तटभिंत असून सभामंडपात कमानी आहेत. मठाच्या आवारात दोन मोठ्या दीपमाळा आहेत. वीरभद्राची मुख्य मूर्ती चार हातांची असून ६० सें.मी. उंच आहे. मुखाला वज्रलेपन केलेले आहे त्यामुळे मूर्तीचा तो भाग काळा कुळकुळीत होऊन चकाकतो. मूर्तीच्या मुखाला चांदीचे डोळे, नाक व मिशा लावल्या आहेत. डोक्यावर चांदीचा मुकूट आहे. शेजारी वीरभद्राची पितळी उत्सव मूर्ती व चिंतामणीचा दगड आहे. लोक याला कौल लावतात. गाभाऱ्यातच एक शिवलींग असून शंकराचा सुरेख मुखवटा आहे. सभामंडपात एका कोनाड्यात पाच मुखे असलेली मूर्ती व शिवपिंडी आहे. याला इथे पंचमुखी परमेश्वर म्हटले जाते. आवारात सतीशिळा आहेत. मठामध्ये कार्तिकी पौर्णिमेनंतर पाच दिवसांनी पाच दिवस चालणारी यात्रा भरते. यावेळी पालखी निघते.

वीरभद्र मठाच्या पाठिमागील बाजूस एका प्राचीन मंदिराचे अवशेष आहेत. अवशेषांवरून मंदिर नक्की कशाप्रकारचे होते ते लक्षात येत नाही. चार स्तंभ व वर छत एवढेच शिल्लक आहे. मंदिरात एक मातृदेवतेचे शिल्प ठेवलेले आहे. या अवशेषाच्या बाजूलाच एक गणेशाची मूर्ती ठेवलेली आहे. दुसरे शिल्प नागराजाचे आहे.

**श्री बालाजी मंदिर :** मुखेड येथील बालाजी मंदिर वैष्णव संप्रदायाचे आहे. उत्तर मराठा शैलीत बांधलेल्या या मंदिराच्या सभामंडपात वीस खांब आहेत. या मंदिराचे पाषाण बासर (आंध्र) येथून आणले आहेत. रोज सकाळी बालाजीच्या चरणावर सूर्याचे किरण पडावेत अशा रितीने दिशासाधन केले आहे. गर्भगृहात बालाजी व त्याच्या लक्ष्मी व पद्मावती या दोन्ही पत्नींच्या काळ्या

१४० कित्ता.

Maharashtra State Gazetteers

पाषाणातील प्रतिमा आहेत. सभामंडपासमोर गरूडध्वज आहे. मंदिरात दसऱ्याचा उत्सव मोठ्या प्रमाणावर साजरा होतो. यावेळी बालाजीची पालखी सिमोल्लंघनाला निघते. नवरात्रात एक दिवस भंडारा असतो. अनेक भाविक मंदिराला श्रद्धेने भेट देतात.

या मंदिराशिवाय गावात विठ्ठल, राम, शनि, मारुती, भवानी, दत्त, महाकाली, आदींची मंदिरे आहेत.

याशिवाय श्रावणबाळ व त्याचे आई-वडील यांची समाधी एका टेकडीवर आहे. श्रावण कावडी म्हणून प्रसिद्ध असणारे हे ठिकाण येथे आजही दाखविण्यात येते.

**क्षेत्रपाल मूर्तीचे अवशेष**[१४१] **:** मुखेड गावालगत अलिकडील काळात क्षेत्रपाल मूर्तीचे अवशेष मिळाले आहेत. मुळात मानसपूरी येथे कंधारजवळ केलेल्या उत्खननात राष्ट्रकूट कालीन क्षेत्रपाल मूर्तीचे भव्य अवशेष उपलब्ध झाले. असेच हे शिल्पांश असून तुलनेने लहान आहेत. विशेषतः हात व पायाच्या पंज्यांचे शिल्प उपलब्ध झाले आहे. शिवाय राष्ट्रकूट कालीन म्हणता येतील अशी मातृका शिल्पेही खंडीत स्थितीत मुखेड परिसरात आहेत.

## मुगुट

**मुगुट :** (ता. नांदेड) नांदेड - मुदखेड मार्गावर नांदेडपासून १३ कि.मी. वर वसलेले हे गाव गोदावरी नदिपासून जवळच आहे. नगराच्या प्रमुख मार्गावर असलेले चौमुखी गणेश मंदिर यादव कालीन नगर रचनेची कल्पना देणारे आहे. सध्या या मंदिराभोवती ग्रामस्थांनी लोखंडी जाळी लावली आहे. गणेशमूर्तीला शेंदूर लावला आहे त्यामुळे त्याचे मूळ स्वरूप नष्ट होत चालले आहे. चौमुखी गणेशाचे हे लहानसे मंदिर ०.४५ मी. उंचीच्या एका चौथऱ्यावर असून, चार स्तंभांच्या मंडपात असलेली गणेश प्रतिमा ०.९१ मी. फूट उंचीची आहे.

याच गावात यादवकालीन म्हणता येईल असे महादेवाचे मंदिर उंच चौथऱ्यावर असून गर्भगृहात महोदवाची पिंडी व बाहेर नंदीचे शिल्प आहे. मंदिराचे बाह्य स्वरूप बंदिस्त आहे. ते कदाचित नंतर बांधले गेले असावे.

याशिवाय गावात चौमुखी गणेश मंदिराकडे जात असताना एका मोठ्या चौकामध्ये आत्माराम बोधी मठासमोर काही शिल्पावशेष जमिनीमध्ये गाडलेले दिसतात. त्यामध्ये एक गणेश मूर्ती तसेच महादेवाची पिंडी आहे. चौमुखी गणेश मंदिर जेथे आहे तेथील चौक व प्रमुख मार्ग या प्रमाणेच असणाऱ्या चौक व प्रमुख मार्गावर हे शिल्पावशेष आहेत. मुगुट येथे असणारी तत्कालीन नगर रचना वैशिष्ट्यपूर्ण आहे. मध्ययुगीन काळात बांधलेली वर्तुळाकार बारव (मोठी विहिर) येथे आहे.

## मुदखेड

**मुदखेड :** (ता. मुदखेड, १९° ५′ उ., ७७° ३०′ पू.) नांदेडजवळ २२ कि.मी. अंतरावर वसलेले हे तालुका मुख्यालय पूर्णा-काचीगुडा आणि मुदखेड-आदिलाबाद रेल्वेमार्गावरील जंक्शन आहे.

१४१. पाटील समुद्रगुप्त यांनी दिलेला अहवाल.

मुदखेडमध्ये नगरपरिषदेची स्थापना १९४५ मध्ये झाली आहे. शहरात काही मंदिरे व एक लिंगायत मठ आहे.

**अपरंपार स्वामी मठ**[१४२] **:** अपरंपार स्वामी मठ हा लिंगायत मठ असून तो जवळजवळ ६०० वर्षे जुना असल्याचे सांगितले जाते. हे मुळचे दगडी बांधकाम असून मठाला प्रशस्त आवार आहे. मूळ मठ जुना असला तरी कालानुरूप त्यामध्ये काही सुधारणा करण्यात आल्या आहेत. त्यानुसार मोठा दगडी गाभारा १९६६ मध्ये व शिखर १९८९ मध्ये बांधले आहे. इथले वैशिष्ट्य म्हणजे इथे एक लाकडी दरवाजा असून त्यामध्ये चौकटी आहेत व प्रत्येक चौकटीत देवाची एकेक लाकडी मूर्ती आहे. हा काष्ठशिल्प असलेला दरवाजा हे या मठाचे वैशिष्ट्य आहे. मूर्ती खराब होऊ नयेत म्हणून काचा लावल्या आहेत. इथे अपरंपार महाराजांची समाधी आहे. याशिवाय इतर अनेक समाध्या आहेत. प्रत्येक शिवरात्रीला तसेच दत्त जयंतीला इथे यात्रा असते. तेव्हा हजारो भाविक दर्शनासाठी येतात. किर्तन व भजन यांचे आयोजन केले जाते. तसेच महाशिवरात्रीचे औचित्य साधून कुस्तीच्या फडांचे आयोजन केले जाते.

**कालेजीदेवी मंदिर :** हे मंदिर या भागातील प्रसिद्ध होय. मंदिर भव्य आहे. या मंदिराचा जीर्णोद्धार झाला असून प्रशस्त आवार, उघडा सभामंडप, अंतराळ व गर्भगृह अशी रचना आहे. गर्भगृहावर शिखर आहे. आवाराला तटभिंत बांधली आहे. गर्भगृहात देवीचे फक्त मुख असलेली दगडी प्रतिमा आहे. या मंदिराची स्थापना १८५७ च्या बंडातील एक क्रांतीकारक कालेजी महाराज यांनी केली. त्यामुळे देवीला हे नाव मिळाले असे सांगितले जाते. आवारात एक मारूतीचे लहान मंदिर आहे. याशिवाय काही जुने शिल्पावशेष आहेत. त्यामध्ये एक जैन शिल्प आहे. परंतु हे अवशेष या मंदिराचे नाहीत.

**बालाजी मंदिर :** हे मंदिर ३०० वर्षे जुने असल्याचे सांगितले जाते. मंदिर भव्य आहे. गर्भगृहात बालाजी व लक्ष्मीच्या संगमरवरी मूर्ती आहेत. बालाजीच्या हातात गदा, चक्र, शंख, पद्म आहेत. इथे जन्माष्टमी व रथसप्तमीचा उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो.

**काझीपुरा मशीद :** ही मशीद शहरातील मशीदींपैकी सर्वात जुनी आहे.[१४३] अनेक लोक नमाज पडू शकतील एवढे विस्तीर्ण सभागृह आहे. मुख्य इमारतीस तीन प्रवेश असून मोठे खांब आहेत. मशीदीचे बांधकाम सिमेंट व विटांचे आहे.

याशिवाय इतरही मशीदी व दर्गे आहेत. मुदखेडमध्ये प्राचीन काळातील अवशेषही सापडत असून त्यामध्ये एका बारवेचा समावेश होतो. इथे असलेली बारव मंडपयुक्त आहे. मंडपयुक्त बारव म्हणजे बारवेची पुढील अवस्था. हे मंडप बहुतांश आयत व कधी कधी चौरस आकाराचे असतात. इथे असणारी बारव एक मंडपयुक्त असून चार स्तंभांच्यावर मंडप उभारला आहे. या मंडपात मुख्य देवकोष्ठ आहे. बारवेचा काळ साधारणपणे १२ वे शतक ठरतो. याशिवाय एक चौमुखी गणेशप्रतिमा आहे.

---

१४२. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, पूर्वोक्त, पृ. ५७३.

१४३. कित्ता.

मुदखेड येथे एक गढी आहे. लोखंडेची गढी म्हणून ओळखली जाणारी ही गढी भग्नावस्थेत आहे. गढीत एक पक्क्या विटांची विहीर होती, ती आता बुजवण्यात आली आहे.

### येंदापेंदा

**येंदापेंदा :** (ता. किनवट) हे अतिशय लहान गाव पैनगंगा नदीच्या काठावर वसले आहे. येथे असलेल्या नागडोह किंवा नागढव यामुळे येथील आदिवासी जमातींमध्ये हे ठिकाण प्रसिद्ध आहे. यासंबंधी एक लोककथा प्रचलित आहे, ती अशी फार पूर्वी येथून काही अंतरावर एक बाई प्रसूत झाली. पण तिच्या पोटी नाग जन्माला आला. ती बाई घाबरून नागाला टाकून गेली. काही दिवसातच नागाला महाप्रचंड रूप लाभले. हा नाग मोहाच्या झाडावर बसला होता. एक आदिवासी मोहाची फुले गोळा करायला आला तेव्हा नागाला पाहून घाबरला. त्याला पाहून नागाने त्याला अभय दिले व आपल्याला एखाद्या जलाशयात सोडण्यास सांगितले. त्यानुसार तो आदिवासी नागाला घेऊन या डोहाजवळ आला व नाग या डोहात वास्तव्य करून राहिला. सर्व लोक त्याला देव मानू लागले व कालांतराने त्याचे मंदिर बांधले. हा डोह नागढव म्हणून पूजनीय झाला.[१४४]

मंदिर छोटे असून आजूबाजूला मोकळी जागा आहे. सध्या मोठा सभामंडप बांधला आहे. नदीला घाट आहे. गाभाऱ्यात सुरेख कोरलेली नागशिळा, शेजारी महिषासुरमर्दिनीच्या दोन प्रतिमा व एक गणपतीची मूर्ती आहे.

आजही बहुसंख्य गोंड व इतर आदिवासी समाज येथे नागदेवतेची आराधना करण्यासाठी येतो. हा नाग शंकराच्या गळ्यातील असल्याचा समज या समाजात आहे. महाशिवरात्रीला येथे खूप मोठी यात्रा असते. त्यावेळी दुरून दुरून आदिवासी येथे सहपरिवार येतात. नैवेद्य तयार करतात व देवतेची मनोभावे पूजा करतात. आदिवासींच्या निसर्गपुजेचा हा एक अविष्कार आहे.

### येवती

**येवती :** (ता. बिलोली) धर्माबाद-भोकर मार्गावर येवती फाट्यापासून दोन कि.मी. अंतरावर येवती हे गाव आहे. गावात महादेव मंदिर व त्याच्याजवळ असलेली बारव ही दोन राज्य पुरातत्त्वीय स्मारके आहेत.

**मंदिराची रचना :** त्रिदल पद्धतीने बांधलेले हे मंदिर उत्तराभिमुख आहे. गर्भगृह, अंतराळ व त्यापुढे असलेला सभामंडप आणि अर्धमंडप अशी या मंदिराची रचना आहे. मंदिराच्या पूर्व व पश्चिम भागात वेगळे गर्भगृह व अंतराळ आहे.

**गर्भगृह :** मुख्य गर्भगृह (२.३५ × २.३५ मी.) साधे असून चार अर्धस्तंभांवर उभे आहे. गर्भगृहात शिवपिंडी आहे. गर्भगृहाचे प्रवेशद्वार चार शाखीय आहे. यावर द्वारपाल व चवरीधारिणी आहेत. ललाटबिंबावर गजलक्ष्मी दाखविली आहे.

**अंतराळ :** गर्भगृहापुढे अंतराळ (१.७० × २.३० मी.) आहे. अंतराळ व सभागृह यांच्यामध्ये १.६० मी. रुंदीचे अंतर ठेवले आहे. हे या मंदिराचे वैशिष्ट्य आहे. या भागात पश्चिमेकडे एक

१४४. चाटे, रामकिशन 'किनवट/माहूर तालुक्यातील ऐतिहासिक अवशेष - एक आढावा', **भारतीय इतिहास आणि संस्कृती**, मुंबई, इतिहास संशोधन मंडळ, जुलै-सप्टेंबर २००९, पृ. २-१३.

उपगर्भगृह असून पूर्वेकडे गर्भगृह बांधता येईल अशी मोकळी जागा ठेवली आहे. या ठिकाणी एखादे प्रवेशद्वार असावे. त्यानंतर मंदिराचा सभामंडप आहे.

**सभामंडप :** १६ स्तंभांवर उभा असलेल्या मंडपाच्या मधोमध असलेल्या ४ स्तंभांमध्ये रंगशिळा आहे. सभामंडपाच्या पूर्व व पश्चिम भागास गर्भगृह व अंतराळ असलेली स्वतंत्र उपस्थाने आहेत.

**उपगर्भगृह :** सभामंडपाच्या पूर्व व पश्चिम बाजूस असलेली दोन उपगर्भगृहे, गर्भगृह (२.१० × २.१० मी.) व पुढे अंतराळ (१.१५ × १.६० मी.) अशा रचनेची आहेत. दोन्ही उपगर्भगृहांची रचना सारखी आहे. अंतराळाच्या उत्तर-दक्षिण भिंतीत प्रत्येकी एक याप्रमाणे देवकोष्ठ आहेत. यातील गर्भगृहाची द्वारशाखा चार शाखीय आहे. त्यावर शेष द्वारपाल आहे. ललाटावर गजलक्ष्मी आहे. विशेष म्हणजे अंतराळाला सुद्धा प्रवेशद्वार असून स्तंभशाखेची एक चौकट आहे. त्यावर मयुरमुखाची नक्षी व गणेशमुर्ती आहे.

सभामंडप एकूण १६ स्तंभांवर उभा असून, त्यात पूर्ण स्तंभ व अर्धस्तंभ कोरले आहे. उर्वरित आठ स्तंभ सभामंडपाच्या उत्तर व दक्षिण बाजूस आहेत. त्यापैकी चार पूर्ण व चार अर्ध स्तंभ आहेत. मंडपाच्या पूर्व-पश्चिम भिंतीत प्रत्येकी दोन दोन देवकोष्ठ आहेत. सभामंडपात अशी ५ देवकोष्ठे आहेत. सभामंडपाच्या समोर चार स्तंभांवर आधारित अर्धमंडप आहे.

मंदिराच्या बाह्यभागावर गजपट कोरला आहे. याशिवाय दुसरे अंकन नाही. तिनही गर्भगृहांमध्ये शिवलिंग आहे. याशिवाय मंदिरात शेषशायी विष्णू व केशव यांच्या प्रतिमा आहेत.

**मंदिराचा काळ :** हे मंदिर यादवकालीन असून १३ व्या शतकाच्या उत्तरार्धात बांधले असावे. तिन्ही गर्भगृहांच्या द्वारशाखांवरची व अंतराळाच्या चौकटीवरची नक्षी चालुक्य शैलीचा प्रभाव दाखविणारी आहे.

मंदिराचे शिखर पूर्णपणे पडले असल्यामुळे त्यावर सध्या लोकांनी स्लॅब टाकला आहे.

**बारव**[१४५] **:** या मंदिराजवळ वैशिष्ट्यपूर्ण एक प्रवेश असलेली देवकोष्ठयुक्त चौरसाकृती बारव आहे. बारवेची रचना एकूण चार टप्प्यात केली आहे. या बारवेला दक्षिण बाजूने प्रवेश आहे. सात पायऱ्यांनंतर १०० सें.मी. रुंदीचा पहिला मुख्य सोपान आहे. पाच पायऱ्यांनंतर ८० सें.मी. रुंदीचा दुसरा सोपान आहे. तिसरा सोपान ६० सें.मी. रुंदीचा तर चौथा सोपान ४० सें.मी. रुंदीचा आहे. यानंतर १.५० × १.५० मी. आकाराचे कुंड आहे. पश्चिम बाजूस असलेल्या ओट्यावर शेषशायी विष्णूची मूर्ती असावी. सध्या ती मंदिरात ठेवली आहे. बारवेच्या ईशान्य बाजूला मोटेची व्यवस्था करण्यात आली आहे. कुंडातील पाणी उपयोगात आणता यावे यासाठी बारवेच्या दुसऱ्या सोपानावर २.३० मी. उंचीचे दोन स्तंभ उभारण्यात आले आहेत. या दोन स्तंभांच्या मध्ये पहिल्या सोपानावर १.२४ मी. उंचीचे दोन स्तंभ उभारून या चार स्तंभांच्या आधारे रहाटासाठी आवश्यक असलेले अन्य स्तंभ उभारण्यात आले आहे. बारवेचे बांधकाम करतानाच या व्यवस्थेचा विचार करण्यात आला होता.

---

१४५. अ. शं. पाठक, **महाराष्ट्रातील बारव स्थापत्य,** पूर्वोक्त, पृ. ४८.

## येरगी

**येरगी :** (ता. देगलूर) प्राचीन काळी एरिगे म्हणून प्रसिद्ध असणारे येरगी देगलूर तालुक्यात तालुका मुख्यालयापासून १७ कि.मी. वर वसलेले आहे. या गावात कल्याणीच्या चालुक्य राजवंशाचे पाच शिलालेख आढळले आहेत. या शिलालेखांमध्ये गावाचा उल्लेख अग्रहार एरिगे किंवा मुलस्थान एरिगे असा आढळतो.

**शिलालेख क्र. १**[१४६] **:** कल्याणी चालुक्य नृपती विक्रमादित्य सहाव्याच्या राजवटीतील या शिलालेखाचा उद्देश अग्रहार एरिगेच्या मुलस्थानाच्या देवाला माणिक भांडारी व दंडनायक चट्टपय्या यांनी दिलेल्या जमिनीचे दान नोंदवणे हा आहे. व्यापारी श्रेणी (नगर) च्या सभासदांनी दिलेले पैशांच्या व कराच्या स्वरुपातील दानही नोंदविले आहे.

**शिलालेख क्र. २**[१४७] **:** (इ.स. ११३४) हा लेख चालुक्य नृपती सोमेश्वर तिसरा याच्या राजवटीतील आहे. लेखामध्ये वेण्णमय्य नायकने बांधलेल्या केशवदेवाच्या देवालयास अग्रहार एरिगेच्या महाजन, प्रभू, पाठशाळेची व्यवस्थापन समिती, ब्रह्मपुरीचे महाजन, नाखर आणि एरिगे, तडगुरु, सिरीमलीगे आणि बवरगावे या गावांच्या सर्व ग्रामस्थांनी दिलेली देणगी नोंदविली आहे. याशिवाय वेण्णामय्य नायकचा भाऊ आचरस याने व महाजन, प्रभू विष्णुदेव व इतरांनी देवाची पूजा व नैवेद्य तसेच देवालयाच्या दुरुस्तीसाठी दिलेले दान नोंदविले आहे.

**शिलालेख क्र. ३**[१४८] **:** (इ.स. ११३८) चालुक्य नृपती सोमेश्वर तिसरा याच्याच राजवटीतील या लेखाचा उद्देश अग्रहार एरिगेमधील वर उल्लेखिलेल्या केशवदेव देवालयास जमिनीचे व उक्कुळगावे येथील घराचे दान नोंदविणे हा आहे. सदर दान महामंडलेश्वर एरयमरस याने दिले आहे.

**शिलालेख क्र. ४**[१४९] **:** (इ.स. ११४९) शिलालेखाचा सुरूवातीचा भाग नष्ट झाला आहे तरी सदर शिलालेख जगदेकमल्ल दुसरा याचा असावा. महामंडलेश्वर एरयमरस याने मुलस्थानाच्या देवाला पुजेसाठी दिलेले दान तसेच अग्रहार एरिगेतील देवालयाच्या दुरुस्तीसाठी दिलेले दान नोंदविणे हा सदर शिलालेखाचा उद्देश आहे.

**शिलालेख क्र. ५**[१५०] **:** १२ व्या शतकातील हा शिलालेख छिन्नविछिन्न अवस्थेत आहे. या शिलालेखात महामंडलेश्वर अपरादित्यचा उल्लेख आढळतो.

वरील शिलालेखांवरून येरगी प्राचीन काळी या परिसरातील प्रसिद्ध शैक्षणिक केंद्र असल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे येरगीचा मूलस्थान असा केलेला उल्लेख हे स्थान महत्त्वाचे किंवा पवित्र

---

१४६. रित्ती व शेळके, पूर्वोक्त, शिलालेख क्र. ९.

१४७. कित्ता, शिलालेख क्र. ३१.

१४८. कित्ता, शिलालेख क्र. ३२.

१४९. कित्ता, शिलालेख क्र. ३५.

१५०. कित्ता, शिलालेख क्र. ३६.

असल्याचे दर्शविते. येरगीला स्थानिक लोकांनी चालविलेली शाळा किंवा घटिकास्थानही होते.[१५१] इतर शैक्षणिक केंद्रांप्रमाणेच या ठिकाणीही त्रैपुरूषदेव (ब्रह्मा, विष्णु व महेश) मंदिर बांधण्यात आले होते असा उल्लेख होट्टल येथील शिलालेखात आढळतो.[१५२] याशिवाय शिलालेखांत उल्लेखिल्याप्रमाणे इथे केशवदेव व नागेश्वर यांचीही देवालये होती. याशिवाय येणारा व्यापारीश्रेणी व महाजनांचा उल्लेख या ठिकाणी मोठी व्यापारी पेठ असल्याची निर्देशक आहे. चालुक्य नृपती जयसिंह दुसरा याच्या सोन्नवडे लेखात येरगीचा उल्लेख विरीगे ४० असा आढळतो.[१५३] यावरून एका लहान प्रशासन विभागाचे ते मुख्यालय असल्याचे स्पष्ट होते. चालुक्य विनयादित्यच्या कासारशिरसी लेखातही असाच उल्लेख आढळतो.[१५४] येरगी शब्दाची व्युत्पत्ती कन्नडमधील 'एर' (जांभळाचे झाड) या शब्दापासून झाली असावी.[१५५] 'गे' हे देखील कन्नडमधील उपपद आहे.[१५६]

येरगी येथे आजही चार मंदिरांचे अवशेष व शिल्पावशेष विखुरलेले आढळतात.

**शिल्पावशेष :**

**लक्ष्मीनारायण :** लक्ष्मी नारायणाची ही मूर्ती आलिंगन स्वरुपातील असून गरूड नमस्कार मुद्रेत दाखविलेला आहे. नारायण म्हणजे विष्णू अर्धपर्यंकसनात असून त्याने डाव्या हाताने लक्ष्मीस धरले आहे. लक्ष्मीचा उजवा हात विष्णूच्या गळ्याभोवती आहे. सध्या लक्ष्मीचा डावा तर विष्णू प्रतिमेचे दोन्ही हात तुटले आहेत.

**उमामहेश्वर :** हे शिल्प शिव-पार्वतीचे आलिंगन मुद्रेतील शिल्प आहे. शंकराच्या डाव्या मांडीवर पार्वती विराजमान झाली असून उजवा पाय खाली सोडला आहे. शिवमूर्ती चतुर्हस्त असून वरच्या उजव्या हातात त्रिशुल व वरच्या डाव्या हातात साप आहे, तर उजवा खालचा हात अभय मुद्रेत आहे. डाव्या खालच्या हाताने शिवाने पार्वतीस आलिंगन दिले असून पार्वतीने आपला उजवा हात शिवाच्या मानेभोवती टाकला आहे. शिवपार्वती दोघेही सालंकृत आहेत.

**मातृदेवता मूर्ती :** मातृदेवतेची मूर्ती गावाच्या मध्यभागी असणाऱ्या एका शिवालयाच्या अवशेषांत आढळून आली आहे. मूर्तीचे पाठीमागचे दोन्ही हात तुटल्यामुळे कोणत्या मातृदेवतेची ही प्रतिमा आहे, ते स्पष्ट होत नाही. या शिवालयाचे केवळ गर्भगृहाचे द्वार शिल्लक आहे. बाजूलाच शिवपिंडी ठेवलेली आढळते.

---

१५१. ठोसर, हरिहर **हिस्टॉरिकल जॉग्रॉफी ऑफ महाराष्ट्र ॲण्ड गोवा**, पूर्वोक्त, पृ. ४८६.

१५२. रित्ती व शेळके, पूर्वोक्त, शिलालेख क्र. ३७.

१५३. ठोसर, हरिहर **हिस्टॉरिकल जॉग्रॉफी ऑफ महाराष्ट्र ॲण्ड गोवा**, पूर्वोक्त, पृ. ४८६.

१५४. कोलते, वि. भि. **महाराष्ट्रातील काही ताम्रपट व शिलालेख**, महाराष्ट्र साहित्य मंडळ, मुंबई, १९८७, पृ. ७७.

१५५. ठोसर, हरिहर, पूर्वोक्त, पृ. ४८६.

१५६. कित्ता.

**सप्तमातृका :** मातृदेवतेच्या मूर्तीच्या पाठीमागे असणाऱ्या भिंतीत सप्तमातृका पट आढळतो. त्याच्या शेजारीच गणेशप्रतिमा आहे.

**ब्रह्मदेव :** गावात प्रवेश केल्यावर मारुतीच्या पारावरील ही मूर्ती चतुर्भूज असून खालचे दोन्ही हात तुटले आहे. मूर्तीच्या वरच्या डाव्या हातात पोथी तर वरच्या उजव्या हातात स्त्रुक असावे. मूर्ती सालंकृत असून मूर्तीच्या मधल्या मुखास दाढी आहे.

**मंदिर अवशेष :** गावात एकूण चार मंदिरांचे अवशेष आढळतात. त्यापैकी दोन मंदिरे गावात असून दोन गावाबाहेर आहेत. गावाबाहेरील दोन्ही मंदिरे महादेवाची आहेत. त्यापैकी एक मंदिर सोमलिंग मंदिर म्हणून ओळखले जाते. दुसऱ्या मंदिराच्या फक्त सभामंडपाचे खांब दिसतात. गावातील मंदिरही महादेवाचेच असून या मंदिरात सभामंडपाचे मुख्य खांबच शिल्लक असून इथे महादेवाची पिंडी व नंदी आहेत. मंदिराच्या समोरच पाण्याचा एक आड आहे.

गावात प्रवेश करतानाच एक बारव आहे. आजूबाजुला झाडे वाढली असल्यामुळे बारव सध्या उपयोगात नाही.

## रत्नागिरी

**रत्नागिरी :** (ता. लोहा) म्हणून ओळखला जाणारा एक डोंगरमाथा लोहा तालुक्यात वडेपुरी गावापासून २ कि.मी. वर आहे. गोदावरीच्या पात्रापासून ७ कि.मी. अंतरावर असलेल्या या डोंगरावरून आजूबाजूच्या विस्तीर्ण पठारी प्रदेशावर आणि जवळपास २५ मैलांच्या टापूवर नियंत्रण ठेवता येईल या हेतूने मध्ययुगीन काळात किल्ला बांधण्याचा प्रयत्न झाला. काही कारणांमुळे किल्ला बांधण्याचे काम अर्धवट राहिले. परंतु आजही तटबंदीचे अवशेष आढळतात. तटबंदीसाठी मोठ्या दगडी चिऱ्यांचा तसेच दगड व मातीचा उपयोग करण्यात आला होता. स्थानिक परंपरेनुसार असे सांगण्यात येते की, कंधारच्या ऐवजी किल्ला या ठिकाणी बांधला जाणार होता. परंतु नंतर किल्ल्याची निर्मिती कंधार येथे करण्यात आली. मात्र या विधानाला आधार देणारा कोणताही प्रत्यक्षदर्शी पुरावा सापडलेला नाही. तसेच येथे घेतलेल्या पायापेक्षा कंधारचा किल्ला निश्चितच आधीचा आहे. एकूण गडावर पाण्यासाठी एक तळे व दोन टाकी बांधल्या होत्या. तसेच मुख्य तटाची भिंत एक कि.मी. पर्यंत बांधली गेली असावी.

याच डोंगरमाथ्यावर हेमाडपंथी शैलीची म्हणून ओळखली जाणारी लहान मंदिरे साधारणपणे तेराव्या शतकात उभारण्यात आली. येथे असलेल्या खंडोबा मंदिरात पूर्वीपासून भाविक दर्शनाला येतात.

आज या स्थानाचे मुख्य आकर्षण म्हणजे रत्नेश्वरी देवीचे मंदिर. साधारणपणे सतराव्या शतकात बांधलेले हे मंदिर जागृतस्थान म्हणून मानले जाते. उत्तर मध्ययुगीन काळातील गर्भगृह आणि त्यापुढे असलेला सभामंडप असे या मंदिराचे स्वरूप आहे. गडावरील या स्थानालगत काही समाधी बांधल्या असून वीरगळ, सतीशिळा व नागबंध ठेवले आहेत.

या स्थानी जाण्यासाठी नियमित बससेवा उपलब्ध आहे. सहलीचे ठिकाण म्हणून याचा विकास होऊ शकतो.

Maharashtra State Gazetteers

## रायवाडी

**रायवाडी :** (ता. लोहा १९° १५′ उ., ७७° ००′ पू.) लोह्यावरून पानभोसेकडे जाणाऱ्या रस्त्यावर हे गाव आहे. प्राचीन मंदिर व नंदीचे शिल्प यासाठी हे गाव प्रसिद्ध आहे. मंदिर गावापासून दूर आहे. या गावापासून राष्ट्रकूटांची उपराजधानी असणारे कंधार हे तालुक्याचे ठिकाण केवळ दहा कि.मी. वर आहे. रायवाडी येथे सापडणारे मंदिर अवशेषही राष्ट्रकूट काळातील म्हणजे साधारणपणे दहाव्या व अकराव्या शतकातील असावेत.[१५७] हे मंदिर अवशेष साधारणतः २०.३० × ४०.२५ मी. एवढ्या परिसरात सापडतात. उपलब्ध असणारे अवशेष साधारणतः मंदिराच्या अधिष्ठानाचे आहेत. जमिनीपासून दीड मीटर उंचीच्या अधिष्ठानावर मंदिराची रचना करण्यात आली आहे. गर्भगृह, अंतराळ, सभागृह व त्यापुढे स्वतंत्र नंदी मंडप अशी रचना असावी. मंदिराचे प्रमुख प्रवेशद्वार पूर्वाभिमूख असून उत्तर व दक्षिण दिशेस मिळून एकूण तीन प्रवेशद्वारे असावी. मंदिर काळाच्या ओघात उद्ध्वस्त झाले असले तरी तेथे आज असलेला नंदी मूळ स्थानावरच आहे. त्यावरून पूर्वी हे शिवमंदिर होते असे वाटते. या ठिकाणी स्तंभपाद, चंद्रशिळा, वितान मध्यशिळा विखुरलेल्या असून त्यांच्या आकारावरून तसेच अधिष्ठानाच्या अवशेषांवरून मंदिराच्या प्रशस्तपणाची व कलात्मकतेची कल्पना येते.

**राष्ट्रकूटकालीन नंदी :** येथील मंदिर काळाच्या ओघात नष्ट झाले. परंतु नंदी मंडपातील शिल्प शिल्लक असून त्याभोवतीच गर्भगृह बांधण्यात आले आहे. त्याचा आकार बाहेरून ७.५० × ४.५० मी. आहे. नंदी सभोवताली चार स्तंभ उभे असून त्यावर गेल्या काही वर्षात शिखर बांधण्यात आले आहे.

हा नंदी काळ्या पाषाणात घडवला असून त्याची लांबी, रुंदी व उंची अनुक्रमे २.०० × १.१५ × १.३१ मी. आहे. नंदीचे पुढचे दोन्ही पाय दुमडलेले आहेत. मागचा डावा पाय त्याने पोटाखाली घेतला असून उजवा पाय गुढग्यातून वाकवला आहे व या स्थितीत तो बसला आहे. त्याच्या अंगावर विविध अलंकार आहेत. गळ्यातून खांद्याच्या मागे बांधलेला एक चौपदरी पट्टा आहे. त्याच्यावर कवड्या, लहान घंटा, रेशमी गोंडे यांची नक्षी आहे. या पट्ट्यावरील प्रमुख घंटा बरीच मोठी आहे. याशिवाय गळ्यातील माळा, मणी, घंटा आणि रूद्राक्ष आहेत. कपाळावर बाशिंग असून शिंगास गोंडे बांधलेले आहेत. बाशिंगावरचे पदक आकर्षक आहे. नंदीचे एक शिंग व कान भंगलेला असून पोटाचा काही भागही भंगलेला आहे[१५८].

## राहेर

**राहेर :** (ता. बिलोली, १८° ५०′ उ., ७७° ४०′ पू.) नांदेडच्या पूर्वेस ४० कि.मी. अंतरावर व बिलोली तालुका मुख्यालयापासून वायव्येला १० कि.मी. अंतरावर, गोदावरीच्या दक्षिण किनाऱ्यावर वसलेले राहेर हे एक गाव आहे. हे गाव पोचमपाड धरणामुळे दुसरीकडे वसविण्यात आले आहे.

---

१५७ राज्य पुरातत्त्व खात्याने केलेल्या गवेषण अहवाला आधारे.

१५८ कित्ता.

पंढरपूरच्या चौऱ्याऐंशीच्या (यादवकाळातील) शिलालेखात या गावाचा उल्लेख आला आहे. या गावातील माईनदेव नावाच्या एका दात्याने दिलेल्या दानाची नोंद या शिलालेखात करण्यात आली आहे.[१५९] महानुभाव पंथाचे संस्थापक, चक्रधर स्वामी यांचे येथे काही काळ वास्तव्य होते. त्यांनी या ठिकाणी केलेल्या लीळांचा उल्लेख महानुभावांच्या लीळा चरित्र व स्थानपोथी या ग्रंथातून आढळतो.[१६०] त्याच प्रमाणे यादव काळात प्रसिद्धीस आलेले वामन पंडीत यांचाही इथे निवास असल्याचा उल्लेख महानुभाव साहित्यात आढळतो.

**राहेर येथील मंदिर :** गोदावरीच्या अगदी काठावर वसलेल्या या गावाचा विस्तार पूर्व पश्चिम असा झाला होता. साधारणपणे १ कि.मी. रुंद व ४ कि.मी. लांबीच्या पट्ट्यात यादवांनी या प्राचीन शहराचा विकास केला होता. मधूनच जाणाऱ्या नाल्यामुळे मुख्य गावाचे दोन भाग पडले होते. शहराला सतत खचणाऱ्या काळ्या मातीच्या रस्त्यांचा त्रास होऊ नये म्हणून यादव काळातच मोठाल्या दगडी गोट्यांपासून बनवलेले पक्के दगडी मार्ग निर्माण करण्यात आल होते. येथे घाटांची मोठ्या प्रमाणात निर्मिती करून यादवकाळात मंदिरे उभारली. येथे योग नृसिंह तसेच आग्या नृसिंह आदि नृसिंहाची पाच स्थाने आहेत. गोदावरी काठी परिसराच्या अभ्यासानंतर उभारलेल्या देव देवतांच्या स्थानांचे विशेष महत्त्व आहे. येथील खडकातील नृसिंहाचे स्थान हे असेच नैसर्गिक परिवर्तनामुळे निर्माण झालेले स्वयंभू स्थान आहे. सध्या पोचमपाड धरणामुळे गाव स्थलांतरित झाले आहे व मूळ यादवकालीन नगर जंगलात परावर्तीत झालेले आहे. असे असले तरी येथील मंदिरे व शिल्पावशेष गतकालीन वैभवाची साक्ष देत उभे आहेत. गावामध्ये एकूण चार मंदिरे असून त्यापैकी नरसिंह मंदिर सर्वात पुरातन आहे.[१६१] गावात योग नरसिंह, भोगनरसिंह मंदिर तसेच महानुभाव स्थान पोथीत नोंदविलेले रामलिंग (शिवमंदिर) ही प्रमुख स्मारके आहेत.

**नरसिंह मंदिर :** सदर मंदिर गोदावरीच्या दक्षिण काठावर रमणीय परिसरात बांधले आहे. १३ व्या शतकाच्या शेवटी आणि चौदाव्या शतकाच्या सुरूवातीस जी मंदिरे बांधली गेली त्यात या मंदिराचा समावेश होतो. या मंदिराच्या सभोवताली प्रांगण असून प्रांगणाभोवती दगडी प्राकार आहे. या सीमाभिंतीचा नदीलगतचा भाग ढासळून गेला आहे. ही शुष्कसांधी तंत्राने बांधलेली भिंतही मंदिर संकुलाचाच भाग असावी, कारण या प्राकाराला प्रवेशद्वार आहे.[१६२] हे प्रवेशद्वारही आज चांगल्या स्थितीत नाही. त्याची पुरातत्त्व विभागाने दुरुस्ती केली आहे.

मंदिर पूर्वाभिमुख असून चांगल्या स्थितीत आहे. मुखमंडप, मंडप, अंतराळ आणि गर्भगृह असा मंदिराचा तलविन्यास आहे. एकूणच मंदिराचा तलविन्यास येळूंब येथील शिवमंदिराशी व जामखेड येथील केदारेश्वर मंदिराच्या तलविन्यासाशी साम्य दर्शवितो.[१६३] गर्भगृह सप्तरथ तलविन्यासाचे असून मंदिराचे स्वरूप सप्तभूम, भूमिज प्रासाद असे असावे.[१६४]

---

१५९. तुळपळे शं. गो. (संपा.) पूर्वोक्त, लेख क्र. ३४.

१६०. कोलते वि. भि. (संपा.), **लीळाचरित्र** (पूर्वार्ध), महाराष्ट्र शासन, मुंबई, १९७९, लीळा क्र. ६४.

१६१. देव, प्रभाकर **द टेम्पल्स ऑफ मराठवाडा**, पब्लिकेशन स्कीम, जयपूर, १९९३, पृ. ७०.

१६२. **स्थापत्य व कला**, पूर्वोक्त, पृ. १८०

१६३. देव, प्रभाकर द टेम्पल्स ऑफ मराठवाडा, पृ. ७०

१६४. **स्थापत्य व कला**, पूर्वोक्त, पृ. १८०

**मुखमंडप :** मुखमंडप ६.५′ × ६.५′ या आकाराचा आहे. त्याच्या प्रवेशालगत दोन्ही बाजूंनी वामनभिंत आहे. त्यामुळे मुखमंडप काहीसा झाकला गेला आहे. वामनभिंतीवर अनेक प्रकारची नक्षी कोरली आहे. मुखमंडपात चार स्तंभ आहेत. ते नक्षीदार असून सुंदर रितीने झिलई केलेले आहेत. मंडपाचे छत समतल असून पारंपारिक पद्धतीचे आहे.[१६५]

**मंडप :** मंडप (२१ × २१ मी.) चौरसाकृती आहे. चारही बाजूंनी असलेल्या भिंतीमुळे तो बंदीस्त झाला आहे. मंडपाचा तलविन्यास पंचरथ आहे. दाराच्या चौकटीवर सुंदर कलाकुसर आहे. जमीन चकचकीत आहे. प्रवेशद्वार पाच शाखांनी युक्त आहे. खालील मंडारकावर किर्तीमुख तर ललाटावर गरूड प्रतिमा अंकित आहे. वैष्णवी द्वारपाल असून गंगा, यमुना व चवरीधारिर्णीच्याही प्रतिमा आहेत. सभामंडपातील मुख्य स्तंभांवर किन्नर, किर्तीमुख, गंधर्व, मगरमुख यांची नक्षी आहे. तर या वरील भागात विविध प्रकारच्या श्रृंखला आणि माणिक्य व मौक्तिक पट कोरले आहेत. येथील तरंग हस्त कीचकयुक्त आहेत. वितानावर पूर्ण विकसित कमलांची नक्षी आहे. छत सपाट असून मंडपात देवकोष्ठ नाहीत.

**अंतराळ :** अंतराळ ६.५ × ६.५ मी. आकाराचे आहे. अंतराळाचे प्रवेशद्वार द्विशाखीय असून त्याच्या ललाटी गणेश साकारला आहे. तर द्वारशाखेवर भौमितिक नक्षी आहे. अंतराळाची द्वारचौकट बऱ्याच प्रमाणात मंडपाच्या द्वारचौकटीशी साम्य दर्शविते. छत समतल असून भिंती साध्या अलंकरणविरहीत आहेत.

**गर्भगृह :** गर्भगृह म्हणजे ६.५ × ६.५ मी. आकाराचे अत्यंत साधे बंदिस्त दालन आहे. गर्भगृह अंतराळाच्याच आकाराचे आहे. गर्भगृहाच्या मध्यभागी नरसिंहाची मूर्ती आहे. अधिष्ठानाच्या मानाने मूर्तीचा आकार बराच लहान असल्यामुळे सध्याची मूर्ती ही मूळ मूर्ती नसावी असे प्रभाकर देव यांचे मत आहे.[१६६] काकतीय राजांनी येथील मूळ मूर्ती इतरत्र हलवली अशी नोंद उपलब्ध होते. गाभाऱ्याच्या मागील भिंतीत एक पोकळी असून त्यात लहानसा झरोका ठेवलेला आहे. तेथे माईनदेव प्रभूची समाधी आहे असे सांगण्यात येते. माईनदेव म्हणजेच यादव काळात होऊन गेलेला एक पंडीत. यांच्या नावावर अनेक रचना प्रकाशित आहेत.

आज मंडपावरील व मुखमंडपावरील छत शिल्लक नाही. मध्ययुगीन काळात मंदिराचा जीर्णोध्दार झाला होता असे मानण्यास जागा आहे आणि विटांच्या शिखराची पुनर्बांधणी करताना शिखराची बाह्यरेषा व्यवस्थित राहिलेली नाही. तथापि मंदिरावर माती आणि विटांच्या सहाय्याने बांधलेले आणि बाहेरून चुन्याचा गिलावा असलेले भूमिज शिखरच होते. हे दाखविण्याइतपत पुरावा शिल्लक आहे.[१६७] आज नृसिंह जयंती यासारख्या उत्सवांना भाविक येथे जमतात. या स्थानापासून

---

१६५. कित्ता, पृ. ७०.

१६६. कित्ता, पृ. ७१.

१६७. **स्थापत्य व कला**, पूर्वोक्त, पृ.१८०

Maharashtra State Gazetteers

जवळच महानुभाव आश्रम आहे. नदीला येथे घाट बांधला आहे. महानुभाव पंथाच्या स्थानपोथी या ग्रंथात राहेर येथील काही ठिकाणांचा उल्लेख आढळतो.[१६८]

## लहान

**लहान :** (ता. नांदेड, १९° १५′ उ., ७७° २५′ पू.) लहान हे गाव जिल्हा मुख्यालयापासून २२ कि.मी. अंतरावर नांदेड-तामसा रस्त्यावर आहे. यादवकालीन अवशेषांसाठी प्रसिद्ध असणारे अर्धापूर इथून आठ कि.मी. अंतरावर आहे. अर्धापूर प्रमाणेच या गावीही यादवकालीन मंदिरांचे अनेक अवशेष आढळतात. ही मंदिरे हेमाडपंती पद्धतीची दिसतात. त्यात महाकाली व परमेश्वर मंदिर फार महत्त्वपूर्ण आहेत, पण ती भग्न स्वरूपात आहेत. गावात असलेले दुसरे बसवेश्वर मंदिर हे १६ व्या शतकातील असावे.

**परमेश्वर मंदिराचे अवशेष :** परमेश्वराचा माळ या नावाने ओळखली जाणारी टेकडी लहानच्या लगत दीड कि.मी. अंतरावर असून तेथे तांत्रिक साधकांची वस्ती असावी असे दिसते. टेकडीवर हे मंदिर असून सध्या फक्त गर्भगृह शिल्लक आहे. आजूबाजूला मंदिराच्या नंदी मंडपाचे, स्तंभांचे व छताचे अवशेष विखुरलेल्या अवस्थेत आढळतात.

हे मंदिर जरी परमेश्वराचे मंदिर म्हणून ओळखले जात असले तरी मुळात या मंदिराचा संबंध शैवाशी असावा. कारण या ठिकाणी सर्वत्र भैरवाची शिल्पे आढळतात. अवशेषांमध्ये एक महत्त्वपूर्ण स्तंभ आढळला असून त्यावर एक मूर्ती आहे. दीड मी. उंचीची ही मूर्ती द्विभूज असून तिच्या एका हातात कपाल व दुसऱ्या हातात मुल आहे. छातीचा सापळा स्पष्ट कोरला आहे. ही मूर्ती कापालिक शिवाचे उत्तम उदाहरण ठरावी. गर्भगृहातही भैरवाची मूर्ती असावी परंतु सध्या ती अस्तित्वात नाही.

**गावातील इतर शिल्पे :**

**१) महिषासूरमर्दिनी :** १.२० मी. उंचीच्या काळ्या पाषाणात घडवलेल्या या मूर्तीचे वैशिष्ट्य म्हणजे ही महिषासुरमर्दिनी एका हाताने एका पुरूष प्रतिमेला आलिंगन देत आहे. तो कदाचित शिव असावा. दुसऱ्या दोन हातांत पाश व अंकूश असून चौथा हात खंडीत आहे. महिषाचे डोके उजव्या बाजूला वेगळ्या रितीने दाखविले आहे.

**२) भैरव मूर्ती :** शिवाच्या भैरव प्रकारातील दोन मूर्ती टेकडीवर ज्या ठिकाणी मंदिर आहे, त्या ठिकाणी आहेत. ही मूर्ती द्विभूज असून २.१० मी. एवढ्या उंचीची आहे. दोन्ही हातातील आयुधे अस्पष्ट आहेत. छातीचा सापळा स्पष्ट दिसतो.

---

१६८. पुरी, सुनिल पूर्वोक्त, पृ. २००.

स्थानपोथीतील स्थाने,

१. या ठिकाणी असलेल्या मठाची नोंद
२. येथे सिद्धनाथ देवळास असलेल्या जगतीच्या आत सिद्धनाथाच्या दक्षिणेस आबाइसाची गुंफा पूर्वाभिमुख आहे.
३. वामन पेंधीचा मठ
४. घाट – या ठिकाणी गोदावरीचा घाट असून त्याच्या दक्षिणेस राम लक्ष्मणाचे देऊळ आहे.

दुसरी भैरव मूर्तीही (उंची १.४० मी.) अशाच वर्णनाची आहे. या टेकडीवर आढळणाऱ्या शिल्पावशेषांवरून येथील शिवमंदिरातील विशेष प्रकारच्या लकुलीशाच्या मूर्ती घडवून त्यांची केलेली प्रतिष्ठापना तसेच तांत्रिक उपासनेसाठी घडविलेल्या मूर्तींचे पुरावे सापडतात. अघोर शिव मूर्ती, उग्रशिव, काली तसेच कपाल व खट्वांग धारण केलेली शिवमूर्ती घडविली आहे. उर्ध्वलिंग शिवाची प्रतिष्ठापनाही इथे झाली होती. येथील मूळ शिवलिंग पूर्णपणे भग्न असून फक्त त्याचे अवशेष दिसतात.

यादव काळात अर्धापूर-लहान परिसरात कालामुख पंथाचा बराच प्रभाव होता. अर्धापूरची मल्लीनाथ व सिद्धेश्वर ही दोन्ही मंदिरे कालामुख पंथाचे गुरु ब्रह्मर्षीदेव यांच्या प्रभावाखाली होती असा स्पष्ट उल्लेख येथील शिलालेखातून आला आहे. अर्धापूर व लहान परिसरात सापडणाऱ्या कालामुख पंथाचा प्रभाव असणाऱ्या कलाअवशेषांचा संदर्भ याच ब्रह्मर्षीदेवांशी जोडावा लागेल.[१६९] याचा अर्थ असा की बाराव्या-तेराव्या शतकात तेथे कालामुख पंथाचा प्रभाव होता.[१७०]

## लोहा

**लोहा :** लोहा तालुका मुख्यालय असून नांदेड-कंधार रस्त्यावर नांदेडपासून ४५.०६ कि.मी. अंतरावर आहे. हा तालुका माळेगाव या खंडोबाच्या जागृत स्थानासाठी विशेष प्रसिद्ध आहे.

**विठ्ठलेश्वर मंदिर :** लोहा शहरात विठ्ठलेश्वर मंदिर हे जवळजवळ २०० वर्षे जुने मंदिर आहे.[१७१] हे मंदिर बऱ्यापैकी भव्य आहे. गर्भगृह, अंतराळ, सभामंडप, अर्ध सभामंडप अशी मंदिराची रचना आहे. गर्भगृहात विठोबा व रखुमाईची मूर्ती ०.७६२ मी. आहे. मंदिराचे बांधकाम दगडी आहे. गर्भगृह (३.०४८ × ३.९४८ मी.) चौरसाकृती आहे. सभामंडप ९.१४४ × ३.६५८ मी. आकाराचा आहे. आठ स्तंभांवर तो तोलला गेला आहे. अर्धसभामंडप त्यामानाने लहान आकाराचा आहे. कालानुरूप मंदिरात काही बदल करण्यात आले आहेत.

शहरात अलीकडे बांधलेले शिवमंदिर असून ते पश्चिमाभिमुखी आहे. या मंदिराचे वेगळेपण म्हणजे इथला नंदी द्विमुखी आहे. आवारात एक समाधी तसेच शनीची छोटी देवळी आहे.

याशिवाय मारूती, गणपती, देवी व बालाजी अशी मंदिरे आहेत. गणपती मंदिरात गणपतीची उभी मूर्ती आहे. मारूती मंदिराजवळ दोन सतीशिळा व काळभैरवाची मूर्ती आहे.

शहरात लव्हेकरांची गढी म्हणून ओळखली जाणारी एक गढी आहे.[१७२] या गढीचे मुख्यद्वार पश्चिमाभिमुखी असून अर्धे बांधकाम दगडाचे तर अर्धे मातीचे आहे. मुख्य प्रवेशद्वारातून आत गेल्यावर दक्षिणाभिमुखी दुसरा दरवाजा आहे. तेथून आत खाऱ्या पाण्याचा आड लागतो. या गढीवर पूर्वी लहान तोफा होत्या. गढीची पूर्वेकडील बाजू पूर्णपणे उद्ध्वस्त झाली आहे.

---

१६९. राजन, अमिताभ (संपा.), पूर्वोक्त, प्रभाकर देव, 'स्थापत्य अवशेष', पृ. २९.

१७०. कित्ता.

१७१. **नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, पूर्वोक्त, पृ. ५७०.

१७२. एकताटे, उषाताई अरविंद **नांदेड जिल्ह्यातील गढी-वाडे, एक अभ्यास**, भारतीय इतिहास संकलन समिती, पुणे, २००३, पृ. ५३-५४.

Maharashtra State Gazetteers

## वासरी

**वासरी :** (ता. नांदेड १९° ०५′ उ., ७७° २०′ पू.) वासरी नांदेड तालुक्यात असून नांदेड शहरापासून १६ कि.मी. अंतरावर गोदावरीकाठी वसलेले आहे.

गावात एक यादवकालीन शिवमंदिर पूर्णपणे भग्नावस्थेत आहे. गर्भगृहाच्या प्रवेशद्वारावर गणेश अंकित केला आहे. उत्तर रंग शिळेवर नागर शिखराची नक्षी आहे. याशिवाय अन्य एक मंदिर असावे असे याच परिसरात २५ मी. अंतरावर असलेल्या उंचवट्यावरील अवशेषांवरून दिसते. येथे काही यादवकालीन शिल्पावशेष सापडले आहेत. यामध्ये नागशिळा (६५ × २२ × १३ सें.मी.), सौम्य नरसिंह मूर्ती (५० × २९ × २४ सें.मी.), खंडीत विष्णू प्रतिमा आहेत. नरसिंह पद्मासनात बसलेला आहे हे एक वैशिष्ट्य म्हणावे लागेल. विष्णूने प्रदक्षिणा क्रमाने पद्म, चक्र, शंख व गदा धारण केली आहे. याशिवाय वीरगळ (७३ × ४५ × ७९ से.मी.) आहे. गावात उत्तर मध्ययुगीन काळातील महाजन पाटील यांची गढी आहे. परंतु ती सध्या अर्धवट पडलेल्या स्थितीत आहे.

गावात काही घरात उपयोगात आणलेल्या अठराव्या शतकातील दरवाज्याच्या लाकडी चौकटी व लाकडी काष्ठशिल्प उत्कृष्ट आहे.

## विष्णुपुरी

**विष्णुपुरी :** (ता. नांदेड) **काळेश्वर मंदिर :** नांदेडपासून ६ कि.मी. अंतरावर विष्णुपुरी हे गाव आहे. या ठिकाणी आज विष्णूपुरी उपसा जलसिंचन प्रकल्प उभा आहे. या गावाच्या उत्तरेस एक कि.मी. अंतरावर गोदावरीकाठी काळेश्वराचे यादवकालीन मंदिर आहे. या मंदिराचा आधुनिक पद्धतीने जीर्णोध्दार करण्यात आल्यामुळे त्याचे मूळ स्वरुप लोपले आहे. तरीही उपलब्ध पुरातत्त्वीय अवशेषांमुळे व मंदिर रचनेमुळे मूळ मंदिराची रचना समजून येण्यास मदत होते. हे मंदिर त्रिदल असून पूर्वाभिमुख आहे. मंदिराची रचना, गाभारा, अंतराळ, गर्भगृह व प्रवेशद्वार अशी आहे. मुख्य प्रवेशद्वाराव्यतिरिक्त दक्षिण व उत्तर दिशेला अशी दोन प्रवेशद्वारे आहेत. मंदिराला मुखमंडप किंवा अर्धमंडप नाही. नंदीसाठी असणारा मंडपही नाही. मंदिराचा गाभारा १.८२ × १.८२ मी. चौरस आकाराचा असून अंतराळ २.१२ × १.८२ मी. आहे. गर्भगृहाचे प्रवेशद्वार पाच शाखीय आहे. यातील स्तंभ शाखा उठावात असून ललाटी श्री गणेश अंकीत आहे. येथील अधिष्ठानावरील कनीकपोत याशिवाय स्तंभ व छतावर असलेली भौमितिक नक्षी आणि गर्भगृहाच्या छतावरील कीर्तीमुखाचे अलंकरण वैशिष्ट्यपूर्ण आहे. हे मंदिर पाताळ लिंगी शिवपिंडी असलेले आहे. कारण गर्भगृह जमिनीच्या पातळीपेक्षा जवळ जवळ १.५२ मी. खोल आहे. शिवपिंडी उत्तराभिमुख आहे. काळेश्वर मंदिराच्या पुढे नव्याने भव्य असा आर.सी.सी. सभामंडप अलिकडील काळात उभारण्यात आला आहे. याशिवाय विष्णुपुरी गावामध्ये अठराव्या शतकातील एक नरसिंह मंदिर आहे.

हे स्थान निसर्ग रमणीय आहे. इथे गोदावरी अर्धचंद्राकृती वळण घेते. इथे उभारलेला विष्णुपुरी प्रकल्प व वनराई त्यामुळे हे एक उत्कृष्ट पर्यटनाचे स्थान ठरू शकते. मंदिराच्या पश्चिमेस उत्कृष्ट असा घाट बांधला असून या ठिकाणी श्रावण महिन्यात व महाशिवरात्रीला मोठी यात्रा भरते. आता विष्णुपुरी जलाशयाचे शंकरराव चव्हाण जलाशय असे नामांतरण करण्यात आले आहे.

स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ ही विद्यापीठाची वास्तू विष्णुपुरी परिसरातच उभी आहे. आधुनिक ज्ञान केंद्र म्हणून याला स्वतंत्र प्रतिष्ठा लाभली आहे.

## शंखतीर्थ

**शंखतीर्थ :** (ता. मुदखेड) नांदेड जिल्ह्यातील मुदखेड तालुक्यामध्ये शंखतीर्थ हे स्थान गोदावरीच्या नाभीस्थानालगत आहे. भौगोलिक दृष्टीने गोदावरीच्या उगमापासून मुखापर्यंतच्या प्रवाहाच्या मध्यभागी हे स्थान आहे. तसेच या ठिकाणी प्रागैतिहासिक काळापासून झालेल्या भौगोलिक बदलांची नोंद येथे मिळणाऱ्या अश्मीभूत (fossils) शंखाच्या अवशेषांवरून मिळते. हे शंख साधारणपणे उजव्या सोंडेचे आहेत अशी मान्यता आहे. गोदावरीच्या या प्रवाहाने सातत्याने तटावरील खडकांची झीज झाली आहे. त्यामुळे साधारणपणे ६ मी. खोलीपर्यंतच्या खडकाचे खनन झाले आहे.

नरसिंह मंदिर : पौराणिकदृष्ट्या गोदावरीच्या अष्टांग विषयीची नोंद गोदावरी महात्म्यात उपलब्ध होते. त्यात नाभीस्थान म्हणून याचा संदर्भ येतो आणि गोदावरीच्या उगमापासून करावयाची गोदा परिक्रमाही या स्थानापर्यंत करण्याचा प्रघात आहे. सिंहस्थाच्या काळापर्यंत साधारणपणे ही परिक्रमा केली जाते. गोदावरीच्या पात्रात एक नरसिंहाचे स्थान दाखवितात. तोच नाभीचा भाग मानला जातो. पात्राच्या लगत साधारणतः १२ व्या शतकात (कल्याणीच्या चालुक्य काळात) उभारण्यात आलेले नरसिंह मंदिर आहे. या मंदिराचे वैशिष्ट्य असे की येथे असलेल्या स्थानाच्या पावित्र्यामुळे सातत्याने मंदिराचा विस्तार करण्याचा प्रयत्न झाला असे दिसते. एका प्रशस्त प्राकारामध्ये हे मंदिर संकुल असून त्यात पूर्व व उत्तर दिशेने प्रवेश आहे. मुख्य मंदिर गर्भगृह, अंतराळ, चौरस सभामंडप आणि मुखमंडप अशा पद्धतीचे आहे. गर्भगृहाच्या बाहेरील बाजूने उत्तर, दक्षिण व पश्चिम अशा तिनही बाजूस एक एक भद्र असून त्यामध्ये विष्णुलक्ष्मी, योग नरसिंह व उमामहेश्वराची मूर्ती असावी. त्यापुढे अर्धमंडप होता. या मंदिराच्या संदर्भामध्ये विशेषत्वाने लक्षात येते ते सभामंडप व अंतराळ यांच्या प्रवेशालगत मूळ मंदिराचे काम झाल्यानंतर लगोलग काही दशकांनी बसवलेले जालवातायन आहे तसेच प्रवेशद्वार आणि मुख्य मंडपाचा नंतर केलेला विस्तार हा जाणवण्याइतपत मोठा आहे. मंदिराच्या द्वारशाखा विशेष उल्लेखनीय नसल्या तरी मंदिरातील स्तंभ हे शिल्पशैलीच्या दृष्टीने उल्लेखनीय आहेत. विष्णुच्या विविध अवतारांचे अंकन स्तंभ मध्यावर केले आहे. तसेच विविध आकार प्रकारची भौमितिक नक्षी पहावयास मिळते. सभामंडपाचे वितान विशेष उल्लेखनीय असून रंग शिळेवरील चौरस स्तंभाच्या आधारे उभा असलेला वितानाचा मध्यभाग हा गजतालु प्रकारात मोडणारा आहे. एकात एक लहान होत जाणाऱ्या वर्तुळातून पूर्ण होणारे हे वितान पूर्ण विकसित कमल पुष्पांच्या नक्षीने बनले आहे.

गर्भगृहातील मुख्य मूर्ती ही नरसिंहाची आहे. हा नरसिंह योग नरसिंह असून शांत मुद्रेत आहे. त्याने योगपट धारण केला आहे. अशाच प्रकारची मूर्ती नांदेड जिल्ह्यात शेळगाव (ता. देगलूर) या ठिकाणी उपलब्ध आहे. केवल नरसिंह प्रकारातील याच काळातील मूर्ती नांदेड येथील होळी या भागातील नरसिंह मंदिरात आहे.

या मंदिर परिसरात मंदिराच्यालगत अन्य एक शिवमंदिर असून त्याची रचना, गर्भगृह, अंतराळ सभामंडप अशाप्रकारची आहे. मुख्य मंदिराच्या लगोलगच्या नंतरच्या काळात या मंदिराची उभारणी झाली असावी. याच प्रकारात समोर बालयोगी महाराज व अन्य महंतांची समाधी आहे. आयताकार चौथऱ्यावर २ छत्र्या उभारल्या आहेत. अर्थात या समाधी १८ व्या शतकातील आहेत. याच मंदिर परिसरात गोसावी समाजाच्या वतीने दत्तमूर्तीची स्थापना केली आहे.

काळाच्या ओघात संपूर्णपणे विस्कळीत झालेले हे मंदिर संकुल राज्यपुरातत्त्व विभागाने केलेल्या जतनविषयक कामामुळे आज पुन्हा पूर्वस्थितीत पहावयास मिळते.

शिवमंदिर : शंखतीर्थ या गावात उत्तर मध्ययुगात एका मोठ्या गढीची निर्मिती झाली. तिच्या बुरुजाचे अवशेष पहावयास मिळतात. गावामध्ये एक शिवमंदिर आहे. हे शिवमंदिर १३ व्या शतकाच्या उत्तरार्धात किंवा १४ व्या शतकाच्या प्रारंभिक दशकात उभारले गेले असावे. एका उंच अधिष्ठानावर उभारले आहे. हे मंदिर गर्भगृह, अंतराळ, सभामंडप व मुखमंडप अशा स्वरुपाची रचना असलेले आहे. याचे वेगळे वैशिष्ट्य म्हणजे गर्भगृह, अंतराळ हे भाग पूर्ण दगडी असले तरी अर्धमंडप व सभामंडपाचा भाग हा विटांमध्ये बांधला आहे. म्हणजे मंदिराचा जंघाभाग साधाच असून तो विटांमध्ये बांधला आहे हे विशेष. यासाठी मुद्दाम तयार केलेल्या ताशीव विटा उपयोगात आणल्या आहेत. मंदिरात असलेले स्तंभ व एकूण काम साधारणप्रतीचे आहे. तथापि मंदिराच्या देवकोष्टात असलेल्या मूर्तींपैकी भैरव, उमा महेश्वर या मूर्ती मात्र १२ व्या शतकातील (चालुक्य काळ) आहेत.

एकूण शंखतीर्थ हे स्थान पर्यटनासाठी भौगोलिक भूशास्त्रीय वैशिष्ट्य, पौराणिक महात्म्य व चालुक्य शैलीतील मंदिर या दृष्टीने योग्य आहे.

## शिऊर

**शिऊर** : (ता. हदगाव) हदगाव तालुक्यात पैनगंगेच्या काठी नांदेडपासून सुमारे ५० कि.मी. अंतरावर शिऊर हे एक लहानसे गाव आहे. या गावाच्या नैऋत्येला एका लहानशा टेकडीवजा डोंगरात तीन लेणी कोरलेल्या आहेत. या ब्राह्मणी लेणी असून वैष्णव पंथाच्या आहेत. स्थापत्य व शिल्प रचनेवरून या लेणी वाकाटक नृपतीच्या राजाश्रयाखाली इ.स. ४ थे ते ५ वे शतक या कालखंडात कोरल्या गेल्या असाव्यात.

**लेणींचे वर्णन :** या लेणींचे काम अर्धवट सोडलेले आहे व त्या अलंकारणदृष्ट्या ओबडधोबड आहेत. तरीही लेणी स्थापत्य विकासाचा विचार करता विशेष महत्त्वाच्या आहेत.[१७३]

**लेणी क्र. १ :** ७ × ४ मी. आकाराची ही लेणी सर्व प्रथम कोरली गेली असावी. खांब सरळसोट असून त्यांना स्तंभशिर्ष किंवा स्तंभकणा असा कोणताही आकार दिलेला आढळत नाही. काही खांबांवर आकृती कोरण्याचा प्रयत्न केलेला आढळतो परंतु त्या खूपच झिजल्या असून छिन्न-विछिन्न झाल्या आहेत. या लेणीत समोरच्या भिंतीतून एक प्रचंड शिळा पुढे आलेली असून त्यातून गर्भ गृह कोरण्यात आले आहे. प्रदक्षिणा पथाचे कार्य अर्धवट सोडण्यात आलेले दिसते.

१७३. **स्थापत्य व कला**, पूर्वोक्त, पृ. ६३.

Maharashtra State Gazetteers

या लेणीमध्ये विष्णुच्या चौदाव्या मूर्तीप्रकारांपैकी वासुदेव हा मूर्तीप्रकार कोरलेला आहे.[१७४] मूर्ती समभंग असून वरच्या दोन हातात शंख व चक्र धारण केले आहेत. परंतु खालचे दोन्ही हात तुटलेल्या अवस्थेत आहेत.

**लेणी क्रमांक २ :** हे लेणे क्रमांक १ पेक्षा मोठे आहे. १५ × ७ मी. आकाराचा सभामंडप त्यात मागील भिंतीलगत गर्भ गृह व गर्भगृहाभोवती प्रदक्षिणा पथ अशी या लेण्याची रचना आढळते. खांबावरील शिल्परचनेत वैष्णव देवतांचा प्रभाव आढळतो.[१७५]

विष्णुप्रतिमांपैकी केशव या मूर्तीप्रकाराचे शिल्पांकन येथील मध्यभागी असलेल्या खांबावर केलेले आढळते. कलात्मक दृष्ट्या ओबडधोबड असणारी ही मूर्ती अलंकारांनी मात्र समृध्द आहे.[१७६] मूर्तीच्या (उजवीकडून पहिला वरचा हात) अनुक्रमे पद्म, शंख, चक्र व गदा अशी आयुधे चार हातात आहेत. सध्या वरच्या हातातील आयुधे तुटलेली आहेत.

**लेणी क्रमांक ३ :** लेणी क्रमांक ३ हे या लेणी समुहातील सर्वात मोठे व शिल्पांकनाच्या दृष्टीने विशेष लक्षणीय लेणे आहे. १५ × ९ मी. आकाराचा सभामंडप व ४.५ × ३ मी. आकाराचे सभागृह अशी त्याची रचना आहे. गर्भगृह पूर्ण झाले असून त्यातील शिवलींग शिलाखंडातून कोरण्यात आले आहे. सभागृहातील खांबांचे आकार पूर्ण असून स्तंभशिर्ष व्यवस्थित कोरलेले आहे. भिंतीवर अर्धवट कोरलेले गरूड, हत्ती यांची शिल्पे व इतर शिल्पे लक्षवेधी आहेत. लेणीचे छत व भिंती गुळगुळीत करण्याचा प्रयत्न केला आहे.

या लेणीत उत्तराभिमुखी असलेल्या मध्य भागाच्या खांबावर पद्मनाभाची सालंकृत मूर्ती असून वरच्या उजव्या हातापासून क्रमाने त्याने शंख, पद्म, चक्र व गदा धारण केले आहेत.

एकूणच या लेण्यांतील शिल्परचनेत ब्रह्मा, विष्णू, विक्रम, वराह, नरसिंह, राम यांना विशेष महत्त्व आहे. याशिवाय महिषासूर मर्दिनी व सप्तमातृकाही कोरण्यात आल्या आहेत. या लेणींमधील विशेष लक्षणीय मूर्तीरचना म्हणजे लेणे क्रमांक तीनच्या स्तंभावरील शिल्पपट्टा. यामध्ये ब्रह्मा व विष्णु शिवलिंगाची पूजा करताना दाखविले आहेत. त्यात बालकृष्ण व पुतनामावशीचे अंकन आढळते. ब्रह्मा आणि विष्णू आसनस्थ असून ब्रह्मा नमस्कार मुद्रेत आहे तर विष्णुने आपला हात शिवलिंगावर ठेवला आहे, अशा प्रकारचे अंकन आहे.[१७७] काही ठिकाणी कृष्णलीलाही कोरल्या आहेत.

या लेणी वाकाटक काळातील असल्याचे वर नमूद केले आहे. मुळचे शिवभक्त असणारे वाकाटक, रुद्रसेन दुसरा या वाकाटक नृपतीने चंद्रगुप्त विक्रमादित्य यांच्या प्रभावती या कन्येशी विवाह केल्यामुळे विष्णूपुजकही झालेले दिसतात. त्याचेच पडसाद शिऊरच्या वैष्णव लेणींमध्येही पडलेले आढळतात.

---

१७४. राजन अमिताभ (संपा.), पूर्वोक्त, भगवान देशमुख, "मूर्तिशिल्प वैभव", पृ. ५५.

१७५. कित्ता, देव, प्रभाकर "स्थापत्य अवशेष", पृ.१८

१७६. कित्ता, देशमुख, भगवान पूर्वोक्त, पृ.५४

१७७. कित्ता, देव, प्रभाकर पूर्वोक्त, पृ. १९

Maharashtra State Gazetteers

## शिरढोण

**शिरढोण :** (ता. कंधार, १८° ५५′ उ., ७७° १५′ पू.) कंधार तालुक्यातील शिरढोण हे गाव तालुका मुख्यालयापासून ३० कि.मी. अंतरावर आहे. गावात एका टेकडीवर उंच ठिकाणी असलेले मंदिर परमेश्वर मंदिर म्हणून प्रसिद्ध आहे. या ठिकाणी ब्रह्मदेवाची मूर्ती प्रमुख मूर्ती असून ती परमेश्वर मूर्ती म्हणून ओळखली जाते. मंदिराला प्रशस्त असा प्राकार आहे. मध्यभागी एका उंच चौथऱ्यावर एकगर्भी गर्भगृहात ओट्यावर एका स्वतंत्र अधिष्ठान शिळेवर या मूर्तीची स्थापना करण्यात आली असून मंदिरापुढे अठराव्या शतकात बांधलेली दगडी दिपमाळ आहे. अलिकडच्या काळात एक सभामंडप उभारण्यात आला आहे. त्याचप्रमाणे मंदिराचा जीर्णोद्धार व शिखराची दुरुस्ती यासारखी कामे हाती घेण्यात आली आहेत. विटा व चुन्याचा वापर करून बांधलेले शिखर एकावार एक वाढत जाणारे असे तीन टप्पे घेऊन पूर्ण केलेले आहे. त्यावर काही देवतांची व प्राण्यांची शिल्पे कोरली आहेत.

**ब्रह्मदेवाची (विश्वकर्मा) मूर्ती :** मूर्तीशास्त्राच्या दृष्टीने विचार करता, सदर मूर्ती नवव्या शतकातील आहे. राष्ट्रकुट काळात कंधारचा विकास झाला. त्याच काळात निर्माण झालेली ही मूर्ती कदाचित कंधारहून सुरक्षिततेच्या कारणामुळे या ठिकाणी आणली असावी. कारण या परिसरात या मूर्ती शिवाय कुठलेही प्राचीन अवशेष उपलब्ध नाहीत. ही मूर्ती उत्कृष्ट प्रतीच्या काळ्या पाषाणात (बेसाल्ट) घडवली गेली आहे. मूर्तीचा आकार १०५ × ६० × १६ से.मी. आहे. मूर्तीला एकूण चार मुखे आहेत. चौथे तोंड हे मागील बाजूस असून काहीसे अस्पष्ट आहे. पुढील तीन मुखे अत्यंत प्रमाणबद्ध व गोलाई असलेली आहेत. समभागात उभी असलेली ही मूर्ती चतुर्हस्त आहे. दक्षिण करक्रमाने आयुध क्रम असा-अक्षमालायुक्त अभयहस्त, दुसऱ्या हातात स्तुप धारण केलेला असून कटक हस्त मुद्रा आहे, तिसऱ्या हातात दंड (मौजी बंध) आहे. चौथा हात काहीसा खंडीत आहे. त्यात कमंडलु असावे. मुर्ती जटा मुकुटधारी असून कानात मकर कुंडलें, गळ्यात मौक्तिक माला सरी, माणिक्य, मौक्तिक, पदकांचा कंठ आणि उदरबंद ल्यायलेली आहे. गळ्यात हिरण्यगर्भसुत्र (जानवे) धारण केले आहे. हातात कंकण, सर्व बोटांमध्ये अंगठ्या, पायात पैंजण व तोडे घातलेली ही मूर्ती शरीरशास्त्राच्या दृष्टीने अत्यंत प्रमाणबद्ध आहे. मूर्तीचे वाहन हंस आहे.

**मूर्तीची प्रभावळ :** मूर्तीच्या पादपिठावर एकूण नऊ प्रतिमांचे अंकन केले आहे. यापैकी समोरील तीन प्रतिमा यक्षांच्या असाव्या. यापैकी एक नमस्कार मुद्रेत असून अन्य दोन आपल्या हाताने वरील भार पेलताना दाखविल्या आहेत. या मूर्ती लहान लहान चौकोनात कोरलेल्या आहेत. ब्रह्मदेवाची मुख्य मूर्ती कमलासनावर उभी आहे. मूर्तीच्या दोन्ही बाजूला स्त्री-पुरुषांची दोन्ही बाजूंनी दोन-दोन जोडपी उभी आहेत. तसेच चवरीधारिणी आहेत. मूर्तीच्या डाव्या बाजूला नमस्कार मुद्रेतील एक सेवक आहे.

मूर्तीच्या प्रभावळीवर दोन शिल्पपट्ट कोरले आहेत. एका शिल्पपटावर गंधर्व युगुलांची नक्षी आहे. हाती पुष्पमाला घेतलेले विद्याधरही दाखविले आहेत. दुसऱ्या शिल्पपटावर प्रभावळीवरच अष्टदिक्पाल दाखविले आहेत. हे दिक्पाल आपल्या वाहन व आयुधांसह सहपत्नीक आहेत हे विशेष. इंद्र आपल्या

Maharashtra State Gazetteers

पत्नीसह म्हणजे शचीसह आहे. त्याच्या हाती गज, अंकुश आणि कमंडलू आहे, तो आपल्या वाहनावर म्हणजे हत्तीवर आरूढ आहे. या प्रकारे यम महिषावर तर अग्नि, नैऋती, वरूण, वायू, सोम, कुबेर, ईशान आपापल्या वाहनांवर आरूढ आहेत.

**मूर्तीचे महत्त्वः** ब्रह्मदेवाच्या अनेक मूर्ती महाराष्ट्रात अधूनमधून आढळतात. पण ह्या मूर्ती मुख्य मूर्ती नसून मंदिरावरील शिल्पांतील किंवा बाह्यांगावरील देवकोष्ठातील उपमूर्ती असतात. शिरढोण येथील परिपूर्ण मूर्तीच्या उपलब्धीवरून असे स्पष्ट होते की, महाराष्ट्रात राष्ट्रकूट काळात ९-१० व्या शतकात ब्रह्मदेवाचे स्वतंत्र मंदिर उभारण्यात आले होते. कारण ही मूर्ती एखाद्या ठिकाणची उपमूर्ती नसून मुख्य मंदिरातील अधिष्ठित मूर्ती म्हणूनच निर्माण करण्यात आली होती. विशेष म्हणजे अशाच प्रकारची एक खंडीत मूर्ती पिंगळी (ता.परभणी) येथे प्राप्त झाली असून तिच्या पादपीठावर नागरी भाषेतील लेख कोरला आहे. या उपलब्धीमुळे महाराष्ट्रातील त्याकाळी प्रचलीत असलेल्या पूजा पद्धतीला दुजोरा मिळतो.

## शेळगाव

**शेळगाव :** (ता. देगलूर) देगलूर तालुक्यातील शेळगाव तालुका मुख्यालयापासून २२ कि.मी. अंतरावर आहे. ते महाराष्ट्र, कर्नाटक व आंध्र प्रदेश या राज्यांच्या सरहद्दीलगत वसले असून या ठिकाणी मराठी, कानडी व तेलुगू या तिनही भाषा बोलल्या जातात.

शेळगांवमध्ये १२-१३ व्या शतकात मोठे नृसिंह मंदिर असावे. या मंदिराच्या अधिष्ठानाचा भाग शिल्लक असून गावात सर्वत्र मंदिराचे द्वारशाखा, स्तंभ मध्य, स्तंभ पाद, स्तंभ शिर्ष यासारखे घटक अवयव विखुरलेल्या स्थितीत आढळून येतात.

गावकऱ्यांना जुन्या अधिष्ठानालगत असलेल्या छोट्या टेकड्यांमध्ये दिनांक ३० सप्टेंबर १९६७ रोजी नृसिंह मूर्ती सापडली. या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा मंदिराच्या जुन्या अधिष्ठानावरच, नंतरच्या काळात बांधलेल्या शिवमंदिरालगत दुसरा एक गाभारा बांधून करण्यात आली. या गाभाऱ्यावर नव्याने एक शिखरही बांधण्यात आले. मूळ मंदिराचे अधिष्ठान हे साधारणपणे ९ × ११ मी. चे आहे. यावर उभ्या असलेल्या शिव मंदिराचा गाभारा २.६० × २.२० मी. चा आहे, तर त्याच्या दक्षिण बाजूस नृसिंह मूर्तीसाठी बांधलेले मंदिर हे प्राचीन मंदिराच्या काही घटक अवयवांचा उपयोग करून बांधल्याचे दिसून येते.

**नृसिंह मूर्ती :** मंदिरातील नृसिंह मूर्ती ०.४५ × ०.८५ × १.१५ सें.मी. उंची, रुंदी व लांबी असलेल्या अधिष्ठानावर बसविली आहे. अधिष्ठानाचा दगड हा मूळ मंदिरातीलच असावा. यावर बसविण्यात आलेली मूर्ती काळ्या पाषाणाची आहे.

हिरण्यकश्यपूची अनुपस्थिती हे या मूर्तीचे वैशिष्ट्य आहे. त्यामूळे तिला केवळ नृसिंह मूर्ती म्हटले जाते.[१७८] ती सौम्य स्वरूपाची आहे. मूर्तीस चार हात असून वरील दोन हातात शंख व चक्र

१७८. देशमुख, बी. **आयकॉनॉग्राफी ऑफ द हिंदू टेम्पल्स् इन मराठवाडा,** पब्लिकेशन स्कीम, जयपूर १९८७, पृ. ५४

धारण केलेली आहे. मूर्तीतील नृसिंह उकीडवा बसलेला आहे. असे बसताना डाव्या पायावर उजवा पाय टाकला आहे व खालील दोन्ही हातांचे तळवे समोर आलेल्या गुडघ्यांवर टेकवले आहेत. अशा प्रकारे उकीडवे बसण्याच्या स्थितीला उत्कटासन म्हणता येईल. योगपट धारणा हे या मूर्तीचे वैशिष्ट्य आहे. मूर्तीच्या मागे प्रभावळ असून प्रभावळीच्या वरील मध्यभागी किर्ती मुखाची नक्षी कोरली आहे, तर त्याखालील भागात मकर मुखाची नक्षी कोरली आहे. प्रभावळीवर दशावतार कोरले असून त्यामध्ये अनुक्रमे मत्स्य, कच्छ, वराह, नृसिंह, वामन, परशुराम, राम, बलराम , बुद्ध व कलंकी[१७९] असा क्रमआहे. मूर्तीच्या अंगावर विविध अलंकार आहेत. शिरावर मुकुट, गळ्यात साखळी, दंडात वाकी व कंबरेला मेखला आहे. मूर्तीचा प्रत्येक अवयव विशेषतः दात, दाढ, जिव्हा, आयाळ, हातांची व पायांचीबोटे हे कलात्मक पद्धतीने कोरले आहेत. मूर्तीचे कान मात्र नेहमी आढळणाऱ्या नृसिंहमूर्तीपेक्षा लांबटआहेत, हे विशेष.

मूर्तीच्या उजव्या बाजूस अंजली मुद्रेतील गरूड आहे. एकूण ही मूर्ती चालुक्य मूर्तीकलेच्या जवळची असून १३ व्या शतकातील असावी.

याशिवाय शेळगावला अनंतशायी विष्णुची प्रतिमा सापडली आहे.

## सगरोळी

**सगरोळी :** (ता. बिलोली १८° ४०′ उ., ७७° ४०′ पू.) बिलोली तालुक्यातील हे गाव चालुक्य शिलालेखांमध्ये 'सवरवल्ली' या नावाने उल्लेखिले आहे.[१८०] या गावी कल्याणी चालुक्यांचे चार शिलालेख सापडले असून त्यांचे वर्णन पुढीलप्रमाणे :—

**शिलालेख क्र. १**[१८१] **:** चार शिलालेखातील पहिला शिलालेख २५ डिसेंबर ११०० (चालुक्य विक्रम वर्ष ३५, विकृत, पुष्य शुद्ध त्रयोदशी, रविवार, उत्तरायण-संक्रांती) या दिवशीचा आहे.

**राजा व राजवंश :** सदर शिलालेख कल्याणी चालुक्य नृपती त्रिभुवनमल्ल म्हणजेच विक्रमादीत्य सहावा याच्या राजवटीतील आहे.

**उद्देश :** शिलालेखाचा उद्देश पसायित योक्कपय्य नायक याने सवरवल्ली येथील सर्वेश्वर देवाच्या पुजेसाठी दिलेले जमिनीचे दान नोंदविणे हा आहे. ही जमीन देवालयाचे आचार्य ब्रह्मर्षी पंडीत यांच्याकडे सोपविल्याचेही नमूद केले आहे. यातील पसायित योक्कपय्य विक्रमादित्य सहावा याचा मुलगा असावा.

**शिलालेख क्र. २**[१८२] **:** काळ : १९ मार्च १११३ (चालुक्य विक्रम वर्ष ३७, नंदन, फाल्गुन महिन्यातील सूर्यग्रहण).

**राजा व राजवंश :** हा शिलालेख कल्याणी चालुक्य नृपती विक्रमादित्य सहावा याच्या कालखंडातील आहे.

---

१७९. या ठिकाणी कृष्णाची प्रतिमा असणे अपेक्षित आहे. परंतु त्या ऐवजी बलरामाची प्रतिमा आहे.

१८०. भगवान काळे (संपा.) पूर्वोक्त, हरिहर ठोसर, "प्राचीन मराठवाडयाचे व्यक्तिमत्व" पृ.८२

१८१. रित्ता, शेळके, पूर्वोक्त, पृ. २२२.

१८२. कित्ता, शिलालेख क्र. १६ पृ. २२३

**उद्देश :** सुर्यग्रहणाच्या दिवशी कोण्या एका रेब्बलादेवी हीने सोमेश्वर देवाला केलेले दान नमूद करणे हा शिलालेखाचा उद्देश आहे.

**शिलालेख क्र. ३**[१८३] **:** हा शिलालेखही सन १११३ चा असून त्याची तिथी शिलालेख क्र. २ प्रमाणेच आहे. या शिलालेखाचा उद्देश या गावातील गौड आणि इतर महत्त्वाच्या व्यक्तींनी सोमेश्वर देवाला दिलेले दान नमूद करणे हा आहे.

**शिलालेख क्र. ४**[१८४] **:** १३ जुलै १११५ (चालुक्य विक्रम वर्ष ४०, मन्मथ, रविवार) या तारखेचा हा शिलालेख आहे.

**राजा व राजवंश :** वरील तीन शिलालेखांप्रमाणे विक्रमादित्य सहावा याच्याच काळातील हा लेख आहे.

**उद्देश :** बोधन ७०० या विभागातील २४ गावांच्या खंपणनामक प्रशासकीय विभागाचे मुख्य ठाणे असलेल्या सवरवल्ली या गावातील सर्वेश्वर देवालयाला दान करणे हा लेखाचा उद्देश आहे. सदर दान बल्लवरसचा अधिकारी पसायित ओक्करया याने केले आहे.

सगरोळी हे त्या काळी कालमुख शैव संप्रदायाचे पीठ होते.[१८५] त्याचप्रमाणे वरील शिलालेख क्र. ४ मध्ये उल्लेखिल्याप्रमाणे विभागाचे ते मुख्य ठाणेही होते. अशाप्रकारे एक शैक्षणिक क्रेंद्र, धार्मिक क्षेत्र व राजकीय हालचालींचे केंद्र म्हणून या गावाचे त्या काळी महत्त्व होते. सवर हे शावरी किंवा शाल्मली या वृक्षनामाचे अपभ्रष्ट रूप असून त्यापासून रेशमी कापसाचे उत्पादन होते. या वनस्पतीतून या स्थलनामाची उत्पत्ती झाली असल्यामुळे पूर्वी हा परिसर या वनस्पतीच्या वैपुल्यासाठी प्रसिद्ध असावा. या ग्रामनामाबद्दल अजून एक मतप्रवाह आहे. त्यानुसार यातील वल्ली म्हणजे वेल, सावर म्हणजे जुन्या कानडीतील सागर (अथांग पाण्याचे स्थळ), वेलीप्रमाणे वलयांकित पाण्याच्या धारांनी वेष्टीत भूभाग असा भावार्थ निघतो. इथे मांजरा नदी वलयांकित असून तिचे पात्र या ठिकाणी फारच रुंद आहे. भौगोलिक पार्श्वभूमीवर हे नामकरण योग्य ठरते.

**गावातील प्राचीन मंदिराचे अवशेष :** वर उल्लेखिलेल्या शिलालेखांमध्ये सर्वेश्वर मंदिर व सोमेश्वर मंदिर या प्राचीन मंदिराचे अवशेष व विखुरलेली शिल्पे आजही गावात आढळतात.[१८६] त्याचप्रमाणे या शिलालेखांमधून सोमेश्वर मंदिरात नंदी मंडप बांधल्याचा उल्लेख येतो. त्याचेही अवशेष आढळतात.[१८७] या अवशेषांपैकी देवालयाच्या खांबावरील शिल्पकारी अत्यंत मनोवेधक आहे.[१८८] एका मंदिराची वास्तु बाजार गल्ली म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भागात आहे. तीन बाजूंनी प्रवेशद्वार

१८३. कित्ता, शिलालेख क्र. १७, पृ. २२३-२२४

१८४. कित्ता, शिलालेख क्र. १८, पृ. २२४

१८५. काळे भगवान (संपा.), पूर्वोक्त, हरिहर ठोसर, "प्राचीन मराठवाडयाचे व्यक्तीमत्व", पृ.८२.

१८६. देव, प्रभाकर द टेम्पल ऑफ मराठवाडा, पूर्वोक्त, पृ.१३८

१८७. कित्ता.

१८८. राजन अमिताभ (संपा.), प्रभाकर देव "स्थापत्य अवशेष", पूर्वोक्त, पृ. २४.

असणारा मोठा सभामंडप (७.३० X ३.३० मी.) त्यालगत अंतराळ व गर्भगृह असे या मंदिराचे मूळ स्वरूप असावे. सभामंडप १६ खांबांवर उभा असून त्यापैकी ४ पूर्णस्तंभ व १२ अर्धस्तंभ आहेत. दोन स्तंभांवर शिलालेख आहेत. आधुनिकीकरणाच्या नावाखाली मंदिराच्या सभामंडपाचे मोठे सभागृह करण्यात आले आहे व वितानाच्या जागी आर. सी. सी. छत टाकले आहे.

**जलाशय :** या गावाला वैशिष्ट्यपूर्ण अशी भौगोलिक पार्श्वभूमी लाभली आहे. याचा उपयोग करून या स्थानाचा विकास करताना एका जलाशयाची निर्मिती करण्यात आली. साधारणपणे लंबवर्तुळाकृती अशा या जलाशयाच्या वाळूवर एका बाजूने घाट व दुसऱ्या बाजूने एका मोठया मंदिर संकुलांची निर्मिती करण्यात आली होती. सध्या हा जलाशय काळाच्या ओघात गाळाने पूर्ण भरला आहे.

**सर्वेश्वर मंदिराचे अवशेष :** येथील प्राचीन जलाशयाजवळ जिथे लिंगायत समाजाची स्मशानभूमी आहे, तिथे साधारणतः २७ X २४ मी. एवढ्या भागात एका मंदिराचे अवशेष उपलब्ध झाले आहेत. येथे एक मातीचा उंचवटा व काही मूर्तीशिल्पे होती. त्या अनुषंगाने इथे ग्रामस्थांना खोदकाम केले असता मंदिराच्या अधिष्ठानाचा भाग स्पष्ट झाला. हे कदाचित शिलालेखात उल्लेखिलेले सर्वेश्वर मंदिर असावे. स्पष्ट झालेल्या भागानुसार गर्भगृह, अंतराळ, सभामंडप अशी याची रचना असावी. येथे अनेक घटक मंदिरात विखुरलेल्या अवस्थेत आहेत. प्रमुख भाग, द्वारशाखा स्तंभ या भागात न आढळणाऱ्या काळ्या पाषाणात घडवले आहेत.

**द्वारशाखा स्तंभ :** या मंदिरास अतिभव्य प्रवेशद्वार असावे. त्याच्या द्वारशाखेचा एक भाग इथे उपलब्ध होतो. त्याचा आकार ३ X ०.६० मी. आहे. द्वारशाखेच्या खालील भागावर शिवद्वारपाल आहेत. शिव आपल्या डाव्या बाजूस बसलेल्या पार्वतीसह आहे. तो त्रिभंगात असून त्याने डाव्या हाताने पार्वतीस सावरले आहे. शिवपार्वतीच्या बाजूस सेविका व पायाजवळ नंदी आहे. एकूण ही द्वारशाखा वैशिष्ट्यपूर्ण आहे. येथे सापडलेली अन्य शिल्पे मंडोवरावरील असावी. चेहरा आरशात न्याहाळणारी श्रृंगार ललना, बालकाला जन्म देणारी रमणी, नृत्यांगना, मिथुन शिल्पे अशी नानाविध शिल्पे येथे आढळली आहेत.

**विष्णूमूर्ती :** गावातील गणेश मंदिरात ही मूर्ती असून तिने शंख, पद्म, चक्र व गदा आदि आयुधे धारण केली आहेत. पद्म धारण केलेला हात वरदमुद्रेत आहे. तिच्या खालील बाजूस गणेश शिल्प कोरले आहे. मूर्तीच्या आयुध क्रमावरून ही मूर्ती पद्मनाभाची ठरते.

येथे सापडणाऱ्या व्यालशिळा, चवरीधारिणी यासारखे शिल्पावशेष चालुक्यकालीन आहेत.

**देशमुखांची गढी**[१८९] **:** १८ व्या शतकात नावारूपाला आलेल्या घराण्यांपैकी एक घराणे देशमुखांचे होते. त्यांची गढी आजही सुस्थितीत आहे. ही गढी १२ बुरुजांची असून तिचे क्षेत्रफळ पाच एकर एवढे आहे. गढीचे मुख्य प्रवेशद्वार पूर्वाभिमुख आहे. गढीमध्ये दगडी बांधकामाची खाऱ्या पाण्याची विहिर आहे. याशिवाय तुळजाभवानीचे पूर्वाभिमुखी मंदिर आहे. ही गढीची कुलदेवता आहे. गढीच्या परकोटाची पश्चिम भिंत बरीच ढासळलेली आहे. तर दक्षिण-पूर्व तटबंदी व बुरुज चांगल्या

१८९. एकताटे, उषाताई अरविंद पूर्वोक्त, पृ. २८-२९.

अवस्थेत आहेत. आजही ही गढी जागती असून येथे नवरात्र महोत्सव होमहवनासह पारंपारिक पद्धतीने साजरा केला जातो. या गढीशिवाय गावात पांढऱ्या मातीचे १८ व्या शतकातील वाडेही पहावयास मिळतात. सगरोळी येथील शिक्षण संस्थांचा विकास व राष्ट्रीय पातळीवर या संस्थेस मिळालेली मान्यता यासाठी कै. देशमुख यांचे योगदान मोलाचे ठरते.

## सहस्त्रकुंड

**सहस्त्रकुंड :** (ता. किनवट) किनवट तालुक्यातील इस्लापूर या गावाजवळ सहस्त्रकुंड म्हणून असलेले ठिकाण नैसर्गिक धबधब्यासाठी प्रसिद्ध आहे. हा धबधबा पैनगंगा नदीवर तयार झाला आहे. हे पर्यटनदृष्ट्या महत्त्वाचे ठिकाण असून विशेषतः पावसाळ्यात सहस्त्रकुंड धबधब्याचे विलोभनीय दृष्य दिसते. इथे संक्रांतीला मोठी यात्रा भरते. या ठिकाणी एक जुने शिवमंदिर असून नुकताच त्याचा जीर्णोद्धार झाला आहे.

## हदगाव

**हदगाव :** हदगाव तालुका पैनगंगा नदीच्या खोऱ्यात वसला असून तालुका मुख्यालय नांदेडपासून ६४ कि.मी. अंतरावर आहे. शहरात एक हनुमान मंदिर आहे. हदगाव तालुक्याला मोठी ऐतिहासिक परंपरा लाभली आहे. नांदेड जिल्ह्यातील सर्वात प्राचीन लेणी या तालुक्यातील शिऊर येथे आहेत. तर तळणी येथे मंदिर व शिल्पावशेष आढळून येतात.

**दत्तबर्डी :** हदगावच्या नैऋत्येस जवळजवळ दोन कि.मी. अंतरावर दत्तबर्डी नावाची टेकडी आहे. या टेकडीवर दत्ताचे मंदिर आहे. टेकडीवरून हदगाव शहराचे व आजूबाजुच्या परिसराचे दर्शन घडते. प्राचीन काळी कोणी ऋषी इथे तपश्चर्या करत होते. त्यांना दर्शन देण्यासाठी प्रत्यक्ष दत्त महाराज इथे आल्याची आख्यायिका सांगितली जाते. मंदिर उंच अधिष्ठानावर असून दगडी आहे. गाभाऱ्यासमोर शिवलिंग आहे. मंदिरावर घुमट आहे. गाभाऱ्यात प्रमुख मूर्ती एकमुखी दत्ताची असून तीनमुखी दत्तमुर्तीही आहे. इथे महंतपरंपरा आहे. त्यांच्याकडून मंदिराचे व्यवस्थापन बघण्यात येते. या स्थानी दत्त जयंती, दसरा, गुरुपौर्णिमा, महाराजांची पुण्यतिथी हे वार्षिक कार्यक्रम होतात. दत्त जयंतीच्यावेळी सप्ताह असतो. त्यावेळी पालखी निघते. सिंहस्थामध्ये दत्तशिखर, माहूर येथील महंत येथील महंतांच्या भेटीस येतात. दत्त मंदिरापासून काही अंतरावर रेणूका माता, सती अनसुया, अन्नपूर्णा व अत्रीऋषी यांची लहान मंदिरे आहेत. आवारात गणपती व मारूती यांची देवळे अलीकडे बांधली आहेत. टेकडीच्या एका टोकाला सयामाय नावाचे स्थान आहे. सयामाय म्हणजे अनसुयेची बहीण. काही वर्षांपूर्वी या स्थानाचा जीर्णोध्दार झाला. त्यावेळी भाविकांना राहण्यासाठी भक्तनिवास व इतर अनेक बांधकामे झाली.

**संत राणप्पा मंदिर :** संत राणप्पाच्या सन्मानार्थ हे मंदिर उभे केले आहे. मंदिर जवळजवळ शंभर वर्षापूर्वीचे आहे. मंदिरात संत राणप्पाच्या पादुकांची स्थापना केली आहे. या जागेवर त्यांनी जिवंत समाधी घेतल्याचे सांगितले जाते.[१९०] मंदिराची रचना आकर्षक आहे. बाह्य भिंतीवर चित्रे आहेत.

याशिवाय गावात मसाईदेवी व अन्य देवतांची मंदिरे आहेत.

---

१९०. **नांदेड जिल्हा गॅझेटिअर**, पूर्वोक्त, पृ. २६५.

## हिमायतनगर

**हिमायतनगर :** हिमायतनगर हे तालुका मुख्यालय पैनगंगा नदीच्या खोऱ्यात पैनगंगेपासून ३ कि.मी. अंतरावर, नांदेडपासून ८० कि.मी. अंतरावर वसलेले आहे. या गावाला प्राचीन ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा लाभला आहे. हिमायतनगरचे मूळ नाव अरणावती होते. नंतर ते वाढवणे झाले. श्री क्षेत्र अरणावती तसेच लोकस्मृतीतील कणकावती हे स्थान आज श्री परमेश्वराचे हिमायतनगर म्हणून ओळखले जाते. पुरातत्त्वीयदृष्ट्या हिमायतनगर एक महत्त्वाचे स्थान आहे. मध्ययुगीन काळाच्या प्रारंभी या स्थानाचा मोठया प्रमाणावर विकास झाला. राजकीय हालचालींचे केंद्र तसेच एक व्यापारपेठ म्हणून या स्थानाला महत्त्व प्राप्त झाले. साधारणपणे बाराव्या-तेराव्या शतकात या ठिकाणी मोठे स्थापत्य कला केंद्र असावे. गावालगतच पुरातत्त्वगर्भक्षेत्र आहे. या ठिकाणी मोठया प्रमाणात विखुरलेली पांढरी माती आहे.

**कनकेश्वर जलाशय :** गावाच्या पश्चिमेस साधारणपणे एक कि.मी. अंतरावर कनकेश्वर जलाशय आहे. एका विस्तीर्ण परिसरात नैसर्गिक पाणलोट क्षेत्राच्या आधारे या जलाशयाची निर्मिती झाली. या तळ्याच्या पाळूवर मध्ययुगीन काळात विशाल मंदिर उभारण्यात आले. तर तळ्याच्या उत्तर भागाला दगडी चिऱ्याचा कट्टा व घाट बांधण्यात आला. गाळ काढून आजही हा तलाव उपयोगात येऊ शकतो. महाराष्ट्रात प्रारंभिक मध्ययुगीन काळात ज्या जलाशयांची निर्मिती तत्कालीन राजवंशांनी केली, त्यात सगरोळी, कंधार, माहूर याप्रमाणेच हिमायतनगर येथील जलाशय आहे. या जलाशयाच्या उत्तर काठावर असलेल्या टेकडीवर एक मंदिर संकुल असावे. आज येथे श्री गणेशाच्या मूर्तीची प्रतिष्ठापना केली आहे.

**बालाजी मंदिर :** गावातील प्रसिद्ध बालाजी मंदिरात १३ व्या शतकातील अनेक मूर्ती ठेवलेल्या आहेत. त्यामध्ये गणेश, कार्तिकेय, शिवपार्वती, ब्रह्मदेव, महिषासुर मर्दिनी या सारखी शिल्पे आहेत. वरील मूर्तींव्यतिरीक्त गावात मारूती मंदिराच्या परिसरात उमा-महेश्वराच्या दोन सुंदर मूर्ती आहेत. नंदीवर बसलेले हे शंकर-पार्वती आपल्या हातात मातृका लिंग धारण केलेले व परस्परांना अर्धालिंगन देणाऱ्या अवस्थेत आहेत.

बालाजी मंदिर परिसरात असलेला गणेश (५० × ३० सें.मी.) हातात एक दंत, परशु तसेच कमल व मोदक धारण केलेला असा आहे. मूषक वाहन असलेली व नाग धारण केलेली ही मूर्ती वैशिष्ट्यपूर्ण आहे. तसेच महिषासूरमर्दिनीची प्रतिमा अत्यंत आवेशपूर्ण असून तिने तिच्या एका हातात नरमुंड तर अन्य हातात टंक, पाश, त्रिशुल, खड्ग, ढाल, धनुष्य यासारखी आयुधे धारण केली आहेत.

हिमायतनगरमधील अन्य मूर्तींमध्ये, विष्णूची मूर्ती (१०० × ४५ सें.मी.), लक्ष्मीची मूर्ती (८५ × ३० सें.मी.), ब्रह्मदेवाची व कार्तिकेयाची मूर्ती (७० × ३५ सें.मी.) विशेष उल्लेखनीय आहेत. या सर्व प्रतिमा यादव काळातील आहेत. स्कंद कार्तिकेयाची मूर्ती ही करंडक मुकूटधारिणी असून सहा मुखांची आहे. मोरावर बसलेला हा कार्तिकेय हाती कमंडलू, त्रिशुल, परशु यासारखी आयुधे घेतलेला आहे. विशेष म्हणजे हा कार्तिकेय आपले दोन हात मोराच्या पुढील हातात देऊन मूल खांद्यावर बसावे त्याप्रमाणे मोरावर आरूढ झाला आहे. याशिवाय अष्टभुजा कालिका मूर्ती (१३० × ९० सें.मी.) राम मंदिरातील द्वारपाल आणि अन्नपूर्णेची मूर्ती (४० × ३० सें.मी.) आढळतात. सीता म्हणून ओळखली जाणारी ही मूर्ती अन्नपूर्णेची असून ती अर्धपर्यांकसनात बसलेली व हाती पळी धारण केलेली आहे.

**परमेश्वर मंदिर :** गावाबाहेर परमेश्वर मंदिर म्हणून ओळखले जाणारे एक मंदिर आहे. या मंदिरालगत एका मध्ययुगीन मंदिराचे अधिष्ठान होते. आजही या मंदिराचे अवशेष आढळतात. याच काळातील एक विहीरही इथे आहे. सध्याचे परमेश्वर मंदिर हे उत्तरमध्ययुगीन काळातील म्हणजे १७ व्या शतकातील आहे. मंदिरातील मुख्य मूर्ती अकराव्या शतकातील केवळ शिवाची असून ती आज परमेश्वर म्हणून ओळखली जाते.[१९१]

**परमेश्वर मूर्तीचे वर्णन :** ही परमेश्वर मूर्ती केवळ शिवाची (१३५ × ३५ सें.मी.) अप्रतिम मूर्ती आहे. ब्रह्म, विष्णू यापेक्षा शिव श्रेष्ठ आहे अशा आशयाचे कथानक पौराणिक साहित्यात आढळते. असाच एक प्रसंग वेरूळच्या कैलास लेणीतही कोरला आहे. या कथानकाला समोर ठेवून बनवलेली ही मूर्ती चतुर्हस्त आहे. उजवीकडील खालचा हात वरदहस्त असून त्यात अक्षमाला आहे. तर वरच्या हातात त्रिशुळ धरले असून त्याला सर्पांनी वेटोळे घातले आहे. डावीकडील वरच्या हातात तीन फण्याचा नाग व खालच्या हातात मातृलिंग किंवा बिजपूरक फल धारण केले आहे. मुर्तीला प्रभावळ असून पायाजवळ स्कंध आणि नंदी दाखविले आहेत. काळ्या पाषाणात घडविलेली जटा-मुकुट धारण केलेली सालंकृत अशी ही शिवमूर्ती खरोखरच अप्रतिम आहे.

**मंदिरातील अन्य शिल्प :** परमेश्वर मंदिरात ज्या अन्य मूर्ती आहेत. त्यामध्ये परमेश्वराची म्हणजेच शंकराची चार हातांची पितळी मूर्ती आहे. तिचा आकार २५ × १५ × १० सें.मी.आहे. याशिवाय पार्वतीची पंचधातूची १८ व्या शतकातील १८ × १५ × १० सें.मी. आकाराची मूर्ती आहे. याच परिसरात यादवकालीन मोठी शिवपिंडी ठेवली आहे. याशिवाय सिंहवाहिनी पार्वतीची अर्धपर्यांकसनात बसलेली सालंकृत मूर्ती (७५ × २० × ५ सें.मी.) आहे. ही मूर्ती शंख, परशू, त्रिशुल व मातुलिंग धारण केलेली आहे. त्याचप्रमाणे विशेष उल्लेखनीय अशी शेषशायी विष्णुची मूर्ती (१९ × ४५ × २० सें.मी.) आहे. याबरोबरच मंदिरात भैरवाची प्रतिमा आहे. परंतु स्वतंत्र शिल्प नसून यादवकालीन मंदिराच्या मंडोवरावरील शिलाखंडावर कोरलेली प्रतिमा आहे. या भैरव मूर्तीच्या हातात कट्यार, डमरू व खट्वांग असून एक हात काहीसा झिजला आहे, तो वरदहस्त असावा. भैरवाची ही मूर्ती सर्पकुंडले घातलेली, मुंडामाला धारण केलेली व घंटांची मेखला असणारी आहे. खाली मनुष्य व वाहन म्हणून कुत्रा दाखविला आहे.

**लकडोबा मंदिर :** हिमायतनगरमध्ये ग्रामपंचायत कार्यालयाजवळ लकडोबा मंदिर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मंदिरात वामनाची मूर्ती आहे. दशावतारांपैकी वामनावतारामध्ये विष्णुने बळीराजाकडून तीन पाऊल एवढी भूमी दान म्हणून घेऊन बळीराजाला पाताळाचे राज्य दिले अशी पौराणिक कथा आहे. येथे वामनाची मूर्ती बळीराजाच्या डोक्यावर पाय देऊन उभी आहे. आज या मूर्तीला शेंदूर लावले आहे. याशिवाय या ठिकाणी सुर्यदेवाचे पिंगलेसह शिल्प आहे.

---

१९१. या जिल्ह्यात परमेश्वराची म्हणून ओळखली जाणारी तीन स्थाने आहेत. ती पुढील प्रमाणे-हिमायतनगर (मूळ मूर्ती शिवाची), धनज (मूळ मूर्ती शिवाची), शिरढोण (मूळ मूर्ती ब्रह्मदेवाची). हिमायतनगर येथील मूर्ती सारखीच आणखी एक मूर्ती नांदेडला कुंभार टेकडीवर आहे. नागपूर येथील मध्यवर्ती संग्रहालयात (मूळची पद्मपूर येथील जि.भंडारा) अशीच एक मूर्ती ठेवण्यात आली आहे.

Maharashtra State Gazetteers

गावातील विठ्ठलमंदिर गल्लीत तुकाई देवी म्हणून ओळखली जाणारी मूर्ती आहे. ही मूळ विष्णूची प्रतिमा आहे. मुख वराहाचे असून चार हाताची ही मूर्ती अनुक्रमे वरदहस्त असलेली, शंख, चक्र व गदा धारण केलेली आहे. मुर्तीच्या एका बाजूला नमस्कार मुद्रेत एक स्त्री म्हणजे पृथ्वी व दुसऱ्या बाजूला भक्त दाखविला आहे. तिच्या दोन्ही बाजूला तीन-तीन घटांची उतरंड दाखविली आहे. तिच्या चार हातांपैकी वरील दोन हातांत त्रिशुल व पाश आहेत.

या शिवाय गावात विठ्ठल मंदिर, राम मंदिर, गणेश मंदिर, मारूती मंदिर व जैन मंदिर इत्यादी मंदिरे आहेत.

## हिरड जुन्नी

**हिरड जुन्नी :** (ता. बिलोली) तालुका बिलोलीलीतीच हिरड जुन्ने किंवा जुन्नी हे गाव तालुका मुख्यालयापासून २२ कि.मी. अंतरावर धर्माबाद-भोकर रस्त्यावर आहे. प्राचीन काळी हे गाव जुनवणी या नावाने ओळखले जात असल्याचे शिलालेखातील पुराव्यांतून आढळते.

जगदेकमल्ल दुसरा या कल्याणीच्या चालुक्य नृपतीच्या शिलालेखात या गावाचे नाव जन्नवलीगे असल्याचे दिसते तर रट्ट बल्लाळच्या यादवकालीन शिलालेखात या गावाचा उल्लेख जुनवणी विषय असा आढळतो.[१९२] जुन्नी येथे १२ व्या शतकातील कलचुरी राजाचा शिलालेख आढळला असून एका खांबाच्या तीन बाजूंवर तो कोरला आहे. राजाचे नाव स्पष्ट दिसत नसले तरी काळांजर-पुरवराधिश्वर आणि सुवर्णवृषभध्वज या त्याच्या दोन उपाधींवरून हा लेख कलचुरी वंशीय राजाचा आहे असे सिद्ध होते. या लेखात विविध व्यक्तींना आणि देवाच्या पुजेसाठी दान दिलेल्या जमिनींचा उल्लेख आढळतो. रित्ती व शेळके यांच्या मते दान दिलेल्या जमिनी बहुधा जुन्नवलीगे (आजचे जुन्नी) मधीलच असाव्या.[१९३]

वर उल्लेखिलेल्या रट्टबल्लाळाच्या अर्धापूर शिलालेखात (इ.स. ११९२) या गावाचा उल्लेख जुनवणी विषय असा आढळतो. या शिलालेखात मल्लिकार्जुन व सिध्देश्वर या देवांना द्यावयाची जमिनीची व रोखीची दाने यांचा तपशील दिला आहे. त्यानुसार जुनवणी विषयातील प्रत्येक गावातून १/४ निष्क कराच्या स्वरूपात गोळा करावा व वरील देवांना दान करावा असा उल्लेख आहे.[१९४] यावरून त्या काळी जुन्नी हे विभागाचे मुख्यालय असल्याची माहिती मिळते.[१९५]

या शिवाय कलचुरी नृपतीच्या शिलालेखात जुन्नी येथील विविध देवालयांची नावे व पंडितांची माहिती आढळते. यावरून चालुक्य-यादव काळात हे एक धार्मिक क्षेत्र आणि विद्वानांचे आगर होते, असे दिसते.

जून्न किंवा जूर्ण हा या स्थलनामातील मुख्य शब्द असून ते सर्पाच्या जातीचे एक नाव आहे.[१९६]

---

१९२. रित्ती श्रीनिवास व शेळके, जी. सी. पूर्वोक्त, पृ. २३६.

१९३. ठोसर, हरिहर पूर्वोक्त, पृ. २३२.

१९४. कित्ता, पृ. २३७.

१९५. काळे भगवान (संपा.), पूर्वोक्त, "प्राचीन मराठवाड्याचे व्यक्तिमत्व," पृ. ७२.

१९६. कित्ता.

मध्ययुगात विकासाच्या सर्वोच्च स्थानावर पोहोचलेल्या या नगराचा विकास प्राचीन काळापासून होत होता. नगररचनेच्या अभ्यासामध्ये विशेष महत्त्वाचे असलेले हे प्राचीन नगर जवळपास एक कि.मी. उत्तर दक्षिण विस्तारलेले आहे.

आजही संपूर्ण गावात जुन्या वैभवाची साक्ष देणारे वास्तु अवशेष व मूर्तीशिल्पे विखुरलेली आहेत. त्यांचे वर्णन पुढे दिलेले आहे.

**मंडप :** गावामध्ये प्रवेश करताना प्रारंभिच एका शेतात चार स्तंभावर उभारलेली वास्तु आहे. एका शेतात असणारा हा लहानसा मंडप १३ व्या शतकातील आहे. एके काळच्या मोठ्या नगराचा हा मंडप पोलीस चौकी (चेक पोस्ट) असावा. आज ही वास्तु काहीशी निखळलेल्या अवस्थेत आहे.

**मंदिर समूह :** आज ज्या ठिकाणी गावाची वसाहत आहे त्या ठिकाणी एका लगत एक अशा दोन मंदिर समुहांचे अवशेष आहेत. त्यातील एक महादेवाचे मंदिर असून एका उंच अधिष्ठानावर ते पूर्वाभिमूख उभे आहे. १३ व्या शतकातील हे मंदिर येथे उभारण्यात आलेल्या अन्य मंदिरांच्या तुलनेत साधे वाटते. या मंदिराचा सभामंडप सर्व बाजूंनी १ मी. उंचीचे पारट बांधून खुला ठेवला आहे. या मंदिराच्या जवळच दुसऱ्या एका शेतात एक मीटर उंचीच्या अधिष्ठानावर उभारलेले शिवमंदिर आहे. आज हे मंदिर पूर्णपणे पडलेले असून फक्त गाभारा उभा आहे. मंदिरावरील अप्रतिम शिल्प वैभव गावात विखुरले गेले आहे. त्यामध्ये मिथुन शिल्पे, सप्तमातृकापट व इतर शिल्पपट आहेत. संपूर्ण मंदिर जागेवरच कोसळले आहे. कदाचित भूकंपासारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे असे घडले असावे.

या मंदिरातील स्तंभ वैशिष्ट्यपूर्ण असल्यामुळे त्यांचा वेगळा विचार करणे आवश्यक आहे. येथील स्तंभ कीचकयुक्त आहेत. उदाहरण म्हणून येथील एका वैशिष्ट्यपर्ण स्तंभाचे तपशीलवार वर्णन दिले आहे. या स्तंभात स्तंभशिर्षानंतर स्तंभमध्य शिळेवर वरील बाजूने वेटोळा आकार देऊन लंबवर्तुळाकारात अष्टकोनी पट्टे कोरले आहेत. यानंतर शस्त्रधारी अश्वारूढ योध्दे यांचा एक पट कोरलेला आहे. त्यानंतर भौमितिक नक्षी काढून पुन्हा स्वतंत्र असा वाद्यवृंद दर्शविला आहे. यामध्ये डमरू, मृदंग, चिपळ्या हाती घेऊन आपल्याच नादात असलेल्या स्त्री, पुरूषांची रांग दाखविली आहे. त्याही खाली पुन्हा एक भौमितिक नक्षी कोरलेली असून त्यानंतरच्या चौरसाकार स्तंभावर देव दानवांचा समर प्रसंग व समुद्रमंथन यासारखे दृश्य कोरलेले आहे. एकूण एकाच स्तंभमध्यावर चार मुख्य भाग करावेत त्याप्रमाणे शिल्प काम करून भौमितिक नक्षीच्या पट्टयाने ते विभाजीत केले आहेत. खालून वर देव दानवांचा समरप्रसंग, वाद्यवृंद आणि युद्ध प्रसंग दर्शविल्यावर वेटोळ्या आकाराचा स्तंभ कोरलेला आहे. या पद्धतीचे स्तंभ क्वचितच आढळतात. स्तंभपादावर कीर्तिमुखासह प्रभावळ दाखवून त्यात विणावादक सरस्वतीदेवी ललितासनात बसलेली दाखविली आहे.

**शिवमंदिर :** गावातील शेतात अजून एक चालुक्य कालखंडातील पूर्वाभिमुख शिवमंदिर आहे. गर्भगृह (२ × २ मी.), अंतराळ (२.१० × १.५० मी.) व सभामंडप (५.२० × ५.२० मी.) अशी त्याची रचना आहे. १६ स्तंभांच्यावर उभा असलेला सभामंडप वितानासह आहे. स्तंभांच्या वर

असलेल्या नक्षीमध्ये भौमितिक नक्षी व विष्णुचे विविध अवतार शिल्पांकीत केले आहेत. हिरण्यकश्यपूचे पोट फाडणारा नरसिंह, केशव रूपातील विष्णू, गजेंद्र मोक्ष करणारा विष्णू, पृथ्वीचा तोल सांभाळणारा वराह, बळीराजा, नृत्यरत गणेश यासारखी दृश्ये दाखविली आहेत. स्तंभांच्या तरंग हस्तासाठी कीचकांचा उपयोग केला आहे. मंदिराचा सभामंडप साधारणपणे १ मी. उंच घेवून येथे पारट बांधून त्यावर ठेंगण्या स्तंभाची उभारणी केली आहे.

या मंदिराच्या लगत दुसरे एक मंदिर असून ते विष्णू मंदिर आहे. मूळात पूर्ण विकसित असलेल्या या मंदिराचा सध्या फक्त गाभारा शिल्लक आहे. येथे शेषशायी विष्णुची (११० × ८० × १० सें.मी.) आकाराची मूर्ती आहे. मुर्तीच्या पायाशी लक्ष्मी बसली असून नाभीतून कमल आलेले आहे व त्यावर ब्रह्मदेव बसलेला आहे. तो तीन मुखांचा व चार हातांचा आहे. मूर्तीच्या प्रभावळीवर वाद्यवृंद व परिवार देवता दाखविल्या आहेत. ही मूर्ती शिल्पकलेचा एक उत्कृष्ठ नमुना आहे.

**बारव :** याच मंदिर परिसरात एक (२२ × ८ चौ. मी.) बारव असून मंदिराच्या बाजूने आत उतरण्यासाठी पायऱ्या आहेत व अन्य भागात मोटेची व्यवस्था आहे. ही बारव काहीशा दुरूस्तीनंतर पुन्हा उपयोगात येऊ शकते.

या परिसरात काही अंतरावर एका त्रिदल शिव मंदिराचे भग्नावशेष दृष्टीस पडतात. तारकाकृती विधान असलेले हे मंदिर उंच अधिष्ठानावर उभे असून त्याचा प्रदक्षिणा पथ उपलब्ध आहे. मंदिराच्या सभामंडपाचा भाग केवळ उभा असून अन्य भाग निखळलेला आहे. वितान मध्य शिळेवर पद्मपत्राची नक्षी आहे. येथे असलेल्या द्विशाखीय प्रवेशद्वारावर शैव द्वारपाल आहेत तर ललाटी गणेश आहे.

या शिवाय अन्य एका शेतात जैन मंदिराचे अवेशष सापडतात. अवशेषांवरून हे जैन मंदिर भव्य असावे याची खात्री पटते. अन्य अवशेषांबरोबर या ठिकाणी पार्श्वनाथाची विशालकाय (१७५ × ६० × ४० सें.मी.) मूर्ती आहे. त्यांच्या पाठीमागे सात फण्यांचा नाग असून मूर्ती कुंतल केश, विशाल कर्ण व अजानु बाहू आहे. अन्य एक पार्श्वनाथाची मूर्ती गावातच दुसरीकडे सापडलीआहे.

गावाबाहेर दक्षिणेकडे घोडाळीचे टेकडे म्हणून प्रसिद्ध स्थान आहे. या ठिकाणी एका मंदिराचे खंडीत अवशेष व विरगळ शिल्प आहे. याशिवाय गावठाणालगत एका उंच अधिष्ठानावर उभारण्यात आलेले त्रिदल पद्धतीचे शिवमंदिर अवशेष रुपात आहे.

याशिवाय एका शेतात अन्य एका मंदिराचे अवशेष आहेत शिवाय पोतराजाची विहीर परिसरातही मंदिर अवशेष सापडलेले आहेत.

एकूण या गावात किमान ९ मंदिरांची उभारणी ११ व्या ते १३ व्या शतकात झाली असावी. चालुक्य कलचुरी आणि यादव राजवंशांनी या नगराचा जाणीवपूर्वक विकास केला असावा असे गावाच्या रचनेवरून वाटते. येथील मुख्य मंदिर समूह साधारणपणे १०० × ६६ चौ. मी. एवढ्या क्षेत्रात विकसित झाला तर लगतच्या परिसरात जैन मंदिराची उभारणी झाली. एकूणच मध्ययुगीन काळात जुन्नी हे भरभराटीचे केंद्र होते, याची खात्री पटते.

Maharashtra State Gazetteers

## होट्टल*

**होट्टल :** (ता. देगलूर, १८° २५′ उ., ७७° ३०′ पू) नांदेड जिल्ह्यातील प्रेक्षणीय स्थळांची भटकंती करतांना अगदी प्राचीनतम् शिऊरच्या लेणींपासून ते मध्ययुगीन गुरुद्वारापर्यंत अप्रतिम ठिकाणे पाहता येतात. यातल्या काही अवशेषांचे स्वरूप उद्ध्वस्त मंदिरांचे, पडक्या इमारतीचे आहे तर काहींचे स्वरूप मध्ययुगीन, आधुनिक बांधकामाचे आहे. अनेक धार्मिक स्थळेही आज प्रेक्षणीय बनली आहेत. प्राचीन आणि मध्ययुगीन शिल्प स्थापत्य परंपरेत मात्र प्रत्येक धार्मिक क्षेत्र हे प्रेक्षणीय शिल्प स्थापत्य अविष्कार घडविणारे कलाकेंद्रच होते. अंजिठा, वेरूळ, कार्ले, भाजा, घारापुरी, औरंगाबाद, नाशिकच्या लेणी असोत किंवा औंढा नागनाथ, अन्वा, धर्मापूरी, खिद्रापूर, निलंगा, उमरगा येथील देवळे असोत, धर्म अभिव्याप्ती बरोबरच तिथे प्रचंड कलाशक्तीचे दर्शन घडते. धार्मिक क्षेत्र म्हणून त्यांचे महत्त्व आज शिल्लक उरले नसले, तरी अप्रतिम कला अविष्कार घडविणारे प्रेक्षणीय स्थळ म्हणून आज महाराष्ट्रातील ही ठिकाणे जगप्रसिद्ध आहेत. महाराष्ट्रातील काही प्राचीन मंदिरे धर्मक्षेत्र म्हणून ख्यातकिर्त नाहीत किंबहूना तिथला धर्म संपलेला आहे आणि उरले आहेत ते उद्ध्वस्त अवशेष. अशाच उद्ध्वस्त पण तरीही प्रेक्षणीय स्थळांमध्ये अप्रतिम कलाकेंद्र व ऐतिहासिक प्रेक्षणीय स्थळ म्हणून आवर्जून पहावीत अशी आहेत होट्टलची मंदिरे.

होट्टलचे महत्त्व : होट्टलचे प्राचीन नाव पोट्टलकेरे किंवा पोट्टल आहे. संस्कृतमध्ये पोट्टल म्हणजे डोंगर. हे स्थान उंच पठारावर वसले आहे. या भौगोलिक वैशिष्ट्यांमुळे या स्थानाला पोट्टल हे नाव मिळाले असावे. केरे या कानडी शब्दाचा अर्थ जलाशय. येथे एक जलाशय (मोठी पुष्करणी) आहे. सोनवडे व धर्मापूरी लेखांमध्ये हा उल्लेख पोट्टलकेरे असा आहे. शिलालेखांमध्ये होट्टल येथील रेब्बेश्वर मंदिराचा उल्लेख आढळतो. हे मंदिर होट्टल येथे निवास करणाऱ्या रेब्बेय नावाच्या कल्याणी चालुक्यांच्या एका अधिकाऱ्याने बांधले असावे. होट्टलमध्ये कल्याणी चालुक्यांचे एकूण तीन शिलालेख आढळले आहेत. त्यात होट्टलचा उल्लेख पोट्टल असा मिळतो. यापैकी एका लेखात येथील सिद्धेश्वर मंदिर कोणी एका सिद्धुगीने बांधले असल्याचे म्हटले आहे. हा सिद्धुगी करडीकल्लु (करडखेड) येथील अर्ग या वन्ही प्रमुखाचा मित्र होता व त्याचे वास्तव्य होट्टलमध्ये होते असा उल्लेख सापडतो. या महत्त्वाच्या व्यक्तींचे उल्लेख होट्टल हे कल्याणी चालुक्य काळात एक भरभराटीला आलेले महत्त्वाचे शहर असल्याचे दर्शवितात. कल्याणी चालुक्यांच्या कर्नाटकात आढळणाऱ्या लेखांमध्ये होट्टलचा उल्लेख जयसिंह दुसरा याची काही काळासाठी राजधानी (नेलवडु) असा आढळतो. याच शासकाच्या संदर्भात बसवपुराणात होट्टलचा संदर्भ होट्टलकेरे असा येतो. कर्नाटकातील रायचूर जिल्ह्यात सापडलेल्या इ.स. १०२९ व १०३१ मधील लेखांमध्ये जयसिंह दुसरा याच्या दोन राण्या, सोमलदेवी व बिज्जलदेवी यांचे होट्टलमध्ये वास्तव्य असल्याचा उल्लेख आढळतो. होट्टल ही कल्याणी चालुक्यांची उपराजधानी राहिली.

---

*. होट्टलचे लेखन डॉ. प्रभाकर देव, निवृत्त विभाग प्रमुख, इतिहास विभाग, यशवंत महाविद्यालय, नांदेड व स्वीकृत सदस्य, दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन यांनी केले आहे.

कल्याणी चालुक्य पूर्व काळातही होट्टल हे महत्त्वाचे केंद्र होते असे हरिहर ठोसर व के. व्ही. रमेश यांनी सिद्ध केले आहे. के. व्ही. रमेश यांनी बदामी चालुक्य विजयादित्य याच्या लेखात उल्लेख असलेले पोट्टलीकंगर नावाचे शहर होट्टल हेच असावे असे प्रतिपादन केले आहे.

कल्याणी चालुक्य नृपती सोमेश्वर दुसरा व विक्रमादित्य सहावा यांच्यात सत्तेसाठी झालेल्या संघर्षात सोमेश्वर दुसरा याने होट्टल इथे आश्रम घेतला होता. सोमेश्वर चौथा या चालुक्य नृपतीनेही काही काळ होट्टल येथे आश्रय घेतला होता व येथूनच पुन्हा सत्ता मिळविण्यासाठी त्याचे मोर्चेबांधणी केली. बदामी चालुक्य ते कल्याणी चालुक्य पर्यंत जवळपास ४५० वर्षे होट्टल हे शहर महत्त्वाचे असल्याचे स्पष्ट होते.

होट्टल हे देगलूर तालुक्यातील प्रत्यक्ष देगलूर पासून १२ कि.मी. अंतरावर असलेले आजचे लहानसे गाव. तसे देशमुखी गढी असलेली तालेदार वस्ती. प्राचीन कालखंडातील म्हणजे आज पासून हजार-बाराशे वर्षांपूर्वी चालुक्य नृपतींची चहलपहल असलेली पोट्टलनगरी. या पोट्टलनगरीत इ.स. १०७०, ११०३ आणि ११२० या ५० वर्षातले तीन शिलालेख आहेत. इथल्या मंदिरांना दिलेल्या दानाची नोंद या शिलालेखात आहे. याचा सरळ अर्थ असा की, इ.स. १०७० पूर्वीच ही देवळे बांधली गेली. आजपासून बाराशे वर्षांपूर्वीचे नांदेड परिसरातील शिल्पकारांचे कलासामर्थ्य या होट्टल मधील अवशेषांनी जोपासले आहे. होट्टल मध्ये पहावयाची ती देवळे कुठल्या देवाच्या दर्शनासाठी नाही तर दगडातून देव साकारणाऱ्या माणसाच्या कलासामर्थ्याची ओळख करून घेण्यासाठी.

धर्मभक्तीने भारावून श्रद्धेने तुम्ही होट्टलच्या मंदिरात दर्शनासाठी आलात तर कदाचित भ्रमनिरास होईल. देव भेटणार नाही पण देवतामुर्तीत सामावलेला माणूस दिसेल. त्याचे अभिव्यक्ती सामर्थ्य जाणवेल. काळ्या पाषाणातून शिल्पकाराने निर्मिलेली कलासृष्टी तुमच्या समोर उभी असेल. मूर्ती अविष्कारातले सौंदर्य, तालबद्धता, लयबद्धता, सुबकता, गतीमानता समजून घेण्याचे औदार्य मात्र तुमच्या जवळ हवे.

ऐतिहासिक पर्यटनस्थळ म्हणून जेव्हा आपण एखाद्या प्रेक्षणीय स्थळी येतो तेव्हा भूतकाळात दडलेला इतिहास आपल्यासमोर उलगडला जातो. त्या भूतकाळाशी संवाद साधण्याची मानसिक तयारी मात्र हवी. हजार-बाराशे वर्षांपूर्वीचा कालखंड आपल्या नजरेसमोर उभा करता आला पाहिजे. होट्टल परिसरात त्याकाळात चालुक्य नृपतींचे राज्य होते. महामंडलेश्वर, महापट्टनायक, या सारखे अधिकारी होते. पाटीलकी, देशमुखी अजून जन्माला आलेली नव्हती. मराठी साम्राज्यातली आणि मुस्लीम सल्तनतीतील वतनदारीही नव्हती. बलुतेदारी नव्हती. तेव्हा कल्याणी ही चालुक्यांची राजधानी होती. चालुक्याच्या राज्याला बळकटी देणारे एक घराणे वन्हीकुल या पोट्टलनगरीत होते. तसे वजनदार घराणे. राजदरबारात मानसन्मान असलेले. शिल्प, स्थापत्य, चित्र, नृत्य, नाट्य, संगीत कलांना आणि ज्ञानसाधनेला आश्रय देणारे सारे वातावरण त्या काळात नांदेड परिसरातही होते. मंदिर हे फक्त धर्मभक्तीचे केंद्र नव्हते तर ते कलासाधनेचे व्यासपीठ होते. इथेच नाटके सादर व्हायची. नृत्यविष्कार घडायचा. येथील नर्तिकांच्या पुढील काळात देवदासी झाल्या व त्यापुढच्या काळात देवदासी प्रथेने आणखी विकृत स्वरूप धारण केले. हे सारे घडण्या अगोदरच्या कालखंडात डोकावता आले पाहिजे.

त्याकाळात स्वच्छंदपणे कला अविष्कार घडत होता. कला निर्मिती हे गुलामाकडून करून घेतलेले काम नव्हते. सक्तीचा रामराम नव्हता. कलाकारांचे, शिल्पकारांचे जथ्थे श्रेणींच्या स्वरुपात स्वांत सुखाय कलानिर्मिती करीत होते. त्या कला अविष्काराला दाद देणारे लोकही होते. ते उदारपणे देणगी देत. देणगीच्या अभिलाषेने हे घडत नसे तर देणगी ही कला अभिव्यक्तीची प्रतिक्रीया असे. शिल्पाविष्कार हा शिल्पकारांचा धर्म होता. शिल्पकार त्याच्या कलानिर्मितीतून अजरामर होई. त्याच्या ठायी व्यष्ठीचा विचार नव्हताच तर तो एकूण समष्ठीत सामावलेला असे. शिल्पाविष्कारातून त्याचे नाव होई आणि असाच शिल्पाविष्कार करण्याचे आव्हान सतत पुढे येई.

इतिहासात लुप्त झालेला हा अनामिक शिल्पकार इथे होट्टलच्या शिल्पाविष्कारातून पर्यटकांना खुणावतो आहे. त्या कलाकाराशी त्याच्या कलामाध्यमातून संवाद साधण्याची इथे संधी आहे. इथे पहावयाचा तो देव नाही, घ्यायचे ते देवाचे दर्शन नाही, मागावयाचा तो नवस नाही आणि वहावयाचे ते हळदकुंकू, फुले नाहीत तर इथे पहावयाचे ते अप्रतिम कलासृष्टी निर्माण करणाऱ्या कलाकाराला, दाद द्यायची त्याच्या कलाअभिव्यक्तिला आणि नवस करायचा तो या अनामिकांचा कलावारसा जोपासण्याचा.

होट्टल गावाच्या सुरुवातीला सिद्धेश्वराचे मंदिर आहे. येथील शिलालेखात नोंदविल्याप्रमाणे याचा काळ इ.स. १०७० आहे. तीन बाजुंनी मुखमंडप असलेल्या प्रचंड सभामंडपाच्या मधोमध रंगशीळा आहे. रंगशिळेवर आज नंदी आहे. पण ऐकेकाळी इथेच नृत्य आणि संगीताची उपासना व्हायची. चौरस सभामंडपात ही रंगशिळा त्या चौकोनाच्या मधोमध एक अप्रतिम वर्तुळ कोरलेले आहे. निवांत इथे उभे राहिलात हजारो वर्षांपूर्वीचे संगीताचे स्वर कानी पडतील. तेवढे संवेदनाशील मन मात्र हवे. रंगशिळेच्या चौकोनात अप्रतिम कोरीव काम असलेले चार खांब आहेत. हे खांब चालुक्य कलाशैलीची सगळी वैशिष्ट्ये बाळगून आहेत.

एकूणच या मंदिरातील खांब लक्षपूर्वक पाहण्यासारखे आहेत. कोरीव कामाचा बारकावा, सुक्ष्म अशी कलाकुसर, दगडावरील प्रत्येक घाव किती हळुवार असेल याची कल्पना देतो. शिल्पकाराची कलात्मकता पावलोपावली दिसते. स्तंभशिर्षावरील छत तोलून धरणारे यक्ष, त्यांच्या एकूण अवतारावरून लक्ष वेधून घेतात. किचक स्वरूपातील या ढेरपोट्या मूर्ती गमतीदार वाटतात. स्तंभशिर्षावरून लक्ष छताकडे जाते. छतावरील रचना विशिष्ट अशी भौमितिक कलात्मकता सुचविणारा अविष्कार आहे. प्रचंड अशा शिळांवरही अप्रतिम कोरीव काम आहे. प्रचंड आकारातील कमळ असलेली छताची झीज उद्ध्वस्त अवशेषांमध्ये लक्ष वेधून घेते. सभामंडपाच्या बाहेरच्या बाजुला विस्तारलेला जो सज्जा आहे त्याच्यावरील कोरीव काम लक्षणीय आहे. स्थापत्य अविष्कारासाठी अगदी प्राचीन काळी देखील लाकूड वापरले जायचे. त्यानंतर दगडाचा वापर सुरू झाला. दगडावरील कोरीव काम करणाऱ्या शिल्पकाराच्या स्मृतीतही लाकूड काम आणि त्यातील वैशिष्ट्यपूर्ण खुबी जीवंत होत्या. त्या लाकूड कामाचा आभास निर्माण करणारे शिल्पकाम होट्टलच्या कलाकारांनी इथल्या देवळातल्या सज्ज्यांच्या छतावर केले आहे. लाकडी कामाचा हा दगडी अविष्कार येथील शिल्पकाराचे कलासामर्थ्य दाखवून जातो.

मंदिराच्या सभामंडपात एकूण १८ खांब आहेत. खांबाच्या मधल्या चौकोनी भागात निरनिराळे पौराणिक प्रसंग कोरण्यात आले आहेत. हे प्रसंग कुठे कालीया मर्दनाचे आहेत तर कुठे रासक्रीडेचे

आहेत. हे प्रसंग हुबेहुब उभे करण्याचे सामर्थ्य लक्षणीय आहे. लहान आकारातील गतीमान शिल्पांवरून शिल्पकाराचे सामर्थ्य दिसून येते. सभामंडपातून गाभाऱ्याकडे जाताना अंतराळ आहे. अंतराळाच्या दोन्ही बाजुच्या भिंतींमध्ये दोन देवकोष्ठे आहेत. अंतराळाच्या प्रवेशाशी असलेले अप्रतिम कोरीव असे स्तंभ आणि दगडी जाळी पाहात राहावी अशी आहे. वरच्या बाजूस असलेले शिल्पकाम, व्यालशिल्प आणि कीर्तीमुखाचे अविष्करण आपल्याला खिळवून ठेवते.

गर्भगृहात प्रचंड अशी महादेवाची पिंडी असावी. चार कोपऱ्यात अर्धस्तंभ आहेत. गर्भगृहाच्या छतावर कोरीव काम आहे. गर्भगृहाचे प्रवेशद्वार प्रेक्षणीय आहे. द्वारपट्टयावरील बारीक कोरीव काम लक्षणीय आहे. गाभाऱ्याच्या प्रवेशद्वाराच्या द्वारपट्टीवरील गजलक्ष्मीचे शिल्प मोहक आहे. द्वारपट्टीवरील कलाकुसर आणि उंबरठ्यावरील किर्तीमुख चालुक्य कलाशैलीचा प्रभाव दर्शवितात.

प्राचीन मंदिरे पहावयाची म्हणजे मंदिरांच्या बाह्य भिंतीवरील शिल्पाविष्कार अनुभवायचा. भारतीय परंपरेतल्या निरनिराळ्या देवतांच्या पौराणिक कथांनी, किर्तनकारांना आणि प्रवचनकारांना जसे मोहीत केले तसेच प्राचीन शिल्पकारांना आणि मुर्तीकारानांही त्यांनी मोहिनी घातली होती. निरनिराळ्या देवतामुर्तींबरोबरच अप्सरा, मेनकारुप धारण करणाऱ्या नृत्यांगनांचे आणि नृत्यगणेशाचे मोहक शिल्पही इथे आहे.

बाह्यभिंतीवरील देवदेवता, नृत्यांगना, सामान्य नर नारी, गण या स्वरुपात पाषाणातून सृष्टी साकारणारा हा अनामिक शिल्पकार ब्रह्मदेवाच्या सामर्थ्याची अनुभूती देतो. दगडामध्ये प्राण ओतणारा शिल्पकार हा खरा इथला सृष्टी निर्माता आहे. त्याचे सामर्थ्य इथे अनुभवायचे आहे. त्या सामर्थ्यापुढे इथे नतमस्तक व्हायचे आहे. बाह्यभिंतीवरील देवदेवतांची पूजा मांडायची नाही. त्याला हळदकुंकू वहायाचे नाही. तशी पूजा मांडायची असते ती गाभाऱ्यातल्या उपास्य देवाची. इथे बाह्यभिंतीवरील पाषाणातून साकारलेला परमात्मा, सामान्य माणसाच्या कलासामर्थ्याची अनुभूती देतो. पूजा बांधायची असेल तर त्या अनामिक शिल्पकाराच्या चरणी पूजा बांधायची. इथे निखळ आनंद उपभोगायचा तो दगडातल्या जीवंतपणाचा. तालबद्धतेचा, चेहऱ्यावर दिसणाऱ्या भावभावनांचा आणि पाषाणातल्या हळुवारपणाचा.

सृष्टी निर्मात्या, जगनियंत्या ईश्वराच्या सामर्थ्या एवढेच सामर्थ्य या शिल्पसृष्टी निर्माण करणाऱ्या माणसाचे आहे. मग ती शिल्पसृष्टी अंजिठा, वेरुळ सारख्या अखंड पाषाणातून निर्मिलेली असो की होट्टलसारख्या हजार-बाराशे वर्षांपूर्वीच्या मंदिराच्या बाह्य भिंतीवरील असो. देवदेवतांची ओळख करून घेतांना आठवला पाहिजे तो माणूस, त्याच्यातला कलाकार, त्याचे कलासामर्थ्य, ज्याने खरे तर ही सारी दैवीसृष्टी या पाषाणातून निर्माण केली.

होट्टलच्या मंदिरातील बाह्यभिंतीवर एक कलासंग्रहालयच आहे. यातील प्रत्येक मुर्ती आपले वेगळेपण दर्शविते. वेगळा अविष्कार घडवते. तत्कालीन समाजाचे प्रतिबिंबच या कलासृष्टीत प्रतिबिंबीत झालेले असते. हजार-बाराशे वर्षांपूर्वीच्या वेशभूषा, केशरचना, अलंकारभूषणे, वाद्ये एक ना अनेक गोष्टी इथे या कलासृष्टीतील पाषाणात गोठवल्या आहेत.

श्रांत होऊन आपले घुंगरू सोडणारी नर्तिका, नृत्याच्या अविष्कारात पुढचा पदन्यास टाकणारी नृत्यांगना, वृक्षाच्या, वेलीच्या फांदीवरील फळ तोडणारी शलभंजीका, वीणावादन करून थकलेली वीणावादिका, मृदंगवादिका एक ना अनेक अप्सरा इथे भेटतील. या अप्सरा आमच्या काल्पनिक

स्वर्गातील नाहीत तर प्रत्यक्ष वास्तवातील आहेत. आमच्या भौतिक जीवनातल्या कलाकारांच्या कलात्मक मनाला भावलेल्या आणि त्याच्या समर्थ कलाविष्कारातून जन्मलेल्या या अप्सरा इथे पाषाणात अजरामर होऊन राहिल्या आहेत.

होट्टल नगरीतले दुसरे अप्रतिम देऊळ सोमेश्वराचे आहे. हे देऊळ गावाच्या दुसऱ्या टोकाला एका शेतात असून मुळात हे देऊळ त्रिपुरुषदेवाचे देऊळ म्हणून ख्यातकीर्त होते. शिलालेखात त्रिपुरुषदेवाचा उल्लेख आहे. त्रिपुरुष म्हणजे ब्रह्मा, विष्णु आणि महेश. या विश्वाच्या निर्मितीचे, पोषणाचे आणि विध्वंसाचे प्रतिक म्हणजे या देवता. विश्वाच्या अस्तित्वाचे अंतिम सत्यच इथे पुनः प्रत्ययाला येते. या जगात पावलो पावली नवसृजन घडते, बी अंकुरते, वाढते आणि पुन्हा मातीत मिसळते. राखेतून पुन्हा फिनिक्स पक्षी आकाशात भरारी घेतो. या वास्तवाची पुजा इथे देवळात मांडली आहे. सभामंडप, मुखमंडप आणि तीन गर्भगृह अशी या मंदिराची रचना आहे. मुख्य गर्भगृह २.७४ × २.७४ मी. आकाराचे आहे. गर्भगृहाचे द्वार आणि द्वारपट्टीवरील कोरीव काम पाहण्यासारखे आहे. द्वारपट्टीवरील पुष्परचना, स्तंभपट्ट आणि दाराच्या दोन्ही बाजुला असलेल्या द्वारपालाच्या मूर्ती आणि चामरधारिणी लक्षणीय आहेत. दुसरे गर्भगृह २.१३ ×२.१३ मी. आकाराचे असून गणेशपट्टीवर गणेशाची मूर्ती आहे. तिसरे गर्भगृहही त्याच आकाराचे असून गणेशपट्टीवर सुखासनात बसलेली लक्ष्मी कोरलेली आहे. मंदिर अगदी पडक्या अवस्थेत आहे. सभामंडप ३.३५ × ३.३५ मी. असून मधोमध रंगशीळेचे अवशेष दिसतात. अप्रतिम कलात्मकता असलेले चार खांब या सभामंडपात आहेत.

या उद्ध्वस्त अवशेषातही खिळवून ठेवण्याचे सामर्थ्य असलेल्या मोहक मूर्ती मंदिराच्या बाह्यभिंतीवर कोरलेल्या दिसतात.*

होट्टल मधील तिसरे देऊळ सिद्धेश्वराच्या बाजुलाच आहे पण कालरुपानुसार त्याची बांधणी इ.स.११२० च्या दरम्यानची असल्याने सोमेश्वर मंदिर पाहून आल्यावर आपण या महादेव मंदिरात येतो. इथल्या उद्ध्वस्त अवशेषात लक्ष वेधले जाते ते एका प्रचंड दगडी शिळेकडे. ही शिळा मुखमंडपाच्या कक्षासनाच्या स्वरुपात असून या शिळेतून सप्तस्वराचे ध्वनी निघतात. हा काही दैवी चमत्कार नव्हे. अशा प्रकारचा दगड पूर्वी आपल्याकडे असायचा, तो ओळखण्याचे तंत्र हजार बाराशे वर्षांपूर्वीच्या माणसांना ज्ञात होते. आज आपण ते विसरलो आणि या अज्ञानात आपल्याला ही गोष्ट चमत्कारीक वाटते.

तसे पाहिले तर पाषाणातील ही सारी कलासृष्टी चमत्कार भासावा अशी आहे. हा चमत्कार घडवलाय तुमच्या माझ्यासारख्या सामान्य माणसानेच पण त्याच्यातल्या श्रेष्ठतम कलाकाराने, त्याच्या कलाअभिव्यक्तीने हजार-बाराशे वर्षांपूर्वी.

येथेच चौथे एक मंदिर आहे ते उत्तरकाळातील आहे. त्यावर फन्साना पद्धतीचे शिखर असून हे साधारणपणे समाधी शिखर प्रकारात येते. येथे एक लहान कुंड आहे. तर मुख्य मंदिर परिसरात चौरसाकृती एक भव्य पुष्करणी आहे.

---

* संपा : सोमेश्वर मंदिर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मंदिराचीच नोंद शिलालेखात रेब्बेश्वर मंदिर अशी आली आहे. तेव्हा याचा काळ इ.स. ११२० असा ठरतो.

Maharashtra State Gazetteers

## परिशिष्ट-१

# मध्ययुगीन मठ*

**प्रास्ताविक :**

मनुष्य स्वभावतः चिंतनशिल व सामाजिक प्राणी आहे. मनुष्याच्या आध्यात्मिक जीवनाला विस्तारीत आणि समृध्द बनविणाऱ्या संघटनांच्या रूपात भारतीय समाजात प्राचीन काळापासून मठांची भूमिका महत्त्वपूर्ण राहिलेली आहे. आस्तित्व केंद्रीत पाश्चात्य परंपरेव्यतिरिक्त भारतीय परंपरा मूल्य केंद्रीत राहिलेली आहे. मठ हे त्या सामाजिक मुल्यांच्या रक्षणाकरिता मोक्ष या अंतिम लक्ष्याच्या प्राप्तीसाठी सहाय्यक राहिलेले आहेत. मुल्यांची गुणात्मक चेतना, सर्वोच्च रुप, 'मोक्षधर्म' या अध्यात्मिक मनोवृत्ती आहेत. या मनोवृत्ती मुख्यतः दोन रुपात अभिव्यक्त होतात. सर्वसामान्य लोक ज्या सांसारिक सुखाची विशेष अपेक्षा करतात त्या प्रति वैराग्य भावना आणि उदारता, त्याग किंवा दुसऱ्याचे हितासाठी तत्पर (तयार) असणे या असाधारण क्रिया या दोन्ही गोष्टी मठवासी साधु, संतांची वैशिष्ट्ये आहेत. मानवी व्यक्तिमत्वाचा गुणात्मक विस्तार आणि परिष्काराच्या दृष्टीने भारतातील परंपरावादी समाजाच्या अपेक्षेप्रमाणे एक कायम स्थिर संघटनांच्या रुपात हिंदू धार्मिक मठांची एक महत्त्वपूर्ण भूमिका राहिलेली आहे.

**मठ शब्दाचा अर्थ :** संस्कृतमधील 'मठ' (वास्तव्य करणे) या धातूपासून हे नाम बनले आहे. अमरकोशामध्ये मठ हा शब्द आढळतो. विविध विद्वानांनी मठाचा अर्थ संन्याशाचे किंवा साधकाचे निवासस्थान, कुटी, विहार, महाविद्यालय, धार्मिक विषयाचे अध्ययन केंद्र, गुरूकुल असा सांगितला आहे. ए. स. आळतेकरांनी मंदिरांबरोबरच मठांनाही भारताच्या प्राचीन संस्कृतिचे केंद्र म्हटले आहे.[१९७] बौध्द कवी अश्वघोषाने 'बुध्द चरित्र' या ग्रंथात मठाच्या संदर्भात एक श्लोक लिहिला आहे. जो आजच्या मठांनाही लागू होतो.

'ब्रह्मघोषो भवेद यत्र, यत्र ब्रह्माश्रयी.।

'देवस्य पूजनम् दानम् मठामित्य भिधीयते।।

बुध्दचरितम्

आजही मठा मध्ये वेदपाठ, देवार्चन, दान इ. कर्म होत आहेत. मठाच्या संदर्भात 'ब्रह्माश्रयी' शब्दाचा प्रयोग अश्वघोषाने 'ब्रह्मचर्य', आश्रमात निवास करणे या अर्थाने दिला आहे.

**नांदेड जिल्ह्यातील पूर्व मध्यकालीन कालखंडातील उपासना पंथांचा आढावा :**

पूर्व मध्यकालीन कालखंडात प्राचीन वैदिक धर्मातील श्रोतयाग बंद होऊन त्या धर्मास स्मार्त पौराणिक धर्माचे स्वरुप प्राप्त झाले होते. हा स्मार्त धर्म बहूजन समाजात लोकप्रिय करण्यासाठी

---

* या भागाचे लेखन डॉ. सुनिल पुरी, संपादक मंडळ सदस्य यांनी केले आहे.

१९७. आळतेकर, अे. एस. **एज्युकेशन इन एन्शन्ट इंडिया**, मनोहर प्रकाशन, वाराणसी, १९७५, (आ. सातवी), पृ. १०६.

Maharashtra State Gazetteers

अत्रिसंहिता सारखे स्मृती ग्रंथ, पुराणे शंकराचार्यांचे कार्य आणि पूर्व चालूक्य, राष्ट्रकुट, उत्तर चालुक्य, यादव या राजवंशांची दान शासने यांनी बहुमोल कामगिरी बजावली. त्यामुळे हा स्मार्त पौराणिक धर्म समाजाच्या सर्व स्तरांमध्ये लोकप्रिय झाला. प्राचीन श्रोतधर्म फक्त वरच्या ब्राह्मण, क्षत्रिय वर्गांपुरताच मर्यादित होता. तथापि याच काळात शैव, वैष्णव, शाक्त या सारखे अनेक धर्मपंथ आणि संप्रदाय बहूजन समाजात आपापल्या मताचा प्रसार करण्याचा प्रयत्न करत होते. त्यापैकी बौध्द, जैन या सारखे काही अवैदिक होते. परंतू वैदिक धर्माचाही प्रसारही झाल्याचे दिसून येते. वैदिक धर्मातील प्रमुख पंथां व्यतिरिक्त नाथ, महानुभाव, लिंगायत, वारकरी या पंथांचे अस्तित्व दिसून येते. शैवाच्या पाशूपत, कालामूख पंथांचे उल्लेख कोरीव लेखात येतात.[१९८] विष्णुच्या नृसिंह अवताराची उपासना गोदावरी नदीच्या काठावर असलेल्या नांदेड, राहेर, शेळगाव, शंखतीर्थ येथील नृसिंह मंदिरांवरुन दिसून येते. शाक्त पंथाचे प्राबल्य माहूर येथे होते. पंढरपूर येथील विठ्ठल भक्तीचा प्रसार या जिल्ह्यातही झालेला दिसून येतो. १३ व्या शतकातील पंढरपूरच्या चौऱ्याऐंशी शिलालेखात राहेर, माहूर येथील व्यक्तींची नावे आढळतात.[१९९]

**नांदेड जिल्ह्यातील मठ**

- **दसनामी मठ** (दसनाम धारण करणारे गोसावी व त्यांचा संप्रदाय)

'गोसावी' हा शब्द 'संस्कृत' गोस्वामिन या शब्दापासून मराठीत रुढ झाला. गोसाई, गुसाई, गोस्वामी अशा नावाने ओळखला जात असलेला भारतात सर्वत्र आढळणारा हिंदु यतीचा वर्ग आहे. तसेच ती एक जात म्हणूनही महाराष्ट्र व मध्यप्रदेश या राज्यात ओळखली जाते. गोस्वामीन शब्दाचे दोन अर्थ होतात. (१) गोधनाचा मालक, (२) इंद्रियावर ज्याचे स्वामित्व आहे असा जितेंद्रिय, यातील दुसऱ्या अर्थी गोसावी हा शब्द येथे आला आहे.[२००]

गोसाव्यांमध्ये प्रामुख्याने शैव, वैष्णव असे दोन भेद आहेत. दसनामी गोसावी हे शैवपंथी असून त्यात मठधारी व घरबारी असे दोन भेद आहेत. यात गिरी, पुरी, भारती इ. पोटभेद असल्यामुळे त्यांना दसनामी असे म्हणतात. ते विवस्त्र राहत असल्यामुळे त्यांना नागा साधु असेही म्हणतात.

शैव संप्रदायातील अद्वैत मताच्या दहा शाखांना शंकराचार्यानी संघटीत करुन धर्म प्रसारार्थ शारदा (द्वारका), गोवर्धन (जगन्नाथपुरी), जोशी (बद्रीनाथ) व शृंगेरी (कर्नाटक) येथे मठ स्थापना केली. त्यावर आपल्या चार शिष्यांची नेमणूक केली. या मठाच्या आश्रयाने राहणाऱ्या अद्वैत मताच्या संन्याश्यांचे पुढीलप्रमाणे दहा संप्रदाय निर्माण झाले—तीर्थ, आश्रम, वन अरण्य, गिरी, पर्वत, सागर, सरस्वती,

---

१९८.रित्ती श्रीनिवास, पूर्वोक्त पृ. LIX ते XIX

१९९. देव, शां. भ. **महाराष्ट्र व गोवे शिलालेख ताम्रपटाची वर्णनात्मक संदर्भ सुची,** मुंबई, १९८४, लेख क्र. ४९५, पंढरपूर चौऱ्यांयंशीचा शिलालेख, पृ. २३६ ते २३९.

२००.जोशी, लक्ष्मणराव **मराठी विश्वकोश खंड-५**, म. रा. साहित्य संस्कृती मंडळ मुंबई, १९७६, पृ. २६७ ते २६९.

भारती आणि पुरी. हे शंकराचार्यांच्या पद्मपाद, हस्तमलक, सुरेश्वर, आणि त्रोटक या चार शिष्यांचे परंपरागत शिष्य असल्याचे समजले जाते.[२०१] या शिष्यांपासून दसनाम संन्यास निर्माण झाला असे मानतात.[२०२]

दसनामी नागा संन्याशांच्या संघटनेला आखाडा असे म्हटले जाते. सर्व दासनामी सात आखाड्यात समाविष्ट केलेले आहेत. आखाड्याच्या प्रमुखास महंत म्हणतात.

नांदेड जिल्ह्यातील दसनामी मठाचे इष्टदेव श्री दत्तात्रेय हे आहेत. माहूर हे तर श्री दत्तात्रेयांचे जन्मस्थानच मानले जाते. नांदेड जिल्ह्यात माहूर, दत्तमंजिरी, उनकदेव, पोटा, हदगाव, वाहेगाव, डोणगाव, रेणापूर, आळेगाव, सांगवी, कोलंबी, येथील दत्त ठिकाणे प्रसिध्द आहेत. जिल्ह्यात दसनाम गोसावी मठ माहुर, दत्तबर्डी, मोहनपूर, कोलंबी, किवळा, नांदेड, निवघा, डोंगरगाव येथे आढळतात.

**१) दत्त शिखर (माहूर)**

एक शक्तीपीठ म्हणून जसा माहूरचा महिमा आहे. त्याच प्रमाणे एक प्रख्यात दत्तक्षेत्र व भारती परंपरेतील ५ वी मढी म्हणूनही माहूरची प्रसिध्दी आहे. माहूर गावा पासून सहा कि.मी. अंतरावरील टेकडीवर असलेले हे स्थान दत्तशिखर किंवा शिखर या नावाने ओळखले जाते. येथे शंकराचार्यांच्या परंपरेतील दसनाम संन्यासांपैकी भारती महंतांचा आश्रम असून नाथ जोगी परंपरेतील महत्त्वाचे ठिकाण आहे. या दत्त स्थानास औरंगजेब बादशहाकडून ४० हजाराची जहागीर मिळाली होती.[२०३] औरंगजेबाने या स्थानास अभय दिल्याची नोंद एका ताम्रपटात आहे.[२०४] मुळ मंदिर महंत मुकंदभारती यांनी सन १२९७ मध्ये बांधले. मुळ मंदिर फक्त ३.०४ मी. × ३.६२ मी. एवढ्या आकाराचे होते. याचा जीर्णोध्दार व विस्तार सन १६२४ मध्ये केला गेला. येथील गर्भगृह व प्रवेशद्वाराची चौकट पाहता ती यादव कालीन असल्याचे दिसते. भारती महंताचा आश्रम हा १७ व्या शतकात निर्माण झाला असावा. महंत भारती गोसाव्याचे येथे निवासस्थान आहे. मूळ मंदिराच्या प्रांगणात इतर महंतांच्या समाध्या आहेत. विस्तृत प्राकार, अनेक ओवऱ्या, इतर इमारती आहेत. या समाध्यांपैकी महंत श्याम सुंदर भारती यांची समाधी आठव्या शतकातील आहे असे सांगतात. यावरुन दत्त संस्थान व भारती मठ यांची प्राचीनता लक्षात येते. मुख्य मंदिरातील एकमुखी दत्तात्रेय प्रतिमेशिवाय, दत्तात्रेयाच्या पादुका,

---

२०१. काणे, पी. व्ही. **धर्मशास्त्राचा इतिहास** (पूर्वार्ध) (अनु. यशवंत भट) मुंबई, १९८०, पृ. ३२१ ते ३३० (गोसाव्याच्या तीर्थ आश्रम, बन, अरण्य, गिरी, पर्वत, सागर, सरस्वती, भारती, पुरी या उपनावावरून त्यांची परंपरा वेदकाळापर्यंत जाते. गोस्वामी पृथ्वीगीर हरिगीर, गोसावी आणि त्यांचा संप्रदाय भाग-१, यवतमाळ १९२६, पृ. १ ते ६२).

२०२. सरकार यदुनाथ, **नागे संन्यासियोंका इतिहास**, प्रथम खंड, प्रयाग, १९५०, पृ. ५४ ते ६६.

२०३. केशवराव, कपाटे **श्री क्षेत्र माहोरगड-पौराणिक व ऐतिहासिक माहिती,** माहूर १९७७. (आवृत्ती सहावी) पृ. १४, १५ (औरंगजेबाप्रमाणे नागपूरकर भोसले, पेशवे, होळकर, शिंदे या सर्वांनीच संस्थानात जहागिरी दिल्या होत्या. महंत मधुसुदन शिखर माहुरगड यांनी सांगितलेल्या माहितीनुसार).

२०४. पाठक, अरुणचंद्र 'महानुभव साहित्य व मध्ययुगीन माहूर', निवडक शोध निबंध-खंड ४, मराठवाडा इतिहास परिषद.

Maharashtra State Gazetteers

शिवलिंग, विठ्ठल - रखुमाई यांच्या मूर्ती आहेत. त्या बरोबरच या परिसरात अनसुयामाता, चिंतामणी, भैरव, कामाख्या या सर्व देवता एके काळी असलेल्या तंत्रमार्गाचे प्राबल्य सूचित करतात.[२०५]

**माहूर येथील सदानंद गिरी**

माहूर येथे गिरी संप्रदायाची वस्ती प्राचीन काळापासून आहे. महाराष्ट्रात जे प्रसिध्द संत आहेत त्यात दत्तशिष्य सदानंद गिरी यांचे स्थान फार वरचे आहे. सदानंद हे शंकराचार्यांपासून नववे प्रमुख. हे इ.स. ९१० ते १०१० च्या दरम्यान होऊन गेल्याचे दिसते. त्यांनी मातापूर येथे तपश्चर्या केली. त्यांना दत्तात्रेयांनी उपदेश केला असे मत्स्येंद्र पुराणात वर्णन आहे. पुढे त्यांनी त्र्यंबकेश्वरी तप केले. त्यांच्या मुख्य पाच शिष्यांनी जागो जागी २७ मठ स्थापन केले. त्यावरुन गिरीच्या हल्लीच्या मढी प्रचारात आल्या. महाराष्ट्रातील नाथ संप्रदायाच्या प्रमुख शाखा सदानंदापासून निघाल्या. हे दत्तशिष्य सदानंद व सदानंद गिरी एकच असावेत. महाराष्ट्रातील नाथसंप्रदायाचा प्रसार गिरी संप्रदायातील गोसाव्यांनी केला.[२०६]

**गिरी संप्रदाय :**

दत्तशिखर संस्थानाच्या भरभराटीस भारतींप्रमाणे गिरींची कामगिरीही महत्त्वाची ठरते. पूर्वी निरंजनी व निर्वाणी या दोन आखाड्यांचे महापुरुष नगरखान्यासमोर राहात असत. त्यांच्या सदावर्ता करिता ही जहागीर मिळाली असे एका सनदे वरुन कळते. या ठिकाणी पूर्वी आईतवारगीर नावाचे महापुरुष होऊन गेले. त्यांनी नगारखाना व सर्वतीर्थ बांधले. किसन गिरींनी महादेवाची दोन मोठी देवालये, काळ्या पाण्याचा बगिचा व विहीर, परकोट, चक्की, घरासमोरचा बंगला (ज्याला किसन गीरचा बंगला म्हणतात), मोतीबंगला व कस्तूर बावडी बांधली. गणेशगिरी यांनी गणेशबावडी बांधली. प्रल्हादगिरी यांनी अनुसया मातेचा दरबार बांधला. मंगळगिरी, सहजगिरी, रामेश्वरगिरी, मोतीगिरी, आनंदगिरी, सोनगिरी, रतनगिरी, जालमगिरी, या महापुरुषांनी इमारती बांधण्याकडे लक्ष दिले. मोठ्या भंडाराजवळ असलेले टाके जलिमगिरी यांनी बांधले असून ते जालिमगीरीचे टाके या नावाने ओळखले जाते. सहजगिरी, रामगिरी, आनंदगिरी यांची मालमत्ता संस्थनात खर्च झालेली आहे.

माहूर येथील देवगिरी महाराजांनी बासर येथील सरस्वती देवीच्या मंदिरातील गंगागिरी महाराजांना १५ रूपयांप्रमाणे वर्षासन दिले, अशी नोंद फसली १३१९ मधील ताम्रपटात केली आहे. सदर ताम्रपट देवगिरी महाराज मठ, माहूर येथे मिळाला आहे.[२०७]

दत्तशिखर येथे आषाढी पौर्णिमा, नारळी पौर्णिमा, दसरा, मार्गशीर्ष पौणिमा (दत्त जयंती उत्सव) व वर्षभरातील इतर सण मोठ्या उत्साहाने साजरे केले जातात. दत्तजयंतीस येथे यात्रा भरते व लाखोच्या संख्येने यात्रिक येतात. एकादशी पासून पौर्णिमेपर्यंत श्री दत्तात्रेयांची पालखी मिरवणूक गडावर निघते. पौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी काला घेऊनच यात्रा संपते. महंत महाराजांच्या दर्शनासाठी किमान एक रूपया द्यावा अशी येथील परंपरा आहे. सिंहस्थ पर्वणीचे येथे फार महत्त्व आहे. गुरू सिंह राशीत आला म्हणजे येथील मठाधिपती महंत गडावरून खाली उतरतात व सर्वत्र संचार करतात. लोक

---

२०५.परांजपे तारा, **सीमा प्रदेशातील भावगंगा**, मराठी साहित्य परिषद, आंध्रप्रदेश, हैद्राबाद, १९८५, पृ. ४७.

२०६.पृथ्वीगीर हरिगीर, गोसावी **गोसावी व त्यांचा संप्रदाय भाग-२**, यवतमाळ १९३१, पृ. ४५८ ते ४६३.

२०७. कंदकुर्तीकर, यादवराव 'माहुर साधूगिरी तर्फे प्रदान दान आज्ञा ताम्रपट परिचय', **इतिहास संशोधन पत्रिका** खंड ८, मराठवाडा इतिहास परिषद, औरंगाबाद (संपा. सोमनाथ रोडे), लातूर, २००४, पृ. १६० ते १६२.

गावो गावी त्यांचा मान-सन्मान करत असतात.[२०८] महंत आपल्या भक्तांना कणी घुगरी (मुग ज्वारीच्या कण्या), मुरमुरे, भस्म प्रसाद म्हणन वाटतात. प्रसादात नारळ कधीच नसतो. खोबऱ्याच्या वाट्या असतात. या संस्थानाचे श्याम सुंदरभारती हे पहिले महंत असून ते फसली सन १४४ ला गादीवर बसले. त्यांची समाधी मूळ मंदिराच्या दक्षिणेस आहे. त्या सिध्द पुरूषापासून आज गादीवर तिसावे महंत श्री मधूसुदन भारती आहे. परंपरेने नवीन महंताची निवड होताच ते महंत प्रथम शंकराचार्याचे दर्शन घेतात हा त्यांचा दंडक आहे.

**माहूर येथील बाळगीर महाराजांची गुंफा : (वडगुंफा)**

किवळा (ता. लोहा) येथील संत बाळगीर महाराज यांनी माहूर येथे वडाच्या झाडाखाली तपश्चर्या केली ते ठिकाण आज वडगुंफा या नावाने ओळखले जाते. दत्तशिखरावरुन खाली सर्वतीर्थाकडे जाणाऱ्या रस्त्यावर हा मठ आहे. नांदेड येथील गोदवरीच्या काठावर त्यांनी मठ बांधला. तो बाळगीर महाराज मठ म्हणून ओळखला जातो. आनंददत्त संप्रदायात त्यांची मोठी ख्याती आहे. त्यांनी या मठाचा विस्तार केला. त्यामुळे यात्रेकरुंची मोठी सोय झाली आहे. मठाच्या परिसरात मठाधिपतींच्या समाध्या आहेत. मठाच्या प्रवेशद्वारावर नव्याने भव्य कमान उभारण्यात आली आहे. या मठातच श्री सिद्धविनायकाचे स्थान आहे. ते गाडीपूरा गणपती या नावाने परिचित आहे.

मठामध्ये अखंड दत्तनाम व अन्नदान चालते. ही परंपरा आजही सुरू आहे. आषाढी पौर्णिमा, श्रावण पौर्णिमा, श्री दत्त जयंती, हे कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरे केले जातात. चातुर्मासात चार महिने अनेक मंडळी राहतात. या मठा अंतर्गत वेणी (ता. महागाव जि. यवतमाळ), ढाणकी (ता. उमरखेड जि. यवतमाळ) येथे शाखा आहेत.

**माहूर येथील गोवर्धन आश्रम - छोटी गुंफा (संत तुळशीबन)**

कोलंबी (ता. नायगाव) येथील बन परंपरेतील मठाचा हा आश्रम असून श्री संत हणमंत महाराज - श्री संत अवधुत बन महाराज - श्री. संत रामबन महाराज व सध्याचे श्री गोवर्धन बन महाराज अशी परंपरा येथे आहे. आश्रमात अखंड दत्त नामघोष चालू असतो. दत्तजयंती मोठ्या उत्साहाने साजरी केली जाते.

**दत्तबर्डी दत्तसंस्थान - हदगाव**

या मठाचे संस्थापक मंडळ मोहनगिरी महाराज असून मठ दसनाम गोसावी संप्रदायातील गिरी परंपरेतील आहे.[२०९]

---

२०८. परांजपे, तारा पूर्वोक्त, पृ. ४७, ४८ (महंताच्या मान सन्मानाचे वर्णन) लोकगीतात पुढीलप्रमाणे आढळते.

माव्हर गडावरी/घोड्याल घोड भिड
जरतारी भगवा उड/महंत माझ्या महाराजाचा
सोन्याच पिंपळपान/हत्तीच्या मस्तकाला
माव्हर गडावरी/डंका वाज घोड्यानी
संग, चौर, अब्दागिरी/महंत की महाराजाला

२०९. हा मठ अखिल भारतीय दशनाम नागा संन्यासी श्री पंचायती आखाडा आनंद यांच्याशी संबंधीत असून विद्यमान महंत गोपाळगिरी गुरू रायगिरीजी यांना या आखाड्याने मान्यता दिल्याचे प्रमाणपत्र येथे भिंतीला फ्रेम करून लावलेले आहे. (१९८९ संवत २०४५).

Maharashtra State Gazetteers

हा मठ एका टेकडीवर असून त्या मठाचे जुने बांधकाम पाडून त्या जागी आता नवीन बांधकाम केलेले आहे. मूळ दत्त मंदिराची दगडी बांधकामाची वास्तू जुनी आहे. या ठिकाणी एकमुखी दत्ताची मुर्ती आहे. टेकडीवर अनसुयामाता, रेणुकामाता, गणपती, हनुमान, अन्नपूर्णादेवी, शंकर इ. मंदिरे आहेत. या वास्तु नंतर बांधलेल्या आहेत. मठाधिपतीस महंत संबोधण्यात येते. दत्तजयंती, दसरा, गुरु पौर्णिमा, नारळी पौर्णिमा, गुरू महाराजांची पुण्यतिथी मोठ्या प्रमाणात साजरी केली जाते.

दत्तजयंतीस पालखीची मिरवणूक काढली जाते. टेकडीवरील अनसुया माता मंदिर, गणपती मंदिर, या ठिकाणी पालखी जाते. दत्त जयंतीस हजारोंच्या संख्येने लोक येथे दर्शनासाठी येतात. त्यांच्या भोजनाची व्यवस्था संस्थानातर्फे केली जाते. पालखीमध्ये श्री दत्तात्रेयाची मुर्ती, डंका नगारा, निशाण (ध्वज), अब्दागिरी (कळस) समोर भजनी दिंड्या आणि ५ घोडे यांच्या सवारी असतात.

या मठाच्या (१) मौजे कामारी (ता. हिमायतनगर), (२) दिघी (ता. हिमायतनगर) (३) मौजे साखरा (ता. उमरखेड जि.यवतमाळ) (४) मौजे मुळावा (ता.उमरखेड) (५) मौजे आष्टी (ता.हदगाव) (६) मौजे पाथरड (ता.हदगाव) (७) मौजे हरडफ (ता.हदगाव) या ठिकाणी शाखा आहेत.

हा संन्यासी मठ असून गुरू आपल्या शिष्याची उत्तराधिकारी म्हणून निवड करतो. आता पर्यंत या मठाच्या गादीवर २६ महंत होऊन गेले. २४ वे महंत दत्तगिरी महाराज, २५ वे महंत ईश्वरगिरी महाराज व २६ वे महंत रामगिरी महाराज हे होते. या सर्वांच्या समाध्या या मठाच्या प्रांगणातच आहेत. दर बारा वर्षानी सिंहस्थात दत्तशिखर माहूर येथील महंत येथे येतात. त्यांना येथे मानाची वस्त्रे दिली जातात. तेही येथील महंतांचा सत्कार करतात.

**दत्तसंस्थान कोलंबी (ता. नायगांव)**

दसनाम गोसावी संप्रदायातील बन परंपरेतील जगन्नाथपुरी येथील गोवर्धन मठाशी संबंधीत असलेल्या या मठाची स्थापना शिवबक्ष नावाच्या योगी प्रमुखाने केली.

कोलंबीच्या मठाचे बांधकाम चिरेबंदी असून वरच्या बाजूस विटांचे बांधकाम आहे. याची लांबी पूर्व पश्चिम ४३.२८ मी व रुंदी दक्षिण उत्तर ४६.६३ मी. आहे. यात्रेकरूंच्या राहण्याची सोय तेथे आहे. मठाच्या आवारात शिखरयुक्त मंदिर असून तेथे असलेल्या ब्रह्मयंत्राची पूजा होते. हे या मठाचे वैशिष्ट्य आहे. हे यंत्र शंक्वाकृती असून कोरलेले आहे. यावर कोरलेल्या आकृत्यांचे आकलन होत नाही.[२१०] हे यंत्र दत्ताचे यंत्र समजले जाते. कार्तिक पोर्णिमेस येथे तीन दिवस यात्रा भरते. १७ ते १२८ नारळांनी ब्रह्मयंत्राची पूजा होते. पौर्णिमेच्या मध्यरात्रीपर्यत हा सोहळा चालते. भजन, किर्तन इ. कार्यक्रम होतात व गावोगावच्या दिंड्या जमतात. दुस-या दिवशी श्रींची पालखी निघते त्यामागे महंतांचा

---

२१०. महंतभोंबन, **अथ परज्ञानी प्रसाद गाथा व महापूजेचा संपूर्ण विधी** (महंत प्रसाद बन यांनी लिहिलेल्या (संपा.) १३०९ अभंगाचा ग्रंथ), दत्त संस्थान, कोलंबी, २००९ (दुसरी आवृत्ती), प्रस्तावना, पृ. ४ ते ७. या विषयीची नोंद अशी, अशा प्रकारची ब्रह्मयंत्रे भारतात फक्त चार होती. त्यापैकी दोन पत्र्यावर कोरलेली होती. पाषाणावर कोरलेले एक ब्रह्मयंत्र मॅक्समुलर यांनी इंग्लंडला नेले तर दुसरे कोलंबी येथे आहे.

मेणा असतो. तृतियेच्या दिवशी दही हंडी, काला व कुस्त्यांचे कार्यक्रम होतात. गुरू पौर्णिमा, विजया दशमीस सकाळी ध्वजारोहण होते. नवीन ध्वज लावण्यात येतो. छत्रधारी व दंडधारी सेवकांच्या पहाऱ्यात महंत आसनस्थ होतात. त्यांना नवीन वस्त्रे दिली जातात. येथे दत्तजयंती मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. अखंड दत्तनामस्मरण व दररोज अन्नदान येथे होते.

या मठाअंतर्गत (१) निलेगव्हाण (ता. गव्हाण) (२) मगनपुरा (ता. नांदेड) (३) संगमेश्वर (ता. नांदेड) (४) निर्मलबन (ता. नांदेड) (५) भोकर, (६) इसाद (ता. गंगाखेड, जि. परभणी) (७) हरिजवळगा (ता. निलंगा, जि. लातूर) (८) जाकापूर व गोडापूरता. (ता. आदिलाबाद, आंध्रप्रदेश) येथे शाखा आहेत.

येथील मठाधिपतीस महंत असे संबोधण्यात येते. गुरु-शिष्य परंपरा येथे आहे. (ब्रह्मचारी व्यक्तीसच महंत होता येते) शिवबक्ष महाराज - कुशदबन महाराज - गौबीबन महाराज - तुळशीबन महाराज - रामेश्वरबन महाराज - प्रसादबन महाराज - गंभीरबन महाराज - विद्यामहंत अशी येथील महंत परंपरा आहे. मठाचे सहावे महंत प्रसादबन महाराज आयुर्वेदीक डॉक्टर होते.

**गोदावरी तीर्थ क्षेत्र संस्थान मोहनपूर (मौजे वाहेगाव) ता. नांदेड.**

गोदावरी नदीच्या दक्षिण काठावर हा मठ असून दसनाम गोसावी संप्रदायातील भारती परंपरेतील संन्यासी मठ आहे. हा मठ महंत मोहनीबाबा यांच्या नावाने ओळखला जातो. या मठाला ९०० वर्षांची परंपरा असल्याचे सांगितले जाते. बादशहा औरंगजेब व मोहनी बाबा यांची भेट झाल्याचे येथील कागदपत्रे व सनदांवरुन दिसून येते. मोहनी बाबांच्या आयुष्याचा शेवटचा कालखंड मठाजवळील मल्लिकार्जून मंदिरात गेला. या मंदिरातून मठापर्यंत व मठातून गोदावरीच्या पात्रापर्यंत भुयार असल्याची आख्यायिका आहे. मठाचे बांधकाम चिरेबंदी असून वरच्या भागावर विटांचे बांधकाम आहे. मठाधिपतीस महंत असे संबोधले जाते.

श्री दत्तजयंती, दसरा, गुरुपौर्णिमा व गुरूंची पुण्यतिथी हे या मठातील महत्त्वाचे उत्सव आहेत. दत्तजयंतीला (मार्गशिर्ष पौर्णिमा) येथे सात दिवस यात्रा भरते. यात्रेकरुंना अन्नदान केले जाते. पशुप्रदर्शन, सर्प प्रदर्शन, कुस्त्यांचा फड, दहीहंडी हे कार्यक्रम होतात. पालखीमध्ये श्री दत्ताची मुर्ती असते. पालखी पुढे महंत घोड्यावर बसतात. पुढे भजनी मंडळ, डंका (नगारा) व निशाण असते. ही मिरवणूक मंदिराच्या पश्चिमेस असणाऱ्या हनुमान मूर्तीपर्यंत जाते व तेथे दहीहंडीचा कार्यक्रम होतो.

दसरा उत्सवात मठातून शिवेपर्यंत मल्लिकार्जून मंदिरापर्यंत निशाण, नगारा, शंख वाजवित महंतासोबत शेतात जाऊन आपट्याच्या पानाची पूजा केली जाते व त्यानंतर मिरवणूक परत येते.

या मठाअंतर्गत विष्णुपुरी (नांदेड), गाडीपुरा (नांदेड), हेरड (ता.नांदेड) येथे शाखा आहेत. येथे गुरु-शिष्य परंपरा आहे. महंत आपला उत्तराधिकारी निवडतात. मठाच्या उत्तरेस गोदावरीच्या काठावर महंतांच्या २२ समाध्या आहेत. एक समाधी गोदावरीच्या पात्राजवळ आहे व तेथे घाट बांधलेला आहे.

**मल्लिकार्जून मंदिर मोहनपूर**

मोहनपूर येथे भारती मठाच्या उत्तरेस असलेले हे मल्लिकार्जून मंदिर महंत मोहनी बाबा यांनी बांधल्याचे सांगितले जाते.

मंदिर पूर्वाभिमुख असून मंदिराचे मोजमाप १२.१९ मी. लांब व ७.६२ मी. रुंद आहे. गर्भगृह, अंतराळ व सभामंडप अशी रचना आहे. सभामंडप १६ स्तंभावर आधारीत असून अंतराळात आधारासाठी दोन स्तंभ जास्त आहेत. सभागृहातील मुख्य मंडप ३.०४ मी. X ३.०४ मी. या आकाराचा असून मध्यभागी नंदी आहे. गर्भगृहाच्या ललाटी गणेश प्रतिमा आहे. मंदिर स्थापत्य वैशिष्ट्यांवरुन हे मंदिर १७ व्या शतकातील असावे.

मंदिराच्या समोर शिवराज भारती, दिगंबर भारती, निरंजन भारती यांच्या समाध्या आहेत. मंदिराच्या समोरील लिंबाच्या झाडाखाली दोन सती शिळा आहेत. जवळच निशाणाची जागा (ध्वज) आहे. दसऱ्याला येथे सिमोल्लंघन होते. याच्या उत्तर बाजूस एक त्रिकोणी आकाराची १.३७ मी. लांब व ०.९१ मी. रुंदीची दगडी शिळा आहे. मंदिराच्या समोरच्या शेतात जमीन नांगरताना ही शिळा मिळाल्याचे सांगतात. त्यावर एक मराठीतून (बाळबोधी) लेख कोरलेला असून दुसऱ्या बाजूस काही आकृत्या कोरलेल्या आहेत. (सूर्य, चंद्र, पालखी व मनुष्य आदींच्या आकृत्या असून त्या अस्पष्ट आहेत)

इन्स्क्रिप्शन्स फ्रॉम नांदेड डिस्ट्रिक्ट या ग्रंथात मोहनपूर (ता.नांदेड) येथील एका कोरीव लेखाची नोंद आहे.[२११]

**दत्त संस्थान मठ, किवळा (ता. लोहा) :**

दसनाम संप्रदायातील गिरी परंपरेतील हा संन्यासी मठ असून जवाहर गिरी हे या मठाचे संस्थापक समजले जातात. मठ तीनशे वर्षांपूर्वीचा असावा असे सांगितले जाते. या मठातील प्रसिध्द व्यक्ती म्हणजे संत बाळगीरी महाराज. त्यांनीच येथील मठाची वास्तू बांधली आहे. माहूर येथील वडगुंफा मठ व नांदेड येथील बाळगीर महाराज मठ त्यांनीच स्थापन केला.[२१२]

मठामध्ये दत्तजयंती मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. यात्रा ५ दिवस चालते. पालखीमध्ये दत्तात्रेयाची मूर्ती ठेवून मिरवणूक काढली जाते. दत्तपौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी दहीहंडीचा कार्यक्रम होतो. मठामध्ये अखंड दत्तनामस्मरण, भजन, प्रवचन इत्यादी कार्यक्रम होतात.

---

२११. लेखकाने स्वतः केलेल्या सर्वेक्षणाआधारे (रित्ती व शेळके जी. सी. इन्स्क्रिप्शन्स फ्रॉम नांदेड डिस्ट्रिक्ट, नांदेड १९६८ या ग्रंथात मोहनपूर (ता. नांदेड) येथील शिलालेखाची नोंद आहे. पृ. २४१ लेख क्र. ५० परंतु यातून काहीच माहिती उपलब्ध होत नाही.)

२१२. वडेपुरीकर सुभानजी, संत बाळगीर महाराज चरित्र, नांदेड, २००८ दुसरी आवृत्ती पृ. १, (बाळगीर महाराजांचा जन्म सन १८५८ मधील या चरित्र ग्रंथात त्यांच्या ११ पिढ्यांची नावे आली आहेत. अध्याय दुसरा, पृ. ११).

Maharashtra State Gazetteers

**लिंगायत किंवा वीरशैव मठ : संप्रदाय परिचय :**

मध्ययुगात दक्षिण भारतात कर्नाटकात वीरशैव तथा लिंगायत हा संप्रदाय उदयास आला. बाराव्या शतकापर्यंत कर्नाटकात जैन धर्माचा प्रभाव होता. तथापि या पंथाच्या उदयाने जैन धर्म प्रसार सिमीत झाला. लिंग धारण करणे या त्यांच्या प्रमुख आचारावरुन त्यांना लिंगायत असे नाव पडले.[१७] वीरशैव म्हटले की महात्मा बसवेश्वरांचे नाव नजरे समोर येत असल्यामुळे त्यांना वीरशैव धर्मसंस्थापक मानले जाते. मात्र वीरशैव सांप्रदायिक, पंचाचार्यांना धर्म संस्थापकाचा मान देतात. 'सिध्दांत शिखामणी' या वीरशैवांच्या प्रमुख धर्मग्रंथात वीरशैव धर्माचे तत्वत्रय, अष्टावरण, पंचाचार आणि षदस्थळांचे निरुपण झाले आहे.[२१४] पंचाचार्यांची उत्पत्ती पाच लिंगांमधून झाल्याची पंथीय श्रध्दा आहे. (रेणाराध्य-सोमेश्वर लिंग, मरुळाराध्य - सिध्देश्वर लिंग, एकोरामाराध्य- रामनाथ लिंग, पंडिताराध्य मल्लिकार्जून लिंग आणि विश्वाराध्य-विश्वेश्वर लिंग) व या पंचाचार्यांनी वीरशैव धर्म प्रसार प्रचाराचे काम केले. त्यासाठी त्यांनी अनुक्रमे बाळेहोन्नूर (कर्नाटक), उज्जैन (मध्य प्रदेश) केदार (उत्तरांचल), श्री शैल्य (आंध्र प्रदेश) आणि काशी (उत्तर प्रदेश) येथे मठस्थापना केली. या पंचपीठांच्या अनेक शाखा व उपशाखा संपूर्ण भारतात आहेत.[२१५] नांदेड जिल्ह्यातील बेटमोगरा, मुखेड, शिराढोण येथील मठ हे गुरु मठ आहेत.

**बेटमोगरा (ता. मुखेड) येथील शिवलींग बादशहा मठ :**

वीरशैवांच्या पंचपीठापैंकी उज्जैन पीठाच्या नंदी गोत्राशी संबंधीत हा मठ असून येथील मठाधिपतीस शिवाचार्य महाराज असे संबोधण्यात येते. या मठाची स्थापना शिवलींगस्वामी यांनी केली. मुघल बादशहा औरंगजेब याने शिवलींगस्वामींना बादशहा अशी पदवी दिली होती. मठातच शिवलींग स्वामींची संजीवनी समाधी आहे. इ. स. १६४२ मध्ये श्री शिवलींग स्वामी बेटमोगरा येथे आले.

या मठाचे क्षेत्रफळ ५८.५२ मी. लांब व ५८.५२ मी. रुंद एवढे आहे. मठाचे बांधकाम चिरेबंदी असून ७ बुरुजांचे आहे. मठ एका भव्य गढीसारखा आहे. मठावरील छतावर १५.२४ मी. लांब व ९.१४ मी. रुंद असा घूमट आहे. त्यामध्ये तीन बाजूंनी प्रवेश करता येतो. आत मध्ये लाकडी सिंहासन असून त्यावर बसून शिवलींगस्वामी धार्मिक न्याय निवाडा करत असत. घुमटावर चाँद तारा आहे. या मठास दोन प्रवेशद्वारे आहेत. एक प्रवेशद्वार उत्तर बाजूस व दुसरे प्रवेशद्वार पूर्व बाजूस आहे. त्याच बरोबर बैठक व्यवस्था, निवासस्थान यांचे बांधकाम १०० वर्षांपूर्वी गुरु सिध्द दयाल स्वामी यांच्या काळात झाले. शिखर व बुरुज असलेल्या मुळ वास्तूचे बांधकाम ३०० वर्ष जुने आहे असे सांगितले जाते. मठाच्या आत महाराजांची समाधी आहे.

---

२१३. गोसावी र. रा., **पाच उपासना पंथ**, प्रसाद प्रकाशन, पुणे, १९७९, पृ. ८८.

२१४. शिवाचार्य चंद्रशेखर **सिद्धांत शिखामणी वीरशैव संत साहित्य**, अभ्यास ग्रंथ, वीरशैव साहित्य संशोधन मंडळ, सोलापूर, १९९२, पृ. १७८.

२१५. कामत अ. प्र., आणि पसारकर, शे. द., **वीरशैव संत साहित्य**, अभ्यास ग्रंथ, वीरशैव साहित्य संशोधन मंडळ, सोलापूर, १९९२, पृ. १७८.

मठामध्ये महाशिवरात्री (हा दिवस शिवलींग स्वामींचा जन्मोत्सव म्हणून साजरा करतात) व चैत्रशुध्द द्वादशी (शिवलींग स्वामींची पुण्यतिथी) या दिवशी ५ दिवस यात्रा भरते. बंदगी नावाचा सुफी संत शिवलींग बादशहाचा शिष्य होता. यात्रेच्या काळात पालखी मिरवणूक, सामुहिक इष्टलिंग पूजन इ. कार्यक्रम होतात. चैत्र शुध्द द्वादशीला टाकळी ते बेटमोगरा कावड मिरवणूक काढली जाते. त्याच बरोबर ईद, मोहरम, हेही सण साजरे केले जातात. हिंदू व मुस्लिम दोन्ही समाजाचे लोक या दोन दिवशी शिवलींग बादशहाच्या दर्शनासाठी येतात.

या मठाअंतर्गत आरळी (ता. बिलोली), रामतीर्थ (ता. बिलोली), बारसगाव (ता. अर्धापूर), किनी बुरघसी (ता. भोकर) तमलूर (ता. देगलूर), कुंबरफळी (ता. देगलूर) येथे शाखा आहेत. तर महाराष्ट्राच्या बाहेर बीदर, म्हैसा, (ता. मुधोळ जि. आदिलाबाद), दम्पली (ता. मुधोळ) येथे शाखा आहेत. हा गरु मठ असून मठाधिपती आपल्या शिष्याची उत्तराधिकारी म्हणून निवड करतो. शिवलींगस्वामींपासून सातवी पिढी चालू आहे.[२१६]

**सद्‌गुरु अपरंपर स्वामी मठ संस्था, मुदखेड :**

हा मठ वीरशैवाच्या पंचपीठांपैकी रंभापूरी पीठाची शाखा आहे. मूळ संस्थापक अपरंपार स्वामी यांच्या नावाने मठ ओळखल जातो. मठ सहाशे वर्षांपूवीच असावा.

मठाचे क्षेत्रफळ साधारणतः ६०.९६ मी. लांब व ९९.०६ मी. रुंद असावे. मठाचे प्रवेशद्वार उत्तराभिमुख असून ते विटांनी बांधलेले आहे. आतमध्ये प्रवेश केल्यावर चौक आहे व त्यानंतर उत्तराभिमुख दुसरे प्रवेशद्वार लागते. आतमध्ये प्रवेश केल्यावर समोर मुळ दगडी बांधकाम असलेली अपरंपार स्वामींची समाधी आहे. पूर्व बाजूस इतर मठाधिपतींच्या समाध्या आहेत.

शिवरात्री आणि दत्तजयंतीस स्वामीजींच्या नावाने यात्रा भरते. किर्तन, भजन, अग्निपूजा व पालखी मिरवणूक इ. कार्यक्रम होतात. महाशिवरात्रीच्या दुसऱ्या दिवशी कुस्ती स्पर्धा भरतात. सोलापूर, नागपूर या ठिकाणचे मल्ल त्या ठिकाणी येतात.

या मठाच्या अंतर्गत वसमत, मालेगाव (ता. वसमत), शंभोली (ता. मुदखेड), पाटनूर (ता. अर्धापूर) येथे शाखा आहेत.

Maharashtra State Gazetteers

**श्री गणाचार्य मठ संस्थान मुखेड :**

हा मठ वीरशैवांच्या पंचपीठांपैकी उज्जैन पीठाशी (नंदी गोत्र) संलग्न असून उज्जैन पीठाच्या जगद्‌गुरुंनी हा मठ स्थापन केल्याचे सांगितले जाते. हा मठ २५० वर्षांपूर्वीचा असावा. या मठाच्या आवारात गजानन प्रास्ताविक मंडळ असून त्याची स्थापना १८९६ मध्ये झाली.

एका उंच दगडी चौथऱ्यावर मठाचे प्रवेशद्वार असून ते उत्तराभिमुख आहे. आतमध्ये प्रवेश केल्यावर चौक लागतो व त्यानंतर उत्तराभिमुख दुसरे प्रवेशद्वार लागते. समोर मठाचार्यांची गादी आहे.

---

२१६. मठामध्ये काही पर्शियन भाषेतील सनदा, मोडी कागदपत्रे, मोडी ताम्रपट, उर्दू फारसी ताम्रपट व काही जुनी नाणी आहेत.

पश्चिमेस मठाधिपतींच्या समाध्या आहेत. मठाचे आताचे बांधकाम विरुपाक्ष शिवाचार्य महाराज यांनी केले आहे.

मार्च महिन्यात गुरुंच्या पुण्यतिथी निमित्त सप्ताह भरतो. वेगवेगळ्या धार्मिक ग्रंथांचे पारायण, इष्टलिंग महापूजा, किर्तन, मुळ समाधीला रुद्राभिषेक, नवरात्रात कुमारिका पुजन तसेच महात्मा बसवेश्वर जयंती हे दिवस येथे साजरे केले जातात. हा गुरु मठ असून या मठाची मेहकर (जि. बुलडाणा) येथे शाखा आहे.

**श्री भीमाशंकर मठ संस्थान, शिराढोण (ता. कंधार)**

हा मठ वीरशैवाच्या काशी पीठाची स्कंद गोत्रीय मठ शाखा आहे. काशी पीठाचा हा मराठवाड्यातील एकमेव मठ आहे. २०० वर्षांपूर्वी या मठात भीमाशंकर नावाचे योगी पुरुष होऊन गेले. त्यांच्या नावाने हा मठ ओळखला जातो. मठाच्या वास्तुचे आता नुतनीकरण झाले आहे. मठामध्ये (१) श्री षडाक्षर शिवाचार्य समाधी, सन १८११ (२) दशमुख शिवाचार्य स्वामी समाधी, सन १८७१, (३) श्री षडाक्षर शिवाचार्य स्वामी समाधी, सन १९१६ अशा तीन समाध्या आहेत. याचबरोबर हप्पया स्वामींची समाधी आहे.

मठ संस्थानातर्फे पूर्व मठाधिपतींच्या पुण्यतिथीबरोबरच नवरात्रात पालखी सोहळा, अग्निपूजा इ. कार्यक्रम होतात. या मठाची गुरु परंपरा शिष्यवर्गीय आहे. तसेच गुरुवर्गाचे नामाभिधानही दशमुख आणि षडाक्षर या दोन नावाने पुढे चालविले जाते. या मठ संस्थनाला महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र या राज्यातील अनेक जाती धर्मपंथांचा शिष्य परिवार आहे. या मठाच्या कलंबर, भोकर, सिध्द हंगरगा, (मेदक, आंध्रप्रदेश), गुडपल्ली, (जि.निजामाबाद, आंध्रप्रदेश), हैद्राबाद (आंध्रप्रदेश) येथे शाखा आहेत.[२१७] या मठाचे विद्यमान मठाधिपती वीरशैवांच्या पंचपीठांपैकी केदारपीठाचे जगद्‌गुरु झाले आहेत.

**महानुभाव मठ :**

**महानुभाव संप्रदाय परिचय :** महाराष्ट्रातील विविध धर्मसंप्रदायांपैकी एक महानुभाव संप्रदाय आहे. यादव काळात या नवीन पंथाचा उदय झाला. श्री चक्रधरस्वामी या संप्रदायाचे संस्थापक होते. महात्मा पंथ, अच्युत पंथ, जयकृष्ण पंथ, भट्टमार्ग व परमार्ग या नावाने ओळखला जाणारा महानुभाव पंथ हा महाराष्ट्रात जरी उदयास आला तरी एके काळी त्याचा प्रसार काबूल, कंदहार पर्यंत झालेला होता.[२१८]

हा पंथ द्वैतवादी असून त्यानूसार जीव, जगत व देवता या पासून पूर्णपणे स्वतंत्र असणारा हा एक नित्यमुक्त परमेश्वरच मुक्ती देण्यास समर्थ आहे. या तीन गोष्टींकडे पाहण्याच्या दृष्टीकोन लक्षात घेतला तर या संप्रदायाचे तत्त्वज्ञान समजून येते.[२१९] महानुभवांचे उपास्य दैवत श्रीकृष्ण असून

---

२१७. नांदेडे, गोविंद, श्री भिमाशंकर मठ संस्थान : एक परंपरा, **स्मरणिका श्री जगदगुरु पंचाचार्य महोत्सव** (संपा. राऊतराव राम नांदेडे), शिरढोण, १९९१, पृ. २५.

२१८. महंत नागराज बाबा, **उत्तर भारतातील महानुभाव पंथाचा प्रसार श्री चक्रधर दर्शन** (संपा. वि. भि. कोलते व इतर), मुंबई, १९८२, पृ. ३८१ ते ३९८.

२१९. मोकाशी, प. रा., **महाराष्ट्रातील पाच संप्रदाय**, पुणे १९७५, दुसरी आवृत्ती, पृ. ५५.

पंचकृष्णांची भक्ती आणि त्या पंचकृष्णांशी संबंधीत तत्त्वज्ञान हे या पंथाचे वैशिष्ट्य आहे. महानुभावांचे पंचकृष्ण (परमेश्वराचे पाच प्रमुख अवतार हा पंथ मानतो) म्हणजेच (१) भगवान श्रीकृष्ण (२) श्री दत्तात्रेयप्रभू (३) द्वारावतीचे चक्रपाणी अथवा चांगदेव राऊळ (४) रिद्धपूरचे गोविंद प्रभू अथवा गुंडम राऊळ (५) पैठणचे श्री चक्रधर स्वामी.[२२०]

महानुभाव संप्रदायांना पुज्य असणाऱ्या पंचकृष्णांत श्री दत्तात्रेयप्रभू दुसरे आहेत. पंचकृष्णांपैकी चांगदेव राऊळांना श्रीदत्तात्रेयांनी व्याघ्ररुपात दर्शन दिले. महानुभाव वाङ्मयात नांदेड जिल्ह्यातील माहूर आणि तेथील दत्तात्रेयप्रभू यांचे वर्णन करणारा 'सैह्याद्री वर्णन' नावाचा प्रसिध्द ग्रंथ आहे.[२२१]

श्री चक्रधरस्वामींच्या वचनांनुसार पंचकृष्णांशी संबंधीत जी स्थाने आहेत. ती सर्व महानुभावांना वंद्य आहेत. त्या स्थानांना तीर्थक्षेत्रे संबोधतात. नांदेड जिल्ह्यातील माहूर, नांदेड, गोपालचौंडी व राहेर ही स्थाने महानुभावांची तीर्थक्षेत्रे आहेत. (या स्थानांना श्री चक्रधरस्वामींनी प्रत्यक्ष भेट दिलेली आहे) स्थान पोथी या ग्रंथात त्यांची नोंद झालेली आहे.[२२२]

नांदेड जिल्ह्यात लिंबगाव (ता. नांदेड), इजळी (ता. मुदखेड), मुगूट (ता. मुदखेड), कांबळजा (ता. मुदखेड), सांगवी (ता. नायगाव), विजेगाव (ता. उमरी), तामसा (ता. हदगाव) येथे महानुभावांची स्थाने आहेत. हि स्थाने माडलीड आहेत. त्यातील काही स्थाने अलिकडच्या काळातील आहेत. काही स्थानांचे नवीन वास्तूत रुपांतर झाले आहे.

**लिंबगाव (ता. नांदेड) येथील महानुभाव मठ :**

लिंबगाव येथे महानुभाव पंथाचे दोन मठ आहेत. त्यापैकी एक मठ ३०० वर्षांपूर्वीचा असावा. परंतू याची १०० वर्षे जुनी इमारत पाडून तेथील वास्तुचे नुतनीकरण केलेले आहे. दुसरा मठ प्रभू मठ म्हणून ओळखला जातो. तो नवीन मठ आहे.

लिंबगाव येथील गोपाळचावडीच्या महानुभाव मठात हस्तलिखितांचा संग्रह आहे. इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांना १३ व्या शतकातील चौबा कवीच्या उखाहरणाची वेगवेगळी अशी फक्त ४९ पाने मिळाली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या मराठी विभागाला येथील

---

२२०. भुसारी, र. म., **प्राचीन महाराष्ट्राचा धार्मिक इतिहास**, मराठी साहित्य परिषद, आंध्र प्रदेश, हैद्राबाद, १९६५, पृ. १३५.

२२१. या ग्रंथात दत्त संप्रदायाचा उल्लेख आहे. त्याचबरोबर श्री चक्रधरस्वामींचे वर्णन व महात्म्य आहे. महानुभाव पंथ म्हणजे दत्त संप्रदाय. महानुभावांच्या पंचकृष्णांपैकी श्री कृष्णाव्यतिरिक्त इतर चार अवतार प्रत्यक्ष श्री दत्त होत. त्यांच्यापासून श्री चक्रपाणींनी माहूर येथे शक्ती विस्तार केला. महानुभवांचा दत्त एकमुखी आहे. प्रस्तुत ग्रंथात सह्याद्रीचे १५२ ते १८० ओव्यांत वर्णन आले आहे. कारण सह्याद्री म्हणजेच श्री दत्तात्रेय प्रभूचे निवासस्थान.

२२२. कोलते वि. भि. (संपा.), **स्थानपोथी**, अरुण प्रकाशन, मलकापूर, १९७६ (दुसरी आवृत्ती), पृ. ११ ते १२०; पाठक अरुणचंद्र, **महानुभाव साहित्य व मध्ययुगीन माहूर**, पूर्वोक्त, पृ. २६ ते ३१.

हस्तलिखीत संग्रहातून उखाहरणाची आद्यान्तयुक्त संपूर्ण पोथीच मिळाली. या पोथीचा काळ शके १६९० हा आहे.[२२३] लिंबगाव मठात महानुभावीय कवी राघव मुनीचे वत्सलास्वयंवर उपलब्ध झाले.[२२४]

**वारकरी मठ :**

**वारकरी संप्रदाय परिचय :** १३ - १४ व्या शतकामध्ये महाराष्ट्रात भक्तीमार्ग चळवळीला अपूर्व असा बहर आला होता. त्यापैकी वारकरी संप्रदाय महत्त्वाचा आहे. हा जरी वैष्णव संप्रदाय असला तरी तो प्राचीन भागवत किंवा पंचरात्र पंथाहून वेगळा होता. या संप्रदायाचा विठ्ठल हा मुख्य उपासक आहे. सर्वश्रेष्ठ देवाची परमभक्ती हा त्याचा मुख्य उद्देश होता. या पंथाच्या उपासकांच्या मते, तो सर्वश्रेष्ठ परमात्मा सगुण आणि निर्गूण असून त्याने सर्व विश्व व्यापलेले आहे. पंथाच्या नावावरुन त्यांच्या उपासकांनी पंढरपूरच्या यात्रेचा विधी पूर्ण विश्वासाने किंवा परमभक्तीने करणे आवश्यक असते. ही यात्रा दर एकादशीला केली तर चांगलेच, परंतु विशेषतः आषाढी, कार्तिकी, माघ अथवा चैत्र यापैकी एका शुध्द एकादशीला गळ्यात तुळशीची माळ घालून नियमाने जो पंढरपूरला जातो तो पंढरीचा वारकरी म्हटला जातो व त्याच्या उपासनेचा जो मार्ग तो वारकरी पंथ होय. आषाढ आणि कार्तिक शुद्ध एकदशीला पंढरपुरची यात्रा करण्याची प्रथा अजूनही अस्तित्वात आहे. या सांप्रदायास वारकरी, माळकरी अथवा भागवत पंथ असे ही म्हणतात. ज्ञानेश्वरांचे वडील पंढरीची वारी करत असल्याचा उल्लेख आहे.[२२५]

ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, एकनाथ महाराजांनी हा वारसा चालवून सामान्य माणसाला भक्ती मार्गाकडे नेले. पंढरपूरच्या विठ्ठल भक्तीचा प्रसार नांदेड जिल्ह्यातही झालेला होता हे तेराव्या शतकातील पंढरपूरच्या चौऱ्याऐंशीच्या शिलालेखातून दिसून येते.[२२६]

नांदेड जिल्ह्यात देगलूर तालुक्यात होऊन गेलेले प्रसिध्द संत श्री गुंडामहाराज देगलूरकर यांनी वारकरी पंथाची पंढरपूरच्या विठोबाशी समर्पित असलेली भक्ती चळवळ पुढे चालविली. नांदेड जिल्ह्यात देगलूर येथे वारकरी संप्रदायाचा मठ आहे.

**गुंडा महाराज मठ - देगलूर :**

देगलूर शहरात गुंडामहाराजांचा मठ आहे. त्यांचा जन्म शके १६७५ मध्ये झाला. ते शके १७३९ मध्ये पंढरपूर येथे समाधिस्थ झाले. जरी ते परंपरेने नाथ संप्रदायाशी संबंधित असले तरी नंतर ते भागवत पंथीय झाले.

---

२२३. पठाण, यु. म., **डॉ. देवीसिंग चौहान गौरव ग्रंथ** (संपा. सु. ग. जोशी), मराठवाडा संशोधन मंडळ, लातूर १९९९, पृ. २७१.

२२४. पठाण, यु. म., महानुभाव साहित्य संशोधन मंडळ, खंड-१, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, १९७३, पृ. ३१-३७.

२२५. भा. पं. बहिरट, आणि प. ज्ञा., भालेराव **वारकरी संप्रदाय उदय व विकास**, व्हीनस प्रकाशन, पुणे, १९८८ (दुसरी आवृत्ती), पृ. १७१.

२२६. शं. गो., तुळपुळे, (संपा.), **प्राचीन मराठी कोरीव लेख**, पुणे, १९६३, लेख क्र. ३४, पंढरपूर येथील चौऱ्याऐंशीचा शिलालेख, पृ. १६५-१९०.

देगलूर येथील मठ त्यांच्या कुटुंबातील हरी महाराज (जन्म - शके १७२४, मृत्यू - शके १८०९) यांनी बांधला. मठाची रचना तीन भागात असून मध्यवर्ती भागात राम, लक्ष्मण, सीता व हनुमानाची मूर्ती आहे. दुसऱ्या भागात विठ्ठल-रुक्मिणी यांच्या मूर्ती आहेत. तिसऱ्या भागात सरस्वती देवाची मूर्ती आहे. मठाचे बांधकाम घडीव दगडात असून वर घुमट आहे. मुळ वास्तू ४०.२३ मी. × ४२.०६ मी. आहे.

मठामध्ये गुरुंच्या पुण्यतिथी साजऱ्या केल्या जातात. रामनवमीचा उत्सवही साजरा केला जातो. आषाढ व कार्तिक महिन्यात देगलूर व पंढरपूर येथे गोपाळ काला व महाद्वार काला असतो. चक्री भजन हे येथील वैशिष्ट्य आहे. देगलूर येथील देवनाथ महाराज यांनी आळंदी येथे जावून ज्ञानेश्वरांच्या समाधीपासून अनुग्रह घेतला. देवनाथ चुडामणी महाराज - गुंडा महाराज (दुसरे) - श्री नारायण महाराज - श्री गुंडा महाराज (तिसरे) - श्री एकनाथ महाराज - श्री चंद्रशेखर महाराज अशी येथील परंपरा आहे.[२२७] श्री नारायण महाराज यांचे बंधू रामचंद्र महाराज यांची दोन मुले धुंडा महाराज व श्री बंडा महाराज आहेत. पैकी धुंडा महाराज हे वारकरी संप्रदायातील उत्तम किर्तनकार व ज्ञानेश्वरीचे व्याख्यानकार म्हणून प्रसिध्द आहेत.

**इतर मठ :**

**संत श्री नराश्याम महाराज मठ, येवती (ता. मुखेड) :**

महाराष्ट्र शासनाकडून पर्यटन स्थळ म्हणून जाहिर झालेले हे मठ संस्थान नराश्याम महाराजांचा मठ म्हणून ओळखला जातो. या मठाचे संस्थापक मुळ पुरुष सदानंद महाराज काशीहून येथे आले. त्यांचा काळ अंदाजे इ. स. १७५० ते १७७५ असावा. आता ९ वे नराश्याम महाराज गादीवर आहेत. हा ब्रह्मचारी मठ असून गुरु शिष्यांची परंपरा आहे. इतर गुरु महाराजांच्या समाध्या मठामध्ये आहेत.

श्रावण वद्यपंचमी, पौष वद्य सप्तमीला येथे मोठी यात्रा भरते. यात्रा ८ दिवस चालते. भजन, किर्तन, अंखड हरिनाम सप्ताह, ज्ञानेश्वरी पारायण व इतर ग्रंथांचे पारायण (हरिपाठ, गुरुचरित्र, नराश्याम स्तोत्र) कुस्त्यांचे फड इ. कार्यक्रम होतात.

कंधार येथे साधु महाराज या नावाने ओळखला जाणारा मठ असून शंकर महाराज हे ज्ञानेश्वरीचे भाष्यकार या परंपरेत होऊन गेले.

**श्री शंकराचार्यांचा मठ, नांदेड :**

नांदेड जिल्हा कचेरीच्या रेकॉर्ड (अभिलेख) दफ्तरात श्री शंकराचार्य मठ वाळे सिध्दनाथ पुरी नांदेड अशी नोंद आढळते. या मठाची परंपरा २५० वर्षे तरी जुनी असावी. शंकराचार्यांच्या (शृंगेरी मठ) आदेशावरुन नांदेडकर ब्रह्मवृंदाच्या अनुमतीने या शंकर मठाची स्थापना झाली.

या मठाचे व्यवस्थापन व पौरोहित्य शेष घराण्याकडे होते. त्या संबंधीची श्रृंगेरी पीठाची आज्ञापत्रे आहेत. आता या मठाचे व्यवस्थापन श्री चंडिदासराव वामनराव पांडे या घराण्याकडे आहे.[२२८]

---

२२७. देगलूरकर, शरद **संत साहित्याचा सामाजिक अन्वयार्थ**, देगलूर, २००४, परिशिष्ट-१ (येथे या घराण्याची वंशावळ दिली आहे.)

२२८. कानोले, तात्यासाहेब नांदेड येथील श्री शंकराचार्यांचा मठ, **प्रतोद दिपवाली अंक**, नांदेड, १९८१, पृ. ५४ ते ५९. (श्रृंगेरी पिठाच्या शंकराचार्यांची आज्ञापत्रे या लेखात दिली आहेत, ती १६५० च्या काळातील आहेत.)

Maharashtra State Gazetteers

**श्री राम मंदिर मठ - कुंडलवाडी (ता. बिलोली) (रामदासी मठ) :**

या मठाची स्थापना समर्थ रामदासांचे शिष्य भीमस्वामी यांनी केली. त्यानंतर येथे शिष्य परंपरा सुरु झाली व तद्नुसार महंत गादीवर बसले. येथील तळघरात मारुती, सखाराम व भगवंत महाराजांच्या वस्त्र समाध्या आहेत. रामकृष्ण महाराजांनंतर नारायण महाराजांनी त्यांचे शिष्यत्व पत्करले. तेथून येथे गृहस्थीपंरपरा सुरु झाली. याशिवाय नांदेड जीयर स्वामी मठ (बालाजी मंदिर), बाळगीर महाराज मठ, सुधाहारी मठ (उर्वशी घाट) त्याचबरोबर जिल्ह्यात तामसा (ता. हदगाव) श्री दिगंबर स्वामी वसमतकर महाराज मठ, मुक्तेश्वर मठ (दत्त मंदिर) किनवट, श्री शिवानंद आश्रम मठ संस्थान, तमलूर (ता. देगलूर), माणिक महाराज मठ, अंबुलगा (ता. कंधार), अमृतकुंड व बैराग्याचा मठ (ता. कंधार), श्री गुरु गैबी व नागेंद्र महाराज भारती पीठ, पानकोशी (ता. कंधार), विष्णुदास कवी (ता. माहूर) त्याच बरोबर शैव व शाक्त सांप्रदायातील प्रसिध्द व्यक्ती-भास्कराय भासुरानंद (विजापूरच्या आदिलशहाच्या कारभाऱ्याचा मुलगा-मृत्यु १७५०) यांचा शिष्य उमापत्यनंद याचा मुलगा शुकानंद याने नांदेड व वसमतनगर येथे मठ स्थापना केल्याचे उल्लेख मिळतात.[२२९]

याशिवाय उदासी मठ, शिख धर्माचे डेरे असावेत. तसेच कंधार, देगलूर, माहूर, नांदेड येथील दर्गे पाहता एक सूफी परंपरा जिल्ह्यात होती, असे सिध्द होते.

Maharashtra State Gazetteers

२२९. पगडी, सेतू माधवराव, महान तंत्र आणि मंत्र वेत्ते, भास्कराय (मृ. १७५०), **प्रतोद दिपवाली विशेषांक**, नांदेड, १९८८, पृ. १-१५.

## परिशिष्ट-२

# प्राचीन शिलालेखांची वर्णसूची

### १. अदमपूर

प्राप्तीस्थळ : हा शिलालेख बिलोली तालुक्यातील आदमपूर या गावी एका शेतात सापडला. मारुती मंदिरात ठेवलेला आहे.

राजवंश/राजा : उत्तर चालुक्य, त्रिभुवनमल्ल विक्रमादित्य सहावा.

वर्ष/तिथी : चालुक्य विक्रम ४० मन्मथनाम, ७ रविवासरे, संक्रांती २३ जानेवारी इ.स. ११९६ रविवार.

सारांश : हा दानलेख आहे. महामंडलेश्वर रेब्बलादेवीच्यावतीने तिच्या अधिकाऱ्यांनी मूलस्थानातील देवतेसाठी आणि मंदिराच्या दुरुस्तीसाठी प्रत्येक वर्षी तीन गद्याणांचे दान दिल्याची नोंद या शिलालेखात आहे.

व्यक्तिनामे : त्रिभुवनमल्ल विक्रमादित्य सहावा, सिरिपती नायक, पेरगदे महाप्रधान, बाणसवेरगदे, मानवेरगदे, दंडनायक, अनंतपालय, महामंडलेश्वर रेब्बलादेवी, कुलीगेचा प्रभुस

### २. अर्धापूर, यादवकालीन शिलालेख

प्राप्तीस्थळ : नांदेड तालुक्यात नांदेड पासून १२ कि.मी. वर अर्धापूर या गावात तीन शिलालेख आहेत.

भाषा/लिपी : संस्कृत व देवनागरी.

राजवंश/राजा : देवगिरीनृपती यादव सिंघणदेव.

वर्ष/तिथी : संवत्सरे शके ११५८ ज्येष्ठ शुद्ध ७ मे १२३६, बुधवार.

सारांश : देवगिरीच्या सिंघणदेव राजाने, आराध्यपूरातल्या इंद्रेश्वर, केदारेश्वर, भिमेश्वर, विश्वेश्वर, नागेश्वर, सकलेश्वर, राजेश्वर, सोमनाथ, नृसिंह, शुभनारायण, विनायक, चंडीकादेवी या देवांना दान दिल्याची नोंद शिलालेखात येते. सर्वाधिकारी संकण आणि सर्वाधिकारी लखण पंडीतांच्या सांगण्यावरुन हे दान दिले गेले.

व्यक्तिनामे : सिंघणदेव, सर्वाधिकारी संकण, सर्वाधिकारी लक्ष्मण पंडित.

ग्रामनामे : देवगिरी, अराध्यपूर.

### ३. अर्धापूर, संस्कृत शिलालेख

प्राप्तीस्थळ : अर्धापूर, ता. नांदेड

भाषा/लिपी : संस्कृत, देवनागरी

राजवंश/राजा : रट्टबल्लाळ

वर्ष/तिथी : शके १११३ विरोधीकृत संवत्सर, माघ शुक्ल सप्तमी नागदिन. २३ जानेवारी इ.स. ११९२.

Maharashtra State Gazetteers

सारांश : रट्टबल्लाळ घराण्याचे वर्णन, विक्रमार्क व देवपाल्प पासूनची वंशावळ देत राजा बल्लाळ आणि राणी पोम्मलादेवीची प्रशस्ती वर्णलेली आहे. त्यानंतर श्रीवत्स घराण्याचे वर्णन असून या घराण्यातला भिम हा बल्लाळाचा प्रधान असल्याची नोंद आहे. त्याचे दोन भाऊ आरसय आणि चाऊण्ड. हेही बल्लाळांच्या सेवेत होते. चाऊंडाने अर्धापूरात मल्लीनाथाची प्रतिष्ठापना केली. अर्धापूरातील निरनिराळ्या देवळांना दिलेल्या दानाचा तपशील या शिलालेखात नोंदवला आहे. मल्लीनाथ आणि सिद्धेश्वर देवळाचा उल्लेख आराध्यपूर, वारसग्राम, पोहराग्राम आणि करकरी ग्रामातील काही जमीनीच्या दानाचीही नोंद या शिलालेखात आहे. जुनवणी विभागाच्या प्रत्येक गावातून १ निष्काचे दान येथील देवळांना दिले जात असे.

कालमुख संप्रदायाचा प्रमुख ब्रह्मर्षीदेव हा सिद्धेश्वर आणि मल्लिकार्जून देवळांचा प्रमुख असल्याचा संदर्भही सदरील शिलालेखात आहे. हा शिलालेख ईश्वरदेवाने रचिला. माईदेवपूत्र श्रीदेवाने तो लिहिला आणि मल्लेयाने तो दगडावर कोरला असाही तपशील आहे.

व्यक्तिनामे : देवपाल, त्याचा पुत्र विक्रमार्क, त्याचा पुत्र रट्टबल्लाळ, रट्टबल्लाळाची पत्नी राणी पोम्मलादेवी, रट्टबल्लाळाचा प्रधान श्रीवत्सकुलोत्पन्न भिम, त्याचे भाऊ अरसय्य आणि चाऊंड, कालमुखाचार्य ब्रह्मर्षीदेव, ईश्वरदेवपुत्र चुडामणी, माईदेवपुत्र श्रीदेव आणि मल्लेय.

स्थलनामे : आराध्यपूर, बारसग्राम, पोहराग्राम, करकरीग्राम, जुनवणी.

### ४. एकलारा शिलालेख

प्राप्तीस्थळ : मुखेड तालुक्यातील एकलारा गाव

भाषा/लिपी : संस्कृत व कन्नडलिपी.

राजवंश/राजा : चालुक्य नृपती सोमेश्वर पहिला त्रैलोक्यमल्ल.

वर्ष/तिथी : विरोधी नामसंवत्सर शक पुष्य ५, १७ डिसेंबर १०४९

सारांश : दंडनायक कालीदासाचा पुत्र काशीराज याने एकलारागावे येथील मल्लीगाउंडाने बांधलेल्या देवळाला काही जमीन आणि नाण्याच्या स्वरुपात दिलेल्या दानाची नोंद सदर शिलालेख करतो.

Maharashtra State Gazetteers

व्यक्तिनामे : त्रैलोक्यमल्ल सोमेश्वर पहिला, दण्डनायक काली दासय्या, मुनेय वाकरस, मल्लगाउंड.

ग्रामनामे : एक्कलगावे

### ५. एकलारा शिलालेख

प्राप्तीस्थळ : मुखेड तालुक्यातील एकलारा गावातील शिवारातील शेतात.

भाषा/लिपी : संस्कृत/कन्नडलिपी

राजवंश/राजा : चालुक्यनृपती त्रैलोक्यमल्ल सोमेश्वर पहिला.

वर्ष/तिथी : पराभव नाम संवत्सरे शके ९८८ पौष शु. ६ रविवार उत्तरायण संक्रांती २५ डिसेंबर १०६६.

सारांश : अमरावतीपुरवराधिश्वर महासामंत कर्कपरस याने येथील मल्लेश्वराला दान दिल्याची नोंद सदर शिलालेखात आहे. एक्कलगावे हे सक्करगे ८० मंडळात समाविष्ट होते याची नोंद इथे आहे.

व्यक्तिनामे : महासामंत कर्कपरस, त्रैलोक्यमल्ल सोमेश्वर पहिला.

ग्रामनामे : एक्कलगावे, सक्करगे ८०.

### ६. उनकेश्वर शिलालेख

प्राप्तीस्थळ : नांदेड जिल्ह्यातील किनवट तालुक्यात उन्हकदेव किंवा उनकेश्वर या गावातील देवालयाच्या दक्षिणेकडील दरवाजाच्या डाव्या बाजूला भिंतीत बसवलेल्या शिळेवर कोरला आहे.

भाषा/लिपी : मराठी भाषा/यादवकालीन देवनागरी

राजवंश/राजा : देवगिरीचा यादव नृपती रामचंद्रदेव.

वर्ष/तिथी : शके १२०१ विक्रम संवत्सर इ.स. १२७९.

सारांश : रामचंद्र यादव, हाथीसहाणी भावकदेव व प्रधान हेमाद्री पंडीत, दुय्यम अधिकारी सोमदेव यांचे उल्लेख करीत सदर शिलालेख प्रभूरामचंद्राने इथला गरम पाण्याचा झरा निर्माण केल्याच्या आख्यायिकेची नोंद करतो. त्याकाळात तत्संबधी प्रचलित आख्यायिका नोंदवतो. तसेच शके १२०१ मध्ये मातापूरचा म्हणजे माहुरचा मेघदेव याने इथे उन्हकदेवाचा प्रासाद बांधल्याचे उल्लेखतो. तसेच ग्रामदेवतेसाठी राजमार्गावरील ब्राम्हणांसाठी, देवळाच्या पुनर्बांधणीसाठी दिलेल्या दानाचीही नोंद हा शिलालेख करतो. पंडीत लाकराबोताने हा शिलालेख लिहीला असल्याचीही नोंद इथे आहे.

व्यक्तिनामे : यादवनृपती रामचंद्रदेव, हाथीसहानी भावकदेव, कायस्थमुतालिक सोमदेव पंडीत, प्रधान हेमाद्रीपंडीत, कण्वशाखीय कौंडिण्यगोत्री मातापूरचा मेघदेव, सरणूनायक, पंडित लाक राबोता.

ग्रामनामे : उन्हकदेवच्या पश्चिमेस असलेले उंबरे, ईशान्येस १४ मैलावर वघाली (ओघाली), पूर्वेस ५ मैलावर करंजी, वायव्येस १० मैलावर काप उत्तरेस ५ मैलावर कुर्वली (कुरली), वायव्येस ८ मैलावर गुढा (गढे) पश्चिमेस ५ मैलावर चिंचवली (चिंचखेड), दक्षिणेस ६ मैलावर जिरवली (जबरली), दक्षिणेस ५ मैलावर पटवदे (पाटोदे), पुर्वेस ३ मैलावर पिंपळझेंडा (पिंपळझेंडा), आग्नेयेस ९ मैलावर पिंपलजै (पिंपळजे) पश्चिमेस २ मैलावर बोथी (बोथरोड) पश्चिमेस २४ मैलावर मातापूर (माहुर), आग्नेयेस २ मैलावर लिंग (लींगी), उत्तरेस २५ मैलावर वापर (खायरी), ईशान्येस १० मैलावर सकरगवा (साखरगाव), ईशान्येस ७ मैलावर सांगवी, वायव्येस ३ मैलावर सावेरे (सावळी).

### ७. उनकेश्वरचा शिवकालीन शिलालेख

प्राप्तीस्थळ : उनकेश्वर गावातील शिव मंदिर परिसरात हा १७ व्या शतकातला शिलालेख आहे.

भाषा/लिपी : मराठी/देवनागरी

राजवंश/राजा : स्थानिक प्रशासक प्रभू, राजा राजवंशाचा उल्लेख नाही.

वर्ष/तिथी : शालीवाहन शके विक्रमांक संवत १७५६, नासम संवत्सर इ.स. १६९९-१७००.

सारांश : उनकेश्वर गावातील गरम पाण्याच्या झऱ्याविषयीची अख्यायिका, त्रेतायुगात रामचंद्राने शरभंगऋषींच्या या आश्रमात गरम पाण्याचा झरा निर्माण केल्याविषयीची आख्यायिका इथेही उल्लेखिली गेली आहे. चारशे वर्षाचे या अख्यायिकेचे सातत्य लक्षणीय आहे. या ठिकाणचे प्राचीनतम शिवालय जीर्ण झाल्यामुळे ईश्वरी प्रेरणेने स्थानिक आधिकारी प्रभू याने मंदिराची पुनर्बांधणी केल्याची नोंद शिलालेखात आहे.

व्यक्तीनामे : शरभंग ऋषी, श्रीरामचंद्र, स्थानिक अधिकारी प्रभू.

ग्रामनामे : उनकेश्वर.

### ८. कंधारचा राष्ट्रकूटकालीन स्तंभालेख

प्राप्तीस्थळ : नांदेड जिल्ह्यातील कंधार तालुक्याच्या गावी बहाद्दरपुरा या भागातील विहिरीत इ.स. १९५९ साली हा शिलालेख पुरातत्त्वखात्याच्या अधिकाऱ्यांना सापडला. आज तो स्तंभ शांतीघाटावरील वस्तुसंग्रहालयात ठेवलेला आहे. खांबाच्या तीन भागांवर हा शिलालेख कोरलेला आहे.

भाषा/लिपी : संस्कृत/कन्नड लिपी १० व्या शतकातील वळण.

राजवंश/राजा : राष्ट्रकूट नृपती कृष्ण तिसरा.

वर्ष/तिथी : तिथीचा तपशील असलेला भाग तुटला असून साधारणतः शके ८७२ च्या दरम्यानचा हा शिलालेख आहे. इ.स. ९५०.

सारांश : खांबाच्या तीन बाजूवर लिहिलेला या शिलालेखाचा ॐ नमः शिवाय पासून प्रारंभ होतो. राष्ट्रकूटराजांच्या प्रशस्तीपर वर्णनानंतर कृष्ण पहिल्याची वंशावळ इथे नोंदवली गेली आहे. स्तंभाची दुसरी बाजू दानपत्राच्या स्वरुपातील आहे. कंधारपुरातील ब्राम्हणांना ते करीत असलेल्या मुखोत्गद पाठानिमित्त २०० द्रम्म, चतुष्काल पढतां द्रम्म शतमेक, अशी दाने दिली आहेत. अन्नछत्राचा आाणि वस्त्राप्रावरणांचाही इथे उल्लेख आहे. कालप्रियनाथाच्या देवळासाठी तेल आणि लवणासाठी काही तरतूद करण्यात आली आहे.

तसेच याच राष्ट्रकूट नृपतीने गोदातटाध्यासिनी नांदीतडे म्हणजे गोदावरी नदी-काठच्या नांदीतडु गावातील अग्रहारासाठीही दिलेले दान याच शिलालेखात नोंदवले आहे. हे नांदीतडू म्हणजे आजचे नांदेड होय.

शिलास्तंभाच्या तिसऱ्या भागात प्रत्यक्ष कंधारपूरवराचे अप्रतिम वर्णन असून शहरात असलेल्या निरनिराळ्या मंदिरांचा, सर्वलोकाश्रय मंडपाचा, पाणपोयांचा, अग्निष्टीकांचा उल्लेख आहे. राष्ट्रकूट नृपतीने इथे सर्वलोकाश्रय मंडप उभारून पांथस्थांसाठी प्रावरणांची सोय करुन त्यासाठी दान दिले आहे. नगरात पाच ठिकाणी म्हणजे राजवाड्याच्या मकरतोरणाजवळ, यक्षद्वाराजवळ, सर्वलोकाश्रय मंडप, सिद्धी विनायकाजवळ, कामदेवाच्या मंदिराजवळ मंडपात, आणि कालप्रियनाथाच्या प्रांगणात अशा ठिकाणी पाणपोया उभारल्याची नोंद इथे आहे. तसेच थंडीच्या दिवसात पाच ठिकाणी अग्निष्टिका

Maharashtra State Gazetteers

म्हणजे शेकोट्याही उभारल्या गेल्याचा इथे संदर्भ आहे. त्यानिमित्त नगरातील कालप्रिय, सगरेश्वर, बंकेश्वर, कृष्णेश्वर, धृतेश्वर, वीरनारायण, क्षेत्रपाल आदि मंदिरांचे उल्लेख या शिलालेखात आहेत.

तत्कालीन कंधारपूरवरातील जगतुंगसागराचा आणि गुर्जर व्यापाऱ्यांच्या बाजारपेठांचा उल्लेख लक्षणीय आहे. १० व्या शतकातील हा जगत्तुंगसागर आजही शहरात तलावाच्या रुपाने अस्तित्वात आहे. गोज्जीग सोमनाथ, तुंगेश्वर, तुडीगेश्वर मंदिराच्या पंचामृत स्थानासाठी दिलेले दानही इथे उल्लेखिले आहे. १०व्या शतकातील कंधारपूरवराचे अप्रतिम वर्णन करणारा हा शिलालेख एक दुर्मिळ आणि लक्षणीय पाऊलखूण होय.

### ९. करडखेड शिलालेख

इ.स. १०७९ ते इ.स. ११४८ या काळातले ९ शिलालेख देगलूर तालुक्यातील करडखेड या लहानश्या गावी विखरून पडले आहेत. बहुतांश शिलालेखांचे दगड सुटे गावरानात आढळले. करडखेड मंदिर परिसरात काही होते. त्यातला पहिला शिलालेख इ.स. १०७९ चा आहे.

प्राप्तीस्थळ : करडखेड गावातील सोमनाथ मंदिर परिसर.

भाषा/लिपी : संस्कृत/कन्नडलिपी

वर्ष तिथी : चालुक्यविक्रम ४, सिद्धार्थनाम, पुष्यशुद्ध ५ उत्तरायण संक्राती, डिसेंबर १०७९

सारांश : महामंडलेश्वर कर्करसाने करडकल्ल या गावात दिलेल्या दानाचा उल्लेख करणारा हा शिलालेख आहे. गावातील सोमनाथ, ढोरेश्वर, काली चोरेश्वर आणि प्रसन्नभैरव या देवळांना, अनुक्रमे आलुरु, कावलीगावे, (अवरवाडी ७००) भाईगावे (सक्करगे ८०) ही गावे दान दिली. हे दान चंद्रशेखर पंडीताच्या स्वाधीन करण्यात आले.

व्यक्तिनामे : महामंडळेश्वर कर्करस, चंद्रशेखर पंडीत.

ग्रामनामे : करडकल्ल, अल्लुरु, कावलीगावे, भाइगावे, सक्करगे ८०, अवरवाडी ७००.

### १०. इ.स. १०८८ चा करडखेड शिलालेख

प्राप्तीस्थळ : करडखेड गावातील उद्ध्वस्त मंदिर परिसरात हा शिलालेख आहे.

भाषा/लिपी : संस्कृत/कन्नडलिपी.

राजवंश/राजा : वन्हीकुलोत्पन्नराजा कालीचोरस.

तिथी/वर्ष : चालुक्य विक्रम १२, प्रभावनाम संवत्सरे, माघ शुद्ध १०, गुरूवार ६ जानेवारी १०८८.

सारांश : होट्टल परिसरातल्या वन्हीकुलाचा उल्लेख करणारा हा शिलालेख, देगलूर तालुक्यातील इतर शिलालेखांप्रमाणे चालुक्यांच्या मांडलीक घराण्याचा वन्हीकुलाचा उल्लेख करतो. वन्हीकुलोत्पन्न कालीचोरस नृपतीने येथील देवळांचे कलशारोहण केले आणि त्या निमित्त गाऊंडगावे हे गाव आणि देईगावे, मरीकल्लु, आणि कोलनुरु या गावातील काही जमीन मंदिराला दान दिली. रेब्बलादेवीनेही दिलेल्या दानाचा उल्लेख सदर शिलालेखात आहे.

व्यक्तिनामे : वन्हीकुलोत्पन्न कालीचोरस, रेब्बलादेवी.

ग्रामनामे : गाउंडगावे, देईगावे, मरीकल्लु आणि कोलनुरु.

### ११. इ.स. ११०२ चा करडखेड शिलालेख

प्राप्तीस्थळ : करडखेड गावातील शेतातल्या मंदिर परिसरात सदर शिलालेख आहे.

